TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY

fly within the book only

text cross

DRENCHED BOOK

UNIVERSAL
LIBRARY

OU_176599

UNIVERSAL
LIBRARY

महाराष्ट्र शब्दकोश

विभाग दुसरा

ओ–ख

कोशमंडळांतील व बाहेरील अनेक साहाय्यकांच्या मदतीनें तयार केलेला.

प्रकाशक—महाराष्ट्र कोशमंडळ लिमिटेड, पुणें; तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर यशवंत रामकृष्ण दाते, ४९५ शनिवार, पुणें २.

मुद्रक—यशवंत रामकृष्ण दाते, महाराष्ट्र कोशमंडळाचा शारदा प्रेस, ४९५ शनिवार, पुणें २

किंमत १० रुपये

इ. सन १९३३] पुणें [शा. शक १८५५

संपादकमंडळ.

श्री. यशवंत रामकृष्ण दाते, बी. ए. एल्‌एल्‌. बी. (प्रमुख)

श्री. चिंतामण गणेश कर्वे, बी. ए.

श्री. आबा चांदोरकर,

श्री. चिंतामण शंकर दातार.

प्रमुख शाखा-साहाय्यक संस्था

विदर्भसाहित्यसंघ (वऱ्हाडी बोली); गोमंतकसाहित्यसेवकमंडळ (गोमंतकी);
वाङ्मयचर्चामंडळ (कर्नाटकी. बेळगांव); शारदोपासकमंडळ (कोंकणी.
मालवण); महाराष्ट्र शब्दकोशमंडळ (कुडाळी. पेडणें); पुणें
भाषाशास्त्रमंडळ (व्युत्पत्ति); शारदाश्रम (महानुभावी.
यवतमाळ); हेटकरी भंडारीमंडळ (दादर);
साहित्यसेवामंडळ (कऱ्हाड). इ. इ.

संपादकीय निवेदन

शब्दाम्बोधिर्यतोनंतो। कुतोव्याख्या प्रवर्तते ॥ –धनंजय

प्रस्तुत विभाग, पहिल्या विभागाच्या प्रकाशनानंतर अकरा महिन्यांनीं बाहेर पडत आहे. दर सहा महिन्यांनीं एक एक विभाग बाहेर पडेल अशी मागच्या संपादकीय निवेदनांत व्यक्त केलेली आशा यावेळीं फलद्रूप झाली नाहीं. या गोष्टीस अनेक कारणें झालीं तथापि चालू पालचा पुण्यातील प्लेग हें एक त्यांतील बलवत्तर कारण होय. शब्दकोशाची छपाई हेच अत्यंत किचकट काम आहे व त्यामुळें छापण्याचें काम जितकें जलद होईल अशी अपेक्षा होती तितकें तें होऊं शकत नाहीं. तथापि पुढील विभाग यापेक्षां लवकर प्रसिद्ध करण्याची खटपट चालली आहे. यश येणें आमच्या एकट्याच्याच हातीं नाहीं.

शब्दकोशाची रचना पूर्वी ठरविलेल्या धोरणासच अनुसरून चालू ठेवली आहे व पूर्वी जमविलेल्या शब्दसंग्रहांतहि मधून मधून क्वचित् आढळणाऱ्या शब्दांची भर घालण्याचें काम चालू आहे. तसेच पूर्वी निवडलेल्या अवतरणांपेक्षां अधिक चांगलीं अवतरणें मिळालीं तर पहावीं या दृष्टीनें ग्रंथवाचन व अवतरणांची निवड करण्याचें कामहि सुरू आहे. प्रथम विभागामध्यें मराठींतील रूढ इंग्रजी शब्द जरा जास्त घेतले गेले असा कांहीं सुविज्ञ वाचकांचा अभिप्राय दिसून आल्यामुळें त्यामध्यें थोडी फार काटाकाट केली आहे. बाकीचें धोरण पूर्वी योजल्याप्रमाणेंच चालू आहे.

प्रस्तुत ग्रंथप्रकाशनाचा ज्यांनीं विशेष आस्थेनें व आपुलकीनें पुरस्कार केला व ज्या श्रीमंत सयाजीरावमहाराजसाहेब गायकवाड यांस ही कृति अर्पण केली आहे त्यांचें हृदय स्वरूप म्हणून गेल्या मार्चमध्यें श्रीमंत महाराजांची स्वारी येथें आली होती त्यावेळीं प्रथम विभाग त्यांस रौप्यमंजूषेमध्यें पुणें येथील सार्वजनिक संस्थांनीं त्यांचा टिळकस्मारकमंदिरांत सार्वजनिक सत्कारसमारंभ केला त्या समारंभांत अर्पण करण्यांत आला. महाराजांनींहि समयोचित शब्दांत या कार्याचा गौरव केला.

पहिल्या विभागाचा महाराष्ट्रीय जनतेकडून अत्यादरानें स्वीकार होऊन त्यावर अनेक चांगले व उत्तेजनपर अभिप्रायहि प्रसिद्ध झाले. यामुळें संपादकांना आनंद वाटून आपल्या श्रमाचा मोबदला मिळाल्यासारखें वाटणें स्वाभाविक आहे. तथापि अद्याप योजिलेले चार विभाग निघावयाचे आहेत; ते पुढील दोन वर्षांत व्यवस्थितपणें प्रसिद्ध होऊन,

हा ग्रंथसागरु येऊदे। उतारोनि पैलाकडा ॥
कीर्तिविजयाचा धेंडा। नाचे जो का ॥ –ज्ञानेश्वरी १८.१७८०

असें ज्ञानेश्वरांप्रमाणें म्हणण्याचें भाग्य आपणाला लाभेल का ? अशी तळमळ अखेरपर्यंत राहणारच. असो.

या विभागाच्या प्रकाशनानें एकतृतीयांश ऋणातून मुक्त होत आहों. राहिलेलें दोनतृतीयांश ऋण लवकर फिटण्यासाठीं अधिक सक्रिय सहानुभूतीची आवश्यकता आहे. ती आपल्या कृपेनें मिळेल अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

प्रस्तुत कार्यामध्यें ज्या अनेक सहाय्यकांचें आम्हांस सहाय्य होत आहे त्यांचे आम्ही कृतज्ञतापूर्वक आभार मानतों व एकंदर कार्याचें उद्यापन होईपर्यंत त्यांच्या ऋणांतच राहण्यास आम्हांस आनंद वाटत आहे.

यशवंत रामकृष्ण दाते

प्रस्तावना

भाषाशास्त्र व जगांतील भाषा

ब्रह्मायं वाचः परमं व्योम । ऋ. १.१६४.३५.

भाषेचा अभ्यास--प्रत्येक मनुष्यास व्यवहाराकरितां भाषेचा अभ्यास हा करावाच लागतो व शिक्षणामध्यें भाषेच्या अभ्यासासहि बरेंच महत्त्व दिलें जातें. बालपणात प्रत्येक व्यक्ति आपली मातृभाषा आपोआपच शिकते. परंतु पुढें त्याच भाषेचा विशेष अभ्यास करण्यांत येतो, व केव्हा केव्हां त्या बरोबर दुसऱ्याहि प्रचलित अथवा मृत भाषांचा अभ्यास आपणांस करावा लागतो. भाषेचा व्यवहारापुरता अभ्यास करावयाचा म्हणजे आपल्या दैनिक आयुष्यक्रमांत तिचा आपणांस उपयोग करतां येण्यापुरसा करावयाचा असतो. आपली भाषा बोलतां, वाचतां व लिहितां आली म्हणजे आपली व्यावहारिक गरज भागते या दृष्टीनें प्रत्येक विद्यार्थी कमीजास्त प्रमाणात आपल्या भाषेची उच्चारपद्धति, शब्दसपत्ति व रचना ह्यांचा अभ्यास करतो व क्वचित् इतरहि भाषांचा याच पद्धतीने अभ्यास करतो यावेळीं तो भाषेची घटना, शब्दांचीं निरनिराळीं रूपें तयार करणें व त्यांची वाक्यांमध्यें माडणी करणें ह शिकतो. या दृष्टीनें ज्या भाषेचें तो अध्ययन करतो ती भाषा त्यास एका स्थिर स्वरूपामध्येंच कांहीं व्याकरणाचे नियम व अपवाद यांनीं बद्ध अशी आढळते तिच्या स्वरूपामध्यें पूर्वी कधीं बदल झाला असेल ही कल्पना त्यास नसते, किंवा पुढें कांहीं बदल होतील हीहि भावना त्यास नसते. बहुधा तो वाङ्मयीन अथवा अभिजात भाषेच्या अभ्यासाकडेच विशेष लक्ष पुरवितो व त्यामुळें भाषा ही स्थिर व अविकारी आहे अशीच त्याची समजूत होते. भाषेंतील नियमांचीं कारणें त्यास त्यावेळीं विचारतां येत नाहींत, व अध्यापकानें दिलेल्या स्पष्टीकरणावर त्यास विश्वासुन रहावें लागतें. विशिष्ट नियमास विशिष्ट अपवाद का करण्यांत येतो ह्याचें कारण जाणण्याची जिज्ञासा त्याच्या ठिकाणीं जागृत होऊं देण्यांत यत नाहीं व संस्कृत भाषेंतील विशिष्ट संधिनियम हा वेदकालीन किंवा तदुत्तर संस्कृत बोलणाऱ्या लोकांनीं उच्चारसुलभतेकरितां केला होता ह्या किंवा अशा गोष्टींचा त्यास सुगावाहि लागू दण्यात यत नाहीं. यामध्यें आपणांस सध्यांच्या भाषाशिक्षणपद्धतीवर टीका करावयाची नाहीं; तर आम्हांस मुख्यतः ही गोष्ट नजरस आणून द्यावयाची आहे कीं, कोणत्याहि भाषेचा व्यावहारिक अभ्यास व ऐतिहासिक अभ्यास यांमध्यें अगदीं दोन भिन्न दृष्टी असतात व व्यावहारिक अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यास ऐतिहासिक दृष्टि व पद्धति भाषाशिक्षणाच्या आद्यावस्थेमध्यें परिचित करून देणें अतिशय अवघड असतं आता, भाषेचा ऐतिहासिक अभ्यास करणाऱ्याची दृष्टि व व्यावहारिक अभ्यास करणाऱ्याची दृष्टि यांमध्यें महदंतर असतें. एकाग जी आपण लेखात वापरतों व वाङमयांत पाहतों तीच वास्तविक व शुद्ध भाषा होय असें वाटतें तर दुसऱ्यास भाषा ही मुख्यतः बोलण्याची व ऐकण्याची आहे ही गोष्ट जास्त महत्त्वाची वाटते व लेखनकला जणूं कांहीं अस्तित्वातच नाहीं अस धरून चालावयाचें असतें. तसेच एकास व्याकरणाचे नियम वेदवाक्याप्रमाणें मानून आपल्या भाषेची रचना करावयास शिकावयाचें असत तर दुसरा म्हणतो कीं, व्याकरणकारास अमुक शुद्ध अगर अमुक अशुद्ध असें म्हणण्याचा मुळींच अधिकार नाहीं. त्यानें फक्त लोकाचा भाषेसंबंधींचा व्यवहार नमूद करावयाचा आहे व ही गोष्ट तो जितक्या सत्यतेनें करील तितका तो चागला किंवा वाईट व्याकरणकार ठरेल. तसेंच प्रत्येक अपवादास कांहीं तरी कारण असतें या गोष्टीस ऐतिहासिक अभ्यासक अधिक महत्त्व देतो व तें शोधण्याचा तो प्रयत्न करतो.

भाषेचा इतिहास--भाषेचा इतिहास म्हणजे विशिष्ट भाषेची वाढ कसकशी होत गेली, तिच्या पोटभाषा कसकशा बनत व वाढत गेल्या व त्यामध्यें प्रारंभापासुन कसकसे फरक पडत गेले यांचे ज्ञान करून घेऊन त्यांची सुसंगत करून ठेवलेली नोंद होय. ह्या दृष्टीनें कोणत्याहि भाषेचें संशोधन करावयाचें म्हणजे विशिष्ट भाषेमध्यें निरनिराळ्या कालांत फरक कसकसे होत जातात व या प्रवृत्तीला कोणतीं कारणें असतात यांची माहिती करून घेणें अवश्य आहे. अर्थात् आपणांस भाषेच्या प्रचलित स्वरूपाच्या पूर्वीच्या स्वरूपाचा अभ्यास करावयाचा झाल्यास तो त्या भाषेंतील लेखांवरूनच करतां येईल. परंतु वास्तविक आपला अभ्यासाचा विषय विशिष्ट भाषा कशा लिहिली जात असे हा नसून लोक ती कशी बोलत असत व ती बोलतांना त्यांची मनःस्थिति व कल्पना कोणत्या असत हा आहे. आपले उद्गार हे आपल्या कांहीं विशिष्ट संवेदनांचे द्योतक आहेत. आपल्या मनांतील

भाव अथवा संवेदना आपणांस कांहीं हावभाव, खुणा, चित्रें किंवा मूर्ति यांवरूनहि व्यक्त करतां येणें शक्य आहे. व भाषा हाहि भावव्यक्तीचा एक प्रकार आहे. मात्र खुणा, चित्रें वगैरे यांस जसा स्वतःच कांहीं विशिष्ट अर्थ असतो तसा भाषेंतील चिन्हें जे शब्द त्यांस स्वतःचा अर्थ नसून एकाच कल्पनेशीं विशिष्ट ध्वनीची सांगड घालण्याची संवय ज्या एका जनसमूहामध्यें झालेली असते त्या जनसमूहांतील व्यक्तींसच फक्त त्या चिन्हांचा अर्थ समजतो व लिखितभाषा ही पुन्हां या उच्चारित चिन्हांचीं ठराविक चिन्हें कल्पून त्यांवर बसविलेली असते. तेव्हां लिहिलेलीं अक्षरें उच्चारल्याखेरीज म्हणजे त्यांचे शब्दांत रूपांतर केल्याखेरीज त्यांचा अर्थबोध होत नाहीं व त्यांस भाषेचें स्वरूप येत नाहीं. भाषा हा शब्दहि भाष्=बोलणें या धातूपासून निघाला आहे. जरी आपणांस एखाद्या भाषेंतील अक्षरें म्हणजे लिपी वाचतां आली तरी त्या भाषेंतील त्या विशिष्ट अक्षरांचा जो ठराविक अर्थ त्या समाजांत होतो तो माहीत असल्याखेरीज आपणांस त्या अक्षरांपासून कांहींहि बोध व्हावयाचा नाहीं. उदा. आपण देवनागरी लिपीमध्यें जर अरबी किंवा तुर्की भाषेंतील कांहीं शब्द लिहिले तर जरी ते आपणांस नागरी लिपीच्या ज्ञानामुळें वाचतां आले तरी त्यांपासून आपणांस कांहींहि अर्थबोध व्हावयाचा नाहीं. तर विशिष्ट अक्षरसमुच्चयापासून विशिष्ट गोष्टीचा अथवा कल्पनेचा बोध होतो असा जो संकेत ती विशिष्ट भाषा बोलणाऱ्या लोकांमध्यें असतो तो ज्यास ठाऊक असेल त्यासच त्या लेखनाचें भाषा म्हणून महत्त्व वाटेल. इतरांस तीं अक्षरें माहीत असूनहि त्यांच्या दृष्टीनें त्यांस भाषेचें स्वरूप येत नाहीं याच गोष्टीचें वर्णन ऋग्वेदांत पुढील ऋचेंत केलें आहे. 'उतत्वः पश्यन्न ददर्शवाचमुतत्वःशृण्वन्न शृणोत्येनाम्।' (ऋ. १०. ७१, ४.) 'तो वाणीला पहात असूनहि ती त्याला दिसत नाहीं व ऐकूं येत असूनहि ऐकत नाहीं' हें अज्ञानी मनुष्याचें वर्णन आहे म्हणजे आपणांस अभ्यास करावयाचा म्हणजे कोणत्याहि समाजामध्यें जे विशिष्ट ध्वनी उच्चारले जाऊन त्यांपासून विशिष्ट अर्थ किंवा मनांतील भाव व्यक्त करावयाची प्रथा पडलेली असते तिचा अभ्यास केला पाहिजे व कालांतरानें या प्रथेमध्येंहि जो फरक पडत गेला असेल त्याचाहि आपणांस अभ्यास केला पाहिजे. यामुळें अलीकडे भाषाशास्त्रीय अभ्यासांत ध्वनींच्या उच्चारणपद्धतीकडे फार लक्ष दिलें जातें व आधुनिक भाषाशास्त्री या ध्वनींचा अथवा शब्दोच्चारांचा अतिशय सूक्ष्म रीतीनें अभ्यास करीत असतात.

भावना व त्यांचें व्यक्तीकरण--भाषेच्या अभ्यासामध्यें किंवा तिच्या स्वरूपामध्यें आपणांस दोन बाजू असलेल्या दिसून येतात--एक मनुष्याचे भाषेच्या द्वारें व्यक्त करावयाचे विशिष्ट भाव अथवा त्याच्या मानसिक क्रिया या होत. ह्या बाजूचा अभ्यास मानसशास्त्रीय दृष्ट्या केला पाहिजे व हे भाव व्यक्त करण्याचें साधन जें शब्दोच्चार अथवा ध्वनींचें उच्चारण व तदनुषंगिक त्याच्या वागिंद्रियाचें चलनवलन या गोष्टी इंद्रियशास्त्रदृष्ट्या व ध्वनिशास्त्रदृष्ट्या अभ्यासिल्या पाहिजेत. अर्थात् हा अभ्यास करावयाचा म्हणजे निरनिराळ्या ध्वनींचें सूक्ष्म पृथक्करण करून प्रत्येक ध्वनीचें आपणांस विनचूक श्रवण करतां येईल व तो पुन्हां उच्चारतां येईल अशा तऱ्हेचें शिक्षण घेणें होय. अलीकडच्या भाषाशास्त्रीय अभ्यासांत या शिक्षणास फार महत्त्व दिलें जातें.

भाषाशास्त्राचा उगम--भाषाशास्त्रविषयक अभ्यासाची सुरुवात प्रथमतः मनुष्याच्या मनांत जेव्हां सर्वत्र लोक एकच भाषा कशी बोलत नाहींत? आपण जे शब्द बोलतों ते प्रथम कसे उत्पन्न झाले असावे? वस्तु व तिचें नांव यांचा परस्पर संबंध काय? अमुक पदार्थाला किंवा अमुक व्यक्तीला विशिष्ट शब्दानेंच कां संबोधावें? अशा तऱ्हेचे प्रश्न उत्पन्न झाले असतील तेव्हां झाली असावी. या प्रश्नांचीं प्राथमिक अवस्थेंतील उत्तरें जगांतील इतर गूढ प्रश्नांच्या उत्तरांप्रमाणेंच असावीं. ईश्वरानें प्रथम भाषा उत्पन्न केल्या, ईश्वरानें निरनिराळ्या वस्तूंना नावें दिलीं वगैरे उत्तरें संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेंतील लोक अशा प्रश्नांस देत असत. ख्रिस्ती लोकांच्या जुन्या करारामध्यें भाषांच्या विविधतेचें असें स्पष्टीकरण दिलें आहे कीं, ईश्वरानें मनुष्याच्या पापाबद्दल व औद्धत्याबद्दल त्यास प्रायश्चित्त म्हणून भाषांमध्यें असें वैचित्र्य उत्पन्न केलें (उ. ११.७) भाषेसंबंधीं निरनिराळे महत्त्वाचे प्रश्न त्या वेळच्या लोकांच्या मनांत येत असत. उदा. निरनिराळ्या वस्तूंच्या नांवांची व्युत्पत्ति जेव्हां सहज उलगडण्यासारखी नसेल तेव्हां त्या वेळचे यहुदी तत्त्ववेत्ते कांहीं तरी काल्पनिक स्पष्टीकरण देत असत. त्यानंतरच्या ग्रीक व लॅटिन ग्रंथकारांच्या ग्रंथांतहि केवळ ध्वनिसादृश्यावरून कल्पिलेल्या अनेक चमत्कारिक व्युत्पत्ती आपणाला पहावयास सांपडतात. तथापि ग्रीक तत्त्ववेत्त्यांनीं व्युत्पत्तीखेरीज आणखीहि कांहीं गोष्टींचा विचार केलेला आपणांस आढळून येतो. विशिष्ट शब्दानें व्यक्त होणारी कल्पना हाच त्याचा स्वाभाविक अर्थ आहे काय? किंवा हा केवळ सांकेतिक व कल्पनेनें बसविलेला आहे? दुसऱ्या कोणत्याहि ध्वनिसमुच्चयानें तो अर्थ स्पष्टपणें व्यक्त होऊं शकला असता कीं नाहीं? याबद्दल त्यांच्यांत मोठमोठे वादविवाद चाललेले आपणांस आढळून येतात. परंतु या वादविवादांपासून कांहींच फलनिष्पत्ति होत नसे हें आपणांस प्लेटोच्या क्रॅटिलस नांवाच्या संवादावरून दिसून येतें. भारतीय तत्त्ववेत्त्यांतहि शब्द व त्याचा अर्थ यांचा संबंध, शब्दाचें नित्यत्व, त्याचें अर्थ व्यक्त करण्याचें सामर्थ्य इत्यादि विषयांबद्दल दर्शनग्रंथांत, पातंजल भाष्यांत व साहित्य ग्रंथांत चर्चा केलेली आढळते. स्फोट वाद हा या चर्चेचेंच फल आहे. पण त्यावेळीं केवळ एकाच भाषेचा अभ्यास करणें शक्य असल्यामुळें यापेक्षां अधिक फलनिष्पत्ति

होणें शक्य नव्हतें. आज एक शतकभर तौलनिक व्युत्पत्तिशास्त्राचा अभ्यास चालू असुनहि हा प्रश्न सुटला नाहीं. शब्द व अर्थ यांतील संबंध नैसर्गिक आहे किंवा सांकेतिक आहे असें मानणारे दोन पक्ष तत्कालीन तत्त्वज्ञान्यांत व वैय्याकरणांत पडलेले दिसुन येतात. व सॉक्रेटिससारखा तत्त्ववेत्ताहि शब्द व त्याचा अर्थ यांमध्यें नैसर्गिक संबंध कांहींहि नाहीं असें म्हणत असतांहि अशी एखादी उत्कृष्ट भाषा आपणांस बनवितां येणें शक्य आहे कीं जीमध्यें शब्द व अर्थ यांचा संबंध नैसर्गिक राहील असें प्रतिपादित असे व हेंच मत आपणांला पुढें बिशप विल्किन्ससारखे अर्वाचीन तात्त्विक भाषेचे पुरस्कर्ते प्रतिपादितांना आढळतात.

वेदाभ्यास--वरील प्रकारच्या कल्पनेला शास्त्र असें म्हणतां येणार नाहीं. कारण शास्त्र म्हटलें म्हणजे त्याला पद्धतशीर निरीक्षण व वर्गीकरण आवश्यक असतें व तसें ग्रीक ग्रंथकारांमध्यें आढळून येत नाहीं. मात्र अशा तऱ्हेचा पद्धतशीर अभ्यास आपणांस भारतीय वैय्याकरणांमध्यें आढळून येतो. भारतीयांची पवित्र वेदभाषा ही बहुतेक लुप्त झाली होती; परंतु तिच्या धार्मिक वर्चस्वामुळें त्यांतील प्रत्येक अक्षरास महत्त्व येऊन धार्मिक सूक्तांचें पठण व उच्चारण, त्यांत अल्पहि फरक न होतां झालें पाहिजे असा दंडक असल्यामुळें प्रत्येक ध्वनीचें व उच्चाराचें सूक्ष्म पृथक्करण करून त्यांस निरनिराळीं पारिभाषिक नांवें देऊन त्यांची व्यवस्थित व्याकरणविषयक व भाषाविषयक मांडणी करण्यांत आली होती. त्यांची पद्धत पाश्चात्यांहून अगदीं भिन्न होती. व त्यामुळें पाणिनीचें व्याकरण जेव्हां प्रथम यूरोपीय अभ्यासकांच्या नजरेस पडलें तेव्हां त्याचा पाश्चात्य अभ्यासकांवर अतिशय परिणाम होऊन त्यांतील अनेक संज्ञा आजहि भाषाशास्त्रांत रूढ होऊन बसल्या आहेत.

शीक्षा—वेदसंहितेचें पठण शुद्ध व्हावें याकरितां प्रत्येक शाखेस उपग्रंथ जोडलेले असत. त्यांपैकीं शब्दाभ्यासाच्या दृष्टीनें महत्त्वाचे ग्रंथ म्हणजे प्रातिशाख्यें हीं होत तथापि संहितांचें पठण योग्य प्रकारें कसें करावें हें सांगणारें शीक्षा म्हणूनहि एक वेदांग आहे. यामध्यें वर्णाची उत्पत्ति कशी होते हें सांगितलें असुन मुख्यतः उदात्तानुदात्तादि स्वरांचें उच्चारण कसें करावें याकडे लक्ष दिलेलें आढळतें. (पा.शी. ६–१४) यामध्यें स्वर व्यंजनांचा क्रम व ध्वनीची उत्पत्ति कशी होते व त्यांचें शुद्ध व स्पष्ट उच्चार कसे करावे हें सांगितलेलें आहे व शब्दोच्चार करतांना दोष घडल्यास त्याचा विपरीत अर्थ कसा होतो हेंहि इंद्रशत्रु यांतील स्वराघात चुकल्यामुळें तत्पुरुष समासा ऐवजीं बहुव्रीहि समास होऊन इंद्रास मारणारा असा अर्थ होण्याच्या ऐवजीं इंद्राकडून मारला जाणारा असा अर्थ कसा झाला व वृत्र हा इंद्रास मारण्याऐवजीं इंद्राकडून कसा मृत्यु पावला ही प्रसिद्ध कथा देऊन दाखविलें आहे. त्याबद्दलचा श्लोक पुढीलप्रमाणें आहे–मंत्रो हीनः स्वरतो वर्णतो वा मिथ्या प्रयुक्तो न तमर्थमाह । स वाग् वज्रो यजमानं हिनस्ति यथेंद्रशत्रुः स्वरतोपराधात् (पा.शी. ५२). तसेंच शब्दांचा उच्चार किती कालजीपूर्वक करावा हें पुढील श्लोकांत ध्वनित केलें आहे:–व्याघ्री यथा हरेत्पुत्रान्दंष्ट्राभ्यां न च पीडयेत् । भीता पतनभेदाभ्यां तद्वद्वर्णान् प्रयोजयेत् । (पा.शी. २५.) तसेंच ' यथा सौराष्ट्रिका नारी तर्क इत्यभिभाषते । एवं रंगाः प्रयोक्तव्याः खेअरा इवि खेदया । ' (पा.शी. २६.). हे शीक्षाग्रंथ प्रत्येक शाखेस जोडले असुन त्यांमध्यें बहुधा हेच विवेचन बहुतेक त्याच श्लोकांत आलें आहे. सामवेदाच्या शीक्षाग्रंथामध्यें सामवेद हा गेय असल्यामुळें त्यांतील स्वराचें अधिक विवेचन संगीताच्या दृष्टीनें केलें आहे. उदा. नारदीय शिक्षेमध्यें आपणांस पुढील श्लोक आढळतातः– ' यः सामगानां प्रथमो स वर्णोमेध्यमः स्वरः । यो द्वितीयः स गांधारस्तृतीयस्त्वृषभः स्मृतः ॥ चतुर्थः षड्ज इत्याहुः पंचमो धैवतो भवेत् । षष्ठो निषादो विज्ञेयः सप्तमः पंचमः स्मृतः ॥ ' (ना.शी. ४.१.२.) याप्रमाणें लौकिक गायनातील सात स्वर व सामांतील सात स्वर यांचा मेळ घातला आहे. तसेंच षड्जं वदति मयूरो गावो रंभंतिचर्षभः अजाविके तु गांधारं क्रौंचो वदति मध्यमं । पुष्प साधारणे काले कोकिला वदति पंचमं अश्वस्तु धैवतं वक्ति निषादो वदति कुंजरः । (ना.शी. ४.२४.) याप्रमाणें निरनिराळ्या सामगायनांतील स्वरांचें निरनिराळ्या प्राण्यांच्या आवाजाशीं तुलनात्मक साम्य दाखविलें आहे. तथापि शीक्षाग्रंथाच्या स्वरूपाकडे पाहतां जरी तैत्तिरीय आरण्यकामध्यें शिक्षाप्रकरणाचा उल्लेखच आढळतो. [' ॐ शीक्षां व्याख्यास्यामः । वर्णः स्वरः । मात्रा बलम् । सामसंतानः । इत्युक्तः शीक्षाध्यायः । ' (त.उप. १.२)] तरी ऋग्वेदीय शीक्षाग्रंथ पाणिनीच्या नांवावर मोडतो यावरून हे बरेच अर्वाचीन असुन भाषाशास्त्रीयदृष्ट्या शीक्षाग्रंथांपेक्षां प्रातिशाख्यें अधिक महत्त्वाचीं आहेत.

प्रातिशाख्यें--हीं प्रातिशाख्यें वेदांच्या चारहि संहितांस जोडलेलीं आढळतात. त्यांतील ऋग्वेद व अथर्ववेद संहितांचीं प्रातिशाख्यें शौनकप्रणीत म्हणून मानलीं जातात; पण तैत्तिरीय संहितेच्या व वाजसनेयी संहितेच्या प्रातिशाख्यांस विशिष्ट आचार्यांचीं नांवें जोडलेलीं आढळत नाहींत. तथापि आपणांस जीं प्रातिशाख्यें आढळतात त्यांमध्यें त्यांच्याहि पूर्वीच्या आचार्यांचीं नांवें व त्यांचीं भिन्न मतें नमूद केलेलीं आढळतात. यावरून यापूर्वीहि भिन्न आचार्यांचे प्रातिशाख्यग्रंथ उपलब्ध होते असें दिसतें. ऋक्संहितेच्या प्रातिशाख्यांत व्याडि, अथवा व्यालि, शाकल्य, शाकल्यपिता, मांडूक्य, शाकटायन, गार्ग्य, बाभ्रव्य इ. आचार्यांचीं नांवें उल्लिखित आहेत. तसेंच तैत्तिरीयप्रातिशाख्यांत आग्निवेश्य (९.४), आग्निवेश्यायन (१४.३२), आत्रेय

(५.३१), उख्य (८.२२), उत्तमोत्तरीय (८.२०), काण्डमायन (९.१), कौण्डिन्य (५.३८), कौहलीपुत्र (५.४०), गौतम (५.३८), पौष्करसादि (५.३७), ग्लाक्षायण (९.६), ग्लाक्षि (५.३८), बाडभीकार (१४.१३), भारद्वाज (१७.३), माचाकीय (मायिकाय) (१०.२२), वात्सप्र (१०.२३), वाल्मीकि (५.३६), शाङ्खायन (१५.७), शैत्यायन (५.४०), सांकृत्य (८.२१) आणि हारीत (१४.१८) इ. नांवांचा उल्लेख असून या खेरीज आचार्यांः म्हणून सामान्यत्वें कांहीं ठिकाणीं उल्लेख केलेला आहे. या प्रातिशाख्यांत आपणांस वर्णराशिक्रम, त्यांतील ह्रस्व–दीर्घ, स्वरव्यंजनादि भेद, त्यांचीं उच्चारस्थानें व व्यंजनांचे स्पर्श, अघोष, घोष, जिह्वामूलीय इ. वर्गीकरण दिलेलें आढळतें. तसेंच स्वरव व्यंजन यांच्या संधीचे नियम व त्यांचे अपवाद नमूद केलेले आढळतात. तसच उदात्तानुदात्तादि स्वराघात व त्यासंबंधीं नियम, संहितेचीं पदें पाडण्यासंबंधीं व पदांचें क्रम वगैरे व्यवस्थेनें पठण करण्यासंबंधीं अनेक नियम दिलेले आढळतात. तसेंच शब्दांचें वर्गीकरण पुढें दिल्याप्रमाणें केलेलें आढळतें. ' नामाख्यातमुपसर्गो निपातश्चत्वार्याहुः पदजातानिशाब्दाः ॥ १७ ॥ तन्नामधेयनाभिदधाति सत्त्वं ॥ १८ ॥ तदाख्यातं येनभावं सधातु ॥ १९ ॥ प्राग्न्यापरानिर्दुरनुब्युपाप संपरिप्रतिन्यत्यधिसूदवापि । उपसर्गाविंशतिरर्थवाचकाः संहेताराभ्यां ॥ २० ॥ इतरेनिपाताः ॥ २१ ॥ (ऋ. प्रा. १२. १७–२१). हेंच वर्गीकरण पुढें निरुक्तामध्यें आपल्याला त्याच स्वरूपांत आढळतें. त्याचप्रमाणें निरनिराळ्या वर्णांचा उच्चार कसा होतो यासंबंधींहि विवेचन केलेलें आढळतें. उदा. ' वायुःप्राणः कोष्ठ्यमनुप्रदानं कण्ठस्थ खे विवृते संवृते वा। आपद्यते श्वासतां नादतां वा वत्कीहायां।' याप्रमाणें उदरांतील प्राणवायु कंठाच्या पोकळींत येऊन त्याच्यावर कमजास्त पडणाऱ्या दाबामुळें तो संकुचित किंवा प्रसृत होऊन त्याप्रमाणें निरनिराळे श्वास, नाद वगैरे आवाज कसे उत्पन्न करतो व त्याला त्याच्या उच्चनीचतेवरून व निरनिराळ्या स्थानांपासून निरनिराळीं नांवें कशीं प्राप्त होतात याचें वर्णन केलें आहे व त्याप्रमाणें अक्षरांच्या मात्रा ठरविलेल्या आहेत. यानंतर वेदांतील निरनिराळ्या छंदांचीं लक्षणें व त्यांतील अक्षरसंख्या यांचें विवेचन केलें आहे. याप्रमाण वेदाच्या शुद्ध अध्ययनास अवश्य तेवढीं अंगें तत्कालीन भाषाशास्त्रज्ञांनीं अभ्यासिलीं होतीं.

वाजसनेयी प्रातिशाख्यावरील भाष्यांत उवट म्हणतो, ' वृद्धमिदं शास्त्रमन्यानिशास्त्राण्यपेक्ष्य । शिक्षाविहितं व्याकरण विहितं चास्मिन् शास्त्रे उभयं यतः प्रक्रियते । ' (वा. प्रा. उवटभाष्य १.१६९).

प्रातिशाख्यें हीं व्याकरणाचीं पूर्वगामी म्हणतां येतील. या प्रातिशाख्यांची वाढ व विकास हळू हळू होत असावा हें वरील अनेक आचार्यांच्या परंपरेवरून दिसून येईल. तसेंच सर्व शाखांचीं प्रातिशाख्यें एकाच वेळीं रचलीं गेलीं असेंहि दिसत नाहीं व त्यांतील विषयहि सर्व प्रातिशाख्यांत एकाच स्वरूपाचे नाहींत. उत्तरकालीन प्रातिशाख्यात व्याकरणविषयक भाग अधिक अधिक येत गेला आहे. अथर्वप्रातिशाख्य हें आपणांस सर्वांत अर्वाचीन म्हणतां येईल. यामध्यें प्रारंभींचा उपोद्घातात्मक भाग नाहीं. वर्णांचीं स्थानें, वर्णोत्पत्ति, वर्णराशी, ध्वनि, संधि वगैरे नियम नाहींत; तसेंच इतर आचार्यांचा उल्लेखहि आढळत नाहीं. यांत व्याकरणविषयक भाग बराच आला आहे.

प्रातिशाख्यें व व्याकरण––प्रग्रह, संधि व स्वर यांचा विचार हा प्रातिशाख्यें व व्याकरण यांस जोडणारा दुवा आहे. उदाहरणार्थ, प्रग्रह्यांचें विवेचन पाहिलें असतां निरनिराळ्या प्रातिशाख्यांत व पुढें व्याकरणांत या विचाराचा विकास कसा होत गेला हें स्पष्ट दिसतें. ऋक्प्रातिशाख्यांत 'ओकार आमंत्रितजः प्रगृह्यः' असें एका सूत्रांत थोडक्यांत विवेचन केलेलं आहे, तर तैत्तिरीय प्रातिशाख्यांत चवथ एक संपूर्ण प्रकरण या विवेचनास खर्च केलं आहे. वाजसनेयी प्रातिशाख्यांत याचें वर्गवार विवेचन आढळतें (वा. प्रा. १.९२–९८) तर अथर्वप्रातिशाख्यांत अथवा शौनकीय चतुराध्यायींत यापेक्षां अधिक निश्चित स्वरूपाचें विवेचन आपणांस पहावयास सांपडतें. तसेंच पुढें दिलेलीं प्रातिशाख्यांत आढळणारीं सूत्रें जशींच्यातशींच पाणिनीय अष्टाध्यायींत आढळतात. १ उच्चैरुदात्तः । नीचैरनुदात्तः (पा. १.२.२९–३०. तै. प्रा. १.३८–३९. वा. प्रा. १.१०८–९. च. अ. १.१४–१५.) २ समाहारः स्वरितः (पा. १.२.३१. तै. प्रा. १.४०. वा. प्रा. १.११०.) ३ तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य । (पा. १. १.६६. वा. प्रा. १.१३४.) ४ षष्ठीस्थाने योगा । (पा. १.१.४९. वा. प्रा. १.१३६.) ५ आद्यन्तवच्च । (तै. प्रा. १.५५. आद्यन्तवदेकस्मिन् । पा. १.१.२१.) ६ ईकारौकारौच सप्तम्यर्थे (च. अ. १.७.४. अ. प्रा. २.१.६. ईदूतौच सप्तम्यर्थे पा. १.१.१९.) ७ तस्मादित्युरस्यादेः (वा.प्रा १.१३५. आदेः परस्य । पा. १.१.५४.) ८ स्वरितवर्जमेकोदात्तं पदम्' (वा. प्रा. २.१. अनुदात्तं पदमेकवर्जम् । पा. ६.१.१५८.) तसेंच कांहीं परिभाषाविषयक विशेषांवरूनहि आपणांस प्रातिशाख्यापासून व्याकरणाकडे भाषाविषयक अभ्यासाची प्रगति कशी होत होती हें दिसून येतें. उदाहरणार्थ, (१) कांहीं पारिभाषिक संज्ञा प्रातिशाख्यें व पाणिनी या दोहोंतहि वापरलेल्या असून त्यांच्या व्याख्या दोहोंतहि आढळत नाहींत. म्हणजे या संज्ञा दोघानांहि पूर्ण परिचित

व पूर्वी रूढ असलेल्या असल्या पाहिजेत–व्यवाय (Intervention), उपसर्ग (Preposition), समास (COmpound), बहुलम् (Optionally), आमन्त्रित (Vocative), निपात (Indeclinable), मतु (प्) (Possession). (२) कांहीं सज्ञा प्रातिशाख्ये व पाणिनी या दोहोंतहि आढळतात पण त्यांच्या व्याख्या प्रातिशाख्यें मात्र देतात– आम्रेडित (Repetition), द्विरुक्तमाम्रेडितम् पदम् (वा. प्रा. १४६). यावरून ही संज्ञा पाणिनीकालीं सामान्य झाली होती व तिच्या व्याख्येची त्या कालीं जरूर नव्हती. (३) कांहीं संज्ञा प्रातिशाख्ये व पाणिनी दोहोंतहि वापरल्या असून त्यांच्या व्याख्याहि दोहोंत आढळतात–उपधा (Penultimate), अपृक्त (Monosyllabic एकाक्षरपद). प्रगृह्य (Uncombinable final) म्हणजे या संज्ञा रूढ होत्या पण अभ्यासकांस त्यांच्या व्याख्याची जरूर होती. (४) कांहीं संज्ञा दोहोंतहि आढळतात पण फक्त पाणिनी व्याख्या करतो (सार्वधातुक [अ. प्रा. २.४.२], अभ्यास च. अ. २.९१). म्हणजे या संज्ञा जरी प्रातिशाख्यकालीं परिचित होत्या तरी स्वत:च्या पद्धतीत वापराव्याच्या असल्यामुळें पाणिनीला त्यांच्या व्याख्या देण्याची पुन्हां जरूर वाटली. (५) कांहीं सज्ञा फक्त पाणिनी वापरतो व त्यांच्या व्याख्याहि देतो– सम्बुध्दि (Vocative singular), प्रातिपदिक (Nominal base) या संज्ञा प्रातिशाख्यांस परिचित नाहींत. तीं आमंत्रित, पद, नाम इत्यादि जुनीच परिभाषा यांचेऐवजीं वापरतात. म्हणजे सदरहू सज्ञा पाणिनीकालीं नवीन प्रचारांत आल्या. (६) कांहीं संज्ञा फक्त प्रातिशाख्यांत आढळतात पण त्यांच्या व्याख्या मात्र आढळत नाहींत–परोक्षा (Perfect च. अ. ४.८४), नैगमी लेट (Vedic subjunctive अ. प्रा. २.३.२१), प्रेषणी (Imperative or Potential mood अ. प्रा. २.१.११.). यावरून या संज्ञा प्रातिशाख्यकालीं सामान्य व रूढ होत्या परंतु पुढें त्या मागे पडल्या यावरून प्रातिशाख्ये व पाणिनी यांतील संबंध आपल्या लक्षांत येईल. याबद्दल बर्नेलनें आपल्या ऋक्तंत्र व्याकरणांत असें म्हटलें आहे कीं, पाणिनीनें आपली पद्धति प्रचारांत आणण्यापूर्वी जी पद्धति प्रचलित होती तीमध्यें या सर्व प्रातिशाख्याचा अंतर्भाव होतो.

ज्याप्रमाणें प्रातिशाख्यांत वेदपठणास महत्त्व देऊन पाठशुद्धीकडे लक्ष पुरविलेलें आढळतें त्याप्रमाणें निरुक्तामध्यें वेदाच्या अर्थज्ञानास महत्त्व देऊन त्याचें सार्थ अध्ययन व्हावें यासंबंधीं आवश्यक तेवढी मदत अभ्यासकास देण्याची प्रवृत्ति दिसते. प्रातिशाख्यामध्यें ध्वनि अथवा शब्दोच्चारास विशेष महत्त्व दिलेलें आहे तर निरुक्तामध्यें व्युत्पत्ति व अर्थ यांस अधिक महत्त्व दिलेलें आहे. तथापि वेदास धार्मिक महत्त्व अतिशय असल्यामुळें या अभ्यासामध्यें आपणांस चिकित्सा अथवा ऐतिहासिक विकास यापेक्षां पूर्वपरंपरेसच अधिक महत्त्व दिलेलें आढळतें, आणि त्यामुळें अभ्यासाचें स्वरूप एकदेशीय झालें आहे.

निरुक्त––आज आपणांस निरुक्तावरील जो ग्रंथ उपलब्ध आहे तो यास्काचार्याचा होय. यास्कसंबंधीं कांहीं विवेचन पहिल्या भागाच्या प्रस्तावनेमध्यें केलेंच आहे त्यानें शब्दाचा अर्थ जाणण्याच्या कार्मी व्युत्पत्तीस किती महत्त्व दिलें पाहिजे यासंबंधीं जें विवेचन केलें आहे त्याचा उल्लेख त्या ठिकाणीं केलेलाच आहे. त्यानें लिहिलेलें वैदिक निघण्टूवरील भाष्य अथवा निरुक्त हा आपणांस उपलब्ध असलेल्या ग्रथातील अगदीं प्राचीन पद्धतशीर प्रयत्न होय. यानें अनेक पूर्वीच्या ग्रंथकारांचा उल्लेख आपल्या ग्रंथांत केला आहे, तसेंच त्यानें तत्कालीन व्युत्पत्तिशास्त्रज्ञ, वैय्याकरण, याज्ञिक, ऐतिहासिक, नैदान वगैरे अनेक विचारप्रवर्तक पंथांचा उल्लेख केला असून पूर्वीच्या निरुक्तकाराच्या मतांचाहि परामर्ष घेतला आहे. यावरून यास्कापूर्वीहि भाषाशास्त्रीय अभ्यासास किती महत्त्व मिळाल होतें व त्याचा किती अनेक अंगानीं अभ्यास होत होता हें दिसून येतें. तसेंच त्यानें उल्लेखिलल्या प्रातिशाख्यावरून ध्वनि किंवा शब्दोच्चारशास्त्रासहि त्या कालीं किती महत्त्व दिलें जात होतें हें आपण वर पाहिलेंच आहे. प्रातिशाख्यें रचलीं जाण्यापूर्वीहि संहिताचे पदपाठ तयार झाले होते व यास्कानेंहि व्युत्पत्तिशास्त्राचा चागला अभ्यास केला होता ही गोष्ट आपणांस त्याच्या ग्रंथांवरूनहि दृष्टीस पडते.

शब्दाच्या जाती––यास्क सर्व शब्दांचे चार विभाग पाडतो (नि. १.१); ते म्हणजे (१) नाम (२) आख्यात (३) उपसर्ग (४) निपात हे होत. नामाची व्याख्या तो सत्त्वप्रधान व आख्यातांची भावप्रधान अशी करतो, तसेंच यास्क हा शब्द हे केवळ इंद्रियनित्य आहेत म्हणजे ते क्षणिक असून उच्चारल्याबरोबर ते नाश पावतात हें औदुंबरायणाचें म्हणणें खोडून काढतो. कारण तसें असतें तर शब्दांची चार प्रकारांत विभागणी होऊं शकणार नाहीं व एकामागून एक उच्चारलेल्या शब्दांचा परस्पर संबंध राहणार नाहीं. व शब्द हे तर निरनिराळे पदार्थ व जगांतील निरनिराळे व्यापार दाखविण्याकरितां त्यांच्या व्यापकत्वावरून व लघुत्वामुळें योजले जातात. भावांचे वार्ष्यायणीनें आठ प्रकार वर्णिले आहेत. उत्पत्ति, स्थिति, वृद्धि, उपक्षय आणि विनाश. व हे यास्कानें मान्य केले असून इतर विकार यांपासून होतात असें म्हटलें आहें. (नि. १.२) हीच गोष्ट आपणांस बृहद्देवतेंत आढळतें. 'भावप्रधानमाख्यातं षड्विकारा भवन्तिते । जन्मास्तित्वं परीमाणो वृध्दिर्हानिं विनाशनम् ।' बृ. दे. २.१२१.

उपसर्ग हे स्वतंत्रतः निरर्थक असून नाम व आख्यात यांचे कर्मोपसंयोग दाखवितात, असें शाकटायनाचें मत यास्कानें नमूद केलें आहे (नि. १.३). गार्ग्य यानें उपसर्गास अर्थ असतात असें जें विधान केलें आहे त्याचा अर्थ आपल्या अर्थांनीं ते नाम व आख्यात यांच्या अर्थामध्यें विकार करतात असें सांगून त्याची संगति यास्कानें लावली आहे, व कांहीं उपसर्गांचे प्रातिलोम्य, आभिमुख्य इ० अर्थ दिले आहेत. निपात हे उपमा, कर्मोपसंग्रह, पदपूरण इ० अर्थांनीं योजलेले असतात असें म्हणून त्यानें कांहीं उदाहरणेंहि दिलीं आहेत (नि. १.४). यास्कानें उपसर्ग अथवा शब्दयोगी अव्ययें यांची स्वतंत्र जात कल्पिली आहे. परंतु क्रियाविशेषणास त्यानें स्वतंत्र स्थान दिलें नाहीं हें पाहून आश्चर्य वाटतें. परंतु संस्कृत भाषेमध्यें उपसर्गांचा उपयोग विभक्तीचें कार्य करण्याकरितां क्वचित्च करण्यांत येतो व बहुतेक तीं क्रियाविशेषणांचेच कार्य करतात. यामुळें वरील विसंगति दूर होते. यास्काच्या वरील शब्दविभागणीशीं हॅलिकार्नेसस येथील डायोनिसियस याचे विचार तुलना करून पाहण्यासारखे आहेत. त्यानें ॲरिस्टॉटलनें अशीच शब्दांची विभागणी केली होती असें म्हटलें आहे. थिओडेक्टसनें व ॲरिस्टार्टसनें शब्दांची तीन विभागांत प्रथमतः विभागणी केली होती ते म्हणजे (१) नाम (२) क्रियापद (३) संयोजक. त्यानंतरच्या स्टोईक तत्त्वज्ञांनीं संयोजक व उपपद यांची विभागणी करून चार विभाग कल्पिले. (Literary Composition, Cha iii, Roberts Ed. P. 71) ॲरिस्टॉटलच्या मताप्रमाणें एकंदर लेखनाचे विभाग पुढील प्रमाणें करतां येतीलः-(१) वर्ण. (२) अक्षर. (३) संयोजक अथवा उभयान्वयी अव्यय. (४) उपपद. (५) नाम. (६) क्रियापद. (७) विभक्ति. (८) भाषण (Poetics-Bywater P. 57). तसेंच क्रियापदाची व्याख्या करतांना ॲरिस्टॉटल क्रियेकडे दुर्लक्ष करून कालावर अधिक जोर देतो. उलट यास्क हा भाव अथवा क्रिया यांस अधिक महत्त्व देतो.

व्युत्पत्तिमहत्त्व—यास्क व्युत्पत्तीस अतिशय महत्त्व देतो, सर्व शब्द अखेरीस धातूपासून व्युत्पादितां येतील असें म्हणतो व याप्रमाणें ज्या ज्या ठिकाणीं स्वरसंस्कार व प्रादेशिक विकार स्पष्ट असतील तेथें सरळ व्युत्पत्ति द्यावी असें म्हणतो. तसें नसेल तेथें अर्थावरून व्युत्पत्ति द्यावी व वृत्तिसामान्यावरून म्हणजे सादृश्यावरून व्युत्पत्ति देण्याचा प्रयत्न करावा. जेथें असें सामान्य नसेल तेथें अक्षरवर्ण सामान्यावरून व्युत्पत्ति द्यावी. परंतु व्युत्पत्ति दिल्याशिवाय कधींहि राहूं नये. व्याकरण किंवा संस्कार यास फारसें महत्त्व देऊं नये. कारण व्याकरणनियम हे अपवादयुक्त असतात. अर्थाप्रमाणें विभक्तीस वळण द्यावें. कारण शब्दाच्या मूळधातूमध्यें व अखेरच्या रूपामध्यें अनेकदां आपणांस विसादृश्य आढळतें. उदा. कांहीं ठिकाणीं आदिलोप होतो (अस्-स्तः, सन्ति); कांहीं ठिकाणीं अंतलोप होतो (गम्-गत्वा, गतम्); कोठें कोठें उपधालोप (Syncope) होतो (गम्-जग्मतुः, जग्मुः); कित्येकदां उपधाविकार होतो (राजन्-राजा, दण्डिन्-दण्डी); क्वचित् वर्णलोप होतो (तत्वायामि-तत्वा-यामि); क्वचित् द्विवर्णलोपहि (Haplology) होतो (त्रि+कृत्व=तृच्); केव्हां केव्हा आदिविपर्ययहि होतो (शु-ज्योतिः); क्वचित् आद्यंतविपर्ययहि (Metathesis) होतो (स्चुत्-स्तोक; सृज्-रज्जु, कृत् तर्कु) (नि. २.१). केव्हां केव्हा अंतव्यापत्ति होते-(वह्-ओघ, मिह्-मेघ; गाह्-गाध, वह्-वधूः); कांहीं ठिकाणीं वर्णोपजन (Anaptyxis) होतो (अस्=[फेकणें] आस्यत्; वृ=[झाकणें] द्वार). जेथें धातूमध्यें स्वराजवळ अर्धस्वर अथवा अंतस्थ असतां तेथें दोन निरनिराळ्या तऱ्हेचे धातू बनतात. अशा ठिकाणीं जर आपणांस विशिष्ट रूप एका धातूपासून व्युत्पादितां येत नसेल तर दुसऱ्या धातूपासून व्युत्पादण्याचा प्रयत्न करावा (अव्-ऊतिः, मृद्-मृद्, प्रथ्-पृथुः इ०). कांहीं वैदिक नामें लौकिक संस्कृत भाषेंतील धातूपासून व्युत्पादिलीं आढळतात. (दमूनाः, क्षेत्रसाधाः) उलट कांहीं लौकिक भाषेंतील नामें वैदिक धातूंपासून व्युत्पादलेलीं आढळतात. (उष्-उष्ण, घृ-घृत). कांहीं लोकांमध्यें प्रकृतिरूप शब्द रूढ असतात, तर कांहीं लोकांमध्यें त्यांच्या केवळ विकृतीच रूढ असतात. उदा. शवति हें गत्यर्थक क्रियापद कंबोज लोकांतच रूढ आहे तर त्याचा विकार शव हा आर्य लोकांत आढळतो. कापणें या अर्थी 'दा' हा धातु किंवा 'दाति' पद प्राच्य लोकांत रूढ आहे तर उत्तरीय लोकांत त्यापासून झालेला 'दात्र म्हणजे विळा हा शब्द रूढ आहे. अशा तऱ्हेनें कांहीं कांहीं शब्दांची व्युत्पत्ति लावावी. तद्धित सामासिक शब्दांमध्यें जे निरनिराळे अवयव असतील त्यांची पृथक् पृथक् व्युत्पत्ति लावावी (नि २. २). एकाकी पदाची व्युत्पत्ति लावूं नये. तसेंच ज्यास व्याकरण माहीत नाहीं, जो शिष्य आपल्या जवळ नित्य रहात नाहीं व जो समजण्यास असमर्थ आहे अशा मनुष्यास व्युत्पत्ति सांगूं नये. तर जो मेधावी, तपस्वी किंवा नित्य जवळ राहणारा असेल त्यासच व्युत्पत्तीचा बोध करावा (नि. २.३).

वरील यास्कांनीं घालून दिलेल्या नियमांचा आपणांस तौलनिक व्युत्पत्तिशास्त्राच्या अभ्यासास फार उपयोग होतो. मूळ धातु व प्रचलित रूप यांमध्यें कधीं कधीं अतिशय विसादृश्य असतें ही गोष्ट आपणांस अनेक ठिकाणीं आढळून येते. उदा. १ इंडोयुरो. पॅक, सं. पंच, झेंद पंच, प्री. पेंटे. लॅ. क्विंक. फ्रे. सॅंक. लिथ. पेंके. गॉ. फिंफ. जर्मन फंफ प्रा. इं. फिफ इं. फाइव्ह.

२ इं. यु, लॅ. ओव्हिस्, ३ इं. फोर, जर्मन व्हिअर, प्री. तेत्तरेस. ४ इंडोयु. घंस, सं. हंस, प्री. क्सीन, लॅ. अन्सेर, ज. गन्स, प्रा. इं. गॉज्, इ. गूज्. परंतु अशा तऱ्हेनें व्युत्पत्ति लावण्यांत पुष्कळदां चुका होण्याचा संभव आहे ही गोष्ट ओळखून यास्कानें संदर्भाशिवाय एकाकी शब्दाची व्युत्पत्ति लावूं नये असा निर्बंध घातला आहे, व अर्थाकडे लक्ष देऊन त्याप्रमाणें व्युत्पत्ति लावण्याचा प्रयत्न करावा या गोष्टीस त्यानें विशेष महत्त्व दिलें आहे. यास्कानें सारख्या अर्थाच्या शब्दांची व्युत्पत्ति एकच असते व निरनिराळ्या अर्थाच्या शब्दांची व्युत्पत्ति निरनिराळी असते त्या अर्थी अर्थाप्रमाणें व्युत्पत्ति करावी असें म्हटलें आहे (तानिचेत् समान कर्माणि समाननिर्वचनानि नाना कर्माणिन नाना निर्वचनानि यथार्थं निर्वक्तव्यानि। नि. २.७) हें अगदीं यथार्थ आहे. कारण कांहीं शब्दांचीं रूपें निरनिराळ्या धातूपासून उत्पन्न होऊनहि अगदीं सारखीं असतात. उदा. १ सं. अज्–अक्त=हांकलेलें, अंज्–अक्त=लेप केलेलें. २ अज्–अज=हांकणारा, अ+जन् न जन्मलेला, ३ अनिष्ट–अन्+इष्(–इष्)=न इच्छिलेलें, (–यज्)=यज्ञ न केलेलें. ४ अनुदार–अन्+उदार=कृपण, अनु+दार=पत्नीनें अनुसरलेला. अशा शब्दाची व्युत्पत्ति अर्थाप्रमाणें लावल्यासच बरोबर होईल. परंतु कांहीं कांहीं ठिकाणीं एकाच धातूपासून व्युत्पादिलेल्या शब्दास पुढें निरनिराळे अर्थ प्राप्त होतात. उदा. लॅ. क्युपिडो=इच्छा व सं. कुप्=गावणें या दोहोंचीहि व्युत्पत्ति एकच आहे. यास्कानें वैदिक व लौकिक या संस्कृत भाषेच्या दोन्ही स्वरूपामध्यें असलेला भेद लक्षांत ठेवला होता व लौकिक भाषा ही वैदिक भाषेचेंच कालांतरानें बनलेलें रूप होय ही गोष्ट ओळखली होती हेंहि महत्त्वाचें आहे. यासारखाच प्रकार ग्रीकमधल्या आर्योनिक व लॅटिन या भाषांचा होता. परंतु लॅटिन भाषा ही आर्योनिक भाषेचेंच उत्तरकालीन स्वरूप आहे ही गोष्ट प्लेटोच्या लक्षांत आली नव्हती असें त्याच्या कॅटिलस या संवादावरून दिसतें (जोवेट डायलॉग्ज ऑफ प्लेटो; १ पृ. ३५८.)

नामांची धातूपासून व्युत्पत्ति––यास्क हा नामें धातूपासून बनलीं आहेत असें ऐरुक्ताचें व शाकटायनाचें मत नमूद करतो व त्याला येणारे आक्षेप खोडून काढण्याचा प्रयत्न करतो (नि.१ .१२–१४). उदा. गार्ग्य व वैय्याकरण हे सर्व नामें धातूपासून बनली आहेत असें म्हणण्यास तयार नाहींत. तर जेवढीं नामें स्वरसंस्कार व प्रादेशिक विकार त्याच्या रूपांमध्यें स्पष्ट दिसतात तेवढींच धातूपासून बनलीं आहेत असें मानतात. उलट गौ, अश्व, पुरुष, हस्ती इ० शब्द अव्युत्पन्न असून केवळ संकेतानें बनलेले आहेत असें त्याचें म्हणणें आहे. एवढेंच नव्हे तर महाभाष्यांत ' नामच धातुज माहनिरुक्ते व्याकरणे शकटस्यच तोकम् ' असें म्हणून व्याकरणकार कोणी तसें मनीत नाहीं असें पतंजलीनें म्हटलें आहे (३.३,१). यासंबंधीं यास्काचे पूर्व–उत्तर पक्ष असे आहेत–जर सर्व नामें धातूपासून बनलेली असतीं तर एक विशिष्ट क्रिया जी जी व्यक्ति करील त्या त्या विशिष्ट व्यक्तीस तेंच नांव प्राप्त होईल, उदा. जो जो रस्त्यावरून धावण्याचें काम करील त्यास अश्व ही संज्ञा मिळेल व ती केवळ विशिष्ट प्राण्याशींच संबद्ध राहणार नाहीं. तसेंच जें जें टोचेल त्यास तृण ही संज्ञा प्राप्त होईल. तसेंच एखाद्या वस्तूकडून जर अनेक क्रिया होत असतील तर तितकी नांवें त्या वस्तूस अथवा नामास प्राप्त होतील. उदा. एखाद्या खाबास सरळ उभें राहण्यावरून ' स्थूणा ' असें नांव मिळेल तर खड्डयांत पुरलेला म्हणून 'दरशया' असें नांव मिळेल; किंवा तुळयांस जोडलेला म्हणून ' संजनी ' असेंहि नांव मिळेल. याप्रमाणें एकाच वस्तूस तीन नांवें प्राप्त होतील. वस्तूंना तर असंदिग्ध व बिनचूक नांवें व व्याकरणविषयक रूपें प्राप्त होणें अवश्य आहे. तसेंच कांहीं लोक कांहीं शब्दांच्या प्रचलित अर्थाबद्दल ज्या शंका काढतात तशाहि काढण्यास जागा राहूं नये. उदा० प्रथ्=पसरणें यापासून जर पृथ्वी हें नांव प्राप्त होतें तर या पृथ्वीला कोणी पसरली किंवा तिला आधार काय अशी शंका विचारण्यांत येते. तसेंच शाकटायन शब्दांतील निरनिराळ्या अवयवांवरून निरनिराळ्या व्युत्पत्ती त्यामध्यें अन्वय नसतांहि करतांना आढळतो. तसेंच क्रिया ही कर्त्यावर अवलंबून असते तेव्हां आधीं अस्तित्वांत असणाऱ्या कर्त्यास क्रियेपासून नांव मिळणें संभवनीय वाटत नाहीं. यास्कानें असें उत्तर दिलें आहे कीं, जेंथें स्वरसंस्कार व व्याकरणविकार स्पष्ट व नियमबद्ध असतील व मूळ धातु स्पष्ट दिसत असेल तेथें त्या धातूपासून तें नांव निघालें आहे ही गोष्ट स्पष्टच आहे. आतां एकच क्रिया जेव्हां निरनिराळे लोक करतात तेव्हां सर्वांनाच आपण तेंच नांव देतों असें नाहीं. उदा. सर्वच लांकूड कापणाऱ्या लोकांस आपण ' तक्षा ' म्हणतों असें नाहीं. तसेंच सर्वच भटकणाऱ्या लोकांना आपण 'परिव्राजक' असें न म्हणतां फक्त संन्याशालाच तो शब्द लावतो. यामध्यें आपण ती क्रिया ज्या व्यक्तीमध्यें अनेक क्रियांमध्यें विशेषरूपानें आढळते त्यावरूनच त्या व्यक्तीस आपण तें नांव देतों, हें स्पष्ट आहे. तसेंच वर्तति, जागरूक इ. शब्द व्युत्पत्तिदृष्ट्या व अर्थदृष्ट्याहि एकच पदार्थ दाखवितात व ते सर्वच नियमबद्ध आहेत. तिसरें अनेक क्रियाकारक पदार्थांनां उत्तरकालीं होणाऱ्या क्रियेवरून नांवें प्राप्त झालेलीं आपणांस आढळतात. तसेंच पसरल्यामुळें पृथ्वी हें नांव मिळण्याबद्दल जी शंका काढण्यांत येते त्यास एवढेंच उत्तर सांगण्यांत येईल कीं पृथ्वी ही पसरलेली दिसते म्हणून तीस पृथ्वी असें सयुक्तिकपणें म्हणतां येईल. आतां जो शब्दांची अवयवांवरून अनियमित रीतीनें व्युत्पत्ति लावतो त्यांत शास्त्राचा दोष नसून त्या व्यक्तीचा दोष आहे. तथापि सर्वच नामें धातूंपासून झालीं आहेत असें आतां कोणी मानीत नाहीं.

अनुकरणात्मक शब्द---यास्कानें अनुकरणात्मक शब्दांसंबंधींहि चर्चा केली आहे (नि. ३.१८). काक हा शब्द शब्दानुकृतीनें उत्पन्न झाला आहे व असे पक्ष्यांच्या नांवांत पुष्कळ शब्द आहेत. औपमन्यव अशी शब्दानुकृति मान्य करीत नाहीं, तर काक हा हांकून द्यावयाचा (अपकालयितव्यः), तित्तिर हा तरतो म्हणून किंवा चित्रविचित्र असतो म्हणून (तरणात् तिलमात्र चित्र), कपिंजल (कपिवत् जीर्ण किंवा कपिरिव जवते किंवा ईषत् पिंगलो वा कमनीयं शब्दं पिंजयति वा); अशा प्रकारें श्वा, सिंह, व्याघ्र, इ. शब्दांची व्युत्पत्ति निराळ्या प्रकारेंहि लावता येते असें त्यानें म्हटलें आहे. तथापि यास्क कितव (किं तव अस्तीति शब्दानुकृतिः १.२२), दुंदुभि (दुंदुभि रिति शब्दानुकरणम् ९.१२), चिक्षा, कृकवाकु इ. शब्द शब्दानुकरणानें झाल आहेत असेंच विवेचन करतो. तथापि एकंदर भाषेंतील शब्द वनविण्याच्या कामीं शब्दानुकृतीस तो फारसें महत्त्व देत नाहीं.

यास्क उपमा शब्दाची व्याख्या देतो (३.१३) आणि तिचे कर्मोपमा, भूतोपमा, रूपोपमा, सिद्धोपमा, लुप्तोपमा, अथवा अर्थोपमा इ० भेद दाखवितो (३ १५–१८.). तथापि मूळ निरुक्तामध्यें वारंवार पडलेली विशेषतः वैकल्पिक व्युत्पत्तींची भर व सर्व शब्दांची कांहीं तरी करून व्युत्पत्ति लावावयाची हा आग्रह यामुळें चिकित्सक दृष्टीनें त्यांत कांहीं दोष आढळतात. यानंतर आपणांस भाषाशास्त्रविषयक सामान्यकल्पना दर्शनें व व्याकरणग्रंथ यांमध्यें शब्दनित्यत्व, शब्द शब्दार्थसंबंध इत्यादि बाबतींत व साहित्यग्रंथांत स्फोट, अभिधा, लक्षणा, व्यंजना वगैरेचें विवेचन करतांना व्यक्त केलेल्या आढळतात. त्यांचें विस्तृत विवेचन करण्यास येथें अवकाश नाहीं.

भाषाशास्त्राचा पश्चिमेंत उदय—युरोपमध्य ग्रीस आणि रोम येथें हळू हळू व्याकरणशास्त्राची परिणति होत होती. ॲरिस्टॉटल याने शब्दांच्या जाती आणि विभक्तींची कल्पना प्रथम प्रचारात आणली. त्यानंतर स्टाइक तत्त्ववेत्त्यांनीं त्याची परंपरा पुढें चालविली व त्यांनीं योजिलेल्या कांहीं व्याकरणविषयक पारिभाषिक संज्ञा आजहि प्रचलित आहेत. अर्थात् त्यांतील कांहींचें लॅटिनमध्यें येतांना विचित्र रूपांतर झालेलें आहे. यानंतर अलेक्झांड्रा हें संस्कृतीचें, तसेंच भाषाशास्त्रविषयक अभ्यासाचें केंद्र होतें. येथील अभ्यासकांनीं मुख्यतः जुन्या काव्यांचा अभ्यास चालविला होता. तथापि त्याच्या अभ्यासानें भाषेच्या स्वरूपाचें ज्ञान किंवा व्युत्पत्तिशास्त्र या विषयांत फारशी प्रगति झाली नाहीं व त्यानंतर येणाऱ्यांनीं या बाबतींत फारसें कार्य केलें नाहीं.

मध्ययुगांतहि आपणांस हीच स्थिति आढळून येते. त्यावेळीं धार्मिक भाषा म्हणून लॅटिन भाषेचा अभ्यास करण्यांत येत असे परंतु तोहि शास्त्रीय पद्धतीनें होत नसे आणि त्यावेळच्या लोकभाषा–ज्यांतून पुढें आजकालच्या वाङ्मयीन भाषा निघाल्या–त्यांचाहि अभ्यास यथातथाच चालत असे.

विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या काळांत विशेषतः ग्रीक भाषेच्या अभ्यासाला महत्त्व येऊन त्यावेळच्या लोकांची दृष्टि विकसित झाली. तसेंच लॅटिन भाषा ही तिच्या अभिजात व शुद्ध स्वरूपांत लिहिली व अभ्यासली जावी या गोष्टीला महत्त्व आल्यामुळें व्याकरणाच्या अभ्यासाकडे जास्त लक्ष जाऊं लागलें. त्यावेळीं सिसरोसारखें लॅटिन लिहिणें हेंच विद्वानांचें ध्येय असे. यावेळीं दळणवळणाचीं साधनें व आंतरराष्ट्रीय व्यवहार जास्त वाढल्यामुळें व देशी भाषेतील वाङ्मयासहि जास्त महत्त्व आल्यामुळें देशी भाषेच्या अभ्यासाकडेहि अधिकाधिक लक्ष जाऊं लागल्याचें पुढील शतकांत आपणास आढळून येतें. त्या अभ्यासाला प्रवर्तक अशी विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे छापण्याच्या कलेचा शोध ही होय. या मुद्रणकलेच्या साहाय्यामुळें परकीय भाषेचें अध्ययन करणें अधिक सुलभ झालें. तसेंच यावेळीं जुन्या करारांची भाषा म्हणून हिब्रू भाषेला धार्मिक भाषेंत महत्त्वाचें स्थान मिळाल्यामुळें त्या भाषेचें ज्ञानहि विद्वान मनुष्यांस आवश्यक होऊन बसलें.

युरोपमध्यें प्रचलित असलेल्या भाषांहून सर्वतः भिन्न असलेल्या या भाषेशीं झालेल्या परिचयामुळें भाषाशास्त्रीय अभ्यासाला चालना मिळाली. परंतु त्यामुळें त्यांत अनेक दोष शिरण्यालाहि वाव मिळाला. कारण सेमिटिक वंशाचें भाषाशास्त्रांतील स्थान त्यावेळीं निश्चितपणें माहीत नसल्यामुळें व हिब्रू ही पॅरेडाइज मधील भाषा अशी समजूत असल्यामुळें हीच सर्व भाषांची मूळ प्रकृतिरूप भाषा अशी समजूत झाली आणि त्यामुळें हिब्रू व तत्कालिन यूरोपीय भाषा यामध्यें आढळणारीं अनेक विचित्र व काल्पनिक साम्यें या वरील समजूतीस आधार म्हणून देण्यांत येऊं लागलीं. विशेषतः हिब्रू भाषा ही उजवीकडून डावीकडे लिहिली जात असल्यामुळें ज्या दोन शब्दांच्या अर्थांत कांहीं साम्य दिसेल त्या दोन शब्दांतील अक्षरें त्यांतील सादृश्य दाखविण्याकरितां वाटेल तशीं फिरविण्याकडे प्रवृत्ति होऊं लागली; तथापि यामुळें जरी अनेक चुकीच्या व्युत्पत्ती पुढें करण्यांत आल्या तथापि यांतूनच चिकित्सक वृत्तीच्या अभ्यासकांना अधिक व्यवस्थित व पद्धतशीर अभ्यास करण्यास साधन मिळालें.

गॉथॉनिक भाषेंत प्रसिद्ध झालेल्या कांहीं पुस्तकांमध्यें व विशेषतः वुल्फिलाचें ' बायबल 'चें गॉथिक भाषेंतील भाषांतर प्रसिद्ध झाल्यामुळें या भाषांच्या सतराव्या व अठराव्या शतकांतील स्वरूपाचा ऐतिहासिक अभ्यास करण्यास साधन मिळालें.

तथापि या वेळच्या भाषाशास्त्राच्या अभ्यासाची एका भाषेच्या निरनिराळ्या शतकांतील स्वरूपाचा अभ्यास करून तिचा इतिहास शोधण्यापेक्षां तत्कालीन अनेक प्रचलित भाषांची तुलना करण्याकडे अधिक प्रवृत्ति दिसून येते. उदा. लिब्निट्झ या तत्ववेत्त्यानें 'पीटर दि ग्रेट' यास आपल्या साम्राज्यांतील निरनिराळ्या भाषांचे नमुने व शब्दसंग्रह जमविण्यासाठीं प्रवृत्त केलें. या लिब्निट्झच्या प्रयत्नामुळें व दुसरी कॅथेराइन या राणीनें या बाबतींत दाखविलेल्या उत्साहामुळें आपणांस तत्कालीन भाषांतील पॅलॅस, हरॉस व ॲडेलुंग यांचे शब्दसंग्रह उपलब्ध झाले आहेत. या संग्रहांत जरी कांहीं उणीवा असल्या व व्याकरणापेक्षां कोशाच्या दृष्टीनेंच त्यांचें महत्त्व अधिक असलें तरी एकोणिसाव्या शतकांतील भाषाशास्त्रीय अभ्यासाचा पाया या ग्रंथांनींच घातला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं व तसेंच दोन भाषांतील नातें शोधावयाचें असल्यास त्यांतील शब्दसंग्रहापेक्षां व्याकरणविषयक साम्यच अधिक महत्त्वाचें आहे ही गोष्ट हरवॅस यानेंच प्रथम निदर्शनास आणली.

लॅटिन भाषेचा अभ्यास--तौलनिक भाषाशास्त्राच्या अभ्यासास सुरवात होण्यापूर्वी तत्कालीन भाषाशिक्षणासंबंधींच्या कल्पनांचें व पद्धतीचें थोडेसें निरीक्षण केलें असतां आपणांस असें आढळून येतें कीं, त्यावेळीं मुख्यतः लॅटिन भाषा शिकविली जात असे व व्याकरणाचा अभ्यासहि फक्त लॅटिन भाषेतूनच केला जात असे. त्यामुळें लॅटिन व्याकरणास विशेष महत्त्व आलें होतें; एवढेंच नव्हे तर सामान्यतः दुय्यम शाळेला व्याकरणशाळा (इंग्लंड) किंवा लॅटिनशाळा (डेन्मार्क) असें संबोधित असत. त्यामुळें तत्कालीन लोकभाषांतून जे व्याकरणविशेष वास्तविक आढळत नसत ते मुद्दां लॅटिन भाषेच्या वर्चस्वामुळें त्यांवर लादले जात असत व ही प्रवृत्ति अजूनहि आपणांस दृष्टीस पडते. आजहि आपणांला लॅटिन भाषेचा ज्यावर परिणाम झालेला नाहीं असें कोणत्याहि भाषेचें एकहि व्याकरण आढळणार नाहीं.

लॅटिन भाषा ही निरनिराळ्या देशांत कशी बोलली जात असे इकडे लक्ष न देतां ती लिहिली कशी जात असे व कशी लिहिली पाहिजे याच गोष्टीकडे लक्ष देऊन तिचा अभ्यास होत असे. त्यामुळें ध्वनीपेक्षां अक्षरांसच अधिक महत्त्व दिलें जात असे. भाषा ही प्रथम बोलली जाते व नंतर लिहिली जाते या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें जात असे आणि यामुळें अनेक व्युत्पत्तिशास्त्रीय नियमांकडे दुर्लक्ष होत असे. याचा एकंदर भाषाशास्त्रीय अभ्यासावर बराच परिणाम झालेला आपणांस दिसून येतो. त्याचप्रमाणें लॅटिन भाषेचा अभ्यास हा विद्वान लोकांस एकमेकांशीं दळणवळण ठेवण्याचा मार्ग म्हणून केला जात असे आणि त्यामुळें लॅटिन भाषेच्या व्याकरणाचा अभ्यास वर्णनात्मक असण्यापेक्षां विधानात्मक स्वरूपाचा असे; म्हणजे, अमुक अमुक पद्धतीनें लिहिलें असतां तें शुद्ध व इतर अशुद्ध अशा तऱ्हेचे आदेश व्याकरणापासून मिळत असत. त्यामुळें तत्कालीन व्याकरणाची व्याख्या म्हणजे शुद्ध कसें बोलावें व शुद्ध कसें लिहावें हें समजण्याची कला, ही होती. जे. सी. स्कॅलिगर यानें व्याकरण शिकण्याचा उद्देश, शुद्ध लिहितां यावें व अशुद्ध लेखन टाळतां यावें असा दिला आहे व हीच पद्धति पुढें इतर लोकभाषांचें व्याकरण शिकतांनाहि अनुसरली गेली. शब्दसंग्रहाकडेहि पाहण्याची दृष्टि अशीच होती हें आपणांस त्यावेळच्या फ्रेंच व इटालियन विद्यापीठांनीं प्रसिद्ध केलेल्या कोशांवरून दिसून येतें. हे कोश सर्वशब्दसंग्राहकस्वरूपाचे नसून अभिजात शब्ददर्शकस्वरूपाचे होते ही गोष्ट पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत दाखविलीच आहे.

त्याप्रमाणेंच भाषेतील वाक्प्रचार अथवा शब्दांचीं रूपें जेथें भिन्न भिन्न स्वरूपाचीं आढळतील तेथें कोणत्या तरी एकास महत्त्व देऊन बाकीचीं अशुद्ध ठरविण्याकडे प्रवृत्ति असून या बाबतींत कांहीं कांहीं वेळीं बुद्धीस न पटणारे किचकट नियम देण्यांत येत असत. यामुळें एखाद्या प्रयोगाची व्याकरणशुद्धता ठरविणें झाल्यास अनेकदां त्यांतील तर्कशुद्धता ही लॅटिन शब्दप्रयोगाशीं साम्याच्या आधारावरच अवलंबून ठेविलेली आपल्या दृष्टीस पडते आणि त्यामुळें जिवंत भाषांच्या वाढीस अडथळा झालेला दिसून येतो.

भाषेच्या उत्पत्तीविषयीं कल्पना--अठराव्या शतकांत भाषेची नैसर्गिक उत्पत्ति कशी झाली असावी यासंबंधीं कांहीं तत्ववेत्त्यांनीं विचार केलेला आपणांस आढळतो. रूसो याची अशी कल्पना होती कीं, आरंभीच्या मनुष्यांनीं मुद्दाम एकत्र बसून आपसांत संकेत ठरवून त्याप्रमाणें एखादी भाषा बनविली असावी, परंतु यामध्यें प्रथम संकेत ठरविण्याकरतां तरी एकमेकांचें मनोगत या मनुष्यांनीं एकमेकांस कसें कळविलें असावें हा प्रश्न उत्पन्न होतोच. कॉडिलॅकच्या मतें, प्रथम भाषा अवगत नसलेल्या स्त्रीपुरुषांनीं कांहीं स्वाभाविक उद्गार काढून किंवा खुणांनीं आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या असाव्या व विशिष्ट वस्तु कांहीं आवाज व खुणा यांच्या द्वारें दिग्दर्शित करून विशिष्ट अर्थ त्याच त्याच खुणेची पुनरुक्ति करून तीस जोडला असावा व या व्यक्तींची मनोगत व्यक्त करण्याची शक्ति जरी मर्यादित असली तरी त्यांच्या मुलांच्या बाबतींत तिची वाढ झाली असावी व याप्रमाणें भाषेची प्रगति झाली असावी. जोहान गॉट्फ्रेड हर्डर यानें आपल्या 'भाषेची उत्पत्ति' या निबंधांत प्रथम भाषा ही ईश्वरप्राप्त देणगी आहे हें मुस्लिमलक वगैरे जुन्या लोकांचें मत खोडून काढून भाषा ही मनुष्यप्रणीतच आहे असें प्रतिपादन केलें. यांचें एक कारण त्यानें

असें दिलें आहे कीं, भाषा ही जर ईश्वरप्रणीत असेल तर ती पूर्णपणें तर्कशुद्ध असली पाहिजे. परंतु सध्यांच्या भाषेंत इतकी अव्यवस्था व घोटाळा आढळतो कीं, ती ईश्वरप्रणीत असणें शक्यच नाहीं. त्याप्रमाणेंच भाषा ही मनुष्यानें एखाद्या शास्त्रीय सिद्धांताप्रमाणें शोधून काढली हेहि मत हडैरनें त्याज्य ठरविलें आहे. भाषा ही हेतुपुरस्सर बनविलेली नसून ती मनुष्याच्या गरजेप्रमाणेंच बनत गेली आहे व मनुष्याच्या गर्भाची जन्मण्याकरितां धडपड चाललेली असते त्याप्रमाणेंच भाषा ही मनुष्याच्या स्वाभाविक प्रेरणेनें उत्पन्न झाली असली पाहिजे व तिचें मूळ मनुष्याच्या निरनिराळ्या भावनांचें व विकारांचें व्यक्तीकरण हेंच होय. परंतु एवढ्यानेंच केवळ भाषेंतील सर्व शब्दांची व प्रयोगांची उपपत्ति लागत नाहीं. स्वाभाविक भावना व्यक्त करणें एवढाच व्यापार मानव करीत नसून पशूपेक्षां त्याचे व्यापार अनेकविध प्रकारचे असतात व त्यांचें निरीक्षणहि विविध असतें व कांहीं गोष्टी पाहून त्यांचा तो सूक्ष्म विचार करतांना आढळतो. उदा. बँ बँ करणारें बकरें त्यानें ऐकलें म्हणजे त्याचा आवाज त्याच्या लक्षांत राहून पुन्हां जेव्हां तो प्राणी त्याच्या नजरेस पडतो तेव्हां हा बँ बँ करणारा प्राणी आहे हें ओळखून कांहीं दिवसांनीं तो त्यास बकरें हें नांव देतो. याप्रमाणें क्रियापदांची उत्पत्ति होऊन पुढें त्याप्रमाणेंच नामांची उत्पत्ति होते. याचे उलट जर भाषा ही ईश्वरनिर्मित असती तर याच्या उलट पद्धतीनें म्हणजे नामापासून ती तयार झाली असती, कारण तीच पद्धति अधिक तर्कशुद्ध आहे. तसेंच प्राथमिक अवस्थेतील मनुष्यास आपल्या मनांतील निरनिराळ्या भावनांचे सूक्ष्म भेद वर्णन करण्यास फार कठिण पडतें व तें अप्रत्यक्ष रीतीनें व कांहीं उपमा किंवा रूपक देऊन करावें लागतें. याप्रमाणें एका बाजूस शब्दांचें दुर्भिक्ष आढळतें तर उलट एकच पदार्थास अनेक समानार्थक शब्द किंवा नांवें प्रचलित असल्यामुळें कांहीं बाबतींत शब्दांचें वैपुल्य आढळतें. इ. स. १७९४ मध्यें बर्लिन ॲकॅडमीनें पूर्ण परिपक्व भाषेचे ध्येय व त्याप्रमाणें युरोपांतील मुख्य भाषांची तुलना या विषयावर निबंध मागविले होते. या चढाओढींत डी. जेनिश याच्या निबंधास बक्षीस मिळालें. या निबंधांत जेनिश यानें मुख्यतः असें दाखविलें कीं, भाषेच्या स्वरूपावरून मनुष्याच्या स्वभावाचें बौद्धिक व नैतिक ज्ञान होतें व पूर्ण भाषेमध्यें विशेषतः पुढील गोष्टी असणें आवश्यक आहे–(१) शब्दवैपुल्य, (२) सामर्थ्य किंवा जोर, (३) स्पष्टता व (४) गौरव. जेनिश यानें त्यावेळच्या भाषांची तुलना मोठ्या विद्वत्त्वपूर्ण दृष्टीनें केली आहे. या निबंधाचा त्यावेळच्या विद्वानांनीं फारसा परामर्ष घेतलेला आढळत नाहीं व लेफमन यानें तर हा निबंध लिहिणारा किंवा तो लिहिण्यास सांगणारा यांपैकीं अधिक मूर्ख कोण हें ठरविणेंच अधिक कठिण आहे असा त्यावर शेरा मारला आहे. तथापि निरनिराळ्या भाषांच्या तौलनिक अभ्यासाच्या दृष्टीनें हा निबंध महत्त्वाचा आहे.

संस्कृत भाषेशीं परिचय--एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं आपणांस अभ्यासामध्यें ऐतिहासिक दृष्टि प्रथमच उत्पन्न झालेली दिसते. यामुळें भाषाशास्त्राच्या अभ्यासांतहि फरक पडलेला आपणांस दिसून येतो आणि भाषेचा ऐतिहासिक दृष्टीनें अभ्यास सुरू झाल्याबरोबर मानवशास्त्र व मनुष्येतिहास यांकडेहि अभ्यासकांचें लक्ष वेधल्याचें आपल्या दृष्टीस पडतें. याच वेळेला युरोपीय लोकांना संस्कृत भाषेचें प्रथम ज्ञान झाल्यामुळें भाषाशास्त्रीय अभ्यासाला नवीन चालना व दृष्टि प्राप्त झाली. कुर्डो नांवाच्या एका फ्रेंच जेसुइट मिशनरीनें १७६७ मध्यें फ्रेंच इन्स्टिट्यूटला एक निबंध पाठवून त्यांत अनेक संस्कृत व लॅटिन शब्दांतील साम्य नजरेस आणलें. परंतु त्याकडे त्यावेळच्या अभ्यासकांचें फारसें लक्ष गेलें नाहीं. इ० स. १७९६ मध्यें सर विल्यम जोन्स यानें असें प्रसिद्ध केलें कीं संस्कृत भाषेची रचना अत्यंत आश्चर्यकारक असून ती ग्रीक भाषेपेक्षां अधिक पूर्ण व लॅटिन भाषेपेक्षां अधिक समृद्ध आणि दोहोंपेक्षांहि अधिक सुसंस्कृत अशी असून त्या दोन्ही भाषांशीं तिचें धातु व व्याकरणविशेष यामध्यें अतिशय साम्य दृष्टीस पडतें व तें इतकें स्पष्ट आहे कीं, तें आपाततः आलेलें नसून कोणाहि व्युत्पत्तिशास्त्रज्ञास या तीनहि भाषा मूळ एकाच परंतु सध्यां अस्तित्वांत नसलेल्या भाषेपासून निघाल्या असाव्या असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. तसेंच गाथिक व केल्टिक भाषा यांचाहि संबंध संस्कृत भाषेशींच निकटचा असून जुनी फारसी भाषाहि त्याच वंशांत मोडते. तथापि सर विल्यम जोन्स यानें या भाषांची तुलना करून पुढें अधिक निष्कर्ष काढण्याचें काम फारसें केलें नाहीं व ती गोष्ट पुढील तरुण अभ्यासकांच्या वांटयास आली.

तौलनिक व्याकरण--यानंतर आपणांस फ्रे. व्हॉ. श्लेगेल यानें प्रसिद्ध केलेल्या पुस्तकामध्यें संस्कृत व जर्मन, ग्रीक आणि लॅटिन या भाषांतील शब्दांची तुलना केलेली आढळते. यानें संस्कृत भाषेचा पॅरिसमध्यें अभ्यास केला होता व संस्कृत भाषेच्या व भारतीय धर्माच्या अभ्यासापासून युरोपीय विचारपरंपरेवर विद्यापुनरुज्जीवनापेक्षांहि अधिक परिणाम होईल असें त्याचें म्हणणें होतें. यानें वरील भाषांमध्यें केवळ शाब्दिक साम्य नसून व्याकरणरचनेमध्येंहि या भाषांत बरेंच साम्य आहे ही गोष्ट निदर्शनास आणली व तौलनिक व्याकरणाचा पाया घातला. यानें जगांतील भाषांचे मुख्य दोन वर्ग केले–एक संस्कृत व तत्संबद्ध भाषा आणि दुसरा इतर सर्व भाषा. भाषेच्या उत्पत्तीसंबंधानें श्लेगेल यांचें असें मत होतें कीं, निरनिराळ्या भाषांच्या

रचनेमध्ये जेथें फरक आढळून येतो तेथें त्या भाषांची उत्पत्ति भिन्न असली पाहिजे. उदा. मांचू भाषेसारख्या भाषांमध्ये अनुकरणात्मक शब्द इतके आढळतात कीं, ती भाषा बनतांना निसर्गातील निरनिराळ्या ध्वनींचें अनुकरण यास महत्त्व दिलें गेलें असावें. उलट संस्कृतसारख्या प्रत्यययुक्त भाषांमध्ये ध्वनींच्या अनुकरणास तितकें महत्त्व नसावें. यानें केलेल्या द्विवर्गीय वर्गीकरणामध्येंच पुढच्या त्रिवर्गात्मक वर्गीकरणाचें मूळ आपणांस सांपडतें व याचा भाऊ एं. डब्ल्यु. श्लेगेल यानें या त्रिवर्गात्मक वर्गीकरणास स्पष्ट स्वरूप दिलें, तें असें–(१) एकाक्षरी शब्दांच्या भाषा, (२) प्रत्ययी भाषा, व (३) विकरणात्मक भाषा. यांतील विकरणात्मक भाषा तो सर्वांत श्रेष्ठ समजतो.

यानंतर रासमस रास्क यानें आइस्लेंडिक भाषेचा अभ्यास करून व प्राचीन नॉर्स भाषांच्या उत्पत्तीवर निबंध लिहून भाषाशास्त्रीय अभ्यासास चालना दिली. या निबंधांत त्यानें गॉथॉनिक, स्लॅव्होनिक, लिथुअनिअन, लॅटिन व ग्रीक या भाषांतील अनेक शब्दांच्या साम्यावरून या भाषांचें एक तुलनात्मक व्याकरण दिलें आहे. यास आशियांतील भाषांचें विशेषसें ज्ञान नसल्यामुळें यानें फक्त फारसी व भारतीय भाषा यांचा संबंध ग्रीक भाषेमार्फत आइस्लेंडिक भाषांशीं आला असावा एवढेंच ध्वनित केलें आहे. यानें गॉथॉनिक भाषांची पूर्वज ग्रीक भाषा असावी असें म्हटलें आहे. परंतु त्या बाबतींत किंचित अनिश्चितता दाखवून या सर्वच भाषा एखाद्या अज्ञात व सध्यां मृतावस्थेंत असलेल्या भाषेपासून निघाल्या असाव्या असें सुचित केलें आहे. यानें आपल्या एका पत्रांत या भाषावंशांचें पुढीलप्रमाणें वर्गीकरण दिलें आहे: भारतीय(दख्खनी, हिंदुस्थानी), इराणी (फारसी, आर्मीनियम, ओसेटिक); थ्रेशिअन (ग्रीक, लॅटिन), सरमेशिअन (लेटिक, स्लॅव्होनिक); गॉथिक (जर्मानिक, स्कॅंडिनेव्हियन); केल्टिक (ब्रिटॅनिक, गेलिक). याच वेळीं त्यानें फिनोउग्रिअन भाषावंशाचेंहि वर्गीकरण दिलें आहे व तें आजहि कांहीं अर्वाचीन वर्गीकरणापेक्षां अधिक चांगलें आहे असें वुइल्हेम थॉमसेन आणि एमिल सेट्राला यांसारख्या भाषाशास्त्रज्ञांनीं म्हटलें आहे. यानें झेंद भाषेचें नक्की स्थान ओळखून भारतीय व फारसी भाषांचें निरीक्षण करून त्यावर एक निबंध लिहिला होता; तसेंच द्राविड भाषा या संस्कृत भाषेपासून सर्वतः भिन्न आहेत ही गोष्टहि यानेंच प्रथम निदर्शनास आणली. यानें स्वीडन, फिनलंड, रशिया, कॉकेशस, इराण व हिंदुस्थान यांमधून प्रवास करून अनेक भाषांचें ज्ञान प्रत्यक्ष मिळविलें होतें व अनेक भाषांचीं व्याकरणें लिहिलीं होतीं. तीं पध्दतशीर व शुध्द असून त्या त्या भाषांचें स्वरूप समजण्यास फार उपयुक्त आहेत.

ग्रिमबंधू—जेकब ग्रिम यानें लोककथा व लोकगीतें यांचा संग्रह करून लोककथाशास्त्राचा पाया घातला. प्रथम भाषाशास्त्राकडे याचें विशेष लक्ष नव्हतें. तथापि श्लेगेल याच्या टीकांमुळें व रास याचें उदाहरण समोर असल्यामुळें यानें भाषाशास्त्राचा–विशेषतः प्राचीन जर्मन भाषा व तत्संबध्द भाषांचा–पध्दतशीर अभ्यास सुरू केला. त्याचें मत असें होतें कीं, प्रत्येक लहानसहान पोटभाषांना व बोलींना सुध्दां स्वतंत्र स्थान देऊन त्यांचा पृथक्पणें अभ्यास करणें इष्ट असून सारखेच महत्त्वाचें आहे. यामुळें उपभाषांसहि आजपर्यंत जें महत्त्व मिळत नव्हतें तें यापुढें मिळूं लागलें. श्लेगेल यानें असें म्हटलें आहे कीं, ग्रिम बंधूंनीं जुनें राष्ट्रीय वाङ्मय व लौकिक परंपरागत कथावाङ्मय यांसहि व्युत्पत्तिशास्त्रदृष्टया ग्रीक, लॅटिन किंवा बायबल यांच्या भाषांइतकेंच महत्त्व दिलें व त्यामुळें त्यांनीं व्युत्पत्तिशास्त्राचें क्षेत्र बरेंच विस्तृत केलें. आजपर्यंत व्युत्पत्तिशास्त्रज्ञ अलिखित लोककथा, गीतें, दंतकथा यांना जो कमीपणा देत असत तो काढून टाकून त्यानें व्युत्पत्तिशास्त्राच्या अभ्यासास राष्ट्रीय व लोकप्रिय असें स्वरूप देऊन पृथ्वीवरील सर्व राष्ट्रें व मनुष्यजातीचा मानसिक आयुष्यक्रम यांचा तौलनिक व शास्त्रीयदृष्टया अभ्यास करणें किती इष्ट आहे व त्या मानानें लिखित वाङ्मय हा त्या क्षेत्राचा किती अल्प अंश आहे हें दाखवून दिलें. यानें ऐतिहासिक व तौलनिक व्यापक स्वरूपाचें जर्मन व्याकरण लिहून जर्मन भाषेची वाढ कसकशी होत गेली याचें स्पष्टीकरण केलें. यानें आपल्या व्याकरणांत कोणतेहि निर्बंध घालण्याच्या ऐवजीं भाषेचें स्वरूप स्वाभाविकपणें कसें बदलत गेलें आहे हें दाखविलें. त्यानें असें प्रतिपादिलें आहे कीं, 'व्याकरणामध्यें केवळ तर्कपध्दति अनुसरणें याच्या मी विरुध्द आहें कारण त्यामुळें जरी निरनिराळ्या संज्ञांच्या व्याख्या निश्चित करतां आल्या तरी त्यामुळें निरीक्षणाचें क्षेत्र मर्यादित होतें आणि ऐतिहासिक स्वरूपनिरीक्षण हाच वास्तविक भाषाशास्त्राचा आत्मा होय. माझी दृष्टि आपल्या भाषेचें स्वरूप व स्थल कालमानाप्रमाणें कसें बदलत गेलें आहे हें पाहण्याची असल्यामुळें निरनिराळ्या पोटभाषांकडे व आपल्या भाषेशीं संबध्द असलेल्या परकीय भाषांकडेहि मला क्रमाक्रमानें दृष्टि देणें जरूर पडतें.' याप्रमाणें आपणांस भाषाशास्त्राच्या ऐतिहासिक अभ्यासाचें स्पष्ट स्वरूप या ठिकाणीं दृष्टीस पडतें व याच दृष्टीस भाषाशास्त्रांत यापुढें विशेष महत्त्व प्राप्त झालें. ग्रिमच्या अभ्यासावर रास्क याच्या लेखनाचाहि विशेष परिणाम झालेला आढळतो. ग्रिमचें सूत्र म्हणून पुढें प्रसिध्दीस आलेला भाषाविषयक सिध्दांत यानेंच प्रथम पुढें मांडला. त्याच्या व्याकरणाच्या चौथ्या भागामध्यें त्याची विद्वत्ता, सूक्ष्म निरीक्षणशक्ति आणि ऐतिहासिकपध्दति आपणांस स्पष्टपणें दिसून येते.

फ्रांझ बॉप--अर्वाचीन भाषाशास्त्राचा पाया घालणाऱ्यांपैकीं तिसरा महत्त्वाचा मनुष्य फ्रँन्झ बॉप हा होय. यानें संस्कृत, ग्रीक, लॅटिन व टयुटॉनिक भाषांचा तौलनिक अभ्यास करून ग्रंथरचना केली. याची दृष्टि व्याकरणांतील निरनिराळ्या रूपांचा उगम शोधण्याकडे होती. यानें असें म्हटलें आहे कीं ग्रीक, लॅटिन किंवा युरोपीय भाषा, आज ज्या स्वरूपांत आपणांस संस्कृत भाषा ग्रंथांतून लिहिलेली आढळते त्या स्वरूपांतील संस्कृत भाषेपासून निघालेल्या नसून या सर्व एका मूळ भाषेच्या विकृती असाव्या. मात्र त्या मूळ भाषेचें स्वरूप संस्कृत भाषेमध्यें अधिक स्पष्टपणें कायम राहिलें असावें, व ज्याप्रमाणें आपणांस ग्रीक व लॅटिन भाषेंतील शब्दांचीं मूळ रूपें शोधून काढण्यास संस्कृत भाषेचा उपयोग होतो त्याप्रमाणें संस्कृत व्याकरण स्पष्ट करण्यासहि या भाषांचा उपयोग होतो. यानें संस्कृत, ग्रीक वगैरे भाषांतील शब्दांचीं सारखीं दिसणारीं रूपें एकत्र करून त्यांपैकीं सर्वांत जुनीं रूपें कोणतीं असावीं हें पाहून त्यावरून या सर्व रूपांचें मूळ शोधून काढण्याचा प्रयत्न केला. परंतु या प्रयत्नांत त्यानें प्रचलित व्याकरणापेक्षां तात्त्विक व्याकरणावरच अधिक भर दिला होता. गॉटफ्रड हर्मन यानें तार्किक पद्धतीस अनुसरून प्रत्येक वाक्याचे तीन मूलभाग असतात असें म्हटलें ते असे-१ उद्देश्य, २ विधेय व ३ संयोजक. ज्या अर्थी क्रियापद हेंच उद्देश्य व विधेय यांस जोडण्याचें कार्य करतें त्याअर्थी वास्तविक फक्त 'असणें' हें एकच क्रियापद असूं शकतें. बॉपचा अध्यापक सिल्व्हेस्त्र सॅसी यानेंहि असेंच म्हणणें होतें व बॉपनेंहि त्याचाच पुनरुच्चार केला. तो म्हणतो क्रियापद याचा वास्तविक अर्थ कर्त्यास तत्संबद्ध विधानार्शी जोडण्याचें कार्य करणारा शब्द हा होय. आणि त्यामुळें एकाच क्रियापदानें अस्तित्व शक्य आहे आणि तें म्हणजे 'असणें' हें होय. ग्रीक, लॅटिन वगैरे सारखी रचना असलेल्या भाषा एकाच क्रियापदानें कोणतेंहि तर्कशुद्ध विधान करूं शकतात व त्यामुळें संस्कृत भाषेंतील 'अस्' आणि 'भू' हे अस्तिवाचक धातू प्रत्येक क्रियापदाच्या रूपाच्या मुळार्शी आहेत असें त्याचें म्हणणें आहे. तसेंच आज जे आपणांस प्रत्यय म्हणून दिसतात ते पूर्वी स्वतंत्र शब्द होते ही गोष्टहि त्यानें पुढें मांडली आहे. अर्थात हॉनेब्रुक यानें ही गोष्ट पूर्वीच दिग्दर्शित केली होती. तसेंच त्यानें संस्कृत व तत्संबद्ध भाषांतील धातु आणि सेमिटिक धातु यांतील फरक दाखवून दिला आहे. क्रियापदांच्या शेवटीं असलेले पुरुषवाचक प्रत्यय हे पूर्वीचीं सर्वनामें असावीं ही गोष्ट शिडिअस आणि रास्क यांनींच प्रथम नजरेस आणली होती. बॉपनेंहि तेंच मत ग्राह्य धरलें आहे. बॉपनें निरनिराळ्या भाषांतील नात्यांचा अभ्यास रास्कच्या इतका सूक्ष्मपणानें केलेला आढळत नाहीं, त्यामुळें त्यानें फारसी भाषा ही संस्कृत भाषेपेक्षां जर्मन भाषेस अधिक जवळची आहे असें विधान केलें आहे व त्यानें मलायो-पॉलिनेशियन भाषा व इंडो-युरोपीय भाषा यांचा संबंध जोडण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि एकंदरींत त्यानें व्युत्पत्तिशास्त्र व तौलनिक व्याकरण यांच्या अभ्यासांत फारच मोठी भर टाकली व आपल्या पध्दतींतहि पुढें पुष्कळ सुधारणा केल्या ही गोष्ट स्पष्ट आहे. त्यानें नवीन नवीन समस्वरूपी भाषा विचारांत घेऊन आपलें निरीक्षणक्षेत्र पुष्कळच विस्तृत केलें व केल्टिक भाषांचें स्थान निश्चित केलें व एकंदरींत तौलनिक व्याकरणाच्या अभ्यासाची पुष्कळांस गोडी लावली. यानें भाषांचें तीन वर्गांमध्यें मुख्यतः वर्गीकरण केलें आहे-(१) अधातुभाषा. उदा. चिनी वगैरे. (२) एकाक्षरधातुभाषा. उदा. इंडो-युरोपीय वगैरे. (३) द्व्यक्षरधातुभाषा. उदा. सेमिटिक. बॉपचें असें मत होतें कीं, भाषांच्या स्वरूपाची वाढ पूर्णपणें होऊन गेली असून अर्वाचीन काळीं त्यांची अवनती होत चालली आहे. जरी रचनेच्या दृष्टीनें त्यांची प्रगति होत असली तरी व्याकरणदृष्ट्या त्यांची अवनतीच होत आहे व पूर्वी व्याकरणदृष्ट्या भाषेची रचना पूर्ण स्वरूपाची असून वाक्यांतील प्रत्येक शब्दाचा इतर शब्दांशीं संबंध निश्चित स्वरूपाचा असून निरनिराळ्या शब्दांच्या रूपांचा मूळच्या रूपांशीं संबंध स्पष्ट असे. हंबोल्ट व श्लेपेर यांनींहि असेच विचार प्रदर्शित केले आहेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे बॉपनें शब्दांच्या रूपविकृतींचा अभ्यास सुरू केला व तौलनिक व्याकरणाची स्थापना व वाढ केली आणि हें त्यानें संस्कृत भाषेच्या अभ्यासाच्या साहाय्यानें केलें. रास्क यानें तीच गोष्ट संस्कृत भाषेच्या अभ्यासाशिवाय साध्य केली होती. पण तितक्या स्पष्ट स्वरूपांत ती मांडली गेली नव्हती तें काम बॉपनें केलें.

भाषेची अस्थिरता--यानंतरचा भाषाशास्त्रीय अभ्यासक विल्हेल्म हंम्बोल्ट हा होय. यानें जावांतील कवि भाषेवर ग्रंथ लिहिला आहे. याचें म्हणणें असें कीं, भाषेची पूर्ण वाढ अशी कधींच होत नसून तिच्याकडे एखादी पूर्णपणें तयार झालेली वस्तु अशा दृष्टीनें न पाहतां एक सतत चालू राहाणारी क्रिया या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. भाषेमध्यें कोणतीहि गोष्ट स्थिर नसून प्रत्येक क्षणीं तिचें स्वरूप बदलत असतें व लेखनांतहि तिला स्थिरता कधींहि प्राप्त होत नाहीं व ती जिवंत राहण्याकरितां ती बोलली व समजली गेली पाहिजे. यानें भाषांकडे पूर्ण व कमी पूर्ण याच दृष्टीनें पाहण्याची दृष्टि ठेविली. याच्या मतें एखाद्या रानटी टोळीच्याहि भाषेस कमी महत्त्व देऊन तिच्याकडे दुर्लक्ष करूं नये कारण असंस्कृत भाषेवरून आपणांस भाषा तयार करावयाच्या मूळ प्रवृत्तीचें चित्र किंवा स्वरूप पहावयास सांपडेल. चिनी भाषा ही त्यांतील कल्पनांस प्राधान्य दिल्यामुळें व इतर आनुषंगिक

गोष्टींचा त्याग केल्यामुळें महत्त्वाची आहे, तर मल्यु या भाषेचें साधें स्वरूप व सरळ रचनेमुळें महत्त्व आहे. पण सेमिटिक भाषांना त्यांतील निरनिराळ्या स्वरभेदांवरून अर्थामध्यें जो फरक दाखविण्यांत येतो त्यांतील कौशल्यामुळें महत्त्व आहे. बास्क भाषेला त्यांतील संक्षिप्तता व जोरदारपणा यामुळें महत्त्व आहे, तर दिलावेअर वगैरे अमेरिकन इंडियन लोकांच्या भाषांत ज्या गोष्टीकरितां आपण अनेक शब्द वापरतों त्या गोष्टी एकाच शब्दांत व्यक्त करण्याचें सामर्थ्य आहे. याप्रमाणें हंबोल्ट यानें निरनिराळ्या भाषांचें महत्त्व दिग्दर्शित केलें आहे व लहानसहान पोटभाषांकडेहि-त्या जणूं कांहीं इतरांपासून स्वतंत्र असून पूर्ण घटक आहेत या दृष्टीनें व निरनिराळ्या राष्ट्रांच्या मनोव्यापारांचें दिग्दर्शन करण्याचें साधन म्हणून त्यांकडे पाहिलें पाहिजे व राष्ट्रस्वभावदर्शक म्हणून त्यांस मानलें पाहिजे असें त्यानें प्रतिपादिलें आहे. यानें भाषेच्या वाढीचें आणि स्वरूपाचें वर्णन असें केलें आहे कीं, प्रथम भाषेमध्यें फक्त निरनिराळ्या वस्तूंचें दिग्दर्शन केलें जातें व त्यांतील संबंध समजावून घेण्याचें काम ऐकणाराचें असतें. कालांतरानें वाक्यांतील शब्दांचा क्रम निश्चित ठरून कांहीं शब्दांचें स्वतंत्रतेनें अस्तित्व नाहींसें होऊन त्यांच्याकडे या शब्दांच्या क्रमाप्रमाणें संबंधदिग्दर्शनाचें काम येतें व यांचेच पुढें प्रत्यय बनतात. तथापि प्राथमिक स्वरूपांत हे संबंधदर्शक दुवे स्पष्टपणें दृष्टीस पडतात. यानंतरच्या स्थितीमध्यें निरनिराळ्या शब्दांतील संबंध व्यक्त करण्याचें काम त्या शब्दांतील विकारांवरून व प्रत्ययांवरून होतें आणि शब्दांचे निरनिराळे वर्ग पडून प्रत्येक शब्द विशिष्ट वर्गामध्यें अंतर्भूत होऊन संबंधदर्शक शब्दांचा स्वतंत्र अर्थ नाहींसा होतो. यानें भाषांचें वर्गीकरण चार प्रकारांत केलें आहे-१ चिनीसारख्या व्याकरणविषयक रूपभेद नसलेल्या भाषा; (२)रूपविकारी भाषा; ३ चिकटया अथवा संश्लिष्ट भाषा; ४ समावेशक भाषा. या शेवटच्या भाषांत तो मेक्सिकन वगैरे ज्या अमेरिकन भाषांत कर्माचा क्रियापदाच्या रूपांतच समावेश होतो त्या भाषांचा अंतर्भाव करतो. तथापि या निरनिराळ्या प्रकारांत तितका वेगळेपणा नसून आपण संस्कृत व चिनी या दोन भाषांस विरुद्ध टोकांस बसविलें तर बाकीच्या सर्व भाषा यांच्या दरम्यान कोठेंतरी बसूं शकतात असें त्यानें म्हटलें आहे.

प्रगति कीं परागति--ग्रिमनें भाषा ही परमेश्वरानें उत्पन्न केलेली असणें शक्य नाहीं असें म्हटलें आहे. कारण भाषेंतील अनेक अपूर्णता व वरचेवर तिच्या स्वरूपांत होणारा फरक या गोष्टीच तिच्या दैवी संभवाच्या विरुद्ध आहेत. भाषेची वाढ हळू हळू होत जात असून ती मनुष्यानेंच घडवून आणलेली आहे आणि या बाबतींत मनुष्य आणि इतर प्राण्यांचे आवाज व गाणीं यांत आपणांस स्पष्ट फरक दिसून येतो. परमेश्वरानें प्रथम स्त्री व पुरुष यांस निर्माण केलें व तेंहि एकच दंपत्य निर्माण न करतां अनेक दंपत्यें निर्माण केलीं असावीं. कारण एकाच दंपत्यास कदाचित सर्व पुत्रच किंवा केवळ कन्याच होण्याचा संभव होता. या दंपत्यांच्या मुलांपासून पुढील मानवसृष्टि निर्माण झाली असली पाहिजे. हीं प्रथम उत्पन्न केलेलीं मनुष्यें भाषा प्रचारांत येण्यापूर्वी एकमेकांस आपले विचार कसे व्यक्त करीत असावीं यासंबंधीं ग्रिमनें कांहीं सांगितलें नाहीं. परंतु शब्द व त्यांचे अर्थ यांतील संबंध हा प्रथम केवळ स्वैर असला पाहिजे. भाषेच्या प्राथमिक अवस्थेचें वर्णन त्यानें असें केलें आहे कीं प्रथम केवळ अ, इ, उ हे तीनच स्वर अस्तित्वांत असून कांहीं व्यंजनांचे पुंज असावे. पहिले सर्व शब्द एकाक्षरी असून अमूर्त कल्पनावाचक शब्द प्रथम अस्तित्वांत नव्हते. शब्दांच्या स्वरूपांत पुल्लिंग व स्त्रीलिंगदर्शक जो भेद आढळतो तो समाजांतील स्त्रियांच्या प्रभावामुळें असावा व सर्व नामें हीं धातूंपासून उत्पन्न झालीं असावीं. भाषेच्या वाढीमध्यें तो तीन अवस्थांची कल्पना करतो. प्रथमावस्थेंत फक्त धातु आणि शब्द उत्पन्न झाले असावे. दुसऱ्या अवस्थेंत या शब्दांच्या स्वरूपांत अर्थानुसार विकार होत गेले असावे व तिसऱ्या अवस्थेमध्यें विचारांची वाढ होऊन शब्दांतील विकारांस पुन्हां त्याज्य ठरविलें असावें; परंतु ही अवस्था अजून पूर्णत्वास पोंचली नाहीं. भाषेचें सौंदर्य तिच्या प्राथमिक अवस्थेंत नमून आपणांस दुसऱ्या अवस्थेंत आढळतें व तिसऱ्या अवस्थेंत आपणांस तिचें फळ प्राप्त होणार आहे. प्राथमिक अवस्थेमध्यें भाषा कर्णमधुर परंतु विस्कळित स्वरूपाची असावी. मध्यावस्थेंत ती काव्यमय व जोरदार असून सांप्रत अवस्थेंत तिचें जरी सौंदर्य कमी झालें असलें तरी तिच्यामध्यें सुसंगतपणा व परिणामकारकता अधिक उत्पन्न झाली आहे. ग्रिमनें भाषांची दिवसानुदिवस अवनतीच होत चालली आहे असें प्रतिपादिलें आहे. सध्यांच्या भाषांच्या जुन्या स्वरूपांत आपणांस संपन्नता व पूर्णता अधिक दिसत असून त्यांचें मौतिक व आध्यात्मिक स्वरूप त्यावेळीं पूर्णपणें एकमेकांत मिसळलेलें होतें व ती सुसंगति आतां हळूहळू नष्ट झाली आहे व शब्दांतील स्वरूपविकारांचें स्थान आतां कांहीं अंशीं साहाय्यक शब्दांनीं घेतलें आहे. एकंदरींत भाषेच्या इतिहासावरून पूर्णतेपासून तिची परागतीच होत आहे हीच गोष्ट आपणांस इतरहि भाषाशास्त्रज्ञांनीं व्यक्त केलेली आढळते. परंतु ग्रिमनें एका ठिकाणीं असेंहि म्हटलें आहे कीं, 'जरी मानवी भाषेची आपणांस बाह्यतः कांहीं बाबतींत परागति होत असलेली दिसते तथापि सर्व बाजूंनीं विचार केला असतां तिची प्रगतीच होत असून तिच्यांतील अंतर्गत शक्ति सारखी वाढत आहे.' या बाबतींत त्यानें इंग्रजी भाषेचें उदाहरण दिलें आहे. या भाषेनें शब्दांतील रूपविकारांचा

त्याग करून सर्व ध्वनिशास्त्राचे नियम झुगारून दिले आहेत. तथापि इतर कोणत्याहि भाषेपेक्षां या भाषेमध्यें सामर्थ्य व जोर अधिक वाढलेला आहे. तिची रचना युरोपमधील दोन मोठमोठया भाषांच्या संयोगापासून झाली असून अर्वाचीन काळांतील महान् कवींचे विचार व्यक्त करण्यास तिला योग्य असें स्वरूप प्राप्त झालें आहे व जागतिक भाषेचें स्थान तिला प्राप्त झालें असून इंग्रज लोकांप्रमाणेंच जगांतील अनेक भागांवर तिचें वर्चस्व चालू राहील असा अंदाज दिसत आहे. परंतु श्लेपर या जर्मन पंडितानें अगदीं त्याच्या उलट अभिप्राय व्यक्त केला आहे. त्यानें इतिहास व वाङ्मय या दोन्हीहि दृष्टींनीं महत्त्वाच्या अशा राष्ट्राची भाषा ही किती त्वरित अवनति पावूं शकते याचें उदाहरण म्हणून इंग्रजी भाषेकडे बोट दाखविलें आहे.

भाषांचा वांशिक संबंध---बॉप व ग्रिम यांनीं भाषाशास्त्रीय अभ्यासावर व संशोधनावर बराच परिणाम केला आहे. त्यांनीं घालून दिलेल्या दिशेनें पुढील अभ्यासकांनीं संशोधन चालू ठेवून या शास्त्रांत पुष्कळ वाढ केली. भाषाशास्त्रीय प्रश्नांवर त्यांनीं बराच प्रकाश पाडला व व्युत्पत्तिशास्त्र जें पूर्वी अनिबद्ध रीतीनें विकास पावत होतें त्याची स्थिर पायावर उभारणी होऊन त्यास नियमबद्धता प्राप्त झाली. याचें मुख्यतः कारण युरोपांतील बऱ्याचशा भाषा व आशियांतील कांहीं महत्त्वाच्या भाषा या मूळ एकाच वंशांतील आहेत ही गोष्ट स्पष्ट होऊन पूर्वीची लॅटिन व ग्रीक भाषांतील शब्दांचा हिब्रू भाषेतील शब्दांशीं संबंध जोडण्याची प्रवृत्ति मागें पडली. या भाषावंशाला रास्क यानें प्रथम 'युरोपीय' व नंतर 'सारमॅटिक' आणि अखेरीस 'जॅफेटिक' (सेमिटिक आणि हॅमिटिक यांच्याशीं प्रतियोगी म्हणून) असें नांव दिलें आहे. बॉप यानें 'इंडोयुरोपीय' या नांवास प्राधान्य दिलें आहे व हेंच फ्रान्स, इंग्लंड व स्कँडिनेव्हिया या देशांत मान्यता पावलें आहे. तथापि जर्मनीमध्यें हँबोल्ट यानें 'सांस्कृतिक' व नंतर 'इंडो-जर्मानिक' हें नांव पसंत केलें आहे. या भाषावंशांतील पूर्व व पश्चिम या दोन विरुद्ध दिशांच्या टोकांस असलेल्या भाषांवरून 'इंडो-केल्टिक' हें नांव कांहींनीं सुचविलें आहे. तथापि हीं संयुक्त नांवें क्लिष्ट वाटतात. त्यापेक्षां 'आर्यन्' भाषा हें नांव अधिक सुटसुटित आहे व हेंच नांव सर्वांत विशेषतः प्राच्य भाषांमध्यें जुनें आहे. या कालच्या भाषाशास्त्रीय अभ्यासामध्यें संस्कृत भाषेस विशेष महत्त्व दिलें जात असे. मॅक्समुल्लरनें तुलनात्मक भाषाशास्त्राचा संस्कृत हाच स्थिर असा पाया असून हीच भाषा आपणांस मार्गदर्शक आहे व संस्कृत भाषेचें ज्ञान नसलेला तौलनिक भाषाशास्त्रज्ञ हा गणितांचें ज्ञान नसलेल्या ज्योतिषशास्त्रज्ञाप्रमाणें होय असें म्हटलें आहे परंतु पुढेंपुढें संस्कृत भाषेचें महत्त्व त्या मानानें कमी झालें व अर्वाचीन भाषाशास्त्रज्ञांची प्रवृत्ति एलिसच्या शब्दांत सांगावयाची म्हणजे अशी आहे कीं, 'भाषाशास्त्राचा अभ्यास संस्कृत भाषेच्या अभ्यासापासून सुरू करावयाचा म्हणजे उलट टोकास सुरुवात करण्यासारखें आहे. अर्थात संस्कृत भाषेचें ज्ञान युरोपांत झालें नसतें तर आपलें भाषाशास्त्राचें ज्ञान अगदींच बाल्यावस्थेंत राहिलें असतें व ज्यांनीं या भाषेचा संबंध युरोपीय भाषांशीं आहे हें दाखवून दिलें त्यांचे भाषाशास्त्रावर फार उपकर झाले. तथापि संस्कृत भाषेच्या अभ्यासापासून भाषाशास्त्राचा अभ्यास सुरू करणें म्हणजे प्राणिशास्त्राचा अभ्यास प्रस्तारावशेषशास्त्रापासून सुरू करण्यासारखें आहे किंवा जिवंत मनुष्याचा अभ्यास त्याच्या अस्थीपासून सुरू करण्यासारखें आहे.' त्याप्रमाणेंच या काळांत निरनिराळ्या भाषांतील साम्य शोधून काढण्याकडे अधिक प्रवृत्ति असल्यामुळें अभ्यासास एकदेशीपणा प्राप्त झाला होता व प्रत्येक भाषेच्या वैशिष्ट्याकडे दुर्लक्ष होत होतें. ही गोष्ट विशेषतः पॉट यानें नजरेस आणली व त्यानें तौलनिक भाषाशास्त्राबरोबर विशिष्ट भाषांचाहि अभ्यास करणें जरूर आहे असें प्रतिपादिलें व सध्यां याच गोष्टीकडे विशेष लक्ष्य दिलें जातें. तसेंच या काळीं भाषाशास्त्रज्ञांचें लक्ष मृत भाषांकडेच विशेष असे. उदा. ग्रिमच्या व्याकरणांत गॉथिक, प्राचीन उच्च जर्मन, प्राचीन नॉर्स इ. भाषांचें विवेचन विस्तृततेनें केलें असून त्यांच्या अर्वाचीन वाढीकडे त्या मानानें कमी लक्ष्य दिलें आहे. तसेंच बॉपच्या तौलनिक व्याकरणांत अभिजात ग्रीक व लॅटिन भाषांचें विवेचन काळजीपूर्वक केलें असून अर्वाचीन ग्रीक किंवा रोमॅटिक भाषांचा निर्देशहि केला नाहीं. भाषांच्या अर्वाचीन स्वरूपाचा अभ्यास हा तौलनिक भाषाशास्त्राच्या कक्षेबाहेरचा समजला जात असून त्यांचा अभ्यास केवळ या विशिष्ट भाषांच्या अभ्यासकांनीं करावा अशी त्याबेळची समजूत दिसते. अर्थात् भाषांच्या जुन्या स्वरूपाचें ज्ञान केवळ लिखित वाङ्मयापासून होत असल्यामुळें या आद्यभाषाशास्त्रज्ञांचें लक्ष ध्वनीपेक्षां अक्षराकडे अधिक असे; परंतु यामुळें त्यांच्या अभ्यासास वैगुण्य प्राप्त होत असे. तसेंच बॉप, ग्रिम, पॉट किंवा बेन्फे यांच्या ग्रंथांत आपणांस त्या भाषांचा केवळ वाङ्मयिक अभ्यास केलेला असून प्रत्यक्ष अभ्यास केलेला दिसत नाहीं. परंतु रास्क यानें या भाषांचा अभ्यास त्यांच्या जिवंत व प्रत्यक्ष स्वरूपांत केला असल्यामुळें त्याच्या अभ्यासामध्यें आपणांस अधिक गाढपणा दिसून येतो. तसेंच तेव्हां पोटभाषांचा किंवा बोलींचा अभ्यास करतांना त्यांतील आर्षस्वरूपाच्या वैशिष्ट्याकडे अधिक लक्ष दिलें जात असे व प्रचलित बोलल्या जाणाऱ्या भाषेतील जुनीं रूपें, जुने ध्वनी, निवडून काढून त्यांकडेच अधिक उत्साहपूर्वक लक्ष देण्यांत येत असे व सामान्यतः अशी समजूत असे कीं लौकिकभाषा या सुशिक्षित लोकांच्या

भाषेपेक्षां अधिक प्राचीन स्वरूपाच्या असतात. वस्तुस्थिति याच्या अगदीं विरुद्ध आहे व लोकभाषांमध्यें जरी कांहीं प्राचीन काळचे अवशेष असले तरी त्यांची वाढ अभिजात भाषेपेक्षां अधिक झालेली असते. कारण अभिजात भाषेस परंपरा व वाङ्मय यांमुळें अधिक स्थैर्य आलेलें असतें.

बोलींच्या अभ्यासाचें महत्त्व--ग्रिमनें निरनिराळ्या बोलींच्या अभ्यासास जें महत्त्व दिलें होतें तें भाषांच्या प्राचीन स्वरूपाचें ज्ञान व्हावें या दृष्टीनेंच होतें व त्यांतील ध्वनींच्या फरकांकडे तितकें लक्ष देऊं नये असें त्याचें म्हणणें होतें. कारण भाषेच्या इतिहासावर त्याचा विशेष परिणाम होत नसे. या दृष्टीनें के. एम्. रॅप यानें ग्रीक, लॅटिन, गॉथिक या भाषांतील शब्दोच्चारांचा अभ्यास करून त्यावरून पुढें या उच्चारपद्धतींत मध्ययुगांत बायझन्टाइन ग्रीक, प्राचीन प्रॉव्हेन्सल, प्राचीन फ्रेंच, प्राचीन नॉर्स, प्राचीन उच्च जर्मन वगैरे भाषांत कसा फरक होत गेला व अर्वाचीन ग्रीक, इटॅलीयन, स्पॅनिश भाषांतील शब्दोच्चार कसे बनत गेले व आजच्या नीच व उच्च जर्मन भाषेंत व निरनिराळ्या बोलींत ते कोणत्या स्वरूपांत आढळतात याचें दिग्दर्शन करणारा एक ग्रंथ लिहिला. या ग्रंथाकरितां त्यानें निरनिराळ्या भाषांचें अध्ययन व प्रचलित भाषांचें सूक्ष्म निरीक्षणहि पुष्कळ केलें होतें. त्यानें असें म्हटलें आहे कीं 'भाषेच्या ऐतिहासिक स्वरूपाच्या अभ्यासावरून आपणांस तिच्या एका अंगाचें ज्ञान होतें तर तिच्या निरनिराळ्या शाखांच्या प्रचलित व केव्हाहि लेखनिविष्ट न झालेल्या बोलींतील स्वरूपावरून तितक्याच महत्त्वाच्या दुसऱ्या अंगांचें ज्ञान होतें, व त्यांचेहि संशोधन अत्यंत आवश्यक आहे.' परंतु त्यावेळीं लेखनिविष्ट भाषांच्याच अभ्यासाकडे जास्त प्रवृत्ति असल्यामुळें त्याच्या लेखनांतील अनेक दोष दाखवून जर्मन भाषाशास्त्रज्ञांनीं त्यांतील महत्त्वाच्या व सत्यांशाकडे कानाडोळा केला आहे. तथापि त्यानें उच्चारविषयक व ध्वनिविषयक काढलेलीं अनुमानें महत्त्वाचीं असून उच्चार व लेखन यांमधील संबंधाचें ग्रहण करण्यास उपयुक्त आहेत, व याच दृष्टीनें त्यानें प्रचलित व मृत दोनहि भाषांतील साम्यस्थलें दिग्दर्शित करतांना उच्चारानुसार लेखनपद्धति अवलंबिली आहे व याच पद्धतीनें वास्तविक कोणत्याहि भाषेच्या उच्चार किंवा ध्वनिपद्धतीचें स्पष्ट ज्ञान होणें शक्य आहे. ही गोष्ट त्यावेळीं तितकीशी मान्य झाली नव्हती. रॅपची कल्पना सामान्यतः जरी मान्य झाली असती तरी भाषाशास्त्राची वाढ यापेक्षां अधिक झपाट्यानें झाली असती.

भाषेंत होत जाणारे फरक--याचवेळीं जे. एच्. ब्रेड्सडॉर्फ या डॅनिश विद्वानानें एक ग्रंथ लिहून भाषेमध्यें फरक कसा व कां पडत जातो याचें विवेचन केलें आहे. बॉप किंवा ग्रीम यांनीं भाषेच्या स्वरूपांत फरक कां होतो या प्रश्नाकडे केव्हांच लक्ष दिलें नाहीं. संस्कृत व लॅटिन किंवा लॅटिन व फ्रेंच या भाषांमध्यें एवढें अंतर कसें पडत गेलें हें वास्तविक भाषाशास्त्रज्ञांनीं पाहणें अवश्य होतें ब्रेड्सडॉर्फनें या फरकांस पुढील कारणें दिलीं आहेत व त्यांचीं निवडक उदाहरणेंहि दाखल केलीं आहेत--१ ऐकण्यामध्यें किंवा समजण्यामध्यें होणारी चूक, २ स्मृतिदोष, ३ अंगदोष, ४ आळस किंवा सुलभता; या कारणामुळें नऊ दशांश फरक होतात असें त्यांचें म्हणणें आहे. ५ साम्य किंवा सादृश्य, ६ स्पष्ट उच्चार करण्याची इच्छा, ७ नवीन कल्पना व्यक्त करण्याची आवश्यकता. या खेरीज परकीय भाषा व परकीय राष्ट्राचा संसर्ग यांमुळेंहि भाषेमध्यें बदल होत जातात असें त्यानें दाखविलें आहे. रॅप व ब्रेड्सडॉर्फ यांच्या कल्पना तत्कालिन भाषाशास्त्रज्ञांच्या मानानें पुष्कळच पुढें गेलेल्या होत्या परंतु इतर त्या वेळचे विद्वान् अद्यापि ग्रिम व बॉप यांच्याच कल्पनांस अनुसरत होते.

श्लेपेर--यानंतरचा या कालांतील भाषाशास्त्रीय अभ्यासांत भर टाकणारा पंडित ऑगस्ट श्लेपेर हा होय. यानें स्वतःच्या जर्मन भाषेखेरीज स्लॅव्होनिक, लिथुॲनियन, प्रशियन व चेक या भाषांचा अभ्यास प्रत्यक्षतः केला होता, व जर्मन भाषेंतील निरनिराळ्या बोलींचाहि अभ्यास करून त्यांतील गाण्यांचाहि संग्रह केला होता. लहानपणीं दोन भाषा बोलण्याची संवय असल्यास परकीय भाषा शिकणें अधिक सुलभ जातें असें त्यानें आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. हा हेगेलच्या तत्त्वज्ञानपद्धतीचा अनुयायी होता. याचें म्हणणें असें होतें कीं भाषा ही मनुष्याच्या मेंदूची रचना व वागिंद्रियाची घटना यावर अवलंबून असते. आणि त्यामुळें भाषाशास्त्राचा अभ्यासहि इतर भौतिक शास्त्रांच्या अभ्यासाप्रमाणेंच करणें अवश्य आहे. कारण भाषा ही मेंदूच्या रचनेंतील द्रव्याची कार्यात्मक जे तोंड यांतील अस्थि, स्नायु व मज्जातंतु यांवर जी क्रिया होते तिचेंच आपणांस श्रवणद्वारा प्रतीत होणारें स्वरूप होय. परंतु भिन्न भिन्न भाषा, उदा. फ्रेंच किंवा जर्मन बोलणाऱ्या लोकांच्या मेंदूमध्यें किंवा इंद्रियरचनेंमध्यें कांहीं फरक असतो असें शारीरशास्त्रज्ञांनीं अद्यापपर्यंत दाखविलेलें नाहीं. तसेंच एकच मनुष्य सर्वतः भिन्न असणाऱ्या दोन भाषा पूर्णपणें अवगत करूं शकतो ही गोष्टहि वरील श्लेपेरच्या विधानास अपवादक आढळते परंतु श्लेपेर या अपवादाचें असें खंडन करतो कीं एका मनुष्याला सर्वतः भिन्न अशा दोन भाषा पूर्णपणें आत्मसात करणेंच शक्य नाहीं. परकीय भाषा पूर्णपणें शिकणें केवळ बालपणांतच मातृभाषा सोडून तिचें अध्ययन केलें असतां शक्य होतें व तसें झाल्यास ती व्यक्ति अर्थातच निराळी बनते. आणि तिच्या मेंदूची व वाचेची वाढ

निराळ्या तऱ्हेनें होते. एखादा मनुष्य जर्मन, इंग्रजी व फ्रेंच या तिन्ही भाषांत सारखाच निपुण आहे असें कोणी म्हटल्यास श्लेपेर यास प्रथम या विधानाच्या सत्यतेबद्दल संशय वाटतो, व वास्तविक तसें असल्यास तो मनुष्य एकाच वेळीं या तिन्ही राष्ट्रांचाहि घटक म्हणून मानतां येईल. कारण या तिन्ही भाषा एकाच वंशांतील असून एकाच मूळ भाषेपासून उत्पन्न झालेल्या आहेत. परंतु एखाद्या मनुष्याला चिनी आणि जर्मन किंवा अरबी आणि हॉटेन्टॉट या भिन्न भाषा एकाचवेळीं अवगत होणें शक्य नाहीं असें त्यानें म्हटलें आहे. परंतु आपणांस याचें उलट फिनलंडमध्यें स्वीडिश व फिनिश भाषा बोलणारे किंवा जावामध्यें डच व मलाई भाषा दोन्ही उत्तम तऱ्हेनें जाणणारे लोक आढळतात त्याची वाट काय? अर्थात श्लेपेर यास ही गोष्ट कबूल आहे कीं आपलीं इंद्रियें हीं परिस्थित्यनुरूप संस्कारक्षम असून जे व्यापार त्यांस प्रथम करतां येत नाहींत तेहि कालांतरानें त्यांस साध्य होऊं शकतात. तथापि कांहीं विशिष्ट भाषारचना फक्त स्वाभाविक असूं शकतात, व त्यामुळें एखाद्या मनुष्यास परकीय भाषा चांगली अवगत होऊं शकली म्हणून भाषा ही मेंदूच्या व वागिंद्रियाच्या रचनेवर अवलंबून आहे या विधानास बाध येत नाहीं असें त्यानें प्रतिपादिलें आहे. जरी आपणांस श्लेपेरचें विधान मान्य झालें कीं दोन भाषा जाणणाऱ्या मनुष्यासहि एक भाषा दुसरीपेक्षां अधिक स्वाभाविकपणें अवगत असते तरी या दोन भाषांसंबधीं त्याच्या ज्ञानामध्यें किंवा प्राविण्यामध्यें फक्त कांहीं प्रमाणाचा फरक असेल. त्यास तात्त्विक फरक म्हणणें ही वास्तविक अतिशयोक्ति करण्यासारखें आहे, व एकदां एका भाषेची संवय झाल्यावर दुसरी भाषा तितक्या पूर्णतेनें शिकणेंच अशक्य आहे हें त्याचें अनुमान तर अगदींच चुकीचें दिसतें, कारण एखाद्यास सतार चांगली वाजवितां येऊं लागल्यावर त्यास सारंगी तितक्या चांगल्या रीतीनें वाजवितांच येणार नाहीं, कारण त्याच्या मेंदूची रचना एका गोष्टीस पूर्णपणें अनुकूलतेनें बनून गेलेली असते असें म्हणणें आपणांस प्राप्त होईल. परंतु या बाबतींत केवळ संवयीनें प्राप्त होणारें कौशल्य हेंच अभिप्रेत असून एका गोष्टींत तें स्वाभाविक असेल तर दुसऱ्या गोष्टींत प्रयत्नानें मिळालेलें असेल एवढेंच? किंवा एका बाबतींत मनुष्याची अधिक स्वाभाविक प्रवृत्ति असेल एवढेंच.

श्लेपेरचें भाषावर्गीकरण--श्लेपेरचें आणखी एक असें म्हणणें होतें कीं, मनुष्यजातीचें वर्गीकरण त्याच्या डोक्याची कवटी किंवा केंस अशा बाह्य लक्षणावरून करण्याऐवजीं तिच्या भाषेवरून करण्यांत यावें, व ही वर्गीकरण पद्धति अधिक स्वाभाविक होय, कारण या पद्धतीनें सर्व तुर्क लोक एकाच वर्गांत मोडतील व सध्यांच्या पद्धतीप्रमाणें उस्मानअली तुर्क कॉकेशन वंशांत व तातेर तुर्क मंगोलियन वंशांत याप्रमाणें होणार नाही. परंतु ही गोष्ट तितकी पटण्यासारखी नाही, कारण एखाद्या मनुष्याचा मुलगा जर अगदीं परकीय भाषा बोलूं लागला, उदा. एखादा बास्क मनुष्याचा मुलगा जर फ्रेंच किंवा स्पॅनिश भाषाच बोलूं लागला तर त्या बापलेकांचें वर्गीकरण भिन्न वंशांत करावयाचें की काय? असो. तथापि आपणांस या विषयासंबंधी येथें यापेक्षां जास्त विवेचन करावयाचें नाही. श्लेपेरनें भाषांचें वर्गीकरण त्रिवर्गात्मक पद्धतीनें केलें आहे: १ एकाकी भाषा, यामध्यें शब्दांतील फक्त ध्वनीनेंच अर्थ व्यक्त होऊन त्या शब्दाचा इतर शब्दांशी संबंध त्या त्या स्थानावरून निश्चित होतो. २ चिकटया भाषा, या मध्यें शब्दाच्या ध्वनीनें त्याचा अर्थ व इतर शब्दांशी संबंध ही दोन्हीहि व्यक्त होतात. परंतु संबंधदर्शक शब्द केवळ शेजारी ठेवलेले असतात. ३ विकरणात्मक किंवा रूपविकारी भाषा, यांमध्यें शब्दाचा अर्थ व इतर शब्दांशी संबंध हा त्याच्या स्वरूपावरून व त्यांत होणाऱ्या विकारांवरून जाणला जातो. व त्यांतील मूळ शब्द त्याच्या स्वरूपातील विकारांवरून किंवा लागणाऱ्या प्रत्ययांवरून ओळखतां येण्यासारखा असतो. श्लेपेरचें असें म्हणणें होतें कीं,आपणांस हे तीनहि भाषांचे प्रकार आज प्रचलित स्थितींत आढळतात एवढेंच नव्हे तर भाषेच्या वाढीतील या तीन अवस्था होत व त्यांतील रूपविकारी अवस्था ही सर्वांत पूर्ण अवस्था होय व त्या पूर्वी प्रत्येक भाषा या पूर्वीच्या दोन अवस्थांमधून जात असते. श्लेपेरनें जी वर वर्गीकरणपद्धति दिली आहे तिला मॅक्समुल्लर व व्हिटने यांसारखे अनुयायी मिळून ती बरीच लोकप्रिय झाली व तिचें वर्चस्व भाषाशास्त्रामध्यें विशेष स्थापन झालें. कारण ती सुलभ असून नियमित व बुद्धीस पटण्यासारखी दिसते. तसेंच त्यावेळच्या सुसंस्कृत राष्ट्रांच्या ज्या आर्यन व सेमाइट भाषा त्यांना या वर्गीकरणांत उच्चस्थान दिलेलें आहे. आणि यामुळें अमेरिकेंतील समावेशक भाषा यामध्यें विकरणात्मक भाषांचें वैशिष्ट्य अधिक स्पष्टपणें व अधिक परिणतरूपांत दिसून येतें असें जरी पॉटनें विवेचन केलें आहे तरी त्यांस या वर्गीकरणामध्यें मुळींच थारा दिलेला नाहीं. कारण अमेरिकन इंडियन लोकांच्या भाषांना संस्कृत किंवा ग्रीक भाषेपेक्षां महत्त्वाचें स्थान मिळणें शक्य नाहीं. तसेंच आजच्या प्रचलित भाषांचें स्वरूप पाहिलें म्हणजे पूर्वीच्या अभिजात भाषांपेक्षां त्या अवनत स्वरूपांत आहेत ही गोष्टहि स्पष्ट होते. कारण अर्वाचीन युरोपमधील कोणत्याहि भाषेचें हल्लीं पूर्वीप्रमाणें विकरणात्मक स्वरूप राहिलेलें नाही. फक्त लिथुॲनियन भाषेमध्यें हें विकरणात्मक स्वरूप व संस्कृत भाषेची व्याकरणपद्धति जवळ जवळ त्याच स्वरूपांत आपणांस दिसून येते. परंतु यावरून आपणांस असें म्हणतां यावयाचें नाहीं कीं आजचा लिथुॲनियन शेतकरी हा शेक्स्पिअरपेक्षां अधिक सुसंस्कृत आहे.

संस्कृति व भाषा यांचें मापन निरनिराळ्या मापांनीं केलें पाहिजे व त्यांचें महत्त्वहि निरनिराळ्या दृष्टीनें आपणांस प्रतीत होतें. या वर दिलेल्या वर्गीकरणपद्धतीवरहि कांहीं आक्षेप घेतां येण्यासारखे आहेत. कारण या पद्धतीमध्यें पहिल्या वर्गात फक्त चिनी व इतर पूर्वेकडील भाषांचा समावेश होतो तर तिसऱ्या वर्गात दोनच भाषावंशांचा अंतर्भाव होतो. परंतु दुसऱ्या वर्गात शेकडों भिन्न भिन्न स्वरूपाच्या व एकमेकांशीं कोणताहि संबंध नसलेल्या भाषांस घुसडून देण्यात आलें आहे. या वर्गातील भाषांस कोणतहि सामान्य तत्त्व लावतां येत नाहीं; उदा फिनिश या भाषेत नेहमीं चिकटी किंवा संश्लिष्ट भाषा म्हणण्यांत येतें, परंतु त्या भाषेतीलहि कांही शब्दांच्या बाबतींत आपणास रूपविकार झालेले आढळतात. आफ्रिकेंतील कांगो भाषापैकीं कीयोंबे भाषेमध्यें करणें, आणणें इत्यादि वाचक क्रियापदांचे भूतकाल इंग्रजी भाषेतल्याप्रमाणें धातूंतील स्वरांत विकार करून साधलेले आढळतात. अशा तऱ्हेच्या उदाहरणांवरून रूपविकरण हें फक्त आर्यन व सेमाइट भाषांतच आढळतें असें नव्हे तर तें इतरहि भाषांत आपणांस आढळून येतें अस स्पष्ट होतें. तसेंच कांहीं भाषाशास्त्रज्ञांनीं जेव्हां अनेक भाषांचीं वर्गीकरणें दिलेलीं आढळतात तेव्हां त्यांनीं या त्रिवर्गात्मक पद्धतीचा अवलंब केल्याचे आपणांस आढळत नाहीं. उदा० स्टेन्थॉल यानें कोणतीच विशिष्ट वर्गीकरणपद्धति न अनुसरतां क्वचित् भौगोलिक व क्वचित् रचनात्मक पध्दतीस अनुसरून भाषांचें वर्गीकरण आपल्या ग्रंथांत केलें आहे. फ्रेडरिक म्युलर यानें तर मानवशास्त्रीय किंवा रचनात्मक वर्गीकरणपध्दति बाजूस ठेवून मानववंशाप्रमाणें सुमारें शंभरांहून अधिक भाषांचे बारा जातींमध्यें वर्गीकरण केलें आहे. मिस्टेली यानें भाषांचे सहा प्रकार वर्णिले आहेत–१ समावेशक, २ धातुप्रधान, ३ मूलशब्दप्रधान, ४ प्रत्ययी, ५ चिकटी, व ६ विकरणात्मक; व यांचे पुन्हां त्यानें चार वर्गात वर्गीकरण केलें आहे. पहिल्या वर्गात तो वाक्यरूपी शब्दांच्या भाषांस म्हणजे वरील पहिल्या वर्गाच्या भाषांस स्थान देतो. दुसऱ्या वर्गात शब्द नसणाऱ्या भाषा म्हणजे वरील दोन, तीन, चार या वर्गातील भाषास स्थान देतो. तिसऱ्या वर्गात वरील ५ व्या वर्गातील म्हणजे बाह्यतः शब्द असणाऱ्या भाषांची तो गणना करतो व चौथ्या वर्गात वरील ६ व्या वर्गातील म्हणजे वास्तविक शब्द असलेल्या भाषांची गणना करतो. परंतु ही दुसरी वर्गीकरणपद्धति प्रथम शब्द कशास म्हणावें हें निश्चितपणें ठरल्याशिवाय स्वीकारतां येण्यासारखी नाहीं. म्हणून ती जरी बाजूला ठेवली तरी वरीलप्रमाणें अनेक वर्गीकरणपद्धति आपणांस निरनिराळ्या भाषाशास्त्रज्ञांनीं अनुसरलेल्या दिसून येतात. तसेंच श्लेपेरनें दिलेलें वर्गीकरण हें खरोखर प्रत्येक भाषेच्या विकासातील निरनिराळ्या तीन अवस्था दाखवितें आणि आज हें वर्गीकरण सर्वमान्य झालें आहे असें नाहीं.

मूळ आर्यन भाषा—श्लेपेरनें वास्तविक भाषाशास्त्रीय अभ्यासामध्यें टाकलेली महत्त्वाची भर म्हणजे त्यानें मूळ आर्यन भाषेची रचना कशी असावी यासंबंधीं संशोधन व दिग्दर्शन करण्याचा केलेला प्रयत्न हें होय. ही मूळ आर्यन भाषा संस्कृत, ग्रीक, लॅटिन, गॉथिक या सर्व भाषांच्या मुळाशीं असलेली भाषा होय व आजचा इंग्लिश, स्पॅनिश, फ्रेंच इ० भाषांचा जो मूळ लॅटिन भाषेशीं संबंध आहे तोच या वरील भाषांचा मूळच्या आर्यन भाषेशीं होता व या दृष्टीनें प्रयत्न करून त्यानें मूळच्या आर्यन भाषेचें स्वरूप कसें असावें यासंबंधीं सोदाहरण विवेचन केलें आहे व या विवेचनामध्यें निरनिराळ्या भाषांचा विकास रूपकसा होत गेला याचा इतिहास आपणांस पढावयास सांपडतो. अशा रीतीनें श्लेपेरनें मूळ आर्यन भाषेचा नमुना म्हणून एका कथेचें त्या भाषेंत रूपांतरहि दिलें आहे. आतां अशा तऱ्हेनें मूळ भाषेचें स्वरूप आपणांस खराखर शोधून काढतां येईल काय हा प्रश्न आहे व याचें उत्तर हीं गोष्ट केवळ कांहीं अंशानच संभवनीय आहे असच आपणास द्यावें लागेल.

तौलनिक अभ्यास—प्राग युनिव्हर्सिटीतील श्लेपेरचा सहाध्यायक जॉर्ज कर्टिअस हाहि त्या वेळचा एक महत्त्वाचा भाषाशास्त्रज्ञ होऊन गेला. यानें ग्रीक भाषेचा अभ्यास केला होता व ग्रीक व्युत्पत्तिशास्त्रांत यानें बरीचशी सुधारणा केली. अभिजात भाषा व जर्मन भाषा यांच्या व्युत्पत्तीमधील दुवा जोडण्यासहि यानें बरेंच साहाय्य केलें. याच सुमारास होऊन गेलेला जोहान निकोलाय मॅडविग यानें युरोपियन अभिजात भाषांचा विशेषतः चांगला अभ्यास केला होता. यानें भाषाशास्त्रांतील संदिग्धता व गूढपणा या गोष्टींस विरोध करून त्यांतील तत्त्वें सामान्य तर्कशुद्धतेस पटतील अशा तऱ्हेनें विषद करण्याचा प्रयत्न केला. विशेषतः त्यानें असें प्रतिपादिलें कीं, आजकालच्या लोकांप्रमाणेंच प्राचीन काळच्या लोकांचाहि उद्देश भाषेस पद्धतशीर स्वरूप देण्याचा किंवा तिची रचना विशेष पद्धतशीर बनविण्याचा नसून केवळ आपल्या मनांतील विचार दुसऱ्यास समजतील अशा रीतीनें मांडणें एवढाच होता व त्यामुळें सर्व भाषांतून आपणांस पद्धतशीरपणाचा अभाव आढळून येतो. परंतु भाषा तयार करण्याची कला आजच्याप्रमाणें पूर्वीच्याहि लोकांना सर्वकालीं अवगत होती. मॅडविग यानें ध्वनिविषयक व व्युत्पत्तिविषयक संशोधनाला महत्त्व बाजवीपेक्षां कमी दिलें होतें. तथापि एकंदरींत त्याचे सिद्धांत इतर तत्कालीन कांहीं विद्वानांपेक्षां अधिक पायाशुद्ध होते. परंतु त्यानें आपले निबंध डॅनिश भाषेत लिहिल्यामुळें त्यांकडे तत्कालीन लोकांचें फारसें लक्ष गेलें नाहीं व त्यानें प्रतिपादिलेल्या बऱ्याचशा

गोष्टी व्हिटने वगैरेसारख्या इंग्रजींत लिहिणाऱ्या भाषाशास्त्रज्ञांनीं स्वतंत्रतेनें पुढें मांडल्यामुळें त्यांस अधिक महत्त्व मिळालें. याच वेळीं तौलनिक व ऐतिहासिक भाषाशास्त्राची वाढ बरीच झाली. निरनिराळ्या भाषांचा तौलनिक अभ्यास करणारे बरेच पंडित पुढें आले. उदा० संस्कृत भाषेमध्यें वेस्टर्डगार्ड आणि बेनफे; स्कॅन्डेनेव्हिनिक भाषांत मिक्लॉसिश आणि श्लेषेर; व केल्टिक भाषेंत झ्यूस वगैरे. गॉथॉनिक अथवा जर्मानिक भाषांचा अभ्यास करणारे ग्रिमचे बरेच अनुयायी होते व फ्रेडरिक डिझ व त्याचे शिष्य हे रोमॅनिक व्युत्पत्तिशास्त्रामध्यें प्रगति करीत होते व याच वेळीं भाषाशास्त्राचा पद्धतशीर व ध्वनि, रूपें, शब्दरचना व वाक्यरचना या सर्व अंगांनीं अभ्यास चालला होता व त्यांचा एकमेकांशीं संबंधहि शोधण्यांत येत होता.

मॅक्समुल्लर व व्हिटने—याच सुमारास १८६१ सालीं मॅक्समुल्लरनें भाषाशास्त्रावर व्याख्यानें दिलीं; त्यांत त्यानें विशेषतः श्लेषेरच्या प्रमुख कल्पनांचा पुरस्कार केला व भाषाशास्त्र हें एक भौतिकशास्त्र असून ऐतिहासिक पद्धतीवर रचलेल्या व्युत्पत्तिशास्त्राचा याशीं कांहीं संबंध नाहीं असें त्यानें प्रतिपादन केलें; परंतु त्यानें प्रत्यक्ष ज्या गोष्टींचें विवेचन आपल्या व्याख्यानांत केलें त्यांवरून भाषाशास्त्राच्या भौतिकत्वाच्या विरुद्धच अनुमान निघतें. व अखेरीस भौतिकशास्त्राची जी आपण व्याख्या ठरवूं त्यावर ही गोष्ट अवलंबून आहे असें म्हणून त्यानें आपली माडवणूक करून घेतली आहे. तथापि श्लेषेर किंवा मॅक्समुल्लर यांच्या भाषा हें एक भौतिकशास्त्र आहे या उपपत्तीस विशेषसें अनुयायी मिळाले नाहींत व उलट कर्टिअस, मॅडविग व व्हिटने यांनीं या गोष्टीस विरोधच केला तथापि या भौतिकदृष्टीचा भाषाशास्त्राच्या वाढीवर व इतिहास वर बराच परिणाम झाला. विशेषतः तत्कालीन भाषाशास्त्रज्ञांनीं जे प्रश्न संशोधनाकरितां आपल्यापुढे घेतले व त्यांचे ज्या पद्धतीनें संशोधन केलें त्यांमध्यें आपणांस ही दृष्टि आढळून येते. ग्रिमपासून पॉट, श्लेषेर व त्याचे अनुयायी या मंडळीनीं ध्वनिमूलक अथवा उच्चारमूलक सादृश्यावरून निरनिराळ्या भाषांची तुलना केली व निरनिराळे ध्वनिशास्त्रीय नियम बनविले व ते लावून व्युत्पत्तिशास्त्रीय संशोधनास अधिक निश्चित स्वरूप दिलें. परंतु या ध्वनिशास्त्रीय अभ्यासास प्रत्यक्ष उच्चाराच्या संशोधनाचें पाठबळ नसल्यामुळें हे व्युत्पत्तिशास्त्रीय संशोधन केवळ निर्जीव व यांत्रिक स्वरूपाचें झालें. त्याला आत्मिक पाठबळ नव्हतें. कोठले तरी शब्द, स्वर किंवा व्यंजनें किंवा शब्दांचीं रूपें घेऊन त्यांची कोठल्या तरी रूपाशीं तुलना करण्यांत येत असे व त्यामुळें प्रत्यक्ष ती भाषा बोलणारे लोक अथवा व्यक्ति यांचा विसर पडल्यासारख दिसत असे व कित्येकदां ह्या भाषाशास्त्रज्ञास अनेक भाषांतील ध्वनिविषयक अथवा उच्चारविषयक नियमांचें किंवा व्याकरणांतील रूपांचें ज्ञान असे परंतु प्रत्यक्ष त्या भाषेचें विशेषसें ज्ञान नसे; निदान फारसा प्रत्यक्ष परिचय याचा त्या भाषांशी झालेला नसे. श्लेषेर यास ही गोष्ट कदून चुकली होती व त्यानें मरणापूर्वी लिहिलेल्या आपल्या शेवटच्या पुस्तकांत असें म्हटलें आहे कीं, निरनिराळ्या भाषांच्या व्याकरणाबरोबर त्या भाषांचें प्रत्यक्ष ज्ञान असणें ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. त्यामुळें तौलनिक व्याकरणास निरनिराळ्या भाषांच्या प्रत्यक्ष नमुन्यांची अत्यंत आवश्यकता आहे. नाही तर तौलनिक व्याकरणांत निरनिराळ्या एकभाषासंभव भाषांमध्यें असलेल्या सादृश्यावरच विशेष भर देण्यांत येतो व त्यांतील प्रत्येक भाषेच्या वशिष्ट्याकडे दुर्लक्ष होतें. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी कीं व्याकरणामध्यें आपणांस फक्त विशिष्ट बाजूचें ज्ञान होतें. परंतु त्या भाषेच्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान व्हावयास त्या भाषेंतील कांहीं तरी लिखाणाचा अभ्यास करणें अवश्य असून त्यांतील निरनिराळीं रूपें इतर संबद्ध भाषांशीं कशीं सदृश असतात किंवा त्यांचा काय संबंध असतो हें पाहिलें पाहिजे. त्यावेळीं जरी ऐतिहासिक व तौलनिक ध्वनिसादृश्यावरच विशेष भर दिला जात होता तरी कांहीं भाषाशास्त्रज्ञ निराळ्या दृष्टीनें अभ्यास करीत असलेले आपणांस आढळतात. उदा० हेमन स्टेन्थॉल यानें भाषेच्या मानसशास्त्रीय विवेचनावर ग्रंथरचना केली परंतु त्याच्या ग्रंथाच्या दुर्बोधतेमुळें त्याकडे फारसें कोणाचें लक्ष गेलें नाहीं. भाषाशास्त्राचें सर्वसामान्य विवेचन करणारा श्लेषेरनंतरचा महत्त्वाचा ग्रंथकार म्हटला म्हणजे विल्यम ड्विट व्हिटने हा अमेरिकन ग्रंथकार होय. याच्या ग्रंथांची (भाषेचा अभ्यास, भाषेचें आयुष्य व वृद्धि) अनेक भाषांत भाषांतरें झालीं व त्याचा प्रतिस्पर्धी मॅक्समुल्लर याच्या इतकेच ते लोकप्रियहि झाले. मॅक्समुल्लर व यामध्यें मुख्य मतभेद म्हटला म्हणजे हा होता कीं, व्हिटनेच्या मतानें भाषा ही मनुष्यानें एकमेकांचे विचार समजण्याकरितां उत्पन्न केली असून शब्द हीं केवळ सांकेतिक चिन्हें आहेत व त्यांत कोणत्याहि तऱ्हेचा गूढपणा नाहीं. अर्थात् विशिष्ट शब्दांना जो विशिष्ट अर्थ प्राप्त झाला तो केव्हांहि मनुष्यांनीं एके ठिकाणीं जमून चर्चा करून ठरविला असें नव्हे तर एकमकांच्या समजुतींवरून व संवयीवरून तो निश्चित झाला असला पाहिजे. या दोन भाषाशास्त्रज्ञांतील किरकोळ मतभेद बाजूला ठेवले तर हे दोघेहि विसाव्या शतकांतील महत्त्वाचे भाषाशास्त्रज्ञ होत व त्यांनीं गेल्या पन्नास वर्षांत झालेल्या भाषाशास्त्रीय शोधांचें आपल्या ग्रंथांत उत्कृष्ट दिग्दर्शन केल व विशेषतः आर्यन भाषेतील शब्द व रूप यांचें अधिक स्पष्टीकरण करून तत्कालीन भाषाशास्त्रीय उपपत्तींचें स्पष्टपणें आविष्करण केलें. अर्थात आज त्यांच्या सर्वच उपपत्ती ग्राह्य मानल्या जातात असें नव्हे तर त्यांतील कांहीं केव्हांच सोडून देण्यांत आलेल्या आहेत.

संस्कृत व इतर भाषा--परंतु वरील भाषाशास्त्रज्ञांनी, मूळ आर्यन भाषेतील शब्दांचीं रूपें संस्कृत भाषेंत कायम राहिलीं असुन ग्रीक, लॅटिन वगरे युरोपीय भाषा ह्या संस्कृत भाषेपेक्षां मूळ भाषेपासुन अधिक दूरच्या आहेत असें जें तत्त्व प्रतिपादन केलें होतें तें तितक्या पूर्णतेनें पुढें टिकाव धरीत नाहींसें झालें. तालव्य नियमावरून संस्कृतपेक्षां ग्रीक भाषेमध्यें कांहीं बाबतींत शब्दांचीं रूपें मूळच्या भाषेशीं अधिक जवळचीं आहेत अर्से दिसन आल्यामुळें या भाषावंशांतील भाषांच्या परस्पर संबंधाबद्दलच्या पूर्वीच्या उपपत्तीस बराच धक्का मिळाला व कर्टिअसनें म्हटल्याप्रमाणें संस्कृत भाषा म्हणजे भाषाशास्त्राची जी अगदीं देवता म्हणून मानण्यात येत असे व तिच्यावर जी अंधश्रद्धा ठेवण्यांत येत असे ती आतां मागें पडत आहे याच सुमारास कालें व्हर्नर यानें प्राचीन गॉथॉनिक भाषांमध्यें जी व्यंजनप्रक्रिया होत असे ती त्यांतील स्वराघातावर अवलंबून असे व या स्वराघाताचें स्वरूप आपणास संस्कृत भाषेच्या प्राचीन स्वरूपांतच अवशिष्ट राहिलेलें आढळतें आणि अर्वाचीन गॉथॉनिक भाषांमध्यें तें अगदीं बदलून गेलें आहे ही गोष्ट निदर्शनास आणली व यामुळें शब्दांच्या एकवचनांतल्या एका व्यंजनाबद्दल अनेक वचनांत दुसरेच व्यंजन जे येतें तें त्यांतील स्वराघात बदलल्यामुळें होय ही गोष्ट स्पष्ट झाली. (उदा. इंग्रजींतील एकवचनीं वॉज यायें अनेकवचन वेअर होत याचें कारण पहिल्या शब्दांत स्वराघात आरंभीं असतो तर दुसऱ्या शब्दांत तो अखेरीस असतो.) अशा तऱ्हेच्या शोधमुळें भाषाशास्त्रीय नियम इतर शास्त्रीय नियमाप्रमाणें अबाधित आहेत ही गोष्ट अधिक निदर्शनास आली.

नवीन व्याकरणशास्त्रज्ञ--यानंतर येणाऱ्या नवीन तरुण व्याकरणशास्त्रज्ञांनी ध्वनिविषयक नियमांस पुष्कळच महत्त्व देऊन त्यास मुळींच अपवाद असणें शक्य नाहीं असें प्रतिपादन करण्यास सुरवात केली. यामध्यें प्रथम आपणांस लेस्किन याचें नांव आढळतें. त्यानंतर ब्रुगमन, डेलब्रुक, ऑस्थॉफ, पॉल वगरे येतात ऑस्थॉफ असें प्रतिपादीत असे कीं ध्वनिविषयक फरक हे शब्दांचे अंगभूत असुन सादृश्यविषयक फरक हे मानसिक क्रियेचे द्योतक होत. अर्थात् हें त्यांचें म्हणणें खरें नव्हतें. तथापि ध्वनिविषयक व सादृश्यमूलक अशा तऱ्हेचे दोन विकार शब्दांच्या रूपामध्यें होतात ही महत्त्वाची गोष्ट यानें निदर्शनास आणली. जे फरक ध्वनिविषयक नियमाप्रमाणें होत नसत त्यांचें कारण शोधून काढणें या शास्त्रज्ञांना भागच होतें, व त्यामुळें हे फरक सादृश्यमूलक होत ही गोष्ट त्यांनी पुढें मांडली. परंतु प्रारंभीं अशा तऱ्हेचे फरक हे भ्रामक सादृश्यामुळें होतात अशी समजूत होती परंतु सादृश्यमूलक विकार हे भाषेमध्यें उत्तरकाळीं आले नसुन भाषेच्या वाढीमध्यें तें एक महत्त्वाचें अंग आहे ही गोष्ट या नवीन तरुण शास्त्रज्ञांनीं पुढें मांडली. या नवीन दृष्टीनें विचार करण्यास प्रथम हरमन पॉल यानें सुरवात केली. त्यांचें म्हणणें असें होतें कीं अगदीं मूळचीं इंडो-जर्म्यानिक भाषेची निरनिराळ्या शाखा पडण्यापूर्वीची स्थिति घेतली तरीसुद्धां तीमध्यें आपणांस धातु, प्रत्यय वगैरे न आढळतां प्रत्यक्ष शब्दच दृष्टीस पडतील ही गोष्ट विसरतां कामा नये, व अशा शब्दांच्या संग्रहावरच प्रत्येक मनुष्याला बोलण्याकरितां अवलंबून राहावें लागतें. प्रत्येक वेळीं मूळ शब्द घेऊन त्यास प्रत्यय लावून त्याचें योग्य तें रूप बनविण्याची क्रिया बोलणारा मनुष्य करीत असणें शक्य नाहीं. अर्थात् प्रत्येक शब्दाचीं सर्व रूपें त्याला तोंडपाठ येत असणेंहि शक्य नाहीं. कारण अशीं सर्व रूपें ध्यानांत ठेवणें अशक्य आहे. परंतु प्रत्येक नामाचें किंवा क्रियापदाचें पूर्वी कधीं न ऐकिलेलेंहि रूप योग्य प्रसंगीं बनविण्याचें मनुष्याला ज्ञान असतें. अर्थात हें रूप बनवितांना दुसऱ्या शब्दांचीं तशीं निरनिराळीं रूप त्याला ठाऊक असतात त्यावरून तो बनवीत असतो. अशीं निरनिराळीं रूपें वरचेवर बनत असतात व त्यांचे व्याकरणांतील प्रकारांप्रमाणें निरनिराळे वर्गहि तयार होतात. परंतु त्याचें व्याकरणमूलक ज्ञान अथवा स्थान व्याकरणाचें शिक्षण मिळाल्याशिवाय निश्चित होत नाही. परंतु अशा तऱ्हेचे निरनिराळे वर्ग बनवण्यामुळें ते लक्षांत ठेवण्यास व योग्य प्रसंगीं त्यांचा उपयोग करण्यास मदत होते आणि याचेंच नांव सादृश्य. यावरून प्रत्येक मनुष्य बोलतांना शब्दांचीं सादृश्यमूलक निरनिराळीं रूपें बनवीत असतो ही गोष्ट स्पष्ट होते. या क्रियेचीं स्मरणपूर्वक उपस्थिति व सहाचर्यमूलक नवीन उत्पत्ति हीं दोन मुख्य अंगें आहेत. एखाद्या व्याकरणामध्यें किंवा कोशामध्यें भाषेतील सर्व शक्य तितके शब्द अथवा रूपें आलेलीं आहेत असें मानणें चुकीचें होईल. प्रत्यक्ष भाषा ही व्यक्तिगत असते व शास्त्रीय संशोधनामध्येंहि भाषेची व्यक्तीपासून फारकत करतां येणार नाही. आपणांपुढें एखाद्या शब्दाचें विशिष्ट रूप आलें असतां तें प्रचलित भाषेमध्य आढळतें किंवा नाही किंवा त्या भाषेच्या व्याकरणाच्या नियमांप्रमाणें तें बनतें किंवा नाहीं या प्रश्नापेक्षां तें विशिष्ट रूप त्या बोलणाऱ्या व्यक्तीनें आपल्या स्मरणशक्तीमुळें उच्चारलें असेल काय किंवा तें स्वतःच बनवून त्यानें त्याचा प्रथमच उपयोग केला असेल काय व तसें असेल तर कोणत्या सादृश्यामुळें ? हे प्रश्न विचारणेंच प्रत्येक शब्दाच्या निरनिराळ्या रूपांचें वास्तविक ज्ञान होण्यास आवश्यक आहे. जेव्हां एखादा मनुष्य मेंढरें असा शब्द उच्चारतो तेव्हां तो शब्द त्यानें दुसऱ्या कोणापासून ऐकलेला असणें शक्य आहे किंवा त्यास मेंढरूं हा एकवचनी शब्द ठाऊक असून कोंकरूं, वासरूं इ० शब्दांच्या अनेक वचनाप्रमाणें त्यास त्याचें 'मेंढरें' असें अनेकवचन सुचलें असण्याचा संभव आहे. परंतु त्याची स्मृति

अर्धवट असून जर बांसरें, कोंकरें या शब्दांशी मेंढरें या शब्दाचें त्याच्या मनांत साहचर्य नसतें तर तो विसरूनहि जाण्याचा संभव आहे. व वरील साहचर्य हें त्यास शब्दाचें स्मरण करण्यास उपयोगी पडतें. तेव्हां प्रत्येक शब्दाच्या बाबतींत स्मरणशक्ति व साहचर्य यांचें कार्य किती अंशांनी असतें हें ठरविणें कठीण आहे.

अर्वाचीन दृष्टि--याप्रमाणें भाषाशास्त्राचा मुख्य विषय ती भाषा बोलणारा व्यक्तिसमूह हा बनला व भाषाशास्त्रज्ञांचें विशेष लक्ष भाषेमध्यें फरक पडण्याचीं कारणें कोणतीं व ते कमकसे होत जातात व त्यांचें वर्गीकरण कसें करावें या प्रश्नाकडे वळलें. या प्रश्नांवर अनेक भाषाशास्त्रज्ञांनी आपले विचार प्रसृत केले; परंतु यांमध्यें हरमन पॉल यानें या प्रश्नाचें विवेचन अधिक पूर्णतेनें केलेलें आढळतें. यानें लिहिलेल्या ग्रंथाच्या अनेक सुधारून वाढवलेल्या आवृत्ती निघाल्या व या ग्रंथाचा भाषाशास्त्रीय विचारांवर फार महत्त्वाचा परिणाम घडला. तसेंच यानें बॉप व श्लेखर यांनीं दुर्लक्ष केलेला व्याकरणांतील वाक्यरचना या भागाकडे विशेष लक्ष दिलें व त्यावेळच्या भाषाशास्त्रज्ञांनां भाषेच्या ऐतिहासिक व तौलनिक पद्धतीच्या अभ्यासानें भाषेच्या बाह्यस्वरूपाप्रमाणें तिच्यांतील वाक्यरचनेवरहि बराच प्रकाश पडतो असें दाखवून दिलें. या कालचे भाषाशास्त्रज्ञ या शास्त्रांतील नव्या नव्या महत्त्वाच्या प्रश्नांकडे जसें लक्ष देत होते तसेंच पूर्वीच्या भाषाशास्त्रज्ञांनी विशेष महत्त्वाच्या मानलेल्या कांही प्रश्नांकडे त्यांनी अगदी दुर्लक्ष केलें होतें असें आपणांस आढळून येतें. उदा० व्याकरणांतील निरनिराळ्या प्रत्ययांचें मूळ काय किंवा भाषेची प्रथम उत्पत्ति कशी झाली असेल इ० प्रश्नांचा उत्तरकालीन भाषाशास्त्रज्ञांनीं विचारच करण्याचें सोडून दिलें असल्याचें आपणांस दिसून येतें या काळीं भाषाशास्त्रीय संशोधन विशेष जोरानें चालू असलेलें आढळतें. त्यामध्यें ध्वनिशास्त्रीय संशोधनास विशेष प्राधान्य दिलेलें आढळतें. त्यांतहि ध्वनि किंवा उच्चार पद्धतीचा अथवा वाग्विंद्रियपद्धतीचा विचार अधिक केलेला आपणांस आढळून येतो. तसेंच भाषेच्या बाह्यस्वरूपाच्या त्यांतील वाक्यरचना पद्धतीच्या व शब्दार्थशास्त्राच्या अभ्यासाकडेहि विशेष लक्ष दिल्याचें दिसतें व शब्दांचा एकाकी स्वरूपांत अभ्यास न करतां ते वाक्याचें अथवा संबद्ध भाषणाचें अवयव आहेत अशा दृष्टीनें त्यांचें संशोधन करण्याची प्रवृत्ति अधिक दिसून येते. ध्वनिविषयक अभ्यासांतहि संधिनियम व एकंदर वाक्याचा उच्चार यांस महत्त्व दिल्याचें आढळतें. तसेंच स्वराघात यांचेंहि योग्य महत्त्व मानण्यांत आल्याचें दिसून येतें. तसेंच शब्दांचीं निरनिराळीं रूप व वाक्यांतील त्यांचा उपयोग व त्यांचें कार्य म्हणजे एकंदरीत वाक्यरचना या गोष्टीसहि या अभ्यासांत योग्य स्थान दिलेलें दिसून येतें व शब्दांचा परस्परांशीं असलेला संबंध निश्चित करण्याच्या पद्धतीमधूनच अलीकडील शब्दार्थशास्त्राची उत्पत्ति झालेली आपणांस आढळते. अर्थात् या सर्व गोष्टी निरनिराळ्या भाषांतील प्रयोगांचें प्रत्यक्ष ज्ञान प्राप्त करून घेतल्याशिवाय साध्य होणें शक्य नव्हतें. यामुळें सामान्य भाषाशास्त्रज्ञ व विशिष्ट भाषेच्या व्युत्पत्तीचा अभ्यासक यांमध्यें पूर्वी जो आपणांस विरोध आढळून येत होता तो हळूहळू नष्ट झाला व अनेक विद्वानांनीं भाषाशास्त्राच्या विशेष शाखेवर व तदंतर्गत व्युत्पत्तिशास्त्र यावर एकाच वेळीं ग्रंथरचना केलेली आपणांस आढळून येते व यामुळे या दोन्हीहि शास्त्रशाखाचा फायदा झालेला आहे. तसेंच अलीकडे जिवंत भाषांचा अभ्यास करण्याकडेहि अधिक प्रवृत्ति होत असल्याचें दिसून येत आहे ध्वनिशास्त्र व भाषाविषयक मानसशास्त्र यांचा अभ्यास करण्यास प्रचलित भाषांचें निरीक्षण व अभ्यास याची आवश्यकता आहे ही गोष्ट अधिक स्पष्टपणें निदर्शनास आणली गेली. विशेषतः हेन्री स्वीट यानें ही गोष्ट प्रामुख्यानें पुढें मांडली व आतां कोणताहि भाषाशास्त्रीय सिध्दांत मांडावयाचा झाल्यास त्याला प्रचलित भाषेचा आधार असला पाहिजे ही गोष्ट स्पष्ट झाली असून त्यामुळे प्रचलित भाषांचें ज्ञानहि अधिक वाढत आहे. गेल्या चाळीस वर्षांत अनेक विद्वानांनीं भाषाशास्त्राच्या क्षेत्रामध्यें परिश्रम केले आहेत त्यांतील नांवें घ्यावयाचीं झाल्यास पुढील देतां येतील-जॉर्ज व्ही. डी. गॅबेलेंड्स, विल्हेल्म वुट, बॅली, कोर्टने, ब्लूमफिल्ड, डेलब्रुक, व्हॉन गिनेकेन, हेल. हेन्री, हर्ट, ॲलेक्स कॉक, मेलेट मेरिंगेर, नोरिन, ओअर्टेल, पेडरसन, सॅडफिल्ड, शुशार्ट, सेकेझाये, स्ट्रीटबर्ग, स्टर्टव्हॉन, सटर्लिन, स्वीट, उहलेनबेक, वॉसलर, वेशस्लर, इ०.

वरील विवेचनावरून आपणांस असें दिसून येईल कीं प्रारंभीच्या भाषाशास्त्रांनीं भाषांचें वर्गीकरण वगैरेसारख्या मोठमोठ्या प्रश्नांचा विचार करून सामान्य सिद्धांत शोधून काढण्याकडे दृष्टि ठेवली होती. परंतु अर्वाचीन भाषाशास्त्रज्ञांची दृष्टि निरनिराळे शब्द, त्यांचीं रूपे व ध्वनि यांची विस्तृत प्रमाणावर तुलना करून त्यांचें स्पष्टीकरण करण्याकडे असते व त्यांची उत्पत्ति किंवा भाषापद्धतीचा विकास किंवा भाषेची रचना अशासारख्या प्रश्नांस ते वाजूला टाकतात तेव्हां यांपैकीं अधिक महत्त्वाची गोष्ट कोणती असा प्रश्न आपल्यापुढें उभा राहातो. अर्वाचीन शास्त्रज्ञ भाषाविषयक सर्वसामान्य सिद्धांत प्रतिपादन करणें धोक्याचें आहे असें म्हणतात परंतु शास्त्राचें ध्येय स्पेन्सरच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ज्ञानाचें एकीकरण करणें हें आहे. आणि त्यामुळें मोठमोठ्या प्रश्नांचा विचार करून सामान्य सिद्धांत शोधणें आवश्यक होय व अर्वाचीन अभ्यासांत या गोष्टीकडे दुर्लक्ष झाल्यामुळें

त्यास दक्षता प्राप्त झाली आहे तसेंच त्यामध्ये व्यापक दृष्टीहि आढळत नाहीं व त्यांनीं भाषांचे तौलनिक महत्त्वमापन करण्याकडेहि लक्ष दिलें नाहीं. तसेंच विशिष्ट शब्द किंवा त्यांचे विशिष्ट रूप यांस प्राधान्य देण्याचे कारण काय? किंवा भाषेतील शुद्ध-अशुद्ध कशास म्हणावें, तसेंच भाषेत होत जाणारे फरक इष्ट आहेत कीं अनिष्ट आहेत, तसेंच एखादी सर्व राष्ट्रांस बोलतां व समजतां येईल अशी सार्वराष्ट्रीय भाषा बनविता येणें शक्य आहे काय इ प्रश्नहि खरोखर महत्त्वाचे आहेत व त्यांचे शास्त्रीय दृष्टीने मंथोधन झालें पाहिजे. परंतु अर्वाचीन शास्त्रज्ञ अशा कल्पनांना वेडगळ ठरवितात किंवा त्यांची टवाळीहि करितात. परंतु या प्रश्नांकडे वळण्यापूर्वी आपण भाषेची वाढ प्रथम कशी होत जाते ह पाहू.

भाषेची उत्पत्ति--भाषेची उत्पत्ति प्रथम कशी झाली असावी यासंबंधीं आतांपर्यंत अनेक अभ्यासकांनीं अनेक मतें व्यक्त केलेली आढळतात यासबंधींची प्राथमिक कल्पना म्हणजे ईश्वरानें भाषा निर्माण केली ही होय. ईश्वरानें सर्व वस्तु निर्माण केल्या व त्यांस नांव दिलीं. हीच कल्पना ऋग्वेदांत 'बृहस्पत प्रथम वाचो अग्र यत् प्रैत नामधेयं दधानाः।' (ऋ. १०.७१ १) या ऋचेत व्यक्त केलेली आढळते परंतु चिकित्सक अभ्यासकांस ही कल्पना मान्य होणें शक्य नाहीं तेव्हां तो भाषेचे आधिभौतिक कारण शोधूं लागतो. सृष्टीमध्ये भाषा असणारा म्हणजे शब्दोच्चार करणारा एकटा मनुष्यप्राणीच आहे असें नाहीं, तर इतरहि कांहीं प्राणी शब्द करतांना आढळतात. पक्षी, माकडासारखे सस्तन प्राणी हे शब्दांनीं व मुद्रांपासारखे प्राणी कांहीं विशिष्ट अवयवांच चलनवलन करून आपल्या मनातील इंगित व्यक्त करण्यास समर्थ असतात. पण या बाबतींत मनुष्यप्राण्याची रचना अधिक सोईस्कर आहे. त्यास दोन पायांवर चालता येत असल्यामुळ त्याचे हात मोकळे राहतात व हातांनं आज्ञा घेऊन शब्द करावयास त्याचे तोंड मोकळें राहते त्याला आपलं रक्षण केवळ कुठ्यासारखें तोंडानें चावून करावयाचें नसतें, तसेंच त्यास उदरभरणासहि गाईसारखा पुष्कळ चारा खावा लागत नाहीं त्यामुळें त्यास तोंडानें गाणें किंवा शब्द करणें अधिक सुलभ असतें. पण या शब्द करण्यापासून भाषा कशी उत्पन्न होते हा प्रश्न आहे. यांचीं उत्तर निरनिराळ्या अभ्यासकांनीं निरनिराळीं दिलीं आहेत.

अनुकरणमूलकता--भाषा इतर प्राण्यांच्या शब्दांच्या अनुकरणानें उत्पन्न झाली असें एक मत आहे. पक्ष्यांचीं व कांहीं प्राण्यांचीं नांवें त्यांच्या शब्दावरून पडलीं आहेत ही गोष्ट स्पष्ट आहे कोकिळ हा शब्द अनेक भाषांत जवळ जवळ याच रूपांत आढळतो. उदा. सं कोकिला, ग्रो कोक्कुस; लॅ कुकुलस; फ्र कुकु, इं. कुक्कू कुकूओ; प्र जुनी फ्रें कोगुल; प्रा नी. जर्म. कुक्कु; उ. नी. जर्मे कुक्कु; डच कोएकोएक; ॲं सॅ. गोक, डॅ गिऑग, स्वी गोक; आइस्लॅंडिक गौक, प्रा. उ जर्म कौच; इं. कुकू; प्रा. कोइल, हिं. कोएल; का कोगिले. इ. यास्कानेंहि पक्षिनामे शब्दानुकरणावरून पडलीं आहेत ही गोष्ट निरुक्तात नमूद केली आहे. तसेंच नादाचा संबंध असणारे वाद्यवाचक शब्द किंवा फडफडणें, धडधडणें हे शब्द असल्या नादसदृश क्रिया दर्शक शब्दांच्या अनुकरणावरून तयार झाले आहेत ही गोष्ट खरी. तथापि सर्व शब्दांची उत्पत्ति अनुकरणाने लागत नाहीं हींहि गोष्ट खरी. या मताची 'बौबौ मत' म्हणून मॅक्समुल्लरने चेष्टा केली आहे.

उद्गारमूलकता—मनुष्य निरनिराळे विकार व्यक्त करण्याकरितां आहा! छी! वा! अगाई! अबबब! असले जे उद्गार काढतो त्यांवरून भाषेची उत्पत्ति झाली असें एक मत आहे आता आश्चर्य, भय वगैरे प्रसंगीं मनुष्याच्या तोंडून आं! सारखे ध्वनी निघतात हे खरें, पण बहुतेक उद्गारवाचक शब्द एकाक्षरी व तुटक स्वरूपाचे असून भाषेतील अनेक प्रकारचे शब्द बनविण्याच्या किंवा त्यांतील संबंध जाडण्याच्या कामीं ते समर्थ होणें शक्य नाहीं. या मताला 'फु! फुः! मत' असें म्हणतात.

नादमूलकता--प्रत्येक वस्तूस आघात झाला असतां नाद उत्पन्न होतो व प्रत्येक वस्तूस एक विशिष्ट नाद असतो. यावरून शब्दाचा विशिष्ट नाद व त्याचा अर्थ यांचा कांहीं तरी मूल संबंध असावा व त्यामुळें मनुष्याच्या विशिष्ट भावनांचें व्यक्तीकरण विशिष्ट नादानें होत असतें असें हें मत आहे. यासच 'डिंगडॉंग मत' असें नाव असून हे मॅक्समुल्लरने पुढ आणलें होतें पण लवकरच तें टाकून दिलें.

निःश्वासमूलकता--जेव्हां मनुष्य एखादें श्रमाचें काम करीत असतो तेव्हां तो विशिष्ट तऱ्हेनें श्वास बाहेर टाकतो व मधून मधून तो श्वास विशिष्ट आवाजयुक्त अथवा शब्दयुक्त असतो. ओझें उचलणार लोक किंवा श्रमाचें काम करणारे लोक तें काम करीत असतांना कांहीं तालबद्ध उद्गार काढताना अथवा गाणें म्हणतांना आपणांला आढळतात. त्या विशिष्ट उद्गारांवरून साहचर्यामुळें तत्तत्क्रियाबोधक शब्द निघाले असावे असें एक मत आहे. यास 'यो हे हो' असें नाव असून याचा पुरस्कर्ता नॉयर हा आहे.

प्रेमोद्गारमूलकता--तथापि या वरील कोणत्याहि एका विशिष्ट मताचा अंगीकार केला असतां भाषेतील सर्व प्रकारच्या शब्दांची उपपत्ति लागत नाहीं, तर या सर्वांचा थोडाफार आश्रय घेऊनच प्रत्येक भाषेचा इतिहास अभ्यासून भाषेच्या उत्पत्तीची मीमांसा लाविली पाहिजे अशा तऱ्हेनें विचार करून जेस्पर्सन यानें भाषा ही प्राथमिक अवस्थेतील मनुष्यप्राणी आपल्या उत्कट भावना व विशेषतः प्रेमविषयक भावना व्यक्त करण्याकरतां जीं गाणीं वगैरे म्हणत असे किंवा अभ्यास व नादयुक्त शब्द उच्चारीत असे त्यावरून बनली असावी असें मत नमूद केलें आहे.

भावनाव्यक्तिमूलकता--तथापि वरील मतांचा परामर्ष घेतां असें दिसतें कीं, मनुष्याच्या मनामध्यें कांहीं कल्पना उत्पन्न झाली, त्यानें एखादी आश्चर्यकारक गोष्ट पाहिली, त्यास अतिशय आनंददायक अशी गोष्ट घडली किंवा त्यानें एखादें पराक्रमाचें कृत्य केलें किंवा पाहिलें म्हणजे त्याच्या मनांत जे विकार उत्पन्न होतात--ज्या भावना उसळतात--त्या व्यक्त करण्याची त्यास उत्कट इच्छा उत्पन्न होते. एखादा सुंदर देखावा पाहिला कीं आपल्या सहचराचें त्याकडे लक्ष वेधावें असें त्यास वाटतें, सुंदर गाणें ऐकलें कीं त्याचें अनुकरण करावें असें वाटतें, पराक्रमाचें कृत्य पाहिल्यास त्यास शाबासकी द्यावीशी वाटते. याप्रमाणें भावनांची उत्कटता उद्गाररूपानें बाहेर पडते. ह्या भावना प्रेमविषयक, वीररसात्मक, हर्षात्मक, शोकपूर्ण वगैरे अनेक प्रकारच्या असूं शकतील व त्या प्रमाणें निरनिराळे उद्गार मनुष्याच्या तोंडून बाहेर पडतील व प्रसंगसाहचर्यानें त्या उद्गारांत निरनिराळे अर्थ उत्पन्न होतील याप्रमाणें अनुकरण, भावनिदर्शन वगैरेपासून शब्दांचा व नंतर भाषेची उत्पत्ति झाली असली पाहिजे.

प्राथमिक व प्रगत भाषा--आतां या प्राथमिक भाषेच प्राथमिक अवस्थेतील स्वरूप कसें असावें हें आपणांस ऐतिहासिकदृष्ट्या भाषांचा अभ्यास करीत मागें मागें गेलें असतां कळण्यासारखें आहे अशा तऱ्हेनें ऐतिहासिक दृष्टीनें भाषेचा अभ्यास करूं लागल्यास आपणास असें दिसून येतें कीं, मनुष्याची प्रवृत्ति भाषेतील शब्दांचे उच्चार अधिकाधिक सुलभ व साधे करण्याकडे असते मूळ आर्यन् भाषेतील शब्द उच्चारावयास बरेच अवघड असून संस्कृत नंतर प्राकृतामध्यें ते अधिक सुलभ, तर आज त्याहूनहि सुलभ झाले आहेत. तसेंच शब्दातील स्वराघात नाहींसा होत चालला आहे. आपण आपले विकार प्रदर्शन करण्याच्या कामीं अलीकडे पुष्कळच संयम वापरतों परंतु असंस्कृत लोक तेच विकार फारच क्षुब्धतेनें प्रकट करतात. तसेंच दिवसेंदिवस शब्द आखूड करण्याकडे प्रवृत्ति आढळते. प्राथमिक भाषेतील शब्द लांब, उच्चारावयास अवघड, जोडाक्षरयुक्त व नादयुक्त असावेत. अर्वाचीन भाषापेक्षां प्राचीन भाषांत व्याकरणविषयक रूपेंहि अधिक आढळतात. उदाहरणार्थ ऋग्वेदामध्यें तुबन्त अथवा हेत्वर्थक रूप करण्याचे १६ प्रकार आढळतात. [अर्नोल्ड ऐतिहासिक वैदिक व्याकरण पृ ३१०] तसच शब्दाच्या रूपांत विकार करण्याऐवजीं अलीकडे सहायक शब्द अथवा अव्ययें वापरण्याची प्रवृत्ति अधिक आढळते. पूर्वीच्या भाषा अधिक क्लिष्ट तर अलीकडील सुटसुटीत दिसतात. भाषेची प्रगति अधिक अधिक पृथक्करणात्मक होण्याकडे आढळते. पूर्वीच्या भाषांत व्याकरणविषयक अपवाद, अनियमितपणा वगैरे गोष्टी अधिक आढळतात तर अलीकडे साधारणतः सर्वसामान्य नियमांकडे प्रवृत्ति आढळते. आज असंस्कृत अथवा प्राथमिक अवस्थेतील लोकांच्या भाषांकडे पाहिलें असतां वरील गोष्टींची सत्यता पटते. ही गोष्ट हिमड यानें अंदमानी भाषा, मीनॉफ यानें आफ्रिकेतील भाषा, थॉम्सन यानें संताळ भाषा, कर यानें आस्ट्रेलियन भाषा, यासंबंधीं केलेल्या विधानांवरून स्पष्ट होते.

यावरून ह्विटने याच्या मताप्रमाणें प्राचीन भाषा अधिक साध्या व सुटसुटीत असण्याऐवजीं त्याच्या अगदीं उलट स्थिति आढळते पूर्वीच्या भाषांतील वाक्य व शब्दरचना अधिक क्लिष्ट व अवघड असून अनेक अपवाद, अनियमितपणा वगैरे भानगडी त्यांमध्यें असत. तसच प्राचीन भाषांमध्य अमूर्तकल्पनावाचक शब्द कमी असून मूर्तकल्पनावाचक शब्द फार असत. उदाहरणार्थ टॅस्मानियामधील भाषेंत आंबा, पेरू, फणस यासारख्या निरनिराळ्या जातींच्या झाडास शब्द आहेत पण सर्वसामान्य वृक्षवाचक शब्दच नाहीं. तसेंच मृदु, कठोर, शीत, दीर्घ इत्यादि कल्पना त्यांस व्यक्त करतां येत नाहींत. ह्युरन भाषेंत निरनिराळ्या रंगांच्या गाई दर्शविणारे स्वतंत्र शब्द आहेत पण गाय अशा अर्थी सामान्य शब्द आढळत नाही. ब्राझिलमधील बकैरी भाषेंत असेच निरनिराळ्या रंगांच्या पोपटांस स्वतंत्र शब्द आहेत पण पोपट असा जातिवाचक शब्द नाहीं. परंतु याच प्राथमिक भाषात एकच पदार्थास अनेक शब्द वापरलेले आपणांस आढळतील. उदाहरणार्थ निघटूमध्यें पृथिवीवाचक २१ शब्द दिले आहेत. कदाचित् पूर्वी या प्रत्येक शब्दास स्वतंत्र अर्थकक्षा असेल पण आज त्यांतील फरक नाहींसा होऊन ते सर्वसामान्यार्थानेंच वापरले जातात. अर्थात् एकाच वस्तूमधील थोडाफार फरक दाखविण्यास स्वतंत्र शब्द असणें चांगलें व आजच्याहि भाषांत असे शब्द-समुच्चय आढळतात; उदाहरणार्थ बल या शब्दास सांड, धांडया, खोंड, पोळ, वसू, पाडा, वळू इत्यादि निरनिराळे शब्द आहेत

पण त्यांच्या अर्थात आपणांस थोडाफार भेद करतां येतो व भेद करण्याची प्रवृत्ति व प्रत्येक शब्दास स्वतंत्र अर्थकक्षा निश्चित करण्याची प्रवृत्ति अर्वाचीन भाषांत दिसून येते. परंतु बलांचा तांडा, लांडग्यांची टोळी, माशांचा थवा, हरणांचा किंवा मेंढ्यांचा कळप, माणसांची झुंड इत्यादि समूह या एकाच कल्पनेचे वाचक अनेक शब्द आपणांस आढळतात. ही गोष्ट प्राचीन भाषांत अधिक आढळते पण मनुष्याच्या सामान्य व्यवहाराबाहेरच्या अनेक कल्पना व्यक्त करण्यास त्या भाषांत शब्दच आढळत नाहींत.

तसेंच पूर्वीच्या भाषा अधिक काव्यमय असून शास्त्रापेक्षां काव्याची उत्पत्ति अधिक जुनी असन भाषेची प्रवृत्ति अधिक अधिक वस्तुनिदर्शक व गद्यमय होण्याकडे असे आढळते. तसेंच विचारापेक्षां विकाराचा प्रादुर्भाव लवकर होतो त्यामुळें पूर्वीची भाषा मानवी विकार दर्शविण्यास अधिक समर्थ असून निरनिराळ्या विचारांची वाढ कमी झाली असल्यामुळें ते व्यक्त करण्यास कमी समर्थ होती. भाषेचा उत्तम गद्य वाक्यें अथवा विचारयुक्त कल्पनापेक्षां मनातील निरनिराळ्या भावनांचा उद्रेक, उत्कट विकार व त्यांचे प्रदर्शन करणारें काव्य यामध्येच आपणांस शोधला पाहिजे. मनुष्य आपले विचार गद्यामध्ये व्यक्त करण्यापूर्वीच आपल्या कल्पना अथवा विकारांचें काव्यांत अथवा गाण्यात निबंधन करीत असे अर्थात् हें त्यांचें काव्य अथवा गाणें म्हणजे आधुनिक संगीताच्या स्वरूपाचें नसून गुणगुणण्याच्या किंवा लावण्या-पोवाडयाच्या रूपाचें असे.

मनुष्यास जेव्हां आपले विचार दुसऱ्यास कळवावे व ते त्यास समजावे अशी इच्छा झाली असेल त्या वेळीं त्याच्या उद्गारांस भाषेचें स्वरूप प्राप्त झालें असलें पाहिजे व येथे पद्याऐवजीं गद्याचा त्याने उपयोग केला असला पाहिजे. अशा वेळीं विशिष्ट ध्वनींची विशिष्ट अर्थाशी सांगड घालण्यांत आली असली पाहिजे व या बाबतींत प्रथम अनुकरणात्मक शब्दांस प्राधान्य मिळालें असलें पाहिजे. यावेळी चिवचिव करणारी ती चिमणी, कावकाव करणारा तो कावळा असे शब्द ताबडतोब विशिष्ट पदार्थवाचक बनले असले पाहिजेत; पण सर्वच शब्द अशा रीतानें बनणें शक्य नाहीं. बाकीचे शब्द हे वऱ्याच क्रिया होऊन वळणावळणानें सध्याचें स्वरूप पावले असले पाहिजेत.

तसेंच प्राथमिक भाषेंतील शब्द बहुतेक मूर्त कल्पना अथवा पदार्थ किंवा वस्तुवाचक असले पाहिजेत. या प्रकारचे प्रथमचे शब्द म्हणजे विशेषनामें होत व हींहि विशिष्ट मनुष्याच्या काहीं ध्वनिविषयक लकबी, किंवा विशिष्ट ध्वनी अनेकवार उच्चारण्याचा संयव वगैरवरून पडलीं असावीं. त्यानंतर सामान्यनामें बनलीं असावीं काहीं विशेषनामांची सामान्यनामें बनण्याची क्रिया आपल्या भाषेंत आजहि चालू असलेली आपणांस दिसते. जमदग्नि (रागीट मनुष्य), धृतराष्ट्र (आंधळा), विदुर (संकरज) इत्यादि नांवे सामान्यनामांचे स्वरूप पावलीं आहत. तसेंच प्रथम काहीं तरी एकामागून एक अशा प्रकारें उच्चारलेल्या ध्वनींस ऐकणाराकडून अनुरूप प्रतिक्रियेचें उत्तर मिळाल्यास त्याच ध्वनींच्या पुनरुच्चारामुळें तीच क्रिया पुन्हां पुन्हा उत्तरादाखल घडल्यास त्या ध्वनि समुच्चयास उच्चारणारा व ऐकणारा याच्या मनात विशिष्ट अर्थ प्राप्त होतो. अशा तऱ्हेनें प्रथम विशिष्ट क्रियाबोधक अगर वाक्यस्वरूपी ध्वनींस अर्थ प्राप्त झाला असावा व त्यानंतर त्याच पृथक्करण होऊन निरनिराळे शब्द बनले असावे असें एक मत आहे.

एकेदरींत भाषा प्रथम अर्धवट नादबद्ध ध्वनींच्या वयक्तिक व विशिष्ट प्रसंगींच्या उच्चारणापासून उदय पावून अर्धवट वाक्यखंड अथवा शब्दाच्या रूपानें प्रगट होत गेली असावी. आरंभींचें तिचे स्वरूप क्लिष्ट व बाजड असून मनुष्याच्या वयक्तिक लहरीवर अवलंबून असावें परंतु प्रथमपासन तीमध्ये हळू हळू कमी अधिक गतीनें पण सारखी प्रगति होत असून तिचें स्वरूप अधिकाधिक स्पष्ट, नियमबद्ध, सुलभ व सोपें होत चालले आहे अद्यापि कोणतीहि भाषा पूर्णत्वाप्रत पोंचली नाहीं परिपूर्ण भाषेंत प्रत्येक बाब एकाच शब्दानें, व सारख्या बाबी सारख्या शब्दांनीं व्यक्त होत जाऊन सर्व विकल्प वगैरे नाहींसे होतील, ध्वनि व अर्थ यांचा पूर्ण मिलाफ असेल व अर्थातील निरनिराळ्या छटा स्पष्टपणें व्यक्त करतां येतील, तसेंच गद्य व पद्य, सौंदर्य व सत्य, विचार व भावना, यांस व्यक्त करण्यास योग्य शब्द असून व्यक्तीस आपले विचार व्यक्त करण्यास स्वातंत्र्य, सुलभता व चारुता यांची कधीं वाण पडणार नाहीं.

मुलांची भाषा--ही भाषमध्यें प्रगति कमकशी होत गेली असेल हें पाहण्यास आपण आतां लहान मुलांच्या भाषेपासून आरंभ करू. लहान मुलाच्या भाषेच्या वाढीमध्ये तीन काल असतात. (१) ओरडण्याचा काल, (२) बोबडे बोलण्याचा काल व (३) व्यावहारिक भाषा बोलण्याचा काल. हा शेवटचा काळ बराच दीर्घ असुन त्याचे पुन्हां दोन भाग पाडतां येतील--(१) बालभाषेचा काल, व (२) जनभाषेचा काल. पहिल्या कालामध्यें तो आपली वैयक्तिक भाषा बोलत असतो व दुसऱ्या काळांत सामान्य समाजाची भाषा बोलूं लागतो. सामान्यतः म, ब, प हीं अक्षरें त्यास प्रथम यऊं लागतात, असें अनेकांचें मत आहे. व यानंतर हळु हळू इतर अक्षरें तें मूल बोलूं लागतें व र वगैरेसारखीं व्यंजनें यावयास त्यास दीर्घकाल लागतो प्रथम प्रथम मुलें एका वेळीं एक एकच अक्षराचा उच्चार करतात व अनेक अक्षरांचें पुनरुच्चारण करतात. त्यामुळें त्यांच्या भाषेत दादा,

पापा, नाना अशा पुनरुच्चारित अक्षरांचे शब्द बरेच अपतात. जीं व्यंजनें त्यांस प्रथम येत नाहींत त्यांबद्दल तीं दुसरीं व्यंजनें उपयोगतात. (उ० खाऊबद्दल मुल आऊ म्हणताना बहुधा आढळून येतें.) ती येऊ लागल्याबरोबर सर्वत्र चुकीचीं व्यंजनें काढून शुद्ध शब्द उच्चारण्याकडे त्यांची प्रवृत्ति असते. भाषेचे ज्ञान व्हावयास केवळ त्या भाषेतील बऱ्याचशा शब्दांचे ज्ञान होऊन भागत नाहीं तर ते शब्द एकमेकांशीं कांहीं विवक्षित नियमांनी जोडले गेले पाहिजेत म्हणजे त्या भाषेचे व्याकरण माहीत झालें पाहिजे. प्रथम प्रथम मुलास व्याकरणासंबंधीं कांहींहि माहिती नसते व तीं बोलताना निरनिराळ्या शब्दांचा संबंध दाखविण्याच्या किंवा ते एकमेकांशी जोडण्याच्या भानगडीत पडत नाहींत. तर तीं नुसते निरनिराळे शब्द स्वतंत्रपणें एकापुढें एक म्हणून ठेवतात व कांहीं वेळां एकाच शब्दावरून सर्व वाक्याचा बोध करितात. उदा. 'वर एवढाच शब्द उच्चारून मला उचलून घे असें मुलें सांगतात. तर 'टापी' किंवा 'आगरखा एवढयाच शब्दावरून त्या वस्तू आपणास घालावयास पाहिजेत असे दर्शवितात. किंवा 'बाहर' (भूर) या शब्दावरून फिरावयास जावयाचें आहे ही गोष्ट व्यक्त करितात. कालांतराने एक शब्दच उच्चारणारें मूल कांहीं अधिक शब्द परंतु अनिर्बंध रीतीने जोडलेले असे उच्चारूं लागतें व याप्रमाणें त्यांची हळु हळु नियमबद्ध वाक्य उच्चारण्याकडे प्रवृत्ति होत जाते. या बाबतींत एका गोष्टीची त्याम फार मदत होते व ती म्हणजे अनुकरण किंवा पुनरुच्चारण ही होय. आपण लहान मुलाजवळ जे शब्द किंवा जे वाक्य उच्चारतों त्याचा तें पुनरुच्चार करीं व अशा रीतीने त्याचे शब्दांचे व वाक्यांचें ज्ञान वाढत जातें. जेव्हा आपणास एखादी परकीय भाषा शिकावयाची असेल तेव्हां अशा रीतीनें ती भाषा बोलणाऱ्या मनुष्यानें उच्चारलेलीं वाक्यें किंवा शब्द याचा पुनरुच्चार करणें हे फार फायद्याचे होतें. कारण त्यामुळें तीं चांगल्या तऱ्हेनें स्मरणांत राहून वेळेवर त्यांचा पुन्हां उपयोग करता येतो. लहान मुलास प्रश्नार्थक व निषेधार्थी वाक्यें अगोदर येतात असेहि कांहीं भाषा-शास्त्रज्ञांचें मत आहे. शब्दयोगी अव्ययें यावयास मुलास फार वेळ लागतो अथ स्टने यानें कांहीं आंकडे देऊन दाखविले आहे, व प्रथम प्रथम मुलें निरनिराळे शब्द मधल्या संयोजक शब्दांशिवायच बोलताना आढळतात. तसेंच लहान मुलें भाषा शिकत असताना परकीय भाषा शिकतांना ज्या आपल्या चुका होतात तशाच प्रकारच्या चुका करतानाहि आढळतात.

मातृभाषा शिकणें सुलभ कां?—आपणास आपली मातृभाषा इतकी चांगली कशी शिकतां येते यासंबंधीं अनेकांनीं अनेक कारणें व मतें निर्दशित केलीं आहेत. (१) लहानपणीं आपले वागिंद्रिय अधिक चलनसुलभ असतें तितकें मोठेपणी रहात नाहीं. पण लहान मुलें लहानपणीं उच्चारांत फार चुका करतात. (२) लहान मुलाचे श्रवणेंद्रिय अधिक तीक्ष्ण व संस्कारक्षम असतें. पण त्यासहि शिक्षण अवश्य आहे (३) लहान मुलास पूर्वीच्या कांहीं सवयी जडलेल्या नसतात व त्यामुळें कांहीं दोष टाळण्याचा त्यास श्रम पडत नाहींत असें कांहींचे म्हणणें आहे. परंतु त्यासहि कांहीं चुका मुद्दाम टाळाव्या लागतात. (४) स्वीटनें एक कारण असें दिलें आहे की, लहानपणीं मुलास कोणतेच काम करावयाचे नसल्यामुळें त्याला आपली भाषा शिकण्यास परिस्थिति अत्यंत अनुकूल असते (५) कांहींचे म्हणणें असें आहे की, आनुवंशिक संस्कारामुळें लहान मुलाच्या मेंदूची रचना व वाढ अशी झालेली असते की, त्यामुळें त्यास आपली भाषा शिकणें अतिशय सोपें जातें. परंतु एखादें मूल आईबापांस परकीय असलेली भाषाहि त्या दशांत राहिल्यास सुलभतेनें शिकतें. (६) जस्परसनच्या मत या गोष्टींचें कारण त्या मुलामध्येंच व त्याच्या सभोंवतीं असलेल्या लोकांच्या त्याजपाशीं असलेल्या वर्तणुकीमध्येंच आढळेल. उदा. मातृभाषा शिकण्याचा काल आयुष्यातील अगदी प्रथमचीं वर्षें हा असल्यामुळें अतिशय साईस्कर असतो. त्यावेळीं अनुकरणशक्ति अतिशय तीव्र असते व ती पुढें हळु हळु कमी होत जात. तसेंच लहानपणीं परिस्थितीशीं अनुरूप होण्याची पात्रता मनुष्याच्या अंगीं अधिक असते. दुसरी गोष्ट लहान मुलास त्याची मातृभाषा जितकी सातत्याने एकावयास मिळते तितकी एखाद्या मनुष्यास परकी भाषा उत्तरवयात शिकावयाची असता मिळत नाही. तसेंच लहानपणीं मुलाची आई अथवा दाई तेच तेच शब्द पुन्हां पुन्हां उच्चारून मुलाच्या मनावर ते पक्केपणीं ठसविण्याचा प्रयत्न करीत असतात. तसच लहान मुलास मातृभाषेचे धडे सर्व काल मिळत असतात. परंतु उत्तरवयांत एखादी भाषा शिकावयाची असतां आपणास कांहीं नियमित वेळां व तेहि इतर अनेकांबरोबर धडे मिळूं शकतात. तसेंच लहान मुलास जी भाषा शिकावयाची असते ती प्रत्यक्षतः ज्या परिस्थितीसंबंधीं शिकावयाची असत ती परिस्थिति समोर पहात असतां व समोर दिसत असता शिकावयास मिळते. तसेंच बोलताना हात असलेल्या हावभावाबरूनहि त्यास भाषेचे निश्चित ज्ञान होत असतें. उलट परकीय भाषा शिकतांना आपण ती अकाळीं, भलत्याच परिस्थितींत व कृत्रिम मार्गानें शिकत असतों. याप्रमाणेंच ज्याचा प्रत्यक्ष संबंध नाहीं अशाहि अनेक गोष्टीसंबंधीचे भाषण मुलांस ऐकावयास मिळतें व त्याचा त्याच्या मेंदूवर परिणाम होऊन त्याच्या स्मरणांत राहण्यास मदत होते. तो जें जें कांहीं ऐकतो त्याचा त्याच्या मनावर परिणाम होऊन तो तें लक्षांत ठेवतो व जरूर तेव्हां त्याचा उपयोग करतो. तसेंच मुलें आपली भाषा ज्या

मनुष्यांपासून शिकतात तीं त्यांचे शिक्षक नसतांहि शिक्षकाचें कार्य करितात त्यामुळें शिक्षकाबद्दल वाटणारा संकोच त्या व्यक्तीच्या बाबतींत त्या मुलांस बाधक होत नाहीं. तसेंच हीं माणसें म्हणजे त्याची आई, बहीण वगैरे अगदीं निकटचे आप्त असल्यामुळें तीं हें शिकविण्याचें काम अतिशय सहानुभूतिपूर्वक करतात व त्याच्या स्वाभाविक चुकाकडे दुर्लक्ष करून व त्यास उत्तेजन देऊन त्याची भाषा शुद्ध होण्याचा प्रयत्न करतात. बोलावयास शिकण्याच्या बाबतींत मुलांपेक्षां मुली अधिक पुढें असतात व त्या अधिक शुद्ध बोलतात आणि त्यांच्या उच्चारामध्यें मुलांपेक्षां कमी दोष असतात असें दिसतें,

येथें मातृभाषा म्हणजे आईची भाषा नव्हे बालपणांतील सभोंवारच्या समाजाची भाषा असें समजलें पाहिजे. भाषेच्या बाबतींत मातेपेक्षां पित्याच्या भाषेचा परिणाम मुलांवर त्यापेक्षांहि कमी होतो जर कोणाचा विशेष परिणाम मुलांच्या भाषेवर होत असेल तर ज्या व्यक्तींशीं त्या मुलाचा त्याच्या वयाच्या तिसऱ्या वर्षानंतर संबंध येतो त्यांचा होय. आपणांस कांहीं मुलें आपल्या घरच्या नोकरांच्या बोलण्यांतील कांहीं लकबी उचलतांना आढळतात व त्या त्यांना कायमच्या जडलेल्याहि दृष्टीस पडतात. परंतु मुलाच्या भाषेवर विशेष परिणाम त्याच्या समवयस्क किंवा थोड्या वयानें मोठ्या अशा संगडग्यांचा होतो. कारण त्यांच्या संगतींत तें मूल वारंवार असतें व त्याचे शब्द-ज्यावेळीं त्याची बुद्धि अत्यंत संस्कारक्षम असते अशा वेळीं-त्याच्या कानांत सारखे गुणगुत राहतात. ग्रीनलंडमधील डॅनिश आईबापांचीं मुलें डॅनिश भाषेपेक्षां एस्किमो भाषा अधिक लवकर शिकतात ही गोष्ट प्रख्यात आहे. तसेंच जर्मनीच्या आफ्रिकेतील वसाहतींतील जर्मन मुलें जर्मन भाषेपेक्षा आफ्रिकन भाषा लवकर शिकतात असें मिनहॉकनें म्हटलें आहे.

मुलांच्या स्वतंत्र भाषा—आपणांस लहान मुलें कधीं कधीं विचित्र शब्द किंवा आपल्या लहानपणा स्वतंत्र भाषाहि तयार करतांना आढळतात. परंतु त्यांची फारशी वाढ होत नाहीं व त्यास तितकें महत्त्वहि राहात नाहीं मुलांच्या खेळांतील कांहीं गुप्त भाषाहि आपणांस आढळतात. त्यांतील सरकारी किंवा चकारी भाषा आपल्या इकडे दृष्टीस पडतात. या भाषांत प्रत्येक शब्दास आरंभीं किंवा मध्यें सकार किंवा चकार जोडलेले आढळतात. तसेंच प्रत्येक शब्दाचें स्वरूप विकृत करूनहि एक नवीनच भाषा मुलें तयार करतांना आढळतात; किंवा वर्णव्यत्यास करून नवीन शब्द बनविलेलेहि आपणांस दृष्टीस पडतात. उदा. 'घाबरोबा बामणला' किंवा 'स्वाराजांची म्हारी आली पसरंजी सतरा.' असे प्रकार लहान मुलें खेळत असतां करतांना आपणांस आढळतात. प्रौढपणामध्येंहि मिताक्षरा किंवा महानुभावांच्या सांकेतिक लिपि हीं अशा तऱ्हेच्या भाषांचीं उदाहरणें म्हणून देतां येतील. कित्येकदां लहान मुलें जर बराच काल निराश्रित राहिलीं तर आपली एक नवीनच भाषा बनवितात. अशा तऱ्हेच्या भाषांचीं उदाहरणें हॉरेशिओ हेल या अमेरिकन मानवशास्त्रज्ञानें आपल्या एका अहवालात नमूद केलीं आहेत. अशा तऱ्हेची भाषा उत्पन्न करण्यास दोन किंवा अधिक मुलें अशा परिस्थितींत राहिलीं पाहिजेत कीं. त्यांचा प्रौढ माणसांशीं बिलकुल संपर्क येतां कामा नये, व हीच स्थिति त्यांची पूर्ण वाढ होऊन त्यांचीं स्वतंत्र कुटुंबें होऊन त्यांस आपली भाषा पुढच्या पिढीस देण्याकरितां प्रजाहि उत्पन्न होण्यापर्यंत कायम राहिली पाहिजे. अशा तऱ्हेची परिस्थिति त्यास कांहीं अमेरिकेतील इंडियन लोकांत आढळली. ऑस्ट्रेलियामध्येंहि तशी असणें संभवनीय आहे. त्यानें अशा पांच नवीन भाषांचीं उदाहरणें दिलीं आहेत. अशा तऱ्हेचीं आइसलंड व स्वीडनमध्येंहि कांहीं उदाहरणें नमूद केलेलीं आढळतात. परंतु अशा तऱ्हेची बनविलेली भाषा फारच तुटपुंजी असते. ब्राझिलमध्येंहि आपणांस अशा तऱ्हेच्या कांहीं केवळ कांहीं कुटुंबातच प्रचलित असलेल्या स्वतंत्र भाषा आढळतात

बालभाषेंतील विशिष्ट शब्द--लहान मुलें अगदीं बाल्यावस्थेंत जे तोंडातून निरर्थक ध्वनी काढतात त्यांसच त्यांच्या माता अथवा दाई किंवा भोंवतालची मंडळी कांहीं तरी अर्थ जोडून शब्दाचें स्वरूप देतांना आपणास आढळतात. अशा तऱ्हेचे शब्द म्हटले म्हणजे मा, अम्मा, बाबा, दादा, ताता, आबा इ० होत. वास्तविक मूल हे वर्ण केवळ चाळा म्हणून तोंडातून उच्चारतें व पूर्वी सांगितल्याप्रमाणें म, ब, प हे ओष्ठ्य वर्ण लहान मुलांस प्रथमत. उच्चारावयास येऊ लागल्यामुळें तोंडातून वरील ध्वनी निघूं लागतात व त्यांस विशिष्ट अर्थ प्राप्त होऊन मातृपितृत्ववाचक व निकटचे आप्तवाचक शब्द तयार होतात ही गोष्ट आपणांस जगांतील सर्व भाषांमध्यें जे मातृपितृत्ववाचक मा, ममा, बाबा, अबा, पपा वगैरे शब्द आहेत त्यांवरून स्पष्ट दिसून येते.

भाषा व स्त्रिया--भाषेच्या वाढीमध्यें व तिच्या स्वरूपांत निरनिराळ्या काळीं पडणाऱ्या बदलामध्यें स्त्रियांचेहि अंग प्रामुख्यानें असतें. कित्येक समाजांत आपणांस पुरुष व स्त्रिया अगदीं स्वतंत्र निरनिराळ्या बोलीमध्यें बोलतांना आढळतात. अशा तऱ्हेचें उदाहरण कॅरिबियन लोकांबद्दल रॉशफर्ड यानें दिलें आहे. या लोकांत पुरुष कॅरिबियन तर स्त्रिया अरावाकन भाषा बोलतात. व पुरुषांनींच स्त्रियांच्या भाषेचें अनुकरण केलें आहे. आपणाकडे इश्श ! मेल्या ! यासारखे उद्गार पुरुष काढणार नाहीं. परंतु

या लोकांच्या भाषेचीहि कसुन तपासणी केल्यास आपणांस असें आढळतें कीं, वास्तविक ह्या समाजांतील पुरुष व स्त्रिया अगदीं पृथक् अशा भाषा किंवा बोली बोलतात असें नसुन त्या समाजामध्यें कांहीं विशिष्ट शब्द केवळ स्त्रियांतच व कांहीं विशिष्ट शब्द केवळ पुरुषांतच वापरले जातात एवढेंच दिसुन येतें. व त्या भाषेचें व्याकरणहि सर्व लोकांस सामान्य असेंच आहे. परंतु ही गोष्ट आपणांस सुसंस्कृत समाजांतहि आढळून येते. उदा. कांहीं समाजामध्यें स्त्रिया नवऱ्याचें नांव उच्चारीत नाहींत व विशिष्ट शब्द विशिष्ट परिस्थितीमध्यें योजणें स्त्रियांस योग्य मानलें जात नाहीं. अशा ठिकाणीं त्या शब्दाचें कार्य दुसरे शब्द योजून अप्रत्यक्षपणें करून घ्यावें लागतें (न्हाव्याबद्दल 'बाहेरचा' तसेंच बाहेर बसणें, चूळ भरून येणें इ०). अशा वेळीं आपणांस स्त्री व पुरुष हीं स्वतंत्र भाषा बोलतात असें म्हणतां यावयाचें नाहीं. परंतु कांहीं ठिकाणीं उदा. संस्कृत भाषेतील नाटकामध्यें आपणांस असें आढळतें कीं, पुरुषवर्ग सामान्यतः शुद्ध संस्कृत भाषा वापरतो व स्त्रिया प्राकृत भाषेमध्यें संभाषण करतांना आढळतात. परंतु या ठिकाणीं या दोन भाषा बोलणाऱ्या वर्गांमध्यें वास्तविक स्त्री-पुरुष हा भेद नसुन वर्गभेद किंवा सांस्कृतिक भेद आहे. कारण संस्कृत भाषा ही राजे, मंत्री, ब्राह्मण, वगैरे उच्चवर्गीय लोकांची असुन कनिष्ठ वर्गातील उदा० वाणी, उदमी, कोळी, शिपाई वगैरे वर्गातील पुरुषहि प्राकृत भाषाच बोलतात. या ठिकाणीं या दोन भाषांतील फरक एकाच भाषेच्या दोन निरनिराळ्या अवस्था दाखवितो. एक सुलभ, स्वाभाविक व परिचित असुन दुसरी अधिक आर्ष, कठिण व प्रौढ अशी आहे. व आजहि आपणांस एखाद्या न्यायाधीशाच्या व सामान्य मनुष्याच्या भाषेमध्यें हा फरक आढळून येईल. आजहि आपणांस शहरांतील सुसंस्कृत वर्गाची भाषा व खेडवळवर्गाची ग्राम्य भाषा यामध्यें बराच फरक आढळतो. परंतु या दोन स्वतंत्र भाषा नसुन हा भेद एका भाषेवरील उच्च संस्कार मात्र दाखवितो. वास्तविक स्त्रिया आपली परंपरागत भाषा कायम ठेवण्याच्या बाबतींत पुरुषांपेक्षां अधिक स्थिर स्वरूपाच्या असतात; त्यांस घराबाहेरील वातावरणाचा व व्यवहाराचा तितका संपर्क होत नसल्यामुळें पुरुषांइतक्या अनेक बाह्य गोष्टींचा त्यांच्या बोलण्यावर परिणाम होत नाहीं. त्यामुळें पुरुषवर्गाची भाषा जितकी चंचल असते तितकी स्त्रियांची असत नाहीं. तंजावराकडील महाराष्ट्रीय लोकांत आज आपणांस स्त्रियांमध्येंच मराठीची परंपरा अधिक स्थिर राहिलेली दृष्टीस पडते. आतां स्त्रियांच्या बोलण्यामुळें भाषेमध्यें कांहीं ध्वनिविषयक फरक होतात ही गोष्ट खरी आहे. परंतु एकंदर भाषेतील फरकांच्या मानानें ते तितके फारसे महत्त्वाचे नाहींत. परंतु शब्दांच्या बाबतींत मात्र स्त्रियांकडून कांहीं विशिष्ट शब्द भाषेमध्यें विशेष रूढ झाल्याचें किंवा विशिष्ट शब्दांस विशिष्ट अर्थ प्राप्त झाल्याचें आढळून येतें. उदा. स्त्रिया शरीराच्या विशिष्ट अवयववाचक शब्दांचा उच्चार करण्यास लाजतात, आणि त्यामुळें अशा शब्दांबद्दल त्या इतर समानार्थक अथवा अप्रत्यक्ष अर्थबोधक शब्द वापरतात, व अशा शब्दासहि कांहीं काळानें पुन्हां तेच विशिष्ट शरीरावयववाचक अर्थ प्राप्त होऊन पुन्हां त्याबद्दल दुसरे अप्रत्यक्ष शब्द योजावे लागतात. तसेंच स्त्रिया असभ्य व ग्राम्य शब्द सहसा उच्चारीत नसल्यामुळें त्या बाबतींत भाषेच्या स्वरूपामध्यें त्या बराच बदल घडवून आणितात. तसेंच अपशब्द टाळण्याचेहि स्त्रिया प्रयत्न करतात, व शपथेचे प्रकारहि त्यांस वर्ज्य असतात.

स्त्रियांची शब्दसंपत्ति--स्त्रियांची शब्दसंपत्तीहि मर्यादित असते. कारण त्यांचें कार्यक्षेत्र मर्यादित असल्यामुळें त्यांस कांहीं विशिष्ट व्यापारांतीलच शब्द परिचित होतात. उलट पुरुषाचें कार्यक्षेत्र व संचार अधिक विस्तृत असल्यामुळें तो नव्या नव्या कल्पना व विषय वाचक शब्द नेहमीं तयार करीत असतो. सामान्यतः स्त्रियांच्या मनांत कोणत्या कल्पना विशेष वागत असतात व पुरुषांच्या मनांत कोणते विचार चालले असतात यासंबंधानें अनुमान काढावयाचें झाल्यास पुढील उदाहरण बोधप्रद होईल:-आस्ट्रो या अमेरिकन प्रोफेसरानें केलेला एक प्रयोग आपणांस मनोरंजक वाटेल. त्यानें एकाच विश्वविद्यालयांतील एकाच वर्गांतील २५ विद्यार्थ्यांस व विद्यार्थिनींस त्यांस वाटतील ते शंभर शब्द शक्य तितक्या कमी वेळांत लिहून आणावयास सांगितलें. अशा तऱ्हेनें त्याच्या जवळ ५००० शब्द लिहून आले. त्यांतील बरेचसे शब्द अर्थात् पुनरुक्त होते. परंतु स्त्रियांनीं लिहिलेल्या शब्दांत विचाराचें क्षेत्र अधिक मर्यादित व समव्याप्त होतें. पुरुषविद्यार्थ्यानीं १३७५ निरनिराळे शब्द लिहिले तर स्त्रियांनीं फक्त ११२३ च लिहिले. एकदांच लिहिल्या गेलेल्या १२६६ शब्दांपैकीं शेंकडा २९ पुरुषांनीं लिहिले होते व शेंकडा २० स्त्रियांनीं लिहिले होते. पुरुषांनीं प्राणिवाचक शब्द अधिक लिहिले होते तर स्त्रियांनीं पोशाखविषयक शब्द अधिक लिहिले होते. अन्नवाचक शब्द पुरुषांनीं फक्त ५३ लिहिले तर स्त्रियांनीं १७९ लिहिले. स्त्रियांनीं लिहिलेल्या शब्दांत सामान्यतः सभोंवतालची परिस्थिति, पूर्ण वस्तुबोधक, अलंकारिक, वैयक्तिक व मूर्तस्वरूप शब्द अधिक होते तर पुरुषांनीं लिहिलेल्या शब्दांत अधिक दूरचे, विधायक, उपयुक्त व सामान्य स्वरूपाचे व भाववाचक शब्द अधिक होते. अनुप्रासयुक्त शब्द स्त्रियांपेक्षां पुरुषांनीं अधिक लिहिले. यावरून पुरुषांचें शब्दांतील ध्वनीकडे अधिक लक्ष असतें ही गोष्ट स्पष्ट होते व त्याप्रमाणेंच पुरुषांमध्यें शब्दांवर कोट्या करण्याची

प्रवृत्ति अधिक असते असें आपणांस आढळतें व आपणांस स्त्रियांमध्यें भाषाशास्त्राचा अभ्यास केलेल्या स्त्रिया कमी कां आढळतात हें यावरून स्पष्ट होतें. वास्तविक स्त्रिया कोणतीहि गोष्ट पुरुषांपेक्षां अधिक लवकर शिकतात, अधिक लवकर ऐकतात व अधिक लवकर प्रत्युत्तरहि देतात. पुरुष हा या बाबतींत स्त्रीपेक्षां अधिक धिम्मा आहे. तो एखादी गोष्ट ऐकल्यावर तिच्यावर विचार करतो, नंतर आपल्या शब्दांची निवड करतो आणि नंतर योग्य शब्दांची निवड केल्यावर उत्तर देतो. स्त्रियांमध्यें 'हें' 'असें' अशा तऱ्हेचे सामान्यार्थक शब्द घालण्याची प्रवृत्ति अधिक आढळते. याचें कारण त्यांच्यामध्यें कित्येक वाक्यें अर्धवट सोडून देण्याची प्रवृत्ति असते. कारण त्या आपणांस काय बोलावयाचें याचा पूर्णपणें विचार करण्यापूर्वीच बोलावयास प्रारंभ करतात. तसेंच त्यांच्या शब्दांमध्यें उद्गारवाची शब्दांचा व वाक्यखंडांचा भरणाहि अधिक असतो. स्त्रियांची ग्राहकशक्तीहि पुरुषांपेक्षां अधिक असते ही गोष्ट दिसून आलेली आहे. एकच पॅरिग्राफ स्त्रियांनीं व पुरुषांनीं सारखाच वेळ अवलोकन केल्यास त्यांचें पुनरुच्चारण अथवा सारांशकथन पुरुषांपेक्षां स्त्रिया अधिक चांगलें करूं शकतात. स्त्रिया प्रत्युत्तर देण्यास किंवा बोलण्यास पुरुषांपेक्षां अधिक तत्पर असतात, ही गोष्ट जरी खरी असली तरी त्यांची शब्दसंपत्ति मर्यादित क्षेत्रापुरतीच व संख्येनेहि मर्यादित असते व त्या विचाराच्या बाबतींत सूक्ष्मपणापेक्षां सरासरीकडे अधिक झुकलेल्या दिसतात. हॅवेलॉक एलीस यानें असें दाखविलें आहे कीं, ज्याप्रमाणें अत्यंत बुद्धिमान् व्यक्ती पुरुषांमध्यें अधिक होतात त्याप्रमाणें वेडयांचेंहि प्रमाण स्त्रियांपेक्षां पुरुषांमध्यें अधिक असतें व ही गोष्ट आपणांस भाषेच्या बाबतींतहि आढळून येते. जगांतील अत्यंत मोठमोठे वक्ते किंवा ग्रंथकार हे पुरुषच होऊन गेले आहेत. तसेंच अज्ञानी लोकांची लोकसंख्याहि पुरुषांमध्येंच अधिक निघेल. परंतु सरासरीनें बुद्धीचें प्रमाण स्त्रियांमध्यें अधिक आढळेल. याचें कारणहि शोधण्यास फार दूर जावयास नको. याचें मूळ आपल्या कुटुंबांतील श्रमविभागणीमध्यें आहे. आज पिढ्यानुपिढ्या मनुष्यास अशा तऱ्हेचें काम पडत आहे कीं, त्यास आपला सर्व उत्साह फार थोडया वेळेपुरता एकत्र करावा लागतो व ती वेळ म्हणजे जगांतील कलह. उदा. युद्ध व पारध हे प्रसंग होत. अशा वेळीं त्यास बोलण्याचे प्रसंग थोडेच असतात. हे श्रमाचें काम झाल्याबरोबर मनुष्य लागलाच शिथिल होऊन आळसामध्यें आपला वेळ घालविण्यास प्रवृत्त होतो. उलट स्त्रियांच्या वांटणीस जें घरकाम येतें त्यामध्यें असा तात्पुता विशेष जोराचा उत्साह दाखविण्याचे प्रसंग येत नसतात. तरी सतत श्रमाचे प्रसंग तिच्यावर नेहमींच येतात. उदा. तिला मुलांची काळजी घेणें, स्वयंपाक करणें, शिवणें, टिपणें, धुणें वगैरे कामें करावीं लागतात. या कामांत तिला फारसा खोल विचार करावा लागत नाहीं, व हीं कामें इतरांच्या सहवासांतहि करतां येण्यासारखीं असल्यामुळें सामान्यतः काम करतांनाहि तोंड चालू ठेवण्याची प्रवृत्ति त्यांच्या ठिकाणीं जास्त आढळून येते, व हीच घटना थोडयाबहुत फरकानें आपणांस आजहि चालू असलेली आढळून येते.

परकीयांचा संपर्क--भाषेच्या वाढीमध्यें एखाद्या राष्ट्राचा परकीय राष्ट्राशीं संबंध आल्यास फार महत्त्वाचा परिणाम होतो. दोन भिन्न भिन्न राष्ट्रांचा सैनिकी पुंडे दिलेल्या निरनिराळया प्रकारांनीं होऊं शकतो असें हेम्पल यानें दाखविलें आहे. (१) जेत्यांची संख्या लहान असून जरी ते राज्यकर्ते असले तरी त्यांची संख्या देशाच्या भाषेवर परिणाम करण्यासारखी नसते. अशा वेळीं त्यांचे वंशज देश्यभाषेचाच स्वीकार करतात व त्यांची मूळ भाषा नष्ट होते. परंतु त्यांतील शासनसंस्था, सैन्य वगैरे बाबतींतील शब्द देश्यभाषेमध्यें मिसळतात. (२) जेत्यांची संख्या पुष्कळ असून ते स्वतःचीं कुटुंबें घेऊन येतात व त्यांचा प्रवाह दीर्घकालपर्यंत चालू राहतो. अशा वेळीं जेत्यांचा वर्ग हा उच्च व मध्यमवर्ग बनून त्यांच्यापैकीं कांहीं खालच्या वर्गातहि अंतर्भूत होतात. देश्य लोक दूर निघून जातात किंवा दास बनतात व त्यांची भाषा दासभाषा होते व ती जवळ जवळ नाहींशी होऊन फक्त त्यांनीं उचलेलेल्या कांहीं हलक्या धंद्यांमध्यें मात्र शिल्लक राहते. (३) जित लोकांना जेते आपल्या साम्राज्यांत सामील करून त्यांचा एक प्रांत बनवून त्यावर आपले सरदार व सैन्य पाठवून राज्य करतात व कांहीं व्यापारी व वसाहती लोकहि त्यांबरोबर येतात. हे लोक जित राष्ट्रांतील उच्च व वजनदार मध्यम वर्गाचे बनतात. ही क्रिया जर दीर्घकाल चालली तर जित राष्ट्रांतील लोक जेत्यांच्या भाषेचें व राहणीचें अनुकरण करतात. (४) कांहीं लोक परकीय देशामध्यें लहान लहान टोळयांनीं निरनिराळया वेळीं वसाहत करण्यास येतात व तेथें नोकरी-चाकरी करून किंवा लहान सहान धंदे करून राहतात. अशा वेळीं ते देश्य लोकांशीं मिसळण्याचा व त्यांची भाषा शिकण्याचा प्रयत्न करतात व आपलें पूर्वदेशीय वैशिष्ट्य टाकून देऊन देश्य लोकांशीं एकजीव होण्याची धडपड करीत असतात. असे लोक हळू हळू देश्य लोकांतच अंतर्भूत होतात व त्यांच्या मूळ भाषेचा देश्य भाषेवर कांहीहि परिणाम होत नाहीं. वरील प्रकारांमध्यें आपणांस असें आढळून येईल कीं, पहिल्या व चौथ्या प्रकारामध्यें देश्य भाषांस प्रामुख्य मिळतें आणि दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारामध्यें जेत्यांच्या भाषांस महत्त्व प्राप्त होतें व तिसऱ्या प्रकाराशिवाय बाकीच्या सर्व प्रकारांत बहुसंख्य लोकांची भाषा ही सामान्य भाषा बनते.

वरील प्रकारांत आपणांस चौथ्या प्रकारामध्यें वसाहतवाल्यांच्या मूळ भाषेंतील कांहीं वर्णे देश्यभाषेंतील कांहीं वर्णांबद्दल योजलेले आढळून येतील. परंतु ही क्रिया जोंपर्यंत ते मूळ भाषेस चिटकून राहतील तेथपर्यंत दृष्टीस पडेल. त्यांचीं मुलें लहानपणापासून जर देश्य भाषा शिकतील तर तीं आपल्या मूळ भाषेंतील लकबी अजीबात टाकून देतील व त्यामुळें त्यांच्या परकीयपणाचा देश्य भाषेवर कांहींच परिणाम होणार नाहीं. परंतु तिसऱ्या वर्गामध्यें जेव्हां एखाद्या राष्ट्रांतील सर्वच लोक दीर्घ कालामध्यें स्वतःची भाषा टाकून राज्यकर्त्यांची भाषा स्वीकारण्याचा प्रयत्न करतील तेव्हां त्यांच्या भाषेमध्यें वर्णेव्यत्यासाचीं अनेक उदाहरणें आपणांस आढळून येतील व त्याचा त्या प्रदेशांतील एकंदर भाषेवर महत्त्वाचा परिणाम होईल.

शब्दांची देवघेव--अशा तऱ्हेनें जेव्हां दोन भाषा बोलणारे लोक एकत्र येतील तेव्हां त्या दोन भाषांतील कांहीं शब्दांची देवघेव होणें मात्र अपरिहार्य आहे. अशा तऱ्हेनें शब्दांची देवघेव कोणत्या प्रकारच्या शब्दांत होत असते हें आपण पाहूं. जेव्हां दोन भाषांचा संबंध येतो तेव्हां जर एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राची भाषा शिकत असेल तर त्या परकीय राष्ट्राच्या भाषेपेक्षां त्या राष्ट्राच्या देश्यभाषेवरच त्याचा परिणाम अधिक होतो. जेव्हां आपण एखादी परकीय भाषा बोलतों तेव्हां बोलण्यामध्यें आपण स्वभाषेंतील एकहि शब्द न आणण्याचा प्रयत्न करतों. परंतु स्वतःची भाषा बोलत असतांना मात्र आपण तितकी काळजी घेत नाहीं. फेडरिक दि ग्रेट हा आपणांस फ्रेंच भाषा फार उत्तम येते म्हणून अभिमान बाळगीत असे, व त्याच्या फ्रेंच भाषेंतील लेखनांत एकहि जर्मन शब्द आढळत नसे. परंतु त्याचें जर्मन भाषेंतील लेखन मात्र अनेक फ्रेंच शब्द व वाक्प्रचार यांनीं भरलेलें आढळतें. कित्येकदां वक्ता परकीय भाषेंतील शब्द आपले त्या भाषेच्या ज्ञानाचें प्रदर्शन करण्याकरितां घालीत असतो. आपणांकडील फारसा इंग्रजीचा गंध नसलेले हरिदासहि मधून मधून इंग्रजी शब्द कीर्तनांत उच्चारतांना आपणांस आढळतात. जेथें असे परकीय शब्द एखाद्या देश्य भाषेंत गेलेले आढळतात तेथें त्या बाबतीपुरता तरी परकीय भाषेचा त्या देश्य भाषेवरील श्रेष्ठपणा व्यक्त होतो. आतां अशी परकीय शब्दांची संख्या देश्य भाषेमध्यें नेहमींच पुष्कळ आढळते असें नाहीं. कित्येकदां ती फारच थोडी व कांहीं विशिष्ट बाबीपुरतीच आपणांस आढळून येईल. उदा. एखादा जिन्नस एका देशांत मुळींच तयार होत नसेल व तो परकीय देशांतून आणावा लागेल तर त्या पदार्थाचा वाचक शब्द त्या पदार्थाबरोबर त्या देशांत येईल. उदा. आपणांस शर्करा हा शब्द जगांतील अनेक भाषांत गेलेला आढळून येईल. सं. शर्करा; फा. शक्कर; अर. सक्कर, आमक्कर; ग्री. सक्खर; लॅ. सॅक्करम्; इटा झुक्केरो; जर्म. त्सुकर; जु फ्रें. सुक्र; फ्रें सक्कर; इं. शुगर; हिं. शक्कर; का. शक्करे, सक्खरे; सिं. शकर. तसेंच कांहीं वनस्पती व प्राणी नवीनच एखाद्या देशांत प्रवेश करतांना आपलीं नांवें आपल्या बरोबर घेऊन येतात व तीं देश्य भाषांतून रूढ होतात. अननस, पपई, बांबू, कांगरू, जिराफ इत्यादि शब्द या प्रकारचे होत. जेव्हां एखाद्या राष्ट्राची संस्कृति दुसऱ्या राष्ट्रापेक्षां अधिक प्रगत असते तेव्हां त्या संस्कृतीबरोबर त्या भाषेंतील शब्दहि त्या हीन संस्कृतीच्या देशांत प्रवेश करतात. गणित, ज्योतिष वगैरे शास्त्रांतील पारिभाषिक शब्दांचे उदाहरण आपणांस या बाबतींत देतां येईल परकीय भाषेंतील शब्द घेणें कित्येकदां खरोखरीच जरूर असतें. परंतु कांहीं प्रसंगीं तितकी जरूरी नसतांहि परकीय शब्द देश्य भाषेंत घुसलेले आपणांस आढळतात. या गोष्टीस कारण म्हटलें म्हणजे परकीय भाषेंतील शब्द योजून आपण फार शिष्ट आहों असें दाखविण्याची प्रवृत्ति किंवा परकीय भाषेंतूनच विचार करण्याची प्रवृत्ति हें होय. तसेंच कित्येकदां एखादी कल्पना अगर वस्तु प्रथम परकीय भाषेच्या द्वारें आपणांस ज्ञात झाल्यास स्वभाषेंतील योग्य शब्दांत ती व्यक्त करण्याचे परिश्रम न घेतां केवळ आळसामुळेंच परकीय शब्दांतच ती व्यक्त करण्याची प्रवृत्ति कित्येक लोकांत आढळून येते. या गोष्टीस कित्येकदां भाषांतरकारहि जबाबदार असतात. भाषादूषणाचें कारण अनेकदां वांशिक संस्काराच्या ऐवजीं संस्कृतिसंस्कार हेंच अधिक प्रभावशाली असतें, तथापि आपणांस हीहि गोष्ट विसरून चालणार नाहीं कीं, परकीय शब्द घेतल्यानें भाषा अधिक समृद्ध होते व विचारांतील निरनिराळ्या छटा दाखविण्यास ती अधिक पात्र होते. यामुळें भाषाशुद्धीबद्दल गवगवा करणाऱ्या लोकांचें म्हणणें आपणांस केव्हांहि सर्वच मान्य करतां येणार नाहीं. आतां कोणत्या तऱ्हेचे परकीय शब्द सामान्यतः देश्य भाषेंत प्रवेश करतात हें पाहूं:- सामान्यतः नामें, विशेषणें किंवा क्रियापदें अशा तऱ्हेचे मुख्य शब्दच परकीय भाषांतून घेण्याकडे प्रवृत्ति दिसते. सर्वनामें, शब्दयोगी अव्ययें, साहाय्यक क्रियापदें इत्यादि दुय्यम दर्जाचे शब्द बहुधा स्वीकारले जात नाहींत. संख्यावाचक शब्द क्वचित्च परकी भाषेंतून घेतले जातात, व असे घेतले गेलेच तर ते एखाद्या खेळासंबंधीं तदनुषंगानें आलेले आढळतात. उदा. इटिदांडूच्या खेळांतील वकट, लेड, मुंड इत्यादि शब्द १,२,३ या संख्यांचे वाचक असून ते तेलगू भाषेंतून मराठींत आले आहेत. तसेंच सांकेतिक अथवा गुप्त भाषेकरितां म्हणून कांहीं परकी भाषेंतील संख्यावाचक शब्द व्यवहारांत आपणांस आढळतात. उदा. आवारु (२), उदानु (३) इत्यादि नंद भाषेंतील शब्द व्यापारी लोकांत रूढ आहेत. शब्दयोगी अव्ययें व

उभयान्वयी अव्ययें वगैरे क्वचितच परकीय भाषेंतील घेतलीं जातात. व अशीं घेतलीं गेल्यास आपणांस त्या दोन भाषांचा संबंध विशेष आला असला पाहिजे असें म्हणतां येईल. उदा. मराठी भाषेंत व, आणि, कीं, ही फारसी भाषेंतील आलेलीं अव्ययें होत. परकीय भाषेंतील शब्दांचा देश्य भाषेच्या व्याकरणावर कांहीं परिणाम होतो काय असा प्रश्न विचारला असतां व्हिटने यानें त्यास जोराचें नकारार्थी उत्तर दिलें आहे व सामान्यतः परकीय भाषेंतील शब्द घेतांना त्यांचें विशिष्ट रूपच घेतलें जातें व त्याचें व्याकरण सामान्यतः देश्य भाषेप्रमाणें होतें. तथापि आपणांस देश्य भाषेचें व्याकरण परकीय भाषेपासून सर्वस्वी अविकृत राहतें असें म्हणतां यावयाचें नाहीं; तर आपणांस कित्येक ठिकाणीं वाक्यरचनेवर परकीय भाषेचा परिणाम झालेला आढळतो व कित्येक वाक्प्रचारहि परकीय भाषेवरून देश्य भाषेमध्यें उत्पन्न होतात. सध्यांच्या इंग्रजी शिकलेल्या लेखकांच्या मराठी लिखाणांत आपणांस ही गोष्ट प्रत्ययीं आढळते. कित्येक शब्द परकीय भाषेंतील शब्दांच्या भाषांतर रूपानें देश्य भाषेंत नवीन तयार होतात. हातरुमाल, आभारात ठेवणें, अभिनंदन करणें, ठराव मतास टाकणें इत्यादि उदाहरणें या प्रकारचीं होत. याखेरीज उर्दू, पिजिन इंग्लिश, चिनक जार्गन, क्रिओल, बिशेलेमार इत्यादि प्रकारच्या मिश्र भाषादि भिन्न लोकांच्या व्यवहारामुळें उत्पन्न होतात.

भाषेचें बदलणारें स्वरूप—एखाद्या राष्ट्रामध्यें एकच भाषा दीर्घकालपर्यंत प्रचलित असली तरी तिच्या स्वरूपामध्यें कालांतरानें बदल होत चालेला आपणांस आढळून येतो. उदाहरणार्थ, आर्य लोक भरतखंडामध्यें आले त्यावेळीं जी संस्कृत भाषा बोलत होते तीस आर्ष अथवा वैदिक असें नांव आहे तिच्यामध्यें व रामायणमहाभारतकालीन संस्कृत भाषेमध्यें आपणांस फरक आढळतो तसेंच कालिदासादिकांच्या काव्यग्रंथांच्या संस्कृत भाषेचें रूपहि आपणांस थोडेंसें भिन्न आढळतें व त्यानंतर तर त्याच लोकांचे वंशज प्राकृत तर अलीकडे देश्य भाषा बोलूं लागले आहेत हें आपण पहातों. इंग्रजी ही एकच भाषा दीर्घकालपर्यंत बोलणाऱ्या इंग्रज लोकांच्या भाषेंतहि प्राचीन, मध्यकालीन व अर्वाचीन अशीं तिचीं भिन्न स्वरूपें आपणांस आढळतात. ज्ञानेश्वरकालीन मराठी व आजचें मराठी यांतहि आपणांस किती तरी फरक पडलेला दिसतो. एवढेंच नव्हे तर सं. धूम, ग्री. थ्युमस, लॅ. फ्युमस, प्रा. रुंब्हा. दायम्यु, गॉ. दौस, प्रा. इं. दुस्ट-डुस्ट-डस्ट या शब्दांमध्यें कांहीं साम्य असेल अशी आपणास प्रथम कल्पना यावयाची नाहीं. परंतु तौलनिक भाषाशास्त्रामध्यें जर कांहीं अर्थ असेल तर हे सर्व शब्द एकाच मूळ शब्दामध्यें उच्चारभेद उत्पन्न होऊन तयार झालेले आहेत. हे उच्चारांतील फरक प्रत्येक समाजामध्यें बरोबर होत असतात. भाषेमध्यें जर कांहीं स्थिर गोष्ट असेल तर तींतील मानसिक क्रिया अथवा स्मृतिचित्रें ही होय. या क्रियेचा ऐतिहासिक अभ्यास करणें शक्य नाहीं. परंतु याच स्मृतिचित्रांस आपण जें ध्वनिरूपानें व्यक्त स्वरूप देतों त्यामध्यें मात्र कालांतरानें सारखा फरक पडत असतो. यावरून ध्वनींतील फरक अथवा उच्चारभेद म्हणजे या स्मृतिचित्रांना व्यक्त स्वरूप देण्याच्या बाबतींत होणारा फरक होय. व असा फरक समाजांतील निरनिराळ्या व्यक्तींमध्यें हळू हळू इतका पडत जातो कीं, एकाच शब्दाच्या उच्चारांतील ध्वनीमध्यें कांहीं पिढ्यांच्या अंतरानें पुष्कळच फरक पडतो व ज्याअर्थी आपणांप असा फरक आढळतो त्याअर्थी तो शब्द उच्चारतांना त्या समाजांतील व्यक्ति आपल्या वागिंद्रियाची रचना दोन्ही वेळीं निरनिराळ्या प्रकारानें करीत असली पाहिजे. विशिष्ट उच्चार करावयाच्या वेळची जी वागिंद्रियाची रचना तीस च वाक्पद्धति असें म्हणतात व उच्चारभेदाची मीमांसा करावयाची म्हणजे विशिष्ट समाजाच्या या वाक्पद्धतीचीच मीमांसा करणें होय. प्रत्येक व्यक्तीच्या वागिंद्रियाची रचना स्वाभाविकतःच अस्थिर असल्यामुळें त्या व्यक्तीनें केलेल्या उच्चारामध्यें थोडा बदल होण्याची संभवनीयता नेहमींच असते व हळू हळू हे बदल कायमचे होतात. अशा तऱ्हेनें व्यक्तीच्या उच्चारामध्यें बदल होणेंही गोष्ट स्वाभाविक व न टाळतां येणारी आहे व त्यामुळें विशिष्ट वाक्पद्धति बदलत असते आणि त्याबरोबर उच्चारभेद होत जातो.

ध्वनिनियम अथवा उच्चारभेदनियम—हे भेद कांहीं विशिष्ट नियमांस अनुसरून होतात त्यांसच 'उच्चारभेदनियम' किंवा स्वरनियम किंवा ध्वनिनियम असें नांव देण्यांत येतें, व आधुनिक भाषाशास्त्रामध्यें यास फार महत्त्व देण्यांत येतें. याचें थोडक्यांत स्वरूप सांगावयाचें म्हणजे असें सांगतां येईल कीं, विशिष्ट भाषेच्या विशिष्ट कालीं उच्चारण्याच्या पद्धतीचें निरीक्षण करून केलेलें विधान म्हणजे ध्वनिनियम होय तसेंच विशिष्ट परिस्थितीमध्यें विशिष्ट शब्दाचा विशिष्ट उच्चार कसा होतो हेहि आपणांस अशा ध्वनिनियमानें सांगतां येतें. उदा. पुढें जोडाक्षर आलें असता मागील ह्रस्व स्वरास गुरुत्व येतें. किंवा त्यावर जोर पडतो. जसें–सत्ता येथें स तींतील अ वर जोर येतो. तसेंच ध्वनिनियमानें आपणांस एकाच शब्दाचीं दोन निरनिराळ्या काळाचीं रूपें विशिष्ट तऱ्हेचीं असतात असें सांगतां येतें. उदा. ज्ञानेश्वरकालीन औ च्या ऐवजीं सध्यां उ वापरण्याचा प्रघात आहे. उदा. म्हणौनी–म्हणून, विवरौनियां–विवरूनियां, सांडौनि–सांडून इ. तसेंच निरनिराळ्या भाषांतील शब्दाची तुलना करूनहि आपणांस विशिष्ट ध्वनिनियम तयार करतां येतात उदा. सं. शतं, ॲ सातेम्, ग्री. हेक्तोन, लॅ. केंटम्, गॉ. हुंड, लिथु सिंतस् म्हणजे शंभर, यावरून आपणांस असा नियम काढतां येईल कीं, मूळ एका ध्वनीस संस्कृतमध्यें श, ग्रीकमध्यें क, लॅटिनमध्यें क,

जर्मनमध्यें ह, लिथुॲनिअनमध्यें स असें रूप प्राप्त होतें. अशा तऱ्हेनें विशिष्ट ध्वनीमध्यें निरनिराळ्या तऱ्हेचे फरक कसे पडत जातात हें पाहणें ही भाषाशास्त्रांतील एक महत्त्वाची गोष्ट होय, व या संशोधनास ऐतिहासिक व तौलनिक अशा दोन बाजू आहेत. व भाषाशास्त्राचें मूळ या ध्वनिविषयक संशोधनामध्येंच आहे, व अशा तऱ्हेचे बदल होण्याची निरनिराळ्या भाषांतील प्रवृत्ति जर आपणांस निश्चितपणें माहीत होणार नाहीं तर एकाच शब्दास भिन्न भिन्न कालांत व भिन्न भिन्न भाषेंत जीं निरनिराळीं स्वरूपें प्राप्त होतात त्यांतील सादृश्य आपणांस निश्चितपणें सांगतां येणार नाहीं. आपणांस वैदिक सोम व अवेस्ती होम हे शब्द एकच आहेत ही गोष्ट 'ह' हा विशिष्ट परिस्थितींत 'स' चाच उच्चारभेद आहे हा नियम ठाऊक असल्याशिवाय माहीत होणें शक्य नाहीं.

ध्वनिनियमांचें निरपवादित्व––भाषेंतील फरक न कळत होत असतात ही गोष्ट वर सांगितलीच आहे. बोलणारी व्यक्ति शब्दाच्या उच्चारामध्यें ऐकणाराच्या किंवा स्वतःच्याहि फारसें लक्षांत येणार नाहीं इतका किंचित् फरक करूं शकते. म्हणजे प्रत्येक बोलणारा विशिष्ट अक्षराच्या प्रमाण मानलेल्या उच्चाराच्या जवळपास कोठें तरी उच्चार करण्याचा प्रयत्न करीत असतो व प्रत्येक वेळीं तें अक्षर उच्चारतांना तो तसाच उच्चार करण्याचा जाणूनबुजून प्रयत्न करतो. आतां निरनिराळ्या वेळच्या उच्चारांमध्यें कदाचित किंचित फरक भासण्याचा संभव आहे. परंतु तो इतकी काळजी घेतो कीं, त्या विशिष्ट उच्चाराबरून प्रमाण उच्चाराचा बोध व्हावा. एवढी गोष्ट लक्षांत ठेवून आपणांस असें सामान्यतः विधान करतां येईल कीं, प्रत्येक मनुष्य विशिष्ट अक्षराचा एकच उच्चार करतो व ही गोष्ट जशी व्यक्तीच्या बाबतींत लागू पडते तशीच समाजाच्याहि बाबतींत खरी आहे. म्हणजे विशिष्ट समाज एका गृहीत धरलेल्या कालीं विशिष्ट उच्चार त्याच परिस्थितींत त्याच पद्धतीनें करीत असतो यासच लेस्किन, ब्रुगमन, ऑस्टॉफ, पॉल, सीव्हर्स वगैरे भाषाशास्त्रज्ञांच्या पंथानें ध्वनिनियमास अपवाद नसतो असें म्हटलें आहे. आतां ज्या ठिकाणीं आपणांस वारंवार अपवाद दिसून येतात त्या ठिकाणीं तसे दिसण्यास पुढील कारणांचा संभव असतो. (१) त्या ध्वनीवर त्याच शब्दांतील इतर शब्द, वाक्य अथवा आघात यांचा परिणाम झालेला असतो. किंवा (२) एखाद्या शब्दामध्यें आपणांस तो ध्वनि असल्यासारखा वाटतो तेथें वास्तविक तो निराळ्याच वर्गांतील असुन त्याची उपपत्तीहि भिन्न असते. (३) तो शब्द निराळ्याच भाषेंतील उसना घेतलेला असुन त्याचा उच्चार भाषेंतील सामान्य उच्चारापेक्षां भिन्न असतो. (४) तो अपवादात्मक ध्वनि सामान्य ध्वनिनियमावरून बनलेला नसुन दुसऱ्याच एखाद्या वर्गांतील ध्वनीवरून केवळ सादृश्यावरून बनलेला असतो. वरील अपवाद सोडले असतां एका भाषेंतील अमुक अमुक ध्वनीस विशिष्ट कालीं दुसऱ्या भाषेंत अमुक स्वरूप प्राप्त होतें अशा तऱ्हेचें विधान करणें समर्थनीय ठरतें इतक्या गोष्टी लक्षांत ठेवून ध्वनिनियम हे अबाधित असतात असें म्हणतां येईल व असें नसेल तर ध्वनींतील फरक जर कोणाच्याहि लहरीकरितां होत जातील तर भाषाशास्त्र हें शास्त्र या पदवीसच प्राप्त होणार नाहीं ध्वनिनियम हे भौतिक शास्त्रांतील नियमासारखे नाहींत. कारण त्यांची व्याप्ति सार्वत्रिक नसते, तर केवळ विशिष्ट भाषेपुरतीच मर्यादित असते. ध्वनिनियम हे केवळ एका विशिष्ट परिस्थितीबद्दलचें विधान अथवा विधानपरंपरा असुन त्यांस यापेक्षां अधिक व्यापक स्वरूप नसतें.

भाषेंत फरक पडण्याचीं कारणें––ज्या उच्चारभेदाचीं कारणें शोधावयाचीं असल्यास आपणांस विशिष्ट समाजाची वाक्पद्धति विशिष्ट वेळीं कशी बनत असते याचा विचार केला पाहिजे. पूर्वी सर्व उच्चारभेदांचें कारण मनुष्याचा स्वाभाविक आळस किंवा उच्चारसौलभ्य हें आहे असें समजण्यांत येत असे (श्लेपेर, व्हिटने). परंतु सुलभता व काठिण्य ह्या गोष्टी सापेक्ष आहेत. जी गोष्ट आपणांस एका वेळीं किंवा विशिष्ट परिस्थितीमध्यें कठिण वाटते तीच दुसऱ्या वेळीं वाटणार नाहीं. व संवयीनें कांहीं कठिण उच्चारहि आपण सहज काढूं शकतों व अपरिचित उच्चार आपणांस कठिण वाटतात, व कांहीं उच्चारभेद तर आपणांस सुलभतेपेक्षां काठिण्याकडेच झुकलेले आढळतात. कांहीं ग्रंथकारांनीं कर्णसाधुर्य किंवा नादबद्धता हें एक उच्चारभेदाचें कारण दिलें आहे (बॉप, शेरर). परंतु बोलणाऱ्याकडून जे शब्दोच्चारामध्यें फरक होतात ते बहुतकरून बुद्धया केलेले नसुन नकळत होत असतात व असे जर कर्णसाधुर्याकरतां शब्दोच्चारामध्यें फरक होत गेले असते तर ती गोष्ट निरनिराळ्या व्यक्तींच्या लहरीवर अवलंबुन राहून शब्दांच्या उच्चारामध्यें अगणित फरक होत जाऊन समाजामध्यें अनवस्था प्राप्त झाली असती. कांहींनीं हवामान हें एक उच्चारभेदाचें कारण दिलें आहे (ऑस्टॉफ). अर्थात हवामानाचा सामान्यतः राहणीवर, आयुष्यावर व संवयीवर परिणाम घडतो ही गोष्ट आपणांस मान्य केली पाहिजे. परंतु एकाच हवामानामध्यें राहणाऱ्या समाजाच्या भाषेमध्येंहि आपणांस कालांतरानें फरक पडलेले दिसतात. त्यामुळें हें कारण आपणांस निश्चितपणें विशिष्ट तऱ्हेच्या उच्चारभेदास म्हणून देतां यावयाचें नाहीं. कांहीं भाषाशास्त्र्यांनीं उच्चारभेदाचें कारण लहान मुलें भाषा शिकत असतांना वडिलांपासून तीं ऐकून पुन्हां उच्चार करतांना ज्या चुका करतात तें होय असें प्रतिपादिलें आहे, (डार्मेस्टेटर, पॅसी). ही गोष्ट खरी

मानली तरी असें म्हणावें लागेल कीं, लहान मुलांना आपल्या समाजाची भाषा पूर्णपणें केव्हांहि शिकतां येत नाहीं. परंतु आपणांस ह्याच्या उलट अनुभव येतो, कारण लहान मुलांनीं केलेल्या ढोबळ चुका लक्षकरच दुरुस्त करतां येतात व साधारणतः मुलें ७।८ वर्षांचीं होईपर्यंत आपल्या भाषेंतील शब्दांचे निरनिराळे सर्व उच्चार व ध्वनी पूर्णपणें अवगत करून घेतात तसेंच एका पिढींतील सर्वच मुलें एकाच प्रकारच्या चुका कशा करतील? परकीय लोकांशीं संबंध हेहि उच्चारभेदाचे एक कारण देण्यांत येतें (हर्ट, वेझेलर). यासंबंधीं बरेंचसे विवेचन आपण पूर्वी केलेच आहे. एकाच मानववंशाची वाक्पद्धति सामान्यतः एकाच स्वरूपाची असते व भिन्न वंशांमध्यें जितकें अधिक अंतर असेल तितका त्यांत फरक अधिक असेल. वरील मत अर्थात् भाषेंतील निरनिराळ्या शाखांमध्यें– उदा० लॅटिन भाषेच्या निरनिराळ्या इटॅलियन, स्पॅनिश, फ्रेंच, प्रॉव्हेन्सल इ० पोटशाखांमध्यें– जे फरक पडले आहेत त्यांची उपपत्ति लावण्यास सयुक्तिक दिसतें व परकीयांचा सैनिकी हें एक भाषेंतील फरकांस बलवत्तर कारण आहे ही गोष्ट अलीकडील बहुतेक शास्त्रकारांस मान्य झाली आहे. परंतु जेथें अशा परकीयांचा संबंध येत नाहीं अशा भाषेमध्येहि– उदा. इंग्रजी भाषेमध्यें–निरनिराळ्या काळांत जे अनेक फरक पडत गेले त्यांचें स्पष्टीकरण या उपपत्तीनें होत नाहीं. अशा तऱ्हेचे फरक पडण्यास मनुष्याचा व्यवसाय अथवा धंदा हें एक कारण पुढें करण्यांत येतें. विशिष्ट व्यवसायांतील मनुष्य नेहमीं आपल्या शरीराच्या विशिष्ट अवयवांचा उपयोग वारंवार विशिष्ट तऱ्हेनें करीत असतो. त्यामुळें त्याच्या अवयवांची रचना व त्याच्या शारीरिक संवयी यांस एक विशिष्ट वळण लागतें. ह्या संवयींचा त्याच्या वागिंद्रियावरहि परिणाम होत असला पाहिजे व त्यामुळें त्याची वाक्पद्धतीहि विशिष्ट प्रकारची बनत असली पाहिजे. एखाद्या मनुष्यास आपल्या धंद्याच्या निमित्तानें एकसारखें मोठ्यानें ओरडावें लागत असल्यास त्याच्या आवाजावर त्या ओरडण्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. तसेंच पुष्कळ गोंगाट असलेल्या ठिकाणीं काम करावयाचें असल्यास किंवा नेहमीं दूर अंतरावरून दुसऱ्यांशीं बोलावयाचा प्रसंग आल्यास सामान्यतः हळू होत जाणारे उच्चार या व्यक्तींच्या बाबतींत ऐकून न आल्यामुळें जरा मोठे होतात व स्वरांस–विशेषतः ज्यावर आघात आहे अशा अक्षरांतील स्वरांस–या लोकांच्या भाषेंत प्रामुख्य मिळतें व त्यामुळें त्यांच्या सामान्य वाक्पद्धतीवरहि त्याचा परिणाम होतो. तसेंच देशामध्यें युद्ध वगैरेसारखी एखादी मोठी खळबळ झाली किंवा सामाजिक अगर धार्मिक क्रांति झाली, दुष्काळ वगैरेसारखी आपत्ति आली तर समाजाच्या आयुष्यक्रमांत जो गोंधळ होतो व विस्कळितपणा उत्पन्न होतो तोहि या उच्चारभेदास कारण होतो. एकंदरींत पाहतां वंश, हवामान, व्यवसाय, वागिंद्रियाची रचना, व्यक्तिगत उच्चारभिन्नता, ऐतिहासिक व सांस्कृतिक परिस्थिति, उच्चारसुलभतेकडे प्रवृत्ति, मानवस्वभाव, अनुकरणप्रियता, परकीयांचा सहवास, आनुवंशिक संस्कार, यांत पुन्हां (अ) बाह्यस्वरूपविषयक अथवा भिन्न प्रकृतिमूलक, (आ) अंतःप्रवृत्तिमूलक–हवामान, रोग, अनैतिक आचरण इ. पासून होणारे, (ई) जातिसंकरज इत्यादि. यामुळें भाषेमध्यें फेरबदल नेहमीं घडून येत असतात. यांपैकीं प्रत्येक व सर्वांचाच मनुष्याच्या व समाजाच्या राहाणीवर व संवयीवर व त्यामुळें भाषेवर थोडाबहुत परिणाम होतो ही गोष्ट आपणांस मान्य केली पाहिजे.

उच्चारभेदांचे प्रकार—हे ध्वनिविषयक फरक दोन प्रकारचे असतात, निरपेक्ष व सापेक्ष. उदा (१) शब्दाचा उच्चार करण्याची निरनिराळ्या लोकांतील भिन्न पद्धति अथवा वाक्पद्धतींतील भेद यामुळें होणारे फरक. उदा. मराठीमध्यें आपण व आणि व हीं अक्षरें निरनिराळ्या तऱ्हेनें उच्चारतों पण बंगालीमध्यें दोहोंचाहि उच्चार व प्रमाणेंच करतात. किंवा अचा उच्चार ऑसारखा करतात. (२) आघातांतील फरक. यामुळें तर फारच महत्त्वाचे व निरनिराळ्या प्रकारचे फरक होतात. प्रत्येक वर्णाच्या उच्चाराच्या इतिहासामध्यें त्यावर आघात असेल किंवा नसेल त्या मानानें त्याच्या रूपांतराची दिशा अगदीं भिन्न भिन्न असते. प्रसिद्ध व्हर्नरचा नियम या आघातवैशिष्ट्याचेंच उदाहरण आहे. तसेंच इंग्रजी भाषेंतील धातूचीं स्वरभेदानें होणारीं निरनिराळ्या काळचीं रूपें (सिंग, सँग, संग) हीं आघातभेदामुळेंच होतात. या आघातभेदामुळें अनेक प्रकारचे फरक होतात. त्यांचें येथें विस्तृत विवेचन करण्यास जागा नाहीं, पण निर्देश करतों– (अ) स्वरद्वंद्वीकरण (डिफ्थॉंगायझेशन), (आ) द्वंद्वस्वरैकीकरण (मानाफ्थॉंगायझेशन), (इ) स्वरलोप, (ई) द्वित्तीकरण, (उ) वर्णनिमज्जन, (ऊ) विभिन्नीकरण, (ऋ) वर्णलोप, (ॠ) वर्णागम वगैरे. हे फरक निरपेक्ष असतात. यांखेरीज प्रत्येक भाषेंत उच्चाराच्या बाबतींत कांहीं सापेक्ष फरक होत असतात. म्हणजे एका वर्णाशेजारीं दुसरा वर्ण आला असतां कांहीं परिस्थितींत त्या वर्णांत फरक होतो. (१) गुण, वृध्दि व संप्रसारण हे संस्कृत शब्दांमध्यें आपणांस दिसतात, (२) अन्त्यलोप– यावत्–जों, कटक–कडें, (३) स्वरलोप– गम्–जग्मुः, (४) सान्निध्य परिणाम–पुनश्चर्वण; (५) स्वरागम– स्त्री–अस्तुरी, (६) स्वरभक्ति– स्वतः–सवता; –त्रास तरास; वर्ष–वरीस; इन्द्र–इन्दर, (७) अवयवलोप–सुकें केळें–सुकेळें, (८) वर्णलोप– जीवन–जिणें, (९) वर्णव्यत्यास– मशहूर–महशूर: लघु–हळु इत्यादि.

ग्रिमचें सूत्र हाहि एक महत्त्वाचा ध्वनिनियम आहे. त्यामध्यें इंडोयूरोपीय अथवा मूळ आर्यन् भाषेतील वर्णांचें ग्रीकमधून गॉथिक भाषेत व नंतर जर्मन भाषेत जातांना रूपांतर कसकसें होत जातें तें दाखविलें आहे. उदा. इंडोयुरोपीय भाषांतील प, त (ट), क या वर्णाबद्दल गॉथिक अथवा प्राचीन भाषांत अनुक्रमें फ, थ, ह हे वर्ण येतात व नंतर त्यांचे जागीं उच्च जर्मन भाषेत ब, द, ग हे वर्ण यतात. यांतच पुढें थोडी दुरुस्ती करून व्हर्नरनें असें दाखविलें कीं संस्कृत भाषेतील प, त, क या वर्णांपूर्वी असलेल्या वर्णावर जर आघात नसेल तर त्यांचें रूपांतर फ, थ, ह मध्यें होऊन लागलीच ब, द, ग मध्यें होतें. तसेंच संस्कृत किंवा आर्यन् भाषेतील यूरोपीय एसदृश अपूर्वी येणाऱ्या कण्ठ्य वर्णाबद्दल तालव्यवर्ण येतात. हा तालव्य नियमहि महत्त्वाचा आहे.

सादृश्यमूलक भेद--ध्वनिविषयक नियमांप्रमाणेंच सादृश्य हेहि ध्वनिविषयक फरक घडवून आणण्यास कारण होतें. आपण शब्दांतील उच्चारांमध्यें फरक झालेलीं अशीं दोन उदाहरणें घेतलीं कीं एकामध्यें ध्वनीबरोबरच अर्थामध्यें फरक झालेला आहे व दुसऱ्यामध्यें केवळ ध्वनींतच फरक झाला असुन अर्थ कायम राहिला आहे. तर आपणांस असें आढळून येईल कीं, दुसऱ्या उदा. हरणांत ध्वनिविषयक नियम हें फरकाचें कारण असुन पहिल्या उदाहरणांत सादृश्य हें कारण असण्याचा संभव आहे. ज्या भाषेचें आपणांस साधारण ज्ञान आहे त्या भाषेमध्यें बोलत असतांना आपल्या मनांतील निरनिराळ्या तऱ्हेचे विचार व्यक्त करतांना शब्दांचीं निरनिराळीं रूपें आपणांस सहज बनवितां येतात. परंतु अशा तऱ्हेनें विशेषणांचीं क्रियाविशेषणें बनविणें, क्रियापदांचीं निरनिराळीं रूपें बनविणें किंवा नामांचीं लिंग-वचन-विभक्तीप्रमाणें निरनिराळीं रूपें बनविणें ही गोष्ट आपणांस केवळ स्मरणशक्तीच्या साहाय्यानें बिनचूक रीतीनें करतां येत असें म्हणणें बरोबर होणार नाहीं. कोणाच्याहि स्मरणामध्यें सर्व तऱ्हेचीं रूपें राहणें शक्य नाहीं. हीच गोष्ट भाषेतील सर्व शब्दांच्या ज्ञानाच्या अशक्यतेबद्दल पतंजलीनें सांगितली आहे. 'बृहस्पतिरिंद्राय दिव्यं वर्षसहस्रं प्रतिपदोक्तानां शब्दानां शब्दपारायणं प्रोवाच नान्तं जगाम।' (पा. महा. १.१.१). या गोष्टीची तितकी जरूरहि नाहीं. कारण मनुष्य बोलतांना शब्दांचीं योग्य तीं रूपें बनविण्याची प्रवृत्ति त्यास स्वाभाविक होऊन त्याच्या स्मरणांत नसलेलीं रूपेंहि तो वापरतो. हीं बनवितांना तो कांहीं प्रत्ययहि योजतो. यावेळीं जर प्रत्येक वेळीं त्याम स्मरणशक्तीचा उपयोग करणें जरूर पडेल तर त्यास न चाचपडतां बोलतांच येणार नाहीं. वस्तुस्थिति अशी असते कीं, आपल्या स्मरणांत फारच थोडीं शब्दांचीं रूपें तयार असतात. परंतु त्यांवरून आपणांस सर्वसामान्य रीतीनें जरूर तीं शब्दांचीं रूपें बनवितां येतात. याच क्रियेस सादृश्य हें नांव आहे. आपल्या बोलण्यामध्यें विशिष्ट कार्य करणारे कांहीं प्रत्यय असतात व वेळेवर विचाराबरोबरच त्यांची उपस्थिति मनामध्यें होऊन आपल्या भाषणांत आपण त्यांची योजना करतों. यावरून आपल्या भाषणांत व्यवहारामध्यें आपण स्मरणशक्तीपेक्षां सादृश्य या गोष्टीचाच वास्तविक अधिक उपयोग करतों. अशा तऱ्हेनें बनविलेलीं बहुतेक रूपें शुद्ध असतात परंतु क्वेचिकदां मनावर कांहीं विशिष्ट संस्कार होऊन एकाच पिढींनें वापरलेल्या रूपांमध्यें व दुसऱ्या पिढीनें वापरलेल्या रूपांमध्यें फरक पडण्याचा संभव असतो. विशिष्ट रूप हें शुद्ध किंवा अशुद्ध ठरविणें हें त्या वेळच्या त्या समाजाच्या रूढीवर अवलंबून असतें. जीं रूपें रूढ आहेत तीं शुद्ध समजण्यांत येतात व रूढ नसलेलीं अशुद्ध समजलीं जातात. परंतु दोन्हीही रूपें एकाच पद्धतीनें बनविलेलीं असतात. विशिष्ट व्यक्तीनें वापरलेलें विशिष्ट शब्दाचें रूप रूढ रूपापेक्षां भिन्न किंवा अशुद्ध असण्याचें कारण त्याच्या मनांतील त्या रूपाच्या कल्पनेशीं इतर गोष्टींचें असलेलें साहचर्य व इतर समाजाच्या मनांतील साहचर्य यांमध्यें असलेला फरक हें होय. अशा तऱ्हेचे कल्पनासाहचर्यावरून बनलेले निरनिराळे शब्द किंवा रूपें आपणांस प्रत्येक भाषेच्या इतिहासांत निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या तऱ्हेनें बनलेलीं आढळतात. आपल्या मनामध्यें विशिष्ट शब्दांचें निरनिराळ्या वर्गांशीं कल्पनासहचर्य असतें. उदा. (१) ल्या शब्दाचा अर्थ, (२) त्याचें व्याकरणविषयक कार्य, (३) स्वरूपवाच्य इ. जेव्हां विशिष्ट शब्दाच्या रूपामध्यें एकापेक्षां अधिक गोष्टींचें साहचर्य असेल तेव्हां त्याचें रूप शुद्ध बनण्याचा अधिक संभव असतो. यांतील अर्थविषयक साहचर्य पुढीलप्रमाणें निरनिराळ्या तऱ्हेचें असूं शकेल:- (१) आप्तसंबंध- पिता, माता, बंधु, सखा इ (२) ऋतुमानविषयक- उन्हाळा, पावसाळा, हिंवाळा इ. (३) प्राण्यांचीं नावें- (अ) जंगली- सिंह, वाघ वगैरे, (आ) पाळींव- कुत्रा, मांजर वगैरे. याप्रमाणें आपण शब्दांच्या निरनिराळ्या विभक्ती, क्रियापदांचें कार्य वगैरेंचे गट कल्पून आपल्या स्मरणांत ठेवतों व अशा तऱ्हेनें बोलणाऱ्याच्या मनांत भाषेतील प्रत्येक शब्द कोणत्या तरी विशिष्ट गटांत अंतर्भूत असतो व त्याचा अर्थ त्याशीं संबद्ध असतो. या आपल्या गटांस आपण साहचर्यसंघ म्हणूं. दुसऱ्या तऱ्हेचा साहचर्यसंघ व्याकरणविषयक किंवा वाक्यांतील कार्य यांवरून बनलेला असेल. याच्या साहाय्यानें आपण नामांचीं अनेकवचनें, विशेषणांचीं क्रियाविशेषणें वगैरे बनवितों. अशाच तऱ्हेच्या कालविषयक साहचर्यसंघावरून आपण क्रियापदांच्या निरनिराळ्या काळांचीं रूपें बनवितों. उदा. धरणें-धरलें, भरणें-भरलें,

परंतु आपणांस कित्येकदां जीं अशुद्ध रूपें बनलेलीं आढळतात तींहि वास्तविक याच पद्धतीनें बनविलेलीं असतात. आपण अशुद्ध रूपांस सदोषसादृश्यानें बनविलेलीं असें म्हणतों परंतु तीं बनविणारा आपल्या दृष्टीनें शुद्ध म्हणूनच बनवीत असतो. परंतु परिणाम मात्र आपणांस निराळाच झालेला आढळतो. उदा. मरणें यावें भूतकालवाचक मेला हें रूप पाहून त्यावरून एखाद्यानें चरणें याचें जर चेला असें रूप केलें तर त्यास अशुद्ध म्हणूं. परंतु त्यांत त्याच्या पद्धतीचा दोष नसून त्यास चरणें याचें चरला, सरणें याचें सरला अशा तऱ्हेनें रूप बनतात व मरण व चरणें हीं दोन क्रियापदें एका गटातील नसून भिन्न गटांतील आहेत ही गोष्ट माहीत नसते व त्यामुळें माहीत असलेल्या रूपावरून व सादृश्यावरून तीं भलतेंच रूप बनविती एवढेंच. अशा तऱ्हेनें जेव्हां आपणांस एखादा मनुष्य अशुद्ध अथवा भलतेंच रूप वापरतांना आढळतो तेव्हां त्यासंहि वास्तविक कांहीं कारण असतें व ते कारण शोधून काढणें म्हणजे त्याच्या मनातील कल्पनासाहचर्य शोधून काढणें हीं गोष्ट मोठी मनोरंजक आहे. जर हें साहचर्य आपल्या मनातील साहचर्यापेक्षां भिन्न असेल तर सादृश्यामुळेंच तो मनुष्य निराळेंच रूप बनवील हीं गोष्ट उघड आहे आतां विशिष्टशब्दाचें रूप शुद्ध कोणतें हें त्या शब्दाशीं संबंध असलेल्या शब्दांच्या गटांवरून किंवा तें रूप भाषेमध्यें वारंवार वापरले जाण्यावर अवलंबून असतें. स्वीट यानें असें दाखविलें आहे कीं, शब्दांचीं जीं अपवादात्मक रूपें भाषेमध्यें रूढ असतात तीं बहुधा अतिशय सामान्य अथवा नेहमीं व पहिल्या जाणाऱ्या शब्दांचींच शिल्लक राहातात. क्वचित आढळणारीं रूपें हळु हळु सामान्य शब्दांच्या कक्षत येण्याचा संभव अधिक असतो. एकाच वाक्प्रचारांत आढळणाऱ्या शब्दांमध्येंहि अशीच साहचर्याची कल्पना उद्भवत होते. एकाच धातूपासून बनलेल्या शब्दांचीं कांहीं परिस्थितीमध्यें इतकीं भिन्न रूपें होतात कीं, त्यांचें मूळ एकच असेल असें वाटेनासें होतें. अशा वेळीं तीं शब्द आपल्या मूळच्या गटापासून निघून दुसऱ्याच गटांत सामील होतां. कित्येकदां असें प्रतिपादण्यांत येतें कीं, ध्वनिविषयक फरकांच्या नियमांमध्यें सादृश्यामुळें घोटाळा होण्याचा संभव असतो. परंतु वास्तविक असें असतें कीं ध्वनिविषयक नियम आपले कार्य नियमितपणें करीतच असतात. परंतु कांहीं बाबतींत कल्पनासाहचर्याचा जोर इतका असतो कीं, त्यामुळें विशिष्ट शब्दांचें तशाच तऱ्हेच्या रूपांतर न पावलेल्या शब्दांच्या सादृश्यामुळें पुन्हा मूळ रूपाकडे परावर्तन होतें. अशा वेळीं रूपांतर पावलेला व मूळ रूपांतील असे दोन्ही शब्द भाषेमध्यें रूढ होतात व कित्येकदां त किंचित् भिन्न अर्थानीं वापरले जातात व त्यांच्या रूपामध्यें जितकें अंतर अधिक असेल तितकें त्यांच्या अर्थांमध्यें अधिक अंतर राहण्याचा संभव असतो. हीं सादृश्यमूलक रूपें बनण्याची क्रिया प्रत्यक्ष भाषेच्या इतिहासामध्यें आपणास सर्व कालांत आढळून येते व त्यामुळें भाषेमध्यें कांहींसें स्थैर्य आणण्याचें कार्य व त्याबरोबरच नवीन नवीन साहचर्यसंघ बनवून त्यापासून नवीन नवीन प्रकार बनविण्याचें कार्य प्रत्येक जिवंत भाषेमध्यें चालू असतें. हीं नवीन साहचर्यें प्रथम एखाद्या व्यक्तीच्या मनांत उत्पन्न होतात व त्यांचा एकंदर समाजाच्या मनावर जितक्या मानानें परिणाम होईल त्यावर तन्मूलक शब्दरूपें भाषेंत कायम राहोत अगर न राहोत हें अवलंबून असतें. जर व्यक्तिविषयक साहचर्यकल्पनेचा समाजावर कांहींच परिणाम झाला नाहीं तर तन्मूलकरूप समाजातील व्यवहारामध्यें लुप्त होतात. तसेंच व्यक्तिप्रमाणें एका समाजामध्यें ध्वनिविषयक फरक पडण्याची विशिष्ट प्रवृत्ति आढळते त्याप्रमाणें या कल्पनासाहचर्याची व सादृश्यमूलक रूपें बनविण्याची पद्धति विशिष्ट समाजामध्यें भिन्न भिन्न असत. व त्या त्या प्रमाणें त्याच्या बोली अथवा पोटभाषा बनत असतात जेव्हां आपणास अशा भिन्न साहचर्यकल्पना असलेल्या लोकांच्या बोलींतील कांहीं निराळीं शब्दरूपें बनलेलीं आढळतात तेव्हां आपण त्यास अशुद्ध किंवा व्याकरणदुष्ट म्हणतों. परंतु आपण त्यावेळीं अशा तऱ्हेनें शब्दांच्या रूपाची शुद्धता ठरविण्यास वास्तविक कांहींच प्रमाण नसतें हा गाढ विपरीत विशिष्ट बोलींमध्यें विशिष्ट साहचर्यकल्पना प्रचलित असतात. व त्या सर्व समाजास सामान्य असतात. त्यामुळें तन्मूलक बनलेलीं रूपें त्या भाषेतीलीं शुद्ध असतात. त्यामुळें एखाद्या समाजाची भाषा शुद्ध रीतीनें बोलणें म्हणजे त्या समाजांतील या साहचर्य कल्पनांचें पूर्णपणें ग्रहण करणें होय. कोणत्याहि भाषेच्या इतिहासाचा अभ्यास करतांना आपणास या तऱ्हेचीं ध्वनिनियमापेक्षा सादृश्यमूलक रूपें बनलेलीं वारंवार आढळतात व अशा वेळीं आपलें काम त्या साहचर्यकल्पनांचा संघ शोधून काढणें हेंच होय. हें संघहि वारंवार बदलत असून निरनिराळ्या काळीं निरनिराळे संघ बनण्याची प्रवृत्ति असते व ही क्रिया प्राचीन आर्येकालापासून आजतागायत चालूच आहे.

वाक्यविषयक व अर्थविषयक फरक—ध्वनिविषयक पद्धतीशीर फरक हा प्रथम निरनिराळ्या वैयक्तिक अनुभवांवरून ज्ञात होतो. परंतु अशा तऱ्हेनें आपणास त्यांची अनेक उदाहरणांवरून एकदां जाणीव झाली म्हणजे समाजात तो नियमितपणें रूढ झालेला आपणांस आढळून येतो. व हा प्रकार आपणास केवळ ध्वनीमध्येंच आढळतो असें नव्हे तर स्वराघात, उच्चनीचत्व, ह्रस्वदीर्घत्व व मृदुगुरुत्व इत्यादि गोष्टींतहि आढळतो तेव्हां हा ध्वनिविषयक फरक केवळ शब्दांच्या उच्चारामध्येंच होत असेल व त्याचा अर्थावर परिणाम होत नसेल तेव्हा त्यास आपण केवळ ध्वनिविषयक फरक असें म्हणतों. उदा.

करौनि–करून, म्हणौनि–म्हणून, दिधला–दिला, इत्यादि फरक अर्थभेदास कारण होत नाहींत. परंतु जेव्हां स्वरभेदाबरोबर अर्थभेदहि होत असेल तेव्हां त्यास केवळ ध्वनिविषयक फरक असें म्हणतां येणार नाहीं. याप्रमाणें शब्दाच्या उच्चारभेदाबरोबर अर्थभेद झाल्याची उदाहरणें आपणांस अनेक देतां येतील. कधीं कधीं एकाच शब्दाच्या उच्चारभेदामुळें त्याच्या दोन स्वरूपांत अर्थभेदहि झालेला आपणांस आढळून येतो. उदा. टाळ (राव), टाहळा (पल्लव), फाळ (नांगराचा) फाळा (पट्टी) कित्येकदां वाक्यरचनेच्या बाबतींतहि कालांतरानें आपणांस फरक झालेला दृष्टीस पडतो. अर्थभेदाच्या बाबतींत आपणांस एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, जरी विशिष्ट शब्दास एखाद्या भाषेमध्यें विशिष्ट कालीं विशिष्ट अर्थ रूढ असला तरी त्या शब्दाच्या स्वरूपामध्यें व अर्थामध्यें स्वाभाविक किंवा अंतस्थित असा कांहींच संबंध नसतो. यामुळें शब्दाच्या स्वरूपांत बदल होण्याचें व अर्थांत बदल होण्याचें कार्य स्वतंत्र रीतीनेंहि होत असण्याचा संभव आहे. कित्येकदां शब्दांच्या स्वरूपांत बदल होईल पण अर्थ जुनाच कायम राहील. व या दोन फरकांमध्यें परस्परसंबंध कोणताच नसेल. व अशा तऱ्हेनें शब्द व त्याचा अर्थ हीं इतकीं निगडित नसतात ही गोष्ट आपणांस भाषेचा ऐतिहासिक अभ्यास केला असतां दिसून येईल व यामुळेंच आपणांस जेथें शब्दाच्या स्वरूपामध्यें बदल होणें किंवा न होणें यावर अवलंबून नसलेला अर्थामध्यें बदल झालेला आढळतो तेव्हां त्यास आपण अर्थभेद असें नांव देतों. याप्रमाणें जरी आपण भाषेंतील फरकांचें ध्वनिविषयक, स्वरूपविषयक, वाक्यविषयक व अर्थविषयक असें वर्गीकरण केलें तरी हे एकमेकांशी इतके संबद्ध किंवा मिश्र असतात कीं, त्यांची एकमेकांवरील व्याप्ति आपणांस टाळतां येणें शक्य नसतें. उदा. आपणांस कांहीं शब्द असे आढळतात कीं, ज्यांचा उच्चार व अर्थहि जवळ जवळ सारखेच असतात व त्यामुळें आपण त्यांचा एकमेकांशी संबंध जोडतों. परंतु त्यांमध्यें कोणत्याहि तऱ्हेचा ऐतिहासिक संबंध नसतो. उदा. इं. स्पॅरोग्रास व ॲस्पॅरागस. या प्रकारास लौकिक व्युत्पत्ति असें नांव देतात. या लौकिक व्युत्पत्तीमध्यें ध्वनिविषयक, अर्थविषयक किंवा ध्वनि व अर्थविषयक अशा कोणत्या तरी एका प्रकारचें सादृश्य मुळाशीं असतें. मनुष्याची प्रवृत्ति मनामध्यें निरनिराळ्या शब्दांचे गट अथवा संघ बनविण्याकडे असते व एकाकी शब्द त्यास भानगडीचे वाटतात. त्यामुळें आकस्मिक सादृश्यामुळें कांहीं शब्द भलत्याच गटामध्यें अंतर्भूत केले जातात. ही गोष्ट विशेषतः परकीय भाषेंतून घेतलेल्या शब्दांच्या बाबतींत आपणांस आढळून येते. तथापि ज्या शब्दांची व्युत्पत्ति माहीत नाहीं व जे फारसे प्रचारांत नसतात अशा स्वभाषेंतील शब्दांच्याहि बाबतींत घडून येते. अशा तऱ्हेचीं लौकिक व्युत्पत्तींचीं उदाहरणें सर्व भाषांतून कमीजास्त प्रमाणांत आढळून येतात. अशा तऱ्हेच्या लौकिक व्युत्पत्तींचे वर्गीकरण करणें कठिण आहे. तथापि त्यांचे पुढें दिल्याप्रमाणें तीन प्रकार करतां येतील, (१) ध्वनि व अर्थविषयक सादृश्यमूलक, (२) केवळ ध्वनिविषयक सादृश्यमूलक, (३) केवळ अर्थसादृश्यमूलक.

गौरवोक्ति अथवा पर्यायोक्ति—या लौकिक व्युत्पत्तींसारखाच औचित्य, भीति, सभ्यपणा इत्यादिबद्दलच्या आपल्या मनांत ज्या कल्पना असतात त्यामुळें शब्दांच्या अर्थांत फरक घडून येतो. ज्या शब्दांचा अर्थ अपवित्र, विघ्नकारक अप्रिय, त्रासदायक, अधार्मिक इ. प्रकारचा असेल तेथें त्याच्या स्वरूपामध्यें फरक पडण्याची प्रवृत्ति आढळते. यास सदुक्ति ग्राम्यतापरिहार, किंवा गौरवोक्ति असें नांव देतां येईल. ही प्रवृत्ति आपणांस सुसंस्कृत व असंस्कृत सर्वच लोकांत आढळते. व याचें कारण त्या शब्दाचा त्या प्रत्यक्ष वस्तूशीं संबंध जोडण्यांत येऊन त्या वस्तूचें अप्रियत्व त्या शब्दासहि जोडण्यांत येतें हें होय. या प्रकारामुळें शब्दामध्यें पुढील तऱ्हेचे फरक घडून येतात. (१) ध्वनिविषयक भेद, उ. परसाकडे–परशुराम पाटलाकडे, लघवी,–लघुशंका, (२) समानार्थक शब्दप्रयोग बैल–गाईचे प्राणनाथ; धेनुवल्लभ; लठ्ठ–स्थूल (३) नास्त्यर्थक शब्दप्रयोग दरिद्री–निष्कांचन, विटाळ–अशुचिता, अशौच इत्यादि.

अर्थमूलक शब्दस्वरूपभेद—शब्दामध्यें रूपभेद व्हावयाचे अनेक प्रकार आहेत. हे करतांना कर्त्याच्या मनांत शब्दाच्या स्वरूपामध्यें फरक करावयाचा ही गोष्ट प्रामुख्यानें नसते. विशिष्ट शब्दाच्या अर्थामध्यें कालांतरानें असा फरक पडतो कीं, त्या शब्दाच्या मूळ स्वरूपामध्यें तो अर्थ व्यक्त करण्याचें पूर्ण सामर्थ्य नाहीं असें वाटूं लागतें व ही उणीव भरून काढण्याकरितां मनुष्य आपल्यामतानें त्या शब्दाच्या स्वरूपांत बदल घडवून आणतो. किंवा शब्दाच्या मूळ स्वरूपांबद्दलचीच कल्पना कांहीं कालांतरानें बदलते व विशिष्ट अर्थ व्यक्त करण्यास तें विशिष्ट स्वरूप अयोग्य वाटून त्यामध्यें फरक घडवून आणण्याची प्रवृत्ति होते. उदा. (१) कधीं कधीं मूळ शब्दातील कांहीं भाग प्रत्ययरूपी आहे अशी समजूत होते. व त्यामुळें नवीनच स्वरूपांत एखादा नवीन शब्द त्या मूळ शब्दापासून तयार करण्यांत येतो. उदा. असुर–सुर–भूसुर; अदिती–दिती–दैत्य, (२) कित्येकदां प्रत्यय हाच मूळ शब्दांत सामील होतो व अशा तऱ्हेनें नवीनच शब्द बनविला जातो. तिळेल तेल; खोबरेल तेल; (३) कित्येकदां कांहीं स्वतंत्र शब्दांस लाक्षणिक अर्थानें प्रत्ययाचे स्वरूप येतें व त्यावरून अनेक शब्द बनविण्यांत येतात. उदा.

वाह=वाहन, घोडा वगैरे मनुष्य किंवा सामान वाहणारा यावरून कार्यवाह (चिटणीस), भारवाही (कुटुंबाचा पोषणकर्ता). (४) कित्येकदां एखाद्या सामासिक शब्दाची रचना मूळ कशी झाली आहे तें न समजतां निराळ्याच तऱ्हेनें बनली असावी अशी कल्पना होऊन त्यामुळें कांहीं शब्दांच्या स्वरूपांत बदल होतो. (उदा. इं. चाइल्डहुड, स्टेडफास्ट). कित्येकदां परकीय भाषेंतील उपसर्ग किंवा प्रत्यय उसने घेतल्यानेंहि शब्दामध्यें बदल झालेले आढळतात.

शब्दस्वरूप भेदांचा वाक्यरचनेवर परिणाम--अशा तऱ्हेनें शब्दाच्या स्वरूपांत बदल होत गेले म्हणजे ज्याप्रमाणें ध्वनिविषयक फरकामुळें शब्दांमध्यें स्वरूपविषयक फरक होतात तसे भाषेमध्यें वाक्यरचनेच्या बाबतींतहि फरक होतात. उदा. द्विवचन व प्रथमेचें एकवचन ही रूपें आतां मराठींतून अजिबात नाहींशीं झालीं आहेत. किंवा विभक्तीचें कार्य शब्दयोगी अव्ययांकडूनहि सध्यांच्या मराठी भाषेंत होतें. तथापि ध्वनिविषयक किंवा स्वरूपविषयक बदल होण्यापेक्षां वाक्य रचनाविषयक बदल होण्याची क्रिया अधिक मंद असते.

शब्द व अर्थोत्पत्ति—आपण वर पाहिलेंच आहे कीं, शब्दाच्या स्वरूपांतील ध्वनिविषयक फरक व त्याच्या अर्थांतील फरक यांची गति भिन्न भिन्न असून त्यांचा परस्परांशीं संबंध असतोच असें नाहीं. उदा. सं. ग्रंथि, म. गांठ यामध्यें रूपभेद झाला असला तरी अर्थभेद झालेला आपणांस दिसत नाहीं. विशिष्ट शब्दाला विशिष्ट अर्थ कसा प्राप्त होतो यासंबंधीं सर्वसामान्य असा निश्चित नियम आपणांला सांगतां येणार नाहीं. भाषा जेव्हां प्रथम तयार झाली किंवा भाषा मुळींच अस्तित्वांत नव्हती तो काल आपणांपासून अत्यंत दूर आहे. आपणास केवळ कांहीं विशिष्ट कल्पनाद्योतक असे विशिष्ट ध्वनिसमुच्चय आपणांकडे परंपरागत आलेले आढळतात. व त्यांचा आपणांस फार तर तार्किकदृष्ट्या व मानसशास्त्रीयदृष्ट्या पृथक्करण करून अभ्यास करतां येणें शक्य आहे. जेव्हां आपल्या मनामध्यें एखादी कल्पना येते व ती व्यक्त करावी अशी आपणांस स्फूर्ती होते तेव्हां आपणांजवळ असलेल्या ध्वनिसमुच्चयाच्या साहाय्यानें आपण ती व्यक्त करतों व त्या विशिष्ट ध्वनिसमुच्चयास तत्कल्पनाबोधक अर्थ प्राप्त होतो. हीच गोष्ट शंकराचार्यांनीं आपल्या भाष्यांत व्यक्त केली आहे. ' प्रजापतेरपिक्षुः सृष्टेःपूर्ववैदिकाश्शब्दा मनसि प्रादुर्बभूवुः पश्चात्तदनुगतानर्थान् ससर्गजैतिगम्यते । स भूरितिव्याहरत् स भूमिमसृजत ' (तै. ब्रा. २।२।४।२). हीच कल्पना वैशेषिक सूत्रांत ' बुद्धिपूर्वा वाक्यकृतिर्वेदे ' या शब्दांनीं व्यक्त केली आहे. [वै. सू. ६.१.१] विशिष्ट कल्पना विशिष्ट ध्वनिसमुच्चयानें व्यक्त करणें हें कार्यहि प्रत्येक व्यक्ति आपल्या पूर्वसंस्कारानुरूप करीत असते. यामुळें प्रत्येक ध्वनिसमुच्चयाशीं विशिष्ट अर्थ परंपरेनें निगडित होतो. शब्द आणि त्याचा अर्थ यांचा परस्पर संबंध काय यासंबंधीं भारतीय पंडितांनीं फार मनोरंजक चर्चा अनेक ठिकाणीं केलेली आढळते. उदा. पतञ्जलीनें महाभाष्यांत ' गौ रित्यत्र कः शब्दः ' या प्रश्नास तो रूप, द्रव्य, क्रिया, गुण, आकृति इत्यादि वाचक नसून 'कस्तर्हि शब्दः' म्हणून पुन्हा प्रश्न करून 'येनोच्चरितेन सास्नालाङ्गूलककुदखुरविषाणिनां संप्रत्ययो भवति सशब्दः । अथवा प्रतीत पदार्थको लोके ध्वनिः शब्द इत्युच्यते ' असें उत्तर दिलें आहे व शेवटीं ' तस्माद् ध्वनिः शब्दः ' असा सिद्धान्त सांगितला आहे. तसेंच शब्दातील वर्णापासून अर्थबोध कसा होतो यावद्दल थोडक्यांत श्रीशंकराचार्यांनीं बादरायणसूत्र भाष्यांत विवेचन केलें आहे. ' व्यवहारेष्वेकैकवर्णेग्रहणानन्तरं समस्त प्रत्यवमर्शीन्यांबुद्धौ तादृशाएव प्रत्यवभासमानास्तंतमर्थमव्यभिचारेण प्रत्याययिष्यन्तीति वर्णवादिना लघीयसी कल्पना । स्फोटवादिनस्तु दृष्टहानिरदृष्टकल्पनाच वर्णेभ्यो क्रमेण गृह्यमाणाः स्फोटं व्यञ्जयन्ति स स्फोटोऽर्थं व्यनक्तीति गरीयसी कल्पना स्यात् । (वेदांतसूत्रभाष्य १.३.२८) न्यायसूत्रांत 'आप्तोपदेशसामर्थ्यात् शब्दादर्थसंप्रत्ययः ' [न्यासू. २-१-५२] व याचे पुढील ५६ व्या सूत्रावरील भाष्यांत वात्स्यायनानें शब्दार्थसमयाचें ' कः पुनरयंसमयः । अस्य शब्दस्येदमर्थजातमभिधेयमिति अभिधानाभिधेयनियमयोगः । ' असें स्पष्टीकरण केलें आहे. महाभाष्यांत ' कथं पुनर्ज्ञायते सिध्दः शब्दोर्थं संबधंश्चेति । याचें ' लोकतः ' असेंच उत्तर दिलें आहे. [पा. म. १.१.१] ' अनेन शब्देनायन्मर्थोबोद्धव्यः इति संकेतः ' याप्रमाणें समाजसंकेतानें शब्दास अर्थ प्राप्त होतो. ही गोष्ट सर्वमान्य आहे व साहित्यशास्त्रकारांनीं साक्षात्संकेतज अर्थ तो अभिधा अथवा वाच्यार्थ असेंच म्हटलें आहे. आतां विशिष्ट भाषेतील अर्थविषयक विकास एका दिशेनें होत गेले व ध्वनिविषयक विकास निराळ्याच दिशेनें होत गेला तर त्यामध्यें फरक होणें साहजिक आहे व अशा तऱ्हेनें दोन्ही विकासांची प्रवृत्ति भिन्न असणेंहि शक्य आहे. कारण विशिष्ट ध्वनिसमुच्चय तयार होणें व त्यास विशिष्ट अर्थ प्राप्त होणें या दोन क्रिया यांचें फल जरी एक असलें तरी त्या भिन्न भिन्न परिस्थितींत चालू असतात. आतां विशिष्ट अर्थामध्यें फरक पडला आहे ही गोष्ट आपणांस बिनचूक रीतीनें कळण्यास शब्दांचे अर्थ व भाषा यांचा मनाशीं संबंध आहे ही गोष्ट ठाऊक असली पाहिजे. दोन ध्वनी एका शेजारीं ठेवल्यानें जर त्यांवर मानसिक क्रिया झाली नाहीं तर त्यांपासून अर्थनिष्पत्ति होणें शक्य नाहीं. व ही मानसिक क्रियाहि जेव्हा वक्ता आणि श्रोता ह्या दोघांच्याहि मनांत एकाच स्वरूपांत होईल तेव्हां एकाचें भाषण

वृत्त-व्यास समजेल. विशिष्ट भाषा बोलणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मनांत विशिष्ट तऱ्हेच्या ध्वनींचें साहचर्य, विशिष्ट भावना, उद्देश वगैरेशी निगडित असतें व हा संबंध ती व्यक्ति ज्या समाजामध्यें वावरत असते त्या समाजांतील लोकांच्या संवयी अथवा प्रघात यांवर अवलंबून असतो व विशिष्ट चिन्हांना विशिष्ट अर्थ प्राप्त होऊन तो स्थिर राहण्याच कारण अनेक व्यक्तींच्या मनामध्यें त्या विशिष्ट ध्वनिचिन्हांनीं विशिष्ट मानसिक कार्य घडून येणें हेच होय.

शब्दांच्या अर्थामध्यें बदल—जेव्हां आपण विशिष्ट शब्दाचा अर्थ बदलला आहे असें म्हणतों तेव्हां त्या विशिष्ट ध्वनिसमुच्चयामध्यें कांहीं फरक पडला आहे असें नसून तज्जनित त्या समाजांतील लोकांच्या मानसिक क्रियेमध्यें मात्र कांहीं फरक होऊन त्यांनीं त्याच विशिष्ट ध्वनिसमुच्चयास निराळ्या कल्पनेशीं निगडित केल आहे हें होय. यावरून आपणांस हीं गोष्ट स्पष्ट होते कीं, शब्दांच्या अर्थातील फरक ही एक सामाजिक मानसिक क्रिया असून त्या संबंधीचे नियम व तिचे स्वरूप आपणांस मनुष्याच्या मनःप्रवृत्तींचे व्यक्तिक व सामाजिक दृष्ट्या नियम व स्वरूप यांचा अभ्यास केल्याशिवाय समजणार नाहीं. प्रथम विशिष्ट शब्दास विशिष्ट अर्थ देण्याचें कार्य एका व्यक्तीकडून घडते व तोपर्यंत तो अर्थ व्यक्तिक असून त्यास स्थैर्य प्राप्त झालेलें नसतें. परंतु जेव्हां तेच ध्वनी त्याच अर्थानें अनेकवार एखाद्या समाजातील लोक आपल्या व्यवहारामध्यें वापरूं लागतात तेव्हां त्या ध्वनीस तो अर्थ निश्चितपणें प्राप्त होतो. तथापि या विशिष्ट अर्थावरहि मनुष्याचें मन त्याच्या साहचर्य, भेद, तादात्म्य, पृथक्करण, संयोजन, उत्पादन, पुनर्ह-पादन इ शक्तींनीं सारखें कार्य करीत असतें व त्या त्या अर्थात कमीजास्त फेरबदल करून अधिक निश्चितता आणण्याचें कार्य करत व अशा रीतीने त्यास सामान्यतः स्थिरता प्राप्त होते. परंतु व्यवहारांतील भाषेमध्यें या अर्थामध्यें थोडाफार फरक होण साहाजिक असतें व त्यामुळें बोलण्याचा व्यवहार हे अर्थविषयक बदल घडवून आणण्याचें कारण आहे. इतर सर्व कारणें त्या मानाने दुय्यम प्रतीचीं आहेत व ज्या मानाने व्यवहारामध्यें वाक्यांत उपयोग करतांना विशिष्ट शब्दास विशिष्ट अर्थ देणें प्राप्त होईल त्या मानानें त्या शब्दाला विशिष्ट अर्थ प्राप्त होत असतो व अशा तऱ्हेनें वाक्यांत किंवा व्यवहारांत रूढ झाल्याखेरीज विशिष्ट शब्दाच्या अर्थामध्यें पडलेला वैयक्तिक फरक सामान्यत्व व स्थिरत्व पहूं शकत नाहीं. आतां हे अर्थविषयक फरक होण्याचीं निरनिराळीं कारणें कोणतीं असतात हें पाहू (१) शब्दाच्या स्वरूपांतील अथवा ध्वनींतील फरक (उदा. वाचाट=बडबड्या व चावट=चेष्टखोर, वाघट, कलश=ताम्या, कळस=शिखराग्र पक्ष पक्ष, बाजू पाखे-छपराची बाजू). (२) स्थानभिन्नता किंवा भिन्नसाहचर्यमूलक फरक. (उदा. जस्ताचें फूल, दगडफूल, तगरीच फूल, कर्णफूल). (३) सांस्कृतिक फरक. यामुळें विशिष्ट शब्दाच्या मूळ अर्थामध्यें बदल होऊन रूढ अर्थ निराळाच होतो. उदा मणि संस्कृत रत्न, मराठी काचेचा मणि, क्रिया संस्कृत कार्य, मराठी और्ध्वदेहिक; फुलपात्र शौच इत्यादि. (४) परकीय भाषेतील उसन घेतलेले शब्द (उदा. मिस्किल-फारसी-गरीब, मराठी-लबाड; औरत फारसी-गुप्त भाग, मराठी-स्त्री). (५) स्वराघातांत बदल. उदा. इंद्रशत्रु. (६) अलंकारिक उपयोग (उदा. पात्र, अंगवस्त्र, अर्धांग, गुरू, मामा, बनविण इत्यादि). कित्येकदा आपणांस विशिष्ट शब्दाचा अर्थ अधिक व्यापक झाल्याचें आढळून येतें. उदा. कादंबरी. कित्येकदां आपणास लक्षणेने एकाच शब्दाचे अनेक अर्थ झालेले आढळतात. यामध्यें यौगिक अर्थ जरी एक असला तरी त्याच्या निरनिराळ्या अंगाप्रमाणें निरनिराळे लाक्षणिक अर्थ उत्पन्न होऊन आपणांस एक शब्द अनेक गोष्टींचा वाचक झालेला आढळतो. उदा. डोळा हा इंद्रिय अथवा दृष्टीचें साधन म्हणून आपणांस माहीत आहे परंतु त्याचाच अर्थ छिद्र असाहि लक्षणेन होतो. अभिलाषबुद्धि असाहि एखाद्या गोष्टीवर डोळा ठेवणें या बाबतींत होतो. किंवा जागरूकता हाहि अर्थ एखाद्याच्या कृत्यावर डोळा ठेवणें या ठिकाणीं संभवतो. अशा प्रकारें लक्षणेनें एकच शब्द अनेक कल्पना व्यक्त करू शकतो. लक्षणा ही भाषेमध्यें शब्दसंपत्ति वाढविणारी एक मोठी शक्ति आहे व तीमुळें भाषेस सौंदर्यहि प्राप्त होतें. साहित्यदर्पणकारानीं लक्षणा ८० प्रकारांची असतें असें म्हटलें आहे. उपमारूपकादि अलंकारानींहि लक्षणेचें कार्य होतें तसेंच शब्दाची अभिधा व लक्षणेप्रमाणें अर्थ व्यक्ताकरण्याची जी व्यंजना ही तिसरी शक्ति तीमुळेंहि शब्दांचे अनेक अर्थ संभवतात. 'सायंकाळ झाली' या शब्दांवरून निरनिराळे अर्थ ध्वनित होतील. उदाहरणार्थ ब्राह्मणास संध्येची वेळ झाली असें सूचित करता येईल, मजूराम काम बद करण्याची वेळ झाली असें व्यंजित तर अभिचारिणीस प्रियकराकडे जाण्याची वेळ झाली असें मनांत येईल. शब्दांचे अर्थविषयक फरक पहात असतां आपण फक्त विशिष्ट अर्थानेंच केवळ शब्दांच्या अर्थामध्यें पडलेल्या फरकांचा अभ्यास करतों. परंतु ज्या ज्या शब्दाला अर्थ म्हणून आहे तेथें तेथें त्या अर्थामध्यें फरक होणें संभवनीय आहे या दृष्टीने प्रत्ययरूप पावलले कांहीं शब्द उदा. कर किंवा करी हा क्रियावाचक शब्द निरनिराळ्या शब्दांशीं योजला असतां त्याच्या अर्थात किती फरक होत जातो हे पाहणें फार मनोरंजक आहे, उदा. देणेकरी, घेणेकरी, मधुकरी, बारकरी, गडकरी, मोलकरी, मारेकरी इ. तसेंच कांहीं सामासिक शब्दांच्या अवयवामध्येंहि

आपणांस असेच भिन्न भिन्न अर्थ भिन्न शब्दांशीं समास केला असतां झालेले आढळतात. अशा तऱ्हने शब्दामध्ये त्याच्या वाक्यातील स्थानावरून, आघातावरून, ध्वनीवरून, वगैरेहि फरक झालेला आपणांस दिसून येईल तसेंच द्विवचनाचा लोप विभक्तीचा लोप इत्यादि गोष्टींमध्येहि आपणांस भाषेमध्ये कसकसे फरक पडत जात त ह दिसन येईल.

शब्दांचा लोप—तसच आपणांप भाषेमध्ये कांहीं शब्द अजीबात कालांतराने लुप्त झालेले आढळतात. घरांतील वृद्ध माणसाने अथवा आजाने उच्चारलेले शब्द नातवास अगदी अपरिचित होतात जुने ग्रंथ चाळीत असताना तर आपणास ही गोष्ट अधिक स्पष्ट दिसते. ज्ञानदेवाच्या काळचे किती तरी शब्द आज भ पेक्षून अजीबात गेले आहेत. विशेषतः समानार्थक शब्दांतील अनेक शब्दांचा लोप होण्याची क्रिया अगदी स्वाभाविक दिसत ही गोष्ट आपणास वैदिक भाषेत एकच पदार्थवाचक असलेली अनेक नामे अभिजात संस्कृत म धत लुप्त झाली यावरून दिसून येते सामान्यतः जवळ जवळ सारखीच कल्पना व्यक्त करणारे दोन शब्द असल्यास त्यांच्या अर्थामध्ये थोडा फार फरक करण्याची क्रिया प्रत्यक समाजांत आढळते उदा पोथी व पुस्तक या दोन शब्दांनीं दोन निरनिराळ्या तऱ्हचे ग्रंथ व्यक्त होतात अस जेथे होण र नाही तथ एक शब्द लोप पावतो. केव्हां केव्हां विशिष्ट शब्द समाजांतील एका विशिष्ट गटामध्येच लुप्त होतात व इतर समाजांत ते प्रचलित असतात

नवीन शब्दांचा प्रवेश--तथापि लुप्त होणाऱ्या शब्दांपेक्षा प्रत्येक भाषेमध्ये नवीन शब्द रूढ होण्याची क्रिया मात्र अधिक जोराने चालू असते सध्याच्या इंग्रजी भाषेचे उदाहरण घेतल्यास तींतील शब्दसपत्ति पूर्वीच्या कोणत्याहि कालापेक्षा अधिक आहे व शास्त्रीय ज्ञान व संशोधन यांची वाढ व त्याचा व्यवहारात उपयोग मनुष्याचा वाढत असणारा व्याप व व्यवहार व बदलणारी परिस्थिति आणि विचार, जगातील भिन्न भिन्न प्रदेशातील लोकांमधील वाढत असणारे दळणवळण व्यापार व उद्योगधंदे यांची अवाढव्य प्रगति व मालाची प्रचंड देवाण-घेवाण व वाढत्या मोठी यामुळ लिखित भाषेची वाढ झपाट्याने होत असून शिक्षण सामान्य लोकांमध्यहि वाढत आहे. या सर्व व इतर अनेक गोष्टी मिळून सामान्य लोकांचीहि शब्दसपत्ति झपाट्यान वाढत आहे. व ज्या राष्ट्राम आपली भाषा समृद्ध व्हावी अशी इच्छा असेल त्यानें आपला अनेकविध कार्याचा व्याप व शिक्षणाचा प्रसार वाढविणें जरूर आहे भाषेमध्ये नवीन नवीन तयार होणारे शब्द सर्वच लोकांमध्ये सारख्याच प्रमाणात रूढ होतात अस नाही तर त्यातील कांहीं-उदाहरणार्थ शास्त्रीय परिभाषा ही विद्वान लोकातच रूढ होऊं शकते व कांहीं-मात्र सामान्य जनापर्यंत पोंचतात प्रत्यक शब्दाने विशिष्ट व निश्चित कल्पनाच व्यक्त व्हावी व प्रत्येक कल्पनेस स्वतंत्र शब्द असावा म्हणजे समानार्थक शब्दांच्या अर्थातील निश्चित असण्या ही अलीकडे वाढत असणारी प्रवृत्ति भाषेमध्ये नवीन नवीन शब्द रूढ होण्यास बरीचशी कारणीभूत होते. इंग्रजी भाषेमध्ये तर अशा तऱ्हचे समानार्थक शब्द अनेक भाषांतून येत असल्यामुळे त्यांचे अर्थ निश्चित करणे त्या भाषेस अलीकडे जरूरीचे वाटते उदा स्टूल, चेअर, हेड, चीफ, मिस्ट्री, कॅपेंशन इ. मराठी भाषेतहि टेबल, चूक, खिळा, खीळ, मोळा, स्क्रू, बाल्ट, सुरमा; किंवा अडमर, अडगा, कंडा, चपरास, बोल्ट, खीळ, हॉलंड्राप या शब्दांच्या अर्थात एकच कार्य करीत असतांहि भेद केलेला दृष्टीस पडतो.

नवीन शब्दांचे उत्पादन—जेव्हा भाषा प्रथमच तयार होत असेल तेव्हा प्रत्येक शब्द नवीनच बनविण्याची क्रिया प्रामुख्याने चालू असली पाहिजे. नैसर्गिक ध्वनी व क्रिया यापासून प्रथम अनुकरणात्मक, पुनरुक्तिमूलक व उद्गारवाचक शब्द तयार झाले असावे. लहान मुलेहि कांहीं शब्द तयार करतात अस एक मत आहे. यासबधी पूर्वी विवेचन केलेच आहे परंतु वरचेचे शब्द भाषेतून प्रचलित असलेले ध्वनी व रूढ शब्द यांच्या संयोगापासून अथवा त्यांच्या स्वरूपात बदल करून बनविलेले असतात शास्त्रीय परिभाषा सामान्यतः पूर्वीच्या अभिजात म्हणजे संस्कृत, ग्रीक लॅटिन वगैरे भाषांतील धातूवरून बनविण्याची प्रवृत्ति आढळते. व अस बनविलेले शब्द फार लाक्षणिक होत असल्यास त्यामध्ये संक्षेप करण्याचीहि प्रवृत्ति दिसते विशेषतः लौकिक भाषेत रूढ होत अस ना त्यास संक्षिप्त रूप दिलेले आपणास आढळते अनेक शब्दांच्या आद्याक्षरावरूनहि नवीन शब्द बनविण्याची आपणांस काही उदाहरणे आढळतात उदा. सोकोनी (स्टँडर्ड ऑइल कंपनी ऑफ न्यू यॉर्क), बेस्ट (बॉंबे प्लेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रॅम कपनी), एडसु (ई डी ससन) टॉमको (टाटा ऑइल मिल कंपनी), टोबी (टयुबरक्युलॉसिस) इ. याशिवाय भाषेतील शब्दसपत्तीमध्ये भर पडण्याचा एक मार्ग म्हणजे परकीय भाषेतील घेतलेले शब्द होत. यासबधी विवेचन पूर्वी केलेच आहे.

पोटभाषा कशा बनतात—आतां एकाच भाषेच्या स्वरूपामध्ये कालांतराने फरक होऊन निरनिराळ्या पोटभाषा अथवा बोली कशा उत्पन्न होतात हें आपण पाहू वास्तविक मूळ भाषा व तिची बोली यामध्ये मूलतः कांहीच फरक नसतो तर त्यामध्ये मूळ भाषेच्या स्वरूपात व प्रचलित स्वरूपांत किती प्रमाणांत फरक पडला आहे हे पाहून आपण एकीस भाषा व दुसरीस

बोली असें नांव देतों भाषेमध्यें फरक पडण्याला प्रथम व्यक्ति कारण होते व अशा अनेक व्यक्तींमध्यें फरक पडला म्हणजे त्या समाजाच्या भाषेमध्यें फरक पडतो. आतां प्रत्येक व्यक्तीच्या भाषेमध्यें कांहीं तरी वैशिष्ट्य असतेंच; तरी एखाद्या समाजाची किंवा व्यक्तीची भाषा एका स्वरूपाची आहे असें आपणास कसें म्हणतां येईल? तेव्हां भाषेच्या दृष्टीनें ज्यास आपण समाज म्हणतों त्याची व्याख्या अशी करतां येईल कीं, जो व्यक्तिसमूह सामाजिक दळणवळणामुळें एकाच तऱ्हेची भाषा उपयोगांत आणतो व त्या भाषेतील वयक्तिक भेद इतके क्षुद्रक असतात कीं, त्यांस उपेक्षणीय म्हणतां येईल अशा तऱ्हेचा व्यक्तिसमूह होय. आतां एखाद्या राष्ट्रामध्ये–जरी आपण त्यास एक राष्ट्र असें म्हणतों तरी--असे लहान लहान समाज बरेच असतात व जितका समाज लहान असेल तितका त्याच्यामध्यें परस्पर दळणवळण व लागाबाधा अधिक असतो. अशा तऱ्हेनें एखाद्या प्रांतांत, जिल्ह्यांत किंवा शहरात एकेक स्वतंत्र समाज असुन ते इतर प्रांत, जिल्हा किंवा शहर यांपासुन बरेचसे पृथक् असतात व त्यांचा परस्परांवर फारसा परिणाम होत नाहीं. अशा लहानशा समाजांत आपसांतील दळणवळण व लागाबांधा इतर अशाच तऱ्हेच्या दुसऱ्या समाजापेक्षां अधिक असतो. परंतु अशा तऱ्हेच्या प्रांत किंवा जिल्ह्यांतील समाजामध्येंहि त्यापेक्षां लहान व अधिक निगडित असे खेडयांत किंवा लहान वाड्यांत राहणारे दुसरे लहान लहान समाज असतात व अशा खेडयांत किंवा वाडींतहि निरनिराळीं कुटुंबें रहात असतात व अशा कुटुंबामध्य कांहीं व्यक्ती असतात. आतां आपणांस एकभाषिक समाज कोणास म्हणावें हा प्रश्न पडतो. सामान्यतः एक गांव अथवा खेडें हा एक एकभाषिक समाज होतो. मोठाल्या शहरामध्यें निरनिराळ्या दर्जाचे व धंद्यातील लोकांचे एकभाषिक समाज बनतात व केव्हां केव्हां शहराच्या विशिष्ट भागांत राहणारेहि लहानसे एकभाषिक समाज असतात. आतां अशा एकाच समाजांतील व्यक्तीमध्यहि आपणांस उच्चारभेद किंवा उच्चारभेदाची प्रवृत्ति आढळून येते. परंतु ती इतकी अल्प असते कीं, ती त्या व्यक्तीच्या अथवा त्या समाजाच्याहि लक्षात येत नाहीं. हे भेद मानसिक व शारीरिक रचनेमुळें स्वभावतःच उत्पन्न झालेले असतात. परंतु त्यांची वाढ विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे कधींहि होत नाहीं. कारण व्यक्तीची प्रवृत्ति साधारणतः आपण ऐकिलेल्या विशिष्ट शब्दाच्या उच्चाराप्रमाणें शक्य तितका शुद्ध उच्चार करण्याकडे असते व सर्व समाज एकाच परिस्थितींत रहात असल्यामुळें त्यांची मानसिक व शारीरिक वृत्तीहि एकाच तऱ्हेची बनण्यास परिस्थिति अनुकूल असते व त्यामुळें या समाजाची एकच वाक्पद्धति व उच्चारभेदप्रवृत्ति सर्व व्यक्तीमध्यें वसत असते. अर्थात एकाच व्यक्तीमध्यें ज्या प्रवृत्ती असतील त्याच जर त्या समाजामध्यें असतील तर त्या प्रवृत्तींस बळकटी येईल व ज्या केवळ वैयक्तिक असुन समाजामध्यें नसतील त्या क्षीण होऊन लुप्त होतील याप्रमाणें प्रत्येक समाजामध्यें त्यातील सर्व व्यक्तींस सामान्य अशा कांहीं प्रवृत्ती स्वाभाविकतःच व न कळत बाध करीत असतात व त्यांस विरोध करण्याचीहि प्रवृत्ति सामान्यतः आढळत नाहीं. याप्रमाणें वैयक्तिक भेद सोडुन दिले तर समाजाची भाषा सामान्यतः एकरूप असते असें म्हणतां येईल व तींतील फरकहि सामान्यतः एकाच दिशेनें होत जातील असें म्हणावयास हरकत नाहीं आतां समाजामध्यें अशा तऱ्हेचें भाषेचें एक स्वरूप राहण्यास एका विशिष्ट परिस्थितीचें अस्तित्व आपण गृहीत धरले आहे समजा, कांहीं आकस्मिक कारणांमुळें सदर परिस्थितींत बदल झाला व त्या समाजांतील व्यक्तींतील दळणवळण पूर्वीइतकें कायम राहिलें नाहीं किंवा त्याच्या आयुष्यक्रमांत फरक होऊन निरनिराळ्या व्यक्तींची परिस्थिति भिन्न भिन्न बनत गेली तर आपणास अशा तऱ्हेनें भिन्न परिस्थितींत पडलेल्या निरनिराळ्या व्यक्तींच्या समूहास एकच समाज म्हणुन म्हणतां यावयाचें नाहीं. तर मूळ परिस्थितीमध्यें जे निरनिराळ्या तऱ्हेचे फरक झाले असतील व त्या फरकांचे जवढया लोकांत सामान्यत्व असेल तेवढेच लहान लहान समाज एकस्वरूपी राहतील व अशा तऱ्हेचे हे लहान समाज एकमेकांपासून पृथक्त्व पावतील व हें पृथक्त्व त्यांमधील परस्पर दळणवळणास होणाऱ्या प्रतिबंधाच्या प्रमाणावर अवलंबुन असेल व अशा तऱ्हेचे या समाजामध्यें पृथक् पृथक् लहान समाज उत्पन्न झाल्यावर प्रत्येक समाजांतील प्रवृत्तींची स्वतंत्र वाढ होत राहील व कालांतराने त्यांमध्यें आपणांस पुष्कळ फरक पडलेला दिसुन येईल. आतां यांतील कोणत्या प्रवृत्तींची वाढ विशेष होईल हें त्या समाजाच्या एकंदर राहणीवर व स्वरूपावर अवलंबुन असेल. याप्रमाणें पोटभाषा किंवा बोली बनण्याची क्रिया ही अशा तऱ्हेचे पृथकत्व पावलेले निरनिराळे लहान समाज व त्या समाजातील निरनिराळ्या प्रवृत्तींवर अवलंबुन आहे व दोन बोलींतील फरक हा त्या बोलणाऱ्या समाजातील पृथकत्वावर अवलंबुन राहील.

पोटभाषा बनण्याचीं कारणें--आतां असें पृथकत्व होण्याचीं कारणें कोणतीं तें आपण पाहूं:–याकरतां समाजाचे चढत्या प्रमाणांत भाग पाडावयाचे झाल्यास आपणांस असे पाडतां येतील, कांहीं व्यक्ती मिळून एक कुटुंब होते कांहीं कुटुंबें मिळून एक लहानशी वाडी होते कांही वाडयांचे एक खेडें होते व अशीं कांहीं खेडीं मिळून तालुका–जिल्हा–प्रांत-प्रांतांचें राष्ट्र याप्रमाणें हा वाढता क्रम आहे. व राष्ट्रामध्यें प्रांत, जिल्हे, तालुके, वाडया, कुटुंबें व व्यक्ती ही सर्व अंतर्भूत होतात. या

सर्व विभागांमध्यें थोडें बहुत पृथकत्व असतेंच. एका कुटुंबांतील व्यक्तींतहि आपणांस वय, लिंग वगैरे बाबतींत भाषेच्या दृष्टीनें भिन्नपणा आढळतो; परंतु तो इतका अल्प असतो कीं त्याकडे लक्ष देण्याचे कारण नसत. कुटुंबाकुटुंबामध्यें निरनिराळे धंदे, वर्ग किंवा रहाणी इत्यादि सामाजिक कारणांमुळें फरक असतो. निरनिराळ्या गावात भौगोलिक फरक असतो. उदा. त्यांच्यामध्यें कमीजास्ती अंतर, पर्वत, नद्या, अरण्य, दलदली, तळीं वगैरे भिन्न भिन्न असतात. तसाच राज्यपद्धतीमध्येंहि निरनिराळ्या गावांत किंवा प्रांतांत फरक पडलेला असतो. तसाच निरनिराळ्या राष्ट्रामध्येंहि भौगोलिक व राज्यशासनविषयक भिन्नपणा आपणांस आढळतो. याशिवायहि हवामान, जमिनीची सुपीकता, आयुष्यक्रमपद्धति, धर्म, वंश इत्यादि गोष्टीहि निरनिराळ्या प्रांतांत व राष्ट्रांत भिन्नपणा आणण्यास कारणीभूत असतात. आपणांतील सामाजिक भेद जितके तीव्र असतील तितका आपणामध्यें पृथकपणा अधिक आढळेल. तसेंच एखाद्या समाजाची त्यांतील लोकसंख्येमुळेंच एवढी वाढ व विस्तार होणें शक्य आहे कीं, त्यांतील सरहद्दीवरचे लोक व मध्यवर्ती लोक याच्यामध्यें भौगोलिक दृश्य व हवामान, जमिनींची सुपीकता इत्यादि बाबतींतहि बराच फरक होण्याचा संभव आहे. त्यामुळें त्याच्या आयुष्क्रमामध्येंहि सर्वस्वी फरक होऊन समाज रचनेमध्येंहि भिन्नपणा येणें साहजिकच आहे व त्यांचा नवीन समाजाशीं किंवा राष्ट्राशीं संबंध येऊन त्याच्यांत निरनिराळे बदल पडण्याचा संभव आहे. किंवा एखादा समाज आपलें मूलस्थान सोडून अगदीं निराळ्याच भौगोलिक परिस्थितींत असलेल्या प्रांतांत जाऊन राहिल्यास त्याच्यामध्यें थोडयाच काळात अतिशय फरक पडण्याच्या संभव आहे. भाषेमध्यें फरक पडण्याच्या बाबतींत भौगोलिक परिस्थिति हें एक अत्यंत महत्त्वाचें कारण आहे. कारण तीमुळें समाजामध्यें पृथकपणा व दळणवळणास पूर्ण प्रतिबंध होणें शक्य असतें व भौगोलिक परिस्थितीमध्यें हवामान, जमिनींची सुपीकता वगैरे गोष्टीहि अंतर्भूत असल्यामुळें मनुष्याच्या शारीरिक व मानसिक रचनेमध्यें व त्यामुळें त्याच्या वाक्पद्धतीमध्यें फरक घडून येणें स्वाभाविक असतें. एकाच परिस्थितीमध्यें राहणाऱ्या मनुष्याच्याहि वाक्पद्धतीमध्यें फरक होण्याची प्रवृत्ति असते हें आपण पाहिलेंच आहे तेव्हां जर समाजाच्या परिस्थितीमध्यें परदेशगमन, भिन्न हवामान किंवा शत्रुपहवास इत्यादि गोष्टी घडून आल्या तर ही प्रवृत्ति अधिक बळावते एकाच मोठ्या शहरामध्यें निरनिराळ्या सामाजिक वर्गांमध्यें बोलण्याच्या पद्धतींत किती फरक असतो हें आपणास माठमोठे अधिकारी, व्यापारी, धेंदेवाले लोक, कसबी लोक व कंगाल लोक याच्या भाषेकडे पाहिलें असतां दिसून येतें. या निरनिराळ्या वर्गामध्यें सामाजिक पृथकत्व असतें व तें कांहीं अंशीं व्यवसायांतील फरक व कांहीं अंशीं निरनिराळ्या समाजाच्या दर्जातील किंवा जातींतील फरक यावर अवलंबून असतें. तथापि सामान्यतः एकाच शहरांतील भाषेचा विचार केल्यास आपणास ती एकाच स्वरूपाची वाटते व तिच्यामध्यें आणि इतर शहरांच्या भाषांत आपणास फरक दृष्टीस पडतो. त्या मानानें अभिजात किंवा नागर भाषा ही मात्र अनेक निरनिराळ्या वर्गांकडून एकाच स्वरूपात बोलली जाते व याचें कारण पाठशाला व विद्यापीठें हीं होत. त्याप्रमाणच निरनिराळे उत्सव, सभा, सम्मेलनें, परिषदा नाटकें, कीर्तनें, विवाहादि समारंभ, जत्रा वगैर ठिकाणीहि सर्व लोकांस समजेल अशा तऱ्हेची भाषा वापरणें जरूर असल्यामुळें भाषेंस एकरूपता येणें व विशिष्ट भाषेस प्रामुख्य मिळणें या क्रिया होत असतात. या क्रियेत एक विशिष्ट भाषा ही इतर पोटभाषांवर आक्रमण करीत असून आपलें सार्वत्रिकत्व प्रस्थापित करण्याचें कार्य घडवून आणते व आगगाडी, मोटार, चित्रपट, बोलपट, टेलिफोन, वायरलेस, रेडिओ इत्यादि दळणवळणाचीं साधनें जसजशीं वाढत जातील तसतशी भाषेस एक स्वरूप येण्याची प्रवृत्ति अधिक वाढत जाईल.

शिष्ट अथवा एकस्वरूपी भाषा--सध्याच्या सामाजिक व्यवस्थेमध्यें व दळणवळणाच्या साधनांच्या सुलभतेमुळें अगदीं लहान खेडयांतील व्यक्ति सोडून दिली तर कोणत्याहि इसमास आपणास एका विशिष्ट समाजाचा घटक म्हणून वेगळें काढतां येणार नाहीं. कारण त्याच्या समाजातील स्थानामुळें त्याच्या व्यवसायामुळें व त्याच्या वस्तीस्थानामुळें त्याचा एकाच वेळीं अनेक तऱ्हेच्या समाजाशीं निरनिराळ्या वर्गांच्या लोकांशीं व देशातील निरनिराळ्या भागांशीं एकाच वेळीं संबंध येतो. याचा परिणाम असा होतो कीं, एखादी व्यक्ति अगदीं एकांतवासात व जगाशीं संबंध नसलेल्या लहानशा खेडयांतच राहात नसेल तर तिची भाषा कोणत्याहि एखाद्या विशिष्ट समाजाची भाषा म्हणून राहणार नाहीं तर तीमध्यें अनेक समाजांच्या भाषांचें अथवा बोलींचें मिश्रण सांपडेल. आपण एखाद्या मुंबईकर श्रीमान व्यापाऱ्याचें उदाहरण घेतल्यास आपणांस असें आढळेल कीं, तो आपला बराचसा काल शहरामध्यें आपल्या व्यवसायाकरता आपल्याशीं शिक्षण व दर्जा या बाबतींत सारख्या अशा समव्यवसायी लोकांत घालवितो. तर कांहीं वेळ त्याच धंद्यामुळें अगदीं निरनिराळ्या दर्जाच्या व परिस्थितींतील लोकांशीं त्यास घालवावा लागतो. तसेंच त्याचें शिक्षण एखाद्या कॉलेजमध्यें किंवा युनिव्हर्सिटीत झालेलें असतें. तेथें तो सुशिक्षित लोकांत वागलेला असतो. त्यानें बराचसा प्रवासहि केलेला असतो व त्याच्या संपत्तीमुळें त्यास मुंबईबाहेर एखाद्या

हवाशीर ठिकाणी बंगला वगैरे बांधून उपनगर किंवा खेड्यांतील आयुष्यक्रमाचाहि अनुभव घेतां येतो. आपला धंदा सांभाळून त्याला जा फुरसतीचा वेळ मिळतो त्यावेळी त्याचा इतर धंद्यातील विद्वान लोक, राजकारणी पुरुष, कौन्सिलचे सभासद किंवा इतर पुढारलेले लोक किंवा कामगार, मजुर वगैरेशीहि संबंध येतो. अशा मनुष्यास आपणाला कोणत्याहि नागरिक, खेडवळ, सुशिक्षित वगरे एका विशिष्ट वर्गात घालता येणार नाहीं कारण त्यामध्ये या सर्वच घटकांचे थोडे बहुत गुण आढळतात व अशा तऱ्हेचा मनुष्य बहुधा अभिजात भाषा व्यवहारात वापरतो व अशा तऱ्हेने बोलणाऱ्याच्या भाषेवर अनेक भाषांचा मिश्र परिणाम झालेला असतो. तसच प्रत्येक समाजाची अथवा प्रांताची भाषा अभिजात भाषेत थोडाफार सस्कार पावलेली असते थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे कोणत्याहि सामाजिक व्यवस्थेमध्ये ती अगदीं प्राथमिक स्वरूपाची किंवा विशेष प्रगत अशी नसली तरी कोणताहि समाज इतर समाजाशीं अगदीं अलग असा राहूं शकत नाहीं. आता प्राथमिक अवस्थेमध्ये विशिष्ट समाजातील व्यक्तीचा बाह्य लोकांपेक्षा स्वकीय लोकांशीच अधिक संबंध येत शकत आहे. तथापि समाजबंधनाच्या इतर समाजाच्या संपर्कापासून कोणताहि समाज अलिप्त राहूं शकत नाहीं व त्याचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष कांहीं तरी परिणाम त्या समाजाच्या भाषेवर होतच असतो. हा परिणाम त्या समाजातील निनिराळ्या व्यक्तीवरहि निरनिराळ्या प्रमाणांत होत असल्यामुळे कांहीं व्यक्तीच परकीयांच्या भाषाविशेषांचे ग्रहण करतात त्यामुळे कोणत्याहि समाजाची भाषा पूर्णपणे एकरूप असूं शकत नाहीं ही गोष्ट गृहीत धरून आपणास कोणत्याहि कालची उदा. प्राचीन आर्य लोकांची किंवा जर्मन लोकांची भाषा म्हणून विशिष्ट भाषेस संबोधितां येईल कारण परकीय भाषाचा संपर्क प्रथम एका कुटुंबांत होऊन त्या कुटुंबापासून त्याच्या जमातीमध्ये पसरून त्या जमातीचा इतर जमातींशी संबंध आला म्हणजे त्यांमध्ये पसरून ज फरक आरंभी अल्प प्रमाणांत असतात तेच कालांतराने वाढत जाऊन त्यात बरेच अंतर पडत. सध्या जी आपणांस सर्व प्रांतभर भाषेचे एकच स्वरूप बनण्याकडे प्रवृत्ति दिसून येत आहे ती वास्तविक भाषेची स्वाभाविक प्रवृत्ति नसून एक विशिष्ट भाषा इतर बोलींवर आक्रमण करून तिचे स्वरूप इतरांस प्राप्त होण्याची ती क्रिया आहे. अर्थात ही क्रिया किती अंशाने पूर्ण होईल हे त्या विशिष्ट भाषेच्या प्रभावावर अवलंबून राहील व तिच्यातील एकरूपता कायम राहणे हे पुन्हां भौगोलिक व सामाजिक पृथक्त्व कमी कमी होत जाण्यावर अवलंबून राहील तथापि अशा एकस्वरूप समाजाच्या भाषेमध्येहि सूक्ष्म निरीक्षण करणारास थोडाफार स्थानिक फरक आढळल्याशिवाय राहणार नाहीत.

राष्ट्रभाषा--प्रांताचा व्यवहार सुलभतेने व्हावा म्हणून ज्याप्रमाणे एखादी प्रांतिक बोली प्रांतीय शिष्ट भाषा बनते तशीच राष्ट्रव्यवहार चालविण्यासाठी राष्ट्रीय भाषेची अवश्यकता उत्पन्न होत व एखादी प्रांतिक भाषा राष्ट्रभाषा बनते. ही गोष्टहि राजसत्ता व विशिष्ट भाषेने व्यापलेले क्षेत्र अथवा लोकसंख्या यांवर अवलंबून असते मराठी हीत मराठीचा प्रसार कानडी व हिंदी भाषाच्याहि क्षेत्रात बराच झाला होता पण आज आपणांस हिंदी ही राष्ट्र भाषा करण सुलभ आहे असे आपण मानतों. नेदरलंडमध्ये एका काळी केवळ बोली असलेली हालेंडातील पश्चिम भागीच फ्रेंकोनियन भाषा ही कालांतराने साहित्यिक किंवा ड्युमर्यान स्वरूप पावून तच लोकांनी तिला आपल्या राष्ट्रभाषेचे स्वरूप दिले जर्मनीमधील सध्यांची शिष्ट भाषा हा एक बरच्या संस्कृत प्रांतातील मध्य व उच्च जर्मन बोलीचे संकीर्ण स्वरूप होय. हिंदुस्थानच्या दक्षांतील निरनिराळ्या प्रांतातील अनेक बोलींवर आपले वर्चस्व स्थापित केले आहे व त्या त्या प्रांतात प्रवेश केला आहे. नेदरलंड व जर्मनी या देशांच्या राष्ट्रीय भाषांतील फरक स्पष्ट असून त्यामध्ये सांकेतिक अवस्था आपणास आढळत नाहीं. तशीच गोष्ट फ्रेंच व इटॅलियन या अर्वाचीन शिष्ट भाषांची आहे तथापि सामान्यतः आपणांस असे म्हणतां येईल की, जर दोन शिष्ट भाषांचा संबंध येतो तेथे एकीचा शेवट कोठे होतो व दुसरीचा आरंभ कोठे होतो हे नक्की सांगणे कठिण असत या दोन भाषांच्या क्षेत्रामध्ये अशी एक लहानशी पट्टी असते की जिच्यामध्ये ह्या दोन्हीहि भाषांतील विशेष मिसळलेले आपणांस आढळतील. उदा. आपण दक्षिण महाराष्ट्राकडे जाऊं लागलों तर मराठीचे क्षेत्र कोठे संपते व कानडीचे कोठून सुरू होते याची मर्यादा रेषा आपणांस निश्चितपणे घालता येणार नाहीं. तीच गोष्ट गुजराथी व मराठी याचा जेथें संबंध येतो तेथा प्रकाराबद्दल म्हणता येईल.

सार्वराष्ट्रीय अथवा जागतिक भाषा--सर्व जगास सुलभतेने बोलतां येईल अशी एकभाषा प्रचलित होणे शक्य आहे काय यासंबंधी अलीकडे बरीच चर्चा करण्यांत येते व एस्परँटो नांवाची भाषा बोलणारे लोक युरोपमध्ये हजारों व सर्वत्र पसरलेले आढळतात. तथापि ही कृत्रिम भाषा जर जगातील सुसंस्कृत देशांत रूढ होऊन कायम राहिली तर तिच्यांतील उच्चार व रचना या बाबतींतील एकरूपता, फारशी दीर्घकाल टिकणार नाहीं व त्यामुळे तिचे मूळ उद्दिष्ट साध्य होणार नाहीं. सध्यां त्या भाषेतील शब्दांची उच्चारपद्धति सामान्यतः बहुतेक देशांतील लोकांस सुलभतेने शिकतां येते. परंतु

प्रत्येक देशांतील व्यक्ति आपल्या मातृभाषेच्या वाक्पद्धतीप्रमाणें शब्दांच्या उच्चारांत फरक करीत जातें. त्यामुळें या उच्चारामध्येंहि प्रत्येक देशांत तेथील भाषेंतील उच्चाराप्रमाणें हळू हळू स्वाभाविकतःच फरक पडत जातील व त्यामुळें कांहीं पिढ्यांनंतर याच एस्परँटो भाषेस प्रत्येक देशांत उच्चाराच्या बाबतींत निरनिराळें स्वरूप आलेलें आपणास दिसून येईल. तसेंच या भाषेंतील आघात कायम ठेवणेंहि कठिण जाईल. व त्यामध्यें किंचितहि बदल झाला तरी शब्दाचा अर्थ कळणें कठिण होत जाईल. आतां दळणवळणाचीं साधनें अतिशय त्वरित गतीनें वाढत असल्यामुळें निरनिराळ्या देशांचा संबंध आज निरनिराळ्या प्रांतांचा संबंध आहे त्यापेक्षाहि अधिक सुलभतेनें जाडतां येईल ही गोष्ट खरी आहे. टेलिफोन वगैरे साधनांनीं जगांतील कोणत्याहि भागांतील मनुष्यांशीं आज बोलतां येणें सुलभ झालें आहे. तथापि हीं साधनें कितीहि सुलभ झालीं तरी जगांतील दोन निरनिराळ्या भागांतील व्यक्तींचा संबंध एका खेड्यातील दोन व्यक्तींच्या संबंधाइतका निकट येणें केव्हाहि शक्य नाहीं. त्यामुळें हे भाषेंतील फरक जरी मंदगतीनें होत राहिले तरी ते फरक होण्याची क्रिया ही सतत चालूच राहणार. तसेंच वैश्य भाषेतील वाक्यरचनेचा तिच्यावर परिणाम होणारच. थोड्क्यांत सांगावयाचें म्हणजे जोंपर्यंत एस्परँटो भाषा जिवंत आहे तोंपर्यंत तिच्यामध्यें फरक हे होत जाणारच. तेव्हा जोंपर्यंत एस्परँटो ही भाषा प्रचलित असेल तोंपर्यंत तिचें स्वरूप नेहमीं निरनिराळ्या देशांत बदलत राहील हें निर्विवाद होय. एस्परँटोसारख्याच व्होलापुक, ईडिअम न्यूट्रल, अँक्किआरी लॅटिन, इडो, नॉव्हिअल, बेसिक वगैरे भाषा जागतिक म्हणून पुढें आणण्याचा प्रयत्न चालू आहे, त्यांचीहि तीच गत आहे.

भाषांचें वर्गीकरण--आपणास जर वर्गीकरणाच्या दृष्टीनें संख्येच्या केवळ अभिजात अथवा राष्ट्रीय भाषांचाच विचार करावयाचा असेल तर आपलें काम बरेंच सुलभ होईल. परंतु तसें वर्गीकरण अशास्त्रीय होईल, याकरितां आपणांस भाषेच्या क्षेत्राच्या मर्यादा निश्चित करणें अवश्य आहे. परंतु या बाबतींत आपणांस जेथें दोन भाषांचा सीमाप्रदेश येतो तेथें निश्चित मर्यादा घालणें कठिण जातें. तसेंच कांहीं बाबतींत भाषेचें स्वरूप शास्त्रीयदृष्टीनें प्राप्त झालेलें नसतें व कांहीं नवीनच तयार होत असलेल्या आढळून येतात. तसेंच आतापर्यंत किती भाषा नष्ट होऊन गेल्या याचीहि आपणांस पूर्ण खबर नसते. त्यामुळें आतापर्यंत होऊन गेलेल्या सर्व भाषांची यादी तयार करणें हें फार कठिण काम आहे. फ्रिंक यानें आपल्या पुस्तकांत दोन हजाराच्या वर भाषांचीं नांवें नमूद केलीं आहेत. तसेंच पुन्हा केवळ भाषांची संख्या देण्यापेक्षा त्यांच गटवार वर्गीकरण करणें ही गोष्ट त्याहूनहि कठिण आहे. अशा तऱ्हेनें वर्गीकरण करण्याकरतां कोणतें तत्त्व स्वीकारावें हा मोठा प्रश्न पडतो. व अशा तऱ्हेचें तत्त्व आपण लावूं म्हटलें तरी आपलें अनेक भाषांचें ज्ञान इतकें मर्यादित असतें कीं, आपणास त्यांचे विशिष्ट तत्त्वाच्या दृष्टीनेंहि वर्गीकरण करणें निर्दोष होईल अशी खात्री नसते. हीं गोष्ट अस्तित्वांत असलेल्या भाषांची झाली. मग ज्या भाषा आज नष्ट झाल्या आहेत त्यांच्याबद्दल तर बोलावयासच नको. त्यामुळें भाषांचें कोणत्याहि तऱ्हेनें वर्गीकरण केलें तरी तें अगदीं निर्दोष होईल अशी अपेक्षा करणें बरोबर होणार नाहीं. तथापि या बाबतींत आजपर्यंत झालेले प्रयत्न मनोरंजक असून त्यामुळें भाषाशास्त्रीय संशोधनालाहि अनेक दिशांनीं चालना मिळाली आहे.

बाह्य स्वरूपमूलक वर्गीकरण--भाषेचें वर्गीकरण करण्याची एक पद्धति निरनिराळ्या भाषांचें बाह्य स्वरूप अवलोकन करून त्यावरून बसविलेली आहे. या वर्गीकरणांत भाषेतील कोणतेंहि वाक्य हें पूर्ण कल्पना व्यक्त करणारें सर्वांत लहान मूलमान धरून त्याच्या स्वरूपामध्यें निरनिराळ्या भाषांत जे भेद आढळतात त्यास अनुसरून निरनिराळ्या भाषांचे वर्ग पाडलेले आहेत उदा. 'सुतार लाकूड तासतो' यामध्यें आपणास एक कल्पना पूर्णपणें व्यक्त झालेली दिसते. तेव्हां हा एक भाषेचा पूर्ण घटक समजावयास हरकत नाहीं. यास आपण वाक्य असें म्हणतों. आतां यामध्यें सुतार, लाकूड आणि तासणें या तीन गोष्टींतील कल्पनांचें एकत्र ग्रथन करून आपणास विशिष्ट गोष्टीचा बोध होतो. यांत आपण वाक्यांचे सुतार, लांकूड आणि तासणें या निरनिराळ्या भागामध्यें पृथक्करण करतों. व त्या कल्पनेचा पूर्ण अर्थ होण्याकरतां त्यांचें पुन्हा एकत्र ग्रथन करून आपण वाक्यार्थ करून घेतों. याप्रमाणें पृथक्करण व संग्रथन या दोनहि क्रिया आपणांस या ठिकाणीं दिसतात. यांतील सुतार किंवा तासणें या दोन्हींपैकीं कोणत्याहि एका गोष्टीस प्रामुख्य देऊन दुसरीस गौण अथवा तत्संबद्ध मानतां येईल यांतील सुतार हें नाम असून तासणें ही क्रिया आहे. याप्रमाणें कांहीं भाषांत नामास प्रामुख्य असतें तर कांहीं भाषांत क्रियेस प्रामुख्य असतें. आणि त्यामुळें कांहीं भाषास नामप्रधान भाषा व कांहींस क्रियाप्रधान भाषा असें आपणांस म्हणतां येईल. संस्कृत किंवा मराठी या क्रियाप्रधान भाषा आहेत तर ग्रीनलेंडिक ही भाषा नामप्रधान आहे. उदा. संस्कृतमध्यें आपण जर 'अहं पश्यामि' असें म्हणूं तर ग्रीनलेंडिक भाषेमध्यें तीच कल्पना 'दर्शन तस्य मम' अशा रीतीनें व्यक्त केली जाईल. संस्कृतमधील 'अहं तं हन्मि' याचें ग्रीनलेंडिकमध्यें 'मरण तस्य मम' असें रूप होईल. यावरूनच विशेषणात्मक अथवा संबंधमूलक आणि विधेयात्मक असें एक भाषांचें वर्गीकरण करण्यात येतें.

रूपात्मक व अरूपात्मक भाषा--आतां पृथक्करण अथवा संग्रथन हें वर आपण वाक्यामध्यें केलेलें पाहतों. परंतु ही क्रिया भाषेच्या कोणत्याहि अवस्थेंत हाण्यासारखी आहे. उदा. वाक्यांतील निरनिराळे शब्द बनविण्याच्या कामींहि आपण या क्रियेचा उपयोग कित्येकदां करतों. ह्या तत्त्वावरूनहि भाषेचें वर्गीकरण आपणांस करतां येणें शक्य आहे. उदा. कांहीं भाषांस रूपात्मक भाषा व कांहींस अरूपात्मक भाषा असें म्हणण्याची एक प्रथा आहे. संस्कृत वगैरे भाषांमध्यें नामांस आपण निरनिराळे प्रत्यय लावून रूपें बनवितों. परंतु चिनी भाषेमध्यें अशा तऱ्हेचा शब्दांच्या रूपांत मुळींच फरक पडत नाहीं. परंतु हें वर्गीकरण अलीकडे कोणी मान्य करीत नाहीं.

पृथक्करणात्मक व संयोगात्मक भाषा--वरील पृथक्करण व संग्रथन हें तत्त्व जर आपण वाक्यरचनेस न लावतां वाक्यांचे भाग जे निरनिराळे शब्द त्यांस लावलें तर आपणांस एक नवीनच वर्गीकरणाचें तत्त्व प्राप्त होईल. अशा दृष्टीनें ज्या भाषेंतील शब्द केवळ स्वतंत्र नसून त्यांमध्यें एखादा मूलघटक अथवा धातु व प्रत्यय इ. गौण अवयव असतात अशा भाषेंत ही संग्रथनाची क्रिया आपणांस दिसून येते. उदा. 'त्याच्या मुलास खेळावयास आवडतें.' येथें वाक्यांतील प्रत्येक शब्दांत मूल शब्द व इतर प्रत्ययादि गौण घटक आढळतात व हे घटक मूळ शब्दाशीं जोडलेले दिसतात. परंतु चिनीसारख्या भाषेंत वाक्यांतील प्रत्येक शब्द निरनिराळा ठेवलेला असतो व त्यामध्यें ही जोडणी आपणांस दिसत नाहीं. अशा प्रकारें मूळ शब्दास निरनिराळीं कार्यें दाखविणारे घटक जोडण्याची क्रिया कांहीं भाषांत अधिक परिणत स्थितीस गेलेली असते तर कांहीं भाषांत ती फक्त कांहीं अंशानींच दृष्टीस पडते. कांहीं भाषांत तर एकाच शब्दानें सर्व वाक्याचा बोध होऊं शकतो. उदा. सं. गच्छति. या शब्दानें जाणारी व्यक्ति, जाण्याची क्रिया, तिचा काल, वचन वगैरे सर्व गोष्टींचा बोध पूर्ण होतो. व यास वाक्यात्मक शब्द असें म्हणतां येईल. कांहीं भाषांत तर अनेक मिश्र कल्पनादर्शक वाक्यैहि एका शब्दांत व्यक्त करतां येतात. अशा प्रकारच्या अमेरिकेंतील मूळच्या रहिवाशांत कांहीं भाषा आहेत. त्यांना अनेकसंधायक (पॉलिसिंथेटिक) असें म्हणतात. अशा तऱ्हेचें एक उदाहरण फिंक यानें ग्रीनलंडिक भाषेमधील दिलें आहे. यांत मी मासे पकडण्यास योग्य अशी वस्तु मिळविण्याचा प्रयत्न करतों, इतक्या कल्पना 'औलिस-उत्-इसर-सि-निअरपु-न्ग' या एका शब्दांत व्यक्त होतात. यांत औलिस=मासे धरण्याचें साधन, इसक=योग्य, सिवुन्ग=मिळविणें इ. घटक आहेत. अशा भाषांमध्यें मूळ शब्द व घटक हे ज्या पद्धतीनें एकमेकांस जोडले जातात तीवरून भाषांचें वर्गीकरण करण्यास साधन प्राप्त होतें. दयाळूपणा, दुकानदारी, गृहरचना या ठिकाणीं प्रत्येक शब्दांतील अवयव एकापुढें एक ठेवलेले असुन ते सहज वेगळे करतां येण्यासारखे आहेत व त्यांतील एक अवयव दुसऱ्या शब्दांशीं जोडून निराळा शब्द सहज बनवितां येण्यासारखा आहे. या जोडणीस संश्लेषण अथवा चिकटणें म्हणतात व यावरून कांहीं भाषांस चिकट्या अथवा संश्लिष्ट असें नांव मिळालें आहे. अशा भाषांचीं कांहीं उदाहरणें म्हणजे तुर्की, फिनोउग्री, बंटु व मलायापोलिनेशन भाषासंघ हे होत. उदा. तुर्कीमध्यें मक्-करणें हा शब्द निरनिराळ्या शब्दांस जोडून विशिष्ट कृति करण्याचा बोध करतां येतो. उदा. सेवमेक्-प्रेम करणें. यझमक्=लेखन करणें इ. यासच ईस हा परस्परदर्शक शब्द जोडला तर सेवइसमेक=परस्पर प्रेम करणें किंवा 'दिर' हा प्रयोजक शब्द जोडला तर सेवदिरमेक्=प्रेम करावयास लावणें असे शब्द तयार होतात. जितके या दुय्यम शब्दांचे अथवा प्रत्ययांचे अर्थ निश्चित असतील तितका या भाषेचा चिकटपणा अधिक स्पष्ट होईल. जेव्हां मूळ शब्द व घटक यांच्या संयोगामुळें मूळ शब्दांत किंवा घटकांत फरक होऊन तो ओळखणें कठिण जातें तेव्हां आपणांस एक निराळाच प्रकार आढळतो. यास मीलन (फ्युजन) असें म्हणतां येईल. उदा. उपेक्षा यांतील उप्-ईक्ष् याचें पूर्ण मीलन झालें आहे तसेंच 'धार्ष्ट्य' येथेहि घडलें आहे तसेंच इंग्रजीतील सिंग-संग-संग यांतील किंवा माऊस व माइस यांतील विकरण ओळखण्यास अधिक कठिण असतें. अशा तऱ्हेचा बिकार विशेष रीतीनें सेमिटिक भाषांमध्यें आढळतो. त्या भाषांत शब्दांतील व्यंजनें हे मूळ शब्द असुन स्वर हे फरक घडविणारे घटक असतात. त्यांतील मूळ व्यंजनांचा स्वरांशिवाय कांहीच अर्थ होत नाहीं. परंतु निरनिराळ्या स्वरांची योजना केली असतां मात्र निरनिराळे अर्थ प्राप्त होतात. उदा. अरबी भाषेतील कृत्ब् हा धातु अथवा मूळ शब्द घेतला तर 'कतब' याचा अर्थ 'त्यानें लिहिलें' असा होतो. पण त्यांत निरनिराळ्या स्वरांची योजना केली असतां पुढें दिल्याप्रमाणें निरनिराळे अर्थ प्राप्त होतात. (१) कत्ब=लेखन, (२) कातिब्=लेखक, (३) किताब=पुस्तक, (४) किताबत्=शिलालेख, (५) मक्तूब=लिहिलेलें, (६) तक्तीब=लिहावयास लावणें, (७) मुकातबत्=पत्र व्यवहार, (८) इक्ताब=लिहावयास सांगणें, (९) तकातुब=एकमेकांस लिहिणें, (१०) मुत्कातीब=पत्रव्यवहार ठेवणारा, (११) मक्तब=लेखनशाला. अशा भाषांत विशिष्ट प्रत्ययांस विशिष्ट अर्थ असून तो जोडला असतां मूळ शब्दाच्या अर्थांत तेवढी भर पडत जाते. परंतु वर दिलेल्या उदाहरणांत जेथें प्रत्ययामुळें शब्दाच्या स्वरूपांत फरक पडतो तेथें अर्थामध्येंहि संक्षिप्तता येण्याचा संभव असतो. या चिकटेपणाचाच केव्हां केव्हां प्रत्ययाशीं

भिन्नपणा दाखविण्यांत येत असतो. परंतु प्रत्यय ही संज्ञा इंडो-युरोपीय भाषांतील प्राचीन भाषामध्यें जे विकार होतात ते दाखविण्याकरितां योजिलेली होती. 'करिष्यामि' यांतील प्रत्यय लागल्यामुळें मूळ धातूमध्यें जो अधिक अर्थ उत्पन्न होतो किंवा 'नृपाणाम्' येथे जी विभक्तिप्रत्ययामुळें अर्थात भर पडते ती वास्तविक त्या विशिष्ट शब्दाचें वाक्यांतील इतर शब्दांशीं जें नातें किंवा संबंध असतो तो दाखविण्यामुळें पडते म्हणून तिचा वास्तविक संबंध मूळ शब्दाकडे येण्याऐवजीं वाक्यरचनेकडे जातो. परंतु चोर-चौर्य या शब्दांमध्यें केवळ अर्थदर्शकच फरक झालेला असून विभक्तिदर्शक फरक नाहीं. प्रत्ययी भाषांमध्यें प्रत्ययमीलन व वाक्यरचनेंतील फरक या दोहोंचेंहि मिश्रण असतें.

एकाकी भाषा--भाषांतील प्रत्ययांवरून त्यांचें स्वरूप संश्लेषणात्मक म्हणजे चिकटेपणाचें किंवा विभक्तिप्रत्ययाचें किंवा पृथक्पणाचें आहे यावरून निरनिराळ्या भाषांत भेद दर्शविण्यांत येतो व ज्या भाषेंतील शब्द केव्हांच विकरण पावत नाहीं (उदा. चिनी) त्यांना एकाकी भाषा म्हणतात. तसेंच त्यांतील शब्द जर सामान्यतः एकाक्षरीच असतील. तर त्यांस एकाक्षरी भाषा असेंहि नांव देतात. अशा प्रकारची चिनी ही नमुनेदार एकाक्षरी भाषा म्हणतां येईल. तथापि त्या भाषेंतहि क्वचित समास आढळतो.

समावेशक किंवा अंतर्ग्राही भाषा--भाषेच्या स्वरूपावरून आणखीहि एक प्रकार पाडतां येतो. त्यास अंतर्ग्राही (इन्कार्पोरेटिंग) भाषा असें नाव देतां येईल. या भाषांचा कधीं कधीं अनेकसंधायक भाषांशीं घोंटाळा करण्यांत येतो. यांच्या नांवावरून या भाषांमध्यें शब्दाच्या पोटांत प्रत्ययात्मक अगर गौण घटक शब्द घेण्याची क्रिया होत असते. हा नवीन अंतर्भूत होणारा भाग प्रत्यक्ष मळ शब्दाच्या पोटांतच गेला पाहिजे असें नसून मूळ शब्द व प्रत्यय किंवा दोन प्रत्यय यांच्यामध्येंहि आला तरी चालतो. वर दिलेले तुर्की भाषेचे सेवमेक=प्रीति करणें व सेवइसदिरमेक्=परस्पर प्रीति करणें व सेवइसदिरमेक्=परस्परांवर प्रीति करावयास लावणें. हीं अशा तऱ्हेचीं अंतर्ग्रहणाचीं उदाहरणें म्हणून देतां येतील. संस्कृतमध्यें 'उपैनं यज्ञो नमति' यांत उपनमति या क्रियापदांत 'एनं' व 'यज्ञ' हे शब्द अंतर्भूत झाल्याचें आपणांस दिसतें. किंवा पर+अपहार यामध्यें परस्वापहार, परदारापहार, परदाराधनापहार या रीतीनें पर आणि अपहार यामध्यें स्व, धन, दारा, इ. शब्द अंतर्भूत झालेले आपणांस दिसून येतील. मेक्सिकोंतील इंडियन लोकांच्या भाषेंत " नि नका क्वा=मी मांस खातों, नि त्ला क्वा=मी कांहीतरी खातों." अशा रीतीनें मी आणि खातों यामध्यें खाण्याच्या पदार्थाचें नांव अंतर्भूत केलेलें आपणांस दिसून येईल. अशा तऱ्हेनें अंतर्भूत झालेल्या शब्दाच्या रूपामध्यें कधीं कधीं संक्षेप करण्याचीहि प्रवृत्ति आढळून येते.

एकाकी व इतर भाषा--एकाकी व एकाकी नसलेल्या भाषांमध्यें एक महत्त्वाचा फरक हा आहे कीं, एकाकी भाषेंतील शब्द स्वतः स्वतंत्र असून स्वयंपूर्ण असतात परंतु त्यांचा अर्थ वाक्यांतील त्यांच्या विशिष्ट स्थानावर अवलंबून असतो व स्थानांतराबरोबर अर्थांतरहि होतें. उदा. चिनी भाषेमध्यें 'वो त नी'=मी तुला मारतों. पण ' नी त वो'=तूं मला मारतोस. ' तसेंच 'त्स ऐ जेन'=समर्थ मनुष्य. परंतु 'जेन त्स ऐ'=मनुष्यसामर्थ्य. 'हौ जेन'=चांगला मनुष्य. पण ' जेन हौ ' =मनुष्याचा चांगुलपणा असे अर्थ होतात. तेंच मराठीमध्यें 'तूं मला मारतोस' यासारख्या वाक्यांत 'मला तूं मारतोस' किंवा 'मला मारतोस तूं' किंवा ' मारतोस मला तूं.' अशा रीतीनें शब्दांचें स्थान कसेंहि बदलले तरी अर्थबदल होत नाहीं. याप्रमाणें प्रत्ययी भाषांमध्यें वाक्यांतील शब्दाच्या स्थानावर त्याचा अर्थ अवलंबून नसतो, व त्यांतील प्रत्ययांवरून त्याचा व वाक्यांतील इतर शब्दांचा संबंध व तदनुषंगिक अर्थ हे निश्चित होतात.

या पद्धतींचें ग्राह्याग्राह्यत्व--बाह्यस्वरूपविषयक पद्धतीप्रमाणें भाषांचें (१) एकाकी, (२) चिकटया, (३) प्रत्ययी अथवा विकरणात्मक, (४) समावेशक, (५) अनेकसंधायक व (६) पृथक्करणात्मक असे सहा वर्ग पडतात. ही पद्धति अलीकडे त्याज्य समजण्यांत येते. वास्तविक एकाकित्व, संश्लिष्टत्व किंवा विकारित्व या भाषेच्या वाढीमधील निरनिराळ्या अवस्था आहेत. शिवाय यामध्यें वाक्यरचना व शब्दरचना यांचा घोंटाळा होतो. तसेंच या तिन्ही प्रकारची रचना आपणांस एकाच भाषेंत व एकाच वेळीहि आढळूं शकते. आतां कित्येक भाषांत विशिष्ट प्रवृत्तीवरच जोर दिलेला आढळतो. व इतर पद्धतीकडे त्या मानानें दुर्लक्ष झालेलें आढळतें. चिनी भाषेमध्यें एकाकित्व व पृथक्करण या गोष्टीस प्राधान्य देऊन संयोगीकरणाकडे दुर्लक्ष केलें आढळतें. तथापि चिनी भाषेमध्येंहि तिला एकाकी स्वरूप येण्यापूर्वी प्रत्यय होते असें एक मत आहे (बनेहार्डे कालेप्रेन. पूर्वचिनीप्रत्यययुक्त भाषा, जर्नल एशियाटिक १५, २०५-३२). तसेंच भाषेचें स्वरूपहि सर्व काल एकाच प्रकारचें राहतें असें नाहीं. केव्हां केव्हां भाषेच्या इतिहासांत आपणांस भाषेची प्रवृत्ति एका दिशेकडून अगदीं विरुद्ध दिशेकडे गेल्याचींहि उदाहरणें आढळतात. तेव्हां अशा तत्त्वावर केलेलें वर्गीकरण हें कायमचें टिकणारें न होतां वरचेवर बदलण्याची पाळी येईल, व

यामुळें ज्या भाषांचा परस्परांशीं कांहीं संबंध नाहीं अशाहि भाषा आपण एकाच वर्गांत घालण्याचा संभव आहे. याकरितां अलीकडे या वर्गीकरणपद्धतीवर कोणी फारसा भर देत नाहीं.

मानववंशमूलक वर्गीकरण--भाषावर्गीकरणाची दुसरी पद्धत म्हटली म्हणजे ती ज्या मानवसमाजांत रूढ आहे त्या मानवसमाजास अनुलक्षून निरनिराळ्या भाषांचें वर्गीकरण करणें होय. ही पद्धति फ्रेडरिक मुलर यानें सुचविली आहे. यानें प्रथम बारा निरनिराळे मानववंश अस्तित्वांत होते अशी कल्पना केली आहे व त्यांचेहि पुन्हां भाषेची वाढ होईपर्यंत सुमारें शंभर मानवशाखाश्रेष्ठया निरनिराळे गट कल्पिले आहेत व याप्रमाणें सुमारें निरनिराळ्या मूळ शंभर प्रकरच्या भाषा होत्या अशी त्यानें कल्पना केली आहे व त्यांपासून पुढें अनेक भाषा निघाल्या अशी त्याची समजूत आहे. हें मानववंशाचें वर्गीकरण त्यानें मनुष्यांच्या केसांच्या रचनेवरून कुरळे, सडक, अशा तऱ्हेनें केलेलें आहे. परंतु भाषाशास्त्रज्ञांनीं या वर्गीकरणपद्धतीस फारसें महत्त्व दिलें नाहीं. याचें कारण मनुष्य प्रथम अनेक मूळ वंशांपासन उत्पन्न झाला हें मानणें अशास्त्रीय आहे. कारण मनुष्यजातीची उत्पत्ति कशी झाली याबद्दल अद्यापि एकवाक्यता झालेली नाहीं व याबद्दल ऐतिहासिक पुरावा मुळींच उपलब्ध नाहीं. मानववंशशास्त्रज्ञांसहि आपल्या विचारपद्धतीमध्यें मधून मधून मोठमोठाले खंड पडलेले आढळतात. जर पृथ्वीच्या पाठीवर निरनिराळ्या ठिकाणीं स्वतंत्रतेनें निरनिराळ्या मानवसमाजांची उत्पत्ति झाली असेल तर त्यामध्य निरनिराळ्या तऱ्हेच्या भाषा उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. तथापि पुढें अशा भाषांचें मिश्रण झाल असतां त्या मिश्रित भाषेची उत्पत्ति शोधून काढणें साधनांच्या अभावी अशक्य आहे. कोणतीहि भाषा अगदीं तिच्यांत फरक केल्हांहि होणार नाहीं अशा तऱ्हेनें सीलबंद असूं शकत नाहीं, ह आपणांस प्रत्येक भाषेच्या इतिहासावरून कळून येतें. आजची मराठी ही इंडो-युरोपियन किंवा आर्यन् भाषेपासून निघाली आहे ही गोष्ट जरी खरी असली तरी हा संबंध जोडण्याम आपणास मध्यंतरीं पुष्कळच दुवे जोडावे लागतात, तसेंच निरनिराळ्या मानववंशांविषयींहि विचार करीत असतांना आपणास (कोणतहि तुलनेच प्रमाण लावलें तरी) सर्वस्वी शुद्ध व एकरक्ताची अशी मानवजाति आज जगांत कोठेंहि आढळत नाहीं. एखादा जपानी मनुष्य जर इंग्लंडांत जन्मून इंग्लंडांतच वाढला तर त्याची मातृभाषा इंग्रजी होऊन तींतील ध्वनी व उच्चारण्याची पद्धति तो इतकी आत्मसात् करील कीं, त्यास एखाद्या इंग्रज मनुष्याइतकेंच जपानी भाषा शिकणें कठिण जाईल. अमेरिकेमध्यें आज युरोपांतील सर्व निरनिराळ्या वंशांच्या लोकांनीं (जर्मन, डच, फ्रेंच, इटालियन, पोल, जपानी, नीग्रो, यांनी) आपली मूळ भाषा सोडून देऊन इंग्रजी भाषेचा स्वीकार केलेला आहे व थोड्या पिढ्यांमध्य त्यांनीं ती आत्मसात् केलेली आहे. इंग्लंडमध्यहि आज जे निरनिराळ्या वंशांचें मिश्रण झालेलें आपणांस आढळतें व त्या प्रत्येक वंश नें आपल्या भाषेचे विशेष इंग्रजी भाषेमध्यें कायम ठेवल्याचें आढळतें, त्यावरूनहि मानववंशाचा भाषेशीं तितका निकट संबंध नाहीं ही गोष्ट आपल्या ध्यानांत येत. यावरून मानववंशांची प्रगति व भाषेची प्रगति ही एकाच दिशेनें चालेलली नसते ही गोष्ट आपल्या लक्षांत येईल. यामुळें वंशमेकर झाला असता जरी त्याचा भाषेवर थोडा फार परिणाम होतो ही गोष्ट खरी असली तरी ती भाषेच्या वर्गीकरणास पुरेसें साधन मानता येणार नाहीं स्टेन्थॉल व मिस्टेली यांच्या वर्गीकरणांचा उल्लेख पूर्वी केलाच आहे.

भाषावंशानुसारी वर्गीकरण--भाषावर्गीकरणाची आणखी एक पद्धति म्हणजे भाषावंशानुसारी वर्गीकरण होय. ही पद्धति अनेकांनीं मान्य केलेली आहे. या पद्धतीस वास्तविक ऐतिहासिक वर्गीकरण हें नांव अधिक सार्थ होईल. कारण भाषांचा वंश अथवा विस्तार ही कल्पना तितकी अन्वर्थक नाहीं. जेव्हां आपण भाषाचे वंश कल्पून भाषाचीं कुळें व भाषाचा मातृकन्यासंबंध अथवा स्वसृसंबंध आहे असें म्हणतों तेव्हां आपण तें केवळ अलंकारिक पद्धतीनेंच बोलतों अस म्हटलें पाहिजे. एका भाषेपासून दुसरी भाषा उत्पन्न होत नसून भाषा ही वास्तविक मनुष्यापासून उत्पन्न होते. भाषा ही एक मानवी व सामाजिक स्वरूपाची क्रिया आहे व मनुष्याच्या मानसिक व व्यावहारिक प्रगतीबरोबर भाषेचीहि प्रगति व तिच्या स्वरूपांत बदल होत असतो. ज्याप्रमाणें एखाद्या एक वर्षाच्या मुलाचें कांहीं वर्षांनीं ऐशी वर्षाच्या म्हाताऱ्यांत रूपांतर होतें परंतु मूळची व्यक्ति तीच असते त्याप्रमाणें प्राकृत किंवा देश्य भाषा या वैदिक किंवा संस्कृत भाषांचींच रूपांतरें आहेत. परंतु आज आपल्या दृष्टीला निरनिराळ्या देश्य भाषा ह्या स्वतंत्र व नवीन भाषा आहेत असें दिसतें. कारण त्यांच्या स्वरूपांतील फरक फारच मोठा असून त्या एकमेकांसहि अपरिचित झाल्या आहेत. हा फरक पडण्याचें कारण त्या भाषांच्या अंगीं नसून ती बोलणाऱ्या समाजाच्या व त्याच्या इतिहासाच्या ठिकाणीं आहे. तेव्हां निरनिराळ्या प्राकृत भाषा ह्या आपणांस सदश भाषा किंवा स्वसृभाषा आहेत अस म्हणतां येईल. कारण त्या एकाच मूळ संस्कृत भाषेपासून बनल्या आहेत. परंतु ही परिभाषा केवळ अलंकारिक आहे हें आपणांस विसरून चालणार नाहीं. याप्रमाणें जर आपणांस प्रत्येक भाषेच्या इतिहासाचें ज्ञान करून घेतां आलें व त्यांचा उगम अथवा त्यांस

वेगळें स्वरूप केव्हां प्राप्त झालें हें निश्चितपणें माहीत करून घेतां आलें तर आपणांस त्यांच्या उच्चारपध्दतीचा, स्वरूपाचा किंवा वाक्यरचनापध्दतीचा तौलनिक अभ्यास करण्याचें कारण नाहीं व अशा रीतीनें ऐतिहासिक अभ्यास हीच सरळ व अत्यंत सुरक्षित अशी पद्धति होय. याप्रमाणें आपणांस भारतखंडांतील निरनिराळ्या बंगाली, हिंदी, गुजराथी, मराठी इ देश्य भाषांचा ऐतिहासिक अभ्यास करून त्यांचें नातें अथवा परस्पर संबंध त्यांच्या स्वरूपाचा तौलनिक अभ्यास केल्याखेरीजहि जाणतां येईल. आपण या निरनिराळ्या भाषांतील लेखांचा अभ्यास केला असतां प्रत्यक भाषा विशिष्ट प्राकृतापासून व ती विशिष्ट प्राकृत संस्कृत पासून निघाली आहे हें कळून येईल व जोंपर्यंत विशिष्ट प्रांतांतील लोक आपली परंपरागत भाषा वापरीत आहत तोंपर्यंत या देश्य भाषामध्ये परस्परांत कितीहि फरक पडत गेला तरी त्यांचें मूळ हुडकून काढण्यास आपणास कठिण जाणार नाहीं व त्यांचे परस्परांशीं असलेलें नात कायम राहील. अशा पध्दतीनें अभ्यास केला असतां आपणांस असें दिसून येतें कीं, या निरनिराळ्या भाषांत घटनाविषयक, शब्दसंपत्तिविषयक किंवा वाक्यरचनात्मक जे साद्रश्य आढ ते त्यांच्या या वांशिक संबंधामुळें असून त त्यांचें कारण नसून परिणाम आहे. अनेक शतकांमध्यें घडून येणाऱ्या फरकामुळें दोन भाषांतील साम्य अगदीं नाहींसें होऊन त्यास पूर्णपणें निराळेच स्वरूप प्राप्त होणें संभवनीय आहे. व अशा वेळीं परस्पराच्या साक्षात् तुलनेनें त्यांतील साम्य अ ढळून येणें अशक्य आहे आज जर बलोचियन व इंग्रजी यांची त्यांच्या अर्वाचीन स्वरूपांत तुलना करू लागलों तर त्या दोन्ही इंडो-युरोपियन भाषेपासूनच निघाल्या आहत ही गोष्ट जर आपणास इंडो-युरोपियन भाषेचीं कांहीं वैशिष्ट्यें ठाऊक नसतील तर सिद्ध करणें कठिण जाईल तेव्हां दोन भाषांचें मूळ जर एकच असेल तर आजच्या त्यांच्या स्वरूपांत कितीहि बदल झाला असला तरी ऐतिहासिक अभ्यासानें त्यांस एकत्र जोडणें आपणास कठिण नाहीं अशा तऱ्हेचा ऐतिहासिक अभ्यास जेव्हां एखाद्या भाषेतील निरनिराळ्या कालचे लेख आपणांस उपलब्ध असतील तेव्हांच त्यांची तुलना करून करतां येणें शक्य आह. तसेच हे लेख जेथें शब्दाचे ध्वनिलेख असतील तेथेंच त्यांची तुलना करणें शक्य होईल. परंतु चिनी भाषेसारख्या भाषेच्या लेखात जेथें ध्वनि, चिन्हांच्या ऐवजीं कल्पनाचित्रें असतात तेथ त्यांची तुलना करून ऐतिहासिक अभ्यास करणें शक्य नसतें व यामुळेंच चिनी भाषेमध्यें जरी फार मोठें वाङ्मय उपलब्ध आहे तरी त्याचा ऐतिहासिक अभ्यास करणें फार अवघड पडतें अशा तऱ्हेनें निरनिराळ्या भाषांचे वांशिक संबंध जोडण्यास पुढील निरनिराळीं साधनें सुचविण्यात आलीं आहेत. (१) भौगोलिकस्थान-जेव्हां एकमेकांशीं संबंध नसलेल्या, दोन निरनिराळ्या ठिकाणीं असलेल्या दोन भाषांत पुष्कळसे शब्द सामान्य असतात तेव्हां त्यामध्यें वांशिक संबंध असावा अशी कल्पना करण्यात येते. जर ऐतिहासिक कालामध्य या दोन स्थानांतील लोकांचें दळणवळण असल्याचें दिसून आलें नाहीं व त्यामध्य शब्दांची देवघेव झाली नाहीं तर त्यांतील साम्य वंशमलकच असलें पाहिजे परंतु ज्या लोकांच्या भाषेंतील लेख उपलब्ध नसतील त्यांचा इतिहास आपणास इतका अल्प माहीत असतो कीं, त्यांच्या निरनिराळ्या समजांतील घटकामध्यें परस्पर दळणवळण होतें कीं नव्हतें हें सिद्ध करण कठिण जातें. कारण इतिहासामध्यें आपणास निरनिराळ्या भाषांच्या भौगोलिक स्थानामध्य पुष्कळच फरक पडलेला कांहीं बाबतींत आढळून येतो. केव्हा केव्हा एखादा समाजच आपली भाषा बरोबर घेऊन स्थानत्याग करतो (उदा० दक्षिण आफ्रिकेतील डच), केव्हां केव्हां परिस्थितीमुळें एका बोलीचा पगडा दुसऱ्या बोलीवर पडून तीस प्रबलत्व मिळतें व दुसरी अजीबात नष्ट होते आणि त्यामुळें त्या जेत्या बोलीचा संबंध निराळ्या शेजाऱ्यांच्या भाषाशी येतो (उदा. पूर्व जर्मनीतील गॉथिक बरोबरीच्या बोली). केव्हा केव्हां विशिष्ट बोली बोलणारे लहान लहान समाज पहाडामध्य किंवा समुद्रकिनारीं जाऊन राहतात व त्यामुळें त्यांच्या भाषाप्रदेशास लहान लहान बेटांचें स्वरूप येतें (उदा. ब्राहुई, बास्क, हंगेरियन वगैरे) (२) कांहीं कांहीं भाषेची सामान्य घटना ध्वनिविषयक, स्वरूपविषयक किंवा वाक्यरचनात्मक ही वांशिक संबंध जोडण्यास पुरेशी कारण आहेत असें मानतात. तथापि भाषाशास्त्रीयदृष्ट्या या गोष्टींस कितीहि महत्त्व असलें तरी वंशसंबंध जोडण्यास त्या पुरेशा नाहींत. भाषेचें स्वरूप प्रत्ययी, चिकटी, एकाकी वगैरे कोणत्याहि प्रकारचें असलें तरी अशा स्वरूपाच्या दोन भाषामध्यें संबंध असेलच असें मानतां येणार नाहीं. ही गोष्ट आपण वर दाखविलीच आहे या गोष्टी भाषेच्या प्रगतमध्यें कमी-अधिक प्रमाणात नेहमींच चालू असतात. आणि हे परिणाम जगाच्या निरनिराळ्या भाषामध्यें निरनिराळ्या गोष्टींपासून उत्पन्न होतात. (३) एकाच वंशापासून उत्पन्न झालेल्या भाषामध्यें कांहीं शब्द सामान्य असण साहजिकच आहे. परंतु हे दोन शब्दातील साम्य अधिक सूक्ष्म दृष्टीनें तपासणें जरूर आहे. वर वर सारख्या दिसणाऱ्या एकाच मूळ शब्दापासून उत्पन्न झालेले अशा भासणाऱ्या शब्दांचाहि केव्हा केव्हा परस्परसंबंध अगदीच नसल्याचें आढळून येत. उदा. ग्रो. थिऑस, लॅ. लूस किंवा ज. फ्युएर, फ्रे फ्यू यांचा एकमेकांशीं कांहीं संबंध नाहीं. उलट फ्रे ट्रोनेर व क्रिक हे इं कम्, व फाइन्ड या शब्दांशीं संबद्ध आहेत. एका भाषेतील शब्द दुसऱ्या भाषेत जाण्याची क्रिया इतकी सहज घडून येत असते कीं त्यावरून त्यांचा

संबंध जोडणें अवघड होतें. कोणत्याहि भाषेमध्यें अमिश्र अशी शब्दसंपत्ति आढळत नाहीं. कांहीं भाषांतून तर परकीय शब्द घेण्याची प्रवृत्ति अतिशय आढळून येते. याचें कारण शब्द हा भाषेंतील एक स्वतंत्र घटक असून तो दुसऱ्या भाषेच्या व्याकरणामध्यें फरक केल्याशिवाय सहज आपला प्रवेश करून घेऊं शकतो. विशेषतः ज्या भाषेंतील शब्दांची व्युत्पत्ति फारशी भानगडीची नसते तींत ही क्रिया अधिक सुलभ असते. जेथें भाषेंतील लेखपरंपरा अत्रुटित उपलब्ध असते तेथें विशिष्ट परकीय शब्दांनीं त्या भाषेंत केव्हां प्रवेश केला हें आपणांस निश्चितपणें सांगतां येतें. परंतु ज्या भाषेंतील लेख दीर्घकालपर्यंतचे उपलब्ध नसतात तेथें ही गोष्ट कठिण होते. जेव्हां दोन भाषांत एकच शब्द आढळतो तेव्हां तो कोणत्या भाषेपासून कोणत्या भाषेनें उसना घेतला हें ठरविणें पुन्हां अधिक कठिण असतें. केव्हां केव्हां तो तिसऱ्याच एका भाषेतून दोहीनीहि उचलला असण्याचा संभव असतो. किंवा त्यांतील साम्य त्यांची निरनिराळ्या तऱ्हेनें परिणति झाल्यामुळेंहि उत्पन्न झालेलें असण्याचा संभव असतो. यामुळें अशा वेळीं केवळ शब्दसाम्यावरून दोन भाषांचें नातें जोडणें कठिण असतें. तथापि सामान्य शब्दसंपत्ति हें एक दोन भाषांतील संबंध जोडण्यास महत्त्वाचे कारण आहे ही गोष्ट आपणांस अमान्य करतां येणार नाहीं. शब्दाचें स्वरुप जितकें सामान्य तितका तो परकीय असण्याचा संभव कमी व जितकें अमूर्त अथवा नवकल्पनादर्शक तितका तो उसना घेतलेला असण्याचा संभव जास्ती. जर दोन भाषांमध्यें तुलनेनें सामान्य वस्तुवाचक (उदा. प्राणी, शरीरावयव, तारे, पंचमहाभूतें, खाणें, पिणें, निजणें इ० परिचित क्रिया, पुरुषवाचकसर्वनामें, संख्यावाचक विशेषणें, अव्ययें इ०) शब्द बरेचसे सामान्य आढळतील तर त्या दोन भाषांत वांशिक संबंध आहे असें म्हणण्यास बरीच जागा आहे असें समजण्यास हरकत नाहीं. (४) दोन भाषांतील वांशिक संबंध सिद्ध करण्यास त्यांतील ध्वनिविषयक आणि स्वरूपविषयक साम्य हें महत्त्वाचें आहे. वास्तविक ह्या दोन गोष्टींत इतका एकसारखा फरक पडत असतो कीं, त्यावरुन वांशिक साम्याची कल्पना करणें बरोबर होणार नाहीं असें आपणांस प्रथमदर्शनीं वाटतें. परंतु भाषेच्या प्रगतीच्या विशिष्ट अवस्थेमध्यें तिची ध्वनिपद्धति निश्चित असून ती बोलणाऱ्या समाजाच्या वाक्पद्धतीशीं निगडित असते. व तत्संबद्ध कांहीं मानसिक क्रियाहि निश्चित स्वरूपाच्या असतात. ही वाक्पद्धति आणि ह्या मानसिक प्रवृत्ती विशिष्ट समाजाच्या ध्वनिपद्धतीस इतरांपेक्षां निराळें असें निश्चित स्वरूप देतात. व त्यांचें वैशिष्ट्य इतकें निश्चित असतें कीं एका भाषेंतील विशिष्ट ध्वनींचें अनुकरण दुसऱ्या भाषेंत क्वचितच केलें जातें. व ह्या ध्वनींमध्यें जो कालांतरानें फरक पडत जातो तो त्या विशिष्ट वाक्पद्धतीमध्यें व मानसिक प्रवृत्तीमध्यें होणाऱ्या बदलास अनुसरून असाच होत असतो. जेव्हां कांहीं अनपेक्षित कारणांमुळें एखादा निराळाच ध्वनि एखाद्या भाषेमध्यें प्रवेश करतो तेव्हां तो त्या पुढील एखाद्या कालामध्यें पुन्हां टाकून दिलेलाहि कधीं कधीं आढळतो. इंग्रजी भाषेमध्यें अनेक परकीय भाषांतून शब्द घेतले गेले आहेत परंतु त्यांचा उच्चार त्या भाषेंतील विशिष्ट ध्वनिपद्धतीस अनुसरून बदलण्यांत आलेला आहे तसेंच भाषेमध्यें जे निरनिराळे उच्चार करण्यात येतात ते विशिष्ट मूळ ध्वनींच्या निरनिराळ्या प्रकारच्या संयोगापासून बनविण्यांत येतात. तेव्हां एखादा परकीय ध्वनि भाषेंत आल्यास त्यानें अनेक प्रकारचे संयोगहि त्या भाषेंत येण्याचा संभव असतो व ही गोष्ट भाषेच्या प्रगतीच्या विरुद्ध असतें. प्रत्येक भाषेतील ध्वनींची वाढ अंतःप्रवृत्तीनें होत असून त्यामध्यें बाहेरची भर पडत नसते. तेव्हां ज्या ठिकाणीं आपणास दोन भाषांमध्यें ध्वनिविषयक नियमांचें सादृश्य आढळून येईल तेव्हां त्या दोन भाषांत वांशिक संबंध आहे असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं. (५) भाषांचा वांशिक संबंध जोडण्याम भाषांचें स्वरूप हेहि एक गमक आहे. भाषेचें स्वरूप म्हणजे केवळ ती प्रत्ययी आहे वगैरे प्रकारचे नसून भाषेतील विशिष्ट शब्दांचीं प्रचलित रूपें सारखीं असणें जरूर आहे. उदा. क्रियापदांचीं निरनिराळीं रूपे नाम व सर्वनामांचीं निरनिराळीं रूपें हीं ज्या दोन भाषांत सारखीं असतील त्यांमध्यें स्वरूपविषयक व अर्थात वांशिक संबंध आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. विशेषतः जेथें अपवादात्मक रूपें सारखीं असतील तेथें तें एक भाषेच्या प्राचीन स्वरूपांतील गमक म्हणून त्यास अधिक महत्त्व आहे. वरील विवेचनावरून आपणांस असें दिसून येईल कीं, भाषांचा वांशिक संबंध जोडणें ही गोष्ट कांहीं सोपी नव्हे. कित्येक भाषांच्या बाबतींत जुन्या लेखांच्या अभावामुळें किंवा त्यांच्या स्वरूपांत आमूलाग्र बदल झाल्यामुळें त्यांचा ऐतिहासिक अभ्यास करणें कठिण असतें. यामुळें सर्व भाषांचें पूर्ण वर्गीकरण करणें हें ध्येय साध्य करणें नेहमीं दूरच राहील. तथापि आतांपर्यंतच्या संशोधनावरून कांहीं भाषावंश निश्चितपणें मान्य करण्यांत आले आहेत. त्यामध्यें इंडो-युरोपिय हा सर्वांत महत्त्वाचा असून सेमिटिक, फिनोउग्रिक, बंटु, मलाया, पोलेनेशिअन, कॉकेशन, द्राविड यांचेहि स्थान निश्चित झालें आहे. ज्या भाषांत लेख किंवा वाङ्मय उपलब्ध आहे त्या भाषांचा अभ्यास अलीकडे बराच झालेला असून ज्या भाषांच्या पूर्वस्वरूपाबद्दल फारशी माहिती मिळत नाहीं त्या भाषांचा अभ्यास अजून व्हावयाचा आहे व तो अधिक कठिण आहे.

आर्यन् भाषावंश—सध्यां पश्चिम व दक्षिण आशियांतील आणि युरोपांतील बहुतेक देशांमध्यें प्रचलित असलेल्या भाषेला आतांपर्यंत इंडो-युरोपीय, इंडो-जर्मानिक व आर्यन् अशीं नांवें निरनिराळ्या भाषाशास्त्रज्ञांनीं दिलीं आहेत. त्यांपैकीं

इंडोजर्मानिक हें नांव विशेषतः जर्मन भाषाशास्त्रज्ञांत रूढ आहे तर लॅटिन देशांतील भाषाशास्त्रज्ञ विशेषतः इंडो–युरोपियन हें नांव अधिक पसंत करतात. पहिल्या नांवांत या भाषेनें या दोन लोकांनीं व्यापलेल्या भाषा येतात तर दुसऱ्यांत दोन प्रदेश येतात. इंग्रज भाषाशास्त्रज्ञ दोन्हीहि शब्द वापरतात व कांहीं भाषाशास्त्रज्ञ आर्यन् हें नांवच अधिक पसंत करतात. ही आर्यन् भाषा बोलणारे लोक मूळ कोठें होते याबद्दल निरनिराळीं मतें प्रदर्शित झालीं आहेत कांहींच्या मतें त्यांचें मूलस्थान मध्य आशिया हें होतें तर कांहींच्या मतें स्कॅंडिनेव्हिया, डॅन्यूब नदीकांठ, जर्मनी किंवा कॉकशस पर्वत असें होतें. लो. टिळकांच्या मतें वेदभाषी आर्यांचे पूर्वज पूर्वी उत्तरध्रुवाजवळ राहात होते. या भाषेचें मूळ स्वरूप कसें होतें याचें आपणास निश्चित ज्ञान नाहीं तथापि तिची वाढ दीर्घकालपर्यंत झालेली असुन ती पूर्ण प्रत्ययी भाषा होती व तिचें स्वरूप बरेंच गुंतागुंतीचें होतें असें मानतात. या इंडो–युरोपियन भाषांच्या बाबतींत आपणास शास्त्रीयदृष्ट्या असें दाखवितां येतें कीं, या सर्व मूळ एका भाषेपासुनच निघालेल्या आहेत. परंतु त्या बोलणाऱ्या लोकांचा कांहीं वांशिक संबंध आहे असें निश्चितपणें म्हणतां येत नाहीं, असें प्राफचें मत आहे. कारण ही आर्यन् भाषा बोलणारे मूळचे लोक जेव्हां निरनिराळ्या प्रदेशामध्यें गेले तेव्हां त्यांच्यामध्यें अनेक प्रकारचें वांशिक मिश्रण होणें स्वाभाविकच होतें व अनेक प्रदेशातील लोकांनीं आपली मूळची भाषा टाकून तिच्या ऐवजीं या भाषेचा स्वीकार केला असणें संभवनीय आहे. अशा तऱ्हेचें स्वतःची भाषा सोडुन निरनिराळ्या भाषा स्वीकारल्याचे प्रकार ऐतिहासिक काळांतहि आपणांस आढळतात व यामुळेंच आपणास ज्या लोकांनीं या आर्यन भाषेचा स्वीकार केला नाहीं असे कांही ब्राहुइ भाषा बोलणाऱ्या लोकाप्रमाणें बेटां-सारख्य प्रदेश आढळतात. व हीच गोष्ट आपणांस वशतः भेद नसलेले इस्थोनियन लोक फिनोउग्रिक भाषा व लेट हे आर्यन् भाषा बोलतात यांत दिसते. आज आपणांस शुद्ध आर्यवंशाचें स्वरूप युरोपांतील कोणत्याहि प्रदेशांत पाहावयास मिळणें कठिण आहे. आर्यन भाषेचें सर्वांत जुनें स्वरूप आपणांस वेदांमध्यें पहावयास सांपडतें. या भाषेचें ख्रिस्तपूर्व कालांतील स्वरूप आपणांस दुसऱ्या फक्त तीन भाषांत आढळून येतें त्या म्हणजे (१) इंडो–इराणी अथवा अवेस्ता, (२) ग्रीक, (३) लॅटिन भाषासंघ. यांतील इंडो–इराणी भाषेचें स्वरूप मूळच्या भाषेशीं अधिक जवळ आहे. जर्मानिक भाषांतील लेख ख्रिस्ती शकाच्या आरंभ-कालापूर्वी आढळत नाहींत. व या वेळीं त्या भाषेमध्यें ध्वनिविषयक व स्वरूपविषयक पुष्कळच फरक पडला होता. हा फरक पडण्याचीं कारणेंहि ह्या भाषेनें व्यापलेल्या निरनिराळ्या क्षेत्रांत निरनिराळ्या प्रकारचीं होतीं. ज्या भाषेमध्यें वास्तविक अधिक अर्वाचीन लेख उपलब्ध आहेत त्यांमध्येहि कांहीं प्राचीन आर्य प्रयोग आपल्या दृष्टीस पडतात, तर कांहीं भाषांतील अत्यंत जुन्या लेखांतहि अधिक बदल झालेले आढळून येतात. स्लॅव्होनिक व लिथुॲनिअन भाषामध्यें हे फरक पडण्याची क्रिया जर्मानिक भाषां-पेक्षां फारच मंद गतीनें चाललेली आढळते. या दृष्टीने आपणांस ह्या आर्यनवंशसंभव भाषामध्यें निरनिराळ्या प्रकारचीं नातीं दाखवितां येतील.

मूळचीं आर्यन् भाषा––आपणास जरी आज मूळच्या आर्यन् भाषेचें स्वरूप कसें होतें हें प्रत्यक्ष आढळत नाहीं तरी काळजीपूर्वक तौलनिक पद्धति स्वीकारल्यास आपणांस तिच्या स्वरूपाचें कांहींसें ज्ञान करून घेतां येणें शक्य आहे. उदा. प या ध्वनीबद्दल आजच्या या वंशांतील भाषांत पुढें दिल्याप्रमाणें निरनिराळे ध्वनी आपणांस आढळतात. इंडो–इ. प, प्री. प, लॅ. प, मूळ जर्मन फ–ब, लिथु. प, स्लॅ. प, आर्मे. ह, व. या सादृश्यावरून आपणास असें म्हणतां येईल कीं, या सर्व ध्वनींस अनुरूप असा मूळ आर्यन् भाषेंत एखादा ध्वनि असला पाहिजे. व अशी या सर्व भाषांतील निरनिराळीं सादृश्यें एकत्र केल्यास त्यांतून आपणास प्रत्येक सादृश्यास एक असे मूळ आर्यन् भाषेंतील सर्व ध्वनी शोधून काढतां येतील. अर्थात् ही गोष्ट जितकी आपणांस वाटते तितकी सोपी नाहीं. परंतु त्यावरून मूळ भाषा शोधून काढण्याची पद्धति आपणांस दिसुन येते. व जी गोष्ट आपण ध्वनींस लावतो तीच शब्दांचीं रूपें व वाक्यरचना यांसहि लावतां येणें शक्य आहे असें गृहीत धरण्यास आप-णांस कांहीं हरकत नाहीं. अशा रीतीनें मूळ आर्यन् भाषेचें ज्ञान आपणांस करून घेतां येणें शक्य आहे. अर्थात अशा रीतीनें आपण कल्पनेनें जुळविलेल्या विशिष्ट रूपामध्यें जसजसे नवीन नवीन शोध लागत जातील तसतसा फरक करणें जरूर पडेल. उदा. १८७६ पर्यंत आर्यन भाषेमध्यें फक्त अ, इ, उ हे तीन स्वरच होते अशी कल्पना होती परंतु मागाहून असें दृष्टीस पडलें कीं, जेव्हां आर्यन् भाषेंतील 'अ' यास सदृश युरोपियन भाषांत 'ए' हा स्वर असतो तेव्हां आर्यन् भाषेंतील कण्ठ्य वर्णांचें तालव्यांत रूपांतर होतें व जेव्हां आर्यन भाषेंतील 'अ' चें युरोपियन भाषेंतील 'अ' अथवा 'ओ'बरोबर सादृश्य असतें तेव्हां याप्रमाणें फरक होत नाहीं. (यास तालव्य नियम असें म्हणतात). यावरून आर्यन् भाषेंतील 'अ' हा युरोपियन भाषेंतील 'अ', 'ए' व 'ओ' या तिन्ही स्वरांचें कार्य करतो असें दिसुन आलें. याप्रमाणें नवीन नवीन शोध जसजसे लागत जातील तसतसे आपल्या कल्पित मूळ आर्यन् भाषेच्या स्वरूपामध्यें फरक पडलेला आपणांस दिसुन येईल. म्हणजे सध्यां आपणांस केवळ तिचें एक काल्पनिक स्वरूप फार झालें तर बनवितां येईल. परंतु तें आजच्या जिवंत भाषांच्या मानानें फारच आकुंचित स्वरूपाचें असेल.

वांशिक संबंधाचें ज्ञान--वांशिक वर्गीकरण हें ऐतिहासिक सत्यावर अवलंबून असल्यामुळें अधिक स्थिर स्वरूपाचें व वैयक्तिक कल्पनाविचित्र्यावर अवलंबून नसलेलें असतें. ऐतिहासिक सत्य हें स्थिर स्वरूपाचें असून त्याचें महत्त्व बदलत नाहीं आणि ऐतिहासिक विवेचनपद्धतीनें संशोधन केलें असतां आपणांस दोन भाषांमध्यें वांशिक संबंध एक आहे तरी अथवा नाहीं तरी अशा तऱ्हेचें स्पष्ट ज्ञान होतें. व ज्या पद्धतीनें आपणांस इंग्रजी ही आर्यन् कुलातील भाषा आहे ही गोष्ट स्पष्ट होते त्याच पद्धतीनें संस्कृत व लिथुॲनियन या भाषाहि आर्यन कुलांतील आहेत ही गोष्ट स्पष्ट होते. अर्थात् त्यांमधील परस्पर संबंधाचें प्रमाण निरनिराळें असेल एवढेंच. दोन भाषांच्या आजच्या स्वरूपात आपणास कितीहि फरक दिसत असला तरी त्यांचें मूळ वांशिक स्वरूप कधींहि बदलत नाहीं. उदा. अर्वाचीन फारसीमध्यें विभक्तिप्रत्ययांचा बहुतक लोप झालेला आहे, तर अर्वाचीन जर्मनमध्यें विभक्तिप्रत्यय बरेचसे राहिलेले आहेत. भाषेंत होत असणारा फरक भौगोलिक परिस्थिति व कालाचें अंतर यांखेरीज अनेक कारणांवर व परिस्थितींवर अवलंबून असतो व यामुळें आर्यन् वंशातील निरनिराळ्या भाषामध्यें साम्य अथवा विरोध कमीजास्त प्रमाणांत का आढळतो या प्रश्नाचा विचार करणें महत्त्वाचें आहे.

श्लेषरचा स्तम्बमामांसा--श्लेषर या भाषाशास्त्रज्ञानें आपल्या 'स्तंबं' उपपत्तीमध्यें विशिष्ट भाषेचें मूळ आर्यन् भाषेपासून अंतर, एवढींच गोष्ट लक्षांत घतली होती. त्याच्या मतानें मूळच्या आर्यन् भाषेच्या प्रथम दोन शाखा झाल्या--(१) स्लॅव्ह्ा जर्मानिक, (२) आर्यो-प्राकृ-इटॅलो-कॅल्टिक. पहिल्या शाखेच्या पुन्हा स्लॅव्ह्ा-लिथुॲनियन आणि जर्मानिक अशा दोन उपशाखा झाल्या. व दुसऱ्या शाखेच्या आर्यन् आणि प्राकृ-इटॅलो-कॅल्टिक अशा दोन उपशाखा बनल्या व त्या शाखांच्या पुढें निरनिराळ्या पोटशाखा तयार झाल्या. त्याच्या मतानें मूळ आर्यन् लोकांची वस्ती मध्य आशियांत होती आणि त्यामुळें त्या मूळ प्रदेशापासून विशिष्ट भाषेचा प्रदेश जितका दूर असेल तितकी ती मूळ भाषेपासून लौकर पृथक् झाली असली पाहिजे व तिचें प्राचीन अथवा आर्षस्वरूप कमी प्रतीं असलें पाहिजे. यामुळें पश्चिमेकडील दूरच्या भाषा ह्या मूळ भाषेपासून लौकर अलग झालेल्या व त्या मानानें कमी आर्ष स्वरूपाच्या व पूर्वकडील भाषा त्या मानानें नंतर अलग झालेल्या व अधिक आर्ष स्वरूपाच्या असल्या पाहिजेत असें त्याचें मत होतें. परंतु वस्तुस्थिति त्याच्या सिद्धांतास पोषक अशी आढळेना. उदा. स्लॅव्हानिक भाषेचें स्वरूप आर्यो-प्राकृ-इटॅलो-कॅल्टिक भाषासंघापेक्षा वास्तविक जर स्लॅव्ह्ा-जर्मानिक शाखा मूळ आर्यन भाषेपासून लौकर अलग झाली असेल तर अधिक अर्वाचीन तऱ्हेचें असावयास पाहिजे. परंतु स्लॅव्ह्ा-लिथुॲनियन भाषांचें इंडो-इराणियन भाषांशी तर इतकें साम्य आहे कीं, त्यांस कटम संघाएवजीं सातम् संघामध्यें घालण्यात येतें. श्लेषर यानें ही गोष्ट केवळ आपाततः घडली आहे असें याचें स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. परंतु अर्वाचीन संशोधनामुळें असें सिद्ध झालें आहे कीं, इटालिक व कॉल्टिक भाषांचें जर्मानिक भाषांशीं स्लॅव्ह्ा-लिथुॲनियन भाषापेक्षा अधिक साम्य आहे. व यामुळें स्लॅव्ह्ा. जर्मानिक म्हणून एक मुख्य शाखा होती ही उपपत्ति ग्राह्य मानली तर ज्या दोन शाखा मूळच्या भाषेपासून साक्षात निघाल्या आहेत त्यांच्या प्रदेशामध्यें स्पष्ट अशी मर्यादरेषा आढळणार नाहीं, तर सीमांतक्षेत्रांत एक मिश्र स्वरूप आढळलें पाहिजे. तसें या दोन भाषांच्या बाबतींत आपणास दिसून येत नाहीं.

श्मिटचा लहरीमामांसा--वरील विरोधाचा परिहार करण्याकरतां जोहानीस श्मिट यानें पुढील उपपत्ति पुढें आणली. त्यानें असें सुचविलें कीं, मूळच्या आर्यन् भाषेमध्यें जो फरक पडत गला तो एकदम एका भाषेपासून दुसरी भाषा उत्पन्न झाली अशा तऱ्हेचा नसून ज्याप्रमाणें एका परातींतील पाण्यात एखादी वस्तु टाकली असतां निरनिराळ्या लाटा उत्पन्न होतात व त्या एकमेकांत मिसळून जुन्या मोडून नव्या लाटा पुन्हा तयार होत असतात तशा तऱ्हेनें निरनिराळीं व्यापक अशीं भाषाक्षेत्रें उत्पन्न होऊन त्यांच्या मिश्रणानें पुढें नवीन भाषा उत्पन्न झाल्या असाव्या. व यामुळें एका भाषेतील कांहीं गोष्टींचें दुसऱ्या एका शाखेशीं साम्य आढळलें, तर दुसऱ्या कांहीं गोष्टींचें तिसऱ्याच एका भाषेशीं साम्य आढळलें. उदा. केल्टिक भाषेतील कांहीं विशेष इटालिक भाषेशीं, तर कांहीं जर्मानिक भाषेशीं सदृश आहेत. अलीकडे पोटभाषासंबंधीं अभ्यास होऊन जी उपपत्ति बसविण्यांत आली आहे तिच्याशीं वरील उपपत्ति विसंगत दिसते. या पोटभाषांच्या अभ्यासावरून असें दिसून आलें आहे कीं, पोटभाषांची उत्पत्ति ही एकापासून दुसरी अशी सरळ रेषेंत होत नसून निरनिराळ्या पोटभाषामध्यें कांहीं कांहीं गोष्टींत साम्य आढळतें. उदा. 'अ' पोटभाषेतील कांहीं गोष्टी 'ब', 'क', पोट भाषांशीं तर इतर कांहीं 'क', व 'ड', पोटभाषांशीं सदृश असतात परंतु 'ब' भाषेशीं नसतात तर 'ब' भाषेतील कांहीं विशेष 'क' व 'ड' भाषेशीं सदृश असतात पण 'अ' भाषेशीं नसतात व प्रत्येक भाषेतील विशेष भाषापल्या परीनें परिणत होत असतात. व त्यांचा इतरांशीं संबंध नसतो. अशा तऱ्हेनें आपण प्रत्येक भाषाविशेषाची जर आकृति काढूं लागलों तर एकमेकांत मिसळणाऱ्या अनेक वक्र रेषा तयार होतील. यांस समभाषाविशेषवक्र

(आयसोफोन्स) असें म्हणतात. जर या भाषांत स्वरूपविषयक, शब्दसंपत्तिविषयक अथवा वाक्यरचनाविषयक साम्य-असेल तर हे वरून समस्वरूपी असतील. जेथें आपणांस दोन पोटभाषा शेजारीं शेजारीं असून त्यांमध्यें मिश्र प्रदेश आढळणार नाहीं तेथें एका पोटभाषेनें आपलें वर्चस्व दुसऱ्या पोटभाषेवर पूर्णपणें बसविलें आहे असें समजावें. ही गोष्टहि आपणांस वस्तुस्थितीस अनुसरून दिसते. परंतु या लहरीमीमांसेमध्यें एक दोष असा दिसून येतो कीं, मूळ आर्यन् भाषा ज्या प्रदेशांत बोलली जात होती तो प्रदेश भौगोलिक दृष्ट्या तिच्या स्वरूपांत फरक पडण्यास अतिशय अनुकूल होता ही गोष्ट गृहीत धरण्यांत येते. याकरितां आर्यन भाषेचा प्रसार कसा होत गेला, या गोष्टीचा ऐतिहासिक अभ्यास अलीकडे चालू आहे. जेव्हां एक भाषा दुसऱ्या भाषेचें सर्वस्वी अतिक्रमण करून तिचें स्थान आपण घेते व तिला नामशेष करते तेव्हां मूळच्या भाषेचे कांहीं विशेष नवीन भाषेमध्यें शिरणें अपरिहार्य असतें व ही क्रिया मूळ आर्यन भाषेच्या स्वरूपामध्यें निरनिराळ्या क्षेत्रांत निरनिराळे फरक घडवून आणण्यास कारण झाली असावी. आर्यन् भाषाभाषी लोकांनीं जगांतील अत्यंत विस्तृत असें क्षेत्र व्यापिलें आहे व त्यांच्या भाषेचें अनेक निरनिराळ्या भाषांशीं मिश्रण झालें आहे. जेथें ते अधिक काल स्थायिक होऊन त्यांच्या अधिक पिढ्या झाल्या असतील तेथें त्यांच्या भाषत फार मंद गतीनें फरक पडला असेल. व त्यामुळें जुन्या भाषेच्या स्वरूपाचे अवशेष त्या भाषेंत अधिक आढळतील परंतु जेथें त्यांचें मिश्रण अतिशय जलद झालें असेल व मोठमोठाल्या उलाढाली झाल्या असतील तेथें त्यांच्या भाषेंत फरक फार जलद पडत गेला असेल. दक्षिण आफ्रिकेंत बोअर लोकांचा पोर्तुगीज, फ्रेंच आफ्रिकन व अंग्लो सॅक्सन इतक्या लोकांशीं थोडक्या कालांत संबंध आल्यामुळें दक्षिण आफ्रिकेंतील डच भाषा हींस निराळेंच स्वरूप आलें आहे. उलट लिथुअेनियन भाषेचें स्वरूप दीर्घकालपर्यंत स्थिर राहिलें आहे

आर्यन् भाषेचें मूळ स्वरूप--ही मूळ आर्यन् भाषा बोलणाऱ्या लोकांची सांस्कृतिक प्रगति बरीच झाली असल्यामुळें त्यांच्या भाषेस सुसंस्कृत स्वरूप प्राप्त झालें असावें परंतु तिचें मूळचें स्वरूप कोणतें होतें व तिचा तत्कालीन इतर भाषांशीं काय संबंध होता हें सांगणें कठिण आहे. आर्यन् भाषेसारख्याच सेमिटिक व फिनोउग्रिक या दोन भाषांचा व आर्यन भाषेचा कांहीं संबंध असावा हे हर्मन मोलर (सेमिटिक आणि इंडो-जर्मानिक १९००) यानें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु त्यावरून कांहीं निश्चित अनुमान काढता येत नाहीं. अद्यापि या भाषांच्या मूळ स्वरूपाचा अभ्यास पुष्कळच व्हावयाचा आहे. आशिया मायनरमधील बाणाग्र लिपींतील लेखांच्या वाचनामुळें हिटाइट या भाषेमध्यें आर्यन भाषेचें स्वरूप कायम असून तींत कांहीं शब्दविषयक, ध्वनिविषयक व वाक्यरचनाविषयक इतर भाषांतील विशेष शिरले असावे असें दिसून येतें. हिटाइट ही भाषा मूळच्या आर्यन भाषेची एक स्वतंत्र भाषा असावी अशीहि एक उपपत्ति पुढें करण्यात आली आहे. तसें असल्यास हिटाइट भाषेचा अभ्यास अधिक झाल्यास आर्यन् भाषेच्या मूळ स्वरूपाविषयीं आपणास अधिक ज्ञान होण्याचा संभव आहे.

केंटम् व सातेम् संघ--जरी मूळची आर्यन् भाषा सामान्यतः एक स्वरूपाची होती असें म्हणण्यांत येतें तरी ही गोष्ट पूर्णांशानें सत्य मानून चालणार नाहीं. कारण बराचसा मोठा प्रदेश व्यापणाऱ्या कोणत्याहि भाषेचें स्वरूप सर्वत्र पूर्णपणें अभिन्न असणें शक्य नाहीं. तर त्यामध्यें बदल होण्याची प्रवृत्ति सर्वत्र असून परिस्थितीप्रमाणें विशिष्ट प्रवृत्तीचा जोर होऊन एकाच भाषेमध्यें निरनिराळे फरक घडून येतात व या भेदप्रवृत्तीमुळेंच आर्यन् भाषेच्या कन्यारूप भाषा-मध्यें निरनिराळे फरक उत्पन्न झाले आहेत. याचीं दोन उदाहरणें पुढें दिलीं आहेत--मूळ इंडो-युरोपियन भाषांतील दंततालव्य वर्णाबद्दल तिच्या कांहीं कन्याभाषांत 'स' कार व कांहीं भाषांत 'क'कार आढळतो. उदा. मूळ आर्यन् भाषेतील 'कतम्'बद्दल ग्री. हेक्तान लॅ. केंटम्, वेल्श कंट, गॉ. हुंड, उलट सं. शतम्, झेंद सातेम्, प्राची. स्लॅ. सुतो, लिथु. शिंतस्, अशी रूपें आढळतात. तसेंच ग्री. ओइकॉस, बरोबर लॅ. विकस्, गॉ. वैहस्, तर उलट अल्बे. विस, सं. विशम्, झेंद विसपम् अशीं रूपें आढळतील. वरील फरकांमुळें शंभरवाचक शतं शब्दावरून 'केंटम्' व 'सातेम्' भाषा म्हणून दोन भाषाकुलें पृथक् कल्पिलीं आहेत. केंटम् कुलांत पश्चिमेकडील ग्रीक, इटालिक, केल्टिक आणि जर्मानिक भाषा येतात, तर सातेम् कुलांत पूर्वेकडील इंडो-इराणी, स्लॅव्हो-बाल्टिक, आर्मेनियन व अल्बेनियन भाषा मोडतात. परंतु अशा तऱ्हेनें केवळ एकाच भेदप्रवृत्तीवरून भाषांचें वर्गीकरण करणें अशास्त्रीय आहे असें प्राफ म्हणतो. कारण अशा तऱ्हेनें दुसऱ्याहि एखाद्या भेदप्रवृत्तीवरून आपणांस भाषांचें वर्गीकरण करतां येईल; किंवा विशिष्ट भेदप्रवृत्तीवरून वर्गीकरण करूं लागल्यास ती भेदप्रवृत्ति सर्वच भाषांत सामान्य नसल्यास तें वर्गीकरण बरोबर होणार नाहीं. कारण एका भाषेपासून निघणाऱ्या सर्वच भाषांमध्यें विशिष्ट भेदप्रवृत्ति सामान्यत्वें असतेच असें नाहीं हें आपण वर दाखविलेंच आहे. कांहीं भाषांस एक भेदप्रवृत्ति सामान्य, तर दुसऱ्यांस निराळीच असते. एका भाषेंत एक आढळली तर दुसरीस तिचा संपर्कहि नसतो. उदा. इंडो-युरोपियन भाषांतील ब, द, ग या ध्वनींबद्दल जर्मन व आर्मेनियन या दोन्हीहि भाषांत प, त, क हे

ध्वनी येतात. परंतु या दोन्ही भाषांमध्यें साक्षात् नातें कांहीहि नाहीं. तसेंच केंटम् व सातेम् भाषासंघांचें भौगोलिक क्षेत्रहि एकसंबद्ध नाहीं. मध्य आशियांतील तुखारी भाषा ही एक कटम् भाषा आहे. केंटम् आणि सातेम् हा फरकहि कदाचित मूळचा नसून मागाहून उद्भूत झाला असण्याचा संभव आहे.

भाषांचीं मूळ स्वरूपें--ज्याप्रमाणें मूळच्या आर्यन् भाषेचें स्वरूप शास्त्रीय व तौलनिक पद्धतीनें आपणांस माहीत करून घेतां येईल त्याप्रमाणें मूळची जर्मानिक, मूळची स्लॅव्होनिक, मूळची केल्टिक व मूळची ग्रीक या भाषांचेंहि स्वरूप आपणांस कदाचित बनवितां येईल. ही गोष्ट निरनिराळ्या एका कुलांतील भाषांतील साम्यें एकत्र करून करतां येण्यासारखी आहे. तथापि आपणास या भाषांचें निरनिराळ्या पोटभाषा बनण्यापूर्वीचें स्वरूप आजच्या स्थितींत अज्ञात आहे. आतां भाषांच्या निरनिराळ्या कुलांचा विचार करूं.

इंडो-इराणी--या कुलांत भारतीय व इराणी या दोन भाषासंघांचा समावेश होतो.

भारतीयः--यांच्यामध्यें तीन कालिक भेद पाडण्यांत येतात-(१) प्राचीन भारतीय अथवा संस्कृतः हींत वेद संहिता, ब्राह्मणें, उपनिषदें यांतील भाषाचें स्वरूप अधिक प्राचीन असून रामायण व महाभारत यांतील स्वरूप तदनंतरचें आहे. पाणिनि व इतर वैय्याकरणांनीं संस्कृत अभिजात भाषेचें स्वरूप निश्चित केलें व या भाषेमध्यें अर्वाचीन कालांतहि ग्रंथरचना होत आलेली आहे. (२) मध्यकालीन अथवा प्राकृत भाषा. यांमध्यें पाली, शौरसेनी, मागधी, अर्धमागधी, महाराष्ट्री व तेंतचे निरनिराळे अपभ्रंश यांचा अंतर्भाव होतो. (३) अर्वाचीन कुलांतील मराठी, बंगाली, हिंदी, गुजराथी वगैरे दृश्यभाषा होत. भारतीय भाषांची माहिती पुढे स्वतंत्र परिशिष्टांत दिली आहे व यांचें विवेचन मराठी भाषेच्या उत्पत्तिविषयीं विवेचन करतांना येईल.

प्राचीन इराणीः—दरायस पासून अर्ताझरक्षिसमपर्यंतचे बाणाग्र लिपींतील लेख उपलब्ध आहेत त्यांत प्राचीन इराणी भाषा ही पाहावयास सांपडते. त्या वेळच्याच दुसऱ्या भाषेचें सर्वांत जुनें स्वरूप अवेस्ता, हें होय. झेंद-अवेस्ता या पार्शांच्या धार्मिक ग्रंथांत आपणांस ह्या भाषेंतील वाङ्मय पहावयास सांपडत. वास्तविक अवेस्ता हा झरथुष्ट्राचा मूळ ग्रंथ असून झेंद ही त्यावरील टीका होय परंतु सध्या दोहोंसहि झेंदावेस्ता असें म्हणतात. आपल्या वेदाप्रमाणेंच झेंदावस्ता हा ग्रंथ अवस्ता भाषेंतील छंदग्रंथ आहे. या ग्रंथाची परंपरा जरी प्राचीन असली तरी त्याचे लेखन सासनिद कालांत (२२६-६४१) झालेलें आहे. साप्रत झेंदावस्ता हा शब्द प्राचीन इराणी अवेस्ता भाषेस सामान्यतः लावतात. यांतील गाथांची भाषा ऋग्वेदांतील भाषेसारखी असून कांही विशिष्ट ध्वनिनियमांस अनुसरून त्यांतील अक्षरांत फरक केल्यास आपणास त्याचें वैदिक भाषेमध्यें सुलभतेन रूपांतर करतां येतें.

मध्य इराणीः—या भाषेचा काल सामान्यतः खिस्तपूर्व चौथ्या शतकापासून ख्रिस्तोत्तर सातव्या शतकापर्यंतचा आहे. परंतु हींतील लेख आपणांस ख्रिस्ती शकानंतरचच आढळतात. पेहलवी भाषेची उत्पत्ति प्राचीन बाणाग्र लिपींतील लेखांतील भाषेपासून झाली असावी. इतर मध्यकालीन इराणी लिखाणांत आपणास सोगदियन व शक ह्या पोटभाषा आढळतात.

अर्वाचीन इराणीः—हिचा काल आठव्या शतकानंतरचा होय. हिची उत्पत्ति पेहलवीपासूनची आहे. या भाषेंत विविध वाङ्मय असून ही सर्व इराणांत चालू आहे. व तीमध्यें फारच थोडा फरक पडलेला आहे मात्र तिनें पुष्कळच अरबी भाषेंतील शब्द उचलले आहेत. हीसच फारसी असें म्हणतात. मुसलमानी राज्यकर्त्यांबरोबर हिचा हिंदुस्थानांत पुष्कळच प्रवेश झालेला आहे. ह्या फारसी भाषेखेरीज इराणलगतच्या भागांत अनेक भाषा प्रचारांत आहेत त्यांतील मुख्य म्हणजे कास्पियन, कुर्दीश, बलुची, पामीर, अफगाण, यग्नोबी, ऑसेटिक, ह्या होत. ही शेवटची भाषा बोलणारे फक्त सतरा हजार लोक असून ते कॉकेशस पर्वतावर राहतात.

तुखारी--विसाव्या शतकाच्या आरंभीं पूर्व तुर्कस्थानांत कांही ग्रंथ सांपडले त्यांमध्यें दोन इंडो युरोपीय पोटभाषा आढळल्या. त्यांस तुखारी असें नाव देण्यांत येतें त्या १० व्या शतकापूर्वी प्रचलित असाव्या असें म्हणतात. त्यांचा अभ्यास अजून फारसा झालेला नसून त्यांस कोणत्या भाषाशाखेंत घालावें हें निश्चित ठरलें नाहीं.

आर्मेनियन--ही भाषा बोलणाऱ्यांची संख्या सुमारें ४० लक्ष आहे व तिचा प्रदेश आशिया व युरोप यांचा सीमांतप्रदेश होय. तसेंच मेसापोटेमिया, कॉकेशस पर्वताचा दक्षिण भाग व काळ्या समुद्राचा दक्षिण किनारा या प्रांतांत ती चालते. आर्मेनियन लोकांचे संघ निरनिराळ्या प्रांतांत (इराण, हिंदुस्थान, ईजिप्त, तुर्कस्तान, बल्गेरिया, रुमानिया, संयुक्त संस्थानें-अमेरिका) वसाहत करून राहिले असून आपली मातृभाषा बोलतात. या भाषेंत अनेक पार्थियन (फारसी) शब्द असल्यामुळे ही भाषा इराणीची एक शाखा असावी असें मानण्यांत येत असें परंतु तीं एक इंडो युरोपीय भाषेची स्वतंत्र शाखा आहे असें आतां निश्चित ठरलें आहे. ह्या भाषेंत झालेलें नवव्या शतकांतील बायबलच एक भाषांतर उपलब्ध आहे. परंतु त्याची

भाषा पांचव्या किंवा सहाव्या शतकांतील असावी असें म्हणतात. या मार्गेत अलीकडे ऐतिहासिक, धार्मिक, व इतर कांहीं वाङ्मय तयार झालें आहे. हिच्या स्वरूपांत फारच थोडा फरक झालेला आहे. हिच्या निरनिराळ्या स्वतंत्र अनेक बोली तयार झाल्या आहेत. परंतु त्यांस स्वतंत्र मानण्याइतका पृथक्पणा त्यांमध्यें आलेला नसून त्यांच्या वाङमयीन भाषेचें स्वरूप एकच आहे.

हेलेनिक--इंडो-युरोपियन भाषेचा प्रसार सध्याच्या ग्रीस देशांत झाला तो एकाच वेळीं नसून निरनिराळ्या कालीं होत गेला व तो होत असता ती भाषा बोलणाऱ्या लोकांचा निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या लोकांशीं संबंध आला. त्या लोकांची जरी आज आपणास माहिती नसली तरी सध्यां आपणांस जी ग्रीक भाषा म्हणून परिचित आहे तिला फार प्राचीन कालींच बोलीचें स्वरूप प्राप्त झालें होतें. ग्रीक भाषेंत ल जुन्यांत जुने लेख ख्रिस्तपूर्व ७ व्या ८ व्या शतकांतील आढळतात व पांचव्या शतकापासन बरेच शिलालेख वगैरे मिळतात तसेंच होमरचे काव्य व इतर अनेक प्रकारचें वाङमय मिळतें. या लेखांतील भाषेवरून ग्रीक भाषेस बोलीचें स्वरूप आल्याचें स्पष्ट दिसतें परंतु या निरनिराळ्या लेखांत आढळणाऱ्या बोलींत फारसा फरक आढळत नसल्यामुळें त्यामध्यें बरेचसें ऐक्य आढळतें व त्यांतील साम्यावरून त्यांचे निरनिराळे संघ पाडतां येतात. उदा. (१) आयॉनिक, ॲटिक, एकियन, एओलिक, डोरिक वगैरे या भाषांचे पुन्हा अनेक प्रकार आलेले आढळतात. तसेंच त्यांचा दर्जाहि निरनिराळा आढळतो. ॲटिक व आयोनिक या भाषा ऐतिहासिक वाङमयाने संपन्न अशा आढळतात. व त्यांचा प्रसारहि बऱ्याच मोठ्या क्षेत्रावर झाला असावा असें दिसतें व त्यामुळें एक सामान्य प्रकारची बोली त्या त्या प्रदेशांत तयार झाली असावी असें दिसतें. या सामान्य बोलीस कोइनेभाषा असें म्हणतात. व हिचे प्रांतागणिक निरनिराळे प्रकार होते उदा. डोरिककोइने, ॲटिककोइने, आयॉनिककोइने वगैरे कालांतरानें (सुमारें ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकांत) ॲटिककोइने या भाषेंत आयॉनिक शब्द-संपत्तीची भर पडून ती सर्व ग्रीक लोकांची भाषा झाली व इतर सर्व पोटभाषा नाहींशा झाल्या. सध्यां ग्रीस देशांत चालू असलेल्या बोली या ॲटिक भाषेपासन निघालेल्या असल्या तरी त्याचा पूर्वीच्या बोलींशीं कांहीं संबंध नाहीं. सध्यां प्रचलित असलेली अर्वाचीन ग्रीक भाषा रोमेइक या नावानेंहि प्रसिद्ध आहे व तिची ॲटिक कोइनेपासून उत्पत्ति कशी झाली यासंबंधींचा इतिहास अर्धवट ज्ञात आहे ही सध्यां ग्रीस देश व आयोनिक आणि एजियन समुद्रांतील बेटें, एशिया मायनरमधील कांहीं भाग, इजिप्त, इटली, उत्तरअमेरिका यांतील ग्रीक वसाहती यांत प्रचलित आहे. प्राचीन इतिहासामध्यें हेलेनिक प्रदेशाच्या उत्तरभागांत थेसियन, फ्युजियन, मॅसिडोनियन वगैरे भाषा प्रचलित असल्याचें आढळतें. या इंडो युरोपियन भाषा असून आर्मेनियन आणि ग्रीक यांमधील दुव्याच्या स्वरूपाच्या असाव्या.

अल्बेनियन--अल्बेनियन-ही भाषा अल्बेनिया व ग्रीस, इटली सिसली, डाल्मेशिया, उत्तर अमेरिका येथील कांहीं वसाहतींमध्यें सुमारें पांच लक्ष लोक बोलतात. ही इंडो-युरोपियन शाखेच्या इलिरियन नावाच्या संघापासून 'निघाली असें कांहींचे मत आहे. या इलिरियन भाषेचे कांहीं शिलालेख उपलब्ध आहेत पण त्यांचे पूर्ण वाचन अद्याप झालेलें नाहीं. ही भाषा बहुधा ग्रीक, व इटालियन भाषा यांमधील्याकालिक अवस्था दाखवीत असावी. अल्बेनियन भाषेतील जुन्यांत जुने लेख केवळ सतराव्या शतकापासनचे उपलब्ध आहेत व या भाषेंत लॅटिन ग्रीक टर्किश, स्लॅव्होनिक व इटालियन या सर्व भाषांतील शब्दांची भर पडलेली आहे असें दिसतें या इलिरियनसमवेत इतरांच्या इटलीतील डॅलमेटिक व दक्षिण इटलीतील मेसॅपिक या फारशा माहीत नसणाऱ्या दोन भाषा मोडतात.

इटालो-केल्टिक--इटालो केल्टिक हा पूर्वी अतिशय सदृश अशा पोटभाषांचा संघ असावा असें वाटतें. परंतु भाषांतील त्यांचे जे ऐतिहासिक ज्ञान आहे त्यावरून जरी इटॅलिक व केल्टिक भाषांत कांहीं साम्य दिसून आलं तरी त्यांमध्यें इतका फरक आढळतो की त्यांस दोन स्वतंत्र शाखा मानणं सयुक्तिक होईल.

इटालिक:--या संघांतील लॅटिन ही एकच भाषा जिवंत राहिली आहे. हिच्यापासून पुढें रोमान्स भाषा निघाल्या. परंतु लॅटिन भाषेचा सर्व रोमन साम्राज्यात प्रसार होण्यापूर्वी इतर कांहीं इटॅलिक बोली प्रचारात होत्या, त्यांतील कांहीं पूर्णपणें नष्ट झाल्या असल्या पाहिजेत परंतु त्यांपैकीं कांहीं बोलींच अवशेष आढळतात. उदा. सॅम्निअम, कॅम्पॅनिया, लुकॅनिया, ब्रुटिअम, अंब्युया आणि मेसाना या प्रांतांतील रूढ असलेली आस्कन बोली हींतील कांहीं शिलालेख उपलब्ध आहेत व ती पहिल्या शतकापर्यंत जिवंत असावी दुसरी एक उंब्रियन ही बोली अपेनाइन्स व टायबर नदीच्या डाव्या तीरावर प्रचलित होती. या भाषेंतील कांहीं ख्रिस्तापूर्वीचे मंत्र वगैरे उपलब्ध आहेत ही केव्हां नष्ट झाली हे कळत नाहीं.

लॅटिन:—लॅटिन ही पूर्वी रोम शहराची भाषा होती. या भाषेने सभोंवतालच्या प्रदेशांतील व शहरांतील बोलींवर लवकरच वर्चस्व स्थापन केलें. जोंपर्यंत हिचे क्षेत्र मर्यादित होतें तोंपर्यंत ही एकस्वरूपी होती. परंतु तिचें क्षेत्र विस्तार पावल्यानंतर

तिनें ऑस्कन, उंब्रियन वगैरे इटालिक बोलींवर व इटलींतील इलिरियन आणि सिसिलींतील इतर केल्टिक बोलींवर आपलें वर्चस्व स्थापन केलें. परंतु या निरनिराळ्या भाषांशीं संबंध आल्यामुळें लॅटिन भाषेच्या स्वरूपांतहि पुष्कळच फरक पडत गेला. लॅटिन लेखनभाषेस अभिजात स्वरूप प्राप्त होऊन तिच्यामध्यें महत्त्वाचें व समृद्ध असें वाङ्मय तयार झालें. त्यामुळें लॅटिन वाङ्मयीन भाषा व बोली यांमध्यें हळू हळू अंतर पडत गेलें. लॅटिन लेखनभाषेचें कृत्रिम व स्थिर असें स्वरूप रोमन साम्राज्य नष्ट झाल्यानंतरहि अनेक शतकें कायम राहिलें. कारण सर्व शास्त्रीय लेखन मध्ययुगीन कालानंतरहि याच भाषेंत चालू असून ग्रंथ-लेखनाकरितां हिचें नंतरहि पुन्हां पुनरुज्जीवन करण्यांत आलें. सांप्रतहि रोमन कॅथोलिक लोकांची धार्मिक व विधिविषयक भाषा हीच लॅटिन आहे.

रोमान्स भाषाः—कालांतरानें इटलीच्या बाहेरील रोमन लोकांच्या वसाहतींत तेथील स्थानिक भाषांचें प्राबल्य वाढलें व जसजसा रोमन साम्राज्यांतील निनिराळया प्रांतांतील लोकांचा रोमशीं व परस्परांशीं संबंध शिथिल होत गेला व अखेरीस रानटी लोकांच्या स्वारीमुळें अजिबात नष्ट झाला तसतशी निरनिराळया देशभाषांमध्येंहि अराजक स्थिति निर्माण झाली व प्रत्येक भाषेची भिन्न भिन्न परिस्थितीमध्यें निरनिराळया तऱ्हेंची वाढ होऊन रोमान्स भाषा नांवाच्या अगदीं निरनिराळया भाषा तयार झाल्या. या संक्रमणावस्थेंत कांहीं भाषा केवळ बोली म्हणून शिल्लक राहिल्या तर कांहीं अजीबात नष्ट झाल्या. परंतु त्यांतील कांहींनीं आपलें क्षेत्र वाढवून आपणांस वाङ्मयीन व बौद्धिक दळणवळणास योग्य असें स्वरूप प्राप्त करून घेतलें. त्यांतील कांहीं भाषांस राष्ट्रीय स्वरूप प्राप्त होऊन त्यांचा पुष्कळ मोठ्या क्षेत्रावर प्रसार झाला. सध्या अस्तित्वांत असलेल्या रोमान्स भाषा पुढें दिल्याप्रमाणें आहेतः—(१) इटॅलियन संघः—याचें क्षेत्र इटली, सिसिली, सार्डिनिया, कॉर्सिका हे प्रदेश असून त्यांत पुष्कळच बोलींचा अंतर्भाव होतो. फ्लॉरेन्स येथील टस्कन भाषेस राष्ट्रीय स्वरूप प्राप्त होऊन ती सध्यांच्या इटलीची वाङ्मयीन भाषा बनली आहे. या भाषेंतील जुन्यांत जुना लेख ख्रिस्त शक ९६४ चा आहे. (२) व्हिटो रोमनिक अथवा लॅडिन संघः—ही पूर्वीच्या व्हिटिया नांवाच्या रोमन प्रांताची भाषा होती. सध्यां या संघांतील तीन बोली स्विट्झरलेंडांतील ग्रिसन या भागांत व टिरोल आणि फ्रौल या परगण्यांत चालू आहेत. (३) रुमानियन संघः—या संघांत रुमानिया, ट्रान्सिल्व्हानिया, ग्रीसचा कांहीं भाग व इस्ट्रिया यांतील तीन किंवा चार बोली मोडतात. रुमानियन भाषेस सहाव्या शतकापासून साहित्यिक स्वरूप आलें आहे. (४) प्रॉव्हेन्सल संघः—यामध्यें प्रोव्हेन्सल, लॅग्विडॉक, ऑवेर्ग्नॉट, लिमोसिन, गॅस्कन वगैरे भाषा मोडतात. यांतील जुन्यांत जुनें वाङ्मय अकराव्या शतकांतील आढळतें. (५) फ्रेंच संघः—यामध्यें पॉएतेविन, नॉर्मन, पिकार्ड, वालून, लॉरेनिज, बर्गंडियन, शापेन्वा, इले-द-फ्रांसे, डॉफिन्वा, वॉदवा, व्हॅलेसिए, सव्होयर्द इ. भाषा येतात. इले-द-फ्रांसे व विशेषतः पॅरिसमधील भाषा ही राष्ट्रीय स्वरूपाची व फ्रेंच लोकांची साहित्यिक भाषा आहे. हींतील जुन्यांत जुना लेख इ. स. ८४२ चा आहे. (६) कॅटेलन संघः—यांतील जुन्यांत जुना लेख ११७१ सालचा आहे. (७) पोर्तुगीज संघः—यामध्येंच गॅलिशियन भाषा येतात. पोर्तुगीज भाषेचें साहित्यिक स्वरूप ११९२ मधील एका सनदेंत आढळतें. (८) स्पॅनिश संघः—यामध्यें कॅस्टिलियन, अँडाल्युशिअन, ॲरागोनीज, लिओनीज या बोली येतात. यांतील कॅस्टिलियन भाषेस राष्ट्रीय व साहित्यिक महत्त्व आहे. हींतील प्रथम लेख ११४५ मधील आहे. स्पेन व पोर्तुगालमधील यहुदी लोकांनीं आपल्या स्पॅनिश नांवावरून सेफार्डिक किंवा सेफार्दिम नांवाची एक स्वतंत्र बोली बनविली आहे. हिचें व्याकरण व बराचसा शब्दसंग्रह स्पॅनिश आहे. तथापि तीमध्यें बरेच सेमिटिक विशेष आढळतात. स्पेनमधून बाहेर जाणाऱ्या ज्यू वसाहतकारांनीं जगाच्या अनेक भागांत-विशेषतः मोठमोठ्या शहरांत-या भाषेचा प्रवेश केला आहे. सोळाव्या शतकापासून अनेक रोमान्स भाषांनीं जगाच्या निरनिराळ्या भागांत प्रवेश केला आहे. पोर्तुगीज ही ब्राझिलमध्यें, तर स्पॅनिश ही दक्षिण व मध्य अमेरिका, मेक्सिको, मोरोक्को आणि अल्जेरिया या भागांत, फ्रेंच ही क्वेबेक, उत्तर आफ्रिका व फ्रेंच वसाहती यांमध्यें आणि इटालियन ही उत्तरअमेरिका, तसेंच अजेंटाइनमधील आणि उत्तर-आफ्रिकेचा किनारा व इटलीच्या इतर वसाहतींत आढळते. या क्षेत्रांतून या भाषांचें निरनिराळ्या स्थानिक असंस्कृत भाषांशीं मिश्रण होऊन त्या त्या ठिकाणीं मिश्र भाषा उत्पन्न झाल्या आहेत.

केल्टिकः—ख्रिस्ती शकापूर्वी केल्टिक भाषा युरोपांतील बऱ्याच मोठ्या भागावर प्रचलित होती. परंतु इतर इंडो युरोपीय भाषांपुढें तिची पिछेहाट होऊन तिचे थोडे अवशेष मात्र युरोपांत पहावयास सांपडतात. परंतु आयर्लंड व ग्रेटब्रिटन या बेटांमध्यें या भाषेंतील कांहीं वाक्प्रचार शिल्लक आहेत व कांहीं नष्ट झालेल्या पोटभाषांतील लेख उपलब्ध आहेत. या बेटांतील भाषांत मुख्य दोन संघ आढळतात-(१) ब्रिटनः—ही इंग्लंडचा बराचसा भाग व फ्रान्समधील ब्रिटनी या प्रांतांत पुढील निरनिराळ्या नांवांच्या बोलींत आढळते. (अ) किमरिक अथवा वेल्श-ही वेल्स प्रांतात आठव्या शतकापासून रूढ आहे.

(आ) कॉर्निश:—या भाषेंतील नवव्या शतकांतील लेख उपलब्ध आहेत. ही अठराव्या शतकांत नष्ट झाली. (इ) ब्रेटन अथवा आर्मोरिकन:—ही अद्यापि ब्रिटनमधील सुमारें दहा लक्ष लोक बोलतात. हिच्या कांहीं पोटभाषा आहेत. (२) गेलिक—ही पूर्वी आयर्लंडमध्यें प्रचलित होती. या भाषेंतील लेख पांचव्या शतकापासून उपलब्ध आहेत. या भाषेमच आयरिश असें नांव असून हिच्यामध्यें आठव्या शतकापासुनचें फार मोठें वाङ्मय मध्य युगामध्यें उपलब्ध होतें. अलीकडे तिला राष्ट्रीय स्वरूप देण्याचे प्रयत्न चालू आहेत. पांचव्या शतकामध्यें कांहीं आयरिश वसाहतकारांनीं ही भाषा स्कॉटलंडमध्यें आणली. हिची येथें स्वतंत्र वाढ होऊन कांहीं वाङ्मयहि हिच्यामध्यें तयार झालें. सध्यां हींस गेलिक, स्कॉच किंवा एरसे म्हणतात. हिचेच एक स्वरूप मॅन्क्स या नांवानें आइल ऑफ मॅनमध्यें प्रचलित आहे.

वाल्टाङ्लॅव्हॉनिक—स्लॅव्हॉनिक व बाल्टिक हे अलीकडे स्वतंत्र संघ मानतात परंतु ते अलीकडेच स्वतंत्र झाले असून त्यांमध्यें बरेंच साम्य आहे. या भाषेत असलेल्या आपि विशेषावरून–विशेषत: यांतील विभक्ति व शब्दसंग्रह यांवरून भाषाशास्त्रीयदृष्ट्या यांस फार महत्त्वाच्या मानतात. विशेषत: लिथुॲनियन ही तौलनिक भाषाभ्यासास अतिशय महत्त्वाची आहे. हिचें अर्वाचीन स्वरूप तिच्या १६ व्या शतकांतील स्वरूपाहून फारसें भिन्न नसून कांहीसें गार्थिक भाषेहूनकें प्राचीन स्वरूप तींत पहावयास सापडतें.

बाल्टिक:—या तीन भाषा आहेत. (१) जुनी प्रशियन ही सध्यां नष्ट असून तींतील १२ व्या व सोळाव्या शतकांतील कांहीं लेख मात्र उपलब्ध आहेत (१) लिथुॲनियन:—ही अद्यापि सुमारें पंचवीस लक्ष लोक पूर्व प्रशिया व लिथुॲनियामध्यें बोलतांना आढळतात. या देशास स्वातंत्र्य प्राप्त झाल्यामुळें राष्ट्रीय भाषा म्हणून तिचें महत्त्व वाढण्याचा संभव आहे. हींतील जुने लेख १५४७ पासूनचे उपलब्ध आहेत. (३) लेटिश:—ही लटविया देशाची अता राष्ट्रीय भाषा झाली असून कूर्लंड व लिव्हॉनियाच्या दक्षिणेस सुमारें १० लक्ष लोक ही भाषा वापरतात. हिचें स्वरूप लिथुॲनियन भाषेपेक्षां थोडेसें प्रगत आहे. हींतील लेख सोळाव्या शतकापासूनचे आढळतात.

दक्षिण स्लॅव्हॉनिक:—या भाषात तीन संघ येतात. (१) दक्षिण स्लॅव्हॉनिक या भाषेम–तींत ९ व्या शतकांत सायरिल व मेथोडियस या दोन बंधूंनीं बायबलचें भाषांतर कल्यामुळें–अतिशय धार्मिक महत्त्व प्राप्त झालें आहे. व धार्मिक भाषा म्हणून तिचा प्रसार बराच झाला असून तिला जुनी चर्चस्लॅव्हॉनिक असें म्हणतात. याखेरीज या भाषेमध्यें पुढील तीन संघ येतात. (अ) स्लोव्हेनियन–ही सुमारें दहा लाख लोकांची भाषा असुन हिची माहिती १० व्या शतकापासुनची मिळते व हींतील वाङ्मय आठव्या शतकापासुनचें उपलब्ध आहे. (आ) सर्बोक्रोएशियन–ही युगोस्लोव्हियांतील सर्व व क्रोट मिळून सुमारें ९० लक्ष लोक बोलतात. हींतील वाङ्मय १९ व्या शतकापासून आढळतें. (इ) बलगारियन–ही बलगारियामध्यें तीस लक्ष लोक बोलतात. १९ व्या शतकांत हीस राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें.

पूर्व स्लॅव्हॉनिक.—यामध्यें पूर्वी बाराव्या शतकात एकत्र असलेले परंतु आतां विभक्त झालेले तीन निरनिराळे संघ आढळतात. ते सर्व रशियांत प्रचलित असून त्यांतील जुन्यांत जुना लेख ११ व्या शतकांतील आढळतो (अ) लघुरशियन अथवा रुथेनियन–हींत अनेक बोली असून हिचा प्रसार दक्षिण रशिया बुकोविना, पूर्व गॅलिशिया, उत्तर हंगरी या भागात आहे. लोक-संख्या तीन कोट. (आ) श्वेतरशियन–ही श्वेतरशियाच्या म्हणजे मोगिलेव्ह, स्मालेन्स्क विटेब्स्क, मिन्स्क या प्रांतात बोली म्हणून प्रचलित आहे. (इ) महत् रशियन किंवा रशियन–ही मध्य व पश्चिम रशियामध्यें प्रचलित आहे यापकी मास्का येथील भाषेस साहित्यिक स्वरूप प्राप्त झालें आहे. हिचा प्रसार राज्यसत्तेमुळें बऱ्याच मोठ्या प्रदेशावर झाला आहे. सध्यां ही दहा कोटी लोक बोलतात. हिचें सध्यांचें स्वरूप १८ व्या शतकांतील आहे.

पश्चिम स्लॅव्हॉनिक:—या भाषेचे चेकोस्लॉव्हेकियन ही सुमारें ९ लाख लोकांत प्रचलित असलेली व तेराव्या शतकांतील लख असलेली आणि पोलिश ही सुमारें दोन कोट लोकांची भाषा हे दोन प्रकार आहेत पोलिश भाषत बरेंच वाङ्मय असून तींतील प्रथमचे लेख १४ व्या शतकातील आहेत. यांखेरीज या भाषेच्या सोरबियन अथवा वेंडिश आण पोलेबिश या दोन बोली आहेत. कांहीं किरकोळ स्लॅव्हॉनिक बोली जर्मन भाषेत अंतर्भूत होऊन गेल्या आहेत.

जर्मानिक—उत्तरजर्मानिक अथवा स्कँडेनेव्हियन. सर्वात जुने जर्मानिक शिलालेख स्कँडेनेव्हियन भाषेत सुमारें ३ ते ८ व्या शतकांतील आहेत. यांतील भाषेस जुनी नॉर्स किंवा जुनी स्कँडिनेव्हिअन म्हणतात. ८ व्या शतकानंतर या भाषेच्या अनेक शाखा झाल्या व अकराव्या शतकांत हिच्या पश्चिम स्कँडेनेव्हियन (आइसलंडिक व नॉर्वेजियन) व पूर्व स्कँडेनेव्हियन (स्वीडिश, डॅनिश) अशा दोन स्वतंत्र शाखा आढळतात. आइसलंडिक व नॉर्वेजियन या भाषा प्रथम एकस्वरूप होत्या परंतु नॉर्वेजियन लोकांनीं ९ व्या

शतकांत जेव्हां आइसलंडमध्यें प्रवेश केला तेव्हां तेथें त्यांच्या भाषेची वाढ तेथील परिस्थितीस अनुसरून झाली. मध्ययुगांत आइसलंडिक भाषा वाङ्मयसमृद्ध होती व तींतील एड्डा नांवाच्या कथा वाङ्मयदृष्ट्या महत्त्वाच्या आहेत. नॉर्वेजियन भाषेचाहि मध्ययुगापासूनचा इतिहास उपलब्ध आहे. १४ व्या शतकांत नॉर्वेवर डेन्मार्कची सत्ता स्थापन झाल्यामुळे तीवर डॅनिश भाषेचा पगडा बसला व १९ व्या शतकात तिला केवळ बोलीचे स्वरूप आल. १९ व्या शतकात डेन्मार्कपासुन नॉर्वे स्वतंत्र झाल्यामुळें या भाषेची राष्ट्रभाषा म्हणून वाढ होत आहे. व तींत वाङ्मयहि तयार होत आहे. स्वीडिश व डॅनिश या भाषांची वाढ १४ व्या शतकापासुन राष्ट्रीय व साहित्यिक भाषा म्हणून चालू आह. या दोहोंवर नीच व उच्च जर्मन या भाषाचा बराचसा परिणाम झालेला आहे.

पूर्व जर्मानिक:—अनेक पूर्व जर्मानिक बोली आतां नामशेष झाल्या आहेत. वॉंडियन व व्हँडाल लोकांच्या बोलींतील फक्त कांहीं विशेषनामे शिल्लक आहेत. या संघापैकीं गॉथिक भाषेतील लेख बरेच उपलब्ध आहेत. गॉथ लोकांनीं तिसऱ्या शतकांत बाल्कन प्रदेशांत जें राज्य स्थापन केलें होतें त्याचे आस्ट्रो—गॉथ व विसीगॉथ असे विभाग पडले त्यांपैकीं पहिल्या लोकांच्या भाषांवर उत्तरइटलींतील भाषांनीं आक्रमण केल व दुसऱ्या लोकाच्या भाषावर स्पॅनिश भाषेचें आक्रमण झालें. यांच्या भाषाचे अवशेष उल्फिलास नावाच्या एका चौथ्या शतकांतील बिशपाने भाषांतर केलेल्या बायबलामध्ये सापडतात. बाल्कनप्रभील गॉथिक भाषा फार प्राचीन काळींच नष्ट झाली. क्रिमियामधील गॉथिक भाषेचे कांहीं शब्दरूपी अवशेष १६ व्या शतकांत जमविलेले आढळतात.

पश्चिम जर्मानिक:—या भाषेत पुढें दिलेले संघ आढळतात (१) ॲंग्लोफ्रिजियन (अ) इंग्लिश—जर्मनीमधून जे ॲंगल्स, सॅक्सन, जूट व कदाचित फ्रिजियन लोक पांचव्या व सहाव्या शतकांत ब्रिटनमध्य आले त्यांनीं आपली भाषा केल्ट लोकांवर लादली आणि त्यांना डोंगराळ प्रदेशांत हाकलून दिलें. तथापि या नवीन भाषा सर्वस्वी एक स्वरूपाच्या नव्हत्या व बारकाईनें पाहिल्यास त्यांचीं तीन स्वरूपें आढळून येतील (१) ॲंग्लिकन—उत्तर, मध्य प्रदेशात (नॉर्दंब्रिया व मर्शिया), (२) सॅक्सन—दक्षिणेत (ससेक्स वेसेक्स), व (३) केंटिश—नॉर्दुम्बियम (केंट) युरोपशीं संबंध तुटल्यामुळ येथील भाषेची वाढ स्वतंत्रपणें झाली. पाचव्या शतकापासन बाराव्या शतकापर्यंत हीस ॲंग्लो सॅक्सन किंवा जुनी इंग्रजी असें नांव होतें हींतील जुने लेख व वाङ्मय (किडमॉन, सायनेवुल्फ, बेओवुल्फ वगरेंचें) सातव्या शतकातील आढळतें या भाषेवर जुन्या केल्ट भाषेचा, खिस्ती धर्मामुळें लॅटिन भाषचा व नॉर्मन लोकाच्या व डेन व नार्वेजिअन लोकाच्या स्वाऱ्यामुळें त्याच्या भाषाचा व अखेरीस फ्रेंच भाषेचा परिणाम होत गेला. तथापि तिचें मुळ जर्मानिक स्वरूप नाहींस झालें नाहीं तेराव्या शतकापासुन फ्रेंच भाषेचा परिणाम कमी होत जाऊन पंधराव्या शतकांत इंग्रजी भाषेस पुन्हां राजभाषेचे स्वरूप प्राप्त झालें मध्य इंग्लिश.—या भाषेचा काल ११ व्या शतकापासन १६ व्या शतकापर्यंत होता. या कालात तिला बरचसें एकस्वरूप प्राप्त झाल व तिचा प्रचार सवत्र होऊन स्कॉटलंड व आयर्लंडमध्येंहि तिचा प्रवेश झाला व ती राष्ट्रीय भाषा होऊन तीमध्यें वाङ्मयहि पुष्कळ तयार होऊन इतर बोली मागें पडल्या. अर्वाचीन इंग्लिश:—या भाषेच्या स्वरूपांत विशेष हा आहे कीं ती अतिशय साधी व पृथक्करणात्मक आहे तिचें व्याकरणहि साध असून तिच्यामध्यें सर्व राष्ट्रातील शब्दाचा संग्रह केलला आहे व तिचा प्रसारहि जगाताल सर्व भागात झाला असून जगातील व्यवहारास व व्यापारास तिचा उपयोग होत आहे. ही भाषा सुमारें वीस कोटी लोक बोलतात. हिच्या प्रसारामुळें हिच्यात ब्रिटिश अमेरिकन, ऑस्ट्रेलियन, कॅनेडियन असे स्थानिक भेद पडले आहेत. तसच स्थानिक भाषाशीं मिश्रण होऊन हिच्यापासूनच पिजिन इंग्लिशसारख्या कांहीं मिश्र भाषा तयार झाल्या आहेत.

फ्रिजियन:—या भाषेच इंग्रजी भाषेशीं बरेंच साम्य आहे. पूर्वफ्रिजियन भाषेच नॉर्दंब्रियन भाषेशीं व पश्चिम फ्रिजियन भाषेचें केंटिश भाषेशीं सादृश्य आहे. मध्ययुगात फ्रिजियन भाषा वायव्य जर्मनीमध्ये व नेदरलंडातील किनाऱ्यावर मोठ्या प्रदेशावर बोलली जात होती. परंतु अलीकड डच व नीचजर्मन भाषाच्या प्रसारामुळें तिचें क्षेत्र बरेंच आकुंचित झालें आहे. सांप्रत फिनलंड या डच प्रातात वेस्ट फ्रिजियन व ओल्डेनबर्ग या जर्मन प्रातात ईस्ट फ्रिजियन या भाषा चालू असून ऑल्डिंग व जवळपासच्या बेटात नॉर्थ फ्रिजियन ही प्रचलित आहे व त्यातील जुनें वाङ्मय तेराव्या शतकांतील असून तिला हॉलंडमधील फ्रिजियन लोकानीं आपल्या लेखानीं साहित्यिक स्वरूप दण्याचा प्रयत्न केला आहे.

जर्मन:—जर्मनभाषासंघातुन मुख्यतः दोन राष्ट्रीय भाषा निघाल्या आहेत. (१) जर्मन व (२) डच. या दोन्हीहि वाङ्मयसमृद्ध आहेत. जर्मनभाषाचे मुख्यतः दोन वर्ग त्यांतील विशिष्ट उच्च जर्मन व्यंजनविकारावरून करण्यात येतात ज्यांमध्यें हा व्यंजनविकार होत नाहीं त्यास नीचजर्मन असें नाव त्या सखल प्रदेशात असल्यामुळ मिळालें आहे. या जर्मनीच्या

उत्तरभागांत प्रचलित आहेत. दुसरा वर्ग जर्मनीच्या दक्षिण भागांत अथवा डोंगराळ भागांत असून त्यास उच्चजर्मन असें नांव आहे या दुसऱ्या वर्गामध्ये हा व्यंजनविकार सातत्यानें होत आला आहे या वर्गात (अ) बव्हेरियन भाषा (बव्हेरिया, ऑस्ट्रिया, सिरिया, टिरालचा भाग, रॅगिया), (आ) व अलमॅनिक भाषा (स्विट्झरलंड, बेडन, अल्सस, वुरटेंबर्ग) ह दोन वर्ग येतात. यांस अपरजर्मन असें नांव आहे मध्यजर्मन भाषामध्ये पुढील विभाग पडतात (अ) थुरिंजियन (थुरिंजिया), (आ) अपर फ्रँकोनियन व (इ) पूर्वफ्रँकोनियन (वुर्झबर्ग, बँबर्ग). (ई) हेसिश फ्रँकोनियन (मेन्झ, फ्रांकफुर्ट ऑन द मेन, वर्म्स, स्पेयर, विसेनबर्ग), (उ) मध्य फ्रँकोनियन हिचाच प्रकार मोसेल फ्रँकोनियन (ट्रिअर) आणि रिपुआरियन (कोलान). नीचजर्मन भाषा डन्स्के ते कोनिग्झबर्ग यास जोडणाऱ्या रेषेच्या उत्तरेच्या बाजूस आहे यामध्ये सॅक्सन व नीच फ्रँकोनियन बोली मोडतात. परंतु अलीकडे नीच फ्रँकोनियन भाषेचे नदरलँडमधील राष्ट्रीय भाषेमध्ये रूपांतर झालें असल्यामुळे मध्यें नीच जर्मन हा शब्द त्यांतील फक्त सॅक्सन भाषासच, म्हणजे अलीकडे प्लॅटडॉइच नांवानें माहीत असणाऱ्या भाषासच वापरतात.

उच्च जर्मन:--आठव्या शतकामधील जे लेख सापडतात त्यावरून उच्चजर्मन व नीचजर्मन भाषामध्ये आढळणारा व्यंजनविकारातील फरक फारच स्पष्ट दिसतो. अकराव्या शतकापासून सोळाव्या शतकाच्या मध्यापर्यंत या भाषेस मध्यउच्चजर्मन असें नांव देत असत व यामध्ये बऱ्याच पोटभाषांचा अंतर्भाव होत असे. परंतु त्या वेळच्या वाङ्मयात त्या सर्वांस एकस्वरूप देण्याची क्रिया चालू असल्याचें दृष्टीस पडतें. या सर्व भाषांस एकस्वरूप प्राप्त झाल्यानंतर तीस अर्वाचीन उच्च जर्मन असें नांव प्राप्त झालें. ही क्रिया लॅटिन भाषेच्याएवजी देश्य भाषा उपयोगात आणणें, मुद्रणकलेची वाढ व लुथरनें केलेलें बायबलचें भाषांतर इ. कारणांमुळें घडून आली तथापि या भाषेस हल्लीचें पोटभाषांवर वर्चस्व मिळून एकस्वरूप येण्यास बराच दीर्घ काल लागला व उच्च तऱ्हेचें अभिजात वाङ्मयमय या भाषेमध्यें तयार झाल्यामुळेच ही क्रिया घडून आली. सध्या ही अर्वाचीन उच्चजर्मन भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या आठ कोटी असून तिचा प्रसार सभोवारच्या पोलंड, चेकोस्लोव्हेकिया, ऑस्ट्रिया, स्वित्झरलंड, फ्रान्स, बेल्जिअम, हॉलंड व हंगेरी, रुमानिया, रशिया, उत्तर व दक्षिण आफ्रिका यांतील वसाहती यांमध्ये चालू आहे.

जुडो जर्मन अथवा यीडिश:—स्पेनमधील यहुदी लोकांस सेफार्डिम असें नांव होतें तसें जर्मनीमधील ज्यू लोकांस अश्केनाझिम असें म्हणत असत. यांनीं चौदाव्या शतकापासून आपली एक स्वतंत्र जुडा-जर्मन अथवा यीडिश नांवाची भाषा तयार केली आहे ही भाषा मुख्यत: मध्यजर्मनीमध्यें हिब्रू, स्लॅव्होनिक व इतर काहीं भाषांच्या मिश्रणानें तयार झाली आहे. हिचा प्रसार सध्यां खुद्द जर्मनीमध्यें फारसा नाहीं. कारण तेथील ज्यू लोकांनीं जर्मन भाषेमध्यें महत्त्वाचें वाङ्मय लिहून काढून आपल्या समाजात यीडिश भाषेएवजीं जर्मन भाषा रूढ केली. परंतु जे लोक जर्मनीतून युरोपच्या निरनिराळ्या भागांत वसाहत करण्यास गेले त्यांनीं ही भाषा आपल्याबरोबर नेली असून बाल्टिक समुद्रापासून काळ्या समुद्रापर्यंत ज्या यहुदी वसाहती आहेत त्यांमध्यें ही भाषा प्रचलित आहे. यांतलेच कांहीं लोक अमेरिकेमध्यें वसाहत करून राहिले असून तेथें यीडिश भाषा साधारण बऱ्या प्रमाणात वापरली जाते. हिचाच एक प्रकार अलसस व लॉरेनमधील कांहीं जमातींत रूढ आहे.

नीच जर्मन:--सर्वांत जुनें नीचजर्मन भाषेतील लिखाण म्हटलें म्हणजे नवव्या शतकातील हेलियंड नांवाचें धार्मिक काव्य होय. या स्वरूपात या भाषेस ओल्डसॅक्सन हें नांव होतें कालांतराने या भाषेनें फ्रिजियन, डॅनिश व स्लॅव्होनिक भाषांवर वर्चस्व स्थापन करून बराच प्रदेश व्यापला परंतु उच्च जर्मन भाषेच्या वाङ्मयीन व अभिजात स्वरूपामुळें ही भाषा मागें पडून आतां फक्त कांहीं ठिकाणीं स्थानिक बोलीच्या रूपानें आढळतें. १९ व्या शतकात हिचें पुनरुज्जीवन करण्याचा थोडा प्रयत्न करण्यांत आला होता.

डच:--नेदरलंडात सध्यां प्रचारांत असलेल्या निरनिराळ्या भाषा म्हटल्या म्हणजे फ्रिजियन (फ्रिजिया), सॅक्सन (पूर्वभाग), वेस्ट लो फ्रँकोनियन (दक्षिण व पश्चिम भाग), या होत प्राचीन डच भाषेतील लेख उपलब्ध नाहींत. दहाव्या शतकांतील कांहीं स्तोत्रांचे भाषांतर मात्र उपलब्ध आहे. परंतु त्यांची भाषा डच भाषेची मूळ प्रकृति जी वेस्ट लो फ्रँकोनियन तिच्याहून थोडी निराळी असून तिला ईस्ट लो फ्रँकोनियन म्हणता येईल पश्चिमेकडील भाषेतील पहिला लेख १२ व्या शतकातील आढळतो त्यानंतर या भाषेच्या वाटीतील मध्यकाल सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंतचा असून त्यावेळीं सांस्कृतिक व आर्थिक समृद्धीचीं केंद्रें फ्लँडर्समध्यें होतीं व त्यामुळें मध्यकालीन डच भाषेचें स्वरूप आपणांस फ्लेमिश किंवा दक्षिण डच भाषेमध्यें आढळतें. यानंतर या भाषेस अर्वाचीनडच असें नांव प्राप्त झालें या वेळच्या उलाढालीमुळें या देशाचें सांस्कृतिक व आर्थिक केंद्र फ्लेमिश शहरांच्या ऐवजीं अम्स्टरडॅम, हेग, हार्लेम, लेडेन, वगैरे शहरांकडे गेलें आणि त्यामुळें हॉलंडमधील भाषेस महत्त्व मिळून त्या भाषेत धार्मिक वाङ्मय व इतर साहित्य तयार होऊन तीस अभिजात स्वरूप प्राप्त झालें. तथापि इतर भाषा

घरगुती व्यवहारांत कायम राहिल्या. बेल्जममधील परिस्थितीमुळें डच भाषेस आपलें वर्चस्व आपल्या प्रांताच्याबाहेर स्थापन करणें कठिण झाल. तथापि सध्यां हॉलंड व फ्लँडर्समध्यें एकच भाषा चालू आह असें म्हणतां येईल. युरोपबाहेर डच भाषा दक्षिण आफ्रिकेतील बोअर लोकांत व डच इस्ट आणि वेस्ट इंडीजमध्यें आणि अमेरिकेतील डच वसाहतींत प्रचलित आहे. अर्थात तेथे तीस बरेंच मिश्र स्वरूप प्राप्त झालें आहे.

आर्यनेतर भाषा--पश्चिम आशियामध्यें अलीकडे जी संशोधनाची व निरनिराळ्या ठिकाणीं जमिनींतील अवशेष खणून काढण्याची क्रिया चालू आह तीमुळें अनेक भाषांतील लेख अवशेषरूपाने नजरेस येत आहेत. यापैकीं कांहीं भाषा आर्यन् भाषेशीं संबद्ध असलेल्या आढळतात. परंतु कांहींचे स्थान अद्यापि निश्चित झालें नाहीं. याचें कारण ज्या लिपींत ते लेख लिहिलेले असतात त्यांचे वाचन करणें व त्यांचें व्याकरण व इतर अर्थ लावणें हें काम अद्यापि नीटस झालें नाहीं. सी. आउट्रेन यानें या भाषांचे पुढें दिल्याप्रमाणें तीन वर्ग पाडले आहेत. (१) युफ्रटिस-तिग्रिस या नद्यांच्या प्रदेशांतील, (२) एशियामायनर व मेसापोटेमियाचा डोंगराळ प्रदेश यांतील व (३) भूमध्यसमुद्रातील. तथापि या भाषांच निरनिराळ्या तत्त्वावरहि संघ पाडण्यांत आले आहेत. (१) सुमेरियन:-यांतील पहिला संघ सुमेरियन भाषांचा होय. यांतील जुन्यांत जुनें लेख ख्रिस्तपूर्व चार हजार वर्षांचे आहेत. ही ख्रिस्तपूर्व पांच हजार वर्षापासन युफ्रेटिस नदीतीर, बाबिलोन, व इराणी आखात या प्रदेशात प्रचलित होती. ती स्वत: सेमिटिक संघातील नसली तरी तिनें सेमिटिक भाषांवर बराच परिणाम केला आहे. यातील वाङमय सुमारें दोन हजार वर्षाइतक्या दीर्घकालावर पसरलेलें आहे. व जरी सुमेरियन भाषेवर पुढें अक्कड भाषेचें वर्चस्व स्थापन झालें तरी सुमेरियन हीच लिहिण्याची व धार्मिक भाषा म्हणून ख्रिस्तपूर्व ३०० पर्यंत चालू होती. हिचीं दोन कालांतील दोन भिन्न स्वरूपें आढळतात. (२) दुसरा संघ एशियामायनर व मेसापोटेमिया या प्रदेशातील होय. यांत पुढील भाषा येतात. (अ) मित्तनियन:-ही युफ्रेटीस नदीच्या वरच्या बाजूस प्रचलित असुन या भाषेंतील कांहीं पत्रें व विशेषनामें मात्र उपलब्ध आहेत. (आ) कॉसियन:-ही झगरोस पर्वताच्या पूर्वेकडे प्रचलित होती. हीतील कांहीं तुरळक शब्द राहिलेले आहेत. (इ) वानिक:-ही वान सरोवराच्या सभोंवती बोलली जात होती. या भाषेंतील ख्रिस्तपूर्व ८ व्या ९ व्या शतकातील कांहीं शिलालेख उपलब्ध आहेत (ई) एलामाइट:-ही झगरोस पर्वताच्या दक्षिणेकडे प्रचलित असून या भाषेंतील शिलालेख ख्रिस्तपूर्व २६०० पर्यंतचे उपलब्ध आहेत. (उ) हिटाइट-कॅपेडोशियन भाषा या काळच्या समुद्राच्या दक्षिणेस कॅपेडोशियामध्यें प्रचलित असून यांतील बरेच बाणाग्र लिपीतील इष्टिकालेख उपलब्ध आहेत. हिटाइट भाषेच्या अभ्यासावरून सेमिटिक, सुमेरियन, मिट्टनी, एलमाईट, कॉकेशियन, इट्रुस्कन व आर्यन् या भाषांमध्यें उच्चारविषयक व शब्दविषयक कांहीं सादृश्य असाव असें दिसतें. हिचे स्वरूप आर्यन् भाषांसारखें दिसतें. हिचे वांशिक नातें अद्यापि निश्चित झालें नाहीं. परंतु तिचा पश्चिम आशियामायनरमधील सिलिशियन, कॅरियन, लिशियन, लिडियन वगैरे अल्पज्ञात भाषांशी संबंध असावा असें दिसतें.

भूमध्यसमुद्र:--या संघामध्यें भूमध्य समुद्रालगतच्या भागांत चालू असलेल्या प्राचीन आशियांतील भाषा मोडतात. यांतील महत्त्वाचा भाषा म्हटली म्हणजे इटलींतील इट्रुस्कन भाषा ही होय. ही पूर्वी फ्लोरेन्सपासून रोमपर्यंत प्रचलित होती. व पुढें तिचा प्रसार या प्रांतांत अधिक झाला. या भाषेचा एशियामायनरमधील भाषशीं कांहीं तरी संबंध असावा ही गोष्ट निश्चित आहे. परंतु तो संबंध कशा तऱ्हेचा होता यासबंधीं अद्यापि निश्चित मत दतां येत नाहीं. या भाषेशीं सदृश अशा दुसऱ्या अनेक भाषा भूमध्यसमुद्रातील सायप्रस, क्रीट, लेम्नॉस वगैरे बेटात चालू होत्या.

हॅमिटो-सेमिटिक:--या संघांत हॅमिटिक (नोव्हाचा दुसरा मुलगा हॅम याच्या नांवावरून) आणि सेमिटिक (नोव्हाचा वडील मुलगा सेम याच्या नांवावरून) हे दोन वर्ग येतात. यांतील पहिल्या वर्गांतील भाषांमध्यें परस्पर संबंध फार थोडा आहे. परंतु दुसऱ्या वर्गांतील भाषा अधिक संबद्ध दिसतात. या भाषा उत्तर आफ्रिकेतील गोरे लोक व पश्चिम आशियांतील महत्त्वाच्या लोकांत रूढ आहेत. यांचा आर्यन् भाषेशीं किंवा मध्य आफ्रिकेतील बांटु भाषेशीं संबंध जोडण्याचा प्रयत्न करण्यांत आला होता. परंतु त्यास विशेष फळ आलें नाहीं. या भाषानीं व्यापलेल्या प्रदशांमध्यें अद्यापपर्यंत फारसा फरक झालेला नाहीं. तथापि त्यांचा प्रसार व महत्त्व यांवर कालाचा बराच परिणाम झालेला आहे. (अ) सेमिटिक:--हिचे पूर्व सेमिटिक व पश्चिम सेमिटिक असे दोन वर्ग पाडतां येतात व पश्चिम सेमिटिकचे पुन्हां वायव्य व नैर्ऋत्य असे दोन पोटभेद मानतात. या भाषांचा विशेष म्हणजे त्यांतील मूळ शब्द तीन व्यंजनात्मक असून त्यांस जोडलेल्या निरनिराळ्या स्वरांवरून व स्वरांच्या स्थानांवरून निरनिराळे शब्द बनविण्यांत येतात. याचें उदाहरण पूर्वी अरबी कूतुब् या शब्दांत दिलें आहेच. (आ) पूर्व सेमिटिक:--यांपैकी अक्कडी भाषा मात्र ज्ञात आहे. ही प्राचीन बाबिलोनिया व असिरिया यांमध्यें प्रचलित असल्यामुळें तीस असुरो-बाबिलोनियन

असेंहि म्हणतात. या भाषेंतील लेख ख्रिस्तपूर्व ३६०० ते ३८०० वर्षांचे आढळतात. परंतु बाबिलोन शहराचा नाश झाल्यानंतर (ख्रि. पू. ५२६) या भाषेचे स्थान अरेमियन भाषेनें घेतलें व ही फक्त ख्रिस्ताच्या उदयापर्यंत धार्मिकभाषा म्हणून प्रचलित होती.

वायव्य सेमिटिक:--या शाखेत कॅनेनेटिक व अरेमियन या भाषा येतात. यांपैकीं पहिलीच्या पुन्हां फिनिशियन आणि हिब्रू या दोन शाखा असून जुनी कॅनेनेटिक म्हणून हिचें आणखी एक स्वरूप ख्रिस्तपूर्व १४०० च्या सुमारास शिलालेखांत आढळतें.

फिनिशियन:--ही भूमध्यसमुद्राच्या आशियाकडील किनाऱ्यावर प्रचलित असून तिचें क्षेत्र उत्तर आफ्रिकेतील कार्थेजपर्यंत पसरलेलें होतें. या भाषेतील शिलालेख ख्रिस्तपूर्व नवव्या शतकापर्यंतचे उपलब्ध आहेत. परंतु त्या लेखांत स्वर-चिन्हें आढळत नसल्यामुळें त्यांचा अर्थ लागत नाहीं. आशियामध्यें ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत हिचें स्थान अरेमियन भाषेनें घेतलें. तथापि ही कार्थेजमध्यें ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकापर्यंत चालू होती. या वंशाहूनींतील फिनिशियन भाषेस प्युनिक असें दुसरें नांव होतें.

हिब्रू:--ही भाषा पॅलेस्टाइनमध्यें प्रचलित असून बायबलमधील जुना करार हा या भाषेतील सर्वांत जुना लेख आहे. याचा काल ख्रि. पू. एक हजार वर्षांच्या पूर्वीचा जाहे असें मानितात. ख्रि. पू. पाचव्या शतकामध्यें या लेखाची पुन्हा नव्यानें मांडणी करण्यांत आली. तथापि हिब्रू ही बोलण्याची भाषा म्हणून हळु हळु प्रचारांतून नाहींशी होत चालली. ख्रि. पू. तिसऱ्या शतकांतच या भाषेचें मिश्रक हिब्रू या नांवाचें एक नवीन स्वरूप तयार झालेलें आढळतें. मध्ययुगापासून आतांपर्यंत अरेमियन भाषा-मिश्र अशी एक हिब्रू भाषा यहुदी धर्मोपदेशक शिकत असलेले आढळतात. सध्याची 'झायनिस्ट' चळवळ हिब्रूच्या पुनरुज्जीवनास थोडीशी कारण झाली आहे त्यातच सध्या जर्मनीमधून चालले ली ज्यू लोकांची हद्दपारी या चळवळीस पोषकच होईल असें वाटतें.

अरेमियन:--ही भाषा अनेक बोलींच्या स्वरूपांत अक्कडीयन भाषेच्या पूर्व दिशेस व हिब्रू व फिनिशियन भाषेच्या सर्मोवतालच्या प्रदेशांत चालू होती. हिचा विस्तार ख्रि. पू. ३ ते ६ व्या शतकांत बराच झाला व त्या वेळीं हिने अक्कडीयन, फिनिशियन, व हिब्रू या भाषांवर वर्चस्व स्थापन केलें. सध्यां ही आजच्या स्वरूपांत निओअरेमिया, अथवा निओसिरियॅक या नांवानें सुमारें दोन लक्ष लोक बोलतात. बाकीचा तिचा प्रदेश अरबी भाषेनें व्यापिला आहे.

नैऋत्य सेमिटिक:--अरबी:-उत्तर अरबस्तानांत पहिल्या व दुसऱ्या शतकांतील कांहीं लेख अरबी भाषेशीं संबंध असलेल्या लिह्यानाइट नांवाच्या भाषेत आढळतात. ही मध्य अरबस्तानांत प्रचलित होती. याच वेळीं एक अरबी साहित्यिकभाषा इस्लामेतर काव्यामध्यें वापरलेली आढळते. परंतु ती अद्याप लेखनविशिष्ट झाली नव्हती. या भाषेमध्यें ख्रिस्ती शकाच्या सातव्या शतकांत कुराण नांवाने महंमदाची धार्मिक वचनें संग्रहीत करण्यांत आलीं. कुराणांत जें अरबी भाषेनें स्वरूप आढळतें तें साहित्यिक असून प्रचारांतील बोलीचें स्वरूप त्यापेक्षा थोडें निराळें होतें. परंतु या साहित्यिक भाषेस अभिजात स्वरूप प्राप्त होऊन तिच्यामध्यें भरपूर व विविध ग्रंथरचना झाली. अद्यापिहि लेखनभाषा म्हणून हिचें स्वरूप कायम आहे व इस्लामी धर्मा-बरोबर हिचा प्रसारहि पुष्कळ झालेला आहे. या वेळच्या प्रचारांतील बोलींबद्दल फारच थोडी माहिती मिळते. सध्या आशिया व आफ्रिका खंडांत ज्या भाषा प्रचारांत आहेत त्या परस्परांस सहज समजण्यासारख्या असून त्यांचे निश्चित असे भिन्न प्रकार पड-लेले नाहींत. सध्यांची बोलण्याची अरबी भाषा अतिशय साधी असून व्याकरणदृष्ट्या पृथक्करणस्वरूपाची आहे. याच भाषेशीं संबद्ध असलेल्या दक्षिणअरबीमध्यें ख्रि. पू ६ ते ८ व्या शतकामधील शिलालेख आढळतात. या भाषेंत इतर वाङ्मय फारसें नसून सध्यां ही फक्त अरबस्तानच्या आग्नेयीकडील प्रदेशांत थोडी फार चालू आहे.

इथिओपिक:--ही अबिसिनियामध्यें प्रचलित असून दक्षिणअरबी व हॅमेटिक बोलींचें मिश्रण आहे. सध्याच्या अबि सिनियन ख्रिस्ती लोकांची धार्मिक भाषा गीझ या नांवाची आहे. सध्यां प्रचलित असलेल्या येथील भाषांमध्यें अम्हारिक ही विशेष महत्त्वाची असून तीमध्यें तेराव्या शतकापासून लेखन सुरू असून ती राजभाषा आहे.

हॅमिटिक--या शाखेतील इजिप्शियन ही ख्रि. पू. चार हजार वर्षांपासून प्रचलित आहे. ही ख्रि. शकाच्या ७ व्या शतकांत जिवंत होती. या भाषेच्या चित्रयुक्त लिपीमुळें ही फार महत्त्वाची असून प्राचीन संस्कृतीच्या अभ्यासाच्या दृष्टीनेहि तिचें महत्त्व फार आहे. ख्रि. शकाच्या ३ ऱ्या शतकामध्यें नवीन करारांचें त्या वेळच्या कॉप्टिक भाषेमध्यें भाषांतर झालें होतें. ही १६ व्या शत-कांत प्रचारांतून गेली. तथापि तिला अजून कॉप्टिक पंथामध्यें धार्मिक महत्त्व आहे. इतर हॅमिटिक भाषांबद्दल शास्त्रीय अशी फारच थोडी माहिती मिळते. इजिप्त व अटलांटिक या दरम्यानच्या उत्तर आफ्रिकेमध्यें लिबियन आणि बरबर या बोली

विखुरलेल्या आढळतात. यांतील फारच थोडे लेख व धार्मिक ग्रंथ उपलब्ध आहेत. अरबी भाषेनें सातव्या शतकामध्यें यांचें स्थान घेण्यापूर्वी उत्तर आफ्रिकेमध्यें लिबियन व बरबर या बोलण्याच्या भाषा असून प्युनिक व लॅटिन या लिहिण्याच्या भाषा होत्या.

कुशिटिक:--(हॅमचा वडील मुलगा कुश याच्या नांवावरून) ही हॅमिटिक भाषेची शाखा आफ्रिकेच्या पूर्वेकडील कोपऱ्यांत प्रचलित आहे. हींत निरनिराळ्या बोली असून त्या बोलणाऱ्यांची संख्या सुमारें आठ लाख आहे. परंतु त्यांमध्यें वाङ्मय उपलब्ध नाहीं. यांतील महत्वाच्या बोली म्हणजे बेजा, साहो, आफर, सोमाली, गल्ला, अगाव, सिदमा ह्या होत.

फिनोउग्रिक आणि सामोयिदिक--इ.स.च काल पर्यंत फिनोउग्रिक अथवा उरल आणि सामोयिदिक या उरल अल्ताइक भाषासंघाची एक शाखा म्हणून मानीत असत. परंतु एका सामान्य उरेलियन भाषेपासून त्या निघाल्या असून त्यांचा एस्किमो-अल्युशियन भाषेशीं संबंध आहे. फिनोउग्रिक ही प्रथम व्होल्गा नदीच्या मध्यभागाजवळ बोलली जात होती. पुढें तेथील लोकांच्या परिभ्रमणाबरोबर तिच्या बऱ्याच शाखा झाल्या. त्या फिनिश व तत्संबद्ध केरेलियन, ओलोनेशियन, व्हेपसे, वोते, एस्थोनियन, लिव्होनियन, लॅप, मोर्डव्हिनियन, शेरेमिशियन, पर्मियन, व तिच्या शाखा झिरियन व वोतियक, तसेंच वोगल, ओस्तियाक आणि मग्यार अथवा हंगेरियन या होत. यांतील फक्त एस्थोनियन (१७ वें शतक), फिनिश (१२ वें शतक), लॅप व हंगेरियन (१८ वें शतक), या चार साहित्यिक भाषा आहेत. सामोयिदिक:--ह्या बोली उरल पर्वताच्या उत्तरेपासून येनिसीपर्यंतच्या प्रदेशांत सुमारें अठरा हजार लोक बोलतात.

तुर्की, मंगोली व तुंगुसी--यांस अल्तेइक भाषा असें म्हणतात. यांत परस्परांमध्यें बरेंच साम्य आहे. तथापि त्यांचा अजून वांशिक संबंध निश्चित झाला नाहीं.

तुर्की:--या भाषेंत सुमारें २८ बोली असून ही युरोप व आशियांतील बऱ्याच मोठ्या प्रदेशावर प्रचलित आहे. युरोपमध्यें क्रिमिया द्वीपकल्प, कॅस्पियन समुद्रकिनारा व्होल्गा आणि कामा या नद्यांचें तीर आणि तुर्कस्तान या भागांत ही प्रचलित असून आशियामध्यें आशियामायनर व चिनी तुर्कस्तानपासून इराण, अफगाणिस्तान ते येनिसी नदीपर्यंत हिच्या बोली पसरलेल्या आहेत हिचीच याकुत नांवाची एक बोली सैबिरियामध्यें प्रचलित आहे. या भाषेचा प्रसार सुमारें चार कोटी लोकांत आहे. ऑटोमन अथवा उस्मानली हिला वास्तविक तुर्की म्हणून म्हणतात. ही युरोपमध्यें व आशियांतील तुर्कस्तानांत प्रचलित आहे. या एकंदर बोलींमध्यें याकुत व दुसरी व्होल्गा आणि कामा नद्यांच्या आसपास असलेली चुवाश या दोन बोलींत विशेष फरक आढळून येतो. या भाषेंतील लेख इ. सनाच्या आठव्या शतकांतील आढळतात. यांतील वाङ्मय चौदाव्या शतकापर्यंत विशेषपणें पुढें आलेलें नव्हतें व १९ व्या शतकापर्यंत या भाषेवर अरबी व फारसी भाषांचा पगडा बसलेला होता. परंतु अलीकडे युरोपियन भाषांचें वर्चस्व स्थापन होत आहे.

मंगोली:--तेराव्या शतकामध्यें चेंगिझखान या मोंगल सरदारानें बराच भूप्रदेश आक्रमण केला होता. परंतु त्यापूर्वीचा या लोकांचा इतिहास मुळींच उपलब्ध नाहीं. या भाषेचे सध्यां थोडेफार अवशेष कास्पियन समुद्राच्या उत्तरेकडे व्होल्गा नदीच्या किनाऱ्यावर व उत्तर अफगाणिस्तानामध्यें आढळतात. सध्यां सुमारें तीस लक्ष लोक या बोली वापरतात. यांतील जुन्यांत जुने शिलालेख तेराव्या शतकांतील असून त्यानंतरचें कांहीं ऐतिहासिक व धार्मिक वाङ्मय उपलब्ध आहे.

तुंगुसी:--तुंगुसी व मांचु लोक आणि भाषा यांविषयींची पूर्वीची फारशी माहिती मिळत नाहीं. ही सध्यां सुमारें दहा लाख लोक वापरतात. चिनी भाषेच्या वर्चस्वामुळें ही लवकरच नष्ट होण्याचा संभव आहे. तथापि सतराव्या शतकापासून मांचु भाषेमध्यें भाषांतरें, व्याकरणें व मोठमोठे कोश तयार झाले असून तिला निश्चित स्वरूप प्राप्त झालें होतें. मांचु भाषेंतील पांच भाषांचा व ३६ भाग असलेला एक कोश ब्रिटिश म्युझियममध्यें उपलब्ध आहे. भाषाभ्यासाच्या दृष्टीनें या भाषेंतील लेख फार महत्वाचे आहेत. या भाषेच्या बऱ्याच बोली आहेत.

जपानी--या भाषेचें वांशिक स्थान अजून निश्चित झालें नाहीं. हिचा कोरियन भाषेशीं निकटचा संबंध दिसतो परंतु कांहीं भाषाशास्त्रज्ञ तिला उरल अल्तेइक संघाशीं जोडतात. या भाषेंतील लेखनपद्धति चिनी भाषेशीं संबद्ध आहे. या भाषेंतील वाङ्मय समृद्ध असून ८ व्या ९ व्या शतकापासून उपलब्ध आहे. सध्यांची जपानी भाषा टोकियो येथील बोलीवरून तयार झाली आहे. ही भाषा बोलणारे सहा कोटी लोक असून ते मुख्यतः जपानमध्यें परंतु थोडेफार कोरिया, अमेरिका व इतर देशांत आढळतात. हिचें स्वरूप संश्लिष्ट अथवा चिकटें आहे तथापि प्रत्ययप्रवृत्तीहि आढळते.

कोरियन--ही जपानी भाषेशीं सदृश व संबद्ध अशी एक चिकटी भाषा आहे. हिची लोकसंख्या एक कोटि सत्तर लक्ष असून ती कोरियामध्यें प्रचलित आहे. या भाषेंत पुष्कळ चिनी शब्दांची भर पडलेली आहे. पंधराव्या शतकापर्यंत ही चिनी लिपींत लिहीत असत. त्या सुमारास संकृत भाषेवरून एक वर्णमाला तयार करण्यांत आली व स्वर आणि व्यंजनांची स्वतंत्र व्यवस्था करण्यांत आली.

ऐनु--याच प्रदेशांतील दुसरी अवर्गीकृत भाषा म्हटली म्हणजे साघालीन व इतर बेटांत सुमारें वीस हजार लोकांत प्रचलित असलेली ऐनु ही होय. हिचें स्वरूप चिकटें असून हिच्या तीन बोली आहेत हींत मुळींच वाङ्मय नाहीं.

हायपरबोलियन अथवा पॅलिओ एशियाटिक भाषा--या भाषा संबंधीं फारच थोडी माहिती असून यांमध्यें युकाघीर, चुक्चे आणि कोर्याक (सायबेरियांतील ईशान्यभागांतील), कामचाडल (कामश्चाटकामधील) व गिलियाक (सॅघेलियन बेटांतील) या भाषा मोडतात. या लेखनविशिष्ट नसून त्यांच्यांतील परस्पर संबंध अजून निश्चित नाहीं.

बास्क--ही भाषा आर्यन् प्रदेशांत असुन आर्येनेतर आहे. हिला बास्क लोक युस्कारा अथवा एस्क्वारा असें म्हणतात. स्पेनमध्यें उत्तरेकडील चार प्रांतात व फ्रान्समधील दोन जिल्ह्यांत ही प्रचलित आहे. हिचा संबंध निरनिराळ्या भाषांशीं जोडण्यांत येतो. कांहींच्या मतें ही स्पेन व दक्षिण फ्रान्समध्यें पूर्वी प्रचलित असलेल्या आयबेरियन भाषेपासून निघाली असावी. तर कांहींच्या मतें ती हॅमिटोसेमिटिक, कॉकेशन, इट्रुस्कन वगैरे भाषांशीं संबद्ध आहे. ही जरी फार लहानशा क्षेत्रांत प्रचलित आहे तरी तीमध्यें अनेक पोटभाषा असून त्या पोटभाषांत पुन्हा अनेक प्रकारचें साद्दश्य असल्यामुळें परस्परांपासून त्यांचे भिन्नत्व दाखवितां येत नाहीं. यांतील जुन्यांत जुने अवशेष आठव्या शतकांतील असुन तीं गांवांचीं नांवें आहेत. या भाषेंतील पहिला ग्रंथ १५४५ मधील असून १९ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत या भाषेंतील वाङ्मय फक्त धार्मिक होतें. परंतु अलीकडे बरीच नवीन ग्रंथरचना झाली आहे. भाषाशास्त्रदृष्ट्या ही फार महत्त्वाची भाषा आहे. हिचें स्वरूप चिकटें आहे.

कॉकेशन भाषा--कास्पियन व काळ्या समुद्राच्या दरम्यान आपणांस आर्यनहि नव्हे व सेमिटिक किंवा उरल अलताइक नव्हेत असे दोन भाषासंघ आढळतात. यांस उत्तर व दक्षिण कॉकेशन अशीं नांवें असून यांची लोकसंख्या सुमारें वीस लक्ष आहे. कांहीं भाषाशास्त्रज्ञ यांचें जाफेटिक भाषा म्हणून वर्गीकरण करतात. कॉकेशन भाषांचे पुन्हां पूर्व व पश्चिम असे दोन वर्ग पाडण्यांत येतात. यांतील पहिल्यास त्यांतील एका पोटभाषेवरून चेचेन असें नांव देतात. यांतील अवार नांवाच्या एका भाषेमध्यें नामाच्या तीस विभक्ती आहेत. चेचेन भाषेंत नामांस सहा लिंगें असून त्यांतील चारांत फक्त ध्वनिविषयक फरक आहेत. व त्यामुळें अर्थांत कोणताहि बदल होत नाहीं. यांतील बहुतेक नामें व क्रियापदें अनियमित रीतीनें चालतात. परंतु पश्चिमेकडील संघांमध्यें इतका अनियमितपणा आढळत नाहीं. या संघांत तीन शाखा असून त्यांतील सर्केशियन ही विशेष ज्ञात आहे. ह्या कोणत्याहि भाषेस स्वतंत्र लिपी अथवा वाङ्मय नाहीं. दक्षिण कॉकेशन:--ही शाखा मध्य व पश्चिम कॉकेशसमध्यें सुमारें पंधरा लक्ष लोकांत प्रचलित असून तीमध्यें पांच निरनिराळ्या बोली आहेत. त्यांपैकीं जॉर्जियन ही फार महत्त्वाची आहे. हिची स्वतंत्र लिपी असून तीमध्यें १० व्या शतकापासून खिस्ती वाङ्मय उपलब्ध आहे. हिचें स्वरूप प्रत्ययी आर्यन् व चिकटया तुर्की भाषा यांच्यामधलें आहे.

द्राविड--या भाषा दक्षिणहिंदुस्थानांतील सुमारें सात कोटी लोक बोलतात. यांचा कांहीं लोक मुंडा भाषेशीं संबंध जोडतात. परंतु बरेच लोक तो मान्य करीत नाहींत. पूर्वी या भाषांचा प्रसार हिंदुस्थानाच्या बऱ्याच भागावर होता, असें मानावयास जागा आहे. बलुचिस्तानांत एकाकी असलेली ब्राहुइ भाषा हा तिचा उत्तरेकडील अवशेष होय. या भाषेंतील लिंगभेद हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि भाषांत आढळत नाहीं. मुंडा भाषेप्रमाणें या भाषेंत परसंग्राहक व परव्यावर्तक (आपण करूं, आम्ही करूं) अशीं स्वतंत्र प्रथम पुरुषी सर्वनामें आहेत. तसेंच कांहींमध्यें अकरणरुपी क्रियापदें आढळतात. यांत पुढें दिलेल्या पोटभाषा आहेत. (अ) तामिळ--ही वाङमयसंपन्न भाषा आहे. साहित्यिक तामिळ भाषेचें स्वरूप आर्ष असून अशिक्षित लोकांस तें समजत नाहीं. (आ) कानडी--ही पश्चिमेकडे पंधरा लाख लोक बोलतात. हीमध्यें पांचव्या शतकांतील शिलालेख उपलब्ध असून ९ व्या शतकापासून वाङ्मय आढळतें. (इ) तेलगू--ही पूर्व किनाऱ्यावर प्रचलित असुन हींत अकराव्या शतकापासुन वाङ्मय आढळतें. (ई) मल्याळम्--हिला तामीळ भाषेचाच पोटभेद मानतात. हीमध्यें तेराव्या शतकापासूनचें वाङ्मय उपलब्ध आहे. या भाषा आपल्या निकटवर्ती असल्यामुळें त्यांची संस्कृत भाषेशीं काल्डवेलनें केलेली तुलना पुढें दिली आहे.

द्राविड व संस्कृत--द्राविड भाषा व संस्कृत यांमध्यें पुढील बाबतींत व्याकरणविषयक भेद आढळतात--(१) द्राविड भाषांत सर्व अचेतन वस्तुवाचक नामें नपुंसकलिंगी मानतात, पुल्लिंगी आणि स्त्रीलिंगी हा भेद फक्त पुढील बाबतींत आढळतो,

(अ) तृतीयपुरुषी सर्वनामें, (आ) सचेतन वस्तूंस लागणारीं विशेषणें. यांस सार्वनामिक प्रत्यय लागतात. क्रियापदाचीं तृतीयपुरुषीं रूपें हींहि सार्वनामिक प्रत्यय लावून बनवितात व त्यांचीं एकवचनीं तीन रूपें व अनेकवचनीं दोन रूपें तृतीयपुरुषीं सर्वनामाप्रमाणें बनवितात. इतर बाबतींत जेव्हां लिंगभेद दाखवावयाचा असेल तेव्हां स्त्रीपुरुषवाचक स्वतंत्र शब्द मागें जोडतात. पण या ठिकाणींहि त्या नामाचें लिंग नपुंसकच असून क्रियापदाचें रूपहि त्यास जुळणारें असेंच वापरतात. हा विशेष आपणांस सिथियन भाषांत आढळतो. पण सर्व आर्यन भाषांत लिंगभेदाचें विशेष महत्त्व आहे. (२) द्राविड नामांचीं विभक्तीचीं निरनिराळीं रूपें विभक्तिप्रत्ययांच्या ऐवजी निराळींच अव्ययें शेवटीं जोडून बनविण्यांत येतात. यांमध्यें एकवचनी व अनेकवचनी रूपें बनवितांना असा भेद आढळतो कीं, एकवचनामध्यें विभक्तिप्रत्यय मूळ शब्दासच जोडतात तर अनेकवचनी प्रत्यय मूळ शब्दास जोडण्याऐवजीं सिथियन भाषेप्रमाणें अनेकवचन करणाऱ्या प्रत्ययास जोडतात. मूळ शब्दास अनेकवचनी प्रत्यय जोडला म्हणजे सर्व नामें एकवचनाप्रमाणेंच अनेकवचनांत व तिन्ही लिंगांत चालतात. (३) द्राविड नपुंसकलिंगी नामाचें अनेकवचन क्वचित होतें व क्रियापदाच्या बाबतींत तर नपुंसकलिंगी अनेकवचन फारच क्वचित येतें. (४) द्राविड भाषांतील चतुर्थीचे प्रत्यय कु, कि अथवा गे यांचें संस्कृत अथवा इतर कोणत्याच आर्यन भाषेंतील प्रत्ययांशीं साद्दश्य आढळत नाहीं. तर उलट ते तुर्की भाषेंतील चतुर्थीच्या प्रत्ययांसारखे अथवा बेहिस्तून शिलालेखांतील सिथियन भाषेसारखे किंवा कांहीं फिनिश वंशांतील भाषांसारखे दिसतात. आर्यन् भाषांमध्यें ज्या ठिकाणी उपसर्ग अथवा शब्दयोगी अव्ययें शब्दाच्या मागें जोडलेलीं आढळतात त्या ठिकाणीं द्राविड भाषेमध्यें सिथियन भाषेप्रमाणें पश्चात्योगी शब्द जोडतात. या शब्दांस भाषेमध्यें स्वतंत्र स्थान नसून ते संबंधदर्शक अथवा गुणदर्शक नामें असून साहाय्यक शब्दाप्रमाणें त्यांचा उपयोग करतात. सर्व क्रियाविशेषणें हीं सामान्यनामें, धातुसाधितनामें, किंवा क्रियापदांचीं तुबंत किंवा हेत्वर्थक रूपें असून तीं त्यांचा संबंध असणाऱ्या क्रियापदाच्या पूर्वी येतात. (५) संस्कृत व इतर आर्यन भाषांत विशेषणांचीं नामाप्रमाणें रूपें होतात. व तीं तत्संबद्ध नामाप्रमाणें लिंग, वचन, विभक्ति यांस अनुसरून होतात. परंतु द्राविड भाषांमध्यें सिथियन भाषांप्रमाणेंच विशेषणांचीं रूपें बदलत नाहींत. यांचें मूळ स्वरूप भाववाचक नामाप्रमाणें असतें. व जेव्हां तीं भाववाचक नामें म्हणून वाक्यांत वापरलीं जातात तेव्हां त्यांवर नामांप्रमाणेंच सर्व कार्यें होतात. परंतु जेव्हां नामाशीं गुणविशेषणें म्हणून उपयोग करण्यांत येतो तेव्हां त्यांच्या रूपांत कोणताहि बदल न होतां तीं फक्त नामांच्या पूर्वी योजतात (६) मंगोलियन, मांचू व कित्येक सिथियन भाषांप्रमाणें व इतर आर्यन् भाषांच्या उलट द्राविड भाषेंत विशेषणांच्या ऐवजीं क्रियापदांचीं धातुसाधित रूपें योजतात व त्यामुळें जेव्हां गुणदर्शक नामांचा विशेषणांप्रमाणें उपयोग केला जातो तेव्हां धातुसाधिताचे प्रत्यय त्यांस जोडतात व त्यांस नामाचें व क्रियापदाचें असें दोहोंचेंहि स्वरूप येतें. (७) द्राविड भाषांचा इतर अनेक सिथियन भाषांप्रमाणें हा एक विशेष आहे कीं, त्यांमध्यें प्रथमपुरुषी सर्वनामांचीं अनेकवचनीं दोन रूपें असतात. एकामध्यें द्वितीयपुरुषाचा अंतर्भाव होतो व एकांत होत नाहीं. (उदा. आपण, आम्ही) म्हणजे एक परसंग्राहक असतें तर दुसरें परव्यावर्तक असतें. ही गोष्ट आपणांस संस्कृत किंवा इतर आर्यन भाषांत आढळत नाहीं. या दोन भाषांस सदृश अशा गोष्टी म्हटल्या म्हणजे दोहींतहि द्विवचन आढळतें ही होय. (८) द्राविड भाषांत कर्मकर्तरि प्रयोग आढळत नाहीं. त्याऐवजीं कांहीं साहाय्यक क्रियापदें वापरतात. (९) द्राविड भाषांमध्यें सिथियन भाषांप्रमाणें व आर्यन भाषांच्या उलट उभयान्वयी अव्ययांच्या ऐवजीं पूर्वकालवाचक धातुसाधित वापरण्याची अधिक प्रवृत्ति आढळते. (१०) द्राविड भाषांत करणरूपी व अकरणरूपी क्रियापदांचे स्वतंत्र प्रयोग असतात. याहि बाबतींत त्यांचें सिथियन भाषांशीं साम्य व आर्यन भाषांशी विसादृश्य दिसून येतें. (११) द्राविड भाषांमध्यें मंगोलियन, मांचू व कांहीं अंशानें सिथियन भाषांत आढळणारा एक विशेष म्हणजे संबंधीसर्वनामांच्या ऐवजी संबंधीधातुसाधितें वापरण्याची प्रवृत्ति आढळते. गोंड भाषेशिवाय कोणत्याहि द्राविड भाषेत संबंधीसर्वनाम आढळत नाहीं. गोंड भाषेमध्यें संबंधी धातुसाधिते नष्ट झालीं असून त्याऐवजीं हिंदी भाषेंतील संबंधीसर्वनामें रूढ झालीं आहेत. द्राविड भाषांत संबंधीसर्वनामांची जागा संबंधीधातुसाधितांनी घेतली असून हीं धातुसाधितें क्रियापदाच्या वर्तमान, भूत व भविष्य काळाच्याच धातुसाधितांस प्रत्यय लावून तयार करतात व हा प्रत्यय व षष्ठीचा प्रत्यय हे एकच होत. उदा० सं. ' पुरुषः य आगतः' या ऐवजीं तामिळ भाषेत ' य आगतः पुरुषः ' (वंद अ आळ) असा वाक्प्रचार आढळतो, येथें वंदु–आगतः या भूतकालवाचक धातुसाधिताचें वन्द अ=यआगतः असें संबंधी धातुसाधित ' अ ' हा षष्ठीचा व विशेषणात्मक प्रत्ययें लावून बनविण्यांत येतें. (१३) द्राविड भाषांतील वाक्यरचनाहि सिथियन भाषांप्रमाणेंच संस्कृत भाषेहून सर्वथा भिन्न आहे, संस्कृत भाषेंत मुख्य शब्दाच्या पूर्वी तत्संबद्ध शब्द योजतात. जसें 'रामस्य पुत्रः' परंतु द्राविड भाषेंत मुख्य शब्द प्रथम येऊन संबद्ध शब्द नंतर योजण्यांत येतो. यामुळें वाक्यरचनेंत आरंभी नेहमीं कर्त्याचें स्थान असतें व क्रियापद वाक्याच्या शेवटीं येतें. विशेषण

विशेष्याच्या पूर्वी असतें. क्रियाविशेषण क्रियापदाच्या पूर्वी असतें. ज्या नामाचा क्रियापदार्शी संबंध असतो तें नाम तत्संबद्ध शब्दांसह क्रियापदाच्या पूर्वी येतें. संबंधी धातुसाधित तत्संबद्ध नामाच्या पूर्वी येतें. वाक्यांतील अकरणरूपी भाग करणरूपी भागाच्या पूर्वी येतो. षष्ठ्यन्त नाम तत्संबद्ध नामाच्या पूर्वी येतें. शब्दयोगीअव्यय तत्संबंध नामाच्या पूर्वी येण्याच्या ऐवजीं नंतर येतें व वाक्याच्या शेवटीं क्रियापद येतें. या सर्व बाबतींत द्राविड भाषांचें सिथियन भाषांशीं साम्य आहे.

द्राविड भाषा व संस्कृतसंभव भाषा--द्राविड भाषा व उत्तरहिंदुस्थानांतील भाषा यांमध्यें पुढील बाबतींत व्याकरणविषयक साम्य आढळतें-(१) नामांचें सामान्य रूप करून त्यास विभक्तिप्रत्यय जोडण्यांत येतात. (२) नामांस अनेकवचनाचा प्रत्यय लागल्यानंतर बहुधा एकवचनासारखेच प्रत्यय लावून त्यांचीं निरनिराळीं अनेकवचनी विभक्तीचीं रूपें बनविण्यांत येतात. (३) प्रथमपुरुषी एकवचनी सर्वनामांचीं परसंग्राहक व परव्यावर्तक अशीं दोन रूपें असतात. उदा. आपण करूं व आम्हीं करूं. (४) पूर्वयोगी अव्ययांच्या ऐवजीं पश्चात्‌योगी अव्ययें वापरतात. म्हणजे उपसर्ग पूर्वी जोडण्याच्याऐवजीं शब्दयोगी अव्ययें नंतर जोडण्यांत येतात. उदा. –अभिरामं–रामापुढें; उपगृहं– घराजवळ इत्यादि. (५) क्रियापदांचीं निरनिराळ्या काळांतील रूपें धातुसाधिताच्या साहाय्यानें करतात. (६) मुख्य वाक्याच्या पूर्वी संबंधी वाक्यें योजतात. जर तो आला तर मी येईन. (७) मुख्य शब्दानंतर संबद्ध शब्द योजतात.

द्राविड भाषा व बेहिस्तून लेख भाषा--द्राविड भाषा व बेहिस्तुन लेखांतील भाषा यांच्यामध्यें पुढील सादृश्य आढळतें-(१) या दोन्ही भाषांत ट, ड, ण हीं मूर्धन्य व्यंजनें आढळतात. ही व्यंजनें संस्कृतमध्यें आढळत असलीं तरी तीं संस्कृत भाषेमध्यें द्राविड भाषेमधून आलेलीं आहेत. (२) तामिळ भाषा व या लेखांतील भाषा यांमध्यें एकच व्यंजन शब्दाच्या प्रारंभीं आलें तर त्याचा उच्चार कठोर करावयाचा व शब्दाच्या मध्यें आलें तर मृदु करावयाचा व एकाकी असेल तर कठोर करावयाचा आणि द्वित्त असेल तर मृदु करावयाचा हा नियम सामान्य आढळतो. (३) या लेखांतील भाषेंत षष्ठीचीं रूपें न, निन, व इन्न हे प्रत्यय लावून बनविलेलीं आढळतात यासारखींच द्राविड भाषेंतील रूपें तेलगूमध्यें नी लावून गोंडी व ब्राहुईमध्यें न अथवा अ लावून आणि तामिळमध्यें इन् हा प्रत्यय लावून होतात. (४) या लेखांतील चतुर्थीचा प्रत्यय इक्की अथवा इक्क असा आहे व द्राविड चतुर्थीचे प्रत्यय कु, कि, क इत्यादि आहेत. या प्रत्ययांच्या पूर्वी तामिळ व मल्याळीमध्यें उ व इ असे स्वर येतात. आणि त्यामुळें क चें द्वित्त होतें. उदा. तुला या अर्थी कानडीमध्यें निन–अ–गे मल्याळीमध्यें निन–अ–क्कु तर बेहुस्तुन लेखांत निन–इक्क अशीं रूपें आढळतात. (५) बेहिस्तुन लेखांत सर्वनामांचीं द्वितीयेचीं रूपें उन्, इन् अथवा न प्रत्यय लावून केलेलीं आढळतात, यांशीं तेलगूमधील नु अथवा नि आणि कानडीमधील अम्, अन, ऊ हे द्वितीयेचे प्रत्यय सदृश दिसतात. (६) या लेखांत संख्यावाचक शब्द फक्त 'किर' हा आढळतो. याचा र अथवा इर या संख्यावाचक विशेषणांशीं अथवा उपपदांशीं संबंध दिसतो. तेलगूमध्यें एक या अर्थी ओक असा शब्द असून तामिळमध्यें ओर असा शब्द आहे. खोंड भाषेंत एक या अर्थी र हा शब्द आहे, तो तामिळमधील ओरु शब्दांशीं किंवा विशेषतः बेहिस्तून लेखांतील र अथवा इर शब्दांशीं सदृश दिसतो. या लेखांतील क्रमवाचक संख्याविशेषणांच्या शेवटीं इम् असे वर्ण येतात तर तामिळभाषेंतील याच संख्याविशेषणांच्या शेवटीं आम् हे वर्ण येतात व सामोयिदीक भाषांमध्यें इम् असे येतात. (७) द्वितीयपुरुषवाचक सर्वनाम या लेखांत व द्राविड भाषांत नी असें एकच आढळतें. यांचें सामान्य रूप निन् असें होतें. व तेंच द्वितीयेचेंहि रूप आहे. या सर्वनामाचें अनेकवचनी रूप या लेखांत योजलेलें आढळत नाहीं. (८) या लेखांच्या भाषेत द्राविड भाषांप्रमाणेंच संबंधीधातुसाधित योजलेलें आढळतें याखेरीज संबंधीसर्वनामहि आढळतें. व हा विशेष सर्व सिथियन भाषावंशांत आढळतो. (९) या लेखांत अकरणात्मक आज्ञार्थी अथवा निषेधार्थक अव्यय इन्नि असें योजिलेलें आढळतें. गोंड भाषेंत आपणांस मिन्नि असें आढळतें. बेहिस्तुन शिलालेखांतील क्रियापदें चालविण्याची पद्धत उग्रियन वंशांतील हंगेरियन किंवा मोर्द्विन भाषांसारखी आढळते. परंतु द्राविड भाषांपासून ती सर्वथा भिन्न आहे. द्राविड भाषांतील क्रियापदांची रूपें धातूस कालवाचक अव्यये जोडून बनविण्यांत येतात. व त्यांचीं निरनिराळीं पुरुषवाचक रूपें सार्वनामिक प्रत्यय जोडून बनविण्यांत येतात. हें विसादृश्य लक्षांत घेतलें तरीसुद्धां या दोन भाषांमध्यें कांहीतरी निकटचा संबंध असावा ही गोष्ट लक्षांत येते. द्राविड भाषा ह्या सिथियन वंशांतील तुर्की, उग्रियन, मंगोली किंवा तुंगुसी भाषांशीं संबद्ध नसून त्या फिनिश किंवा उग्रियन–विशेषतः ओस्तियाक शाखेशीं–संबद्ध असाव्यात असें काल्डवेलनें म्हटलें आहे.

द्राविड भाषांत शिरलेले आर्य विशेष--द्राविड भाषांत जे आर्यन भाषाविशेषांचे मिश्रण झालेलें आहे तें पुढील बाबतींत होय–(१) एकापुढें एक येणाऱ्या दोन स्वरांचा संयोग होऊं नये म्हणून त्यामध्यें न घालण्याचा प्रीक अथवा संस्कृत भाषांप्रमाणें प्रघात. (२) तृतीयपुरुषवाचक सर्वनामें व क्रियापदें यामध्यें लिंगभेद, विशेषतः नपुंसकलिंगाचें अस्तित्व.

(३) दर्शकसर्वनामें अथवा तृतीयपुरुषवाचक सर्वनामें यांचें नपुंसक लिंग करीत असतांना 'द,' अथवा 'त,' हा आगम लावणें. (४) नपुंसकलिंगी शब्दाचें अनेकवचन लॅटिनप्रमाणें अकारान्त असणें. (५) दूरचा पदार्थ दाखविण्याकरितां योजावयाच्या दर्शकसर्वनामांत 'अ' व जवळचा पदार्थ दाखविण्याच्या दर्शक सर्वनामांत 'इ' हा स्वर असणें. (६) फारसी भाषेप्रमाणें भूतकालवाचक रूपें 'द' जोडून करणें. (७) कांहीं भूतकालवाचक रूपें वर्णाची द्विरुक्ति अथवा अभ्यास करून करणें (८) धातुसाधित नामें अथवा तद्रूपें क्रियापदांतील स्वर दीर्घ करून बनविणें.

संस्कृत व तामिळ—तामिळ भाषेवर संस्कृत भाषेच्या संसर्गानें पुढील परिणाम झालेले दिसतात (१) लिंगायत आगम, शंकराचार्य व रामानुजाचार्य यांच्या ग्रंथांनीं आपल्या तत्वज्ञानाच्या प्रसाराबरोबर ११ व्या शतकापासून १६ व्या शतकापर्यंत अनेक संस्कृत तत्सम शब्द तामिळ भाषेत अंतर्भूत केले. (२) यापूर्वी ९ व्या शतकापासुन १३ व्या शतकापर्यंत जैन ग्रंथकारांनीं अनेक संस्कृत तद्धित शब्द तामिळ वाङ्मयामध्यें योजले. हा काळ तामिळ वाङ्मयाचें सुवर्णयुग म्हणून प्रसिद्ध आहे. याच वेळीं कुरळ, चिंतामणी आणि अभिजात तामिळ कोश व व्याकरणें लिहिलीं गेलीं. या तद्धित शब्दांत तामिळभाषाविशेषांनुसार बदल झालेला आढळतो. उदा. लोक या संस्कृत शब्दाचें उलगु असें रूप झालें आहे. राजा याचें अरसु असें रूप झालें आहे. (३) यापूर्वीहि कांहीं संस्कृत तत्सम अथवा तत्भव शब्द तामिळ भाषेत प्रविष्ट झाले होते. हे प्राचीनकाळच्या ब्राह्मण, पंडित, ज्योतिषी, पुरोहित वगैरे वर्गाच्या संसर्गापासून आले असावे. यांचें रूप वरील दोन्ही प्रकारच्या शब्दांपेक्षांहि अधिक बदललेलें दिसतें. उदा. सं. श्री या शब्दाचें तिरु असें रूप बनलें आहे तर कर्मन याचें करुमम् अथवा कन्मम् व प्राचीन तामीळमध्यें कम् असें रूप आढळतें. कांहीं तामिळ महिन्यांचीं नांवें संस्कृत नांवांपासून बनलेलीं आढळतात. उदा. पूर्व आषाढ पासुन पुरांडे, पूर्व भाद्रपदापासून पुरट्टासी अशी रूपें बनलेलीं आढळतात.

संस्कृत भाषेंतील मूर्धन्य वर्ण—संस्कृत भाषेंतील मूर्धन्य वर्ण द्राविड भाषेंतून आले असावे यास पुढील कारणें संभवतात (१) द्राविड भाषांत मूर्धन्य वर्ण हे अनेक धातूंमध्यें त्यांचें इतर धातूंशीं पृथक्त्व दाखविण्याकरितां अवश्य व मुख्य घटक म्हणून आढळतात तर संस्कृतमध्यें मूर्धन्य वर्ण हे दंत्यवर्णापासून संधिनियमानें बनलेले आढळतात. (२) संस्कृत भाषेशीं वांशिक संबंध असलेल्या ग्रीक, लॅटिन, गॉथिक, केल्टिक, लिथुॲनियन, स्लॅव्हॉनिक, फारसी, झेंद यांपैकीं कोणत्याहि भाषेत मूर्धन्य वर्ण आढळत नाहींत. व या भाषांचा संबंध संस्कृत भाषा बोलणाऱ्या लोकांशीं हिंदुस्थानांत त्यांचें आगमन होण्यापूर्वी होता. तर द्राविड भाषांशीं संबंध त्यांचें हिंदुस्थानांत आगमन झाल्यावर आला. व सर्व द्राविड भाषांत मूर्धन्य वर्ण आढळतात. तसेंच या मूर्धन्य वर्णांचा प्रचार संस्कृतपेक्षांहि हिंदुस्थानामध्यें उत्पन्न झालेल्या प्राकृत भाषांमध्यें अधिक आढळतो. (३) तामिळ भाषेमध्यें जे संस्कृत भाषेंतील शब्द आले आहेत त्यांतील कठीण रूपें तामिळ भाषेनें उच्चार सुलभ करून घेतलीं आहेत. संस्कृत शब्दांतील महाप्राण व संस्कृत 'ष' हा उच्चारण्यास कठिण असलेला वर्ण तामिळ भाषेनें गाळून टाकला आहे. किंवा त्यामध्यें बदल केला आहे. अर्थात या भाषेनें संस्कृतमधील उच्चारास कठिण असे मूर्धन्य वर्ण संस्कृत तद्भव शब्दांतच केवळ नव्हे तर मूळ तामिळ शब्दांतहि घेतले असणें संभवत नाही. (४) तेलगु ही भाषा संस्कृत भाषेशीं अगदीं निकट असूनहि मूर्धन्य वर्णांचा उपयोग तेलगु भाषेपेक्षां तामिळ भाषेंत अधिक आढळतो. या सर्व कारणांवरून मूर्धन्य वर्ण हे द्राविड भाषांनी संस्कृत भाषेपासून घेतलेले असण्याच्या ऐवजीं संस्कृत भाषेतच द्राविड भाषांमधून आले असावें हें अधिक संभवनीय दिसतें.

उत्तरद्राविड:—या हल्ली नष्ट होत असून त्यांचें स्थान आर्यन् भाषा घेत आहेत. गोंडी (मध्यहिंदुस्थान), ब्राहुइ (बलुचिस्थान), कोरकु (छोटानागपूर), व माल्तो (राजमहाल टेकड्या) या भाषा या संघांत मोडतात.

अंदमानी—अंदमान बेटांतील भाषांस अद्यापि कोणत्याहि विशिष्ट संघांत सामील केलेलें नाहीं.

आस्ट्रो-आशियाटिक भाषा—या भाषा अनामपासुन छोटानागपुरपर्यंत विखुरल्या आहेत. यांमध्यें मुख्य तीन शाखा आहेत. पश्चिमेकडे मुंडा व कोल (छोटा नागपूर), पूर्वेकडे अनामी (दक्षिण चिनी समुद्र) आणि मॉनख्मेर (वरील दोहोंच्या दरम्यान) यांतील शब्दसंग्रह व व्याकरणविशेषांवरूनच त्यांचा एक भाषासंघ समजण्यांत येतो. तथापि अजून यांचा वांशिक संबंध तितका निश्चित ठरला नाहीं, यांमध्यें संख्याविशेषणें, उपसर्ग वगैरे बाबतींत साम्य असलें तरी रचनेच्या बाबतींत बरीच भिन्नता आढळते, उदा. मुंडा या चिकटया भाषा असून अनामी एकाक्षरी आहेत.

मॉनख्मेर:—या संघांत मॉन, ख्मेर, चाम, या तीन सुसंस्कृत भाषा व अनामपासुन आसामपर्यंत ते मलाया द्वीपकल्प पर्यंत पसरलेल्या अनेक असंस्कृत भाषा मोडतात. यांतील सयाम व इंडो चीनमधील ख्मेर भाषासंघ फार महत्त्वाचा आहे. यांतील जुने शिलालेख इ. स. सातव्या शतकांतील आढळतात. या भाषांची व्याकरणपद्धति महत्त्वाची आहे.

अनामी:—या भाषा टांकिनचा पूर्व किनारा इंडो-चीन व कोचीन चीन या प्रदेशात प्रचलित असून या तई व आस्ट्रो आशियाटिक यांमधील संक्रमणावस्था दाखवितात. यांत अनामी ही सुसंस्कृत भाषा असून तिच्या अनेक बोली आहेत. या भाषेतील पहिला ग्रंथ पंधराव्या शतकांतील चिनी लिपींत लिहिलेला आढळतो. सतराव्या शतकापासून ही भाषा लॅटिन लिपींत लिहिण्याची पद्धत पडली आहे. ही भाषा कांहीं बाबतींत मॉनख्मेर भाषेशीं सदृश दिसते, तथापि चिनी व तई भाषांतीलहि कांहीं विशेष तीमध्यें आढळतात, ही चिनीसारखी एकाक्षरी, अप्रत्ययी व पृथक्करणात्मक भाषा आहे.

मुंडा अथवा कोल:—या भाषा हिमालयाच्या भोंवतीं व छोटानागपूर या दोन प्रदेशांत आढळतात. या भाषांचा तिबेटी व ब्रम्ही भाषांशीं संबंध जोडण्यांत येतो, प्राचीनकाळीं हिमालयापासून बंगालच्या उपसागरापर्यंत मुंडा भाषा प्रचलित असे, परंतु हळू हळू तिचें स्थान तिबेटी, मंगोलियन व आर्यन् भाषांनीं घेतलें. हिचें अर्वाचीन स्वरूपच पाहण्यास सांपडतें, व तें चिकटें आहे.

चिनी, तिबेटो-ब्रह्मी व तई—या भाषासंघास तिबेटो-चिनी अथवा इंडो-चिनी अशेंहि म्हणतात. तिबेटो-ब्रह्मी ही चिनी भाषेशीं संबद्ध असावी. परंतु तई भाषा तिबेटो-ब्रह्मी व मॉनख्मेर या दोन्हीशींहि संबद्ध आढळते. चिनी-तिबेटी-ब्रह्मी व ऑस्टो-आशियाटिक भाषा यांचा एक स्वतंत्र भाषासंघ असावा अशी एक कल्पना आहे. व तई ही भाषा या दोन भाषांमधील दुवा असावा. या तिहींसहि एकाक्षरी समजण्यांत येतें. परंतु त्यांच्या अर्वाचीन स्वरूपांतहि त्यांस हें नांव पूर्णपणें लागू पडत नाहीं. तिबेटो-ब्रह्मी भाषांत उपसर्ग आढळतात. तिबेटी भाषेंत तर क्रियापदाच्या स्वरूपांतहि कांहीं विकार झालेले आढळून येतात. तसेंच प्राचीन काळीं चिनी भाषेंतहि नामांच्या व धातूंच्या रूपांत विकार होत असावा असें दिसतें. परंतु त्यांच्या विशिष्ट लेखन-पद्धतीमुळें त्यांतील मूळशब्द अथवा धातु पृथक् करणें कठिण असल्यानें यासंबंधीं निश्चित मत देतां येत नाहीं. तथापि सामान्यतः या भाषांची एकाक्षरी रूपाकडे प्रवृत्ति दिसून येत असल्यावरून चिनी व तिबेटी या भाषांत तई भाषेपेक्षां अधिक साम्य आढळतें.

तिबेटो-ब्रह्मी:—यामध्यें तिबेटी व ब्रम्ही हे दोन भाषासंघ व त्यांचे अनेक प्रकार येतात. यांची लोकसंख्या दोन कोटी आहे. तिबेटी भाषेंतील लेख सातव्या शतकापासून, तर ब्रह्मी भाषेंतील अकराव्या शतकापासून आढळतात.

चिनी:—या भाषेंतील लेख ख्रि. पू. दोन हजार वर्षांपासूनचे आढळतात. परंतु या भाषेची लिहिण्याची तऱ्हा विचित्र असल्यामुळें यांतील लेख वाचणें अतिशय कठिण आहे. व या भाषेत इतके प्रकार आहेत कीं, एका शाखेच्या लोकांस दुसऱ्या शाखेंतील लेख मुळींच वाचतां येत नाहींत. या भाषेंत वर्णलिपी नसून प्रत्येक शब्दाकरितां स्वतंत्र अक्षरें असतात, व तीं बहुतेक कल्पनाचित्रें असतात. त्यामुळें अशा अक्षरांची संख्या पुष्कळ मोठी असते. ही कमीत कमी चार हजार असून त्यांचे त्यांतील सामान्य वर्णावरून २१४ गट पाडण्यांत येतात व हे सामान्यवर्ण कोशामध्यें आद्याक्षराप्रमाणें वापरतात. ही भाषा वाङ्मय व संस्कृति-दृष्ट्या फार महत्त्वाची आहे. परंतु हिच्या लिहिण्याच्या विचित्र पद्धतीमुळें हिचा ध्वनिविषयक अथवा स्वरूपविषयक ऐतिहासिक अभ्यास करतां येत नाहीं. हिचे आर्षकालीन (६ वें शतक), प्राचीन (६-१० वें शतक), मध्यकालीन (१०-१३ वें शतक) व अर्वाचीन (१३ नंतर) असे कालदृष्ट्या विभाग पाडण्यांत येतात. प्राचीन चिनीचें स्वरूप अत्यंत पृथक्करणात्मक होतें. परंतु आर्षचिनीमध्यें उपसर्ग व प्रत्ययपद्धति असावी असें दिसतें. हिची एकाक्षरी स्वरूपाकडे स्पष्टपणें प्रवृत्ति आढळते. सांप्रतची पेकिन शहराची भाषा हिलाच मंदारिन, क्वान, ह्वा अथवा गौरयु असें म्हणतात. ही सरकारीभाषा म्हणून सार्वत्रिक बनत चालली आहे. चिनी भाषा बोलणारे लोक चाळीस कोटी असून ती भाषा भोंवतालच्याहि अनेक देशांत पसरलेली आहे.

तई:—तई किंवा शान भाषा या सयाम, तिबेट, ब्रह्मदेश, चीन व इंडो-चीन यांच्या कांहीं भागांत प्रचलित आहेत. यांतील सयामी ही भाषा सुसंस्कृत असून वाङ्मयसमृद्ध आहे. इतर निरनिराळ्या बोली चीनपासून हिंदुस्थानपर्यंतच्या निरनिराळ्या प्रदेशांत पसरलेल्या आहेत. सर्वांत जुने सयामी शिलालेख इ. स. १२९३ मधील आढळतात.

मलाई-पॉलोनेशियन अथवा ऑस्ट्रोनेशियन भाषा—या भाषा हिंदी व पॅसिफिक महासागरांतील मादागास्कर बेटापासून चिलीच्या पश्चिमेकडील ईस्टर बेटापर्यंत पसरल्या आहेत. यांची विभागणी साधारणतः भौगोलिक प्रदेशावरून करतात. परंतु ती भाषाशास्त्रदृष्ट्या तितकी बरोबर नाहीं. यांचे इंडोनेशियन, मेलानेशियन, मायक्रोनेशियन व पॉलिनेशियन असे संघ पाडलेले आहेत. यांची रचना व स्वरूप सामान्यतः एकरूपी असते पण शब्दांची बरीच भेसळ आढळते. यांतील मूळ शब्द बहुधा दोन अक्षरांचे आढळतात. परंतु पूर्वी ते एकाक्षरी असावेत असें वाटतें. या भाषांतील क्रियापदांस उपसर्ग बंगरे लागतात. परंतु नामांस विभक्ति, लिंग अथवा वचन आढळत नाहीं. जरी या भाषांत परस्पर संबंध आहे असें गृहीत धरतात तरी तो अद्यापि कोणत्या स्वरूपाचा आहे हें निश्चित झालें नाहीं. यांतील कांहींचा अभ्यास बराचसा झाला आहे. परंतु कांहींचें ज्ञान फारच अल्प आहे.

इंडोनेशियन:--हीं भाषा बोलणारे लोक पांच कोटी आहेत व ते उत्तरेकडे फोर्मोसा बेटापर्यंत, पूर्वेकडे न्यू गिनीपर्यंत, तर पश्चिमेकडे मादागास्करपर्यंत पसरलेले आहेत. हिच्या मुख्यत: आठ शाखा असून त्यांमध्ये अनेक पोटभाषा आहेत. (१) फिलिपाईन फोर्मोसा संघ:-यांतील फोर्मोसन ही फोर्मोसा बेटांत असून तगलोग, विसायन, विकोल व बॉटॉक ह्या फिलिपाईन बेटांत आढळतात. (२) सेलिबिससंघ:-यामध्ये बुगी आणि मकासर ह्या भाषा आहेत. (३) बोर्निओ संघ:-यांत डायक ही एकच भाषा आहे. (४) जावा-मदुरा-बलि-संघ:-ह्यामध्ये कवि ही मृत भाषा व जावानी, सुन्दानी, मदुरी व बलिनी या भाषा येतात. (५) सुमात्रासंघ:--यामध्ये अचिनीज, बत्तक, रेजंग, लॅपॉग, मलयु, मेन्तावे ह्या भाषा मोडतात. (६) मलाक्का संघांमध्ये मलयु भाषा आहे. (७) मादागास्कर बेटांत मादागासी नांवाच्या बोली आढळतात. (८) बलि व सेलिबीस आणि न्यू गिनी या बेटांच्या दरम्यान लोंबॉक व पौलोहि या भाषा दिसतात. यांपकीं जावानी भाषेचाच इतिहास काय तो १०-१२ शतकांचा आढळतो. कवि हें प्राचीन जावानी भाषेचें नांव असून त्या भाषेत आठव्या शतकापासूनचें लिखाण आढळतें. या भाषेत महाभारतादि अनेक संस्कृत ग्रंथांचें भाषांतर, झालें असुन अनेक संस्कृत, शब्द वृत्त वगैरे आढळतात. जावा बेटांत ही भाषा बोलणारे लोक पूर्वकडील भागांत सुमारें दोन कोटी असून पश्चिमेकडील भागांत सुमारें सत्तर लाख लोक सुन्दानी भाषा बोलतात व पूर्वेकडील भागांत आणि मदुरा बेटांत सुमारें तीस लाख लोक मदुरी भाषा बोलतात. बलि बेटांत बली भाषा बोलणारे लोक सुमारें तीस लाख आहेत. या चारहि भाषांत एक शिष्ट व एक ग्राम्य अशीं दोन स्वरूपें आढळतात. जावानी भाषेतील शिष्ट भाषेस क्रोमो असें म्हणतात व ग्राम्य भाषेस न्गोको असें म्हणतात. या भाषेंत संस्कृत, अरबी, पोर्तुगीझ, डच, पर्शियन, द्राविड, चिनी वगैरे अनेक भाषांतील शब्द पुष्कळ प्रमाणांत मिसळलेले आहेत. तसेंच द्वैभाषिक शब्दयुग्में या भाषांत फार आढळतात. उदा. शपथ-मंग् मंग्=शाप देणें हें संस्कृत कवि शब्दयुग्म असून जव्हारमाणिकं=रत्न हें फारसी-मलयु (संस्कृत) शब्दयुग्म आहे. संख्यापद्धति दशमानात्मक आहे. अतिशयितता दाखविण्याकरितां शब्दाची द्विरुक्ति करण्याचा प्रघात आहे. उदा. मेताबे भाषेंत इगि=पुष्कळ असा शब्द असून इगि इगि इगि इगि याचा अर्थ कल्पनेपेक्षांहि अतिशय असा होतो. या भाषांची संस्कृत, अरबी किंवा लॅटिन लिपी आढळते.

मेलानेशियन:--या भाषा प्रामुख्यानें सॉलोमन, सांताक्रूझ, टॉरेस, बँका, न्यू हेब्रिडिज, लॉयल्टी आणि फिजी या बेटांत आढळतात. यांतील फिजी बेटांतील बोलींचा अभ्यास कांहींसा झालेला आहे. परंतु त्यांत लेखनपद्धति रूढ नसल्यामुळें यांचें ज्ञान केवळ युरोपियन मिशनऱ्यांनीं आपल्या लिपींत लिहिलेल्या लेखांवरून मिळतें व हे मिशनरी भाषाशास्त्रज्ञ नसल्यामुळें त्यांचें लिखाण भाषाशास्त्रीयदृष्ट्या विनचूक नसतें. या भाषांचे विशेष म्हणजे द्विरुक्ति अथवा अभ्यास, एकाकी व सप्रत्यय पुरुषवाचक सर्वनामें, द्विवचनी, त्रिवचनी व परग्राहक आणि परव्यावर्तक रूपें, हे होत. कांहीं बेटांत दशमानसंख्यापद्धति आढळते, तर कांहींत पंचमान, तर कांहींत विंशतिमानपद्धति आढळते. लॉयल्टी बेटांत बीस ही संख्या मनुष्यवाचक शब्दानें दाखवितात. तर ४० ही संख्या दोन मनुष्यें या अर्थी शब्दानें दाखवितात.

मायक्रोनेशियन:--ही भाषा गिल्बर्ट अथवा किंग्समिल बेटें, मार्शेल बेटें, कॅरोलीन बेटें. याप बेट व मरियाना बेटें यांमध्ये आढळते. परंतु कॅरोलिन द्वीपसमूहांतील पेल्यू बेटांतील आणि सैपन बेटांतील चामोरा भाषा फिलिपाइन संघांतील आहेत. या भाषांचें स्वरूप व उच्चारपद्धति मेलानेशियन भाषांसारखीच आहेत. या सर्व भाषांत सर्वनामाच्या बाबतींत आपणांस वैचित्र्य आढळतें. व तें म्हणजे सर्वनामांत द्विवचन, त्रिवचन, चतुर्वचन असून परसंग्राहक व परव्यावर्तकरूपें आढळतात.

पॉलिनेशियन:--या भाषा मेलानेशियनच्या पूर्वेकडे व दक्षिकडे आहेत. सामोआ अथवा नॅव्हिगेटर बेटें, कुक अथवा हर्वे बेटें, सोसायटी बेटें, त्वामोतु बेटें, तोंगा अथवा फ्रेंडली बेटें, गॅम्बियर बेटें, ईस्टर बेट, न्यू झीलंड, चॅटहॅम बेट, मार्केसस बेटें, हवाई बेटें व कांहीं मेलानेशियन संघांतील बेटांत या भाषा प्रचलित आहेत. या भाषांचा इंडोनेशियन भाषांशीं निकटचा संबंध दिसतो. परंतु यांमध्यें व्यंजनांचा लोप करण्याची प्रवृत्ति विशेष आढळते. उदा. मलाई भाषेत अकर हा शब्द मूळ या अर्थी वापरतात, तर मॅओरी(न्यू झीलंड) मध्ये अक असा शब्द योजला जातो. पण हवाई भाषेत त्याचें रूप अअ असें होतें. या भाषांत जोडाक्षरें आढळत नाहींत. पण द्विरुक्ति अथवा अभ्यास आढळतो. यांतील उपपदास अनेकवचनीं रूप निराळें असतें. हा विशेष इतर मलायापॉलिनेशियन भाषांत आढळत नाहीं. संख्यापद्धति दशमान असून पुरुषवाचक सर्वनामास एकवचन, द्विवचन व अनेकवचनी रूपें आढळतात व परसंग्राहक व व्यावर्तक रूपें असतात.

पाप्युअन--न्यू गिनी व आसपासचीं बेटें यांतील भाषांचें अजून वर्गीकरण करण्याइतकें ज्ञान झालें नाहीं. या भाषासंबंधीं निरनिराळ्या संशोधकांनीं निरनिराळी व परस्परविरुद्ध माहिती दिलेली आढळते. न्यू गिनी बेटांतील कांहीं बोली मलाया

पॉलिनेशियन स्वरूपाच्या असाव्यात. परंतु पॉप्युअन या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या भाषांचा मलाया पॉलिनेशियन अथवा ऑस्ट्रेलियन लोकांच्या भाषेशीं संबंध दिसत नाहीं. यांतील कांहीं भाषा अत्यंत लहान क्षेत्रांत म्हणजे थोड्याशा चौरस मैलांतच बावरत आहेत. पी. डब्ल्यू. श्मिट यानें यांतील ध्वनिविशेष व व्याकरणविशेषांवरून त्यांचें वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु त्यास त्यानें केवळ तात्पुरतें असें म्हटलें आहे.

आस्ट्रेलियन देश्य भाषा--ऑस्ट्रेलिया खंडामध्यें प्रचलित असलेल्या निरनिराळ्या भाषांचा परस्परसंबंध अद्यापि निश्चित झाला नाहीं. ऑस्ट्रेलियांतील साठ लक्ष लोकसंख्येमध्यें फक्त साठ हजार देश्य लोक आहेत. व त्यांचीहि संख्या हळू हळू कमी होत चालली आहे. या भाषा मृत होण्याच्या पूर्वी त्यांचा शास्त्रीय पद्धतीनें अभ्यास होणें फार अगत्याचें आहे. त्यांच्यासंबंधीं जी तुटपुंजी माहिती मिळते तीवरून या सर्व भाषांचें मूळ स्वरूप पूर्वी एकच असून त्या परस्परांमध्यें निकट संबंध असावा असें दिसतें. श्मिट यानें त्यांचे उत्तर व दक्षिण असे दोन संघ पाडले आहेत. त्यांतील दक्षिण संघांतील भाषांत कांहींसें साम्य आढळतें.

टॅस्मॅनियन--ही एक स्वतंत्र भाषा असून ती टॅस्मानिया बेटावर प्रचलित होती. परंतु आतां ती नष्ट झाली आहे.

अमेरिकन इंडियन भाषा--या वर्गामध्यें युरोपियन लोक येण्यापूर्वी उत्तर व दक्षिण अमेरिकेंत ज्या देश्य भाषा प्रचलित होत्या त्यांस घालण्यांत येतें. कोलंबसाच्या आगमनाच्या वेळीं अमेरिकन लोकांची अधिकांत अधिक लोकसंख्या चार-साडेचार कोटी असावी असें पी. रिवेट यानें अनुमान केलें आहे. त्यांपैकीं सुमारें पंधरा लाख मेक्सिकोच्या उत्तरेकडील भागांत असावे व त्या विस्तीर्ण प्रदेशांत ते दूरवर तुरळक तुरळक पसरलेले असावे. व त्यामुळें त्यांच्यामध्यें भाषाविषयक फरक अतिशय पडले असावे. सांप्रत उत्तरअमेरिकेमध्यें सुमारें पांच लक्ष इंडियन लोक आहेत तर मध्यअमेरिकेंत ६५ लक्ष व दक्षिण अमेरिकेंत ८५ लक्ष इंडियन लोक आढळतात. हे आंकडे अंदाजानें खरे मानले तर त्यांची लोकसंख्या पूर्वीच्या मानानें एकतृतीयांश पर्यंत घटली आहे. मानववंशशास्त्रदृष्ट्या विचार केला असतां अमेरिकन इंडियन लोकांची पूर्वी एक मूळ भाषा असून तिच्या पासून सध्यांच्या अनेक बोली निघाल्या असल्या पाहिजेत. परंतु भाषाशास्त्रदृष्ट्या तसा पुरावा आढळत नाहीं. या लोकांमध्यें मध्य अमेरिकेंतील कांहीं थोडे समाज सोडले तर लेखनकला कधींच प्रचलित नव्हती. यांनीं दगडावर, अस्थींवर किंवा लांकडावर वगैरे काढलेलीं जीं निरनिराळीं चित्रें आढळतात त्यांचा अर्थ फक्त त्या त्या जमातींतील लोकांसच कळत असला पाहिजे. परंतु भाषाशास्त्रदृष्ट्या त्यांचा फारसा उपयोग होत नाहीं. खरी लेखनपद्धति फक्त अझ्टेक व त्यांच्या आसपासच्या कांहीं जमाती आणि मध्यअमेरिकेंतील मय लोकांत आढळते. यांतील बरेचसे लेख शाबूत असून नवीन नवीन उपलब्ध होत आहेत. परंतु त्यांचाहि उपयोग मर्यादितच होतो. अझ्टेक लोक एका चित्रलिपींत हरणाच्या कातडयावर किंवा बुरणुपावर लिहीत असत व कांहीं ठिकाणीं त्यांचें स्पॅनिश भाषेंत किंवा रोमन लिपींत रूपांतर केलेलेंहि आढळतें. तथापि या लेखाचा अर्थ निश्चितपणें लावतां येत नाहीं. मय लोकांतहि चित्रलिपीच प्रचारांत असून त्याचे लेख स्मारकांवर आढळतात. या लिपीचा अद्यापि पूर्णपणें उलगडा झाला नाहीं. तथापि संख्यावाचक शब्द व दिवस आणि महिने यांचीं नावें व त्यांची कालगणनापद्धति माहीत झाली आहे, याखेरीज मिशनरी व संशोधकांनीं जमविलेल्या कांहीं शब्दांच्या याद्या व अगदीं अलीकडे लिहिलेले लेख व वनविलेलीं कांहीं व्याकरणें आज पहावयास सांपडतात. सांप्रतच्या या अमेरिकन बोलींच्या स्वरूपांत इतका भिन्नपणा आढळतो कीं, त्यांमध्यें वांशिक संबंध जोडणें अशक्य नसलें तरी अतिशय कठिण काम आहे. याच्या अभ्यासाची सामुग्री म्हणजे केवळ कांहीं शब्द एवढीच असल्यामुळें व त्यांचें स्वरूप अथवा ध्वनि किंवा उच्चारपद्धतिविषयक कोणतेंहि साम्य या निरनिराळ्या भाषांत दाखविण्यांत येत नसल्यामुळें त्यांचें तौलनिक व्याकरण करण्याचा अद्याप कोणीहि प्रयत्न केला नाहीं. या सर्वच बोलींत अंतर्ग्राहकता अथवा समावेशकत्व आढळत नाहीं. उदा. मय भाषेची रचना अतिशय साधी आहे. हिचें स्वरूप संयोजक नसून पृथक्करणात्मक आहे. यांतील बहुतेक मूळ शब्द अथवा धातु एकाक्षरी किंवा द्व्यक्षरी आहेत व त्यांची वाक्यरचनापद्धति इंग्रजी पद्धतीप्रमाणें आहे असें ब्रिटन यानें दाखविलें आहे. तसेंच या निरनिराळ्या भाषांतील परस्परसंबंध दाखविणाऱ्या कांहीं दुय्याच्या स्वरूपाच्या बोली अजीबात नष्ट झाल्या आहेत व कांहीं झपाटयानें नष्ट होत आहेत. यामुळें ज्यांचा एकमेकांशीं कांहीं संबंध लागत नाहीं अशा बोलींची संख्या बरीच मोठी आहे. रिवेटच्या गणतीप्रमाणें ती १२३ आहे. एकटया उत्तर अमेरिकेंत त्यांची संख्या उहलेनबेक यानें ५४, तर रिवेट यानें २६ दिली आहे. यांत एस्किमो भाषेचा अंतर्भाव करितात परंतु ती फिनोउग्रिक किंवा उरलियन भाषेशीं संबद्ध असावी असें मानतात. रेडिन यानें उत्तर अमेरिकेंतील भाषांचे तीन कुळींमध्यें वर्गीकरण केलें आहे. परंतु त्यास एक केवळ धाष्टर्याचा प्रयत्न असें मानतात. तथापि अर्वाचीन अभ्यासकांनीं तौलनिक पद्धतीनें पूर्वी ज्या भाषांस स्वतंत्र मानीत असत त्यांना एका वर्गांत आणण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. नादेनेसंघ यामध्यें अटलांटिक किनाऱ्यापासून उत्तर मेक्सिकोपर्यंत आणि पॅसिफिक किनाऱ्यापासून हडसन उपसागरापर्यंतच्या सर्व भाषांचा समावेश होतो. याच्या अथापासून, हैदा आणि त्लिन्गित या

तीन शाखा आहेत. दुसरा युटो अझ्टेक संघ. यामध्यें शोशोनियन पायमासोनोरन आणि नहुआतल या तीन शाखा येतात. या उत्तर व मध्य अमेरिकेमध्यें विस्तीर्ण प्रदेशावर पसरल्या आहेत. कधीं कधीं यांतील एखाद्या बोलीस महत्त्व प्राप्त होऊन तिचें आजूबाजूच्या बोलींवर वर्चस्व स्थापन होत असे व त्याचें स्थान ती घेत असे. अशा तऱ्हेनें केचुअन अथवा ग्वारानि ही दक्षिण अमेरिकेतील कोलंबसापूर्वीची थोडाफार संस्कार पावलेली भाषा होती. ही इंका साम्राज्याची राजभाषा असून स्पॅनिश लोकांच्या कारकीर्दीत ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं तिचा धर्मप्रसाराच्या कार्मी उपयोग केल्यामुळें तिचें क्षेत्र अधिकच वाढत गेलें. हीच गोष्ट टुपिग्वारानी नांवाच्या दुसऱ्या एका भाषाकुलाची आढळते. १६ व्या शतकाच्या आरंभीं ही भाषा पॅराग्वे व त्याभोंवताल च्या प्रदेशांत रूढ होती. परंतु ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं आपल्या प्रचाराकरितां तिचा उपयोग केल्यामुळें सर्व ब्राझिल देशामध्यें स्थानिक भाषेबरोबरच तिचा स्वीकार सर्व लोकांनीं करून बहुतेक लोक द्वैभाषिक बनले. अशा तऱ्हेचे एक विचित्र उदाहरण अँटिलिस या बेटांत आढळतें. या ठिकाणीं पूर्वी दक्षिण अमेरिकेतील अरावाकन जातीचे लोक रहात असत परतु कांहीं काळानें कॅरिब नांवाच्या दुसऱ्या एका टोळीनें हें बेट जिंकून आरावाकी लोकांस घालवून दिलें किंवा मारून टाकलें परंतु त्यांच्या बायकांस जिवत ठेवून त्यांच्यांशीं लग्नें लावलीं. त्यामुळें तेथील स्त्रिया आरावाकी भाषा बोलत तर पुरुष कॅरिब भाषा बोलत. व मुलांस जरी दोन्ही भाषा येत असत तथापि आरावाकी ही स्त्रियांची भाषा व कॅरिब ही पुरुषांची भाषा म्हणून दीर्घकालपर्यंत अस्तित्वांत राहिली व अद्यापहि ही स्थिति पूर्णपणें नष्ट झाली नाहीं त्यांतल्यात्यात आरावाकी भाषेचेच विशेष कॅरिब भाषेनें उचलले आहेत यावरून स्त्रियांच्या भाषेचा परिणाम पुरुषांच्या भाषेवर अधिक झाला ही गोष्ट स्पष्ट होते. उत्तर अमेरिकेतील महत्त्वाच्या इंडियन भाषा म्हटल्या म्हणजे एस्किमो, अल्गोंकियन, होकन, इरॉक्विअन, नादेने, पेनुशियन, सिओवन, युटो अझ्टेक ह्या होत.

आफ्रिकेतील नीग्रो भाषा--अमेरिकेच्या उलट आफ्रिकेतील भाषा अधिक एकस्वरूपी आढळतात. उत्तरेकडील प्रदेशांत प्रचलित असलेल्या हॅमिटो सेमिटिक भाषा सोडून दिल्या व हॉटेंटॉट, बुशमेन, आणि पिग्मीज या दक्षिणेतील भाषा वगळल्या तर बाकी राहणाऱ्या विस्तीर्ण प्रदेशामध्यें या निरनिराळ्या बोली आढळतात. त्यातील निकट संबंध स्पष्ट दिसून येतो. जरी आज सुदानी भाषांत बांटु भाषेपेक्षां अधिक वैचित्र्य आढळतें तथापि मॉरिस दला फॉसे याच्या मतानें त्या सर्वांत इतक्या महत्त्वाचीं साम्यें आढळतात कीं त्या मूळच्या एका आफ्रिकन नीग्रो भाषेपासून निघाल्या असाव्या असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु पी. ड्रल्य. श्मिट ही गोष्ट मान्य करीत नाहीं अमेरिकेतील इंडियन लोकांपेक्षां आफ्रिकन लोकांची वस्ती अधिक दाट आहे. कदाचित हॉटेंटॉट, बुशमेन व नेग्रिलो या लोकांमध्यें प्रचलित असणाऱ्या भाषा ह्या मूळच्या भाषेचे थोडेसें प्राथमिक रूप असन सुदानी व बांटु या तिच थोडेसें अर्वाचीन स्वरूप दर्शवीत असतील या भाषांचे क्षेत्र व स्वरूप गेल्या ४।५ शतकांत कायम राहिलें आहे एवढेंच नव्हे तर त्याच्या शब्दातहि फारसा बदल झालला नाहीं--ही गोष्ट महत्त्वाची आहे. पॅलिआ--आफ्रिकन भाषांमध्यें हॉटेंटॉट ही अधिक परिचित आहे. तिचा बुशमेन भाषेशीं निकटचा संबंध दिसतो बुशमेन भाषत मूळच्या भाषेचें स्वरूप अधिक स्पष्ट दिसतें तर हॉटेंटॉट भाषेवर हॅमिटिक भाषाचा काहींसा परिणाम झालेला असावा. हॉटेंटॉट लोकांनीं पूर्वी फार मोठा प्रदेश व्यापला असून एका काळीं ते झेमाइट लोकांचे शेजारी असावे. हॅमिटिक भाषेचा परिणाम आफ्रिकन नीग्रो लोकांवर फार प्राचीन काळापासून झाला असावा. नाईल नदीच्या वरच्या भागापासून कॅमेरून पर्वतच्या प्रदेशात असणाऱ्या नीग्रो लोकांच्या बोलींबद्दल फारच थोडी माहिती उपलब्ध आहे हे खुद्द लोक अतिशय मंद बुद्धीचे असून बहुतेक आपल्या शेजाऱ्याच्या नीग्रो भाषा बोलतात. परंतु मधूनच ते जे काहीं नीग्रोशब्द वापरतात त्यांच्या उच्चारावरून त्यांची हॉटेंटॉट व बुशमेन भाषांशी संबद्ध अशी एखादी स्वतःची भाषा असावीसें वाटतें. हॉटेंटॉट भाषांपकीं बहुतेक सर्व शब्द एकाक्षरी असतात. या भाषांत प्रथमपुरुषी द्विवचन व बहुवचन असून पर संग्राहक व व्यावर्तक सर्वनामें आहेत. व त्यातील क्रियापदें अनेक तऱ्हेनें व करणरूपी व अकरणरूपी निरनिराळीं चालतात. ह्या सर्वांना नीग्रो भाषा असें सामान्य नाव असलें तरी त्याचें वर्गीकरण करण्याचे काहीं प्रयत्न झाले आहेत. यामध्यें मुख्यतः दोन शाखा आहेत. बांटु शाखा ही भूमध्यरषेच्या दक्षिणेकडे प्रचलित असून तीमध्यें अनेक थोडा फार फरक असलेल्या परंतु सामान्यतः एकाच स्वरूपाच्या बोली आहेत सुदानी शाखा ही भूमध्यरषेच्या उत्तरेस असून हॅमिटो--सेमिटिक भाषांच्या दक्षिणेस आहे. या शाखत परस्परापासुन अनेक बाबतींत भिन्न परंतु स्वतः एकस्वरूपी असे अनेक लहान लहान संघ आहेत. परंतु त्यांतील मर्यादरेषा स्पष्ट काढतां येत नाहींत. त्यांमध्यें काहींत अरबी तर कांहींत हॅमटिक विशेषाचें मिश्रण झालेलें आहे. कांहीं अर्धवट बांटु स्वरूपाच्या भाषा कांगाचा उत्तर भाग, गाबून, कामेरून, सुदान आणि अटलांटिक किनारा या प्रदेशांत आढळतात. यांचा कांहीं लोक पश्चिम आफ्रिकन म्हणून स्वतंत्र संघ मानतात. या भाषांचें स्वरूप अगदीं साधें दिसतें ही गोष्ट कदाचित परकीय भाषांशीं संबंध आल्यामुळे झाली असावी. ह्या मुख्य वर्गाच्यापुढें या भाषाचे वर्गीकरण करणें अतिशय कठिण आहे कारण द ला फॉसे यानें उल्लेखिलेल्या सुमारें ४३५ सुदानी भाषापैकीं फक्त ५।६ च लेखनिविष्ट आढळतात. त्या म्हटल्या म्हणजे (१) वाइ(नायगेरो सेनेगॉली संघ)--

हिची देवय अक्षरी लेखनपद्धति आहे. (२) मोम अथवा बामन (नायगेरो कामेरून संघ)–हिची प्रथम कल्पनाचित्रलिपी होती परंतु सध्यां ध्वनिलेखनपद्धति आहे. (३) कानुरी (नीलो चॅडियन संघ). (४) हौसा (नायगेरो चॅडियन संघ). (५) पेउल (सेनेगॅलो गिनियन संघ),–ही अरबी लिपीमध्यें लिहितात आणि (६) न्यूबियन (नीलो चॅडियन संघ) ही पूर्वी कॉप्टिक लिपींत ४ ते ७ व्या शतकापर्यंत लिहीत परंतु अलीकडे मेमिटिक पद्धतीचीं अक्षरें वापरतात. पेऊल व हौसा या भाषांत बरेंच लिखाण आढळतें. परंतु इतर ४२९ भाषामध्यें मुळींच लेख नसल्यामुळें वरील लेखांचा वर्गीकरण करण्याच्या कामीं कांहीं एक उपयोग होत नाहीं. या इतर भाषांतील कांहीं शब्द, धार्मिक लेख व भाषांतरें मिशनरी व प्रवासी लोकांनीं मिळविलीं आहेत. परंतु तीं अनभ्यासी लोकांनीं लिहिलीं असल्यामुळें त्यांचा शास्त्रीय बाबतींत पुराव्यादाखलतितका उपयोग होत नाहीं. अलीकडे आफ्रिकन नीग्रो भाषांचा अभ्यास सुरू झाला असून कांहीं विश्वासार्ह व्याकरणें तयार होऊ लागलीं आहत सध्यां तरी या भाषांचें केवळ प्रादेशिक वर्गीकरण करणेंच जरूर आहे. सुदानी व बांटु भाषांतील कांहीं विशेष महत्त्व गोष्टी पुढें दिल्या आहेंत बहुधा नामांचे त्यांनीं निर्दिष्ट होणाऱ्या वस्तुवरून गट करण्यांत येतात. या नामाचे गट दाखविणारीं ध्वनिविषयक चिन्हें उपसर्ग किंवा प्रत्ययस्वरूपाचीं असतात. कांहीं भाषांत हें वर्गीकरण सर्वांस रूढ आहे तर कांहींमध्यें तें अल्प प्रमाणांत असून कांहींत अजीबात नष्ट झाल आहे. ज्या भाषांत असें नामांचें वर्गीकरण केलेलें नसतें त्यामध्यें नाम व क्रियापद यांमध्यें कांहींच फरक नसतो. व ही गोष्ट शब्दाच्या स्थानांवरून निश्चित करावी लागते. या भाषांतील मूळ शब्द व प्रत्यय यांमध्यें सर्वत्र एकवाक्यता आढळते व तसेंच यामध्यें स्वरूपविशेषांतहि बरेचसें साम्य आढळतें. दला फांसे यानें सुदानी संघांतील ४३५ भाषांच्या १६ शाखा पाडल्या आहेत. या भाषांत अधिक वैचित्र्य असल्यामुळें त्यांचें वर्गीकरण करणें शक्य नाहीं. परंतु बांटु संघांतील भाषांत इतक साद्दश्य आढळतें कीं, त्यांच्या शाखा पाडणें कठिण आहे बांटु या शब्दाचा अर्थ मनुष्यप्राणी असा आहे. यांतील मूळ शब्द 'न्तु' असा असून त्यास 'ब' हा जिवंत प्राणिवाचक उपसर्ग जोडण्यांत आला आहे. मुन्तु याचा अर्थ एक मनुष्यप्राणी असा होतो तर किन्तु याचा अर्थ वस्त असा होतो. या भाषांस बांटु हें नांव देण्याचें कारण हा शब्द बहुतेक सर्व भाषांत आढळतो हें होय. झांझिबार व त्याच्या लगतच्या किनाऱ्यावर प्रचलित असलेली स्वाहिली भाषा अरबी लिपीमध्यें लिहितात. याखेरीज इतर लिखाण रोमन लिपींत लिहिलेलें आढळतें. पूर्वीच्या अरब लोकांनी उल्लेखिलेले कांहीं शब्द सोडल्यास मध्ययुगापासून या भाषांची माहिती युरोपियन मिशनरी व प्रवासी यांच्या लेखावरूनच मिळते. बांटु भाषेनें हॉटेंटॉट व पिग्मी लोकांच्या भाषांवर वचस्व मिळवून त्यांचे स्थान पटकाविलें असावें. परंतु तीवर इंग्रजी व डच भाषांचा बराच परिणाम झाला आहे. बांटु भाषेंतील ध्वनि नादबद्ध आढळतात. बहुतेक शब्द स्वरांत असून अक्षरांचा संयोग शिथिल असतो. त्यामुळें या भाषेंत व्यंजनें कमी असून जोडाक्षरें फारशीं आढळत नाहींत. परकीय भाषेंतील घेतलेल्या शब्दावरहि ही क्रिया होतेच त्यामुळें क्लिस्टस याचें किरिस्ती असें रूपांतर होतें.

आफ्रिकेतील युरोपियन लोकांच्या व्यापारामुळें अनेक मिश्र स्वरूपाच्य व्यापारी भाषा अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावर तयार झाल्या आहेत. त्यांतील मुख्य नीग्रो पोर्तुगीझ, नीग्रो इंग्रजी नीग्रो फ्रेंच असून यांमध्यें शब्द युरोपियन भाषांतील पण व्याकरणपद्धति नीग्रो भाषाची असा प्रकार आढळतो. तसेंच आफ्रिकेतील हौसा नावाची बोली नायगर नदीपासून लेक चॅडपर्यंतच्या विस्तीर्ण प्रदेशापर्यंत पसरली आहे. या भाषेचा हॅमिटिक, सुदानी व बांटु या भाषांशीं काय संबंध आहे या संबंधीं बराच वादविवाद झालेला आहे. अरबी भाषा सोडल्यास हौसा भाषेचा प्रसार आफ्रिकेतील बऱ्याच मोठ्या प्रदेशावर झालेला आहे. व्यापारी बोली म्हणून हिचा पश्चिम व मध्य सुदानपासून भूमध्यसमुद्रांतील बंदरापर्यंत प्रचार आहे.

सदर्भग्रंथ—प्रस्तुत निबंध लिहिण्याच्या कामीं अनेक ग्रंथांचा उपयोग करण्यांत आला आहे त्यांतल्यात्यांत पुढें दिलेल्या ग्रंथांचा विशेष उपयोग झाला असून त्या ग्रंथकर्त्यांचे आम्ही आभारी आहों. विशेषतः प्रि. राजवाडे यांनीं भांडारकर इन्स्टिट्यूटकरितां संपादन करीत असलेल्या निरुक्ताची अमुद्रित प्रस्तावना आम्हांस पहावयास दिली याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले पाहिजेत.

१ निरुक्त–(१) Dr. Laxman Sarmp. (२) वै. का. राजवाडे (अमुद्रित).

२ Language–Otto Jesperson.

३ Language & Languages–Willem L. Graff. या पुस्तकांत सहाशेंच्यावर भाषाविषयक ग्रंथांची व इतर लेखांची फार उपयुक्त यादी दिली आहे.

४ Historical Study of the Mother Tongue–H C. Wyld.

५ Census Report–India–1931.

६ A comperative grmmer of Dravidian Languages–R. Caldwell.


७ मराठी भाषा उद्गम व विकास––रा. कृ. पां. कुळकर्णी. याखेरीज वेदसंहिता, ब्राह्मणें, शिक्षा, प्रतिशाख्यें, वैशेषिकसूत्रें, न्यायसूत्रें, पातंजल महाभाष्य वगैरेंचा उपयोगहि केला आहे. कांहीं ग्रंथाचा नामनिर्देश निबंधांतच केला आहे.

यशवंत रामकृष्ण दाते

परिशिष्ट

१ आर्यन् अथवा इंडो-युरोपियन भाषावंश

जगांतील सर्वांत महत्त्वाचा जो आर्यन् अथवा इंडोयुरोपीय भाषावंश त्याचा विस्तार पुढें दिला आहे. बाकीच्या वंशांचा विस्तार एवढा व्यापक व महत्त्वाचा नसल्यामुळें त्यांचें वर्णन मूळांत दिलें आहे तें येथें वृक्षरूपानें दाखविलें नाहीं.



२ जगांतील मोठ्या भाषा.

नांव	लोकसंख्या	नांव	लोकसंख्या
चिनी	४० कोटी	स्पॅनिश	७ ,,
इंग्रजी	२० ,,	जपानी	६॥ ,,
रशियन	१४ ,,	पोर्तुगीज	६ ,,
पश्चिम हिंदी	१० ,,	इटालियन	५ ,,
जर्मन	८ ,,	बंगाली	५ ,,
फ्रेंच	७ ,,	मराठी	२ ,,

३ हिंदुस्थानांतील प्रचलित भाषांचें वंशवार वर्गीकरण.

भाषा	लोकसंख्या	भाषा	लोकसंख्या
अ-हिंदुस्थानांतील देश्य भाषा	**३४,९८,८७,५२७**	**आ-आशिया व आफ्रिका यांतील देश्य भाषा**	**३,०२,३२४**
ऑस्ट्रिक भाषावंश	५३,४२,७०८	इंडो-युरोपियन वंश (आर्यन् पोटवंश)	३९,२२४
ऑस्ट्रोनेशियन पोटवंश	६,५४२	तिबेटो-चिनी वंश (तई-चिनी पोटवंश)	१,८५,८२२
ऑस्ट्रो आशियाटिक ,,	५३,३६,१६६	सेमिटिक वंश	५९,९५४
तिबेटो-चिनी भाषावंश	१,८०,१०,४९६	हॅमिटिक वंश	५,०३९
तिबेटो-ब्रह्मी पोटवंश	१,२९,८२,८४०	मोंगोलियन वंश	११,९४३
तई-चिनी पोटवंश	१०,२७,६५६	मलायो-पालिनेशियन वंश	३४२
करेण भाषावंश	१३,८१,३३१		
मान भाषावंश	९४७	**इ-युरोपियन भाषा**	**३,३९,७०६**
द्राविडी भाषावंश	७,७६,४४,७८७	इंडो-युरोपियन वंश	३,३९,६६०
इंडो-युरोपीय भाषावंश	२५,७४,९२,८०५	मंगोलियन वंश	१३
अवर्गीकृत भाषा	५४,४५३	युरोपियन भाषा (अनिर्दिष्ट)	३३

४ हिंदुस्थानांतील प्रचलित देश्य भाषा व बोलणारांची लोक संख्या.

भाषा	लोकसंख्या	भाषा	लोकसंख्या
हिंदुस्थानांतील देश्य भाषा	**३४,९८,८७,५२७**	वा	२२,१४२
ऑस्ट्रिक वंश--	**५३,४२,७०८**	दानाव	१,१५९
(अ) ऑस्ट्रोनेशियन पोटवंश,		खामुक	१९१
इंडोनेशियन शाखा, मलाया वर्ग	**६,५४२**	यांग	३,१५१
मलायी	४,६३४	यांगलाम	१०,७२५
सालोन	१,९०८	पलौंग आणि पले	१,३९,६४४
(आ) ऑस्ट्रोआशियाटिक पोटवंश-	**५३,३६,१६६**	खासी वर्ग-खासी	२,३४,३८७
मॉन्ख्मेर शाखा	**७,२६,५७८**	निकोबार वर्ग-निकोबारी	९,८८५
मॉनवर्ग-तलैंग	३,०५,२९४	**मुंडाशाखा**	**४६,०९,५८८**
पलौंग-वा वर्ग	१,७७,०१२	खेरवारी (संताळी, मन्दारी, हो वर्गरे)	४०,३१,९७०

भाषा	लोकसंख्या
कोकं	१,६९,७२८
खारिया	१,५२,०१८
ज्वांग	१४,५८३
सावारा	१,९४,९४७
गादाबा	४४,३७१
मुंडा (अनिर्दिष्ट)	१,९७१
(अ) तिबेटो-चिनी वंश—	**१,४०,१०,४९६**
तिबेटो-ब्रह्मी पोटवंश--	**१,२९,८२,८४०**
तिबेटो-हिमालय शाखा	**४,६८,४२९**
तिबेटी वर्ग	२,५२,०६३
भोतिया (तिबेटी)	९,७९९
भोतिया (बाल्टी)	१,३७,९१४
भोतिया (लडखी)	४१,४४४
भोतिया (शार्पा)	११,६७७
भोतिया (भूतान)	२,८१९
भोतिया (सिक्कीम)	११,१०८
भोतिया (इतर)	३७,३०२
सार्वनामिक हिमालयन वर्ग	१,१३,९५२
कनौरी	२६,१२२
कानाशी	३४८
किरांती	८७,४८२
असार्वनामिक हिमालयन वर्ग	१,०२,४८४
गुरुंग	३,६०९
मुरुमी	४२,६७३
सुंवार	३,४३३
मागारी	१७,४७८
नेवारी	९,७६६
रोंग अथवा लेपचा	२५,१५१
कामी	१७५
मांझी	२९९
उत्तर आसाम शाखा	**१७,८४३**
अका	३३
अबोर	१३,८८०
दाफला	१,६४४
मिश्मि	२,२८६
ब्रह्मीशाखा	
आसामी ब्रम्ही शाखा	**१,२४,७८,६११**
बोडो वर्ग	९,११,२१०
गारो	२,३०,६७४
राभा	२७,००८
चुटिया	४,३१७
कूच	९,५५२
बाराबोडो (कचारी)	२,९१,३७६
दिमासा (कचारी)	१४,६८०
लालुंग	९,०१७
टिपरा (मृंग)	१,९८,१२९
मिकिर	१,२६,४५७
नागा वर्ग	३,४९,१११
नागाबोडो पोटवर्ग	४०,८६४
काचानागा	७,२८२
काबुई	१८,४७५
इतर	१५,१०७
पश्चिम नागा पोटवर्ग	९३,३६९
अंगामी	४३,६६६
केझामा	५,२८८
सेमा	३८,१४६
रेंग्मा	६,२६९
मध्यनागा पोटवर्ग	५५,७३३
आओ	३३,११७
लोहटा	१८,२५४
संग्तम	४,३६२
पूर्वनागा पोटवर्ग	१,०२,८१५
कोन्याक	९,४७८
रंगपंग	११,०७२
इतर पूर्व-नागाभाषा	८२,२६५
नागाकुकी पोटवर्ग	४८,४२९
मेमी (माओ)	२१,२८७
तंगखुल	२७,१४२
इतर अनिर्दिष्ट नागा भाषा	७,९०१
कुकी-चीनवर्ग	९,७२,८८६
मारिंग	४,२५१
काथे(पौआ) मेइथि (मणिपुरी धरून)	३,९१,९०३
जुनीकुकी पोटवर्ग	५३,२६१
ऐमोल	५११
अनाल	३,३१४
चिरु	१,२६९
हलाम	१०,८६७
कोल्रेंग (कोंइरेंग)	५२१

भाषा	लोकसंख्या
कोम	२,६६२
म्हार	२१,५८३
रंगखोल	१,७४५
इतर	१०,७८९
उत्तरचिन पोटवर्ग	१,२८,८०८
पैते	१४,६७४
राल्ते	१६,१६३
सियीन	३,५०६
सोक्ते	३७,६४३
थादो	५६,८२२
मध्यचिन पोटवर्ग	१,२७,३०९
बांजोगी	८१०
लई	३९,६४६
लाखेर	६,२५०
लुशेइ	६०,४७१
पांखु	८३
ताशोन	२०,०४९
दक्षिणचिन पोटवर्ग	६६,२८८
चिबोक	२०,१९५
चिबोन (शो)	१०,२६८
खयांग (कुमि)	२,८२५
खामी	३२,९९१
यिंदू	९
अवर्गीकृत चिनभाषा पोटवर्ग	६९,९९८
आनू	३
च्वाम्प्यी	३२
कौकादन	२९४
लावतु	९,७०५
लेंदू	१,७१९
मतु	१५४
न्योर्न	५,८०८
रोंगतु	१३,५४८
सैंगबोंग	८०३१
शेन्तांग	७,३२४
सित्तु	४,२८२
तमान	९,२२८
यो	१,३६५
योतुन	८,९८५
इतर चिन पोटवर्ग–	१,२१,१३६
इतर कुकी पोटवर्ग–	९,९३५
काचीन वर्ग-काचीन	५,५६,९८०

भाषा	लोकसंख्या
ब्रह्मी वर्ग–	९९,६०,३९४
ब्रह्मी	८८,५३,५३८
आराकानी	३,०८,५४४
तौंग्यो	२२,२६१
इंथा	५६,८२९
दानू	६०,९६६
मारू	१७,४४७
ताबोयान	१,५९,१७४
चौंग्था	३४,६२६
मैंग्था	४८७
अत्सी	५,२९५
याव	८७७
मेरगुमी	१,०१,१४४
यांब्ये	३,२६,६४२
लाशी	१२,५६४
लोलोसुह्शो वर्ग	९३,७३१
लाहु	२६,८६४
लिसाव	१९,६९८
हूपून	६७९
नुंग	१०१
क्वी	३,८३९
अखा	४०,४०७
अको	१,३४३
प्यिन	८००
साक (लुइ) वर्ग	३४,२९९
कदु	२०,३०५
गानान	७,१४४
साक	६९१
देंगेत	६,१५९
म्रोवर्ग–म्रो	१७,८८७
(आ) तईचिनी पोटवंश	
तइ शाखा-तइ वर्ग	**१०,२७,६५६**
लाओ	७,१६३
लु	३०,०३१
खून	३१,२३४
दाये	६९८
खामती	४,२९५
शांगाले	९,१४,३८९
शानतयोक	१८,२७०
शानबामा	७,७३५
शान (अनिर्दिष्ट)	४,५०३

भाषा	लोकसंख्या
सयामी	८,६४८
करेण भाषावंश–करेण वर्ग	**१३,४१,३३१**
मोन्नेप्वा	२,१२६
ब्वे	६,२२७
करेन्ब्यू	१५,२९९
ब्रेक	६,६९५
स्गाव	४,९९,७८९
पाकू	८,६२२
प्वो	४,७३,७२२
तौंग्थू	२,२२,७१४
पदौंग	२६,४८५
थिंबा	२,९२२
घेको	४,०७५
करेन्नी	३१,५५६
झायिन	३,७३७
करेण (अनिर्दिष्ट)	४७,३६२
मानवंश--	**९,४७**
मानवर्ग	९४७
मियाओ	८३०
याओ	११७
द्राविडवंश--	**७,१६,४४,७८७**
द्राविड वर्ग	८,१८,५८,५९३
तामिळ	२,०८,११,६५२
मल्याळी	९१,३७,६१५
कानडी	१,१२,०६,३८०
कोडगू (कुर्ग)	८५,३६८
तुळु	६,५१,८४२
तोडा	६००
कोटा	१,१३६
मध्यमवर्ग	३६,०९,४१८
कुरुक किंवा ओराओन	१०,३७,१४२
माल्तो	७०,७६१
गोर्डी	८,६४,८७८
कंधी किंवा कुई	५,८५,१०९
कोलमी	२९,१८७
इतर (कोंडा)	२२,३४१
आन्ध्र वर्ग–तेलगु	२,६३,७३,७२७
वायव्य भाषा–ब्राहुई	२,०७,०४९
इंडो-युरोपियनवंश--	
आर्यन पोटवंश	**२५,७४,९२,८०५**
इराणीशाखा पूर्ववर्ग	**२२,७०,४६६**
पुश्तु	१६,३६,४९०
बलुची	६,२८,०८६

भाषा	लोकसंख्या
फारसी	५,२८२
इतर इराणी भाषा	६०८
दार्दिकशाखा	**१५,२२,९३६**
खोवारवर्ग (खोवार, चित्रळी उर्फ अर्णिय्)	६,९५६
दर्देवर्ग	१५,०९,७४१
शिना	६८,१९९
काश्मिरी	१४,३८,०२१
कोहिस्तानी	३,५२१
काफिर वर्ग	६,२३९
बाशगली	७
इतर काफिर भाषा	६,२३२
इंडो आर्यन शाखा	**२५,३६,९९,४०३**
बाह्यपोटशाखा–संस्कृत पोटशाखा–संस्कृत वर्ग	**१,१८१**
बाह्य पोटशाखा	**१२,८५,२१,९४१**
वायव्यवर्ग	१,२५,७२,१९८
लहन्दा उर्फ पश्चिम पंजाबी	८५,६९,०५१
सिंधी	४०,०६,१४७
दक्षिणवर्ग	२,१३,६१,३९३
मराठी	२,०८,८९,६५८
कोंकणी	४,७१,७३५
पूर्व वर्ग	९,४५,८८,३५०
उरिया	१,११,९४,२८५
बिहारी	२,७९,२६,५५९
बंगाली	५,३४,६८,४६९
आसामी	१९,९९,०५७
मध्यवर्ग पूर्वहिंदी	७८,६७,१०३
आंतर पोटशाखा	**११,७३,०९,१७८**
मध्यवर्ग	११,४५,५६,७४६
पश्चिम हिंदी	७,१५,४७,०७१
राजस्तानी	१,३८,९७,८९६
गुजराथी	१,०८,४९,९८४
भिल्ली	२११,८९,५३१
खानदेशी	२,३३,०१०
पंजाबी	१,५८,३९,२५४
पहाडीवर्ग	२७,५२,४३२
मध्यपहाडी	७,१७०
पूर्वपहाडी, खसकुरा अथवा नेपाळी	८,१२,९५१
पश्चिम पहाडी	२३,२५,९१६
पहाडी (अनिर्दिष्ट)	६,३९५
अवर्गीकृत भाषा--एकूण	**५४,४५३**
अन्दमानी	**४६६**
जिप्सी भाषा	**२५,९९९**
इतर	**१,९२१**

॥ श्री ॥

महाराष्ट्र शब्दकोश

विभाग दुसरा

ओ

ॐ—महानुभावी वाङ्मयांत व बाराव्या आणि तेराव्या शतकांतील जुन्या मराठी वाङ्मयांत ओ किंवा वो ऐवजीं ' ॐ ' हें अक्षर लिहिण्याचा प्रघात होता. ' देऊॐ आत्मसमर्पु । मी कामबाणीं विच्छिन्नु ॥ ' –ऋ ४६.

ओ—मराठी वर्णमालेंतील तेरावा स्वर अक्षरविकास–अशोकाच्या गिरनार लेखांत ओ आहे व पुढें १२ व्या शतकापर्यंत निरनिराळ्या आकाराचे ओ सांपडले आहेत. पण आज आपण लिहितों तसा (डोक्यावर मात्रा असणारा) ओ पूर्वी कोठेंहि आढळत नाहीं. पूर्वी पृष्ठमात्रा वापरीत.

ओ—उद्गा. हाक मारली असतां उच्चारावयाचा ध्वनि –स्त्री. १ हांकेस द्यावयाचें उत्तर. (क्रि० देणें) २ ओकारी होत असतां होणारा आवाज, ओकारी. वांती. (क्रि० येणें) ' ओ येईपर्यंत जेवला. ' [ध्व]

ओ—सनाभी. (साष्टी–कोळी) ती; वो. ' नाचत गेली ओ कांवी वनाला । ' –मसाप १.२.१९. सनाप –(खा) हा, तो ' पेन ओ टोगेहे एहें जाईन केडो दोवडी आलो नाहा ! ' =पण हा ठकवितो हें जाणून कोणी धांवून आलें नाहीं. –भि १४ ' खेरों आख्यो ते ओ अर्थ बरोबर होमजुतो नाहा ' =खरें म्हटलें तर हा अर्थ नीट समजत नाहीं. –भि ३१. [हिं बो] **ओ कां ठो**–कांहीं देखील. (याचा उपयोग नेहमीं अकरणरूपी होतो). (वाप्र.) ' ओ म्हणतां ठो येईना ' १ ' ओ चा ठो करतां न येणें ' =मुलाला धुळाक्षरें शिकविण्याच्या अगोदर ॐ नमःसिद्धं हें शिकवितात. ओ म्हणजे अर्थात् अगदीं पहिलें अक्षर, ते देखील येईना म्हणजे तो अगदीं अक्षरशत्रु आहे. ठो हें अक्षर केवळ ओबरोबर ध्वनिसादृश्यासाठीं योजिलें आहे. त्याला कांही अर्थ नाहीं. ' त्याला ओ का ठो देखील कळत नाहीं ' म्हणजे हें अक्षर ओ आहे कीं ठो आहे हें देखील त्याला समजत नाहीं. ' संस्कृतामध्यें ओ का ठो करतांयेत नसतांहि हिंदु धर्माविषयीं सव्वा सव्वा हात गप्पा ठोकणारे पाद्रीसाहेब कोणी पाहिले नाहीं ? ' –नि ८९. २ ओ म्हटल्यावर ठो–(ओ म्हटल्यावर ठो एकतो असा) दगड, शुद्ध सूर्ख. ३ ओ चे ठो. ओ कां ठो पहा.

वाचायला येण्याच्या नांवानें ओंचें ठो म्हटलें तरी चालेल. ' –पहोघे. **ओंच ओळखणें**–(तुच्छता ओ येत असणें) ज्याला एकच गोष्ट माहीत आहे, म्हणजे कोणताहि विषय अथवा वस्तु याच्या एकाच अंगाचें किंवा रीतीचें ज्याला ज्ञान आहे, त्याविषयीं निराळ्या रीतीचें विचारच ज्याच्या मनांत येत नाहींत अशा रेम्याडोक्या, महामूर्खाबद्दल योजतात. **ओंच्या नांवानें पूज्य, ओंच्या नांवानें शून्य काढतां येत नाहीं, ओंची गांड फाडतां येत नाहीं असा**–(ज्याला ओंचें शून्य (गांड)हि काढतां येत नाहीं असा), अक्षरशत्रु; मंदड असा माणूस. **ओ देणें** (**देवानें, कमानें, प्रारब्धानें**)–नशिबानें हात देणें; दैव उदयास येणें. **ओ देणें**–(चोरानीं, भुतांनीं, वाघानीं इ०)–मुळमुळाट होणें. पाळतीवर असणें; धांवून, चालून येणें (हाक मारल्याश्रमाणें–वाघ, भूत इ० नीं.) **ओ येईपर्यंत** (जेवणें, खाणें)–ओकारी येईपर्यंत जेवणें, खाणें.

ओईचणें—सक्रि. (कों.) सुपांत घेऊन विशिष्ट प्रकारें हलवून धान्यांतील कण्या, रव वगैरे काढणें. **०पाखडणें**–वेचणें पहा. [सं. आ+उद्–दाणे निवडणें]

ओइरणें—सक्रि (नगरी) तांदूळ आधणांत घालणें; धान्य दळावयाकरितां थोडयोडें जात्यांत घालणें. वैरणें, वैरणें पहा.

ओई—स्त्री. ओंवीचें ग्राम्य रूप. ओंवी पहा.

ओंऊळ—स्त्री. (कों.) बकुळीचें झाड. –न. बकुळीचें फूल. [सं बकुल, बोवल] **०दोडा**–पु. बकुळीचें फळ.

ओक—स्त्री. १ वांती; वमन; ओकारी; उलटी. २ कर्नाटकांतील कार्तिकस्वामीच्या देवस्थानाच्या शेजारीं सांपडणारा

खड्गसारखा एक पदार्थ (स्वामी पळून जात असतां पार्वती त्यांच्या मागें लागली तेव्हां त्यांनीं तिचें प्यालेलें दूध ओकून टाकलें अशी दंतकथा आहे तिला अनुलक्षून). ३ वांतीबरोबर बाहेर पडलेले पदार्थ. [ध्वनि; प्रा. ओक्किअ; का. ओक्करिसु=ओकणें]

ओक—पु. एक वृक्ष. मराठी बायबलांत यास अल्हा, अल्होन, एला, एकोन असे प्रतिशब्द आढळतात. याच्या तीनशें जाती आहेत. याच्या लांकडाचा जहाजें बांधण्याकडे उपयोग करितात. याला मोरू, तिलंगसा, भारू, शिंदर वगैरे नांवें आहेत. याचे हिरवा ओक, करडा ओक, लोमेलोमा ओक, पिंगट ओक असे प्रकार आहेत. युरोपांत २९ मे रोजीं यांचीं पानें अंगावर धारण करतात व त्या दिवसाला ओकदिवस म्हणतात. [इं.]

ओकट—वि. वकट; एक या अर्थी. 'ओकट लेंड सुंड नाल पुढें आणि लेंका । भक्तीबळें खेळ खेळूं जनार्दनी एका ॥' –भज ११३ [ते. वकट; का. ओक=एक]

ओकटा—वि. वाईट; ज्याचा वाईट वास येतो व जो पाहिल्यानें डोळ्यांस त्रास होतो अशा पदार्थाबद्दल योजितात; घाणेरें किळसवाणें. ओखटा पहा.

ओकटें—न. १ (काव्य) त्रास; खेकटें; उपाधि; संकट पीडा. २ घुवड (निंदार्थक योजितात). ३ प्रेताची तिरडी ताटी. ४ एक प्रकारचें भूत अगर पिशाच्च. ५ कोणतीहि अशुभ दायक किंवा असह्य गोष्ट, वस्तु. [ओखटें]

ओकणें—अक्रि. १ वांती होणें; उलटी होणें. २ पाट फुटून पाणी बाहेर जाणें. –उक्रि. १ उलटून पडणें, पाडणें. २ (ल.) आवेशानें उच्चारणें, तोंडाबाहेर काढणें. (शाप, शिवी). 'मत्तेज क्षांति मला म्हणति अहाहा न ओकशापातें।' –मोआदि ३२.२२ ३ अन्यायानें मिळविलेलें द्रव्य किंवा लांच वगैरे परत करणें; हरामानें खाल्लेला पैसा परत करणें. ४ बाहेर काढणें; ओघळणें (माळेचे मणी किंवा मोतीं). ५ मनांतील गोष्ट कोणाजवळ उत्सुकतेनें सांगणें. 'कोणाच्या जवळी ओकूं।' –संग्रामगीत १२. ६ बोलून टाकणें (पोटांत डाचत असलेलें). [का. ओक्करिसु=ओकणें; प्रा. ओक्किअ; सिं. ओकणु; तुल० सं. आवच्–आऊक–ओक; आवचनं–ओकणें (बोलणें). –भाअ १८३४; सं. उद्गिर्; प्रा. उग्गिर–भांडारकर]

ओकती, ओक्ती—स्त्री. (कों.) विहिरींतून पाणी बाहेर काढण्याचें एक साधन. दोन खांबांमध्यें किंवा एका वेळक्यामध्यें एक लांकडी दांडी असून एका बाजूला वजनासाठीं दगड व दुसऱ्या बाजूला बांबू जोडून त्याच्या खालच्या टोंकाला पोहरा लावलेला असतो. कोंकणकिनाऱ्याला व कर्नाटकांतहि हिचा विशेष प्रसार आहे. –लोक २.७६. [का. ओगसु=फेंकणें, फेंकविणें; ओगत=फेंकण्याची क्रिया. ओकणें?]

ओकबोक—स्त्री. दुफाशीं सोंगटयांनीं खेळण्याचा एक डाव. चारी रंगाच्या सोंगटया एके ठिकाणीं ठेवून नंतर एकेक गडयानें फांसे टाकावयाचे; ज्याला ज्या सोंगटीचें दान पडेल ती त्यानें घ्यावयाची व त्या रंगाची संपली असेल तर आपल्या जवळची ओकावयाची म्हणजे पुन्हां मध्यें ठेवावयाची. फांशांवरील दान पांच पडलें तर काळी, दहा पडलें तर पिंवळी, बारा पडल्यास लाल व नऊ पडल्यास हिरवी असें ठरलेलें असतें. अशा तऱ्हेनें एकेका रंगाचा कट झाला (चारी सोंगटया मिळविल्या) म्हणजे मग ओकावयाला नको. मधील सर्व सोंगटया अशा डावानें घेऊन झाल्या म्हणजे कोणावर किती चढले तें ठरवावयाचें. २ (ल.) हिसकाहिसकी; देणें घेणें. 'हल्लीं चाललेला ओकाबोकीचा प्रकार सुधारलेल्या राज्यपद्धतीस गैरहिताचा आहे.' –टि १.५५७. [ओक द्वि.]

ओकरा—वि. ओकणारा; नेहमीं ओकणारा; ओकण्याचा स्वभाव असलेला. [ओक]

ओकसाबोकशीं, ओक्शाबोक्शीं, ओक्साबोक्शीं–क्रिवि. उक्साबोक्शीं. रडणें अनावर होऊन उमाळा येतो तसें; मोठ्या आवेशानें आणि हेल काढून (रडणें). 'तिचा शोक तिला आवरेना, आणि ती ओक्साबोक्शी रडूं लागली.' –मायेचा बाजार. [सं. वक्षस् द्वि.]

ओकळी—पु. (कर्ना.) तांबडा रंग; होळी, उत्सव किंवा लग्नसमारंभांत एकमेकांच्या अंगावर शिंपडतात तो तांबडा रंग. [का; तुल० इ. ओकर=गेरू]

ओका–कें—वि. १ उवडें; नागडें; बुच्चें; भुंडें; नेहमींचा अलंकार अगर वस्त्राशिवाय (शरीर, अवयव इ०) (सामा.) बोका या शब्दाबरोबर प्रयोग. 'नाहींतरी कान, गळे, हात ओकेबुके कधींच राखावयाचे नाहींत.' –भाऊ २.३. २ सुनें; शून्य. 'सगळें घर आपली सखी येथें नाहीं त्यामुळें ओकेंओकेंसें झालें आहे.' –स्त्र ७४.

ओकाओक, ओकाबोक—स्त्री. अतिशय, एकसारखी वांती होण्याची क्रिया; (सामा.) वांती; ओकारी. (क्रि० होणें). [ओक द्वि]

ओकांबा—पु. (राजा.) कोरडी वांती; वांतीपूर्वी येणारा उमासा. ओबक पहा.

ओकांबा—पु. (बेळ.) रातांबा; कोकंब; कोकम. [ओक+आम्ल]

ओकाबोक—ओकबोक पहा.

ओकारणें—अक्रि. १ मळमळणें. २ (ल.) कंटाळणें; त्रासणें; किळस येणें. [का. ओक्करिसु=ओकणें. ओक पहा.]

ओकारा-री—पुस्त्री. १ वांती; कळमळून, उन्मळून येणें; उलटी. ओक पहा. २ (विशे. ओकारा) तोंडांत घातलेला घांस पुरता गिळला न जातां बाहेर पडतो तो. ३ (ल.) त्रास; मळमळ; कंटाळा; वीट; किळस. (क्रि० येणें) [ओ करणें; का. ओक्करिसु=ओकणें; सं. ओकार]

ओंकारेश्वर—१ बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक; हें नर्मदेमध्यें इंदूर मध्यभारतांतील मोरटका स्टेशनजवळच्या एका वेटावर आहे २ पुणें येथील ब्राह्मणी स्मशानाजवळील एक प्रख्यात शिवमंदिर. (सामा.) स्मशान. यावरून **ओंकारेश्वरावर गांवच्या जाणें**-मरावयास टेंकणें; अति वृद्ध होणें. ' गोखले काय आणि टिळक काय दोघांच्याहि गोवऱ्या आतां बहुतेक ओंकारेश्वरावर गेल्या आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. ' –टि ३.३०१.

ओंकीर–पु. (गो.) डोळ्यांतून निघणारा मळ, पू. उकीर अर्थ ३ पहा.

ओखट—वि. (काव्य.) वाईट; किळसवाणें; वोखट ' कुंतीचा माद्रीचा उत्तम, माजाचि ओखटा कुसवा । ' –मोस्त्री ३.११. [सं. उच्छिष्ट (?); अवशिष्ट]

ओखटपण-णी—नस्त्री. १ गुरें धुवावयाचें पाणी. २ भांडीं घासलेलें खरकटें पाणी; (सामा.) गढूळ पाणी; वाईट घाणेरडें पाणी. [ओखट+पन=पाणी]

ओखटपणें, ओखटपाणा-णी—वि. वाईट; घाणेरडें खराब; ओंगळ; किळसवाणें (पाणी, जागा, माणूस, वस्तु). [ओखट+(कुण.) पाणी=सारखा]

ओखटा—वि. ओखट. ओखट पहा.

ओखटा—पु. आईबाप गांवीं गेले असतां किंवा त्यांचा वियोग झाला असतां त्यांबद्दल वाटणारी खंती (लहान मुलाची); ध्यास; हाय. (क्रि० धरणें; करणें). [ओका (?)]

ओखटी वेळ—स्त्री. वाईट वेळ; अशुभ मुहूर्त.

ओखटें—ओकटें पहा. १ घुबड. २ पीडा; संकट. ' तों पुढें आणिक संकट। दैवें ओढवलें दुर्घट । जेंवें चिंतावला वैकुंठनाथ । म्हणोनि ओखटें वाटलें । ' –जै ६१.६१.

ओखड-द, ओखाड-द—न. औषध; दवा; वखाद. 'जाणतसां द्रोणाला धृष्टद्युम्नाख्य दिव्य ओखद हो ! ' –मोभीष्म ३.१४. ' खाय हें ओखद रामनामामृत । ' –ज्ञगा ६. [सं. औषध; चि. गु. ओखड; कु. ओखाद; माण. वखाद]

ओखदी—वि. औषधी; औषधविषयक; औषधोपयोगी: दुखणें नाहींसें करणारें. [सं. औषध]

ओखरणें—उक्रि. वखरणें पहा. [सं. उत्+कृ]

ओखळणें—अक्रि. (कु.) (पाऊस) ओसरणें. [सं. आ+उ किंवा उत्+स्खलन–म. खळणें]

ओखयंवचें—अक्रि. (गो.) समाधान पावणें.

ओग—पु. १ (भि) जुलाब. ' हातीं तो खूब ओकां आन ओगां टेक्यो ' =मग त्यास पुष्कळ वांत्या व जुलाब झाले. –भि २५. २ वेग; वेदना; (विंचू, सर्प इ०) चढणें. ' वृश्चिक नांगीवरी मधुबिंदु । देखोनि धांवे मतिमंदु । चाखों जातां खेदु । ओग आला अपार ॥ ' –मुरंशु ३६३. [सं. आ+वेग]

ओगटी—ओकती पहा.

ओगडावण—(गो) हरविणें. आगडणें पहा.

ओंगण—न.गाडीच्या,रहाटाच्या कण्याला किंवा सांध्याच्या ठिकाणीं फार घर्षण होऊं नये म्हणून लावण्यांत येणारें तेल, वेरी, चरबी. वंगण. **म्हo** घरचाहि गाडा ओंगणावांचून चालत नाहीं [सं. अंजन]

ओगर—पु. पानांत वाढण्यासाठीं मोळ्या भांड्यांतून पळींनें उकरून काढलेली (भाताची) रास, मूद. २ घास. ' काळयवनाचा ओगरू । पुरडैला देतुयें ढकरूं ॥ ' –शिशु ४४०. [का. ओगर=भात; का. ओग्गर=रास]

ओगरणें—सक्रि. अन्न वगैरे वाढणें. ' काळापुढें त्वदनयें ओगरिलें स्वकुल ताट कळलें कीं । ' –मोभीष्म ६.२७. ' रत्नखचित मांडिलीं ताटें । तळी तिवई ठेविलीमें नेटें । माजी ओदन ओगराळें स्पटें । जेवीं कळया मोगऱ्याच्या ॥ ' –जै ९.२८ [ओगर]

ओंगराळें—न. वाटीस मागें दांडी लावलेलें एक पात्र यांतून भाताच्या मुदा पाडतात व पातळ पदार्थ वाढतात. [का. ओगर+सं. आलय; गु. ओगराळो]

ओंगल—(सांकेतिक गुन्हेगार जातींत रूढ) एक हजार; (१०००) संख्या.

ओगळ—पु. ओळक पहा.

ओगळ-ळी-णें—ओघळ-ळी-णें पहा.

ओंगळ—वि. १ वाईट; घाणेरडें; किळसवाणा; अमंगळ; घाण खपणारा (पदार्थ, माणूस). २ (ल.) कडक; त्रासदायक; रागीट; अशुभकारी. ' बहिरोबा आहे ओंगळ । त्याचा नवस पाहिजे फेडला ॥ ' –ऐपो ४८. [सं. अमंगल; कुण. वंगाळ] **०वाणा**–वि. अमंगल; अशुभ; वाईट; घाणेरडा; किळसवाणा. ' असें ओंगळवाणी बोलूं नये. ' [ओंगळ+वाणा] **०सांगळ**–वि. वाईटसाईट; खराब. ' तो अतिशय ओंगळसोंगळ आहे. ' [ओंगळ द्वि.]

ओगा—पु. जोंधळा काढल्यानंतर कणसासकट त्याच्या ताटांच्या पेंड्या बांधून खळ्यांत जो ढीग घालतात तो. [का. ओग्गु=रास, ढीग]

ओगोत—पु. (गो.) कुण. वखत. १ वेळ. २ उशीर.

ओघ—पु. १ प्रवाह; धोत; लोट; लोंढा. 'तो उत्साहो न संवरे। इंद्रिय ओघां ॥ ' –ऋ ६३. 'ऐका कैसा ओघ भारतीं यवनांचा लोटला। ' –विक ३०. २ लहानशी नदी; नदीचा फाटा; ओहोळ; ओढा. 'गंगा शेकडों ओघांनीं समुद्रास मिळते.' ३ (ल.) परिपाटी; परंपरा; वहिवाट; क्रम; लौकिक, रूढ पद्धति. ४ (संगीत) द्रुत ताल; जलद ताल; आलाप घेणें. ५ समुदाय, जमाव. [सं.] ॰येणें–प्रवाह येणें; लाट येणें. (शब्दशः व ल०). **ओघाओघाखालीं**–चालू प्रवाहांत; (एक पद्धति) अंमलांत असतांना (देणें, करणें इ०) **ओघाओघाचा**–प्रवाहाचा किंवा पद्धतीचा. **ओघाओघानें**–पद्धतीनें; ओळीनें; क्रमानें **ओघांत पडणें, ओघास येणें**–पद्धतींत समाविष्ट होणें; क्रमांत सांपडणें, क्रमानें प्राप्त होणें. 'तिचा नाश करणें ओघास आलें तरती गोष्ट निराळी.' –विवि १०.५–७ १२३. **ओघाबरोबर वाहात जाणें**–प्रवाहाप्रमाणें जाणें, सामान्य जनरीतीप्रमाणें वागणें. 'तथापि ओघाबरोबरच जाणारे लोक अधिक असतात ' –टि २.४५०.

ओघरणें—अक्रि. फोडणी देणें. 'तूंकें ओघरिलीं। '–राक [का. ओगरग=फोडणी, मसाला; ओगरिसु=फोडणी देणें. मसाला लावणें]

ओघळ—पुस्त्री. पाण्याचा लहानसा प्रवाह, ओहोळ; ओढा; पर्ह्या; झिरपा; झरा; पाट २ पाट, झरा, पातळ पदार्थ वाहिल्याची खूण. 'तोंडावरचा ओघळ तसाच आहे, जा धुवून ये ! ' ३ डोंगरांतील पाणी वाहून पडलेला चर; ओघळण; हरळ. [सं. ओघ+गृ; अवगल=लहान दरी, प्रा. ओग्गाल]

ओघळणें—उक्रि. १ गाळींतून निसटणें; बाहेर काढणें 'सरांतून म्यां दहा मोतीं ओघळलीं' 'हातांतून बांगड्या ओघळल्या ' २ हिसांतून थोडासा अंश काढून घेणें; 'तांदूळ ओघळले' 'शेरभर ओघळला. ' 'पांच रुपये ओघळले. ' - अक्रि. १ पाझरणें; बारीक प्रवाहानें सरणें; गळणें २ मोत्यांचें वेज मोठे होणें; दागिन्याच्या वजनाच्या भारानें कान, नाक यांचें भोंक मोठें होणें, खालीं उतरणें. ३ गाळींतून मणी, मोतीं वगैरे बाहेर पडणें; गळून पडणें; तुकडे पडणें ४ गुदरणें; बारगळणें; वगळला जाणें. [ओघळ]

ओघळनिघळ—पु. (भितीवरून, तोंडावरून, जमिनीवरून) वेडावांकडा, अनियमित मार्गानें वाहणारा प्रवाह [ओघळ द्वि.]

ओघळी—स्त्री. १ लहानसा ओघळ; झरा; पाट; स्राव. २ पाण्याच्या प्रवाहामुळें पडलेला चर; घळण; हरळ, [ओघळ लघुत्वदर्शक, स्त्री,]

ओचका—पु. एखाद्या गोष्टीचा उत्कट ध्यास, भीति, अगर ती हटकून होईल अशी वाटण्यामुळे होणारा खरोखरीचा भास; स्वप्न पडण्यास कारण होईल इतका मनावर पडलेला पगडा. [वचक]

ओंचणें—ओहंचणें, वेंचणें पहा.

ओंचा—पु. १ वस्त्राचा लोंबता घोळ; नेमलेल्या वस्त्राचा सोगा. २ धोतराचा किंवा लुगड्याचा सोगा कमरेशीं खोंवल्यानें पडणारी घडी; वस्त्राचा कांठ धरून मध्यें थोडासा मोकळा सोडून पुढें दुसर स्थळीं धरून तेथेंच घ्यावे या प्रकारें केलें असतां जे अवच्छेद पडतात ते प्रत्येक. –शास्त्रीको. [सं. अंचल; अवचय–ओचअ–ओंचा–राजवाडे (भाअ १८३२)?]

ओंच्छेद—स्त्री (कों) छाया; सावली. [आदि+च्छद ?]

ओज—स्त्री. १ काळजीपूर्वक केलेला उपचार, संस्कार, पदार्थ उत्तमप्रकारें टिकावा म्हणून घेतलेली काळजी, सांभाळ, निगा (क्रि० राखणें) 'शरीरसुखाचेनि ओजें । सत्य संसार भाविला ॥ ' –मुआदि २०.६६. २ (एखाद्या कामाची) आस्थेनें पूर्तता करणें; नीट उरकणें, पार पाडणें. ३ कुशलता; चातुर्य; व्यवस्था; टापटीप. ४ नीट, व्यवस्थेशीर मांडणी, रचना, स्थिति; वरी रीत. म्ह० घराची ओज आंगण सांगतें. ५ (राजा.) संवय [का. ओजिसु=काळजीपूर्वक, व्यवस्थेशीर बनणें; ओजे=व्यवस्थितपणा, सदभिरुचि]

ओंज—न. १ चैतन्य; उत्साह; तेज, प्राणशक्ति; जीवन. २ धातूवरील चमक, झिलई. ३ पाणीदारपणा; धैर्य; पुरुषार्थ; शौर्य. ४ कळा; तेज; पाणी. ५ (साहित्य) एक काव्यगुण, काव्योत्कर्ष साधक अशा भाषेचे जे तीन गुण (माधुर्य, ओज, व प्रसाद) सांगितले आहेत त्यांतील एक; भाषेंतील जोरदारपणाचा गुण. उदा० वामनाच्या नृसिंहअवतारामधील श्लोकांपैकीं पुढील एक असा –' अमर तो मरतो अति लौकरी । चपळ तो पळतो वरितां करीं । उखळला खळ लाघवलक्षणीं । विलपती लपती सुरया क्षणीं ॥ ' [सं. ओजस्]

ओंजगी—(राजा.) अशोक वृक्ष.

ओंजणें—अक्रि. काळजीची निगा राहणें, काळजीच्या संपादणुकीचा विषय होणें. 'शेत ओंजलें तर पीक येईल.' [ओज]

ओंजली—वि. (गो.) वजनदार, जड; ओझें पहा. [सं. वर्य; प्रा. वज्ज=श्रेष्ठ, प्रधान ?; म. ओंझें; का. ओज्जे; म. ओंझील]

ओंजविणें—सक्रि. काळजीनें, आस्थेनें संपविणें, पुरें करणें; (एखादा धंदा किंवा गोष्ट) योग्य रीतीनें करणें; (माणसें) गुणसंपन्न किंवा तयार (लायक) करणें. [ओज]

ओंजळ—ओंझळ पहा. 'पुत्र देईल पित्या ओंजळी।' –वसा १७. [सं. अंजलि]

ओजार—अवजार पहा.

ओज्यें—(गो.) ओझें पहा.

ओझडणें—ओझरणें पहा. 'त्यांची पत्नेज्याधारीं देखा। पुर्षे ओ(वो)झडी झाली रुखा॥' –मुआदि ४.१०५.

ओझर—पु. १ धार; झिरपा; पाझर; ओघळ, पाट. २ लोंढा; प्रवाह; ओढा. [सं. अव+क्षर्; तुल० निर्झर; प्रा. ओज्झर= झरणारा, प्रवाह]

ओझरणें—अक्रि. १ पाझरणें; स्रवणें; गळणें; झिरपणें. २ पाट वाहणें; ओढे, नाले, बनणें. ३ (सृज्) कमी होणें; उतरणें; ओसरणें. [ओझर]

ओझरणें—उक्रि. घासटणें; पुसून टाकणें–जाणें. झाजरणें पहा

ओझरता, ओझडता—क्रिवि. अधेवट; निसटता; कांकरता; वरवर, निसुरता (क्रि० पाहणें, लागणें; पडणें; जाणें, दिसणें; (क्वचित्) दाखवणें; देखणें.) [सं. अव+क्षर्=प्रा. उज्झिअ, ओज्झर]

ओंझळ—स्त्रीपु. १ दोन्ही हात जोडून झालेली पोकळी, पुडा; जुळलेले दोन पंजे. २ पितरांस द्यावयाची तिलांजलि. **म्ह०** ओंजळीनें पाणी पिणें=तेव्हानें, कलानें, मिनतवारीनें, मिंधेपणानें वागणें; परस्वाधीन असणें. [सं. अंजलि]

ओझा—पु १ उपाध्याय. २ एक हिंदी आडनांव; मराठी ओझे (आडनांव). [सं. उपाध्याय; प्रा. उवज्झाअ–ओज्झाय हिं. ओझा; का. ओज=गुरु, शिक्षक]

ओझीक-ल—वि. १ ओझें वाहणारा; हमाल. २ न दमतां नेणारा; भारी वजन सहन करणारा. ३ (ल.) न कुरकुरतां कुटुंबाच्या अडचणी पार पाडणारा, (विशेषतः ओझिक याचा अर्थ) [ओझें]

ओझीगोखण—स्त्री. (कु.) सुतारांचें एक हत्यार; एक प्रकारचा रंधा.

ओझें—न. १ भार; बोजा; वजनः जड पदार्थ. २ (ल.) एखाद्यानें आपल्यावर केलेल्या उपकाराचा भार; काळजी, जबाबदारी, कर्तव्य यांचा भार. 'तुजवर घातलें गडाचें ओझें।' –ऐपो ४२. ३ धान्य, गवत, वगैरेचा बांधलेला बोजा. गठ्ठा; मनुष्य किंवा पशु इत्यादिकांनीं वाहावयाजोगा काष्ठ, दगड इ० परिमित असा पदार्थ. ४ (गो.) टोपली किंवा हारा. [सं. वाह्यः दे. ओझ्झ तु. का. ओज्जे]

ओझेकरी—पु ओझें वाहणारा; हमाल; हेलकरी.

ओझेरी, ओझेल-ली—वि. १ (गो.) ओझेकरी; हमाल २ पुष्कळ ओझें नीटपणें वाहणारा (तट्टू, बैल इ०). ३ कोणतेहि कामाचें ओझें अंगावर पडलें तरी न कंटाळतां निर्वाह करणारा. [ओझें]

ओझोन—पु. हा वायु प्राणवायूचें रूपांतर आहे. हें रूपांतर प्राणवायूमध्यें विजेच्या ठिणग्या सोडून किंवा अन्य तऱ्हेनें घडवून आणतां येतें. या वायूचें गुरुत्व प्राणवायूच्या दीडपट असतें. यास एक प्रकारचा चमत्कारिक वास येतो. [इं.]

ओट—न. एक प्रकारचें थंड हवेंत उगवणारें धान्य व गवत. हें घोडा व मनुष्य यांना खाण्यास उपयोगी पडतें. [इं.]

ओट—पु. गाडीच्या चाकास टेकण्यासाठीं लावलेला दगड. उट, उटी पहा. [सं. ओथ]

ओंट, ओटंब—पुस्त्री. ओटआंबा; गोमांतक व कर्नाटकमधील एक आंब्यासारखें झाड; याचीं पानें कुडयाच्या पानासारखीं असून फळें कार्तिकांत येतात, त्यास ओटआंबा म्हणतात. त्याच्या सुकविलेल्या कापट्यांना ओटाचीं मालें म्हणतात. चिंच किंवा कोंकंबाएवजीं सागंत तीं वापरतात. पिकेलेल्या ओटांचें लोणचें, रायतें व सार करतात. [सं. ओष्ठ; का. ओंटे; लॅ. गार्सिनिआ कांबोगिआ]

ओटंगण—पुन. टेकावयाचा लोड, गिर्दी, तक्क्या वगैरे; टेकण. [ओट=उट]

ओंटभरण-णी—नस्त्री. ओंटीभरण पहा.

ओंटवणी—न. ओंटाच्या तुकड्यांचें सार. [ओंट+वणी= पाणी]

ओंटळा—पु (कों.) धोतराची अथवा लुगड्याची ओटी, तींत पुष्कळसे पदार्थ भरल्यामुळें मोठी दिसते ती. [ओंटी]

ओटा—पु. १ दगड विटा वगैरेनीं बांधलेला घरापुढील कट्टा, चबुतरा. २ ओटी; ओसरी. ३ गच्चीपुढील वरवंडी किंवा लहानशी भित ४ पार, वरंवा; उंच ताटवा. 'ओंटे लावी रतिकांतु। पार्यातिकांचे॥' –शिशु २५४. [का. ओट्टु=एकत्र करणें; हीग, रास; तुल० सं वृत्त=गोल]

ओटा—पु. कोवी इ० वनस्पतीस लागणारा पांढरा किडा. –बागेची माहिती २३.

ओंटा—पु १ धोतराचा किंवा लुगड्याचा घोळ, झाल; ओंटी पहा [का उडि=ओंचा] **म्ह.** १ ओटयांत घालणें= दत्तक देणें; स्वाधीन करणें; पदरीं बांधणें. २ ओटयांत घेणें= दत्तक घेणें.

ओटारणें—अक्रि (डोळे) वटारणें पहा.

ओटारणें—अक्रि १ ओटा नांवाच्या किडयानें खाल्ल्यामुळें झाडाची वाढ खुंटणें. २ (ल.) कोणत्याहि कारणानें वाढ खुंटणें; (लहान मूल, रोप, इ०); अवश्रणणें. [ओटा]

ओटाळी—स्त्री. दोन दोन, तीन तीन उंस एके जागीं बांधण्याचें काम. (क्रि० करणें). [वद्रः सं. वृत्; का. ओट्टु=एकत्र करणें]

ओटी—स्त्री. घराच्या माजघरापुढें किंवा मागें भित न घातलेली पडवी; ओसरी; सोपा. [ओटा; गु. ओटली]

ओंटी, ओंटी—स्त्री. १ (गाय, म्हैस इ०) जनावराची कांस. २ बैलीच्या खालचा व गुद्यांगाच्या वरचा भाग. [का. उडि=कंबर, कटिप्रदेश; तुल० सं ऊधस्]

ओंटी, ओटी—स्त्री. १ लुगडें किंवा घोतराचा घोळ, खोळ; पदराचा किंवा उपरण्याचा घोळ; खोलगट भाग; ओंटा. 'फुलें ओंटींत घेऊन ये.' २ स्त्रीच्या नेसलेल्या लुगड्याच्या ओंच्यांत किंवा पदरांत तांदूळ, सुपारी, हळकुंड, नारळ इ० घातलेले पदार्थ; ओंटींत घालावयाचे पदार्थ [का. उडि=ओंचा, ओटी; प्रा. उअट्टी=लुगड्याची गांठ, नीवि.] **०भरणें**–१ सुवासिनीच्या ओंटींत फळें, फुलें तांदूळ वगैरे घालणें; ओंटी-भरणविधि करणें. 'गतधवा स्त्रिया घेउनि । ओंटी भरिति मृत्तिका घेउनि ।' 'आजचा ओटी भरण्याचा समारंभ कांहीसा मामींच्या हौसेखातर .. ... व्हावयाचा होता.' –झांमु २ वाङ्निश्चयाच्या वेळीं वधूच्या ओटीचा विधि करणें. –ज्ञेराप्र ३३७. ३ (ल.) जीवदान देणें (मुलास, नवऱ्यास). 'वैद्य बोवा माझ्या मुलाला बरें करून माझी ओंटी भरा.' **भरल्या ओटीनें**–१ सुखरूप प्रसूत होऊन मुलासह. २ सवाष्णपणीं **०करणें** (गाय इ० कांनीं)–गरोदरपणीं विण्याच्या पूर्वी त्यांची ओंटी (कांस) पिण्पुष्ट होणें. **ओटींत घालणें**–सक्रि. १ दत्तक देणें. 'ती कशी वरें आपला मुलगा तुझ्या ओंटींत घालील ?' २ पदरीं बांधणें. 'हा अन्याय तुम्ही उगीचच्या उगीच माझ्या ओंटींत घालीत आहां !' ३ आश्रयार्थ स्वाधीन करणें, हवालीं करणें. 'पोरीला मी तुमच्या ओंटींत घालीत आहें, तिचा पोटच्या मुलीप्रमाणें सांभाळ करा.' **ओंटींत घेणें**–सक्रि. १ दत्तक घेणें २ आपलासा म्हणणें; आपुलकीचा भाव ठेवणें. **ओंटींत देणें**–सक्रि. दत्तक देणें; स्वाधीन करणें.

ओंटीभरण—न. १ गर्भाधान. २ गर्भारशीच्या आठव्या महिन्यांत (किंवा आधींहि) अनेक सुवासिनी मिळून पतिसमवेत तिच्या ओटींत तांदूळ, नारळ वगैरे पदार्थ घालतात तो विधि (मुलानें प्रसुति व्हावी म्हणून). ओंटीभरणें पहा.

ओंटो—(इं.) अत्तर: सुवासिक तेल उ० ओंटो ऱ्होजहार–मोहिनी [अर इत्र. इं]

ओटांळा—शेतांतील माळा; पटाळी, अटोळी पहा 'ओटोळ्या जवळी पातला ।' –दावि ३४७.

ओंठ, ओंठ—पु ज्यानें दांतांची कवळी झांकली जाते असा नाकाच्या खालचा व हनुवटीच्या वरचा मांसल भाग; अधर. [सं. ओष्ठ; त्सीगन उश्, वुश्; प्रा. ओट्ठ] (वाप्र.) **०करपणें**–फजिती होणें; पराभव होणें. 'कुरुगुरुसवें झगडतां त्या सुरगुरुचेहि ओठ करपावे ।' –मोविराट ६.९०. **०चाघणें**–(अतिशय राग आला असतां मनुष्य स्वतःचा ओठ चावतो) त्वेष येणें; मोठा राग येणें. 'त्याउपरि ओंठ चावुनि शकुनि प्रेषी कराल करवाल ।' –मोशल्य ४.२९. 'चावती मराठे ओठ' –संग्रामगीतें ३३. **०फुटणें**–थंडीनें ओंठाला चिरा, भेगा पडणें. **ओठाचा जार न वाळणें**–बाल्यावस्थेत असणें, लहानपण न सेपणें; तरुणपणांत येण्यापूर्वीच्या स्थितींत असणें. 'ओठाच्या वरचाहि जार अजुनी नाहीं तुझ्या वाळला ।' –कुशलवाख्यान ४१. **म्ह०** १ ओठ पिळला तर दूध निघणें=लहान वयाच्या माणसानें शक्तीबाहेर काम केल्यास त्याला हिणविण्यासाठीं योजतात. 'ओंठ पिळला असता तर खरंच दूध निघालं असतं' –तोर्य २०. २ ओठांतून कीं पोटांतून–(व.) अंतःकरणापासून कीं नुसतें वरवर (बोलणें) **ओठाबाहेर काढणें**–बोलून दाखविणें. **म्ह०** ओंठाबाहेर तें कोठाबाहेर. **ओंठापर्यंत येणें**–(कोणतीहि गोष्ट) प्राप्त होण्याची संधि येऊन पोचणें. (टीप–देशावर ओठ यांऐवजीं होट हा शब्द विशेष प्रचारांत आहे.)

ओंठंगण–णें—न १ ज्यावर तोल टाकतां येईल, टेकतां येईल, रेलतां येईल असा (लोड, भित, खांब वगैरे) पदार्थ. २ (ल.) आधार; आश्रय; पाठिंबा; टेकू; आश्रयदाता; पुरस्कर्ता. [सं. अवष्टंभन]

ओंठंगणें—अक्रि. १ रेलणें; टेकणें; तोल देणें. 'दूर वनीं जाउनि तो ओंठंगुनि तरुसि बैसला क्षत्ता.' –मोआश्रम ४.४४. २ (ल) अवलंबून राहणें (आश्रय, संरक्षण, आधार यासाठीं); उत्सुक असणें; भिस्त ठेवणें. ३ झेंपणें; आहारांतील असणें; उरकण्यासारखें, व्यवस्था लावतां येण्यासारखें असणें. 'जें काम ओंठंगेल तें करावें.' [ओंठंगण]

ओठणें—अक्रि वर येणें; बाहेर पडणें, उठणें; ठळकपणें दिसणें (शिक्का किंवा ठसा); इतर अर्थांसाठीं वठणें पहा. [उठणें]

ओठरणें—अक्रि. १ 'ओटारणें' पहा (दोन्ही अर्थी). २ दुःखणें; आठरणें, अटरणें पहा. 'नेहमीं पहावें तेव्हां तूं ओठरलेला, कधीं चेहऱ्यावर तजेला नाहीं.'

ओठविणें, ओठाविणें—उक्रि. (कों.) (वेडाविण्यासाठीं ओठ काढून दाखविणें) वर्मायाजोगें बोलणें; टोमणा मारणें; खरडपट्टी काढणें; दोष देणें; टिंगल करणें. 'एक दिवस तुम्हांस बोलवावयास विसरलों म्हणून इतकें ओठावता कशास.' [ओंठ]

ओठाळ—वि. जाड ओठाचा; बाबर ओठ्या. [ओष्ठ]

ओंठाळी—स्त्री. घोड्याच्या खालच्या ओठास बांधावयाची काढणी; दोरी (चरावयास सोडतांना). [ओठ+आळा ?]

ओठिंग, ओठिंगणें—ओठंगण, ओठंगणें पहा.

ओड, ओडक, ओडकर, ओडगस्त, ओडघस्त, ओडगस्ती, ओडघस्ती, ओडण, ओडणी, ओडणें. ओडदोरा, ओडव, ओडवणें, ओडा, ओडाताण, ओडाळ इ०—ओढ या शब्दाखालीं पहा.

ओंड—स्त्री. १ सुरमाडाची पोय, लोंगर, फलसमुदाय. २ (नाचणीवरील) टरफल; टरफलासह नाचणीचे दाणे. [?]

ओंड—स्त्री. एक झाड.

ओंड—वि. खोल (पाणी, विहीर, खड्डा, खाचर). 'महाराष्ट्र भाषेचे प्रयोग ठरविण्याच्या ओंड पाण्यांत त्यांनीं शिरणें म्हणजे पुष्कळ अशीं हितोपदेशांतील अभ्यापारेपु व्यापार करूं जाणाऱ्या वानरासारखीच अवस्था होय.' –नि ९१७. 'ती ओंड शब्दानें म्हणाली 'समाचार बहुत वाईट आहे.'' –बाळ [का. ऑंडु=गढूल पाणी, तळचें पाणी, गाळ] **०करणें**–(कों) जास्त खोल करणें. **०पणा**–खोली. 'एके बाजूचा ओंडपणा कमी केला.' –भू ९९.

ओंडकर, ओंडका, ओंडकी, ओंडकूर, ओंडकें, ओंडी—पुष्कळ लांकडाचा ठोकळा, खोड. 'खांद्यावर एक मोठें ओंडकर घेऊन येतो.' –तुफान नाटक ५१. [का. ओडक=फोडलेली, मोडलेली स्थिति]

ओंडण—न. १ (काव्य.) ढाल. 'कोणी शिरीं धरिली ओंडण।' –जै ३३.४५. २ (ल.) पांघरूण. 'जडेचे ओंडण। करीत पळती तपोधन॥' –शिशु २७१. ३ 'ओंढण' पहा [सं. अवगुंठन=ओंढण]

ओंडण—वि. (कों.) ओंड; खोल आणि पुष्कळ पाणी मावण्याजोगें (भातखाचर); उखरल्या उलट. –न. खोलगट शेत, खाचर. 'डोंगरांतून ओंडण तुडवीत तो किल्ल्यावर पोहोंचला' [ओंड=खोल]

ओंडणी—स्त्री. (राजा. कुण.) (पोटांतील) वेग; कळ [ओढणें ?]

ओंडप—पु. (तंजावरी) भंग. 'पाऊस अतोनात पडल्यानें नदीस ओडप (वडप) आला आहे.' [ता. ओडप्पु=तूट, भंग. का. ओडक=भेग; भग्नावस्था]

ओंडंबर—न. चमत्कार. आडंबर पहा. 'निजशक्तीचेनि ओडंबरें।' –विपु ७.४९. 'नभीं धूम्राचे डोंगर। उचलती थोर थोर। तैसें दावी ओडंबर। माया देवी॥' –दा ७.४.४०.

ओंडंबरी—स्त्री. (काव्य.) गारुडीविद्या; माया; ऐंद्रजाल; जादू. 'कीं विषाचें शीतलपण। कीं ओडंबरीचें भूपण। कीं गंधर्वनगरीचें सैन्य। तैसें जाणू स्वर्गसुख॥' –ह १३.२६. **ओंडंबरीचें लेणें**–जादूनें उत्पन्न केलेला अलंकार, वस्तु; तकलादी वस्तु.

ओंडवा—स्त्री वाळवी; वाळिवा, (गो.) अळेवा, ओळेवो आळेवा पहा.

ओंडवण—स्त्री. न १ ढाल. ओंडण अर्थ १ पहा. २ (ल) आडकाठी; संरक्षण. 'जन अगाध्यिी विंदेचे पाषाण। पुढें केलें क्षमा ओडवण॥' –ह २०.१५.

ओंडवण—न. (कों.) खोलगट व सखलवट अशी जमीन, तळ, खाचर. [ओंड]

ओंडवणें—अक्रि. १ पुढें होणें; पुढें करणें; प्राप्त होणें. 'कळिकापात्रें ओडवीलि भली। जाति कळिकाची॥' –शिशु ५६४. 'शुद्धमती घाली जीवन। राजा प्रक्षाली चरण। सकलहि आलीं धावोन। तळीं माथा ओडविती।' –ह २४.१३८. २ (ल.) वर्णन करणें. 'तेंची ओडओं कथांगमती॥' –दाव १५.

ओंडवणें—क्रि. भोगास येणें ओढवणें अर्थ २ पहा. 'बहु वय भरलें, उरलें थोडें तों काय कर्म ओडवलें।' –मोद्रोण २२.२०.

ओंडवा—स्त्री. (गो.) देवीच्या नांवानें जेवावयास घालण्यांत येणारी कुमारी. –हिदु ११२.१९३०.

ओंडसणें—(गो) आडबुडप छाटून मोकळी जागा करणें. अडसणें पहा.

ओंडा—वि. खोल (पाणी इ०). ओंड पहा.

ओंडा—पु. १ लांकडाचा ठोकळा, तुकडा, खांड. २ (कों.) केळीचें लोंगर तोडून घेतल्यानंतर जमिनीवर वाढलेला जो केळीचा भाग असतो तो हा भाग तोडला म्हणजे त्यालाहि ओंडाच म्हणतात ३ झाडाचें खोड, खोडाचा भाग, तुकडा. ४ मूर्ख; मठ. [का. ओडि=तोडणें, मोडणें; ओडे=खांड, तुकडा] **०पट्टी**–स्त्री. सरकारी कामासाठीं जे ओंडे कापतात त्याची मजुरी भागविण्यासाठीं बसविलेला कर.

ओंडा—पु. गोंवर, माती वगैरे घालून तयार केलेली जागा, जसें–भळवाचा ओंडा, भाजीचा ओंडा. [ओंडा ?]

ओंडा—पु. पाण्याचा लोंढा; ओंडा. [का. ओडि=झुळुझुळु वाहणें, झिरपणें]

ओंडाण, ओंढाण—वि. (राजा.) ओढाळ; भटक्या; उनाड. [ओंढणें]

ओंढ—स्त्री. १ खेंच, आकर्षण; हिसका (घट्ट करण्यासाठीं किंवा ओढण्यासाठीं). (क्रि० देणें). 'इतर धर्माचे पाद्री लोक नीच मानलेल्या लोकांवर प्रेमाचें जाळें पसरून त्यांस आपल्यांत ओढीत. या त्यांच्या ओढीला विरोध करणारा आजपर्यंत कोणी नव्हता.' –दयानंदसरस्वती २३९ २ ताण, जोर, दाब (लांबविण्यासाठीं); आंवळ. (क्रि० घालणें; बसणें; पडणें). 'तुरटीच्या पाण्यानें माझ्या दांताला ओंढ बसली आहे.' ३ ओढा-

वयाचा दोर; ओढण्याचें कोणतेहि साधन, सामान. ४ ओढीत नेण्याचा किंवा वर काढण्याचा पदार्थ. ५ ओढण; वजन; ओढण्याची शक्ति. 'हा दगड सहा बैलांच्या ओढीचा आहे.' ६ ज्या वरून ओझें ओढीत नेतात तो रस्ता; रस्त्यावर त्या वजनानें उमटणारा चर, रेघ, घांसर, खरड. ७ अडचणीची परिस्थिति, पेंशांची चणचण; सावकारांचा तगादा, निकड, चिमट. 'या महिन्याला माझी खर्चाची फार ओढ झाली आहे.' ८ अतिशय मेहनतीमुळें व थकव्यामुळें शरीराला येणारा ताठरपणा. ९ नदी किंवा प्रवाह यांचा जोर, ताण. 'इंद्रायणीचे पाण्यास फार ओढ आहे.' १० सुरमाडाची पोय; जेथें पावसांत किंवा ओलींत एखादा बांधकामाचा भाग येत असेल तेथें याचा बांधावयाच्या दोरीसारखा उपयोग करितात तो. ११ कल, प्रवृत्ति; गति; झोंक; –कडे प्रयत्न. 'उदकाची ओढ स्वभावतः खोल प्रदेशाकडे असते.' १२ आकर्षण; मोह; पाश; आंगावर घेतलेलें काम वगैरेचा जोर (जग, धंदा, कुटुंब यांबाबत); ओढणारी शक्ति (माया, प्रेम, इच्छा, आशा इ०); कळकळ; स्नेह; सहानुभूति. 'कां गे बाई रोड। तर गांवाची ओढ' १३ मार्गे राहाणें; जोराचा विरोध करणें; निष्ठुरपणें प्रतिबंध करणें; वेगानें सुटणें; प्रवाह, जोराचा ओघ. (क्रि० घेणें). १४ जनावर लावून एका वेळीं ओढीत आणलेला एक किंवा अनेक लाकडांचा समुदाय. १५ वरील लाकडांना बांधावयाची दोरी. १६ बैलरहाट किंवा तेल्याचा घाणा यांच्या जोखडास व बैलाच्या मार्गे जो बेसनेकड असतो त्यास बांधावयाची दोरी किंवा दांडी; ओढाळा. १७ तहान 'मला पाण्याची ओढ लागली आहे.' [उदन्या (तृष्णा)–उडण्ण–ओढणी–ओढ. भाअ १८३४.] १८ मनाची हौस. 'प्राणसखे राजसे रोज गडे तुझ्या मनाच्या ओढी। आम्ही तृप्त करूं या घडीं।'–सला १४. [ओढणें; तुल० दे. ओड्ढ=अनुरक्त; सं. अवकर्ष–अउअढ–ओढ; आकृष्ट–आउड्ढ–ओढ· किंवा सं. उपधा] **०काढणें**–(हिं.) संकटांत दिवस काढणें. **एक ओढ किंवा एके ओढीनें**–एका हिसक्यासरशी; पहिल्याच प्रयत्नास, जोरास, दणक्यांत. **ओढीं ओढ असणें**–दुःखावर दुःख येणें; संकटांवर संकट येणें. **ओढींत ओढ (घारणें, करून घेणें इ०)**–एक संकट भोगीत असतां दुसरें वारणें किंवा दुसरें ओढवून घेणें. वोढ पहा.

ओढक––वि. १ खेंचणारा; प्रतिबंध करणारा; मार्गे मार्गे घेणारा (इष्ट कृत्यांत मुखेंपणें नसते अडथळे आणणारा). २ पुढें ओढणारा खेंचणारा पहा. 'परि ओढुनि ने त्यासि देव ओढक सा।' –मोभीष्म ४.४२. ३ (ल) तकारी; हट्टी; दुराग्रही. [ओढणें]

ओढकर––पु. लाकूड; दगड वगैरे बाजारांत बैलावरून अगर स्वतः ओढीत नेऊन त्याच्या मजुरीवर उपजीविका करणारा; गाडीवान. [ओढ+कर]

ओढकाठी––स्त्री. (कों.) उंसाच्या चरकाचा (जोखडाच्या दोन भागांना जोडणारा) दांडा. [ओढ+काठी]

ओढगस्त–घस्त––वि. अडचणींत अगर बिकट परिस्थितींत असलेला; अडकित्त्यांत सांपडलेला; द्रव्याच्या अभावामुळें पेचांत आलेला. [ओढ+ग्रस्त]

ओढगस्ती–घस्ती––स्त्री. पैशाची टंचाई; अडचण; नड; ताणाताण.

ओढण––नस्त्री. १ संपविलेल्या हिशेबाची बाकी पुढील मितीस ओढणे. 'मागील खात्यावरील ओढण पुढील खातीं घेऊन' २ पिढीजाद अथवा वर्षानुवर्षे चालत आलेली (वहिवाट, पद्धत, मत, परंपरा, चाल, रूढी). 'वडिलांचें ओढण असेल त्याप्रमाणें चालावें.' 'या कुळीं बायकोस प्रथम कन्या व्हावी अशी ओढण चालत आली.' ३ जोराचा अडथळा; मार्गे पाय. (क्रि० घेणें). ४ बायकांच्या नेसलेल्या लुगड्याचा आंतल्या पदराचा जो एक कोन ओढिला असतां नेसणें घट्ट होतें तीं; लुगड्याच्या पदराचीं दोन टोकें जवळजवळ आणून नेसणें घट्ट करण्यासाठीं एकें ठिकाणीं बांधतात त्यास ओढील असें म्हणतात, ओढणाच्या शेवटास जी गांठ दिली असते ती ओढणगांठ. –न. १ सामान्यतः वर खेंचण्याचा दोर; ओढणदोर; तंबूच्या तणाव्याचा दोर; कमणी; ढोलाचा ताल वर–खालीं उतरविण्याची दोरी; गाडीचा दोर २ प्रयासानें, श्रमानें ओढणें; खेंचण्यास पडणारा अतिशय त्रास. 'गाडीला (अथवा बैलांना) वाळूमध्यें ओढण लागती.' [ओढणें] **०गांठ**–स्त्री. ओढण अर्थ ४ पहा. **०बाकी**–स्त्री. मालोसाल पुढें ओढलेली बाकी (सरकारी वसुलामधील); चुकीनें ओडबेकी **०शिल्लक**–स्त्री. नवीन हिशोबापर्यंत ओढलेली मागची शिल्लक.

ओढण––न. ढाल. ओडण पहा. 'माझ्या देहाचें ओढण। भाड असतां तुम्हां विघ्न। स्वप्नीही परि नाहीं जाण।'–मुरंशु ९.

ओढण––न. एक चर्मवाद्य; ड्रम. [ओढणें]

ओंढण, ओंढाण–णी––ओंडण पहा.

ओढणी––स्त्री. १ डोक्यावरून व खांद्यावरून घेण्याचा जरीच्या कापडाचा अथवा शालीचा किंवा शेल्याचा बुरखा (स्त्रियांचा); चादर; पदर. २ (मारवाडी, मुसलमानी) लहंगा किंवा झगा यावरून घ्यावयाचें वस्त्र. [सं. अवगुंठन; दे. ओड्ढण=उत्तरीय; सि. ओढिणी, हि. ओढन; दे. अवघाटनी; प्रा. ओहाडणी]

ओढणी––स्त्री. १ ओढ; हिसका. २ दोरी (वटण्याची वगैरे). ३ (क.) औताची सर्वांत पुढची जागा. 'ओढणीला पाडे जुंपा.' 'ओढणीच्या बैलावर लक्ष ठेव.' ४ रांगोळ्याचा लोखंडी आंकडा. [ओढणें]

ओढणें—उक्रि. १ खेचणें; सरकविणें; लोटणें; जवळ घेणें, करणें; आपल्याकडे आणणें; ताणणें. 'परि ओढुनि ने त्यासि देव ओढकसा।'—मोभीष्म ४. ४४. 'तूं पाणी ओढ, मी आंघूळ करतों.' २ (शेत जमिनींतील डिखळे फोडून साफ करण्यासाठीं दातालें किंवा गुर्ठे वगैरे जमिनीवर) फिरविणें. ३ रेघा, ओळी काढणें; आंखणें. 'काय रेघा ओढल्यास! सरळ ओढ.' ४ ओढ बसणें (फोड, उष्णता, रोग वगैरेपासून डोळे इ०). ५ (दुखणें, आजार, दारिद्र्य यांमुळें शरीर) क्षीण होणें. ६ (गुडगुडी, विडी इ० चा) धूर काढणें, अंमल करणें. ७ (धान) पिणें; चोखणें. (गाय, म्हैस इ० चें) दूध काढण्याकरितां आंचळ ओढणें; धार काढणें. ८ (तपकीर) हुंगणें; सुंगणें ९ (भांपेची-अर्थाकरितां) ओढाताण करणें; वाटेल तो अर्थ बसविणें. १० लावणें; बंद करणें (दार, खिडकी इ०). [सं. वह्-वोढ-ओढ] (वाप्र.) **ओढून आणणें**—१ गर्वानें किंवा रागानें ताठून बसणें. २ कां कूं करीत मागें राहणें. **ओढून काढणें**—बाहेर खेंचणें; मोठ्या युक्तीनें बाहेर काढणें; जबरीनें जवळ आणणें, घेणें. **ओढून घेणें**—(एखादें संकट अथवा अडचण) स्वत:वर ओढून आणणें. 'भरतानें रामासारखाच वनवास आपल्यावर ओढून घेतला.' २ आपल्या बाजूचें करणें. 'हींच मुलें आपल्याकडे ओढून घ्यावयाचीं आहेत.'—ईप ४२. ३ (गंजिफा) घेणी घेणारानें राजावरोबर जें पान टाकलें असेल त्यावरील बंद दुसऱ्या-जवळ असल्यास त्यानें राजावरोबरचें पान मारून ओढून घेणें. हा ओढून घेण्याचा हक्क देणी घेणाऱ्याच्या उजव्या हातच्या मनुष्यास असतो. **ओढून बळकट करणें**—(दोरीची सैल व मोकळी गांठ घट्ट व न सुटेल अशी आंवळणें). फाजील शहाणपणानें स्वत:ला फसविणें; उद्देश बाजूला सारणें; हट्टानें किंवा पड न खाल्ल्यामुळें (अटी, करार, परिस्थिति) अधिक विकट करून घेणें. **ओढून विकणें**—१ जास्त किंवा अवाच्यासवा किंमतीस विकणें. २ (ल.) स्वत:ची योग्यता फार मोठी मानणें; अभिमानानें आत्मप्रतिष्ठा चढविणें. **कर्ज ओढणें**—कर्जावर कर्ज काढणें. **चाबूक०**—एखाद्याला चाबूक लगावणें. **जमीन०**—शेत-जमीन लागवडीस आणणें. **जीभ०**—कांहीं विकृतीनें जीभ कोरडी होणें. **बाकी०**—१ हिशेबाची शिल्लकबाकी पुढील सालच्या कीर्दीवर नेणें. २ देणें न देतां कांहीं काळ राखणें. **वरून ओढून टाकणें-ताणणें**—(जसें-शास्त्रावरून ओढणें, विधेवरून ओढणें) थोडेसें, वरवरचें ज्ञान असणें. **श्वास०**—श्वास घेणें. **ओढून टाकणें**—रागानें, दांडगाईनें ओढून ढकलणें किंवा झुगारून देणें (मनुष्य, वस्तु इ०).

ओढणें—अक्रि. १ मागें घेणें; ओढून धरणें; घासघीस करणें; हट्ट धरणें; हेका धरणें. २ (भात शिजतांना) आकसून जाणें. ३ पेटक्यामुळें (अवयव) आखडणें; आकुंचित होणें. ४ एखाद्याचा भाग असणें; एखाद्याच्या खालीं येणें, मोडणें; समाविष्ट असणें. 'हा प्रांत पुण्याखालीं ओढतो.' ५ मन इ० मोहित होणें, एखाद्याकडे वळणें, जाणें; कल ओढा, असणें. 'बुडत्याचे पाय खोल पाण्याकडे ओढतात.' (वाप्र.) **ओढता घेणें**—१ अडवून घेणें; घासाघीस करणें; ताणून धरणें. २ एखाद्या गोष्टीपासून मागें घेणें, सरणें. **ओढता (अथवा) ओढून धरणें**—१ अडचणी आणि अडथळे दाखविणें, आणणें. २ (एखादा सौदा किंवा व्यवहार जुळविण्यांत) आपल्याच मूळच्या अटीला चिकटून राहणें. **ओढून पाहणें**—आपल्याच अटी खऱ्या, पुऱ्या करण्याबद्दल प्रयत्न करणें, घासाघीस घालणें. **ओढून बोलणें**—लांब हेल काढून बोलणें. **ओढून येणें**—१ (गळवामध्यें पू) जमणें; मुख धरणें; तोंड पडणें. २ अकस्मात येणें; ओढवणें (एखादी आपत्ति). **जीव ओढणें**—१ भूक, तहान, श्रम इत्यादिकांमुळें उत्साहहीन होणें. २ प्रेमानें एखाद्याकडे मनाचा ओढा असणें. **देवा, गांवर ओढणें**—देवी वगैरे बाळणें. **मृत्यु-मरण-काळ०**—शेवटीं नाइलाज होऊन मृत्यूच्या जवळ जाणें; कपाळीं असलेलें प्राप्त होणें.

ओढणें—सक्रि. (राजा. नाविक) गलबत पावसाळ्याच्या दिवसाच्या प्रारंभीं किनाऱ्यावर ओढून आणून ठेवणें.

ओढणें—क्रि. नेसणें; वेढणें; पांघरणें. 'नित्य ओढिती धौत वस्त्रें।'—मुसभा १४.६७. [सं. वह्]

ओढत—स्त्री. हलाखीची, ओढगस्त स्थिति. [ओढ+सं. ग्रस्त-म. गस्त]

ओढदोरा—पु. पिशवीचें तोंड उघडझाप करण्याचा दोरा; कसणी; कशाचा दोरा.

ओढप—स्त्री. जोराचा ताण; ओढतांना लागणारा जोर, शक्ति.

ओढपट्टी—स्त्री. (विणकाम) कापड गुंडाळावयाच्या दांड्याला लावलेली अडकवणी. [ओढणें+पट्टी]

ओढमाणकी—स्त्री. गाडी भरल्यानंतर वरील वेष्टण आवळण्याकरितां एक लांकडाचा छिद्रें व कण्णी असलेला ठोकळा असतो त्यातून दोरी दोहीं बाजूनें ओढून बांधतात तो. [म. ओढ+मणि-मणका] यावरून **ओढमाणक्या घेणें**—ताणून धरणें; आढेवेढे घेणें, एखाद्या गोष्टीस संमति देतांना पुष्कळ वांधे घालीत बसणें. [ओढ+मणि-मणका]

ओढव—स्त्री. मोटेच्या विहिरीची धांव (उतरती जमीन). —पु. गायनांतील चढता सूर. (क्रि० करणें). [ओढ]

ओढवण—न. पर्वतावरून निघणाऱ्या ओढ्याचें कोरडें पात्र. [ओढा+वन=पाणी]

ओढवण—न. पांघरूण. वोढवण पहा.

ओढवणें—अक्रि. १ आपोआप घडणें–कडे जोरानें वळणें; नाइलाजानें ओघास येणें; जोरानें हलणें, सरणें, येणें; गुदरणें; प्राप्त होणें; झोका बसणें; अकस्मात येणें; (दैव, मृत्यु, संकट, पीडा, उपाधि इ० संबंधी योजितात व त्यांत प्रेरकत्व, अधीश्वरत्व गर्भित असतें). 'वाटे ओढवला प्रळयकाळ.' 'दुःख सुख जे ओढवेल तें भोगणें प्राप्त.' (टीप–दैव, प्रारब्ध या अर्थी योजले असतां नेहमींच दुःख किंवा संकट असा अर्थ होत नाहीं. जसें–मूर्ख जरी असला तरी दैव ओढवलें म्हणजे ऐश्वर्य भोगावयास सांपडतें.) २ (व्यापक) निश्चयपूर्वक, बेत ठरवून अंगावर येणें, कोसळणें (संकटें, शत्रु, रानटी जनावरें, भिकार अथवा अपरिहार्य अडचणी वगैरे संबंधानें योजतात); भोगास येणें. ३ वळणें; जाणें; कलणें; प्रवृत्त होणें; (कोणत्याहि दिशेकडे) ओढणें; होरा वाहणें (मन, अंतःकरण, चित्त वगैरे संबंधानें योजितात); (रागानें व निंदापूर्वक) आगमन करणें; येणें. (आपल्या स्वतःची धाड आणणें). –सक्रि. (ओढविणें) १ (काव्य). (एखादा पदार्थ घेण्यासाठीं) हात पुढें करणें. 'ओढवितो हात भाजिल्या पाना.' [सं. वह्; तुल० का. ओडु=हात पुढें करणें] २ आटवून टाकणें; क्षीण करणें. 'शरीर ओढवी पांचाजणा. म्हणवी पवित्र कुलांगणा.' –मुसभा १५.२२. [ओढणें]

ओढवणें—अक्रि. ओणवा होणें.

ओढा—पु. १ ओढ मधील १, २, ९, ११, १२ हे अर्थ पहा. २ (दोर, गज) वळकट व स्थिर करणें. ३ दुसऱ्या ठिकाणीं लावलेल्या भाताच्या रोपांतून वाळलेल्या पात्या ओढून काढणें; लावणी केल्यानंतर नवी पात फुटूं लागते तेव्हां जुनी सुकलेली पात काढून टाकितात, हा जो व्यापार तो. ४ घरगुती कामें; कामाचा रगाडा, ढीग. (क्रि० ओढणें). 'सारा दिवस घरांतला ओढा ओढला पाहिजे.' ५ खांब व तुळई यांना बळकटीसाठीं जें एक जोड लाकूड जोडतात तें. ६ (फोड वगैरेचें) आकर्षण; त्यावर देण्याचा औषधीचा लेप. (क्रि० घालणें; लावणें; शेकणें; धरणें). 'तुमचे पायाचे सुजेवर चांगला ओढा घाला.' [सं. उपधा (वर ठेवणें)–ओढा. भाअ १८३४]. ७ नारळ, सुपाऱ्या वगैरे एका ठिकाणीं जमा करणें. ८ पन्हा; नाला; हरळा; विशेषतः पावसाचा बरड जमिनींतील वाहणारा लहानसा प्रवाह व त्याचें कोरडें पात्र. 'ओढु' –पाटण शिलालेख शके ११२८. 'ओढा वदे तो तरि काय ऐका.' ९ खोगीराच्या तंगाची अथवा पटाडीची दोरी. १० रहाटाला बैल अगर रेडा जोडण्याकरितां बांधलेल्या जोखडास मागें जो बांबू दोरांनीं बांधून बैसनेकडास जोडलेला असतो तो. [सं. अवकर्षक–अउअढअ–ओढा रा. ग्रंथमाला] ०**ओढणें**–(वाप्र.) एखाद्याच्या विपर्यी प्रीति बाळगणें. **ओढ्यांत ओढा वारणें**–एक गोष्ट करीत असतां दुसरी जरूरीची करणें.

ओंढा—ओंडा पहा.

ओढाओढ-ढी—स्त्री. १ चोहोंकडून किंवा जोराची खेचाखेच, ओढ. २ (ल.) सर्व बाजूनीं निकड, तारांबळ, त्रास. [ओढ–द्वि]

ओढाखोडा—पु. लहान ओढे अथवा डोंगराच्या घळींतून वाहणारे प्रवाह व त्यांचीं सुकलेलीं पात्रें, घळण, चर वगैरेंना व्यापक संज्ञा. [ओढा द्वि.]

ओढाताण—(अपभ्रष्ट ओढाटाण, ओढाताड). स्त्री. १ जोराची खेचाखेच: इकडून तिकडून ओढणें; घाटेल तसें खेचणें. २ (ल.) मानसिक खळबळ, गोंधळ, (सर्व बाजूंनीं कामाचा ताण लागला असतां किंवा उद्दिष्टांमध्यें परस्पर विरोध असतां होणारी) तारांबळ, धांदल. ३ घासाघीस; खाराखीर; कां कूं करणें; जिकीर. [ओढणें+ताणणें]

ओढामाणकी-क्या—स्त्रीअव. बळेंच मागें घेणें; नको नको म्हणणें; इच्छा असतां ती नाहीं असें ढोंग करणें. (क्रि० धरणें; लावणें; करणें) ओढमाणकी पहा. [ओढा+मणि–मणका]

ओढावण-णें—न. १ एक प्रकारची हातगाडी. २ लाकडाचा ओंडा. (?). –शर. ३ ओळ्यांचें कोरडें पात्र. –स्त्री. वंशपरंपरेनें चालत आलेली पद्धति, रीत, वहिवाट. [ओढणें]

ओढावारा—पु. प्रतिबंध; मर्यादा. 'नाहीं ओढावारा. पडिला प्रसंग तो बरा॥' –तुगा २०२७.

ओढाळ—वि. १ अनिर्बंध; उनाड; भटक्या; गोठ्यांतून पळून जाणारें; कळपांतून निसटून एकटें चरणारें; स्वतःची गव्हाण सोडून शेजारच्या गव्हाणीवर हल्ला करणारें. 'नाहीं त्या यमासी करुणा। बाहेर काढितां कुडी प्राणा। ओढाळ सांपडे जैसें धान्या। चोर यातना धरिजेतो॥' –तुगा ७०२. 'मन हें ओढाळ गुरूं परधन पर कामिनीकडे धांवे.' –मोरो. २ (ल.) निष्प्रतिबंधक; चंचल; भटकें (मन); उनाड; द्वाड; स्वैर (मूल). [ओढणें]

ओढाळकी, ओढाळगिरी, ओढाळी—स्त्री. स्वैराचार; भटकेपणा; ओढाळपणा (ओढाळ पशु, वगैरेचा). [ओढाळ]

ओढाळा—पु. (कों.) जोखड व बैसनेकड यांचे टोकांस दोरीनें बांधावयाची दांडी. ओढ अर्थ १६ पहा. [ओढ]

ओढाळी—स्त्री. प्रेम; प्रीति; लघळपणा. 'अतारायें भाग्य देखती। लटकीच प्रीति वरिवरि दाविती। ज्या ओढाळी अत्यंत करिती। अतारार्शी वंचनार्थ॥' –ह २९.१७. [ओढ]

ओढियाण—पु. (योग.) उड्डीयानबंध पहा.

ओढिस्त—वि. १ अडचणीची; टंचाईची; ओढगस्त (परिस्थिति इ०). २ अडचणींत सांपडलेला; कावेलेला; पेंचांत सांपडलेला; मध्यास आलेला; ओढगस्त. [ओढ+स्थ]

ओढी—स्त्री. १ संवय; कल. 'ओढाळाची ओंगळ ओढी। उगी खोडी नवजाय।' –तुगा ३११९. २ धनुष्याची दोरी; गुण. 'वोढूनि धनुष्याची ओढी। त्र्यंबक मोडिलें कडाडी।' –एभा ११.७३५. ३ (गो.) लळा; माया. ओढ पहा. ४ हिसका; खेंच; ओढ पहा. 'ओढी घेतां तडाडी।' –आसी ६५. [ओढणें]

ओढीक—वि. १ ओझें चांगल्या रीतीनें ओढणारा. २ अडकित्त्यांत सांपडलेला; अडचणलेला; ओढगस्त; संकटग्रस्त; चारी बाजूंनीं कावकाव झालेला; कावलेला. ३ आपलें म्हणणें न सोडणारा; ओढून धरणारा (दुकानदार). ४ हळु हळु पैसा सोडणारा; घट्ट मुठीचा; चिकट; कदू; कृपण. [ओढ]

ओढीताड—ओढाताड; ओढाताण पहा. 'काया करोनि कडोविकडी। ओढीताडीं पीडियलें।' –मुसभा १५.१३३ [ओढ]

ओढील-ळ—स्त्री. ज्यांनीं कमरभोंवतीं लुगडें आवळतात त्या लुगड्याच्या दोन टोकांपैकीं प्रत्येक. ओढण अर्थ ४ पहा. [ओढणें]

ओढून चंद्रबळ—न. १ आवडणाऱ्या वस्तूविषयीं वरून वरून नावड दाखविण्याचें ढोंग करणें; आग्रहाची आवश्यकता. (क्रि० आणणें). 'हें तोडा विडया, ओढून चंद्रबळ नको आणायला.'–मोर ३२. २ महत्त्वाचा, परिणामाचा उगाच बाऊ दाखविणें. (क्रि० आणणें). ३ भाषणाची, वाक्यांची ओढाताण करणें; दूरान्वय लावणें. (क्रि० आणणें). ४ मारून मुटकून बळेंच संपादन केलेली गोष्ट (धैर्य, उमेद); नसतें अवसान. ५ (शब्दशः) कोणत्याहि शुभ कार्याच्या वेळीं अवश्य लागणारें लग्नकुंडलींतील चंद्राचें बल अनुकूल नसतांना ओढून ताणून तें अनुकूल करून घेणें. (वाप्र.) **ओढून चंद्रबळाचा**-१ बळेंच आणलेला; वर दाखविलेला, धरलेला; कृत्रिम. २ अयोग्य रीतीनें हक्क सांगितलेला, दाखविलेला. ३ बळेंच ओढाताण केलेला; बळजबरी केलेला; दूरान्वित.

ओढून-ताणून—(अपभ्रष्ट ओढूनताडून-हून). –क्रिवि. १ जोरानें खेंचून; वेडेवांकडे प्रयत्न करून; कांहींतरी जुळवाजुळवी करून. 'ओढूनताणून मोजलें असतां दहा हात भरेल.' २ कांहींतरी करून; कष्टानें; बळेंच; मोठया मेहनतीनें. [ओढणें+ताणणें]

ओढें—न. १ उडें; सुड. (क्रि० काढणें; घेणें. उगवणें), 'नगर पीडिलें त्याचें ओ(वो)ढें। आज काढीन एकदां।' –मुआदि ३८.८३. २ (व्यापक) वचपा; मोबदला. (क्रि० घेणें; काढणें). [ओढणें?]

ओढ्या—वि. (विनोदानें) पाट किंवा मोहतुर लावलेल्या बायकोचें पहिल्या नवऱ्यापासुन झालेलें मूल; पोटाखालील मूल. [ओढणें]

ओंढयालांबी—स्त्री. गव्हाचें कणीस.

ओणखुचें—सक्रि. (गो.) पाठ टेकणें.

ओणत-थ—स्त्री. (गो.) भित.

ओणव—स्त्री. शरीर पुढें कलणें; झोंक; ओणवी स्थिति.

ओणवणें, ओणावणें—अक्रि. १ पुढच्या अंगाला कमरेशीं खालीं वांकणें. २ शरीराच्या दुर्बलतेमुळें अथवा म्हातारपणामुळें पाठीस बांक येणें. [सं. अव किंवा उप+नमन; प्रा. ओणाविय]

ओणवा—वि. १ कमरेपाशीं शरीर वांकून उभा राहिलेला; वांकेलला. [सं. अवनत; प्रा. ओणय; सं. अवनमित; प्रा. ओणविय]

ओणवा—पु. वणवा; रानांतील आग. 'ओणवा वाढे लागतां वात।' –पांप्र १५.२६. [वणवा]

ओणोली-ळी—स्त्री. (गो.) हनुवटी.

ओत—पु. १ (सामा.) ऊत; कढ वर येणें; ओतास जाणें. २ पूर आलेल्या नदीचा एक फुटलेला प्रवाह, ओघ; जो जमिनींत बाजूच्या नाल्यांतून आंत दूर वर जातो तो. (क्रि० फुटणें). [सं. अवस्तृत; प्रा. ओत्थअ; का. ओत्तु=पूर]

ओत—पु. मागावर विणण्याचें आडवें सूत. 'ये अंता यावतीः सिचो य ओतवो येच तंतवः।' –अथर्ववेद १४.२.५१. 'मी आघवियेचि सृष्टी। आदिमध्यांतीं किरीटी। ओत प्रोत पटीं। तंतु जेवीं।' –ज्ञा १०.२६४. [वै. ओतु]

ओतकाम—न. धातूचा रस सांच्यांत ओतण्याचें वगैरे काम. [ओतणें+काम]

ओतणी—स्त्री. १ उंचावरून भांड्यांतील पातळ पदार्थ खालीं (भट्टींत, साच्यांत) ओतणें; स्राव; लोट. २ वितळलेल्या धातूकरितां केलेला सांचा. [ओतणें]

ओतणें—उक्रि. १ वरून पातळ पदार्थ खालीं सोडणें; धार पाडणें. २ साच्यांत धातूचा पातळ रस ओतून आकार देणें; प्रतिमा तयार करणें. 'मुकुट कुंडलें श्रीमुख शोभलें। सुखाचें ओतलें सकळही।' –तुगा २. –अक्रि. ऊत येणें. उतणें पहा. [सं. अव+स्तरण; प्रा. ओत्थरण; का. ओत्तु; सिं. ओतणु]

ओत देणें—सक्रि. (व.) भर देणें; साहाय्य करणें.

ओतना—१ सैन्य; पृतना. 'यादवु होतें थोकलें। ऐसा हीं तिनि ओतनें जुंझीनिलें॥' –शिशु ९७५. २ युद्ध. [वै. पृतना=युद्ध?]

ओतप्रोत—(अप. रूप ओतपोत). क्रिवि. (ओत म्हणजे आडवा धागा, प्रोत म्हणजे उभा धागा). १ उभे आणि आडवे;

लांबीकडून व रुंदीकडून; एकमेकांशीं काटकोनांत असणाऱ्या दिशांना. २ (काव्य) अंतर्बाह्य; सर्वत्र; चोहों बाजूनीं. 'घायाळ कीजे तरटमार। तैसें ओतप्रोत दुःख फार।' –एभा १०.६७५. 'सेना उतरली ओतपोता।' ३ सढळ; पूर्ण; पुष्कळ; भरपूर. 'त्या गोष्टींत करुणरस ओतप्रोत भरला आहे.' –पान्ह (प्रस्ता.) –पु. उभे–आडवे तंतू; बाणा आणि ताणा. 'मी आघविये चि सृष्टी। आदिमध्यांतीं किरीटी। ओतप्रोत पटीं। तंतु जेवीं॥' –ज्ञा १०.२६४. [वै. ओतु+प्रोत]

ओतल—पुन. (सोलापूर) पाणी तापविण्याकरितां मातीच्या चुलाणांत कायमचें बसविलेलें कढई किंवा गगाळासारखें मोठें पात्र; वतल; कांहीं ठिकाणीं पाणी भरण्याच्या अथवा तापविण्याच्या रुंद तोंडाच्या भांड्यास किंवा माठासहि म्हणतात. [ओतणें]

ओतवरा—वि. उतावळा; अतिशय उत्सुक. 'नाना फळीं ओतवरा होतु। श्रीकृष्णभेटी लागीं॥' –दाव १५४. [म. ऊत; का. ओत्तु]

ओतशाळा—स्त्री. १ (सामा.) ओतकामाचा कारखाना. २ टाईप (टंक) ज्या ठिकाणीं पाडले जातात ती जागा; टंकशाळा. (इं.) फाउंड्री. –चित्रमयजगत् ९.१९१८.

ओताऊ—वि. ओतींव; ओतलेलें, तयार केलेलें. [ओतणें]

ओताणा—पु. सोनारांचें एक हत्यार; काकता. काकणता पहा.

ओताम—क्रिवि. (भि.) इतक्यांत? 'आन तियाल मारा आं ओताम उंदऱ्यो तियाल आरुयों' =व त्याला मारणार इतक्यांत उंदीर त्याला म्हणाला. –भिक्षी १७.

ओतारी—पु. ओतकाम करणारा; धातूचा रस ओतून वस्तू बनविणारा; भांडीं घडविणारा; धातूच्या मूर्ती तयार करणारा. 'देव घडिला सोनारीं। देव ओ(वो)तिला ओ(वो)तारीं॥' –दा ६.६.३७. [ओतणें]

ओतींव—वि. १ ओतून बनविलेलें; साच्यांत घालून तयार केलेलें; ओताऊ. 'ओतीव हे न–घटिताकृति बोलिजेली।' –नल ७३. २ (ल.) सुंदर; शुद्ध; अस्सल. 'जें मायेचें शुद्धत्व। तेंचि ओतीव महत्तत्त्व।'–विपू ३ ६८. 'ओंतीव श्रीमुख सुखाचें सकळ। वामांगीं वेल्हाळ रखुमादेवी।' –तुगा ३. **०थाळी-पीट**–न. भांडयांत फोडणीस टाकलेली पातळसर भाजणी शिजून जें थालीपीठ तयार होतें तें. तव्यावर थापून केलेलें थालीपीठ नव्हे. **०लोखंड**–न. बीड. (इं.) कास्ट आयर्न.

ओतु—पु. आडवा धागा; ओत पहा. 'ऋग्वेदांतील मंत्रांत (६.९.२) तंतु (उभा धागा), ओतु (आडवा धागा), हीं पदें आलीं असुन तीं वस्त्रासच लाविलीं आहेत.' –टि ३.४६.

ओतु—पु. मांजर; विडाल; मार्जार. 'नकुळ म्हणे व्याघ्र शिरीं दिधला हा वामपाद ओतूनीं।' –मोसभा ७.२६. [सं.]

ओतू—उतू पहा.

ओत्सा—वि. १ क्षुद्र; कमीपणाचा; कमी योग्यतेचा; हलका. २ (गुज.) कमती; उणा; पाहिजे त्यापेक्षां थोडा; किमतींत हलका; लहान बांध्याचा. [हिं. ओछा=हलकें; गु. ओच्छा]

ओथंबणें—अक्रि. १ वाकेपर्यंत लोंबणें (फांदी). २ फळांच्या भारानें खालीं वांकणें (फांदी); स्वतःच्या भारानें खालीं वांकणें (पिकलेलें फळ); खालीं लोंबणें (पोट, ढग). ३ पासून लोंबणें; झोके घेणें; ४ एखाद्या पातळ पदार्थानें, रसानें वगैरे थबथबणें. ५ (कों.) (रक्तातिशयामुळें) शरीराचा अवयव अतिशय खालीं लोंबणें. ६ वर चढणें; टेकणें; आश्रय मिळविणें. –उक्रि. (क्र.) खालीं दाबणें; वांकविणें (तक्ता, फळी, फांदी इ०). [सं. अव किंवा उत्+स्तंभ्; प्रा. उत्थंभ]

ओथंबा—पु. १ (झाडाला, वेलीला) आश्रयासाठीं लावलेला डांब, मेढ. २ (ल.) आश्रय; आधार; आश्रयदाता; आधारकर्ता; ठेपा 'तोहि सर्वसाक्षी ओथंबा।' –निगा २९. ३ झोक; हेलकावा. (क्रि० घेणें). ४ (गो.) ओथेंबे; पावसाची सर सपल्यावर झाडाच्या पानांवरून पावसाचें पाणी टपटप गळतें ते थेंब. [ओथंबणें]

ओथळा-थिळा-थिवळा—पु. (कों. चि.) ठिपकणें; ओथंबा अर्थ ४ पहा. 'शेत ओथिवळयांनीं भेलें.' 'म्यां पाऊस निवारला परंतु ओथळ्यांनीं भिजलों.'

ओंदण—न. (कों.) कोठार, दुकान इ० च्या फळ्या (दारापेवजी) बसविण्याकरितां खांचणी घेतलेलें वरचें, खालचें व बाजूचें लाकूड. [कोंदणें?]

ओदन—पु. शिजविलेले तांदूळ; भात. उ० शाल्योदन, दध्योदन. [सं.] **ओदनाचें**–न. (लु.) जेवण; भोजन.

ओदर—पु. धूर; वास; घाम (?). 'न लवीं वो कुपुरू। सार्वांगीं येतुसें ओदरू॥' –शिशु ८३२. [सं. उद्+धू; म. धूर; तुल० इं. ओडर]

ओदुण—न. गुंडाळी; दुघडी. 'कृष्णाजिनाचें ओदुण केलें.' –शिशु १४२. [सं. द्विगुण; म. दुर्णे]

ओंध-द—स्त्री. (कों.) मळभ; अभ्रामुळें आलेली अंधारी; झापड; काहूर. (क्रि० घालणें). 'अभ्रानें अथवा पावसानें ओंध घातली.' –वि. ओंधट पहा. [सं. अंध]

ओंधट—वि. (कों.) १ काळोखीचा; अंधारी आलेला; उदासवाणा (दिवस); अंधारी; अंधाराची (खोली). २ अंधुक; अस्पष्ट; सहज न ओळखूं येणारा (पदार्थ, वस्तु). ३ कोंदट; मलिन. [ओंध]

ओनव-वा-वणें, ओणावणें—ओणव-वा-वणें पहा.

ओनवा—पु. रानांतील वणवा; आग. ओणवा पहा [वणवा]

ओनामा, ओनामासीधं—१ ॐनमः सिद्धम् चा संक्षेप किंवा अपभ्रष्ट रूप (ॐ=ब्रह्म; नमःच्या योगी चतुर्थी असावी परंतु ॐ अव्यय असल्यानें चतुर्थीची जरूर नाहीं. सिद्ध शब्द मंगलवाचक आहे. ॐनम.सिद्धम् म्हणजे (शब्द)ब्रह्मास नमस्काररूप मंगलवर्ण. पण हा वाक्प्रचार जैन आहे. अर्थ-सिद्धास नमस्कार-जिनास नमस्कार. श्रीगणेशायनमः हा सनातनी, त्यास प्रतिरूप असा जैन वाक्प्रचार. २ (ल.) प्रारंभ; पहिला धडा; सुरवात; मूलतत्त्व. 'संस्थानें बरखास्त वाकीच्या राहिलेल्या हिंदुस्थानाला डोमिनियन स्टेटस लागू करतों अमें कोणी म्हणेल तर त्याला राज्यघटनेचा ओनामाहि कळत नाहीं अमें म्हणावें लागेल.'-सासं २.४५०. 'म्हणता कशास ओनामा। जननीं घ्या हरिच्या नामा।' **ओनाम्या**-वि १ ओनामा शिकणारा; कोणत्याहि विद्येला ज्यानें नवीनच सुरवात केली आहे असा. २ ओनामा शिकविणारा; पंतोजी. [ओं नमः]

ओप—स्त्रीपुन. १ उजळा; जिल्हई, चकाकी. (क्रि० देणें, घेणें; बसणें). 'बालसूर्याची ही ओप। जया पाहता पारुषे॥' -मुसभा १४.४९. २ जिल्हई; मुलामा; वस्त्रे; गिलीट (अलंकार, दागिने वगैरेस) (क्रि० देणें; घेणें; बसणें). 'प्रभु मदेहा, गेहा शोभा दे, कुशलें जेविं ओप नगा.' -मोअनु ७.९९. 'जाणों हटकासि ओप दीधलें।' -अनंत सीतास्वयंवर ३१. ३ धुणें; निर्मळ करणें; शुभ्रता; निर्मळपणा (कापड धुवून उन्हांत टाकून वर पुन्हां पुन्हां पाणी शिंपडून खळ घालविणें). (क्रि० देणें; घेणें; बसणें). 'दुग्धसमुद्रीं ओपिलें। कीं निर्दोष यश आकारलें। तैसें शुभ्र वस्त्र परिधान केलें। ध्यानीं मिरवले भक्तांच्या।' -ह १.८. ४ (नि. कों.) सकाळचा व थंडीच्या दिवसांतील मंद सूर्यप्रकाश; कोंवळें ऊन्ह, उन्हाचा ताव, (या सूर्यप्रकाशांत लोक आनंदानें उन्ह खात बसतात); सूर्यस्नान, (क्रि० घेणें; घेत बसणें). 'आभाळ आलें म्हणजे वस्त्राला ओप बसायची नाहीं आणि तुला देखील ओप घेववणार नाहीं.' ५ वाफ; वाष्प. [दे. ओप्पा=झिलई देणें; का. वोप्प=सुंदर, नीट; गु ओप=चकाकी] **०देणें**-सुशोभित करणें; नटविणें; खुलविणें; चकाकी देणें; शोभा आणणें. 'तूं मत्स्यवंशी कुळदीपकीरे। न हें तुला देइल ओप कीर।' -वामन विराट ६.२९. 'गोऱ्या मनुष्यास काळा पोषाख ओप देतो.'

ओपटणें—अक्रि. (कों.) कृश, अशक्त, किरकोळ होणें; खंगणें; फिकटणें. [ओप]

ओपणी—स्त्री. ओप देण्याचें हत्यार; सळई. [ओप]

ओपणी—स्त्री. विकणें; विक्री. ओपणें पहा.

ओपणी—स्त्री. (वपणें) पेरणें; लावणी टुपणी; लावणी देणणी. [सं. वप्]

ओपणें—सक्रि. १ एखाद्याच्या हवालीं करणें, हातीं देणें; सोंपविणें. 'नृपें तयाच्या करीं ओपिला निज कन्येचा कर।' -विक २७. 'प्रधानास कारभार ओपून आपण अनेक देशाटन करीत असावें.' -सिंब २६. २ (सामा.) देणें, अर्पण करणें; नजर करणें; वाढणें; घालणें. 'जें जयासी पाहिजे अन्न। तें तें तयांसी ओपित।' -ह ३४.५८ ३ (कृ्ण. गो.) विकणें; विकत देणें. [सं. अर्पण; प्रा. ओप्पणं; का. ओप्पिसु=देणें]

ओपणें—उक्रि. (तेजावर) तोंडपाठ म्हणून दाखविणें. **ओपून घेणें**-कबूल करून घेणें.

ओपणें—अक्रि. १ निर्मल, शुभ्र, स्वच्छ करणें; धुणें. 'दुग्धगमुद्रीं ओपिलें। कीं निर्दोष यश आकारलें। तैसें शुभ्र वस्त्र परिधान केलें। ध्यानीं मिरवले भक्तांच्या॥' -ह १.८. ओप अर्थ ३ पहा. २ वाळत घालणें, ऊन देणें. [ओप]

ओपणें—न. देणें; देणगी; लाभ. 'घेओनि जाय ओपणें धर्ममोक्षाचें।' -भाए ७५३.

ओपतें—न. (कों.) ओपण्यासाठीं ठेवलेलें कापड; धुण्याचें वस्त्र. [ओप]

ओपल—न (इं.) एक उपरत्न. शिवधातु पहा.

ओपला येणें—(क.) (जनावर) वांफेला येणें; संभोगाची इच्छा उत्पन्न होणें. 'कुत्री ओपला आली आहे.'

ओपवणी—स्त्री. ओप, झिलई, चकाकी, मुलामा देणें; ओपविणें. [ओप]

ओपविणें—सक्रि. १ निर्मळ करणें; उन्हांत वाळविणें, शुभ्र करणें. ओप अर्थ ३ पहा. २ झिलई, मुलामा देणें. ३ उजळ करणें, लखलखीत, चकाकीत करणें. [ओप]

ओपसर-रा—पु. १ रत्नाच्या खाणींत त्यांचें तेज वाढविण्यासाठीं जो चकाकित वस्तूंचा तुकडा किंवा पूट देतात तें. २ झिलई, उजळा, झकाकी, ओप देणें. (क्रि० देणें). [ओप]

ओपसळई—स्त्री. धातूंना झिलई देण्याची गारेची किंवा शिंपेची कांडी अथवा कवडी; ओपणी. या गारेच्या सळईस एका बाजूस निमुळतें टोंक असतें आणि दुसऱ्या बाजूस दांडी असते; [ओप+सळई]

ओपळी, ओपाळी—स्त्री. हिवाळ्यांतील सौम्य ऊन; उन्हाची तिरीप. ओप अर्थ ४ पहा. (क्रि० घेणें; बसणें). 'ओपळीस बस.'

ओपा—पु. तेज; तेजेला; झिलई. ओप पहा. 'छत्र चामरें ढळती ज्यावर कनक ओपा ओपती।' -प्रला ११७. [ओप]

ओपार—स्त्री. (गो.) तिखटमिठाचा सांजा; उपमा. [का. उप्पु=मीठ]

ओपारा, ओपारेकरी—ओवांडा-ओवांडेकरी पहा.

ओपावणें—अक्रि. (राजा.) पायाच्या चवडयावर उभें राहणें. [सं. उत्+पद; हिं. पाव]

ओपास्ती—स्त्री. उपासना. '१ मंले ओपास्ती देवें फुल १.' –पंढरपूर ८४ चा शिलालेख. [सं. उपास्ति]

ओपीव—वि. ओप, मुलामा, झिलई दिलेलें. [ओप.]

ओफटणें—क्रि. पांढरें, फिकें पडणें; उफटणें पहा.

ओफरें—न. (प्रां.) १ भूत; पिशाच्च इ० चें अंगांत येणारें वारें; फेपरें; चाळे; वेडेचार; झटका; भूतबाधा. २ (ल.) मनाचा उच्छृंखळपणा; रागाचा झटका. (क्रि० येंणें; चढणें; जाणें; उतरणें). 'आईबापाला ओफरें आलें म्हणून लेंकराचें ओफरें जाईल काय?'

ओफाडा—पु. (कों.) भाजी लावण्यासाठीं केलेलें खांचर. १०–१५ रोपें ज्यांत लावतात ती वाडी व १०–१५ वाड्यांचा ओफाडा; वाफरें; लहान शेत. [सं. उत्+पट्-पाटय्-उप्पाड?]

ओंब—पु. एक इमारती लांकडाचें झाड.

ओबक—पु. ओकारी; ओकारीमधील आवाज; ओकांवा. (क्रि० करणें; होणें). [ओ ध्वनि]

ओंबकळणें—अक्रि. झोकें घेणें; हेलकावणें; लोंबकळणें; ओळकंबणें पहा.

ओंबकळा-काळा—पु. लोंबकळा; झोका; ओळकंबा. (क्रि० घेणें).

ओंबट—न. कणीस (राळा, वरी, सांवा इ० चें). [ओंबी]

ओंबट—वि. कोंबट; सोमट; सोमाळा; गरमनरम. [उबट, कोंबट अप.]

ओबडधोबड—वि. वेडेंवांकडें; प्रमाणरहित; घस्मर; रांगडा; सरासरी; खरखरीत; वेढब. आबडधोबड पहा. 'ओबडधोबड बायकोला कसली भीती नाहीं.' –मोर १९. [सं. उद्भट; प्रा. उब्भड; ओबड द्वि; उद्बद्ध(=लढ)–उब्बड–ओबड–ओभड; हि. अबडधबड]

ओंबण—न. घराच्या छपरावर आडव्या रचलेल्या कारव्या, रिका, कामटया इ० (गवत किंवा कौलें घालण्यासाठीं), पांझरण. [सं. उद्बंधन; प्रा. उब्बंधण. किंवा सं. उल्ब=(गर्भवेष्टन)–ओब्ब-ओंवण; ओंव=लाकूड?]

ओंबण—न. ओंवण; ओंवण पहा.

ओंबणें—उक्रि. १ ओंवण पसरणें; वाशांवर ओंवण घालणें. २ (कु.) ओमणें; बांधणें. [ओंवण]

ओबरट—वि. (प्रां.) खडबडीत; जाडेभरडें (कापड, सुत वगैरे). [अरबट?]

ओंबळणें—उक्रि. खलबळणें; चुबकणें; हळु हळु धुणें; बुचकळून काढून वाळत घालणें, पिळणें. [प्रा. ओंबालइ=सं. ह्लावयति=अधोळणें?]

ओंबी—स्त्री. १ गव्हाचें कणीस, लोंगर; लोंबी; ओला दाणा. २ (अव.) ओंब्या; ओंबींतील काढून भाजलेले गहूं, हुरडा केलेले ओले गहूं. [सं. दे. उंबी=भाजलेलीं गव्हाचीं कणसें] **०टाकणें**–(गव्हाला) कणीस येणें.

ओंबील—पु. एक प्रकारचा तांवडा मुंगळा, डोंगळा (बहुधा झाडावर आढळणारा); वाळिबा. उंबील पहा.

ओब्जाडणें—क्रि. (गो.) लाथांनीं बडवणें अथवा मारून जेरीस आणणें. [?]

ओभाणें—न. पूर; वेग. –शर.

ओभावणें—सक्रि. नाहींसें करणें. उभविणें पहा. 'ओभावी वो मधुकरू। विसारीं वो चकोरू।' –शिशु ८३९. [उभविणें, अभाव?]

ओम्, ॐ—अ. अ=विष्णु, उ=शिव, म=ब्रह्मा. ह्याप्रमाणें तिन्ही देवांचें वास्तव्य या शब्दांत आहे. १ वेद, पुराण, पोथी, स्तोत्र इ० म्हणण्यापूर्वी व संपविल्यानंतर जो पवित्र शब्द उच्चारतात तो; प्रार्थनेच्या वेळीं प्रारंभीं उच्चारावयाचा शब्द. 'ओम् नमोजी गणनायका।'; 'ओम् श्रीरामरक्षास्तोत्रमंत्रस्य।' २ आरंभ; उपक्रम. ३ प्रणवब्रह्म; शब्दब्रह्म; एकाक्षर ब्रह्म. 'ॐ नमोजी आद्या॥' –ज्ञा १.१. ३ वैदिक काळीं (मांडूक्य उपनिषदांत), अ=वैश्वानर, उ=तैजस, म=प्राज्ञ, ओम्=अतर्क्य, अवाच्य व ज्यामध्यें सर्व जगाचा समावेश होतो असें ब्रह्म, असा अर्थ होता. ओम् हें अक्षर प्रथम उपनिषदांत आढळतें. **०कार**–ओम् पहा. **०तत्सत्**–ॐ(=ब्रह्म), तत्(=तें), सत्(=खरें,) फक्त ब्रह्म हें खरें किंवा शाश्वत आहे. 'ओम्, ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु।' मंत्र किंवा एखादें कर्म संपविल्यानंतर हें वाक्य म्हणण्याचा परिपाठ आहे. लक्षणेनें याचा अर्थ संपविणें, पाणी सोडणें असा आहे. 'ॐ तत्सत् ब्रह्मार्पणं सेवट।' –दावि २६. **०पुण्या-पुण्याहम्**–१ मी प्रणवरूप, पुण्यस्वरूप आहें अशा अर्थाचा मंत्र. एखाद्या मंगल संस्काराचे पूर्वी स्वस्तिवाचन नांवाचें कर्म केलें जातें त्यामध्यें संस्कारकर्त्या यजमानास ब्राह्मण 'ओं पुण्याहं' असा आशीर्वाद देत असतात. 'चिद्ब्रह्मेंसि लग्न लाविशी। ओं पुण्येसी तत्त्वता।' –एभा ८ १. २ लग्न मंत्राचा आरंभ, पुण्याहवाचनाचे वेळीं म्हणण्यांत येणारे मंत्र. 'ॐ पुण्याह म्हणोनियां जाण। लाविलें उभयतांचें लग्न॥' –जै ५६.२०. **०फस, ०फस होणें**–१ निष्फळ होणें; फसणें. 'परीक्षा नापास झाल्यामुळें त्याचे सारे बेत ओंफस झाले व पुन्हां तो कॉलेजची वारी करूं लागला.' २ लयास

जाणें, नायनाट होणें. [ओम्+फस्=फुगा फुटल्याचा आवाज] **०भवति**–१ (भिक्षां देहि). बाई भिक्षा वाढा, असा भिक्षा-मागतांना म्हणावयाचा मंत्र. २ (ल.) भिक्षा(मागणें); भिक्षाटन. 'नीट वागला नाहींस तर ओंभवती करीत फिरशील बरें !' **०भवति पक्ष**–१ भिक्षावृत्ति; भीक मागण्याचा पेषा. ' ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा । ओं(वों)भवति या पक्षा ! रक्षिलें पाहिजे ॥ ' –दा १४.२ १. २ (ल. उप.) अजे विनंत्या करून (स्वराज्य) मागणाऱ्यांचा एक पक्ष; मवाळ पक्ष.

ओम—स्त्री. (व.) १ प्रकाशाची पूर्वप्रभा, तेज. ' चंद्राची ओम पडली. ' **०जिकणें**–पाणी जोखणें; सामर्थ्य ओळखणें. ' तिनें नवऱ्याची ओम जिकली. ' [ओप ?]

ओमण–णें, ओमळणें—ओंवण, ओंवणें, ओंवळणें पहा. (कु.) ' दोरयेन ओमून घे. '

ओमेरा–(कऱ्हाड) मुलींचा एक खेळ (मुलांच्या हुतुतु सारखा), शिवावयास जाणाऱ्या मुलींनीं ' ओ मेरा। चकी भोरा । भो–भोरा । भो–भोरा । ' असें म्हणावयाचें [ध्व.]

ओय—उद्गा. कळ उठली किंवा कांहीं दुःख झालें असतां एकदम उच्चारला जाणारा शब्द; दुःखोद्गार; दुःसह वेदना झाली असतां हा उद्गार निघतो. [ध्व.]

ओयरण–णें—वैरण–णें पहा.

ओयरा—पु. १ वैरा; एका दिवसाच्या स्वयंपाकासाठीं डाळ, तांदूळ इ० काढून ठेवलेला शिधा. **म्हण** १ जों जवळ ओयरा तों जग सोयरा. २ निराळा ओयरा कोणकोणाचा सोयरा. २ ह्या शिध्यांपकीं (वायकांनीं) संचय म्हणून काढून ठेवलेला भाग. [सं. अभ्यवहार. (धातु अव+हृ) वैरणें, वैरा]

ओयरा—पु. १ (कों.) स्वयंपाकघर. ओवरा पहा. २ (कांहीं प्रांतांत) माजघर. [ओवरी ?]

ओयल—वि. (गो.) रागीट.

ओर—स्त्री. ओरी, ओवरी पहा.

ओर—पुन. (पाण्याचा) पूर; लोंढा. और पहा. [सं. आ+पूरय; प्रा. आऊर]

ओरक–ग––न. मोठा हातबाजः हारमोनियम. [पोर्तु. ओर्गाव; इं. ऑर्गन]

ओरकल—पुस्त्रीन. सोन्याचा कस लावण्याची कसोटी (चौकटींत बसविलेली); कसोटीचा दगड; निकष. [का. ओरे-कल, ओरे=कस लावणें, घांसणें; कल्लु=दगड]

ओरखडणें, ओरखाडणें––उक्रि. १ चीर पाडणें; रेघ ओढणें; पृष्ठभाग किंचित दुखविणें; ओरखाडा काढणें; ओचकारणें. २ (ल.) जमीन वरवर नांगरणें. ३ वेडेवांकडे, आडवेतिडवें लिहिणें; रेघोट्या मारणें; खरडणें; तासणें. –अक्रि. अपक्व, ज्ञान असणें; शास्त्रादिकांचा वरवर अभ्यास करणें; कसेंतरी ओर बडलें जाणें. ' हा केवळ निरक्षर नव्हे, कांहीं ओरखडला आहे. '

ओरखडा—पु. चिर (शरीरावर नख, काटा इ०कांनीं पाडलेली); जोरानें ओढल्यावर पडणारी चीर, रेघ; ओचकारा. [सं. आ+रेखा]

ओरंगउटंग, ओरंगोटंग––पु. शेंपूट नसलेला लांब हाताचा एक वानर. हा मलाया, बोर्निओ, सुमात्रा इ० अरण्यांत आढळतो. [मलाई ओ० उतन=रानमाणूस; तुल० सं. उरु+अंग+उत्तान= मोठा]

ओरंगणें––उक्रि. विटंगें; त्रासणें. वोरंगणें पहा. [अव+रंग]

ओरंगळ––स्त्री. वरंघळ; उतार. [का. वार=उतार]

ओरट–ड––पु भाजल्या जाणाऱ्या मिरच्यांचा वास; खकाणा; मिरच्या दळतांना येणारा दुःसह वास; त्यांचे नाका तोंडांत जाणारे बारीक कण; विझणारी मेणबत्ती इ० चा तीव्र, असह्य वास. [का. उरुटु=मर्यादा सोडणें; दुःसह होणें] **०घाण, ओरट्राण, ओरढाण**–स्त्री सहन न होणारी घाण; उग्र वास; दुर्गंधि.

ओरंट—पु. (प्रां.) आचका; पेटका; कळ; चमक. [?]

ओरड–णें, ओरडा, ओरडाओरड—तकार. अरड–णें, अरडाअरड पहा. ' हिंदुस्थानांतील इंग्रज राज्यकर्ते यांच्याजवळ ओरड करून कांहीं एक मिळायचें नाहीं. ' –टि १.२५७.

ओरंडी—स्त्री गोट; कांठ; कठडा, कठडयाची भित; वरवंडी पहा. [का. ओर=कांठ, शेवट]

ओरडी—स्त्री. (गु.) ओवरी; खोली. ' मुलगा तोफान करतो म्हणून त्याच्या आईनें त्यास मारलें आणि त्यास ओरडींत पुरून ठेवून बाहेरच्या बारण्यास साकळ दिली. ' –मौज २–६–३०.

ओरडेल—न. घाणेरडें तेल; तळणांतील शिल्लक राहिलेलें तेल. [ओरट–ड+तेल]

ओरण–णें—वैरण–णें पहा.

ओरप––पुस्त्री. १ (केसांतील उवा मारण्यासाठीं) केसांतून फणी जोरानें ओढणें, विंचरणें. (क्रि० करणें; घालणें) २ (सामा.) ओरपणें या अर्थी प्रयोग; जोरानें ओढणें, खेंचणें. ३ नागवणूक; लूट; लुबाडणी. (क्रि० घेणें; करणें). ४ ओरपण्यापासून मिळालेली गोष्ट; लूट; बुचाडलेलें द्रव्य. (क्रि० काढणें). [ओरपणें]

ओरपणें––उक्रि. १ जोरानें भुरका मारणें; भुरक्याचा आवाज काढून खाणें. २ (डहाळीचीं पानें फुलें इ०) ओरबाडणें; (जटा झालेल्या केसांतून दोऱ्यांतून इ०) जोरानें बोटें ओढणें; (शेत जमीन) वरवर नांगरणें; त्यांतील गवत, झुडपें,

कुंदा इ० काढणें. ३ (दुखवलेल्या भागावर डागण्यासाठीं) तापविलेली लोखंडाची सळई जलदीनें ओढणें. सर्दीसारख्यावर उपाय–पावसाळ्यांत दिवसभर गारठ्यांत राहिल्यामुळें पायास होणारी सरदी घालविण्यासाठीं तळव्यावर ओला कपडा ठेवून अगर ताक लावून वरून तापविलेली लाल लोखंडाची सळई बंबेरे फिरविणें. ४ जोरानें, ओबडधोबड रीतीनें बोचकारणें; खाजवणें. ५ (ल.) लुटणें; नाश करणें; तुचाडणें; नागवणें. [सं. ओरंफ= जोराचा ओरखडा (धातु रफ्–रंफ् = जाणें); दे. ओरंपिअ= तासलेलें; नष्ट]

ओरफडणें, ओरबडणें, ओरबाडणें––ओरपणें अर्थ २, ३, ४ पहा.

ओरफुल––न. (गो.) गिलीट: मुलामा.

ओरबडा–बाडा––पु ओचकरा; ओरखडा पहा

ओरंबा––पु. मातीचा डींग; (बागेला घातलेला) मातीचा वरंबा, धक्का, वरवंडी; (क्रि० घालणें) [वरंबा; का. ओर=कांठ, कड]

ओरय, ओरी––स्त्री. (गो.) एक डोंगरी धान्य; वरी. [वरी]

ओरवा––पु. वरवा. १ पाण्यांत जहाज (कांहीं दिवसांकरितां) नांगरणें. ' जेथें ओरवा करावयाचा तेथें आलें म्हणजे नांगर खालीं सोडितात ' –मराठी ३ रें पुस्तक, आवृ. ४, पृ. ६१. २ (जहाज) नांगरून केलेला मुक्काम. ' मार्गांत दोन तीन ठिकाणीं ओरवा करावा लागला. ' –अर्ह ४९. ३ (जहाज) नांगरण्याची जागा. **०करणें**–जहाज नांगरणें.

ओरष्टाण––स्त्री. (कों.) ओरट्घाण पहा.

ओरस––पु. ओहोटी. ' तेव्हा पंचतत्त्वांचा नाश। दश प्राणांचा ओरस। होवोनि राहे येक अंश। सर्वात्मपणें ॥ ' –कथा ७.२.४२. [सं. अव+स्रु; ओसर अप.]

ओरस––पु. १ उत्साहाचा उत्कर्ष; अत्यानंद. ' तैसा भरला ओरसु। करितां मठ प्रवेशु। ' –ऋ ६१. २ स्नेहोत्कर्ष; (गाई इ० चा) पान्हा फुटणें. ' जैसी ओरसें धेनु। हुंबरत ये वच्छा लागौनि ॥ ' –ऋ २७. ' गोवर्धनीं ज्या गाई चरती । त्या ओरसा येऊनि वत्से चाटिती। ' –ह १०.२६७. ' ओरसेवेळा पाजी प्रेत पान्हा। ' –नाग १'१३५. (क्रि० येणें). [सं. अव+रस किंवा औरस्य=हृदयोत्पन्न; प्रा. ओरस्स]

ओरसणें––अकि. पान्हा फुटणें. वोरसणें पहा.

ओरळी––स्त्री. बांध; वरुळी. ओरंबा पहा. ' जेयां कस्तुरिअेंची बुडवती । कापुराची ओरळी भवंती ॥ ' –शिशु ३०८ [का. ओर=कांठ; म. वरळी]

ओरा, ओंरा––ओयरा पहा.

ओरा––पु. (हिं.) विशिष्ट मिठाई; साखरेचा लहानसा लाडू. ' पाण्यास लागलेला साखरेचा ओरा (म्हणजे लाडू) जसा पाणी शोधून घेतो ... ' –मराठी ६ वें पुस्तक, पृ. २२७. (१८७५). [हिं. ओला]

ओरा––पु. ओहरा. १ (कों.) मोठ्या शेतामध्यें नांगरण्याच्या सोयीसाठीं पाडलेले जमिनीचे जे मोठे तुकडे ते प्रत्येकी. २ नांगराची एक अथवा थोड्याशा रेषा (तास). ३ अशा प्रकारें नांगरलेला शेताचा अंडाकृति भाग. आरा पहा.

ओरी––ओवरी पहा.

ओर्के––ओरक–ग पहा.

ओल––स्त्री. १ भिजलेली स्थिति; ओलावा; दलदल; आर्द्रता. ' दानव रुधिराचिया ओला. ' –शिशु २. २ (ल.) साध्यता; सुलभपणा (काम करण्यास जागा, सवड). उ० तेथें कांहीं ओल आहे=आशा करण्यास कांहीं जागा, अनुकूल स्थिति, साधन, सोयी आहेत. [सं. आर्द्र; प्रा. उल्ल–ओल्ल] **म्हण** १ ओल आहे कीं पो(फो)ल आहे, ओल ना पोल, ओल कीं पोल (कांहीं ओलावा आहे ? कां रगळा भुसाच), तेथें कांहीं लम्प्यांश आहे किंवा नाहीं. २ मुलांचा एक खेळ, (चार, पांच मुलें एकत्र बसून उभी पोकळ मूठ करितात, एक मुलगा आपल्या हातांतील खडा कोणातरी एकाच्या मुठींत टाकतो व मग ओल कीं पोल असें डाव आलेल्या मुलाला विचारतो व त्यानें ज्याच्या हातांत खडा असेल त्याचा तो हात धरल्यास त्याची हार जाऊन खडा धरणाऱ्यावर येते.) ३ (ल.) दयाळूपणा, दयार्द्रता. ' भीतरि नाहीं प्रेमाची ओ(ल)ळ। तया कवि बोलवती वियोगिचे बोल। ' –ऋ ९९. **०धरणें**–जमिनींत पडलेल्या पावसाच्या पाण्याची वाफ होण्यापूर्वी जमीन नांगरणें. **ओलीला आल मिळणें**–जमिनींत ओलावा वाळून गेला नाहीं तों पुन्हां पाऊस पडणें.

ओल––स्त्री. कापडाचा तुकडा (एकेरी पन्ह्याचें ५–७ हात लांब उपरणें, पलंगपोस), (गो.) स्त्रिस्नान वायांची ओढणी.

ओल––स्त्री. हमीदाखल ठेवलेली वस्तु (गुरें, माणसें इ०); तारण; शत्रूनें तहाच्या अटी पाळाव्या म्हणून त्याजकडून खातरजमेसाठीं मनुष्य, गुरें, द्रव्य इ० मागून घेऊन त्यांस अटी पूर्ण होईपर्यंत अडकवून ठेवणें. ' कोट किल्ले दिले ओलिला त्रिंबकजीसाठीं। ' –ऐपो ३८३. [का. ओळु=हमी, तारण; दे. उल्ल=कर्ज]

ओलंगार––पु. (प्रां.) झिरप; पाझर; हळु हळु (पाणी) वाहणें, ठिपकणें.

ओलट––वि. दमट; भिजलेलें; ओलसर; सर्द. [**ओल**]

ओलट––स्त्री. ओलीं जळाऊ लांकडें. [ओलें+काष्ठ]

ओलटा––पु. (कों.) होलटा; हिरवी फांदी; ओल्या लांकडाचा बारीक तुकडा; दांडकें; दंडुका (हा फळ पाडतांना वापरतात). **म्हण** पडला तर आंबा नाहीं तर ओलटा. [ओलें+काष्ठ]

ओलंडणी—ओलांडणी पहा.

ओलं(लां)डणें—१ ओलांडणें पहा. २ उलंडणें (उल्टा होणें) या अर्थी चुकीनें योजतात.

ओलंडा—ओलांडा पहा.

ओलतेर—न. (गो.) निजण्यासारखी खुर्ची; ईजी चेअर [पोर्तु. इं. आर्मचेअर]

ओलपटणें—उकि. (कों.) ओलटा किंवा अर्धांच वस्तु फेकणें; अथवा फेंकून मारणें.

ओलपटणें, ओलपटा—नपु (कों.) होलटा. ओल्टा पहा. [ओल+पट्टा]

ओलपाटा—पु (सामा.) काठी; लहान लांकूड, लांकडाचा तुकडा. [ओलपटा]

ओलवट—स्त्री. १ ओलट; ओली जागा; किंचित् ओलसर असलेली जमीन. २ (कु.) ओलें लांकूड. [ओल]

ओलवण-णी—नस्त्री. ओला करण्याचें साधन. (भात, भाकरी इ. कोरडें अन्न खातांना) तोंडाला ओलावा आणण्यासाठी खावे लागणारे ओले पदार्थ, उ० दहीं, दूध, ताक; तोंडाला चव येण्यासाठी (चटणी, तोणचें इ०); पाणी (माती अगर कणिक भिजविण्यासाठी). —स्त्री (राजा.) हिरवळ जमीन; चराऊ रान, वालुकारण्यांतील हिरवळ प्रदेश. [सं. आर्द्रयण; प्रा. ओल्हण]

ओलवणें-विणें—सक्रि. १ (माण.) पीठ इ० पदार्थ दूध अथवा पाण्यानें भिजविणें; (गब्दास) पाणी लावून ते ओले झाल्यावर एखाद्या जाड फडक्यांत घट्ट बांधून सुमारें बारा तास दडपून ठेवणें. २ (स्नानाच्या वेळीं) नेसलेलें वस्त्र भिजविणें किंवा भिजविण्यासाठी दुसरें वस्त्र वापरणें. [ओलवण]

ओलवत—स्त्री. (कों.) दलदलींतील मधून मधून आढळणारी हिरवळ, भाजीपाला, झाडेझुडपें; ओलवण. [ओला+वन]

ओलवा—ओलावा पहा.

ओलवाहू—वि. पाणी मिळणारी जमीन, बागाईत, ओलावा धरणारी जमीन; अशा जमिनींतील पीक; कोरडवाहूच्या उलट [ओल+वाहणें]

ओलसर—वि. थोडासा ओला; दमट; भिजट; सर्द —स्त्री. ओलावा; दमटपणा. [सं. आर्द्र+सदृश]

ओला—वि. १ भिजलेला; न वाळलेला, कोरडा याच्या उलट. २ ताजा; हिरवा; न सुकलेला. 'पान ओलें आहे तोंचरस काढा.' ३ (ल.) फलदायक (कोरडा=फल रहित याच्या उलट); लाभदायक; किफायतशीर; उत्पादक. 'हा व्यापार पहिल्यासारखा आतां ओला राहिला नाही.' ४ भरभक्कम; भरगच्च; पुष्कळ दळ, गर असलेलें; रसाळ; रसभरित. ५ पैकेवाला; मालमत्ता असलेला. 'रामचंद्रपंत दिसतो भिकाऱ्यासारखा पण तो आंतून ओला आहे हो!' [ओल] म्ह० हात ओला तर मित्र भला=जोंपर्यंत कांहीं लभ्यांश आहे तोंपर्यंतच मित्राची मैत्री टिकते. **ओलें कोरडें पहाणें**—(खाण्यामध्यें) चव घेत, चाखतमाखत बसणें; चोखंदळपणा करणें. **ओलें जाळणें**—१ हिरवें, कच्चें (जिवंत) जाळणें २ (ल.) फार जुलूम करणें. **०इसप**—इसपाची एक जात-ज्यांतून सारखें पाणी गळते असें. **०कचकचीत**—वि. अतिशय भिजलेला; ओला चिंब. **०गोळा**—पु. (ल.) मढ; मढद; फार कच्चा; अडाणी. **०चिंब-तिंब**—वि. अतिशय ओला; थबथबणारा; ओला कचकचीत. **०दंड**—पु. १ पाण्याचा सतत वाहणारा पाट २ (ल.) सतत, वर्षभर असणारा बाग, आगर. 'त्याचे घरीं ओला दंड आहे.' **०दुक(का)ळ**—पु. अतिशय पावसानें पिकाची हानि झाल्यामुळें पडलेला दुष्काळ. **०दुंठ**—पु. हिरवे रोपटें किंवा झाडा, कोंवळें गवत; किंवा एखाद्या धान्याचें पीक. **०नायटा**—१ वाहणारा व चरत जाणारा नायटा; गजकर्ण. **०मसाला**—पु. ओला तयार करावयाचा मसाला; विशेषत. मांसान्नात हा वापरतात. त्यांचें मिश्रण असें—कांदे १० तोळे, लसूण, आलें प्रत्येकी अडीच तोळे, सुकी मिरची १ तोळा, अंबे हिंग व अडीच तोळे कोथिंबीर. —सृष्टि २.५३.

ओलावा—वि पाटवण किंवा पावसाच्या पाण्याखेरीज केवळ जमिनींतील ओलामुळें उगवलेला, लावलेला (ऊस इ०).

ओलांडणी—स्त्री उतरण; उल्हंघन; पलीकडे जाणें. [ओलांडणें]

ओलांडणें—उकि. १ स्पर्श न करतां (मध्यें आलेल्या वस्तू) वरून पलीकडे जाणें; पलीकडे पाय टाकणें; उल्हंघन करणें. २ नदी वगैरे उतरणें; पार जाणें. ३ देश उल्हंघित करणें; पादाक्रांत करणें, मधून जाणें. [सं. उल्हंघन, प्रा. ओलंडण; दे उद्+उडिअ]

ओलांडा—पु. १ गर्व, करट. २ केसतूड झालेल्या माणसानें ती जावी म्हणून सात गांठी मारलेल्या एका पिवळ्या चिंधींत सात बिब्बे, हळकुंड, तांदूळ घालून जी रस्त्यांत फेकतात ती. 'रस्त्यांत कोणी तरी ओलांडे टाकले आहेत, ते ओलांडे नकोस.' ३ ही चिंधी ओलांडली असतां होणारा रोग; विशेषत: उपदंशादि रोग; ओलांडा ओलाडल्यानें अथवा उपदंश झालेल्या रोग्यानें जेथें लघुशंका केली असेल तेथें दुसऱ्यानें लघुशंका केली असतां त्यास तो रोग चिकटतो. (क्रि० बाधणें). ४ (विशेषत: हमालांत) रस्त्याच्या मधोमध येणारा खड्डा (जो ओलांडणें भाग असतें तो); चर. [सं. उल्हंघ्; प्रा. ओलंड]

ओलांडा—उलेंडी पहा.

ओलाणी—स्त्री. वस्त्रें वाळविण्यासाठीं, टेवण्यासाठीं बांधलेली दोरी. [सं. अवलंबिनी]

ओलाणी-णें—स्त्रीन. चाडें सोडून बाकीचा ओलाणा दिवा, दिव्याची सांखळी; ओळाणें. [सं. अवलंबिनी]

ओलाणी-णें—स्त्रीन. स्नानाच्या वेळीं भिजविण्याकरितां घेतलेलें वस्त्र; ओलेतें; पडदणी. [सं. आर्द्रयण; प्रा. ओल्हण]

ओलावण-विणें—ओलवणें-विणें पहा.

ओलावणी—स्त्री. १ भिजविणें; पाणी शिपडणें; ओलें करणें. २ (ल.) शांति -शर. [ओलें]

ओलावा, ओलाव्हा—पु. १ ओल; ओलसरपणा; दमटपणा; आर्द्रता. 'जीवनाचा झाला ओलावा अंतरीं। विश्व विश्वंभरी मावळलें ॥ ' -तुगा ४०५५. २ (ल.) किफायत; लाभ; नफा. ३ फायद्याचा-यशाचा संभव, शक्यता; आशादायित्व; आशेला जागा; उ० धनाचा अथवा पैक्याचा ओलावा. ४ अंतःकरणांत असलेली सदयता; दयार्द्रता; कनवाळूपणा; जिव्हाळा. ' स्नेहाचा निजचित्तीं लेशहि येऊं न देचि ओलावा। ' -मोआदि ५. १०५. ' ममतेचा अथवा कृपेचा ओलावा. ' ५ अप्रकट द्रव्यांश, तत्त्वांश, तत्त्व, सत्त्व. उ० बुद्धीचा, शहाणपणाचा ओलावा [ओल] **ओलाव्याचा**-वि. १ भिजट; दमट. सर्द; ओलसर २ भरींव; फायदेशीर ६० अर्थी ओला अर्थ ३ ते ५ पहा. उ० ओलाव्याचा व्यवहार-व्यापार-धंदा-रोजगार-चाकरी, ओलाव्याची ममता-प्रीति-मैत्री-बोलणें. याच्या उलट कोरडा.

ओलास्रा--१ ओलावा पहा. २ ओलीचा आश्रय. ' ही भाजी ओलास्र्यास ठेव म्हणजे वाळणार नाहीं. ' -वि. ओलीचा आसरा असलेलें; आर्द्रतायुक्त. [ओल+आसरा]

ओलिसेलें—न. तलम वस्त्र; अतिशय मृदु व नाजुक वस्त्र. ' मृणालसुतांचे ओलिसेलें। तुआं खांचटें मणीनि वेढूं सांडिले। तिअें चंद्रकलेसी कांहं जालें। कैसी घोंट साहतींमें। ' -शिशु ६९३. [का. ओळि=लहान पंचा+शेला]

ओली—स्त्री. (वस्त्राचा) कांठ; शेवट, पदर. ' वालिपेचिआं ओली। ' -शिशु १७५. [जु. का. ओळि=रेघ, रांग; दे. ओली=ओळ; सं. आलि, आवलि]

ओली—वि. ओला पहा. **०आग**-स्त्री. पुष्कळ पाऊस पडल्यानें आलेली आपत्ति; ओला दुकाळ. **म्ह०** कोरडी आग पुरवेल, ओली आग पुरवणार नाहीं. **०काडी**-स्त्री. हिरवें पीक, शेत, गवत; धान्याचीं हिरवीं रोपें. **०कूस**-स्त्री बाळंत झाल्यानंतरचा स्त्रियेचा गर्भाशय (अशा वेळीं पुन्हां लवकर गर्भ राहण्याचा संभव असतो). **०कोरडी भाकर**-स्त्री. अल्पस्वल्प, जाडेभरडें अन्न. ' प्रामाणिकपणानें मिळविलेल्या ओल्याकोरड्या भाकरीला जी रुचि असते ती दुसऱ्याचें मिथें होऊन मिळविलेल्या पक्वान्नाला नसते. ' -निबंधचंद्रिका. **०खरूज-पू**-स्त्री. १ वाहणारी खरूज. २ (ल.) सतत त्रास देणारा इसम, व्याधि, जंजाळ. **०भांग**-स्त्री. ही कोरडीपेक्षां जास्त अमली असते ह्या-वरून (ल.) दुष्ट, स्वच्छंदी, तामसी मनुष्य. **०भिक्षा**-स्त्री. शिजविलेल्या अन्नाची भिक्षा; मधुकरी; याच्या उलट कोरडी भिक्षा म्हणजे धान्य, दाणे वगैरे. **०ममता**-स्त्री. खरेंखुरें, सात्त्विक प्रेम; ज्यापासून कांहीं लाभ होतो अशी प्रीति. **०सवाशीण**-स्त्री. न्हाती-धुती सवाशीण (कोरी म्हणजे नहाण न आलेली). -मसाप १.१.१.

ओलें—न. १ ओलेतें; भिजलेलें वस्त्र. २ ओला चारा (गुरांकरितां). [सं. आर्द्र; प्रा. उल्ल-ओल्ल] -वि. ओला पहा. **०अंग**-न. नुकत्याच बाळंत झालेल्या स्त्रीचा देह, शरीरावस्था. **०कुष्ठ**-न. रक्तपित्ती; पू वाहत असलेलें कोड; महारोग. **०जाळणें**-(बाळबल्याबरोबर ओलें जाळणें किंवा नुसतें ओलें जाळणें) जुलूम करणें. **०हळदकुंकुं**-न. (सुगधी) खोबरेल किंवा फुलेल यांत हळद किंवा कुंकुं चांगलें घोटून तयार करितात ते.

ओलेटा-ता—वि. (स्नान करण्याकरितां अथवा झाल्यानंतर) ज्यानें ओलें वस्त्र वेढलें आहे असा; ओलें अंग असलेला. [सं. आर्द्रवत्]

ओलेतें-तें—न. भिजलेला कपडा; ओलें वस्त्र. [ओला]

ओलेपालें—न. ओला चारा. ओलें अर्थ २ पहा. [ओला+पाला]

ओल्ली—स्त्री. (गो.) बांबूच्या कांबींची केलेली टोपली, रोळी; (पदार्थ ठेवण्यासाठीं) बांबूचें पात्र.

ओल्ला—उद्गा. ओहो! आश्चर्यार्थी उद्गार. ' ओल्ला, बचंमट, आम्ही तुमचीच इच्छा केली होती. ' -मोर २२. [इं. ओ+लो=पहा]

ओल्हांटणें, ओल्हांटा—ओलपटणें, ओलपटा पहा.

ओल्हांडणें-ओल्हांडा—ओलांडणें, ओलांडा पहा.

ओल्हावण—न. ओलवण; उत्तेजन. ' कीं प्रमोदासी ओल्हावन। मन्मथाचें ॥ ' -शिशु ६२४. ओलवण पहा.

ओल्हावणें—सक्रि. भिजविणें; ओलावणें; ओलें करणें. ' असो माथा वन्दूनि उदक। ओल्हाविलें द्रुय अंबक। ' -मुआदि २२.३९. [सं. आर्द्रयण; म. ओलावण]

ओंवड--न. (कों. हेट.) बकुळीचें झाड; वोवल; ओळ, ओवळ पहा. [सं. बकुल ?]

ओवंडकरू, ओवंडेकरी, ओवांडकरी—वि. ओवंडा धारण करणारा; परक्या ठिकाणची शेती करणारा.

ओवंडा—पु. १ ज्या गावांत मालक राहतो त्या गांवच्या शिवारांत नसणाऱ्या जमिनीचा मालकी हक्क किंवा लागवड. २ अशा प्रकारची लागवडींत आणलेली किंवा ताब्यांत आलेली जमीन. ३ (यावरून) स्वत:च्या घरापासून दूर असलेलें काम, धंदा; एखाद्या कामाचा कांहीं भाग एकीकडे करणें व दुसरा

दुसरीकडे करण्याची तऱ्हा, प्रकार; दूर राहून करावयाचा व्यवसाय. –गांगा ९९. [?]

ओंवण—स्त्री. १ ओंवणें; छिद्रांतून किंवा छिद्रें पाडून आंत दोरा घालणें; गुंफणें. 'देवाचा प्रसाद रत्नाच्या ओवणी । शोभतील गुणीं आपुलीया ॥ ' –तुगा १९५१. २ शिवण; टाका घालणें [सं. उप+वे=विणणें]

ओवणी—स्त्री. ओवलेली जिन्नस; एकत्र केलेली स्थिति माळ. 'रविमंडळा भंवती । जरि तारागणांची ओवनी दीसेती ॥ ' –शिशु ३९९.

ओवणें, ओंवणें—उक्रि. १ सुईत वगैरे दोरा घालणें, गुंत विणें; गुंफणें; धागा घालणें, अडकविणें. २ (कुण.) शिवणें टांके घालणें. ३ (ल.) श्लोक, वाक्य इत्यादींत नवीन अक्षर किंवा शब्द, पदें घालणें, संबद्ध करणें. ४ माळेंत फुलें घालणें [म. उप+वे=विणणें; प्रा. ओविअ]

ओवर—न. दंपती; वधूवर; जोडपें; नवरा–बायको (विशेषतः लग्नाहून परत आलेलीं अथवा कुलदेवतेच्या दर्शनास जाणारी) (अव. ओवरें) [सं. वधूवर; प्रा. वहुवर] ०**जत्रा-यात्रा**–स्त्री वधूवरांनीं कुलदेवतेच्या दर्शनास जाणें. (क्रि० भरणें). खेरीज याच अर्थी **ओवरभरणी**–स्त्री. **ओवरभरणें**–न. (क्रि० करणें). ०**जेवण**–न. नवरीच्या बापाने नूतन वधूवरांस केलेली मेजवानी.

ओंवरा—पु. स्वयंपाक घर. ओयरा पहा. 'ओवरा ओसरी भूमि माळिवरी उपरिया.' –वमा १४. [ओवरी]

ओवरी—स्त्री. १ मुख्य देवळाच्या बाहेरील आवाराच्या भिंतींत गोसावी, यात्रेकरी, देवाची पुजारी मंडळी यांना तात्पुरतें राहण्यास बांधलेली खोली, पडवी, सोपा; कोंहींच्या मतें हा शब्द 'वांव' पासून झाला असावा, कारण ओवरीची रुंदी एक वांव असते. २ (सामा.) खोली; ओसरी. 'रत्नांचिआं चित्रशाळेया । चितामणीचिआं ओवरियां ।' –शिशु ५९६. [प्रा. ओवर=निकर, समूह; दे. ओवारी=धान्याचें कोठार; सं. अपवारिक–ओवारिआ–ओवारी: किंवा सं. अपवरक, उपरक: प्रा. उवरओ–भांडारकर]

ओवरें—न. फुलांचें मखर ? माळा. 'कनक–कमलें कल्हारें । पार्यातकें सेंदुआरें । गुंफीवु कीजेती ओवरें । अशोका तळवंटी ॥ ' –शिशु ६३१. शिवाय ६३८, ७७३. [ओवरी]

ओंवसणें—अक्रि. (बायकी) व्रत (वसा) घेणें; करणें. 'मंगळागौर पांच वर्षे ओवसावी लागते.' [सं. उपवास्=पूजा करणें; प्रा. उवास: म. वसा]

ओंवळ, ओंवळदोडा—(गो.) बकुल; ओऊळ, ओळदोडा पहा.

ओंवळणें—अक्रि. (वस्त्र) थोडेंसें धुणें; खळबळणें. [सं. उद्+वल्]

ओंवळणें—अक्रि. (कों) (आंबे इ०) अधेवट पिकून खालीं गळणें; उमटणें; उमळणें; उंबटणें. [ओघळणें; सं. उत्+पच्]

ओंवळा, ओंवळा—वि. अगदीं पवित्र (सोंवळा) व अगदीं अपवित्र यांच्या मधल्या स्थितींतला; सोवळें न नेसलेला; अशुद्ध; अपवित्र; विन धुतलेल्या धोतरास किंवा स्नान न केलेल्या मनुष्यास शिवलेला(मनुष्य). ब्राह्मणांत संध्या, भोजन, यज्ञ, इतर धार्मिक कृत्यें करण्यासाठीं स्नान करावें लागतें. तें केलें नसेल तो ओंवळा: सोंवळ्यांतील माणसानें इतर माणसें, वस्त्रें इ० स शिवलें तर ओंवळेपणा येतो. सोंवळा असतां कामोटा सुटल्यासहि माणूस ओंवळा होतो. तेव्हां अनेक गोष्टींनीं माणूस किंवा वस्तु ओंवळी होते. 'सदा पवित्र ज्वालामाळी । त्यास ओवळे कोण म्हणेल ॥ ' –ह ३२.५३. [सं. अमंगल; प्रा. ओमळिआ]

ओंवळी—स्त्री. (कों.) ओऊळ पहा.

ओंवळ्याभोंवळ्या—स्त्री. अव. लहान मुलांचा खेळ. स्वतःभोवतीं गिरगिर फिरणें. [भोंवळ द्वि.]

ओवा-हा-व्हा—पु. (ना.) १ (गाई, म्हशी यांची) वासः ओटी. २ पान्हा 'वो(ओ)हा दाटल्या चहूंस्तनीं । दुग्धधारां वर्षती ।'–मुवन १२.६७. [सं. ऊधस्]

ओवा—पु एक प्रकारचें ओषधी झाड आणि त्याचें बीं. झाडाची उंची १ ते १॥ हात असून, बीचा रंग पिवळसर असतो; पोटदुखीवर उपयोगी. ओव्यांत किरमाणी ओवा, पानओवा इ० भेद आहेत. पानओव्यास बीं येत नाहीं. यांचें झाड, पसरट दीड हात उंच असून पानें जाड असून त्यास ओव्यासारखा वास येतो. पानांचीं भजीं करतात फोपा लावल्यानें हें झाड होतें. ओव्याच्या अर्काला ओव्याचें फूल असें म्हणतात [गं. यवानी, अजमोदा, हिं. अजवान: बं. यमानी; ते. ओममी ता. अमन] **म्ह०** १ ज्याचें पोट दुखेल तो ओवा मागेल. २ ओवा म्हणतो मी आहे गुणी पण माझ्यावर पितात पाणी

ओवांडा, ओवांडाकरी, ओवांडदार—पु. ओवंडा. ओवंडेकरी पहा.

ओवासणें—अक्रि. (कु.) ओवरजत्रा करणें; नवीन जोडपें देवास जाणें. [ओवसणें पहा]

ओंवाळणी—स्त्री. १ तोंडाभोंवतीं फिरविणें (हात, आरती वगैरे); आरती करणें. २ कथा झाल्यानंतर श्रोतेमंडळी हरिदासावरून जो पैसा वगैरे ओंवाळून आरतीच्या ताम्हनांत टाकतात तो. ३ कोणाहि ओंवाळणेकऱ्याच्या ताम्हनांत बक्षीस टाकावयाचा पैसा; ओंवाळून टाकलेलें द्रव्य; देणगी; भेट; बक्षीस. ४ (ल. उप.) फजिती; खरडपट्टी. 'पुढील साली साहेबाची असल्या

प्रकारची ओवाळणी करण्याची पाळी न येवो म्हणजे झालें' –टि २.२१४. [ओवाळणें] **०काढणें**–(बायकी) ओवाळून टाकणें; उतरून टाकणें (पैसा, कापड इ०). 'असल्या पैशांची ओवाळणी काढावी माझ्या बाळावरनं.' –झांमु.

ओवाळणें—उक्रि. १ लामणदिवा घेऊन किंवा तबकांत निरांजन, पैसा, सुपारी, अक्षता घालून तें माणसाच्या अगर देवाच्या तोंडाभोंवतीं उजवीकडून डावीकडे फिरविणें (अमंगल, इडापिडा जाण्यासाठीं, पूजेच्या वेळीं, अगर मंगलप्रसंगीं). २ स्त्रियांचें न्हाणें किंवा पुरुषांची आंघोळ झाल्यावर त्यांचीं वडील माणसें शेवटचा तांब्या घालून मग पुरुष असल्यास उदंड आयुष्याचा हो, मुलगी असल्यास चांगला पति मिळो व सुवासिनी असल्यास जन्मसावित्री–पुत्रवंती हो असे आशीर्वाद देऊन हातांत पाणी घेऊन स्नान करणाऱ्याच्या अंगाभोंवतीं फिरवितात तें. ३ भोंवतीं ओंवाळून टाकणें; क:पदार्थ मानणें; बलि देणें. 'तन मन धन यथार्थ। रामावरुनि ओंवाळिती ॥' 'इजे ते ओवाळोनि आखतां। दावावियां वसंतां।' –शिशु ८१७. [सं. उद्वलन किंवा अवज्वलन]

ओवाळलेला—वि (कु.) वाईट, तिरस्कारलेला. [ओंवाळणें]

ओवाळून टाकणें—कुचकिमतीचें म्हणून फेंकून देणें. 'काय देउं उपमा तुळणेस दिसेना कांहीं। ओंवाळून काय टाकावी वाटे लवलाहीं। '–प्रला ९२. 'हीं मोतीं उत्कृष्ट आहेत, कालचीं मोतीं ह्यांच्यावरून ओवाळून टाका.'

ओवी, ओंवी—स्त्री. १ मराठींतील चार चरणांचा एक छंद. महाराष्ट्र संतकवींचा हा छंद अत्यंत आवडता आहे. यांत वर्ण व मात्रा यांची संख्या अनियमित असते. तथापि अष्टाक्षरी–औट्चरणी व अष्टाक्षरी–त्रिचरणी असे दोन प्रकार साधारणपणें पाडतात. 'पहिली माझी ओंवी। पहिला माझा नेम। तुळशीखालीं राम। पोथी वाचे॥' हा पहिला प्रकार. 'आकाशींच्या अंतराळीं। तारकांना तेज चढे। तुझी माझी प्रीति जडे॥' हा दुसरा प्रकार. 'नागार्जुनाचा दातारू। राणेराओ श्रीचक्रधरू। ओंवी प्रबंधीं कवी भास्करू। वर्णितुसें।'–शिशु ७. २ सदर छंदांत रचलेलें गीत बायका दळतांना, मुलांना थोपटतांना किंवा झोपाळ्यावर बसून म्हणतात. 'तथा महाराष्ट्रेषु योषिद्भिर् ओंवी गेया तु कंडने।' –मानसोल्लास ५.२०५२. 'ओविजें गातांति यादवांचां राणा।' –दाव ३३. 'जात्यावर बसलें म्हणजे ओवी आठवते' किंवा 'हातीं खुंटा आल्यावांचून ओवी सुचत नाहीं.' ३ विणकामांतील प्रत्येक ताणा जींतून ओवला जातो व जिच्यामुळें विणतांना तो खालींवर केला जातो ती; वही; नेहमीं ओव्या असा अनेकवचनीं प्रयोग करतात. **ओव्या गाणें**–(ल.) भलतीच स्तुति करणें. [सं. वे=विणणें; दे. ओविअम; म. ओवणें]

ओव्हरकोट—पु. कोटावरून किंवा कपडयांवरून घालावयाचा पायघोळ डगला; थंडीचा कोट. [इं.]

ओव्हरसिअर—पु. १ देखरेख करणारा; ओरशर. २ बांधकाम खात्यांतील देखरेख किंवा पाहणी करणारा लहान अधिकारी (इंजिनियरचा दुय्यम). [इं.]

ओशंग—स्त्री. मांडी. ओसंग पहा.

ओशट, ओशेट—न. १ तेलकटपणा; बुळबुळीतपणा; स्निग्धता. २ कोणताहि बुळबुळीत अथवा तेलकट पदार्थ; स्निग्ध द्रव्य. 'ताप आला असतां ओशट खाऊं नये.' ३ (कृण.) मांस. 'बामणीचीं लांकडें ओशटाखालीं जाळीत नाहींत.' –खेया ४३. ४ (ल.) लांच. [सं. अवशिष्ट–ओशिष्ट–ओशेट–ओशट–भाअ १८३२; किंवा सं. उच्छिष्ट] –वि. १ तेलकट; बुळबुळीत; स्निग्ध (हात, वस्त्र, पात्र इ०). २ ओशट पदार्थांचा वास असलेला.

ओशत–द—स्त्री. १ (कों.) (झाड, दिवा, पलंग, माणूस अथवा इतर वस्तू यांची) सावली; छाया; ओशेटा; त्याच्या मध्यें बसूं नये अगर उभें राहूं नये कारण ती वाईट आहे अशी भावना असतांना प्रयोग. २ (सामा.) सावली; छाया. [ओस=झाडाची छाया]

ओशाळ—वि. १ निलाजरी; निसवलेली; स्वैर (स्त्रीसंबंधीं योजितात). **म्ह**० ओढाळ गुरूं आणि ओशाळ बायको. २ ओशाळा पहा.

ओशाळ, ओशाळगत, ओशाळी, ओशाळीक—स्त्रीपु. ओशाळेपणा; लज्जा; खजिलपणा; शरमिंधेपणा; मोकळेपणा न वाटणें अशी अवस्था. 'नसतां ओशाळ महीपाठीं। कलिकाळातें मारूं काठी।' –नव २१.३३. 'सुंदर परंतु निर्दोष वस्तूकडे पतित मनाला ओशाळेपणामुळें उघड्या डोळ्यांनीं पाहण्याचा धीर होत नाहीं.' –एकच्याला पृ. ७५. [ओस=छाया]

ओशाळणें—अक्रि. १ लाज वाटणें; शरमणें; ओशाळा होणें. २ दवेल, दरा्याखालीं असल्याप्रमाणें राहणें.

ओशाळा—वि. खजिल; शरमिंधा; दवेल (उपकारामुळें वगैरे); लाजलेला (आपलें दुष्कर्म उघडकीस आल्यामुळें). 'कित्येकांना हजारों रुपयांचीं बक्षिसें, घरेंदारें देऊन ओशाळे करून ठेवलें आहे.' –विक्षिप्त ३.१४०. **म्ह**० ओशाळा आदितवाराला भितो. [ओस=छाया (छायेनें घेरलेला)?; सं. अपसार–ओसार–ओशाल–ळा]

ओशिंड—न. वशिंड पहा.

ओशेटा—पु. १ सावट; मोठ्या झाडाची सावली; (हिच्याखालीं वनस्पतींची वाढ होत नाहीं). ओशत–द पहा. २ झपाट्यानें

जात असतां होणारें अस्पष्ट ज्ञान; अंधुक दिसणें (मनुष्य झाड इ० चें). [ओस=छाया]

ओषण—पु. (रसा.) प्राणवायूंत विद्युत्कुल्लिंग सोडला म्हणजे हा वायु तयार होतो. यास चमत्कारिक वास येतो. याचा कर्बयुक्त पदार्थांशीं संयोग होऊन निरनिराळीं रासायनिक द्रव्यें होतात. –ज्ञाको ओ ३२. [इं. ओझोन पहा] **०ऊदिन** (ओझोवेझिन)–पु. एक पांढरें स्फोटक द्रव्यः हें ऊदिनचें प्राणीदीकरण होऊन तयार होतें. –ज्ञाको ऊ ६.

ओषध—न. औषध पहा.

ओषधी—स्त्री. १ औषधी वनस्पति. ' राजासि विशल्य करी देउनि इलुसीच ओषधी राजा ! ॥ ' –मोभीष्म ८ ८. २ (सामा.) झाड; झुडुप; वनस्पति; एकवर्षायु झाड; एक वेळ फळ येऊन जें झाड मरतें तें; –अमरकोश. २.३.६. ३ उद्भिज्ज पदार्थ. –वि. औषधी गुणयुक्त; औषधाला उपयोगी.

ओष्ठ—पु. ओठ; होट पहा. [सं.] **०आखादणें**–मुका घेणें. 'कोणीं ओष्ठही नाचतां । मुख मुखी घालूनि आखादिलें ॥ –मोल. **०पादी**–पु. (प्राणि.) या वर्गांतील प्राण्यांत अगदीं पुढच्या दोन पायांचा उपयोग ओठांप्रमाणें चर्वण करण्यास होतो. उ० घोणी इ० प्राणी–प्राणिमो १२१. **०पुट**–न. ओठ (खालचा किंवा वरचा); ओठाचा पुडा. ' तिमें बन्धी ओष्ठपुटें । बिंबफळा पासोनी । ' –शिशु ४११. [सं. ओष्ठ+पुट] **०भाषा**–स्त्री. (ओठांची भाषा) बहिऱ्यांशीं बोलतांना स्पष्ट उद्गार न काढतां उद्गाराला अनुसरून ओठ हलविण्याची क्रिया. **०रोग**–पु. ओठांचे रोग. 'वातादि पृथक् तीन दोषांनीं तीन, त्रिदोषापासून एक, आणि रक्तजन्य, मांसजन्य, मेदजन्य व अभिघातजन्य या चार दोषांनीं चार असे एकंदर आठ ओष्ठरोग आहेत. ' –योर २.४४९.

ओष्ठ्य—वि. ओठापासून उच्चारले जाणारे (वर्ण. जसे– उ, ऊ, व प वर्ग).

ओष्ठामृत—न. (काव्य.) ओठांतील अमृत. (चुंबनाच्या वेळीं हें लाभतें). चुंबनाच्या वेळीं मिळणारें सुख. [सं. ओष्ठ+अमृत]

ओष्णावणें, ओष्णेणें—अक्रि. झोपेंत बोलणें, बरळणें, बडबडणें, ओसणणें, जावडणें. [सं. उत्स्वप्न]

ओस—वि. १ निर्जन; लोकांनीं सोडून दिलेलें; ओसाड (गांव, शहर); पडित (जमीन). २ रिकामा; शून्य. ' ओस जाल्या दिशा मज भिगुळवाणें । '– तुगा १५५६. [सं. अ+उषित–ओसिअ–ओस किंवा अवस–ओस. –राजवाडे भाग १८३४]

ओस—स्त्री. १ (कों.) भात झोडल्यावर त्या तृणाच्या पेंड्या बांधतेसमयीं कवळी अग्रभागीं धरून झाडली म्हणजे तींतून आखूड, कुजका तृणांश खालीं पडतो तो. २ नारळ, केळ इत्यादिकांचें काढून टाकलेलें सोपट किंवा काथ्या.

ओस—पु. (कों. कु.) नाकाच्या आंतील हाड.

ओस—न. (हिं.) दंव; धुकें. [दे. ओसा=निशाजल]

ओस, ओसंग—नपु. (प्रां.) १ झाडाची सावली. २ दाट झाडी; झुडुपाचा अंधार; सावट.

ओसंग-गा—पु. (काव्य) मांडी. ' बाळ ओसंगा घेतला । केला नमस्कार धर्मासी. ' –जै ८१.७०. [सं. उत्संग; प्रा. ओच्छङ्ग; हिं. उछंग] **ओसंगीं घालणें, देणें**–एखाद्याच्या आश्रयाखालीं जाणें, देणें, हवाली करणें. **ओसंगीं असणें–पडणें–राहणें–निघणें**–आश्रय करणें; स्वाधीन होणें; लीन होणें. 'तुका म्हणे पांडुरंगा । तुझ्या निघालों ओसंगा ॥ ' –तुगा (मोल).

ओसग-गी—स्त्री. अशोकाचें झाड. [सं. अशोक]

ओसंगळ—स्त्री. (ल.) आश्रय; संरक्षण; छत्र; कृपा; आच्छादन. बहुधा विभक्तिप्रत्यय लावूनच उपयोगांत आणतात. उ० ओसंगळीनें–चा, ओसंगळीं. [ओसंग]

ओसंगा—पु. मदतगार; मेहा; प्रोत्साहक. [उत्संग]

ओसट—ओशट पहा.

ओसट—न. सावट; झाडाची छाया. ओस पहा.

ओसंड-ड्ड—न. वशिंड पहा.

ओसडणें—उक्रि. (मावळी) लुटणें; नागविणें. [सं. अवशातनः प्रा. ओसाडण ?]

ओसं (सां) डणें—अक्रि. १ (काव्य) पडणें; सांडणें; गळणें. ' जया स्वानंद ओसंडे । सर्व ही इंद्रियद्वारें । ' –विपू १. ४३. २ वरून वाहणें; भरपूर भरून वाहून जाणें. ओसंडणें पहा. ' कैसा मुक्ताचा निजबोधू । घेवों जातां रसस्वादू । रसत्व लोपूनि स्वानंदकंदू । परमानंदू ओसंडे । ' –एभा ११.३१५. [सं. उत्सन्न; सं. उत्+म. सांडणें]

ओसंडणें—उक्रि. (काव्य) बाहेर फेकणें, देणें, त्यागणें. जे हें माझें मत अव्हेरुनी । ओसंडिती ॥ ' –ज्ञा ३.१९४. ' कंठवीण राज्य आलें हाता । तरी काय ओसंडावें तत्त्वता । ' –रावि १.२००. [सं. उत्सन्न; उत्+सांडणें]

ओसंडणें—ओसणणें पहा.

ओसण—न. वैल, रेडा यांच्या नाकांतील वेसण. [वेसण]

ओसणणें-वणें, ओसणावणें—अक्रि. १ झोपेंत बोलणें. ओष्णावणें पहा. ' ओसणतां गा आपण । स्वप्नीं ही जाण नेदावें । ' –एभा २९.५०३. ' उखेसी न वाटे ऐसे । कीं हें स्वप्न देखतसें । गोष्टी करी रतिरसें। बोलतसें ओसणतां ॥ ' –ह २८.४४. २ बडबडणें; बरळणें. [सं. उत्स्वप्न]

ओंसणें—उक्रि. (कों.) ओस (काथ्या, सोपट) काढणें, खरपुडी किंवा साल काढणें; सोलणें (नारळ, पोकळ, शेंग. अंबाडीची काडी इ०). [ओस]

ओसत-द्—स्त्री. (राजा.) सावट. ओशत पहा.

ओसपटणें, ओसपाटणें—उक्रि. १ (कों.) पाणउतारा करणें, होणें. ' आतां आणखी कशाला सांगतोस ? पुरा ओसपटलास. ' २ शक्तीपेक्षां जास्त काम केल्यानें अतिशय थकणें. [कों. ओस+पडणें]

ओसंबणें—अक्रि. (राजा.) स्फुंदत स्फुंदत रडणें. उसंबणें पहा.

ओसर—पुस्त्री. १ एकीकडे होऊन किंवा बाजूस सरून दुसऱ्यास जाण्यासाठीं दिलेली वाट; जागा. (क्रि. घेणें; देणें). २ नदीच्या पुराच्या पाण्याची ओहोट. [सं. अव+सृ; अवसर; प्रा. ओसर]

ओसरणें—अक्रि. १ (नदीचा पूर, पाणी) कमी होणें; खालीं जाणें, उतरणें; (पाऊस, ताप, सूज) कमी होणें; (श्रीमंती, कीर्ति, तारुण्य, जोम इ० स) उतरती कळा लागणें; (पाऊस, अभ्रें) जाणें; नाहींसें होणें. ' क्षणें शोकिले जलाणेंव । सूर्य उगवतां तम सर्व । जाय जैसें ओसरोनी । ' –मोल. (बाजार, जमाव, गर्दी), पातळ होणें; मागें जाणें; हटणें; बाजूला होणें, करणें. ' हा शूर दूर ओसर म्हणणार महाप्रभाव हा रविला । ' –मोभीष्म १०.९२. २ रिकामा होणें. ' जैसा वृष्टि करुनियां आणाया तोय मेघ ओसरला । ' –मोकर्ण ३५.४०. [सं. अवसरण; प्रा. ओसरण]

ओसरा, ओसरी—स्त्री. माजघराच्या पुढील अगर मागील, तीन बाजूंनीं भिंत असलेली मोकळी जागा; ओटी; पडवी; सोपा. ' पृथ्वी रुसोनि ओसरां राहे । ' –एभा २२.४१०. ' ओवरा ओसरी भूमि ... ' –वसा १४. [सं. अवसर; दे. ओसरिआ; हि. उसारा=देवडी, ओवरी] **म्ह०** भटाला दिली ओसरी, भट हातपाय पसरी.

ओसवा—पु. झाडाची सावली. ओस पहा.

ओसळणें—अक्रि. (तंजावरी) झोंपेंत बरळणें. ओसणणें पहा.

ओसा—पु. ओस पडलेला; (पीक असलेल्या शेतांतील) पडित जमिनीचा तुकडा; शेतांतील रिकामी, पीक न उगवलेली जागा. [ओस]

ओसाड—वि. उजाड; निर्जन; माणसांनीं सोडलेलें; मनुष्य वस्ती नसलेलें; वाईट. **म्ह०** ओसाडगांवीं गाढवी सवाष्णी. ' एखाद्या ओसाड अरण्यांत जाऊन पडल्यास आपली काय दशा होईल ... ' –टि ४१४८. [सं. उत्सद्; प्रा. ओस्साड]

ओसाड—स्त्री. (गो.) सुकतीच्या वेळीं नदीचें पाणी जोरानें उसळतें ती पाण्याची स्थिति.

ओसाडा—पु. वाऱ्यानें वाहून आणलेला पाऊस, तुषार (नेहमीं अव. ओसाडे असा प्रयोग). (क्रि० येणें).

ओसाडा—पु. पडदा. ' तंव भीत भंगा चहुंकडे । वानलगा वस्त्राचे ओ(वो)साडे. ' –ऋ ६८३. [सं. अव+शाट=वस्त्र]

ओसाडी—स्त्री. ओसाडपणा; उजाडी; निर्जनता. **ओसाडीचा लांडगा** (भयाण व एकांत स्थलींचा लांडगा)–जेथें रक्षण करण्यास कोणी नाहीं अशा ठिकाणीं नाश करण्यास टपून बसलेला माणूस.

ओसार—पु. वाट, ओहटी या अर्थी ओसर पहा.

ओसार-रा—पु. १ पार वाहून जाणें; कमी होणें; उपरम; उतार. २ तहकुबी; मंदी (व्यापार इ० ची); खंड; खाडा; (क्रि० घेणें; खाणें). [ओसरणें]

ओसार—स्त्री. (गु.) (बांधकाम) भिंतीची जाडी. असार पहा.

ओसावणें—अक्रि. १ कमी होणें. २ शक्तिहीन, अशक्त होणें. ' कैसीं दिहें दिहूं ओसावली । वैदर्भी हें ॥ ' –शिशु ८३७. [सं. अवसद्–अवसाद्; दे. ओसब्बिअ]

ओसीक—वि. पडित; विनलागवडीची (जमीन). [ओस]

ओस्तें—न. (कों.) सावट. ओस, ओसट पहा. [ओस]

ओहकर—न. (व.) १ म्हशींचें पारडें. २ (ल.) शेवटचें मूल (हें आईच्या मागें मागें असतें तेव्हां त्यास म्हणतात). [ओव्हा]

ओहट-टी-टें—पुस्त्री. १ ओंहोटी; समुद्राच्या पाण्याची सुकती; भरती उतरणें; चंद्रसूर्याच्या–विशेषतः चंद्राच्या आकर्षणानें समुद्राचें पाणी वाढल्यानंतर पुन्हां उतरतें त्यास ओहोटी म्हणतात. २ विराम; उपरम; तहकुबी. ' मग पांडवीं ओहटु केला । दळभारूं मागौता परतैला । ' –शिशु ८८४. [सं. अव+घट्ट्; प्रा. ओहट्ट=कमी होणें, न्हास पावणें; तुल० ते. ओट्=नाश]

ओहटणें—अक्रि. १ मागें हटणें; कमी होणें. २ ओसरणें; आटणें; ओहोटी लागणें. ३ (ल.) उतरती कळा लागणें. ' यशास ओहटी लागली. ' [ओहट]

ओहड-णें—ओढणें पहा.

ओहण—न. (कों.) पर्वतांतील लहानसा ओढा, प्रवाह; वहाळ; पऱ्हा, त्याचा पाट, चर (शेतांत पाणी घेण्यासाठीं काढलेला). [वाहणें]

ओहदा—पु. १ हुद्दा; (मुलकी किंवा लष्करी) अधिकाराचें स्थान; (सरकारी) नेमणूक. २ कर्तव्य; ठराव; हक्क. ' पातशाहाकडून वस्त्रें घेऊन जावीं हा ओहोदा आमचा आहे ' –दिमरा १.१३१. [अर. उहदा] **०दार–ओहदेदार**–पु. अधिकारी; सरकारी नोकर; हुद्दा धारण करणारा; ऑफिसर.

ओहम-ओम—न. विद्युत्प्रतिरोधाचा एक; विद्युत्प्रतिबंध मोजण्याचें मूलमान. (हें ओहम नांवाच्या जर्मन शास्त्रज्ञानें शोधून काढलें, सन १७८७-१८५४). [इं.] **०मापक**-न. विद्युद्रोधनामुळें उत्पन्न होणारा प्रतिरोध मोजावयाचें विद्युद्यंत्र. -ज्ञाको, ओ ३५-३६.

ओहमा—पु. (प्र.) वहमा; वहीम; संशय. [अर. वहम्; फा. वहीम]

ओहमाय—स्त्री. वधूची आई; बायकोची आई; सासू. [वधू+माय; प्रा. वहू+माय]

ओहर—न. वधूवर; नवरानवरी (नवीन जोडपें). ओवर पहा. 'मिरवावया दोघें वधूवरें। वरात काढिली कंसासुरें। रथावरी वैसविलीं ओहरें। आपण धुरे सारथी जाहला।' -ह २.१२८. 'हे तुळजापुरचे आई, तुझ्या यात्रेला ओहोरानें येईन.' -थोरले माधवराव पेशवे (नाटक). [सं. वधू+वर; प्रा. वहूवर]

ओहर—पु. (कों.) १ समुद्राच्या भरतीचें पाणी जमिनींत शिरून तयार झालेला चर; फांपूं; पोहडी; पोंई; पाईड; आखात २ समुद्राचा दूरवर गेलेला फांटा.

ओहरजत्रा-यात्रा, ओहर-भरणी-णें—ओवरजत्रा-यात्रा, भरणी पहा.

ओहरणें—उक्रि. (प्र.) होरणें; भर घालणें. १ भरणें (खड्डा, चर, खांच इ०) बुजविणें. २ (ल.) आच्छादून, मढवून काढणें (दागदागिने, वस्त्रालंकार वगैरेनीं); होरणें पहा. [सं. आ+उद्+भृ]

ओहरता—वि. सरळ; नीट. -ऋ ९२. (५७७ ओंवीवरील टीप). [सं. अव+हर-सर?]

ओहरा—पु. (कों.) नांगरटीचा तास; तुकडा. ओरा पहा.

ओहवां—स्त्री. (भि.) हसूं. 'इं उनाजनें वागाल ओहवां आली' =हें ऐकून बाघाला हसूं आलें. -भि १७. [दे. आहेक=हेसें? प्रा. ओहास? सं. उप+हास्]

ओहळ—पु. १ नाला; ओढा; पन्हा; झिरपणी; वाहणी. 'इतर ओहळ आणि भागीरथी। वरकड गज आणि ऐरावती।' -रावि २५.६८.'वाघ आणि गाय यांनीं एकाच ओहोळावर पाणी प्यावें.' -नि ५२६. २ पर्वतावरील ओढा व त्याच्यापासून झालेला चर, घळण. [सं. वह्; प्रा. ओहळी=ओघ; दे. वाहळी=लहान प्रवाह; का. व्हळी; म. वाहळी] **ओहळ उडून राऊत होणें**-१ संकट पार पडल्यावर मग धाडसी बनणें. २ (ल.) आपल्या हितकर्त्याकडून आपलें काम झालें म्हणजे मग त्याच्यावर उलटणें. **०खोघळ-ओढे-नाले**; दरी-खोरीं; खाच-खळगे. [ओहळ द्वि.] **ओहळींखोबळीं शिरणें**-मुख्य मुद्दा सोडून भलतेंच बोलणें; आडमार्गाला जाणें.

ओहळणें—अक्रि. १ झिरपणें; वाहणें; ठिबकणें; स्रवणें. २ मोठें भोंक होत जाणें (मोती, इ० चें); वेज सैल होणें. ३ ओघळणें पहा. [ओहळ]

ओहळणें—उक्रि. (कों.) उलटणें; लवंडणें; उलथणें.

ओहळी—स्त्री. (कों.) लहानसा ओढा; पाट; पाझर. ओहळ पहा.

ओहा—पु. गाईम्हशीची ओटी; कांस. ओव्हा पहा.

ओहार-जत्रा—ओवर-जत्रा पहा.

ओहिरी—स्त्री. ओवरी पहा.

ओहो, ओहोहो—उद्गा. आश्चर्य, कौतुक, आनंद, आटवण यांचा दर्शक उद्गार! वाहवा! ओलो! [ध्व.]

ओहों—क्रिवि. (भि.) दूर. 'तों ओहों चोरांआ गियो.' =तें दूर चरायला गेलें. -भि ९.

ओहोबाप—पु. (लग्नप्रसंगीं) वधूपिता. **ओहोमाय**-स्त्री. वधू माता ओहोबाप व ओहोमाय हे शब्द नवऱ्यामुलाच्या मातापितरांनाहि लावतात.

ओहोट, ओहोटणें, ओहोटी, ओहोड, ओहोडणें, ओहोण, ओहोर-णें, ओहोरा, ओहोळ-णें-ळी—ओहनें आरंभ होणाऱ्या शब्दांखालीं पहा. जसें ओहट, ओहटणें इ०.

ओहोळकट—पु लहान ओढा. [ओहळ+कट=अल्पार्थी प्रत्यय]

ओहोळणी—स्त्री. (तेजावरी) ओढणी; परकरावर लुगड्यासारखें नेसावयाचें लहान वस्त्र. [सं. अवगुंठनी; दे. अवघाटणी; प्रा. ओहाडणी; म. ओढणी]

ओळ—स्त्री. १ रांग; पंगत; माळिका; पंक्ति. २ लेखणीनें ओढलेली रेघ, अथवा लिहिलेली अक्षरांची पंक्ति. (क्रि० पाडणें; ओढणें). ३ दर्जा. ज्या बलुतदारांचा जितका उपयोग त्या मानानें त्यांची प्रतवंदी लागून जे तीन वर्ग झाले त्या वर्गाला **ओळ** म्हणतात. -गांगा १४. ४ (ल.) मार्ग; पद्धत; रीत; ओघ; शिस्त; सभ्यपणाची वागणूक. 'त्या रुक्मिणी-कृष्णापासून जरी इतिहास पाहिला तरी तुम्हां वहिनी-दादांना एकच ओळ कां ग!' -गडकरीकृत वेडयांचा बाजार. [सं. आवलि; आलि; प्रा. ओआली, ओली; जुका. ओळि=रांग] **ओळीस येणें**-बोलण्याच्या ओघास येणें; प्रवाहांत पडणें, सांपडणें; पाळी येणें.

ओळ—स्त्री. (प्रां.) ओढा; पऱ्हा; नाला. [ओहळ]

ओळक—पु. (राजा.) १ दांडी लावलेली किंवा न लावलेली नारळाची करवंटी; बेली; डबली (बाहेर पाणी उपसण्यासाठीं किंवा ताक, कढी इ० वाढण्यासाठीं); नारळाची पळी. २ त्यासारखेच धातूचें किंवा लांकडी पात्र; पळी; ओगराळें. -पया.

ओळकंबणें, ओळकुंबणें—अक्रि. १ लोंबणें; झोंके घेणें; लटकणें; लोंबकळणें. २ फार वेळ लटकल्यामुळें रक्त साकळणें (पायाचें, मानेचें इ०). ३ भारावणें; स्वतःच्या वजनानें खालीं वांकणें. –सक्रि. झोंके देणें; पुढेंमागें करणें; हेलकावे देणें. [सं. अवलंबन; प्रा. ओलंबण; सं. अव+लंब्. का. ओळु=लटकणें]

ओळकंबली पाटी–स्त्री. आड्याला टांगलेली टोपली; सुरक्षित ठेवण्याकरितां शिक्क्यासारखी केलेली एक पाटी.

ओळकं(कुं)बा—पु १ झोका; लोंबण्याची, उलटण्याची क्रिया; (क्रि० घेणें; मारणें); हेलकावा. २ लोंबण्यासाठीं आधार (घेणें).

ओळकी—स्त्री. लहान ओळक; डबली; बेली. [ओळक]

ओळख—स्त्री. १ परिचय; ज्ञान; माहिती (वस्तु, मनुष्य यांविषयीं). 'ओळखी जालेंया बुधीं कांइसीं.' –शिशु ७८. २ आठवण; स्मरण; याद; अभिज्ञान. ३ खूण (वस्तु अथवा पदार्थ ओळखण्यासाठीं केलेली); ओळखीचें साधन. ४ जामीन (कर्जदारासाठीं घेतलेला). 'कोणाची ओळख आण, म्हणजे उधार देतों.' [सं. अवलक्ष्, उपलक्ष्] **०पटविणें–देणें**–उधार द्यावयाचें किंवा पैसे द्यावयाचे असतां घेणाराच्या व देणाराच्या ओळखीचा तिसरा माणूस जामीनकीदाखल पुढें उभा करणें.

ओळखण—स्त्री. १ खूण; चिन्ह. ओळख अर्थ ३ पहा. (क्रि० करणें). २ ओळखीसाठीं दिलेली वस्तु. (क्रि० देणें). ३ (व.) (भली खोड मोडली या अर्थी) कायमची आठवण. (गु.) ओळखण. [सं. उपलक्षण]

ओळखणें—उक्रि. जाणणें. **म्ह०** आपणावरून जग ओळखावें. २ माहीत आहे असें दाखविणें; स्मरणें; याद असणें. [सं. अवलक्षण, उल्लक्षण, उपलक्षण; सिं. ओखाणणु]

ओळखदेख, ओळखपाळख, ओळखभेट—स्त्री ज्ञान; परिचय; माहिती; सख्य; ओळख (दाट परिचयाचा अथवा तोंडओळखीचा या दोहींसहि लावतात). 'ओळखीपाळखीचीं बीस माणसें आहेत.' 'तो माझे ओळखीचा नाहीं कीं पाळखीचा नाहीं.' '... पंतांची आणि विठोबादादांची ओळखभेट झाली नव्हती म्हणून नाहीं?' –भक्तमयूरकेकावली – प्रस्तावना ९. [ओळखणें+देखणें; ओळख द्वि.]

ओळखंबणें-खंबा—ओळकंबणें, ओळकंबा पहा.

ओळखी-चा—वि. माहितीचा; परिचयाचा; ठाऊक असलेला (मित्र). २ सगासोयरा; मित्र; परिचित. **ओळखी-देखीचा–पाळखीचा, ओळख्या-देख्या–पाळख्या**—**म्ह०** ओळखीचा चोर जिवें न सोडी=आपल्या माहितीचा चोर चोरी करतांना सांपडला तर तो स्वतःला होणाऱ्या शिक्षेच्या भीतीनें जिवंत सोडीत नाहीं. 'अंतरंगींचा हा ओळखीचा चोर जीवें न सोडी अशापैकीं करून सोडतो.' –भा १७.

ओळग—पु. ओळक पहा.

ओळग—पु. आश्रय. [सं. अवलग; प्रा. ओलग]

ओळगणा––वि. आश्रय घेणारा; चिकटणारा; सेवक. [ओळगणें]

ओळगणें, ओळगणें—अक्रि. वोळंग–घणें पहा. १ पासून लोंबणें; झोंके घेणें; वेंघणें; २ (ल.) आश्रय घेणें; चढणें; आरोहण करणें. 'फळें तांबूल सुगंध सुमनें। भोगोपचारें ओळगे।' –मुआदि ३७.७७. 'अश्वावरी वीर ओळंगले।' ३ शरण जाणें; सेवा करणें; रावणें. 'ते ओळगे श्रीचरण।'–शिशु ८८. 'शतांच्या शतदारी। ओळंगिती जियेपासी।' ४ प्रसन्न होणें; वश होणें; प्राप्त होणें. 'ओळगो देआं श्रीचक्रधरा।'–दाव ४६६. आपण होऊन प्राप्त होणें. 'आणि मुक्तिसायुज्यता। वोघेंचि ओळंघे।' –विपू १.२७. [सं. अव+ लग्; प्रा. ओलग्ग=सेवा करणें; का. ओळगिसु=सेवा करणें]

ओळगणें–घणें, ओळंगणें–घणें—उक्रि. मिठी मारणें; बिलगणें (हिसकून घेण्यासाठीं); चिकटणें; (क्वचित) वळगणें; प्रसन्न होणें; आलिंगणें. 'तेह वेळीं कुचपर्वताचां घाटीं। ओळघतां डोळे जालें आयेतुटीं।' –शिशु ५६०. [सं. अवलग्, आलिंगन]

ओळंगर—पु. (राजा.) लहानसा ओघळ; लहान झिरपा. [ओळ]

ओळगवट—स्त्री. सेवकवर्ग. 'कीं धर्माची उत्तर वेंठ। कीं सिद्धीची ओळगवट॥' –ऋ ११. [सं. अवलग्; प्रा. ओलग्ग=सेवा करणें+वट (सं. वृत)]

ओळंगा—पु. आश्रय. ओळग पहा.

ओळगावणें—उक्रि. शरण जाणें; आश्रय करणें. 'ओळगावेआ परेशु। नाहीं ब्रह्मादिकां सौरसु॥' –ऋ २६.

ओळण—स्त्री. (राजा.) दिवा अडकवावयाची कडी, दोरी इ०; सांखळी; ओलाणी–ओलाणें पहा.

ओळण—वळण पहा.

ओळणें—अक्रि. १ (काव्य) एखाद्याकडे ओढला जाणें, वळणें. 'ओळ खगावरि घनसा।'–मोआदि ३६.४८. २ अनुकूल होणें; प्रसन्न होणें; प्राप्त होणें. 'कौरव म्हणती कोण देवो। आजी आम्हां ओळला॥' –सुसभा १४.९३. २ अनुग्रह करणें; उपदेशणें; कृपा करणें. 'एणें श्रीकृष्णघनें शमवाया सर्व ताप ओळावें।' –मोमौसल २.९१. 'मच्छिद्रानें बोध गोरक्षासि केला। गोरक्ष ओळला गयनीप्रती।' –ज्ञानदेवगाथा प्रस्तावना ४. [वळण]

ओळणें—उक्रि. स्रवणें; पाझरणें; झरणें. 'तेणें धातु आदि करौनी। अमृत ओळतांती।' –दाव ३२६. [ओळ=रांग, प्रवाह]

ओळत—स्त्री. (गो.) भित (घराची).

ओळदांडी—स्त्री. गाडीची आखरी व सांटा आवळणाऱ्या आळ्यास पीळ घालून तो पीळ न सुट्ण्यासाठीं त्यांत अडकविलेली दांडी; आवळदांडी. [आळा+दांडी]

ओळंबणें—अक्रि. १ ओळकंबणें पहा. २ वांकेपर्यंत लोंबणें (फांदी इ०). ३ ओळंबा नांवाचा विकार होणें. [सं. अवलंबन; प्रा. ओलंबण]

ओळंबळणें—अक्रि. उचंबळणें; उतू जाणें (नदी, भांडें इ०).

ओळंबा—पु. (गवंडी) १ गवंड्याचें एक हत्यार; एका दोरीला लावलेलें गोल वजन (शिसें, दगड वगैरेचें); हें वजन लोंबकळत ठेवून दोरी स्थिर झाल्यावर सिद्ध होणारा उभा लंब (भित सरळ रेषेंत आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं). २ (व.) त्रास. 'त्याला कशाला माझ्या घरीं ठेवतां, उगीच माझ्या भोवतीं ओळंबा. ३ गाडीचा सोल ज्यांतून जातो तो भाग. ४ ०किंवा **ओळंबी**—स्त्री. कों. गाय, बैल इ० जनावर अशक्त झालें असतां मानेखालीं रक्त उतरून जमलेला गोळा किंवा त्यामुळें पडलेला दाब; रक्त सांखळून झालेला विकार. ५ (ल.) ठपका; मर्मभेदक खरडपट्टी. –होकै ११. [सं. अवलंबन–लंबक; प्रा. ओलंब] **ओळंब्यांत असणें**–क्षितिजाच्या पातळीशीं काटकोनांत असणें; लंबरेषेंत असणें.

ओळंबा–बो—पु. (गो.) वाळवी; अळंबो. वाळिंबा पहा. 'कोप आलिया ओळंबयासी। केवीं स्पर्शे अग्नीसी। श्रीगुरुकृपा असे जयासी। काय करील यवन दुष्ट ॥ ' –गुच १४.२४.

ओळसा—पु. वळसा; फेरा; वेढा. 'कोल्हाळ चुकविला। त्रिगुणांचा ओळसा। ' –भज २२. [वळसा]

ओळा—पु. रीत; तऱ्हा; शिस्त; पद्धत; मोळा. 'हिला कांहीं ओळा नाहीं, नुसता गोळा आहे. ' [ओळ]

ओळा—ओवळा पहा.

ओळांगर—पु. (राजा.) ओळंगर पहा.

ओळाणें—न. ओलाणी पहा.

ओळी—स्त्री. १ (राजा.) ओहळ–ळी पहा. २ पाण्याचा लहानसा पाट; लहानशा ओव्यांचें सुकलेलें पात्र.

ओळीचा—वि. विद्वत्ता, कुलीनता, संपत्ति वगैरेनीं बरोबरी करणारा; समान योग्यतेचा. २ सभ्य चालीरीतींचा. [ओळ]

ओळींबा—पु. (माण.) तिवडग्यास बैल जुंपण्याकरितां घातलेलें लोखंडी कडें. ओळंबा पहा.

औ

औ—चवदावा स्वर. 'ओ'ला एक मात्रा देऊन हें अक्षर काढतात. इ. स. ६ व्या शतकापासून (मंदसोर लेख) 'औ' आढळतो.

औकात–द, औकाळ–ळीं—पुस्त्री. १ गुजारा; चरितार्थ. अवकाळ पहा. 'एणेंकरून आपला औकात चालत नाहीं. ' –रा १८.४८. २ निर्वाहसाधन. 'त्यांचा योगक्षेम चालावयासी कांहीं औकात नाहीं. ' –रा १७.३९. [अर. औकात्. वक्तचें अव.]

औख–वण—(कु.) औक्ष–वण पहा.

औखळ—वि. (व.) खोडकर. अवखळ पहा.

औचट—अवचट पहा.

औचित—अवचित पहा.

औचित—वि. उचित; योग्य. 'औचिता करौनि धरा। मग लेखा येईल ॥ ' –शिशु ६९६. [उचित अप.]

औचित्य—न. युक्तता; योग्यपणा; उचितपणा; शोभण्यासारखें असणें. [सं.]

औजड–जाड—वि. मोठें; अगडबंब; अवाढव्य; विशाल; अवजड पहा.

औजस द्रव्य—न. अल्ब्युमिन; एक पौष्टिक द्रव्य. हें अंड्यांत असतें. [सं.]

औजार—न शीड इ०; अवजार पहा. [अर. औझार्]

औंजार—पु. (गो.) उपद्व्याप. [अपचार ?; अवजार]

औज्ज्वल्य—न. उज्वलता; चकचकीतपणा; तेज; चमक; झळाळी. [सं.]

औट—वि. १ साडेतीन. 'हें औठ हात मोठकें। ' –ज्ञा १३.१२. 'औट हात तुझा जागा। येर सिणसी वाऊगा ॥ ' –तुगा २६९२. २ (योग) साडेतीन मात्रा. 'तैशी ते कुंडलिनी। मोटकी औट वळगी। ' –ज्ञा ६.२२३. 'रत्नखचित सिंहासन शोभे औटपीठावर। ' –महिपती (राजवाडे ९८). [अर्धचतुर्थ–अद्धट्ठ–अउट्ठ–औट; दे. आउट्ठि=३॥] ०**पद–पीठ–न.** (योग) द्विदल अग्निचक्रावरील एक स्थान; त्रिकूट, श्रीहट्ट, गोल्हाट, औटपीठ हीं जीं महाकारणस्थानें आहेत त्यांपैकीं एक. 'शोषुनि सहस्र दळाचे पाट। औटपीठ आणि गोल्हाट। क्रमोनिया श्रीहट। आली उद्भूट ब्रह्मस्थाना। ' –एभा ६.१२९. २ कोल्हापूर; तुळजापूर; मातापूर हीं तीन व सप्तशृंग अशीं, मिळून देवीचीं साडेतीन स्थानें. 'नाना औटपीठें ओकारें दर्शना आलीं। ' –सप्र ५.१८. ०**मात्रा**–स्त्री. ओंकार; प्रणव. ०**घटकांचा आनंद**–पु. (साडेतीन घटकांचा म्हणजे) अल्पकाळ टिकणारें सुख,

आनंद; क्षणभंगुर सुख. **०घटकांचें, घटी(डी)चें राज्य**– (किरीटी रामराजानें आपल्या अबदागिऱ्याला साडेतीन घटका राज्य दिल्याच्या गोष्टीवरून अथवा शिराळशेटाच्या गोष्टीवरून) थोडा वेळ मिळणारा अधिकार, सुख; पाण्यावरचा बुडबुडा; शिराळशेटी राज्य पहा. **औटकीं-कें**—न. उजळणीचा प्रकार; अवटकी; साडेतीनचे पाढे व त्यांचें कोष्टक; एकपासून शंभरपर्यंत संख्यांची साडेतीन पट देणारें कोष्टक.

औट—पु. जळाऊ लांकडांचा किंवा इमारती लांकडांचा ढीग, रास. अवट पहा.

औट—क्रिवि. बाहेर; बाद. [इं.] **०डोअर**–वि. घराबाहेरचें; फिरतें; बैठेच्या उलट (काम). **०हाउस**–न. पडघर; पडशाळा; चाकर लोकांसाठीं बांधलेला स्वतंत्र सोपा. [इं.]

औटकी—स्त्री. अवटी यांचें काम, अधिकार, धंदा. अवटकी पहा.

औट-औटभर—न. १ बैलांना त्रास न देतां झालेलें दिवसाचें नांगरटीचें काम; एक नांगरभर; खुटणभर (क्रि० नांगरणें). २ (ल.) (व.) एक शेत, वावर किंवा त्याची लांबी. 'तें गांव येथून औटभर आहे. [औत]

औटडें—न. (साडेतीन हातांचें) शरीर. 'बंदी बंदाची कौपीन। बहिरवास औटडें ॥ ' –तुगा ४०२०. [औट]

औटावी—वि. १ औट(मात्रा)मधील अर्धी; ओंकाराच्या साडेतीन मात्रांपैकीं शेवटची अर्धमात्रा. 'देवा तूं अक्षर। औटा विये मात्रेसि पर। ' –ज्ञा ११.३०७. २ (ल.) माया; ब्रह्मस्वरूप. आउटाविए, आउटावें अर्शी रूपेंहि आढळतात. 'आउटाविए पर्दी आरोहण। ' –तुगा ४०३५. [औट]

औटी—स्त्री. १ लांकडी ठोकळ्याला आंत चीप बसविण्यासाठीं पाडलेली आडवी खांच. (क्रि० घेणें; पाडणें; करणें.)[सं. अवटी=खांच] २ (टंक.) टंककृर्तीत काशाची किंवा पोलादाची केलीली मादी. –चिज १९१८. (इं.) डाय. अवटी पहा. [सं. अवटी=खांच; म. अवटी=(सोनार धंदा) ठसा]

औठणें—अक्रि. ओहटी लागणें. ओहटणें पहा.

औठी—स्त्री. ओहोटी पहा.

औठें, औठडें— औट पीठ पहा. 'तैसी ते निजांगें कुंडलिनी। निजेली होती औठें वळणीं ॥ ' –स्वादि ९.५.२.

औड– (व. खान.)शेतकामाकरितां किंवा वखरण्याकरितां निश्चित केलेला एक तुकडा; आवड.

औड, औडकें—औट, औटकें पहा.

औड-भर—औट-भर पहा.

औडकचौडक—पु. लहान मुलांचा एक खेळ. त्यांतील गाणें असें–'औडकचौडक दामाइ। दामाइचे पंचाइ। पंचाडखोड खासा। हिरवा दाणा कुडकुडी। राजघोडी व्याली। सोनपाणी प्याली। अन्यामन्या शेजीवेचा। डावा उजवा हातच कन्या ॥ ' अर्थः–अरे भाऊ! आपल्या शेताच्या ह्या बांधापासून त्या बांधावर जा. तेथें आपलीं जनावरें घेऊन राळे, गहूं, तीळ आणि हरभरे वगैरे पिवळीं धान्यें आपल्या शेतांत पेर व त्याजवळच्या मळ्यांत बाजरी व ओंवा पेर. –चिज १२.१९१६. अवडकचवडक पहा.

औडबारा—अउडबारा पहा.

औडुव—पु. (संगीत) (प्र.) औडव. पांच स्वर; औडुव राग पहा. **०तान**-पांच स्वरांची तान. **औडुवत्व**–जे दोन स्वर रागालापांत वर्ज्य असतील ते न घेण्याची दक्षता ठेवणें. **०राग**–पु. १ ज्या रागास पांचच स्वर लागत असून दोन स्वर वर्ज्य असतात असा राग. २ ज्या रागाच्या आरोहांत पांच स्वर व अवरोहांत पांच स्वर असतात तो. **०षाडव**–पु. ज्या रागाच्या आरोहांत पांच व अवरोहांत सहा स्वर असतात तो राग. **०संपूर्ण राग**–पु. ज्या रागाच्या आरोहास पांच स्वर व अवरोहास सात स्वर लागतात असा राग. [सं. औडव=एक राग]

औत—न. १ आऊत; शेतकी वगैरे धंद्याचें साधन. जसें– मळ्याच्या कामाचीं औतें–नांगर, कुळव, पाभर, दंताळें, मैंद, पेटारी, फावडें, पिकाव, पहार, करवडी, कोळपें, खुरपें व विळा, कोयता वगैरे कापणीचीं साधनें; शेतीसाठीं औत वापरण्याची चाल वेदकालापासूनची आहे. सामान्यतः नांगर, कुळव, पाभर इ० जीं बैलांनीं फिरवावयाचीं साधनें त्यांस औत म्हणतात. 'जे कर्ता जीव विंदाणीं। काढूनि पांचही खाणी। घडित आहे करणीं आउती दाहे। ' –ज्ञा १८.४५४. 'नागरीं कवळी मग आउतें वोढीं। ' –उषा १५९७. २ एका नांगरानें नांगरली जाईल इतकी जमीन. सुमारें ८० विघे. –विल्सन कोश. ३ (व.) शेतकामाच्या बैलांची एक जोडी. 'आमच्या घरीं चार औतें आहेत.' ४ –पुन. (कों.) भंडाऱ्याचा माडाची पोय कापण्याचा कोयता. ५ साधन; हत्यार (सोनार, कांसार, कुंभार इ० धंद्याला लागणारें); आयुध; शस्त्र. ६ (राजा.) सूप, टोपली, रोवळी, पंखा, इ०; वंशपात्र. प्रभु जातींत वरातीच्या वेळीं बांबूच्या हातरीवर वरीलपैकीं जें साहित्य ठेवतात त्यास औत म्हणतात. ७ मासे पकडण्याचें जाळें; आवत. (वाक्प्र.) औताचा नांगर, औताचा बैल. [सं. आयुध, आ+युत=जोडला जाणारा; गो. आवत] **०चालणें**–नांगर चालू असणें. **०धरणें**–शेतकाम चालू करणें. **०भरणें**–शेतकीचीं हत्यारें साफसुफ, तयार करून ठेवणें. **०सुटणें(पडणें)**–काम बंद करणें. **०करी**–पु. नांगर धरणारा; शेतकरी; औत्या. **०काठी**–स्त्री. (सामा.) औत; शेतकीचीं हत्यारें. **०पट्टी**–स्त्री. १ प्रत्येक नांगरावरील सरकारी कर. (नांगऱ्यावरहि असा जादा कर बसवीत.) २ ताडाच्या

तोडणीच्या प्रत्येक कोयत्यावरील कर. **०बंदी**–स्त्री. प्रत्येक नांगरावर कर बसविण्याची पद्धति; नांगरबंदी. खानदेशांत यास ओटबंदी म्हणतात. **०भरणा**–पु. (समुच्चयानें) १ शेतकरी वर्ग. २ शेतकीचीं हत्यारें. ३ नांगरावरील सरकारी कर. औतपट्टी पहा. (आळत असाहि प्रयोग आढळतो).

औत—पु. (व.) आहुति–आहुत (अप.) १ बलि; २ (ल.) अतिशय कष्टमय स्थिति; आसन्न मृत्यूची अवस्था. **औत घेणें**–अति श्रम होणें; त्रास होणें; मरणोन्मुख होणें–स्थितीस येणें. 'बाळंतपणानें औत घेतली.'

औतकी—स्त्री. प्रत्येक नांगरामागें ठराविक धान्य मिळण्याचा पाटलाचा हक्क. [औत]

औतण–णं, औतण–णें, औतन–नें—नउक्रि. आमंत्रण; आमंत्रण करणें; आवतण, अवतण–णें पहा. **औतून कटकट–कज्जा आणणें–करणें**–भांडण उकरून काढणें, भांडणास आमंत्रण देणें.

औतें—न. (खान.) अंबाडी, ताग, केतकी, यांचा एक इंच घेराचा दोर.

औत्पातिक—वि. अशुभ; अमंगलसूचक; पीडादायक. [सं. उत्+पत्–उत्पात]

औत्पादिक—वि. आकस्मिक; उपटसुंभ. 'ग्रँट डफचाच इतिहास वाचणाऱ्या गृहस्थांस मराठ्यांचा अभ्युदय हा केवळ औत्पादिक वाटण्याचा संभव आहे. पण वस्तुतः तो तसा नाहीं.' –टि २.२२९. [सं. उत्+पद्]

औत्या—पु. १ शेतकरी; नांगर धरणारा; नांगऱ्या, आवत्या. २ (ल.) औत धरण्याच्या वयाचा बाप्या. 'अशी मनसुभी वाटून घाटून आडला आवत्या गडी। लटकीच कुरबुर बायको झोडली घालून बसला आढी।' –पला ८६. २ (खान.) चाकर; सालदार; आवत्या. 'बिहीरांहीं आवत्यो रिईने तो आखे तों काम केवों.' =दुसऱ्याच्या येथें चाकर राहून तो सांगेल तें काम करावें. –भि ३५.

औत्सुक्य—न. उत्सुकता; उत्कंठा; धाधावणें; उतावीळपणा. 'विविधा औत्सुक्यांची दाटी।' –ज्ञा १८.१५५६. [सं.]

औदंड—वि. उदंड; विपुल. 'औदंड भजनिं अखंड, चित्त लागे.' –देप ६६. [उदंड अप]

औदंबर–री—(काव्य) ओडंबर–री पहा.

औंदा—क्रिवि. (कुण.) यंदा; ह्या वर्षी; चालू सालीं. 'औंदा पीक बरें आहे.' [फा. आयंदा=भावी–पुढील साल]

औदार्य—न. उदारपणा; दातृत्व; दानशीलता; वदान्यता. [सं.]

औदासीन्य, औदास्य—न. १ उदासीनपणा; निरानंदावस्था; सुखाभाव. २ बेफिकिरी; अलिप्तपणा; निष्काळजीपणा; तटस्थपणा. [सं. उदासीन]

औदुंबर—पु. (प्र.) उदुंबर; औदुंबराचें झाड; उंबर. [सं. उदुंबर] –वि. उंबराविषयीं; उंबराचें (काष्ठ, पर्ण, पुष्प, इ०).

औदुंबरी माळ–स्त्री. उंबराची माळ (अठांगुळाच्या वेळेस स्त्रीच्या गळ्यांत घालतात, ही एक लोकरूढी आहे). 'औदुंबरी माळ गळां न घाली.' –सारुह २.३५.

औदुंबर—न. तांबें. 'औदुंबर सुवर्ण रजत। काष्ठाचेंही असे पवित्र। ऐसें असे निर्मळपात्र। वामहस्तीं उदक घ्यावें॥' –गुच ३६.२७७. [सं.]

औद्धत्य—न. उद्धटपणा; दांडगेपणा; वरचढपणा. 'तैसे मौढ्य घणावे। औद्धत्य उंचावे।' –ज्ञा १६.३९१. [सं.]

औद्योगिक–वि. उद्योगासंबंधीं. **०उन्नति**–स्त्री. धंदे वगैरेची भरभराट. 'धंदेशिक्षण मिळाल्याखेरीज औद्योगिक उन्नति कशी होईल.' –टिसु ४१. **०शिक्षण**–न. उद्योगधंदे शिकविणारें शिक्षण. 'औद्योगिक शिक्षण घेणें हा राष्ट्रभक्तीचा पहिला पाठ आहे.' –के १६.४.३०.

औंध—स्त्री. काळोखी, अंधारी. ओंध पहा. [सं. अंध]

औधिया—स्त्री. चोऱ्या करणारी एक बैरागऱ्यांची जात; त्यांतील माणूस. –गांगा १३२. [औध, ओढ्या किंवा अयोध्यापासून]

औपचारिक—वि. १ उपचाराविषयींचा–बद्दल. २ ओढून ताणून; कसातरी; वरवरचा; शिष्टाचार म्हणून पाळलेला. 'सर्व व्यवहार औपचारिक चालला होता, त्यांत प्रेम राहिलें नव्हतें.' –इंप ४२. ३ अलंकारिक; रूपकात्मक. ४ खुशामतीचें; प्रशंसात्मक; गौरवपर (भाषण). [सं.]

औपम्य—न. सादृश्य; तुल्यता; सारखेपणा. [सं. उपमा]

औपरोधिक—वि. उपरोधयुक्त; गुप्त; गूढ; ज्यांतील खरा अर्थ गर्भित असून शब्दार्थ किंवा वाच्यार्थ निराळा असतो असें; वर्मी; छद्मी (भाषण इ०); शालजोडीतील (मारणें). [सं. उपरोध]

औपाधिक—वि. उपाधीसंबंधीं; उपाधि जडलेला; मायिक. 'दाविजे तेवीं औपाधिका। बोली हया॥' –ज्ञा १५.४७०. [उपाधि]

औपासक—वि. (काव्य) उपासकबद्दल चुकीचा प्रयोग; भक्त; सेवक. 'त्याच्या औपासकासी विघ्न। करूं कवण शकेल।'

औपासन—पु. स्मार्ताग्नि किंवा गृह्याग्नि; विवाहामध्यें गृहप्रवेशाचे वेळीं ज्या अग्नीवर 'गृहप्रवेशनीय' होम होतो तो अग्नि. हा अग्नि गृहस्थाश्रमीनें आमरणांत संरक्षण करावयाचा असतो

व यावर सकाळ-संध्याकाळ होम यावयाचा असतो. 'सांडोनि वैश्वदेव औपासन । सदा भक्षिती परान्न ॥' -कथा ४.१६.३६. [सं.]

और—पुन. १ ऊर; ओर; नदीचा पूर. २ खाडींत किंवा नदीच्या पात्रांत आलेली समुद्राची भरती. [सं. आ+पूर; प्रा. आऊर]

और—वि. १ अन्य; दुसरा; तद्भिन्न. २ (ल.) विलक्षण: विचित्र; मजेदार. 'और आहे बुवा!' 'तुका माऱ्या पेटका और न जाने कोय।' -तुगा ४२९. ३ छान: सुंदर. -क्रिवि. आणखी: शिवाय. [सं. अपर-अवर; हिं. और; दे. ओर=सुंदर] **म्ह०** और तो लगाव पीछे बतायेंगे, मेरे गळीमे तो आव=म्याड माणसाच्या वागण्याबद्दल म्हणतात.

औरंग—न. १ सिंहासन; तख्त. २ (हिं.) व्यापारी जिन्नस तयार होण्याचें किंवा एकत्र मोठया प्रमाणांत भसण्याचें ठिकाण. ३ ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारांत वखारींना हा शब्द लावीत असत. [फा.]

औरत—स्त्री. स्त्री; पत्नी. सरकारी दफ्तरांत व कुणबाऊ बोलींत याचा विशेष उपयोग होतो. [अर. औरत्]

औरस—पु. १ धर्मविधीनें लग्न लावलेल्या स्वस्त्रीस स्वत:-पासून झालेला पुत्र; स्वस्त्रीचे ठायीं स्ववीर्यानें उत्पन्न झालेलें अपत्य; अस्सल; दत्तकाच्या उलट. 'गांधारि! उगीच रहा, होळं दे दूत औरसा मान्य।' -मोसभा ६.८७. -मोमीष्म ३.२२. [सं. उरस्=वक्षस्थल] -वि. १ छातीसंबंधीं. २ स्वीय; अस्सल. [सं. उरस्]

औरस—स्त्री. (चुकीनें) लग्नाची बायको; पाटाची नव्हे.

औरसचौरस—क्रिवि. १ अवरसचवरस; सर्भोवार; चोहोंकडे; चारी बाजूस; आसपास. २ लांबी-रुंदीनें; उभें-आडवें (क्षेत्रादिकांचें प्रमाण); लांबीनें रुंदीस गुणून; आडवातिडवा. [चौरस द्वि.] 'चोळीस खण औरस चौरस सात विती लागतो.' 'चवरंग औरस चौरस एक हात कर.' [सं. चतुरस्र द्वि.]

औरसपुत्र—पु. विवाहित स्त्रीपुरुषाची संतति; धर्मपत्नी-पासून स्वत:ला झालेला पुत्र. औरस अर्थ १ पहा. [सं. उरस्]

और्ध्वदेहिक—न. (प्रेताविषयींचें) उत्तरकार्य-क्रिया; प्रेत-संस्कार. -वि. उत्तरक्रियेसंबंधीं. [सं. ऊर्ध्व+देह]

औलाद—स्त्री. प्रजा. अवलाद पहा. [अर. औलाद्]

औलिया—अवलिया पहा.

औषध—न. (अप.) औषध. १ रोग निवारण करणारा पदार्थ; ओखद; दवा; उपाय; ज्याचे सेवनानें रोगनिवृत्ति होते असा झाडपाला, मुळी, काष्ठ, धातु, रस, रसायन, मात्रा इ०. २ (ल.) कार्यसिद्धीचें साधन, अर्थ; उपाय; इलाज. ३ (वांई) दारू (शोधेची-बाराची). 'हवाया नळे भरभराटे। औशधकळा गाजली॥' -वेसीस्व ७.८८. 'मोहित्यांच्या लग्नांत औषध फार जळलें.' ४ (संकेतानें) सोमल; अफू इत्यादि अंमली पदार्थ. **०करणें**-औषध लावणें, घेणें; उपाययोजना करणें. **औषधाला नसणें**-औषधापुरतेंहि नसणें; संपुर्णांत येणें; मुळींच नसणें; अत्यंत अभाव असणें. 'त्याच्या घरांत पान औषधालाहि नाहीं.' औषधावांचून खोकला जाणें. =(ल.) अनायासें ब्याद टळणें. **०पाणी**-न. औषध; औषधउपचार; उपाययोजना (व्याधपक्षणें). (क्रि० देणें; घेणें; करणें). [सं.]

औषधी—स्त्री. १ फळें पिकेपर्यंत जीं झाडें जगतात तीं, एक हंगाम जगणारीं झाडें प्रत्येकीं. २ (सामा.) झाड; वनस्पति; जडीबुटी. [सं. ओषधी] -वि. औषधासंबंधीं गुणदायक; औषधाला उपयोगी. **०द्रव्य**-न. औषध किंवा औषधाची वस्तु, पदार्थ **०शास्त्र**-न. वनस्पतींत औषधी गुणधर्म कोणते आहेत ह्याचा विचार करणारें शास्त्र. (इं.) 'मटीरिया मेडिका.'

औषधोपचार—पु. रोगावर उपचार; उपाय; औषधयोजना; दवा. (अनेकवचनी प्रयोग). सक्तोपचार पहा. [औषध+उपचार]

औषधोपाय—औषधोपचार पहा. 'हा दुखणाईत औषधोपाय करून भुईचा सावडला.' [औषध+उपाय]

औष्णिक—वि. (शाप.) उष्णता देणारें (किरण, इ०).

औस—स्त्री. (कुण.) अमावास्या. अवस पहा.

औंस—१ (ट्रॉय वजन) $\frac{१}{१२}$ पौंड. २ (अवाडुपाईय); $\frac{१}{१६}$ पौंड; अडीचतोळे. १ औंस=२ जेवणाचे चमचे (टेबलस्पून). २ औंस=१ दारूचा पेला (वाइन ग्लास). [इं.]

औसर—अवसर पहा.

औसा—पु. पुजारी. [दे. अउस=पुजारी, सं. उप+आस्]

औसाफ—पु. १ लौकिक; कीर्ति. 'परशुरामपंत यांत छत्रपतींनीं मारविले सबब विश्वासराव यास मारिले ही गोष्ट बेहिशेबाची, आमचे घराण्याचे औसाफास योग्य न जालें.' -ख ११. ६१३५. २ (हिं.) गुण; लायकी. [अर. औसाफ; वरफ चें अव.]

औसिकम—पु. हरणाच्या रंगाचा घोडा. -अश्वप १.१०४.

औक्ष—न. (कुण. बायकी) आयुष्य; जीवित; जीवनमर्यादा. 'औक्ष कसें कमि झालें सवाई माधवरायाला।' -ऐपो ३०३. [सं. आयुष्य]

औक्षण, औक्षवण—न. आरती ओवाळणें; आरती; निरांजन; आरती वगैरे ठेवलेलें तबक किंवा लामणदिवा. लग्न कार्याच्या अथवा इतर शुभप्रसंगीं देवाची मूर्ति किंवा ज्याचें मंगलकार्य असेल त्यास त्याच्या तोंडाभोंवतीं सुवासिनीनें ओवाळण्यासाठीं घेतलेलें दीपादियुक्त ताम्हन; सदर ताम्हन

ओवाळण्याची क्रिया; (सामा.) ओवाळणें. अक्षवाण पहा. 'त्या (वधू) बसल्यावर त्यांचें सुवासिनी स्त्रियांकडून औक्षण होतें.' –ऐरापुविवि २६. (क्रि० करणें). आयुष्यवर्धक विधि. [सं. आयुष्य+वान् किंवा वर्धन?]

औक्षवंत-वान—वि. (कुण. बायकी) चिरायु; चिरंजीव· आयुष्यमान; उदंड आयुष्याचा. (आशीर्वाद). [सं. आयुष्यवंत–वान्]

अं

अं—मराठी वर्णमालेंतील पंधरावें अक्षर. अच्या डोक्यावर टिंब देऊन अं अक्षर बनविण्याची पद्धत फारशी प्राचीन दिसत नाहीं. गिरनार शिलालेखांत टिंब अच्या पुढें आहे. इ. स ४ थ्या शतकांत अच्या डोक्यावर नुसती लहान रेघ दिलेली आढळते

अंः—उद्गा. तिरस्कार, वेषर्वा, अविश्वास दाखविणारें उद्गारवाचक अव्यय; उंः; तुच्छतादर्शक उद्गार.

अंऽऽ—उद्गा. काय? पुन्हा सांग या अर्थी.

अँ—उद्गा. ऊं; आँः; पुन्हां सांग याअर्थी उद्गार; पुन्हां बोल तर पाहूं असा धाक यानें दर्शविला जातो.

अंक—पु. १ संख्या; आंकडा (१, २, ३ इ०); आंख (अंक गणितांतील). 'अंकें जैसीं शून्यें सद्यःकार्यक्षमें, न तीं अन्यें।' –मोवन ६.३५. २ खूण; चिन्ह; छाप; शिक्का. 'अंक तो पडिला हरिचा मी दास।' –तुगा १३३८. ३ नाटकाचा एक भाग; कथाभागाला किंवा संविधानकाला विरोध दाखविणार नाहींत असे जे नाटकाच्या कथानकाचे विभाग त्यांना अंक म्हणतात. असे अंक चारपासून बारापर्यंत असतात अलीकडील सुमारें २५ वर्षांतील गद्य-पद्य नाटकें तीन अंकांचीं असतात. 'ज्ञाकुंतल नाटकाचा चौथा अंक फार बहारीचा आहे.' –नाकु ३.१. ४ मांडी. 'आधार शक्तीचिया अंकीं। वाढविसी कौतुकीं।' –ज्ञा १२.५. ५ (डोळ्याजवळचा) आंख. भुंवई व कान यामधील जागा. ६ डाग; कलंक. 'सुत हो! शुद्धांस कसें आतळलें व्यसन अंक हा रविला।' –मोसभा ७.४२. ७ नियतकालिकाचा (वर्तमानपत्र, मासिक इ०) एक भाग, अनुक्रम, संख्या, नंबर. 'साप्र हकीगत लांबलचक असलेमुळें पुढील अंकावर ठेवणें भाग आहे.' –विक्षिप्त १.१४. [सं. अंक (अंक्=खूण करणें, मोजणें); लॅ. अंकस्; ग्री. ओगकोस] **०गणित**—न. अंक किंवा व्यक्त संख्या यांचा विचार ज्यांत केलेला असतो तें शास्त्र. भास्कराचार्यांनीं याला 'पाटीगणित' असें म्हटलें आहे. याची उभारणी संख्येच्या कल्पनेवर असल्यामुळें या शास्त्राची उत्पत्ति व्यापाराचें मूळस्वरूप जे विनिमय त्यापासून फार प्राचीन काळीं झाली असावी. बीजगणिताच्या (अक्षरगणिताच्या) उलट याचे पूर्णांकगणित व अपूर्णांकगणित असे दोन भाग आहेत. यांत बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, वर्ग, वर्गमूळ, घन, घनमूळ असे आठ प्रकार येतात. 'अंकगणिती कोटद्या काढून नेटिवांस फसविण्याचे दिवस आतां राहिले नाहींत.' –टि २.५२३. **०गति**–स्त्री. (हिशेबाचे) आंकडे मांडण्याची किंवा मोजण्याची पद्धत. **०चक्र**–न. (ज्योतिष) कालगणना चक्र. हें चक्र ५९ वर्षांचें असतें. या कालगणनेंत वर्षारंभ भाद्रपद शु. १२ ला समजतात. ६ किंवा ० ज्याच्या शेवटीं आहे तें वर्ष गणनेंत धरीत नाहींत. मद्रास इलाख्यांतील गंजम जिल्ह्यांतील लोक ओंको किंवा अंक नांवाच्या चांद्रसंवत्सरचक्रानुसार वर्षे मानितात. –ज्ञाको (अं) २७ **०चालन**–न. (ज्योतिष) अंकांचीं किंवा गणिती कोष्टकें, सारण्या; निरनिराळ्या कालांना जुळतील असा अंकांचा फरक. **०जाल**–न. आंकडयांचें कोष्टक, सारणी, (पंचांगांचें गणित सोपें करण्यासाठीं तयार केलें). [अंक+जाल] **०पट्टी**–स्त्री. (कापडाच्या गांठीमधील) कापडाच्या अनुक्रमाची, किंमतीची किंवा इतर माहितीची चिठ्ठी; बीजक. आंकपट्टी पहा. **०पाश**–पु. संख्यारचनेसंबंधीं प्रकार. (इं.) परम्युटेशन. [सं.] **०मोडणी**–स्त्री. १ आंकडेमोड; हिशेब. २ अंक मांडण्याची पद्धत (डावीकडून उजवीकडे किंवा उजवीकडून डावीकडे). ३ बोटें मोडून अंक मोजणें. [अंक+मोडणी] **०राशि**–स्त्री. संख्येची मालिका; ओळ; रकमा (बेरजेसाठीं). [सं.] **०लिपी**–स्त्री. १ संख्यालेखनपद्धति (आंकडयांची–अक्षरांची नव्हे), आंकडे लिहिण्याची पद्धति, अठरा लिपीपैकीं एक. २ ज्यांत पाढे वगैरे लिहिले आहेत असें पुस्तक; उजळणीचें पुस्तक. [सं.] **०स्थल-स्थान**–न. (अंकगणित) आंकडयांची जागा. 'गणितांत अंकस्थानें नऊ आहेत.' [सं.]

अंकडा-डी—सर्व अर्थी आंकडा–डी पहा.

अंकण—न. मळणीचीं कणसें, धान्य. आकण पहा. 'अंकणा तुझीं सात कणसें।' –भोंडला.

अंकण-णा-णें—न. पायांत बांधावयाचें पराक्रमसूचक ब्रीद (तोडा); एखाद्यास जिकलें असतां जिकणारा त्याची प्रतिमा किंवा नांव आपल्या तोडरावर कोरीत असे. 'पण स्वामी निमालिया कुगावरि। तेही अपोस्तोली केली कीर्ति थोरी। संसारु बांधला तोडरी। अंकण कहनि।' –स्फिपु २.४१. ११८. २ ब्रीद; बिरुद. आंकण–णा–णें पहा. [सं. अंकन]

अंकणकडवें—न. गाण्याचें पालुपद; ध्रुवपद. आंकणकडवें पहा.

अंकणा—आंकणा पहा.

अंकणी—आंखणी, रेघ, पट्टी, खण इ० अर्थी आंकणी पहा.

अंकणें—उक्रि. १ (सामान्यतः) खूण करणें; मोजणें; छाप मारणें; आंखणें; चितरणें. ' मी अनंगव्रतें अंसे अंकिली । ती तंवं तुम्ही येथें नसे जिंकिली । जी संगविरहें बहुत व्यापिली । ती काय जाणाल स्वामिया ॥ ' –जै १७.११५. २ रेघा ओढणें; रेखाटणें; नकाशा काढणें; बेतणें; आराखडा काढणें; वर्णन करणें. आंकणें पहा. ३ योजणें; संकल्प करणें. ४ अंकित होणें; वश होणें. ' कामाचे विकिले क्रोधाचे जिंकिले लोभाचे अंकिले सर्वेभावें ॥ ' –ब १९१. ५ अंकित, स्वाधीन करणें. [सं. अंकन]

अंकणें—न. घरावरील धाब्याचा – पाणी जाण्यासाठीं केलेला–उतरता भाग. [का. अंकण=घराचा खण]

अंकदार—वि. गांवांतील जमीनींपैकीं कांहींचा मालक; खातेदार; सारा भरणारा. [सं. अंक+फा. दार]

अंकन—न. १ खूण करणें; मोजणें, आंकडे घालणें. २ अंगावर देवताचिन्ह किंवा नांव डागणें; गोंदणें. [सं.]

अंकनीय—वि. चिन्ह करण्याचें किंवा करण्याजोगें; गणना करण्याचें किंवा करण्याजोगें. [सं.]

अंकरी—स्त्री. कुळीथ; हुलगा.

अंकसळ, अंकशाळ—पु. १ सोनार, अकसाळी पहा. २ सोनें कसोटीस लावण्याचा दगड. ' कां भंवरेंचि केला मळा । वरकलुचि जाला अंकसळा । ' –ज्ञा १८.४९२. [सं. अर्क–अङ्क=सोनें+शाला=साल; अंकन+शलाका; तु० का. अङ्कसालिग=शकांची एक पोटजात, हे पूर्वजांचे टांक ठेवीत]

अंकित—वि. १ चिन्हित; खुणा केलेलें. ' कां मातापितर मरणें । अंकित जे दिवस ॥ ' –ज्ञा १८.११०. २ मर्यादित; सांगितलेलें; ज्याचा मार्ग किंवा वागण्याची रीत ठरवून दिली आहे असा. ३ सेवक. (अंकित=खुणा केलेला, राजाच्या सेवकाच्या अंगावर कांहीं तरी सेवकपणाचें चिन्ह असतें त्यावरून); ताबेदार; गुलाम. ' जो श्रीहरिभजनीं होईल रत । कलिकाळ अंकित होय त्याचा । ' ' तैसा मी संतांचा अंकित । ' –दा १.६. २०. ४ वश; आज्ञा उल्लंघन न करणारा. ' केलीं नारायणें आपुलीं अंकित । तोचि त्यांचें हित सर्व जाणे । ' –तुगा ११. सामाशब्द आज्ञांकित=आज्ञेनुसार वागणारा; श्रमांकित=थकलेला; नियमांकित; पापांकित. [सं.]

अंकिला—स्वाधीन असलेला; ताबेदार; अंकित पहा. ' हे स्वामिचे अंकिले । भणौनि दंडवतें घातलें । ' –ऋ १३. ' चारी मुक्ति ज्याच्या दासी होती । त्याचा अंकिला मी श्रीपती, ' –एभा २२.६९१. [अंकणें]

अंकी—वि. १ अंकासंबंधीं. २ अंकानें लिहिलेला, मंडित केलेला; याच्या उलट अक्षरी. ३ तिथिवाचक अक्षरांनीं न लिहितां त्याऐवजीं केवळ अंकांनींच लिहिलेलें (पंचांग, इ०).

अंकु–कू—पु. १ अंक पहा. २ शिष्य; सेवक. ' या बोला आन होये । तरी व्यासाचा अंकु न वाहें । ऐसें गाजोनि बाहें । उभिली तेणें । ' –ज्ञा १८.१६५८. [अंक]

अंकुडें—वि. आंकडा असलेलें; आंकडयासहित.

अंकुर—वि. १ कोंभ; मोड. (क्रि० फुटणें; येणें). ' सपूर गगनांकुर सबळ । तैसे मस्तकीं केश कुरळ । ' –एहस्व १.६३. २ (ल.) मूल; वंशवृक्षाचा कोंभ, मोड; वंशज. ' गंगाबाईच्या या एका अंकुराशिवाय कुणीच वंश नव्हता. ' –इंप २८. ३ अणकुची; टोंक. ' कधी डवचिती ... हरिणपोत शृंगांकुरें । ' ४ भावी कर्तृत्वाचें चिन्ह. (लहान मुलाच्या अंगचे–चेष्टा, भाषण इ०). (क्रि. दिसणें). [सं.]

अंकुरणें—अक्रि. १ कोंभ फुटणें; मोड येणें; उगवणें; प्रगट होणें. ' कीं क्षीरसागरू आंकुरला । गगनभूमीं । ' –शिशु ४२. ' भाजलें तें बीज अंकुरेना कदा । न मिळेचि दुधामाजी लोणी । ' –ब ३४५. २ (ल.) अंगावर रोमांच उभे राहणें. ' त्या महोत्सवेंविशेषें अंकुरलें अंग । ' –रास २.२१२.

अंकुरित—वि. १ अंकुर फुटलेला; उगवलेला. २ (ल.) स्पष्ट झालेला, दिसूं लागलेला, प्रादुर्भूत. शरीराच्या ठिकाणीं दिसूं लागलेली (तारुण्यावस्था, इ०). उदा० अंकुरित यौवन=वयांत आलेला–ली. [सं.]

अंकुश—पु. १ हत्तीला ताब्यांत आणण्याचें, एका बाजूला आंकडीसारखें वांकविलेलें हत्यार; हें त्याच्या गंडस्थळास टोंचतात. टोंचणी. ' ध्वजवज्रांकुशरेखा । चरणींची सामुद्रिकें देखा । ' –एहस्व १.२२. **म्ह०** ' हत्तीला अंकुश केवढा असतो ? ' (क्षुद्र वस्तु मोठ्याला आपल्या अंकित ठेविते तेव्हां योजितात). =थोडयाशा दुष्ट लोकांनीं पुष्कळ सुष्ट लोकांवर अंमल चालविणें. २ आंकडी; अंकुशी. ३ जैन यतीच्या हातांतील एक उपकरण ज्यानें तो देवपूजेकरितां वृक्षाचीं पानें फुलें काढतो. ४ दाब; आकलन; मर्यादा. ' निरंकुशाः कवयः । ' =कवींना कांहीं धरबंध, प्रतिबंध नसतो. ५ तुरा; शिरपेंच. ' स्त्रीमात्र इये सृष्टीं । गंगेसमान माझिये दृष्टीं । जितेंद्रियत्व गुणाचे मुगुटीं । वरी अंकुश खोंविला ॥ ' –मुआदि २३.७१. [सं.] **०मारणें**–(गों.) टोंचणी लावणें. ' ताजेकडच्यान कसलेंय् काम करून घॅतलॉ जाल्यार ताका पोतुं-पोतुंन अंकुश मारूं जाय. '

अंकुशी—स्त्री. आंकडी; अंकुश. **०रुपया, अंकुसी–अंकोसी**–पुस्त्री. ज्याच्यावर अंकुशाचा छाप आहे असा रुपया (हा पेशवाईंत चालू होता). ' पगार मक्ते प्रमाण । घ्यावे सुरस अंकोसी नाणें । ' –पैमार्षेदु ६.

अंकोल-ळ—पुस्त्री. डोंगरांत वाढणारें एक झाड. याचें पान एक अंगुळ रुंद व पांच सहा अंगुळें लांब असुन फूल पांढरें असतें, कच्चें फळ निळें व पिकलेलें लाल रंगाचें असतें; झाडाला कांटे पुष्कळ असतात. कृमी, शूल, विषार (साप, उंदीर इ०) यावर औषधि आहे. [सं. अंकोट, प्रा. अंकोल्ल] –न. त्याचें फळ. याचा रस वांती, विष, पिशाचपीडा, अतिसार इ० चा नाश करतो. याचें तेल मंत्र-विद्येतहि उपयोगी पडतें.

अंख—पु. १ अंक; आंकडा; संख्या; अंकगणितांतील चिन्ह. २ डोळ्याचा आंख; कपाळाचें गंडस्थळ. आंख पहा. [अंक]

अंखणपंखण—वि. धान्य, कणीस याप्रमाणें चिखुरलेलीं ? अंखणपंखण नक्षत्रें.' –भोंडला, मसाप ४.२५२. [अंकण द्वि.]

अंखणी-णें—अंकणी-णें पहा.

अंखी—अंकी पहा.

अंखोअंख—क्रिवि. चिठ्ठीवरील आंकडयाप्रमाणें, म्हणजे किंमत कमजास्त न करतां, मूळ किंमतीस (विकणें किंवा विकत घेणें). [अंक-आंख द्वि.]

अंग—न. (अप.) आंग. १ शरीर; देह. 'पै जयाचेनि अंगसंगें।' –ज्ञा ९.२६९. 'अंगाला वारा लागेल, आंत जा!' २ अवयव; इंद्रिय; गात्र. 'अति क्षीणता पावलीं सर्व आंगें.' –दावि २४२. ३ (ल.) कोणत्याहि गोष्टीचा घटक, विभाग. 'हत्ती, रथ, घोडेस्वार आणि पायदळ हीं प्राचीन काळीं सैन्याचीं चार अंगें समजलीं जात असत.' ४ बाजू; दिशा. दारा अंग = (व.) दरवाज्यामागें किंवा जवळ. 'आठे आंगें पोळती । वसुधरेचीं।' –शिशु ७४८. 'किल्ल्याचें आंग भिउनि फिरंग भार हा पळतो कानडयाचा.' –ऐपो १८३. 'तुमचें पागोटें मागल्या अंगानें बैडौल दिसतें.' ४ वेदांग; वैदिक वाङ्मयापैकीं विशिष्ट ग्रंथ-समूहास संज्ञा. उदा० शिक्षा, ज्योतिष, निरुक्त, इ. ५ एखाद्या कामांत असलेला हात, घेतलेला भाग किंवा संबंध. 'त्या मसलतींत रामाजीपंतांचें अंग आहे.' ६ चोरून मदत किंवा मिलाफ; आश्रय; फूस. 'ह्या चोराला कोतवालाचें अंग आहे.' 'ही सासूबरोबर भांडते, हिला नवऱ्याचें अंग आहे.' ७ अधिष्ठान; ठिकाण; शरीर; देह (एखाद्या गुणदोषाचा कर्ता, पात्र). 'ही चोरी ज्याचे अंगीं लागेल त्यास मी शासन करीन,' 'त्याच्या अंगीं चित्रकलेचा गुण आहे.' ८ (एखाद्या वस्तूचा किंवा कार्याचा) गौण, अप्रधान; भाग. उ० विवाहामध्यें होम हा प्रधान आहे, अवशिष्ट कर्में अंगें होत. ९ खूण. 'अनुभवाचीं आंगें जाणें।' –दा ५.९.२२. १० आंतडयाचा गुदद्वाराबाहेर येणारा भाग, किंवा प्रसूतीनंतर योनीच्या बाहेर येणारा भाग. (सामा.) गुदद्वार. 'आंगीं सारी बर्फ कुणाच्या छत्री गाजर मुळा। मेणबत्तीचा खेळ चालला' –विक्षिप्त १.१३५. ११ विशिष्ट काम करण्याची पात्रता, ताकद, क्षमता, बुद्धि. १२ आपल्या बाजूचा माणूस(मोठ्या अधिकावरील);पुरस्कर्ता,तरफदारी करणारा; वशिला 'दरबारांत अंग असल्यावांचून कार्य सिद्धीस जात नाहीं.' १३ (ज्यो.) पूर्वक्षितिजावरील क्रांतिवृत्तावरचा बिंदु, अंश. (अस्तलग्नाच्या उलट). १४ (संगीत) प्रबंधाचा पोटविभाग; रागवाचक स्वरसमुदाय; हे विभाग सहा आहेतः– स्वर, विरुद, पद, तेनक, पाट, ताल. १५ (ताल) तालाचें मात्रानियमानें झालेलें कालप्रमाण हीं अंगें सात आहेतः–अनुद्रुत, द्रुतविराम, लघु, लघुविराम, गुरु व प्लुत. १६ कौशल्य; चातुर्य; कल. 'त्याला गाण्याचें अंग आहे.' १७ मगधाच्या पूर्वेचा जुना बंगाल देश; सध्यांचे मोंघीर, भागलपूर, पूर्णिया इ०. जिल्हे यांत येतात. याचा उल्लेख अथर्ववेदांत आलेला आहे. पुढील काळीं शोण, गंगा या नद्यांच्या आसपासचा प्रदेश; कर्णाचें राज्य. १८ आचारांग सूत्रांपैकीं एक जैन आगम ग्रंथ. १९ स्वतः, खुद्द. आंगें असाहि प्रयोग आढळतो. 'दीप वांचुनि दिवा लाहे। तैं आंग भुललाचि कीं।' –अमृ ३.२०. 'राहोनि गुप्त धृष्टद्युम्नें तच्छोध लाविला आंगें।' –मोआदि ३४.१८. २० प्रकार. 'घालाघालीचें आंग सांधों कैसें। चालितां बिंबु न दिसें।' –शिशु १००६. 'कारभाराचें सांगावें अंग कैसें।' –दा ११.५.२३. –शब्र. (व.) कडे. उ० 'भिंतीअंग' (वाप्र.) **०ओढविणें**–आपल्या आंगावर घेणें; स्वतः पुढें होणें; (एखाद्या कार्यांत–कडे). 'आपुलेंचि अंग तुम्हीं वोडविलें। त्याचें निवारिलें महादुःख।' **०काढणें-काढून घेणें**–१ स्वतः एखाद्या कामांतून माघार घेणें; संबंध तोडणें (एखाद्या कामांतून). 'मी त्या कामांतून आपलें अंग काढून घेतलें आहे.' २ (कु. गो.) दचकणें. 'आंग काडप.' **०घालणें**–१ हात घालणें; मदत करणें; मन घालणें. 'या कामांत तूं जर अंग घातलेंस तर फार सोय होईल.' २ दुःखामुळें (जमिनीवर पडणें.) 'ऐकोनियां आंग घाली पृथ्वीवरी।' –दा ३.५.३०. **०घासणें**–झीज सोसणें. 'परांजप्यांनीं प्रामाणिकपणानें अंग घासून ... स्वतःची स्कीम करून कार्यास लागावें' –केले १.२६३. **०घेणें-भरणें**–१ लठ्ठ होणें. २ (गो. 'आंग घेवप.') (कामांत) भाग घेणें. **०न घेणें**–पुढें न सरसावणें; भाग न घेणें. **०चढणें**–सदरांत पडणें; वर्गांत येणें. 'जें विधीसी नातुडे। तें निषेधाचें अंग चढे.' –एभा ७.६९. **०चढून येणें**–(व.) ताप भरणें, चढणें. **०चोरणें-जोगावणें**–१ अंग राखून काम करणें; टंगळमंगळ करणें; चुकारपणा करणें. 'संत सेवेसी अंग चोरी। वृद्धी न पडो तयावरी।' २ शरीराचा भाग आकुंचित करणें (मार चुकविण्याकरितां). 'असा अंग चोरतोस म्हणून नीट लागत नाहीं.' **०जड करणें**–(गो. 'अंग जड करप') एखाद्या कामांत

भाग घेण्याचें टाळूं पहाणें. **०जड जाणें**–(गो. 'आंग जट जावप. ') अंगावर कांटा उभा राहणें. **०झांकणें–लपविणें**–स्वतःची बाजू किंवा भाग (कामांतील) दाबून, गुप्त ठेवणें. **०झाडणें**–साफ नाहीं म्हणून सांगणें; नाकबूल करणें. 'आंग झाडिती न ममें। येणें बोलें।'–ज्ञा १७.३७२. **०टाकणें**–१ अशक्त होणें; वाळणें. 'आई गेल्यापासुन बाळानें अंग टाकलें आहे.' २ जोरानें देह जमिनीवर टाकणें. ३ विश्रांतीसाठीं आडवें होणें; कसें तरी अस्ताव्यस्त पसरणें. 'घरीं जाऊन केव्हां अंग टाकीन असें मला होतें.' **०टेकणें**–आश्रय करणें 'योगें आंग टेकिलें योगीं।'–अमृ ९.२६. **०दर्शविणें**–एखाद्या गोष्टींत किंवा व्यवहारांत हात किंवा संबंध आहे अशी भासविणें. **०दाखविणें**–एखाद्या कामांत कौशल्य दाखविणें. **फड जिंकणें. ०न दाखविणें**–अंग असल्याचें लपविणें; मागें रहाणें, जबाबदारी टाळणें. (गो. आंग दाखेना जावप. ') **०देणें**–१ मदत करणें; हातभार लावणें. २ प्रवृत्त होणें; वळणें. 'मुखा अंग देऊं नये।' **०दोडपणें, दुडपणें, दुमडणें**–(गो. 'आंग दोडप. ') अंग चोरणें. **०धरणें**–१ ताठणें; संधिवातानें शरीर आंखडणें. २ लढ होणें; ताकद येणें. **०मरणें**–अर्धांगवायूनें शरीर अथवा एखादा अवयव बधिर होणें. **०मारणें**–१ अंग चोरणें.पहा. २ जोरानें अंग आंत घुसविणें. 'मी दारींतून अंग मारलें.' **०मुरडणें**–मुरडणें; मागें पहात दिमाखानें जाणें; ठमक्यानें जाणें; 'नवी साडी नेसुन पोर पहा कशी अंग मुरडीत चालली आहे.' **०मोडून काम करणें**–खपणें; श्रम करणें; अतिशय मेहनत करणें; जिवाकडे न पाहतां काम करणें; जीव पाखडून काम करणें. **०मोडून येणें**–तापानें अंगावर कांटा येणें; कणकणणें; कसकसणें. 'तदपरि अविलंबें आंग मोडून आलें।'–साहह ३.५७. **०येणें**–(गो. 'आंग यॅवप. ') १ लठ्ठ होणें. २ प्रसूति समयीं गुह्यांग बाहेर येणें. **०रक्षण करणें, राखणें–वांचविणें**–अंग चोरणें; आपला बचाव करणें. 'यश रक्षावें न आंग लेकांहीं।' –मोउद्योग १०.६१. 'वत्सें भीमें एकें काय करावें ? न अंग राखावें।' –मोभीष्म ३.४. **०सांवरणें**–१ तोल सांवरणें.२ गेलेली ताकद पुन्हां मिळविणें; पूर्व स्थितीवर येणें. **०सोडणें**–(गो. 'आंग सोडप ') खंगत जाणें. **०हलकें होणें**–(गो. आंग ल्हवु जावप. ') हायसें वाटणें; (जबाबदारींतून) मोकळें झाल्याबद्दल समाधान वाटणें. **अंगा**–नें आरंभ होणा रे वाप्र. **–खांद्यावरचें**–(बायकी) (ल.) दागदागिने. **–खालची, खालची बायको**–स्त्री. राख; उपस्त्री. **–खालीं घालणें**–स्वतःच्या चैनीसाठीं अथवा उपभोगासाठीं राखणें (वेश्या, परस्त्री, इ०). **–खालीं पडणें**–१ सवयीचें होणें. २ भोग देणें; रतिसुख देणें–घेणें. **–चा आंकडा होणें**–आंकडीनें पेटके येणें, अंग वांकडें होणें. **–चा आळापिळा करणें**–१ अंग पिळवटणें; आळेपिळे देणें. २ अतिशय श्रम करणें. **–चा खकाणा करणें**–(व.) संताप करून घेणें. **–चा खुर्दा होणें**–(श्रमानें) अतिशय श्रमानें अंग ठणकणें; गलितगात्रें होणें; मणके ढिले होणें. **–चा हुरपळा–भडका होणें**–अंग अतिशय तापणें (तापानें, संतापानें); लाही होणें; आग होणें. **–ची आग–लाहकी–होळी होणें**–रागानें, संतापानें अंगाची आग होणें. **–ची चौघडी करणें**–१ शरीराच्या चार घडया करणें (दोंधाऱ्याच्या कसरतींत). २ सर्व अंग पोटाशीं घेऊन निजणें (थंडी, ताप इ० मुळें). **–ची लाही होणें**–अंगाचा हुरपळा होणें पहा. १ उन्हानें अतिशय अंग तापणें; काहिली होणें; भडका होणें. २ अतिशय संताप येणें (जोंधळा इ० धान्याची भाजून लाही होते त्याप्रमाणें), 'तें तिजला खपलें नाहीं। अंगाची झाली लाही।'–विक १७. **–ची लाही करणें**–संतापविणें, खिजविणें. भाजणें; जाचणें. **–चें आंथरूण करणें**–स्वतःवहुची काळजी सोडून सर्व प्रकारच्या संकटांना तोंड देणें; एखाद्याचें काम करण्यासाठीं स्वतःच्या जीविताची पर्वा न करणें. 'त्याचें लग्न व्हावें म्हणून म्या अंगाचें अंथरूण केलें तरी त्यानें त्याचा कांहीं उपकार मानला नाहीं.' **–चें आंथरूण होणें**–(तापामुळें) अशक्तता येणें; उठवणीस येणें; मरगळीस येणें. **–चें कातडें काढून जोडा शिवणें**–(एखाद्याविषयीं) अतिशय कृतज्ञता, आदरबुद्धि दाखविणें. **–चे चकदे काढणें**–(मांसाचे तुकडे करून काढणें) जोरानें वेदम मारणें; अंगाची सालडी काढणें. **–चे–चा तिळपापड होणें**–रागानें शरीराची लाही होणें. 'मी दहांच्या तोंडून ऐकलें आणि माझ्या अंगाचा असा तिळपापड झाला कीं सांगतां पुरवत नाहीं.' –मोर १५. **–चे धुडके उडविणें**–(शरीराच्या) लकतऱ्या काढणें; चेंदामेंदा करणें; फार झोडपणें. 'त्या बदमाषानें त्याच्या अंगाचे नुसते धुडके उडविले.' **–चें पाणी करणें–होणें**–अतिशय श्रम करणें (त्यामुळें अंगास पाणी, घाम येणें). 'अंगाचें पाणी करूनच या हतभाग्या आयुष्याचे दिवस मला लोटले पाहिजेत.' –पाव्ह ९९. **–च्या चिंध्या करणें**–१ (व.) अंग ओरखडणें. २ त्रास देणें. **अंगांत मांग शिरणें**–शरिरांत अतिशय कोधाचा संचार होणें. (मांग हा फार क्रूर समजला जातो यावरून). **–त येणें–वारें शिरणें**–१ भूतसंचार होणें. २ अति उत्कंठेनें काम करणें **–त शीळकळा येणें**–(माण.) अंगांत देव येणें, वारें येणें. **–निराळा–बाहेर–टाकणें–झोंकणें–सोडणें–झिडकाविणें**–(कामधंदा, जबाबदारी) सोडून देणें; माथ्यावर, अंगावर न घेणें. 'पेशव्यांनीं आम्हाला आंगाबाहेर

टाकलें आहे.' –अस्तंभा २४. **–निराळे करणें**–अंगावरील टाकणें पहा. **–बरोबर होणें, –त बसणें**–एखादा कपडा अंगास बरोबर बसणें, ठीक होणें, बेताचा होणें; **–ला लावणें**–१ अंगाला तेल वगैरे चोपडणें. 'नवी नवरी म्हणून अंगाला लावीन म्हटलें; नाहीं!'–झांमु. २ बाळंतिणीचें अंग रगडणें, चोळणें. (एका) **–वर असणें–होणें**–एका कुशीवर निजणें; पडून राहणें. **–वर कांटा उभा राहणें**–भीतीनें किंवा आनंदानें अंग रोमांचित होणें. 'वृत्तश्रवणें आला सर्वांगीं आमुच्या पहा कांटा।'–मोकर्ण १८.१. **–वर काढणें**–आजार वगैरे सोसणें. **–वर कोसळणें–कोसळून पडणें–ओघळणें**–१ रागानें एखाद्याच्या अंगावर चालून जाणें, पडणें. २ संकट आपत्ति वगैरे गुदरणें; जबाबदारी येणें; आपत्तींत सांपडणें. **–वर गाण किंवा गोणी येणें**–(व.) अंगावर जोखीम किंवा जबाबदारी येणें **–वर घेऊन**–स्वत:वर जबाबदारी घेऊन; आपलें म्हणून; कैवार घेऊन (क्रि० करणें, बोलणें; सांगणें; पुसणें, विचारणें). **–वर घेणें**–१ मुलास प्यावयास घेणें, देणें; पान देणें. २ स्वत:वर जबाबदारी घेणें. ३ आपला म्हणणें, अतिशय प्रीति दाखविणें. **–वर तुटणें–तुटून पडणें**–हल्ला करणें; धांवून जाणें; एकदम चालून जाणें. **–वर देणें**–जामिनकी किंवा गहाण न घेतां वैयक्तिक जबाबदारीवर कर्ज वगैरे देणें. **–वर देणें–बांधणें–भरणें–पोसणें–करणें** इ०–स्वत:च्या जबाबदारी–साधन–संचयावर देणें, बांधणें वगैरे. **–वर पडणें–येणें**–१ शिरावर पडणें; विकींत नफा होईल म्हणून जो माल खरेदी केला तो अडीअडचणीमुळें, भाव उतरल्यामुळें आपल्याजवळ पडून राहणें; तोटा भरून देण्याची जोखीमदारी अंगावर येणें. २ गळ्यांत येणें; एखादा धंदा अगर काम करण्यास भाग पडणें. ३ रागानें चालून जाणें; वसकन अंगावर येणें. ४ हल्ला करणें; चालून येणें. **–वर पिणें, खाणें**–(मुलानें) स्तनप्राशन करणें; स्तनप्राशन करण्याइतकें लहान असणें. **–वर शेकणें**–तोटा होणें (व्यापारांत); बूड येणें (रुपये, व्यवहार, इ० ची); कुमांड येणें. **–वरचें**–वि. दूध पिणारें (मूल). **–वरचें जाणें**–(बायकी) महिन्याच्या महिन्यास तरुण स्त्रीच्या शरीरांतून जसें दूषित रक्त बाहेर जातें तसें अबेळीं जाऊं लागणें; धुपणी रोग होणें. **–वरचें तोडणें**–तान्ह्या मुलाचें अंगावर पिणें बंद करणें. **–वरून वारा जाणें**–अर्धांगवायु होणें. 'भूतपिशाच्च्य लागलें। अंगावरून वारें गेलें।'–दा ३.७.५५. **–स कुयला लागणें**–मत्सरानें किंवा संतापानें हिरवा–निळा होणें; मिरच्या लागणें; अतिशय राग येणें. **–स झोंबणें**–(व.) अंगास स्पर्श करणें; धरणें. **–स मुंग्या येणें**–वातादि विकारामुळें अंगाला एक प्रकारची बधिरता येणें. **–स बसतें येणें**–अंगाला बरोबर बसेल असें होणें (कपडा इ०). 'नोकरलोकांच्या अंगास बसते येतील असें पोषाख करण्यांत यावेत.'–खानगींतील नोकरांचे पोषाख (बडोदें) ७. **–स–अंगीं–येणें**–१ व्यापारांत बूड येणें; नुकसान होणें; ठोकर बसणें. 'मिरच्यांचा व्यापार अंगास आला.' २ अंगांत बाणणें. 'मराठीच्या अंगीं आलेली क्षीणता क्षणमात्रहि झांकली जाणार नाहीं.'–नि. **–स येणें–होणें**–अंगाबरोबर होणें. **–स–आंगीं–लागणें**–१ पुष्टिकारक होणें; लठ्ठ होणें. २ एखादा दोष किंवा गुन्हा अंगावर शाबीत होणें, लागू होणें. 'तेंवें न करितां चोरी। आंगीं लागे।'–दा ६.१.७२. ३ तोटा सोसावा लागणें; ठोकर बसणें; अंगावर शेकणें. **–स लावणें**–१ (बायकी) स्नानाच्या अगोदर तेल व हळद अंगाला लावणें, चोळणें. २ बाळंतिणीच्या अंगाला तेल लावणें. **–स लावणें–लादणें**–चिकटविणें; शाबीत करणें (गुन्हा, अपराध). **अंगीं**–यानें आरंभ होणारे वाप्र.–**असणें**–जवळ, पदरीं असणें; ठायीं असणें. 'हा दोष माझ्या अंगीं नाहीं.'–**आणणें**–१ आपल्यावर घेणें; तावा घेणें. २ आपल्या ठिकाणीं असूं देणें; स्वाधीन राखणें. 'हा गुण अंगीं आणण्याचा प्रयत्न कर.' **०आदळणें**–अंगास चिकटणें, कोसळणें. 'अंगीं आदळतो शोक.'–दावि ४२३. **अंगीं(एका अंगीं)–अंगें–उणा**–वि. १ आईबाप मेलेला; पोरका; विधवा; विधुर. २ व्यंगी; लुळा; कमीपणा असलेला; एका पायानें लंगडा; ३ (ल.) सरळ, ताठ नसलेला; उणेपणा असलेला; कमजोर बाजू असलेला; लुच्चा; जाणूनबुजून अपराधी. **म्ह०** अंगीं उणा तर जाणे खाणाखुणा=ज्याला आपला कमीपणा ठाऊक आहे तो लोकांची टीका आपल्याला चिकटवून घेतो. **०खिळणें**–शरीरांत भिनणें. **०घुमारणें**–भूत लागणें; अवसर येणें. 'आजि अंगीं घुमारिलें.'–दावि १५६. **–चा उतारा**–वि. अंगावरून ओवाळून दिलेला, काढून टाकलेला जिन्नस (वस्त्र, अलंकार इ०). 'तुझें अंगीचा उतारा।तो मज देई गा दातारा।'–भज ४२. **–ची सावली करणें**–(स्वत:चा) आश्रय देणें. 'आपुलिये अंगीं ची सावली।अहोरात्र करुनि तया रक्षी।'–**जिरणें**–सरावाचें होणें; मुरणें. **–ताठा भरणें**–गर्विष्ठ होणें. 'अंगीं भरलासे ताठा। वळणीं न ये जैसा खुंटा।'–**तुटणें**–अशक्त होणें; वाळणें; रोड होणें (मूल). **–नसणें**–१ जातीनें अनुभव, माहिती नसणें. २ स्वत:चा नसणें; मूळचा नसणें. 'इतका उद्धटपणा त्याच्या अंगीं नाहीं.'–**पडणें**–१ सहाय, पक्षपात करणें. 'हा अविवेचा अंगीं पडे.'–अमृ ६.६. २ सवय होणें. अंगीं मुरणें पहा. **–फुटणें**–१ लठ्ठ होणें; गुबगुबीत होणें. २ एखादा रोग अंगावर स्पष्ट दिसणें, वाहणें (रक्तपित्ती इ०). **–बसणें**–सुगम असणें; सवय होणें. **–बिंचाड देणें–करणें**–शरीरांत थारा देणें; हृदयांत, अंत:करणांत

बाळगणें; आस्रा देणें (दुर्गुण, पापवासना इ० ना). **-माशा मारणें**-आळशी बनणें. **-(माशीं) भरणें**-लठ्ठ होणें. **-मिरच्या, कुयले, लागणें-झोंबणें**-(एखाद्यानें मर्म काढलें असतां) रागानें जळफळणें. **-मुरणें**-१ संवयीचा होणें. २ हार्डी शिरणें; शरीरांत (ताप) भिनणें. ३ जिरणें; बाहेर न येणें (देवी, गोवर). **-येणें**-अंगांत भुताचा संचार होणें; अवसर येणें; भूतबाधा होणें. 'शूद्र येक त्याचे अंगीं आला बोले।' -रामदासी २.११. **-लागणें**-अन्न पचणें; लठ्ठ होणें. 'त्याच्या अंगीं अन्न लागलें.' **-वाजणें**-(बाजणें) अंगांत शिरणें; शोभणें. 'थोरपण अंगीं वाजे नाना' -दावि ६५. **अंगीं-गें**-१ स्वतः, जातीनें. **म्ह०** 'अंगें केलें तें काम। पदरीं असे तो दाम।' 'अंगें करितांती आपण। दोघे जण मिळोनी।' -एभा ७.५७८. 'अंगें धावे कार्यासमान।' -नव १६.१७५. २ च्या वतीनें, मार्फत (प्रतिनिधि). दादा अंगे वयनी सोयरी. **अंगें, आंगें**-शअ. जवळ; बाजूस. 'पाण्याचा तांब्या बापूचे आंगें होता.' -बाळ २.६८. **म्ह०** १ अंगीं (माझ्या इ०) का माशा मेल्या आहेत = काय (मी) आळशी आहें, का माझा धंदा काय माशा मारीत बसण्याचा आहे? २ आली अंगावर तर घेतली शिंगावर=सहजासहजीं, आगाऊ न ठरवितां एखादी गोष्ट अंगावर येऊन पडली असतां, आडवी आली असतां ती करणें (बैलाच्या शिंगांच्या टप्प्यांत कोणी आला तर तो त्याला शिंगावर घेण्याला कमी करीत नाहीं यावरून, आयता मिळालेला फायदा करून घेणें हा अर्थ). ३ अंगापेक्षा बोंगा मोठा; अंगापेक्षां बोंगा, कोंठें जासी सोंगा=(शरीरापेक्षां धोतराचा अथवा लुगड्याचा पुढचा भाग मोठा) खऱ्यापेक्षां जास्त योग्यतेची ऐट मारणें. सामाशब्द: **०अंग, आंगप्रत**-क्रिवि. पृथक् पृथक्; अलग अलग; इसमवार; प्रत्येकीं. **०उद्धार**-पु. (प्र.) अंगोद्धार. १ (काव्य) शरीराची, देहाची मुक्तता. २ तीर्थांत स्नान करणें; तीर्थस्नान; देहशुद्धि. ३ (योग) पोटांतील आंतडीं तोंडांतून बाहेर काढून स्वच्छ करणें; धौती; धुतीपुती. [अंग+उद्धार] **०उधार**-वि. अंगावर दिलेलें, केलेलें (कर्ज, उधारी); स्वतःच्या पतीवर केलेली उधारी. **०ओलाचें**-न. (कों.) जिच्यांत पाणी सांठविण्याची शक्ति आहे असें शेत, जमीन; उन्हाळ्यांत पाणी न देतां हिवांतून पीक काढतात. **०कंप**-पु. शरीरास कंप सुटणें; थरकांप होणें. [सं.] **०कल**-पु. शरीराचा तोल, बांक. [सं.] **०कवळी**-स्त्री. (काव्य) आलिंगन; मिठी; पकड. 'परस्परें अंगकवळी होतां। आनंदिलीं उभयतां।' -मोल. [अंग+कवळणें] **०कष्ट**-पु. शारीरिक श्रम. [सं.] **०कळा**-स्त्री. शरीराचें तेज, कांति; मुसमुशीतपणा (निरोगावस्थेत). **०काठी**-स्त्री. अंगबांधा; अंगयष्टि; शरीराचा बांधा, ठेवण. (अंगलट-लोट-ठेवण-वटा-वठा-वळण हे शब्द शरीराचें स्वरूप, कांति, भरदारपणा इ० दाखवितात तर अंगकाठी-बांधा-यष्टी हे रचना, बांधणी दाखवितात). **०काडू-ढू-ळ्या**-वि. अंग काढणारा; पळपुट्या; जबाबदारी टाळून निसटूं पाहणारा (संकट, अडचणी असतांना); काम चुकारू; माघार घेणारा. [अंग+काढणें] **०कार्य**-न. शरीराचा लुकडेपणा; सडपातळपणा; कृशता. [सं.] **०गडी**-पु. पोटांतील भिड्; पित्त्या; (सोंगट्या, पत्ते इ० खेळांत) भिड्ंचा तोटा असतां आपणच त्यांच्या वाटचें खेळणें, म्हणजे आपणच एक कल्पित भिड् आहों असें मानणें. **०ग्रह**-पु. आचके, पेटका, गोळा येणें. [सं.] **०चपळाई-चापल्य**-स्त्रीन. अंगांतील चपळपणा; स्वतःसिद्ध चापल्य. **०चुकाऊ-र**-रू, **-चोर**-वि. कामांत कुसराई करणारा; मनापासून, नेटानें काम न करणारा. 'अंगचोर वाग्वीर-पट्टूचें पेव कसें फुटलें।' -सन्मित्र समाज मेळा पृ. १३. १९२९. **०च्छाया**-स्त्री. १ अंगाची सावली. २ (ल.) आश्रय. 'तंव वैकुंठपिठींचें लिंग। जो निगमपणाचा पराग। जिये जयाचेनि हें जग। अंगच्छाया।' -ज्ञा १७.४६. **०छेद-विच्छेद**-स्त्री. शरीराचा एखादा अवयव कापणें. [सं.] **०ज**-वि. अंगापासून झालेला. -पु. स्वतःचा पुत्र; मुलगा; औरस. **०जा**-स्त्री. स्वपुत्री. **०जड**-वि. जड शरीराचा; लठ्ठ; फोपसा; अगडबंब; मंद; आळशी. **०जूठ**-स्त्री. मल्लयुध्द; कुस्ती; झटापट. [स. अंग+युध्द-जुध्द-जुट्ठ] **०जोर**-पु. अंगबळ; शरीराची ताकद, शक्ति. (असे घेडगुजरी समास मराठी भाषेंत पुष्कळ झाले आहेत). [सं. अंग+फा. जोर] **०झाप**-स्त्री. पेंढाऱ्यांपैकीं कोणी एखादा पेंढारी झटापटींत मारला गेल्यास त्याला तात्पुरती मूठमाती देण्याची जी चाल होती तीस म्हणत. ठग लोकांत, त्यांनीं मारलेल्याला तात्पुरती मूठमाती देण्याची पध्दत; पुढें त्या मृताला सवडीनें नीट लपवून ठेवीत. [अंग+झापणें-झांकणें] **०झांक**-पु. शरीराचा तोल, कल. [अंग+झोंक] **०झोल**-पु. (काव्य) छातीवरील बंदांचा लांब अगरखा. **०ठसा-ठाण-ठेवण**-पुनस्त्री. अंगाची ठेवण; अंगकाठी. 'भीमा ऐसा अंगठसा। माझिये दृष्टी दिसतसे।' **-मुसभा ६.** १५३. २ (ल.) बळ; सैन्य. **-होकै** १. **०ठोळा-ळी**-पु.स्त्री. हातांच्या किंवा पायाच्या बोटांत घालावयाचें एक वेढें, वेढणें. (मराठ्यांत स्त्रिया व मुलें बहुधा वापरतात). [अंगुष्ठ] **०तुक**-न. अंगाचें वजन. 'तरी लोहाचें आंगतुक। न तोडितांचि कनक। केलें जैसें देख। परिसें तेणें।' -ज्ञा १७.२१६. [अंग+तुक] **०तोल**-पु. अंगझोंक पहा. **०त्राण**-न. शरीरसंरक्षक साधन; चिलखत; बख्तर: कवच. 'गोधांगुळें घालिती हस्तीं। अंगत्राणें बांधिलीं।' -पांप्र ३२.६५. **०त्वानें-त्वें**-क्रिवि. (अंगत्व याची तृतीया) प्रतिनिधि म्हणून; एखाद्या करितां; एखाद्याच्या नांवानें-तर्फे-आश्रयानें, मार्गदर्शकत्वाखालीं; वतीनें. 'मला न फावल्यास मी

आपल्या अंगत्वानें दुसरा कोणी पाठवीन.' **०दृट**–वि. १ अंगास घट्ट बसणारें, दाटणारें. २ दृढ; बळकट. 'आत्मविषयीं आंतुवट। साधन जें आंगदट॥' –ज्ञा १६.४५. –पु. (कर्ना.) अंगरख्याच्या आंत घालावयाची कोपरी. [सं. अंग+दृढ] **०देण्या**–वि. प्रत्यक्ष शेत कसणारा शेतकरी; शारीरिक श्रम करणारा पक्ष. **०देवता**–स्त्री. उपदेवता (कर्मातील जी मुख्य देवता तिच्या अंगभूत असणारी). २ (ल.) सेवक; चाकर; भोंवतालची मंडळी. [सं.] **०धट**–वि. उद्धट; असभ्य; शिरजोर. [अंग+धृष्ट] **०ध(धि)टाई**–स्त्री. १ केवळ शारीरिक बळ; पाशवी बळ, शक्ति (चातुर्य, युक्ति यांच्या विरुद्ध). २ रानटी जुलूम; आंगमर्दी. **०धार**–आंगधार पहा. **०धुणें**–न. १ (वायकी) स्नान; अंघोळ. २ (व.) न्हाणीघर. **०न्यास**–पु. देवतास्थापनेच्या वेळीं, धर्मविधि करतांना निरनिराळे मंत्र म्हणून देवतेच्या प्रतिमेला ६ किंवा १६ स्थानीं स्पर्श करावयाचा विधि; संध्या वगैरे करतांना स्वतःच्या शरीराच्या निरनिराळ्या स्थानीं स्पर्श करावयाचें कर्म. [सं.] **०परिवर्तन**–न. उलटें करणें (शरीर इ०); एका बाजूवरून दुसऱ्या बाजूला वळणें. 'आषाढमासीं शयन। भाद्रपदमासीं अंगपरिवर्तन। कार्तिकीं उद्बोधन।' [सं.] **०पात**–पु. १ शरीराचा ऱ्हास; लुकडेपणा; क्षीणता. २ (कड्यावरून) स्वतःस खालीं लोटून घेणें. ३ शरीरास किंवा एखाद्या अवयवास पक्षघात होणें. ४ अंग बाहेर येणें (गुह्येंद्रियाचा भाग). [सं.] **०पांथी**–स्त्री. खासगत वांटा; सरकतीच्या व्यवहारांत सावकारानें आपली सरकत ठेवली असतां सावकारीचे पांथीहून निराळी सरकतीसंबंधें जी त्याची नफ्याची पांथी असते ती. २ अंगवांटा. [अंग+पंक्ती] **०पिळा-मोड**–पु. अंगादिक पिळणें; आळस आला असतां किंवा भूतसंचारामुळें अंगास दिले जाणारे आळेपिळे; आळोखेपिळोखे; तापानें अंग कसकसणें. **०पीडा-बाधा**–स्त्री. नैसर्गिक विकार; शरीरास जडलेली व्याधि किंवा रोग (भूतपीडेच्या उलट). [सं.] **०प्रत्यंग**–न. अवयवांसकट शरीर; पूर्ण शरीर. [सं.] **०प्रस्थान**–न. प्रत्यक्ष प्रवासास निघण्यापूर्वी एखादा शुभ मुहूर्त साधण्यासाठीं आपलें घर सोडून जवळपास दुसऱ्याच्या घरीं स्वतः रहावयास जाणें. [सं.] **०बल**–न. शारीरिक शक्ति; ताकद; अंगधटाई. 'अवनीतीनें वर्तो नये। आंगबळें।' –दा २.२.२२. [सं.] **०बांधा**–पु. शरीराची ठेवण. **०भंग**–पु. १ अंगाचे सांधे धरणें; अशक्तपणा वाटणें. २ अंगविक्षेप; शरीराचे निरनिराळे चाळे, हावभाव, चेष्टा. 'अंगभंग बहु दाविती रंगीं। रामरंग सुखसिंधु तरंगीं।' **०भंगवात**–पु. अंगभंग रोग; ज्यामुळें हा रोग होतो तो वातदोष. **०भर-भार**–क्रिवि. शरीराच्छादनापुरतें (वस्त्र). 'अंगभर वस्त्र, पोटभर अन्न.' –पु. (ल.) शक्ति; जोर. 'एऱ्हवीं प्राप्तें मतांतरें। थातंबूनि आंगभरें।' –ज्ञा १३.३१८. **०भर होणें**–(ना.) १ फजिती उडणें. २ भार होणें. **०भा**–स्त्री. अंगकांति. 'अंगभा विलोकितां तटस्थ जाहली सभा।' –(अनंत) सीतास्वयंवर ८९. **०भूत**–वि. एखाद्या वस्तूचा भाग, अंश; अवलंबी; समाविष्ट; तदंतर्गत; संबंधी; आश्रयी. 'सीमंतपूजन हें विवाहाचें अंगभूत होय.' 'ज्वराच्या अंगभूत अरुचि असतेच.' [सं.] **०मर्दन**–न. अंग रगडणें; चंपी; मालिश. [सं.] **०मर्दाई-मर्दी**–स्त्री. [सं. अंग+फा. मर्दी=पौरुष] **०मस्ती**–पाशवी शक्ति; दांडगाई; उद्धटपणा. [सं. अंग+फा. मस्ती=दांडगाई] **०मार्दव**–न. शरीराचा नाजुकपणा. [सं.] **०मास**–न. (व्यापकपणें) शरीर या अर्थी 'माझें अंगमास दुखतें.' 'तिचें अंगमास शेकलें पाहिजे.' **०मेहनत**–स्त्री. शारीरिक श्रम; प्रत्यक्ष कष्ट. [सं. अंग+अर. मिहनत्=श्रम, कष्ट] **०मेहनती-त्या**–वि. शारीरिक कष्ट करून पोट भरणारा; कष्टाळू; पोषाखीच्या उलट. २ स्वतः शेत कसणारा; शेतकरी. **०मेळ**–पु. अंगसंग; संबंध. 'तियेचेनि अंगमेळें।' –विपू १.१०३. [अंग+मिळणें] **०मोड**–स्त्री. अतिशय मेहनत करणें; कष्ट करणें; सक्त मेहनत. **०मोडा**–पु. १ आळेपिळे (आळस घालविण्यासाठीं). (क्रि० देणें.) 'निद्रेनें व्यापिली काया। आळस आंगमोडे जांभया।' –दा १८.९.२. २ ताप भरण्यापूर्वी अंग कसकसणें; अंग मोडून येणें. (अव.) अंगमोडे. 'अंगमोडे येऊं लागले.' [अंग+मोडणें; बं. अंगमोडा] **०यष्टी-रचना**–स्त्री. शरीराचा बांधा, ठेवण. [सं.] **०रस**–पु. वनस्पतीच्या पानांचा, पाणी न घालतां काढलेला रस; आपरस पहा. [सं-] **०राखणा**–वि. अंग राखून काम करणारा (आळसामुळें, अप्रामाणिकपणानें); अंगचोर; चुकार. **०राग**–पु. १ सुगंधी उटणें; उटी, लेप; चोपडण. 'श्रमघर्मानें रणिं वीरांचा अंगराग पसरला।' –सुसु नाटक २१. २ उटीचें द्रव्य (अरगजा, केशर, इ०). [सं.] **०रेटा**–पु. अंगानें दिलेला, शरीरानें दिलेला धक्का, ठोसा. 'गाड्यास अंगरेटा दे म्हणजे चालता होईल.' [अंग+रेटणें] **०रेटाई**–स्त्री. अंगाची धक्काबुक्की; मस्ती; ठोसेठोशी; अंगधटाई. **०रोग**–पु. शरीरास होणारा स्वाभाविक रोग (पिशाच्चबाधेनें किंवा देवतापराधानें न होणारा). **०लग**–वि. १ (जात, मैत्री, नोकरी इ० संबंधानें) जडलेला; संबंधी; संबंध असलेला. २ जिव्हाळ्याचा; जवळचा; –पु. १ नातेवाईक; स्नेही. 'तुम्हा पिता तरी विरोचन। तो आमुचा अंगलग जाण।' –कथा २.६.८८. 'अवघे अंगलग तुझे वधियेले वीर।' –तुगा ३९२. २ समागम. 'संतांचेनि अंगलगें। पापातें जिणणें गेगें।' –ज्ञा १२.१७७. ३ आश्रय; साहाय्य. 'परब्रह्मींचेनि अंगलगें। सृष्ट्यादि कार्य माया करूं लागे।'

–विउ ११.१६. 'देवा मंदराचेनि अंगलगें।' –ज्ञा ११.२५७. **०लट–लोट–वटा–वठा**–स्त्री पु. शरीराची ठेवण, कांति, तेज. अंगकाठी पहा. 'तेची अंगलट गोरी आसा' 'माझी आंगलट त्यावेळीं कांहींशी पातळ होती' –वेवि ११.८.२०४. [सं. अंगयष्टिः; प्रा. अंगलट्ठी–अंगलट; किंवा अंग+लोट्ट] **०लट घेणें**–स्वतः होऊन जबाबदारी पत्करणें. **०लट येणें**–१ अंगास चिकटणें; तोटशांत येणें. २ अंगाला चिकटणें; धक्काबुक्की करणें: खोडी काढणें. (अंगलट जाणें असाहि प्रयोग आढलतो). **०लीन**–वि. अंगांत मुरलेलें; शरीरांत गुप्त असलेलें. 'सद्गुण जैसें दोषा। अंगलीना।' –ज्ञा १६.४२. **०लेणें**–न. अंगावरचा दागिना; अलंकार. 'नाना अळंकार अंगलेणीं।' –सप्र २.५. **०लोट**–१ अंगलट पहा. २ अंगभार; अंगानें वजन, पतन. 'मस्तकीं वाहती करूनि मोट। भूमीं टाकिती जैसा घट। तळीं पाषाण होती पिष्ट। आंगलोटें दोघांच्या॥' –मुसभा ७.३२. **०वख**–पु. अंगप्रदेश. 'जलतेया गिरिचेया आंगवखां।' –राज्ञा ११.४२०. [अंग+वक्ष?] **०वटा**–क्रिवि. स्वाधीन. [अंग+वत्] **०व(वा)टा**–शेतांत उत्पन्न झालेल्या मालाच्या तीन (शेतमालक, बैल–नांगर मालक व शेत कसणारा) वांट्यांपैकीं शेत कसणाऱ्याचा वांटा. [अंग+वाटा] **०वण**–स्त्री. १ सरावाच्या योगानें आलेली योग्यता; संपादन केलेली कार्यक्षमता; वाकबगारी. 'ऐसी अंगवण नाहीं मज देवा।' –तुगा ४४९५. 'वातात्मजासि म्हणे यदुनंदन। जरी तुज असेल आंगवण। यांतून एक स्त्रीरत्न। तुवां घ्यावें स्वेच्छेनें॥' –जै ११.६. २ पराक्रम; शौर्य; जोर; उत्साह. (व.) खटपट; प्रयत्न. आंगवन असाहि प्रयोग. 'जळो तुमचें दादुलेपण। नपूंसकाहूनि हीन। वृथा गेली आंगवण। काय वदन दावितां॥' –एरुस्व ८.६. 'नीलजां कैची आंगवणा॥' –उषा १४२३. ३ शरीरावस्था. 'तंव भीम सेनाची आंगवण। कृष्णधर्म पाहाती।' –जै ६.७०. ४ देवीचा व्रण; तीळ; चट्टा. (क्रि० पडणें, उठणें, येणें, जाणें). ५ उपासना; भक्ति; (गो.) (देवाला केलेला) नवस. 'कीं वीरश्रीची धरितां अंगवण। प्रताप विशेष वाढे पैं।' –रावि ११.६. ६ सराव; नित्यक्रम; वहिवाट. 'ऐसें करितां पापाचरण। तयासी आलें वृद्धपण। पुत्र जाहाले अति दारुण। तरी आंगवण न सांडी॥' –रावि १.१११. ७ (ल.) साहाय्य; मदत. 'या परी चतुरंग सेना। मिसळली रणकंदना। आपुलालिया अंगवणा। गज रथ रणा आणिती' –एभा ३०.११७. ८ द्वंद्व युद्ध; झुंज. 'तेआं भीड भीमसेना। जुंझतां बहुती आंगवणा। परतिजे ऐसी हांव कहूणा। उपजेचिना॥' –शिशु ८७८. [अंगवलन किंवा अंगापण–अंगावण] **०वणा**–वि. शूर. 'तो अक्रूर आंगवणा पुढां चाले।' –शिशु ५४५. **०वत**–सामर्थ्य; अभिमान. 'आतां हा जळता वारा कें वेंटाळे। कोणाही विषा भरलें गगन गिळे। महाकालेंसि खेळें। आंगवत असे' –ज्ञा ११. ४०५. **०वळा**–वि. जवळचा; अनुकूल; स्वाधीन. **०वसा**–(झाडाचें) साल, पाला, शेंडा. 'अशोकाचे अंगवसे। चघळिले कव्हेनि जैसे।' –ज्ञा ११.४१४. **०वर्से**–न. रूप.? –मनको. **०वस्त्र**–न. १ उपरणें; उत्तरीय; उपवस्त्र. 'नुसत्या अंगवस्त्रानिशीं तो घराबाहेर पडला.' २ जेगोटी (गौरवार्थी) [सं.] ३ (ल.) प्रेमपात्र; ठेवलेली स्त्री; रखेली; उपस्त्री. [अंगना+उपस्त्री=आंगवस्त्रि–आंगोवस्त्र असा हा शब्द बनला आहे. वस्त्र(कपडा)पासीं याचा कांहीं संबंध नाहीं असें राजवाडे म्हणतात–भाअ १८३२] 'मला तर असें आठवतें आहे कीं, त्या वेळच्या खाजगी शाळेच्या एका मास्तरास सकाळची शाळा असतां शाळेंतील विद्यार्थी त्याच्या आंगवस्त्राच्या घरांतून चित्ये-दां बोलावून आणत असत!' –टि ४. २९१. वाप्र. एका अंगवस्त्रानें निघणें–भाऊबंदांशीं वेबनाव होऊन एका उपरण्यानिशीं कांहीं एक तनसडी न घेतां घराबाहेर निघणें. **०वळ**–पु. आगवळ, आगूळ. अगवळ पहा. –नागा १२८. (–शर) **०वळण**–पु. अंगलट; अंगाची, शरीराची ठेवण. **०वळणीं पडणें**–सरावाचें होणें (हा शब्द प्रथमा विभक्तींत क्वचित योजितात). 'जी भाषा आम्ही ... बोलतो त्यांतील शब्दांचे उच्चार आमच्या आंगवळणीं पडले असल्यामुळें ...' –टि ४.४०१. **०वळा**–पु. १ अंगाचे आळेपिळे; आळसामुळें येणारी जांभई. अंगपिळा पहा. २ मुलांची चळवळ. ३ सांगाती, सोबती; संबंधी; सहवासी. 'नित्य त्या सेवकाजवळा। अंगें अंगवळा तूं होशी।' –एभा ६२९४. ४ अंगकाठी. **०वळेकार**–वि. भारी; शक्तिमान्. 'सेजवळ सहवासी। आंगवळे–कारूं विश्वासी।' –शिशु ५०५. **०वाटा**–पु. १ अंगवटा पहा. २ (व्यापारधंदा) भांडवल उभारल्याखेरीज प्रत्यक्ष काम करणाराचा वांटा. ३ अंगपांघी पहा. **०वाटेकरी**–पु अंगवाटा घेणारा. **०वाण**–पु. (कु.) नवस 'देवाक आंगवाण केली हा.' [अंग+वाणी.] **०वात**–पु. चालतांना वेगानें उत्पन्न होणारा वारा; अंगवारा; गतिमान् वस्तूपासून उत्पन्न होणारा वायु. **०वाला**–वि. (गो.) अंगांत घालण्याचा; आंगाचें. **०विकार–विकृति**–पु.स्त्री. शारीरिक रोग. **०विक्षेप**–पु. हावभाव; अभिनय; चाळा; अंगचेष्टा; हातवारे. [सं.] **०वृद्धि**–स्त्री. शरीराची वाढ (रोगामुळें झालेली–अंतर्गळ, अंडवृद्धि; इ०). [सं.] **०वेग**–पु. १ शरीराचा वेग; चालण्याचा जोर अंगवात. २ शरीर वाढत असतांना त्याला आंतून मिळणारा जोर. **०वैकल्य**–न. १ शरीराचा अधूपणा; लुळेपणा; व्यंग. २ (ल.) (धार्मिक विधींतील महत्त्वाचा भाग गाळल्यामुळें) येणारी न्यूनता; अपूर्णता; दोष; वैगुण्य. **०शः**–क्रिवि. एकेक भाग घेऊन; भागशः; खंडशः.

०शैथिल्य–न. शरीराचा ढिलपणा; थलथलीतपणा; मांद (अंगदाढर्थ याच्या उलट). **०संकोच**–पु. १ शरीराचें आकुंचन. अंग चोरणें. 'कि अंगसंकोचें पारधी । टपोनि तत्काळ मृग साधी ।' २ आकुंचनाची स्थिति; आकुंचन; संकुचितपणा. [सं.] **०संग**–पु. १ शरीराचा संयोग, मीलन; अंगस्पर्श. 'दीपाचिया अंगसंगा । कोण सुख आहे पतंगा ।'–एभा ८.७४. 'दुरून बोल, अंगसंग कामाचा नाहीं.' २ संभोग; मैथुन; रतिसुख. 'घडे भक्ति जैसी मनाच्या प्रसंगें । न साधे तसी माझ्या अंगसंगें ।' ३ हातघाई; अंगलट; लठ्ठालठ्ठी; कुस्ती. [सं.] **०सफाई**–स्त्री. शरीराची अथवा कामाची चपळाई; अंगचापल्य. [सं. अंग+फा. सफाई] **०सरकती**–पु. अंगवाटेकरी पहा. **०संस्कार**–पु. १ अभ्यंगस्नान वगैरे; शरीरावर संस्कार. २ अंगस्पर्श; शरीरसंयोग. [सं.] **०सामर्थ्य**–न. शारीरिक बळ; अंगजोर. [सं.] **०साळ्या**–वि. नाणें पाडण्याचें काम न करतां इतर कामें करणारा सोनार (टंकसाळ्याच्या विरुद्ध). अकसाळ्या पहा. **०सिक**–न. अंगावरील वस्त्र. 'आंगसिकें वेढूं नेणोनि । सर्वज्ञांचीं ॥ ' –ऋ ७०. 'आंगसीकें दीधली उदारें । भणे कवी भास्करु ॥ ' –शिशु २३२. **०सुख**–न. रतिसुख; संभोगसुख. 'यावा निजांगसुख लाभ वधूजनातें ।' [सं.] **०सुटका**–स्त्री. १ एखाद्या संकटांतून किंवा अडचणींतून कांहीं नुकसान किंवा इजा न होतां सुटणें. २ मुक्तता. 'हें काम मी पतकरलें आहे यांतून माझी अंगसुटका झाल्याशिवाय तुम्हांकडे कसा येऊं ?' **०सुस्ती**–स्त्री. शरीरमांद; जाडय. **०सूट**–वि. चपळ; हलक्या अंगाचा; सुटसुटीत; मोकळा. **०सौष्ठव**–न. शरीराचा बांधेसूदपणा; सौंदर्य. [सं.] **०स्तनें**–न. लेकरूं. –शर ? **०स्वभाव**–पु. जन्मजात अथवा उपजत स्वभाव; नैसर्गिक वृत्ति. [सं.] **०हार**–पु. (वृत्य) सहा किंवा सहापेक्षां जास्त करणांचा समुदाय. हे अंगहार ३२ आहेत:–स्थिरहस्त; पर्यस्तक; सूचीविद्ध; अपविद्ध; आक्षिप्त; उद्धहित; विष्कंभ; अपराजित; विष्कंभापसृत; मत्ताक्रीड; स्वस्तिकरेचित; पार्श्वस्वस्तिक; वृश्चिकापसृत; भ्रमर; मत्तस्खलित; मदाद्विलसित; गतिमंडल; परिच्छिन्न; परिवृत्त; वैशाख रेचित; परावृत्त; अलातक; पार्श्वच्छेद; विद्युद्भ्रांत; उद्वृत्तक; आलीढ; रेचित; आच्छुरित; आक्षिप्तरेचित; संभ्रांत: अपसर्प व अर्धनिकुट्टक. **०हीन**–वि. व्यंग; न्यून; अपूर्ण; अवयवरहित (शरीर). 'कां अंगहीन भांडावें । रथाची गति ॥ ' –ज्ञा १७. ३८९. –पु. मदन. –स्त्री. वेश्या; पण्यांगना. 'अंगहीन पडपं । जियापरी ।' –ज्ञा १७.२५६.

अंगचा—वि. १ शरीराचा; बाहेरचा नव्हे; स्वाभाविक. २ स्वतःचें; जन्मजात; जातीचें; उमनें न घेतलेलें; अंगभूत. ३ स्वतःच्या डोक्यांतील, कर्तबगारीचा, करणीचा, शोधाचा, बरून). 'तेवीं पुत्रापासोन सुखप्राप्ती । माता पिता होईल दुसऱ्यानें शिकविलेला नव्हे असा. ४ स्वतःच्या योजनेचा; कल्पनेचा. (ल.) थोतांडाचा; कवटाळपणाचा; बनावट; खोडसाळ. ५ व्यक्तिविशेषाचा; खासगत; पडद्याचा; **एकांतीचा. वरील** अर्थात कमीजास्त फरक होऊन पुढील कांहीं शब्द झालेले आहेत. **०कल्पक**–वि. स्वभावतः नवीन गोष्टी शोधून काढणारा; जास्तीच शोधक, तीव्र बुद्धीचा. **०कसबी**–वि. स्वतःच निरनिराळ्या वस्तू मेहनतीनें व स्वतःच्या चतुराईनें नीट करणारा; **नेहमीं** लागण्याऱ्या वस्तू तयार करणारा. **०कारागीर–कारिगर–गाणारा–चितारी, इ०**–वि. जन्मतःचकुशल–कलावान्–गवई–चितारी इ०. **०खांब**–पु. इमला ज्या सामानाचा (लांकूड, दगड इ० चा केला असेल) त्याच सामानाचा तयार केलेला खांब. **०जोड**–पु. मुख्य इमारतीपासून अथवा वस्तूपासून झालेली वाढ; जास्ती वाढविण्यासाठीं घातलेली भर. **०झरा**–पु. पावसाळ्यांतच केवळ उत्पन्न होणारा नव्हे तर सतत पाणी वाहणारा जमिनींतील जिवंत झरा. 'या विहिरीला अंगचे झरेच पुष्कळ आहेत, पावसाळी एकदोन असतील.' **०धणी**–स्वतःचा मालक; कोणाचा चाकर नव्हे तो. **०मळ**–पु. स्वतःच्या शरीराची घाण; एखाद्याम अगदीं निरुपयोगी असलेली वस्तु. जसें:–तो अंगचा मळ यावयाचा नाहीं. (कंजूष माणसाबद्दल योजतात). **०लिहिणार**–वि. लेखक वगैरे न ठेवतां स्वतःचें लेखन स्वतः करणारा. 'मोरोपंत अंगचा लिहिणार होता.' **०वक्ता**–वि. उपजत वक्ता. **०शहाणा**–वि. स्वभावसिद्ध शहाणा; चतुर. **०ची कळा**–स्त्री. स्वतःच्या अंगचें नैसर्गिक तेज, चातुर्य, हुशारी. **०ची गोष्ट**–स्त्री. वैयक्तिक किंवा स्वतःचें काम, धंदा; स्वतः काढलेली कल्पना. (क्रि० सांगणें) **०ची बुद्धि**–स्त्री. उपजत शहाणपण. **०चें देऊळ**–न. खडकांत, डोंगरांत कोरून काढलेलें देऊळ.

अंगचें—आंगचे पहा.

अंगछा—पु. १ (अंगवस्त्र) उपरणें. २ (कों. मुंबई) हातरुमाल ३ (माण.) कोपरी; हाफजाकीट. [सं अंग+वस्त्र; हिं. अंगोचा: गु. अंगुछो; सि. अंगोचो; काश्मी. अंगोस]

अंगठा, अंगोठा—पु. १ हाताचें किंवा पायाचें पहिलें जाड बोट. 'त्या आरशा घालुनि आंगठ्याला । त्याली अमे सुंदर आगठ्यांला ।' –सारुह ६.२७. २ कळाशीचा एक प्रकार; चाळा; दांता. ३ हाड; काठी; धज इ० शब्दांप्रमाणें या शब्दाचाहि बांधा, ठेवण या अर्थी उपयोग करतात. **०दाखविणें**–वाप्र. नाकबूल जाणें; नाकारणें; फसविणें, ठकविणें (तर्पण करतांना पितरांना प्रत्यक्ष वस्तू देण्याऐवजीं आंगठ्यावरून पाणी सोडतात त्यावरून किंवा नाहीं याअर्थी अंगठा हलवितात त्यावरून). 'तेवीं पुत्रापासोन सुखप्राप्ती । माता पिता होईल

म्हणती। शेखीं पुत्र अंगोठा दाविती। केवळ भ्रांती पुत्रमोहो।' –एभा ११.८२. [सं. अंगु=हात+स्थ, अंगुष्ठ; प्रा. अंगुट्ठ; जि. अंगुष्ठ; झेंद. अंगुस्त; फा. अंगुस्त्; हिं. अंगूठा; गु. अंगूठो] **०धरणें**–अव. अंगठे धरणें. पायाचे अंगठे ओणवे होऊन हातानें धरणें (शाळेंतील एक शिक्षेचा प्रकार). 'अंगठे धरून ह्या म्हाता-=याला उभा करा.'–वाय २.१. पायाचे अंगठे मुखांत धरणें=वरील अर्थ. 'हरि हरि दाहापूर्वी कळतें तरि अंगठे मुखीं धरितों। अपराध कोटि पोटीं घालाया मुकुट पाय ते करितों॥' –मोस्त्री ६.६३. **०ठ्यास आग लागणें**–संकटांचा प्रारंभ होणें; (आगामी संकटाला प्रथमपासूनच घाबरण्याच्या वेळीं म्हणतात.) 'अजून तर तुझ्या आंगठ्यास देखील आग लागली नाहीं.' –धर्माजी ९१. **०ठ्याची आग मस्तकास जाणें**–रागानें नखशिखांत लाल होणें. **०ठ्यावर दिवस मोजणें**–आतुरतेनें वाट पाहणें; एखादी इष्ट गोष्ट साध्यापूर्वीच दिवस मोजणें. **०ठ्याचा मान**–अंगठेदाम पहा. **०ठ्याची खूण–छाप–करणें**–बिन लिहि-णा=यापासून पावती घ्यावयाची असतां सहीच्या ऐवजीं डावे हातच्या अंगठ्याचा ठसा शाईनें उठविणें. 'गोप्रदान घेणारा लिहिणारा नसल्यास अंगठ्याची खूण करून घ्यावी.' –गोप्रनि ४. **०ठ्यावरील जोर**–(व्यायाम) दोन्हीं हातापायांचे आंगठे टेंकून दंड, जोर काढणें. –व्यायाम, आगष्ट १९२३.

अंगठी—स्त्री. १ हाताच्या बोटांत घालावयाचा एक अलं-कार; मुदी; वेढें; मुद्रिका; मोहरेची–देव दशेनी–मिन्याची–सील (नांवाचीं आद्याक्षरें) इ० अंगठ्या असतात. २ हाताची करंगळी. ३ पायाचें बोट. ४ अंगुस्तान. **म्हण०** १ आंगठी कापली तरी हा मुतायचा नाहीं=अतिशय कृपण माणसाबद्दल योजतात. २ आंगठी सुजली म्हणून डोंगराएवढी होईल कां? =क्षुल्लक गोष्ट कितीहि फुगवून सांगितली तरी तिला महत्त्व येत नाहीं. ३ ज्याची आंगठी त्याच्याच डोळ्यांत घालणें=एकाद्याला डावांत फसविणें; ज्याच्या तंगड्या त्याच्याच गळ्यांत घालणें. [अंगु-लिस्थ (रत्न)–आंगुट्ठ–आंगुट्ठी–आंगठी; सं. अंगुष्ठ; सिं. आड्वठी]

अंगठेदाबणी–दाम—स्त्रीपु. (लग्नाच्या) सप्तपदीच्या वेळीं नवरीची बहीण नवरीच्या पायाचा आंगठा दाबून धरून बसते, तेव्हां तो सोडविण्यासाठीं नवऱ्यामुलानें तिला द्यावयाचा मान-पान, पैका. [आंगठा+दाम]

अंगठेधरी—स्त्री. अंगठे धरण्याची शिक्षा. –संगीत घोटाळा १३.

अंगडी–डें—स्त्रीन. १ (सामा.) अंगरखा. 'आंगडें झाडुनि धोंगडें करी।' –तुगा ६२०. 'अंगडी पगडी शाल दुशाला.' –अमृत ११२. २ लहान मुलाचा अंगरखा; अंगा. **आंगडे–बंदुकी (चें)**–कापडी रूंदार चिलखत. 'आंगडे बदुकी व तिरंदाज यांची संचणी करून हराम मेळविले.' –मदाआ ६. (कु. राजा.) आंगडा=बंडी; झबलें] **०टोपडें–टोपी**–अंग-रखा आणि टोपी; पोशाख. 'तुझा नामदेव शिंपी। घेऊनि आला आंगडी टोपी.' –रंगानु. संतस्तवन.

अंगडी—स्त्री. (कर्ना.) बाजार; दुकान. [द्रा; का. अंगडी]

अंगण—न. १ घरापुढील अथवा मागील मोकळी जागा; आवार; घरापुढील झाडून सारवून तयार केलेली जागा; पटांगण; मैदान; जसेः–युद्धांगण, रणांगण. ३ (ल.) टप्पा. 'उभा नयनाचें आंगणां.' –देप १९०. वाप्र. **अंगणीं जाणें**–(व.) (बायकी) मोरी-वर जाणें, लघ्वीला जाणें. **म्हण०** १ घर सोडलें अंगण पारखें (परदेशी). अंगणावरून घराची परीक्षा. अप. रूपें–आंगण–णें. [सं.]

अंगत—वि. आंगच्या. 'महाराजांनीं समक्ष बोलावून अंगत स्वभावानुसार शिव्यागाळी करून.' –विक्षिप्त ३.११३. [सं. अंग+गत]

अंगतपंगत—आंगतपंगत पहा.

अंगद—न. १ बाहुभूषण (दंडांत किंवा मनगटांतहि घाल-तात). कडीं, वाकी,बाजूबंद इ०. 'करकंकणें बाहुअंगदें.' –एभा १४.४८५. 'अंगदमंडित चंदनचर्चित सायुध नृपाळभुज तोडी.' –मोकर्ण ११.३. –पु. २ वालीपुत्र (रामदूत). [सं.] **०नीति**–स्त्री. (रामदूत अंगदानें रावणास सांगितलेलें नीतिशास्त्र; त्यावरून) सुनीति; सन्मार्गाचे नियम. **०शिष्टाई**–स्त्री. सीता परत करण्या-साठीं अंगदानें रावणाशीं केलेली वाटाघाट, सामाचें बोलणें, त्या-वरून (ल. उप.) दोन्हीं पक्षांचा समेट करण्यासाठीं आपण होऊन लुडबुडेपणानें केलेली मध्यस्थी; लुडबूड; चोंबडेपणा.

अंगदेणें—न. प्राचीनकाळीं मुंबईस पोर्तुगीजांनीं कोळ्यांवर बसविलेला एक कर; शिरपट्टी.

अंगना—स्त्री. १ स्त्री. 'ऐकें नरवीरपंचानना। प्राप्तकाळीं पाणिग्रहणा। तुज कोण वरीना अंगना। मनमोहना श्रीकृष्णा॥' –एरुस्व ४.११. २ पत्नी; स्वतःची बायको. [सं.]

अंगरखा—आंगरखा पहा.

अंगरेज, अंग्रेज—इंग्रज माणूस. इंग्रज पहा.

अंगरेजी, अंग्रेजी—इंग्रजी पहा.

अंगलणें—अक्रि. स्वाधीन होणें. अंगवणें पहा. –शर.

अंगलाई, आंग्लाई—स्त्री. इंग्रजशाही; इंग्रजांचें राज्य; इंग्रजी अमदानी. [इं. आंग्लो]

अंगलाई—स्त्री. एक देवता. 'अंगलापुरीची अंगलाई' –सप्र ५.३६.

अंगवणें—अक्रि. (गो.) नवस करणें. आंगवणें पहा.

अंगवणें-विणें—उक्रि. प्राप्त होणें; मिळणें; होणें. 'तेणेंचि परब्रह्म आंगविले । जेणें जिंकिलें मनातें । ' –एभा २३.७०५ 'देहो दिव्यस्त्रीचा आंगवला ॥ ' –मुसभा ६.३९. २ अनुकूल असणें. 'गुरूचा उगाळू ध्यावया देख । मी होईन आंगवला सेवक ॥ ' –एभा १२.५५४. ३ स्वाधीन होणें, करून घेणें. 'देहत्वें कां आंगवता । मी म्हणोनि ॥ ' –परमा १०.२३. 'तो करितां जरी आंगवला । तरी सांगेन तुज ॥ ' –ज्ञा ३.२६७. 'तैं आपुलेनीचि बळें । आंगविलें जिहीं ॥ ' –ज्ञा १२.४५.

अंगवला—वि. स्वांगानें, स्वतः, शरीरानें. 'कांतेचिया भिडा । आवरला होय जगायेवढा । आंगवला उघडा । जियेवीण । ' –अमृ १.३४.

अंगवे—अंगापासून. 'ऐशी हीं पचवीस तत्त्वें । रचिलीं लिंगदेहा अंगवे । ' –कथा ६.११.७९.

अंगळी—अंगुली पहा.

अंगा—आंगरखा पहा.

अंगा—संबो. अगा ! अरे. (कृण.) हंग. 'हे अंगा अगाये कृष्णा । '–रासपं १.८४६. ' यदंगदाशुषेत्वं ' –ऋग्वेद १,१,६. [वै. सं. अंग=संबोधन, अहो, बरें !]

अंगाई—उद्गा. मुलाला निजवितांना म्हणावयाचें गाणें व त्याचें पालुपद. या गाण्याच्या आरंभीं व अखेरीस. 'अंगाई ' असें म्हणतात. 'तनयातें करिते अंगाई. ' –विक ८७. [अंग+आई] –स्त्री. झोंप (मुलांच्या बाबतींत) (क्रि० करणें). 'अंगाई बाळाची टंगाई ' ०**करणें**–(उप थट्टा) झोंप घेणें; निजणें; गाई करणें. 'तर आमचें आख्यान फार लांबून वाचकमंडळी-पैकीं जर कोणास डुकल्या यायला लागल्या तर त्यांनीं खुशाल मधून उठून जाऊन अंगाई करावी. ' –नि.

अंगाकढा—पु. पानगा; निखाऱ्यावर भाजलेली आरोळी. अगाकडा पहा. [अंगार+कडबू ?]

अंगांगीभाव—पु. अवयव आणि अवयवांनीं युक्त जो देह यांचा परस्पर संबंध; गौण भागाचा प्रधान भागाशीं संबंध; गौण-मुख्य भाव; उपकार्योपकारक भाव. [सं. अंग+अंगी+भाव]

अंगार—पु. १ जिवंत विस्तव; निखारा; इंगळ. 'अंगारकर्णी बहुवर्सी । ' –ज्ञा १३.१०६२. २ (ल.) रागीट माणूस. ३ आग, (ल.) दारूगोळ्याचा वर्षाव. 'अंगार भडकली होती. ' –संग्राम ६९. [सं.] ०**होणें**–(व. घाटी) १ आग होणें. २ राग येणें. ०**डब्बी, पेटी**–स्त्री. (ना.) आगपेटी.

अंगारक—पु. १ मंगळ ग्रह. २ (संकेत) आंध्रे, (मराठी राज्याचे आरमाराधिपति) यांचें आंगारक असेंहि एक रूप आढळतें–भाअ १८३५. २०९; ३०९. ३ म्लेच्छ; ताम्रलोक. ४ कोळसा (शाप.) कार्बन –सृपनि ८. ५ मंगळवार. [सं.]

अंगारकी, अंगारी—स्त्री. मंगळवारीं येणारी वद्यपक्षांतील (संकष्टी) चतुर्थी. 'श्वेतमांदारीं गजानन । अंगारकचतुर्थीसी साधिल्या जाण । ' –एभा १५ २०४. [अंगारक]

अंगारा—पु. देवापुढें जाळलेल्या धूपाची राख; ही भक्तलोक आपल्या कपाळास अरिष्टनाशक म्हणून लावितात. रक्षा; धूपारतींतील अवशेष. 'तुझा दास शेषशायी । म्हणुनि लावी अंगारा ॥ २ (वैष्णव वगैर पंथांत) वर सांगितलेल्या राखेची कपाळास लावलेली भुकण; विभूति; भस्म. ३ एखाद्या साधूनें किंवा मांत्रिकानें अरिष्ट किंवा पिशाच वगैरेचा उपद्रव होऊं नये म्हणून मंत्रून दिलेली राख; रामरक्षा, शिवकवच इ० स्तोत्रें म्हणून राख मंतरतात ती; भस्म. ४ जोंधळ्यावर पडणारा काजळीचा रोग. ५ विस्तव; निखारा. (ल.) रागीट माणूस. ६ (सामा.) राख. 'तुका म्हणे पाहता घडी । जगा जोडी अंगारा ॥ ' –तुगा ३९७६. [सं. अंगार; फ्रें. जि. अंगर; गु अंगारो] **म्ह**० अंगाऱ्याला गेला पागारा घेऊन आला=मोठा पराक्रम करण्यासाठीं जाऊन सामान्य गोष्ट करणें. ०**करणें**–१ भुतांखेतांची पीडा नाहींशी करण्यासाठीं, विषार उतरण्यासाठीं, किंवा एखादें लोकोत्तर कार्य हातून घडण्यासाठीं मंतरलेलें भस्म अंगास चोळणें. २ (ल.) अंकित करणें; कबजांत आणणें. ०**लावणें**–(ल.) एकाद्यास आशा दाखवून शेवटीं निराश करणें. **डाव्या पायाचा अंगारा**–दृष्ट लागूं नये म्हणून आई आपल्या डाव्या पायाच्या तळव्याची माती मुलाच्या कपाळास लावते ती. ०**धुपारा**–१ अंगारा; विभूति; रक्षा; मंत्रतंत्र. (क्रि० करणें). अंगारा करणें पहा. २ (ल.) अपुरी सामुग्री, वेगमी; चिक्कूपणाचा खर्च. तुटवडा येणें. 'शेरभर तांदुळांचा सहा माणसांस अंगाराधुपारा होईल. '

अंगाराम्ल—न. (शाप.) कार्बनिक ॲसिड. –सृपनि ८.

अंगारी चतुर्थी-चौथ—स्त्री. अंगारकी-अंगारी पहा.

अंगावते—न. घोडयाच्या पुढील पायाच्या फऱ्यावर उजवेकडे किंवा डावेकडे भोंवरा असतो तो. [सं. अंग+आवेत]

अंगाविणें—उक्रि. १ (काव्य). कवटाळणें; मिठी मारणें. २ आपला करणें; स्वतःवर जबाबदारी घेणें; अंगावर घेणें. [अंग]

अंगिक—वि. १ अंगासंबंधीं; शारीरिक. २ अंगचें; स्वाभाविक. अंगभूत 'जयाचेनि आंगिकें तेजें । ' –ज्ञा ६.११०. –न. शरीरावयव; अंगुलि. 'कीं अंगिका अंगुष्ठद्वया जवळें । गर्भिचेया लावण्या आठांगुळें । ' –ऋ ८७. २ सामर्थ्य; बल. 'जे आपुलेनि आंगिकें । त्रिविधपणाचेनि अंकें । ' –ज्ञा १८.५२४. ३ अंगचा स्वभाव. 'हिंवलीं जैसी आंगिकें । हिंवों नेदी निजांग । ' –ज्ञा १७.२२९. ०**पण**–१ स्वभावधर्म. 'कोण्ही म्हणती साय जैसी

दुधावरी । तैसी ब्रह्मीं मायेची असे उजरी । क्षणें लपे क्षणें प्रगटे साईचे परी । आंगींच्या अंगिकपणें ॥ ' –स्वानुदिन १३.१.५६. **०भाव**–पु. १ शरीराची आकृति, ठव; आकार; ठेवण. ' स्मृति तेचि अवयव । देखा अंगीकभाव । ' –ज्ञा १.४२. २ सामर्थ्य.

अंगी—स्त्री. अंगडें; सुरकी; झग्याप्रमाणें वर खणाची चोळी व खालीं जोडून परकर असा कशिदा काढलेलें लहान मुलाचें आंगडें. (हल्लींचा फ्रॉक हा अंगीचा सुधारलेला नमुना आहे) –शिशि ३.४१. ' सावरीत फिरणें अंगी कुंची । ' –दावि १८. २ अंगरखा; कोट; पोषाख. ' चंद्रतारां आंगि टोपरें । केलेसें शार्ङ्गधरें । ' –शिशु ५१०. ' लोहसुयी हातीं न घेतां । अंगी सिवितां न ये कीं ॥ ' –भवि ३.८९. –पु. अनेक अवयव मिळून झालेला विशिष्ट पदार्थ. –वि. अनेक अंगांचा, अवयवांचा, भागांचा. [सं. अंगिका=कुडतें, चोळी; अंगिन् हिं. अंगिया= चोळी]

अंगीकरण-कार—नपु. १ हक्क सांगणें; स्वीकारणें; स्वतःचें म्हणून मान्य करणें; मानणें. २ रुकार भरणें; संमति देणें. ३ हातीं घेणें; अंगावर घेणें. ४ स्वीकार, मान्यता. ' आंगीकार जाधवरायांनीं केला । ' –ऐपो ८६. ५ (कायदा) (इं.) ॲडमिशन. कोर्टांत चाललेल्या कामांतील पक्षकारानें स्वतः, किंवा स्पष्ट किंवा गर्भित अधिकार दिलेल्या इसमानें कळविलेल्या तोंडीं किंवा दस्त ऐवजी हकिकतीवरून निघणारें मुद्याच्या किंवा लागू गोष्टीविषयीं अनुमान. ६ (हिंदुधर्मशास्त्र) देणें मान्य असल्याबद्दल लेखी कबुली. (इं.) ॲक्नॉलेजमेंट. [सं. अंगीकृ]

अंगीकारणें—उक्रि. अंगिकार करणें. १ आपला म्हणणें; हक्क सांगणें; स्वीकारणें इ. २ कबूल करणें; रुकार भरणें; मान्यता देणें. ३ हातीं घेणें; अंगावर घेणें. ४ स्वीकारणें; घेणें. ' जरी मी अंगीकारीं राज्यासन । ' –रावि ११.१६४. [सं. अंगीकार]

अंगीकृत—वि. १ कैवार घेतलेलें; आदरलेलें; अंगिकारिलेलें; आपलेसें केलेलें. २ कबुली, परवानगी दिलेलें; मान्य केलेलें. ३ हातीं घेतलेलें. ४ घेतलेलें; स्वीकारलेलें. [सं.]

अंगीज—स्त्री. उरक; उठाबणी; पार पाडणें. ' त्यांच्यानें कोणा एका कार्याची स्वतां अंगीज करवत नाहीं. ' –मराआ १३. [फा. अंगेझ्, अंगेख्तन् (=उठाबणी करणें) चें आज्ञार्थी रूप; सं. अंग]

अंगीसणें—अक्रि. एकरूप होणें. ' एकाकी असे आंगु । आंगींसूनी । ' –ज्ञा १२.२०६. **अंगिसुनी**–निश्चळ–मनको.

अंगुठा—पु. (काव्य) अंगठा पहा.

अंगुठी—स्त्री. अंगठी पहा.

अंगुर-गूर—न. द्राक्ष. ' अंगुरखिरण्या द्राक्षिस घड लोंबतात मुंढाबळी । ' –प्रला १५४. **०शिरका**–द्राक्षासव.

अंगुरशेफ—स्त्री. (हिं.) काश्मिरांत उगवणारें एक झुडप. (इं.) (ॲट्रोपा बेलाडोना)

अंगुल ळ—न. आंगुळ पहा. १ आठ यव एकास एक जोडून (रुंदीकडून) झालेल्या लांबीचें माप. २ हाताच्या बोटांच्या रुंदीचें माप. १२ अंगुळें=१ वीत. चोवीस आंगुळें=एक हात. ' तो जगदात्मा दशांगुळें उरला । ' ३ बोट; अंगठा. [सं. अंगुल] **०वेढें**–१ आंगळ्याचा एक रोग; कांडरूं. बोटाच्या सांध्याचा एक विकार. ' अंगुळवेडे(ढे) गालफुगी । ' –दा ३.६. १८. २ आंगठी.

अंगुली-ळी—स्त्री. १ हाताचें किंवा पायाचें बोट. ' दुर्ती दुजी आंगुळी न पडे । श्लोक अध्याय तेणें पाडें । ' –ज्ञा १८.५७. ' रुचिरतर विरोधा शोभती अंगुळीला । ' –सारुह ६. ३१. २ (नृत्य) अंगुलीच्या चार क्रिया. –आवेष्टित, उद्वेष्टित, व्यावर्तित व परावर्तित. **०त्राण**–१ बाण वगैरे मारतांना हाताच्या बोटास इजा होऊं नये म्हणून हाताच्या पंजांत घालावयाचा एक कातड्याचा हातमोजा. २ अंगुस्तान पहा. [सं. अंगुली+त्राण] **०तोरण**–कपाळावर गंधाचें किंवा भस्माचें त्रिपुंड्र. [सं. अंगुली= बोट+तोरण=दरवाजाची कमान] **०नर्तन**–न. विचारांत गर्क असतां हाताच्या बोटांची हालचाल;चाळा. **०निर्देश**–पु. हाताच्या बोटानें दाखविणें; उल्लेख, दिग्दर्शन करणें (हा तो माणूस इ० वाक्प्रचारांत) **०भंग**–पु. १ बोटाचे सांधे मोडणें; बोटें मोडणें. शाप देतांना किंवा अलायबलाय करतांना कानशिलावर बोटें मोडणें. २ (ल.) कार्यनाश. **०संदेश**–पु. हाताच्या बोटांच्या खुणांनीं भाषण करणें; खुणा करणें. [सं.]

अंगुलीयक—न. अंगठी. [सं.]

अंगुलें-ळें—न. हातांतील अंगठी. ' जायाचें अंगुळें लेतां नाहीं मान । शोभा नेदी जन हांसविलें ॥ ' –तुगा ३२१८. ' अंगुलें, लोळुलें, वाघनख, सरी । ' –वटसा ३५.

अंगुलें—न. अंगडें पहा. ' नवां ठाई तडुकलें । हें पांच पुडें आंगुलें । ' –ऋ ५४.

अंगुष्ठ—पु. अंगठा. ' रत्नें भरोनि पृथ्वी दीजे । एकांगुष्ठींही तपिजे । ' –ज्ञा १७.४१५. [सं. अंगुष्ठ; अर. फा. अंगुश्त्; झेंद. अंगुस्त] **-ष्ठाची आग मस्तकांत जाणें**–१ अंगाची लाही होणें; फार संतापणें, रागावणें. **अंगुष्ठावरून दशशिर (रावण) करणें**–आंगठ्याचा रावण करणें. (ल.) अंशमात्र पाहून सर्व गोष्टी किंवा प्रकार अतिशय युक्तीनें सांगणें; फुगवून सांगणें. **–दशशीर करणारा**–गप्पिष्ट; अतिशयोक्ति करणारा. **०पर्व**–न. अंगठ्याचें पेर. **०पर्वभर**–न. अंगठ्याच्या पेराएवढा; टीचभर; बोटभर. **०मात्र पुरुष-शरीर**–मनुष्याचें सूक्ष्म शरीर; प्राण गेल्यानंतर यमदूत हें शरीर स्थूल शरीरांतून ओढून नेतात व हेंच

शरीर पापपुण्य भोगतें, असा समज आहे; लिंग देह. 'अंगुष्ठमात्र पुरुषाप्रति यम पाशेंकरूनि आकर्षी।' –मोवन १३.५८.

अंगुष्ठाण-स्तन-स्तान-स्थान—न. १ बोटाला सुई टोचूं नये म्हणून व सुईस मागून नेट मिळावा म्हणून तर्जनींत घालावयाचें एक धातूचें (लोखंडी, पितळी) टोपण. २ अंगठी. [सं. अंगुली+स्थान किंवा त्राण; फा. अंगुश्तदान; अंगुश्तरी=अंगठी]

अंगुसा—पु. (माण.) फडकें; चिंधी; अंगवस्त्र; अंगोछा. अंगछा पहा. 'त्या अंगुशांत भाकरी बांध.' [सं. अंग+वस्त्र]

अंगुस्ती—स्त्री. (गो.) दुःख; चिंता; काळजी. 'तु देवाची अंगुस्ती साचारू।' –ख्रि १.१.१४. [पोर्तु. अंगुस्तिआ; इं. अँग्विश]

अंगुस्ती—स्त्री. १ चिळस, भीति वगैरेमुळें किंवा ताप येण्यापूर्वी अंग कसकसणें, शहारा येणें; अंगावरील काटा; शिरशिरी (क्रि० येणें, वाटणें) २ खांदे उडविणें; शरीरावयवाची एकदम हालचाल. (क्रि० देणें). [सं. अंग+हस्ता-स्ती=विचलन]

अंगुस्ती—स्त्री. रखेली; राख. [अंग+स्त्री]

अंगुळ-ळू—वि. (नंदभाषा) दहा संख्या (बोटें दहा असतात यावरून संकेत) 'मुळु उदानु अंगुळु ऐसी। नंदभाषा सांगितली त्यासी।' –भवि ४२.४५. [सं. अंगुलि]

अंगून—अव्य. १ च्या बाजूनें; च्यावर अथवा खालीं, वरून अथवा खालून (रस्ता, भिंत इ०). 'वर जी टेकडी ती वरचे अंगून चिरेबंदी दगडांनीं बांधून काढिली आहे.' –विवि ८.१.१०. २ एखाद्यापासून, करितां, कडून, तर्फे (निरोप, विनंति) [अंग+ऊन, ह्न]

अंगेज-जणी. अंगेजी—पुस्त्री. शौर्य, धाडस; उठावणी; पराक्रम. 'जनरलांनीं अंगेज केला आहे.' –राज १२.९७. 'स्वामी हिंदुराज्यकार्यधुरंधर राज्याभिवृद्धिकर्ते, तुम्हांलोकांचे आंगेजणीनें सिद्धीस पावले.' –मराआ ७. [फा. अंगेझ्–अंगेख्तन्=उठावणी करणें; सं. अंग]

अंगेजणें—उक्रि. (काव्य) अंगीकारणें पहा. [अंग. रागेजणें प्रमाणें घटना]

अंगेठी—स्त्री. शरीरयष्टि; अंगकाठी. 'लिंग का प्रतिमा दिठी। देखतखेवों अंगेठी।' –ज्ञा १७.२०४. [सं. अंग+यष्टि]

अंगोगडी-ड्या—आंगोगडी-ड्या पहा.

अंगोछा-च्छा—पु. अंग पुसण्याचा पंचा; अंगवस्त्र; उपवस्त्र. अंगछा पहा.

अंगोठा—पु. १ अंगठा पहा. २ (ना.) अंगठ्याचा छाप, शिक्का. [अंगठा]

अंगोठा—पु. (ना.) अंगकाठी; शरीरयष्टि; अंगलोट-वटा पहा.

अंगोवांगीं—क्रिवि. १ स्वतःस, जातीनें. 'येथोनि निघावें वेगीं। एकलाचि आंगोवांगीं।' –एभा ७.२९. २ (ल.) सहज, अनायासें. 'ऐसे योगबळें योगी। माया जिणती अंगोवांगी।' –एभा ६. ३८५. [अंग+वा+अंग, किंवा अंग द्वि. सांगोवांगीं प्रमाणें]

अंगोशा-शी—पुस्त्री. (व.) पंचा; धोतर; अंगवस्त्र; अंगोछा; अंगछा पहा.

अंगोस्तर, अंगोस्ती, अंगोस्त्र अंगोस्त्री,—नस्त्री. अंगवस्त्र; उपरणें. 'गांडीस धोतर। येक अंगोस्तर।' –रामदासी ९६. 'मग स्नान करूनि अंगोस्त्र बरवें।' –दावि १६४; 'सुचवोनि अंगोस्त्री बांधविलें।' –दावि २५३. [सं. अंग+वस्त्र]

अंगोस्ती—स्त्री. अंगावरील शाहारे; काटा. अंगुस्ती पहा. (क्रि० येणें, वाटणें).

अंगोळिका, अंगोळी-गौळी—स्त्री. बोट (हाताचें, पायाचें), करंगळी; अंगुलि पहा. (अव.) अंगोळिया, अंगोळिका. 'अंगोळीस जडीत घालुनि मुदी। कानास कांडाळिते।' –विरस ३१. 'सुरेख सरळ अंगोळिका। नखें जैशी चंद्ररेखा।' –स्वं ५५. 'सुनील नभाचिया कळिका। तैशा आंगोळिया देखा' वरी नखें त्या चंद्ररेखा।' –एहस्व १ २४.

अंगौन-आंगौन—वि. अंगासंबंधी, अंगावरला. –न. धोतर. 'आंगौनि ऐकुणा झोलु। फेडितांचि तो बाहिरलु।' –अमृ २.४८. [अंग]

अंग्या—पु. अंगी, अंगरखा पहा.

अंग्रेज-जी—अंगरेज-जी पहा.

अंघूळ-घोळ-घोळी—स्त्री. आंघोळ; स्नान. (क्रि० घालणें, करणें). 'आंघोळी देवें पूजा सारिली।' –शिशु ५७६. 'त्या मिळोन एके वेळीं। जाती उदकीं आंघोळी।' –कथा १.५.६. [सं. अंग+का. होळणें=धुणें; प्रा. अंघोहलि=खांद्यावरून स्नान]

अंघ्र-घ्री—पु. पाय. 'अर्पिलीं अंघ्रियुगुलीं। विश्वरूपाच्या॥' –ज्ञा ११.७०८. 'विलोकीं अग्रजाचे अंघ्र।' –मुवन १.१०५. [सं.]

अंचल-ळ—पु.स्त्री. अचल पहा. १ वस्त्राचा शेवट, टोंक; पदर. 'मुखकमल तियेचें अंचलें म्हाय झांकी।' –सारुह २.९१. २ पडदा. 'ते अहंकाराचा अंचळु लोटी।' –माज्ञा २.१३२. ३ दशी: मागावरील कापड विणून झाल्यानंतर शेवटास उरलेले उभे दोर. अंचळी पहा. पुल्लिंगी. अव. शब्द वापरतात. ४ योगी जे एक प्रकारचें वस्त्र वापरतात तें. ५ जनावराचें थान; स्तन; अंचूळ [सं. अंचल] ०फेडणें–(व.) लुगड्याच्या पदरानें दृष्ट काढणें. 'अंचळ फेडल्यानें डोळ्याला बरें वाटेल.'

अंचवण—न. १ जेवणानंतरचें तोंड हात धुणें. (क्रि० करणें). २ (गो.) आचमन. ३ (ल.) त्याग. [सं. आचमन]

अंचवणें—अक्रि १ जेवणानंतरचें तोंड हात धुणें. 'जेवावयास पंचामृत अंचवावयास खारें पाणी.' २ अंतरणें; मुकणें; सोडणें. अंचवणें हें भोजनोत्तर करावयाचें असतें त्यापुढें भोजन करणें शक्य नसतें यावरून प्राणास, धनास अंचवणें=जिवास, धनास मुकणें. 'संसारसुखास अहल्या आंचवली पोरवयांत.' –विक १६. ३ (गो.) आचमन करणें. –उक्रि. दुसऱ्याचें तोंड हात धुणें. [सं. आचमन; हिं. अंचवना, अचाना; बं. ऑचान]

अंचळी—स्त्री. दशी; वस्त्राच्या शेवटास असणारीं दोऱ्यांचीं टोंकें. अंचल-ळ ३ पहा. **आंचळया काढणें**–पदर लावणें. [सं. अंचल]

अंचित—वि. १ पूजलेला, मान दिलेला; आदरलेला; [सं.] **०करण**–न. (नृत्य) बोटें व्यावृत्त परिवृत्त करून मग डावा हात छातीसमोर वांकडा करून नाकाच्या शेंडयासमोर ठेवणें. **०पाद**–न. टांच जमिनीला टेंकवून पाऊल सर्व उचलून बोटें वांकविणें. **०बाहु**–पु. (नृत्य) छातीवरील हात थोडा छातीच्या पुढें धरणें. **०मान**–स्त्री. (नृत्य) शरीराचा तोल पुढें जाऊं लागला असतां तो सांभाळण्यासाठीं मान मागें घेणें. **०शीर्ष**–न. (नृत्य) डोकें किंचित एका बाजूला खांद्यावर वांकविणें (रोग, मूर्च्छा इ० गोष्टी दर्शविण्याचा अभिनय). [सं.]

अंची—स्त्री. १ डाक, टपाल; घेणें (टपालाचा घोडा बदलण्याची जागा व मुक्काम). 'सरकारांतून पत्रें आंचीवर जीं जीं आलीं तीं तीं नवाब बहादूर यांस श्रवण करून पत्राचे भाव समजाऊन, उत्तरे निरोत्तरें आलीं. त्या अन्वयें आंचीवर लिहित गेलों.' –राज १०.१९७. –ख३६४०. २ हरकारा. [सं. अंचि (अंचगतौ). ते. अंचे, अंचिय=टपाल; घोडा बदलण्याची जागा; जासूद. का. अंचे=टपालरस्ता.] **०वाला**–पु. टपाल खात्याचा अधिकारी. (का.) अंचेदार.

अंचेलिया—पु गुरांचा एक रोग. –शे ६.९६ नामजोशी.

अंज, अंजन—पु. (शाप.) एक धातु. (इं.) अँटिमनी; याचा उपयोग छापावयाचे खिळे तयार करावयाच्या धातूमध्यें मिसळण्यासाठीं करतात. तसेंच सुरम्याकडेहि करतात. म्हणून याला सुरम्याची धातु असेंहि नांव आहे. –ज्ञाको अं ४३. याच्यापासून अंजत्रिगंधकिद, अंजत्रिहरिद, अंजद्राक्षित इ० संयुक्त द्रव्यें होतात. –ज्ञाको अं ४६. [सं. अंज्]

अंजन—न. १ डोळ्यांत घालावयाचें काजळ, सुरमा. 'न लेति जे लोचन अंजनाला.' –सारुह २.९६. 'माझी वेणी आपुल्या हातें। गुंफिली रात्रीं कृष्णनाथें। अंजन सोगयाचें स्वहस्तें। कंसांतकें रेखिलें ॥' –ह २७.२२. २ एक औषधी द्रव्य. यानें नेत्रविकार, शैत्य इ० रोग बरे होतात. ३ विशिष्ट प्रकारचें काजळ; हें डोळ्यांत घातलें असतां भूमिगत द्रव्य दिसतें. यानें इच्छित वस्तु दिसणें इ० अतींद्रियज्ञान होतें. 'जैसें डोळयां अंजन भेटे।, –ज्ञा १.२३. 'जैसें नेत्रीं घातलितां अंजन। पडे दृष्टीस निधान।' –दा ५.१.३८. ४ (ल.) गुरुकृपा, प्रसाद; ज्ञानदृष्टि प्राप्त होण्याचें साधन; ईश्वरीप्रसाद. 'गुरुअंजनेवीण तें (ब्रह्म) आकळेना।' –राम १४१. ५ (ल.) शुद्धीवर आणणारी गोष्ट; शहाणपणाचें औषध. 'डोळ्यांना चुरचुरूं न देतां पुरुषांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालण्याची युक्ति बायकांनाच साधते.' –मानाप ६९. **०शलाका**–स्त्री. एक औषधी सळई. त्रिफळाचा रस (काढा), माक्याचा रस, सुंठीचा काढा, तूप, गोमूत्र, मध व शेळीचें दूध यांपैकीं प्रत्येकांत शिसें तापवून पातळ करून सतत सात वेळ बुडवावें. नंतर त्याची सळई करावी ती नेत्ररोगांचा नाश करते. –योर ५५१. **०हारी**–पु. (नकळत दुसऱ्याच्या डोळ्यांतील अंजन काढून घेणारा) अट्टल चोर, सोदा, भामटा.

अंजन-नी—स्त्री. एक इमारती लांकूड. हें दहा बारा हात उंचीचें असून त्यास डहाळ्याच्या अंगास लागून जांभळीं फुलें व फळें येतात; पानांपासून पिवळा रंग होतो. –शे ११.७०. –वगु १.८. [सं.]

अंजनी—वि. एकरंगी आंगावर काळे, निळे, तांबडे किंवा पिवळे ठिपके असणारा (घोडा.) उदा० काळांजनी, रक्तांजनी. –अश्वप ९४. [सं. अंजन]

अंज-जु-मान—स्त्री. १ सभा, संस्था, समिती. २ पारशांमध्यें धर्माचारांसंबंधीं वादांचा निर्णय सांगणारी संस्था. [फा. अंजुमन्]

अंजलि—स्त्री. १ ओंजळ; अंजळी; दोन्ही तळहात एकत्र जोडून केलेली पोकळी (नमस्कारासाठीं, किंवा कांहीं पदार्थ घेण्यासाठीं). २ नमस्काराची एक पद्धत; अभिवादन. ३ ओंजळभर कांहीं पदार्थ (फुलें, धान्य, इ०). ४ एक माप (ओंजळींत राहाणाऱ्या धान्याचें); कुडव. [सं.] **०जोडणें–बांधणें**–दोन्ही तळहात एकमेकांस जोडणें (नमस्कार–प्रार्थनेसाठीं); हात जोडणें; प्रार्थना करणें. 'अंजलि बांधोनि म्हणे जरि अभय असेल तरि निवेदीन।' –मोवन ११.११३. **०पुट**–अंजली १ पहा. **०संयुक्तहस्त**–पु. (नृत्य) हातांचीं बोटें सरळ पसरून एकमेकांस लावणें व आंगठा थोडा आंखडणें नंतर दोन्ही हातांच्या करंगळीकडील बाजू एकमेकांस जुळविणें.

अंजान—वि. (हिं.) अज्ञानी; गैरमाहीत; नेणता; अडाणी. [सं. अज्ञान]

अंजाम—पु. परिणाम; शेवट. 'मर्जी हजरतीची खुष राहिली म्हणजे कृतकृत्य ! अंज्याम कसा आहे. इकडे कोणी

पहात नाहीं.' –रा ५.१०४. [फा. आंजाम्=शेवट. बं. अंजाम= बंदोबस्त]

अंजारणें-गोंजारणें—उक्रि. १ कुरवाळून सांत्वन करणें; समजूत पाडणें; लाडीगोडीनें बोलणें. २ माया लावणें; ममता करणें. [गोंजारणें द्वि.] **अंजारून गोंजारून**–१ पोटाशीं धरून; कुरवाळून. २ आर्जवून; समजूत घालून.

अंजिर, अंजीर—पु उंबरासारखें एक झाड व त्याचें फळ. हें उष्ण प्रदेशांत होतें. उंची दहा हातांपेक्षां अधिक नसते. पानें मोठीं. फळाच्या पांढरी व जांभळी अशा दोन जाती आहेत. फळ रसकाळीं व पाककाळीं मधुर जड व थंड असून कफ, आम वात करणारें अग्निमांद्यकारक व रक्तदोष, दाह, वायु व पित्त यांचा नाशकारक आहे. पिकल्या अंजिराचा मुरंबा होतो. सुके अंजीर अरबस्थानांतून येतात- अंजिराच्या लाखेचा अळिता उत्तम होतो. –योर १.५२. वगु १.१४. [सं. फा.अजीर.] **०दोडी**–स्त्री. भाजीचा कच्चा अंजीर.

अंजिरी-जीरी—वि. अंजिराच्या रंगाचें (कापड, वस्त्र, इ०). –स्त्री. अंजिरी रंगाचें वस्त्र, पेठणी. दोन घरें हिरवें दोन घरें काळें उभार, व आडवण सर्व तांबडें असें लुगडें. 'मग दोन्ही नागकुमरी। मदालसा देखिली सामोरी। तंव येरीनें सरसाविली अंजिरी। लाजलेपणें। –कथा ५.६.१३८.

अंजीर—स्त्री. गुरांच्या घशांत औषध वगैरे ओततांना हातास इजा वगैरे होऊं नये म्हणून त्यांच्या तोंडांत जी लांकडी नळी देतात ती.

अंजुली-पुट—अंजली-पुट पहा.

अंजुळ-ळी—अंजुली; ओंजळ पहा. 'ऐक्यभावाची अंजुळी।' –ज्ञा १५.२.

अंजूत—पु. (व.) गजकर्णासारखा एक त्वचारोग; चट्टा. 'हें अंजुतावर गुणकारी मलम आहे.' [?]

अंटसंट—वि. (मालवी) ताळतंत्ररहित; बेअंदाज.

अंटा-ठा-रणें—अटारणें; अवटरणें पहा.

अँटिमनी—स्त्री. एक धातु; अंज पहा. 'अन्टीमनी ही धातु हुबेहुब शिशासारखी दिसते.' –अभि ३. [इं.] **०टार्ट**–(होमिओ.) गोंवर, डांग्या खोकला, दमा वगैरेवर औषध. [इं.].

अंटथा, अंठा—पुस्त्री. (व.) कारभार; हालचाल. 'त्यानें त्याचा अंटया बंद केला.' 'तुम्हीं तर आमची अंठाच बंद केली.'

अंठी—अठी पहा.

अंठी—(खा.) अकल. –भात्रै ७.१.४

अं(आं)ठी—स्त्री. ऐक्य; मिठी; आलिंगन. अठी अर्थ ४ पहा. 'मग सुखेंसि घे आंठी। गाढेपणें।' –ज्ञा ५.१३२. [का. अंटु=मिठी मारणें, एकत्र येणें]

अंड—न. १ अंडकुली; वृषण. २ कस्तुरीमृगाची कस्तुरी असलेली नाभी; नाफा. ३ कंवठ; अंडें पहा. ४ (व.) हईचें, सरकी काढलेल्या कापसाचें आंख. [सं.] **०काढणें-बडविणें**–खच्ची करणें (पशूस). **अंडाखालीं खाजवणें**–हां जी हां जी करणें; खुशामत करणें; लोणी लावणें. **०गाळणें**–१ खचणें; लटपटणें; गळाठणें. २ भीतीनें मागें घेणें, राहाणें. **०ब्रह्मांडास-कपाळीं-जाणें**–तिरपीट उडणें; पांचावर धारण बसणें; धीर खचणें. **०म्हणजे उंवरफळ म्हणणें**–अतिशय मद्दड किंवा मूर्ख असणें; अडाणी, दगड असणें. **अंडाचें निवर्ण करून बसणें-अंडावर अंड घालून बसणें- अंडावर बुक्क्या मारणें**–(व.) आळशीपणानें काम न करतां बसून राहाणें; स्वस्थ बसणें. अगदीं आळशी माणसावद्दल वापरतात. **अंडावरमूत गळणें-पडणें**–(व.) १ अतिशय अशक्त व असहाय्य होणें; निर्बल, कमकुवत असणें. २ (ल.) मेंग्या, भागुबाई, पंढ होणें, असणें. **–स येणें**–वार्धक्यामुळें कमजोर व मलूल, कमताकद होणें; लुळाखुळा होणें. **–स लोणी लावणें**–हां जी हां जी करणें; मिनतवारी करणें; कांहीं कार्य साधून घेण्यासाठीं फार आजीव करणें; खुशामत करणें. **(दुसऱ्याच्या) अंडानें विंचू मारणें**–दुसऱ्याच्या नफानुकसानीची पर्वा न करतां त्याजकडून परभारें आपलें काम करून घेणें; पाहुण्याच्या हातानें साप मारविणें. **०उबारा**–पु. (ल.) माया; गर्भ श्रीमंती. –वि. (नवीन घातलेल्या अंड्याच्या उबेप्रमाणें) उबट; किंचित गरम; कोंबट. **०कटाह**–पु. १ विश्व, ब्रह्मांड; खगोलाचा दृश्य गोलार्ध. २ ब्रह्मांडाभोंवतीं असलेलें अष्टधा प्रकृतीचें आवरण किंवा कवच. 'दुज्या पदें अंडकटाह फोडी।' –(वामन) नवनीत १११. [अंड+कटाह=कढई] **०कुली-कुलें-कूल**–स्त्रीन. वृषण, अंड; (लहान मुलाचें). २ दोन्हीं वृषणें; सबंध आंड. **०कोश-प**–पु. अंडावरचें आवरण आंतील वृषणासह; वृषण; अंडाशय. २ ब्रह्मांडकोशाचा संक्षेप. 'भागीरथी अंडकोश फोडून आली.' **०गडी**–१ (सोंगट्या इ० खेळ) हाताखालचा खेळगडी, पिंतू. २ पोटांतला गडी, एकादा गडी कमी असतां त्याच्याबद्दल आपणच खेळणें; मुका गडी. ३ मदतनीस; सोबती; अडगडी. ४ हस्तक; बगल्या; सर्व अर्थी अंगगडी पहा. **०गोल-गोलक**–पु. वृषण; अंड. [सं.] **०ज**–वि. अंडापासून जन्मलेलें. २ अंड्यापासून उत्पन्न होणारा प्राणिवर्ग (पक्षी, सर्प; इ०). –न. पक्ष्याचें पिल्लूं. 'तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज।' –नामना ६२. [सं. अंड+ज] **०त्रास**–पु. (शब्दशः-अंडकुल्या वर उचलायाजोगी अवस्था) अतिशय भीति; तिरपीट; त्रेधा; पांचावर धारण. 'करी अंडत्रासें वरिकर दुजा, जो भय हरी।'–मृत्तिकाभक्षण (वामन) ४. **०दोरी**–स्त्री. खोगीर आवळतांना जनाव

राच्या अंडावरून आवळला जाणारा व पाठीमागें बांडगें यास बांधण्यांत येणारा पट्टा, मुठीची दोरी. **०धरणी**–स्त्री हां जी हां जी; मिन्नतवारी; खुशामत; शेंपूट घोळणी; अंडमळणी पहा. **०पंचा**–पु. अतिशय अरुंद पंचा. **०बंध**–पु मंदिराच्या शिखरावरील अंडाकार गोळा; घुमटी. **०बुर्ली**–स्त्री. लहान मुलाच्या करदोडयाच्या किंवा घागऱ्यांच्या मधोमध घालण्यासाठीं (बुलीसारखा) केलेला सोन्याचा किंवा चांदीचा एक दागिना. **०मळणी, ०मळणी-चांटमळणी**–स्त्री. (कुग.) हां जी हां जी; हलकी कामें करून किंवा फाजील स्तुति करून मर्जी संपादणें; खुशामत. [अंड+मळणें] **०विकार-विकृति**–पुस्त्री. अंडाला होणारा रोग. **०वृद्धि**–स्त्री. अंतर्गळ; अंड वाढणें (वाताच्या उपद्रवानें). **०स्थिति**–स्त्री. प्राणी अंडयांत असण्याची अवस्था. –प्राणिमो १००.

अंडाकार-कृति—वि. अंडाच्या आकाराचा; अंडासारखा लांबट गोलाकार. [सं.]

अंडावर्ते—वि. वृषण ज्या जागीं पोटास लागतें त्याजागीं किंवा वृषणावर भोंवरा असणारा (घोडा). –अश्वप ९४.

अंडाशय—पु. ज्या ठिकाणीं मादीच्या पोटांत अंडीं उत्पन्न होतात तें स्थान. गर्भाशय (इं.) ओव्हरी.

अंडाळबंडाळ—स्त्री. (व.) अव्यवस्था; गैरसोय. [बंडाळी द्वि.]

अंडी—स्त्री. एरंडाचें बीं, एरंडी. (अव.) अंडया.

अंडींपिल्लीं—नअव. १ अंडीं आणि पिल्लीं. २ (पक्षी आपलीं अंडींपिल्लीं खोल दडवून ठेवतात यावरून) अतिशय गुप्त व सूक्ष्म गोष्टी; एकूण एक खुबया; सांद्यंत हकिकत. 'तूं कशास त्याची इतकी प्रतिष्ठा सांगतोस, मला त्याचीं अवघीं अंडींपिल्लीं ठाऊक आहेत.' ३ काळें बेरें; दुष्कृत्य. (क्रि० बाहेर काढणें. 'तो त्यांचीं अंडींपिल्लीं बाहेर काढील.' –टि ४.१३०.

अंडील-डेल—वि. १ अंड शाबूत असलेला; न बडवलेला (बैल इ०). सांड. 'त्यांचा थोरला बैल अजून अंडील आहे.' (ल.) रगदार; तगडा. २ वद्ध (घोडा, बैल इ०). खच्ची न केलेला. 'अंडील घोडा.' ३ (ल.) बगल्या; अत्यंत प्रीतीतील माणूस. ४ तारुण्यानें मुसमुसलेला जवान. ५ बाहेरख्याली; कामासक्त. ६ अट्टल; पक्का. 'अंडिल गडी.' [सं. अंडीर=वीर्यवान्, पौरुषयुक्त]

अंडुकली-लें—अंडकुली पहा.

अंडें—न.कंठ;पक्षी किंवा इतर कित्येक प्रकारच्या प्राण्याच्या स्त्री जातीपासून उत्पन्न होणारा प्रजोत्पादक गोलक. यांत असलेल्या गर्भाची वाढ होऊन पिल्लें तयार होतात. इतर अर्थी अंड पहा. [सं. अंड] **०गाळणें**–१ पक्ष्यानें अंडें घालणें; विणें. २ (खोखोमधील एक संज्ञा); कोणत्याहि चुकीबद्दल (उ० खो देण्याच्या जागीं आधीं गडी उठल्यास) म्हणतात. शिवाय. **०घालणें, पडणें, करणें, होणें**–असे वाक्प्रचार आहेत. ३ (ल.) भीतीमुळें माघार घेणें; लेंडया गाळणें; भेदरणें. **अंड्यास येणें**–१ अडें टाकण्याच्या स्थितीस येणें. २ (ल.) जिकीरीस येणें.

अंडेर—स्त्री. अंडरी; (खा.) मुलगी.

अंडोर—पु. (खा.) मुलगा. 'तेथचि आंडोरां करवि सात खडे वोलांडवणें।' –ऋ १०८. [सं. अंडज=अंडाउय=अंडाउर=अंडोर]

अंड्या—वि. १ अंड सुजलेला; अंड मोठें असलेला. २ (ल.) अंतर्गळ झालेला. ३ कोनफळाची एक जात. [सं. अंड]

अंत—पु १ शेवट; निकाल; परिणाम. २ मृत्यु; मरण. 'आतां असे अंत समीप आला.' –सारुह १.१८. ३ (वैद्यक–निदान) रोगाची पांचवी अवस्था; प्रकार; निकाल. (रोगांतून उठणें किंवा मरणें). ४ (गणित) श्रेणीची शेवटची रकम; पद. ५ (ल.) शेवट; ठाव, खोली; तळ. 'या विहिरीच्या पाण्याचा अंत लागत नाहीं.' ६ अवसान; अंतिम स्वरूप; कठिण परीक्षा; कसोटी. 'कोणाचा अंत पाहिल्यावांचून देव कोणावर कृपा करीत नाहीं.' 'इतका वेळ माझा कां अंत बघायचें झालें?' –बाय २.४. ७ कर्तृत्वाची पराकाष्ठा; सीमा; दम; तथ्य. 'या घोतरांत आतां कांहीं अंत राहिला नाहीं.' 'त्या घोडयाचा अंत पाहून दाहा कोस न्या.' ८ समाप्ति; पूर्णपणा. 'माझा ग्रंथ अद्यापि अंतास गेला नाहीं.' ९ कड; तीर; टोंक उ० वनान्त; वस्त्रान्त. **०पाहाणें**–कसाला लावणें, छळणें, गांजणें; निघेल तितकें काम काढणें. 'धाव रे रामराया किती अंत पहासी।' –रामदास. **०पुरणें**–काल समीप येणें. मरण ओढविणें. 'माझा तों पुरलासे अंत।' –ह ३१.२२०. **०लागणें**–सर्व समजणें; अखेर सांपडणें; शेवट दिसणें; ठाव लागणें. **अंताला लागणें**–अ. व्यवस्थित पार पडणें. शेवटास जाणें. 'हें कार्य एकदांचें अंताला लागलें.'

अंत, अंतः— अ. आंत; मध्यें; अंतर्गत; आंतर. 'उबरजे-अंत स्थापिला मारुती.' –रामदासी २.१०. समासांत किंवा स्वतंत्रपणें उपयोग होतो. [अंतः, अंतर्]

अंतक—पु. १ काळ; यम. 'जेणें नादे अंतकु। गजबजला ठाके।' –ज्ञा १.१५०. [सं.] २ (ल.) प्राण घेणारा; फांशी देणारा (मांग); संहारक पदार्थ; भयंकर शत्रु: जन्मजात वैरी. –वि. संहार करणारा; प्राणनाशक (रोग, जखम, वैरी).

अंतःकरण—न. १ अंतर्याम; हृदय; विकार-विचाराचें स्थान; मन; आत्मा; जीव; अंतःकरण चतुष्टयांपैकीं प्रत्येक. निर्विकल्प जें स्फुरण। उगेंच असतां आठवण। तें जाणावें अंतःकर्ण। जाणती कळा।' –दा १७.८.४. २ (ल.) दया; माया. 'त्याला अंतःकरण नाहीं.' [सं.] **०चतुष्टय**–न मन, बुद्धि, चित्त व अहंकार मिळून होणारें आंतर मन. चार प्रकारांनीं चेष्टणारा आत्मा. **०पंचक**–न. अंतःकरण, मन, चित्त, बुद्धि आणि

अहंकार यांचा समूह. **०शुद्धि**-स्त्री. मनाची शुद्धि; पवित्रता; निष्कपटता; मनांतून कामक्रोधादि विकार काढून टाकणे. [सं.] **०जळणें**-१ अतिशय तळमळ लागणें; आस्था असणें. 'अंत:करणींच जेथें जळत आहेत तेथें असंतोषाग्नीच्या ज्वाला बाहेर पडणारच.' -टिसु १२. २ मत्सर वाटणें; द्वेषबुद्धि जागृत होणें. 'बाजीराव स्वयंसिद्ध होऊं पाहतात, हें पाहून बाळोबाचें अंत:करण जळूं लागलें.' -ऐरुतंभा १८. **-णांत घर करून बसणें**-अत्यंत विश्वासू होणें; विश्वासास पात्र होणें, बनणें. 'हा नानांचा कांटा त्याच्या अंत:करणांत घर करून बसला आहे.' -अस्तंभा ५५. **-णांत-णास चटका लागणें, बसणें**-व्यास लागणें, तळमळ होणें. 'तुमच्या अंत:करणांत देशाबद्दल चटका लागून राहिला असल तर स्वदेशी कापड वापरा.' -टि १.५११.

अंतकाल-ळ—पु. मरणकाल; शेवटची घटका. म्ह० 'अंतकाळापेक्षां मध्यान्ह काळ कठीण' 'जिवाशीं जडविलेल्या जिवासाठीं अंतकाळाला लाभकाळ समजावें लागतें.' -र जगे ५. २ (ल.) कार्यमात्राच्या उपसंहाराची वेळ; समाप्तीची वेळ. अखेरीची वेळ. [सं.]

अंतडी-डें—स्त्रीन. आंतडी-डें पहा आंत्र प्राण्याच्या पोटांतील दोरीसारखा एक अवयव. [सं. अंत्र] **०उघडणें-फाडणें-गळयांत घालणें-बाहेर काढणें-उपसणें**-१ अतिशय रागावणें; खरडपट्टी काढणें. २ स्फोट करणें; उघडकीस आणणें **०कातडें एक असणें-होणें-मिळणें-जमणें**-रक्त-मांस एक असणें; एकोदर असणें. **अंतडीं गळ्यास येणें**-अतिशय श्रम होणें; अतिशय त्रास-त्रस्त होणें. **०तुटणें**-कळवळा येणें; दया येणें; हृदयास पीळ पडणें. **०निपसणें**-१ आंतडी बाहेर काढणें. २ (ल.) खिंगें, अंडीं पिल्लीं बाहेर काढणें. ३ हात धुवून पाठीस लागणें; पिच्छा पुरविणें. **०पिळणें, आंतड्याला पांळ पडणें-बसणें**-१ कळकळ वाटणें; तळमळणें. २ अतिशय श्रमामुळें आंतड्याला दुखापत होणें. **०रंगविणें-चोपडणें-रंगणें**-चांगलें खाऊं पिऊं घालून शरीर पुष्ट करणें; तजेला आणणें; धष्टपुष्ट होणें. **०ड्या घालविणें-वाळवीत बसणें**-दातांस दांत लावून बसणें; भुकेनें व्याकूळ होणें.

अंतडें कातडें—न. आतडें आणि कातडें (लहान मुलांसंबंधानें आईनें कळवळ्यानें व प्रेमानें म्हणावयाची संज्ञा). 'हें माझें अंतडे कातडें आहे.' **अंतड्याकातड्याची माया**-स्त्री. आईची कळकळ, माया.

अंत:पट-पाट—पु. अंतर्पाट; लग्नांत नवरा व नवरी यांच्या मध्यें किंवा मुंजींत गुरु (बाप) व मुंज होणारा मुलगा यांच्या मध्यें जें वस्त्र, पडद्याप्रमाणें ठराविक मुहूर्तघटकेपर्यंत धरतात तें. 'काळ सावधान म्हणत। सुर्ये लग्नघटिका पाहत। वियोग अंत:पट सोडित। भावार्थे म्हणत ओंपुण्या।' -एरुस्व ७.६५. [सं. अंतर्+पट]

अंत:पाती—वि. आंत असलेलें; अंतर्गत; आश्रित; मधलें; आंत गुंडाळलेलें, सांपडलेलें; समाविष्ट; आंत येणारें; पोटांत गणना होणारें. ज्ञानाज्ञानाचे विकार। अविद्यांत:पाती साचार।' -एभा २८.५०९ सांमाशब्द-जगदंत पाती; जलांत:पाती. 'मी शास्त्री बाबांचाच शिष्यवर्गांत:पाती आहें.' [सं. अंतर्+पत्]

अंतपार—पु. अखेर व पलिकडील जागा; शेवट; सीमा; इयत्ता (नेहमीं नकारार्थी प्रयोग). 'गोकुळींच्या सुखा। अंतपार नाहीं लेखा।' -तुगा १९४. २ (गो.) ठावठिकाणचा पत्ता. [अंत+पार]

अंत:पुर—न १ राणीवसा; झनानखाना. 'सोळां सहस्र अंत पुर। तेतुलेया नाना उपचार।' -शिशु ७५३. 'गरिबांनां अंत पुर नाहीं, सुखसोहाळे नाहींत.' -मानाप १२. २ (ल.) स्त्री. बायको. 'जया सोळा सहस्र अंत:पुरां।' -उषा ७२५. भणौनि गोळां सहस्रें अंत:पुरें प्रणिली।' -शिशु ७०२. ३ आंतलें घर, बायका बसण्याची जागा. [सं. अंतर्+पुर]

अंत:प्रकृति—वि. आंतल्या गांठीचा; कुढा; भिडस्त; संकोची; अबोल्या; खोल. [सं.]

अंतमाळ—स्त्री आंतडीं. [सं. अंत्र+माला]

अंतर—आंतील; मधील; मध्यंतरींचा. यापासून बनलेले सामासिक शब्द कांहीं स्वतंत्र व कांहीं अंतर शब्दानर्थ्ये दिले आहेत. [सं. अंतर्; झें. अंतेर; लॅ. इंटर; गॉ. उंदर्]

अंतर—न. १ विवक्षित गोष्टींमधील स्थलावकाश, कालावकाश; अवधि (सामा.) काळ; वेळ. 'मग तोही निगे अंतरें। गगना मिळे।' -ज्ञा ६.३००. 'पुणें व मुंबई यांमध्यें १२० मैलांचें अंतर आहे.' २ खंड. ३ फरक; भेद; असमानता. 'तेवीं आम्हां तयां परस्परें। बाहेरी नामाचींचि अंतरें। वांचूनि आनुवट वस्तुविचारें। मी तेचि ते।' -ज्ञा ९.४११. ४ विपरीतपणा; विप्रतिपत्ति; असंमति; विपरीत मत. ५ द्विमत: भेदभाव; भांडण; वांकडेपणा. 'परि न वदावें बंधु-प्रेमीं जेणें पडेळ अंतर तें॥' -मोसभा ४.६१. ६ कसर; तफावत; कमतरता (काम) चाकरी, धंदा यांत). 'चाकरीत अंतर पडलें असलें तर ...' ७ चूक, अशुद्ध; तफावत. (क्रि०पडणें). 'ह्या हिशेबांत अंतर नाहीं.' ८ मन; हृदय; मनांतील गोष्ट; अभिप्राय. 'तुमचें अंतर कळलें तर बरें?' अंतरींचा ज्ञानदिवा मालवूं नको रे.'' तुका म्हणे देवा माझें अंतर वसवा।' -तुगा ११६८. ९ (ल.) रहस्य; मर्म. 'भक्तीचें अंतर अतिगूढ। न कळे उपड श्रुतिशास्त्र।' -एभा १४.२४१. १० (समासांत पदाच्या अंतीं) दुसरा; अन्य, जसें.-भाषांतर, म्हणजे दुसरी भाषा; देशांतर, देहांतर; स्थलांतर. 'गुढी उभविली अनेगीं। शास्त्रांतरीं।' -ज्ञा ६.५२. ११ (अंकगणित) विवक्षित न्यूनीकरण, वजा करणें; जसें-विसांत पांचांचें अंतर करून पधरा-

१२ (काव्य) अंतरिक्ष;आकाश; अंतराळ. ' कीं अंतरींहून खालीं पडली । गेली चुर होऊनिया । ' –मोल. १३ (काव्य) आंतली बाजू, स्थल, भाग. जसें–' अंतरी शर भिनला. ' ' वायुतत्वाचें अंतर । ' –ज्ञा १३.११५, ' पात्रांतरीं वाजति क्षीरधारा । ' १४ वियोग; ताटातूत. ' मायलेकरांस अंतर पडलें. ' [सं. अंतर; गॉ. अंथर्; लिथु. अंत्र; लॅ. अल्टर] **०करणें**–(अंकगणित) वजाकरणें. **०देणें**–सोडणें; त्यागणें; टाकून जाणें. ' तुका म्हणे आतां नको देऊं अंतर । न कळे पुढें काय बोलूं विचार ॥ ' –तुगा १८३७. –ख१२३३. **०पडणें**–न्यूनता, कमतरता येणें (मित्रप्रेमांत, भक्तिभावांत, इ०) अंतर अर्थ ५ पहा. **०होणें**–फरक पडणें. ' ह्मापू, यांत अंतर होणार नाहीं. ' –इंप ६६. **म्ह०** अंतरंमहदंहतरं=कोणताहि भेद, फरक असो तो मोठाच भेद होय. **०कळा**–स्त्री. अंतःकरण, मन. ' प्रीतीपात्र अंतकळा । घेऊन गेली । '–दा ३.२.४२. **०खूण, –ची खूण**–स्त्री. गुप्त खूण; चिन्ह; बिंग, इंगित. ' म्हणे कांहीं सांगे अंतरखूण । तो ताटिकांतक मखपालण । जेणें करूनि संतोषे । ' **०गळ**–अंतगॅळ पहा. **०गड्डू**–वि. १ विशेष परिचयाचा (कुटुंबांतल्या गुप्त गोष्टी, धंद्यांतल्या खुब्या, एखाद्या गोष्टीची कच्ची हकीकत इ० इत्थंभूत माहिती असलेला); अंतर्भेद्या. २ लुडबुड्या; लांडा कारभार करणारा; मध्यस्थ. ३ त्रासदायक; निरुपयोगी (अंग, अवयव, भाग). ४ (ल.) खटपटी; निष्णात. [सं. अंतर्गडु=निरुपयोगी] –पु. १ गुप्त हेतु; गुह्य गोष्ट; मनांत ठरविलेला बेत (कि०राखणें; ठेवणें–बाळगणें; पोटांत). २ अडथळा; आडकाठी; प्रतिबंध; [सं. अंतर्+पडणें] **–चा निरोप**—पु आंतला (खाजगी, गुप्त) संदेश, आज्ञा. **–रीची मात**—स्त्री. गुह्य गोष्ट; गुप्त गोष्ट. ' सांगें अंतरींची मात । तो येक मूर्ख ॥ ' –दा २.१.९. [अंतर्+मात] **०गृह**–न. १ माजघर; स्वयंपाकघर. २ अंत.पुर; जनानखाना. ' वस्त्रें भूषणें अंगावरूती । तीं सकळ ब्राह्मणांसि वांटी भूपती । मग जावोनि अंतरगृहाप्रती । पुत्रमुख प्रीती पहातसे । ' –संवि १७.१६२. **०दृष्टि**–स्त्री. अंतस्थ नजर; मनश्चक्षु; ज्ञानचक्षु. ' बैस सावधान माझे ध्यानीं । अंतरदृष्टीं लक्षुनि । ' **०पगडी–पकडी**–स्त्री. (व्यायाम) १ टांगलेला मलखांब. २ छताला दोरीनें लटकलेल्या दीड फूट लांबीच्या मलखांबावरील आडवा, उडवा. यांत खाली उडी मारण्यांत शिताफी असते; वज्रमुष्टी पहिलवान या व्यायामाचा विशेष अभ्यास करतो. हा मलखांब सागवानी लांकडाचा करतात. –संव्या ६३. **०पट–पाट**–अंतःपट पहा. ' मंगळ हें नोंद कन्यापुत्रादिक । राहिला लौकिक अंतरपाट ॥ ' –तुगा ३६५३. **०पट्टी**–स्त्री. (शिवण काम) पुढ्याला बळकटी आणणारा कापडाचा भाग. ' कापडाच्या रुंदींत पाठ, पुढा व अंतरपट्टी इतके अवयव बसतात. ' –काप्र. **०पर**–वि. (बंगाल) एक वर्ष पडीत असलेली (जमीन). [ईस्ट इंडिया कंपनी रेकॉर्डे ३.१७३] **०मळिण**–वि. (काव्य) वाईट अंतःकरणाचा; मनाचा खोटा; दुराचारी; भ्रष्ट, दुष्ट. **०मार्ग**–पु. १ आंतील रस्ता. २ (संगीत) प्रत्येक रागाच्या विशिष्ट नियमानुसार वादी–संवादीच्या धोरणानें वैचित्र्य उत्पन्न करणारा स्वरसमुदाय रागविस्ताराच्या मध्यें मध्यें योजणें; रागाचें वैशिष्ट राखण्यासाठीं व रंजकतेसाठीं केलेली स्वररचना. **०मिठी**–स्त्री. अतिशय प्रेम. ' राम जावईविशेष । अंतरमिठी जनकाची । ' –वेसीस्व ७.१०. **०याम**– अंतर्याम पहा. ' नवल वाटतें अंतरयामीं । '–देप २९. **०वन**–न. नागवेलीचे अंकुर; जुन्या नागवेलीचें कडें करून तें जमिनींत पुरलें असतां त्यापासून जे नवीन अंकुर किंवा धुमारे फुटतात ते व गुंडाळी व नवीन फुटलेलीं पानें (नवती). **०वही**–ई–स्त्री. आंतील कुंपण, बांध, वई; अनुक्रमानें लागत गेलेले जे अनेकस्वामिक भूभाग त्यांच्या भेदार्थ मध्यें मध्यें ज्या आडव्या वह्या असतात त्या प्रत्येक **०विटाळ**–पु. साक्षात् स्पर्श न होतां गवत, काठी इ० मध्यस्थ वस्तूनें झालेला विटाळ. [सं. अंतर+दे. विट्टाल; म. विटाळ] **०वेधी**–पु अंतरज्ञानी पुरुष; मनकवडा. ' अंतरवेधी अंतर जाणें । बाहेरमुद्रा कांहींच नेणें । ' –दा १८.८.१५. **०वेल**–पु.स्त्री. आकाशवेल; अमरवेल; सोनवेल. **०साल**–स्त्री. झाडाच्या वरील सालीच्या आंतली पातळ साल, त्वचा; जनावराच्या वरील कातड्याच्या आंतील पातळ चामडी. **०साळ**–स्त्री. भाताचा एक प्रकार. **०साक्ष–क्षी**–वि. १ अंतर्ज्ञानी (ईश्वर, योगी) २ अंतर्यामज्ञाणणारा. **०सुख**–न. आत्मसुख; आत्मतृप्ति; अंतर्यामीचा आनंद. ' जयारा लाधलें अंतरसुख । मग तो न मानी प्रपंचदुःख । ' **०सुती**–वि. १ ज्याची अर्धी विणकर सुती आहे असें कापड, सणंग. २ (ल.) आंतून काम करणारा; गुप्तपणें खटपट करणारा. ३ प्रच्छन्न भावाचा; गूढ अर्थाचा. [अंतर्+सूत्री] **०स्थ**–वि. १ अंतस्थ; आंतील. २ अंगची; मूळची ३ स्वाभाविक; नैसर्गिक. **०हेत–तु**–पु. गुप्त हेतु. ' अंतरहेत चुकत गेला । समुदायाचा । ' –दा १९.९.७. **०ज्ञ**–वि. १ अंतर्ज्ञानी; जगांतील सर्व गोष्टी मनानें जाणणारा. २ अंतरसाक्षी. [सं.]

अंतरंग—न. १ (काव्य) मन; अंतःकरण. ' भक्ति निकट अंत(आंत)रंगें । तो सत्वगुण । ' –दा २.७.३४. २ आंतील भाग; अभ्यंतर; अंतर्भाग; गुह्य. बहिरंगाच्या उलट. ' ऐसा हा अंतरंगु । सच्छब्दाचा विनियोगु । ' –ज्ञा १७.३८५. **–गीचा**–वि. अंतरीचा; जवळचा; शरीरसंबंधी; जिवलग; निकटवर्ती असलेला; कुटुंबांतला (चाकर, नोकर, आप्त, मित्र इ०); ' मी जरी सलगीचा चांगु । तरी काय आइसीहूनि अंतरंगु ॥ ' –ज्ञा ११.३२. ' बहु अंतरंग होउनि करिती स्वार्थाजनीं न अनमान । '–मोआदि ३५.३०. २ आत्मीय; स्वतःचा; स्वकीय; वैयक्तिक; सर्वसामान्य

नव्हे असा. 'सरकारी कामापेक्षां घरचें काम अंतरंग असतें.' **०परीक्षण**–न. १ समग्र ग्रंथ अवलोकन करून त्यांतील मर्म, रहस्य, मथितार्थ किंवा प्रमेय काढणें. –टिसु ७७. २ ग्रंथाचें प्रस्तावनावजा सिंहावलोकन; ग्रंथसार.

अंतरणें—उक्रि. १ गाळणें; सोडणें; वगळणें; टाकणें; दुर्लक्ष करणें. २ पुढें, वर जाणें; मागें टाकणें; कांहीं अंतरावर सोडणें. समय अतिक्रांत करणें. 'आतां धर्मातें पाचारीं। विलंबे दुरी अंतरती।' –मुसभा १६.११. ३ चुकणें; आंचवणें; मुकणें. 'भावनेच्यामुळें अंतरला देव। शिरला संदेह भय पोटीं।' –तुगा ४८. 'पुत्र विटाळले ते पितृधनासीं अंतरले।' ४ नाहींसें होणें; हातचें जाणें; वियोग पावणें; दूरावणें(मृत्यु, देशांतर इ० कांमुळें). 'आणि परलोक ही अंतरल। ऐहिकेंसी॥' –ज्ञा २.२७. 'मला चाकरी अंतरली तर अंतरो!' ५ मरणें. 'पूर्व दिनीं गोत्रज अंतरे। तैं स्वगोत्रीं सूतक भरे।' –एभा २१.१२५. [अंतर]

अंतरमाळ–ळा—स्त्री. आंतडें. (भीति, तहान, काळजी यांपासून होणारें दुःख सांगण्यासाठीं योजतात). (क्रि० सोकणें; शोषणें; वाळणें; सुकणें). 'चतुर्थ नरसिंह विशाळ। ...निवटुनि असुरांसि समूळ। काढी अंतरमाळ।' –पाळणे २२. 'तें वर्तमान ऐकून माझ्या अंतरमाळा सोकल्या.' **०गळ्यांत घालणें**–१ ठार करणें; नाश करणें. २ त्रास देणें. **०गळ्यांत येणें**–त्रास होणें; नाश होणें.

अंतरा—पु. १ मधील अंतर, काळ; अंत्रा पहा. २ एकदिवसा आड येणारा ताप. ३ (संगीत) अंत्रा; विजेचा दुसरा भाग–ह्यांत तारसप्तकांतील स्वर असलेच पाहिजेत; (सामा.) गाणें; गाण्यांतील पहिल्याखेरीज कोणतेंहि कडवें. ४ अंतर पहा. [अंतर]

अंतरा—पु. तरवारीच्या मुठीवरील बोटांचा आसरा.–शर. [फा. ?]

अंतरा—पु. (जंबिया) बॉकमधील एक डाव; आपल्या हातांतील जंबियानें जोडीदारास त्याच्या उजव्या बाजूला शेवटच्या बरगडीजवळ छातीवर मारणें. [सं. आंत्र; किंवा अंतर् म. अंतर]

अंतरागमन—न. मधून जाणें (मूळ अर्थ यज्ञांत ऋत्विज अनुष्ठानास बसले असतां त्यांचे मधून अथवा कर्मकर्ता, ऋत्विज व देवता यांच्यामधून इतरांनीं जाणें). १ वादीप्रतिवादी, गुरुशिष्य, नवराबायको इ० कांच्या मधून इतरांचें गमन. २ मध्यस्थी; **मध्यस्थपणा**. [सं. अंतर्+आ+गम्]

अंतरात्मा—पु. १ जीवात्मा; मन. २ अंतर्विकार; भावना; हृदय; अंत.करण. [सं.]

अंतराय–व—पु. १ अडथळा; विघ्न; अडचण; हरकत. 'जैसा सिद्धांसि सिद्धलाभ होतां। उठी अवचिता अंतराय।' –एरुस्व २.४१. 'विचार कळला सांगता नये। उदंड येती अंतराये।' –दा १५.२.१३. २ वियोग; ताटातूट. 'तुजसी अंतराय होईल।' –ज्ञा १.२३४ 'श्रीकृष्णदेवेसी अंतरावो।' –निगा ३. ३ उणीव. 'अंतराय कांहीं अनुग्रानीं राहिल्या। गायी या जन्मल्या पुण्यवेगें।' –ब १८. [सं. अंतर्+इ–अय्=जाणें, अंतराय]

अंतरायामघात—पु. शरीराच्या पुढील भागाचे स्नायू आखडून शरीर धनुष्याप्रमाणें वांकविणारा धनुर्वाताचा एक प्रकार (वहिरायामवाताच्या उलट). [सं.]

अंतराल–ळ—पुन. १ पृथ्वी आणि आकाश यांच्यामधील जागा; अंतरिक्ष; वातावरण; आकाश. 'हें असो स्वर्ग पाताळ। कीं भूमी दिशा अंतराळ।' –ज्ञा ११.२७१. 'बाण जळत अंतराळीं।' –एरुस्व ९.३५. 'पुढें भीम तो अंतराळें उडाला।' –राक १.१३. 'अंतराळांत काय काय चमत्कार आहेत ...' –नि ३९. २ मधली जागा; अवकाश; अभ्यंतर. [सं. अंतराल्] –क्रिवि. आकाशामध्यें; हवेंत; वर. **०दीप**–पु. आकाशदिवा.

अंतराळ्यो—उद्गा. (क.) (विटीदांडू) खेळांतील एक संज्ञा; विटी हवेंतून फेक या अर्थी शब्द. 'मी अगोदर अंतराळ्यो म्हटलें आहे.' [अंतराळ]

अंतरास्पर्श—पु. (अप.) अंतरस्पर्श. अंतरविटाळ पहा.

अंतरित—वि. १ अंतरलेलें; ओलांडिलेलें; गाळलेलें; वगळलेलें; अपुरें टाकलेलें. २ विभागलेलें; वेगळें केलेलें; अंतरावर सोडलेलें. [सं.]

अंतरि(री)क्ष—न. आकाश; अंतराळ पहा. 'अंतरिक्षीं तारागणें। धरी कवण॥' –ज्ञा १३.५४. –क्रिवि. अंतराळीं; आकाशांत; पोकळींत. 'मार्ग होये परी अंतरिक्ष।' –दा ४.४. १३. [सं.]

अंतरीक—वि. अंतरित पहा.

अंतरीय–वस्त्र—न. १ आंतील वस्त्र; आंतला कपडा (याच्या उलट उत्तरीय–पांघरावयाचें–वस्त्र). २ नेसावयाचें धोतर (पूर्वी अंतरीय व उत्तरीय अशीं दोनच वस्त्रें असत). [सं.]

अंतरोळ—न. (गो.) १ अंतःकरण. २ आकाश. अंतराळ पहा.

अंतर्कळा—स्त्री. १ (काव्य) चाणाक्षपणा; हुषारी; चातुर्य; कल्पकपणा. २ अंतरकळा पहा.

अंतर्गत—वि. १ आतील; अंतःस्थित; मधील. २ समाविष्ट; पोटांत आलेलें. ३ मनांतला; गुप्त. –न. मनांतला हेतु; गुप्त मसलत. [सं.]

अंतर्गर्भ—पु. १ आंतला भाग; गाभा; गर; मगज; दळ; सार. [सं.] २ (ल.) गर्भितार्थ; आंतील हेतु; गूढार्थ.

अंतर्गळ—पु आंतड्याचा कांहीं भाग वातप्रकोपानें अंडाशयांत किंवा कांहींच्या मतें जांघेंत उतरून अंड मोठें होणें; यानें अंडसंधीमध्यें गांठीप्रमाणें सूज उत्पन्न होते. [सं. आंत्र; म. अंतर+गळणें]

अंतर्गृह—अंतरगृह पहा.

अंतर्गोल—वि. ज्याचा आंतील भाग गोल आहे असा, (इं.) कॉन्केव्ह. (बहिर्गोलाच्या विरुद्ध). **०भिंग**–न. अंतर्गोलाची जाड कांच. (इं) कॉन्केव्ह लेन्स.

अंतर्ग्रह—पृथ्वी व सूर्य यांमधील बुध व शुक्र ग्रह; हे पृथ्वीपेक्षां लहान असून यांची घनता व आसाभोंवतीं फिरण्याचा कल पृथ्वीसारखा असतो. हे सूर्याजवळ असल्यानें तेजस्वी असतात हे सायंकाळीं पश्चिमेस किंवा सकाळीं पूर्वेस कांहीं उंचीवर दिसतात. –सृष्टि १०५.

अंतर्चक्षु—वि. अंतर्ज्ञानी; दुसऱ्याचें अंत:करण जाणणारा, दिव्यदृष्टि असलेला; मंत्रद्रष्टा. –पु. दुसऱ्याचें अंत:करण जाणण्याची दृष्टि; ज्ञानदृष्टि; अंतर्दृष्टि [सं.]

अंतर्जठर—न. (आतलें पोट) पोट; उदर. [सं.]

अंतर्ज्योति—स्त्री. (वेदांत) अंतरात्मा; आत्मा. 'कीं अंतर्ज्योतीचें लिंग। निर्वाळिलें।' –ज्ञा ६.२५४. –वि. आत्मज्ञान झालेला. [सं.]

अंतर्झुल-ली—स्त्री. हत्तीच्या अंगावरील चित्रविचित्र झूल, पाखरा. [सं. अंतर्+म. झूल]

अंतर्त्याग—पु. (काव्य) खरोखरचा, मनापासूनचा, अंत:करणपूर्वक केलेला त्याग. 'बाह्य कुटुंबा करी सांड। पण जेथें स्थूळ देह न साडे। तेथें अंतर्त्याग कैंचि घडे।' मोल. [सं.]

अंतर्दशा—स्त्री. (फलज्यो.) जन्मकुंडली करतांना उप ग्रहाचा पगडा; ग्रहाचा फल देण्याचा काल; जन्मकाळीं जें नक्षत्र असेल त्याच्या आरंभापासून जितकी घटका-पळें गेलीं असतील तितकी दशा जन्मापूर्वी गेलेली असते व शिल्लक राहिलेली जन्मानंतर भोगावयाची असते. याच्या उलट महादशा, म्हणजे मुख्य ग्रहांची बाधा, स्वामित्व. २ स्वत:ची अंतस्थ खरी स्थिति; वस्तुस्थिति. 'माझी अंतर्दशा तुम्हास काय माहीत?' [सं.]

अंतर्दर्शी—वि. आत्मचिंतनांत मग्न असणारा; आत्मज्ञानी. [सं.]

अंतर्दाह—पु १ बाहेरून हातास अंग ऊन लागत नसून शरीरांत होणारी जळजळ; आग. (ताप पित्त इ० मुळें). २ (ल.) आंतील दाह, दु:ख, संताप (काम, क्रोध इ० मुळें होणारी). [सं.]

अंतर्दृष्टि—स्त्री. १ दृष्टि अंतर्मुख करून चित्त, मन पाहणें; अंतरावलोकन; अंत:चक्षु; आत्मप्रवणता. २ अंतर्ज्ञान; अंतर्ज्ञानानें जाणणें. –वि. १ मनाची वृत्ति आत्म्याकडे वळवून पाहणारा; अंतर्मुखी. २ अंतर्ज्ञानी; दूरदर्शी; सिद्ध पुरुष. [सं.]

अंतर्द्वार—न. १ आंतलें दार. २ जनानखान्याचें, राणीवशाचें दार. ३ (ल.) गुप्तपणें मध्यस्थी करणारा, वशिला लावणारा माणूस; मध्यस्थ. [सं]

अंतर्धान—न. १ एकदम नाहींसें होणें; दिसेनासें होणें; गुप्तता; अदृश्यावस्था. 'आज्ञा मागोनि समर्थाप्रती। अंतर्धान पावे मारुती।' –संवि ३.५८. (क्रि० पावणें). २ आच्छादन; एखादी वस्तु किंवा शरीर झांकावयाचें साधन, जसें–पडदा; माया; डोळ्यावरील पटल. [सं. अंतर्+धा=ठेवणें]

अंतर्धायक—वि. अंतर्धान करणारें; गुप्त, आड ठेवणारें. [सं]

अंतर्ध्यान—न. ध्यानरूप समाधि; ध्यानस्थ असणें, भक्ताची परमेश्वराच्या ठिकाणीं लागणारी तंद्री. [सं.]

अंतर्निष्ठ—वि. १ ध्यानस्थ; समाधिस्थ. २ निवृत्तिमार्गावर निष्ठा असलेला; अंतर्मुख पहा. [सं.]

अंतर्निष्ठा—स्त्री. अंतर्ध्यानानें झालेली मनाची एकाग्रता: समाधि; ध्यान. [सं.]

अंतर्पाट—पु. अंत:पट पहा.

अंतर्बाह्य—न १ अंतरात्मा आणि बाह्यक्रिया, अथवा चलनवलन; अंत:करण आणि आचरण. या गृहस्थाचें अंतर्बाह्य शुद्ध आहे.' २ आंतील आणि बाहेरील बाजू. –क्रिवि. आंत आणि बाहेर सर्व बाजूंनीं; चोहोंकडून; हरएक प्रकारें. 'कोणताहि व्यवहार अंतर्बाह्य पाहिल्यावांचून समजत नाहीं.' [सं.]

अंतर्भाव—पु. १ समावेश; समाविष्ट स्थिति. 'स्वातंत्र्यांत स्वराज्याचा अंतर्भाव आहे.' –टि ३.२४८. 'राजास आमंत्रण केलें म्हणजे प्रधानादिकांच्या आमंत्रणाचा त्यांत अंतर्भाव होतो.' २ मन: मनोभाव; अंत:स्थ हेतु; अभिप्राय. [सं.]

अंतर्भूत—वि. समाविष्ट; अंतर्गत; अंतःस्थित. 'नाम धरिलें कैंटी। असें अंतर्भूत पोटीं॥' [सं.]

अंतर्भेद—पु. १ आतील किंवा खाजगी गुह्य गोष्टी; गुपित; आंतली बातमी. २ अशा गुह्य गोष्टींची फोड, परिस्फुटता. (शत्रु, बाहेरचे लोक इ० मध्यें). ३ गुप्त गोष्टींची माहिती, ज्ञान. [सं.]

अंतर्भेदी-द्या—वि. १ गुप्त गोष्टी माहीत असलेला; अंतःस्थितीचें ज्ञान असलेला. २ गुह्य बाहेर फोडणारा; घरभेद्या; गुप्त गोष्टींची परिस्फुटता करणारा. [अंतर्भेद]

अंतर्माळ—अंतरमाळ पहा. **०उडप**–क्रि. (गो.) पांचावर धारण बसणें; तोंडचें पाणी पळणें; धीर सुटणें. 'तें आयकनाफुडें म्हजी अंतर्माळ उडली.'

अंतर्मुख—वि. १ अंतर्निष्ठ; आत्मनिष्ठ; ध्यानस्थ. २ निवृत्तिमार्गी; विरक्त. ३ आंत वळलेली; विचारी; आत्मचिंतनपर (दृष्टि इ०). [सं.]

अंतर्याम—न. १ आत्मा; जीव. २ (ल.) मन; अंतःकरण; चित्त. ३ अंतरंग; आंतील गोष्ट. [सं.] (वाप्र.) **०कळवळणें**–आंतड्याला पीळ पडणें; तळमळ होणें. **–मीं ताप बसणें**–हाडीं ज्वर चिकटणें. **–मीं रडणें**–मनांतल्या मनांत दुःख करणें; झुरणें. **–मीं वास करणें**–हृदयांत खोल जाऊन बसणें; अंतःकरणावर ठसून राहणें. **–मास डाग बसणें–लागणें**–हृदयास धक्का बसणें (दुःखामुळें). **–मी वें दुःख अंतर्यामास ठाऊक**–मनाची पीडा मनासच माहीत (ती इतरांना कळणें अशक्य या अर्थी). **–मीची खूण अंतर्यामास ठाऊक**–मनांतले बेत किंवा खलबतें, अनुभव ज्यांचीं त्याला माहीत; अपकार किंवा उपकार केलेले मनाचे मनास माहीत. **–मीची खूण आईला ठाऊक**–१ आपल्या मनांतल्या गोष्टी आईलाच माहीत असतात –मोल. २ मुलाचा जनक कोण हें आईसच माहीत असतें. (अंतर्याम याऐवजीं अंत्राम अशेंहि अशुद्ध रूप योजितात).

अंतर्यामी—वि. १ जवळचा; जिवश्चकंठश्च; जिवलग. २ अंतर्यामाचा साक्षी (जीवात्मा; ईश्वर).

अंतर्यामींचा—वि. १ जिवलग; अतिशय परिचयाचा; अंतर्यामी पहा. २ अकृत्रिम; खराखुरा; कळकळीचा; मनोभावापासूनचा; निष्कपट (अंतर्याम शब्दाच्या सप्तमीपासून साधित झालेला शब्द).

अंतर्युति—स्त्री. (ज्यो.) ग्रहांची गौणयुति. [सं.]

अंतर्लापिका—स्त्री. श्लोकाचा अर्थ लावण्याचें मर्म गुप्त रूपानें त्याच श्लोकांत ठेवलेलें असतें अशा प्रकारचा श्लोक; गूढ श्लोक; गर्भितार्थश्लोक. 'कं बलवंतं न बाधते शीतं। कंबलवंतं न बाधते शीतम्।' 'औषध न लगे मजला.' –नल ५.१. [सं.]

अंतर्वत्नी—स्त्री. (काव्य) गरोदर स्त्री. 'अंतर्वत्नी पत्नी झाल्या, व्याला सपुत्र फळ शकलें।'–मोसभा १.७७. 'संवत्सरें झालीं षोडशी। अंतर्वत्नी झाली ऐका।' –गुच ११.१०. [सं.]

अंतर्वर्ती—वि. १ आंत असलेला; मध्यस्थित; समाविष्ट; आकलित. 'परि मह्नेशें सूर्याहाती। दिधली तेजाची सुती। तया भासा अंतर्वर्ती। जगचि केलें।' –अमृ १०.२. २ गौण (ग्रह.) याच्या उलट बहिर्वर्ती. बुध आणि शुक्र ह्यांस अंतर्वर्ती ग्रह म्हणतात, कारण ह्यांच्या कक्षा पृथ्वी आणि सूर्य ह्यांच्यामध्यें आहेत. [सं. अंतर्+वृत्]

अंतर्वसन—आंतलें वस्त्र. अंतरीय पहा. 'अंतर्वसन बाह्य वसन। कंचुकीवरून प्रावरण। –ह ३४.१६३. [सं. अंतर्+वसन]

अंतर्वास—पु. (योग). १ आंतील वस्ती. २ आत्म्यांत वास करणें; परमेश्वराशीं तादात्म्य पावणें; आत्मनिष्ठ असणें 'आवडीच्या करा ऐसे। अंतर्वासें जाणतसा।' –तुगा १७६१. [सं. अंतर्+वस्]

अंतर्वासी—वि. आत्मनिष्ठ (योगी); आत्म्यांत विलीन झालेला (योग्याचा एक प्रकार).

अंतर्वृद्धि—स्त्री. अंतर्गळ पहा.

अंतर्वेदी—स्त्री. १ कोणत्याहि दोन नद्यांमधील प्रदेश; दुआब. २ (विशेषतः) गंगा व यमुना यांमधील प्रांत; (प्राचीनकाळीं येथें ब्रह्मदेवानें जो यज्ञ केला त्याची ही वेदी होती म्हणून हा देश पवित्र मानतात). तैत्तिरीय आरण्यकांत (५.१) आर्यावर्त अथवा कुरुक्षेत्रावर यज्ञभूमीचें रूपक केलें आहे त्यांतील वेदीची जागा गंगा आणि यमुना नद्यांच्या भागांत येते. प्राचीन काळीं इटावा ते अलाहाबाद या दुआबच्या दक्षिणेकडील प्रदेशाला अंतर्वेदी म्हणत. कधीं कधीं सबंध दुआबालाच हें नांव दिलेलें आढळतें. 'अब्दाली कोळेहून यमुना उतरून अलीकडे येऊं लागले तरी, अंतर्वेदींत सर्वांनीं उतरून पायबंद द्यावा.' –रा १.२००. [सं.]

अंतर्वैर—पुन. गुप्त शत्रुत्व; आंतून द्वेष. [सं.]

अंतर्वैरी—पु. १ गुप्त शत्रु. २ एखाद्याच्या मरणाच्या वेळेस ज्याचा ध्यास घेतला असतां जो (मुलगा, मुलगी) कांहीं अडचणीमुळें त्यास भेटत नाहीं परंतु मरणानंतर येऊन पोंचतो तो. 'पोटचा पोर देखील एखादवेळीं अंतर्वैरी होतो.' [सं.]

अंतर्हित—वि. १ अदृश्य; अंतर्धान पावलेला. –शिल्पवि ४७७. २ लपविलेलें; आवरण घातलेलें; दडविलेलें. [सं.]

अंतर्ज्ञान—१ परमात्म्याविषयींचें ज्ञान; दिव्यज्ञान. २ योगसाधन, ईश्वरकृपा इ०मुळें दुसऱ्याच्या मनांतील गुह्य गोष्टींची होणारी माहिती; गुप्त ज्ञान. ३ जगांतील चाललेल्या व्यवहारांचें–ते व्यवहार प्रत्यक्ष न पाहतां–मनास झालेलें ज्ञान; अप्रत्यक्षविषयदर्शन. ४ सहजोपलब्ध ज्ञान; तात्कालिक ज्ञान. (इं.) इन्टुइशन. [सं.]

अंतर्ज्ञानी—वि. अंतर्ज्ञान असलेला; अप्रत्यक्ष विषयद्रष्टा; सहजज्ञानी. [सं.]

अंतवंत—वि. नाशवंत; मर्त्य; जिला शेवट आहे अशी (वस्तु, देह). 'अथवा ऐसा नेणसी। तूं अंतवंतचि हें मानिसी।' –ज्ञा २.१५२. [सं.]

अंतःशौच—न. मनाची शुद्धता; अंतःकरणाचें पावित्र्य; (काम–क्रोधादिकांचा त्याग व शमदम, वैराग्य, भगवद्भक्ति इ. चा स्वीकार केल्यामुळें होणारी अंतःकरणाची निर्मळता); अंतःशुद्धि. [सं.]

अंतःसंज्ञा—स्त्री. आंतून जागृति; आत्मज्ञान; आत्मबोध. [सं. अंत+सम्+ज्ञा]

अंतःसाक्षी—वि. अंतःकरण जाणणारा. अंतर्ज्ञानी. [सं.]

अंतःस्थ—न. अप. अंतस्थ;अंतस्त. १ (व्यापक) गुप्त रीतीचा लांच; दरबारखर्चाचा एक भाग; सरकारांतून आपल्यासारखें काम करून घेण्यासाठीं कारकून, मुत्सद्दी, मोठमोठे सरकारी अधिकारी यांना त्यांचा हक्क म्हणून (लांच नव्हे) ठोकळ रोख रक्कम देण्याची पद्धत. ही मुसलमानी, मराठी व इंग्रज कंपनीच्याहि रियासतींत त्यावेळीं सररहा प्रचलित होती, दरबारखर्च पहा. –गांगा ५६; –पया २०४. गुप्त मसलत किंवा तह ठरविणाऱ्या अधिकाऱ्यास शत्रूकडून ही रक्कम मिळे. 'चिकोडी व मनोळी हे दोन प्रांत पेशव्यांनीं कोल्हापुरकरास नजर केले व त्याबद्दल किंमत म्हणून ११ लाख रुपये सरकारात घेतले व खेरीज १० लाख रु. अंतस्थ स्वतःसाठीं घेतले.' –थोमारो २०९. 'गडवाल संस्थानापासून सरकार २०००० खंडणी सालीना घेई. त्यांत सखारामबापूला ५००० अंतस्थ मिळत.' –थोमारो २५४. २ (सामा.) लांच. –वि. १ गुप्त; खासगत; एकांत स्थळीं किंवा खासगत जागीं केलेलें. २ अंतस्थित; मधला; आंत असलेला; आंतील. [सं.] **०पट्टी**–स्त्री. सरकारास आवश्यक लागणारा खर्च निभावण्यासाठीं प्रसंगीं जमीनदारावर व क्वचित रयतेवर बसविण्यांत येणारा कर. **०पत्र**–न. हुंडीबरोबर पाठविलेलें खुणेचें पत्र.

अंतःस्थिति—स्त्री. १ आंतली अवस्था (मन, आत्मा, प्रसंग, घर इ० ची). 'अंतःस्थिति यजमानाची ठाउकी आम्हा ती.' २ आंतील अधिष्ठान, वास्तव्य. ३ अंतरात्मा. [सं.]

अंतस्थी—अंतस्थ अर्थ १ पहा.

अंतावन—न. शेवट. 'आतां स्तवकाचें अंतावनीं. ब्रह्मप्रळय वर्णील मुनी.' –कथा १.१४.१२८. [सं. अंत+अवन ?; वण–न]

अंतिक—वि. जवळचा; निकटचा; समीपवर्ती. –पु. (ल.) सेवक; नोकर. [सं.]

अंतिम—वि. शेवटचा; अखेरचा; शेवटील; अंत्य. [सं.] **०साध्य**–न. शेवटचें उद्दिष्ट, ध्येय. 'स्वातंत्र्य हें अंतिमसाध्य ठरावें.' –टिव्या. [सं.]

अंतीं—अ. १ शेवटीं; नंतर; पश्चात्, परिणामीं; अखेरीस; मग. अनुभवाअंतीं=अनुभवानंतर; केल्याअंतीं; घेतल्याअंतीं. 'व्यवहाराचे अंतीं चार पैसे बुडतात किंवा मिळतात हें चाललेंच आहे.' २ ज्यामुळें; सारीं; करितां; स्तव. 'सरकारकामाअंतीं मी आलों नाहीं.' [अंतची सप्तमी विभक्ति]

अंतीगुंती—स्त्री. अडचण; अडथळा. 'अवश्य म्हणून नृपनाथ। बोळवीतसे समस्त। ऐसें रायास गांवोगांवीं होत। अंतीगुंती चालवया।' –नव १८.१४. [गुता–ती द्वि.]

अंतील—वि. अंतीचा;शेवटचा. 'हाचि श्लोकींचा अंतील चरण।' –एभा २९.८८. [अंत]

अंतुता—क्रिवि. आंत 'आकाशा ठाव अंतुता। भूतभास बिबला।' –वेसीस्व ११.२९.

अंतुती—अ. शेवट; समाप्ति. 'नमस्कारासी वारी नाहीं अंतुती।' –सप्र १.६६. [अंत]

अंतुरी–तोर–तोरी—स्त्री. १ (काव्य) स्त्री; बायको; पत्नी; भार्या. (सामा.) बाई. (अव). अंतोरिया. 'अंतोरिया कुमरें। साडोनिया भाडारें।' –ज्ञा १.२२०. 'जन्मला जगांचे उदरीं। तयासीं जो विरोध करी। सखी मानिली अंतुरी। तो येक मूर्ख।' –दा २.१.८. (सामान्यपणें) कोणतीहि स्त्री. 'न कळे हो माव मुनि मागें एकी अंतुरी। शार्टी संवत्सरा जन्म तया उदरीं॥, –तुगा २७७. [सं. आन्त.पुरिकी, आन्त.पुरी; प्रा. अंतेउरी–अंतुरी]

अंतुवट—आंतुवट पहा.

अंतेज—पु. अंत्यज; महार. 'तीन दिवसांचा उपासी अंतेज।' –रामदासी २.१५८. [अंत्यज]

अंतेवासी—पु. (कायदा), (शब्दशः जवळ राहणारा). गुरूजवळ राहणारा; उमेदवार; शिष्य; विद्यार्थी (करार केलेला). [सं. अन्ते+वस्]

अंतेष्टि–ष्टी—स्त्री. और्ध्वदेहिक संस्कार; क्रिया; उत्तरक्रिया. [सं. अंत्य+इष्टि]

अंतोरिक–अंतौर—न. अंतःपुर; राणीवसा. 'तैसीं दीसतीं अंतौरें। यादवांचीं।' –शिशु ५५. –पंच ३.७. अंतुरी पहा. [सं. अन्तःपुर; प्रा. अंतेउर]

अंतोर–री—न.स्त्री. अंतुरी पहा. 'आपुलें लपविलें अंतौर। मेरू पर्वतीं॥' –शिशु २४०; 'हिरोनियां देवांचीं अंतोर।' –एभा ४.२२७.

अंतौतें—शअ. आंत, मध्यें. अतौत पहा. [सं. अंतर् द्वि.]

अंत्य—वि. शेवटचा; अंतिम; चरम, अखेरचा. –न. संख्यास्थानसंज्ञांतील 'जलधी' च्या पुढील व 'मध्य' च्या मागील एक संज्ञा; एक हजार महापद्म. –पु महार. 'अंत्यु राणिवे बैसविला।' –ज्ञा १३.७२४. [सं] **०कर्म–क्रिया**–न स्त्री. उत्तरक्रिया; अंतेष्ट पहा. **०गोदान**–न. १ पापक्षालनार्थ अनुष्ठान करतांना त्यांतील प्रधान कर्म आटोपल्यानंतर लागलीच करावयाचें गाईचें दान. २ मरणपूर्वी ब्राह्मणास केलेलें गाईचें दान. **०धन–पद**–न. गणित किंवा भूमितिश्रेढींतील शेवटची संख्या. **०नाडी**–स्त्री. (ज्यो.) अश्विनी, भरणी, कृत्तिका इत्यादि २७ नक्षत्रांना आद्यनाडी, मध्यनाडी व अंत्यनाडी अशा अनुक्रमें संज्ञा आहेत, त्यांपैकीं कृत्तिका वगैरे नक्षत्रास लागणारी संज्ञा. नाडी पहा.

अंत्यज—पु. शूद्र जातीच्या खालील महार, मांग, चांभार इ० अतिशूद्र; धोबी, चांभार, बुरूड, नट, कोळी, मेद (पारधी)

शरीर पापपुण्य भोगतें, असा समज आहे; लिंग देह. 'अंगुष्ठमात्र पुरुषाप्रति यम पाशेंकरूनि आकर्षी।' –मोवन १३.५८.

अंगुष्ठाण-स्तन-स्तान-स्थान—न. १ बोटाला सुई टोचूं नये म्हणून व सुईस मागून नेट मिळावा म्हणून तर्जनींत घालावयाचें एक धातूचें (लोखंडी, पितळी) टोपण. २ अंगठी. [सं. अंगुली+स्थान किंवा त्राण; फा. अंगुश्तदान; अंगुश्तरी=अंगठी]

अंगुस्सा—पु. (माण.) फडकें; चिंधी; अंगवस्त्र; अंगोछा. अंगछा पहा. 'त्या अंगुशांत भाकरी बांध.' [सं. अंग+वस्त्र]

अंगुस्ती—स्त्री. (गो.) दुःख; चिंता; काळजी. 'तू देवाची अंगुस्ती साचारू।' –ख्रि १.१.१४. [पोर्तु. अंगुस्तिआ; इं. अँग्विश]

अंगुस्ती—स्त्री. १ चिळस, भीति वगैरेमुळें किंवा ताप येण्यापूर्वी अंग कसकसणें, शहारे येणें; अंगावरील कांटा; शिरशिरी (क्रि० येणें, वाटणें). २ खांदे उडविणें; शरीरावयवाची एकदम हालचाल. (क्रि० देणें). [सं. अंग+कस्ता–स्ती=विचलन]

अंगुस्ती—स्त्री. रखेली; राख. [अंग+स्त्री]

अंगुळु-ळू—वि. (नेदभाषा) दहा संख्या (वोटें दहा असतात यावरून संकेत) 'मुळु उदानु अंगुळु ऐसी। नेदभाषा सांगितली त्यासी।' –भवि ४२.४५. [सं. अंगुलि]

अंगून—शअ. १ च्या बाजूनें; च्यावर अथवा खालीं, वरून अथवा खालून (रस्ता, भित्त इ०). 'वर जी टेकडी ती वरचे अंगून चिरेबंदी दगडांनीं बांधून काढिली आहे.' –विवि ८.१.१०. २ एखाद्यापासून, करितां, कडून, तर्फे (निरोप, विनंति). [अंग+ऊन, हून]

अंगेज-जणी, अंगेजी—पुस्त्री. शौर्य; धाडस; उठावणी; पराक्रम. 'जनरलांनीं अंगेज केला आहे.' –राज १२ ९७. 'स्वामी हिंदुराज्यकार्यधुरंधर राज्याभिवृद्धिकर्ते, तुम्हांलोकांचे आंगेजगीनें सिद्धीस पावले.' –मराआ ७. [फा. अंगेझ्–अंगेख्तन्=उठावणी करणें; सं. अंग]

अंगेजणें—उक्रि. (काव्य) अंगीकारणें पहा. [अंग. रागेजणेंप्रमाणें घटना]

अंगेठी—स्त्री. शरीरयष्टि; अंगकाठी. 'लिंग का प्रतिमा दिर्ठी। देखतखेंवों अंगेठी।' –ज्ञा १७.२०४. [सं. अंग+यष्टि]

अंगोगडी-ड्या—आंगोगडी–ड्या पहा.

अंगोछा-च्छा—पु. अंग पुसण्याचा पंचा; अंगवस्त्र; उपवस्त्र. अंगछा पहा.

अंगोठा—पु. १ अंगठा पहा. २ (ना.) अंगठ्याचा छाप, शिक्का. [अंगठा]

अंगोठा—पु. (ना.) अंगकाठी; शरीरयष्टि; अंगलोट–वटा पहा.

अंगोवांगीं—क्रिवि. १ स्वतःस, जातीनें. 'येथोनि निघावें वेगीं। एकलाचि आंगोवांगीं।' –एभा ७.२९. २ (ल.) सहज, अनायासें. 'ऐसे योगबळें योगी। माया जिणती अंगोवांगी।' –एभा ६. ३८५. [अंग+वा+अंग, किंवा अंग द्वि. सांगोवांगीं प्रमाणें]

अंगोशा-शी—पुस्त्री. (व.) पंचा; धोतर; अंगवस्त्र; अंगोछा; अंगछा पहा.

अंगोस्तर, अंगोस्ती, अंगोस्त्र अंगोस्त्री,—नस्त्री. अंगवस्त्र; उपरणें. 'गांडीस धोतर। येक अंगोस्तर' –रामदासी ९६. 'मग स्नान करूनि अंगोस्त्र बरवें।' –दावि १६४; 'सुचवोनि अंगोस्त्री बांधविलें।' –दावि २५३. [सं. अंग+वस्त्र]

अंगोस्ती—स्त्री. अंगावरील शाहारे; कांटा. अंगुस्ती पहा. (क्रि० येणें, वाटणें).

अंगोळिका, अंगोळी-गोळी—स्त्री. बोट (हाताचें, पायाचें), करंगळी; अंगुलि पहा. (अव.) अंगोळिया, अंगोळिका. 'अंगोळीस जडीत घालुनि मुद्री। कानास कांडाळिते।' –विरस ३१. 'सुरेख सरळ अंगोळिका। नखें जैशी चंद्ररेखा।' –व्यं ५५. 'सुनील नभाचिया कळिका। तैशा आंगोळिया देखा' वरी नखें त्या चंद्ररेखा।' –एहस्व १.२४.

अंगौन-आंगौन—वि. अंगासंबंधी, अंगावरला. –न. धोतर. 'आंगौनि ऐकुणा झोलु। फेडितांचि तो बाहिरलु।' –अमृ २.४८. [अंग]

अंग्या—पु. अंगी, अंगरखा पहा.

अंग्रेज-जी—अंगरेज-जी पहा.

अंघूळ-घोळ-घोळी—स्त्री. आंघोळ; स्नान. (क्रि० घालणें, करणें). 'आंघोळी देवें पूजा सारिली।' –शिशु ५७६. 'त्या मिळोन एके वेळीं। जाती उदकीं आंघोळी।' –कथा १.५.६. [सं. अंग+का. होळणें=धुणें; प्रा. अंगोहलि=खांद्यावरून स्नान]

अंघ्र-घ्री—पु. पाय. 'अर्पिलीं अंघ्रियुगुलीं। विश्वरूपाच्या॥' –ज्ञा ११.७०८. 'विलोकीं अग्रजाचें अंघ्र।' –मुवन १.१०५. [सं.]

अंचल-ळ—पु.स्त्री. अचळ पहा. १ वस्त्राचा शेवट, टोंक; पदर. 'मुखकमल तियेचें अंचलें माय झांकी।' –सारुह २.९१. २ पडदा. 'ते अहंकाराचा अंचळु लोटी।' –माज्ञा २.१३२. ३ दशी; मागावरील कापड विणून झाल्यानंतर शेवटास उरलेले उभे दोर. अंचळी पहा. पुल्लिंगी. अव. शब्द वापरतात. ४ योगी जे एक प्रकारचें वस्त्र वापरतात तें. ५ जनावराचें थान; स्तन; अंचूळ [सं. अंचल] ०फेडणें–(व.) लुगड्याच्या पदरानें दृष्ट काढणें. 'अंचल फेडल्यानें डोळ्याला बरें वाटेल.'

अंचवण—न. १ जेवणानंतरचें तोंड हात धुणें. (क्रि० करणें). २ (गो.) आचमन. ३ (ल.) त्याग. [सं. आचमन]

अंचवणें—अक्रि १ जेवणानंतरचें तोंड हात धुणें. 'जेवावयास पंचामृत अंचवावयास खारें पाणी.' २ अंतरणें; मुकणें; सोडणें. अंचवणें हें भोजनोत्तर करावयाचें असतें त्यापुढें भोजन करणें शक्य नसतें यावरून प्राणास, धनास अंचवणें=जिवास, धनास मुकणें. 'संसारसुखास अहल्या आंचवली पोरवयांत.' –विक १६. ३ (गो.) आचमन करणें. –उक्रि. दुसऱ्यांचें तोंड हात धुणें. [सं. आचमन; हिं. अंचवना, अचाना; बं. आँचान]

अंचळी—स्त्री. दशी; वस्त्राच्या शेवटास असणारीं दोऱ्यांचीं टोंकें. अंचल-ळ ३ पहा. **आंचळ्या काढणें**–पदर लावणें. [सं. अंचल]

अंचित—वि. १ पूजलेला, मान दिलेला; आदरलेला; [सं.] **०करण**–न. (नृत्य) बोटें व्यावृत्त व परिवृत्त करून मग डावा हात छातीसमोर वांकडा करून नाकाच्या शेंडयासमोर ठेवणें. **०पाद**–न. टांच जमिनीला टेंकवून पाऊल सर्व उचलून बोटें वांकविणें. **०बाहु**–पु. (नृत्य) छातीवरील हात थोडा छातीच्या पुढें धरणें. **०मान**–स्त्री. (नृत्य) शरीराचा तोल पुढें जाऊं लागला असतां तो सांभाळण्यासाठीं मान मागें घेणें. **०शीर्ष**–न. (नृत्य) डोकें किंचित एका बाजूला खांद्यावर वांकविणें (रोग, मूर्च्छा इ० गोष्टी दर्शविण्याचा अभिनय). [सं.]

अंची—स्त्री. १ डाक, टपाल; पेणें (टपालाचा घोडा बदलण्याची जागा व मुक्काम). 'सरकारांतून पत्रें आंचीवर जीं जीं आलीं तीं तीं नवाब बहादूर यांस श्रवण करून पत्राचे भाव समजाऊन, उत्तर निरोत्तरें आलीं. त्या अन्वयें आंचीवर लिहित गेलों.' –राज १०.१९७. –ख३६४०. २ हरकारा. [सं. अंचि (अंचगतौ). ते. अंचे, अचिय=टपाल; घोडा बदलण्याची जागा; जासूद. का. अंचे=टपालरस्ता.] **०वाला**–पु. टपाल खात्याचा अधिकारी. (का.) अंचेदार.

अंचेलिया—पु. गुरांचा एक रोग. –शे ६.९६ नामजोशी.

अंज, अंजन—पु. (शाप.) एक धातु. (इं.) अँटिमनी; याचा उपयोग छापावयाचे खिळे तयार करावयाच्या धातूमध्यें मिसळण्यासाठीं करतात. तसेंच सुरम्याकडेहि करतात. म्हणून याला सुरम्याची धातु असेंहि नांव आहे. –ज्ञाको अं १ याच्यापासून अंजत्रिगंधकिद, अंजत्रिहरिद, अंजद्राक्षित इ० संयुक्त द्रव्यें होतात. –ज्ञाको अं ४६. [सं. अंज्]

अंजन—न. १ डोळ्यांत घालावयाचें काजळ, सुरमा. 'न लेति जे लोचन अंजनाला।' –सारुह २.९६. 'माझी वेणी आपुल्या हातें। गुंफिली रात्रीं कृष्णनाथें। अंजन सोगयाचें स्वहस्तें। कंसांतकें रेखिलें॥' –ह २७.२२. २ एक औषधी द्रव्य. यानें नेत्रविकार, शैत्य इ० रोग बरे होतात. ३ विशिष्ट प्रकारचें काजळ; हें डोळ्यांत घातलें असतां भूमिगत द्रव्य दिसतें. यानें इच्छित वस्तु दिसणें इ० अतींद्रियज्ञान होतें. 'जैसें डोळयां अंजन भेटे।, –ज्ञा १.२३. 'जैसें नेत्रीं घातलितां अंजन। पडे दृष्टीस निधान।' –दा ५.१.३८. ४ (ल.) गुरुकृपा, प्रसाद; ज्ञानदृष्टि प्राप्त होण्याचें साधन; ईश्वरीप्रसाद. 'गुरुअंजनेवीण तें (ब्रह्म) आकळेना।' –राम १४१. ५ (ल.) शुद्धीवर आणणारी गोष्ट; शहाणपणाचें औषध. 'डोळ्यांना चुरचुरूं न देतां पुरुषांच्या डोळ्यांत क्षणक्षणीत अंजन घालण्याची युक्ति बायकांनाच साधते.' –मानाप ६९. **०शलाका**–स्त्री. एक औषधी सळई. त्रिफळाचा रस (काढा), माक्याचा रस, सुंठीचा काढा, तूप, गोमूत्र, मध व शेळीचें दूध यांपैकीं प्रत्येकांत शिसें तापवून पातळ करून सतत सात वेळ बुडवावें. नंतर त्याची सळई करावी ती नेत्ररोगांचा नाश करते. –योर ५५१. **०हारी**–पु. (नकळत दुसऱ्याच्या डोळ्यांतील अंजन काढून घेणारा) अट्टल चोर, सोदा, भामटा.

अंजन-नी—स्त्री. एक इमारती लांकूड. हें दहा बारा हात उंचीचें असून त्यास डहाळ्याच्या अंगास लागून जांभळीं फुलें व फळें येतात; पानांपासून पिवळा रंग होतो. –शे ११.७०. –वगु १.८. [सं.]

अंजनी—वि. एकरंगी आंगावर काळे, निळे, तांबडे किंवा पिवळे ठिपके असणारा (घोडा.) उदा० काळांजनी, रक्तांजनी. –अश्वप ९४. [सं. अंजन]

अंज-जु-मान—स्त्री. १ सभा, संस्था, समिती. २ पारशांमध्यें धर्माचारांसंबंधीं वादांचा निर्णय सांगणारी संस्था. [फा. अंजुमन्]

अंजलि—स्त्री. १ ओंजळ; अंजळी; दोन्ही तळहात एकत्र जोडून केलेली पोकळी (नमस्कारासाठीं, किंवा कांहीं पदार्थ घेण्यासाठीं). २ नमस्काराची एक पद्धत; अभिवादन. ३ ओंजळभर कांहीं पदार्थ (फुलें, धान्य, इ०). ४ एक माप (ओंजळींत राहाणाऱ्या धान्याचें); कुडव. [सं.] **०जोडणें–बांधणें**–दोन्ही तळहात एकमेकांस जोडणें (नमस्कार–प्रार्थनेसाठीं); हात जोडणें; प्रार्थना करणें. 'अंजलि बांधोनि म्हणे जरि अभय असेल तरि निवेदीन।' –मोवन ११.११३. **०पुट**–अंजली १ पहा. **०संयुक्तहस्त**–पु. (नृत्य) हातांचीं बोटें सरळ पसरून एकमेकांस लावणें व आंगठा थोडा आंखडणें नंतर दोन्ही हातांच्या करंगळीकडील बाजू एकमेकांस जुळविणें.

अंजान—वि. (हिं.) अज्ञानी; गैरमाहीत; नेणता; अडाणी. [सं. अज्ञान]

अंजाम—पु. परिणाम; शेवट. 'मर्जी हजरतीची खुष राहिली म्हणजे कृतकृत्य। अंज्याम कसा आहे. इकडे कोणी

ज्याला ज्या गोष्टीचा उपयोग नाहीं ती त्याला देणें. (वाप्र.) अंधा देतां आमंत्रण सवेंचि येती दोघेजण (=आंधळ्याला बोलविलें असतां हातीं धरणारा माणूस व आंधळा असे दोघे येतात).

अंधक—वि. १ अंधुक; कमी प्रकाशाचा (उजेड, प्रकाश अथवा चकचकीत वस्तु). २ फिक्का, विन तकतकीचा; निस्तेज, (रंग, रंगीत वस्तु) मंद. [सं.]

अंधक, अंधकअंधक—क्रिवि. १ तुरळकतुरळक; अस्पष्ट; अव्यक्त; मिणमिणीत (दिवा, वस्तु) (क्रि० दिसणें). २ धुकट, धुंद (हवा, वातावरण).

अंधकणें—अक्रि. अंधक होणें; झाकुळणें; आवरण पडणें. निस्तेज होणें; मावळणें. 'तारा झमकत होता। अंधकळा।' –ऐपो ९२. [अंधक]

अंधकार—पु (अप.) अंधःकार. १ अंधार; काळोखी; काळोख; प्रकाशाभाव. 'सूर्य देऊनि घेतला अंधकार।' –ह ३. २०३. २ (ल.) बुद्धिमांद्य; अज्ञान. [सं.]

अंधकूप—पु. १ गवत किंवा झाडझुडप यांमुळें जिचें तोंड दिसत नाहीं अशी विहीर; अंधारी विहीर. 'मग अंधकूप आथावा।' –ज्ञा १.२३९. –एभा ७.४५२. २ एक नरक. [सं.]

अंधतम—पु. १ जास्त अंधार; आंधळें करण्याइतका काळोख. २ (ल.) आध्यात्मिक अज्ञानांधकार; अध्यात्मज्ञानाचा अभाव. ३ एक नरक. 'तेंगें अकर्म कर्मवशें अंधतमीं तो प्रवेशे।' –एभा १०.५९०. –वि. अत्यंत अंधळा. [सं.]

अंधतामिस्र—न. एक नरक. [सं.]

अंधत्व—न. आंधळेपणा; दृष्टिहीनता; चक्षुरिंद्रियाचा अभाव. 'प्रळयाग्नीच्या ज्वाळा। अंधत्व केवि पावल्या॥' [सं.]

अंधपरंपरा—स्त्री. १ आंधळ्यांची ओळ, माळ; एका आंधळ्यापासून दुसऱ्या अंधळ्यास प्राप्त होऊन चालत आलेली रीत वगैरे. २ एकाचें पाहून दुसऱ्यानें, त्याचें पाहून तिसऱ्यानें, याप्रमाणें कोणतीहि गोष्ट करण्याचा परिपाठ; गतानुगतिकत्व; खरें खोटें, फायदा तोटा न पाहतां वाडवडील किंवा समाज जसें करीत आला तसें करणें (यावरून अंधपरंपरान्याय निघाला आहे). 'लोकांची सामान्यतः प्रवृत्ति अशी आढळते कीं जो समज एकदां होऊन बसला तो पीछेसी आयी या न्यायानें केवळ अंधपरंपरेनें पुढें चालवावयाचा.' –नि [सं.]

अंधबंध—न. अंधपटल. –हंको.

अंधविलोकन—न. आंधळ्याचें पाहणें (यावरून अशक्य गोष्टीविषयीं योजतात–जसें खपुष्प); असंभाव्य गोष्ट. [सं.]

अंधळा—वि. १ ज्याला दिसत नाहीं असा (मनुष्य, डोळा); अंध पहा. २ (ल.) अज्ञानी; अजाणता; चुकणारा; विवेकशून्य; अविचारी; गोंधळघा; अव्यवस्थित (व्यवहार), बेकायदेशीर (राज्य). [सं. अंध] **म्ह०** अंधळा सांगे गोष्टी, बहिरा गाढव पिटी; अंधळ्या मनीं आयतवार (सोमवार), बहिरा (किंवा पांगळा) म्हणतो माझी बायको गर्भार. या (परस्पर गैरसमज दाखविणाऱ्या) व अशा पुष्कळ म्हणी आहेत. अंधळ्याच्या गाई देव राखतो=ईश्वर गरिबा–दुबळ्याची काळजी घेतो. अंधळ्यानें दळावें कुत्र्यानें पीठ खावें किंवा अंधळें दळतें कुत्रें पीठ खातें=एकानें कष्ट करावे व भलत्यानेंच त्याचा फायदा घ्यावा अशी बेबंदशाही, अंदाधुंदी. 'यास्तव आमचें सरकारास रयतांच्या वर्तीनें असें निक्षून सांगणें आहे कीं आंधळें दळतें आणि कुत्रें पीठ खातें असला प्रकार यापुढें चालावयाचा नाहीं.' –सासं २.३१६. अंधळ्यापुढें नाच बहिऱ्यापुढें गायन=ज्याला ज्याची किंमत नाहीं त्याला ती वस्तु देणगी देणें. (गो.) 'आंधळ्यासरी नाजून आनी भैऱ्यासरी गावन उपयोग कितें?' अंधळ्या बहिऱ्याची गांठ=प्रत्येक जण दुसऱ्याबद्दल गैरसमज करून घेतो अशा दोन माणसांची भेट. २ परस्परांना मदत करण्यास असमर्थ अशांची गांठ. अंधळा मागतो एक डोळा देव देतो दोन(देव अनुकूल झालें असतां कधीं कधीं आपल्या इच्छेपेक्षां अधिकहि देतें यावरून)=अपेक्षेपेक्षां अधिक मिळणें. अंधळ्यास अंधळा वाट दाखवितो=एक अज्ञानी दुसऱ्या अज्ञानी माणसास उपदेश करतो, मार्गदर्शक होतो (म्हणजे दोघेहि फसतात). अंधळा रोजगार आणि मिंधा संसार=अव्यवस्थितपणामुळें दुसऱ्याचा पगडा स्वतःवर बसणें. **–ळ्याचा रस्ता–वाट–मार्ग**–पु. सरळ; रुंद व मोकळा रस्ता; आंधळ्याला अडचणीशिवाय जातां येईल असा हमरस्ता. **०कारभार**–पु. अंदाधुंदीनें चालविलेलें राज्य; बेबंदशाही; अव्यवस्थित काम **०डोळा**–पु. अंधळा माणूस (विशेषतः एका डोळ्यानें) **०तिंधळा–तिरळा**–वि. (कों.) १ अंडगडी; पोटगडी; पित्त्या २ (इटीदांडूच्या खेळांतील) दुश्या; दोन्ही बाजूंनीं खेळणारा रहाट्या. ३ (ल.) दोहीं दगडींवर हात टेकणारा; दुरोखी **०नारळ**–पु. कोंवळा नारळ; शहाळें; ज्यांत नुसतें पाणीच असल्यामुळें वाजत नाहीं असा. आडसर पहा. **–ळ्याची काठी**–१ अंधळा, अशक्त, निराश्रित यांचा पुढारी अथवा आश्रयदाता अंधळ्याला आधारभूत गोष्ट (अंधळ्याला मुख्य आधार त्याच्या काठीचा असतो यावरून). 'या अंधाबुद्धाची राहों देतास एक जरि यष्टी। भीमा, मी मानस तरि होऊं देत्यें कशास बहु कष्टी।' –मोस्त्री ३.४६. २ म्हाताऱ्या आईबापांचा एकुलता एक मुलगा. **–ळ्याची माळ–माळका**–स्त्री. १ अंधळ्या लोकांचं माळ, रांग. २ (ल.) अज्ञानी व मूर्ख लोकांची परंपरा **–ळ्याची मिठी**–स्त्री. घट्ट मिठी; चिकटणें. **–ळ्यांत काणा राजा**–जेथें सर्वच अडाणी असतात तेथें थोडयाशा शहाण्याः

तेज पडतें. **-ळ्यासी जन सारेंचि आंधळें**-जसें आपण असतों तसेंच जग आपल्याला दिसतें.

अंधळी कोशिंबीर—स्त्री. एकानें डोळे मिटून इतरांना धरण्याचा मुलांचा एक खेळ. वि. का. राजवाडे यांच्या मतें अंधा कोशिंबी नांवाचा खेळ, कौशांबी नगरांत खेळत. -भाअ १८३२. (र हा बंगालींत षष्ठीचा प्रत्यय आहे, जसें:-आमार देश=आमचा देश, तसें-कौशांबीर=कौशांबीचा). **०खेळणें** न्यायनीति सोडून वागणें. व्यवहाराकडे दुर्लक्ष करणें 'इकडे अशी अंधळीकोशिंबीर खेळतांना पाहिलें कीं अंगाची अशी आग होते.' -प्रेमसंन्यास ३१.

अंधळी गाय—स्त्री. गरीब, अशक्त, निरुपद्रवी माणूस. **म्ह०** अधळ्या गाईत लंगडी गाय प्रधान=गांवढळ माणसांमध्यें शेंदाड शिपाई किंवा तिस्मारखान; ओसाड रानांत एरंड बळी (अडाणी लोकांना कोणीहि शहाणपण शिकवावें याअर्थी)

अंधळी वेळ—स्त्री. (फलज्यो.) ज्या वेळीं हरवलेली वस्तु सांपडत नाहीं ती वाईट वेळ. अंधळें नक्षत्र पहा.

अंधळें—वि. दृष्टिहीन. **०गारुड**-न. १ लबाडी; लुच्चेगिरी; अंतरमंतर. २ गुप्त मसलत; छक्केंजे; कट. 'दुसरे कांहीं अंधळेंगारूड असलें तरी त्याचा थांग लागूं देणारा नाहीं.'-कफा ६. **०तिरळें**-न. अंधळा, तिरळा घेऊन खेळ खेळणें. अंधळातिरळा पहा. **०नक्षत्र**-न. ज्या नक्षत्रावर हरवलेली वस्तु पुष्कळ खटपट करूनहि सांपडत नाहीं तें नक्षत्र. अंध ४ पहा. (क्रि० लागणें). **०वरण**-न. ज्या वरणांत मुळींच डोळ शिल्लक राहिले नाहींत असें वरण. ह्याच्या उलट डोळस वरण.

अंधळ्या—स्त्रीअव. सूर्य चित्रा नक्षत्राजवळ असणें; त्यावेळीं पडणारा पाऊस.

अंधाई—स्त्री. १ अंधार; काळोख. २ (ल.) अंदाधुंदी; बखेडा. [हिं.]

अंधाटी—स्त्री. १ एखाद्याच्या सरळ बोलण्यावर दुसऱ्यानें घेतलेला आक्षेप; अडफाटा. २ असल्या आक्षेपानीं स्वतःचें मत सिद्ध करण्याचा धरलेला हट्ट. (क्रि० घेणें; फोडणें; काढणें) ३ बधाटी पहा. हा शब्द कधीं कधीं बेधाटीशीं जोडून येतो. [बेंधाटी द्वि.]

अंधाधुंद-ध, अंदाधुंदी-धी—स्त्री. गोंधळ; घोंटाळा अराजकता; बेंडाळी; अव्यवस्था (राज्य, घर, कामकाज इ० मध्यें). -वि. अव्यवस्थित; अनियमित; बेबंदी (कारभार, राज्यतंत्र). [हिं. अंधा+धुंद]

अंधार-रा—पु. १ काळोख; अंधकार. 'खोलींत अंधार पडिला फार । खालीं न दिसे अणुमात्र ।' -संवि १.१३४. 'अंधार हा चोरास पथ्य.' २ (ल.) अडाणीपणा; अज्ञान. 'जाणपणें घे अंधार । तो एक पढतमूर्ख ।' -दा २.१०.२७. ४ (ल.) अन्याय; उपद्रव; अंदाधुंदी; घोंटाळा; बेबंदशाही. [सं. अंधकार; प्रा. अंधार] **०अंधारीं उजाडीं** (सांगणें, शिकविणें)-क्रिवि. गुप्त रीतीनें व उघड; सरळ; स्पष्ट शब्दांत व सुचवून; खाजगी रीतीनें व चारचौघांत; अनेक मार्गांनीं व रीतींनीं. **०कोठडी**-स्त्री. एकांतवासाची शिक्षा देण्याकरितां चोहोंकडून बंद असलेलें व फक्त हवा येण्याकरितां झरोका असलेलें तळघर, खोली. २ (ल.) एकांतवासाची शिक्षा. (क्रि० ठरणें; ठरवणें; देणें). **०कोंडी-खण-खणी, अंधारी कोठडी**-स्त्री. अंधारकोठडी; काळोखी खोली; तळघर; तुरुंग. **०खोली**-स्त्री. १ (फोटो) (इं.) डार्क रूम; फोटोग्राफीसाठीं लागणारी बिन उजेडाची खोली. २ अंधारकोठडी पहा. **०गडत**-न. अतिशय काळोख (क्रि० पडणें; येणें; चढणें; होणें). अंधार गडप-ब असेंहि शब्द वापरतात. -क्रिवि. दाट काळोखांत. [सं. अंधकार+गर्त]

अंधारणें—अक्रि. १ जमून येणें व काळोख करणें (अभ्रें, पाऊस). 'पाऊस अंधारला' 'अभाळ अंधारलें' **मेघ अंधारले.**' [सं. अंधकार] २ (अकर्तृक) काळोखी येणें (अभ्रामुळें), अंधार पडणें; रात्र्याकाळ होणें. **अंधारून यणें**-असाहि प्रयोग वरील अर्थी करतात. (गो.) पावस सामकॉ आंधारून आयला.' 'सरीवरी येति महासरीही । अंधारुनी येइ दिसे न कांहीं ।' -पाअक ९९.

अंधारी—स्त्री. १ काळ्याकुट्ट ढगांमुळें पडलेला अंधार. २ घोडा किंवा रहाटाचा, घाण्याचा बैल यांच्या डोळ्यांस लावण्याची झांपड. 'अंधारी भरगच्चीची निमजरी.' -ऐरापुप्र ९.५१३. ३ पित्तज्वरामानें डोळ्यांपुढें एकाएकीं भासणारा अंधार किंवा चक्कर; मूर्च्छा; तसेंच उतारवयामुळें व (ल.) आळ्यनेमुळें डोळ्यांवर येणारी धुंदी. (क्रि० येणें). (गो.) 'ताज्या डोळ्याकडेन अंधारी आयली.'

अंधारी—स्त्री. १ रहाटगाडग्याच्या चाकाच्या दोन दात्यांमधील जागा; दंतांतर; खांचा. २ कडीपाटाच्या दोन कडयांमधील जागा झांकण्याकरितां बसविलेली आडवी फळी; खांडे व दाडे यांच्यामधील फळी. ३ लांकडी जिन्याच्या दोन पायऱ्यांमध्यें मागच्या बाजूस असलेली पोकळ जागा बंद करण्याकरितां बसवावयाची फळी. 'अंधारी उंच ठेवूं नका.' ४ तुरुंग; अंधारकोठडी; तळघर. ५ अंधार; काळोख; (क्रि० येणें; पडणें). ६ (ल.) अज्ञान. 'तेथें अंधारी गेली। मग बुद्धी मावळली।' -परमा १०.११. ७ बळद; भिंतींत काढलेलें कपाट; तळघर. **०कुंधारीं-कोंधारीं**-क्रिवि. १ काळोखांत; अंधारांत; सांधीकोंदींत; कोन्याकोपऱ्यांत. २ (ल.) गुप्तपणें; चोरून; आडून; (अंधारी द्वि.). **०रात्र**-स्त्री. वद्य पक्षांतील रात्र; अंधारानें युक्त असलेली रात्र; काळोखी रात्र.

अंधारूपण—न. अध्यारु-पारशांचा एक धार्मिक हुद्दा व त्याचें काम; अंदाळ, मोबेद यांचें काम. [अध्याचार्य-अध्यार्य-अधि+आर्य]

अंधारें—न. १ अंधार; काळोखी. 'तुझीयेन अभयंकरें। अनावर हे माया वोसरे । जैसें सूर्यप्रकाशें अंधारें । पळोन जाये ॥ ' –दा १.४.९. २ रातांधळे. ' गिरी विरी आणि अंधारें ' –दा ३.६.२६. [अंधार]

अंधी—स्त्री. (हिं.) १ काळोखी; अभाळ भरून येणें. २ तुफान; वादळ; जोळ. (क्रि० होणें; उठणें; बसणें; जाणें). [सं. अंध; हिं. आंधी]

अंधु—पु. विहीर; कूप. ' सिंधु अगस्त्याऽचमला न पुरे, पुरतील काय मग अंधु। ' –मोद्रोण २.८५. [सं. अंधस्=कूप]

अंधुक-धूक—क्रिवि. मंद; अंधक पहा.

अंधुककाय—स्त्री. (गो.) परोत्कर्षासहिष्णुता.

अंधुको—वि. (गो.) दुसऱ्याचा उत्कर्ष ज्याला पाहवत नाहीं असा; मत्सरी. [सं. अंधक]

अंधुळी—स्त्री. सावली; छाया. –शर.

अंधेर—अंधार पहा. [सं. अंधकार; प्रा. अंधार; हिं. अंधेर –रा] **०नगरी**–स्त्री. (अन्याय, जुल्म–जबरदस्ती जेथें नेहमीं चालते असें स्थळ) अव्यवस्थितपणाचा कारभार; बेबंदशाही. **म्ह०** अंधेरनगरी व झोटिंग पादशाही. ' आजवरचा अंधेरनगरी व झोटिंग पाच्छाहीच्या पद्धतीचा कारभार यापुढें मुळींच चालूं देतां कामा नये. ' –सामं २.२३८.

अंधेरी—अंधारी पहा.

अंपायर—पु. खेळातील निर्णय देणारा माणूस; मध्यस्थ; पंच; न्यायस्थ. ' पण आमच्या अंपायरनें मला नॉटआऊट दिल्यावर मी खेळलों यांत मला गुन्हा वाटत नाहीं. ' –पुदे ८३. [इं.]

अंब—स्त्री. आंब अर्थ १ पहा. [सं. अम्ल]

अंब—न. पाणी; अंबु पहा. [सं. अंबु]

अंब—उद्गा. राजपत्नी, गुरुपत्नी, मित्रपत्नी, साध्वी, सासू व आई या सर्वांस आदरार्थी संबोधन [सं. अंबा]

अंबकटी-काठी—स्त्री. कच्च्या आंब्याची वाळविलेली फोड; अंबोशी; हिचा उपयोग चिंचेऐवजी कालवणांत करितात **आंबकटी** पहा. [सं. आम्र+काष्ठ; म. अंबा+काटी]

अंबट—वि. १ आंबट; खट्टा; आम्ल; चवीला, वासाला **दिरवा आंबा,** चिंच, लिंबू यांच्यासारखा. २ (ल.) निरुत्साही: **वाईट; खिन्न.** [सं. अम्ल; प्रा. अंब; अम्लवत् अम्ल=आंब+ट (लघुन्वदर्शक)] ' अंबटतोंड ' **०करणें**–(ल.) निराश करणें; **होणें. ०होणें–होऊन येणें–पडणें**–निराश होणें; हताश होणें. **०मागणें**–दुसऱ्याचें भांडण स्वत:वर ओढून घेणें. **०ओलें**–वि. अर्धवट ओलसर; दमट; किंचित् ओलें. **०चिंबट**– अंबट द्वि. अंबट, तेलकट इ० अपथ्यकारक; विवक्षित मधुरपणा नसलेला. **०ढाण-ढस**- (व.) अंबट डहन; अतिशय अंबट (ताक, दहीं, चिंच इ०); ठसका लागण्याइतकें आंबट. [अंबट+ढाण, ढस= अतिशयार्थी (ध्वनिवाचक), सं. ध्वनित; प्रा. ढणिय] **०तोंड**– न. निराश; खिन्नमुद्रा, (क्रि० करणें; होणें). ' महात्मा गांधींच्या स्वातंत्र्यकूचाच्या बातम्या...नोकरशाहीला आबट तोंड करून वाचाव्या लागतात.'–केसरी २५.३.३. **०निंबू**–न. कागदी लिंबू. **०मिसींग** (लावप)–(गो.) १ तिखटमीठ लावणें. २ बहारीनें वर्णन करणें. ' तॉ गॅलें कितेंय सांगता तें आंबट मिसींग लावून सांगप ' **०वणी**–न (निंदायुक्त) अंबट पाणी. आमटी. [अंबट+वन=पाणी] **०वाणा**–वि. १ अतिशय आंबट. २ (ल.) निराश केलेला; खट्टू; रुसलेला; खिजलेला. [अंबट+वर्ण] **०वेल**–स्त्री. अंबोशीची वेल; हिचा रस अंबट असतो, वेलाचा रंग पांढरा, पानें जाड, असतात, ही सारक व अग्निदीपक आहे; कडमवेल. –शे ६.२६. [सं. आम्लपर्णी; अंबष्ठवल्ली]. **०शोक**–पु. नसती आवड; भलतीच चैन. 'त्याचा उद्योग म्हणजे निव्वळ आंबट शोक ' –तोबं २२१. **०शोकी**–वि. भलतीच चैन करणारा. ' राजेश्री मोठे आंबटशोकी खरे.' **०वरण**–न चिंचगुळाचें, फोडणीचें पातळ वरण (साध्या वरणाच्या उलट); मंदोसरी. ' या नाटकांत सार कळेना का अंबट वरण कळेना ! ' –नाकु ३.७०. **०पण**–न. (व.) चिंच, आमसुल वगैरे अंबट पदार्थ. ' वरणांत आवटपण टाक ' **०सर**–वि. थोडेसें अंबट (ताक वगैरे). **चईवरून अंबट होणें**–थोडक्यासाठीं रागावून मनुष्यास तोडणें.

अंबट—स्त्री. एक वनस्पति. (इं.) ऍबेलिया तेतान्द्रा.

अंबटणें—अक्रि. अंबट होणें. [अंबट]

अंबटा—वि. अतिशय अंबट (फळ वगैरे). [अंबट]

अंबटाई—स्त्री. आंबटपणा.

अंबटाण—स्त्री. १ अंबूस वास. २ (गो.) टरफलें काढलेलीं चिंचेचीं फळें; चिंच. ३ पदार्थांतील अंबट रस. ४ (कु.) अंबटपणा. ' अनूं आबटाण सवाय आसा. '

अंबटावणें-विणें—अक्रि. आंबट पदार्थ खाल्ल्यामुळें आंबणें (दांत, ओंठ वगैरे). –उक्रि. हवेंत उघडें ठेवून आंबविणें (पाणी घातलेलें पीठ वगैरे).

अंबटी—स्त्री. १ एक झाड, हें ओलसर मळई जमिनींत उन्हाळ्यांत रुजतें. यास अंबोशीहि म्हणतात. याचीं पानें चिंचेप्रमाणें अंबट, फळें भाल्यासारखीं टोंकदार व लांबट. २ एक वनस्पति; ' अंबट ' पहा. –शे ६.२३. ३ अमटी; डाळ, पीठ, चिंच, मसाला वगैरे लावून किंवा बटाटे वगैरेच्या फोडी घालून केलेला

तोंडी लावण्याचा पातळ पदार्थ; कालवण; अंबटवरण. **०नाटक मंडळी**–स्त्री. (ल.) पौराणिक नाटक मंडळयांच्या भोजनांतील अंबटी हा एक विशेष प्रकार असे, म्हणून त्या नाटकमंडळयांना ही 'आमटी नाटक मंडळी' म्हणून अनादरपूर्वक म्हणण्यांत येई. [अंबट]

अंबट्या—वि. १ जें फळ नेहमीं अंबट असतें तें (चिंच, एक प्रकारचा आंबा इ०); अंबट असणारा (पदार्थ). २ ज्याला अंबट पदार्थ आवडतो तो (माणूस). [अंबट]

अंबर्णे—अक्रि. १ अंबट होणें (उघडें राहिल्यामुळें, शिळें झाल्यामुळें अन्न वगैरे). २ अंबट पदार्थ खाल्ल्यानें दांत, ओंठ अंबट होणें. ३ अतिशय श्रमानें, कष्टानें किंवा मार लागल्यामुळें अंग ठणकणें, हल्लक होणें; अधु होणें. ४ अतिशय तृप्त झाल्यामुळें कंटाळा येणें, वीट येणें. ५ एखाद्या विषयांत निष्णात किंवा पटाईत होणें. [सं. अम्ल; प्रा. अंब] **अंबत पडणें**–पुष्कळ काळ अधांत्रीं लोंबकळत राहणें; भिजत घोंगडें पडणें; रेंगाळणें; दिरंगाईवर टाकलेलें असणें (आरंभिलेलें काम, धंदा इ०). **अंबत टाकणें**–आरंभिलेलें काम किंवा धंदा, उद्योग अर्धवट किंवा दिरंगाईवर टाकणें.

अंबर-री—पुस्त्री. १ (लोहारी) खिळे उपसून काढावयाचा चिमटा. २ (सोनारी) अडकित्यासारखा दोन पायांस एका खिळ्यानें सांधून वरच्या बाजूस वर्तुळाकार असलेला, धातूचें सूत अगर तार ओढण्याचा चिमटा.

अंबर—पु. एक सुगंधी तांबूस पदार्थ (उदबत्त्या करण्याच्या कामीं–उपयोगी) अंबरउदी. 'तोळाभर अंबर' –ब्रप २७२. [तुल. अर. अन्बर; फ्रें. आंब्र; इं० अंबर, अंबरग्रिस]

अंबर—न. १ वस्त्र, कापड. 'पदबंध नागर। तेंचि रंगाथिलें अंबर' –ज्ञा १.६. २ (समासांत) वस्त्र परिधान, पोशाक या अर्थी, जसें:–पीतांबर, पिवळें असें जें वस्त्र; वस्त्रानें युक्त असा, जसें:–दिगंबर=दिक् (दिशा) आहे वस्त्र ज्याचें; चर्मांबर, इ०. ३ आकाश, वातावरण. 'सागर शोधूनि उधवला। अंबरासी ॥' –ज्ञा १.९०. 'पुष्पांजुळी मंत्रघोष जयजयकार। दुमदुमी अंबर तेणें नादें ॥' –तुगा ८१. [सं. अम्बर]

अंबर—पु. (बे.) एक प्रकारचें गवत.

अंबर—पु. धान्य ठेवण्यासाठीं भिंतींत केलेली कोठडी; धान्यागार; कोठार; बळद. २ (ल.) खजिना. 'जें मागशील तें देईन भरला अंबर।' –सला १.३०. [फा. अंबार] **०लुटणें**–धान्याचा सांठा उधळपट्टीनें खर्चणें; लुटारूनें धान्य लुटणें. **०खाना**–पु. अठरा कारखान्यांतील एक; धान्यागार; कोठार. 'अंबरखाना चांगला। वक्त गैरवक्त कामाला। तोचि राजा शोभला। जगतीं तळीं।' –भाअ १८३४. याच्या कामाबद्दल इ० २२. २४. पहा. [फा.]

अंबर—पु. १ एक धातु; देशी औषधांत याचा उपयोग करतात. २ अंबरचा केलेला जिन्नस (मणी, सळई, दागिना); अंबरउदी पहा.

अंबर, अबरवेल–स्त्री. अमरवेल. [सं.]

अंबरउदी—पु. स्पर्मेसेटी व्हेल नांवाच्या माशाच्या आंतड्यांत होणारा एक पदार्थ. हा सुगंधी व औषधी आहे.

अंबरस—पु. पिकलेल्या आंब्यांचा काढलेला रस; आमरस; आंबरस. [सं. आम्र+रस; म. अंबा+रस]

अंबरसा—पु. (व.) अंबरचा लहान मुलांच्या गळ्यांतील एक दागिना. 'मुलीला अंबरसा केला आहे.' [अर. फ. अन्बरचा]

अंबराई—स्त्री. आंब्यांच्या झाडांची रांग किंवा बाग. 'छाया तरूंची बहु तोषदायी। आहे तशी ही घन आंबराई।' [सं आम्र+राजी=राई]

अंबरी—वि. अंबरानें सुगंधित केलेली (तंबाखू, वगैरे). [अंबर]

अंबलें—न. १ काकडीसारखें एक कडू फळ. २ मुलांच्या कानांतील डूल. अमला; आंबला. [सं. आम्र]

अंबवण—न. १ अंबोण पहा. 'अधरपान आंबवणें। गाढालिंगनीं मेळवणें।' –मुआदि १५.११८. २ आंबवण्याकरितां घालण्यांत येणारा पदार्थ (पिठांत, कोंडयांत, तंबाखूंत ताक, लिंबाचा रस इ०); विरजण. [सं. अम्ल+वन=पाणी]

अंबवण—न. आवण; आमण; गाडीच्या चाकाच्या तुंब्याच्या तोंडांत, आंतील आखानें तुंबा झिजूं नये म्हणून जें लोखंडी वाटोळें कडें घालतात तें.

अंबवण-णी—नस्त्री. (कों.) नाव वल्हवितांना नावाडी जें गाणें गातात तें; चकवा. [का. अंबी=नाव; अंबिग=नावाडी?]

अंबवणी—न. १ हिरवा आंबा भाजून पाण्यांत कालवून आंत गूळ किंवा साखर घालून केलेलें सार किंवा पन्हें. [सं. आम्र+वन]

अंबवणी—न. उंसाची लागवड झाल्यावर त्यास तिसरे दिवशीं द्यावयाचें पाणी. अंबुणी पहा. **०चिंबवणी**–न. उसाची लागवड झाल्यावर ५।६ दिवसांनीं जें पाणी देतात तें.

अंबवशी—स्त्री. अंबोशी पहा.

अंबवा-रंग—पु. १ अंब्याच्या रंगासारखा रंग; नीळ व अंबेहळद यांपासून केलेला रंग. [अंबा] २ अंबवा रंगानें रंगविलेलें कापड. –सन १८५७.४४३.

अंबविणें—उक्रि. १ अंबटावणें पहा. अंबण्यास लावणें (भिजविलेलें पीठ उघड्यावर ठेवून वगैरे). २ (ल.) बडविणें;

धोपटणें; मारून हुळहुळा करणें. ३ लोंबकळत ठेवणें; आशा लावून ठेवणें. [अंब]

अंबशी—वि. मेघासारखा निळा; मेघवर्ण. [सं. अंभस्=पाणी+सदृश]

अंबष्ठाण, अंबसाण—स्त्री. (कों.) अंबटघाण; अंबूस वास; अंबटाण पहा.

अंबष्ठ (ष्ठ)—पु. ब्राह्मण बाप व वैश्य आई यांपासून झालेली संतति; अशांची जात. 'अंबष्ठ आणि मूर्धावसिक्त.' –एभा २०.३३. [सं.]

अंबसाण—स्त्री. आमसाण; अमसुल; अंबटाण पहा.

अंबसुका-खा—वि. (कों.) अधेवट सुकलेला: दमट; किंचित ओलसर; अंबट ओला. [अंब+सुका–खा]

अंबसूल-सोल—न. रातांबीच्या फळाचें त्याच्याच रसांत भिजवून वाळविलेलें सालपट; कोकंबसाल; याच्या बियांचें तेल काढतात त्यास रातंबेल, कोकंबेल असें म्हणतात. थंडीनें अंगाची कातडी तडकल्यास तिच्यावर हें लावतात. अमसुल पहा.

अंबळ–सा—अमळ–सा पहा.

अंबळी—पु. एक मासा; पिउरा मासा (पुणें). याच्या छातीवर दोन व पाठीवर एक असे तांबडया रंगाचे पंख असून बाकीचें अंग पांढरें असतें; लांबी दोन तीन इंच.

अंबा—स्त्री. १ आई. 'म्हणोनि अंबे श्रीमंते.' –ज्ञा १२. १०. २ राजपत्नी; साध्वी इ० स आदरार्थी संबोधन. ३ दुर्गा; भवानी; पार्वती (देवी). अंबाबाई पहा. 'साह्य नव्हेचि गे अंबा । विन्मुख जाहली जगदंबा ।' –एरुस्व ५.७३. [सं. अंबा; द्रा. अम्मा; जर्मन अम्मा–मो]

अंबा—पु. एक झाड व त्याचें मधुर फळ; आंबा; आम्र; याचें कोंवळें फळ अंबट व त्रिदोष, रक्तदोषकारक आहे. पिकलेलें फळ गोड, शक्तिवर्धक, जड, वातनाशक आहे. याचा रस सारक, स्निग्ध, बलकारक आहे. याची कोय तुरट, ओकारी व अतिसारनाशक आहे. याचा मोहोर अतिसार, प्रमेह व रक्तदोष नाशक आहे. याचें पान कफ व पित्तनाशक आहे. अंब्याला रंगावरून, रुचळावरून, व्यक्तीवरून व रुचीवरून निरनिराळीं नांवें असतात. जसें:–शेंदरी, शिवापुरी, हापूस, शोपा इ०. अंब्याचें झाड हिंदुस्थानांत होतें. रानांत, डोंगरांत उगवणाऱ्या अंब्याला रायवळ, बागेंत लावलेल्यास इरसाल व कलम केलेल्यास कलमी अंबा म्हणतात. याच्या कापा (कापून खाण्याचा) व रसाळ (रस काढण्याचा) अशा दोन जाती आहेत. हें झाड पुष्कळ वर्षे टिकतें. कच्च्या आंब्याचें लोणचें व पाडाच्या आंब्याचा मुरंबा, गुळंबा करतात. 'पिवळा आणि सुगंध । अमृता ऐसा असे स्वाद । परी अंबा तव प्रसिद्ध । एकलाचि ।' –विउ १०.१९. [सं. आम्र; प्रा. अंब] **–ब्याचा–काप–तळका**–पु. अंब्याचा एका, बाजूचा काप, फोड. **–चा टाहाळा–डाहळा–ढाळा**–पु. १ आंब्याची लहानशी फांदी. हा शुभ व अशुभ दोन्ही प्रसंगी असतो यावरून. २ (ल.) शुभ–अशुभ प्रसंगीं किंवा सुखदुःखाच्या प्रसंगीं दुसऱ्याच्या घरीं सारखेपणानें वागणारा माणूस; लग्न वगैरे समारंभांत दोहोंपक्षांकडील माणूस. **–चा शेंकडा**–६ आंब्यांचा १ पाडा, ५३ पाडयांचा (३१० आंबे) १ शेंकडा. सबंध शेंकडा घेतला तर ३२० आंबे मिळतात. निरनिराळ्या ठिकाणीं अंब्याचा शेंकडा निराळा आहे. **कांहीं** ठिकाणीं २२ पाडयांचा शेंकडा असतो. **०उतरणें–१** आंबे झाडावरून खालीं न पाडतां काढणें. 'आज आमच्या झाडाचे आंबे उतरावयाचे आहेत.' २ फार पिकणें. 'आंबा उतरला आहे; कशाला खातोस?' **०शिंपणें**–वरात घरीं जाण्याच्या पूर्वी गौरीहारांतील देवी घेण्याकरितां वर जातो तेथें गौरीहाराच्या जागीं भितीवर अंब्याचें झाड काढलेलें असतें, तेथें आंबा शिंपतांना वधू आपला डावा पाय वराच्या उजव्या **मांडी**वर आणि डावा हात त्याच्या पागोटयावर ठेवून त्याजपाशीं उभी राहून उजव्या हातानें नागवेलीच्या किंवा आंब्याच्या पानानें आंबा शिंपते त्यावेळीं बायका आंबा शिंपण्याबद्दलचें गाणें म्हणतात. 'आंबा शिंपावया गोरटी। कडे घेऊनि कृष्ण उठी। आहती केलीसे गोमटी। कुंकुमें वाटी परिपूर्ण।' –एरुस्व १५.१४२. **०बाधणें–झाडास** फळ लागणें. **अंबेवार–बहार**–फाल्गुन महिन्यांत म्हणजे आंब्याला मोहोर येण्याच्या दिवसांत जें तिसरें फळांचें पीक येतें तें, म्हणजे तिसरा बार (मृगबार, **हत्तीबार** असे आणखी दोन बार आहेत). –शे २.१२. **–ब्याचा मोहोर**–पु. (एक पक्वान्न) दुधांत भिजविलेल्या रव्याचे गवले करून मध्यें चिमटून थोडे वळले म्हणजे होणारें त्रिदळ. **–चें पन्हें**–न. अंबवणी पहा. **–चें साठ**–न. कल्हईच्या ताटाला तूप लावून त्यांत अंबरस ओततात व तो सुकवून त्यावर दुसऱ्या अंबरसाचा थर ओततात व पुन्हां सुकूं देतात. गोडीसाठीं यांत साखर घालतात. सुकल्यावर तो पोळीप्रमाणें होतो. अशा प्रकारें जी पोळी करतात तें. **–चा भात**–पु. केशरी भाताप्रमाणें भात शिजत आला म्हणजे त्यांत हापूसचे आंबे चिरून त्याच्या फोडी घालून केलेला भात. **०गद्रलेला–गद्रा–गजरा**–पु. पाडाचा अंबा. 'अतिरति एक दोरींत ओविलें फळझाडें आंबागद्रा.' –पला ६६.

अंबाडा—पु. बायकांच्या केंसांचा बुचडा; केंसांची मानेवर गांठ; हा आंब्याच्या आकाराचा असतो म्हणून हें नांव. फुग्याचा, पोलक्याचा इ० याचे प्रकार आहेत. 'तो बहुतकरून नुकताच उलटा घातलेला अंबाडा'–पकोघे. 'पत्नी घालिते अंबाडा। वर खोंवुनी केवडा। मार्गि धांवे दुडदुडा । शारदा पहाया ॥' –मेळयांतील पदें. [सं. आम्रातक; प्रा. अंबाडय=अंब्याचें फळ]

अंबाडा—पु. १ अंबाडीचें झाड व पानें; हें झाड चार पांच हात उंच वाढतें. सुकल्यावर भिजूं घालून त्यावरील वाख काढतात, त्याचे गोणपाट, दोर व कागद करतात. काडयांना सणकाडया म्हणतात. विलायती अंबाडी हा एक दुसरा प्रकार आहे. याचीं बोंडें तांबडया रंगाचीं, आमसुलाप्रमाणें आंबट असुन तीं सुकवून उपयोगांत आणतात. २ कोंकण व कर्नाटकांत होणारें मोठें झाड, पानें रामफळी सारखीं व फळ आंबट व पोफळाएवढें असुन त्यांत आंब्यासारखी कोय असते. चिंचेऐवजीं याचा उपयोग करतात. कोवळया फळांचें लोणचें होतें. यास आंब्यासारखा मोहोर येतो. हें रक्तदोष, क्षत व क्षयनाशक आहे. [सं. आम्रातक; प्रा. आम्माडओ; अप. अंबाडय. हिं. अंबाडा; गु. अमेडा]

अंबाडी—स्त्री. १ अंबाडा अर्थ १ पहा. २ या झाडाचें बी (यापासुन तेल काढतात). ३ याचें तंतुमय वेष्टन-त्वचा; यापासुन दोर करतात. ४ याचीं पानें-भाजी म्हणून हीं खातात, ५ अंब्याची कैरी. ६ अंब्याचें रोप. ७ (गो.) कैऱ्यांचें नुसतें मीठ घालून केलेलें तोंडीलावणें. **केसांची ०होणें-दिसूं लागणें**-केस पिकल्यामुळें अंबाडीच्या वाखासारखे दिसूं लागणें. 'नाहीं तर याचे पहा अंबाडीकेस?'-नि **०पट्टी**-स्त्री. अंबाडीच्या लागवडीवर किंवा तिच्यापासुन दोर करण्याबद्दलची एक पट्टी.

अंबाडी—पु. वेदाण्यांतील एक जात. -मुंब्या १०८.

अंबाडी—पु. एक मासा (वाळलेलें सुकट).

अंबाडी—स्त्री. अंबाडीचें पान; मोठया व तिखट पानाची नागवेलीची एक जात. [म्हैसुर संस्थानांत अंबाडी नांवाचें गांव आहे, त्यावरून; का. अंबाडी वेले]

अंबाबाई—स्त्री. १ कोल्हापुरची देवी. (सामा.) कोणतीहि (जोगेश्वरी, तुळजापुरची वगैरे) देवी. 'उदो उदोगे अंबाबाई। भक्तासाठीं धांवत येई।' २ (ल.) हट्टी स्त्री. ३ (विनोदानें) आमटी. [सं. अंबा+म. बाई] **०चा उदो**-पोत घेऊन 'उदो उदो गे' करीत नाचणें; (गो.) अंबाबाये हुर्दो. **०चा पोत**-अंबाबाईचा पुजारी जो भुत्या त्याच्या हातांतील चिंध्यांचा पीळ देऊन केलेला मोठा पेटलेला कांकडा. [सं. पोत=वस्त्र. पलेता?]

अंबार—न. १ अंबारखाना; भिंतींतील धान्य ठेवण्याची कोठडी; धान्यागार; कोठार. अंबर पहा. (सामा.) कसलाहि ढीग, रास. २ (बे.) कापलेल्या गवताचा ढीग. **०बांधणें**-धान्य सांठविण्यासाठीं तळघर बांधणें. ३ (कर्ना.) पिकाचा सरकारी हिस्सा; अंबारराशी. [फा. अंबार=ढीग, धान्याचें कोठार.] **०सारी**-ब्राह्मण गांवकामगारांखेरीज इतर घरांवर कर.

अंबारी—स्त्री. हत्तीवरील बसावयाची मेघडंबरी, आसन, बैठक; जेव्हां वर छताची योजना नसेल तेव्हां या बैठकीला हौदा म्हणतात, क्वचित उंटावरील बैठकीलाहि अंबारी म्हणतात. 'अवर्षे अंबाऱ्या शोभल्या वरी।' -नव १३.७५. [अर. अमारी] **अंबारींत बसणें**-श्रेष्ठपणास चढणें. **उलट्या अंबारींत बसणें, उलट्या अंबारीनें राज्य करणें-उलटी अंबारी हातांत येणें**-भिक्षांदेही करणें; भीक मागणें (गांठ मारलेल्या भिक्षेच्या झोळीचा आकार उलट्या अंबारीसारखा असतो यावरून). 'माझी कातडयाची पेटी व फराळाचें आणि चार धोतरें एवढें मात्र ..... बचावलें. नाहीं तर आजच उलट्या अंबारीच्या राज्याचा उपभोग घ्यावा लागला असता.' -रंगराव.

अंबावाटी—स्त्री. अंबा शिंपण्यामधील रंगाची वाटी. 'तुर्यां अंबावाटी घेऊनि गोरटी.' -दावि ३७.

अंबिका—स्त्री. १ आई. 'कां एकलौतिया बाळका-। वरी-पडौनि ठाके अंबिका।' -ज्ञा १३.५०२. २ जगदंबा; पार्वती. 'चंद्र तेथें चंद्रिका। शंभु तेथें अंबिका।' -ज्ञा १८.१६३२. अंबा, अंबाबाई पहा.

अंबी, अंबेकरी—पु. (कर्ना.) नावाडी; भोई; धीवर. 'मासे मारणारे कोळी व नावा वलविणारे अंबी नदींत एके ठिकाणीं बुडून बऱ्याच अंतरावर पाण्यावर येतांना पुष्कळांनीं पाहिलें असेल.' -प्राणिमो १५. [का. अंबी=नाव; अंबिग=नावाडी; हिं. अंबी]

अंबीण—स्त्री. इतरांपेक्षां अधिक लांबट अंबा येणारें आंब्याचें झाड. [अंबा]

अंबीर—पु. अमीर; हंबीर; सरदार. राज या शब्दाला जोडून विशेषतः हा शब्द येतो. 'धन्य पुण्यामर्धि आपुण राज अंबिरा।' -प्रला १८. [अर. अमीर]

अंबीरी—वि. अमिरी, सरदारी. 'महादेव कवीचे छंद राज अंबीरी' -प्रला १४३. अमीर पहा. [अर. अमीर]

अंबील—स्त्री. १ नाचण्याचें पीठ अंबवून किंवा ताकांत घालून शिजवून केलेला पदार्थ; वऱ्हाडांत ज्वारीचें पीठ भिजवून त्यांत खोबरें, खसखस, साखर टाकतात. ही अंबील महालक्ष्मीच्या सणास करतात. 'लाडू अनारसे नाहीं कामाचे। भावाची आंबील बरी।' -अमृत १३९. 'पिष्ट जळें कालवितीं। तें जोंवरी आंबे तोंवरी ठेविती। तो आंबट वास गोड मानूनी पिती। आंबिल म्हणती तयातें॥' -यथादी १७.१३७. २(ल.) घाणेरडें पाणी; गढूळ पाणी. [अम्ल; सं. प्रा. आंबिल=खट्टा रस] **०भुरक्या**-वि. १ अंबील खाणारा. २ (ल.) अशक्त; नेभळट; मेषपात्र; दुधखुळा; भोळा (माणूस). **अंबिलगाडा**-पु. (बे.) चित्रविचित्र वेलींनीं नटविलेली, सजविलेली गाडी.

अंबु—न. पाणी. 'महा प्रळयांबूंचें जैसें भरलेपण।' –ज्ञा १५.२८४. [सं.]

अंबुखणें-खिणें, आंबुखणें—उक्रि- १ टाकणें; फेकणें; वर्षणें. 'प्रळयाग्नीचीं उजिती। आंबुखिलीं जैशीं।' -ज्ञा ११. ३४२. २ सेचन करणें; सिंचणें; शिंपडणें. 'घृतें आंबुखूनि आगियाळें।' –ज्ञा १४,१६२. [सं. अभि+उक्ष्, अभ्युक्षण; प्रा. अब्भुक्खण=शिडकाव, सिंचन]

अंबुखा—पु. पाण्याचा वर्षाव, वृष्टि; शिंतोडा; हवका. आबुखा पहा. 'मोक्षमार्गाकडे। जैं यांचा आंबुखा पडे।' –ज्ञा १६. २६१. [सं. अभि+उक्ष्; प्रा. अब्भुक्ख=सिंचन करणें]

अंबुची, अंबुची(बोची)चिंबोची—स्त्री. एक आंबट वेल, हिच्या पानांची भाजी करतात. अंबोशी पहा.

अंबुज—न. कमळ. नयनांबुज; पादांबुज; अंबुजाक्ष इ० समास होतात. 'जें तूं ज्ञानांबुज। द्विरेफु कीं॥' –ज्ञा १४.२८६ 'सिंहांगनेसि मज नेइल अंबुजाक्षा। जंबूक चैद्य जरि तूं करिसी उपेक्षा॥' –वामन (रुक्मिणी पत्रिका) ४. [सं. अंबु=पाणी+ज=जन्मलेलें]

अंबुट—न. अंबर; आकाश. आबुट पहा. 'धडधडिले चक्रवाट। रजें अंबुट कोंदलें॥' –एरुस्व ८.१४.

अंबुटकी—स्त्री. अगदीं कोंवळा आंबा. 'मुलें अंबुटक्या टिपण्यास गेलीं.' [अंबा, अंबुट--की प्रत्यय]

अंबुणी—स्त्री. उंसाची लागवड झाल्यानंतर त्यास तिसरे दिवशीं पाणी देतात तें; अंबवणी. [अंबु+वर्षण?]

अं(आं)बुथंणें—उक्रि. १ वाढणें; जास्त होणें. 'औषधाचेनि नांवें अमृतें। जैसा नवज्वरु आंबुथे।' –ज्ञा १३.७२२. २ (ल.) प्रज्वलित होणें; प्रदीप्त होणें; पेटणें; पेटविणें; उजळणें. 'तैसा वैराग्याचा वोलावा। विचाराचा तो दिवा। आंबुथितां आत्मठेवा। काढीची तो।' –ज्ञा १८.१००८. [सं. अभ्युत्थ; प्रा अब्भुत्थ किंवा अब्भुत्त=प्रकाशित होणें]

अंबुद—पु. ढग; मेघ. 'जगदंबुदवर्गी नभ।' –ज्ञा १८.५. 'किं ऐकतां तव वचनांबुद। ममचित्त शिखी नृत्य करी॥' [सं.]

अंबुधर—पु. ढग; अभ्र. 'चातक होतां तृषाक्रांत। आवडीनें लक्षित अंबुधरातें॥' –संवि २५.२. –ह २६.११७. [सं.]

अंबुधि, अंबुनिधि—पु. समुद्र. महासागर. सामाशब्द–दुःखांबुधि; क्षारांबुधि इ० 'अंबुधे सहज बा तुज पाहतां' [सं.]

अंबुरकी चिंच—स्त्री. बहुतेक पिकलेली, गाभुळेली चिंच

अंबुरा—पु. अंबूर; अंबर पहा.

अंबुला—पु. नवरा; पति. 'नंदनंदन हा आचोज अंबुलावो।'–निगा ६५. –ज्ञा १३.९७८. **अंबुलेपण**–न. नवरेपण आंबुलेपणा पहा.

अंबुला—पु. पाण्याचा थेंब. [सं. अंबु+ल]

अंबुला—पु. कानांतील आंब्याच्या आकाराचा डूल. आंबला, आमला, अमल पहा. 'कुमारांचे आंबुले कडदोरी। मजपाशीं आणिजे॥' –ख्रिपु १.१९.३९. [सं. आम्र, आमलक]

अंबुली—स्त्री. आबुली; पत्नी; नवरी. 'लांबलांबै कासोटें। मिरविती आं(आ)बुलिआं पुढें॥' –शिशु ८९१.

अंबुली—स्त्री. (कों.) आंब्याचें लहान झाड. [सं. आम्र; प्रा. अंब+ल]

अंबुशी—अंबोशी पहा.

अंबुसणें—अक्रि. अंबणें पहा.

अंबूर—पु. पकड; चिमटा याअर्थी अंबर पहा. [तुल० सिं. अंबूरु]

अंबूस—वि. १ अंबलेलें; अंबट वास येणारें. २ (ना.) अंबट. 'दही भलं अंबूस झालं नै?' [सं. अम्ल]

अंबेकरी—पु. अंबी पहा.

अंबेमोहोर-हर—पु. आंब्याच्या मोहोराइतका बारिक, गोल, पांढरा व सुवासिक तांदूळ. याच्या काडाच्या पातीलाहि आंब्याच्या मोहोरासारखा वास येतो. बेळगांवाकडे याच्या काळा व पांढरा अशा दोन जाती आहेत. पैकीं काळा उत्तम. २ नाचणीचा एक प्रकार. [अंबा+मोहोर; गो. अंबेम्होवर]

अंबेरी—स्त्री. (राजा.) एक झाड व त्याचा चीक.

अंबेहळद—स्त्री. एक हळदीचें झाड. हें रानांत होतें. या हळदीच्या गांठी मोठ्या असुन त्यांस दर्प फार असतो. अंबेहळद वागाइती हळदीप्रमाणें खाण्याच्या–मसाल्याच्या उपयोगी पडत नाहीं. हिचें लोणचें मात्र घालतात. ही रक्तविकार नाशक असुन अंगास लावण्याच्या मसाल्यांत घालतात. दुखावेलेल्या भागावर हिचा लेप करितात. –शे ६.२४. [सं. आम्र+हरिद्रा; प्रा. अंबहलद्दा; हिं. अंबिया हलदी; गु. अंबाहलदर]

अंबोण—न. गुरांना घालावयाचें पेंड, कोंडा, सरकी इ० चें भिजवून किंवा शिजवून केलेलें मिश्रण, त्याला अंबूस वास येतो. २ विवाह झाल्यावर वर व वधू या दोहीं पक्षांकडील वायका परस्परांस जेवणाचें आमंत्रण देतेवेळीं मुख्य विहिणीपुढें भाजीसह कोंडा, पेंडीचा खडा, भाजीच्या काडया इ० शिध्यानें भरलेलें शिपतर ठेवतात तें. [आम+अभ्र; अंबणे] **०दाखविणें**–(ल.) सांच देणें. 'साहेबांची भेट घ्यायची म्हणजे चपराशाला अंबोण दाखवावें लागतें.'

अंबोण—न. गाडीच्या चाकाच्या तुंब्यांतील लोखंडी कडें. अंबवण पहा.

अंबोणी—स्त्री. ऊस लावल्यावर तिसऱ्या दिवशीं प्रथम पाणी देतात तें. अंबवणी पहा.

अंबोटी—स्त्री. १ आमटी. २ एक वनस्पति. ३ चुका; शतवेधी. [अंबट; हिं. अंबोटी]

अंबोरा—पु. (व.) (धनगरी) लग्नांत शिल्लक असलेलें अन्न एकत्र शिजवून सर्व नातेवाईकांना हक्कानें वाटण्यांत येणारें अन्न.

अंबोशा-शी—स्त्री. (कों.) कच्च्या आंब्याच्या वाळविलेल्या फोडी. यांचें लोणचें करतात.

अंबोशी—स्त्री. १ बारीक पानांची, भुईसरपट, आपोआप उगवणारी वनस्पति; अंबट वेल; अंबुशी. २ एक लहान क्षुद्रुप—याच्या पानांची चटणी करतात. [सं. आम्र]

अंबोली—स्त्री. एक वनस्पति. –शे ६.२४.

अंबोसा—पु. आलुबुखार. [फा.]

अंबोळी—स्त्री. धिरडें; तांदूळ व त्याच्या निमी उडदाची डाळ भिजत घालून वाटून त्यांत मीठ, मिरच्या, कढीलिंब वगैरे घालून तें मिश्रण आंबल्यावर चुलीवर तूप लावलेल्या तव्यावर ओतावें वर झांकण घालावें, थोडथा वेळानें अंबोळी बनते. [अंबणें+पोळी] ०बांबोळी–पु. (कु.) लहान मुलांचा एक खेळ.

अंब्या—पु. अंबेकरी; नावाडी. अंबी पहा. [का. अंबी=नाव]

अंब्युलन्स—न. (इं.) १ फिरतें इस्पितळ; सैन्याबरोबर असणारा दवाखाना. २ जखमी किंवा रोगी यांच्यांकरितां वाहन. ०कौअर–न. रुग्णपरिचर्यापथक.

अंब्र—पु. (काव्य) आंब्र; आम्र. आंबा. 'अंब्रदानें दिधलीं।' –ज्ञा ३.३.४४. [सं. आम्र]

अंब्रुक-को—क्रिवि. (गो.) आंतल्या आंत. अंब्रुकोहांसो=आंतल्या आंत हंसणें.

अंब्रुचें—अक्रि. (गो.) पिकणें (फळ).

अंभ—न. पाणी. 'नातरी आटलिया अंभ।' –ज्ञा १५.२७. (काव्यांत हा शब्द समासयुक्त येतो. जसें:–अंभोनिधि=समुद्र; अंभोज=कमळ इ०). [सं. अंभस्]

अंभोज—न. कमळ; पद्म; अंबुज. [सं.]

अंभोधि, अंभोनिधि—पु समुद्र. अंबुधि पहा. [सं.]

अंमल, अमलदार—अमल–दार पहा.

अंमळ–सा—अमळ–सा पहा. [अम्नर(=अल्पार्थी)–अंमल–अंमळ–भाअ १८३४]

अंमस—स्त्री. (गो.) अमावास्या; आंवस. अमास पहा. [सं. अमा]

अंमा—अ. परंतु; पण. अमा पहा. [अर. अम्मा]

अंवठा—अवठा पहा.

अंवढा-डा-वंढा—अवढा पहा.

अंवदां—क्रिवि. (कुण.) यंदा; ह्या वर्षी. अवंदा पहा.

अंश—पु. १ भाग; खंड; विभाग; तुकडा; हिस्सा; वांटा. हा शब्द विशेषतः समासांत योजला जातो व त्यांत थोडासा भिन्नार्थहि आढळतो. जसें:–जलांश; धान्यांश; ज्वरांश; उष्णांश; इ०. 'तरी ताकाचे अंश फेडणें।' –ज्ञा १५.४६४. 'हंसवाहिनी आख्या ऐशी तुझेनि अंशेंसी तिसी झाली।' –एभा १३.९. २ लेश; राहिलेला; शेष. 'केळीं खाल्लीं तर त्यांचा अंश फार वेळ राहतो.' 'पोटांत अन्नाचा अंश गेला म्हणजे हुशार होईल.' ३ वर्तुळाचा ३६० वा भाग; (इं.) डिग्री. अंक्षांश; रेखांश. ४ (गणित) अपूर्णांक; व्यवहारी अपूर्णांकांतील रेघेवरील संख्या; याच्या उलट छेद. ५ आदित्यांपैकीं एक. ६ (ल.) माया. 'अंश शेवटीं एकीकडे। अनंतें हारपैलीं ब्रह्मांडें।' –ऋ ८५. [सं.] ०मात्र–क्रिवि. अंशतः; थोडें; किंचित्. ०सवर्णन–न. सर्व अपूर्णांक समच्छेद करणें; सारखें रूप देणें. ०स्वर–पु. (राग) वादी स्वर पहा. ०हारी, अंशाधिकारी–वि. भागीदार; वटिकरी; पातीदार.

अंश—बकाट; खांदा; अंस. ०फलक–न. खांदा; बकाट. [सं. अंस=खांदा]

अंश—पु. (छाप.) खिळ्याची जाडी (मजकुराच्या उठावाच्या मानानें). (इं.) पॉईंट. [सं.]

अंशतः—क्रिवि. भागाभागानें; पायरीपायरीनें; थोडें थोडें; हळूहळू; जराजरा; किंचित्; कांहीं. [सं.]

अंशावतार—पु. ईश्वराच्या अंशाचा अवतार; ह्याच्या उलट पूर्णावतार (यांत प्रत्यक्ष ईश्वरच अवतार घेतो.) [सं. अंश+अवतार]

अंशांश—पु. अंशाचा अंश; भागाचा भाग; पोटविभाग. [सं. अंश+अंश]

अंशिक—वि. अंशात्मक; थोडेसें; किंचित्; अल्प. 'जयाचें आंगिक अंशिकें।' –ज्ञा १८.१७२४. [सं. अंश]

अंशित—वि. वांटलेले; विभागलेलें. [सं.]

अंशी—पु. भागीदार; अंशहारी पहा. [सं.]

अंशु—पु. किरण; कर; रश्मी. प्रकाशशलाका.. ०मापक–पु. किरणांच्या अंगीं असणारे गुणधर्म ओळखण्याचें यंत्र., (इं.) रेडिओमिटर. ०माळी–पु. सूर्य. 'जैसा वर्षोनि भूतलीं। आपुला रसु अंशुमाळी।' –ज्ञा १५.२९७.

अंशुक—न. वस्त्र. 'न भातळे जो द्विज अंशुकासी।' –सारुह १.४४. [सं.]

अंस—पु. खांदा; अंश पहा. 'वागवी निज सिदोरिस अंसीं।' –सारुह ३.१२२. [सं.] ०फलक–अंश–फलक पहा.

अंसुढाळ—वि. १ अश्रुढाळ पहा. २ अश्रुढाळ पहा. ३ रडया; सदोदित रडका. [अंसू+ढाळणें]

अंसुपात—अश्रुपात पहा.

अंसू—न. असुं पहा.

अँहँ—उद्गा. नापसंति दाखविणारा उद्गार. [ध्व.]

अंक्ष्व—न. १ पूज्य; शून्य. –विवि ८.३.४६. २ अभाव. 'आज तुपाचें अंक्ष्व आहे.' ['अंक्ष्वमंक्ष्वेति कज्जलम्' या श्राद्धांतील वचनावरून]

अः

अः—शेवटचा स्वर. –पु. १ कार्तिकस्वामी. २ विसर्ग. ३ मंत्रांतील बीज.

अःअः—उद्गा. हाः! हाः! आनंद, खेद या विकाराचा दर्शक ध्वनि. 'अः अः तव भजना विसरलों।' –दावि ७६.

क

क—१ मराठी वर्णमालेंतील १७ वा वर्ण आणि पहिलें व्यंजन. अक्षरविकास–याच्या पांच अवस्था असून पहिली अशोककालीन तर शेवटची ११ व्या शतकांतील. पहिली अवस्था थेट कूसासारखी असून पुढें आडवी–उभी रेघ बांकदार होऊं लागली. २ पुष्कळ संस्कृत नामांना तीं दुसऱ्या शब्दांशीं संयुक्त होतांना (समासांत) हा शब्दातिशय प्रत्यय लागतो, जसें:–आत्म–आत्मक. 'हें जग पंचभूतात्मक आहे'; 'अलंकार सुवर्णात्मक आहेत. स्तुत्यात्मक; निंदात्मक (परिपूर्ण या अर्थीं); मूल–मूलक; ज्यापासून उत्पन्न होतें तो या अर्थी. 'पुण्य मूलक सुख' (ज्या-अर्थीं) 'स्त्रीमूलक कलह' इ०; पूर्व–पूर्वक पुरस्सर; अनुसरून; मुद्दाम उ० बुद्धिपूर्वक; आदरपूर्वक; शपथपूर्वक (भाषण इ०). लहान वय, सारखेपणा, प्रेम इ० दर्शविण्याकरितां कधीं कधीं शब्दाच्या शेवटीं हें अक्षर जोडतात. त्यामुळें अर्थ फारसा बदलत नाहीं. उ० बालक; पुत्रक; दंडक इ०; ब्रह्मुव्रीहि समासापुढें प्रायः याचा प्रयोग होतो. उ० देवदत्त आहे नाम ज्याचें तो देवदत्त नामक. 'जीवत्पितृक पुरुष', 'देवमातृक देश'; 'आनंदविषयक वाक्य.' ३ ब्रह्मदेव; दक्षप्रजापति; कश्यप; वायु; सूर्य; यम; विष्णु; अग्नि इ० देवता. ४ मन; अंतःकरण; आत्मा. ५ पक्षिविशेष; पक्षी; पक्ष्यांचा राजा. ६ पाणी; पिण्याचा पातळ पदार्थ.

कं—न. सुख; आनंद; उ० नाक=(न अकं=दुःखं यत्र). स्वर्ग [सं.]

का॥—१ कर्यात; कसबा. २ कमावीस. [संक्षेप] **०दार**–कमाविसदार.

कॅ—अ. (गो.) कोठें.

कइं—क्रिवि. (चि.) केव्हां. कई पहा. 'उरास उर हा सये कइं फिरूनि लागेल गे॥'

कईचा—क्रिवि. कैचा पहा.

कइठ–ड–कईठ—न. (गो. खा.) कवठ (झाड व फळ) पहा.

कइली—कैली पहा.

कइवाड–र—न. अंगिकार; कैवार; कैवाड–र पहा. 'कईवाड नव्हे घालावया उडी। आपणांसी ओढी भय मागें॥' –तुगा ४७. 'घेईं माझा भार करी कईवार। उतरी हा पार भवसिंधु॥' –तुगा १६५७.

कई–ई—क्रिवि. १ (काव्य) केव्हां; कधीं. 'जळो आतां संसारु वो कईं शेवट पुरे।' –तुगा १२०. २ कोठें. 'एयेंहि सलगी करूं विहो। तरी निवो कईपां।' [सं. कदा; प्रा. कइ]

कईक—कैक पहा.

कईपक्षी—पु. कैवारी. 'माझा तो कईपक्षी पांडुरंग।' –तुगा ७७२. [?]

कउल, कउलावण, कउली, कऊल—कौमर्ध्ये पहा. 'हिगडे सल्ला कउल दिला' –ऐपो १४.

कऊबऊ—वि. (विचित्र प्रयोग) ओंगळ; तिरस्कार वाटण्याजोगी; कुरूप (वस्तु). [काऊ+वाऊ ?]

कऊळ—पु. (व.) कावीळ पहा. 'त्याला कऊळ झाला.'

कंक—पु. १ बगळा; करकोचा; कौंच; बाणाच्या शेवटीं यांचीं पिसें लावीत असत. २ अज्ञातवासांत धर्मराजानें (पांडव) ब्राह्मणरूपांत धारण केलेलें नांव; आपणास वळेंच ब्राह्मण म्हणविणारा; खोटा ब्राह्मण. ३ क्षत्रिय; यावरून मराठ्यांतील एक आडनांव उ० एसाजी कंक. [सं.] **०पत्री–पिच्छ**–पु. बाण. 'ते वज्रापरीस कठोर। कंकपत्री सरळे' –कुमुरा ५०.९२.

कंकण—पुन. १ बांगडी; चुडा. 'पुरुषा हातीं कंकणचुडा। नवल दोडा वृत्ति या।' –तुगा ९७७. २ बायकांच्या हातांतील सोन्याचा बांगडीसरखा पण रुंद व कांटेदार असा दागिना; **कांकण**; बांगडी. 'नाग मुदी कंकण.' –अमृ ९.१२. ३ यज्ञदीक्षा घेते वेळीं यजमान आपल्या हातांत पिवळा दोरा बांधतो तो. 'तें यज्ञकंकणरकरांबुजिं राघवातें. –कुशलवाख्यान' ४ लग्नविधींत हळदीनें पिवळा करून वधूवरांच्या हातांत बांधलेला अनेक पदरी दोरा. ज्यांत दुर्वा व हळकुंड बांधलेलें असतें व जो लग्नांत मंत्रून वधुवर (वधूच्या डाव्या व वराच्या उजव्या मनगटांत) परस्परांच्या मनगटांत बांधतात तो. ५ (सामा.) हातांतील कडें. [सं.]

०(हातांत) बांधणें–१ (स्वीकारलेल्या गोष्टीचा) अभिमान बाळगणें. २ (एखाद्या कामाचें) तें काम पार पाडण्यासाठीं प्रतिज्ञा करणें; मेहनत करीत राहणें. **०काडी**–स्त्री. (बे.) एक गवत; सनकाडी. **०घटित**–वि. परस्पर समान अशीं लहान लहान कंकणें किंवा वलयें एकास एक जोडून ज्या प्राण्यांचीं शरीरें बनतात तो (प्राणिवर्ग). –प्राणिमो ९७. **०बंध**–पु. १ गोलाकार बत्तीस अक्षरी श्लोकरचना; यांत कोणत्याहि अक्षरापासून म्हणावयास आरंभ केला तरी कांहीं तरी सुंदर अर्थनिष्पत्ति होते. २ लग्नांतील कंकण बांधण्याचा विधि. [सं.]

कंकणाकृति—वि. कांकणाच्या (वाटोळ्या) आकाराचें –स्त्री. कंकणासारखी आकृति. **०ग्रहण**–न. ज्या सूर्यग्रहणामध्यें सूर्याचा मध्यभाग खग्रास होऊन सभोंवतालचा बाहेरील वलयाकार भाग दृश्य असतो असें ग्रहण. वलयाकार ग्रहण. (इं.) ॲनुलर. [सं.]

कंकणाश्व—पु. मानेवर तीन भोंवरे असलेला घोडा; हा शुभदायक व कल्याणप्रद होय. –अश्वप ९२. [सं.]

कंकणी–दार—कंगणी–दार पहा.

कंकर–रा—पु. १ रेंव; वाळू; रेती; लहान लहान खडे; गारगोटयांचा चुरा; पुळणीच्या जमिनींत चुनखडीप्रमाणें या मातीचे थर पुष्कळ ठिकाणीं आढळतात. 'जेथील लाधल्या कंकर. नीच ते थोर वेव्हार होती.' –एभा १७.५. लहान खडा; गारगोटी; कण. 'हिरा कंकरा म्हणोनि.' –दावि २०१. 'नर्मदेंत जितके कंकर तितके शंकर.' २ कांकर; ढोल, मृदंग इ०ची ओढदोरी; वादी; सामान्यतः चामडें. 'कोणी वाणवशावांचून असेल त्याच्या पाठीचा तीन बोटें कंकर काढा.' –गोपद्यांची कहाणी पृ. ३६. –वि. (ल.) दगडासारखें; कठोर. 'वचन कंकर तें उतराया.' –दावि ३८०. [सं. कर्कर; प्रा. कक्कर; हिं. ककरी; सिं. ककिरो]

कंकर–री—स्त्री. देवबाभळ.

कंकरी—स्त्री. १ पीळ भरलेल्या रेशमाची लड; कांकरी, (नगच्या उलट). २ खणावरील कांठाला लागुन काढलेली खडी. [कंकर?]

कंकवा—कंगवा पहा.

कंकातणें—अक्रि. त्रासणें; भुकेनें व्याकूळ होणें; दमणें; –उक्रि. बेजार करणें; त्रास देणें; छळणें. [कांतणें]

ककार—स्त्री. १ क सारखा आकार असलेली वस्तु; ककारासारखी वस्तु. २ (ल.) सुषुम्ना नाडी. काकीमुख पहा. **ककारांत**–सुषुम्ना नाडीचें अग्र, शेवट; ब्रह्मरंध्र. 'मग जालंधर सांडी. ककारांत फोडी.' –ज्ञा ६.३०२. [सं. क+कार+अंत]

कंकाल–ळ—पु. १ अस्थिपंजर. 'नग्नभैरव वेताळ. झोटिंग पिशाच कंकाळ.' –एभा १०.५८०. २ पिशाच्च; प्रेत. 'झोटिंग वेताळ कंकाळ बंड.' –दावि ४४६. [सं. कंकाल]

कंकास—पु. (गु.) त्रास; जंजाळ; भांडणतंटा. –मौज. ता. २.६.३०. [कंकातणें]

कंकाळा–ळी—वि. (काव्य) क्रूर; रानटी, राक्षसी. [कंकाल] –स्त्री. राक्षसी; पिशाची; एक क्षुद्र देवी. 'येक म्हणती काळी कंकाळी. येक म्हणती भद्रकाळी.' –दा ८.१०.३५. **०मंत्र**–पु. वरील देवतेचा मंत्र. 'बाळा मंत्र बगुळा मंत्र. काळि मंत्र कंकाळि मंत्र.' –दा ५.४.७. [सं. कंकाल]

ककु—स्त्री. गळ्यांतील घाटी; मानेचा पुढील भाग. 'भविष्योत्तरें शोभे कंठ. बृहन्नारदीयें ककु बरवंट. ब्रह्मांडपुराणें ग्रीवा सुघंट. मनोहर शोभली॥' –स्वानु ७.३.८९. [सं. ककुद्=उंचवटा]

कंकोत्री—स्त्री. (गु.) कुंकुमपत्रिका; लग्नचिठ्ठी; निमंत्रणपत्र. [सं. कुंकुमपत्रिका]

कंकोल–ळ—पु. कापुरचिनी; कबाबचिनी. याचा वेल असतो, फळ मिऱ्याएवढें व काळें असुन थंड असतें. सुगंधी पदार्थांत व औषधांत याचा उपयोग करतात व विडयांत घालूनहि खातात. –शे ११.९६. [सं. कंकोलक; हिं. कंकोला; बं. कांकला]

कक्का—पु. (सराफी) हिरकणीच्या जातीचा रेतीचा दगड. कंकर पहा.

कंक्रांतणें—कंकातणें पहा. **कंक्रो म्हणून बसणें**–(विचित्र प्रयोग) खा खा होणें; खाखावणें; भुकेनें व्याकुळ होणें.

कंगई—स्त्री. कंगवा पहा.

कंगट्टी—पु. (बेरडी) अठरा इंच लांब व दीड इंच व्यासाचा एका टोंकाला चपटा होत गेलेला लोखंडी बत्ता. यानें बेरड लोक घर फोडतात. –गुन्हेगारजाती १०.

कंगण–णी—पु.स्त्री. १ कंकण; बांगडी; कांकण. स्त्रियांच्या हातांतील एक दागिना, हा पाटल्यांच्या शेजारीं घालतात. विशेषतः नूतन वधूच्या हातांत घालतात. 'चंद्रहार पुतळयांची माळ आली घसरून पाठिखालती. या मजला वेदना लागती कंगण्या तुमच्या पाठीप्रती॥' –होला ९६. २ पागोटयाचा कपाळावरील बिनीवरचा उंच व वळथा असलेला कंगव्याच्या आकाराचा भाग, पेच; पीळ. 'पगडीच्या कंगण्या सुटल्या.' –संग्राम ७४. ३ कंगोरा; किनार; छपेली; कंकणाकृति उंचवटा, कोर (भित, खांब इ० सुशोभित करण्यासाठीं केलेला); साधारणपणें १०।१२ फुटांवर बांधकाम गेल्यावर. एकेरी अगर दुहेरी विटांचा थर बांधकाम सोडून पुढें दाखवितात ती भित, कंगोरा. (इं.) स्ट्रिंग कोर्स. 'छप्पर जेथें भितीस मिळतें तेथें कंगणी असावी' –मॅरट ११६. ४ घोडयाची कलगी, कंगर; कपाळावरची पट्टी. 'घोडिया बाणली मोहाळी. कंगण टोप रागावळी.' –एरुस्व ८.१५. ५ केस विंचरण्याचा लहान कंगवा. [सं. कंकण; हिं. कंगन–नी; सिं.

गु. कंगणु; पं. कंगण; काश्मी. कंगुन] ०दार–वि. १ कंगणी–पुढें पीळ असलेलें (पागोटें, पगडी). ' कंगणिदार भरजरी पिळाची पगडि शिरावर । ' –मृ १८. २ नक्षीदार; सुरेख. ' अशी फक्कड कंगणीदार लावणी काढूतस कीं ज्याच नांव त्ये ' –तोबं ९८. ०बाळ्या–स्त्री. अव. कानांतील कंगण्याच्या आकाराच्या बाळ्या; बाळ्यांचा एक प्रकार; एक दागिना. ' हिरी बाळ्या कंगण बाळ्या मनोहर । ' –अफला ५५.

कंगणें—खंगणें पहा.

कंगर-ळ—कंगण–णी अर्थ ४ पहा.

कंगरपिस्स—वि. (गो.) कौशल्यपूर्ण; नक्षीदार; छानदार. [कंगरा]

कंगरा-रो—पु. १ (गो.) कौशल्य. २ कंगोरा; कांठ. [फा. कंगुरा]

कंगवा—पु. अर्धचंद्राकार पाठीची, एका बाजूनें दांते असलेली एक प्रकारची केंस विंचरण्याची फणी; कंगई. ' न्हाव्याच्या धोकटींत कंगवा असतो. ' [सं. कंकत; सिं. कंगो; हिं. कंगुवा]

कंगाल—वि. १ भिकार; दरिद्री; निष्कांचन. ' नातरी गुरू मम मातेन । योजिला होता कंगाल हीन । ' –नव १६.११७. २ गरीब; क्षुद्र; नापीक; दुर्भिक्ष असलेला (देश, गांव, पीक, जमीन, इ०). ३ लुटारू. –ख ३७०२. [फा. कंगाल; तु० सं. कंकाल=हाडाचा सांपळा; सिं. कंकालु] ०पोतें–न. १ भिक्षेची झोळी. २ अतिशय सैल अंगरखा; चोळी, विजार वगैरे पोतेवजा कपडा (निंदाव्यंजक प्रयोग). ०वंत–वि. अतिशय दरिद्री. ' जेवीं अर्कीपुढें खद्योत । हीन दीन अति दीसत । तेवी मज कंगालवंतातें । ओळखील कोण तेथें । ' –नव १९.९.

कंगाली—स्त्री. १ कंगालपणा; दारिद्र्य; दुर्भिक्ष; हीनता. २ गरिबी; द्रव्यहीनता. कंगाल पहा.

कंगी—एक वनस्पतिरोग. –शे ९.११६.

कंगुमंगू, कंगमंग—स्त्री. १ टंगळमंगळ; टाळाटाळी; कांकूं; घुटमळणें; मागें मागें घेणें. २ मोघम, दुटप्पी भाषण. ३ चोखंदळपणा (जेवणांतील); जेवतांना चार करणें. –वि. १ कांकूं करणारा; गुळमुळीत (माणूस, भाषण, वर्तन इ०). २ व्यर्थी; मोघम; निरर्थक (भाषण). ३ अशक्त; दुबळा; लुळा (प्राणी). [ध्व. मंग (मग) द्वि. ?]

कंगूरा-गोरा—पु. १ कड; कांठ; कोर. ' ती खडकाच्या कंगो=यावर शेळया चरावयास सोडून. ' –पाव्ह ४२. २ कंगणी अर्थ ३ पहा. याच्यावर नक्षीकाम करतात. ३ खांब, कोनाडा, भिंत इ० च्या कडांवरची कोरलेली नागमोडी रेघ. ४ कठडा; कोट; (वेऊळ किंवा विहीर याची). ५ कोणाकार वस्तूंच्या शिरा, कोपरा. [फा. कंगुरा=किल्ल्याचा कोनाडी तट]

कंगोरी—स्त्री. एक फुलझाड व त्याचें फूल. [कंकरी ?]

कंघी—स्त्री. (काशीप्रांत) फणी; कंगवा पहा. [हिं.]

कच—स्त्री. (च चा उच्चार दंततालव्य) १ चोहोंकडून आलेली अडचणीची स्थिति; घोंटाळा; संकट. २ चेप; दाब; अटकाव; कोंडमारा. ३ रेव; रेतीचे बारीक कण; खडयाचा अंश (भाकरी पीठ इ० तील. ४ (गवंडी) बारीक, अर्धा इंची खडी. ५ माघार घेणें; भीतीनें शरण जाणें; मागें पाय काढणें. (क्रि० खाणें). ' इंग्रजी सैन्यानें कच खाल्ली. ' –इंप १३९. ६ भांडाभांडी; तंटा; मारामारी. [ध्व.]

कच—पु. ठोकर; पोंचा; खोंक; खळगा. करकोचा; खांच; छिद्र. (क्रि० पाडणें). ' झाडास कच पाडल्यानें ... ... तेलकट राळेसारखा रस वाहतो. ' –सेंपू १.९७. [का. कच्चा=खांच]

कच—पु. केंस (उच्चार तालव्य). ' दुःशासनें धरिले कच । तेणेंचि वाढली कचकच । ' –एभा १.२१०. ' तूं मलिन कुटिल निरस जडहि पुनर्भवपणेंहि कचसा च । ' –मोआदि ९.६३. [सं.]

कंच—न. (कनां. तंजा.) पितळी तपेलें; गोल आकाराचें, ओतींव, कांशाचें किंवा पितळेचें भांडें; गुंडा. [का. कंचु=कांसें]

कचक—स्त्री. १ हाणाहाणी; मारामारी; चकमक; तंटा (काठ्या,तरवारी इ०नीं–यांत कचकच असा ध्वनि निघतो यावरून). (क्रि० उडणें; झडणें). २ (रोगाची) शिणक; शिळक; चमक; उसण. (क्रि० भरणें). ३ आकस्मिक धक्का. ४ कंबरपट्ट्याला तरवार टांगण्यासाठीं असलेली कडी; पडदळ्याची चपरास, आंकडा; (दोन टोकें एकमेकांत अडकविण्यासाठीं) फांसा; अडकण. ५ (व.) भीति; दहशत. कच पहा. (क्रि० खाणें). ' तेव्हांपासून कचक खाल्ली. ' [ध्व.] –वि. अवाढव्य; जंगी; अजस्र; प्रचंड (इमारत); मोठें; भरभक्कम (ओझें); सपाट्दून; यथास्थित (जेवण).

कचकच—स्त्री. १ पिंगळा, करकोचा यांचें ओरडणें. २ रेव किंवा रेवाळ पदार्थ दातांखालीं सांपडल्यानें होणारा आवाज. ३ अशी रेव, रेती, खडे, कण. ४ (ल.) कटकट; वाद; तंटा; भांडण; त्रास; पिरपीर. ' वृथा कचकच वाढविती । ' –एभा २८.५८३. ' मथुराताईच्या जाण्याच्या वेळीं कचकच त्यांच्या कपाळाशीं नको असेंहि त्या माउलीच्या मनांत आलें. ' –मायेचा बाजार. ५ (गु.) बडबड; जल्पना; गप्पा. ' शब्द कचकच वाढविती । ' –एभा ९.४०८. ६ (गो.) अस्ताव्यस्तपणा; गर्दी.

कचकच-चां—क्रिवि. १ कचकच आवाज करीत (खाणें, चावणें); मोठ्यानें आरडाओरड करून (भांडणें). ' त्या दोघी सदानकदा कचकच भांडतात. ' [ध्वनि]

कचकचणी—स्त्री. (गो.) कचकच लागेल, होईल अशी स्थिति; अधिकच्चेपणा. 'जिन्नसाची कचकचणी करूं नाका.' [कचकच]

कचकचणें–अक्रि. १ कचकच आवाज करणें. २ दांत चावणें, खाणें, वाजणें. [कचकच]

कचकचाट—पु. १ अतिशय कचकच; मोठा व संयुक्त आवाज; हलकल्लोळ (पिंगळ्याचें ओरडणें, भांडणांतील आरडाओरड, तरवारीचा खणखणाट वगैरे). २ भांडाभांडी; तंडाबखेडा. [ध्व.]

कचकचीत—वि. १ टणक; अपक्व; कच्चा हिरवा; (भात). २ बद वाजणारें; फुटक्या आवाजाचें (मडकें इ०). ३ मोठा आणि ठळक; स्पष्ट दिसणारा (दागिना, अलंकार). ४ जींत कचकच लागते अशी; रेवाळ (भाकरी वगैरे); रेताड; भरड. ५ (गो) पुष्कळ; विपुल. –क्रिवि. १ रोख वाजवून; खणखणा (दिलेला दाम, पैका). 'या दागिन्याबद्दल कचकचीत शंभर रुपये दिले आहेत.' २ पुरेपूर; सपाटून (मौज करणें, उपभोग घेणें). केवळ जोर दर्शविण्याकरितांहि हा शब्द योजतात. [कचकच]

कचकट—स्त्री. पटकन मोडतां येण्याजोगा, ठिसूळ असा गोरू; काठी; वांसा; तरवार इ०.–वि. भिकार; ठाकाऊ; मोडका. [कच]

कचकडा—पु. १ कांसवाची पाठ, हाड; कासवाचा खवला. २ गव्याचें शिंग वगैरे; ज्यापासून फण्या वगैरे करतात तो. ३ इंग्रजी सेल्युलाइडला प्रतिशब्द. [सं. कच्छ+कृत्ति; प्रा. कच्छकड]

कचकणें—अक्रि. १ कच खाणें; मागें परतणें; माघार घेणें (भीतीनें). २ मारामुळें दबणें; एका बाजूस निसटणें; स्थलापासून भ्रष्ट होणें. ३ ताण पडून किंचित् मोडणें (हाड; काठी, तुळई इ०). 'घराची तुळई कचकली.' ४ निराशा होणें; शरण जाणें; धैर्य गळणें. –उक्रि. जोरानें ओढणें; हिसका देणें; धक्का मारणें. [ध्व. कच; का. कचक्कने=जोरानें, एकदम; कच असा आवाज होऊन]

कचकन-कर-दिशीं—क्रिवि. काच, मडकें इ० मोडतांना होणाऱ्या आवाजाचा अनुवादक; ताडकन; खाडदिशीं; जोरानें, एकदम (पोटांत शस्त्र खुपसणें; दातांखालीं खडा सांपडणें). (क्रि० फुटणें; वाजणें). [ध्व.; का. कचक्कने]

कचकय—पु. (गो.) आंबाडे शिजवून केलेला पदार्थ. कोचकई पहा.

कचकरणें—अक्रि. कचकणें पहा. [कच+करणें]

कचकल—पुन. १ फुटक्या मडक्याचा खालचा अर्धा भाग. २ (राजा.) रास; ढीग (कांचेच्या तुकड्यांचा, बांगड्यांचा किंवा इतर वस्तूंचा). अनेक पदार्थांच्या तुकड्यांचा समुदाय; काचेचे तुकडे. [फा. कचकोल=भिक्षापात्र; प्याला]

कचकल—पुन. कांहीं कच्च्या फळांचा कठिण मगज; बीजगर्भ; गाभा. [कच्चा ?]

कचका— पु. १ तरवार किंवा काठी यांचा जोराचा वार, मार, घाव, टोला. 'दोहों हातांनीं कचका दिला। वेंबीपावता चिरित नेला।'–ऐपो ६०. २ एकदम व जोराचा हिस्का; ओढ. ३ जोर; बळ; आवेश; कामाचा धबडगा, सपाटा, झपाटा. 'सध्या कामाचा कचका भारी.' ४ निष्काळजीपणानें, धसमुसळेपणानें वापर, वागवणी; अतिशय ताण. 'याच्या कचक्याखालीं हें धोतर टिकावयाचें नाहीं.' ५ रोखठोकपणा; तडफ; तापटपणा. 'त्या सुभेदाराचा कचका कठिण.' ६ भीतीमुळें एकाएकीं बसणारा धक्का; मनावर होणारा परिणाम. (क्रि० खाणें; बसणें). [कच, कचक]

कचकाडी—स्त्री. (बायकी) तीन मुली चकावयास लागल्यावर सर्वांचे हात पालथे अगर उताणे पडले तर कचकाडी म्हणून पुन्हां चकावें लागतें त्यास म्हणतात. [चकणें]

कचकावणें-विणें—अक्रि. १ जोरानें बांधणें; खेंचणें (ओझें, गाठोडें, भारा इ०). २ मारणें; ठोकणें; खरडपट्टी काढणें; (जोराजोरानें व मोठ्यानें) शिव्या देणें. ३ सपाट्यानें लागणें; उरकण्याच्या पाठीस लागणें (काम, धंदा, व्यापार इ०). ४ एकदम जोरानें हिस्का मारणें; हासडणें; कचकणें. ५ ठासणें; चोंदणें; ठाकून ठोकून दडपणें. [कचका]

कचकावून, कचकून—क्रिवि. (प्रत्येक क्रियापदार्शी–विशेषतः जेथें शक्ति, उत्साह, चापल्य, जोर दाखवावयाचा असतो तेथें जोडतात) सर्व शक्ति खर्च करून; जिवापाड मेहनत करून; खूप; अतिशय. [का. कचक्कने] ०**बांधणें**–जोरानें, ताणून बांधणें. ०**धरणें**–घट्ट धरणें; मिठी मारणें. ०**मारणें**–सपाटून ठोकणें. ०**जेवणें-खाणें**–चापून, गळ्यापर्यंत, ओ येईपर्यंत जेवणें. 'मजल गांठायाची आहे, कचकून जेव.' ०**बोलणें-सांगणें** इ०–निर्भीडपणें, स्पष्ट बोलणें; खरडपट्टी काढणें इ. ०**कापणें, तोडणें, मोडणें, पोट भरणें, खर्च करणें** इ०–

कचकोडा—पु. (ना.) अगदींच कच्चें फळ; दोडा; कोंवळें फळ. [कच्चा+दोडा]

कचकोल—पु. कचकल पहा. –न. (कों.) फुटक्या कांठाचें किंवा विनातोंड मडकें. [तुल० फा. कचकोल=भिक्षापात्र, नरोटी]

कचक्या—वि. १ खुमखुमी जिरविणारा;जोरदार; हिंमतदार; धीट; साहसी; अधिक बलवान; वरचढ; शक्तिमान; दुसऱ्याला दाबांत ठेवण्यासाठीं तीव्र उपाय योजण्यांत मागेंपुढें न पाहणारा; खमक्या. २ सपाट्यानें काम करणारा; तडफदार; चट्चट् कामें उरकणारा; चलाख, ३ कचक पहा. [कचका]

कचखडी—स्त्री. (इमारतकाम) सामान्य खडीपेक्षांहि बारीक खडी; अर्धा इंच जाडीचे दगडाचे तुकडे. कच अर्थ ४ पहा.

कचडें—न. (ज्याचा वरील भाग फुटला आहे असा) घागरीचा खालचा भाग; बिनतोंडी भांडें. कचकल पहा.

कचणी—स्त्री. १ (कु.) गिरमीट फिरविण्याची धनुकली. २ आवळून बांधलेली दोरी: कसणी पहा.

कचणें—अक्रि. कचरणें; कचकरणें पहा. [ध्व.]

कचदील—वि. १ कुटिल. २ कच्च्या मनाचा; भित्रा; संशयी; दुबळा; अशक्त; भेकड. 'राजा कचदील आहे, येथें भेटीस येतां संशय धरितो.' -सभा १४. [फा. कज्+दिल]

कंचन—स्त्री. पंजाबांतील दोर करणारी व साप पकडणारी आणि खाणारी जिप्सीसारखी कंजर जात. कंजर पहा.

कंचन, कांचन—पु. १ आपट्याच्या पानासारखीं पण पातळ व लहान पानें असलेला, पिंवळसर फुलें येणारा एक वृक्ष; तांवडीं फुलें येणारेंहि एक झाड आहे. कांचन पहा. २ डोंगरी टेंबुरणी. ३ सोनें. 'काहे परिस कंचन करे धातु। नहि मोल तुटत पावत धातु॥' -तुगा ४३९. [सं. कांचन]

कचनार—स्त्री. एक सुगंधी वनस्पति; याच्या फुलांची सुंदर भाजी होते. 'पाच दवणा मरवा कचनार।' -अफला ४९. [सं. कांचनार; हिं. कचनार-ल]

कंचनी—स्त्री. (हिं.) नाचणारी बाई; कसबीण; कळावंतीण; नर्तकी. 'त्या कंचनी विषयीं तुम्हास कसें काय वाटतें?' -विवि १०.५-७.१२२.

कचपाश—पु. १ डोक्यावरचे केंस; कच. २ केंसांचा पाश, फांस. (क्रि० घालणें) [सं.] ०घालणें-केंसानें गळा कापणें; विश्वासघात करणें.

कचंबणें, कचमणें, कचमळणें—उक्रि. १ ढवळणें; गढूळ करणें; रेंदाळणें (हात, पाय इ० कांचा स्पर्श करून पाणी वगैरे). 'कचंबलेलें उदक.' २ हाताळणें; चिवडणें; राड करणें (अन्न). [कच+मळणें?]

कचंबणें, कचमणें—अक्रि. (पोटांत) खळाळणें; कालवणें; पोट बिघडणें.

कचमच-चां—क्रिवि. कचकच असतांना (रेव लागल्यामुळें येणारी-चव, आवाज). [ध्व.]

कचमा—पु. १ गढूळपणा (पाण्याचा, दारूचा); रेंदाळपणा. २ सबगोलेंकार; गोंधळ; घोंटाळा; अव्यवस्थितपणा; गर्दी (अन्न, कामधंदा, माणसें, गुरें इ० ची); वस्तूंचा अव्यवस्थितपणा. ३ घाण; केरकचरा; गवतकाडी. [?]

कचमोडा—वि. (व.) धैर्य नसणारा; कच खाणारा; भित्रा; भेकड; कच्च्या दिलाचा; अवसानघातकी (माणूस). 'इतक्याच श्रमानें तो कचमोडा होऊन गेला.' [कच+मोडणें]

कचमोहरें—वि. (ल.) कच खाल्लेलें; बिन हिंमतीचें (माणूस) 'मार दिला त्यामुळें लोक कचमोहरे जाले.' -पया ४३१. [कच+मोहरा]

कचर—स्त्री. (कों. व.) तळ्यांत लव्हाळ्याच्या मुळाशीं उगवणारा एक सुपारीएवढा कंद; हा उपासाला खातात. हा चिकट व गोड असतो; फुरडी. कचरा पहा. [सं. कमेरु; कच्चुरा?]

कचर-कचेर—न. (गो.) वाढ खुंटलेलें विड्याचें पान. [कुचर?]

कचर—स्त्री. (गो.) खिळे ठोकण्यासाठीं भिंतींत बसविलेलें लांकूड; ठोकळा; फळी. [?]

कंचर-री—कांचर; कंचार पहा. ०पट्टी-बांगड्या तयार करणाऱ्यावर बसविलेली पट्टी.

कचरट—वि. १ लबकर तुकडा पडणारा; ठिसूळ (पदार्थ). २ (ल.) अशक्त; कुचकामाचें; हलकट (माणूस, पशु, वस्त्र इ०). 'हिरवटामीं दुरी धरावें। कचरटामीं न बोलावें।' -दा ११.५. २१. [सं. कच्चर=दुष्ट, कुत्सित]

कचरट—न. कचरा; घाण. -वि. घाणीचें. [सं. कच्चर=वाईट, घाण. कचरा+ट=लघुत्वदर्शक प्रत्यय]

कचरणें—अक्रि. १ कच खाणें. कचकरणें पहा. -अकर्तृक क्रि. (प्रां.) (उचकी वगैरेमुळें) घशाशीं-घशाखालीं येणें (अन्न वगैरे). 'माझ्या गळ्याशीं कचरतें.'

कचरा—पु. १ घाण; केर; लांकूड वगैरेचे बारीक तुकडे; गाळसाळ. २ उकिरडा; उकिरड्यावरील घाण. (सामा.) टाकाऊ गोष्ट; निरुपयोगी वस्तु. ३ (ल.) बिन लढाऊ लोक.-ख ४३०९. 'सैन्याबरोबरचा बाजार, उदमी लोक वगैरे कचरा.' -ऐपो २३२ वरील टीप? [सं. कचर=मलिन; सिं. किचिरो]

कचरा—पु. कचरकंद. कचर पहा.

कचरा—वि. तांदुळाची एक जात.

कचरा-री—पुस्त्री. एक झाड. हें सुगंधी असतें. कचरा अंगाला लावितात; काचरी; काळी हळद. कचोरा पहा. [सं. कर्चूर; प्रा. कच्चूर; हिं. कचूर; गु. कचूरो]

कचरा, खचरा—पु. खांच किंवा खोबण पाडण्याचें सुतारांचें एक हत्यार. [खांच, खचणें]

कचरी, काचरी—स्त्री. फळाचे किंवा भाजीचे काप; फोडी. काचरी पहा. ०सुपारी-खांडकी सुपारी पहा.

कचऱ्याल—न. (कु.) फडताळ. 'कचऱ्यालांत डबी आसा.' [?]

कचलपट—वि. कच खाणारा; कच्च्या दिलाचा; भित्रा; भेकड. [कचर+पट किंवा कच+लटपट]

कचला—कचोरा पहा.

कचवा—पु. एक वाद्य. 'सतार, कचवा, सरोद आणि सारमंडळ वाजविणारे.' –(बडोदें) कलावंत खातें ४९. कछवा पहा.

कंचा-ची-चें—सना. कोणता-ती-तें. ? प्रश्नार्थक. 'त्यांतुन कंचा मागून घ्यावा.' –ऐपो ३३. [कोणचा अप]

कचा—कच्चा पहा. (अव) कचे. 'त्या गांवचे कचे राखावे.' –मसाप २.७०.

कचा—(ना.) कांचेची गोटी; बैदुल. [कांच]

कचॉ-चो—पु. १ (गो.) ठिपकेदार लहान मासा; लहान ढोमेले मासा. २ (सामा.) लहान पोर, मूल (मनुष्य, जनावर, पक्षी इ० चें) –वि. लहान; काचा. [कच्चा]

कचाकच-चां—क्रिवि. १ जोरानें मारण्याचा आवाज होऊन; सपासप; चटाचट (मारणें, तोडणें, मोडणें). 'त्यानें तरवारीनें कचाकच माणसें तोडलीं.' २ दातांखालीं रेव सांपडल्यानें आवाज होऊन; खडे लागून; कचकचां पहा. [ध्व.]

कचाकच, कचाकची—स्त्री. १ भांडण; चकमक; कज्जा; वाचाबाच. 'त्याची व आमची कचाकच झाली.' २ केशाकेशी; गुद्दागुद्दी; तरवारी, काठ्या इ० ची हातघाईची लढाई; हाणमार; तोडातोड. [ध्व. कचकच]

कचाच—पु. १ अनेक करकोच्यांचा एकदम झालेला ओरडा, शब्द. २ गोंगाट; गलबला; कलकलाट (पक्षी, माकडें, माणसें यांचा). [ध्व. कच]

कचाचणें—अक्रि. कचकचणें; कचाच करणें (पिंगळ्यानीं); ओरडणें; कलकलाट करणें; गोंगाट, करणें; रागानें आरडाओरडा करणें (माणसें, पक्षी, माकडें इ०नीं) [ध्व. कचाच]

कचाट—पुन. १ युक्ति; बेत; धाडस; यत्न; कारस्थान. 'पवें करावीं अचाटें. चालवावीं भक्तांचीं थाटें. नाना वैभवें कचाटें. उपासनामार्ग.' –दा २.९.१७. २ त्रासाचें, अवघड काम. 'हजार कचाटें करावीं तेव्हां कोठें पोट भरतें.' ३ घोंटाळा; संकट; अडचण; भानगड; लचांड. 'ऐसें सांगतां अचाट. तुज वाटेल हें कचाट.' –एभा ७.३४५; १४.४५८. ४ तोहमत; कुभांड; दुसऱ्याचें नुकसान करण्यासाठीं योजलेली गुप्त युक्ति; व्यूह. [सं. कृच्छ्र+पात ?]

कचाटी—संकटमय स्थिति; त्रास; अडचण; गोंधळून जाण्यासारखी मनस्थिति. (क्रि० सांपडणें; धरणें–बहुधा सप्तम्यंत, 'तावडींत सांपडणें' याप्रमाणें प्रयोग). 'न पडतां कचाटीं धरा भाव.' –दावि ४७३. २ लचांड; भानगड; त्रास. ३ (ल.) संसार. 'गुंतलें कचाटीं क्षमा करा.' –दावि ७६५. **कचाटींत सांपडणें**–एखाद्याच्या तावडींत येणें; अडचणींत येणें. (व.) कचाट्यांत सांपडणें.

कचाटी-टया—वि. १ कचाटें करणारा; उपद्व्यापी; भानगड्या; लटपट्या; कुभांडखोर. २ उद्योगी; कारस्थानी; मोठा योजक; ममलत्या.

कचाडें—न. कचकल. कचडें पहा.

कचार-री—पु. कांचकाम किंवा बांगड्या करणारा; कांचार; बांगडी-कासार. [कांचकार]

कचावणें—अक्रि. कचणें; कचकरणें पहा.

कची—वि. चीर पडलेला; बद आवाजाचा (रुपया इ०); व्यंग असलेला. [ध्व. कच] **०ढेली-चा**–वि. बद; ठोका पडलेला; छाप पुसलेला (रुपया इ०)

कची—स्त्री. (गो.) फुगलेलें पोट. [?]

कचीकाई—स्त्री. (कर्ना) ईडनिंबू. [का. कंच=पितळी भांडें+काई=फळ; पितळेच्या भांड्याप्रमाणें पिवळे दिसणारें फळ]

कची वहिवाट—स्त्री. कुळकर्ण्यानें लिहून पाटलाची सही घेतलेली जमाखर्चाची पावती; कच्ची पावती. [कच्ची+वहिवाट]

कंचुक—पु. १ पेटी; बंडी, अंगरखा; झगा; खमीस; पांघरूण; चोळणा; लांडी विजार, इ० 'समर्थकटीचा आपाद कंचुक.' –सप्र. ७.३१. २ कवच; चिलखत. ३ सापाची कात. ४ साल; कोंडा; कवटी; कवच; बाह्यांग (दाणा, फळ, इ० चें). ५ (काव्य) आवरण, आच्छादन; पांघरूण. 'बाहेरी नभाचा कंचुक.' –विपू ४.६५. 'पाविजे जेंव कंचुकातें. ब्रह्मांडाचिया.' –गीता १.११४५. [सं.]

कंचुकित—वि. कंचुकानें, आंगरख्यानें आच्छादित. 'आपाद कंचुकित. रोमांच आले ॥' –ह्रा ९.५२७.

कंचुकी—पु. १ अंतःपुराचा वृद्ध द्वारपाळ, पाहारेकरी; खोजा; चोपदार; (काव्य) राजमहालांतील राजाचा विश्वासु नोकर. २ साप. –स्त्री. १ काचोळी; चोळी. 'अंतर्वसन बाह्यवसन. कंचुकीवरून प्रावरण. पंचवसनें संपूर्ण. स्त्रियांलागीं देईं का ॥', –ह६४-१६६; 'करयुगें उर मस्तक ताडिते. वसन आणिक कंचुकि फाडिते ॥' –वामन भामा. ५. २ एक वनस्पति; आमंध. ३ फुलाचें कचोळें, वाटी, गोंड; देठांजवळ असलेलें फुलाचें आवरण, [सं.] **०विधान**–न. चोळी उतरून ठाकणें; घटकंचुकीचा प्रकार. 'कुंभपूजा कंचुकीविधान. अघोरक्रिया मद्यपान. आणि त्रिपुरसुंदरीपूजन. कामाक्षा विधी ॥' –स्वानु ७.२.४३.

कचेबचे—पु.अव. (प्र.) कच्चे बच्चे पहा.

कचेमांडूक—न. (कु.) शेपटी असलेली बेडकाची जात; लहान बेडूक. [कच्चा+सं. मंडूक]

कचेरी—स्त्री. काम, कारभार करण्याची (खाजगी, संस्थानी, सरकारी) जागा; कार्यालय, न्यायालय; कोर्ट; चावडी. २ कचेरींत काम करणारी मंडळी. ३ त्यांचें काम; कारभार. [हिं. कचहरी; ते. कचेली]

कचेल—न. कपाट. कच-याल पहा.

कचोरा—पु. (नाविक) नावेचा कणा–नाको.

कचोरा-री-ला—पुस्त्री. हळदीच्या झाडासारखें एक झाड. याचे कंद जमिनींत सांपडतात. कंदाच्या काच-या उकडून लोण-च्यांत घालतात. कचोरा सुगंधी असल्यामुळें अंगास लावण्याच्या मसाल्यांत घालतात. कापूरकाचरी म्हणून याची एक दुसरी जात आहे. कचरा-री पहा' [सं. कर्चूर; प्रा. कच्चूर; गु. कचूरो]

कचोरी-डी—स्त्री. १ तिखट मसाल्याचें पुरण भरलेली पुरी, यांत बटाटे व डाळींचें पुरणहि घालतात. (गु.) कचोरी. ' पोळी भात सीरा कचोर । ' –नव ९.११६. २ कणीक व उडदाची डाळ यांची तळलेली पुरी. ३ विरडीपुरी; शिंगाडेपुरी(मांसयुक्त)चा एक प्रकार. –गृशि २.१९. [प्रा. दे. कच्चरा; हिं. कचौरी; का. कच्चरी]

कचोळ-ळा-ळें, कंचोळ—नपु. १ एकास एक लागून तीन घरें व वर पेला असलेलें एक लहान पूजेचें उपकरण (पंचा-मृत ठेवण्याकरितां); गंधाक्षतपात्र; एक पूजापात्र. ' उगेंच हातीं मिरवी कचोळें ' –सारुह ७.९०. –ह १९.४७. २ वर्तुळाकृति बसलेले लोक; कोचाळें. ३ फुलांचें आच्छादन, ' कनक कमळांचा कचोळा । कीजे परागाचा उधळा । ' –शिशु ७८१. –शिल्पवि ६६५. [फा; कचकोल=पेला. तुल० सं. कच्छ+आलय]

कचोळी—स्त्री. (गो.) सोनें इ० धातूंची देवाची मूर्ति.

कच्च—(कर्ना.) खांच; लहान खळगा (लाकूड वगैरेवर चाकू, रंधा वगैरेनें पडणारा). [का. कच्चु=खाच, वण]

कँच्चकरप—अक्रि. (गो.) खेकसणें.

कच्च जावप—अक्रि. (गो.) दचकणें; धस्स होणें.

कच्चा—वि. १ न पिकलेला; हिरवा; कोंवळा (फळ, गळूं, पान इ०). २ साफसूफ न केलेला; ओबडधोबड (दगड, चित्र, इ०). ३ अशिजा (भात, भाकरी, रसायन इ०). ४ अपुरा व पक्का न केलेला; सरासरीचा; ठोकळ (जमाखर्च, काम, इ०). ५ अपूर्ण; अपक्व; अप्रौढ (कट, मसलत इ०). ६ अपुरें समजलेलें किंवा मिळविलेलें (शास्त्र, कला). ७ अपुऱ्या ज्ञानाचा; अर्धवट शिक्ष-णाचा (माणूस). ' तो अभ्यासांत कच्चा आहे.' ८ बिन वाकब-गार; अडाणी; संस्कारहीन; यथातथा ज्ञान असलेला. ९ कोता; अप्रौढ; संकुचित (विचार, बुद्धि). १० गौण; लहान; कमी (वजन, माप; इ०). ११ न टिकणारा; लवकर नाहींसा होणारा (रंग इ०). १२ सविस्तर; सर्व पोटभेद ज्यामध्यें घेतले आहेत असा (हिशेब). १३ बळकट नाहीं असा (बांधकाम इ०). ' मातींत घर बांधूं नये, मातीचें काम अगदीं कच्चें असतें. ' १४ इयत्तेहून, वाजवी-पेक्षां कमी. ' आम्हीं एका तासांत एक कच्चा कोस चाल्तों. ' १५ कढवून फार घट्ट न केलेला (साखरेचा पाक इ०). १६ (गणित) त्रैराशिकांतील दुसरें व तिसरें या दोन पदांचा गुणाकार करून येणाऱ्या रकमेस कच्चे म्हणतात. नंतर त्यांस प्रथमपदानें भागून आलेल्या भागाकारास पक्के किंवा पक्का म्हणतात (ज्याच्या-मध्यें भारी परिमाणाच्या किंमतीवरून हलक्या परिमाणाची किंमत काढावयाची असते अशा हिशेबांत उपयोग), उ० १० शेरांस पांच रुपये, तर १॥ पावशेरास किती. येथें ५ व १॥ यांचा गुणाकार जो ७॥ ते कच्चे. १७ कामामध्यें तोटानफा होईल तो मूळ धन्याचा अशा बोलीनें केलेली (नोकरी. मामलत, इ०); पगारी (मक्ता न देतां नोकराकडून प्रत्यक्षपणें सारा वगैरे वसूल करण्याच्या पद्धतीला हा शब्द लाविताता). कच्चा हा शब्द अपुरा, ओबड-धोबड, अप्रौढ, उणा ह्या अर्थानें शब्दशः व लाक्षणिकरीत्या अनेक प्रकारें योजतात. उ० **कच्चा मजकूर–लिहिणें–घर्तमान–बातमी–हकिगत–कैफियत**–वरवरचें, पक्कें नव्हे तें, कसें तरी तयार केलेलें; अंदाजी. **कच्चा ताळा–ताळेबंद–कीर्द–जमाबंदी–बाब–हिशेब–वेरीज** इ०, =अपुरा;बंद न केलेला, अपूर्ण. [ध्व. कच; हिं. कचा; तु० सं. कथ्थ=खोटें] **०अमदानी**–स्त्री. एकंदर जमा (खर्च वजा न करितां). **०अंमल**–पु. १ पगार घेऊन केलेली सरकारी (जिल्ह्याची, तालुक्याची) नोकरी, काम; याच्या उलट मक्त्याचा अंमल. **कचा मोकद्दमा** पहा. २ कच्चा अर्थ १७ पहा. **०असामी**–पु. हंगामी, उपरी शेतकरी–मालक; ज्याचा कबजा कायमचा नाहीं असा इसम. **०आकार**–पु. ठोकळ हिशेब, अंदाज; साधारण आढावा. **०कागद**–पु. खळ न लावलेला कागद. **०करवड**–पु. माशाचा एक प्रकार, याचा रस्सा करतात. –गृशि २.४७. **०खर्च**–पु. १ कच्चा हिशेब, टांचण. २ तात्पुरता, कायम नव्हे असा खर्च. 'कच्चे खर्चाचे तमाशे असतील त्यांच्या नाइकानें वेळीं आपले लोकास १० दिवस रजा द्यावी.' –(बडोदें,) कलावंत खातें २०. ३ जुजबी; ठोकळ खर्चाखेरीज खर्च; जो प्रसंगीं होईल तो सामान्य खर्च. **०खर्डा**–पु. १ अंदाज-पत्रक; बजेट (हिशेबाचें); पक्का करण्यापूर्वीचा पहिला खर्डा. २ कुळकर्ण्यानें शेतकऱ्यांकडून आलेल्या रकमांचा ठेवलेला हिशेब. **०खाना**–पु. पोळया, डाळभात, खिचडी इ० जिन्नस. –मसाप १.१०. **०डांक, डाग**–पु. शिसें, जस्त किंवा कथील यांनीं दिलेला डांक (चांदीचा नव्हे); तात्पुरता जोड; कस्तर करणें. **०ताप, ज्वर**–पु. साधा ताप; विकोपाला न गेलेला ताप. **०तोळा**–पु. (क.) ९२ गुंजांचा तोळा (पक्का तोळा ९६ गुंजांचा असतो). **०दोरा-धागा**–पु. पटकन् तुटणारा दोरा; पीळ न घातलेला दोरा. **०पक्का**–वि. अंदाजी, ठोकळ आणि त्यावरून केलेला पक्का हे दोन्ही ज्यांत आहेत असा (जमाखर्च, वही, खतावणी इ०). **०पाडा-ढा**–पु. ठोकळ, तोंडीं, त्रोटक, ठाकठीक न केलेली, कच्ची हकिगत,

वर्तमान, साधन (क्रि० वाचणें). **०बटवडा**–पु. इसमवार पगारवाटणी (सरकारी नोकर किंवा मजूर यांना); डोईपगार. **०भरणा**–पु. रयतेनें भरलेला सारा, वसूल (ऐन किंवा नक्त). **०मामला, मामलत**–पु. कच्चा अंमल पहा. **०माल**–पु. ओबडधोबड; न कमावलेला; मूळच्या स्वरूपांतील; ज्याचा जिन्नस बनविला नाहीं अशी वस्तु (कापूस, कातडें, बी, वनस्पती इ०). ' विलायती कारखान्यांत हिंदुस्थानांतून जो कच्चा माल जातो तो बंद झाला. ' –के ३१.५.३०. **०मोकदमा**–पु. कामामध्यें नफातोटा होईल तो धन्याच्या वाटयाला अशा बोलीनें केलेलें काम, गुमास्तेगिरी; कच्चा अंमल. मक्त्याच्या उलट. **०रंग**–पु. १ धुतला असतां जाणारा, न टिकाऊ रंग; रग पक्का करण्यासाठीं उकळावा लागतो, तो उकळला नसला म्हणजे त्यास कच्चा रंग म्हणतात. २ तिफाशी सोंगटयांत काळा अथवा हिरवा रंग. **०वसूल**–पु. रयतेकडून आलेला सारा, खंड (ज्याची वर्गवारी काढली नाहीं असा). **०शेर**–पु. प्रमाणभूत (पक्क्या) शेरापेक्षां कमी असणारा शेर. (क.) १५ रुपये भारांचा शेर. (उलट पक्का ८० भारांचा). **कच्ची**–स्त्री. (तिफाशी सोंगटयांत) १ मेलेली पण पुन्हां नुकतीच जिवंत केलेली, नुकतीच बसविलेली सोंगटी; पट फिरून न आलेली सोंगटी. २ हिरवी किंवा काळी सोंगटी. तिफाशी सोंगटयांत तांबडा व पिंवळा यांस पक्का व हिरवा व काळा यांस कच्चा रंग अशा संज्ञा आहेत. ३ (ल.) फजिती; मानहानि; अपकीर्ति. **०असामी**–स्त्री. दिवाळें वाजलेला किंवा अपुरीं साधनें असलेला, नालायक सावकार, कंत्राटदार, कूळ, अजेदार, खंडकरी इ०. **०कमाविशी–कमावीस**–स्त्री. तैनात घेऊन केलेलें सारावसुलीचें काम; नफातोटा धन्याचा अशा बोलीनें मामलत वगैरे करावयाचा प्रकार; कच्चा अंमल (ह्याच्या उलट मक्त्याची कमाविशी). **०कुंदी**–स्त्री. कपडा भट्टींत न घालतां नुसता धुवून केलेली थंडी इस्त्री. २ धुतलेल्या कपडयास खळ न लावतां केलेली इस्त्री. [कच्ची+कुंदी=खळ लावणें, इस्त्री करणें] **०कैद**–स्त्री. चौकशीपूर्वीची किंवा अपराध शाबीत होण्यापूर्वीची कैद. २ नजरकैद; साधी कैद. **०कोंबी करणें**–(क.) एखाद्याचें भजन करणें. **०खोर**–पु. सदोदित ज्याची फजिती किंवा पच्ची होते असा माणूस;फजीतखोर. **०जमाबंदी**–स्त्री. एकूण आलेली गांवची जमा (खर्चे वेगळा काढून तो वजा न घालतां). **०जप्ती**–स्त्री. (कायदा) दाव्याचा निकाल लागण्यापूर्वी केलेली जप्ती; अवलजप्ती पहा. **०बाजू**–स्त्री. (सोंगटयांचा खेळ) तिफाशी डावांत काळधा व हिरव्या सोंगटया. **०बुटी–ट्रटी**–स्त्री. सोनेरी किंवा रुपेरी रंगानें कापडावर काढितात ती बूट, फुलें, खडी. –वि. अशा कापडाचें (पागोटें; अंगारखा इ०); **खडीदार. ०माती**–स्त्री. कोरडी, चिकणपणा नसणारी माती. **०मामलत**–कच्चा अंमल पहा. **०मिती**–स्त्री. मारवाडी, सावकार हे कर्जाऊ दिलेल्या रकमेची तारीख आदल्या दिवशींची घालतात ती. याच्या उलट पक्की मिती (कुळाकडून आलेल्या रकमेची तारीख मात्र दुसऱ्या दिवशींची घालतात). **०मुदत**–स्त्री. (सावकारी) हुंडी हातांत पडल्यानंतर अमुक दिवसांतच ती वटविली पाहिजे अशा प्रकारची दिलेली मुदत; ह्याच्या उलट बंदीमुदत (=हुंडींत दिलेल्या तारखेनंतरची जास्त मुदत). २ हुंडीची ठराविक मुदत भरण्यापूर्वीचा काल; अद्याप संपावयाचा मुदतीचा काल. **०लढाई**–स्त्री. पुरा निकाल न होतां झालेलें युद्ध; दोन्ही पक्षांनीं मध्येंच सोडून दिलेली लढाई; अनिर्णीत लढाई. **०वहिवाट**–स्त्री. कच्ची वहिवाट पहा. **०शाई**–स्त्री. लाख न मिसळलेली, पाण्यानें निघून जाण्यासारखी शाई. **०सुपारी**–स्त्री. न शिजविलेली सुपारी; पोफळ, रोठा. **०हुंडी**–स्त्री. अद्याप न पटलेली किंवा न स्वीकारलेली हुंडी. **कच्चें**–वि. न पिकलेलें, व इतर अर्थी कच्चा पहा. **०अंडें**–न. नवीन घातलेलें अंडें; ताजें अंडें. **०अक्षर**–न. खराब व बिन किंमतीचें अक्षर; वळण नसलेलें अक्षर. **०इरसाल**–न. जिल्ह्यांतून सरकारी खजिन्यांत पाठविलेला शेतसाऱ्याचा भरणा. **०कातडें**–न.न कमावलेलें किंवा रंगविलेलें कातडें.–**खोर**–कच्ची-खोर पहा. **०खातें**–न. (हिशेब) ज्या खात्याचें येणें–देणें पुढील सालास उतरावें लागत नाहीं असें खातें; तात्पुरतें खातें. **०गिरी**–स्त्री. कच्चेपणा; अपूर्णता; अपक्वता. 'तुम्ही आधीं कच्चेगिरी केली म्हणून फसला.' **०चीट–छीट**–न. जें धुतलें असतां त्यावरील रंग नाहींसा होतो असें चीट. **०दूध**–१ न तापविलेलें, निरसें दूध. २ नवीन व्यालेल्या जनावराचें पहिल्या बारा दिवसांतील दूध; कोवळें दूध. **०नाणें**–न. चलनी नाण्यांत आलेला सरकारी वसूल (यांत निरनिराळीं नाणीं सरमेसळ आलीं असतात). **०पान**–न. पानवेलीचें, विडयाचें हिरवें पान (याच्या उलट पक्कें, पिकलेलें पान). **०पोतें**–न. सरकारी चावडींत भरलेला शेतसारा; सरकारी खजिन्यांत ज्या स्थितींत येतो त्या स्थितींतील वसुली पैसा. **०बच्चें**–न. (अव. कच्चींबच्चीं) मूलबाळ; पोरबाळ; लहान मूल. ' येक म्हणे गा पळोन जावें । तरि कच्चे बच्चे काय करावे । ' –दावि २३२. ' तो चार कच्च्याबच्च्यांचा धनी आहे. ' [हिं. कचबच] **०वारा**–पु. (तिफाशी सोंगटयांत) फांशांवरील एक दान; (एकावर पांच, एकावर सहा व एकावर एक अशा) बारा ठिपक्यांचें दान. **०मडकें**–१ न भाजलेलें मडकें. २ (ल.) अज्ञानी माणूस (मडकें=डोकें, बुद्धि). ' हें अजून कच्चें मडकें आहे. ' –नाम ४. **०रंग**–पु. (तिफाशी सोंगटयांत) हिरवा व काळा रंग. कच्ची बाजू पहा. **०रेशीम**–न. पाण्यांत न उकळलेलें रेशीम. **०लोणी**–न. कोऱ्या दुधापासून घुसळून काढलेलें लोणी (दह्याचें नव्हे). **०वजन**–न. (क.) (सोन्याचें) ९२ गुंजांचा तोळा. कच्चा तोळा पहा.

कच्चेरा–पु. पावसाळ्यांत, बाजारांत भात येत राहील अशी व्यवस्था करणारा मुंबईतील ठेकेदार. अशी नेमणूक जुन्या काळीं सरकारांतून होत असे.

कच्छ—पु. १ कासोटा; नेसलेल्या वस्त्राचें टोंक जें मागें खोंवितात तें. (क्रि० घालणें; सोडणें). २ नदीच्या किंवा समुद्राच्या कांठचा प्रदेश. कच्छप्रांताला यावरून नांव पडलें आहे ३ दलदल; पाणथळ जमीन. 'भीतो बहु दूरुनिहि पद ठेवाया जसा करी कच्छीं.' –मोमंभा २.४८. ४ कांसव, व त्याची पाठ. ५ विष्णूच्या दशावतारांपैकीं दुसरा; कच्छावतार. ६ नांदुरकीचें झाड ७ नावेची नाळ. [सं.]

कच्छप—पु. १ कांसव. 'पृथ्वीलागुनी कच्छप।' –दावि १६८. २ नांदुरकी. ३ कासोटा. कच्छ पहा. **कच्छपीं लागणें**–आश्रय करणें; एखाद्याच्या मागें मागें करणें, तेंव्हानें चालणें, नादी लागणें (माणसाबद्दल–आपलें काम करून घेण्यासाठीं); त्याचेंसें होणें; त्यावर अवलंबून असणें (कार्य, पदार्थ) (सोमयज्ञामध्यें बहिष्पवमानाच्या वेळीं एक ऋत्विज दुसऱ्याच्या कामोट्याला धरून आहवनीयाकडे जातो त्यावरून). 'तो सारखा बायकोच्या कच्छपीं लागला आहे हें बरें नाहीं.' २ पाठ न सोडणें; पाठ पुरविणें; त्रास देणें. 'अरे, माझ्या कां असा कच्छपीं लागला आहेस? जरा खेळायला जा!' [सं. कच्छ]

कच्छपी—स्त्री. सरस्वतीचा वीणा. [सं. कच्छ]

कच्छमच्छ—न. (बायकी) चातुर्मासांत पहिले दोन महिने दूध व शेवटचे दोन महिने दहीं न खाणें हें व्रत. (विष्णूच्या पहिल्या दोन अवतारांच्या जोडीप्रमाणें दूध, दहीं हे शब्द जोडीनें येतात यावरून).

कच्छी—वि. १ कच्छ प्रांतांतील (घोडा, माणूस इ०). [कच्छ] –स्त्री. (गो.) मेणा.

कछवा—स्त्री. (संगीत) एक सतार; यांतील भोपळा कासवाच्या पाठीसारखा असून क्वचित लांकडी असतो. तारांची संख्या, तारा मिळविण्याची पद्धति, पडदे वगैरे सर्व बाबी सतारी सारख्याच असतात. यांतहि रागदारीच्या व लयकारीच्या गती वाजवितात. [सं. कच्छ]

कंज—पु. ब्रह्मदेव. –न. कमळ. 'सर्वस्व परित्यागुनि ज्याचें स्मरतात पाद–कंज यमी।' –मोवन १.२८. [सं. कम्+ज] ०**कन्या**–स्त्री. सरस्वती.

कज—(कों.) एक मासा.

कंजर—स्त्री. शिंके करणारी, जोतीं–जुंपण्या, पिछाडया, म्होरक्या, दोऱ्या वळणारी एक जात; जिप्सिप्रमाणें एक भटकी जात. –गांगा ११९. ही जात अस्पृश्यांपैकीं समजली जाते. कंचर पहा.

कंजरीट—पु. खंजरीट; ताजवापक्षी. ह्याच्या डोळ्यांची उपमा बायकांच्या डोळ्यांस देतात. 'बोलली भुपास काय कंजरीट लोचनी.' –(रामसुतात्मज) द्रौपदी-वस्त्रहरण ११४. [सं. खंजरीट]

कजलणें–जेलणें—अक्रि. (दुफाशी सोंगटयांत) दुफाशी सोंगटयांत सोंगटया जुगल्यानंतर वारा, वेती, दुहुंडी इत्यादि जुगदान खेळणें. कदलणें पहा.

कजलवाश—पु. बंदुकवाला, लाल टोपीचा इराणी शिपाई. [तु. किझीलवाश्]

कजली—कदली पहा.

कजा—कज्जा पहा. 'कजा शंभू ब्रह्मा करिति हृदयाब्जीं पदक ज्या।' –वामन विराट ५ १.

कजाख–ग—वि. १ क्रूर; दुष्ट; राक्षसी; रानटी. (रशियन सैन्यांतील कोसॅक नांवाचे शूर व धाडसी घोडेस्वार, यावरून). २ भांडखोर; तंटेखोर; खाष्ट; हट्टी. [तु. कझाक्=लुटारू, चोर, पुंड; रशि. कोसॅक]

कजाखी–गी—स्त्री. १ रानटीपणा; क्रूरपणा; राक्षसीपणा; कजागपणा. २ गनिमिकाव्याची जोराची लढाई. 'ते फौज कजाखीस व आमची फौज समुन्ख झुंजास कामास येईल.' –दिमरा १.२२. ३ कष्ट–अष्टप्रधानांचा इतिहास २४५. ४ ताकद; सैन्यबळ. ५ युक्ति; हुन्नर. 'चौकशी पडली असतां कजाखी करून नांवें न सांगतां सुटून येऊन....' –मराचिथोशा ३९. ६ पुंडाई; चोरी; लुटफाट. 'इस्माईलबेग कोठील कोण ऐसें असतां ५००० फौज बाळगून कजागी करितो.' –रा १०.२०१ [तुर्की]

कजान—पु. नारळाच्या सावळथा.

कंजार, कंजारी—पु. एक जातीचे लोक. कंजर पहा. –गांगा ११९.

कंजारी, कंजारीण—स्त्री. १ कंजार जातीची स्त्री. या टाळथा पिटून व अश्लील गाणीं गाऊन भिक्षा मागतात. –गांगा ११९,१२६. २ (ल.) केस पिंजारलेली स्त्री. 'कशी कंजारीण आयत्यावेळीं पुढें झाली.' –कीच. –भाव ११८. [हि.]

कजावा—पु. १ उंटाचें खोगीर. २ उंटाचें वाहन. यांत बायका बसून जातात. [फा.]

कजिया—कज्जा पहा.

कंजूत—वि. (व.) शिवळा बेरडया.

कंजूश–ष–स—वि. कदू; कवडीचुंबक; कृपण; चिक्कू. [सं. कर्ण+जुष्; प्रा. कण्णझूस ?; हिं. कंजूस=कानांतील मळ खाणारा, कृपण]

कजेल–ली—नस्त्री. कदली पहा.

कजेलीवर येणें—सक्रि. भांडण करणें; मारणें; ओरडणें. [कज्जा]

कज्जल—पुन. काजळ (दिव्यावर धरलेलें); शोभेसाठीं किंवा औषधासाठीं याचा उपयोग करतात; सुरमा. कज्जली पहा. [सं.]

कज्जला—वि. (व.) भांडखोर; कजाग. [कज्जा+ला]

कज्जली—स्त्री. १ (वैद्यक) पारा व गंधक एकत्र खलून केलेलें रसायन; काजळी. २ काजळासारखें औषध.

कज्जा—१ भांडण; तंटा; वैर; वितुष्ट; शिवीगाळ. २ (कायदा) वाद; प्रकरण; खटला. (विशेषतः फौजदारी वाद). ३ लढाई. 'कज्जा मोठा घोरंधर जाला.' –राज ३.१८४. [अर. कज्जिया=प्रतिज्ञा, गोष्ट; फा. कज्जिया=भांडण; तुल० सं. कार्य–काज्ज] **०खांदून काढणें**–भांडण उकरून काढणें. **०कटकट–खोकला–भांडण-कफावत**–पुनस्त्री. लहानमोठे भांडणतंटे· वादविवाद; वितुष्ट-विरोध. –रा ८.१८३. 'कज्जेकफावती होवोत रस्त्यांत.' (क्रि० करणें; काढणें; आणणें).

कज्जाक-ख, कज्जाकी-खी-गी—कजाख-खी पहा.

कज्जेखोर, कज्जेदलाल—वि. भांडखोर; तंटेखोर; कळीचा नारद; भांडणें लावणारा, उपस्थित करणारा. 'आम्हां भांडखोर व कज्जेदलाल शास्त्र्यांचीं अशीं लग्नें लावण्यांत आल्यामुळें नानासाहेबांच्या वारसांप्रमाणें आम्हालाहि भाऊबंदकी साधण्याचा हक्क सांप्रत प्राप्त झाला आहे.'–भाऊ अं. २.प्र. १. **कज्जेदलाली**–स्त्री. उपस्थित केलेलीं भांडणें; भांडणें लावण्याची वृत्ति; त्याबद्दल मिळणारा पैसा. –के ३१.५.३०. 'शांतेच्या प्रसंगीं कज्जेदलालीच्या तंटेबखेड्यामध्यें रूपमाया सेनापतिसाहेबानीं वादीप्रतिवादीचें काम आपल्याकडे घेणें म्हणजे परमेश्वरी संकेताविरुद्ध वागण्यासारखें आहे.' –बाय २.२. [फा. कज्जियादलाल]

कज्या—कज्जा पहा. –सभासद ४८. 'बाकीचा पैसा द्यावा म्हणून कज्या केला.' –ऐपो २८६.

कंज्याळ—न. (माण.) पाण्यांत उगवणारी एक वनस्पति.

कट—पु. १ जूट; टोळी; संघ; ऐकमत्य. 'अलीकडे अशा प्रकारच्या हजारों जुटी किंवा कट युरोपांत होऊं लागले आहेत.' –आगर ३.६७. २ बंदुकीच्या दस्त्यास नळी घट्ट बसविण्यासाठीं असलेलें वेढें, कडी; हत्तीच्या दातांना घातलेलें कडें; (सामा.) वेढें; रिंग. 'बंदुकीला कट पट्ट्यास नक्षी.' –प्रला ४७. ३ अंगावर किंवा कपड्यावर बसलेलें मळाचें पूट, लेप. ४ सोंगट्यांच्या पटांत × अशी खूण केलेलें घर, (ह्या घरामध्यें सोंगटी बसली असतां ती मरत नाहीं, तिला कटावर बसली असें म्हणतात). 'हिरवी मागें पिवळी लागे लाल बैसली कटीं। घरांत राहे पडून काळी तिची खुंटली गति।' –विक ८६. ओकीबोकीच्या वगैरे खेळांत एक रंगाच्या चार सोंगट्या. ५ तंबूच्या किंवा कनातीच्या काठ्यांचीं टोकें बसविण्यासाठीं आणि तंबूचे दोर ज्या जागीं बांधतात ती जागा सुरक्षित राहण्यासाठीं तंबूच्या कनातीला लाविलेली कातडी टोपी, खोबण; (सामा.) चामडयाचा कांठ; कड; पदार्थाची कड खराब होऊं नये म्हणून तिला घातलेला कातडी गोट. ६ गंडस्थल. 'प्रेरियलें भेदाया पतिद्वैर्यद्विरदकट कटाक्ष तिनें.' –मोसभा ५.१६. ७ अमुक एक परिमाणाचा कडबा बांधण्याची दोरी (साडेतीन हात लांबीची). –खरे ८५०. ८ आग्रह. –खरे ४४८६. ९ (अ.) सतारीचा पडदा. (आ) ज्यांतून सतारीच्या तारा ओवून खुंटीस बांधतात त्या भोकें असलेल्या हस्तीदंती पट्ट्या. १० हिरडे व लोखंडाचा कीस यांचें मिश्रण. (?) ११ बिझिक खेळांतील ४ एक्के, ४ राजे, इ० जे मार्कांचे संच ते. [सं. कट्=आवरण घालणें, आच्छादणें; कट. तुल० का. कट्टु=बांधणें, रचणें, बंधन घालणें] **कटास हात लावणें**–देवळाची पायरी अथवा उंबरठा याला हात लावून विश्वासु राहण्याबद्दल शपथ घेणें; (एखाद्या कार्याबद्दल अथवा गुप्त मंडळीबद्दल), वेलभंडार उचलणें.

कट—पु. कष्ट; त्रास; दुःख; यातना; वेदना (अव.) (क्रि० खाणें; भोगणें). [कष्ट]

कट—पु. १ सैन्याचा एक गट, व्यूह, विशिष्ट रचना. २ गुप्त मसलत; व्यूह; विभू. 'तुम्हाला त्या सर्वांनीं वेगळें टाकण्याविषयीं कट केला आहे.' 'आमच्याविरुद्ध पुण्यांत कट झालेला आहे कीं नाहीं बोल?' –इंप ३७. [का. कट्टे=रचना, बांधणी]

कट—पु. १ पुरण शिजवून आमटीसाठीं त्यांतील जें पाणी काढतात ते. २ काढा; कषाय; घाणेरडें पाणी (कपडे धुतल्यानें झालेलें). [का. कट्टु=डाळीचा, कडधान्याचा रस]

कट—स्त्री. कटि; कंबर. 'सुंदर ते ध्यान उभे विटेवरी। कर कटावरी ठेवूनिया।'–तुगा १. 'विटेवरी पाय, कटेवरी हात.' [कटि, कट]

कट—पु. कूट गाणें. 'कटावरि कट बंदावरि प्रबंद।' –दावि १६३. [का. कट्टु=रचणें (कविता, नाटक इ०), कटाव]

कट—पु. मनाई; थांबविण्याचा हुकूम. 'ते जाणोनियां एम्पेर दोरु। लोकासि कटु केला थोरु। म्हणे नकरा युवेअनचा संसारू। ऐसा डांगोरा पिटिला।' –लिपु २.४२.१३७. [का. कट्टु= प्रतिबंध करणें]

कट—पु. १ घाव; वार; फटका. २ (क्रिकेट) बोलरनें टाकलेला चेंडू अडविणें (डाव्या बाजूस न मारतां); दिशा बदलणें (चेंडूची). याचे फॉरवर्ड कट, स्क्वेअर कट व लेट कट असे प्रकार

आहेत. –व्यायाम १०.१९२२. [इं.; तुल० सं. कृत्त; प्रा. कट्ट= कापलेलें, छिन्न]

कट—पु. काळा रंग; कीट. [सं. किट्ट]

कट—पु. १ (कुण.) कड; शेवट; बाजूचा गोट. २ (बा.) शेताचा बांध. [कड; का. कट=शेवट]

कटई—पु. चांभारांतील एक पोटजात; यांतील लोक पडद्यास कट लावितात. कट अर्थ ५ पहा.

कटक—न. १ सैन्य. 'एकी पाषाण वाऊनि उतरलीं । समुद्र कटकें ॥ '–ज्ञा १०.३६. 'हें कटक सोड तिकडे चाल तुझ्या हरुनी गोधना खळ तो । ' –मोविराट. (नवनीत) ७१. 'तरी बहुत कटक घेऊन । ज्येष्ठासि धरी तूं वेष्टून ।'–रावि ३८.१३९. २ कंकण; कडें (हातांतील). 'परंतु मुगुट नव्हे कटक। कडें मुगुट होइचना ॥ ' –यथादी १५५७. 'यश हारविलें तेथें किति शस्त्रें हार कुंडलें कटकें ॥ ' –मोआदि ३२.३२. ३ छावणी. ४ राजधानी. [सं.] ०**उलगणें**–(क.) कार्य पार पडणें. **म्हण** कटकास गुळवणी=सैन्याला गूळपाणी· जसें पुरणार नाहीं तसें (पुष्कळ पाहुण्याना अपुरें अन्न). अपुरेपणा. ०**बंद**–वि. सैन्यासहित; सैन्यानें सिद्ध. 'खान कटकबंद केला ' –ऐपो ११. 'कटकबंद फावे पुढें कीर्ति धावे । ' –दावि ३३३. ०**बंध**–सैन्यरचना; व्यूह. 'वातें घनसा द्रोणें धर्माचा भेदिला कटकबंध । ' –मोद्रोण १०.४.

कटक—पु. (गो.) नारळाचा एक प्रकार.

कटक—न. कटकी पहा

कंटक—पु. १ कांटा; वृक्षावरील टोंचायाजोगा अवयव. 'कंटकशल्यें बोथटलीं । मखमालीची लव वठली । ' –केक (क्षपूर्ण्ण) १. २ माशाच्या शरीरांतील हाडांचा सांपळा. ३ (ल.) व्याधि; पीडा; दुर्जन; दुष्ट माणूस. 'भाविकां कंटक करितातीं पीडा । ' –तुगा १२८९. 'पवित्राला म्हणती नको हा कंटक । '–तुगा ४०८. ४ (ल.) क्रूर; रानटी माणूस. ५ चिक्कू; कृपण. ६ शत्रु; वैरी., आजि अकंटक केलें नृपनयनिपुणें सुयोधनें राज्य । ' –मोसभा ७.३. ७ (शाप.) अम्र; टोंक. (इं.) पाइंट. ८ अडथळा; अडचण. 'माझ्या मार्गांतला तो कंटक आहे. ' [सं.]

कंटक—वि. सोशीक; काटक पहा.

कटकई—स्त्री. सैन्याचा तळ. 'उपरी श्रीरामचंद्रकि कटकई । ' –वैद्यकबाड ८०. [सं. कटक, कटकिका]

कटकट—स्त्री. १ भांडण; कज्जा; तंटा. **म्हण** 'मिया आणि बिबी व कटकट उभी. ' २ किरकीर; बडबड; गडबड; गलबला; गोंगाट. ३ युद्ध. 'दळीं केला कटकट । '–दावि ४९६. –पया १०७. ४ त्रास; पीडा; भुणभुण. 'नेणती वैकुंठनायका। वृथा कटकट करिताती । ' –ह १६.६४. 'काशी केली वाराणशी केली तरी कपाळाची कटकट नाहीं गेली.' ५ घासाघीस; तक्रार. (क्रि० करणें). ६ आवाज (घडघाळाचा); किटकीट; कांहीं त्रासाचा, रागाचा शब्द. [ध्व. कट्.; सिं. किटिकिटी]

कटकट—उद्गा. दुःखोद्गार: अरेरे ! हायहाय ! कटकटा पहा. 'अहा कटकट ! ते काळीं. ' –एभा १०.४२५. आहाकटा पहा.

कटकटणें—अक्रि. १ (कों. कु.) चुटचुटणें; हळहळणें. २ स्वतःविषयीं त्रासणें; स्वतःवर रागावणें; वैतागणें. ३ कलकल करणें. ४ कटकट करणें; त्रासाचा, रागाचा आवाज करणें. [कटकट]

कटकटा—उद्गा. (काव्य) दुःख, त्रास, असंतोष याचा उद्गार; दैवाला दोष लावतांना काढलेला उद्गार; हायहाय ! हा नशीबा ! प्रारब्धा ! 'एथ अर्जुन म्हणे कटकटां । '–ज्ञा ११. ४५२. 'मग म्हणे गा कटकटा । किती करूं गे आहाकटा । मर मर विधातया दुष्टा । काय अदृष्टा । लीहिलें ॥ ' –एरुस्व ५.६९. 'यमसम यम समरीं हे पाहुनि म्हणतील तूं कटकटा कीं ' –मोउद्योग ४.६. [सं.]

कटकट्या—वि. कटकट करणारा; किरकिऱ्या; **तुसडा**; चिडका; भांडखोर. [कटकट]

कंटकत्वक्—पु. (प्राणि.) ताराकृति प्राणी; या वर्गांतील प्राण्यांच्या कातडीवर कांटयासारखे केंस असतात. –प्राणिमो १३६. [सं.]

कटट्-कन-कर-दिशीं—क्रिवि. पटदिशीं मोडण्याचा आवाज (घट्ट दोरी, काठी इ० चा) होऊन; कट् असा आवाज करून. [ध्व.]

कटकरणें—अक्रि. १ (बे.) तुटणें (दोर, काठी इ०). 'दोर नवा करकरीत बाजारांतून आणला पण पाणी ओढतांना कटकरला. ' २ (व.) हूं कीं चूं करणें. [कट् करणें]

कटका—पु. (हिं.) तुकडा; **कुटका** (भाकरीचा). [ध्व, कट्]

कंटकारी—स्त्री. १ रिंगणी. २ सांवरी. ३ वेहकळीचें झाड. [सं.]

कटकी—स्त्री. दालचिनीच्या पानासारखें पान असलेलें, १२।१५ फूट उंचीचें चिवट झाड. याचें फळ लहान असून मुलें त्याचा नळींत घालून बंदुकीप्रमाणें आवाज करतात.

कटकी(खण)—पु. अपुरा, (तीन सळी किंवा घडी) कर्नाटकी खण; हा दक्षिणी बायकांना चोळीला पुरत नाहीं, थोडा जास्त (एक घडी) घ्यावा लागतो.

कटगर-घर—न. (व.) १ लांकडी कठडा; कटारा; कुंपण; कुडण. २ घराभोंवतालचें कंपाउंड, कुंपण. [सं. काष्ठ+गृह; हिं. कटघरा–गारा]

कटंजन, कटिंजन—न. १ कठडा (नक्षीदार); गरादा; गराद (दार, खिडकी, गाडी, पलंग इ० कांचा); कंपाउंड (झाडाभोंवतालचें); कामटयांची उभी–आडवी जाळी; जाळीदार काम. २ अर्धी जाळी किंवा भिंत घातलेला ओटा. ३ (माण.) पिंपळ, औदुंबर वगैरेच्या भोंवतालचा पार. ४ देवळाभोंवतालची प्रदक्षिणेची वाट; कटांजन. [सं. काष्ठ+जनित]

कटणें—अक्रि. १ अतिशय मळणें (शरीर, वस्त्र इ०); मळ बसणें; किटणें. २ एखाद्या गोष्टींत निपुण, तरबेज, तयार होणें. ३ विटणें; नकोसें होणें; किटणें. ' तेंच तेंच रडगाणें ऐकून कान कटले. ' [कट]

कटणें—अक्रि. अतिशय मेहनत करणें, जिवापाड श्रम करणें. [कष्ट]

कटणें—अक्रि. १ (हिं.) लढाईत ठार होणें; जायबंदी होणें; एखादा अवयव तुटणें, कापला जाणें. ' त्या युद्धांत हजारों माणसें कटलीं. ' २ कापलें जाणें; कापणी होणें (शेताची). ३ कमी होणें (खर्च, पगार, मजुरी इ०); काट मारली जाणें. ४ कष्टानें जाणें; कसातरी निघून जाणें (दिवस, इ०) ' असें नसतें तर महेंद्राच्या घरामध्यें ती रात्र कटतीना ! ' –पपप्रे १८०. ५ (ल.व.) खजील होणें; शरमिंधें होणें. ६ तुटणें; छाटलें जाणें. [ध्व. कट्; हिं. कटना=कापलें जाणें; तुल० इं. कट्.] **कटून करणें**–**झटून काम करणें. कटून मरणें**–अखेरपर्यंत लढाई करून मरणें; हात, पाय इ० अवयव तुटून जाणें; लढाईत कापले जाणें. ' कटून मरावें खरें असा धर्म क्षत्रियाचा । कसें रहा म्हणतीस घरीं डाग लागेल जन्माचा । ' –होला १६७. **कटून लढणें**–पुष्कळांना मारीत मारीत लढणें; मोठया शौर्यानें लढणें.

कटतर––न. (विणकाम) खाटसरी पहा.

कटता–ती—पुस्त्री. मालाच्या पोत्यांत ज्या प्रमाणांत भोंगा (पोकळपणा) किंवा खोका असेल त्या प्रमाणांत त्या गोणाची किंमत कमी करणें; नुकसानभरपाई (पल्ल्याच्या भावानें); कडता पहा. [कटणें]

कटतें व्याज—न. तुटक मुदतीचें व्याज; कटमितीचें म्हणजे (मुदतीच्या आंत सुद्धां) ज्या मितीस परतफेड होईल तेथपर्यंतचेंच फक्त मितीवार आकारलेलें व्याज.

कटदोरा—पु. कमरेभोंवतीं बांधावयाचा चांदीचा,सोन्याचा, रेशमाचा, अगर साधा दोरा, गोप; सांखळी; करगोटा; करदोडा; कटिसूत्र. [सं. कटि+म. दोरा; कटित्र–कडतर–कडदर–दोर–दोरा]

कटपट—पु. कमरेचें वस्त्र (धोतर, लुगडें). ' कटप्रदेसीं कटपटा ' –वेसी ९.१६. [सं. कटि+पट]

कटपट्टा—पु. नळी घट्ट रहावी म्हणून बंदुकीभोवतीं असणारें वेढें, कडी. ' बंदुकीला कटपट्यास नक्षी । ' –ऐपो २१७. **कट अर्थ २** पहा.

कटबंद—पु. गाडीच्या चाकाच्या तुंब्यावरील आंतील बाजूची कडी, पट्टी; बाहेरील बाजूच्या कडीला तोंडबंद म्हणतात [कट]

कटबंद—पु. कडदोरा; कटिबंध. ' कटबंध कौपीन अंगवसन. ' –दावि २५३. [कटि+बंध]

कटबंद—पु. श्लोक; कटिबंध पहा. ' कटबंद बदलें दासावरी ' –दावि ७८७. [का. कट्टु=रचणें; कट=कटाव+बंध]

कटमस्त–ता, कटमस्तान—वि. (हिं.) १ धिप्पाड; गलेलठ्ठ; गबदुल; घटिंगण; बेडर. २ चढेल; मस्त; आडदांड. ३ (व. ना.) हाडापेरानीं मजबूत; सशक्त; बळकट. ' बायको कटमस्त आहे. ' [हिं. कट+मस्त]

कटमिति–मुदत—स्त्री. व्याजाच्या हिशेबाचा एक प्रकार (ह्यांत कर्जाची रक्कम व्याजासह जसजशी फेडली जाते तसतसें मुद्दल कमी कमी होत जातें); तूटमिती–मुदत (तृतीयांत, षष्ठ्यंत प्रयोग–**कटमितीनें, कटमितीचा**) [हिं. कट+मिती=तिथी]

कटर—वि. १ कापण्याचें यंत्र (फोटोच्या बाजू, इ०) २ कपडे कापून वेतणारा (शिंपी). ' कपडा उत्तम होणें हें सर्वस्वी कटरवर अवलंबून आहे. ' [इं.]

कटरा—पु. (हिं.) चौक (शहरांतील); बाजार; किल्ल्याची बाजारपेठ. [कट्टा]

कटरी—वि. (चांदा, ना.) ठेंगणा; लहान.

कटलरी—स्त्री. चाकू, सुऱ्या इ० लोखंडी हत्यारें व तीं करण्याचा धंदा, कारखाना. [इं.]

कटला—पु. कडता पहा.

कॅटलाग—पु. १ (इं.) शाळेंतील मुलांचें हजिरीपत्रक. २ याद; यादी; जंत्री; टिपण; फेरिस्त. ३ माहितीपत्रक; अनुक्रमणिका; सुचिका. –के १६.४.२३.

कटवट—स्त्री. कमरेची किंवा मांडीची बाजू. ' लिंग आदळतां कटवटीं । आदळलें वीर्य । ' –कथा २.५.६६. [सं. कटि+वर्ती]

कटवणी—स्त्री. पाथरवटाचें हत्यार; दगडफोडयाची पहार. (सामा.) पहार. ' कटवणीनें जमीन खोदली. ' [का. कटि=टाकीनें दगड फोडणें]

कटवणी—न. १ शिजविलेल्या पुरणांतील आमटीकरितां काढलेलें पाणी; कोणत्याहि शिजविलेल्या उसळीचें पाणी **काढून** त्यांत ताक घालून केलेलें मिश्रण; कढ. २ गढूळ, खराब, मलिन पाणी (कपडे वगैरे धुतल्यामुळें झालेलें). [का. कट्टु; म. कट+वन=पाणी]

कटवणें–विणें—अक्रि. (व.) खजील करणें. ' त्या प्रसंगीं बापूनीं त्याला लगेच कटवला. ' –उक्रि. १ कमी करणें; **कापणें.**

'ह्या हिशोब व्याज कटवा जी.' –होला १४३. २ तोडणें; छाटणें. 'मी ती वावडी कटविली.' [कटणें]

कटवा—पु. (व.) वेहकळीच्या लांकडाची मोठी टिपरी हिनें मुलें खेळतात. 'त्याच्याकरितां कटवा आणला नाहीं. [कटणें]

कटसरी—स्त्री. (गो.) कडोसरी कनवट-टी पहा.

कटा—उद्गा. हाय हाय! कटकटा! कटकटा पहा 'कटा मियां चाटिला। कुचस्वेदु।' –ज्ञा १३.५३९. 'भूप म्हणे कटा पोटा महद्भूत आलें कैचें।' –दावि ४९०.

कटा—पु. कटा पहा.

कटा—पु. १ (हिं.) वध, हत्या; कत्तल; कापाकापी; ठार मारणें. –होकें १८. 'संपूर्ण कटा जाला.' –शिदि २९. २ रज पुतांचा जोहार. [कटणें]

कटाई—१ (व.) शेताची, पिकाची कापणी २ कापणीकरितां दिलेली मजुरी. [हिं]

कटाकटा—उद्गा. कटकटा पहा. 'म्हणती नाडलों कटाकटा' –रास २.२९.

कटाकटी—स्त्री. काटाकाटी. १ सर्वसाधारण छाटाछाट, कपात (विविध बाबी, वेतन इ० ची). २ (मु. ना.) भांडण, कटकट .[कटणें द्वि.] **कटाकटीनें**–क्रिवि. जेमतेम; ओढूनताणून; सरासरी.

कटाकय, कीटाकोय—(गो.) कोकिळ पक्षी. [हिं. कोयल; म. कोयाळ]

कटाग्नि—पु. अपराध्याच्या अंगाला गवत बांधून त्याला आग लावून जाळण्याची शिक्षा. [सं. कट=गवत+अग्नि]

कटाचूर—वि. १ (व.) पुरेपूर. 'सुधारायाला कटाचूर दोन महिने हवेत.' २ (माळवी) दोन देणारा दोन घेणारा.

कटांजन—न. कटंजन पहा.

कटांदर—पु. (कु.) ऊर; कांडेचोर; कलेदर, कलिदर पहा

कटाप—पु. (गो.) उपाय; इलाज 'कटाप चलप ना.'

कटाप—वि. (पत्त्याचा खेळ) खलास; नास्तिरूप: अभाव रूप. (कि० करणें). 'त्यानें किलावर रंग कटाप केला.' [इं. कट् ऑफ]

कंटापार—क्रिवि कांटयाबाहेर; कांटयापार-पलीकडे. 'परि बद्रिकाश्रमी बद्रीतरु । त्यातें वर्णितां नमे पारु। कीं वाट दावी कंटापारू। तयामाजीं रिघाल्या॥' –नव १२.१७७.

कटार्या—कढई, कटाह पहा.

कटार-ट्यार—स्त्री. १ सरळ व एक हात लांबीचें दोन्ही बाजूला धार व पुढें चिंचोळें टोंक असलेलें, पोटांत खुपसण्याचें एक हत्यार, हें कमरेला खोंवतात. 'तरी वायांचि कां बांधावीं कटारें।' –ज्ञा ४.२३३. 'काढती मार्जीच्या कटारा। उभयांच्या कापिती शिरा।' –कथा ३.१०.१५०. २ कापडावर कटयारीसारखी काढलेली वेलबुट्टी. ३ (ल.) दहशत; भीति; धास्ती; अंतर्यामी होणारें दुःख; आधि; मानसिक यातना; मनाला सतत वाटणारें दुःख 'इंग्रजांचे उरावर कटयार राहील.' –पया २५६. ४ अधिकाराचें एक चिन्ह; स्वराज्यांत मोठ्या अधिकाराचीं वस्त्रें देतांना शिक्केकट्यार सरकाराकडून मिळत असे. 'शिक्के दउत पट कटार दुसरी करा.' –ऐपो ३०५ [सं. कट्टार; दे. कटार, कट्टारी; हिं. गु कटार; गि. कटारो] **०जिवाला असणें-लागणें**–अतिशय दुःख काढणें; मनाला अतिशय काळजी लागणें; कटयारीप्रमाणें दुःख, चिंता वाटत राहाणें. **०उरावर-जिवावर-टाकणें**–(कर्ज, अपरिहार्य कर्तव्य, वाईटाची भीति, जबाबदारी इ० ची) कचाट्यांत सांपडणें; नेहमीं आगामी संकटाच्या काळजींत असणें. 'इंग्रजांचे उरावर क० राहील' –पया २५६. **०लावणें**–टोंचून बोलणें; निंदा करणें. **०आरी**–स्त्री. (चांभार) काट्याची आरी, हिनें सुईशिवाय खालींवर दोरा आणतां येतो. **०कांठ**–पु. (कापडाचा) कटयारीप्रमाणें काढलेला कांठ. **०वाह-हा**–वि. कटयारवाला; कटयार बाळगणारा (शिपाई). 'वाहाणी लाविती कटारवाहें. –उपा १११०.

कटारा—पु कठडा; गरादा. [सं. काष्ठ+हारक; प्रा. कट्ठहारय; हिं कटहरा=कठडा]

कटारी, कटारीदार—वि. १ कटयारीसारखे पेंढे, वेलबुट्टी, शिवण असलेलें (कापड, चींट इ०). 'चोळी अंजिरी जरिकाठाची रंग कटारी नवा।' –पला ४.२१. २ कटयारीप्रमाणें वीण असणारा (गोफ, दागिना, शिवण इ०). –स्त्री. १ लहान कट्यार. २ डोंगरकांठ, कपार; बाजू. 'डोंगरकटारीचे किल्ले.' –शिदि २८५. –शे ७ १५९. [कटार, दे. कट्टारी]

कटाव—पु १ व्यवस्थित बांधणी; डौलदार रचना; थाट; मेळ; देखावा (सैन्य, परिवार इ० चा). –शिल्पवि ५२९. २ (ल) आटोपशीरपणा; भारदस्तपणा; प्रौढपणा (भाषण, निबंध इ० चा). ३ व्यवस्थितपणा. तरतरीतपणा; भपका (पोषाख, चेहरा, चाल, रुबाब इ० चा) ४ सघ. कट, जूट 'आनंद घटाव ब्रह्म कटाव। थोर चिटाव हे गुरु कृपा।' –दावि ३१३,४७६. ५ एक प्रकारचा कांतेचा छंद. कटावाची कविता, ही एक धांवती रचना असून यांतील गटांच्या पंक्तींची संख्या निश्चित नसते. अमृतरायकवीनें या छंदांत बरींच पदें केलीं आहत कटिबंध पहा. ६ (ल) कत्तल; लढाईतील जोराचा हल्ला. 'कटाव करीत चालले जेव्हां तिराचे मार बसविली॥' –ऐपो २७८. [सं. कृत्; अर. कट्=आकार, रूप, कापणी (कोट इ०) ची] **०गरी**–स्त्री. घालून

पाडून बोलणें. 'बहुतचि बोलिला कटावगरीनें' –दावि १८४.

कटावणी—स्त्री. १ व्याजकटावणी; कटमिती पहा. २ कटिबंध पहा. ३ कटवणी पहा.

कटास—पु. कष्ट; त्रास; संकट (अन्न वस्त्र, घरदार इ० च्या अभावामुळें); काबाडकष्ट; कुत्तेघाशी; अंगमोड (आजारी, त्रासिक, असंतोषी माणसाच्या शुश्रूषेमुळें, श्रमामुळें होणारी). (क्रि० काढणें; सोसणें; निघणें)

कटासणी–णें—उक्रि. कडासणी–णें पहा.

कटासणें—अक्रि. १ त्रास, संकट सहन करणें; हाल सोसणें. [कष्ट] २ दमणें; थकणें; भागणें. [कटास्]

कटासन—न. दर्भ, मोळ किंवा गवत यांची लहानशी एका माणसापुरती चटई; तृणासन; दर्भासन. [सं.] **०घालून बसणें**–१ तपश्चर्या करणें. २ (ल.) तपश्चर्येचें ढोंग करणें.

कटाह—पु. कढई; कटाची (कढई उलटी केली असतां तिचा आकार आंतून आकाशासारखा दिसतो. वेदांतांत ब्रह्मकटाह, अंडकटाह अशी आकाशास उपमा दिलेली असते). 'तेथें ब्रह्मकटाह शतकूट। हो पाहत असे॥' –ज्ञा १.१४७. [सं.]

कंटाळ—पु. १ कंटाळा; थकवा. २ वीट; शिसारी; तिरस्कार. कंटाळा पहा. **०खोर**–वि. कंटाळा करणारा; आळशी; टिवल्याबावल्या करणारा; सुस्त. [कंटाळा+फा. खोर=करणारा] **०वाणा–वाणी**–वि. कंटाळा आणणारा; त्रासदायक. [कंटाळा+वान]

कंटाळणें—अक्रि. १ त्रासणें; दमणें; भागणें. २ आळसणें. ३ शिसारी येणें; विटणें. [सं. कठ् (=कृच्छ्रजीवने)–कट–काटाळणें –भाअ १८३२; सं. कंटकिल; प्रा. कंटइल? –कांटाळ]

कंटाळा, कटाळा—पु. १ थकवा; शीण; भाग. (क्रि० येणें). २ अरुचि; वीट; चिळस; खंती; शिसारी. (क्रि० येणें). 'पापा जयाचा कंटाळा।' –ज्ञा १६.४१९. ३ आळस. ४ भय; त्रास; कांटाळा पहा. 'कां हातीं घेतलिया माळा। फिटे सर्पाभासाचा कंटाळा।' –ज्ञा १५.५६०. [कंटाळणें]

कंटाळ्या—वि. लबकर त्रासणारा; कंटाळणारा (काम, करमणूक, धंदा, इ० स). [कंटाळा]

कटाक्ष—पु. १ डोळ्याच्या कोपऱ्यांतून पाहणें (साभिप्रायानें); अपांगदर्शन–दृष्टि; डोळा घालणें, मारणें; वांकडी दृष्टि. 'काय चंचळ्ळ मासा। कामिनीकटाक्षु जैसा।' –ज्ञा १४.१७०. २ (ल.) व्यंग्यार्थाचें भाषण; छद्मीपणा; उपरोधिक भाषणाचा रोख. ३ दांत; राग; वैर. 'जेव्हां तेव्हां त्याचा माझ्यावर कटाक्ष! मी काय त्याचें असें घोडें मारलें आहे?' ४ कोधदृष्टि; गैरमर्जी. 'त्यानें माझ्याकडे कटाक्षानें पाहतांच मी भ्यालों.' ५ मुद्रा; जोर; रोख; कल; प्रवृत्ति. 'मोठमोठ्या रसिकांचाहि वरीलप्रमाणें कटाक्ष आढळेल.' –नि. 'गीतेचा सर्व कटाक्ष याच तत्त्वावर आहे.' –टि ४.५२३. [सं.]

कटाक्ष—वि. काटक; सहनशील (शरीर, माणूस). 'मेंढरापेक्षां बकरें कटाक्ष असतें.' –मराठी ३ रें पु. (१८७३). ११८. –पु. कणखरपणा; सोशिकपणा; (श्रम वगैरेचा) काटकपणा. [सं. काष्ठ+अक्ष=आंस; प्रा. कट्ठ+अक्ष?]

कटि—स्त्री. १ कंबर; देहाचा मध्य भाग; माजी. २ कड (कडेवर घेण्याचें ठिकाण). 'कर कटीवरी ठेऊनिया।' ३ (नृत्य) नृत्यामध्यें कटिकर्में पांच आहेत:–कंपित, छिन्न, विवृत्त, उद्वाहित, व रेचित. [सं.] **०कांची**–कंबरपट्टा. 'कटिकांची वरी हिरे थोर। जैसे दिनकर जडियेले॥' –रावि ८.४९. **०छिन्न**–न. (नृत्य) दोन्ही हात दोन्ही बाजूस वर उचलून पताकाहस्त करून मनगटांत सैल करून कंबर पुढें मागें हलविणें. **०तट**–न. कंबर; ढुंगण; कनवट. 'वंशी नादनटी तिला कटितटीं खोवोनि पोटीं पटीं।' –वामन, वनसुधा १८. **०न्हाण**–न. (गो.) कमरेपर्यंतचें स्नान. **०बंद**–वि. १ कटबंद पहा. २ संयमी; ज्यानें कामविकार आटोक्यांत ठेवला आहे असा (पुरुष, स्त्री.) **०बद्ध**–वि. १ कंबर कसलेला. २ तयार. (क्रि० होणें; असणें). **०बंध**–पु. १ कंबरपट्टा; कटिबंद; मेखला; कांची. २ भूमेखला; भूवलय; पृथ्वीच्या गोलावरील वातावरणाचा कल्पिलेला पट्टा, प्रांत; अयनवृत्तें आणि ध्रुववृत्तें यांच्यामुळें झालेले भूपृष्ठाचे भाग; हे पुढील प्रमाणें आहेत:–१. उष्णकटिबंध–कर्कवृत्त आणि मकरवृत्त यामध्यें (४७ अंश) आहे. यांत उष्णता फार असते. २ समशीतोष्ण कटिबंध–अयनवृत्त आणि ध्रुववृत्त यांच्यामध्यें (प्रत्येक ४३ अंश) आहे. उत्तरकडील तो उत्तरसमशीतोष्ण आणि दक्षिणेकडील तो दक्षिण समशीतोष्ण. यांत उष्णता व थंडी समसमान असते. ३ शीत कटिबंध–ध्रुववृत्त आणि ध्रुव यांच्यामध्यें (प्रत्येक २३॥ अंश) आहे. यांत थंडी फार असते. ३ कटाव; विविक्षित प्रकारची पद्यरचना. **०बंधन**–न. कंबरपट्टा; करदोडा. 'कटिबंधनें, अंगशोल परिधानपीतांबर प्रावरणें हे सामग्री आणावी.' कटिबंध पहा. **०भ्रांत**–न. (नृत्य) उजवा पाय सूचीकरून मग अपविद्ध करणांप्रमाणें करून कटिरेचित करणें. **०वात**–पु. कंबरेंत शिरणारा वात; कंबर धरणें. **०शूल**–पु. (ल.) अतिशय कामवासना; विषयलंपटता (पुरुषाबद्दल वापरतात). **–शूलाची व्यथा**–स्त्री. बाहेरख्यालीपणाचा छंद. **०संधी**–स्त्री. प्रत्येक गात्राचा आदिम भाग. (इं.) कॉक्स. ? **०सम(करण)**–न. (नृत्य) पायांचें स्वस्तिक करून पाय काढून घेणें व दोन्ही हात कटीवर ठेवणें व कमरेची एक बाजू थोडी वर करणें. **०सूत्र**–न. करगोटा; करदोडा; कंबरपट्टा; कटिबंद. [सं.] **०स्नान**–कटिन्हाण; पायापासून कंबरेपर्यंतचें अंग धुणें; स्नानाचा एक प्रकार.

कटिंग—न. १ (शिवणकाम) वेतलेले कपडे कापणें; शिवण्यासाठीं कापणें. २ केंस कापणें; केंस राखणें. 'हेअर कटिंग सॅलून. [इं.]

कटिता-टा, कटेटा—पु. (व.) जिम्मा; मक्ता; कंत्राट; करार. 'आम्हीं असा कटिता नव्हता केला. '

कटिंदर—पु (कु.) कलिंदर; कांडेचोर; ऊद; काळमांजर; हें झाडाच्या ढोलींत रहातें.

कटिंजन—कटंजन पहा.

कटिबंध—पु. कटिबंद; कटबंद; कटावाची कविता; यांत प्रास, अनुप्रास, यमकें यांची रेलचेल असते. कटाव पहा. उदा० 'श्री शुकयोगींद्रानें रंभेचा गर्व हरिला ॥ ' ध्रु० ॥ तरीच एथें जन्मा यावें, तरुणी कुचद्वय पेटे घ्यावें, मन्मथसरिता तरुनी जावें, तरुणीसंगें निसंग व्हावें, व्यर्थचि कां तारुण्य हरावें ? तृणासनाला काय करावें ? सुखमंचकीं मंदिरीं भरावें, गाढालिंगनिं शयन करावें,' इ० इ०. –अमृत २५. [कट+बंध]

कटी—कटि पहा.

कटु—वि. १ तिखट (मूळ अर्थ तिखट असा असुन पुढें कडू असा झाला). 'संस्कृतांत कटु म्हणजे तिखट आणि तिक्त म्हणजे कडू असा अर्थ असुन ... ' –गीर ८२१. तिक्त याचाहि मूळ अर्थ कडू असा असुन पुढें तिखट असा झाला. २ कडू. 'कटवम्ल लवण मेलें । गर्भवतीचे पुरती डोहळे । ' –एभा १०.४३०. ३ तीव्र; उग्र; भयंकर. ४ अप्रिय; वाईट; दुःखदायक; मर्मभेदी (भाषण इ०). ५ (ल.) आवेशपूर्ण; जळजळीत; जहाल; तापट. [सं.] **०करंज**–पु. करंजाचें झाड व फळ; हें कडू व ज्वरनाशक असतें. **०तुंबी**–स्त्री. कडू भोपळा. **०फल**–न. १ कारली. २ कडू पडवळ; कंकोळ इ०. **०रोहिणी**–स्त्री. काळी कुटकी, कटुकी. **०वाण**–न. (रत्ना.) १ नापीक जमिनीची कायमधारा पद्धतीनें वंशपरंपरागत दिलेली देणगी. २ अशी देणगी दिलेली जमीन. [सं.]

कटुकी—स्त्री. कुटकी; एक औषधी झाड.

कटुता—स्त्री. १ कडवटपणा; तीव्रता. २ तिखटपणा; तीक्ष्णता. 'अंतर्मलिन द्रवतें चक्षु जसें पाहतांचि कटुतेला. ' –मोआदि २४.२८. ३ अप्रियता. [कटु]

कटुवण—न. (क.) वाडवडिलांचें ठिकाण.

कटुळतें, कटोळतें—न. सराफाचा किंवा सोनाराचा गोल झोळणा; बटवा (दागिने, वजनें, तराजू इ० ठेवण्याचा). [का. कट्ले=सोनारांचीं वजनें, कट्लेचील=वजनें, इ० ठेवण्याची पिशवी]

कंटुली, कंटोली, कंटूल—स्त्री. करटोली; करंटुली.

कटोत्रा—कटमिती पहा. 'कटोऱ्याचे दोन आणे याज पासुन घेऊं नये. ' –विक्षिप्त २.५८.

कटोरा—पु. १ मोठी वाटी; मोठ्या तोंडाची पसरट वाटी; वाडगा; द्रोण. २ कडू भोपळा; जव्हेरी नारळ, लांकूड इ० चें [illegible]ेला. 'कटोऱ्यांत दुग्ध श्वानीचें काढून । ' –रामदासी २.७३. ३ (भरतकाम) वाटीप्रमाणें खोलगट जरीची टिकली. –वि. (ल.) लहान; सुंदर (स्त्री, मूल, गाय इ०). **कटोरी जनावरें**–१ (माण.) लहान जातीचीं जनावरें. २ ठुसका; ठेंगणा (माणूस, जनावर इ०). [सं. कटोरा; प्रा. कट्टोरग; हिं. कटोरा; सिं. कटोरो; गु. कटोरी–रो]

कटोरी—स्त्री. लहान कटोरा.

कटोल (व.), **कंटोलें–कंटोळ–ळी**—न. कर्टुले (भाजी); करटोली, काटले.

कटोळजें—(कों.) कटुळतें पहा.

कट्ट, कट्टसीन—पु. (नाटक) महालाचे नुसते खांब; जंगलाचीं नुसतीं झाडें, पाण्याचे नुसते प्रवाह, पर्वताचे चढउतार, इ० दाखविणारे पडदे किंवा पडद्याचे तुकडे. हे त्या त्या आकाराच्या चौकटी करून व त्यावर कापड ठोकून रंगवितात. जसेः– जंगलकट; महालकट इ०. [इं.]

कट्टूट—न. (गो.) कवच; करवंटी.

कट्टट—स्त्री. १ कंबर. 'लवथवित मलपे दोंद । वेष्टित कट्टनागबंद । ' –दा १.२.१६. [सं. कटि]

कट्टट—न. १ वेडें; अंगठी. 'रत्नजडित कट्ट झळके येकदंत. ' –दावि ३७;४०४. २ एकोपा; जूट. 'कट्ट घालून राजकारणा । लोक लावी ॥ ' –दा १५.२.२५. [का. कट्टु=बंधन, बांधणें] **०बंद**–जूट; एकत्रितपणा.

कट्टट—पुन. एक प्रकारचा आवाज (विशेषतः तार देण्याच्या यंत्रावर होणारा); खट्ट, खुट्ट आवाज; याशिवाय बाकीचे अर्थ कट शब्दामध्यें पहा.

कट्टट–कन–कर–दिर्शी—कट–कन–कर–दिर्शी पहा.

कट्टर—वि. १ (गो.) कट्टेर; जुनेंपुराणें; जीर्ण; फाटकें; नष्टप्राय. २ पुराणमतवादी; सनातनी. ३ (हिं.) हट्टी; दुराग्रही; निर्दय. ४ कट्टा; पक्का; पूर्ण; अढल; बिलंदर. [हिं.]

कट्टा—वि. १ बळकट; धिप्पाड; कंटक. २ हुषार; चतुर; निपुण; तज्ज्ञ; चपळ (लेखक, वक्ता, योद्धा, स्वार, इ०). ३ वीरश्रीयुक्त; शूर; उत्साहपूर्ण; तालख; धाडशी (माणूस, मसलत, युक्ति). –शिदि ३४३. ४ घनघोर; भयंकर; कडाक्याची; आवेशाची; कटाकटीची; जोराची (लढाई, कज्जा, भाषण, मेहनत). ५ थोर; अफाट; मजबूत; साहसी; बळकट (सैन्य, व्यूह). ६ अंत.करणापासूनचा; निग्रही; पक्का. 'औरंगजेब कट्टा मुसलमान होता. ' ७ पूर्ण; पुरा; जाज्वल्य. उ० –कट्टा सुधारक; कट्टा

अभिमानी. [कट=अति, पुष्कळ; कटखादक=कट्टा खादाड. –भाअ १८३४]

कट्टा—पु. १ ओटा. 'घरापुढील कट्टा;' 'जकातकट्टा;' 'देऊळकट्टा.' २ (क.) ओझेकऱ्यांनीं ओझें ठेवण्यासाठीं मोठ्या रस्त्याच्या बाजूला खांबाइतका उंच बांधलेला ओटा; धर्मधक्का. ३ जूट. [सं. कट=आवरणें; ते. कट्टु=ओटा, बांध] ४ दुकानांची रांग, जसें–सराफकट्टा. [का. कट्टु=बांधणें; कट्ट=ओटा]

कट्टा—पु. कापाकाप; कत्तल; नाश –पया ३११. [अर. कत्अ; सं. कृत्=कापणें; प्रा. कट्ट]

॰कट्टी घालणें-(क.) पतंगांची काटाकाट. 'मी त्याच्या पतंगाशीं कट्टाकट्टी घातली.'

कट्टी—स्त्री. (कर्ना.) सोंगटयांच्या पटातील कट, कट अर्थ ७ पहा. 'सोंगटी कट्टीला बसवा.' **॰धरणें–गांठणें–बसणें**-(क.) निर्भय ठिकाणावर असणें. 'त्यानें कट्टीला धरली आहे. [सं. कटि; म. कट]

कट्टी-ट्टे—स्त्री. (गो.) करवंटी (नारळाची) हिचा उपयोग भांड्याप्रमाणें करतात. 'लेकांनो एक एक कट्टी फेणी तर आगाऊच वसूल केली आहांत.' –सह्याद्री २०१. [सं. कवच; म. कवटी] **॰खायरो**–वि. (गो.) दरिद्री; भिकारी; दैवहीन.

कट्टी करणें—अक्रि. (कु.) मैत्री तोडणें.

कट्टिमणी-नी—पु. कट्टीमती. १ (भामटी बोली) भामट्यांचा नाईक; तालमड; तालदरू. –गु १३. २ (विजापूर) महारांवरील एक अधिकारी. [का.]

कट्टेर—कट्टर अर्थ १ पहा.

कट्टेल—न. (गो.) करवंटीचें तेल [कट्टी+तेल]

कट्टो—न. (गो.) फुटकें भांडें.

कट्यार—कटार–ट्यार पहा. 'फरस मुरज माड कट्यार' –नव १२.१७०.

कटघ—वि. कटु, कडू. 'कटघ तिक्षणें सर्वांग पोळे.' –दा ३.१.३१. [सं. कटु]

कठ—न. १ यजुर्वेदाची एक शाखा. कठऋषीनें ही रचिली. २ कठवल्ली नामक कृष्णयजुर्वेदाचें उपनिषद्. [सं]

कंठ—पु. १ गळा (हनुवटीच्या खालील व खांद्याच्या वरील शरीराचा भाग). 'कंठीं झळके माळ मुक्ताफळांची' –गणपतीची आरती. २ (गायन) गळ्यांतून निघणारा ध्वनि; आवाजी. 'स्वरा-वरुनि समजे कंठ.' 'तिचा कंठ फार मधुर आहे.' ३ (पोपट, कबूतर, चिमणा इ०) पक्ष्यांतील नराला तारुण्यावस्था प्राप्त झाली असता गळ्याभोंवतीं जी एक काळी रेषा उमटते ती. (क्रि० फुटणें). ४ भांडें वगैरेंच्या तोंडाखालचा आवळ भाग; काठ ५ श्वासनलिकेचें वरचें तोंड, मणका; नरडें; घसा. 'दुःखामुळें कठातून शब्द निघेना.' [सं.] **॰दाटणें–भरून येणें–सद्गदित होणें**–दुःख किंवा आनंद यांच्या उमाळ्यानें घसा दाटणें, त्यामुळें तोंडांतून शब्द न निघणें; आवेग येणें; सद्गदित होणें. 'दासाकडे हनुमंत पाहे। तों गहिंवरें कंठ दाटलाहे.' –संवि २.८५. 'सांगू जातां सुखानें। तों कंठ आला भरून.' –नव २२.४५. **॰फुटणें**–(गायन) १ चिरका आवाज होणें. 'फार उंच स्वरांत म्हणूं नकोस, कंठ फुटला तर पंचाईत होईल.' २ कंठ (अर्थ ३) येणें (पोपट, इ० पक्ष्याला). ३ खणखणीत शब्द निघणें. 'त्याला नुकताच कंठ फुटला आहे.' ४ वयांत येणें; प्रौढदशा प्राप्त होणें. **॰बसणें**–घसा बसणें; आवाज (गाण्यांत, भाषणांत) स्पष्ट न निघणें. 'उष्णकाळीं तेल तिखट खातां। तेणें बद्धक जहालें बहुतां। म्हणती कंठ बैसले आतां। नये गातां कीर्तनीं॥' –संवि २२.१२२. **॰मोकळा करून रडणें**–मोठ्यानें रडणें; मनमुराद रडणें; ओक्साबोक्शी रडणें; भोकाड पसरणें. 'मोकळा करुनि कंठ तेधवां। आठवूनि मनिं जानकीधवा।,–(वामन) भरतभाव १४. **कंठास–कंठी–प्राण येणें**–१ (भीतीनें, दुःखानें) अधेमेले होणें. 'प्रतिवचनप्रसंगीं प्राण कंठास आला.' –सारुह २.१०३. २ दुःखानें किंवा भुकेनें व्याकुळ होणें. **कंठास लावणें**–मिठी मारणें; आलिंगन देणें. 'कंठास त्यास लावून.' –संग्राम १५. **कंठी प्राण उरणें**–आसन्नमरण होणें; धुगधुगी राहणें. 'त्याच्या नुसता कंठीं प्राण उरला आहे.' **कंठी प्राण ठेवणें, धरणें–राहणें**–एखादी इच्छा किंवा आशा सफळ झाल्यावर मरूं अशा इराद्यानें जीव धरून राहणें. 'अस्थि शिरा दिसती नयनीं। प्राण कंठीं धरिले त्यानीं.' –संवि २०.७७. –हृ २१.७२. 'तुम्हाविण कंठीं प्राण राहिला असे॥' –स्वप्न ४.३. 'मुलगा येईपर्यंत म्हातान्यानें कंठीं प्राण धरून ठेविला होता.' **कंठीं धारण करणें**–१ गळ्यात घालणें (माळ, अलंकार, इ०). २ जपणें; स्मरण करणें. ३ अति प्रिय असणें. **॰कार्कश्य**–न. कर्कश आवाज; आवाजाचा कर्कशपणा **॰कोकिला–ळा**–स्त्री. (ल.) सुकुमार, मधुर आवाजाची स्त्री; पिककंठी. [सं.] **॰गत**–वि. १ गळ्यांतील (दागिना, वस्त्र इ०) २ नेहमीं तोंडपाठ असलेला (अभ्यास, वचन इ०); मुखोद्गत ३ गळ्याशीं आलेला. [सं.] **॰गत प्राण**–वि. धुगधुगी असलेला; ज्याचा प्राण गळ्याशीं आला आहे असा. **॰चामाकर न्याय**–पु गळ्यांत सोन्याचा दागिना असुन तो हरवला अशा समजुतीनें घरभर हिंडणें. समानार्थक:–कांखेंत कळसा, गांवाला वळसा; गांडीखालीं आरी, चाभार पोर मारी. **॰नाळ**–न. गळ्याची नळी. मान 'मग कंठनाळ आटे.' –ज्ञा ६.२०७ 'तदा कंठनाळांतुनी शब्द झाला' –गणपतिजन्म. [सं.] **॰नाळ चिरणें**–गळा कापणें; ठार करणें. **॰पाठ**–वि. तोंडपाठ; मुखोद्गत. 'धौम्य म्हणे तुज यावें शास्त्रासह कंठपाठ वेदांनीं.' –मोआदि

२.५१. **०भूषण**–न. गळ्यांतील दागिना. **०मणी**–पु. १ गळ्यांतील हारामधील मुख्य मणी; गळ्यांतलें रत्न. २ गळ्याचा मणका, घांटी. ३ (ल.) अतिशय लाडका; गळ्यांतील ताईत (माणूस, वस्तु). 'आवडते कंठमणी ही.' –संग्राम २९. **०मर्याद**–क्रिवि. गळ्यापर्यंत. आकंठ पहा. 'आज मी कंठमर्याद जेवलों.' **०माधुर्य**–न. (गायन) सुंदर गळा; गोड आवाज. [सं.] **०माळ**–स्त्री. (गो.) गंडमाळा. **०रव**–पु. आवाज. [सं.] **०रवानं, ०रवंकरून**–१ मुद्दाम; निश्चयानें; स्पष्टोक्तीनें. २ मोठमोठ्यानें ओरडून; घसा फोडून; कंठशोष करून. **०रवोक्त**–वि. निश्चयानें सांगितलेलें (भाषण इ०). **०शोष**–पु. १ (तहानेनें) घशाला पडणारी कोरड. २ (ल.) ओरड; उगीच घसा कोरडा करणें घसाफोड; व्यर्थ समजूत (काढणें); (क्रि० करणें). 'वादी प्रतिवादी कहून अतोनात कंठशोष होत असतांहि ...' –दि ४.१३१. [सं.] **०सूत्र**–न. १ जानवें. २ मंगळसूत्र. [सं.] **०स्थ**–वि. १ घशात अडकलेलें (केंवडा, प्राण). २ गळ्यांतील (दागिना इ०) ३ (ल.) जिव्हाग्रीं. पाठ असलेला (अभ्यास, पाठ, इ०). ४ कंठस्थ वर्ण (गळ्यांतून ज्यांचा उच्चार होतो ते:–अ, आ, क, ख, ग, घ, ङ, ह). [सं.] **०स्थान**–न. गळा. –वि. कंठस्थ पहा. **०स्नान**–न. १ गळ्याखालचें स्नान (विशेषत. बायकांचें), (क्रि० करणें). २ (ल.) मान छाटणें; शिरच्छेद करणें. (शीर छाटल्यानें आंतून वाहणाऱ्या रक्तानें होणारें स्नान): नागवणें; लुटणें. (क्रि० घालणें). 'घोडी वाघासारख्या काळपुरुषास ज्यानें कंठस्नान घातलें, त्या बापू गोखल्याच्या पराक्रमाचें वर्णन काय करावें?' [सं.] **कंठाग्र**–न घसा; ध्वनि इंद्रिय. कंठ अर्थ ५ पहा. (सामान्यतः समस्येत प्रयोग), **कंठाग्रीं**. 'कठाग्रीं संधानीं धरियेला हरी। अवघ्या विखारीं व्यापियेला।' [स.] **कंठाभरण**–न. १ गळ्यांतील एक अलंकार. 'सौभाग्यद्रव्यें कंठाभरणें.' –एरुस्व ६. ८७. २ घोड्याच्या मानेखालीं असलेला शुभदायक भोंवरा ३ गळ्यातील ताईत; प्रिय. **कंठावगध**–पु घसा दाटून येणें. घसा धरणें, बसणें. [सं.]

कंठक–वि. काटक; कंटक; चिम्मा; मोशीक, घाडशी [कंठण]

कठडा–पु १ गरादा; रेजे बसविलेली चौकट; गजाचें काम (पलंग, गाडी, दार, खिडकी इ० चें); कटारा. २ खोगिराचें खोड; खोगिराच्या बाजू ३ (बुरुडी) कुंडीच्या तोंडाला पेल्याच्या तोंडासारखा सभोंवार केलेला कामट्यांचा कांठ. ४ कामट्यांचा पिंजरा (आंत जनावर ठेवण्याचा). 'चित्त्यास बसण्यासाठीं एक कठडा केलेला असतो, तो घोडयावर ठेवितात.' –चिमा ३४. ५ गॅलरी; सज्जा. [काष्ठ+कट=आवरण; सिं. कट हडो] **–ड्याचें खोगीर**–न. चौकटीचें खोगीर; भोंवतीं कठडा किंवा गादा, गिर्दा असलेल खोगीर; खोड.

कठण—न. कटवणी पहा.

कंठणें—उक्रि. १ सहन करणें; सोसणें (आजार, दुःख). 'कैसा कंठूनियां राहीं संसार।' –तुगा ५६५. २ कष्टानें घालविणें, सेपविणें; कमातरी काढणें (दिवस, काळ). 'रामदास हनुमंतासि म्हणे। मज सर्वथा न कंठे रामविणें।' –संवि २.८६. ३ गतीनें मार्ग अतिक्रांत करणें, तोडणें, चालणें (अंतर, रस्ता, प्रवास). 'तें मार्ग न कंठे तेणें। परी कष्टणें अनिवार।' –एभा २१.३७. [सं. कष्ट, कंठ् किंवा सं. कष्ट; प्रा. कट्ठ; का. कैटिसु=दुखणें, दुःख होणें]

कठरडा—पु. कठडा.

कठवणी—न. कटवणी पहा.

कंठा—पु. मोत्यांच्या माण्यांचा, मोत्यांचा, हिऱ्यांचा किंवा इतर रत्नांचा गळ्यात घालावयाचा हार; माळ; कंठभूषण. २ फुलांचा गोल; एक प्रकारचा तुरा. तुरा पहा. [कंठ]

कठांजन—कटंजन पहा.

कठाड-डा-रा—पु. कठडा पहा.

कठाडीखोगीर—कठड्याचें खोगीर पहा.

कठाण-न, कठाणमठाण—न. १ मूग, उडीद, तूर वगैरे कडधान्ये; कडदण, काठण पहा. २ (व.) रब्बीचें पीक. 'यंदा कठाण बरें आहे.' **कठाणी ठेवणें**–१ कडधान्यासाठीं, रब्बीसाठीं जमीन राखून ठेवणें. २ उपाशी ठेवणें. [सं. काष्ठ; प्रा. कट्ठ+दाणा]

कठाणी—स्त्री. वावर. –शे ७.९१. (–नाको.)

कंठाळ-ळा—स्त्री. जनावराच्या पाठीवर दोहों बाजूस सारखी बसेल अशी पडशी, गोणी, वारदान. 'भरोनिया कंठाळ स्वामीपासी यावें।' –रामदासी २.५७. 'भाऊ कंठाळीस गुंतला। चाकर पळाला।' –ऐपो ३३४. –वि (ल.) पुष्कळ विषयांचा समावेश करणारा (ठराव). 'घोड्यावरील कंठाळींत ज्याप्रमाणें निरनिराळ्या वस्तू ठेवलेल्या असतात त्याप्रमाणें कंठाळी ठरावांत निरनिराळ्या विषयांचा समावेश केलेला असतो.' –टिव्या. [का. कंटे=पडशी, गोणी (जनावराच्या पाठीवरील); कंठल+अंबिका-राजवाड] **०लादणें**–१ तट्टावर भारी गोण, ओझें ठेवणें. २ (ल.) एखाद्यावर जबरदस्तीनें एखादी गोष्ट लादणें **म्ह०** तुम्ही आम्ही एक आणि कंठाळीला मेख; किंवा कंठाळीला हात लावूं नको=कामापुरतें नातें जोडणें; खोटी मत्री, स्वार्थी स्नेह. [का. कठले]

कठाळू—पु. (व. ना.) सांड; पोळ. [सं. कठि=शोके, कृच्छ्रजीवने]

कंठाळू—पु. अळवाची एक जात. याचीं पानें मोठीं असून राजाळवापेक्षां लहान असतात. पानाचा रंग हिरवा असून देंठास लाल कंठ असतो. [कंठ+आळू]

कंठाळ्या—वि. १ कंठाळ, ओझीं वाहणारा, वाहण्याच्या लायकीचा (पशु). २ (ल.) मंदबुद्धीचा; जड (माणूस).

कठिण-ठीण-न—वि. १ अवघड; अशक्यप्राय; दुष्कर. २ संकटपूर्ण; आपद्ग्रस्त; कष्टप्रद (गोष्ट, बनाव, प्रसंग). 'कठिण समय येतां कोण कामासि येतो.' –र १०. ३ घट्ट; बळकट; टणक; नरम नव्हे असें; जें तोडण्यास बळ लागतें असें. 'लोखंड कठीण असतें.' ४ करण्यास वाईट 'ही गोष्ट (चोरी) कठीण आहे!' ५ दुःखप्रद; सोसण्यास अवघड; जिवावरचें; मरणप्राय (आजार, रोग, स्थिति). ६ क्रूर; कठोर; दयाशून्य (माणूस, कृत्य). ७ मनास लागेल असें; कडक; कठोर (शब्द, भाषण). 'आपले झांकी अवगुण। पुढिलास बोले कठिण।' –दा ५.३.९२. 'वचन जयाचें कठीण। तो येक पढतमूर्ख॥' –दा २.१०.११. ८ समजण्यास अवघड (ग्रंथ, अभ्यास, व्यवहार). [सं. कठिन; गु. सिं. कठण; पं. कटण–न] **०वाटणें**–अवघड वाटणें; दुःख होणें. **–नोत्तर**–न. (काव्य) दुर्भाषण; शिवीगाळ; निर्भर्त्सना. 'म्हणोनि भांडे दिवस रात्र। कठिनोत्तर बोलत।' [कठिण+उत्तर] **०मर्जी**–स्त्री. गैरमर्जी; इतराजी. **०वर्ण**–पु. ट वर्ग आणि जोडाक्षरें.

कठिणत्व—न. कठिणपणा; काठिण्य. 'यास्तव भाषांतराचें कठिणत्व यांत इतकें दिसून येणार नाहीं.' –नि १९७६. [सं. कठिनत्व]

कंठी—स्त्री. १ पुरुषांच्या गळ्यांतील सोन्याचा किंवा मोत्याचा तीन किंवा चार पदरी माळेसारखा एक अलंकार, माळ. कंठा पहा. 'तैशी घेतां कंठीं मजसि तत्र कंठी धरियेली.' –विविध ८.१.२०. [कंठ] २ तुळशीच्या मण्यांची केलेली माळ. (सामा.) माळ. (विशेषतः पंढरीच्या वारकऱ्याच्या गळ्यांतील). 'लावूनियां मुद्रा बांधोनियां कंठी। हिंडे पोटासाठीं देशोदेशीं।' –तुगा २७३०. (क्रि० बांधणें=शिष्य करणें, बनविणें). ३ सतारीचा किंवा विण्याचा भोपळा व दांडी यांच्या सांध्यावरील वर्तुळाकार हस्तिदंती काम. ४ अंगरख्यास गळ्याच्या ठिकाणीं शिवून जी हारासारखी एक प्रकारची नक्षी करतात ती. [सं. कंठिका; प्रा. कंठिआ] **०दार**–वि. कंठी असलेला (अंगरखा). अंगरख्याचा एक प्रकार. 'कंठीदार अंगरखा दुपेटा भरनक्षी भरजरी।' –होला १२१.

कंठी—स्त्री. (गु.) भाताचें लोंगर, कणीस.

कंठीदार—वि. धष्टपुष्ट; रुंद पुठ्ठ्याचा. 'म्हशी दोन सहस्र कंठिदार बाणीच्या.' –ऐपो ३०९. [सं. कटि?]

कंठीरव—पु. सिंह. 'वृद्ध म्हणे पांच पांडव। द्वैत काननीचे कंठीरव।' –पांप्र ३१.२१. [सं.]

कठे-थे—क्रिवि. (खा.) कोठें. [सं. कुत्र; प्रा. कुट्ठ–कुत्थ; म. कुठें, कोठें; गु. कठे; सिं. कथे]

कंठेर—पुवि. (गो.) सुंदर तांबडया कंठाचा; पोपट. [सं. कंठ]

कठोर—वि. १ टणक; कठिण (दगड, लांकूड, इ०). 'विस्तीर्ण वर्तुळ उदग्र कठोर भारी। वर्धिष्णु ते स्तन तिचे कनकानुकारी।' –र १५. २ निर्दय; दयाशून्य (अंतःकरण, मन). ३ तीक्ष्ण; बोचणारें; मर्मभेदी (भाषण). ४ कर्कश; भसाडा (आवाज); याच्या उलट कोमळ; मृदु. ५ सक्तीची; कडक; निष्ठुर (शिक्षा, वागवणूक). [सं.] **०वर्ण**–पु. कवर्गादि पांच वर्गांपैकीं प्रत्येकांतील आरंभींचे दोन व शषस हे वर्ण. **कंठ्य**—वि. १ गळ्यासंबंधीं; कंठांतून बाहेर पडणारा (उच्चार). २ कंठवर्गीय; कंठस्थानाचे (वर्ण). [सं.] **०वर्ण**–पु. कंठस्थ वर्ण; अआ, कवर्ग आणि ह. **०स्वर**–पु. अ आणि आ हे स्वर.

कड—स्त्री. कंबर. [सं. कट, कटि]

कड—पुस्त्री. १ बाजू; पक्ष. 'तूं सदानकदा त्याची कड घेऊन बोलत असतोस.' २ बाजू; टोंक; कांठ; शेवट; मर्यादा (शेत, तळें इ० ची). 'सूर्याची चकचकीत कड दामूस लवकरच दिसूं लागली.' ३ दिशा; प्रदेश; विभाग (चतुर्थ्यंत, षष्ठ्यंत प्रयोग–त्याकडेस; त्याकडेस; इकडचा; तिकडून इ०). 'नये मंत्रादिक तयाकडे।' –ज्ञा १७.१९२. ४ (व.) बरगडयांची एक बाजू; कूस. ५ सीमा; पराकाष्ठा. 'तंव देओ भणती साचची। परि कड केलें आम्हींची।' –शिशु २००. ६ निकाल; शेवट (आरंभिलेल्या कार्याचा). 'अरे! असें करण्यानें तुझी कड लागेला का?' [का. ते. कड=जागा, बाजू, दिशा; का. कट=शेवट] **०ओढणें–घेणें–धरणें**–एखाद्या(माणूस, कार्य)ची बाजू धरणें; पक्ष स्वीकारणें. **०करणें**–(व.) टिकाव धरणें. 'तुमचा भाऊ कड नाहीं करूं शकत यापुढें.' **०काढणें**–एका सपाटयांत, दमांत शेवटास नेणें; आरंभून संपविणें (काम इ०). **०चा**–वि. शेवटचा; कांठावरचा; कडेचा. **०चा रविवार**–पु. शेवटचा रविवार (म्हणजे कधींच नाहीं). **०लावणें**–तडीस लावणें; शेवटास नेणें. 'कडे लावूं आपुला काळ। सोडोनि तळमळ चित्ताची।'–भवि ५०.१४०. **कडावर ठेवणें**–(ना.) उपाशी ठेवणें; दुर्लक्ष करणें; उपेक्षा करणें.

कड—पु. कड्, कड् असा आवाज, ध्वनि (तारायंत्राचा इ०). [ध्व.]

कड—पु. (राजा.) कढ; उकळी; उसळी (तापलेलें पाणी, राग वगैरेचा); आंच; उष्णता. कढ पहा. **०काढून रडणें**–(राजा.) ओक्साबोक्शी रडणें.

कड—पु. एक प्रकारचा रेतीचा दगड. [का. कडु-कडल=दगड]

कंड—स्त्री. १ खाज. २ खरूज. ३ (ल.) तीव्र इच्छा; स्फुरण; सुरसुरी; चेव (लढाई, भांडण वगैरेची). [सं. कंडू]

कंड—न. (गो.) बांबूची कांब. [सं. कांड]

कँड—न. (गो.) ज्वाळा. [पोर्तु. इं. कँडल; लॅ. कँडेर=चकाकणें]

कडक—वि. (कडक असा मारतांना होणारा आवाज, यावरून). १ टणक (लांकूड, माती); कमी चिकण. २ महाग (भाव, दर). 'विलायती हुंडीचा भाव घसरल्यामुळें सरकार कृत्रिम उपायांनीं नाणेबाजार कडक राखून ठेवतें.' –के १०.६.३०. ३ शिस्तीचा; तापट. 'आपले वडील मोठे कडक आहेत.' –विवि १०.५–७.१२४. ४ (ल.) कठोर; उग्र; रागीट. 'त्याची मुद्रा बरीच कडक दिसत आहे.' –विवि ८.१.५. 'ठाऊक नाहीं कडक मर्जा आमची.' –कफा १७. ५ जलाल; प्रखर (भाषण, लेख, ऊन इ०). 'उष्ण कटिबंधांत एकादे वेळेस उन्हाळा कडक होऊन सर्व पदार्थांचा सत्यनाश होऊन जातो' –पाव्ह ५५. ६ तेजस्वी; पाणीदार. 'कृष्ण पुरःसर पांडव आले हांकीत हय कडक डोहा।' –मोगदा १.१९. ७ वाळलेलें; आर्द्रता नाहींशी झालेलें (धान्य, भाकरी). ८ सणसणीत; जोराचा. 'अधिकाऱ्यानें त्याच्याविरुद्ध कडक रिपोर्ट केला.' ९ टणक पण ठिसूळ (लोखंड, सोनें किंवा शिसें यांच्यापेक्षां तुलना करतांना). १० जहाल; झोंबणारें; उष्ण (तिखट). ११ कच्चेपणामुळें दडस (फळ, भाजी). १२ दणगट; निकोप (माणूस, जनावर). १३ (ल.) कडू; तीव्र (औषध, तपकीर, विडी). १४ तीक्ष्ण; बोचणारें (थंडी). १५ कर्कश; कानठाळ्या बसणारा (आवाज, संभाषण). [ध्व. कड; तुल० सं. कड्डु = कठिण होणें. हिं. कडा=कडक; किंवा सं. कर्कश–वर्णव्यत्यय होऊन] –क्रिवि. (ध्वनि) झपाट्यानें; चट्दिशीं; चट्कन; मोकळेपणानें (उद्योग इ० होणें, करणें; माणसे इ०नीं धांवणें, चालणें). **०झोंप**–स्त्री. गाढ झोंप; शांत झोंप; तब्बल झोंप. (क्रि० घेणें). **०बिजली**–स्त्री. १ कडक वीज. २ (ल.) चलाख; चपळ; तडफदार; तापट (घोडा, घोडी, स्त्री). ३ (ल.) त्वरेनें मारा करणारी तोफ. **०लक्ष्मी**–स्त्री. लक्ष्मीच्या (देवीच्या) उग्र स्वरूपाचें सोंग घेऊन भिक्षा मागणारा; आसुडवाला भिक्षेकरी. (हा आसुडानें कडक असा आवाज काढतो म्हणून). **०बीज**–स्त्री. (ल.) कडक; तापट; चपळ (मनुष्य, जनावर). **०सावित्री**–स्त्री. कडक, तापट, तडफदार, चलाख स्त्री. **०हजामत**–स्त्री. राठ केस असल्यामुळें त्रास होणारी हजामत.

कडक—कडाका पहा.

कडक—प (हिं.) (जंबिया, बांक) आपल्या हातांतील जंबियानें जाडादाराच्या उजव्या पायाच्या बाहेरील घोटयावर मारणें.

कडक—पु. (हिं.) समुदाय; गर्दी; गोंगाट. 'पायदळ निशाण कडक पुढें उडाला।' –ऐपो ११०. [सं. कटक]

कडक-का, कडाका—पु. (हिं.) हिंदी भाषेंतील एक वृत्त, छंद. ह्या वृत्तांत भाटांचें गाणें असतें. याला वीर असेंहि दुसरें नांव आहे. अमृतरायाची कांहीं कविता या छंदांत आहे. याचें उदा० 'ध्रुवागमन ऐकतांचि भूप हर्ष मानितसे, तट तट तुटति कसे, पूर्व दिशे पूर्ण चंद्र समुद्रासि जसा दिसे, उचंबळूनि गर्जतसे.' –अमृत ११. 'नाना पदें नाना श्लोक। नाना वीर नाना कडक।' –दा १२.५.५. [हिं. कडका–खा=यशोगीत, युद्ध गीत] **०भार**–पु. कडका गाणाऱ्या भाटांचा समुदाय. 'कडकभार निघाले।' –वेसीस्व ६.५६.

कडकड—पु. नगारा; ताशा; टाळ; ढोल इ० चा आवाज; वाद्यांचा ध्वनि; गोंगाट; कडकडाट. [ध्व.]

कडकड—पु. (गो.) हुडहुडी; थंडीचा कांकडा. [कडकड]

कडकडां—क्रिवि. नगारा, ताशा इ० वाद्यें वाजणें; वाळलेला पदार्थ मोडणें, संतापून शिव्या देणें, झाड मोडणें वगैरेच्या आवाजाप्रमाणें किंवा उकळणाऱ्या तेलाच्या कडकड आवाजाप्रमाणें; कडकन (क्रि० वाजणें, फुटणें). 'कडकड फाटतें गगन।' –विक १०९. कडकड शब्द उडाला गडगड गगनांत खांब जो चिरला॥' 'प्रगटे सिंह नराकृति ...'; 'कडकडां जांभया येती।' –दा १८.६.३. [ध्व. कड द्वि.] **०दांत खाणें**–त्रासानें किंवा रागानें जोरानें दांतावर दांत घासणें; जोरांत दांत खाणें. **०भेटणें**–जोरानें आलिंगन देणें; मिठी मारणें; कडकडून भेटणें.

कडकडणें—अक्रि. कडकड आवाज होणें (वीज इ० चा). 'कडकडिला भडभडिला।' –दावि २७८. २ अतिशय उकळणें, तापलें जाणें (पाणी, तेल, रागांत असलेलें माणूस). 'बहु कडकडे परशेरें, जैसा अति तैलपाक येबानें।' –मोभीष्म ११.५६. ३ वादळ होणें; प्रलयकालाप्रमाणें स्थिति होणें. 'बारा सूर्य कडकडिले।' –दा १३.४.७. ४ जोरानें रागावणें; तणतणणें; खवळणें. 'धिक्कारिति किति कीं या बाहिर सोडुनि भय कडकडो हा' –मोगदा १.१९. ५ मोडणें; तुटणें; आदळणें; आपटणें. ६ रागावून मोठ्यानें बोलणें; शिवीगाळ करणें. –न. भांडण; कज्जा; कलह. [कडकड]

कडकडविणें—उक्रि. (गो.) कांपविणें; थरारविणें; धास्ती उत्पन्न करणें.

कडकडाट—पु. १ कडकड असा मोठा शब्द; कडाका; दणका; गर्जना. कडकड पहा. 'राक्षसांचा भार कडकडाट।

वाद्यांचा होय दणदणाट ॥ ' २ (ल.) निष्ठुरपणा; कडक स्वभाव; तापटपणा. ३ (ल) आक्रोश; धडपड (नाखुषीमुळें). 'सात्विक त्याग करी विवेकनिष्ठें। तामस त्याग करी कडकडाटें।' –एभा १३.१५२. [कडकड]

कडकडाटणें—अक्रि. कडकड असा आवाज होणें; मोठ्यानें शब्द होणें (धनुष्याच्या दोरीचा, मोडण्याचा, तुटण्याचा, इ०). ' सीत ओढिता आकर्ण । कडकडाटें घोष दारुण । ' [कडकडाट]

कडकडा वाल—पु. (कों.) भाजल्यामुळें कडकड वाजणारा वाल; भाजलेला कडवा वाल.

कडकडी—स्त्री. १ कडकडीतपणा; ताठरपणा. २ जास्त वाळल्यानें होणारा (कापड, पानें, कागद, इ० चा) कडकड आवाज; फडफडी. ३ तापानें अंगीं येणारी कचकच, कांटा, हींव; कापरें; कंप; हुडहुडी. [कडकड]

कडकडीं—स्त्रीअव. (गो.) डोक्यांत घालण्याचीं सोन्याचीं लहान फुलें. [ध्व. ?]

कडकडीत—वि. १ दाताखालीं फोडतांना आवाज देणारा, कुडकुडीत; कुडुंकुडं वाजणारे (तळलेले वाटाणे वगैरे). २ अतिशय उष्ण; कढत (ऊन, पाणी इ०). अति प्रखर; ऐन (दुपार). ' कडकडित दुपारीं चेतला अग्निभारी । '–मुंव १२६ ३ ताजी; तयार; पक्की; चांगली अवगत (विद्या, ज्ञान); त्या विद्येनें भूषित (माणूस). ४ भाडभीड न ठेवतां केलेले; स्पष्ट; मोकळें; खुलें (भाषण, व्यवहार); अशा स्वभावाचा; स्पष्टवक्ता; तापट (मनुष्य). ५ अक्षरशः शास्त्रोक्त आचारविचार पाळणारा; फार सोंवळा; अत्यंत शुद्ध; पवित्र; कट्टा (माणूस, सोवळें). ' रामायणाचें वैशिष्ट्य स्थापन करणाऱ्या अनेक गोष्टींपैकीं कडकडीत चातुर्वर्ण्य ही एक गोष्ट असल्यामुळें आम्ही या गोष्टीस फार महत्त्व दिलें आहें. ' –मसाप २.२.११. ' स्वतः पंतचरित्रकारहि तत्पूर्वीच्या पंतलेखकाचे बाबतीत कडकडीत सोंवळे राहिले आहेत असें नाहीं ' –भक्तमयूर केका प्रस्तावना १५. ६ वाळलेलें आणि कडकड आवाज करणारें; शुष्क (कापड). ७ नैष्ठिक; अत्यंत नियमित; न चुकतां पाळलेलें; अतिशय कठिण (व्रत, ब्रह्मचर्य, तपश्चर्या, वैराग्य इ०). ८ खरेखुरें, जागृत (पिशाच्च, वारें, सचार). ९ (काव्य) खडबडीत; रखरखीत. ' तंव वल्कलें कडकडीत कठिन । नेसतां नये सीतेलागुन ।' –रावि १०.१४९. [ध्व. कडकड]

कडकडून—क्रिवि. १ जोरानें आवळून; गच्च; दृढपणें (बांधणें, आवळणें, मिठी मारणें). २ (गो.) भिऊन; थोपटून. ३ आवेशानें; जोरानें; रागानें; त्वेषानें; चवताळून (अंगावर जाणें). **०चावणें**–रागानें, धावून जावून, जोरानें, चावणें. ' पुच्छ रगडिता नागें धावाव कडकडोनि चावावें । ' –मोकर्ण १४.३. [कडकडणें]

कडकणा-णी-र्णें—पुन्नीन. १ नवरात्रांत (अगर इतर वेळीं) देवीच्या वरील मंडपीला टांगलेले कागदाचे नक्षीदार वाटोळे तुकडे. २ वरील आकाराच्या तळलेल्या पुऱ्या; तेलऱ्या; फुलोरा. ' कृष्णालागीं तेलवणें । आणलीं कडकडीत कडकणें । ' –एरुस्व १५.९०. –वेसीस्व ८.११७.

कडकणी—स्त्री. क्षयासारखा एक रोग; झडी; हाडीज्वर. (क्रि० बसणें). [कडक]

कडकणें—अक्रि. १ वाळणें; सुकणें; कडकडीत होणें (कापड, भाकर, इ०). २ अतिशय सुकल्यानें तडकणें; उलणें. ३ शुष्क होणें; आकसणें; करपणें (थंडीनें, उष्णतेनें उभें पीक इ०). ४ पक्कें होणें; वाळणें; कापणीला तयार असणें (गवत, धान्य इ०). ५ अशक्त, दुबळें होणें (माणूस, जनावर). ६ कडकड वाजणें (चावतांना भाकरी; कापतांना गवत; जळतांना काटे, वाळलेले कपडे, कागद इ०). ' बहु वार्षे मेळा कडकत भरें व्योम भरलें । ' –दावि २२३. ७ खूप रागावून मोठ्यानें भांडण करणें; ताशेरा झाडणें. ' गोदूबाई पुन्हां कडकल्या. ' –हांकाध ९९. ८ कडकड वाजणें; गडगडाट होणें (मेघ, वारा, वीज यांचा). ' वीज कडकडली. ' ' तया तेजापेक्षां कडकत बळें वात सुटला । ' –दावि २५५. ९ महाग होणें; जास्त वाढणें (बाजारभाव). –शे ८.१८७. **कडकून सांगणें-बोलणें**–मोठ्यानें, जोरानें सागणें; बोलणें, ओरडणें, शिरा ताणून बोलणें. [कडक]

कडकतवाला—वि. कडका गाणारा (भाट). कडका छंद पहा. ' गवई, गाणारणी, कडकडतवाले भाट, धाडी, नाटकवाले व भांडांचे तमाशे वगैरे जास्त नोकरींत ठेवण्यांत आले. ' –ऐरा ६९.

कडका—पु. कडाका–खा. १ अतिशयपणा; तीक्ष्णपणा; भर; तीव्रता (ऊन्ह, थंडी इ० चा). ' उन्हाचा–थंडीचा कडका. ' ' आज थंडीचा मोठा कडका पडला आहे, नाहीं ? ' २ एकाएकीं झालेलें अतिशय दुःख (अंग भाजलें, पलिस्तर मारलें असतां होतें तसें). ३ कडकडाट; गर्जना (मेघांची); दणदणाट; खणखणाट; घोष; गजर (अनेक वाद्यांचा). ' टाळी भजनाचा करवूनि कडका ' –दावि २६८. ' मंगळतुराचा कडका । ' –वेसीस्व ६.६९. ४ जोराचें भांडण; रागाचा आवेश. ' आला क्रोधाचा कडका । ' –दावि ३१४. ५ ओरडा, रड (अतिवृष्टि, अनावृष्टि, दुष्काळ, सांथ, परचक्र वगैरेबद्दल). अधिक अर्थासाठीं कडाखा व तडाखा पहा. ६ थाट; मौज. 'आरंभला उत्साह कडका' –दावि २४८. ७ ज्वारीवरचा एक रोग (यानें पीक वाळतें). (क्रि० पडणें). –शे ७.१९५. ८ (कातकरी) आवाज; चाहूल. ' रथाचा

कडका लागतांच राजाच्या मुलानें धांवत जाऊन देवाचा रथ धरला.'–मसाप १.३.३१. –क्रिवि. सपाटयानें; तडाख्यानें; त्वरेनें: तत्परतेनें (काम, माणसाचें बोलणें किंवा क्रिया चालणें). [कडक]

कडका—पु. (हिं.) हिंदी पदाचा एक वीररसप्रधान, उत्तजनपर प्रकार; पोवाडा; वीरश्रीचें कवनः एक छंद. 'भाट बोलती कडका। धडाधडी होतसे।' –दावि ४९६. कडक पहा.

कंडका—पु. (वे.) खांड; तुकडा; ओंडका (लांकडाचा). (क्रि० पाडणें). 'लांकडाचा एक कंडका फोड.' **०पाडणें**– (क.) तोडून टाकणें; भानगड मिटविणें. [सं. खंडक]

कडकांगी—वि. सडपातळ; किडकिडीत; किरकोळ. [कडक+अंग]

कडकावणी—स्त्री. फटका; तडाखा. [कडकावणें]

कडकावणें-विणें—अक्रि. १ चापणें; हजेरी घेणें; रागावून बोलणें; खरडपट्टी काढणें (रागें भरणें, निषेध करणें; ताकीद देणें अशा वेळीं). २ आवेशानें बोलणें; गर्जना करणें. 'तों जेव्हां कडकावला, धनुवरी टेला उभा भूतसा।' –आसी ३५. –उक्रि. १ (थप्पड) मारणें; (चाबूक) लगावणें; सडकून काढणें; चोपणें. 'मालकानें आपल्या नोकराला चांगलाच कडकावला.' २ निर्भयतेनें, स्पष्ट बोलणें, सांगणें; झोकून देणें; म्हणून दाखविणें; (उत्तर, आधारवाक्य इ०). [कडका]

कडकावून, कडकून—क्रिवि. १ त्वरेनें; लागलीच; झपाट्यानें. २ धमकावून; धडकूनः न भीतां. कडकडून पहा. [कडकाविणें]

कडकिंद—पु. डांग; आकारानें व चवीनें शिंगाडयासारखा पांढरा कंद. याचे काप उकडून खातात. [कुडा+कंद?]

कडकी—स्त्री. १ अंगांत भिनलेली अतिशय उष्णता (उपदंश, उग्र औषध, विष, ताप इ० ची); मुरलेला, भिनलेला ताप; हाडीज्वर. (क्रि० बसणें). २ आग; दाह; ताप. (कु.) क्षयरोग. 'तेकां कडकी लागली हा.' =त्याला क्षयरोग झाला आहे. [कडक]

कंडकी—स्त्री. (क.) (न्हावी) हजामतीच्यावेळीं मांडीवर, अंगावर घालण्याचा कापडाचा तुकडा. 'अरे तुझी कंडकी फार घाण आहे.' [सं. खंडक; कर्ना. कंडका]

कडकुसर—स्त्री. (व.) काटकसर; कसोशी. 'मोठया कडकुसरीनें त्यानें संसार चालविला.' [कड+कुसर, काटकसर]

कडक्या—पु. ज्वारीचा एक रोग; कडका पहा. –शे ११. १५५.

कडंग—वि. १ वाळलेलें; कडकडीत (अनावृष्टीमुळें अगर अतिपक्वतेमुळें बनलेला–तांदूळ इ०). २ फार भाजलें असतां, चावतांना किंवा दळतांना कडकड वाजणारें; कठिण; खट्टर (धान्य, भाकरी). 'ताक घालशील तर कडंग भाकरी खाईन.' ३ खरपूस; पक्कें. –पु. धान्यांतील टणक दाणा; गर्णग. [ध्व.]

कडंग—स्त्री. थोडासा ताप; अंग कोंबट होणें; कणकण. [कडत+अंग]

कडंगणें—अक्रि. १ कडंग होणें (भात, पोळ्या वगैरे वाळल्यामुळें). २ अतिशय तापल्यामुळें किंवा कांडण्यामुळें कणी होणें, चुरा होणें. [कडंग]

कडंगी-डांगी—स्त्री. (राजा.) तापाची कणकण; कणकणी; अंग माडल्यासारखें होणें. (क्रि० येणें; लागणें; भरणें; जाणें; निघणें). [कडंग]

कडगुलां-लें—न. १ (राजा.) कडें; कांकण; बांगडी. 'अडगुरे मडगुलें, सोन्याचें कडगुलें.' २ आंधेल्याच्या(सापाच्या) अंगावरील काळें वर्तुळ, रेषा [कटक]

कडगें—न. कडें; बांकी; एक अलंकार; दागिना. 'बांकि, साखळें अनंत, हस्तकडगें.' –ऋ १३८. [सं. कटक; प्रा. कडग]

कडचा—(व.) सराटा; कलथा; उलथणें. –महाराष्ट्र १९१९. [?]

कडच्या—वि. १ कडेस असणारा; कांठचा; कडेचा; बाजूचा. २ कडील. ३ पक्षाचा. 'दर्याबाई आपल्याकडची फार दिवस राहील असें साबाजीस वाटलें नाहीं.' –विवि ८.६.१११. [का. कडे] **०आदितवार**–पु. शेवटचा आदितवार (कधींच न येणारा), (जी गोष्ट कधींच करावयाची नसते ती करावयाची असें वरवर दाखविण्यासाठीं ठरविलेला दिवस). 'कडच्या आदितवारीं.' **०पोहणारा**–पु. १ नदीच्या तीराजवळच्या उथळ पाण्यांत पोहणारा. २ (ल.) फाजील सावधगिरी बाळगणारा (माणूस, व्यापारी, सेटबाज, घोडेस्वार इ०). २ लांबून, दुरून मदत करणारा; प्रत्यक्ष संकटांत उडी न टाकणारा.

कडची—स्त्री. लहान कडई. [दे. कडच्छुः गु. कडची; सिं. कछी; हिं. कर्छी]

कडची, करछी—(खा. ब.) पळी (आमटी वाढण्याची). 'पितळेची एक कडची पाहिजे.' [गु. कडछी]

कडझील—चिकारी (तार) पहा.

कडडड—उद्गा. (झाड, वीज वगैरे पडतांना होणारा) धडाडाडा आवाज; गडगडाट. –क्रिवि. धाडदिशीं; धप्पकन्; काडकन्. [ध्व.]

कडण—स्त्री. १ (राजा.) नदीचा किंवा पर्वताचा कडा; दरड; टोंक; कड. २ शरीराची एक बाजू; सैन्याची एक बगल; बरगडयांची बाजू किंवा कडसणी याअर्थी कडणपेक्षां कडणी (अव.) असा प्रयोग राजापुराकडे आढळतो. कोंकणांत कांहीं

M.2202.

ठिकाणीं हाच शब्द एकवचनींहि आढळतो. ३ नेसलेल्या वस्त्राच्या घासण्यानें कुशीना होणारी खरूज. [कड]

कंडण—न. (गो.) मुगाची डाळ व गूळ एकत्र शिजवून केलेली आमटी; कढण. [कढणें]

कंडण-णें—स्त्रीन. (कों. चि.) चटईप्रमाणें विणलेला नारळीचा झाप; झावळी; साऊळ. [सं. कटन; प्रा. कडण=घरावरील पांजरण, ओमण]

कंडण-न—न. कांडणें; मार; कांडण पहा. ' अश्वासहित वीरकंडन एकसरें मांडिलें । ' [सं. कंडन]

कंडणी—स्त्री. १ (कु.) ओमणाच्याखालीं आधार म्हणून घरावर घालावयाची बांबूची काठी. २ कंडण पहा.

कंडणी-नी—स्त्री. मुसळ. [सं. कंडन]

कंडणें-नें—शअ. कडून; बाजूनें; पासून; ज्या दिशेनें. [कड]

कंडत—(कर्ना.) (सोंगटी) उडतपगडयाच्या डावांत एका पक्षानें दुसऱ्या पक्षाची सोंगटी प्रथम मारणें. ' त्याचें अद्याप कडत झालें नाहीं. ' [का.]

कंडतर—न. १ जुनी-मोडकी टोपली, शिप्तर, चटई, चाळण इ०. २ जुनें, रद्दी, चिंध्या झालेलें वस्त्र. ' जैसें जीर्ण कडतर । परी म्हणाया वैभवी थोर छत्र । '—नव १७.१३३. ३ नारळाचा जुना झांप; खडतर. [सं. कट+तर]

कंडतर—खडतर पहा.

कंडतरणें—अक्रि. १ अंगीं भिनणें, बोचणें; खडतरणें पहा. ' कुसी कडतरतांती भाले । ' —शिशु ९७१. २ बाजूस पडणें. ' जीव्हार भेदलें कडतरला । ' —उषा १४०६. [सं. कट=कड+तरलित=बाजूस पडलेला]

कंडतरी—स्त्री. शेताचा लहानसा तुकडा; लागवडीस योग्य असें लहान शेत.

कंडता—पु. (चाळीस शेरांचा) वजनी एक मण जिन्नस विकला असतां त्याच्यावर द्यावयाचा वर्ताळा (उदा० तूप, गूळ, तेल यांच्या दर मणामागें १॥ शेर कडता मिळतो. **०कांटा**—पु. अडत्याला अर्ध्या पल्ल्यावर किंवा एका आख्यावर जो वर्ताळा मिळतो तो. कांहीं ठिकाणीं हा कडता दर वजनी पल्ल्यास १०॥ शेर असतो आणि कांटा २॥ शेर असतो, मिळून १३ शेर, हे कच्च्या पल्ल्याच्या १२० शेरांत मिळविले म्हणजे १३३ शेरांचा पक्का पल्ला होतो. दुसऱ्या कांहीं ठिकाणीं कांटा व कडता यांचें प्रमाण निरनिराळें आढळतें. पुण्यांत गूळ वजन करतांना १ मणाच्यापुढें डेपेचें वजन भरल्यास मणामागें चार शेरप्रमाणें कडता (वजन) कमी करतात. [का. कडत=छाट]

कंडता—वि. (ना.) ऊन; गरम; कढत पहा. **०कंडता**—क्रिवि. गरमागरम; कढतकढत; ऊनऊन. [कढणें]

कंडतेल—(कों.) (नाविक) तेलांत थोडीशी राळ कढवून तयार केलेलें तेल. हें गलबतांस पाण्याच्या वरील भागाला लावतात. [कढणें+तेल]

कंडदण-दाण-धण - धान्य—न. द्विदलजातीय, डाळी करण्याचें धान्य (मूग, मठ, उडीद, तूर, मसुर, हरभरा, पावटा, वाटाणा इ०) [सं. काष्ठ+धान्य; प्रा. कट्ठ+धन्न]

कंडदोर(मणदोर)—पु. (जुन्नरी) वाघुर (एक जाळें) वरचे व खालचे बाजूनें ज्या दोऱ्यांतून ओवून घेतलेलें असतें त्या दोऱ्या; कढेचे दोर. [कडा+दोर]

कंडदोरा—पु. करगोटा; कट(टि)दोरा पहा. पायीं घागरिया सरी । कडदोरा वांकी । '—तुगा १२५. ' कडदोऱ्याला घागऱ्या शोभत नाहींत. ' —कमं १.३२. [सं. कटित्र, किंवा कटि+दोरा]

कंडनाळ—न. (बे.) तांब्याचें भांडें.

कंडनिकड—स्त्री. १ निकडीचा प्रयत्न. ' ते कड-निकड करून कच्चे चाळीस कोस भुई चालून चार घटका रात्र आहेतों लष्करापासोन दोन कोसांवर दाखल जाहले . ' —भाव १३१. २ शेवट; तड. ' कडनिकडीला निर्वाणीला । ' —संग्राम ८८. [कड+निकड]

कंडप—न. १ हरभऱ्याचीं, तुरीचीं वगैरे झाडें काढल्यानंतर तीं बाळण्यासाठीं त्यांची घातलेली लहान रास (पेंढया बांधण्यापूर्वी); शेत कापतेवेळेस शेतांतच बांधल्यावांचून जे कवळे ठेवीत जातात ते प्र. कडपी-पें. —शे ६.१८५. २ (कांहीं ठिकाणीं) धान्याची कापणी. [प्रा. कडप्प=समूह, निकर]

कंडप—(गो.) गुळानें भरलेली काहील. [सं. कटाह ?]

कंडपल— न. (बे.) कडदण पहा. [सं. काष्ठ+फळ; प्रा. कट्ठ+फल]

कंडप वळणें-बसणें-होणें—क्रि. अशक्त, रोड होणें; वाळणें.

कंडपा, कंडपा पाग—न. (कों.) एक प्रकारचें जाळें.

कंडपास—पु. (गो.) काढणीचा फांस.

कंडपी-पे—स्त्रीन. पीक कापून जमिनीवर ठाकलेल्या जुडया, त्यापैकीं प्रत्येक; कडप पहा.

कंडप्या—स्त्री. (अव.) सूर्य चित्रा नक्षत्राजवळ असणें व त्या वेळचा पाऊस (हा पाऊस पडतो तेव्हां शेतामध्यें बाजरीच्या कडप्या वाळत ठाकलेल्या असतात); [कडप]

कंडबंची—कडबंची पहा.

कंडबड—स्त्री. गुरानें कांहीं खाऊन व तुडवून ठाकलेला कडबा; गुराचा उष्टा कडबा. [कडबा]

कडबडीत—वि. कडकड, सळसळ असा वाळलेल्या पदार्थांसारखा आवाज करणारा; कडकडीत अर्थ ६ पहा. [ध्व.]

कडबा—पु. १ कणसें कापून घेऊन उरलेलीं जोंधळ्याचीं वाळलेलीं ताटें (गुरांना खाण्यासाठीं); वैरण; कडबाड; कडबी. २ (ल.) निरुपयोगी पदार्थ; गाळ; गदळ. [सिं. कड्ब; हिं. कडबी; का. कडबे; तुल० सं. काष्ठ+कृष्; प्रा. कड+वड्ढ–कडवाढ–कडबाड]

कडबाड—न. धान्याचें ताट; कडबा. ' हीरवीं कडबाडें । तैंचि तोडीतु आलें चहूंकडे । ' –शिशु ९६५.

कडबानायकीण—स्त्री. (कडब्याप्रमाणें क्षुद्र किंवा कडबा वाहणारी) स्वस्त रांडरूं; म्हातारी–जख्खड कुंटीण.

कडबी—स्त्री. १ जोंधळा कापल्यानंतर त्याच्या ताटास पुन्हां येणारी फूट (ही उन्हाळ्यांत गुरांना खावयास घालतात). २ (चुकीनें) कडबा.

कडबू—पु. १ कणकीच्या पापडींत चण्याच्या डाळीचें पुरण घालून तळलेली मोठी करंजी; पुरणाची करंजी; एक पक्वान्न. २ (ल.) यःकश्चित माणूस; फालतू मनुष्य. ३ (यद्वेनें) कानडी लोकांस म्हणतात. [का. कडबु, कडुबु]

कडबोळें, कोडबुळें–बोळें—न. १ भाजणीच्या पिठाचा तेलांत तळून केलेला एक पदार्थ; हा वाटोळा, अर्धवाटोळा असतो. २ कडबोळ्याच्या आकाराचा पदार्थ. ३ शोभेच्या दारूचा केलेला एक कडबोळ्याचे आकृतीचा प्रकार. –अग्नि ३. **अठराधान्याचें कडबोळें**–अठरा शब्द पहा. [सं. कट+वलय]

कडमड–डा, कडमोड–डा—स्त्रीपु. १ तापापूर्वी किंवा त्यानंतर येणारी कणकण; (क्रि० येणें; भरणें). कडंगी–डांगी पहा. ' आंगास तीव्या कडमोड आला । ' –सारुह २.६९. २ दुखणें गेल्यानंतर वाटणारी हलकता; रोगाच्या झटक्यानंतर येणारी ग्लानि; (क्रि० राहणें; येणें; होणें). ३ गळवाची ठसठस; पाय, डोळे, दांत यांची होणारी आग; अतिशय परिश्रम केल्यानंतर अस्वस्थता वाटणें इ०. [सं. कृष्; प्रा. कड्ढ; किंवा सं. क्लथ्; प्रा. कढ्; काढणें+मोडणें]

कडमडणें—अक्रि. १ ताप येण्याचीं पूर्वचिन्हें होणें; अंग रसरसणें; शिरशिरी येणें; अंग कुसमुसणें. (वाप्र.) **हिवानें, तापानें, कडमडणें, कडमडत निजणें, पडणें, कडमडून येणें.** २ आग होणें; दुखणें; ठसठसणें (गळूं, पाय, दांत, इ०). कडमड अर्थ ३ पहा.

कडमणी—पु. (सोनारी) जाळीच्या मण्याशेजारीं (दोन्ही बाजूस) असणारा सोन्याचा अष्टपैलू मणी; करमरा मणी. [कडा=बाजू+मणी]

कडय—न. (तंजा.) हातांतील कडें; वलय. कडें पहा.

कंडरा—पु. गळ्याचा दोर; काढणी. [सं. कंधरा]

कडलग—न. १ कडें. ' कंठीं कडलग सोनसळें । ' –मुसभा १५.२१३. ' भुर्जी केयूर हातीं कडलगें । ' –स्वानु ५.१.२२. [सं. कटक]

कडलगी—पु. कडें; लोखंडाचें वलय? ' प्रेमाचा कडलगी ठाकौनि कैवल्य दुर्गे । ' –भाए १६५.

कडव—पु. दारावरची देवडी. ' मेळविले थोवे–कारीं । कडवांपाशीं ॥ ' –शिशु ५०२. [कवाड?]

कडव—वि. कडू. ' पीत मनोहर वृंदावन । वरी चांगलें आंत कडव पूर्ण । ' –जै ५३.११६. [सं. कटु; हिं. कडवा]

कडवई, कडवी—स्त्री. १ उडदाचा डाहळा. कडव्या वालाचा वेल. २ कडूपणाची अवस्था; कडवटपणा. [सं. कटु]

कडवेंकें—न. कडकपणा (?). –शर.

कडवंची—स्त्री. कडवंची; जोंधळ्याच्या शेतांत उगवणारा एक वेल. याच्या मुळाशीं कांदा असतो. यांचीं फळें सुकलेल्या मनुकासारखीं बारीक व हिरव्या रंगाचीं असतात, त्यांस कडवंच्या म्हणतात व त्यांची भाजी करतात. [सं. कटु+श्रा. हंची= गवत; हिं. कडवंची]

कडवट—वि. कडसर; किंचित् कडू. [सं. कटुवत्; हिं. कडवाहट]

कडवणी—स्त्री. कडू पाणी. –क्षिपु. [कटु+वन=पाणी]

कडवर—क्रिवि. कडेपर्यंत; शेवटपर्यंत; समाप्तीपर्यंत. [कड= शेवट+वर=पर्यंत]

कडवली—स्त्री. (कु.) एक प्रकारचें मातीचें भांडें.

कडवसा–से—पुन. अंधार; आडबाजू. ' आणि ललाटपटाचिये खोळे । कैसे भयातें भेडवितातीं डोळे । हो कां जे महामृत्यूचे उमाळे । कडवसा राहिले । ' –ज्ञा ११.३६४. ' फिटलें भेदाभेदाचें कडवसें । ' –ज्ञा ७.११२. [कूट+वास? कडा=बाजू+वास?]

कडवसा—पु. प्रतिबिंब. कवडसा पहा. ' जो अमृतांचा कडवसा । ' –ज्ञा ४.१७४. ' तेज सूर्य जयाचेनि उजाळे । कडवसेनी । ' –अमृ २.२३. [कवडसा]

कडवसी—स्त्री. कडोसरी; क० ' देशोदेशींची पाटौळी भरिया फोडलिया कडवसी । ' –धवळे ४०.

कडवळ—न. १ उन्हाळ्यांत पाणथळ जमिनींत गुरांना घालण्यासाठीं केलेला ओला चारा (बाजरी, ज्वारी, मका यांचा); चाऱ्यासाठीं पेरलेलें शेत. ' तैसें कडवळ फोकिलें नोव्हे । सोंपटचि राहे वाढोनियां ॥ ' –निगा १९७. –हो ६.२५५. २ मक्याचीं ताटें. [सं. काष्ठ+म. वल, प्रत्यय; हिं. कडवी=बी?]

कडवळ—न. (गो.) कोठा व आंतडें यांचा अंतर्भाग; कूस (शरीराची). ' तुझेया कडवळाची संधी । जी अमृताची

निधी । ती सबळ करें अगाधें । दुखंडी केली ॥ ' –स्रिपु २. ५४.१९. [सं. कटि+वलय ?]

कडवळीया—वि. कैवारी; कळवळ बाळगणारा. ' ना तो शृंगाराचा कडवळिया । ' –शिशु २.६४,

कडवा—वि. १ कडू; (गोड, याच्या उलट, भाजी पाला वगैरे शब्दास लावतात). गोडा पहा. २ जहाल; रागीट; तापट. ३ ज्याच्या अंगीं भांग, अफू, इ० कैफ जिरून गेले आहेत असा; दुखणें, रोग इ० ज्याच्या सरावाचा झाला आहे असा; नाजूक, कोमल राहिला नाहीं असा. ४ उपदंशादि विकार न बाधणारें ज्याचें शरीर आहे असा. ५ शूर; निर्भय; धाडसी. (खून, मारामारी, लढाई इ०मध्यें). घनचक्कर; घोर (लढाई, तंटा). ६ रानटी; आडमुठा; व्यवहार करण्यास कठिण. ७ क्रूर; निर्दय; पाषाणहृदयी; कठोर. –पु. १ वालाची एक जात. २ बदामांतील कडू जात. ३ खाजरा मुरण. ४ अनौरस; अवैवाहिक संतति; कडू जात. [सं. कटु; प्रा. कडु; हिं. कडवा]

कडवां—क्रिवि. कडेवर ' ऐसें म्हणनि दासिचिया कडवा । पुत्र बैसविला बरवा । ' –कथा १.१०.१४७. [सं. कटि]

कडवॉ-वो—पु. (गो.) कांबीची वई; कूड; बांबू, कांबी इ०चा पडदा. [कूड]

कडवाय—वि. (गो.) कडवट. ' दोडगीं कडवाय आस.' [कडवा]

कडविखा—स्त्री. कडवटपणा. –शर.

कडविड—स्त्री. किडुकमिडुक; (सोन्याचा) चाराचुरा. ' करूनि कडविड जमा । घडली लगड । '–तुगा ३४८४. [स. कृत्; प्रा. कट्ट–कड द्वि.]

कडवी—स्त्री. १ कडव्या वालाची वेल; कडवा. २ (ल.) अफू; अफीण.

कडवी जात—स्त्री. १ कडू जात; जारज वंश. २ क्रूर; रांगडी; अडाणी जात. [कडु]

कडवें—न. आंकणकडव्यानें किंवा पालुपदानें जेथें गाण्याचा एक भाग संपतो तो भाग; पद्यविभाग. [कड=शेवट]

कडवेळ—न. कडवळ पहा.

कडस—क्रिवि. जोरानें, खेंचून, (क्रि० बांधणें).

कडस—न. पाडस; लहान गुरूं. ' वेउलीं त्रशिलें वच्छ । कीं पाशमुक्त कडस । ' –ऋ ६१. [का. कडसु=लहान गाय]

कडसणी-नी—स्त्री. १ (काव्य) चौकशी; विचार; वाटाघाट; परीक्षा; शोध; निवड. ' ये युक्तीचि कडसणी । नाहीं जयाच्या अंतःकरणीं । '–ज्ञा २.३४२. ' बैसउनि केली कडसणी । निज निष्ठेची । ' –रास ४.२९१. 'नित्यमुक्तआणि जीवन्मुक्त। हेहि कडसणी हे निभ्रांत। ते उपाधि आरोपित। म्हणूनच ॥ ' २ नाडा; दोरी (बटण्याची, गाडीवरील बोजा आवळण्याची, पडद्याची, तंबूच्या कनातीच्या वरच्या भागाची इ०). ' ऐसा सद्गुरु पूर्णपणी । तुटे भेदाची कडसणी ॥ ' –दा ७.१.१८. ३ (ल.) मंथन; घुसळणें. ' करितां दधिकडसणी । मग नवनीत निर्वाणीं । दिसे जैसें ॥ ' –ज्ञा २.१२९. ४ (ल.) विचार; भेद; भेदभाव. ' मी तूं हे कडसणी । ' –विपू २.४१. ' देव भक्त हे कडसणी । निरसोनि गेली ॥ ' –दा ८.८.१८. ५ (ना.) धाकदपटशा; तंबी; दटावणी; काच. ' तेयें द्वैतबुद्धीची कडसणी । ' –परमा २.१९. ६ चातुर्यांची रचना (बोलण्याची, लिहिण्याची). [सं. कृष्; प्रा. कड्ड=खेचणें; का. कडे=घुसळणें ?] **०देणें**–(व) पखवाज किंवा तबला आवळून बांधणें. **०घालणें, कडसणींत धरणें**-अडचणींत घालणें, पेचांत आणणें; घोटाळ्यांत पाडणें. **-स लागणें**–उतरती कळा लागणें.

कडसणी—स्त्री. १ (कों.) बाजू; बरगडया; कूस. ' त्याच्या कडसण्या तटाटल्या. ' ' हें गुरूं कडसण्या हाणतें.' २ कनवट; कडोसरी; कमरंजवळचा नेसलेल्या वस्त्राचा भाग (हिऱ्यांत लहानशी वस्तू खोचून ठेवतात) (क्रि० खोचणें, खुपसणें). ' कडसणीचा पैसा, सुपारी, डब्बी. ' [सं. कटि]

कडसणें—उक्रि. १ जोरानें बांधणें, आवळणें (गांठोडें, पखवाज, तबला इ०). २ कस लावणें, निक्षून करणें. ' श्रीगुरुकडसुनि गोष्टी पुसतां ऐसी । शिष्य अंतरीं चमकला ॥ ' –स्वानु ११.३.२६. ३ घुपळणें. ४ (ना.) घट्ट बांधणें; मारणें; चोप देणें. [कडसणी पहा]

कडसणें—उक्रि. १ विचार करणें; कसास लावणें; परीक्षा घेणें. ' आतां दया ते ऐसी । पूर्णचंद्रिका जैसी । निवतिां न कडसी । सानें थोर । ' –ज्ञा १६ १५४. २ (ल.) निवड करणें. ' परी तें असो आतां आघवें । नलगे श्रोतयांतें कडसावें । ' –ज्ञा ६.२७.

कडसणें—अक्रि. क्षीण होणें; अशक्त होणें; वाळणें. [दे. कड=क्षीण, दुर्बल]

कडसणें—उक्रि. १ कढविणें; अग्निशोधन करणें; तावून सुलाखून घेणें, कसास लावणें. ' मग ज्ञानाग्निसंपर्कें । कडसिलें विवेकें । ' –ज्ञा १.५२. २ (ल.) निवडणें; शुद्ध करणें. ' ज्ञानाग्निहुतार्शी कडशिलें वोजा । आत्मसिद्धी काजा लागूनियां । ' –तुगा ३९५८. [सं. कथ्; प्रा. कड; का. कडसु=कढविणें]

कडसर—वि. कडवट; किंचित कडू. [कटु+सदृश]

कडसर—पु एक प्रकारचें झाड. घोडयास होणाऱ्या कृमिरोगावर याच्या बियांचें चूर्ण दुसऱ्या कांहीं औषधांच्या चूर्णाबरोबर देतात. –अश्वप २.४६.

कडसर—स्त्री. टेकडीची उतरती बाजू; उतार. [कड+सरणें]

कडसरणें—अक्रि. १ एका बाजूस जाणें; एकीकडे होणें. २ (ल.) अंग काढून घेणें; मागें हटणें. [कडे+सरणें]

कडसरा—पु. (धान्याच्या) मुढ्याभोंवतीं बांधावयाचा हेरी दोर. [कड+सर]

कडसरी—स्त्री. १ पाटीच्या, दुरडीच्या, कांठाचा वरचा वेष्ट विणलेला भाग; कड; कांठ. २ पाठीच्यामध्येंहि मजबुतीसाठीं अधिक सरी घालून घट्ट वीण करतात ती. ३ पर्वताच्या कड्यांचा प्रदेश. ४ (हेट.) घराच्या ओट्यावरचें (काठाचें) भाडवें लाकूड. **०स येणें**–अवघड कार्यें करीत असतां मेटाकुटीस येणें. [कड+सरी]

कडसरी—(गो.) बांबूच्या बारीक काठ्या दोरांनीं विणून केलेलें जाळें. [प्रा. कडसक्करा–बांबूची काठी, वांसा? कड+सरी]

कडसरी—कडोसरी पहा.

कडसाण–र—वि. (गो.) कडवट; कडसर पहा.

कडसूत—न. करगोटा. ' म्हणून पुच्छ वज्राचें केलें कडसूत रामदासा । ' –पला ३८. [सं. कटि+सुत्र]

कडसूर—न भात कापल्यावर त्याचे जमिनींत राहिलेले खुंट.

कडळ—न. कडवळ पहा.

कडळ—करड पहा. **०काढणें**–पर्यायापर्यायानें पद्धतशीर रीतीनें न करतां एकदमच सरासरी करून टाकणें (काम).

कडा—पु. १ डोंगराचा सुळका; खडपा; डोंगराची तुटलेली बाजू, कड; पर्वताच्या धारेखालचा नीट उभा प्रदेश. (क्रि० तुटणें). 'आणि शोकाचा कडा उपडता ' –ज्ञा ७ ८७. [सं. कट–आवरणें; कट–ड. कटक–कडअ–कडा–भाअ १८३१; हि. कडाडा–कडा]

कडा—पु (व.) तुराटयांचा किंवा वेळूचा तट्टया, कुड. 'मध्यें कडा लावून एका खोलीच्या दोन खोल्या बनविल्या ' [सं. कट]

कंडा—(गो.) विणलेल्या चुडतांचें इरलें. [सं. कट; प्रा. कड=तृण ?]

कंडा—पु. १ खोटया अभिमानानें ताठणें, फुगणें; स्वतःच्या महत्वाचें प्रदर्शन; दिमाख; डौल. [कंद]

कंडा—पु. वरून सकलाद किंवा चांदीचा पत्रा मढविलेला दोराचा तुकडा: (घोडया–बैलाच्या गळ्यांतील) शोभेचें चव्हाट; कंठभूषण ' सर्जे तोडर पाखरा सजहुमे कंडे पटे चांगले । '–सारुह ३.४५ [कंठा] १ (मुलांच्या खेळांतील विजयसूचक शब्द) मात; कडी. (क्रि० लागणें; लावणें) ' आज आमचा तुमच्यावर देखील कंडा झाला कीं नाहीं सांगा ? ' –खरादे १०. [कंद] **०पट्टा**–पु. घोडयाच्या गळ्यांतील व डोक्यावरील अलंकार. ' सर्भोवती कंडेपटे साज घोडे उभे केले। ' –सप्र १८.२२.

कंडा—पु. (मावळी) गोवरी. [हिं.]

कडाऊ—वि. विटेचा एक प्रकार. –शिल्पवि ८५.

कडाकड–डां—क्रिवि. (फोडण्याचा, मोडण्याचा, मारण्याचा) अवाज करून, होऊन; कडकड पहा. [ध्व.] **कडाकडा करणें**–(क.) कडमडणें; धडपडणें.

कडाकडी—स्त्री. मोडण्याचा, तोडण्याचा, फुटण्याचा इ० मोठा आवाज; भांडण, लढाई यांतील गर्जना. कडकड पहा. ' भाऊनानाच दुःख ऐकतां हृदय फुटलं कडाकडी । ' –ऐपो १३२.

कडाका—पु. १ कडाखा पहा. ' सुटती तोफा एक कडाका गणति नाहीं वायाला । ' –ऐपो १७७. २ एक छंद; कडक–का पहा.

कडाकूट—पुस्त्री. १ एखादी गोष्ट सिद्ध करण्याविषयीं करावयाचा जोराचा प्रयत्न, मेहनत, दगदग. २ बारीक शोध; काथ्याकूट. ३ अतिशयपणा; लयलूट; समृद्धि; कडेलोट. ' काय हो, आज आंब्यांची–गुळाची–तुपाची–लाडवांची–पिकाची–धान्याची कडाकूट ! ' ' पावसानें–वाऱ्यानें–थंडीनें कडाकूट केली ! ' ४ मनस्वी आवेश: जोर. (कडाकोट शब्दाहून हा शब्द भिन्न आहे). [सं. कड्ड=कठिण, कडक असणें; कड+कूट=रास; गु. कडाकुट=त्रास; खडा+कुटणें] –क्रिवि. १ अतिशय; फार; गडद; धो धो; जोरानें; तडाख्यानें (पडणारा पाऊस, जमणारे ढग, वाहणारा वारा, वादळ, अंधार इ०). २ झाडून सर्व जोर, पूर्णत्व इ० दाखविण्याकरितां हा शब्द योजतात. ' आज कडाकूट पंडित मिळाले होते. '

कडाकोट—पु. १ कडे तुटलेली अथवा तट घातलेली अशी कोंडून ठेवण्याची जागा [कड=कांठ+कोट=किल्ला] २ कडया–कुलुपें लावून उत्तम बंदोबस्त करणें. ' घरांत जिकडे तिकडे कडाकोट केला. ' ३ एखादी जागा बंदोबस्ताच्या साधनांनीं सुरक्षित करणें; नाकेबंदी करणें; असा बंदोबस्त; नाकेबंदी. ' फौजेचा कडाकोट ' ' निवडुंगाचा–शेराचा कडाकोट. ' ' वाघाच्या भयामुळें धनगर म्हशींचा कडाकोट करतात. ' ४ व्यापणें; झांकणें; आच्छादन; आवरण. ' मेघाचा–पावसाचा–आभाळाचा कडाकोट. ' यावरून सर्वत्र पसरण्याची क्रिया; अतिशयपणा; धुमाकूळ (जुलमांचा, कृत्यांचा, उत्पादनांचा, जिन्नसांचा). ' लढाईचा–मारामारीचा–तोफांचा–वायांचा–अध्ययनाचा–गाण्याचा–बोलण्याचा–मंडळीचा–समारंभाचा–धान्याचा–पिकाचा–पक्ष्याचा कडाकोट. ' ५ केव्हां केव्हा कडाकूट या अर्थीहि चुकीनें उपयोग करतात. –वि. (समासांत) भक्कम; भारी; मोठा. ' कडाकोट बंदोबस्त. ' [सं. कड्=रक्षण करणें; कडा=कट्टा+कोट=किल्ला]

कडाखा—पु. १ (ध्वनि) मारण्याचा, मोडण्याचा मोठा आवाज; कडकडाट. २ तडाखा (ठोसा, बुक्का, गुद्दा इ० चा); फटका; फटकारा. इतर अर्थी तडाखा पहा. ' मोठा कडाखा जाला; धुराची व धुळीची धुंदी जाली. ' –भाब १२. ३ (ल.)

तीक्ष्णता; जोर; आधिक्य; तीव्रता; भर; झपाटा, (गुणांचा, कृत्यांचा वाचक). जसेः–थंडीचा, उन्हाचा, पावसाचा, रागाचा, धारणेचा कडाखा. ४ उणीव; दुर्मिळता; महर्गता. 'धान्याचा कडाखा.' ५ (ल.) थाट; धडाका पहा. 'लग्नाचा कडाखा झाला.' ६ वेग; आवेश; पराक्रम (पेंढारी, परचक्र, सेनापति इ०). 'विजयाधिक भीष्माचा परिहरतां सायकां कडाखा तो।' –मोभीष्म ५.६. 'कडाखा सेनापतीनें केला.' –ऐपो ७९. ७ भयंकर हल्ला; उपद्रव; नासधूस. 'महामारीचा कडाखा.' ८ उंसावरचा एक रोग. –शे ७.२२२. [ध्व.]

कडांगी—स्त्री. (राजा.) तापानें अंग मोडून येणें; शिरशिरी (क्रि० येणें; जाणें; भरणें; लागणें; निघणें). कडंगी पहा. [कड+अंग]

कडाचूर—पु. १ चक्काचूर; तुकडे तुकडे; मोडतोड; फोड मोड. २ (ल.) खाऊन फस्त करणें; ताट धुवून ठेवणें; फन्ना. 'खाऊन खाऊन कडाचूर करून टाकला.' [ध्व. कड–कड+चुरा]

कडाड—पु. १ (ध्वनि) कडड; कडकड पहा. २ धक्का, तडाखा. ३ (ल.) कठिण प्रसंग; दुष्काळ. ४ जोर. 'मन निजकल्पना कडाडी। नाचवी धांदडी त्रैलोक्या।' –एभा २३.६७८. –क्रिवि. कडकड आवाज करून. 'उलथला वृक्ष तुटोनी कडाड' –दावि २१८. [ध्व.]

कडाड—वि. (ल.) जाणता; ज्ञानी; पंडित. 'म्हणोनि विश्वरूप तूं सहसा। दाविसी हा कीर भरंवसा। कां जे कडाडां आणि गर्हिसा। माजीं नित्य नवा तूं कीं।' –ज्ञा ११.९७. [कट्टा?]

कडाड—पु. पर्वताचा कडा; कडाडी. 'तरीं कडाडीं लोटला गाडा। तो आपणपें न मनीं अवघडा।' –ज्ञा १८.६४६. [हिं.]

कडाडणें—अक्रि. १ कडकड असा मोठा आवाज होणें (मारण्याचा, मोडण्याचा इ०); कडकणें. 'शशीसूर्यं नक्षत्र माळा कडाडी।' –राक ८८. २ काडकन् मोडणें, कोसळणें. 'कळंब खांदी कडाडली बाई।' 'कडाडतां चाप भयानका ही। करी असा उग्र जनास कांहीं॥' –वामन सीतास्वयंवर ४९. ३ गर्जना करणें; ओरडणें. 'कपी वीर तो थोर कोपें कडाडी.' –राक ७२. ४ (ल.) खडसावून बोलणें (रागानें); आवेशानें बोलणें; ओरडणें. 'ती कडाडली–माझ्या प्रियकराच्या नालस्त्या करितोस ..... चल नीघ मेल्या!' –दरोडेखोर (तीन आणे माला). [ध्व. कडाड]

कडाडी—पुस्त्री. (ल.) धार, प्रवाह; जोर; कडाड. 'मोह नदीची कडाडी। माजीं समळ जळ प्रबळ वोढी' –एभा १२. ५७७. [हिं. कडाड]

कडाडां-डीं-डून—क्रिवि. कडाकडा; काडदिशीं; झपाट्यानें; एकदम जोरानें. 'अभ्यासाच्या गडाडीं। प्राण खवळल्या कडाडी।' –एभा १४.४३०. 'वोघ वेगाच्या कडाडी। पाडित आयुष्याच्या दरडी।' –एभा ७.५२३. [ध्व.]

कडाडी—स्त्री. १ तीव्रता; झपाटा. 'मज नाहीं वैराग्य-कडाडी।' –एरुस्व ५.५२. 'खवळला अति कडाडी। तपाच्या कोडी निर्दालित।' –एभा २३.२५२. –वि. कडक; कडकडीतपणाचें. [कडाड]

कडाडींगर—१ कडपा; सुळका; डोंगराची चढण. २ चढणीचे श्रम. 'बाबा म्हातारा झाला, त्याला कडाडींगर होत नाहीं.' [कडा+डोंगर]

कडाण—न. १ (कु.) चटईप्रमाणें वळलेला नारळाचा झांप; वळलेलें चुडत. कडण–णें पहा. २ (गो.) कडधान्य पहा.

कडाणी—स्त्री. १ (बे.) छिनीचा एक प्रकार. २ (क.) चाकाची कुणी (चाक कण्यांतून निसटूं नये म्हणून त्यास घालतात ती). [का. कडाणी=कुणी]

कडाफोड—स्त्री. आदळ; आपट. 'कडाफोडि होतांच येतांचि झोडी.' –राक ३०. [ध्व. कड+फोडणें]

कडाबीन—स्त्री. रुंद तोंडाची आखूड बंदूक; दामा. 'त्यांना पुण्यास कडाबिनीचे पाहाऱ्यांत ठेविलें.' –विक्षिप्त ३.१७७. [इं. कॅराबिन; फ्रें. काराबिन]

कडामोड—स्त्री. (गो.) आळेपिळे (ताप येण्यापूर्वीचे); शिरशिरी; कडमड पहा.

कंडारणा—वि. मोठा आणि सुरेख; जाडजूड आणि सशक्त; मोठा; भरींव आणि दिखाऊ (माणूस, जनावर, दोर, खांब इ०). [सं. कांड; प्रा. कंड=दंड, लाठी]

कंडारणें—अक्रि. १ लठ्ठ होणें; भरणें (ऊंस, धान्याचें कणीस, माणूस, जनावर इ०). २ (ल.) मोठा व धट्टाकट्टा होणें (माणूस, जनावर, झाड, इ०). [सं. कांड]

कंडारणें—न. १ शेतकऱ्याच्या आसुडाचें दांडकें, मूठ. २ दाव्याचा मधला जाडा भाग. ३ दांडकें; सोडगा. ४ एक अलंकार; जाड, ओबडधोबड वेढें, कडी, सरी, इ०. 'सरीचें कंडारणें.' [सं. कांड; प्रा. कंड=लाठी]

कंडारणें—उक्रि. करांडणें; कुरतडणें; तोडणें (उंदरानें वस्त्र, कागद इ०). [सं. कांड]

कंडारणें—न. १ सोन्याचांदीच्या पत्र्याला ठोकून आकार आणण्याचें सोनाराचें एक हत्यार. २ कागदाच्या जाळ्या करण्यासाठीं कात्रे पाडलेलें एक हत्यार. ३ न्हाव्याची नराणी, नखोरें. [प्रा. कंडार=खोदणें, ठीक करणें]

कडालिंगी—पु. भटक्या हिंदु बैराग्यांचा एक पंथ; सेवर (शबर) पंथ. (हे लोक स्वतःचें जननेंद्रिय कर्डीत अडकवून ठेवतात). [सं. कटक=कर्डे+लिंग; म. कर्डे+लिंग]

कडालोट-टी—कडेलोट पहा. 'कडालोट करितां सिंधूत बुडवितां।' –दावि २७७.

कडाशी-स—स्त्री. (कु. गो.) भितीवरील छपराच्या खालचा पोकळ भाग; पागोळी; सरीवरील छपराचा भाग; छपराखालचें अखेरचें बहाल.

कडाशीण—स्त्री. १ कैदाशीण; कैकाडीण (कैकाडी स्त्री). २ (ल.) कर्कशा; क्रूत्या; तोंडाळ; जहांबाज स्त्री.

कडासणी-नी—स्त्री. कडसणी पहा.

कडासणें—उक्रि. कडासून बांधणें; आवळणें; कडसणें पहा.

कडासन—न. गवतांचें अगर जनावराच्या कातडयाचें बसावयाचें आसन. 'कडासन मृगासन तृणमयी शेजा।' –वसा ५. 'कडासनावरुनीयां मग मी सडाचि धडधड धांवत आणिन।' –अमृत २१. [सं. कट=गवत+आसन]

कडाळणें-सणें—सक्रि. (गो.) दूर करणें, सारणें.

कडाळी—पु. एक इमारती लाकडाचें झाड; तमन कडाळी.

कंडाळी—स्त्री. कंडी; गप्प; हूल; बाजारबातमी; अफवा. (क्रि० उठणें; पिकणें; उडणें.) [कंडी+आळी]

कडाळू—(व.) ज्वारी–बाजरीचा चारा; कडवळ पहा.

कडिबंद—पु. कटिबंध पहा.

कडिया—वि. कडवा; शूर; काटक. 'पठाण कडिये फौजेमधीं नित्य झडती' –ऐपो ३५८. [कडु]

कडिया—पु. (गु.) गवंडी 'खानगींतील कडिये नसल्यास ...' –स्वारीनियम (बडोदें) ७४.

कडियाळ-ळी-ळें—नस्त्री. १ सांखळी; गोल कर्डे; कडी; 'जैसें लोहाचें कडियाळें'–ह १७.१८४. २ कटिलग्गाम(घोडयाचा). 'तुझे तोंडी मी कडियाळें घालुनि।' –पंच ४.६. ३ (ल.) वेढा; वेष्टण. 'जाहली चौदाहि भुवनांसि कडियाळी।' –ज्ञा ११.३१७. ४ माळ; हार; जाळी; जाळीचा अंगरखा. 'लेइलीं मोतियांचीं कडियाळीं।' –ज्ञा ९.५२९. [सं. कटक; प्रा. कडय; म. कडी–डें=आळ]

कडिये, कडियेला—क्रिवि. (काव्य) कडेवर. 'क्षणी दृष्टी लागेल माये। म्हणोनि कडिये घेतली॥' –एरुस्व १.९०. 'राधे हा मुकुंद कडिये। उचलुनि घेई घेई॥' [सं. कटि; प्रा; कडि]

कडिलु—क्रिवि. कडेला; बाजूस. 'ऐलिची कडिलु' –मुरा ६१.७९. [कडे]

कडिवळपण—न. आंबट, कडू तोंड. 'जेयाचें देखौनि बरवेपण। उच्चैश्रवा करी कडिवळपण।' –शिशु ५०६. [सं. कटु; प्रा. कडु; कडवट–ळ+पण]

कडिवळें—न. हातांतील कडें. 'सोनें परिणामलें सांखळें। कीं साडेपन्हरें जालें कडिवळें' –ऋ ९३ [कटक+वलय]

कडी—स्त्री. १ धातूची लंबवर्तुळाकृति साखळी (दाराला लावावयाची); कडीचा दुवा; हंडया वगैरेचे हूक ज्यांत अडकवितात तें वेढें. २ (विणकाम) कापसाच्या बारीक दोऱ्याची गुंडाळी किंवा वेढें, लड (ही १०।१२ हात लांबीची व खुंटयाभोवतीं गुंडाळलेल्या १०० ते २०० वेढयांची असून चार पुंजाबरोबर असते. असल्या आठ दोऱ्यांच्या गुंडीला चिवट म्हणतात); कडिये. [का. कडी] ३ लांकडी अरुंद व लहान चौरस किंवा गोल बहाल, तुळवट (पाटणीच्या खालीं घालण्याचें). [हिं. कडी.] ४ वळण; चाल; रीत; कृत्य, तऱ्हा (कृत्याची). 'दिव्य लावगीची कडी लीहून घ्या अभय पत्रावरी' –होला ११५. ५ (गवंडीकाम) कमानीची कडी. –शिल्पवि १६९. [सं. कटक; प्रा. कडअ] ०**कुलूप करणें**-कुलूप लावून पक्का बंदोबस्त करणें; अगदीं सुरक्षित, बंदिस्त ठेवणें. 'तींत (अंधार कोठडींत) शुद्ध मेंढराप्रमाणें कोंबून भरिलें, आणि दरवाजा लावून घेऊन कडीकुलूप केलें.' –हिंक १४०. ०**पाट**–पु. लांकडांच्या फळयांचें छत; तक्तपोशी; पटई; पाटणी; कडेपाट. [कडी+पाट] ०**बंद**–वि. कडीपाट केलेलें (याच्या उलट किलचबंद). ०**भोंवरा-भोंरा**–पु. जंगी भोंवरा; ह्याच्या डोक्यावर कडी असते. ह्या कडीच्या भोंकांत भोंवऱ्याच्या डोक्याचा खिळा फिरतो.

कडी—स्त्री. मात; तोड; ताण. 'रामानें गोविंदावर कडी केली.' [कड]

कंडी—स्त्री. गप्पा; हूल; बाजारअफवा; भुमका; अवई; वदंता; कंडाळी पहा. (क्रि० उडणें; उठणें; पिकणें). २ कुभांड; थाप; थोतांड. 'जड झालें पातळ कुसुंबी नाहीं सांगत कंडी।' –प्रला १८८. [सं. कूट=खोटे?] ०**खोर**–वि. गप्पिष्ट, हूल उठविणारा. 'सुधारक थोडया महिन्यांनीं अजिबात बंद होणार... म्हणून जी कंडी उठली होती व कंडीखोरांच्या कृपेनें जी कंडी पुन्हांही उठण्याचा संभव आहे...' –आगर.

कंडी—कंडू पहा.

कंडी—(हिं.) (माळवी) गोवरी. 'कंडया काय भाव दिल्या?' [हिं.]

कंडी—स्त्री. (हिं.) करंडी; वेळूची उंच टोपली; हींत माणूस बसतो व ही मजूर आपल्या पाठीवर बांधून घेऊन डोंगरावर चढतात. 'बरोबरील मंडळीस बसण्याकरतां कंडया ...घेतल्या.' –तीप्र ३३. [सं. करंडी]

कडीकाळ—पु. कठिण वेळ; कळिकाळ (अप.) 'कास घालुनि बळकट। होय कडिकाळावर नीट॥' [कडु+काल?]

कडीकोट—पु. (कड्यांचा कोट, किल्ला.) बंदिस्तपणा; सुरक्षितता; कड्या-कुलुपें लावून केलेला बंदोबस्त. कडाकोट पहा. –वि. १ गर्द; धोधो; भरपूर; खूप. उ० कडीकोट-पाऊस-आभाळ-फौज-सभा-मारामारी पीक इ० 'तो (महमद कासिम) मोठया कडीकोट तयारीनें देवल शहराजवळ येऊन उतरला.' –हिंक २०. २ तयार; सज्ज; साधनयुक्त; सिद्ध (विशेषतः बंदोबस्त शब्दाबरोबर योजतात). –क्रिवि. गर्दीनें; पुष्कळपणें; पूर्णपणें; मनस्वीं. [कडी+कोट]

कडीत—स्त्री. (महानुभाव) धूळपाटी. 'पृथ्वी एसनी कडीत आन मेरू एसनी खडी।' –सूत्रपाठ २७२. [का. कडत=कोळशानें रंगविलेले कापडाचें पुस्तक. यावर हिशेब लिहीत असत.]

कडील—वि. कडचा; बाजूचा. (स्थळ किंवा दिशा या संबंधीं) उ० 'इकडील, तिकडील, गांवाकडील, घराकडील इ०' [कड]

कडु—पु. कड; बाजू. 'दक्षिणे श्रीमुकुटाचा कडु केला' –ऋ १३५; –अमृ २.४८. (कांहीं प्रतींत). [कडे]

कडु-डू—वि. १ कडवा (गोडाचे उलट, कडूनिंबाच्या चवीप्रमाणें). २ चेवचे; पित्तविकारामुळें वदलणारी (जिभेची रुचि). ३ न रुचणारें; अप्रिय; कठोर (वाक्य, भाषण इ०). 'आधीं कडु मग गोड.' ४ ज्यास कीड लागत नाही, जें कीड खात नाहीं असें (विशिष्ट झाड, वनस्पति). ५ जारज संतति (गोडच्या उलट). ६ गोड नसणारें; अशुद्ध (विशिष्ट तेल). ७ कठिण, गांठयाळ (बाभळीच्या लांकडाचा आंतील भाग; नार; वरचा भाग ठिसूळ, नरम किंवा गोड असतो). ८ निर्दय; कडक; ताठर (माणूस, स्वभाव). ९ नापीक; लागवडीला प्रतिकूल (जमीन). १० झोंबणारी; कडक; तिखट (विशिष्ट भाजी). –न. १ (ल.) अफू. २ कात (रात्रीच्या वेळेस कातांचें नांव घ्यावयाचें नाहीं म्हणून त्याबद्दल म्हणतात). ३ मृताशौच; **कडु विटाळ** या शब्दाचा संक्षेप. –स्त्री. डोळयाचें दुखणें (डोळयांत माती गेल्यानें, जाग्रण केल्यानें येणारें). (क्रि० येणें. उ० डोळयांला कडू येणें). –पु. १ दासीपासून झालेली संतति; **अनौरस, जारज संतति**; लेकवळा (याच्या उलट गोड). 'त्याच्या राज्यांत मल्हारराव नामक त्याच्या एका कडू सापत्न भावानें जें बंड माजविलें होतें ...' –हिंक ८४. २ पाटाची संतति. [सं. कटु; प्रा. कडु; गु. कडवु; हिं. कडुवा; सिं कडो] **०इंद्रायण**—न. कुंपणाबरील एक वेल; ह्याचीं फळें तांबडीं, विषारी व रुचीस कडू असतात; कवंडळ; इंद्रावण; इंद्रवारुण; कडूइंदांवन. २ (ल.) तुसडा, माणूसघाण्या; एकलकोंडा माणूस. **०करांदा**—पु. एक कडवट तपकिरी रंगाचा कंद. **०कारलें**—न. १ कारलें. २ (ल.) वाईट स्वभावाचा व न सुधारणारा माणूस. 'तो एक कडू कारलें आहे, त्याची संगत धरूं नको म्हणजे झालें.' **म्ह०** कडू कारलं, तुपांत तळलें, साखरेंत घोळलें तरी तें कडूच.' **०कारळी-ळें**—स्त्रीन. कारळे तीळासारखें औषधी बीं; कडू जिरें; काळें जिरें. याचें झाड दोन तीन हात उंच असून त्यास बोंडें येतात व त्यांत बीं असतें. हें कृमिनाशक आणि वातनाशक आहे. –शे ९.२३४. **०काळ**—पु. वाईट दिवस; अडचणीची स्थिति; साय; दुष्काळ; दुर्गति. (क्रि० येणें; असणें; चालणें; वाहणें; जाणें; टळणें; चुकणें; चुकविणें). **०घोसाळें**—न. घोसाळयाची एक जात. –शे ९. २३५. **०जहर**—वि. अतिशय कडू; विषासारखें कडू. **०जिरें**—न. कारळी पहा. **०झोंप**—स्त्री. अपुरी झोंप; झोंपमोड; झोंपेनें खोबरें. (क्रि० करणें). **०तेल**—न. १ करंजेल. करंजाच्या बियांचें तेल. २ उंडिणीचें तेल; (हेट.) पुन्नागफळांचें तेल. ४ (सामा.) न खाण्यापेक्षां तेल (चोखटेल किंवा गोडें तेल याच्या उलट). **०दोडका**—पु. १ कडवट दोडका. २ दासीपुत्र; लेकवळा. ३ (ल.) पंक्तिबाह्य; जातिबहिष्कृत माणूस. कडू भोपळा पहा. **०दोडकी**—स्त्री. भाद्रपद महिन्यांत फुलणारी एक वेल; दिवाळी; हिची पानें औषधी असून. फळास दिवाळें म्हणतात. –शे ९.२३५. **०निंब**—पु. बाळनिंब; बाळंतनिंब; हा वृक्ष फार मोठा असून सर्वत्र होतो. याचीं पानें गुडीपाडव्याला खातात. हा अनेक व्याधींवर उपयोगी आहे. याचें लांकूड इमारतीच्या उपयोगी आहे. आर्यवैद्यकांत याला रसायन म्हटलें आहे. **म्ह०** १ गूळ चारणारापेक्षां निंब चारणारा बरा होतो. २ (कन्हेपठारी) कडू निंबाच्या झाडाखालून उठून आला=ज्याच्या जवळ कांहीं पैसा नाहीं असा; भणंग; (उपहासार्थी योजितात). **०पडवळ**—न. कडू असलेलें पडवळ. –शे ९.२३५. **०पाणी**—न. १ पाण्यांत कडूनिंबाचें किंवा निरगुडीचे टहाळे घालून उकळलेलें पाणी (यानें आजाऱ्यास, बाळंतिणीस वगैरे स्नान घालतात). २ विटाळ संपल्यानंतर बायका ज्या पाण्यानें डोक्यावरून स्नान करतात तें पाणी. अशा स्नानालाहि म्हणतात. (क्रि० घेणें). ३ मृताशौच किंवा कडूविटाळ संपल्यानंतर माणसानें स्नानार्थ घ्यावयाचें पाणी. (यैथें कडू म्हणजे दुःखदायक प्रसंगाशीं आलेला संबंध). (क्रि०घेणें). ४ भाजीपाला शिजविलेलें पाणी. **०पाणी काढणें**–(बायकी वाप्र.) वरील विटाळ फिटल्यांचें स्नान झाल्यानंतर तें स्नान नाहींसें करण्यासाठीं पुन्हां दुसऱ्या साध्या पाण्यानें स्नान करणें किंवा अंगावर पाणी घेणें. **०पाला**—पु. कडू पाण्यांत घालावयाचीं करंज, लिंब, निर्गुडी, जांभळी इ० चीं पानें. **०भोपळा**—पु १ कडवट रुचीचा भोपळा; दुष्या भोपळयाची एक जात (याचा उपयोग सतार, वीणा, वगैरे वाद्यांच्या कामीं व सांगड, तुंबडी इ० च्या कामीं करतात).

२ (ल.) दासीपुत्र. ३ (ल.) पंक्तिबाह्य; हलक्या जातीचा; बहिष्कृत माणूस. **०भोपळी**–स्त्री. कडू भोपळ्याची वेल; कडू भोपळा अर्थ १ पहा. –शे. ९.२३६. **०वट–टु**–वि. (काव्य) कडवट पहा. 'केलासवन कडुवट। उमावन तुरट।' –शिशु ६१५. 'जैसा निंब जिभे कडुवटु।' –ज्ञा १८.१८६. 'कडुवट हरिनामे वाटती पापियाला।' –वामन, नामसुधा १.४.३४. **०वाघांटी**–स्त्री. कडवट फळे येणारी एक वनस्पति; आषाढी द्वादशीस हिच्या फळांची भाजी करतात. **०विख**–वि. कडूजहर; विषाप्रमाणें कडू **०विटाळ**–पु. १ मृताशौच; सूतक. २ बाळंतपणाचा विटाळ; बाळंतिणीला येणारा दहा दिवसांचा विटाळ; जननाशौच. (क्रि० येणें; जाणें; सरणें; फिटणें;). **०वृंदावन**–न. कडू इंद्रायण पहा. 'कडू वृंदावन। साखरेचें आळें।' –तुगा.

कंडुलो—पु (गो.) १ लहान कंड्डो. २ (ल.) मोठें पोट.

कडुवा—वि. कडवट; दुःखकारक. कडवा पहा. 'कडुवा संसार दुःकाळू। दारें नीगतु दिसें॥' –शिशु ५८७. [सं. कटुवत्]

कडुवाळ, कोडवाळ—(गो.) कडू मासळी. [स. कटु+व्याल; प्रा. वाल]

कडुसा—पु. (माण.) संधिप्रकाश. [कवडसा]

कंडू—पुस्त्री. १ खाज; खाज सुटण्याचा रोग. २ खाल्ल्यावर किंवा स्पर्श केल्यावर खाज उत्पन्न करण्याचा धर्म (वनस्पति, भाजीपाला यांचा) ३ (ल.) शिरशिरी; खुमखुम; उत्कंठा; आवेश; ईर (लढाई, भांडण इ० ची) 'जेमु तुवां उत्तमु प्रेत्नु केला। महापवित्रु बावतिस्मु रचिला। तेणें पापाचा कंडु फेडिला।' –खिपु १.१.२८. ४ मस्ती; माज; चळ. 'घोडयाला नगाऱ्याखालीं घाला म्हणजे त्याची कंडू जिरेल.' ५ कोरडी खरूज [सं.]

कडून—शअ. १ पासून. 'त्याकडून रुपये घ्या.' २ दिशेनें; बाजूनें. 'हा हिंदुस्थानाकडून आला.' ३ करून; नें; वारी (साधन दाखविणारें अव्यय.) 'त्यानें शस्त्रेकडून मारले.' ४ करवीं; द्वारां; परत्वें; मार्गानें; मुळें; साहाय्यानें; मदतीनें; च्या योगानें. (प्रयोज्य कारण दाखविणारें). 'मी त्याकडून घर बांधवीन.' 'पर्जन्येंकडून सर्वास सुख होतें.' 'विचारें कडून' –पया ८७. [का. कड, कडे]

कडूसें—न. (क.) संधिप्रकाश; कडुसा पहा. 'आतां कडूसें पडलें आहे.'

कडे—शअ. १ बाजूला; दिशेला. 'हातीं धरुनि तियेसी। कडे काढी व्योमकेशी।' –मुच ३३.११०. 'यंदा तुमच्या कडे धारण कशी आहे?' २ पार्शी; जवळ; ताब्यांत; हातांत; हाताखालीं; दिमतींत; व्यवस्थेंत. 'त्याजकडे शंभर शिपाई आहेत.' ३ आंत; खालीं; संबंधीं; निसबत. 'हा पागेकडे चाकर आहे.' ४ हवालीं; स्वाधीन (करणें, देणें). 'ज्याचें त्याकडे दे.'

५ पक्षाला; वांट्याला. 'सरदारांनीं तलवार मारावी, परंतु यश धन्याकडे;' 'कौरव-पांडवांच्या युद्धांत श्रीकृष्ण पांडवांकडे गेला.' ६ हातांत; पार्शी; जवळ. 'त्याकडे माझे रुपये आहेत.' ७ (ल.) पलीकडे; पार. 'स्वामी तारका गुरुनाथा। संसारसागराकडे लावी।' –गुच ४५.१०६. ८ जबाबदारी; पत्कर. 'हें काम माझ्याकडे लागलें.' ९ (कुण.) काळ, वेळ यासंबंधीं निरर्थक अव्यय; स; ला. 'तूं उद्यांकडे मला भेट.' [का. कडे; म. कड]

कडे—क्रिवि. (काव्य) कडेवर; कमरेवर. 'विवाहहोमालागीं श्रीहरी। वेगें चला बोहल्यावरी। कडे घ्यावी नोवरी।' –एरुस्व १६.१९. 'रडे शिशु तयास घे कळवळोनि माता कडे' –केका १२१. [सं. कटि]

कडें—न. १ हातांत, पायांत किंवा दंडांत घालावयाचा एक वाटोळा कंकणाकृति अलंकार. २ (ल.) वेढा; घेर; भोंवतालून घेर; सर्भोवतालीं वर्तुलाकार रांग (सैन्य, डोंगर इ०ची) 'भोंवतें आवर्णोदका कडे।' –दा १६.३.१०. 'जमलें भ्रमरांचें हो कडें।' –स्प्र १०. 'कठिण दिवस म्हणून कुणब्यानें पितराला एकाद-दुसरा जातिबांधव सांगितला कीं दारापुढें माहारांचें कडें पडतें.' –गांगा १०३. ३ विहिरीच्या तळचा लाकडाचा गोल थर (ज्यावेळीं खालीं घर लागत नाहीं त्यावेळीं कडें घालून त्यावर बांधकाम करतात). ४ पोवाडे गाणाऱ्यांचें एक चर्मवाद्य; डफ; हें लांकडी एक-सव्वा हात व्यासाचें कडें घेऊन त्यावर चिकण मातीनें कातडें चिकटवून वर चौफेर कागदपट्टी लावतात. 'रामजोशी यांनीं आपल्या वयाचीं वीस वर्षे तमाशा पाहण्यांत व कडें वाजविण्यांत घालविलीं.' –राला २. ५ (ल.) वेडीस पायांत अडकवावयाचीं वलयें असतात तीं प्रत्येकी. (सामा.) बेडी. 'माझे भक्तीचिया आवडीं। अहं सोहं दोनी कडी। तुटली अभिमानाची बिडी। विषयगोडी निमाली।' –एभा १४.३११. ६ (व.) (ल.) गुद्द्वारांतून पडणारें लेंडिक. ७ वर्तुळाकार कांठ, सीमा, कड (तंबोरा, चाळण इ०ची). ८ खळ्यांतील धान्य बाहेर जाऊं नये म्हणून त्याभोंवतीं वेलींचें किंवा गवताचें घातलेलें वेटोळें. १९३०. ९ मोठ ज्याला बांधतात तें लोखंडी गोल वलय. [सं. कटक; प्रा. कडअ; गो. कु. चि. कडां]

कडेकपाट–र—न. १ दरड व गुहा; दरीखोरें; गिरीगव्हर; डोंगरांतील खबदाड; खोरें; दरीकंदर; गुहा; भुयार. (प्रथमेंत क्वचित प्रयोग, बहुतेक कडेकपारांत, कडेकपाटीं असेच प्रयोग आढळतात.) 'कडेकपाटीं धांवती जनें।' –सप्र ३.३४. २ (ल.) दुर्गम, अवघड ठिकाण. 'कडेकपाटीं जाऊनि. महासोवे दडाले।' [कडा+कपाट]

कडेकांठ—पु. १ शेवट; बाजू. २ लांब; दूरवर. (सामा.) कडेकांठास; कडेकाठेंस असेहि प्रयोग आढळतात. [कड+कांठ]

कडेकोट—वि. कडाकोट पहा.

कडेपाट—पु. कडीपाट पहा.

कडेल—न. रेशमी लुगडें. [सं. कटि; दे. कडिल्ल=कटिवस्त्र]

कडेलग—क्रिवि. अगदीं शेवटाजवळ. 'जेथ हटिये सांडिती होडा। कडेलग ॥' –ज्ञा ६.५६. [कड+लग=पावेतों]

कडेलोट—पु. १ कडेपात; मुक्ति मिळण्यासाठीं योग्यानें कडयावरून घेतलेली उडी; अपराध्यास कडयावरून लोटून देणें; अशी दिलेली शिक्षा. (क्रि० करणें). २ (ल.) परमावधि; शिकस्त, अतिरेक; कमाल (पाऊस, पीक, संपत्ति, कृति इ० ची) (क्रि० होणें). 'ही (जॉन्सनची) भ्रमावस्था स्थाईक होऊन मुळींच आपला बुद्धिभ्रंश होईल कीं काय याची त्यास अतिशयित भीति वाटे ... पण या कडेलोटावर गोष्ट येऊन ठेपली नाहीं.' –नि ७०२. ३ (ल.) ऱ्हास; अधःपात; उतरती कळा. ४ पराकाष्ठेच्या तिरस्कारानें वागविणें. ५ घालवून देणें; काढून टाकणें (जागा, अधिकार, इ० वरून). ६ शेवट करणें. –वि. खालच्या प्रतीचा, दर्जाचा; हलका (माणूस, वस्तु). [कड+लोटणें]

कडेवाला—वि. कडें (वाद्य) वाजविणारा; तमासगीर; डफवाला. [कडें]

कडेशेवट—क्रिवि. कर्मीत कमी; कांहीं नाहीं म्हटलें तरी; सरतेशेवटीं; पराकाष्ठा; कडे शेवटीं, कडे शेवटचा असेहि प्रयोग आढळतात. 'मी तुला कडेशेवटची गोष्ट सांगतो.' [कड+शेवट]

कडेशेवटचा—वि. १ अगदीं अखेरचा; अंतिम; अगदीं कडेचा; सीमेचा. २ पराकाष्ठेचा (मूर्ख, वृद्ध, दुर्दैवी, इ०). ३ अगदीं शक्य तों कमी (किंमत, खर्च, नफा, इ०). 'कडेशेवटचा उपाय–उपचार–मसलत–योजना–तोड–मनसुबा इ०.'

कडेस–सी—शअ. कडेला; बाजूस. कडे पहा. 'बापाच्या उजवे कडेसि बसली म्यां पाहिली नोवरी।' –र ६.

कडो, कोडो—पु. (गो.) भात टेवण्यासाठीं तट्या वगैर लावून केलेली जागा; कणगा. [कडा]

कडो—पु. (गो.) काढा. [कढ, कढणें]

कडोकडी—क्रिवि. १ जोरानें; नेटानें; झपाट्यानें. कडोविकडी पहा. 'आले अवघे नवलक्ष गडी। बळकाविली यमुनाथडी। हमामा घालिती कडोकडीं।' –ह १०.९५. –दावि ४९२. [कड]

कडोजी—स्त्री. एक वनस्पति; कुड्याचें मूत.

कंडोरा—पु. (कों.) उसाचा करवा; गंडेरी. [सं. कांड; प्रा. कंड]

कडोविकडी—स्त्री. (कडयांत कडया; त्यापासुन झालेली गुंतागुंत). १ भाषणांतील डावपेंच; (ज्यांत मुद्दापत्ता लागणार नाहीं असें) अनिश्चितपणाचें व खाचाखोचींचें भाषण; दुटप्पी बोलणें; (कडोविकडीचा असा षष्ठ्यंत प्रयोग रूढ आहे). २ (कुस्ती) पेंच; कौशल्य. 'मल्लविद्येच्या कडोविकडी। जीमूती दावितां पडेपाडीं।' –मुविराट २.६८. ३ युक्त्या; खुब्या; मसलती. 'तेवीं उत्तमोत्तम ज्ञाननिवडी। उद्धव कडोविकडीं शृंगारिला।' –एभा २८.६९८. –वि. उत्तम; व्यवस्थित; बंदोबस्तीचें. 'राखण ठेवी कडोविकडी।' –कथा १.२.१७८. –क्रिवि. १ अति जोरानें; झपाट्यानें. निकरानें; नेटानें. 'शत्रें मुटतील गाढीं। वीर भिडती कडोविकडीं।' –एरुस्व ७.७४. –दा २०.८.१९. २ नाना प्रकारानीं, रीतींनीं. –एभा १५.२५. 'पुच्छ नाचवी कडोविकडी.' –रावि २०.४९. ३ दुटप्पी, खुबीदार भाषणें करून; मोठ्या युक्तीच्या बोलण्यानें. **–डोचा**–वि. १ कडोविकडीनें भरलेल, केलेलें (भाषण, अर्थ, कल्पना, लिहिणें, गाणें, नाचणें, वाजविणें इ०); अन्योक्तिव्याजोक्ति–व्यंगोक्तीचा; उपरोधिक; औपरोधिक. 'कडोविकडीचे विचार सुचले।' –ऐपो २१४. २ युक्त्या; मसलती; डावपेंच यांनीं युक्त (क्रिया, हावभाव, वागणूक इ०). शिताफी इ० नें भरलेलें. 'कडोविकडीचीं विवरावीं। अंतःकर्णी॥' –दा १९.१०.१०. ३ खुबीदार; कुशल; चतुराईनें अलंकृत; झील, कंप, आघात, छाया, उडगी, झोक इ० नें भरलेलें (गाणें, नाचणें, वाजविणें). 'ठेवी कडोविकडिची ठेवण हो। अक्षरीं मोत्यांची ववण। लय लाऊन करती श्रवण हो।' –प्रला १२२. [कडी द्वि.]

कडोविकडीचा—वि. १ कडचें; शेवटचें; पराकाष्ठेचें; परमावधीचें (भांडण, लढाई, वाद इ०). २ कडक; रागीट; उग्र; जहाल (भाषण, निंदा इ०). ३ सक्त; भारी; निश्चयाची (मागणी, बोलावणें, इ०). [कड=शेवट]

कडोसरी, कडोल्ली–सां—स्त्री. १ कमरेस बांधलेल्या (लुगडें, धोतर इ०) वस्त्राचा कमरेजवळ खोवण्यांत येणारा भाग (यांत पैसा, सुपारी इ० जिन्नस ठेवतात). 'कडोसरी नसला तरी कनवटीला खास आहे.' –तोबे १४. २ शरीराची (उजवी, डावी) जागा; कमरेचा भाग. ३ वस्त्राच्या आवळण्यानें काळवंडलेली, वाईट झालेली कमरेची जागा. (सामान्यतः चतुर्थंतव षष्ठ्यंत स, चा इ० प्रत्यय लागून प्रयोग). **कडोसरीस खोवणें, खुपसणें, कडोसरीचा पैसा**. [सं. कटि; म. कड+सरी; किंवा कटिवस्त्र.] (वाप्र.) **कडोसरी–सरीस येणें**–अगदीं जेरीस येणें.

कडोसा—पु. संधिप्रकाश. कवडसा पहा. 'मेरूभोंवते कडे कापले। असंभाव्य कडोसें पडिलें।' –दा १६.३.१७.

कडोळ—न. कडवळ पहा. 'न राहे खोंडया मका कडोळ।' –अफला ६६.

कडोळ–ळी–ळें—न. स्त्री. १ वेढें; आंगठी. २ (ब.) स्त्रियांच्या पायांतील चांदीचें कडें. [सं. कटालिका; प्रा. कडोली]

कडोळी-ळया लगाम—पु. प्रत्येक टोंकास दोन दोन कड्या असलेला लगाम. लगाम पहा. [सं. कटालिया; प्रा. कडाली –घोड्याच्या तोंडास बांधण्याचें एक उपकरण.]

कडौंचें—उक्रो. (गो.) शिजविणें. कढविणें पहा.

कंड्ड—पु. (गो.) फोडलेला अर्धा बांबू. [सं. कांड]

कड्डाण—(गो.) कडण, कडधान्य पहा.

कड्डावंचें—क्रि. (गो.) घरावर बांबूचें ओंबण करणें. [कड्ड]

कड्डुंचें—क्रि. (गो.) दगडानें बाटून बारीक पूड करणें. [कांडणें]

कडया—पु १ पिवळें फूल येणारें एक झुडप अथवा त्याची बी. २ दुसरें एक झाड व त्याचें फळ. कढया पहा.

कडया—पु झाळण्याचें लोखंडी हातोडीसारखें हत्यार; खडया. [कडी]

कड्याखार—पु टाकणखार. याचे दोन प्रकार:–कड्या टाकणखार व तेल्या टाकणखार (चौकयाचा टाकणखार). [खडा+टाकणखार]

कड्यांचा लगाम—पु. कड्यांचा केलेला लगाम; सांखळी लगाम. लगाम पहा. [कडी]

कड्यारोग—पु जनावरांला होणारा एक रोग; फोफसा. –शे १०.१३२.

कड्याळ—न. १ जनावरांचा चारा (जोंधळा किंवा बाजरी). कडवळ पहा. २ (ल.) उंच व राकट स्त्री. [कडवळ] **०दातीं धरण**–१ आश्रयास जाणें, शरण जाणें; दातीं तृण धरणें. २ दैन्य प्रदर्शित करणें; नादार होणें.

कड्याळ—न. अळोंप; आळ; कवटाळ पहा.

कड्याळें—न. १ मोठा नफा, प्राप्ति, लाभ (व्यापारांत). २ एकदम, एकाएकीं दैव उघडणें; घबाड सांपडणें (क्रि० लागणें).

कड्याळें—न. कडोळया लगाम पहा.

कड्ये—स्त्री. (कों.) कंबर; कटि. (फक्त चतुर्थ्यंत प्रयोग). 'कड्येला–कड्येवर घेणें' –क्रिवि. कडेवर, कमरेवर. कडिये पहा. [सं कटि; म. कड]

कढ—पु. १ उष्णतेमुळें पाणी इ० स येणारी उकळी; आधण. फार तापल्यामुळें बुडबुडे येतात ती अवस्था. (क्रि० येणें). **म्ह०** जाळावांचून किंवा आगीवांचून कढ नाहीं आणि मायेवांचून रड नाहीं.' २ फार तापल्यामुळें येणारे बुडबुडे, फेंस. ३ (ल.) डोक्यावर फार वेळ ओझें घेतल्यामुळें डोक्यास येणारी तप्तता, शीण, रग. ४ (ल.) उमाळा; गहिंवर (प्रेम, दुःख, इ० कांचा); स्फुरण; शिरशिरी (भांडण: वादविवाद, शिवीगाळ इ० ची). **०रडण्याचा–भांडण्याचा–क्रोधाचा कढ** [सं. क्वथ्; प्रा. कढ] **०ओढून घेणें**–परस्पर चाललेल्या भांडणाचा संबंध आपणाकडे घेणें; दुसऱ्यावरचा राग आपणावर ओढून घेणें. **०जिरविणें**–एखाद्याचा राग, ताशेरा शमविणें, शांत करणें.

कढई—स्त्री. १ पदार्थ तळण्यासाठीं किंवा कढविण्यासाठीं अर्धवट पसरट व दोन कान असलेलें धातूचें भांडें; काईल (दूध, उसाचा रस वगैरे कढविण्यासाठीं). २ (नाशिक) नदीला मोठा पूर आला असतां पाण्यांत होणारा जंगी भोंवरा. [सं. कटाह; प्रा. कडाह; हिं. कडाहा; बं. कडाई; उरि. कऱ्हाई; गु. कढा किंवा कढणें]

कढंक—क्रिवि कढ येईपर्यंत? 'धडधडा ज्वाळा जळती कढंक. त्यासी कुंभपाक बोलिजे।' –स्वानु २.४.११. [कढ+अंक?]

कढण, क—न. १ (सामा) काढा; कढविलेलें पाणी; ज्यांत कांहीं पदार्थ उकळला आहे असें पाणी; पिठलें. 'कढण काला कालविलें ताक।' –निगा १००. २ तूर, मूग वगैरे कडधान्य ज्यांत शिजविलें आहे असें पाणी; कट; कट्टू. ३ मांसाचें कालवण; मांस शिजविल्यानंतर त्यांत आलेला तवंग, मांदें. [कढ] **०निघणें**–(ना.) रंजीस येणें; मेटाकुटीस येणें.

कढणी—स्त्री. पदार्थ कढण्याची किंवा कढविण्याची क्रिया; [कढणें]

कढणें—अक्रि. १ कढण्याच्या अवस्थेला येणें; आधण येणें; उकळणें; शिजणें (दूध, तेल, लोणी इ०) 'बोले जें तच्छ्रवणें माझेंचि कढोत न तुमचें कीं।' –मोकर्ण ४०.९. २ ऊष्णतेपासून तापून रस होणें, (धातु इ० चा) ३ (ल.) रागावणें; संतापणें; तापणें. 'अश्वत्थामा कोपें अस्त्र न कं घल म्हणोनियां कढला।' –मोऐषिक १.३९. [सं. क्वथ्; प्रा. कढ; हिं. कढना; गु. कढवुं; सिं.कढणु] **कढण्याचा बिंदु**–पु. कढ येण्यापर्यंतचें उष्णमान, (इं.) बॉइलिंग पॉइंट.

कढणें—अक्रि. कण्हणें; विवळणें. 'येक डोई खाजविती। येक कढों लागती। सावकास।' –दा १८.९.१५. [ध्व.]

कढत—वि. भाजण्यासारखें गरम; ऊन; कडकडीत तापलेलें; आधण आलेलें (दुध, पाणी, पदार्थ, धातु इ०). [कढणें]

कढतघणी—न. (कों.) कढत पाणी (पोळ्याच्या भातावर, भाकरी करावयाच्या पिठांत वगैरे घालावयाचें). २ (ल.) चहा. [कढत+पाणी किंवा वणी –सं. वन्=पाणी]

कढता—पु. कडता पहा.

कढय—स्त्री. (गो.) कढई पहा. –वि. (गो.) अति तापलेलें; कढलेलें; कढत (दूध, पाणी वगैरे). [कढ]

कढविणें—उक्रि. कढणें याचें प्रयोजक रूप. १ कढ आणणें; फार तापविणें; उकळविणें; शिजविणें (दूध, तूप इ०). पाण्याकडे याचा कचितच उपयोग करितात. २ वितळविणें; रस करणें (धातु इ० चा).

कढशीळ—वि. फार तापलेलें; कढत; उतण्यापर्यंत आलेलें (दूध, तूप, लोणी इ०). [सं. क्वथ्+शील]

कढा—पु. (गो.) काढा. [कढ]

कढी—स्त्री. १ ताकास हरभऱ्याचें पीठ लावून, फोडणी वगैरे देऊन कढवून केलेलें कालवण; ताकाची आमटी. कोंकणांत आंबसुलाचीहि कढी करतात.'भाजी होती वांग्याची। वालाचे गोळयाची कढी।' –स्त्रीगीत ६६. २ एक औषधी काढा; निरगुडीचीं पानें, ओवा, चित्रकमूळ, हळद व सुंठ यांचें चूर्ण, व कांजी ताकांत मिसळून केलेली कढी. ही वातहारक व अग्निवर्धक आहे. [सं. क्वथ्=कढणें; कढिआ; सिं. कडही] (वाप्र.) शिळ्या कढीला ऊत आणणें=१ (शिळी कढी कढविणें), प्रसंग संपल्यानंतर एखाद्याचें धाडस किंवा शौर्य चेष्टविणें. २ स्मरणांतून गेलेल्या–जुन्यापुराण्या वादाला पुन्हां तोंड पाडणें. **०पातळ होणें**–(ल.) १ आजारामुळें अशक्त–फिकट–निस्तेज होणें. २ भीतीनें घाबरणें–गांगरणें–जर्जर होणें. (कष.) **०खाऊ**–वि. १ कढीची आवड असलेला. (ब्राह्मणास उपहासानें म्हणतात). २ (ल.) शेळपट; भ्याड; नामर्द. **०गवत–पात**–नस्त्री. गवती चहा किंवा पाती चहा, हा कढींत घालतात. **०चट**–वि. (ना.) कढीभुरक्या; कढीखाऊ (ब्राह्म ण). **०निंब**–पु. बारीक कांटे असलेलें एक झाड; याच्या पाल ला एकप्रकारचा सुवास येतो, तो कढींत, मसाल्यांत घालतात वत्य ची चटणीहि करतात. यास गोड निंब, (खान.) मद्रुनिंब, झिरग अ^सहि म्हणतात. [सं. कैटर्य.] **०भात**–पु. लग्नविधींतील एक सोहळा; सीमांतपूजनांत वधूपक्षानें वरपक्षाकडील मंडळींस कढीभाताचें जेवण घालणें व कढीचें व भाताचें भांडें आंदण देणें. **०भुरक्या, कढीभात खाणारा**–वि. कढीखाऊ पहा. 'कढीभातखाऊ म्हणती ब्राह्मणा जगांत ..... तयांनींच करणी केली प्रसंगीं अचाट।' –विक ७.

कढें—न. कढई; उंसाचा रस कढविण्याची काहील. 'रस उसाचा लोहाचे कढे। जों जों अग्नीज्वाळा करितां कढें।' –यथा १३.५९२.२७५. [कढई]

कढ्या—पु. एक झाड व त्याचें फळ; कज्या.

कण—पु. १ रज; रेणु; परमाणु; एखाद्या पदार्थाचा सूक्ष्म अंश; (शाप.) अणु. २ रत्नांचा पैलू; चमक; (हिं.) कनी; हिरकणी; हिऱ्याची बारीक चुणी. ३ कणी; धान्याच्या दाण्याचा अंश 'एऱ्हवीं कणा आणि भूसा।' –ज्ञा १८.९३९. ४ सबंध दाणा; 'आतां कक्षेंत झोळी घालून। मागे कण घरोघरीं. –नव. १७.१२४. ५ धान्य. 'कणु एकु साटविती' –ऋ ८८. –एभा ३.३७२. 'दामदुप्पट, कण तिप्पट.' ६ ठिणगी; स्फुलिंग (अग्नीचा). 'जळति अग्निकणेंचि तृणें जरी।' –वामन, नामसुधा ५८. ७ थेंब (पाणी वगैरे पातळ पदार्थाचा). ८ (कों. कुलाबा) रताळ्यासारखा कंद; कणक. कणगर. [सं.]

कण—पु. (सोनारी) कारल्यासारखें परंतु मूठ नसलेलें, वीतभर लांबीचें (अंगठी वगैरेस गोल आकार देण्याचें) एक उपकरण.

कण—स्त्री. एक प्रकारची उसण; तिडीक; कळ (पाठ, मान, कंबर वगैरेंत येणारी). धमक पहा. (क्रि० भरणें). [?सं. क्वण्, कण]

कण—पु. (क.) वावडी समतोल राहण्याकरितां तीस बांधावयाचा कापडाचा तुकडा, शेपटी, चिंधी. (क्रि० लावणें; मारणें). 'ही वावडी कण मागते आहे.'; 'वावडीला बहुधा कण लागतो.' [का. कण=चोळींचें वस्त्र; म. खण]

कणऊब—स्त्री. (कों.) दाणेऊब; धान्य पिकून तयार होण्याच्या हंगामांतील उष्णता (भाद्रपद, आश्विन महिन्यांतील). [कण+ऊब]

कणक, कणंक—न. (कु.) कळक; बांबुची एक जात.

कणक—न. एक कंद, मूळ; कणगर; कण अर्थ ८ पहा.

कणक—स्त्री. कळ; तिडीक (ताण बसल्यामुळें किंवा संधिवातामुळें पोटांत, कमरेंत, पाठींत, डोक्यांत वगैरे उत्पन्न होणारी); उसणीहून भिन्न. धमक पहा. (क्रि० चालणें; निघणें; भरणें). [कण]

कणकण–णी—स्त्री. १ हुडहुडी; शिरशिरी; अंग मोडून येणें; (ज्वर भरण्याच्या सुमारास) थंडीची वेळ. (क्रि० येणें; भरणें). २ ताप निघाल्यावर अंगांत राहणारी कडकी; सुरलेला ज्वर. (क्रि० राहणें; येणें; होणें). ३ (गो.) दुःख. [ध्व. सं. कण्=शब्द करणें]

कणकणणें—अक्रि. अंग मोडून येणें; कणकण वाटणें; डोकें दुखणें; थंडीचे शहारे येणें (ज्वर वगैरे येण्याच्या वेळीं). [कणकण]

कणकणीं—क्रिवि. (गो.) घडीघडीं; पावलोपावलीं; वेळोवेळीं. [क्षणोक्षणीं]

कणकणें—अक्रि. १ कळकणें; आंबट पदार्थास हिरवटपणा व विकारीधर्म उत्पन्न होणें (निकृष्टईच्या भांड्यांत ठेवल्यामुळें). २ कलंक लागणें; कळकलें जाणें (भांडें). [सं. कलंक]

कणका—पु. कनका. पहा.

कणकील—न. (कर्ना. शेती) जोखडास बैलाच्या मानेजवळ, आंतील बाजूस असणारी खीळ; पडदांडी जुवाची आंतील खीळ. [कणा+कील=खीळ]

कणक्या—वि. दणकट; दांडगा; बळकट; खमक्या; पड न घेणारा (याच्या उलट पिठ्या; गव्हाची कणीक म्हणजे दाढर व इतर धान्यांचें पीठ मऊ, दबेल असतें यावरून). भरपूर; मोठा (बाजार. इ०). [कण]

कणखर—वि. कठिण; बळकट; मजबूत; घट्ट (दगड, लांकूड इ०); टिकाऊ; दणकट (कापड वगैरे); घट्टाकट्टा; घडधाकट (शरीर, मनुष्य); प्रखर; धगधगीत (कांहीं लांकडांचा जाळ). [कण+खर]

कणखाविणें—उक्रि. (विरू.) खणकावणें; रागें भरणें; भोसडणें; तासडपट्टी काढणें; चापणें. (ध्व. खणकाविणें)

कणग, कणंग, कणण—न. १ (गो.) कणगर नांवाचें कंद. कण, कणक-कें पहा. २ रतालें. कण, कणकें पहा.

कणंग—स्त्री. धान्य सांठविण्यासाठीं बांबूंचें किंवा फोकाट्यांचें केलेलें पात्र, लहान खोली; पेंव; कणगा; टिकी; कणिंग. [कण+गम् ?; तुल. का. कणजी=कणगी (का. कण=बांबूची काठी)?]

कणंग—पु. चवळया सालासकट दळून त्यांत मैदा, मऊ भात व साखर घालून त्याचे गोळे करून उकडतात तें पक्वान्न. –गृशि १.४०१ [कण]

कणगर-रें—न. १ बटाट्यासारख्या एका कंदाचा वेल. (स्त्रीपु.) २ मूळ; कंद (न.) यास गोवेंबटाटा म्हणतात. हा कंद शिजवून किंवा भाजून खातात. यास कण, कणक, काटेकणगर व कनककंद असेंहि नांव आहे. हा रतालयापेक्षां जाड असतो. उपासास खातात. याचा वेल मोठा वाढत नाहीं. पानें वाटोळीं व बारीक असतात. यास जमिनींत बटाट्यायेवढे लांबट कंद लागतात. ३ (पुस्त्री.) एक झाड; कुडका काकणा.

कणगा—पु. १ मोठी कणंग. कणंग पहा. २ धान्य सांठविण्यासाठीं जमिनीवर वर्तुळाकार बांबूचा तट्टया उभा करून बाहेरील बाजूनें कळक पुरून त्यासह तट्टया दोरांनीं बांधून केलेलें साधन; पालटें; पालें; कोथळा; कणगोली; कोठार. [कणंग पहा]

कणगी, कणगुला-लें—स्त्रीपुन. १ (कों.) लहान कणंग. 'कणगींत उतरोनि पाटया भरोनि देती.' –रामदासी २.२. 'कणगीची काढितील लिपण। गूळ शक्रेरा खातील संपूर्ण।' –जै ६.४९.

कणगी—स्त्री. कणगर कंद; रातालू. कण, कणक पहा.

कणगुली-गूल-गोल—स्त्रीन. कणग्याप्रमाणें बांबूच्या कांबटयांचा विणलेला वाटोळा कोथळा; लहान कणगी, कणगुला. [कणगा]

कणडुली-डुलो, कणडो—(गो.) करंडी (बांबूची, वेताची) . कणगुली पहा.

कणणें—अक्रि. १ कण्हणें; कुंथणें; विवळणें; हायहुय करणें (आजार, वेदना यांच्या अतिरेकामुळें). २ कण किंवा उसण भरून दुःखित होणें; स्नायू ताठणें. [सं. कण्=शब्द करणें]

कणदार—वि. १ कणीदार; कण्या असलेलें (तूप वगैरे). २ भरपूर कणसें आलेलें (पीक); दाण्यांनीं गच्च भरलेलें (कणीस). ३ सकस; कसदार; ज्यांत अधिक सार, सत्त्व आहे असा (कडबा, गवत, धान्य, तूप इ०). [कण=दार प्रत्यय]

कणपट्टी—स्त्री. (माण.) (शेती) मोठेचा कणा बसविण्यास आधार अशा खांच असलेल्या दोन पट्टयांपैकीं एक. [कणा+पट्टी]

कणयार—पु. (वे.) (शेती) रेडयाच्या चामडयाच्या पट्टी, मोट व तीवरील कडें यांना जोडणारे चामडयाचे पट्टे. [का. कोण=रेडा+वार=वादी पट्टी]

कणवी—पु. (गु.) कुणवी पहा.

कणभ—पु. एक प्रकारची विषारी माशी, ही चावली असतां सूज, ज्वर, वांती इ० लक्षणें होतात, देशाची जागा कुजते. [सं.]

कणलक्षांश—पु कणाचा एक लक्षावा भाग; अणूहून लहान; अति सूक्ष्म अणु; परमाणु; कणाचा अत्येत सूक्ष्म अंश (ज्याचे आणखी भाग पडणार नाहींत असा). [सं.]

कणलोणी—न. कसदार लोणी; सरकीचा रतीब असलेल्या जनावराच्या दुधापासून केलेलें लोणी (याच्या उलट तणलोणी.) [कण + लोणी]

कणव, कणवा—स्त्री. पु. करुणा; दया; कळवळा; कृपा. 'कीं कणवा घालुनि उडी । पाविला संत थडी।' –ऋ १०२. सांडिली कणव या भवनाची' –किंगवि ५४. 'जया सर्वभूतीं कणव। तया नमस्कारिती सकळ देव।' –मुआदि १९.१७२. [सं. कण्=रडणें, अश्रु गाळणें. ?]

कणवट-टी—स्त्री (राजा) कडोसरी पहा. [सं. कटि+वत्; का. कणय=कमरभोंवतीं वस्त्राची गांठ+वत]

कणवट—न. कणीस धान्य. 'जैसें भाजलें कणवटें।' –विउ ७.९४ [सं. कण+वृत्]

कणवण—स्त्री. कण्हू; विवळणी; किरकीर (विशेषतः लहान मुलांची). [सं. कण्=शब्द करणें; म. कण्हणें]

कणवणणें—अक्रि. कण्हणें; विवळणें; किरकीर करणें. [कणवण]

कणवळणें, कणवळा—कन्हवळणें, कन्हवळा पहा.

कणवाळ-वाळा—वि. कृपाळु; दयाळु. कन्हवाळ पहा. 'भक्तांचा कनवाळ भीम म्हणे।' –रामदासी २.१२४.

कणवाळू—कन्हवाळू पहा.

कणशः—क्रिवि १ कणाकणानें. २ थोडथोडें; हळूहळू. [सं.]

कणशा—वि. १ कणीस चोळणारा. २ (ल.) अडाणी; मूर्ख; गांवढळ; रानवट; रिठोळ. [सं. कणिश; म. कणीस.]

कणशी—स्त्री. (कों. कु. गो.) भाताची ओंबी, लोंबी, लोंगर, कणीस, [सं. कणिश]

कणस—न. (कों.) कणीस पहा. (अव.) कणसा.

निधी। ती सबळ करें अगार्धे । दुखंडी केली ॥ ' –लिपु २. ५४.१९. [सं. कटि+वलय ?]

कडवळीया—वि. कैवारी; कळवळ बाळगणारा. ' ना तो श्रृंगाराचा कडवळिया । ' –शिशु २.६४,

कडवा—वि. १ कडू; (गोड, याच्या उलट, भाजी पाला वगैरे शब्दास लावतात). गोडा पहा. २ जहाल; रागीट; तापट. ३ ज्याच्या अंगीं भांग, अफू, इ० कैफ जिरून गेले आहेत असा; दुखणें, रोग इ० ज्याच्या सरावाचा झाला आहे असा; नाजूक, कोमल राहिला नाहीं असा. ४ उपदंशादि विकार न बाधणारें ज्याचें शरीर आहे असा. ५ शूर; निर्भय; धाडसी. (खून, मारामारी, लढाई इ०मध्यें). घनचक्कर; घोर (लढाई, तंटा). ६ रानटी; आडमुठा; व्यवहार करण्यास कठिण. ७ क्रूर; निर्दय; पाषाणहृदयी; कठोर. –पु. १ वालाची एक जात. २ बदामांतील कडू जात. ३ खाजरा सुरण. ४ अनौरस; अवैवाहिक संतति; कडू जात. [सं. कटु; प्रा. कडु; हिं. कडवा]

कडवां—क्रिवि. कडेवर ' ऐसें म्हणनि दासिचिया कडवा । पुत्र बैसविला बरवा । ' –कथा १.१०.१४७. [सं. कटि]

कडवॉ-वो—पु. (गो.) कांबीची वई; कूड; बांबू, कांबी इ०चा पडदा. [कूड]

कडवाय—वि. (गो.) कडवट. ' दोडगीं कडवाय आस.' [कडवा]

कडविखा—स्त्री. कडवटपणा. –शर.

कडविड—स्त्री. किडुकमिडुक; (सोन्याचा) चारानुरा. ' करूनि कडविड जमा । घडली लगड । '–तुगा ३४८४. [सं. कृत्; प्रा. कट्–कड द्वि.]

कडवी—स्त्री. १ कडव्या वालाची वेल; कडवा. २ (ल.) अफू; अफीण.

कडवी जात—स्त्री. १ कडू जात; जारज वंश. २ क्रूर; रांगडी; अडाणी जात. [कडू]

कडवें—न. आंकणकडव्यानें किंवा पालुपदानें जेथें गाण्याचा एक भाग संपतो तो भाग; पदविभाग. [कड=शेवट]

कडवेळ—न. कडवळ पहा.

कडस—क्रिवि. जोरानें, खेंचून, (क्रि० बांधणें).

कडस—न. पाडस; लहान गुरूं. ' बेउलीं त्रशिलें वच्छ । कीं पाशमुक्त कडस । ' –ऋ ६१. [का. कडसु=लहान गाय]

कडसणी-नी—स्त्री. १ (काव्य) चौकशी; विचार; वाटाघाट; परीक्षा; शोध; निवड. ' ये युक्तीचि कडसणी । नाहीं जयाच्या अंतःकरणीं । '–ज्ञा २.३४२. ' बैसउनि केली कडसणी । निज निष्ठेची । ' –रास ४.२९१. 'नित्यमुक्त आणि जीवन्मुक्त। हेहि कडसणी हे निश्चांत। ते उपाधि आरोपित। म्हणूनच ॥ ' २ नाडा; दोरी (वटण्याची, गाडीवरील बोजा आवळण्याची, पडद्याची, तंबूच्या कनातीच्या वरच्या भागाची इ०). ' ऐसा सद्गुरु पूर्णपणी । तुटे भेदाची कडसणी ॥ ' –दा ७.१.१८. ३ (ल.) मंथन; घुसळणें. ' करितां दधिकडसणी । मग नवनीत निर्वाणीं । दिसे जैसें ॥ ' –ज्ञा २.१२९. ४ (ल.) विचार; भेद; भेदभाव. ' मी तूं हे कडसणी । ' –विपू २.४१. ' देव भक्त हे कडसणी । निरसोनि गेली ॥ ' –दा ८.८.१८. ५ (ना.) धाकदपटशा; तंबी; दटावणी; काच. ' तेथें द्वैतबुद्धीची कडसणी । ' –परमा २.१९. ६ चातुर्याची रचना (बोलण्याची, लिहिण्याची). [सं. कृष्; प्रा. कड्ढ=खेंचणें; का. कडे=घुसळणें ?] **०देणें**–(व.) पखवाज किंवा तबला आवळून बांधणें. **०घालणें, कडसणींत धरणें**-अडचणींत घालणें, पेचांत आणणें; घोटाळ्यांत पाडणें. **–स लागणें**–उतरती कळा लागणें.

कडसणी—स्त्री. १ (कों.) बाजू; बरगडया; कूस. ' त्याच्या कडसण्या तटाटल्या. ' ' हें गुरूं कडसण्या हाणतें. ' २ कनवट; कडोसरी; कमरेजवळचा नेसलेल्या वस्त्राचा भाग (हिच्यांत लहानशी वस्तू खोचून ठेवतात) (क्रि० खोचणें, खुपसणें). ' कडसणीचा पैसा, सुपारी, डब्बी. ' [सं. कटि]

कडसणें—उक्रि. १ जोरानें बांधणें, आवळणें (गांठोडें, पखवाज, तबला इ०). २ कस लावणें, निक्षून करणें. ' श्रीगुरुकडसुनि गोष्टी पुसतां ऐसी । शिष्य अंतरीं चमकला ॥ ' –स्वानु ११.३.२६. ३ घुसळणें. ४ (ना.) घट बांधणें; मारणें; चोप देणें. [कडसणी पहा]

कडसणें—उक्रि. १ विचार करणें; कसास लावणें; परीक्षा घेणें. ' आतां दया ते ऐसी । पूर्णचंद्रिका जैसी । निवविती न कडसी । सानें थोर । ' –ज्ञा १६.१५४. २ (ल.) निवड करणें. ' परी तें असो आतां आघवें । नलगे श्रोतयांतें कडसावें । ' –ज्ञा ६.२७.

कडसणें—अक्रि. क्षीण होणें; अशक्त होणें; वाळणें. [दे. कड=क्षीण, दुर्बल]

कडसणें—उक्रि. १ कढविणें; अग्निशोधन करणें; तावून सुलाखून घेणें, कसास लावणें. ' मग ज्ञानाग्निसंपर्के । कडसिलें विवेकें । ' –ज्ञा १.५२. २ (ल.) निवडणें; शुद्ध करणें. ' ज्ञानाग्निहुतार्शी कडशिलें वोजा । आत्मसिद्धी काजा लागूनियां । ' –तुगा ३९५८. [सं. कृष्; प्रा. कड; का. कडसु=कढविणें]

कडसर—वि. कडवट; किंचित कडू. [कटु+सदृश]

कडसर—पु एक प्रकारचें झाड. घोड्यास होणाऱ्या कृमिरोगावर याच्या बियांचें चूर्ण दुसऱ्या कांहीं औषधांच्या चूर्णाबरोबर देतात. –अश्वप २.४६.

कडसर—स्त्री. टेकडीची उतरती बाजू; उतार. [कड+सरणें]

सोऱ्यांत दाबून त्याच्या कुरड्या पाडतात. ५ उंसाचें वाढें, तुरा. 'ऊस सांडुनि मागती। कणीस त्यांचें।' –एभा २१.३३९. [सं. कणिश; प्रा. कणिस; 'कणिसं सस्यशीर्षकं।' –हेमचंद्र] **०निसवणें–पसवणें**–कणीस बाहेर येणें. **०पागोरा**–पु. (व्यापक.) जोंधळा, बाजरी वगैरेचें कणीस. (क्रि० घेणें; तोडणें मोडणें). 'हिंडत्या फिरत्या बलुत्यांनीं कणीसपागोरे नेले म्हणून तार्टेथोर्टी राहिलीं.'

कणीस—न. गाडीच्या चाकांत शिरलेला कण्याचा भाग [कणा]

कणुरा—पु. कणी; सूक्ष्म अंश. 'हीम कणुऱ्यापाटीं। लागतु दीसती।' –शिशु ६४१. [कण]

कणू—न. कण; अंश. [कण]

कणेकड—न. (कों.) रहाटगाडग्याच्या चाकाचा कणा. कणेकड रुख व तोरण यांवर फिरत असें. [कणा+काष्ठ] **०डाचें खापेकड करणें**–(एखाद्या मोठ्या लाकडाचे कणेकड करावें म्हणून तें तासीत असतां त्याचे खापेकडाच्या आकाराचे तुकडे करणें) एखादी मोठी गोष्ट सुधारावयाची म्हणून यत्न करीत असता उलट ती अधिक बिघडविणें; विनायकाचा वानर बनविणें

कणेचीबाहुली–स्त्री. रहाटाचा किंवा मोटेचा कणा ज्या दोन खांबांवर टेकतो व फिरतो त्यास म्हणतात.

कणेर-री, कण्हेर-री—पुस्त्री. तांबडी किंवा पांढरी फुल येणारें एक झाड. याचीं फुलें एकेरी, दुहेरी, तिहेरी पाकळीचीं असतात. मुळी विषारी असून पानें लांबट असतात. पिवळीं फुलें असणाराहि एक कण्हेर आहे. याचीं फुल घंटेच्या आकाराचीं असतात. –न. कणेर; कण्हेरीचें फूल. [सं. कणेर, कर्णिकार; प्रा. कणिआर]

कणेर—पु. (कों.) कंडेसर पक्षी.

कणेरा, कण्हेरा—वि. १ कण्या फार असलेला (सडलेला तांदूळ). २ कण्यांचा (भात.) [सं. कण] **०भात**–पु. कण्यांचा केलेला भात.

कणेरा—वि. लाल किंवा काळें अंग असून त्यावर पांढरे पट्टे असलेलें (कापड). लुगड्याची एक तऱ्हा. कणेरी लुगडें पहा. [कण्हेर]

कणेरान—न. (खाटिक) कंबर व त्या भागांतील मांस. [कणा]

कणेरी-रा, कण्हेरी-रा—स्त्रीपु १ कण्या शिजवून पातळ, पिण्याजोगें केलेलें पेय. २ तांदूळ धुवून भाजून वाटून तें पीठ पाण्यास लावून पातळ, पिण्याजोगी केलेली लापशी, मंड, ही आजारी माणसास देतात; पेज; कांजी. कण्हेरी करतांना तांदुळाच्या सहापट पाणी घेतात.

कणेरी केळ—स्त्री. एका जातीची केळ. कण्हेरपात पहा. **कणेरें केळें**–न. कणेरी केळीचें फळ.

कणेरी लुगडें, कणेरें लुगडें—न. काळा किंवा तांबडा पोत असून त्यावर पांढरे पट्ट असलेलें लुगडें. [कणेर+लुगडें]

कणेवाल—स्त्री. (गो.) एक वनस्पति.

कणेरी—स्त्री. कणेरीचें झाड व त्याचें फूल. 'कणेरीची लाखोली वाउनी।' –शिशु ७३९. [सं. कणेर]

कणो—पु. (गो.) गव्हाचा जाड रवा; गरा; सांजा. [कण]

कणोर, कणवर—पु. डाळीची चुरी, कण, कळणा. [कण]

कण्ण—न. (गो.) मूग किंवा मुगाच्या डाळीची केलेली गोड कांजी. [सं. कण]

कण्णेवचें—क्रि. (गो.) निरुपयोगी गवत काढून टाकणें.

कण्या—कणी अव. कणी पहा. तांदूळ, जोंधळा, बाजरी वगैरे धान्य भरड दळून तें शिजवून केलेलें पक्वान्न; कण्यांचें अन्न. 'कण्या विदुर मंदिरीं म्हणति साधु आस्वादिल्या।' –केका ३८.

कण्व—पु १ एक ऋषि. २ यजुर्वेदाची एक शाखा व त्या शाखेचे ब्राह्मण; कण्व व काण्वन हीं उपनांवें यापासून झालीं आहेत. [सं.]

कण्हणें—क्रि. विवळणें; कणणें पहा. 'एक कुंथितु पढवंतु। एक सेकसीतु कंण्हतु' –शिशु १०५७.

कण्ही—स्त्री. (शेती) उंसावरील रोग. –शे ७.२२३.

कण्हेरपात—स्त्री. केळीची एक जात; हिचें केळें मधुर असून त्याचा गीर ऊन भाकरीवर वितळतो. –कृषि ४८९.

कण्हेरी गाणें—क्रि. रडणें; केकाटणें; किरकिरणें; बारीक आवाजांत रडणें.

कंत—पु. (प्र.) कांत. पति; नवरा. [सं. कांत; प्रा. कंत]

कंत—पु. (गो.) (सरकारास) सारा, कर देण्याचा हंगाम [?]

कतक—न. एक दाणिना; पदक. –शर. –देहु ४७.

कतक—पु. एक झाड; निवळी; कासविंदा. 'अतिसहवासि वच मना कतक कलुषिता वना निवळबील।' –मोविराट ३.१६. [सं.] **०पिठी**–स्त्री. निवळीच्या बींचें चूर्ण. यानें गढूळ पाणी स्वच्छ होतें. 'उदकीं न घालितां कतकपिठी।' –रायो १०.६८३.

कतगुता, कुतगुत्ता—पु. ठराविक वसुलाच्या बोलीनें जमिनीची मालकी. यात वसुलीचा दर नेहमीपेक्षां कमी असतो. [ता. कतु गुत्तगइ]

कंतणें—अक्रि. (क.) चळणें; ढळणें; हलणें; जागा सोडणें. 'ही बावडी कंतत आहे, तिला काना लावा.' [सं. क्रम्–क्रांत; प्रा. कंत. तुल० का. कंतु=बुडणें, खालीं जाणें, मावळणें]

कतवा, कतावत-ती—पुस्त्री. १ करारपत्र; पंचायतीपुढें दिलेली कैफीयत, लेख; आमचें म्हणणें खोटें ठरल्यास आम्हीं अपराधी होऊं असें वादी–प्रतिवादी या जबानींत प्रतिज्ञापूर्वक लिहून देतात. २ ऋणपत्र; कर्जरोखा. ३ लेख; करारनामा; कबुलायत.

'तुमच्या चाकरापासून कतवे घेतले आहेत की तुम्हांकडे चाकरीस जाऊं नये; त्यास ते कतबे तुमचे तुम्हास देऊं.' –रा ८.१७८. [अर. किताब, किताबत]

कतरण—स्त्री. १ कातरलेले तुकडे; काचण; सडका भाग कापून काढलेले विड्यांच्या पानांचे तुकडे. २ पुस्तकबांधणींत कडा कापून टाकतांना निघालेला कागदाचा चुरा. [सं. कृत्, कर्त्तितः प्रा. कत्तरिअ; बं. कतरण; हिं. कतरन्]

कतरणी—स्त्री. (माळवी) कातरी. [सं. कृत्]

कतरणें—क्रि. निघून जाणें; उडून जाणें; नाहींसें होणें. 'तुम्ही येथून कतरा!' [सं. कृत; हिं. कतराना=भोंवतालीं फिरणें]

कतरबेत—पु. १ काटकसर; मितव्यय; छाटाछाट. २ उचलेगिरी; खिसेकातरूपणा. ३ ठाकठिकी; टापटीप; सुव्यवस्था. [सं. कातर+बेत]–ती–वि. १ काटकसरी; मितव्ययी. २ उचलेपणा करणारा; खिसेकापू. ३ नीटनेटका; ठाकठिकीचा.

कतरभेद—पुअव. १ शक्कल; कल्पत्या; डावपेंच; युक्त्या; लबाड्या. २ लष्करी डावपेंच; गनिमी कावे; सेनापतीनें सैन्याकडून दाखविलेल्या हुलकावण्या. [सं. कातर+भेद]

कतरा—पु. (बे.) केरकचरा; अडगळ. कतरण पहा.

कतल—कत्तल पहा. 'कतलमध्यें तीनचार लक्ष माणसें कतल जालीं.' –रा ६.२४७.

कतलाम—स्त्री. सर्रास कत्तल; काटाकाट; कापाकापी; बिजन. 'त्यास दीड प्रहर लूट व कतलाम जाली.' –रा १.१११. 'गोळी न वाजवितां (शहर) दिलें यास्तव कतलाम केलें नाहीं.' –ख १.३२. [फा. कतल्–इ–आम]

कतवर–वार—न. १ सैन्यांतील बाजारबुणगें, सामानसुमान वगैरे लेंढार. **म्ह०** एकपट लष्कर सातपट कतवार. 'पानपतच्या लढाईत लष्कराबरोबर कतवारही बरेंच होतें.' २ (ल.) जनसमुदाय; मेळा; थवा (उडाणटप्पू, तमासगीर, रिकामटेकडे, गप्पा मारणारे वगैरे लोकांचा). ३ केरकचरा; गदळमाती; गवत. ४ अडगळ; निरुपयोगी वस्तू. [हिं. कत्वार]

कतान, कंतान—न. तागाचें कापड; कॅन्व्हसचें कापड. [अर. कत्तान=तागाचें कापड; कतान=जवस]

कतार–रा—स्त्रीपु. १ रांग; ओळ (विशेषतः उंटांची). 'जबर्जंग गाडयाच गाडया कतारे।' –दावि ३३३. 'बारा हजार बाणांची कतार.' –ऐपो १०६. २ रांग; ओळ; श्रेणि (डोंगरांची). [अर. कतार, किनार] **०बनी**–(संघव्यायाम) कवाइत करणाऱ्यांना लहान लहान टोळ्या करण्याबद्दलचा हुकूम. –सेंव्या ३८. (इं.) फॉर्म सेक्शन्स. एक कतार=एका रांगेत उभें राहण्याचा हुकूम.

कति—किती पहा. [सं.]

कतिपय—वि. कित्येक; अनेक. 'साडयाहि नौपटीच्या कतिपय लुगडीं जे नवे पांजणीचीं।' –सारुह ३.४१. [सं.]

कतेरा—पु. झाडापासून निघणारा एक प्रकारचा गोंद, डिंक. [हिं. कतीरा]

कंतोस—पु. झुरणी; काळजी. 'जिवाला कंतोस लागलाय अगदीं.' [कम्=कमी+तोष]

कत्तल—स्त्री. १ हिंसा; लढाईंत होणारी माणसांची कापाकापी; छाटाछाटी; बिजन. (क्रि० करणें, उडविणें). कतल पहा. २ सरसकट नाश; एकजात मोडतोड (झाडें, इमारती इत्यादिकांची). ३ मोहरमच्या दहाव्या दिवशीं मुसलमान फकीर जे विधी आचरतात ते. [अर. कत्ल] **–ची रात्र**–स्त्री. १ मोहरमच्या दहाव्या तारखेची रात्र (या रात्रीं अलीचे मुलगे लढाईत मेले यावरून). २ आणीबाणीची वेळ; ऐन घाईची–गर्दीची वेळ; लग्नघाई. ३ (ल.) काटाकाटी, कापाकापी. **०खाना**–पु. जेथें बकरीं इ० जनावरें मारून त्यांचें मांस विकलें जातें ती जागा; खाटीकखाना. 'कत्तलखाने गांवाबाहेर नेणें हें आरोग्याच्या दृष्टीनें आवश्यक आहे.' –के २४.६.३०. **०बाज**–वि. हिंसाप्रिय; रुधिरप्रिय; कत्तल करणारा. [अर. कत्ल+फा.बाझ्] **०होणें**–मारला जाणें. 'नानापाशीं कत्तल झाला।'–ऐपो १२०.

कत्ति—स्त्री. (कर्ना.) कोयता; तरवार. [का. कत्ति; फ्रें. जि. कत=सुरी, वस्तरा; हिं. कत्ती=सुरी; गु. कती; सिं. काती; सं. कृत्–कृंत्]

कत्थक—पु. (हिं.) उत्तरहिंदुस्थानांतील गवयांची एक जात हे लोक पायांत चाळ बांधून नाचतात. कत्थकी नाच तिकडे प्रसिद्ध आहेत. [सं. कत्थ्=वाखाणणें]

कत्थन—न. बडबड; वृथा बोल. 'कर्णा! उगा उगा रे! किति कत्थन? हें न ऐकवे कानें।'–मोकर्ण २५.१७. [सं. कत्थन=वढाई]

कंत्रण–त्राण—न. १ मसलत; शक्कल; तोड; गुप्त बेत; (चातुर्यानें बांधलेलें) संधान. २ कंत्राट पहा.

कंत्राणी–ण्या—वि. १ गुप्त मसलत करणारा; तोड काढणारा; हिकमती; मसलत्या; खलबत्या (अपायकारक बुद्धीनें करणारा). २ कंत्राटदार पहा.

कंत्राट–ड—न. १ ठेका; मक्ता; (इं.) कॉन्ट्रॅक्ट. २ (ल.) कुलंगडें; लचांड; किटाळ. कंत्रण पहा. [इं. कॉन्ट्रॅक्ट] **०दार**–वि. कंत्राटें घेणारा; ठेकेदार; मक्तेदार; कबालदार; एखादें काम अंगावर घेऊन पुरें करून देणारा; कॉन्ट्रॅक्टर.

कत्रेल, कंत्रेल—न. (कु. गो.) भिंतींतील फडताळ; दुलाब. [पोर्तु. कांतारीरा]

कत्वार—न. (व.) मेळा; थवा; लेंढार. कतवर पहा. 'कशाला त्यांच्या पोरांचं कत्वार आपल्या घरीं आणतां?' [हिं.]

कथ—क्रिवि. (खा.) कोठें. [सं. कुत्र; प्रा. कत्थ; तुल० बं. कथि]

कंथ—पु. (काव्य) पति; नवरा. 'कंथा सामोरी आली.' –वसा ५६. [सं. कांत; प्रा. कंत; गु. कंथ]

कथक—पु. १ पुराणीक; कथेकरी; गोष्टी सांगणारा. २ कथन करणारा; सांगणारा. [सं. कथ्=सांगणें]

कथंचित्—क्रिवि. १ कसातरी; कोणत्या तरी रीतीनें; मोठ्या कष्टानें; प्रयत्नानें. २ कदाचित्; यथाकथंचित् पहा. [सं.]

कथज्या—क्रिवि. (बागलाणी) कोठें. कथ पहा.

कथडथा—वि. (निंदार्थ.) कथा करणारा; (हरदास, संत इ०). [कथा]

कथणें—उक्रि. १ सांगणें; निवेदन करणें; वर्णन करणें; तपशीलवार गोष्ट सांगणें. 'तैसेंचि मातें विश्वीं कथित। कथितेनि तोषें कथूं विसरत॥' –ज्ञा १०.१२८. 'स्वामी अर्जुनसुभद्रापाणिग्रहण। कथा कथावी म्हणतां मुनिकुलमंडण। परमानंदें कथन करी॥' –निमा, सुभद्राचंपू १.१२. २ पद्यरूपांत सांगणें, गाणें. [सं. कथ्=सांगणें] **कथून ठेवणें, अगोदर कथून ठेवणें–कथणें**–भविष्य सांगणें; गोष्ट घडण्यापूर्वीच सांगून ठेवणें.

कथन—न. १ सांगणें; निवेदन करणें; कथण्याचा व्यापार. (क्रि० करणें). 'तें झडकरी कथन करी। मजप्रती।' –ज्ञा १.८७. २ आख्यान; गोष्ट; हकीकत; वृत्तांत. [सं.]

कथना—स्त्री. गप्पा; थापा; बाता. 'बहिणी म्हणे मज दिसती कथना। जोंवरि न मना अनुताप।' –ब ५१३. [सं. कत्थना=वढाई]

कथनात्मक—वि. १ सांगण्यासारखें (कथा, गोष्ट, हकीकत); कथनीय पहा. २ वर्णनात्मक; ज्यांत नुसतें वर्णन, हकीकत लिहावयाची असते असा (निबंध); निबंधाचा हा एक प्रकार आहे. [सं.]

कथनीय—वि. सांगण्यासारखें; कळविण्यास योग्य असें (हकीकत, वृत्तांत वगैरे). [सं.]

कथंबा—(कों.) केळीचें रोप. [?]

कथरी—स्त्री. (गो.) एक प्रकारची ढाल. [?]

कथला-ळा—पु. (हिं.) भांडण; तंटा; हरकत; कटकट; भानगड. [तु. ते. कलत=भांडण; का. कोटले=त्रास, दुःख]

कथला-ली—पु. गुरांना होणारी खरूज, खवडे. [कथील (?)]

कथली—एक प्रकारचा डिंक. –मुंव्या ४६.

कथली—स्त्री. १ कथलाचें भांडें; कथलें. २ कथलाच्या तपेल्याच्या आकाराचें पात्र. –वि. कथिलासंबंधी; कथलाचें (भांडें वगैरे). [कथील]

कथली—स्त्री. एक तृणधान्य. **कथली खरूज**–१स्त्री. जींतून पू वहात आहे अशी–ओली असलेली खरूज. २ (ल.) अति द्वाड, खोडकर मनुष्य. ३ काळजास जाऊन झोंबणारें दुःख, पीडा; त्रासदायक गोष्ट. **कथली व्याध-धी-पीडा**–स्त्री. १ वहात असलेली गर्मी, उपदंश, बद; २ (ल.) खोडकर, त्रासदायक मनुष्य; मरी, प्लेग, वाखा वगैरे आजार; सांथ; व्याधि; पीडा.

कथली, काथली—स्त्री. (ना.) महालक्ष्मीच्या सणाच्या दिवशीं पडवळ घालून केलेली कढी. हा शब्द याच दिवशीं उपयोगांत आणिला जातो. [सं. कथ्=कढणें]

कथलें—न. कथलाचें मोठें भांडें; मोठी कथली. [कथील]

कथलेंदुःख, कथल्यारोग, कथलेंपरमें–नपुन. उपदंशाचा एक प्रकार; कथलीव्याध अर्थ १ पहा.

कथल्या देवी—स्त्रीभव. मोठे फोड उठणाऱ्या, चिघळणाऱ्या देवी; चिघळ्या देवी. देवी पहा.

कथा—स्त्री. १ गोष्ट; रचलेली गोष्ट; कल्पित गोष्ट; कहाणी. 'कथा बोलूं हे मधुर सुधाधारा।' –र १. २ हकीकत; वर्णन. 'स्मरला स्मरहर भरला कंठ न वदवेचि ते कथा राहो।' –मोसभा १.३३. ३ टाळ, मृदंग, वीणा इ० साधनांनीं हरिदास देवादिकांचें गुणवर्णन करतात ती; कीर्तन; देवादिकांच्या गोष्टी सांगणें; हा एक सार्वजनिक करमणुकीचा, परमार्थ साधनाचा प्रकार आहे. 'चातुर्मासांत बहुतेक देवळांतून कथा चालतात.' ४ केलेलें कृत्य; काम; (पराक्रमाचा) प्रसंग; पराक्रम. 'गेला माधव लोक सोडुन किती गाऊं तयाच्या कथा।'; 'अशा त्याच्या कथा आहेत बाबा!' ५ (ल.) महत्त्व; वजन; पर्वा; मातब्बरी (मनुष्य, वस्तू वगैरेंची) किंमत पहा. 'तो दुसरा ब्रह्मा करील उत्पन्न। मग ऐसियाची कथा कोण।' –नव १६.६८. 'क्षुद्रा पशु पक्ष्यांची काय कथा पांचही महाभूतें।' –विद्याप्रशंसा (चिपळूणकर) ७. ६ भाषण; म्हणणें; सांगणें. ७ हकीकत; प्रंथार्थ; विषय. 'तूं संतस्तवनीं रतसी। कथेची से न करिसी।' –ज्ञा ५.१४१. [सं.] **०होणें**–क्रि. केवळ कथेंत राहणें; नुसती कथा बनणें (खरें अस्तित्व नसणें); स्मृतिरूपानें अस्तित्व असणें. **कथेची गति**–स्त्री. कथा सुरू, चालू असणें; कथेचा ओघ, प्रवाह. 'जेव्हां कथेची गति हे वदावी। धनुष्यभंगीं रस रौद्र दावी।' –वामन–सीतास्वयंवर ४९. **–नुसंधान**–न. वृत्तवर्णनाचा संदर्भ, संबंध; गोष्टीची, हकीकतीची संगति. **०प्रसंग**–पु. १ गोष्टीचा, संभाषणाचा ओघ. २ गोष्टींतील, वर्णनांतील प्रसंग. **०बांधणें**–क्रि. कथा रचणें, लिहिणें; पद्यमय रचनेंत चरित्र लिहिणें. 'तथापि

बांधेन कथा विचित्रा । ' –सारुह १.३०. **०भाग**–पु. १ पुराण किंवा इतर ग्रंथांतील राजे वगैरेचे पराक्रम, गोष्टी, चरित्रें इ०चें वर्णन ज्यांत आहे असा भाग. २ कीर्तनांतील आख्यान; कीर्तनाचा विषय. ३ विशिष्ट प्रसंगाचें वर्णन; हकीकत. [सं.] **–मृत**–न. अमृताप्रमाणें गोड, चित्त रंजन करणारी गोष्ट. कथारस पहा. ' कालिदिचें जीवन शुद्ध केलें । कथामृताला जग हें भुकेलें ' **–वामन**–हरिविलास १.२४. [सं.] **०रस**–पु. (कथेंतील गोडी) १ प्रतिपादनाची सुंदर हातोटी; उत्तम प्रकारें अलंकारादिकांनीं कथाभाग सजविणें; कथाशृंगार. ' हरिदासानें कथारस चांगला केला. ' २ सार्थे भगवद्गुणानुवाद, कीर्तन, कथा (अलंकार इ० सजावटीविरहित). ' कथारस काय निघाला होता ?' [सं.] **०रूप ग्रंथ**–पु. १ वर्णनांनीं, हकीकतींनीं भरलेला किंवा इतिहासपर ग्रंथ; ज्यांत आख्यानें, गोष्टी आहेत असा गद्य ग्रंथ; बखर. २ गद्यमय ग्रंथ; प्रबंध. **०लाप**–पु. वर्णन; कथा सांगणे. ' व्यापारांतर टाकुनी तव कथालापासि जे आदरी । ' –र ६. **०वार्ता**–स्त्री. गप्पा, गोष्टी. 'त्या दोघी महालांत बसून परस्पर कथावार्ता करीत होत्या. ' –राणी चंद्रावती १६४. **०शेष**–वि. कथारूपानें उरलेला; स्मृतिरूपानें अवशिष्ट राहिलेला; सत्कार्यादिरूप कथा मात्र ज्याची राहिली आहे असा; कथेवरूनच ज्याची माहिती मिळते असा (मृत, गत मनुष्य). ' दुराग्रही प्रवर्तोन योग्यायोग्य कार्य न विचारतां स्वांगें संपादित होत्साता स्थळोस्थळीं अपमान पावोन कथाशेष जाहला ' –मराआ ५. **०संदर्भ** (चुकीनें) **संदर्प**–पु. भाषणांतील पूर्वापर संबंध, वृत्तवर्णनांतील संगति. कथानुसंधान पहा. [सं.]

कंथा—स्त्री. १ गोधडी; अनेक चिंध्या एकत्र शिवून व ठिगळें देऊन केलेलें जाड वस्त्र. ' कंथा हो कां मृदु आस्तरण । ' –एभा १८.२५०. ' प्राकृत संस्कृत मिश्रित यास्तव कोणी म्हणेल ही कंथा ! ' –मो स्फुट आर्या ५ (नवनीत पृ. २५४). २ (हिं.) जोगी वापरीत असलेलें एक उत्तरीय वस्त्र; याचा झोळीसारखाहि उपयोग होतो. ' कंथा कमंडलू देह उपचारा । जाणवितो वारा अवसरू । ' –तुगा २१४०. ' समर्थे कंथा मेखळा देऊनि स्छळासी आणिले । ' –सप्र २१.५५. [सं.] **०धारी**–पु. १ कंथा पांघरणारा, घेणारा, वापरणारा. २ (ल.) जोगी; गोसावी. ' कंथाधारी बहुत केले ' –सप्र १२.३८.

कंथा—(गो.) कथा पहा.

कथाईन, कथाकन—क्रिवि. (खा.) कोठून; कोणीकडून. [सं. कुतः, प्रा. कत्थ. पंचमीचा हून व कडून प्रत्यय लागून; [सं. कुतः+कन.]

कथान—न. कथानक पहा. ' धर्में केला अश्वमेध पूर्ण । तें मज कथान सांगावें ॥ ' –जै १.३७.

कथानक—न. १ गोष्ट; वृत्तांत; हकीकत; वर्णन. २ नाटक, कादंबरी वगैरेचें संविधानक, विषय. [सं.]

कथांबो—(कु. गो.) इरडो; झाडाचें रोप; इरडो पहा. [सं. काष्ठ+आय; प्रा. कट्ठ+आव ?]

कथाल—न. (कु.) कथली; कथलाचें भांडें. [कथील]

कथाव—न. (ना.) गाऱ्हाणें; निंदा. अव.प्रयोग. ' कथावें करणें ' =गाऱ्हाणीं सांगणें, निंदा करणें. [सं. कथा]

कथिका—स्त्री. कढी. ' कथिका वाढिती सुवास । ' –वेसीस्व १२.१०१. –मुवन ११.११६. [सं. कथ्]

कथित—वि. सांगितलेलें; वर्णिलेलें (वृत्त, हकीकत वगैरे) [सं.]

कथील—न. एक खनिज धातु; वंग; त्रपु; कल्हईची धातु. हा धातु मऊ, ठिसूळ असून उष्णतेनें वितळतो; आंबट पदार्थ कळकूं नये म्हणून भांडयांस कल्हई करण्याकडे याचा उपयोग होतो, व भांडयास डांक देण्याकडेहि याचा उपयोग करतात, पण हा डांक कच्चा असतो. कथिलांत खुरक व मिश्रक असे दोन भेद आहेत. खुरक हें मृदु व पांढरें असून लवकर वितळतें, मिश्रक काळसर पांढरट असतें. ' कृष्णाश्रितें करावी चिंता न, जशी रसाश्रितें कथिलें । ' –मोमीष्म ११.४७. [सं. कस्तीर; अप.कत्थील=कथील] **०कुटणें**–क्रि. (ल.) काथ्याकूट करणें; व्यर्थ बडबडणें. **०कुट्या**–पु. १ कथलाचें काम करणारा. २ (ल.) वृथा बडबड करणारा; कथ्याकुट्या. ३ (निंदार्थ.) सोनार. **०कूट**–न. (ल.) काथ्याकूट; गप्पाष्टक; रिकाम्या गप्पा.

कथेकरी—पु. १ कथा करणारा; हरदास; कीर्तन करणारा. २ गोष्टी सांगणारा. [कथा+करणें]

कथलागी—वि. १ कथेला उपयोगी, योग्य, आवश्यक (गवयी, वाद्य, इ०). २ (क्र.) कथेचा शोकी; कथा असेल तेथें नेहमीं जाणारा. [सं. कथा+लग्]

कथ्थक—कत्थक पहा. ' १९१५–१६ सालापासून गवई, तंतुवाद्यकार व कथ्थक यांच्या परीक्षा चालू राहिल्या आहेत ! ' –कला (बडोदें) ९.

कथ्य—वि. कथनीय; सांगण्यास, बोलण्यास, निवेदन करण्यास योग्य (गोष्ट, हकीकत इ०) [सं.]

कद—पु. रेशमी, सोंवळयाचें नेसावयाचें वस्त्र; रेशमी मुकटा; साधारणतः कद बिनकाठी असतात, पण याचे जरीकांठी, हइफुलकाठी व साधा असे प्रकार आहेत. कद जनानी व मर्दानी असा दोन्ही प्रकारचा असतो. [सं. कदक ?]

कद—स्त्री. १ किंमत; लायकी; महत्त्व; वजन. ' काकुंनाची कद किती ? ' –होकें ४४. ' तुझा काय कद मजशीं वाद करायाला ? ' २ बांधणी; उभार; आकार; ठेवण; आंगलट. ' औलादीचे कद मादीचे कदीप्रमाणें बहुतकरून होते. ' –अश्व १.१४२.

'घराची कदठेंगणी आहे!'; 'तो इसम ठेंगण्या कदाचा व जाडा होता!'–विक्षिप्त १.१५२. ३ गोणीचे दोन भाग जोडणारा पट्टा किंवा दोन भाग जोडणारी शिवण. ४ जाडी; भरींवपणा; घनता. (क्रि० धरणें; सोडणें.) 'हिऱ्याचा कद जसजसा पातळ तसतशी त्याची किंमत अधिक.' [अर. कद्=ठेवण बांधा] ०**जिरविणें-मोडणें**–वि. (एखाद्याचा) ताठा, अहंता, मीपणा झाडणें, उतरविणें. ०**पाहणें**–कस पाहणें; किंमत करणें; पाणी परीक्षणें.

कंद–पु. १ कांदा; गड्डा; मगज. गीर असलेलें मूळ (सुरण, अळू वगैरेचें). 'जन्ममरणाचा बाध। समूळनि तुटो कंद।' –तुगा ११४२. २ (खा. ना.) रताळें. ३ (ल.) (समासांत) मूळ; सांठा; उगम; उत्पत्तिस्थान. जसें:–आनंदकंद; अमृतकंद; विलासकंद. 'जैसें महूर कां म्हणिजे। विषकंदातें॥' –ज्ञा ५ ११५. 'इंदिरावरा आनंदाकंदा।' –ह ३.९३. ४ (योग) नाभिस्थानाखालील मणिपूरचक्र; मूलाधाराचा ऊर्ध्वभाग; (सामा.) नाभिस्थान; नाभिस्कंद. 'कंदावरि शक्ती। उठली दिसे।' –ज्ञा ६.२२७. [सं.]

कंद–स्त्री. (व.) कांडलेली ज्वारी. [कंडण]

कदंड–पु. घोर, कठोर शिक्षा. 'दंडु करितां कदंडीं। आंग देईन॥' –गीता १.७०. [सं. कु+दंड]

कदन, कंदन–न. १ नाश; कत्तल; संहार. 'जुझती त्यांचें करूनि कंदन।' –मु ३३. 'एकचि झाला हाहाकार। कदन करितां लोटला पूर।' –नव १७.८८. 'युद्ध यावें मज दारुण। जेणें भुजांचें होय कंदन॥' –कथा १.६.१४. २ युद्ध; लढाई. 'पृथ्वी तेचि उखळ जाण। नांगरें वीर घाली वैरण। मुसळघायें करी चूर्ण। रणकंदन मांडिलें॥' –एरुस्व १० ६०. 'कदन कराया मदन शुभांगी.' –अमृत २४. [सं. कद्, कंद्; फा. कंदन=खणणें, उखडणें]

कदन्न–न. १ वाईट, जाडेभरडें, हलकें अन्न; निःसत्त्व अन्न; हलक्या धान्याचें अन्न. 'कदन्नासि देखतां नयनीं। कुसुमुसुनी खातसे॥' –संवि. ८.३३. २ दानास किंवा हवनास अयोग्य अन्न (घृतादिरहित हरीक, राळा, इ०). [सं. कद्=कुत्सित+अन्न]

कदपस–पु घोड्यास होणारा एक रोग, यामुळें बरसातींत घोड्याच्या गुडघ्यावर फोड येतात. यावर एरंडीचें बीं गाईच्या जुन्या तुपांत वाटून लावतात. –अश्वप २.२९०.

कदंब–पु. १ एक वृक्ष; कळंब. 'तूंचि मूळ प्राणारंभा। विश्वकदंबा जीवन तूं॥' –एरुस्व ६.९४. 'हरी देखिला वक्रदृष्टी कदंबीं।' 'जाळवे न तरु तोचि कदंब।' –वामन, हरिविलास १.४२. २ मोहरीचें झाड; मोहरीचा दाणा. ३ समुदाय. फणस पेरू आणि लिंबतरूंच्या भरलें तीर कदंबीं।' –नरहरि 'जेथ तो श्रीवल्लभु। जेथ भक्तकदंबु।' –ज्ञा १८.१६५७. ४ पृथ्वीचे ध्रुव ज्या बिंदूंभोवतीं फिरतात तो बिंदु. [सं.]

कदंबक–पु. घोड्याच्या पायास होणारा एक रोग. –अश्वप २.३८.

कदंबभ्रमवृत्त–न. ध्रुववृत्त. कदंब ४ पहा. [सं.]

कदवा–पु. करार; कतबा पहा.

कदंबिनी–स्त्री. १ स्त्री; सखी. २ कदंबाचें फूल? 'कदंबिनी घालिती मुकुटीं।' –शिशु ७८४. [सं.]

कदम–कदंब पहा.

कदम–पु. १ पाय; पाऊल. 'आमचे दिलांत रावसाहेबांचे कदम पहावयाची उमेद बहुत आहे.' –रा १.६४. २ चालतांना दोन पावलांत राहणारें अंतर (सुमारें अडीच फूट). ३ एक मोजणीचें माप. वायव्यसरहद्दप्रांतांत २० कदम=एक कच्चा बिघा (एकदशांश एकर) धरतात. ४ (ल.) शिरकाव; प्रवेश. 'पातशाहींत त्याचा कदम न शिरावा हें आहेच.' –दिमरा १.३६. ५ चालरीत, वागणूक; वर्तणूक. [अर. कदम्] ०**खोल**–(संघ०यायाय) हा हुकूम मिळाल्यावर प्रत्येकानें आपला डावा पाय डावीकडे १२॥ इंच अंतरावर आपटून ठेवावा व हात मागें नेऊन ते एकमेकांत एकमेकांनीं धरले आहेत असे असावेत. डाव्या हाताच्या तळहातावर उजव्या हाताचा पालथा पंजा ठेवावा. –संव्या ७. (इं.) स्टॅड ॲट ईझ. ०**बोस**–वि. पायाचें चुंबन घेणारा; अत्यंत नम्र. 'प्रथमदर्शनीं मोगलअल्ही नवाबापाशीं येतांच कदमबोस झाले.' –रा ५.१९१. [फा. कदम्बोस्] ०**बोसी**–स्त्री. पादस्पर्श; पायांचें चुंबन; नमस्कार; प्रणाम; वंदन (वडील माणसास किंवा राजास पायाला हात लावून त्या हाताचें चुंबन घेणें ही चाल मुसलमानांत आहे). 'बडी फजर साहबके कदमबोसी करनेकू हुजूर खडे होऊं.' –मब ६७. [अर. कदम्=पाऊल. फा. बुसा=चुंबन]

कंदमूळ–न. खाण्याच्या उपयोगी असे कंद व मुळें (रताळीं, मुळे, गाजर इ०). [कंद+मूळ]

कदर–स्त्री. १ किंमत; शक्ति; प्रभाव; हिंमत; फिकीर. २ तब्येत; प्रकृति; स्वभाव (विशेषतः कडक, वाईट, अहितकारक, निष्ठुर इ०). 'आदेर करून विनवितां कदर कां कठीण करितां तुम्ही.' –प्रला १२१. ३ ठराव; अधिकार. 'आपणाकडे फौजेचे बेगमीस सरंजाम कदर करून दिला.' –समारो १.१५५. ४ धनीपणाचा डौल; अस्मल चालविण्याचा स्वभाव; वचक; हुकमत; धाक; जरब; शिस्त; दरारा. 'नानाची कदर (मुत्सद्दी म्हणून) मोठी होती.' –नि १००९. ५ गुणाची पारख, चहा, बूज. 'त्याचा उद्देशलायकीची कदर करून चांगल्या गोष्टीला उत्तेजन देणें हाच होय.' –सगाभा २. [अर. कद्र=किंमत, महत्त्व] ०**काढणें**–

सोसणें–क्रि. त्रास सहन करणें; मर्जी, तब्बेत संभाळणें (रागीट किंवा आजारी मनुष्य, धनी, मूल वगैरेची).

कंदर–रा—नस्त्री. १ गुहा; दरी. 'दुमदुमिताती गिरिकंदरें।' –ज्ञा १.१३०. २ डोंगरांतील कोंरीव लेणें. ३ (ल.) अंतःकरण; हृदय. 'बोले तों गृहि कृष्ण ये झटकरी आनंदली कंदरीं।' –नदा ३१. [सं.]

कदरणें—अक्रि. त्रासणें; दमणें; थकणें. 'तुम्ही कितीहि कावला, कदरला, हताश झाला तरी ... ' –दिवाकरदृष्टि २७. [कदर]

कदरदान—वि. योग्यता जाणणारा; गुणग्राही; पारख करणारा; चहाता (कागदपत्रांतील लिहिण्याच्या मायन्यामध्यें उपयोग करतात). 'कैलासवासी महाराज हे मनुष्याचे कदरदान होते.' –विक्षिप्त २.५०. [अर. कद्र+फा. दान]

कदरदानी—स्त्री. गुणग्राहकता; पारख; चहा. 'जें त्यांचे खावंदगिरीस व कदरदानीस उचित तेंच करितील.' –रा ३.१२०. [अर. कद्र; फा. दानी]

कदर्थणें—अक्रि. १ कष्टी करणें; गांजणें. संकटांत घालणें. 'आतां पराजयें राजा। जैसा कदर्थिजे लाजा।' –ज्ञा १६.१७५. 'न देखों हें विषयस्वप्न। जेणें कदर्थलें बहु' –रास १.११. २ कासावीस होणें; कष्टी होणें. 'इये हिंसेचे भेण। तेथ कदर्थिले प्राण।' –ज्ञा १३.२३५. [सं. कदर्थन=पीडा करणें; हाल]

कदर्थविणें—प्रयोजक क्रि. १ कष्टविणें; त्रासविणें. 'जो कदर्थवी निजप्राण। कदर्यू पूर्ण त्या नांव।' –एभा २३.१०५. २ नाहींसा करणें. 'आतां कदर्थवित व्याधी। बळी करण्याचिया आधीं।' –ज्ञा १६.१४१.

कंदर्प—पु. १ मदन; कामदेव. 'ऐसा नियतु कां कंदर्पु।' –ज्ञा ७.५१. 'कोटि कंदर्प लोपती पुढें। ऐसें सुंदर लावण्य रूपडें।' –संवि १७.१६४. [सं. कदर्प] २ (ल.) कांदा. [सं. कंद+दर्प=कुत्सित दर्प (?)] **–पांचें घर**–न. योनी; स्त्रीजननेंद्रिय; स्मरमंदिर–गृह–कूप. 'कुथित कंदर्पाचें घर। म्याचि साचार सेविलें।' –एभा २६.११२. **०केली**–पु. शृंगार; मदनक्रीडा; सुरतक्रीडा; संभोग. 'तेथ कंदर्पकेळी खेळतीं युगळे। राजहंसांचीं॥' –शिशु ६४९.

कदर्य–र्यु—वि. कृपण; कंजूष; चिक्कू. 'समर्थी सारथ्यगुणा नुघडूनि कदर्युचा न डेरा हो।' –मोविराट ३.१९. [सं. कद्=वाईट+अर्य; कदर्य=कृपण]

कदर्य—न. कदान्न; कुत्सित अन्न. 'कदर्यावर बैसली माशी। ते उडवितांही न उडे जैसी। गुंतोनी राहे तियें रसीं। रुचीचिया चाडां॥' –ज्ञाप्र ७१०. [सं. कद्+अर्य; कदर्य=क्षुद्र; अप्रिय]

कदल—न. केळें; केळीचें, कदलीचें फळ. [सं.]

कदेल—न. (गो.) खुर्ची. [पोर्तु. कादेरा]

कदलणें—अनि. (दुफाशी सोंगटयाचे खेळांत) सोंगटया जुगल्यानंतर बेती, बारा वगैरे जुगदान खेळणें. कदली पहा.

कदलणें—अक्रि. खचणें; घालविणें; गमाविणें (वेळ) [का. कडयिसु, कदालिसु=घालविलें, हालविणें ?]

कदली—स्त्री. (दुफाशी खेळांतील) बारा, बेती, दुड्ढी, आठ वगैरे जुगदान.

कदली—स्त्री. केळ; केळीचें झाड. [सं.]

कदा—क्रिवि. १ केव्हां; कोणत्या वेळीं. 'कदा नेणों वोढी शरधितुनि काढी शर कदा।' –र ३. 'असा अतिथिधार्मिकस्तुत पहा! कदा सांपडे।' –केका १२१. २ केव्हांहि. 'मायानिवर्तक ब्रह्मज्ञान। तयांसही जाण कदा नुपजे।' –एभा २.४६२. 'मग हा कदा देशांत। जाणार नाहीं सर्वस्वें।' –नव १६.१२. [सं.; तुल० लॅ. कांदो] **०काळाचा, काळीचा**–वि. अतिशय जुन्या काळांतील; प्राचीन; पुरातन; ज्याचा काल नक्की माहीत नाहीं असा. [कदा+काळ] **०काळीं, कदानकाळीं**–क्रिवि. प्राचीनकाळीं; पूर्वी; मागें; केव्हां तरी; क्वचित् प्रसंगीं. 'नित्यशः जो येणार त्यापेक्षां कदाकाळीं येणाराचा आदर फार होतो.'

कदाचित्, कदांचित्, कदाश्चित्, कदाचित्पक्षी, कदान—उभ. न जाणों; सहजगत्या; एखादवेळीं; चुकून. –क्रिवि. केव्हां तरी; कधीं तरी; क्वचित्. [सं. कदा+चित्]

कदान्न—न. नीरस अन्न, कदन्न पहा. 'भावें हें कदान्न खासी त्याचे घरीं।' –तुगा ९३४. [कद्=वाईट+अन्न]

कदापि—क्रिवि. १ केव्हांहि; कधींहि; मुळींच; कोणत्याहि वेळीं (नाहीं–निषेधार्थी उपयोग). २ कधीं कधीं; केव्हां केव्हां. 'कदापि त्या होवोनि अप्सरा। जळद्वारें नेती विवरां। मग भोगिती पुरुषमात्रा। मानवांसी॥' –कथा ६.४.८९. [सं. कदा+अपि]

कदा पुरणें—क्रि. (व.) कंबख्तीं निघणें; दुर्दैव ओढवणें.

कंदार—वि. (गो.) हट्ट; वर्दळ; निकर. (क्रि. येणें; पेटणें) 'कंदार आयलॉ–पेटलॉ=निकरावर, वर्दळीवर येणें, आला. [कंद+वर ?]

कंदाल—स्त्री. (कों. कुण.) त्रास; कटकट; भांडण. कंदाळी पहा.

कंदाळी—स्त्री. (कों.) परचक्रापासून होणारा उपद्रव; हानि; त्रास; भांडण. (शत्रु सैन्य, लुटारू इ० चा). [सं. कंद्, कंदल=युद्ध, तंटा.]

कंदाळू—न. महाबळेश्वराकडे होणारें भुईकमळ; महादकांदा; याचा कांदा फार मोठा असतो म्हणून यास हें नांव पडलें. [सं. कंदली=कमळबीज; कंद+आळु]

कदिमी, कदिमाई—स्त्री. जुनेपणा; जुना लौकिक, परंपरा, स्नेह. 'सर्कारचे काम होऊन येईल परंतु यांमचे कदिमीस व

निष्ठेस एक प्रकारें दिसेल.' –रा १.३३५. 'आपल्या कदिमाईस बोल न लागे तो विचार करणें.' –रा ८.११९. [अर. किद्म=प्राचीनत्व; कदीम=प्राचीन; जुना; कदीमी=प्राचीन; फा. कदीमी]

कंदी—वि. कंदाच्या (मूळाच्या) रंगासारखा; धुळीच्या रंगाचा; भुरकट; पिंगट रंगाचें; उदी (वस्त्र, पागोटें). [सं. कंद=मूळ; कंदी=मुळाच्या रंगाचा; तुल० सं. कद्रु=पिंगट] **०पागोटें**–न. भुरकट रंगाचें, कंदी रंगाचें पागोटें. 'धुंद नेत्र पहा घाईंत गळ्यामधें आलें पागोटें कंदी।' –प्रला १८९. 'कंदी पागोटें, खादीचीं धोतरें ..... वगैरे वस्तूस उदार आश्रय देणें किती शक्य आहे ...' –आगर ३.९६. **०पेढा**–पु. एक प्रकारचा पेढा (साताऱ्याकडे रूढ).

कंदी—स्त्री. खाण; स्थान; सांठा. 'जे ज्ञानाची कंदी।' –परमा ११.५. [सं. कंधि=महासागर]

कंदी—क्रिवि. (कुण. माण. कों.) कधीं; केव्हां. [सं. कदा; तुल० लॅ. कांदो] **०मंदी**–क्रिवि. कधींमधीं; केव्हांकेव्हां.

कदीम-मी—वि. प्राचीन; पुरातन; जुनापुराणा; फारा दिवसांचा. (चाकर, वतन, धर्म, वहिवाट इ०). 'खेचुन वाडयाबाहेर काढलें कदीम शिपायाला।–ऐपो ३९८. 'पाटील कुळकर्णी शेटे महाजन कदीम हकदारी।' –पला ७०. [अर. कदीम–मी]

कदीमल् अय्याम—पुरातनकाळापासून. 'कदीमल्अय्याम सेणवी मजकूर याचे पिडी दर पिडी भोगवटा चालिला आहे.] –गोहसा १२. [अर. कदीमुल्अय्याम्]

कंदील—पु. १ हातांत धरून कोठेंहि नेण्यासारखा, वारा लागूं नये म्हणून ज्यास भोंवतीं कांच बसविलेली असते असा दिवा; फाणस. २ पितळेचा लामणदिवा; टांगता दिवा (वाणी लोकांच्या दुकानांत लावतात तो). [अर. कंदील; तुल० इं. कँडल्; (लॅ. कँडेर=प्रकाशणें, कँडेला)]

कंदुक—पु. चेंडू. 'नातरी उदकाचिये भूमिके। आफळिलेनि कंदुके।' –ज्ञा १७.२८०. 'हरि मुलांसह कंदुक खेळतो' –वामन–द्वारका विजय ३.२३. [सं.]

कंदुरी, कंदोरी—स्त्री. १ (कों.) गलबतासाठीं व इतर कामीं मोठे दोर तयार करण्यासाठीं बांधलेला लांबट सोपा–घर. २ गळ्यांत बांधावयाचा मंतरलेला दोरा. ३ करगोटा; कडदोरा. [का. कण्णी=दोर? गु. कंदोरो=कडदोरा; करगोटा]

कंदुरी, कंदोरी—स्त्री. १ पैगंबर महंमद याची मुलगी फातिमा हिच्या सन्मानार्थ मुसलमान लोक करतात तो भोजन समारंभ. २ (ल.) उत्सवाचें जेवण; भंडारा; समाराधना. 'कंदुरी सोहळा स्वानंदाचा.' –दावि ३५३. –ऐपो २६२. 'शेख सल्लाची करूं कंदुरी मशीरण बोलले.' –पया ५३. [फा. कंदूरी]

कंदुरी, कंदोरी—स्त्री. बकऱ्याचें मांस; साग्रुती; मांसाचा नैवेद्य. 'त्या कंदुरीचीं पुष्पें जालीं ते करामत देखोन।' –मब १०३. 'ते गांवचे पिराला बकऱ्याची कंदुरी करतात.' –गुजा ३१. [फा. कंदूरी]

कंदुरी—मेजावरील आस्तरण (तागाचें अथवा चामड्याचें). [फा. कंदूरी]

कंदुल—पु. कांचनाचें फूल; फुलाची एक जात; कंदल. 'कंदुलांचें हार तुटले। अशोकाचें झळबुकें गळलें।' –शिशु ७१७. [सं. कंदल]

कंदें—न. (कु. गो.) पसरट तोंडाचें मातीचें भांडें (पाणी ठेवण्याच्या उपयोगी). [अर. कदह्=पेला?]

कदेल, कदेलडाव, कदेलदान, कदेली, कदेलणें—कजेली व कजेलणें पहा.

कदेली—स्त्री केळीचें झाड; कदली पहा.

कंदोरी—पु १ कंजारी लोकांची जात. हे दोऱ्या करतात. २ कंदुरी पहा.

कद्दू—पु. (ना.) दुध्या भोपळा. [फा. कुदु–द्दू; प्रा. कदुइया; हिं. कद्दु] **०दाखविणें**–क्रि. (ना.) निराश करणें; अंगठा दाखविणें; वाटाण्याच्या अक्षता लावणें.

कद्धीं—क्रिवि. (वायकी) कधींहि; केव्हांहि; कोणत्याहि वेळीं; कदापि (नकारार्थी व निश्चयात्मक). (जोरानें ठासुन सांगतांना योजतात). [कधीं+हि]

कद्धीं, कत्धीं—क्रिवि. केव्हां केव्हां. 'कद्धीं ते उपवास निर्जळ करी कद्धीं करी पारणा।' –निमा सुमद्राचंपु ३.८४. [कधीं+कधीं]

कंद्या—पु. (कों.) कंदील; फाणस. कंदील पहा.

कद्रू—वि. कृपण; कंजूष; चिक्कू; कदर्यू. [सं. कदर्य]

कंधर, कंधरा—पुस्त्री. मस्तक; शिर; कंठ; मान; गळा. 'कंधरीं घातली ज्यानें त्यानें.' –वामन, उपदेशमाला १.६३. [सं.]

कधीं—क्रिवि. १ कोणत्या दिवशीं? केव्हां? केव्हां पहा. २ कोणत्याहि वेळीं; केव्हांहि; नेहमीं. [वै. कर्हि; सं. कदा] **०कधीं, ०मधीं**–क्रिवि. केव्हां केव्हां; मधून मधून; एखाद्यावेळीं. [सं. कदा द्वि] **०काळीं**–क्रिवि. कदाकाळीं; केव्हां तरी; कोणत्या तरी वेळीं; किती तरी दिवसांमागें; फार दिवसांनीं; क्वचित् प्रसंगीं. **०च**–क्रिवि. १ पुष्कळ दिवसांपूर्वी; पुष्कळ काळापूर्वी; फार मागें. २ केव्हांहि; कद्धीं (नकारार्थी प्रयोग). **०चा**–वि. १ पूर्वीच्या काळचा; प्राचीन काळचा; फार मागचा. २ केव्हांचा? कोणत्या वेळचा–दिवसाचा? ३ केव्हांपासून, फार वेळापासुन. 'मी कधींचा आपली वाट पहात आहें.' **०तरी**–क्रिवि.

कोणत्या तरी, या नाहींत्या वेळीं; केव्हांतरी. **०नवत-नव्हत**–क्रिवि. पूर्वी कधीं घडलें नसतां; फार क्वचित् प्रसंगीं; क्वचित्; अपवादात्मक; कधींकाळीं. [कधीं+न+होणें] **०न होतेला-नव्हतेला**–वि. पूर्वी कधींच नसणारा; अति क्वचित् घडलेला; अविद्यमानपूर्व. [कधीं+नवत (न+होत)] **०वधीं, ०मधीं, ०ना कधीं, ०नाहीं कधीं ०तरी**–क्रिवि. १ केव्हां केव्हां; प्रसंगोपात्त; अधून मधून; अनियमितपणें. 'देशावर पाऊस इकडल्यासारखा पडत नाहीं, कधीं बधीं पडतो.' २ विरळा; क्वचित्. [कधीं द्वि.] **०शीक,– ०सक-साक**–क्रिवि. (कुण) केव्हांसा ?; कोणत्या वेळेसा ? (प्रश्नार्थक व नकारार्थी).

कंधूर—न. (माण.) हरळीसारखें एक गवत; कुंदा. [सं. कंदल=नवा अंकुर; कंधर=तांदुळजा]

कन, कन्—अ. सर्व अनुकरणवाचक शब्दांना लागणारें अव्यय. जसें:–झट्कन; पट्कन; चट्कन. 'झटकन निघून जा.' [सं. क्षण्]

कन—(खा.) १ कडून; पासून; मुळें (तृतीया विभक्तीचा प्रत्यय) जसें:–'मनाकन काम व्हनार नाहीं.' 'गेल्या वर्षी मेघराजाकन कपाशीचें येक बोंडुस बी भेटलें नाहीं. [कडून] २ जवळ; समीप; निकट. [तुल० गु. हिं. सिं. कने=जवळ, समीप]

कनक—पु. धोतरा नांवाची वनस्पति. 'कनकाचिया फळा। आंतु माज बाहेरी मौळा।' –ज्ञा १८.६५८. 'कनक झाड म्हुण वंदियेलें माथां। परि तेंहि अर्था न मिळे माजी।' –तुगा २९३८. [सं.]

कनक—न. सोनें. एक मौल्यवान पिंवळी धातु. याचे दागिने करतात. 'लोहाचें कनक होये।' –ज्ञा १.७७. कनकासवें जैशी कांति। कीं सूर्यासवें जैसी दीप्ति।' –एरुस्व १.११. –वि. पिवळें; पिवळ्या रंगाचें; जरतारी (वस्त्र वगैरे). 'स्ववदनें वदिजे कनकांबरें।' –वामन, हरिविलास ६.१९. [सं.] **०कीट**–पु. काजवा. 'कनक कीट तो सवै मी रवी। म्हणुनियां तमीं गवै मीरवी' –वामन, विराट ७.१३७. [सं.] **०चंपक**–पु. सोनचाफा. 'तो कनकचंपकाचा कळा।' –ज्ञा ६.२५७. [सं.] **०तार**–न. सोन्याची बारीक तार. जीग व सलमा यांचें विणकाम. **०दंड**–पु. १ सुवर्णदंड (भालदाराचा). २ रवी प्रमाणें एक हत्यार. **०नारायण**–पु. अति श्रीमान् मनुष्य.

कनक—पु. एक कंद, कणगर पहा.

कनक, कन्नक—वि. (व.) कणखर; टणक; कठिण. 'कनक माणूस होता म्हणून टिकला.' [ध्व.]

कनकनीत—वि. कणकणीत; कणयुक्त; कणांचें (?). 'ते घडौनि अरुवारू। कनकनीतु उभिलें सेजारूं। तेथ विरहोज्वरां उपज्यारू। मानिती ना।' –शिशु ७९८. [कणकण]

कनकफळ—न. १ धोतऱ्याचें फळ. 'फणस टाकूनी रसाळ। प्रीतीनें घेतलें कनकफळ।' २ जमालगोटा; जयपाळ. [सं.]

कनका-खा—पु. १ तापट स्वभाव; कडकपणा; जलालपणा (प्रकृतीचा). 'याच्या कनक्याखालीं कोण टिकेल बरें ? २ कडका; कडाका; जोर; कचका (थंडी, वारा, पाऊस वगैरेचा) (क्रि० पडणें; सुटणें; चालणें.) ३ (व.) दणका, धक्का; ठोसा; बुक्का. [ध्व.]

कनकबीज—न. धोतऱ्याचें बी. 'तेथें कनकबीज पेरिलें।' –रावि १.१३६.

कनकाचल, कनकाद्रि—पु. सोन्याचा पर्वत;सुमेरु;हेमाद्रि; पर्वत. 'कनकाद्रीचा चेंडू करून' –रावि १.६१. 'कीं कनकाद्रि भोंवतीं पाळी। कुलाचलाची विराजित।' [सं. कनक.=सोनें+अचल, अद्रि=पर्वत]

कनकाडया—वि. (राजा.) उंचाड; अति उंच व काटकुळा; लांबटांगया (मनुष्य). [कण+काडी]

कनकांबर—पु. पीतांबर; पिवळें वस्त्र. सोनेरी जरीचें वस्त्र. 'गौळिणी नेसल्या कनकांबरें।' –ह ४.३२. [सं. कनक+अंबर]

कनकावळा—पु. १ (कावळ्यासारखा किंवा पक्ष्यासारखा उडणारा) पतंगाचा, वावडीचा एक प्रकार. [हिं. कन–कौवा=पतंगाचा एक प्रकार; हिं. कन्ना=जेथें दोरा बांधतात तो पतंगाचा भाग+कावळा] २ कागदाच्या नळकांडींत दारू भरून केलेला. दारूचा बाण. ३ लगोऱ्यांच्या उतरंडीवरील शेवटची कोंचदार लगोरी.

कनगरें—न. (व) धान्य सांठविण्याचा तुराटयांचा मोठा केलेला कणगा, जेंत. [कणगा, कणगर]

कनथोडा—पु. (भि.) भिल्लांचा घर फोडण्याचा मोठा लोखंडी खिळा. –गुजा २९. [का. कन्न=चोरांनीं भितीला पाडलेलें भगदाड, फट+हातोडा]

कॅनन—पु. १ ख्रिस्ती धर्मसभेचा ठराव. २ पवित्र शास्त्रांतर्गत प्रमाणभूत पुस्तकें. ३ इंग्लंडीय चर्चच्या आचार्यांस दिलेली एक पदवी. ४ विशपाच्या उपासनामंदिरांत राहून रोजची उपासना चालविणारा आणि गायकवर्गास शिकविणारा आचार्य. 'कॅनन सेल यांनीं कुराणाचें इंग्रजींत भाषांतर केलें.' [इं. ग्री. कॅनोन=नियम, (मूळ कॅन्ना, कॅने=छडी)]

कनपटणें, कनपटींत देणें—सक्रि. (व. ना.) कानशिलांत मारणें; कानफटींत देणें. [सं. कर्ण+पट; म. कान+फट; हिं. कनपटी=आंख]

कनपटणें—अक्रि. (व.) आजारी होणें, पडणें; बीमार पडणें.

कन(कान)पट्टी—स्त्री. (मल्लविद्या) जोडीदाराच्या हाताचा पंजा धरून तो झटक्यानें ढकलून देऊन आपल्या हाताच्या तळव्याला किंचित् खड्डा करून जोडीदाराच्या कानाच्या भोंकावर मारतात तो डाव. [कान+फट]

कनभानिन—न. (शाप.) एक रासायनिक द्रव्य; उदिल अमिदिनाचे स्फटिक उष्ण केले म्हणजे ते पृथक् होऊन अम्न आणि कनभानिन तयार होतात. (इं.) सायन फेनाइन.

कनला—अ. (बा.) कशाला ?

कनव—स्त्री. १ करुणा; दया; कणव पहा. २ दयेविषयीं प्रार्थना; काकुळती; कन्हव पहा.

कनवट—स्त्री. कणवट; कडोसरी, कणवट पहा. ' कडोसरीला नसला तरी कनवटीला खास आहे. ' –तोबं १४. २ कनवटीला होणारा खरजेसारखा रोग.

कनवळ, कनवळा, कनवाळा, कनवाळु, कनुघाळ— कन्हवळा–वाळू पहा.

कॅनवास, कॅनव्हस—न. १ कितान; एक तऱ्हेचें जाड कडक कापड; शर्ट वगैरे कपडयांच्या छात्यांगास कडकपणा येण्यास व टोप्या, बूट वगैरेत घालण्याकडे उपयोग करतात. ' कॅनव्हस कापतांना तें शिवणीची माया सोडून कापलें असल्यास चूक येण्याचा संभव आहे !–काप्र १२. २ खळ लावलेलें गोणपाट; यार्ची शिडें, बूट इ० करतात. ३ एका तऱ्हेचें जाळीदार कापड; यावर नक्षीचें भरतकाम करतात. ४ एक तऱ्हेचें जाड कापड हें तैलचित्रांकरितां वापरतात. [इं.]

कॅनव्हसिंग—न. १ मालास गिऱ्हाईक मिळवणें; माल खपविणें. २ प्रसार करणें; सहानुभूति, मदत मिळवणें; मतें मिळविणें. [इं.]

कनशा—वि. कणशा पहा.

कनहसलि—पु. घोडयाच्या अंगावरील एक भोंवरा. हा कानापासून निघून मानेवर गेला असल्यास चांगला व मानेपासून कानाकडे गेला असल्यास वाईट. –अश्वप १.१०२. [कानसल ?]

कना—पु. कणा पहा.

कना—पु. १ (व.) पाय असलेली सापाची एक जात. २ (व.) डेळी(दुबेळकें)च्या दोन टोकांपैकीं एक. [हिं. कन्ना]

कनागरा—पु. (व.) (बैलगाडी) दाबखुंटा; एकंदर दाबखुंटे तीन असतात, पैकीं मधल्यास दाबखुंटा म्हणतात, बाजूच्या दोन खिळयांना कनागरे असें नांव आहे.

कनात—स्त्री. १ खस्ता; त्रास; कष्ट (द्वाड मनुष्याच्या चाकरींतील). २ तुसडेपणा किंवा वाईट वागणूक सहन करणें. (आजारी किंवा छांदिष्ट मनुष्याची), (क्रि० काढणें; सोसणें). [अर. कनाअत=समाधान]

कनात-थ—स्त्री. तंबू, डेरा यांची कापडी भिंत; किंवा त्यांच्या भोंवतालचा कापडी पडदा. ' शिबिर कनाथ पडप थोर। ' –नव १६.२४. [अर. कनात्]

कनांदणें—अक्रि. (राजा.) व्याकूळ होणें; हाल होणें; मट्ट्यास येणें; पेंचांत सांपडणें (दारिद्र्य, देणें वगैरेमुळें). [सं. कु+नंद्; म. नांदणें]

कनानी—स्त्री. (व.) तापाची कसर; शिरशिरी; अंग मोडून येणें. ' तापाची कनानी येते. ' [कणकण]

कनारो—पु. (कु.) एक कंद व फळ; करांदा पहा.

कॅनाल—पु. कालवा; पाट; पन्हळ (पाण्याचा.) ' मुठाकॅनाल. '; ' आज कॅनालला पाणी नाहीं. ? ' [इं.]

कनाळ—(व.) शेतांतील पिकाच्या तासांतील प्रत्येक झाडामधील अंतर, जागा. [?]

कनाळी—स्त्री. कणाळी पहा.

कनिद—न. (रसायन, शाप.) (इं.) सायनाइड. नत्र आणि कर्ब यांपासून तयार झालेलें जें सायनोजन द्रव्य त्यापासून हें रासायनिक मिश्रण बनलें आहे.

कनिष्ठ—वि. १ सर्वांत धाकटा; लहान; वयानें कमी. २ कमी योग्यतेचा; कमी प्रतीचा; हलक्या दर्जाचा (गुणानें). ' विरक्ति न व्हावें कनिष्ठ। पराधेनपणें। ' –दा २.९.२७. ३ अगदीं खालचा;कमी;तिसऱ्या प्रतीचा; शेवटचा (उत्तम, मध्यम, कनिष्ठ या तीन प्रतींपैकीं). 'येती तुझिया भजना आड। दाविती प्रपंचाचें कोड। कनिष्ठीं रुचि ठेवूनी गोड। ' –तुगा ७३४. ४ अल्प; थोडा; लहान. –पु. (लय) (संगीत) द्रुतलय पहा. **०पक्ष**—पु. उत्तम, मध्यम याच्या खालचा पक्ष; कमींत कमी प्रमाण, स्थिति, अनुक्रम. –क्रिवि. कमींत कमी; किमान पक्षीं; नाहीं म्हटलें तरी. ' याचे लग्नाला कनिष्ठपक्ष शंभर रुपये लागतील. ' [सं.]

कनिष्ठिका—स्त्री. करंगळी [सं.]

कनी, किनी, किनई—अ. (बायकी), (लडिवाळपणें बोलतांना वाक्यांत केवळ अर्थपूरणार्थ). कीं नाहीं (संक्षेप). ' सरू आक्का कनी गर्भार आहे. ! '; ' तिला किनी आण्णा, तो नवराच पसंत नाहीं म्हणे ! ' –झांमू.

कनी खाणें—क्रि. (व.) कच खाणें; हिंमत सोडणें; धीर सुटणें. ' तेव्हांपासून कनी खाल्ली आपण. ' [कण ?]

कनीनिका—स्त्री. डोळ्यांतील बाहुली. [सं. ऐ. ब्रा. २४. ३,२२]

कनुधार—स्त्री. पिचकारींतून उडणारी पाण्याची बारीक धार. ' अवो दुजी कनुधार लागती। तरी पाणिअे वाति पाजळति। जलकेळी होती। निकी कीरूं। ' –शिशु ६७५. [सं. कन, कण+धारा]

कनेकड—न. रहाटाचा आंस; कणेकड पहा. 'राहाटाला यंदा नवें कनेकड घेतलें पाहिजे.'

कनोजा, कन्होजा—पु. कनोज (अंतर्वेदी) देशांतील ब्राह्मण; कनोजी ब्राह्मणांची जात. (हिं.) कनौजिया. 'वऱ्हाडास येती कनोजे विदेशी।' –सारुह ६.४१. [सं. कान्यकुब्ज]

कनोजी—वि. कनोजसंबंधी; कनोजचें (अत्तर, इ०).

कनोशी—एका जातीचा मासा.

कन्ना—पु. (ना.) पतंग समतोल उडण्याकरितां पतंगाच्या कमानदार कामटींत खोंचलेली लहान चिंधी; कणू पहा. [हिं. कन्ना=जेथें दोरा बांधतात तो पतंगाचा भाग] **०काटणें**–प्रसंग निभावून नेणें, टाळणें.

कन्ना, कन्नाकाळ—क्रिवि. (गो.) केव्हां; केव्हांशा.

कन्नमेरें, कानमात्रें—वि. (गो.) ऐकलें न ऐकलें करणारें; दुर्लक्ष करणारें. [कान+बधिर]

कन्यका—स्त्री. कन्या; मुलगी; कुमारी. [सं.]

कन्या—स्त्री. १ कन्यका; कुमारी; आठ वर्षांची मुलगी; (सामा.) पुत्री; मुलगी. 'कन्या सासुरासी जाये। मागें परतोनि पाहे।'–तुगा ८४३. २ (ज्यो.) बारा राशींपैकीं सहावी रास; कन्यारास. ३ (रामदासी) शिष्यीण. 'इतरां कन्येसी समेसी कीर्तन आज्ञा नाहीं।' –सप्र २०.३१. **०इत्यर्थ**–पु. वधूनिश्चिति; मुलगी ठरविणें. 'कन्या इत्यर्थु करऊन संभ्रमें' –दावि ३३. **०कुमारी**–स्त्री. १ दुर्गा; पार्वती; गौरी. २ हिंदुस्थानचें दक्षिण टोंक, भूशिर; केपकामोरिन (हा अपभ्रंश आहे). **०गत**–पु.न. कन्याराशीस गुरु येतो तो काल; हा काल सुमारें तेरा महिने असतो. हा सिंहस्थानंतर येतो. हा फार शुभ समजतात. सिंहस्थांत राहिलेलीं विवाहादि कार्यें यांत करतात. या कालांत भागीरथी नदी कृष्णा नदीस भेटावयास येते अशी समजूत आहे. कृष्णातीरावरील क्षेत्रांतून(उ० वांई इ०) कन्यागतचें माहात्म्य पाळण्यांत येतें.–न. हुंडा. **०ग्रहण**–न. विवाहांतील कन्येचें पाणिग्रहण. [सं.] **०दान-प्रदान**–न. वधूच्या मातापितरांनीं वरास करावयाचें कन्येचें विधियुक्त समर्पण; विवाहसंस्कारांतील एक विधि. सर्व दानांमध्यें हें श्रेष्ठ मानितात. 'कन्यादान करी अश्वपति।'–वसा ५०. 'पुनर्विवाहांत कन्यादान करून पंक्तिप्रसादाची चुकवाचुकवी करण्यास फारशी अडचण येत नाहीं.' –टि ४.११३. **०दूषण**–न. कौमार्यभंग; कुमारिकेवर हात टाकणें; बलात्कार करणें. [सं.] **०दोष**–पु. कुमारिकेच्या अंगीं असलेला उणेपणा, एखादें व्यंग किंवा रोग. [सं.] **०धन**–न. उलट हुंडा; वधूच्या बापानें विवाहप्रसंगीं वराकडून घेतलेलें द्रव्य; शुल्क; आंदण. [सं.] **०निरीक्षण**–न. ज्या कुमारिकेशीं लग्न लावावयाचें तिचें शहाणपण, तिचे गुण, वगैरे पाहण्याची क्रिया; विवाहांत वाङ्निश्चयाचे वेळीं हा विधि होत असतो. [सं.] **०पुत्र**–पु. कुमारिकेस कौमार्यावस्थेंत झालेला मुलगा; कानीन. [सं.] **०भाव**–पु. कुंवारपण; कौमार्य. 'प्रसवें कन्याभाव न मळला पळ लागलें न सुटकेला।' –मोआदि ८.४१. [सं.] **०रत्न**–न. (गौरवार्थी) कन्या; पुत्री. 'कन्यारत्नं प्रासूत, असें मुलीच्या कुंडलींत लिहितात.' 'बाळंतीण होऊन कन्यारत्न झालें' **०रास**–स्त्री. बारा राशींपैकीं सहावी राशि. कन्या अर्थ २ पहा. –वि. १ (मुलींतील) षंढ; नपुंसक (मनुष्य). २ (बायकी) दुर्बल; भागूबाई. **०शुल्क**–न. कन्याधन पहा. [सं.] **०हरण**–न. विवाहास योग्य अशा मुलीस बलात्कारानें पळवून नेणें. [सं.]

कन्याळ—स्त्री. केळीची एक जात. कणेरी केळ पहा.

कन्याळें—न. कन्याळ जातीचें केळें.

कन्हणें—अक्रि. कुंथणें; विवळणें; कण्हणें. **म्ह०** 'कन्हतो कुंथतो मलिंद्याला उठतो, किंवा कामाला मरतो.' (आळशी व खादाड मनुष्याबद्दल योजतात). [सं. कण्=दुःखाचा शब्द, आवाज काढणें; कणन]

कन्हव—स्त्री. प्रार्थना; दयेची याचना; विनवणी; काकवृत. 'पारख्याची करावी कन्हव' [कण+रव]

कन्हवळणें—अक्रि. कळवळणें; करुणा येणें; दयार्द्र होणें.

कन्हवळा-वाळा, कनोळा—पु. कळवळा; अनुकंपा; दयेचा उमाळा, पाझर. (क्रि० येणें.) [कन्हणें+वळणें]

कन्हवाळू—वि. मायाळू; ममताळू; प्रेम, दया करणारा.

कन्हाटणें—अक्रि. (व.) अत्यंत मलिन होणें; खराब होणें. 'हा परकर कन्हाटून गेला.'

कन्हारणें—उक्रि. १ लचकणें; अवघडणें (अंग, शरीरावयव). २ तिडीक निघणें; शिणका येणें; कांटा येणें (दुखणें, आल्यानें दाताखालीं खडा सांपडून किंवा शरीरावर ताण पडून वगैरे). ३ दुखविणें; कष्टविणें; त्रास देणें; जबर करणें(दाबामुळें, संकोचल्यामुळें अंग, अवयव) 'फुलांचेनि भारें ए मृणालेचे आंगु कन्हारें' –शिशु ६८८. [सं. कण्=शब्द करणें]

कन्हारी-कन्हेरी—स्त्री. १ कण्ह; विवळ; कण्हण्याची क्रिया; किरकीर (हा शब्द बहुधा अनेकवचनीं कन्हाऱ्या, कन्हेऱ्या या रूपांत येतो). (क्रि० करणें) **नावानें कन्हारी गाणें**–क्रि. एखाद्याबद्दल तक्रार करणें; रडगाणें गाणें.

कन्हावणें—अक्रि. (व.) कण्हणें; कुंथणें; विवळणें.

कन्हाळ—न. (चांभारी) जुनी मोट सोंडेला फाटल्यावर तिच्या दोन्ही बाजूंस शिवलेलें नवीन कातडें. [सं. कर्ण+आलि]

कन्हे—न. कण्ह; विवळ. (क्रि० चालणें; होणें; करणें).

कन्हेर—कण्हेर पहा.

कन्हैया, कन्हया—पु. (हिं.) कृष्ण. –वि. (ल.) (कृष्णलीलेवरून) खेळाड्या; शोकीन; रंगेल; क्रीडासक्त. 'कन्हया

माधवराव फुलांचा झेला।' –ऐपो २५२. [सं. कृष्ण; प्रा. कण्ह; हिं. कन्ह]

कप—पु. (कों.) १ सुरमाड किंवा भेरला नांवाच्या नारळी-सारख्या झाडाच्या अंगास येणारा कापसासारखा बुरा; झाडांच्या सोपांत असणारी मऊ लोंकर; याचा उपयोग रक्तस्राव बंद करण्याकडे, व विस्तव पेटविण्याकडे करतात; कापूस. कर्नाटकांत चिलीम पेटविण्यासाठीं याचा उपयोग करतात. 'कपाचें नळकंडे बाहेर काढलें आणि ठिणगी काढण्यासाठीं पोलाद आणि गार काढली.' –कोरकि २९५. **०तयार करणें**–(माण.) चकमकीनें विस्तव पाडण्यासाठीं सुरमाडाचा, पाणसराच्या कणसाचा किंवा शेवरीचा कापूस तयार करणें. [सं. कार्पास; प्रा. कप्पास; हिं. कपास]

कप—पु. १ पेला; चहा पिण्याचें पात्र. 'सुशीलेनें चहाची केटली आणली होती ती हातांत घेऊन कपांत चहा ओतण्यापूर्वी त्याच्याकडे पाहून विचारलें ...' –सुदे ११०. २ पेलाभर पातळ पदार्थ. (दूध, चहा इ०) 'सिंगल कप,' 'डबल कप' **०बशी**–चहाचा पेला व तो ठेवावयाची ताटली. 'आमचीं मातापितें मूल जन्मलें कीं त्याच्या तोंडांत कपबशा खुपसतात.' [इं. कप]

कप—पु. शर्टच्या अस्तनीच्या शेवटास असलेली पट्टी. [इं. कफ; तुल० अर. कफ=हात]

कप—स्त्री. (यंत्र) (इं.) कॅप. टोपी; झांकण; सायकलच्या चाकांतील ट्यूबमध्यें हवा भरावयाच्या नळीवरील टोपण, किंवा ॲक्सल वगैरेवरील झांकण; सायकल, मोटार, तांगा, वगैरेच्या चाकाच्या तुंब्यावरील टोपण. [इं. कॅप.]

कप—स्त्री. नदीचा किंवा विहिरीचा आंत गेलेला भाग; कपी. दरड; कपार पहा. [सं. कल्प; प्रा. कप्प=विवर, गुहा; का. कप्पु=जमिनींतील खड्डा, बीळ]

कॅप—न. (गो.) (एखाद्या पदार्थावर मळ, कीट सांचून झालेली) खपली; कपची; कपचा पहा.

कॅप—स्त्री. १ डोक्यास घालावयाची टोपी; बसकी टोपी. २ टोपण; झांकण. [इं. कॅप]

कंप—पु. १ थरकांप; कांपरें; हलणें; थरथरणें; वात, भय इ०कानीं शरीर, वृक्ष, इ०कांस जें चलन मिळतें तें. 'मस्तक आदरी शिरो–। भार्गी कंप।' –ज्ञा १३.७५६. २ (ल.) धाक; दहशत; भीति. 'आजि जयाचा अहा कंपु। तापसांसी॥' –ज्ञा १८.१०५७. ३ (संगीत) गातांना कंठांतून निघणारा कांपरा आवाज, तान. [सं.]

कँप—पु. १ छावणी; तळ; गोट (सैन्याचा). काप. २ यूरोपियन वस्तीचें ठिकाण (शहराजवळील); लष्कर. [इं.]

कपचा-ची—पुस्त्री. १ (कों.) कपरी; दगडाचा निघालेला–उडालेला तुकडा; भिंगाचा तुकडा; (सामा.) पदार्थाच्या अंगचा निघालेला तुकडा; चीप. २ खपली; कवची; वाहेरचें आवरण (खरूज, फोड, वगैरवरील). ३ (वास्तु.) चीप; पातळ, सपाट दगडाचा तुकडा; फाशी. 'दगडाच्या पोकळ जागेंत चुना घालून त्यांत कपच्या ठोकून बसवाव्या.' –मॅरट ३०. **कपची झड**–स्त्री. (मूर्तिशिल्प) मूर्ति घडतांना वाया गेलेला दगड. [सं. कवच]

कपट—न. १ छद्म; लबाडी; लुच्चेगिरी; ढोंग; कावा. २ खोटेपणा; असत्यता. ३ मत्सर; हेवा; कृत्रिम भाव; द्वेष-बुद्धि. ४ (कायदा) फसवणूक; भुलथाप; फसविण्याच्या इरादानें केलेलें कृत्य. **०कुभाव**–पु. मत्सर आणि दुष्टबुद्धि; वाईट वासना; द्वेष. **०नाटक**–न. कपटी व्यूह, योजना; कपटीपणाचा खेळ. 'कलह नाटक कपट नाटकापेक्षां पुष्कळ बरं!' –कृयु ११. **०निंदा**–स्त्री. व्याजनिंदा; गर्भित स्तुति; बाहेरून निंदा पण खरी स्तुति. याच्या उलट कपटस्तुति. **०पाश-फांसा**–पु. १ इच्छित दान पडावें म्हणून मंत्रादि विद्येनें बनविलेला खेळाचा फांसा; लबाडीचे फांसे. 'तरी पांडव जिंकावया बळ। एकयुक्ति आहे सबळ। तरी कपटपाश केवळ। वश मज असती।' –पांप्र २०.६१. २ फसविण्याकरितां केलेली घटना; कट; गुप्त मसलत. **०बाब**–स्त्री. (कायदा) मत्सरानें किंवा दुष्टपणानें उत्पन्न केलेला निराधार खटला; खोटा खटला. **०मूर्ति**–वि. अति लुच्चा, लबाड मनुष्य; कपटाचा मूर्तिमंत पुतळा. **०युद्ध**–न. १ गनिमी काव्यानें चाल-विलेली लढाई; छद्मी लढाई. २ गनीमिकावा; युद्धाचे कपटी डावपेच. **०रूप**–न. खोटे रूप; लबाडीचा वेष; छद्मवेष; ढोंगी रूप. **०विद्या**–स्त्री. लुच्चेगिरीचे डावपेच; ठकबाजी; कावा; खोटीं कृत्यें आचरणें. **०वेष**–पु छद्मवेष; स्वतःचें रूप पालटून घेतलेला अन्य वेष; सोंग. –वि. सोंग घेतलेला; रूप पालटलेला. **०सिंधु**–१ (गणित) गुणाकाराची एक पद्धत; गुणकाच्या पहिल्या आंकड्यानें गुण्यास गुणून आलेल्या गुणाकारांत गुणकाच्या राहिलेल्या आंकड्यांचा गुणाकार मनांतल्यामनांतच मिळवून एकदम गुणाकार मांडणें. गुणाकार पहा. २ फार कपटी मनुष्य; अतिशय लबाड, खोटा, घातकी मनुष्य. **०स्तुति**–स्त्री. व्याजस्तुति; वाह्यतः स्तुति पण आंतून निंदा; व्याजनिंदा; याच्या उलट कपटनिंदा.

कपटराव—पु. (गो.) गालगुट.

कपटा—पु. तुकडा (केळीचें पान, कागद, दगड, लांकूड वगैरेचा) [सं. कूप; प्रा. कप्प=कापणें?]

कपटाई—स्त्री. १ लुच्चेगिरी; ठकबाजी; कपटीपणा. २ मत्सर; द्वेष; हेकेखोरपणा. 'तुमचे मनीं कपटाई म्हणोन तीनदां मजवर रुसता, जाऊन घरीं बसता' –होला १२४. [कपट]

कपटी—वि. १ ढोंगी; खोटा; लुच्चा; गळेकापू. 'कपटी पूर्ण दुरात्मा।' २ हेकेखोर; मत्सरी; कपटानें वागणारा. [कपट]

कपट्या—पु. (हेटकरी) द्यूतूचा खेळ. ? खेळतांना तोंडानें म्हणावयाच्या कपट्टी, कवट्टी वगैरे शब्दावरून [ध्व]

कपडछान—वि. (हिं.) वस्त्रगाळ. (क्रि० करणें). –शे १०.४८. [कपडा+छाननें]

कपडलेप—पु. कुपी, वाटली, वरणी, मडकें वगैरेंत कांहीं औषधें घालून त्यांची भट्टी लावण्यासाठीं तें भांडें व त्यावरील झांकण याच्या भोंवतीं मातीनें भरलेल्या ओल्या कापडाचा द्यावयाचा लपेट, लेप. [कापड+लेप]

कपडा—पु. कापड; वस्त्र; चिरगूट; प्रावरण. [सं. कर्पट; प्रा. कप्पड; सिं. कपिडो] **०लत्ता**–पु. कापडचोपड; वस्त्रप्रावरण; पोषाखाचे सर्व प्रकारचे कपडे. [कपडा+फा लत्ता, म. लक्तर= चिंधी] **कपडे करणें**–१ कपडे अंगांत घालणें; पोषाख करणें. 'चंद्रशेखरानें कपडे केले'–निचं ५३. २ नवे कपडे शिवणें, शिवावयास देणें. 'परवांच मी त्यास कपडे केले.'

कंपण, कंपणकांटा—पु. (सोनें, मोतीं वगैरे). सूक्ष्म पदार्थांचें तंतोतत वजन दाखविणारा ताजवा [सं. कंप+कांटा] २ (सोनारी) पेटीच्या मध्यावर उभा लोखंडी दांडा बसवून त्यावर पेलणारा (भारधडीच्या कामाचा) मोठा ताजवा.

कंपणें—अक्रि. (प्र.) कांपणें; थरथरणें; लटलटणें (भीति वगैरेमुळें); कापणें पहा. [सं. कंपू, कंपन]

कपर्दी—स्त्री. (कों.) खपरडी; वेडेंवांकडें बीळ; खोल व पोकळ जागा; दरी; गुहा: विवर; कपार; खोल, एकांताची जागा. [कु+पदर; सं. द्र–दारय; तुलo गु पाद्रा ?]

कःपदार्थ—उद्गा. (तिरस्कारार्थी) त्याची काय किंमत–काय योग्यता ? ; तुच्छतादर्शक प्रयोग. [सं.] –वि. तुच्छ; क्षुद्र.

कंपन—न. कांपरें; कांपणें; थरथरणें; लटलटणें; हालणें (भीतीनें, क्रोधातिशयानें) [सं.] **०अधर**–(नृत्य) ओठ कांपविणें. हा अभिनय रागावणें, थंडी वाजणें, रोगग्रस्तता दाखविणें, भीति वाटणें व जयप्राप्ति इत्यादिकांचा द्योतक असतो. **०ऊरु**–न. (नृत्य) पाय वारवार उद्धटित करून मांडीला कंप उत्पन्न करणें; चालण्याची क्रिया दाखविणें झाल्यास हा अभिनय करतात.

कंपनी—स्त्री. १ मंडळी; टोळी; संघ; मंडळ. २ लष्करी शिपायांची एक तुकडी (१०० ते २०० पर्यंत शिपायांची). ३ व्यापारधंदा करण्यासाठीं कायघानें एकत्र झालेली मंडळी; कुंपनी. 'समाईक भांडवलाच्या कंपन्या', 'लिमिटेड कंपनी.' [इं.]

कंपमान, कंपायमान—वि. थरथरणारा; लटलटणारा; कापणारा; हलणारा. [सं.]

कपर—स्त्रीन. (कों.) कपरी; दगडाचा फोडलेला लहान तुकडा; कपचा. कपरा पहा. 'लागाला कसुं घालण्यासाठीं मला हजार कपरें पाहिजे आहेत.' [सं. कूप]

कपरथूल-ळ—पु. (हिं.) जाळीदार व मलमलीसारखें पातळ कापड. [कपडा+ ?]

कपरा-री—पुस्त्री. चीप; दगडाचा तुकडा; कपचा–ची पहा. कपरी (लहान कपरा) हें कप-यांचें लघुत्वदर्शक रूप आहे. (क्रि० निघणें; जाणें; उडणें). –शिल्पवि ५८३. [सं. कूप ; प्रा. दे. कप्परिअ=विदारलेलें, चिरलेलें]

कपरेदार दगड—पु बारीक मातीच्या गाळाचे थर, एकावर एक बसून झालेला दगड. –भू २५. [कपरा+दगड]

कपर्दक, कपर्दिका, कपर्दीक—पुस्त्रीपु. कवडी. हिचा नाण्याप्रमाणें उपयोग होत असे. 'कपर्दीक हो प्राप्त होतां न दीसे। बहु आपुल्या प्राक्तनालागि रूसे।' –केचैसुच १५. [सं.]

कपॅल—न. (गो.) लहान चवे, इगजे. [पो. कापेला; इं. चॅपेल]

कंपवायु—पु. कंपवात; ज्याच्यामुळें अंग कापतें असा वात; एक रोग. खंजवायु. [सं.]

कपळ—न. (गो.) कपाळ. ? **कपळाच्यो किडी**=मद, भ्रम.

कपळा—पु. मोठा कपचा, कपरा; दगडाचा, लांकडाचा किंवा गिलाव्याचा सुदून पडलेला मोठा तुकडा; भेतळा पहा. –शिल्पवि ५५. [कपरा]

कपा—पु. १ कप्पा; मगी; मणका. [इं.] पुली. २ (कों. हेटकरी) (नाविक) मोठी कप्पी, पुली; यास पांच–सहा गाळे असतात. कपी पहा.

कपा—पु. १ कपरा; तुकडा (कोणत्याहि पदार्थाचा) २ ठिगळ.

कपा—पु. १ बटवा किंवा पिशवी यांचें पुढ. २ पेटीचा खण–घर. [सं. कल्प ?]

कपॉ—पु (गो.) मासळीचा तुकडा. [का. कप्पु=मांस]

कॅपॉ—वि. (गो.) बहिरा.

कंपाउंडर—पु. औषध तयार करून देणारा; डॉक्टराचा नोकर. [इं.]

कंपाझिटर—पु छापण्याचे खिळे (टाईप) जुळणारा; जुळारी. [इं.]

कपाट—न. १ कबाड; दार; दरवाजा; दरवाजाची फळी; खिडकीची झडप. 'येथ आड मज न साहावे बारा। देऊनि कपाट आलें तें दुसरें बारा वो।' –तुगा १२६. 'म्हणे तो तिते जागिजे द्वारपाळीं। कपाटें हढें दुष्ट मोठें कपाळी॥' –देप–कृष्णजन्म ५१. २ गुहा; दरी. 'कीं धर्मगिरीचे कपाटा। विवेक

सिंहाचा दरकुटा।' –ऋ ३६३. 'त्या तुझिया प्राप्तीलागीं। कपाटें सदां सेविती योगी।' –एभा ५.१६. [सं.] ०देणें–दार लावणें. 'आलें लेखुनी ब्रह्मगिरी कपाटें। तों पार्वतीनें दीधलीं कपाटें।' –उमाविलास ९. 'रात्रीं दृढ कपाटें दडेनी।' –ह ७.६५. [सं.]

कपाट––न. फडताळ; उभी खणांची पेटी. हा शब्द इं. कप्बोर्डला प्रतिशब्द म्हणून गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत आला. १८५७ च्या मोलस्वर्थ कोशांत हा नाहीं. [सं. कपाट]

कपात, कप्पा––नपु. खजूर ठेवण्याकरितां शिंदीच्या पार्तीचा केलेला करंडा. 'खारकेंचा भाव काय आहे म्हणून दुकानदारास विचारलें तर तुम्हीं किती कप्पे घ्याल असें विचारतात. –मुंव्या ५. [अर. कफ्आत]

कपात––स्त्री. छाट; काट; कमी करणें; बाद करणें; काढून टाकणें. 'साडेसात टक्के कपात केल्यावांचून निभाव लागणार नाहीं.' –केसरी २.१०.२८. [सं. कृप्; हिं.; म. कापणें]

कपार––स्त्री. खवदड; दरड; विवर (खडक किंवा डोंगर यांमधील). 'ती दाट झाडींतील गुहेसारखी कपारीची जागा होती!'–स्वप २८४. [सं. कृप्; अर. खफर; तुल. प्रा. कप्परिअ= विदारलेले, चिरलेले; ते. कुपारमु=दरड.]

कपारत-लत––कफारत, कफावत पहा.

कंपारी––स्त्री. थरकांप; थरथराट. 'आपण राग मानाल अशी माझी मनोदेवता मला सांगू लागली म्हणजे माझ्या शरीराची कंपारी होते.'–विक्षिप्त ३.८७. [सं. कंप]

कंपार्टमेंट––पु. आगगाडीच्या डब्यांतील किंवा एखाद्या मोठ्या दालनांतील बंद केलेला खण, भाग किंवा लहान डबा. [इं.]

कपाल––न. (संगीत) शुद्ध जातीच्या स्वरांपैकीं ज्या एका विशिष्ट स्वरसमूहापासून रागोत्पत्ति संभवते ते. [सं.]

कपाल-ळ––न. १ डोक्याची कवटी; डोक्याचें हाड; करटी. २ मडक्याचा अर्धा भाग; खापर; खापराचा तुकडा; श्रौतकर्मांत ज्यावर पुरोडाश भाजतात असे खापराचे तुकडे. हे ८, ११, १२, १३ असून त्यांचा एक गट असतो. ३ भिवया आणि डोक्याचे केस यामधील भाग; ललाट; भाल. ४ नशीब; प्रारब्ध; ब्रम्हलिखित (ब्रम्हदेव मनुष्याच्या कपाळावर त्याचें भविष्य लिहून ठेवितो या समजुतीवरून). 'कीं एकदांचि फुटलें त्वत्पतिपचककपाळ पापानें.' –मोसभा ६.४. 'गडे, काय कपाळाला करूं। नाहीं बरांत एक लेंकरूं॥' –प्रला. ५ (कपाल) चपटें, पातळ हाड; खांद्याचा किंवा मांडीचा फरा. ६ भिक्षापात्र. 'कपाल झोळी एका स्मशानींचा वास। एक जगन्निवास विश्वंभर।' –तुगा २०५०. ७ (भूगोलशास्त्र) कोणत्याहि याम्योत्तर वृत्ताच्या पूर्वेकडील किंवा पश्चिमेकडील अर्धे गोलार्ध. –उशा. १ नाहीं, खोटें, अशक्य हा अर्थ पटविण्यासाठीं 'माझें कपाळ! तुझें कपाळ!' इ० उद्गार काढतात. 'असें ऐकतां हासले द्वारपाळ। वदों लागले कृष्णजीचें कपाळ!।' –कचसु ६. २ दुःखदर्शक उद्गार, हाय! हाय! 'काय सांगूं, कपाळ!' ०उठणें, चढणें–डोकें दुखणें; त्रास, कटकट होणें; पीडा होणें. 'भजन करितो सर्व काळ। उठलें कपाळ आमचें॥' 'उगा करिती कोल्हाळ। माझें उठलें कपाळ।' –रामदास. ०काढणें–वैभवास चढणें; नशीब काढणें. 'तो चांगला कपाळ काढील असा मला रंग दिसत आहे.' ०खुलणें–(हिं.) दैव उदयास येणें. ०जाणें–दुर्दैवाच्या फेऱ्यांत सापडणें; भाग्य नाहींसें होणें. ०टेकणें–एखाद्यावर भरंवसा ठेवून, अवलंबून असणें; कपाळटेक करणें. ०ठरणें–नशिबांत लिहिल्यासारखी एखादी गोष्ट घडून येणें; दैवांत असणें. 'पुढें मागें ... याही गोष्टींत सुधारकाचा वरचष्मा होऊन या हताश, विचारशून्य, मत्सरी ... लोकांस ... मुद्दमुद्दू रडत बसावें लागेल हें यांचें कपाळ ठरलेलेंच.' –आगर. ०धुवून पाहणें–नशिबीं काय आहे तें पाहणें; नशीब पाहणें; ०पिटणें–दुःखातिशयामुळें डोकें जमिनीवर आपटणें. 'एक अवनीं कपाळ आपटिती।' –ह १८.९६. ०फुटणें–१ दुर्दैव ओढवणें; दैव प्रतिकूल होणें; सर्वस्वाचा नाश होणें; आपत्ति कोसळणें. 'कपाळीं कुंकूं लागतें आहे म्हणून हंसायला लागूं कीं कपाळ फुटलें म्हणून रडत बसूं.' २ वैधव्य येणें. 'मी गरीब कितिही असलें। जरि कपाळ माझें फुटलें।' –(राजहंस) गोविंदाग्रज. ०फोडणें–फार शोक, दुःख करणें. 'कुंतल तोडी, कपाळ फोडी, करी थोर आकांत।' –विक ५३. ०बडविणें–दुःखातिशयामुळें किंवा क्रोधाच्या आवेगानें कपाळ पिटणें; कपाळावर हातानें मारून घेणें. 'कळतां वृत्त क्रोधें घे बहु बडबुनि तो कपाळाला.' –मोवन ४.८३. ०मोक्ष करणें–१ एखाद्याचा सर्वस्वीं नाश करणें. २ खूप झोडपणें; ठार मारणें. कपाळमोक्ष पहा. –ळाला लावणें–कुंकूं लावणें. (गो.) कपाळाक लावप. –ळाचा रेघ-रेषा उमटणें, उघडणें–आकस्मिक रीतीनें सुदैव प्राप्त होणें; एकदम मोठेपणा, श्रीमंती मिळणें. –ळाचें कातडें नेणें–विपत्तींत लोटणें; भाग्यहीन करणें; नुकसान करणें. –ळांत तिडीक उठणें–१ डोकें दुखणें. २ (ल.) त्रासणें; रागावणें. 'आडमुठ्यांच्या घरांचें नांव काढलें कीं यशवंतरावांच्या कपाळास तिडीख उठे.' –यशवतराव खरे. –ळांतले तीन फातर–(गो.) दुर्दैवाचे फेरे. (ढोमले, थोडयारें–थोडयारें म्हणून एक प्रकारची मासळी आहे तिच्या डोक्यांत तीन पांढरे दगड असतात यावरून). –ळाला आठ्या घालणें, चढणें–त्रासणें; अति त्रास होणें; मनाविरुद्ध गोष्ट घडणें (त्रास झाला असतां कपाळास आठ्या पडतात यावरून). 'उलट कपाळाला आठ्या

घालून म्हटलें–तुला काय त्याची चौकशी?'–उप:काल. **–ळाला किंवा कपाळावर केस उगवणें**–अशक्य गोष्ट घडणें. (पुढें घडेल असें वाटणाऱ्या एखाद्या गोष्टीची असंभाव्यता दर्शवितांना हा प्रयोग योजितात. तळहाताला केस येणें याप्रमाणें). **–ळावर, कपाळाला किंवा कपाळीं हात मारणें, लावणें**-१ नशीबास दोष देणें. २ आश्चर्य, दुःख, काळजी प्रदर्शित करणें. 'अशींच तुम्हीं दोघंही सदोदित कपाळाला हात लावून रडत बसत असतां.' –हामुबा ८२. **–ळाशीं कपाळ घासणें**–१ आपल्याला लाभ होईल या आशेनें एखाद्या भाग्यवानाशीं सहवास करणें; संगतींत राहणें. २ कच्छपी लागणें; मागें मागें असणें; गुलामवृत्तीनें अनुकरण करणें. **–ळास अपकीर्ति-अपयश-दारिद्र्य-आपत्ति येणें**–अपमान, गरीबी, दुर्लौकिक इत्यादि प्राप्त होणें; नांव बहु होणें. **–ळास, कपाळीं येणें**–नशीबीं येणें. 'जरि आलें पतन या कपाळाला।'–मोआदि १०.८२. **–ळीं कांटी घेऊन जाणें**–निघून जाणें; चालतें होणें; काळें करणें. **–ळीं डाग लागणें**–वेअब्रू होणें; फजिती होणें; कलंक लागणें. **–ळीं भद्रा असणें**–नेहमीं दुर्दैवी असणें; प्रतिकूल ग्रह असल्यामुळें दारिद्र्य येणें. **–ळीं लिहिलेलें असणें**–नशीबीं असणें; प्राक्तनांत असणें; योग येणें. 'माझ्या कपाळीं आपली सेवा एवढीच लिहिली होती.'–एक १२२. **–म्ह०** १ कपाळभर कुंकूं व हातभर बांगड्या = सुवासिनीपणाची स्थिति; सौभाग्य. २ (ल.) केवळ कुंकवाचा धनि म्हणूनच जी स्त्री नवऱ्याला मानते अशा स्त्रीच्या बाबतींत योजतात. **०कटकट**–स्त्री. तोच तोच विषय पुन्हां पुन्हां सांगत बसणें; कर्म कटकट. 'आतां मी जातें आणि त्या पोरीजवळ कपाळकटकट करीत बसतें.'–पिंगला नाटक. **०करटा, करंटा**–वि. दुर्दैवी; अभागी; दैवहीन; जना वराच्या कपाळावर आंगठ्याखालीं झांकण्याइतपत पांदरा टिकला असल्यास तें अशुभ, कपाळकरंटें समजतात. 'काळें तोंड करी कपाळकरटे जा, खेप आणी दुजी।'–आठल्ये. **०कष्टी**–स्त्री. १ अति त्रास; अतिशय श्रम, (मूर्ख किंवा हेकेखोर मनुष्याची समजूत घालण्यासाठीं पडणारा); डोकेफोड; उरस्फोड. २ एकाच गोष्टीचा नाद, हट्ट; एकसारखी बडबड–वटवट; खिसखिस; धरणें धरून केलेली मागणी. कपाळकूट–खटखट पहा. [कपाळ+कष्ट] –वि. थकवा आणणारें; त्रास देणारें (काम); असें काम करणारा. **०काठी**–स्त्री. (विणकाम) वही (ओवी) किंवा चाळा ज्यास पक्कें केलें आहे किंवा बांधलें आहे असें आडवें लांकूड किंवा दांडा. हें मागाच्या वर असतें. **०कूट**–स्त्रीन. १ माथेफोड; शिकविण्याचे फुकट श्रम. कपालकष्टी पहा. 'कपाळकुट जाहालें लोकीं बोभाट ऐकिला। सांवळें।'–भज ८. २ वटवट; बडबड; एकसारखी विनवणी, याचना. 'एकदां तिनें दाराची कडी लावली कीं कोणी कितीहि कपाळकूट करो, इला कडी काढील तर शपथ!' –इलासुंदरी १५. **०क्रिया**–स्त्री. यति संन्यासी वगैरे मृत झाल्यावर समाधी देण्यापूर्वी मस्तकावर शंख आपटून मस्तक फोडण्याची क्रिया; कपाळमोक्ष. **०खटखट**–स्त्री. त्रास; उद्वेग कपाळकूट पहा. **–ळाचा डाग**-पु. (कपाळावरील काळा डाग; दुर्लौकिक; अपकीर्ति; कलंक; (क्रि० लागणें, चुकणें, लागू होणें). **०टेंक-टेंकणी-ढांकणी**–स्त्री. (कपाळ टेंकणें). (ल.) एकाद्यावर भार; भरंवसा टाकणें; अवलंबून राहाणें; स्वतःच्या आकांक्षा-इच्छापूर्ति दुसऱ्यावर सोंपविणें. **०दुखी**–स्त्री. ज्यांत सतत डोकें दुखत राहतें असा रोग; डोकेदुखी; कपाळशूळ. **०पट्टा**–पु. १ घोडयाची म्होरकी किंवा सरोसरी हिचा एक भाग; कपाळावरचा पट्टा. हा मुखपट्टयाहून निराळा असतो. **०पट्टी**–स्त्री. १ कपाळ; कपाळाचा भाग; ललाटपटल. 'विधात्यानें प्राणिमात्रांचें अदृष्ट डोळ्यांला न दिसणाऱ्या कपालपट्टीवर लिहून ठेवलं आहे.'–एक ४१ २ कुंचडें, कानटोपी इ० चा कपाळावरील भाग, पट्टी; टोपीचा कपाळावरील भाग. ३ दरवाज्याच्या चौकटीचें वरचें आडवें लांकूड; गणेशपट्टी. ४ मोटेच्या विहिरीच्या घावेवरील खांबांवर असलेलें आडवें लांकूड. ५ कोणत्याहि यंत्ररचनेंतील आडवें बहाल. ६ ब्रह्मलिखित; ब्रह्मदेवानें कपाळीं लिहिलेलें; नशिबी असलेलें. [कपाळ+पट्टी] **०पांचशेरी-पांसरी**–स्त्री. न टळणारी दैवगति; अटळनशीब. नशिबाचा दाखला कशानेंहि बदलत नाहीं असा. 'कोठेंहि गेलां तरी कपाळपांचशेरी बरोबर.' [कपाळ + पांचशेरी = चरितार्थ] **०पाटी**–कपाळपट्टी १ पहा. 'तीची अमें सज्ज कपाळपाटी।'–साहृह ५. ११०. **०फुटका**–वि. कपाळकरंटा; दैवहीन, कमनशिबी; अभागी. [कपाळ+फुटणें] **०फोड**–स्त्री. कपाळकूट; कपाळकष्टी पहा. (हा शब्द फार त्रासदायक कामाला लाविताति). **०फोडा**–स्त्री. कपाळफोडीचें फळ. **०फोडी**–पु एक वनस्पति: चिरबोटी; फोपेटी. याचें फळ (कपाळफोडा) वाऱ्यानें फुगवितां येतें; लहान मुलें हें फळ कपाळावर आपटून वाजवितात (कपाळावर फोडणें–म्हणून कपाळफोडी हें नांव). **०फोड्या**–पु. डोईफोड्या; मनाजोगें झालें नाहीं म्हणजे कपाळ फोडून घेणारा; इष्टवस्तु मिळेपर्यंत हट्ट धरून बसणारा (भिकारी); आततायी. –वि. कपाळकूट करणारा; हट्टी; दुराग्रही; अक्रस्ताळया; अकांडतांडव करणारा. **०माळा**–ऊ्रा. कल्पनातीत वाईट अवस्था पाहून आश्चर्य किंवा दुःखदर्शक उद्गार. –स्त्री. रुंडमाळा; शंकराच्या गळ्यांतील नरमुंडांची माळा. 'जटा विभूती उटि चंदनाची। कपाळमाळा प्रित गौतमीची।...तुजवीण शंभो मज कोण तारी।'–शिवस्तुति. **०मोक्ष**–पु. १ प्रेत जळत असतां कपाळाची कवटी फुटण्याची क्रिया. २ मृत संन्याशाच्या डोक्यावर शंख आपटून मस्तक फोडण्याची क्रिया. ३ डोक्यास आकस्मिक

होणारा एखाद्या वस्तूचा आघात; डोकें फुटणें. **-करणें**-ठार मारणें. 'मनोहराला स्वर्गी पाठवावें म्हणून त्याचा कपाळमोक्ष करण्याचा मी प्रयत्न केला.' -मतिविकार. ४ काशीक्षेत्रांतील पांच मुख्य तीर्थांपैकीं एक तीर्थ. **-होणें**-(ल.) मरणें; अंत होणें. 'खरी वेळ आली म्हणजे या भीमाच्याच लत्ताप्रहारानें त्या धर्मभ्रष्टाचा कपाळमोक्ष होणार हें मला पक्कें दिसत आहे.' -कीच. **०रेखा-रेषा-लेख**-स्त्री. नशीब; दैव; विधिलिखित (विधीनें कपाळावर लिहून ठेवलेलें. **०शूल-सूळ**-पु. कपाळदुखी पहा.

कपाली-ळी—पु. शिव; शंकर. 'ये पार्वतीचे पडला कपाळीं। अद्यापि पाहे न चुके कपाळी।' -सारुह ३.३ [सं. कपालि=शिव]

कपाली—वि. दोन्ही खुरांवर नवाच्या आंकड्याप्रमाणें आणि कमळाकृति भोंवेर असणारा (घोडा). -अश्वप ९०.

कपाशी—स्त्री. (खा.) कापूस (सरकी असलेला). याच्या प्रांतांवरून बऱ्याच जाती पडल्या आहेत. -शे ६ १०७,२७०. [सं. कार्पास; प्रा. कप्पासी; हिं. कपास; गु. कपाशिआ]

कपास—पु. १ कापूस; कापसाचें झाड. -शे ६.५२. २ कापसाचा डिगारा. ३ वाऱ्यानें उडण्यासारखा एखाद्या हलक्या पदार्थाचा कीट; पोल; म्हातारी. ४ भेरळी-सुरमाडाचा कापूस; कप. [सं. कार्पास; प्रा. कप्पास; हिं. गु. कपास]

कपास करप—क्रि. (गो.) जनावरांतील नरांचें वृषण बडवणें-अंड काढणें, खच्ची करणें. [कापूस+करणें ?]

कंपास—पु. १ सुतार, लोहार, चांभार, वगैरे धंदेवाईक हें हत्यार वापरतात. वर्तुळ आकृति काढण्याचें दोन बाहु असलेलें साधन. 'कोशकारांनीं आपला स्वैरक्रम सोडून मर्यादेनें वागण्यास सांगणें म्हणजे नदीच्या ओघावर व पर्वतांच्या रांगांवर रूळ व कंपास चालविणें होय.' -नि ४९७. २ होकायंत्र. 'तसेंच कितीएक देशांतील लोक ह्या यंत्रास (होकायंत्रास) कंपास असेंम्हणतात.' -मराठी ६ वें पुस्तक ८०. (सन १८७५). **०घालणें-मारणें**-कंपासानें आंखणें [इं. कॉंपस]

कपि—पु. १ माकड; वानर. 'कपिकुळ उद्धरिलें। मुक्त केले राक्षसां।' -तुगा ३९९. २ हनुमान; मारुती. ३ (ल.) मंडळींतील सर्वांत वृद्ध-अनुभवी-पुढारी मनुष्य. ४ (थट्टेनें) एकाद्या धंद्यांतील अनुभवी मनुष्य; मुरब्बी; तावूनसुलाखून तयार झालेला. (मारुती कपिकुळांतील असल्यानें त्याच्या चारीत्र्यावरून लक्षणेनें). [सं. कपि; फा. कपी] **०ध्वज**-पु. अर्जुन. (याच्या निशाणावर मारुती होता. म्हणून हें नांव). 'मग यायाचि गा कपिध्वजा।' -ज्ञा १८.९५२. [सं.] **०मुख**-वि. १ वानरासारखें तोंड असणारा (घोडा) ज्याचा वरचा ओठ लहान व खालचा ओठ मोठा आहे असा. हें घोड्याचें अशुभ लक्षण होय. [सं.]

कपिंजल—पु. कवडा; तित्तिर; चातक पक्षी. [सं.]

कंपित—वि. हालत असलेलें, कांपत असलेलें, थरथरणारें (शरीर वगैरे). [सं. कंप्]

कंपित—(संगीत) स्वर हलविणें. **०शीर्ष**-न. (नृत्य) भराभर डोकें खालीं वर करणें, राग आला असें दाखविणें, प्रश्न विचारणें, विचारांत गढलेलें दाखविणें वगैरे गोष्टी व्यक्त करण्यास हा अभिनय करतात. **०कटि**-स्त्री. (नृत्य) चालतांना एका पायावरचा भार दुसऱ्या पायावर पडत असतां कंबर एकदां एका बाजूस व एकदां दुसऱ्या बाजूस वांकली जाईल असा अभिनय करणें. **०कपोल**-पु (नृत्य) हसतांना गाल स्फुरण पावल्याचा अभिनय दाखविणें.

कपिता—स्त्री. माकडचेष्टा; कुचाळी; लबाडी; 'सहदेव ग्रह माझा स्पर्शोहि न यन्मना शिवे कपिता॥' -मोसभा ४.५७. [कपि+ता प्रत्यय]

कपितान—पु. कप्तान; फौजेतील एक अधिकारी. [इं. कॅप्टन]

कपित्थ—पु कवठीचें झाड व त्याचें फळ; कवठ. [सं] **०हस्त**-(नृत्य) आंगठा व तर्जनी याशिवाय बाकीचीं तीन बोटें मिटून तळहातास चिकटून ठेवणें; आंगठा उभा ठेवून त्याच्या मागील बाजूनें तर्जनीनें त्याला विळखा घालणें.

कपिल-ला—वि. पिंगट; तपकिरी किंवा जर्दा (रंग). 'एकें तातलें साडेपंधरें। तैसीं कपिलवर्णें अपारें।' -ज्ञा ११.१३२. [सं.]

कपिला—स्त्री. १ कामधेनु; स्वर्वेनु. 'कपिलेचें म्हणावें क्षीर। मा इतरांचें काय नीर।'-एभा १.१२४. २ एक रंग असलेली; कोणत्या तरी एकाच रंगाची (गाय). 'काळी-तांबडी-पांढरी कपिला' 'काहीं सफेत कपिला व्याघ्रांबर खाणीच्या।' -ऐपो ३०९. ३ (सामा.) गाय. 'माझे घरीं पांच कपिला आहेत.' ४ रंगाकरितां कित्येक जातींच्या फुलांची वाळवून केलेली भुकटी, यांत कपिला व कपिली असे दोन प्रकार असून कपिली सरस आहे. ५ काव. **०षष्ठी, कपिल सठ**-स्त्री. (कपिलखट मोल.) भाद्रपद वद्य षष्ठीच्या दिवशीं मंगळवार, रोहिणी नक्षत्र, व्यतीपात योग, सूर्यनक्षत्र हस्त, यांचा योग झाल्यास तीस कपिला षष्ठी म्हणतात. हा एक अपूर्व व पुण्यकारक योग मानतात. हा क्वचित येतो; बहुधां साठ वर्षांनीं असा योग साधतो. 'चंद्रसूर्यग्रहणांसी। वोंवाळुनि सांडी ते दिवशीं। कपिलाषष्ठी तिची दासी। मा अर्धोदयासी कोण पुसे।' -एभा ११.१२६९. **कपिलाषष्ठीचा योग**-१ ज्या गोष्टी एकत्र होणें-जमणें अशक्य त्या आकस्मिक रीतीनें एकत्र जमल्यास त्यास आनंदानें म्हणतात. दुर्मिळ सुयोग, संधी; दुर्लभ घटना. २ (उपरो.) अशक्य; असंभाव्य; क्वचित् घडणारी गोष्ट.

कपिश—पु. कवडया ऊद; धूप. –वि. पिंगट रंग. [सं.]

कपी—स्त्री. १ (कों.) पुस्ती, जोड (फुटलेल्या लांकडास दिलेला). २ कलिंगड, भोपळा वगैरेचा नमुना पाहण्यासाठी कापून काढलेली फोड. ३ (गो.) ठिगळ. कपा पहा.

कपी—स्त्री. कप्पी; मणका; पुली; खरडी, ओझें वगैरे उचलण्याचें साधन, लांकडाच्या भरींव तुकडयाला भोंक खोदून त्यांत चाकें भरून त्या चाकावरून दोरी घालून त्या दोरीस सामान बांधून यारीसारखें उचलण्यास उपयोग करतात. कपा पहा. [ते. कप्पी=चाक]

कपीत—पु. (गो.) कप्तान (लष्करांतील किंवा आरमारांतील). [पोर्तु. कापितांव; इं. कप्टन]

कपुत्र—(प्र.) कबूतर पहा.

कपुरकाय, कपुरी—स्त्रीन. (हिं.) विडयाच्या पानांची एक जात ही जात बंगाल प्रांतांत होते. या पानास कापरासारखा वास येतो. [सं. कर्पूर, प्रा. कप्पूर; हिं. कपूर]

कपुरीमेणबत्ती—स्त्री. उत्तम पांढऱ्या रंगाची मेणबत्ती. [कापूर+मेणबत्ती]

कंपू—पु. १ तंबू देऊन, तळ देऊन राहिलेलें सैन्य. २ सैन्याचा एक विभाग, तुकडी, कंपनी, (११ पलटणी). 'एकापरीस एक शिपाई रांगडा हिंदुस्थानी। दोन कंपू फिरंगाणी।' –ऐपो २७८. ३ विशेषतः युरोपियन लष्करी पद्धतीनें तयार झालेलें देशी राजांजवळचें सैन्य. कवाईती पलटण. 'तवां कंपूनें कटाव केला मोरचे आले म्होरे म्होरे।' –ऐपो ३५०. 'पुणेयास गारद्यांच्या ऐवजीं त्यांचे कंपू ठेवून घेण्याचें कबूल केल्यावर पुन्हां लढाईची जंगी तयारी करण्यास ते तयार आहेत.' –भाऊ ९२. ४ विशिष्ट मताची किंवा विचाराची मंडळी; गट; समुदाय; मंडळ. 'कुटाळ कंपू.' 'आम्ही हॅरिसन आदिकरून मंडळींच्या कंपूंत जाऊन मिळालों' –टि १६०. [इं. कॅंप]

कपूत—पु. दुर्गुणी; अवज्ञा करणारा मुलगा. [सं. कुपुत्र, म. पूत]

कपूयचरण—न. पापाचरण, दुर्वर्तन. 'कपूयचरण म्हणजे पापाचें आचरण' –गीर २९५. [सं. कपूय=निंद्य+(आ)चरण]

कपूरकचरी—स्त्री. कापूरकचरा पहा.

कपेरी—स्त्री. (कु.) दगडाची कपरी–तुकडा. [कपरा]

कंपेश—पु. १ कंबेश; फरक; कमी अधिक प्रमाण. 'बाजीराव कबूल होतांच त्याशीं पूर्ववत् प्रमाणें कांहीं एक कंपेश न करितां दोस्ती सरकारनें कायम ठेविली. –इनाम १४०. –स्त्री. कंबेशी. न्यूनाधिक्य; घोंटाळा; गोंधळ. –वि. १ कमीअधिक, थोडें जास्त किंवा थोडें कमी; जवळजवळ. 'कंपेश चाळीस हजार फौज' –ख ७.३२८८. २ तंतोतंत. 'सला झाल्याप्रमाणें वर्तणूक कंपेश न केल्यास पारिपत्य होईल.' –ख ५.२६०७. [फा. कम्+बेश्]

कपेळफोडणी—स्त्री. (गो.) कपाळफोड; डोकेफोड. [कपाळ+फोडणें]

कपो—पु. (कु. गो.) १ पापुद्रा ठिगळ, इ. कपा पहा. २ मासळीचा तुकडा.

कपोक—पु. पांढरी सावरी. याचा कापूस फार मऊ असून त्याचा गिर्दी, उशी करण्याकडे उपयोग करतात. कप पहा.

कपोट—स्त्री. (कों.) ताडाच्या पानाची केलेली पेटी. कपात पहा.

कपोत-ता—पु. (काव्य) कबडा; पारवा; कबूतर. (स्त्री.) कपोती. या पक्ष्याच्या मानेवर ठिपके असतात. [सं. कपोत] **॰कपोता घळणें**–वाळणें, खंगणें, क्षीण होणें.

कपोतक(संयुतहस्त)—पु. (नृत्य) दोन्ही हात एकमेकांजवळ आणून तळहाताकडील बाजूनीं एकमेकांस चिकटवून एकावर दुसरा झांकण बसेल अशा प्रकारें ठेवणें. [सं.]

कपोल-ळ—पु. गाल. 'अधिष्ठानविशाळ भालीं। तैसी शोभा कृष्णकपोळीं।' –एरुस्व १.६१. [सं. कपोल]

कपोल-ळ—न. (चुकीनें) कपाळ; गंडस्थळ. 'कपोलांचें वर्तुळपणाभर्णो ज्ञान प्रेमाचें दर्पण॥' –ऋ ९५. 'कंपु लपवीसी आंगिचा। स्वेदू पूसीसी कपोळीचा।' –शिशु २२६. [सं. कपोल=गाल]

कपोल(अभिनय)—पु. (नृत्य) गालानें केलेला अभिनय. याचे सहा प्रकार आहेत. त्यांचीं नांवें.–क्षाम, फुल्ल, पूर्ण, कंपित, कुंचित, सम. [सं.]

कॅप्टन, कप्तान—पु. १ नाईक, प्रमुख, नेता. २ सेनापति. ३ मुख्य नाखवा, तांडेल. 'अभयलेख देणारे कपतान तरी त्यास किती भेटतील?' –नि ८८८. [इं. कॅप्टन]

कप्तान—न. बैलगाडींत असलेल्या मालास पाऊस वगैरे लागूं नये म्हणून केलेला आडोसा, पडदा. हा बहुदा खजूर भरून आलेल्या तट्ट्याचा असतो. [अर. कफ्आत–कपात=(खजुराची) शिंदीच्या चटईची पेटी]

कप्पा—१ कपा पहा. 'दोन कप्प्याची बनलेली थैली म्हणजे हृदय होय.' –आरोशा १.१४.

कप्पा—पु. पेटी; गढा; आंख. 'खारकेचा भाव काय म्हणून दुकानदारास विचारलें तर तुम्ही किती कप्पे घ्याल हें सांगा म्हणजे मग आपणांस भाव सांगूं असें बोलतात.' –मुंव्या ५०. [कपात पहा]

कप्पी—स्त्री. पुली; कपी पहा. 'शिडाला कप्पी बांधा आणि त्या दुष्ट मनुष्याचे पाय बांधून त्याला उलटा डोलकाठीवर टांगा!' –स्वप २९६.

कप्पी—स्त्री. लहान कप्पा, खण.

कफ—पु. १ शरीरांतील श्लिदोषांपैकीं एक. कफामुळें तोंड गुळमट चिकट होणें, तोंडाला पाणी सुटणें, झोंप फार येणें, घशांत

घुरघुरणें, तिखट पदार्थ खाण्याची इच्छा होणें, उष्ण उपचारांची इच्छा होणें, अग्निमांद्य, मलमूत्राचें आधिक्य वगैरे लक्षणें होतात. २ खाकरलें असतां घशांतून बाहेर येणारा पातळ बुळबुळीत पदार्थ; श्लेष्मा; खाकरा; बेडका. ३ फेंस; फेन. [सं. कफ. तुल० फा. कफ्=फेंस, थुंका] **०घ्न, नाशक, निःसारक, भेदक, सारक, हर, हारक, कफारी**–वि. कफ नाहींसा करणारें (औषध वगैरे). **०ज्वर**–पु. कफ जास्त झाल्यानें किंवा शरीरस्थ कफांत दोष उत्पन्न झाल्यामुळें येणारा ताप; कफप्रधान ज्वर. [सं.] **०पित्त ज्वर**–पु. कफ आणि पित्त यांचें आधिक्य होऊन येणारा ज्वर. [सं.] **०प्रकृति**–स्त्री. कफ किंवा कफजन्य दोष जींत अधिक आहेत अशी प्रकृति. [सं.] **०रक्त**–पु. कफाबरोबर रक्त पडणें; एक रोग. 'आम्लपित्त, रक्तपित्त। वातरक्त, कफरक्त। खोकलें, खरूज अत्यंत। विसर्प एकां।' –गीता १३.२४९७. [सं.] **०वात पित्त ज्वर**–पु. कफ, वात व पित्त हे तीन वाढल्यामुळें येणारा ताप, त्रिदोषजन्यताप. [सं.]

कफ—पु. सुरमाडाचा कापूस; भूस, रुई वगैरेच्या फळांतील म्हातारी, इ०. कप पहा. 'लोह कफ गारा अग्निचिया काजें। येरव्हीं तें ओझें कोण वाहे।' –तुगा २१७४. [सं. कार्पास]

कफ—पु. (कों.) कप्पीचें घर, सांचा (कप्पीसह किंवा कप्पीशिवाय)

कंफ—पु. (प्र.) कंप (गाण्यामध्यें आवाजांत होणारा कांप. रेपणा) २ थरकांप; शरीर लटलटणें, हलणें. [सं. कंप]

कफण-न—न. मुसलमानाच्या प्रेतावरील वस्त्र–आच्छादन. 'त्याची कफन आणून त्यास माती दिल्ही.' –रा ६.११२. 'मयत माणसाचे कपन घेतो.' –मसाप २.२.६४. [अर. कफन् तुल० इं. कॉफिन] **०खायरा-रो**–वि. (गो.) कफनाचा तुकडा सुद्धां विकून खाणारा. (ल.) अतिनीच (मनुष्य).

कफणी-नी—स्त्री. १ कोपरापासून पुढील हात व डोकें यांशिवाय सर्व शरीर झांकेल असा अंगरखा, हा फकीर, साधू वगैरे लोक वापरतात; बिन बाह्यांचा अंगरखा; पायघोळ सद्रा. २ (व.) जाकीट. [अर. फा. कफनी] **गळ्यांत कफनी घालणें**–(ल.) १ संसारपाश तोडून विरक्त होणें, संसारत्याग करणें. २ भिक्षापात्र हातीं घेणें. भीक मागणें.

कफल्ल, कफल्लक—वि. अतिशय गरीब, ज्याच्यापाशीं कवडी देखील नाहीं असा भिकारी, भिका-यांचा राजा. (सामा.) कंगाल; दरिद्री; निष्कांचन. 'दोघेहि सारखेच कफल्लक.' –नि ६६८. 'आतां प्रत्येक मनुष्यास असा अधिकार (प्रत्येक मनुष्यानें मिळविलेल्या द्रव्यावर त्याचें पूर्ण स्वत्व) मिळाल्यानें, एकाजवळ लाखों रुपयांची इस्टेट, व दुसरा अगदीं कफल्लक अशी स्थिति होते.' –ठि ४.२४. –पु. कफल हें जगांतील आदिचोराचें नांव आहे. चोरांनीं चोरी करूं नये म्हणून लोक निजते वेळीं अस्तिक अस्तिक काळभैरव, कफल्लक' असें म्हणून याच्या नांवाचें स्मरण करतात. याला ब्रह्मदेवानें वर दिला आहे कीं तुझें जो स्मरण करील त्याला चोरापासून भय नाहीं. 'आदिचोर कफल्लस्य ब्रह्मदत्त वरस्य च।' इ०. कोठें कफल्लाच्या तीन बायकांचें स्मरण करावें असें सांगितलें आहे. 'तिस्रो भार्या कफल्लस्येति०' [सं. कापालिक? कफल]

कफशदोज-गर—जोडे शिवणारा. [फा. कफ्श–जोडा]

कफारत-लत—स्त्रीपु. १ तंटा; तेढ; कज्जा. कज्जाशेजरा-बरोबर कज्जा कफालत–कफावत हा विशेषतः आढळतो. 'तुम्हांजवळ आम्हांविषयीं हरएक बाबेविशीं कफारत पडते, त्या गोष्टीवर न जावें. –पाब ९. २ आळ; तोहमत; आरोप (क्रि० घेणें आणणें). 'ही रति कफालत सरती त्याचि मज वरतीच संगत पडेल।' –राला ५७. 'संपादणी कौटाल कफालती ठाऊक आवध्या तुज।' –होला ३१. ३ अडचण; त्रास; संकट; पेंच; क्लेश; अरिष्ट (क्रि० येणें). गळ्यांत पडणें, उभा राहणें, उपस्थित होणें. ४ लचांड; झट; झेंगट; पीडा (क्रि० येणें, इ०). [अर. कुफात्–कृतघ्नता; अविश्वास]

कफालत—स्त्री. जामीनकी; हमी. 'हे दफा कफालतीचे अहदनाम्यांतील नाहीं.' –रा ७.९४. [अर. कफालत्]

कफावत—स्त्री. उघडकीस आणलेली, उमगून काढलेली चूक, दोष, गुन्हा. (क्रि० काढणें). घेणें, जाणणें. २ भांडणतंटा; कज्जा; कलह; बखेडा. 'कज्जे कफावती होऊत रस्त्यांत। असावी घरांत शांती मोठी॥' [अर. कफालत्]

कफोदर—न. कफाचा जोर झाल्यामुळें होणारा एक रोग. जलोदराचा एक प्रकार. [सं.]

कबई—स्त्री. एक प्रकारचा अंगरखा, झगा. [फा. कबा–वरचा अंगरखा किंवा जाकीट.]

कबकबीत—वि. पचपचीत; पाणचट (ऊंस, कलिंगड खरबूज इ०) बेचव; कवकवीत पहा.

कंबखत-ती, कंबक्ती—स्त्री. कमबखत-ती पहा. 'कंबखती आली आतां पण डरून काय उपयोग?' –त्राटिका. 'आली कंबक्तीची वेळ!' –भा ११८. [फा. कम्+बस्त]

कबगीर—पु. मोठा चमचा; पळी. 'यखनी उकळूं लागतांच तिला वारंवार कबगीरानें हालवीत जावी.' –गृशि २.१३. [अर. कब्ब्=उलथणें, परतणें+गीर]

कबचाड—न. (व.) कवच. [सं. कवच]

कबज—न. १ लेखी पावती, पोंच. 'ऐवज पावोन दीक्षितांची कबजे घेतलीं आहेत.' –रा १.२९४. 'पावले पैकियाची कबज' –भाअ १८३४.१३८. २ धनकोला देण्याकरितां जप्त केलेला माल. –जप्ती, कांहींहि माल किंवा जिंदगी यांची जप्ती. अशा

रीतीनें जप्त केलेला माल; जिंदगी; मिळकत. ३ लेखी पावती किंवा करारनामा लिहून दिल्यामुळें उत्पन्न होणारें बंधन; आळा; वचनबद्धता; लेखामुळें, वचनामुळें गुंता. ४ पाटील-पटवारी यानें साऱ्याच्या पोटीं शेतकऱ्याला दिलेली पावती. ५ मलाव रोध; सांखळा; अवष्टंभ ६ धरणें; पकडणें;(बोलण्याचा) आधार घेणें (विशेषतः एखाद्या मनुष्याला त्याच्या भाषणांत). (क्रि० धरणें, पाडणें). ७ ताबा, कबजा पहा. ' एकमुठ असते तर आपले हातीं कबज राहता. –रा ६.६००. –वि. स्वाधीन. 'सालगुदस्त किल्ले रायगड मोगलास कबज जाला.' –रा १७.३८. [अर. कब्ज़] **०करणें**-जिंकणें; ताब्यांत घेणें. **०दस्त**-वि. हस्तगत; स्वाधीन. ' मुलुख कबजदस्त केला.' –मव १०३. **०पत्र**-न. मालकी हक्क किंवा कबजा एकानें दुसऱ्याचे ताब्यांत दिल्याबद्दलचा करारनामा. –भाअ १८३२.

कबजा—पु. कबज; कब्जा. ताबा; अम्मल; मुठ; पकड, भोगवटा. [अर. कब्ज़]

कबजा—पु. जाकीट; अस्तन्या नसलेली बंडी. 'तिनें डोक्यावरून घेतलेल्या किरमिजी रंगाच्या ओढणींतून तिनें घातलेला भरजरी किनखापी कबजा स्पष्ट दिसत होता.' –स्वप २४५. [फा. कबाचा]

कबजा—पु. (ना.) बिजागिरी. –शर.

कबजी—पु. कलुशाचें टोपण नांव कविजी. [स. कवि+जी]

कबजी—वि. कबजांत, ताब्यांत असलेला; हस्तगत केलेला (सरंजाम, प्रांत). 'सरंजाम गैर कबजी' –खरे ९४२. [अर. कब्ज़] **०धरणें**-क्रि. पेंचांत धरणें; पकडणें; गोवणें.

कबजेगहाण—न. (कायदा) तावेगहाण; कर्जफेडीबद्दल धनकोनें ऋणकोची मिळकत तिच्या उत्पन्नांतून व्याज व मुद्दल फेडून घेऊन त्याचा हिशेब ठेवून परत करण्याच्या करारानें-ताब्यांत घेणें. (इं.) युसुफ्रक्टरी मॉर्टगेज. [अर. कब्ज़+गहाण]

कबजिगरी—स्त्री. ताबा, अम्मल. ' अलीकडे या राज्यांत कबजिगरी आधीं जाली ते गांवीं ठाणें बैसवून तर्फा केलिया आहेत.' रा. १५.७८. [अर. कब्ज़]

कंबडी—स्त्री. कळकाची कांबीट; कामटी, फीट, भेतूक. [सं. कमठ=वेळू]

कंबणें—क्रि. (बे.) वांकणें.

कबंध—पुन. १ मस्तकविरहीत शरीर; धड. ' सुता संशय न धरीं मद्वीर कबंध-तुल्य अवशिष्ट.' –मोकर्ण ५.४. २ मस्तक तुटून गेलें असतांहि चलन वलन करणारें धड. ' जाणो सन्मरण महा लाभें बहु नाचले भटकबंध.' –मोभीष्म ७.३९. 'रजपूत महा पराक्रमी, शिरच्छेद झाला तरी कबंद नाचतें.' –हिंलई २२२. [सं.] **०नाचणें**—क्रि. लढाईत अतिशय कत्तल उडणें; रक्तपात होणें. (एक लाख सैनिक युद्धांत मेले म्हणजे एक कबंध उठून नाचूं लागतें असें पुराणांत वर्णन आढळतें.)

कबर—स्त्री. मुसलमानाचें थडगें, पीर. ' शेवटीं त्या प्रांतींच कबर होऊन राहिले.' –थोशा ६. [अर. कब्र] **०स्तान-स्थान**-न. मुसलमान लोकांची मसणवटी' स्मशान. [फा. कब्रिस्तान्]

कबर-री—स्त्री. वेणी; बुचडा; खोपा. ' मस्तकीं कुटिलालकभार। सुमनीं, कबर शोभती।' –एभा १४.४९४. ' परततां कबरांबर नावरे।' –(वामन) नवनीत १३०. ' तवकें उठोनि धांउनि पळतां कबद्धनि नीच कबरीतें।' –मोविराट १.६६. 'मोकळे झाले कबरी भार। हरिवक्त्र विलोकितां॥' [सं. कबरी]

कंबर—स्त्री. हा शब्द कमर शब्दाप्रमाणें पहा. [फा. कमर]

कबरा—वि. १ चित्रविचित्र, ठिपक्या ठिपक्यांचा (वस्त्र, पशु वगैरेवर असणारा रंग) २ करडया रंगाचा (वस्त्र, पशु वगैरे). [सं. कबुर; प्रा. कब्बुर; हिं. कबरा] **०बांडा**-वि. चित्र विचित्र रंगाचा; अनेक रंगी, मळकट पाढऱ्या रंगाचा (घोडा वगैरे). बांडा १ पहा. [कबरा+बांडा]

कंबल-ळ—पु. कांबळा; घोंगडी; लोंकरीचें वस्त्र; धाबळी. ' मोक्षादि सर्वसिद्धिची श्रेणी। श्वेतकंबलासनीं साधकां।' –एभा १४.४०५. [सं. कंबल]

कंबल—(संगीत) ज्यांत न्यासस्वर षड्ज असून ग्रह, अंश व अपन्यास स्वर पंचम असतो व ज्यांत ऋषभ स्वराचें बहुलत्व व गांधार मध्यम व धैवत त्यांचें अल्पत्व असतें अशी स्वररचना. [सं.]

कंबल, कबल—नपु. (राजा.) अर्धा किंवा अर्ध्याहून अधिक भाग (फळ, दगड वगैरेचा फुटून निघालेला). [सं. कबल]

कबलात-कबलायत—स्त्री. कबुलायत पहा.

कंबळ—पु. (पगडबंद) पागोटयाचा किंवा पगडीचा डोक्याभोंवतालचा भाग. हा डिकानें कागद चिकटवून तयार करतात व त्यावर कापडी पट्टा शिवतात. [सं. कपाल]

कंबळ—स्त्री. भोंवरसाल; एक झाड.

कबळ—पु. केस; कबरी. 'बाळाच्या कवळानिमित्त कबळा विस्तारुनीयां बळा.' –भासु ४. [सं. कबरी]

कंबळी—स्त्री. कांबळें; जुनी घोंगडी, पटकूर. ' काळी कंबळी गुंतून बुथी।' –नव १३.१२३. [सं. कंबल हिं. कमली]

कबाई-यी—कबई पहा.

कबाड—न. एक घोडा किंवा उंट नेऊं शकेल इतकें ओझें (लांकडें, गवत, वैरण वगैरेचें); वैरण, कडबा, गवत, यांचें ओझें, गुरांनीं वाहून आणलेलें जळण. (क्रि० बांधणें). हा शब्द कोठें कोठें आखें (अंधे ओझें) या अर्थी चुकीनें वापरतात. ' कही कबाड या लष्करांचें केल्यावर.' –खरे १७०७. [हिं. कबाड-

र=मोडकें सामान] ०कष्ट-काम-कष्टाचें, मेहनतीचें, श्रमाचें काम. हलक्या दर्जाचें काम. ०खोत-पु. १ (कों.) जंगलांतील जळाऊ लांकडें तोडण्याचा मक्ता ज्याकडे आहे असा खोत; अधिकारी. २ कबाड, सर्पण किंवा कडबा, धान्य वगैरे (बैलावरून वाहून) पुरविण्याचा मक्ता घेतलेला ठेकेदार. ०खोती-स्त्री. कबाडखोताचें काम; अधिकार. ०हाट-पु. लांकडें गवत वगैरेंचा बाजार. ' कबाड हाट तेथ खेळु.' -ऋ १२०.

कबाडवान्—पु. (व.) वाण्याच्या दुकानीं मिळणाऱ्या चिल्लर औषधी व वाळक्या वनस्पती. [कबाड+वाण=प्रकार]

कबाडी गलबत—न. व्यापारी मालाची वाहतुक करणारें जहाज. माल गलबत. -पु. (ल.) व्यापारी.

कबाडी-डया—वि. १ ओझें वाहणारा-नेणारा (मनुष्य, बैल, घोडा वगैरे). २ श्रमाचीं, कष्टाचीं, दगदगीचीं कामें करणारा; काबाडकष्ट करणारा; कांहीं सुख नसतां केवळ संसाराची खटपट करणारा. ३ ओबडधोबड कारागिरीचें काम करणारा (मनुष्य). ४ क्षुद्र, हलका, कमी योग्यतेचा मनुष्य. [कबाड]

कबाब—पु. मुसलमान लोकांतील एक मांसाचें पक्वान्न. ' काय हो कबाबांचा घमघमाट सुटला आहे.' -विवि १०.१०. २३०. [फा. कबाब=भाजलेलें मांस] -वि. (व.) शुष्क झालेला; वाळलेला; रोडावलेला (मनुष्य). ' रोगानें जळून कबाब झाला.'

कबाब—स्त्री. १ दूधभोपळा किंवा मुळा यांची किसून केलेली गोळाभाजी. २ कोरडया मसाल्यानें तयार केलेली भाजी. ' पाकशास्त्रांत कबाब या नांवाखालीं जे पदार्थ येतात ते सर्व मसाले लावून कोरडे तयार केलेले असतात.' -गृशि २.१११. [कम्+भाव=पाणी ?]

कबाबचिनी—स्त्री. कंकोळ; एक औषधि (कोणी चुकीनें नागकेशरासहि म्हणतात). कबाब नावाच्या झाडाचें वाळलेलें फळ. रानलवंगा. [अर. कबाब्+फा. चीनी; लॅ. पायपर क्युबेबा]

कबालत, कबाला—स्त्रीपु. (प्रचारांत कबाला असा शब्द येतो). १ सनदशीर विक्री; खरेदीखत; मालकी हक्कांचा कागद. ' देशमुखी आपली आपण खुश-रजावंदीनें, कबालतीनें फरोख्त करून दिल्ही.' -रा १७.१. २ (बडोदें) कबुलायत; करार; कबूलनामा; कंत्राटदारानें केलेला करार. ' जिनसा अगर माल पुरविण्याची कबाल्यांत शर्ते नसेल, त्यावेळीं तशा जिनसा व माल त्यांविषयीं स्थानिक अंमलदारामाफत रीतसर हरराजी करून कबाले करावे.' -स्वारीनियम २९. [अर. कबालत्, कबाला]

कबालदार—पु. कबाला, करार करून देणारा; कंत्राटदार. ' कबालदारास एकादा शामियाना लावून देण्याची कबाल्याप्रमाणें शर्ते असल्यास अथवा ती नसतांही, स्वारी कामदार यांनीं हुकूम केल्यास गोटापासून दूर एक शामियाना लावून देऊन पाहरा लाविणें आणि आगीपासून बचावासाठीं पाण्याच्या चार डेगा त्या मंडपाच्या बाहेर थोडया अंतरावर भरून ठेवणें.' -ब्रुकरची शिकार १०. [फा.]

कबालपत्र—न. सनद; कबुलायतनामा; करारपत्र; दस्तैवज. ' दिल्हे कबालपत्र ऐसे जे.' -रा १२.१८०. [फा.]

कबाहत—स्त्री. १ दोष; गुन्हा; कुभांड. ' लटक्या कबाहती उठवितील.' -रा ५.७६. ' खरें बोलावयासी जावें तर कबाहत उठेल. ती आटोपणें मुष्कील.' -रा ५.१६७. २ कलह; तंटा. ' आपआपल्यांत कबाहत लागल्यानें शत्रूस राजकारणें करावयास जागा होती.' -रा १९.३५. [अर. कबाहत्]

कबित्त, कबीत—न. १ (हिं.) कवित्व; काव्य; कविता. २ हिंदींतील काव्याचा एक भेद. भाठ लोक म्हणतात त्या प्रकारच्या कविता. ३ कवितेचा एक प्रकार; पोवाडा, कटाव यासारखी सामान्यतः घनाक्षरी वृत्तासारखी रचना. [सं. कविता]

कबिरा—पु. उंसाची एक जात. -शे ७.२०५. [का. कब्बु=ऊंस]

कबिला—पु. १ कुटुंब; बायकामुलें; परिवार; जनाना. २ (विशेषतः) लग्नाची स्त्री; घरधनीण; मालकीण. [अर. कबीला]

कबिला—पु. (कों.) (नाविक) वांक व पठाण यांस जोडण्याकरितां केलेला लोखंडी जाड गजासारखा खिळा, हे खिळे बाहेरून ठोकतात.

कबिलेदार—वि. कुटुंबवत्सल; बायकोमुलें असलेला; प्रापंचिक. [अर. कबिला+दार]

कबिलेमाही—क्रिवि. महिन्यापूर्वी. ' त्यास कबिले माही दादासाहेबाबावे व चिखली वगैरे राणे फत्तेसिंगराव गायकवाड यांचे मुलखाबाबद मजकूर मरकूम केला आहे.' -रा १०.१६४. [अर. कब्ल=पूर्वी+माह=महिना; फा. कब्ल+माह्]

कबीरपंथ—पु. कबीरसंप्रदाय; कबीर (१५ वें शतक) नांवाच्या रामभक्त साधूनें स्थापन केलेला एक भक्तिसंप्रदाय. [अर. कबीर=श्रेष्ठ, मोठा+पंथ]

कबीरपंथी—वि. कबीरपंथास अनुसरणारा; कबीराचा अनुयायी.

कबीलदार—कबिलेदार पहा.

कंबु—पु. शंख. ' इक्षित हास्य मनोहर। ग्रीवा सुंदर कंबु जैशी।' -एभा १४.४७८; ' श्रीद त्यजिले वरिला अदक्षिणावर्ते तुच्छ कंबु कसा।' -मोसभा ४.१४. [सं.] ०कंठ-पु. शंखासारखा गळा. (हें सौंदर्याचें लक्षण समजतात). ' ओंकार मातृकांसकट। तोचि जाणावा कंबुकंठ।' -एरुस्व १.४२.

कबु-बू-तर—न. एक पक्षी; कबूतर; कपोत. याच्या रंगपरत्वें पाढरा, काळा, शिराजी वगैरे जाती आहेत. [फा. कबूतर्]

०खाना–पु. १ कबूतरें ठेवण्याची जागा; कबूतरें पाळण्याची, वाढविण्याजी जागा. २ खुराडें, ढाबळ. [फा. कबूतर्] **०बाज**–वि. कबूतरें पाळणारा, कबूतरें खेळविणारा. [फा.]

कबुलात, कबुलायत—स्त्री. १ (कायदा) कबूलनामा; करारनामा. लेखी अथवा तोंडी केलेला करार; संमतिपत्र. (इं.) अॅग्रीमेंट. 'कबुलातीचा मजकूर' –ख ४.१४५७. २ (महसुली) वसूल, खंड किंवा सारा देणाऱ्याचा साऱ्याच्या रकमेबाबत कबुली बद्दलचा करार. [अर. कबूलीयत्]

कबुली—स्त्री. १ संमति; मान्यता; स्वीकार. २ (कायदा) आरोपीनें गुन्हा केला आहे अशाबद्दल अनुमान निघेल अशी कबूल दिलेली तोंडी किंवा लेखी हकीकत. (इं.) कन्फेशन. [अर. कबूल्] **०जबाब**–पु. १ (कायदा) वादीचें म्हणणें न्याय्य आहे असा प्रतिवादीनें न्यायसभेत दिलेला लेख. २ आरोपीनें आरोप कबूल असल्याबद्दल दिलेली जबानी. [फा. कबुली+जबाब्]

कबू—(गो.) उंसाची एक जात. हा जाड असून पेऱ्यांवर उभ्या लाल रेषा असतात. [का. कब्बु=ऊंस]

कबूतांदूळ—पु. एक उंची जातीचा तांदूळ.

कबूल—वि. १ मान्य; पसंत; संमत; राजी (गोष्ट, वस्तू वगैरे). २ मान्यता देणारा; संमति देणारा (मनुष्य); अनुकूल. ३ मान्य केलेलें, पसंत केलेलें (कार्य, वचन). [अर. कबूल] **०कतबा–(पा)–कदबा**–पु. १ वादाचा निकाल लागण्यापूर्वी पंचांनीं दिलेला निकाल आम्हांला मान्य आहे असा पंचांपुढें वादीप्रतिवादीनीं दिलेला लेख, राजिनामा. २ (महसुली) पाटलानें घेतलेल्या साऱ्याला कबुली देणारा रयतेचा कबूलनामा, संमतिपत्र. ३ कबुली लेख. –रा ३.४४. [अर. कबूल+कतबा, कतपा=लेख] **०कागद**–पु. कबुलीलेख. 'हा कबुल कागद लिहून दिल्हा.' –रा ६.१८०. [फा.]

कबूस–पु गलबतावरील भटारखाना–स्वयंपाक गृह. [जर्म. कबूस, डच. कबुइस; इं. कबूस (कॅबिन+हाऊस)]

कंबेश—कंपेश पहा. 'आहेरही कंबेस दों हजारांचा आला' –मदबा. [फा. कम्+बेश]

कंबेशी—स्त्री. न्यूनाधिक्य; कमी अधिकपणा. कंपेश पहा. 'चाकरीच्या कंबेसीचे इलाजमास चिंता नाहीं, परंतु हरामखोरीचे इलाजमानें आमचे शिळास बट्टा आहे.' –होकै ३३.

कबेशी—पु. (कों.)(नाविक) नावेच्या फळीच्या घडकामास मजबुती येण्यासाठीं ठोकावयाचे खिळे, हे आंतून ठोकतात. हे खिळ्यांपेक्षां लहान असतात. हे फळघांस सांधकामास ठोकतात.

कब्जा—कबज, कबजा पहा. 'पण शत्रूचे कबजांत राहणें मापेक्षां जीव जाईल तर बहुत उत्तम!' –रा १२.९२.

कब्जी—कबजी पहा. 'लश्कर पावसाळे दिवसांत छावणीस आपले कब्जी देशांत यावें' –चित्रगुप्त ३६.

कब्बू—वि. (प्रां.) १ घेतलेलें ऋण परत करण्याच्या कामीं चिकट (ऋणको); खमकया; धकाबुकीला तयार. २ जड हाताचा; चिक्कू. चिकट (माणूस)

कँब्लेट, कांब्लेट—न. (कु.) कामलेट; ब्लँकेट; पांघरण्याचें वस्त्र. [इं. कॅमल=उंट; अर. जमल; लॅ. कॅमेलस्; कॅमलेट=उंटाच्या लोंकरीचें वस्त्र; किंवा इं. ब्लँकेट=पांघरें लोंकरीचें वस्त्र, ब्लँक=पांघरें, सं. क्रमेलक=उंट]

कम—पु. (परीट) भट्टीचें पाणी, खारें पाणी. 'कमांत कपडे भिजवा.' 'परटाकडून कम घेऊन या.'

कम—वि. १ अल्प; थोडें. 'आपल्यास शिबंदी कम पडे म्हणोन लिहिलें ते कळलें' –रा ६.२२९. २ उणा; कमी; उणीव असलेलें. उ० 'आण्याकम रुपया'; 'शेर कम मण'. [फा. कम्] **०अक्कल**–स्त्री. अल्पबुद्धि; [सं. सम-ब.] [फा. कम्+अक्ल] –वि. अल्पबुद्धीचा; कमी समजुतीचा; मंद मति. **०असल अस्सल**–वि. १ हलका; कमी योग्यतेचा. २ दासीपुत्र; दासीपुत्र, अकुलीन. कमसल पहा. 'मी कमअस्सल नाहीं.' –चंद्रप्र ८. 'जो कम अस्सल असेल तोच दगलबाजी करतो.' **०इज्जत**–स्त्री. अप्रतिष्ठा. 'अमा गैरहिसाबी जाजती सोसून कमइजतीनें व गैरमेहेरबानीनें पेशजी ही खिद्मत केली नाहीं व पुढेंही न करूं.' –इम ६७. [फा.] **०कस**–वि. कमी कसदार; कमी दर्जाची (जमीन). (क्रि० होणें). –शे ८.१४५. **०कसर**–वि. जवळजवळ; सुमारें; थोडें कमी असलेलें; कमींतकमी. 'मशारनिलेस जाऊन कमकसर एक साल गुजरलें.' –रा १०.१६४. '...फुलें त्यांजवर उधळतात तेव्हां कमकसर जमिनीवर घोटघाइतका तुळशीफुलांचा थर...पडलेला असतो.' –तीप्र ११७. [फा. कम्+अर. कसर्=न्यून] **०कायदा**–पु. १ कायदा, शिस्त, सभ्यपणा, शिष्टाचार याची उणीव; सभ्यपणाची रीत, वळण, शिस्त इत्यादीमधील सदोषता, सैलपणा, ढिलाई; बेकायदा–शिस्त वर्तन. 'कमवेतन रहावें, पण कमकायदा राहूं नये.' 'म्यां त्याचे घरीं कमकायदा पाहिला म्हणून जाणें सोडलें.' २ दोष; उणीव; पद्धतशीर नसणें; योग्य वहिवाटी–प्रमाणापेक्षां कमी असणें. (क्रि० करणें) [फा. कम्+अर. कायदा] **०कुवत**–वि. दुबळा; अशक्त; हलका; कमजोर; निर्बळ; अधु; पंगु. 'महाराष्ट्रीय मेंदू इतका कमकुवत झाला काय?' –नाकु ३.१६. [फा. कम्+कुवत्] **०जयाद**–वि. कमी अधिक; कमी किंवा जास्त. –पु. कमीपणा किंवा आधिक्य; उणाई किंवा फाजीलपणा; उणीव किंवा चढ. –वाडसमा २.२५८. [फा. कम्+झियाद्] **०जात**–वि. हलक्या जातीचा; हीन कुळांतील; लेकवळा; कमसल. [फा. कम्+झात्]

०जादा–वि. कमी अधिक. 'कमजादा होईल त्याप्रमाणें करार करून घेऊन लेहून पाठवितों.' –खरे १.४३८. [फा. कम्+झियाद्] **०जास्त–स्ती**–वि. कमीजास्ती; थोडें किंवा अधिक, अधिकउणें. [फा. कम्+झियाद्] –नस्त्री. उणीव किंवा चढ. कमतरता किंवा आधिक्य. **०जोर**–वि. दुर्बळ, अशक्त. कमकुवत पहा. [फा. कम्+झोर्] **०तर**–स्त्री. १ कर्तव्य करण्यास चुकणें; कर्तव्य टाळणें; साधारण चूक, दोष. (क्रि० होणें–पडणें). [फा. कम्+तर्] –वि. १ उणें; कमी असलेलें; अल्पतर. २ क्षुद्र; निःसत्व. 'पातशाही कमतर पडली असें समजून राजियानें विजापूरचे किल्हे तळ कोंकणांत होते ते सर्व घेरले.' –सभासद २०. २१. **०तरपणा**–वि. कमीपणा. –गल्लि ३.२४. **०तरीन**–वि. १ (लेखन–पत्रव्यवहारांत रूढ) कमी योग्यतेचा; कमी प्रतीचा; हलक्या दर्जाचा; अतिक्षुल्लक. (लेखक स्वतःविषयीं हा शब्द सौजन्यानें योजतो.) 'बंदे कमतरीन'–रा १५.९९. २ कमींत कमी. 'सिबंदीचे कम–तरीन पन्नास साठ लक्ष देणें आहे.' –रा १२. ८७. [फा. कम्+तरीन्] **०तोल**–वि. १ वजनांत कमी असलेला. २ (ल.) कमी दर्जाचा, हलका, कमी योग्यतेचा. [फा. कम्+सं. तुल्] **०दर**–पु. कमी झालेला भाव किंवा दर (विशेषतः साऱ्याचा). [फा. कम्+दर] **०दरी**–वि. ज्याचा भाव कमी झाला असा (विशेषतः सारा). **०दस्त**–पु. कमी कर किंवा सारा. [फा. कम्+दस्त=हात] **०दस्ती**–वि. जीवरील कर कमी झाला अशी, जीवरील कर कमी आहे अशी (जमीन वगैरे). **०नशीब**–न. दुर्दैव. [फा. कम्+नसीब्]. **०नशिबी**–वि. दुर्दैवी; दैवहीन. **०पेश(ष)बेश**–कंपेश पहा. **०बख्त–बखत**–वि. १ दुर्दैवी, कमी नशीबाचा; दैवहीन. २ लुच्चा; लबाड; दुष्ट. 'या कमबख्त मनुष्यास माझ्या डोळ्यांसमोरून दूर करा.' –गुलबकावली. [फा. कम्+बख्त्] **०बख्तगी**–स्त्री. १ दुर्दैवीपणा. २ संकट; आपत्ति; मार खाण्याचा प्रसंग; शिक्षा घडण्याची शक्यता. कंबख्ती पहा. (क्रि० येणें, भरणें) [फा. कम्+बख्त्] **०लावणें**–न. १ (कों.) आगरांत दर विघा माड, पोफळी अमुक असाव्या असा शिरस्ता असतां त्याहून कमी लागण करणें (याच्या उलट भर लावणें). २ कमी लागणीमुळें कमी केलेला सारा. [फा. कम्+लावणें]

कमकमचें–क्रि. (गो.) थक्क होणें; आश्चर्यचकित होणें.

कमचा–ची–स्त्री. १ (हिं.) फोक; फोकाटी; बारीक छडी शिपटी; शिरटी. २ बांबूची बारीक कांबीट; कामटी 'गोसावी नंग पिऊन भांग हातीं घेउन समसेर कमची खबर आम्ही घेतों फिरंग्याची.' –ऐपो ३९२. ३ वेताची छडी; वेताची काठी; चमकी. 'कमचा पाठीं उडती भरी.' –(नवनीत) अमृतराय २३९. 'म्हणे गंगु हैबती हो अशी कशी प्रीती तुमची महादेव. ख्याल करती विलायती थेट कमची.' –प्रला १४३. [तु. कमची; हिं. कमची=छडी; सं. कमट=वेळू]

कमट–न. कमठ; कांसव; कच्छ; कूर्म; 'रूपे कमट तुझा पती तीव्र दृष्टी आकृती.' –होला ३०. [सं. कमठ]

कमटा–ठा–पु. धनुष्य (विशेषतः कळकाचें किंवा शिंगाचें) तीरकमटा असा संयुक्त शब्द बहुधा येतो. 'गोसाव्यानें लगट करून मार बसवी तिरकमठ्याचा.' –ऐपो. ३९२. 'या लाठी कमठा बाण.' –संग्रामगीतें २१. [सं. कमठ=बांबू; हिं. कमठा=धनुष्य]

कमठ–पु. कांसव; कूर्म. 'नातरी पाठी करोनि निवर. रूप धरी कमठाचें.' –एरुस्व २.१३. 'म्हणे कमठ जाहला तुझा भ्रतार. कूर्म दृष्टी पाहत परमतीव्र.' –हवि ३०.३८. [सं.]

कमंडलु–पुन. माती, लांकूड किंवा धातु यांचें केलेलें पाण्याचें भांडें; तुंबा; विशेषतः संन्यासी किंवा ब्रह्मचारी वापरतात. कह भोपळ्याचाहि कमंडलू करितात. 'करिं कमंडलु दंड मृगाजिन.' –(वामन) नवनीत १०९. [सं.]

कमडी–स्त्री. १ (ना.) वेळूचें कांबीट. २ कोपरापासून मनगटापर्यंतचें हाताचें हाड. कंबडी पहा.

कमत–न. (कर्ना.) घराऊ शेती; स्वतः कसलेली शेती; घरवहा शेती; कुळेबावा. 'त्या इसमाच्या घरीं दहा बैलांचें कमत आहे.' उत्तर हिंदुस्तानांत कामत (उपरी माणसाची शेती) हा शब्द यावरूनच पडला आहे. [बे]

कमतणूक–स्त्री. कमतरता; न्यूनता; तूट; उणीव. [फा. कम्]

कमतनूक–वि. १ सडपातळ; कृश; बारीक; किडकिडीत; रोड (मनुष्य किंवा जनावर). २ कमकुवत; बारीक; लेचापेचा (खांब, वासा; इमारत; वगैरे). [फा. कम्+सं. तनु]

कमतरता–स्त्री. उणीव; कमतणूक पहा. [फा. कम्]

कमता–वि. कमी; उणें; अल्प; पाहिजे त्यापेक्षां थोडें. [फा. कम्]

कमताई–स्त्री. उणीव; वाण; न्यूनता; कमतरता [फा. कम्]

कमतावणें–अक्रि. हलकें होणें; उतरणें; हळु हळु कमी होत जाणें. [कमता]

कमतावा–पु. बट्टा; कसर. (इं.) एक्सचेंज डिफरन्स. हुंडणावळ. 'रुपयाची किंमत वाढल्यास शेतकऱ्यांच्या साऱ्याच्या रुपयांची संख्या त्या प्रमाणानें कमी करून त्यास कमतावाचा फायदा द्यावयास नको होता काय? –टि २.४०२. [फा. कम्]

कमती–स्त्री. तूट; वाण; कमीपणा. –वि. १ थोडें, अल्प, कमी. 'त्याला प्रसंग फार कमती असत.' म. सहावें पुस्तक (१८७५) १९८. २ उणें; उणीव; वाण; कमीपणा. [फा. कमती] **०चढती**–स्त्री. उतारचढ, क्षयवृद्धि. [फा. कमती+सं. वृध्]

कमन—वि. सुंदर; प्रियकर; रमणीय; कमनीय. 'हृदयीं वाहूनि कमना । प्रेमें लाविला स्तना.' –आपू ९. [सं. कम्=प्रेम करणें]

कमनीय—वि. सुंदर; पसंत; मनोहर; तोषद; इष्ट; कमन. 'गणाधीशा ईशा परम रमणीया कमनिया' –दावि २२२. 'कमनीय बाला' [सं. कम्=आवडणें; प्रेम करणें]

कमर—स्त्री. १ कंबर; कटि; मध्य; माज. २ (जंबियाचा एक डाव) आपल्या हातांतील जंबियानें जोडीदाराच्या उजव्या बाजूच्या कमरेवर कनवटीजवळ मारणें. [फा. कमर्, तुल. सं. ककुम्मती] ०**कचका**–पु गुडघ्यानें पाठींत मारलेला ठोसा, गुद्दा, धक्का. (क्रि० मारणें–देणें–बसणें–बसविणें) ०**कोट**–(**कंबर-कोट**)–पु. (ना.) कंबरेपर्यंत लांब असलेला व अंगास घट्ट होणारा कोट, अंगरखा. हा आडाणी लोक वापरतात. ०**खुलाई**–स्त्री. (हिं.) अपराधी कुळाकडे खंड, गुन्हेगारी वगैरे कारणाकरितां आलेल्या शिपायास कंबर सोडावयाकरितां द्यावें लागणारें द्रव्य. (सरकारी शिपाई हा पैसा ग्रास देऊन उकळून घेतो, एरवीं गुन्हेगाराला कांहीं वेहप्रमें इ० हि करून देत नाहीं). ०**खोडा**–पु. (मल्लविद्या) कुस्तींतील एक पेंच. आपला एक पाय जोडीदाराच्या पोटाखालीं घालून त्या पायाचा आपला पंजा आपल्या दुसऱ्या पायाच्या गुडघ्याच्या लवणींत धरून जोडीदाराला आवळून घुसमटून त्याला चीत करणें. [कमर+खोडा] ०**गुर्दा**–पु. कमरेस बांधावयाची गदा. –इम १०. [कमर+गुर्दा] ०**ठाव**–वि. १ कमरेपर्यंत, कमर बुडेल इतकें (पाणी वगैरे); कंबरभर. –पु. २ कमरेइतकी पाण्याची खोली. ०**ताऱ्यो**–पु. (ना.) मुलांचा एक मैदानी खेळ. ०**पट्टा-टूटी**–पुस्त्री. १ कमरेभोंवतीं घालावयाचा सोन्याचा किंवा चांदीचा पट्टा; स्त्रियांचा एक दागिना. २ कमरबंद. [कमर+पट] ०**पाईक**–पु. (गो.) शूद्रांपैकीं एक जात ०**बंद**–पु. १ करगोटा. २ काचा, कमरेस बांधावयाची वस्तू ३ तरवार लटकविण्यासाठीं कमरेस बांधावयाचा पट्टा; दाली. ४ कांहीं अंगरख्यास असणारा कमरेजवळ बांधावयाचा बंद. ५ कमरपट्टा पहा. [फा. कमर्+ बंद्, सं. बंध.] –वि. सिद्ध; तयार; कटिबद्ध (एकादें काम करावयासाठीं). 'आजि कमरबद होवोनि.' –मसंगी ५०. ०**बंदगी**–**बंदी**–स्त्री. १ सिद्धता; तयारी; मुस्तेदी (युद्धाची, प्रामांतराची वगैरे). 'तमाम खुषकीतील सरदारानीं एकदिल होऊन इंग्रजांचे तंबीवरी कमरबंदी केली.' –रा १०.१९९. २ तयार होणें; सिद्ध होणें; काचा बांधणें (गांवास जाणें, युद्धास जाणें वगैरेसाठीं). ०**बस्ता**–पु. १ सिद्धता; तयारी, सज्जता. कमरबंदी पहा. (क्रि० करणें, बांधणें). 'कास कासली वरून ज्यानें कंमरबस्ता केली.' –ऐपो ७०. २ कमरपट्टा काचा; कमर; बांधावयाचे वस्त्र. [फा. कमर्+बस्ता; सं. वस्त्र] ०**बस्ती**–स्त्री. कमरबंदी. 'बरकड कंबरबस्ती करून। कल्पिल्या मार्गी चालिले ॥' –नव १५. ८९. [फा. कमर्+बस्ती] ०**मोड**–स्त्री (स्वतःची कंबर मोडणें). –वि. १ (ल.) अति मेहनतीचें, दगदगीचें. २ कमरमोड होण्यासारखें. [फा. कमर्+मोड] ०**मोडकाम**–न. अति श्रम पडणारें काम; अति कष्टाचें काम. ०**मोडी इरलें**–न. ज्याचा खालचा भाग थोडा आंतील बाजूस वळविला आहे (इरलें घेतलेला मनुष्य खाली वांकल्यास जो वळलेला भाग पाठीच्या खालीं येईल) असें इरलें. [फा. कमर्+मोडणें+इरलें] ०**सरी**–स्त्री. (गो.) घराचे वांसे वाकूं नयेत म्हणून मध्यें आडवें घालतात तें लांकूड. भिंतीवरील सर. –**कमरेचा कांटा**–पाठीच्या कण्याचा अगदीं शेवटचा मणका, याच्या उलट मानेचा कांटा. (क्रि० हिला होणें= अगदीं गळून जाणें; फार त्रास होणें). –**खवाट-टा**–नपु. कुल्ल्याचा भाग; मांडीचा सांधा; ढुंगण. –**जोर**–पु. शारीरिक बळ (पैसा, मित्र, बुद्धि यांच्या बळाहून भिन्न). –**ढिला**–वि. १ शक्तिहीन; निर्बळ; कमजोर. २ नपुंसक; नेभळा; पुरुषत्वहीन. –**सांधा**–पु. कमरेचा खवाटा; कुल्ल्याचा भाग; ढुंगण. –**ची कमान**–स्त्री. कुबड; वांकलेलें शरीर. 'कमरेची कमान झाली तरी मी तरुण आहे असें त्याला वाटतें.' ०**कसणें**–(वाप्र.) सिद्ध होणें; तयार होणें; काच्यानें कमर बांधणें. 'संभाजी महाराजांचा पुतळा उभारण्यास या उभयतां महाराजांच्या विद्यमान वंशजांनीं कंबर कसली पाहिजे.' –सासं २. १८०. ०**खचणें**–१ अशक्त होणें; कमरेंत जोर नसणें; कमर निर्जीव होणें. २ (ल.) उत्साह, आशा, धैर्य सुटणें; हिंमत, धमक नाहींशी होणें. –**रेचे टाके ढिले होणें**–अति श्रमित होणें; फार कष्ट होणें; दमणें. 'यामुळें साऱ्या नोकरांच्या कमरेचे टांके (पांचसहा तासांत अगदी) ढिले होऊन जातात.' –आगर ३.४५. ०**ताठणें**–आजारामुळें किंवा अशक्तपणामुळें कमर हालविण्याची शक्ति न राहाणें; एकसारखें बसून किंवा उभे राहिल्यानें कमरेस ताठरपणा येणें. ०**धरणें**–कमर दुखणें किंवा ताठणें; कमरेंत उसण भरणें. ०**बसणें**–कमर खचणें; धैर्यहीन होणें; घाबरणें. ०**बांधणें**–सिद्ध होणें; तयार राहणें; उत्साह बाळगणें (एखाद्या कामास). 'पुढें वंशवृद्धी करण्यारतव कंबर बांधा।' –प्रला १३१. 'तेव्हां अर्जुन जोंवर हें संकट अनिवार्य झालें नाहीं तोंवरच तिच्या कैवाऱ्यांस कंबर बांधण्यास अवकाश आहे.' –नि ६. ०**भरणें**–१ कंबर धरणें पहा. २ (चांभारधंदा) टांच व टाळा यांमधील भागांत भर टाकणें. ०**मोडणें**–१ कमर खचणें पहा. २ दुमकत–मुरडत चालणें. 'चालतां कमर ठुमकत चमकत मोडितें।' –प्रला १५७. ०**वांकणें**–१ कुबड निघणें; वातादि विकारामुळें शरीराची कमान होणें. 'कुब्जेची कमर सतरा ठिकाणीं वांकली होती.' २ क्षीण होणें; अशक्त, दुर्बल

होणें; पोंक येणें. **०सोडणें**–१ कमरेचा बंद ढिला करणें; काढून टाकणें. २ पोषाख उतरणें. ३ (ल.) विश्रांति घेणें; जामानिमा उतरणें. ' सोडीना कंमर कधीं काढीना पायजमा। ' –प्रला ६४.

कमर—पु. (बे.) तेलकट पदार्थे विस्तवांत जळला असतां येणारी घाण. [का. कमरु=जळकट]

कमरक-ख—न. एक झाड व त्याचें आंबट फळ. कमेर; कंब्रक; कम्रक. –शे ९.२६२; ६.२६१. हें झाड फार मोठें होत नाहीं. पानें पातळ, रंग हिरवा, छाया थंड असते. फळें येतात त्यांचें लोणचें करतात. फळास चार धारा असतात. ' सप्ताळें, ळंस, पुंडे, कविठ, कमरखे, वाळकें सूक्ष्म, थोरें. । ' –सारुह ३.४९. [सं. कमेरंग, हिं. कमरख]

कमरकस—पु. पळसाचा डिंक. हा औषधोपयोगी आहे बाळंतिणीस देतात, हा शक्तिवर्धक आहे. –प्रसुक ६. [फा. कमर्+कस]

कमरका-गा,-कंबर्का—पु. १ पर्वताचा मध्यभागचा भोंवतालीं पुढें आलेला विभाग. 'भेटी घेऊन श्रीमंतांस खालीं किल्ल्याच्या कमरग्यांत चौक्या आहेत तेथें घेऊन आले. ' –खरे ६.३१९३. २ सैन्याची बगल, बाजू, मध्यभाग. ' सीतर पहाड पहा जीवबादादा कंबरक्यांत सोडी बार। ' –ऐपो २५८. (क्रि. मारणें.) ३ एखाद्या भांड्याचा पुढें आलेला (फुगीर) किंवा (बसकट) आंत गेलेला भाग; आवळ किंवा वाढलेला भांड्याचा भाग. ४ (क) कंबर, मध्यभाग. ५ (मल्लविद्या) कंबरपकड, कमरेंत धरणें. (कुस्तींतील एक डाव) **०मारणें**–शत्रूवर बाजूनें हल्ला करणें. [फा. कमर्+गाह्=जागा]

कमरबस्तो—वि. (गो.) निगरगट्ट; निर्लज्ज (मनुष्य) [फा. कमरबस्ता=तयार, सिद्ध]

कमरा—पु. (हिं.) कोठडी; खोली. [हिं. कमरा; तुल० ग्रीक कमरा=कमानदार वस्तु: लॅ. कॅमेरा=खोली: इं. कॅमेरा, चेंबर फा. कमरा=पुढची बाजू उघडी असलेली खोली, दालन, मनोरा]

कमरो—वि. कमर दुखावलेला; कमरेस ताण बसलेला; कमरमोडका; अशक्त. –स्त्री. घोडयाचा एक रोग. घोडा वरून पडला किंवा पाय घसरून पडल्यानें किंवा उंच जागेवरून पडल्यानें अथवा हवेमुळें त्याची कंबर तुटते म्हणजे लब खाते व मानेच्या शिरा तुटतात व त्यास जमिनीवरून उठतां येत नाहीं, ह लक्षणें होतात. –अश्वप २.१०९.

कमल-ळ—न. १ तळ्यांत, सरोवरांत उत्पन्न होणारें फूल याचे कांदे असुन त्यास लांबट देठ येतो व देठास फूल येतें; पान वाटोळें असतें. कमळाच्या तांबडें, पांढरें, गुलाबी, निळें अशा रंगपरत्वें जाती असुन तांबडया कमळास कोकनद किंवा निळ्या कमळास इंदीवर म्हणतात. शिवाय कल्हार, कुमुद, कमलाक्ष, पोयसर, अशा जाती आहेत. पोयसर कमळास चपटें फळ येतें. त्यांत पांच सहा बिया असतात. त्यांस कमलाक्ष किंवा कमळकाकडी म्हणतात. कमलाक्षाच्या काशीकडे लाह्या करतात. कमळाच्या देठास भिसे म्हणतात कमलाच्या सर्व वेलास कमलिनी म्हणतात. शरीरावयवांचें सौंदर्य दाखविण्याकरितां त्या त्या अवयववाचक नामांच्यापुढें कमल शब्द घालून समासांत योजितात. जसें:–मुखकमल, नेत्रकमल, चरणकमल इ०. २ पूजेचें देव ठेवावयाचें कमळाच्या आकाराचें एक पात्र; देवाचें आसन, बैठक. ३ गर्भ. ' कमळ लागलें फिरूं पोटामधें करी कांति झळझळा। ' –पला १००. ४ केळफूल. ' जैसें केळीचें कमळ। तैसें हृदयीं अष्टदळ। ' –एभा १४.४६५. [सं.] **०कला-ळा**–स्त्री. कमलाची कांति, सौंदर्य. (ल.) तेज; सौंदर्य; शोभा; कांति, (चेहऱ्याची इ०). **०काकडी**–१ कमळांतील बी. २ एक वनस्पति. कमलाक्ष पहा. –शे ९.२३७. **०गट्ट**–पु. कमळाचें बीं ज्यांत असतें तो गाभा [कमळ+गट्टा=गोळा कांदा] **०जन्मा**–पु. कमलामध्यें जन्मलेला; कमलोद्भव ब्रह्मा. ' तंव म्हणे तो कमळजन्मा। भूतांप्रति। ' –ज्ञा ३ ८७. [सं. कमल+जन्म] **०जा**–स्त्री. कमलांतून उत्पन्न झालेली; लक्ष्मी; रमा. [सं.] **०नयन**–वि. कमलासारखे सुंदर डोळे असलेला; कमलाक्ष. –पु. विष्णु; लक्ष्मीपति. ' कमळनयना कमळापती। थोर अपकीर्ती तुज तेव्हां ॥ ' –एरुस्व ४.१७. **०नाल**—न. कमळाचा देठ [सं.] **०पिंडी**–स्त्री. (नृत्य) कमळाच्या आकारांत नर्तकांनीं उभें राहून नृत्य करणें. **०बीज**–न. कमळाचें बीं, अठरा उपधान्यांत याची गणना होते. याचे माळेचे मणी करतात. कमलबी औषधी आहे. कमलाक्ष पहा.

कमला-ळा—स्त्री. १ लक्ष्मी; पद्मा. ' शिणली कमळा जेथ वावटे। ' –ज्ञा ११.२१९. २ (ल.) सुंदर स्त्री. ३ भ्रमरी. [सं.]

कमला-ळा-पति—पु. विष्णु ' तुका म्हणे माझी विनंती। तुम्ही परिसा कमळापती। ' –तुगा १८३४ ' जो सच्चिदानंद कमळापती। ' –पांप्र ४५ १. [सं. कमला+पति]

कमलाकर—न. कमळांचें तळें; सरोवर. ' कमलाकर मधुपांतें जेवि प्रेषूनि वायुसह वास। ' –मोसभा १.९. [सं. कमल+आकर]

कमलावरु—पु. कमलावर; विष्णु. ' प्रजापालनीं कमलावरु। ' –सुवन (नवनीत पृ. १८२) [कमला+वर]

कमलासन—पु. (नेहमीं कमलावर स्थित असतो म्हणून) ब्रह्मादेव. [सं. कमल+आसन]

कमलाक्ष—पु. १ कमळाचें बीं, याचे माळेचे मणी करतात. कमलबीज पहा. कमळकांकडी. –शे ९.२३७. २ कमलासारख्या डोळ्याचा परमेश्वर; देव. ' तुमचे छायेसी बैसला कमलाक्ष। ' –ह १८.५९ (नवनीत पृ. २२३). –स्त्री. एक फुल झाड. –न. त्याचें फूल. –वि. कमळासारखें सुंदर डोळे असलेला; कमलनयन. [सं. कमल+अक्षि]

कमलिनी, कमळ-ळि-णी—स्त्री. १ कमळाचें झाड. २ कमल; कमलपुष्प. 'किं रविकिरणीं कमळणी विकासति । दाता देखतां याचक हर्षती ।'; 'मुक्तता होऊं पाहे, कमळिणीपासुनि भ्रमरा ।'–होला १६. [सं.] **०वरचा बिंदू**–पु. १ कमळाच्या पानावरील पाण्याचा थेंब. २ (ल.) कमलाच्या पानावर पाण्याचा थेंब पडला असतां त्याच्या गुळगुळीतपणामुळ तो वाटोळा होऊन गडगडत पडून जातो यावरून आयुष्य, संपत्ति, वैभव, ऐश्वर्य वगैरची क्षणभंगुरता व अनिश्चितता दाखविण्याची काव्यांतील उपमा. ३ मन, हेतु, वचन यांचें चंचलत्व, असत्यता, बेभरवंसा दाखविण्यासहि योजतात. पाण्यावरचा बुडबुडा पहा.

कमविणें—उक्रि. १ कमावणें; मिळविणें; प्राप्त करून घेणें; कमाई करणें. म्ह० कवडीपासून कमवावें लाखापासुन खर्चावें. २ कातडें वगैरेवर संस्कार करणें; नरम करणें. ३ मेहनतीनें, व्यायामानें शरीर तयार करणें. ४ शेतास खत घालून, नांगरून त्याची मशागत करणें; लागवडीस उपयुक्त करणें. [सं. कम्=इच्छा करणें–प्रयोजक-कामय् किंवा कृ–कर्म; हिं. कमाना; प्रा. कम्मवण=उपभोग]

कमशकुनी—वि. (व.) नाजूक, फारसे श्रम सहन न करणारा, होणारा [फा. कम्+म. शकणें]

कमसल—वि. १ कम-अस्सल पहा. हलका; कमी योग्यतेचा. म्ह० १ असल आपल्या असलपणावर गेला कमसल म्हणतो मला म्याला. २ 'कमसल आपला कमसलपणा टाकीत नाहीं तर असलानें असलपणा कां टाकावा?' २ हलक्या कुळांतील, दासीपुत्र. [फा. कम्+अस्सल्]

कमहिंमत—स्त्री. भ्याडपणा; भीरुता; दुर्बलता. 'याजवरून श्रीमंतास आपली कमहिंमत दिसेल.'–दिमरा १.२२. [फा. कम्; अर. हिम्मत्]

कमळण—स्त्री. कमळाचा वेल. 'कमळण तळ्यांत.'?

कमळदाँकॉ—पु (गो.) एक पक्षी.

कमा—पु घोड्याच्या पायास होणारा रोग.–अश्वप २.२८२.

कमाई—स्त्री. १ (हिं.) मिळकत, प्राप्ति; नफा; फायदा. कमाईस मोल येथें नका रीस मानूं ।'–तुगा ३३५. जो दुवा देशील पांथा तेवढी माझी कमाई.–यशोधन–पाणपोई. २ (ल.) पुण्यायी; भाग्य; पूर्वसंचित. 'घटकेंत बुडाला सरली ज्याची कमाई ।'–ऐपो ४०५. 'धन्य कमाई तयाची ।'–दावि २९०. ३ मशागत, मेहनत (शेताची–नांगरून, खत घालून, पाणी देऊन, वगैरे) ४ पीठ मळणें (भाकरी करितां); तिंबणें (कणीक वगैरे); चेंचणें. ५ तुडवणें; मळणें (चुना वगैरे). एखादी वस्तु तयार करण्यासाठीं मळणें, मिसळणें वगैरे करावी लागणारी खटपट. ६ वठणीस आणणें, शिकवून तयार करणें, (घोडा वगैरे). ७ कातडें कमाविण्याची क्रिया व त्याबद्दलची मजुरी. [सं. कम्=इच्छा करणें, किंवा कृ–कर्म; हिं. कमाई; गो. कमाय] **०पूत**–वि. (ना.) कर्ता, मिळविता, कमाई करणारा (पुरुष). [कमाई+पूत] **०चा हीन**–दैवहीन; अभागी. 'मी तरी कमाईचाहीन। ह्यास्तव जीवीं वाटतो शीण । तूं अनाथ बंधु करुणाघन। तें साच वचन करि आतां ॥'

कमाऊ—वि. १ मिळविणारा; कर्ता, जोडता (पुरुष). २ चांगला तयार केलेला, मळलेला, चिकट केलेला, कमावलेला (चुना माती रंग, वगैरे). [कमाविंणे. हिं. कमाऊ] **०पूत**–पु. कर्तबांतील कर्ता पुरुष; पोशिंदा; कुटुंबांतील मिळविता मनुष्य. (सामा.) जोडता पूत. [कमाऊ+पूत]

कमाच—न. एक तंतुवाद्य. 'वीणा चिपोळया कमाच चिरक ।'–दावी १७५. [फा. कमान्चा=एक तंतुवाद्य]

कमांडर—पु. सेनापति. **०इन्-चीफ**–सर सेनापति; मुख्य सेनापति; सेनाध्यक्ष. [इं.]

कमाण-न—स्त्री. १ अर्ध वर्तुळ; मेहेराप (इमारतीच्या बांधकामांतील). (इं.) आर्च. बांधकामाचें वजन सारखें वांटलें जावें म्हणून जें दरवाजे, खिडक्या वगैरेवर गोल, निमगोल इ. प्रकारचें बांधकाम करतात तें. २ धनुष्य; कमठा; मुलतानी कमान (धनुष्य) फार प्रसिद्ध असुन तिची उपमा नेहेमीं देण्यांत येते. 'आली वीरश्री हात कमान घातला।'–ऐपो ८८. 'मुलतानी भुवया कशा कमाणा जशा बाहार मधीं कुंकाचे टिकलीचा।'–होला १०४. 'दुरवर किर्ती हि गोष्ट आर्थी जशी काई कमान मुलतानी।'–गापो ७. ३ धडधाळ, कुलुप, उंदराचा सांपळा वगैरेमधील दाब उत्पन्न करणारी पोलादी कंसाकृति अगर वर्तुलाकृति तार किंवा पातळ पट्टीची रचना; स्प्रिंग; आडवी पट्टी. 'धडधाळांतील कमानीचा धर्म सुटण्याचा आहे. ती सारखी सुटण्याचा प्रयत्न करीत असते.'–सृष्टि २८. ४ (पिंजारीधंदा) पिंजारी लोकांचें कापूस पिंजण्याचें हत्यार (धनुकली). यास तांत लावलेली असते. ५ (सुतारी, कांसारी) लामता फिरविण्यासाठीं हात दीड हात लांब काठीच्या टोकास सुतळी बांधून केलेलें हत्यार, धनुकली. ६ (ल.) इंद्रधनुष्य. 'विलसती गगनांत कमाना।'–दावि ३७९. ७ (जरतारी धंदा) तराकांतील फिरकी दाबून धरणारें साधन; कुत्रें. ८ शरीराची विशिष्ट रचना; हात व पाय जमिनीवर टेकून तोंड वर करून पोटाचा भाग उंच उचलणें. ९ बैल गाडीस (ऊन, पाऊस लागूं नये म्हणून) तट्टया घालण्यासाठीं आंतून कळक किंवा वेत याच्या कांबी बांधतात त्या प्रत्येकी. [फा. कमान्=धनुष्य] **०काढणी**–स्त्री. घोड्याचा दागिना. –स्वप ५३. **०गार**–पु. १ धनुष्य बाण तयार करणारा. २ हाड वैद्य. 'खाले माकणीवर पडोन मांडी जाया जाली, मग कमानगार आणोन बांधली.'–रा ३.११२. [फा. कमान्+गार्] **०दार**–वि. १ मेहेराप, कमान असलेला (अंगरखा, भित, वगैरे). [फा. कमान्+दार्] २ ज्याच्या

जवळ धनुष्यबाण आहे असा; धनुर्धारी. 'मालजेठी कमानदार।' –दावी ६९. **०मारी**–वि. धनुर्धारी; धनुष्य बाण धारण करणारा. चित्रगुप्त ३०.

कमानिक—स्त्री. कमान अर्थ ५ पहा.

कमानीन—पु. कमांडर पहा.

कमाल—स्त्री. १ आत्यंतिकता; पूर्णता; पराकाष्ठा; सर्वांत उच्च मर्यादा. २ (एकाद्या खेडयाचा किंवा प्रदेशाचा) जास्तींत जास्त सरकारी वसूल हा लागवडीच्या जमिनीवर आकारलेला नसून एकूणएक जमीन जमा धरून ती पेरली असतां तींत येणाऱ्या अति उत्कृष्ट पिकाचा अंदाज करून त्या प्रमाणांत बसविलेला असतो; कुलजमा; वसूल. 'साऱ्या प्रांतांत कमाल जमेवर रयत निस्बत दर सदे दहा रुपये.' –खरे ५.२४७१. –वि. आत्यंतिक मर्यादेचा; पराकाष्ठेचा; पूर्ण; अतिशय. 'त्याजवरी दिवसें दिवस कमाल मेहेरबानगी.' –चित्रगुप्त १११. 'ना. शार्पे यांचा कमाल अंदाज खरा धरला तरी फारतर तीस लक्ष रुपये होईल.' –केले १. १३०. (इं.) [अर. कमाल=पूर्ण, पूर्णता] **०करणें**–कल्पनातीत वागणें, पराकोटीला जाणें. 'कमाल केलीस बुवा!' 'जेथें शूरपणा अनंत समरीं शत्रुप्रती दीपवी। तेथें भीरुपणा कमाल करुनी देशास त्या लाजवी।' –भांडाअ ३०३. **०होणें**–कळस होणें; हद्द होणें; पराकाष्ठेप्रत पोंचणें. 'आतां मात्र कमाल झाली म्हणायची!'–(फाटक) नाटयछटा १. –पु. कमाल या शब्दाचा मूळ अरबी अर्थ पूर्णता, संपूर्णपणा, हा जमाबंदीच्या कामांत अनेक सामासिक शब्दांत येतो. जसेः– **०पत्रक, झाडा**–पु. तनखा, रगबा, कूळ, इनाम, मोजणी, वसूल, दर वगैरेंच्या एकुणात रकमांच्या तपशिलाचा पट. **०तनखा**–कमाल अर्थ २ पहा. 'मराठेशाहींत दर गांवाहून जास्तींत जास्त जो वसूल आला, त्याचा दाखला काढून तोच गांवाच्या तनख्याऐवजीं कायम केला.' –गांगा ११. **०रगबा**–तालुका किंवा खेडेगांव यांतील एकंदर जमीन. **०धारा**–अधिकतम, जास्तींत जास्त येणें शक्य असलेला सारा. हा इ.स. १७६९त ठरला गेला. सामाशब्द **०इनाम-दर-मोजणी-वसूल-ठिकेबंदी-आकार-लावणी-घहीत-पडीत-गायरान-हडोळा**–पूर्वीची एकंदर सर्व इनामें, मूळचा किंवा एकंदर सारा, मोजणी, वसूल इ. या समासांत कमाल या शब्दाचे जागीं कमाली असाहि शब्द योजतात. मुसलमानांशी संघटण असलेल्या लोकांच्या तोंडीं कमाल शब्द पूर्णत्व किंवा अतिशय या अर्थानेंच परंतु अनिर्बंध रीतीनें येतो. जसेः–कमाल-दौलत–नशीब–कृपा–पीक–भरणा–पूर–सस्ताई–लढाई–थंडी–ऊन वगैरे. शिवाय स्वतंत्र रीतीनेंहि जसें–जरीमरीचें कमाल, दारिद्र्याचें कमाल इ.

कमालखानी हार—पु. गुडघ्यापर्यंत लांबीचा व दोन ते आठपर्यंत पदर असलेला फुलांचा मोठा हार; कंठा. 'कमाल खानी हार अमोलिक तुरे तसेच राहिले।' –प्रला १००. [कमालखान=एक मनुष्य+हार] (वाप्र.) कमालखानी हार व पंचवीस लडे तुरा=१ मोठा हार व मोठा तुरा. २ (ल.) अंग अत्यंत सुशोभित करणें. (दागिने कपडे वगैरे घालून).

कमावणें-विणें—कमविणें पहा 'भाषा ज्यांनीं कमावली नाहीं...असल्या विद्वान् पण दरिद्री लेखकाच्या हलगर्जीपणाचें हें भयंकर प्रदर्शन नव्हे काय?' –नाकु ३.६. [सं. कम्=इच्छा करणें–प्रयोजक–कामयू किंवा कृ–कर्म; हिं. कमाना; सिं.कमाइणु]

कमावणी—स्त्री. जमिनीची मशागत; जमीन कमावणें –शे ८.१८०. [कमावणें]

कमावता—वि. १ मिळविणारा, संपादन करणारा. २ कार्यकर्ता; जोडता; घरांतील कर्ता (पुरुष). **०पूत**–पु. मिळविणारा, संपादन करणारा माणूस; कर्तापुरुष.

कमावशी—स्त्री. (कु.) मेहनत. [कमविणें]

कमाविशी(सी)-वीस—स्त्री. १ (सरकारी) एकंदर झालेली वसुली. २ वसूल जमा करणें; वसुली काम; कलेक्टरांचें काम; अमीनी. 'मख्त्याच्या कमाविशी करून गोविंदपंतानें सरकारचा फायदा करून दाखविला.' –रालेख १.६६. ३ कारभाराची व्यवस्था; कारभार; देखरेख (खाजगी, जहागिरी किंवा सरकारी). ४ एखाद्या हातीं घेतलेल्या कामांतील नफा, फायदा, लाभ. [कमावणें] **ऐनकमावीस**–निरनिराळ्या प्रकारच्या बागाइत मालावरचा ठराविक वसूल (हा मालाच्या रूपांत घेण्यांत येई). **०जमा**–स्त्री. १ दंड, जप्ती किंवा इतर बाबींपासून झालेली वसुली. २ कमाविसदारानें कमाल वेरजेच्या बाहेर केलेला वसूल. **०दार**–पु. १ वसुली कामावरील मुख्य अधिकारी; जिल्ह्याचा कलेक्टर; अमीन. २ मक्त्यानें वसुलीचें काम करणारा. (ही पद्धत पूर्वी संस्थानांत होती). 'कमाविसदार म्हणजे संस्थानच्या वसुलाचा मक्तेदार होय' –बडोदें राज्यकर्ते ३५५. **०दारी**–स्त्री. कमाविसदाराचें काम किंवा त्याचा हुद्दा.

कमिटकरणें—क्रि. (कायदा) खालच्या कोर्टानें मोठ्या अपराधाबाबत पुरावा धुंडून तो सबळ असल्यास आरोपीला इन्साफाकरितां वरिष्ठ कोर्टाकडे पाठविणें. 'सेशनकमिट्ट करणें' [इं. कमिट्=सोंपविणें]

कमिटी, कमेटी—स्त्री. १ पोटमंडळ; काहीं गृहस्थांची समिति; विशेष प्रश्नांचा विचार करून निर्णय करण्याकरितां नेमलेली एखाद्या संस्थेच्या सभासदांची अगर काहीं गृहस्थांची लहान मंडळी; चौकशीमंडळ. 'या कमेटीच्या आश्रयानें मराठी भाषेंत आजवर बरेच ग्रंथ झाले.' –विवि ८.७.१२१. २ व्यवस्थापक मंडळ; नियुक्तमंडळ. 'स्त्रियांमध्यें संक्षोभन करून शेवटीं एक

प्रचंड कमिटी (व्यवस्थापक मंडळी) उत्पन्न केली आहे. ' –टि ४.९०. ३ पंचायत. [इं. कमिटि]

कमिशन—न. चौकशीमंडळ (सरकारनें अथवा लोकांनीं नेमलेलें); पंचमंडळ; कोर्ट; निवाडा करणारी कमिटी. ' कमिशनमधील सभासद इंग्रज आहेत ' –के १४.६.३०. २ सनद किंवा अखत्यारनामा. ३ (दिलेला) हुद्दा किंवा अधिकार. ' यांतले २२ कमिशनहि देण्याला नालायक ठरले. ' –के २१. ३.३०. ४ अडत; दलाली; मालाचे खरेदीचे व विक्रीचे रकमेवर शेंकडा अमुक रुपये असा जो ठराव असतो तें–छअं १३६. अशा केलेल्या ठरावान्वयें द्यावयाची रक्कम [इं. कमिशन] **०एजंट**–पु. दलाली, अडतीचें काम करणारा; दलाल; अडत्या. [इं]

कमिशनर—पु. १ चौकशीमंडळाचा सभासद. ' बंगाल सरकारचें हें उत्तर आल्यानंतर कलकत्ता म्युनिसिपालिटींत कमिशनरांनीं पुढें काय करावें असा प्रश्न सहजच उत्पन्न झाला. ' –टि २. ५२. २ सात आठ जिल्ह्यांवरील अधिकारी. कलेक्टरवरचा अधिकारी; सरसुभा. [इं कमिशनर]

कमी—वि. १ न्यून; उणा; वाण असलेला. २ आंखूड. त्रुटित; तुटका. [फा. कम्] **०पण–णा**–पु. १ उणीव; कमतरता. २ हलकेपणा; मानहीनता. [फा. कम्] **०घेणें**–स्वतःचा हीनपणा, चूक, दोष, अपूर्णता कबूल करणें; आपल्याकडे दोष पत्करणें. **०पेशी**–वि. कमीजास्त, चुकभूल. कंपेशी पहा. [फा. कम्+बेश्]

कमीज—पु. खमीस, शर्ट; एक प्रकारचा सद्रा, कुडतें. –गलिव्ह २.२०. [अर. कमीस; इटा. कॅमिसा]

कमीन—वि. १ हलका, कमी दर्जाचा; क्षुद्र, उपकार न स्मरणारा; बदनियत; नीच. ' कमीनाचे बाईल व मूल बनाम कमली व राम ऐसें दस्तगीर होऊन. ' –भाद्रीसंवृ ५.०. २ स्वतः आपण (पत्र व्यवहारांत सौजन्यदर्शन). ३ चाकर; नोकर; बंदा. ' बंदकमीन कमीन कहिया. ' –दावी १३४. [फा. कमीन्] **०बच्चा**–वि. (ना.) नीच; हलकट; उपकार न स्मरणारा. [फा. कमीन्=नीच, हलका+हिं. बच्चा; सं. वत्स]

कमुनीदाद्—स्त्री. (गो.) ग्रामसंस्था. [पोर्तु. कम्युनिदाद]

कॅमेरा—पु. १ छायाचित्रलेखनयंत्र; फोटो घेण्याचें यंत्र. २ न्यायाधिशाची बसण्याची खासगी खोली; चेंबर. [इं. कॅमेरा]

कमोद्—पु. १ तांदुळाचा एक प्रकार. या तांदुळास उत्तम वास येतो. २ (संगीत) गायनांतील एक राग. –न. एक प्रकारचें कमळ; कुमुद. [सं. कुमुद–पांढरें कमळ].

कय—१ (गो.) पंचमी विभक्तीचा प्रत्यय. पेक्षां; ऊनः हून. उ० मज्याकुय. २ (कों. कुण.) द्वितीया किंवा चतुर्थीचा प्रत्यय. ' पोठाकय पण नाय्. ' –मसाप २.४.३६८.

कय—(गो.) पोरेंबाळें.

कय—क्रिवि. १ (चित्पा. गो.) कधीं; केव्हां. २ कोठें, (कों.) खय; खे. [सं. क्व.]

कय—स्त्री. (कु.) जहाजें लावण्याच्या सोईची जागा. [इं. की=धक्का]

कयपंजी, करपंजी—(गो.) हातांत वागवावयाची मोठी पगती, दिवा. [सं. कर; का. कय=हात+म. पणती]

कयरा–री, कयवार–री—कैमल्यें पहा.

कयसान—वि. (खा.) कळकलेलें. ' बेरट (लोणचें) कयसान लागतं. ' [सं. कलंक+सम. ? फा. कय=कडवट ?]

कया—स्त्री. तजेला; टवटवी; आरोग्य; निरोगीपणा (चेहऱ्याचा, शरीराचा). [सं. कला–कळा–कया; का. कय=शोभा] **०खाऊ**–वि. १ तेज नाहींसें करणारें; कळाहीन. २ बदनाम, दुर्लौकिक करणारें. **०घान्**–वि. निकोप–निरोगी–टवटवीत चेहऱ्याचा. याच्या उलट; कयाहीन. **०हीन**–वि. १ मंद; सुस्त; आळशी. २ निस्तेज; रोगट.

कयार—वि. लुब्ध; लंपट. ' जीव अस्त्रीयाचे कयार. ' –उषा ५४६.

कयाशी—स्त्री. (व.) यंत्र. [म. कळाशी]

कयास—पु. १ तर्क; अनुमान; अंदाज. ' कयास पुरता करून आम्हांकडे किमपि अंतर नाहीं ऐसें समजोन ' –खरे ६. ३१७२. –शे ८.८५. २ मत; निर्णय; न्यायाधीशानें दिलेला निवाडा, निकाल. ३ मत; विचार. ' जो ज्याच्या कयासास येईल तसा निर्णय करील. ' ' कयास मज हा लया रुद्र करि दया दृष्टि झांकली. ' –ऐपो ३६८. (क्रि० ठरवणें–काढणें–ठरणें–निघणें–करणें). [अर. कियास्] **०नामा**–पु. निकालपत्र; हुकूमनामा; निकालाची नक्कल. [अर. कियास्+फा. नामह्]

कर—पु. १ हात; हस्त. ' सुंदर तें ध्यान उभें विटेवरी। कर कटावरी ठेवूनियां ॥ ' –तुगा १. ' कर श्रवणिं ठेविते नुघडि नेत्र घे भीतिला. ' –केका १०. २ सोंड (हत्तीची) ' गजेंद्राचे बंधू कवळुनि गजेंद्रा निजकरीं. ' –र ५७. ३ किरण; अंशु. ' सहस्रकर. '; ' शिवतला चंद्रकरीं. ' –ज्ञा ११. २४८. ' मन:स्वानंद बोधाचे चंद्रकर. ' –एभा १२.५१७. ४ सरकारी कारभाराबद्दल मोबदला; मजुरी देणें; जमिनीवरील सारा; पट्टी; मालावरील जकात; खंड; खंडणी. ' त्यांनीं आपल्या इच्छेप्रमाणें स्वतंत्र सेस म्हणजे कर बसवून शिक्षण वाढवावें ' –केले १.११८. ५ गांवकामगार व बलुतेदार (जोशी, कुलकर्णी, पाटील इ०) यांना सरकाराकडून दिला जाणारा ठराविक मुशाहिरा. ६ नाव, तर, रस्त्यावरील वाहतुकीचें वाहन यांकडून घेतली जाणारी दस्तुरी. ७ विशिष्ट तीर्थे व देवता यांच्या दर्शनास जाणाऱ्याकडून घेतलेली

जकात; द्रव्य. ८ (सामा.) कांहीं एक नियमानें जें द्यावयाचें ठरविलेलें असतें तें. ' हा त्या राक्षसाचा कर त्या नगरांतील सर्व माणसांना द्यावा लागे. ' ' ज्या घरीं हरीचा कर आहे । त्या घरीं हरी चाकर आहे ॥ ' [सं.] ०संपुट–न. एकास एक जोडलेले असे दोन्ही तळहात; हस्तांजुली. ' तंव करसंपुट आपसें। वामचरणीं बैसे। '–ज्ञा ६.२०१. (वाप्र.) **करास कर मिळविणें**–हातावर हात देणें; वचन देणें. ' मेळउनी करास कर. ' –नव १३ १४. **कर जोडणें, जोडून उभें राहणें**–अभिवादन करणें; विनम्र होणें; सेवक म्हणून सज्ज राहणें. ' ' भूतभविष्य वर्तमान ज्ञान । हें ज्यापुढें उभें कर जोडून । ' –ह ३१.१०.

कर—स्त्री. १ ग्रहण, अयनसंक्रांति व होळी आणि ज्या दिवशीं गांवांत कोणी मनुष्य गेला असेल अशा दिवसांचा पुढील दिवस हा अशुभ मानतात. या दिवशीं कोणतेंहि शुभकृत्य किंवा गमन करूं नये. ' संक्रांतीची कर. ' [सं. करिदिन] २ दिव्याचा एक प्रकार. धर्मग्रथावर तुळस व भांडयांत गंगेचें पाणी ठेवून तें आरोपीनें डोक्यावर घेणें. ठराविक मुदतींत त्यावर कांहीं आपत्ति न आल्यास त्याचा निर्दोषीपणा सिद्ध होत असे.

कर—वि. (एखाद्या) गांवांत राहणारा, गांवचा, असें दाखविणारा प्रत्यय जसेः–काशीकर; पुणेकर; होळकर इ०. [सं. (वुङ्) कः (तास्यार्थी) प्रत्यय. सं. अस्मत्क, युष्मत्क, पाटलिपुत्रकपासून–प्रा. अम्हेकर, तुम्हेकर, पाडलिपुत्तेकेर, म. पाडळि (पुत्र)कर. –भाअ १८३३]

कर—वि. १ कर्तृत्वदर्शक समासांतील शेवटचा शब्द; करणारा. जसेः–प्रकाशकर; शीतकर; सुखकर. २ विशिष्ट काम–धंदा करणारा जसेः–मजूरकर=मजुरी करणारा; काठकर; पोयकर इ०. –अ. ध्वन्यनुकारी अव्ययापुढें येणारा शब्द. जसेः–झटकर; पटकर. [सं. कृ=करणें] –पु कृति; संबंध; संपर्क; हात (कामधामांत). ' ज्याला कर नाहीं त्याला डर नाहीं ' =ज्याच्या हातून पाप घडलें नाहीं त्याला भीति बाळगण्याचें कारण नाहीं

कर—वि. (व.) करपलेले; भाजतांना अधिक होऊन काळे झालेले. ' जवस भाजतांना कर झाले म्हणून चटणी कडू लागते. ' [का. करि=भाजणें, करपणें; करकु=करपलेलें]

करक—पु. दिंडा नांवाच्या तांबडया झाडाचा फोक. शिम्ग्यांत हे फोक फुपाट्यांत भाजतात व जमिनीवर आपटतात तेव्हां आवाज होतो. [सं. करीर; गु. करकटी=फांदी]

करक—स्त्री. आखडल्यामुळें, ताण बसल्यामुळें किंवा वातविकारानें मानेंत, पाठींत भरणारी लचक, उसण किंवा निघणारी कळ ' पाठीमधें करक भरली । ' –दा १८.१०.२४. [हिं. करक=दुखणें]

करक—पु. १ कमंडलु; मडकें; नारळाच्या करवंटीचें बेलें (संन्याशी, ब्रह्मचारी पाणी पिण्यास उपयोगांत आणतात तें). २ झालींतील दिवा. [सं. करक]

करक—पु. पावसांतील गार. ' पाषाण करका वोसांडी. –नव १३.१३४. ' मग अमृतवचाच्याही जीची हांसेल धूलि करकेला । ' –मोआदि २.१२०. [सं. करक=पावसांतील गार]

करकचणें, करकचावणें, करकटणें, करकसणें—उकि. जोरानें घट्ट आंवळून बांधणें (पुडकें, ओझें वगैर). २ पक्कें, गच्च धरणें. (बांधणें, आंवळणें, ओढणें, धरणें या क्रियापदांनां जोडून हा शब्द येतो जसें.–करकचून बांध, धर.) [ध्व. फा. कर्=शक्ति+म. कसणें; हिं. करकस]

करकचा—पु. १ (रा.) करकोचः शरीर किंवा वस्तु यांस दोरीनें आवळून बांधण्यानें उमटणारी खूण. २ एखाद्या वस्तूस दोरी बांधण्यासाठीं पाडलेली खांच. ३ ओरखाडा [फा. कर्+कसणें]

करकटणें—अक्रि. १ नोकरी वगैरे करतांना हातास पीठ लागून हात करवडणें; स्वयंपाकाचीं भांडीं खरकट्यानें करवडणें, बरबटणें; भरणें. २ भांड्याला चिकटणें, लागणें. (भात, पीठ, इ०) [का. करकु=कीड; (भांड्याच्या बुडाशीं भांडें जळल्यामुळें बरणारें)]

करकभिग—(व) कर्क संक्रांत [स. कर्क]

करकमळिका—स्त्री. तंबोरी. ' शीर कापून आपुलें देखा। यंत्र केलें करकमळिका । ' –सुच ६ ७१. [सं. करकमल]

करकर—स्त्री. कटकट पहा. १ कर्कश, कानास अस्वस्थता उत्पन्न करणारा, कानठळ्या बसविणारा आवाज (कावळ्याच्या ओरडण्याचा, लोखंडी वस्तूवर कानस घासतांना होणारा, दार वगैरेंचा). ' त्यांचें नाम व्यर्थ करकर । जैसें कीर अनुवादती । ' ' कावळ्यानें भयंकर करकर चालविली होती. ' –ज्ञांमू १०. २ कटकट; त्रास; आरडाओरड (भिक्षेची, रागाची, इ०) ' सदा करकर संतांसवें । ' –ब ५४३.५. ३ भांडणतंटा; कज्जेकच; कुरकुर. ' तेंही झालें कुमर । त्यांसी वाढला मत्सर । त्या दोघांची । करकर । वृद्धापकाळीं सोसावी ॥ ' –जै ८९.४०. ४ हट्ट; तक्रार; त्रास; कुरकुर. [ध्व.]

करकर-रां—क्रिवि. कावळ्यांचें ओरडणें; कानशीनें कानस-तांना, दांत खातांना होणारा आवाज, किंवा इतर कर्कश ध्वनि काढून; तसा आवाज होऊन. (क्रि० वाजणें). ' करकरकर वाढा वाजती पाय खोडी । ' –ज्ञवि ४६१. [ध्व. कर.]

करकरणें—उकि. १ (कावळ्यानें) काव ! काव ! शब्द करणें ' कावळा करकरला म्हणून पिंपळ मरत नाहीं. ' २ करकर आवाज करणें (दार, पायांतील जोडा, दोरी, लांकूड वगैरेनीं). ' तंव तो पर्वत समग्र । एकाएकीं करकरिला । ' –ह १२.७३. ३ कर्कश,

कर्णकटु शब्द उच्चारणें. -उक्रि. निंदागर्भित बोलणें; कर्णकटु बोलणें. [ध्व. करकर]

करकरा—पु. १ (गो.) एक लहान मासा. २ (गो.) एक तऱ्हेचा हलवा.

करकराट—पु. एकत्र कर्कश आवाज; हलकल्लोळ; मोठ्यानें करकर शब्द होणें. 'दांत खाऊनि करकराटी।' -मुसभा ७.२४. [ध्व. करकर+आट=अतिशयिततेचा प्रत्यय]

करकराणें—उक्रि. १ करकचणें; घट्ट आवळलें जाणें. २ दातांवर दांत घासुन आवाज काढणें; दांत खाणें. [ध्व. करकर]

करकरीत—वि. १ अगदीं नवा; कोरा; ऐन नवा; नवेपणामुळें कडकड, खडखड, सळसळ, आवाज करणारा (नवा जोडा. कापड वगैरे केव्हां केव्हां घर, भांडें, दागिने यांनांहि लावतात). २ सामान्यतः करकरीत हा शब्द नवा, ताजा, कोरा या शब्दांपुढें आधिक्य, जोर दाखविण्यासाठीं लावतात. जसें:- नवा करकरीत, कोरा करकरीत. ३ कुरकुरीत; खातांना ज्याचा करकर आवाज निघतो असा (पदार्थ, काकडी, आंब्याचें नवें लोणचें). [ध्व.] **॰तिनींसांजा**-स्त्री. अव. फुटकी सांज; ऐन संध्याकाळ; सूर्य मावळल्यानंतरचा संधिप्रकाश (ही वेळ अशुभ मानतात). 'वेळ करकरीत तिन्हि सांजाची होती.' -अभा ६३.

करकरून—क्रिवि. कचकावून; कचकून; रगडून; खचाटून; घट्ट, जोरानें, न सुटे असें आंवळून. (क्रि० बांधणें, धरणें, खेंचणें, ओढणें). 'भस्म ललाटीं धरितों कीं करितों प्रथम बद्ध करकरुनि.' -मोसभा ५.४३. 'कर श्रीकांताचा करकरुनि माता धरि करें।' -वामन, मृत्तिकाभक्षण ४. [ध्वनि]

करकऱ्या—वि. १ किरकिऱ्या; करकर आवाज करणारा; (नवा जोडा, दार, लांकूड इ०). २ किरकिर करणारें; अशक्त; रोगट; रडवें; कटकट लावणारें (मूल). [ध्व. करकर]

करकांड—न. दंड; खांदा व कोपर यांच्यामधील भाग. 'हाणिती करकांडी गदा। मांसाचा करिती चेंदा।' -कथा ३.१०.१४०. [सं. कर+कांड]

करकी—स्त्री. १ (बे.) डोक्यांत गूळ ओतल्यानंतर काहि लीस लागून राहणारा गूळ; गुळाची खरवड. [का. करकु= भांडें जळल्यामुळें त्याच्या बुडाशीं बनणारें कीट]

करकी—स्त्री. (बे.) हरळी.

करकुची—स्त्री. करकोचा पक्ष्याची मादी. [सं. क्रौंच]

करकुची—स्त्री. करकोची पहा.

करकेतन, कर्केतन—न. एक रत्न. याचा रंग रक्त किंवा मधासारखा असतो. हें राजे लोक वापरीत असत. पूर्वी हें फार प्रसिद्ध होतें. पण हल्लीं दुर्मिळ आहे. [सं. कर्केतन]

करकोचा—पु. एक पक्षी; भारडी. [सं. क्रौंच] **करकोच धाड**-स्त्री. करकोचा पक्ष्यांची (उभें पीक असलेल्या शेतावर टोळधाडीप्रमाणें येऊन पडणारी) झुंड, थवा.

करकोचा-ची—पुस्त्री. १ मृदु पदार्थावर दोरी वगैरेनीं आवळल्यामुळें उठणारा वण, खूण. (क्रि० पडणें). २ लांकूड, काठी वगैरेस दोरी बांधण्यासाठीं पाडलेली खांच; अवटी. [करकचणें पहा]

करग—वि. हस्तगत; करगत; स्वाधीन. 'पुण्याविणें जयश्री होईल कशी मुनीश्वरा करगा।' -मोवन ३.८०. [सं. कर+गम्]

करगणें—क्रि. (बे.) करपणें. [का. करकु = जळक्या भांड्याच्या बुडाचें कीट, मस]

करंगळी-गुळी—स्त्री. १ हाताचें किंवा पायाचें शेवटचें लहान बोट. २ पायाच्या करंगळींत घालावयाचें चांदीचें वेढणें (बहुधा मराठ्यांत वापरतात). **म्ह०** करंगळी सुजली म्हणून डोंगरा-एवढी होईल काय? =प्रत्येक पदार्थाच्या वाढीला कांहीं मर्यादा असतेच, कांहीं केल्या तिचें अतिक्रमण होत नाहीं; या अर्थी. 'इंग्रज केवढे, आम्ही केवढे! चालले आपले त्याच्यार्शी बरोबरी लावायला! करंगळी सुजली म्हणून डोंगरा एवढी होईल काय?' -केसरी.

करंगुट—स्त्री. (गो.) एक प्रकारचें भात, साळी.

करगोटा—पु. १ कमरेस बांधावयाचा दोरा, गोफ (रेशमी किंवा चांदी-सोन्याचा); सोन्याचांदीच्या करगोटयास घागऱ्या असतात व मध्यें पान (शिश्राच्छादन) असतें. करगोटा सर्व हिंदु लोक घालतात. बडोद्यास श्रावणीच्या दिवशीं मराठे मंडळींत राखी व करगोटे बांधण्याची चाल आहे. 'खासी व्यक्ति स्त्री असल्यास फक्त राखी व पुरुष असल्यास राखीबरोबर करगोटा याप्रमाणें ज्या त्या खाशाकडे तिकडील जबाबदार इसमाच्या नांवावर एखादा दिवस आगाऊ पाठवून वाटणीच्या यादीवर पावत्या घेणें.' -ऐरापुप्र १४.६६९. २ (कों.) रहाटगाड-ग्याच्या रहाटाच्या चक्रावर बरोबर मध्यावर बांधलेली दोरी; ही सुंभाची असते. [सं. कटि+दोरक; हिं. करगदा] **करगोटे बांधणें-बाटणें**-(बायकी) मुलगा पांच महिन्यांचा झाल्यावर त्यास प्रथम करगोटा बांधतेवेळीं त्याचे समवयस्क अशा चार मुलांस एक एक चांदीचा अथवा रेशमी करगोटा साखर भरलेल्या (चांदीपितळेच्या अगर खोबऱ्याच्या) वाटीसह देण्याची चाल आहे.

करग्रहण—न. पाणिग्रहण; लग्न; विवाह. 'स्वकरग्रहणोद्युक्ता त्या दोघांलाहि केशिनी कन्या।' -मोसभा ५.९५. [सं. कर+ग्रहण]

करचणी—स्त्री. द्राक्षाची एक जात. [करवणा प्रदेशावरून]

करचकर, करचकर, करंजकर, करजकर, करजगार—पु. हत्यारें करणारा; शस्त्रकार; शिकलगार. कारंचकर पहा. –शिल्पवि ६०९. [सं. क्रकचकार]

करंचली, करांचली—स्त्री. (हि.) एक प्रकारची सरळ व लहान तरवार.

करछा-छी—पुस्त्री. (हिं.) उलथणें; हलवाई लोकांचें दूध वगैरे आटवितांना ढवळण्याचें, पदार्थ खालीं वर करण्याचें साधन. [सं. करस्थ; हिं. कर्छा]

करज—(गु.) कर्ज पहा. –मौज २.६.१९३०.

करज, करंज—पु. एक झाड. याच्या बियांचें तेल जाळण्यासाठीं उपयोगी व औषधी आहे यास कडू वास येतो. –शे ११.११४. [स. करंज]

करज, करंज—पु. मुद्रांचे झाड; करंडी पहा.

करज—न. (हातापासुन उत्पन्न झालेंले) हाताच्या बोटाचें नख. 'श्रीरमाकुचयुगीं करजांचे, बालचंद्र करिती कर ज्याचे.' –पार्थभाग्य (वामन) १०. [सं. कर+जन्]

करजतकाळ, करझतकाळ—पु. अति भयंकर मनुष्य, प्राणी, वस्तु, करदनकाळ. [सं. कृतांत+काळ; कदन+काळ?]

करजलपुतळी—स्त्री. दिवा व काजळ लावलेंले भांडें घेऊन शकुन पाहण्याची तऱ्हा. करपुतळी पहा. 'करजळ पुतळ्यातें नित्य चोरून पाहे.' –सारुह ६.८६. [सं. कज्जल+पुतळी]

करजी, करंजी—स्त्री. १ करंज झाडाची शेंग; बीं; इ०. २ एक झाड. ३ (करंजाच्या शेंगेच्या आकाराचें) एक पक्वान्न. रवा तुपांत परतून तो भिजवून त्याची पापडी करून तींत खसखस, खोबरें परतून व त्यांत साखर मिसळून तें पुरण भरतात, नंतर तें कांतून तुपांत तळतात. [सं. करंज; तुल० सं. करज=नख; का. करची–जी. करचीकाई]

करजुचें—कि. (गो.) फार वेळ पाण्यांत राहिल्यानें सर्व अंगास सुरकुत्या पडून आंखडणें.

करजेल, करंजेल—न. करंजाच्या बियांचें तेल. [सं. करंज+तैल]

करंजेळी—स्त्री. केळीची एक जात.

करट—पुन. कांकडीच्या जातीचें एक अतिशय कडू फळ; याच्या आंतील मगज काढून टाकून सालीचा पणतीसारखा दिवा लावण्याकडे उपयोग करतात; कडू कारेटें; करवट पहा. [सं.]

करट, करंट—न. अतिशय आग होणारें गळूं; उठाणु: उबाळू. 'स्तनमान काय पावे जरिहि उरीं वृद्धि पावलें करट' मोकर्ण २८.३३. [सं.]

करट—पु. १ मृताच्या अकराव्या दिवशीं करावयाचें श्राद्ध. २ कावळा; काक. 'परि तूं वरटेसि करट नीच कसा मान्य काय होशील.' –मोविराट १.१३२. [सं.]

कॅरट—पु. १ हिरे वगैरे तोलण्याचें वजन–परिमाण; एक कॅरट=एक रति किंवा एक आणा, पूर्वी हा ३½ ग्रेन बरोबर असे, पण हल्लीं ३½ ग्रेन बरोबर मानितात. २ सोन्याच्या शुद्धतेचें परिमाण; आपल्याकडील शंभर नंबरी सोनें २४ कॅरट बरोबर समजलें जातें. एखाद्या २४ भाग सोन्याच्या तुकडयांत जर २२ भाग शुद्ध सोनें व २ भाग इतर हीन धातु असेल तर तें सोनें २२ कॅरटचें आहे असें समजतात. [सं. रक्तिका, रति=गुंज; अर. किरात=एक बी; ग्री. केरातिओन. इं. कॅरट; फ्रें. कॅरट; इटा. कारातो; पो. स्पॅ. किलाते]

करंटपक्ष—कि. वि. कमींत कमी; किमानपक्षीं. [सं. करट+पक्ष]

करंटलक्षण—न. दुर्दैव किंवा अनिष्टसूचक चिन्ह, खूण, गुण. 'सुचित करनी अंतःकर्णे। ऐका करंटलक्षण।' –दा १९.३.१. [सं.] –वि. दुर्दैवी; अनिष्टसूचक चिन्ह दाखविणारा.

करंटवली–ळे—करंटुली, करंटोली, करंटोल पहा.

करटा, करंटा—वि. १ दैवहीन; दुर्दैवी; कमनशिबी; हतभागी. 'नव्हेसी वीरवृत्तिलाठा। अति करंटा नपुंसक।' –एरुस्व ६.४२. 'पालथा घट करटा जन।' –यथा २.७५५. २ कंगाल; दरिद्री; कृपण. 'त्या सुखास लात मारून। जात आहे करंटा॥' –नव २१.११८. ३ (व्यापक) भिकार; ओसाड; नापीक; धनहीन (गांव, देश). ४ निष्फळ; वेफायदेशीर (मनांतील विचार, बेत, कल्पना, शक्कल इ०). ५ नास्तिक; उदासीन. 'धर्माविषयीं फार करंटा।' –अमृतराय ५२. ६ फसगारा; निष्फळ होणारा (उपाय इ०) [सं. करट] **करंट्या कपाळाचा, हाडाचा**–वि. दुर्दैवी; भाग्यहीन; कमनशिबी. **करंटापोपट**–पु. बोलक्या पोपटाचे गुण ज्यांत नाहींत असा पोपट; रानपोपट; कुलक्षणी पोपट. **०बांगडा**–पु. समुद्रांतील बांगडा नांवाच्या माशाचा एक प्रकार.

करटी, करंटी—स्त्री. लहानसें करंट, गळूं, पुटकुळी (पुवानें भरलेलें क्षत). 'त्या दुर्गंधीला तोंड पडून करट्याच्या रूपानें म्हणा...पापी म्हणून बोट दाखवितां येत नाहीं.' –भाऊ अं. २, प्र. १. [करट–करंट शब्दाचें लघुत्वदर्शकरूप]

करटी—पु. हत्ती. 'कीं काल व्याल करटि–घोटक–भट–भेक खावया सुटले।' –मोभीष्म ३.५९. [सं. करट=हत्तीचें गंडस्थळ; करटी=हत्ती]

करटी, करंटी, करवटी, करवंटी, करोटी—स्त्री. १ डोक्याची, कपाळाची कवची. २ नारळाची कवची; सगळी, अर्धी कवची किंवा तुकडा; कवचीचें केलेलें पात्र; नरटी; नरोटी. करवंटीचीं बटणें करतात. हिचें तेल गजकर्ण, नायटे यांस लावतात. [सं. करोटी=कपाळाचें हाड] **करोटी हातांत येणें**–भिकेस लागणें. **म्ह०** पोरास जेवूं सांगे वाटींत तों पोर जेवी करटींत.

करटुलग्यां—(कु.) दारू.

करटुलें, करंटुली-ले, करंटोली, करटोलें—स्त्रीन. एक वेल व तिचें फळ. ही वेल ५।६ हात पसरते. हीस आषाढांत फळें येतात. फळाचा रंग हिरवा असून वर कांटे असतात. फळांची भाजी करतात. यास कांदली, कंटोली, रानकारलें म्हणतात. –शे ९.२६१. [सं. कर्कोटकी; गु. कंटोला]

करटें—न. कवची; पाठ. 'चालतेयां दळाचेनी भारें । कूर्मांचें करटें कुसकरें ।' –शिशु ५४०. [सं. करोटी]

करटें खाणें—न. वाईट अन्न; कदन्न; भाजीभाकरी. [सं. करट]

करटें लक्षण—न. अभाग्यलक्षण; करंटलक्षण पहा.

करड—स्त्री. एकदांच घरटींतून भरडून काढलेलें किंवा एक दांच घाव लावलेलें भात; वरील टरफल निघालेला तांदूळ; भरड. असडी तांदूळ. [का. करडु=भरड] **०काढणें**–क्रि. भराभर कसेंतरी उरकणें, अव्यवस्थितपणें व सपाटयानें काम करणें. [का करड] **०भाजणी**–स्त्री. (व.) जाचणूक; छळणूक. 'तुझ्यामुळें जिवाला करडभाजणी आहे.'

करड—स्त्रीन. (कों) तांबूस रंगाचें, वाईट वास असलेलें एक प्रकारचें खरखरीत डोंगरी गवत; कुसळी गवत. –स्त्री केसाचा राठपणा, खरखरीतपणा (करडगवता सारखा). 'केशांचें करड झालें.' –वि. शुष्क (तुळतुळीत नसलेले); रुक्ष; खरखरीत; राठ; ताठर (केस) [का. करड=वाळलेला चारा, गवत]

करड—पु. (व.) उंदरानें खाल्लेला कापूस. [करंडणें]

करंड—पु. १ करंडी; परडी; बुरुडी पात्र; विणलेलें, झांकण नसलेलें किंवा असलेलें एक पात्र (फळें, भाजी वगैरे ठेवण्यासाठीं) २ करंडा; डबा; डुंकू, दागिने, खाद्यपदार्थ, पानसुपारी, वगैरे ठेवण्याचें धातूचें, लांकडी किंवा हस्तिदंती झांकणासहित पात्र. (गो.) करण. [सं. करंड]

करड अडुळसा—पु. एक औषधी वनस्पती.

करडई—स्त्री. १ एक पालेभाजी. हें झाड ढोपराइतकें वाढलें, पानें लांबट असून त्यांची भाजी करतात. फूल पिवळ्या रंगाचें असतें. त्यांत केशरासारखे तंतू असतात. ते वाळवून त्यांचा रंगाकडे उपयोग करतात. त्यांस कुसुंबा म्हणतात. फुलाच्या मागें बोंडांत बीं असतें. त्याचें तेल काढतात व पेंड गुरांना घालतात. तेलाचा जाळण्याकडे व खाण्याकडे उपयोग करतात. –वगु २.१६. –शे ९.२६०. २ एक उपधान्य; करडईचें बीं.

करडकांगोणी—स्त्री. कांगोणीचा एक प्रकार.

करडकूट, करडगूळ—न. करडईचें कांड किंवा भूस (करडई वडवून बीं काढून घेतल्यानंतर राहिलेलें). [करडई+कूट=गुळी]

करडणें—क्रि. पांढुरकें, भुरकट, करडया रंगाचें होणें. 'तेव्हां करडेजे काति । डोळे कोंदनी जाती । सुढाळ मुखाचे भाव काढती । जाउनी टवकेपणें ।' –ज्ञाप्र ८२३. [करडा]

करडणें करंडणें—उक्रि. कुरतडणें; चावून चावून भोंकें पडतील, फाटेल असें करणें (उंदीर, घोडा इत्यादिकांनीं वस्त्र वगैरे) 'दांत लाउनि बळें करडावें' –किंगावि २९. [ध्व?]

करडा—वि. १ भुरकट; काळा व पांढरा मिश्र असा (एक रंग) २ भुरकट रंगाचा; पांढऱ्या रंगावर काळे व तांबडे ठिपके असलेला (घोडा). ३ अर्धवट पिकलेले, काळे पांढरे (केस). [करडई]

करडा–वि. अर्धवट सडलेला; करड, (तांदूळ) [का. करडु]

करडा—वि. तेल न लावल्यामुळें भरभरीत, रुक्ष, राट, ताठर झालेले (केस किंवा शरीर) [का. करड]

करडा—वि. १ कडक; निष्ठुर; कठोर; रानटी; पक्का (मनुष्य, जनावर). २ सख्त; जाज्वल्य; कठिण (अमल, कारभार इ०) ३ भेसळ केल्यामुळें कठिण, टणक झालेलें (लोखंड, चांदी वगैरे) [ते. करडु=कडक; म. खरडणें]

करडा—पु. १ (सोनारी धंदा) ठसे उठविण्याचें किंवा खांचा (रुपयाच्या कडेला असलेले चरे, रेषा) पाडण्याचें एक पट्टीसारखें हत्यार. २ सोन्याच्या तारेवर रेषा, चरे वगैरेसारखी उठविण्याची नक्षी; तरवारीच्या मुठीवर व पट्ट्यावर किंवा बुगड्यांवर अशा प्रकारची नक्षी असते. अवटीवर तार दाबून ही नक्षी वठवितात. कोंदणकामासाठीं करड्याच्या नकशी खाच्यांत तार किंवा पट्टी बेटतात. **–डाच। आवटी**–स्त्री. (सोनारी) करडा तयार करावयाचा ठसा, यास खाचा किंवा भोंकें असतात. **०पट्टी**–स्त्री. (गो.) (सोनारी धंदा) मोनें, चांदी वगैरे धातूच्या लडींचे तुकडे पाडण्याचें हत्यार; (नाविक) गलबताच्या बाजूच्या भोवतीं असणारा फळ्यांचा किंवा कळकाच्या कांबींचा (पावसाच्या झडीच्या निवारणार्थ) लाविलेला पडदा.

करडा—खर्डा पहा.

करडा अम्मल—पु. १ कडक सत्ता; कठोर, निष्ठुर कारभार. [हिं. करडा+अर. अमल=सत्ता] २ धुंदी; अंधता; सामर्थ्य; उन्माद (एखाद्या कैफकारक वस्तूचा). [करडा+अमल=मादक पदार्थाचा कैफ]

करडा हात—पु. पराक्रम; जोराची कृति, त्वेषयुक्त क्रिया. 'लहान पराई होउनि शूरानें करडा हात केला.' –ऐपो ८९.

करंडा—पु १ करंड पहा. 'कां कापूर करंडाचा वेचे।'–विउ २.५१. 'तिच्या पाठीमागून पानसुपारीचा करंडा बाळगणारी दासी' –विवि ८.२,१९. २ झाडाच्या खोडाचा कापून काढलेला ओंडका, तुकडा. ३ (कों.) केळीचा खुंट किंवा लाकडाचा ओंडका.

४ (राजा.) पातीच्या तयार केलेल्या छत्रीचा पोकळ दांडा, ज्यामध्यें पाहिजे तेव्हां दुसरा दांडा घालतां येतो.

करडा—पु (पाक.) नारळाच्या खवीपासुन तयार केलेली पोळी, हिला 'सोयची पायडिश' असेंहि म्हणतात. –गृशि १. ४४६.

करंडा—पु. (कु.) (सोनारी) सोन्याच्या मण्यास पाडलेले करवे प्रत्येकी. करडा पहा.

करडी—स्त्री. करडई पहा. 'कुणास न मिळे भाजी कुणी राजी करडी मिळो आंबाडी जुनी।' –ऐपो ३७०.

करडी—वि. १ कठोर; निष्ठुर; करडा पहा. २ (माळवी) पक्की; आवळ. 'परकोराची गांठ चागली करडी घाल.' **०कमान**–स्त्री. १ भुवयांचे आकुंचन (कपाळास आठी पडतांना होणारें). २ वक्रदृष्टि; क्रूरता. **०नजर**–स्त्री. वक्रदृष्टि; निष्ठुरता; कडक पहारा; सक्त देखरेख; गैरमेहेरबानी; अवकृपा; क्रूरता. **०मर्जी**–स्त्री. १ खप्पा तबियत; इतराजी; राग. २ मनोवृत्तीचा कडकपणा, करडेपणा; निष्ठुरता. [हिं. करडा+अर. मर्जी]

करडी-करंडी, ढोल—पु. (बे.) एक प्रकारचें चाम डयाचें रणवाद्य; करंढोल. [प्रा. करडी=एक वाद्य; का. करडे=पखवाज; दोन्हीकडून वाजणारा ढोल]

करंडी—स्त्री. १ लहानकरंडा; करंडक; करंड पहा. 'दिव्य परिमळाचेनि पवनें। विश्व केलें करंडी'–मुआदि २७.२०६. २ देव ठेवण्याची संबळी; वेताचा किंवा बांबूचा झांकणासह लहान डबा. 'जे परमात्मया शिवाची करंडी।'–ज्ञा ६.२७३.

करंडी—स्त्री. एक झाड; याचें फळ मुद्रेसारखें असतें, म्हणून त्याला मुद्रा म्हणतात. मराठे लोक गोपीचंदनाच्या गंधांत हें फळ घुडवून कपाळावर वगैरे गंधाच्या मुद्रा लावतात [सं. करंड]

करडूं, करडें—न. शेळीचें, बकरीचें लहान पिलूं, कोंकरूं; शेळीच्या सुमारें तीन महिन्याच्या पिलास म्हणतात. [तुल. का. करडु=ओबड धोबड, करडी=अस्वल]

करंडूल—न. लहान करंडा; करंडक.

करडे तांदूळ—करड अर्थ १ पहा.

करडेल—न. करडींचें तेल. [करडई+तेल]

करढोंक-की, करडोक, कडेढोक—पु. एक पक्षी, करकोचा.

करंढोल—पु. (बे.) एक चर्मवाद्य; मोठा ढोल; हें दोहींकडून वाजवितात. करंडीढोल पहा.

करण—पु. (भूमिति) (कारागिरी) काटकोण त्रिकोणांतील काटकोनासमोरील बाजू किंवा चतुष्कोणांतील समोरासमोरचे तिरपे कोनबिंदु जोडणारी रेषा; कर्ण. [सं. कर्ण]

करण—न. १ कोणतेंहि कृत्य करण्याचें साधन; साधनीभूत वस्तु; साहित्य. 'म्हणोनि इंद्रियातें आम्ही। करण म्हणों।' –ज्ञा १३.१७८. २ शरीरावयव; इंद्रिय. 'जाणिजे तेवीं करणें। सांगती ज्ञान॥' 'कीं करणामार्जी चपल मन। तयाहून सवेग कपिउडुडाण।' –ज्ञा १८.५०६. ३ (व्या.) तृतीया विभक्ति व तिचा अर्थ. ४ (ज्योतिष) बव, बालव, कौलव, तैतिल, गर, वणिज, विष्टि, शकुनि, चतुष्पाद, नाग, किंस्तुघ्न इ० करणें अकरा आहेत. हीं दर तिथीस सुमारें दोन भोगलीं जातात. यांच्यापैकी प्रत्येक; अर्धी तिथि. ५ (ज्योतिष) इष्टशकापासुन ग्रहादि गणितसाधन ज्यांमध्यें सांगितलें आहे असा ग्रंथ (याच्या उलट सिद्धांत व तंत्र). ६ करणें; कृति; कार्य. 'कैसें वो तुमचें करण।' जे पुढिलां एओ पाहे मरण।' –शिशु ८२०. ७ (समासांत) करणें; करण्याचा व्यापार. जसें:–पवित्रीकरण; निर्मलीकरण; एकीकरण; शुद्धीकरण इ०. [सं. कृ=करणें]

करण, करणो—पु. (गो.) करंडा (कुंकवाचा). [पं. करंड]

करण—न. १ (नृत्य) हस्तपादांची संयुक्त क्रिया. हीं करणें १०८ आहेत. २ (नृत्य) दोन चारींचा समूह [सं. कृ=करणें]

करण—वि. (व.) उंच.

करण—पु. (बडोदे) दागिन्यांत उभा लटकता बांधावयाचा, लांबोळया आकृतीचा लोलक वगैरेसारखा भाग. –जनि (बडोदे) शेवटची यादी १.

करणकुवारी—स्त्री. (व.) कोरफड; कुवार कांडें; कवारपाठा. [करण+सं. कुमारी=कोरफड]

करणकुसूं—न. (सांधकाम) दोन लांकडें एकमेकांत बसविण्याची पद्धत, तऱ्हा (कानाच्या आकाराचें कुसुं करून) [सं. कर्ण+म. कुसुं]

करणग्राम—पु. १ इंद्रियसमूह. २ देह; शरीर. 'कासया हा करणग्रामु। वोसु पाडावा।'–गीता १.२३४२. [करण+ग्राम]

करणचौकट, करणाची चौकट—स्त्री. करण फुसवानें सांधलेली चौकट. [सं. कर्ण+म. चौकट]

करणता—स्त्री. साधनात्मकता; साधनीभूतत्व. 'आणि आपण होउनी कर्ता। ज्ञाना आणी करणता।'–ज्ञा १८.४९४.

करणपुतळी—करपुतळी पहा.

करणफूल—कर्णपुष्प, फूल पहा.

करणरूप—न. (व्या.) कोणत्याहि धातूचें विधिरूप, अस्तिवाचक रूप (आहे या अर्थी) जसें:–मी आहें. तूं आहेस. याच्या उलट अकरण रूप.

करणवाच्य—न. (व्याक.) तृतीयांत नाम. [सं.]

करणा—पु. कर्णा. तोंडानें वाजविण्याचें, पितळेचें, तुतारीसारखें आरंभीं लहान व शेवटास मोठें होत गेलेलें एक वाद्य. याचा आवाज गंभीर व खर्जातील असतो. लांबी सुमारें चार हात. थोरलें तोंड सुमारें टीचभर व्यासाचें रुंद असुन लहान तोंड, पायाच्या आंगठ्याच्या व्यासा एवढें असतें. चौघडयाचे अखेरीस करणा वाजवितात. [हिं. करनाई; फा. कर्ना, कर्नाय्; तुल. सं. कर्ण] **करणा फुंकणें**–(क.) गांवांतील सर्व लोकांस जेवणास बोलाविणें: जेवणाचें जाहीर आमंत्रण देणें. 'रामाच्या मुंजीत करणा फुंकला होता.' **करणेकरी**–वि. करणा वाजविणारा.

करणाबिदरी—स्त्री. एक प्रकारचें नक्षीकाम. (कदाचित् बेदरकडे रूढ असलेलें.) –देहु ८३. (नाको)

करणावळ—स्त्री. एखादें काम केल्याबद्दलची मजुरी. [करणें]

करणिक—पु. १ कर्णिक; कुलकरणी. [सं. करणि=लिहिणें, लेखन] २ श्रीकरणाधिपतीच्या कचेरींतील कारकून; हें आडनांव कायस्थ प्रभूंमध्ये रूढ आहे. 'मलि मालो दत्तयेकू। करणिक।' –चौऱ्याशीचा लेख (पंढरपूर शके ११९५)

करणी—स्त्री. (गवंडी काम) गिलावा वगैरेचा चुना, चिखल साफ करण्याचें हत्यार; थापी. [सं. करण=लेप देणें.]

करणी—स्त्री. एक झाड.

करणी—स्त्री. १ कृति; क्रिया; कार्य करणें; वागणूक; आचरण. 'वीर उदंड असति परि त्यांला पार्था तुझी नये करणी.' –मोकर्ण ४५.५१. 'ज्याची त्यासच फळासि ये करणी.' –चंद्रहास, कीर्तनतरंगिणी भा. १ पृ. ३४. याचा उपयोग क्वचित करतात जसें:–हें करणीनें केलें; त्याची करणी वाईट आहे. **म्ह०** १ करणी कसाबाची, बोलणीं मानभावाचीं. २ ज्याची करणी त्याला. २ लीला; अलौकिक गोष्ट; याचा प्रयोग विस्मयकारक किंवा लोकोत्तरकृत्यासंबंधीं करतात. जसें:–'ही गोष्ट घडावी असें नव्हतें पण देवाची करणी यामुळें घडली'; 'न कळे देवाची करणी।' –ऐपो ३५५. 'विचित्र करणी वदावी।' 'सप्तपाताळा झाली ती करणी ऐकली नाहीं.' **म्ह०** ईश्वराची करणी, नारळांत पाणी. ३ लग्नांत हुंड्याशिवाय वर व तत्पक्षीय मंडळींचा करावयाचा मानपान, सत्कार, देणगी (वस्त्र, दागदागिने वगैरे देऊन). (क्रि० करणें) 'हुंडा घ्यावयाचा नाहीं असें म्हणायचें पण करणी मात्र चोपून घ्यावयाची.' ४ एखाद्यास उद्देशून केलेलें चेटूक, जारणमारण, मंत्र तंत्र इ० प्रकार; कंवटाळ. 'ते पतिवंचका निर्धारी। सर्व काळ करणी करी।' –कथा ५.२.४८. ५ अचाट कृत्य; पराक्रम. 'नर करणी करे तो नरका नारायण होगा' 'कळे राजेंद्राची त्वरित शरसंधान करणी।' –र २. ६ (गणित) वर्गमूळ न तुटणारी संख्या, ज्याचें मूळ बरोबर पूर्णांक येत नाहीं तें पद. [सं. कृ=करणें; करणी]

करणीगत—वि. (गणित) ज्याचें वर्गमूळ पूर्णांक येत नाहीं तो (राशी). इं सडे. [सं.]

करणीचा—वि. कृत्रिम; कृतीचा (राघू, घोडा, मनुष्य वगैरे मातीचीं चित्रें). 'करणीचें कांहीं न मनें सज्जना। यावें लागे मना वृद्धांचिया।' –तुगा २८६३. **–चें पागोटें**–न. पगडबंदानें ठोकळ्यावर बांधून तयार केलेलें पागोटें (डोक्यावर बांधलेलें नव्हे) **०फूल**–न. कृत्रिम केलेलें फूल. **–चा रोग–ची बाधा**–पु. मंत्र तंत्र, जादूटोणा वगैरेनीं उत्पन्न केलेली बाधा. **०आंबा**–पु. कलमी आंब्याचें झाड व फळ. **०वाघ–घोडा–कुत्रा**–पु. वाघ, घोडा, कुत्रा इ० चें रूप घेऊन तशी कृति करणारा मनुष्य.

करणीय—वि. करण्यास योग्य, उचित (असें कर्म). 'परी करणीया अकरणीया न देखा। आपेंपरू नोळखा।' –ऋ ४५. 'जे कां करणीय प्रतिदिनीं' –ज्ञा १८.११५. [सं.]

करणीसार—क्रिवि. कृतीप्रमाणें; कर्मासारखें. [करणी+(अनु)सार] **म्ह०** करणीसार फळ=कर्मासारखें बक्षीस.

करणें—उक्रि. १ उरकणें; उलगडणें; तडीस नेणें; बनविणें; जमविणें; रचणें. २ होणें; घडून येणें; बनणें (अकर्मक प्रयोग). जसें–मला मळमळ करतें; उन्हाळे करतात; भोंवळ करते. ३ एखाद्या पद्धतीनें वागणें; एखाद्या पद्धतीस अनुसरणें. [सं. कृ–कर्; झेंद. कर्; फ्रें.जि. केर; आर्मेनि. कर; फा. कर्दन्] (वाप्र.) **केलें केलें न केलें न केलेंसें करणें**–(एखादें काम) निष्काळजीपणानें करणें, कसें तरी तडीस लावणें. (वाप्र.) (प्राप्ति) **करून घेणें**–एखाद्याच्या–कडून, द्वारें काम उरकून घेणें; एखाद्याच्या मार्गानें तडीस नेणें, मिळविणें, संपादणें. **करून चुकणें–टाकणें**–(एखादें काम) पुरें करणें; संपविणें. 'ती तर अस्मादिकांना पसंत करून.केव्हांच चुकली' –माझी पण तीच गत (उषाग्रंथमालिका) ६.

करणें—न. कृति; कर्म; **काम. म्ह०** १ करणें थोडें मचमच फार. २ (गो.) करणें थोडें उलवणें चढ=करण्यापेक्षां बडबड मोठी.

करणें—शअ. पर्यंत; पावेतों; बरोबर; च्या वेळीं; त्यापेक्षां उशिरां नाहीं (वेळ दाखविणारें अव्यय). 'आज प्रारंभ केला तर उद्यां दोनप्रहरांकरणें संपेल.'; 'सकाळींच करूं लागत तर एव्हांकरणें आटोपले असतें.'

करणेर—न. वरास द्यावयाची देणगी; मानपान; करणी अर्थ २ पहा. 'समर्थें दुबळयाचें करणेर साजिरें केलें.' –ख्रप्र १४.३९.

करतड—वि. (व., घाटी) खरतड; खतरड; कम नशिबाचा; दुर्दैवी. खडतर पहा.

करतल—पु. तळ हात; हाताचा तळवा. 'प्रत्यक्षबुद्धी करतळें । हातवसावें' –ज्ञा १५.२५८. [सं.] **०भाष**–स्त्री. हातावर हात मारणें; वचन देणें. 'असें बदून करतलभाष । देऊन तुष्ट केलें त्यास ।' –नव १५.१७७. **०भिक्षा**–स्त्री. १ घरोघर जाऊन जें अन्न कोणी घालील तें तळ हातावर घेऊन तेथच्या तेथेंच उभ्या उभ्या खाणें; अशा प्रकारचें व्रत किंवा भिक्षा. २ (ल.) घरदार नसणें; फटिंग असणें; भिक्षावृत्ति. 'करतल भिक्षा । तरुतल वासः ।' –चपैटपंजरी [सं.]

करतलामल, करतलामलक, करतलामलकवत्—विकिवि. (हातांत प्रत्यक्ष स्थित असलेला आवळा जसा सर्व बाजूंनीं पाहतां येतो त्याप्रमाणें) १ सिद्ध; स्पष्ट; उघड; ज्याचें सर्व बाजूंनीं ज्ञान झालें आहे असें; ज्यास दुसरे प्रमाणाची गरज नाहीं असें. असंशयित' 'वेदशास्त्राचा मथितार्थ । झाला करतलामलकवत ।'–एभा ११.१०४९. 'ते करतलामलकसे दूरूनि दिसले अशेष मग तीतें ।' –मोस्त्री ४.३. २ (ल.) अवगत असलेली; हातचा मळ बनलेली; अत्यंत सुलभ; साध्य (विद्या, कला, शास्त्र वगैरे). 'चतुर्दश विद्या चौसष्ट कला । करतळामळ जयासी सकळा ।' –ह ३१.८. 'महाराष्ट्र व संस्कृत या दोन्ही भाषा मोरोपंताला करतलामल होत्या' –नि ७६५. ३ स्वाधीन; सुगम. 'सारा भूगोल ज्यास करतलामलकवत् आहे त्यास एखाद्या रानांत नेऊन सोडला किंवा त्याच्या हातीं जहाजाचें सुकाणूं दिलें तर काय मौज होईल बरें !' –नि [कर+तल+आमलक]

करताल–ली, **करतालिका**—नपुस्त्री. १ (वाद्य) बाहेरच्या बाजूनें निमगोल व आंतून सपाट असें कांशाचें टीचभर लांब व तीन बोटें रुंद व दोन्ही कडांना निमुळतें असें दोन दोन तुकड्यांचें वाद्य. हें आंगठा व बोटें यांमध्यें धरून चिपळ्यांसारखें वाजवितात. ताल धरण्याकडे याचा उपयोग करतात. केव्हां केव्हां मृदंगाच्या साथींत वाजवितात. (सामा.) चिपळ्या; झांज. 'नृत्यकृत्य तत्कारतान करताल झुंमकड्या अंतरीं ।' –राला ३१. २ टाळी; दोन्ही तळहात एकमेकांवर आपटून काढलेला आवाज. (क्रि० वाजविणें; देणें; पिटणें). 'अद्वय भजनें अखंड स्मरणें वाजवि करताळी ।' –एकनाथ पदें (नवनीत) पृ. ४४९. 'कथा अन्वय लापणिका । नाम घोष करताळिका' –दा ४.२.१०. ३ चुटकी, चिटकी. (क्रि० वाजविणें) [सं. कर+तल, ताल; गु. करताल] **०धरणें**–हातांनीं ताल धरणें; सांथ करणें.

करतुकीचा कांदा—वि. (श्लेषार्थानें) करणारा; कर्तृत्ववान्. 'गाडे घोडे गाई म्हैशी बैल आदणचुरी । करतुकीचा कांदा तिनवां येतो आंगावरी ।' –पला ८१. [सं. कर्तृत्व]

करतुत—स्त्री. (बे.) पराक्रम; कर्तेपणा. [सं. कर्तृत्व; हिं. करत्–त; गो. करतुव]

करद्—वि. कर देणारा; मांडलिक; 'पांचाळ, कुलिंद, ऋषिक केले जिंकूनि करद सस्नेह ।' –मोकर्ण ६.९. 'कोची एथील राजा सामरीन राजाचा करद असतां त्यानेंही यावेळीं आपल्या अधिपतिविरुद्ध बंड केलें होतें.' –गोमंतक इतिहास ४०. [सं. कर+दा=देणें]

करंद, करंदी—स्त्रीन. (कु. राजा.) करवंदीचें झाड; यास फार कांटे असतात. करवंदाचें फळ पिकल्यावर काळ्या रंगाचें होतें व रुचकर लागतें. हिरव्या फळाचें लोणचें करतात. [सं. करमर्द; प्रा. करमद्द किंवा करमंद; गु. करमदां; हिं. करौंदा]

करदनकाळ—वि. अति क्रूर; करक्षतकाळ पहा. [सं. कदन+काळ]

करदळ–ळी—स्त्री. १ एक फुलझाड; कापूरकेळ. २ केळीचें झाड. [सं. कदल]

करदा—पु. शेतकरी; जमीन करणारा, कसणारा; स्वतः शेतीचा धंदा करणारा (मालक किंवा कूळ). हा शब्द अनेकवचनींहि उपयोगांत आणतात, जसेः–करदे पाटील. [फा. करदकार; सं. कर+दा]

करंदा, कारंदा—पुन. करंद पहा.

करदाय, करंदें—स्त्री. (गो.) १ कटकट; मोठा आवाज. २ कठोर शब्दांनीं ताडण; दुःशब्द. [ध्व.?]

करदावलें—न. एक प्रकारचें गवत; यांचीं फुलें पिवळीं असतात. करंदोळ पहा.

करंदी चौकट—स्त्री. जोड चौकट; दुहेरी चौकट.

करदोटा–डा–रा, करधोटा–डा—पु. १ कडदोरा, करगोटा पहा. २ कमरपट्टा. 'कटीं ल्यालिसे करदोरा' –देवीदास भामावर्णन ८. **०तोडणारा**–वि. अतिशय कडक तंबाखुला म्हणतात.

करदोडा—पु. (ना.) बांधीव विहिरींत उतरण्यासाठीं बांधकामास धरून राखलेला कंगोरा; हा विहिरीच्या तळापर्यंत असून सुमारें दीड हात अंतरानें ठेवतात.

करदोडी—स्त्री. शूद्र लोकांचा कमरेस बांधावयाचा सुती करगोटा; करदोरा–डा. [सं. कटि+म. दोरा]

करदोडी–री—स्त्री. मोठाले दोर वळण्यासाठीं तयार केलेला तात्पुरता सोपा; दोरशाळा.

करदोंडी—स्त्री. एक प्रकारचें झाड.

करंदोळ—न. (बे.) एक प्रकारचें गवत. करदावलें पहा [का. करंडे]

कर न कर, कर न करी, कर ना करी, कर न कऱ्या—वि. १ जें करावयास पाहिजे तें न करणारा व जें करावयास नको तें करणारा असा (मनुष्य). २ हट्टी; तेढा; तंडेल;

अकरनकर. 'हा तुझा करनकरी स्वभाव तुझ्या मावशीला आवडला नाहीं.'–बाळ २.७७. ३ (गो. कु.) परोत्कर्ष न साहणारा. [करणें+न करणें] **ह्न० करनकऱ्या चा वसा=करनकरेपणाचें व्रत;** वरील प्रमाणें वागण्याचें व्रत, प्रकार, तऱ्हा. 'आयर्लंद जिंकल्यापासून आजपर्यंत इगलंदनें तेथें नुसता करनकऱ्याचा वसा चालविला आहे.'–आयर्लंदचा इतिहास.

करनाटक—पु. एक देश; कर्नाटक पहा. [सं. कर्णाटक; का. करि=काळा+नाडु=प्रांत] **०ओस पडणें**–बहिरें होणें; बधिरत्व पावणें. [सं. कर्ण=कान]

करनाटकी—वि. कानडी (भाषा, मनुष्य वस्तु, इ०).

करप-पी—पुस्त्री. १ शिजवितांना करपलेलें, काळें होऊन भांड्यास चिकटलेलें अन्न, पदार्थ. २ अति उष्णतेनें जळलेलें किंवा वाळलेलें पीक. [करपणें]

करप—न. (रा.) कठिण पदार्थाचा धार असलेला तुकडा (काच, शिंप, दगड, खापर, काल्वें वगैरेचा); कपरी. [सं. कर्पर=दगड, खडा; म. कडपा, कपरा]

करपचंद—पु. (गो. सोनारी) घडयाळाची सांखळी; छडा.

करपंजी, कयपंजी—स्त्री. (गो.) हातांत धरावयाची मोठी पणती.

करपट—वि. १ करपलेलें; अर्धवट जळलेलें (अन्न, भात भाकरी). २ जळका; जळकट (वास). ३ अजीर्णामुळें घशाशीं येणारें दुर्गंधयुक्त आंबट (ढेकर). [का. करि=भाजणें, करपणें; करकु–करिकु=भाजलेलें, जळलेलें?]

करपट—न. वस्त्राचा फाटका तुकडा; फडकें, 'जेवि करपटशतें कृशान. विकसिजे जैसा.'–कथा ३.१६.१. [सं. कर्पट=जुनें कापड]

करपट—पु. (कु.) आकस्मिक येणारा, तुफानासारखा वारा व पाऊस.

करपटसड्या, करपटड्या—वि. पौष्टिक अन्न अथवा पदार्थ सेवन केले असतांहि जो पुष्ट होत नाहीं असा (मनुष्य). [करपट+सडणें]

करपटाण—स्त्री. करपलेल्या अन्नाचा वाईट वास, घाण. [करपट+वाण]

करपणें—अक्रि. १ भाजणें; जळणें; होरपळणें; भाजून निरुपयोगी होणें (अन्न वगैरे). २ कडक थंडी किंवा ऊन यामुळें नष्ट होणें; नासणें (शेतांतील पीक, झाडें). 'फळर्ती झाडें करपती.'–दा ३.३.४६. ३ म्लान, निस्तेज, दुर्बल होणें (भय, शोक इ० मुळें) वाळणें; झडणें; निस्तेज होणें. 'स्वास्थ्य पावे करपलिही सती.'–मोरा पृ. १९. ४ खंगणें; दुःखानें, बिकारानें क्षीण होणें (शरीर). 'स्पर्शु जालेआं कमळांचा। तनु करपतुसै।'–शिशु ८३३. ५ कष्टी होणें; दुःख पावणें. 'तसें तत्सौंदर्यें रतिमदन चित्तीं करपती।'–विवि ८.१.२०. [का. करकु, करपु; का. करि=जळणें, भाजणें; तुल० सं. कृप्=दुर्बल होणें]

करपत्र—न. करवत. 'किति दिस करपत्रीं आपला जीव घालूं।'–सारुह ३.७३. [सं. कर+पत्र]

करपल्लव—पु. १ (काव्य) हाताचा पंजा; हात. 'पहात करपल्लवां जेंव सरळा.'–ज्ञा ११.२१५. २ हातानें खूण करणें; पालवणें. [क्रि० करणें] [सं.] **करपल्लवा, करपल्लवी भाषा,** (अप.) **करपालवी**-स्त्री. अकारादि वर्ण हाताच्या बोटांवर बसवून त्या संकेतानें भाषा बोलणें; खुणांनीं बोलणें; गुप्त, गूढ भाषा. (क्रि० करणें). नेत्रपालवी नादकळा। करपालवी भेदकळा।'–दा ५.५.२७. 'माझ्या मुक्या मनाची करपल्लवी आपल्याला समजेल का?'–भा १०७.

करपविणें—उक्रि. १ करपणें प्रयोजक. अन्न शिजत असतां जाळणें, भाजणें, काळें करणें. २ जाळणें; नासणें; कोमविणें (झाड, पीक इ०)

करपक्ष्म प्राणी—पु. पंख हेच ज्यांचे हात आहेत असे प्राणी (वाघूळ, पाकोळी वगैरे).–प्राणिमो २३. [सं. कर+पक्ष्म+प्राणी]

करपा—वि. करपट पहा. 'करपा ढेंकर.'

करपा—पु. जळका; वाळलेला तुकडा, भाग; करपलेला भाग. [करपणें]

करपा—पु. (गो. कों.) चपटा, सपाट व पातळ शिंपला. करप पहा. [कडपा]

करपा—पु. द्राक्षावर पडणारी एक कीड, जंतु. [करपणें]

करपा—पु. काळ्या रंगाचें फूल येणारें एक झाड. –नाको.

करपात्री—वि.कर (हात) हेंच ज्याचें (भोजनाचें) पात्र आहे असा (परमहंस); करतलभिक्षाशी; जोग्यांचा एक वर्ग. 'परमहंस करपात्री'–वेसीस्व १२.६१. [सं. कर+पात्र]

करपी—स्त्री. १ जळणें; नासणें; सुकलेली, वाळलेली स्थिति (पावसाच्या अभावामुळें पीक इ० ची). (क्रि० पडणें). २ ताप, भूक वगैरेमुळें पोटांत पडणारी आग. (क्रि० पडणें). ३ भांड्याच्या बुडास लागलेली जळ, मस, काळेपणा. ४ करपलेलें अन्न. [सं. करपणें]

करपी—वि. (जुन्नरी) दोन्ही गालांवर पांढरा रंग असलेली (मेंढी.) 'ही मेंढी करपी आहे.'

करपुतळी—स्त्री. कांश्याच्या थाळ्याला काजळाचा लेप लावून त्यावर दिव्याच्या प्रकाशांत शकुन किंवा भविष्य पाहण्याची एक रीत. कोणी हाताच्या आंगठ्याच्या नखास काजळ लावून त्यावरहि पाहतात; कज्जलपुतळी. [कर+पुतळी]

करपुष्कर—न. (करकमल) १ हाताचें अग्र; बोटें. २ (काव्य) हत्तीच्या सोंडेचें टोक. 'घे इक्षु वारण जसा करपुष्करानें । श्रीराम चाप उचली करपुष्करानें' –वामन, सीतास्वयंवर ३२. [सं. कर=हात+पुष्कर=कमल, पुष्प]

करपृष्ठ—न. तळ हाताचा मागचा, खालचा भाग; हाताची पाठ. [सं.]

करपेल—न. मऊ व चांगलें, गुरांनीं खावयाजोगें एक प्रकारचें गवत.

करफग—स्त्री. (खा.) (सोनारी) भागठया वगैरेच्या ठशाची पट्टी.

करफप—पु. सरडा. 'चार करफप व जवखाईचें मूळ बारीक करून करडईचे तेलांत भाजून मिळवून केंस गेले असतील तेथें लावावें.' –भअप २.३०४. [फा.]

करंबट—स्त्री. १ एक प्रकारची चटणी; आलें धुवून त्यांत मीठ, हिंग घालून वाटून दह्यांत कालवून केलेली चटणी. २ आवळकाठी, केळफूल वगैरे पदार्थांत हिंग, जिरें, मिरें, अमसूल, मीठ घालून वांटून केलेली चटणी. ३ (कु.) आंबा, काजू यांच्या फोडीस मीठ, मसाला लावून केलेलें लोणचें. [सं. करंभ=मिश्रण, दध्योदन, मिश्र पदार्थ, खाद्य]

करबड–बाड—स्त्री. गुरांनीं खाऊन उरलेला व तुडविलेला कडब्याचा गाळ; कडबड पहा. 'जावयासवें आलें घोडें । दाणा देती करबाडें ।' –भावार्थ रामायण, किष्किंध ११.१०४.

करबडणें—अक्रि. खरबडीत होणें, करवडणें पहा.

करबडी—आउताचा एक प्रकार. –शे ७.१७.

करबंदी—स्त्री. कर देण्याचें बंद करणें; सरकारी कर (शेती व प्रासीवरील) न देण्याबद्दलची चळवळ. 'अलाहाबाद कांग्रेस मध्यें करबंदी, जंगलसत्याग्रह वगैरे ठराव पास झाले.' –के ३१.५.१९३०. [कर+बंद]

करबपाग—न. (को.) मासे धरण्याचें एक प्रकारचें जाळें. [करब=? +पाग=जाळें]

करबल—न. (वे.) मुसलमानांच्या मोहरमांत हिंदूंनीं काढलेले मेळे; लेजिमीचा खेळ. [अर. करबला=हुसेनचें मृत्युस्थान]

करंबल—स्त्री. एक झाड. हें झाड मोठें असून यांचें पान मोठें हात-सव्वा हात लांब असतें; कमल पहा. 'न पाहाता सवेले। मानससरोवरीचीं कमळें। आणिजेती करंबाळें। गुंडालौनियां।' –शिशु ७८६.

करंबुटी—स्त्री. १ (कों.) लहान, हिरवा, कच्चा, न पिकलेला, आंबा; आंब्याची कैरी. २ खारांत मुरलेल्या कोंवळ्या कैऱ्या 'आणि करंबुटया रायतीं।' –मसाप २.२४. ३ चटणी; करंबट पहा. [कर=काळा+अंबुटी]

करंबें, करमर्जे—न. १ भाजलेल्या आंब्याच्या बलकांत गूळ व मसाला घालून केलेलें तोंडीलावणें; चिंचेंत गूळ, मसाला घालून केलेलें तोंडीलावणें. २ रुचकर पदार्थ घालून भाजलेलें किंवा उकडलेलें फळ; रुचकर पदार्थ घालून भाजलेला किंवा उकडलेला बाठ धरलेला आंबा.

करबेल, करबील—पु. (गो.) एक झाड. यांचीं पानें फोडणीस उपयोगी पडतात. करवील पहा.

करंबेळ—पुन. एक झाड व त्याचें फळ. हें झाड सह्याद्रीच्या उतारावर होतें. यांचें लाकूड इमारत कामास उपयोगी असतें.

करंबेळें—न. लोणच्याचा एक पदार्थ; करंबें पहा.

करभ—पु. १ मनगटापासून कोपराटांच्या मुळापर्यंतचा तळहाताचा भाग. २ हत्ती, उंट किंवा इतर पशूंचें लहान पिलूं; छावा. [सं.]

करभार. करभाग—पु. मांडलिक राजानें सार्वभौम राजास द्यावयाची खंडणी; कर. (सामा.) खंडणी, कर. (कि० घेणें; देणें; वसविणें). 'श्रीमंतांस करभार दउन आले शरण त्रिपु पृथ्वीवरले.।'–ऐपो १९८. 'सर्व गांव देती करभार। कर जोडुनि वारंवार।' [सं. कर+भार, भाग]

करभूषण—न. हातांत घालावयाचें रत्नजडित कडें. 'पिवळें पदक, करभूषण।' –रामदासी नवमाळी [सं. कर+भूषण]

करम—न (हिं.) नशीब; दैव; कर्म पहा. [सं. कर्म]

करम, करमकंद, करमकल्ला, करमकांदा, करमगड्डा, करमाचाकांदा, करमभाजी—न.पु.स्त्री. कोबी; पानकोबी [फा. करम्, करंब्]

कॅरम—पु. एक टिकल्यांचा खेळ. यांत एका फळ्यावर दोन रंगांच्या ९।९ टिकल्या व एक राणी टिकली असून त्या दोन बाजूंच्या गडयांनीं आपआपल्या रंगाच्या टिकल्या कोपऱ्यांत असलेल्या खिशांत घालावयाच्या असतात. हा खेळ कलकत्ता येथील कार व महलानोबिस कंपनीनें प्रचारांत आणला व त्यांच्या आद्याक्षरांवरून त्यास नांव पडलें. ०बोर्ड—पु. टिकल्यांचा खेळ खेळावयाचा, चार खिसे असलेला चौरंग.

करम-फर्माय-मुख्लिसान—वि. (फा.) स्नेह्यावर कृपा करणारा (पत्रव्यवहारांतील एक मायना)–रा ३.४५१. [फा.]

करमट—स्त्री. करंबट पहा.

करमणूक, कईमत—स्त्री. १ (काव्य) आनंदानें, सुखानें काळ घालविणें; मनोरंजन; रमणूक. २ खेळ; मौज; आवडता उद्योग; क्रीडा. [करमणें]

करमणें—उक्रि. आनंदांत, सुखांत, मौजेंत, चैनींत काळ घालविणें; आनंदांत सुखांत, काळ जाणें. 'मला करमत नाहीं.' [सं. क्रम्=जाणें; क्रमण]

करमणें—अक्रि. एखाद्या क्षारांत फळ वगैरे राहिल्यानें त्यास, किंवा फार वेळ पाण्यांत राहिल्यानें हात पाय वगैरेस सुरकुत्या पडणें; आक्रसणें; चिरमुटणें; चिरम्या पडणें.

करमर—स्त्रीन एक झाड व त्यास येणारें फळ; करंबळ; करमख; याचें पान आंवळ्याच्या पानासारखें परंतु थोडें लहान असतें. फळ लांबट असुन त्याच्या पाकळ्या थोड्या वर आलेल्या असतात. फळांचें लोणचें करतात. –शे ६.२२. लॅ. अव्हरोआ कॅरमबोला. [सं. कर्मरंग]

करमरा—वि. आकारानें करमराच्या फळासारखा (कांचेचा, सोन्याचा वगैरे मणी); बाहेरून फुगीर करवे असलेला मणी. जव्याचा (मणी). [करमर]

करमल-ळ—न. १ कमरक; करमर; एक आंबट फळें येणारें झाड व त्याचें फळ. लॅ. अॅव्हरोआ कॅरमबोला. २ करबेला; एक मोठें झाड; याचीं पानें मोठीं व लांबट असतात. लॅ. ट्रिलेनिआ पेंटाजिनिआ.

करमलवाल—स्त्री. (गो.) भाजीच्या उपयोगी पडणारी एक वेल.

करमाला—स्त्री. माळेप्रमाणें बोटांचा उपयोग करणें; जपसंख्या मोजण्यासाठीं उपयोगांत आणलेलीं उजव्या हाताचीं बोटें (त्यांचीं पेरें). करांगुलीचीं तीन पेरें, तर्जनीचीं तीन पेरें व मधील दोन बोटांचीं मध्यल्याशिवाय दोन पेरें याप्रमाणें दहा पेरांची ही माला होते. [सं. कर+माला]

करमीन—पु. एक प्रकाचा मासा (हा शब्द चुकीनेंहि तयार झाला असेल. कारण यांच निरनिराळे पाठभेद आढळतात). 'शुशुमार घडियाळ मत्स्य मगर। कूर्म करमीन जळविखार।' –मुआदि २९.७७. [कर? +मीन; का. कर=वरिष्ठ, महत्]

करमुर—स्त्री. कळा. –शर.

करमुंचें—क्रि. (गो.) मिठाच्या पाण्यांत भिजणें. करमणें पहा. [स क्षार+मुच्?]

करमोड—पु. (व.) तापाची कसर; अंग मोडून येणें. 'तापाचा करमोड येतो.' [कर+मोडणें; गु. करमोडिया=गुरांचा एक रोग]

करमोडी—स्त्री. (वांई.) एक वनस्पति.

करल—स्त्री. (चि.) तांदूळ, सावे, नाचणी, राळा, वरी यांच्यावरील टरफ़ड; (विशेषतः) बारीक तुष. [सं.]

करल—वि. (कु.) रोड; अशक्त: कमी दूध देणारी (म्हैस)

करल—वि. बरड; मुरमाड (जमीन).

करली-ळें—स्त्रीन. (कु. कों.) पाणी उपसण्याचें लांकडी साधन. बागेंत नारळी, केळी, पोफळी यांना पाणी शिंपण्यासाठीं याचा उपयोग करतात. हें पन्हळासारखें असून कमानदार असतें. यास हातकरलें म्हणतात. पायकरल्याची दोन्हीं तोंडें रुंद असतात. याची एक बाजू हातांत धरून दुसरी बाजू पाण्यांत टेकवून मधील भागास गुडघ्यानें धक्का देऊन पाणी उडवितात. 'करल्यान् पाणी उसाप.' [तुल० हिं. करवार=विहिरींतून पाणी उपसण्याचें साधन]

करलावणी—स्त्री. (कु.) चिचेपासून चिचोके वेगळे करण्याची (काढण्याची) कृति; काटलणी.

करलावणें—क्रि. (कु.) चिचेपासून चिचोके काढणें, वेगळे करणें; काटलणें.

करली—स्त्री. (कों.) पांढऱ्या रंगाचा मासा; याच्या अंगावर कांटे असतात. लांबी सुमारें दीड हात असते.

करली—स्त्री. एक प्रकारचें गवत.

करली—वि. (कुलाबा) आखूड.

करलें—करली पहा.

करंवजी-जें—स्त्रीन. एक औषधी वनस्पति.

करवंजी—(कु.) करंजी पहा.

करवंजें—न. पाण्याचा फवारा; कारंजें पहा.

करवट—पुन (काव्य) एक कडू फळ व त्याचें बीं, करट पहा. 'जैसें भाजिलें करवटें। तेण क्षुधा न घटे।' [सं. करट]

करवट—स्त्री. (ना.) एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळणें [हिं. करवट]

करवटणें—अक्रि. (ना.) एका कुशीवर पडणें, निजणें. [हिं. करवटना]

करवटी, करवंटी, करोटी—स्त्री. नारळावरील कठिण कवच; नरटी; नरोटी. (वाप्र.) **हातीं करवंटी देणें**–भिकेस लावणें. [सं. करोटी]

करवड—स्त्री. १ खरवड; दूध वगैरे पदार्थ तापविले असतां भांड्याच्या तळाशीं बसणारा खरवडून काढण्यासारखा भाग. २ (ल.) खोडसाळ माणूस. 'ती साऱ्या मुलखाची मेली करवड!' [खरवडणें]

करवडणें—अक्रि. करकटणें पहा.

करवडी, करवंडी—स्त्री. पोटाची खांच; पोटाची खळगी; पोट. 'बाप करी जोडी लेकराचे ओढी। आपली करवंडी वाळ वूनि।' –तुगा १५८३. [स. करंड]

करवडी, करवंडा—स्त्री. समूह; रांगा; जमाव; थवा. 'नदी वाहतां दुथडी। झाल्या प्रेताच्या दरडी। घोडणें कमठें पृथ्वी गाढी। गज करवडी महाग्राह॥' –एरुस्व १०.८०. 'हस्तींपां महित गज करवंडी, असंख्यात पाडिल्या।' –मुआदि ४४.१०३. [?]

करवण—स्त्री. (गो.) १ फळाची लहान खाप-फोड-फाक. २ फळांचा घड.?

करवत—पु. १ (सुतारी) लाकूड कापण्याचें हत्यार; दंतुरी पातें; अरकस. २ सोनारीहत्यार. -वि. (व.) (ल.) अतिशय गार, थंड. बोट बुडविल्या बरोबर करवतीनें कापल्या सारखें वाटण्या इतके थंड 'पाणी फार करवत आहे.' करवंद पहा [सं. करपत्र] **०कांठ, करवती कांठ**-पु. (विणकाम) धोतर, लुगडें वगैरेच्या कांठांत करवतीच्या आकाराची नक्षी; करवती नक्षीचा कांठ. **करवता कांठी**-वि. ज्याच्या कांठांत करवतीसारखी नक्षी आहे असें (धोतर, लुगडें वगैरे). **आडवा करवत घालणें**-वाप्र. एखाद्या कार्यास अडथळा करणें; प्रतिबंध करणें; हरकत करणें. **जिवाला करवत लागणें-असणें**-अतिशय काळजी लागणें, असणें. **करवतीखालीं धरणें, करवती घालणें**-अतिशय गांजणें, जाचणें, जुलूम करणें.

करवतणें—उक्रि. करवतीनें कापणें (लाकूड वगैरे); अरकसणें. -शे ७.७ [करवत]

करवती—स्त्री. लहान करवत. **०लगाम**-कांटेरी लगाम पहा.

करवती—स्त्री. एक झाड; काळा उंबर.

करवंद-दी—स्त्री. एक झाड करंद पहा. -शे ९.२६२;११.८८. [सं. करमर्द-करमंदी; प्रा. करवंदी]

करवंद—न. १ करवंदीचें फळ. २ (ल.) (करवंदाचें फळ फार आंबट शहारें आणणारें असतें यावरून) अतिशय गार; शहारें आणणारें; गारपगाचें आधिक्य दाखविण्यासाठीं गार शब्दापुढें हा शब्द योजितात 'गार गार करवंद' (हवा, दारू इ०)

करवंदणें—अक्रि. १ झोंबण्यासारखें, शहारण्यासारखें गार असणें; अतिशय थंडगार होणें (पाणी, ताक, हवा, हात वगैरे). [करवंद]

करवल-ळ—पु. करोल; बंदूकवाला घोडेस्वार. 'एकी गदा उचलोनि बळें। वीर करवले पाडिती' -एभा ३०.११५. 'चाळीस हजार करवल जमले' -ऐपो १०७. 'नामी करवळ आहे हुजुरांत।' -ऐपो २७७. [हिं. करोल; तु करावुल]

करवला-ली—पुस्त्री. नवऱ्या मुलीच्या किंवा नवऱ्याच्या भावास व बहिणीस लग्नांत विनोदानें म्हणतात. विवाहप्रसंगीं करवली वधू व वर याच्या पाठीमागें हातांत कन्हा (कलश) घेऊन उभी रहात असते (सामा) मानकरी, मानकरीण. 'करवली सुभद्रा वेल्हाळ। चालें सुढाळा उन्मनी।' -एरुस्व १६.४२. 'करवलीचा मान, सुप्रसन्ना ठेवी घंगाळी।' -वसा ५४. [सं. करक (कलश)+वान, वती. म. कन्हा+वला-ली प्रत्यय]

करवली—स्त्री. (हिं.) बंदूकवाल्या घोडेस्वारांचे युद्धांतील कौशल्य किंवा कामगिरी. [करवल पहा.]

करवस्त्र—न. हातरुमाल; घाण पुसण्याचें वस्त्र. (इं.) हँडकरचीफ. [सं. कर+वस्त्र]

करवळणें—क्रि. (व.) कळवळणें; हळहळणें; द्रव येणें. 'हालपाहून मुद्धां त्याचा जीव करवळत नाहीं.' [कळवळणें]

करवा—पु. १ सोललेल्या उसाचा तुकडा; गंडेरी. [का. कर्बु, कब्बु=ऊस; तुल० सं. खर्व=लहान, खुजा] **०पडणें**-क्रि. शरीराचा एखादा अवयव मोडणें; तुकडा पडणें; अतिशय दुखावणें; दमणें; थकणें. (कंबर, हात वगैरे). 'हाताचा, कमरेचा करवा पडला.'

करवा—पु. १ करकोचा; दोरी वगैरे बांधल्यामुळें पडलेला वण. २ लांकूड वगैरेस दोरी बांधण्याकरितां पाडलेली वाटोळी खांच; अवटी.

करवा—पु. मोत्यास मध्ये खोलगटपणा असणें. मोत्यास मध्यभागीं सभोंवती पडलेला करकोचा, रेघ. हा मोत्यांत दोष समजतात. मोतीं डोळ्यासमोर धरलें असतां आंतील बाजूस चिरल्यासारखी रेघ दिसते तिला नर म्हणतात. अशा मोत्यास थोडा खोलगटपणा असल्यास करवा म्हणतात.

करवा—पु. नृत्यांतील एक प्रकार; कारवा, केरवा नाच. यांत वेषपरिवर्तन केलेलें असतें. 'त्या दिवशीं गाणें व करवा नाच पाहून दरबार फार खुष झाले.' -धर्माजी ९०. [सं. कैरव]

करवाड-डें—न. करवड पहा. 'वोंलि जोंधळियाचीं करवाडें। खातां अत्यंत लागती गोडें।' -एभा २१.२६७.

करवाद—पु (कों.) त्रास; कष्ट; श्रम. [करवादणें]

करवादणें—अक्रि. (कु.) त्रासणें; श्रमणें; कष्टी होणें; पिरपिरणें. कंटाळा आल्यामुळें रागानें कुरकुरणें, पिरपिरणें. 'अरे, पण झालें काय तुला इतकें करवादायाला' -रत्न ५.४. [ध्व. कर+वद्-वाद=कुरकुर करणें]

करवाल—स्त्री. तरवार. 'फोडितु करवाळें। काढिती आंतांचें पेटोळे।' -शिशु १०४८. 'त्यांजवळ धनुर्बाण, परशु, करवाळ वगैरे हत्यारांखेरीज हत्यारें नाहींत.' -चंद्रगुप्त ६१. [सं. करवाल]

करवाळ—न. (कु.) सर्पादिकांच्या अगाचा मधला भाग. [?]

करवीं-वें—शअ. (एखाद्या) कडून; द्वारें-साधन-मार्गे, मध्यस्थी दाखविणारें. प्रयोज्य कर्त्यापुढें कर्तृत्वबोधक हें अव्यय लागतें. 'दुर्फोडीं करविलीं करतळें। भीममेना करवी॥' -शिशु ८५३. -अमृ ७.१२६. 'तुला करवेना तर मुलाकरवीं करीव' [सं. कृ.]

करवीर—पु. १ कण्हेरीचें झाड व फूल. २ कोल्हापूर. [सं.]

करवील—(गो.) एक वनस्पति, हिचीं पानें सुवासिक असून तीं कढींत किंवा आमटींत घालतात. करवेल, करवेली पहा.

करवेण—न. (गो.) लहान खाप, तुकडा. करवण पहा.

करवेल—न. (वायदेशी) हरळीसारखें एक गवत. करपेल पहा. -मसाप ३.२४६.

करवेली—स्त्री. (कों. कुलाबा) गाडीच्या साटीचें पुढचें व मागचें आडवें लांकूड.

करव्ह—न. (व.) नांगर धरण्यासाठीं मागील बाजूस लावलेलें मुठीचें लांकूड; हमणें. [स. कर+वह]

करशींग—पु. (गो.) गोमंतक प्रांतांतील एक झाड.

करशुद्धि—स्त्री. हातावर पाणी घालणें; हात धुणें. विशेषतः श्राद्धास ब्राह्मण जेवावयास बसतांना त्यांचे हातांवर घालतात. 'खाद्य नैवेद्य समर्थ भक्षिती। करशुद्धि देतसे भूपती।'–संवि ७.१२१.[सं.]

करस्थापन—न. कर बसविणें, लादणें. [सं.]

करसांबळ-ळी—स्त्री. खरसांबळी पहा.

करहाट देश—पु. कऱ्हाटक; कऱ्हा नदीच्या कांठचा प्रदेश; कऱ्हाड व त्याच्या आसपासचा प्रांत. [सं.]

करळ—पु. वालुमिश्र, ठिसूळ दगड; खरड, कड. [सं. करक] **०लागणें**–(वांई) पाभरीच्या फणानें जमीन जास्त खोल उकरली जाणें.

करळ—नस्त्री. (राजा) तांदूळ व इतर धान्याचें तूस, भुसा, टरफल. करल पहा.

करळ—स्त्री. छिद्र, (विरळ विणलेल्या रोवळी, सूप, पाटी यांच्या मधील) फट; चीर. [सं. करल=वेधः किंवा करालः=रंध्र, उघडें]

करळ-ळा—नपु. कुंभाराच्या भट्टींत कौलें, विटा वगैरेच्या खालीं घातलेलें, अर्धवट जळलेलें गवत. २ अशा गवताची एक काडी.

करळ—वि. (व.) उतरतें; कलतें. 'झोपडीचें छप्पर जास्त करळ असल्यानें पाणी थांबलें नाहीं.' **०जाणें-होणें**–क्रि. एका अंगाला कलणें, जाणें (जूं, धुरी, नांगर, गाडा, तराजू, तराजूची दांडी यासंबंधीं योजतात). हा शब्द शेतकरी लोकांत विशेष रूढ आहे. **०धरणें**–क्रि. (नांगर) आडवा धरणें. **०चालणें-आडवें जाणें**, आडवें निघणें. याच्या विरुद्ध शेव (उभें) जाणें, चालणें.

करळ—काळ्या जमीनीचा एक प्रकार; हिव्यांत भुसभुशीतपणा नसून ही फार चिकट लसते. हिव्यांतून पाणी झिरपून जात नाहीं. पाणी पडलें असतां हिव्यावर मिठासारखा पांढरा क्षार येतो. हिचे काळा करळ व पांढरा करळ असे दोन प्रकार आहेत. [का. करल=खारटपणा; क्षारता.]

करळ—वि. (व.) महाग; कडक; वाजवीपेक्षां जास्त (किंमत). 'बाजारांत उशिरां गेल्यानें गहूं जरा करळ पडले.'

करळी—स्त्री. मोडशी झाल्यामुळें पायांतून येणारे पेटके.

करळी—१ गाडीच्या साटीच्या चौकटीचें पुढचें व मागचें लाकूड प्रत्येकी. करवेली पहा. २ (कों. ठाणें) उभे खुंट ज्यांत बसवितात त्या दोन लाकडांपैकीं वरच्या लाकडास करळी म्हणतात; पिंज्यावरील आडवें लाकूड; इरळी, दोन आडवीं लाकडें (तरशे) दोन लांब तुकडे (घोडी किंवा घोडकीं) हीं सर्व मिळून गाडीची साटी होते. ३ (माण.) बावकड्या व घोडबाल्या यांच्यामध्यें बसविलेल्या एक हात उंचीच्या व चार बोटें रुंदीच्या फळ्या प्रत्येकीं. ४ (सुतारी) कपाटाच्या माथ्याचीं फळी. ५ गाडीच्या पेटीवरील भाग.

करळी—स्त्री. १ कुरळी; जाळ्याचा न विणलेला भाग, धागा, तंतु. [का. करि=दशी] २ धोतर, लुगडें वगैरेचा भाग; दशी. [का. करि=दशी]

करळी—वि. करळ दगडांनीं बांधलेली; करळ दगडाची (इमारत, वस्तु वगैरे). [करळ]

करक्षालन—न. हात धुणें; आंचवणें. 'देऊनि कृष्णासि आचमन। सवेंचि केलें करक्षालन।'–एरुस्व १५.१५६. [सं.]

करा, करा-दिया, करा दिव्याचा मान—पु. कऱ्हा पहा.

करा—पु. (राजा.) पाण्यावर आलेला तरंग, साय. –पु. जोंधळा, बाजरी वगैरेच्या कणसावर पाऊस पडून दाण्यास येणारा मोड. अंकुर.

करा—पु. (गो.) पावसांत पडणारी गार. [सं. करक=गार]

कराकर-रां—क्रिवि. (ध्व.) दांत खाणें, ऊस चावणें, काकडी खाणें यावेळीं होणाऱ्या आवाजानें युक्त; करकरां पहा. [ध्व.]

करांगळा—पु. (व.) खाचरा(गाडी)चा सांगाडा व आंख यांना जोडणारे दोन बाजूचे खुंट.

करांगळी, करांगुलि-ळी—स्त्री. हाताचें किंवा पायाचें लहान बोट; कनिष्ठिका; करंगळी पहा. [सं. कर+अंगुलि]

करांचलि—स्त्री. एक आंखूड तलवार; करंचली पहा. [फा. करांचळी]

कराज—न. (कु.) कर्ज (अप.) ऋण; कर्ज. 'कराज काढलां हां'. [अर. कर्ज]

कराड—पु. १ झटका; आवेश; लहर (ताप वगैरे विकृतीनें येणारी). २ मनोविकाराचा क्षोभ; जोराची लहर; चीड. (क्रि०येणे.)

कराड-डी—स्त्री (खान. गु. व.) पर्वताची किंवा नदीची दरड; कडा. 'मोहनडीची थोर कराडी।'–एभा १३.५८१.

कराड—न. (कु) सुकलेलें रान, गवत. करड पहा. [का. करड=वाळलेला घास, गवत]

करांडणें—क्रि. कुरतडणें; करडणें पहा. 'कामक्रोधाच्या उंदरीं पाही। मूळाच्या टारीं करांडी।'–एभा १०.५१७. 'मूषकें करांडोनि दशनीं। पादहीन करावा।'–मुआदि ३४.४.

करांडणें—क्रि. (कु.) जून होणें. [का. करडु=कठिण, रुक्ष]

कराडा—पु. २ (व. घाटी) अंगावर फोड अथवा गळूं झालें असतां येणारा ताप; वणकण. (क्रि० येणें)

करांडा—पु. १ (कों.) ओंडा: ठोकळा; करंडा अर्थ २ पहा. २ (कु.) करांडो; नारळाच्या किंवा केळीच्या झाडाचें खोड, खुंट.

कराडी—स्त्री. १ शक्ति, जोर, बळ, अवसान. (क्रि० धरणें; येणें). २ श्रम; कष्ट. 'उपास कराडीं। तिहीं करावीं बापुडीं।' –तुगा ६४७. ३ (अव. कराड्या) पेटके; वांब. (क्रि० येणें; चढणें; ओढणें; उठणें.)

कराडूं—न. शेळीचें पिलूं; करडूं पहा.

कराणा—पु. एक प्रकारची भाजी.

कराणी—पु. (गो) मुखत्यार; एजंट. [करणें, करणारा]

करांतल्यो—स्त्री. (गो.) गमजा; चेष्टा [सं कृ]

करांती—(कों.) एक प्रकारची उघडी गाडी.

करांदा-दें—पुन. करंद; करवंद; करवंदी पहा. [स. करमर्द]

करांदा—पु करंदा. (कों.) एक प्रकारची वेल. हीस जमीनींत येणारा कंद, व वर येणारें फळ. याचे गोड करांदा व कडू करांदा असे दोन भेद आहेत.

कराप—न. (क्रु.) १ लोहाराच्या भट्टीतील जळकट विडासारखी अशुद्ध धातु; कीट. २ सुकलेला पदार्थ. करप पहा. [करपणें]

कराब—न. (कु) आठ पाकळी कमळाच्या आकाराचें व एका पाकळीस मोत्यांचे घोस असलेलें कर्णभूषण; कराबफूल; (अव.) करावां. [सं. कुरबक=तांबडी कोरांटी]

करावीन—स्त्री. कडाबीन पहा. 'करावीन बकमार यांची खूण.' –ऐरो १०९. [इं. कॅराबिन]

करामत—स्त्री. १ चमत्कार: अद्भुत गोष्ट: नवल. 'म्हणे येथे करामत दिसे बहुत। मग औरंगजेबासी जाणविली मात।' –संवि २५.३६. 'म्हणे करामत पाहूं याची।' –रामदासी. २ १२२. २ कर्तृत्व; कौशल्य; खूबी: चातुर्य, चमत्कार करण्याचें सामर्थ्य. 'आपली करामत कोरणारानें त्या पुतळ्यांत खर्च केली होती.' –विवि ८.२.२९. ३ गुतागुतींचा, कौशल्याचा रचना. यंत्र; विविध साधनांची जुळवाजुळव [अर. करामत्]

करामती—वि. अंगीं करामत असणारा. युक्तिवान्; चातुर्यवान्; कुशल: हिकमतीचा; शोधक; कल्पक. 'मृत्यु न म्हणे करामती। कवाड जाणे॥' –दा ३.९ ११. 'असती दैवत करामती।' –दावि ४६३. [अर. करामत]

करामात—स्त्री. महत्कृपा 'जे ये समयीं आपलें येणें गोया (=म्हणजे) करामात जाली.' –रा १.१८८. [अर. करामात: करामत्चें अव]

करार—पु १ ठराव; वचन; बोली; कबुली. 'मत्सबा करार केला.' –सभासद ३०. 'जमीनच देवास करार करून दिल्ही पाहिजे.' –मसाप २.३.९५. २ निश्चय; शाश्वति; ठाम मत. 'तुका म्हणे एका क्षणाचा करार। पाईक अपार सुख भोगी।' –तुगा ३७३. 'राजश्री नारायणराव घोरपडे यांस पाठवणार म्हणतात, करारांत नाहीं.' –ख ११ ५६६६. ३ (कायदा) कायद्यानें अंमलबजावणी करतां येईल अशी कबुलायत. (इं.) कॉंट्रॅक्ट; 'दोन इसमांमध्ये एकमेकांस वचनें देऊन जेव्हां एखादी गोष्ट ठरते तेव्हां अशा वचनाला संगनमत म्हणतात व तें संगनमत कायद्यानें अमलांत आणतां येण्यासारखें असेल तर त्यास करार म्हणतात.' –धका ९२. –वि. मुक्कर; कायम; निश्चित. [अर. करार्] **०दाद**—पु ठराव; लेखी वचन; हरारमदार. [फा. करारदाद] **०नामा**—पु. ठरावपत्र; करारांचा कागद; करारलेख. [फा. करार+नामह्] **०पदार**—पु. १ वचन; बोली; कागद लिहून देणें; अनुमति वगैरेबद्दल व्यापक संज्ञा. [अर. करार+मदार] २ (मदारावर जोर देऊन योजितात) खात्रीचें अभिवचन; आणभाक; बेलभंडारा. **०वाकई-वाके, वाकै**—घडल्याप्रमाणें; बरोबर; अचुकपणें. 'करारवाकई हकीकत.' –रा १८ ५१. 'त्यामी माली–गमल्तीचा इतला करारवाकै देऊं.' –रा ६ ६१२. [फा. करारवा कैई]

करार—पु. (स्त्रि.) देवाची मनुष्यजातीसंबंधें केलेली योजना (हिब्रू भाषेत करार या शब्दाचा अर्थवाचक जो शब्द आहे त्याचा अर्थ कापणें अथवा बंधन असा आहे). 'मी मेघांत धनुष्य ठेविलें आहे तें तुमच्या माझ्या मधल्या करारासें चिन्ह समजावें.' –उत्प ९.१३. ख्रिस्ती करार दोन आहेत: **१ जुना करार**-पु (स्त्रि.) ओल्ड टेस्टामेंट या इंग्रजी शब्दाचा, पर्याय; परमेश्वरानें इस्रायल लोकांशीं मोशे याच्यातर्फे जो करार केला होता तो. त्यात नेमशास्त्रासंबंधीं बाह्यविधि व नियम लाविले होते. 'कारण जुना करार वाचितात तेव्हां तेंच आच्छादन तसेंच न काढिलेलें राहतें.' –करिंथ ३ १४. –इब्री ८ ७.१३. २ ख्रिस्ती पवित्रशास्त्र या ग्रंथाचा पूर्वार्ध. **नवा करार**-पु. १ (स्त्रि) न्यू टेस्टामेंट या इंग्रजी शब्दाचा पर्याय; भविष्यवादामध्ये ईश्वर व मानवजाति यामधील ज्या नैतिक संबंधाविषयीं भविष्य वर्तविलें आहे तो संबंध. 'मी इस्राएलाच्या घराण्याशीं ... नवा करार करीन.' –इब्री ८.८. २ येशू ख्रिस्तानें मनुष्यांशीं केलेला करार, त्यानें क्रुसावर आपलें रक्त सांडून त्यावर आपला छाप मारिला. त्यायोगें ख्रिस्तावर भाव ठेवणारास तारण प्राप्त होतें. ३ पवित्रशास्त्र या ग्रंथाचा उत्तरार्ध.

करारांचा—वि. १ केलेल्या ठरावास जो कधीं ढळत नाहीं तो; विश्वासु: प्रतिज्ञा पाळणारा. 'निवडक चालिस सहस्र बरोबर फौज करारांची।' –ऐपो ३१५. २ निश्चयी; एकवचनी. [करार]

करारा—वि. १ करारांचा. २ निश्चयी; बाणेदार: विश्वासू. ३ पक्का; स्थिर मनाचा; दृढप्रतिज्ञ. ४ टिकाऊ; तग धरणारा (वस्तु,

रंग इ०). ५ पक्का; भरपूर; खंबीर. [फा.] **०पणा**-पु बाणेदारपणा; तडफदारपणा. 'पण जीं विद्यापीठें ... सरकारच्या लायसेन्सप्रमाणें चालावयाचीं तेथें ... करारीपणा कोठून नजरेस पडणार ? ' –टि २.५.१७.

करारी—पु. शाक्त पंथाचा एक भेद. हे स्वतः देहदंड करून घेतात; काली, चामुंडा इ० देवते भजतात. [सं. कराल=भयंकर. फा. करारी]

करारी—स्त्री. १ बळ; जोर; जोम (क्रि० धरणें; येणें) कराडी पहा २ (राजा.) वचन; बोली. करार पहा.

कराल—न. कोंडा; तूस. करळ अर्थ २ पहा.

कराल-ळ—वि. भीतिप्रद; भयंकर; भीषण. 'खवळत रिपुकाळें काळकाळें कराळें।' –दावि २७८. [सं.] **०वदन**-वि. वरील दांत लांब व खालील आंखूड असणारा (घोडा). [सं. कराल+वदन]

करालता—स्त्री. (संगीत) तोंड वासून गाणें. [सं. कराल]

कराली-ळी—स्त्री. पेटका; वांक; वळ; कराडी पहा. (क्रि० चढणें; उतरणें; बांधणें). करळघा असा अव. प्रयोग.

कराष्टमी—स्त्री. आश्विन वद्य अष्टमी. या दिवशीं कुमारिका गंगोदकानें भरलेला करा (मडकें) हातांत घेऊन देवीची पूजा करतात; ही चाल विशेषतः काशीप्रांतीं रूढ आहे. कांहींच्या मतानें आषाढ व कार्तिक वद्य अष्टमीस हें व्रत करावें. परंतु अधिक रूढ आश्विन वद्य अष्टमीच आहे. [कऱ्हा+अष्टमी]

कराहा—पु घोड्यास होणारा एक रोग; ढांस; आंतड्यांतील रोगांपैकी एक रोग. –अश्व २.१०९. [अर. कऱ्हा]

करळ जाणें-होजें—करळ जाणें पहा.

करि, करी—पु. हत्ती. 'करीतुरंगसमाजें। सेना नाम निफजे।' –ज्ञा १३.१५२. [सं. करिन्] **०चर्म**–न. हत्तीचें कातडें. 'करिचर्म घेतसे प्रावणें। न कंटाळें दुर्गंधीनें मन।' **०हस्त (संयुक्त हस्त)**–पु (नृत्य) उजवा हात ललाखून करून ह्या बाजूकडून त्या बाजूकडे झुलत ठेवणें, तसेंच डावा हात त्रिपताक करून डाव्या कानावर ठेवणें. [सं.] **०हस्तक(करण)**–न (नृत्य) पाय अंचित करून डावा हात वक्षस्थलावर ठेवणें. उजव्या हाताचा तळहात तर्जनीच्या बाजूनें आरंभ करून वाहेरून आतल्या बाजूस फिरविणें.

करिणा-ना—पु. १ (वादीप्रतिवादींनीं) पंचायतीपुढें दिलेली स्वतःची लेखी जबानी, कैफियत. २ वर्तमान; गोष्ट; हकीकत. 'करिणा कांहीं पातशाहास समजत नाहीं.' –सभासद ३९. ३ योग्यायोग्य विचार. 'कांहीं करिणा जाहला.' –सभासद ३८. ४ अनर्थ. ५ प्रकार. [अर. करीना]

करिणा—पु संदर्भ; संबंध. 'आम्ही लोक कोणे करिणेयाचे व मोगल लोक कोणे करिणेयाचे हे रावसाहेब बेहत्तर जाणत असतील. ' –रा १.५२. [करिणा. तुल० दे. करणि=समानता]

करिगी—स्त्री. हत्तीण. ' अगे गेहारण्यीं श्रमसिल कसी मत करिणे ! ' –मोराधा ३० [सं.]

करितां, करतां—शअ. १ कारणें; सारीं; स्तव; मुळें; प्रीत्यर्थ. 'जेंवें करितां बाणे खुण। सर्वज्ञपणाचीं।' –दा २.२.१. २ पेक्षां; हून 'तेथ वसंतां करता चढावनी। म्रिष्मिमें केली रीगवणी।' –शिशु ६२१. [सं. कृते]

करिंदा–करांदा पहा.

करियात-द्–स्त्री. दहा–बारा खेडयांचा लहान महाल; यांत कांहीं या महालांतील व कांहीं त्या महालांतील खेडयांचा समावेश होतो. कर्यात पहा. [अर. कर्यतह्. (कर्या=गांव)]

करियाद, कर्याद–स्त्री. (गो.) दाट जंगल व उंच असा पर्वत. [?]

करी—पु. कर पहा. पुढील अर्थी नामांना हा प्रत्यय लागतो. १ मालक, धनि, जबळ बाळगणारा. उदा० पैकेकरी= पैसा जवळ बाळगणारा; घरकरी=घराचा मालक; मानकरी=मानाचा अधिकारी. २ एखाद्या गावचा रहिवासी; –चा माणूस. उदा० गांवकरी. ३ एखादा धंदा करणारा; काम करणारा; एखाद्या धंद्यावर उपजीविका करणारा. उदा० भिक्षेकरी; शेतकरी; भाडेकरी. ४ वाहणारा; बरोबर घेणारा. उदा० इटेकरी (राजशस्त्रधर, इटा नावाचें राजानें वापरावयाचें शस्त्र बरोबर बाळगणारा, खेळणारा); पटटेकरी. ५ नुसतें कार्य करणारा किंवा उरकणारा. उदा० यात्रेकरी; मारेकरी. करी याचे अनेक अर्थ असून ज्या शब्दांना तो लागतो तेथें तेथें त्याचे अर्थ दिले आहेत. करी हा प्रत्यय वाला या प्रत्ययाप्रमाणें वाटेल तेव्हां उपयोगांत आणीत नाहींत. –वि. कर (शहरांच्या नांवाना लागणारा प्रत्यय) चें विशेषणात्मक रूप; संबंधदर्शक; उदा० पुणेकरी=पुण्याचा किंवा पुण्याच्या लोकांसारखा. [सं. कृ=करणें.]

करीं—शअ. (काव्य)नें; मुळें; योगानें; करितां (तृतीयेचा प्रत्यय). 'ज्याचिया नामस्मरणाकरीं। सकळ पातकांतें हरि हरी।' –एभा ३.५८८. [सं. कृत्वा]

करीणा-ना—हकीकत; वर्तमान. करिणा–ना पहा. 'ज्याचा मला हा कळला करीणा।' –सारुह ३.८ **०रोखा**–करारनामा, अर्जे.

करीणा—पु. (ना.) कर्तबगारी; पराक्रम

करीबल—न. सैन्यांतील गजदळ; हत्तींचे पथक [सं. करि+बल]

करीर—पुन. नेपती (तें) नांवाचें काटेरी झुडुप व त्याचें फळ. 'करीर पुष्प शुष्कही रसार्थ चाखितो तरी।' –कक ७८. [सं.]

करीव—शअ. (राजा.) कडून; करवीं, करव पहा.

करुण—वि. १ दया उत्पन्न करणारा, पाझर आणणारा (प्रसंग). २ दयाद्र; दीन; कृपावंत. [सं.] **०रस**-पु. नवरसां पैकीं एक; दुसऱ्याची विपन्न स्थिति, प्रियजनवियोग इ० कारणांनीं अंतःकरणांत जी वृत्ति उत्पन्न होते ती; दुसऱ्याचें दुःख पाहून अंतःकरणामध्यें उत्पन्न होणारी भावना व्यक्त करणारा रस. 'सांगों नवरस लक्षण । तरी शृंगार हास्य करुण ।' –निगा २८५. [सं.]

करुण(दृष्टि)—वि. (नृत्य) दुःख झालें असतां डोळे अर्धवट मिटतात व बाहुल्या अश्रुपूर्ण होतात व नासाग्रीं नजर लागते तशी (दृष्टि). हा अभिनय करुणरसाचा आहे.

करुण, करुणा—पुस्त्री. दया; कृपा; माया; द्रव येणें; कींव 'मग जी जलदश्यामा करुणा बसली नवासनावर ती।' –मोउद्योग ७.९५. 'कृपालुवा परमपुरुषा । करुणा केसी तुज नये ।' –ब्यें. २२

करुणाकर—वि. दयासागर; कृपानिधि; दया करणारा, कृपा करणारा (परमेश्वर). 'नाभी नाभी या उत्तरें । करुणाकरें शांतवीजे ।' –तुगा ११५६ 'जो जगद्गुरु करुणाकर । त्यासि भक्त चरित्रें आवडती फार ।' –संवि १.१६.

करुणाकीर्तन—न. १ (परमेश्वराच्या) दयेचें व कृपेचें वर्णन. २ (ल) गयावया करणें; काकुळत करणें; दयेसाठीं विनवणी.

करुणांग—वि. नम्र. 'नमन केलें साष्टांगीं । उभा राहिला करुणांगीं ।' –गुच ३५.३१. [सं करुण+अंग]

करुणा भाकणें—क्रि. दुसऱ्यास करुणा येईल असें दीनवाणें भाषण करणें; दयेची याचना करणें; काकळूत करणें; गयावया करणें. 'देखोनिया अंतसमया। करुणा भाकिती भोगीतनया।' ह–११.१४१. 'करुणा अनुतापें भाकावी॥' –संवि ३.६५.

करुणारस—करुणरस पहा.

करुणास्वर—पु. दीनवाणा, करुणेचा, काकुळतीचा शब्द. [सं.]

करुणाळा—वि. दया, करुणा करणारा; कृपाळु. 'जरि तूं करुणाळा गोसावी । भणौनि विटसी ना ।' –क ५२. [सं. करुणा+आलुच्]

करू—वि. करणारा. उदा० यात्रेकरू; बिऱ्हाडकरू; होतकरू 'पूर्ते हे शुभलक्षणी रत सदा धर्मेकरू रक्षणीं ।' –आसीस्व १८. [सं. कृ]

करून—शअ. १ कडून; करवीं; मुळें; योगानें (साधन, कारणीभूत, मार्गदर्शक या अर्थी). 'क्षेमें यावा द्वारकानाथ। याचस्वार्थें करूनियां ।' –ह २५.६०. २ होऊन (स्वतःच्या मर्जीनें, विचारानें) बहु० योजतात. परंतु हा तितका शुद्ध नाहीं. होऊन पहा.

करूब—पु. (ख्रि.) हे एक प्रकारचे देवदूत असून ते देवाच्या समक्षतेचे रक्षक होते असे जुन्या करारावरून दिसतें. 'एदेन बागाच्या पूर्वभागीं करूब व गरगर फिरणारी ज्वालारूप तरवार ठेवली.' –उत्प ३.२४. [हिब्रू. कुब. (अव.) कुबीम; फ्रें. चिरुबिन; इं. चीरब]

करे—न. (व) मडकें; करा [सं. करक.]

कर-कन्हें—न. उंट. 'अशोकाचे अंगवसे। चघळिले कन्हेनि जसें।' –ह्रा ११.४१४. [सं. करभ=उंटाचें पिलू]

करें—वि. (गो.) कृश; अशक्त. [सं. कृश.]

करेंड—न. (गो) तणाची एक जात; एक प्रकारचें गवत; करड पहा. २ तवल्याच्या चामड्यावर डकवावयाची शाई, पुडी. [का. करिडु=काळा पदार्थ, काळेपणा]

करेणु—स्त्री. हत्ती; हतीण हत्तींचें पिलू; गजबालक 'करेणुयूह चालतां दिसति पंकजाचे परी।'–गंगारत्नमाला,नरहरि १४३. नवनीत पृ. ४३२. [सं.]

करेत—न. (गो.) घोडयाची गाडी, बग्गी. [पो. करित; इं. कॅरज]

करेप-य—स्त्री. (गो.) तंबाखू जाळून केलेली पूड. करप पहा. [करपणें]

करेपाक—पु. (तंजा.) कढिलिंब. [ते. करे=काळा+वेप =लिंब+आकु=पाला]

करेम-करेमेट—स्त्री. (गो.) कोणत्याहि फळाची कोंशिबीर, करंबें, करमंगें पहा. 'आमाडयां करेम.'

करेमती—स्त्री. (बे.) एक प्रकारचें भात, साळी.

करेल, करेल आंबा—पु. (गो.) कलमी आंब्यांची एक जात. [पोर्तु. कॅरेरा]

करेला—पु. (व्यायाम) कारलें; दोन हातांनीं फिरविण्याचा मोठा मुद्गल. याचे वजन सुमारें दीड मण, लांबी ४३ इंच, घेर २९ इंच असतो. [हिं. करेल; सं. कराल ?]

करळ—पु. (कों) एक जातीचा मासा. हा आक्टोबर–नोव्हेंबरमध्यें सांपडतो.

करो—पु. (गो.) कर, करा पहा.

करोट—पु (व) शेताच्या लागवणीबद्दल येणारें धान्य [खंडी?]

करोड होणें—क्रि. (कुण.) मरणें; स्मशानभूमिविषयगत होणें. [सं. करट; म. करोटी, कारट.]

करोटी—स्त्री. करवंटी; नरोटी. **करोटी हातांत घेणें**—भीक मागणें; विपन्नावस्थेस पोंचणें. [सं. करोटी]

करोड—वि. १ (हिं.) कोटी (संख्या), २ (ल.) असंख्य. [सं. कोटि; प्रा. कोडि]

करोडगिरी—स्त्री. १ करोडा याचें काम व कचेरी. २ मालगुजारीपैकी जकात; कर. 'निजामाला करोडगिरीचें जबरी उत्पन्न आहे.' [करोडा+गिरी]

करोडा—पु. १ (कांहीं प्रांतात) कमिशनर किंवा सर मामलेदाराच्या दर्जाचा अधिकारी; सुभा. २ (मोंगलाईंत) मालावरील जकात वसूल करणारा कामगार; जकातदार; नाकेवाला. [हिं. करोडा-डी; सं. कर]

करों(रौ)डा—स्त्री. कुरवंडी पहा. --शर.

करोनी—शअ. करून; करून पहा. 'दानांबुपान करवी मधुपां करोनी।'—र ५५.

करोनी—क्रि. करून (कर धातूचें रूप).

करोल-ळ—पु. वेंदुकवाला घोडेस्वार; करवल-ळ पहा. 'यांखेरीज थोर थोर गाडयांवरील भांडीं व करोळ असा चालता तोफखाना सज्जिला.'—मराआ ६. [तु. करावुल]

करोळी-ळी—स्त्री. १ करोल्याचें काम, कसब. २ (घोडेशावरील स्वारांनीं केलेला) बंदुकीचा मारा, फैर. 'श्रीमंतांकडील बारगीर झाडून जमा होऊन करोळी सुरू झाली.'—पया ४५.

करोळा—पु. कुंभाराच्या आव्यांतील जळकें गवत. करळ-ळा पहा.

करोळी—स्त्री. (व.) गाडीचे धुरे ज्या ठोकडांत घालतात खास म्हणतात. करळी पहा. 'नुकतीच करोळी केल्यानें जरे झालें.'

करोळें—न. १ गाडीच्या साटींचें आडवें लांकूड; याच्या उलट बाजू. २ करळी पहा.

कर्क—पु. १ खेकडा; कुरलें-ली; वेलकडें; किरवें. २ (ज्यो.) बारा राशींपैकीं चौथी रास. [सं. कर्क; फा. कर्क] ०वृत्त—न. उत्तरध्रुव सूर्याकडे पूर्णपणें कलला म्हणजे २३॥ उत्तरअक्षांशापर्यंत सूर्यकिरण लंबरूप पडतात, या अंतरावरून जाणारें जें अक्षवृत्त तें. ०रेषा—स्त्री. सूर्याच्या उतरेकडे जाण्याच्या मर्यादेवरील रेषा.

कर्क—पु. करक. वरातीच्या झालींतील दिवा. 'वंश विस्तारितां सुख । सोळा कळांचे सोळा कर्क।'—एरुस्व १६.१५९. [सं. करक]

कर्कट-कर्कटलें—वि. (व.) कळकट; घाणेरडें; ओंगळ; मळानें करवडलेलें. 'फडकें कर्कट होऊन गेलें, धू एकदांचें.' [करवडणेप्रमाणें]

कर्कट, कर्कांटक, कर्कोटक—पुन. १ (गणित) भिज्या. २ वर्तुल काढण्याचें साधन; कंपास. ३ कर्क पहा.

कर्कटशृंगी—स्त्री. एक झाड; काकडशिंगी पहा. [सं. कर्कट=कांकड-डी+शृंग=शिंग]

कर्कणें—क्रि. करण्याचा (वाद्य) कठोर आवाज काढणें; कठोर शब्द करणें. 'कर्णें किर्तीएक रणबहिरी कर्कती।'—ऐपो ११९. [ध्व.]

कर्कर—पु. (एखाद्या रत्नाच्या आंत दिसणारे) रजःकण, रेवती; कण. [ध्व. खरखर]

कर्कश—वि. १ कर्णकठोर; कर्णकटु; शिरशिरी भरणारा; झोंबणारा (आवाज); याच्या उलट मधुर. 'वाजों नको कर्कश रे तनीरा —दावि १६६. २ (ल.) बोचणारें; अंतःकरणाला रे पाडणारें (भाषण, वचन). 'कर्कश वचनें कवेश मार।' —रा ८.२७. ३ तुरडा; तिरसट; रानटी; वांट स्वभावाचा. ४ किंवा, अति दाट. 'झाडी हे कर्कश भयेंकर.' —रामदासी २.१३७. तों रान कर्कश अचाट। गगनचुंबित तरु अचाट।'—नव २३.९. ५ क्रूर; कठोर; निर्दय; भयंकर. 'कर्कश वेश उभा रणरंगी राघव तसा।' —दावि ३३४. [सं. कर्कश]

कर्कशा—स्त्री. १ आटिका; कैदाशीण; कृत्या; जगनाड; तंटेखोर; भांडकुदळ स्त्री. २ कर्कश, कठोर आवाज असणारी स्त्री; मधुर भाषीच्या उलट. [सं. कर्कश]

कर्कशा—पु. भांडण. 'ते समयीं यांशीं भाऊपणियाचा कर्कशा केला नाहीं.'—रा १६.१५. [अर. कर्कशा; ध्व.]

कर्कष्टक (संयुतहस्त)—न. (नृत्य) दोन्ही हातांचीं बोटें एकमेकांच्या बेचक्यांत घालून अडकवून ठेवणें. [सं.]

कर्की—स्त्री. धडकी; भीति; वचक. 'समोर गातां कोणी दिसेना। मनामधीं बसली कर्की।'—होला १८. [कडकी]

कर्कोचा (च्या)—पु. एक पक्षी, करकोचा पहा. 'हुमे कर्कोच्या सुतार।'—दावि २४४. [सं. क्रौंच]

कर्कोट, कर्कोटक—पु. १ (पुराण) कद्रूपुत्र, एक नाग; सर्पराज, याला नऊ हजार हत्तींचें बळ होतें. नल राजास वनवासांत यानें दंश केला होता. कलिदोषनाशकरितां याचें स्मरण करतात. 'कर्कोटकस्य नागस्य.....कीर्तनं कलिनाशनम्।' 'नाना सर्पे उगवले काळ कर्कोट चालिले।' —दावि ५०१. २ (उप.) कन्हाडे जातीच्या ब्राह्मणास म्हणतात. ३ सुंड घेणारा; दीर्घद्वेषी मनुष्य. [सं.]

कर्कोटकी, कर्कोटी—स्त्री. करटुली पहा.

कर्कोड्—पु. (रत्न) लसण्या; रत्नाचा एक प्रकार. हें एक उपरत्न आहे. [सं. कर्कतर=रत्नविशेष करकेतन पहा]

कर्कोटांचा नारळ—क्रि. (गो.) नारळाचा कीस पाटयावर घालून किंचित बारीक करणें. खरंगटणें. [ध्व.]

कर्पूर—पु. कचरा; कापुरकाचरी; कचोरा; एक सुगंधी व औषधि द्रव्य; हा रुक्ष, उष्णीपक; कटु व गुल्मवात, कफ, कृमिनाशक आहे. —बृहन्निघंटु १२५. [सं.]

कर्ची—पु. हिऱ्याचा लहान तुकडा, कण; रज. —मनि (बडोदें) (परिभाषा).

कर्ज—न. ऋण; दुसऱ्यापासून उसनें घेतलेलें द्रव्य; खर्चासाठीं परत देण्याच्या बोलीनें काढलेली रक्कम; ठराविक व्याजानें दुसऱ्याकडून उसनवार घेतलेली रक्कम; कर्जाचे ऋणकोसंबंधीं पांच व धनको संबंधीं दोन असे सात प्रकार आहेत. [अर. कर्ज़; सं. तुल० कर्ज्=पीडा देणें] ०**लागणें**–कि. ऋणकरी होणें. 'हा माझें कर्ज लागतो.' **डोईवरून पाणी जाई इतकें कर्ज असणें**–अतिशय कर्ज असणें; कर्जांत बुडून राहाणें. ०**अमदान**–स्त्री. परत किंवा वसूल आलेल्या कर्जाची जमाखर्चाच्या वहींतील बाजू; कर्जफेडीसाठीं आलेली रक्कम जेथें जमा केली असते ती हिशेबाची बाजू; कर्जदादन पहा. [अर. कर्ज़+आमदनि] ०**करी**–पु. १ ऋणकरी; ऋणको. २ धनको; कर्जाऊ रक्कम देणारा. ३ कर्जदारांना तगादा लावणारा नोकर, माणूस, शिपाई, अधिकारी. ०**खत**–न. कर्ज घेतल्याबद्दल ऋणकोनें धनकोस लिहून द्यावयाचा कागद; कर्जरोखा; ऋणपत्र. ०**दादन**–न. परतफेड म्हणून वसूल आलेल्या कर्जाची जमाखर्चाच्या वहींतील बाजू; कर्जफेडीसाठीं दिलेली रक्कम जेथें मांडली जाते ती जमाखर्चाची बाजू; कर्ज अमदान पहा. [फा. कर्ज़+दादन] ०**दार**–वि. १ कर्जकरी; ऋणकरी; ऋणको. 'सबब नादारीस आलें आणि लोकांचे कर्जदारी जाहलों.' –रा १३.९१. २ धनको. 'तर्फ मजकूरची रयत कर्जदार (ऋणको) जाली आहे त्यास कर्जदाराची (धनकोची) निकड होते आणि व्यावयासी अवसर नाहीं.' –बाडसमा २.२२५. [फा. कर्ज़+दार] ०**दारी**–स्त्री. ऋणकोपणा. ०**पाणी**–न. कर्जेवाम; कर्ज या शब्दास व्यापक संज्ञा. ०**बंदी**–वि. ऋणको. 'खायावांचून बैल मेले, कर्जबंदी झाला' –पला ८६. [कर्ज+बंदी] ०**बाजारी**–वि. ज्यास अनेकांचें कर्ज आहे असा; देणेंदार; ज्यास फार कर्ज आहे असा (माणूस.) [अर. कर्ज़+बाज़ार्] ०**भरी**–रू–वि. कर्जबाजारी; देणेंदार. 'आपण कर्जभरू होतात.' –बाळ २.१२९. [कर्ज+भरणें.] ०**रोखा**–पु. कर्जखत पहा. (क्रि० लिहून देणें; घेणें) [फा.] ०**वाम**–न. ऋण; देणें. 'साहुकाराच्या योगानें राज्य आबादान होतें...पडलें संकट प्रसंगीं कर्जेवाम पाहिजे तें मिळतें.' –मराआ २०. [अर. कर्ज़+फा. वाम्]

कर्जाऊ—वि. व्याजाच्या बोलीनें घेतलेलें किंवा दिलेलें (द्रव्य). [कर्ज] **कर्जी**–क्रिवि. व्याजू; व्याजानें; व्याजाच्या बोलीनें दिलेल्या किंवा घेतलेल्या संबंधानें. [कर्ज]

कर्डा, कर्डि, कर्डी—करडा पहा. 'गंगथडीहुन भाली पुण्याला कर्डिफौज बांकी स्वारी.' =ऐपो ३२३.

कर्डी—करडई पहा.

कर्डा काकडा—वि. कडक; कडवा; कठोर. 'हम बडे कर्डे काकडे शिपाई है.' –रासक्रीडा १०. [कर्डा+काकडा]

कर्ण—वि. सब्जा (रंग). –अभप १.२७.

कर्ण—पु. १ कान; शब्दग्राहक इंद्रिय; ज्यानें आपणास ऐकावयास येतें तो अवयव. 'परि दूतांच्या मुखें हे वार्ता। सत्यभामेच्या कर्णी तत्त्वता। प्रवेशली आधंत।' –ह २६.१०२. २ अंग देशचा राजा; हा फार उदार होता. 'रिपुगज पंचानन। कर्णवीरु।' –झा १.१०५. ३ (वरील कर्ण उदार होता म्हणून त्यावरून लक्षणेनें), मोठा दाता; उदार पुरुष; (उप.) कृपण मनुष्यासहि म्हणतात. उदा० 'कर्णाचा अवतार.' ४ (भूमिती) भुजाच्या अंतापासून कोटीच्या मूळापर्यंतचें सूत्र; काटकोन त्रिकोणांत काटकोनासमोरील बाजू; काटकोन चौकोनाचे समोरील दोन कोण जोडणारी रेषा. ५ नावेचें सुकाणूं. 'त्या नावाड्यांनीं बाजीला शेकून जहाजाच्या कर्ण्यावर निजविलें.' –स्वप ३३०. [सं.] ०(कान.) **ओढणें, ओढविणें**–लक्ष्यपूर्वक कान देणें, किंवा व्यावयास लावणें. 'जो मायानियंता। तो वसिष्ठापुढें बोठवी कर्णे।' (वाप्र.) **कर्ण स्पृष्ट कटि चालयति**–एक सांगितलें असतां एक करणारा; हुंब्या, टोणप्या मनुष्यास लावतात. ०**कटु**–वि. १ कानाला त्रास आणणारें; कठोर; कर्कश. २ (ल.) अप्रिय (भाषण, शब्द, गाणें). [सं.] ०**गत**–घृष्ट–वि. कानावर आलेलें; एकवार ऐकलेलें; कानावरून गेलेलें; उडत उडत ऐकलेलें (वाक्य वगैरे). [सं.] ०**छेद**–पु. १ कान कापण्याची शिक्षा. (चोरांना दिलेली) २ कानाच्या पाळीस भोंक पाडणें; कर्णवेध. [सं.] ०**जप**–पु. १ कानांत सांगितलेला मंत्र; उपदेश; उपनयनाच्या वेळीं गुरु शिष्यास सांगतो तो. 'गीत भाटींव तो प्रवर्णी। कर्णजप।' –झा १७.२९७. २ कानांत गुप्त गोष्ट सांगणें. ३ कानाशीं केलेली पुटपुट; चहाडी; चुगली; चुगलखोरी; कर्णजप पहा. ०**तार्टक**–न. तानिवडें; कर्णभूषण. 'भुलविल्या कृष्णवेधकें। पार्यी घातलीं कर्णतार्टकें।' –ह १९.६६. [सं.] ०**ताळा**–पु. (कानाचें झडपणें) कानाची हालचाल. 'पाठीं निवृत्ति कर्णताळे।' –झा १७.७. ०**धार**–पु. १ नावाडी; सुकाणू धरणारा; सुकाण्या. २ (ल.) पुढारी; नेता. 'कळों आलें बरे उघडले डोळे। कर्णधार मिळे तरी बरें।' –तुमा ८८७. [सं.] ०**नाद**–पु. कानांत एकसारखा होणारा आवाज. [सं.] ०**पथ, पथ**–पु. कानाचा मार्ग, ज्या मार्गानें कानांत ध्वनि शिरतो तो मार्ग. 'कथा गेली कर्णपथां.' [सं.] ०**पाली**–स्त्री. कानाची पाळ. खालचें टोंक. [सं.] ०**पिशाच**–पुन. १ मंत्रसाध्य एक पिशाच; हें उपासकास भूत, भविष्य, वर्तमान वृत्त सांगतें असा समज आहे. 'कर्णपिशाच भगलिनी। उच्छिष्टचांडाळी रानसटवी जखणी।' –ह १३.६. 'मला तुझें सारें कृत्य कर्णपिशाच्चानें सांगितलें.' २ भविष्यकथन; भाग्यकथन. ३ गुप्त गोष्टी सांगणारा; [सं.] ०**पिशाची**–पु. भविष्य सांगणारा; ज्योतिषी. ०**पिशी**–स्त्री. कर्णपिशाच. ०**पुट**–न. कानाचा बाहेरचा भाग; कान. 'या बोलाची

डांगुरडी। तिये प्रसिद्धी आलीं किरीटी। म्हणोनि तुम्ह्या हन कर्णपुटीं। वसों कां जे।' –ज्ञा १८.२८१. [सं.] **०पुष्प–फूल–भूषण**–न. १ स्त्रियांच्या कानांतील एक दागिना; ईअररिंग. 'करीन संतांसी कर्णभूषणें।' –ज्ञा १४.१८. –देहु ५२ (नाको). २ घोड्याच्या कानांतील दागिना. –स्वप ५३. [सं.] **०पूर**–एक दागिना–देहु ४६ (नाको). [सं.] **०मधुर**–वि. मंजुळ; कानास गोड लागणारा; मनाला समाधान, आल्हाद देणारा; सुस्वर (ध्वनि, आवाज). [सं.] **०मात्रा**–स्त्री. कर्णभूषण; कानांतील दागिना. 'हस्तमात्रा कर्णमात्रा। कृष्णासी बोपिल्या विचित्रा।' –एरुस्व १५.१४९. 'कर्णमात्रा यया देणें।'–गीता २.२४९६. **०मूळ**–न. १ कानाचें मूळ; कान. 'जरा कर्णमुळीं सांगों आली गोष्टी.' –तुगा ३३४७. 'हलु हलु तनयेच्या कर्णमूळास गेली।' –सारुह २.११३. २ कानाच्या खालीं होणारें दुःख, रोग; कर्णवळ. ३ कानाच्या मागें भोंवरा असणें; घोड्याचें एक लक्षण. –अश्वप ९८. **०मैथुन**–न. कानाशीं लागणें; चुगली, चहाडी, कानगोष्टी, कानमंत्र करणें. (बाईट अर्थानें योजितात). [सं.] **०रोषा**–स्त्री. कर्ण अर्थ ४ पहा. –शिल्पवि ४०३. **०रोग**–पु. कानास होणारे रोग. हे कर्णशूळ, कर्णनाद, बाधीर्य, कर्णस्त्रेव, कर्णस्राव, कर्णकंडू इ० २८ आहेत. –योर २.८०. **०वेध**–पु. लहान मुलाचा कान टोंचण्याचा (कानाच्या पाळीस भोंक पाडण्याचा) एक विधि. हा मुलाचें नांव ठेवण्याच्या दिवशीं करतात. [सं.] **०व्रण**–पु. कानाच्या आंत पडलेलें ज्यांतून पू वगैरे वहात आहे असें क्षत. [सं.] **०शूळ**–पु. कानामध्यें कांहीं विकृतीमुळें उत्पन्न होणारा ठणका. [सं.] **०श्रुत**–वि. कानांनीं ऐकलेलें; ऐकींव. [सं.] **०संपुष्ट**–न. कानाच्या तीन भागांपैकीं एक भाग; पाळ व चाफा याशिवाय जो खोलगट भाग असतो तो. [सं. कर्ण+संपुट]

कर्णखोर—वि. (ना.) कर न करणारा; कर म्हणून सांगितलेलें न करतां जें करूं नको म्हणून सांगितलें तें मुद्दाम करणारा. [कर+न+कर+खोर]

कर्णम्, करणम्—पु. (तंजा.) कुलकर्णी, लखदीव बेटांत करणी नांवाचे कारकून, शानभोग आहेत. [तामिळ–करणम्]

कर्णा—पु. एक वाद्य. करणा पहा. 'वाजंत्रें। वाजती, कर्णे वाजंत्रें वाजती'–दत्तपदें ५. **०करणे**–क्रि. (क.) कर्णा वाजविणें. 'तो कर्णा करून आला.'

कर्णाचा अवतार—पु. १ मोठा दानशूर; उदार पुरुष. २ (उप.) कृपण मनुष्य.

कर्णाचा पहारा—पु. सूर्योदयापासून पहिल्या तीन तासांचा पहारा; पहिला पहारा; अति पवित्र वेळ; रामपहारा.

कर्णांत—क्रिवि. कानापर्यंत (लांबट डोळे, वगैरे). [सं. कर्ण+अंत]

कर्णारूढ—वि. कानावर आलेलें, गेलेलें; ऐकलेलें; ऐकींव शब्द, वाक्य इ०). [सं. कर्ण+आरूढ]

कर्णाशी—पु. कान फुटणें; कान वाहणें; कानाचा एक रोग. [सं. कर्ण+अर्श]

कर्णावतंस—पु. कानांतील अलंकार; कर्णभूषण. [सं. कर्ण+अवतंस]

कर्णावळ–ळी—स्त्री. एक फूल झाड. [सं. कर्ण+आवलि]

कर्णिक—करणिक पहा.

कर्णिका—स्त्री. १ कमळ वगैरे पुष्पांचा कोश. 'येरी म्हणती योगदुमा। श्रेष्ठ कर्णिका राजउगमा।' –नव २२.७१. २ हाताचें मधलें बोट. ३ कमळाची कळी. 'यंत्र उभवणि उपासकां। त्याची आंगोळियां मुद्रिका। त्रिकोण षट्कोण कर्णिका। जडित माणिका आगमोक्त।' –एरुस्व १.५१. ४ कर्णभूषण (तानवडें, ताटंक इ०). –देहु ४६. (नाको). ५ कमळाची पाकळी. 'माझें हृदय दिव्य कमळ। जें तेजोमय परम निर्मळ। अष्टकर्णिका अति कोमळ। मध्यें घननीळ विराजे।' –ह ३५.१. [सं.]

कर्णी—स्त्री. गवंड्याची थापी. करणी पहा.

कर्णेकरी—वि. कर्णा वाजविणारा.

कर्णेजप—वि. चहाडखोर; प्रच्छन्न निंदक. कर्णजप पहा. [सं. कर्ण सप्तमी+जप]

कर्णोपकर्णी—क्रिवि. या कानापासून त्या कानीं; एकानें दुसऱ्याला, त्यानें तिसऱ्याला, त्यानें चौथ्याला अशा रीतीनें; उडत उडत (ऐकलेली गोष्टी, हकीकत). 'सर्व बातम्या कर्णोपकर्णी आल्या तशा दिल्या.' –के १७.५.३०. [कर्ण+उपकर्ण; सं. कर्णाकर्णि]

कर्तक—वि. १ कापणारा; छेदणारा. २ कपडे बेतणारा (शिंपी). 'कर्तकानें काळजीपूर्वक कर्तकाचें काम केलें पाहिजे' –काप्र. [सं. कृत्]

कर्तन—न. १ छेदन; कापणें; कातरणें; कातरकाम. २ (विणकाम) सूत कातणें; सूत काढणें. ३ (शिंपी) कापडाचें कातरकाम; बेतकाम. (इं.) कटिंग [सं. कृत्] **कर्तनीय**–वि. कापण्यास, कातरण्यास, छाटण्यास योग्य. [सं.]

कर्तव—न. १ चातुर्य; कसब; कर्तृत्व; शिताफी, २ (हिं.) गायनांतील कौशल्य, आलाप, ताना वगैरे. [सं. कर्तव्य] **०गारी–दारी**–स्त्री. १ कर्तृत्व; कौशल्य; करामत; हुशारी. २ गानकौशल्य. [हिं. कर्तब+फा. गार]

कर्तरि—वि. (व्या.) कर्तृ शब्दाची सप्तमी; कर्त्याला अनुसरून तें; याच्या उलट कर्मणि. धातूंना व शब्दांना लागून ज्यांच्या योगें अनेक प्रकारचीं धातुसाधितें होतात असे प्रत्ययाचे प्रकार. [सं. कर्तृ] **०प्रयोग**–पु. (व्या.) कर्त्यावरून क्रियापद फिरतें म्हणजे

कर्त्याच्या लिंगवचनास अनुसरून क्रियापदाचें रूप असतें, तेथें कर्तरि प्रयोग होतो; याचे दोन भेद आहेत: सकर्मकर्तरि व अकर्मकर्तरि.

कर्तरि—स्त्री. कातरी; कैंची. [सं. कर्तरी]

कर्तरीमुख(हस्त)—पु. (नृत्य) तर्जनी व मधलें बोट मागच्या बाजूस वळवून उभें ठेवणें. करंगळी उभी सरळ ठेवणें, अनामिका व आंगठा तळहाताच्या बाजूस वळलेला ठेवणें. [सं.]

कर्तवी, कर्तुत्वी—पु. (कर्ता याचें अप. रूप). कर्ता, करणारा; बनवणारा. [सं. कृ]

कर्तव्य—वि. १ मनांत योजिलेलें; आवश्यक करावयाचें; उद्दिष्ट (कार्य); करण्यास योग्य असें. [सं.] –न. १ अवश्यकर्म, काम, कृत्य, कार्य. २ कार्य करण्यांत कुशलता. 'विचित्र कर्तव्य निरंजनाचें' **कर्तव्यता**—स्त्री. कर्तव्य पहा. 'स्फूर्ति ये चढण्यास दुर्घट तरी कर्तव्यतेचा कडा।' –मनोहरमाला वर्ष १ अं. १. **०भूमिति**–स्त्री. भूमितीचा एक प्रकार. यांत निरनिराळ्या आकृति काढण्याच्या कृति सांगितलेल्या असतात. (इं.) प्रॅक्टिकल जॉमेट्री. **०शून्य**–वि. आवश्यक कर्म न करणारा; कर्तृत्वहीन; बेजबाबदार. [सं.]

कर्ता—पु. १ करणारा; उरकणारा; कारण होणारा; बनविणारा; रचणारा; जुळवणारा. 'नवल कर्तयाची करणी। पुढें सेवक वेत्रपाणी। धांवा म्हणतां सभाजनीं। चपळ चरणीं धांवतो॥' –ह ३४.१२८. 'कर्ता न दिसे नयनीं।' –दावि ३८५. २ (व्या.) प्रथमा विभक्ति किंवा क्रियापदाचें उद्देश्य; एक कारक; उद्देश्य. ३ कर्तबगार माणूस; कर्तृत्ववान्. 'समशेर बहादर रणीं थकले कर्त्याची गत आहे न्यारी.' –ऐपो १३५. ४ व्यवस्थापक; श्रम करून मिळविणारा मनुष्य; कारभार, प्रपंच, घर इ० संभाळणारा; मिळविता माणूस. ५ (कायदा) हिंदु एकत्र कुटुंबाची व्यवस्था पाहणारा पुढारी इसम. [सं. कर्तृ] **०हर्ता, ०हर्तापालिता**-वि. (करणारा व नाश करणारा; जड विणारा व भंगणारा; जोडणारा तोडणारा). परमेश्वराचें गुणदर्शक नांव. 'कर्ता हर्तापालिता। मज परता नसेचि॥' [सं.]

कर्ता, कडता—पु. (व.) उर्दू; वचपा. 'या अपमानाचा कर्ता काढल्याविना मी राहणारा नाहीं.'

कर्तुक, कर्तुक—स्त्री. १ (व.) पराक्रम; कर्तृक, कर्तृत्व पहा. २ (ना.) करणी अगर जादूटोणा. [सं. कर्तृत्व]

कर्तुकी—स्त्री. कर्तृत्व; कर्तुक. –गांगा २६१. [सं. कर्तृत्व]

कर्तुत्व—स्त्री. १ (कर्तृत्व अप.) काम; कार्य; कर्तव्य. 'रजोगुणाचें कर्तुत्व। दाखऊं आतां।'–दा २.५.६. २ कुशलता; काम करण्यांत चतुराई. ३ पराक्रम; कर्तबगारी; कर्तृत्व पहा. 'कर्तुत्व याचेंन स्वभावें।'–दा १८.४.३३.

कर्तुप—स्त्री. (व) कर्तबगारी.

कर्तुमकर्ता, कर्तमकर्ता—विपु. कुशल; दक्ष; निपुण, शिताफीनें काम चालविणारा, आवरणारा; हुषार, कार्यक्षम चालक. **म्ह**० कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं समर्थ (ही संस्कृत म्हण आहे.)=ज्याच्या शक्ती अमर्याद आणि अप्रतिबद्ध आहेत अशा पुरुषासंबंधानें योजतात. जो नवीन करण्याला, असलेलें मोडण्याला किंवा वाटेल तसें फिरविण्याला समर्थ आहे असा (परमेश्वर, साधु, ऋषि, राजा, अधिकारी वगैरे) 'किंवा म्हणसि समर्थोंहं कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं।' –मोसंशयरत्नमाला २४. (नवनीत पृ. ३५१). 'आज मराठेशाहींत कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं शक्ति जर कोणाची असेल तर ती संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव या दोघांचीच होय.' –स्वप २१०. [सं. कर्तुं+अकर्तुं+अन्यथा+कर्तुं]

कर्तृज—न. (कृ.) कसब; कौशल्य. 'तेऱ्याकडे कर्तृज बा आसा'=त्याचे जवळ चांगलें कसब आहे. [सं कर्तृत्व; म. कर्तृत्व]

कर्तृब-गारी—कर्तब-गारी पहा.

कर्तृक—वि. (समासांत) जो करतो, उरकतो, बनवितो त्याचें विशेषण; –नें केलेलें. 'हा श्लोक परशुरामकर्तृक आहे.' [सं.]

कर्तृत्व—न. १ कर्तेपणा; सामर्थ्य; नैपुण्य वाकबगारी; कार्य करण्याची शक्ति. २ कृति; काम; कार्य. 'कर्तृत्व कुमारीचें कळलें। ऋषीनें शापिलें ते वेळे।'–रावि ३.१०१. [सं.] **०शक्ति**–स्त्री. उत्कृष्टपणें काम पार पाडण्याचें सामर्थ्य, उरक; कार्यक्षमता. (इं.) एफिसीएन्सी. –शिल्पवि ७५२.

कर्तृभूत—वि. (व्या.) कर्ता म्हणून असणारा; क्रियापदाचा कर्ता; क्रियेचा प्रवर्तक. [सं.]

कर्तृवाचक—पु (व्या.) धातुसाधित विशेषण; हें मूळ धातूस प्रत्यय लागून होतें. उदा० करणार; हंसणार; करणारा; जाणारा इ०. [सं.]

कर्तृवाच्य—पु. १ कर्तरिप्रयोग. २ कर्तृदर्शक नाम; कर्तरि धातूचें विशेषण वगैरे. [सं.]

कर्दगर-गार—पु. शस्त्रें करणारा. [फा. कार्द=चाकू+गार]

कर्दनकाळ—वि. क्रूर; तापट; कडक; भयंकर शिक्षा करणारा. कदनकाळ, करमतकाळ पहा. 'मराठे म्हटले म्हणजे मोगल, रोहिले, पठाण, रजपूत वगैरेंना कर्दनकाळासारखे वाटतात.'–लोकहितवादी.

कर्दनवस्तन—न. १ जडविणें व वितळविणें; एक दागिना मोडून त्या धातूचा दुसरा दागिना करणें; घडामोड करणें; २ (जमाखर्च) ठोकमालापैकीं वस्तु नांवें लिहून त्याचे तयार झालेले जिन्नस जमेकडे लिहणें; उदा० धान्य नांवें लिहून त्याचें दळून आणलेलें पीठ जमा लिहिणें; कापड नांवें लिहून तंबू, वस्त्रें

इ० जमा करणें; हिशेब. 'कर्दन वस्तन, गुणाकार भागाकार करावयाचा सराव बहुत असावा.' –पया ४५९. ३ ठोक नाण्याचा खुर्दा करणें व खुर्दाचें नाणें करणें; बंदे करणें व मोड करणें. [फा. कर्दन्=करणें+बस्तन्=बांधणें]

कर्दम—पु. १ चिखल; रेंदा; गाळ. 'जैसा कदमी रुपला । राजहंस।' –ज्ञा २.४. 'कर्दमपंथें वर्षाकाळीं। मार्ग चालत नाहीं कीं ॥' –मुसभा ३.८१. २ (ल.) जाळें; जुंबाड; अव्यवस्थित रास किंवा समूह; उकिरडा. ३ (ल.) वर्णसंकर; जातीजातींचा गोंधळ; शुद्ध–अशुद्ध यांचा अगर सोंवळें–ओवळें यांचा एकंकार. 'केवढी ये रांडेची अंगवण। भ्रमविले अवघे जन। याती अठरा चारी वर्ण। कर्दम करूनि विटाळिले ॥' –तुगा ४१४९. [सं.] **०वायु**–पु. (शाप.) एक विषारी वायु; अनूपवायु (इं.) मार्श ग्यास. –शिल्पवि ७६१.

कर्दळ-ळी—स्त्री. १ केळ;कापूर केळ; करदळ पहा. 'ना तरी कर्दळीचा गाभा। बुथी सांडोनी उभा।' –ज्ञा ६.२९५. 'कर्दळी वनीं अश्व बांधिला.' –लवकुशाख्यान १०. (मराठी ५ वें पुस्तक १८८५). २ एक केळीसारखें लहान फूल झाड. [सं. कदली]

कर्दळणें—अक्रि. (व.) १ करुणा येणें. 'माझें मन तें पाहून कर्दळलें.' २ (पदार्थ) घशांतून आग करीत खालीं जाणें. 'आजचें औषध कर्दळत गेलें.' [?+सं. दल्=फुटणें]

कर्दा—करदा पहा.

कर्दी—स्त्री. लागवडीखालची जमीन. –शर

कर्नाटकी—वि. १ कर्नाटक देशांतील; कानडी; कन्नड. २ (व.) करणी किंवा जादूटोणा जाणणारा (पुरुष, स्त्री). **०संगीत-पद्धति**– 'दक्षिणीसंगीतपद्धति' पहा.

कर्पट—करपट पहा. **०ढेंकर**–करपटढेंकर पहा. 'येक राउत सोडिती। येक कर्पट ढेंकर देती।' –दा १८.९.१७.

कर्पटाण—स्त्री. कर्पटघाण; करपटाण पहा. 'दग्ध होतां सुटली कर्पटाणी' –कृमु ४१.५६.

कर्पसाण, कर्पुसाण—स्त्री. (गो.) करपट घाण; करपटाण.

कर्पी—स्त्री. (कातकरी) अंगांतील बंडी. –गुजा ५४.

कर्पील, कर्पूल—पु. (कु.) एक जातीचें गवत. करपेल पहा.

कर्पूचें—क्रि. (गो.) करपणें पहा.

कर्पूर—पु. १ कापूर; एक सुगंधी द्रव्य; हें पूजेच्या साहित्यांत वापरतात. याचे चंद्रसेनी, भीममेनी व रंभा असे तीन भेद आहेत. 'जैसा कर्पूराचा राशी कीजे.' –ज्ञा २.२५१. 'चंद्रासि कर्पूराचें उटणें।' –रावि १.२१. २ (होमिओपाथी) कॅफर; हें माहामारी (कॉलरा) वर रामबाण औषध आहे. [सं.] **०कर्दळी-केळी-केळें**–स्त्री. कर्पूरकेळी; कर्दळी. 'कर्पूरकेळींचीं गर्भपुटें। उकलतां कापुराचेनि कोदटि।' –ज्ञा ११.२५०. 'कर्पूरकर्दळी डोलती।' –ह १०.१६०. 'कर्पूरकेळें सोनकेळें।' –सप्र १५.२४. **०गौर**–पु. शंकर. 'कर्पूरगौर भोळा नयनी विशाळा।' –शंकराची आरती. –वि. कापरासारखा गोरा. 'अथवा धवळधाम गोक्षीर । कर्पूरगौर पंचवक्त्र।' –एभा १३.९५. [सं.] **०रंभा**–स्त्री. कापूरकेळ; कर्पूरकर्दळी पहा. दिसत मृदु जिचे ऊरु। कर्पूररंभा।' –आप १४. **०विडा**–पु. कापूर घातलेला विडा. 'ऐसें संपादूनीयां भोजन। मग कर्पूरविडे घेती दोघेजण।' –जै १०.३०.

कर्पूस—पु. (गो.) लहान मुलाची कानटोपी.

कर्पूराम्ल—न. (रसा.) कापराचें अम्ल. (इं.) कॅम्फोरिक ॲसिड. [सं.]

कर्ब—पु. (रसा. शाप.) एक अधातुरूप मूलद्रव्य (परमाणुभारांक १२). हें हिरा, ग्रॅफाईट, कोळसा, संगमरवरी दगड वगैरेंत आढळतें. (इं.) कार्बन.

कर्बाम्लवायु—पु. (शाप.) कॅर्बानिक ॲसिड वायु; हा कर्ब आणि प्राणवायु यांच्या संयोगापासून बनतो. हा ज्वलनास मदत करीत नाहीं.

कर्बट—न. (गो.) एक बारीक मासळी.

कर्बाड—न. कडबा; करबड पहा.

कर्बूर—वि. १ करडा; कबरा; काळसर पांढरा (घोडा इ०) २ चित्रविचित्र; निरनिराळ्या रंगाच्या छटा असलेला (घोडा इ०) [सं. कर्बुर]

कर्म—न. १ एखादें काम, कृत्य. 'हें कर्म झालें समरांत जेव्हां। होतास कोठें रणभीरु तेव्हां।' –वेणीसंहार ३. २ स्नानसंध्या, यज्ञयागादि धार्मिक विधि; याचे नित्य, नैमित्तिक व काम्य असे तीन भेद आहेत. ३ सांप्रतच्या आयुष्यांतील कृति, चाल, आचार, वर्तणूक; यावरून दैव किंवा नशीब अशा अर्थानें योजतात–येथें दैव म्हणजे पूर्वजन्मार्जित पापपुण्याचा भोगवटा होय; पूर्वजन्मकृत आचरण; संचित. 'अरे अरेकर्मा। बारा वर्षे झालीं याच धर्मा॥' 'या व्यापारांत मीं साफ बुडालों, माझें कर्म! दुसरें काय?' 'कर्मबलिवंत', 'कर्मबलवत्तर', 'घोर-कठिण कर्म' या संज्ञा कर्मांचें (दैवाचें) वर्चस्व, काठिण्य, निष्ठुरता दाखवितात. ४ विशिष्ट काम; नैतिक कर्तव्य; जाति, धंदा वगैरेंनीं मानलेलें आवश्यक कृत्य. ५ (व्या.) कर्त्यानें अमुक क्रिया केली हें दाखविणारा शब्द; कर्तृविषयक व्यापाराचें कारक; कर्माची विभक्ति प्रायः द्वितीया असते. 'रामा गाय बांधतो' यांत गाय हें कर्म. ६ उद्योग; कामधंदा; नेमलेलें, विशिष्ट प्रकारचें काम. ७ सुरतक्रीडा; मैथुन; रतिसुख; संभोग. 'त्यानें तिच्याशीं कर्म केलें.' ८ सामान्य क्रिया; ऐहिक व्यापार; मायिक क्रिया. 'माया हा सामान्य शब्द असून तिच्याच देखाव्याला नामरूपें

व व्यापाराला कर्म हीं विशिष्टार्थक नामें आहेत.'–गीर २६०. [सं.] (वाप्र.) **कर्म दोन पावलें पुढें**–नशीब नेहमीं आपल्यापुढें धांवत असतें. **०आड ठाकणें**–कर्म आडवें येणें; आपत्ति ओढवणें. 'अन्न घेवोनि जों निघाली । तों कर्म आड ठाकलें.' –ह १६.१३०. **कर्मानें ओढणें–ओढवणें**–दैवाचा पाश येऊन पडणें; दैवाधीन होणें. **–नें जागें होणें**–दैव अनुकूल होणें. **–नें धांव घेणें**–दैव पुढें येणें; दैवाकडून प्रतिबंध, अडथळा होणें. **–नें पाठ पुरविणें–उभें राहणें**–दैवानें मोडता, अडथळा घालणें; कर्म ओढवणें. **–नें मागें घेणें–सरणें**–दैवानें साहाय्य न करणें; **केल्या कर्माचें फळ**–न. केलेल्या कृत्याचा परिणाम. 'केल्या कर्माचें फळ बापा। ऐश्वर्य तुज देतील.'–अमृत, नव ४४३. (सामाशब्द) **०कचाट**–न. प्रारब्धामुळें मागें लागलेलें दुर्दैव, संकट, विपन्नावस्था; कर्म कटकट; पूर्व जन्मीचें पाप, भोग. 'प्राणी कष्टकष्टोंचि मेले। कर्मकचाटें.'–दा १८.८.२०. [सं. कर्म+म. कचाट] **०कटकट–खटखट**–स्त्री. १ प्रारब्धयोगानें वांट्यास आलेलें किंवा गळ्यांत पडलेलें व कंटाळा येण्याजोगें कोणतेंहि काम; वरचेवर त्रास देणारें, डोकें उठविणारें, अडथळा आणणारें काम किंवा व्यक्ति: कोणतीहि नशीबीं आलेली पीडा, त्रास, छळ, जाच वगैरे. २ (ल.) जिकिरीचें, नावडतें काम; व्याद. 'मी म्हातारा झालों, माझ्यामागें ही शिकविण्याची कर्म कटकट कशाला?' 'आतां त्यांची कर्मकटकट आपणांस कशाला हवी'–नि ६७. ३ (ल.) भांडण; तंटा; कटकट. 'तुम्हां दोघांत नेहमीं इतकी कर्मकटकट चालत असते.' –भा ३७. **०कटटो**–वि. (गो.) हतभागी: कर्मकरंटा. **०कथन–नी**–न. १ कर्मकथा; कर्माची कहाणी. २ (ल.) दुर्दैवी प्रसंगकथन; दुःखदकथा; कर्मकथा पहा. 'ऐसी आमुची कर्मकथनी। तें अनायासें आलें सर्वे घडोनी।' –मक २६ १८५. [सं.] **०कथा**–स्त्री. १ प्रारब्धामुळें भोगलेल्या दुःख, त्रास, दगदग, वगैरेची दुसऱ्याजवळ सांगितलेली गोष्ट, वृत्तांत, कहाणी. २ आत्मश्लाघेचें किंवा रिकामटेकडें भाषण; बाता. ३ एखाद्या प्रसंगाची किंवा कृत्याची खरी व इत्थंभूत हकीकत. ४ कंटाळवाणें, निरर्थक भाषण, बडबड. [सं.] **०कपाट**–न. कर्मकचाट पहा. [सं.] **०कहाणी**–स्त्री. कर्मकथा पहा. **०कांड**–न. त्रिकांड वेदांतील यज्ञासंबंधींचा कर्ममार्गदर्शक व आचारनिदर्शक भाग;–मंत्र व ब्राह्मणें मिळून जो वेदभाग त्यास कर्मकांड व उपनिषदांस ज्ञानकांड म्हणतात. 'कर्म कांड तरी जाणें। मुखोद्गत पुराणें।'–ज्ञा १३.८२८. २ धर्मकर्मे, आचारविचार, संस्कार वगैरेना व्यापक अर्थानें हा शब्द लावितात. (सामा.) **०ज्ञानिक**; नित्यनैमित्तिक आचार. 'कृष्णगीत रुचतां श्रवणातें। कर्मकांड रुचि न दे कवणातें ॥।' 'आतां आपलें कर्मकांड अगदीं एकाबाजूस ठेवावें.' –चंद्रगुप्त ३५. ३ कंटाळवाणी, निरर्थक बडबड; कर्मकथा. (क्रि० गार्णे; सांगणें; बोलणें). **०कार**–वि. १ (गो.) कर्मनिष्ठ. २ शिल्पी; लोहार. [सं.] **०काल–ळ**–पु. धर्मकार्यें करण्यास उचित असलेला काळ, वेळ, समय. [सं.] **०केरसुणी**–स्त्री. कर्मरूपी केर सरसकट झाडणारी, कर्मापासून सोडविणारी केरसुणी. 'तेव्हां तेचि श्रद्धा होये। कर्मकेरसुणी।' –ज्ञा १७.६४. **०गति**–स्त्री. दैव; प्रारब्ध; नशीब. दैवगति पहा. [सं.] **०चंडाळ–चांडाळ**–पु. (कृत्यानें) निवळ चांडाळ. १ अति क्रूर, पाषाणहृदयी माणूस. २ स्वैर वर्तनी; धर्मलंड; दुरात्मा. [सं.] **०चोदना**–स्त्री. कर्म करण्याची प्रेरणा. 'कर्मचोदना व कर्मसंग्रह हे शब्द पारिभाषिक आहेत.' –गीर ८३५. [सं.] **०ज**–वि. कर्मापासून उत्पन्न झालेलें. 'सकळ यज्ञ कर्मज' –ज्ञा ८.४६. [सं.] **०जड**–पु. कर्मठ लोक. 'तिन्हीं लोकांचा शास्ता। ईश्वर तो मी नियंता। येणें कर्मजडांची वार्ता। अनीश्वरता छेदिली।' –एभा १०.६२१. **०जात**–न. सर्व प्रकारचें कर्म; सर्व तऱ्हेचे व्यापार. 'मग सस्य फळपाकांत। तैसें निमालिया कर्मजात। आत्मज्ञान गिंवसित। अपैसें ये।' –ज्ञा १८.१२९. [सं.] **०जीव**–वि. (गो.) बारीक, लहान प्राणी. **०दक्ष**–वि. धर्माचार व विधि यांत निपुण; कर्मठ; कर्मशील; कर्मनिष्ठ, कर्मिष्ठ यांसारखा उपयोग. 'कर्मदक्षा कर्ममोचका। जयराम कोदंड भंजना।' [सं.] **०धर्म**–न. (क.) पु. (व्यासमासांतील धर्म शब्द जरी पुल्लिंगी असला तरी बहुतेक सर्व समास नपुंसकलिंगीच आहेत; कारण यांतील प्रधानार्थे कर्म शब्दापासूनच निघालेला असून धर्म शब्द केवळ जोडशब्द आहे) वर्तन; वर्तनक्रम; कृत्य; आचरण. 'जसें ज्याचें कर्मधर्म तशी त्यास फलप्राप्ति,' 'कर्माधर्मानें कोण्ही संपत्ति भोगतो आणि गादीवर बसतो, कोण्ही फांशी जातो.'; 'कोण्हाच्या कर्मधर्मांत कोण्हाचा वांटा नाहीं.' =प्रत्येकाला स्वतःच्या कृत्याबद्दल झाडा दिला पाहिजे. **०धर्मगुण**–पु. कर्मधर्मांचा प्रभाव, शक्ति. कर्मधर्मसंयोग पहा. [सं.] **०धर्मविरहित**–वि. धर्माज्ञा, धार्मिक व्रतें व कृत्यें ज्यानें सोडलीं आहेत किंवा जो त्यापासून मुक्त झाला आहे असा; ऋषि किंवा साधुजन यांना चांगल्या अर्थी व उच्छृंखल व धर्मलंड यांना वाईट अर्थी लावतात. 'आम्हीं कर्मातीत झालों म्हणती' या शब्दाचा अर्थ दोन्हीं प्रकारचा म्हणजे चांगला व वाईटहि आहे. 'झालों कर्मधर्मविरहित। मना आवडे तो भोग भोगित।' [सं.] **०धर्मसंयोग–धर्मयोग**–पु. १ स्वतःचें दैव आणि सत्कर्म यांचा संयोग; भाग्य व सदाचार यांचें ऐक्य (पूर्वजन्मार्जित आणि इहजन्मार्जित सत्कृत्यांचें फळ मिळून) २ अकल्पित मेळ; यदृच्छा; प्रारब्धयोग. **०धर्मसंयोगानें**–क्रिवि. अचानक; चमत्कारिक किंवा अकल्पित मेळ मिळून येऊन; प्रसंगोपात्त; प्रारब्धयोगानें. 'कर्मधर्मसंयोगानें मी अगदीं सहज बाहेर गेलों तों

माझी नजर तिच्याकडे गेली.'–मायेचा बाजार. 'कर्मधर्मसंयोगानें तुमची गांठ पडली आहे तर गोड बोलून काळ लोटावा.' ०धारय समास–पु. (व्या.) वक्त्याच्या मनांत उभय शब्दांचा भाव ज्यांत समान असतो किंवा उभय शब्दांचा परस्पर उपमानोपमेयभावसंबंध ज्यांत असतो तो; विशेष्य-विशेषणांचें साभिप्राय असून त्यांचा जो समास घडतो तो; उदा० 'भक्तिमार्ग= भक्ति तोच मार्ग, किंवा भक्तिरूप जो मार्ग तो; भवसागर; संसारातवि;काळपुरुष.'–मराठीभाषेचेंव्या. २७५. तत्पुरुषसमासाचा एक भेद. [सं.] ०निष्ठ–वि. कर्मठ पहा. 'जया लाभाचिया आशा। करूनि धैर्यबाहूंचा भरंवसा। घालीत षट्कर्मांचा धारसा। कर्मनिष्ठ।' –ज्ञा ६.४७४. [सं.] ०निष्ठा–स्त्री. १ कर्मावर निष्ठा. २ कर्मयोग. 'वैदिक धर्मांत ... दोन मार्ग ... आहेत, पैकीं एका मार्गास ... ज्ञाननिष्ठा व ... दुसऱ्यास कर्मयोग किंवा संक्षेपानें नुसता योग अगर कर्मनिष्ठा असें म्हणतात. –गीर ३०१. [सं.] ०न्यास–पु. १ कर्म किंवा कृत्यें यांचा त्याग (पुढील जन्मीं हित व्हावें किंवा फळ मिळावें म्हणून). २ फलन्यास; कर्मापासून मिळणाऱ्या फलाविषयींच्या इच्छेचा किंवा आशेचा त्याग; निष्कामकर्म. [सं.] ०फल–न. प्रारब्धापासून मिळणारें फळ; पूर्वजन्मीं केलेल्या पापपुण्याचें चांगलें अगर वाईट असें या जन्मीं भोगावें लागणारें फळ. 'सांडुनि दुधाचि टकळी। गोंवारी गांवधेनु वेंटाळी। किंबहुना कर्मफळीं। तैसें कीजे।' –ज्ञा १८.१७४. [सं.] ०फुटका–वि. भाग्यहीन; दुर्दैवी; कमनशिबाचा; अभागी. [कर्म+फुटणें] ०फुटणें–सक्रि. दुर्दैव ओढवणें; गोत्यांत येणें; नुकसान होणें. ०बंध–पु. फलाशेनें केलेल्या कर्मामुळें प्राप्त झालेलें बंधन; प्रारब्धप्राप्त स्थिति; मायिक पसारा; ऐहिक मायापाश; प्रपंच; संसार. 'जो पहुडला स्वानंदसागरीं। कर्मबंधीं न पडे तो।' [सं.] ०बंधु–पु. व्यवसायबंधु; समव्यवसायी; एकाच प्रकारचें काम करणारा. [सं.] ०भुवन–न. कर्मरूप घर. 'तेथ न्यावो आणि अन्यावो। हा द्विविधु साधूनि आवो। उभवितां न लवी खेंवो। कर्मभुवनें।' –ज्ञा १८.४५५. [सं.] ०भूमि, भूमिका–स्त्री. १ इहलोक; मृत्युलोक; यज्ञादि धार्मिक कृत्यें जेथें करतां येतात ती जागा; कर्म करावयाचें क्षेत्र; रंगभूमि (मर्त्यांची). 'जेथें मनाचा प्रवेशु नाहीं। त्यांची पायवाट ते ठायीं। ऐसें स्वइच्छा विचारितां महीं। आले ते पाही कर्मभूमीसी' –एभा २.१८४. 'परम प्रतापी दशरथपिता। कर्मभूमीस येईल मागुता।' –रावि १६.८६. [सं.] २ प्राधान्यानें भारतवर्ष. –हंको. ०भोग–पु. भवितव्यतेच्या नियमानुरूप मिळणारीं सुखदुःखें सोसणें; दैवाची भरपाई; पूर्वसंचितानुरूप या जन्मीं प्राप्त होणारी स्थिति. 'माझा कर्मभोग चुकत नाहीं.' [सं.] ०भ्रष्ट–वि. धर्मशास्त्रविहित नित्यनैमित्तिक कर्मांचें आचरण न करणारा; धर्माज्ञा व धर्मकर्म परिपालनाविषयीं उदासीन; कर्तव्यच्युत; कर्तव्यपराङ्मुख. [सं.] ०मार्ग–पु. १ स्नानसंध्या इ० कर्में करण्याची रीत; यज्ञयागादि कर्मरूप ईश्वरप्राप्तीचा किंवा मोक्षाचा साधनीभूत मार्ग; सत्कृत्यें केल्यानें व धर्माचरणानें मोक्षाला जाण्याचा मार्ग. २ धर्मकृत्यें करण्याचा खरा मार्ग. ३ श्रौत म्हणजे यज्ञयागादि कर्मांचा मार्ग. 'भारतीय तत्त्वज्ञानांत मोक्षाचे कर्ममार्ग, ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग असे तीन मार्ग सांगितले आहेत.' –ज्ञाको क १३२. [सं.] ०मार्गी–वि. कर्ममार्गानें जाणारा; जो निष्ठापूर्वक धर्माचरण करून परमेश्वरप्राप्तीविषयीं झटतो तो. [सं.] ०मुक्ति–स्त्री. स्नानसंध्यादि नित्य नैमित्तिक कर्में करण्याची आवश्यकता ज्या स्थितींत उरत नाहीं अशी अवस्था; नैष्कर्म्यसिद्धि [सं.] ०मोचक–वि. कर्ममार्गापासून मुक्त करणारें; ऐहिक सुखदुःखापासून सोडविणारें. 'कर्मदक्षा कर्ममोचका। जयराम कोदंडभंजना।' [सं.] ०मोचन–न. कर्ममार्गापासून मुक्तता. ०योग–पु. १ प्रारब्ध; दैव; यदृच्छा; योगायोग. २ दैवगतीनें घडणारी गोष्ट. –शर. ३ व्यापार; चलवळ किंवा कार्य करण्याचें तत्त्व. –ज्ञाको क १३५. ४ ज्ञान हेंच जरी मोक्षसाधन असलें तरी कर्मशून्य राहणें कधींच शक्य नसल्यामुळें त्यांचें बंधकत्व नाहींसें होण्यास कर्में कधींहि न सोडतां शेवटपर्यंत तींच निष्कामबुद्धीनें करीत राहण्याचा जो योग तो. –टिसु ४७–४८; याला इंग्रजींत एनजींक्षम असा प्रतिशब्द गीतारहस्यांत सुचविला आहे. –गीर ३०१ वरील टीप. या योगाचें जें शास्त्र त्यास कर्मयोग म्हणतात व तें आचरणारा तो कर्मयोगी). 'बलवंत (टिळक) कर्मयोगी' –सन्मित्रसमाज मेळा पद्यावली १९२९, पद १. [सं.] ०लंड–वि. धर्मशास्त्रविहित नित्यनैमित्तिक विधींचें पालन न करणारा; धर्मभ्रष्ट; धर्मविधि व धर्माज्ञेचा धिक्कार करणारा, उपहास करणारा. [सं.] ०लोप–पु. नित्य धार्मिक कर्मांतील एखादें कर्म सोडणें, न करणें; दीर्घकालपर्यंत नित्य अगर नैमित्तिक कर्मविधि न करणें. [सं.] ०वाचकधातुसाधित–न. मूळ धातूस 'ला' किंवा 'लेला' हे प्रत्यय लाविले असतां होणारें धातुसाधित. उ० केलेला, दिलेला. परंतु यांत 'पढ' धातूचा गण वर्ज्य करून हे प्रत्यय लाविलेसमयीं सकर्मक धातूस 'इ' आगम होतो. उदा० ठेविला, अर्पिला, आकर्षिलेला. –मराठीभाषेचें व्याकरण १७३. [सं.] ०वाद–पु. १ धर्मविहित कर्मांनींच मोक्षप्राप्ति होते असें मत. २ मनुष्यास विशिष्ट जन्मांत जें सुखदुःख मिळतें तें त्याच्या पूर्व जन्मांतील कृत्यांचें फल होय असा युक्तिवाद; कर्माचें फलभोगणें ही कल्पना. –ज्ञाको क १३६. [सं.] ०वादी–पु. कर्मवादावरच भिस्त टेवून त्याचें समर्थन करणारा माणूस [सं.] ०वासना–स्त्री. दैनिक धर्मकृत्यांबद्दलची इच्छा, आवड. [सं.] ०विधि–पु. (अनेकवचनींहि प्रयोग

होतो) धर्मसंबंधीं कृत्यें वगैरेचे नियम, पद्धति, रीति, मार्ग; कोणत्याहि विशिष्ट प्रकारच्या धर्मकृत्याचें सूत्र किंवा विधान. [सं.] **०विपाक**–पु. १ पूर्व जन्मीं केलेल्या पुण्य, पाप वगैरे कृत्यांचें फल पुढील जन्मीं हटकून यावयाचें हा सिद्धांत. २ कर्माची फलनिष्पत्ति; परिणाम. [सं.] **०वीर**–पु. कार्यकर्ता; पराक्रमी मनुष्य. 'कर्मवीर निघुनी गेला' –संग्राम ४९. [सं.] **०वेग–कर्माचा वेग**–पु. दैवाचा किंवा प्रारब्धाचा जोर, झपाटा, सामर्थ्य, धक्का; पूर्वसंचिताचा प्रभाव. 'कलालाचा भोवरा. जैसा भवे गरगरा । कर्मवेगाचा उभारा । जोंवरी.' 'जेथें कर्माचा वेग सरे । तेथें धांव पुरे ।' [सं.] २ (अनेक वार केलेल्या) कृत्यांचा जोर, सामर्थ्य, प्रचोदन; संवयीचा जोर; स्वाभाविक प्रेरणा; 'कर्मवेग भलत्याकडे ओढून नेईल.' **०शील**–वि. कर्मासक्त; धर्मानें वागणारा; शास्त्रानें सांगितलेलीं सर्व धर्मकर्मे जो मनापासून काळजीपूर्वक करतो तो. [सं.] **०संगी**–वि. कामांत, धर्मानुष्ठानांत, व्रतनियमनांत सतत गढलेला; याच्या विरुद्ध ज्ञानाभ्यासी [सं.] **०संग्रह**–पु. निरनिराळे व्यवसाय, व्यापार; आपण ज्या क्रिया करतों त्या; मानसिक क्रियेच्या तोडीची बाह्य, प्रत्यक्ष क्रिया. 'कर्मसंग्रह या शब्दानें त्याच मानसिक क्रियेच्या तोडीच्या बाह्य क्रिया दाखविल्या जातात.' –गीर ८३६. [सं.] **०संचय**–पु. कर्मसंग्रह; मनुष्याचे अनेकविध व्यापार, क्रिया; चलनवलनादि कृत्य 'तैसेंचि कर्ता करण कार्य । हा कर्मसंचयो ।' –ज्ञा १८.५१२. [सं.] **०संन्यास**–पु. १ कर्मांचा त्याग; नित्य नैमित्तिकादि कर्मे करण्याचें सोडून देणें. २ शारीरिक सोडून इतर सर्व कर्मांचा त्याग (शांकरमत). 'शंकराचार्यांच्या ग्रंथांत कर्मसंन्यासच प्रतिपाद्य आहे.' –टिसू ५. [सं.] **०सूत्र**–न. नित्य धर्मकर्मांची व त्यासंबंधीं नियमांची मालिका; कर्तव्यकर्मपरंपरा. 'भवपाश तोडिते शस्त्र । ज्ञान ईश्वराचें विचित्र । परि जिवाचें कैसें कर्मसूत्र । जे अनावडी तेथें विषयीं ।' **०हीन**–वि. धार्मिक नियम, विधि न पाळणारा; धार्मिक नियमाबद्दल काळजी न करणारा. [सं.] **म्ह०** कर्मणो गहना गतिः=नशिबाची गति जाणणें शक्य नाहीं (एखादी वाईट गोष्ट अकल्पित घडली म्हणजे दैववादी मनुष्य ही म्हण म्हणतो.)

कर्मठ–वि. १ शास्त्रविहित स्नानसंध्या इत्यादि कर्मांविषयीं निष्ठावंत; धर्मासंबंधींच्या बारीकसारीकहि गोष्टी श्रद्धेनें किंवा आग्रहानें पाळणारा; सनातनी; धर्मनिष्ठ. 'आतां कर्मठा कै वारी. मोक्षाची हे ।' –ज्ञा १८.६८. २कर्ममार्गी; कर्मावर भिस्त ठेवणारा. **०पण**–न. निष्ठापूर्वक धर्माचरण. 'वृथा गेलें त्यांचें हवन । कर्मठपण कर्मांचें ।' –एरुस्व ३.३१. [सं. कर्म+स्थ]

कर्मणा–स्त्री. कर्मेण्क; फुकट कालक्रमणा. 'जेथें नाहीं आत्मज्ञान । तया नांव कर्मणा ।' –दा ७.९.५७. [सं. क्रमण]

कर्मणि–वि. कर्माच्या संबंधाचें: कर्मार्थी जुळणारें. कर्तरि पहा. **०प्रयोग**–पु. (व्या.) जेथें वाक्यांत कर्माप्रमाणें क्रियापदाचें लिंगवचन फिरतें तो प्रयोग. [सं.] **०व्युत्पत्ति**–पु. (व्या.) १ कर्मकर्तरिप्रयोग. २ कर्मणिकृदंत; कर्मणि धातुसाधित. [सं.]

कर्मणें–अक्रि. क्रमणें; जाणें; पार पडणें. 'जैसे बहुत दिवस कर्मले ।' –पंच ३.१०. –सक्रि. घालविणें; पार पाडणें.

कर्मर–न. एक प्रकारचें शस्त्र. 'काय देह घालूं करवती कर्मरी । टाकूं या भीतरीं अग्नीमाजीं ।' –तुगा १११८. कर्वतीं कर्मरीं देहासी दंडण ।' –तुगा २४९४.

कर्मल–ली–पु. (गो.) कुळागरांत होणारें एक रानझाड. –न. त्याचें फळ.

कर्माकर्मविचार–पु. योग्य किंवा करावयाच्या गोष्टी आणि अयोग्य किंवा टाकावयाच्या गोष्टी या विषयींचा विचार; विवक्षित कृत्य नैतिकदृष्ट्या योग्य अथवा अयोग्य या संबंधीं विचार; व्यावहारिक नीति. –ज्ञाको क १३९. [सं.]

कर्माकार–पु. कर्म; नाना प्रकारच्या क्रिया, व्यापार, हालचाली. 'पैं प्राचीनसंस्कारशेषें । पांचही कारणें सहेतुकें । कामबीजती गा अनेकें । कर्माकारें ।' –ज्ञा १८.४३१. 'आणि पंचकारणदळवाडें । जिहीं कर्माकारु मांडे ।' –ज्ञा १८.३०५. [सं. कर्म+आकार]

कर्मांग–न. कर्मांचा किंवा धार्मिक आचारांचा भाग, परिशिष्टरूप क्रिया. [सं.] **०देवता**–स्त्री. ('कर्मांगभूत देवता' या शब्दाचा संक्षेप) कोणताहि धार्मिक विधि अगर कर्म ज्या देवतेला उद्देशून केलें असेल ती देवता; मुख्य देवता. [सं.]

कर्माचा दोरा–पु. दैवाची गति; प्रारब्ध प्राप्त आयुष्यक्रम; स्थिति.

कर्माची गति–स्त्री. दैवाची गति; दैवगति; प्रारब्ध; नशिबाचा फेरा. 'पहा कर्माची गति गहन । जिच्या अंगुष्ठां न पडे रविकरण । ते गरोदर फिरे विपिन । मृगनेत्री ।'

कर्माचें कातडें–न. (ना.) नशीब; प्रारब्ध. 'तो काय माझ्या कर्माचें कातडें नेणार आहे ?'

कर्मांतर–न. और्ध्वदेहिक क्रिया; उत्तरक्रिया; क्रिया शब्दार्थी जोडून वापरतात जसेंः–क्रियाकर्मांतर. [सं. कर्म+अंतर]

कर्मांतऱ्या–पु. और्ध्वदेहिक धर्मकर्म सांगणाऱ्या ब्राह्मणाला तुच्छतेनें, हलक्या अर्थानें लावण्यांत येणारा शब्द; कारटा. [सं. कर्म+अन्तर.]

कर्मातीत–वि. धार्मिक आचारविचार पाळण्याची आवश्यकता ज्यास उरली नाही, त्याची ज्याला जरूर नाहीं असा; ज्याला कर्मबंधन नाहीं असा; मुक्त; योगी; परमेश्वर. 'जे

आत्मा मी कर्मातीतु । सवैकर्मसाक्षिभूतु । हे आपली कहीं मातु । नायकेचि कानीं ।' –ज्ञा १८.३८४. [सं. कर्म+अतीत]

कर्माध्यक्ष—पु. प्रत्येक कार्याचा न्यायान्याय पाहणारा; मनुष्यांचीं कृत्यें व व्यवहार यांचें यथार्थ परीक्षण करणारा; ईश्वराचें एक नांव. 'जो भूतांतरात्मा कर्माध्यक्ष ।' –ह १८.५९. [सं. कर्म+अध्यक्ष]

कर्मार्पण—न. स्वतःची धार्मिक कृत्यें किंवा अनुष्ठानें परमेश्वरास किंवा इष्ट देवतेस अर्पण करणें' 'कर्मार्पणाचा क्रम सांग झाला ।' [सं. कर्म+अर्पण]

कर्माभिमानी-या—पु. कर्म मी करतों असा अहंकार बाळगणारा. 'आतां यायाचि कर्मा भजतां । कर्माभिमानिया कर्ता । तो जीवुहि त्रिविधता । पातला असे ।' –ज्ञा १८.६२८. [सं.]

कर्मिष्ठ—वि. कर्मठ पहा.

कर्मी—वि. कर्मठ पहा. 'आणि तयाही केलियाचें । तोंडीं लावी दोंडीचें । कर्मी या नाम पाठाचे । वाणें सारी ।' –ज्ञा १८.६०३. [कर्म]

कर्मीभूत—वि. (व्या.) कर्मविभक्तियुक्त, द्वितिया विभक्तीचा; कर्माच्या स्थानीं असलेला; क्रिया घडलेला. [सं.]

कर्मेंद्रिय—न. १ ज्याच्या योगें कोणतें तरी काम होतें व पदार्थाचें ग्रहण, गमन इ. कर्म करतां येतें तें शरीराचें इंद्रिय. ज्ञानेंद्रियाच्या उलट; कर्मेंद्रियें पांच आहेतः–हात, पाय, वाणी, शिश्न व गुद. 'परी कर्मेंद्रिय प्रवृत्ती । निरोधुनी ।' –ज्ञा. ३.६४. २ शिश्न; जननेंद्रिय. 'शिनळ पुरुषाचे डोळे काढून त्याचें कर्मेंद्रिय छेदीत.' –व्यभिचार निषेधक बोध ८. [सं. कर्म+इंद्रिय] ०**पंचक**–वरील पांच इंद्रियांच्या समुदायास म्हणतात.

कर्मेंधर्मे—नअव. वाईट कृत्यें; दोष; उणीवा; छिद्रें. (क्रि० काढणें). [सं. कर्म+धर्म]

कर्मोपासना—स्त्री. धार्मिक विधि करीत राहणें; धार्मिक अनुष्ठान सतत चालविणें; कर्ममार्गाला अनुसरून परमेश्वराची सेवा करणें; आत्मोपासना, ज्ञानोपासना यांच्या उलट. [सं. कर्म+उपासना]

कर्यात-द्—करियात पहा.

कर्‍या—वि. कडक; कठिण; भयंकर 'काय दुकाळ पडला कर्‍या ।' –अमृत ११७. [अर. करह्=काळा]

कर्ल—न. (गो.) फळावरचें सालपट; साल; 'कर्लावुंक' =सोलणें; सालें काढणें.

कर्ली—पु. (कों.) माडाला पाणी शिंपण्याचें एक साधन. करला-ळें पहा.

कर्ली-ल्ली—स्त्री. १ (कु.) एक जातीचा अरुंद व लांब मासा. २ (गो.) एक प्रकारचें गवत. करवेल पहा.

कर्वत—करवत पहा. 'तों पुत्रें कर्वता आणविलें ।' –जै ४७.८

कर्वल-ळ—करवल-ळ, करोल पहा. 'नामी कर्वल आहे हुजुरांत.' –पया ५४.

कर्वळी—स्त्री. (गो.) केसांत घालण्याचा बायकांचा एक दागिना.

कर्वा—१ करवा पहा. २ (गो.) माड अथवा कसल्याहि झाडाचा तुकडा; ओंडका; करंडा.

कर्शण—न. कृश होणें; रोड होणें, करणें; वैद्यकांतील एक प्रकार; मेद नाहींसा करण्याची प्रतिक्रिया; बृंहण (लठ्ठ होणें) याच्या उलट. [सं. कृश्–कर्श्]

कर्ष—पु. सोनें, चांदी मोजावयाचें सोळा मासांचें एक परिमाण; प्राचीन पद्धतीप्रमाणें मासास ५ गुंजा धरीत, पण सध्यांच्या पद्धतींत ८ गुंजा धरतात, त्यामुळें प्राचीन पद्धतीप्रमाणें ८० गुंजांचा म्हणजे १७६ ट्राय ग्रेनचा कर्ष होईल. पण सध्यांच्या पद्धतीप्रमाणें १२८ गुंजांचा म्हणजे २८० ट्राय ग्रेन भार कर्ष होय. [सं. कृष्]

कर्षक—वि. १ ओढणारा; खेंचणारा. २ शेत करणारा; नांगरणारा. [सं. कृष्=ओढणें]

कर्षण—न. १ ओढणें; खेंचणें. २ शेत कसणी; जमीन नांगरणी. [सं. कृष्; झेंद करेश; फा. कशिदन्] –क्रि. कर्षणें. १ ओढणें, खेचणें. २ शेत नांगरणें, कसणें.

कर्षित—वि. १ ओढलेलें. २ नांगरलेलें. [सं.]

कन्हवेळु—न. एक प्रकारचें गवत. करवेल पहा. 'कन्हवेळु मारवेळु गोडाळें ।' –गीता २.५२८६.

कन्हा-न्हें—पु. उंट; उंटाचें पिलूं. 'तंव विकट नामें कन्हा' –पंच ३९. 'अशोकाचे अंगवसे । चघळिले कन्हेनि जैसें ।' –ज्ञा ११.४१४. [सं. करभ]

कन्हा-न्हें—१ मडकें; मातीचा लहान घडा; ज्या मडक्यास तोटीसारखें स्तन (टोक) असतें असें मडकें; रहाट गाडग्याच्या माळेंतील मडकें. 'राहाटमाळेचे करे । पुढती रिता पुढती भरे ।' –एभा १०.६७६. 'सोन्याचा कन्हा मोत्यांनी भरा' –वेड्यांचा बाजार. २ लग्नांत पाणी भरलेल्या तांब्यांत अथवा पंचपात्रींत आंब्याच्या डहाळ्या, पानें ठाकून त्यावर शेंडी वर केलेला नारळ ठेवतात. या भांड्यास कन्हा म्हणतात. व तो नवरीच्या व नवऱ्याच्या बहिणीच्या (बहीण नसल्यास दुसऱ्या स्त्रीच्या) हातांत असतो आणि तो कन्हा घेऊन ती आपल्या बहिणीच्या (बधूच्या) अगर भावाच्या (वराच्या) मागें उभी असते. –(क्रि० घेणें.) ३ सामान्यतः कलश; तांब्या. ४ (बायकी) मंगळागौरीची पंचामृती पूजा झाल्यावरोबर तें तीर्थ एका

भांड्यांत भरून त्यांचें तोंड चोळीनें बांधून त्यावर गोड्या तेलाचा दिवा ठेवतात तो (हा प्रकार बहुधा कोंकणस्थांत आढळतो). ५ एखाद्या मंगल संस्काराच्या वेळीं ओवाळावयास अगर मागें धरावयास जो दिवा घेतात तो. ' मागें मी मुहूर्ताचा कन्हा घेऊन उभी होतें. ' –वेड्यांचा बाजार. [सं. करक; प्रा. करअ= करा] ०दिवा–पु. वरील ५ वा अर्थ पहा. ओलाण दिवा; लामण दिवा. (क्रि० घेणें.) [सं. करक+दीप; प्रा. करअ+दीव] ०दिव्याचा मान–पु कन्हा दिवा धरणाऱ्या स्त्रीस वस्त्रें वगैरे देऊन तिचा केलेला सन्मान व तीं घ्यावयाचीं सन्मानार्थीं वस्त्रें– पोषाख.

कन्हाट—पु. कडवट रानकाकडी; कडू कारिट. [सं. करट]

कन्हाडकांगुणी–कांगोणी—स्त्री. कांगुणीची एक जात.

कन्हाडा—पु. महाराष्ट्रीय ब्राह्मणांचा एक पोटभेद व त्यांतील व्यक्ति.

कन्हेरी—पु. चवरी धरणारा. ' मीचि बारी मी कन्हेरी ' –एभा १२.५६१. ' धारना पवनु । कन्हेरी वरुणु । ' –शिशु ५०.

कन्होड—स्त्री. (व. घाटी) कालवड.

कन्होडा—पु. (खा.) मुगाच्या डाळीचा वडा.

कन्ह्या—पु. वाळूच्या दगडाची एक नरम जात. [का. केरे=काळा.]

कन्ह्या बसणें—वाप्र. (व.) नेट लागणें; जिवावर येणें. ' दुपारपर्यंत कन्ह्या बसला '=उपास पडला.

कल—पु. १ ओघ; ओढा; प्रवृत्ति; झोंक. २ (ल.) मनाचा किंवा इच्छेचा ओढा; बुद्धीची किंवा स्वभावाची प्रवृत्ति; चित्तवृत्तीचा ओघ; रोंख. ' असत्कार्यीं कल नसो मानसाचा। '–भजनतरंगिणी ८३. ३ –ह्रास, ओसरा, उतार यांचा आरंभ (दिवस, विकार, लहर, पूर, अतिरेक, यांचा). (क्रि० खाणें, पडणें) ' कांहीं कालापूर्वी सुधारणा ऐन शिखरास जाऊन पोंचल्याचें जें मान दिसत होतें त्यास आतां कल पहून लोकांच्या मनानें उलट खाल्याचीं चिन्हें ... दृष्टीस पडूं लागलीं आहेत ... ' –नि ४९०. ' एकाच पारडयांत सगळें वजन पडलें म्हणजे जशी तराजूची दांडी एकाच बाजूस कल खाते ... ' –नि ४३९. ४ पातळीचा तिरपेपणा, तिरकसपणा (इं.) इंक्लिनेशन ऑफ दि प्लेन. ' क्षितिज पातळीशीं उतरणीची सपाटी जो कोन करिते त्यास उतरणीचा कल म्हणतात. ' –यंस्थि ९६. ५ मळसूत्राचा तिरपेणा, चढ, वळण; (इं.) अँगल ऑफ दि स्क्रयु; मळसूत्राचा कल. –यंस्थि १०१. ६ वळण; रोंख; झोंक (क्रि० धरणें=गाडीचें एक चाक खालीं व एक चाक उंच झालें असतां उंच झालेल्या चाकाला हात देणें; तोल संभाळणें). [सं. कल्=प्रवृत्त करणें] ०पाहून वागणें–(वाप्र.) एखाद्याच्या तब्येतीप्रमाणें, मर्जीप्रमाणें हलकेपणा

स्वीकारून वागणें; वारा वाहील तशी पाठ देणें. २ प्रसंगीं धोरण किंवा योग्यायोग्य विचार पाहून त्याप्रमाणें वागणें.

कल—वि. मंजुळ; मृदु; हलु (आवाज) ' ते जयजय घोष कलरवें । स्वर्ग गाजविताती आघवे । ' –ज्ञा ११.३३६. [ध्व. सं.]

कलई–कर–गार—कल्हई पहा.

कलंक—पु. १ तांबें किंवा पितळेच्या भांड्यांना आंबट पदार्थांचा संपर्क झाला असतां जो हिरवट विषारी पदार्थ उत्पन्न होतो तो; जंग; रुप्याच्या हीणाला व लोखंडाच्या कीटालाहि म्हणतात. २ डाग; ठिपका (विशेषतः चंद्रावरील दिसणारा काळा डाग). ' जरी चंद्रीं जाला कलंकु । ' –ज्ञा १८.२७३. ' ग्रह आला चंद्रासी। स्पर्श केला गुरुपत्नीसी । कलंक लागला चंद्रासी। ऐसें झालें जाण पां । ' –शनिमहात्म्य ३३९. ३ (ल.) दोष; काळिमा; दुष्कर्मामुळें प्राप्त होणारा, अपकीर्तिरूप दोष; बट्टा; कमीपणा. [सं.] (क्रि० लागणें).

कलकत—पु. (व.) थवा; जमाव.

कलकत्तिया—पु. विलायती तंबाखू. –कृषि ४२१.

कल–कन–कर–दिशीं—क्रिवि. एकदम फुटल्यानें, तुटल्यानें जो आवाज होतो तसा होऊन, करून; त्या आवाजानें युक्त होत्साता. ' कलकन फुटलें, उललें, चीर गेली. ' ' काय सुख वाणूं सख्यांचें जणूं कलकन छाती फाटेल '–पला ४.१. [ध्व.]

कलकल–कलकल—पु. एकमेकांत मिसळलेला ध्वनि, आवाज, शब्द, गोंगाट, वटवट; कठकट (माणसांची); किलकिलाट; कल्ला (पक्ष्यांचा). (क्रि० करणें=विवळणें) ' कलकल कलहंसें फार केला मुठाया । ' –र ४३. ' मुलानों कलकल करूं नका. ' –कोर ४८४. ' किती गुण आठवूं राजसा कलकल करितें अनिवार. ' –प्रला १३७. [सं. कल्=अव्यक्त शब्द करणें]

कलकलणें—अक्रि. १ (कों. गो.) अस्वस्थ होणें; त्रासणें (माणसांच्या भांडणानें किंवा पक्ष्यांच्या किलकिलाटानें). २ उन्हानें, पित्तक्षोभानें मस्तक दुखूं लागणें. ३ घाबरणें; काळीज धडधडणें. ४ गडबड, गोंगाट, कोलाहल करणें. [कलकल]

कलकलाट—पु. १ भांडणाऱ्या माणसांचा किंवा चिडलेल्या पक्ष्यांच्या आवाजाचा शब्द. २ कोलाहल; कल्ला; आरड ओरड; गोंगाट; ' हेंसे मुक्ता नेली मग केला कलकलाट काकांनीं. ' ३ अशा आवाजापासून उत्पन्न झालेला अस्वस्थपणा. ' माझें डोकें कलकलाट करितें. ' ४ अतिशय उष्णतेची कंपोत्पादक अवस्था. ऊन्ह कलकलाट करितें. ' [सं. कल्=अव्यक्त शब्द करणें]

कलकल्या—पु. साळुंकीहून लहान, पांढऱ्या रंगाचा व अंगावर काळे ठिपके असलेला, लांबट चोंचीचा एक पक्षी; खंड्या; विठ्या; हा मरळ माशांचीं पिलें खातो. –मरळ माश्यांची पैदास७.

कलंकित–कलंकी—वि. १ कलंकयुक्त झालेला किंवा कलंकाचे गुण ज्यांत आले आहेत असा; कळकट. २ (ल.) दूषित; डाग लागलेला; अपवित्र झालेला. ३ बदनाम झालेला; निंदित. [कलंक]

कलंकी—पु. १ दुष्टांचा संहार करणारा, भावी, दहावा, शेवटचा विष्णूचा अवतार. २ (ल.) भांडण, तंटा; कलह. ' तेथुनि माजला कलंकी ऐका आश्चर्याची मात.' –ऐपो ३८३. ३ दशावतारी गंजिफांतील शेवटचा रंग. [सं. कल्की]

कलखापरी—स्त्री. एक औषधी; (इं.) क्षिक कारबोनेट. ही गोमूत्रांत दोलायंत्रानें शिजविली म्हणजे शुद्ध होते. –योर २२४.

कलंगडा—पु. (संगीत) गाण्यांतील एक राग. राग पहा.

कलंगडी-डें—कलिंगडी-डें पहा.

कलगायन—न. मंजूळ, मधुर गाणें. ' जेथें तो लक्ष्मीरमण। करित होता कलगायन।'–रास १.१८२. [कल+गायन]

कलगी—स्त्री. १ पागोटयावर खोंवावयाचें एक रत्नखचित शिरोभूषण; शोभादायक पिसें किंवा तुरा. २ घोडयाच्या डोक्यावर बांधावयाचा पिसांचा तुरा; तसेंच म्होरकीस ज्या दोन्ही बाजूंस झुरमुळ्या लावतात त्यांसहि म्हणतात. ३ शृंगारिक लावणीचा एक प्रकार; यांत प्रकृति ही पुरुषापेक्षां श्रेष्ठ मानतात व ती पुरुषाचें आजीव करिते असें वर्णन असतें; या संप्रदायाचें दर्शक चिन्ह जें डफावर लावतात तें. ' सगनभाऊ व त्याचे अनुयायी आपणास कलगीवाले असें म्हणवून घेतात व हें चिन्ह ते धारण करितात.' ४ पुष्पगुच्छ. ' श्रीमंतांस प्रथम कलगी समर्पण करून त्यावरच अत्तर, गुलाब देतात.'–ऐरा प्रपु ९.४२३. ५ कोंबडयाच्या डोकीवरील तुरा. ६ एक फुलझाड व त्याचें फूल. [तु. कलगी] **०तुरा**–पु. कलगी हा एक पक्ष व तुरा हा त्याचा प्रतिपक्ष यांमधील चढाओढ; लावणीचा एक प्रकार; ही लावणी प्रश्नोत्तररूपी असते. कलगीवाल्यांना नागेश व तुरेवाल्यांना हरिदास असेंहि म्हणतात. –झाको. क १४६. **०वाला**–वि. (हिं.) पुरुषापेक्षां प्रकृति श्रेष्ठ मानून कलगी जातीच्या लावण्या म्हणणारा.

कलच—पु. कीट (अंगावर घट्ट बसलेलें); घाण; किटण; मळ.

कलचर्ड मोतीं—न. कृत्रिम मोतीं; जपानी लोकांनीं नैसर्गिक मोत्यांप्रमाणें मौक्तिकजंतूकडून कृत्रिम मोतीं तयार करण्याचें काम सुरू केलें आहे. कांहीं जातींच्या माशांच्या खवल्यापासून उत्तम जातीच्या रंगाप्रमाणें तेज असलेलें एक सत्त्व तयार करून तें काचेच्या आंतून अगर बाहेरून लावून खोटें मोतीं फ्रान्स–जपानांत तयार करतात. हें व कलचर्ड मोतीं हीं दोन्ही भिन्न आहेत. [इं. कल्चर्ड=वाढविलेलें, कृत्रिम]

कलचुडी—स्त्री. (गो.) सोनें साफ करण्याची रानडुकरांच्या केसांची सोनाराची कुंचली. [कल+सं. चूडा]

कलछा—पु. उलथणें. करछा पहा.

कलंडणें—अक्रि. एका बाजूस तोल जाणें, भार जाणें; पडणें; लवंडणें. –उक्रि. विरुद्ध किंवा दुसऱ्या बाजूस ढकलणें, पालथें होणें. [सं. कल्]

कलंडविणें—उक्रि. १ एकीकडच्या तोलावर पाडणें. २ उलटविणें, उलंडविणें.

कलंडा—वि. एका बाजूवर आधार देऊन किंवा टेकून असलेला; कलथा; बाजूवर पडलेला. [कल]

कलंडी—स्त्री. १ बाजूवर तोल जाणें, उलटणें. (क्रि० देणें). २ उलथापालथ.

कलणें—अक्रि. १ बाजूवर पडणें; एका अंगावर तोल जाणें; कलंडणें; एकारणें; किंचित झोंक जाणें; झुकणें; टेकणें. [कल] २ (ल.) कमी होण्यास लागणें; उतरणें; मध्यरात्र, माध्यान्हादि जे काल ते कांहींसे अतिक्रांत होणें; ऱ्हास होऊं लागणें. ३ (ल.) एखाद्याकडे कल, ओढा, प्रवृत्ति असणें (मन, मर्जी, स्वभाव यांची). [सं. कल्=प्रवृत्त करणें]

कलणें—क्रि. जाणणें. [सं. कल्=गणणें, मोजणें]

कलता—वि. एका बाजूवर झुकलेला; तोललेला; वळलेला; लवलेला; कलंडलेला; तिरकस; ' जरि कांटा कलताए दैवांचा। जेउता राजमठु।' –ऋ ३९. [कलणें]

कलतान—न. (व.) तागाचें जाड विणलेलें कापड; कंतान; बारदान. ' भुसार मालाचें बारदान...मोठें कलतानी असल्यास २॥। रत्तल वजन धरतात.' –मुंव्या ६६. [कंतान पहा.]

कलत्र—न. लग्नाची स्त्री; भार्या; पत्नी; कुटुंब; बायको; (वामांगी) ' पहिलें संवचोराचें मैत्र। हाटभेटीचें कलत्र।'–ज्ञा १८.७९७. ' पुत्र कलत्र आणि ब्रह्मचारी। हेहि परी दाखविली।' –एभा १.१९१. ' तुझ्याठायीं अति तत्पर। कलत्रभावें विनटली॥' –एरुस्व ३.४७. ' वृद्धापकाळीं ओळखिजे कलत्र॥' [सं. कल=शरीर+त्र; गड्–कडत्र–कलत्र]

कलथणें—उक्रि. १ उलथणें; पालथें होणें; एका बाजूवर किंवा विरुद्ध दिशेला फिरविणें; तोल जाणें; उलटविणें; उलथें पालथें करणें. ' अगे पृथ्वी माते दशवदन पाडीं कलथुनि।' –अनंत सीतास्वयंवर ७०. ' तो कलथला सव्य अंगावरी।' –ह ५.२७. ' तैसें शिवचाप कलथलें।' –रावि ८.८०. २ सर्भोवार वळविणें; फिरविणें; वळणें; फिरणें (जड किंवा कोणत्या तरी एका बाजूला घट्ट बसविलेली वस्तु.) [कल]

कलथा—वि. एका बाजूस तोल गेलेला; कलता पहा. –स्त्री. धक्का; ठोसा; गुद्दा. –शर. –पु. एक प्रकारचें पसरट तोंडाचें व ज्याला मागें दांडा आहे असें उपकरण; तव्यावरील पोळ्या, भाकरी इत्यादि परतण्यासाठीं, तळलेला पदार्थ कढईतून बाहेर काढण्याकरितां, निखारे चुलींतून बाहेर काढण्यासाठीं, उपयोगांत

आणावयाचें व तापत असलेलें दूध वगैरे ढवळण्याचें साधन; उलथणें; काविलथा; सराटा. 'रुप्याचा कलथा, सोन्याचा तवा.' –मदनमं ९६. [सं. कल्]

कलथी—स्त्री. उलथणी. कलंडी पहा. –वि. कललेला–ली–लें; वळलेली. 'मानेवर मस्तकाची कलथी बैठक पाहून कुणाचें डोकें ठिकाणावर राहील?' –भावबंधन २४. 'अंमल अडचा प्रहराचा दुपार कलथी' –सला २६.

कलंदर—पु. कलिंदर; ऊद; कांडेचोर.

कलंदर—पु. मुसलमान साधु, फकीर. [अर.]

कलंदर—पु. मिश्र उत्पत्तीचा मनुष्य; संकरज. [सं.]

कलंदर-रा-द्रा—पु. १ एक जुती व रेशमी वस्त्र; गर्भ-रेशमी वस्त्र; लुगडयाची एक जात. 'चंदा–चंदी ओर कलंदर.' –अमृत ४९. २ दुहेरी आच्छादन अशलेला तंबू. ३ अशा आच्छादनांपैकीं वरचें आच्छादन. [अर. कलंदरा]

कलदार—वि. (हिं.) इंग्रजी चाल शिक्क्याचें (नाणें). ज्या नाण्यावर मुखवटा आहे असें नाणें; सुरती. 'पंचवीस शें रुपये कलदार घेऊन...' –विक्षिप्त २.१६. [अर. कल्ह=डोकें]

कलंधर—पु. एक फकीरांचा पंथ; मुसुलमान साधु. 'फकीर कलंधर बल्लिमूर्ति।' –सप्र १७.३८. [अर. कलंदर=साधु]

कलना—स्त्री. १ जिवाच्या अंगीं अंतःकरणासंबंधानें उत्पन्न होणारा सामर्थ्यविशेष; ज्यामुळें विषयानुभव मिळतो ती; पदार्थांचे गुण किंवा परिणाम जाणण्याचें मानसिक सामर्थ्य, चेतना; जाणण्याचें सामर्थ्य; ज्ञान. 'सृष्ट पदार्थापैकीं ज्यास जीवन आहे पण चैतन्य व कलना नाहीं.' –मराठी सहावें पुस्तक, पृ २१७. (आ २. सन १८७५). [सं. कल्=गणणें] **कालकलना**–स्त्री आयुष्याचा शेवट जीवितावधि; जीवनांत; मृत्यु. 'खड्गें वाजती खणखणा काळकलना मांडिली' –एरुस्व ८.४०. [सं. कल्=गणणें, मोजणें]

कलप—पु. संशय; अंदेशा; विकल्प. [सं. कल्प]

कलप-फ—पु. १ परीट लोक कपड्यांना लावतात ती खळ. २ पांढरे केंस काळे दिसावे म्हणून जो रंग लावतात तो. [सं. कल्क]

कलपणें—अक्रि. अतिशय दुःखांत किंवा क्लेशांत येणें; धडपडणें; धापा टाकणें; तडफडणें (वेदनांमुळें). [सं. क्लृप्]

कलपणें—उक्रि. १ (कल्पिणें अप.) मानणें; कल्पना करणें. २ दुसऱ्याचें अनिष्ट चिंतणें; जळफळणें. [सं. क्लृप्]

कलपरटें—न. (बे.) दगडी भांडें. [का. कल्ल=दगड+परटी=नरोटी]

कलबी-लंबी-ळंबी—स्त्री. (नाविक) अगदीं पाठीमागचें शीड. [अर. कल्ब्=मध्य?]

कलबुरगी—वि. कलबुरगा गांवासंबंधीं (लुगडें वगैरे) 'कलबुर्गा, हलबुर्गे लुगडें।' –अमृत ४९.

कलबूत-द्-भूत-द्—पु. १ सांगाडा; ठोकळा किंवा चौकट (ज्यावर कोणतीहि वस्तु तयार करतात अशी); मुलाची पगडी तयार करावयायाचा ठोकळा; जोडयाचा लाकडी सांचा. ०ठोकणें-(चांभारी धंदा). जोडयांत लांकडी सांचा घालणें. २ (गवंडी काम) कमानीखालीं दगडमातीच्या आधारा करितां ठेवावयाची लाकडांची वाटोळी मांडणी. 'सर्व कमानी कलबु दावर बांधाव्या.' –मॅरट १२. 'रायवळ लाकडांचीं कलबुदें तयार करवून' –मॅरट १८. छत्रीचा करंडा, पशूचा सांगाडा. २ टेंगणा पण मजबूत मनुष्य, घोडा; भरींव व मजबूत नग, भांडें, पदार्थ. ३ कातडयांत पेंढा किंवा भुसा भरून ठेवलेली जनावर इत्यादिकाची आकृति. 'वाघाचा कलभूत दिसे वाघा ऐसा। परी नाहीं दशा साच अंगीं।' –तुगा २८६१. [फा. कालबुद=आकृति]

कलंबो-बी—पु. (गो.) कलमी आंबा.

कलभ—न. हत्तीचें पिल्लू; छावा. 'कलभमथन हरिसि तसें त्याला तें कर्म वाटलें सोपें।' –मोद्रोण ३.४०. [सं.=करभ]

कल(ळ)भंट-ड-त—वि. कलहशूर; भांडण-तंटा करण्यांत पटाईत, तत्पर; भांडकुदळ. 'पाटील, कुळकर्णी बरेच कलभंड असले तर ...' –गांगा ८५. 'निशंक निलाजिरा कळभंट। टौणपा लौंद घट उद्धट।' –दा २.३.३२. [सं. कलह+भंड]

कल(लं-ळं)भा-मा-ह्मा—पु. भांडण-तंटा; झगडा; कलागती. (क्रि० लावणें; भांडणें; करणें; माजणें; लागणें). 'बोलें इंद्रियां लागे कळंभा। एकमेकां।' –ज्ञा ६.१६. [सं. कलह+भंड]

कलभांड—वि. भांडखोर. कलभंड पहा. 'मोगल कलभांड, मारिला कोंडू कोंडू, झाले श्रीमंतासी बळ।' –ऐपो २४५. [कलह+भांडणें] –न. गोसाव्यांचा एक पंथ व त्यांतील व्यक्ति; अठरा आखाडे पहा.

कलम—न. १ लेखांतील विशेष मुद्यांबद्दल किंवा गोष्टींबद्दल लिहिलेला तेवढाच भाग; स्वतंत्र सदर, बाब, मुद्दा; परिच्छेद. 'पुस्तकगृह हें एक सुधारणुकीचें मोठें कलम आहे ...' –नि १५. 'एकटयावरूनच ... काव्यरचनेस नाक मुरडणें हें अलीकडील रसिकांचें पहिलें कलम ठरून गेलें आहे.' –नि १४१. २ एका झाडाची फांदी-डहाळी दुसऱ्या झाडाच्या फांदीवर लावून कांहीं कृतिविशेषानें त्या दोहोंचाहि एकजीव करणें; कलमाचे प्रकार:–१ जिभलीचें कलम–दोन फांयांचे नुसते लेखणीसारखे तास घेऊन त्या एकमेकीस जोडणें. २ पाचरीचें कलम–एका फांदीला खांचा पाडून त्यांत दुसऱ्या फांदीचा तुकडा पाचरीप्रमाणें मारणें, बसविणें. ३ दाबाचें कमल–फांदीला चीर घेऊन फट पाडून ती मातींत पुरतात, थोडया दिवसांनीं तिला मुळ्या फुटल्या म्हणजे ही मुळयांची फांदी कापून निराळी लावतात.

४ खुंटीचें कलम–एक जाड वृंध्याचें सबंध झाड कापून टाकून त्या कापलेल्या भागांत आंतील गाभा व साल यांत फट पाडून त्यांत दुसऱ्या झाडाच्या फांदीचा जाड तुकडा खुंटीप्रमाणें बसविणें. ५ गुरीचें कलम–डोळे भरण्याचें. ६ भेटकलम–दोन झाडांच्या साली काढून आगें एकत्र जोडून बांधून एकजीव होईल असें करणें. ३ वरील कलम करण्याची कृति. ४ चिताऱ्याची कुंचली किंवा पेन्सिल. 'रजपूत कलम, कांगडी कलम, महाराष्ट्रीय कलम, मोंगली कलम इ० ' –चित्रकला संप्रदाय. ' इतकें नाजूक कलम कोणत्या चिताऱ्याजवळ असेल? ' –हंप ४४. ५ बोरूची लेखणी. ' हातीं कलम घेऊन पडला ' –ऐपो ३९१. ६ कापाकाप; तोडातोड (हात, पाय वगैरेची); झाडांची खच्ची किंवा छाटाछाटी. ' हे ज्योतिषी व त्यांचे पुरस्कर्ते यांचे आमच्या कर्मठ राजांचे कारकीर्दीत खचित हात कलम केले असते. ' –विवि (कि० करणें.) ' द्राक्षाच्या दुसऱ्या छाटणीच्या वेळेस फांदी जितकी जून असते तितकी ठेवून बाकीची छाटतात यास कलम म्हणतात. ' –शेतकरी २.११. ७ रकाना. ८ कायद्याच्या पुस्तकांतील प्रत्येक नियम; कानू; परिच्छेद; ' पिनल कोड कलम ४३५ प्रमाणें अपकियेचा अपराध वामनरावाचे मार्थी बसला. ' –विक्षिप्त १.४३. ९ (कु.) (सोनारी धंदा) पच्ची करण्याचें एक हत्यार. १० दुकानदारांचा परस्पर उधार देवघेवीच्या हिशेबांतील मुदत. ही १ महिना १० दिवस किंवा १॥ महिना असते. त्यानंतर उधार रकमेवर ब्याज आकारतात. त्यास मुदत संपल्यानंतर कलम पिकलें असें म्हणतात. ११ (ल.) पत्र ' चाललें कलम फौजेचें । राव्हत पायदळाचे । ' –ऐपो २३०. [अर. कल्म=बोरू, लेखणी] **०कसाई**–पु. १ हिशेबनीस; हिशेब तपासनीस; पगाराचा बटवडा करणें वगैरे कामाचा कारकून; खर्चांत छाटाछाट करून लोकांचें (लेखणीनें) नुकसान करणारा इसम. २ जो आपल्या लेखणीनें (लेखानें) लोकांना बुडवितो तो. ३ कारकुनी डावपेचांत दुसऱ्याचा गळा गोत्यांत अडकविणारा. **०कुचराई**–स्त्री. लुच्चेगिरीनें हिशेबांत एखादी बाब गोवणें, गाळणें; गबाळेपणानें किंवा घाईनें लेखामध्यें अक्षरें खाणें–गाळणें. [कलम+कुचराई] **०जारी**–१ पत्रें लिहून सैन्याची केलेली जमवाजमव; नांवनिशी. (कि० करणें; चालणें). ' कलम ज्यारीचे घटाव मचले । ' –ऐपो २१४. २ विज्ञप्ति; पत्रलेखन. ' ते कलमजारी करून फौज ठेवूं लागले. ' –मराचिथोशा ९. [फा.] **०तराश–स**–पु. हुषार; चलाख; लेखणीबहाद्दर. [फा. तराश=चाकू] **०दान–दानी**–नस्त्री. १ लेखणी व दौत ठेवण्याचें लांकडी घर, ठोकळा, खोबळा; लांबट पेटी. [फा. कल्म दान्] २ ज्या दिवाणखान्याची मधली तख्तपोशी तबकासारखी सपाट असून दोन्ही बाजूंची (डाव्या व उजव्या हाताकडील) तख्तपोशी छपराप्रमाणें उतरती असते असा दिवाणखाना. ३ फटाक्यांची एक जात; प्रकार. ' कलमदानी एका पेटींत ५०० पुडे असतात. ' –मुंव्या ११८. ४ (इमारत) हवा आंत खेळण्यासाठीं भिंतींत केलेली खिडकीवजा योजना. ५ दरवाज्याच्या झडपेमध्यें फळीची चौकट करून आंत नक्षीदार अगर एखादी आकृति काढून पातळ फळी भरून तयार करतात तें. **०बंद**–वि. पत्रीं नमूद; लेखनिविष्ट; लिखित. ' तेच मजकूर येक जरा तफावत न करितां कलमबंद केले. ' –रा १. ४४. [फा.] **०बंद करणें**–क्रि. लिहून घेणें; टिपून ठेवणें; टाक गुंतविणें. **०बंदी**–वि.१ अनेक प्रकारचीं अनेक कलमें निर्णयपूर्वक ज्यांत बांधून दिलीं आहेत तो लेख; निरनिराळीं खातीं, सदरें व बाबी निरनिराळ्या कलमाखालीं लिहिलेली याद (यांत हुकुमाची, कबुलायतीच्या किंवा करारांच्या कलमांची नोंद असते); विषयवार नोंदणी; सर्व तपशिलांच्या बाबींची एकाखालीं एक क्रमानें केलेली नोंद. २ कलमजारी पहा. **०बहादर**–वि. लेखणीशूर; हुषार लेखक; तरबेज कारकून. **०बाज**–वि. १ कलम चालविणारा; फरडा. २ सर्व कलमें अथवा बाबी, नियम यांत निष्णात. ' कायद्याच्या कलमबाज शब्दार्थानें ... ' –अभ्युदय ता. ३०.११.२८. **०वार**–क्रिवि. ज्यांत एकामागून एक सर्व अटी, बाबी लिहिल्या किंवा सांगितल्या आहेत अशा तऱ्हेनें; बाबीमागून बाब याप्रमाणें सूक्ष्मपणें व विशेषपणें; तपशीलवार; विषयवार. **०सफाई**–स्त्री. वळणदार लिहिणें; सुंदर अक्षर; कारकुनी हात. [फा.] **०सूत्रा**–वि. लेखनकुशल; लेखननिपुण. [अर. कलम+सं. सूत्र]

कलम—स्त्री. (माण.) मूर्च्छा; बेशुद्धि. (कि० येणें).

कलम—पु. (गो.) तेलामुळें भांड्याला आलेला हिरवेपणा; कळंक. [सं. कल्मष]

कलमल-कलमलणें—कळमळ–कळमळणें पहा.

कलमा-म्हा—पु. (' ला इलाह इल्लल्ला मुहम्मदुर्रसुल्लाह =अल्लाशिवाय दुसरा देव नाही, मुहम्मद अल्लाचा प्रेषित आहे ') हें इस्लामी धर्मसूत्र. या शब्दाच्या उच्च व तालख उच्चारामुळें मराठ्यांनीं याचा अर्थ पुढील प्रमाणें रूढ केला आहे:– भांडणतंटा; कलागत; मोठमोठ्याने ओरडणें; (कि. करणें; लावणें; मांडणें; माजवणें; उठवणें; चालवणें. –अक्रि. होणें; लागणें; माजणें) ' झाला लष्कराचा बोभाट कलमा दाट तीनशें साठ बिगारी धरले। ' –मर्शिपो ४३५. [अर. कलिमा; फा. कल्मा]

कलमाकाप—न. (गो.) एक वन्य औषधी.

कलमी—वि. १ लेखी; लिहिलेलें; लेखनिविष्ट; याच्या उलट तोंडी किंवा उडत उडत. क्रि० करणें, लिहिणें. ' जबानी बातमीस व कलमी बातमीस थोडें बहुत अंतर पडतच आहे. ' –खरे ४. १४७०. 'मुंबईकरांनीं आंग्रे यांस कलमी केलें ' –खरे ७.५७१. २

पगारी. 'या स्वारीस कलमी फौज ठेवावी असा इरादा.' –होकै ५. ३ (गो.) लिहिणारा. ४ (व. घाटी) उंची व तिखट दालचिनी. ५ कलम केलेलें झाड; सदर झाडाचें फळ, (आंबा इ०) ६ (कु. ल.) देवळी जात. ७ (हेट.) डोलाच्या मागची काठी किंवा मागचें म्हणजे दुसरें शीड; ही काठी डोलकाठीपेक्षां एक हात कमी असते. (कलबी पहा) [अर. कलम = बोरू, लेखणी] **०दालचिनी**–स्त्री. वरील ४ था अर्थ पहा. **०लता**–स्त्री. लवंगी वासाची वेल. **०सोरा**–पु. उत्तम जातीचा सोरा. हा पांढरा असून याचे लांबट खडे असतात.

कलय—स्त्री. (गो.) कलई पहा.

कलयुग—न. कलियुग चौथें युग; शेवटचें युग, ज्यांत कली कलह, भांडण इ०चा अम्मल जास्त तें. [सं. कलियुग]

कलरव—पु. मंजुळ, मधुर असा पक्ष्यांचा आवाज: किलबिल. 'वरि सुहावे कलरव। पक्षियांचे' –ऋ १५. 'वसते शृंगारिलें वन। कोकिला कलरवें गायन।' –एभा ४.८१. [सं.]

कलवड—पु. शेण; माती वगैरेनीं झांकलेला वाळलेल्या गोवऱ्यांचा ढीग. कलोड पहा. [सं. कल्=एकत्र करणें]

कलवंडणें—सक्रि. भांडणें; तंडणें. कळवंडणें पहा.

कलवणें-विणें—सक्रि. (ना.) मागें किंवा बाजूला करणें वळविणें; कलतें करणें. [कल]

कलवंत—न. (गो.) कलवंतीण. [कला+वंत–वान]

कलवतें—स्त्री. (कु.) करंगळीच्या नखाइतके रुंद अतिशय चपल व सुंदर मासे. हे कळप करून पाण्यांत हिंडतात.

कलवार—पु. (हिं.) कलाल; दारूविक्या. कलाल पहा.

कलश—पु. १ तांब्या; गडवा; धातूचें किंवा मातीचें भांडें; कळशी; घागर (पाण्यासाठीं). 'येर कलशीचें येरीं। रचविजे जयापरी।' –ज्ञा. १३.११४४. 'न करिती कलशपूजेचें काम। नवरीचे उपाध्ये सकाम।' –एरुस्व १५.६३. २ कळस; घुमट; कलशाकार शिखर. 'दारवंडा सदा उघडा। वरी कलशु चोखडा' –ज्ञा १८.१५०८. [सं.; तुल. इं. चॅलीस] **०भुति**–पु. कुंभकर्ण. [सं.] **०संभव-कलशोद्भव**–पु. अगस्ति ऋषि. हा घटांत जन्मला म्हणून यास म्हणतात. 'सिंधु गर्जे तोंवरींच पाही। जों कलशोद्भव देखिला नाहीं।' –रावि १.१६१. [सं.]

कलसणें-कलसवलसकरणें—(व. ना.) परतणें; ढवळणें. 'रवा खूप कलसून काढावा.'

कलसपाकी—वि. काठामध्यें कळसाची नक्षी काढली आहे असें (धोतर, लुगडीं, पागोटीं). कळसपाक पहा. **०बुगडी**–वि. ज्याच्या काठामध्यें तीन गोमा व एक कळसासारखी बुगडी असते असें वस्त्र.

कलह-हो—पु. तंटा; भांडण; कज्जा; शिवीगाळ; हुद्दी. 'लावाल कलहो नव्हतें।' –शिशु १२४. [सं.] **०उकरून काढणें**–क्रि. भांडण उपस्थित होईल असें पूर्वीचें एखादें कारण शोधून काढून त्याचा उल्लेख करणें. 'यूतीं द्रुपदसुतेतें मांडीवरि बैस ये म्हणे खल हा। खिजवुनि सभेंत काढित होता उकरुनि पुनः पुन्हा कलहा।' –मोगदा ५.१०.

कलहमा—पु. (व. घाटी) गोंगाट. [कलमा पहा.]

कलहंस—पु. १ राजहंस; मराल (कित्येकांच्या मतें पाणकोंवडा). बगळा. 'त्यांतील एक कलहंस तटीं निजेला।' –र ९. २ ब्रह्मदेवाचें नांव. [सं.]

कलहांतरिता—स्त्री. जिचें भांडण संपलें आहे अथवा प्रच्छन्न आहे, जिची समजूत झाली आहे किंवा सांत्वन केलें आहे अशी पत्नी. परंतु कांहीं ग्रंथकारांनीं जी भांडणामुळें आपल्या नवऱ्यापासून विभक्त झाली आहे अशी स्त्री असा अर्थ केला आहे. भांडखोर; कर्कशा; कैदाशीण. –सा.द. ११७. [सं.]

कला-ळा—स्त्री. १ लिहिणें, वाचणें, गाणें, घोडयावर बसणें, चित्रें काढणें इ० कौशल्याचीं कामें; कला चौसष्ट आहेत. चौसष्ट कला पहा. २ चतुराईची यांत्रिक वगैरे योजना; तिच्या रचनेचें ज्ञान; चालविण्याची युक्ति; त्यांपासून विवक्षित फल उत्पन्न करण्याचें चातुर्य; त्याची गुप्त खुबी, किल्ली, मख्खी; यटक. ३ चतुराई; बुद्धिकौशल्य; शोधक बुद्धि; कसब; युक्ति; लीला. 'तुका म्हणे त्याची कोण जाणें कळा। वागवी पांगुळा पायावीण।' –तुगा ३६७७. 'तयांत फिरती तरी करिती अप्सरांच्या कला' –नरहरी, गंगारत्नमाला १४३. (नवनीत पृ. ४३२.) ४ चंद्राच्याधिबाचा सोळावा भाग; प्रत्येक दिवशीं वाढणारी किंवा कमी होणारी चंद्राची कोर. 'चंद्रासि लागती कळा। उपराग येतो।' –र २. ५ वेळाचें एक परिमाण सुमारें ८ सेकंदाबरोबर; ३० काष्ठा म्हणजे एक कला. ६ एक अंशाचा (वर्तुळाच्या ३६० व्या भागाचा) एकसाठांशावा भाग. ७ पदार्थमात्राचा (सोळावा किंवा लहानसा) अंश; लेश; लव; तीळ; रज; कण. ८ कांति; टवटवीतपणा; स्वच्छपणा; नितळपणा; सौंदर्य; तेज; चमक (माणसाच्या चेहेऱ्यावरील). 'राजसुकुमार मदनाचा पुतळा। रविशशि कळा लोपलिया।' –तुगा २. 'घराची कळा अंगण सांगतें.' ९ सूर्य; पृथ्वी व परप्रकाश वस्तु पदार्थ यांमध्यें कोण झाल्यामुळें पृथ्वीवरून त्या पदार्थांची जी कांहीं प्रकाशित व अप्रकाशित आकृति दिसते ती. –सृष्टिशास्त्र १३८. ग्रहाच्या प्रकाशित भागाचा जो अंश आपणांस वाढतांना किंवा कमी होतांना दिसतो तो. –ब्रूस, ज्योतिःशास्त्राचीं मूलतत्त्वें. १० (प्राणिशास्त्र) शरीरांतील नाजुक त्वचेसारखा पडदा. (इं.) इंटरनल मेंब्रेन. ११ (अश्व) कुच आणि कुक्षिका-

घोड्याचे अवयव. –अभ्रप ६४. १२ (ताल) मात्रा; नियमानुसार तालाचे झालेले भाग; हे आठ आहेत–ध्रुवका; सर्पिणी, कृष्णा, पद्मिणी; विसर्जिता; विक्षिप्ता; पताका व पतिता. १३ (ताल) खाली; टाळी न वाजविणें. १४ शास्त्राचा व्यावहारिक उपयोग; कोणत्याहि उद्दिष्ट विषयास उद्दिष्ट प्रसंगीं शास्त्रीय सिद्धांत लागू करणें (शास्त्र याच्या विरुद्ध). –सुकौ १२. [सं.] **०तीत**–वि. अत्यंत सूक्ष्म; अंशाच्या विभागाच्या पलीकडला; मायेच्या पलीकडला. ' कलितकाळ कौतूहल । कलातीत । ' –ज्ञा १८.३. [सं.] **०निधि**–पु. चंद्र. ' आल्हादकारक कलानिधि परंतु न्यून क्षयासहित । ' –सीता स्वयंवर. (नाको.) [सं.]

कलाक—पु. तास; अवर. ' गाडीला अजून दोन कलाक अवकाश आहे. ' –भावबंधन ५२. ' घेरी आली म्हणजे अर्धा अर्धा कलाक निपचित पडत असे. ' –उषाग्रंथमाला, माझी हीच गत १५. [इं. क्लॉक; तुल. सं. कला+क]

कलाकंद—पु. माव्याची, खव्याची बर्फी; मिठाई. [हिं. कला+कंद; फा. कल्हा–इ–कंद=मिठाई]

कलाकल—क्रिवि. एकामागून एक कडकड होणारा आवाज. (टाके तुटणें, गाठी तोडणें, फाडणें, तडकणें वगैरेचा). [ध्वनि]

कलाकौशल्य—न. शास्त्र व त्यांतील कुशलपणा; चातुर्य; युक्ति; बुद्धि. कळाकुशळता पहा. [सं. कला+कौशल्य]

कलागत—स्त्री. सपाटयाचें भांडण; तंटा; रागाची शिवीगाळ; खटखट; कळ; लावालावी. (क्रि० करणें; लावणें=कोलीत लावणें). ' करूं कलागती । तुज भांडणें भोंवतीं । ' –तुगा ५७३. [सं. कलह+गति]

कलागती–त्या—वि. भांडखोर; कटकटया; कज्जेदलाल: भांडण लावून गम्मत पाहणारा. (क्रि० लावून देणें; लावणें) ' श्रीआचार्यांनीं निदान या रिकामटेकडया कलागतीखोर पुणेकरांच्या नादास मुळींच लागूं नये. ' –आगर ३.१४५. [कलह+गति]

कलाजंग––पु. (कुस्ती)(कोपरापासून मनगटापर्यंतच्या भागास कलाई म्हणतात) मनगटापासून कोपरापर्यंत हात बांधून फिरून पाठीवरून ओझें टाकतात त्याप्रमाणें टाकणें. [सं. कला; अर. जंग=लढाई; हिं. कलाइ=मनगट]

कलाझंगडी—(माण.) भांडखोर. [कला+जंग]

कलांट—पु. (रत्ना.) भांडखोर; त्रासदायक; अतिशय द्वाड मनुष्य; लचांडी. [कलह]

कलाटणी—स्त्री. १ (क.) कोलांटी; उलटी. २ (ल.) परावर्तन; स्थित्यंतर. ' केव्हां केव्हां काव्यांत विचाराला एकदम कलाटणी दिली असतां काव्याचें सौंदर्य वाढतें. ' ३ (माण.) थाप; बात; उडवाउडवी. [कल]

कलांडणें–कलांडा—कलंडणें–डा पहा.

कलांतर—न. पैशावरील व्याज. ' म्हणे कलांतर घेऊन अगोदरी । होन चार सत्वरीं मज द्यावे । ' –भवि ५३.१८६. [सं. कला+अंतर]

कलाप––पु. १ समुदाय; समूह; जमाव. (सामा. शब्द) केशकलाप; मुद्राकलाप; क्रियाकलाप; पल्लवकलाप; तंतुकलाप. ' परी क्रियाकलापु आघवा । ' –ज्ञा ४.९५. २ मयूरपिच्छांचा समुदाय. –हंको. [सं. कलाप]

कलापक—पु. (नृत्य) तीन करणांचा समुदाय. [सं. कलाप]

कलापीठ—न. (टंक यंत्र) सूत्रनिबद्ध चिन्हांची कळ–त्यांचें पीठ. (चिन्हांची कळ दाबतांना कागदावर तें चिन्ह मुद्रित होतें). (इं.) कीबोर्ड.

कलाफ—पु. संशय; अंदेशा; अनिश्चिति; शंका; भीति; धरसोड [अर. कलफ=लक्ष, चेहऱ्यावरील सुरकुती; सं. कल्प]

कलाबतु—पु. चांदीचा अथवा सोन्याचा जर (तार) चढवून पीळ दिलेला रेशमाचा दोरा. [फा. कलाब=धुताची गुंडी, रील; हिं. कलाबत्तून]

कलाभुवन—न. निरनिराळीं कलाकौशल्यें शिकण्याची जागा, कारखाना. [सं. कला+भुवन]

कलामुला—ईश्वरी वचन. ' कलमे शरीफ म्हणजे अत्युत्कृष्ट वचन व कलामुला म्हणजे ईश्वरी वचन. ' –घाको १०५. [अर. कलाम=वचन; भाषण, प्रवचन]

कलामेशरीफ—न. अत्युत्कृष्ट वचन (कुराण ग्रंथ). [अर. कलाम=वचन+शरीफ=श्रेष्ठ]

कलाय—पु. वाटाणा (विशेषतः करडया रंगाचा) [सं.]

कलाल—दारू वगैरे अमली पेयें गाळणारा व विकणारा. [सं. कल्यापाल; दे. कल्लाल, कल्या=मद्य अर. कल्वार=दारू गाळणारा व विकणारा] **०भट्टी**–स्त्री. १ दारू गाळण्याची भट्टी; मद्य तयार करण्याची जागा, कारखाना. २ मद्यावरील कर. ' पूर्वी या राज्यांत कलालभट्टीचें म्हणून एक उत्पन्न असुन तें जामदारखान्यांत जमा करण्यात येत असे. ' –ऐरा (बडोदे) ७१.

कलाली—स्त्री. १ कलालाचें काम, धंदा. २ दारू गाळण्याच्या भट्टीवरील व दारू विकणाऱ्या दुकानावरील सरकारी कर.

कलाली—वि. कपटी; मतलबी. ' आणि मन जयाचें कलाली । ' –ज्ञा १८.६७२. [सं. कला]

कलाली—वि. भयंकर; क्रूर. ' बहु सावजें व्याघ्रसिंहें कलाली ' –विवि २९.२१७. [सं. कराल]

कलाली—स्त्री. पक्षाची किलबिल, आवाज, ओरडणें. ' सिक पिंगळा आणी पाली । वोखटें होला काक कलाली । ' –दा ३.७.५८. [सं. कल्=शब्द करणें]

कलाव—पु. गोळा–शर. [सं. कल्=संकलन करणें]

कलावणें—क्रि. (व.) फिरविणें; कलविणें, कलतें करणें [कलणें पहा]

कलावत—पु. (हिं.) एक प्रकारचें गाणें, गीत.

कलावंत—वि. १ कांहीं तरी कला जाणारा; कलाभिज्ञ; कला पहा. परंतु विशेषतः गाणारे नाचणारे वाजविणारे आणि त्यांतहीं कलावंतिणींचे साजिंदे, पखवाज व सारंगी वाजविणारे, यांना लावतात. [सं. कलावत्] २ (प्रबंध) ध्रुवपद गाणारा. ३ (गो.) नाचणारी स्त्री; गाण्याचा धंदा करणारी एक जात (नायकीण). 'मौलाबक्षांचे चिरंजीव...यांस कलावंत सुपरिंटेंडेंट असा हुद्दा देऊन...' —कलावंतखातें (बडोदें) १. ०खातें—न. गुणीजनांचा (गाणारे, नाचणारे वाजविणारे इ० चें) परामर्ष घेणारें एक खातें. 'कलावंत खातें स्थापन झाल्यापासून कोणते गुणीजन नोकरीत ...ठेविले.....' —कलानंत खातें (बडोदें) २. म्हण० (गो.) १ कलावंत नाचतां देवळांत, म्होण गावडी नाचतां घरांत (दुसऱ्याचें निरर्थक अनुकरण करणें याअर्थी) २ कलावंताचें भाग्य आणि तिरडयाचें राज्य तीनच दीस=कलावंतिणीचें भाग्य तारुण्य असेपर्यंत व तेरडयाचें राज्य रंग विटेपर्यंत (अल्पकाळ टिकणारें वैभव) **—ची प्रीत**—(गो.) खोटें, लटकें, वरकांती प्रेम, प्रीति.

कलावती—स्त्री. १ नर्तकी, नायकीण, वेश्या. [सं.] २ तुंबरूच्या वीणेचें नांव [सं. कला+वत्]

कलावंतीण—स्त्री. १ कळवंतीण; गायिका; वेश्या; नर्तकी; नायकीण; कलावती पहा. ह्या बाया उत्सवांत, यात्रेंत, बैठकींत गाणें करतात. 'स्वर्गीतील जी प्रमुख कलावंतीण मेनका तिची मुलगी शकुंतला' —नाकु ३.२. [सं. कलावती]

कलावनी—स्त्री. (व.) औत वळवण्याची जागा. [कलणें]

कलावा—पु. १ हत्तीवरील माहुत ज्या रिकीबींत पाय ठेवतो त्या रिकीबीची दोरी. ही हत्तीच्या गळयाभोवतीं असते. २ एका बाजूस किंवा वर वळविणें किंवा तोलता करणें. (डाव्या किंवा उजव्या आंगावर) तोलून ठेवणें; (घोडा) परत फिरवणें; एक दोन फेऱ्या, खेपा किंवा वळणें घेणें; फेरफटका करणें. (क्रि० एक सारखें देणें). 'तूं शेताकडे कलावा देऊन ये.'

कलावा—पु. जनावरास चरावयास सोडलें असतां तें फार दूर जाऊं नये म्हणून त्याच्या पायास दोरी बांधून ठेवतात ती, मानपखोडा; दुपकी; मानखुंट. कळवा पहा.

कलि-ली—पु. १ कृतत्रेताद्वापारादि चार युगांतील शेवटचें, चालू युग; कलहाचा किंवा दुर्बुद्धीचा काळ; कांहींच्या मतें या युगाचा आरंभ ख्रिस्ती शकापूर्वी तीनशें, कांहींच्या मतें ३१०१ व कांहींच्या १३७० वर्षांपूर्वी झाला. याचा अवधि ४३२००० वर्षे आहे व तो अवधि संपला म्हणजे सर्व जगाचा प्रलय होणार आहे. २ भांडण; तंटा; कलह. 'नमींच कलि प्रगटे।' —मोमंभा ३.२३. ३ कलियुगाची देवता. 'सांभाळा जी ब्रीदावळी। तुम्ही कां कलिसारिखे।' —तुगा १४५८. ४ दशावतारी गंजीफांतील शेवटचा रंग. ५ बिब्बा; भिलावा. ६ पाप. 'गर्तिच्या वाटविल्या त्वां मुली। काय वाढविसिल हा कली' —राला ४०. ७ युद्ध. 'करिति महागजसमान गाढ कली।' —मोआदि २८.३६. ८ मत्सर. 'तच्चित्तीं शिरला अनर्थ मूलक कली।' —विक ३१. ०काल—पु. कलियुगांतील दिवस; अज्ञानमय, त्रासदायक, संकटकारक काल. कळिकाळ पहा. [सं.] **—चा पहारा**—पु. राक्षसी निर्दयता; दुष्टपणा किंवा बेबंदी घडून आली असतां उच्चारावयाचा शब्द. ०द्रुम—पु. १ बेहडा, त्याचें झाड व फळ. २ बिब्याचें झाड व त्याचें फळ. [सं.] ०पुरुष—पु. १ वाईट, भांडखोर मनुष्य; दुष्ट मनुष्य. २ नाटकांतील नायकाचा प्रतिस्पर्धी; खलपुरुष; दुष्ट पात्र. 'आपल्या नित्याच्या ओळखीचा जो कलिपुरुष' —विचारविलास ४१. [सं.] ०मल—पु. कलियुगांतील पापवासना; दुष्ट वासना; दुर्बुद्धि; दोष; पातकें. 'एका जनार्दनीं रसाळा। कथा कलिमल नाशिनी।' —एरुस्व ९.६६. [सं. कलि+मल] ०महात्म्य—न. कलियुगापासून उद्भवणारे परिणाम, संकटें इ० कलियुगाचें वर्चस्व; अंमल, प्रभाव. [सं.] ०युग—न. कलि—ली अर्थ १ पहा. युगचतुष्टयांतील चवथें युग. ०युगवर्ष—न. शालिवाहन शकापूर्वी ३१७९ या वर्षी (खिपू. ३१०२ ता. १८ फेब्रुवारी) भारतीय युद्ध झालें त्यानंतर थोडक्याच दिवसांनीं कलियुग सुरू झालें. —झाको क १७५. ०युगाचा ब्रह्मा—पु. कल्पक व चतुर पुरुष; बुद्धिवान मनुष्य. ०संचरणें—क्रि. मनुष्य भांडण्याच्या बेतास आला म्हणजे त्याच्या संबंधानें म्हणतात. 'ह्याच्या मनांत, पोटांत कली संचरला'

कलिका-कली—स्त्री. कळी; न उमलेलें फूल; मुकुल; कुड्मल [सं. कलिका]

कलिंग—पु. १ हिंदुस्थानांतील एका प्राचीन देशाचें नांव; सांप्रतचा ओडया प्रांत (कटक, बालासूर, जगन्नाथपुरी इ० जिल्हे यांत येतात). २ एक पक्षी. —मोशाक्षी ६३. [सं.]

कलिंगड-डी-णा—स्त्रीन. कलिंगडाची वेल व तिचें फळ; टरबूज. (सिंधमध्यें कद्दू कलिंगड होतें, त्याला किरबट म्हणतात. दिलपसंत ही याची एक जात आहे. त्यास घेंडसें म्हणतात. त्याची भाजी करतात. तिचीं तेंडूं, टिंडा, मेहो टिटक वगैरे हिंदी नांवें आहेत). याच्या दोन जाती आहेत:—काळें व गोल, पांढरें व लांबट. यांतील गर लाल असून तो खातात. याच्या पानास पांच टोकें असून दोन टोकांत दीड अंगुळ खांच असते. हें मलबंधक असून दृष्टिदोष, पित्तदोष, व शुक्र यांचें नाशक आहे. —योर १. ५५. वयु २.१९. [सं. कालिंगी]

कलिजा—पु. काळीज. [हिं. कलिजा; तुल. अर. कल्ब=हृदय]

कलिं(लीं)दर—पु. ऊद; कांडेचोर; काळमांजर; कानेदर. 'सांबरें, ससे, कलिंदरें, सायाळ इत्यादि जनावरांचा सवेंदां त्रास.' –खेया ३३.

कलिंदर—पु. १ मुसलमानी भिकारी; फकिराची एक जात; दर्वेशाचा एक पंथ. या पंथांतील लोक मुंडण करितात व नेहमीं फिरत असतात. 'मलंग भडंग कलंदर।' –दावि ४७४. २ लावणीमध्यें हा शब्द नेहमीं येतो पण याचा अर्थ निरनिराळा आढळतो. जसें:–अनिर्बंध वागणारा: त्यावरून. दुर्व्यसनी; निसबलेला; फंदी; इष्कबाज; किंवा सुंदर चपळ किंवा फटकुऱ्या; गबाळ; भटक्या; उनाडटप्पू; दारुड्या, व्यसनी; लोकांतून उठलेला; पिसाट; छांदिष्ट. 'पति बिजवर नवरा माझा कलिंदर राजा।' [अर. फा. कलंदर=एका पंथाचे फकीर]

कलिंदरा—वि. कलिंदराच्या गुणावगुणांनीं युक्त, विषयासक्त; बदफैली. [अर. कलंदर]

कलिंदरा-द्रा—पु. (हिं.) १ एक प्रकारचें सुती किंवा रेशमी कापड, कलंदरा. २ दुहेरी आच्छादनाच्या तंबूचें बाहेरील आच्छादन. [अर. कलंदरा]

कलिंदरी—स्त्री. कलंदराची वृत्ति अथवा अवस्था.

कलिंदा-जिवाचा कलिंदा—पु. अत्यंत प्रिय मनुष्य प्राणप्रिय माणूस. [हिं. कलिजा=काळीज]

कलिबार—पु. १ जिवलग; कंठमणि; (मित्र, वस्तु). २ होडीच्या समोरासमोरील बाजू तोलणारी आडवी दांडी.

कलिया—पु. मांसाचे खाण्याचे पदार्थ. –गृशि २.९. धने, जिरें, शहाजिरें, मिरें, दालचिनी, लवंगा, वेलची इ० वस्तूंचा मसाला वाटून मांसाला लावतात व तें रसेदार बनवितात त्याला कलिया, कोरमा, दोप्याजा किंवा सालन अशीं नावें आहेत. –गृ २.५१. [अर. कलिया]

कलियाद्-कल्याद्—न. (गो.) कुलुप; टाळें. [पो. कादि आदो]

कलिवर-कलेवर—न. १ शरीर. 'जीव आला पायांपाशीं। येथें असें कलिवरेसीं।' –तुगा ८३४. २ प्रेत. 'अन्योन्य ब्यंगुलही राहों देती न धड कलेवर ते।' –मोद्रोण ३.३२. [सं. कलेवर; तुल. लॅ. कॅडेवर]

कलिशता—स्त्री. किल्मिष; खलप; किंतु. 'माझे मनांत आतां कलिशता नाहीं.' –रा ५.८. [फा. खलिश्]; तुल. सं. कलुष]

कलील—पु. गोळा; मिश्र रास; काला. 'जन्म संख्यावेरही। योनि गर्भ कलील पांथरी। उकडीजती जठरीं। पूयपंकी।' –ज्ञाप्र २८९ [सं. कलिल=गोळा]

कलुली-लोली—स्त्री. घोडा (घोडीसाठीं) किंवा घोडी (घोड्यासाठीं) माजावर येणें; भोगेच्छा; तलफ; मस्ती येऊन मारलेल्या उड्या. कुलुली पहा. [सं. कल्लोल]

कलुष—न. पाप; पातक; दोष. 'जन्ममृत्यूदुःखें। व्याधिवार्धक्य कलुषें।' –ज्ञा १३.५३५. [सं. कलुष] –वि. (ल.) गढूळ; मातट; घाणेरडें; दूषित; खराब; अस्थिर; प्रतिकूल; संशयग्रस्त. 'चित्तवृत्ति कलुष झाली असतां श्लेषाची स्फूर्ति कोठून होणार?' –नि ८७७. [सं.]

कलुषित—वि. गढूळ झालेलें; मलिन असलेलें; खराब केलेलें; संशयग्रस्त; दूषित.

कलेक्टर—पु. (इं.) इंग्रजी राज्यांतील जिल्ह्याचा अधिकारी.

कॅलेंडर—न. इंग्रजी तारीख व वारांचें पत्रक, पंचांग, कालादर्श. [इं.]

कलेप—पु. कलप-फ पहा.

कलेवर—न. १ मनुष्यांचें अथवा पशूंचें शरीर (आत्म्याहून निराळें दाखविण्यासाठीं योजतात). २ निर्जीव; अचेतन; प्रेत; शव; रागाच्या बोलण्यांत वापरतात. 'अझुनी वैरियांचिया कलेवरा। विसंबसीना।' –ज्ञा ११.१०५. 'घायीं घायीं किळकिळती एक वेळें। गज कलवरें पाडिलीं।' –एरुस्व १०.५५. 'एकसरीं केली कलेवरें साटी। आतां नका तुटी पायासवें।' –तुगा ९२२. ३ (गो. ल.) कृश मनुष्य. [सं. कलेवर तुल० लॅ. कॅडेवर]

कलोक—क्रिवि. (ना.) कोठपर्यंत; किती वेळपर्यंत; कुठवर. 'मी येथें कलोक बसूं?' [कुठला-कुलोग-कलोग=कुठवर]

कलोड-कलवड-ड्ड—पु. १ शेण, माती इत्यादि लिंपणानें आच्छादित असलेला सुकलेल्या गोवऱ्यांचा ढीग, गंज; हा ढीग पावसांत भिजूं नये म्हणून त्यावर घातलेलें खोपटासारखें छप्पर. २ कांहीं प्रांतांत लांकुडफांटा, कडबा, गोवऱ्या वगैरेच्या गंजीला म्हणतात. हा ढीग शेणामातीच्या लिंपणानें आच्छादिलेला असतो किंवा नसतो. 'तमाम शिरांचीं नाकें कापून डेरियांपुढें कलवडाप्रमाणें चौत्रा घातला.' –भाब ७१. 'गोवऱ्यांचा मोठा कलवड लाव.' ३ शेणामातीनें लिंपलेला डेरा अगर मडकें. (क्रि० बसणें=म्हातारपणामुळें शक्तिहीन होणें, परस्वाधीन होणें). 'माझे हातींचा कलवडु। मजवांचुनि नको फोडूं।' –तुगा २९६३. [सं. कल्=संकलन करणें]

कलोत्तर—कलांतर पहा.

कल्क—न. पाट्यावर बारीक वाटलेलें द्रव्य; वाळलेलें असल्यास पाणी घालून गंधाप्रमाणें बारीक वाटलेलें औषध. –योर १.१७८. वाटून, ठेचून, चेचून, शिजवून, खलून गलगलित दळयुक्त चूर्ण केलेलें औषध; ठेवा, 'त्यांत चिंचेचा कल्क टाकावा.' –गृशि २.४४. [सं.]

कल्की—कल्की पहा.

कल्केरिया कार्ब—न. (होमिओपाथी) मुर्दुस, दांत उशिरां येणें, पोट मोठें होणें, व हातापायांच्या काड्या असणें, इ० लहान मुलांच्या रोगांवर औषध–होमि ३९. [इं.]

कल्ड–र्डे—न. (खा.) पायांतील किंवा हातांतील कडें [सं कटक]

कल्प—पु. १ चार अब्ज, बत्तीस कोटी मानुष किंवा सौर वर्षे, ब्रह्मदेवाचा एक अहोरात्र, दिवस; जगाच्या उत्पत्तिलयामधील काळ; चार युगांची एक चौकडी अशा हजार चौकड्या. ' मज दास करी त्याचा . संतदासाच्या दासाचा . मग होत कल्प वरि । सुखें गर्भवास हरी । '–तुगा ११७४. 'ब्रह्मदेवाच्या दिवसासच कल्प असें म्हणतात. ' –गीर ७३३. ' मना कल्पना कल्पितां कल्प कोटी . नव्हे रे नव्हे सर्वथा राम भेटी । ' –राम ५९. २ धार्मिक विधि, आचारांचें वर्णन ज्यांत केलें आहे असें सहा वेदांगांपैकीं एक, यांत श्रौत व गृह्यसूत्रें येतात. ३ विशेष प्रचारांत विकल्प. ऐच्छिक अथवा विकल्पेंकरून. ४ संशय; अंदेशा; शंका. 'मी सर्वस्वें दासी मनीं नको कल्प आणूं दुसरा । ' –होला ९९. ' काशिराम म्हणे कल्प कांहीं ठेवूं नको रे । ' –होला १५०. ५ निश्चय किंवा उद्देश. ६ एखाद्या वस्तुविषयीं एक मुख्य व एक गौण असे दोन पक्ष असतात ते प्रत्येकीं. –वि. १ -च्या योग्यतेचा, शक्त; समर्थ. २ (समासांत) सारखा, सदृश. उ० तृणकल्प, पर्वतकल्प. [सं. क्लृप्–कल्पना करणें]

कल्पक—वि. योजक; नवीन युक्ति, कल्पना, शोध काढण्यांत हुषार, चतुर; शोधक. [सं.]

कल्पणें—कल्पिणें पहा.

कल्पतरु–द्रुम—पु. १ इंद्र लोकांतील पांच देवतरूंपकीं एक; एक काल्पनिक वृक्ष; आपण कल्पिलेली कोणतीहि वस्तु याच्यापासून प्राप्त होते अशी समजूत आहे. ' जयजय देव श्रीगुरो । अकल्पनाक्यकल्पतरो । ' –ज्ञा १८.१०. ' कल्पतरूची कल्पना वारी । परिसाची निवारी जडत्व काळिमा । ' –एरुस्व ३.१५. ' हे हरि नामाची आंबिली । ... । विश्रांति कल्पतरूची साउली । ' –तुगा ३३९. ' मना राम कल्पतरू कामधेनु । ' –राम ६०. ' धावा कुठार कल्पद्रुमसा हा वर मला वधोपाय । ' –मोभीष्म १. ८५. ' कल्पद्रुमांचे मांदोडे । चहूंकडे शोभती । ' –एभा १०. ६०९. २ पुष्कळ फळें देणारे इहलोकांतहि कांहीं वृक्ष आहेत त्यांस म्हणतात. ३ फायदेशीर धंदा. ४ उदार, सर्वांचें सर्वप्रकारें चाल विणारा यजमान. ५ माड. [सं.]

कल्पना—स्त्री. १ मनःपटावर उमटलेलें चित्र किंवा तत्संबंधीं विचार. तत्त्ववेत्त्यांनीं या शब्दाचा पुष्कळ प्रकारें अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. –ज्ञाको. क १८०. एखादी गोष्ट करावी किंवा न करावी याबद्दल अंतःकरणांत जी विशेष वृत्ति उठते ती; विचार. 'मना कल्पना ते नको विषयाची ' –राम ५. २ योजना; युक्ति; शक्कल; तोड. ' त्या गुप्त कल्पना कोणास कळाल्या. कोणें येऊन आटोपाल्या । ' –दा १९.८.१८. ३ विवक्षित कार्यसिद्धीसाठीं बुद्धीनें योजलेला उपाय. ४ भावना; मनोवृत्ति; समज; ग्रह; कल्पित गोष्ट; मानसिक सृष्टि. ५ तर्क; अनुमान; भास. ६ उद्देश; बेत; हेतु. ७ संशय; शंका; अंदेशा; भय. ' कल्पनेची बाधा नहो कोणे काळीं. ही संतमंडळी सुखी असो । ' –तुगा. 'वेदशास्त्र संत चार कल्पना घेती साधुजन । ' –ऐपो ३८९. ८ गृहीत धरणें; मानणें; आधारभूत धरणें. 'उपासक उपासनेसाठीं ईश्वरी मूर्तीत्वादि कल्पना करितात. ' ९ शब्द किंवा वाक्य जुळविण्यासाठीं मांडणी, करामत; गोष्टीची रचना; 'पदें जरी ठाऊक असलीं तरी वाक्याची कल्पना करण्यास बोलण्याचा अभ्यास पाहिजे. ' १० कला; युक्ति; रहस्य (कल्पक योजनेचें) जुळविण्याची किंवा करण्याची योजना. ११ मनांत उठलेले तरंग; विचारलहरी. [सं. क्लृप्] **०पूरित**–वि. कल्पनेचा भरपूर विलास असलेलें. ' पाखरास व हालत्या पिंपळ पानास –या कविता कल्पनापूरित आहेत.' –गोविंदाग्रज (हर्षेकृत). **०बाज**–वि. तर्क, अनुमान करण्यांत हुशार, वस्ताद; नवीन नवीन युक्त्या काढणारा; तर्कबाज; बुपीक डोक्याचा. [सं. कल्पना+फा. बाज] **०रूप**–वि. कल्पित; मानीव; कल्पनामात्र; अवास्तविक; ज्यांत खेर असें कांहींच नाहीं असें (प्रपंच, संसार, सुखदुःख, देह, संपत्ति, सृष्टि यांविषयीं योजतात). **०वाद**–पु. नवीन कल्पना, युक्त्या, सारणी, तर्क, तोड काढण्याची किंवा बांधण्याची शक्ति; कल्पना करण्याचें मनाचें सामर्थ्य; बुद्धिसामर्थ्य; भावनेचा जोर. (इं.) आयडिआलिझम्. **०शक्ति**–स्त्री. शोधक बुद्धि; तर्कशक्ति; कल्पनेनें जाणण्याचें सामर्थ्य. **०साहचर्य**–न. (मानसशास्त्र) एखाद्या वस्तूचें प्रत्यक्ष ज्ञान झालें असतां त्यामुळें मागील अनुभवाचें स्मरण होतें ती क्रिया; हें साहचर्य तीन प्रकारचें आहे–सान्निध्य, साम्य, विरोध. –ज्ञाको. क १८०. [सं.] **०सृष्टि**–स्त्री. कल्पनेनें रेखाटलेले चित्र, वस्तु; वस्तुतः जागेवर पदार्थ नसतांहि अंतःकरणानें अनेक कल्पना करून स्वप्नमनोरथादिरूप रचिला जो प्रपंच ती; कविकल्पित, चमत्कारावह अद्भुत गोष्टी. **०सृष्टिप्रिय**–वि. कल्पनासृष्टींत रमणारा. (इं.) आयडियालिस्टिक. [सं.]

कल्पनीय—वि. मनांत आणण्यास, तर्क करण्यास, शोधून काढण्यास, गृहीत धरण्यास योग्य किंवा शक्य. [सं.]

कल्परूख—पु. (गो.) कल्पवृक्ष; कल्पतरु पहा.

कल्पलता—स्त्री. कल्पतरु पहा. ' परि ते वाचाचि केली कल्पलता । विवेकाची । ' –ज्ञा १०.२०.

कल्पवर—क्रिवि. कल्पाच्या अंतापर्यंत; कल्पांतीं; सृष्टीच्या अंतापर्यंत; महाप्रलय होऊन सर्व सृष्टीचा नाश होईपर्यंत; सृष्टीच्या आयुष्यभर. [कल्प+वर]

कल्पवृक्ष—पु. कल्पतरु पहा. मंदार, पारिजातक, संतान, कल्पवृक्ष, हरिचंदन या पांच देवतरूंपैकीं एक. 'फळे कल्पवृक्षु जैसा।' –ज्ञा ४.२१६. 'कीं कल्पवृक्ष शोधित आला घर।' –रावि १.४८. 'कल्पवृक्षाखालीं बसुन झोळीला गांठी कां द्याव्या?' 'कल्पवृक्ष अंगणीं देख। तो कासया मागेल भीक।' [सं.]

कल्पांत—१ कल्पाचा शेवट; जगाचा अंत ज्यावेळीं होतो त्यास कल्पांत, प्रलय असें म्हणतात–तोहि एक कल्पपर्यंत राहतो. ब्रह्मदेवाच्या अहोरात्राचा शेवट. 'कुपितें कर्णे केली कल्पांतीं जेंवि घाबरी सृष्टि।' –मोकर्ण ४७.१२. २ भयंकर संकट; अनर्थ या शब्दाचे अर्थ १, २ पहा. ३ (ल.) परमावधीचें दुःख; आकांत; कल्लोळ (भूक, तहान, ऊन, रोग, दुःख, विरह इ०चा). [कल्प+अंत] **०काळ**–पु. १ विश्वाचा अंतकाळ; प्रलयकाळ. २ (ल.) अतिशय, भयंकर, क्रूर माणूस, भूत, राक्षस.

कल्पांतरीं–कल्पांतीं—क्रिवि. १ (काव्यांत) (अकरणात्मक, नास्तिपक्षी रचनेंत) केव्हांहि नव्हे; जगाचा नाश होईपर्यंतहि नव्हे. २ नास्तिपक्षीं रचना नसतांनाहि, नेहमीं; सदोदित; सृष्टीचें अस्तित्व आहे तोंपर्यंत; जगाच्या अंतापर्यंत. [कल्पांत]

कल्पांतरीं—क्रिवि. एक संपल्यानंतर दुसऱ्या कल्पामध्यें. [सं. कल्प+अंतर]

कल्पांतवरीं—क्रिवि. जगाच्या अंतापर्यंत. 'तो पडेल अघोरीं। कल्पांतवरीं पतित।' –मोल.

कल्पादि—पु. कल्पारंभ; कल्पास ज्या दिवशीं प्रारंभ झाला तो दिवस; ब्रह्मदेवाच्या दिवसाचा प्रारंभ. 'तें हें ज्ञान कल्पादी। चतुःश्लोकपदबंधी।' –एभा १.१४५. [सं. कल्प+आदि]

कल्पिणें—उक्रि. १ विचार करणें; कल्पना करणें; वाटणें; अनुमान करणें. २ योजणें; मनांत आणणें (बेत, युक्ति, शक्कल). ३ मनन करून रचणें; जुळविणें; बनविणें. मनोमय तयार करणें; शोध लावणें. ४ कल्पना करणें; तर्क करणें; अनुमान, अजमास बांधणें. 'हा जीतु ना नोहे। लोक कल्पी येणें भावें।' –ज्ञा १३.१९५. ५ मनन, चिंतन, विचार करणें; विचारांत मग्न असणें. ६ गृहीत धरणें; मानणें. [सं. क्लृप्]

कल्पित—वि. मानलेलें; वाटलेलें; कल्पिलेलें; योजिलेलें; रचलेलें; युक्तीनें बसविलेलें; नवीन शोधून काढलेलें; जुळविलेलें, खरें नव्हे तें. **०कांदबरी**–स्त्री. (करमणुकीचा ग्रंथ) कल्पनेनें रचलेली, खरी नसलेली गोष्ट; अवास्तविक कथा. [सं.]

कल्पित—वि. कल्पना करणारें (मन). 'हेंचि कल्पावें तरी जाणिजे। परी आतां कल्पितें कैंचें आणिजे।'–ज्ञा ६.२७७.

कल्पे झाडणें—क्रि. (व.) मारणें.

कल्बी—वि. मध्यें असलेला. 'कल्बी काठी' =मधली डोलकाठी. –वाडमा १.३३६. [अर. कल्ब्=मध्य; अंतरंग]

कल्मश–ष—न. १ चिखल; राड; रेंदा; कोणताहि मळ; घाण. २ पाप; अंतःकरणांतील दुष्ट विचार. 'या कल्मषाची थोरी। सांगेन तुज।' –ज्ञा १.२४२. 'त्वद्दर्शनें कल्मश सर्व गेलें' –नरहरी गंगारत्नमाला ३० (नवनीत, पृ. ४१९). [सं.]

कल्मा—कलमा पहा.

कल्या—स्त्री. (कुल्या अप.). नदी. घृतकल्या मधुकल्या या समासांत योजतात.

कल्याण—न. १ क्षेम; कुशल; शुभ; चांगलें; बरें; हित; फायद्याची गोष्ट. 'चित्तीं धरी जो हे बोल। त्याचें कल्याण होईल।' २ गायनांतील एक थाट; राग. राग पहा. यांतील स्वर-शुद्ध षड्ज, शुद्ध ऋषभ, शुद्ध गांधार, तीव्र मध्यम, शुद्ध पंचम, शुद्ध धैवत व शुद्ध निषाद. 'कल्याण गोडी श्रीराग। मुरलींत आळवी श्रीरंग' –ह १०.११७. 'दीप भूप कल्याण तूं गातां प्रकाश सान्या स्थळीं पडती।' –प्रला १३७. ३ श्रीसमर्थ रामदास स्वामींचा पट्टशिष्य; याचें मूळ नांव अंबाजी, गांव डोमगांव. हा ब्रह्मचारी होता. समर्थांनीं सांगून यांनीं दासबोध लिहिला. (यावरून लक्षणेनें) पट्टशिष्य. 'केसरीकारांस रावबहादुरांचा मत्सर झाला आहे इत्यादि कांहीं कुत्सित कल्पना रा. ब. च्या कल्याण शिष्यानें काढल्या.' –टि ४.४. ४ (द्राविड) लग्न. 'शके १६०४ मध्यें लक्ष्मीनारायण कल्याण नांवाचें एक मराठी नाटक तंजावर येथें रचलें गेलें. 'येणें रीती नांद्यारंभ करून लक्ष्मीनारायणकल्याण नाटक निर्विघ्नसिद्धि सर्व जनास संतोष देवो.' –ग्रंथमाला.

कल्याणछु—उद्गा. (ना.) (मुलांच्या खेळांतील) डाव बुडाला नाहीं असें दर्शविणारा एक सावधगिरीचा शब्द.

कल्याणथाट—एका थाटाचें नांव; अनेक राग जनक कल्याण नांवाचा स्वरसमुदाय. कल्याण अर्थ २ पहा.

कल्याणी—स्त्री. १ (ज्योतिष) भद्रा नांवाचा एक योग. याचा काल अर्धीतिथि अथवा एक करणाइतका असतो व दर साडेतीनतिथि अथवा सात करणांनंतर तो पुन्हा येतो. म्हणजे प्रत्येक सातव्या करणास भद्रा असतात. 'व्यतिपात वैधृत कल्याणी हे तव कुयोग असे' –होला ४९.७. २ एक रागिणी. –वि. कल्याण गांवचें (तांब्या वगैरे पात्र). [सं.]

कल्याद—न. (गो.) कुल्प, कलियाद पहा.

कल्ल—वि. (गो.) पोकळ.

कल्ल—न. (गो.) साल; टरफल.

कल्लँ–ल्ली–ल्लें—नस्त्री. (गो.) कुळागरास पाणी देण्यासाठीं केलेलें लाकडाचें लांबट पन्हळासारखें पात्र. करली पहा.

कल्ला—पु. १ गुलमिशा; गालावरील केसांचा झुपका; काप. २ कोंबडयाचा तुरा; डोक्यावरील लाल मांसल भाग. [सं. गल्ल ? हिं.; फा. कल्ल=गाल]

कल्ला—पु. घोडयाचा एक रंग, सर्व शरीर लाल परंतु त्यांत जर्दा रंग मिश्र असून आयाळ व शेपटी काळी अगि पाठीवर सैली अशा रंगास म्हणतात. –अश्व १.२९.

कल्ला—पु. (ध्वनि) गलबला; ओरड; गोंगाट; गोंधळ; कल्लोळ. [ध्व. सं. कल्]

कल्लांवचें—सक्रि. (गो.) सोलणें. [गो. कल्ल=सालपट]

कल्ली-ल्ले—स्त्रीन. (गो.) बाग शिंपण्याचें साधन. करली पहा.

कल्लोल-ळ-कल्होळ—पु. १ पाण्याची लाट, लहर; मोठी लाट. 'तें आणिकें म्हणती वेगळें । कल्लोळ हें ।' –ज्ञा ५.१००. 'पाणी कल्लोळाचें मिसें । आपणपें हेलावे जैसें ।' –अमृ ७.१३५. 'कैसा गुरु कर्णधार कुशळ । आवर्त खळाळ आदळ । चुकवूनि विकल्पाचे कल्लोळ ।' –एभा २०.१७७. २ आगीचा डोंब, लोळ, झोत; जोराचा झोंक. ३ दंग्याचा गलबला, कलकलाट; आरडाओरड; गर्जना. 'गवेषण राजा रणकल्लोळीं । घेईल समफळी यादवांसी ।' –एरुस्व ९.६३. 'हरिनामें पिटोनि टाळी । कीर्तनकल्लोळीं गर्जती ।' ४ (ल.) आधिक्य; अतिशयितता; अवाढव्यता. 'होती दुःखाचे कल्लोळ' –रामदास (नवनीत पृ. १४८). [सं.]

कल्हई-ल्हे, कल्हय—स्त्री. १ कथील व नवसागर यांचें मिश्रण करून स्वयंपाकाच्या तांब्यापितळेच्या भांड्यांस जो लेप करतात तो, व तो देण्याची क्रिया. २ मुलामा; पातळ थर; सोन्याची कल्हई अथवा रुप्याची कल्हई=दागिन्यावरचा मुलामा–सोन्याचा अथवा रुप्याचा. ३ भिंगामध्यें प्रतिबिंब दिसावें म्हणून त्यास जो पाऱ्याचा लेप देतात तो. आरशाच्या मागील पाऱ्याचा लेप, मुलामा. 'आरसे आहेत, ज्यांची कल्हई उडाली असेल व पालखीस लागू होत असे असतील ...ते हुजूर पाठवावे.' –रा १२.१४२. [अर. कलई=कथील] ०करणें–क्रि. १ झिलई, पातळ हात, लेप देणें; चकचकीत करणें; वरच्या अंगानें चकाकी आणणें. २ (ल.) सावरासावर करणें; वाईट बाजूवर पांघरूण घालून चांगली बाजू पुढें मांडणें; एखाद्या गोष्टीस वरवर चांगलें स्वरूप देणें. ३ उगीच उपद्व्याप करणें; उद्योग, स्तोम माजविणें, फुगविणें (साधारण दुखापत वगैरेचें.) ४ (विनोदानें) पुरणपोळींत पुरण वगैरे थोडें भरणें; ०च्या–वि. १ ज्याला कल्हई केली आहे असा. २ (ल.) वरवर धुतलेला; किंचित उजळ केलेला; चकचकीत केलेला. ०कर-गर-गार–पु. भांड्याकुंड्यांना कल्हई लावणारा. [अर. कलई=कथील+फा. गर (म. कर).] ०करप–(गो.) (ल.) सारवासारव करणें.

कल्हई—स्त्री. (काहील किंवा काईल अप.) कढई; उसाचा रस कढविण्याचें पात्र. [सं. कटाह]

कल्हडमा—पु. (व.) गोंगाट; आरडाओरड. [अर. कलिमा]

कल्हातणें—उक्रि. कलंडून पडणें–पाडणें. 'कां वाटे जातां वोघें । कल्हातांही डोळा लागे ।' –ज्ञा १४.१८८. [कलणें]

कल्हार—पुन. (प्र. कह्लार) १ पांढरें कमळ; याचें बीं खातात. 'कल्हारांचिया मोहटिआं' –शिशु ७६६. २ (ल.) हृदयकमल. 'कल्हारी जिवाचिये ।' –भाए ४५३. 'सर्वमं हृदयकल्हारीं । तेथ कारुण्यवेळेच्या भरीं ।' –ज्ञा २.७१. 'सर्पाचिया परी । विषें भरला कल्हारीं ।' –तुगा २१७७. [सं.]

कल्हे-गर-गार—पु, मुलामा; कल्हई पहा. 'लावूं जाणे विल्हे तुकासाच आणि कल्हे !' –तुगा ६२५.

कल्हो-ळ्हो—पु. कल्ह पहा. 'कल्हो लागला पंडितांपंडितांला ।' –दावि ३९४.

कल्होड—पु. (दे.) कालवड. –देशीनाममाला.

कल्होळ—पु. कल्लोल पहा. 'श्वेत चामरें छत्रें डवळ । जेवीं कल्होळ लहरींचे ।' –मुविराट ८.२७.

कल्होळणें—अक्रि. आरंबळणें; ओरडणें; दुःखानें रडणें; विव्हळणें. [कल्लोळ]

कव—स्त्री. १ मिठी; वेंघ; विळखा; वेढा; वेंग; वेंस; खेंव; हस्ताग्राशीं हस्ताग्र मिळवून मध्यें होणारी पोकळी. 'महा कल्पापरौती । कव घालूनि अवचिती ।' –ज्ञा १३.६१. 'हें झाड माझ्या कवेंत मावत नाहीं.' 'कव मारिलि अवदुळ्यानें' –ऐपो १९. 'सोडा कवेंतून मला घेउद्या जरा विसावा तरी' –प्रला १९८. २ मासे धरण्याचीं जाळीं समुद्रांत ज्या डांबांना बांधतात त्या डांबांनीं व्यापली जाणारी जागा. ३ (ल.) झडप; उडी. 'करितां आठव । धावोनियां घाली कव ।' –तुगा २५२१. 'सह्याद्रीनानें कव घालून । प्रीवेशी धरिला दशवदन ।' –रावि २.१२३. 'वरी मांजरें कव घातली ।' –गीता १.२१४५. ४ आक्रम; आकलन (उघडून विस्तृत केलेलें तोंड, कात्रीचीं दोन पातीं, मन, बुद्धि वगैरेचें क्षेत्र. ५ (चि.) फार मोठी झीट; बेशुद्धि. ०घालणें–क्रि. १ मिठी घालणें, मारणें; झडप घालणें. 'कर्ण धराया धांवे त्या अरिला घालुनि कव चपळाला' –मोकर्ण १४.६५. २ (संसारास किंवा कामास) आवडीनें, हौसेनें मनांत थारा देणें; आस धरणें; दृढ इच्छा करणें. 'रुक्मिणी अति सत्वर पातली । चरण सप्तमनीं कव घातली ।' –किसुदा २८. [सं. क्षेम–म. खेंव–कव ?]

कवइता—पु. कवन करणारा; कवि. [सं. कु]

कवकवित—वि. १ पाणचट; बेचव; निचव; पचपचीत. २ (गो.) ठवठवीत.

कवकचित यासारख्या शब्दांत कवबद्दल कौ असें पुष्कळ ठिकाणीं वापरतात. कौ पहा.

कवच—पुन. १ कठिण आवरण; बाह्य आच्छादन; फळाची जाड साल; कठिण त्वचा. २ चिलखत; अंगत्राण; शरीराचें संरक्षण करणारें एक प्रकारचें पोलादी किंवा चामडयाचें वगैरे साधन. 'जैसें वज्र कवच लेइजे. मग शस्त्रांचा वर्षावो साहिजे.' –ज्ञा २.२३२. 'गोवळीं यश नेलें अमुचें. म्हणोनि कवचें बाणलीं.' –एरुस्व ८.१०. ३ (ल.) कोणतेंहि आच्छादन; प्रावरण; रक्षणसाधन. 'अभि ऐसें आहाच. तेजा नामाचें आहे कवच' –ज्ञा ७.३६. 'नातरी सर्पे कवच सांडिलें' –ज्ञा ८.६६. ४ झाडाच्या सालीवर अगर कागदावर मंत्र किंवा तोडगा लिहून हातांत अगर अंगावर धारण करतात तो. ५ मंत्रांतील ह्रां, ह्रीं इत्यादि बीज अक्षर. ६ मारुती अगर देवी यांच्या मूर्तीवरील शेंदुराचा थर. हा कांहीं दिवसांनीं सुदून पडल्यास देवानें कवच टाकलें असें म्हणतात. ७ टणक आच्छादन; टरफल; कठिण त्वचा. 'अंडयावरील कवच' [सं.] **०टाकणें**–क्रि. १ कात टाकणें (सापानें). 'नातरी सर्पे कवच सांडिलें.' –ज्ञा ८.६६. २ (ल.) पुनरुज्जीवन होणें; नवा उत्साह येणें; दुखण्यांतून उठणें. ३ मूर्तीवरील शेंदुराचा लेप, थर पडणें. **०कुहरी-ली, ०कुहिरी-ली**–स्त्री. काचकुहली; खाजकुहली-कुहरी. **०धर वर्ग-धारी**–वि. गोगलगाय, खेकडा, शेवंडे, शिंगे, कांसव या वर्गांतील प्राणी. संधिपाद प्राणी. ह्यांतील बहुतेकांना शिंगासारखे चार अवयव व दहा पाय असतात. छाती व डोकें मिळून एकच भाग असून मागें पोट असतें. पाठीवर कवचासारखी कठिण कातडी असते. **०बीज**–न. खाजकुहरीचें बीं; हें औषधी आहे.

कवचा—पु. (व.) गवंडयाची करणी; थापी. (ना.) मोठा चमचा.

कंवचाळ—न. वर्तुळाकार बसलेल्या माणसांचा घेर, वर्तुळ; घेरा. (क्रि. घालणें; बसणें; जमणें;) [कवच]

कंवची—स्त्री. १ (कों.) उडलेला किंवा फुटलेला लहान तुकडा; कपची. २ अंडयावरील कठिण पापुद्रा, आच्छादन; विशेषतः अर्धा भाग किंवा तुकडा. ३ डोक्याची कवटी; नरटी. ४ कपाल. ५ नारळाची अर्धी करवंटी, भाग. ६ (गो.) काचेचा तुकडा.

कवट—स्त्री. (कों.) वेंग; कव पहा.

कंवट—न. (कों.) कोंबडीचें अंडें. **०गाळणें**–क्रि. धीर सोडणें; भयानें गांगरणें, घाबरणें. **०भावलें**–न. (कु.) पिशाच बाधा काढून टाकण्याकरतां पिठाचें बाहुलें, कोंबडयाचें अंडें व एक दिवा अंगावरून काढून बाहेर नेऊन टाकतात तें. [कंवट+बाहुलें]

कंवंटल-ळ-ल्य-टाल-ळ—न. १ जारणमारणादि प्रयोग; कुयेडें; चेटूक. 'केलीं नाना कवटालें. पुत्रलोभें केलीं डालें.' –दा ३.३.४५. २ कुभांड; डावपेंच; खोटें नाटें करणें; कृत्रिम; लचांड; तुफान; कारस्थान. 'राणीचा एवढें कवटाळ रचण्यांतला जो उद्देश ... तें मात्र बिलकुल झालें नाहीं' –नि ५२९. [सं. कूट=वाकडा; कौटल्य=कपट]

कवटा—पु. (ना.) वेंग; कव पहा.

कंवटाली-ल्या-ळ्या-ळी—वि. १ कवटाळ करणारा; चेटक्या. २ कुभांडी; तुफानखोर; डावपेंच करणारा. [कंवटाल]

कंवटाळणें—उक्रि. १ मिठी मारणें; आलिंगन देणें; कवेंत धरणें. 'अभिस्तंभ बाही कवटाळविती.' –तुगा ७०२. २ भोंवतें लागणें; आश्रय घेणें; भोंवतीं धरणें; वेष्टणें (वेलींनीं झाडादिकांस). ३ आंत घेणें; स्वीकारणें; मित्रभावानें दाखल करणें. ४ कबज्यांत घेणें (देश वगैरे). ५ (ल.) आंत येणें, जाणें, असणें. ६ समजणें; बुद्धीनें आकलन करणें (एखादा विषय). [का. कट्टाडिसु; ? म. कव]

कंवटाळी—स्त्री. मिठी.

कवटाळीण—स्त्री. चेटकीण; जादुगारीण. [कवटाल]

कवटी—स्त्री. (कों.) मिठी. कव पहा.

कवटी—स्त्री. (कों.) अंडयाचें कवच; नारळाची नरोटी; माणसाच्या डोक्याचें हाड.

कंवटील-ळ-टिल्य—न. कंवंटल पहा. **०मंत्र**–पु. कवटल पहा.

कंवटें—न. अंडयाचें कवच.

कंवठ—स्त्री. एक फळझाड. हें दमट प्रदेशांत होतें. झाड मोठें असून याच्या फळास कंवठ म्हणतात. हें फळ वाटोळें असून याच्यावरील कवच कठिण असतें. हिरव्या कवठाच्या मगजाचें सार आणि पिकलेल्याचा मुरंबा करतात. –वगु २.३०. कवठ इतीस फार आवडतें. पाल्याचा रस पित्तविकारावर उपयोगी आहे. झाडापासून उत्तम गोंद निघतो. –कृषि ७६८. –स्त्री. २ आणिक एक निराळें झाड; याचें फळ कवठासारखेंच असतें. परंतु हें फळ कडू असतें म्हणून खात नाहींत. याच्या बिया सुपारीएवढया असतात व त्यांचें तेल काढतात. तें खरजेवर औषधी आहे. हें झाड कोंकणांत होतें. –न. (कोंबडीचें) अंडें. [सं. कपित्थ; प्रा. कवित्थ; कपित्थ–कविट्ठ–कवीठ–कवठ–रा. ग्रंथमाला हिं. कैथ] **–ठाचा तकू**–पु. (व.) कवठाची चटणी.

कंवठाळी—वि. (गो.) कारस्थानी. [कवटाल]

कवंठी—स्त्री. कवंठाचें झाड.

कवठी—स्त्री. मस्तकाची कवटी.

कवठेल—न. कडू कवठाचें तेल. हें तेल कवठें काढून ठेवून तीं पंधरा दिवसांनीं पिकल्यावर फोडून बिया राखेंत कालवून रास करून ठेवून चार–सहा दिवसांनीं काढतात. [कवठ+तेल]

कंवळ्याल—न. (कु.) कवठेल.

कवड—स्त्री. १ (कों.) फोडलेल्या नारळाचा अर्धा भाग. 'शुद्ध सत्वाचा कवड मोठा। बोध बिरडें बांधला गांठा।'—तुगा ४४४६. [सं. करोटी]

कवडपट्टा—पु. (व.) कवड्यांची गुंफिलेली माळ. [कवडी+पट्टा]

कंवडल-ळ—स्त्रीन. १ कडू वृंदावनाचा वेल व फळ. याचें पान खरखरीत व सुरकुत्या असलेलें असून त्रिदली असतें. फळाचा रंग पहिल्यानें हिरवा व पिकल्यावर तांबडा होतो. हें फळ कडू असतें. —वगु २.२१. २ (ल.) (हें फळ वरून सुंदर दिसतें पण अंतर्भाग काळा असून कडू असतो म्हणून वर चांगल्या दिसणाऱ्या परंतु अंतःकरणाच्या दुष्ट मनुष्यास यानी नेहमीं उपमा देतात.) मत्सरी, दुष्ट, नीच, द्वेषी माणूस. ३ (कों.) नारळाचें बेलें. [सं. कमंडलु]

कवडसा, कडोसा—पु. १ खिडकींतून, दरवाज्यांतून, छपरांतून अथवा एखाद्या फटींतून पडलेले प्रकाशाचे किरण. अथवा परावर्तित प्रकाश. 'सूर्य जयाचेनि उजाळे। कवडसेनि' —अमृ २.२३. 'झाडांच्या सावलींत लांब लांब उन्हाचे कवडसे पडले म्हणजे लांबचे लांब प्रकाशस्तंभ दिसत.'—पाण्ह ४९. २ रात्रीच्या वेळीं पडणारा मनुष्य, दिवा अथवा एखादा पदार्थ यांची त्याच्या जवळच पडणारी छायाकृति.

कवडा—पु. एक पक्षी; कपोत; होला; होलगा; हा अनिष्टसूचक समजतात. हा घरांत शिरला असतां कपोतशांति करतात. 'जळीं तळपतांचि मासा। कवडा झेलुनि ने आकाशा।'—एभा २२.७२८. 'हा न भला बुडवाया शिरला या राजमंदिरीं कवडा।'—मोसभा ४.२७. [सं. कपोत]

कवडा—पु. १ मोठी कवडी. 'आयुष्याचे तीन कवडे। विषयांचें चाडें कदा न करी।'—एंभा ३.५६१. 'जैसा वेश्याभोगीं कवडा वेंचे। मग दारहि चेपूं न ये तियेचें।'—ज्ञा ९. ३२९. 'नुसता पोरवडा। घरीं न कवडा चित्तीं बरा नीवडा।' —आसु ४९. 'नेदी फुटका कवडा। चोरीं घातला दर्वडा'—दावि २८४. २ (ल.) डोळ्यावर येणारा सारा; डोळ्यांतील फूल; कवडी. ३ विखुरलेले, विस्कळित मेघ, ढग. ४ (चांभारधंदा) गिरणींतील साच्यांस लागणारें कातडें. ५ दह्याचा किंवा नासलेल्या दुधाचा घट्ट व कापतां येणारा गोळा; गांठ; गठळी. 'दुधीं कांजीचा येंचू पडे। तेणें दुग्धाचे होती कवडे।'—भारा १०.६७. [सं. कपर्दिक] ०**भिरविणें**—क्रि. निषाणी, चिन्ह, लक्षण दाखविणें, खेळणें (देवीचा भुत्या किंवा आराधी देवीचा अलंकार म्हणून आपल्या गळ्यांत कवड्यांची माळ घालतो यावरून) कोणत्याहि गोष्टीचें वैभव मिरविणें. 'आपले कवित्वाचा कवडा। मिरवी सधन सभेपुढें।' ०**गहूं, कवडया गहूं**—पु. एकप्रकारचा गहूं. खपल्या गहूं पहा.

कवडाशा—पु. एक जातीचा मासा.

कवंडाळ—न. कवटाळ; कपट; चेदक पहा. 'कांहीं तरी कंवडाळ करतें.' —नामना ८४.

कवडी—स्त्री. १ कपर्दिका; समुद्रांतील एका जलजंतूच्या शरीरावरील कवच. याचा चलनाकडे उपयोग होत असे. एका पैशाला ६४ किंवा ८० कवड्या मिळतात. तीन प्रकारच्या कवड्या असतात—दही, सगुणी व भवानी. 'हातीं कवडी विद्या दवडी'. 'शंख सिंपी धुला कवडे। आधीं त्यांचें घर घडे।'—दा ९.७.५. 'परि खळ जन हे नेदिती कवडी तेही'—श्रीधर (नवनीत पृ. ४४४). २ हाताच्या पायाच्या नखावर जो पांढरा ठिपका असतो तो. ३ विटीदांडूच्या खेळांतील एक शब्द. ४ कवडा अर्थ ५ पहा. ५ रेशीमकाठी वस्त्राच्या काठाची विणकर विरळ झाली असतां त्यांत उभ्या ताण्याचे दिसणारे पांढरे ठिपके. अंश. ६ डोळ्यांतील फूल, वडस. ७ चलनाचा अत्यंत अल्प अंश. ८ सर्पाच्या अंगावरील पांढरे ठिपके. ९ (उपहा.) दांत; कवळी? १० बुबुळाशिवाय डोळ्याचा पांढरा भाग. ११ कवडीचें झाड; हें लहान असून यास पांढरीं फुलें येतात याचा तापावर उपयोग होतो. १२ झोडपलेल्या गव्हाच्या ताटांतील कणस. १३ मुसलमान लोक दाढीचा जो भाग कधींहि काढीत नाहींत तो; अल्लाचा नूर. १४ दह्याचा घट्ट गोळा; गांठ, गठळी. [सं. कपर्दिका; प्रा. कवड्डिआ=कवडी; हिं. पं. कौडी] ०**कवडी सांठविणें**—क्रि. चिक्कूपणानें पैशांचा सांठा करणें. ०**उलटी पडणें**—क्रि. फांसा किंवा डाव उलटा पडणें; गोष्ट अंगावर येणें. ०**किमतीचा**—वि. निरुपयोगी; कुचकामाचा. ०**चा खेळ**—पु. इटीदांडूच्या खेळांतील एक प्रकार. ०**चा माल**—पु. १ अगदीं कमी किमतीचा माल. २ (ल.) तुच्छ पदार्थ; कुचकामाचा. ०**टंक-चुबका-पूत**—वि. चिक्कू, कृपण, कंजूष (मनुष्य). 'कवडीचुंबक आहे.' 'दोघेही गुलाम कवडी चुंबक!'—विवि ८.११.२०७. ०**बाज**—वि. चांगल्या प्रकारें कवड्या खेळणारा. ०**मोल**—वि. अगदीं कमी किमतीचा; क्षुल्लक दर्जाचा. 'एका मार्गातील कुशल वाटाडेहो दुसऱ्या मार्गात कवडीमोल ठरतात.' —टि ४.१२२.

कवडी—स्त्री. काटक्यांचें कवाड; कवाडी. [सं. कपाट=कवाड]

कवडेफोक—पु. (कों.) एक प्रकारचें गवत; एक पालेभाजी; हिचीं फुलें बारीक, पांढरीं व पोह्यासारखीं असतात.

कवडे लोभाण—पु. कवड्या ऊद; जाळण्याचा एक प्रकारचा धूप.

कवडेसाळेर—पु. (गो.) एक जातीचा पक्षी.

कवडी—पु. (माळवी) हुतूतूचा खेळ. यांत हुतुतु असें न म्हणतां कवड्डी, कवडड्डी असें म्हणतात. [ध्व.]

कवड्या ऊद्—पु. धुपाची पांढरी जात. कवडेलोभाण.

कवड्या-घणस-घोणस—पु. घोणस; सापांतील एक जात; याच्या अंगावर ठिपके असतात.

कवड्या लिंब—पु. लिंबाची एक जात.

कवड्या साप-सर्प—पु. अंगावर कवडीसारखे ठिपके असणारा साप.

कवण—प्रसना. (काव्य) कोण ? काय ? कोणता ? कोणीहि 'जैसें उसळलें कालकूट । धरी कवण ।' –ज्ञा १.८९. 'त्या द्रौपदेय वीर्ये न सुर नरांमाजीं तोषला कवण ।' –मोकर्ण ९.२३. 'ऐसा कवण नाहीं भांडला ।' –ऐपो ८९. 'पंख नसुनी सर्वथा पराधीन । कवण ऐशी वाढवी हरीविण ।' –विक १४. [सं. कः नु; कःपुनः] **कवणीकडे**–क्रिवि. कोठेंही. 'कां महाप्रळयीचें तेज वाढे । तैसें आपणेंनवीण कवणीकडे । नेदीची उरों !' –ज्ञा ११.१९४. **कवणीया**–कोणत्या; कोण्या. 'कवणीयापरि न निर्वेचे ।' –विनि ८.४५. **कवणियाचा**–कोणाचा. 'कोण तूं गा कोठील कवणियाचा' –र २४. **कवणु**–कोण. 'वाणौ कवणु जाणें ।' –दाव ७. [सं. कः पुनः–कउण–कवण–कोण. –राभाअ १८३३] **कवण्या**–कोणत्या ? 'विश्वोदर तूं तुला वहावा पट कवण्या हातीं' –विक २. **०गुणें**–क्रिवि. (काव्य) कां; कशामुळें; कोणत्या कारणासाठीं. 'कां माझा विसर पडला मायबाप । सांडियेली कृपा कवण्यागुणें ।'

कवणी—स्त्री. सुतार नांवाचा पक्षी.

कवणें—उक्रि. १ रचणें (ओळी, श्लोक, भाषण, ग्रंथ, कविता) जुळविणें; कवन करणें. 'मग कोण कवी न कवी कविता ।' –लीलावती. 'सुवर्णी जो वर्णी वद कवण वर्णी कवयिता' –र ९१. २ (गो.) गोळा करणें. [सं. कु–कवन]

कवणें—क्रि. (गो.) आलिंगिणें; कवेंत घेणें. कव पहा.

कवणें—स. कोणी. 'प्रपंच कवणें निर्मिला ।' –विपु २.१०१.

कवतिक-तीक-तूक—न. (काव्य) कौतुक; नवल; आश्चर्य; लीला. 'एऱ्हवीं एकही नुरतीं भूतळीं । कवतिका लागीं । –शिशु ७०२. 'आतां अर्जुना आणिकही येक । सांगेन ऐकें कवतिक ।' –ज्ञा २.३०३. 'भणोनि तें वाणितां कवतिकें । वाचे सौरसु न देखे ।' –ऋ ३८. 'एकु घरा नेउनि कवतिकें पांजरा घातला' –पंच ५.१. 'अवधारिजे कवतीक' –उषा २८.११. 'रामकृष्णें केलें कवतुक गोकुळीं । गोपाळांचें मेळी गाई चारी ।' –तुगा १६. [सं. कौतुक]

कवंद-दी—स्त्री. १ (राजा.) खपली; सालपट; पापुद्रा (जमिनीचा, गिलाव्याचा, फोडावरचा). वाळलेला फोड, पुळी. २ (बे.) वाकळ; गोधडी. [का. कवंदी=वाकळ]

कवदर-रीं—स्त्री. चवेणी व तिचें पान. रानकेळ पहा.

कवदो—पु. (गो.) टेंभा.

कवन—न. कविता; काव्य; पद्य; गाणें. त्याची जुळणी. 'स्तवन करी रघुनाथ तयाचें । कवन स्वीकारावें' –र ४२. २ (कु.) कल्पित गोष्ट. [सं.]

कवयिता—पु. कवि; काव्यकर्ता. 'सुवर्णी जो वर्णी वद कवण वर्णी कवयिता ।' –र ९२. [सं. कु–कवणें]

कवल-करार—कवल व तत्संबद्ध शब्दासाठीं कौल पहा.

कवल-ळ—पु. तोंडांतील घास. 'न बळ प्रेक्षी परि यतिहस्तींचा पाहतां गळे कवळ ।' –मोकृष्णविजय ८६.१२. 'शिष्य श्रवणीं कवळ भरी । उद्गार वचनें ।' –दा ५.२.१७ [सं. कवल=ग्रास; तुल. हिब्रू. कओम्हून=अन्न]

कवल-ळ—स्त्री. मिठी. 'घालुं दे कवळ बैस ये जवळ तुला मैतरणी ।' –प्रला २०८. [कव]

कवल-ळ—न. (कों.) भातशेतीची जमीन भाजण्यासाठीं ऐन, किंजळ, साग, बेहडा इत्यादि झाडांचे जे टाळे तोडून ठेवतात ते. राब. (क्रि० तोडणें; लावणें–भाजणें; जाळणें). 'कवळ तोडावयासी मजुरी असामी वीस एकून आकार पोटापुढा दर आणेप्रमाणे' –मसाप २.२.६५.

कवला-फोक, लसलशीत, कवलार-रू, कवलाघण, कवली, कवलुं—कौ खालीं पहा.

कवलिता—वि. रक्षणकर्ता; रक्षक. [सं. कवल]

कवसरी-ली-कुहिरी-ली—कवचकुहरी पहा. 'भुईकोहळे पांच शेर आणि कवसकुहिरीचें बी. पांच शेर एकत्र करून त्यांचें चूर्ण करावें.' –अश्वप १.१३९.

कंवसाल—न. कुभांड; कपट; कंवटाळ; किटाळ; बदनामी करणारें कपटजाल; जादु; युक्ति. 'कृष्णें कंवसाल केलें ।' –रास २.६४५. [सं. कौशल्य ?]

कंवसाली-ल्या—वि. कंवसाल करणारा; चेटका; कपटी.

कवळ—न. (कों.) टाळे; शिरडीं; शिरीं. कवल-ळ २ पहा. **०काठी**–स्त्री. १ राब. २ झाडपाला; हलक्या काटया; काडया; शिरीं, शिरकाठीं वगैरे. कवल-ळ पहा.

कवळ—पु. १ घास, कवल-ळ अर्थ १ पहा. 'मुखींचा कवळ मुखींजाण । माझें ध्यान लागलें ।' –एभा १२.११२. 'तयाचे मुखीं मिष्टान्नकवळ ।' –विउ ११.१३३. २ (मुठींत घेतलेली) वस्तु, (हातांत मावणारा) पदार्थ (गवत, लाकूड); मूठभर जिन्नस. 'कामधेनूसी शुष्क तृणकवळ ।' –रावि १.२२. ३ मध्यभाग;

गाभा. 'त्या मुसळाचा मध्यकवळ। चूर्ण नव्हेच अतिप्रबळ। उरला वज्रप्राय केवळ। तो समुद्रीं तत्काळ झुगारिला।' –एभा १.३८१. ४ टांच; (टांचेच्या) खालचा भाग; तळ. 'बालसूर्याचेनि उजाळें। तैसीं कवळें टांचांचीं' –एरुस्व १.२१. ५ (कु.) औषधी झाडाचा पाला वगैरे वाटून डोकीवर घालतात तो लेप, थर, पेंड. 'कांयांचा कवळ डोक्यावर घाल.' ६(चांभार) (मोटेच्या) डेऱ्यास सोंड जोरण्याचा सांधा. (कि० काढणें= सोंडेचें व डेऱ्याचें मेज बरोबर बसण्यासाठीं केलेली कापाकाप). ७ (गो.) गोळा.

कवळ—स्त्री. कावीळ; कामीण. (पित्तप्रकोपामुळें उत्पन्न होणारी). 'कवळें अभ्यासिला डोळा। तों चंद्रमा देखे पिवळा' –एभा १०.६३३. [सं. कामला]

कवळचें—क्रि. (गो.) कवळणें; मिठी मारणें.

कवळटें-ठा—नपु. (कों.) कवळासाठीं राखलेला बिन लागवडीचा डोंगराळ भाग. ०ठा–पु. राब. कवल–ळ २ पहा. 'गरीब रयतेस गुरें चारण्यास व कवळठा नेण्यासही मोकळीक देण्याची मारामार पडते.' –टि १.२०१.

कवळ—स्त्री. १ मिठी; आलिंगन; खेंव. 'पृथा देवी आणि सौवळी। स्नेहें मिळाल्या खेंवकवळीं।' –मुआदि ४५.११९. 'दोघे मिसळले केशकवळी.' –मुविराट ३.१४१. २ नांगराच्या रुमणीची खीळ; पाचर. [कव]

कवळणी—स्त्री. (कों.) गोळा करणें; कवळणें. [कव]

कवळणें—उक्रि. १ (गो. कवळचें) पकडणें; कवटाळणें. 'शीघ्र रथावरुनि उडी टाकी कवळुनि शक्ति मुखनि गदा।' –मोभीष्म ९.५४. 'नांगरीं कवळी मग आउतें वोढी.' –उषा १४९७. २ (राजा.) एके ठिकाणीं जुळविणें; रास करणें (विस्कटलेल्या वस्तूंची). ३ (काव्य) तोंडानें धरणें; दाढेंत पकडणें; गिळणें. 'सर्पानें मंडूक कवळिला।' ४ व्यापणें. 'हे तिन्ही एकवटले। तेथ शब्दब्रह्म कवळलें।' –ज्ञा १.२०. ५ आकलन करणें. 'परी अपराधु तो आणिक आहे। जें मी गीताथें कवळुं पाहें।' –ज्ञा १.६६. [सं. कवल]

कवळणें—सक्रि. आलिंगन देणें; मिठी मारणें. 'सुहृद तो विश्वपाळ कवळावा' –मोउद्योग ७.९. 'स्नेहें धावोनि लवलाही। मातें कवळी दोन्हीं बाहीं।' 'सखा माझा मातें कवळि बहु दाळनि ममता।' –विवि १८७६.१.२०. [कव]

कवळपट्टी—स्त्री. (ढोर) मोटेच्या सोंडेची मोठी पट्टी.

कवळा—पु. १ घास. कवल–ळ अर्थ १ पहा. २ राब. कवळ अर्थ ३ पहा. ३ (गो.) वळकटी. [कवल]

कवळा—वि. कोवळा. –पु. माडाच्या, ताडाच्या झाडाचा रील शेंडा(जेथें नारळ धरतात व जेथून झापे सुटतात तो). [सं. कोमल]

कवळाचें सळ—न. (ढोर) मोटेची सोंड व डेरा एकत्र करावयास लागणारें सळ.

कवळास—पु. (गो.) दसऱ्यानंतर उत्सवसमाप्तीच्या वेळीं देवाच्या अवसरावरून विडा इ० प्रसाद कल्याणार्थ घेणें. ०णें–उक्रि. १ उत्सवसमारंभ आटोपल्यानंतर गणपती अथवा गौरी यांच्या मूर्तीचें तळ्यांत अथवा नदींत विसर्जन करणें. २ (बायकी) मंगळगौरीची पूजा झाल्यावर दुसऱ्या दिवशीं ती बोळवावयाच्या पूर्वी तिची मूर्ति उठविण्यासाठीं हलविणें, विसर्जन करणें; पूजापत्री वगैरे एकत्र काढून देवी वेगळी काढणें. [सं. कवल]

कवळी—स्त्री. १ कवळ याचें लघुत्वदर्शक रूप; वेंघेंत मावणारा गवत, लांकूड इ० पदार्थ. २ मिठी; वेंग; झडप. 'महा काळेशीं कवळी। देओ पातांती।' –शिशु ८७९. 'उच्चपणें देतीं कवळीं। धूमंडळासीं॥' –शिशु ३२२. ३ दातांची पंक्ति, रांग. ४ पांचशें अथवा साडेपांचशें (विड्यांच्या) पानांचा पुडा. 'तर मग बहुधा रामटेकच्या पानांची कवळी आली असेल.' –तोबं ६९. ४ पानांचा लहानसा पुडा, गुंडाळी. ५ कानांतील एक दागिना. ६ (कु.) नांगराच्या रुमणीची खुंटी. ७ नांगराच्या रुमणीची खीळ. ८ (गो.) घट्ट जमीन. ९ (कों.) माशाची एक जात. हे मासे ऑक्टोबर, नोव्हेंबरांत पकडतात. १० घास. [सं. कवल] ०करणें–क्रि. (व.) रवंथ करणें.

कवळी—स्त्री. पोटांतील रोग; कावीळ. [सं. कामला]

कवळी—वि. कोवळी. 'बारे तनू असतां कवळी। परी शयनाहूनि उठसी उषःकाळीं।' –नव २२.१६३. [सं. कोमल]

कवळु—पु. स्पर्श. –शर (नागा ३८२).

कवळो—पु. (गो.) अंथरुणाची गुंडाळी, बळकटी. कवळा पहा. [सं. कवल]

कवळ्या—वि. (गुऱ्हाळ) उसाचीं कांडीं अथवा पेरें गोळा करून कांडेकऱ्यापाशीं (चरकांत लावण्यासाठीं) नेऊन देणारा. [कवळ]

कवा—पु. कॉफी किंवा बुंद शिजवून तयार केलेला अर्क; एक पेय. [अर. कह्वा]

कवा—क्रिवि. (कुण.) केव्हां. 'बाऱ्या वक्ताला इस्तरी राज कवा व्हत.' –वाय २.३. [सं. कदा]

कवाइती-दी, कवाइतदार-दार—वि. लष्करी डावपेंचांत निष्णात, तरबेज; परंतु खोल बुद्धीचा; युक्तिबाज; कारस्थानी अशा माणसाबद्दल पुष्कळ वेळां योजतात. [अर. कवाईद]

कवाईत-द—स्त्री. १ शिस्त; लष्करी हालचाली, रचना; युद्धकलेचें शिस्तीचें शिक्षण. २ (ल.) शकल; युक्ति; हिकमत. [अर. कवाईद]

कवांकी—स्त्री. (कु.) एक जातीचा पक्षी.

कवाटी—स्त्री. (कों.) आलिंगन. [कव]

कवा ठाचन—क्रिवि. (माण.) केव्हांपासून.

कवाड—न. १ दार; दरवाजा. ' नेत्रद्वारींचीं कवाडें लागूं पाहती । ' –ज्ञा ६.२०२. ' मनीं लागलें हें ध्यान । कवाड केव्हां उघडे हें । ' –दत्तपदें भूपाळी, पृ. ८. ' घाली कवाड टळली वाट रातीं. ' –तुगा १२१. २ (व) दरवाज्याच्या फळ्या; कावड. माळवी किवाड. (क्रि० घालणें; लावणें). [सं. कपाट; प्रा. कवाड; हिं. किवाड; गु. कमाड; पं. कवाड]

कवाडी—स्त्री. लहानसें कवाड; कामटयांची किंवा गवताची केलेली ताटी; शेताचें फाटक; परसाचा झांपा. [सं. कपाट]

कवाडी—स्त्री. विटीदांडूच्या खेळांतील एक शब्द. कवडी पहा.

कवाणी—स्त्री. सुतार पक्षी. कवणी पहा.

कवाता-तो-था-थो-ठी—पु. १ (कों. कु.) माडाचें लहान झाड; रोपटें; नारळ लागण्यापूर्वीचें अडीच हात उंचीचें झाड. २ (गो.) नारळाच्या झाडाचा कोंब. ३ (कों.) पोफळीचें रोप. ४ (कों.) नारळाच्या रोपास नवीन फुटलेलीं पहिलीं तीन पानें.

कवाधरन—क्रिवि. (माण.) केव्हांपासून; फार वेळपासून.

कवाथी-काथथी—स्त्री. पोफळीचें रोप.

कवायत—स्त्री. १ युध्दविषयक सामुदायिक हालचाल; सैन्याची कसरत; कारवाई; कवाईत पहा. 'लढाईचे समयीं कवायतीनें चालावें ' –रा १०.६५. २ नियम; पद्धति; युक्ति; शिस्त. ' सखारामपंतानी कवायत धरली आहे जे. ' –ख ५.२६२५. [अर. कवाइद=काइदाचें अव]

कवायती; कवाइती-कवाइतीत—वि. १ कवाईत शिकलेला. ' काळे कवाइतीत दहा-पांच नित्य येतात. ' –रा १०. १९१. २ (गो.) कावेबाज; कारस्थानी. [अर. कवाइद्]

कवारी—स्त्री. (गो.) कापलेल्या लाकडाची भेग मोठी होण्यासाठीं आंत ठोकलेली मोठी पाचर. कावर पहा.

कवाल—पु. १ ख्याल गाणारा गवई. ' कवालाचें गायन ऐकून...वर्खा जाले. ' –रा ७.५०७. २ ख्याल नांवाचें मुसलमानी गाणें. [अर. कव्वाल्]

कवाला—पु. जमीन, घर वगैरेचें क्रयपत्र; खरेदीखत; सौदापत्र; दस्तऐवज; कबालत. कबाला पहा. [अर. कबाला]

कवाली-ख्याल—स्त्रीपु. कवाल गवई जें गाणें गातो तें; ख्याल. (क्रि० गाणें.) [अर. कव्वाल्]

कवाली—वि. कवालासंबंधीचें.

कवासो—पु. (गो.) केवडा; केतकी. [सं. केतकी]

कवाळ—न. १ (कु.) राब; कवळ. कवल-ळ पहा. २ (क.) वाळलेल्या काटक्यांचें ओझें.

कवाळा—पु. (कु.) कवळा अर्थ २ पहा.

कवाळु—पु. (कों.) नारळाचें चोड सोलून कावल्यावर त्यांतून निघणारा कोवळा नारळ.

कवि—पु. १ रसालंकारविशिष्ट रचना करणारा; काव्यकर्ता; शाहीर, ' जें न देखे रवि तें देखे कवि. ' २ (ल.) पंडित; जाणता; ज्ञानी. ' स्वपरांच्या भूषणासि कवि ठाळी । ' –मोआदि ८.३५. ' हा प्राकृत पुरुष नव्हे सांगावें काय म्यां तुला कविला ' –मोकर्ण २२.३८. ' फार तर काय पण कवि या शब्दाचा अर्थ शहाणा असाहि पुढें होऊन गेला. ' –नि ३४. ३ शुक्राचार्य; दैत्यगुरु. 'झाला ययाति कविचा जामाता तीच सत्कया परिसा । ' –मोआदि ९.६.४ (ल.) विदुर. ' नमुनि कवि म्हणे राया न भूत-विचार हा मला रुचला । ' –मोसभा ३.४९. 'तेथें ज्ञान विशारद शारद शशि गौर गौरवाई कवी । ' –मोसभा १.१२. [सं. कु=शब्द करणें–कवि] ०**नैरंकुश्य**–न. कवीची निष्प्रतिबंधता; कविस्वातंत्र्य. [सं.] ०**समय-संकेत**–पु. निसर्गीत विद्यमान नसलेल्या अशा कांहीं गोष्टी आपल्या प्राचीन कवींनीं कल्पिल्या होत्या त्या; कविकल्पना. ' गगनांतले सगळे देव गगनकुसुमाप्रमाणें खोटे आहेत. ते मानणें हा एक कविसंकेत किंवा सुजनसंकेत आहे. ' –सुदे ११९. ०**हीर**–वि. कविश्रेष्ठ, कवींमध्यें हिऱ्यासारखा; मोठा कवि.

कविजा—पु. कलथा; उलथण्याचें साधन. [अर. कब्ज्= उलथणें, परतणें]

कविजा—स्त्री. शुक्राचार्याची मुलगी देवयानी. [सं. कवि+ जन्]

कंविथ—न. कवंठ पहा.

कवित-ता-त्व-त्र-कवीत—नस्त्री. १ कवन; काव्य; पद्य; आल्हादकारक पद्यरचना; रसयुक्त वाक्यरचना. २ प्रतिभासंपन्न (गद्य, पद्य,) रचना. ' जेणें अनुताप उपजे । जेणें लोकिक लाजे । जेणें ज्ञान उमजे । या नाव कवित्व । ' –दा १४.३.४८. [सं.]

कवित्वाशक्ति—स्त्री. प्रतिभा; काव्यरचनेचें सामर्थ्य; स्फूर्ति. [सं.]

कवित्व—कविता पहा. ०**करणी**–स्त्री. (काव्य) काव्य रचनेंतील चतुराई. ०**कला**–स्त्री. १ कवितेची कला; कवितेंतील सरस पद्यरचना, खुबीदार अर्थबोध, मनावर ठसण्यासारखी वर्णनपद्धति वगैरे गुण; काव्यरचनेंतील कौशल्य, सौंदर्य. २ कवितेंतील रसपरिपोष. ३ कविता शक्तीपासून स्वाभाविकपणें उद्भवणारी (कवीच्या मुखावरील चमकणारी) शोभा, तेज, चमक, दीप्ति. [सं.]

कविलास—पु. कैलास या शब्दाचा अपभ्रंश. –हेको.

कवींठ—न. १ कवंठ पहा. 'जैसें कां कवींठ घातलें वडवानलीं–ज्ञा ११.४३३. २ (खा.) लहान खरबूज.

कवीदील—वि. शक्तहृदय; निर्भय; धीट; शूर. [अर. कवी=सशक्त; सामर्थ्ययुक्त,+दिल्=मन]

कवीशा—वि. (व.) कैदाशीण. [सं. ककैश]

कवीहाल—वि. बेशक; निःशंक; धीट. 'तुम्हीं कवीहाल होऊन आपल्या वतनावरी येणें।' –रा १७.३४. [अर. कवी=सशक्त, बळकट, फा. हाल=धीर, धीटपणा]

कवूल—न. (छपरावरील) कौल; कऊल.

कवेड—न. (गो.) झोंपडीचें दार; कवाड पहा.

कवेश—पु. (कवीश अप.) पति; नवरा. 'व्यर्थ दिवस जातात खबर सांगा माझ्या कवेशा।' –होला १११.

कवेळ—न. (गो.) लेप; थर; पेंड. कवल पहा.

कव्य—न. पितरास अर्पण करावयाची वस्तु, अन्न वगैरे. [सं.]

कव्हर—क्रिवि. (मुंबईच्या आसपास, कुण.) कोठवर; कोठपर्यंत; किती लांब (स्थळ व अवकाश यांसंबंधीं). [सं.कुत्र किंवा कदा+वर]

कव्वा—वि. (ना.) कावेबाज; धूर्त. [हिं. कव्वा=कावळा]

कव्ह—न. (व.) निर्मळीचें बीं. (कवणा पहा.)

कव्ह-व्हा-ळ—न. वेढा; गवसणी. 'आकाशासि कव्हळ। पडोनि ठेलें।' –ज्ञा ११.३५९. [कवळ]

कव्हण-णा-णी—कोण? कोणा? कोणी? 'कव्हणांहि न चिंती वीरू' –शिशु ८६८. 'तया येसणा बलिष्ठु। नाही कव्हणीं।' –गीता १.९०१. [कोण]

कव्हणी—क्रिवि. १ कोठेंहि. 'कव्हणीं सुक्षेत्र नाहीं ऐसें। जेथ फीटे भवपाशें।' –ऋ १९. २ कोणत्या; कोण्या. 'कव्हणी एकी वेळीं।' –शिशु ३८.

कव्हणें—क्रिवि. कोणतें, कोणत्या. 'तरी आलेंति कव्हणें कांजे।' –शिशु ११८.

कव्हेरी—क्रिवि. (ना.) किती वेळपर्यंत? कोठपर्यंत? कव्वर पहा.

कव्हा—पु. बुंद; कॉफी. कवा अर्थ १ पहा. 'शहाजादे यासही कव्हा यावा' –रा ५.२२. [अर. कहवा]

कशा—पु. १ चाबूक; कोरडा; 'चाल उगीच प्रभुसीं हट करितां पाठिसीं कशा लागे।' –मोसभा ५.८. 'क्षत्रिय तेज असें हें जें तुजला पीडितें कशापातें' –मोआदि ३२.२२. २ कमरपट्टा. –शर [सं.]

कशा—पु. (बायकी) कोवसा (अप.) पक्षपाती काम पत्करणारा; सुड घेणारा किंवा रक्षण करणारा; विशेषतः भांडणतंट्याला फूस देणारा.

शको. २. २१

कशाचा—वि. (काय) कोणत्या वस्तूचा, गोष्टीचा, जातीचा, प्रकाराचा, तऱ्हेचा? 'हा रुपया कशाचा तर चांदीचा.' [सं. कस्य]

कशा(सा)य—पु. काढा. [सं. कषाय]

कशाला—क्रिवि. कोणत्या गोष्टीसाठीं? कां? काय म्हणून. [कसा]

कशास—क्रिवि. कशाकरितां? 'जया बहु तयास या मज कशास मी हांवरा।' –केका १४. [कसा]

कशि(शी)दा—पु. वेलबुट्टीचें काम; वस्त्रावरील दोऱ्यानें, रेशमानें किंवा जरीनें केलेलें नक्शी काम; भरतकाम; खडीचें काम (वस्त्रावरील). [फा. कशिदह]

कशी—स्त्री. (राजा. कुण.) नाचणी वगैरेचें झोडपून दाणे काढून घेतलेलें कणीस; पिशी.

कशी—स्त्री. कांचणी; जाच; जिकीर. –शर [सं. कष्]

कशीश—स्त्री. ओढ; हट्ट; आढेवेढे. 'नबाबाचे प्रकृतींत कशीश फार आहे.' –रा ५.१७१. [फा. कशिश्=आकर्षण; विरोध]

कशेट-ड-रु—न. बरूसारखें एक तृण. [सं. कशेरु]

कशेय—क्रिवि. (गो.) कसाही; कांहीं तरी करून. [कसा]

कशेरु—पु. (शाप.) पृष्ठवंश; (सामाशब्द) कशेरुकंठक–धन–पार्श्वशृंग–बाहु. [सं. कशेरु=पृष्ठवंश]

कशेला—वि. १ कसला (अप.) कशासारखा; कसल्या जातीचा, प्रकाराचा, पद्धतीचा.

कशेला—पु. १ (ना. व.) वाटोळा गडवा; लहान लोटा; वाटोळ्या बुडाचा घडींव तांब्या. 'कशेला फुटका निघाला' [कलश?]

कशो—स्त्री. (ना.) कस.

कश्चन, कश्चित्—सना. कोणी एक; कोणी तरी एक; अमुक. [सं.]

कश्मल-ळ—न. १ घाण; कचरा; दूषित वस्तु. 'जैसा गांवींचिया कश्मळा। उकरडा होय येकवळा।' –ज्ञा १८.६५०. –वि. आक्षिप्त; खराब झालेलें. 'तें कश्मळ आठवी। आचरण जें।' –ज्ञा १८.६२०. 'पाहतां देहो अतिकश्मल' –एभा २०.१४६. 'कवण वधु वरीते, कश्मला कोणपा या?' –आसि ३८. २ पाप; मल; दोष. –वि. पापी; दूषित; अमंगल. [सं.]

कश्यपीं लागणें—क्रि. कच्छपीं लागणें या रूपाचें चुकीचें रूप. आश्रय घेणें; मागें लागणें. कच्छप पहा.

कश्याक—क्रिवि. (हेटकरी) कशाला?

कष-पाषाण—पु. ज्या दगडावर घांसून सोनें वगैरे धातूंच्या शुद्धतेची परीक्षा करतात तो दगड; कसवटीचा दगड. [सं. कष्=घांसणें+पाषाण]

कषा—पु. (व.) काढा. [सं. कषाय]

कषाय—पु. १ औषधी वनस्पतींचा काढा; अर्क. २ गेरूचा रंग. [सं.] –वि. १ तिखट; चुकीनें कडवट. २ (काषाय अप). गेरू अथवा कावेच्या रंगाचें; ३ कलुषित; बेरंग; विचलित (चित्त वृत्ति, तादात्म्य).

कष्ट—पु. १ शारीरिक श्रम; त्रास; आयास; प्रयत्न; मेहनत; परिश्रम. ' कष्टेविण फळ नाहीं । कष्टेविण राज्य नाहीं । ' –दा १८.७.३. २ थकवा; शीण; श्रम (शारीरिक; मानसिक); दुःख; अस्वस्थता (सामान्यतः अव. प्रयोग). ३ दुःख; व्याधि; संकट. [सं. कष्=घांसणें] ०करी–पु. मजूर; अंगमेहनतीचें, दगदगीचें, हलक्या दर्जाचें काम करणारा; कामकरी.

कष्टणें—अक्रि. १ फार अंगमेहनतीमुळें, काबाडकष्टामुळें थकणें; दमणें; प्राण कासावीस होणें. २ (मनांत) दुःखी होणें; अतिशय कलेश, त्रास होणें. ' बहु कष्टली शब्द कारुण्य बोले । ' –दावि ४९६. ३ श्रम, आयास करणें; हाडाचीं काडें करणें; रक्ताचें पाणी करणें (अंगमेहनतीमुळें, अंगमेहनत करून). [कष्ट]

कष्टसाध्य—वि. अति श्रम किंवा मेहनत केल्यावांचून सिद्धीस न जाणारा; मेहनतीचा; त्रासदायक. [सं. कष्ट+साध्य]

कष्टाची धण—स्त्री. श्रमाची, मेहनतीची समृद्धि होईल असें काम; जिच्यापासून कांहीं फलप्राप्ति नाहीं पण केवळ मेहनत पडली अशी गोष्ट; विफल श्रम.

कष्टार्जित—वि. श्रम करून मिळविलेलें. [सं. कष्ट+अर्जित]

कष्टाळू—वि. मेहनती; उद्योगी; परिश्रम करणारा. [सं. कष्ट+आलुच्]

कष्टी—वि. १ कष्टाळू. २ त्रासदायक; मेहनतीचें. ३ शिण लेला; थकलेला; खिन्न; व्याकुळ; दुःखी. ' म्हणउनि होतों क्षणोक्षणें कष्टी । ' –मोकर्ण १.१५. –पु. (गो.) मजूर; माडाची सूर काढणारा नोकर.

कष्टीक—वि. (व.) कष्टाळू; मेहनती.

कस—पु. १ सामर्थ्य; तकवा; जोर; जोम; हंशील; अर्थ; पाणी; चांगुलपणा; (शरीराचा) जोम; पाणी; बल; शक्ति; सामर्थ्य. ' नामापुढें उरावयालागीं । कस त्याचे अंगीं असेना । ' –एभा २८.३९१. (एखाद्या वस्तूचें) सत्त्व; पुष्टिदायक जोमदार, पुष्टीकारक, जोमदारपणा उत्पन्न करणारा तत्त्वांश (जमिनींत धान्योत्पादक अंश, धान्यांत अन्नांश, दुधांत स्निग्धांश इत्यादि प्रमाणें). अभ्यासांही लागीं । कसु नाहीं तुझिया आंगीं । ' –ज्ञा १२.१४. 'गाईपेक्षां म्हशीचें दूध कसाला जास्त '; 'नदीकांठची शेतजमीन कसाला चांगली असते. ' २ फलदायकता; व्यापार धंदा, यांच्यापासून योग्य प्राप्ति; कूस. ३ कसोटीवर लावून सोन्याची किंवा रुप्याची ठरवलेली योग्यता, गुण; शुद्धतेचें प्रमाण व ही शुद्धता ठरविण्यासाठीं त्या दगडावर मारलेली रेघ; घांसलेला भाग. ' या महातेजाचेनि कसें । जरी चोखाळु प्रतिबिंब दिसे । ' –ज्ञा ४.१८०. ' हें सोनें कसाला जास्त भरेल. ' (क्रि० उतरणें; लागणें). ४ परीक्षा; ' तुजविणें दुसरें दिसतें न ज्या । जन कसा न कसा उतरे तुम्ह्या ? ' –लेलेशास्त्री. ' जरी उतरेल माझ्या कसी । ' –मुवन (नवनीत, पृ. १८४). –स्त्री. ५ कचक; लचक; उसण. (क्रि० भरणें). ६ (गो.) रेती. ७ (चि.) अवशेष; कसर. [सं. कष्=घांसणें]

कस—पु. व्यक्ति; जण; असामी. ' कुणबीण कस एक. ' [फा. कस्]

कस—क्रिवि. (कातकरी) कोठें ? ' तूं आहास कस ? '

कंस—पु. १ वर्तुळाचा, परिघाचा भाग, अंश, तुकडा; ([ ] यांपैकीं कोणतेंहि चिन्ह; कुंडली. २ वर्तुळाची ज्या. ३ श्रीकृष्णाच्या मामाचें नांव; मथुरेचा एक राजा. [सं.]

कसई—स्त्री. कासई; कसाड; एक प्रकारचें जाडें गवत; याचा उपयोग कूड घालण्याकडे करतात. कशेट पहा. [सं. कशेरु]

कसकस—स्त्री. १ ताप येण्याच्या पूर्वी अंग मोडून येणें, व दुखणें; सामान्यतः शरीर, अवयव दुखणें. (क्रि० येणें; भरणें). २ शिरशिरी; हुडहुडी (भयंकर गोष्ट पाहिल्यानें किंवा ऐकल्यानें येणारी). (क्रि० येणें; वाटणें; भरणें). ३ भय; काळजी; दुःख; हुरहुर. (क्रि० लागणें.) [ध्व.]

कसकसचा-ला—वि. कोणत्या प्रकारचा-पद्धतीचा-रीतीचा ? कशासारखा ? कसा ? [कसा द्वि.]

कसकसणें—अक्रि. १ शरीर किंवा अंग दुखणें, मोडून येणें (दुखापतीनें, पक्षघातानें, दगदगीनें, अति श्रमानें). २ ताप येण्यापूर्वी शिरशिरी, हुडहुडी भरणें. ३ शहारे येणें, भरणें; शिवशिवणें. [ध्व.]

कसकसा—वि. १ कसकसचा पहा. [कसा द्वि.] –क्रिवि. २ कसा; कोणत्या अर्थानें ? ' तूं कसकसा गेलास, त्यानें कसकसें सांगितलें ? '

कसकुसणें—क्रि. कुसकरणें. ' तुआं गोकुळींचां भानवसी । देत्यांचीं मोरांडी कसकुसीं । ' –शिशु ४३५.

कसचा—वि. (कधीं कधीं काय किंवा कधीं कधीं कसा यांचें विभक्ति-रूप). कशाचा; कोणत्या गोष्टीचा, वस्तूचा; कोणत्या प्रकारचा, जातीचा, तऱ्हेचा.

कसणी-नी—स्त्री. १ बांधण्याची दोरी (एखाद्या ओझ्याची, गोणीची, गठ्ठ्याची, चोळीची) बंधन; पाश; बंद. ' साठविलें तें सांडिल क्षणीं । यालागीं कंचुकी गोणी । माजीं दाटोनि कसणी । विरडें कशी सुबद्ध । ' –मुरंशु ४८. ' दाटले त्रिगुणाचे कसणी ।

कृष्णावांचोनी कोण सोडी।'–एरुस्व ७.४१. २ कसा; लांबट व अरुंद अशी पैसे ठेवण्याची पिशवी. **म्ह०** (व.) कसणी ढिली करावी लागेल=पैसा खर्च करावा लागेल. ३ सुतारांची सामग्री ओढण्यासाठीं काठीला दोरी बांधून केलेली धनुकली. ४ काढणी; दोरी. **०ची चोळी**–स्त्री. काचोळी. 'साडया साउलीं पातळें गोंडे कसणियाच्या चोळया। बुंथी घेउनी सकळां कळंबा-वरी पळे।'–तुगा १३३. [सं. कर्ष्] **कसण्या-मी**-अव. (विण-काम) (अव.) हत्त्येच्या खिळया (बाजूच्या खुंटया) गुड व पान (हत्त्येची वरील पेटी) यास बांधण्याच्या दोऱ्या. [कसणी अव.]

कसणी—स्त्री. (कसणें या उक्रि. चें धातुसाधित नाम) कसोटी; पारख; परीक्षा. 'रोज लष्कराची तपासणी व कसणी करीत।'–मदमं २७२. [सं. कष्=घांसणें]

कसणु(नु)सा-कसनसू—वि. ज्याचें स्वरूपाविष्करण होत नाहीं असा. कसाचसा पहा.

कसणें—उक्रि. १ घट्ट बांधणें; दोरानें अथवा दोरीनें घट्ट आवळणें; करकचणें; जोरानें ओढणें; धरणें. 'गुलालाचे हौदे भरुनिया खुप कसले हस्तीवरी।'–ऐपो २०३. 'मारी सोटे घेतो झोले बैल भाडयाचा कसावा।'–अफला ६८. 'पाहुं म्हणे राजया। तोंर कसुन सोडला.''वांच्छी चाप कशी मनीं स्थिति कशी'–आसी ५५.'धोंडा किंवा टोला कसुन मारला. २ (शेत) करणें. ३ घट्ट बांधणें; नेसणें. 'कांसे कशिला सोनसला।'–एभा ३.५७१. 'जन कासया विते सुत कसिते न करावया भजन कास'–मोविराट ५.२२. [सं. कर्ष्]

कसणें—उक्रि. १ (सोनें वगैरे) कसोटीवर घासून पाहणें; परीक्षा करणें. २ कसून परीक्षा घेणें; कडकपणें तपासणें; नाना प्रकारांनीं चाळणें, छाननें; उलट सुलट प्रश्न विचारणें; सामान्यतः परीक्षणें; तपासणें. 'कसोनि पाहे रुक्मिणी रमण। टाकितो भजन काय माझें।''राजा बलातें कशी।'–आसी ७. ३ झटून मिळ-विणें. 'मग शरण रिघून त्यातें। योगालागीं कशीन कीं।'–नव १४.१०३. –अक्रि. १ काटक, सहिष्णु, मजबूत होणें (श्रमामुळें व्यायामामुळें–शरीर). चांगला सराव किंवा तरबेजपणा असणें व त्यामुळें निःश्रमत्व अंगीं येणें. [सं. कष्=घासणें]

कसणें—क्रि. कसकसणें; दुखणें; ठणकणें (शरीर अथवा अवयव).

कसद—पु. हेतु; विचार; निश्चय. 'दुसरे रोजीं ... ठाणें खालीं देखोन कसद ठाणीं घेण्याचा केला.'–रा १५.२०. [अर. कस्द=हेतु, इच्छा]

कसदार—वि. ज्यांत सार, सत्त्व, बळ, जोम, चांगुलपणा आहे असें; सत्त्वयुक्त; सरस; बलिष्ठ; भरींव; सकस. [कस+दार]

कसंदी—स्त्री. (व.) तिखटाची भुकटी. कसुंदी पहा.

कसना—क्रिवि. (कातकरी) कोठला? कसला? 'शिपाई सांगह तूं कसना।'–मसाप २.१.३२. [कसा]

कसपट—न. (लाकूड वगैरेचा) लहान कण; सालपट; केर; गवताचा तुकडा; धान्याचे कण; तूस. 'बायको धमकट दादला कसपट'–**टाप्रमाणें मानणें, मोजणें, लेखणें, गणणें, धरणें**–तुच्छ मानणें; क्षुद्रवत् लेखणें.

कसब—न. १ धंदा; व्यापार; काम; उद्योग; कला. 'कसबे व व्यापार होई'–शालोपयोगी नीति ११८. २ चातुर्य; हुषारी; कौणत्याहि कर्मेत नैपुण्य; करामत (लिहिणें, घोडयावर बसणें, पोहणें यांमधील). 'शिपाईगिरीचें कसब जेथें, तेथें लिहिण्याचें कसब मनसब्याचें उणें असतें'–खरे ६.२६५६. ३ वेश्येचा धंदा; शरीरविक्रय. ४ हिकमत; कावा; शक्कल (लबाडीची). ५ रुप्याची बारीक तार; (सोनेरी रुपेरी) कलाबतू. [अर. कस्ब] **०चिट्ठी**–स्त्री. वेश्येला आपला धंदा चालविण्याबद्दल दिलेला परवाना, पत्र. **०चोर**–पु. अप्रामाणिकपणानें काम करणारा; चुकारतटूंद; आपलें कौशल्य पुरतें खर्च न करणारा; सुमार-वट काम करणारा. **०चोरी**–स्त्री. १ कसबाची चोरी; फसवाफ-सवी; लबाडी; कपटानें किंवा लुच्चेगिरीनें पूर्ण कौशल्य न दाख-विणें. २ सोनार, कुळकर्णी, वाणी वगैरे लोक आपल्या धंद्यांतील कौशल्यानें दुसऱ्यांशीं जी लबाडी करतात ती.

कसबा-बे—पु. १ परगणा किंवा महालाचें मुख्य ठाणें; शहरांतील जुनी वसाहत, वस्ती; नव्या वस्तीहून भिन्न; जुनें गांव. 'कसब्याचें गांव मौजे गांवापेक्षां अधिक विस्तृत व रोजगारयुक्त असतें.'–गांगा २. [अर. कसबा]

कसबाती—वि. १ धूर्त; कावेबाज; लुच्चा; हिकमती (कला किंवा कपट यांत). २ (अनिश्चित) कसबी; हुशार; चलाख; कुशल (कारागीर). 'कसबाती लोक'–समारो ५.७. [कसब्]

कसबी—वि. चतुर; हुशार; तरबेज (कला, कामांत) गुणी; कारागीर; हुन्नरी. 'गलवतें बांधणारे मोठे कसबी व खलाशी फारच हुशार असतात.'–पान्ह १०२. [अर. कस्ब]

कसबीण—स्त्री. नाचणारी स्त्री; वेश्या; शरीरविक्रय करून त्या पैशावर चरितार्थ चालविणारी स्त्री. कलावंतीण पहा. [कसब]

कसम—स्त्री. शपथ; प्रतिज्ञा. (क्रि० खाणें). 'यांहीं कसम खाऊन सांगून पाठविलें कीं ...'–रा १.४६. [अर. कसम]

कसमस-सा-साट—स्त्री १ रग; जोर. 'विषयांचा विसर पडे। इंद्रियांची कसमस मोडे।'–ज्ञा ६.१८८. 'तऱ्हीं खेळाचेनि कसमसाटें। कांहीं जाणिजे ना।'–शिशु ७१३. २ चांचल्य. ३ दाटी. 'आंगिचेनि कसमसाटें।'–शिशु ७११. ४ (ल.) झळाळ; चकचकीतपणा. 'कांतिचिया कसमसा। सुधाकरेसि सरि करि आरिसा।'–भाए ६४६. [कस]

कसमसा—वि. क्षुद्र. 'हा लोक हो कसमसा करितो बकाया।' –अकक हरिराज मुद्रलायींचें भाषांतर २५.

कसमळ—स्त्री. मळ; घाण. 'अवघाच माल खळ्यांत आणून कसमळ काढून स्वानंदाची रास करणें।' –भज १२३. –वि. ओंगळ; ढराचारी. 'नये राहों उभें कसमळापाशीं।' –तुगा २६९. [स. कश्मल्]

कसय—स्त्री. (गो.) गाळ. [कस]

कसर—स्त्री. १ न्यूनता; उणीव; कच्चेपणा; अपुरेपणा; चूक (मापांत, वजनांत, काम पुरें करण्यांत, हिशेबांत इ०). 'तूं जोजण्यामध्यें कसर करूं नको' (क्रि० राहणें; येणें; निघणें). २ अंश; लेश; किंचित् भाग; थोडीशी बाकी. 'पागोटयाचा रंग पुरतेपणीं गेला नाहीं, कांहीं कसर आहे.' 'ज्वर गेला परंतु कांहीं कसर राहिली आहे.' ३ आधिक्य; नफा; फायदा. 'दहा तोळे घेऊन विक्री केली त्यांत मासाभर कसर राहिली.' 'त्या रुपयांत कसर मिळाली.' 'त्या व्यापारामध्यें माझी कसर सुडाली.' ४ (हिशेबांत) दोन्हीं बाजूंच्या बेरजा बरोबर होण्याकरितां कोणत्या तरी बाजूंतून काढलेली किंवा मिळविलेली रक्कम. 'जमेंत कसर होऊन .....' –रा.१०.३४१. ५ तापाची कणकण; कडकी (ताप येण्यापूर्वीची किंवा ताप गेल्यानंतरची). 'सरदीची हवा यामुळें कसर येते.' ६ चिक्कूपणाची काटाकाट; छाटाछाट; काट; कपात. ७ अप्रामाणिक, अयोग्य मार्गानें मिळविलेला पैसा; उपटलेली रक्कम; मधल्यामध्यें चावलेला पैसा; लांच; गैरवाजवी फायदा. ८ कागद किंवा कापड खाणारी एक कीड. 'कपड्यास कागदास, भातास पिठास तांदुलास वगैरेस खाणाऱ्या कसरीच्या आळ्या भिन्न भिन्न जातींच्या असतात.' –प्राणिमो ११४. ९ कर्जमित्तीचें व्याज; जसजसें मुद्दल जमा होईल तसतसें त्यावरील व्याज बंद करण्याचा प्रकार. १० कामामध्यें कुचराई, चालढकल. 'कोणीहि लढाईमध्यें अणुमात्र कसर केली नाहीं.' 'आपला निरपेक्ष उत्तम सल्ला देण्यास कसर केली नाहीं.' –नि ९९७. [अर. कस्र] ०**काढणें**–क्रि. कमीपणा भरून काढणें; एखाद्या धंद्यांत किंवा गोष्टींत आलेला किंचितसा तोटा किंवा उणीव दुसऱ्या धंद्यांत किंवा गोष्टींत भरून काढणें. ०**करणें**–(व.) १ काटकसर करणें. २ ज्वरांश येणें. ०**येणें**–अंगावर कांटा उभा राहाणें; बारीक ताप येणें (गो.) कसरवें. ०**लागणें**–कसरीच्या किड्यानें पदार्थ खाणें. ०**कुसर-कुसरात**–स्त्री. उणीव; न्यूनता; कसर अर्थ १ पहा. [कसर द्वि.] ०**णें**–अक्रि. १ एका बाजूस घसरणें; निसरणें; जागेवरून थोडेसें बाहेर जाणें. 'भ्रमांतुनि कसराल, आदि पुरुषाला अनुसराल हो' –मोहिरोबा (नवनीत पृ. ४४९). २ (ल.) कमी होणें; उतार पडणें (ताप, पाऊस, दुष्काळ यांस); कमी होणें; उतरणें (दिवस). ०**दिढी**–स्त्री. ऐन जिनसी सारा भरणाऱ्या रयतेवर त्या धान्याचा बसविलेला अधिक कर. ०**पट्टी**–स्त्री. १ जादा कर (प्रत्येक कुळावरील). २ तोटा भरून काढण्यासाठीं बसविलेला कर. ०**वतेळा**–पु. ऐन जिनसी वसुलांत जें कमीजास्त होईल त्याबद्दलची सुट.

कसर—स्त्री. विरळ (कापूस पिंजल्यासारखे) ढग; मळभ; अभ्रे.

कसर—पाण्यांत उत्पन्न होणारा खाण्याच्या उपयोगी एक प्रकारचा कंद.

कसरत—स्त्री. १ संवय; सराव; नेहमीं गुंग असणें; राबता (कला, तालीम इ० मध्यें); सरावामुळें प्राप्त होणारा तरबेजपणा; हुषारी; चतुराई. २ मर्दानी खेळ. ३ मेहनत करणें; कष्ट करणें; मोठे श्रम करणें. [अर. कस्रत्] ०**खाना**–पु. व्यायामशाळा. 'जोत्याजीबरोबर कसरतखान्यांत गेले आहेत.' –स्वप २४५. [अर. कस्रत्+फा. खाना]

कसरता—क्रिवि. किंचित् तोललेला; सरळ रेषेपासून थोडासा कलंलेला; सरकलेला; एका बाजूवर गेलेला. [कसरणें] –**तें घेणें**–क्रि. लुच्चेगिरीनें युद्धांतून हळु हळु माघार घेणें, निसटणें; एका बाजूस होणें.

कसरती—वि. १ व्यायाम केलेला; तालीमबाज. २ राबलेला; वहिवाटलेला. ३ वांकडा झालेला. [अ. कसरत्]

कसरा—वि. १ करडा; पांढुरक्या रंगाचा; कबरा. २ निरनिराळ्या रंगाचा, तऱ्हेचा.

कसरी—वि. १ कसरीसंबंधाचा; मितव्ययी; काटकसरी; विशेषतः कडू, कृपण माणसास म्हणतात. २ काटकसरीनें, थोड्या खर्चांत घेतलेला (माल वगैरे.) [कसर]

कसरी—वि. (माण.) अंगावर काळ्या-पांढऱ्या रंगाची लोकर असलेली (मेंढी.)

कसलत-ती—कसालत-ती पहा.

कसला—वि. कोणत्या प्रकारचा, जातीचा, तऱ्हेचा; कशासारखा; कोणासारखा. [कसा]

कसलमंद—वि. अस्वस्थ; आजारी; बिमार. 'मीर आलम याची तबियत कसलमंद, येण्याची ताकद नाहीं.' –रा ५.१४३. [अर. कसल्+फा. मन्द]

कसवट-टी—स्त्री. १ कस लावण्याचा दगड; कसोटी. 'लाऊनियां कसवटी। उत्तम सुवर्णाची खोटी।' –एभा ११. १४६४. २ करामत. –शर. ३ परीक्षा; एखादी गोष्ट, व्यक्ति हिचा खरेपणा किंवा लबाडी टरविण्याठीं युक्तीनें कसून परीक्षा करणें. (क्रि० घेणें; पाहणें; उतरणें.) 'स्वपद वोपाया लाविती कसवटी।' –दावि २१७. 'म्हणे ऋषीची जाहली कसवटी।' –कथा ३.३.७५. (ल.) कसास लावणारा; परीक्षा पाहणारा

परीक्षक. 'देखपां गा किरिटी। आश्रमधर्मांचिया राहाटी। विधिमार्गा कसवटी। जे आपणचि होती।' –ज्ञा ९.३०७. [सं. कष–पट्टिका; प्रा. कसवट्टिआ]

कसवटी—स्त्री. शेताची मशागत, मेहनत. [सं. कर्ष्]

कसवंटी—स्त्री. एक प्रकारचें लोणचें. कसुंदी पहा.

कसा—वि. कोणत्या जातीचा, प्रकारचा, धर्तीचा, रीतीचा, देखाव्याचा, **म्ह०** 'कशांत काय फाटक्यांत पाय' [सं. कीदृश]

कसा—क्रिवि. १ कोणत्या प्रकारानें अथवा रीतीनें? कशासाठीं? कोणत्या कारणानें? हा शब्द अपूर्वता किंवा लोकोत्तरपणा दाखविण्यासाठीं निरनिराळ्या क्रियापदाबरोबर पुष्कळ वेळां योजितात. जसें:–हा धावतो कसा, जेवतो कसा, लिहितो कसा, बोलतो कसा इ० त्याचें वर्णन मला करवत नाहीं!; ओहो! धाव कसा, बोल कसा, जेव कसा=ज्याला दुसरें उदाहरण नाहीं असें धाव, जेव, वगैरे. म्हणजे मारुती सारखा धाव; बृहस्पतीसारखा बोल, गणपतीसारखा लिही, कर्णासारखा किंवा बळीसारखा दानधर्म कर इ० २ सामान्य अर्थानेंहि योजितात जसें:–जा कसा; ये कसा; बोल कसा=कोणत्या तरी प्रकारानें, कसेंहि करून जा, ये, बोल इ०. ३ निश्चितार्थानें किंवा निःसंदेहार्थानें जसें–तूं जा कसा=निश्चित जा. 'भीष्म पतन पावे तों आम्हाला हो सहाय चाल कसा।' –मोभीष्म १.१०२.

कसा—पु. १ अंगरखा किंवा टोपडें इत्यादिकांचा बंद. 'आंगडियाचा कसा सोडितां। म्हणे नखें दुखती माझीं आतां।' –ह ७.२४४. २ पैसे ठेवण्याकरितां हात दीड–हात लांब व अरुंद असलेली कमरेस बांधावयाची पिशवी. ३ (बायकांचा) झोळणा, बटवा वगैरेची दोरी, नाडी. [सं. कर्ष्]

कसा—पु. (आगरी) लहान बोरू. याची लेखणी करतात. 'ह्या ओहोळाच्या खाचरांत चालू सालीं कसा फार आहे.' [सं. कशेरु]

कसां—क्रिवि. (राजा.) कसें.

कसाई—पु. १ खाटीक; गुरें मारून त्यांच्या मांसाच्या विक्रीवर पोट भरणारा, ही मुसलमान लोकांची जात असते. २ (ल.) अत्यंत निष्ठुर हृदयाचा माणूस. **०खाना**–पु. कत्तलखाना; पशुवध करण्याची जागा. **म्ह०** कसायाला गाय धारजिणी (कसाई निष्ठुरपणानें गाईचा घात करतो असें असतांहि ती त्याच्यापुढें गरीब बनते. यावरून) =दुष्ट आणि कठोर माणसाशीं सारे लोक गरिबीनें वागतात या अर्थी.

कसाई—स्त्री. खेचून बांधणी. 'वाहनाचे कसाईची जबाबदारी ज्या त्या माल्हतावर आहे.' –स्वारीनियम (बडोदें) ८६. [सं. कर्ष्]

कसाकसा—वि. कोणत्या प्रकारचा, रीतीचा, जातीचा? कशासारखा? [कसा द्वि.]

कसा काय—क्रिवि. कसकसा पहा. 'आज तिकडचा वेत कसा काय आहे?'

कसाकुशा—स्त्री. घासाघीस; खाराखुरी; तडफड; काकूं; टंगळमंगळ; नांतूं. [ध्व.]

कसाचसा—वि. ज्याचें स्वरूप सांगतां येत नाहीं अशा एखाद्यासारखा; कधीं दृष्ट नव्हे किंवा श्रुत नव्हे अशा कांहीं विलक्षण प्रकारचा, (चमत्कारिक व आश्चर्यकारक वस्तु किंवा प्रसंग यांबद्दल योजतात.) 'हा काय पदार्थ चमत्कारिक, हा कसाचसा दिसतो.' [कसा+च=जोर दाखविणारा+सा, असा=सादृश]

कसाट–ड—न. एक प्रकारचें गवत. कशेट पहा. [सं. कशेरू]

कसाटी—स्त्री. (व.) बैलांच्या गळ्यांत बांधावयाची घंटा.

कसांडी—स्त्री. १ (व.) दुधाची चरवी; कासंडी. २ भिरच्यांची पूड; तिखट. कसुंदी पहा.

कसा तरी—क्रिवि. कोणत्या तरी प्रकारानें. 'प्रसादचतुरा कसा तरि करा बरा हा जन.' –केका ६३.

कसाब—पु. खाटीक. कसाई पहा. 'कसाबाचे आळी मांडिले प्रमाण। बस्वण्णाची आण तया काई।' –तुगा ३०६८. [अर. कस्साब] **०करणी**–स्त्री. कसाबासारखी निष्ठुर कृति.

कसाबसा—क्रिवि. मोठ्या कष्टानें, प्रयासानें. 'मी त्यापासून कसेबसे दहा रुपये मिळविले.'

कसाबी—स्त्री. १ खाटकाचा धंदा. २ (ल.) क्रौर्य. –वि. क्रूर. [फा. कस्सावी]

कसाय—पु. (गो.) औषधांचा काढा. [सं. कषाय]

कसालत—स्त्री. १ पीडा; दुःख; संकट. २ कठिण काम; मेहनतीचें काम; (क्रि० काढणें) ३ अतिशय श्रम, आयास. (क्रि० येणें; करणें.) ३ खसालत पहा. [अर. कसालत्=दुःख] **०काढणें, सोसणें**–क्रि. त्रास–ओझें सोसणें; एखाद्याची घाण काढणें; जाच काढणें; कुरकुर, किरकीर पिरपीर सोसणें.

कसालती—वि. १ फार श्रम करणारा; मेहनती. २ अतिशय दगदगीचें, त्रासाचें, मेहनतीचें (काम). [अर. कसाला]

कसाला—पु. १ श्रम; आयास. कसालत पहा. 'राजश्री गोविंदपंत मामा वृद्ध, त्यांनीं कसाला किती करावा?' –खरे ९.४६८४. 'त्यांजला लिहिण्याचा कसाला होईना.' –रा ६. २५१. २ कडक रीतीनें वागविणें; छळणें; पिळून काढणें; बेजार करणें. (क्रि० करणें; लावणें). ३ अतिशय मेहनतीची परिस्थिति; जुलमाची अमदानी. (क्रि० होणें; लागणें; गुजरणें). ४ पीडा; संकट. 'स्वामींनीं हा नूतन संपादिलेला देश यावर कसाला पडतो ही विचाराची वाट नव्हे.' –मराआ ७. [अर. कसाला=दुःख]

कसि(सी)दा—पु. कशि(शी)दा पहा.

कसिया—स्त्री. हिरवी गारगोटी. एक रत्न.

कसीद करणें—क्रि. काढून घेणें. कसीदगी पहा. [अर. कासिद्=न्यून, कमी; फा. कशीद्=न्यून, कमी]

कसीदगी—स्त्री. कमी करणें. 'जरूर एक वक्त बादशाही कामाबद्दल कांहीं कसीदगी केले तरी अवल-सवाईनें मुबादला देऊन बाजद कसीद करावें.' –इम ६७. [फा. कशीदन्=कमी करणें, काढून घेणें. फा. कशीदगी=गैरमर्जी]

कसु—पु. कस पहा. 'कांइ कैवल्यकनकांचा कसु। भरे कसवटिए वीण।' –ऋ ९८. [कस]

कसुदा—पु. कशिदा पहा. 'आपले गच्चीवर बसून कंचुकीला कसुदा काढीत होत्यें.' –पारिभौ १५.

कसुंदी—स्त्री. १ (ना.) मिरच्यांची भुकटी; तिखट. २ (व.) आंब्याच्या किसाचें लोणचें. 'यंदा आंब्याची कसुंदी घालूं.' [हिं. कसौंदी]

कसूं—न. (कों.) शेताची हद्द दाखविण्यासाठीं घातलेली दगडाची बांधवरळी, गडगा. 'यंदा शेताला कसूं घालावयाचें आहे.' [कूसूं]

कसूर—स्त्री. १ कमीपणा; न्यूनता. २ चूक; अपराध; दोष. 'कसूर माफ' ३ हयगय; अळंटळं; आळस. 'आपलीं मतें स्पष्टपणें बोलून दाखविण्यास कधींही कसूर केली नाहीं.' –टि ४.३४३. [अर. कुसूर्=दोष,न्यूनता] **०कोताई**–स्त्री. चूक; न्यून. 'स्वामी सेवेचे ठायीं आम्हांपासुन कसूरकोताई हा कालपर्यंत जाली नाहीं व पुढेंहि होणार नाहीं.' –पया ६८. [कसूर+कोताई] **०दार**–वि. दोषी; अपराधी. 'पोषाख ठरविलेले मुदतीचे आंत खराब केल्यास नवीन करण्याकरितां कसूरदाराचे पगारांतून खर्च कापून घेतला जाईल.' –खानोनियम (बडोदें) प्रस्तावना ३.

कसूरी—कसूर पहा. खानो नियम (बडोदें) १.

कसें—क्रिवि. कोणत्या रीतीनें; कशाप्रकारें? 'हें कोडें कसें सोडवायचें' 'तुझें कसें काय चाललें आहे?' [सं. कथम्] **०करून-ही करून**–क्रिवि. कोणत्याही प्रकारें; कशाहि रीतीनें. **०बसें**–क्रिवि. मोठ्या कष्टानें; अति श्रमानें; कसें तरी; कांहीं तरी करून; जेमतेम. 'करुनियां चित्त स्थिर कसेंबसें।' –ज्ञेश्वरी. [सं. कथम्, कसें द्वि.]

कसेई—स्त्रीन. कांसे गवत; एक औषधी वनस्पति. [सं. काश, इं. काइक्श]

कसेरू—पुन. एक गवत; कचरा; (कों.) फुरडें. कशेट पहा. [सं. कशेरु]

कसेला—वि. कशासारखा; कोणासारखा; कोणत्या जातीचा, तऱ्हेचा, पध्दतीचा. [कसा]

कसेंसें, कसेंसेंच—क्रिवि. कांहीं तरी चमत्कारिक; नसांगतां येण्यासारखें; कसाचसा पहा. **०होणें, वाटणें**–१ (बायकी.) चमत्कारिक वाटणें; नेहमींपेक्षां निराळ्याच भावना होणें. 'तुला कां बरें आज कसेंसेंच वाटतें?.' –खरा रजपूत वीर. २ चैन किंवा स्वस्थता नसणें [कसें द्वि.]

कसो—(कों. गो.) कप्पा पहा.

कसो—पु. (गो.) बंद; कसा पहा. (झग्याचे वगैरे).

कसोटा—पु. १ कस लावण्याचा दगड. २ परीक्षा. कसोटी पहा.

कसोटा, कसोटापेंच—पु. १ कुस्तीचा एक पेंच. आपल्या पंजानें जोडीदाराचा एक पंजा धरून एकदम जोडीदाराचा हात बाहेर ढकलून जोडीदाराच्या कानाच्या खालीं मानेवर आपल्या आंगठ्याकडील बाजूच्या हातानें मारणें. २ जोडीदाराचे दोन्हीं हात आपले हातांत धरून जोडीदाराचा एक हात झिडकारून देऊन आपल्या हाताच्या मुठीच्या हाडानें जोडीदाराच्या कानशिलावर मारणें. [कस]

कसोटी—स्त्री. १ कसवट-टी पहा. (क्रि० घेणें; पहाणें). २ परीक्षा. 'व्यवहाराची एकच कसोटी आपणास पुरे होईल, –टि ४.११९. ३ कसवटीचा दगड. **कसोटीस उतरणें**–क्रि. परीक्षेंत उत्तीर्ण होणें; उत्कृष्ट निघणें. [सं. कष+पट्ट; प्रा. कसवट्ट; हिं. कसोटी]

कसोटी कसणें—क्रि. १ परीक्षा करणें. २ पेंच घालणें. ३ (ल.) सुरत क्रीडेंतील डाव खेळणें. 'शांत होईल जीव जरा फिरून मग मला कसोटी कसा। नव्या नवतीचा बहर नूतन जी बोली आली रसा।' –होला ८४. [कस]

कसोशी—स्त्री. १ सूक्ष्म, बारीक, छेइन छेइन घेतलेली परीक्षा; तपासणी; चौकशी; पारख. २ काळजी; श्रम; दक्षता. (क्रि० खाणें; भोगणें). ३ त्रास; दगदग; खस्त; नेहमींची कटकट. (क्रि० खाणें; सोसणें). 'नवऱ्याची कसोशी बायकोनें फार खाल्ली.' ४ झोंबणारें व त्रासदायक दुःख; यातना, ठणका. (क्रि० सोसणें) ५ आटोकाट प्रयत्न. [कस; फा. कोशिश्=अभ्यास, प्रयत्न] **कसोसींत आणणें**–क्रि. कष्टसाध्य करणें: जेरदस्तींत आणणें. -पाब १६.

कस्करणें—अक्रि. दांत करकर खाणें. 'दांत कस्करे आणि हरळे। या नाव आदिभूतिक।' –दा ३.७.२३. [ध्व.]

कस्कसा—पु. कचकच; शहारे. 'नेत्रासि फीरवि कसा अणि कस्कसा ये।' –अकक. गंगाधर, रसकल्लोल ११६. [ध्व.]

कस्त—स्त्री. १ खराची; नुकसान; झीज; तोटा. (क्रि० सोसणें, खाणें) २ (ल.) उणेपणा; न्यूनता; कमताई; वाण. (क्रि० घेणें; खाणें). 'हा कसाही प्रसंग पडला तरी कधीं कस्त

वेत नाही.' ३ तसदी; परिश्रम; दगदग; त्रास. (कि० खाणें). शुश्रुषा; मेहनत; खस्ता. 'पावल अस्त रवी मग मस्त ते कस्त करूनि ते दस्त करावे।' –अकक, राधावर्णन ४. 'नाना जलदीनें रवानगी होण्याची कस्त करीत आहेत' –ख ११.६१५४. 'काकाच्या दुखण्यांत त्यानें फार कस्त खाल्ी' [सं. कष्ट.; हिं. कस्त=वाण, कमताई]

कस्त—पुस्त्री. हेतु; विचार; निश्चय. 'अब्दाली कोठें ? त्याचा कस्त कसा आहे ?' –रा १.२४९. 'पुण्यास यावें ही इंमजाची मोठी कस्त आहे.' –खरे ७.३५८५. [अर. कस्द्=इच्छा, हेतु]

कस्त(स्ता)न—न. १ वाळलेला पाचोळा; केरकचरा. २ (कों.) गवती छपरांतील काडया, गवत वगैरे. [सं. कुत्सित+तृण–कुत्तण–कस्तन; तुल० का. कस=घ,ण, गदळ+सं. तृण, म.तण]

कस्त(स्ता)न—न. कसण्याचा दोरखंड; गाडीचा दोर. [कसणें+ताणणें ?]

कस्तर—पुन. १ डांक-ख; भांडें सांधण्याकरितां किंवा फुटलेलें घड करण्याकरितां जो कथलाचा लेप बसवितात तो. 'कथलाचें काम करणारे व शिशाचें काम करणारे कासार ह्या मिश्र धातूंचें कस्तर करितात.' –मराठी ६ वें पुस्तक (१८७५) १६९. २ जडण; डांक लावण्याची क्रिया. (क्रि० करणें; होणें; लादणें; बसणें; जाणें). **कस्तुरी करणें**–कस्तरणें पहा. [सं. कस्तीर=कथील, कल्हई; तुल० प्री. कस्सीतेरोस]

कस्तर—कस्तन पहा.

कस्तरणें—उक्रि. कस्तर करणें; झाळणें; डांक बसविणें.

कस्ता—पु. (माण.) त्रास; खस्ता. [सं. कष्ट]

कस्ता-स्ती—वि. १ कसरता; कललेला; सरकलेला; झुकलेला (खांब, भित, तराजूची दांडी, माप इ०) २ (ल.) हलका; कमी (मापांत किंवा वजनांत). ३ कमी मापलेली किंवा वजन केलेली (वस्तु, माप) याच्या उलट रास्ती=बरोबर. ४ (ल.) हलका; खोटा; वाईट; अप्रामाणिक (धंदा, भाषण इ०). ५ एका बाजूला वळलेले; मार्गापासून ढळलेलें; सरकलेलें; मार्गच्युत. [सं. कस्=हलणें; जाणें; का. कसि=सरकणें, घसरणें ?; हिब्रू. कोइसिचिम्=जाणें] **कस्ते घेणें**–क्रि. १ एका बाजूस होणें. २ माघार घेणें; अंग काढून घेणें (धंद्यांतून).

कस्तान—कस्तन पहा.

कस्तानी—वि. काळसर तांबूस रंगाचा; तेल्या, कुमाईत (घोडा).

कस्ती—वि. फार श्रम करणारा; उद्योगी; मेहनती; कष्टाळु. –स्त्री. श्रम; कष्ट; मेहनत. [सं. कष्ट]

कस्तुरी—कस्तूरी पहा. 'कस्तुरी चोरिली चोरें। परी परिमळें हाट भरे।' –ह ३.१७९

कस्तुरी भेंडी—स्त्री. एक झाड. –शे ११.१४०.

कस्तुर मोगरा—पु. एक वेली; कुसर. –शे १०.४४.

कस्तुरी मोगरा—पु. (गो.) दुर्गंधी सोडणारा एक किडा.

कस्तूर—पुन. डांक लावणें. कस्तर. अर्थ १ पहा. (क्रि० करणें; होणें). 'वाहकांच्या तुकडयांचीं टोकें स्वच्छ करून त्यांस तिरपा पालवसांधा करून ... सांध्यास कस्तूर करावा.' –मॅरट ८९. **०गोल**–पु. डांक लावण्याचें हत्यार.

कस्तूरी-कस्तुरिका—स्त्री. १ एक अति सुगंधी द्रव्य. याचा रंग काळा असून हें विशिष्ट मृगाच्या नाभींत सांपडतें. कस्तूरीमृग नेपाळ, तिबेट इ० हिमालयाच्या प्रदेशांत आढळतात. 'नेपाळेश्वर भाळलग्न चिखला कस्तूरिका मानिती।' –मराठी ४ थें पुस्तक पृ. २०७ (१९०६). 'केशरकस्तुरी लक्षाटी। कंठीं हार साजिरा।' –मूपाळी गणपतीची. २ कपाळास लावावयाच्या तांबडया गंधाच्या मधोमध जो काळा टिपका लावतात तो. **०एण–मृग**–पु. ज्या हरिणाच्या बेंबींतल्या गांठींत कस्तुरी सांपडते तो हरिण; एका जनावरापासून सरासरी एक औंस कस्तुरी मिळते. 'सिंहजसे प्रतिपर्वेति नाहित कस्तुरी एण वनोवनि कैचे।' –वामनी. ग्रंथ, ४. बोधपर सवाया ८. 'देहींच देव असतां करि भ्रमतोसि व्यर्थ तूं रानीं । नाभित सुगंधि असुनी कस्तुरिमृग जैवि तो फिरे रानीं।'

कस्बीण, कज्बीण—कसबीण पहा.

कस्मळ—न. १ कश्मल पहा. २ (माण) मोठें करट. (क्रि० होणें; उठणें).

कस्रत-ती—कसरत-ती पहा.

कस्रे-कम—क्रिवि. कमींत कमी. 'कस्रेकम हजार फिरंग उतरले आहेत' –चिरा १. [अर. कस्र+कम]

कस्स—न. (गो.) कळ; कसर.

कस्सा—कसा १ पहा. (वाप्र.)

कस्सा म्हणून कस्सा—क्रिवि. अगदीं; बिलकुल. 'मणमंगळसूत्र अन् जोडव्याशिवाय कस्सा म्हणून कस्सा सुद्धां सुतळीचा तोडा देखील दादानं वहिनीला केला नाहींन' –प्रफुल्लता १२ ७.२४.

कहगया बहगया, कहिंबया बहिंगया—वि. क्रिवि (हिं.) वाऱ्यावर गेला; उडून गेला; नाश झाला; फुकट गेल नष्ट झाला (उपदेश, शिकवण, भाषण इ०). याच अर्थी कैहगर बहगया अथवा कैगयाबैगया–बहिंगया असेहि शब्दप्रयोग आढळतात. [हिं. कहां गया वहां गया]

कहड—पु. कढ; त्रास. 'तेत्तिस कोटी सुरगण मुनिज जोडिति ज्याला पाणी। कळिकाळाचा कहड अहेमा सदां फिरि निर्वाणी।' –दत्तपदें पृ. ४९. **कहडणें**–उक्रि. कढणें पहा.

कहर—पु. १ निकर; अतिरेक; पराकाष्ठा; जोर; अमर्याद पणा; आवेश. 'तोफेचा एकच वर्षला कहरा' –पया ५५. २ ईश्वरप्रकोप; अनर्थ; क्षोभ. 'उदंड झाला कहर तर टाकूं नये शहर.' ३ जुलूम; गहजब. ४ बिकट प्रसंग. –वि. कहरी, कहरी अर्थ ४,५ पहा. 'कहर मजील–कोस–ऊन्ह–पाऊस–वारा.' [अ. कहर्=अनर्थ] **०दर्याव–दर्या**–पु. अफाट, अमर्याद समुद्र; महासागर. (महासागराच्या विशालतेसंबंधीं योजतात.)

कहरवा, कहरवी—कारवा पहा.

कहरी–च्या, कहारी—वि. १ भयंकर; क्रूर; अतिशय कडक; निष्ठुर. 'पारिपत्यहि कहरी होत असतें.' –खरे ८.४३९४. २ अतिशय विषारी; जालीम; जलाल (साप, विंचू वगैरे). ३ प्रखर; फणफणणारा; पोळणारा (ताप, कपाळ दुखणें, आजार, ऊन). ४ (व्यापक) पराकाष्ठेचें; बेसुमार; अतिशय दुःखद; भयंकर; प्रचंड (ओझें, मजल, कोस, पर्वत, अरण्य इ०), ५ आवेशाचें; रानटी; अद्वातद्वा (रडणें, खरडपट्टी काढणें वगैरे). ६ प्राणहारक; मर्मभेदी. 'जखमा शस्त्रांच्या कहरी लागून मृत्यु पावले.' –चित्रगुप्त ७०.

कहा—क्रिवि. (हिं.) कोठें? [सं. कुत्र, क्व; प्रा. कहिं, कहिआ] **म्ह०** कहा राजाभोज कहां गंगातेली (कुठें इंद्राचा ऐरावत व कुठें शामभटाची तट्टाणी या म्हणीच्या समानार्थक हिंदी म्हण. तैलंगणांतील गंग राजाच्या उपहासार्थी मूळ ही म्हण पडली).

कहाकर––पु. (व.) जमिनीचा विशिष्ट तुकडा, –महाराष्ट्र सप्टेंबर १९२९.

कहाडणी–कहाडणें––काढणी–णें पहा.

कहाणी–काहाणी—स्त्री. १ गोष्ट; वृत्तवर्णन; कथा; आख्यायिका. 'म्हणोनि मृत्युलोकीं सुखाची कहाणी। ऐकिजेल कवणाचिये श्रवणी।' –ज्ञा ९.५०१. 'कृष्णाची आणीक काहाणी। तो स्त्री जाहला मोहिनी।' –एरुस्व २.१९. २ दुःखदायक आत्मकथन; हालअपेष्टांची स्वतःची गोष्ट. (क्रि० सांगणें; गाणें). ३ शिकवण; उपदेश; कानउघाडणी. 'उपडे घागरीवर पाणी नी मूर्खाजवळ काहाणी।' ४ स्वतः घेतलेल्या व्रताच्या दिवशीं वायका व्रतविषयक जी गोष्ट सांगतात ती. [सं. कथनिका; प्रा. कहणिआ; हिं. कहानी; सिं. किहाणी]

कहाणी—स्त्री. ज्वारीवर अवचित पडणारा एक रोग; काजळी. यानें ज्वारीचे दाणे काळे होऊन जळून जातात. काणी पहा.

कहा(ह)ती—स्त्री. १ दरोडा; लूट; धाड (चोरांची, दरोडेखोरांची). २ एखाद्या वस्तूवर पडणारी धाड, उडी (खादाड मुलांची). ३ शेतावर पडणारी धाड (गुरांची, टोळांची). ४ चढाई; चाल. [अर. कहत्=दुष्काळ] **कहातीस येणें**–क्रि. विकारवश होणें; कुल्लीस येणें; क्रोधाविष्ट होणें; भान सुटणें.

कहातला, कहातेला—वि. (व.ना.) आधाशी; हांवरा; वखवखलेला. 'असा कहातेल्यासारखा काय करतोस?' [अर. कहत्]

कहाता—वि.क्रिवि. कललेला; कस्तर; तिरपा; एका तोलावरचा; कसरता.

कहा(ह)ती—वि. १ निर्भय; धीट; साहसी. २ तुफान; क्षुब्ध; विचारशून्य. ३ धाडशी; अविचारी; बेछूट; बेडगळ (कृत्य) ४ (व्यापक) अतिशय मोठा; बेसुमार मोठा (वजन; पर्वताची चढण, प्रवासाची मजल, ऊन, पाऊस, वारा इ०) [अर. कहत्]

कहामहा—क्रिवि. (खा.) केव्हां तरी; कधींमधीं.

कहार—पु. कहर पहा. –जना ३१२. **०मांडणें**–क्रि. (बायकी) अतिशय त्रास देणें; उच्छेद मांडणें.

कहार—पु. १ भोयांची एक जात. मेणा, पालखी वाहणारांची एक जात. २ (काशी) गडी; नोकर (हा बहुधा कहार जातीचा असतो यावरून). [सं. स्कंधकार; हिं. कहार]

कहार—पु. जोंधळ्याची एक जात. –शे ११.१५५.(नाको).

कहारवा, कहिरवा—कारवा पहा.

कहाली—स्त्री. १ आग; उष्मा; उकाडा. काहिली पहा. 'विषयकहालिनें अति पोळतें। जेव्हां लहर मनीं येते तेव्हां करीं कुच आपुले चोळतें।' –प्रला १०२.

कहाल्या—(व.) जमिनीचे लहान लहान बहीत भाग.

कहावणें—अक्रि. १ (कों.) अतिशय भेदरणें; भयानें गांगरून जाणें. २ रागावणें; कावणें पहा.

कहिं—क्रिवि. कधीं; केव्हां. कहीं पहा. **०बही**–कधींमधीं; कधीं तरी. 'विक्षेपू ज्ञाल्या कहिबही। अभ्यास तिहीं करावा।' –एभा १३.२४८. [सं. वै. कहिं]

कहिरा—वि. तिरळा. 'मदनपुतळा काणा कहिरा।' –अमृत ४२.

कही—स्त्री. १ (हिं.) लष्करासाठीं गवत, लाकूडफांटा इ० लुटून किंवा अन्य रीतीनें आणणारी सैन्याची टोळी. २ अशी सामुग्री आणण्याची क्रिया; सैन्याला दाणावैरण मिळवणें. 'तशा मध्यें पतिराज नित्य जातात उडून कहिला।' –प्रला २०२. 'मशारनिल्हेचे खेडयांची कही होतें कापून नेलीं.' –खरे ५.२३१२. [फा. कही] **०कबाड**–न. चारा, गवत व लाकूडफाटा. **०वाला**–पु. कहींतील माणूस. २ (ल.) तेजोहीन; मळीण; वलहीन.

कहीं—१ (खा.) कधीं? केव्हां? केव्हाहि. 'परी कहीं न करिशी संभाषण। विसरोनियां।' –शिशु ८८. 'जो दुजयाची वास पाहे। त्यांचें कार्य कहींच नोहें।' –एरुस्व ५.२. 'भक्तिज्ञान

कहीं उपजेचिना।' –रंयो १.१०९९. २ कोठें? कोठेंहि. 'संशयात्मिकासी कहीं नाहीं सुख।' –दावि ६३. [सं. वै. कहिं; लिथु. कुर्; गॉ. हर; जर्म. वर; इं. ह्वेअर; प्रा. कहिं; हिं. कहीं]

कह्या—पु. (हिं.) आज्ञा; हुकूम; म्हणणें; सांगणें. 'कहे तुका जग भुलारे। कह्या न मानत कोय।' –तुगा ४२९. [सं. कथ्; प्रा. कह] **कह्यांत**-(कह्या सप्तमी) आज्ञेंत; हुकुमांत; ताब्यांत. (क्रि० असणें; राहणें; वागणें; चालणें.) **०कह्यांत नसणें**–क्रि. ताब्यांत, हुकुमांत नसणें.

कह्हार—न. कल्हार पहा.

कळ—स्त्री. तीक्ष्ण व एकदम उद्भवणारें दुःख; तिडीक; रग (डोकें, शरीर, पोट यांत); धमक पहा. (क्रि० उठणें; होणें). 'वाटी वटक वायगोळा। हातीं पायीं लागती कळा।' 'सराटे जेवि महागजातें। कळ लाउनि उभे करिती।' –श्रीधर (नवनीत पृ. २२२.); 'माझे पोटांत कळ निघाली आहे.' [ध्व.] **०पडणें**–क्रि. चैन पडणें; विश्रांति मिळणें (नकारात्मक प्रयोग) 'सुजना जेंवि खळ, कळ क्षणहि पडोंदे नरा न देवा त्या।' –मोकर्ण ११.५४. 'चंद्रावळ पाहतां नपडे त्यार्शी कळ।' –अफला ५४.

कळ—स्त्री. युक्ति (उघडणें–झांकण्याची, बंद करण्याची, खुलें करण्याची); चावी; किल्ली; साधन; मर्म. 'तुका म्हणे कळ। पाय धरिल्या न चले बळ।' –तुगा ४४३. 'ज्याचा गर्व हरे परस्पर असा योजीत कोणे कळे।' –किंगवि १०. 'या यंत्राची कळ दाबिली कीं तें झालें सुरू.' २ कला; खुबी; रचना; रहस्य; किल्ली (यंत्राची किंवा युक्ति-रचनेची) या अर्थासाठीं कला पहा. ३ तराजूच्या दांडीचा मधला कांटा. 'घाय हाणितां कळेजवळीं। पारडें उचलेल अंतराळीं।' –ह ३०.८६. [सं. कला] **दाबणें**–कमान दाबणें; मूलस्थान दाबणें; ठिकाण, किल्ली यांस हात घालणें. २ (ल.) मर्मस्थानीं स्पर्शणें; वश होईल असें करणें.

कळ—स्त्री. १ भांडण; कलागत; तंटा; खोडी. (क्रि० काढणें; लावणें). 'ऐसें गोत्रचि दोहीं दळीं। उदित जालें असे कळी।' –ह्या १.१८४. 'तिनें घरांतल्या घरांत बारीक कळ लावण्यास अगोदरच प्रारंभ केला होता.' –रंगराव. 'एलवज्यावर पहिल्यानें जाउन केली कळ।' –ऐपो ३८७. २ कुरापत; भांडणाचें कारण. (क्रि० काढणें). 'आम्हासि ग्रह नाहीं अनुकूळ। नसती उत्पन्न होते कळ।' –शनि १८२. 'मी म्हणतो कीं त्वां कळ काढली.' –बाळ २.४५. [सं. कलि] **म्हण** बोलतां कळ भुतां मळ=उत्तर–प्रत्युत्तरानें भांडण वाढतें आणि वरवर भुतल्यानें अधिक अधिक मळ सुटत जातो.

कळक-कळंक—पु. १ मोठ्या जातीचा भरींव किंवा पोकळ बांबू, टोकर, वेळू. २ (कों.) एक मोठा कळक घेऊन त्याला प्रत्येक पेराचर फुटलेल्या फांदीचे टोंक पाय ठेवण्यापुरतें वीतभर राखून ठेवून तोडतात आणि त्या लांकडाचा उपयोग उंच झाडावर चढण्यासाठीं शिडीसारखा करतात तें लाकूड. 'झाड उंच आहे, शिडी पुरणार नाहीं, कळक लाव.' –स्त्री. (कळंक) बांबूचें बेट; जाळी.

कळंक—पु. कलंक; डाग; बट्टा; काळिमा; कीट; गंज. कलंक पहा. 'तयाचिये दिठीचा झणें कळंकु। लागेल तुझिया प्रेमा।' –ज्ञा ६.११५. कळकट पहा. [सं. कलंक]

कळकट—न. १ कलंक; मळ; गंज; तांब्या वगैरे तांब्याच्या भांड्यावर आंबटाचा स्पर्श झाला असतां उत्पन्न होणारा हिरवट विषारी पदार्थ. २ घाण (कपडे, भांडीं यांवरील). [सं. कलंक]

कळकट, कळकट—वि. १ गंजानें कळकलेलें; विषार लागलेलें; मलिन; खराब. २ घाणेरडें; वाईट गुण ज्यांत आहेत असें; दूषित; पापी (माणूस, चाल, वर्तन). [सं. कलंकित]

कळंकटणें, कळकटणें—अक्रि. १ किंचित कळकणें; हिरवें होणें; गंजणें. २ घाणेरडें होणें; नासणें. 'कळकटेना हें नाम-पियुख' –दाव ७८१. [कळकट]

कळकट्या—वि. भांडखोर; कलह करणारा. 'ज्यासी त्यासी कळकट्या। स्वयें सदाचा चोरट्या।' –दा १९.३.९. [कळ=भांडण]

कळकणें, कळंकणें—अक्रि. विषार लागणें; हिरवें होणें; विटणें; बिघडणें; गंज चढणें; मलिन होणें; कळकट होणें (भांडें अम्लादि पदार्थ.) [सं. कलंक]

कळ-कर-कन-दिशीं-दिनीं—क्रिवि. फुटण्याचा आवाज होऊन (कांच किंवा कोणत्याहि ठिसूळ पदार्थांचा). [ध्व. कल्=आवाज करणें]

कळकळ—स्त्री. १ मनापासून काळजी, वेध; आस्था; उत्सुकता (एखाद्या कामाविषयीं). २ मनाला येणारा द्रव; कळवळा; दया. (क्रि० वाटणें; असणें). [सं. कल्=जोडणें]

कळकळ—स्त्री. भांडणांतील आवेशाचें व ओरडून केलेलें भाषण; गोंगाट; कलकल पहा. [ध्व. सं. कल्=आवाज करणें]

कळकळणें—अक्रि. १ तापणें; संतप्त होणें (उन्हानें, सूर्याच्या उष्णतेनें); उकाडा होणें; धगधगणें. २ फिरणें; हलणें; तळमळणें (उन्हानें); उकळी फुटणें; बुडबुडे येणें (उकळत्या पाण्याला); सळसळणें. ३ अतिशय दुःख होऊन क्षुब्ध होणें; तळमळणें; व्याकूळ होणें; त्रासणें (आत्मा, जीव); पोटांत कालवणें (दया, कींव येऊन); द्रव येणें; हळहळणें. 'हितरत

गुरु मन पाहुनि गत सद्गुरुता मुलास कळकळतें।' –मोभीष्म १२.४३. ४ उबळणें; उमळणें (अकर्तृकप्रयोगीं उपयोग). 'माझ्या पोटांत कळकळतें.' ५ अतिशय भूक लागणें; खाखा सुटणें, करणें. ६ गरजणें; ओरडणें; मोठ्यानें, उंच सुरांत बोलणें (भांडणांत). [ध्व. सं. कल्=आवाज करणें]

कळकळघणी—न. (कों.) निवळ पाणी; पुळपुळवणी; पाणी मिसळलेल्या दुधाला, ताकाला म्हणतात. [ध्व. कळकळ+सं. वन=पाणी]

कळकळी, कळकळीत—वि. किळकिळी, किळकिळीत पहा.

कळकळ्या—वि. १ रागानें ओरडून मोठ्यानें बोलणारा; तणतणणारा. २ कळवळ्यानें बोलणारा. –स्त्रीअव. किळकिळ्या पहा. [सं. कल्=आवाज करणें]

कळकी—वि. कळकाचें, बांबूचें केलेलें (टोपली, दुरडी वगैरे जिन्नस). [कळक] **०कागद**–पु. कळकापासून तयार केलेला पांढरा शुभ्र व उत्तम प्रकारचा दौलताबादी कागद. **०नारायण**–पु. अतिशय उंच मनुष्य; ताडासारखा उंच, लेंबाडग्या मनुष्य. **०बाण**–पु. बांबूच्या नळकांड्यांत दारू खचून जो बाण करतात तो. **०चा कोंब**–पु. वेळूचा कोंब; याची भाजी करतात.

कळंकी—स्त्री. (गो.) बांबूची एक जात; कणक. [कळक]

कळंकी—पुवि. पातकी. कलंकी पहा. 'गेला तरी जावो पुखें नरकासी। कळंकी याविशीं शिवो नये।' –तुगा ३७४४. **०नारद**–पु. भांडखोर, कळलाव्या; तंटा लावणाऱ्या माणसाला म्हणतात.

कळकुटा—वि. (ना.) कळ लावणारा; भांडण जुंपविणारा. कळकटा पहा.

कळकुटा, कळकूट, कळंकूट—वि. कळंकट; थोडासा कळकलेला, नासलेला. कळकट पहा.

कळकुंबा—वि. दांडगा; मजबूत. [कळकाचा कोंब?]

कळकूट, कळंकूट—न. बांबूचा लहान तुकडा [कळक]

कळक्या-ऊंस—पु. एक प्रकारचा ऊंस. हा फार टणक असून यांत रस थोडा पण फार गोड असतो. [कळक+ऊंस]

कळखंड—पु. अतिशय लहान तुकडा; सूक्ष्म भाग. 'भिवई जाणो कामकोदंड। नयन बाणले कापखंड। पातीं पातरिले कळखंड अंजनाचे॥' –कथा ५.१६.१८०. [सं. कला+खंड]

कळगा—पु. १ कांच; बांगडीचा लहानसा तुकडा. 'हे व्यर्थ कांकणाचे दावितिल न समरसिंधुतट कळगे।' –मोसभा ७.९. २ (व.) मोडतोड झालेलें सामान. [सं. कल्=आवाज करणें]

कळगा—वि. भांडखोर; कळलाव्या. [कळ=भांडण]

कळगा—पु. (बेने इस्राएल) अंगी; अंगवस्त्र. '(महारणीस) आपल्या मुलीचा कळगा बक्षीस देऊन तिची पीडा टाळणें' –बेने १७.

कळंगु—पु. भिल्ल स्त्रियांच्या कानांतील एक दागिना (?) 'कर्णी कळंगु लेइली सुंदरी। केतकीदळें शोभती शिरीं।' –कथा २.१५.१३७.

कळगोटा-चेटग्या-चेतव्या—वि. कळलाव्या; आगलाव्या. [कळ+चेतविणें.]

कळघोडा—पु. कळ असलेला लांकडाचा घोडा. यांत्रिक रचनेचा घोडा. [कळ=कला+घोडा]

कळघोडा—वि. (कु.) हट्टी; दुराग्रही. [कळ=भांडण+घोडा]

कळंजणें—अक्रि. (कों.) अतिशय भुकेमुळें किंवा रडण्यामुळें थकून जाऊन व्याकुळ होणें. (मूल इ०); मूर्च्छित होणें. [सं. कलंज]

कळंजतूक—वि. अतिशय सुडाळ व वजनांत भारी असें; औटभार वजनाचें (मोतीं वगैरे). 'गवारा हातीं दीजे कळंजतूक मोतीं।' –भाए ६७४. [सं. कलंज=परिमाणविशेष+म. तुक=तोलणें]

कळजी—न. (जनावराच्या) हृदयांतील मांस. [काळीज]

कळंजें—न. (गो.) अपयश. [काळें+अंजन]

कळण—न. (कों.) कडधान्याचा कट; कडधान्य शिजवल्यानंतर काढलेलें पाणी; कढण.

कळण-णा—नपु. भरडलेल्या डाळीचा चुरा–चुरी. 'आणि सुरस डाळी उडिदांची घेती। कळणा विरस टाकिती।' –यथा १७.१३४. [सं. कला=अंश]

कळणाकोंडा—पु. १ धान्याचा चूर व टरफल. 'देवा कळणा अथवा कोंडा। आम्हां देई भुकेच्या तोंडा।'–तुकाराम पदें (नवनीत पृ. ४४८) २ गरिबांचें अन्न. 'कळण्याकोंड्याची भाकरी आणि केण्याकुरड्ची भाजी' (दळणकांडण करितांना निघणारा कणी, चुरा, कोंडा वगैरे, यावरून) ३ (ल.) दळणकांडणाचा धंदा. 'मी कळणाकोंडा करून पोट भरतें.' [कळणा+कोंडा]

कळणें—अक्रि. १ समजणें; उमजणें; जाणणें. 'कळे साधूसी दुर्जनाची बुद्धि।' –ज्ञा ७.९३. २ मनांत भरणें; ठसणें. ३ क्षणक्षणणें; थरथरणें; चेतनायुक्त असणें; अनुभव, आठवण (विशेषतः दुःखाची) राहाणें (शरीरावयव, इंद्रिय). [सं. कलन] **कळे न कळे इतका**–किंचित; अतिशय थोडा; लक्षांत न येण्याइतका अंश. **म्ह० कळेना वळेना भाजी भाकर गिळेना=अक्षरशत्रु,** ठोंब्या माणसाबद्दल वापरतात.

कळणें—क्रि. (ल.) ओढणें. 'वाखाणिती वेदपुराण लीला। जिणे तुझा दास बळें कळीला।' –निमा १.६१. [सं. कल्]

कळणें, कयणें—न. (गो.) कडधान्याचा कट. कळण पहा.

कळत—क्रिवि. कळून; समजून; उमजून; ठाऊक असून; मुद्दाम. [कळणें] **०न कळत**–न समजून; चुकीनें; ठाऊक नसतां. **०नकळत**–१ अगदीं थोडा; हळू; न समजेल अशा रीतीनें; पक्कें होय कीं नाहीं हें न सांगतां येण्याजोगें. 'ताप कळतनकळत येतो.' २ गफलतीनें; चुकून; दुर्लक्षामुळें; प्रमादानें; अजाणता. 'अपराध कळतनकळत केला असल्यास क्षमा करावी.' **०मूर्ख**–वि. पढतमूर्ख; कळत असून मूर्ख; लुच्चेगिरीनें समजत नाहीं असें दाखविणारा. [कळणें+मूर्ख]

कळत्र—न. स्त्री; पत्नी. कलत्र पहा.

कळथी—स्त्री. (गु.) कुळीथ; हुलगा. [सं. कुलित्थ]

कळप—पु. १ समुदाय; जमाव; समूह (पशु, पक्षी इ० चा); झुंड; थवा. २ (ल.) पंथ; धर्म. ख्रिस्ती धर्मांत चर्चेच्या कक्षेंतील लोकसमूहाला 'फ्लॉक' (कळप) म्हणतात यावरून, 'येशूच्या कळपांत तो गेला.' –हिंदु ११.२.३०. [सं. कलाप; तुल० ते. कलपु=एकत्र होणें] **०शुद्ध**–वि. कळपामध्यें राहणारा; कळप सोडून न जाणारा. याच्या उलट ओढाळ=कळप सोडून जाणारा; कळपांतून पळणारा. [कळप+शुद्ध] **कळपांतलें गुरूं**–न. (ल.) दांडगा, उद्धट, अतिशय झोंड, खेडवळ असा माणूस; असंस्कृत.

कळपा, कळपणें—पुन. १ सालपट; खपली; कवची; तुकडा; साल (भाजण्यानें किंवा उन्ह लागण्यानें शरीरावरील निघणारा). २ निघालेला तुकडा; खवला (गंजलेल्या लोखंडाचा); पोपडा; पापुद्रा. ३ दगडाची निघालेली कपरी; लांकडाची ढलपी, झिलपी.

कळपुटी—स्त्री. (गो.) मासळीच्या डोक्याचा केलेला एक खाद्यपदार्थ.

कळंब—पु. कदंब; हें झाड मोठें होतें. पानें रुंद असून झाडास गोंद येतो. –वगु २२. –शि ९.२६३. 'देव चढले कळंबावरी।' [सं. कदंब; प्रा. कलम्ब]

कळंबी—स्त्री. मागली डोलकाठी; कलवी–कलंबी पहा.

कळंबें—न. कुत्र्याचें मृत; कुत्र्याची छत्री. अळंबें पहा.

कळंभा—पु. भांडण; तंटा. 'बोलें इंद्रियां लागे कळंभा।' –ज्ञा ६.१६. [सं. कलह+भंड]

कळभांड—कळंभट पहा. [कळ=कलह+भंड–भांड]

कळम—पु. (गो.) कळंक; गंज.

कळमळ–ळी—स्त्री. वांती होण्यापूर्वी पोटांत होणारी विकृति; मळमळ; उबळ; पोटांत कालवणें; ढवळणें. [क्लम्=ग्लानि –भाज १८३४; क्लम्=थकणें+ग्लै=दमणें]

कळमळणें—अक्रि. १ पोटांत ढवळून येणें; उमळणें. 'माझे पोटांत–मला कळमळतें.' २ दयेनें, मनाच्या कोमलपणानें कळवळणें; पोटांत तोडणें. [कळमळ]

कळयारा—वि. (कु.) हट्टी; दुराग्रही.

कळयुग—न. चौथें युग; कलियुग पहा.

कळलावी—स्त्री. १ एक फुलाची वेल, हिचीं पानें आल्याच्या पानाप्रमाणें असतात. फुलाच्या पाकळ्या लांब असून फूल जास-वंदीच्या फुलाएवढें असतें. ही वेल कुंपणावर येते. हिला खड्या-नाग, (कों.) कलहे, कळवी अशीं नांवें आहेत. –वगु २.२२. २ एक वनस्पति–कंद. [सं. कलिहारि]

कळलाव्या—वि. तंटे लावणारा; आगलाव्या; कळीचा नारद; कज्जेदलाल. 'असो नारद तेथूनि निघाला। बाणासुराचे दळीं पातळा। वीर कांपले ते वेळां। म्हणती कळलाव्या आलारे।' –जै ८३.८४. [कळ+लावणें]

कळव, कोळोव—पु. (गो.) माडाचा कुंचा.

कळवंड–डा–डी—नपुस्त्री. १ गमतीची कुस्ती; झोंबा-झोंबी; अंगलटीस जाणें (कुत्र्या–मांजरांचें). 'कुत्र्यांचें कळवंड पुष्कळ वेळ चालू होतें' २ भांडण; कलह. 'शिंदे–होळकर आले कळवंडी। मरणाची हुंडी।' –राला १०४. [कळ+भंड–वंड]

कळवंडणें—अक्रि. १ मोठमोठ्यानें ओरडून भांडणें; तंटा करणें; कज्जा करणें. २ भांडणांत किंवा आरडाओरडींत दुस-ऱ्याच्या अंगावरून पलीकडे उड्या मारणें; खेळांत भांडणें (कुत्रीं मांजरें इ० नीं). [कळवंड]

कळवंडाकळवंड—स्त्री. परस्पर भांडण, तंडण; साधारण भांडणतंटा. कळवंड पहा.

कळवंतीण—स्त्री. नाचणारी व गाणारी स्त्री; नाइकीण; कंचनी. कळवंतीण व कसबीण यांत भेद आहे. कळवंतीण उभी राहून किंवा नाचत गाते पण कसबीण बसूनच गाते; तसेंच कळवंतीण गीत, नृत्य इ० कलांनर आपली उपजीविका करते. पण कसबीण उपजीविकेसाठीं देहविक्रय करते; या परस्प-रांना आपलें काम करूं देत नाहींत. २ बाजरीच्या पिकावरील एक किडा, पांखरूं; फुलपाखरूं; पतंग. [सं. कलावंतिनी]

कळवळ–ळा—स्त्रीपु. १ कींव; द्रव; पोटांत होणारी कालवा-कालव; दयेचा उमाळा. २ खळखळ. 'योगिया अंतरीं अति निश्चळ। नाहीं कळवळ कल्पना।' –एभा ८.५६. ३ आस्था; माया. 'त्याला मुलांचा कळवळा अधिक आहे.'

कळवळणें—अक्रि. १ दयार्द्र होणें; कींव येणें; द्रवणें. 'रडे शिशु तयास घे कळवळोनि माता कडे।' –केका १२१. २ व्यथित होणें; दुःखानें कासावीस होणें; व्याकुळ होणें (विंचू चावणें, तिडीक उठणें इ० मुळें).

कळवा—पु. (गो.) विसवण नांवाच्या मासळीचें पोर.

कळवा, कळावा—पु. १ (घोडा वगैरे जनावराच्या) पुढच्या व मागच्या एकेका पायास बांधलेली दोरी, वादी (सदर जनावरानें कुरणांत चरत असतां दूर जाऊं नये म्हणून बांधतात ती). (क्रि० घालणें). ' घोड्याला कळवा घालून सोड. ' ' पाठीवरि मोळी। तोचि कळवा पायीं तळीं। ' –तुगा १५४२. २ कळव्यानें जनावर बांधणें; जखडणें; खोडा घालणें. [का. कळिवु= अडकवणें; खोडा घालणें]

कळवाकळव—स्त्री. १ सर्वत्र सांगणें; चोहोंकडे कळविणें. २ यानें त्याला, त्यानें याला अशा रीतीनें सांगणें; परस्पर कळविणें. [कळविणें द्वि.]

कळविणें—उक्रि. १ माहीत करून देणें; माहिती सांगणें; बातमी देणें. २ फोड करून, स्पष्टीकरण करून सांगणें; शिकविणें; विवेचिणें. [कळणें प्रयोजक]

कळवी—स्त्री. मुख्य सरकारी खजिन्यांतून खोटें किंवा बद नाणें म्हणून परगण्याच्या खजिन्यांत परत आलेली रक्कम, पैसा; खोटें नाणें.

कळशी-सी—स्त्री. १ लहान घागर; केळी. २ भिंतीवर किंवा इमारतीवर नक्षीसाठीं गोळा, काठी इ० वर कळसाप्रमाणें असणारी नक्षी. ३ (गो.) तबला. [सं. कलश]

कळस—पु. १ देवळ, अंबारी, देव्हारा, तंबूचा खांब, छपराचीं टोकें इत्यादिकांवर सुशोभित किंवा रंगीत असा लांकडाचा, दगडाचा, बांधकामाचा वगैरे नक्षीदार कलशाकार जो भाग लावतात तो. ' राजमंडळाचे ढळले कळस। ' २ घुमटी; शिखर. ३ (ल.) उत्तरोत्तर होणाऱ्या वृद्धीचा (मोठेपणाचा, चांगल्या किंवा वाईट कृत्याचा) अतिरेक; पराकाष्ठा; शिरोबिंदु, शिखर; ४ एखाद्या कामाचा शेवट, अंत; पलटीवा प्रारंभ. 'झाला भक्तीचा कळस। आले वसतीस दोष। ' –तुगा ४९२. ५ मानेचा कळस, शिखर; मस्तक; डोकें. मानेचा कळस ढळणें=मरणोन्मुख होणें. ६ कलश; लहान घागर (मातीची किंवा धातूची). **कळसास येणें**–संपणें. 'कळसा आला प्रबंधु। ' –ऋ १०३. 'कळसा आलें निरूपण । प्रेम सज्जन जाणती। ' –एरुस्व १८.६०. ' कामहि आलें कळसासी. ' –दावि ४६२. **०होणें**–देवळ वगैरे इमारतीवर कळस ठेविला म्हणजे बांधकामाची पूर्णता झाली असें होतें. त्यावरून पूर्ण वैभवास चढणें; जोर, तीव्रता, विस्तार वगैरेंची पूर्णे वाढ होणें (हा शब्दप्रयोग चांगल्या व वाईट अशा दोन्ही अर्थी वापरतात). ' वैभवाचा–दुःखाचा कळस झाला.' 'अवरंगजेबाच्या कारकीर्दीत मोगलसत्तेचा अगदीं कळस झाला होता.' **०पट्टी**–स्त्री. (बांधकाम) कळसांची नक्षी असलेली पट्टी, पान. ' माडीला कळसपट्टी सोनियाची। ' –लोक २.६८. **०पाक**–पु. पांढऱ्या वस्त्रावरील एक प्रकारची रंगीत वेलपत्ती. (ओजीच्या आकाराची, उलट सुलट कळस असलेली). ' नाना मछलीबंदरें । कळसपाकें दशेनासी आलीं। ' –सप्र ९.२८. **०पाकी**–वि. कळसपाक काढलेलें (कापड, पागोटें); विशिष्ट नागमोडी रंगीत वेलपत्तीचें (वस्त्र, बायकांचें पातळ). –भात्रे १०.३.१२६. [कळस+पाक] **०पाणी**–न. १ (लग्नांत) वधूवरें नहातेवेळीं नवऱ्यामुलाच्या अंगावरील पाणी मुलीच्या अंगावर जें पडतें त्यास म्हणतात. (सामा.) नवऱ्याचें उष्टें पाणी; एक ग्रामाचार. [सं. कलश+वन=पाणी]

कळसणें—उक्रि. गुप्तपणें पहाणें; हेरणें; बारीकपणें व जिज्ञासुपणें पहाणें; जिज्ञासापूर्वक व चौकसपणानें तपासणें; सूक्ष्म रीतीनें व लक्षपूर्वक पाहणें; कळाशीनें पहाणें. [सं. कला+ईक्ष्]

कळसा—पु. १ (कों.) तोटीची, मातीची घागर, घडा; कोंकणांत नारळी वगैरे झाडांस पाणी घालण्यासाठीं कळसा वापरतात. २ (राजा.) धातूची घागर. ३ (कुंभारी) ज्यापासून मडकीं वगैरे करतात त्या मळलेल्या मातीचा ढीग. ४ (ना. व.) अक्षयतृतीयेच्या दिवशीं ब्राह्मणास जो मातीचा कलश दान देतात तो. ५ (व.) शुभकार्याच्या प्रसंगीं वापरण्यांत येणारी मातीची लहान घागर; कलश. ' कळसा घेऊन उभा रहा. ' **म्ह०** कांखेस कळसा, गांवास वळसा. [सं. कलश]

कळसुंचें—क्रि. १ (गो.) भिसळणें; कालविणें. २ नारळाचा कीस तव्याबर परतणें. कलसणें पहा.

कळसूत्र—न. १ बाहुली चालविण्याची दोरी, साधन. कळसूत्री बाहुलें पहा. २ (ल.) मुख्य भाग; मध्यवर्ती कल्पना; मुख्य आधार; ज्यावर सर्व हालचाली अवलंबून असतात असा भाग. ' जी साऱ्या नाटकाचें जणों काय कळसूत्रच आहे. ' –नि ५३७. ३ खरा चालक अदृश्य राहून निर्जीव वस्तू स्वयंप्रेरणेनें चलनवलन करतात असें भासविण्याची युक्ति. [सं. कला–कळ+सूत्र]

कळसूत्री—वि. कळसूत्राची; कळसूत्रासबंधी. –स्त्री. (ल.) क्रांति; अचानक झालेली उलथापालथ. ' कशी एकाएकीं झाली धन्य कळसुत्री। ' –ऐपो ४०४. **०बाहुलें**–न. १ बाहुल्यांचे अवयव जसे पाहिजेत तसे फिरावे म्हणून युक्तीनें त्यांच्या अंगांतून तारा नेलेल्या असतात, त्या तारांच्या योगानें त्या बाहुल्यांना पाहिजे तसें नाचवितां येतें, अशा बाहुल्यांपैकीं प्रत्येक. प्राचीनकाळीं कळसूत्री बाहुल्यांच्या खेळाचा प्रचार सर्वत्र असे. ' सूत्रधार ' हा शब्दहि त्यावरून आला. २ (ल.) स्वतःस कांहीं ठाम मत नसून दुसऱ्याच्या मतानें वागणारा माणूस; कोणाच्या तरी कह्यांत राहणारा, पुळपुळीत माणूस. ' बाजीरावाचें कळसूत्री बाहुलें आपले हातीं बरें सांपडलें असें बाळोबास वाटलें ' –अस्तंभा १९.

कळज्ञ—वि. १ सूज्ञ; जाणता. 'श्लाघ्य हा तुज नसें कळज्ञा।' –अकक हरिराज मुद्गलाचार्यांचें भाषांतर ३. २ कलावान. [सं. कला+ज्ञ]

कळा—पु. १ फुलाची मोठी कळी; कोरक; कळींचें मोठें स्वरूप. 'तो कनक चंपकाचा कळा।' –ज्ञा ६.२५७. २ केळ-फूल. 'पाहतां जैसा केळीचा कळा। स्वयें विकासे फळांदळां।' –एभा २.५७७. ३ चौफुला वगैरेस शोभेसाठीं कळीच्या आकारा-चें हातांत धरण्यासाठीं जें बोंड बसवितात तें. ४ बुगडीचा वरचा कळीसारखा भाग. [सं. कलिका] ०**फूल**–न. १ एक औषधासाठीं वाळविलेली फुलाची कळी. २ कोणतेंहि कळीच्या आकाराचें फूल. ०**मोगरा**-पु. (सोनारी) मोगऱ्याच्या फुलांच्या कळीसारखा आकार दिलेला कोणत्याहि दागिन्याचा भाग. कळी पहा.

कळा—स्त्री. १ कला या शब्दाच्या सर्व अर्थी योजतात. 'कीं हे नाना कळांचें जीवन।' –दा १.७.२. 'असो सकळ कळा प्रवीण। विद्यामात्र परिपूर्ण।' –दा. २ किरण; प्रकाश. 'जैसें शारदीयेचे चंद्रकळे–। माजीं अमृत कण कोंवळे।' –ज्ञा १.५६. ३ तेज. 'तैसें पिंडाचेनि आकारें। तें कळाचि कां अवतरे।' –ज्ञा ६.२५०. 'जनविजन समान कळा। तेचि आपाद वन-माळा।' –एरुस्व १.४१. ४ चंद्राचा १६ वा अंश; त्यावरून १६ ही संख्या. 'चंद्रमा कळीं धाला। न दिसे कोणे आंगीं वोसावला।' –ज्ञा १५.३०३. 'चंद्रासि लागति कळा उपराग येतो।' –र २. ५ मनस्थिति. 'काय भाव एक निवडूं निराळा। जाणसी तूं कळा अंतरींची।' –तुगा १६१३. ६ देखावा; दशा. 'दावुनि वैराग्याची कळा। भोगी विषयांचा सोहळा।' –तुगा २८३५. ७ युक्ति. 'कळा तुजपाशीं आमुचें जिवन। उचित करून देई आम्हां।' –तुगा ९. ८ चातुर्य; करणी. 'पाव्याभाजीं रागज्ञान। केल्या अति मधुर गायन। तो पाव्याचा नव्हे गुण। कळा जाण गात्याची।' –एभा १०.२६७. ज्याची कळा तोच जाण।' –ऐपो १४४. ९ ज्ञान. 'कस्तूरीचा वास घेईल काऊळा। तरिच ती कळा कळे तया।' –व ९८. १० हालचाल; चलनवलन. 'शरिरांतुनिया प्राण गळाल्या लोपति सर्व कळा।' –रत्न ४.३. ११ प्रकार. 'जेवीं माउली देखोनि डोळा। बालक नाचे नाना कळा।' –एभा ३.५९९. [सं. कला] ०**जाणें**–वि. (व.) अवनति होणें; दुर्मुखलेलें दिसणें. 'त्याच्या अठरा कारखान्याच्या गेल्या कळा।' –ऐपो १४२. ०**ईत**–वि. कुशल; कलावान (मनुष्य). ०**कळी**–स्त्री. मर्म; कौशल्य. 'तेआं जुंझाची कळाकळी। ते देशांचि वेगळी।' –शिशु ८७९. ०**कांती**–स्त्री. (शरीराची, चेहऱ्याची, देहाची) चमक; सतेजता; तेज; टवटवी. 'परम मळीण दिसती। कळाकांती नसे कांहीं।' ०**कुशलता**–**कौशल्य**–स्त्रीन. कसब व चातुर्य; नैपुण्य व करामत; शहाणपणा व बुद्धि. ०**कुसरी**–स्त्री. १ (कुसरी हा शब्द लुप्त झाला असून बहुधा कला शब्दाबरोबर अधिक जोर येण्याकरितां योजितात) चातुर्याची कल्पना; युक्ति; करामत; कुशलतेची रचना; शहाणपणाची योजना. २ कौशल्य; कसब; कारागिरी (गाणें, चित्रकला इ० तील). 'पतिच्या संगावांचूनि सर्वै स्त्रीच्या वृथा कळाकुसरी।' –मो. ३ बारीक नक्षीकाम (जीगचें काम, भरतकाम इ०). [अनेकवचन, कळा=कुशलता+कुसरी] ०**खाऊ-घाण**–वि. १ एखाद्याच्या मोठेपणास, अब्रूस काळिमा आणणारा. २ जो दुसऱ्याला मूर्ख बनवितो, घोटाळ्यांत, गोत्यांत आणतो तो. 'घरीं कळाखाऊ अबला नसावी अशी। अवघा वेळ रागामधीं नागीण धुसधुशी।' –पला ८०. २ (व्यापक.) शोभा येण्यासाठीं, सौंदर्यासाठीं कोणतीहि गोष्ट केली असतां तिचा ज्यावर परिणाम होत नाहीं अशी व्यक्ति (विशेषतः स्त्रिया व मुलें); घाणेरडा; कळाहीन; मळकट; घाण. 'कळाखाऊ कपडे घालून जर गेलात तर काम कसें होईल?' ०**तीन**–स्त्री. (व.) कळावंतीण. ०**धर**–वि. कलावान; पंडित; विद्वान्. 'जितुके कळाधर पृथ्वीवरी। जे जे आले शाहू नगरीं।' –निमा (आत्मचरित्र) १.१०६. ०**निधि**–पु. १ चंद्र. २ ज्याच्यापाशीं पुष्कळ कला आहेत असा. ०**न्यास**-वि. अनेक कलाकौशल्यानें बनविलेलें; नक्षीदार. 'पांचा आंगोळियां विन्यास। कळान्यास मुद्रिका।' –एरुस्व. १५.५३. ०**पात्र**–वि. कळावान; कलावंत. 'विद्यापात्रें कळापात्रें। विशेष गुणांचीं सत्पात्रें।'–दा १.८.२३. –न. कलावंतीण. 'तों सभेसी आलीं कळापात्रें। श्रीची लीला वर्णिती विचित्रें। त्या गौरविल्या राजीव-नेत्रें। वस्त्रें भूषणें देवोनियां।' –ह २९.१५१. ०**वंत**–वि. कलावंत पहा. ०**वती-वंती-वंतीण**–स्त्री. कलावंतीण, कळवंतीण पहा. 'कळावती ते करी दरिद्र। कामिका पाश घालूनि।'–दावि ४५१. ०**विद्**–वि. कलावान; कुशल. 'तें कळाविदीं आइकावी। अवधान देओनी।' –शिशु ६५१. ०**विद्पण**–न. कुशलता. 'एय कळाविदपण कळा।' –ज्ञा २.३७. ०**सूत्र**–न. कळसूत्र पहा. ०**सूत्राचा खेळ**–पु. कळसूत्री बाहुल्यांचा खेळ. ०**सूत्राची बाहुली**–स्त्रि. विशिष्ट प्रकारच्या दोऱ्यांनीं हालणारी बाहुली. ०**सूत्री**–वि. कळसूत्री पहा.

कळाकळा करण—क्रि. (ध्वनि) त्रास आणण्यासारख्या व डोकें उठविण्यासारख्या हेकेखोरपणानें भाषण करणें; भीक मागणें; कंटाळा येईल अशा रीतीनें पुनःपुनः सांगणें.

कळांतर—न. व्याज. कलांतर पहा. 'पै कळांतर गांठीं बांधिजे' –ज्ञा. १७.२८७. 'लोभ्या कळांतरीची आस। बोटें मोजी दिवस मास' –तुगा ११४७. 'द्रव्य नसेल तरी घ्यावें। रूण कळांतरें।' –दा ३.२.३७. 'अतीत अभ्यागत आलियां

वरासी । त्याचरी जैसें कुतरें वसवसी । कळांतरें काहून व्याघ्रा-जावयांसी । पायां पडोनि समजावी । ' –स्वानु ३.५.१७.

कळातीत–वि. निर्गुण (परब्रह्म). [सं. कला+अतीत]

कळाये—पु. (गो.) एक दागिना. कळावी पहा.

कळाव—पु. (गो.) उशीर; वेळ. ' कळाव जालो. ' =उशीर झाला. [सं कालव्यय]

कळावंत—पु. कलावंत; गवई वगैरे कलावान लोक. ' कळावंतांचें जें मन । तें कळाकार जालें । ' –दा १४.५.३०. [कलावंत]

कळावा—पु. पायवंद; कळवा पहा. ' भीम कसा विक्रमगति सेवक झाला हया कळावासा । ' –मोद्रोण १२.२६.

कळावी-कळाविया—स्त्री. १ स्त्रियांच्या हातांतील कलेदार दागिना. 'करीं कळाविया चुडे कंकणें । मुद्रिका रत्नें सुलक्षणें।' –कथा. ५.१६.१८३. २ हत्तीच्या दांतांस बसविलेल्या सोन्याच्या सुळी, शेंबी, टोपण. ' पृष्ठीं मिरविलीं गुढारीं । दंतीं खोविल्या कळाविया सुरी । ' –कथा ४.९.४६. [कळा]

कळावो—पु. (गो.) मिठागरांतील माती.

कळाशी-सी—स्त्री. १ दोन लांकडें किंवा दगड यांचा एकाशीं एक घट्ट व नीट बसविलेला सांधा, संधि. २ सांध्याचा बेमालूम जोर; एकसंधीपणा. ३ असा सांधा करण्याकरितां दोन्ही वस्तूंचा जोडाशीं येणारा सफाईदार केलेला पृष्ठभाग. ' सांध्यांत दर्शनी बाजूपासून निदान तीन इंच कळाशी असावी. ' –मॅरट ३४. ४ कळाशी करण्याचें हत्यार. ५ (गो.) (सुतारी) खिळा असलेली बारीक काठी, हिनें लाकडावर खोल रेघा काढतात; ठेवण; फावडी; आंखणी; खतावणी. ६ (व.) नांगराच्या दांतास फाळ पक्का बसविण्याकरितां घालावयाची लोखंडी कडी. ७ कायमपणा; बेमालूमपणा. ' अक्षुणिहि न वचे हा चंद्र अस्ताचलासी । यदुपतिविरहाची बैसवीली कळासी ॥ ' –सारुह ३. ११०. [कला]

कळाशी—स्त्री. (महानुभावी) मुख, हात, पाय आणि वाद्यघोष यांसह नृत्य. ' मोटका कळाशी करी । ' –भाए ४५९. [सं. कला. किंवा कलशिका; प्रा. कलसिया=वाद्यविशेष ?]

कळाशी-सी—स्त्री. कौशल्य. कळास पहा. 'युक्तीनें, कळाशीनें मोर्चेबंदी केली. ' –भाव १५.

कळास-सू—वि. घाटदार; डौलदार, 'मध्य कळासु नेटका। क्षुद्र घंटिका मेखळे । ' –एभा ११.१४८१. 'सुरेख खांबु कळासे। ओडविलें बहुतें सायासें । ' –शिशु ३४७. –पु. कौशल्य; चातुर्य. ' तों तांडवमिसे कळासु । दाविसी तूं । ' –ह्मा १७.८.

कळासणें—क्रि. १ सांधा जोडणें; एकत्र करणें. ' जैसे यंत्र कळासिलें । तैसेंच हें ठायीं ठायीं बांधिलें । ' २ (ल.) जखडणें; घट्ट करणें, बांधणें. ' कर्माच्या वज्रगांठी । कळासे तो । ' –ह्मा १८. ३९२. ' सवैत्र बांधिजे कळासुन । ' –रंयो ६.१३५. ३ फट न ठेवतां बांधकाम करणें; घट्ट, मजबूत जोडणी करणें; पक्कें बंद करणें. ' सर्व द्वारीं कवाडें । कळासती । ' –ह्मा १८.११२. ' कळा सले एकेवेळें अखंडकुलुपें । ' –एभा २.५१४. ४ निग्रह, निरोधन करणें. ' बाहेरी धीट जैसी । दाटुगा पति कळासी । ' –ह्मा १३.५०५. [कळासी]

कळास्य—पु. कळाशीनें केलेली घडण; बेमालूम रचना, बांधणी; कळाशी. ' पाहतां मंडपाचा कळास्य। तेणें हर्षे परम हास्य । ' –स्वानु ८.५.४९. [कळासी]

कळिकटा-काटा—पु. भांडण; कलह. 'विधि निषेधांचिया वाटा। दाविता हाचि दिवटा । बंधमोक्ष कळिकाटा। शिष्ट हाचि।' –अमृ ६.५. –वि. भांडखोर; कलह लावणारा. [सं. कलि+कंटक]

कळिका—स्त्री. १ कलिका पहा. ' परि कळिकेमाजीं सांपडें। कोंबळीये ॥ ' –ह्मा १.२०१. २ (ल.) ज्योत (दिव्याची). ' जैसी दीपकलिका धाकुटी । परी बहु तेजातें प्रगटी । ' –ह्मा २.२३८.

कळिका—न. एक प्रकारचें कापड; कॅलिको. –मुंव्या १२३. [इं. कॅलिको]

कळिकाळ—पु. १ (काव्य) कलियुग; कलियुगांतील काळ. २ (ल.) अनिष्ट, संकटमय वेळ; विपत्तीचा समय. 'त्यासी कळिकाळाचें नाहीं भय । ' –ह १८.८२. ' घालुनियां कास करितो कैवाड । कळिकाळासि आड लागों नेदी । ' [सं. कलि+काल]

कळिता—वि. १ प्रास करणारा; खाणारा. ' पैं कळितयांमार्जी महाकाळु । ' –ह्मा १०.२४८. २ कळ चालविणारा, हातांत असलेला, फिरविणारा, नियामक. ' जो जगाचा नियंता । त्या काळाचा कृष्ण कळिता । ' –एभा ६.३२६.

कळिद्री—वि. (गो.) दरिद्री; दळभद्र्या. कलंदर पहा. [फा. कलंदर]

कळिलावा—वि. कळलाव्या; आगलाव्या; भांडणतंटा उपस्थित करणारा. 'एकु वेळु मीं कैलासां गेलां । तंवं भणती हा कळिलावा आला । ' –शिशु १३१. [कळ+लावणें]

कळि(ळी)वर—न. कलेवर पहा. ' आतांचि पडो अथवा राहो । मिथ्या कळीवर । ' –दा ७.१०.९. [सं. कलेवर]

कळी—पु (विणकाम) सात चटके ज्यांत एकत्र असतात ती सुताची लड. [सं. कलिका]

कळी—स्त्री. १ कलिका; फूल उमलण्यापूर्वी पाकळ्यांचा जो परस्परांत संकोच झालेला असतो ती स्थिति; मुकुल; कोरक. २ कमळाच्या कळीच्या आकाराचें एका जातीचें हस्तीदंती किंवा लांकडी भांडें (यांत केशर इ० ठेवितात). ३ बुंदीच्या लाडवांतील

दाणा. ४ लहान खडा (भाजलेल्या चुनखडीचा, मिठाचा, इ०); उदा० चुनकळी. 'तुका म्हणे लवणकळी। पडतां जळीं तें होय।' –तुगा २७२९. ५ कळीच्या आकृतीचा खाचयाचा विडा–पट्टी; कळीदार पट्टी. ६ आंगरख्याच्या घोळाच्या दोन त्रिकोणी भागांपैकीं मागील भाग (हे दोन भाग व आगा मिळून घोळाची बाजू होते–मोल.); अंगरख्याच्या कापडाचे त्रिकोणाकार जे तुकडे असतात ते प्रत्येकीं. –शाको. ७ सदऱ्याच्या बगलेंत किंवा चोळीच्या बगलेंत जो अनुक्रमें चौकोनी व तिकोनी तुकडा देतात ती; बगल झांकणारा कपडा. ८ मराठेशाही पागोटयाच्या पुढील भागीं असलेला कळीच्या आकृतीचा पीळ.९ एखाद्या काठकी भोंवतालीं गुंडाळलेलें सुमारें तीन मासे वजनाचें रेशीम, रेशमी दोरा. १० एखादा काटकीचा तुकडा किंवा पानाचा हीर किंवा असाच दुसरा पदार्थ ज्यावर मातीची लहानशी गोळी लावून त्यावर बेगड चिकटविलेला असतो किंवा बेगड लावलेली मातीची कळीच्या आकाराची गोळी ज्यावर बसविलेली असते तो कळस. 'गणपतीच्या मस्तकावरची कळी पडली.' ११ चौपाखी छपराची तिकोनी बाजू. **०उमलणें**–१ फूल विकसणें, फुलणें, उघडणें. २ (ल.) मौन सोडून मोकळेपणानें बोलावयास लागणें (आंतल्या गांठी व्या व घुम्या माणसानें). ३ एखाद्याचा रुसवा, औदासिन्य जाऊन चेहरा प्रफुल्लित होणें. ४ स्पर्धेनें किंवा मत्सरानें जळणें; चढाओढीच्या भरीस पडणें. **कळीचा चुना**–पु. भाजलेली चुनखडी; चुन्याच्या कळ्यापासून तयार केलेला रवाळ चुना (खाण्याचा). **कळ्यांची पटी**–पु. (कु.) चांपेकळ्यांची तयार केलेली वेणी. **कळीचें पान, कळीदार पान**–न. आंकडयाचें विडयाचें पान; ज्याची आकृति लांबट किंवा कळीसारखी आहे असें टोंकदार पान. **कळीचें काम**–न. दगडांची बिनथरी ओबडधोबड रचाई; (इं.) रँडम रबल.

कळी—स्त्री. १ भांडण; तंटा; कज्जा; कलागत. 'विकत कळी जयानें घेतली आजि मोलें।' –सारुह ३.७८. 'कळी करि धुनिमैळीं परम उप्र दावा नळीं।' –केका २१. 'येगे कळी बैस माझे नळीं.' २ कलियुग; चालू युग. 'ऐसें युगीं परी कळीं। आणि महाराष्ट्र मंडळीं।' –ज्ञा १८.१८०२. ३ युद्ध. 'ऐसें गोत्रचि दोहीं दळीं। उदित जालें असे कळी।' –ज्ञा १.१८४. **कळीचा नारद**–पु. कळलाव्या; भांडण लावून देणारा; कज्जेदलाल; आगलाव्या; चुगल्या; लावालावी करून तंटे उपस्थित करणारा (पुराणांत नारद हा नेहमीं तिन्ही लोकांत भांडणें उपस्थित करतो अशा कथा आढळतात यावरून). [कळ+नारद] **कळीवांचून कांटा निघणें**–भांडणतंटा किंवा त्रासावांचून अनिष्ट गोष्ट नाहींशी होणें. 'कालेजांत विद्यार्थ्यांची मनस्वी गर्दी होत असते ती कमी व्हावी यासाठीं कॉलेजची फी वाढवून १५ रुपये करावी म्हणजे आपोआपच कळीवांचून कांटा निघेल अशी कल्पना निघाली आहे.' –मनोरंजन पु. ७. भाग ८.

कळीत—न. उभ्या पिकांचा किंवा फळांचा अंदाज, अभावणी, आणेवारी. [कळणें.] **०करप**–(गो.) कळविणें.

कळेवर—न. कलेवर पहा. 'आपण व्हावें एकीकडे। देव कळेवरी जोडें।' –तुगा ३४६१. [सं. कलेवर]

कळो—पु. कलह; भांडण. 'मग ते कळो वाढविती। परस्परें कष्टती।' –दा १२.२.९. 'नित्य घरामधें कळो माजला करूं पाहती फुगडी।' –पला ७६. [सं. कलह] **०कळो**–(गो.) बायकांची बजबज, कलकलाट.

कळो—पु. (गो.) कळथा; सोनार जातीस उपहासानें म्हणतात. [कळा]

कळोतर, कळोत्र—न. वस्त्र; उपवस्त्र. 'धोत्रें कळोत्रें नेसला। यज्ञोपवीत रुळे गळां।' –ह ४.११२. [सं. कलत्र=कटि+उत्तरीय?]

कळ्थौंचें—क्रि. (गो.) फुलणें; कळी येणें. [कळथो=कळथा]

कळ्ळहणा—पु. (कों) कळण; डाळीचा चुरा. कळणा पहा.

कळ्ळहांटणें—उक्रि. (राजा.) धान्य आणि माती एकत्र मिसळलीं असतां हातानें चाळवून चाळवून निवडणें. [सं. कल्=गोळा करणें]

कळ्ळो—पु. कलह; दंगा; भांडण; तंटा; कळी; कळो पहा. 'जाणता पुरुष असेल जेथें। कळ्ळो कैचा उठेल तेथें।' –दा १९.४.१६. (क्रि० करणें; माजविणें.) [सं. कलह]

कळ्ळ—वि. (बे.) चोरटा. [का.]

कक्ष—पु. १ खांक; खांद्याच्या खालची बाजू. २ एक बाजू; बगल; कूस. 'शैल कक्षांचीं कुहरें। जळाशय परिसरें।' –ज्ञा १३.६१२. [सं. कक्षा]

कक्षा—स्त्री. १ वादविवादांतील वादीप्रतिवादींचा कोटिक्रम, आक्षेप, उत्तरप्रत्युत्तर. [सं.] २ खण; खोली. ३ ग्रहांचा व तारयांचा संचारमार्ग; चंद्र, सूर्य, नक्षत्रें इत्यादि कोणतीहि स्वस्थ वस्तु दुसऱ्या कोणत्याहि स्वस्थ वस्तूभोंवतीं ज्या मार्गानें फिरते तो मार्ग; ग्रह व उपग्रह यांच्या कक्षा दीर्घवर्तुळाकृति असतात. ४ (ल.) सीमा; आटोका; पोंच; मर्यादा; क्षेत्र. 'यांची चौकशी कमेटीच्या कक्षेबाहेरची आहे.' –केसरी १२.७.३०. ५ कक्ष पहा. **०पति–कक्षाधीश**–पु. १ (लक्षापति किंवा लक्षाधीश या शब्दार्थी जुळविण्याकरितां बनविलेलें विनोदी रूप) आपल्यापाशीं फुटकी कवडीहि नाहीं हें दाखविण्यासाठीं स्वतःच्या खाकावर करून दाखविणारा. २ (ल.) अत्यंत दरिद्री माणूस. **म्ह० कक्षापती कीं लक्षापति. ०पात**–पु. (ज्यो.) एका ग्रहाची कक्षा

दुसऱ्याच्या कक्षेच्या सरळ पातळीस ज्या बिंदूवर छेदते तो. (इं.) नोड. ०पातरेषा–स्त्री. जी सरळ रेषा पृथ्वीच्या मध्यबिंदूतून जाऊन कक्षापातांस जोडते ती रेषा.

कक्षा—स्त्री. (गो.) मर्यादा; भीड; मुर्वत. [सं. कांक्षा]

का—क्रिवि. प्रश्नार्थक वाक्याच्या शेवटीं तोच अर्थ दाखविण्याकरितां हें अव्यय योजतात व त्यामुळें वाक्यार्थ पुराहि होतो; काय. 'हें तूं आणलेलें पागोटें का?' 'तूं मग तिकडे जातोस का?'

का, कां—उअ. अथवा; किंवा; कीं. 'कां नुदेलिया सुधाकर। आपणपें भरें सागर।' –अमृ ७.१५२. निमोलीं वल्कलें परिधान। का त्यागिलीं अति जीर्ण वस्त्रें घ्यावीं।' –एभा ३.४९२. 'सळो का पळो.'

का, कॉ—उद्गा. काव्, काव् असा कावळ्याचा ध्वनि. 'का का शब्द करूनी भ्रमती त्यांच्या कुळांत मी झालों।' –मोकर्ण २८.५९. [ध्व.]

कां—क्रिवि. १ प्रश्नार्थक अव्यय; कशासाठीं; कोणत्या कारणानें; काय म्हणून; 'मीं पायां लागें कां। कांइसेयां लागीं।' –शिशु २२४. २ (काव्य) पादपूरक अव्यय. 'देशोदेशींचे जे कां नृप।' [सं. किम्; फ्रेंजि. क.]

काइ, कांइ—सना. कांहीं. 'कांइ करो अभ्यागतु। तुम्हीं निजानंदें तृप्तु।' –शिशु ७४. 'कांइ करीन प्राणेश्वरा।' –उषा ५४६. [सं. किंहि–काइ]–क्रिवि. किती; काय? 'तेवि नगरप्रवेसी आनंदु। कांइ सांघों।' –ऋ २०. 'तो निर्मत्सरु काइ म्हणिजे। बोलवरी।' –ज्ञा ४.११३. –प्रश्नार्थक अव्यय; काय. 'असो तुम्हीं आमुचा भर्ता। देखीला काइ जातां?' –रास २.१८१. [सं. किंहि–कांइ]

काइणी—स्त्री. (प्र.) काहणी, कहाणी. जोंधळ्यावरील रोग. काणी पहा.

काइमी—स्त्री. कायमपणा; स्थिरपणा; पक्केपणा; शाश्वति; अढळपणाची स्थिति; ठरलेली परिस्थिति. [अर. काईम]

काइरस—पु. काकडी वगैरे कच्च्या फळांची चिंच, गूळ घालून केलेली पातळसर कोशिंबीर. कायरस पहा. [का. काई=कच्चें फळ+रस]

काइलींतला खडा—पु. १ उंसाच्या रसाच्या काहिलींतील खडा. २ (ल.) तावून सुलाखून निघालेला, कसोटीस उतरलेला मोणूस.

कांइसा–सी–सें—सना. १ कसला? कशाचा? कोठील? 'हा वो कवणु असे आंगनीं चाहाळु कांइसा।' –शिशु १७३. २ कशाचा ची–चें? कशाकरितां? काय म्हणून? ३ कसा–सी–सें? 'ऐसें कांइसें वो निढाळपण।' –शिशु १७९. [कसा]

काइसेन–नि—सना. कशानें; कोणत्या मार्गानें, प्रकारानें? 'वेदशास्त्रयुक्तिबळें। माझें स्वरूप काइसेनि न कळे।' –एभा १९.५३. 'जेथ जीवाशिवा ऐसी गति जाली। तेथ आतां काइसेन करावी बोली।' –स्वानु १०.५.६. [कसा, कशानें]

काई—वि. (तं.) कच्चा. –न. कच्चें फळ. [द्रा. का. काई=कच्चें फळ]

काई, कांई—१ (काव्य) काय?, काइ पहा. 'एरीकडे श्रीचक्रपाणी। कांई करिते जाले।' –शिशु ८५२. 'एरें प्राकृतें कांई जालीं।' –दाव ३४०. 'तेणें मतें काज कांई।' –विउ ८.१३. २ कसें? ३ कांहीं तरी. 'मेला काळा विकाळ दशानन करून काई।' –राला ९.

काईट—पु. (व.) काळवीट (अप.) पहा.

काईत—पु. (हिं.) कायस्थ जात व त्या जातींतील व्यक्ति. कायत पहा.

काईम—वि. १ कायम; उभा. २ स्थिर; मजबूत ठोकलेला; पक्का. ३ कबीज. 'परंतु आठपंधरा दिवसांत सारीं स्थळें इंग्रजांनी काईम करितात.' –खरे ११.६०७९. ४ नित्य. [अर. काईम्=उभा, स्थिर] ०दाईम, काएमदाएम–वि. निरंतरचा; कायमचा; फार काळ पूर्वीपासूनचा; सतत चालणारा. [अर. काइम्+दायम्]

काईल—स्त्री. काहिली; उंसाचा रस कढविण्याचें, पसरट तोंडाचें भांडें; मोठी कढई. [सं. काहल=विस्तृत; काहला=मोठा नगारा]

काईल–यल–यर—वि. १ दंडित; जित. 'दोंहींकडून तुम्ही काईल व्हाल तेव्हां आम्हांवर शब्द.' –रा १.२२६. २ कुंठित; निरुत्तर. 'पत्र कोठें आहे तें काढावें म्हणजे आम्हीं त्यांस काईल करूं' –खरे ५.२४७३. [अर. काइल=जित]

काउ–ऊ—पु. (बालभाषा) कावळा. 'ये रे ये रे काऊ। बाळ घाली जेवूं।' ०काऊ–उद्गा. कावकाव पहा. 'मग आठवावे कृष्णवाई। भ्रम फुटल्यावर होइल काउकाउ।' –सला ८९.[ध्व.]

काउरें—न. वेड; काविरें पहा.

काउस—न. (व.) एक प्रकारचें गवत. हें शेतांत उगवतें. याच्या मुळया १०–१२ फूट खोल जातात. त्या पिकांना त्रासदायक असतात. [सं. काश]

काउळा—पु. कावळा. 'तरी तो काउळियांसीचि सुकाळु जाहला।' –ज्ञा ९.४३८. [कावळा]

काउळकाठी—स्त्री. काटक्या; राबासाठीं झाडाच्या तोडलेल्या फांद्या; कवळकाठी पहा.

काऊ—स्त्री. (कों.) गरू; काव पहा.

काऊन–हून—(ना.) का म्हणून.

काऊर—वि. (व.) जबर काम करणारा; मेहनती. 'म्हातारा मोठा काऊर आहे.' [सं. कार्यकर]

काऊल—न. (बे.) कुरण. [का. कावल–ली–लु]

काऊस—पु. १ (व.) उसाच्या शेंडयाचा नीरस भाग; वाढें. २ (ल.) कुचकामाचा माणूस. म्ह० उंसाच्या पोटीं काऊस जन्मला=हिऱ्याच्या पोटीं गारगोटी. [सं. कु+इक्षु]

काऊळकाटी—(गो.) कवळकाठी पहा. –शे ३.९.

काक—पु. कावळा; काऊ. 'जे मृत्यु काकासि कुरोंडी। सांडिली आहे।' –ज्ञा ८.१४०. 'देऊनि काक घ्यावे पांच तुवां चित्र–बर्हे–शितिकंठ।' –मोसभा ४.१९. [सं.] ०**अंधा**–स्त्री. एक वनस्पति; कांग. [सं.] ०**तालीय**–न. यदृच्छा; आकस्मिकता; दैवघटना. –वि. यदृच्छापूर्वक; एकसमयावच्छेद; सहजासहजीं घडणारी; आगंतुक; दैवागत. [सं. काक+ताल=ताड] ०**तालीयन्याय**–पु. (मूळ संस्कृतांत कावळा येणें व त्याच वेळीं ताडफळ प्राप्त होणें. याचा दृष्टांत आकस्मिक इष्टवस्तु–लाभाच्या वेळीं देतात) ताडाच्या झाडाच्या फांदीवर कावळा बसला आणि त्याच वेळीं जर कर्मधर्मसंयोगानें ती फांदी मोडली तर बसणें आणि मोडणें ह्या दोन क्रियांचा एकमेकीशीं वास्तविक कार्यकारणभाव नसतांहि अज्ञानी लोक त्यांचा परस्पराशीं संबंध जोडतात. त्याप्रमाणें यदृच्छेनें किंवा अकल्पित तऱ्हेनें एखादी गोष्ट घडून आली असतां तिचा संबंध दुसऱ्या एखाद्या विशिष्ट गोष्टीशीं कोणी माणूस जोडूं लागला तर त्यावेळीं हा न्याय लागू करतात. यावरून काकतालीय न्यायानें म्हणजे यदृच्छेनें; कर्मधर्मसंयोगानें; दैवगतीनें असा अर्थ होतो. 'ऐसी कर्माचि गति गहन। एथ काकतालीयन्यायें जाण। अवचटें लाभे माणूसपण। भवाब्धितारण महातारूं।' –एभा २०. १७३. 'प्रस्तुत पुस्तक लिहिलें जाण्यास काकतालीयन्यायानें आम्हीं कारण झालों ...' –टि ४.१८१. ०**तालीयवत्**–क्रिवि. केवल यदृच्छेनें; दैवयोगानें; काकतालीयन्यायानें. [सं.] ०**ताळ**–काकतालीय पहा. 'अमृतसिद्धी योग फावला। अकल्पित काकताळें।' –निमा (आत्मचरित्र) १.१०४. ०**दंतपरीक्षा**–स्त्री. ज्यांत कांहीं अर्थ नाहीं अशा विषयाची खोल चिकित्सा (वास्तविक कावळ्याला दांत नसतात यावरून). (संस्कृत म्हण). ०**दृष्टि**–वि. १ तीक्ष्ण दृष्टीचा; सूक्ष्म दृष्टीचा; बारीक व चलाख नजरेचा. २ छिद्रान्वेषी; बाईट तेवढयाच गोष्टी पाहणारा. –स्त्री. (कावळ्या सारखी) तीक्ष्ण नजर; सूक्ष्म नजर, दृष्टि. 'बाजारांतून जर सोदे काकदृष्टीनें फिरले तर संध्याकाळीं येयें वेळ मोहन राहण्याचा मोबदला मिळेल.' –विवि ८.८.१५५. [सं.] ०**पद**–न. १ लिहितांना गळलेल्या अक्षराच्या दुरुस्तीच्या वेळीं जेथें तें अक्षर घालावयाचें असेल तेथें करावयाची (कावळ्याच्या पाया सारखी) Λ अशी खूण. (गु.) काकपद. २ हिरा वा रत्नांत तीन मोठे काळे छाटे असल्यास त्या दोषास म्हणतात. [सं.] ०**पक्ष**–पु. (कानावरील झुलपें; लहान मुलाच्या पहिल्या हजामतीच्या वेळीं दोन्हीं कानांवर हीं झुलपें ठेवतात. व मोठेपणीं तीं काढून टाकतात. परंतु कांहीं लोक (विशेषतः लष्करांतील मराठे) तीं नेहमीं ठेवतात. [सं. काक+पक्ष=पंख) ०**फळ**–**फळी**–स्त्री. एक वनस्पति. –न. तिचें फळ. हीच काकमारी नांवाची वनस्पती असावी असें कांहींचें मत आहे. ०**बलिबळ**–**ळी**–पुस्त्रीन. (कों. गो.) वैश्वदेव व बलिहरण होऊन उरलेला भात घराबाहेर कावळ्याला टाकतात तो; कागवळ. ०**मारी**–काकफळी पहा. ०**मुखी**–वि. सगळा एकरंगी पण तोंड काळसर असलेला (घोडा). ०**मैथुन**–न. कावळी–कावळा यांचा रतिप्रसंग, मैथुन. हें पाहिल्यास लवकर मरण येतें अशी समजूत असल्यानें तें पाहणारा आपल्या मृत्यूची खोटीच बातमी पाठवितो. म्ह० 'काकमैथुन पहावें सहा महिन्यांत मसणांत जावें.' ०**मैथुनशांति**–स्त्री. काकमैथुन पाहिलें असतां पाप किंवा अनिष्ट निरसनार्थ करावयाची शांति. ०**यव**–१ ज्यामध्यें पीठ किंवा सत्त्वांश नसतो असा पोंचट यव; पोल; फोलकट; धान्याचें वांझें कणीस. २ तृणधान्य. 'षंढतिळ चर्ममयमृग काकयव जसे तसेचि फटकळ गे।' –मोसभा ७.९. [तुल० फा. काक=कोंडा] ०**रव**–१ कावळ्याचें ओरडणें; कावकाव. 'दिवसां काकरवातें भीते रात्रीं तरूनि जाय नदी।' २ (ल.) निंदकांची व्यर्थ निंदा. 'ज्यास आपली योग्यता यथार्थ भासत असेल त्यानें ..... कर्णकटु काकरवाची अगदीं पर्वा करूं नये.' –नि. ०**वंध्या**–स्त्री. एकदां प्रसूत होऊन पुन्हां जी प्रसूत होत नाहीं अशी स्त्री, मादी. ०**शंका**–स्त्री. कावळा ज्याप्रमाणें साशंकपणें बसतो तसा साशंकपणा; भीति; शंका. 'संकोचें अंग खाणें असुखद बसणें काकशंकाप्रमाणें।' –किंसु ८३. ०**सावळा**–वि. काळा; काळ्याशी सावळ्या रंगाचा. ०**स्नान**–न. (कावळ्याप्रमाणें) घाईघाईनें, अर्धवट केलेलें स्नान, अंघोळ; मुसळस्नान पहा. ०**स्पर्श**–पु. मृताच्या दहाव्या दिवशीं मृतास यावयाच्या पिंडाला कावळ्यानें शिवणें. हा पिंड तयार असतां त्याला कावळा शिवला नाहीं तर मृताच्या आसापैकीं कोणी तरी त्यावेळीं मृताच्या इच्छा पूर्ण करण्याचें वचन देतो व त्यानंतर पिंडाला कावळा स्पर्श करतो. [सं.] ०**स्वर**–पु. १ कावळ्याची ओरड; कावकाव. २ (ल.) कर्णकठोर स्वर.

काक—पु. (माण.) फांदी फुटण्याचा सांधा; काख. [सं. कक्षा]

काक, कॉक—पु. तोटी; नळाची चावी. –शिल्पवि २२८. [इं.]

कांकई—स्त्री. १ कवच असलेला एक प्रकारचा मासा. २ त्याची कवची

काककव्वा—पु. काकाकुवा. काकाकव्वा पहा.

काकट-ड—वि. अढळ; स्थिर; मजबूत बांध्याचें.

कांकटणी-डणी—स्त्री. (गो.) तिरपीट; अडखळण्याची स्थिति.

काकड—स्त्री. थंडीनें भरणारी हुडहुडी. (क्रि० भरणें) [काकडणें]

कांकड—न. १ कांकडाचा वृक्ष. हा मोठा असून याचीं पानें साधारण मोठीं व लांबट असतात. कांकड हें फळ आवळ्याएवढें दिसतें, परंतु त्यांत आवळ्यासारखी मोठी आठी नसते. याचें लोणचें चांगलें होतें. –वगु २.२४. –शे ९.२६४. [सं. कर्कटक]

कांकड—पु. १ (काव्य) खडा; कंकर; २ कुचर; चाड –वि. (राजा.) पुरतेपर्णी न शिजलेला, कच्चा (भात, चाड); कडधान्यांतील जे दाणे भिजत किंवा शिजत नाहींत व कठिण राहतात ते 'सगळें शिजवितां अवघड । काकड करिती कड-कड । समभावें भरडी दृढ । होतील गोड परिपाकें ।' –एरुस्व १८.४९. 'ते अपकचि राहे प्राप्ती । जेवीं कांकड जाती मुगाची ।' –एभा २४.४१९. [सं. कर्कर; प्रा. कक्कर; म. कंकर]

काकडआरती—स्त्री. पहाटेच्या वेळीं काकडा पेटवून त्यानें देवाला करावयाची आरती. 'काकडआरती परमात्म्या श्री रघुपती ।' –पावि २६०. [काकडा+आरती]

काकडकुडा—वि. थंडीनें काकडलेला, कुडकुडलेला, ताठर-लेला. [काकडणें+कुडकुडणें]

काकडणें—अक्रि. थंडीनें गारठणें; कळा येऊन अवठरणें, संकुचित होणें (हात, पाय, इ०). 'काकडले वेसली दातखिळी ।' –दावि ६६. 'आणि हिमाच्या वर्षावानें काकडलेली ऐशी ।' –केक ४. [ध्व. कड]

काकडशिंगी—स्त्री. एक औषधी वनस्पति. हिरड्याच्या पानांच्या देठांशीं रस जमून तेथें फोडासारखी ग्रंथी बनते ती शिंग हिचा रंग काळसर असून आकार खेकडाच्या आकड्याप्रमाणें किंवा बोकडाच्या शिंगाप्रमाणें असतो. म्हणून हीस हें नांव पडलें. बाळंतपणांत किंवा लहान मुलांच्या रोगावर ही औषधीआहे. –शे ११.११७. [सं. कर्कटशृंगी; हिं. काकडसिंगी; बं. काकडा=खेकडा]

काकडा—पु. १ (को.) पुरतें पिकलें नसलेलें भात पीक वगैरे. कोंवळें, कच्चें फळ (पेरु इ०); (गो.) काकाडो. –वि. लहान, व रसभरित, हिरवा व रसाळ. जारस पहा.

का(कां)कडा—पु. १ कापडाच्या चिंधीची वळलेली वात. 'त्रिगुण काकडा द्वैतघृतें तिंविला ।' –दावि २१०. २ दिव्याची वात. ३ काठीला चिरगूट गुंडाळून त्यावर तेल ओतून पेटविलेली मशाल. 'सूक्ष्महि रविकराहुनि बहुत तमा काय काकडा खातो ।' –मोभीष्म ५.६. ४ कापड्याची बारीक गुंडाळी–दोरी. ५ (ल.) चामड्याच्या चाबकाचें टोंक; चाब-काच्या वाद्या प्रत्येकी. ६ वादीनें मारलेला फटकारा, तडाखा. ७ (ल.) लांब आंकडा (चिंच वगैरेंचा). ८ (खान. ल.) विंचवाची वळलेली नांगी.

काकडा-डी—पुस्त्री. अतिशय थंडी; अंग गारठविणारी थंडी. (क्रि० भरणें)

कांकडी—स्त्री. १ एक प्रकारचा वेल व त्यास येणारें फळ. तवसें; खिरा. काकडीचा वेल असतो. खिरा, कांकडी, वाल्क, तवसें इ० फळें एकाच जातीचीं आहेत. कांकडींत साधी, सात पानी, टरकांकडी, तवसें व नारंगी अशा जाती आहेत. काकडीची भाजी, कोशिंबीर, सांडगे, लोणचें, कायरस इत्यादि पदार्थ करतात. पांढऱ्या काकडीला राजकाकडी असें म्हणतात. ती पडवळासारखी लांब असते. काकडी मूत्रकारक, थंड, रुक्ष व रक्तपित्त आणि मूत्र-कृच्छ्र यांची नाशक आहे. –वगु २.२५. पिकलेली काकडी पित्त-कारक व कफवात नाशकारक आहे. –योर १.४३. 'जन्मकाळची कांकडी । भक्षितांहे ।' –दा ३.१.९. **म्ह०** कोल्हा काकडीस राजी. २ लहान भोपळा, कोहळा. [सं. कर्कटी; प्रा. हिं. पं. ककडी; सिं. ककिडी]

कांकडें—न. (कों.) कोवळें शहाळें; अडसर.

काकण—पु. (कु.) गरुड पक्षी. [सं. कंक=श्येन ?]

कांकण-णी—नस्त्री. कंकण; १ बांगडी; पाटली; बायकांच्या हातांतील सोन्याचा एक दागिना; कंगणी; मनगटाचें भूषण, अलंकार. 'घोंसाळा कांकणाचा हातीं । नारीं सडें घालितांती ।' –शिशु ५९०. 'कां नाडितां कांकण । सोनेंचि तें ।' –ज्ञा १४. ३७८. [सं. कंकण] **म्ह०** हातच्या कांकणास आरसा कशाला ? **०घालणें-भरणें**–हातांत बांगड्या भरणें. (ल.) बायकी, भागू-बाई, भ्याड पुरुषास लावतात. 'कांकणें आम्हासम हातीं । भरलेलीं कां हो होतीं ।' –संग्रामगीतें ४२. **०फोडणें**–(गो.) १ वैधव्य आणणें. २ कडक शिक्षा करणें. **०वाढणें-वाढविणें**–(बायकी) बांगड्या पिचणें, फुटणें, (कांकण हा सोभाग्या-लंकार असल्यानें त्यास फुटणें न म्हणतां उलट वाढणें, वाढविणें असा प्रयोग करितात. उ० कुंकू वाढविणें–वाढणें. इ०). **०कार**–पु. (गो.) बांगडी कासार; बांगडीवाला. कांकणवाला पहा. **०कोर**–न. (ना.) बांगडीचा तुकडा. **०घोण**–स्त्री. (गो.) गोम; घोण. **०भर, दोन कांकणें**–थोडें अधिक, जास्त; दोन वस्तूंची तुलना करतांना एकींचें दुसरीवर किंचित आधिक्य दाख-विण्यासार्ठी योजितात. 'त्यापेक्षा हा कांकणभर जास्त होईल,' 'पुरुषाइतकीच किंवा कांकणभर जास्तच बुद्धिमत्ता असून कित्येक शतकें आम्ही विचार करावयाचें सोडून दिलें.' –विविधवृत्त (खास अंक १९२८) २ (सामा.) अल्पप्रमाण; कांकणभराने

– न्यानें अशींहि रूपें आढळतात. **०घाला**–पु. बांगडया भरणारा; कासार. 'कांकणवाले फुलारी कासार।' –दावि ४८८.

काकणता, कांकणा–पु. १ (सोनारी) गोठ, पाटली, आंगठी, वाकी, किंवा गोसारख्या दागिन्यास गोल आकार देण्यासाठीं केलेला खुंटा, निमुळता लाकडी ठोकळा; वेशमूख; वरताणा; काकता. २ (दे.) चौंगा; पांच अंगुळें रुंदी; हाताची रुंदी. [कंकण]

काँकणा–पु. (गो.) सुदांची एक जात. [कोंकण]

काकणी–(गो.) अर्धे कणीस.

काकणी तांफता–पु तापता, ताफता नांवाच्या कापडाचा एक प्रकार.

काकणी पाग–न. (कों.) मासे पकडण्याचें एक प्रकारचें जाळें. [कांकण+पाग]

काकणेज–न. रेणुका; रेणुकबीज. एक सुगंधी औषधी द्रव्य. –मुंव्या ११०, १६५.

काकता–काकणता पहा.

कांकबाळ–न. (कु.) कडेवरचें मूल; कुकुबाळ.

काकंबी–स्त्री. काकवी; चिकी; राब. [दे. कक्कव. का.]

काकम, काकैं–स्त्री. (गो.) काकवी.

काकय–स्त्री. (गो.) कावीळ.

काकर–पु. (पिंजारी) कापूस पिंजण्याच्या कमानीस असलेल्या पंख्याच्या कडेवरील पट्टी.

काकर–स्त्री. १ (भाकरीचा खेळ.) नदीतील, तलावांतील पाण्याच्या पृष्ठभागावर खापरी अथवा चपटा दगड जोरानें पाण्याला लागून मारल्या असतां होणाऱ्या उशा प्रत्येकी. २ भोंवरा जमिनीवर टाकला असतां त्याचे होणारे पहिले एक दोन फेरे (हे हळू होतात).

कांकर–पु. (हिं.) खडा. कंकर, पहा.

का-कांकर–पु. १ कातडयाची वादी; ढोल, तबला यांची वादी, ओढण; कंकर पहा. २ (राजा.) शरीरावर नखानें बोचकरल्यामुळें होणारा ओरखडा; ओरबाडा; खरचटल्याची खुण. ३ ज्याला छातीच्या बरगडया जुळलेल्या असतात तो कण्यासुद्धा पाठीचा भाग. 'बरगडया, मान, काकर वगैरे भागांतलें मांस व हाडें यखनीच्या चांगलीं उपयोगी पडतात. –गृशि २.१३.

कांकरणें–अक्रि. चाचरणें; कां कूं करणें; डळमळणें; होना करणें.; दिरंगाई करणें. [कांकूं करणें]

कांकरणें–अक्रि. (व.) मिटणें; लागणें. 'सगळया रात्रींत डोळा कांकरला नाहीं.'

का(कां)करता–वि. क्रिवि. तिरकस, कसरता; वळलेला; तिरपा; बाजूवर कललेला. **०घेणें**–क्रि. माघार घेणें; मागें पाय काढणें; निसटणें.

काकरी–स्त्री. नांगराची एक फेरी, वळसा. (क्रि० घेणें).

काकरी–स्त्री. (व.) चिंता; काळजी; दुमणें. 'एक सारखी आमच्या मागें काकरी असे.'

काकरी–स्त्री. (गु.) बारीक खडी; दगडाच्या बारीक चिपा, 'रेती अथवा काकरी टाकून जागा साफ करावी.' –स्वारी नियम (बडोदें) ११५. [कंकर]

कांकरी–स्त्री. कातलेलें रेशीम, त्याचे गुंडे, गुंडाळें, लड, कुकडें; कंकरी.

काकरोळ–पु. एक पक्षी; 'ढोंक, कबूतर, सुरखाब, काकरोळ हे जसे जमीनीवरचे पक्षी' ... –गृशि २.१०.

काकलक–न. कंठमणि; नरडा; कंठनाळाचा पुढें आलेला मुख्य भाग. [सं.]

काकलूत–काकळूत पहा.

काकवी–स्त्री. १ उंसाच्या रसाचा कच्च्या कढाचा पातळ रांधा. २ आटवून थोडासा घट्ट झालेला उंसाचा रस मडक्यांत भरून तीं मडकीं घडवंचीवर पालथीं ठेविल्यावर त्यांतून गळून पडणारा रस. 'भिऊनि म्हणतील कां जशि सुधा तशी काकवी।' –केका १०९. [दे. कक्कव; का. काकंबी]

काकसावणें–अक्रि. (कुण.) शंका घेणें; अंदेशा धरणें; आशंका धरणें. [सं. कांक्षा]

काकसासू-सासरा–स्त्रीपु. (तंजा.) नवऱ्याची आत; तिचा नवरा. [काका=आत]

काकळूत, काकळूत मामळूत–स्त्री. १ दया करण्याबद्दल परोपरीची विनवणी; कळवळा उत्पन्न करण्यासाठीं गयावया करून प्रार्थना, विनंति करणें, करुणा भाकणें. (क्रि० करणें). २ करुणा; दया; अनुकंपा; कळवळा. (क्रि० येणें; करणें). 'देवाला भक्ताची काकळूत आली.' 'बा गडयानों, तुमची मला काकळूत वाटत्ये.' –बाळ १.७०.८०. ३ दयेमुळें अपराधाची उपेक्षा करण्याची बुद्धि. [सं. काकलि=मंजूळ, बारीक, मृदु; तुल. का. कक्कलाते=प्रेम, दया, काकळूत] **काकळुतीस येणें**–अंत:करणाला पाझर फुटविण्यासारख्या रीतीनें गयावया करणें. **काकुळती करणें**–१ दया येणें; विनवणीनें हृदयाला द्रव येणें, २ अति दीनवाण्यारीतीनें, पदर पसरून, कळवळयानें मागणें. **काकुळती येणें**–(राजा.) दया भाकणें; द्रव येईपर्यंत विनवणी करणें. **काकळूत घाणा–णी**–वि. दीनवाणा; रडवा (स्वर, ध्वनि, वाणी).

का का–उद्गा. कावळयांची कावकाव. काव पहा. 'स्वजाति श्रेष्ठाचें गतितांडव पाहतांचि काकांनीं। हर्षभरें नभ भरिलें का का का का अशा स्वहाकांनीं।' –मोकर्ण २८.४१. [ध्व.]

काका—पु. १ चुलता; बापाचा भाऊ. २ एखादा आपल्याहून वडील पुरुष यांसहि म्हणतात. व्यावहारिक नांव पहा. 'त्याचा काका दुसरा' =त्याच्यासारखा दुसरा कोणी.' [हिं. काका; दे. का. कक्क; सिं. काको; तुल० फा. काका=वडील भाऊ] ०मामा-कोणी तरी नातेवाईक; आप्त; संबंधी. ०मामा करणें-मनधरणी करणें.

काका—स्त्री. (कु.) आत; आत्याबाई; काकीस.

कांका—पु. (कों.) नारळाच्या सावळीचा (शावळीचा) अग्रभाग; माडावर ज्या दांडयाला फुलें व फळें (नारळ) येतात तो दांडा; पोय. याला अनेक फटि फुटलेले असतात. 'कांक्याचे अळवण चांगलें होतें.'

काकाकव्वा, काकातू—पु. काकाकुव्वा; एक प्रकारचा पोपट. [हिं. काकातूआ; मलाया. काकातुआ; इं. कॉकातू; काका+हिं. कौवा]

काकाडो—पु. (गो.) लहान व कच्चें फळ; काकडा.

कांकाण, काकाण्णी—न. (कु. गो.) बांगडी; कंकण, पहा. [सं. कंकण; म. कांकण]

कांकारडा-डो—वि. (कु.) अपक्व; कच्चा; हिरवा; काकाडो; काकिर्डा. विशेषतः काजूला म्हणतात.

कांकांवचें—क्रि. (गो.) कोंवडयाचें ओरडणें. [ध्व. गो. कॉं=कोंवडयाचें ओरडणें; कोकलणें; तुल० इं. कॉक]

कांकाळणें—क्रि. (कु.) कचरणें; डगमगणें. कांकरणें पहा.

काकाक्षिगोलकन्याय—पु. (कावळयाच्या दोन डोळ्यांत एकच बुबुळ असून तें तो प्रसंगाप्रमाणें एकांतून दुसऱ्यांत फिरवितो अशी लोकसमजूत आहे त्यावरून हा न्याय). एकच शब्द अनेक अर्थांनीं योजणें. एका शब्दाचे दोन किंवा अनेक अर्थ संभवत असल्यास किंवा एकाच वस्तूचा दोन किंवा अनेक कामीं उपयोग होत असल्यास त्याच्या स्पष्टीकरणार्थ हा न्याय लावतात.

काकिणी—स्त्री. १ वीस कवडयांचें वजन; एक दमडी. 'काकिणी म्हणजे वीस कवडी.' -एभा. २३.३५४. २ एक कवडी. ३ एका दैडाचा (काठीचा) चौथा भाग; एक हात (कोपरापासून मधल्या बोटाच्या टोकापर्यंत). [सं. काकिणी, काकिणिका]

काकिता—स्त्री. (संगीत) गातांना कावळयासारखा निघणारा आवाज.

काकी—स्त्री. काकू; चुलती; काकाची बायको. काका पहा. [का. कक्कि; फा. हिं. काकी=मावशी]

काकी, कांकी—स्त्री. एक प्रकारची रानांतील पालेभाजी.

काकी, कांकी—स्त्री. काकवी पहा.

कां कीं—उभ. (कां=काय+कीं=असें; कां? असें जर विचारलें तर त्याचें कारण असें) कारण कीं; सबब; म्हणून; कां तर. 'पोरास लहानपणापासून शिक्षेत ठेवावें कां कीं, थोरपणीं शिक्षा लागत नाहीं.' 'नवीन मराठी ग्रंथ वाचावे, कां कीं नवीन शब्दांच्या भाषापद्धतीचें अवलोकन करावें.' -विवि ८.८.१४२. [सं. किं किं]

कांकीट—वि. (कों.) सडपातळ बांधाचा; बारीक; पातळ; किडकिडीत. [अर. काकू=बालका, सडपातळ]

काकीमुख—न. (हटयोग) सुषुम्ना नाडीचें टोंक; ब्रह्मरंध्र. 'जिणोनि काकीमुखाची वाट। सवेंगें त्रिकूट चेतलें।' -एभा १४.४४६.

काकीस—स्त्री. (कों. कुण.) आत्या; आपल्याहून वडील अशा स्त्रीला सन्मानार्थी म्हणतात. काका पहा.

काकु—स्त्री. एक प्रकारचा अलंकार; यांत प्रश्नार्थक किंवा दुसऱ्या स्वरानें शब्दार्थाच्या अर्थाहून उलट अर्थ ध्वनित होतो; स्वरभेदेंकरून विरुद्धार्थ कल्पनाबोधक जो वाक्याचा डौल तो. 'मी काय तुम्हीं भाषणें समजत नाहीं? परंतु काय करूं उपाय नाहीं?' (यांत भाषणें समजतों असा अर्थ होतो). 'तो काय मूर्ख आहे?' 'हें होणार नाहीं?' (म्हणजे हें खात्रीनें होईल.) [सं.]

काकुलता-काकुलपण—स्त्रीन. काकळूत पहा. 'तर त्यास काकूलपणें सांगून पहावें' -भाब १३३.

काकुलती-ळत-ळती—स्त्री. याचना, कींव इ०; काकळूत पहा. 'अहो देहो पार्थिव कीर जाये। यया ची काकुळती करणा आहे।' -ज्ञा ११.३६७. 'आठवण तुम्हीं यावी पाडुरंगा। कींव माझी सांगा काकुलती।' -तुगा २२०७. [का. कक्कलाते] ०स येणें-जाणें-करणें-करुणा भाकणें. 'किती देवा येऊं तुम्हां काकुळती। काय या संचितीं लिहिलें माझ्या।' कोठें विशेषणार्थीहि योजतात. 'आणिका मी कोण्हा जाऊं काकुळती। कोण कामा येती अंतकाळीं।'

काकुलयेत—वि. (गो.) दयाशील स्वभावाचा.

कांकुला—पु. मुलाची डोई करतांना टाळूवर जे केंस ठेवतात ते; चौल. (क्रि० ठेवणें). [सं. काक+कला?]

काकू—स्त्री. चुलती; काकी पहा.

कांकूं, कांकूं—क्रिवि. १ अनमान, अळंटळं, टंगळमंगळ करीत. 'मी बोलतों या विषयीं स्पष्ट काय तें सांगा, कांकूं करीत बसं नका.' -स्त्री.२ टंगळमंगळ; धरसोड; अळंटळं; कुचराई; कुरकुर. (क्रि० करणें). सारें एकपंचमांश आयुष्य देखील लोकहिताकडे देण्यांत लोकांनीं कांकूं करावी ना?' -टि ४.१४८. 'आम्ही कितीहि कांकूं केलें तरी विद्याप्रसार हा होत जाणारच.' -आगरकर. २ कण्हणें (ताप वगैरेमध्यें); हळु व अस्पष्ट शब्द करणें (मार बसला असतां). (क्रि० करणें; म्हणणें) -न. होय किंवा नाहीं याविषयीं अनिश्चय; एकमत नसणें; उभयविध भाषण [ध्व.]

काकूस—स्त्री. काकी; चुलती; काकीस पहा.

कांकूस—पु. (गो.) हगणवटी; शौच्यास बसण्याची जागा.

कांकोरा—पु. (प्रां.) ओरखडा; बोचकारा. कांकर पहा.

काकोली—स्त्री. एक ज्वरनाशक व कफनाशक वनस्पति; क्षोलिका; वायसाली. [सं.]

काकोळ—पु. १ डोंबकावळा. २ एक प्रकारचें विष. ३ (गो.) कावळा. ४ (गो.) काकवळी. [सं. काकोल]

कांकीट—न. चुना, वालू, सिमीट, इगड; गोटे यांचें एकत्र केलेलें मिश्रण; बांधकामांत याचा उपयोग करतात. [इं. कॉंक्रीट]

काकर्थ—पु. एक अलंकार; यांत प्रश्नार्थक किंवा दुसऱ्या स्वरानें शब्दाच्या वाच्यार्थाहून उलट अर्थ ध्वनित होतो. काकु पहा.

काख, कांख—स्त्री. १ खांद्याखालील हात व बरगडी यांमधील खोलगट जागा; बगल; खांक. 'काखेसी मेरू घेऊनि देखा । कैसें नृत्य करील पिपीलिका ।' –ज्ञानि १.२२. **म्हण०** ' काखेंत कळसा, गांवास वळसा.' 'काखेंत धाकटें महारवाडा शोधी.' २ तंतू; ताणा; पागोरा (कारण हा देंठाच्या काखेंतून फुटतो म्हणून). (क्रि० फुटणें). [सं. कक्षा; प्रा. कक्ख; हिं. कांख; गु. बं. उ. काख; मैथिल कख] **काखा वर करणें**–बगलेंत कांहीं नाहीं हें दाखविण्यासाठीं दोन्ही हात वर करणें; दिवाळखोरी प्रसिद्ध करणें; आपण खंक बनलों असें सांगणें; नंगा बनणें. **काखा वाजविणें**–आनंद प्रदर्शक चेष्टा करणें; आनंदाचे भरांत दंड बगलेवर मारणें; टिऱ्या पिटणें. **काखेतला काढून बाजारांत मांडणें**–स्वकपोलकल्पित गोष्ट खरीच आहे म्हणून भर चारचौघांपुढें मांडणें, सांगणें. **काखेस मारणें**–१ एखाद्याला आश्रय देणें, आपलासा म्हणणें. २ कांहीं पदार्थ घेऊन पळ काढणें, किंवा एखादी वस्तु उपटून पोबारा करणें. **०बि(भि)लाई–बिल्ली**–स्त्री. काखेंत होणारी एक गाठ; बगलबिल्ली; काखमांजरी पहा. **०भोंवरा**–पु. घोड्याच्या पुढील दोन पायांपैकीं कोणत्याहि एका पायाच्या जांघेंत असणारा केसांचा भोंवरा; हा अशुभकारक समजतात. **०मांजरी**–स्त्री. काखेंतील गळूं; बगलेंतील पुटकुळी; बाहु, बरगड्या, खांदे व काखा या ठिकाणीं पित्तप्रकोपामुळें वेदनायुक्त व काळपा फोडांनीं व्याप्तलेली अशी होणारी एक गांठ. –योर २.४२५. हिला लोणी लावून ते मांजराकडून चाटविलें म्हणजे ही बरी होते अशी समजूत आहे. **०खाळ**–(कु.) चोळीला काखेंत लावण्याची पट्टी; लाग. **०सावला**–वि. (वाटेनें जाणाऱ्या किंवा जावयास निघालेल्या प्रवाशाप्रमाणें काखेंत सावलें म्हणजे चिरगूट घेतलेला) आळशी; उदासीन; (चालू कामधंद्याविषयीं) काळजी, आस्था, किंवा संबंध न दाखविणारा. (निष्काळजी चाकर, मुलगा किंवा एखाद्या संस्थेच्या सभासदाला हा शब्द निंदाव्यंजकतेनें लावतात.)

कांखर—पु. (राजा.) ओरखडा; बोचकारा. कांकर पहा.

काखवी—स्त्री. (राजा.) काकवी पहा.

काखा—पु. ताणा; तंतु, काख अर्थ २ पहा.

काखां—पु. १. (कों.) झाडाचें वाळलेलें खोड किंवा धान्याचें ताट; खुंट. २ (ल.) किडकिडीत माणूस [अर. काक् ?]

काखाटणें—अक्रि. काखा वर करणें पहा. [काख]

काखाटणें, काखाळणें—उक्रि. काखेस मारणें पहा. [काख]

काखाटी–काखोटी—स्त्री. (व्याप.) काख; बगल; बगलेंत एखादी वस्तु घेतली किंवा घेऊन पळवली तर विशेषतः योजतात. ' काखाटीस ओढें मारून चालला.' 'त्यानें त्याचा कज्जा काखोटीस मारला.' [काख]

काखावर्त—पु. काखभोंवरा पहा. –अभ्रप १.२४.

काखाविणें—उक्रि. काखेस मारणें; काखाटणें पहा.

काखाळा–ळ्या—वि. (प्रां.) एखादी वस्तु उपटून पळविण्याला टपून बसलेला; उचल्या; लोभी; आपल्या पोळीवर तूप ओढणारा. ओढाळ जनावरालाहि म्हणतात. [काख+आळुच् प्रत्यय]

काखाळी—स्त्री. विनाकारण अतिशय कांगावा करणारी स्त्री.

काखी—वि. काळा–तांबूस असा रंग. खाकी पहा. [काषाय–काखाइ–काखी. –भाअ १८३२.]

काग—पु. कावळा. ' विषयवासना घरूनि थोर । बाह्य भिरविती आचार । जेवीं कागाचा शौचाचार । विष्ठातत्पर मानसीं । ' –एभा ९.३५६. 'आज कागे काग बोलतो घरावरी । हाच शकुन साच पति येत असे घरीं । ' –होला १३०. 'ते काय गुण लागती येरा । कागा न शोभे पिंजरा । ' –तुगा २८६२. **म्हण०** शंभर वर्षे कागा हजार वर्षे नागा. [सं. काक; प्रा. काअ, सिं. कांगु; हिं. कौवा; हिं. पं. गु. बं. काग] **०टाळीन्याय**–काकतालीयन्याय पहा. ' पावलों हा देह कागढाळी न्यायें । न घडे उपायें घडों आलें । ' –तुगा १६१६.

कांग—पु. एक धान्य; वरींतील एक प्रकार. परंतु वरींत व यांत फरक पुष्कळ आहे. वरीवरील साल पातळ व रंग पिंवळा असतो परंतु कांगाचें साल जाड असून तांबूस, पिवळें, काळसर अशा तीन–चार रंगांचें असतें. कांगाचा भात, पेज, लाह्या, भाकरी इ० करितात. कांगाचें रोप दोन–अडीच हात उंच होऊन त्यास जे कणीस येतें तें बाजरीच्या कणसाप्रमाणें लांब व बारीक असतें. राळा. –शे ९.२८१. [सं. कंगु]

कांगची—स्त्री. कांगुणी पहा.

कांगडया—स्त्री. (कु.) कांगण्या, कांजिण्या रोग.

कागज—(हिं.) कागद पहा. कागज्–पत्र. –रा १३.९३.

कांगडा—पु. एक फुलझाड. –बागेची माहिती ९३.

कांगडा—पु. कावळा (निदार्ण्यजक). –वि. कावळ्याच्या दृष्टीसारखी चंचल दृष्टि असलेला; धूर्त; दक्ष; कावेबाज; हुषार. 'तो मोठा कांगडा आहे.' [हिं. कांगडा=कावळा; गु. कांगडो=कावळा; भि. कांगडो] ०**खाऊ**–पु. (उप.) पारशी लोक.

कांगडे—(हेट. नाविक) नैर्ऋत्य दिशा; नैर्ऋत्य दिशेचा अधिपति. निर्ऋति ही मृत्युदेवता आहे व कांगडा (कावळा) मृत्यु सूचक पक्षी आहे. तेव्हां कांगडा व नैर्ऋत्य यांचा असा संबंध असावा.

कांगणी—स्त्री. कांगुणी पहा.

कांगणेल—न. कांगणीचें तेल. [कांगणी+तेल]

कागद—पु. १ कापूस, चिंध्या, ताग वगैरेपासून रांधा तयार करून त्यापासून लिहिण्यासाठीं केलेला पदार्थ–पत्र. हिंदुस्थानांत भवर, मुंज वगैरे गवतापासून कागद करितात. कृतीसाठीं झाको. (क.) २२२ पहा. कागदापूर्वी भूर्जपत्रें, ताडपत्रें, पापीरस (ईजिप्तमधील एका झाडाची साल), अगरूची साल, बांबूची पट्टी, चर्मपत्रें, कमळाचीं पानें यांचा उपयोग लेखनाकडे करीत. २ पत्र; चिट्ठी; त्यावर कांहीं लिहिलें आहे असा कोणताहि कागद, खर्डा. ३ दस्तैवज; रजिष्टर पत्र; खत. 'अहो कागद करून घ्या.' ४ वचनचिट्ठी. [अर. काघझ्; फा. कागद; गु. कागळ; ते. कागितमु] ०**कापणें**–कागदाच्या जाळ्या, चित्रें वगैरे तयार करणें; हस्तव्यवसायाचा एक प्रकार. –अध्यापन १५०. –**दावर बसणें**–(शाळेतील मुलांबद्दल) धूळपाटीवरचें लिहिणें सोडून कागदावर खर्डे लिहिण्यास सुरवात करणें; मूलाक्षरापुढें प्रगति होणें. –**दावर बसविणें–घालणें**–खर्डे लिहिण्यास प्रारंभ करविणें; खर्डे लिहिण्यास शिकविणें. ०**भिजविणें**–(छाप.) छापण्यासाठीं जे कागद घेतात ते प्रथम भिजवावे लागतात. दहा किंवा बारा कागद घेऊन त्यांवर प्राणी शिंपडतात. मोठ्या छापखान्यांतून प्रत्येक भिजलेल्या दस्त्याखालीं एक एक कोरडा दस्ता असा क्रम ठेवतात. याप्रमाणें सर्व कागदांच्या जुडग्या पाणी शिंपडून तयार झाल्यावर त्यांच्यावर दडपण ठेवतात म्हणजे कागद नरम होतो. –मुद्रणदर्पण ७८. ०**भेटविणें**–पत्र देणें; चिठी पाठविणें. 'शहराबाहेर मुक्काम करुनि कागद भेटविला। गोष्ट लावितां तिशीं पतीचा हुकूम आठविला।' –पला ८८. ०**कुटारी–कुट्या**–पु. कागद करणारा; चिंध्या किंवा रद्दी कागद कुटून त्यांचे कागद तयार करणारी एक जात. [कागद+कुटणें] –**दाचा घोडा**–पु. कबुलीपत्र (कर्ज इ० चे); कर्जरोखा; दस्त. (क्रि० करून देणें). ०**पत्र**–न. (व्यापक) कागदपत्रें; चिठ्ठ्याचेपाट्या; सनद; रोखा; पत्रव्यवहार. [कागद+पत्र] ०**बहा**–पु. सरकारी कामासाठीं होणारा कागदाचा खर्च. [फा.]

कागदी—वि. १ कागदाचा; कागदासंबंधीं; कागदापासून तयार केलेला (जाळी, मखर, डबा इ०) २ (ल.) तकलादी; बारीक; निर्जीव; निंवळ; किरकोळ बांध्याचा, हाडाचा. ३ (ल.) पातळ व नाजूक सालीचा (आंबा, लिंबू, वगैरे फळ, बांबू) ४ पत्रें नेणारा, पोंहोचविणारा; जासूद; दूत; काशीद; हलकारा. –पु. १ कागद तयार करणारा माणूस; त्याची जात. हे बहुतकरून मुसलमान असतात. २ (गु.) कागदाचा व्यापारी; स्टेशनरी सामानाचा दुकानदार. [अर. काघझ्] ०**घोडे नाचविणें**–१ कागदोपत्रीं व्यवहार करण्यांत वेळ खर्चे करणें; फक्त कलमबहाद्दरी दाखविणें. २ (ल.) प्रत्यक्ष अंग मोडून काम न करितां, कृति न करतां, केवळ पत्रोपत्रीं व्यवहार करणें (दिवाळींत मुलें जनावरांचीं कागदी चित्रें करून तीं दिव्याभोंवतीं फिरावयास लाविंतात, त्यावरून). 'कोणतीही नवीन घटना करावयाची जबाबदारी व अधिकार सर्व इंग्रज मंत्रिमंडळाकडेच असल्यानें आयरिश लोकांना संघटनेचे कागदी घोडे नाचवून तरी काय उपयोग?' –आयर्लंदचा इतिहास. ०**आंबा**–पु. पातळ सालीचा आंबा. हा चवीस उत्कृष्ट असतो. ०**इमारत**–स्त्री. कमजोर इमारत. ०**खबुतर**–न. दुधासारख्या पांढऱ्या रंगाचा पारवा. –मराठी ४ थें पु. ६७ (१८७३) ०**गोळीबार**–पु. लेखी विरोध; लेखी मारामारीचीं उत्तरें–प्रत्युत्तरें; कागदावर कोरडी वाटाघाट करणें. 'बुक कमिटी क्रमिक पुस्तकांत ढबळाढबळ करूं लागतांच डॉक्टर भालचंद्र यांचे दवाखान्यांत कांहीं शहाण्यांनीं जमून जुमता कागदी गोळीबार सुरू करावा. ... ...' –टि ४.४१९. ०**चिवा**–पु. चिवा बांबूतील स्त्रीजात; पोकळ वेळू. याच्या उलट भरींव चिवा. ०**जवान–उवान**–पु. अशक्त, किडकिडीत काठीचा मनुष्य; काडीपेलवान; लेचापेचा माणूस. ०**निंबू–लिंबू**–न. लहान व पातळ सालीचें लिंबूं. हें आंबट, वातनाशक, अग्निदीपक व हलकें असतें. ०**बदाम**–पु. पातळ सालीचा बदाम. ०**वांगें**–न. एक प्रकारचें पातळ सालीचें वांगें. 'सारा केशरी भात! कागदी वांगी भात' –स्त्रीगीत ६७. ०**वेळू**–बांबू, कळक. पातळ सालीचा, पोकळ, कागदी चिवा पहा.

कागदोपत्रीं—क्रिवि. १ पत्ररूपानें; पत्रव्यवहारानें; लेखद्वारा. २ पत्रांत; चिठ्ठींत; पत्रोपत्रीं; लिहिण्यांत. [कागद+पत्र]

काग (गी) फळ—न. काकफळ; एक वनस्पति.

कागबळ—स्त्री. काकबलि पहा.

कांगरघाई—स्त्री. (व.) कांघाई; कांगावा. आपलीच कांघर घाई मचवितो.'

कांगल—न. (कु.) कांगुणी पहा.

कागली—वि. कागल गांवचा (रुपाबा).

कांगली—स्त्री. (बे.) एक प्रकारचें फळ.

कांगा—न. (गो.) एक लहान मुलांचा (तिकटधांचा) खेळ.

काँगॉ—पु. (गो.) शिंपल्याच्या वर्गांतील प्राणी.

कांगाई—स्त्री. कांघाई पहा.

कागाकव्वा—काकाकव्वा पहा.

कांगातांवूळ—पु. (गो.) एक डोंगरी धान्य; वरीसारखे एक धान्य; कांग पहा.

कागाबाशी—न. एका जातीचें काळें मोतीं. –वि. कागाबाशी रंगाचा. –शिल्पवि ५६४. [काक+आबाशाही]

कांगारु—न. ऑस्ट्रेलियांतील एक जनावर; याला लांब शेपूट असतें व याचे मागील पाय पुढील पायांपेक्षां मोठे असतात. मादीच्या पोटाला एक पिशवी असते व तींत ती आपलीं पिलें ठेवते. [इं.]

कांगाव–वा, कांगावखोर—कांघाव–कांघावखोर पहा 'तिनें जो एक रट्टा सुंदरीचे पाठींत दिला, त्यानें ती पोर कळवळली, पण तें लक्षांत न घेतां ती आपल्या डोक्याला लागल्या बद्दल कांगावा करूं लागली.' –पकोघे.

कांगावें—न. कांघाव पहा.

कागाळ(ळी)खोर—वि. कागाळी करणारा.

कागाळी—स्त्री. १ गान्हाणें; तक्रार; ओरड (एखाद्याबद्दल). २ विरुद्ध सांगणें, कळविणें; चुगली करणें; चहाडी. (क्रि० करणें) [काग+आळी ?]

कागिनी—स्त्री. एका रागिणीचें नांव, राग पहा.

कांगु(गो)णी—स्त्री. १ एक उपधान्य; कांग पहा. २ एक औषधी वनस्पति आणि तिचें फळ; (हिं.) मालकांगनी; (सं.) ज्योतिष्मती. हीं झाडें पावसांत उगवतात व दोन हात उंच वाढतात. यास लाल व गुंजेएवढीं फळें येतात, तीं मुलें आवडीनें खातात. याच्या पानांच्या रसानें कागदावर लिहिलेलें हिरव्या रंगाच्या शाईप्रमाणें दिसतें. [सं. कंगुणी].

कागुद—(माण. कुण.) कागद.

कांगू—कांग पहा.

कांगोणेल—न. कांगुणीचें तेल; कांगणेल पहा.

कांग्रेस—स्त्री. १ सभा; मंडळी; मंडळ. २ महापरिषद; प्रतिनिधिसभा. ३ हिंदी राष्ट्रीय सभा. हिची स्थापना इ. स १८८५ सालीं डिसेंबरांत मुंबई शहरीं झाली. 'सर्वांनीं मिळून काँग्रेससारख्या संस्थेनें आमच्या ममांत ज्या आशा उत्पन्न केल्या आहेत त्या सफल करण्याच्या उद्योमास हरएक प्रकारें लागलें पाहिजे.' –टि २.११. 'नेमस्त पक्षाची निराळी कोंग्रेस व राष्ट्रीय पक्षाची निराळी काँग्रेस हा प्रकार टिळकांना इष्ट वाटत नव्हता.' –केरे. ६२.

कांघाई–घाव, कांघावें—स्त्रीन. (लहानशी दुखापत अगर थोडेसें नुकसान झालें असतां तें) फुगवून सांगणें; उगीच ओरडणें; अन्यायाचा खोटा डांगोरा पिटणें. (क्रि० करणें) [ध्व. ?] **०खोर**–कांगावा करणारा; उगीचआरडाओरड करणारा; लटकी तक्रार करणारा. [ध्व. ?]

काच—पु.स्त्री. १ एक कठिण ठिसूळ व पारदर्शक असा पदार्थ; भिंग; वाळू, सोडा, पोटॅश, चुना, अल्युमिना, शिशाचा आक्साइड वगैरेपासून काच तयार करतात. हिच्या अनेक जाती असून प्रत्येकीचे गुणधर्म निरनिराळे आहेत. काचेचे बांगडी, आरसे, छायाचित्र घेण्याची काच वगैरे अनेक पदार्थ करतात. २ स्फटिक; गार (रत्नासारखा जिचा उपयोग होतो ती). ३ पोटॅशचा कोणताहि स्फटिकावस्थेतील क्षार. ४ डोळ्यांतला काचबिंदु. ५ (माळवी) आरसा. [सं. कांच] **०मारणें**–(चांभारी) कांचेनें घासणें. **०कमळ**–न. एक कमळासारखी आकृति; एका वर्तुळाच्या परिघामध्यें ज्यांचे मध्यबिंदु आहेत अशीं वर्तुळें यांत असतात. **०कागद**–पु. सामान्यतः लांकूड वगैरे घांसून गुळगुळीत करण्यासाठीं, यंत्रावर किंवा भांडयावर चढलेला गंज काढण्यासाठीं वापरण्यांत येणारा काचेचा, वाळूचा, कुरंदाचा कागद; पॉलिश कंपडा; चांदीसोन्याच्या भांड्यांस जिलई देण्याकरितां हा वापरतात. कागदावर सरसांत कांचेची पूड, वाळू, कुरंदाची पूड वगैरे बसवून हा तयार करतात. **०चित्रकला**–स्त्री. रंगीवेरंगी कांचेचे बारीक तुकडे जुळवून केलेलीं चित्रें, आकृती. (इं.) मोसाईक. **०बंदी**–स्त्री. काचेचे तुकडे बसविलेली जमीन. 'काचबंदि आणी जळ। सारिखेंचि वाटे सकळ।' –दा ८.५.४३. **०बिंदु–चिंब**–पुन. एक नेत्ररोग; मोतीबिंदु; डोळ्यांतील बुबुळांत एक काचेप्रमाणें बिंदु येतो व त्यामुळें दिसेनासें होतें. **०मणी**–पु. काचेचा मणी; स्फटिक; एक प्रकारचें रत्न. **०मिना**–पु. काचेच्या रसानें एखादें पात्र मढविणें, चित्रें काढणें. सिलिका, मिनियम् व पोटॅश यांच्या मिश्रणापासून तयार करतात. (इं.) एनॅमल. **०लक्षण**–न. (हिं.) कृत्रिम मीठ. **०घटी**–स्त्री. काचेचा तुकडा; भिंग. 'चिंतामणीचिया साठीं। देईजे फुकटी काचवटी।' –ज्ञेप्र २.५५. 'ज्याचे गांठीं नाहीं काचवटी। परी संतुष्टता नित्य पोटीं।' –एभा १९.५५९. 'तुका म्हणे दिली चिंतामणीसाठीं। उचित काचवटी दंडवत।' –तुगा २३५७.

काच—पु. सदरा वगैरेच्या गुंडीचें घर. काज पहा.

कांच—पु. १ जाच; त्रास; छळ. 'चांगल्या गोष्टी मनुष्यास हव्या खऱ्या-पण ... त्यांचेपासून-त्यास कांच लागूं नये अशासाठीं त्या नकोत.' –अमृताचा घुटका (उषा ग्रंथमालिका) ९. २ दुःख. 'पाणी मीच पाही-तूंच घाली मीच। मजवीण काच

मनीं वाहे।' –ब १४. [काचणें; सं. कच्=बांधणें; किंवा कांच्=बांधणें]

कांचकळणें—अक्रि. १ (कों.) भयानें किंवा व्यग्रतेनें अडखळत बोलणें; अधेंवट, घोंटाळ्याचें भाषण करणें. २ गोंधळल्याप्रमाणें, अनिश्चितपणें कोणतेंहि काम करणें. [काच=त्रास+कलन=दोष ?]

काचका—पु. सागरगोटा; मुली खेळण्यासाठीं वापरतात ते लाखी रंगाचे खडे –मुंव्या. १७०. गजगा पहा. [सं. कंटकरंज; ते. कवचकाई; गु. कांकच; म. गजगा]

कांचका—पु. (कों.) एक मासा.

काचकिरडा—वि. १ (बायकी, कों.) दडस; कचकचित; भरड कणी लागणारा असा (भात, भाजी). २ पुरता न शिजलेला; कच्चा. 'भाताला पळी देऊन जाळ कर नाहींतर तो काचकिरडा होईल.' [सं. काच]

काचकुय(इ)री, काचकुरी—स्त्री. खाज उत्पन्न करणारी एक वनस्पति. कुइरी पहा. 'बागेंत वाढणाऱ्या ... काचकुइरीचा मुलाजा करण्यांत कांहीं हंशील आहे काय ?' –नि १०८३.

काचळली—स्त्री. (राजा. बायकी) गुदगुली; कुचकुली (क्रिया व भावना). (क्रि० करणें; होणें).

काचकूच—स्त्री. अळंटळं; टंगळमंगळ.

कां(का)चणी—स्त्री. १ घर्षण. 'दैवें वायूच्या कल्होळीं। परस्परें वेळूजाळीं। स्वजातिकांचणीं इंगळी। पेटली ते होळी वनाची करी।' –एभा १३.१८९. २ घर्षणानें पडलेली खांच, वळ, ओरखडा. 'दोरें चिरा कापे पडिला कांचणीं।' –तुगा ३३९४. ३ रेडे वगैरेचीं शिंगें कापण्याकरितां तयार केलेली दोरी. ४ काळजी; हुरहुर; चिंता. 'ऐसा पडिलों कांचणी। करी धांवा म्हणउनि।' –तुगा १५०८. ५ गांजणी; जाचणी; छळणूक. १ नाश; काटणें; छाटणें; 'बुंद नोहे तें चिंतामणी। हरषें केली भवकांचणी।' –नव १४.२६. [सं. कांचन=बंधन] म्हo–(व.) गहूं वालावा दाटणी बायको वालावी कांचणी.

कांचणी—स्त्री. (गु.) एक प्रकारची चोळी, कांचोळी. [सं. कांचन=बंधन]

का(कां)चणें—अक्रि. १ घर्षणानें कमी होणें, झिजणें. 'तुज जवळि भल्यांचा काय सन्मान काचे।' –सारुह ६.१०५ २ (ल.) झिजणें; झडणें; कृश होणें; वाळणें. (भूक, तहान, काळजी, दुःख, आजार यांमुळें). ३ भिणें; धाकणें. 'परि झाले हरिवरि करि वर जातां जैवि तेविं भट काचे।' –मोकर्ण ४३.६६.; –उक्रि. गांजणें; छळणें; त्रास देणें. [सं. कच् किंवा कांच्=बांधणें; कांचन=बंधन; म. काच]

कांचनें—न. कंचन. १ सोनें; सुवर्ण. 'एकें लसत्कांचनसम पिंवळे।' –हा ११.१३५. [सं. कांच्=प्रकाशणें]

कांचन—पु. १ एक फुलझाड; कांचनार. हें झाड मोठें वाढतें, पानें आपटयाच्या पानासारखीं असतात. याच्या पांढरा, पिंवळा, तांबडा, अशा तीन जाती आहेत. शेंग चपटी–शिकेकाईसारखी असते. लांकडाचा रंग तांबूस असून तें रंगाच्या उपयोगी पडतें. हें फार चिवट असून याच्या काठया करितात. –वगु २.२७. 'कांचन फुल्ले श्वेत पीत। तेणें सैन्यांत अति शोभा।' –भारा किष्किंधा ९.४१. २ डोंगरी टेंभुर्णी –शे १०.२१४. [सं. कांचनार; गु. कंचनार]

कांचन—पु. गंजिफाच्या खेळांतील एक रंग. –शाब्रीको. ? चनकांचनी म्हणून गंजिफांचा एक प्रकार आहे तो हा असावा.

कांचनभट—पु. (शारदा नाटकांतील एक पात्र. यानें द्रव्यलोभानें शारदा नांवाची आपली अल्पवयी मुलगी श्रीमंत पण जरठ मनुष्याला देण्याचा बेत केला होता यावरून ल.) द्रव्याच्या लोभानें म्हाताऱ्याला मुलगी देणारा; अति लोभी माणूस.

कांचनाम्ल—न. (शाप.) किसेनिक ॲसिड. [किसीन=कांचनीय]

कांचनार—पु. डोंगरी टेंभुर्णी. [सं.]

काचफोड—पु. एक प्रकारचा फोड. यांत पाणी असून हा मोठा असतो. कासेफोड (अप.) [का. कच्च्+फोड]

काचय—वि. (काव्य) भित्रा; अधीर. काचा अर्थ २ पहा.

कांचरणें—कांचणें पहा. 'तिच्या आयुष्याच्या दोरीचा अर्धवट कांचरलेला एकेरी पदर तुटला नव्हता.' –झांमृ ६७.

काचरी—स्त्री. १ फळें, फळभाज्या यांचे काप काढून वाळवितात ती; फोडी, उसरी. 'ते पाहे होईल काचरी। वाळली जैसी।' –हा १३.५५५. 'वाळऊनि काचरी करावी। सांजवेळेची।' –अमृ ६४८. २ (ल.) म्हाताऱ्या स्त्रीचे सुरकुतलेले स्तन. ३ (ल.) सुरकुती. [सं. कातरा; प्रा. कच्चरा; गु. काचरी; सिं. कचिरी] ०सुपारी–स्त्री. खांडकापी सुपारी.

काचरी—कचरा, कचरी पहा. [सं. कचूर]

काचवणें—क्रि. काचेचा मिना चढविणें.

कांचवा—पु. बिन वाळ्यांचा कमरेपर्यंतचा अंगरखा; बंडी; कबजा; जाकीट. [सं. कांच्=बांधणें]

काचळ—स्त्री. १ पातळ तुकडा; चीप. २ कातळ; दगडाचा लांबट तुकडा; दगडाची लांबट कपरी. 'दगडांच्या तळाशीं काचळा असूं नयेत.' –मॅरट ३४. –वि. दगडाचे तुकडे, चिपा असलेली (जमीन इ०). ०रान–न. दगडाचे गोटे, चिपा असलेली जमीन.

काचा—वि. १ (काव्य) कच्चा; अपक्व; न शिजलेला; हिरवा. 'विचार हा काचा कदा नव्हे।' –दावि ७४. २ (ल.)

भित्रा; अधीर; घाबरा. 'तेथ भेडांची कवण मातु। कांचया केर फिटतु।' –ज्ञा १.१३४. ३ अतज्ज्ञ; अधैर्यवंत ज्ञानी. 'ऐसा मागैं विवेकाचा। प्राणी जो स्वयें कांचा। त्यास हें कळेना।' –दा ११.८.२४. 'म्हणे अल्पधी तोचि हें बाळ काचें।' –मंराधा ३९. [कच्चा. ध्व. कच्]

काचा—पु. (व.) करकोचा; घट्टा. [काच, काचणें]

काचा, कांचा-च्या—पु. १ वीत-सव्वावीत रुंदीचा व तीन-साडेतीन हात लांब असा कमरेस बांधावयाचा पट्टा, वस्त्र. २ नेसलेल्या धोतराचा, लुगड्याचा जो पुढचा ओचा मागें खोंवतात तो. (क्रि० घालणें; खोचणें; मारणें). ३ लंगोटासारखी कुस्तीच्या वेळेस नेसावयाची नवारीसारखी घट्ट पट्टी; चड्डी. 'पहिलवानानें आंत लंगोट घातलेला असून त्यावर काचा घातलेला आहे ...' –पहिलवान व कुस्ती (बडोदें) ११. [सं. कच्=बांधणें; कच्छ] **०घालणें–भिडणें**-पुढला सोगा मागें खोवणें. **०भिडविणें**-काचा घट्ट आवळणें; कंबर भिडणें. 'त्यांमागें मांडचोळणा घालून काचा भिडविलेले ... तीन चारशें मावळे हेटकरी लोक चालले आहेत.' -मोचनगड.

काचाकुची—स्त्री. संकोच. काचकूच पहा.

काचाबुल-भूल—वि. (गो.) कावराबावरा. **काचाबुलचें**-(गो.) कावराबावरा होणें.

काचार-री, कांचारी—पु. काच तयार करणारे लोक; कांसार. –वेहु १३२. [सं. काच]

काचावणें—अकि. १ आजारामुळें खंगणें; क्षीण होणें; काळजीनें किंवा दुःखानें निःशक्त होणें. २ (काव्य.) भीतीनें माघार घेणें; कचणें; कच खाणें; अडखळणें; कांपणें; धैर्य सुटणें. 'काचावला वीर पुढें धसेना।' –वामन, भीष्मप्रतिज्ञा १२. [काच]

कांचाळा, कांचोळ—पु. (कु.) गोणपाटाची, कांबळयाची हात नसलेली बंडी. कांचवा पहा.

काची—पु. (हिं.) फळभाजी, फळफळावळ विकणारा; काछी; काचिया. 'नंतर जानूनें काचीला विचारिलें कीं, सिताफळें महाग झाल्याचें कारण काय?' –मराठी ६ वें पुस्तक (१८७५) १८८. [काच्छी, कच्छी]

कांची—पु. (कों.) एक मासा.

कांची—वि. (तंजा.) करवतीकांठी (साडी, लुगडें).

कांची—स्त्री. १ कमरपट्टा (सोन्याचा-चांदीचा); कमरेची सांखळी, पट्टा. –वेहु ४९.५०. [सं. कांच्=बांधणें] २ **कांजीवरम्** शहर; सप्तपुऱ्यांपैकीं एक.

काची-चें—वि. १ काचा; कच्चा. 'ऐकें सबाह्य अंबटें। एके अधैकाचीं तुरटें।' –एरुस्व १४.१०६. –वि. 'अमृतादिक मधुरहि तीं मातुनि एका तुझेनि मन काचीं।' –मोकर्ण १.८.

'चोरटे काचे निघाले चोरी। आपलें तैसें पारखे घरीं।' –तुगा २९३४. २ (ल.) अधीर अज्ञ. 'एथ मन करूनियां काचें।' –ज्ञा ११.६३०. 'बुद्धिवीण माणुस काचें।' –दा १५.१.१५.

कांचीकुची—स्त्री. संकोच; काचाकुची; काचकूच पहा. 'नव्हों आम्हीं आजिकाळीचीं। कांचीकुची चालवणी।' –तुगा १३९८. [काच]

कांचीबंद, कांचुबंदी—काचबंदी पहा. 'सुंदर श्रीधर नागर रुपडें कांचीबंद आंगणी।' –नामदेव ७८. 'कांचबुंदी करूनी भुई।' –श्रीगीत ६२.

काचुक—न. (क.) (विटीदांडू) अंतराळीं विटी झेलणें. 'माझीं चार काचुकें झालीं.' [?]

कांचुलिया—पु. घटकंचुकी विधि आचरणारा हिंदु शाक्तांचा एक पंथ. कांचोळीपंथ पहा. [सं. कंचुली=काचोळी; हिं कांचुली]

काचेचें भांडें—न. १ (ल.) समुद्राचें खारें पाणी खारींत येऊं नये यासाठीं खारीवर नेहमी राखण ठेवावी लागते. समुद्राचें पाणी आंत आल्यास खारीची जमीन निरुपयोगी होते. म्हणून या जमिनीस हें नांव आहे; शेत जमीन. २ (ल.) नाजुक व ठिसूळ असा पदार्थ किंवा प्राणी (स्त्री, घोडा, अब्रू इ०).

काचोटी—स्त्री. (काव्य) काचेचा मणी (अलंकार म्हणून मानलेला). 'काचोटी आणि महामणी। मेरू मशकसम नव्हे।' –ह १.८४. [काच]

कांचोळणें—अक्रि. (आंब्यांत) बाठ, कोय धरणें; बनणें. [कांचोळी]

काचोळा—पु. १ धान्य वगैरेचा कोंडा, कीस; भूस. २ बारीक कोंडा. [कातळ, काचळ ?]

कांचोळा—पु. काचळ पहा.

काचोळी—स्त्री. १ (व.) मिरचीचा देंठ. २ (तंत्रा.) वांग्याचा देंठ. कचोळें, काचोळें पहा.

का(कां)चोळी—स्त्री. १ जिचे बंद पाठीवर बांधतात अशी चोळी, हिला गांठ किंवा बिरडें नसतें. ही तुकडयातुकडयांची करतात. लहान मुली, मारवाडी व गुजराथी स्त्रिया ही बहुधा वापरतात. 'आंगींची उतटली कांचोळी।' –एरुस्व ५.८८. 'ढेर पोटीला जशी कांचोळी शोभत नाही...' –कमं. २ पांढऱ्या रंगाची अखंड चोळी (लग्नांत नवरीला घालतात ती). [सं. कंचुलिका, कंचुली] **०पंथ**–पु. हा गुजराथेत आहे. या पंथांतील लोक (स्त्री, पुरुष) रात्रीं एके ठिकाणीं जमून जेवतात व नंतर जमलेल्या स्त्रियांच्या काचोळ्या एका घागरींत घालतात. त्यांतील एकएक काचोळी काढून पंथाचा गुरु जमलेल्या एकएक पुरुषाला देतो. जिची काचोळी ज्या पुरुषाला मिळेल त्या स्त्रीशीं तो पुरुष रात्रभर रममाण होतो. घटकंचुकी पंथ. **०पंथी**–वि. वरील पंथाचा अनुयायी.

काचोळी, कांचोळी—स्त्री. नुकतीच तयार झालेली आंब्यांतील कोय.

काचोळें—न. १ फळें, फुलें यांच्या देंठास आच्छादन करणारा भाग, वाटी. २ धान्याचें टरफल, कवच. ३ गंध, अक्षता, हळद, कुंकूं या पांच वस्तू ठेवण्याचें एक गोल, पांच घरांचें धातूचें भांडें, पात्र. कचोळें पहा.

काच्छी-काछी—पु. कच्छ प्रांतातील माणूस; फळें विकणारा, उत्तरहिंदुस्तानांत हे माळ्याचा धंदा करतात. [सं. कच्छ=प्रांत]

काच्छीण—स्त्री. कच्छी स्त्री.

काज—न. १ (काव्य) काम; धंदा; कृत्य. 'तरी आलेंती कव्हणें कांजे।' –शिशु ११८. 'आमुचिया काजाचेनि पाडें।' –ज्ञा १.११२. 'आतां काज न ये हातां।' –उषा २८.९. 'तें (नारायणास्त्र)हि प्रतिहत केलें करितो हीं सिद्ध कृष्ण तो काजें।' –मोकर्ण १.२१. 'होड घाली अवघड। काजेविण करी बडबड।' –दा २.१.४९. 'भक्तजनाचिया काजा। जेवीं करिती अवर्णपूजा।' –एरुस्व ६.५४. २ कारण; उपयोग; प्रयोजन. 'त्या वेडियाच्या गोठी। काय काज।' –विपू १.३४. 'ऐसा काजेंवीण आंतुडला।' –ज्ञा ६.७९. 'शिरीं आहे रामराज। औषधाचे कोण काज।' ३ (ल.) हेतु; मनोरथ. 'त्र्यंबक हा तीर्थराज। पुरवी अंतरीचें काज।' –भूपाळी ११. [सं. कार्य–कज्ज–काज; सिं. काजु; गु. हिं. पं. काज] **०काम-कारभार**–पु. (प्र.) कामकाज-कारभार पहा.

काज—स्त्री. १ कांच, भिंग. [सं. काच] २ (गो.) कांचेसारखें तकाकणारें तेल, रोगण, वार्निश.

काज—पु. गुंडी अडकविण्याचें भोंक (सदरा, अंगरखा इ० चें). [हिं. काज; पोर्तु. कासा] **०पट्टी**–स्त्री. काज केलेली पट्टी (सदरा, अंगरखा यांची). 'डावीकडे काजपट्टी जोडावी' –शिकशि २.३०.

काज—स्त्री. (कों. गो.) काजूचें झाड व फळ. रस्त्याच्या बाजूला तांबडया, पिंवळया फळांच्या भारानें लवलेल्या हिरव्या गार काजींची रांग लागली होती.' –सह्याद्री ८८. [काजू] **०कार**–पु. (गो.) काजूची दारू करून विकणारी एक खिस्ती जात. **०चेल-याल**–न. (कु.) काजूची दारू, तेल.

काज—न. बदक. 'उदूंत काज म्हणजे बदक.' –गृशि २.१२०. [तुर्की काझ्]

काजकीर्द—स्त्री. अमदानी; अम्मल; कारभार (राजाचा). [काज+कीर्द]

काजगी, काजा—स्त्री. तोंडामधून घेऊन (ओठाळी) पाठीवरून शेपटाखालून गेलेली घोडयाच्या लगामाची दोरी; ओठाळी व दांडी जिनें बांधतात ती दोरी; लगाम; काटेरी मुंगा. [अर. काइझी; हिं. काझ]

काजगें—न. (ढोरधंदा) अधोड उलटी करतेवेळेस तंगडीला भोक पाडून तिच्यांत ओवावयाची दोरी. [काजगी]

कांजणी—स्त्री. (गो.) लग्नामधील बोहल्याच्या भोंवतालची भांडयांची किंवा मडक्यांची उतरंड; वही.

कांजणी—स्त्री. (क्र.) कानाच्या बाजूनें चेहऱ्यावर येणारे केस. [सं. कर्ण+जन्]

कांज(जि)णी—स्त्री. १ एक प्रकारचा देवीसारखा रोग व त्याचा फोड (नेहमीं कांजण्या असा अव. प्रयोग करतात); देवीपेक्षां हे फोड लहान असतात. यांचा उद्भवकाल तेरा दिवसांचा. लक्षणें:–थोडया तासांच्या दुखण्यानें पाठ, छाती, तोंड, मान, पोट यांवरून उद्भवतात. एका आठवडयांत यांच्या घन, जल व रुक्ष पीटिका बनतात. यांचा वर्ण लाल व किंचित खोलगट असतो. –गोस्तनीप्रयोगचंद्रिका १२. (क्रि० येणें; निघणें; उगवणें).

काजर—न. काजऱ्याच्या फळाचें विष.

काजरवेल—स्त्री. एक जातीची औषधी वेल.

काजरा—पु. कुचला; एक विषारी वृक्ष. याचीं फळें, पानें, बीं हीं विषारी असतात. फळास जहरी कुचला म्हणतात. हिंदुस्थानांत याच्या सात जाती आहेत. हें झाड ४० ते ६० फूट उंच वाढतें. बुंध्याचा घेर १२ फूट पर्यंत वाढतो. पुष्कळ विस्तार वाढतो. हें औषधोपयोगी आहे. याचीं पानें रुंद, अंडाकृति, नागवेलीच्या पानासारखीं असतात. फुलें हिरवट पांढरीं व मंजिरीच्या आकाराचीं असतात. फळ कवंडळाच्या आकाराचें व नारिंगी रंगाचें असून आंत सफेत पिवळधा रंगाचा गर व गराच्या आंत दोन्हीं बाजूस एक इंच व्यासाच्या पिंवळट किंवा उदी रंगाच्या बिया असतात. या अतिशय विषारी असून यास वास नसतो. –वगु ७.४१३. 'होइल अकीर्ति देतां कां हा उपदेश काजरा मातें।' –मोउद्योग १३.२६. [सं. कारस्कर; का. कांजवार]

काजवणी—स्त्री. (कु. गो.) कांजी; भाताच्या पेजेला पीठ व मीठ, मिरची लावून तयार केलेली पेज. [कांजी+पाणी]

काजवा—पु. रात्रीं ज्याच्या ढुंगणाजवळ प्रकाश दिसतो, असा एक किडा. 'करूनि काय जिकील रविला काजवा रण।' –मोअंबरीषाख्यान ४२. (नवनीत पृ. ३६५). १ (अव.) पित्तादिकानें किंवा जबर मार बसल्यानें डोळधापुढें जे सूक्ष्म प्रकाशाचे अणु दिसतात ते; यांना 'काजवे लखलखतात' असें म्हणतात. **म्हo काजव्याचा उजेड गांडीभोंवता.** =गरिबाला गरिबीचींच कामें होणार, किंवा स्वत:पुरतीच मदत करतां येणार. [सं. खद्योति, खद्योत; प्रा. खज्जोअ] (डोळयापुढें) **काजवे**

चमकणें–अंधारी येणें. **–ल्याचा उजेड**–क्षणभंगुरता; अशाश्वतता; कमताई; महागाई, पाण्यावरचा बुडबुडा.

काजळ—न. दिव्यापासून उत्पन्न होणारा एक काळा पदार्थ. हें अंजन म्हणून औषधासाठीं अगर शोभेसाठीं डोळयांत घालतात, मस [सं. कज्जल] **–ळाचा डोंगर**–पु. १ दिव्यावर जो काजळाचा उलटा निमुळता गड्डा जमतो तो. २ (ल.) अतिशय काळा मनुष्य. **०कुंकु**–न. १ स्त्रियांची वेणीफणी, नट्टापट्टा वगैरेंना व्यापक संज्ञा. 'तिला न्हाऊं धुवूं घालून काजळकुंकूं करून अंगावर वस्त्रें भूषणें घालून संतोषित केलें.' –कमं २.५७. २ एका रानटी झाडाच्या फुलाला (व्यंगोक्तीनें) म्हणतात. **०तीज**–(व.) हरतालिकेचा दिवस. **–ळाची कोठडी**–स्त्री. (ल.) सरकारी खजिना किंवा पैशाच्या देवघेवीची मोठी पेढी. 'काजळाच्या कोठ डींत गेलें तर तोंड काळें मोजलें तर हात काळे.'

कांजळ-ळा—पु. खाडीच्या कांठीं उगवणारें व सरपणाच्या उपयोगी असें झाड. यास बकुळीच्या फुलासारखीं लहान व सुवासिक फुलें येतात. –वगु २९.

काजळणें—क्रि. काळें होणें. 'ते अद्यापि काजळेले दिसतुसें.' –शिशु ७४०.

काजळी—स्त्री. १ वात किंवा काकडा वगैरेचा जळून काळा झालेला कण, भाग; कोळी; कोजळी. 'मग आगी लागलिया कापुरा। ना काजळी ना वैश्वानरा।' –ज्ञा १५.४३९. २ धान्यावर, विशेषतः जोंधळयावर पडणारा एक रोग, यामुळें कणसांत धान्याऐवजीं काळा पदार्थ निघतो; कोळशी, काजळघा. काणी. ३ दिव्याच्या धुरानें जमलेला काळथा पदार्थाचा थर. ४ दाग्गिन्याच्या अरुंद व खोलगट भोंकांतील लाख जाळून बाहेर काढली म्हणजे आंत जो लाखेचा थोडासा जळका भाग राहतो तो. ५ पित्तविकारानें डोळयांपुढें येणारी अंधारी. ६ काजळ धरण्याकरितां दिव्यावर जें भांडें वगैरे धरतात तें. ७ काजळाइतपत अतिशय बारीक वाटलेलें औषध वगैरे. ८ काजळ–ळा नांवाचें झाड. ९ अंबर, राळ, टरपेंटाईन वगैरे पदार्थ जाळले असतां शिल्लक राहणारें काळेपण. १० (ल.) दुःख, काळजी. 'नाना चिंतेची काजळी। नाना दुःखें चित्त पोळी।' –दा ३. ६.५२. 'चिंता काजळी लागली।' –दा ३.७.५८. –वि. काजळाचें केलेलें (शाई, पागोटयासाठीं केलेला रंग, अशा रंगानें रंगविलेलें कापड). [सं. कज्जल] **०कागद**–पु. (इं.) कार्बन पेपर. ज्याच्या पाठीवर लिहिलें असतां खालीं ठेवलेल्या कागदावर अक्षरें उठतात असा काळा लेप लावलेला कागद.

कांजळी—स्त्री. गाय, म्हैस इत्यादिकांचें व्याल्यानंतर काढलेलें दूध; चीक. [फा. कंज़]

काजळ्या—पु. गव्हावरील रोग. काजळी पहा.

काजा—पु. काजगी पहा.

काजाऊ—वि. कामीं येणारा; कामास उपयोगी पडणारा; उपयुक्त. [सं. कार्य=काज]

काजाणू—न. इमारतीचें लहान-मोठें लांकूड; सर्व लांकडी सामान. [सं. कार्य]

काजार—न. (गो.) लग्न. [पो. काजारी=लग्न झालेला]

काजारी—पु. काचेच्या बांगडया करणारा व विकणारा कासार व त्याची जात. काचारी पहा. [सं. काच]

कांजिणी-कांजे—कांज(जि)णी पहा.

काजी—पु. मुसलमानी धर्मशास्त्राप्रमाणें निकाल देणारा न्यायाधीश [अर. काझी] **म्ह० १** राजा बोले दळ हाले काजी बोले दाढी हाले–राजाचा हुकुम सर्व सैन्य ऐकतें पण गरीब काजीचें कोणी ऐकत नाहीं. फक्त त्याची दाढी हालते तेवढीच–म्हणजे गरिबाला कोणी विचारीत नाहीं. २ (व.) काजीजी दुबळे क्यों? शहरका अंदेशा=जेव्हां एखादा माणूस नसती चिंता करतो तेव्हां म्हणतात. **काजीफौंड**–पु. (गो.) मसणवट. **०शरा**–धर्मशास्त्र. –शारो १८३. [अर. काझी+शर्अ=धर्मशास्त्र]

कांजी—स्त्री. १ कढ काढलेलें पाणी; आंबलेली पेज; कांजवणी; कण्हेरी. 'जो अमृतासि ठी ठेवी। तो जैसा कांजी न सेवी।' –ज्ञा २.३६४. 'गांजीन परि सहावें म्हणिजे वैद्यें दिली सुधा कांजी।' –मोकर्ण २१.४०. 'कां जीवनामृत उपेक्षुनि प्याल कांजी।' –आसु ५४. 'कांजी वदनीं घातली।' –दे कृष्णजन्म ५९. २ खळ. ३ ताकाची स्वच्छ निवळी. **म्ह०** शेजी नांदे कांजी लाभे. [सं. काजिका; ता.कांशी] ४ –न. (कु.) त्रिफळें, तांदुळाची पेज, कोथिंबीर यांची कढी. 'थोडें कांजी वाढ' **०वडे**–पु. पु.हिंगाची धुरी दिलेल्या मातीच्या भांडयांत स्वच्छ पाणी भरून त्यांत मीठ, मोहऱ्या, वगैरे मसाल्याचे पदार्थ घालून त्यांत तळलेले उडदाचे वडे घालावे व भांड्याचें तोंड तीन दिवस बांधून ठेवून मग काढावे. –योर. (व.) हरभऱ्याची भिजलेली डाळ वाटून फोडणीचे ताकांत कालवून नंतर त्याचे वडे करतात ते. **०हाऊस**–न. १ (लष्करी) लष्करांतील शिपायाला शिक्षा देण्याचा एक प्रकार शिपायाला खूप काम करावयास देऊन फक्त कांजी पिण्यास देतात. २ (व. ना.) कोंडवाडा.

कांजीण—स्त्री. (गो.) मगज.

काजुरा गौरी—स्त्री. आंबे हळद.

काजुला—पु. १ (कु.) समई मालवल्यानंतर लुकलुकणारें वातीचें टोंक; काजळी; गूल. २ (कु.) कानांतील मळ. [सं. कज्जल]

काजुली—स्त्री. (गो.) गोकर्णाचें झाड.

काजुलें—न. (गो.) कानकोरणें.

काजुलो—पु. १ (कु.) काजवा नांवाचा किडा. २ (गो.) वातीचें गुल, कोळी; कोजळी. ३ (गो.) काजूची दारू.

काजू—पु. काजूचें-जांभीचें झाड व फळाची बी. हें झाड रानांत, डोंगरांत-विशेषतः मलबार, गोमंतक, मालवण या प्रांतीं होतें. याच्या तांबडा, पिवळा व पांढरा अशा जाती आहेत. फळ मळ असून पुढें बी असतें. तिची साल कठिण असून आंत बिब्यासारखा चीक असतो. सालीच्या आंतील गोळ्यास काजूगोळा म्हणतात. पिकलेल्या फळास जांब म्हणतात व ते खातात. बी भाजून अगर वाफ्न वरील साल काढून खातात. मिठाई इत्यादि पदार्थांत बीचा उपयोग करतात. बीयांचा चीक तारवांच्या तळास लावतात. -वगु २.२९. काजूच्या फळांची दारू होते. कच्च्या फळाचा चीक पायास होणाऱ्या चिखल्या रोगावर उपयोगी पडतो. -कृषि ७३७. धातूस डाक लाविण्यासाठीं याचा रस उपयोगी आहे. [मलायी. कायु; फ्रें. अकाजु; पोर्तु. अकाजु; इं. कॅशु; हिं. गु. काजे]

कांजें—वि. (गो.) खुरटें झालेलें, वाढ खुंटलेलें फळ. [काचा]

कां जे—कारण; कीं 'कां जे विद्येनें मोठा। म्हणोनियां।' -दा ९.४.९.

काजेल-ज्येल, काज्याल—न. (कु. गो.) काजूचें तेल. २ काजूची दारू. ३ काजूचा डामरासारखा चीक; हा गाडीच्या वंगणास उपयोगी पडतो.

काज्या—पु. काजगी पहा.

काझ—स्त्री. (गो.) वारनीस; काचेसारखें तकतकणारें तेल.

काझी—काजी पहा.

काट—न. शाई बनविण्यासाठीं नाचणी, बाजरी इत्यादि जाळून त्यांत पाणी ओतून केलेलें शिरें. कुळीथ हरभरा इ० कडधान्यांचें शिजवून काढलेलें पाणी, कढण; कट; सुपाऱ्या रंगीत पदार्थ किंवा कडधान्य शिजविलेलें पाणी; आमसुलें तयार करण्यासाठीं त्यांनां पूट देण्यासाठीं केलेलें रातांब्यांचें पाणी; (गो.) मांस शिजवून तयार केलेलें पाणी. [सं. क्वथ्=कढविणें]

काट—पु. १ (कों.) कवळ, शिराटी इ० (राबासाठीं). २ (विड्याच्या पानाची) लहानशी रास; फुजकीं पानें कापून शिल्लक राहिलेली कत्रण. ३ गंजिफा अगर पत्ते पिसून झाल्यावर वाटण्याच्या आधीं वाटणाऱ्याच्या डावे हातच्या माणसाकडून जो भाग काढून ठेवतात ती क्रिया. ४ राज्यकारभार, घरखर्च वगैरेमधील काटछाट, काटकसर, कपात. 'लँकेशायरच्या गिरणीवाल्यांनीं मजुरींत काट करण्याचें ठरविलें आहे.' -के १४.५.३०. ५ रेष; फुली; खोड़णें, ६ -स्त्री. तोटा. 'या व्यवहारांत त्याला चांगलीच काट बसली.' ७ (शिंपीधंदा) कापलेला नमुना. 'बिजारीचा काट पोंचला नाहीं.' ८ (गो.) पडावळी किंवा द्रोण यांना बांधावयाचा बंद. ९ आघात, प्रहार. 'केला षड्वैऱ्यावर काट.' -दे कटिबंधसंग्रह ३. [सं. कृत्=कापणें; लिथु. केटु; ग्री. केइरो; स्लॉ. कोतु; लॅ. कर्टस; हिब्रू कतैधिम्] ०देणें-मारणें; खोडणें, छाटणें, अपमान करणें.

काट—पु. १ गुप्त कट; खोल मसलत. 'असा काट नजीबखान यानें केला.' -भाव ५८. २ यत्न; युक्ति; चातुर्य. 'त्याचा तेथें कांहीं काट चालत नाहीं.' ३ (व.) द्वेष. 'तो पहिल्यापासून माझा काट करतो.' [सं. कूट]

काट—पु. १ घट राड; राप; गंज; मळ. 'भीतरीं जिव्हा तें चामखंड। असत्य कांटें कांटलीं।' -एभा ११.५९५. 'अनेक दोषांचे कांट। जे जे गादलें निर्घोट। होती हरिनामें चोखट। क्षण एक न लागतां।' -तुगा २४९८. २ (महानुभाव.) कपडयावरील वेलबुट्टीचें (लाख, चीक वगैरेचें) लुकण, खडीचा रंग; कापडावरील डाग. 'कषायाचें काट। फेडूनि कीजे धुवट।' -भाए २८३.

काट—न. मसण. [सं. कट=स्मशान; फा. कटह=स्मशान]

काटांत जाणें-मसणांत जाणें. २ (ल.) ज्याची आपल्याला माहिती किंवा काळजी नाहीं त्यांच्या हजर असण्याबद्दल अगर जाण्याबद्दल बेफिकीरवृत्तीनें बोलणें. जसें:-'तो काटांत गेला' =कुठें तरी, मसणांत गेला.

कांट—न. १ पावसाळ्यांत उत्पन्न होणारा जळूसारखा एक किडा. [काणट पहा] २ (कों.) कुंपण, वई घालण्यासाठीं (बाभळ, बोर वगैरेच्या) भाऱ्यांतील एक फांटा, खुंट. ३ (कों.) आक्टोबर-नोव्हेंबरमध्यें पकडला जाणारा समुद्रांतील एक मासा. [सं. कंटक]

काटक—वि. कर्नाटकांतील एक रानटी व क्रूर रामोशी, बेरड यांसारखी जात; यावरून दरोडेखोर, गळेकापू लोकांना हा शब्द लावतात. [सं. कंटक, तुल. का. काट=किडा] -वि. कष्टाळु; कणखर; अति मेहनती (शरीर, माणूस).

काटकढी—स्त्री. कढण शिजवून त्याच्या पाण्याची-काटाची केलेली कढी. [काट+कढ]

काटकवळ—न. (कों.) राबाचें कवळ. [काट+कवळ]

काटकसर—स्त्री. १ खर्च कमी करण्याची क्रिया; काटछाट, मितव्यय. (क्रि० करणें; काढणें; पहाणें) 'दुष्काळामुळें काटकसरीची पहिली कात्री युनिव्हर्सिटीस सरकारांतून जी पांच हजार रुपयांची मदत होती तिजवर पडली.' -टि २.१२२. २ अशा रीतीनें शिल्लक टाकलेला पैसा, रक्कम. [हिं. काटना+अर. कसर] ०री-ऱ्या-वि. बेतानें खर्च करणारा, मितव्ययी.

काटकाई—स्त्री. १ काटक, रामोशी, बेरड, भिल्ल वगैरे लोकांनीं केलेली पुंडाई, नासधूस, अनर्थ. 'वाटेस काटकाई फार यास्तव माणसें येत नाहींत.' –खरे १११०. यावरून. २ क्रूरता, विध्वंस, रानटीपणा. [काटक]

काटकी, काटकुळी, काटकोळी—स्त्री. लांकडाची झिलपी, धलपी, तुकडा, शिरपुटी; (अव.) काटक्याकुटक्या; काटक्या; काटकुटी; काटकूट. [सं. काष्ठक]

काटकुटी-कूट—स्त्री. १ काटकी (अव). २ लहान काटकी. ३ काथ्याकूट, वादविवाद, ऊहापोह, चर्चा. [काष्ठ]

काटकुळा-कोळा—वि. रोडका; किडकिडीत; क्षीण; खंगलेला; कृश; सडपातळ.

काटकोण-न—पु. १ नव्वद अंशांचा कोन; वर्तुळाच्या चतुर्थांशाइतका कोन; दोन सरळ रेषांनीं एकमेकींस छेदिलें असतां छेदनबिंदूशीं झालेले सर्व कोन जर अगदीं सारखे म्हणजे एक परिमाणाचे असतील तर त्यांतील प्रत्येक कोन काटकोन होय.' –महमा ४. (इं.) राइट ॲंगल. २ गवंडयाचा अगर सुताराचा गुण्या; कोनाळी (क.)[काटणें+कोन] **०चौकोन**–पु. ज्या चौकोनाचे सर्व कोन काटकोन असतात तो. –महमा ८. **०त्रिकोण**–पु. ज्या त्रिकोणाचा एक कोन काटकोन असतो तो. –महमा ७.

काटकोना-न्या—पु गुण्या. काटकोण–न अर्थ २ पहा.

काटक्याकुटक्या—स्त्री.अव. लांकडाच्या तलप्या,झिलप्या; तुकडे.

काटगिरी—स्त्री. शहाणपणाची व धूर्तपणाची मसलत; योजना किंवा बेत करण्यांतील चातुर्य; धूर्तता; कावेबाजपणा (विशेषतः अपकार करण्यामध्यें) [काट+फा. गिरी]

काटगोल—पु. वाटोळा वासा, सोट इत्यादि. [काट+गोल]

काटणी—स्त्री. १ जोंधळा, सजगुरा इत्यादि पिकांच्या कणसांची कापणी. २ गंजिफा, पत्ते वाटण्यापूर्वी त्यांतील कांहीं पानें उचलून काढून ठेवण्याची क्रिया; काट ३ पहा. ३ विडयाच्या पानांतील नासक्या पानांची छाटणी. ४ जंगलाची, रानाची कापणी, छाटणी. ५ सैन्याची कत्तल, कापाकाप. **०वाटणी**–स्त्री. पत्ते किंवा गंजिफा काढून वाटण्याची क्रिया. [सं. कृत्]

काटणें—अक्रि. मळणें, मलीण होणें; राप चढणें; लेप चढणें. 'तैसिया वदनीं प्रळयरुधिरें। काटलिया दाढा।' –ज्ञा ११.३४५. 'जे काटली नित्य महानृतानें।' –सारुह १.२८. 'धुळीनें काटलें आकाश।' [काट=मळ]

काटणें—उक्रि. १ छाटणें; कापणें (परंतु विवक्षित प्रसंगींच याअर्थी उपयोग करतात). गंजिफा, पत्ते इत्यादिकांतून कांहीं भाग उचलणें; कमी करणें; छाटणें; (शरीराचा एखादा भाग), 'कोरा काटलिया मुखीं कटकटा ढोरांचियां शोणितें।' –आता १३. २ दुःखांत, अडचणींत, त्रासांत वेळ घालविणें, खर्चणें. 'हुजूर चाकरी राजापाशीं कांहीं दिवस काटले।' –पला ८८. [सं. कृत्; हिं. काटना; तुल. प्रा. कट्ट; पं. कट्टणा; सिं. कटणु; बं. काटिना; गु. काटवु]

काटदार-बाज—वि. कावेबाज, धूर्त; कल्पक; मतलबी; कारस्थानी.

काटमूय—स्त्री. (गो.) काडमुंगी; वाघमुंगी. ही मोठी, काळी असून चावते. दंशाचा वेग फार तीव्र असून गांधी–दादी उठतात. 'काटमूय आयल्या जाल्या रामलक्ष्मणाची दुराय घाल.'

काटमोगरा—स्त्री. मोगऱ्याची एक जात.

का(क)टला—पु. कडता पहा.

कांटला-ली, काटवेल—पुस्त्री. फळ न येणारा करटोळीचा वेल; रानकारले.

काटलें—न. १ (कों.) करटुलीचें फळ. २ कांटेरी रान? –शर.

काटवट—स्त्री. १ भाकरीचें पीठ मळण्याची लांकडी, कान असलेली परात; काथोट. २ (बिडकाम) चरकाची खालची बैठक; बूड. [सं. काष्ठ+वृत्]

काटवण-न—न. १ काटेरान; कांटेरी वन. 'कांटवण अटव्यक्षिति। आंधळें सांडोनि जाये सांगाती।' –एभा ६.३४३. 'कडे चुकवूनि कांटवण। ऐका आणिलीं तीं कोण कोण गा।' –तुगा ४१४६. 'पसरितो सराटे भारी। कांटवण बोरी।' –राला ६६. [सं. कंटक+वन]

काटवणी—न. १ कडधान्य शिजविलेलें पाणी; रंग उकळलेलें पाणी. २ अतिशय गढूळ पाणी, (कोड, गळूं इ० तून वाहणारें पाणी यासहि ही संज्ञा लाविताते). 'निळा म्हणे काटवणीं। घालिती घालणीं जाणिवेच्या।' –निगा २४१. [सं. कथ्–काट+वन–राणी]

काटवल—न. १ (व.) करटोली; काटली. २ (कों.) गुराला घालण्याचें किंवा छपरावर घालण्याचें गवत (ह्याच्याहून भात्याण निराळें).

काटवळ—न. कांटेरी झाडांच्या बारीक फांद्या.

काटवाडा—पु. (कों.) कोरड्या दिवसांत रानामध्यें किंवा कुरणांत तात्पुरता बांधलेला गोठा; भोंवतीं कांटयांची सळदीं लावून केलेली, रात्रीची गुरें कोंडण्याची जागा. [काटे+वाडा]

काटविकरा—पु. (राजा.) अतिशय दुर्मिळता; महागाई; टंचाई; कमतरता. 'भाजीस अतिशय काटविकरा आला.' [काट+विक्रय]

काट(ट)शह-हा—पु. (बुद्धिबळ) काढून शह; बुद्धिबळाच्या खेळांत एखाद्या मोहऱ्याच्या पर्गात असलेलें आपलेंच दुसरें मोहरें बाजून खेळून प्रतिपक्षीय राजावर मोहऱ्याचा मारा लागू रणें; (सामान्यतः) जरब काढणें. [काढ+शह]

कांटस—वि. काटयांचा, कांटेरी. 'जैसा कमळवनीं फांसु। काढिलिया कांटसु।' –ज्ञा १८.६१७. [सं. कंटक]

काटसरी—स्त्री. १ (ढोरधंदा) कातडयाच्या कडेचा भाग; कडेची पट्टी. २ (विणकाम) टोंकास टांचणी बसविलेल्या दोन काटया लुगडें विणतांना कांठांस ताण बसण्याकरितां लावतात त्यांपैकीं प्रत्येक; मट्टी. काटोली पहा. [काठ+सरी]

काटळणें—उक्रि. चिंचेच्या आंकडयांतून चिंचोके काढणें.

काटळी—स्त्री. एक प्रकारचें हलकें धान्य. ?

काटा, कांटा—पु. १ अणकुचीदार, तीक्ष्ण टोंक असलेली, जी बोचली असतां रक्त काढते अशी काडी; बाभळीचा, बोरीचा दाभणासारखा टोंचणारा अवयव. 'सर्प कपाळीं कांटा नेहटे। कां सापसुरळीचें पुच्छ तुटे।' -भारा बाल ८.३५. २ (भयानें, थंडीनें वगैरे) अंगावर उभे राहणारे शहारे; रोमांच. ३ (अव.) तापानंतर अंगावर खरखरीतपणा अथवा बारीक पुटकुळया असतात तो; पुरळ. ४ (अव.) तापाच्या पूर्वी अंगावर येणारी शिरशिरी; रोमांच; कसर. ५ विंचवाच्या नांगीचें पुढचें तीक्ष्ण टोंक. ६ कुलुपादिकाचा खिळा, जो कुलुपाच्या दांडींत बसतो व मागें सरतो तो. ७ वेळू, बांबू वगैरेंना येणारा तुरा; मोहोर; फुलोरा. ८ कंबर,मान, पाठ यांच्या आंतील बाजूस आधारभूत असलेला अस्थिविशेष. ९ गुणाकार भागाकार यांचा ताळा पाहण्यासाठीं अंक मांडण्याकरितां घातलेली चौफुली (×). १० राघु, मैना इत्यादि कांच्या गळयांत होणारा एक रोग. ११ वजनानें विकलेल्या वस्तूंवर जें कांहीं वजन कटतें देतात तें. कडता पहा. १२ नदी किंवा समुद्रांतील पाण्याखालीं झांकलेला खडक. १३ काटयासारखी शरीरास बोचणारी कोणतीहि वस्तु (माशाचें हाड, चक्राचा दांता, घडयाळाचा हातकांटा, खडबडीत लगामाचें टोंक, करवतीचा दांता, जेवणांतील वापरावयाचें दांताळें–कांटा, जनावरें किंवा भाजीपाला यांवरील खरखरीत केंस, लव इ०). 'काटा बराबर एकावर एक आला.' –रासक्रीडा ७. १४ हलवा, इतर मिठाई यांवरील टोंकें, रवा. (क्रि० येणें; उमटणें; वठणें; उठणें). १५ (विणकाम) वशारन करतांना इकडून तिकडे (वशारन पुढें सरकण्यासाठीं) फिरवावयाचें लांकूड. १६ (व.) थेंब. 'घरांत तेलाचा एक कांटा नाहीं.' –वशाप ५१.१२. ४७८. १७ (कु) सुतारांचें एक हत्यार. १८ (ल) त्रास देणारा माणूस, व्याधि, शल्य, पीडा, शत्रु. 'धर्माच्या हृदयांतिल काढितसे मी समूळ कांटा हो।' १९ तराजूच्या दांडीमधील उभा खिळा. 'जरि कांटा कलताए दैवांचा। जेउता राजमठु।' –ऋ ३९. २० काटा असलेला तराजू (विशेषतः सोनाराचा, सराफाचा). 'मेरूचिया वजनास पाहीं। कांटिया वातली जैशी राई।' –ह ३०.१६१. [सं. कंटक, प्रा. कंटओ, अप. कंटउ; त्सीगन; फ्रें. जि. कंडो. ते काटा] **०उपटणें**–१ (क. व.) त्रासदायक प्राणी, शत्रु, गोष्ट, नाहींशी होणें. २ (व. ष.) समूळ नाहींसा करणें, काढून टाकणें. **०काढणें**–आपल्या मार्गांत असलेल्या, आपणांस पदोपदीं नडवणाऱ्या शत्रूस दूर करणें. 'वसुदानाच्या पुत्रें जो अभिमुख काशिराज तो वधिला। कांटाचि काढिला तो जाणो तव सूनुच्या मनामधिला।' –मोकर्ण ४.१५. **०मारणें**–१ काटयानें सिद्ध करणें. २ अंगांत (तापानें) कसर येणें. **०मोडणें**–१ (व.) विंचू चावणें. २ किंचित उष्ण होणें. 'थंड पाण्याचा थोडा कांटा मोडला.' **कांट्याचा नायटा होणें**–कांटा मोडल्यावर लगेच तो काढला नाहीं तर त्या ठिकाणीं नायटा होतो म्हणजे आरंभीं क्षुल्लक वाटणाऱ्या वाईट गोष्टीचे पुढें मोठे हानिकारक परिणाम कधीं कधीं होतात. **कांट्यानें कांटा काढणें**–एका दुष्टाच्या हातून परभारें दुसऱ्या दुष्टाचें शासन होईल असें करणें. 'कांट्यानें काढितात कांटा कीं.' **काट्याप्रमाणें सलणें**–सतत त्रासदायक होणें; दुःखकारक होणें; मत्सर, हेवा, द्वेष वाटणें. **कांट्यावर ओढणें**–दुःखांत घालणें; वस्त्र कांट्यावर ओढलें असतां फाटतें त्यावरून. **काट्यावर घालणें**–दुःखांत लोटणें. 'त्यांत (कौरव सैन्यांत) मरेनचि शिरतां कांटयावरि घालितां चिरे पट कीं।'–मोविराट ३.४१. **कांट्यावर येणें**–(बैलगाडी) आंसाच्या दोन्ही बाजूंला समतोल वजन होणें. **०धारवाडी**–अगदीं बरोबर तोल दाखविणारा कांटा. 'टीका करणाऱ्याच्या हातांत नेहमीं धारवाडी कांटा असला पाहिजे.' **कांटेकाळजी**–अतिशय सूक्ष्म काळजी; चिंता. 'नवीन गव्हर्नर हे काटयाकाळजीनें व निःपक्षपातबुद्धीनें आपलें काम करतील.' –टि १.४३३. **०भर**–(बायकी) थोडें. 'आज तिच्या दुखण्याला कांटाभर मागचें पाऊल आहे.' **०रोखण**–स्त्री. (कु.) लांकडांत खांच, रेघ, पाडण्याच्या उपयोगी सुतारांचें एक हत्यार; खतावणी; फाडी. **०कणगी**–(गो.) कणगर; कनक पहा.

काटाकाट, टी-काटाकूट—स्त्री. १ काटकसर; कापाकापी; छाटाछाटी. २ सरसहा कापाकापी; तोडातोडी; कत्तल (लढाईतील). 'त्या काटाकाटींतून तो वांचला.' –अस्तंभा ४१. [काटणें]

काटागिरी—काटगिरी पहा.

काटां(टिं)जन—न. कठडा. कटंजन पहा.

काटावाटा—वि. मारून मुटकून बनविलेला.

कांटांदोर-कांटुंदूर-कांटांदूर—पु. (गो.) झाडावर राहाणारा घुशीसारखा एक प्राणी; कांडेचोर; ऊद. [काष्ठ+उंदीर]

कादारा—उटकदार—री पहा.

कांदारा—पु. (राजा. कु.) कांटा.

कांदाळें—न. १ तराजू. २ रोमांच, शहारे.

कांदाळणें—अक्रि. कंटाळणें. 'जो कांटाळे रोगमरणीं। तो एक कुपुत्र दुरात्मा।' –मुसभा ५.८८. 'ऐशी उन्नाहतमाची ख्याती। ऐकोनि उद्धव कांटाळे चित्तीं. ।' –एभा २९.५४४. 'प्राकृत आइकोनि कांटाळे।' –गीता २.२२५२. 'कांटाळला दीनकरु।' –उषा १७७८.

कांटाळवाणी—वि. कंटाळवाणी; 'अमुप लवथविती कातडी। कांटाळवाणी।' –दा ३.१.४१९.

कांटाळा—पु. १ रोमांच. 'सर्वांगा कांटाळा आला।'–ज्ञा १.१९७. 'देखोनि अरिष्टांचा मेळा। शुक्राआंगीं भय कांटाळा।' –मुआदि ५.१२९. २ ताजवा. 'जें नित्यानंदाचेनि मानें। उपमेचा कांटाळां न दिसे सानें।' –ज्ञा ८.२६३. 'माझिया प्रचंडपुण्याचळा। तुलण घालिजे कोण कांटाळा।' –मुआदि १९.१७९. ३ कांटा; कंटक. ४ भय; त्रास. 'जेवीं मोतियांची कंठमाळा। भ्रमें सर्प भासली डोळां। ते भ्रमार्ती घालिती गळां। न बाधी कांटाळा सर्पभयाचा।' –एभा २४.६८. ५ आभंड, धडा, समतोल करण्याकरितां घातलेला पदार्थ. 'म्हणोनि शिवेंसीं कांटाळा। गुरुत्वें तूंचि आगळा।'–ज्ञा १७.३. [सं. कंटक]

काटाळी—स्त्री. (गो.) धिंड.

काटाळू—वि. (क.) कांटे असणारें (बाभळ, वोर इ०) झाड.

कांटाळें—न. १ ताजवा. तोलण्याचें साधन; तराजू. कांटाळा पहा. 'जोख जालें फुडें। ताजवें काटाळें।' –कालिकापुराण २८.४०. 'नातरी पृथ्वीचेनि पाडें। कांटाळें जरी जोडे।' –ज्ञा ४.१८१. 'मेरूसहि मिळेल काटाळें। आज्ञाहि पाळिजे कळिकाळें।' –स्वानु ७.२.१०. २ उपमेय; तुल्य वस्तु; सारख्या वजनाचा पदार्थ; 'म्हणौनि इये आत्मलीले। नाहीं आन कांटाळें।' –अमृ ७.२६६. ३ वजन. 'संवतुकी कांटाळें। माझें जाले।' –ज्ञा १४.५१.

का–कांटी—सवि. (नंदभाषा) वीस ही संख्या. 'उधानु काटीवरी चोपइची आस। नवरा राजस मिरवतसे।' –तुगा ४४५९. **०मुळू**–संवि (नंदभाषा) पंचवीस ही संख्या. 'सोन्याचा भाव काटीमुळ आहे.'

कां(का)टी—स्त्री. १ कांटेरी झुडुप, शेताच्या कुंपणां तीलकटि असलेली एक फांटी; कांटेरी झाड किंवा झुडुप; वईतील त्याची एक फांदी. 'धोंडे मढधावर टाकले त्यावरतीं काटी टाकली.' –विवि ८.४.६६. 'अंधा जोडली जों हट्टी। सवेंचि पायीं लागली कांटी।' –कथा १.७.१६. २ (आटधापाटधा) प्रत्येक बाजूची उभी मर्यादरेषा (या दोघांना जोडणारी मधली आडवी ती पाटी). ३ बाभळीचें लहान झाड. ४ कांटेरी कुंपण. 'बाहेरी यमनियमांची कांटी लाविली।' –ज्ञा९.२१३. 'खेटितां कुंप काटी खुंट दरडी न पाहे।' –तुगा ३४९. 'काटियां कांटी झाडावी– –शिशु ४९४. **०चड**–न. कांटा, कंटक. 'तया तोंवीं कांटिवडें। आंतु नुसतीं हाडें।' –ज्ञा १३.६७८. **०लागणें**–ओस पडणें. **०लावणें**–(घर, संसार, व्यवहार; रोजगार) मोडणें, नाश करणें, सोडणें, विध्वंस करणें. 'आपुल्या संसारास लावोनि कांटी। आमचे पाठीं लागलास कां।' **०आपल्या पोटावर ओढणें**–भुकेनें मरण्यापेक्षां कांटे खावयास तयार होणें, अति अधाशी, स्वार्थपरायण होणें. **कांट्याचें कोल्हें करणें**–क्षुल्लक गोष्टीचा बाऊ करणें. **–नें कांटी झाडावी**–कांट्यानें कांटा काढणें. 'कांटीनें कांटी झाडावी ।' –दा १९.९.१२. **कांट्याकुट्या**–स्त्री. (अव.) कांटेरी झाडेंझुडपें. **म्ह०** 'दुरून डोंगर साजरा जवळ गेलें कीं काट्याकुट्या(जवळ जातांना काजरा) =लांबून कोणतीहि गोष्ट चांगली दिसते पण जवळून पाहतां तिचे दोष दिसतात. **–शीं कांट्या घासणें**–(व. ष.) फजिती करणें; बेजार करणें; छळ करणें; त्रास देणें; गांजणें. **कांट्यावरून ओढणें**–अतिशय त्रास देणें, छळणें, गांजणें.

कांटील—स्त्री. रानकरटोली व तिचें फळ.

का–कांटूक—न. १ लांकडाची झिलपी; बारीक काटकी; काडी. २ लहान काठी. 'धांवली मारूं काटुक घेऊनि।' –दावि १९. –वि. (गो.) चामुट पहा.

कांटे—न. १ पावसाळ्यांत उत्पन्न होणारा लहान किडा; काट अर्थ १ पहा, काणीट. २ जोंधळा तूर पिकणारी काळी जमीन, जोंधळ्याची एक जात. –नामको

कांटे—पु. कंटक (अव.) **०आसण**–पु. एक जातीचें कांटेरी झाड. **०कडी लगाम**–पु. कडया असलेला लगाम, कांटे लगामाचा एक प्रकार, लगाम पहा. **०कणंग**–न. कणगर फळ. **०कुट्याचा–सराट्याचा**–वि. कांटेरी (झाडझुडप); कांटे असलेला; कंटकयुक्त. **०कुयरी**–स्त्री. कुयरीची एक जात. **०कुंद (वा)र–कुवारी–कोरफड**–स्त्री. कोरफड, कुवारकांडें. [कंटक+कुमारी] **०कुवळा**–पु. एक झाड. लॅ. सायझेरोक्सिलॉन टोमेन्टोसम. **०केकत–ती**–पुस्त्री.रानकेवडा; घायपात. 'कांटे केकतीचे झाडाला आंत जन्मला केवडा।' **०कोर**–वि. १ कडक; तडीस नेण्यांत, अमलांत आणण्याचे कामीं शिस्तवार; निष्ठुर. २ रेखलेला; नेमका; बरोबर; बिनचूक; रीतसर, रतिभरहि चूक नाहीं असा; मेहनतीनें केंलेला. ३ बारीक, सूक्ष्म, नाजूक, जेथें तिळाएवढीहि चूक खपायाची नाहीं असें (काम). –क्रिवि. बरोबर, ठाकठिकीनें, योग्य प्रमाणांत करणें, वर्तणें. [कांटा+कोर] **०कोहळ–कोहळें**–न. (व.) कोहळा, कोहाळा. **०गहूं**–पु. (व.) गव्हाचा

एकप्रकार (आकोला, खामगांव या भागांत होतो). **०गारी**–स्त्री. छाटाछाटी; कापाकापी. [काटणें.] **०घर**–न. ज्याचें अंगावरील कवच कांटयांनीं व्यापलें आहे असा किडा. 'कोसले अथवा काटेघरें । नाना पृष्ठिभागीं चालती घरें ।' –दा ९.७.४. **०चिर्णी**–स्त्री. (गो.) कुळकर्ण्यांचा भत्ता. **०चुंबक**–पुन. विलायती किंवा पांढरा धोत्रा, उंटांना हा फार आवडतो. हा चेचून कांटा मोडलेल्या जागीं बांधला असतां कांटा बाहेर निघतो. **०डोळे**–पु. (अब.) अतिशय खुपतात अशाप्रकारें डोळे येणें, याच्या उलट शेणडोळे. हे नुसते बुजतात व अतिशय पू येतो. **०तोल**–वि. १ अगदीं बरोबर वजन असलेला, कांटयानें तोललेला; बिनचूक; बरोबर; नेमका. २ फार नाजुक. **०धोत्रा**–पु. पिवळा धोत्रा, विलायती धोतरा. हें झाड दोन हात उंचीचें असून त्यावर सर्वत्र कांटे असतात. बीं बंदुकीच्या दारूप्रमाणें काळें असतें व मुळास चौक म्हणतात. ई. यलो स्टॅमोनियम.–वगु २.३१. **०बुरुड**–स्त्री. (गो.) पुष्कळ कटि असलेली मासळी. **०भाजी**–स्त्री. एक पालेभाजी, कांटेमाठ (लॅ.) अमरंथस स्पिनोसस. **०भोंवरी**–स्त्री. ज्याचें फळ भोंवऱ्याप्रमाणें असून त्यास कांटे असतात असें एक कांटेरी झाड. **०मोडणावळ**–स्त्री.१ शेताच्या जमीनीची पाहाणी करीत असतां मामलेदाराच्या पायांत कांटा मोडल्यामुळें घरटीं जो दंड वसूल करण्यांत येत असे तो. –मोल. २ कदाचित् कटिरी झाडेंझुडपें तोडून टाकण्याकरितां त्यांवर बसविलेला सरकारी कर. **०रा–री**–वि. कांटयांनीं भरलेला, ज्यावर कांटे आहेत असा. –पु. एक लहान कटिरी झाड. याला पांढरीं सुंदर फुलें येतात. **०रिंगणी**–स्त्री. एक कटिरी, जमीनीसरपट वाढणारें झुडुप. याला वांग्यासारखें फळ येतें तें औषधी आहे. **०री**–वि. कांटयांनीं भरलेलें. **०री तार**–जिला लोखंडाचे कांटे मधून मधून बसविलेले असतात अशी कुंपणास बसविलेली तार. इं. बार्ब्डवायर. **०रें**–न. (राजा.) कंटकयुक्त करवंदीचें वगैरे शिरें, फांदी. **०लगाम**–पु. कंटकयुक्त लगाम. **०वन**–न. अरण्य, जंगल (ज्यांत कांटेरी झाडें पुष्कळ आहेत असें). **०वाळूक**–न. (क.) कांटे असलेलें वाळूक. **०शेवती**–स्त्री. शेवंती नांवाच्या फुलझाडाची एक जात. पांढरी शेवती, गुलाबी शेवंती अगर शेवंतीगुलाब. गुलाबाप्रमाणें हिच्या झाडास कांटे असतात. याचीं पानें गुलाबाप्रमाणें काट्रेदार असून त्यास राखडीच्या आकाराचें लहान व एक पाकळीच्या घेराचें पांढरें फूल येतें. हीं झाडें हिमालयांत होतात. –वगु २.३२. –तीप्र–४०.

काटेळें—न. (कों) झाडावर लागणारें मोहोळ, मधाचें पोळें.

काटोमोटो—पु. (गो.) मीठभाकर. [काटो=मासळीचा तुकडा+मोटो=भाताचें शीत]

काटोळी—स्त्री. (विणकाम) कोष्टयाचें एक उपकरण; लहान खिळे मारलेली एक पट्टी, काठी; मागावरील ताण ताठ राहण्याकरितां त्याच्या दोन्हीं बाजूंस लावतात. काटसरी पहा.

काट्टा-ट्टी—पुस्त्री. (व.) कार्टा-टी.

कांटधाळें—न. (गो.) पाकोळी.

कॉंट्रॅक्ट—न. (इं.) (कायदा) मक्ता; ठेका; घर अगर इमारत बांधण्याची जोखीम स्वतःवर घेऊन त्याबद्दल रोख रकम घेणें, करार. [इं. कॉंट्रॅक्ट]

का-कांठ—पु. १ कडा; बाजू; मर्यादा; टोंक; किनारी (ताट, पागोटें, मडकें इ. च्या भोंवतालचा भाग); कोर (भांडी वगैरेंची); कंगोरा. २ किनारा (समुद्राचा); जवळची भूमि; थड–डी (समुद्र, नदी यांची). ३ पदर; किनारी (वस्त्राची वेलबुट्टीची किंवा साधी). [सं. कंठ=गळा, काष्ठा=सीमा] **०कोणा मोजणें**–सूक्ष्मपणें परीक्षणें, बारकाईनें तपासणें. **–ठावर बसणें** (पखवाजाच्या कांठावर थाप मारली म्हणजे बद आवाज होतो त्यावरून) सोडणें, कमी होणें, (धंदा, गोष्ट), नासणें (काम) अकर्तृक योजतात. 'याच्या कांठावर बसली (चोपकाडी किंवा एकादें अध्याहृत स्त्रीलिंगी नाम) **–ठावर मारणें**–विघडणें, नासणें, मारणें. **–ठावर येणें**–जिवावर येणें. **०किनारा**–पु. बाजूची पट्टी–कडा–कांठ. [काठ+किनारा] **०कोपरा**–पु. बाजू, कड, कोपरा, कोन. 'सारें शेत पिकेंल (गेलें) नाहीं कांठकोपरा पिकला (गेला). **०दोरा**–पु. कापडाच्या गांठीस–काठाला घातलेला जाड दोरा, पदराला घातलेली दोऱ्याची शिवण. **०(ठा)परा–प्रा–फरा**–पु. १ (कों.) फुटलेल्या मातीच्या मडक्याचा वरचा भाग; अर्धा भाग; गळा; कांठ. 'काणा कुंटा व्याधिव्याप्त। चिंता कांठफरा गळां वहात। तोही शुनीमागें धांवत। कामासक्त अविचारी।' –एभा १३.२०६. 'जें कां काठफरा उलले। देखसी ज्याचें बुड गेलें। तें न पाहिजे हालविलें। असो संचरलें निजआळां।' –एरुस्व १८.४५. ५ बोडकें गलबत (शीड, काठी वगैरे कांहीं नसलेलें). गलबताचा सांगाडा; खटारा. **०फुटका**–वि. ज्याचा कांठ मोडला आहे असा. **०मोडका–मोडा**–कांठफुटका पहा. **०मोरा**–१ कांठप्रा पहा. 'जे हीं नीचाचा कांठमोरा। गळां अडकल्या मांजरा। ते रिघोनि शुचीचिया घरा। नाना रसपात्रां विटाळी।' –एमा२६.२०६. 'कांठमोरा त्याचे निडळी स्तला।' –पंच ४.४. 'हातां न ये ज्या घरचा गोरस। तरी ताडन करी त्यांचिया मुलांस। त्यांच्या गळां कांठमोरे हृषीकेश। घालोनियां हिंडवी।' –ह ७.१४६. २ पोळी, भाकरीचा कडेचा तुकडा. (क्रि० घेणें; तोडणें). **कांठमोरा गळ्यांत अडकणें–येणें**–एकाद्या धंद्यांतील, कामांतील लभ्यांश हातीं न लागतां व्यर्थ शीण पडणें (ज्याला मडक्यांतील वस्तु खावयास मिळाली नाहीं पण मडक्याचा कांठ गळ्यांत अडकला त्या कुत्र्याप्रमाणें). **०रें**–न.

कापडाची किनारी, धार. 'धोतराची कांठरी लोंबू लागली.' **०चा**–पु. (ना.) कांठ; किनारा; थडी. **०सर**–तुडुंब; कांठोकाठ; ओतप्रोत.

काठकर—पु. देवादिकांच्या उत्सवसमारंभांत पागोटें बांधलेली काठी किंवा निशाण घेऊन चालणारा माणूस. [काठी+कर]

काठंगा-ग्या—वि. (कों.) काठीसारखा; बारीक; सडपातळ; किरकोळ; काटकोळा. [काठ+अंग]

काठ(ठा)ण—न. कडधण; कडधान्य; कांहींच्या मतें हरभरा वाटाणा मसूर लाख इ. रबीच्या पिकाला हा शब्द लागत नाहीं. बाकीच्या खरीपांतील द्विदल धान्याला लावतात. 'काठाणी तील, उडीद, तुरी वगैरे पावसाळी' –मसाप २.२.६९. [सं. काष्ठ+अन्न]

कांठणें— उक्रि. कंठणें; सोसणें; –तून पार पडणें.

काठभोंवरी—कटि भोंवरी पहा. एक झाड.

काठवट-टा—१ काटवट १ पहा. [काष्ठ+वाटी] २ (गु-हाळ) नवरानवरीच्या खालचा आंस फिरणारें आडवें लांकूड; चरकाची बैठक.

काठवण—१ कांटवण पहा. झाडी, कांटेरी रान. 'सातपुडी डोंगर साजणी झाडी काठवण भिल्लाचें।' –मसाप १.१.२. 'ओढिती कांठवणा सोई।' –तुगा ७०२. [सं. कंटक+वन]

काठवाड—न. घोडे विकणाऱ्या काठेवाडी लोकांचा तळ किंवा समुदाय. [काठेवाड=एक प्रांत]

का-कांठळी—स्त्री. हलकें धान्य. [काठण]

का-कांठळी—कांठाळी; वस्त्राचा कांठ; किनारी. [कांठ]

काठा—पु. (व.) बरू. [सं. काष्ठ]

का-कांठा—पु. १ (कों.) कांठ; किनारा; थडी. [कांठ] २ वर जमीनीचा थर असलेला कातळ; खडकाळ जमीन. 'विहिरीस दहा हातांपासून कांठा आहे.' ३ पर्वताची कटारी. [सं. काष्ठा]

मूळकाठा-मुळबांध–पु. (कों.) समुद्रकांठच्या भातशेतीच्या जमिनी (खार) भोंवतालचा बांध. या बांधाच्या मातीमध्यें भाताचा पेंढा बळकटीसाठीं घालतात. –कृषि २१३.

काठांगा-ग्या—काठंगा पहा.

का-कांठाड—न. चेहऱ्याची एक बाजू; गाल; थोबाड. कानळाळ पहा. [काठ] **काठाण, काठाप्रा** वगैरे–काठण, काठप्रा इ. पहा.

काठा बांधणें—भांड्यांत शिजविलेल्या पदार्थांची वाफ बाहेर जाऊं नये म्हणून भांडयावर ठेवलेलें झांकण सर्व बाजूंनीं ओल्या कणकीनें बंद करणें. –गृशि २.१४०. [कांठ+बांधणें]

काठार-रा—नपु. नदी–समुद्राचा कांठ; किनारा. [कांठ]

काठारा—पु. १ काठ(ठा)प्रा; फुटलेलें भांडें. २ गलबताचा खटारा–सांगाडा.

कांठाळी—स्त्री. १ कापडाचा कांठ–पदर. [कांठ] २ (कों.) मासे पकडण्याचें वस्त्रासारखें एक लांब जाळें.

कांठाळी—स्त्री. कानाचें टाळें–पडदा. क्रि. बसणें. 'अगदींच बसली मग कांठाळी।' –ऐपो २२४. [कान+टाळी]

काठिण्य—न. कठिणपणा; बहुपणा; मजबुती; कडकपणा; दृढता; एका पदार्थांचा दुसऱ्यावर चरा पडण्यास जो प्रतिबंध होतो तो. –पदार्थविज्ञान ६. 'विसवूं न सके धोंडीं। काठिण्य जैसें।' –ज्ञा १८.७५४. [सं.]

कांठिळी—स्त्री. एक हलकें धान्य. कांठळी पहा.

काठी—स्त्री. १ लहान झाडाचा सोट; खोड. २ दांडकें; छडी; (सामान्यतः) वेळू, बांबू इत्यादिकांचा पांच चार हात लांबीचा सोटा, दांडका, लाटी (टोकाला गोळे नसलेली), ३ निशाण; दिंडी; 'खंडेरावाची काठी' –ऐरापु १.३०५. महादेवास काठी नेतात' –मसाप २.२.२६. 'नाना काठया शासनें वेत्रधार।' –सप्र २१.३४. ४ जहाजाची डोलकाठी; ज्यावर शीड बांधतात तो सोट. 'सोडिले मचवे लोक चढती काठीवर।' –विवि ८.३.५४. ५ काठीचा फटकारा. (क्रि० मारणें) 'आम्हां लागलिसे पाठी। बालत्व तारुण्य काठी।' –तुगा १३४७. 'माझी साहों शके काठी। ऐसा बळिया सृष्टी असेना।' –एभा ४.१२०. ६ जमीन मापनाचें एक माप, साधन. ही पांच हात पांच मुठी लांबीची असते. एकविसांश पांड, किंवा एकचारशें अंश बिघा. ७ वरील काठीनें मोजलेलें क्षेत्रफळ. ८ शरीर, शरीराची काठी; अंगकाठी; चण; बांधा; ठेवण. 'सूर्याचेनी दीपें। वसीस्टाची काठी तपें।' –उषा ८७०. 'ते काठीनें मध्यम उंचीचे होते. –कोरकि २१. ९ जननेंद्रिय (पुरुषाचें). १० उंसाची एक जात. ११ (नंदभाषा) वीस ही संख्या. 'केवला काठी पवित्रु त्यासी। सांगोनियां दीधलें।' –भवि ४२.४५. १२ (ल.) अडकाठी. १३ महाराच्या हातांतील सरकारी काठी. 'महारांच्या कामाची पाळी आली व संपली म्हणजे काठी आली व काठी पडली असें म्हणतात.' –गांगा ४९. १४ (कु.) लांकडें (जळाऊ), सरपण. 'आज काठया नाय हाडल्य' १५ (छा.) झुलविलेले खिळे (टाईप) छापण्यासाठीं लोखंडी चौकटींत (चेसमध्यें) आंवळण्यासाठीं सर्भोवार टाकावयाची एका बाजूस सरळ व एका बाजूस निमुळती होत गेलेली विवक्षित मापाची लांकडी पट्टी (इं. साईडस्टिक). [सं. काष्ठ; तुल. सीगन कास्टे; पो. जि. काटे; काष्टी; फ्रें. जि. कष्ठ] **०टाकणें**–सरकारी चाकरीच्या महारानें आपली पाळी दुसऱ्यास देणें. **०नें हाकणें**–१ भेदाभेद न करतां सर्वांना एका ओळींत गोवणें. सब घोडे बारा टक्के अशा न्यायानें वागविणें. **–नें पाणी शिंपणें**–स्वतः श्रम न करतां दुसऱ्याकडून काम करवून घेणें. **०नें पाणी शिवणें**–कुचराईनें

निष्काळजीपणानें काम करणें. **-नें पाणी हाटलें तरी दोन ठिकाणीं होत नाहीं**-पक्की जिवलग मैत्री, दाट मैत्री, पक्का स्नेह. **-ला सोनें बांधून चालावें**-चांगल्या बंदोबस्ताच्या राज्याचें निदर्शक. **-वर कांबळा घेणें-घालणें**-भांडण-तंटयासाठीं तयार होणें, राहणें, सज्ज असणें, कंबर कसणें; सिद्ध होणें. **०वाजणें**-(नाविक) डोलकाठी भंगणें. **०शिखरास लागणें**-१ (जन्नेमध्यें निरनिराळे मानकरी लोक आपल्या निशाणाची काठी देवळाच्या शिखरास लावतात त्यावरून) आपल्या जन्माचें सार्थक करणें; ध्येय साध्य करणें; उद्दिष्ट साधणें; इष्टार्थ साधणें. 'माझ्या काठ्या लागल्या शिखराला' -मसाप १.१.६. २ आयुष्याच्या अखेरीस येणें; आयुष्यांतील इतिकर्तव्यता संपणें. **-सारखें पडणें**-साष्टांग नमस्कार घालणें; 'लिंग का प्रतिमा दिठीं। देखतखेवों अंगेष्टी। लोटिजे कां काठी। पडली जैसी।'-ज्ञा १७.२०४. **काठ्या लावणें**-(ना.) चिड विणें, नाहक त्रास देणें. **०कर-रु-कार**-हातांत सोन्याचांदीची काठी घेतलेला राजाचा, देवाचा द्वारपाळ; चोपदार. 'नंदिकेश्वर महानीळ। काठीकर दोघे प्रबळ।'-गुच २९.११९. 'तंव तो बळीदैत्याचे द्वारीं। काठीकर झालासे हरी।'-कथा २.३.३१. 'ऐसें काठीकरू बोलिला।'-उषा ८९. 'मग राजा काठिकारातें म्हणे।'-पंच **०कांबळा**-पु. श्रीकृष्णाची गोकुळांतील वेषाची नक्कल करण्यासाठीं गुराख्यांचीं पोरें हातांत काठी व पाठीवर-खांद्यावर कांबळा घेतात त्यास समुच्चयानें म्हणतात. **०वाला**-पु सरकारी पाळीचा महार.

काठें—न. (राजा.) डोंगराच्या वरतीं पुष्कळ माती असलेली सपाट जमीन. ही वरकस पिकाची असते. भाजावळ करून लव्ही, कडेनें वाटोळा तीळ किंवा अंबाडी, लव्ही वेंचून झाल्यावर ताग अथवा भात त्यांतच तूर व कडेनें वरी दुसऱ्या वर्षी भाजावळ न करितां सावा, त्यांतच तूर व उडीद अथवा मोचणा, कुटीवर लाविलेला हीं पिकें होतात. [कांठ]

काठि—न. (कों. कु.) मान; कंठ; गळा. [कंठ]

काठे(ठ्ये)डोळे—कांटेडोळे पहा.

कांठेमोडा—वि. (कु.) कुटिल वृत्तीचा.

काठेवाड-डी-काठ्यावाड-डी—वि. १ काठेवाडसंबंधींचा. २ काटकुळा; कृश; बारीक (माणूस, घोडा.)

काठे(ठ्या)घाडी भिकार—न. किरकोळ, काटकुळ्या, रोडक्या माणसाला तुच्छतादर्शक म्हणतात.

कांठोकांठ—क्रिवि. कांठापर्यंत; भरपूर. [कांठ द्वि.]

काठोट-ठ-ड—स्त्री. (व. खा.) काथोट; काटवट पहा.

काठोट्या—पु. (व.) कुचकामाचा माणूस. 'कोणाचा हिरा म्हाका काठोट्याच बरा.'

काठोडा—पु. (व.) जोम; काठी पहा. (क्रि० मोडणें= जोम नाहींसा होणें, करणें.) 'कामानें मुलीचा काठोडा मोडला.'

काठ्या— वि. १ गव्हांचा एक प्रकार; काटे गहूं. २ काटेडोळे पहा.

काठ्याळा—वि. काटकुळा; सडपातळ; किरकोळ. [काठी]

काठ्याळें—न. १ (कों.) लहानसें मधमाशांचें पोळें (लहान फांदीला अथवा काठीला लागलेलें). [काठी] २ ब्राह्मणांना घालावयाचें वड्यांचें जेवण.

काड—स्त्रीन. १ कडधान्य काढून घेतल्यावर राहिलेलें गुर्ळी; भूस. २ गहूं, नाचणी, उडीद वगैरे धान्य काढल्यानंतर राहणारें ताट; तृण, ३ (कों.) भात काढून घेऊन पेंढ्याचे मोठाले बांधतात ते झाडल्यानें आंतून जो बारीक पेंढा पडतो तो. ४ (कों.) आवण उपटल्यावर जे कांहीं शिलक राहतें तें. ५ अंबाडी, ताग इ० च्या सोललेल्या काड्या, जोरुया, सणकाड्या. ६ (सामान्यतः) द्विदल धान्याचें भूस. ७ (बे.) नाचण्या कापल्यानंतर उरणारें ताट. ८ (व.) मातीच्या भिंतीचा एक हात उंचीचा थर. कांड पहा. [सं. काष्ठ] **०कुसुंबा**-पु. एक प्रकारची रानभाजी. ही खातात. **०क्या**-(काड्क, पुन) (लुप्त) १ काडीसारखा. २ भांडखोर; कलह लावणारा; यजुर्वेदी ब्राह्मण ऋग्वेदी ब्राह्मणाबद्दल योजितात. **०दान**-न. जेवल्यानंतर दांत कोरण्याकरितां ज्या काड्या लागतात तें ठेवण्याचें एक भांडें, किंवा भिंतींतील एक कोनाडा. **०भिकारी**-पु अत्यंत कवडीचुंबक माणूस, काडीमुद्दा फुकटन घालविणारा मनुष्य. **०वात**-स्त्री. तुळशी वगैरेच्या काडीस कापूस लावून-गुंडाळून देवापुढें लावण्यासाठीं जो काकडा करतात तो. 'रात्रीं उजळोन काडवाती। अर्चनीं ओवाळिजे गभस्ती।'-मोल. [काष्ठवर्ति] **म्ह०** सूर्यापुढें काडवाती=निरुपयोगी, तुलनेस अयोग्य वस्तु. **०वाळा**-पु. लहान मुलांच्या पायांतील रुप्याचा बारीक भरींव वाळा, कांडोळें. **०शीर**-न. वालाचें अगर बाजरीचें पानांसह उपटलेलें रोपटें **०सर**-न. कडधान्याची मळणी झाल्यावर राहिलेलीं ताटें, झुडपें. **०सर-री**-पुस्त्रीन. (विणकाम) काटसरी पहा.

काड—पु. एक प्रकारचा मासा. हा आपल्याकडे कोचीन संस्थानच्या समुद्रकिनाऱ्यावर सांपडतो. याचें तेल (यकृतांतून काढलेलें) औषधोपयोगी आहे. हें संधिवातविकार, डबा व कफक्षय ह्या रोगांवर फार उपयोगी पडतें. [इं. कॉड]

कांड—न. १ दोन सांध्यांमधील भाग, पेरें. २ झाडाचें खोड; सोट; बुंधा. ३ वेदाच्या त्रिकांडांपैकीं प्रत्येक. (उपासनाकांड, कर्मकांड, ज्ञानकांड) अध्याय; प्रकरण; अंक; परिच्छेद; विभाग. 'एवं हिंसाचि अहिंसा। कर्मकांडी हा ऐसा।'-ज्ञा १३.२३६. 'धनुर्भंग नाटिकेंत अंकाऐवजीं कांड हा शब्द

बापरला आहे.' ४ बाण; तीर. 'योद्द कांडांचा घाई मातला।' –शिशु ४३९. 'तो माझे आं कांडा। सदां भिए।' –शिशु ८९४. 'कुबोलांचीं सदटें। सुति कांडें।' –ज्ञा १६.४०४. 'हरिनामाचें धनुष्यकांडें।' –तुगा २१५९. 'केली निर्माण कमी हाणुनि बसुधेंत कांड वनधारा।' –मोभीष्म १२.२२. ५ गलबताचें शीड उभारण्याचा दोर; परभाणास अडकविलेली जाडी दोरी; परभाण, डोलकाठीला ज्या दोरखंडानें बांधलेलें असतें तो दोर. हा खालींवर सरकतो. ६ गहूं, नाचणी हरभरा इ० चें कांड, ताट, (दाणा काढल्यानंतरचें). ७ (कों.) माडाचा सोट; खोड. ८ (व.) मातीच्या भिंतीचा एक थर. 'त्यानें एक कांड नवीन बसविलें.' ९ (गो.) कमरेस घालण्याचा चांदीचा गोफ. १० (सोनारी) सरीचा आंतील गाभा. ११ संधि; सांधा. १२ (महानुभावी) ज्ञान (?) 'येणेशी कांड गुंडा कल्हणी घेना।' –भाए ५२०. **०काढणें**–खारीच्या आंत ज्या पाटद्या (जमीनीचे लहान लहान तुकडे) पाडतात त्यांच्या बांधास मातीची भर देणें. हें काम वैशाखांत करतात. **०क–(व.)** १ वेळूचें पेर. २ मातीच्या भिंतीचा एक थर. **०का–कोंडका**–पु. लांकडाचा ओंडका, ठोकळा. **०कें**–न. १ कांडक अर्थ २ पहा. २ कांडका–कोंडका पहा. 'कांडकें डवचितां कृष्णसर्प।' –मुवन १२.२१. ३ उंच; धिप्पाड; लट्ट; अगडबंब; ठोंब्या. (मनुष्य). ४ कुडें. 'कांडकें मोठें म्हणजे जाड व लांब असावें.' –मुंब्या २०७. **०त्रय**–न. वेदांचीं तीन कांडें, भाग; कर्म–उपासना–ज्ञान कांड. 'तरी कांडत्रयात्मकु।शब्दराशी अशेखु।' –ज्ञा १८.१४३१. [सं.] **०पा**–पु. (गो.) मुसळ. **म्ह०** कांडपाक कोंब फुटणें=मुसलाला अंकुर फुटणें. **०रू**–न. १ बोटाचीं पेरें व अग्रें यांस होणारें उठणूं. २ तीन चार पेरांचें उंसाचें कांडें. **०वेल**–स्त्री. एक औषधी निवडुंगाप्रमाणें पण बारीक वेल. वई. त्रिधारी, चौधारी अशा हिच्या दोन जाती आहेत. हिला पेरें असतात. त्रिधारी कांड वेलीस हाडसंधि असेंहि म्हणतात. [सं. कांडवल्लि] **०शेर**–पु. शेराभोंवतीं आढळणारी लांब नाजुक पेरांपेरांची एक वेल. **०सोट**–पु. सहा मुठी सोन्याच्या एका सुतावर मधील भागाच्याच सुमारें २॥, ३ मुठीच्या भागावर दुसरें एक सोन्याचें सुत पिळून पहिल्या सुताच्या एका टोकास वाटोळा फासा व दुसऱ्या टोकास नागफासा करून गजरे बेटण्यापूर्वी जो सरीचा भाग तयार होतो तो. (कांड १० पहा).

काड-कन-कर-दिनी-दिशीं—क्रिवि. (ध्वनि) चाबकाच्या किंवा छडीच्या आवाजासारखा आवाज करून; अशा आवाजासहित.

कांडकूट-कांडणकुटण—स्त्रीन. कांडणें; कुटणें; पाखडणें वगैरेस समुच्चयानें. [कांडणें+कुटणें]

कांडण—न. १ तांदूळ वगैरे सडणें (त्यांचेवरील तूस काढण्यासाठीं). 'आकाश उजलें कांडणी। सांडि काळिमा।' –ऋ्येराज ८१. २ सडण्यासाठीं घेतलेली धान्याची रास. ३ कांडणावळ; सडणावळ; सडण्याची मजुरी. ४ नाचणी, उडिदाची काड. [सं. कंडन] **०साळ-कांडसाळ**–स्त्री. दळणकांडणाचा वरांतील एक सोपा. **कांडणावळ**–स्त्री. कांडणाबद्दलची मजुरी.

कांडण-काणण—न. (गो.) मुसळ.

काडणा—न. (कु.) विहिरींतून पाणी काढण्याचें साधन; बागर; कळशी; काढणें. [काढणें]

काडणी—काढणी पहा. [काढणें]

कांडणी—स्त्री. कांडण; कांडण्याची क्रिया.

कांडणें—उक्रि. भात इ० धान्य वरील तूस काढण्याकरितां उखळींत सडणें–चेचणें; कुटणें (मुसळानें). [सं. कंडन] **म्ह०** कांडल्याबगर फोव् न्हय मारल्याबगर धोव न्हय्=(गो.) कांडल्याशिवाय पोहे बनत नाहींत तसेंच बायकोला मारल्याशिवाय नवरेपण येत नाहीं.

कांडप—न. (राजा.) कांडण. **०काढणें**–क्रि. १ (कु.) मारणें; झोडणें. २ शक्तीच्याबाहेर काम देणें.

कांडपी—पु. (राजा.) कांडपाचा धंदा करणारा बाप्या, पुरुष, मनुष्य. **०ण**–स्त्री. (राजा.) कांडपाचा धंदा करणारी बाई. 'कांडपिणींचा प्रश्न सोडविणें किती अवघड आहे!' –विचारविलास १३३.

काडबा—पु. (कों.) संथ पाण्यांत न सांपडणारा मासा.

काडमुंगी—स्त्री. एक मोठी काळी मुंगी, ही चावली असतां वेग येतात.

कांडय—स्त्री. (कु.) एक जातीचा मासा.

कांडर-डार-रें-डेर—न. सापाची एक जात. हा चावला असतां तो भाग कुजूं लागून तो माणूस मरतो. याचे कांटे पायाला लागले तरीहि पाय कुजतो.

कांडरणें—अक्रि. (माण.) कांडीं करणें; कातरणें.

का(कां)डवाळा-चळी-डोळी—पुस्त्री. (सोनारी) पायांत घालावयाचे चांदीचे वाळे.

कांडविणें—उक्रि. १ खाज शमविण्यासाठीं नखांनीं खाजविणें. २ (ल.) चेतविणें, चिडविणें, डिवचणें. [सं. कंडूय्=खाजविणें]

कांडळणें—अक्रि. घासून घासून झिजणें, कमी होणें. [सं. कांड्]

कांडळणें—क्रि. खाजविणें; चोळून खाज नाहींशी करणें. [सं. कंडूय्=खाजविणें]

काडा-डो—पु. (कों. गो.) काडेहुरा; शेर; चिकाडा.

काडा–पु. (बे.) धान्यरूपी कर्ज. काढा अर्थ २ पहा. [काढणें]

कांडाई—स्त्री. कांडणावळ.

काडाकूट—स्त्री. काष्ट्याकूट; कष्टसाध्य गोष्ट. 'चाळीस ग्रंथ छापून प्रसिद्ध करणें ही केवढी काडाकूट आहे बरें!' –तुफान प्रस्तावना ३०.

कांडात काढणें—क्रि. खूप ठोकणें; बेदम मारणें. 'त्यांनीं मारे दंडांनीं बेदयांचें कांडात काढलें. –नामना. ४९. 'आई माराय्च्या आधींच मी तुझं कांडात काढीन.' –विचार विलास २७३.

कांडादळाभरडा—पु. दळण, कांडण वगैरेंस व्यापक संज्ञा.

कांडानुसमय—पु. विशिष्टसमुदायांतील प्रत्येक व्यक्तीला एक वस्तु अगर वतूंचा सेच–जोड देण्याचा अनुक्रम; प्रतिसमुच्चय, प्रतिसंघ (देणें); याच्या उलट पदार्थानुसमय.

कांडारणें—उक्रि. जोराचा कोंब फुटणें, फोफावणें, कांड,खोड मजबूत, भक्कम होणें (ऊंस, जोंधळा इ. चें; कधीं कधीं मुलालाहि लावतात.) [सं. कांड]

कांडारणें—सक्रि. करांडणें पहा; चावून चावून कमी करणें; कुरतडणें.

कांडारा-रो—पु. १ (गो.) बांबू, ऊंस, केळ इ. चा उभा चिरलेला तुकडा, फांक. [सं. कांड] २ कांडण्यानें निराळा झालेला कोंडा; तूस. [कांडणें]

कांडारी—पु. सुकाणू धरणारा; नावाडी; कर्णधार.

कांडार्की—पु. (गो.) एक प्रकारचा मासा.

कांडाविणें—उक्रि. कांडविणें पहा.

काडासेक—स्त्री. (गो.) चमचे पळ्या इ. अडकविण्यासाठीं भींक पाडून केलेली लांकडाची अथवा लोखंडाची एक पट्टी.

कांडाळ—स्त्री. (कु.) मासे धरण्याचें लहान जाळें, याच्या टोकास लांकडाचें लहान तुकडे लावतात.

कांडाळणें—अक्रि. १ लांब व बळकट अशीं पेरें येणें, वेगानें व जोमानें वाढणें (जोंधळा, बाजरी इ.). २ (ल.) मूल सपाटून वाढोस लागणें ३. (नाशिक) जोंधळा, बाजरी, ऊंस पेराशीं काळा पडणें. (ल.) रक्तपिती होणें (माणसाला). [कांड]

कांडाळणें—उक्रि. खाजविणें. [सं. कंडू]

कांडाळणें—सक्रि. १ कांडारणें, करांडणें पहा. घासून झिजविणें. २. खाज सुटणें; कंड खाणें. [कंडूय्]

कांडाळी-ळो—स्त्री. मध्यम प्रतीचें, सुताचें मासे धरण्याचें जाळें. [कांड]

कांडाळें—न. धनुष्य. 'अर्जुनाचेनि कांडाळें। बहुत माणुस्त्रणां आलें।' –शिशु ८८२. [कांड=बाण+आलय=घर]

कांडिखणें—क्रि. (कों.) खाजविणें; घांसणें; चोळणें. [सं. कंडूय्]

काडी—स्त्री. १ गवत वगैरेचा तुकडा–दांडा; 'तृणाची काडी न मिळे। ऊर्णे झाडोरे करपले।' –भावार्थ रामायण, बाल १. ७९. २ लांकडाची काटकी, शिरपूट, धातूचा बारीक लांबट तुकडा, आगकाडी इ. (ल.) काडीच्या मोलाची अथवा आकाराची वस्तु. 'जीवनें शिंपिला तिडपिडी। विजिला प्राण सांडी। लागला तरी काडी। उरों नेदी।' –ज्ञा १३.७२०. 'काडीचोर तो पाडीचोर'= काडी (क्षुल्लक वस्तु) चोरल्याचें एकदां सिद्ध झालें म्हणजे पुढें त्यानें पाडी (वासरूं) सारखी मोठी वस्तु चोरली असा आळ साहजिकच येतो. क्षुल्लक अपराध करणारा माणूस मोठा अपराधहि करतो. [काष्ठ] ३ (जरीची किंवा रेशमाची या शब्दाच्या पुढें काडी आली असतां) जरी–रेशमी–कांठ (वस्त्राचा) किंवा वस्त्रावरची पट्टी, वीण असा अर्थ होतो. ४ (गंजिफा) डाव जिंकणें. एका खेळाडूस सर्व पानें देण्याची पाळी येणें. क्रि. लागणें. ५ (खा.) दिव्याची (पणतीची) ज्योत. ६ (बुरुड काम) बांबूची बारीक कांब ७ (व. ना.) हातांतील टेकावयाची काठी. ८ (व. ना.) सरपण (अव.) काडया. ९ गुरांचा चारा. 'जनावरांनां वैरण–काडी देण्याचा हुकूम सोडला.' –कोकि ७३६. १० (गो.) बायकांच्या नाकांतील चमकी. ११ (कु.) एक जातीचा मासा. याच्या अंगावर कांटे असुन आकृति सर्पाप्रमाणें असते. **म्हण** १ काडीची सत्ता लाखाची मत्ता=थोडयाशा अधिकारानें जें काम होतें तें पुष्कळशा पैशानें होत नाहीं. २ काडीपासून जोडावें लाखापासून मोडावें. (वाप्र.) (**आडवी उभी**) **काडी ओढणें**–(ल.) निषेधपर आडव्या उभ्या रेषा काढायला समर्थ नसणें, म्हणजे कांहींहि अक्षर लिहितां न येणें. अक्षरशत्रु. **–ची आग माडींस लागणें**–श्रेष्ठ माणसास कनिष्ठ माणसापासुन किंवा एखाद्या क्षुल्लक कारणापासुन अगर व्यक्तीकडून उपद्रव होणें. **–नें औषध लागणें**–दुसऱ्याच्या जखमेला दुरून बोट न लावतां काडीनें औषध लावणें यावरून, अंग राखून काम करणें. **०मोडणें–मोडून देणें**–क्रि. पदर फाडून देणें, पालव कापून देणें. विवाहसंबंध तोडून टाकणें, रद्द करणें. **काडी लागणें**–जळणें; राख होणें; नाश पावणें, नाहींसा होणें. 'नमुताईच्या संसारास काडी लागली.' –हाच कां धर्म –नाशिककर २५. **०कसपट**–न. गदळ; घाण; केरकचरा, 'म्या म्हटलें हा मार्ग चांगला काडीकसपट नसे।' –अफला ७५. **०कुडुल्यो**–(वाप्र, बायकी) छत्र्यापाणी खेळतांना जर सर्व मुली बसल्या तर एका मुलीनें सर्व गडयांस सावध करून तोंडानें काडी कुडुल्यो म्हणून सर्वांनीं उठणें. **०खार–काडेखार**–पु. पापडखार (सोनार वापरतात). **–चा**–यत्किंचितहि; थोडा; अल्प. 'नाटक वाल्यांत काडीचा देखील गुण नसतो' –विकार विलसित. **०पेंढी**–स्त्री. पेंढी काडी पहा. **०भर**–फार थोडा; यत्किंचितहि. 'तुम्हांला कोणी काडीभरहि उपद्रव करणार नाहीं.' –विवि

८.३.५३. **०महाल**–पु. कोल्हाटी–डोंबारी घिसाडी इ० भटक्या लोकांच्या गवती झोंपड्यांनां तुच्छतेनें म्हणतात. **०मात्र**–कांडीभर पहा. **०माया**–(व.) अगदीं रोड. **०मोड**–१ (हिंदुकायदा) नवरा व बायको यांनीं आपला विवाहसंबंध तोडून टाकणें (या समयीं गवताची कांडी चार मंडळींसमक्ष मोडतात. ही रीत शूद्रादि लोकांत आहे). २ (ल.) संबंध तोडणें. 'घावरियांच्या मोडा काडया । धाडा म्याडां वळतियां ।' –तुगा २२७. **०येवढी**–कांडीभर पहा.

कांडी—स्त्री. १ वेखंड, सुंठ, आलें, हळद इ. चीं मुळें व तुकडा; मोड; अंकूर; ऊस वगैरेचीं पेरें. २ ला आकाराचा धातूचा लांबट तुकडा. ३ वस्त्र विणण्यासाठीं ज्या काडीला सूत गुंडाळलेलें असतें ती काडी. ४ (विणकाम) धोटण्याच्या आंतील दोऱ्याचें गुंडाळें, बाबीण; धोट्यामध्यें बसेल अशा लांकडी अगर बोरूच्या तुकड्यावर भरलेल्या सुताची गुंडाळी. ५ लसणीचा गड्डा. ६ (गो.) चंदनाचें खोड. 'गंधा कांडी बरी वासाची आसा.' ७ (कों. नाविक) दोन्ही रोजांस सांधणारें व दोन्ही रोजांसहित भागाचें लांकूड, हा गलबताचा पाया होय. या लांकडास वरच्या अंगास दोन्ही बाजूंस खांचा पाडून त्यांत फळया बसवितात. ८ (छापखाना) फर्मा ठोकतांना पान (पेज) व सामान (फर्निचर) हें चौकटीला आंवळून बसण्याकरितां ठोकावयाचा लांकडाचा तुकडा. [सं. कांड] **–चें लांकूड**–धोट्यांतील सूत ज्या बोरूच्या कांडीवर गुंडाळतात ती, गव्या. **०फिरगाळणें-फिरविणें**–गारुडी आपल्या हातांतील लांकडाची लहान काठी आपल्या डाव्या हाताभोंवतीं अथवा अंगाभोंवतीं फिरवितो ती. (**यक्षिणीची**) **कांडी फिरविणें**–चमत्कार घडवून आणणें, अवचित एकादी गोष्ट घडवून पूर्वी घडलेल्या कृत्याच्या उलट घडून येणें.

काडुक—न. (व.) काटुक, लहान कांडी. [सं. काष्ठ]

कांडुरचें—क्रि. (गो.) नखांनीं कुरतडणें; खाजवणें. [सं. कंडूय्]

कांडुळणें—अक्रि. तुकडे तुकडे पडणें (दोरा, सूत, धागा इ. चे) [सं. कांड]

कांडुळणें—उक्रि. (कों.) खाजविणें. [सं. कंडूय्]

काडू—पु. १ गांडूळ; गांडवळ; पावसाळ्यांत उत्पन्न होणारा एक किडा; दानवें–दानवा. २ सुताराचें एक हत्यार.

कांडें—न. १ पेर; पर्व; सांधा. २ दोन पेरांतील भाग–तुकडा. ३ ऊंस, बांबू इ. चा तीन चार पेरांचा तुकडा–भाग, टिपरें. ४ झाडाचें सबंध खोड, विशेषतः फांद्या फुटावयाच्या आधींचें. ५ (ल.) लांबी मोजण्याचें एक माप (कांडी, दोरा इ.) अशा रीतीनें बांटेल त्या लांबीचें घेतलेलें माप. यावरून (लांब भितीचा, ओटयाचा, विहिरीचा, पाण्याच्या पाटाचा, इमारत कामाचा) एक किंवा विशिष्ट भाग. ६ जुनी वाळलेली, वठलेली टणक वेल. ७ एकदां मळणी केलेलीं किंवा झोडपलेलीं धान्याचीं ताटें, कणसें (फेकून दिलेलीं किंवा दुसऱ्यांदां मळणी करण्यासाठीं, झोडपण्यासाठीं ठेवलेलीं). ८ भात, नाचणी, वरी इ. ची लावणी करण्यास योग्य असलेली दाढ. ९ वोटांच्या सांध्यास होणारा एक रोग. १० बाण; तीर. 'कांडें मोकलीसी चांगें।' –उषा. १५२६ **कांड** पहा. ११ (ना.) वोरू [सं. कांड.] **अढचा-अडीच कांड्याचर येणें**–१ (गव्हाच्या ताटास ओंबी फुटते तेव्हां अडीच पेरें असतात यावरून) ओंबी बाहेर पडण्याच्या वेतास येणें. २ चिडण्याच्या परमावधीस पोंचणें (माणूस). **कांडेंपेरें लावणें–लावून पहाणें**–वहिमी, खुनी मनुष्याच्या, चोराच्या पायांचे मोजमाप सांपडलेल्या मागाच्या पायाशीं ताडून पाहाणें. **कांडेपेरें मिळणें किंवा कमीजास्त होणें**–वरील प्रकारांत बरोबर जुळणें किंवा न जुळणें. **कांडेपेरें घेणें**–मोजमाप घेणें. **कांडेपेरें पाहून**–(गुरें विकत घेतांना) त्यांचे सांधे व हाडपेर, अंगकाठी वगैरे पाहून (घेणें). **०करी**–पु. १ (गुऱ्हाळ) कवळ्यानें आणून दिलेलीं उसाचीं कांडीं चरकांत घालणारा. २ (क.) सुतार. **०चिरणें**–(आटयापाटया) सूर धरणारानें पहिली टाळी देऊन पहिल्या पाटीस पाय लावून पुन्हां परत येऊन दुसरी टाळी देणें. **०चोर-दर**–पु. ऊद; काळमांजर; कलिंदर; कानेदर; वनेर. **०श्वर-सर**–पु. लांब मानेचा बगळा, 'गीध घारी कांडेसरें।'–दावि २४४. [कांड+ईश्वर] **०साबर**–न. निवडुंगाची एक जात, त्रिधारी किंवा चौधारी निवडुंग. (याच्या उलट पानसाबर). **०हुरा**–पु. (कों.) काडाशेर; चिकाडा. कांडीं असलेला शेर.

काडेचिराइत—न. चिराईत नांवाच्या लहान झाडाच्या वाळलेल्या फांद्या, याचा रंग काळसर असून चव कडू असते. याचा ज्वरावरील काढ्यांत उपयोग करतात. [काडे+चिराईत]

कांडोकांड—क्रिवि. बोटाच्या प्रत्येक पेरावर. 'किती कांडोकांड मिरवाल मुद्या ।' –अमृत ११७. [कांड द्वि]

कांडोरी-रें—स्त्रीन. १ कांडें अर्थ १, २, ३ पहा. तुकडा, खांडोळें, खांडोळी. 'सहस्रभुजांचीं कांडोरी करी।' –एभा ४.२४२. 'तुझिये भुजांची कांडोरी । करील तो ।' –कथा १.६.३१ 'तुझी करीन कांडोरी ।' –जै. १३.२७. 'करीत आहे हाताचीं कांडोरी।' –उषा १४३४ [सं. कांड]

कांडोळ-ळी—पुस्त्री. सारडोळ, एक मोठा वृक्ष. याचा रंग पांढरा असून याला वसंत ऋतूंत फळें येतात. फळाचा आकार बदामासारखा व फुलें लाल असतात. झाडास पांढरा डिंक येतो. त्यास कथल्यागोंद म्हणतात. –वगु २.३०.

कांडोळणें—उक्रि. खाजविणें. 'पायें पाये कांडोळी। सेवा करी हीन कुळीं। तो येक मूर्ख।' –दा. २.१.६४. 'हरिण कांडोळितो हर्षे ग रोहिणी अंगें।' –बटसा ५९. [सं. कंडूय्]

कांडोळी–ळें—स्त्रीन. (कों.) शेतामध्यें पाणी भडविण्यासाठीं घातलेले मातीचे बांध, ताल. कांड काढणें पहा. [कांड]

कांडोळें—न. १ लहान मुलांच्या पायांतील रुप्याचा वाळा; विडी. २ अधिकाऱ्यानें आपल्या येथील कार्याकरितां वसूल केलेला जादा कर. –मोल. [सं. कांड+वलय]

काड्डुंघ—न. (गो.) एक लहान मासा.

काडथा—स्त्री. १ काडी या शब्दाचें अनेक वचन. २ विडा इ० टोचण्याकरितां हाताच्या बोटासारखीं टोंकें असलेलें चांदीचें झाड. **०निवडुंग-हुरा-काडेहुरा** पहा.

काढ—पु. जंगलांतून ओढून आणलेला लांकडाचा ओंडका.

काढकुसुंबा—काडकुसुंबा पहा.

काढघाल—स्त्री. एखादा पदार्थ विनाकारण पुन्हां पुन्हां बाहेर काढणें व आंत घालणें–उचलणें ठेवणें इ. [काढणें+घालणें]

काढणी—स्त्री. १ (काढणें–धाना.) कापून घेणें (जोंधळा, बाजरी वगैरे पीक) द्विदल धान्यें खुडणें, भुईसपाट असलेल्या झुडुपावरील अगर वेलीवरील फळें खुडणें, कापून रास करणें (मर्यादित उपयोग). २ विशेषतः सुताचा पक्का दोर; अंबाडी ताग, रेशीम यांचाहि दोर–री (मर्यादित उपयोग) विहिरींतून पाणी काढण्याकरितां; घोडयाला खुंटयाशीं बांधण्याकरितां; किंवा त्याला फेरीवर धरण्याकरितां; गोणी, कंठाळ, आखें, बस्ता, मालाचा गठ्ठा, यांना आंवळण्याकरितां; तंबू ताणण्याकरितां वापरतात. ३ सर्व साधारण औतास वेटक अगर येटक घालण्यास उपयोगांत आणण्याची दोरी; वेठण; सोल. [काढणें]

काढणें—उक्रि. १ आंतून बाहेर, वर, घेणें; ओढून घेणें. 'दाढी धरून ह्या मेल्याला बाहेर ओढून काढल्याशिवाय हा ताळ्यावर यायचा नाहीं.' –बाय. २.४ २ (ल.) वळविणें; उठविणें (अक्षरें, ओळी, आकृति). ३ मागावर वस्त्र इत्यादि तयार करणें–विणणें. ४ नवीन शोध करणें, जुळविणें, पाडणें. (तऱ्हा, मागे, रीत, दृश्य). ५ मिळविणें; जुळविणें; उत्पन्न करणें. 'या शेतांतून वर्षास दोन खंडी धान्य काढतों.' ६ मिळविणें; श्रमानें संपादन करणें. ७ घेणें, कर्जे काढणें, उसनवारी घेणें. (पैसा उपटणें.) ८ वादविवादाचा विषय, भाषण सुरू करणें; ओघास आणणें; मुद्दा पुढें मांडणें; उपस्थित करणें. ९ शोधणें; उजेडांत आणणें; छडा लावणें; दाखविणें (दोष, गुणधर्म). १० कंठणें; सहन करणें; सोसणें; लोटणें; घालविणें (दुःख, आजार, क्लेश, काळ). 'मी धान्यावांचून दोन दिवस काढले.' 'एका धोतरावर थंडी काढली.' 'गुरूं काढितां भूत आणि पोर काढितें दुःख.' ११ (कों.) शिकविणें; बठणीस आणणें; कामायोग्य तयार करणें (पशु). १२ शुश्रूषा करणें, चाकरी करणें (पोराची, दुखणेकऱ्याची). १३ हुडकणें; पत्ता काढणें (रस्ता, पाहिजे असलेली वस्तु). 'पुढें वाट काढणारी मंडळी होती.' –विवि ८.१'१८. १४ उपटणें (जोंधळ्याचें पीक). १५ (घोडा, बैल इ. नीं दुःखामुळें) चालतांना पाय वांकडा टाकणें. १६ उपसणें (तरवार). 'मी तरवार काढली.' १७ दूर करणें. 'संसार काढूनियां कांटी।' –ज्ञा १३.८६६. [सं. कृष्–(कृष्ट)–कर्ष्. प्रा. कड्ढ, आर्मेनियनमजि. कस; पो. जि. कूल; बं. काड, सिं. कढ (णु) हिं. काढ (ना.), गु. काढ (वुं.)] (वाप्र.) **कज्जा काढणें**–बळेंच भांडण सुरू करणें, वर्दळीवर येणें, आणणें. **काढतें घेणें**–स्वतःला सोडवून घेणें, पाय मागें घेणें (भांडण, झगडा, लढाई यांमधून). 'कृतवर्म्मा बलिभद्र काढिलें। जुंझतजुंझतां।' –शिशु. ९७६. **काम काढणें**–१ काम लांबविणें. २ (व.) ठार मारणें, नाश करणें, कांबांत काढणें. ३ (व.) रतिसमागम करणें, स्त्रीत दमविणें. **केश काढणें**–श्मश्रु करणें (विशेषतः विधवा स्त्रीची). **घोडी काढणें**–घोडीस घोडा लावणें (संभोगासाठीं). **दाणा-पीक काढणें**–धान्य, शेत पीक कापून जमा करणें. **दुखणें काढणें**–(व. ष.) (आजाऱ्याची) शुश्रूषा करणें, स्वतःचें दुःख सहन करणें. **दैव-प्रारब्ध-नशीब-काढणें**–उदयास येणें, दैव उघडणें, पैसा मिळविणें. 'दैवचि मूर्तिमंत। येईल देखा काढत। तुम्हांपाठीं।' –ज्ञा ३.१०१. **पाऊस-आभाळ-काढणें**–वाऱ्यानें पाऊस आणणें; ढग भरणें. **रडें काढणें**–रडूं लागणें. **शेत-बनजर-नवें रान-काढणें**–नवीन जमीन लागवडीस आणणें, नांगरणें.

काढणें—अक्रि. उतरणें, शमणें, निघणें, कमी होणें (पाऊस, ताप, नदीचा पूर). 'पाऊस काढला म्हणजे मी बाजारांत जाईन.' 'सिंधु एके आंगें काढे।' –ज्ञा १५.११९.

काढणें—न. (कों. गो.) विहिरींतून पाणी काढण्याचें साधन: पोहरा, कळशी, बसकट आकाराचा तांब्याचा लोटा, दोरी. बांधण्यासाठीं याला एक कडी असते.

काढता पाय—पु. प्रसंगांतून निसटणें, पळणें. 'नानांनीं प्रसंग पाहून पुण्यांतून काढता पाय घेतला.' –अस्तंभा ६.

काढतें—न. (जुगार) पैशाऐवजीं ठेवलेली हस्तीदंताची नरद.

काढतें घेणें—क्रि. १ मागें पळणें; २ फौज मोडूं न देतां शिस्तवार माघार घेणें.

काढदगड—पु. (गवंडीकाम) खाणींतून काढलेला बिन घडविलेला दगड; अनघड दगड; पायाच्या भरतीच्या कामीं उपयोगी.

काढल्या कामाचा-रेघेचा—वि. सोंपविलेलें, सांगितलेलें तेवढेंच काम करणारा, करण्याला समर्थ, सांगकाम्या.

काढघण-न—न. गांवांतून शेताकडे औत बैल जोडून नेतांना वाटेंत तें जमीनीवर घासूं नये यासाठीं त्याच्याखालीं एक कोनाकृति लांकूड घालतात तें.

काढवणी—न. काढलेलें पाणी. (ह्याच्या उलट प्रवाहानें अगर पाटानें वाहात येणारें पाणी). [काढणें+पाणी]

काढवाढ—स्त्री. (व.) मागें पुढें करण्याची क्रिया; सरकासरकी.

काढवान—काढवण पहा.

काढविणें—उक्रि. १ घोडयाजवळ घोडी (संभोगार्थ) आणविणें. २ घोडीपासून संतति उत्पन्न करून घेणें. [काढणें]

काढशाह—काटशह पहा.

काढा—पु. १ औषधी वनस्पति उकळून त्यांचा अर्क ज्यांत उतरला आहे असें पाणी; कषाय; अर्क; याचें सामान्य प्रमाण:–काढा करण्याचीं जीं द्रव्यें असतील त्याच्या सोळापट पाणी घालून तें चौथाई राहीपर्यंत आटवावें म्हणजे तो पिण्यास योग्य होतो. –योर १.३१५. [सं. कषाय, क्वाथ] ०काढणें–१ अधिक काढणें; उपटणें; मिळविणें. २ लोभी बनणें. ३ पाठलाग करणें (टोणग्यांची अथवा बैलांची झोंबी लागली म्हणजे एक टोणगा अथवा बैल दुसऱ्या टोणग्याच्या अथवा बैलाच्या मागें धांवत जाऊन पाठलाग करतो त्यास व मनुष्याच्या बाबतींतहि म्हणतात. 'तें देखोनि शैल्यांचा साबळीं। काढाओ काढिला।' –शिशु ९५६. **काढ्यांत कोळणें**–१ काढ्यांत एखादें औषध कुसकरणें. २ (ल.) दुःखानें क्षीण होणें. 'पाहुन मनाचा खंबीर दुःखें पहा काढी कोळतें।' –प्रला १०२. ३ एकाद्यास रोख नाण्यानें कर्ज वेऊन व्याजाच्या ऐवजीं धान्यरूपानें व्याज घेणें–देणें, व तो व्यवहार. (क्रि० काढणें; करणें) (पंचम्यंत प्रयोग काढ्यावर काढ्यानें इ०) [काढणें] ४ माळवें; भाजीपाला विकत घेतला असतां त्यावर बोलीपेक्षां ज्यास्त जो अधिक मागून घेतात तो भाजीपाला; वर्तोळा, (क्रि० घेणें) 'एका पैशाची खरेदी, दोन पैशाचा काढा.' ५ (व.) उपवास; लंघन. 'त्याला तापांत काढा पडला.'

काढाऊ—वि. १ काढून, भुरळ घालून, फूस लावून आणलेला (चाकर, बायको इ.) २ मुद्दाम तयार केलेला.

काढाओढ–ढा—पुस्त्रि. अनेकांपासून कर्ज काढण्याची क्रिया. 'तो काढाओढा काढून पोट भरतो.' **०चा धनी**–पु. कर्ज बाजारी झालेला माणूस.

काढाओढी—स्त्री. (गो.) आलेपिळे; त्रास.

काढाकाढी—स्त्री. १ घाईनें, गडबडीनें, काढणें; काढून टाकणें; हिसकणें. या वरून झटपटीनें लगबगीनें तयारीस लागणें; उपाय योजना करणें. 'तुका म्हणे आतां करी काढाकाढी। जाती ऐसी घडी पुन्हा न ये।' –किवि. त्वरेनें; घाईनें; जलदीनें; त्वेषानें. 'म्हणशी युद्ध मांडेल कडाडी। मी उठेन काढाकाढी।' –एरुस्व ४.३८. [काढणें द्वि.]

काढावा—पु. शोध; तपास; तलास. 'काढावा काहूनि येक वीरातें। घेऊनि गेला।' –कालिका पुराण १७.४६

काढं(ढीं)व—वि. १ सांपून तयार करविलेलें, मुद्दाम बनविलेलें; काढाळ (वस्त्र, इ.). २ खोडकर मुलाला व कजाग स्त्रीला –वेश्येला–निंदेनें म्हणतात. ३ मुद्दाम काढविलेली, तयार करविलेली (घोड्याची पैदास). [काढणें]

काढू–ढ्या—वि. दुसऱ्यापासून आजेब इ० युक्त्या करून कर्ज, द्रव्य इ० काढणारा; पैसे उपटणारा; उंडीबकाल; तुंबड्या.

काणकूण—स्त्री. १ कुणकुण; गुणगुण; दुसऱ्याला ऐकूं न येईल असें भाषण; पुटपुटणें. [ध्वनि] २ पिरपिर; कुरकुर. ३ टंगळमंगळ; उडवाउडवीची भाषा; धरसोड. [ध्व]

काणको—पु. (गो.) एक जातीचा मासा.

काण(न)गी—स्त्री. कानगोष्ट.

काण(न)गी—स्त्री. देवाचा नैवेद्य. 'कांहीं काणगी नको कराया कानगिला घेउनि।' –राला १९.१५. [का. कणिके=देणगी]

काणट—स्त्री. सर्पाची एक जात. (काणीट पहा).

काणस—कानस पहा.

काणा—वि. १ ज्याच्या दोन डोळ्यांपैकीं एका डोळ्याची शक्ति गेली आहे असा; एका डोळ्यानें अंधळा; एकाक्ष. 'काणीला जसें सोग्याचें काजळ शोभत नाहीं.' –कमं १.३२. २ तिरव्या डोळ्याचा, चकणा; ज्याला बुबुळें तिरकस केल्याशिवाय दिसत नाहीं असा. हाच अर्थ विशेष रूढ–प्रचारांत आहे. 'कावळा हा काणा पक्षी आहे.' ३ तिरवा डोळा (एका डोळ्यानें, दोहों डोळ्यांनीं). काणा डोळा, काणे डोळे, असे प्रयोग होतात. ४ ज्या देशांत पाहिजे असलेला जिन्नस वेळेस मिळत नाहीं किंवा जेथील भाव एकदां स्वस्त तर एकदां महाग असतात असा देश, शहर, खेडें. ज्या देशांत आपण दुष्कर्मादि केल्यामुळें पुन्हां त्या देशांत जावयास आपल्यास लाज वाटते तो देश, शहर, खेडें इ. 'डोळा काणा असावा पण मुलुख काणा असुं नये.' ५ एक पेड मोठा व दुसरा बारीक अशा तऱ्हेनें विणलेला दोर. तसेंच तिहून वांकडी झालेली खाट, मांचा, बाज. ६ तिरकस; तिर्यक्; तिरवा; वक्र; वांकडा. 'जाईल काणे वाटारे।' –दावि १५८. [सं. काण एकाक्ष का. काण] **म्हo** १ काणा कैपती अंधळा हिकमती. २ काण्या डोळ्यानें पाहणें=कटाक्ष मारणें. ३ क्वचित् काणा भवेत्साधु=काणा किंवा एका डोळ्यानें अंधळा मनुष्य प्रायः सुस्वभावी नसतो बहुतकरून लबाड असतो. अंधळ्यांत काणा राजा.

काणाडी—स्त्री. कामशील. कानाडी पहा. [सं. कर्णाटी]

काणी—स्त्री. खिन्नता; क्लेश. 'जाणोनि अंतःकरणें । काणी घेतली ।' -ज्ञा १८.७६. [सं. क्वण्=ध्वनि] –वि. क्लेशदायक. 'मायबाप, बंधु बहिणी । नोवरी न दिसतां वाटे काणी ।' –दा ३.२.४०.

काणी—वि. तराजूचीं दोन्हीं पारडीं सारखीं नसणें; एक पारडें तिरपें असणें. –स्त्री. तीं सारखीं करण्यासाठीं एकांत जे वजन, पासंग घालतात तें; पासंग. [का. काणि=तराजूंतील बेतोल, पासंग]

काणी—स्त्री. १ (कु. माण.) बैलाचा लगाम, जनावराच्या गळ्यास बांधण्याचें चर्‍हाट, दोर. २ लहान दोरी; दाव्याची एका बाजूची दोरी. ३ (बे.) लहान फास केलेली दोरी.

काणी—स्त्री. ज्वारी, गहूं यांवरील एक रोग; ह्यामुळें कणीस, लोंबी काळी पडते: काजळी.

काणी—स्त्री. (गो.) कहाणी गोष्ट.

काणोट—न. एक जळूच्या जातीचा लहान प्राणी. हा माणसाच्या त्वचेला चिकटून रक्त ओढून घेतो. (काणट पहा.)

काणी पेठ—स्त्री. काणा ४ पहा; धान्य वगैरेचा सांठा नसल्यानें दुसऱ्या गांवावर अवलंबून राहाणारें, तसेंच भावांत वरचेवर चढउतार होत असल्यामुळें जेथील व्यापारी लुच्चेगिरी–नफेबाजी करतात असें शहर.

काणु-णू-क—न. (गो.) देवास द्यावयाची देणगी, देवापुढें पैसा ठेवतात तो, काणगी. [का. कणिके=देणगी]

काणे—न. एक जातीचा मासा, हा भाद्रपदांत, अश्विनांत पकडतात.

काणेर—न. कांडर पहा.

काणोसा—पु. कानोसा; लक्ष्य देऊन ऐकण्याची रीत. (क्रि० घेणें) [सं. कर्ण]

काणोसें—वि. वांकडें; तिरपें. 'कांहीं बरें कांहीं काणोसें ।' –दा १९.८.२२.

काण्वव-व्हव—पु. कण्वशाखीय ब्राह्मण; ब्राह्मणांतील एक पोटजात व त्यांतील व्यक्ति. [सं. कण्व]

काण्णी—स्त्री. (गो.) काढणी; दोरी. [काणी पहा]

काण्णुबाण्णु—न. (कायनुबायनु) १ कांहीं तरी; ज्याला कोणी विचारीत नाहीं किंवा ज्याकडे कोणी लक्ष देत नाहीं अशी वस्तु किंवा मनुष्य; क्षुद्रतादर्शक किंवा औदासिन्यदर्शक शब्द. 'ह्या जागीं कांहीं काण्णुबाण्णु भरलें.' 'ह्यानें कांहीं काण्णुबाण्णु आणलें.' 'तो कांहीं काण्णुबाण्णु बोलला.' २ पुरुषानें मृदुपणानें घातलेल्या समजुतीस लिया हा शब्द लावतात. क्रि० बोलणें. ३ परस्त्री अथवा परपुरुष यांच्या परस्परांतील अनीतिकारक शृंगारचेष्टा; कुजबुज; गुलगुल गोष्टी. [सं. किम्+नु]

कात-थ—पु. खैर वगैरे झाडांच्या लांकडापासून उकळून काढलेला एक पदार्थ; हा (खाण्याच्या) विड्यांत घालतात. याच्या काळा, पिवळा व खैरसाल अशा तीन जाती आहेत. [सं. क्वाथ] (वाप्र.) एवढ्यानें काय कात होणार ? कमीजास्त उणीव. अतिशय थोडा या अर्थानें वापरतात. (एकादा पदार्थ कमी पडल्यास). **०कडी-री-कातोडी**–पु. कात तयार करणारी एक जात व त्यांतील व्यक्ति; एक गुन्हेगार जात, काथोडी. यांच्यांत दोन पोट जाती आहेत. १ घोर कातकरी व २ सोन कातकरी. मुख्य वस्ती ठाणें व कुलाबा जिल्ह्यांत आहे. यांची भाषा मराठी असून ते नाकांत बोलतात आणि प्रत्यय गाळतात व खैराचा कात काढतात. लांकडें तोडून कोळसे पाडतात. उंदराच्या बिळांतील धान्य काढतात वगैरे. –गुन्हेजात ५४. **०गोळी**–स्त्री. कातामध्यें सुवासिक द्रव्यें घालून जी लहान गोळी करतात ती. ही विड्यांत घालतात. **०चुली**–स्त्री. कात तयार करणाऱ्यांवर बसविलेला सरकारी कर. **०बोळ**–पु. खैरकात आणि बोळ यांचें मिश्रण; हें औषध बाळंतिणीचे उपयोगी आहे. याचा रंग काळा असतो. 'पोराचें पोर गेलें आणि कातबोळाचें मागणें आलें.' 'संन्यासास सुळ वांझेस कातबोळ.' [कात+बोळ] **०भट्टी**–स्त्री. १ कात तयार करण्याची भट्टी; चुलाण. २ कातचुली; त्यावरील कर. **०वड-कार-वडी**–पु (कों.) कातकरी. **०वाडी**–स्त्री. कातकऱ्यांची वस्ती.

कात—स्त्री. (कु.) भाजीपाला व मिरची यांचें फळ, कातरुड.

कात—स्त्री. सापानें टाकलेली त्वचा, मेंग (कृत्ति शब्दाचा मूळ अर्थ कोणत्याहि जनावराचें कातडें असा आहे.). हें एक प्रकारचें कातडेंच होय. क्रि० टाकणें. [सं. कृत्ति–कत्ति–कांति कत्तिट=कांत्ति–कात राज–ग्रंथ; भाइ. १९३२.] **कात टाकणें**–पुन्हा ताजातवाना होणें. **कातीला येणें**–कात टाकण्यास तयार होणें; वृद्ध होणें.

कात—स्त्री. रेशीम (कातलेलें). **०एकतारी**–स्त्री. रेशमाची एक जात. एकेरी रेशीम. –मुंव्या ९७. **०कलकत्ता**–स्त्री. चीन देशांतून येणारें कातलेलें रेशीम. **०दोनतारी**–स्त्री. रेशमाची एक जात. पिळाचें रेशीम. –मुंव्या ९७.

कांत—स्त्री. १ तेज; तकाकी; पाणी; सौंदर्य. २ (ल.) टवटवी; निर्मळपणा; निरोगीपणा (चेहरा, मुद्रा किंवा शरीराचा वर्ण यांवरील). –वि. सुंदर; तेजस्वी

कांत—पु. १ लांकूड, हस्तदंत वगैरेचा कातताना पडलेला भुसा; चुरा; कीस [कांतणें.]

कांत—पु. (कों.) कांठ याचा अपभ्रंश, कडा, कांठ.

कांत—पु. नवरा; पति. 'तिये कांतु मिनलिया न राहवें । हृदय जेवीं ।' –ज्ञा ११.५७७. 'तेणें तरी कृष्णनाथ । भीमकीकांत हो लग्नीं ।' –एरुस्व ६.२६. [सं कम्–कांत]

कांत—पु. १ (लोहकांत याचा संक्षेप) लोहचुंबक; चुंबक व त्याचें भस्म. 'जैसा कांत अवच्छिन्न । जड लोहातें अचेष्टून ।' –विउ ४.४९. २ कढई वगैरेचें लोखंड. [सं (अयस्)–कांत]

कांतकाम—न. कांतण्याचें काम. लांकूड, धातू यंत्रावर चढवून फिरवून हत्यारानें त्यांनां निरनिराळे आकार देऊन बनविलेलें काम. [कांतणें+काम]

कातकुतली—स्त्री. (गो.) खाजकुयली.

कातकुली—स्त्री. गुदगुली; काचकुली; गुदगुलीची क्रिया.

कातडी—स्त्री. १ मनुष्य, पशु (सजीव) इ० च्या अंगावरील कातडें–त्वचा; चर्म; चामडी; पापुदरा; साल. २ चोळवटलेलें, घासलेलें, लोंबत असणारें कातडें. [सं.कृत्ति] **०वायसर**–पु यंत्रांतील भाग घट्ट बसण्याकरितां चामडयाचा जो तुकडा वापरतात तो. [कातडी+इं. वॉशर]

कातडें—न. १ त्वचा; चर्म; चामडी. २ कमावलेलें कातडें. [कृत्ति]; आपल्या अंगाचें कातडें काढून जोडा शिवला तरी फिटणार नाहीं=एखाद्याचा अतिशय (न फिटण्यासारखा) उपकार झाला असतां म्हणतात. **०पांघरणें**–एखादी गोष्ट माहीत असून मुद्दां माहित नाहीं असें ढोंग करणें; ठकविणें; फसविणें. 'परंतु दोघांचा न्याय चालत असतां अनाहुत मध्येंच तोंड घालून त्यय स्थाचें कातडें पांघरून कांहीं घोंटाळा करणें अगदीं रास्त नाहीं.' –टि ४.१२८. सिंहाचें कातडें पांघरणें=खोटेंच अवसान आणणें; लटकेंच शौर्य दाखविणें. **डोळ्यावर कातडें ओढणें**–डोळेझांक करणें; लक्ष न देणें.

कातण—न. करंज्या वगैरे करतांना त्यांच्या कडांचें कांतण्यानें निघालेलें पीठ. [सं. कर्तन]

कांत(ती)ण—स्त्री. कोळ्याच्या वर्गांतील एक किडा. ह्याचे पाय लांब व शरीर काळसर असतें. माशा पकडण्यासाठींहि कोळ्या सारखे हा आपल्या अंगांतून तंतु काढतो म्हणून म्हणतात. 'पिसवा गोचिड कांतणी ।' –दावि २४४. 'कांतण्या म्हणती घर आमुचें ।' –दा १.१०.३६. **–चें घर**–न. वरील किड्याचें पांढऱ्या रंगाचें तकतकीत व चिवट असें घर. हें घराच्या सांधीकोपऱ्यांत तुळवटावर आढळतें. हें लावलें असतां कापलेल्या भागाचें रक्त थांबतें. [सं. कांतणें]

कांतणा—न. (कृ.) सुताराचें एक हत्यार.

कांतणें—उक्रि. १ चाती, रहाट वगैरेवर सुत काढणें. २ चर कावर धरून विशिष्ट गोलाकार देणें. ३ करंज्या वगैरेचे कांठ कांतण्यानें कापणें. ४ (ल.) (खोडी किंवा दुष्कृत्य करण्याबद्दल) शक्कल लढविणें, युक्ति काढणें. 'त्यानें मजवर–विषयीं फारसें कातलें ।' ५ छळणें; गांजणें; बेजार करणें; पाठीस लागणें; पिळणें. 'काय कातलें भगवंता वेळोवेळा ।' –ऐपो १४२. ६ (गो.) नारळ खवणें. ७ जुंपणें. 'जेथ गरुडाचिये जावळियेचे । कांतले चाऱ्ही ।' –ज्ञा १.१३८. 'उच्चैश्रवेयाचिअे जावळिके । कातळे साव्राअणीचें ।' –शिशु ९३६. ८ पिसाळणें. 'कांतेलेंसे श्वान । तैसें दिशा हिंडे मन ।' –तुगा २९००. ९ (जरतार) पीळ देणें; वळणें. [सं. कृत्] **कातून पिंजणें–काढणें**–पुष्कळ श्रम घेऊन तयार करणें; नांवरूपास आणणें.

कांतणें—अक्रि. (कों.) १ काचणें; घर्षणानें झिजणें; कमी होणें. २ दुखणें, त्रास वगैरेनें कावणें; क्षीण होणें. [सं. कृत्]

कांतणें—न. १ करंज्या वगैरेच्या कांठास कटि आणण्याचें एक साधन. याच्या चातीला दांते असतात व धरावयाला दांडा असतो. लहानशा पितळी दांडयाला (दांते असलेलें) बसविलेलें चक्र. २ (गो.) खवणी; खवला; नारळ खवण्याचें साधन.

कातनेकड—न. (कों.) तोरणावर कनेकड फिरत असतांना दोन्हीं लांकडें घासून झिजूं नयेत म्हणून बाजूस दोन खुंट्या मारून त्यांमध्यें कनेकडाखालीं व तोरणावर जें लांकूड घालतात तें. 'कांहीं लोक कातनेकडासाठीं माडाच्या पोयडयाचाहि उपयोग करतात.'

कातन्याभाजी—स्त्री. एक वनस्पति. कात पहा.

कातयंत्र—न. सर्व साधारण कांतकाम तयार करण्यासाठीं लागणारें यंत्र; हीं निरनिराळ्या प्रकारचीं असतात. (स्क्रू करणारें, व्हर्टिकल, सपाट टरेट, बोअरिंग, मिलिंग वगैरे.). इं. लेथ.

कातयो—स्त्री. (गो.) कृत्तिका.

कातर—स्त्री. जिवंत प्राण्याच्या केसावर अथवा लोंकरीवर पडणारा एक रोग; कातरी; चई; चाई; उंदरी.

कातर—वि. १ भ्यालेला; भित्रा; भयभीत; भ्याड. 'बहु कातर विदुर सदा वटवट करितो अशीच हा नीच ।' –मोसभा ४.९०. २ अंगचोर. 'गुरु दास्यावियेयीं कातर ।' –विपु १.५२. 'त्यासि चोरू हेरू कातरू । म्हणोनि दंड केला थोरू ।' –एभा ११.४५९. [सं.] **०वेळ**–ऐन तिन्हीसांज; दिवस व रात्र यांचा संधिकाल. 'मग काय करतां इथें बसून ? कातर वेळ झालीना ?' –स्वप ३४.

कातर—स्त्री. १ मोठी कात्री; बोटें अडकविण्यासाठीं मागें पोलादाचीं दोन भोकें असलेली व एका खिळ्यानें सांधलेली व फिरतीं पातीं असलेली; हिनें कागद, कापड इत्यादि वस्तु कातरल्या जातात. २ (ल.) दोन नद्या किंवा रस्ते जेथें जुळतात, मिळतात त्यांच्यामधील त्रिकोणाकृति प्रदेश; वतुंळाच्या दोन त्रिज्यांमधील भाग; आढें ठेवण्यासाठीं दोन वांसे जोडून केलेली कैची, त्रिकोण.

३ (ल.) अडचणीची स्थिति; घोंटाळा; आपत्ति; पेंच; कोडें. ४ तळहातावरील विवक्षित दोन रेघांमधील त्रिकोणाकृति भाग व त्या रेघा. या रेघांवरून दुर्भाग्य वर्तवितात, अशा माणसाजवळ पैसा टिकत नाहीं अशी समजूत आहे. ५ तेल्याच्या घाण्याभोवतीं फिरणारें कातरीच्या आकाराचें एक लांकूड. ६ (माण.) कणसें असलेल्या कडब्याच्या पुष्कळ पेंढ्यांची मंडलाकृति रचना. ७ अष्टदिशांच्या मधील अंतराळें प्रत्येकी. ८ (कों.) ओक्तीचें दुबेळकें, बेळें. ९ दांडपट्टा खेळण्याचें एक हत्यार. 'याशिवाय मारु, धोक, कातर इत्यादि नाना प्रकारचीं उपकरणीं मर्दानी खेळांस लागतात.' –संज्ञा ६८. [सं. कृत्–कर्तरी; फ्रें. जि. कत; पोर्तु. जि. कच्छ, कषस्] **म्ह०** हातावर साखर आणि मानेवर कातर (गोडबोल्या दुष्ट माणसाच्या बाह्य वर्तनाला, बोलण्याला लावतात). **०लावणें**–कमी करणें; काटकसर करणें. 'वाढत्या खर्चास कातर लावली.' **०कुतर**–वि. आंत बाहेर कापलेलें, कातरलेलें; करवतीकांठी. –स्त्री. कातरलेला चुरा, भुसा. **०खुरा**–पु. (चांभार) नखीखालचा खुरा. **०चुरा**–स्त्री. (ओतकाम) जिल्हई देतांना खालीं पडणारा धातूचा चुरा, भुसा. **०ण**–क्रि. (गो.) कातरणें. **०ण–णी**–स्त्री. कापण्याची, कातरण्याची क्रिया. –न. १ वस्त्र विणल्यावर फणीला जीं उभ्या सुतांचीं टोकें राहातात तीं. २ कातरलेले तुकडे; चुरा. ३ (व.) कातीण नांवाचा किडा. ४ वनस्पतीवरील रोग. **०वेत–ती–वेघत–ती**–कातरवेत–ती पहा. **०माळा**–पु. घराच्या अगदीं वरचा माळा, मजला. **०विडा–कात्रीविडा**–पु. चार पानें घेऊन त्यांतील एक एक पान मधल्या शिरेस दुमडून हाताचे नखांनीं डेखापासून ते शेवटपर्यंत सारखे कातरे पाडून गोविंदविडा करतात तो. **०वेल**–स्त्री. कातरी; हिचीं पानें कातरनिरगुडीच्या पानासारखीं असतात. –वगु ५.३२. [कातर+वल्ली] **०शितर**–वि. काटकसरी; मितव्ययी; सावध; विचारी. [कातर द्वि.] **कातऱ्या चोर**–पु. कातरीनें खिसा कापणारा चोर; खिसेकातरू.

कांतर—वि. (गो.) खारवट शेतजमीन.

कां तर—उभ. कारण; कां कीं. [कां+तर; सं. किं+तर्हि]

कातरणें—उक्रि. १ कात्रीनें कापणें; काटणें. २ चावून, कुरतडून टोचून कापणें. ३ मेंढीवरील लोंकर भादरणें. ४ (कु.) कमी होणें. [सं. कर्तन]

कातरणें—अक्रि. भिणें; कचरणें; माघार घेणें. 'धुविचारा कातरूं नको.' –अफला ६१. [सं. कातर]

कातरता—क्रिवि. तिरकस; तिरपा; घसरता; चाटून. काकरता पहा. 'गोळी मानेस कातरती लागली.' –भाब ५७.

कातरा—पु. १ कातण्याचें कृत्य; काट; छाट. 'तेणें प्रपंची वर कातरा रे.' –दावि ३७९. २ कातरलेले तुकडे; भूसा; कीस; चुरा (वस्त्र, लांकूड, कागद, सुपारी, पानें इ० चा). ३ कातराव्याचा भाग. ४ पाथरीची भाजी; हिचीं पानें कातरल्याप्रमाणें असतात. ५ फाक; फोड; तुकडा. (क्रि० घेणें). ६ (ल.) दोन सोप्यांच्या जोडाचा संधिभाग. ७ (राजा.) हातापायास पडणाऱ्या भेगा. (क्रि० पडणें). ८ (माण.) शाळू किंवा जोंधळ्याच्या पेंढ्यांची गंजी; जेथें शाळू अगर जोंधळा होत नाहीं तेथें या शब्दाऐवजीं ढींग, सुडी हे शब्द वापरतात. कातर अर्थ ६ पहा. ९ तिरकस येणारे दोन ओघ, प्रवाह. 'वायोचा कातरा घसवटे। तेणें उष्णें वन्हि पेटे।' –दा १३.३.८. [सं. कृत्]

कातरा—वि. कातरता; तिरका; ओझरता; वांकडा. काकरता पहा.

कातरी—स्त्री. १ कातर अर्थ १ पहा. २ (ल.) तेलाच्या घाण्याच्या खालीं दोन आडवीं लाकडें जेथें मिळतात ती जागा, भाग. ३ केसांना लागणारा एक रोग; चाई; उंदरी. (क्रि० लागणें). ४ (कुस्ती) एक डाव; आपला एक पाय जोडीदारानें वरतीं उचलला तर तो पाय जोडीदारानें जितका उचलिला असेल तेथें त्याच्या पोटाला किंवा छातीला टेकून आपला दुसरा पाय जोडीदाराच्या गुढग्याच्या लवणीनवळ व पंजा जोडीदाराच्या टाचेला टेकून कातरीच्या दोन्हीं पातीप्रमाणें दोन्ही पायानें जोडीदाराला चीत करणें यास कातरी असें म्हणतात. –वि. कातलेलें, छाटलेलें, खांडें पाडलेलें, (कांहीं कांहीं वनस्पति) जसें–कात्री निर्गुंड–निरगुडी–निरगूड–निवडुंग–पान–विडा. [सं. कर्तरि, प्रा. कत्तरि] **०चालविणें**–काटकसर करणें. **०निर्गुंड**–स्त्री. निर्गुंडींतील एक प्रकार.

कातर्य—न. भितरेपणा; भ्याडपणा; नेभळेपणा. [सं.]

कातली–ळी—स्त्री. (गो. कु. हेट.) ओल्या नारळाचें खवलेलें खोबरें. 'नव–यानं दिली कातली' –सह्याद्रीच्या पायथ्याशीं ६. [सं. कृत्]

कातवणें—अक्रि. संतापणें; कातावणें; खेंकसणें. [सं. क+तप् किंवा तू?]

कातवळ—वि. खडकाळ प्रदेश. [कातळ पहा.]

कात(ता)विणें—उक्रि. १ छळणें; बेजार करणें; त्रासविणें; चिडविणें. २ (गो.) कोरणें.

कातळ—पुन. खडक; प्रस्तर; एकसारखा सलग दगड किंवा दगडाळ जमीन. 'सीळा कातळा परवडी।' –दावि २४४. 'कशा कठिण कांतळांवरूनि इंद्रयज्राहुता।' –आधुनिक कविता वि. मो. महाजनी [कातल] **०वट**–वि. कातळ असलेली, खडकाळ (जमीन, प्रांत).

कातळा—पु. (कों.) पातळ फाक, फोड (फळ, मूळ इ० चा). [सं. कृत्]

कांतळा—वि. कांतिमान; श्वेत. 'तो कैसा दिसताए कांतळा। जैसा अमृतरसाचा ओतिला।' –शिशु ९९४. [सं. कांति] **०ऊंस**–पु. एक प्रकारचा ऊंस.

कांता—स्त्री. १ सुंदर स्त्री; आवडती स्त्री. २ पत्नी; लग्नाची बायको. 'परी प्रियापुढें कांता। रिगे जैसेनि।' –ज्ञा १७.२७५. [सं. कम्–कांता] ०**दृष्टि**–स्त्री. (मृत्य) चित्त प्रसन्न व संतुष्ट झालें असतां खोटया रागाचा आव आणून शृंगारसूचक भ्रूक्षेप व कटाक्ष दाखविणें. हा अभिनय शृंगाररसाचे वेळीं करतात.

कातार्डी-डें—कातडी-डें पहा.

कांतार—न. १ अरण्य; वन. 'सिंह ससा असतां पाही। कांतार हिंडतां भय नाहीं।' २ कठिण व बिकट वाट. [सं.]

का(कां)तारी—पु. कांतकाम करणारा; कांतणारा.

का(कां)तावणें—अक्रि. चिरडीस जाऊन तोंड टाकणें; रागावणें; चिडणें.

का(कां)ताविणें—उक्रि. त्रासविणें; पीडणें; बेजार करणें; भागविणें.

कातळ—पु. (कु.) कातळ पहा.

कांति-ती—स्त्री. १ तेज; सौंदर्य; शोभा; प्रकाश. 'अवयवकांतीची भांब। तैसी दिसे।' –ज्ञा ६.२५३. 'कनकासवें जैसी कांति' –एरुस्व १.१६. २ देह; काया; 'काय सांगों सुख झालें आलिंगनें। निवाली दर्शनें कांति माझी।' –तुगा ६१७. 'पेटली सकळ कांति रोमावळी। नावरे हे होळी दहन जालें।' –तुगा ६५०. [सं. कम्=शोभणें–कांति] ०**करणें**–(बे.) शंकराच्या पिंडीच्या वर तजेलदार गिलावा करणें. ०**पुंज**–पु. तेजाचा पुंजका. 'त्यावर कांहीं ठिकाणीं कांतिपुंज असावेत असा भास होतो.' –सूर्यावरील ठिपके. आगरकर. ०**मान**–वि. ज्याचे अंगीं तेज, पाणी आहे असा; तेजस्वी; सतेज; सुंदर; तेजःपुंज. [सं.]

कांति—स्त्री. सर्पाची कांत; मेंग. [सं. कृत्ति]

कांतिऊ—वि. (महानुभावी) रेखीव; कोरीव; कांतीव. 'वैराग्याचा कांतिउ।' –भाए २५१. [कातणें]

का(कां)तिया, का(कां)ती—पुस्त्री. माडाची पोय काप-ण्याचें, ताडी काढण्याचें एक हत्यार; कोयता. 'आपुलिया पुढिलांचिया। अंगीं घालुनि कातिया।' –ज्ञा १७.९६. 'लोहागेळा त्रिशूळ कोयते कातिया।' –ह २२.३५. 'नातरी कंठीं घालिती कांती।' –कथा ३.१०.७८. [कातणें; सीगन. कों. गो. कु. कात का. कत्ते]

कातोखुमारी—स्त्री. ज्या माडापासून माडी काढतात त्या माडावरील सरकारी कर.

का(कां)तीण—स्त्री. कांतण अर्थ २ पहा.

का(कां)तीव—वि. १ चरकावर तयार केलेलें; चरकीं धरलेलें; पैलू पाडलेलें. २ लहानसें पण सुबक बनविलेलें; नक्षीदार; उठावदार [कातणें.] ०**कोरींव**–वि. कातविलेलें व कोरविलेलें; सुबक; सुंदर; सुरेख डौलाचें.

कातुकडी—स्त्री. (राजा.) काथ्याचा तुकडा, दोरी; काथकडी पहा.

कातें—न. (का.) काथ्या; सुंभ.

कातोर—पु. १ कातकरी पहा. २ तीरकमठयासारखें कठिण लाकडाचें, कातड्यानें मढविलेलें, तीन फूट लांबीचें हत्यार. हें गरगर फिरवून मारलें असतां घुमारें ५० यार्ड लांब जातें आणि चांगला मार बसला तर मोठी दुखापत होते. –गुजा ६९.

कांतौणा—पु. (गो.) पिंजारी; कांतणारा. [सं. कृत्]

कात्या—स्त्री. (अव.) (राजा.) कृत्तिका नक्षत्र. [कृत्तिका –कृत्तिआ–कात्या] ०**चा पाऊस**–पु. कृत्तिका नक्षत्राचा पाऊस.

कात्यातन—न. ठार मारणें; बडविणें; नुकसान करणें. (क्रि० करणें; काढणें).

कात्यायन—पु. एक ऋषि व सूत्रकार. ०**सूत्र**–न. यजुर्वेदाच्या एका शाखेचें सूत्र.

कात्यायन वीणा—स्त्री. सारमंडळ शब्द पहा, एक वीणा, वाद्य.

कात्यायनी—स्त्री. पार्वती.

कात्री—कातरी पहा. **कात्रींत धरणें**–अडचणींत आणणें.

कात्रुड—न. (कु.) भाजीपाला व मिरची यांचें लहान फळ.

कात्रो—पु. (गो.) सुपारीचा घड.

काथ-करी-गोळी-बोळ-वडी-काथोडी—कात मध्ये पहा.

काथकडी—स्त्री. काथ्याची काडी. [काथ्या+काडी]

काथंबणें—अक्रि. (राजा.) आंबा बाठ धरण्याच्या दशेस येणें.

काथंबा—पु. केळीचा मोठा कोंब (केळीला चिटकून उगवलेला किंवा निराळा लावलेला मोना;). मोना; पासंबा.

काथवट—काटवट पहा.

काथा-थ्या—१ नारळाच्या सोडण्याच्या आंतील तंतुमय आवरणाचा जाड थर. हा भिजवून, कुटून त्याच्या दोऱ्या वळतात, त्यास सुंभ म्हणतात. २ याचा केलेला दोर, दोरी. ३ सुरमाडावरील तंतु. ४ आंब्याच्या कोईस, बाठीस असलेलें केशर. ०**कुटणें**–(ल.) ज्यापासून कांहीं फलनिष्पत्ति नाहीं असा पोकळ वादविवाद करणें. [काथ्या+कुटणें] ०**कूट-थ्या-थे-कूट**–स्त्री. रिकामी चर्चा; निरर्थक वाद. (क्रि० करणें). 'असल्या शास्त्रार्थांत पडून विनाकारण काथ्याकूट तरी करण्याची काय जरूर आहे.' –टि ४.११८. ०**मेथा**–पु. आजीबाईच्या बटव्यांतील औषधें, वनस्पती. –**थ्याचा नमदा**–पु. दरवाज्यांत पाय पुसण्यासाठी

ठेवलेलें काथ्याचें जाड तरट. 'रस्त्यास लागून काथ्याचे दोन नमदे टाकण्यांत यावे.' –ऐरापुप्र (बडोदें) ३.१८३.

काथी—स्त्री. कढी; कालवण. 'काथी ताथी सार्थी चरुसह।' –अमृतसुदा ३४. [सं. कथ्]

काथोट—स्त्री. १ कायवट. काटवट पहा. २ (कों.) गुरांना होणारा एक प्रकारचा रोग. 'आमच्या म्हशीला काथोट झाली होती म्हणून तिला डागावी लागली.'

काथोट—वि. (गो.) सोलतां न येणारें; बराच काथ्या असलेलें. (फळ, सुपारी). [काथ्या]

काथोडी—पु. कातकरी.

काथ्या—स्त्री. अव. (राजा.) कृत्तिका नक्षत्र.

काथ्ल—स्त्री. (गो.) कढई; काहील. [सं. कटाह]

कांदपणें—अक्रि. कानपणें पहा.

कादंबरी—स्त्री. १ कल्पित कथा; सुंदर, मनोरंजक, अद्भुत, रसमय गोष्ट. २ बाणभट्टानें रचलेली एक गोष्ट. [बाणभट्टाच्या कादंबरी नांवाच्या ग्रंथावरून]

कादय—पु. (गो.) तुरुंग. [पो. काडेयो]

कादराई—स्त्री. एक प्रकारचें कापड. –मुंव्या १२३.

कांदरी—स्त्री. (राजा.) कांथास जे लहान लहान कांदे फुटतात ते प्रत्येकीं. [सं. कंद]

कांदल-ळ—पु. (राजा.) खाडीच्या कांठीं किंवा खाऱ्या पाण्याच्या दलदलींत (खाजणांत) उत्पन्न होणारें एक झाड. हीं झाडें खाजणाच्या बांधाची माती वाहून जाऊं नये म्हणून लावतात. 'शेत बुडून कांदळाचें रुख झालें.'

कांदल्या—न. (हेट.) कमळाचें कंद.

कादव मासा—पु. हा मासा मरळमाशाप्रमाणें दिसतो. दोहोंत मुख्य भेद तोंडाच्या आकृतींत असतो. कादव्याचें तोंड त्याच्या आकृतीच्या मानानें मोठें व रुंदट असतें. मरळाचें तोंड लांबट असतें. –मरळ माशांच्या पैदासी संबंधीं नियम ४ (बडोदें).

कांदा—पु. १ एक कंद; पलांडु; याचा रोपा हात-सव्वा हात लांब व सरळ असून याचीं पातीं नळीसारखीं असतात. बीं काळें व बंदुकीच्या दारूप्रमाणें असतें. पात्यांच्या मधून जो देठ निघतो त्यास नळा म्हणतात. कांद्याच्या पांढरा व तांबडा अशा दोन जाती आहेत. पांढरा औषधी आहे. हा गुणानें लसुणीप्रमाणें कफकारक, थंड व रसकाळीं व पाककाळीं गोड असल्यानें वाताचा नाश करतो. –भोर १.५७. कांदा पौष्टिक आहे. –वगु २२. २ मुख्य भाग; गड्डा (कोबी, नवलकोल इ० चा; सामान्यतः कोणत्याहि पदार्थाचा महत्त्वाचा किंवा मूळ भाग). ३ (ल.) जिभेचा मूळ भाग. ४ मधाच्या पोळ्यांतील मध असलेला भाग. ५ सरकारी जागेंत लावलेल्या कांद्यावरील कर. ६ (उप.) मूर्ख. 'शहाण्याचा कांदा.' 'अकलेचा कांदा.' ७ वनगाईचा केसांसह शेपटीचा भाग. **म्ह०** कांदा आणि मदाचा बांधा; कांद्याला भिस्मिल्ला कशाला? 'तुमच्यासारख्या धुंधुरट्यांना ते (ईप्रज सरकार) फुंकारानें उडवून देतील. कांद्याला... कशाला?' –खरादे २०६. [सं. कंद]

कादाचित्क—वि. १ कदाचित् जें होणार तें; असंभाव्य तरी शक्य. २ प्रसंगोपात्त येणारें; कारणप्रसंगानें, क्वचित् उपस्थित होणारें. [सं. कदाचित्+क]

कांदाळ—न. (कों. कोळी) कोळ्यांचें मासे पागण्याचें एक जाळें.

कादिंबिनी—स्त्री. मेघमाला; अभ्रे. 'तापोपशम कादिंबिनी।' –ऋ १. [सं. कादंबिनी]

काद्रव—पु. कद्रुपुत्र; पाताळलोकांतील सर्प, नाग. 'कीं काद्रवें देखतां अरुणानुज... येवोनियां झडपीं जैसा।' [सं. काद्रवेय]

काधया—अ. काय? कसें. 'तेयें काधया अपघातें' –गीता २.१४२.

कांधान—वि. (ना. व.) अति आंबट. **०णें**–अति आंबट होणें; कळकणें; (दहीं इ०) 'दहीं कांधानलें मिळालें.'

कान—पु. १ श्रोत्र; कर्णेंद्रिय; श्रवणेंद्रिय; शरीराच्या ज्या अवयवामुळें आपणास ऐकूं येतें तो अवयव. २ (ल.) कढई, मोदकपात्र किंवा या सारख्या भांड्याच्या कडचा; सामान्यतः कानाच्या आकाराची वस्तु. ३ दागिने घालण्यासाठीं कानाला पाडलेलें भोंक. 'माझा भिकबाळीचा कान बुजला आहे.' ४ बंदुकीचा काना किंवा रंजक; दारू पेटविण्याचें छिद्र; बत्ती लावावयाची जागा. [सं. कर्ण] (वाप्र.) **०उघडणें**–केलेल्या मूर्खपणाची कृत्यें समजणें (स्वतःची व दुसऱ्याची); डोळे उघडणें; एखादी गोष्ट स्पष्ट करून दाखविणें; समजूत पटविणें; **०उघडून सांगणें**–बजावून सांगणें; स्पष्ट सूचना देणें. **०उपटणें, धरणें, पिळणें, पिरगळणें**–शिक्षा करण्यासाठीं कान धरून पिळविटणें, ओढणें; शिस्त लावणें. 'त्याला जिकून जिवंत पकडून त्याचे कान उपटल्याशिवाय आम्ही राहणार नाहीं.' –बाय २.२. **०कापणें–कापून हातावर देणें**–वरचढ करणें; कडी करणें; वर ताण करणें; मात करणें; फसविणें. 'दुकानदारानें माझा चांगला कान कापला' **०किटणें**–एखादी गोष्ट पुन्हां पुन्हां ऐकविण्यामुळें वीट, कंटाळा येणें. **०खडा-डी लावणें**–सूचना देणें; मनावर ठसेल असें सांगणें. **०खडी लावून घेणें**–स्वतःला शिक्षा लावून घेऊन चुकी सुधारणें. **०झाडणें**–१ स्पष्ट नाकारणें; ऐकून न घेणें; कानावर येऊं न देणें; निषेध करणें. 'स्वर्गा जाणें हें सांडी। भवविषयीं कान झाडी।' –ज्ञा १३.६१७. २ उपदेश झिडकारणें, न मानणें. **०टवकारून, पसरून, ऐकणें**–लक्ष देणें; पूर्ण लक्ष देऊन

ऐकणें. 'भाषण करणार म्हटल्याबरोबर त्यांनीं कान टवकारून पहावें.'–के ३१.५.३०. **०टोचणें**–१ कानाला भोंक पाडणें. २ (ल.) फूस देणें; चिथावणें; चढविणें. ३ कानउघडणी करणें; झाडणें; ताशेरा झाडणें; खरडपट्टी काढणें. (**सोनारानें**) **कान टोचणें**–तिऱ्हाइतानें कानउघडणी करणें. **०देणें**–लक्ष देणें. 'श्रीरामराजा देतसे कान।' –दावि ७८०. **०धरणें**–शासन करणें. **०धरून-पिळून घेणें**–वादाची वस्तु बळजबरीनें कबज्यांत, ताब्यांत घेणें. **०निघणें-थंड होणें**–बरें वाटणें; आवडती किंवा जिज्ञासेची उत्कंठा लागलेली अशी गोष्ट ऐकून संतोष होणें **०पसरून ऐकणें**–पूर्ण लक्ष देऊन ऐकणें (पण कृति न करणें). **०पाडणें**–१ धैर्य सुटणें; निराश होणें. २ आपल्या तांठ्याला आळा बसलासें वाटणें; गरीब बनणें; माघार घेणें. ३ ऐकूं येत नाहीं असें सोंग करणें; काणा डोळा करणें. 'कान पाडुनि बसे धरणीसी।' –किंगवि २.२०. 'मी ह्याविषयीं कान पाडणार नाहीं.' –बाल २.१५. **०पिळून घेणें**–स्वत:चा मूर्खपणा कळून आल्यामुळें व त्याचे दुष्परिणाम भोगल्यानंतर पुन्हां तसें न वागण्याबद्दल दृढ निश्चय करणें. **०पूर ओस करून बसणें**–बहिऱ्याचें सोंग घेणें; ऐकूं येत नाहीं असें भासविणें. **०पूर ओस पडणें**–बहिरा होणें. **०फुंकणें**–१ कानांत मंत्र सांगणें; उपदेश देणें. २ चुगली करणें; मनांत भरविणें; चाहाडी, लावालावी करणें. **०फुटणें**–बहिरा होणें (पूर्ण, अर्धवट). **०भरणें-भारणें**–चहाडथा करणें; कानांत सांगणें; चिथविणें. **–०येणें**–ऐकण्याची शक्ति येणें. **०लांबणें**–१ वयानें जसजसें मोठें होत जाईल तशतशी अक्कल कमी होत जाणें (लहान मुलाविषयीं). २ (गाढवाचे कान लांब असतात यावरून) गाढव होणें. **०होणें**–लक्ष देणें; सावध होणें; सावधपणानें वागणें. **कानाआड-मागें-घरून-ऊन जाणें**–उपदेश, शिक्षा, ताकीद वगैरेचा एखाद्यावर उपयोग न होणें. **–चा चावा घेणें**–खोट्या नाट्या गोष्टी सांगून दुसऱ्याचें मन कलुषित करणें. **–चे कानघले होणें**–कान वांकडे, (कानोल्याप्रमाणें) पिळवटलेले होणें. **–चे किडे झाडणें**–१ परनिंदा श्रवणदोषापासुन मुक्त करणें; किल्मिष घालविणें; मनांतील गैरसमज, अढी दूर करणें. २ (कानांत किड्यांचा प्रवेश झाला आहे अशा समजुतीनें) बरोबर समजूत पाडणें; हितवाद सांगणें; चांगली खरडपट्टी काढणें. **–त खुंटया मारणें**–१ बहिरें होणें. २ पूर्वीचा एक शिक्षेचा प्रकार. 'कानीं खुंटया आदळिती। अपानीं मेखा मारिती।' –दा ३.७.७३. **–त जपणें**–कानांत पुटपुटणें; गुप्त रीतीनें बोलणें, सुचविणें; **कानमंत्र** देणें; चहाडी करणें. **–त तुळशी घालणें-घालून बसणें**–१ ऐकूं येत नाहीं असें भासविणें, सोंग करणें. २ मायापाश झुगारून दिल्याचा आविर्भाव आणणें; उपरति झाल्याचें दाखविणें; विरक्तीचें सोंग आणणें. **–त तेल घालून निजणें**–अतिशय दुर्लक्ष करणें; पूर्णपणें उदासीन असणें. **–त भरणें**–चुगल्या करणें; एखाद्याचें वाईट करण्याविषयीं भरी भरणें. **–त मेंड घालणें**–(व.) बहिरेपणाचें सोंग घेणें; न ऐकणें **–त वारें भरणें**–उच्छृंखल होणें; एखाद्या गोष्टीचा पूर्ण विचार न करतां हुरळून जाणें. 'ही गरीब गाय कानांत वारें भरल्यामुळें उधळली आणि सैरावैरा धांवून अखेर चिखलांत रुतली' –सु ६१. **(या) कानानें ऐकणें-त्या कानानें-सोडणें**–मनांत मुळींच न ठेवणें, राखणें. **–पाठीमागें टाकणें**–दुर्लक्ष करणें 'फुकटच्या उपदेशाप्रमाणें त्यांचा निरोप कानापाठीमागें टाकणार नसाल तर सांगतों' –सु १०५. **–बाहेर-वेगळा करणें**–दुर्लक्ष करणें; उदासीन राहणें. **–मध्ये-त-मंत्र सांगणें, फुकणें**–चिथविणें; चेतविणें. **–मागें टाकणें**–१ उपदेश शिकवण, सूचना इ० कडे लक्ष न देणें. २ दुर्लक्ष करणें. 'शत्रूचा समाचार अगोदर घेतला पाहिजे. घरचीं भांडणें तूर्त कानामागें टाकलीं पाहिजेत.' –बाजीराव. **–लाखडा लावणें**–मूर्खपणाचें किंवा दुष्टपणाचें काम पुन्हां न करण्याविषयीं निश्चय करणें (कानाच्या पाळीच्या मागें खडा लावून दाबण्याचा पूर्वी शिक्षेचा एक प्रकार होता). **–वर (उजव्या डाव्या) पडणें-निजणें-लेटणें**–एका कुशीकर (डाव्या-उजव्या) निजणें. **–वर मान ठेवणें**–आळशीपणानें किंवा निष्काळजीपणानें बसणें. **–वर येणें**–ऐकणें; श्रुत होणें; 'येणार पुढें पुष्कळ आलें आतांचि काय काना तें।' –मोभीष्म ७.६. **–वर हात ठेवणें-त बोटें घालणें, कान-झांकणें**–१ एखादी गोष्ट मुळींच माहीत नाहीं अगर तींत आपला बिलकुल संबंध नाहीं असें दाखविणें; नाकारणें; नाकबूल जाणें. २ एखादी मनाविरुद्ध गोष्ट ऐकवत नाहीं म्हणून कानांत बोटें घालणें. 'तो हा वधिला केलें कर्म अमित साधु घातसें मोठें। खोटें हें म्हणतिल शिव शिव कर्णीं घालतील बुध बोटें.।'–मोस्त्री ४.३६. **–वरून जाणें**–१ कान चाटून जाणें; २ (ल.) थोडासा तोटा होणें. ३ ऐकलेलें असणें. **–शीं कान लावणें**–गुप्त रीतीनें मिळून मसलत, खलबत करणें. **–शीं लागणें, कानीं लागणें**–कानांत सांगणें; हळूच बोलणें; गुप्त रीतीनें सुचविणें **–स कोन न कळूं-न लागूं देणें**–अतिशय गुप्तपणा राखणें. 'आणि झाल्यावर सुद्धां कानास कोन लागूं नये ही तर खबरदारी घेतलीच पाहिजे.' –सु १०.८. **–स दृष्टे-वडे बसणें**–बहिरा होणें. **कानीं कपाळीं रडणें–ओरडणें**–सदोदित, नेहमीं बुद्धिवाद करीत असणें; नेहमीं, पुन्हां पुन्हा सांगणें. **–नीं कोचीं बसणें-लागणें**–(चोरून ऐकण्यासाठीं) कानाकोपऱ्यांत, अडचणींत बसणें, कानोसा घेणें. **–नीं मनीं नसणें**–एखाद्याची कल्पना नसणें; कधींच न ऐकलेलें, मनांत नसलेलें ऐकणें. **–नीं सात बाळ्या असणें**–(लहान मुलांच्या भाषेत) (ऐकावयाचेंच

नाहीं असा निश्चय दाखवावयाचा असतां) ह्या कानाचें ह्या कानास कळूं न देणें; अतिशय गुप्तपणा ठेवणें. **म्ह०** (व.) १ कानांची कोन झाली नाहीं=कुणालाहि कळलें नाहीं. २ कानामागून आलें महालिंग (तिखट) झालें; =मागून आलेला किंवा वयानें लहान असा माणूस जेव्हां वरचढ होतो तेव्हां योजतात. ३ मुठया कानाची पण अभिमानाची=अंगांत दोष असून अभिमानयुक्त. ४ (गो.) कान मान हालवप=एखादी गोष्ट करण्यासाठीं उत्सुकता दाखविणें. ५ (गो.) कान फुंक म्हळयार व्हान फुंकता=एक सांगितल्यावर दुसरेंच करणें. ६ (गो.) कानाचा पोळा आनी पोटाची चिरी वोढता तितली वाढता=संबंधीनें संबंध वाढते. ७ कान आणि डोळे यांच्यांत चार बोटांचें अंतर=पाहिलेलें व ऐकिलेलें यांत केव्हां केव्हां अंतर असतें, ऐकलेलें तितकें विश्वसनीय नसतें, पुढें खोटें ठरण्याचा संभव असतो. ८ कानामागून आलें शिंगट ते झालें अति तिखट–(कानाच्या नंतर शिंगें उद्भवतात म्हणून) एखादा उपटसुंभ मागून येऊन एकाएकीं मोठया पदाला चढला व पहिल्या लोकांना शिकवूं लागला–त्रास देऊं लागला तर त्यास म्हणतात. यावरून कानामागून येणें व तिखट होणें. सामाशब्द– **०आढा**–पु. (बैलगाडी) गाडी उतरणीवर असतां किंवा बैल बेफाम असला तर तो ताब्यांत रहावा म्हणून कासऱ्यानें बैलाच्या कानाला टाकलेला वेढा. **०कडी**–स्त्री. (लोखंडी काम) कानाच्या आकाराचा पत्रा कापून त्याला जें एक लांबट तोंड ठेवतात तें वळवून त्यांत बसविलेली कडी. अशा दोन बाजूस दोन कड्या असतात. **०कवडा**–पु. कानखवडा पहा. **०कळाशी–सी**–स्त्री. (घोडा, बैल इ० च्या) कानाची व डोक्याची ठेवण, आकार. 'अस्सल जरदी घोडी भिवरथडी वर बसली चांदणी। कानकळाशीं फेरफटक्यामध्यें कोणी तरी दिली आंदणी।'–पला ४.२१. **०कात्रा**–पु. (गो.) पाण्यावर तरंगणारा एक लहान मासा. –मसाप ३.३.१५७ –वि. कान कापलेला;कानफाटया. **०कारी**–स्त्री.(विणकाम) ताणा ताणून धरणारी एक धनुकली. **०किरळी–कीड–कुरकुटी–कुरटी**–स्त्री. (कों.) कानास होणारा एक रोग; कानाची कीड. **०कुडें**–न. कानांतील कुडें; एक अलंकार. [कर्ण+कुंडल; कण्णकुइल–कानकुडें.] **०कुलाय**–स्त्री. (गो.) कान झाकेपर्यंतचा डोक्यावर घालण्याचा निमुळता टोप. [सं. कर्ण+कुलाय=घर, झांकण] **०कूण**–स्त्री. १ गुणगुण; बाजारगप्प. २ कुजबूज; कुरकूर. ३ तक्रार; कां कूं; अनिश्चित बतेन. [कान+कुणकुण] **०कूस**–अनिश्चितता; कां कूं; चालढकल; कानकूण अर्थ ३ पहा. [कान+ध्व. कुस्] **०केस**–पुअव. (नुकत्याच विधवा झालेल्या स्त्रीचें) केशवपन करणें व अलंकार काढून घेणें. (क्रि० करणें.) **०कोंडा**–वि. १ (आश्रयदाता, उपकारकर्ता, ज्याला आपलीं अडीपिडीं, दोष माहीत आहेत अशा माणसासमोर) लज्जित; मुग्ध; खजिल; कुंठित; ओशाळा; भयचकित झालेला; मिंधा. 'गुरुज्ञानाचें अंजन नसतां कानकोंडा प्रपंच फोल।' –अमृत १९. 'ईश्वरी कानकोंडा जाला। कुटुंबकाबाडी।' –दा ३.४.४७. 'मी कानकोंडा जाहलों दुमैती।' –भवि ५५.१०६. २ ऐकूं येत नाहीं असें ढोंग करणारा. –पु. दुर्लक्ष्य; ऐकूं येत नसल्याचें सोंग. 'तुजविषयीं कानकोंडा करुं काय मी आतां।' –दावि ८२. [कान+कोंडणें] **०कोंडा–पु. कानांतील भुसकट, मळ. ०कोंडी–गाडा,कानागाडा**–स्त्रीपु. बहिरेपणाचें सोंग घेणें; दुर्लक्ष करणें; कांकूं करणें; अळंटळं करणें; ऐकण्या न ऐकण्याबद्दल अनिश्चितता. (क्रि० करणें). [कान+कोंडा] **०कोंडा–डी–वाटणें**–शरमिंदे होणें, वाटणें. **०कोंडें**–वि. लाजिरवाणें. कानकोंडा–डी पहा. 'ऐसी परस्त्रीची संगत। घडतां जनांत कानकोंडें।' –महिकथा २८.१००. –न. १ दुर्लक्ष; 'केली नाही चिंता नामीं कानकोंडें। अंती कोण्या तोंडें जात असे।' –रामदास (नवनीत पृ. १५२.) २ भिडस्तपणा. 'कानकोंडें साहो नये।' –दा १४.१.६ **०कोपरा**–पु. वेडावांकडा भाग; कान किंवा कोपरा; पुढें आलेला भाग(शेत, घन पदार्थ इ०चा) चतुरस्र, वर्तुल इ०. आकारविरहित जे क्षेत्रादिकांचे अंश असतात तो. **०कोरणी–र्णे**–कानांतील मळ काढण्याची, पुढें वाटी असलेली धातूची लहानशी काडी; कानमळ काढण्याचें हत्यार. **०खडी**–स्त्री. सूचना; ताकीद. 'मी त्यास कानखडी लावली.' **०खवडा**–पु. वासरांच्या कानाला होणारा एक रोग; तो नाहींसा होण्यासाठीं वासराच्या कानांत एक कथलाची बाळी घालतात. **०खीळ**–स्त्री.१ (बैलगाडी) चाक पडूं नये किंवा जागेवरून मागेंपुढें सरकूं नये म्हणून आंसास घातलेली कडी, कुणी. २ (औत) जेयें दोन शिवळा जोखडास असतात त्यांतील बाहेरील शिवळ. **०खोरणें–(ना.)** कानकोरणी–र्णे पहा. **०गच्ची**–स्त्री. १ पट्टा अगर वस्त्र यांनीं कान झांकणें, बांधणें. (क्रि० करणें; बांधणें). २ खोटया, अनिष्ट गोष्टी ऐकूं नये म्हणून कानावर हात ठेवणें; आपल्या कानीं सातबाळ्या करणें. (क्रि० करणें). [कान+गच्च] **०गोष्ट**–स्त्री. कानांत सांगितलेली गोष्ट; रहस्य; कर्णमैथुन. **०घसणी**–स्त्री. १ कानगोष्ट पहा. २ कुजबूज; आळ. 'जाणोनि कान घसणी हरि चालियेला'–अकक. कृष्ण कौतुक ५४. **०घुशी–घुसणी**–स्त्री. (गोटयांचा खेळ) हाताच्या बोटांनीं आपला कान धरून त्याच हाताच्या कोपरानें गोटी उडविण्याचा प्रकार. **०घोण**–स्त्री. गोम नांवाचा सरपणारा किडा; घोण; कर्णजूलिका; कर्णकोटी. हा कानांत शिरतो **०चा कोन**–पु. क्रिवि. कानाच्या कोपऱ्यांत; अगदीं जवळ; कोठेंहि; किंचित् (ऐकूं न येणें, परिस्फुटता न करणें). 'म्या त्याची लबाडी कानाच्याकोनाला कळूं दिली नाहीं.' 'कानाचाकोन समजला नाहीं.' **०चिट्ट**–पु. खेळांतील समाईक गडी; राहाटया. **०चिपी**–स्त्री. १ कानाचा वरचा भाग पिरगळणें;

कानपिचकी. (शाळेंतील पंतोजीच्या शिक्षेचा अथवा मुलांच्या खेळांतील शिक्षेचा एक प्रकार). (क्रि० घेणें). २ खेळांत लबाडी केल्याबद्दल शिक्षा म्हणून स्वतःचा कान पिरगळून घेणें. (क्रि० घालणें.) **०चिबळी**–(कों.) कानचिपी पहा. (क्रि० घेणें. **०चोर**–वि. (गो.) ऐकून न ऐकलेसें करणारा. **०टाळ-ठाळ-ळी-ळें-ठळ्या-ठाळ्या-टाळीं-ळें**–(अव.) (बसणें क्रियापदास जोडून) बधिर होणें; दडे बसणें; कानाचे पडदे बंद होणें. ऐकूं न येणें (थंडी, वारा, मोठा आवाज इ. मुळें). –मालि ३.१७ २ (उघडणें क्रियापदाला जोडून) बहिरेपणा जाणें; ऐकूं येऊं लागणें. ३ समजण्याला, शिकविण्याला योग्य होणें; डोळे उघडणें; ताळ्यावर येणें. ४ ताळ्यावर आणणें. [कर्ण+स्थळ] **०टोपी**–पु. कान, कपाळ झांकणारी टोपी; माकडटोपी; कानपट्टीची टोपी. **०पट**–स्त्री. (व.) कानशील; कानाजवळील गाल व कपाळ यांमधील भाग. **०पट्टी**–स्त्री. १ कानगच्ची अर्थ १ पहा. कान झांकतील अशा तऱ्हेनें डोक्याला गुंडाळणें. २ कानपट; कान–शील. 'भाल्याची जखम कानपट्टीस लागली.' –भाब ५७. **०पिसा**–वि. (कों.) कानाचा हलका; भोळसर; खोटया गोष्टींवर विश्वास ठेवणारा. **०पिळा-ळथा**–पु. (लग्नांत) नवऱ्यामुलीचा भाऊ. नवरीच्या हातांत लाजाहोमाच्या वेळेस लाह्या घालतो व नवरामुलगा त्याचा कान पिळतो, त्याबद्दल त्याला नवऱ्यामुलाकडून कानपिळथाचें अगर कानपिळणीचें पागोटें मिळतें तो मान. **०फट-ड**–स्त्रीन. कानशील; गालफड; कानाच्या पुढील गालाचा प्रदेश (विशेषतः थोबाडींत मारतांना ह्या शब्दाचा उपयोग करतात. जसें–मी तुझें कानफड सुजवीन, फोडीन; कानफडांत मारीन. [सं. कर्ण+फलक] **०फटा-फाटा-टी-टथा-डी**–पु. नाथपंथ व त्या पंथांतील गोसावी. ह्यांची परंपरा आदिनाथापासून आहे. यांच्यांत प्रख्यात असे नऊ नाथ होऊन गेले. हे शैवमतानुयायी आहेत. हे कानाच्या पाळीस मोठें भोंक पाडून त्यांत काचेच्या किंवा लाकडाच्या गोल चकत्या घालतात. ह्यांच्या गळ्यांत शिंगी, पुंगी असते. हे किनरीवर गोपीचंद राजाची गाणीं म्हणतात. 'ब्याघ्रांबर गजचर्मांबर परिधान शुद्ध कानफटा।' –प्रला ५. [कान+फाट] **कानफटा (इ.) नांव पडणें**–कि. दुर्लौकिक होणें; नांव बद्दू होणें. कानफाटयांच्या वर्तनाबद्दल लोक साशंक असतात त्यावरून लोकांत एकदां शंका उत्पन्न झाली कीं ती जात नाहीं. उदा० म्ह० एकदां कानफाट्या नांव पडलें म्हणजे जन्मभर तें तसेंच राहातें, त्यावरून एकदां दुष्कृत्य केलें म्हणजे त्याचा कलंक जन्मभर राहतो. **०फुटी**–स्त्री. १ एक औषधी वेल. २ (हेट.) कडधान्यांतील एका गवतावें बीं. **०फुशी**–स्त्री. कानगोष्ट; कानांत पुटपुटणें; कुज बूज. **०फोडी**–स्त्री. अजगंधा वनस्पति; तिळवळ. **०भेरा-भायरा**–वि. बहिरट. **०मंत्री**–पुस्त्री. कानांत सांगितलेली गोष्ट; गुप्त मसलत. **०वडा**–वि. १ एका कुशीवर, बाजूवर निजलेला; आडवा झालेला. (क्रि० निजणें; पडणें; होणें). 'ना येणेसीं मुख वांकडें। करूनि ठाकाल कानवडे।' –ज्ञा १८.१६९३. 'परि ते कानवडि परांमुख निजेली होती।' –पंच ३.१५. 'कोणी कानवडे निजती –ज्ञा १८.९.७. २ पराङ्मुख. 'दुर दुर जासी निघुन बघुन लगबगुन होसि कां कानवडा।' –प्रला १६२. –पु. दारांचें झांकण, बखाचा आडपडदा. –शर **०वर्डे**–क्रिवि. कानवडा पहा. एका कुशीवर, बाजूवर. 'तिएं धारेवेनि दडवादडें। नावेकु मुखचंद्र कानवर्डे।' –शिशु ७१२. 'नये अळसे मोडूं अंग। कधे कानवडे हुंग।' –तुगा २४१३. **०वसा**–पु. कानोसा; दूरचा शब्द कान देऊन एकाग्रतेनें ऐकण्याची कृति. (क्रि० घेणें; लागणें; लावणें). **०वळ**–पु. कानामागें होणारा एक रोग. **०वळा**–वि. कानवडा पहा. (क्रि० असणें; निजणें; पडणें). –पु. (पशूच्या) डाव्या कानाखालीं दिलेल्या डागाची रेघ. **०वळे**–पुअव. गालावर आलेले कानाच्या बाह्य अंगावरील केंस **कानवा–व्ह–ळा**–पु. कानोसा. (क्रि० घेणें; लावणें). **०विळें**–न. (कु.) कानांतील मळ **०वेणी, कानशीलवेणी**–स्त्री. लहान मुलांच्या कानावरील केसांची घातलेली वेणी. **०वेरी**–क्रिवि. कानापर्यंत; कानाविरी. 'जे अनर्थांचे कानवेरी।' –ज्ञा ९.१८२. **०शिरा**–स्त्रीअव. कानाजवळच्या शिरा. 'कानशिरा दुखतात, धमकतात, उठल्या.' **०शील-सल-सूल, कानाड**–न. १ कानाच्या जवळचा, गाल व कपाळ यांमधील भाग 'कानसुलां भाली। आगें कूट जालीं।' –शिशु ९७०. 'घोर जाहली हातफळी। हाणिताती कानसुली। एकमेकां।' –कथा ५.१७.१४१. 'याच कानसुलीं मारीतसे हाका।' –तुगा १८०५. २ गालफड; चेहऱ्याची एक बाजू; कानठाड; कानफट. [कर्णशिरस्] **०सर**–पु. बैलाच्या कान व शिंगाभोंवतीं बांधावयाची रंगीत सुती दोरी. **०साक्षी**–पु. ऐकींव माहिती सांगणारा साक्षीदार. **काना**–नें आरंभ होणारे सामान्यशब्द–**कानाकोचा**–वि. कानाला कटु, कर्कश, वाईट लागणारें; कर्णकटु (भाषण, इ०) 'आणि कां कानेंकोचें बोले।' –तुगा २७३५. **०कोचा-कोपरा**–१ उंचवटे व भेगा. पृष्ठभागीं विषमता (जागा, वस्तू इ० चीं). २ (ल.) एकूण एक भाग. 'मी घराचा कानाकोपरा शोधला.' [कान+कोपरा, कोचा] ३ पुढें मागें झालेला, भाग; उंचसखल भाग; गट्टू व खड्डा. **कानाकोपऱ्याचें भाषण**–न. गुपचुपीचें भाषण; कुजबूज; गुप्तपणाचें बोलणें; खाजगी, घरगुती बोलणें. **–चा आदळ**–वि. ज्याच्या पोटांत कोणतीहि गोष्ट राहात नाही असा; बहकणारा; बडबड करणारा. **–चा जड**–वि. १ अर्धवट बहिरा; बहिरट. २ (ल.) ज्याला सांगून लवकर समजत नाहीं असा. **–चा टप्पा**–पु. हांकेचें अंतर. **–चा**

तिखट–वि. तीक्ष्ण श्रवणेंद्रियाचा. **–चा पडदा**–पु. ध्वनीचा आघात होऊन नाद उत्पन्न होणारें कानांतील तंबुर; ध्वनिलहरी ज्यावर आदळल्यामुळें कंप उत्पन्न होऊन ऐकूं येतें तो पातळ पापुदरा. **–घर लेखणी ठेवणारा, बाळगणारा**–वि. हुषार; वाकबगार कारकून, लेखक यास म्हणतात. **–चा हलका**–खरी खोटी गोष्ट सांगितली असतां तीवर सहज विश्वास ठेवणारा; चहाडखोराचें खरें मानणारा.

कानं—अ. (व.) काय जणूं; कीं काय ? अनिश्चितार्थी;वाक्यपूरक शब्द. ' तो गेला कानं. ' [सं. किं नु]

कानकली—स्त्री. ज्वारीची एक जात. –शे ८.२२४.

कानगी—स्त्री. १ (गुप्तपणें) कानांत सांगणें; कानगोष्ट; कानमंत्र. (क्रि० करणें; देणें.) 'त्याला कानगी मिळाली वाटतें ?' २ ऐकणें; कानोसा. (क्रि० घेणें; घेत बसणें). [कान]

कानगी—स्त्री. गिरीच्या त्र्यंबकोबाला जी वार्षिक दक्षिणा देतात ती; देवापुढील देणगी; नैवेद्य; काणुक पहा.| ' लोक उदंड कानग्या वाहती । ' –दावि ४५. [का. कणिके, ते. कानुक= देणगी.]

कानगी—स्त्री. (कों.) एक मोठें झाड. याच्या बियांचें तेल काढतात; लांकूड इमारतीला उपयोगी पडतें. [का. कानगु]

कानगो—पु. कुळकर्ण्यासारखा एक ग्रामाधिकारी; जमिनीची, वहिवाटीची, वसुलाची नोंद ठेवून माहिती पुरविणारा; मोजणी करण्यांत व धारा ठरविण्यांत मदत करणारा वतनदार मुलकी अधिकारी; कुळांचे मृत्यु, वारसा, स्थानिक वहिवाटी, सार्वजनिक कायदे इ० सर्व गोष्टींची माहिती हा देत असे. याला सारा माफ असून जमिनी व कांहीं बलुतीं असत. [फा. कानून+ गो=कायदा जाणणारा.]

कानगोई—स्त्री. कानुगोचें काम अगर वतन. ' सर्कार मज्कूर येथील कानगोईचें वतन.' –रा १२.१७४.

कानची—स्त्री. लांब कानाचें वटवाघूळ.

कानट—स्त्री. (कों.) समुद्रांतील एक लहान मासा.

कानटें—न. (कों.) १ फुरशाच्या जातीचें एक विषारी जनावर; लहान साप. ' विंचू सर्प दंश करिती । कानटे फुर्सी । ' –दा १.१०.५५. २ (गो.) जळूच्या जातीचा व जळूप्रमाणेंच रक्त शोषून घेणारा प्राणी, हा पावसाळ्यांत उत्पन्न होतो व पावसाळ्यानंतर मरतो, (गो.) कानटा. काणट, काणीट पहा.

कानडा—पु. एक राग; राग पहा. [हिं. कान्हडा]

कानडा—पु. वहिरा; कानवडा पहा. ' कानडा सखा ना वेडा नेत रोकडा किं पैलेतिरा । ' –केप २८.

कानडा—वि. १ कर्नाटकासंबंधी (भाषा, माणूस इ०). 'याबेगळे नंदुकी, तुरसंदाज, कानडे...यांची संचणी करून हशम मेळविले. ' –मराआ ६. २ (ल.) वेडावांकडा; दुर्बोध. ' हें परिसतां जरी कानडें । तरी जाणपां पार्थ उघडें । ' –ज्ञा ६.१२०. 'ऐसें गुरुगम्य कुवाडें । उमगताचि कानडें । ' –सिसं ६.१५. ३ लबाड. 'तुकयाबंधु स्वामि कानडया कौसाल्या रे ।' –तुगा १४०. [सं. कर्णाट; प्रा. कण्णाड; का. कन्नड.]

कानडी—वि. १ कर्नाटकांतील (भाषा, माणूस, इ०). २ (ल.) अडाणी; चमत्कारिक; रानटी; ओबडधोबड; लोकविरुद्ध; आडदांड (द्रम, चालरीत, भाषण, पोषाख, माणूस इ०). कानडा अर्थ २ पहा. **०अप्पा**–पु. कर्नाटकांत सामान्य माणसाला उद्देशून हा शब्द उच्चारतात. ' आणि मराठीला मज्जाव झालातर एखादा गुजराथी शामळो होईन, कानडी–अप्पा होईन.' –भा ४५.

कानडे—पुअव. सुताच्या चरख्याच्या चातीजवळचे दोन खुंटे.

कानन—न. अरण्य; रान. 'भरत जननि धाडी काननी राघवासी । –वामन (भरतभाव) २. ' महा दुर्धर कानन । देखतां भयभीत होय मन । ' –रावि १.१०६. [सं.]

कानपणें—अक्रि. १ मंद पडणें; मावळणें; कमी होणें (देवी, गोवर इ० च्या पुळ्या, ताप, ज्वर इ०). २ (ल.) घोंटाळणें; लज्जित होणें; लाजणें; ३ हिरमुसणें. [तुल. सं. कनयति=कमी-करणें; हिं. कान=लज्जा.]

कानपा—पु. १ (कों.) काथोट, काळवट किंवा कढई यांचे धरावयाचे कान, कड्या; २ तोफेचा गाडीवर टेकणारा अवयव; तोफेचा काना.

कानमुशी—स्त्री. समुद्रांतील एक मासा.

कानवडणें—अक्रि. एका कुशीवर निजणें; एका अंगावर असणें. ' कानवडोनि अमृत येऊनि पडे सुखा । –माजीं कुंडलिनीच्या । ' –स्वानु ९.५.५३. [कानवडा]

कानवला—पु. एका झाडाचें नांव.

कानवला—पु. १ पोटांत गूळ–साखरेचें पुरण घातलेली मोठी करंजी. ' चिंतामणिगल बालक जो दुर्लभ त्यासि काय कानवला । ' –मो विराट ५.७३. २ (व.) सपीटाची घडीची पोळी; चिरोटा. हा खिरीशीं खातात. ' बहु साधु साधु वदले ते काळाच्या पुढील कानवले । ' –मोशल्य १.५९. ३ (विनोदानें) कान पिरगळा. (क्रि० देणें; घेणें; खाणें; मिळणें). **हातापायांचा कानवला होणें**–हातपाय कानवल्याप्रमाणें आखडून जाणें.

कानवा—पु. कानांतील मळ. [कर्णावर्ती ?]

कानवाथरा—वि. (महानुभावी) ओबडधोबड. ' कर्मे कानवाथरा उपळा । तिही टाकी कीजे निर्वाळा । ' –ज्ञाप्र ४२५.

कानस—स्त्री. १ घासणी; लोखंड घासून साफ करण्याचें, कीस काढण्याचें, धार लावण्याचें एक पोलादी हत्यार; सोनाराच्या धंद्यांत सुमारें पन्नास प्रकारच्या कानसी लागतात (गोल, अर्धगोल, चौकोनी, तिधारी, चपटी, सुरीसारखी, फर्मा इ०). २ करवत. ०घालणें–इशारा देणें; जोरानें सांगणें, बजावणें; बजावून सांगणें. 'त्या गोष्टीची कानस घातली.'

कानसणी—स्त्री. १ कानसण्याची क्रिया. २ करवतण्याची क्रिया. [कानसणें]

कानसणें—उक्रि. १ कानसण्याची क्रिया करणें; कानशीनें घासणें. २ करवतणें; अरकसणें; करवतीनें कापणें, चिरणें.

कानळ—पु. पर्वताचा लांब गेलेला फाटा, ओळ, भाग. [कान+ओळ]

काना—पु. १ बंदुकीची, तोफेची दारू किंवा रंजक शिलगवण्याचें भोंक. 'ठोकिले खिळे कानांत.' –संग्रामगीतें ७३. 'त्या (तोफा) हलविणें शक्य नसल्यानें अपजय झाल्यास त्यांच्या कान्यांत खिळे मारून त्या निरुपयोगी करण्यांत येत.' –हिंक १७८. २ रंजकीचा पेला. [दे. काण=सच्छिद्र; का. कन्न=भोक]

काना—पु. १ तोफेस दोहों अंगाला मुठीनें धरण्याजोगे व गाड्यांत अडकविण्याजोगे जे दोन आडवे खुंट असतात ते. २ अक्षरांची पुढील 'आ' काराची उभी रेघ (।). ३ (कों.) मोरीचें पाणी वगैरे वाहण्यासाठीं पन्हाळीसारखा कोरलेला चिरा किंवा चुन्याची केलेली पन्हाळी. ४ (माण.) नांगराच्या फाळानें पडलेली रेघ, तास. –मसाप २.३ ७९. [सं. कर्ण; कान]

काना—वि. काणा पहा. चकणा; तिरळा. **म्हण०** (व.)' काना कयपति आंधळा हिकमति।' [सं. प्रा. काण; हिं. काना]

काना—पु. कोना; कोपरा. 'मग एरी कानिभां परतली। वैदर्भीतें।' –शिशु १७५.

कानाईचा—पु. समुद्रांतील काळथा, पांढऱ्या माशाचें एक नांव.

कानागाडा—पु. बहिरा असल्याचें सोंग; टंगळ मंगळ; दुर्लक्ष; ऐकलें न ऐकलेसें करण्याची क्रिया. (क्रि० करणें.) [कान+गाडणें]

कानाडी—क्रिवि. कानापर्यंत; आकर्ण; (बाण सोडण्याच्या वेळीं धनुष्याची दोरी कानाच्या टोकापर्यंत ओढतात यावरून). 'द्रौढ कानाडी भरुनी नीजभुजीं।' –उषा १४०४. 'मग कानाडी धरोनि शर। हृदयीं विंधिला निशाचर।' –कथा २.१३ १२२. 'नाराच अर्धेचंद्रकार जाण। कानाडी ओढोनि वर्षतसे।' –जै ४३.२. 'शरासनीं शर लावून। कानाडी ओढून सावज लक्षी। –शिवी २.४१. –स्त्री. कानापर्यंत ओढलेली धनुष्याची दोरी. [कर्ण+नाडी; कण्णनाडी–कानाडी]

कानाडोळा—पु. (प्र.) काणाडोळा. एखाद्या अपराधाकडे दुर्लक्ष्य; मनांत न आणणें. २ डोळ्यांनीं फेकेलेली खूण; गुप्त खूण. (क्रि० करणें). ३ उदासीनपणा; दुर्लक्ष; आळस; ढिलाई.

कानाफॉ-पॉ—पु. (गो.) चौरंग. [पोर्तु. कानापे; तुल० इं. कॅनोपी]

कानामात्रा—स्त्री. (शुद्ध लेखनांत) अक्षरावर द्यावयाचीं काना, मात्रा, बिंदु इ० चिन्हें 'मी आपलेकडून चांगलें लिहिलें परंतु कोठें कानामात्रा गेली असली तर पहा.' [काना+मात्रा]

कानारी—वि. (गो.) कोंकणी.

कानावर्त—पु. घोडयाच्या कानावरील केसांचा भोंवरा. हा अशुभ मानितात. [कान+आवर्त]

कानिट—कानटें पहा.

कानिघला—पु. (गो.) कानांतील मळ.

कानी—१ जोंधळ्यावरील एक रोग. काणी पहा. –शे ९.१३१.

कानी—स्त्री. १ (कों) गुराच्या दाव्याचा फांस; दावें; काढणी; पेंड; (गुरांच्या गळ्यांत अडकविण्याचें अगर त्यालाच जोडलेलें दुसरें); दाव्यांतील दोहोंपैकी एका बाजूची दोरी. 'ऐसें सत्व सुखज्ञानीं। जीवासि लावूनि कानी।' –ज्ञा १४.१५८. २ शिंके व त्याच्या दोऱ्या प्रत्येकी. ४ (क.) लहान दोरी. काणी पहा. [का. कण्णी=दावें, दोर]

कानीन—वि. १ कुमारिकेला लग्नापूर्वी झालेला पुत्र. (उदा० कर्ण, व्यास). २ मुलीचा मुलगा; दौहित्र. [सं.]

कानुगो—कानगो पहा.

कानुड—वि. कानडी पहा. 'भाषा कानुड बोबडी वाणी।' –दावि ३८९.

कानुडा—वि. लबाड; लुच्चा; कपटी. कानडा पहा.

कानुडा—पु. श्रीकृष्ण. 'कानुडयानें माझें मन मोहिलें।' –अमृत १४. [सं. कृष्ण–कन्ह–कानु+डा]

कानुला—पु. (गो.) कानांतील मळ.

कानू—स्त्री. १ (कायदा) अट; नियम; ठराव. **म्हण०** कान द्यावा पण कानू देऊं नये (ही म्हण खंडक-यांत प्रचलित आहे) =कांहीं झालें तरी नवीन कराचें ओझें येऊन पडूं नये म्हणून यत्न करावा. 'त्यांनीं अशी कानू कधीं आपणावर चढवून घेतली नाहीं ते आतां कसें कबूल करितील.' –ख २.६१३. २ हक्क; रीत; वहिवाट. 'कान देऊं पण कानू सोडणार नाहीं.' ३ बाजारांत विक्रीला आलेल्या जिन्नसावरील द्यावयाचा कर, पट्टी. 'इल्ली सालोसाल नजरेची कानू गांवगन्नास बसविली ते दूर करावी.' –ऐटि २.४१. ४ नियम; कायदा. 'पूर्वापार यास माफ असतां हालीं कानू करावयास कायी गरज.' –रा २०.३६०. [अर. कानून;

तुल० इं. कॅनन] •कनात–स्त्री. चाल; रीत; कायदा; हक्क. •काननात–कर, पट्टी वगैरे. 'वेठी, जेठा व बाजे कानू–काननातीचा उपसर्ग न देणें.' –रा २०.३६०. [कानू+काननात (कानूनचें अव.)] •कायदा–पु. (राजशासन) कायदेकानू, नियम, ठराव वगैरेनां समुच्चयानें योजितात. [कानू+कायदा] •जापता–पु. सरकारी कायदेकानूंचें पुस्तक, कोड. कानूंचें पुस्तक. •बाब–स्त्री. एक कर. पूर्वी मराठी मुलुखांत जमीनदार हा कर बसवीत असत.

कानून—न. एक वाद्य. –देहु ३७. (–नाको). [गो. कॉन्नों]

कानेकोचे—पुअव. १ कोन व कोंपरे, खांचा खोंचा. २ (ल.) गूढार्थ; आंतील खुबी; रहस्य; मर्म. (क्रि० लागणें; जाणणें; समजणें; पाहणें). [काना=कोन, कोंपरा+कोंचा=खोचा] •भाषण–न. खोंचदार, बोचणारें, मर्मभेदी, अपमानकारक भाषण.

कानेटी—स्त्री. (कु.) कानांत जाणारा घोणीच्या वर्गांतील एक लहान प्राणी. [कर्ण+कीटक]

कानेदर—पु. कांडेचोर पहा.

कानेर–न्हेर—(कों. कुण. बे.) गडबड; त्रास; कटकट (वाद्यांचा आवाज इ० ची). 'इंजिनाचा फारसा कानेर होत नाहीं. –मोटारटिप्पणी (जगती १.२४.१८.) [सं. क्वणितृ; प्रा. कणिर=आवाज करणारा]

कानोकान–नीं—क्रिवि. कर्णोकर्णी; एकानें ऐकून दुसऱ्यास सांगितलेलें. 'फार चांगली तूं जर माहीत कळलीस कानोकानाला.' –अफला ७६. [कान द्वि.]

कानोड—वि. (व.) वाकडें; एका कानावर; बाजूवर कललेलें; कलतें 'मातीचा कुंभ कानोडा ठेऊन' –ऐरापु(विवाहविधि) ८१.

कानोडणें—कानवडणें पहा.

कानोला–ली—पुस्त्री. (का.) करंजी. कानवला पहा.

कानोसा—पु. आंबोळी; एक पक्वान्न.

कानोसा—पु. कानवसा पहा. (क्रि० घेणें; लागणें).

कान्नूबान्नू—काण्णूबाण्णू पहा.

कान्मांत्रें—वि. (गो.) ऐकलें न ऐकल्यासारखें.

काम्वेत—(गो.) चाकू; सुरी.

कान्सऱ्या–री—स्त्रीअव. कापड विणतेवेळेस विणलेल्या कापडास ताण यावा म्हणून कापडाच्या काठास, लावावयाच्या ज्यांच्या शेवटास टाचण्या ठोंचलेल्या असतात अशा पट्ट्या. काटसरी पहा.

कान्सुरें—न. (गो.) शक्तिहीनाचें भाषण. [कन्हणें+सूर]

कान्हम—स्त्री. शेतजमिनीची एक जात. –शे ७.१५. (–नाको.)

कान्हा—पु. (कों.) पोई(नारळीच्या झापाचा, चोडाचा शेवटचा भाग)चा एक तुकडा, ज्यानें जमीन सारवतात.

कान्हा—पु. १ (काव्य) कृष्ण. 'धरिला पालव न सोडी माझा येणें. कांहीं करितां या नंदाचिया कान्हें.' –तुगा १३४. 'यशोदे बाळ तुझा कान्हा कान्हा. तो रांगत आला तान्हा.' २ (ल.) तानुलें; लहान मूल. [सं. कृष्ण–कण्ह–काण्हा; प्रा. कण्हो]

कान्हा–ळोळा–माऱ्या, कान्हीं, कान्हु–जावता—काना, कानु इ० खालीं पहा.

कान्हाई–डे—स्त्रीन. (लडिवाळपणें) कान्हा २ पहा. 'माझे सावळे कान्हाई.' –ह १८.८९. –नागा १०.

कान्हाडी—कानाडी पहा. 'कान्हाडी वोढिली आकर्णे.' –वेसीस्व १४.१३५.

कान्ही—स्त्री. (व.) गुरें बांधण्याची दोरी; लहान दावें. कानी पहा. [का. कण्णी=दावें, दोर]

कान्हीं—स्त्री. १ ज्वारी, गहूं यावर पडणारा एक रोग. काणी पहा. 'कां कान्हीं पडे पिकासी. धाली शेतासी निदणें.' –एभा १०.५१४. २ (ढोर धंदा) चामड्याचे केंस निघाल्यावर केंस आणि वरील त्वचा यांच्या दरम्यान असलेला एक काळा पदार्थ. (क्रि० काढणें). [सं. कृष्ण=काळा; प्रा. कण्ह]

कान्हू—स्त्री. कायदा. कानू पहा. 'बैसविली यापें कान्हू.' –देप ८२.

कान्हू–न्हो—१ श्रीकृष्ण, कान्हा पहा. 'कामेंगौ कान्हू नायके.' –चौऱ्याशी शिलालेख. 'अवतारी कान्हो जगजेठी.' –दावि ४४२. २ (ल.) लहान मुलगा, तान्हूला. [सं. कृष्ण–कण्ण=कण्ह–काण्ह–कान्ह–कान्हु (ममतादर्शक)]

कान्होबा—पु. १ श्रीकृष्ण. २ कानिफनाथ ऊर्फ कन्होबा; याची समाधी कान्होबांची मढी (जिल्हा नगर) येथें आहे. हिंदू व मुसलमान हिची पूजाअर्चा करतात.

कान्होला—(व.) कानवला पहा.

कान्होला—पु. तान्ह्या मुलाच्या कानांतून निघणारा पांढरा मळ. कानवा, कानविल.

काप—पुअव. १ स्त्रियांच्या कानांतील एक कुड्यासारखा दागिना. म्हण० 'काप गेले भोकें राहिलीं=वैभवाचे दिवस गेल्यावर फक्त त्यांची आठवण देणारीं चिन्हें मात्र दुःखाला कारणीभूत होऊन राहतात यासंबंधी. [का. कोप्पु] •सरपळी–स्त्री. (कु.) हा कानाच्या पाळींत घालावयाचा अलंकार. कुड्याच्या आकाराचा असतो. कुड्यांत व यांत फरक हा कीं याला बाजूस चवलीच्या आकाराची चिंचोक्याप्रमाणें फुगीर सोन्याची टीक व त्याच्या खालच्या बाजूस

मोत्यांचें वाळें (तवकडी) व सोन्याची सरफळी (सांखळी, श्रीमंत लोक सांखळीला हिरे-मोतीं लावतात) असते. सांखळीचा आंकडा कानाच्या बाजूनें गालफडावरून वर केंसांत अडकवितात. ०सांखळी-कानांतील दागिन्याची सांखळी; कापाची सांखळी.

काप—पु. १ फाक; फोड; तुकडा (फळाचा). (क्रि० करणें; पाडणें; पडणें). 'रताळ्याचे-बटाट्याचे काप.' २ (कु.) मिठाईच्या वड्या; मिठाई. [सं. कृप् ? प्रा. कप्प=काटणें] ०खर्डी-स्त्री. पडीत जमीन.

काप—पु. कँप; छावणी; तळ; गोट. 'कापाच्या मैदानांत आल्यावर,...सभा भरली.' -के १०.६.३०. [इं. कँप]

कॉप—न. (गो.) १ पेला. २ चिरिमिरी. [पोर्तु. कॉप्स; इं. कप्]

कांप—पु. १ कापणें; थरकांप; लटपट; थरथर. 'विषयीं कैसा, देहीं शिरतां अयशोभयोत्थ कांप, रतू ?।' -मोभीष्म ७.१७. २ भीति; भय. 'मनांत कांप तिच्या।' -मोवन ४.१४५. [कंप]

कापकडी सुपारी—स्त्री. (राजा.) कोवळ्या सुपारीचे शिजवून वाळविलेले काप. [काप+कडी=कढणें+सुपारी]

कापट-टें—पुन. (व. ना.) खण (चोळीचा); कापडाचा तुकडा, कपटा. 'कापटें स्वस्त भावांत पडलें.' [सं. कर्पट]

कापटणें—उक्रि. (कों.) भादरणें (मेंढ्या, म्हशी) [कापणें]

कापटा—पु. कपटा पहा. तुकडा; फाळका (केळीचें पान, कागद, दगड, लाकूड इ० चा). (वा.प्र.) **कापटे काढणें**-(व.) खूप मारणें, बडवणें. [कापणें]

कापटी—स्त्री. १ (कों.) पातळ, चपटी फोड; फाक; चकती; काचरी (आंबा, टरबूज इ० ची). २ (गो.) ढलपी; तुकडा (लांकडाचा). [काप]

कापट्य—न. १ कपटीपणा; खोटेपणा. २ कपट; छद्म; फसवणूक. 'ऋषीनें कापट्य नेणोन।' [सं.]

कापड—न. १ वस्त्र; कपडा; (गो.) लुगडें. २ (विणकाम) उभार सुतांत आडवण सुत घातलें म्हणजे त्यास कापड म्हणतात. [सं. कर्पट; प्रा. कप्पड; सिं. कपडु; हिं. कपडा] ०आंख-पु. कापडावरील त्याच्या किंमतीची चिट्ठी, आंकडा; आंख अर्थ ३ पहा. ०करी-पु. कापड विकणारा; बजाज; चाटी. ०गज, कापडाचा गज-पु. हा दोन फूट तीन इंचपासून दोन फूट अकरा इंच असतो. ०चोपड-न. (व्यापक) वस्त्रें व इतर पदार्थ (तूप, तेल इ०); कापड व दुसऱ्या किरकोळ वस्तू. [कापड द्वि.] ०चौकी-स्त्री. कापडाचा तंबू. 'राजगिरी मांडविया। सुरंगा कापड चौकिया।' -शिशु ५७२. 'दारवंटा बाह्यप्रदेशीं। कापड चौकी उभविली कैसी।' -कथा ४.१८.२१७. ०ताका-पु. कापडाचा वीस ते चाळीस वारांचा तुकडा. ०निशी-निवीशी-स्त्री. कापडासंबंधीं लिहावयाचें काम; कापडमिसाचें काम, हुद्दा. ०नीस-निवीश-पु. फरासखान्यावरील अधिकारी; राजाच्या वस्त्रागारावरील अधिकारी. ०लेप-पु.मात कापड पहा.

कापडणें—उक्रि. (कों.) कापडानें मढविणें (छत, खांब इ०).

कापडणें—क्रि. (राजा.) कापटणें पहा.

कापडी—पु. गंगेची कावड खांद्यावर घेऊन रामेश्वरास जातां जातां वाटेंत गंगोदक, जपमाळा, जानवीं इत्यादि विकणारे यात्रेकरू; भगवें वस्त्र, भगवी पताका असलेले तीर्थयात्रा करणारे. (सामा.) यात्रेकरू; प्रवासी; मुशाफर. 'जिये मार्गींचा कापडी। महेशु आम्हुनि.' -ज्ञा ६.१५३. 'तुझा कापडी केला जगन्नाथा।' -शिशु ४४४. 'प्रभातकाळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्षी' -होला १६. [सं. कार्पटिक; प्रा.कप्पडिअ=भिक्षुक, भिकारी; दे. कंपड=मुशाफर]

कापडी—वि. कापडाचें बनविलेलें. [कापड]

कापडीक—पु. यात्रेकरू; कापडी पहा. 'मुक्तीचे कापडीक।' -भाए १०३.

कापण-णी—स्त्री. १ (कु. गो.) श्मश्रु; हजामत. २ (विशे.) कापणी; छाटणी (पिकाची); पीक काढणें. 'भातकापणी.' [कापणें]

कापणावळ—स्त्री. कापण्याची, तोडण्याची मजुरी (पीक, शेत, लाकूड इ० ची). [कापणें]

कापणें—उक्रि. १ छाटणें; चिरणें; फोडणें; तोडणें; दोन भाग करणें (धारेच्या शस्त्रानें). २ (ल.) कपात करणें; कमी करणें; काटाकाट करणें (पगार, वर्षासन, रोजमुरा, इ०). ३ (कों.) हजामत करणें. ४ होण्यासारखें, उरकण्यासारखें असणें (काम). 'हें काम मला कापतें.' **म्हण** १ कापलें तरी आपलें =शिक्षा केली तरी आपलेंच मूल (पुढें त्याची काळजी आपणच घेतों). २ कापल्या करंगळीवर मुतणें=(नकारार्थी) केव्हांहि कोणा ज्याहि उपयोगी न पडणें. [सं. कृप्, प्रा. कप्प; सिं. कपणु]

कांपणें—अक्रि. हलणें; कंपायमान होणें; थडथड वाजणें. 'कुरवाळूनि म्हणे गा राजसुता योग्य तूं न कांपाला।' -मोविराट ३.७७. [सं. कंप्]

कापण्या—स्त्री.अव. जनावराच्या काळजामधील मांसापासून तयार केलेला पदार्थ (खजूरासारखा). -गृशि २.११०. [कापणें]

कापता—विक्रिवि. तिरकस; कातरता.

कापरवणी—न. कापराच्या वासाचें पाणी; कापूर घातलेलें पाणी. [सं. कर्पूर+वन=पाणी. कापूर+पाणी]

कांपरा-री-रें—पुस्त्रीन. १ कंप; थडथड; हुडहुडी; कापण्याची विकृति. (क्रि० सुटणें भरणें). 'हृदयी दाटून भय कांपरा।' –नव १०.६५. २ (ल.) भीति; भय. –वि. कांपणारा; कंपायमान; भीरु. 'केला असेल भीमें व्यूह जसा बाल कांपरा भूतें।' –मोभीष्म ६.३. [सं. कंप; म. कांप]

कार्पटिक—पु. तीर्थवासी; यात्रेकरू. कापडी पहा. [सं.]

कापला—काफला पहा.

कापविणें—क्रि. (कापणें प्रयोजक). भिववि णें; दटाविणें; कंप सुटावयास लावणें. 'काळोख कांपवुं दुरी निज तर्जनीनें।' [कंप]

कापशा—वि. १ (कों.) फोफशा; लठ्ठ; स्थूल; ढमाळ्या. 'तो दिसायला कापशा आहे पण ताकद नाहीं.' २ हलका; जलमय; कापसासारखा मऊ (मुळा, भोंपळा, दोडका). [कापूस]

कापशी—स्त्री. कापसाचें झाड; कापूस. कापशीचे प्रकार दोन. –देवकापशी व रानकापशी, बागांत व घरांत लावतात ती देवकापशी व शेतांत लावतात ती रानकापशी. रान कापशीचीं झाडें दोन–तीन हात उंच वाढतात व देवकापशीचीं झाडें पुरुषदीड पुरुष उंच वाढतात. झाडास येणाऱ्या बोंडापासून कापूस उत्पन्न होतो. कापशीच्या बियांचें (सरक्यांचें) तेल काढतात. –शे १०.२४. [सं. कार्पास; प्रा. कप्पास; म. कापूस]

कापसाळें—न. कापसाचें देवास वाहण्याकरितां स्त्रिया तयार करतात तें कुंकुमयुक्त वस्त्र. [कापूस]

कापसाळें—न. (गो.) एक जातीची मासळी.

कापळा, कोपळा—पु. (कों.) उंडीच्या गराचा काप. [काप?]

कापा—वि. कापून खाण्यासारखा, टणक व भरलेला (आंबा फणस, पपई इ० फळ); याच्या उलट बरका(=लिबलिबीत). ०**फणस**–पु. ज्याचे गरे मऊ नसून जो कापून खावा लागतो असा फणस. हा उत्तम समजतात. 'कवन बहुत उदरामधीं भरलें, फणस जसा मोठा कापा.' –होला १८. [कापणें]

कांपाउंड—न. १ आवार; परसूं. २ कुंपण; परडें. [इं.]

कापाड—न. (राजा. कु. कुण.) वस्त्र; लुगडें; कापड पहा. [कापड अप.]

कापालिक—पु. वाममार्गी, शैव–शाक्तपंथी लोक, संप्रदाय (ह्यांच्या हातांत पाणी पिण्यासाठीं नरकपाळ असतें यावरून). –वि. कपाळासंबंधीं; कवटीसंबंधीं [सं.]

कापिल्लणें—वि. (काव्य) कांपणें पहा. घाबरणें; भयानें थरथरणें. 'रंभा कापिल्ली गदगदा।' –मुरंशु. ४३९.

कापी—स्त्री. (कु.) सोललेल्या सोडणाच्या काथ्याच्या बरचें साल,

कॉपी—स्त्री. १ नक्कल; प्रतिलेख. २ इंग्रजी किंत्याचें पुस्तक; यांत इंग्रजी मूळाक्षरें, शब्द इ० वळविण्यासाठीं छापलेले असतात. ३ (छाप.) छापण्याकरितां तयार केलेला लेख; ज्यावरून खिळे जुळवून मुद्रण करावयाचें तें अगदीं अखेरचें हस्तलिखित. (इं.) मॅनुस्क्रिप्ट. ०**राइट**–पु. ग्रंथावरील मालकीहक्क; पुनर्मुद्रणाधिकार; कोणताहि ग्रंथ किंवा ग्रंथरचना ही तयार करून पुढें आणणें किंवा त्या ग्रंथाचा वराचसा भाग संकलित करणें व तो प्रसिद्ध झाला नसल्यास प्रसिद्ध करणें या बाबतींतील जो विशिष्ट आणि एकटयापुरता हक्क असतो तो. –घरचा कायदा १५५. २ ग्रंथमालकीचा कायदा. [इं. कॉपी+राईट=हक्क]

कापींव—वि. १ कापलेला; तोडलेला; छाटलेला. २ कापण्यास योग्य; कापा. [कापणें] ०**सुपारी**–स्त्री. दुधांत शिजवून वाळवलेले सुपारीचे काप, फोडी, तुकडे; कापकडी सुपारी.

कापुसणें—अक्रि. १ (एखादा पदार्थ) बुरशीनें, पांढऱ्या तंतूंनीं आच्छादित होणें; बुरसणें. २ स्थूल, थलथलीत, लठ्ठ होणें. [कापूस]

कापूर—पु. एक पांढऱ्या रंगाचें ज्वालाग्राही सुगंधी द्रव्य. वऱ्याच झाडांपासून व दालचिनी इ० द्रव्यापासून कापूर बनवितात. हिंदुस्थानांत कापूरकेळीपासूनहि कापूर निघतो. 'कापुरें तैं चांगु मालाथिलें।' –शिशु ६२९. [तुल० द्रा. करुप्पु=दालचिनी. (हा शब्द ग्रीकांनीं उचलला होता. काल्डवेल ९३.९४); सं. कर्पूर; प्रा. कप्पूर; हिं. गु. कपूर; ते. कर्पुरामु; मलाया कापूर; खड्–अर. काफूर; लॅ. कॅफोरा; इं. कॅफर] **म्ह०** चोळला कापूर नासतो= अति झालें म्हणजे विघडतें. ०**आरती**–स्त्री. (कर्ना.) कापुरारती. १ तबकांत कापूर पेटवून त्यानें देव, गुरु, ब्राह्मण यांस ओवाळण्याची क्रिया. २ (बडोदा) कापूर पेटविण्याचें पात्र; हलकारती. –ऐरापुप्र २ २. ०**कचरा-री**–पुस्त्री. एक सुवासिक कंद. [सं. कर्पूर+कचूर; हिं. कपूरकचरी.] ०**करदळी**–स्त्री. जिच्या गर्भांत कापूर निघतो अशी कर्दळ, केळ. ०**केळ-ळी**–स्त्री. एक प्रकारची केळ; कापूरकरदळी पहा. –शे ३०.४३. 'वरोनि कापूरकेळीं। भ्रमरांची झांक ऊठिलीं।' –शिशु ६०५. ०**गौरी**–वि. कापरासारखी गोरी; शुभ्र. 'कापुरगौरी चोखट।' –ऋ ८२. ०**चिनी**–स्त्री. चिनी कापूर; एक ओषधी वनस्पति, द्रव्य. [सं. चीनाक+कर्पूर] ०**पोवळें**–न. खोटें, कृत्रिम पोवळें (हें लाखेचें करतात). ०**भेंडी**–स्त्री. एक झाड. ०**मोतीं**–न. खोटें, कृत्रिम मोतीं (हें पाऱ्याचें बनवितात). ०**वणी**–कापरवणी पहा. ०**विडा**–पु. कापूर घालून केलेला पानाचा विडा. 'आरोहण तया झाली, कापूरविडे देती।' –वसा ५३. ०**वेल**–स्त्री. १ नागवेलीचा एक प्रकार. 'कापुरवेलीचीं चोखडीं। उजलिली परीवडीं।' –ऋ ८४. २ एक फुलवेल.

कापूस—पु. १ कापशीच्या फळांतील द्रव्यविशेष, तंतुमय पांढरा पदार्थ; ह्यापासून वस्त्रें करतात. याचे दोन प्रकार आहेत–**आखूड** धाग्याचा (खानदेश, वऱ्हाड) व **लांब** धाग्याचा (सिंध). (क्रि० पिंजणें; कातणें; लोढणें; वठणें). रुई, सावरी, कुडा व इतर कांहीं झाडें यांच्यापासूनहि जो असाच पदार्थ निघतो तो. २ (ल.) अवाळू, चामखीळ वगैरेमधील पांढरें कापसासारखें फुशफुशीत मांस. ४ केळीच्या कालांतील तंतू. ५ तवसें, मोपळा इ० नासल्यामुळें आंत होणारा पांढरा पदार्थ. [सं. कार्पास, प्रा. कप्पास; हिं. गु. कपास] **०वठणें**–लोडणें; कापसांतील सरकी काढणें. **०महाग करणें**–(ल.) कृश, अशक्त होणें. (याच्या उलट कापूस स्वस्त, सवंग करणें=लठ्ठ होणें). (गो.) कापूस म्हरग करणें. **म्ह**० (व.) १ कापुस केन्हड्या चिकट लेबड्या= ध्यावयाचें थोडेंच पण भाव विचारून विचारून दुकानदाराला सतावलें असतां दुकानदार असें म्हणतो. २ (गो.) कापूस खाल्ली चोटान, बैल खाल्ले बैलान=कापूस विकून आलेले पैसे चैनींत घालविले पण कापूस लादून आणलेले बैल पोसण्यासाठीं एकेक बैल विकणें भाग पडलें. **–साची बीं**–सरकी. **–साचा नग**–(धारवाडी) धारवाड येथें ४८ मणाला एक नग म्हणतात व २८ पौंडांचा एक मण असतो.

कापोळा—कापळा पहा.

काफडी—स्त्री. खरपुडी (खरजेची) ?– नाकी.

काफर—वि. (मुसलमान लोक मुसलमानेतरांस हा शब्द लावतात) अश्रद्धावान; यहुदी, ख्रिस्ती, अगर मुसलमान धर्म ग्रंथांवर श्रद्धा न ठेवणारा; परधर्मी; नास्तिक. 'या कलीमध्यें मुसलमान काफर जहाले यांचा संहार करावयाकरितां रहीमनें पैदा केला आहे.' –चित्रगुप्त ७०. 'प्रथम तूं कोण काफर आहेस तें सांग।' –स्वप १४३. २ (ल.) लुच्चा; लबाड; बदमाश; हरामखोर. ३ हबशी. काफरी पहा. [अर. काफिर] **०शाई**–स्त्री. काफराचें राज्य. 'यवनांचे मनांत कीं काफरशाई जाहली.'–ऐटि १.१८.

काफरी—पु. १ हबशी; शिद्दी. २ पूर्व आफ्रिकेंतील एक जात.

काफला, काफिला—पु. १ प्रवाशांचा, लमाणांचा तांडा; प्रवासी यात्रेकरूंचा तांडा, समूह; कारवान. 'किती येक ते काफले लुटताती' –इमं २४. २ जहाजांचा, गलबतांचा समुदाय; आरमार. [अर. काफिला; इं. कॉफिला]

काफिर—काफर पहा.

काफी—स्त्री. १ बुंद, एक झाड व त्याचें बीं. २ बुंदाची भाजून, दळून केलेली पूड. ३ या पुडीचें साखर, दूध इ० घालून केलेलें पेय; एक उत्तेजक पेय. काफीचें झाड ३–४ हात उंच वाढतें. फुलें चमेलीसारखीं पांढरीं असून फुलण्यानंतर आठ महिन्यांनीं फळें तयार होतात. तीं लांबोडीं व पिकल्यानंतर तांबडया रंगाचीं दिसतात. तीं पिकल्यावर त्यांतून बुंद काढून घेतात. एका फळांत दोन बुद (बिया) असतात. एका झाडावर एका वेळीं शेर–अच्छेर बुंद निघतात. बुंदाचा रंग हिरवा असतो. –वगु २.३९. १६ व्या शतकांत आशिया खंडाच्या पश्चिम भागांत कॉफीचा प्रसार होता, पुढें सर्वत्र झाला. [तुर्की, अर. काह्वे=पिणें; इं. कॉफी; फ्रें. काफे; कव्हा पहा.]

काफी—पु. (संगीत) १ एक राग. या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत व कोमल निषाद हे स्वर लागतात. जाती संपूर्ण–संपूर्ण, वादी पंचम व संवादी षड्ज. गानसमय मध्यरात्र, तरी पण सार्वकालिकहि मानतात. २ एका थाटाचें नांव. याचे सात स्वर असे:–शुद्ध षड्ज, शुद्ध ऋषभ, कोमल गांधार, शुद्ध मध्यम, शुद्ध धैवत व कोमल निषाद.

कांब—स्त्री. १ बांबू वगैरेचें उभें लांबट भेतुक, चिरफळी, कामटी. २ लोखंड अगर इतर धातूंचा चापट लांबट तुकडा, गज ३ कोपरापासून मनगटापर्यंतचा हात, हाड. 'त्याच्या मनगटाची कांब रुंद व जाडी होती.' –कोरकि ९१. ४ (कों) (कुस्ती) जोडीदाराच्या मानेला घातलेला विळखा, मिठी. ५ (कु.) रीप; लांकडाची पट्टी. ६ पंधरा तसू लांबीची काठी (जमीन मोजण्याची). ७ (विणकाम) लगा तणून झाल्यावर त्याची परामणी करतेवेळीं सांधींत घालण्यासाठीं वेळूच्या कामटीचे केलेले लांबट तुकडे प्रत्येक ८ (तंजा.) तार. [का. कंबि] **०मोठी असणें**–मनगट बळकट, जोरदार, भरभक्कम असणें; हाडपेर बळकट असणें; सशक्त असणें.

कांबजात—स्त्री. ताबा; अम्मल; सत्ता; कांबीजाती. 'सिद्दीच्या किल्ल्याच्या कांबजातीची मुबारकी आँ शहामत–पन्हास दिली जाली.' –ऐटि २.९०. [अर. कब्जियत्]

कांबट-टी—स्त्री. १ कांबीट पहा. २ (गो.) पन्नावळी लावण्याची शिगरें करण्याकरितां नारळीच्या झावळीच्या दांडयाच्या पाठीचे काढलेले लांबट तुकडे प्रत्येकी; चोय. [का. कम्बि; तुल० सं. कमठ=वेळू.]

कांबडी—स्त्री. (खान.) (कुंभारी) कांबीट (चार बोटें लांब व दोन बोटें रुंद) ही मडकें घासण्यास घेतात. [कांबटी]

कांबरणें—क्रि. (क. कुण.) पांघरणें (वर्णव्यत्यासानें), 'कांबळा कांबर.'

काबरा—वि. कबरा पहा. भुरकट; काळा. [सिं. कबिरो; सं. कर्बुर]

कावरा—पु. भुईसरपट पसरलेलें झुडुप (नेपती, आर्दड, पंचोबंद इ० झुडपें). (लॅ. कॅपारिस) –ह्राको क ३६४ [तुल. हिं. काव्रा; सिं. कालबारी]

कांवरूण—न. (राजा. कुण) पांवरूण. 'धद्दद कांवरूण बी घेऊक गावाद. ' =चिरगूट पांघरूणहि घेण्यास सांपडेल. –मसाप २.४.११०. [पांघरूण वर्णव्यत्यास]

कांवर्रे—न. (कों.) डोळ्यांतीला वाळलेला मळ; चिपड. [कॅंबरें ?]

कावली—वि. (कों.) कावूलसंबंधीं (उंट इ०). –स्त्री. भाजलेले पांढरे कावुली हरभरे; हे शुक्रवारीं वाटतात, यावरून खारे वाटाणे शुक्रवारीं वाटतात त्यांसहि म्हणतात. –मसाप २.२.७२. ह्यांस तिखट मीठ व हळद लावलेली असते. [काबूल]

कांवळ-ळा-ळी-ळें—स्त्री.पुस्त्रीन. १ घोंगडी; मेंढीच्या लोकरीचें वस्त्र. 'अकीर्तिचें असो रुचे तुज कशी वर्जी कांवळी. ' –केका ७८. ' कांवळा घेई काळा. ' –होला १६. २ लोकरीच्या दोन घोंगड्यांची शिवून केलेली मोठी घोंगडी. ३ गाई-बैलाची मानेखालची पोळी. ' गळ्याखालीं गाईस जशी कांवळ असते... ' –तीप्र ९४. [सं. कंबल] **भिजत कांवळें जड होणें**–१ एखाद्या संकटाची उपेक्षा केल्यानें तें जास्तच वाढत जाणें. २ एखादें काम लोंबकळत पडणें. **कांवळ्याचर काढणें**–मरणाच्या वेळीं मनुष्याला गादीवरून काढून घोंगडीवर ठेवतात त्यावरून मरणाची शेवटची घटका; आसन्न मृत्यु. ' तुम्हांला कांवळ्याचर काढलें होतें.' –नामना १२३. **कांवळीट**–न. घोंगडी; ब्लँकेट. ' घोंगडी, धाबळी, बुरणूस, पट्टू, फलानीन, कांवळीट हीं सगळीं लोकरीचींच करितात. ' –मराठी तिसरें पुस्तक आवृ. ४, पृ. १५. **कांवळ्या**–१ (वि.) कांबळें वापरणारा. २ (ल.) मजूर.

कावळो—पु. (कु.) काष्या.

कांवळो-ळ्या-घोणस—पु. एक जातीचा सर्प. याला चट्टे असतात.

कावा—पु. उत्तरेकडील लोक: (गु.) ओखा मंडळांतील खांचे लोक.

कावा—पु. (कों.) कोंवळा, बेचव नारळ.

कावा—पु. मक्केस मशिदींत जो मोठा काळा दगड आहे तो. [अर.]

कांवाटणें—उक्रि. गाय वगैरेच्या निरणांत विषयुक्त कांब घालून ठार मारणें; गोमांस खाण्यास मिळावें म्हणून महार लोक असें करतात अशी समजूत आहे. [कांब.]

कावाड, कावाड कष्ट-काम—पुन. कवाड पहा. ' मग स्वप्नाचें कावाड. दोहरी निद्रा. ' –ह्रा १८.५४०. ' तैसें गुरुकृपेवीण कावाड. ' –रावि १.४४. 'वाहोनि प्रपंच कावाड। शिजविलें हाड व्यर्थचि ' –भवि ४९.६३. ' वाटतें कावाड विषय-सुख।' –तुगा १६१८. 'कावाडकष्ट मुलीच करतात.' –नाकु ३.४२. **०खोत**–पु. (कों.) कावाडाची खोती करणारा; सरकारास सरपण पुरविणारा मक्तेदार. **०खोती**–स्त्री. सदर मक्ता.

कावाडी—पु. मजूर; कष्ट करणारा माणूस; कवाड वाहणारा; ज्याला नाजुक, कुशलतेचें काम करतां येत नाहीं असा माणूस; ' कावाडी वाहती कावाड. ' –दा ६.९.६.

कावाड्या—वि. कावाडी पहा. **०गाड्या**–स्त्रीअव. सामानाच्या गाड्या.

कावाय—स्त्री. (गो.) झबलें [पो. काबिया; तुल. म. कब्जा; फा. कबा चा]

कावासांब—न. (गो.) तडजोड; निकाल.

कावाळ—पु. (कों.) काथ्या (नारळाच्या सोडणाचा).

कांबी—स्त्री. १ धनुष्याची कांबीट. धनुर्दंड; कमठा; 'कांबी वाजे काळाची ' –विउ ८.१. २ छर्डी; काठी. ' तयाच्या माथां कांबि वाजे। ' –भाए ६३९. ' पुढां बोधांचिये कांबीवरी। ' –ह्रा १८.१०७०. ' बळें भक्तरीपू शिरीं कांबी वाजे। ' –राम २९. [सं. कमठ=वेळु; का. कंबि] **०आयाळ**–घोड्याच्या डोळ्यांवरून खालीं लोंबणारी आयाळ व खालपर्यंत लोंबणाऱ्या केसाची शेपटी (ही असणारा घोडा शुभदायक समजला जातो). –अश्वप १.९१. **०चें लोखंड**–ज्याच्या लांब सळ्या किंवा पट्ट्या करतात असें लोखंड; (इं.) बार आयर्न. **०तासप**–(गो.) पळून जाणें.

कांबी—स्त्रीअव. (क.) सुतास पाजण करण्याकरितां फुलीच्या आकाराच्या केलेल्या काठ्या.

काबीज—वि. १ कब्जा घेणारा; सत्ताधीश. ' पुन्हां पाटीलबावा सल्तनतींत काबीज होईल. ' –दिमरा १.२५२. २ आधीन; हस्तगत. –न. त्रास; दगदग. [अर. काबिझ्] **०मुतसरिफ**–वि. कब्जा व वहिवाट उपभोगणारा. ' हर्गाह की काबीज मुतशरीफ बहात्तर वर्से नाहीं ... ' –रा २०.४७. [अर. काबिझ्+मुतसर्रिफ्]

काबीजात-द्—पु.काबीज केलेला प्रांत; ताब्यांतील प्रदेश. ' नवीन काबिजादींतील हिंदु लोकांचा न्यायनियम एक प्रकारच्या कायद्यानें चालत होता. ' –गोमांतकरीतीभाती प्रस्तावना [अर. काबिझ्]

काबीजाती—स्त्री. ताबा. ' यावरी त्यांची काबीजाती वैसली. ' –पेदसमा २१७.

कांबीट—स्त्रीन. १ कांबटी; बांबूचा तुकडा; भेतुक; वेळूची लांब फाक. ' तेथें या कांबिटाचा गरिब गुण किती प्रौढिही कोण घेगें ?' –आसी ३२. २ (ल.) मनगटाची कांब; हाड; जनावरांच्या

पुढच्या तंगडीचें हाड. २ तिरकमठा; धनुष्याची काठी; दंड 'मग पांचशतें कांबिटें वोढी। वोढोनियां बोटें।'–कथा २.१४. २. [सं. कमठ=वेळु; का. कम्बि]

कावील—वि. १ कर्तृत्ववान; कर्तबगार; हुशार; प्रवीण. 'एक कावील मनुष्य नजीबखान रोहिला आहे.' –भाव २०. 'त्यांस जन्मभर...कुमार्गांत कावील करतात.' –व्यनि ३५. २ मजबूत; बळकट; चिवट. ३ (चुकीनें) कावीज. –शाब्दी को. [अर. काबिल्]

कांबील—स्त्री. कामीण; कावीळ. [सं. कामला]

काबुची—वि. लुच्चा; धूर्त; फसव्या; युक्तिबाज. 'मोंगल लोक काबुची आहेत.' –रा १.५२. [तु. काबूची=जुलमी, अनिर्बंध]

काबुयार, काबुयारी—स्त्री. काबू पहा.

काबू—स्त्री. १ संधि. 'आपली काबू साधून तेथें न गुंततां महाराजांनीं स्वराज्यांत यावें.' –चित्रगुप्त ८०. 'मस्लत काबूस आली.' –खरे १.१४४. २ कब्जा; ताबा; सत्ता; नियंत्रण 'पातशहाचे मनांत स्वामींचे कांबूत राहावें.' –दिमरा १.११. 'या पद्धतीनें घोडा स्वाराचे कांबूत राहतो' –हिलह १७२. –वि. १ बळकट; मजबूत. '(चेनरायदुर्ग) इतका काबू किल्ला असून एकाएकीं फते झाला.' –खरे १२२४. २ धूर्त; कावेबाज; लबाड. [तु. काबू=सामर्थ्य; सत्ता] **०कार–यार–घर**–वि. धूर्त; हिकमती; लबाड. 'जाटांत जीव आहे...मोठा काबूकार आहे.' –रा १.१३९. 'काबूवार खरा फिरंगी' –आयाह ३. **०तलब**–वि. संधि साधणारा. 'इंग्रज बेइमान काबूतलब' –पया ४६४. **०यारी**–स्त्री. लुच्चेगिरी; धूर्तता. **०वख्त**–पु. संधि; योग्य समय. 'खालीं मैदान देखून व काबूवख्त पाहून...' –खरे ३५६७.

कांबेरू—न. (कों.) साप अडचणीच्या जागीं असतां त्याला धरून ठेवण्यासाठीं टोंकाला लोखंडी अणकुचीदार कांटे बसविलेली काठी. [कांब]

कांबोज—पु. १ एक देश; रोहिलखंड, मुरादाबाद वगैरे भाग. २ ब्रह्मदेशाच्या दक्षिणेस असलेला देश (कांबोडिया) [सं. कुंभज?]

कांब्या शेंदूर—पु. कांबेसारखा, लांब तुकड्यांचा शेंदूर. हा औषधी आहे. [कांब+शेंदूर]

कांभरूण—न. पांघरूण=(वर्णव्यत्यास). (क्रि० कांभरणें=पांघरणें)

कांभि(बे)रा—पु. आडें किंवा पाखाड्या यांना तुळईपासून दिलेला लांकडी घिरा. [कांब]

काम—न. १ गोष्ट; कार्य; व्यापार; कृत्य. २ धंदा; उद्योग; हातीं घेतलेला व्यवसाय. 'तुमच्या मुलाला काय काम आहे?' ३ क्रिया; कृति करण्याचा व्यापार. 'कर्माचें काम सरे। विरमे मन।' –ह्रा ७.१७७. ४ सामान्यतः कोणताहि व्यवहार, बाबत; 'या कामांत माझा एक वांटेकरी आहे.' ५ गरज; प्रसंग; प्रयोजन. 'सध्यां मला चाकूचें काम नाहीं.' ६ उपयोग; पात्रता; उपयुक्तता; सोईस्करपणा. 'हें हत्यार त्याच्या कामास पडेल.' [सं. कर्म; प्रा. कम्म; सिं. कमु; हिं. गु. काम; सीगन कम] (वाप्र.) **०काढणें**–१ सपाटून त्रास देणें; मन मानेल तसें वागविणें; सतावणें; छळणें. २ (ल.) खोड मोडणें; कुंठित करणें; नक्षा उतरणें; खरडपट्टी काढणें; जेरीस आणणें. ३ ठार मारणें. 'सन १८७३ सालीं होन्याकोळ्यानें बंड केलें व मारवाड्यांचें काम काढलें.' –गुजा ५९. **०चोरणें**–अंग राखून, कुचराईनें रेंगाळत, काम करणें. **०नसणें**–निरुपयोगी, निष्फळ होणें; (एखाद्या वस्तूची) गरज नसणें. **०बजावणें**–करणें; पार पाडणें; तडीस नेणें. **०मनावर घेणें**–१ महत्त्वाचें समजणें; किंमत देणें. २ करण्याविषयीं उद्युक्त होणें; कळकळीनें झटणें. **०साधणें**–वाटेल तें झालें तरी काम तडीस नेणें, संपविणें, पुरें करणें. **काम करून घेणें–उरकणें**–मोठें काम चाललें असतां त्याच्या साधनांनीं त्याच जातीच्या लहानशा प्रकारचें काम साधून घेणें. 'कामांत काम भज मना राम।' **–मांत पडणें**–१ एखाद्या कामांत, धंद्यांत, व्यवसायांत भाग घेणें, पत्करणें. २ पराभूत होणें; अयशस्वी होणें (उद्योगांत, धंद्यांत). **–मांत पाणी शिरणें**–व्यवहारांत, धंद्यांत तोटा होणें. **–मांतून जाणें**–निरुपयोगी होणें. **–मा नये**–(काव्य) उपयोगी नाहीं. **–मा येणें**–उपयोगी पडणें. 'सहदेव मात्र कामा आला करि विक्रम प्रकाम रणीं।' –मोकर्ण ३८.३१. 'तुला कामा येतील वेल्हाळे।' –र १२. **–माला येणें**–१ पत्करणें; सहन केलें जाणें. 'तूं अशा रीतीनें वागलास तर तें माझ्या कामाला येणार नाहीं.' २ उपयोगी पडणें. 'कठिण समय येतां कोण कामासि येतो?' –र १०. **–माला–स येणें**–लढाईत स्वामीकार्यार्थ मरण येणें. **–मावर पडणें**–१ उपयोगी होणें. २ योग्य होणें; बरोबर असणें (कृति, रीत, काम इ०). **कामीं असणें**–१ (व.) कामावर असणें. २ नोकर असणें. **–मीं येणें**–कामाला–स येणें पहा. 'गोखल्यांच्या निशाणाभोंवतीं पांचशें वीर कामीं आले.' –विवि. १०.१०.२२९. **–मीं लावणें**–१ उपयोग करणें. २ वेठीस धरणें. **म्हo** १ (क.) काम करत्या बैलाला मारणें=ऐकणाऱ्यालाच पुन्हां पुन्हां काम सांगणें. २ (गो.) काम केल्यार दाम दिवप=काम केल्यावर दाम (मजुरी) देणें. ३ खांदा देऊन काम करणें=सदून, मनःपूर्वक काम करणें. ४ कामांत भट पडणें=काम

विघडणें. ५ कामापुरता मामा, ताकापुरती आजी (गरज सरो वैद्य मरो याअर्थी) काम साधून घेण्यापुरतें गोड गोड बोलणें. (सामाशब्द) **०करी**–पु. मजूर; हेलकरी; नोकर. [सं. कर्म+कर] **०करी वर्ग**–पु. मजुरांचा समुदाय; मजूर लोक. **०करी संघ**–पु. मजुरांचें मंडळ; मजुरांची संस्था; जूट. **०कर्दा**–पु. कार्यकर्ता. 'बहुकामकर्दा म्हणवी शहाणा.' –दावि १४७. **०काज**–न. लहानमोठें काम; कोणतेंहि काम, धंदा. **०कारभार**–पु. कोर्ट-कचेरींतील किंवा सरकारी कामकाज. **०गत**–स्त्री. १ कामगिरी, उद्योग; करावयाचें काम. 'म्यां घरची कामगत पत्करली.' २ मजुरांचा मेळा. **०गार**–पु. १ सरकारी नोकर (मंत्री, चिट-णीस, एखाद्या दर्जाचा अधिकारी). 'राजसे समस्त सुरवर। ते तंव माझे कामगार।' –कथा ३.४.१९. २ सामान्यतः वरिष्ठ प्रतीचा मजूर (कारखान्यांतील). ३ कार्यकर्ता. 'कामगार आणि आंगचोर। येक कैसा।' –दा १२.७.२९. [कर्मकार] **०गिरी–गारी**–स्त्री. १ कामधंदा; करावयाचें काम; उरकावयाचें काम. २ काम उरकणें, करणें; बजावणी; ३ कारागिरी; करामत. 'कामगारी व्हावयाची असल्यास त्याप्रमाणें नायब खानगी कारभारी यास कळवून ...' –कलावंतखाते (बडोदें) ४२. ४ विशेष काम. [काम+फा. गिरी] **०चलाऊ**–वि. तात्पुरता उपयोगी पडणारा; वेळ मारून नेतां येण्यासारखा; खपण्या-सारखा; साधारण. **०चुकार–रू–चुकवू–व्या**–वि. कामाची टोलवाटोलवी करणारा; सोंगाडया; कुचराई करणारा; चुकार-तट्टू, अंगचोर. **०चोरपणा**–पु. अंगचोरी. 'त्यांच्यांत काम-चोरपणा अधिक असता तर ते खात्रीनें अधिक काळ जगले असते.–विचारविलास १०८. **०जोड**–वि. कामांत तत्पर; कामांत गढलेला (क्वचित प्रचार पण दामजोड=पैशाकडे दृष्टि असणारा, याच्या विरुद्ध हा शब्द योजतात). **०झोडया**–वि. सपाटून काम करणारा; ओबडधोबडपणें काम संपविणारा; दडपून काम करणारा. [काम+झोडणें] **०ठ–ठा**–नस्त्री. दुकान; व्यापार. 'तेव्हां कर्ता रिगे कामठां। कर्तृत्वाच्या।' –ज्ञा १८.३५८. २ (व.) कारखाना; यंत्र; टांकसाळ. 'गांवाखातीये औंघे मिळौनि कामठा घालिती।'–चक्रधर सिद्धांतसूत्र ८९. 'गुणत्रयाच्या पडतें। कामठां जे।'–ज्ञा १५.४८०. [कर्म+स्थान] **०ठ**–वि. (राजा.) उद्योगी; मेहनती. [कर्मठ] **०दार**–पु. सरकारी नोकर; अधिकारी; अंमल-दार. **०धंदा**–कामकाज पहा. **०बोध**–पु. कामोद नांवाचा एक राग; राग पहा. **०लाटया**–वि. कसें तरी करून काम उरकविणारा (मजूर). [काम+लाटणें] **०वट**–न. १ कामकरी; मजूर. 'येक आणवसीं कामवटें।'–उषा ७.७३. २कौशल्य. 'कीं विश्वकर्म्याचें कामवट। खांब सोडविले निघोट।' –कालिका पुराण ६.१८. **०साधु**–वि. आपसतलबी; स्वार्थी; स्वतःचें तेवढें काम करून घेणारा. **०सू**–वि. नेहमीं काम करणारा; कष्टाळु; काम करण्यांत पटाईत; उद्योगी; व्यासंगी. [कर्मशूर–कामसुभ–कामसु –भाइ १८३४.] **कामाकार**–पु. अंकितपणा. 'आणि ज्ञानाचेनि कामा-कारें।' –ज्ञा १६.६०. **–माचा**–नि. १ उपयुक्त; कामाला उप-योगी पडणारा (पदार्थ, माणूस). २ कामांत गुंतलेला (ज्याला कामधंदा आहे असा); उद्योगी; रिकामा नव्हे तो. **–माचा गाडा**–पु. १ येईल तें काम करणारा माणूस; मेहनतीचें काम करणारा पुरुष. २ भरपूर काम. (क्रि० ओढणें.) **–माचा जड**–वि. आळशी; मंद; धिम्मा; सुस्त. **–मारा–री–रें**–पुन. कामकरी; सेवक; दास; दासी; चाकर. 'माझी होतील कामारीं।' –ज्ञा १६. ३५३. 'वेद तयाचे सेवक। विधिविवेक कामारी।' –एभा ७.१११. 'नाना उपचारीं। सिद्धी वोळगती कामारी।' –तुगा २७८. जेआचिये घरींचीं कामारी।' –दाव २७८. 'जैसी ते कामारी दासी पाहें।' –ब ४६९. 'लागले लक्षावधि कामारी।' –कृमुरा ६१.१०६. [कर्मकार–री] **–मारीपण**–न. सेवावृत्ति; दास्यत्व. 'इथा कामारिपणें भुक्ति मुक्ति। देती भाविक जनांसि।' स्वानु १०.१.८.

काम—पु. १ मदनविकार; संभोगेच्छा. 'या कारणें कामें। स्त्रीपुरुष युग्में।' –ज्ञा १६.३१०. 'कामें हिरतल्या दृष्टी। धनुष्यें गळालीं पै मुष्टी।' –एरुस्व ७.५५. २ मदन; कामदेव. 'जाळ गळयामधिं माळ कशाला व्याळ काम कोपला।' –राला ८७. ३ इच्छा; स्पृहा; आकांक्षा. 'तुला राम सेवेविणें काम नाहीं।' –वामन भरतभाव २३ ४ धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांतील तिसरा (विषयोपभोग). ५ (संस्कृत रचनेंत) आपल्या मना-प्रमाणें वर्तणारा. जसें:–कामवाद=वाटेल तें बोलणारा; कामभक्ष= इच्छेप्रमाणें खाणारा; कामचार=आवडेल तें करणारा इ० ६ (संस्कृत रचनेंत तुम् प्रत्ययांत रूपापुढें.) इच्छिणारा; वांछिणारा. जसें:– गंतुकाम=जाऊं इच्छिणारा; भोक्तुकाम = खाऊं इच्छिणारा इ० ७ इच्छा; लोभ. 'जे स्वर्गैकामु मनीं धरिती।' –ज्ञा २.२५०. 'करी काम निःकाम या राघवाचें।' –राम ७७. (वाप्र.) **०गें**–इच्छा करणें. 'जेणें आत्मसुख कामिजे। पंडुकुमरा।' –ज्ञा ४. १२४. 'त्वा कामिला मानसें।' –निमा. सुभद्राचंपू ५.१२. 'मज कामणे हा शुद्धकाम। ज्याचा आराम मज मार्जी।' –एभा ११.७४८. **–माथ(थि)णें**–कामविकारानें युक्त होणें. 'कामार्थी करिताति युद्ध आपुल्या जातींत कामाथिले।' –निमा सुभद्राचंपू ६.४. (सामाशब्द) **०कर**–पु. मंदनाचा वेग. 'माया नियंता जो ईश्वर। तो कामकर निवारी।' –एभा २६.१७८. **०कळा**–स्त्री. कामशास्त्र; कामाचा आवेग. 'हास्य विनोद कमकळा। हें ज्ञान नव्हे।' –दा ५.५.२९. **०कांति**–स्त्री. मदनासारखी कांति; सुंदर वर्ण, रूप. 'कीं काम कांति धवळारें। काळरात्रीची।'

–शिशु ९४६. ०कारी–वि. मदनाचा वेग उत्पन्न करणारा. 'नसे अंतरीं कामकारी विकारी।' –राम ५०. ०क्रोध-लोभादि–पुष्ब. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रिपूंबद्दल योजावयाचा संक्षेप. 'विकल पडतां प्राज्ञन। स्वधर्मीं राहाटे कीं मन। कामक्रोध शत्रु संपूर्ण। केले आधीन तुवां कीं।' –पांप्र १५.१३०. 'परस्त्रीसीं काम निषिद्ध। ब्राह्मणावरी नसावा क्रोध। सुहृदयातीसीं मद। सहसाही न करावा।' –पांप्र १५.१३३. 'सत्संग धरावा आधीं। नायकावी दुर्जनांची बुद्धी। कामक्रोधादिक वादी। दमवावे निज पराक्रमें।' –पांप्र ३९.२१. ०गृह–न. स्त्रियांचें जननेंद्रिय. 'कामिनी कामगृहासक्ती। प्राणी प्राणातें स्वयें शिणविती।' –एभा ३.२४२. ०ग्रस्त-पीडित-दग्ध-व्यथित-व्याकुळ-व्याप्त-वश-आकुल-आक्रांत-आतुर-अंध-आधीन-अन्वित–वि. मदन विकारानें क्षुब्ध झालेला (सर्व शब्द समानार्थक आहेत.) [सं.] ०चेष्टा–स्त्री. शृंगारचेष्टा, क्रीडा; कामविकार उत्पन्न करणारे हावभाव, चाळे. 'कामचेष्टा करी तरळी। मधुर वचन बोलोनियां।' [सं.]. ०ज्वर–पु. १ मदनाचा वेग. २ मदनपीडेनें झालेला संताप. ०ट–वि. मदनानें व्याप्त. 'शिश्न कामट मातलें।' –गीता २.५०६१. ०थाळोरें–रोळें–वृषण; अंडकुली. 'कामथाळोरां पुसाटीं। घालुनि पडे।' –एभा १४.३८२. [काम+थारोळें] ०देव–मदन. ०धेनु–स्त्री. १ (पौराणिक) इच्छिलेली वस्तु तात्काळ देणारी स्वर्गांतील एक गाय; सुरभि; सुरधेनु; त्यावरून पुष्कळ दूध देणारी गाय. २ (ल.) नेहमीं उपयोगी पडणारा धनी; नानाप्रकारचा हिकमती नोकर; अतिशय उत्पन्न येणारें शेत, झाड; नानाप्रकारचे विषय ज्यांत नमूद केले आहेत असें पुस्तक. 'मना राम कल्पतरु कामधेनु' –राम ६०. 'जयातें कामधेनु माये। तयासि अप्राप्त कांहीं आहे।' –ज्ञा १.७९. २ पुष्कळ ठिकाणीं उपयोगी पडणारें वस्त्र, वस्तु, पदार्थ. ३ सर्वांना उपयोगी पडणारा माणूस. ४ (ल.) भिक्षा मागण्याची झोळी. (क्रि० लाभणें.) ०निक–न. मनांत कांहीं इच्छा धरून केलेलें व्रत. –वि. हट्ट; आवडण्यासारखें (कामधंदा). [सं.] ०पिसा–वि. मदनविकारानें व्याप्त झालेला. 'तया कामपीसा धरी कंठनाळीं।' –दावि २४३. ०प्रकोप–पु. कामविकाराचा क्षोभ. [सं.] ०बाज–वि. विषयासक्त; कीलेपट; बाहेरख्याली; रंडीबाज. ०भक्ति–स्त्री. मनांत इच्छा धरून केलेली भक्ति, उपासना; याच्या उलट भावभक्ति. [सं.] ०मगरमिठी–स्त्री. मदनरूपी मगरानें घातलेली मिठी; तीव्र संभोगेच्छा. ०मरण–न. इच्छामरण; वाटेल तेव्हां स्वतःला मृत्यु आणण्याची शक्ति. [सं.] ०मरणी–वि. इच्छामरणी. [सं.] ०रमण–वि. स्वेच्छेनें विहार करणारा. 'जो सकळ मंगळां मंगळ पूर्ण। जो कां गोकुळीं कामरमण।' –एभा १.२३९. ०रूप–न. १ इच्छेप्रमाणें धारण करतां येणारें रूप. २ एक देश (आसाममध्यें). –वि. १ इच्छेप्रमाणें रूप धारण करणारा. २ सुंदर; मनोहर; रमणीय; ज्याचें मदनासारखें रूप आहे असा. ०रूपि–वि. कामरूप (वि.) पहा. ०शास्त्र–रतिशास्त्र; कोकशास्त्र; स्त्री–पुरुष संभोगाची इतिकर्तव्यता ज्यांत सांगितली आहे तें शास्त्र; शृंगारशास्त्र; स्त्रीपुरुषप्रेमविषयक शास्त्र. [सं.] ०सदन–स्थान–न. जननेंद्रिय; योनि; उपस्थ. कामांतक–पु. मदनाचा नाश करणारा; शंकर. –मातुर–वि. मैथुनेच्छेनें विव्हळ झालेला–ली. 'जाणितला तिहीं कामातुर नारी। कृष्णभोगावरि चित्त ज्यांचें।' –तुगा १२. 'नव्हेचि तो शुक कामातुरिला।' –अमृत (शुकचरित्र) २५. –मानल–ळ–पु. मदनाचा दाह; कामविकाराचा संताप. 'मी कामानळें करून। गेले आहळोन प्राणपती।' [सं.] –मारी–पु. कामांतक पहा. 'त्या प्रभुयशासि मानी अमृतांचें पूर्ण ताट कामारी।' –मो परंतु रामायण. –मालय–कामसदन पहा.

काम—न. एक प्रकारचें पाणकोंबडीसारखें पांखरूं; हें पाण्यांत सांपडतें व कोंकणात कार्तिकापासून पुढें तळ्यामध्यें आढळतें.

कामट-टी-ठी—कांबीट पहा.

कामठा—पु. (ना.) सुतारांची सुतारकाम करण्याची शाळा, जागा. (काम पहा). [सं. कर्मस्थान]

कामणुक—स्त्री. कर्मणूक. 'सुनास नाहीं तरि कामणुका।' –सारुह ३.१६. [करमणूक]

कामण्णा—पु. कामदेवाची मूर्ति; कर्नाटकांत मदनाची मूर्ति करून तिची पूजा करण्याची चाल आहे. [सं. काम+अण्णा]

कामत—पु. सारस्वत ब्राह्मणांतील एक उपनांव. –न. १ (गो.) डोंगरी वरकस शेत, जमीन. २ घराऊ शेती; खंडानें न दिलेली शेती; उपरी कुळानें केलेली शेती; सरकारी कामगारास मिळालेली जमीन. [विल्सन–ते. कमतमु; सं. कर्म]

कामती—पु. (वे.) नोकर; शेतावर काम करणारा मजूर. [काम]

कामथ—न. (माण.) इमानेइतबारें केलेल्या चाकरीबद्दल मिळालेली इनाम जमीन. (कामत पहा)

कामदा—स्त्री. एक वृत्त. याच्या चरणांत दहा अक्षरें असून र, य, ज, ग, हे गण येतात. [सं.]

कामदानी—वि. कशिद्याचें अंगरख्याचें कापड.

कामना—स्त्री. इच्छा; कल; वासना; मनोरथ. 'पै अवज्ञा आणि कामना।' –ज्ञा १८.२०२. 'नारदा सांगती कामिनी कामना।' –नरहरि दानव्रत १०२. 'जें मागसी पुरवितों तव कामना ही।' –वामनचरित्र ८. [सं.] ०पूर्ति–स्त्री. इच्छेची तृप्ति, समाधान; संतोष.

कामरूण—कांबरूण पहा.

कामला-ळ—स्त्री. कावीळ रोग; हळवा रोग. 'कवळैली कामलादि दोषीं। दृष्टी न रीगे वर्णविशेषीं।' –ऋ. ६७. [सं. कामला]

कामलेट—न. ब्लँकेट. 'बकऱ्याच्या केसाचीं कामलेट वगैरे वस्त्रें होतात.' मराठी तिसरें पुस्तक पृ. ११९ आवृ. ४.

कामविणें—क्रि. १ कमविणें; उपयोगांत आणणें; कामांत आणणें. 'जे सर्व दोषांचा वसौटा। तपचि कामऊनि सुभटा।' –ज्ञा १८.७५२. 'तै देवोचि नुसधा कामविजे।' –अमृ ९.३९. २ निर्माण करणें, संपादणें; कुशलतेनें तयार करणें. 'पांचही कारणें सहेतुकें। कामवीजती गा अनेकें।' –ज्ञा १८.४३१. उथाळीं कामविलीं कुसर। हिरकणिया।' –कालिका २७.३१. [सं. कृ-कर्म]

कामळ—न. कांबळ पहा. 'वनी धेनु चारितां कामळ हाती काठी।' –अफला ८१.

कामळा-ळी-ळें-ळया—कांबळा पहा.

कामळीफुज्यांव—वि. (गो.) भ्याड; पळपुटा.

कामाऊ-यी-विणें—कमाऊ पहा.

कामाटी—१ व्यापार; काम; कर्म. 'मनें कल्पिली सकळ सृष्टि। मनःकृत इंद्रिय कामाटी।' –एभा २२.४६२. [सं. कम]

कामाठी—पु. १ तेलंगणांतील एक जात व तींतील व्यक्ति. २ झाडणें, बैठक घालणें वगैरे घरकामाकरितां ठेविलेला नोकर (कामाठी अगर इतर कोणत्याहि जातीचा); याच्या बायकोस कामाठीण म्हणतात. 'शीघ्र आणोनि कामाठ्यांसी। गर्ती योजिली कृपासरसी।' –नव १४.१७८. ३ लष्करांतील डेरे, राहुटया लावणारे मजूर. 'आली सातपुडयाची घडी, तोफगाडी, दाटली घोडी वाट पुढें नाहीं कामाठे खादी पर्वत फौज उभी राही।' –ऐपो ४३४. [सं.]

कामाठी—(ल.) खांबाचें उथाळें.

कामाठी—स्त्री. कांबीट, कामटी पहा.

कामाठी—स्त्री. (महानुभावी) येरझार; व्यापार; काम. 'तया कांहींच नाहीं कामाठी। जन्ममरणाची।'–भाए ८३२. [सं. कृ-कर्म]

कामाने—(तंजा.) नको असणें; कामा नये याचा संक्षेप. 'पथ्य कामाने, पण रोग बरा व्हावा, असें कसें होईल?' [कामा नये]

कामार—पु. (गो.) घिसाडी; लोहार. [वै. सं. कर्मार; –ऋग्वे १०.७२.२. सं. कर्म-कार]

कामार काडूबुंग—न. (गो.) एका जातीचा मासा.

कामार खर्चा—स्त्री. (गो.) एका जातीचा मासा.

कामावणें—सक्रि. १ कमविणें; तयार करणें; घडविणें. 'कीं मेरूचा गाभा कामाविला। विश्वकर्मेनी।' –शिशु ४५. २ संस्कार करणें; स्वरूप देणें; आकार देणें. 'जेवीं लोह कामावितां जाणा। होय दर्पण सोज्वळ।' –एभा १९.२६२. [सं. कृ-कर्म]

कामाक्षी—स्त्री. १ एक फूलझाड; कर्दळीचें झाड. २ एक देवी (कांची–कांजीवरम् येथील). [सं.]

कामिक—वि. काम्य; इच्छा धरून केलेलें; 'परी न कामितां कामिक। न निफजे जें।' –ज्ञा १८.९७. [सं. कम्]

कामिण-णी—स्त्री. कावीळ. 'कुळिक तरळ कामिणी। मुरुमा सुंदरें माळिणी।' –दा ३.६.२५. [सं. कामला]

कामिणी—स्त्री. (अव.) कामिनी; स्त्री. 'इष्टमित्र सोईरे वटकी कामिणी।' –दावि ३५०. [सं. कामिनी]

कामित—न. इच्छित; वांछित 'कामद मेघश्याम पुरवितो कामित निजदासाचें।'–मो सुदामचरित्र ७६. (नवनीत पृ. ३७९). [सं. कम्]

कामिता—वि. इच्छा करणारा. 'नातरि कामितयाचिया इच्छा।' –ज्ञा. ४.२१६. [सं. कम्]

कामिना-नी-णा-णी—स्त्री. १ प्रियकर स्त्री; सुंदर स्त्री; शृंगारचेष्टा करणारी स्त्री; प्रियतमा. 'काय चंचळु मासा। कामिनी कटाक्षु जैसा।' –ज्ञा १४.१७०. 'ऐशीं सहस्र ज्या सुंदरा कामिनी। माजीं मुखरणी मंदोदरी।' –तुगा ३४६३. 'बगुन कामिणी तुला नगरच्या पडतिल बीमार' –मृ १८. 'गौडी माध्वी पैष्टी। तीन मद्य प्रगट जनीं। चौथें मद्य तें कामिनी।' [सं.] २ सामान्य अर्थानें स्त्री. [सं. कम्]

कामी—वि. १ विषयासक्त; कामुक. 'कामी कोपी लोभी जे संसारांत पावती भ्रमते'–मोविराट ४.६०. २ इच्छा करणारा; अभिलाषी. 'पतिप्रीति कामी नसे पापकामी। असी ते अहा पावलें शाप कां मी।' [सं. कम्]

कामी—वि. १ उपयुक्त; उपयोगी पडणारा (माणूस). २ उद्योगी; तत्पर; नेहमीं कामांत असणारा. 'कामी निकामी लोकां। बरें पाहे।' –दा १२.१.१९. [सं. कृ-कर्म]

कामीक—वि. विषयासक्त. 'कामीक म्हणे परमप्रीति। बैसे मंचकीं वल्लभे।' –मुविराट २३.१३५. [कम्]

कामीक-ष्टु—वि. (राजा.) उद्योगी (माणूस.) [सं. कृ. कर्म]

कामीट—स्त्री.न. कांबीट पहा.

कामीण-न—स्त्री. कावीळ. यानें डोळे, अंग, नखें इ० पिवळे होतात व त्या माणसास सर्व वस्तू पिवळ्या दिसतात. 'कामीण होतां नेत्रासि। पीतवर्ण चंद्र भासे त्यासी।' –अनि

१३.१०२ 'कामीणीनें पिवळी जाली।' दा–१४.१०.२० 'कामीन जयाच्या जाहाली नेत्रासि । देखे तो चंद्रासी पीतवर्ण ' –तुग। ३११०. [सं. कामला]

कामुक—वि. १ विषयी; स्त्रीलंपट; कामीक (काव्य) 'नविये आवडीचेनि भरें। कामुक निज वनिता विसरे।' –ज्ञा १.१८७. 'अशा कामुका गोपकुमारी।' –रासक्रीडा ६ २ इच्छा करणारा; फलासक्त; लोभी. 'आचरे कामुक जैसा। कर्मी भरू होआवा तैसा।' –ज्ञा ३.१६९. (समासांत) विद्याकामुक; धनकामुक; मोक्षकामुक; पुत्रकामुक. [सं.]

कामुकी—स्त्री. १ विलासिनी स्त्री. २ स्वैरिणी. [सं.]

कामुनी—स्त्री. औषधीवनस्पति; हिचीं फळें लहान भिन्या सारखीं, लाल रंगाचीं व आंबटगोड असतात.

कामून-म्हून-हून-ऊन—(खा. व. ना.) काय म्हणून ? कां ? 'का म्हून सातावतं गा ! ' म्ह० (व.) 'कामून पेरले जव तर ज्याची त्याला गव. '

कामेरपण—न. (कों.) शेतकाम. [काम.]

कामेरा-री-रें—स्त्री. (गो. कु.) कामकरी स्त्री; मोलकरीण; मजुरीण. [कर्मकार]

कामोखी—स्त्री. लोहाराचा, तांबटाचा चिमटा.

कामोद—पु. (राग) गायनशास्त्रांतील एक राग. या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, तीव्र मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाती संपूर्ण–संपूर्ण, वादी पंचम, संवादी ऋषभ, गानसमय रात्रीचा पहिला प्रहर. [सं.]

काम्य—वि. १ आनंददायक,; इष्ट; पसंत पडणारें; सुखदायक. २ पुढें कांहीं फायदा होईल किंवा चांगलें होईल अशा इच्छेनें केलेलें काम; इच्छित कर्म करण्यास योग्य. ' केलें काम्य कर्म तैसें।' –ज्ञा १८.१०३. ३ हेतु; इच्छा; इच्छित वस्तु; गोष्ट. ' येणें विधि पुर्यें वाहतां। काम्य होय तुम्हां त्वरितां। ' –गुच ३७.५८. [सं. कम्=इच्छा करणें.] **०कर्म**–न. १ फलाशापूर्वक कर्म; मनांत इच्छा धरून केलेलें कर्म; (याच्या उलट नित्यकर्म, नैमित्तिक कर्म). 'आपण...शास्त्रास अनुसरून जें कर्म करतों तें काम्यकर्म होय.' –गीर ५५. [सं.] **०दान**–न. १ आनंददायक देणगी. २ (अनिश्चित) मनांतील इच्छा पुरी होण्यासाठीं केलेलें दान; केवळ मनाच्या प्रेरणेनें दिलेली देणगी; (याच्या उलट नित्यदान). [सं.] **०धर्म**–न. मनांत इच्छा ठेवून केलेला धर्म; इष्ट हेतु साधण्यासाठीं केलेलें व्रतनियमादि कृत्य. **०प्रीति**–स्त्री. मनांतील इच्छा तृप्त होण्याकरितां किंवा मोबदला मिळविण्याकरितां केलेलें प्रेम. **०भक्ति**–स्त्री. फलप्राप्तीच्या इच्छेनें केलेली भक्ति. **०मरण**–न. १ कांहीं इष्ट हेतु सिद्धीस जावा यासाठीं पत्करलेला मृत्यु. २ इच्छामरण. **०व्रत**–न. फलप्राप्तीच्या आशेनें केलेलें व्रत.

काम्र—न. (गो.) म्युनिसिपालिटी. [पो. कामर; इं. कॅमेरा]

काय—पु. देह; शरीर; (विप्र.) काया. 'तैसें मनें वाचा काये। भलत्या दुःख देतु जायें।' –ज्ञा १८.६५६. 'माय करी बाळाचें नित्य श्रमवूनि काय जेवि हित.' –मोउद्योग ६११. [सं.]

काय—सना. १ कशाचा ? कसला ? कोणता ? 'आनृण्य न जोडावें तरि आम्ही अर्थ जोडिला काय ' –मोभीष्म १२.६०. 'प्रसाद मग काय तो जरि निवारिना लाघवा।' –केका ६६. २ जें; जें काय. 'तो काय देईल तें घेऊन ये.' ३ किती मोठा; केवढा; 'हा काय हो मूर्ख।' 'दुःखामयेंचि सरलें, सुख काय सांगें।' –वामन स्फुटश्लोक ६९, (नवतीत पृ. १४१.) ४ (गो.) मुळींच; कांहीं मुद्दां. 'पांचा नळांत जेव्हां काय दिसेनाचि भेद लव तीस ' –मोवन. ४.७१. 'लोभ केलिया कायही नुरे ' –नरहरी गंगाधररत्नमाला ३४. (नवनीत पृ. ४२०). ५ तुच्छतादर्शक. 'हा काय रत्नभोक्ता मारू अनुताप पावुनी हाका।' –मोआदि ३२.१७. 'जिउबा बोले गर्जून मोगल काय आणिल जिन्नस।' –विवि ८.४.८०. ६ एखाद्या समुच्चयांतील निरनिराळ्या वस्तु, किंवा निरनिराळे प्रकार दाखविणारें सर्वनाम. 'सजगुरा काय, जोंधळा काय, गहूं काय, जो जिन्नस पाहिजे तो आहे.' ७ द्विरुक्ति (काय काय); संख्याविस्तार, भेद यावद्दल आश्चर्य दाखविण्यासाठीं, एखाद्या पदार्थाचा विशेषपणा किंवा भिन्नपणा दाखविण्यासाठीं. 'मी कायकाय त्याचे गुण सांगू ? ' 'त्यानें काय काय तुला सांगितलें किंवा कायकाय पदार्थ तुला दिले. **म्ह०** १ (गो.) कांय दीस सुनेचे कांय दीस मायचे=कांहीं दिवस सुनेचे कांहीं सासूचे. २ काय करूं कसें करूं=कांहींच न सुचणें. **०एक**–कांहीं; किती; कोणी; कित्येक. 'काययेक उपजतां मरती '–तुगा ७२५. **०क**–कांहीं एक; कोणतें. 'दिनानाथ द्वारकाधीश साह्य जरी तरी कायक न करी' –राला ११. **०गे बाई तरी**–क्रिवि.(बायकी) एक वाक्प्रचार. (आश्चर्यदर्शक). **०की**–कोण जाणें; ठाऊक नाहीं अशा अर्थाचें उत्तर. ' माझा बैल इकडून गेला काय ? उत्तरः=काय कीं. ' **०जाणें**–कोण जाणतो ? कोणाला ठाऊक ? कोण सांगेल ? (अशिष्ट लोकांत हा प्रयोग रूढ आहे.) ' **०जाळणें**-(निरुपयोगी, कुचकामाच्या वस्तूस अनुलक्षून एक वाक्प्रचार) काय उपयोग ? काय जाळावें (जळे) नेऊनि ' –दावि २१०. ' जैसें विगत विधवेचें स्वरूप। यौवन काय जाळावें। ' ' काय जळळें दिवसभर अभद्र बोलणें ? ' **०तो**–(तिरस्कारदर्शक) कःपदार्थ; यःकश्चित. **०माय**–(कु.) कांहीं [काय द्वि. कांहीं बाही] **०म्हणून**–कशाकरितां **०ले–हाले**–(ना.) कशाला ? कशाकरितां ?

कां म्हणून? ०शी-सी-सें-कितीशी? कोणती? कशाची? काय होय? कशाचें? कशाला? क्षुद्रतादर्शक; क:पदार्थ. 'दयानिधि तुम्हांपुढें जनकथा अशा कायशा।' -केका २६. 'इतरांची शक्ति कायशी।' -दावि ४०५. 'ब्रह्मविद्येची गोष्टी। त्यांसी कायसी।' -विपू १.५७. 'तया साम्यता कायसी कोण आतां' -राम ६०. 'समर्थाघरीं कायसें उणें' -दावि २१. ०सया-कशाला? कशाचें? 'सांगा कवण तें ब्रह्म। कायसया नाम कर्म।' -ज्ञा ८.२. ०सा-वि. १ (अनिश्चितार्थी) एखादी गोष्ट निश्चित न आठवतां तिची साधारण आठवण असतां योजतात. 'त्यानें कायसा निरोप सांगितला होता पण मी विसरलों.' २ कशासारखा. ३ कशाचा. 'जनीं मूर्ख हो बोल कायसा आतां -दावि १७८.४ कशासाठीं? कशाकरितां? काय फायद्याचा? काय उपयोग? 'तेथें कायसा या ग्रंथाचा उद्यम।' -विपू ७.१५४. ०साच-वि. कसाचसा; कसासाच; बरोबर वर्णन करतां येत नाहीं असा, अशासारखा; चमत्कारिक; आश्चर्य उत्पन्न करणारा. ०साठीं-(व.) कशासाठीं. ०सें-न. कांहींसें. 'असेंच कायसें तुम्हीं म्हणाला होता खरें!' -अस्तंभा ६६. ०सेसें-क्रिवि. कांहीं तरी एक. मुलांसाठीं बाईसाहेबानीहि कायसेसें केलें आहे.' -कोरकि २६. ०सेना-नी-नें-कशानें; कोणत्या कारणानें. 'कायसेनी पाहुणेरु क्षीरसागरा।' -ज्ञा १०.११. 'तें तूं म्हणसी कायसेन। ऐक सांगेन उद्धवा।' -एभा २९.८३६. ०होय-काय पर्वा आहे? काय उपयोग आहे? 'आंधळयाला बगीच्या काय होय.' -नि ५१०.

काय—क्रिवि. प्रश्नार्थक किंवा आश्चर्य उत्पन्न करणारें अव्यय. 'त्वां त्याला मारलेंस काय?' 'आज पाऊस पडेल काय?'

काय—(गो.) पणा (भाववाचक) या अर्थाचा प्रत्यय. 'किरपीन काय=' कृपणपणा.'

कायकोळ—स्त्री. (गो.) कावीळ.

कायकोळ—स्त्री. (गो.) कलिंगडाची वेल.

कायक्लेश—पुअव. शारीरिक दुःखें; अंगमेहनत; श्रम; कष्ट. [सं. काय+क्लेश]

कायजा—पु. घोडयाचा लगाम. [अर. कायजाह्]

कायटी—स्त्री. घालमेल. -ढंको.

कायडो—पु. (गो.) कर्तव्यकर्म.

कायणी—स्त्री. (कु.) कहाणी; गोष्ट.

कायणु(नु)बायणु(नु)—काहीं तरी. काण्णुबाण्णु पहा.

कायत-थ—पु. कायस्थ; एक हिंदु जात. यांचा धंदा लेखकाचा-विशेषतः विक्रीसाठीं काढलेल्या ग्रंथाच्या नकला करण्याचा असे. हे उत्तरहिंदुस्थानचे रहिवासी आहेत. यांना कायस्थ असें जरी म्हणतात तरी दक्षिणेकडील कायस्थ प्रभूंशीं यांचा कांहीं संबंध नाहीं. कायस्थ प्रभु हे क्षत्रिय आहेत. [सं. कायस्थ]

कायती—वि. कायत जातिविषयक (लिहिण्याची एक पद्धत) [कायत]

कायदा—पु. १ नियम; व्यवहार; धर्मशास्त्र; शिरस्ता; वहिवाट; न्यायानें वर्तावें, अन्यायानें वागल्यास अमुक शिक्षा होईल असें सांगणारा तो कायदा. 'समाजनियमनाच्या अनेक साहित्यापैकीं कायदा हें एक साहित्य होय.' -ज्ञाको क ३८२ [अर. काइदा] **कायदे-कौन्सिल**-न. कायदा ज्या प्रतिनिधि (लोकनियुक्त, सरकारनियुक्त) मंडळांत मान्य केला जातो तें. हिंदुस्थानांत ज्या प्रांतांत गव्हर्नर असतो त्या प्रांतांत कायदे-कौन्सिल असतें. ०पंडित-वि. कायद्यांत निष्णात. ०बाज-वि. कायद्यांत तरबेज; कायदेपंडित, ०भंग-पु. जुलमी कायदे मोडण्याची क्रिया. ०मंडळ-न. कायदेकौन्सिल. ०शीर-क्रिवि. कायद्याप्रमाणें; नियमाप्रमाणें; नियमांबरहुकूम; कायद्याबरहुकूम; ठरावाप्रमाणें; सशास्त्र; न्याय्य (वागणारा). ०शीर चळवळ-स्त्री. न्याय्य, कायदा न मोडतां प्रजेनें केलेली राजकीय चळवळ (इं.) कॉस्टिट्यूशनल ॲजिटेशन. 'हक्क देणारे व घेणारे यांच्या शक्तींत जमीनआस्मानाचें अंतर असलें तरी (प्रजेनें) सामोपचार अर्थात कायदेशीर चळवळ करणें. जरूर आहे.'-टिसु ५६. -द्याची अट-स्त्री. कायद्याचा निर्बंध. -चा बळी-पु. जुलमी कायदे मोडल्यामुळें शिक्षा पावलेला माणूस.

कायदा—पु. लगाम. कायजा पहा.

कायनातें—न. (गो.) आंब; मासळी नसलेली कांद्यांची भाजी. आंब पहा.

कायपत्री—स्त्री. एक प्रकारची साल; जायपत्री; मायपत्री; खोटी जायपत्री.

कायपुळी—स्त्री. पाठीवर होणारी काळपुळी. [काया+पुळी]

कायफळ—१ एक लहान झाड; यांचें साल व बीं औषधाच्या उपयोगी असतें. हें सुगंधी उटण्यांत वापरतात. २ रानजायफळ. ३ हरदासी कोटींत जायफळ, मा२फळ, कायफळ या तिघांचा संबंध आणून जाय फळ=लहान मूल, नुकतेंच जन्मलेलें मूल (जें जावयाचें=मरावयाचें आहे), त्याची माया धरून -मायफळ= कायफळ (=कायलाभ) आहे अशी विनोदी रचना करतात. [सं. कटफल; प्रा. कप्फल; म. कायफळ]

कायम—वि. सततचें; स्थिर; टिकाऊ. 'मुलूख सरंजामास देऊन केली कायम गलिमाई, मनुष्यमात्रादिकांचें माहेर होति पेशवाई.'-ऐपो ४२१. [अर. काइम्] ०जुबान-वि. एक वचनी; सत्यवक्ता; शब्दास मागें न घेणारा. 'फरासीस कायम जुबान

व बहादर आहे.' –चिरा २४. **०ठशांचें**–वि. ठराविक पद्धतीचें. 'समेचे ठराव कायमठशाचे झाले आहेत.' –टि १. ५३५. **०दायम**–वि. निरंतरचें; नेहमींचें; पक्कें; टिकाऊ. [अर. काईम्+दायम्] **०मकाम**–पु. येक अधिकारी तगीर होऊन त्याचे कामावर दुसरा होणें त्यास कायम मकाम म्हणावें. –रा ७.९२. [अर.] **०मुक्काम**–वि. (व. ना.) बदली; हंगामी; तात्पुरता. 'तुमची नेमणूक कायममुक्काम केली आहे.' [अर. कायम+मकाम्] **०मिजाज-स**–वि. निश्चयी; अचंचल; दृढचित्त. 'सांप्रत तिकडे कायममिजाज व मजबुत एक नवाब नजबखान आहेत.' –दिमरा १.८.'आसाहेबी कायममिजास जाणोन...'–ख ३५७५. [अर. काइम्+मिझाझ्] **०मिजाजी**–स्त्री. करारीपणा; निश्चयीपणा. 'यांचे कायम मिजाजीचा प्रकार म्हणावा तरी मेणाचें नाक यांचा मिजाज आहे.' –दिमरा १.२३८.

काय(ई)मी—स्त्री. निश्चिती; स्थैर्य; मजबुती. 'कलकते-करांचें लिहिणें रास्त, दुरस्त व कायमीचें.'–खरे ७.३५६८. 'तिकडील मात्र कायमी असावी' –रा ५.१८८. [फा.]

कायर—वि. लाचार; भित्रा. 'ते कायर जाले.' –होकै ३६. [अर. काहिर्; सं. कातर]

कायरस—पु. अंगरस; पाणी न वापरतां काढलेला रस. [काय+रस]

कायरस—पु. कोणत्याहि हिरव्या फळांचें पंचामृत. [ते. काय=कच्चें, हिरवें फळ; का. काई+सं. रस]

कायल—काईल पहा. **०करणें**–(व.) फजीत करणें.

कायल—स्त्री. (कु.) मोठी काहील; कढई.

कायलाथो—पु. (गो.) लोखंडी कलथा.

कायली—स्त्री. (गो. कु.) काहिली; भडका; लाही.

कायलोण—न. (गो.) काहील.

कायलोळी—स्त्री. १ (गो. कु.) आंबोळी; धिरडें. २ एक प्रकारची पोळी.

कायस्थ—पु. १ एक हिंदूंची जात व तींतील व्यक्ति. प्रभूंच्या दोन (कायस्थ आणि पाताणे) भेदांपैकीं एक भेद. यांचा धंदा लेखकांचा. 'जितकी कदर एखाद्या दासावर किंवा कायस्थावर (कारकुनावर) तितकीच कदर आपल्या ... मानीत नसत.' –चंद्र १०६. २ कास्त. –मोल. (जाति विवेक पहा). ३ कायत पहा. [सं.]

कायस्थी—वि. कायस्थासंबंधी.

काया—स्त्री. देह; शरीर; रूप; आकार; अंग. 'याति वृक्षवल्ली होत्या कोमेलिया। त्यांसि कृष्णें काया दिव्य दिली।' –तुगा ५३. [सं. काय] (वाप्र.) **०दाखविणें-दिसणें-पाहणें**–(रोगी व वैद्य, पति–पत्नी अथवा पुनर्विवाहास अनुकूल असलेली विधवा यांच्यासंबंधीं प्रयोग करतात) अंग उघडें करणें. **०झांकणें-उघडी टाकणें-पडणें**–या वाक्प्रचारांत काया शब्दानें शरीराचा जो भाग सभ्याचारानुसार अवश्य झांकला पाहिजे त्याचा बोध होतो. हा शब्दप्रयोग स्त्रियांच्या बोलण्यांत येतो. अंग, आंग (देह–शरीर, तनु नव्हे) या शब्दानेंहि वरील वाक्प्रचारांत तोच अर्थ निघतो. **०पडणें**–मरणें. **०पालटणें-फिरणें-बदलणें**–आजारानंतर शरीर सतेज होणें. **०वाचा-मनेंकरून**–शारीरिक, शब्दिक, मानसिक यांनीं युक्त; शरीराच्या सर्व अवयवांनीं, इंद्रियांनीं व मनाच्या कल्पनांनीं युक्त; सामान्यतः सर्व प्रकारांनीं मनःपूर्वक (एखादें कृत्य करणें). **सामाशब्द-०पूर**–पु. देह; शरीर. **०कष्ट**–पु. अंगमेहनत. 'माझें हें धन कायाकष्टाचें आहे.' **०वाचामानस**–न. शरीर, वाणी व मन; देह, वाचा आणि आत्मा. 'हा अवतरला शेषशाई। जाण क्षीराब्धीचा जावई। दृढ लागे पायीं। कायावाचामानसें।'

कायि-यी—न. हिरवें फळ. [का.]

कायिक—वि. शारीरिक; देहाविषयींचें. [सं.] **०वाचिक-मानसिक**–वि. शारीरिक, शाब्दिक व अंतःकरणविषयक (पादसेवन, पूजा, भक्ति, शुश्रुषा, सेवा इ०). **०वृद्धि-व्याज**–स्त्री. (शारीरिक श्रमाच्या प्राप्तीला अनुसरून) दररोज अगर मासिक द्यावयाचें व्याज; कायिक व्याज, याऐवजीं कालिक व्याज–वृद्धि असेंहि म्हणतात.

कायिसा—अ. कशाकरितां –शर.

कायी—अ. (काव्य) काय? कोणतें? 'सांगाजी मुनिराया। कारण कायी। संतचरित्रें तिही ठायीं। वरणावया कारण कायी।' –कथा १.२.३०. [काय]

काये—अ. १ काय? 'मना सांगपा रावणा काये जाले।' –राम १३. २ कांहीं. 'भाग्य पुरुष काये येक। सेवीत नाहीं।' –दा १.६.११.

कायेसी—वि. कसली? कसची? कितीशी? 'पाहतां देवाचे कृपेसी। मातेची कृपा कायेसी' –दा ४.८.२४.

कार—पु. जोंधळ्याची एक जात.

कार—पुस्त्री. एक प्रकारचा काळा व टणक दगड. [का. कार=काळा]

कार—पु. करार; ठराव; वचन. (क्रि० करणें; ठरविणें.) 'आम्हीं त्याचा मोडूनि कार।'–अफला २०. [अर. करार]

कार—पु. (राजा. कु.) खत; राब.

कार—पु. अक्षराच्या पुढें त्याचा निर्देश करण्यासाठीं लावला जाणारा एक प्रत्यय. जसें–अकार, ककार, पकार इ० [सं. कृ]

कार—पु. कर्ता, करणारा या अर्थी संकृत शब्दापुढें लावण्यांत येणारा एक प्रत्यय. जसें:–वस्त्रकार; शस्त्रकार. [सं. कृ; का. कारि]

कार—पु. कहार; पालखी वाहणारा भोई. [कहार]

कार—पु. (बे.) कहर. [कहर]

कार—पु. (गो.) माळयानें आगराच्या–बागेच्या–मालकास द्यावयाचा आड उत्पन्नाबद्दल खंड. [सं. कर]

कार—स्त्री. (चंद्रपुरी) मुलगी; लेक.

कार—पु, (कों.) एक मासा.

कार—न. (क.) सुजलेलें नख; कॉर. [कोर]

कार—न. काम. ' त्या मवाफीक कार सुरत–पिजीर होऊन ...' –पया ३८४. [फा. कार्]

कार—पु, (व.) शेवट; अखेर; परिणाम. ' हें मलम जख मेचा कार करील ' **०करणें**–परिणामकारक होणें. [कहर]

कार—स्त्री. (व. कारपट्टा) कोरफड; कुमारी. [सं. कुमारी–कुआंरी–कार]

कार—पु. (हेट.) कार व पांजरी हे जहाजावर पूर्वी दोन अधिकारी असत. यांना आकाशांत वर दूरवर फिरणाऱ्या ठराविक जातींच्या पक्ष्यांची माहिती असे. होकायंत्राची युक्ति निघण्यापूर्वी असे दोन अधिकारी प्रत्येक जहाजावर असत.

कारक—वि. करणारा; घडवून आणणारा; प्रेरणा देणारा; उत्पन्न करणारा; सामाशब्द–शांतिकारक; पुष्टिकारक (असे सामासिक शब्द हजारों आहेत व आणखी हजारों करतां येतील).

कारक—न. (व्या.) क्रियेच्या अन्वयानें जो विभक्तीचा अर्थ होतो तो; नामाचा क्रियापदाशीं असलेला संबंध; हीं कारकें सहा आहेत–कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान व अधिकरण; [सं.] **कारकनिमित्त**–न. (तर्कशास्त्र) कारण; साधन; क्रियेची निमित्तभूत वस्तु; याच्या उलट ज्ञापक निमित्त. [सं. कृ.]

कारक—वि. (राजा.) खतविलेली जमीन.

कारक—पु. व्यापाऱ्यांनीं द्यावयाचा कर –बिल्सन ?

कारका—स्त्री. गारा; मेघांतून पडणारे बर्फाचे तुकडे. करक पहा. [सं. कृ=विकिरणें; करक=गार]

कारकीर्द—स्त्री. अमलाची मुदत, काळ; (राजाचा वगैरे राज्य करण्याचा काळ); राजवटी; सत्तेचा काल; अधिकाराचा, व्यवहाराचा काल. [फा. कार्+कर्द]

कारकुनी—स्त्री. १ कारकुनाची जागा, काम. २ केलेल्या कामगिरीबद्दल कारकुनाला दिलेला पैसा, वेतन (जो आपला कारकून नव्हे त्यास). ३ चाकरीबद्दल किंवा विक्रीच्या जिनसावर मिळणारी कारकुनाची किफायत, नफा. ४ कारकुनाच्या कामगिरीबद्दल त्यास द्यावयाच्या रकमेसाठीं बसविलेली पट्टी, कर ५ (ल.) काटकसर; बारकाई; काटेकोर व चोख व्यवस्था. ६ एक मुद्रुप. –वि. कारकुनासंबंधीं. [कारकून] **०कावा–मत**–पुन. कारकून लोकांचा धूर्तपणा, लबाडी, डावपेंच; यावरून सामान्यतः कपट; लुच्चेगिरी. **०घटा–चिन्ह**–प्रन. कारकुनाचा घट्टा; चिन्ह; खूण; निशाणी (मांडी मोडून सतत बसल्यामुळें डाव्या पायाच्या घोटयाला घट्टा पडतो यावरून). **०पेशा, कारकूनकी**–पुस्त्री. कारकुनाचें काम, धंदा; नोकरी.

कारकून—पु. १ कामाचा माणूस. लेखक; लिहिण्याचें काम करणारा;महालीचे कारकुनानी इस्कील करून दुम्बाला करीत नाहींत. –रा २०.१५२. २ (गो.) (ल.) धूर्त मनुष्य; हिशेबी व हुषार माणूस (तिरस्कार दर्शवितांना कारकुंडा म्हणतात). (वाप्र.) सवा हात लेखणीचा कारकून (=शिफारस करतांना व्याजोक्तीनें म्हणतात).– **नाची मेहुणी**–स्त्री. (ल.)कातरावयाची कातर. (विनोदानें कातरी इकडे तिकडे पडते व लवकर सांपडत नाहीं म्हणून म्हणतात). [फा. कारकुन् =करणारा]

कारकोळी–ळथा—वि. कारकोळ देशासंबंधीं (ब्राह्मण वगैरे).

कारखानदार—वि. कारखान्यावरील अधिकारी; कारखान्यांतील कोणीहि माणूस; कारखान्याचा मालक. [फा.]

कारखाननीस—पु. कारखान्यावरील मनुष्य; कारखान्याचा हिशेब ठेवणारा अंमलदार; सरकारी धान्याच्या कोठारावरील अधिकारी; आठ दरकदारांपैकीं एक. [फा. कार्खान+नवीस]

कारखाना—पु. १ जेथें एखाद्याचा व्यवहार चालतो अशी मोठी इमारत. जसें–गलबतें बांधण्याची गोदी, दारुगोळ्याचा कारखाना, यंत्रशाळा वगैरे कोणतेंहि प्रचंड काम, धंदा वगैरे व तो चालविण्याकरितां ठेवलेला परिवार, खातें. ' तमाम कार्खानेजात चराईस जाण्याचा हुकूम जाला. ' –रा ७.१६६. ' खंडेराव महाराजांच्या कारकीर्दीत त्यास (कलावंत खातें) कारखान्याचें स्वरूप नव्हतें.' –कलावंत खातें १ (बडोदें). ' कारखाने ज्याचे त्याला ' –ऐपो २३१. ३ कोणतीहि धंद्याची जागा. ४ संभारगृह–राज्यको ७.१०. [फा. कार्+खाना=कामाची जागा]

कारगत—स्त्री. (चि.) कारकीर्द. –मसाप २.४.१०८.

कारगुजरी—स्त्री. (हिं.) बाजारपेठ.

कारगुजार—वि. (हिं.) कामकाजांत हुषार; अनुभविक.

कारचकर–रंचकर–रजकर–रंजकर–रजगार—पु. बंदुकी, पिस्तूलें, तलवारी, खंजीर, चाकू, घुऱ्या वस्तरे वगैरे शस्त्रें करणारा; शस्त्रकार; भाथीं करणारा कासार; चिलखत करणारा; [सं. कचकार]

कारज—न. (चंद्रपुरी) काळीज; हृदय.

कारंजें—न. शोभेसाठीं पाण्याचा फवारा उंच उडविण्याचें एक साधन. ' न रंजे कारंजें निरखुनि फणी तें फणफणी ' –र ३२.

कारट—न. १ (कों.) और्ध्वदेहिक कर्मास कुत्सितार्थी म्हणतात. २ ती क्रिया करणाऱ्या ब्राह्मणास दिलेली दक्षिणा.

०खाऊ–वि. और्ध्वदेहिक क्रिया करणाऱ्या ब्राह्मणास उपहासानें म्हणतात. [सं. करट]

कारटा-टया—पु. कारटखाऊ पहा. 'कीं प्राणी पावल्या मृत्युसदन। संतोषती कारटे ब्राह्मण।' –मक ४९९. 'नदीवर क्रिया चालवणारे कारटे यांच्या पदरीं पडणारा प्रतिग्रह पाहून ... विल्सन साहेब अशा सारख्यांचा आत्मा कां बरें तळमळूं नये' –नि १०५८.

कारटा-पोरटा—पु. खोडकर; व्रात्य; द्वाड मूल. [सं. कुमार–कुआर+टा]

कारंडव—पु. बदकाच्या जातीचा एक पक्षी; करडुवा; करडोंक. याच्या मादीस कारंडवी म्हणतात. [सं.]

कारंडा—पु. ओंडा; ठोकळा. करंडा पहा.

कारडोल—न. काजूच्या बियांचें तेल.

कारण—न. १ कार्याचे अधिकरणीं नियमेंकरून विद्यमान असून जें कार्योत्पादक तें; निमित्त; कार्यप्रवर्तक; प्रमाण; आधार; ज्यामुळें एखादी गोष्ट घडते तें; हीं तीन आहेत–समवायी, असमवायी व निमित्त (अंतस्थ किंवा अविभाज्य, दूरस्थ किंवा अप्रत्यक्ष, साधनभूत किंवा आकस्मिक; कारण याचा प्रथमार्थी कर्तृत्व, हेतु, अपेक्षा, प्रेरणा, उद्देश, आधार इतक्या अर्थी प्रयोग होतो). 'तयाही बोधा कारण। जाणता मीचि।' –ज्ञा १५.४३८. 'ऐसा आहे समाचार। कारण पाहिजे विचार।' –दा १२.६.२९. २ प्रयोजन; हेतु. ३ गरज; काम; प्रसंग. 'आज पाऊस पडला नाहीं म्हणून छत्रीचें कारण लागलें नाहीं.' ४ मुंज किंवा लग्नासारखा कोणताहि समारंभ. ५ साधन उपकरण; घटक; मूलतत्त्व; आद्यद्रव्य. ६ (न्याय) नियतपूर्वे; दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीवर अवलंबून नसणारें. –न्याप ३४. ७ मसलत. 'हाता चढे धन। ऐसें रचिलें कारण।' –तुगा १८४०. ८ कार्य. 'जाऊं दे सावित्री, मज करूं दे कारण।' –बसा ६७. 'करूनी कारण स्वामी यश घ्यावें। पाईका त्या नांवें खरेपण' –तुगा ३७९. ९ इच्छित वस्तु; सृष्टीचें आद्य तत्व. 'तेथ इच्छा आणि बुद्धी घडवी अहंकारेंसीं आधीं। मग तिया लाविता वेधीं। कारणाच्या।' –ज्ञा १३.९६८. १० साध्य. 'तें परब्रह्म निर्वाण। जें आत्मविदांचें कारण।' –ज्ञा ५.१४९. ११ (वेदांत) महत्तत्त्व, अहंकार, व सूक्ष्म पंचभूतें (आनंदगिरीचें मत); पंचज्ञानेंद्रियें, त्यांचें पांच विषय मन, बुद्धि व अहंकार, (शांकरमत भगवद्गीता १३.२०.). [सं. कृ=करणें] **कारणीं लाविणें**–कामाला, उपयोगाला लावणें. (देह, द्रव्य, सामर्थ्य, आयुष्य, जन्म इ०). 'कारणीं लावोनि करील सार्थक।' –दावि ३९१. **०त्व**–न. कारण असणें; कारणरूप असणें. [सं.] **०देह-शरीर**–पुन. देहचतुष्टयांपैकीं तिसरा देह. याला अविद्येचें किंवा अज्ञानाचें अधिष्ठान आहे. 'स्थूल सूक्ष्म देहद्वयातें। आणि विपरीत ज्ञानातें। अज्ञानचि प्रसवलें म्हणोनि त्यातें। कारण देह म्हणिजे पैं।' [सं.] **०परत्वें**–कारण पडल्यास; जरूर लागल्यास. 'कोंडोभटाबरोबर मात्र ती कारणपरत्वें बोलत होती.' –स्वप २१४. **०वादी**–पु. (कायदा) वादी; फिर्यादी. [सं.]

कारणा—स्त्री. १ (अशिष्ट) करुणा; दया; कृपा. २ गया वगैरे; काकळूत; विनवणी. (क्रि० भाकणें.)

कारणात्—क्रिवि. कारणासाठीं–मुळें–स्तव; [सं. कारण याची पंचमी]

कारणि(णी)क—वि. १ उपयुक्त; जरूर; समुचित; जरूरीपुरतें. 'कारणिक लढाऊ लोक मात्र किल्ल्यांत ठेविले' –भाव ३६. २ घडवून आणणारा; व्यवस्था ठेवणारा. ३ कारणपरत्वें घडलेला; निमित्तपूर्वक बनलेला. 'गौळीयाचे घरीं देखा। कृष्ण उपजला कारणिका।' –गुच ८.५४. –पु. राज्याचा मुख्य मंत्री किंवा सावकारी जहाजावरील मुख्य गुमास्ता; कारभारी; व्यवस्थापक. 'इतर कारणी भले लोळविले।' –ऐपो २०९. [सं.]

कारणीं-णें—शअ. १ चतुर्थी विभक्तीचें लक्षण; स्तव; साठीं; करितां; मुळें. 'ब्राह्मणाकारणें गाय दे.' २ ठिकाणीं, 'देवकारणीं लाजाळू' –दा २.५.३०. ३ कडे. 'तेव्हां त्या तेलिणीनें। पाहिलें विक्रमाकारणें।' –शनि २८७. [कारण]

कारणोत्तर—न. (कायदा) विशिष्ट मुद्दा कबूल न करितां वादीचें म्हणणें कबूल करणें; विशेष हरकत घेणें. [सं.]

कारतुस, काडतुस—न. बंदुकींतून उडवावयाचें दारू व शिशाची गोळी असलेलें कवच. [इं. कार्टरिज]

कारंदा—पु. १ (व.) कारभारी; कारवाई करणारा मनुष्य; कर्ता; कारस्थानी. [फा. कारंदाज; सं. कर्ता]

कारं(रिं)दा—पु. एक वेल, त्याचें फळ व कंद. करांदा, करिंदा पहा.

कारंदाज—वि. काबील; कारस्थानी. [फा. कारंदाज]

कारंदाजी—स्त्री. कारस्थानीपणा; शहाणपणा; मुत्सद्दीगिरी. 'कारंदाजीची मस्लत सांगितली ते न ऐकिली जे.' –जोरा ३६. [फा.]

कारनीस—न. गलथा; कंगोरा; कंगणी. 'भिंतीच्या माथ्यासभोंवतीं लांकडी कारनीस बसवावें.' –मॅरट ७७. [इं कॉर्निस]

कारबेल—पु. (इं.) एखादा लांकडी सर वगैरे ठेवण्याकरितां भिंतींतून पुढें काढलेले दगडी किंवा लांकडी ठोकळे. 'दगडाच्या ठोकळ्याऐवजीं कारबेल्स भिंतींत घालावे.' –मॅरट ६०. [इं कॉबेल]

कारभाऊ नारभाऊ—पुअव. कारु नारु हे एकमेकांना संबोधितांना म्हणतात. –गांगा १३.

कारभार—पु. राज्य, सावकारी किंवा एखादा धंदा अंगावर घेऊन त्यासाठीं करावयाची सर्व तऱ्हेनी खटपट, व्यवस्था; उद्योगधंदा; काम. (क्रि० हांकणें; टांकणें.) [सं. कार्यभार; तुल. फा. कार–ओ–बार] म्हण० करील त्याचा कारभार, मारील त्याची तरवार, राखील त्याचें घर, व खपेल त्याचें शेत.

कारभारी—पु. १ व्यवस्थापक; कारभार करणारा; मोठा धंदा चालविणारा; राजाचा मुख्य मंत्री किंवा दिवाण. २ (सामा.) व्यवस्था पाहणारा कोणीहि प्रतिष्ठित गृहस्थ (मग तो स्वतःच्या घराची किंवा मालकाच्या घराची किंवा धंद्याची व्यवस्था पहात असो). ३ (कों. कु. स्रा. कुण.) बायकोनें नवऱ्याचा उल्लेख करतांना योजावयाचा शब्द. ४ (ल.) उठाठेवी करणारा माणूस. ०मंडळ–न. सरकारी किंवा एखाद्या संस्थेच्या अधिकाऱ्यांची मंडळी; व्यवस्थापक मंडळी; राजाचें मंत्रिमंडळ. ०मुखत्यार–पु. १ राज्याचा मुख्य प्रधान. २ मुख्य व्यवस्थापक किंवा मुख्य चालक.

कारभारीण—स्त्री. १ कारभाऱ्याची बायको किंवा एखाद्या कामाची स्वतः व्यवस्था पाहणारी स्त्री. २ (कों. स्रा. कुण.) नवऱ्यानें बायकोचा उल्लेख करतांना म्हणावयाचा शब्द.

कारमान्य—न. १ पीडा देणारें जादूचें कृत्य; जारणमारण; चेटूक. २ खोटा व्यवहार; कचाट; खटले; कवटाळ. (क्रि० करणें; रचणें; योजणें; मांडणें.)

कारमोरी—वि. (जुन्नरी) वैशाख महिन्याच्या विर्णीत जन्मलेलें कोंकरूं (मेढी वैशाख किंवा कार्तिक महिन्यांत विते).

कारला—पु. स्त्रियांच्या हातांतील कारल्यासारख्या बांगड्यांचा एक प्रकार.

कारली–ले—स्त्रीन. १ एक भाजी व तिचा वेल; कारेती; याचें फळ कडू व सुमारें वीतभर लांब असून, अग्निदीपक, अत्युत्तम कफनाशक आहे याच्या पांढरें व हिरवें अशा दोन जाती आहेत. –योर १.४२ २ कांहीं लोक करडीच्या झाडासहि म्हणतात. [सं. कारवेल्ल]

कारलें—न. १ कारली वेलीचें फळ. २ कारल्याच्या आकाराचा सोन्याचा दागिना (स्त्रियांच्या गळ्यांतील घुटा किंवा एखाद्या माळेच्या मधोमध असलेला). 'भोंबऱ्या कारलें भांगार' –वेसीस्व ११.५. ३ अणकुचीदार खिळे मारलेलें लांकडी किंवा लोखंडी मुद्गर, हें पूर्वी प्रत्येक किल्ल्यांतील बुरुजावर ठेवीत व शत्रु बुरूज किंवा तट चढून येऊं लागला तर त्याच्यावर फेंकीत. 'तेथ घोडश महावाक्येंसी कारलीं।... समविषमत्वें प्रति बुरुजीं ठेविलीं।' –स्वानु १०.२.९. ४ (मल्लविद्या) करेला; मुद्गर; हा निमुळता, लांब, कमरेपर्यंत उंचीचा व पांच शेरापासून दीड मणापर्यंत वजनाचा असतो. ५ मोहरमच्या सणांत कारल्याच्या फळाच्या आकाराची एक ताटी करून तिला कागद वगैरे चिकटवून इकडे तिकडे नाचवितात ती. ६ चाबकाच्या दांडीच्या व वादीच्या मधील कारल्याच्या आकाराचें सुतळीचें किंवा चामडयाचें विणकाम. ७ (मावळी) दोन–तीन पायल्या भात मावणारें कणगुलें.

कारल्या—वि. कारल्याच्या आकाराचा एका जातीचा आंबा.

कारव—स्त्री. एक झाड व त्याचें कांडें किंवा फोक. हें झाड पांच–सहा हात उंच व बारीक असतें. याचे फोक कुंपणाला, कुडांला, ओमणाला वापरतात. [सं. करीर]

कारंव—न. (गों.) एक फुलझाड. आबोलीची निळी जात.

कारव(वा)ई—स्त्री. चातुर्याची व्यवस्था;हुषारीचा कारभार; काटकसर; खोल कारस्थान; गुप्त मसलत; कारस्थान पहा. [सं. कार्य]

कारवणें—अक्रि. १ (राजा. कु.) खतावणें (शेत वगैरे). २ खत घातल्यानें फोफावणें (भाजीपाला वगैरे); जोरानें वर येणें. ३ नासणें; कुजणें (फणसांतील गरा वगैरे). ४ शिजतांना बिघडल्यामुळें, बेचव पचपचीत होणें (भाजीपाला). ५ जळका वास येणें (दूध, खीर, भात वगैरेना). [कार=खत]

कारवा—पु. (नृत्य) स्त्रीचा वेष घेऊन डोकीस पागोटें व कमरेस तलवार लावणारा सोंगाड्या; किंवा पुरुषाचा वेष घेतलेल्या स्त्रीचें सोंग; असें सोंग घेणारी व्यक्ति; अशा सोंगाड्याचा नाच. (क्रि० देणें; नाचणें; नाचविणें). [हिं. काहारवा; काहार= पालखीवाला भोई यावरून]

कारवाद—पु. कारस्थानीपणा; युक्ति; शकल; कट (विशेषतः वाईट गोष्टीविषयीं) करण्यांतील चातुर्य. [सं. कृ]

कारवादी—वि. मसलती; गुप्त कट करणारा; कारस्थानी; फसव्या; लबाड (कुटिल कृत्यांत).

कारवान—न. घोडे विकणाऱ्या अरबांचा तांडा, टोळी, तळ; अशा तळांतील प्रत्येक व्यक्ति. [तुर्की. अर. फा. कारवान]

कारवानी—स्त्री. कारवानाचा धंदा –वि. १ कारवान संबंधी (घोडा, माणूस वगैरे). २ (ल.) धूर्त; चलाख; खोल (देवघेवीमध्यें).

कारविणें—अक्रि. १ (कों.) करवतीनें कापणें.

कारविण—१ कारवणें. पहा.

कारवी—स्त्री. कारव पहा.

कारस(सा)ई—स्त्री. १ रयतेला दिलेली तगाई; ही पुंगीच्या वेळीं धान्याच्या रूपानें परत करण्याच्या बोलीवर देतात. २ किल्ल्याच्या घेरांतील (टापूंतील) खेड्यांतील लोकांकडून किल्ल्यावर असलेल्या सरकारी इमारतींच्या शाकारणीसाठीं, चूड व इरली करण्यासाठीं बसविलेला सरकारी कर. झांत गवत, नारळीच्या सावळ्या, पानें, कारव्या, बांबू वगैरे सामान असतें. तसेंच

महालाचा अधिकारी फिरतीवर असतांना त्याच्या उपयोगासाठीं लांकूडफांटा, जळण, फळफळावळ, भाजी वगैरे गांवकऱ्यांनीं पुरवावयाचें सामान.(एका जुन्या यादींत पुढील कारसाईचा (वस्तूंचा) समावेश केलेला आढळतोः–हरळें, तवसें, काळा भोपळा, कोन, करांदे, हरसाल फणसपोळी, आमसोल, दोरगुंडे, चुडी, वासे, चिवली वगैरे). कुळाकडून गवत, लांकडें फुकट घेण्याचा हक्क. खोत-वेठ पहा. 'कारसाई किल्ले रायेगड येथील शाकारणीबद्दल वगैरे गांवगना नेमणूक आहे ते.' –मसाप २.२.१५१. ३ गुप्त कट; उलाढाली; कारस्थानें. (क्रि० करणें; चालवणें). [सं. कृषि ?]

कारस्थान—न. १ काटकसर; मितव्यय. २ कट; गुप्त मसलत. ३ राज्य किंवा कुटुंब यांतील व्यवस्था; बंदोबस्त. [सं. कार्य+स्थान]

कारस्थानी—वि. १ काटकसरीचा; मितव्ययी. २ खोल मसलत्या; धूर्त. ३ कर्तबगार.

कारळा-ळे-तीळ—पु. खुरासणी; काळा तीळ. याचें झाड दीड–दोन हात उंच असतें. फुलांचा रंग पिवळा असून बीचा रंग काळा असतो. याचें तेल जाळण्यास व खाण्यास उपयोगी आहे. पेंड गुरांना घालतात.[सं. कृष्ण+तिल; तुल.का. करि=काळा]

कारळें—न. कडू जिरें; हें औषधी आहे. [का. करि=काळें]

कारा—स्त्री. १ तुरुंग; कारागृह; कारागार; बंदिशाला. 'काय दिसे न तुम्हास्तव रिपुनीं उघडून ठेविली कारा।' –विक ६६. २ (ल.) त्रासदायक धंदा, काम, संसार. [सं.]

कारा(रि)गिरी—स्त्री. १ कारागिरीचें कौशल्य; चतुराई; कसब; कामाची उत्कृष्ट उठावणी; करामत. [फा. कारिगरि]

कारागीर-गिरी—पु. १ (कों.) कारभारी. 'अर्जुन तिथें कारागिरी।' –मसाप २.१.२३.

कारागृह—न. तुरुंग; बंदिशाळा; 'कारागृहीं अवतरले। श्रीकृष्ण गोकुळीं वाढिन्नले।' –दशावतारांची भूपाळी ९. [सं.]

कारात—न. कॅरट पहा. सुमारें दोन रतींचें वचन; हिऱ्याचें वजन करण्यासाठीं वापरतात. 'हा हिरा १६८० कारात वजन आहे.' –मराठी सहावें पुस्तक पृ. ११४. आडा. २ री. [इं.कॅरट अर. किरात]

कारार्थे—न. (गो.) कारलें; कारेतें.

कारांना—न. (गो.) करवंद.

काराफूल—न. (कु. गो.) स्त्रियांच्या कानांतील कुर्डी, लवंग. [कर्णफूल]

काराब—न. (गो.) एक कानांतील मोत्यांचा दागिना.

कारावर्णे—क्रि. १ (कु.) घासाधीस करणें. २ पाण्याच्या पाटांतील गाळ काढणें.

काराविर्णे—कारविर्णे पहा.

कारिका—१ अर्थबोधक श्लोक. हा ३२ अक्षरी असतो. 'अखंड वेदांतिक कारिकांचें' –सारुह ५.१४. २ टीका; व्याख्या. ३ टीकारूप श्लोकांची मालिका. [सं.]

कारिंगणा– –(गो.) ब्राह्मी वनस्पति.

कारिगर-गार, कारागीर, कारेगार—पु. १ उत्तम काम करणारा; कसबी माणूस. 'बहुत दिवस नगास लागले त्यास इकडे दंगा कारीगर न मिळे।' –रा ३.१६८. २ चांगला कसबी सुतार, गंवडी, चितारी, सोनार, न्हावी. 'मिळेल तितका उत्तम कारागीर बोलवावा.' –आगर ३.५. –वि. उपयोगी; कामी पडणारें; गुणकारी इ० उत्तम. 'तिनें बगा कसं कारागीर काम केलं ते!' –मदमं ५५.

कारिट-रीट—स्त्रीन. एक वेल व तिचें फळ. हें काकडी-सारखें लहान पण कडू असतें.

कारिंदा—पु. कारंदा वेल व तिचें फळ; करांदा. या वेलीचीं पानें किंचित वाटोळीं असून हिला वीत-दीड वीत अंतरावर गांठीं असतात व प्रत्येक गांठीला करांदे येतात, व खालीं जमिनींतहि लागतात. फळ पूर्ण वाढल्यावर आंब्याएवढें होतें. याचे दोन प्रकार आहेत–गोडा व कडवा. [सं. करमर्द]

कारिघणा-ना—पु. ब्राह्मी वनस्पति.

कारिवृद्धि-व्याज—स्त्रीन. (कायदा) ऋणकोनें किंवा कुळानें ठरविलेलें व्याज. [सं.]

कारिसवाणा—वि. केविलवाणा. 'धर्म बैसविला कारिसवाणा।' –भाए १०९. [सं. कृश]

कारी—वि. करणारा; घडविणारा; बनविणारा (समासांत जसें–कफकारी, नाशकारी इ०), कारक सारखाच हा शब्द असून यांचीं पुष्कळ प्रकारचीं विशेषणें बनतात. [सं.]

कारी—स्त्री. (नाविक) राळ (गलबत, नाव इ० ज्या खालीं लावतात); तेलांत चेंदरुस ढवून तयार करतात. ही फळ्या कायम घडतेवेळीं बाहीस लावून नंतर कापसाची घडी ठेवून घडतात.

कारी—पु. (कों.) एक मासा.

कारी—उद्गा. (व.) कां ग ह्या अर्थी मुलीस हाक मारतांना योजावयाचें संबोधन. 'करें सखेचा कर घेय कारी।' –सारुह ८.४४.

कारीक-कारींघ—वि. (राजा.) खत घालून तयार केलेली (जमीन). [कार=खत]

कारीगर-गार, कारेगर-गार—वि. परिणामकारक; लागू; कारिगर पहा. 'हल्ला जाहली होती परंतु कारीगर जहाली नाहीं.' –रा १४ ३५. [फा. कारगर; तुल० सं. कार्यकर]

कारु-रू—पु. १ कसबी; कारागीर; शिल्पकार; कलेबर निर्वाह करणारा माणूस. २ समुच्चयानें बारा बलुतेदार; कारुनारु, नारुकारु पहा. [वै. सं. कृ–कारु – ऋग्वे ९.११२.३.]

कारुक—पु. चितारी; कारागीर. 'परम रुचिर चित्रें कारुकीं काढियेलीं.' –सारुह ६.१३. [सं. कारुक]

कारुणा—पु. (बे.) ब्राह्मी. कारिवणा पहा.

कारुणिक—वि. दयाळु; कृपाळु. [सं. करुणा]

कारुण्य—न. दया; कृपा; करुणा. 'जाणूनि जीव सानुलें। कारुण्यामाजीं पाउलें। लपवूनि चाले।' –ज्ञा १३.२४८. [सं.] ०वृत्ति–स्त्री. दयाळूपणा. 'आपल्या अंगांत कारुण्यवृत्ति जागृत झाली...' –गीर ८१.

कारुना—पु. (हेट). कारिवणा–ना पहा.

कारुनारु—पु. अलुतेदार व बलुतेदार.

कारें—न. १ एक कांटेरी वनस्पति. २ समुद्रांत टाकावयाच्या बुरीच्या जाळ्यास लावलेलें हलकें व तरतें लांकूड.

कारेती—स्त्री. कारल्याची वेल.

कारेतें-तां—न. (कों. कु.) कारलें.

कारेवारे—पुअव. (एकवचन कारावारा; परंतु हा शब्द बहुतेक एकवचनी उपयोगांत आणीत नाहींत. कर आणि वारा यांपासून) धूळधाण; फडशा; सत्यानाश (पैसा, नशीब वगैरेचा). (क्रि० करणें). [केर+वारा]

कारेळ-ळा, कारेला तीळ, कारेलें—कारळा तीळ पहा.

कारो—पु. (गो.) काजऱ्याचें झाड; काजरा; कुचला.

कारोट—पु. (कों.) वाताहत; विनाश; उच्छेद (शील, धान्य, गांव, घर इ० चा). [का. कार=ओकणें]

कार्कश्य—न. शब्दांतील कर्कशपणा; कर्णकठोरपणा. [सं.]

कार्कीदि-र्दी, कार्कुनी, कार्खाना—कारकीद इ० मध्ये पहा.

कार्गरी—स्त्री. परिणाम; यशस्विता. 'परंतु अडचण व पर्जन्य फार यास्तव कार्गरी जाहली नाहीं.' –रा १४.३५. [कारीगर पहा]

कार्चोंबी—वि. वेलबुट्टीदार. 'खिल्त पाच पारचे कार्चोंबी दिला.' –रा ७.७०. [फा. कार्चोंबी]

कार्चोंबु—पु. भरतकाम; जरतारीचें, वेलबुट्टीचें काम करणारा. [फा. कार्चोंबु, सिं. कार्चोंबु]

कार्टा-टीं—पुस्त्री. कारटा पहा. 'ओंकारेश्वरावरच्या कार्ट्याच्या रडण्याच्या...अंगीं इतका बेशरमपणा नसेल.' –नाक ३.८८.

कार्टा-टीं-टें—पुस्त्रीन. द्वाड मुलगा–गी–गें. 'एखादे वेळीं हीं थोरांचीं द्वाड कार्टीं प्रसंगीं विसरून जाऊन ...' –रत्न ५.३. [कारटा पहा]

कार्ड—न. १ (इं.) लिहिण्याचें कोरें पत्र; गंजिफा, पत्ते यांतील एक पान. २ स्वतःचें नांव व पत्ता लिहिलेली चिट्ठी. [इं. कार्ड] ०बोर्ड–पु. (इं.) पुठ्ठ्याचा जाड कागद. [इं. कार्डबोर्ड]

कार्त—पु. (गो.) पाव रत्तल वजन. [इं. क्वार्टर]

कार्तकाढप—१. (गो.) राजरोस परवाना मिळविणें (धंद्याला). २ (ल.) घरबंद सोडणें. [इं. चार्ट+काढणें ?]

कार्तवीर्य—पु. पुराणप्रसिद्ध सहस्रार्जुन. याला परशुरामानें मारलें. हरवलेली वस्तु याच्या नामस्मरणानें सांपडते असा भाविक लोकांचा समज आहे व त्यासाठीं पुढील श्लोक रूढ आहे– 'कार्तवीर्यार्जुनो नाम राजा बाहु सहस्रवान्। यस्य स्मरणमात्रेण गतं नष्टं च लभ्यते॥' [सं.]

कार्तिक–पु. खाटिक; मांसविक्रय करणारी एक जात. –विलसन. [सं. कृत्=कापणें]

कार्तिक-र्त्तिक—पु. ज्या महिन्यांत पौर्णिमेच्या दिवशीं कृत्तिका नक्षत्रीं चंद्र असतो तो महिना; चांद्रमासीय आठवा महिना; इं. नोव्हेंबर महिन्याचा सुमारास येणारा महिना. [सं. कृत्तिका] ०स्नान–न. अश्विनी पौर्णिमेपासून कार्तीकी पौर्णिमेपर्यंत कृत्तिका नक्षत्र मावळण्यापूर्वी पहांटेस करावयाचें स्नान, आंघोळ. हें राधादामोदराप्रीत्यर्थ करतात. ०स्वामी–पु. देवांचा सेनापति; षडानन; शंकराचा वडील मुलगा; ह्याचा प्रसाद होणाऱ्याला सात जन्म ब्राह्मणजन्म येतो व जी सुवासिनी स्त्री याचें दर्शन घेईल तिला सात जन्म वैधव्य प्राप्त होतें (कारण तो ब्रह्मचारी आहे) अशी महाराष्ट्रांत समजूत आहे. परंतु मद्रासेकडे अशी समजूत नाहीं, उलट तिकडे कार्तिकस्वामीला दोन बायका आहेत असें मानितात व त्यास सुब्रह्मण्यम् असें म्हणतात. ०स्वामीचा हिमायती-च्या भिडेचा–पु. केवळ ब्राह्मण जातींत उत्पन्न होऊन ब्रह्मकर्मादि विधि न करणाऱ्याला उपहासानें म्हणतात. –काचे दिवे–पुअव. ह्या महिन्यांत लावण्यांत येणारे आकाशदिवे. 'हिरंभटीं स्नान केलें अग्निसेवें। कार्तिकाचे दिवे आकाशांत'–ब १५.

कार्तिकी—स्त्री. कार्तिक महिन्यांतील एकादशी.

कार्ति(का)की—वि. कार्तिक महिन्यासंबंधी (सोमवार, एकादशी, पौर्णिमा इ०).

कार्नीस—स्त्री. कारनीस पहा.

कार्पण्य—न. कृपणपणा; चिक्कूपणा; कंजूषपणा. [सं.]

कार्पर्दीज—पु. कार्यकर्ता; मुत्सद्दी. 'परंतु कार्पर्दीज यांचा अर्ज आपल्यास मान्य पडून...' –रा ५.३०. [फा. कार्पर्दाझ्]

कार्पास—पु. कापसाचें झाड व कापूस. [सं.]–वि. कापसासंबंधीं.

कार्मुक—पु. धनुष्य. 'बीरीं कार्मुकें बाहिलीं।' –एरुस्व ८.२६. 'एका दों न ढळेचि कार्मुक करें हें नेटकें जों कळे।' –आसी ४२. [सं.]

कार्य—न. १ काम; उद्योग; कृति; क्रिया. 'तया नांव धनंजया। कार्यें पैं गा।' –ज्ञा १३.९६९. २ परिणाम; क्रिया; योग. 'जे कार्य ना कारण।' –ज्ञा १५.७८. 'चुन्यावर आसिडाचें कार्य झाल्यास कार्बानिक आसिड वायु बाहेर पडतो.' –पदाव ११. 'तो कार्यावर दृष्टि देतो.' ३ समारंभ; उत्सव. उ० लग्नकार्य. ४ (व्या.) विभक्तीचीं रूपें; विकार. ५ फिर्याद; खटला; मुकद्दमा. ६ (वेदांत) अकरा इंद्रियें व पांच विषय. (आनंदगिरीचें मत). ७ (वेदांत) शरीर (पंच ज्ञानेंद्रियें, त्यांचे पांच विषय, मन, बुद्धि व अहंकार). (शांकरभाष्य भगवद्गीता १३.२०.) –वि. करण्यास योग्य. (वाप्र.) **०उठणें**–काम पार पडणें. 'असें झालें असतां ... किती कार्यें उठणारीं आहेत पहा.!' –नि ४४०. **०उरकणें**–१ काम पार पाडणें. २ (ल.) रतिसंभोग करणें. **कार्यावर दृष्टि देणें**–आपल्या ध्येयाचा ध्यास घेणें; आपला उद्देश सिद्ध करण्याकडे लक्ष देणें; काम साधणें. **–सलावणें**–योग्य कामीं उपयोग करणें. 'त्यानें आपला पैका कार्यास लावला.' सामाशब्दः– **०कर्ता**–वि. १ लोकांचीं कामें करण्यांत तत्पर. २ स्वतःच्या हिमतीवर काम तडीस नेणारा. **०कारणन्याय**–पु. हेतु व परिणाम यांच्या संबंधाचा नियम. [सं.] **०कारणभाव**–पु. फल व तदुत्पादक क्रिया यांचा संबंध. 'ज्या दोन गोष्टींचें आनुवर्त्य दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीवर अवलंबून नसतें त्या दोहोंत कार्यकारणभाव असतो.'–न्याप ३४. 'घटाचा आणि मृत्तिकेचा कार्यकारणभाव आहे.' **०कारी**–वि. कार्य करणारा; व्यापार करणारा; तटस्थ नव्हे तो. **०कुशल**–वि. धंद्या मध्यें चतुर, कल्पक. **०क्रम-पत्रिका**–स्त्रीपु. सभेत व्हावयाचें काम व त्याचा अनुक्रम दाखविणारा कागद. –सभा ७१. (इं.) अजेंडा. **०तः**–क्रिवि. कांहीं कारणासाठीं, उद्देशामुळे. **०तत्पर**–वि. कार्यांत निमग्न. **०दर्शक दिशा**–स्त्री. (यंत्रशास्त्र) प्रेरणा ज्या दिशेंत कार्य करते ती दिशा. –यंस्थि ४. **०दर्शक बिंदु**–पु. (यंत्रशास्त्र) प्रेरणेचें कार्य ज्या बिंदुस्थळीं होतें तो बिंदु. –यंस्थि ४. **०प्रयोजन**–न. विवाह, मुंज वगैरे समारंभ किंवा सण यांना व्यापक संज्ञा. **०भाग**–पु. १ काम किंवा पत्करलेलें अंगावर घेत लेलें कार्य; करावयाचें काम; साधावयाचा उद्देश. (क्रि० करणें; उरकणें; उचलणें; लोटणें.) २ कामाचा अंश, भाग. **०भार**–पु. १ अंगावर घेतलेलें कामाचें ओझें; जबाबदारी; जोखीम. २ काम; व्यवस्था; कारभार. [सं.] **०लोभी**–वि. कार्यसाधु; काम साधून घेणारा. 'न चालिन भिडेस मी जरिहि कार्यलोभी तिला।' –केका १०. **०वादी-वादु-साधु**–वि. कोणीकडून तरी आपलें कार्य साधण्यासाठीं गोड बोलणारा. **०वाह-ही**–पु. व्यवस्थापक; जबाबदारीनें कार्य करणारा; संस्थेचा चिटणीस वगैरे. **०व्यग्र-व्याकुळ-व्यावृत्त**–वि. हातांत घेतलेल्या कामानें बेजार झालेला; अडचणींत आलेला; वेढलेला. **०शरीर**–न. कारणशरीराच्या अनुषंगानें योजावयाचा शब्द; स्थूल शरीर. **०संपादन-साधन**–न. कामाचा उरक; काम तडीस नेणें; काम साधणें, सफल करणें. **०साधक**–वि. कार्य साधणारा (घटक, माणूस, साधनें). **०सिद्धि**–स्त्री. शेवटास नेलेलें काम; फलसिद्धि; कामाची पूर्णता. **०क्षम**–वि. काम करण्यांत हुषार; निपुण; प्रवीण; कामाला प्रसंगीं उपयोगी पडणारा; काम करण्यास समर्थ, योग्य. [सं. कार्य+क्षम=समर्थ]

कार्याकारण—वि. आवश्यक कार्याच्या निर्वाहापुरता; जरूरी पुरता; प्रसंगापुरता. [सं. कार्य+कारण]

कार्याची वस्त-स्तु—स्त्री. कामाला उपयोगी पडणारी कोणतीहि वस्तु, पदार्थ; अनेक कामाला जरूरीची असणारी वस्तु (औषध, पदार्थ, माणूस).

कार्यार्थी—वि. १ जो आपलें कार्य हळु हळु पण धिम्मेपणानें सिद्धीस नेतो तो; कार्यसिद्धीकडे लक्ष देणारा; हेतु सफल करून घेणारा. २ स्वार्थसाधु. [सं. कार्य+अर्थिन्]

कार्यानुमेय—वि. परिणामावरून, फलावरून अनुमान करण्यास योग्य. [सं. कार्य+अनुमेय]

कार्श्य—पु. कृशता; रोडपणा. 'जयाचे मनीं आलस्य। देहीं अति कार्श्य।' –ज्ञा १३.५१७. [सं. कृश–कार्श्य]

कार्षापण—वि. जुन्या काळचें एक नाणें. 'आपण कोणापासून एक कार्षापणहि दक्षिणा म्हणून घेऊं इच्छित नाहीं.' –चंद्र ६९. [सं. कार्षापण]

कान्हळ-ळा, कान्हेळ-ळा-तीळ—काळा तीळ पहा.

कान्होड—स्त्री. (व. ना.) गाईचें वासरूं; कालवड पहा.

काल—न. केळीचा गाभा. कांलें पहा.

काल—न. चालू दिवसाच्या मागील दिवस. [सं. कल्य–कल्ल–काल]

काल—पु. १ वेळ; समय (ज्याचें मोजमाप दिवस, प्रहर, इ० नीं होतें तो). २ हंगाम; मोसम; योग्य वेळ. ३ संकटाची वेळ. ४ यमराज; मृत्यु; ज्यापासून जिवाला धोका वाटतो अशी वस्तु, प्राणी (साप, वाघ इ०); एखादें संकट; मृत्यु; नाश; मृत्युसमय. 'शिवाजी महाराजांचा काल शके १६०२ मध्यें झाला.' ५ चांगलें किंवा वाईट होण्यास कारणीभूत अशी परमेश्वराची इच्छा. ६ भूत, भविष्य, वर्तमान इत्यादींचा समय. ७ (गायन) ताल, कालाचीं तालोपयोगी प्रमाणें:–अणु, द्रुत, लघु, गुरु, प्लुत. [सं. काल] (वाप्र.) **०देशतार्तम्य करणें–देश पाहून करणें–वर्तणें**–काल, स्थल परिस्थिति पाहून वागणें. **०साधणें**–अचूक, योग्य संधि गांठणें; योग्य काळीं

एखादी गोष्ट घडवून आणणें. सामाशब्दः- **०कंटक**-पु. काळकंटक पहा. **०कल्ला**-पु. वेळ; प्रसंग; संधि वगैरे. 'सशाचे पारधीस बाघाचें सामान असावें, न जाणो कालकल्ला आहे.' -क्रिवि. दुःखाचे दिवसांत; वेळप्रसंगीं (भविष्यकालीन प्रसंग); संकटाचे दिवसांत; अडचणीचे दिवशीं; जास्त अर्थासाठीं वेळ-अवेळ पहा. 'धान्य देऊन ठेवावें, कालकल्ला उपयोगी पडेल.' [काल द्वि.] **०कूट**-न. १ देवदैत्यांनीं अमृताच्या प्राप्तीसाठीं समुद्रमंथन केल्यावेळीं निघालेलें, त्रैलोक्य जाळणारें विष. 'तैसें तें घनदाट। उठावलें एकवाट। जैसे उसळलें कालकूट। धरी कवण।' -ज्ञा १.८९. २ सामान्यतः विष. ३ (ल.) द्वेष; मत्सर. **०कृत**-वि. (कायदा) मुदतबंद गहाण; गहाण ठेवण्याचा एक प्रकार; यांत विशिष्ट मुदतीच्या आंत गहाण सोडवून नेण्याची सवलत असते. [सं.] **०क्रमण-णा**-नस्त्री. करमणूक; वेळ घालविणें (खयाली खुशालीत, चैनींत). [सं.] 'कालक्रमणा बरवी होइल आतां म्हणोनि नाचतसे।' **०गति**-स्त्री. दैवाची गति; काळवेळ लोटणें, जाणें; बरें-वाईट होण्याची काळाची रीति, ओघ; कालाचा प्रभाव. 'कालगतीनें भूमीनें पीक सोडलें.' [सं.] **०गुजराण-गुजारा-री-गुद्राण**-पुस्त्री. संकटांत काळ घालविणें; हरहुन्नर करून काळ कंठणें; कसें तरी करून तात्पुरता उदरनिर्वाह करणें. [सं. काल+फा. गुजरान्=जीवन] **०गूत**-न. १ कला; कल्पनेची योजना; चतुराईची योजना; गूढ योजनेंतील रहस्य. २ अशा तऱ्हेची रचना किंवा रीत. ३ यंत्रांतील गूढ रचना, किल्ली व त्या रचनेनें युक्त असें यंत्र. [सं. कला+गति-गुत?] **०ग्रस्त**-वि. मरणोन्मुख; अतिशय संकटानें त्रस्त झालेला, घेरलेला; विपत्तींत सांपडलेला. **०घन**-पु. (काव्य) मृत्युरूपी ढग; प्रलयमेघ; सृष्टीचा नाश होण्याच्या वेळीं जे मेघ वृष्टि करून सृष्टि बुडवितात तो. 'कालघन गडगड आटले हो तेधवां।' **०चक्र**-न. १ कालाची राहाटी व त्याचा प्रभाव; नशिबाचा फेरा; दैवगति; आयुष्यांतील बरी-वाईट घडामोड. (क्रि० घडणें; उलटणें; पालटणें). २ विशिष्ट कालघटकांची आवृत्ति, उ० ६० संवत्सरांचा फेरा; ऋतूंचें आवर्तन वगैरे. ३ कालाचा किंवा वेळाचा विशिष्ट अंश,भाग; मुदत; विशिष्ट कालखंड; कालाचें ठराविक परिमाण. **०चरित्र**-न. नशिबाचा खेळ; दैवाची लीला. 'कालचरित्र विचित्र।' **०त्रय-त्रितय**-न. भूत, भविष्य, वर्तमान हे तीन काळ. **०त्रयीं**-क्रिवि. (नास्तिपक्षी) तीनहि काळीं (कधींहि नाहीं या अर्थानें). 'स्पर्श न करी कालत्रयीं।' **०दंड**-पु. १ यमानें दिलेली शिक्षा. २ मृत्यु; मरण. **०दशा**-स्त्री. १ बरीवाईट दैवगति; परिस्थिति. २ सत्ता घाल विगारा काळ, दिवस. (क्रि० फिरणें; पालटणें; बदलणें; वाईट असणें). 'कालदशा कोण्हाच्यानें सांगवत नाहीं.' **०धर्म**-पु काल-महिमा; (मनुष्याच्या दैवावर चालणारी, घडणारी) कालाची सत्ता, अधिकार, सामर्थ्य, प्रभाव. **०निर्वाह**-पु. १ रोजच्या चरितार्थास लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा. २ काळ घालविणें. **०परत्वें**-क्रिवि. काळाच्या अनुरोधानें; प्रसंगविशेषीं; योग्य कालीं; कधीं कधीं; केव्हां केव्हां. **०पराभव**-पु. संकटकाळीं काळाशीं झगडून यशस्वी होणें; कालावर विजय; बिकट परिस्थितींतून मार्ग काढणें, पार पडणें. **०परिच्छेदरहित**-वि. तिन्ही कालांच्या पलीकडील म्हणजे सतत, नित्य (परब्रह्म). **०पाश**-पु. मृत्यूचा फास; मरण. **०पुरुष**-पु. १ यमाचा सेवक; यम; यमदूत. २ ब्राह्मणास दान देण्याकरितां केलेली लोखंडाची, द्रव्य आंत भरलेली (पोकळ) यमाची प्रतिमा. ३ (ल.) कोणताहि भयंकर पुरुष; शत्रु; क्रूर मनुष्य. **०बेल**-स्त्री. १ भविष्य सांगणें; शकुन वगैरे सांगणें. २ कालबेला गोसाव्यांचें काम. **०बेला-ल्या**-पु. गोसाव्यांचा एक पंथ व त्यांतील व्यक्ति-वि. १ वरील पंथांतील; जो कालबेल करतो तो. २ कालबेलासंबंधी. **०महिमा-माहात्म्य**-पुन. कालचक्र अर्थ १ पहा. **०मान**-न. १ वेळमापन. २ वेळामापक यंत्र; (इं.) क्रॉनोमिटर. ३ हंगाम; रागरंग; कोणताहि काल (चांगला -वाईट). 'आतांचें कालमानच वेगळें।' (क्रि० फिरविणें; बदलणें; उलटणें; पालटणें.) ४ परिस्थिति. **०मूर्ति**-पु. १ भयंकर क्रूर माणूस. २ यम. **०यातना**-स्त्री. यमयातना; अत्यंत दारुण क्लेश. **०रात्री**-स्त्री. १ प्रत्येक ७७ व्या वर्षाच्या सातव्या महिन्याची सातवी रात्र. २ काली देवीचा जन्मदिवस; कांहींच्या मतें हा दिवस आश्विन शुद्ध अष्टमी व कांहींच्या मतें श्रावण वद्य अष्टमीची रात्र. ३ कल्पाची शेवटची रात्र. ४ (सामा.) अंधारी, काळीकुट्ट रात्र; भयंकर रात्र; मरण येण्याच्या वेळची रात्र. **०वंचन-ना**-नस्त्री. १ कालक्रमण; वेळ घालविणें. २ मृत्यूची फसवणूक; गुंगरलेल्या कठिण काळांत कसा तरी निर्वाह करणें. **०सत्ता**-स्त्री. कालमहिमा पहा. **०साधन**-न. १ वेळ समजण्याचें यंत्र (घड्याळ); छायायंत्र. २ स्नानसंध्यावगैरे कर्मांस जो काळ सांगितला आहे त्या वेळीं करावयाचें तें तें अनुष्ठान. ३ वेळाचें घेतलेलें माप. **०सूत्र**-न. नशिबाचा, दैवाचा धागा, रेषा. **०स्वरूप**-न. (मृत्युसम वाटणारा) कोणताहि अति भयंकर पदार्थ; मृत्युरूपी वस्तु. **०हरण**-न. १ कालक्रमण; वेळ घालविणें; २ दिवस मारून नेणें; त्या दिवसाची साधन सामुग्री मिळविणें; दिवस काढणें. **०क्षेप**-पु. १ कालव्यय; कालक्रमण; कालहरण, कालातिक्रमण; आयुष्याचे दिवस कंठणें. २ निर्वाह.

काल—वि. काळा.

काल—(खा.) उद्यां. 'कालदिन येजो' =उद्यां ये. [हिं. गु. कल.]

कालगुंत—स्त्री. भोकें पाडलेली लोखंडी पट्टी (सोनार, लोहार इ० ना उपयोगी). कालगूत पहा.

कालण—न. (राजा. कुण.) कालवण. [कालवण अप.]

कालणें—अक्रि. (लुप्त) कालवणें; मिसळणें; मिश्रित करणें.

कालथा—पु. उलथणें. कलथा पहा.

कालनेमीची मूर्ति—स्त्री. (गो.) कपटी माणूस. [कालनेमि या नांवाचा एक कपटी राक्षस होता त्यावरून]

कालपी-साखर—स्त्री. उत्तरहिंदुस्थानांत कालपी गांवीं तयार झालेली साखर (खडीसाखर, पिठीसाखर या दोन्ही; विशेषतः खडीसाखर.)

कालमील-मैल—स्त्री. तगमग; अस्वस्थता; तळमळ (दुःख, ताप यांपासून होणारी).

कालमेलणें—अक्रि. तळमळणें; तडफडणें (ताप, दुःख यांमुळें).

कालमेह—पु. काळ्या रंगाची लघ्वी होणें; प्रमेह पहा. [सं. काल+मेह]

कालरा—पु. (इं.) पटकी; महामारी; अजीर्णामुळें शरीरांत वातदोष होऊन सुया टोचल्याप्रमाणें पीडा करणारा रोग; कुळीक; विषूचिका; वाखा; जरीमरी. हा विकोपास गेल्यास दोन्ही पार्यांच्या खोटांना डाग द्यावा किंवा शुद्ध गंधक अगर केशर लिंबाच्या रसांतून द्यावें. –योर १.५१०. [इं. कॉलरा]

काललवण—न. एक कृत्रिम व रेचक मीठ; पादेलोण; गंधबीज. बिडलवण पहा. [सं.]

कालव—न. शिंपांत असणारा एक समुद्रांतील प्राणी; काल व त्याचा शिंपला; या प्राण्यास डोकें नसतें. हा समुद्रकिनाऱ्यावरील खडकांतहि सांपडतो.

कालव(ह्ह)ड-डी—स्त्री. लहान वासरूं, गाय; गोजी. [सं. कलभटी–कलहडी–कलभडी–कलवडी –भाअ १८३२; का. कडसु]

कालवण—न. १ भात, भाकर इ० कोरडे पदार्थ ज्याच्याशीं खातात असें ताक, दहीं, दूध आमटी, सांबारें, कढी, पातळ भाजी. (व.)शिकरण, (केळीं शिताफळें इ० ची) वगैरे पदार्थ; पातळ तोंडी लावणें; कोरडघास; (गो.) निस्त्याक. 'दधि दुधें तकें। कढिया कालवणें विचीत्रें।' –ऋ ८४. २ मिश्रण [सं. किंचित्+लवण]

कालवणें-विणें—उक्रि. १ दोन पदार्थांचें एकत्र मिश्रण करणें. 'जैसीं जवळिकेंचीं सरोवरें। उचंबळलिया कालवती परस्परें।'–ज्ञा १०.१२१. २ पित्तादिकांमुळें पोटांत ढवळल्यासारखें होणें. [दे. कल्लवियं; का. कलबु] **जीव-प्राण कालविणें**–जीव घाबरा होणें. 'भ्रमांत मन कालवे, प्रखर तेजही मालवे।' (वाप्र.) **विटाळ कालवणें**–झालेला विटाळ प्रगट न करतां चहूंकडे शिवणें.

कालवा—पु. नदी, तलाव इ० चें पाणी नेणारा मोठा पाट. 'कर्ण म्हणे तुज सागर भासे, मज भीम कालवा राया।'–मोकर्ण ३२.२५. [सं. कुल्या; का. कालिवे; इं. कॅनॉल]

कालवा—पु. १ भात भाकर इ० चा कालवणाशीं कुसकरून बनविलेला काला; त्यावरून. २ (ल.) कालवाकालव; गर्दी. 'सोडली पुण्याची जागा तोडिल्या धागा, भडकल्या पागा कालवा झाला.' –ऐपो ४३३. [कालवणें]

कालवाकालव—स्त्री. १ परस्पर विरुद्ध वस्तूंची मिसळ, भेसळ. २ ढवळाढवळ; विचका. ३ घोटाळ्याचा वाद. ४ पोटांतील अस्वस्थता. ५ कोणताहि मनोविकार प्रबल झाल्यानें मन अस्थिर होणें; चलबिचल; 'रोम शहर जुलमी पोपच्या व फ्रेंच राजाच्या ताब्यांत गेलेलें पाहून ग्यारिबॉल्डीचे मनांत कालवाकालव होऊन जात जसे' –ग्यारिबॉल्डीचें चरित्र [कालवणें]

कालसांव—(गो.) विजार. [पोर्तु.]

काला—न. १ मिश्रण. 'तेयां दोन्हींचा काला कींजे।' –शिशु ७६. २ दहीं काला; (संक्षेपानें) गोपाळकाला. 'प्रेमें काला पूर्ण मांडियेला।' –दावि ३८. 'आमुच्या शिदोऱ्या एकत्र करूनि। काला वाटिसी तूं चक्रपाणी।' –ह ३६.५७. ३ कोहळा, भोपला यांचा कीस तिखट, मीठ इ० घालून (सांडग्यांसाठीं) करतात तो. ४ (गो.) बार मारण्याचा एक प्रकार. ५ चिखल. 'नीलोत्पालाचिये माळें। दीन्हलें कस्तुरिएचें कालें।' –शिशु ३७७. ६ पूट; रंगाचा पुन्हां पुन्हां द्यावयाचा हात. 'इश्वरध्यानाचिया चोळा। मना काले दिजती वेळोंवेळा।' –माए ६८६. [कालविणें] **०कथला**–पु. (ना.) भानगड; उलाढाल. **०कित्ता**–पु. १ निरनिराळ्या जिन्नसांचा किंवा वस्तूंचा संग्रह, जमाव, ढीग. (क्रि० भरणें.) २ (समुच्चयानें)नाना प्रकारच्या धान्यांचीं पिकें किंवा बाजारांत विक्रीस आणलेलें निरनिराळें धान्य. (क्रि० नासणें; पिकणें; बुडणें; येणें; भरणें). ३ शेतांत उसाच्या फडांत, सुपारीच्या आगरांत निरनिराळ्या प्रकारचें पेरलेलें मोगण; दुय्यम प्रतीचें पीक.

कालानुकूल्य—न. कालाची अनुकूलता; योग्य संधि, प्रसंग; धारजिणी वेळ. [सं.]

कालापकर्ष—पु. कालाचा अपव्यय. [सं. काल+अपकर्ष]

कालापाक—न. प्रत्येक श्लोकांत अर्थ पुरा करण्याऐवजीं क्रियापदाच्या कारकवृद्धीनें जोडलेल्या चार श्लोकांचा समुच्चय; युग्मविशेषक; कुलक पहा. [सं.]

कालाबुल-ली-भूल-भुली—स्त्री. (ताप, पित्त, भूक वगैरेनें आलेली, झालेली) कासाविसी; तळमळ; तगमग;

अस्वस्थता. 'कां चिखली रुतली गाये । धड भाकड न पाहे । जो तियेचेया ग्लानी होये । कालाभुला ।' –ज्ञा १६.१४२. 'मग कालाबुली हाका देते वेळे। होतोसी परि डोळे नुघडिसी ।' –तुगा ४०८३.

कालायस—न. पोलाद. [सं. काल+आयस्]

कालावधि—स्त्री. विशिष्ट वेळेची मर्यादा;. कांहीं काळ; काहीं वेळ; 'विचार बदलण्याला कालावधीची आवश्यकता मुळींच नसते.' –भा११०. [सं. काल+अवधि]

कालाष्टक—न. आषाढ वद्य प्रतिपदा ते अष्टमीपर्यंतचा काळ. या काळांत काळभैरवाचे भक्त त्याची पूजा करतात, उपवास पाळतात, व आठ ब्राह्मणांना जेवण घालतात. [सं. काल+अष्टक]

कालाष्टमी—स्त्री. कार्तिक वद्य अष्टमी; प्रत्येक महिन्याची वद्य अष्टमी; (विरू.) कालाष्टकांतील शेवटचा दिवस. या अष्टमीचे दिवशीं कालभैरवाची पूजा करतात. [सं.]

कालिक—वि. कालासंबंधीं; मुदतीचें. [सं.] ०**वृद्धि**–स्त्री. ठरलेल्या मुदतीचें व्याज. कायिकवृद्धि पहा.

कालिका, कालिकाई-काली—स्त्री. पार्वतीचें एक स्वरूप. बंगाल्यांत हिची पूजा करतात. [सं.]

कालिंग—१ (गो.) कलिंगड पहा. २ द्रव्याचा संचय.

कालिंगड-ण—न. कलिंगड पहा. [सं. कालिंगी]

कालिंगडा—पु. (राग) ह्या रागास षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाती संपूर्ण संपूर्ण, वादी पंचम, संवादी षड्ज, गानसमय रात्रीचा चवथा प्रहर.

कालिंदी—स्त्री. यमुना नदी. 'कालिंदीचें हृदयशल्य फेडिलें.' –ज्ञा १०.२९०. [सं.]

कालिपास—पु. (शाप.) (इं.) कॅलिपर्स; गोलाकार वस्तूंचा आंतील व बाहेरील व्यास मोजण्याचा वाटोळा कंपास. [इं. कॅलिपर्स]

कालिमा—स्त्री. १ काळेपणा. २ (ल.) डाग; कलंक (दोष, पाप इ० मुळें आयुष्यास, चारित्र्यास लागणारा). ३ लाज; शरम (अपराधी माणसाची). ४ काळवंडलेपणा; निस्तेजता; प्रेतकळा (रोग, अतिश्रम इ० मुळें येणारी). ५ शरीराचा काळेपणा (अतिशय उन्हामुळें आलेला). [सं.]

काली—स्त्री. १ पार्वती. २ एक वनस्पति. 'मेथिका, धातकी, काली, उपलसरी, बाजपूरक यांचा पिंड तेजाची वृद्धि करणारा होय.' –अश्वप २.८.

कालीन—वि. कालविषयक; काळासंबंधीं; काळाचा. (सामा.) एतत्कालीन; तत्कालीन.

कालीफास—न. (होमिओपाथी) बारा क्षारांतील एक महत्त्वाचें औषध; हें मेंदूचे रोग, विषमज्वर, पक्षघात यांवर विशेष उपयोगी आहे. [इं. कॅल्शिअम–फॉस्फेट]

कालीफ्लॉवर—स्त्री. फुलकोबी; फुलवर; एक भाजी. [इं.]

कालीमूर—न. (होमिओपाथी) बारा क्षारांपैकीं एक. आमांश, सर्दी, बहिरेपणा, त्वग्रोग, प्रदर इ० वरील औषध. [इं.]

कालीय—पु. कालिया सर्प. 'गरुडीं कालीय तसा ज्यावरि तूं कोपगरळ वमशील.' –मोकर्ण ३०.११.

कालीसलक—न. (होमिओपाथी) बारा क्षारांपैकीं धुपणी, देवी, गोवर व छातीचे सर्व रोग यांवर व कोणत्याहि रोगांवर हें औषध घेतात. –जीवनरसायन ४९. [इं.]

कालू—पुस्त्री. एक वाद्य; सनई; चौघड्यांतील टिमक्यांसहि म्हणतात. 'कालू कर्णे, वाजती पुढें भाग्याची चढती। पाहुन जीव माझे तडफडती।' –प्रला १३४. 'कालू कर्णे बाजे होती नौबत हत्तीवर चौघडे' –ऐपो २३७.

कालू-लूं—न. कालव.

कालें—न. केळीचा गाभा; केळीच्या मध्यांतून एक दांडा वर पानापर्यंत येऊन तेथून त्या दांडयाला केळींचें लोंगर (केळयांचा घड) येतें. या दांडयाला (केळीच्या पोटांत असणाऱ्या भागास, बाहेर आलेल्या नव्हे) कालें म्हणतात. (वाप्र.) काल्यासारखा थंड=केळीच्या गाभ्यासारखा थंडगार (अंग).

कॉलेज—न. महाविद्यालय; पाठशाळा; उच्च शिक्षणाची संस्था. [इं. कॉलेज]

कालेत—स्त्री. (गो.) प्रकृति.

कालेवेलें—न. वाईट, विश्वासघातकी काम, मार्ग; प्रच्छन्न कृत्य. कालबेल पहा.

कालो—पु (कु.) काला पहा.

कालोवा—पु. मेळ; मिलाफ; ऐक्य. 'जाला भृत्युभज्य कालोवा । भक्तिच्या घरीं ।' –अमृ ९.३०. [कालवणें]

काल्पक—वि. (कल्पक अप.) योजना करणारा; युक्तिबाज; चतुर. [सं. कल्पक]

काल्पनिक—वि. मनानें किंवा कल्पनेनें शोधून काढलेलें; कल्पित; नकली; बनावट; बसविलेलें, जुळविलेलें; अवास्तविक. [सं. कल्पृ]

काल्हवृत—कल्वृत-द पहा.

काल्हवड—स्त्री. कालवड पहा.

काव—स्त्री. गेरू; एक प्रकारची तांबडी माती; हिचे लोखंडी काव व सोनकाव असे दोन प्रकार आहेत. [ते. का. कावि=तांबडा]

काव—स्त्री. १ त्रास; कंटाळा. २ कावा; कपट. 'एक बटीक काव करूनि जात होती धुर्णे घेउनी.' –ऐपो ३५५. ३ (वे.) ताप; कोप; राग. [कावणें.]

कावकाव—स्त्री. १ (ध्व.) कावळ्यांचें ओरडणें. २ (ल.) कर्जदार, भिकारी यांचा मागणीचा, तगाद्याचा एक कल्लोळ, गोंगाट, आरडाओरड. (क्रि० करणें). [ध्व.]

कांवजौचें—क्रि. (गो.) पाण्यांत फार वेळ राहिल्यानें अंग आंखडणें.

कावटी—पु. (कों.) एक मासा.

कावड—न. (खा.व.) (कवाड अप.) दार; दाराची एक फळी. [सं. कपाट=कवाड]

कावड-डी—स्त्री. १ पाण्याच्या घागरी अथवा एखादा जड पदार्थ नेण्यासाठीं बांबूच्या दोन टोकानां शिक्याच्या रचनेप्रमाणें दोऱ्या बांधून त्यांत घागरी घालून नेण्याचें साधन. 'सांहुनिया रजतमाची कावडी।' –हा १६.७७. 'काष्ठाची लघु कावडी धरुनियां होतों वडाखालता।' –कचेसुच ११. [का. काउ–ओझें वाहणें; का. ते. कावडि; सं. कार्पट] २ विटीदांडूच्या खेळामध्यें ठराविक गुण ज्या बाजूच्या खेळाडूंचे होतील त्यांनीं आपल्यापैकीं एका हुषार खेळाडूकडून विटीचे ठराविक टोले मारून शेवटीं त्रिटी जेथें टोलली असेल तेथून दुसऱ्या बाजूच्या खेळाडूंपैकीं एकेकानें सुर अथवा लंगडी, खेळण्याच्या जागेकडे घालावी, परंतु मध्यें तो गडी (थकल्यामुळें) जेथें थांबेल तेथून विजयी बाजूच्या गड्यानें आणखी एक विटीचा टोला लगावला तर पुन्हा तेथून सुर अथवा लंगडी सुरू करावी व याप्रमाणें हरलेल्या डावाची फेड करावयाची अशी पद्धत 'बाळूचे व सुनंदाचे ९० झाले, शंभराची कावड होती.' –सुदे ६. **काघडश्या**–वि. कावड वाहणारा.

कावडता(था)घड—स्त्री. १ (चमत्कारिक शब्दरचना) गिऱ्हाईक व दुकानदार यांच्यांत पदार्थांच्या भावाविषयीं चढउताराची घासाघीस होऊन शेवटीं ठरलेली किंमत, रक्कम, भाव; अडचणींत आलेल्या व्यापाऱ्याशीं त्याच्या सावकारांनीं केलेली कर्जाची तडजोड अगर तोंडमिळवणी; सरासरीची विभागणी; प्रमाणशीर वाटणी; अदलाबदल (वस्तु, धंदा काम इ० ची); एकदम दिलेली ठोकळ रक्कम. २ लुच्चेगिरीनें, धूर्तपणानें काम साधणें. ३ कामांतील शकल; धूर्तता; कावा; खुबी. ४ खांजणीभांजणी.

कांवडल—स्त्री. कवंडल पहा.

कावडी—पु. कापडी पहा.

कावण-वाण—न. १ (कों.) लग्न वगैरे समारंभाचा स्वयंपाक वगैरे कामासाठीं घराबाहेर बांधलेली झोपडी किंवा झावळ्या, वगैरेचा मांडव; तात्पुरता मांडव; गुऱ्हाळाकरितां घातलेला कुडाचा मांडव वगैरे. २ पशूंचा गोठा (उन्हाळ्यांतील); कोंडवाडा; छप्पर. [का. कावण्ण]

कावणें—अक्रि. १ फार संतापणें; रागावणें; रागावून तोंड सोडणें. 'तेथ कायसी सेवकांसी गोठी। कावलीं पोटीं लीपुनें।' –एभा २३.९५. २ कंटाळणें; त्रासणें; वैतागणें (रागानें, दुःखानें). 'दीनता ल्याली; दुःखानें कावली' –विक ८. ३ पिसाळणें. (कुत्रें). ४ कंटाळून आंतल्या आंत तडफडणें; तळमळणें. 'संकटीं मनुष्य कावे।' –दावि ४५५. 'तनू भववनिं त्रितापदवपावकें कावली।' –मंम ६०. ५ भयानें गांगरून जाणें.

कावती—स्त्री. (राजा.) पोफळीचें रोप. कवाता पहा.

काव(घा)र—न. १ (कों.) पाचर, खुंटी (भितीतील); खुंटा (जात्याचा) ढिला झाल्यास त्यांत बसविण्याची पाचर किंवा लाकडी चीप. २ (व.) कावल; अतिशय झिजलेलें भांडें. ३ (योगशास्त्र) गुदस्थानीं टांच जोडणें, गुद व शिश्न यांच्या मधील शिवण. 'अपान रंध्रद्वया–।–माझारीं धनंजया। पाळीं पिढ्नियां। कांवर मूळ।' –हा १८.१०३६. ४ (नाविक) फळीच्या वाढींत दुसरी फळी गच्च बसती करणारी लांकडी पाचर ही कावर खालच्या व वरच्या दोन्ही फळ्यांस चार अंगुळें अंतरावर दोन दोन भोंकें पाडून त्यांत मस्तूर भरून नंतर ठोकतात. हिचें पुढचें टोंक निमुळतें व रुंदट असून वरचा माथा गोल व सपाट असतो. **०मूळ**–न. गुद व शिश्न यांमधील शिवणीचें मूळ.

कावरखा—न. (व.) झाडावरचें बांडगूळ. कावरुख पहा.

काघरणें—अक्रि. (व.) पिसाळणें. कावणें पहा.

कावरा—पु. (व. ना.) (बैलगाडी) जुंपावर मधोमध बसविण्याची एक पितळी वस्तु. हिची नागासारखी आकृति असते व दोन्ही बाजूंस मधोमध लहान आरशी असते. या नागाच्या तोंडातून बैलांचा कासराहि घेतात.

कावरा-कावराबावरा—वि. भयभीत; फार गोंधळलेला; भय, आश्चर्य, राग यांनीं चकित झालेला; घाबरलेला; बुजलेला. [का. कावु=ताप, शोक + बेवरू=घाम]

कावरुख—न. झाडावरचें बांडगूळ. 'संसार हें कांवरुखें। झाड तैसें।' –हा १५.५२. 'सदा सफळ आंब्याचा रूख। त्यावरी उपजे कांवरुख।' –एभा २३.३३. (ल.) –वि. क्षणभंगुर; आश्चर्यकारक. [सं. किम्+वृक्ष?]

कावरें-विरें—न. वेड; भ्रम. 'लाविलें कावरें। प्रल्हादासी म्हैसासुरें।' –तुगा २८१. –वि. वेडें; पिसाळलेलें; भ्रमात्मक; आभासात्मक; आश्चर्यकारक. 'परीतें असो हें ऐसें। कावरें झाड उससे।' –हा १५.१०९. [कावरा]

कावल-ली-ल्या—न. १ (कों. गो.) फार जुनें झालेलें किंवा नवें असुन अतिशय हलकें असलेलें भांडें. २ किडकी, ठिसुळ, जीर्ण झालेली तुलई, लांकूड. ३ झिजून पातळ झालेलें भांडें, भांड्याचा तुकडा. ' नरदेह खोंकर जैसें फुटकें कावल।'–स्वादि ६.४.७६. –वि. १ झिजलेलें; मोडीचें; निरुपयोगी. (भांडें इ०) २ किडका; मोडका; किरकोळ (खांब, तुलई); कीडखाद (भाजी). [सं. कोमल; तुल. गु. कावलुं]

कावल(ळ)काठी—स्त्री. हलकी काठी; किरकोळ लांकूड; झिलपी; निरुपयोगी लांकडाचा तुकडा.

कावला—पु. चर; पाण्याचा पाट. कालवा पहा. (अप. पहा).

कावली—पु. पांच-सहा इंच लांब व बराच रुंद, छातीवर व पाठीवर दोन दोन पंख असणारा एक मासा; फेकिन.

कावळा—पु. १ काळया रंगाचा, लांबट व बळकट चोंचीचा, मांस, किडे, गोचीड वगैरे खाणारा, कावकाव असा कर्कश शब्द करणारा एक पक्षी; काक. २ अगस्त्याच्या फुलांतील कावळ्याच्या आकाराची काडी. ३ केळफुलाच्या दात्यांतील एक न शिजणारा निबर तंतु, हा काढून मग दात्यांची भाजी करतात. ४ कावळी नांवाच्या वेलीचें फळ. ५ (बैलगाडी) गाडीवानाच्या चाबकाच्या टोकाला असलेला गोंडा. ६ (वे.) आमटी वाढण्याचें एक सारपात्र. ७ (कों.) नारळीच्या झाडाच्या शेंडयावरील कोवळ्या पानांचा झुबका. –कृषि ७४८. ८ (जरतार) कावळ्याच्या चोंचीच्या आकाराचा एक चिमटा. [सं. काक; ते. काकि; सिं. काऊ; हिं. कव्वा; इं. क्रो] (वाप्र.) **०शिवणें**–१ मृताच्या दहाव्या दिवशीं त्याच्या नांवानें केलेल्या पिंडास कावळ्यानें स्पर्श करणें. २ स्त्री अस्पर्श झाली असतां लहान मुलांच्या समजुतीकरितां हा शब्द वापरतात. (कावळा शिवला म्हणजे पाप लागतें अशी समजुत). ' मद्विक्रम तुच्छ नरा, शिवला हा जेवि काक डाग मला।' –मोवन १२.३७. **–चें आयुष्य असणें**–शंभर वर्षे म्हणजे दीर्घायुष्य असणें. **–च्या शापानें गाई मरत नाहींत**–क्षुद्र माणसानें थोरामोठ्यांना कितीहि दूषणें दिलीं तरी त्यांचें कांहींहि नुकसान होत नाहीं. पांढरे कावळे जिकडे असतील तिकडे जाणें=देशत्याग करणें. (पोटांत) **कावळे कोकलणें–ओरडणें**–फार भूक लागणें. (गो.) कावळे म्हातारे जावप=पुष्कळ काळ लोटणें. **म्हण** १ कावळा सारंयांचा गू खाईल पण कावळ्याचा कोणं खाईल=ओंगळपणा, नीचपणा, हलकटपणा यांनीं युक्त अशा माणसाबद्दल योजतात. २ कावळां मोलांपोवळ्यांचा चारा काय उपयोगी ? =गाढवास गुळाची चव काय ? ३ घरांत नाहीं शीत कावळ्यास आमंत्रण= ज्यांत सामर्थ्य नसतां बढेजावीच्या गोष्टी बोलणें, जवळ पैसा नसतां भरमसाटपणें देणग्यांचीं वचनें देणें. कावळ्यानें गू उष्टावप=कावळ्यानें गू उष्टावण्यापूर्वी म्हणजे अगदीं सकाळीं. **कावळे बुक**–न. पत्रें, पावत्या, बिलें इ० चिकटवून ठेवण्याकरितां शिवणीपासून दोन बोटें रुंदीच्या कोंगदाऱ्या पट्टया कापून शिवून तयार केलेलें चिकटबूक. **–ळ्याचा डोळा**–पु. १ (राजा.) एका वनस्पतीचें फूल. २ (ल.) फार पातळ ताक. **–चें गोत**–न. एखाद्याच्या घरीं कांहीं निमित्तानें जमलेला गोतावळा; अनेक नात्यागोत्याच्या माणसांची गर्दी, झुंड वगैरे.

कावळाड—स्त्री. (कु.) रुंद तोंडाची मातीची घागर.

कावळी—स्त्री. १ गोव्याकडे कुंपणात उगवणारें पुरुष–दीड पुरुष उंचीचें, चिंचेच्या पानासारखीं पानें असलेलें व वाटाण्याएवढीं जांभळ्या रंगाचीं फळें येणारें एक झाड. याचीं फळें मुलें खातात. कावळें. –वगु २.४३. २ (गो.) एक औषधीवनस्पति. ३ जोंधळ्यांतील एक प्रकार. –कृषि २७७. ४ (सोनारी) विस्तवांतील सूस उचलण्याचा वांकडया टोंकांचा चिमटा; सांडसी. ५ लांबट घडीची टोपी, हिला मागें जाड शेंपूट असतें. ही लहान मुलें घालतात; नावेची टोपी. ६ (कु.) खेळांतील पराभव; हार.

कावळ्या आचय—वि. (गो.) सारखी हिंडणारी व इकडची बातमी तिकडे करणारी बाई.

कावा—पु. १ घोडयाची रग जिरविण्याकरितां त्यास द्यावयास लावलेले फेरे; मंडळें; घिरटी; घेर. घोडा भरधांव पळत असतां त्याला वाटेल तसा वळविणें, फिरविणें. मंडळावर धरणें, पुढें मागें भरधांव सोडणें. (क्रि० देणें). ' कर्णाभवतें बहु उरगाभवतें जवि गरुड कावे घे।' –मोद्रोण १५.२०. ' घोडयाला दोन चार कावे दिल्हे मग निवळ झाला ' ' घोडा पुढल्या काव्यावर फिरवावा.' २ लुच्चेगिरी; ठकबाजी. ३ गुप्तकट; मसलत; लुच्चेगिरीची योजना; कारस्थान (क्रि० करणें, बांधणें). ४ हुलकावणी. ' गनीम यांनीं कावे देत देत अंतर्वेदप्रांतीं गेले ' –भाव ११०. ५ पिछेहाट. ' वीरीं घेतला रणकावों। देखोनि धाविन्नला शाल्वो।' –एरुस्व १०.६२. [फा. काव्=खणणें, तपासणें ?]

कावादावा–पु. लुच्चेगिरी; सोदेपणा; भेद. (क्रि० बांधणें; करणें). 'मुलुख काव्यादाव्यानें सर करून' –पाव १७, [कावा द्वि]

कावा-कव्हा—पु. बुंद; काफी. [अर. कव्हा]

कावाड—न. कवाड; दार; फाटक. [सं. कपाट=कवाड; दे. कियीडी]

काविजा—पु. खडया; लोखंडी कामाच्या कारखान्यांतील डांक लावण्याचें हातोडयासारखें साधन.

कावित्र—न. लबाडी; धूर्तता; कावा; युक्ति. [कावा]

काविरडा—वि. (कों.) दुखणें वगैरेमुळें चिडखोर बनलेला; त्राशिक; कावलेला.

कावरें—न. १ वेड; भ्रम; धुंदी; भ्रांति. 'त्यांचें अज्ञान कावरें नुरे.' –विउ ११.११८. भरलें क्रोधाचें कावरें.' –दा २.६.५. 'या लागीं मदाचें कावरें.' –मुक्तेश्वर हरिश्चंद्राख्यान (नवनीत. पृ १८८). २ काहूर; अंधारी; काळोख. –वि. वेडगळ.

काविलथा—पु. कलथा; उलथनें.

कावीड—स्त्री. (सोनारी) शेवटीं वाटोळी केलेली लोखंडी तार.

कावीण-ळ—स्त्री. कामीण पहा. 'कावींळ झाली म्हणजे सगळें जग जसें पिंवळेंच दिसतें.' –टि ४.४.९४. [सं. कामला]

कावील—स्त्री. उंसाच्या रसाची मोटी काहील.

कावीस—? उंसावर पडणारा एक रोग. –शे ७.२२२.

कावेखोर-दार-बाज—वि. युक्तिबाज; धूर्त; आंतल्या गांठीचा; लबाड; वस्ताद; गुप्त कट करणारा; कारस्थानी. 'असली कावेबाज वकिली करण्यास... दुसरें स्थळच नव्हतें काय?' –टि ४.४.५१. [कावा]

कावेडी—स्त्री. (ना.) स्त्रियांच्या हातांतील दागिने गळून पडूं नयेत म्हणून दागिन्यांच्या सांध्याला लावलेलें एक साधन.

कावो—पु. गोळा. –लोक २.७९.

कावो—पु. पिछेहाट; कंटाळा; त्रास.

काव्य—न. कविता; कवितेचा एखादा प्रसंग, भाग; पद्यरचना. –पु. दैत्यगुरु; शुक्राचार्य. 'प्रेमी द्रुपद गुरुसि जो संमत जीवा तसाच काव्याहि.' –मोउद्योग १.२७. 'जो मुनि तयासि प्रिय काम दयाळु काव्य तो तारी.' –मोआदि ९.२८. [सं. कु=गानें] ०**कथा**—स्त्री. पद्यात्मक कथा, गोष्ट. हा शब्द मुख्यतः रामायणाबद्दल योजतात. [सं.] ०**कळा**—स्त्री. काव्य करण्याचें चातुर्य; काव्यकौशल्य; कवित्वशक्ति. 'ज्याची काव्यकळा पाहोन.' –श्रीधर (नवनीत पृ. २१५.) ०**चोर-चौर**—वि. दुसऱ्याचें लिखाण चोरून आपल्या नांवावर प्रसिद्ध करणारा. ०**पठक**—पुवि. भाट अथवा कविता पाठ म्हणणारा. 'हे काव्यपठक कोणी कोणी स्वतःहि काव्यें रचीत.' –नि ४०. ०**समस्यापूरण**—न. दुसऱ्यानें दिलेला अपूर्ण श्लोक पुरा करणें; दिलेल्या एका चरणास अनुरूप असे नवीन तीन चरण रचणें. ०**सुता**—स्त्री. शुक्राचार्यांची कन्या; देवयानी.

काव्हणें—कावणें पहा.

काव्हरा-बावरा—कावरा पहा.

काव्हळी-ळा—(व.) आरडाओरड; गडबड; कांगावा; गोंगाट. 'मुलगी थोडा वेळ दिसेना तेव्हां आईनें काय काव्हळी केली.' [सं. कोलाहल]

काश—पु. कासें गवत; याची वाढ जोराची असते. याचा शाकारणीकडे उपयोग करतात. वेठापासून दोर करतात. हें गवत म्हशींना जास्त आवडतें. [सं. काश]

शको. २. ३०

काशश्वास—पु. श्रमयुक्त श्वासोच्छ्वास; धांपा; उसासा; [सं. काश+श्वास]

काशा—क्रिवि. (काव्य) कशाला? कशाकरितां? कशासाठीं? 'कैलास काशा गिरी' –निमा १.१८. 'या काशा आनकीशा.' –आसेतु २५. [कसा]

का(कां)शा, कासाड, काशिया—१ स्त्रीअव. (व.) कुंदा गवताच्या लहान मुळथा; दुर्वांच्या मुळथा. 'मंशयाचा काशा गोळा करून' –भज १२२. एभा ३१.३९२. हातीयेरां दुकाळ पडला. मग यासी नांगर सांपडला. सैन्य नांगरावयां आला. वीर काशिया काढित.' –एरुस्व १०.७४.२ कडव्याचे बुडखे; यांचा उपयोग सरपणाकडे होतो (एकवचन काशी–क्वचित उपयोग). [सं. काश] ०**भरडणें**–बरळणें; बडबडणें; शिव्या देणें; शिव्या हासडणें.

काशाचा-ची-चें—क्रिवि. कशाचा–ची–चें. 'महापुरुष काशाचे. थोर थोराहि.' –दावि ७.२.६९.

काशामशीं—क्रिवि. कशासाठीं. ? 'वादावाद समर्थाशीं काशानशीं करावा.' –तुगा १३८३. [कसा]

काशानें-ला-स—क्रिवि. कशानें; कशाला; कशासाठीं. 'निर्भयो जाले काशानें.' –दावि १२१. 'व्यर्थ कलह हा काशाला' –निमा १.५. [कसा]

काशिका—स्त्री. काशी; वाराणसी. 'तो विश्वेश्वर राहे येऊनि भक्तार्थ काशिकेमाजी.' –नरहरी गंगारत्नमाला १५३. (नवनीत पृ. ४४३.)

काशि(शिं)दा—पु. एक वनस्पति.

काशी—स्त्री. १ वाराणशी; बनारस. एक शहर. २ कलिंगड; टरबूज इ० लावण्याचा मळा, जागा; तें पीक; वेल. (वाप्र.) ०**ची वाट दाखविणें**–लहान मुलांना कानाशीं हातानें दाबून धरून वर उचलणें व सूर्याची पिल्लें दाखविणें. ०**रामेश्वराचें अंतर**–फारच मोठें अंतर. ०**स गंगा नेणें**–गंगेच्या पाण्यानेंच गंगेचें तर्पण करणें; निरुपयोगी गोष्ट करणें, **म्ह**० १ काशीस गेला काशीदास, मथुरेस गेला मथुरादास=वारा पाहून पाठ देणारा; लुच्चा, कार्यसाधु, माणसास म्हणतात. २ काशी केली वाराणशी केली कपाळाची कटकट नाहीं गेली=वैतागानें यात्रेस गेल्यावरहि संसाराची कटकट न सुटणें. ३ काशीस जावें नित्य वदावें=एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतल्यानें केव्हां तरी ती गोष्ट घडून येईल असा विश्वास. 'काशीस जावें नित्य वदावें असा निदिध्यास मुमुक्षूनीं धरावा...' –आगर ३.९. सामाशब्द– ०**कर**–पु. १ काशीचा रहिवासी. २ काशीयात्रा केलेला. ३ (ल.) अत्यंत लुच्चा माणूस; काशीकर गुंड ह्याच्यापेक्षां नाशिककर शंभरपटीनें लुच्चा असतो. 'शंभर काशीकर एक नाशिककर.' ०**गोत**–न. सबंध जात; जातगंगा

(एखाद्या निर्णयार्थ भरलेली). **०चा कोतवाल**–पु. काशी येथील काळभैरव; काशींत केलेल्या पापांबद्दल हा शिक्षा करतो अशी समजूत. **०चा पट**–पु. काशी येथें तयार होणारें व ज्यांत रामायणांतील प्रसंगांचीं चित्रें काढलीं आहेत असें वस्त्र, पट, कापड; हा फार मोठा असतो त्यावरून. (ल.)–वि. लांबलचक; कंटाळवाणें; त्रासदायक (गोष्ट, भाषण, आजेब, चरित्र). (क्रि० काढणें; आणणें). **०चा सोदा**–पु. अट्टल लुच्चा 'अशा वेषधारी गुरूबरोबर जे चेले असतात तेहि काशीचे सोदे असतात.' –व्यनि ५०. **०फळ**–न. काळा-तांबडा भोपळा; गंगाफळ; चक्की; हा भोपळा बसकट व करवेदार असून रंग हिरवा, पांढरा, शेंदरी असतो. वेलाची वाढ कमी; दुसऱ्या भोपळ्यापेक्षां याची भाजी कमी गोड असते. **०माल**–(तंजा.) मोहर. **०यात्रा**–स्त्री. १ काशीची तीर्थयात्रा. २ (सोंगटयांचा खेळ) कवड्यांचे दान दहा किंवा पंचवीस तीन वेळां लागोपाठ पडलें असतां तें फुकट जातें त्याबेळेस म्हणतात. ३ (बायकी) अल्पवयी वधूवर एकमेकांस भेटलीं किंवा जवळ आलीं असतां थट्टेनें म्हणतात. **०शिक्का**–वि. काशीच्या टांकसाळींत पाडलेला रुपया.

काशी—स्त्री. १ (वे.) भात कापल्यानंतर जमिनींत राहिलेला त्याचा बुडखा. २ काशा पहा.

काशी—स्त्री. १ (गो.) देवदारी रिकामा खोका; काश्याव पहा. [पो. कास्याओ; इं. कास्केट ?]

काशी असणें—क्रि. (व.) आश्रय असणें; आश्रयानें राहणें. [सं. सकाशात]

काशीद, कासद—प. नेहमींचा पत्रें पोंचविणारा दूत; जासूद; हरकारा. –रा ८.२०१.; –दिमरा १.९०. [अर. कासिद]

कांश्यॉ—पु. (गो.) लोखंडाची पळी. [सं. कांस्य]

काश्यांब—पु. मोठी पेटी; शव वाहण्याची पेटी. [पो. काश्याओ; तुल. इं. कास्केट]

काश्यात—न. लहान पेटी; डबी.

काश्मि(श्मी)री—वि. काश्मीर देशासंबंधी (केशर, शाल, लुगडीं इ०). –स्त्री. वाग्देवता; सरस्वती. 'प्रभु काश्मिरीं मुकें। नुपजे हें कौतुकें।' –ज्ञा १३.११६७. **०द्राक्ष**–न. काश्मीर देशाचें द्राक्ष. ह्या द्राक्षाचे झुबके मोठे व विरळ असतात. याला विलायती द्राक्षें असेंहि म्हणतात. –कृषि ५१३. **०मूर्ति**–स्त्री. शुभ्र संगमरवरी किंवा स्फटिकाची मूर्ति.

काश्मीर—न. १ हिंदुस्थानांतील उत्तरेकडचा एक प्रांत. २ स्फटिक; शुभ्र संगमवरी दगड. 'मग काश्मीराचे स्वयंभ। कां रत्नबीजा निघाले कोंभ।' –ज्ञा ६.२५३. 'काश्मीरांचे बक धांवती।' –ह ३४.१५०. ३ लोंकरीच्या कापडाचा एक प्रकार; **काश्मिरा**. ४ केशर. 'चांदणें शोभे शुद्ध निराळीं। तैसी उटी आंगीं शोभली कीं इंद्रनीळा गवसणी घातली। काश्मीराची सुरंग।' –ह ३.१५५.

काषाय—वि. तांबडें; भगव्या रंगाचें (वस्त्र.) 'कीं बाह्यास्यंतरें अरागें रातेलीं। तैसीं काषायें पांगुरैलीं।' –ऋ २१. [सं.]

काष्ट—काष्ठ पहा.

काष्टक—न. (शाप) कचकडा; (सेल्युलोज याला प्रतिशब्द)

काष्टा—पु. धोतर, लुगडें यांचा जो सोगा पाठीमागें खोंवतात तो; कासोटा. (क्रि० घालणें; फेडणें.) [सं. कच्छ+पट–कच्छट; दे. कच्छुटिया] **काष्ठ्याचा बळकट**–वि. एकपत्नीव्रतस्थ; अव्यभिचारी; स्त्री–पतिव्रता.

काष्ठामल—न. (शाप.) लांकडांपासून निघणारें अम्ल. इं. ऑक्झॅलिक ॲसिड.

काष्टि-ष्टी-स्टी—स्त्री. (कु. गो.) लंगोटी (उपहासानें म्हणतात). 'काष्टी न्हेसुंक येत नूं=लंगोटी तर नेसतां येई ना?' कांसोटी पहा. [सं. कच्छ]

काष्ठिन—न. (शाप) कोळशाच्या डांबराचें पातन केलें म्हणजे त्यांत हा सांपडतो. इं. क्झायलिन यास प्रतिशब्द.

काष्ठ—न. १ लांकूड. 'मग तया काष्ठाच्या ठार्यीं।' –ज्ञा ७.५६. 'प्रगटिला कोरडिये काष्ठीं। वचनासाठीं भक्ताच्या।' –एरुस्व १.८४.–पु. (ल.) उंच व लुकडा माणूस. [सं. काष्ठ] (वाप्र.) **०वळणें–होणें**–क्रि. अशक्त होणें; कृश होणें. सामाशब्द–**काष्ठें खाणें**–अग्निकाष्ठ भक्षण करणें; चितेंत उडी टाकून मरणें. 'तुजसारिखा असतां पिता। आम्हा वैधव्य आलें आतां। तरी काष्ठें खाऊं आतां। तुजवेखतां।'–कथा २.२.४९. सामाशब्द–**०कुट्ट**–पु. सुतार पक्षी. [सं.] **०घंटा**–स्त्री. ओढाळ गुराच्या गळ्यांत बांधावयाचें लांकडी ओढणें, लोढणें. [सं.] **०तंतु**–पु. १ (शाप.) (इं.) कचकडा; सेल्युलोस. २ लाकडांतील तंतु. **०पुतळा-ळो**–पुस्त्री. लांकडाची कळसूत्री बाहुली. 'सूत्रधार न हालवितां। काष्ठपुतळा नाचेना' –ह १.६५ 'दैवनाथ हे काष्ठपुतळी सूत्र तुझ्या हातीं।' –देप ८.८. **०माळा**–स्त्री. तुळशीच्या काष्ठाची माळा. 'काष्ठमाळा गंधमाळा।' –दा १३.१०.२. **०यंत्र**–न. अपराधी मनुष्याच्या हातापायांत घालावयाचा खोडा. [सं.] **०युद्ध**–न. बुद्धिबळांचा डाव. 'काष्ठयुद्धांत ... सरशी होणें हें जसें खेळणारांच्या पटाईतपणावर नेहमी असतें ...' –नि ९७१. **०वत्**–वि. भय, आश्चर्य वगैरे कारणानीं लांकडाप्रमाणें निचेष्ट झालेला; लांकडासारखा ताठ. 'मुलास दृष्टीनें पाहत। तों हातपाय झाले काष्ठवत्।'[सं.] **०वेदिका**–स्त्री. लाकडी चौरंग; पाट; लाकडाचें उंच आसन. 'पायऱ्यांची काष्ठवेदिका तयार करण्यांत येऊन ...'–ऐरापुप्र(बडोदें) ५.२९०. **०स्वार्थ**–पु. लांकडें विकण्याचें काम. 'येक काष्ठस्वार्थ करिती। येक शुभा येकवाटिती।' –दा ६.९.७.

काष्ठा—स्त्री. १ वेळेचें माप; अठरा निमिषांचा काल; कलेचा एक-तिसांशावा भाग. २ दिशा. 'नादें काष्ठा घुमती।' –दे. कृष्णजन्म ६८. ३ मर्यादा. 'देखोन पुंडलिकाची निष्ठा। नेगों चांगली पूर्ण काष्ठा।' –ब ४६६. [सं.]

काष्ठिका—स्त्री. काठी. 'धन्य तीं गोधनें कांबळी काष्ठिका।' –तुगा २०८.

काष्ठौषध-धि—नस्त्री. औषधोपयोगी वनस्पति; त्यांचीं मुळें, पानें, फुलें वगैरे. [सं.]

कास—स्त्री. गाय, म्हैस वगैरे पशूंची दुधाची ओटी. 'सुरभीच्या कासेसी सुइें होऊनि वत्स लागावें।' –मो. **०घालणें**–गाय, म्हैस वगैरे ओटी घालावयाल लागणें; गाभण असतां जसजसे दिवस भरत येतात व ती विण्याची वेळ जवळ येते तसतशी तिची ओटी मोठी होत असते त्याला कास घालणें म्हणतात.

कास, कांस—स्त्री. १ धोतर, लुगडें यांचा कांसोटा, लंगोटी; काचा; (क्रि० घालणें; खोचणें; फेडणें). 'तैसींच ते कास गुरुराज याची।'–दावि ४२०. 'तुळशीहार गळां। कांसे पितांबर।' –तुगा २. 'बल्वंतासि बांधणें कांस। मग अनर्थासी काय उणें।' –पांप्र ३९.३४. २ (ल.) आश्रय, आधार. 'कामक्रोधलोभांची कास। न सोडीच पाळिली भाष।'–ह्रा १६.४४८. [सं. कच्छ] **०कसणें–घालणें–बांधणें**–१ कासोटा घालणें. 'हा सीते! जरि नत मी कशितोंचि तथापि कास हां–सीते' २ (ल.) काम करण्याला तयार असणें; कंबर बांधून काम करण्यास तयार असणें, संकल्प करणें. 'आणि होय येवढी कास। कासिली जेणें।' –अमृ ७.१२९. 'तों पवन म्हणे हुं घाल खलांतिका शिशो कास।' –मोभीष्म ५.३६. **–कासेस लागणें, कास धरणें**–एखाद्या बलिष्ठ माणसाच्या आश्रयार्थ जाणें. 'तरी आम्हीं तुझी धरियेली कास।' –तुगा १६०७. 'भगवंताची कास धरावी आणिक आस कशास रे।' **–सेस लावणें**–आश्रय देणें; आधार देणें. 'आमुचें चाळकपण कृष्णासि आलें। कांसें लाविलें जनार्दनीं' –एरुस्व १६. १६५.

कास—न. १ (कों.) कुरण (गवताचें). [सं. काश=गवत]

कास—स्त्री. हलकी किंवा भारी जमीन. ही बागाईत किंवा जिराईत करण्यासाठीं रयतेस दिलेली असते. या जमिनीचे लहान लहान भाग पाडून ते लागवडीस आणतात, तथापि सरकारसारा मात्र त्या भागांवर किंवा त्यांत उत्पन्न होणाऱ्या सरसनिरस पिकांवर न बसवितां सबंध जमिनीवर बसविलेला असतो. केव्हां केव्हां निव्वळ बागाईत किंवा जिराईत जमिनीलाहि कास म्हणतात. 'कासबंदी व कासजमीन पहा. २ (कों.) खाचराचा एक लहान भाग. खत वगैरे सांठविण्यासाठीं राखलेला खाचराचाच भाग. ३ (माण.) दुसरीकडे पुरवणीसाठीं किंवा भरीसाठीं बक्षीस दिलेली जमीन. –पु. १ (कु.) डोंगरावरील बरकस भागांत मशागत केलेली म्हणजे धान्य पेरण्यास योग्य केलेली जमीन. २ (कु.) रेताड जमिनीचें मोठें खाचर. [सं. कृष्=कसणें]

कास—विक्रिवि. १ (शिंपी) सरळ. २ सरळ कापलेलें कापड; याच्या उलट इराब, इरेफ=तिरकस.

कास—पु. खोकला. [सं. कास]

कास—न. (गो.) शिकार.

कांस—स्त्री. १ कास १ पहा. २ कास २ पहा.

कांस—स्त्री. (गो.) फूत्कार, यातना. [ध्व.]

कांस—पु. (गो.) कळ; आवेग; तिडीक.

कांस—स्त्री. (नाविक) काठीचा बुंधा खालीं दबण्यासाठीं दुरमीणास व काठीस अडकवावी लागणारी दोरी (वाकाच्या दुरमीणास एक शेंवट–टोंक अडकवून दुसरें शेंवट काठीच्या बुंधास फेरा देऊन दुरमीणास दुसऱ्या बोडतास अडकवून ठेवतात. [सं. कृष्=ओढणें]

कासई—न. १ (व.) (स्त्रियांचें) काळथा रंगाचें पातळ. २ सीमांतपूजनाचे वेळीं स्त्रियांना द्यावयाचीं मानाचीं लुगडीं.

कासकवळी—स्त्री. कंबरेची मिठी. 'दोघे आले कासकवळी।' –कथा ३.१३.६५. [कांस+कवळणें]

कासकुशा—स्त्रीअव. थंडीचें कापरें; कापणें; कुडकुडणें; हुडहुडी. (क्रि० घेणें; देणें.) [कुस द्वि]

कासकूस—स्त्री. काचकूच; ढंगळढंगळ; अळंटळं; धरसोड. (त-हेवाईक शब्द)

कास(ज)गी—स्त्री. ज्याची दोरी घोडयाच्या पाठीवरून शेपटीखालून गेलेली असते असा लगाम. काजगी पहा.

कासजमीन—स्त्री. प्रतवारी न लावलेली सरसकट जमीन; हिच्या वरचा आकार एकंदर म्हणून बसविलेला असतो. हा ठराविक नक्त असतो. कासबंदीपद्धतीप्रमाणें कुटुंबाची सर्व मालमत्ता काय आहे हें कासजमिनीवरून समजतें. कासबंदी आणि कास पहा.

कासंडी-सांडी—स्त्री. एक प्रकारचें भांडें (धातूचें); चरवी; गुंडी. [सं. कांस्य+हंडी]

कासणी-नी—स्त्री. एक वनस्पति; एका झाडाचें पांढरें बीं. चिकरी [हिं.]

कांसणें—अक्रि. १ कांचणें; झिजणें. २ बांधणें; कसणें. (कांस, कासोटा). 'कांसे काशिली निजभक्ति।' –रास ४.३६. ३ कमर धरणें; कांसेस लागणें. 'पोहणार आइता कासे जेवीं।' –ह्रा १३.५४५.

कासंदा—पु. कासवदा पहा.

कासफोड—पु. कासेफोड पहा.

कासबंदी—स्त्री. १ निरनिराळया प्रतींच्या जमिनी ज्यांत असतात अशा गांवच्या जमिनीचे प्रतवार निरनिराळे तुकडे करण्याची पद्धत. एकंदर जमिनीचा मगदूर पाहून त्यावरून प्रत्येक तुकडयावर प्रतवार उत्पन्नाप्रमाणें सारा बसविण्याची रीत. कास पहा.

कासबिघा—पु. कासबंदी गांवांतील जमिनीच्या निरनिराळया तुकडयांचें प्रतवार सारा बसविण्याकरितां धरावयाचें एक परिमाण; साऱ्यासंबंधीं किंमत काढण्याचें एक माप.

कासया—क्रिवि. (काव्य) कशाला ? कां ? कशाबद्दल ? कशाकरितां ? 'कासया वहावी चिंता मनीं मग जहाल ।' –विक ७. 'नाना साधनीं साक्षपें। कासया सिणावें । ' –दा ४.६.२३. [कसा] **०च्या**–कशाचा? कोणत्या गोष्टीचा ? कोणत्या प्रकारचा ? ' प्रपंच कोणें निर्मिला । कासयाचा उभारला । ' –विपू २.१०१. **०ला**–कशाला ? ' विस्तार करणें कासयाला । ' –दावि १८५.

कासर—पु. १ कोकिळ पक्षी. २ रेडा. ' देवीसमक्ष उरला त्रिभुनदुर्जयहि काय कासर तो । ' –मोद्रोण ५.७२.

कासरा—पु. १ बैलांना बांधलेली लगामासारखी दोरी; ही बेसणींतून ओवतात; बैलांच्या शिंगांना बांधलेली दोरी. २ आसुड; चाबुक–शाकी.को. [सं. कश–कशा=दोरी, चाबुक] (वाप्र.) कासराभर किंवा दोन कासरे दिवस किंवा सूर्य येणें–राहाणें=क्षितिजापासून कांस-याच्या लांबीइतका सूर्य उगवल्यानंतर वर येतो किंवा मावळतांना राहतो त्यावेळीं, शेतकरी व खेडवळ लोकांत म्हणतात; सकाळचा सात–आठ वाजण्याचा किंवा संध्याकाळचा पांच सहा वाजण्याचा सुमार.

कासरी—स्त्री. भाजी किंवा फळें यांची कापून वाळविलेली फोड; काचरी.

कासलाठो—पु. (कु.) (अव. कासलाठे) कलथा.

कासली—स्त्री. एक वनस्पति; हिनें सापाचें विष उतरतें असें म्हणतात. हिच्या फळास मुद्रा म्हणतात; मुंगुस वनस्पति (?)

का(कां)सव—नपु. १ कूर्म; पाण्यांतील एक प्राणी; याची पाठ अतिशय कठिण असून पोट फार मृदु असतें. कांहीं कांसवें जमिनीवर फिरणारींहि असतात. २ हातास किंवा पायास होणारा, आंत पाणी असलेला एक फोड; काश्याफोड; हा कांटा वगैरे टोंचल्यानें होतो. ३ रांगोळीची किंवा पोतेची कांसवासारखी काढलेली आकृति. [सं. कच्छप; प्रा. कासवो–कच्छवो; झेंद कश्यप; हिं. कछुआ; सिं. कछउं, कछुं; बं. काछिम] **म्ह०** (गो.) १ कासवाक कोंबो जमान=अगदीं विरुद्ध परिस्थितींतील मनुष्य जामीन राहाणें. २ कासवा मामान गाडां (=गात्रें) आंबुळली=सगळा कारभार आटोपणें, आवळून धरणें. **०दृष्टि**–स्त्री. दयादृष्टि; कृपादृष्टि. ' प्रतिदिन इस दृष्टी कांसवाचेंच देखा ।'– सारुह २.४८. **०पृष्ठ**–न. (काव्य) कासवाची पाठ. ' बहु कठोर म्हणे धनु जानकी । निपट कासव पृष्ठसमान कीं । ' –वामन सीतास्वयंवर २४. **–घाचें तूप**–न. असंभवनीय गोष्ट; मिथ्या कथा (सशाच्या शिंगाप्रमाणें). **कासवी इरलें**–नपु. (मावळी) कांसवाच्या पाठीसारखें केलेलें एक प्रकारचें गोल इरलें. हें फक्त डोकीवर घेतात. **–ड्याची पाठ**–स्त्री. कासवाची पाठ; पोटांतलें म्हणून जो रोग होतो त्यावर औषधासारखा हिचा उपयोग होतो. **०ड्या रोग**–पु. १ बस्तिप्रदेश ताणला जाऊन त्याच्या अंगीं जें काठिण्य येतें तो रोग. २ जनावरांचा एक रोग. [कांसव+रोग]

कासव(वं)(चिं)दा, कासिंदा—पु. एक क्षुद्रुप. याची उंची कमेरइतकी असून तरोटयापेक्षां यांचीं पानें बारीक, फुलें पिवळीं असून शेंग दाभणासारखी जाड व लांब असते. –वगु २.४३.

कासवळ—पु. तिळाची एक जात.

कासश्वास—पु. कफ व दमा; श्वासावरोध [सं. कास+श्वास]

कांसळणें—अक्रि. (कों.) धापा टाकणें; दम लागणें; ऊर्ध्व लागणें (चढण चढण्यानें, धांवण्यानें). [सं. कास]

कांसा—पु. १ (कों.) समुद्रांत असलेला उघडा व सपाट खडक हा कधीं कधीं पाण्याच्या आंतहि असतो. २ डेऱ्याचा मध्यभाग. –शर. [सं. कच्छप]

कांसॉ—न. (गो.) कासवाच्या आकाराचें, पसरट चिनी मातीचें किंवा लोखंडाचें, तोंड धुण्याचें किंवा लघवीचें तस्त.

कासाई—स्त्री. (पोवाडा) लुगड्यांतील एक प्रकार. कासइ पहा.

कासाकुळी—स्त्री. कासावीसी; तळमळ; तगमग; घाबरगुंडी. [सं. कास+व्याकुल]

कासाची लागवड—स्त्री. (कों.) वांग्याच्या लागवडीचा एक प्रकार. –कृषि ६०९.

कासांडी—स्त्री. कांसंडी पहा.

कासांदा—पु. कासवंदा पहा.

कासार—न. सरोवर; तलाव; डोह. ' म्यां तुज अमृताब्धिपुढें मिरवावें स्वयश काय कासारें । ' –मोभीष्म १२.५४. ' तया कासारीं राजहंस पाहे । ' –र ९. [सं. कासार]

कासार—पु. (मूळ कांचार, –चुकीनें) बांगड्या करणारा, भरणारा. [सं. काचकार]

का(कां)सार—पु. १ एक जात व तींतील व्यक्ति; पितळ, तांबें, कांसें वगैरेंचीं भांडीं घडविणारा व विकणारा. ' चार शेर तांब्याला कां म्याला म्हणे कासार देत आचेली ।' –ऐपो ३७२. **०डा**–पु. कासारास निंदार्थानें म्हणतात. **०थळ**–न. बांगडीवाले, भांडीवाले कासार आणि पटवेकरी यांच्या वरील कर.

०भट्टी—स्त्री. बांगडीवाले, भांडीवाले यांच्या भट्टीवरील सरकारी कर. **०भांडें**—न. (व.) तांब्यापितळेचें भांडें. **०भात**—पु. (राजा.) जाडेभरडे व अर्धवट सडिक अशा तांदुळांचा, फडफडीत शिजलेला भात. [सं. कांस्यकार–कांसआर]

कासावणें—अक्रि. (कों.) कांसळणें पहा. [कांस]

कासावयलें भूत—न. (गो.) काजऱ्यावरचें भूत; पिंपळावरचा मुंजा.

कासाविसी—स्त्री. व्याकुळता; घाबरगुंडी; त्रास; तळमळ; अतिशय अस्वस्थता.

कासावीस—वि. व्याकुळ; घाबरा; फार क्षुब्ध; धडपडणारा; तळमळणारा (दुःखानें किंवा तहानेनें वगैरे). 'बहु कासावीस झाला भक्तांसाठीं।'–तुगा १०३. [सं. कास=खोकला, श्वास] **०होणें**–क्रि. (माण.) धापा टाकणें; दम लागणें; जलद श्वास चालणें; जीव घाबरणें.

कांसाळ—स्त्री. (गो. कासाळें) कांशाची मोठी झांज (ही गौबतीवरोबर वाजवीत असत.) -वि. टाळकुट्या. [कांस्य]

कांसाळवत-कांसाळू—न. १ (कों.) मोठ्या पानाचें अळूं (भाजी); काळें पांढरें अशा याच्या दोन जाती आहेत. याच्या देंठांची भाजी करतात व कांद्याचे सांडगे करतात. –कृषि ६४५.

कासिनी—स्त्री. कासणी पहा.

कासिंबर—पु. (काश्मीर अप.) 'आले द्राविड गौड कोंकण कळा कोल्हार कासिंबरी।'–रामसुतात्मज द्रौपदी वस्त्रहरण २०२. अकक.

कासिया—अ. कशाबद्दल, कासया पहा.

कासीणें—सक्रि. परजणें. (शस्त्र) 'ते रतिरायाचे मार कासी।'–भाए ४४५. [सं. काश्=प्रकाशणें]

कासीद्—पु. जासूद. काशीद पहा.

कासीद्—पु. एक वृक्ष. कासवदा पहा.

कासीस—न. हिराकस. [सं.]

कासुंदा, कासांदा—पु. कासवदा पहा.

कांसुल-ला-लें—न. (कु. गो.) स्वयंपाकाची लहान पळी.

कासू—स्त्री. काश नांवाच्या गवताची केरसुणी. 'कासुनि भूमि सारविती।'–वसा २१. [सं. काश]

कांसें—न. घंटेची धातु; जस्त व तांबें यांची मिश्र धातु; त्यांत चार भाग व शिसें एक भाग यांची मिश्र धातु; यांचे दोन प्रकार आहेत–पुष्पकांसें व तैलक कांसें. पुष्पकांसें हें औषधोपयोगी आहे. [सं. कांस्य; इं. ब्रॉंझ]

कासेन-नी—क्रिवि. कशानें? कोणत्या प्रकारें; कशाच्या योगानें. 'वैरियें कासेन नाशति।'–गीता १२.७४८.

कांसेफोड—पु. पायाचा किंवा हाताचा तळवा यांस होणारा मोठा व पाण्यानें भरलेला पांढरा फोड; हा गुरांच्या पायालाहि होतो; कुकडा; कोण; कासव पहा. [कासव+फोड]

कांसोटा—पु. धोतर, लुगडें यांचा पुढील सोगा किंवा टोक पाठीमागें खोंवतात तो; काष्टा. (क्रि० घालणें; मारणें; खोंचणें; बांधणें; सोडणें). [सं. कच्छ+पट–कच्छट, कच्छुट्टिया–कच्छोटिका; तुल. का. कच्चे] **–टेकार**–वि. लंगोटधा; लंगोटबंद. 'कैसी कासोटेकारा भगवंता। वरिपडी जालिअ।'–शिशु २११. **–ट्याचा-खबरदार, बळकट–चें पाणी प्यावयाजोगा**–वि. ज्याच्या हातून व्यभिचार कदापि झाला नाही असा. (पुरुष–स्त्री.) **–ट्याचा हलका**–वि. विषयी; जारकर्मी.

कांसोटी—स्त्री. १ कच्छ; कांसोटा. 'मग रुद्र धावे पाठोपाठीं। तेणें सहज सुटली कांसोटी।'–कथा २.५.६६. २ लंगोटी. [कच्छ+पटी]

कॉस्टिकम—ग. इं. (होमिओपाथी) मूळव्याध, मोतीबिंदु, अर्धांग, झोपेंत लघवी इ० वरील औषध.

कास्त—पु. ब्राह्मणांतील एक जात व तींतील व्यक्ति.

कास्तकार—पु. शेतकरी. [सं. कृष्+कृ]

कांस्य-कार—कांसें व कासार पहा. [सं.]

काहडणें—अक्रि. काढणें पहा. 'पाऊल मागें काहडीत तेथून।'–दावि १४१.

काहणी—स्त्री. कहाणी पहा. 'तुका म्हणे अरे काहण्या काय सांगाल गोष्टी।'–तुगा १९५.

काहलि-हिली बंदर—न. काहली बंदरचें मोतीं; हें हलक्या जातीचें व लालसर असतें. काहली बंदर हिंदुस्थानच्या आग्नेयीस आहे. किलोन?

काहली, काहिली—स्त्री. आळस; सुस्ती; 'जेणें जेणें काहली केली। तेणें जीविका बुडविली।' [अर. कहल=आळस; फा. काहिली]

काहवणें—अक्रि. त्रासणें; कावणें पहा. 'कामक्रोध दीर फारच खंदे जीव माझा काहवला'–पला १२.

काहवा—पु. गोंधळ; कोलाहल; आरडाओरड. 'येती गोकुळिंच्या समस्त युवती ऐकोनि तो काहवा।'–आनंदतनय, नवरसचरित्र ४१ ११८. [ध्व.]

काहविणें—सक्रि. कष्टी करणें; त्रास देणें. 'तृष्णेचा तो काहो काहवितो'–तुगा ३८३३. [कावणें पहा प्रयोजक]

काहळ—काहाळ पहा. 'शृंगें डिमडिमी काहळ मोहरी। झल्लरी मृदंग ताल नानापरी।–जै १८.३८.

काहाडणी, काहाडणें, काहाण।, काहात, काहार, काहाली—हे शब्द कहामध्यें पहा.

काहातणें—अक्रि. (व.) हपापणें. कहातला पहा.

काहार—पु. भोई; कोळी; कहार पहा. 'काहारीं मग जाळियांत धरिला तो मत्स्यही चांगला' –अकक कृष्णकौतुक २.२६.

काहार—पु. कार दगड पहा. जेथें पाण्याचा मार विशेष होतो (पूल वगैरे जागीं) तेथें हा उपयोगांत आणतात.

काहार—पु फार त्रास. कहर पहा. 'पोटें पिटिलें काहारें ।' –तुगा ६५४. 'बळी सर्वस्वें उदार। जेणें उभारिला कार। करूनि काहार। तो पाताळीं घातला ।' –तुगा १२५१.

काहाले—अ. (खान.) कशाला ?

काहावणें, कावणें—अक्रि. कष्टी होणें; त्रासणें. कावणें पहा.

काहाळ(ल)-ळी—नस्त्री. (काव्य) एक चर्मवाद्य; ढोल; नगारा; भेरी. शिंगासहि म्हणतात. 'तेथ वाजती शंख काहाळा ।' –शिशु १०२६. 'शंख भेरी मृदंग काहाळी ।' –मुआदि ३२. ३१. 'काहाळ ढोल मृदंग जाण। त्यावरी होतसे हरिकीर्तन ।' –भवि २५.३२. [सं. काहला]

काहिणी—स्त्री. काहणी; जोंधळ्यावरील एक रोग. कहाणी, काणी पहा.

काहिरा—वि. जयस्वी; यशस्वी [फा. कहार=बलिष्ठ, विजयी]

काहिल, काहिली, काहली—स्त्री. १ तापानें किंवा उन्हामुळें अंगाची होणारी तगमग; तळमळ, त्रास. (क्रि० होणें).

काहिल-ली—स्त्री. उंसाचा रस कढविण्याची मोठी कढई. हिचा तळ सपाट असतो. [सं. कटाह; प्रा. कांहिल्लीआं]

कांहीं—वि. १ किंचित्, थोडें; अल्प; लहान (संख्या किंवा परिमाण); थोडेसें (वस्तु किंवा व्यक्तींपैकीं). २ विवक्षित समुदायांतून अंश, अंशमात्र; थोडा किंवा कांहीं भाग; कित्येक; थोडा किंवा पुष्कळ; कमी किंवा जास्त. 'आंबे कांहीं खाल्ले कांहीं लोकांस दिल्हे, कांहीं ठेविले.' ३ फार नव्हे परंतु थोडेसें; अल्प प्रमाणांत. 'केवळ उपाशीं जाऊं नको कांहीं खा!' ४ एखादी अनिश्चित गोष्ट किंवा काम वगैरे. 'तुम्हांपासीं कांहीं बोलावयाचें आहे.' –क्रिवि. १ अवर्णनीय प्रकारचें, तऱ्हेचें; ज्याची फोड करतां येत नाहीं अशा तऱ्हेचें. 'ब्रह्मप्राप्तीचें सुख कांहीं विलक्षण आहे.' २ अर्थ स्पष्ट करण्याकरितां. 'तो कांहीं गवत खात नाहीं अन्न खातो.' ३ (निषेधपर) मुळींच नाहीं; केव्हांहि नाहीं. 'राहेन मी हें न घडेचि कांहीं. ।' ४ भलतेंच; मनांत नसलेलें; अकल्पित. 'कांहीं करतां कांहीं होणें.' ५ कोणतीहि युक्ति, शक्कल. 'कांहीं तरी करून' [सं. किम्, किम्+हि] **०एक**–वि. १ थोडेसें; कित्येक (मनुष्य, वस्तु). २ (निषेधपर) एकहि; मुळींच; तिळभरहि नाहीं. 'पेंड्याऱ्यांनीं कांहींएक भांडें घरांत ठेविलें नाहीं.' **०कांहीं**–वि. १ अल्पस्वल्प; येथें थोडें तेथें थोडें; साऱ्या समुदायापैकीं कांहीं व्यक्ती. 'कांहीं कांहीं शेतें बरीं आहेत कांहीं कांहीं वाईट आहेत.' –क्रिवि. २ (अतिरेक, बाहुल्य दाखविणाऱ्या शब्दाशीं जोडून) अवर्णनीयप्रकारें; अतिशय कमालीचा; 'आज पावसानें कांहीं कांहीं शर्थे केली' **०कांहींचें बाहीं-च्या बाहींच**–वि. अगदींच भलतें; भलतेंसलतें; अवास्तव; बेताल; बाष्कळपणानें; गैरलागू; अमर्याद; अप्रासंगिक; बेताल; कांहीं तरीच विसंगत; अनपेक्षित. 'एकदां जें आमचें भांडण जुंपलें तें कांहींच्या बाहींच !' –पकोघे. **०न-होतेला-नव्हतेला**–क्रिवि. जणूं कांहींच घडलें नाहीं अशा अर्थानें. 'रात्रीं चोऱ्या करून दिवसास कांहीं नव्हतेल्या गोष्टी सांगतो.' **०बाहीं**–वि. थोडा अंश; थोडेसें. 'आळु आला तो गेलिया। कांहीं बाहीं जें उरे।' –ज्ञा १८.४१२. 'औषध घेतांच कांहींबाहीं दिसूं लागलें.' कांहींबाहीं गूळ घेतला कांहींबाहीं च्यावयाचा आहे.' [कांहीं द्वि.] –क्रिवि. भलतेंच; अवास्तविक; अनियमित; असंबद्ध कांहींबाही बोलतां मंदवचनी.' –मराठी ६ वें पुस्तक पृ. १७३. **०तरी**–वि. वाटेल तें; वाह्यात; असंबद्ध.

काहीन—वि. (जरतार) मध्यम तऱ्हेचें.

काहीर—वि. थकलेला; भागलेला; निःशक्त; विकल. [अर. कहल=आळस; फा. काहिली]

काहील—स्त्री. १ काहिल २ पहा. –कृषि ४७४. २ धिरडें किंवा आंबोळया करण्याचा लोखंडी थाळा, तवा.

काहील—वि. निरुत्तर; कुंठित; खंडित–वाड–समा १.११८. [अर. काईल]

कांहींसा—वि. जाणीव होण्यासारखा; दिसण्यासारखा; भासमान. 'हा कांहींसा आहे' =याच्यांत कांहीं पाणी, अर्थ आहे.

कांहींसा—क्रिवि. १ कांहीं अंशानें; थोडासा; किंचित्; अंशमात्र; अल्पसें (नामें व विशेषणें यांच्या अर्थाचें नियमन करण्यासाठीं हा शब्द योजितात). 'कांहींसा काळा पांढरा, गोड, आंबट इ०' २ अनिश्चितपणें; गैरमाहितपणानें; अनिर्णीतपणें. 'हा कांहींसें खातो, बोलतो, जाणतो, करतो.'

काहुरा—पु. (काव्य) अंधारी; दाट काळोख. 'तों चंद्र गेला मावळोनि। काहुरा गगनीं कोंदला।' [का. करि, कार=काळा]

काहून—अ. (व. ना.) काय म्हणून ? कां ?

काहूर—न. १ दाट काळोख; सामान्यतः अंधारी (विशेषतः दाट व काळेकुट्ट ढग आभाळांत आले असतां पडलेली). (क्रि० येणें; उठणें.) २ (ल.) काळा डाग; कलंक; काळिमा; मळ. (क्रि० आणणें). ३ (ल.) मोठें संकट; कचाटी; आपत्ति. (क्रि० येणें; गुजरणें; आणणें). ४ कुभांड; आळ. ५ कहर या अर्थी चुकीनें योजतात. **०काहूर**–वि. कावराबावरा. [फा. कहर्]

काहुल—स्त्री. आरडाओरड; गोंधळ (मनुष्यें किंवा पशू यांचा).

काहो—पु. घोष; नाद; छंद. 'तृष्णेचा तो काहो काह वितो।' –तुगा ३८३३.

काहोर—एक वनस्पति. –नाको.

काह्यला–ले, काह्या, काह्यास—अ. (व. ना.) कशास? कशाला? 'तव भीमकीआ भणितलें। काह्यां हानतु करतळें।' –शिशु १८०. 'येर काह्या मोलें वेंचूनि।'–ज्ञा १८.९४७. अर्द्रताचा समो फुटे। तरी काह्या होती भाटें। शाल्लें तुर्शी।–अमृ ९.७०. **०च्या**–कशाचा. 'तया बंधु कोण काह्याचा।' –ज्ञा ६.९५. **०चें**–क्रिवि. कशाचें? 'काह्याचें निर्वाण मांडलें।' –स्वानु २.१.२२. [कस्य+कृते, अर्थे]

काळ—पु. काल व त्याचे सामासिक शब्द पहा. १ यम; मृत्यु; 'काळ करीत बैसला लेखा गा' –तुगा ४१४७. 'नवल नव्हे काळसा तो पत्रेला वाटला।' –विक २१. २ (काळ=मृत्यु यावरून ल.) अतिशय नाश करणारा, फडशा पाडणारा, माणूस किंवा वस्तु जसें:–तुपास–तेलास–लांकडास–काळ. 'धूम्रिहोत्राचा धुकाळ। वडांपिंपळासी काळ।' –एकनाथ. 'ही मुलगी खर्चास काळ आहे' ३ नाश; मृत्यु; अंत; शेवट. 'जर आलेल्या सावकाराचा खचित काळ होणार असला तर कौल दे.' –विवि ८.१.१७. [सं.काल] (वाप्र.) **काळाच्या तोंडीं घालणें–देणें–जाणें–पडणें–येणें–सांपडणें, काळाच्या दाढेंत जाणें–देणें**–श्मशान दाखविणें, पाहणें; मारणें; मरणें; अति मोठ्या संकटांत, धोक्यांत घालणें, आणणें, पडणें. **इ० म्ह०** १ कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ=आपल्याचपैकीं एखाद्यानें शत्रूस मिळून आपला नाश करावा याअर्थी. २ खाण्याला काळ भूमीला भार=काम न करणारा; ऐतखाऊ. 'खाया काळ भुईस भार जगला पापां कराया धणी।' –रामशास्त्र्यांचा राघोबास उपदेश. ओक–पुष्पवाटिका. 'भाकड म्हैस उगीच खायास काळ.' ३ मारत्याचा गुलाम पळत्याचा काळ=जबरदस्तांस भिणारा परंतु गरिबास त्रास देणारा. ४ काळ आला होता पण वेळ आली नव्हती=जिवावरच्या संकटांतून मोठ्या शिकस्तीनें सुटणें. सामासशब्द– **०कंटक**–पु. १ मोठें संकट; अनर्थ; कचाट. २ फार भांडखोर; कळ लावणारा; त्रासदायक माणूस. **०कष्ट**–पुअव. प्राक्तन व यातायात; दैव व दगदग; भाग्य व प्रयत्न. साधारणपणें षष्ठी विभक्तीत प्रयोग; जसें–काळकष्टाचा पैका–पदार्थ–प्राप्ति–मिळकत–भोग–काम इ० 'काळाकष्टाचा हक्क–माल कधीं जात नाहीं.' **०कौळु**–वि. काळाला (यमाला) कवळणारा, खाणारा. –नागा ७४३. (–शर) [काल+कवल] **०खर्ग**–पु. यमाचें खड्ग, तरवार. 'तो काळखर्ग अकस्मात। गगनपंथें उतरत।' [काल+खड्ग] **०ज्वर**–पु. विषमासारखा मुदतीचा व भयंकर प्रकारचा ताप. 'जया काळज्वरु आंगीं बाणे।' –ज्ञा ४.२००. **०झोंप**–स्त्री. १ मृत्यूच्या वेळची झोंप; शेवटची झोंप. २ (ल.) प्रत्यक्ष मृत्यु. 'मलाहि कधीं तरी या ... रंगमहालांत काळझोंप घ्यावी लागणार.' –भा ११६. २ अति गाढ झोंप; तंद्री; मूर्च्छा. ३ जींत असतां कांहीं संकट, अरिष्ट गुदरतें अशी झोंप. **०टोला**–पु. मृत्यु. 'झोला निरसेल काळटोला रे।' –आप २४. **०तिथि**–स्त्री. पुण्यतिथि; मृत्युतिथि. (क्रि० येणें; भरणें). **०धाड**–स्त्री. आकस्मिक व सर्व बाजूंनीं घेरणारा, अनिवार्य असा कहर, अनर्थ (आग किंवा चोर यांचा); संकटाचा आकस्मिक हल्ला. **०निद्रा–नीज**–स्त्री. काळझोंप. **०पुरुष**–पु. १ यम किंवा त्यासारखा क्रूर त्याचा दूत. २ भयंकर, आडदांड माणूस. ३ (ल.) पोलीसचा शिपाई. 'येवल्याच्या काळपुरुषाचें कृत्य उघडकीस आलें नव्हतें.' –टि १.१.३६९. **०पुळी–फोड–पुई**–स्त्रीपुस्त्री. अग्निरोहिणी; चाळपुळी; काखेच्या आसपास किंवा पाठीच्या कण्यावर मांस विदारण करणारा फोड. यानें आंत दाह होऊन वेदना व ज्वर हीं लक्षणें होऊन विस्तवानें भाजल्याप्रमाणें आग होते व सात, दहा किंवा पंधरा दिवसांत रोगी मरतो. हा रोग असाध्य आहे. –योर २.४२५. गुरांनाहि अशाच तऱ्हेचा एक रोग होतो. विष्णुकांत व करंडीचें मूळ कांजींत वाटून त्याचा लेप केला म्हणजे काळपुळी जाते. –योर२.२०७. 'बोखटें वर्ण काळफोड।' –दा ३.६.१७. **०भैरव**–पु. काशी येथील ग्रामसंरक्षक देवता; काशीचा कोतवाल; शंकराचा एक अवतार. **काळभैरवाचा सोटा**–पु. पोलीसचें कोतवालीचें काम. 'तुझें माझें रक्षण करण्याकरितां काळभैरवाचा सोटा कोणाच्या हातीं आला आहे.' –भाऊ २२. **०मुख**–न. मृत्यु; मृत्यूचें तोंड. 'जिवा कर्मयोगें जनीं जन्म जाला। परी सेवटी काळमूखीं निमाला।' –राम १४. **०मृत्यु**–पु. आकस्मिक, पूर्ण आयुष्य भरण्यापूर्वी आलेलें मरण; आकस्मिक मृत्यु. 'काळमृत्यु न बाधे जाण।' –गुच १४.२७. **०रजनी**–स्त्री. एक रात्रिचर देवता. 'वेताळ मुंज्या काळरजनी।' –ह १३.६८. **०रात्र**–स्त्री. भयंकर किंवा प्रळयकाळची रात्र. 'काळरात्रीची कटकें। उठावलीं जैसीं।' –ज्ञा ११.१९९. **०रूप–रूपी–स्वरूप**–वि. यमासारखा भयंकर अक्राळविक्राळ किळसवाण्या रूपाचा (माणूस) **०रोग**–पु. असाध्य, प्राण नाशक रोग. **०वंचना**–स्त्री. १ कालाचा अपव्यय. २ मृत्यूला फसविणें (योगी लोक ब्रह्मांडीं प्राण नेऊन मृत्यूपासून वांचतात अशी समजूत आहे.) **०सर्प**–पु. १ यम; मृत्यु. २ वेळ (सर्व भक्षक; काळरूपी सर्प) **काळाचा काळ**–वि. जो मृत्यूलाहि भीत नाहीं असा. अतिशय भयंकर; भुतासारखा (माणूस). **–ळाचा फेरा**–पु. यमाची फेरी; कांहीं तरी अपरिहार्य किंवा भयंकर अनर्थ; रोगाची साथ.

काळ—पु. १ वेळ; प्रसंग; समय. २ दुष्काळ; कठिण प्रसंग. ३ दैव; नशीब; परिस्थिति. 'हल्लीं आमचा काळ फिरला आहे.'—विवि १०.५—७.१२६. 'मला नाहीं काळ अनकूळ!' —मृ ७. ४(व्या.) क्रियापदाच्या रूपविशेषावरून ती क्रिया अमकया वेळीं घडली असा जो बोध होतो तो. [सं. काल] (वाप्र.) **०अनुकूल होणें**—नशीब फळफळणें. **०कंठणें**—व्यर्थ काळ दवडणें; वेळ घालविणें; दिवस काढणें. **०चिन्मुख होणें-फिरणें, काळानें घेरणें-वेढा घालणें**—नशीब किंवा दैव वांकडें होणें; वाईट दिवस येणें. **काळाची गांड मारणें**—कसा तरी घालविणें. **-ळानें ओढणें-बोलावणें**—नशिबानें संकटांत किंवा मृत्युमुखीं पडणें **-नें घेरणें**—मृत्यु येणें. 'चिमणा बापूस लौकरच काळानें घेरलें.'—विवि ८.७.१२८. **-नें मागें पाहणें**—नशीब किंवा परिस्थिति प्रतिकूल होणें. **-नें हातीं धरणें**—नशीब किंवा परिस्थिति अनुकूल होणें. 'त्याला काळानें हातीं धरलें आहे.' **-ळावर दृष्टि ठेवणें-देणें**—नशिबावर किंवा पुढें येणाऱ्या परिस्थितीवर, भविष्यावर अवलंबून राहाणें; परिस्थिति पाहून वागणें. 'तिची काळावर दृष्टि आहे.' **चालता काळ**—भरभराटीचे दिवस, आयुष्य; हातीं घेतलेल्या कामांत ज्यावेळीं सारखें यश येत असतें असे दिवस. याच्याउलट पडता काळ. 'बा तुझा चालता काळ; खायाला मिळती सकळ।'—अमृत ११८. **काळोकाळ भविष्यति (सं. काले काले भविष्यति)**—केव्हां तरी होणें याअर्थी. **म्ह०** (व.) काळा अंतीं बरबटया दुष्काळांत बरबट खाणेंहि मनुष्य खातो त्याप्रमाणें अडचणींत सांपडल्यावर मनुष्य हलकें काम करण्यास तयार होतो. सामाशब्द—**०काळ**—क्रिवि. प्राचीन काळा पासून; पौराणिक काळापासून. **०खंडा**—पु. १ बहुत दिवस वांचलेला दुर्जन माणूस; ज्यानें काळाचेंहि खंडन केलें असा. २ कोडगा; निगरगट्ट. **०गत**—स्त्री. १ काळगति. [कालगति] २ ठराविक काळाच्या पुढें गेलेला वेळ; वेळेचा अपव्यय (या अर्थी दिवसगत हाहि शब्द अधिक रूढ आहे). **०चुपाऱ्या**—वि. (निंदाव्यंजक) माध्यान्ह उलटल्यावर जेवणारा. **०घात**—स्त्री. जगाच्या बरेवाईटपणास कारणीभूत असलेली कालाची शक्ति; काळवेळ. 'यंदा काळघातच अशी आहे म्हणून शेती पिकली नाहीं.' **०प्रसंग**—पु. वेळप्रसंग; संधिसमय, यांना व्यापक संज्ञा. जो काळप्रसंग पाहातो तो शहाणा.' **०वशें**—क्रिवि. कालांतरानें; कालानुसार; योग्य काल आल्यावर. **०वार**—पु. अशुभ दिन; (जोशी किंवा शूद्र लोकांत) घातवार. **०वेला-ळा**—स्त्री. १ शिवालिखीत ग्रंथांमधील अशुभ वेळ. वेळ पहा. २ वेळप्रसंग; काळप्रसंग पहा. ३ मृत्यूची वेळ. 'या परि ते काळवेळा। रायें राखिली तये वेळां।'—कथा १.२.१२१. **०वेळ**—स्त्री. १ वाईट किंवा संकटाचे दिवस; कालव्हा पहा. 'काळवेळ सांगून येत नाहीं.' २ वेळप्रसंग; हंगाम; योग्य वेळ, संधि. 'जें कांहीं करणें तें काळवेळ पाहून करावें.' ३ सामान्यतः वाईट किंवा अशुभ वेळ. **०शुद्धि**—स्त्री. शुभ वेळ; पवित्र वेळ. 'काळशुद्धि त्रिकाळीं। जीवदशा धूप जाळी।'—ज्ञा १३.२८८. **काळाचा काकडा**—पु. दणकट, बळकट म्हातारा; निरोगी, खडस, टणक म्हातारा; भयंकर धोक्यांतून निभावलेला माणूस. **काळांतरीं**—क्रिवि. (नास्त्यर्थी) भविष्यकाळींहि नाहीं, केव्हांहि नाहीं. 'ही गोष्ट काळांतरींहि व्हावयाची नाहीं.' २ थोडे दिवस गेल्यावर; कांहीं कालानें; 'हें कांहीं काळांतरानें होईलसें वाटतें.' **-ळांतून ओढलेला**—वि. दुष्काळांतून जेमतेम वांचलेला; अतिशय लुकडा; जरत्कारू. **काळींकाळीं**—क्रिवि. योग्य वेळीं; जेव्हां जेव्हां पाहिजे असेल त्या त्या वेळीं; 'पर्जन्य तोहि उपकारार्थ। काळीं काळीं वृष्टि करित।'—निमा १.९८. [सं. काले काले] **काळें करून**—क्रिवि. थोडया वेळांत; कांहीं कालानें; योग्य वेळीं; थोडया वेळानें. 'काळें करूनि सुख जोंवरि होय लेखीं।'—र २७. **काळेंचि**—क्रिवि. तत्काळ. 'जें विटोनि विकारी होत। तें अपुनीत काळेंचि'—एभा २१.११७. **काळो काळ**—क्रिवि. १ बहुत प्राचीन काळापासून; अनादि काळापासून. २ पुन्हां पुन्हां (नकारार्थी). 'माझी विनंति आपण ऐकावी, मी काळोकाळ मागायचा नाहीं.

काळ—पु. (धारवाडी) लहान मुलें खेळांत सुपाऱ्या, चिंचोके वगैरे घेतात त्यास म्हणतात.

काळ—पु. (व.) उडीद किंवा मूग यांचें जाडेभरडें भूस.

काळकाई—स्त्री. पार्वतीचें एक भयंकर स्वरूप; कालीदेवी. [सं. कालिका]

काळगई—स्त्री. १ (वे.) मिश्र पीक. २ नांगरटी.

काळगेला—वि. काळसर शरीराचा वर्ण असलेला; काळेला. याशिवाय काळ हें पूर्वपद असणारे रंग, वर्ण या अर्थांचे सामासिक शब्द काळा शब्दाखालीं पहा.

काळजी—स्त्री. १ चिंता; आस्था; कळकळ; अंतःकरणास होणारी व्यथा; फिकीर. २ मनांतील भाव. **०काटा**—पु. चिंता. **-चा धगड**—वि. अत्यंत निष्काळजी; बेगुमान. (माणूस). [काळीज]

काळण—पु. (कों.) अन्नाचें मद्य करून विकणारी एक जात व तींतील व्यक्ति.

काळपात—स्त्री. (खान.) पराकाष्ठेची विनवणी; काकळूत. [कल्पांत]

काळपेरी—वि. नाचणीचा एक प्रकार.

काळंबें—न. मोठें व मधानें भरलेलें मधमाशांचें पोळें. **०माशी, कोळंबी**—स्त्री. वरील पोळ्यांतील माशी.

काळवीट-चिंट-हरिण—पु. काळ्या पाठीचा हरिण.

काळसा—पु. नाकतोडे, टोळ, गोचीड इ० खाणारा एक पक्षी.

काळा—पु. १ (सांकेतिक) बिब्बा; भिलावा. २ (काव्य) श्रीकृष्ण; विठोबा. 'अपयशाचें खापर ..... त्या काळथाच्या ढाळक्यावर फुटलें' –नामना १३. ३ काळसर्प. 'जागविला पुच्छीं त्वां वेदुनि पद बहु सपूर्वफट काळा।' –मोउद्योग १२. २१. –वि. १ कृष्णवर्ण; श्याम; काजळाच्या रंगासारखा; तशा रंगानें युक्त असलेला. २ कपटी. 'कृष्ण बाहेर काळा तसाच आंतहि काळा आहे.' –परिभौ २५. [सं. काल; फ्रें. जि. काळो, काळार्दी=जिप्सी माणूस; पो. जि. काळी; फा. कारा; सिं काला; का. करि] काळपूर्वपद असलेले रंग, वर्ण या अर्थाचें सामासिकशब्द– **काळजिभ्या**–वि. १ शिवराळ तोंडाचा; अनिष्ट बोलणारा; निमदळ; शिव्याशाप देणारा; अचकट विचकट बोलणारा. २ ज्याचें वाईट भाषण खरें होतें असा. **•टिक्या**–वि. १ काळे ठिपके असलेला (घोडा इ०) घोड्याच्या ७२ अशुभ चिन्हांपैकीं हें एक आहे. –मसाप २.५६. **•तोंड्या**–वि. १ दुर्दैवी; अपशकुनी; दुष्ट. २ लज्जित झालेला; गांगरलेला; खजिल. 'स्नेह कैसा सांडिला ध्रुवा आजी। काळतोंडा जाहलों अगामाजीं।' –चिंतामणिकवि ध्रुवाख्यान. ३ (व.) ओठावर काळे केंस असलेलें(जनावर). **•ळेंद्रा-ळुंद्रा**–(शिवी) काळथा उंदरासारखा काळा कुळकुळीत. **•दांत्या**–वि. १ काळे दांत असलेला (कर्मविपाकावरून असला माणूस पूर्वजन्मीं मांग होता अशी समजूत आहे.) २ (ल.) अशुभकारक; अनिष्टदर्शक; अपशकुनी (माणूस). ३ (ल.) शिव्याशाप देणारा; शिवराळ; निंदक. **•ळेंबन-ळमन**–स्त्रीन. अंधारलेली, सदैं हवा; पाऊस, थंडी यांनीं युक्त वांवाळी हवा. [कादंबिनी] **•बुंडी-बोंडी जोंधळा**–पु. जोंधळ्याची एक जात; याचें बोंड काळें असतें. **•मांजर**–पुन. कांडेचोर; ऊद. **•मुखी**–वि. १ काळथा तोंडाचा; तोंडावर काळे केंस असलेला (घोडा), हा अशुभकारक समजतात. २ सामान्यतः काळथा तोंडाचा. ३ (काव्य) दुष्ट; भयंकर; राक्षसी. 'नागविले प्रतापी थोर थोर। दशवक्त्र काळमुख।' **•मुखी गुंज**–स्त्री. काळा ठिपका असलेली गुंज. **•मुख्या**–वि. दुर्दैवी; अभागी; अधम; नीच. **•लोह**–न. पोलाद; कालायस. 'काळलोहें डंब चिलें। वज्रवाटीं बांधिलें।'–शिशु ५०९. **•वख-खा-खें**–पुन. १ काळोख; अंधार (कांहीं ठिकाणीं चुकीनें काळवखें असा शब्द वापरलेला आहे). 'महामोहाचा काळवखा।' –भाए १०२. 'कां काळ राहे काळवखा। तो आपणा ना आणिकां।' –अमृ ४.३६. 'निद्रेचे शोधिले। काळवखें।' –ज्ञा १२.४९. 'अग्नियेचे काळवसे। समूळ गेले तेधवां।' –भवि ९.१९६.

२ काळेपणा; डाग. **•वट**–वि. १ काळसर. २ काळा; काळी (जमीन). [काळा+वत] **•वटणें-वंडणें**–अक्रि. १ काळें पडणें; मलिन होणें; (ऊन वगैरे लागल्यामुळें शरीर इ०) **अपराध**, भय यानीं चेहरा काळा ठिकर पडणें; काळानिळा पडणें; हिरवा निळा होणें. २ शेत पीक यांचा फिकटपणा जाऊन टवटवीत होणें; निसवण्याच्या स्थितीस येणें. ३ (काव्य) काळा पडणें. 'प्रहणीं काळवंडे वासरमणि।' 'चंद्रबिंब विठाळलें। शुद्धदेहें काळवंडलें।' –कथा १.२.१५०. **•वटी-वण**–स्त्री. काळिमा; डाग; कलंक; दोष. **•वंडी**–स्त्री. (कों.) काळवटणें, काळवंडणें पहा. **•वत्री-वथरी**–स्त्री. सह्याद्रीतील दक्षिणमधील अग्निभभे काळा खडक; हा ज्वालामुखीच्या रसाच्या थरांतील उष्णता विसर्जन पावून झाला आहे. –सृष्टि ३८. **•वद्दन**–वि. काळमुखी (घोडा) पहा. –अश्वप ९४. **•विद्रे-काळुंद्रा** पहा. **काळवें**–(राजा. कुण.) संध्याकाळची काळोखी. **•सर**–वि. काळवट; किंचित् काळथा रंगाचा. **•सरणें**–अक्रि. काळवटणें; काळवंडणें पहा. **•सावळा**–वि. काळासावळा; साधारण काळा. (रंग). **काळानें आरंभ होणारे** शब्द (वाप्र.) **काळथाचे पांढरे होणें**– एखाद्याचे काळे केस पांढरे होणें; म्हातारपण येणें. **पांढऱ्याचे काळे होणें**–म्हातारपणांत तरुणपणाचे चाळे करणें; सचोटी सोडून देणें. **काळ्या डोईचें मनुष्य**–न. (जेव्हां इतर जीवांपेक्षां (प्राण्यांपेक्षां) माणसाची अद्भुत शक्ति वर्णावयाची असते अशावेळीं हा शब्द माणसास लावतात). **काळ्या दगडावरची रेघ**–(वाप्र.) टिकाऊ; अक्षय्य; अबाधित अशी गोष्ट; उक्ति; न बदलणारी गोष्ट. 'ही आपली माझी काळथा दगडावरची रेघ.' –तोबं १७९. सामाशब्द– **•अबलख**–वि. पांढऱ्या अंगावर काळे ठिपके असणारा (घोडा). **•अभ्रक**–पु. काळथा रंगाचा अभ्रक. **•आजार**–पु. हा भयंकर रोग आसाम व मद्रास इलाख्याच्या एक भागांत होतो. यानें यकृत व प्लीहा फार वाढतात आणि रोज ताप येतो. **•उन्हाळा**–पु. १ अत्यंत कडकडीत उन्हाळा; यामुळें सर्व सृष्ट पदार्थ रखरखीत भासतात. २ कठिण, आणीबाणीची, टंचाईची वेळ; आयुष्याच्या भरभराटीच्या साधनांचा अभाव. 'तूं काळथा उन्हाळ्यांत मजजवळ पैका मागतोस काय?' ३ चैत्र व वैशाख हे दोन महिने. **•उंबर**–पु. उंबरे झाडाची एक जात. **•कभिन्न-कभीन**–वि. अत्यंत काळा; लोखंडासारखा काळा. [सं. काल+का. कब्बिण्ण=लोखंड] **•किट्ट-कीट-कुट्ट-कुळकुळीत-मिचकुट**–वि. अतिशय काळा. (किट्ट, कुट्ट वगैरे शब्द जोर दाखवितात). लोखंडासारखा किंवा शाईसारखा काळा. काळा जहर पहा. 'हा अमावास्येचा {काळाकुट्ट अंधार' –चंद्रप्र २. **•कट्ट्या**–पु. काळा तीळ. **•करजत-करंद**–वि. काळाकभिन्न. **•करंद**–

फत्तर–पु. काळा दगड. 'कृष्णवेणीचें पाणी काळाकरंद फत्तरांतून उसळया मारीत' –खेया २९. **०कुडा**–पु. कुडयाच्या झाडांतील एक जात. दुसरा तांबडा कुडा. [सं. कुटज; बं. कुटराज; हि. कुडा, कौरेया; गु. कडी] **०कुमाईत**–वि. काळया रंगांत तेल्या रंगाची झांक असलेला (घोडा.) **०कूम**–पु. (चांभारी) विशिष्ट पद्धतीनें कमावलेलें काळें कातडें. **०खापर**–वि. खापरासारखा काळा. **०गरु**–पु. काळया रंगाचा अगरु, धूप. 'तत्काळ काळागरु धूप दावी।' –सारुह ८.७९. **०गवर**–पु. एक शक्तिवर्धक वनस्पति. **०गहिरा**–वि. काळा कुट्ट. **०गुगळी**–पु. गुगळासारखा काळा मासा. **०गुरा**–पु. एक लहान झाड. **०गोरा**–वि. १ काळा व गोरा. २ खराखोटा; शुद्धाशुद्ध. **०चांफा**–पु. चाफ्यांतील एक भेद. **०चित्रक**–पु. चित्रक (एक औषधी) झाडाची एक जात. **काळचो**–पु. (गो.) नीच मनुष्य. **–लांजनी**–वि. एकरंगी असून डाव्या खाकेच्या जवळ किंवा छातीवर काळा टिपका असलेला (घोडा) यामुळें धन्याला मृत्यु येतो अशी समजूत आहे. अश्व ९६. **०जहर–ठिक्कर–ढोण**–वि. काळाकभिन्न. **०डगलेवाला**–पु. पोलीसचा शिपाई. **०तित्तर–तीतर**–पु. रंगीबेरंगी तितर पक्षी. **०तीळ**–पु कारळा तीळ पहा. **०दगड**–पु. काळवत्री-बथरी पहा. **०दाणा**–पु. एक वेल; हिचें कांडें व शाखा यांवर बारीक कुसें असून पानें कपाशीसारखीं असतात. फुलें फिकट, निळया रंगाचीं घंटेच्या आकाराचीं, व मोठीं असतात. फळ नरम असून आंत तीन पुडें व त्यांत काळें बीं असतें. याचा औषधाकडे उपयोग करतात. –वगु ७.१. [सं. कृष्णबीज, नीलपुष्पी] **०धोतरा**–पु. काळसर–जांभळट धोतऱ्याचें झाड. **०निळा**–वि. काळासांवळा (रंग, चेहरा). **०फत्तर**–पु. १ काळवथरी दगड. २ (ल.) अत्यंत मूर्ख; अडाणी माणूस. **०बगळा**–पु. काळया पाठीचा बगळा. **०बाळा–बाहाळा**–वि. फिकट काळे किंवा काळे व पांढरे पट्टे अंगावर असलेला (पशु.) **०बेंदरा–बेंद्रा**–वि. काळा व हेंगाडा; विदूप. 'मी चांगट फांकडी रूपानें तूं काळा बेंदरा' –पला ५. [काल+हेंदर] ? **०बेरा**–वि. काळाबेंदरा (अंगाचा वर्ण, स्वरूप, कपडालत्ता वगैरे). **०बोळ**–पु. बाळंत-बोळ; एका झाडाचा वाळलेला चीक. हा मुलांच्या पोटदुखीवर उपयोगी आहे. **०भिल्ल–भील–मांग–वीख**–वि. काळाकभिन्न. **०भोपळा**–पु. भोपळ्याची एक जात; तांबडा भोपळा; गंगाफळ. **०माजा**–पु. मायफळ; माजूफळ. **०मासी**–पु. पित्तपापडा. **०मुरूम**–पु. काळया रंगाचा मुरूम. **०शेंगळ**–पु. काळया रंगाचा एक मासा. **०साधळा**–वि. केवळ काळाहि नाहीं व केवळ गोराहि नाहीं असा (रंग, रंगाचा); साधारण काळा. [सं. काल+श्यामल] **०सावा**–पु. साव्याची काळी जात. **०सुरमा**–पु. डोळ्यांत घालावयाचें एक अंजन; (ब्लॅक सल्फेट ऑफ ॲंटिमनी).

काळे उडीद–पुभव. माप; एक द्विदल धान्य. **०केस**–पुभव. (ल.) तारुण्य व त्यांतील खुमखुमीचा काळ; याच्या उलट पांढरे–करडे केश. **०तीळ**–पुभव. काळया रंगाचे तीळ, श्राद्धपक्ष, श्रावणी वगैरे कार्यांत उपयोगी पडणारे तीळ. **काळेला–रा**–वि. काळसर वर्णाचा. **काळ्या पाठीचें खोबरें**–न. ज्या खोबऱ्याची पाठ काळी असतें तें, ही खोबऱ्याची एक जात आहे. **काळीनें** आरंभ होणारे शब्द. **काळी**–वि. १ रंगानें काळी (स्त्री, मादी वगैरे). स्त्री. –स्त्री. म्हैस (कारण ती रंगानें काळी असते) ज्याचे घरीं काळी त्याची सदा दिवाळी।' **म्ह०** (व.) काळीकाळीउंदर तिचा सैपाक सुंदर–काळया स्त्रीस चढविण्यासाठीं म्हणतात. सामाशब्द · **०काठी**–स्त्री. एक औषधी झुडप. **०कांब**–१ काळयाकुट्ट ढगांची रांग. (क्रि० येणें; जमणें; उठणें; विरणें; फाकणें). २ (ल.) काळया रंगाच्या कुणब्यांची (जेवण वगैरेस बसलेली) पंगत. **०खजुरी–खजूर–खारीक**–स्त्री. एक औषधोपयोगी रानखारीक. ही कडू, अग्निदीपक व ज्वरनाशक आहे. **०गुळी**–स्त्री. काळा रंग तयार करण्याच्या कामीं उपयोगांत येणारी नीळ. **०घेट्टूळ–टोळी**–स्त्री. घेट्टूळचीच एक काळी जात. **०चंद्रकळा**–स्त्री. काळें लुगडें; याचें उभार व आडवण सर्व काळें व किनार कोणत्याहि तऱ्हेची असते. **०जिरी**–स्त्री. कडू कारळी. **०तुळस**–स्त्री. काळया पानांची व मंजिऱ्यांची तुळस; कृष्णतुळस **०तेरी**–स्त्री. काळया रंगाचें अळूं; हें मुळव्याध नाशक, अग्निदीपक, व शौचास साफ करणारें आहे.–योर १.४७. **०धार**–वि. दृश्य क्षितिज; समुद्रांत पहात असतां ज्यापुढें दृष्टि पोंहचत नाहीं तो मर्यादाप्रदेश. –शास्त्रीको. 'त्याची हद्द काळेधारेशीं लागलेली आहे.'–बाळ २.११८. **०पानवेल**–स्त्री. काळया रंगाच्या विड्यांच्या पानांची वेल; हिचें पान स्वादिष्ट परंतु तिखट असतें. **०प्रजा**–स्त्री. १ सामान्यपणें मजूरवर्ग. २ बडोदें संस्थानांतील भिल्लासारखी एक जात; (गु.) काली परज. **०भित**–स्त्री. उत्तरदिशेस जेथपर्यंत मनुष्याचें गमन होतें तेथील सीमाप्रांत. –शास्त्री. **०भोपळी**–स्त्री. काळया भोपळ्याचा वेल. **०माशी**–वि. १ मोठी, काळया रंगाची, व्रण, क्षत, मेलेलें जनावर यांवर बसणारी माशी. २ एका जातीचें गवत. **०मिरची**–स्त्री. १ (हिं.) काळ्या मिरच्या येणारी मिरचीची एक विशिष्ट जात. २ काळीं मिरें. **०मुष्टी**–स्त्री. जारणमारणांतील मूठ (मारण्याची). 'काळीमुष्टीची बाधा होतां।' –नव६.१५२. **०मुसळी**–स्त्री. एक औषधी वनस्पति व मुळी; मुसळीची काळी जात. **०रात्र–शिळी रात्र**–स्त्री. १ भयंकर रात्र; भयाण रात्र. 'ही काळीरात्र चालली आहे मी खोटें बोललों तर पाहून घेईल.' [काल+रात्र] २ हा शब्द क्रियाविशेषणासारखा सप्तम्यंत करूनहि योजतात. जसें:–काळ्याशिळया रात्रीं. जास्त माहितीसाठीं बंद खालील

भरल्या बंदाखालीं बसणें पहा. ३ अमावास्या, मध्यरात्र, अशुभ भाषण, भूतपिशाच्चांचें आगमन (असत्य भाषण व शपथ यांखेरीज) वगैरेसंबंधानेंहि सामान्य रात्रीस हा शब्द लावितात; अरिष्टसूचक रात्र. **०वस्तु**-स्त्री. एक औषधी वनस्पति; हिचा दुसरा प्रकार पांढरी वसू. **०वेल**-स्त्री. गुरांच्या रोगावर उपयोगी पडणारी एक वेल. **०साळ**-स्त्री. काळ्या रंगाची साळ किंवा भात. **काळेंनें** आरंभ होणारे शब्द- **काळें**-न. १ डाग; कलंक; काळिमा; अपकीर्ति. [काळा] (वाप्र.) **काळें करणें-तोंड काळें करणें**; तोंड लपवून जाणें; दृष्टिआड होणें, फरारी होणें (दोष, अपराध वगैरेमुळें). 'जा कर काळें।' -कर्म २. **०तोंड घेऊन जाणें**-पळून जाणें; पोबारा करणें. 'काळें तोंड घेऊनि। गेला नेणो कोणीकडे।'सामाशब्द- **०अक्षु**-न. काळी तेरी पहा. **०अक्षर**-न. कागदावर लिहिलेलें मनोगत, अक्षरें लेख, पत्र इ०; यच्चयावत् अक्षरमात्र -शास्त्रीको. 'हा पंडित काळ्या अक्षरांचा अर्थ करील.' **०कमळ**-न. हें हिमालय पर्वतावर बर्फांत उत्पन्न होतें. याला एक हजार पाकळ्या असून त्यांचा घेर एक हातभर असतो -तीप्र ४१. **०कृत्य**-न. कृष्ण कारस्थान; अन्याय. **०खापर**-न. अतिशय काळा माणूस. अपकीर्ति, बदनाम झालेला, पराभव झालेला, आजारानें कृश, अशक्त झालेला माणूस. **०गवत**-न. एक प्रकारचें गवत. **०जिरूं-जिरें**-न. १ कडू कारळें. २ शहाजिरें [हिं. काली जिरी, सं. कालाजीरक] **०ढवळें**-न. १ संशय; शंका; अनिष्ट कल्पना; अंदेशा. २ काळे बेरें पहा. **०तेरें**-न. काळी तेरी, काळें अक्षु पहा. **०तोंड**-पु. स्वतः पासून पुढील पांचवा वंशज (आपल्या पणतूचा मुलगा). -वि. लाजिरवाणीं कृत्यें केल्यानें कलंकित झालेलें तोंड. 'तुझें काळें तोंड दृष्टीआड कर.' **०थर**-वि. काळ्या रंगाचा भर;कार दगड किंवा काळवथरी धोंडा **०द्राक्ष**-न. एक प्रकारच्या काळा मनुका. **०पाणी**-न. १ महासागर. २ अकाली किंवा अतिशय पडलेल्या पावसाच्या पाण्याचा दोष घालविण्यासाठीं बागेस दिलेलें विहीरीचें पाणी. ३ (ल.) हद्दपारीची शिक्षा व ती भोगावयाचें ठिकाण (ही शिक्षा झालेल्या इसमास हिंदुस्थानाबाहेर अंदमानांत ठेवतात). 'अखेरीस जाल काळ्या पाण्यावर चांगले' -भा १०४. **०पान**-न. काळ्या पानवेलीचें विड्याचें पान. **०बुबुळ**-न. डोळ्याचा काळा भाग (बाहुली व कनीनिका). **०बेरें-भेरें-ळें**-न. १ अनिष्ट संशय; वाईट आकांक्षा; अनिष्ट कल्पना; कुशंका; कपट. (क्रि० येणें.) 'हें काळेंबेरें तुझ्या मनांत कोठून आलें?' -गीर ६१२. २ लुच्चेगिरी; डावपेंच; कारस्थान; गिळंकृत करणें; दडपादडपी. **०भिवरी**-स्त्री. काळवथरी पहा **०मांजर**-नपु. कांडेचोर; ऊद. **०मिरें**-न. काळ्या रंगाचे मिरें. ' मिरूं पहा. **०मीठ**-न. १ पावेलोण. २ खाऱ्या मातीपासून उत्पन्न केलेलें मीठ. **-रें**-न. कडू कारळें.

काळ-कूट-गुजारा-री-गुजराण-चक्र-त्रय-धर्म निर्वाह-पाश-महिमा-माहात्म्य-वंचन-ना-समता-साधन-स्वरूप-क्षेप- हे शब्द काल शब्दाखालीं पहा.

काळाई—स्त्री. १ कासार व इतर कांहीं लोकांची देवी; हिचें स्वरूप काली देवीसारखें असतें. २ काळी जमीन (शेतकरी लोकांत रूढ) ' यंदा काळाईनें हातचें सोडलें ' २ काळवंडी (अनिश्चित) पहा. [सं. कालिका]

काळांचणी—स्त्री. अत्यंत काळजी; जांचणी; काचणी; आंच.

काळांचरें-ळें—न. जांभळ्या रंगाचें एक रानफूल.

काळांतर—न. (गो.) व्याज. [सं. कलांतर] **म्ह०** (गो.) काळांतरा आंसे मुद्दल नासे.

काळापात—पु. १ लुच्चेगिरी; अफरातफर; दडपादडपी; दुरुपयोग. ' तुमच्या रुपयांचा मी कांहीं काळापात करणार नाहीं.' २ फसवून, ठकबाजी करून फरारी होणें. ' तो काळापात करून देशोधडी झाला. ' [काल+आपत्ति]

काळाष्टक—१ कालाष्टक पहा. २ काळभैरवाप्रीत्यर्थ आठ दंपत्यें (जोडपीं) भोजनास सांगणें. -तीप्र परिशिष्ट २.पृ. ४.

काळिक—स्त्री. काळसरपणा. ' सांगें पितळेची गंधि काळिक।' -ज्ञा ४.६४. [सं. काल]

काळिका-काई—स्त्री. काळकाई; पार्वतीचें, काली देवीचें भयंकर स्वरूप. [सं. कालिका+आई]

काळिंग-ण—न. कलिंगड पहा. ' तें पक्व कालिंगण देखिलें नयनीं। प्रीति करूनि भक्षिलें।'

काळिंग असणें—(गो.) द्रव्यसंग्रह असणें.

काळिमा—न. १ कालिमा पहा. ' परिसाची निवारी जडत्व काळिमा।' -एरुस्व ३.१५. २ काजळ. ३ काळोख; अंधार. ' कीं येरीही दिशा तियेचि काळीं। काळिमा नाहीं।' -ज्ञा ५..८६. [सं.]

काळिया नाग—पु. काळा साप. ' कां काळियानाग धुंधुवातु।' -ज्ञा १८.७१२. [सं. काल]

काळी—स्त्री. काळिका पहा. [सं. काली]

काळी—स्त्री. १ शेतीची जमीन (देशावरील शेतजमीन बहुतेक काळ्या रंगाची असते यारून). 'काळीनें पीक सोडलें.' २ शेतांत पिकणारें पीक. ' काळी पिकली म्हणून पांढर वांचली. ३ लागवड करण्यासारखी जमीन; याचे उलट पांढर=वसतीची जमीन. ४ (ल.) शेतकरी वर्ग. 'ही गोष्ट काळी-पांढरीला माहीत.' -गांगा २. [सं. काल=काळें] **म्ह०** (व.) काळीवर

शेत नाहीं पांडरी वर घर (जागा) नाहीं. =ज्याला शेत नाहीं व घरहि नाहीं, भणंग, भिकारी अशा माणसाबद्दल योजतात. **०चा वसूल–पैका–चें उत्पन्न**–पु. शेतसारा; जमीन महसूल; याच्याहून मोहतर्फा वसूल निराळा. **०चुणकरी**–स्त्री. चुनखडीवरची काळी जमीन. ही नापिक असते. **०जमा**–स्त्री. काळीचा वसूल. **०जमीन**–स्त्री. ही जमीन रंगानें काळी, भुसभुशीत, खचणारी व पाणी धरणारी असते.

काळीज—न. १ (हिं.) मूळ यकृत; पित्ताशय. परंतु रूढ हृदय; रुधिराभिसारक इंद्रिय. 'भेदोनि काळिजाला गेला लोकापवाद शर...'–मोभारतीय रामायण. २ (ल.) अंतःकरण; मर्म; हृदयांतील नाजूक भाग 'कीं काळजीं घातली सुरी।' –रावि ४. ४९. 'खोंचोनि बोळे कौरवराचे। काळिजीं घालिसी कां घावो।' –मुसभा १७.५०. [हिं. कलिजाह्] (वाप्र.) **०उडून जाणें–कांपणें–थरथरणें–थरारणें–धडकणें**–छाती थरथरणें, कांपणें, धडधड उडणें (भीति, दुःख वगैरेमुळें) **०कठीण**–वि. (संस्कृतच्या अनुकरणावरून अशुद्ध समास) कठीण काळजाचा; निष्ठुर; कृपण; घाबरी; बेडर (माणूस) **०काढून टाकलें तरी विश्वास न येणें**–अविश्वासाची परमावधि. **०काढून देणें**–आपल्यास अत्यंत प्रिय अशी वस्तु देणें; स्वतःचें अंतःकरण देणें. **०खाणें–फोडणें**–१ छळणें; गांजणें; बेजार करणें; मर्मभेदक बोलणें. २ पश्चात्तापास, शोकास कारण होणें. **०पाठीमागें असणें–टाकणें**–बेफिकीर असणें; निर्भय असणें. **०फाटणें–दोन जागां होणें, काळजाचें पाणी होणें**–भयानें, दुःखानें विव्हल होणें. **०फुटणें**–धीर सोडणें किंवा ठाव सोडणें. **काळजाला, भोंक–घर पडणें**–भयानें, आश्चर्यानें, दुःखानें धावें दणाणणें; धक्का बसणें; हृदयाला झोंबणें. **–जास फेस येणें**–अतिशय तडफेनें किंवा उत्कंठेनें गुंतणें; फार परिश्रम करून थकणें. **काळजीं घाव घालणें**–डाग देणें; अंतःकरणास धक्का बसेलसें करणें; मर्मावर आघात करणें. **काळजीं कांटा करणें–धरणें–साता काळजाच्या पलीकडे ठेवणें**–अतिशय प्रिय होणें; अति मूल्यवान समजणें; कोठें ठेवूं कोठें न ठेवूं असें होणें; अतिशय काळजी घेणें. 'काळजाचे पलीकडे त्याला ठेव.'–नाम ना ११२. **काळजीं, काळजाला लागणें**–अंतःकरणांत शिरणें; दुःख, वेदना उत्पन्न करीत जिव्हारीं खोंचणें; बोचणें; आंत भिनणें (औषध, विष, वस्तु, अन्न, निंदा, अपशब्द काम वगैरे) या अर्थी किंवा आरुथेनें लक्षांत ठेवणें या अर्थी उपयोग. सामाशब्द **काळजाचा घड**–जिवाचा कलिजा, प्राणप्रिय माणूस. **०चा बोका**–पु. काळजाचें मांस; यकृत; पित्ताशय. (लाटिक लोकांत रूढ) **उफराटया, उलटया काळजाचा**–वि. बाटेल तें साहस कर्म करण्यास तयार होणारा.

कालुकी–ळुंखी—स्त्री. १ काळोखी; अंधार. 'काळुकी. दाटली अपार महीसी।' –नव १३.१५९. २ काळेपणा. ३ डाग; कलंक; काळिमा. **०रात्र**–स्त्री. अंधारी रात्र; चंद्रदर्शन न होणारी रात्र.

कालुगा—पु. काळ. 'रचूनि महत्तत्वाचें खळें। मळी एके काळुगेनि पोळें।' –ज्ञा १३.३९.

काळुंदरा–वि. फार काळा. [काळा]

काळुंदरा–द्रा–द्री—नपुस्त्री. (कु. गो.) काळया रंगाचा लहान मासा.

कालुबाई—स्त्री. एक क्षुद्र देवी. –खेया ५०. –विवि ८ २.३४.

काळेली–स्त्री. काटळी; काळा सावा पहा.

काळेश्वरी–स्त्री. कालीदेवी; दुर्गा.

काळो—पु. (कु.) बिब्बा.

काळोक–ख—पु. अंधार; तिमिर; प्रकाशाचा अभाव. (वाप्र) **०नेऊन दिवसास वाळत घालणें**–अघटित घटनेसाठीं झटणें; असंभाव्य गोष्टीसाठीं प्रयत्न करणें. खपुष्प पहा. **म्ह०** काळोखांत केलेलें केव्हांतरी उजेडांत येतें–पापास वाचा फुटते. **०मेट**–स्त्री. अतिशय काळोख; दाट काळोख; काळोख मिट्ट. **०पाख**–पु. महिन्याचा कृष्ण पक्ष; अंधाऱ्या रात्रीचा पंधरवडा. [काळोख+पक्ष=पाख]

काळोखी–की—स्त्री. १ ढगांनीं; अभ्रानीं आलेली अंधारी; अस्तमानाची अंधारी; थोडासा अंधार. २ पित्तादिकानें डोळ्यांपुढें आलेली अंधारी. ३ (ल.) कलंक; डाग; अपकीर्ति. ४ काळवंडी. **०रात्र**–स्त्री. अंधारी रात्र; चांदणें नसलेली रात्र.

काळोखें—न. काळोख.

काळोजी—पु. १ (ल.) यमदेव. [काळा]

काळोटा—पु. १ काळया रंगाचें कबुतर. २ काळया रंगाचें व दोनच पांढरे ठिपके असलेलें पांखरूं. [काळा]

काळोतरी–री–थरी—वि. काळवथरी दगड पहा.

काळोंदरा–द्रा—वि. काळुंदरा पहा.

काळोबा—पु. (ल.) यमदेव. 'तुझ्या शरीराला काळोबा खाईल.' –नामना ४०. [काळा]

काळोवेळो—पु. (कु.) एका जातीचें भात.

काळोसा—पु. काळोख; अंधार. 'उभ्या काळोशाचे आड। सातापांचा एक भीड.' –तुगा १५५. [काळा]

काळ्यामाळ्या—पुअव. १ (क.) स्वतःच्या अंगाभोंवतीं, दोन्ही बाजूला आपले हात ताठ करून वरचेवर गरगर फिरण्याचा मुलांचा एक खेळ. (क्रि० घालणें.) २ वरील खेळ खेळणें. ३ तेथल्या तेथेंच घुटमळणें. [काळा+माळा]

कांक्षणें—अक्रि. इच्छिणें; इच्छा, अपेक्षा करणें. [सं. कांक्षा]

कांक्षया—स्त्री. कांक्षा; इच्छा; अपेक्षा. ' न धरी चित्तीं तूं कांक्षया.' –वेसीस्व १.२३. [सं. कांक्षा अप.]

कांक्षा—स्त्री. १ इच्छा; अपेक्षा. २ घेतलेली शंका; केलेला प्रश्न. ३ अंदेशा; संशय; शंका. ' कांक्षे नेघ सपक्ष ही क्षितिपती त्वत्क्षात्र संरक्षणें.' –आराम २१. ४ कल्पना; विचार; विचित्र वल्गना किंवा मत [सं. कांक्ष्=इच्छिणें]

कांक्षावणें—अक्रि. संशय, अंदेशा घेणें; कुतर्क किंवा शंका धरणें.

कांक्षित—वि. इच्छित किंवा वांच्छित; ज्याची आवड धरली आहे असें.

कांक्षी(क्षे)खोर—वि. १ आढेवेढे घेणारा. २ मनांत कुतर्क, संशय घेऊन हरकत घेणारा; संशयी; अंदेशखोर. ३ तऱ्हेवाईक; एककल्ली; हुक्कीबाज; भ्रमिष्ट.

किं—सना. १ कोण? कोणचा? काय? हा शब्द बहुतीहि समासांत नेहमीं येतो, जसें– किंकर्तृक=कोणी केलेलें? कोण कारण झालेलें? किंप्रयोजक=कोणत्या कामाचा किंवा कोणत्या उपयोगाचा? किमर्थ, किंनिमित्त=कशाकरितां? कां? काय म्हणून २ किंवा; अथवा. 'नातरि रसेंवीणु वाणी। किं चंद्रेवीणु रजनी.' –शिशु ५३९. [सं. किम्]

किंक—स्त्री. (कों.) किंकाळी; आरोळी. (क्रि० फोडणें; मोकलणें). ' आस्वलाआधीं किंक फोडावी. ' [ध्व.]

किंकट—पु. (काव्य) एका किंवा अनेक हत्तींचा चीत्कार, आरोळी. [सं.]

किं(कि)कट—वि. (कीकट=बहार देश यावरून) रानटी. ओसाड; नापीक (देश).

किंकणी—स्त्री. १ लहान घंटा; क्षुद्र घंटा (बैलांच्या गळ्यातील) पट्टयामधील किंवा स्त्रियांच्या कमरपट्टा अथवा इतर दागिन्यामधील घुंगुर, घागऱ्या. २ किंकाळी. (क्रि० फोडणें; मोकलणें). ३ पिलू या फळाचें बीं [सं. किंकिणी]

किंकणेल—न. पिलू झाडाच्या फळाचें तेल.

किंकर—पु. १ चाकर; सेवक; दास. ' नाम साराचेंही सार। शरणागत यमकिंकर.' –तुगा २५२२. ' वर्णिती राव किंकर ' - ऐपो १४५. [सं.]

किंकर-री—स्त्री. देवबाभळीचें किंवा वेडया बाभळीचें झाड. याचीं फुलें सुवासिक असून याच्यापासून गोंद व इतर पदार्थ होतात. कंकरी पहा.

किंकरी—स्त्री. दासी. ' ज्या सर्व सांडुनि किंकरी। होउनि निकट आल्या.' –रास १.११७६. [सं.]

किंकरें—न. १ (सुतारी) विंधणें; सुताराचें लांकडास भोंक पाडण्याचें एक हत्यार; उळी; पटाशी. (बे.) २ एक खेळणें; किरकिरें; फिरकी.

किंकसा—न. (व.) हळदीचें उटणें.

किंक(का)ळणें, किं(कि)काटणें—अक्रि. १ हत्तीनें चीत्कार करणें. 'मस्त हस्त किंकाटती.' –दावि ४९६. 'श्वेतवर्ण हत्ती चौदंत। किंकाटत धांवती.' २ आरोळी मारणें. ' मग पाहतां ते कृष्णउपासक। हरिनामें किंकाटती.' –ह ३३.११७. [किंक]

किंक(का)ळी—स्त्री. हत्तीचा चीत्कार; (त्यावरून सामान्यतः) आरोळी. (क्रि० फोडणें; मोकलणें).

किंकाट—पु. (काव्य) (हत्ती किंवा घोडा यांचा शब्द) ' हत्ती किंकाट करिताती.' –दावि २४४. ' सुटले अश्वांचे किंकाट ' –कथा २.२.५८. [ध्व.]

किंकार—पु. मोराचा टाहो. ' मयोर नाचती किंकारीं ' –मुसभा २.३४. –वि. चक्राकार. –शर. [ध्व.]

किंकिणी—स्त्री. कमरपट्टयाची घागरी, घुंगुर; कोणत्याहि किणकिण आवाज करणाऱ्या दागिन्याचें घुंगरू. **किंकणी** पहा. ' मधुर शब्दाचिया किंकिणी। गोडपणें वाजती.' –एरुस्व १५. ७६. ' ज्यापीं क्षणत्कारिती किंकिणी। ' –वेसीस्व ३.७३. [सं.]

किंकिदिधी—पु. एक पक्षी. –प्राणिमो ६२. [वै सं.]

किंकीचें पान बाई किंकीचें पान—(मुलींचा खेळ) दोन मुली समोरासमोर उभ्या राहून उजवा हात स्वतःच्या कपाळावर लावून डावा हात एकमेकींचे समोर धरून हें गाणें म्हणत वर्तुळाकार फिरतात.

किंक्रांत—स्त्री. मकर व कर्क संक्रांतीची कर (संक्रातीपुढील दिवस) ही अशुभ समजतात. [संक्रांत द्वि.]

किख—वि. (गो.) अतिशय थंड?

किंग—पु. (व.) कीड; रोग. ' तेव्हांपासून माझ्यामागें किंग लागला. '

किंगरी—स्त्री. एक प्रकारचें शिंग; किनरी.

किंच—न. (कु.) अल्प अंश; थोडेसें. [किंचित्]

किंच—क्रिवि. पुन्हां एकदां; आणखी एकदां; आणि; शिवाय. ' त्रिभुवनपूज्यतम प्रभु सत्यचि हें किंच तो असे व्याही.' –मोउद्योग ७.१६. [सं. किम्+च]

किंचकट-काड—वि. १ बारीक; रोड; पातळ (शरीर, वांसा, खांब वगैरे). ' हें स्थित्यंतर युद्धकलेंत अलीकडे झाल्यामुळें ... ... उंचापुरा जवान आणि किंचकट पोरहि सारखेंच.' –नि ९७१. २ किरटें; वाचावयास कठिण; गिचमीड (अक्षर, लेख). ३ फार बारीक; चिरचिरें (लेखणीचें टोंक).

४ (सामान्यतः) किचर, किचरट पहा. ५ भानगडीचें. 'श्री सिद्धारूढस्वामींच्या मिळकती संबंधानें असला किचरट वाद उपस्थित झाल्याचें प्रसिद्धच आहे.' –सासं २.४१०. [सं. कृच्छ्र]

किचकाट—न. (कु.) गर्दी; गचडी.

किचकाड-डा, किचकाट-कडा—वि. किचकट पहा (प्राणी किंवा वस्तु).

किचकिच—स्त्री. चिकटण; चिकटाई; चिकचिकाट. [ध्व. चिकचिक वर्णव्यत्यास]

किचकिच-चां–क्रिवि. (ध्वनि) रेवाळ वगैरे पदार्थ दांतां खालीं सांपडले असतां होणाऱ्या आवाजाप्रमाणें. (क्रि० लागणें.)

किचकिचणें—अक्रि. १ वानरानें दांत चावून शब्द करणें. २ शब्द काढणें (पिंगळ्यानें). [किचकिच]

किचकिचावणें—क्रि. (गो.) हिणावणें; टाकून बोलणें. (कु.) दांत चावणें. 'दांत ओठ किचकिचावत हत.' [ध्व.]

किचकिचीत—वि. किचकिच आवाज करणारा (कच्चा भात, रेवाळ वस्तु).

किचड—नपु. चिखल; रेंदा; राड; गारा. [बं. हिं. कीचड+र]

किचबिड-डीत—वि. किजबिड-डीत पहा.

किचम—स्त्री. (गो.) खाज; कंडू. [का. किच्च=आग]

किचमणी—स्त्री. (गो.) कटकट; घासाघीस; दिरंगाई; किचकटपणा; चेंगटपणा.

किचमर्णे—वि. (गो.) त्रास देणारें; कुचंबणा करणारें. –न. त्रास. [प्रा. कुचुंबन]

किचमिड—किजबिड पहा.

किचमुचें—अक्रि. (गो.) खाजविणें.

किचर, किचरट—वि. वाईट; त्रासदायक; पीडा देणारें; छळणारें; त्रासदायक गोष्टींनीं परिपूर्ण (काम, धंदा, न वाचतां येणारें अक्षर, दुरान्वयाचा व घोंटाळ्याचा श्लोक, फार महत्त्वाची नाहीं परंतु घोंटाळ्याची व त्रासदायक गोष्ट, काम).

किचवटणें-वंदणें-विंदणें—उक्रि. अस्ताव्यस्त फेकणें; विसकटणें; नासणें; टोचून, ओरखडून, चोळवटून कालवणें; चोळवटणें; चिवडणें. [ध्व.]

किचळणें—अक्रि. किंकाळी फोडणें; आरोळी मारणें; चूं चूं, चिव चिव, कुई कुई करणें [ध्व.]

किचाट-टी-चाटथा, किचाड—पु. १ कचाट. २ गलबला. 'रांड पोर किचाड करते।' –ऐपो ३२. [सं. कृत्या; का. किच्चाट]

किचाटी—स्त्री. गर्दी; दाटी. [सं. कृच्छ्र; का. किच्चाट]

किंचित्—क्रिवि. ईषत्; कांहींसें; थोडें; अल्प. [सं.]

किंचित्दान—न. चातुर्मासांत रोज आठ मुठी तांदूळ व एक पैसा ब्राह्मणास दान करतात तें. [सं. किंचित्+दान]

किंचित्ज्ञ—वि. (प्र. किंचिज्ज्ञ) अल्पज्ञानी; तुटपुंज्या ज्ञानाचा. 'परमात्मा तो सर्वज्ञ । जीवात्मा तो किंचिज्ज्ञ ।' [सं. किंचित्+ज्ञ]

किंचित्ज्ञान—न. (प्र. किंचिज्ज्ञान) १ तुरळक माहिती; तुटपुंजें ज्ञान; अल्प ज्ञान. २ अल्प समजूत; कोती बुद्धि. [सं. किंचित्+ज्ञान]

किंचीबिंची—स्त्री. बगळ्याच्या (पिंगळ्याच्या) चार आवाजांपैकी एक, कीं २ पहा. [ध्व]

किंचीर—वि. किचर; त्रासदायक. [का. किच्च]

किंच्च—पु. (बे.) १ त्रास. २ आग; शेकोटी. [का. किच्च]

किंच्चं, किंचतं—क्रिवि. (क. कुण.) किती ? कितीसें ? 'किंच्चं खाणार ?' 'किंचतं बघायचं ?' [सं. कियत्]

किंजबिंज—स्त्री. (ध्वनि) किलबिल; चिवचिव; किलकिलाट (पोपट, चिमणी, मैना, पिंगळा वगैरे पक्ष्यांचा); त्यावरून किलबिलाट किलकिलाट. [ध्व.]

किंजबिंजणें—अक्रि. किलबिलणें; चिवचिवणें (पक्षी)

किंजबिड-डीत—वि. १ खरडलेलें; गिचमिडीत; न समजेसें लिहिलेलें (अक्षर, लेख). २ ओबडधोबड; बोजड; विशोभित; बेडंवांकडें (कोरींव काम)

किंजल्क—पु. फुलांतील केसर किंवा तंतु. [सं.]

किंजळ—पु. एक मोठा वृक्ष; किंदळ. याचीं पानें लांब, असून लांकूड इमारतकाम व शेतीच्या औतांस उपयोगी असतें. 'ते पाईरहि खैर किंजळ तिथें आईनही वाढती ।' –केक १२९. –स्त्री. साळींतील एक भेद.

किंजिलादोर—वि. (गो.) भांडखोर.

किंजील-किंजित्यांसांव—(गो.) भांडण. [पो. क्रिसिल्ह]

किंजुरा—पु. (कों.) एक झाड. (लॅ.) पेंटाप्टेरा पॅनिक्युलाका.

किट—न. (गो.) तुकत्याच व्यालेल्या जनावराचें पहिल्या चार दिवसांतील दूध; चीक.

किटकिट—स्त्री. किरकिर; कुरकुर; भुणभुण. (क्रि० करणें) 'खुशाल तासचे तास किटकिट लावीत बसावं !' फाटक–नाटयछटा १. [ध्वनि; सं. किट्–त्रासे; किट द्वि.]

किटकिट-टो—पु. (गो.) जोराचा हंशा. [ध्व.]

किटकिटप—क्रि. (गो.) खिदळणें. [ध्व.]

किटकिटांवचे—क्रि. (गो.) आदल्या दिवशीं शिजविलेले पोहे न बिघडावे म्हणून फिरून शिजविणें. [ध्व.]

किटकिट्या—वि. किटकिट करणारा.

किटकूल-र—पुन. (व.) लहानसा किडा.

किटण—न. १ थर रूपानें जमलेला मळ, घाण (कुजलेलें शेण, गवत, काटक्या इ०); जुन्या लोखंडावर गंज चढून राहिलेला

अवशिष्ट भाग; लोखंड गाळतांना अगर नंतर त्याला चढणारी जळ; सामान्यतः धातूवरील कलंक, मळ, गंज; तेलाची चिकटी; भांड्याला लागून राहिलेला जळका अन्नांश; दांतावर जमलेला मळ. २ वीट, कौल इ० जास्त भाजल्यामुळें त्यावर येणारे दगडासारखे काळे गोळे; खंगर. ३ तापलेलें लोखड घणानें ठोकीत असतां उडणारे जळके कण; ठिणग्या. [का. किट्ट; सं. कृष्ण–किट्ट]

किटणें—अक्रि. १ मळानें खराब बनणें. २ गंज चढणें (धातु वगैरेवर). 'फार दिवस किटलेलीं जुनीं पानीं हल्लारें' –फाटक नाटयछटा ७. ३ त्रासणें; विटणें; नकोसें होणें. विशेषतः कान, हात क्वचित दांत यासंबंधें उपयोग उदा० 'मागतां मागतां माझे दांत किटले.' 'त्याचें गाणें ऐकून माझे कान किटले.'

किटना—पु. (जुन्नरी) वाघुर लावण्यासाठीं खुंट टोकण्याचा मोठा लांकडी हातोडा; मोगर.

किटली—स्त्री. चहादाणी. [इं. केटल]

किटळ—न. (कों.) किटाळ.

किटा—पु. फोडलेलीं जळाऊ लांकडें.

किटाड–ण—न. किटण पहा. **किटाणाची जमीन**–स्त्री. दलदलीची, पाणथळ जमीन. –भू ६७.

किटांबर—पु. (गो.) बुलबुल पक्षी.

किटाळ, किटळ—न. १ विस्तवाची ठिणगी; फुणगी (गवत, काटक्या जळत असतां अथवा परशांतून उडणारी). 'मधून मधून विस्तवाच्या ठिणग्या व किटाळें निघत.' –पाव्ह ५७. २ आळ; दोषारोप; संकट; अरिष्ट; हिणकसपणा. 'मामिसें अकल्पित घेतो किटाळी. चेंद्द नाहीं मजजवळी.' –ह ८.१४७. 'ह्यानें हें आमच्यावर उगाच किटाळ आणलें आहे.' –स्वप १४८. [का. किडि=ठिणगी]

किट्टर–किटुरुं—न. (गो.) लहान पांखरूं, पक्षी.

किटेला कोमेला—वि. मळकटलेला; कोमेजलेला; मळिन व निस्तेज; मलूल व अवठरलेला (म्हातारीं माणसें, जुनाट झाडें, फळें यांना म्हणतात). [किटणें+कोमणें]

किट्ट—न. मळ; किटण; कीट; घाण; बुरशी; गंज. [सं.]

किट्टटव—न. (गो.) लहान चिमणी.

किट्टांव—स्त्री. (गो.) मोठी गोचीड.

किट्टी—स्त्री. (गो.) तांब; गंज.

किट्टी—स्त्री. जनावरांवर पडणारी तांबडी लहान गोचीड.

किट्ली—स्त्री. (बे.) ठिणगी. [किटळ]

किडकलें—न. किड्क. [कीटक]

किडका–किडखाद—वि. कीड लागलेलें; किड्यानें खाल्लेलें (फळ पान); 'उत्तम भूमि शोधिली शुद्ध। तेथें बीज पेरिलें किडखाद।' –दा ५.३.३. [सं. कीटक+खाद्]

किडकालें, किडलूं—न. १ किडा; कृमि; कीटक. २ लहान सरपटणारा प्राणी, साप इ०; किरडूं. [सं. कीटक]

किडकिडणें—अक्रि. खिळखिळें होणें; 'अस्थियंत्र किडकिडी।' –भाए २०४. [ध्व.]

किडकिडीत—वि. सडपातळ; रोड; किरकोळ; काटकुळा; कृश.

किडकूल, किडकें—न. सर्पाचें बारीक पिल्लूं; किरडूं. [सं. कीटक]

किडकोळ—वि. १ किड्यांनीं खाण्यासारखा (लांकूड, फळ). २ किड्यांनीं खाल्लेला. ३ (ल.) खरजुला. [सं. कीटक]

किडणें, किडेणें—अक्रि. कीड लागणें; किडखाद होणें; किड्यानें खाणें. [किडा; तुल. का. केड]

किडबिडीत–किडबिड—वि. किजबिड–बिडीत पहा.

किडमाकडा—वि. चिक्कू; कटू. –क्रिवि. चिक्कूपणानें; कंजूषपणानें.

किडमिडा—वि. अस्पष्ट; संदिग्ध (भाषण).

किडमिडें—न. पिंगळाच्या (कुडबुडया जोशी) हातांतील व माकडाचा खेळ करणाऱ्याच्या हातांतील कुडबुड वाजणारें एक वाद्य; किडमुडें [ध्व.]

किडयाळें—वि. (गो.) वांकडेंतिकडें; किचबीड.

किडरुव–रू—न. साप. 'देखा एकी कुसीमाजीं किडरुवें। सामावीलि कीं।' –दाव १०४. [किडा]

किंडला—क्रिवि. (राजा. कुण.) कशाला?

किडवल–ळ—स्त्री. (कों.) इसव; गजकर्ण. [कीट+आवली]

किडवळ—वि. किडलेलें. [किडा]

किडवळणें—अक्रि. १ (कों.) किडयानें खाणें; किडकें होणें (फळ वगैरे). २ शिजण्यांत बिघडणें; कमजास्त शिजणें (भात वगैरे). [किडा]

किडा—पु. एक क्षुद्र जंतु; क्षुल्लक, बारीक प्राणी, जीव, किडयांत अनेक जाती आहेत. [सं. कीट; प्रा. कीडओ, अप. कीडउ; हिं. पं. बं. कीडा] **०मुंगी खाणें**–कांहीं तरी खाणें; किरकोळ खाद्य; कोरडें खाणें (पोहे, लाडू वगैरे). **किडे पडणें**–कुजून कृमि पडणें; नासणें; अपवित्र होणें; भ्रष्ट होणें; 'गुरुसेवा ज्यासी नावडे। त्याच्या ज्ञानासी पडले किडे।' **०मार**–पु. एक वनस्पति. **किड्यांचा पुंजा**–पु. (किड्यांनीं खाल्लेला भुशाचा ढीग यावरून) रोगग्रस्त माणूस; किड्यांनीं खाल्लेलें धान्य, कापड वगैरे.

किडामाकोडा—पु. क्षुद्र जीवजंतु; किडे आळणा वगैरे. [किडा+माकोडा=मुंगळा]

किडाळ-ळ—न. १ (विरू) किटाळ. आगीच्या ठिणग्या किटाळ अर्थ १ पहा. २ कुभांड; अरिष्ट; अपवाद; दुर्लौकिक; किटाळ अर्थ २ पहा. 'इये संग्रामीं शस्त्र न धरीं । हें किडाल बहुतीं परी । दिसतसे । ' –ज्ञा १.२३३. 'मजवरी रचिती किडाळ । नाना शब्दजाळ तर्काचे । ' –एरुस्व १६.१२९. ३ लोखंडाचें कीट किंवा हिणकस लोखंड. कीं अग्निमुखें किडाळ तोडोनियां चोखाळ । ' –ज्ञा २.१२८. 'जैसें परिसें नासे किडाळ । मग तें कर्णी मिरवे कुंडल । ' –कथा ४.१३.१०२. –वि. १ डाकलग; हिणकस: वाईट; निंद्य. २ खोटें. [सं. कीट-किडाळ (आळ प्रत्यय) –भाअ १८३४.; का. किडु=वाईट गोष्ट]

किर्डी—स्त्री. प्रेताची तिरडी.

किडुकमिडुक—न. बारीकसारीक दागिने, वस्तू; मोडतोड; चारापुरा; किरकोळ जिनसा; दागिन्यांचे सुटे भाग. [कुद्रुक द्वि.]

किडूक—न. १ लहानसा किडा, प्राणी. २ लहान मुलांचा हूल; एक दागिना [सं. कीटक]

किडें—न. (कों.) जिवाणूं; एक लहानसा साप. [किडा]

किडेमारी-रू-च्या—वि. चिक्कू; कद्दू; कंजूष (माणूस). [किडा+मारणें]

किडेला—वि. किडका; किडलला. ' किडेल्या खांबाचा तरु करुनि तोही फुलविला । ' –दत्तपदें ध्यानाष्टक पृ. १.

किण-णें—पुन्स्त्री. घट्टा; घट्टे पडलेली चामडी; घर्षणानें शरीराच्या चामडीवर पडलेला वण. ' नमस्कार करितां ते अवसरीं । किण पडली चरणीं तेणें । ' –राचि ७.१०७. ' मुगुटघर्षणें करूनीं । किणें पडलीं दिसतीं चरणीं । ' [सं. किण]

किणकिणी—स्त्री. १ कारंजाचा तुषार: पाण्याचा कण; फवारा. २ (कों.) (विरू.) कणकणी. तापाची शिरशिरी; कणकण; हुडहुडी; कांटा.

किणा—पु. १ घट्टा. किण पहा. २ क्षत; व्रण. –वि. किडे पडलेलें; क्षत पडलेलें.

किणा—स्त्री. एक झाड.

किणॉ—वि. (गो.) बारीक आवाजाचा (मनुष्य).

किणी, किणें-णे—वि. घट्टे पडलेलें. ' सदैव नमितां जरी पद ललाट केलें किणें ' –केका १६. ' दावी रडोनि झाले जे गंध उगाळितां स्वहात किणी । ' –मोविराट १.१०६.

किणेघचे—अक्रि. (गो.) मार बसलेल्या जागचें रक्त एकवटून ती जागा निळसर दिसणें; रक्त साखळणें; घट्टा पडणें.

किण्ण—क्रिवि. १ किणकिण आवाजाचें. २ रातकिडयांच्या किण्ण आवाजाप्रमाणें. ' रात्र किण्ण करती । '

किण्व—स्त्री. कुजण्याची क्रिया करणारी एक वनस्पति. (इं.) यीस्ट.

कित—पु. १ संशय; विपरीत भावना; किंतु; शंका; ' नाना कित निवारिले । नाना संशयो छेदिले । ' –दा १.१.१२. 'येथें न मानावा कित। हा मृत्यलोक विख्यात। ' –दा ३.९.४२. २ कंटाळा –शर. [सं. किंतु.]

कितका—वि. केवढा.

कितकावा—वि. कितव्या संख्येचा; कोणत्या क्रमांकाचा; कितव्या पायरीचा. 'हा मुलगा शाळेंत कितकावा आहे.' [कितवा-याचें क्रमवाचक]

कितकितलॉ—पु. (गो.) हंसा. [ध्व.]

कितन—न. (शाप.) इं. केटोन; ॲसिटोन-सेंपू २. केटॉनिक अलकोहल. **०नाम्ल**–न. केटॉनिक ॲसिड.

कितपत—क्रिवि. कितीसें; कोणत्या प्रमाणानें परिमित; कोठपर्यंत. [सं. कियत्+परिमित]

कितला-लो-ले—वि. (खा. गो.) केवढा; किती.

कितव—पु. १ जुगार खेळणारा; जुगारी; जुवेबाज. 'स्वाश्रयसह नरकांतचि बुडतो स्त्री–बंधुवर्ग कितवाचा । ' –मोकर्ण ४२. ४१. २ (नाटय) नायिकेशीं विश्वासु नसून दुसऱ्याच स्त्रीवर अनुरक्त असणारा नायक. ३ ठक; धूर्त माणूस. –वि. लुच्चा; कपटी; धूर्त.

कितवा—वि. कोणत्या क्रमाचा. कितकावा पहा.

कितां—क्रिवि. (राजा. कुण) काय ?

कितान-तन—न. एक प्रकारचें तागाचें, सणाचें कापड. कतान-कंतान पहा. [अर. कतान, कत्तान]

किताब—पु. पदवी; सन्मानदर्शक संज्ञा. –**०वाला**–पु. पदवीधर. 'युनिवर्सीटीचें किताबवाले तिच्या भजकांत किती सांपडतील ? ' –नि ३. [अर. किताब्]

किताब—पुस्त्री. पुस्तक; लेख. [अर. किताब्] **०खाना**–पु. पुस्तकालय; ग्रंथालय.

किताबत-ती—स्त्री. १ गोष्ट; बखर. ' राजेरजवाडयांचा किताबती । दामाजीपंताच्या बखरा वाचिती । ' –अफला ९. २ पदवी. ' त्यांस हंबीरराव नांव –किताबती देऊन... ' –सभा ६२. ३ हे **किताबत**=पत्रव्यवहाराच्या शेवटीं लिहावयाची 'हे विनंति. ' **०रेघ**–स्त्री. (कारकुनी भाषा) बंदाच्या सात्या जिल्ह्यावर जी रेघ काढतात ती; यापासून किताबती–लिहिणें–प्रकार–रीति इ० =जिल्ह्याच्या सर्व रुंदीवर लिहून मग दुसरीकडे वळणें; रेघ पहा.

किति-ती, कितिएक, कितियेक, किती, कितीक, कितेक, कित्येक—वि. कोणत्या संख्येनें किंवा प्रमाणानें परिमित; कितीसें; कांहीं; केवढें; थोडेंसें; थोडें. 'मत्सारिखीं हे कितियेक वेडीं । ' –सारुह १.१३. [सं. कियत; प्रा. कित्तिय] (वाप्र.)

किती केलेंतरी–१ कांहींहि केलें तरी. २ खरें पाहतां. 'किती केलं तरी तो पडला आडमुठ्या !

किती तरी—वि. पुष्कळ; अनेक.

किती(तीं)दा—क्रिवि. किती वेळां; पुष्कळ वेळां; अनेकदां.

कितीशीक-सक-साक—क्रिवि. (कुण.) किती वेळां, अजमासें किती ? कितीसा (प्रश्नार्थक व नकारात्मक रचना).

कितु-तू—पु. शंका; संशय; अंदेशा; डळमळीतपणा; कांक्षा. कित पहा. (क्रि० येणें).[सं.]

कितुकें—वि. किती. 'पुढें दुःख कितुकें कळेना।' –अफला १. [सं. कियत्]

कितुला—वि. केवढा ? किती ? 'गंधर्वांचा कितुला केवा।' –मुविराट ४.१७. [सं. कियत्]

कितें—क्रिवि. (गो.) काय ? 'कितें आसां थें' =तिथें काय आहे. **०तर**–क्रिवि. कांहीं तरी. 'कितें तरी सांगातलो' =कांहीं तरी सांगत आहे.

कितेंव—कितावत पहा. 'हिशेबकितेंव.' –रा १५.२५४.

कितोक—क्रिवि. (व.) मनांत कितू आणून; संताप करून.

कित्ता—पु. १ आदर्शभूत म्हणून पुढें ठेवावयाचा, वळणदार अक्षरें काढलेला कागद; वळण. २ हा शब्द एकाच सदराखालीं मोडणाऱ्या निरनिराळ्या बाबींच्या पुढें लावतात. त्यावरून या बाबी एकाच सदरांत येणाऱ्या आहेत असें समजावयाचें. ज्यांची खातीं किंवा ठोकळ नामनिर्देश एके ठिकाणीं केला असून बाकीचा विशेष तपशील किंवा माहिती दुसरीकडे लिहिलेली असते अशा बाबी किंवा गोष्टी. ३ बाब; रकम; कलम; खातें. ४ (ल.) नमुना; ज्याचें अनुकरण करावयाचें असा मनुष्य, आचरण, तऱ्हा. (क्रि० घेणें; उचलणें; गिरविणें). 'कर वळविला अजें जें विष्णुधृतस्त्रीस्वरूप कित्ता तें' –मोआदि ३३.१६. ५ चिट्ठी –क्रिवि. सदरहु; उपरोक्त; (इं.) डिटो. [अर. कित्अ] (वाप्र.) **०घालून देणें**–अमुक गोष्ट अमुक एका विशिष्ट प्रकारें करावी म्हणून लेखद्वारा किंवा स्वाचरणद्वारा सांगणें, पुढें मांडणें. **०वळवणें-गिरवणें**–नक्कल करणें; गिरविणें. 'कर वळविला अजें जे विष्णुधृतस्त्रीस्वरूप कित्ता तें।' –मोआदि ३३.१६. **कित्त्यावर घालणें**–लिहिण्यास शिकविणें. 'आपल्या इकडे मुलाला कित्त्यावर घालतात.' –ग्गारिबाल्डी केळकरकृत. सामाशब्द–**०इसम**–पु. १ उपर्युक्त मनुष्य. २ (हिशेबांत) स्वतंत्र; किरकोळ स्वरूपाची बाब; कोणत्याहि सदरांत न येणारी बाब. **०खर्च**–पु. १ किरकोळ, बिनतपशिली खर्च. २ हा खर्च भागविण्यासाठीं बसविलेला कर. ३ उपर्युक्त खर्च. **०बाब**–स्त्री. अनियमित बाबी; कांहीं विशेष कारण नसतां बसविलेला कर. **०वांटणी**–स्त्री. १ किरकोळ खर्चासाठीं बसविलेला कर; निरनिराळ्या प्रकारची तूट भरून काढण्याकरितां बसविलेला कर. २ हिशेबांतून काढून टाकलेली सरकारी वसुलांतील एक बाब (वांटणीची टक्केवारी कमी करण्यासाठीं).

कित्ता—पु. लहानसा मळा.

कित्ती-त्तेक—किती-कितेक पहा.

कित्याक—क्रिवि. (कु. कुण.) कां ? कशाला ? 'कित्यांक हांव यों' =मी कशाला येऊं ?'

कित्याबा—वि. कितीकावा, कितवा.

कित्येक—वि. कितीएक; कांहीं; थोडे. 'कित्येक दिवस लोटतां देखा। घरां आला वैष्णव तुका।'

कित्लो—वि. (गो.) किती ?

किद्दरसाळ—स्त्री. (बे.) भाताची एक जात.

किदरी रेघ—स्त्री. (कारकुनी भाषा) बंदाचे (अर्धा कागद) घडया घातल्यामुळें जे चार भाग होतात त्यापैकीं पहिल्या घराच्या मध्यापासून काढलेली रेघ. रेघ पहा.

किदघाळा—क्रिवि. (कु.)केव्हां ? कोणत्या वेळीं ? [सं. कियत्+वेला]

किदी—क्रिवि. (भि.) कधीं. 'आय किदीहि मोडो वेहें।' –भि ३५. [सं. कदा]

किर्दे—वि. (गो.) कांहीं. [सं. कियत्]

किनई, किनी—क्रिवि. (बायकी) कीं नाहीं; किमान पक्षीं; निदान तरी; कमींत कमी. 'मनुष्यानें किनई कांहीं तरी धीर धरला पाहिजे हो !' –रजपूत कुमारी तारा पृ. ४६९. [सं. किम्+न+हि]

किनखाप-ब, किन्खाब—पु. सोनेरी, रुपेरी जरीच्या वेलबुट्टीचें काम केलेलें रेशमी कापड. 'अंगीं किनखाप घातले।' –ऐपो ३२. [फा. कमख्वाब, कमखाब, किमखाब] **किनखापी**–वि. किनखाबाचें. 'आंगडें टोपडें किनखाबी त्याला' –पाळणेसंग्रह पृ. ९.

किनन—न. (शाप) (इं.) किनोन. मंगलद्विप्राणिद आणि पातळ गंधकाम्ल यांच्या योगानें गंधिलद्विअभिनाचें प्राणिदीकरण होऊन किनन तयार होतें. –झाको अ ३४१.

किनरा—वि. १ बारीक व उंच (आवाज). २ नाकांतील आवाजाचें (बोलणें). [सं. किन्नर]

किनरी—स्त्री. १ गाण्यामधील टीपेचा सूर. २ एक तंतुवाद्य. [सं. किन्नर]

किनरो—वि. (गो.) नाकांत बोलणारा.

किनला, कैंडला—क्रिवि. (चि.) कशाला ?

किनवट—स्त्री. (गो.) कमरेस होणारा एक रोग. कनवट पहा [सं. कटि]

किनळ—स्त्री. (कु.) एक झाड; किंजळ पहा.

किना-नें-न्हें—पुन. घट्टा; वण पडलेलें कातडें; वण; किवण, किवन. किण पहा. (क्रि० पडणें.) –वि. बधिर; स्पर्शज्ञान-रहित; किडे पडलेलें; ज्याला क्षत पडलें आहे असा; किवन्या पहा. [सं. किण]

किनार-री—स्त्री. १ कांठ; कोर; पट्टी; बारीक कांठ (रंगीत किंवा साधा, रेशमी वगैरे वस्त्राचा.) २ (बिणकाम) रेशीम उकलून तनसळीवर तनतात व गुंडाळून काढतात त्यास किनार किंवा वधी म्हणतात. [फा. किनार्]

किनारा—पु. तीर; कांठ, बाजू; मोट (समुद्र, नदी, शेत पर्वत इ० चा). [फा.]

किनो लाख—स्त्री. लाखेचा एक प्रकार.

किन्नर—पु. स्वर्गांतील गायक जात; एक उपदेव; एक देव-योनि; याचें तोंड घोड्यासारखें असतें अशी समजूत आहे. 'येर सुर सिद्ध किन्नर।' –ज्ञा ११.५०६. [सं.]

किन्नर—पु. (मोटर) मोटर गाडी साफसूफ करणारा; क्लीनर अप. [इं. क्लीनर]

किन्नरी—स्त्री. १ किन्नर उपदेवाची स्त्री. २ एक वाद्य. किनरी पहा. [सं.]

किन्निमित्त—क्रिवि. किमर्थ? कोणत्या कारणास्तव? कशा-साठीं? [सं. किम्+निमित्त]

किन्ही—स्त्री. जोंधळ्यावर पडणारा एक रोग. काणी पहा.

किन्हेरा—वि. १ उंच टीपेचा (आवाज, सूर, आलाप). २ नाकांतील; अनुनासिकयुक्त (भाषण.) किनरा पहा.

किन्हा—पु. एक वनस्पति.

किपळा-ळी—पुस्त्री. (कों.) कपचा; तलपी; टवका; कपरी; (दगड वगैरेची) उडालेली चीप.

किंपुरुष—पु. देवांतील एक गायक वर्ग. 'मुखा भासे दिसती पुरुष। शरीर पाहातां श्वापद वेष। ऐसे जे वानर राम-दास। त्यांसि किंपुरुष बोलिजे।' –एभा १४.५०. २ (उपहा-सानें) हलका; कवडीमोल; क्षुद्र मनुष्य. [सं. किम्+पुरुष]

किफाइती-किफाईतवार-किफायतशीर-किफा-यशी—वि. नफ्याचा; फायदेशीर; किफायतकारक, लाभदायक. [अर. किफायत्]

किफाईत-यत—स्त्री. नफा; फायदा; लाभ. 'त्यापासून त्यास मोठी किफायत झाली. –नि ६१४. [अर. किफायत्] ०सर्फा–पु. फायदा. ०सर्फेवार–वि. फायदेशीर. –बाडमा १.४९.

किंबरूं-रें-किंमरूं-रें—नपु. (कों.) घुंगुरटें; मच्छर. कांहींच्या मताप्रमाणें किंबरें, किंमरें हें अनेकवचन आहे.

किंबहुना—अ. इतकेंच नव्हे; फार तर काय पण; फार काय सांगावें; फार कशाला; थोडक्यांत सांगावयाचें तर; 'किंब-हुना भगदत्तें अत्युग्रा शक्ति सोडिली होती।' –मोभीष्म ९.५१. प्रचारांतील एक संस्कृत म्हण० ही विशेष गोष्टींत अथवा विशेष अंशानें ज्या एखाद्या गुणाच्या अस्तित्वाचा बोलणारानें उल्लेख करावयास आरंभ केला आहे त्या गुणाच्या अतिशयत्वाचें विस्तृत वर्णन करण्याची अनवश्यकता दाखविते. तसेंच एखाद्या गोष्टीची वास्तविक सत्यता, संभाव्यता इ० दर्शविण्यासाठीं बोल-लेल्या शब्दापेक्षां ती इतकी अधिक असते कीं, त्यासाठीं अति-शय कडक, निश्चयात्मक, व्यापक शब्दांचा उपयोग करणें आवश्यक असतें किंवा केला तर अतिशयोक्ति केल्याचा दोष येईल अशी भीति नसते अशा वेळीं हा उपयोगांत आणतात. 'हा आईस भीत नाहीं, बापास भीत नाही किंबहुना देवास भीत नाही.' 'त्या लेखकाला लेखणी दिसत नाहीं, कागद दिसत नाहीं किंब-हुना सूर्य दिसत नाहीं.' [सं. किं=काय+बहुना=(बहु ची तृतीया) पुष्कळानें; येथें अधिकाची काय जरुरी आहे?']

किंबील—स्त्री. (नाविक) गलबताचा सुकाणूकडील (मागील) भाग; हा कांहींसा कमानीसारखा गोल असून बाकीचा भिंती-सारखा उभा असतो. [इं. केबिन]

किंबीर—स्त्री. (व.) फिकीर; पर्वा. 'अलीकडे मजुराला अन्नाची किंबीर वाटत नाहीं.'

किंमलगाही—वि. वंश; नामदार, 'किंमलगाही खान' –भाषसंवृ १३५. [फा. किंमलगाह]

किंमलेगाह—वि. १ मूळ अर्थ–प्रार्थनेकरितां ज्या दिशेकडे तोंड करावयाचें ती दिशा, त्यावरून. २ वंश. 'किंमलेगाह नारायणराव साहेब' –खरे ७.३५६५. [फा. किंमलगाह]

किंमलेजुमा—न. होकायंत्र; दिशादर्शक यंत्र. [फा.]

किंमाव—वि. (काव्य) काय किंमतीचा? काय महत्त्वाचा? कोणत्या सत्त्वाचा? निजलोट शब्दाखालीं जास्त चिकेचन पहा. 'किंमाव वैरागरीचा सुभट।' [सं.]

किंमत-किम्मत—स्त्री. १ मोल; मूल्य; बदल द्रव्य; भाव; दर. २ (शब्दशः) योग्यता; महत्त्व; पर्वा. 'फिर्यादीची आब्बी कांहीं एक किंमत समजत नाहीं.' –विक्षिप्त ३.१६५. 'प्रक्षेपकाचें हें एक मत म्हणून तरी त्याची कांहीं तरी किंमत असणारच.' –मसाप २.२.१२८. पुढील शब्दहि प्रश्नार्थक किंवा निषेधार्थक वाक्यांत याचअर्थी वापरतात– कधा; केवा; लेखा; पाड; प्राप्ति; प्राज्ञ; वखा; चिजात; मजकूर, मदार, नामलत, मुद्दाखा. [अर. कीमत] (वाप्र.) ०चुकाचणें–सक्रि. मोल चुकतें करणें, देणें; भागविणें. सामाशब्द– ०कापणी–स्त्री. दुसऱ्यापेक्षां आपण स्वस्त देतों असें एका व्यापाऱ्यानें दुसऱ्यासंबंधानें सांगणें; भाव विचरविणें.

–के ३.१२.२९. ०दार–वि. मौल्यवान. 'शालू, चांदणी किंमत दार.'–ऋप १२८; ०वार–विक्रिवि. १ क्रमानें प्रत्येक जिनसाची किंमत दाखल केलेली (यादी, टिपण, हिशोब). २ किंमतीमागून किंमत (कलमवार वगैरे यादी). [अर. कीमत+वार]

किमती—वि. मूल्यवान; बहुमोल. [फा.]

किमपि—क्रिवि. (नकारार्थी प्रयोग) मुळींच; बिलकुल; कांहींच; थोडें सुद्धां; किंचिन्मात्र; [सं. किम्+अपि]

किम(मि)या—स्त्री. १ हीन धातूचें (विशेषतः तांबें) सुवर्ण बनविण्याची गूढ विद्या. 'निधी दैवें लाभल्या हातीं । किमर्थ शोधाव्या किमयायुक्ती ।' –नव २३.९०. २ (ल.) ज्यापासून फार मोठा लाभ होतो असा धंदा, व्यापार, यंत्र. [अर. फा. कीमिया] ०गर-गार–पु. किमया करणारा, जाणणारा. [फा.]

किमरूं—न. (गो.) चिलट; मच्छर; किंवरूं पहा.

किमर्थ—क्रिवि. कां? काय म्हणून? कोणत्या कारणाकरितां? कशासाठीं? 'मज असत्य किमर्थ म्हणसिल ।' [सं. किम्+अर्थे]

किमसान—न. पिवळें अगर सोनेरी रंगाचें कमावलेलें कातडें, चामडें (जोडे, छत, पडदे यांसाठीं).

किमान, किमानपक्ष—क्रिवि. निदान; कमींत कमी; थोडयांत थोडें; कनिष्ठपक्षीं; कांहीं नाहीं तरी. [सं. किं+मान+पक्ष]

किमान मर्यादा—क्रिवि. कमींत कमी; याच्या उलट कमाल मर्यादा.

किमूस-मेस—न. (गो.) मच्छर; कीटक. किंवरूं पहा.

कियत्—वि. किती; कितीसें. (समासांत) कियद्दूर=किती लांब; कियत्प्रमाण=किती प्रमाणाचा; कियत्संख्या=किती राशीचा?

कियास—कयास पहा. 'त्याजवरून कियास करावा कीं' –रा ५.५२. [अर.]

किर—उद्गा. पराजयदर्शक उद्गार. 'बहिणी घाली वार। अवघ्या म्हणविते किर ।' –ब ५९३. [ध्व.] ०खाणें–(व.) टेकीस येणें; जिकीरीस येणें. 'मुलाच्या अशा उधळपट्टीच्या खर्चानें बाप किर खाऊन गेला.'

किर-रू—क्रिवि. (काव्य) खरोखर; खचित; खात्रीपूर्वक. 'इएचा किरू प्राणेश्वरू। फुण ऐसा नाहीं योगेश्वरू ।' –शिशु ८४७. [सं. किल]

किरकणें—अक्रि. १ किंकाळी फोडणें (हत्तीनें). २ दया येईल अशा प्रकारें गयावया करणें; रडणें (भिकारी, मूल वगैरेनें) किरकिर करणें. ३ त्रासणें; कुरकुर करणें. 'भिक्षा मागतां किरकों नये। ' –दा १४.२.१८. [ध्व.]

किरकाडा—वि. काटकोळा; रोड; अशक्त.

किरकाँड्डें—वि. (गो.) वांकडेतिकडें.

किरकिटणें—अक्रि. खरकटें वगैरेनीं हात किंवा स्वयंपाकाचीं भांडीं करवडणें; घरवडणें; हाताला अथवा भांडयांला (कणीक, भात वगैरे) चिकटलेला असणें.

किरकिर-कीर—स्त्री. १ (ध्वनि.) पिरपीर; पुटपुट वेळ पर्यंत चाललेला, त्रास उत्पन्न करणारा शब्द, आवाज (मूल, भिकारी इ०चा); कटकट. (क्रि० करणें; लावणें; मांडणें.) २ कानास वीस-ण्यामुळें होणारा आवाज. –क्रिवि. कुरकुरत; मुलमुल. (क्रि० वाजणें; रडणें; करणें). [ध्व.]

किरकिरणें—अक्रि. कुरकुर करणें; किरकिर पहा.

किरकिरा-रो—पु.१ (गो.) पांकोळा नांवाचा मासे खाणारा पक्षी. २ किरकिर करणारा मनुष्य.

किरकिरा-ऱ्या—वि. किरकिर करणारा; कुरकुऱ्या. 'नेहमीं आईच्या कडेवर वागणारें पोर जसें किंचकट व किरकिरें होत जातें ... ' –नि ४२९.

किरकिरांट—स्त्री. किरकिरा यांचें अपभ्रष्ट रूप.

किरकिरीत—वि. पिरपिरें; खटखाळ; चिडखोर (मूल).

किरकिरें—न. १ मुलांचे एक करकर आवाज करणारें लांकडी खेळणें. २ गोफणीमध्यें दगड ठेवावयाची मधली जागा.

किरकिसा—पु. (कों.) किडलेल्या लांकडाचा भुसा, पीठ; लांकडात कीड लागली असतां खसखसीसारखा जो पदार्थ उत्पन्न होतो तो.

किरकी—स्त्री. १ नथेचा सोन्याचा आंकडा, फांसा. २ बुगडीचें मळसूत्र. ३ कठड्यामधील कांतीव लांकडी गज.

किरकीट—स्त्री. दांत खाणें. [ध्व.]

किरकीदार—वि. किरकीप्रमाणें पट्टया किंवा वेढे असलेलें (पागोटें).

किरकूळ-कोळ—वि. १ रोडका; काटकुळा; बारीक; लहानसा; छोटेखानी; पाहिजे त्यापेक्षां कमी. २ फुटकळ अथवा लहान प्रमाणांत विकत घेतलेला किंवा दिलेला माल, धान्य; त्याचप्रमाणें असलेला व्यवहार. ३ चिल्लर; मोघम; अनिश्चित स्वरूपाचें; कमी महत्त्वाचें (जिन्नस, प्राप्ति, खर्च, काम, गोष्ट). ४ बारीक;(आवाज,स्वर.) [कीर=पोपट+कोळ=घरटें] ०कागद–पु. चिल्लर खर्चाचा कागद. ०काम–न. हलकें काम; क्षुद्र काम. ०खरेदी-विक्री–स्त्री. फुटकळ खरेदी-विक्री; याच्या उलट ठोक खरेदी-विक्री. 'या शहरांत मालाची किरकोळ खरेदी कधींहि लिहूं नये.' –मुंव्या ५०. ०नाणें–न. खुर्दा; चिल्लर; मोड. ०प्राप्ति–स्त्री. आवांतर मिळकत. ०भाव–पु. फुटकळ किंमत. ०मंडळी–स्त्री. सामान्य लोकांचा जमाव. ०वकूल–पु. अवांतर प्राप्ति.

किरकोळ—वि. किरकूळ पहा.

किरकोळी—स्त्री. किरकोळ वस्तूंचा ठोग.

किरखाद—वि. (कों.) किरानें, पोपटानें किंवा कोणत्याहि पक्ष्यानें खाल्लेला. [कीर+खाणें]

किरगी—स्त्री. (गो.) एक पक्षी. [सं. कीर]

किरगी—स्त्री. (बे.) साडी; चिरडी. [सं. चीर. का. किर=लहान]

किरगुणी—स्त्री. (क.) चिरडी; साडी, 'किरगुणी रुंदीला फार कमी आहे.'

किरगे—स्त्री. (गो. खि.) मूग, धान्य.

किरचण—स्त्री. (चि.) बारीक चुरा, फोडी.

किरट—वि. (गो.) गोचीड.

किरटा—वि. १ (कों.) कृपण; कंजूष. २ बारीक टांकाची लेखणी. ३ अशा लेखणीनें लिहिलेलें गिचमिड, दुर्बोध (अक्षर). (निंदेनें म्हणतात). ४ कृश; गरीब; भिकार; किरकोळ (इमारत, लांकूड). ५ कमजोर; भिकार; लहान (आवाज, उच्चार). ६ लहान, खुरटें, निःसत्त्व (फळें वगैरे). ७ अशक्त, कमजोर (दांत, चेहेरा). 'त्याचा चेहरा लांबट व किरटा होता.' -हाकांघ २०८. ८ काटकुळा, ठेंगणा (माणूस). ९ (सामान्यपणें). नष्टवीर्य; नष्टसत्त्व. [का. किर=लहान]

किरड-डुं—न. १ कीटक. २ लहान साप. 'जी किरड तरी कापडाचें। परि लहरी येत होतिया साचें।' -ज्ञा ११.५४. 'इतर किरडें आणि फणिपाळ।' -रावि. २५.७१. [दे. करोडि; कों. चि. का. किर=लहान]

किरडावणें—अक्रि. (बे.) साप चावणें.

किरडी—स्त्री. प्रेताची तिरडी; ताटी.

किरडुच—न. किडा. 'अविवेक किरडवें तत्त्वतां। अविद्या भ्रांति जल देवता' -रावि १५.४. [किरड]

किरण—पुन. १ प्रकाशरश्मि; सूर्य, चंद्र इत्यादि तेजस्वी पदार्थांपासून निघालेली प्रकाशशलाका; प्रकाशाची रेघ. २ सूर्याचें ऊन. 'किरणें कैंचीं नुगवतां अर्कें।' -रावि १.४२. [सं.] **॰चक्र**-न. किरणाचें मंडळ (सूर्याभोंवतालचें). सूर्याची अंशुमाला. ''किरणचक्रीं विराजे तमारी। चौरें वारिती हरीवरी।' [सं.] **॰जाल**-न. किरणांचें जाळें; रश्मिजाल. **॰परावर्तक दुर्बिण**-स्त्री जीमध्यें खस्त पदार्थाच्या किरणांचें परावर्तन होऊन तो आपणांस दिसतो ती दुर्बिण. (इं.) रिफ्लेक्टिंग टेलेस्कोप. **॰प्रतिबंधक**-पु. ज्यांमधून प्रकाशकिरण पार जाऊं शकत नाहीं असा. **॰घक्रीभवन**-न. प्रकाशाचे किरण एका पदार्थांतून दुसऱ्या कमी अधिक घट्ट पदार्थांतून जातांना कांहींसे वांकडे होऊन जातात ती क्रिया. **॰विसर्जन**-न. किरण निघून जाण्याची क्रिया. (इं.) रेडिएशन. **॰शलाका**-स्त्री. किरणांची रेघ, स्तम्भ, ओळ. (इं.) पेन्सिल ऑफ रेज.

किरण—न. उडी; नेम; किराण पहा. **॰साधणें**-क्रि. (कों.) बरोबर, नेमकी उडी मारणें; बरोबर नेम मारणें.

किरणें—सक्रि. पसरणें; विसकटणें. 'जिकडे तिकडे अपुल्या वदनांतिल उग्र गरल ते किरती।' -कुभक ७७. [सं. कृ=विसकटणें, पसरणें]

किरदार—न. हिशेब वगैरेच्या पुरवणीबंदाच्या माथ्याला लिहिलेला महिना आणि वर्ष अथवा थोडेसे शब्द; पूर्वीच्या भरलेल्या बंदाचा विषय पुढें चालविण्याकरितां मिळवून आणलेला कागद. [फा.]

किरप—पु. (गो.) बारीक माशांचा जमाव. [सं. कृमि]

किरपण-पाण—वि. (राजा. कुण.) लहान; बारीक.

किरपण-पीण-क्रिपण—(गो.) पु कृपण, कंजूष माणूस. [सं. कृपण]

किरपाण—वि. कृपाण; खड्ग; शीख मनुष्य जवळ बाळगतो तें शस्त्र [सं. कृपाण]

किरम—पु. (व.) जंत. [सं. कृमि]

किरमाड-डी-डुं—वि. (क.) कृपण; चिक्कू; कटु. 'परवाच्या समेटभंगाचे खापर किरमाड व्हाइसरायाचे डोक्यावर फुटणारें असो. कीं, हावऱ्या काँग्रेसच्या डोक्यावर फुटणारें असो.' -के २०.९.३०. 'त्या किरमाड्या माणसाकडून तुझी काय गरज पुरी होणार?'

किरमाणी-ओ(वो)वा—पु. चोर ओवा; हा इराण देशांत पिकतो. याची रुचि कडवट असते. एका रशियन वैद्यानें याचें सत्व काढून सँटोनाइन नांवाचें औषध (१८३० मध्यें) तयार केलें हें जंतावर १ ते ३ गुंजांपर्यंत साखरेशीं मिसळून रात्रीं देतात व सकाळीं सुंठीचा काढा अथवा एरंडेल देतात. [फा. किरमान+ओवा]

किरमिजी-मीजी-मेजी—वि. किरमिज (रंग) संबंधी; एक प्रकारचा रंग; हा एक प्रकारच्या किड्यापासून तयार होतो. हा लाल असतो. **॰दाणा**-पु. किरमिज रंगाचा किडा; गोळा, गोळी, दाणा. [सं. कृमिज; फा. किरमिझ्; इं. किमझन]

किरमीज-मेज—न एक प्रकारचा किडा. [सं. कृमिज फा. किरमिझ्]

किरमें—न. (कु. गो.) पडसें; शेंबूड. [सं. कृमि?]

किरली—स्त्री. (कु.) हात अगर पाय यांत कांटा गेल्यामुळें पडलेला घट्टा, घर; भोंवरी.

किरली—स्त्री. (चि.) नुकती दिसूं लागलेली बारीक लहान कांकडी.

किरंब—पु. (कु.) खरजेच्या पुळींतील सुईच्या अग्रापेक्षांहि लहान जंतु. [सं. कृमि]

किरवट—स्त्री. (कु.) कणवट.

किरवण—न. चित्रकाम; चित्राचें कसब. 'किरवणभूवंगा। विस्मयोत्कर्ष सारंगा।' –राला ३७. [सं. कृ–करणें]

किरव(वि)णें—उक्रि. लांकूड, धातू, माती वगैरेवर चित्र, आकृति वगैरे कोरणें.

किरवंत—पु. सावंतवाडीकडे राहाणारी ब्राह्मणांतील एक पोटजात व तींतील व्यक्ति. [सं. क्रमवंत, कृमिवंत ?]

किरवा–वें—पुन. १ डोंगरांत किंवा सपाटीवर आढळणारा एक खेंकडा. याचा रंग काळसर पांढरा असतो. २ गांठ, फांस. –शर.

किरचि(व्या)जणें—अक्रि. भात भाजी वगैरे बरोबर न शिजल्यामुळें नासणें, खराब होणें; अर्धकच्चें भाजणें.

किरवितणें—क्रि. १ (दांत) वाजविणें; किरकिर आवाज करणें. २ (ल.) मागणें; तोंड वेंगाडणें. 'आणि पन्हेसाठीं सुदामयाप्रति। दांत किरवितसां कैसे।' –स्वानु ३.३.४३. [ध्व.]

किरविल—पु. सर्प; किरडूं. 'किरविल जैसा पसरला।' –वेसीस्व ४.९९. [सं. कृमि किंवा कीर+आवली ?]

किरवें—न. १ (कों.) काष्ठादिकांस घासण्यासाठीं तयार केलेलें माशाच्या खरखरीत पाठीचें हाड २ खेंकडा. 'येकांगी करूनि किरवें धरूनि आणिलें।' –दावि ३५६. ३ किरिरें पहा.

किरसाण–न, किसान—(हिं.) शेतकरी. 'रयत, किरसान याजवर महाराजांची दया ...' –विक्षिप्त २.११९. [सं. कृष्–कृषाण]

किरळ–ळी—नस्त्री. १ जोंधळ्याच्या कोंवळ्या सुरव्यांत उत्पन्न होणारा एक विषारी किडा. हा खाल्ला असतां गुरूं मरतें; त्यामुळें गुराला होणारा रोग. (क्रि० लागणें). 'अरे सरुग्यारे हा मदन अनिवार। ज्यार फार करी किरळा।' –प्रला ९४. २ जोंधळा, बाजरी यांची कापणी झाल्यावर शेतांत राहिलेले त्यांचे धस, सड. –नपु. ३ नवीन कोंब फुटलेली हरळी. ४ (क.) भरत येणाऱ्या जखेमचा आंतील भाग. (क्रि० बांधणें; येणें; धरणें; फुटणें). –न. ५ नेसीचें झाड व तिचें फळ. ६ अंकूर; ज्वानी; जोमदारपणा; 'नातु कोंवळें किरळ।' –यथादी १.२९१.

किरळी–स्त्री. १ पायाचा एक रोग; भोंवरी. किरली पहा. २ किरकोळ; बारीक; लहानपणची अवस्था. 'कवळी किरळी नव्हती तुमची पाहिली पंचविशी।' –पला १०४.

किराईत–कोडशी—नस्त्री. काडेचिराईत; याच्या काडेचिराईत व पालेचिराईत अशा दोन जाती आहेत. हें झाड हात–दीड हात उंच असून पानें लहान व लांबट असतात. चव कडू असते. वाळलेलीं पानें, फुलें, फळें, मुळें, काष्ठें हीं पौष्टिक, ज्वरनाशक व सारक आहेत. आम्लपित्तावर याचा काढा करून त्यांत मध घालून देतात. [सं. किरात, चिराटिका; हिं. चिरायता; बं. चिरता, चिराता; गु. करियातु; इं. चिरेटा; लॅ. स्विर्टिया चिरेटा] ०फुलकी–स्त्री. चिराइताची लहान जात.

किरांची—स्त्री. तोफेच्या मागची दारूगोळ्याची पेटी.

किरांटी—स्त्री. (गो.) पोपटाची एक लहान जात. [का. कीर]

किराड—पु. शूद्रांची एक जात. [सं. किरात; सिं. किराडु]

किराण—न. १ उडी; उड्डाण. किलाण पहा. (कांहींच्या मतें खालीं डोकें वर पाय करून मारलेली उडी). (क्रि० मारणें; टाकणें; साधणें). 'उड्डाणें किराणें घेती गगनीं।' –मुवन १५. १५७. 'घेतलें किराण अंतराळ जाऊसे।' –दावि ४९६. २ संधान; निशाण; नेम. (क्रि० साधणें; बांधणें; चुकणे). ३ शुभग्रहयुति; संधि; योग्य समय. [सं. किल्–खेळणें]

किराण—पु. (कुण.) उगवत्या अगर मावळत्या सूर्याचे मंद किरण. (क्रि० पडणें; राहणें). [सं. किरण]

किराणा—पु. लवंग, मिरीं, मिरच्या, गूळ, तूप, साखर इ० माल; वाणजिन्नस. [सं. क्री=विकतघेणें; सिं. किर्याणी]

किरात—पु. १ अरण्यवासी एक जात; भिल्ल. ही जात शिकारीवर निर्वाह करते. 'तो भेटला गुहक नाम किरात वाटें।' –वामन भरतभाव ५०. २ किराइताची एक जात.

किराती—स्त्री. भिल्लाची बायको; भिल्लीण. 'आलिंगिली पुनरपी प्रमदा किराती।' –आश १९.

किरांमोरां—न. (गो) पोपट, मोर वगैरे पक्षी किंवा त्यांचीं चित्रें. [कीर+मोर]

किराया—पु. भाडें 'दोन नावा तीनशें रुपयांची किराया करून पठण्यास आलीं.' –पदमव ७३. [अर. किराया=भाडें; तुल. सं. क्री=विकत घेणें]

किरांव—न. (गो.) (वाघ वगैरेची) उडी; घाला. किरण पहा.

किरावणें—क्रि. (गो.) पोपटासारखें बोलणें. [कीर]

किराळ—पुन. किरळ–ळी अर्थ १, २, ३ पहा.

किराळचें—क्रि. (कों.) कावळ्यासारखा कर्कश आवाज काढून ओरडणें; कर्कश आवाज काढणें; किंकाळणें. [किराळी; ध्व.]

किराळी—स्त्री. (कों.) किंकाळी; किंचाळी; कर्कश आरोळी; हत्तीची किंकाळी. [ध्व.]

किरिरें—न. (कों.) शिंक्यावर भांडें घट्ट बसावें म्हणून शिंक्यास वर फास बांधतात तो.

किरिस्ताव—पु. (गो.) ख्रिस्ती जात व तींतील व्यक्ति. [पो. क्रिस्ताओ; इं. क्रिश्चन]

किरी—स्त्री. १ क्षयरोग. २ (ल.) कीड. 'मज संसारीं कैंचें चितेनें लागतां किरी टिकणें।' –मोसभा ३.२९. [कीड–किडी ?]

किरीट—पुन. डोक्यावरचा मुकुट. ०कुंडलें–न. (अव.) मुकुट व कानांतील भूषणें; पौराणिक नाटकांतील देवांच्या व राक्षसांच्या सोंगांचीं शिरोभूषणें. प्रथम मातीचा मुकुट (किरीट) तयार करून त्यावर कागदाचे थर चिकटवून त्याचा ठसा घ्यावयाचा. नंतर त्याला सोनेरी वर्ख लावावयाचा. त्याच्या मागें बोरांच्या दिसांची ताटी लावली म्हणजे तो सुशोभित दिसे कुंडलें अशींच करीत असत. [सं.]

किरीटी—पु. अर्जुन. 'हा तर्काचिये दिठी। गोचर नोहे किरीटी।' –ज्ञा १.१४८. [सं. किरीट]

किरीम-किर्मे—पु. (कों. कुण.) जंतु; किडा (फळ, पोट, क्षत यांतील). [सं. कृमि]

किरीम(किर्मे)वातालें—न. (कों. कुण.) कृमीपासून उत्पन्न होणारा पेटका; उन्मादवायु. [सं. कृमि+वात]

किरू—क्रिवि. निश्चयें करून; खात्रीनें. 'इमेचा किरू प्राणेभाक।' –शिशु ८४७. 'मज किरु तुझा विणटु' –भाप्र ८३. [सं. किल]

किर्कोंडा—पु. १ सनटी पोयट; कंठ न फुटलेला राघू. २ (कों.) कांदा. [कीर+टा]

किर्कुंचें—क्रि. (गो.) दांत खाणें.

किर्दे—स्त्री. १ रोजनिशी २ रोजचा जमाखर्च लिहिण्याची वही. ३ लावणी (जमिनीची). 'पावसाळा, कौल देऊन आज्ञा केली तर स्वत उभेद घरून किर्दी करितील.' –रा ६.१४८. ४ लागवड केलेली जमीन. [फा. कर्द्=काम] ०आबादानी–स्त्री. लावणी संचणी. 'गांवीं साहून वसाहत करून किर्दे आबादानी करणें.' –रा १६.५५. ०महमुरी-मामुरी–स्त्री.लावणी संचणी; लागवड; वसाहत. 'त्यांणीं तेथें किर्दे महामुरी केली.' –रा १५. २०२. [फा कर्द्+अर. मअमुर=आबाद] ०सार–वि. लागवडीखालील, लागवडीस योग्य (जमीन). [फा. कर्द्+सार]

किर्दवा—पु. पीक; लागवडीचें उत्पन्न. [फा. कर्द्]

किर्मेट—स्त्री. (गो.) कनवटी.

किर्मीजी—किरमिजी पहा.

किर्मीर—वि. चित्रविचित्र. 'अत्यंत किर्मीरित कांति झाली।' –सारुह ६.२६. [सं. किर्मीर]

किर्वुंचें—सक्रि. (गो.) १ अंकूर तोडणें. २ नखानें खरूज खाजविणें.

किर्मिजा—स्त्री. (गो.) लालसर रंग. किरमिजी पहा.

किर्म्यो—न. (कु.) पडसें; सेंवूड. किरमें पहा'

किर्रे—वि. १ कर्कश; शहारे उत्पन्न करणारें (रातकिडयांचा, पक्ष्यांचा आवाज). या वरून २ निबिड अरण्य अथवा दाट झाडी या अर्थानें योजतात, कारण तेथें नेहमीं रातकिडयांचा, पक्ष्यांचा आवाज व झाडांचा करकर आवाज होत असतो. 'मोडमोठे वृक्ष वाहून किर्रे झाडी झाली आहे.' –पाब्रु ९. २ थकून मेलेला; भागलेला. 'मी अगदीं किर्रे झालों.' [ध्व.]

किर्ले(ल्ल)—पु. (गो.) बांबूच्या मुळाला फुटलेले नवीन अंकुर. यांची भाजी करतात. ०फलणें–न. (गो.) झाडावरील फळें, पाला खाण्यासाठीं टोंकास कोयती लावलेली कांब, काठी, बांबू; आंकडी. किर्लुं(ल्लुं)चें–क्रि. (गो.) मोड येणें.

किर्ली—(क.) पावांत कांटा जाऊन झालेला जाड दडदडीत भाग; घट्टा; भोंवरी; (गो.) मोड, अंकुर.

किलकिल-किलाट, किल्किलाट—पुस्त्री. १ (ध्वनि) पक्ष्यांची चिवचिव. त्यावरून २ गडबड; गोंगाट (माणसांचा). 'कोठें नेणों हा फावला एकांत। सदा किलकिल भोंवतीं बहुत।' –तुगा १११. 'अग्रीं संभ्रम किल्किलाट करिती, शोभा दिसे फार ते।' –आसेतु १०. [ध्व.]

किलकिलणें—अक्रि. किलकिल आवाज करणें; गोंगाट करणें; चिवचिवणें (पक्ष्यांचें). [ध्व.]

किलकिला-लीत—वि. अर्धोन्मीलित (डोळे; दार, कळी इ०); अर्धे उघडलेलें; किंचित् उघडलेलें. (क्रि० होणें; करणें).

किलकिलावणें, किलकिला लावणें—उक्रि. (कों.) थोडेसें उघडणें; किंचित् उघडणें (डोळे, दार इ०).

किलकिलें—वि. अर्धवट उघडलेलें.

किलच, किलीच-चा—स्त्री. १ कडीपाटाच्या फर्टीमधून बसविलेल्या लाकडी झिलप्या, ढलप्या. 'गरुडपाचूच्या किलचापाट।' –मुसभा २.२८. २ तुकडयांचा कडीपाट करण्याकरितां एका कडीपासून दुसऱ्या कडीपर्यंत घातलेले फळीचे आडवे तुकडे (जास्त लांब अधिक चांगल्या फळयांच्या ऐवजीं). ३ हिऱ्याचा लांब तुकडा. ४ कापसामधील गवताची काडी, घाण इ०

किलचण-न—स्त्री. (व.) लहान झिलपी. किलच पहा.

किलचबंदी—स्त्री. १ किलचांची तक्तपोशी. २ तख्तपोशी; वरील प्रमाणें केलेला कडिपाट. –वि. किलचांचा केलेला (कडिपाट).

किलची-चण—स्त्री. १ किलच अर्थ १ पहा. 'शुद्ध पाचूंच्या किलच्या वरी। अभेद जोडिल्या कळाकुसरी।' –ह २.१९. २ जास्त किलचांचा डीग. [दे. किल्लिच]

किलप्या—स्त्रीअव. १ थप्पडा; थपटया; चापटया. ०देणें–(ल.) थोबाड फोडणें; 'श्रीमुखांत देणें. 'क्रोध आला हकीमाला किलप्या द्यायचा हुकुम गडयारे।' –रामाचें जुनें गाणें.

किलबिल—पुस्त्री १ किलकिल पहा. २ की ३ पहा.

किलबिलाट-किलबिलाट—किलकिल, किलकिलणें पहा.

किलवणें—क्रि. हलविणें (जमीनींत गाडलेला वासा, वगैरे). [सं. कल्]

किलवाणा-णी-णें—वि. १ केविलवाणा पहा. दीनवाणा; रडवा (स्वर, भावण, माणूस). 'हे नरभूषण दायक अन्य वरिद्र फिरें जरि तो किलवाणें।' –किंशुक ३८. 'मी तरी तुझा अनाथ दीन। येथें दिसतों किलवाण।' –भवि ४७.९१. 'बापूनें किलवाणी तोंड करून म्हटलें.' –बाळ २.७०. २ हलका; लहान; क्षुल्लक; कुरूप (कपडा, दागिना, इमारत); दुर्दैवी; कृपण; नीच (मनुष्य, त्याची वागणूक, कृति). [केविलवाणा पहा]

किलागॉ—पु. (गो.) बारीक मासा.

किलाण—न. १ उडी; उड्डाण; झडप. (क्रि० मारणें; टाकणें; घालणें; साधणें). २ उड्या मारणें; खिदळणें; धिंगाणा घालणें (लहान मुलांचें) (क्रि० मांडणें; माजवणें). किराण पहा. [सं. किल्=खेळणें; हिं. कलान]

किलाफ-फा—पु. संशय; वैर; कपट; वैषम्य; विरोध; किल्मिष. 'हर प्रयत्न करून जनकोजी शिंदे यांस भेटून त्यांचें चित्तांतील किलाफ काढून त्यांचे हातीं मुल द्यावें.' –भाब ३७. [अर. खिलाफ]

किलावर—पु. खेळण्याच्या पत्त्यांतील एक काळा रंग. [इं. क्लब]

किलावा—पु. (हिं.) महाताला पाय अडकविण्यासाठीं. हत्तीच्या गंडस्थळावरून खालीं सोडलेली दोरीची रिकीब; हत्तीचा गळपट्टा; कलावा पहा. 'पायावरती चढोन किलाव्यांत बसले.' –आयाह ११. [फा. कलावा]

किलिसात—पु. (तंजा.) किल्ली.

किली—स्त्री. किल्ली पहा. 'हातास न येतां किली। सर्वही अप्राप्त।' –दा ७.२.१३. 'त्याची किली तूज अधीन आहे।' –सारुह १.४.

किलेमाणी—वि. जात्याच्या खालच्या तळीच्या खुट्याभोंवतीं फिरण्यासाठीं वरच्या तळींत ज्यास वेढी बसविली आहे असें जातें. [सं. कील+म. माणी=मायणी, वेढी] ०करणें–क्रि. वरीलप्रमाणें किलेमाणी बसविणें. 'जात्याला किलेमाणी केली.'

किलोंड—स्त्री. (व.) मांजरांची झोंबी, लढत.

किलकारी—स्त्री. चीत्कार; हर्षाची आरोळी; गर्जना. [किलकारणें. ध्व.]

किल्बिष(लिम)ष—न. १ पाप; दोष; 'ऐशा किल्बिषापासूनी। सुटे यज्ञशेष तें भक्षूनी।' –यथादी ३.२२३. २ (ल.) घाण; मळ. [सं. किल्मिष]

किल्ला—पु. (गो.) कोंक (झाडांचा वगैरे). किल्ल पहा.

किल्ला—पु. गड; दुर्ग; कोट; भोंवतालीं चर, तट, बुरूज इ० करून राहण्यासाठीं तयार केलेलें सुरक्षित स्थळ; गढी. [अर. कल्लाह्=शिखर; किल्ला=कोट] (वाप्र.) ०नेसविणें–किल्ल्याभोंवतालचें रान पेटविणें. **किल्ल्यावर चढविणें**–डोंगरी किल्ल्यांत कैदेंत ठेवणें. 'किल्ल्यावर चढवा आनंदीबाईला.' –ऐपो १६५. सामाशब्द– **किल्लावतीळा**–पु. शेतकऱ्यानीं किल्ल्यावरील शिवंदीला धान्य पुरविण्याऐवजीं त्यांच्यावर पट्टी बसविली जात असे तो. **किल्ले कोट**–पु. साधारणरीत्या किल्ला; किल्ले वगैरे मजबूत ठिकाणें. ०**जात**–क्रिवि. सर्व किल्ले. 'किल्लेजातचा बंदोबस्त' –चाडसमा ३.१६. [अर. किल्ला+जात] ०**दार**–पु. दुर्गाधिपति; किल्लेकरी; याची नेमणूक राजधानींतून, मुख्य सरकारकडून होई व त्याला पगार तेथून मिळे, किल्ल्यावरील शिवंदी त्याच्या दिमतीस असे. त्याचें काम पहा. –इऐ २२.२४. [अर. किल्ला+दार] ०**नशीन**–वि. किल्ल्यावरील, किल्ल्यावर कैद झालेला. 'मन्सबदार किले नशीन वसन्तगड.' –रा १५.९५. 'रघुपतराव नारायणांचा पक्ष केला, ते किलेनशीन केले.' –मदबा १.७८. ०**बंद**–वि. किल्ल्यास वेढा पडल्यामुळें अडकलेला. 'किलेबंद झालें असतां परिणाम नाहीं.' –मराचिथोक्षा ३७. **किल्ल्याकिल्ल्या**–अ. किल्लोकिल्लीं; प्रत्येक किल्ल्यावर; 'किल्ल्याकिल्ल्यानिहाय तोफा करविल्या.' –मदब १.१४५.

किल्लाण—पु. पक्ष्यांचा किंवा मुलांचा कलकलाट; गोंधळ. [ध्व.]

किल्ली—स्त्री. १ चावी; काल. 'झाला हुकूम तोफखान्याला किल्ली जिवबादादाचे हातीं.' –ऐपो २३५. २ एखाद्या कठिण गोष्टीचें स्पष्टीकरण किंवा उलगडा, एखाद्या शास्त्राचा सारभूत प्रास्ताविक भाग. ३ (ल.) हिकमत; कळ; युक्ति; मेख. 'विषय चिंता वेडया भुलवितील लडवून हरकिली।' –पला १०४. 'पेशवाई चालविण्याची किली नानासाहेबाचे खेरीज इतरांस सांपडली नाहीं.' –अस्तंभा ४. ४ (छापखाना) फर्मा आवळण्याचें साधन. [सं. कील; फा. किलीद; फ्रें. जि. किलो] ०**फिरविणें**–कांहीं बाजू युक्ति काढून मथविणें, चिथविणें; गुप्तपणें बंदोबस्त करून ठेवणें.

किल्ली—स्त्री. (गो.) कांटा रुतून पायाच्या तळव्यास होणारा फोड; भोंवरी. किरली पहा.

किल्हाण—न. उड्डाण. किराण, किलाण पहा.

किल्लकू—न. (व.) सर्पाचें पिल्लूं. किरडूं पहा.

किंव-काककूल—न. १ कींव; करुणा; दया. काककृत पहा.

किंव—स्त्री. (गो.) हुक्की; तल्फ.

किंवळा—स्त्री. (व.) निंदा. –वि. निंद्य.

किवंचणें—उक्रि. १ (का.) इकडेतिकडे फेकून, टोचून, बोटें घालून, चिवडणें; विसकटणें; नासणें; कुसकरणें. २ (क.) चांचपणें. (?) 'असा किवचून काय बघतोस ?' [विचकणें]

किवटा—वि. कृपण; चिक्कू; (बाल भाषेंत) किवण.

किवड—पु. (सांकेतिक) पोलीस शिपाई. –गुजा.

किंवडा-डू, किवढ्या—पु. (तंजा.) बहिरा. [का. किवी=कान, कीव्ड=बहिरा]

किवण—स्त्री. कींव; करुणा; दया. [कींव]

किंवण(न), किवान, किवोण-न, किव्येण—न. १ (राजा.) पशूंच्या अंगांवरील किडे पडलेलें क्षत; व्रण. हा रोग गुरांच्या पायांच्या गेळघांत किंवा कानांत होतो. 'भागीचें घोडें किवणानें मेलें.' २ तें बरें करण्याचा मंत्र. [सं. कृमि+व्रण] ०उचकवप–(गो.) घाण उघडी करून दाखविणें.

किवण्या-न्या—वि. किंवण पडलेला; क्षत पडलेला. [किंवण]

किंवदन्ती—स्त्री. उडत बातमी; बाजारगप्प; अफवा; आवाई. [सं. किम्+वदन्ति]

किंवा—उक्रिअ. वा; अथवा. अथवा पहा. [सं. किम्+वा]

किवांटो—पु. (गो.) संताप; जळफळाट.

किविलवाणा, णी, णें—वि. केविलवाणा–णी–णें; दीन; बापडा. 'कां गा किविलवाणा केलों दीनाचा दीन.' –तुगा ४५४. 'ऐसें तयाचें किविलवाणें' –दावि ४५८. [कींव]

किशमिश—नपु. किसमिस पहा.

किशी—स्त्री. (कु.) नारळाची शेंडी.

किंशुक—पु. पळसाचें झाड. 'वसंती जैसें किंशुक फुले । तैसे शोभले दोघेहि । –जै १९.८. 'पावे कुसुमित किंशुक घनबनपिहितादिपालसादृश्य ।' –मोभीष्म ५.४७. [सं.]

किशोर—पु. बाल; लहान मूल; पंधरा वर्षांच्या आंतील मुलगा; कायद्याच्या दृष्टीनें अज्ञान मुलगा. नऊ पासून सोळा वर्षांपर्यंत किशोर अवस्था म्हणतात. –योर १.८८. 'तूं तों तरुण किशोर । पांचां वरुषांचा पोर ।' –वामन नृसिंहदर्पण ९६. [सं.]

किशोरी—स्त्री. मुलगी.

किष्कु—पु. एक प्राचीन मापनाचें परिमाण. हें ३४.२. इंचांचें होतें. –छअं १९९.

किसकिस—स्त्री. (गो.) दुखणें; कळा निघणें; पोटांत चावणें. [ध्व.]

किसकिसो—पु. (गो.) झाडें पोखरून खाणारा एक किडा.

किसगणती—स्त्री. १ गणना; गुमान; पर्वा; चाड; फिकीर (मनुष्य, वस्तु, काम, पैसा यासंबंधी); खातरजमा. २ क:पदार्थ (नास्त्यर्थी प्रयोग). 'हा सरदार त्याच्या किसगणतींत नाहीं.' 'ह्या कामांत मोठमोठे थकले मग हा किसगणती ?' [हिं. किस+गनती का=कोणत्या गणनेचा]

किसणकाम—न. १ (ल.) बारीक, नाजूक, कंटाळवाणें काम. २ कीस काढण्याचें काम. [किसणें+काम]

किसणी—स्त्री. १ कीस काढण्याची क्रिया, अथवा कीस. २ कीस काढण्याचें हत्यार; चार पाय असून त्यांवर भोकें पाडलेला लोखंडाचा किंवा पितळेचा पत्रा बसविलेलें एक हत्यार. [किसणें]

किसणें—उक्रि. १ कीस काढणें. २ किसणीवर खवणें (खोबरें, काकडी इ०). [सं. कृष्=ओढणें, चासणें.] ०किसून दळणें–बारीक दळणें.

किसपट—न. कसपट; बारीक, सूक्ष्म कण (लाकडाचा; गवताची काडी); केसपट, झिलपीचा बारीक तुकडा; कुसळ. [सं. कुश]

किसपणें—न. (गो) साफ करणें; पालीश करणें.

किसबत—स्त्री. (हिं.) भिस्ती लोक मश्केच्या खालीं जें कातडें वापरतात तें.

किसमिस—स्त्री. १ बेदाणा; खिसमिस. २ त्रासदायक आणि कंटाळवाणें भाषण; कुरकुर; भांडणाचें बोलणें. [किसणें द्वि.]

किसमूर-मोर—स्त्री. (गो.) कोशिंबीर.

किसर—न. १ (कों.) केसर; किसपट; २ भात इ० धान्याचें कुसळ.

किसवंती—स्त्री. आंब्याच्या किसाचें लोणचें. [कीस]

किसळचें—अक्रि. (गो.) बिनसणें.

किसा-स्सा—पु. १ गोष्ट; हकीकत; इतिहास; बखर. 'याप्रमाणें किसेकिनई सांगतो.' –खरे ४३५४. २ तंटा. 'याप्रमाणें किस्सानिगैत होऊन स्वारी माघारी फिरली.' –होकै ४. [अर. किस्सा.]

किसान—पु. १ शेतकरी; खेडवळ माणूस. २ हलक्या प्रतीचा माणूस; सामान्य प्रतीचा माणूस; 'तेथें अफ्जल् तूं किसान मजला दृष्टीपुढें दीसतें.' –चित्रगुप्त २६. [हिं. किसान; फा. किसान; सं. कृष्-कृषाण] ०काम–न. १ शेतकी; शेतकाम. २ (ल.) कमी दर्जाचें काम; किरकोळ काम; हलक्या प्रतीचा धंदा.

किसार—न. शल्य; कसपट. –शार सोहिमह.

किसूळ—पु. बारीक आणि किरकोळ तार्टे, देंठ, पार्ती (कोवळें किंवा रोगट गवत, भाजीपाला वगैरेचें). [सं. कृष्]

किसूळ—स्त्री. (गो.) लांकूड साफ करण्याचा रंधा.

किस्कनड—स्त्री. (गो.) भानगड; तिस्कनड.

किस्कूट—(क.) रंधा; सुतारी हत्यार. किसूळ पहा.

किस्त-स्ती—स्त्री. १ कर्जफेडीचा हप्ता, 'किस्तींस इतकी शतै कशास पाहिजे ?' –रा ५.३२. 'बाकी बत्तीस लक्ष रुपये राहिले ते सावकारी किस्ती करून यावी.' –खरे ४.१८६५. २ शेताची मशागत. [अर. किस्त्] ०गारी-बंदी–स्त्री. १ हप्तेबंदी; हप्तेबंदीनें देण्याची फेड. 'किस्तबंद्या करून ...' –दिमरा १.१२४. 'याप्रमाणें किस्तबंदीचा ठराव जाला.' –रा ७.३४. २ शेतकाम, जमीनकसणी. [किस्तबंदी, किस्तकारी]

किस्ती—स्त्री. होडी; नौका; नाव. 'येथून एक किस्ती भाड्यानें साठ रुपये करार करून निघालों. –पदमव ८०. [फा. कश्ती]

किस्पाट—न. (कु.) किसपट.

किस्मत—स्त्री. नशीब; भाग्य; दैव. 'परंतु दुनियादारी किस्मतींत थोडे दिवस होती.' –ऐटि ३.१७. 'जागें नसीब इंग्रजांची किस्मत शाबूत.' –होपो १६. [अर. किस्मत्]

किळ–कील पहा.

किळकांटा–पु. सामानसुमान, हत्यारें पात्यारें. 'सामायन किळकांटा जंगी।' –ऐपो २१७. [सं. कील+कंटक]

किळकिळी-ळ्या—स्त्रीअव. (ध्वनि.) याचनेकरितां किंवा दुःख झालें असतां विवळणें, कण्हणें; काकुळत; दीनवाणा स्वर (भिकारी, दुखावलेला कुत्रा यांचा. क्रि० देणें; मारणें)

किळकिळीत—वि. (कों.) कळकळीत; पचपचीत; पाण्यासारखें (ताक, दूध); बेचव; नीरस.

किळच-ची—स्त्री. (गो.) किंकाळी. ०**किळचीर किळची**–किंकाळ्यावर किंकाळ्या. [ध्व.]

किळवें—न. अर्धा छटाक किंवा एकबत्तिसांश शेराचें एक माप; अर्धें निळवें.

किळशा, किळोशी—वि. (राजा.) रोगट; सतत रोगी असलेला. [किळस]

किळस-ळीस—पुस्त्री. १ (राजा.) चिळस; कंटाळा; तिटकारा; विसारी. 'तुका म्हणे गेला आळस किळस।' –तुगा १८५२. २ (कों.) ज्वरादि दुखण्यानें पीडित स्थिति; अशा स्थितीचें निदर्शक चिन्ह; अवलक्षण (अंगावर उवा पडणें वगैरे). (क्रि०येणें). [सं. क्लेश; प्रा. किलेस–किळस] ०**खोर**–वि. कंटाळखोर; खोडकर.

किळसणें—उक्रि. कंटाळणें; विटणें.

किळांच—पु. (कु.) बारीक, निरुपयोगी कुळीथ.

किळावा-वो—पु. तेज. 'रत्नीं किळावो जैसा।' –ज्ञा १४.३७३. [सं. कील]

कीं—उअ. १ अथवा; किंवा; संशयबोधक अव्यय. 'कीं प्रेम पीयुष मयंकु। परीपूर्ण जे।' –ऋ २७. 'भासति कुरुभटवारथदवदहनग्रस्त कुंज रानीं कीं। कपिहतलंकाग्रह ...।' –मोकर्ण ३७.३३. 'कीं माझें दुर्दैव प्रभुच्या मार्गांत आडवें पडलें।' –मो संशयरत्नमाला ३. २ प्रश्नावर जोर देण्याकरितां प्रश्नाच्या शेवटीं पुष्कळदां योजतात. निश्चय दाखविण्यासाठीं किंवा आश्चर्य दाखविण्यासाठींहि योजतात. जसेः–मी देतों कीं, =मी देत आहें तुला दिसत नाहीं ? येतोस कीं; जातोस कीं. 'म्हणे अधिक याच कीं अखिल याचकीं हावरा।' –केका १२. याला पुष्कळदां रे जोडतात जसेः–आलों कीं रे; जातों की रे, बसतों कीं रे. ३ काय. 'पाठ कृतबंध कीजे। हें कीं वैराग्य देवाचें' –शिशु ७००. [सं. किल]

कीं—अ. स्वरूपबोधक अव्यय; जे; असें. 'ते बोलले कीं आम्हांस यावयास बनणार नाहीं.' [सं. यत्; फा. के]

की—न. पिंगळ्या (पक्षी) च्या कू, की, किलबिल, किचीबिची या चार स्वरांपैकीं दुसरा स्वर. [ध्व.]

कीकट—पु. एक देश; मगधाचें प्राचीन नांव. [वै. सं. –ऋग्वे ३.५३.१४.]

कीक(का)ट—पु. आवाज; ओरडणें. 'आणि कीकाट गजांचे।' –वेसीस्व ४.२३. [ध्व]

कीकस—न. हाड. 'त्वत्तोयीं जरि स्वल्प कीकस पडे पापी कृती तो घडे। तो देवेंद्रपदा चढे सुरवधूसंभोग त्यातें घडे।' –निमा (भागीरथीस्तोत्र) १.१७.

कीच—स्त्री. दुःखाची आरडाओरड. [ध्व.]

कीचक—पु. वेळू; बांबू. [सं.]

कीचक—पु. विराट राजाचा शालक. [सं.]

कीजत—क्रि. १ करीत असत; घडत असे; केलें जातें. 'स्थूल देहें कीजत असिजे।' –विउ ९.१०६. 'तरी तिहीं येतुला अवसरी। काय कीजत असे येरयेरीं।' –ज्ञा १.८७. [सं. कृ]

कीजे—क्रि. करावें; केलें जावें. 'कृष्ण कथेचें आलें कीजे खोलु।' –शिशु २२. 'आपण वज्राचे यां बोलिजे। वरी घडे तरी कीजे।' –ज्ञा १.२१६. 'कीजे कृपा साउली।' –निमा १.१३. 'त्वां कीजे भस्म सधनु तो मंद।' –मोकर्ण ७.१६. [सं. कृ कर्मणि विधि लिंग्–क्रियते]

कीजो—क्रि. करा. 'अपराधी मी मज लागून। क्षमा कीजो।' –गीता १.१८. [सं. कृ]

कीट—न. १ घाणीचा थर; किटण (गुडगुडीच्या नळींतील, शरीरावरील, वस्त्रावरील); चिकटा; खळ. किटण पहा. २ मातीचें मोठें आणि कठिण ढेकूळ (जमीन नांगरतांना निघालेलें.) ३ (राजा.) ठिणगी; किटाळ. ४ हिणकस सोनें. 'आत्मानात्म–किटा। पुटें देउनी।' –ज्ञा १३.१०३५. ५ जळलेली धातु; जळकें लोखंड. [सं. किट्ट]

कीट--क्रिवि. काळा या शब्दाचें आधिक्य दाखविण्यासाठीं त्याच्या पुढें किंवा मागें योजतात. जसें-काळाकीट. 'वरी अंतराळें नभीं कीट काळें।' -दावि २५४.

कीट—पु. १ कीटक; किडा. 'तेथ कृमि कीट लोष्ट।' -ज्ञा १८.२४२. **०स्थिति**-स्त्री. अंडस्थितीनंतरची कीटकावस्था; 'अंडयांतून सुरवंटासारखा लहानसा किडा बाहेर पडतो, तो जलद वाढतो व वाढतांना अनेक वेळां कात टाकतो. या स्थितीस कीटस्थिति म्हणतात.' -प्राणिमो १००.

कीट—न. (गो.) सुपारी शिजविलेलें पाणी; कट पहा. २ (कु.) लहान मूल.

कीट—पु. १ (व.) कृपण; कंजूष माणूस.

कीटक—पु. किडा. सबंध प्राणिशास्त्रांत हा वर्ग मोठा आहे. यास षट्पद म्हणतात. झुरळ, टोळ, माशी, पिसू, पतंग, पिंगुळ, पोरकिडा वगैरे या वर्गांत येतात. हे जल, स्थल, आकाश वगैरे सर्व ठिकाणीं असतात. -ज्ञाको क ५०५. अनेक वेगळे वेगळे १५ ते २० भाग एकत्र जडून झालेला कीटक हा प्राणी असतो. त्यांमध्यें डोकें, छाती व पोट हे तीन भाग स्पष्टपणें भिन्न असतात. -प्राणिमो ९८. यांना शिंगें व पंख बहुधा असतात, शिंगांनीं स्पर्शज्ञान होतें, अन्न शोषण्यास नळीसारखी सोंड असते, सहा पाय असतात. -प्राणी आणि आरोग्य. पृ २१. 'कृमि कीटक पांडुसुता।'-ज्ञा १३.२५५. [सं.] **०भक्षी**-पु. किडे खाणारे सस्तन प्राणी. **०योनि**-स्त्री. किडयांचा वर्ग, जात; जीवजंतु.

कीटण—न. किटण पहा.

कीटी-कीटकी—स्त्री. आळी; किडा. 'भृंगी जड कीटी मूढ।' -एभा ७.३६. 'चिंतितां कीटकी भिंगुरटी। तेचि ते होऊनि उठी।' -एभा ७.९९. [सं. कीटक]

कीड—स्त्री. १ सामान्यतः कीटक. २ लहान किडा. [सं. कीट; सीगन कीरी] **०लागणें**-१ किडयानें खाऊन पोकळ, खराब करणें (धान्य, फळ वगैरे). २ (ल.) उतरती कळा लागणें; क्षय पावणें. 'देशाचा विचार करणारीं माणसें निपजलीं नव्हतीं तोंपर्यंत देशास कोठें कीड लागली आहे हें समजणें कठिण होतें. -ठिप्या. **०खाद**-वि. किडलेलें; किडयांनी खाल्लेलें. **०मुंगी**-स्त्री. कृमि; कीटक; किडा; वाळवी; (सामान्यतः कोणताहि किडा). [किडा+मुंगी]

कीड—वि. १ खोटें; वाईट. 'तैसें शुद्ध सत्त्वा आड। आहे रजतमाचें कवाड। तें भेदणेंयातें कीड। म्हणावें का।' -ज्ञा १७.३१२. २ मळ; गंज. 'कीड झाडावया हट्टीं। रज देऊनि पाठीं पोटीं। सुवर्ण घालितां पुटीं। झळकत उठी निजतेजें।' -एभा १०.६३. [कीट]

कीड(भांगर)—वि. १ (गो.) अन्यधातुमिश्र (सोनें). २ कीट.

कीडरूं—न. साप. किरुडव, किडरू पहा.

कीण—पु. घोडयाच्या खुराचा मध्यभाग. -अश्वप १.६३.

कीण—न. (गो.) कोयनेल. [किनाइन]

कीत—न. (तंजा. म.) झाप. [ता. कीड]

कीदृश—वि. कशासारखा? कोणासारखा? कशा प्रकारचा [सं.]

कीनाश—पु. यम; मृत्यु. 'वपु न बहुत पोसावें यशचि सदा खाय ज्या न कीनाश।' -मोभीष्म ७.४५. [सं.]

कीर—पु. १ पोपट; रावा; राघू. 'समसुत मयूरमुखी वसनामा वससि जेवि कीरांच्या।' -मोस्फुटआर्या (नवनीत पृ. २५६). २ (राजा.) पाणकोंबडयासारखा पक्षी. [सं. का.] **०खाद**-वि. १ पोपटानें खाल्लेलें. २ कीडखाद पहा. **०मुख**-वि. पोपटाच्या तोंडासारख्या तोंडाचा (घोडा). हें अशुभ लक्षण समजतात. **०वाणी**-स्त्री. पोपटासारखा मधुर शब्द.

कीर—स्त्री. (व. खा.) रेघ; ओळ. [उ. लकीर]

कीर—उद्गा. पराजयदर्शक शब्द. किर पहा. 'अछुनी कां थीर। पोरा न म्हणसी कीर।' -तुगा १६३. **०करणें**-(व.) त्रासुन सोडणें.

कीर-रू—क्रिवि. १ (काव्य) निश्चयेंकरून; खात्रीनें; खचित; खरोखर. 'कीरूं तुम्हीं वीरूचि धाकड।' -शिशु ४८५. 'कल्पना कीर नसे।' -विपू २.७०. 'आतां येणेंसि कवण भिडे। हें पांडवसैन्य कीर थोडें।' -ज्ञा १.११९. 'आपणपें गिवसी। हें कीर होय।' -अमृ ३.२१. 'नाहीं दुःखाचा लेश कीर।' -रंयोवा ६.३२५. [सं. किल्]

कीरट—(कों.) जनावराच्या अंगावरीलमोठी ऊ. [कीटक?]

कीरवल-कीरवें—१ खेंकडा, 'तें एका कीरवलें देखिलें।' -पंच ४.९. [सं कुलीरक]

कीरवा—पु. डुकर. 'किरव्या नावडे कस्तुरी।' -तुगा ३१.४९.

कीर्ण—पु. किरण. 'जेथवरी सूर्याचें कीर्ण।' -वेसीस्व ३.९८. 'कीर्णावेढालें कडें।' -गीता १३.३४८. [सं. किरण]

कीर्णा—स्त्री. एक प्रकारचा लगाम. -अश्वप १८५.

कीर्त-र्त्त—स्त्री. किर्ते; कीर्ति; प्रसिद्धि, ख्याति; [सं. कीर्ति.]

कीर्तणें—उक्रि. वर्णन करणें; गुण गाणें; स्तुति करणें; बखाणणें. 'कवींनीं तो सुबहु कीर्तिला भरत।' -मोआदि ११.८९. 'कीर्तित मातें अवधारी।'-ज्ञा ९.२११. [सं. कृत्-कीर्तय-कीर्तन]

कीर्तन—न. १ गाण्या-बजावण्यासह ईश्वराचें केलेलें गुणवर्णन; पौराणिक देवादिकांचें कथानक घेऊन तें भक्तिरसानें साक्या,

दिंडया, यांच्या साह्याव्यानें सांगणें; यांत पूर्वरंग व उत्तररंग असे दोन भाग असतात. पूर्वरंगांत एखाद्या संतानें केलेला तत्त्वबोध नाना प्रसंगांसह सांगून उपदेश करतात व दुसऱ्या उत्तर रंगांत एखाद्या राम, कृष्ण इ० श्रेष्ठ पुरुषाच्या चरित्रावर आख्यान लावून त्याच्या आयुष्यांतील प्रसंग गद्यपद्यादि प्रकारानें सांगतात व शेवटीं आरती होऊन सर्वांनां प्रसाद वांटतात. 'सगुण कथा या नांव कीर्तन।' –दा ४.२.२३. २ ईश्वरनामोच्चार करणें. [सं.] ०**भक्ति**–स्त्री. देवाची स्तुति नेहमीं करावी अशा आशयाची भक्ति जी ती; नवविधा भक्तींतील एक प्रकार. [सं.] ०**रंगण**–न. कथेची बैठक. 'कीर्तन रंगणीं ठाकले।' –दावि २८०.

कीर्तनी––पु. (गो.) कीर्तन करणारा; चालचलाऊ हरिदास.

कीर्तनीय––वि. वाखाणण्यास, प्रशंसा करण्यास योग्य; वर्णनीय. [सं.]

कीर्तवडा––पु. वाईट प्रकारची कीर्ति; अपकीर्ति; कुप्रसिद्धि बोभाट. [सं. कृत्]

कीर्ति-र्ती—स्त्री. लौकिक; ख्याति; उत्तम प्रसिद्धि; नांव. 'हे असतिये कीर्तीसी नाशु। आणि परत्रिकासि अपभ्रंशु।' –ज्ञा २.२०. 'कीर्ति प्रगटली दूरच्या दूर। प्रतिष्ठा थोर वाढली।' [सं. कृत्–वर्णन करणें] **कीर्तित**–वि. प्रख्यात; विख्यात; वाखाणलेला; प्रशंसिलेला. [सं.] **कीर्तिमान्– वान–वंत**–वि. प्रख्यात; विख्यात. [सं.] ०**मुख**–१ देवळाच्या उंबरठ्यावर, दोन शिंगें असलेल्या राक्षसाचें कोरलेलें मस्तक. प्रथम याचें दर्शन घेऊन मग देवळांत जाण्याची रीत आहे. 'तें अज्ञान ज्ञानीं बुडालिया। ज्ञानें कीर्तिमुखत्व केलिया।' –ज्ञा १५.५२६. २ वरील आकाराचा दंडावर बांधावयाचा एक दागिना, अलंकार. 'बाहुदंडीं कीर्तिमुखें। हस्तकंकणें दिव्य सुरेखें।' –ह ३.१६२ ०**स्तंभ**–पु. जय वगैरे मिळाल्यावर त्याच्या स्मरणार्थ बांधलेला मनोरा. 'मदनाचे कीर्तीस्तंभ पार्ध्दले।' –शिशु ६१७.

कीर्त्य—वि. कीर्तण्यास, वर्णन करण्यास योग्य. [सं.]

कीर्द–सार, कीर्दावा, कीर्दी—किर्द पहा. (क्रि० करणें.)

कीर्म–वाताळें—किर्म वाताळें पहा.

कील—पु. १ मेख; खिळा; पाचर; अडसर; बहुधा जात्याच्या खुंटयास म्हणतात. २ गुडगुडींत सांचलेला मळ; मशेरी. ३ शंकु (छायायंत्रावर सावली पाडणारा). [सं. कील्=बांधणें]

कील––न. १ (तंजा.) डामर. २ (तंजा.) वंगण. ३ (तंजा) विजागरी.

कीलक––पुन. १ जात्याचा खुंटा. २ खुंटी; खिळा; पाचर वगैरे. [सं.]

कीलखाना—पु. (हिं.) किरकोळ जिनसांची रास व ती ठेवण्याची जागा; अडगळीची खोली. [कीलकानटा]

कीलना—स्त्री. निश्चय. 'मननांतरें आणि कीलना। हीं उपक्रम लिंगें जाणा।' –महिकथा १६.३०. [सं. कीलना]

कीलवाणी—वि. केविलवाणी पहा.

कीलाकृति––वि. खिळ्याच्या आकृतीसारखें; बाणाच्या टोंकासारखें; (इं.) क्युनिफार्म. [सं. कील+आकृति]

की(कीं)ध––स्त्री. १ रडगाणें; केविलवाणी प्रार्थना; करुणा भाकणें. (क्रि० करणें; दाखविणें; भाकणें; येणें). २ दया; कृपा. 'कींव दाखविल्यावांचून दया येत नाहीं.' [सं. कृपा; प्रा. कीवा–कींव] (वाप्र.) ०**करणें–येणें**–एखाद्याचें रडगाणें ऐकून दया येणें, दाखविणें (दुर्बलता, अशक्तपणा इ० पाहून). **कींवची कानू**–एकदां दया दाखवून उपकार केला असतां सतत उपकार करावा अशी अपेक्षा असते तेथें योजितात. **म्ह**० ज्याची करावी कींव तो घेतो जीव. ०**काकळूत–काकुलती**–स्त्री. करुणेची याचना; दया; करुणा; काकळूत पहा. 'माझीं कींवकाकळूत तुम्हांला यऊं या, अथवा कोण करणारा!' 'भाका बहुता रीती। माझी कींवकाकुळती।' [कींव+काकळूत]

कीश—न. माकड. 'कोण कीश तव नांव कर्थी।' –निमा १.४. [सं.]

कीशाली—स्त्री. वानरांचा समुदाय. 'कीशाली ढग ढीगसे जलदसे भल्लूक मल्लावली।' –आसेतु १०. [सं. कीश+आवली]

कीस—पु. १किसणीनें किंवा खवणीनें खवलेला चुरा, भुगा. [किसणें] –स्त्री. २ (कु.) नारळाची शेंडी. [केश] ३ (रसायन) कानशीनें घांसून निघालेला चुरा. (इं.) फायलिंग्स. ०**काढणें–काढीत बसणें**–बारकाईनें चर्चा करणें; त्याचत्याच गोष्टी फिरून बोलणें.

कील—न. तेज; चमक (रत्नांची); किरण; प्रभा. 'पिंगटा जटेची कील फांकिनिली। दाहीं दीसी।' –शिशु ४३. 'किळेवरि माणिकें। लोपिजे कांई।' –ज्ञा १४.१२३. 'रत्नखचित मुगुटीं झळाळ। नाना सुरंग फांकती कील।' –दा १.२.१४. [सं कीला=ज्योत]

कील—स्त्री. (गो.) अंबर.

कु—स्त्री. पृथ्वी. (समासांत) कुगति=पृथ्वीची गति; कुछाया=पृथ्वीची छाया; कुज्या=पृथ्वीच्या परिघ खंडाची ज्या. [सं.] ०**परिधि**–पु. पृथ्वीचा परिघ. ०**पर्यटन**–न. पृथ्वीपर्यटन; पृथ्वीवर प्रवास करणें. ०**प्रदक्षिणा**–स्त्री. पृथ्वीपर्यटन; पृथ्वीला फेरी घालणें ०**वृत्त**––पु. पृथ्वीचा परिघ. ०**व्यास**–पु. पृथ्वीचा व्यास.

कु—क्रिवि. वाईटपणा दाखविणारें, अपकर्ष सुचविणारें अव्यय; हें संस्कृत भाषेंत पुष्कळ वेळां समासांत नामांच्या पूर्वी योजितात. तितकें मराठी भाषेंत नामांना लावीत नाहींत. म्हणून दिलेले मराठींतील कु लावलेले शब्द नमुन्यादाखल समजावे. 'आणि कुकर्मी संगति न व्हावी।' –ज्ञा २.२६६. [सं.]

कुआ—पु. (हिं.) विहीर. [सं. कूप]

कुआड—स्त्री. (ताल) कोणत्याहि तालाच्या आडीची केलेली दीडपट.

कुआंर—पु. कुवार पहा. [सं. कुमार]

कुइजट—वि. कुजलेलें. 'बहुत दिवसांचें पात्रसाधन। झालें होतें कुइजटपण' –नव २४.२५. [कुजट]

कुइटार-रु—न. १ गवताच्या, माडाच्या वगैरे शाकारणीसाठीं विणलेल्या सांवळ्या. २ जुनें छप्पर. –वि. (कों.) वरील सांवळ्यांनीं शाकारलेलें. [कुईट]

कुइरा-री—पुस्त्री. (कों.) कोंवळा फणस.

कुइरी—स्त्री. १ खाज उत्पन्न करणारी एक वनस्पति व तिची शेंग. हिच्या खाजरी व गोडी अशा दोन जाती आहेत. २ आंब्याची कैरी; कोंवळा आंबा, फणस. ३ शिरपेंचाची कलगी. ४ हळद, कुंकु वगैरे ठेवण्याची, आंब्याच्या आकाराची झांकणासह लहान डबी.

कुइरें—न. खाजकुइरीची शेंग.

कुइला—पु. १ खाजकुयली. हिची शेंग गाई, म्हशी यांच्या वासरांना जंतावर उपयोगी आहे. शेंगेवरील कुसें गुळांत घालून माणसांनाहि जंतावर औषध म्हणून देतात. २ लहान मुलांच्या गळ्यांतील एक दागिना.

कुइली—स्त्री. १ कुइरी अर्थ १, २ पहा. २ एक रानभाजी; हिची भाजी करतात.

कुई—स्त्री. १ (ध्वनि) कोल्ह्याची हुकी; कोल्ह्याची आरडाओरड; कोल्हेकुई. २ माणसांची आरोळी, आरडाओरड; कर्कश आवाज. (क्रि० घालणें). 'गनीम आला रे आला अशी एकच कुई होऊन जो तो घाबरेपणानें आपलीं हत्यारें व पोशाक गोळा करूं लागला.' –पटवर्धनांचे पराक्रम. ३ ससा, खार यांचा शब्द. **०कुई करणें**–१ कर्कश गलबला करणें; आरोळी मारणें. २ (कु.) मुलांचें आनंदानें ओरडणें. [ध्व.]

कुईट—न. १ (कों.) नारळाच्या विणलेल्या सावळ्या; गवत. –वि. खोबरें किंवा धान्य सरदल्यामुळें किंवा कुजल्यानें त्याला येणारी घाण; अजीर्णाची घाण. ३ (ल.) एखाद्याचा दोष मनांत ठेवून तो प्रसंगीं काढावयाचा अशा कुत्सित स्वभावाचा (माणूस); कुत्सित व मर्मभेदक (भाषण). [सं. कुथ्=कुजणें]

कुउडी—स्त्री. (भि.) घार.

कु(कुं)क—स्त्री. (ध्वनि) कोंबड्याचें आरवणें.

कुंकड—पु. (गो.) कोंबडा. [सं. कुक्कुट; बं. कुकडा] **०कुंभा**–(खा.) कुकुटकुंभा पहा.

कुंकड—न. पिंजाऱ्याचें कापूस पिंजण्याचें हत्यार.

कुकडसॉ—पु. (गो.) कोंबड्याच्या अंगावरील एक किडा. [सं. कुक्कुट]

कुकडी—स्त्री. जनावराचें ढुंगण; यिवकुकडी पहा.

कुकडी—स्त्री. (भि.) कोंबडी. 'एक कुकडी आथी.' –भिल्ली ९. [सं. कुक्कुट]

कुकडे—क्रिवि. (खान. व.) कोणीकडे? 'कुकडे जास' =कोणीकडे जातोस?'

कुकडेंड—न. १ चातीवरील सुताची गुंडी; २ जनावरांच्या तोंडास होणारा रोग; यांत जिभेला मोठा फोड येतो.

कुकडेकु—न. १ लहान मुलांच्या खेळांतील शब्द; लपंडावांत सर्व मुलें लपल्यावर ज्यावर हार असेल त्यास सुचनेकरितां करावयाचा शब्द. २ कोंबड्याचें आरवणें. ३ (ल.) पोकळ बढाई. [ध्व.]

कु(कुं)कणें—अक्रि. (ध्वनि) कोंबड्याचें आरवणें; केकाटणें. 'वृक जंबुक नगरा आंत। दिवसां चौंबारा कुंकात।' –एभा ६.२८४. [ध्व.]

कुकर—पु. (हिं.) कुत्रा. 'म्हणें मी कुकर म्हणोनि भुंके।' –एभा २१.२२५. [सं. कुक्कुर] **०चाल**–स्त्री. घोडा किंवा कुत्रा यांची दुडकी चाल. [हिं.]

कुकरणें—क्रि. निंदा करणें [सं. कु+कृ]

कुकरी—स्त्री. कुत्री? 'कुकरी शालाशाला कुणि त्याला उभी राहुं न देति अंगर्णी।' –ऐपो ३७०.

कुकरी—स्त्री. नेपाळांतील गुरख्यांचें, लहान तरवारी सारखें एक हत्यार.

कुकर्म—न. चोरी, चहाडी इ० वाईट काम; पाप; अपराध; व्यभिचार. [सं.]

कुकर्मी—वि. वाईट कृत्यें करणारा. [सं.]

कुकल्पना—स्त्री. दुष्ट अथवा वाईट विचार, कल्पना, बेत; शास्त्राविरुद्ध कल्पना. [सं.]

कुकवाकू—पु. मोर (पक्षी). [सं. कुक्कवाकु]

कुका—पु. १ (कों. बायकी) गर्भाधानाच्या दिवशीं जिचें गर्भाधान व्हावयाचें तिच्याकडून भर्त्याची पूजा करणें, विडया तोडणें इ० क्रिया भोंवतालच्या स्त्रिया करवितात त्यास म्हणतात. २ (राजा.) वयानें मोठा पण पोरकट माणसास उपहासानें म्हणतात.

कुकाट—न. (कु.) कोंबडा [सं. कुक्कुट]

कु(कुं)कार्णे—अक्रि. कोकलणें; ओरडणें. 'आडवाचि उडे मग कुकात।' –निगा ३०. 'भुंकती गाढव कुंकाति डुकर।' –दावि ३५८. [ध्व.]

कुकाम—न. (कु.) कुंकू [सं. कुंकुम]

कुकारणें—अक्रि. मोठ्यानें ओरडणें; हाका मारणें; हाका मारून बोलाविणें; हाकारणें; कोकलणें. [ध्व.]

कुकारा—पु. (कु. कुकारो.) आरोळी; ओरड; साद; ललकारी. (क्रि० करणें; मारणें; घालणें). 'घाला घाला रे कुकारे।' –तुगा २३१. [ध्व.]

कुकीर्ति—स्त्री. अपकीर्ति; दुष्कीर्ति; दुर्लौकिक. [सं.]

कुकुकु-कुकुचकु—(ध्वनि) कोंबड्याचें ओरडणें. 'ककुचकु कोण रे तूं?' असें एक लहान मुलांचें गाणें आहे.

कुकुची—कुचकुची पहा.

कुकुचीकाई—(क.) लहान मुलांचा एक खेळ.

कुकुट—पु. कोंबडा. [सं. कुक्कुट] **०कुंभा, कुकुडकुंभा-कोंभा, कुक्कुडकुंभा**–पु. भारद्वाज पक्षी; सोनकावळा. हा रंगानें काळा असून याचे पंख तांबूस काळ्या रंगाचे असतात.

कुकुड-डे—क्रिवि. कोणीकडे? कुकडे पहा. 'मी तें मी तूं तें तूं। कुकुड हें लाडसी।' –तुगा १०२८. [सं. कुत्र]

कुकुडसों—पु. (कु.) कोंबडीच्या अंगावरील जीव, किडा, पिसू. कुकडसॉ पहा. [सं. कुक्कुट]

कुकुत्-द्—स्त्री. बेलाचें वर्शिड. [सं. ककुद्]

कुकुबाळ—पुन. १ लहान मूल. २ कुका अर्थ २ पहा.

कुकुभ—पु. (राग) गायनशास्त्रांतील बिलावलाचा एक प्रकार; एक राग. ह्या रागास षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाती संपूर्ण संपूर्ण. वादी पंचम, संवादी षड्ज, गानसमय दिवसाचा पहिला प्रहर.

कुंकुम—पु १ केशर. 'मोतियांचें घोंपे। रांविलें कुंकुमरसें।' –शिशु १७. २ कुंकू; पिंजर. [सं. कुंकुम] **०केशर**–पु. १ (कों.) रासतुरा; सोनमोहोर, गुल्मोहोर; एक झाड व त्याचें फूल. २ कुंकू, ३ केशर. **०पत्र-पत्रिका**–नस्त्री. मुंज लग्न, अथवा इतर मंगलप्रसंगींची निमंत्रणपत्रिका; हिच्यावर शुभचिन्हदर्शक कुंकुम शिंपडतात. [सं.] **०रेखा-षा-स्त्री.** कपाळावर ओढलेली कुंकवाची रेघ, चिरी. [सं.] **०वृक्ष**–पु. (कों.) कमळ; शेंदरी, पुन्नाग; एकझाड. बंगाल, संयुक्तप्रांत, पंजाब यांत होतें. याच्यापासून कुंकुमचूर्ण तयार करतात. रेशमी कपड्यांना नारिंगी रंग देण्याकरितां या चूर्णाचा उपयोग होतो. –झाको क ५१७. [सं.] **–मागर–रु**–पु. तांबडा चंदन; रक्तचंदन. –कृषि ७८१. [सं.]

कुकुरडा—पु. (कु.) कोंबड्याच्या अंगावर पिसवा पडून होणारा रोग. [सं. कुक्कुट]

कुकुला-ली-लें—वि. लहान बाल; छकुला-ली-लें. [दे. कुकुला=नववधू]

कुंकू—न. हळदीच्या कुड्यास लिंबू, टाकणखार इ० चीं पुटें देऊन रंगवून त्याची केलेली लाल पूड. हें कुमारिका व विवाहित स्त्रिया आपल्या कपाळास लावतात. हें तेलांत मिसळून डबींत भरून ठेवतात. 'बायकांना जसें कुंकू तसें पुरुषांना स्वातंत्र्य' –दौ ५६. [सं. कुंकुम] (वाप्र.) **०अधिक होणें-वाढणें**-कुंकू कमी होणें, संपणें, पुसणें. **०जाणें**–१ वैधव्य येणें. २ (ल.) भरभराट, कीर्ति, उत्कर्ष यांस ओहोटी लागणें (धंदा व्यापार इ०). **०पुसून शेण लावणें**–(कुण.) (सधवेनें) नवऱ्याला सोडचिट्ठी देऊन पाट लावणें; विधवेनें दुसरें लग्न करणें. **०बळकट होणें**–पुष्कळ दिवस सौभाग्य टिकणें; नवऱ्याला दीर्घायुष्य होणें. **०लावणें**–(खा.) वधू पाहाण्याच्या वेळीं मुलाच्या बापानें अगर दुसऱ्या वडील माणसानें वधूला साखरपुडा देणें. 'शेनफड्याच्या पोरल्ये कुकू लावाल्ये मीन् माह्या भासा धरनगायी गेल्तु' (खानदेशी) **०सरसें होणें-करणें**–सौभाग्य कायम राहणें; टिकणें. **०संरक्षणें-संरक्षण करणें**–सौभाग्याची काळजी घेणें; नवऱ्याची काळजी वाहणें; जपणें. **म्ह०** बोडकीला कुंकू वांझेला कातबोळ कशाला पाहिजे?=विधवेला कुंकुवाची उठाठेव कशाला? सामाशब्द– **–कुंकवाचा(ला)धनी**–पु. नामधारी, सत्त्वहीन नवरा, मालक. 'इंदु–मला कुंकवाला धनी पाहिजे.' –भा ९०. **कुंकूगोपचंदन**–न. १ (ल.) मिश्र विवाहाची संतति. २ (ल.) चांगला न शिजलेला, गोळा झालेला भात.

कुकूणक—पु. दुधाच्या दोषामुळें मुलांच्या डोळ्यांना होणारा एक रोग; यानें डोळे खाजतात व त्यांतून पाणी येतें, डोळे उघडतां येत नाहींत. –योर २.६५३. [सं.]

कुकूम—न. (गो.) कुंकू.

कुंकोत्री—स्त्री. कुंकुमपत्र पहा.

कुकोबा—पु. बायक्या; पोरकट माणूस; मेषपात्र; नाबलि; भोलानाथ; अजागळ.

कुक्कुट—पु. कोंबडा (पाळलेला अथवा रानटी). [सं.] **०युद्ध**–न. कोंबड्यांची झुंज. [सं.] **–टासन**–न. योगशास्त्रांतील एक आसन. प्रथम पद्मासन घालून नंतर दोन्ही हात मांड्या व पोटऱ्या यांमधून बाहेर काढावेत व दोन्ही हातांचे पंजे जमिनीवर टेकून त्यांच्यावर शरीराचा सर्व भार तोलून मांड्या जितक्या वर उचलतां येतील तितक्या उचलाव्या व शरीराचा सर्व भार सांभाळावा. –संयोग ३३६. [सं.]

कुक्कुर—पु. कुत्रा. 'इतक्या पावसांत, अंधारांत जाणारा एकच चाकर कीं कुक्कुर.' [सं.]

कुखावर्त—वि. दोन्ही कुशींवर कंसांचे भोंवरे असणारा (घोडा). हें शुभ लक्षण समजतात. –अश्वप १.९४. [सं. कुक्षि+आवर्त्त]

कुगणें—क्रि. (बे.) ओरडणें; हाक मारणें. [ध्व.]

कुगला—पु. (बे.) कोंवळा फणस.

कुगार, कुंगार—न. भिक्षेकऱ्यांचा तांडा, जमाव. –वि. गरीब; कंगाल; क्षुद्र (माणूस, गांव). ' बदसुरत कुगार असिल्या तरी घरिच्या पोरग्या व्यवयासी कोण्ही रजावेद होत नाहीं. ' –पेद ८.३६. [कु=वाईट+कार–गार]

कुग्रह—पु. अनिष्ट ग्रह; अशुभ ग्रह; रवि, मंगळ, शनि, राहू, केतु, यांना अशुभ ग्रह समजतात. [सं.]

कुग्राम—पु. आडगांव; खेडें; वाटसरूंची जेथें गरज भागत नाहीं व जेथें अग्निहोत्री, वैद्य, सावकार, नदी हीं नाहींत असें खेडें. ' ग्राम कुग्राम पुन्या अग्रहारें । ' –आपू १०. [सं. कु=वाईट+ग्राम=गांव] ०**वस्ती–वास**–पुस्त्री. खेड्यामध्यें राहाणें; स्थाईक होणें. कुभोजन, कुलहीनसेवा, क्रोधमुखी भार्या व कुग्रामवस्ती या चार वाईट गोष्टी आहेत. (क्रि० करणें; काढणें; कंठणें; सोडणें.) [सं.]

कुंग्या—वि. (व.) हलकट; दरिद्री; कवडीचुंबक (माणूस). [कुंगार]

कुच—पु. स्त्रीचा स्तन; पयोधर; थान. 'कटा मियां चाटिला । कुचस्त्रेदु. –ज्ञा १३.५३९. 'कुच सुकुंकुमचर्चित चांगले।' –वामन रुक्मिणीविलास २९. [सं. कुच्=संकोचपावणें; पो. जि. कुचास] ०**कसणी**–स्त्री. चोळी. ' वसन आणि कुचकसणी फेडुनि । ' –अमृत २४. ०**कुंभ**–पुअव. (काव्य) मोठाले स्तन. [सं.]

कुच—पु. कूच पहा.

कुचकट, कुचका—वि. कुजका पहा.

कुचकणें—सक्रि. (व.) टोचणें; भोंसकणें.

कुचकामाचा—वि. (हिं.) अगदीं निरुपयोगी (निषेधार्थी षष्ठ्यंत प्रयोग). [हिं. कुछ् काम का नही.]

कुचकुच–कूच—स्त्री. कुजबुज; हलक्या स्वराचें भाषण; अप्रगट भुमका. ' कुचकुच सखयांची अन्यथा देखियेली । ' –सारुह ३.६१. २ बाजारगप्प; अफवा. [ध्व. सं. कुज्–अव्यक्त शब्दे.] ०**कुचकुचणें**–अक्रि. कुजबूज करणें.

कुचकुची—स्त्री. जोंधळ्याचा एक प्रकार; दुधमोगरा; याचा हुरडा फार उत्तम लागतो.

कुचकुचीत—वि. (गो.) फार; पुष्कळ; गर्द.

कुचकुली—स्त्री. (राजा.) गुदगुली. (क्रि० करणें; होणें.)

कुचंडा—वि. (माण.) चिक्कू; कृपण.

कुचडी—स्त्री. (व. ना.) घाणेरडा बोळ, गल्ली; अडचणीची जागा; बेपट. [फा. कूचह्=बोळ]

कुंचडें, कुचडें, कुंचड—न. १ लहान मुलांचें किंवा बायकांचें (बाळंतपणांतील) डोकीस घालावयाचें टोपडें; लहान कुंची. २ (ल.) संकुचित व गैरसोयीचें घर. ' हें कुंचडें घर आहे. ' [सं. कुच्=संकोच पावणें]

कुचणी—स्त्री. हातभर लांबीची पहार; सबल.

कुंचणी, कुचणी—स्त्री. १ डुकराच्या केसांची कुंचली; कोष्ठ्याची कुंचली. २ कुंची अर्थ २ पहा.

कुंचणें—उक्रि. कुंचलीनें साफ करणें. [कुंची]

कुचंदन—न. रक्तचंदन.

कुचंद्या—स्त्रीअव. (व.) खोड्या; कळ. ' लहान मुलाच्या कुचंद्या करतो. '

कुचनिंदा–दी—स्त्री. कुचेष्टा, कुचाळ्या;व्यंगोक्ति; वाईट आरोप करणें (क्रि० करणें.) कुचिंदी–कुचविंधी पहा, या शब्दांचा एकमेकांऐवजीं जरी उपयोग करतात तरी ते अगदीं समानार्थक मानलेले नाहींत. [सं. कुत्स्=निंदा करणें]

कुचंबण–मण–णी, कुचंबन—स्त्री. १ रोग इ० कारणानीं आलेली कष्टप्रद अवस्था; दुःखाची व पराधीनतेची स्थिति. ' ते परिमळ पालवी साहे कुचंबनें । श्रीचक्रधराचें । ' –शिशु ६९०. २ त्रासदायक स्थिति; खोळंबा; अटकाव; अडचण; पंचाईत. [सं. कुच्=संकोच पावणें.]

कुचंब(म)णें—अक्रि. १ दुःखांत किंवा पराधीन स्थितींत तळमळणें; संकोचणें. २ त्रासदायक अडचणींत पडणें, येणें; लादलेला त्रास, अटकाव यापासून दुःख होणें; त्रास, दुःख खोटी होणें; आडकाठी येणें; अडचणींतून सुटका न होतां दुःखांत कांहीं काळ काढावा लागणें. ३ कोमेजणें –शर. ४ चुरडणें; चुरगळणें, ' कां कमळांवरी भ्रमर । पाय ठेवती हळुवार । कुचंबैल केसर। इया शंका । ' –ज्ञा १३.२४७ [सं. कुच्=संकोच पावणें]

कुचबीं—क्रिवि. (व.) हिशोबांत. ' इतकें काम त्याच्या कुचबीं नाहीं. ' [हिं. कुच भी=कांहीहि]

कुचमण—स्त्री. (गो.) कुचंबणा; कुचंबण–मण–णी पहा.

कुचमुचें—सक्रि. १ (गो.) कुचंबावयास लावणें. कुचंबणें. पहा.

कुचमुचें—सक्रि. (गो .) पोटांत गुरगुरणें. [ध्व.]

कुचर—वि. १ कामचुकारू; कपटी; बुद्धया एखादें काम वाईट रीतीनें करणारा; अंगचोर. 'जैसे कां कुचर घोडें । बरें दिसे परी आडवीं अडे । ' –एभा १३.१३४. ' कुरें कुचर नठयाळ । ' –दा २.३.२३. ' कुटिळ कुचर वादी निंद्य । ' –तुगा २२६०.

२ (ल.) दुर्मुखलेला; द्वेषी; खुनशी. ३ न शिजणारा; मउ न होणारा; कठिण (कडधान्यांतील दाणा). ४ त्रास देणारा; लुच्चा; वाईट; खडतर (खडकाळ रस्ता, दुर्बोध लिखाण, गिचमिड पुस्तक इ०); खचरट (मार्ग.), [सं. कु+चर्]

कुचर—पुन. चाड; धान्यांतील न शिजणारा दाणा; न कांडतां येणारा दाणा.

कुचर—पु. बटाटा जमिनींत तयार होत असतांना त्यावरील माती निघून तो उघडा पडला म्हणजे हिरवा होतो त्यास म्हणतात.

कुचराई—स्त्री. अंगचोरपणा;अप्रामाणिकपणा; टंगळमंगळ; अळंटळं; (काम, धंदा, व्यापार, यत्न यांमध्यें) कसबचोरपणा. [कुचर]

कुचलणें—उक्रि. १ ओबडधोबड रीतीनें पीठ करणें, भरडा करणें; फोडणें; चिरडणें. २ मारणें; ठोकणें; ठेचणें; चेचणें; सडकणें. ' त्याला खूप कुचलला.' [हिं. कुचलना. ध्व.]

कुंचलणें—अक्रि. कुंचलीनें साफ करणें, झाडणें. [कुंचा]

कुचला—पु. काजरा; कोंकणांत होणारें एक मोठें झाड. याच्या बिया कडू असून विषारी असतात. बिया वाटोळ्या व फुगीर असतात. या औषधी आहेत. यापासून स्ट्रिक्नीन व ब्रुसाइन हे महत्वाचे अल्कलाइड तयार करतात. कुचल्याचें विष पोटांत गेल्यास धनुर्वातार्ची लक्षणें होतात. त्याचें सत्त्व हृदयास उत्तेजक, सूक्ष्मवाहिन्यांचा स्तंभ करणारें आहे. कुचल्यार्ची पानें जनावरानें खाल्ल्यास जनावर मरतें. ' त्यजुनि सहकार पिकला पिक लाजेना वरावया कुचला ।' –मोसभा ३.४९. **कुचलिन**–न. स्ट्रिक्नीन. **कुचली**–स्त्री. कुचल्याची बी.

कुचला—पु. संधला. ' विरलेल्या फकीच्या चुन्यांत समभाग विटेची पूड घालून कुचला तयार करावा. ' –मॅरट ११३.

कुंचला—पु. रंग देण्याची मोठी कुंचली अथवा ब्रश; डुकराच्या मानेवरील केसांची तारेंत बांधलेली कुंचली (दागिने स्वच्छ करण्याची). [सं. कूर्च]

कुचविधी-ध्या, कुचिंदी-द्या—स्त्रीअव. चीड येण्याजोग्या भाषणानें काढलेली खरडपट्टी; उपहास; टवाळी; टर; हेटाळणी; व्यंग काढणें. (क्रि० करणें). कुचंदी, कुचनिंदा पहा.

कुंचळणें—अक्रि. (मोराला). पूर्ण पिसारा येणें, फुटणें. [कुंचा]

कुचा—पु. खराब झालेली जरतार.

कुचा, कुच्या, गुच्चा—पु. १ खोमा;पोंचा;किंचित खळगा; लहान भोंक (भोंवरे खेळतांना भोंवऱ्यांनीं पाडलेलें). (क्रि० मारणें). २ आंगठ्याजवळच्या बोटानें मारलेला टचका. **कुचे मारणें**–वादविवादांत टोमणा मारणें.

कुंचा—पु. १ मोराच्या पिसांचा कुंचला, मोरचेल. ' उभिला जैसा देउळीं । जाणोनि कुंचा । ' –ज्ञा १३.६५८. २ मोळ गवत, डुकराचे केस, ताड व इतर झाडांचीं पानें यांची केरसुणी. ३ विणकरांचा सुतास खळ लावण्याचा कुंचला, हा झाडाच्या बारीक मुळयांचा केलेला असतो. सुतास पांजण केल्यावर ह्यानें सूत साफ करतात. सामान्यतः चित्रांच्यांच्या कुंचल्यासहि म्हणतात. [सं. कूर्च; कुच्=संकोच पावणें; सीगन कुच=पुंजका; ते. कुंचे; का. कुच्चु=गोंडा]

कुचाग्र—न. स्तनाग्र; थानाची बोंडी. ' कुचाग्रावरी वर्षतें नेत्रपाणी । ' [सं.]

कुचाल—स्त्री. दुराचरण; कुमार्ग; वाईट चाल. ' मित्रा त्वां कुचाल सोडून उत्तम चाल धरली. ' –बाळ २.१९९. [सं. कु+चल्]

कुचाळ-का—वि. कुचाळी करणारा.

कुचाळकी, कुचाळा, कुचाळी—स्त्रीपु.स्त्री. टवाळकी; थट्टा. कुचविधी पहा. ' करुनि कुचाळा कोप तसा । ' –भागो २३. [कुचाल]

कुचाळखोर—वि. कुचेष्टा करणारा; खोडकर; खटयाळ; त्रासदायक; निंदक; टवाळी करणारा. [कुचाल]

कुंचाळणें—उक्रि. कुंचल्यानें साफ करणें;उजळा,जिल्हई देणें.

कुचाळा—पु. (गो.) निंदा; मस्करी; खोडी. –वि. कुचाळी, निंदा करणारा.

कुचि-ची—स्त्री. किल्ली. ' मुक्तीचा दारवठा । उघडांवेआं कुचिआं वंकटा । ' –शिशु ४२०. [हिं. कुंजि]

कुंचित(कपोल)—न. (नृत्य.) नृत्यांत थंडी वाजणें, ताप आला असें दाखविणें; भय वाटणें वगैरे प्रसंगीं गाल आकसल्यासारखे दाखविणें. **कुंचित(करण)**–न. उजवा पाय पुष्कळ खाली करणें व उजवा हात कुंचित करून डाव्या बाजूस उताणा करून ठेवणें. **कुंचित(दृष्टि)**–स्त्री. बाहुल्या व नेत्रप्रांत आकुंचित करणें, हा अभिनय अनिष्ट गोष्ट पाहण्याचें टाळण्याकरितां व डोळे दुखूं लागलेले दाखवयाचें असतांना करतात. **कुंचित(पाद)**–पु. नृत्यास उभें असतां एक पाय वर उचलून पावलाचा मधला भाग व बोटें आवळून घेणें. **कुंचित(पुट)**–न. नृत्यामध्यें खालच्या व वरच्या पापण्या एकमेकींजवळ आणून आकुंचित करणें; घाण, अप्रिय वस्तूचा स्पर्श, अनिष्ट वस्तुदर्शन यावेळीं हा अभिनय करतात. **कुंचित(मान)**–नृत्यामध्यें चवडे उचलून टांचांवर उभें राहिलें असतां सर्व शरीराचा भार खालीं दाबला जातो. अशा वेळीं डोक्यानें मान खालीं दाबली जाते ती मानेची स्थिति.

कुचित-खोर-पात्र—न. कुचेष्टा पहा. –वि. कुचेष्टेखोर, कुचिंद पहा. [सं. कुत्सित]

कुचिद्-खोर, कुचिदा-द्या, कुचनिंद--वि. कुचाळी करणारा; निंदक; खोडकर; बेअब्रू करणारा; टवाळ. [कुचिंदी]

कुचिंदी, कुचनिंदा, कुचुंदी—स्त्री. १ आळ; आरोप; निंदा; बदनामी. २ उखाळयापाखाळया; व्यंग काढणें; कुचनिंदा, कुचविंधी पहा.

कुचिद्या-चिंद्या—स्त्रीअव. हेटाळणी; टवाळी; आळ (विशेषतः लहान मुलांत रूढ).

कुची--स्त्री. (व.) कुंची

कुची—वि. खोटी; लबाडीची; दिखाऊ. ' होती दृष्टी आंत उघडी आमची । बाहेरी ते वायांचि कुची झांकुं । ' –तुगा ३८. [सं. कूट]

कुंची—स्त्री. १ लहान मुलांचें लहान टोपरें; लांब टोपरें; घुगी. २ रंगाऱ्यांचा; चिताऱ्यांचा, डुकराच्या केसांचा मोठा कुंचला. ३ विणकऱ्यांचा सुतास पाजण करण्याचा मोठा कुंचला. [सं. कुच्=संकोच पावणें–कूचे. का. कुच्चु=गोंडा; हिं. कुंची]

कुची भरणें—क्रि. (व.) ठोकणें; मारणें. 'चांगली कुची भरूं कां ?' [ध्व.] **कुच्या**–स्त्रीअव. १(पाडणें या क्रियापदार्शी जोडून) तुकडे करणें, खांडोळी करणें. २ जबर शिक्षा करणें; यथेच्छ कुटणें, या अर्थानें कुच्या ढिल्या करणें. ३ (तोडणें क्रियापदास जोडून) (घोड्याच्या) मांडीच्या किंवा घोटयाच्या शिरा तोडणें. ४ ठोका; ठोसा. ' तुका म्हणे आतां लाज धरी बुच्या । टांचराच्या कुच्या मारा वेगीं । ' –तुगा २९५१.

कुचुंबणें—अक्रि. कोमेजणें. ' कीं शिरसफूल अरुवार क्षणमात्रें कुचुंबी । ' –ह २.१३५. [सं. कुच्=संकोच पावणें]

कुचेदा—पु. (हिं.) कारस्थान; मसलत –शर.

कुचेष्ट(ष्टे)खोर, कुचिष्ट—वि. टवाळखोर; कुचेष्टा करणारा; कुटाळकी करणारा. [सं. कु+चेष्ट]

कुचेष्टा-कुचोदी—स्त्री. कुचिष्टा; कुचिष्टाई; कुचाळी; कुचविदी; विडंबन; निंदा; थट्टा. ' कुचेष्टेवांचून प्रतिष्ठा वाढत नाहीं.' [सं. कुचेष्टा]

कुचो—पु. (गो.) झाडाचा शेंडा. कुंचा पहा.

कुचोद्य—न. १ कुचेष्टा. (क्रि० करणें). २ विकल्प; कुकल्पना; वाईट विचार. (क्रि० काढणें). ३ कुभांडी स्वभाव; कुटिल वृत्ति. ' त्याचे आंगी कुचोद्य आहे. ' ४ **कुचोद्याचें पांखरूं**–कुचेष्टेखोर. [सं. कु+चोद्]

कुच्चा—पु. कुचा पहा.

कुच्ची—स्त्री. (क.) विणकऱ्याचा कुंचला.

कुच्छरोटी, कुच्छ लंगोटी—(हिं.) कांहीं तरी अन्न आहे कांहीं तरी वस्त्र आहे अशी स्थिति; अतिशय विकट परिस्थिति; दारिद्र्यावस्था.

कुज—न. १ क्षितिज. –पु. २ मंगळ (ग्रह). [सं.] **०पंचमी**–स्त्री. शुद्ध पक्षांत मंगळवारीं आलेली पंचमी. ही अशुभ मानतात. [सं. कुज+पंचमी] **०स्तंभ**–पु. १ (अप. कुच स्तंभ) मंगळाची आपल्या कक्षेतील एखाद्या नक्षत्रांत स्थिरता. २ ज्योतिषविषयांतील एक उपयुक्त योग (लौकिक दशेक). [सं.]

कुंज—पुन. लतागृह; गुंफा; वेली वगैरेनीं आच्छादित अशी जाळी; लतामंडप. [सं.] **०भुवन-स्थान**–न. लतामंडप; (क्रीडा वगैरे करण्यासाठीं उपयोगी). [सं.] **०घन**–न. १ कुंजभवन. २ गोकुळांतील श्रीकृष्णाचें क्रीडास्थान. ' हें कुंजवन अशी कल्पना कर. ' –रासक्रीडा ३.

कुंज—पु. १ छपराच्या दोन पाख्यांनी झालेला आढ्याचा कोपरा; चौकटीचा, रस्त्याचा, नदीचा कोपरा. २ छपराच्या कोपऱ्याच्या बाजूनें लावलेली गवताची झडी. [फा. कुंज=कोपरा.]

कुजकट, कुजट, कुर्हट—वि. नासकट; वाशेरा; घुरट, नासलेला (पदार्थ). [कुजका]

कुजकटाण, कुजटाण—स्त्री. कुजलेल्या पदार्थांची दमट घाण, दुर्गंधी. [कुजकट+घाण]

कुजका, कुचका—वि. १ कुजलेला; सडका; नासका; २ (ल.) विश्वासघातकी; खोटा; कुत्सित; कपटी. [सं. कुथ्=कुजणें] **०कवंडळ**–पु. (ल.) कुजक्या मनाचा; तिरसट; मत्सरी; खुनशी (मनुष्य.) **०नासका**–वि. घाणेरडा; निरुपयोगी.

कुजडा--वि. मनाचा कुचकट; मत्सरी; खुनशी. [कुजणें]

कुंजडा—पु. १ भाजीपाला विकणारी एक जात व तींतील व्यक्ति; केवटा. २ कृपण; कंजूष; हलका; क्षुद्र माणूस. [हिं. कुंजडा]

कुजणें—अक्रि. १ खराब होणें; सडणें; नासणें. २ (सोंगट्यांचा डाव) जुग न उठल्यामुळें, सही न झाल्यामुळें व कच्च्या फिरून आल्यामुळें पडलेलें दान सोंगट्यांस लावतां येत नाहीं अशी स्थिति. कुजी पहा. [सं. कुथ्]

कुंजणें—अक्रि. शब्द करणें; गाणें. ' कोकिळा कृष्णवर्णे कुंजती । ' –एरुस्व ३.९. ' विविध पक्षी कुंजती । ' –जै ३.७०. [सं. कुज्=शब्द करणें]

कुर्ज(जां)त्र—न. प्राणघातक यंत्र. ' मज पांता घातैली कुजांत्रें । ' –शिशु ८०१. ' आणि मज अमर करी । न मरेचि शस्त्रास्त्रीं । काष्ठें कुर्जत्रीं । नाहीं मरण ।' –कथा १.२.५०. [सं. कु+यंत्र]

कुजन—पु. वाईट स्वभावाचा माणूस; दुर्जन; नीच मनुष्य. ' न निश्चय कधीं ढळो कुजनविघ्न बाधा टळो । ' –केका ११९. [सं.]

कुंजप्पा—स्त्री. (सांकेतिक) गोफण. –गुजा ४२–४३.

कुजबुज—स्त्री. कुणकुण; हलु हलु बोलणें; अफवा; कंडी. [सं. कुज्=अव्यक्त शब्द करणें; कुज द्वि.]

कुजबुजणें—अक्रि. हलु हलु बोलणें; कुचकुचणें; पुटपुटणें. [कुजबूज, कुज्=अस्पष्ट शब्द करणें.]

कुंजर—स्त्री. एक प्रकारची रानभाजी. ही जोंधळ्याच्या शेतांत व बांधावर उगवते. कोंवळीं पानें व डेंठा यांची भाजी करतात.

कुंजर-रु—पु. १ हत्ती. ' कां जालें आंगधुणें । कुंजराचें । ' –ज्ञा १३.२३२. ' संगात कुंजर मस्त हत्ती । ' –ऐपो ११ [सं.] २ (समासांत) श्रेष्ठ; जसें–पुरुषकुंजर. ३ पक्षी; पिंगळा. [सं.] **०भार**–पु. गजदळ; हत्तींचें सैन्य. **०शौच**–न. गजस्नान. [सं.]

कुंजरडा—वि. कुंजडा अर्थ २ पहा.

कुंजरा—वि. १ एक भाजी; कुंजर पहा. २ भाजी विकणारा; कुंजडा अर्थ १ पहा. ३ कुंजडा २ पहा.

कुंजरी—स्त्री. १ हत्तीण. ' कां लवणाची कुंजरी । ' –ज्ञा १५.३१८. २ गजदळ; हत्तींचें सैन्य. [सं.]

कुजविणें—उक्रि. नासविणें; सडविणें. [कुजणें प्रयोजक]

कुजष्ठाण—स्त्री. कुजकट घाण; सडलेल्या पदार्थाची घाण. [कुजट+घाण]

कुजा-ज्या—पु. १ खुजा, पाण्याचें मातीचें भांडें. २ मडकें; सुरई. [सं. कु+ज ? फा. कुजाह्]

कुजांतर-रु—न. कुयाडें; चेदूक; कुजंत्र पहा. ' कुजांतरू नाहीं ऐसें । जेणें यां पुसेयांची दांतिखिळी बैसे । ' –शिशु ८४४. [सं. कु+यंत्र]

कुंजारीण—स्त्री. कुंजारी जातीची स्त्री.

कुजी—स्त्री. १ (बुद्धिबळांचा खेळ) राजास प्रतिपक्षीय मोहऱ्याचा प्रत्यक्ष शह तर नाहीं, पण शहावांचून मोकळया जागीं खेळावें म्हटलें तर तसें घर मोकळें नाहीं अशी बिनतोड आपत्ति येऊन डाव अडणें. या डावास बरोबरी मानतात. २ (सोंगटयांचा खेळ) सोंगटी खेळावयास जागा नाहींशी होणें [कुजणें]

कुंजी-जिका—स्त्री. किल्ली; चावी. [हिं.]

कुंजी—वि. (व.) मोहोरका; पुढारी. [सं. कुंजर]

कुंजीर, कुंजरु, कुंजुरु—पु. कुंजर-रु पहा. एक वेलभाजी हिला पावसाळ्यांत बारीक फळांचे घोस येतात. फळाच्या बियांपासून गर्द केशरी किंवा पिवळया रंगाचें तेल निघतें, तें खरजेवर लावतात. अफूच्या विषावर या पाल्याचा रस पाजतात.

कुज्या—स्त्री. (ज्यो.) ता-याचा कांतिवृत्ताशीं कोन होतो त्याची ज्या. [सं.]

कुझामिसरी साखर—स्त्री. खडीसाखरेचा एक प्रकार. –कृषि ४८६.

कुट—न. (कों.) धान्यरूपानें यावयाचा हुंडा.

कुट—स्त्री. (गो.) हळकुंड; खुंटली; कुडें.

कुटका-को—पु. तुकडा; मोडलेला कटका (काठी, भाकर, नारळ, दोरी इ० चा). ' कां पाषाणाचिया माथां । हांडी फुटली पार्था । जीवीं तैसे सर्वथा । कुटके जाले । ' –ज्ञा १६.३६८. ' तेथ कुटका एक यावया हाता । ' –एभा १०.३१०. **०तोडून देणें**–स्पष्ट नाहीं म्हणून सांगणें; निक्षून नाकारणें. [सं. कुट्=कापणें]

कुटकी—स्त्री. औषधी वनस्पति; हें लहान झाड हिमालयावर ९ ते १५ हजार फूट उंचीवर विपुल होतें. हें फार वर्षे जगतें. याचें मूळ नरम असून पानें अधंगोल, देंठाकडे बारीक व टोंकाकडे रुंदट, गुळगुळीत, कातरलेलीं असतात. झाडास निळया रंगाचे दाट घोस येतात. कुटकी फार कडू असून बहुतेक ज्वरावर काढ्यांत देतात. –वगु ७.६७. बाळकडू; हें सौम्य रेचक आहे. पाणथरी, जलोदर, कावीळ यांवर उपयोगी आहे. [सं. कटुका; हिं. कुटकी; गु. कडु; बं. कटुकी; का. केदारकटकी]

कुटकी—स्त्री. (कों.) लांकडी ढलपी; तुकडा; काटकी. [सं. कुटट्=कापणें]

कुटकुट—न. अपचन झालें असतां पोटांत होणारा आवाज. ' पोटांत कुटकुटतें. ' [ध्व.]

कुटकुटीत—वि. (गो.) १ पूर्ण न शिजलेला. २ बारीक व सुदृढ शरीरयष्टीचा. [कुटका]

कुटकें—वि. तुटलेलें. [कुटका]

कुटज—न. कुडयाचें झाड. ' हें मोठें नवल अहो लाजविला पारिजात कीं कुटजें ' –मोआदि ३२.७. [सं.]

कुटण—न. (ल.) टोकणें; मारणें; बडवणें; फरमाशी मार देणें; हत्या मार देणें. (क्रि० काढणें; निघणें). [सं. कुट्=कुटणें, कुट्टन; का. कॉट्टण; ते. कोट्टु]

कुंटण—वि. कुंटीण; मध्यस्थ स्त्री; जार व जारिणी यांचा योग घडवून आणणारी स्त्री. [सं. कुट्=कुटणें, निंदा करणें; कुट्टिनी]

कुंटणकी—स्त्री. १ कुंटणीचें काम. २ कुटाळकी; चुगली; चहाडी. **०खाना**–पु. कोणतेंहि घर, जागा वगैरे कसब करण्यासाठीं इतर कोणत्याहि इसमास नेहमीं वापरूं देतात तो. –घका २६०. **०गिरी**–स्त्री. भडवेपणा; वेश्यांस त्यांच्या धंद्यांत मदत करणें व त्यावर निर्वाह करणें. **०मावशी**–स्त्री. चाहाडया सांगून नसत्या कलागती उत्पन्न करणारी स्त्री.

कुटणें—अक्रि. दुःख मानणें; कुढणें. 'हर्षे द्रोण न कोपे पुत्रोत्कर्षे कुटे न कुटिताहि।' –मोद्रोण. [सं. कूट; सीगन कुर]

कुटणें—उक्रि. १ चेचणें; चेचून बारीक करणें; पूड करणें. 'दांभिकता ही हळदी कुटा।' –मुआदि १.६५. २ (ल.) ठोकणें; पिटणें; मार देणें. 'कुटिल प्रजाहि जो गोपीडक तो ब्राह्मणा न कां कुटिल?' –मोविराट ३.५. ३ (ल.) एखाद्या विषयाची सूक्ष्म छाननी करणें; अतिशय चर्चा करणें. ४ (टाळ) वाजविणें. 'तूं कुटतोस कीं नाहीं रोज टाळ?' –नामना ६६. ५ (ल.) बलात्कारानें संभोग करणें. [सं. कुट्=कुटणें, ते. कोट्टु; फ्रेंजि. कुर]

कुटणो—पु. (कु.) लोखंडी बत्ता (कुटण्याचा).

कुटतांवूळ—पुअव. सडतांना कण्या होणारे तांदूळ; कण्या.

कुटतुम—पु. (कु.) काटकोन; गुण्या.

कुटन—न. (व.) दोन चऱ्हाटांच्या जोडावर बांधलेलें लांकूड.

कुटरा—वि. सडतांना कण्या होणारा (तांदूळ). [कुटणें]

कुटला—पु. (राजा.) कुटलेला भाताचा भुगा; कुंडा. [कुटणें]

कुटलेश्वर—पु. (गो.) कुटलाचा, आंगठ्याच्या पेराचा फटका.

कुटळ—वि. (व.) ठोकळ.

कुटा—पु. १ लाह्यांचा चेचा; भुकटी. २ वाळलेल्या मासळीच्या कुटीचा भुगा. ३ (राजा.) फणसाच्या आठळींत मीठ, तिखट घालून केलेला भुगा, पूड. ४ पूड; भुकटी. ५ कारळे तिळांची कुटून केलेली चटणी. [कुटणें]

कुंटा—वि. लंगडा. 'काणाकुंटा व्याधिव्याप्त।' –एभा १३.२०६. [सं. कुण्ठ्=लंगडें असणें]

कुटाई—स्त्री. १ कुटण्याबद्दलची मजुरी. २ कुटण्याची क्रिया. [कुटणें]

कुटाकुटी-कूट—स्त्री. १ ठोकाठोकी; मारामारी; लठ्ठालठ्ठी. 'मीपणा होऊनि कुटाकुटी।' –दावि ३८८. २ वादविवाद; काथ्याकूट; बाचाबाची. ३ (सोंगटया) मन लावून खेळणें; एकसारख्या खेळणें; त्यांत दंग होणें (उपहासानें). [कुटणें]

कुटाणा—पु. (कों. व. क.) त्रासदायक खटाटोप; अनेक उद्योगांचा एकदम अंगावर पडलेला बोजा; त्रास. [कुटणें]

कुटार—न. (खा. व.) धान्य काढलेल्या कणसांचा चुरलेला भाग (यांत डेंगांचीं टरफलें, झाडांचा पाला वेलाचे तुकडे मिसळलेले असतात); कूट. –वशाप ५२.१. [कुटणें]

कुटाळ-खोर—वि. कुटाळकी करणारा; निंदक; बेअब्रू करणारा; उपहास, टवाळी करणारा; कुचेष्टखोर. [सं. कुट्=निंदा करणें; कुटिल; कूट+आळ]

कुटाळकी, कुटाळी—स्त्री. कुचाळी; कुचेष्टा; बेअब्रू.

कुटाळखोरी-गिरी—स्त्री. (कुण.) कुटाळकी.

कुटि, कुटिका—स्त्री. झोंपडी. 'आल्या मोडकळीला कुटिका तुरळक कुटें कुटें असती।' –विक १०१. [सं. कुटी]

कुटिल—वि. १ वांकडें; वक्र. २ (ल.) दुष्ट; निंदक. (समासांत) कुटिलबुद्धि–तर्क–दृष्टि–भाषण–भाषी–स्वभाव. 'तूं मलिन कुटिल नीरस जडहि पुनर्भवपणेंहि कच साच'–मोकचोपाख्यान ५७ (नवनीत पृ. २६८). 'कुटिळ कुचरवादी निंद्य।' –तुगा २२६०. ३ अपकारी; द्वेषी; खोडकर; मत्सरी. ४ कुरळे (केस) 'आइकें कुटिलालकमस्तका। धनुर्वेद त्रिभका।' –ज्ञा १०.२१५. [सं. कुट्=वांकडा होणें, कुटिल=वक्र] **०देह**–पु. व्यंग शरीर; खोडकर, दोषयुक्त शरीर. **०देही**–पु. व्यंगशरीराचा माणूस.

कुटी—स्त्री. झोंपडी; (सामा.) पणकुटी; लताकुटी. 'आणि मनसर्पाची कुटी' –ज्ञा १६.२४३. **०चक्र**–पु. संन्यासी. 'कर्मे त्यागोनि झाला संन्यासी। ज्ञानध्यान नाहीं मानसीं। अग्नालागीं स्वग्रामवासीं। कुटीचक तयासी बोलिजे।' –एभा १८.१७७. [सं. कुटी=झोंपडी]

कुटी—स्त्री. निंदेचें भाषण; निंदा; आळ. 'तर अंगा ये कुटी कवणाचिया।' –भाए ६१३. 'न गणित कुटी बोलती। आइकतां तुज।' –ज्ञा २.२१८. 'पारखियांसी सांगतां गोष्टी। घरची कुटी खातील।' –तुगा १२४. –वि. कपटी; कृत्रिम. 'तों कुटी खगतनू जडावली।' –आशिवि ३२. [सं. कुट्=वांकडें होणें] **०चें बोट**–न. निंदेचा डाग. 'रूपसा उदयलें कुंठ। भावितां कुटीचे बोट।' –ज्ञा १६.१७८.

कुटी—स्त्री. १ वाळलेल्या मासळीची पूड. २ (ल.) (विनोदानें) ठोकणें; मारणें (विद्यार्थ्यांत रूढ). (क्रि० काढणें). 'आज सुटी उर्या कुटी.' [कुटणें]

कुंटी—स्त्री. एक फुलझाड.

कुंटी—१ (बे.) लहान कुळव. २ खुंटी; कापड गुंडाळण्यासाठीं केलेला लांकडी ठोकळा.

कुंटीण—स्त्री. कुंटण अर्थ १ पहा. [सं.]

कुटीमेटी—स्त्री. घरदार.

कुटीर—पु. झोंपडी; लहान घर. [सं.]

कुटीर—वि. कुटरा पहा. [कुटणें]

कुटींघ—वि. कुटलेलें.

कुटीळ—कुटिल पहा.

कुटुंब—न. १ घरांतील माणसें; परिवार; खटलें. २ घरधनीण. ३ सामान्यतः पत्नी; बायको. [सं.; दे. कुअण्डो] सामाशब्द–**०क(का)ड्डी**–वि. कुटुंबाचा भार वाहक; चाकरासारखा राबणारा; घरचा कर्ता, मिळविता. 'ईश्वरीं कानकोंडा जाला कुटुंब काबाडी।' –दा ३.४.४७. **०कलह**–पु. भाऊबंदकी,

गृहकलह. ०कधि–वि. ज्याच्या कुटुंबांतील सर्वच माणसें कवी आहेत असा. ०घात–पु.-संबंध कुटुंबाचा नाश. [सं.] ०घातकी–वि. घरादाराचें वाटोळें करणारा; कुटुंबाचा नाश करणारा. [सं.] ०वत्सल-वाला-वाळा–वि. १ स्त्रीपुत्रांवर फार प्रेम करणारा. २ बायको, मुलेंबाळें असलेला. 'दरिद्री दीन कुटुंबवत्सल तयास द्रव्य देता झाला।' [सं.] ०शारखी–वि. ज्याच्या कुटुंबांतील सर्व लोक शास्त्रसंपन्न आहेत असा. [सं.] –वारी–वि. कुटुंबवत्सल. 'एका जीवा वरी। होतो दोन्ही कुटुंबारी' –तुगा ४०९०.

कुटुंबण—न. (गो.) महसूल ठरवून दिलेली जमीन. [कुटुंब]

कुटुंबॉ—पु. (गो.) एक पक्षी.

कुटुंबी—पु. १ गृहस्थाश्रमी; घरभारी. २ (कों.) दूरचा नातेवाईक; आप्त; चार पांच पिढ्यांचें अंतर गेलें आहे असा सपिंड, सगोत्र, नातेवाईक. [सं.]

कुटुऱ्याची चोळी—स्त्री. (गो.) वेश्या वगैरे स्त्रिया घालतात अशी विशिष्ट प्रकारची, घट्ट बसणारी चोळी.

कुटूर—(गो.) कवडयाचा (पक्ष्याचा) शब्द. [ध्व.]

कुटूरचें—क्रि. (गो.) कवडयाचें (पक्षाचें) ओरडणें.

कुटें—वि. कुबडें; लंगडें. [सं. कुट्=वांकडें होणें]

कुटो—पु. (कु.) मासळीचे खत. कुटी पहा.

कुटूटक—वि. (व.) कुटाळ. ' येथील लोक भारी कुटक आहेत.'

कुटूटक(करण)—न. (नृत्य) उजवा हात उजव्या खांद्यावर व डावा हात डाव्या खांद्यावर ठेवून बोटें खांद्यास टेकणें व दोन्ही पायांचीं बोटें जमिनीवर हलु हलु आपटणें. [सं.].

कुटूटण—न. १ पीठ; चूर्ण. २ कुट्टा; कुंदी; ठोक; मार; मारझोड; पदार्थाची कुटाकुट, चेंचाचेंच. (क्रि० काढणें, निघणें). [सं. कुट्टन]

कुटूटन(चिबुक)—न. (नृत्य) दांत एकमेकांशीं घासणें (भय वाटणें, थंडी वाजणें, रोग झालासें दाखविणें यांचा द्योतक अभिनय). [सं.]

कुटूटनी—स्त्री. कुंटीण. कुट्टण पहा. [सं.]

कुटूटमित—न. सीत्कारादिक चिन्ह कपटानें करणें. 'कपटें सीत्कारादिक चिन्ह जया त्यास कुट्टमित नांव।'–अकक गंगाधर रसकल्लोल २.१३४.

कुटूटरें, कुडतरें—न. (गो.) केसांच्या अंबाडयाखालीं लोंबकळत ठेवण्याचा एक दागिना. ०मांजर–न. (गो.) कुरकुर आवाज करणारें, काळें रानमांजर; ऊद; कांडेचोर.

कुटूटा-ट्टया—पु. १ लाह्यांचें पीठ; तिळांची कुटून केलेली चटणी; पूड; चूर्ण. [कुटणें] २ ठोक; मार; कुंदी. (क्रि० काढणें; निघणें). ' बापानें मला यथास्थित कुट्टा काढून हांकून बाहेर लावलें असतें.' –बाळ २.२४८. ३ घोकंपट्टी. (क्रि० मारणें.) ' घोकंपट्टीची किंवा कुट्टया मारण्याची रीति तयार होते.' –ब्राह्मण व त्यांची विद्या.

कुटूटी—स्त्री. (गो.) सुतारांचें एक लांकडी हत्यार; मोगरी; ठोकणी; पटाशी वगैरे ठोकण्याकडे याचा उपयोग होतो. [कुटणें]

कुटूट्ट—पु. (माळवी) एक उपवासास खाण्यायोग्य पदार्थ.

कुटथाकुटथा—क्रिवि. (व.) हलुहलु; जेमतेम. ' कुटथा कुटथा घरापर्यंत पायीं गेला. '

कुटथाल-ट्थेल—न. (कों. कु.) यथेच्छ चोपणें; बडबडणें. (क्रि० काढणें; निघणें.) [कुटणें+तेल]

कुठचा-ला, कुठील—वि. कोणत्या ठिकाणचा, गांवचा, जागेसंबंधीं ? [कुठें]

कुंठ(ट)णें—वि. (गो.) लंगडणें.

कुंठणें—अक्रि. थांबणें; कुंठित होणें; खोळंबणें; अवरोध होणें, केला जाणें; बंद होणें. 'पाहा पां असमसाहस। जेथ कुंठले निर्देश।' –ऋ १.२४७. ' मग संतुष्टीच्या ठायीं। कुंठे सहजें।' –ज्ञा ४१. [सं. कुण्ठ्=लंगडे असणें]

कुठणें-नें—क्रिवि. कोठून ? कोठपासून ?

कुंठता—स्त्री. अटकाव; प्रतिरोध; प्रतिबंध. [सं. कुंठ्]

कुठपर्यंत-पावेतों-वर—क्रिवि. किती लांब, दूर; कोणत्या मजलेपर्यंत, अंशापर्यंत, पायरीपर्यंत, प्रमाणापर्यंत; कोणत्या काळापर्यंत.

कुंठष(वि)णें—सक्रि. अडथळा आणणें, करणें. 'कां राजाज्ञा अव्यवहारु। कुंठवी जेवीं।' –ज्ञा १८.७३३. [सं. कुण्ठ्]

कुठार—पु. कुऱ्हाड; परशु; लांकडें फोडावयाचें एक हत्यार. 'देत्यें हात चला जी घेत्यें फळभाजना कुठारा या।' –मोवन १३.८९. [सं. कुठार, कुट्ट=तोडणें; द्राविड कुट्ट; इं. कट्]

कुठार—न. कुठार पहा.

कुठाविणें—न. कोठाविणें पहा.

कुंठित—वि. १ थांबलेलें; अडविलेलें; खोळंबविलेलें; खुंटलेलें. २ घोटाळलेला; निरुत्तर; किंकर्तव्यतामूढ. [सं.] ०पत्र–न. कलमाकलमास लबाडी दिसोन आली सबब यापरतें बोलणें नाहीं म्हणून शेरा लेहून घेणें तें. –भाअ १८३२.

कुठून-ठोन—क्रिवि. कोणता देश, काल, प्रमाण, विषय यापासून ? [सं. कुत्र]

कुठें—क्रिवि. १ कोणत्या जागीं, स्थळीं ? 'कुठें जाशी भोगा तर तुझ्या पाठीशीं उभा !'–मसाप ४.४.२७२. २ (मुख्यत्वें जोरानें उच्चारलें असतां) कोठूनहि; कोठेंहि ? ' मी तेव्हांपासून एथेंच आहे, कुठें गेलों नाहीं. ' [सं. कुत्र]

कुठोरा—वि. कोठारी; कोठीवाला. 'चोरा धरितां सांगे कुठोऱ्याचें नांव। दोघांचेहि पाव हात जाती।' –तुगा ३४१५. [कोठी]

कुठोरी—पु. कोठारी. 'चोर कुठोरी एकेचि ठायीं। वेगळें पाहावें न लगे कांहीं।' –तुका ३७२.

कुठोरी—क्रिवि. कोठवर? कोठपर्यंत? [कुठे–वेरी]

कुड—उन्हा. कोंबडया वगैरे पक्ष्यांना हाकून लावण्याकरितां उच्चारावयाचा शब्द. [ध्व.]

कुड—पु. १ [काटक्याकुटक्या व माती यांनीं घातलेली भिंत (बांधू, कारवी इ०ची). 'ठाव नाहीं बुड। घरें वसविसी कुड।' –तुगा १३९३. **म्ह०** कुडास कान ठेवी ध्यान=जपून हुशारीनें कोणतीहि गोष्ट करणें. २ (नाविक) गलबतावरील मालाच्या रक्षणाकरितां व सावलीसाठीं डोलकाठीच्या मागें असलेली सांवळ्यांची झोंपडी. [सं. कुड्य=भिंत]

कुड—स्त्री. (कु.) ज्याच्या अंगांत देव येतो तो माणूस अथवा त्याचें शरीर. कुडी पहा.

कुड–डी—वि. खोटें; बाईट; कपटी. 'तुम्हीं चालिजे हें मत कुड। अपाडू कीं' –शिशु ४८५. 'गीत साळ करी कुडी।' –भाए २२. 'जेवीं रायापाशील कुडमंत्री। राजबळें अधर्म करी' –एभा २३.८९२. 'विवेकें कुडी कल्पना पालटीजे।'–राम ४०. [सं. कूट]

कुंड—न. १ पाण्याची विहीर; झरा; तळी (पवित्र); (चारी बाजूंनीं दगडांनीं बांधलेला) हौद; टाकें; पुष्करणी. २ भांडें; घट; घडा. ३ (व.) कामटीचें तयार केलेलें व हरमुंजी रोगण इ० लावून घट्ट व टिकाऊ बनविलेलें भांडें. ४ कुंडी (फुलझाडांची). 'दवण्याचे कुंड घालोनि।' –ऐपो १५. [सं. कुंड; कुण्ड्=रक्षण करणें]

कुंड—न. पवित्र अग्नि ठेवण्यासाठीं केलेलें व मातीच्या चौरस काठाचें किंवा धातूचें बनविलेलें पात्र, खळगा. **कुंडवेदिका–वेदी**—स्त्री. यज्ञ, होम, हवन करण्याकरितां केलेली वेदी, कुंड. 'कुंडवेदिका विध्वंसोन समग्र। यज्ञमंडप मोडिला।' [सं. कुण्ड्=जाळणें]

कुंड—पु. गोलक या शब्दाखालील कुंडगोलक पहा. [सं.]

कुंडई—न. एक प्रकारचें लोंकर तयार होणारें भात.

कु(कुं)डका—पु. (गो.) तुकडा (कापड, फळ, लांकूड इ० चा). [कुटका]

कुडकॉ–को—पु. (गो.) तुकडा. (कापड वगैरेचा).

कुडकी—स्त्री. १ पुरुषाच्या कानांतील एक दागिना, हा चार मोत्यांचा चौफुलीसारखा किंवा एकाच मोत्याचा चौकडयासारखा असतो. कुडया; एक मर्दानी कर्णभूषण (पुरुष व स्त्रियाहि घालतात खानदेशांत पुरुष घालतात). खालीं बाळी व वर त्याला माळ असून ती कानाच्या टोंकावर जाते. नुसती बाळीहि घालतात. बेळगांव, खानदेश, वऱ्हाड इकडे मोत्यांऐवजीं फक्त सोन्याची बाळीच असते. 'राम म्हणे घालाव्या कुडक्या चारीहि याच कानीं कीं। मुनि भूषवितां भासे मूर्त स्ववृक्ष याचकानीं कीं।' –भोविराट ७.३३.'मुक्ताफळांच्या कुडक्या तयासी।' –शशिसेना.

कुडकी—स्त्री. (व.) जमी; कुरकी. 'घरावर कुडकी आली.'

कुडकुड—स्त्री. १ दांताखालीं कडक पदार्थ सांपडला असतां होणारा कडकड असा आवाज. २ थंडीनें दांत कुडकुडत असतां होणारा आवाज. ३ कुरकुर; पुटपुट; चिरपिर; चिरचिर. 'धिक्कारितां करित कुडकुड।' –दावि ६५. –क्रिवि. थंडीपासून होणाऱ्या क्रियेस लावतात. 'थंडी कुडकुड वाजती.' [ध्व.; सं. कुड्] **कुडकुडणें**–अक्रि. कुरकुरणें; पुटपुटणें; खुरखुटणें; पोटांत गुरगुरणें. **०वाणा–णी**–वि. दुर्मुखलेला; खिन्न; रडतोंडया; नाखरोगी; मुखदुर्बळ; घुम्या. [ध्व; सं. कुड=विकल होणें.]

कुडकुडा–डी—पुस्त्री. (कों.) थंडीनें अंग कांपणें; थंडीची कुडकुडी; कापरें. (क्रि० भरणें).

कुडकुडा–डी–ड्या—वि. १ कुरकुर करणारा; गुरगुर करणारा; कष्टी. 'कुडकुडा झाला कपोता।'–माए ३१६. २ संकोचयुक्त; लज्जित. 'तैसा मी कुडकुडा होतों केशीराजा।' –सेवा न घडे लाजा म्हणऊनि।' –तुगा १५३८. ३ दुःखी; कष्टी. 'होताती सर्वस्वें कुडकुडी। तितुकेंच कार्य त्यांचें।'–दा ३.२.३८.

कुडकुडीत—वि. कुरकुरीत; कुरकुर आवाज होणारा(पापड, धान्य).

कुडकुडो—पु. (कु.) थंडीचा ताप; हिवताप. [कुडकुडणें]

कुडगा—पु (कु.) (शेती) भात लावण्याकरितां तयार केलेला जमिनीचा तुकडा. [कुटका]

कुंडगोलक—पु. सधवेचा जारज पुत्र. 'पत्यौ जीवति कुंडःस्यान्मृते भर्तरि गोलकः।' –मनु ३.१७४.

कुडघई—स्त्री. (कों.) लहान व बारीक, दुबेळक्यासारखी कुडांत घालण्याची मेढ. [कूड+गई]

कुडचा—पु. एका हाताची ओंजळ; पसा.

कुडचांफॉ—पु. (गो.) खुरचाफ्याचें झाड.

कुडची—स्त्री. (खा.) सद्रा; पैरण; कुडतें. [फा. कुर्ता=खमीस]

कुडची–कुट्टी—स्त्री. (गो.) लाकडी घण; मोगरी.

कुंडजार—पु. ब्राह्मण स्त्रीस जारापासून झालेला पुत्र. कुंडगोलक पहा. –महिकथा २१.१५.

कुडण—न. १ कुंपण; वई. 'दूतीं याच्या मुखा केलेंसे कुडण। वाचे नारायण येऊं नेदी।' –तुगा ३५७. २ आवाड; वाडगें; परसूं; परडें. ३ कुंपण, वई घालण्याची क्रिया. [सं. कुडय=भित] **कुडणावळ**–स्त्री. कुंपण घालण्याची क्रिया व तिची मजुरी.

कुडणें—उक्रि. १ कुंपण घालणें; भितीसारखा कूड घालणें. २ बंद करणें; बुजविणें (रस्ता, मार्ग). ३ कैदेंत टाकणें; बंदींत टाकणें, घालणें. ४ अडथळा, आडकाठी, अवरोध करणें. ५ (ल.) दाबणें; दडपणें; ओशाळणें. ६ मनांत कुढणें; तळमळणें; खेद मानणें; खिन्न होणें. ७ अवटणें; दुखणें; ताठणें (पुष्कळ वेळ एके ठिकाणीं बसल्यानें शरीर, अवयव इ०). [सं. कुण्ड्=रक्षण करणें; कुडय=भित]

कुडत(ता)न—न. छत्तीस अथवा बेचाळीस कवळयांचा विडयाच्या पानांचा गठ्ठा (पांचशे पानांची एक कवळी) [फा. कुर्ता]

कुडतरणें—क्रि. (माण) कुरतडणें.

कुडता—पु १ कुरका; तुकडा. २ कुडचा पहा.

कुडता-ती-तें-कुडताण—कुडतें पहा.

कुडताळ-ळा-ळें—न. संकुचित, अरुंद जागा. –वि. अरुंद; संकुचित (जमिनीचा तुकडा). [कुडता] **०ळयांत येणें**–संपुष्टांत येणें (धंदा, व्यापार).

कुडती—स्त्री. १ उंची; जाडी (क्षेत्रफळासंबंधीं). –क्रिवि. २ उंचीच्या अनुरोधानें, जाडीच्या अनुरोधानें कडीपाटाची कडी वगैरे (वस्तु). (क्रि० लावणें; बसवणें; ठेवणें).

कुडती—स्त्री. जाकीट; कमरेपर्यंतचा कोट. [फा. कुर्ता]

कुडती—स्त्री. १ परटाची मोगरी, ही लांकडी असते. २ (कु) (सुतारधंदा) किंकऱ्याची ठोकणी ३ (कों.) चौरस लाकडी ठोकळा; जातें इ० ना उपयोगी. [सं. कुट्ट=कुर्णे; कुट्टी पहा]

कुडतुडणें—सक्रि. कुरतुडणें.

कुडतूम—पु. (कु.) गुण्या; काटकोन (सुतारांचा).

कुडतें—न. (खा. व.) सद्रा. [फा. कुर्ता=सदरा]

कुडथळ—स्त्री. जिला पाटाच्या पाण्याची सोय नाहीं अशी जमीन.

कुडथळ—न. (शेतजमीन) अपुरी जमीन; ठिकें; दळें नोंदणी केलेल्या प्रमाणांत कमी येणारी जमीन. [कुडता] **–ळीबिघा**–पु. लहान बिघा; पूर्ण बिघ्यापेक्षां थोडा कमी बिघा. (सामान्य बिघा वीस पांडांचा).

कुडनाडया—वि. (माण.) भूत; समंध इ० नां कोपविणारा व शमविणारा (मांत्रिक) [सं. कूट+नाडी]

कुडपण-र्णे—न. लहान, जाड काठी; दांडु; लांकूड; हात-दीड हात लांब व मनगटाइतका जाड लाकडाचा तुकडा. [कुटका]

कुडपर्णे—अक्रि. १ अवठरणें; मुरडणें (पानें इ०). 'सर्वांची पानें कुडपून गेलीं.' –मराठी ६ वें पुस्तक पृ. २४३.२ आकृत्ति २ टाकणें; सोडणें. 'कुडपियला देस आतां करूं नका बळ।' –ब ६०४. 'कुडपीयेला देश आतां येऊं नेदी दुसरी।' –तुगा २९८.

कुडबुड-डां—क्रिवि. कुडबुडयाच्या आवाजासारखा (आवाज). [ध्व.]

कुडबुडणें—अक्रि. १ कुडबुड आवाज करणें (कुडबुडयाचा) २ (ल.) अस्पष्ट रीतीनें बोलणें; कुरबुरणें [ध्व.]

कुडबुडा-मुडा-मुडथा जोशी—पु. हातात कुडबुडें घेऊन भविष्य सांगून भीक मागणाऱ्या जोशांची (अब्राह्मण) एक जात व त्यांतील व्यक्ति.

कुडबुडें—न. डौराहून लहान वाद्य; जिच्या टोकास चिकण मातीची किंवा मेणाची गोळी बसविलेली आहे अशी दोरी मध्यभागीं बांधलेली आहे असें एक चर्मवाद्य. हें सरवदे, कुडबुडे जोशी, पांगुळ, भिक्षेकरी हातांत घेऊन वाजवीत भिक्षा मागतात. [ध्व.]

कुडमुड—स्त्री. (ना.) काकडीची किंवा मुळयाची कोशिंबीर.

कुडय—स्त्री. (कु.) एक जातीचें भात.

कुंडय, कोंडय—स्त्री. (गो.) शिंपी (जात).

कुंडल—न. १ कानांतील एक दागिना. २ वलय; कडें (धातूचें). [सं.]

कुंडला—पु. तपकीर घोटण्याचा दगडी अथवा मातीचा खल. –न. (कु.) मातीचें भांडें. [सं. कुंड+ल]

कुंडलिनी—स्त्री. (योगशास्त्र) शरीरांतील मणिपूर चक्राचे ठिकाणीं सर्पाच्या आकृतिरूपानें राहणारी प्राणरूप शक्ति. 'शक्ति करी उजगरा। कुंडलिनीये।' –ज्ञा ६.२२१. [सं.]

कुंडली-ळी—स्त्री. १ सूर्य, ग्रह, नक्षत्र यांची दशा दाखविण्याकरितां चौरस, त्रिकोनी अथवा वर्तुळाकार भाग पाडलेली आकृति. हिचे तनु, धन, सहज, सुहृत्, सुत, रिपु, जाया, मृत्यु, धर्म, कर्म, आय, व्यय असे बारा भाग किंवा कोष्टकें असतात; राशीचक्र. २ प्रक्षिप्त वाक्य दाखविण्यासाठीं काढलेला कंस व इतर रेषा. ३ (गो.) लहान कुंडी. ४ (खा.) वर्तुळाकार व मध्यें भोंक असलेली चापट चक्ती, (भोंक पाडण्यासाठीं). ५ कुंडलिनी पहा. 'हें असोतें कुंडली। हृदयांभातु आली।' –ज्ञा ६.२७४. –पु. सर्प. 'त्या मणि प्रकाशीत वारुळीं। वैसले किती थोर कुंडली।' (नवनीत पृ. ४२१.) कडी, वर्तुळ, वेटाळें व यांसारख्या इतर अनेक वस्तू. –वि. ज्याच्या कानांत कुंडलें आहेत असा. [सं.]

कुडव—पु. १ (कु. गो.) सामान्यतः आठ शेर अथवा दोन पायलींचें माप. देशावर आठ पायली धान्याचें माप; कोंकणांत राजापुराकडे चार पायली; २ एक प्रस्थाचा एकचतुर्थांश; एक पक्का पावशेर. –अश्वप १.१३०; पातळ औषधें मापण्याकरितां मातीचें, कळकाचें, लाकडाचें किंवा लोखंडाचें, विस्तारानें व उंचीनें चार अंगळांचें भांडें. –योर १.३८. 'तो निजबोधाचें कुडवाकारीं। भरील वखारी श्रवणाच्या।' –एभा ३.८७३. [सं.] **०भरणें**–(कु.) माप भरणें, पूर्ण होणें; मरण ओढवणें. **म्ह०** मेल्या म्हशीस कुडवभर दूध.

कुडवली—स्त्री. १ (हेट.) भात शिजविण्याचें मडकें. २ (कु.) एक प्रकारचें मडकें. [सं. कुंड]

कुडवळ—पु. (गो.) एक पक्षी.

कुडवा—पु. भिंतीच्या तळाचा कंगोरा; निराळ्या रंगानें दाखविलेला वीतभर उंचीचा भाग. (क्रि० घेणें; ठेवणें.) **०घेणें**–(व.) जमीन सारवतांना जमिनीपासुन कांहीं उंचीपर्यंत भिंत सारवणें. [कूड]

कुडवाळी—पु. (गो.) कुळवाडी अप. 'ठिकठिकाणीं दिसणारे कुडवाळयांचे समाधानी वसाधेभोळे चेहरे...'–सह्याद्रीच्या पायथ्याशीं १२०.

कुडवी—पु. कुडव पहा. **०भारा**–पु. झोडलें असतां कुडवभर भात निघेल अशी पेंढी.

कुडरू—न. समुद्रकांठच्या डोंगरांतील कुरण.

कुडसर—स्त्री. (कों.) नाचणी (धान्य). –कृषि २८४.

कुडसारो—पु. (कु.) कापणीनंतर राहिलेले भाताचे सड; धस.

कुडा—पु. हें रानझाड सह्या–सात हात उंच असून पान बदामाच्या पानासारखें लांबट असतें. याच्या विडया करतात. शेंग बारीक व लांब, असून बीं लांबट यवासारखें व कडू असतें, मुळांचा औषधीसारखा उपयोग होतो. त्याच्या पाकास कुडेपाक म्हणतात. कुडयाच्या पांढरा व काळा अशा दोन जाती आहेत. बीची उपधान्यांत गणना होतें. तें कृमिनाशक आहे. कोंवळया शेंगांची भाजी करतात. [सं. कुटज]

कुडा—पु. १ भाताची एक जात. २ स्त्रियांच्या कानांतील एक दागिना; कुडें.

कुडा—वि. १ दुष्ट; शबल; कपटी; विश्वासघातकी. 'विवेकें कुडी कल्पना पालटीजे' –राम ४०. २ (काव्य) वाईट; खोटा (पैसा). 'कुडा आपुला दाम अस्तां पराशीं। वृथा भांडणें ख्यात हे गोष्ट कैशी।' –हरिराज मुद्रलायांचे भाषांतर ४७ (अकक). ३ (काव्य) मिथ्या; अशुद्ध; खोटा; वाईट, नुकसानकारक, चुकीचा. 'नृपातें कुडा मंत्र योजावयातें।' –वामनविराट ७.१३०. 'तैसी विषयेसुखाची गोडी। गोड वाटे परी ते कुडी।' –दा ३.१०.६७. [सं. कूट] **०भाव**–पु. द्वेष; मत्सर; अविश्वास; संशय; कपट; दुष्ट कल्पना; विकल्प.

कुंडा—पु. (गो. हेट.) धान्याचा कोंडा; भूस.

कुंडा—पु. १ मोठी कुंडी (फुलझाडाची, चांभाराची कातडें भिजत घालण्याची, रंगाऱ्याची); उंसाच्या रसाचें मांदण; भांग, तपकीर इ० तयार करण्याचें पात्र. 'जवळच वटवृक्षाची डहाळी लावलेला कुंडा ठेवला असतो. –ऐरापुप्र ८.४४५. २ माडी काढण्यासाठीं माडाला बांधलेला भोपळा. [सं. कुंड]

कुडाक—न. (गो.) कानांतील कुडें (सोन्याचें अगर हिऱ्या–मोत्यांचें); अव. कुडकां. [कुंडल]

कुडाण—न. (कों.) कुडण; गुरांचा उन्हाळी गोठा; कुडलेली जागा. **०करणें**–(कु.) कुंपण घालणें; झांकणें. [कूड]

कुडाण—न. (कु.) ढोल वाजविणें.

कुडामेढीचा—वि. कुड व मेढी यांचें; चंद्रमौळी; फाटकें तुटकें; मोडकेंतोडकें (खोपट, झोपडी, वाडा). [कूड+मेढ]

कुंडाळें—न. (माण.) पातेल्यासारखें मातीचें भांडें. [कुंड]

कुडावा—पु. १ (काव्य) कूड; कार्वी, झिलप्या वगैरेवर माती लिंपून केलेली भिंत. [कुड] २ (ल.) रक्षण; थारा; पाठपुरावा. 'करी संकटीं सेवकाचा कुडावा।' –राम ६७. 'धावोनि त्यांचा करी कुडावा।' –निगा ११८. 'तैं कुडाविला जाणा कंस। पति तुमचा।' –कथा २.२.५१. [सं. कुण्ड=रक्षण करणें]

कुडावा—पु. (कु.) एक खाण्यास योग्य पक्षी.

कुडावेडा—वि. दुष्ट हेतूनें वेड पांघरणारा. [कुडा+वेडा]

कुडाळ—पु. एक प्रांत. हा कोंकणांत सावंतवाडी संस्थानांतील एक तालुका आहे. **०देश**–(प्राचीन रचना) उत्तरेस देवगड तालुका, दक्षिणेस गोंव्यांतील पंचमहाल, पूर्वेस सह्याद्री, पश्चिमेस अरबी समुद्र. हा प्रांत. –आयगौडब्राह्मण, वर्ष २, अंक ३–४. पृ. ३०. **–चा संत**–पु. कुडाल कोटांत जोगण प्रभु पडला तो; त्या स्थळास ब्राह्मण असेंहि म्हणतात. **०देशकर ब्राह्मण**–पु. या प्रांतांतील आयगौड ब्राम्हण. **०माप**–या देशांतील विशिष्ट माप, कोकणांतील सर्वसामान्य मापापेक्षां हें निराळें आहे. चार शेर=एक पायली, दोन पायल्या=एक कुडव, वीस कुडव=एक खंडी, चार खंडी=एक भरा.

कुंडिका—स्त्री. पाणी भरण्याचा लांकडी माठ

कुंडिया—पु. दुध्या भोपळ्याचा एक प्रकार. ज्यास कमंडलूच्या आकाराचें फळ येतें असा भोपळा.

कुडिया, कुड्या—पु. (ना.) जनावरानां होणारा एक रोग; मानमोडी; फेपशा.

कुडी—स्त्री. १ झोंपडी. यावरून, २ देह; शरीर; आत्म्याचें घर; (रागानें किंवा निंदेनें) कलेवर; प्रेत. 'कुडी वाढे कुबुद्धि वाढे.' –दा १५.९.७. 'दिली कुडी टाकोनी.' –तुगा ३६१. 'कुडी साहेबाची घेऊन.' –ऐपो १४७. ३ लांकडाची झिलपी, ढलपा. ४ वनस्पतीच्या मुळाचा लहानसा तुकडा, अंकुर (सुंठ, गाजर, लसूण, हळद, आलें यांच्या कांद्याचा). ५ एक प्रकारची पाभर. ६ भाताचें काड; काटकुटी. ७ कोडी; वीस संख्या. ८ (वे.) पालखी. ९ (कु.) गवताची गंजी. [सं. कुटी; कुडी=देह] **कुडींत जीव धरून रहाणें**–१ मरणोन्मुख होणें. २ कसें तरी जगणें. **०तशी पुडी**–शरीर तसा आहार.

कुंडी—स्त्री. १ भांग, तपकीर घोटण्याचें भांडें, पात्र. २ फुलझाडें लावण्याचें मातीचें भांडें. ३ स्नानाकरितां, धुण्याकरितां पाणी सांठविण्याची दगडाची अगर लांकडाची मोठी डोणी. ४ (कों.) (सोनारी) पाणी ठेवण्याचें भांडें, पातेलें. ५ (आठ्यापाठ्या) कोंडी पहा. ६ (ना. गोंडी) चौघडा (नागपूर येथील अजबखान्यांत गा नांवाचें वाद्य आहे). [सं. कुंड]

कुडु(डू)क—पुन. १ सोन्याच्या तारेंत मोतीं गुंफून केलेला कानांतील एक दागिना. २ (ल.) एक झाड व त्याचें फळ.

कुडुकें—न. (माण.) धान्य सांठविण्याचें लहान कणगुलें. [कूड]

कुडुपणें—न. १ पुराणें; दांडकें; होलपाटा; सोडगें. २ ठेंगणा व मजबूत, धट्टाकट्टा, काटक माणूस.

कुड्डक-घाणा-चाणी—वि. खिन्न; खट्टू; रडतोंडया; असंतुष्ट; मलूल. 'त्याची मर्जी कुड्डकवाणी झाली.' [सं. कूट]

कुडें—न. १ कुडी अर्थ ४ पहा. २ कुडा. कुडुक अर्थ १ पहा. ३ द्वेष; मत्सर; संशय; अविश्वास. ४ कपट; दुष्ट व्यूह; वाईट कचाट; कुलंगडें. 'ज्याचें कुंड त्याजपुढेंच राहे.' –सारुह ८.४८. 'वाटे कुडें म्यां केलें.' –जै १.५३. ५ (ल.) संकट. 'निर्दाळावा तरी कैसें रीतीं। तयाच्या भक्तीस मैनावती। आहे तरी राजयाप्रती निवेदावें कुडें भावें.' –नव १४.१५०. –वि. खोटें. 'जैसें कां कुडें नाणें। खऱ्याचेनि सारखेपणें.' –ज्ञा ४.८६. **०पावडें-कपट**–न. १ दुष्ट विचार; अंतस्थ बेत; कारस्थान. 'नावडीची साखर आळणी आसे काही कुडेपावडे.' –सला ७५. 'माझ्या मनांत कांहीं कुडें पावडें नाहीं.' २ जादूटोणा; मंत्रतंत्र; जादू; चेटूक; कुवेडें. ३ छक्केपंजे; दुष्ट कारस्थान; कावा. [कुडें द्वि] **०शहाणपण**–न. कावेबाजपणा; कुटिल धूर्तता.

कुडेपाक—पु. कुडयाच्या पाळाचा तयार केलेला पाक. हा औषधोपयोगी आहे.

कुंडेपास्ट—वि. (गो.) कोंडयापेक्षां कमी दर्जाचा.

कुंडो—पु. (कु.) कोंडा.

कुड्डा-कुड्डो-कुरडो—१ (गो.) आंघळा. २ (शोभेची दारू) खापरी पेरें; शोभेच्या दारूचें झाड वगैरेस असलेले दारू भरलेलें खापरी नळकांडें.

कुड्डी—स्त्री. (वे.) (सोंगटयांचा खेळ) उडतपगडें या डावांत फाशांच्या एका दानास हें नांव देतात.

कुड्डुबकें—न. (गो.) बगळयाच्या जातीचा एक पक्षी.

कुड्डुक—स्त्री. (गो.) एक प्रकारची भाजी.

कुड्मळ-मुळ—पु. कळा; उमलणारी कळी; कमळ. 'ऐक्य भावाची अंजुळी। सर्वेंद्रिय कुड्मुळीं।' –ज्ञा १५.२ [सं. कुड्मल]

कुडया-ढया—वि. कुढणारा; मनांतल्या मनांत जळणारा; घुम्या. [कुड(ढ)णें]

कुंडया—पु. कुंडा; मोठी कुंडी

कुडयाठ-कुर्याट—न. (कों. राजा.) डोंगराच्या उतरणीवरील भातशेतीचीं खाचरें; हीं सुमारें १०।१५ हात रुंद व १५।२० हात लांबीचीं असतात. ह्यांत भात वगैरे पिकें करतात.

कुढंग—पु. लुच्चेगिरी; खोडी; चाळा; टवाळी. [सं.]

कुढणें—अक्रि. मनांतल्या मनांत त्रासणें; खेद पावणें; घुमेपणानें रागावणें; कष्टी होणें. 'परी या कृपेच्या वोरसें। कुढावयाचेंचि पिसे।' –तुगा १९०२. [हिं. कूढ (ना); का. कुडि=कढणें; सं. कुष्ट–कुट्ठ–कूढ; गु. कूट (वुं)]

कुढा-ढया—वि. मनाचा कुढा; कपटी; खोटा; खिन्न; कुरठा; मत्सरी.

कुढाण—स्त्री. कजकट घाण.

कुढापा—पु. १ मत्सर; द्वेष; संताप; चुरस. (क्रि० धरणें; ठेवणें; करणें). २ मनांतल्या मनांतील जळफळ, तळमळ. (क्रि० धरणें; करणें). [कुढा]

कुढावणें—सक्रि. रक्षण करणें. [सं. कुण्ड्=रक्षण करणें]

कुढावणी—स्त्री. विवेचन; स्पष्टीकरण. 'आपुलिया स्वरूपाची कुढावणी। करिते झाले स्वानंदें।' –स्वानु १२.४.८५.

कुढावा—कुढावा अर्थ २ पहा. 'तुका म्हणे देवा माझा करावा कुढावा।' –तुगा ११८८.

कुढें-पावडें-कपट-शहाणपण—कुडें–पावडें पहा.

कुणकुण—स्त्री. १ हळू आवाजांत बोलणें; गुणगुणणें; पुटपुट; गयावया करणें. २ अफवा; उडत बातमी. (क्रि० करणें; लावणें) [ध्व. सं. क्वण्=शब्द करणें]

कुणकुणणें—अक्रि. कुजबूज करणें; हळु हळु बोलणें; गयावया करणें. [ध्व. सं. क्वण्=शब्द करणें]

कुणकुण्या—वि. कुरकूर करणारा; गुणगुण करणारा; गयावया करणारा. [कुणकुण]

कुणगा—पु. १ कुटुंबांतील पैशाचे बंधु इ० जे अनेक अधिकारी त्यांतील एकानें इतरांस न समजूं देतां चोरून सांठविलेला पैसा, द्रव्य; गुप्तधन. २ धोतराचा सोगा; कासोटा. ३ (कों.) भोंवतीं बांध घातलेला भातशेताचा एक भाग. (बे.) शेतांतील वाफा. [का. कुंगु=निःशब्दता, शांतता]

कुणगी-गो—स्त्रीपु. (कु. गो.) शेताचा एक भाग, तुकडा. 'येक कुणगो पेरची उरला.'

कुणगेकरी-दार—पु. ज्यानें कुणगा केला आहे असा माणूस. [कुणगा+करी+दार]

कुणज—न. एक वनस्पति-नामको.

कुणट—न. (कों.) पोह्यांतील बारीक कण; तूस. [सं. कण]

कुणप—न. १ प्रेत. 'तिचें आलिंगून कुणप । रुरु करी दीर्घ विलाप ।' –पांप्र १.१५८. २ देह. 'हें कुणप त्रीधातुक' –ऋ ५३. [सं.]

कुणबट-ड—पु. १ कुणबी या शब्दाचें निंदाव्यंजक रूप. २ शेतकरी. 'बळिभद्र हा कुणबट । केली चोखट रणभूमी ।' –एरुस्व १०.७६. 'तरि त्या सेतीचा कुणबटु बरवा ।' –दावि ३५०. ३ अडाणी. 'कुणबट कुळवाडी । तैसा आन आन देवमांडी ।' –ज्ञा १३.८११.

कुणबाऊ—वि. कुणब्यास योग्य; कुणब्याप्रमाणें ओबडधोबड; ग्राम्य; खेडवळ (रीत); हलकें; भिकार; दरिद्री (कपडा, पोषाख इ०) [कुणबी]

कुणबाव-बावा, कुणबावा—पु. १ कुणब्याचें काम; शेती; शेतकी. 'कुणबाव निर्मिला देवांनीं' –दावि ३४७. २ सरकाराला ठराविक रक्कम–सारा देण्याचें कबूल करून वंशपरंपरा जिंदगीप्रमाणें धारण केलेली वतनी जमीन, अशा तऱ्हेची पद्धत; अशा जमिनीचा बाबयाचा धारा. [कुणबी]

कुणबावेदार—वि. कुणबावा करणारा.

कुणबी—पु. कुणबावा करणारा; शेती करणाऱ्या जातीपैकीं एक; शेतकरी; शेतीचा धंदा करणारा. **म्ह०** १ कुणबी इलया इतका उजू. २ कुणबी मेला भुतानें, ब्राह्मण मेला वातानें, सोनार मेला पित्तानें. ३ कुणब्यासारिखा दाता नाहीं, कुटल्यावांचून वेत नाहीं. ४ कुणबी सारिखा दाता नही आणि मारे बिगर देता नही. [सं. कुलपति, कुळंबी, कुणबी] **०द्रोक**–वि. (शूद्रोदक या संस्कृत शब्दाच्या अनुरोधानें बनविलेला शब्द) =कुणब्यानें आणलेलें, स्पर्श केलेलें, उपयोग केलेलें (पाणी, भांडें, कोणतीहि वस्तु). [कुणबी+उदक] **०माळी**–पु. शेती करणाऱ्या सर्वसामान्य लोकांसंबंधीं शब्द; शेतकरी लोक; खेड्यांतील लोक. **०हिशेब**–पु. कुणबाऊ हिशेब खेडवळ, हेंगाडा, ठोकळ पद्धतीनें केलेला हिशेब (खड्यांनीं, बोटें चालून इ० केलेला).

कुणबीक—स्त्री. कुणब्याचें काम; शेतकाम. 'जातिधर्म, आनुवंशिक संस्कार यांचे जोरावर कुणब्यानें निरक्षर असतांहि कुणबीक पूर्णत्वाला नेली.' –गांगा १८६. [कुणबी]

कुणबीण—स्त्री. १ कुणब्याची बायको. २ दासी; मोलकरीण.

कुणभवा-भावा-भवेदार—कुणबावा वगैरे पहा.

कुणी—न. १ (राजा.) द्विदल धान्यांतील हलका दाणा; –स्त्री. २ लांकडाची मेख; खुंटी; पाचर; चाकाच्या आंसाची खीळ; शेतकऱ्याच्या अनेक उपकरणांतील खुंटी; खीळ. ३ (बे.) जमिनींत लहानसा खळगा करून त्यांत कांहीं अंतरावरून सागरगोटे, सुपाऱ्या, चिंचोके, दिडक्या वगैरे टाकून खेळतात तो खळगा. [?]

कुणी-कुण्णी—सना. कोणीहि. 'कोणाला न पुसे कुणी ।' –विक १२.

कुणे(ण्ये)ट—न. (कों.) कुणट पहा.

कुणो—पु. (गो.) कोंडा.

कुण्णाटी, कुण्णाठी—वि. (गो.) हेवेखोर.

कुण्णाठाय—पु. (गो.) हेवा.

कुत—न. (गो.) भिंग.

कुंत—पु. भाला. 'करीं घेऊनियां कुंत । म्लेंच्छ संहारीन सत्य ।' –ह ७.२२३. [सं.]

कुतका—पु. १ भांग घोटण्याचा वगैरे बत्ता. २ (ल.) धक्का; दबका; ठोसा; तडाखा. ३ सोटा. 'तमाम पागे पतके वेरोजगारी घेऊनि कुंतके ।' –ऐपो २५२.

कुतकुल्या—स्त्रीअव. (कु.) गुदगुल्या.

कुतंगळ-ळू, कुतुंगळ-ळू—न. (ल.) पंढ; क्लीब; नपुंसक. –वि. १ नाजूक; अशक्त; दुबेल (मनुष्य, पशु). २ (माण.) आळशी. **म्ह०** घर कुतुंगळु कणगीला पडलें डुर्ऱ्हे=घराण्यांतील माणसें अशक्त दुबेल आहेत तरी खाण्यांत हुशार आहेत या अर्थी.

कुतडा-डें—पुन. (राजा. व.) ज्वरादिकामुळें काम करण्यास असमर्थ अशा माणसास निंदेनें म्हणतात; जिवावर आलेली गोष्ट; 'तूं गेलास तर काम होईल पण तुला तर कुतडें आलें आहे.' [कुंथणें] **०भरणें**–चुकारतट्टपणा करणें. 'तुला कुतडा भरला काय ?'

कुतनी—स्त्री. गर्भरेशमी व पट्टे असलेलें कापड. 'कुतनी कनकाचळ गुजैरिचे कटिबंध सुशी तिवटे पटणी ।' –किंशुक २८. [अर. खुत्न]

कुतप–तूप—पु. सूर्योदयापासून आठवा मुहूर्त; मध्यान्हकाळ; पितृयज्ञ करण्यास योग्य वेळ. [सं. कुतप]

कुतरओढ-तोड-चोढ—स्त्री. (निरनिराळीं कामें किंवा कर्ज यांच्या भारामुळें झालेला) त्रास; दगदग; तारांबळ; तिरपीट; त्रेधा. [कुत्रा+ओढणें]

कुतरघाई—स्त्री. १ तांतडी; लगबग; पराकाष्टेची घाई. (क्रि० करणें; लावणें; मांडणें). २ उतावळी; गरी; घाई, धांदल; (क्रि० करणें; होणें.) [कुत्रा+घाई]

कुतरझाड-मूत (वगैरे)—कुतर या शब्दाच्या समासाबद्दल 'कुत्र्याच्या' या शब्दामध्यें पहा.

कुतरा-री-रें—कुत्रा-त्री-त्रें पहा.

कुतर्क—पु. वाईट कल्पना, बेत, विचार; मूर्खपणाची कल्पना, मसलत, युक्ति, बेत. [सं. कु=वाईट+तर्क=कल्पना]

कुतर्की—वि. कुतर्क लढविणारा; कुकरांडी.

कुतर्ल—न. (गो.) कापलेलें पीक ठेवण्याची जागा.

कुंतल—पु. केंस. 'मस्तकींचे नील कुंतल।' –एरुस्व ७.८. [सं.]

कुतांब—पु. (गो.) बंडी; कोट. [पो. तुल; इं. कोट]

कुती—स्त्री. पेटी; पेटारी. 'अंगुराची कुती' –दिमरा १.१०१. [तु. कूती]

कुंती—पु. भाला धारण करणारा योद्धा; भालाईत. 'जीस असुख सल्य गमे दे जें भेदूनि हृदय कुंती तें' –मोउद्योग ७.४३. –स्त्री. पांडवांची माता. 'विदुराति भेटल्यावरि भेटे सर्वांसराज कुंतीतें।' –मोउद्योग ७.४३.

कुतुक—न. कौतुक. 'जें कांहीं करिन कुतुक तें देखावें दुरूनि नयनांहीं।' –मोभीष्म १०.३७. [सं. कौतुक]

कुतुंगल-ळ—वि. कुतंगल-ळ पहा.

कुतू—पु. मुलांच्या भाषेंत कुत्र्यास म्हणतात.

कुतूहल—न. नवल; कौतुक; क्रीडा; कर्मणूक. [सं.]

कुत्त—न. (बे.) संकट. [का.]

कुत्तरचाल—स्त्री. कुत्र्यासारखें जवळ जवळ पाय टाकून जलदीनें चालणें.

कुत्ता—पु. (हिं.) कुत्रा. 'कुत्ता जाने चमडा जाने' –धर्माजीरावाचें कुटुंब १६४.

कुत्तेखानी-खाशी-खासी-घशी-घाशी—स्त्री. (हिं.) १ हां जी हां जी; लांगुलचान. २ हलक्या दर्जाचें काम; काबाडकष्ट; थोडघा लाभासाठीं केलेली निकृष्ट चाकरी.

कुत्तेमल्हार—न. (हिं) बेसुमार गाणें; वाईट गाण्यास हा शब्द लावतात.

कुत्तेवाघूट—न. तरस; कुत्र्याचा वाघ (कारण तो कुत्रे लांबवतो).

कुत्तेवान—पु. १ (हिं.) श्वानाध्यक्ष; कुत्र्यांची व्यवस्था पाहणारा अधिकारी. २ शिकारी. 'कुत्तेवान चित्तेवान। साकरवानी पहिलवान।' –नव ११.६८.

कुत्रा—पु. १ श्वान; सारमेय; कुक्कुर; सर्व चतुष्पाद प्राण्यांमध्यें कुत्रा हें मनुष्याशीं संबंध असलेलें एक महत्त्वाचें जनावर आहे. हा माणसाळलेला प्राणी आहे. कुत्रा चोर व परकी माणसें यांपासून घराचें रक्षण करतो. शिकार करण्याच्या कामीं त्याचा उपयोग होतो. २ (ल.) वाईट, हलकट माणूस. ३ चित्तारू नांवाचा-एक मासा. [प्रा. कुत्त-कुत्ती] **कुत्री**—स्त्री. १ शुनी; सारमेयी; कुत्र्याची मादी. २ एक औषधी वनस्पति व तिचें बोंड, हिच्या फुलास व पानास वाईट वास येतो. कांहींच्या मतें लोखंडी नांवाची वनस्पति. **कुत्रे**—न. १ कुत्रा-त्री. २ (ल.) भांडखोर व शिवराळ माणूस. ३ राहाट थांबविण्यासाठीं केलेली योजना. याला दोन पट्टया असतात, एक चपटी असून तिचें एक टोंक राहाटाच्या विरुद्ध बाजूस खिळ्यांत भक्कम बसवितात व दुसऱ्या टोकात बांकदार चपटी अशी लोखंडी कांब बसवितात. दुसऱ्या टोकाला मध्यें एक खांचा असतो, तो खांचा रहाटांत टाकला कीं गति बंद होते. ४ गवताचा एक प्रकार व त्याचें फूल, तुरा, बोंड. हें वस्त्रास लागलें असतां चिकटून बसतें. ५ लहान कुसळयुक्त रानटी वनस्पतीचें बीं. ६ दार, शब्द लावलें असतां उघडूं नये म्हणून अडकविण्याचें एक अडकवण; आडसर; चक्काचे दांत उलट फिरूं नयेत म्हणून दात्यांत अडकविण्याचा धातूचा तुकडा. ७ (वरील कुत्र्याच्या साम्यावरून) कोपर, खांदा, मनगट, गुडघा, घोटा, कंबरेचा खवाटा यांचा सांधा. (वाप्र.) **(कुत्रा) कोल्टेकर्णी बसणें**–(माण.) पुढील दोन पाय उभे करून मागें दुंगण टेकून बसणें. **(कुत्रा)मुडा घालून बसणें**–(माण.) कुत्र्यानें मांडयांत तोंड घालून बसणें. **०कुत्रा हाल खाईना**–अतिशय वाईट स्थिति येणें. **कुत्रा, कुत्र होऊन राहाणें, पडणें**–आर्जवानें, खुशामतीनें नोकरी करणें. **कुत्रीं मारीत फिरणें, हिंडणें**–रिकामटेकडें भटकणें. **कुत्रीं वाफेला येणें**–(माण.) कुत्री माजावर येणें; संभोगोत्सुक होणें. **०शिवणें**–(माण.) (बायकी) स्त्री विटाळशी होणें (लहान मुलांच्या भाषेंत). **कुत्रासारखी होणें**–(व.) रोड होणें. **कुत्रे आपल्या पायाला डसले म्हणून काय आपण त्याला डसावें?** –शिवराळ माणसाच्या तोंडीं लागूं नये या अर्थी. **-कुत्र्याचे पाय मांजरावर आणि मांजराचे पाय कुत्र्यावर घालणें**–भलभलत्या लटपटी करणें (आपलें काम साधण्यासाठीं, केवळ गमतीसाठीं). **-च्या मोतीनें मरणें**–हालहाल होऊन मृत्यु येणें. **-ला तोंडीं लावला तर डोक्यावर चढतो**–(व.) हलकट मनुष्याशीं स्नेह ठेवला तर तो डोईजड बनतो. **-ला हाड म्हटलें म्हणजे हाडुक टाकतें**–बिगरगड,

कोडग्या माणसाबद्दल योजतात. **कुत्र्यासारखें फिरणें, हिंडणें**–रिकामटेकडें भटकणें. **म्ह०** १ धर्माचे द्वारीं कुत्रें आडवें आलें. २ ये रे कुत्र्या खा माझा पाय–नसतें भांडण उगाच आपल्या अंगावर ओढून घेणें या अर्थी. ३ (गों.) कुत्र्याक पालखेंत बसैलो तरी हाडुक देखून कुत्रे उडी मारतां=जन्माची संवय परिस्थिति आल्याबरोबर उभी राहाते. सामाशब्द– **कुत्र्याचा पाय**–पु. रानतेरड्याचें फूल. **–ची चार**–स्त्री. एक प्रकारचें गवत. **–ची झोंप**–स्त्री. अत्यंत सावध झोंप. **–ची वळवळ**–स्त्री. कुत्र्यासारखी चळवळ, हालचाल. **कुत्र्याचें कुवकुवणें**–कुत्र्याचें गुरगुरणें; भुंकणें. **–चें छत्र**–न. कुत्र्याचें मूत; छत्री; अळंबें. **–च जिणें**–न. दैन्यावस्था; हीन स्थिति; निकृष्ट स्थिति. **–चें झाड**–न. एक कांटेरी झुडुप. याचें फळ चकचकीत, तांबडें व रसाळ असतें. **–चें तोंड**–न. (ल.) फटकळ माणूस; निंदा करणारा, अश्लील भाषण करणारा माणूस. **–चें दांत**–पुअव. (मुलांच्या भाषेंत) दुष्या भोपळ्याच्या बिया. **–चे पाय–मांजराचे पाय**–पुअव. चिडबिडीत अक्षर. **–चे भोकभर–भोकावर**–क्रिवि. कुत्र्याचें भुंकणें ऐकूं जाईल एवढ्या मजलीवर (गांव इ०). **–चें मूत**–१ न. कुत्र्याची छत्री; अळंबें. २ (ल.) एककल्ली, दुसऱ्याच्या अंगावर वस्कन येणारा, तुसडा, चिरडखोर, सदा चिडचिड करणारा माणूस. **म्ह०** (व.) कुत्र्याचें मूत सडयास ना सारवणास **–चें विष**–न. कुत्रा चावला असतां मनुष्य भांबावल्यासारखें करतो त्याला ज्वर येतो, डोळे व लघवी पिवळी होते, कालांतरानें उन्माद येऊन कुत्र्याप्रमाणें भुंकतो व चावतो. यावर उपाय:–काळथा उंबराचें मूळ व धोतऱ्याचें फळ हीं दोन्ही तांदुळाच्या धुवणांत वाटून पिणें किंवा कस्तुरी व बाभळीच्या पानाचा रस गाईच्या तुपाशीं घेणें अथवा शतावरीचा रस गाईच्या दुधांतून पिण्यास देणें. –योर २.७०४. **–चें शेपूट–चि शेपडी**–नस्त्री. (हें नेहमीं वांकडें असतें, सरळ रहात नाहीं यावरून ल.) सुधारण्याचा कितीहि यत्न केला तरी व्यर्थ जाऊन पूर्वीच्या वळणावर जाणारा, लतकोडगा, दुष्ट, द्वेषी माणूस. **म्ह०** कुत्र्याचें शेपूट नळींत घातलें तरी वांकडें–मूर्खाच्या मनावर उपदेशाचा कांहींहि परिणाम होत नाहीं, देहस्वभाव जात नाहीं.

कुत्रापि—क्रिवि. कोठेंहि; जेथें कोठें. [सं. कुत्र+अपि]

कुत्सा—स्त्री. अपकीर्ति; निंदा. 'साधूंत पावले जरि तरि न सुधीरांत कर्म कुत्साही।' [सं. कुत्स्=निंदा करणें.]

कुत्सित—वि. १ गर्हित; निंदित; नीच. २ कपटी; लबाड; कुत्रिमयुक्त. ३ दुर्गंधियुक्त; कुजलेला. **०कुल्पना**–स्त्री. वाईट कल्पना, विचार.

कु(कुं)थणें—अक्रि. १ जोरानें ठोकतांना, शौचास बसतांना, मोठें वजन उचलतांना मोठ्यानें कण्हणें. २ आरंभिलेलें कार्य विरुद्ध झाल्यामुळें खेद करणें. 'पायलीचें उठतें आणि घरदार कुथतें.' ३ बळानें कार्यसिद्धि करण्याचा यत्न करणें; जंगजंग पछाडणें; गुरगुरणें. 'हे जे मिळोनियां मेळे। कुंथती वीरवृत्तीचेनि बळें।' –ज्ञा ११.४५९. [सं. कुन्थ्=क्लेश भोगणें]

कुंथाकुंथी—स्त्री. श्रम; खटपट. 'आतां कायसी कुंथाकुंथी।' –ज्ञा १५.२४७. 'सीतेची शुद्धि तंव किती। यालागीं कायसी कुंथाकुंथी।' –भारा किष्किंधा १७.५४. [कुथणें]

कुंथाडणें—सक्रि. (खा. व.) कुथविणें; चोपून काम करून घेणें; बडविणें; ठोकणें.

कुंद—पु. १ चमेलीच्या वेलासारखा वेल व त्याचें फूल. यास फुलें आश्विन–कार्तिकांत येतात. तें रानमोगरीसारखें पण किंचित लांबट असतें. २ गुरांचा क्षयरोगासारखा एक रोग. ३ छप्पराचीं दोन पाखीं मिळतात त्या ठिकाणीं होणारा कोन; रस्त्याचा कोपरा, कातरा. ४ रुमाल किंवा शालजोडी इ० च्या कोपऱ्यांत काढलेली झाडाची नक्षी, वेलबुट्टी. ५ कुबेराच्या नऊ निधींपैकीं एक. ६ कवड्या ऊर्फ. ७ एक प्रकारचें गवत.

कुंद—वि. चोंदलेलें; बुजलेला (नळ, गुडगुडीची नळी इ०) कोंदट; थांबलेली; थबकलेली; स्थिर झालेली (हवा, वारा); (त्यावरून) चोंदल्यामुळें बद किंवा बेसूर वाजणारा (वाद्य, गळा, स्वर, हवा). [कोंदणें.]

कुदई—स्त्री. (खा.) कुदळी; टिकाव. [सं. कुद्दाल]

कुदकणें—सक्रि. यथेच्छ कुदलणें; मारणें; ठोकणें; लाथाबुक्क्यांनीं तुडविणें. [कुतका]

कुदंड–खेर, कुदंडी–ड्या—कुभांड पहा.

कुदणें—न (गो.) पिशाच्याशी बोलत असतांना धाडी जे अंगविक्षेप करतो ते. –अक्रि. १ उडी मारणें. २ (कु.) खेळणें. ३ (गो.) अवसर येणें; अंगांत येणें. [हिं. कूदना; सिं. कुडणु]

कुदवा—पु. (खा.) त्रास; दंगा. [कुदणें]

कुंदम(र)—पु. डिक. –शे १०.२१५. –नामको.

कुदरत—स्त्री. सामर्थ्य; ईश्वरी शक्ति; प्रकृति; निसर्ग. [अर. कुद्रत]

कुदरती—वि. नैसर्गिक; स्वाभाविक.

कुदरापादरा—वि. खुदरापादरा पहा.

कुदलणें—उक्रि. १ धसफस; निष्काळजीपणानें, भुसडा धडेल असें वागविणें, वापरणें. (जनावर किंवा वस्तु). २ (खा. व.) बडविणें.

कुदव(वि)णें—उक्रि. १ बडविणें; कुटणें; ठोकणें; मारणें. २ धसफसपणानें वागविणें. ३ (राजा) खेळविणें. [कुदणें]

कुदळ–ळी–ळें—स्त्री. १ खणण्याचें एक हत्यार; खनित्र; यास एका बाजूस लोखंडी टोंक व दुसरीकडे दांडा बसविण्याचें

छिद्र असतें. हिचे पानकुदळ, सुंबकुदळ, तोंडकुदळ, बेडगें असे चार प्रकार आहेत. २ (ल.) दांडगा; भांडखोर. ३ (व.) धीमा; जलद काम न करणारा माणूस. [सं. कुद्दाल; तु. का. गुद्दली.] **०पक्षी**–पु. (अलिबागी) करकोचा पक्षी. हा साधारण माणसाच्या कमरेइतका उंच असतो. समुद्राजवळ एकलकोंडा राहातो. याचें मांस एखाद्या लहान बकऱ्याइतकें निघतें. तें खातात. **०भारती**–वि. (व.) ऐदी.

कुदळणें—उक्रि. कुदळीनें खणणें.

कुंदळणें—खुंदळणें पहा.

कुदळा—पु. (कों.) मोठी कुदळ; याच्या तोंडास विळत किंवा पळींव असून दांडा कोनाकृति असतो.

कुदळ्याचा—वि. कुदळीनें खणून केलेला (नांगरानें नव्हे)

कुंदा—पु. १ एक प्रकारचें गवत; हें हरळीसारखें असतें. याच्या मुळ्या जाड असून त्या जमिनींत फार खोल जातात, त्या काढण्यास फार त्रास पडतो. 'कुंदा गोगडी हराळी।' –गीता २ ५२८६. २ एक फुलझाड. [सं. कुंदर; कुंदरु] **०काढणें**–१ ठेचणें. मारणें; चोपणें. २ गवत खणून काढणें.

कुंदा—पु. कुंडा; भांग इ० घोटण्याचें दगडी किंवा मातीचें भांडें. 'शांभवी आलासे घेऊन। कुंदा कुल्का सिद्ध करून। आसनावरी बैसला।' –नव २२.१४६. [कुंड]

कुंदा—पु. (माळवी) कोयंडा.

कुंदा—पु. बंदुकीचा दस्ता. [फा. कुन्द.]

कुंदा—पु. ठेचा. –शर.

कुंदा—पु. (कुस्ती) गळखोडा; आपला एक पाय जोडीदाराच्या मानेवरून, बगलेंतून घालून आपल्या दुसऱ्या पायाच्या गुडघ्याच्या लवणींत आपल्या पायाचा पंजा धरून हाताने जोडीदाराला मानेवरून घातलेल्या पायानें चीत करणें.

कुंदा—पु. खवा.

कुदांड—पु. कुभांड पहा. –वि. दांडगा; भांडखोर; धसमुसळा.

कुदांडी—स्त्री. १ उद्धटपणा; दांडगाई. –वि. २ कुदांडया; कुभांडखोर; कुदांडखोर.

कुदान—न. वाईट दान; अशुभ दान; जें घेतलें असतां पाप लागेल असें दान. [सं.]

कुंदावा—पु. (व.) वायु कोंडणें; गुबारा; अवष्टंभ. [कुंद]

कुदाळ—पु. कुदळ पहा.

कुदिन—पु. अशुभ दिवस; अमंगल दिवस; दुर्दिन. [सं. कु=वाईट+दिन=दिवस]

कुदिन—पु. पृथ्वीच्या दैनंदिन भ्रमणाचा काल. [सं. कु=पृथ्वी+दिन=दिवस]

कुदी—स्त्री. (खा. ना.) उडी. (क्रि० मारणें; खाणें). [हिं. गु.]

कुंदी—स्त्री. १ (धोबी) कपडयाच्या घडया घट्ट बसण्यासाठीं मोगरीनें ठोकण्याची क्रिया. २ कपडे धुतांना मर्दणें, घासणें, बडवणें वगैरे क्रिया. ३ (ल.) खूप मार; कुट्टा; दुर्दशा. (क्रि० करणें; काढणें; गाजवणें.) 'कुंदी करिल रविपुत्र कसे।' –देवनाथ कटिबंध ६. 'कुंदी करील तेव्हां कसे टिकाल।' –अफला ६२. [ध्व] **०पाक**–पु. ठोकाठोकी; बुक्काबुक्की.

कुदृष्टवादी—पु. (कायदा) न्यायाधिशाच्या निकालासंबंधीं असंतुष्ट राहाणारा वादी. 'त्यांत जर कुदृष्टवादी पराजय पावला तर त्याला दंड करावा.' –मिताक्षरा–व्यवहाराध्याय आणि मयूखदायविभाग पृ. ७५.

कुंदेणें—अक्रि. (राजा.) कुंद नांवाच्या रोगानें पछाडणें (जनावरें).

कुंदा—पु. (व.) काठीचा ठोसा. **कुंदावून भरणें**–क्रि. गच्च भरणें, दाबून भरणें. 'दोन्ही पोतीं कुंदावून भरलीं.'

कुंद्वा—पु. आदर्शभूत पुढारी. 'कुंद्वा उमराव नखत निशान.' –इम ६५. [अर. कुद्वा]

कुद्रत-ती—स्त्री. कुदरत-ती पहा.

कुद्रंपाद्रं—वि. कुजकट; लागण्यासारखें (बोलणें). –फाटक नाट्यछटा.

कुद्रव्य—न. निषिद्ध पदार्थ. 'जया का सदोखा। कुद्रव्यासी।' –ह्रा १७.१६२. [सं.]

कु(कुं)द्रू—पु. कुरडू नांवाची रानभाजी; कुंजीर.

कुधण-न, कुंधाण-न—वि. संशयी; मत्सरी; खुनशी; चुरशी; हिरवट; विषण्ण; आंतल्या गाठीचा. [कुढणें] **कुधाणकी**–स्त्री. कुधणाची अवस्था; मत्सर; द्वेष.

कुंधा—पु. गवत; काशा; कुंदा पहा. **कुंधा काढणें**–क्रि. (ल.) मार देणें.

कुधांड-डी-डया, कुधांडखोर—कुभांड पहा.

कुधाण(न)काकडा—वि. मत्सरी; संशयी; खुनशी.

कुधान्य—न. ज्या धान्याचा देवास नैवेद्य, वैश्वदेव करीत नाहींत तें; उदा० हरीक, उडीद, मसूर, लाख, चवळी, बाजरी इ०; इतर धान्यासाठीं अठराधान्यें पहा. [सं.]

कुन—स्त्री. (गो.) नांगराचा दांडा घट्ट बसविणारी पाचर. कुणी पहा.

कुनी—स्त्री. खुंटी; मेख. कुणी अर्थ २ पहा.

कुनी—स्त्री. अंजिराचें लहान कलम. –कृषि. १६८.

कुनीति—स्त्री. १ अनीतीची वागणूक, वर्तणुक; पापाचरण. २ बेबंद राज्यव्यवस्था; अव्यवस्था; बेकायदेशीर अंमल. ३ अयोग्य कायदे; अहितकारक नियमपद्धति. [सं.]

कुन्हा—पु. १ मर्म; खोड; दोष; मत्सर; चुरस; तेढ. 'त्याचे कुन्हे ध्यानांत येण्याकरितां अलाहिदा पुरवणी तुम्ही लिहिली.'–रा ७. 'तहाचे मजकूर तुम्हास सांगितले त्यांतील दगाबाजीचे कुन्हे आहेत ते ... ' –रा १२.८७. २ कुपथ्य. –शास्त्रीको. (क्रि० धरणें; ठेवणें.) [अर. कुन्ह्]

कुन्हारणें—क्रि. (व.) मारणें; ठोकणें. 'त्याला खूप न्हारलें. ' [कुन्हा]

कुन्हेबाज-बाईक—वि. खुनशी; आकसखोर.

कुप—पु. ढीग; रास; जंगलांतील लांकडाचे ढीग. [ते. कुप्प= ढीग; का, कोप्पे=रास]

कुप—पु. कूप पहा. 'जन्मावरि दरिद्रें पीडिला । त्यासि धान्याचा कुप सांपडला । ' –ह २.९२. [सं. कूप]

कुप, कुंप—पु. (ना.) कुंपण; वई; वडांग. 'मग तयाचिया बुडुखा । कुंप कीजे । ' –ज्ञा १३.२१८. ' खेटितां कुंप कांटीं खुंट दरडी न पाहे । ' –तुगा ३४९. ' होतें निर्भय आश्रित अवलंबुनि तुज जसे कुपा सरडे । ' –मोसौत्रिक २.३६. [सं. कूप]

कुपट-ड—स्त्री. १ शेतवगैरेची हद्द; कांठ; बाजू. २ (कों.) शेकोटी; पावटे, वर्णे, मुद्दमूग, चवळी यांच्या शेंगा भाजण्यासाठीं केलेला विस्तव.

कुपण, कुंपण—न. १ जागा बंदिस्त करण्याकरितां लावलेले-कांटे किंवा घातलेला कूड वगैरे. २ सर्व बाजूंनी कांटे लावून अगर कूड घालून बंदिस्त केलेली जागा; आवार. **म्ह०** १ सरडाची धांव कुंपणापर्यंत. २ कुंपणानें शेत खाल्लें=ज्याचे हातीं रक्षणाचें काम त्यानेंच नुकसान केलें. [सं. कूप]

कुंपणी-सरकार—स्त्री. इं. कंपनी; ईस्ट इंडिया कंपनी (इंम-जाची); ही हिंदुस्थानांत व्यापारी सनद घेऊन १६०४ मध्यें आली. पुढें हिनें हिंदुस्थानचें राज्य कमावल्यावर तिला कुंपणी सर-कार अशी संज्ञा मिळाली. [इं. कंपनी]

कुपथ-कुपंथ—पु. १ आडवाट; भलताच रस्ता; दुर्मार्ग; २ (ल.) पाखंड मार्ग. 'शास्त्रज्ञ चालतां कुपंथें । ' –मुक्तेश्वर (नव-नीत पृ. १८०). [सं.]

कुपथ्य—न. रोग्यास जे पदार्थ खाल्ले असतां अपाय होण्याचा संभव असतो अशा पदार्थांचें सेवन; अपथ्य; वावडया पदार्थांचें सेवन. ' जैसा ज्वरित कुपथ्य मर्दे । सांडी जीवा. ' –कथा २.७. १४८. [सं. कु+पथ्य]

कुपराण—न. कुफराण पहा.

कुपरिणाम—पु. अनिष्ट फल; वाईट परिणाम, शेवट. [सं.]

कुपरी—स्त्री. वाईट संगत. –शर.

कुपरी—स्त्री. (कों.) (तेलीधंदा) ही काटकोनाकृति खुंटी असते. ही ढोकाच्या खालच्या टोंकाशीं भोंक पाडून त्यांत भडकवितात व या कुपरीच्या खालील टोकांत आडवी खिळी घालून त्या भोंवतालून दोरीचे वेढे देऊन नाडवळास जोडतात.

कुपा—पु. १ विशेष प्रकारची बाटली; मोठी कुपी; शिसा. २ गारेसारखा एक दगड. याची रांगोळी करतात. [सं. कुतुप; का. कोप्पे=लहान भांडें]

कुपाटी—स्त्री. (व.) कुंपण. –गांगा २०१. [कूप]

कुपातर—पु. (गो.) पूड होण्याजोगा दगड. कुप्पा पहा.

कुपात्र—पु. १ (दान घेण्यास) अपात्र; अनधिकारी मनुष्य, ' ते आपुलेनि कुपात्रपणें । पृथ्विया आछादिले मीं म्हणे । ' –ऋ ७४. २ वाईट भांडें. [सं.]

कु(कुं)पास—पु. (क.) कंपास.

कुपिका—स्त्री. कुपी; बाटली. 'तैंव इये शब्द कुपिकेतळीं।' –ज्ञा ७.१८५. [सं. कूप]

कुपित—वि. रागावलेला; कोपलेला; क्रुद्ध; क्रोधाविष्ट; संता-पलेला. [सं. कुप्=रागावणें]

कुपित-त्त, कुपित्थ—न. १ अपचन. २ पोटांतील न पच-लेलें अन्न. ३ आंतड्यांत राहिलेल्या मळाच्या गांठी. ४ पोटांत असलेला द्वेष, कपट. [सं. कु+पित्त]

कुपिया—वि. गुप्त. [हिं. खुपिया]

कुपी—स्त्री. बाटली (काचेची); शिसी. ' मद्यासक्त नरें जशी नच कधीं कांते कुपी झोंकिली । ' –केक १३. [सं. कुतुप; का. कोप्पे=लहान भांडें] **कुपीतली गोष्ट**–स्त्री. गुपित गोष्ट.

कुपीण-न—स्त्री. लंगोटी; काचा. (क्रि० नेसणें). [सं. कौपीन]

कुपुत्र—पु. वाईट मुलगा; मातापितरांस दुःख देणारा, कुलास कलंक फासणारा पुत्र. [सं.]

कुपेथर—वि. पांढरट, नरम, ठिसूळ भाग असलेला, कुप्पा दगडासारख्या थरांचा (दगड, धोंडा). [कुपा+थर]

कुप्पा—पु. १ मोठी बाटली. २ गारेसारखा ठिसूळ एक दगड याची रांगोळी करतात. –वि. दांडगा; धिप्पाड.

कुप्पा—पु. (तंजा.) केर; कचरा; धूळ. ' कुप्पुराव= केरो-पंत. ' [ता. कुप्पे]

कुप्पी—स्त्री. बाटली. कुपी पहा.

कुप्य—न. हीण धातु; हलकी धातु; सोनें, रुपें याखेरीज जस्त, कथिल इ० धातु. [सं.]

कुफर—पु. स्वामिद्रोह; निमकहरामी. 'त्यांणी सर्कारलक्षें कांहीं एक कुफर न करितां चालावयाचा तहनामा ठरविला. ' –मराचिथोशा ६७. [अर. कुफ्र]

कुफरांड-राण-णा, कुफ्राण—न. १ तोहमत; आळ; कुभांड. ' त्यावरि अजि कशीं कुफराणें । ' –आक्र ३२. २ अधर्म;

काफरशाही; लबाडी; 'पुढें धर्म उच्छिन्न होऊन तेरावे सद्दींत कुफ्राण माजेल.'–ऐस्कुले ६५. (क्रि० येणें; उठणें; घालणें; करणें). ०दार–कुफरांडी पहा. 'हा सोम ठाकूर कुफराणदार.'–मब४६.

कुफरांडी–ड्या–णा–णी–ण्या—वि. आळ घेणारा; तोहमत्या; कुभांडखोर. 'नामदेवासी बोलिला काय। गातोसी काय कुफराणा।' –भवि १०.१७६. [कुफ्राण]

कुंफळ—न. (कों.) कुंभा नांवाच्या झाडाचें फळ.

कुफार—पु. लुच्चा; हरामखोर; बखेडखोर माणूस. 'जकार नामक म्हैसकर ... हस्तगत करावा सगळा कुफार तो आहे.' –खरे ५२०२. [अर. कुफ्फार, काफीरचें अव; कफूर=नास्तिक]

कुफ्तगारी—स्त्री. एक प्रकारचें नक्षीकाम. –नामको.

कुंब—वि. (बे.) आडाणी.

कुबट—वि. १ कुजकट; सडका; वासट; बुरसट. २ (ल.) निंदक,कुजक्या मनाचा. **कुबणें**–अक्रि. कुजकट वास येणें; बुरसटणें.

कुबड—न. पाठीवरील आवाळू; गड्ड; वार्धक्यानें आलेलें पोंक; पाठीच्या कण्याचें बूड. (क्रि० निघणें; काढणें). [सं. कुब्ज; प्रा. खुज्जो, कुब्बड; सिं. कुबो; पं. कोझा; हिं. ओरिसा. कुंजा; बं. कुंजो]

कुबडा–ड्या—वि. १ कुबड निघालेला (माणूस). २ (थट्टेनें) कुबडाभाई.

कुबडी—स्त्री. १ एक प्रकारची पाणगोगलगाय; खुबडी. २ बैराग्यांची हात टेकण्याची किंवा खाकोटीस घेण्याची दुबेळक्याची काठी. ०काढणें–क्रि. कांहीं वाकडेपणा, व्यंग काढणें.

कुंबया–यो—पु. (कों. कु.) कुंभा नांवाचें एक रानझाड.

कुंबरी–जमीन–रान—स्त्रीन. लहान टेंकडयांच्या पायथ्याची नापीक, बरड जमीन; हींतील माती धुवून जाऊं नये म्हणून हीस आडवे बांध घालतात. हींतील लागवडीस कुंबरीची लागवड म्हणतात. कुमरी पहा.

कुबल—वि. १ (व.) कठिण; अडचणीचें; बळकट; भक्कम. 'कुबलगड भीरिका कुडुंगडाचें चांगुलपण।' –ऐपो ८. [फा कुबाल=बांधणारा]

कुबलणें—उक्रि. ठोकणें; मारणें; बदडणें.

कुंबळ—न. (कों.) एक कांटेरी रानझाड; झाच्या फांद्या कुंपणाला लावतात. यांचीं फळें खातात. 'कुबळ, गेळा, तोरण, चिमट व घाणेरी या कांटेरी झुडुपाखेरीज...'–खेया ३३.

कुंबळ—न. १ (कु.) आमटी. २ (कु.) (पत्त्यांचा डाव) लाल बदाम.

कुबा—पु. कुबडी अर्थ १ पहा. खुबा.

कुंबा—पु. कुंभा नांवाचें झाड. 'अंजन, कुंबा, हेल वगैरे इमारतीचे उपयोगी झाडें ...' –खेया ४४.

कुंबारु—पु. (कों.) एक प्रकारचा मासा.

कुबीन—न. रेशमाची एक जात. –मुंड्या ९७.

कुबुद्धि—स्त्री. वाईट इच्छा, विचार; बुद्धीचा दुष्टपणा. [सं.] –वि. वाईट विचाराचा, बुद्धीचा.

कुंबेकुकूड—पु. कुकुडकुंभा पहा.

कुंबेटणें—अक्रि. (बे.) पाडास येणें.

कुंबेटा—वि. (बे.) पाडाचा.

कुबेर—पु. १ देवांचा भांडारी; यावरून. २ (ल.) श्रीमंत माणूस. 'कुबेराचें धन मार्कंडेयाचें आयुष्य (असावें)=सुखस्वास्थ्य असणें. [सं.]

कुबोल—पु. अपशब्द. 'कुबोलांचीं सदटें। सुति कांडें।'–ज्ञा १६.४०४.

कुब्ज–क—वि. कुबडा. 'आणि आपुली माये। कुब्ज जरि आहे।'–ज्ञा १८.९२७. 'कपटरूपें कुब्जक। बाळवेश धरोनिया।' [सं.]

कुब्बल—वि. दृढ; मजबूत; बळकट, भक्कम, कुबल पहा.

कुंब्या—पु. बडवलेला–काढलेला बैल.

कुंभ—पु. १ घागर; घडा. 'दैवें अमृतकुभ जोडला।'–ज्ञा २.२५२. २ कुंभराशि (अकरावी राशि). ३ हत्तीचें गंडस्थळ. 'भवेभकुंभभंजना।' –ज्ञा १०.५. ४ कुंभिपाक नांवाचा नरक. 'काळदंड कुंभयातना थोरा।' –तुगा ७०२. ५ धान्य मोजण्याचें एक माप; वीस द्रोण म्हणजे एक कुंभ (मनु ८.३२०. वरील टीप) ६ (गो.) वीस खंडींचें माप. [सं.] (वाप्र.) **०फळ गळयास लागणें**–(कु.) संकटांत सांपडणें. सामाशब्द– **०कामला**–स्त्री. काविळीची शेवटची अवस्था. [सं.] **०कार**–पु. कुंभार. [सं.] **०पाक**–पु. एक नरक. कुंभ अर्थ ४ पहा. 'कुंभपाक लागे तयासि भोगणें।' –तुगा २८. **०पुट**–न. एका मातीच्या घागरीस चाळीस भोकें पाडून ती अर्धी कोळशानें भरावी व वर औषध ठेवावें, तोंडावर एक परळ झांकून मातकापड करून तोंड लिपावें व सावलींत वाळवावें, मग घागर चुलीवर ठेवून परळांत निखारे घालून खालीं जाळ लावावा. तीन दिवसांनीं औषध काढून घ्यावें. –योर १.२१०. **०मेळा**–पु. कुंभ राशीस गुरु येतो तेव्हां हरिद्वारास भरणारी जत्रा.ही वर्षभर असते. –तीप्र ३१. **०विवाह**–पु. मुलीच्या जन्मकाळीं तिला वैधव्य प्राप्त होण्यासारखे अनिष्ट ग्रह असतील तर अरिष्टनिरसनार्थ, खऱ्या लग्नापूर्वी तिचा घटार्शी विवाह करतात तो. **०संभव**–पु. अगस्ति ऋषि. [सं.] **०स्थळ**–न. हत्तीचें गंडस्थळ. 'गज हाणीत मुसळें। विदारित कुंभस्थळें।' –एरुस्व १०.५५.

कुंभक—पु. (प्राणायाम) पूरकानें आंत घेतलेला वायु रेचक होईपर्यंत कोंडून धरणें. 'प्राण व अपान या दोहोंचाहि निरोध झाला म्हणजे तोच प्राणायाम कुंभक होय.' –गीर ६७८. [सं.]

कुंभकर्ण--पु. १ रावणाचा भाऊ; एक राक्षस. हा फार झोंपाळू होता त्यावरून २ (ल.) अत्यंत झोंपाळू माणूस; गाढ व पुष्कळ वेळपर्यंतच्या झोंपेस कुंभकर्णी झोंप म्हणतात.

कुभक्त--वि. ढोंगी; भोंदू. [सं. कु+भक्त] **कुभक्ति**-स्त्री. ढोंगीपणा; भोंदूपणा; कृत्रिम उपासकता; दांभिक भक्ति [सं कु+भक्ति]

कुभडळी--स्त्री. (गो.) कंवडळ झाड.

कुभंडी—वि. कुभांडी.

कुभर्णे—सक्रि. रोधणें; कोंडणें. 'इहेनि करावा प्राण पूर्ण। तो कुंभूनि राखावा जाण।' –एभा १४.४२०. [कुंभ]

कुंभा—पु. १ एक पक्षी. २ एक रानझाड. याच्या पानाचें इरलें करतात व सालीचें दोरखंड करतात. हें झाड मोठें होतें व फळ बेलफळासारखें गोड असतें. ३ धोतरा; एक औषधी झुडप; याची फुलें शंकराला वाहतात. पानें औषधोपयोगी आहेत. यास दुधाणी, शेतवड, शेताड हींहि नावें आहेत. [सं. कुंभ]

कुभांड, कुभांड-आभांड--न. १ तोहमत; आळ; खोटा आरोप; लबाडीची टाळाटाळ. (क्रि० आणणें; मांडणें; घालणें; रचविणें; करणें; उठविणें). २ कारस्थान; कट; वांकडी व छळदायक मसलत; बनावट पुराव्याचा डोलारा. 'त्यानें निराळेंच कुभांड रचून बादशहाच्या मनांत भरवून दिलें, –उषःकाल [सं कु+भांड] **०खोर, कुभांडी-डया, कुभांडी आभांडी-डया**-वि. १ कुभांड रचणारा. २ तोहमत आणणारा; कपटाचें कारस्थान करणारा.

कुंभातर--पु. (गो.) एक पक्षी. कुंभा पहा.

कुंभार--पु. १ मातीचीं भांडीं घडवून त्यावर उपजीविका करणारी एक जात व तींतील व्यक्ति. २ एक प्रकारची माशी, कुंभारीण. [सं. कुंभकार] **म्ह०** १ (गो.) कुंभाराक मडकीं घड ना=जिन्नस उत्पन्न करणाऱ्याला त्याचें दुर्भिक्ष असतें कारण चांगलीं मडकीं सर्व विकावयाचीं असतात व स्वतः वापरावयास फुटके तुटकें घ्यावयाचें अशी प्रवृत्ति असते. २ (गो.) कुंभाराक जवाहीर=अनधिकाऱ्यास अधिकार देणें; अयोग्य माणसाला मौल्यवान वस्तु देणें. ३ कुंभाराची सुन कधीं तरी उकिरडयावर येईलच=जी गोष्ट निश्चितपणें व्हावयाची ती गोष्ट आज ना उद्यां होणारच. ४ कुंभार कुंभारीण सुखी असेल तर मडक्याला काय तोटा=नवरा-बायको सुखी असतील तर मुलांना काय तोटा. ५ कुंभारणीनें कुंभारणीशीं कज्जा केला आणि गाढवाचा कान पिळला=दोघांच्या भांडणांत तिसरा घुसला असतां त्याला मिळणारें प्रायश्चित्त. **०काम**-न. गाडगीं-मडकीं (समुदायानें) लग्नकार्याच्या वेळचीं सुगडें इत्यादि कुंभारानें करावयाच्या वस्तु. **कुंभारकी**-स्त्री. कुंभाराचा धंदा. **०कुकुड-कुकडा**-पु. भारद्वाज पक्षी. कुक्कुडकुंभा पहा. **०क्रिया**-स्त्री. शूद्र मेला असतां कुंभार जी त्याची उत्तरक्रिया चालवितो ती. **०खाणी**-स्त्री. कुंभाराची मातीची खाण. **०गवंडी**-पु. गवंडीकाम करणारा कुंभार. **०घाणी**-स्त्री. १ कुंभारानें मळून तयार केलेली माती. २ उंसाच्या चिपाडांत राहिलेला रस काढण्याकरितां उपयोगांत आणलेल्या कुंभाराच्या घाणीवरील कर. ३ कुंभाराच्या घाणीसाठीं दिलेलीं उंसाचीं चिपाडें. **कुंभारडा**-पु. (तिरस्कारानें) कुंभारास म्हणतात. **कुंभारणी**-स्त्री. कुंभाराची बायको. **०वाडा**-पु. कुंभाराची आळी; कुंभारांची वस्ती. **-राच्या देवी-माता**-स्त्री. टोंचलेल्या देवी; गोस्तनी देवी.

कुंभारी—स्त्री. (कों.) कुंभारीण माशी. –वि. (कों.) १ जिला आकार, रंग पिकल्याप्रमाणें आला आहे परंतु जी खरोखर पिकली नाहीं अशी (सुपारी). कुमारी पहा. २ कुंभारानें बनविलेली (चूल इ०). ३ कुंभाराशीं संबंधी; कुंभारकामासंबंधीं.

कुंभारीण—स्त्री. १ कुंभाराची बायको. २ कुंभारीण नांवाची माशी.

कुभाव—पु. १ वाईट स्वभाव; संशयीवृत्ति; अविश्वासी स्वभाव. २ मत्सर; द्वेष; खोटी बुद्धि; वरवरचा कुडा भाव.

कुंभिनी--स्त्री. पृथ्वी. 'श्रमें श्रांतला कुंभिनीवर' –मुक्तेश्वर नवनीत १८८. 'फरशधरें अति पराक्रमें कुंभिनी केली निःक्षेत्री।' –ऐपो २६५. **०प्रदक्षिणा**-स्त्री. पृथ्वी प्रदक्षिणा. 'जो करील कुंभणीप्रदक्षणेस स्वर्तत्रीं।' –होला ३९.

कुंभी—स्त्री. (खा.) उथळें; खुर्ची (खांबाच्या खालची); तळखडा. हा दगडी चौकोनी असतो. [कुंभ]

कुंभी-भ्या-ब्या--स्त्रीपु. कुंभा अर्थ २ पहा.

कुंभीपाक—पु. एक नरक. कुंभपाक पहा. 'त्यासी कैचा परलोक। अंतीं होय कुंभीपाक।' –मुच १६.१३६.

कुंभीर--पु. लांब नाकाचा मगर; सुसर. [सं.]

कुभे—स्त्री. दोष. 'म्हणजे यांत हुस्न-कुभेह कोणती आहे ती ध्यानांत येईल.' –रा ५.८४. [अर. कुब्ह्]

कुंभेर-री—स्त्री. १ (कों.) गवताची किंवा धान्याची पेंढी; कवळाची पेंढी. २ कुंभारीण माशी.

कुभोजन--न. कदन्न, जाडयाभरडया अन्नाचें भोजन; कुग्रामवास कुलहीनसेवा, क्रोधमुखी भार्या, कुभोजन या चार वाईट गोष्टींपैकीं एक.

कुमक—स्त्री. मदत; उपराळा; साहाय्य (सैन्य, पैसा इ० चें), मदतीस आलेलें सैन्य, द्रव्य इ० 'इंग्रजांस कुमकेस प्रसंगीं बरोबर घेउनियां।' –ऐपो ३९६. [तु. कुमक्]

कुमकणें—अक्रि. ठोकणें; चोपणें; बदडणें. [ध्व.]

कुमकपत्र—न. शिफारसपत्र. पत्र पहा.

कुमका—पु. (कों.) ठोसा; तडाखा; बुक्कीनें केलेला प्रहार. [ध्व.]

कुमकुमा—पु. पातळ कांचेचा, गुलाल भरलेला गोळा; गुलालगोटा (होळी अगर इतर समारंभांत हा एकमेकांच्या अंगावर फेकीत असत). [अर. कुमकुमा; तुल सं. कुंकुम]

कुमकुमीत—वि. (कु.) गुबगुबीत; लठ्ठ.

कुमटका, कुमटपिका—वि. (राजा. कु) कुमेटका पहा.

कुमंडल, कुमंडलु—पु. कमंडलु.

कुंमडा—पु. (ना.) तांबडा भोपळा. [हिं. कुम्हडा]

कुमति—स्त्री. वाईट बुद्धि; दुष्ट बुद्धि. ' सदा चालिजे धर्म पंथ। सर्व कुमति टाकोनि। ' [सं.]—वि. वाईट बुद्धीचा; दुरात्मा.

कुमंत्र—न. वाईट सल्ला. [सं.]

कुमंत्री—पु. वाईट सल्ला देणारा माणूस. [सं.]

कुमर-री—पुस्त्री. कुमार-री पहा. ' हे रचिले आधि बुद्धिमतें हुपदकुमरें। ' —ज्ञा १.९४. ' तंव रायाचा ज्येष्ठ कुमर। ' —एरुस्व ६.३९. [सं.]

कुमरावळी—स्त्री. उद्भव; परंपरा. 'कुमगवळी तें दीन्हली ऐशी। ' —शिशु ९८. [सं. कुमार+आवली]

कुमरी—स्त्री. जमीनीचा एक प्रकार. कुंबरी पहा. —कृषि २८६.

कुमरी—स्त्री. घोड्याचा एक रोग. —अश्व १.१४८.

कुमळणें—क्रि. कुमकणें पहा.

कुमळें—पु. १ (कु.) मिराशीनें धारण केलेल्या जमिनीचा खंड, भाडें. २ (गो.) नारळ सोलण्याचें भाल्यासारखें एक हत्यार; उत्कड. ३ एक प्रकारची मापाची पद्धत.

कुमाईत-यत—वि. सारंग रंगाचा; दांडी, आयाळ, गुडघे, पाय, कान हे काळे असून बाकीचें शरीर तांबूस असणारा (घोडा) ' परम रागीट कुमाईत। बदकश्याम स्थिर चालत। '—ह २२.४५. ' अबलक पंचकल्याणी कुमाइत। ' —ऐपो ११९. [अर. कुमैत] ०**अबलक**—वि. अर्धे शरीर तांबडें व अर्धे पांढरें असा (घोडा).

कुमा(चा)ळ—स्त्री. (गो.) कुंभारीण माशी (सपक्ष कीटक).

कुमार—पु. १ पांच वर्षांखालील, अप्रौढ मुलगा; मुंज होण्याच्या पूर्वीचा मुलगा. २ राजपुत्र (विशेषतः युवराज) ३ कार्तिकस्वामी. ' ज्याच्या भयें होय कुमारं जोगी। ' —सारुह ३.१२८. [सं.]

कुमार—पु. (गो.) कुंभार.

कुमारिका-री—स्त्री. १ अविवाहित मुलगी; तरुण मुलगी. ' जैसी कुमारीहातीं दिधलीं शस्त्रें। ' —ज्ञा ९.१७७. २ कोरपड. ०**आसव**—न. कुमाऱ्यासव; कोरफडीच्या रसापासून तयार केलेलें आसव. हें खोकला, क्षय, उदर, मूळव्याध इ० वर उपयोगी आहे. [सं.]

कुमारी—स्त्री. (कु.) पाखरानें खाल्लेली कोंवळी सुपारी. कुंभारी पहा.

कुमार्ग—पु १ वाईट रस्ता. २ (ल.) शास्त्रविरहित, लोकविरहित, निंद्य, अनीतीचें आचरण, कृत्य, वागणूक. [सं.]

कुमार्गी—वि. शास्त्रविरुद्ध मार्गानें चालणारा; दुराचारी. [सं.]

कुमाव—पु. (गो.) पायखाना; संडास. [पो.; तुल. इं. कमोद.]

कुमुद—न. पांढरें कमळ; चंद्रविकासी कमळ. ' सांगे कुमुद दळाचेनि ताटें। ' —ज्ञा ५.१०७. [सं. मुद्=हर्षणें] —**दिनी**—स्त्री. १ कमलिनी; श्वेतकमल. २ कमळाची वेल. ३ श्वेतकमलें असलेलें तळें. [सं.]

कुमुद्वती—स्त्री. (संगीत) दुसऱ्या श्रुतीचें नांव. [सं.]

कुमेटका—वि. (राजा. कु.) अर्धवट पिकलेला; पिकण्याच्या मध्यमावस्थेतील (आंबा, फणस इ०).

कुमेत-द—वि. कुमाईत पहा. ' हुजुरच्या कुमेद नरमाया हिंसती। ' —प्रला १२६.

कुमेर—स्त्री. (गो.) पावसांत पेरण्यासारखी जागा; बरड जमीन भाजून कडधान्य पेरणें कुंबरी, कुमरी पहा.

कुमैत—वि. १ कुमाईत पहा. २ (ल.) संशयी; हुशार. 'परंतु ती आटोकाट कुमैत तिजला कोणाचा विश्वास नाहीं. ' —खरे १.३१२. [अर. कुमैत्]

कुयँ—न. (कु. गो.) पेजेतील शीत.

कुयटारु—वि. (कों.) कुईटानें शाकारलेलें.

कुयरा-री-रें, कुयला-ली-लें—कुइ मध्यें पहा.

कुयाडें—१ कुवेडें पहा. २ (कों.) पिकलेले आंबे उकडून त्यांचा बाठासकट रस काढून त्याला मीठ, तिखट, मोहरी इ० लावून फोडणी देऊन तयार केलेलें तोंडीलावणें.

कुयोग—पु. नक्षत्र, अनिष्टग्रह, घातवार; काळ, वेळ वगैरेचा अशुभ योग. [सं.]

कुरकळण-णी—कुळकरण-णी यांच्या वर्णविपर्यासानें बनलेलें शब्द.

कुरकुंची—स्त्री. करकोचीण; करकोचा [सं. क्रौंच]

कुरकुट—पु. एक पक्षी; कुकुडकुंभा; भारद्वाज; 'कुरकुट चंडोल काग घेती फार लाहो। ' —प्रला १३.

कुरकुट(ड)णें—उक्रि. १ कुरतडणें; दातानें तोडणें. २ खुडणें; नखानें तोडणें.

कुरकुटांवचें—सक्रि. (गो.) अपहार करणें.

कुरकुटी--स्त्री. (कों.) शिरशिरी (तापाची); शहारे; हुडहुडी. [ध्व.]

कुरकुर—उद्गा. १ कुत्र्याच्या पिल्लांना बोलावण्यासाठी लहान मुलें म्हणतात. २ मुक्या माणसाला चिडविण्यासाठी नाकावर हात ठेवून केलेला शब्द. [सं. कुर्=शब्द करणें; दे. कुरुकुरिअ; ध्व.]

कुरकुर--स्त्री. चिरचिर; पिरपिर; तक्रार. (क्रि० करणें; लावणें;) [सं. कुर्=शब्द करणें]

कुरकुरणें--अक्रि. १ कुरकुर करणें; पुटपुटणें; चिरचिर, पिरपिर करणें. २ पोटांत गुरगुरणें. 'पोटांत कुरकुरतें.' ३ डुकराचा आवाज करणें. 'जो सुकरांमधें कुरकुरितो।' –दा ११.१.२३. [सं. कुर्=शब्द करणें]

कुरकुर, बुरबुर--स्त्री कटकट; धुसफूस. –क्रिवि. कुरकुरीनें, धुसपुशीनें.

कुरकुरा—स्त्री. पोटांतील घुरघुर. [ध्व.]

कुरकुरी—स्त्री. (व.) घोडयाचा एक रोग. हा पोटांत होतो.

कुरकुरीत—वि. चुरचुरीत; चुरडतांना कुरकुर आवाज होणारा; कुडकुडीत. [सं. कुर्=शब्द करणें]

कुरकुला--पु. हा एक चिखलांत, सदैं जमिनींत येणारा रोपा आहे. याची भाजी अळवासारखी पण चुळचुळीत होते. –वगु २.५१. [सं. कर्करि]

कुरकुला–ली–लें, कुरकूल--पुस्त्रीन. नाना प्रकारचे जिन्नस ठेवण्यासाठी कळकाच्या कांबीचीं केलेलीं चुरडी, पाटी, टोपलें, करंडी, पेटारा वगैरे पात्रें, साधनें. हीं लहान मोठीं असतात (खेळण्यासाठीं, भाजी धुण्यासाठीं वगैरे).

कुरंग—पु. हरिण; काळवीट. [सं.] **०नयना-नैना-नी**–स्त्री. हरणासारखे काळेभोर डोळे असलेली स्त्री (एक सौंदर्याचें लक्षण) 'याचरी बोले कुरंगनयनी।' –महिपति (नवनीत पृ. २४४.) **कुरंगिणी**–स्त्री. हरिणी. 'आळवितों जैसें पाडस कुरंगिणी। पीडिलीया वनीं तहानभूकें।' –तुगा १६०५.

कुरंग—स्त्री. (बे.) एक प्रकारचें गवत.

कुरगई—स्त्री. (बे.) गाडीचा एक भाग.

कुरगी—स्त्री. शेतीचें एक औत. –नामको.

कुरगोटया—स्त्री. (गोटया) ज्यामध्यें जिंकलेल्याच्या पाठीवर बसावयास मिळतें असा गोटयांचा डाव; ढोपरगोटया; अगळगोटया; कोंडडाव पहा.

कुरघोडी—स्त्री. १ दुसऱ्याला पाठीवर घेण्यासाठी ओणवें होणें. २ एकापुढें एक पांचसहा जण ओणवे उभे राहून अगदीं मागच्यानें पुढच्यांच्या पाठीवर थाप मारून जाऊन बसण्याचा खेळ. (क्रि० करणें). 'शिवाय कुरघोडया वेगळया ' –अफला २५. ३ (ल.) छी थू करणें; पायाखालीं तुडविणें; मात करणें; वरचढपणा गाजविणे. 'स्वार्थ साधण्याकरितां ते दोघे एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या विचारांत होते.' –स्वप. ४ (चेंडू) एका बाजूचे गडी ओणवे राहून दुसऱ्या बाजूचे त्यांच्या पाठीवर बसतात व आपल्यापैकीं एका कडून चेंडू वर उडवितात, नंतर तो चेंडू ज्या बाजूचे गडी जिंकतील त्यांना डाव आला असें समजून त्यांना दुसऱ्या बाजूच्या गडयांच्या पाठीवर बसावयास मिळतें.

कुरचणें—उक्रि. (राजा.) कुरतडणें; कुरकुटणें पहा.

कुरचा—पु. (राजा.) बोचकुरा. (क्रि० काढणें; घेणें).

कुरचूक—वि. ठिसूळ; ढिसूळ (कांच, लाकूड इ०)[कुर्=कुरकन् मोडणारा; ध्व.]

कुरडया—अ. इया, इया, इया पहा.

कुरंटक—पु. कोरांटीचें फूल. [सं.]

कुरटा-ठा—वि. १ खरटा; खुजा. 'हे लोक शरीरानेंच खुरटे आहेत असें नाहीं ... ' –सुपनि ८२. २ मनांत कुढणारा. 'कुरटें कुचर नाठाळ।' –दा २.३.२३.

कुरटा-ठा--पु. १ घरटें (पक्ष्यांचें). 'तृष्णापक्षिणीचा कुरठा मोडिला।' –विपू १.१०१. २ कोठा; कोठी; घर. 'ना तो अनंगाचा कुरठा।' –शिशु ४६. 'तूं धनुर्विद्येचा कुरठा।' –कथा ५.११.१०७.

कुरडई—स्त्री. तांदुळाच्या पिठाचा तळावयाचा वर्तुळाकार पदार्थ; (तंजा.) कुरवाडी. [ध्व.]

कुरंड रोग--पु. पितदोषामुळें मुलांच्या अंडांमध्यें हा होतो. त्यासाठीं त्या मुलाच्या कानावर वेध करावा. कुरंड उजवीकडे असल्यास डावीकडे व डावीकडे असल्यास उजवीकडे वेध करावा. –योर २.२४१. [सं.]

कुरडा--पु. १ (राजा. कु.) संकुचित डोळा. –वि. अशा डोळयाचा (माणूस). [का. कुरुड=आंधळा; तुलं० अर. कुर्=आंधळा]

कुरडा—वि. (गो.) अंधळा. **कुरडेपण**–न. (गो.) अंधळेपणा. [का. कुरुड=आंधळा; तुलं० अर. कुर्=आंधळा]

कुरडु-डू—पु. १ स्त्रियांचा कानांतील एक दागिना व तो घालण्याची जागा. –वि. २ एक रान झुडप. पांढऱ्या माठाच्या जातीची भाजी, हिची उंची दोन हात, पानें पातळ व बीं फार असतें. याच्या पानांची कुणबी लोक भाजी करतात. ह्याचें फूल निळसर, मंजिरीसारखें असतें. तांबडया फुलांच्या कुरडूला देवकुरडू म्हणतात. -वगु २.५१. [सं. भूरुंडी]

कुरडुकें-डूक—न. कोरडिकें पहा.

कुरण—न. १ गवतासाठीं राखलेली जमीन; गायरान. २ (ल.) चरण्याची, भक्ष्य मिळण्याची जागा; लाभदायक वस्तु. [सं. कु+अरण्य]

कुरणें-ण्या--पु. कुरणावर देखरेख ठेवणारा अधिकारी.

कुरणेकरी--पु. फार दिवसांच्या दुखण्यानें अशक्त झालेला माणूस.

कुरणो--पु. (कु.) अर्धा कापा व अर्धा बरका फणस.

कुरतुडणें--उक्रि. दातांनीं किंवा नखांनीं बारीक तुकडे करणें. [ध्व.]

कुरंद-दी--कुरंद-दी पहा.

कुरंदी-धी--स्त्री. (कों.) लहान कोयती; खराळी. [का. कुरचिगें]

कुरनिसा(शा)त, कुरनीस--स्त्री. नम्रपणानें केलेलें अभिवादन; सलाम; प्रणिपात. 'कुरनिसां करति जन वाडयामधे जाउनी।' -ऐपो २०१. [तु. कोर्निशात]

कुरपण-पाणी-पाणी--न. (कों. गो.) पाटी किंवा टोपलीस दोऱ्या बांधून शिकें करतात तें; शिकाळी; ह्यांत भांडी वगैरे ठेवतात; आंबे उतरण्यासाठीं टोपलीस दोऱ्या बांधून शिकें करतात तें; परडी. [?]

कुरपें--न. (खा.) खुपऱ्या (डोळ्यांतील)

कुरबाण-न--न. देवास दिलेला बळी; उतारा. 'मी तुझ्या एका शब्दाकरितां हा माझा देह कुरबाण करीन.' -स्वप ४३०. [अर. कुर्बान्] **कुरबानी**-स्त्री. बळी; ओवाळणी; बळी देण्याची क्रिया; उतारा.

कुरबुर--स्त्री. १ फुणफुण; पुटपुट; कुटकुट; रागाची गुरगुर; कटकट. (क्रि० करणें; लावणें; होणें). २ तंटा; कलह; धुसपूस. 'वसाहतवाल्यांची व इंग्रेजांची करांच्या बाबतींत कुरबुर होऊन ...' -नि ७११. [ध्व.]

कुरबुर--पु. (बे.) धनगर. [ता. का. कुरुब=धनगर]

कुरबु(मु)रणें--अक्रि. १ धुसपुसणें; रागावणें; चरफडणें. २ पोटांत कुटकुटणें-कुरमुरणें. [ध्व.]

कुरमणें--अक्रि. १ धुमसणें. २ (ल.) क्रोधादिकानें धुसपुसणें. ३ पोटांत कुरबुरणें. 'पोटांत कुरमतें.'

कुरमाईत--क्रिवि. (व.) थोडें थोडें; हलु हलु. 'कुरमाईत कुरमाईत पोट दुखतें.'

कुरमुड-डें--न. (व. ना.) कोशिंबीर.

कुरमुर--स्त्री. १ कुरबुर पहा. 'सल्गी धरी पयोधर। सहातें कुरमुर सवें।' -तुगा १२७. २ पोटांतील गुरगुर. (क्रि० उठणें; निघणें; राहाणें). [ध्व.] **कुरमुरणें**-क्रि. धुमसणें; कुरबुर करणें.

कुरमुरा-री--पुस्त्री. भाजलेले पोहे; चुरमुरे; मुरमुरे; उबजे तांदूळ इ० भाजून कुरकुर वाजण्यासारखे केलेले असतात ते. [ध्व.] **०व्हाणें**-क्रि. (ल.) इच्छेविरुद्ध गोष्ट झाली असतां निरुपायानें मनांतल्या मनांत चरफडणें.

कुरर-री--स्त्री. टिटवी. [सं.]

कुरली--स्त्री. हाताचा एक रोग; हातावरील गळूं. यानें बोट पुजतें आणि आखडतें. ह्यावर खेकडयाच्या बिळांतील मातीचा लेप देतात. [सं. कुलीरक]

कुरली-लें, कुल्ली--स्त्रीन. लहान खेकडा; ककंट. हा मृगाच्या पावसांत उत्पन्न होतो. [सं. कुलीरक]

कुरवंडणें--उक्रि. कुरवंडी करणें; ओवाळणें; **ओवाळून टाकणें**. (मूर्ति, मूल इ० वरून).

कुरवंडा--वि. (कों.) उथळ; थोडें पाणी राहणारें (उंचट खाचर). याच्या उलट ओंडण, खोल.

कुरव(वं)डो--स्त्री. कुरवई पहा. 'तिया वाढिती कुरवंडिया। पर्पटेसी।' -ऋ ८२.

कुरवंडी--स्त्री. १ (काव्य) ओवाळणी; आरती; मानसाभोवतीं अथवा देवाभोवतीं दिवा वगैरे ओवाळतात ती; अरिष्ट नाहींसें होण्याकरितां तांदूळ, मीठ इ० नवरा नवरी यांच्याभोवतीं ओवाळितात ती. 'संपत्ति मदु सांडिजे। कुरवंडी करुनी.' -ज्ञा ९.३८१. 'कुरवंडी त्यावरून इंद्रपुरी टाकिली।' -वेसीस्व ७.७०. 'आवडला जीवा मना। करुनि कुरवंडि।' -रास १. ४५८. २ यावेळीं म्हणावयाचें गाणें. (क्रि. करणें.)

कुरवडया-कुरोडया--स्त्री. (क.) शेवग्यांतून पाडलेले सांडगे.

कुरवा--स्त्री. (नाविक) गलबताच्या पुढील खांद्यास आंतील बाजूस घालावीं लागणारीं व अशा आकाराचीं लांकडें.

कुरवाळणें--उक्रि. ममतेनें लहान मुलांदिकांच्या अंगावर हात फिरविणें; गोंजारणें. 'ऐकोनि संतोषिला अजनंदन। कुर्वाळी वदन सौमित्राचें।' [का. कूर=प्रेम करणें.] **कुरवाळा**-पु. कुरवाळण्याची क्रिया. 'नावेक केला कुरवाळा।' -कथा १.८. ३५.

कु(खु)रसी--स्त्री. १ खुर्ची. २ खांचें उथळें. [अर. कुर्सी]

कुरळ-ळित--वि. वेठाळलेलें; वांकडें; मोकळें सुटलें असतां ज्याचें वेटोळें होतें असें; सुशोभित (केश). 'भाळीं कुरळित केश रुळती।' [सं. कुरुल-कुरुल; का. कुरुळु=केंस; केंसाची वाटोळी वट]

कुर(रु)ळी--स्त्री. १ दशा; धोतरजोडा, पंचेजोडी यांच्यामध्यें दोन भाग करण्याच्या ठिकाणीं किंवा लुगडें वगैरेमध्यें शेवटीं पदराच्या ठिकाणीं आडवीं सुतें न भरतां निवळ उभीं सुतें (ताणा) असतात ती जागा. करळी पहा. २ खिजणी; चेष्टा. (क्रि० करणें). चेतवणी (हत्ती, घोडे इ० ना ज्यांची शक्ति दाखविण्याकरितां). (क्रि० काढणें). ३ एखादी गोष्ट लढा लावून शोधणें (एखाद्या

माणसाच्या आयुष्यांतील–त्यावर आरोप करण्यासाठीं आधार म्हणून). [सं. कुरुल] ०कोबी–स्त्री. कोबीची एक जात.

कुराईत—वि. (ना.) थोडें थोडें.

कुराड—स्त्री. (गो.) कुऱ्हाड.

कुराडें—न. सायक; शस्त्र; अस्त्र. कुऱ्हाड–डा पहा. कुऱ्हाड 'धनुर्धी योजिलें कुराडें । वज्रातुल्य तेजस्वी ।' –मुआदि ३२. २०. [कुऱ्हाड]

कुराण–न—न. मुसलमानांचा प्रख्यात धर्मग्रंथ. [अर. अल्कुर्आन्]

कुरापत—स्त्री. १ गुप्त दोष; व्यंग; खोडी; कुचेष्टा; कुचाळी; २ जखमेवर टोचणें. (क्रि० करणें). ३ भांडण उकरून काढण्याला काढलेलें निमित्त; कळ काढणें. (क्रि० काढणें; करणें). म्ह० बातकी बात, कुराकी कुरापत. [सं. कु+आपत्ति ?]

कुरापती—वि. कुरापत काढणारा; दोष उकरून काढणारा.

कुरी—स्त्री. १ उपद्रवकारक, त्रास देणारें भूत, रोग इ० चा उपद्रव न व्हावा म्हणून अमुक एका वेळीं अमुक एक उपाय करावा असे जे नियम ठरविलेले असतात ते; तो उपाय करण्याची वेळ; त्यावेळीं द्यावयाचा बळी; त्या वेळची क्रिया. 'भुताला कुरीवर बसविलें.' 'भुताची कुरी चुकली म्हणून उपद्रव होतो.' २ (सामान्यतः) ठराविक वेळ. 'कुरीवर दाणा दिल्हा असतां घोडा चांगला रहातो.' ३ एक झाड. ४ पाभर; धान्य पेरण्याचें यंत्र (चाडें व नळयाविरहित); कुरगी. ५ अर्धा बिघा (जमीन मोजण्याचें माप). ६ दलदलींत राहणारा एक पक्षी. [का. कुरी=मेंढी] **कुरीचें भात**–न. (क.) कुरीनें पेरून आलेलें भात.

कुरीति—स्त्री. वाईट वर्तन; वाईट तऱ्हा, रस्ता, मार्ग; दुराचार; दुर्वर्तन. [सं.]

कुरु—पु. एक देश.

कुरुंग—पु. डोळ्याच्या कोंपऱ्यांत असणारा तांबडेपणा; हें निधनतेचें एक लक्षण समजलें जातें. कुरुंद, कुरूम पहा.

कुरुचीमुरुची—क्रिवि. १ पर्यायानें; ठोकळ मानानें; आडमार्गानें; अन्यप; अडप झडप; अवांतर रीतीनें (मिळविणें, संपादन करणें). २ काटकसरीनें; बेताबेतानें (खर्च). ३ हळु हळु; थोडें फार (पोट दुखणें, ताप येणें). [ध्व.]

कुरुज—पु. (गो.) जनावरांच्या पोटांतील रोग.

कुरुठा—१ कुरटा-ठा २ अर्थ २ पहा. 'यांचा पहिला कुरुठा इंद्रियें.' -ज्ञा ३.२६८,४.१६६. –वि. २ शहाणा. 'जो कां तुम्ही शिक्षापिला । विद्या देऊनि कुरुठा केला ।' –ज्ञा १.९५.

कुरुंद—पु. १ एक प्रकारचा तांबूस रंगाचा, जातें, निसणा यांच्या उपयोगी पडणारा दगड. हा हिंदुस्थानांत फार सांपडतो. हें हिऱ्याच्या खालोखाल कठिण द्रव्य आहे. शुद्ध कुरंद अल्युमिना मातीचा बनलेला असून त्यांत चुना व सिकता यांचे अंश असतात. माणीक, नीळ हीं प्रसिद्ध रत्नें कुरंदाचीं आहेत. २ डोळ्याच्या पांढऱ्या भागावरील तांबडा ठिपका. कुरुंग पहा. –न. एक प्रकारचें गवत. [सं. कुरुविंद; का. कुरंद कल्ले; इं. कोरंडम्] ०**कुरुंदी**–वि. कुरंद दगडाचा.

कुरुंदी—स्त्री. लहान कोयती. कुरंदी पहा.

कुरुपणें—अक्रि. खवळणें; क्षोभणें; वाढणें; चढणें. 'मग वोसंडलोनि दर्पे । कामाही पित्त कुरुपे ।' –ज्ञा १६.३९४.

कुरुक्षेत्र—न. भारतीय युद्धाचें रणक्षेत्र. येथें कौरवपांडवांचें महायुद्ध झालें. [सं.]

कुरुळ—वि. कुरळ पहा. [का. कुरुळु=केंस, केसांची वर्तुलाकारबट]

कुरू—पु. राग; घुस्सा. (क्रि० येणें).

कुरू—स्त्री. (गो.) खूण. [का. कुरुपु=चिन्ह; खूण]

कुरूप—पु. व्यंग असलेला चेहरा. –वि. नकटेपणा, व्यंग इ० दोषांमुळें वाईट दिसणारें माणसाचें रूप, चर्या; विरूप; बावळटपणा. [सं. कु+रूप]

कुरूप—नपु. खडा अगर कांटा टोंचून (हाता-पायाला) आंत झालेलें क्षत, घर; भोंवरी; घट्टयासारखें कठिण आवाळू. [का. कुरुवे-वु=गळूं, जखम, क्षत]

कुरूम—पु. डोळ्याच्या पांढऱ्या भागावर येणारें मांस. कुरुंग पहा. –न. जहाजाच्या नांगराचा दोर, साखळदंड. कुरूप २ पहा.

कुरूळ—कुरळ पहा.

कुर्र—क्रिवि. (काव्य.) निश्चयानें. –शर (शुभानंद उद्योग ५.१४.)

कुर्रो(रौं)डी—स्त्री. कुरवंडी पहा. 'साकरेची कीजे कुर्रोंडी ।' –शिशु १८. 'केली स्वर्गसंसाराची कुर्रोंडी ।' –ज्ञा ६.२८.

कुर्की—स्त्री. (गो.) एक जातीची मासळी.

कुर्कुट—पु. कोंबडा. 'काक कुर्कुट जंबुक मार्जर ।' –दा ८.७.२६. [सं. कुक्कुट]

कुर्कूट—न. (गो.) कोनाडा; लहान कप्पेल.

कुर्गुटली—स्त्री. (गो.) अंगाची कवळी (?)

कुर्टे-ठें—कुरटा-ठा अर्थ २ पहा. 'कठीण कर्कश कुर्टे सांडावे ।' –दा १४.४.१. [का. कुरुचु=ठेंगु]

कुर्टेल—वि. (व.) खुरटलेला; खुजा. 'पोरगा जरा कुर्टेला दिसतो.'

कुर्डु—कुरड अर्थ २ पहा. ०**बाळथा**–पुअव. बायकांच्या कानांतील एक दागिना. 'कुर्डुबाळया मंडवीबाळथा चाले छबीदार ।' –अफला ५५.

कुर्डूकटारना—पु. एक प्रकारचा मासा.

कुर्डेकापु—पु. (कु.) घुबड.

कुर्ती—स्त्री. (कों.) माशाची एक जात; हे मासे आश्विन-कार्तिकांत पकडतात.

कुर्द—वि. कुद्ध (अप.). रागावलेला; क्रोधाविष्ट. 'त्रिंबकराव कुर्दसैन झाला.' –ऐपो ८८.

कु(नि)र्नीस-सा-सात-सी—कुर्निसात पहा. 'त्याला कुर्निसात करायला सांग' –स्वप १३९.

कुर्पण—कुरपण पहा.

कुर्बाण-णी—कुरबाण-न पहा.

कुर्मी-र्में—पुन. (चि.) वारीक ताप; जीर्ण ज्वर. **०करी**–वि. तापकरी; रोगी.

कुऱ्यात—न. (कों.) घराच्या भोंवतालचें परडें (पेरलेलें).

कुर्र—उद्गा. गोटयांच्या खेळांतील एक शब्द. कुरगोटया पहा.

कुर्रजांवचें—क्रि. (गो.) राग येणें.

कुर्रा—पु. १ अभिमान; ताठा; तोरा; अक्कड. २ मत्सर; द्वेष; चुरस; कुन्हा. (क्रि० धरणें; ठेवणें). **कुर्रेदार-बाज**–वि. १ नखरेबाज; अक्कडबाज; बुद्धिमान; हुषार. 'मनुष्य कुर्रेबाज, हा येथें असल्यास मारवाडचे सरदार लगामीं लावील.' –जोरा १०. २ सोंगटया खेळणारा. [अर. कुर्आ=पैज+फा. बाझ्]

कुर्ली—कुरली पहा. [सं. कुलीरक]

कुर्वी-र्वें—पुन. (चि.) काटकोणाजवळ विशाल कोन करणाऱ्या आकाराचें लांकूड. (उभा खांब डळमळूं नये म्हणून बसवतात.)

कुऱ्हय—स्त्री. (गो.) टपाल.

कुऱ्हा(ऱ्हे)—वि. (काव्य) कुबडा; वांकडा. 'आणि आपुली मायें। कुब्ज जरी आहे। तरी जीजें ते नोहे। स्नेह कुऱ्हें कीं।' –ज्ञा १८.९२७. 'पांगुळ कुऱ्हें आणी पावडे।' –दा ३.६.४१. [तुल. कुब्जा. सं. कुब्ज]

कुऱ्हा-बाज-दार—कुर्रा पहा.

कुऱ्हाड-डा-डी-डें—स्त्री. १ लाकडें फोडण्याचें एक लोखंडी हत्यार. फरशु; परशु. २ कुऱ्हाडीच्या आकाराचा बाणांतील एक प्रकार. 'अग्निमुखबाण सोडी कुऱ्हाड।' –जै ४३.२७. [सं. कुठार=कुऱ्हाड; का. कोडली; गु. कुहाडो–डी] (वाप्र.) **–डीचा घाव खोट्याचे कपाळीं**–जो दुसऱ्याचें वाईट करतो त्याचें वाईट होतें, दुसऱ्याकरितां तयार केलेल्या खड्ड्यांत स्वतःच पडणें. **आकाशाची कुऱ्हाड**–महत्संकट; दैवी आपत्ति. (क्रि० कोसळणें) **०पाजविणें**–कुऱ्हाडीला धार लावणें. **म्ह०** १ आकाशाची कुऱ्हाड कोल्ह्याचे दांतावर=एखाद्या चांगल्या माणसावर संकट कोसळणें. २ कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ =कुऱ्हाडीचा दांडा लांकडाचाच असतो व कुऱ्हाडीनेंच लांकडें तोडलीं जातात यावरून. सामाशब्द– **–डी खिळा**–पु. चापट व लांब लोखंडी खिळा. दीड इंचापासून एक फुटापर्यंत असतो. **–डी दांडा**–पु. शत्रूस मिळून स्वजनांचें वाईट करणारा; विश्वास घातकी; देशद्रोही. **–डी जमीन**–स्त्री. १ कुऱ्हाडीनें साफसूफ केलेली जमीन (शेतीची). २ साफसूफ करण्यापूर्वीची, मूळखंडें व बुडखे असलेली शेतजमीन. **कुऱ्हाड्या लगाम**–पु. कुऱ्हाडीच्या आकाराचे दांते असलेला उंच लगाम (हा माजलेल्या घोडयाला घालतात).

कुऱ्हाडा—पु. चापाचीं मळसूत्रें उकलावयाचें हत्यार, चावी. (इं. स्क्रू ड्रायव्हर.)

कुल—वि. १ सर्व; साप्र. 'कुल वजिरांला खबर दिली।' –ऐपो १०. [अर. कुल्ल] समासांत कुलजमा–खर्च–वसूल–इनाम–कानू–बाब. शिवाय कांहीं समास पुढील दिले आहेत. **०अक(ख)त्यार**–पु. सर्व सत्ता. 'फौजेमध्यें कुलअकत्यार,' –ऐपो १०६. [अ. कुल्ल्+अखतियार] **०अखत्यारी**–पु. १ सर्वाधिकारी. २ –वि. सर्व सत्ता असलेला **०अधिकार**–पु. सर्व सत्ता. 'पाटलांना गांवापुरते मुलकी, दिवाणी, फौजदारी वगैरे कुलअधिकार असतात.' –गांगा ४६. **०कारभारी**–पु. सर्वाधिकारी. **०कुल्ला-कल्ला**–पु. सर्वाधिकारी; पूर्ण अधिकार दिलेला मनुष्य; अनियंत्रित अधिकाराचा प्रधान; घरांतील मुख्य कारभारी; खासगी कारभारी. 'कुलकल्ला त्रिंबकजी डेंगुळ लगदि राहिले दिड बोट।' –अफला ४१. [अर. कुल्लकुल्लान] **०बाब-कानू**–सर्व कर आणि पट्टया आणि बाजाराचे सर्व हक्क घेण्याचा अधिकार (अथवा सर्व बाबी आणि सर्व कायदेकानू व रिवाज) दिले आहेत अशा अर्थाचा (इनामदाराच्या) सनदेंत आणि सरकारी कागदपत्रांत येणारा शब्द. **०मुख्त्यारपत्र**–न. (कायदा) एखाद्यानें स्वतःच्या सर्व हक्काबाबत अंमलबजावणीचीं कामें कोर्टांत व इतरत्र करण्याकरितां दिलेलें अधिकारपत्र; (इं.) पॉवर ऑफ अॅटर्नी.

कुल—न. १ वंश; गोत्र; जाति; कुटुंब; पुत्रपौत्रादि वंशपरंपरा. 'शुद्ध करीत दोहीं कुळां। जेवी प्रवाह गंगाजळा।' –एरुस्व १४.२५. ३ सजातीय समुदाय, थवा,कळप. ३ किनारा; थडी; तट. [सं.] सामाशब्द– **०कज्जल**–पु. आपल्या कुटुंबास काळोखी फांसणारा मनुष्य. [सं.] **०कंटक**–वि. आपल्या कुटुंबास पीडा देणारा. [सं.] **०कलंक**–पु. १ कुलकज्जल. २ आपल्या कुलावरील लांछन; डाग. [सं.] **०कुठार**–वि. आपल्या कुटुंबाचा नाशकर्ता. [सं.] **०क्षय**–पु. कुलाचार; कुटुंबांतील रूढी; वंशपरंपरा. 'एवं मीचि कुलक्षयु। शब्दब्रह्माचा।' –ज्ञा ९.२७७. [सं.] **०गुरु**–पु. कुलपरंपरेचा उपाध्याय; कुलोपाध्याय. [सं.] **०घातक-घ्न**–वि. आपल्या कुलाचा नाश करणारा. [सं.] **कुलज**–वि. चांगल्या कुळांत जन्मलेला; मोठया कुळांतील;

अभिजात; कुलीन. [सं.] ०तारक–वि. कुळाचा उद्धार करणारा. [सं.] ०तारण–वि. कुळाचा उद्धार करणारा. [सं.] ०तिलक–वि. स्वतःच्या कुळाला ललामभूत असा. [सं.] ०दीपक–दिवा–पु. स्वतःच्या कुळाला भूषणभूत माणूस, कुळास मान्यता, कीर्ति, मिळविणारा माणूस. 'जो यादवकुळींचा कुलदिवा।' –ज्ञा ८. २७०. [सं.] ०देवता–दैवत–दैवत्य–स्त्रीन. पूर्वज कुलपरंपरेनें ज्या देवाची देवीची पूजा करीत आले ती देवता; कुलस्वामिनी; कुलस्वामी. [सं.] ०धर्म–पु. कुळांत पूर्वीपासून चालत आलेले ठराविक दिवशीं ठराविक प्रकारचे-धार्मिक विधी, आचार. [सं.] ०ध्वंस–पु. कुळाचा नाश करणें अथवा नाश, वाताहात; धूळधाण. [सं.] ०नारी–पु. कुलीन स्त्री; कुलांगना; कुलवधू; उत्तम कुळांत उत्पन्न होऊन तदनुरूप सदाचारादि गुणसंपन्न असलेली स्त्री. [सं.] ०नाश–पु. निसवलेला किंवा धर्मबाह्य मुलगा. [सं.] ०पति–पु. १ कुळाचा मुख्य. २ विश्वविद्यालयाचा मुख्याधिकारी. (इं. चॅन्सेलर). 'विद्यापिठाचे कुलपतीहि हीच भाषा वापरतात.' –केले १.३३९. [सं.] ०परंपरा–स्त्री. बाप, आजा, पणजा किंवा पुत्र, नातू, पणतू इत्यादिरूप वंश परंपरा; वंशावळ; पिढी. [सं.] ०परंपरागत-परंपरायात–वि. पूर्वजांपासून किंवा पिढ्यांपासून आलेलें; पिढीजात; वंशपरंपरा. [सं.] ०परिपाठी–ही–स्त्री. कुलपरंपरागत आचार, चाल. [सं.] ०पर्वत–पुअव. कुलाचल व सप्तपर्वत पहा. [सं.] ०पालक–वि. कुलाचें संरक्षण करणारा, कुळांतील कर्ता पुरुष. [सं.] ०पुरुष–पु. पूर्वज; कुलांतील एक पुरुष; ज्याच्या कुळांत जो उत्पन्न झाला तो त्याचा. [सं.] ०भूषण–मंडण–न. कुलतिलक पहा. [सं.] ०मर्यादा–स्त्री. कुलाचा संप्रदाय, शिष्टाचार, मान; घराण्याच्या अलूचें लक्षण. [सं.] ०रीत–रीति–स्त्री. कुलाचार; कुलीन घराण्यांतील आचारविचार; रीतभात. 'दुःख परासि न यावें सत्य वदावें क्षमा न सोडावी। जोडावी कीर्ति असी कुलरीति तुम्ही कधीं न मोडावी।' –मोउद्योग ८.६. [सं.] ०वधू–स्त्री–स्त्री. १ कुलनारी पहा. २ चांगल्या गुणांनीं आपल्या कुलास भूषणभूत झालेली स्त्री. 'दिनत्रय सत्य जाण। होईन तुमची कुलस्त्री।' –गुच ३३.६९. [सं.] ०वान्–वंत–वि. कुलवंत पहा. [सं.] ०वृद्ध–पु. कुलाचा स्थापक, मूळपुरुष. [सं.] ०संप्रदाय–पु. कुलपरंपरागत आचारविचार, रिवाज, संप्रदाय. [सं.] ०स्वामी–स्वामिनी–पुस्त्री. १ कुलदेवता पहा. २ कुलगुरु. [सं.] ०हत्या–स्त्री. कुलध्वंस पहा. [सं.] ०हीन–वि. हलक्या कुळांत उत्पन्न झालेला; हीनकुळी; कमजात; कमअस्सल. [सं.] ०हीनसेवा–स्त्री. हलक्या कुळांत जन्मलेल्याची चाकरी, कुग्रामवास, कुभोजन, क्रोधमुखी भार्या यांपैकीं ४ थी स्थिति. [सं.] ०क्षय–पु. सर्व कुलाचा नाश; वंशनिर्मूलन. [सं.]

कुलक—न. एकान्वयी जे अनेक श्लोक असतात त्यांचा समुदाय, एकच अर्थ पूर्णपणें व्यक्त करणाऱ्या चारांपेक्षां अधिक श्लोकांचा समूह, गट. कालापाक, युग्म, विशेषक पहा. [सं.]

कुलकर्णी—पु. गांवच्या सरकारी वसुलाचा हिशोब ठेवणारा (शेतसारा व इतर बाबी यांचा); शिवाय इतर सरकारी कामाचें दप्तर याचेजवळ असतें. हा पाटलाच्या हाताखालीं काम करतो. याच्या हिशोबांत एकंदर गांवच्या जमिनीच्या क्षेत्रफळाची नोंद असते. कामाबद्दल यास इनामें असत. प्राचीन ग्रामसंस्थेंतील एक अधिकारी; हा बहुधा ब्राह्मण असे. म्ह० सोनार शिंपी कुलकर्णी आप्पा यांची संगत नको रे बाप्पा. [सं. कुल=गांव+करणिक]

कुलकुल-लोट—स्त्रीपु. कलकलाट; गोंगाट (शाळेंतील खेळण्यांतील, भांडणांतील, मुलांचा; पक्ष्यांची चिवचिव, किलबिल, चीलबिल, कावळ्यांची किरकिर, काव काव. [ध्व.] ०कुलकुलणें–अक्रि. १ कलकलाट करणें (पक्ष्यांनीं किंवा मुलांनीं). २ आनंदानें बेहोष होणें. [ध्व.]

कुलकुलॉ—पु. (गो.) हिवताप.

कुलकुली—स्त्री. १ घोडा किंवा घोडी यांना परस्परांबद्दल होणारी तीव्र कामेच्छा; माज. २ –अव. आनंदातिशय. (क्रि० येणें; होणें).

कुलंग—पु. लिंगायत लोकांमधील एक आश्रम व त्या आश्रमांतील व्यक्ति. –नामको.

कुलं(लां)गडें—न. १ भानगड; घोंटाळा; अडचण; कचाट; झेंगट. (क्रि० घेणें; करून घेणें.) २ कुटिल कारस्थान; हिकमत. ३ (कों.) (यंत्रांतील) चतुराईची व भानगडीची योजना; (मसलत किंवा बेत यांमधील) चातुर्य किंवा शहाणपणाची योजना, युक्ति. (क्रि० करणें.)

कुलं(लुं)गा-गें—वि. १ लहान आणि गुरगुबीत (कुत्रें, घोडा). २ ठेंगणा व मजबूत; वाटोळघा अंगाचा (माणूस). [फा. कुलंग=एक मोठें कोंबडें; करकोचा; ससाणा] ०कुत्रें–न. लहान व केंसाळ कुत्रें.

कुलंच-ज, कुलुंच—वि. शेपूटखळघा; रेंगाळणारा; धीरेधीरे चालणारा (घोडा); चालतांना ज्याचे मागील पाय एकमेकांस घासतात व त्यामुळें स्वारी करण्यास वाईट असा (घोडा). –अश्वप १.१०३.

कुलचा—पु. एक प्रकारची रोटी. 'सीरमाल, खमीरी, कुलचे वगैरे नांवाचे रोटघांचे प्रकार असतात.' –गृशि २.१६. [फा.]

कुलच्या—पु. एक प्रकारचा मासा. –प्राणिमो ८१.

कुलंज—न. एक प्रकारचें धान्य.

कुलंजन—पु. कोळंजन पहा.

कुलटा—स्त्री. व्यभिचारिणी स्त्री [सं.]

कुलडा-ड्डा—पु. (हिं. काशी) मातीचें पात्र, पेला; यांत बाजारांत पेय पदार्थ घालून विकतात; पाणी पिण्याचें मातीचें भांडें.

कुलथा—पु. (व.) कुळीथ; हुलगे. [सं. कुलित्थ]

कुलपणें—अक्रि. लंगडणें; लंगडत चालणें.

कुलपाद—वि. (गो.) जामबंदी; जखमी.

कुलपी-प्पी-प्फी—वि. बंदिस्त, कळ केलेलें (मळसूत्र इ०) [कुलुप] –स्त्री. तसराळ्यासारखें चिनी मातीचें एक भांडें. 'कुल्फ्या झांकणीमुद्धां' –रा २३.१११. **०गोळा**–पु. (लष्करी) बाँब; दारू, खिळे चाकूची पार्ती इ० पोटांत घातलेला तोफेचा स्फोटक गोळा. **०चुडा**–पु. खिळीची बांगडी. 'हातामधि घाल करकरीत कुलपी चुडे।' –पला ७८. **०विडा**–पु. सुपारी, वेलदोडे इ० सामान घातलेला, केळीच्या पानांत गुंडाळलेला व चोयीनें टांचलेला १०।१२ विडयाच्या पानांचा, समारंभांत आलेल्या पाहुण्यांना देण्यासाठीं तयार केलेला विडा. 'नेउन द्या तयासी कुलपी विडे।' –प्रला २१२.

कुलफा—स्त्री. (माळवी) घोळाची भाजी.

कुलवणें—सक्रि. (क.) कोलवणें; उडविणें; भिरकावणें (विटी).

कुलक्षण—न. अशुभदायक चिन्ह, स्वरूप, खोड, खूण; व्यंग. **कुलक्षणी**–वि. अशुभकारक, अनिष्टसूचक चिन्हांनीं, लक्षणांनीं युक्त; अवलक्षणी. [सं. कु+लक्षण]

कुला-ल्ला—पु. नितंब; टिरी; ढुंगण. (वाप्र.) **कुला बाहेर पडणें**–गुदभ्रंश (अगेड) होणें; अंग बाहेर पडणें. **कुल्ले थोपटणें**–आनंदानें टिन्या बडविणें. **कुल्ल्याला पाय लावणें**–पळून जाणें; सुं बाल्या करणें. **कुल्ल्यावर कुल्ला येणें**–लठ्ठ होणें. **मातीचे कुल्ले लावल्याने कोठें लागतात**?–निसर्गदत्त वस्तूप्रमाणें कृत्रिम वस्तु टिकत नाहीं या अर्थी. **म्ह०** रिकामा सुतार कुले तासी.

कुलां(ळां)गना—स्त्री. १ कुलीन स्त्री. २ आपल्या उत्तम गुणांनीं कुलाला भूषविणारी स्त्री. 'माकडाच्या गळां रत्न कुळांगना।' –तुगा ३१२९. [सं. कुल+अंगना]

कुला(ळा)गर—न. (गो.) पोफळीची बाग. [सं. कुल+आकर]

कुलांगार—पु. गृहकलह पेटवून किंवा घराची अब्रू गमावणारी कृत्यें करून कुलास डाग लावणारा पुरुष; कुळबुडव्या माणूस. [सं. कुल+अंगार]

कुलाचल—पु. पुराणप्रसिद्ध सात पर्वत. सप्तपर्वत पहा. [सं. कुल+अचल]

कुलाचार—पु. कुळांतील पूर्वापार चालत आलेल्या रूढ चालिरीती, आचारविचार. [सं. कुल+आचार]

कुलाचारी–वि. कुलाचार पाळणारा. 'कुलाचारी तुजविण हरी केवि सरती।' [सं.]

कुलाचार्य—पु. कुलोपाध्याय; कुलगुरु पहा. [सं. कुल+आचार्य]

कुलाप—न. (कु) कुलुप पहा.

कुलाब—पु. टोप; आच्छादन. 'टोपीस हिरा मोतीं मानीकाचे कुलाब घालोन.' –इम १३. [अर. कुलाब्=ससाण्याची टोपी; फेटयांतील टोपी]

कुलाबा-पा—पु. १ बिजागरीप्रमाणें उपयोगी पडणारी कडी. २ समुद्रांत गेलेली जमिनीची दांडी, चिरटी; भूशिर (अशी दांडी मुंबईस व आंग्र्यांच्या कुलाबा किल्ल्याच्या जागीं आहे). ३ लोंबणारी कडी; हलगी (पाळण्याची). ४ करवतीची वांकडी लांकडी पकड, मूठ. [अर. कुलाब=आंकडा] **कुलाबी**–वि. आंग्र्याच्या कुलाब्यासंबंधीं (रुपया वगैरे). **कुलाबेदार**–वि. दस्ती; हातांत धरण्याजोगी कडी वगैरे असलेलें; 'वरती झांकणी कुलाबेदार कुल्फी मज्बूत' –रा २२.३५. [अर. कुलाब=पकड]

कुलाभिमान—पु. चांगल्या कुलांत जन्म झाल्याबद्दलचा अभिमान; कुळाचा अभिमान. [सं. कुल+आभिमान]

कुलाभिमानी—वि. कुलाभिमान असणारा. [सं.]

कुलायिका—स्त्री. पक्षिशाळा. [सं.]

कुलाल, कुल्लाळ—पु. कुंभार. 'परि ते कुलालमतिचे गर्भी। उमटले कीं।' –ज्ञा ९.७४. [सं. कुलाल]

कुलावतंस—पु. कुळाचें, जातीचें भूषण, अलंकार. [सं. कुल+अवतंस]

कुलास—पु. (गो.) कलमी आंब्याची एक लांबट जात.

कुलिजन—न. कोळंजन पहा.

कुलित्थ—पु. कुळीथ; हुलगे; द्विदल धान्यांतील हें गरीब लोकांचें धान्य आहे. याच्या वेलाची उंची एक हात, पानें कांहींशी उडदाच्या पानासारखीं, शेंग वांकलेली व चपटी; बीचा रंग तांबूस असतो. काळ्या व पांढऱ्या रंगाचेहि कुळीथ असतात. याचें उकडून काट तयार करतात. –वगु २.५२. [सं.]

कुलियात—क्रिवि. तमाम; सर्व; सर्वथा. 'दोही दौलती कुलियात तुम्ही आम्ही मिळून सांभाळावी.' –रा ५.२३. [अर. कुल्लियात्]

कुलिवेल—स्त्री. एक झुडुप.

कुलिश—न. वज्र. 'कुलिश होई इंद्राचें' –जै ३९.६४. [सं.]

कुली—पु. मजूर; बिगारी; हमाल; गुलाम. [हिं.; ता. कुलि=मजूर]

कुली-ल्ली—क्रिवि. कुल; तमाम; सर्वस्वीं. 'कुली वजीर मुस्तेद करून उभे केले.' –चित्रगुप्त ६५. [अर. कुल्लि]

कुलीटान—न. एक प्रकारचें कापड. –मुंव्या १२३.

कुलीन-ळीण—वि. चांगल्या कुळांतील; खानदानीचा; श्रेष्ठ कुळांत जन्मलेला व तदनुरूप सत्क्रिया आचरणारा. [सं. कुल–कुलीन]

कुलुकलू—अक्रि. (गो.) मोठ्यानें ओरडणें. [ध्व.]

कुलुंगा—अक्रि. कुलंगा पहा.

कुलुंज—पु कुलंच पहा.

कुलुंजी—न. कांद्याचें बीं. –मुंव्या १०९.

कुलुली, कुलोली—स्त्री. १ कुलकुली पहा. 'असं कलुलीला आलेल्या येडकावानी काय करतायसा?' –तोर्व ९३. २ खाज; आवेग. ३ आरडाओरडा; आरोळ्या मारणें ४ बोंब मारणें; ओरडणें. ५ कोल्ह्याची हुकी, कुई. (क्रि० ठोकणें; करणें.) [सं. कल्लोल]

कुलुलु—क्रिवि. कुत्र्याला 'यू यू' म्हणून बोलाविण्याचा शब्द. [ध्व.]

कुलुप-फ—न. ताळें; टाळें; दरवाजा किंवा पेटी इ० बंद करण्याचें साधन. 'कवाडकुलुफाचें करूं बंधन।' –दावि १४३. [अर. कुफ्ल]

कुलेत—स्त्री. (गो.) बंडी; जाकीट.

कुलो—पु. १ ढुंगण, कुल्ला. २ कुलो हांक. [सं.]

कुलोच्छेद—पु. १ कुलध्वंस पहा. २ तळपट; सत्यनाश. [सं.]

कुलोद्धार—पु. कुळाचें रक्षण, तारण. –वि. कुळाचा किंवा जातीचा उद्धार करणारा. [सं. कुल+उद्धार]

कुलोपाध्याय—पु. कुलगुरु पहा. [सं.]

कुल्कुल्ला—पु. कुल (सर्व, साप्र) मध्यें पहा.

कुल्डई—स्त्री. (खा.) कुरडई पहा. (खाण्याची).

कुल्फी-गोळा—कुलपी व त्याच्या पोटांतील शब्द पहा.

कुल्या—स्त्री. नदीचा पाट, कालवा; शेतीकरितां काढलेला पाट, नाला; चर. समासांत–घृतकुल्या; मधुकुल्या; क्षीरकुल्या; तक्रकुल्या. (खादाड लोकांच्या भाषणांत). [सं.]

कुल्लस—वि. कुलंच–ज पहा.

कुल्ला—पु. उभी टोपी; फेटयाच्या आंत घालतात ती जरीची टोपी. [अर. कल्ह=डोकें; कुलाह्=टोप]

कुल्ला-ल्हा-ल्लाणा-ल्हाणा—पु. कुला पहा.

कुल्लाल-ळ—पु. कुलाल पहा. 'कुल्लाळाच्या हातें घटाच्या उत्पत्ति।' –तुगा २०१२.

कुल्ली—कुली–ल्ली पहा.

कुल्ली—पु. (गो.) खेकडा. [सं. कुलीरक]

कुल्हडा—पु. मातीचें लहान पात्र. कुलडा पहा.

कुल्हा(लाह)पोश—पु. टोपीवाला; इंग्रेज. 'तरी आम्ही आपले दोस्तीवर नजर देवून...कुलाहपोशाची तंबीचे कामावर नमूद जालों असो.' –रा १०.१८२. [फा. कुलाहपोश्]

कुवत—स्त्री. सामर्थ्य; शक्ति; बळ; जोर. 'हुजुरात वगैरे असतां त्याची काय कुवत आहे?' –ख १३१. [अर. कुव्वत]

कुवती—स्त्री. (गो.) हिरव्या रंगाचा लहान मासा.

कुंवया—पु. (कु.) नारळाचें सोडणें चेचतांना खालीं पडणारा भुगा.

कुंवर—पु. १ पांच वर्षांखालील मुलगा. २ (हिं.) युवराज; राजपुत्र. ३ दासीपुत्र. –शर. [सं. कुमार]

कुंव(वा)रकांडें—न. (कों.) कटिकुंवर; कोरफड. [सं. कुमारिका]

कुंवरा-री—पुस्त्री. (राजा. कु.) कोंवळा फणस. कुइरा–री पहा.

कुवरें—न. (कों.) एक जातीचा मासा.

कुंवला—पु. १ (राजा.) कुयलीचा वेल व तिची शेंग. २ लहान मुलाच्या गळ्यांतील सोन्याचा एक दागिना ३ कुवरा–री पहा.

कुंवली—स्त्री. १ (राजा.) खाजकुयलीचा वेल व त्याची शेंग; हिच्या खाजरी व गोडी अशा दोन जाती आहेत. २ आंब्याची कैरी. कुइरी पहा.

कुवलो—पु. (गो.) कोंवळा फणस. कुंवरा–री पहा.

कु(कुं)व(वा)सा—पु. आश्रय. 'अर्जुन मैत्रियेचा कुवासा।' –ज्ञा ६.१२५. [सं. कु+वस्=राहणें]

कुंवळ—पु. १ (राजा.) कोळ; चिंचा भात वगैरे कुसकरून तयार केलेलें पाणी, मिश्रण. २ सरबरीत ताकभात. ३ (कु.) साधी आमटी. ४ (गो.) ओली चटणी. ५ दोष; व्यंग, न्यून. (क्रि० काढणें). [कुंवळणें]

कुवळणें—उक्रि. (राजा.) चिंचा, भात, गूळ वगैरे पाण्यांत कुसकरून एकजीव करणें; कोळणें; गुरगुट करणें.

कुंवळा—पु. कांटेकुवळा नांवाचें एक झाड.

कुवळावचें—क्रि. (गो.) मऊ करणें; पिकविणें.

कुवा—पु. (हिं.) विहीर; आड. [सं. कूप, कूपक:, प्रा. कुवओ; बं. कुया; सिं. खहु; पं. खूह, कूआ; काश्मी. खुह्; ने. कुवा]

कुवा—पु. (कों.) पाण्यांत कुजलेला झाडांचा पाला. [सं. कुथ्=कुजणें]

कुवा-वो—१ (गो.) नागिणीचें झाड, लांकूड; हें कठिण व सरळ असतें म्हणून याचा तारवाच्या डोलकाठीकडे उपयोग करतात. याचीं फळें नागाच्या फणीसारखीं तांबडीं लाल असतात. –वगु २.४२. पुनर्नवा. २ डोलकाठी.

कुंवाक-की-कु—स्त्री. (कु.) पाणकोंबडी. [सं. कृकवाकु]

कुवाकर—स्त्री. एक पक्षी. [ध्व.]

कुवाड—स्त्री. (भि.) कु-हाड. 'लाकडें रोंडतां रोंडतां तिया कुवाड पायांम् पोडी. '=लांकडें तोडतां तोडतां त्याची कु-हाड पाण्यांत पडली. –भि १५. [सं. कुठार]

कुवाड-डें—न. १ कोडें; कूट प्रश्न. 'बोलतां वेदासि कुवांड।' –विपू २.३९. 'हें अर्जुना सकळ कुवाडें।' –ज्ञा ४.१४३. 'आपल्या कवित्वाचा कुवाडा।' –मुआदि १.६९. 'अनुभव हें कुवाडें। उकलावें।' –दा ७.४.३७. २ कुवेडें; मंत्रतंत्र; चेटूक. –वि. दुर्घट; मूढ. **कुवाडे पोवाडे**–पुअव. चुगल्या; चाहाडया. (क्रि० सांगणें).

कुवाद—पु. उलटा अथवा निरर्थक वाद; घासाघीस; कांक्षा, तकार. (क्रि० धरणें; करणें; घेणें). [सं. कु+वाद]

कुवादी—वि. वितंडवाद घालणारा.

कु(कुं)वार—वि. दहा ते बारा वर्षांच्या खालचा अविवाहित. 'तुला कांहीं कुंवार राहण्याचा प्रसंग येत नाही.' –धनुर्भंग नाटिका ३१. [सं. कुमार]

कुवारकांडें - फोड, कुंवारी—नस्त्री. कोरफड. [सं. कुमारी]

कुवारखांब—पु. (बे.) आढें तोलून धरणारा उभा खांब; धारण.

कुवारसवाशीण—स्त्री. (कों.) कांहीं देवतांच्या उद्देशानें कुमारिकेला जेवावयास बोलावून तिची पूजा इ० करून दक्षिणा देतात ती. [सं. कुमारी+सुवासिनी]

कुवारी-रीण—स्त्री. कुमारी; कुवार. 'कुंवारी करती विभाव। तोचि मनीं हखे होय।' –वसा १६ [सं.कुमारी]

कुवासना—स्त्री. वाईट इच्छा; मनाची वाईट ओढ. [सं. कु+वासना]

कुवासा—पु. १ आश्रय. कुंवसा पहा. 'तुं माझा कुवासा।' –पंच ३२. २ कैवारी. 'परतो भक्तीचा कुवासा। भवग्राहिकया आशा। बांधतसे धिवसां। स्तुती लागी।' –ज्ञाप्र ४८.

कुंवाळो-हाळो—पु. (कु. गो.) कोहळा.

कुविद्या—स्त्री. वाईट विद्या; पिशाच्च्योपासना; जारण. मारण, मंत्रादि चेटूक इ० बद्दलची विद्या. [सं. कु+विद्या]

कुंवीट—वि. घुरट; वाशट. कुवीट पहा.

कुवें-व्यें—न. १ गुरांच्या वांसरास सडी म्हणून जो रोग होतो त्यावर उपाय म्हणून त्याच्या तोंडावर डाग देतात तें. (क्रि० काढणें). २ एखाद्यास बडविण्याची क्रिया. कुटघाल पहा. [कुवेडें]

कुवेकाठी—स्त्री. (नाविक) डोलकाठी.

कुवेडें—न. १ दृष्टिदोषादि निरसनार्थ मंत्रावांचून सांगितलेली इतर क्रिया, उपचार, तोडगा; टाणाटोणा; चेटूक यावरून. २ वांकडया मार्गानें काढलेली युक्ति, मसलत. ३ कोडें; गूढ. (क्रि० घालणें; उघडणें). [सं. कु+विद्या ?]

कुवेळ—पुस्त्री. अशुभ काळ; अवेळ; अकाळ. [सं. कु+वेला]

कुश—पुन. होमहवन, यज्ञयाग, श्राद्धकर्म वगैरेच्या कामीं उपयोगी पडणारे दर्भ. [सं.]

कुशब्द—पु. अशुभ किंवा अभद्र शब्द किंवा भाषण; शिवराळ किंवा निंदा करणारा शब्द. [सं. कु+शब्द]

कुशल—वि. १ सुखरूप; खुशाल; कल्याणकारक (रोग, दारिद्र्य वगैरे विरहित). २ बुद्धिवान; चतुर; पटु; वाकबगार. [सं. कुश=दर्भ+ला=कापणें; सं. कुश्=प्रकाशणें] **०पट्टी**–स्त्री. राजपुत्राच्या जन्मासारख्या प्रसंगीं पाटील वगैरे गांवकामगारांवर जी पट्टी बसविण्यांत येते ती. [कुशल+पट्टी=कर] **०प्रश्न**–पु. वंदन; अभिवादन; दोघे ओळखीचे भेटले असतां; कसें काय ? अशा अर्थानें प्रश्न विचारावयाचे वेळीं उपयोग. [सं.] **०बुद्धि**–वि. कुशल अर्थ २ पहा. **०क्षेम**–पु. आरोग्य व सौख्य; खुशाली व सुख; आयुरारोग्य. [सं.] **–लार्थ**–पु. क्षेमसमाचार. हा शब्द फक्त पत्रांत येतो जसें–'स्वकीय कुशलार्थ लिहून पाठवावा.' [कुशल+अर्थ=हकिगत]

कुशल-ळ—न. क्षेम; कल्याण. [सं.]

कुशसार—न. दर्भोदक. 'गोमूत्र गोमय क्षीर। दधि घृत कुशसार।' –गुच २८.११७. [सं.]

कुशस्थळी—स्त्री. द्वारका. [सं.]

कुशा-स.—पु. १ (खा.) नांगराचा लोखंडी फाळ. २ खणावयाची चापट व लहान पहार; हिचा दांडा गोल असतो. [कुश]

कुशाग्रबुद्धि-मति—स्त्री. दर्भाग्राइतकी तीक्ष्ण बुद्धि; अत्यंत तीक्ष्ण बुद्धि; –वि. तीक्ष्ण बुद्धीचा. [सं. कुश+अग्र+बुद्धि]

कुशाद—वि. १ विस्तीर्ण; प्रशस्त; मोकळें (स्थळ, जागा). 'रान मैदान जागा कुशाद पाहून...' –खरे ४.१८४३. २ (ल.) स्वच्छ व मोकळें (लिखाण). [फा. कुशाद]

कुशान—न. (व.) आउतास चिकटणारा काडीकचरा. [सं. कुथ्–कुथित+तृण]

कुशावर्त—पु. एका कुशीवरील भोंवरा (घोडयाला); हें अशुभ लक्षण मानतात. [सं. कुक्षि+आवर्त]

कुशावर्त—न. गंगेच्या उगमाजवळचें एक तीर्थ. [सं. कुश+आवर्त]

कुशासन—न. दर्भासन. [सं.]

कुशिल्लॉ—वि. (गो.) कुजलेला. [सं. कुथ्=कुजणें; म. कुसणें]

कुशी—स्त्री. कूस; शरीराची एक बाजू; पोट. 'तरी आघुनी प्रतीती–। कुशी न निघे।' –ज्ञा १४.४०. जैंहूनिजन्मली कुशी। तैंहूनि आवडे रायासी।' –एरुस्व १.१६. [सं. कुक्षि; प्रा. कुच्छि] **कुशीचा**–वि. बावरया किंवा चोरटघा रीतीनें फायदा मिळणारा (धंदा).

कुश्चल–श्चील—वि. १ वाईट; खोटें; बेढंग; गैरचाल; अपवित्र; मलिन. ' तुका म्हणे कुश्चल मनीं। विटंबपणीं पडलीं तीं।' –तुगा ३२३४. २ कुत्सित; तिरस्कारार्ह; द्वेष्य; ओंगळ; घाणेरडें; चिळसवाणें; भ्रष्ट. (माणूस, स्थळ, वस्तु) ' तुंदा या मतिमंदा त्यजुनी निंदा कुश्चल धंदा हो।' –आप ३२. ' तपील खादाड आळसी। कुश्चील कुटील मानसीं।' –दा २.१.३१. [सं. कु+चल्–चाल] **०ठाय**–पु (काव्य) वाईट, घाणेरडी, चिळस आणणारी जागा.

कुश्चिका—स्त्री. घोडयाचा एक अवयव; खुरांचा मध्यभाग. –अश्वप. १.६२. [सं.]

कुष्ठ–ष्ठ—न. १ कोड; रक्तपिती; महारोग; पांढरें कोड. कोडाचे एकंदर १८ प्रकार आहेत. कोड उत्पन्न होण्यापूर्वी तेथील चामडें अतिशय गुळगुळीत किंवा खरखरीत होतें. तेथें घाम फार येतो, किंवा मुळींच येत नाहीं. चामडें बधिर होतें. तेथें व्रण लवकर होतात व उशिरां बरे होतात. अपथ्यानें ते पुन्हां उद्भवतात. रक्ताला काळसरपणा येतो. –योर २.३४०. हिरडा, करंजाची साल, मोहऱ्या, हळद, बावच्या, शेंदेलोण यांच्या चूर्णाच्या लेपानें कोड जातें. –योर २.३४७. २ कोष्टकोळंजन. [सं. कुष्ठ]

कुष्ठाण—स्त्री. कुजलेल्या, नासलेल्या पदार्थांची घाण; कुजकट वास. [कुजट+घाण]

कुष्ठाळें—न. (खा.) कुलुप.

कुष्ठी–ष्ठी—वि. १ रक्तपित्या; कोड झालेला; कोडया. २ घाणेरडें. [कुष्ठ]

कुष्ठेंपिष्ठें—नअव. व्यंगें; दोष; उणीवा. (क्रि० काढणें:बोलणें; सांगणें). केव्हां केव्हां कुष्ठपिष्ठ असाहि एकवचनीं प्रयोग करतात.

कुष्मांड—पु. कोहळा. [सं. कूष्मांड] **०नवमी**–स्त्री. कार्तिक वद्य नवमी. या दिवशीं ब्राह्मणांस दक्षिणेसहित कोहळ्याचें दान करतात.

कुष्मांड–१ रचलेली गोष्ट; खोटा आरोप; कुरापत; कुभांड (फसविण्याकरितां, नाश करण्याकरितां). (क्रि० करणें; काढणें; उठवणें; योजणें; रचणें). ' संशयाचीं कुष्मांडें। उचलीतसे पाखांडें।' –सिद्धांतसंहिता ४.१६२. २ भूत किंवा पिशाच्च. [कुभांड अप.]

कुष्मांड्या—वि. खोटा आळ घेणारा; कुभांड्या.

कुस—वि. (गो.) थोडें; चिमूटभर. [कूस; सं. कुश]

कुसक—वि. (गो.) कुजकें.

कुसकट, कुसका—१ कुजकट, कुजका पहा. २ (हेट.) भुसा.

कुसकर–रा–कूर—पु. (भाकरीचा) बारीक चुरा; बारीक चुरा करण्याची क्रिया. (भाकर, गबरी वगैरे). [कुसकरणें]

कुसक(कु)रणें—सक्रि. भुगा करणें; चुरणें; चेंदारणें; तुडविणें. (हातानें; पायानें–खाद्य वस्तु); तुकडे करणें (फुलें वगैरेचे); ओरबडणें आणि चुरगळणें. ' नाना कुचेष्टा मजसी करिती। उरीं कठोरीं दृढ कुसकरिती।' [सं. कुश+कृ]

कुसकी साळ—स्त्री. (गो.) (ल.) गचाळ माणूस.

कुसकुरां—पु. (गो.) कशिदा (लुगडें वगैरे वरील); [कुसर]

कुसकुशीत—वि. (गो.) जीर्ण.

कुसकूट—वि. (गो.) अगदीं थोडा (पदार्थ वगैरे).

कुसक्या काष्टीचा कुणबी—पु. उपहासानें, निंदेनें, तिरस्काररानें कुणब्यास म्हणतात.

कुसंग–ति—पुस्त्री. वाईट संगति; दुष्ट संगत; जिच्यामुळें अपकीर्ति, दुष्ट वासना उत्पन्न होते अशा लोकांचा सहवास. [सं.]

कुसगोम—वि. कुशीवर गोम असणारा (घोडा). [कूस+गोम]

कुसट–टाण, कुसणें—कुजट–टाण, कुजणें पहा.

कुसडा–डो—वि. १ (राजा.) कुजका; सडका. २ (गो.) तुसडा. **०घोणस**–पु. (कों.) घोणस; सापांतील एक जात; याच्या दंशानें झालेली जखम हळु हळु कुजत जाते.

कुसडॉ—वि. एक प्रकारची मासळी.

कुसडॉ–डो—स्त्री. एक वेलीची जात; एक प्रकारची वनस्पति.

कुसंतान—न. ज्यामुळें अपकीर्ति किंवा दुःख प्राप्त होतें अशी संतति. म्ह० कुसंतानापेक्षां निसंतान बरें. ' [सं.]

कुसधुणा–धुवणा—पु. (क.) शेवटचें अपत्य; ज्यामुळें कुक्षि धुतली जाते तो. [सं. कुक्षि+धू=धुणें]

कुसपट—न. १ क्षुद्रपट; क्षुद्र दोष. २ भांडणाचें मूळ कारण. **०काढणें**–क्रि. दुसऱ्याच्या मनाला त्रास होणारी गोष्ट हुडकून काढणें.

कुसंबा–बी—पुस्त्री. कुसुंबा–बी पहा.

कुसबांडी—वि. दोन्हीं बगलेवर पांढरे ठिपके असलेली (मेंढी). [सं. कुक्षि+पांडु]

कुसंबोरी—स्त्री. छोशिबीर. ' दोहीं विभागीं कुसंबीरी पत्रशाकें।' –ऋ ८३. [सं. कुस्तुंबरी]

कुसभोंवरा—कुशावर्त अर्थ १ पहा.

कुसमडणें-कुसमरणें, कुसमारणें—सक्रि. कुसकरणें; दाबणें; चुरडणें. (फुलें, वस्त्र).

कुसमी, कुचमी—स्त्री. (व.) खिसगणती.

कुसमुस—स्त्री. १ धुसफूस; मुसमुस; कुरकुर; जळफळ. 'ऐसा आनंदच्यारी दिवस । सवेंचि मांडिली कुसमुस ।' –दा ३. ४.२४. २ (काव्य) व्यर्थ श्रम; फुकट तळमळ; खवडव. 'जेयें नाहीं समजावीस । तेथें अवघी कुसमुस ।' –दा १८.५.६. 'विषयाचा विसरू पडे । इंद्रियांची कुसमुस मोडे ।' [ध्व.]

कुसमुसणें—अक्रि. १ कुरकुर करणें; आंतल्या आंत जळफळणें. २ फुंदणें, हुंदके देणें. 'कळतां घरच्यास कुसमुसिती ।' –दावि १५०. 'मुखासी लावितां निश्चित । कुसमुसती आंतल्या आंत ।' [ध्व.]

कुसर-री—स्त्री. १ कौशल्य. 'नाना प्रमेयांची परी । निपुणपणें पाहतां कुसरी ।' –ज्ञा १.८. 'नट नाटय कळा कुसरीं ।' –दा १.२.२१. २ कपट. [सं. कुशल]

कुसर-री—स्त्री. कस्तुरमोगरा; मधुमाधवी नांवाची वेल. हिचीं पानें मोठीं असून फुलें जाईच्या फुलापेक्षां मोठीं व पांढरीं असतात. –वगु २.३.

कुसर-सूर—पु. १ सूड. (क्रि० काढणें). २ दंश; डाव; द्वेष. (क्रि० धरणें). [फा. कुसूर] ०खोर–वि. आकसखोर; सूड उगविणारा (माणूस).

कुसरी—स्त्री. (कु.) एक झाड.

कुसरी—पु. (कु.) एक प्रकारचा मासा.

कुसरी—स्त्री. १ (काव्य) श्रेष्ठत्व; सुरेखपणा; सौंदर्य. २ चतुर; शहाणी स्त्री, सुप्रण. ३ कुटिल स्त्री; चेटकी; जादुगारीण. –वि. १ कुशल. २ कपटी. 'तो महा दुष्ट दुराचारी । चतुर्भुज जाहला कुसरी ।' –कथा २.२.९४. ०चें काम–न. नाजूक, सुरेखी, सुबक असें बंकशीचें काम.

कुसरीण-कुसरूड, कुसिरडा—स्त्रीपु. (कोंसाळ) सुरवंट; घुला. 'कुसरूड हे कोशवासी होण्यापूर्वी आपली बाह्यत्वचा सात वेळ टाकितात.' –मराठी सहावें पुस्तक पृ. २५२. (१८७५). [सं. कुश; म. कुस=तीक्ष्ण टोंक]

कुसरुडणें—अक्रि. सुरवंटाचे केस अंगास लागल्यानें अंगाची आग होणें, विकृति होणें. [कुसरूड.]

कुसली—स्त्री. (व.) तिफणीच्या दांत्यास लाविलेलें, मध्यें भोंक असलेलें, लोखंडी अणकुचीदार पातें; शेतकी हत्यार. [सं. कुश+ल]

कुसवळ—न. अतिशय पावसानें किंवा जमिनींतील ओलीनें झालेला पिकांचा नाश. (क्रि० पडणें). [कुसणें]

कुसवळ—स्त्री. (वे.) कुसें असलेलें एक प्रकारचें गवत; कुसळी गवत. [कुस]

कुसवा-सावा—पु. गर्भाशय; कुस (मातेची). मूल चांगलें किंवा वाईट निपजलें असतां मुलाच्या आईच्या संबंधानें वापरतात. उदा० इचा कुसवा चांगला, तिचा कुसवा वाईट, मुलें जगत नाहींत. 'महाराष्ट्रसूनें ज्या वीरकन्यांना जन्म दिला तिचा कुसवा आज वांझ झाला काय ?' –के २१.६.३०. [सं. कुक्षि, म. कूस; तुल० फा. कुस=योनी; लॅ. कोक्सा; ग्री. कुक्सोनी. कुस पहा.]

कुसवाण—न. (कु.) मासळीचें खत. [कुसणें]

कुसहा—वि. (ना.) चिक्कट.

कुसळ—न. १ धान्याचें किंवा गवताचें कूस, टोंक, सड; धस; तृणाग्र. हें फार बारीक व अणकुचीदार असतें. २ केरकचऱ्याचा कण. (क्रि० बोचणें; शिरणें; लागणें; अडकणें; मोडणें). 'कुसळें कोरडीं । बारेनें जाती बरडीं ।' –ज्ञा १३.५६९. [सं. कुश.] म्हo दुसऱ्याच्या डोळ्यातलें कुसळ दिसतें पण आपल्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं.

कुसळ, कुसळण, कुसळी—१ स्त्री. चेटकीण; लबाड बायको. मंत्रविद्येनें दुसऱ्याच्या घरचें लोणी इ० आणणारी स्त्री; २ सुगरण स्त्री; चतुर स्त्री. [कुशल]

कुसळी—वि. कुसें असलेलें; ज्याच्यापुढें बारीक अणकुचीदार धस असतात असें (भात, गवत).

कुसा—पु. कुसवा पहा.

कुसा—पु. (व. खा.) कुशा पहा.

कुसा—पु. १ ढेंकळें (नांगरट जमीनींतील) उलथींपालथीं करण्याचें लोखंडी हत्यार. २ या हत्याराचा लोखंडी भाग. ३ (खा.) खोदण्याचें एक हत्यार; लहान पहार.

कुसा—पु. (कों.) करडा रंग. कुसुंबा पहा. [कुसुंब ?]

कुसीद—न. ऋण; कर्ज; उसनी वस्तु. 'कुसीद घ्यावें पाहोन ।' –जै ८.२४. [सं. कुसीद]

कुसुंडी—स्त्री. (गो.) केळ्याची एक जात.

कुसुंब-बा—पु. १ करडईचीं वाळलेलीं फुलें. २ त्यांच्यापासून केलेला रंग. करडई पहा. ३ एक झाड. –वि. कुसुंबी पहा. [सं. कुसुंभ]

कुसुंबकरडई-डी, कुसुंबेकरडी—स्त्रीपु. करडई; कुसुंबा पहा.

कुसुंबा—पु. १ अफूच्या अर्काचा काढा; बोंडांचा अर्क; हा प्याला असतां कैफ येतो. २ भांवेत मिरें इ० घालून वांटून जे पेय करतात तें.

कुसुंबा-बी—वि. कुसुंब्यासंबंधीं (रंग व रंगविलेलीं वस्त्रें); कुसुंब्याच्या रंगाचें (पागोटें, पदर इ०). 'आपण जरी कुसुंबा शेला नेसुनि कडिचे घे हेरंबा ।' –अमृत १०१. [सं. कुसुंभ]

कुसुम—न. १ फूल; पुष्प. 'तियें कुसुमें सुगुटीं सुगंधें।' –ज्ञा १.१८. २ स्त्रीरज; विटाळ. [सं.] **॰चाप, शर**–पु. मदन; पंचबाण; पुष्पधन्वा.

कुसुमाकर—पु. १ फुलांची खाण, आगर. २ वसंत ऋतु. 'ऋतूंमाजीं कुसुमाकरु। वसंतु तो मी' –ज्ञा १०.२८३. [सं.]

कुसमो—पु. (गो.) बारीक केर. [कूस]

कुसूं—न. १ सांधा करावयाचा असतां एका लांकडाचा भाग दुसऱ्या लांकडांत भरण्याकरितां तासून तयार करतात तें. चवकटीच्या उखलींत बसण्याकरितां दाराच्या लांकडास जें टोंक पुढें आणलेलें असतें तें. उथळथांत बसण्याकरितां खांबास खालीं टोंक ठेवतात तें. २ घर, बाग, खेडेगांव इ० च्या भोंवतालची आवाराची भिंत, तट. ३ (कों.) धान्याचें, दाण्याचें कुसळ. [सं. कुश; किंवा कुस्=जोडणें; का. कुसि=कुसूं.]

कुसूम, कुशून—पु. टिपूचें कवायती पलटण. 'मापिल्यांनीं दोन कुशून व दोन रिसाले टिपूकडील लढाई करून गारत केले.' –रा ७.१२८. [तु. कुशून]

कुसूर-सुरी—स्त्री. १ भांडण. 'पाटलामध्यें व आम्हामध्यें कुसूर पडून...' –रा १५.३३. २ चूक; दोष; अपराध; उणीव. **कसूर** पहा. 'कुसूर माफ असावी.' [अर. कुसूर=चुकी.]

कुसूर, कसुरी—स्त्री. (राजा.) रानजाई; एक झाड.

कुसृष्टि—स्त्री. दुष्ट, वाईट कल्पना, युक्ति, मसलत, विचार. [सं. कु+सृष्टि]

कुस्करणें—कुसकरणें पहा. 'मज हृदयीं धरूनि समस्त। कुस्करिती निजबळें।' –ह ७.१५४.

कुस्करी—स्त्री. (यमक साधण्याकरितां आणि विरुद्ध अर्थ दाखविण्याकरितां मस्करी पासून साधलेलें रूप) भांडण; तंटा. **म्ह०** मस्करीची होते कुस्करी=थट्टेचें भांडण होतें. [मस्करी द्वि.]

कुस्काट, कुस्कुट—(कु. गो.) सुकें व निरुपयोगी गवत; कूस असलेलें गवत; कस्पट; कुसकरलेलें किंवा सहज भुगा होणारें गवत. [म. कूस+कट प्रत्यय]

कुस्कुरांध—न. (गो.) एक प्रकारची पोळी.

कुस्त—वि. थकलेलें; शीण झाल्यामुळें दुखणारें (शरीर) 'मार खाऊन अंग कुस्त झालें.' –मदमं १८६. [फा. कुश्त=ठार करणें, कतल करणें]

कुस्तमकुस्ता—पु. (ना.) झोंबाझोंबी; झुंज. [फा. कुस्ती]

कुस्ती, कुस्त—स्त्री. झोंबी; मल्लयुद्ध; अंगयुद्ध; बाहुयुद्ध. [फा. कुस्ती] **॰बाज**–वि. कुस्त्या खेळणारा.

कुस्तुमसांब—(गो.) थंडी. [पो.]

कुस्पट—कुसपट पहा.

कुस्पृष्ट-स्पिष्ट—न. खोड; वर्मे; न्यून; उणें; चूक; दोष. (क्रि० काढणें; निघणें). [सं. कु+स्पर्श–स्पृष्ट]

कुस्मड—न. (माण.) खोटा आरोप; आळ; कुभांड; **कुस्मांड** पहा.

कुस्मस्थळ—न. (गो.) १ कुंभ. २ मर्मस्थान. [सं. कुसुंभ=कमंडलु? +स्थळ]

कुस्मां(स्पां)ड—न. (प्र.) कुष्मांड. कुभांड; कुफरांड; आळ. (क्रि० करणें; काढणें; रचणें; उठवणें). [तु० सं. कुस्म्=दोष ठेवण्यासारखें हंसणें]

कुस्वभाव—पु. वाईट स्वभाव. याच्या उलट सुस्वभाव. [सं. कु+स्वभाव]

कुहक—वि. कपटी; ठक; दांभिक. 'म्हणोनि अगा ये कुहका। कपटिया मनमोहका।' –रास ३.३२०. [सं.]

कुहजक—वि. कुजलेलें. कुहिजक पहा.

कुहडें—न. १ कोडें; कूट. २ कुवेडें पहा. [सं. कुह=अचंबा वाटविणें]

कुहणें—अक्रि. कुजणें; घाण, वाईट होणें. 'कुहिलें पिशित जैसें। श्वानाचें कां।' –ज्ञा १३.५२१. [सं. कुथ्; प्रा. कुह=सडणें]

कुहना—स्त्री. दंभ; ढोंग; भक्तीचें, पवित्रतेचें अवडंबर; बोकेसंन्यास. [सं.]

कुहर—न. १ गुहा; गिरिकंदर. 'भ्रमानें राहे रे गिरिकुहरिं हा निद्रित हरि।' २ (ल.) विवर; खांच; खळी. 'तैसी अंतःकरण कुहरीं उपजली।' –ज्ञा ७.१२५. 'जननीच्या जठरकुहरीं। प्राणी असे नवमासवरी।' ३ कोठार; आगर. 'जें भुलीचें कुहर। वायुतत्त्वाचें अंतर।' –ज्ञा १३.११५.

कुहर—न. धुकें. 'अरुणोदयीं दाटे कुहर। निबिड पडे अंधकार।' –एभा १९.५३७. [हिं. कुहर, कुहा=धुकें, दंव; सं. कुहेडिका=धुकें]

कुहा—पु. थंडी; दमसरपणा; दमटपणा; सरदी (हवा; जमीन इ० ची). [हिं. कुहा=दंव, धुकें?]

कुहा—पु. (हिं.) विहीर; कुवा. 'एकांधें अधम आंधळें। जेवि.कुहा लोटिजे बळें।' –ऋ २८. 'दुपाउलीं अवचितीं। कुहामाजीं पडिला।' –ज्ञा ८.७०. [कुवा]

कुहाड-डा—पु. वेदना. –शर?

कुहार—न. कोठार. कुहर अर्थ ३ पहा. [सं. कुहर]

कुंहाळो, कोंहाळो—पु. (गो.) कोहळा पहा.

कुहिजक—वि. कुजकें; कुजलेलें. कुजका पहा. 'बहुकाळ ठेविलें सुवर्ण। त्यासि म्हणे कोण कुहिजकु।' –एभा १३.७७०.

कुहिजट—कुजट पहा.

कुहिजणें—१ कुजणें पहा. 'तरी कुहिजलें उष्टें खातां।' –ज्ञा १७.१५४. २ (ल.) कंटाळणें. 'डोळें कुहिजलें बाहु पांतां।' –शिशु १०४. [सं. कुथ्; प्रा. कुह=सडणें]

कुहि(ही)ट—वि. वासट; नासकें; कुजट; बुरसट (पदार्थ). 'हरयाची जुनी जर्जरी। कुहिट जाली।'–दा १.९.१७. २ (ल. व.) वाईट स्वभावाचा; कुरठा; खुनशी. **०खोबरें**–न. कुढया; खुनशी माणूस; खवट खोबरें. [सं. कुथ्; प्रा. कुह]

कुहिटला—वि. (ना.) कुहिजला; कुजलेला; नासका; घाणेरडा. [कुहिजणें]

कुहिटार—न. १ गवत किंवा विजलेले झांप (छपराकरितां); केंबळ; झांवळघा. २ जुनें केंबळ. –वि. केंबळी; गवती छपराचें. 'देशांत धाबे घरें, कोंकणांत कुहिटार घरें.' [सं. कुथ्; प्रा. कुह; तुल. सं. कुटिर]

कुहिटारू—वि. गवतानें किंवा झांवळघानीं शाकारलेलें; कुहिटार पहा.

कुहिना–हीन—वि. संशयी; मत्सरी; कुरठा; कुधाण पहा. [सं. कु+हीन]

कुहिरा–री–रें, कुहिला–हिली—कुहरी–ली पहा. 'काळें तेंचि धवलें। देखणें तेंचि आंधळें। अर्थे तेंचि सगळें। कुहिऱ्या केळें केवीं होती।'–एभा १०.७३९. 'यांनीं येथें कुहिली लावली असती.' –तुफान ४७.

कुही—कुई पहा.

कुही—वि. डोंगरी. 'सर्कारांत कुही शेळीचें प्रयोजन आहे.' –समारो १.९७. [फा. कोह=पर्वत; कोही=डोंगरी]

कुहीटुळी—स्त्री. कुत्रकी घाण. 'बाळपणींची कुहीटुळी। बाहेर घाली।'–ज्ञा ६.२१६. [कुहीर]

कुहु—अ. कोकिलेचा शब्द; त्याचें अनुकरण. [ध्व.]

कुहू—स्त्री. अमावास्या. 'तैं राहु गिळी सूर्यासी। सूर्यचंद्रासी कुहू करी।'–एभा २३.८२८. 'कीं तममय कुहूची यामिनी।' –ह १६.३२. 'कीं कुहूचें काळोखें भरिलें' –रावि ६.६४. [वै. सं. कुहू=अमावास्या]

कुहेडें—न. कोडें; कूट प्रश्न. कुहेडें पहा. [सं. कुहू=अचंबा वाटविणें]

कुह्या—पु. पावसाळयांत हातापायांच्या बोटांच्या सांध्यांतून पडणाऱ्या भेगा, क्षतें. कुहे (अव.) सुध्दां योजतात. [सं. कुथ्; प्रा. कुह=सडणें]

कुळ—न. कुल पहा. 'जो यादव कुळींचा कुळदिवा।' –ज्ञा ८.२७०. –पु. १ शेताचा खंडकरी; कूळ. तेलगूंत कुळ म्हणजे शेतकरी असाच अर्थ आहे. 'कुळाला बरोबर घेऊन आलों आहें.' –नामना १०३. २ (मुलकी) सरकारसारा भरणारा; मालगुजार. ३ (कु.) कुलदेवता; कुडाळदेशकर ब्राह्मणांच्या प्रत्येक गोत्राच्या घराण्याची पाटावर पूजलेली कुलदेवता. शिवाय कूळ पहा. [सं. कुल] **०दिवा–दीप**–वि. कुळदीपक; कुळाची अभिवृद्धि करणारा. 'जो यादव कुळींचा कुळदिवा।' –ज्ञा ८.२७०. 'तैसा वंशीं कुळदीप नसतां।' –संवि २६.३०.

कुळई—स्त्री. रानांत सर्वत्र होणारी एक पालेभाजी; फोडशी.

कुळक—न. इच्छा; हेतु? 'म्यां देखिलें नाहीं पुत्रमुख। दृष्टि राहिलें असे कुळक।'–कथा ३.१५.५४. शल्य? [सं. कीलक?]

कुळक—स्त्री. (राजा.) कुळीक; कालरा; पटकीचा एक प्रकार; मोडशी फार झाल्यामुळें ओक, हागव्हावयाजोगी होणारी विकृति.

कुळकट–त—नस्त्री. कुळाची किंवा आपल्या स्वतःची आद्यंत हकीकत (मुख्यतः पापाची, गुन्ह्याची, अथवा मूर्खपणाची); वंशवृत्त. [कूळ+कथा]

कुळकर्णी—स्त्री. कुशलता; चातुर्य. 'शुंजूची कुळकर्णी जाणिती।'–ज्ञा १.११३.

कुळकर्णें—अक्रि. कुळक, पटकीचा आजार होणें.

कुळकर—पु. (कु.) कुलदेवतेची पूजा करणारा; पुजारी अधिकारी. [कुल]

कुळकरण—न. १ कुळकर्ण्याचें काम, अधिकार. २ (थट्टेनें) कुल्ला; ढुंगण.

कुळकरणी—पु. प्राचीन ग्रामसंस्थेंतील एक प्रमुख अधिकारी. बलुतेदार. कुलकर्णी पहा. म्ह० सोनार शिंपी कुळकर्णी भाप्या, यांची संगत नकोरे बाप्या. [सं. कुल+करण]

कुळकाविर्णे—सक्रि. कुळीक उत्पन्न करणें, आणविर्णे. [कुळक]

कुळकुळर्णे—अक्रि. १ जळजळीत होणें. 'विस्तव कुळकुळला.' [सं. कुल्=जळणें द्वि.] २ (गो.) कुळकुळळणें=घाबरणें; भिणें.

कुळकुळीत—वि. १ काळघा रंगाचें आधिक्य दाखविण्यासाठीं योजिलेला शब्द; उ० काळा कुळकुळीत. [वै. सं. कुल्=जळणें द्वि.] २ (गो.) मातलेला; लहर.

कुळकोटी—स्त्री. कुळकथा (वाईट अर्थानें); कुळकट पहा. 'अवघी कुळकोटी आहे मज ठावी। विश्वास गोंसावी कोण शोभा।'–ब ५२९.

कुळघडणी—स्त्री. कुळकर्ण्यानें गांवांतील प्रत्येक कुळाचा ठेवलेला हिशेब, हकीकतीचा तक्ता. यावरून वार्षिक रयतवार जंत्री तयार करतात. [सं. कुल+घट्]

कुळचा—पु. चुळका; ओंजळ. [चुळका वर्णविपर्यास]

कुळंजन—कोळंजन पहा.

कुळडाळ–ढाळ—न. शेतकरी, कुळें वगैरे. 'मृताच्या सर्व नोकर लोकांस व कुळाढाळांस मेजवानी देतात.' –आगर ३. १५९. [कुळ द्वि.; कूळ+ढाळ]

कुळणी—स्त्रीन. विशेष प्रकारचें धातूचें, मातीचें भांडें;(गो.) कुळणें=मातीची काहील; धान्य भाजण्याचें मडकें. [सं. कुल्+अलें]

कुळपट—न. १ गुप्त दोष; वर्म; व्यंग; खोडी. २ दोष; चूक, गुन्हा. (क्रि० काढणें; निघणें.)

कुळपटा-पाट, कुळपुटा-टी—पुस्त्री. धलपी; कपटा; चीप; तुकडा.

कुळपट्या—वि. कुळपटें, वर्म, खोडी व्यंगें वगैरे काढणारा; गुप्त फोडणारा. [कुलपट]

कुळंबट-बाऊ-बावा, कुळंबी हिशेब—वि. 'कुण' मध्यें पहा.

कुळबांगडी—स्त्री. मल्लयुद्धांतील एक प्रकार. 'कळविकळ कुळबांगडी। अंगुठा कोंपर चरण ओढी।' –कथा ३.११.११७.

कुळंबीण—स्त्री. कुणब्याची बायको; कुणबीण पहा.

कुळव—पु. नांगरलेली जमीन सपाट करण्याचें एक शेतकीचें अवजार. यानें जमीन भुसभुशीत करतात व गवत इ० काढतात; 'नागर, कुळव, पाभर चालवितांना तहान लागली कीं, ज्वारयाचें पाणी या ठिकाणचेंच.'–खेया ७,(क्रि० हाकणें;हाणणें). [सं. कुल] ०मोडक्या–पु. कुळव हांकणारा. ०पाळी–स्त्री. कुळवाची पाळी; शेतावरील कुळवाची एक फेरी. (क्रि० घालणें).

कुळवण-णी—स्त्री. जमीन साफ करण्याचें काम. 'कर्म कुळवणी। न लगे धर्मपाळी दोन्ही।' –तुगा ३६०. [सं. कुल]

कुळवंत-वान—वि. श्रेष्ठ कुळांत जन्मलेला; कुलीन घराण्यांतील. [सं. कुल] **कुळवती**—स्त्री. कुलवंत, कुलीन, कुलवान स्त्री; कुलवती. 'मदें ताठण्याचा कुळवति अहंकार न करीं।' –सारुह ७.१५२.

कुळवाड—स्त्री. उदीम; शेतकी; कुळवाडी पहा. ०की–स्त्री. शेतकी. ०पण–न. शूद्रपणा. ०समजाव(बि)शी–समजूत–स्त्री. अडचणी किंवा शेतकरी लोकांस समजेल अशा रीतीनें त्यांच्याच भाषेंत समजावून सांगणें. ०हिशेब–कुणबी पहा.

कुळवाडी—पु. १ कुणबी; शेतकरी. 'गाणगापुरीचा कुळवाडी। मार्गी लग्न कर जोडी।' –दासपदें पृ. १३०. २ शूद्र; पांढर पेशा नव्हे असा; हलक्या जातीचा. –स्त्री. शेतकी; उदीम; कुणबावा; 'कुळवाडी रिणें दाटली।' –ज्ञा १३.५६५. 'कुळवाडी त्याचीच वाढते।' –ज्ञानदी १८.२३२७. 'तळीं विहिरी कुळवाडी करणें।' कां ते लावणें द्राक्षी आम्लवर्गे।' –स्वानु ५.३.५०. ३ रोजगार; व्यापार; व्यवसाय. 'वाडिलाली सर्व मुद्धाची कुळवाडी।' –ज्ञा ६.४४८. –एभा २३.१४०. 'पुंडलीक पाटील केली कुळवाडी।' –तुगा २४७. ४ देवस्थेच. 'कुळवाडि यांचि आशा। चाळीत असे।' –ज्ञा ३.२४६. [सं. कुल+वाडी (=देशी वृत्ति वाचक प्रत्यय)] ०कर–वि. शेतकी करणारा. 'आणि मना ऐसा आवरी। कुळवाडी करु।' –ज्ञा १३.२८.

कुळवारी—स्त्री. शेत करणाऱ्या कुळांचा तक्ता, यादी (गांव अथवा जिल्ह्याचा). कूळवार पहा.

कुळविणें—सक्रि. कुळवानें जमीन साफ करणें. कुळवणी करणें. [कुळव]

कुळवें—न. (राजा.) रान तोडून प्रथमवर्षीच तेथें नाचणीचें पीक काढतात असें शेत. [सं. कुल]

कुळाकुड—न. वाईट लांकूड. 'तुका म्हणे काचे राहे कुळाकुड। अवगुण तो नाड ज्याचा तया।' –तुगा ३४०५. [कु+लांकूड]

कुळागत—न. खेड्यांतील स्थायिक अथवा वतनदार घराणें. (समासांत) कुळागत–आचार–धर्म–व्यवहार संप्रदाय. [कुल+आगत]

कुळागर—न. १ (गो.) पोफळीचा बाग; २ घराजवळचा बाग; परसूं. 'त्याच्या सभोंवतीं घनदाट भाटानीं व कुळागरानीं वेढलेलीं लहान लहान घरें ...' –सह्याद्रीच्या पायथ्याशीं पृ. ८९. [कुल+आगर]

कुळाचळ—पु. कुलाचल; सप्तपर्वत पहा. 'कनक कलश कुळाचळा। हेळणा करिती हेळाची।' –मुआदि ४६.४. [सं. कुलाचल]

कुळार—न. (गो.) माहेर. 'तिकां कुळार ना.' [कुळागर]

कुळारग—पु. १ खेडयांतील जमीनदार, वतनदार (समुच्चयानें); शेतसारा देणारीं कुळें; वतनदार कुळांचा वर्ग, समुदाय २ (गो.) देणेदारांची यादी, जंत्री. –स्त्री. १ कुळांपासून येणें असलेली रक्कम. 'आमची दहा रुपये कुळारग बुडाली.' २ कुळांना आगाऊ दिलेला पैसा. ३ त्यांना आगाऊ पैसे देणें, पैसे वसुल करणें इ० व्यवहार, प्रकार. 'आम्ही दहा हजार रुपयांची कुळारग केली.' कुळारगी असेंहि रूप आढळतें. ४ (क.) कुळाकडे विशिष्ट हक्कानें असलेली कायमची जमीन. 'कुळारग व खासगी मिळून पांच बिघे जमीन आहे.' कुळारग वार–वर्ग पहा. –वि. (राजा.) सरकारच्या अधिकाराखालीं शेतकऱ्यांनीं, कुळांनी वसविलेला (गांव); याच्या उलट खोतीचा (गांव); कुळाकडे असलेली (जमीन) खोतीची नव्हे अशी. [कूळ+आकर–? आयर–आरग] ०गांव–न. कुळारगी गांव, ज्यांतील सर्व जमिनी कौलदारांनीं धारण केल्या आहेत व ज्यांची वहिवाट गांवकऱ्यांच्या संमतीनें गांवकामगार पाहतात तो गांव. ०पट्टी–स्त्री. कुळवार पट्टी. ०वार–वर्ग–क्रिवि. प्रत्येक कुळामार्गे; दर कुळामागील

(खेडचांतील शेतकऱ्यांच्या). (याद करणें, वसूल करणें–घेणें, पट्टी, वांधा, हिशेब, बाकी, शेतें इ० शीं योजला जाणारा शब्द).

कुळावा—पु. (कु.) लग्न जमविणारा मध्यस्थ. (हेट.) म्हाला. [सं. कुल]

कुळावी—पु. (गो.) कुळदेवतेचा भक्त. [सं. कुल]

कुळाक्षरी—पु. सर्वाधिकारी; कुलाखत्यारी. ? 'धाकले नाना कुळाक्षरी त्याच्या मोहरले फुलशहर.' –ऐपो १३३. [फा. कुल+मख्त्यार].

कुळिजन—पु. कोळंजन पहा.

कुळिपु—वि. कुलवंत; कुळ पावन करणारा. 'हा नोहेचि कुळिपु। यया नाहीं माएबापु।' –शिशु ८६१. [सं. कुल+पू]

कुळिया—पुअव. दिवे. 'भैरगुंडे कुळिया चहुंकडे।' –भाए ४४२. [सं. कुल्=जळणें]

कुळिवंत—वि. कुलवंत पहा.

कुळी—स्त्री. कुल; वंश; गोत्र; जात; घराणें. या शब्दाचा उपयोग मर्यादित करतात. लग्नकार्याच्या वेळीं जातीचा कुलीनपणा, थोरपणा पहाण्यासाठीं कुळीचा विचार करतात. [कूळ]

कुळी—स्त्री. एक पालेभाजी. [सं. कुली]

कुळी—स्त्री. (राजा.) गुळणी; चूळ.

कुळी(ळि)क—स्त्री. १ मोडशी; कॉलरा; पटकी. कुळक पहा. 'कुळिक तरळ कामिणी।' –दा ३.५.२५. २ (ल.) अजीर्ण; तिटकारा. 'शांभवेची कुळिक।' –भाए १७६.

कुळीक—स्त्री. (वे.) खोड.

कुळीत—न. रयतेपासून किंवा कुळापासून यावयाचा पैसा (खंड वगैरे). [कूळ]

कुळीत-थ-द—पु. हुलगा; कुळथी; एक द्विदल धान्य; हे कोंकण, मद्रास, बंगलोर, कोचीन इकडे पिकतें. याला फार पाऊस नको. हें हलक्या जमिनींत पिकतें. गुरांना व माणसांना खावयास उपयोगी. याला गरिबाचें धान्य म्हणतात. –शे ११.२८. [सं. कुलित्थ]

कुळुक—स्त्री. गंडांतर. 'त्याला किनई आठव्या वर्षी कुळुक होती.'

कुळूमसुपारी—स्त्री. सुपारीचे काप, कत्रण, खांडें. [?]

कुक्षि-क्षी—पु. १ बाजू; कूस; काखेच्या खालचा आणि कमरेच्या वरचा भाग (आंतील किंवा बाहेरचा). 'करुनि सडा संमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षीं।'–होला १६.२ पोट; पोटाची खळगी; ३ गर्भाशय ४ (तरवारीचें) म्यान. –शर. ०वात–पु. कुक्षींत उठणारा वायगोळा; पेटका; वायु (पेटका उत्पन्न करणारा). [सं. कुक्षि. कुसवा पहा.]

कुक्षिंभरि—वि. अधाशी; खादाड; बराडी. [सं. कुक्षि=पोट+भृ=भरणें]

कू—न. की पहा.

कूं, कू—अक्री. एखादी व्यथा झाली असतां मनुष्याच्या तोंडून निघणारा दुःखोद्गार (चूं, हूं, इस्, उस्, हुश् याप्रमाणें). (कि० म्हणणें; करणें). हाय पहा. [ध्व. सं. कु=कूं कूं शब्द-करणें).

कूआ—पु. कुवा पहा. [सं. कूप; हिं. कुआ]

कूक—स्त्री. बांग; साद; आरव (कोंबडा इ० ची). [ध्व.]

कूकणें—अक्रि. आरवणें; ओरडणें; शब्द करणें. 'जो नारायणु नाभीकमळीं कूके।' –दाव ३६८. [कूक]

कूकू—उद्गार. कुत्र्यास बोलावण्याचा शब्द; यूयू. [ध्व.]

कू(कु)च—न. १ प्रयाण; मजल (सैन्याची); तळाची उठावणी; तळ हलविणें. 'हली हैद्राबादेहून नवाबाचीं चार कुचें टिपूच्या मोकाबल्यावर जाहलीं.' –ख ८.४३२५. 'तेथून कुच केलें कटकाला।' –ऐपो ११. २ (सामा.) प्रयाण; गमन; प्रस्थान; निघून जाणें. (कि० करणें). 'हेळापट्टण लक्षुनियां पंथ। कुच मुक्काम साधीतसे।' –नव १६.१०२. ३ (ल.) मृत्यु. [फा. कुच्]

०**दरकूच-बकूच**–क्रिवि. मजल दर मजल; सारख्या मजला करीत. 'आम्ही आपले दोस्तीवर नजर देऊन कूच–बकूच रवाना होऊन गेलों असों' –पया ४८६. **कुचाचा नगारा वाजघिणें**–पळणें; कूच करण्याची सूचना देणें.

कूच—वि. (हिं.) निरर्थक; निरुपयोगी. उ० कुचकामाचें कुचकामाचा पहा.

कूचट—क्रिवि. मजल दर मजल. 'सोडिला दखन कूचट आले नीट काम मोठें जबरा केलें।' –ऐपो ४३५. [फा. कूच्]

कूंचा—कुंचा पहा. 'ब्रह्मतेजाचा कूंचा ढळें। मुगुटावरी।' –शिशु १११.

कूज—स्त्री. नाश; विलय; कुजणें. [कुजणें]

कूंजणें—अक्रि. शब्द करणें (पक्षी वगैरेनीं). 'जे कूंजते कोकिल वनीं।' –ज्ञा ६.४५०. [सं. कूजन]

कूंजद—स्त्री. दोन्ही बाजूंना तीळ लावूनत यार केलेली पोळी. –गृशि २.२३.

कूट—न. १ मिरपूड, मिरें, मोहऱ्या, मेथ्या इत्यादि कुटून केलेली पूड (लोणचें वगैरे करितां). २ सडलेल्या तांदुळांतील बारीक कण, भूस, चूर्ण. (ल.) ३ नाश; पीठ; नायनाट. 'कानसुलां भालीं। आंगें कूट जालीं।' –शिशु ९७०. 'ब्रह्मस्व-विषामी करी कूट। ऐसा त्रिलोकीं देव नसे।' –जै १.८३. [कुटणें] ०**काढणें**–क्रि. यथेच्छ ठोकणें, बडविणें.

कूट—न. (कु.) माशाचा तुकडा.

कूट—न. (तंजावरी) अर्धवट पातळ भाजी; रस्सा. [का. कुट्टु]

कूट—स्त्री. लबाडी; कपट; निंदा. 'न साहावे तुम्हां या जनाची कूट।' –तुगा ३१३. [सं. कूट] **०खाणें-कुटणें**–क्रि. निंदा, चुगली करणें. 'कूट खाती मागें पुढें । जाती निरयगांवा पुढें।' –तुगा ९९९. **०शासन**–न. बनावटहुकूम, आज्ञापत्र, सनद. [सं.] **०साक्षी**–वि. खोटी साक्ष देणारा. **०साक्ष्य**–न. खोटी साक्ष. [सं.]

कूट—न. १ कोडें; अंकगणितांतील अवघड प्रश्न; गूढार्थ; गूढ श्लोक; उखाणा. २ गुप्त मंडळ; कट; जूट; एकमतानें केलेली मसलत; एकोपा; (सामासांत) त्रिकूट. ३ वधूवरांच्या पत्रिकेचा विचार करतांना (वर्ण, वश्य, योनि, खेचर, गण, कूट, नाडी वगैरे) ज्या ३६ गुणांचा विचार करावयाचा असतो त्यांपैकीं एक.[सं. कूट] **०तान**–स्त्री. (संगीत) स्वरक्रमांत फेर करून तयार केलेली तान. **०प्रश्न**–पु. कोडें; गूढ (धार्मिक, वेदांत इ० विषयक). –गांगा १३६. [सं. कूट] **कूटस्थ**–वि. १ विस्कलित झालेल्या कुटुंबाचें, घराण्याचें मूळ (पुरुष स्त्री, वगैरे). (कायदा) प्रत्येक वंशाचा पहिला ज्ञात असलेला (पुरुष). २ सर्व एकसारखा; सर्वत्र आणि सदोदित एकच एक असणारा; अविनाशी; निर्विकार (ईश्वर, आत्मा, आकाश) ३ देहाविच्छिन्न (ब्रह्माचा कल्पित) भाग. 'येचि देहीं कूटस्थ।' –एभा १०.३२८. ४ मायेच्या संगतीनें असणारें चैतन्य, आत्मा. 'आणि कूटस्थु जो अक्षर। दाविला पुरुषप्रकारु।' –ज्ञा १६.४३. ५ सर्व भूतांच्या मूळाशीं असणारें प्रकृतिरूप अव्यक्त तत्त्व (त्यास अक्षर असें म्हणतात). –गीर ८०८.

कूट—न. १ पर्वत शिखर. मलयकूट. 'कूटतुल्य ही बर्फ पाहरे।' –नवनीत पृ. ४२१. २ धान्याची रास. [सं. कूट]

कूट—(गो.) हळकुंड; हळकुंडाचा तुकडा. कुडें कुट पहा. [कुटका ?]

कूटी—स्त्री. (महानुभावी) निंदा; खोटेपणा; अपवाद; कूट पहा. 'तान्हयातें पाशी करावे। जाणतयातें अलग धरावे। ऐसें जर माया घेतले जावे। तर कूटी पावे।' –ज्ञाप्र ११०६. [सं. कूट]

कूड—पु. १ बांबूच्या कामटया, कारवी, रिपाड, तट्टया इत्यादींवर चिखल लिपून तयार केलेली भिंत. (क्रि० घालणें). 'तों तृणाचें कूड घातलें।' –ह १६.१००. [सं. कुड्य; प्रा. कुड्ड] २ कुंपण; वई (कांटयांचें, झाडांचें). **म्ह०** रिकामा न्हावी कुडाला तुंबडी लावी.

कूड—स्त्री. १ शरीर; देह; प्रेत (आत्म्यापासून भिन्नता दाखविण्याचें वेळीं किंवा रागानें अथवा निंदेनें उपयोग करतांना). २ (गो.) देह (अंगांत येणाऱ्या माणसाचा). [सं. कुडि]

कूड—स्त्री. (गो.) खोली. [सं. कुटि]

कूड—न. खोटें; कपट; लबाडी; कूट. 'नेणें कूड कदापि मी।' –आक्रू २०. –वि. (कों) लबाड; खोटा; विश्वासघातकी; कावेबाज; आंतल्या गांठीचा. [सं. कूट; प्रा. कूड; गु. कूड]

कूत—पु. १ भर; जोर; आवेश (रोग, पाऊस, वारा, ऊन, भांडण यांचा). २ (ल.) एखाद्या कामाविषयीं उतावीळ; जोराची उत्कंठा, उकळी, खाज; (सामासांत) घायकूत. (क्रि० येणें; होणें; जिरणें; मुरणें). ३ (शब्दशः) खरजेचा भर. (क्रि० येणें; मोडणें). ४ अंदाज ? –शर. [सं. कू=आवाज करणें–आकूत]

कूप-कूंप—पु. कुंपण (आवाराचें); कुडण; वई. 'तेया सोनेकेतकीचें कूंप। चहूंकडें।' –शिशु २५२. 'कल्पतरु तोडोनि केला। कूप शेता।' –ज्ञा ११.५३९. **म्ह०** कूप जर शेत खाऊं लागला तर मालधनी काय करील ? =रखवालदारच जर चोरूं लागला तर मालक काय खाईल ? [सं. कूप]

कूप—पु. १ खणलेला खड्डा. २ (सामा.) बिन पायऱ्यांची विहीर; आड. (समासांत) अंधकूप; जलकूप; धान्यकूप; शौचकूप. 'बापी कूप आराम। अग्रहारें हन महाग्राम।' –ज्ञा १८.९९. 'छाये माकड विटे। धांवे कूपीं काय भेटे।' –तुगा १७७९. [सं.] **०कच्छप-मंडूक**–पु. १ (शब्दशः) विहिरींतील कांसव किंवा बेडूक. यावरून. २ (ल.) घरकोंबडा; आपलें घर हेंच जग समजणारा; बाह्य जगाविषयीं अज्ञानी; आकुंचित दृष्टीचा माणूस [सं.] **०मंडूक-न्याय**–पु. विहिरींतील कांसवाचें किंवा बेडकाचें जग म्हणजे त्या विहिरींतीलच संकुचित भाग, जागा; तिच्या बाहेर काय आहे याची त्याला मुळींच कल्पना नसते. त्याप्रमाणेंच जो मनुष्य आपला गांव किंवा देश सोडून कधीं बाहेर गेला नाहीं त्याला आपलाच गांव किंवा देश चांगला असें वाटतें व इतर गांव किंवा देश यांना तो तुच्छ लेखतो. 'असें प्रतिपादन करणें म्हणजे हिंदुधर्माच्या व्यापक स्वरूपाबद्दल कुपमंडूक न्यायानें आपलें अज्ञान प्रदर्शित करणें होय.' –टि ४.३८८. **०यंत्रघटिकान्याय**–पु. रहाटगाडग्याच्या पोहऱ्यांची सदोदित पालटणारी स्थिति; रहाटगाडगें फिरूं लागलें म्हणजे रिकामे पोहरे खालून जाण्यानें भरून येतात, त्यांतील पाणी ओतलें जातें व ते रिकामे होऊन पुन्हां खालीं जातात आणि पुन्हां भरून वर येतात अशीच माणसांची स्थिति (सुखांतून दुःखांत व दुःखांतून सुखांत) पालटली जाते. चक्रनेमिक्रम; उत्कर्षामागून अपकर्षाचा क्रम. [सं.]

कूप—न. (गो.) १ दगडाची पूड; शिरगोळथाची पूड; रांगोळी. २ ढग.

कूपरी—स्त्री. आळ; आरोप. 'आपणयावरी साकारपणाची कूपरी ।' –भाए ६१७. [सं. कू+परी–प्रकार]

कूपिका—स्त्री. कूपी; बाटली; सुरई. 'तिची वर्णिता रूपरेखा । 'ती सौंदर्याची कूपिका ।' –कथा १.३.३७. [सं. कूप लघुत्व]

कूय—स्त्री. (गो.) हुकी; कोल्हाची कूई. [ध्व]

कूर—(गो.) लघुत्वदर्शक प्रत्यय. उ० फटकूर, बटकूर.

कूर—(तंजा.) रास, ढीग. [सं. कूट] –वि. (तंजा.) तीक्ष्ण धार असलेलें. [सं. क्रूर]

कूर्चे—पु. १ घोडयाच्या खुराचा वरचा भाग. –अश्वप १.६३. २ दाढीचे केंस. 'भवते इंद्रनीळ विरुढती सानट । तर ते कूर्चे बरवंट । उपमीजते ।' –ज्ञाप्र ४६५. ३ पैतृक कर्मांत पितरांना व देवांना उदक देण्यासाठीं व इतर धार्मिक विधींत दर्भाची विशिष्ट आकाराची मुष्टि करतात तो. ४ कूर्चा पहा. [सं. कूर्चे=दर्भमुष्टि]

कूर्चा—स्त्री. (शाप.) मृदु अस्थि; मृदु अस्थींचें वेष्टण; (इं.) कार्टिलेज. 'हाडांच्या शेवटीं कूर्चेचें म्हणजे मृदुअस्थींचें वेष्टण असतें.' –मराठी ६ वें पुस्तक (१८७५) पृ. २५४. [सं. कूर्चे]

कूर्चिका—स्त्री. घोडयाच्या कूर्चाच्या मागील भागाचें ठिकाण. –अश्वप १.६३. [सं. कूर्चे]

कूर्पास, कूर्पासक—पुन. बायकांच्या अंगांतील चोळी; बंडी. 'कूर्पासका आड दडोन धाकें ।' –साहह ७.१३५. [सं. कार्पास+क ?]

कूर्मे—पु. १ कांसव. 'कां कूर्मे जियापरि । उवाइला अवेव पसरी ।' –ज्ञा २.३०१. २ विष्णूच्या दशावतारांतील दुसरा अवतार. 'शेष कूर्मे वाऱ्हाव जाले ।' –दा २०.८.२२. ३ पंच उपप्राणांपैकीं एक. 'नाग कूर्मे कृकल देवदत्त । पांचवा धनंजय जाण तेथ । यांची वस्ती शरीरांत । ऐक निश्चित् सांगेन ।'–एभा १२.३२१. ४ जांभईच्या वेळेच्या वायूच्या विशिष्ट स्थितीचें नांव. 'आणि जांभई शिक ढेंकर । ऐसैसा होतसे व्यापर । नाग कूर्मे कृकर । इत्यादि होय ।' –ज्ञा १८.३४१. 'नेत्रांचीं पातीं झांकतीं उघडतीं । तो कूर्मे ।' –यथादी १८.१००३. ४ डोळ्यांमधील तांबडा ठिपका. (कुमरी पहा). [सं.] **०आसन**–न. (योग) योगशास्त्रांत सांगितलेलें एक आसन. याचे चार प्रकार आहेत पैकीं पहिला प्रकार–वज्रासनाप्रमाणें बसावें परंतु पाय कुल्ल्याखालीं न घेतां ते घोटे जमिनीला टेकतील व बोटें साफ दिसतील असे दोन्ही बाजूंना बाहेर काढावे. हात बगलेवर ठेवून आंगठे बगलेंत भरावे व हातांना बांक न देतां चारी बोटें बाहेर स्पष्ट दिसतील अशीं छातीला टेकून ठेवावीं. यानें पायाचे घोटे, मांड्या, दंड यांस चांगला व्यायाम होतो. यांत कुल्ले टांचेवर टेकणें किंवा जमिनीवर टेकणें असे दोन प्रकार आहेत. [सं.] **०दुग्ध**–न. (कांसविणीचें दूध) असंभाव्य गोष्ट. (खपुष्पाप्रमाणें). [सं.] **०दृष्टि**–स्त्री. कृपा; कृपादृष्टि; मेहेरबानी (कारण कांसविणीस आंचळें नसल्यानें तिच्या नुसत्या मायेच्या दृष्टीनेंच तिचीं पिलें वाढतात). 'कूर्मे दृष्टीनें सांभाळी ।' –वि. कृपादृष्टि दाखविणारा. [सं.] **०पृष्ठाकार**–वि. बाह्य गोल (भिंग वगैरे) (इं.) कॉन्व्हेक्स. [सं.] **०लोम**–न. कांसवाचे केंस–अशक्य गोष्ट. [सं.]

कूर्स–पु. शिक्षणक्रमः–सह्याद्रीच्या पायथ्याशीं (ढीप) २९१. [पो.; इं. कोर्स]

कूल—१ वंश, जात, देवक इ० अर्थी कुल पहा. २ तीर; कांठ. 'श्रीगोदावरीच्या कूलीं ।' –ज्ञा १८.१८०२. [सं. कूल]

कूल—न. (गो.) सोनाराची मजुरी. [का. कूलि]

कूल—न. (कर्ना.) लांकडांत भोंक पाडून त्यांत बसविण्यासाठीं तयार केलेलें लांकडाचें टोंक, खुंटी, कुसुं.

कूली—कुली पहा.

कूश—स्त्री. कूस पहा.

कूष्मांड—कुष्मांड पहा.

कूस—स्त्री. १ शरीराची एक बाजू; बरगडीची, कांखेखालची बाजू. २ जठर, गर्भाशय. 'तो तूं देवकीकुंसीचा सेजारीं ।'–शिशु ११२. [सं. कुक्षि; प्रा. कुच्छि, कुक्खि कोक्खि; हिं. कोख; गु. कुख; पं. कुक्ख; सिं. कुखि. कुसवा पहा.] ३ (ल.) जागा; अवकाश (खोटें बोलण्यास, फसवण्यास, लबाडीस; गैरमिळकतीस). 'मोजणी झाल्यामुळें शेतांत वेकायदा कूस राहिली नाहीं.' 'चिल्लर खर्च कच्चा लिहिल्यामुळें चिल्लरांत कूस राहिली नाहीं.' 'ह्या भांडयाला कूस आहे.' (सामा.) जागा किंवा अवकाश असा अर्थ. 'पोटभर खाल्लें, पाणी प्यायला कूस राहिली नाहीं.' ४ भरलेली जागा; साधलेली संधि (खोटे हिशेब करून, खऱ्या खर्चापेक्षां जास्त रक्कम खर्ची टाकून, माल जमा करून, दुसऱ्याची व्यवस्था करतांना कांहीं रक्कम गिळंकृत करून इ०); घेतलेलें माप किंवा केलेला हिशेब यांत फारशी लबाडी अगीं न लागतां थोडासा कमी–अधिकपणा करणें; थोडी कसर; वर्तावळा. ५ गुरें इ० प्रसवल्यानंतर योनिद्वारें निघणारा कुजका अंश. (वाप्र.) **०भरणें**–एखाद्या पदार्थानें पोट भरणें. 'गाईच्या दोन्ही कुशी भरल्या.' **०घालणें**–(कु.) खेळांतील नियम मोडल्याबद्दल खेळगडयास बाहेर टाकणें. **कुशीस होणें**–एका अंगावर निजणें. **म्ह०** मांजर करी एकादशी उंदीर मारून भरी कूशी=उपास करणें आणि ओ येईपर्यंत खाणें. सामाशब्द–**०गोम–भोंवरा**–स्त्री. घोडयाच्या कुशीवर असलेली गोम, भोंवरा. हा अशुभ मानितात. **०निकुरणीचा–निखवणा–घुणीचा–घुघणा–घुणा**–पु. स्त्रीच्या अनेक मुलांपैकीं शेवटचा मुलगा.

कुसबुणा पहा. [कुस+निकुरणें=बुणें] ०फुटप—(गो.) संतति होण्यास सुरवात होणें.

कूस—न. कुसळ; ढोंक, 'आपली लेखणी ते किती नम्रपणानें चालवीत व तिचें कूसहि कोणास बोचूं नये याविषयीं ते किती जपत असत ... ' –नि ९०९. [सं. कुश]

कूस-से—पु.अव. (व.) पलंगाचे बाजूचे उभे दांडे.

कूंस—न. (कों.) कुसूं अर्थ १,२,३ पहा. 'कवाडाचें कूंस मोडलें.

कूहरी—स्त्री. कैरीसारखा सोन्याचा अलंकार. कुहरी पहा. 'ल्याली राकडि मूद बोरकळि ते शोभे तळीं कूहरी।' –अक अनंत–सीतास्वयंवर ४५.

कूळ—स्त्री. (गो.) नारळीच्या हीरांचें केलेलें जाळें.

कूळ—न. १ गोत्र; वंश; जात; कुटुंब. 'आमचें कुळांत मोरोपंत नांवाचे प्रसिद्ध कवी होऊन गेले.' म्ह० कुळास खोड संतानास वेड (नसावें). २ लग्नांत ठेवावयाचें देवक (मराठे जातींत हें असतें). प्रत्येकाच्या कुळांत चाल असेल त्याप्रमाणें कळंब, मारवेल, वड इ०. झाडाची खांदी आणून ती तुळशी-वृंदावनांत लावतात व तिची पूजा करतात. (वाप्र.) ०उज्ज्वलणें–१ कुलाची कीर्ति वाढविणें. २ (उप.) कुळांतील माणसांना (विशेषतः जवळच्या नातलगांवरून) शिव्याशाप देणें. कुळाला डाग लावणें–कुळाला कलंक लावणें. सामासिक– ०कट–कत–कथा–कहाणी–स्त्री. १ कुळाची कथा किंवा गोष्ट; कूळकट हा शब्द मुख्यत्वें वाईट अर्थानें योजतात. कूळकथा म्हणजे कुळाची कहाणी, कैफियत, इतिहास. २ (ल.) कंटाळवाणी, कळकटीची हकीकत, माहिती. ०कट सांगणें–एखाद्याच्या वंशांतील (मायची किंवा चालू) बिंगे, दोष सांगणें. ०करंटा–वि. कुळांतील हतभागी; अभ्या; कुळाचें नांव घालविणारा; मुख्यत्वें चिक्कू. ०करण–णी–कुळकरण पहा. ०गति–स्त्री. गोत्र, वंश यांची परंपरा, अनुक्रम; वंशवेल–विस्तार. ०टि(ति)ळ(ल)क–पु. वंशाचें भूषण; कुलाला भूषणभूत अशी व्यक्ति. [सं.] ०पर्वत–पु (काव्य) कुलाचल व सप्तपर्वत पहा. ०बुडव्या–वि. स्वतःच्या कुटुंबाचा नाशक; कुलकलंक. ०वंत–वान–वि. कुलीन; अभिजात; कुलवंत; चांगल्या कुलांत जन्म पावलेला. ०शील–न. कुल आणि शील; घडिलांची परंपरा व व्यक्तीची दानत; कुलांतील आचारविचार, चालरीत, स्थितिरीति. लग्न जुळवितांना ज्या बाबी पहावयाच्या त्यांतील एक; यावरून कुळाशीळाचा–कुळशीलवान–वि. कुलीन; अभिजात.

कूळ—ब. १ कौलदार; खंडकरी; पट्ट्यानें जमीन धारण करणारा (सरंजामाची किंवा शेतमालकाची). २ धनकोचा (सावकाराचा) ग्राहक; आरोपीच्या जामीन; वैद्याचा रोगी; वकिलाचा पक्षकार; आश्रयदात्याचा पोष्य; ज्यानें ज्याचें द्रव्यादि दिलें आहे तो; आश्रित (म्हणजे रिणको, जामीन, रोगी इ०). ३ सामान्यतः सरकारास सारा देणारा असामी, असाम्या. इतर अर्थ व सामासिकशब्द 'कुल' शब्दामध्यें पहा. ४ (गो.) गि–हाईक; इसम; व्यक्ति. सामासिकशब्द–०खंडणी–स्त्री. प्रत्येक कुळाची जमीन, साधनसामुग्री, लाग, लागवड व सारा इत्यादि दाखविणारें, कुळकर्ण्यानें तयार केलेलें सरकारी पत्रक, तक्ता. ०जमा–स्त्री. १ गांव किंवा जिल्ह्यांतील कुळांपासून येणाऱ्या साऱ्याची रक्कम. २ सावकारानें कुळास किंवा शेतकऱ्यास कर्जाऊ दिलेली रक्कम. ०झाडा–पु. गांवांतील खंडकरी किंवा कौलदार यांचा तक्ता. ०पट–पट्टा–पु. कौलनामा; खंडपत्र. ०पैसा–पु. कूळजमा अर्थ २ पहा. ०भरणा–पु. (व्यापक) शेतकरी किंवा कुळें; याच्या उलट अडाणकवाड. ०रुजुवात–स्त्री. १ कुळानें सरकारी खजिन्यांत भरलेल्या पैशाची चौकशी करून रुजुवात घालणें. २ अशा रीतीनें काढलेला निर्णय. (क्रि० करणें; घेणें; पहाणें). ०वर्ग–पु. १ कुळघडणीच्या अनुरोधानें कुळें अथवा रयत यांच्या जमीनजुमल्यासंबंधानें किंवा त्यांचेकडून येणें असलेल्या पैशाबद्दलचें वर्गीकरण दाखविणारें वार्षिक पत्रक–तक्ता. २ एकाच कुळाचें वरीलप्रमाणें पत्रक–तक्ता. (समासांत) कूळवर्गपट्टी–जमाबंदी–वसुलबाकी इ०. ३ कुळारग पहा. ०वार–क्रिवि. कुळांच्या अनुक्रमाप्रमाणें दर किंवा हर कुळागणिक. याच्या उलट थळवार. (समासांत) कूळवार पावत्या–पाहणी–फाजील–वसुलबाकी–रुजुवात; त्याचप्रमाणें कूळवार–पत्रक–झाडा. ०वारी, कुळवारी–स्त्री. कुळांचा तक्ता.

कृक—पु, घाटी; गळा; घसा; कंठनाल. [सं.]

कृकर–ल—पु. १ ढेकरेच्या वेळचा वायु. पंच उपप्राणांपैकीं एक. कूर्म पहा. 'आणि जांभई शिंक ढेकर। ऐसैसा होतसे व्यापार। नाग कूर्म कृकर। इत्यादि होय।' –ज्ञा १८.३४१. 'नागकूर्म कृकल देवदत्त।' –एभा १२.३२१. 'शिंका ज्या करितां येती। कृकल म्हणोनी त्यास म्हणती।' –यथा १८. १००४. [सं.]

कृच्छ्र—न. १ एक प्रायश्चित्त. २ शारीरिक दुःख; कष्ट; तप. 'माझेनि उद्देशें संपूर्ण। तपसाधन कृछ्रादिक।' –एभा १७. ४२०. ३ मूत्रकृच्छ्र; मूत्रावरोध. ४ पहिले दिवशीं एकदां जेवण; दुसरे दिवशीं सायंकाळीं जेवण; तिसरे दिवशीं न मागतां आपोआप मिळेल तें खाणें व चौथे दिवशीं उपोषण याप्रमाणें क्रमानें १२ दिवस करण्याचें व्रत. 'अथवा एकांतरा कृच्छ्री!' –ज्ञा १७. ३६४. कृच्छ्राचे १ पाद, २ अर्ध, ३ पादोन, ४ अति, ५ कृच्छ्रातिकृच्छ्र, ६ सांतपन, ७ तप्त, ८ शीत, ९ पराक इ० प्रकार आहेत. [सं.] ०चांद्रायण–न. चंद्रकलेप्रमाणें चढउतारानें जेवणांतील घांस

खाण्याचें कृच्छ्रप्रायश्चित्त. 'कृच्छ्रचांद्रायणें झालीं वेडीं।'–एभा १२.२७. **कृच्छ्रें करून**–क्रिवि.नाखुषीनें;कष्टानें;(देणें; करणें इ०).

कृत—न. चार युगांपैकीं पहिलें; कृतयुग; सत्ययुग. [सं.]–वि. ज्यानें केलेलें आहे या अर्थानें समासाच्या पूर्वी जोडतात. उ० कृतभोजन=ज्यानें जेवण केलेलें आहे असा; कृतविवाह=जो विवाहित आहे असा; कृतापराध=अपराधी; गुन्हेगार; याचप्रमाणें कृतस्नान–प्रमाण–निग्रह–प्रस्थान–प्रसाद–यज्ञ;कृताभ्यंग–कृतातिथ्य –कृतनिग्रह इ० याशिवाय कांहीं सामासिक शब्द पुढें दिले आहेत. **०कर्मा**–वि. निपुण; हुषार; कुशल. [सं.] **०कार्य**–वि. ज्यानें आपलें काम संपविलें आहे असा;यशस्वी;विजयी; कृतार्थ; प्राप्तयश. कृतकृत्य पहा. [सं.] **०काल**–वि. १ निश्चित, ठराविक काळाचा. मुदतीचा; मुदतबंद (गहाण, निक्षेप, यांच्यासंबंधानें). २ अमुक मुदतीपर्यंत चाकरी करण्यास जो आपणांस बांधून घेतो असा (चाकर). [सं.] **०कृतार्थ**–वि. कृतकृत्य; सिद्ध अर्थ झाला आहे ज्याचा असा. [सं.] **०कृत्य**–वि. १ कृतकार्य; ज्यानें संसारासंबंधीं सर्व कृत्यें पार पाडून त्यांपासून मिळणारें सुख अनुभविलें आहे तो; पुण्यकृत्यानें ज्याचा जन्म सार्थकीं लागला आहे तो. २ आरंभिलेलें दुर्घट काम ज्यानें तडीस नेऊन समाधान प्राप्त करून घेतलें आहे तो; ज्यानें आपल्या श्रमाचें फळ गाठलें तो. 'म्हणे कृतकृत्य झालों देवदर्शनें।' –संवि २६.२८ 'त्यालाच जाणता आणि कृतकृत्य म्हणतात.' –मीर १६३. –न. अशक्य किंवा अपूर्व कृत्य; अगदीं अचाट कृत्य; मोठ्या बुद्धिमत्तेचें काम. 'त्या अदत्तापासून तुम्ही पैसा काढला हें मोठें कृतकृत्य झालें.' काव्यांत **कृतकृत्यार्थ**(–वि.) असें रूप येतें. **०कृत्यता**–स्त्री. कृतार्थपणा; यशस्वितेचा अभिमान; 'त्याच्यांत सुस्ती, कृतकृत्यताबुद्धि, पंडितंमन्यता, वगैरे दोष अखंड वसल्यामुळें...' –नि ३. [सं.] **०घटस्फोट**–वि. घटस्फोट करून जातीबाहेर टाकलेला. [सं.] **०निश्चय**–पु. दृढ निश्चय, निग्रह, निर्धार. –वि. दृढनिग्रही; ज्यानें निश्चय केला आहे असा. [सं.] **०परिश्रम–श्रम**–वि. ज्यानें फार मेहनत केली आहे असा. [सं.] **०पुंख**–वि. १ सोडला जाण्याच्या बेतांत असलेला (बाण). २ (ल.) निघण्याच्या बेतांत आहे असा. [सं. कृत+पुंख= पिसें लावलेलें बाणाचें मूळ] **०पुण्यपुंज**–वि. ज्यानें पुष्कळ पुण्य सांठविलेलें आहे किंवा ज्यानें पुण्यकृत्यें केलीं आहेत असा (पुरुष.) [सं.] **०प्रतिष्ठित**–वि. ज्यानें मान्यता, प्रतिष्ठा संपादन केली आहे असा. [सं.] **०बुद्धि**–वि. निश्चयी. 'ऐसे हटनिग्रही कृतबुद्धी।'–दा १.१०.११. [सं.] **०मुष्टि**–वि. ज्यानें मूठ वळली आहे असा. [सं.] **०युग**–न. कृत अर्थ १ पहा.; सत्ययुग. **०संकल्प**–पु. दृढ निश्चय. –वि. दृढ निश्चयी. [सं.] **०संस्कार**–वि. जो संस्कारानें पावन झालेला किंवा ज्याचा विशेष संस्कार झाला आहे असा. [सं.] **०साक्षी**–पु. (कायदा) साक्ष देण्याकरितां नेमलेला; साक्षी पहा. [सं.]

कृंतक—वि. करांडणारे; कुरतडणारे. [सं. कृत्–कृंत्=कुरतडणें] **०प्राणी**–पु. एक प्राणिवर्ग;या वर्गांतील प्राणी शाकतृणाहारी असतात. यांना कुरतडून खाण्याची संवय असते. उ० ससा, उंदीर, खार इ० –प्राणिमो २५.

कृतकपुत्र—पु. (कायदा) मानलेला, पाळलेला मुलगा; विकत घेतलेला मुलगा. [सं.]

कृतघ्न—वि. १ निमकहराम; उपकार न जाणणारा; बेइमान; हरामखोर. याच्या उलट कृतज्ञ. २ केलेलीं कृत्यें किंवा उपाय व्यर्थ पाडणारा; कार्यविध्वंसक. [सं. कृत+घ्न] **कृतघ्नता**–स्त्री. उपकाराची जाणीव नसणें; निमकहरामी.

कृंतन—न. १ कापणी. २ नखानें, दांतांनीं कुरतडणें. [सं. कृत्–कृंत्=कुरतडणें]

कृतज्ञ—वि. उपकार जाणणारा; निमकहलाल; इमानी. [सं.] **कृतज्ञता**–स्त्री. उपकाराची जाणीव. [सं.]

कृताकृत—वि. १ वेपर्वा; उदासीन; आवश्यकहि नव्हे व अयोग्यहि नव्हे असा (केल्या तरी चालतील, न केल्या तरी चालतील अशा गोष्टींसंबंधीं). [सं. कृत+अकृत] २ निष्काळजीपणानें, अनास्थेनें केलेलें; कांहींहि आस्था नसून केलेलें किंवा मुळींच गाळलेलें; अर्धवट; अपूर्ण. 'त्याचे घरीं आचार कृताकृत आहे.' –न. केवळ संभवनीय स्थिति; घडण्याची किंवा न घडण्याची संभवनीयता ज्यांत सारखी आहे अशी स्थिति. अल्पस्वल्प सरव, अस्तित्व. 'यंदा दुभत्याचें कृताकृत दिसतें.' [कृत+अकृत]

कृतांजलि—वि. हाताची ओंजळ पसरलेला; ज्यानें दोन्ही हात जोडले आहेत असा; अगदीं नम्र; आज्ञाशील. [सं.]

कृतांत—पु. १ मृत्यु; यम; काळ. 'जैसें महाप्रळयीं पसरलें। कृतांतमुख।' –ज्ञा १.८८. 'काळघा कृतांत धुधुकारें।' –तुगा ५१. २ दैव; नशीब. ३ सिद्ध केलेला निर्णय; सिद्धांत. [सं.]

कृतान्न—न. शिजविलेलें अन्न; (विशेषतः) भात. [सं.]

कृतार्थ—वि. १ ज्यानें आयुष्यांतील साध्य किंवा हेतु साधला आहे असा; ज्यास कांहीं करावयाचें उरलें नाहीं असा. २ कृतकृत्य; तृप्त; समाधान पावलेला; संशय फेडलेला (धर्मशास्त्र इ० संबंधीं). [सं. कृत+अर्थ]

कृतावस्था—स्त्री. आपला हेतु तडीस नेल्याची स्थिति; आपल्याकडून आटोकाट प्रयत्न केल्याची स्थिति. [सं.] –क्रिवि. आटोकाट; शेवटपर्यंत; कमींत कमी किंवा जास्तींत जास्त.

कृति—स्त्री. १ कर्म; काम; कृत्य; कांहीं कार्य करण्याचा व्यापार. २ क्रिया; रीत; पद्धत; युक्ति; प्रकार (उद्योग, भेदा

इ० चा). 'देशी धंद्यांच्या कृतींत व यंत्रांत कांहीं एक सुधारणा कोणास सुचवितां आली नाहीं.' –सेंपू १.१०. 'औषधाची कृति.' ३ संख्येचा वर्ग; द्विघात. ४ केलेलें काम; साधलेली गोष्ट, कार्य. 'रघुवंश ही कालिदासाची कृति.' ५ ख्याति; पराक्रम. 'शाण्डव कुळीचे भूप मिळालेसांगाया झाल्या कृती।' –ऐपो १७८. –वि. कुशल; हुषार. 'व्यसनीं सहाय होउनि आम्हाला होय जो परासु कृती।'–मोद्रोण११.१५. [सं.] सामाशब्द– **०प्रधान**–वि. ज्यांत कृतींना प्राधान्य दिलें आहे अशी (कादंबरी). (इं०) नॉव्हेल ऑफ इन्सिडेंट्स; याच्या उलट मतिप्रधान. –विचावि १६१. **कृतीचा**–वि. कृत्रिम; करणीचा; बनावट. 'कृतीचीं आयाळें जडवुनि गळा, पुष्ट करुनी।' –सिंहान्योक्ति, मराठी ६ वें पुस्तक पृ. १२५ (१८९६). 'हीं कृतीचीं फुलें, पण खरोखरी फुलासारखीं दिसतात.'

कृतोपकार—पु. १ केलेला मोठा उपकार; कृपा; मेहेरबानी. [सं.] **कृतोपकारी**–वि. ज्यानें उपकार किंवा अनुग्रह केला आहे असा.

कृत्ति—न. चामडें; कातडें; मृगचर्म. [सं.] **०वास**–वि.कातडें पांघरणारा (महादेव, शंकर). 'दिसे कृत्तिवासा शिवा वाम अंगा।' –गंगारत्नमाला (नवनीत पृ. ४२४).

कृत्तिका—स्त्री. सत्तावीस नक्षत्रांपैकीं तिसरें. ह्या नक्षत्रपुंजांत सात (सहा?) तारा आहेत. त्यांची आकृति देशी वस्तऱ्यासारखी दिसते. [सं.]

कृत्य—न. १ काम; कृति; कार्य. (इं.) ॲक्ट. 'प्रेषितांचीं कृत्यें.' –बायबल (नवाकरार). २ भूमितींत करावयास सांगितलेली रचना; कृतिसापेक्षसिद्धांत; वस्तुपाठ. (इं.) प्रॉब्लेम. [सं. कृ=करणें]

कृत्या—स्त्री. १ नाशासाठीं आणि मंत्रतंत्रासाठीं बळी देऊन जिला प्रसन्न करून घेतात अशी स्त्रीदेवता; उग्र देवता; राक्षसी. 'सर्वांहि चमू प्रेषी राजा भीमक्षयार्थ कृत्यासी।' –मोभीष्म ५. ३२. 'झाली उग्रा त्या जटेचीच कृत्या।' –मोअंबरीष २५. २ (ल.) भांडखोर, कज्जेदलाल, कैदाशीण स्त्री. [सं.]

कृत्याकृत्य—न. चांगलें व वाईट काम; योग्य व अयोग्य कर्म; कार्याकार्य. [सं. कृत्य+अकृत्य]

कृत्रिम—न. खोटेपणा; लबाडी; कपट; कावा. 'कृत्रिम अवघेंचि खुंटलें।'–दा१९.९.५. –वि. १ बनावट; करणीचें; कृतीचें. समासांत–कृत्रिम–वेष–रूप इ०. २ मनुष्यानें केलेलें; नैसर्गिक नव्हे असें; अनैसर्गिक.सामाशब्द– **०नाणें**–न.खोटें नाणें;कमी किंमतीचें नाणें. 'असलें कृत्रिम नाणें करून शेतकऱ्यांचें व नेटिव्ह व्यापाऱ्यांचें म्हणजे आपल्या बहुतेक सर्व प्रजेचें नुकसान करण्यास कोणत्याहि दुसऱ्या देशांतील सरकार तयार झालें असतें असें आम्हांस वाटत नाहीं.' –टि १.१५१. **०पुत्र**–पु. मानलेला मुलगा; दत्तक मुलगा. हा आपल्या मातापितरांचें औध्वदेहिक करणारा, बारा वारसदारांपैकीं एक आहे. [सं.] **०पुत्रिका**–स्त्री. मुलींच्या खेळांतील बाहुली. 'आणा चिरें सरस कृत्रिमपुत्रिकांशीं।' –वामन विराट ५. १३३. **०भूमि**–स्त्री. ओटा; कट्टा; गच्ची; घरांतील चोपून तयार केलेली जमीन. [सं.] **०मित्र**–पु. १ उपकारामुळें झालेला मित्र. फायद्यासाठीं झालेला दोस्त. २ (ल.) खोटा मित्र. [सं.] **०युद्ध**–न. १ डावपेंचाचें युद्ध; गनिमी कावा. २ लटकी लढाई. [सं.] **०रुपाया**–पु. १ खोटा रुपाया; बनावट रुपाया. २ ज्यांत सोळा आण्यांची चांदी निघत नाहीं पण जो सरकारी कायद्यानें सोळा आणे किंमतीचा मानला जातो असा रुपाया. (इं.) टोकन कॉईन. 'हिंदुस्थानांत हल्लीं कृत्रिम रुपायाचा प्रसार आहे.' –भारतीय चलनपद्धति ९३. **०वन**–न. बाग; आगर; राई; उपवन; उद्यान. [सं.] **०शत्रु**–पु. १ आपल्या कृत्यांनीं तयार केलेला शत्रु. २ वरून शत्रुत्व पण आंतून मित्रत्व असा माणूस. [सं.]

कृत्रिमी—वि. १ खोटा; कावेबाज; बेइमानी; ढोंगी. 'मी कांहीं लबाड कृत्रिमी नव्हे.' –बाळ २.६८. २ बनावट; मुद्दाम केलेला; काल्पनिक; करणीचा; कृत्रिम पहा.

कृत्स्न—वि. १ झाडून सर्व; सगळें. २ पूर्ण; पुरेपूर; भरपूर; संपूर्ण. [सं.]

कृदंत—न. (व्या.) धातूवरून अथवा क्रियापदावरून साधलेला शब्द; धातुसाधित. [सं.]

कृदंतकाळ—पु. १ कृतांतकाळ. २ करदनकाळ, कृतांत पहा. [सं. कृतांत+काळ]

कृदांत—पु. कृतांत. (अप.) 'न बाधे काळकृदांतक्षोभ।' –दावि २१६. [सं. कृतांत]

कृपण—वि. १ कंजूष; चिक्कू; कवडीचुंबक. 'अंगभोगांकडे। पाहतां कृपणु आवडे।' –ज्ञा १३.२०९. 'कृपण तयासी बोलिजे पडे उपाधिठाई।' –तुगा ४२८. २ गरीब; दरिद्री; दीनवाणा; केविलवाणा (मुद्रा, चेहरा, भाषण). [सं.]

कृपा—स्त्री. १ दया; मेहेरबानी; करुणा. २ दाखविलेली दया; केलेला अनुग्रह. ३ अनुकूल वृत्ति; अनुग्रहबुद्धि; सद्भाव. ४ (भक्ति) ईश्वरी कृपा; अनुग्रह. 'अंबे तुझी कृपा जोडे। तरी मुकाही वेदशास्त्र पढे।' –ह १.२७. कृपामृत; कृपारस; कृपादृष्टि असे कृपापूर्वपदघटित समास पुष्कळ आहेत. पैकीं कांहीं युढें दिले आहेत– **०कटाक्ष–दृष्टि**–पुस्त्री. १ दयादृष्टि;दयेनें, अनुकंपेनें पहाणें. २ कृपा, मेहेरबानी दाखविणें , करणें. 'कृपादृष्टी दासाकडे पाहे।'–दत्ताची आरती. [सं.] **०विलक्ष**–वि.दयेनें पाझर फुटलेला; दयार्द्र; कृपाळु. 'सखीसीं असें बोलतां सारसाक्षी। कृपाविलक्ष हा होय संसारसाक्षी।' [सं.] **०निधि**–पु. अत्यंत कृपाळु; कृपेचा ठेवा; कृपासागर. [सं.] **०पात्र**–न. १ ज्याच्यावर दया

करणें योग्य आहे असा (दरिद्री, गरीब माणूस); दयाई. २ ज्याच्यावर कृपा आहे असा. [सं.] **०वंत-वान**–वि. १ दयाळु; मायाळु. २ ज्यास दया आली आहे असा. **कृपावलोकन**–न. मेहेरनजर; दया. –वि. कृपेनें पाहणारा; कृपादृष्टि; सहानुभूति दर्शविणारा. [सं.] **कृपाळ-ळा, कृपालु-ळु**–वि. मायाळु; दयाळु; कृपावंत; उपकारी; अनुग्रही. **कृपेची नौका**–स्त्री. (काव्य) दयेची नाव; दया; कृपा. 'कृपेची नौका करून । तारीं मज भवसागरीं ।' –रावि १.१४२.

कृपाण—न. तरवार; खड्ग; खंजीर. [सं.] **कृपाणी**–स्त्री. लहान तलवार.

कृपाणिकास्थि—पु. (प्राणि.) तरवारीसारखा ज्यांच्या हाडांचा सांगाडा आहे असे प्राणी; (इं.) पॅरॅस्पेनॉइड.

कृमि—पु. १ किडा; आळी; कीटक; लहान जंतु. 'जे त्रैविध्य आदी ब्रह्मा । अंतीं कृमी ।' –ज्ञा १८.५२५. २ (प्राणि.) या वर्गांतील प्राण्यांचें शरीर वेटाळ्यांचें असतें. हे सरपटणारे असून नारू, जंत, आळी या जातींचे आहेत. ३ किरमिजी रंग; कोचिनील. ४ (अव.) जंत (पोटांतील). **०घ्न-नाशक-घातक-हर-हारक**–वि. कृमींचा नाश करणारें; पोटांतील कृमी नष्ट करणारें (जंत पाडण्याचें औषध, जंतांचें औषध). [सं.] **०वाताळें**–न. पोटांत जंतांमुळें होणारी वातविकृति. **०शूल**–पु. एक रोग; जंतांमुळें पोट दुखणें. 'कृमिशूलें तळमळी तें । तयावरितें ।' –गीना १३.२४९६.

कृमी—वि. ज्याला जंतविकार झाला आहे असा. [सं.]

कृश—वि. १ रोडका; दुबळा; सडपातळ; बारीक. २ नाजूक; पातळ (वस्तु). [सं.]

कृशर, कृशरान्न—न. खिचडी. [सं. कृसर]

कृशांग-गी—वि. रोडक्या शरीराचा; किडकिडीत; सडपातळ बांध्याचा–ची; स्त्री कृशांगी असणें हें एक सौंदर्याचें लक्षण समजलें जातें. 'पोरें सदैव रडती क्षुधितें कृशांगें । '–वामन (नवनीत पृ. १४०). 'शून्याष्टी क्षणभर पिळी अंचला ती कृशांगी।' –मधुकर १९१९. [कृश+अंग]

कृशान, कृशानन, कृशानु––नपु. अग्नि; विस्तव. 'खालीं चेतविती महा कृशानन ।'–रावि १.१३०. 'कृशान प्रवेशेल शुष्क ईधनी ।' [सं. कृशानु]

कृष(षि)क, कृषिजीवि, कृषीवल-ळ—विपु. शेतकरी; कुणबी; शेत कसणारा. 'नाना कृषीवळु आपुलें । पांधुरवी पेरिलें ।' –ज्ञा १३.२०६. 'कृषीवलें खंगलीं भणंगें ।' –मुसभा ३.१०८. [सं.] **०शास्त्र**–न. वनस्पतींची लागवड, जोपासना, संग्रह, पशूंची निपज व त्यांची वाढ, त्यांचा उपयोग इ० विषयांचें विवेचन करणारें शास्त्र; शेतकीचें शास्त्र.

कृषि(षी)—स्त्री. शेती; शेतकी; शेतकाम. 'किंबहुना कृषी जिणें।' –ज्ञा १८.८८१. 'वैश्यें करावें पशुरक्षण । कृषी करावी धर्में करून ।' –जै ८.२३. [सं. कृष्]

कृषिकर्म—न. शेत नांगरणी; नांगरटी; जमीन कसणें. [सं.]

कृषिवर्ते—पु. (गो.) पोर्तुगीज पूर्वकालीन सरकारास ग्रामसंस्थांकडून मिळणारा कर. [सं.]

कृष्ण—पु. १ विष्णूच्या दशावतारांपैकीं आठवा अवतार; गोकुळांतील गोपाळकृष्ण; देवकीपुत्र; वासुदेव. २ अर्जुनाचें एक नांव. –वि. १ काळा; पाण्यानें भरलेल्या मेघासारखा; सांवळा. २ कपटी. [सं.] **०करणें**–क्रि. काळें करणें; तोंड फिरविणें; नाहींसें होणें. सामाशब्द– **०कनक**–पु. काळा धोत्रा. **०कावळा**–पु. सोनकावळा; ज्याची मान पांढरी असते असा कावळा (श्रीकृष्णानें ह्या कावळ्याच्या मानेला दहीं फांसलें अशी दंतकथा आहे त्यावरून). **०कृत्य**–न. वाईट, कपटाचें, नीच, काळेबेरें कृत्य. [सं.] **०गुजरी**–स्त्री. एक प्रकारची लुगड्याची जात. **०ग्रंथी**–स्त्री. सोडण्यास कठिण अशी गांठ (श्रीकृष्णानें गोकुळांत एका गवळ्याच्या दाढीची व त्याच्या बायकोच्या वेणीची गांठ बांधली होती त्यावरून). [सं.] **०तालु-तालुका-टाळू-तालू**–वि. ज्याची टाळू काळी आहे असा (घोडा); हें अशुभ चिन्ह मानितात. **०तुळस**–स्त्री. काळी तुळस. **०धत्तूर**–पु. काळा धोत्रा. [सं.] **०पक्ष**–पु. १ काळोख्या रात्रीचा पंधरवडा; वद्य पक्ष; ज्यामध्यें चंद्राच्या कळा उत्तरोत्तर कमी होत जातात तो पक्ष. २ (ल.) उतरती कळा; क्षय; ऱ्हास. ३ ज्याकडे दोष आहे असा पक्ष, बाजू. 'आस्तिक व नास्तिक, शुक्लपक्ष व कृष्णपक्ष अशा जोडप्यांतील तंटे एक तरस्वल्पजीवि असतात...' –आगर ३.२०२. **०पक्ष-शुक्लपक्ष**–पु. १ घट आणि वाढ; क्षय आणि वृद्धि. २ खोटेपणा व खरेपणा; वाईट आणि चांगलें. **०पक्षी**–पुअव. (ना) विदुर जातीचे लोक. **०मणी**–पु. विवाहित स्त्रियांनीं घालावयाचा काळ्या मण्यांचा गळेसर [सं.] **०मत**–गौरहारी पहा. **०मूग**–पु. काळ्या रंगाची मुगाची एक जात. **०मूर्ति**–स्त्री. अतिशय काळा माणूस; काळाकुळकुळीत माणूस. **०मृग-सार**–पु. काळवीट. 'शरभापुढें टिकेना सिंहहि मग काय कृष्णसार थिरे।' –मोद्रोण ११.६७. [सं.] **०मृत्तिका**–स्त्री. बंदुकीची दारू. **०वर्ण**–पु. काळा रंग. **०वर्ण होणें-काळें होणें**; एखादी वस्तु, मरणानें किंवा अन्य तऱ्हेनें दृष्टिआड होणें (एखाद्याचा अत्यंत तिरस्कार आला असतां योजितात). 'त्या गुलामाचें ज्या दिवशीं कृष्णवर्ण होईल तेव्हां मी येईन.' **०वस्त्र**–न. काळें वस्त्र. [सं.] **०वाळा**–पु. काळ्या रंगाचा वाळा. **०विलास-क्रीडा**–पुस्त्रीअव. १ श्रीकृष्णाच्या गोकुळांतील क्रीडा, खोडया, लीला, पुंडावा. २ (ल.) अर्वाच्य खोडया, खेळ. ३ व्यभिचार;

सुरतविलास. **०सट**—वि. मानेवरील केंस काळे, आवाज मेघ-नगा-याप्रमाणें, गंभीर श्वास, कृष्णसर्पासारखा, गति उत्तम आणि धाडसी असा (घोडा). –अश्वप १.२३.

कृष्णागर-गरु—पु. एक प्रकारचा चंदन. 'कृष्णागर मलयागर परिमळ । देवदार वृक्ष तेथें ।' –ह २३.१००. [सं. कृष्ण+अगरु]

कृष्णाची गाय—स्त्री. इंद्रगोप; पावसाळ्यांत आढळणारा, लहान, तांबडया रंगाचा, पुष्कळ पायांचा किडा. हे किडे समुदायानें राहतात.

कृष्णाजिन—न. काळविटाचें किंवा सामान्यतः हरिणाचें कातडें; मृगाजिन. 'नाहीं नाहीं चर्माआतु । कृष्णाजिन व्याघ्रांबर ।' –तुगा ३४२. [सं. कृष्ण+अजिन]

कृष्णार्पण—न. १ कृष्णभक्तीनें ब्राह्मणास अगर देवळास जमीन दान देणें. २ स्वत्त्व न ठेवतां केलेलें दान. (क्रि० करणें). [सं.]

कृष्णावतार—पु. विष्णूचा आठवा अवतार. [सं. कृष्ण+अवतार]

कृष्णावर्त—वि. शरीरावर एखाद्या ठिकाणीं शंखाप्रमाणें भोंवरा असलेला (घोडा); हें शुभ चिन्ह मानतात. –अश्वप १.९१. [सं. कृष्ण+आवर्त]

कृष्णावळ—पु. कांद्याला विनोदानें म्हणतात. कारण तो उभा चिरला म्हणजे शंखाकृति व आडवा चिरला म्हणजे चक्राकृति दिसतो व शंख, चक्र हीं कृष्णाचीं आयुधें आहेत. 'आगस्तीचें मूत्र मळ । लावुनि म्हणती कृष्णावळ' –तुगा २८२४. [सं. कृष्ण+वलय=कृष्णावळ]

कृष्णावळा—पु. घोडयाच्या पायाच्या आंतील बाजूस होणारें आवाळूं. [सं. कृष्ण+म. आवाळूं]

कल्पित—वि. १ शोधून काढलेलें; नवीन निर्माण केलेलें; रचलेलें, वनविलेलें. २ निपुण; तरबेज. 'न तुजविना आत्ममतें कल्पित तुज असे ।' –आप १७. [सं. कल्पय्]

कल्पिति-ती—स्त्री. १ युक्ति; कला; चातुर्य; शोध; शक्कल; कल्पना; हेतु साधण्याची चतुराईची योजना. 'कोणी रासायनिक शोध लाविले किंवा कोणी कल्पिति काढल्या ...' –सेंपू २. (प्रस्तावना) ११. २ कल्पना; मसलत; युक्ति; उपाय; तजवीज; तोड (मनामधील). ३ (गूढ, गुंतागुंतीची यंत्राची) कळ; रचना; तें चालविण्याची रीत; त्याचा उपयोग करण्याची हिकमत. [सं.]

के, कें—क्रिवि. (चि.) कोठें. 'आतां कें जाइलु साबडा । आम्हां पासौनी ।' –शिशु १४१. 'तये वेळीं तूं कवणें कें । देखावासी ।' –ज्ञा १.२२९. 'तो कें आथी म्हणोनियां ।' –गीता २.१४३०. [सं. क]

के, कें—क्रिवि. कसें. 'परदैवा कें नांदणें । आपुलेनि आंगें ।' –ऋ ४२. 'पूर्णचेद्रसीं उपमिजे कें कळाभाग ।' –स्वानु १०.१. २१. [सं. कथं]

के कें—सना. काय. 'तंव कें नारदु भणे ।' –शिशु १२६. [सं.किम्=काय]

केउता-ती-तें—अ. १ कोठें ? 'चैतन्य गेलें नेणो केउतीं ।' –शिशु ८२८. 'रांडे शिनळी केउती जाति होतीस ।' –पंच १. ३०. 'केउता गेला रे मुरारी ।' –निगा ४५. २ कोठला; कोठील. 'तेथ केउता प्रसंगु । मोक्षाचा तो ।' –ज्ञा १६.४५३. [सं. कुत्र] ३ कशाला. 'केउता कल्पतरूवरि फुलौरा ।' –ज्ञा १०.११. ४ कसा; कशी; 'मज सांडुनि केउती । गोवळाप्रती जातेसी ।' –एभा १२.१०१. 'प्रळयानळा देतां खेंव । पतंग वांचे केउता ।' –मुविराट ६.५४. ५ कोणता; कसला. 'अनंगा केउता हाथि एरू ।' –शिशु २६५. 'इच्छा केउती पुढारीं ।' –मुसभा ६.११७. ६ केव्हां. [सं. कियत्+उत; प्रा. के+उत ?]

केउलवाणा-णी-णें—वि. दीनवाणा; केविलवाणा पहा, 'येती शरण तुला जे केउलवाणे न ते जना दिसती ।' –मोभीष्म १.४५.

केऊं—उद्गा. कुत्र्याचें केंकाटणें; कयंब. 'चोरटें सुनें मारिलें टाळें । केऊं करी परि न संडी चाळे ।' –तुगा ८८६. [ध्व.]

केकटणें, केकणें, केकावणें—अकि. १ दुःखानें ओरडणें; आर्त स्वर काढणें; भोंकणें; मुंकणें (कुत्रें, पोर इ० नीं). 'तें कोल्हें केकटून केकटून उडया मारून मारून... ' –नाकु ३.२४. २ किंकाळणें; मोठ्यानें रडणें. [ध्व.]

केकट्टां—वि. (गो.) अर्धे पिकलेलें (भात).

केकत-ती—नकि. १ घायपातीचें फूल व झाड; केताड. हें उष्ण प्रदेशांत होतें. हें कुंपणाला लावतात. याच्या पातींचे उभे व सरळ तंतू निघतात, त्यांचीं टिकाऊ वस्त्रें विणतात. याच्यापासून दोरखंडेहि करतात. [सं. केतक]

केकत-ती—न. केतक-की पहा.

केकतड-ताड—न. १ घायपात. २ ताडाची एक जात; केकत पहा. **केकतडाचे सळ**—पुअव. (चांभारी) दोर; चामडयाची पिशवी शिवण्यासाठीं कातडयाऐवजीं घायपाताचे दोर उपयोगांत आणतात ते; तोडा; पन्हळी.

केकताट-ड—स्त्री. केकतीचें झाड, कुंपण, बई.

केकया-यी—स्त्री. १ कैकेयी; भरताची आई. २ (ल.) भांडखोर, कैदाशीण, कजाग स्त्री. [सं.]

केंकरा-री-रूं—पुस्त्रीन. मेंढीचें पोर. **केंकरा-री-रूं**; पहा.

केंकरें—न. (राजा.) फावडें. **केरें**; **केगरें**.

केकसणें—अक्रि. खेकसणें; वसकन् अंगावर जाणें. [ध्व. केकणें–केकसा]

केकसा, केकसा माघशी—अक्रि. १ केकया–यी अर्थ २ पहा. कर्कशा; कजाग स्त्री. २ भेसूर, किळसवाणी स्त्री. [सं. कैकस =राक्षस; प्रा. केक्कस; तुल० का. केक्कस=अपमानाची भाषा]

केका—स्त्री. मोराचें ओरडणें, टाहो, ध्वनि. [सं.] **केकावली**–स्त्री. मोरोपंत कवीनें केलेली १२१ कवितांची आवली, माळ. यांत परमेश्वराचा धांवा केला आहे. उदा० 'सदाश्रितपदा सदाशिव मनोविनोदास्पदा। स्वदास वशमानसा कलिमलांतका कामदा।' –केका १ [केका+आवली.]

ककाण—न. समुदाय. 'घेऊनि इंद्रियांचीं केकाणें।' –ज्ञा १८.४६४.

केकाणें—न. दोरखंड. –शर. ?

केंकाण—न. १ केकाण नांवाच्या देशांतील घोडा; घोड्याचा एक प्रकार. 'जालौरीचें केंकाणे थोरूं।' –शिशु ९३७. २ एक देश. –अश्वप १.३७. ३ दौड; धांव ? –शर.

केंकावणें—न. केंकणें पहा. '(कुत्रा) दुःखानें शब्द करतो त्यास केंकावणें म्हणतात.'–मराठी ३ रें पु. (१८७३)पृ. १२१. [ध्व.]

केकी—पु. मोर. [सं.]

केकें—उद्गा. केंकटणें; केंकणें. (क्रि० करणें). [ध्व.]

केगद–दी—स्त्री. केवडा; केतक–की पहा. [सं. केतक; का. ता. केदगे]

केगया, केगामती—केकया–यी अर्थ २ पहा.

केगरें—न. फावडें, खोरें, केंकरें पहा.

केगाद—न. १ (कु.) केवडा; केगद पहा.

केचित्—वि. कांहीं; कांहीं लोक [सं. कश्चित् (अव.)]

केचिन्मत—न. एकदेशीय मत; सर्वांस मान्य नसणारें मत. कांहीं लोकांचें मत. [सं.]

केज–जें—न. १ (माण. व.) मालाच्या मोबदल्याचे धान्य, नारळ इ० पदार्थ: उदा० माळणीपासून भाजी घेऊन धान्यरूपानें दिलेली किंमत. (क्रि० घालणें). 'आदरासी मोल नये लावूं केजें।' –तुगा ३४०४. 'मागच्या आठवडयांत वांगीं घेतलींत त्याचें केजें घाला.' २ मोबदला; मालाची देवघेव. [सं. क्रेय; प्रा. केज्ज] **केज्यास कापूर होणें**–भारी किंमतीचा पदार्थ हलक्या किंमतीस विकला जाणें.

केजणें—उक्रि. (कों.) नारळ, धान्य इ० देऊन त्याबद्दल मासळीचा कुट्टा, अगर भाजीपाला घेणें. [केजें]

केंजणें—अक्रि. (तंजा.) विनविणें; हां जी हां जी करणें.

केंजळ—अक्रि. किंजळ अर्थ १ पहा.

केटर—वि. (व.) अंगानें किरकोळ. 'ती गाय केटरी आहे.'

केटली—स्त्री. चहादाणी. किटली पहा. 'सुशीलेनें चहाची केटली आणली होती.' –सुदे ११०. [इं. केटल]

केठा—वि. (माण.) किडका; कुजका; सुमार (माल). [का. केट=वाईट, घाण; तुल० सं. कीटक]

केड—वि. कद्रू; कृपण; चिक्कू. –शिल्पवि ६३१.

केंड—न. हरिकांतील फोल; धान्यावरील आवरण.

केंड—पु. निकृष्ट माशाची एक जात, हा वाटोळा असतो.

केंड—पु. १ जळलेल्या गवऱ्यांचा ढीग. २ (गो.) ज्वाळा. [का. केंड=जळता निखारा]

केड करणें—सक्रि. (बे)नासणें; नास करणें. [का. केडिसु= नाश करणें; विघडविणें.]

केडगा—वि. (क.) कळ, भांडणें लावणारा. 'त्या केडग्या पोराच्या नादाला लागूं नको.' [का. केडिसु]

केडणार—वि. (गो.) अवहेलना करणारा. [केंडणें]

केंडणी—स्त्री. अवहेलना. केंडणें पहा.

केंडणें—उक्रि. १ अडवणें; रोधणें; अडथळा करणें. २ (राजा. कु.) दोषारोप ठेवणें; दूषण देणें; तुच्छ लेखणें; टोंचून बोलणें. 'कोणाही केंडावें हा आम्हां अधर्म।' –तुगा ४२४५. ३ धुडकावून देणें; हिडीसफिडीस करणें; अव्हेर करणें; लाथाडणें. 'जरि केडिला तरी हिरा स्तविलाचि शिरीं चढे न शिरगोळा।' –मोआदि २७.४४. ४ (सर्व अर्थी) कोंडणें. (उदा० अडवून ठेवणें; बांधून टाकणें; खिळून ठेवणें ?) ५ (व.) खुंटणें; बरोबर वाढ न होणें. [का. केडिसु, केडु.]

केडला—क्रिवि. (चि.) केव्हां. [सं. कियत्+वेला]

केडलावणें—(कु.) वेडावणें. [सं. कंडु]

केंडशी—स्त्री. बुरशी; बुरा. [का. केडु=नासणें]

केढवळ, केढोळ—पु. पुष्कळ काळ; किती वेळ; फार वेळ. 'त्यास जाऊन केढोळ झाला अझून येत नाहीं.' –क्रिवि. पुष्कळ काळपर्यंत. 'मी केढवळ येऊन बसलों.' [केवढा+वेळ] **०चा**–वि. किती वेळचा; केव्हांचा. बऱ्याच कालापूर्वीपासून. 'तो केढोळचा येऊन बसलेला आहे.'

केणा–णी—पुस्त्री. केना नांवाची शेतांत उगवणारी भाजी; यांचीं फुलें निळीं–जांभळीं असतात. त्याला कातरपानें येतात. **केणाकुरुडूची भाजी, केण्याकुंजऱ्याची भाजी**–स्त्री. केणा आणि कुंजरा या दोन हलक्या पालेभाज्या आहेत त्यावरून भिकार अन्न. कळणाकोंडा पहा. 'केण्याकुंजऱ्याची भाजी भोगे।' –दावि २९. 'घागरी–मडक्यांत कांहीं दाणे पहा, दळून त्याची भाकरी कर, केणी कुरडूची भाजी कर.' –संपत शनवारची कहाणी पृ. ३२.

केणी—केंण पहा. १ माल. 'तरी तैसी एथ कांहीं। साविध्याचि केणी नाहीं।' –ज्ञा ६.३४१. २ वस्तु; प्रकार. ३ बाजारांत विकायास आलेल्या जिनसांवरील देशमुख–देशपांडे वगैरे वतनदारांचा कर. उदा० पत्रेकेणी, धीकेणी; हा कर वसुल करणारा तो केणी (आडनांव). –भाअ १८३२. पृ. १३२. [सं. क्रयण; प्रा. किण; फ्रेंजि. कीन=विकत घेणें]

केणें—न. वासनाभोंवतीं बांधावयाची सुताची किंवा रेशमाची दोरी; केवणें पहा. 'तेया ध्वनिताचें केणें सोडुनि।' –ज्ञा ६.२९२. [केवणें]

केणें—न. १ बाजारांत विकावयास आलेला पदार्थ; व्यापारविषयक पदार्थ, (विशेषतः धान्य, फळें, भाजी वगैरे). 'इयां पाटणीं जें केणें उघटे।' –पाटणचा शिलालेख. 'विकते देखोनि मुखाचें केणें।' –शिशु ४७. 'तूं मोक्षद्वीपाचें केंण भरून। जासी कैलासराजपेठ लक्षून।' –शिली १४.१५५. २ बाजारांतील मालावरील सरकारी कर. ३ (सामा.) माल; जिन्नस; व्यापाराचा पदार्थ. 'द्वारकेमाजीं शब्द केणें।' –एहस्व ३.१७. 'काय लाभ झाला काय होतें केणें।' –तुगा ६०२. 'व्यास वाल्मीकी व्यापारी। कीर्तन केणें उमाणिती॥' –भवि २९.५५. ४ (क.) वर्तावळा; वर लावणें. ५ (मावळी) पैसा; डबोलें. 'एक घरीं केंण आलें.' =सर्व पैसा एके ठिकाणीं जमा झाला.

केत—पु. १ (राजा.) झाडाचा नार, गाभा. २ झाडांतील जून लांकूड. –शिल्पवि ६६१.

केत—पु. १ केतु; ध्वज. 'सुवर्ण केत ...' –मुवन १२. ५१. २ इच्छा; हौस. 'श्वशुरप्रमुख सासू कृष्ण आराधि केतें।' –मंराधा ७८. [सं. केतु]

केतक—न. १ केवडा; केवड्याचें कणीस. २ कणसाचें एक पान–पात. ३ डोक्यांतील एक सोन्याचा दागिना. [सं.] **०पान**–न. केतक अर्थ ३ पहा. **–काचें कणीस**–न. केतकीचा सबंध तुरा, कणीस.

केतकद्रु—स्त्री. (कों.) केतकीचें झाड; केवडा. –न. केतकीचें लांकूड.

केतकी—स्त्री. केवड्याचें झाड. केतक पहा. [सं.]

केतकी—स्त्री. (कों.) एक प्रकारचा पक्षी; चांभारीण पक्षी.

केतकें—न. (बे.) गूळ उकरण्याचें उलथणें. [का. कितु=उपटणें]

केतन—न. ध्वज; पताका; निशाण. [सं.]

केतपत—क्रिवि. कितपत.

केतु—पु. १ (ज्यो.) नवग्रहांतील नववा ग्रह. २ एक दैत्य. याचें शिर विष्णूनें मोहिनीरूप घेऊन उडविलें. राहू पहा. ३ निशाण. ४ धूमकेतु; शेंडें नक्षत्र. 'उदैजणें केतूचें जैसें।' –ज्ञा १६.३१९. [सं.]

केतुका–की–कें, केतुला–ली–लें—वि. (काव्य) केवढा? किती? कसला? कितीसें? 'ते सैन्यु सांगौ केतुलें।' –शिशु १०३१. 'हें औट हात मोटकें। कीं केवढें पां केतुकें।' –ज्ञा १३.१२. 'तक्षकविषाचा केतुला केवा।' –मुआदि ८.१९. [सं. कियत्+क]

केतें–पान—न. चेनकांचनी गंजिफांच्या खेळांत चारी हुकूम एकास आल्यानें होणारी जीत (सोहि. अद्वया ३). –शर.

केथवर—क्रिवि. (प्रां.) कोठवर? कोठपर्यंत? किती लांब?

केदरावणें—अक्रि. (कु.) वेडावणें.

केदार—नपु. १ शेत. २ मळा. ३ पाटाचा बांध. 'वाटेस फुटतां केदार।' –पांप्र १.६६. ४ केदारेश्वराचें स्थान; बद्रिकेदार. [सं.] **०खंड**–पु. शेतबांध; पाणी अडविण्यास बांधलेला बंधारा. 'केदारखंडबंधन आज्ञापुनि धाडिला तुम्हीं म्हणती।' –मोआदि २.१९.

केदार—पु. एक वृक्ष. –शे ९.२५७.

केदार–रा—पु. (संगीत) एक राग. ह्या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल मध्यम, तीव्र मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. आरोहांत ऋषभ व गांधार वर्ज्य व अवरोहांत गांधार वर्ज्य. जाति औडुव–षाडव; वादी मध्यम व संवादी षड्ज. गाण्याची वेळ रात्रीचा पहिला प्रहर. ह्या रागाचे प्रकार–चांदणी केदार; जलधर केदार; मल्लहाकेदार इ०. 'मूर्तिमंत केदार वरुन तूं आणिलास जैसा बाहोनी।' –प्रला २३६. [सं.]

केंदाळ—न. (क.) पाण्यांत वाढणारी एक वनस्पति; एक प्रकारचें गवत. 'नदींत केंदाळ वाढलें आहे.'

केंदी—वि. (गो. कु.) केवढा. [सं. कियत्]

केंदोळ—(गो.) केढवळ पहा. [सं. कियत्+वेला]

केंद्र—न. (शाप.) १ दीर्घवर्तुळांतील ज्या दोन बिंदूंपासून परीघावरील कोणत्याहि बिंदूपर्यंत अंतरांची बेरीज सारखी येते अशा बिंदूंपैकीं प्रत्येक; (इं.) फोकस. २ वर्तुळाचा मध्यबिंदु; नाभि. (इं.) सेंटर. ३ (ज्यो.) ग्रहाच्या कक्षेच्या प्रथमबिंदूपासून त्याचें चवथ्या, सातव्या अथवा दहाव्या अंशांपर्यंतचें अंतर. पतनकेंद्र; द्वितीयकेंद्र, शीघ्रकेंद्र, मंदकेंद्र पहा. ४ समीकरणविषय. [सं.; तुल० प्री. केंत्रोन; इं. सेंटर] **०च्युति**–स्त्री. (ज्यो.) केंद्रापासूनचें अंतर; दीर्घवर्तुळाच्या मध्यापासून एका केंद्राच्या अंतरास बृहदक्षाच्या अर्धानें भागिलें असतां येणारें गुणोत्तर. (इं.) एक्सेंट्रिसिटी. –सूर्यमाला २२. [सं.] **०पराङ्मुख**–वि. केंद्राकडून दूर जाणारे; केंद्रोत्सारी. (ह्याच्या उलट). **केंद्राभिमुख**–वि. केंद्राकडे जाणारे.

(इं.) कॉन्व्हर्जिंग. **केंद्रीकरण**–न. एकीकरण; ऐक्य. 'लोकमतांचें केंद्रीकरण करण्याकरितां राष्ट्रीय सभा आहे.' –टि ३. ९'५. **केंद्रोत्सार-गति**–स्त्री. केंद्रापासून दूरदूर जाणारी किंवा एखाद्या पदार्थास दूर नेणारी गति. –शिल्पवि ७४२. **केंद्रोत्सारक**–वि. मध्यबिंदूपासून दूर जाणारें. (इं.) सेंट्रिफ्युगल.

केह्वां, केदवां–अ. (कु.) प्र. केधवां; केव्हां.

केधवां–क्रिवि. (काव्य) केव्हां; कधीं; कोणत्यावेळीं. तुझें श्रीमुख साजिरें। तें मी केधवां देखेन।' –तुगा २८२. 'तुका म्हणे धीर नाहीं माझ्या जीवा। भेटसी केधवा पाडुरंगा।।' –तुगा ८४६. 'निकरें हाणी न दिसे सोडी शर केधवांचि धरुनि करें।' –मोकर्ण ३८.४२. [सं. कदा; प्रा. केद्दह]

केन–न. आऊत.? –शे ७.१७. –नामको.

केनशी–स्त्री. १ (कों.) बुरशी; बुरा. केंडशी पहा. २ लोणा. –शे ११.२०१.

केनसावणें–अक्रि. (कों.) बुरसणें; बुरशी येणें (अन्नादि पदार्थास).

केना–(वांई) केणा पहा. –मसाप ३.३.२४६.

केनाळ–न. (गो.) एक प्रकारचें भाताचें बीं; काळासो; करगुंट; कोळपा.

केनी–केना; केणा पहा.

केनी–केनशी पहा.

केप–नस्त्री. १ बंदुकीच्या घोडयाचा ज्यावर आघात होऊन बार उडतो ती तांब्याची लहान टोपी. २ दिवाळींत मुलांच्या पिस्तुलांत घालावयाची दारू भरलेली कागदी चकती. [इं. कॅप]

केप-पू–न. (गो.) लाल; माणिक. [का. केंपु=लाल (रंग)]

केपगुजबरी–स्त्री. एक फळझाड; ढोलांबा. –बागेची माहिती १६२. [इं.]

केबरा–पु. १ शेतांतून कोठारांत भात नेत असतां येणारी तूट भरून निघावी म्हणून दिलेली सूट, भत्ता. २ विक्रीसाठीं स।ज्वलेल्या सरकारी पिकाची नुकसानभरपाई करण्यासाठीं (मागें साष्टी गांवावर) बसविलेली पट्टी. –विल्सनकोश. पृ. २७२.

केंबरें-रीं, केमरें-रीं, केंबूर-मूर–न. (कों.) घुंघुरटें; चिलट. या एक जातीच्या माशा असून नेहमीं डोळ्यांजवळ उडतात त्यामुळें डोळे येतात.

केंबळ-मळ–न. १ भिंतीवर अथवा छपरावर लोंबणारीं, होणारीं कोळशेटें, जाळीं (धूर, धुराळ्यापासून). २ बायकी शिवी. ३ (ल.) खोकड, अशक्त, म्हातारी बाई.

केंबळ-बळा-बळी, केमळ-मळा–पुस्त्रीन. १ छपरावरचें जुनें गवत; शाकार; नवीन शाकाराखालीं केव्हां केव्हां हें घालतात. घरावरील गवत, पेंढा एका पावसानंतर कुजून निकामी होतो तीं केंबळ. २ (माण.) उंसाचा जुना पाला अगर खपलीचें जुनें शाकार, काड. ३ लाल रंगाचें गवत; तांबोळी; तांबेटी.

केंबळी–वि. केंबळानें शाकारलेलें गवताचें (घर).

केंबळ्याघुडा-ड्या–वि. घुडा जातीचें भात.

केंबें–न. (गो.) द्रव्य; संपत्ति. ?

केम–न. यंत्राच्या विशिष्ट प्रकारच्या गतीचें दुसऱ्या प्रकारच्या गतींत रूपांतर (उ० वाटोळ्या गतीचें मागें पुढें होणाऱ्या) करावयाचें साधन. [इ.–कॅम्]

केमटा–वि. हेमटा; हिमटा; चिक्कू; कृपण. केड पहा.

केमण–स्त्री. (वे.) काव; हुरमुंज; गेरु. [का. केंपु=लाल +मण=माती]

केमशी–स्त्री. बुरशी. केंडशी पहा.

केमसा-शी–पुस्त्री. (बायकी) पुरुषाला अथवा स्त्रीला बायका एक शिवी देतात ती.

केय–न. (खा.) केंळ. [केळ मधील ळचा य उच्चार होतो]

केयडो–पु. (गो.) एक जातीची मासळी.

केयूर–न. दंडामधील कडें, वळें; बाजूबंद. 'जैसा केयूरादिकीं कसु। सुवर्णाचा।' –ज्ञा १३.१०६५. [सं.]

केर–पु. (गो.) मोठा उंच रथ. उदा० म्हाळसेचा केर.

केर–पु. (गो.) मासळी.

केर–स्त्री. (गो.) दोन डोंगरांमधील लांबट शेतजमीन; पावसाळी हंगामाची शेतजमीन.

केर–पु. १ कचरा; गवताच्या काड्या; धुरळा; शेण, माती, गवत, पानें इ० चा वाईट साईट अंश. २ गाळ; रेंदा; निरुपयोगी पदार्थ; अवशिष्ट भाग. –न. ३ (कों.) बारीक कण; गवतकाडी, कसपट, तुकडा इ० (साखरेंतील, धान्यांतील, कापसांतील). (वाप्र.) **०फिटणें-कचऱ्याप्रमाणें उडून जाणें**; नाश होणें. 'तेथ भेडांची कवण मातु। कांचया केर फिटतु।' –ज्ञा १.१३४. **०फेडणें**–नाश करणें. **०धारा करणें**–क्रि. घरांतील निरनिराळीं कामें करणें. **०धारा करून टाकणें**–क्रि. १ (ल.) धसफस करून काम बिघडविणें; नासणें; खराब करणें. २ तिरस्कारानें नाकारणें (उपदेश वगैरे). सामाशब्द– **०कचरा**–पु. केराप्रमाणें निरुपयोगी पदार्थ, यांस समुच्चयानें म्हणतात. **०कतवार-कातर**–पु. अडगळ; गाळसाळ; केरकचरा. [केरद्वि.] **०कसपट-कस्तान-किलच**–न. केरकचरा; गवतकाडी; गाळसाळ. **०कोंडा**–पु. केर व कोंडा; घराची झाडलोट करणें वगैरे सारखीं हलकी नोकरी (उदरभरणार्थ केलेली). **०कोन-खंड**–पु. घरांतील केर सांचविण्याचा कोपरा, कोन. **०डोक**–न. छपरापासून लोंबणारें जाळें; गवताच्या काड्या; जळमट (चालतांना डोक्याला लागतात म्हणून). **०पट्टी**–स्त्री. केरणेणावळ; केर काढण्यासाठीं

झाडूवाले जे नेमतात त्यांचा खर्च वारण्यासाठीं बसविलेला कर. **०पाणी-पोतेरें**–न. झाडलोट, पाणी भरणें, सारवणें, सडासंमार्जन वगैरे बायकांचीं रोजचीं कार्यें. **०भार**–पु. केराचा ढीग. **०सुणी-सोणी**–स्त्री. १ केर झाडण्यासाठीं शिंदीच्या पातींची अगर नारळीच्या हिरांची केलेली झाडणी; वाढवण; सळाथी. २ आयदी स्त्री; आळशी स्त्री. –वि. नेहमीं बाजूला शेपटी वळविलेला (घोडा); उघडगांडया पहा. [सं. केर+संवाहनी] **म्ह०** १ केरसुणीच्या काडया मोडून फळ नाहीं. २ केरसुणी पाहून जात अन् दिवा पाहून येत –मसाप ४.४.२७२. **०सुणीकार-रु**–पु झाडलोट करणारा नोकर. 'तंव गोरंभकु नामें केरसुणीकारु।' –पंच १.२६. **केरावारी-केरासमान**–वि. टाकाऊ; कवडी किंमतीचा (माल).

केरणें—अक्रि. खाणें ? –शर.

केरवळया(कोणाऱ्या)—पुअव. एक खाद्य; कोणफळ सोलून व उकडून त्यांत मीठ घालून वाटून त्याच्या लाटयांत खोबऱ्याचा कीस, भुईमुगाचे दाणे यांचें पुरण भरून तळून काढतात. –गृशि १.४७५.

केरवा—पु. एक चिनी मातीचें भांडें. 'केरवा नांवाचें चिनी मातीचें पात्र आहे त्यांत एक मुंबईमण गुलाबपाणी असतें.' –मुंव्या ११९. [फा. कहरुबा]

केरवा—पु. केरवा नाच. कारवा पहा.

केरवा—पु. तबल्याचा एक बोल. याच्या मात्रा ४. धागे न धिनक धीं, धागे न तिनक धीं.

केरवा—पु. १ बागडयांचा एक प्रकार. २ पिंवळा दृष्टमणि; तृणमणि. [फा. कहरुबा]

केरा—वि. (व.) १ तिरप्या नजरेचा; चकणा. २ वाकडा. [सं. ककर=तिरवा]

केराव(वें)णें—अक्रि. (कों.) धान्य वगैरेमध्यें केरकचरा मिसळणें. [सं. केर]

केरावाऱ्यात-निर्शी—क्रिवि. १ घाणींत; केरांत. (यावरून ल.) २ वाऱ्यावर; गमावलेला, गेलेला, उडून गेलेला. [केर+वारा]

केरी—स्त्री. १ केर; काडया (नांगरानें उपटून निघालेल्या); केरकचरा (पाण्याच्या ओघाबरोबर आलेला, भरतीबरोबर आलेला). २ जमीन भाजल्यावर राहिलेलें कवळ वगैरे; शेतांतील धस, खुंट; पिकाबरोबर वाढलेलें तण, पाचोळा. ३ (कों.) माडाच्या पात्यांची विणलेली पाटी. [केर]

केरी— स्त्री. एक प्रकारचा विहिरींतील मासा. –मसाप २४७.

केल-ळ—न. १ काठीचें दुबळकें, डोकें, भाग. २ दुबेळें, दुबेळक्याचा कांटा. ३ मोडलेल्या फांदीचा, झाडाच्या खोडावर राहिलेला भाग. ४ काठीला लाविलेली आंकडी.

केल(ळ-य)टें-डें, केल्लें—न. (कों. गो.) माकडाचें पिल्लूं; माकड. [पो. केल्दन] **म्ह०** करायला गेला गणपती तों झालें केलडें.

केलडें—न. (नाविक) कप्पीसारखें पण साधारण लांबट चाक.

केलमल—पु. (कैकाडी) रुपयांना सांकेतिक शब्द. –गुजा. ४२–४३.

केलाडुं—न. (कों.) लहान मूल; लेंकरूं.

केलि—स्त्री. (काव्य) खेळ; करमणूक; क्रीडा; विलास; विहार. 'जगदुन्मीलनाविरल-केलिप्रिय।'–ज्ञा १८.६. 'सिंधूंत तरेल कशी जी केली केलि-हेतु नाव सरी।'–मोर (नवनीत पृ. ३००). **०कलह**–पु. प्रीतिकलह; लाडझगडा; खेळांतील विनोदाचें भांडण. [सं. केल=खेळणें–केलि–ली]

केलें—न. कर्म; कृत्य. 'न देखे आपुलें केलें। पराप्रसाद स्वयें बोले।' –एभा २३.२७४. प्राप्तलाचें केलें कोण वारी।' –व १५. [सं. कृ.; म. करणें–केलेलें] **०न केलेसें करणें**–निष्काळजीपणानें, कुचरपणानें एखादें काम करणें.

केलेला पुरुष—पु. अनुभवी व सरावलेला माणूस; प्रौढ.

के(कें)व—स्त्री. करुणा; याचना. कींव पहा. [कींव]

केवट, केवटपण—न. किरकोळीचा व्यापार; किरकोळ विक्री–व्यवहार. [सं. क्री=विकत घेणें]

केवटळ—स्त्री. ओढा किंवा नदी यांच्या कांठीं असुन जींत डोंगराच्या वरच्या प्रदेशांतुन गाळ वाहात येऊन बसतो अशी जमीन; घडवा म्हणई. –कृषि १६. [केवटा]

केवटा—पु. गाळानें बनलेली जमीन; बारीक गाळ, माती. 'ही जमीन नदीच्या केवटयाची असावी.' –बागेची माहिती ३. –शे ९.१०७.

केवटा—वि. अति कृपण; चिक्कू; चिकट.

केवटा-टी-ट्या—वि. मोठया दुकानांतून खरेदी करून किरकोळ भावानें जिन्नस विकणारा; किरकोळ, लहान व्यापारी; घाऊक खरेदी करणारा; केवटी. [केवट]

केवडा—पु. १ केतकीचें झाड व त्याचा तुरा, कणीस; हिंदुस्थानांत पाणथळ जागीं केवडा होतो. पांढऱ्या जातीस केवडा व पिंवळया जातीस केतकी म्हणतात. केतकीस फार सुवास येतो; त्याचें तेल व अत्तर काढतात. २ बायकांच्या वेणींतील लांबट चौकोनी सोन्याचें फूल. ३ अंगरख्याची कासेंतील कळी. ४ वेणीचा एक प्रकार. (कि० घालणें; काढणें; उतरणें). ५ जोंधळयावरील एक रोग. –शे ९.३२. [सं. केतकी; हिं. केओंडा, केवडा; गु. केवडो.] **केवड्याचा खाप**–पु. स्त्रीपुरुषाच्या स्वरूप–चेहऱ्याला म्हणतात. **–चें कणीस**–न. केतकीचें फूल.

केवडी—स्त्री. केतकी; केवडा पहा.

केव(व्ह)डा-ढा—वि. किती; पुष्कळ; मोठा ?; किती प्रमाणानें, अंशानें ? (प्रश्नार्थानें किंवा मोघम रीतीनें उपयोग). एव्हडा (कंसांतील मजकूर) पहा. [सं. कियत् वृद्ध; प्रा. केवड] **केवढ्याचा-नें**-क्रिवि. केवढया मोठ्या आवाजानें.

केवण—स्त्री. मुरुडशेंगेचें झाड; साधारणपणें हें पुरुषभर उंच असतें. याचीं पानें मोठीं नसतात. शेंगा मुरड घातल्याप्रमाणें असतात. झाडाच्या सालीचीं दोरखंडें करतात. –वगु २.५६.

केवणें—न. १ कापडाचा गठ्ठा बांधण्याची दोरी (रेशमी अगर सुती). केणें पहा. २ साठा; संचय; पुंजी. केवा पहा.

केवन्या-न्यो—स्त्रीअव. (कु. गो.) न्यून; उखाळ्यापाखाळ्या. [सं. किम्+ऊन-न्यून]

केवल-ळ—वि. १ शुद्ध; स्वच्छ; भिश्र नसलेलें; निर्भेळ. 'हें भांडें केवळ चांदीचें आहे.' २ ज्यास दुसऱ्या कोणाचेंहि साह्याच्य नाहीं असा; एकटा; फक्त; मात्र. 'केवळ तांदूळ असल्यानें भोजन होत नाहीं.' ३ निवळ; नुसता; शुद्ध. 'तो केवळ भोळा नाहीं कीं ठकला जाईल.' –क्रिवि. १ बरोबर रीतीनें; नियमित रीतीनें; नियमानें; निश्चितपणें. 'केवळ नाहीं म्हणवत नाहीं.' 'केवळ तूंच यावें नलगे, तुझा भाऊ आला तर कामास येईल.' २ अगदीं; निखालस; हुबेहूब; सादृश्यामुळें तद्रूप दिसणारें. 'ही नगरी केवळ लंका दिसते.' ३ बिलकूल; मुळींच. 'दक्षिणेंत केवळ असामी नाहीं दुसरा.'–ऐपो २३६. –वि. निश्चळ; अकर्ता. 'तो पुरुष स्वतंत्र असून निसर्गतः केवळ म्हणजे अकर्ता आहे.'–गीर १६२. सामा शब्द– **०उष्णमान**–न. मूल शून्यांशापासूनची उष्णतेची तीव्रता (इं.) अॅबसोल्यूट टेम्परेचर. **०प्रयोगी**–वि. उद्गारवाचक (अव्यय); जीं अव्ययें वाक्यांत असतां ज्यांवरून वक्त्याचे अथवा सांगणाराचे हर्षशोकादि जे मानसिक विकार अथवा उद्गार यांचा उद्बोध होतो त्यांस–त्यांचा वाक्यांतील इतर शब्दांशीं कांहीं संबंध नसतो म्हणून केवलप्रयोगी अव्ययें अथवा उद्गारवाचक अव्ययें म्हणतात. **०नैय्यायिक-वैय्याकरण**–पु. नुसता न्याय अथवा व्याकरण जाणणारा. **०व्यतिरेकी**–वि. (न्याय) केवल नास्तिपक्षानें संबद्ध असलेला; अभावाचा संबंध असणारा; याच्या उलट केवलान्वयी; अन्वयव्याप्ति पहा. [सं.] **केवलेश्वर वादी**–वि. फक्त ईश्वराचें अस्तित्व मानून धर्म हा ईश्वरप्रणीत आहे हें मत न मानणारा.

केवल(विल-घुल)घाणा-णी—वि. दीन; ज्याबद्दल कींव, दया उत्पन्न होईल असा; बापुडा; विव्हळणारा (स्वर, मुद्रा इ०). 'कां मातेनें टाकिलें तान्हें। तें अनाथ दिसे केविलवाणें।' 'बघुं नको मजकडे केविलवाणा' –एक [सं. कृपालु; प्रा. किवालु; म. केविल (कींव)+वाणा]

केवला—पु. (गवंडी, वे.) भिंतीचा पुढील अगर मागील भाग, टोंक; चांदईचा शेवट.

केवला—वि. (क. गो.) (नंद भाषा) एक ही संख्या (इसम, रुपाया इ०). 'केवला हरवला' =रुपया हरवला. [सं. केवल]

केवल्यांबावल्यो—स्त्रीअव. (कु.) चेष्टा; टिवल्याबावल्या. [बाहुली द्वि.]

केवशीन—क्रिवि. (गो.) कोठून.

केवा—पु. १ सांठा; संग्रह; पुंजी; डबोलें. २ (नंदभाषा, क.) रोख रक्कम; रोकड. 'गरीबांना केव्याची जरूरी असते.' ३ महत्त्व; सामर्थ्य; प्रौढी; पाड (निषेधार्थी प्रयोग). किंमत पहा. 'संतभजनी माझा सद्भावो। केवा कोण पाहा भक्तीचा।' –एभा ११.१५५३. 'तक्षकविषाचा केतुला केवा।' –मुआदि ८.१९. 'परि केवा काय तिचा शत्रु दलाचा अफाट विस्तार' –विक ६७. [सं. क्री–क्रय ?]

केवि(वीं)—क्रिवि. (काव्य) कसें; कोणत्या रीतीनें; कशा सारखें; कोणत्या प्रकारानें ? 'तो केवि मार्गी इयें. क्षेमी होए।' –ऋ ७. 'श्रुतिह्रहि म्हणे सदा स्तविल आमुची केंवि धी।' केका २७. [सं. कथम्]

केवी—स्त्री. (कों. गो.) केवा अर्थ १,२ पहा.

केवी—पु. (राजा.) उपरी–न्या शेतकरी; परगांवचें कूळ; याच्या उलट गांवकरी; वतनदार.

केवूं—पु. कसा; कशी ? कैवीं पहा. 'प्राणेश्वरा त्यजूनी केवूं। वाचुं म्हणतसे ते नारी।' –गुच ३०.९०.

केवेळीं—क्रिवि. केव्हांहि. 'वाटा केवेळीं न वचती।' –ज्ञा ४.६०. [सं. कियत्+वेला; प्रा. के+वेला; म. केवेळ]

केव्हडा—पु. केवढा पहा.

केव्हां—क्रिवि. १ (प्रश्नार्थक) कोणत्या वेळीं ? कोणत्या प्रसंगीं, समयास. २ (जोरानें उच्चारला असतां) कोणत्याहि वेळीं; कधींहि (निषेधार्थी प्रयोग). 'मी केव्हां गेलों नाहीं.' ३ केव्हां केव्हां. 'जुनीं वस्त्रें मी तुला केव्हां देतें खरें.' ४ किती काल झाला असतांना; 'तो केव्हां आला हें मला ठाऊक नाहीं.' केव्हां व कधीं याच्यामध्यें भेद आहे. केव्हां यानें नुकत्याच होऊन गेलेल्या काळाचा बोध होतो व कधीं यानें कोणत्या तरी बऱ्याच पूर्वीच्या काळाचा बोध होतो. सामाशब्द– **०कधीं**–क्रिवि. कधीं कधीं; कांहीं कांहीं प्रसंगीं; मधून मधून. **०च**–क्रिवि. अगदीं त्याच क्षणीं; लगेच (मागल्या काळाबद्दल, गत कृत्याकडे संबंध). 'घोडयास गवत घातलें तें त्यानें केव्हांच खालें.' **०चा**–वि. पुष्कळ काळपर्यंत; किती वेळचा (गेलेल्या, असलेल्या, बसलेल्या वाट पाहिलेल्या माणसाबद्दल योजतात). 'तो केव्हांचा वेळ

बसलेला आहे.' ०**व्हेव्हां, केव्हांना, केव्हां, नाहीं केव्हां. केव्हांतरी**–क्रिवि. कधींकधीं; मधूनमधून; वेळेनुसार. ०**शीक-सक-साक**–क्रिवि. (कुग.) १ केव्हांहि (निषेधार्थी). २ केव्हांच. **केव्हांसा**–क्रिवि. (व.) कोणत्या वेळेच्या सुमारास. 'तो केव्हांसा गेला ?

केव्हेळी—क्रिवि. केव्हां तरी.

केश—पु. केस; बाल; रोम; लव. (याचें अव. केश असेंच होतें). 'केश म्हणिजे मस्तकींचे।' –एंभा १८२०. [सं. तुल० फ्रें. जि. केश] वाप्र. व **म्ह**० १ हातास (मनगटास) काय केश आले ? =मी काय म्हातारा, अशक्त, दुर्बल झालों ? २ केसांच्या अंबाडया होणें–केस पांढरे होणें; वृद्धावस्था येणें. 'आमच्या केंसांच्या अंबाडया होत चालल्या, आतां आम्हांला इंग्रजी शिकून काय करावयाचें आहे ?' ३ सुटलेले केश पाठीला शरण (आहे त्या स्थितींत राहावें लागणें.) अनन्यगतिक, हतभागी माणूस. सामाशब्द– **केशटथो**–पुअव. (गो.) झिपऱ्या. (लघुत्वदर्शक) ०**तोड**–केसतूड पहा. 'काखमांजरी केशतोड।'–दा ३.६.१७. ०**धरणी**–स्त्री. केशाकेशी; झोंटधरणी. एकमेकांचे केंस धरून केलेलें युद्ध, मारामारी. 'वीरां झाली केशधरणी।' –जै ७५.७५. ०**पाश-जाल**–पु. केशांच्या जटा; बांधलेले, वेणी घातलेले केश; पुष्कळ केस. ०**पुळी**–स्त्री. (गो.) करट. ०**बंध(संयुक्त हस्त)**–पु (नृत्य) पताकहस्त करून ठेवणें. ०**वपन**–न. केशांची श्मश्रू करणें; केस काढणें; हजामत (विशेषतः विधवांच्या बाबतींत योजतात). 'विधवांनीं केशवपन केलें नाहीं तर त्यानें या राजकीय प्रश्नाचा उलगडा होण्यास यत्किंचितही मदत होण्याचा संभव नाही.' –टि ४.१८६. ०**वाहिनी**–स्त्री. (प्राणिशास्त्र) केसासारखी सूक्ष्म नलिका; सूक्ष्म प्रवाहसाधन. (इं.) कॅपिलरि. ०**विंचरणी**–स्त्री. केश विंचरण्याची फणी. ०**संवाहन**–न. केस धुवून पुसून साफ करणें. **केशाकर्षण**–न. (शाप.) अत्यंत बारीक छिद्राच्या नळींतून द्रव पदार्थांचें होणारें आकर्षण. (इं.) उदा० 'कापसाच्या वातींत तेल चढतें तें केशाकर्षणाच्या साहाय्यानेंच होय.' **केशाकेशी**–केश धरणी पहा. 'तुम्हीं ही शब्दांची केशाकेशी चालविली आहे.' –नाकु २०३. **केशांत**–पु. घोडयाच्या कपाळावरचा भाग.–अभ्रप १.६१. **केशानें गळा कापणारा-काप्या**–वि. वरून गोड बोलून विश्वासघात करणारा; गळा शब्द पहा.

केशर—न. जाफरा, काश्मीर या देशांत होणारें एक तंतुमय सुगंधी द्रव्य; याचा उपयोग लाडू, जिलबी इ० खाद्यपदार्थांस रंग व सुवास येण्याकरितां करतात. याला कुंकुम, अग्निशेखर, काश्मीरज, पीतक, काश्मिर, रुचिर, वर, पिशुन, रक्त, शठ इ० नांवें आहेत. याचीं झाडें नेपाळ, काश्मीर इकडे होतात. हें झाड लहान असून लागवडीनंतर दोन तीन महिन्यांनीं यास फुलें येतात. यास तीन पाकळया असून आंत तंतु असतात, तेंच केशर. रंग तांबूस असून तंतू लांब असले म्हणजे तें उंची प्रतीचें केशर होय. –वगु २.५७. २ एक झाड. याचा रंगाकडे उपयोग करितात. कपिला. [सं.]

केशरा—पु. मरेन किंवा मारीन या पूर्वनिश्चयाचें चिन्ह म्हणून लढाऊ शिपाई जो केशरी रंगाचा पोशाख अंगावर घालतात तो. विशेषतः रजपूत योद्धे केशरा घालीत. (क्रि० करणें; घेणें). [केशर]

केशरी—वि. १ केशरासंबंधीं; केशरयुक्त; केशरी रंगानें रंगविलेलें; केशरी वस्त्र परिधान केलेलें (केशरी बर्फी, केशरी पातळ इ०). २ केशरी पोषाख करून जिवावर उदार झालेला (योद्धा). –स्त्री. १ केशराची उटी. २ केशरमिश्रित पक्वान्न, पदार्थ (केशरीभात, मिठाई इ०). ३ एक फुलझाड. ०**गंध**–न. कपाळादिकांस लावावयाकरितां केशर, कुंकु, रवे इ० चें जें गंध करतात तें. ०**भात**–पु. केशर, साखर, बदाम, लवंगा इ० घालून केलेला भात.

केशऱ्या—वि. १ रेषा असलेला (आंबा). २ केशरा पहा.

केशव—पु. विष्णूच्या चोवीस नांवांपैकीं पहिलें. 'केशव हा शब्दहि केश म्हणजे किरण या शब्दापासून निघाला ... ...' –गीर ६०७ [सं.] ०**करणी**–स्त्री. १ विष्णूचा पराक्रम. २ परमेश्वरी लीला. 'केशवकरणी अद्भुत लीला नारायण तो कसा। तयाचा सकल जनावर ठसा।' –राला १३. ०**माधव**–पु. १ विष्णूच्या चोवीस नांवांपैकीं पहिलें व तिसरें नांव. २ (ल.) वुरसलेल्या पदार्थांतील बारीक किडे; अशुद्ध पाण्यांतील किडे.

के(कें)स—केश पहा. (कांहीं वाप्र) ०**काढणें**–श्मश्रु करणें. ०**नखलणें**–केंसांतून नखें (बोटें) फिरवून (फणीप्रमाणें) केंस व्यवस्थित करणें; जटा काढणें. 'वेणी विंचरली केंस नखलून। अलंकार चढविले हिऱ्याचे कळसकाप कुंचलून।' –प्रला २२७. **केसानें गळा कापणें**–विश्वासघात करणें; गोडगोड बोलून फसविणें. 'चांडाळानों, हरामखोरानों दगा करून आमचा सर्वांचा केसानें गळा कापलात अँ ! !' –कांचनगड. **केसानें चरण झाडणें**–सेवा करण्याचा कळस करणें; अगदीं हलकी सेवा करणें. 'पाहिन क्षणभरी। चरण झाडीन केसीं।' –धावा, नवनीत पृ ४४९. **केसास धक्का लागूं न देणें**–उत्तम प्रकारें संरक्षण करणें; उपद्रव होऊं न देणें. 'तुझिया ढका न लागो साधुपिपीलिकचमूगुडा केशा।' –मोकर्ण ५०.३. **म्ह**० १ (गो.) केसाचाचो पार ना तर बोडकांक कोण विचारतां=मोठमोठयाची दाद नाहीं तर गरिबाची काय कथा ? २ केस काढल्यानें मढें हलकें होत नाहीं. =थोडयाशा मदतीनें काम भागत नाहीं. ३ हजार बोडक्या आणि एक केसकरीण=निराधार अशा पुष्कळ निराश्रितांमध्यें

थोडीशी मालमत्ता बाळगून असणारा. ४ ज्यानें केसकरणी गिळल्या त्यास बोडकीचा काय पाड. सामाशब्द- **०करीण**-स्त्री. सकेशा विधवा. **०टी**-स्त्री. १ घाणेरडया, विसकटलेल्या केसांच्या झिपऱ्या. २ (तिरस्कारार्थी प्रयोग). केंस. केशटयो पहा. **०तूड-तोड**-नपु. केस तुटल्यानें होणारा फोड, गळूं. **०पिक्या**-वि. म्हातारा. 'हा केंसपिक्या सयाजीरावांचा वडील भाऊ.' -विवि ८.२.३०. **०पुळी**-(गो.) केसतूड पहा. **०भर**-क्रिवि. थोडें सुध्दां. 'मग एवढी जड पारडीं उचललीं असतां खांदा केसभरहि इकडे कीं तिकडे कलत नाहीं.' -नि.

केस—स्त्री. १ कज्जा; खटला. 'कोर्टांत ही केस चालू असल्यानें त्यासंबंधीं लिहितां येणार नाहीं.' २ (छापखाना) अक्षरांचे खिळे (टाईप) ठेवण्यासाठीं लहान लहान खण असलेलें टाइपाच्या उंचीइतकीच खणांची उंची असलेलें खोकें; यांत दोन भाग असतात. अशीं दोन खोकीं मिळून एक केस होते. त्यापैकीं एकीस अपर (वरची) व दुसरीस लोअर (खालची) केस म्हणतात. सामान्यतः कोणतीहि वस्तु ठेवण्याची पेटी, डबी वगैरे. ३ रुग्ण; आजारी मनुष्य. 'या डॉक्टरकडे आज प्रथमच केस आलेली दिसते. ४ मृत्यु; विशिष्ट रोगानें आलेलें मरण. 'शहरांत रोज प्लेगच्या केसी २५ होत असत. [इं. केस]

केसणा-णी, केसना नी—क्रिवि. किती ? केवढा ? 'परमाणुची केसनी थोरी.' -दाव ३८८. 'बिरडिया पाड तो केसगा. तूं देखणा निजदृष्टी.' -एरुस्व १६.७५.

केसपट—न. केर; बारीक कण. कसपट पहा. [केस+पट]

के(कें)सर—पुन. १ फुलांतील तंतु. 'का कमळावरी भ्रमर। पाय ठेविती हळुवार। कुसुंबेल केसर। इया शंका।' -ज्ञा १३.२४७. २ आंब्याच्या कोयीला असणाऱ्या शिरा. -न. १ भाताचें लोंगर, कणीस, लोंबी. २ मंजरी, मोहोर, (तुळस, आंबा इ०चा). ३ कसपट; केर; बारीक कण; केसपट. ४ सिंहाची, घोडयाची आयाळ. -अश्वप १.६२. **०बोंडी**-स्त्री. केसर; एक प्रकारचें झाड. याच्या बोंडांत केशरी रंगाचा गर व बिया असतात.

केसरणें—अक्रि. मोहोर येणें. 'वसंत ऋतूंत फळझाड केसरतें.'

केसरिया—केशरा पहा.

केसरी—स्त्री. १ पाचेंचें झाड व त्याचें फूल. २ भाताचें लोंगर; घोंस. -पु. सिंह. 'ऐसें कळुपकरिकेसरी।' -ज्ञा १७.४२३. 'कृष्णकेसरीची संपत्ती। चैद्यजंबुक जैं गा नेती।' -एरुस्व४ १७. [सं. केसरी]

केसरी-ऱ्या—वि. १ केशरी वस्त्रांनीं आच्छादिलेलें; केशरी रंगाचा पोशाख घातलेला. केशरी-रा पहा. २ रेषा असलेला (आंबा).

केसरी, केसारी, केसाळी—स्त्री. १ दृष्ट लागूं नये म्हणून (अस्वलाच्या) केसांची केलेली दोरी. जनावरांच्या गळ्यांत बांधतात ती. २ केसांची दोरी. [केस+सरी]

केसरीबोंड—न. केसरबोंडीचें बोंड.

केंसार—पु. (गो.) बगळ्याच्या जातीचा एक पक्षी.

केसारीण—स्त्री. केसाच्या दोरीचा गळफांस लावून मनुष्यास मारणारी स्त्री (अशा स्त्रिया असतात अशी दंतकथा आहे). [केस]

केसाळ-ळा-ळूं—वि. अंगावर पुष्कळ केंस असलेला. [केस]

केसा(सो)ळी—स्त्री. (व. ना.) आगवळ; वेणी घालतांना जी लहान दोरी वेणीच्या टोंकाला बांधतात ती. केसरी-केसाळी पहा.

केंसाळीण—स्त्री. (तंजा.) सकेशा विधवा स्त्री.

केसुरडी—केसटी पहा.

केस्ताव—न. (गो.) भांडणतंटा.

केस्तोड—केसतूड पहा.

केहरवा—पु. १ केरवा; कारवा पहा. २ (ताल) ह्यास मात्रा चार व विभाग दोन असतात. केरवा पहा.

केंही—क्रिवि. कोठें? 'दुरी केंही न वचावें.' -ज्ञा ३.८९. 'कहीं न माये तेने संतोसे.' -उषा ७७७. [सं. क+हि]

केहेठीं—क्रिवि.(चि. राजा.) कोठून? 'तुम्हीं केहेंठीं आहेत?' -लोक २.६१. [सं. कुतः+स्थानात्]

केळ—पु. (गो.) पिंपळाच्या जातीचें एक झाड.

केळ—स्त्री. केळीचें झाड. हें पुष्कळ दिवस टिकणारें, कंदरूप आहे. ह्याला मोठीं पानें येतात. ह्याच्या अनेक जाती आहेत. गोवें, कर्नाटक, वसई इकडे यांचें पीक फार. कच्च्या केळ्यांची, व केळफुलांची भाजी होते. सोपटांची राख कोष्टी व धनगर लोक सूत रंगविण्याकडे वापरतात. पानांचे दांडोरे वाळवून त्यापासून उत्पन्न होणारा क्षार कोंकणांत परीट लोक साबणासारखा वापरतात. -वगु २.५७. वैष्णव लोक कपाळास जी अक्षत (काळा टिकला) लावतात ती हळकुंड उगाळून त्यांत सोपटाची राख खलून करतात. केळीच्या मुठेळी, तांबेळी, बसराई, वेलची, सोन, राजेळी, म्हशेळी इ० जाती आहेत. आगाशीकडे केळीं वाळवून तयार करतात त्यांस सुकेळीं म्हणतात. 'फेडून केळयाची सालडी।' -विउ ४.६२. 'घिवर जिलब्यांनीं केळ पोसल्यें।' -प्रला २२९. २ केळीचें फळ. ३ ब्राह्मणी पागोटयावरील कपाळपट्टीवरचा भाग, बिनी. ४ स्त्रिया लुगडयाच्या निऱ्या पोटाजवळ खोवून केळयाच्या आकाराचा भाग करतात तो. [सं. कदली; प्रा. कयल-केल] (वाप्र.) **केळें खाणें-साखरखाणें**-(ल.) खोटें बोलणारा, मूर्खासारखी बडबड करणारा वगैरेना औपरोधिक शब्द. शेण, गू खाणें, झक मारणें तूं किंवा तो तर आपल्या घरचा

राजा. असे याच अर्थाचे कांही वाक्प्रचार आहेत. सामाशब्द- **०खंड**–न. न भरणारें केळें; बांझ केळें. यांची भाजी करतात. **०फूल–बोंड–कमळ**–न. केळीच्या कोंक्यापासून निघालेलें फूल; हें कडू, तुरट, ग्राहक, अग्निदीपक, उष्ण, वीर्यवर्धक व कफनाशक आहे. याची भाजी करतात. **केळंबा–भा**–पु. १ केळीचें पोर; पासांबा; नवीन फुटलेला कोंब; केळीचें रोप. (क्रि० फुटणें.) २ चवेणीचा पोगा, पोगाडा; काल. **०खंड–घडी–केळावली**–स्त्री. (कों.) केळघांचा घड, लोंगर; त्यांच्या देठांचा झुबका. 'बारा महिने नेहमीं केळवंडी पिकत.' –पाव्ह ११. **०चत्तर निरी**–स्त्री. परवंटघाची सर्वांत वरची निरी. 'केळवत्तर निरी झळकैली.' –शिशु ४३. **०चली**–स्त्री. पिकलेलीं केळीं मोदकपात्रांत सालीसकट उकडून काढून, तीं सोलून, कुसकरून त्यांत साखर, नारळाचा खव इत्यादि घालून त्या पुराचें मोदकासारखें पक्वान्न तुपांत तळून करतात तें. –गृशि १.४६४. **०चा**–पु. (कों.) केळंबा भा– पहा. **केळीचा कांदा**–पु. केळीचा गड्डा; हा वातनाशक व स्त्रियांच्या प्रदर रोगावर औषधी आहे. –योर १.४६. **केळ्याचा हलवा**–पु. राजेळी केळीं मोठालीं तीन घेऊन चुरावीं व त्यांत साखर, तूप मिसळून, थोडें चुलीवर आटवून तें ताटांत ओतावें व त्याच्या वड्या पाडून त्यावर बदामवीं पसरावें. –गृशि १. ४२३.

केळचें–क्रि. (गो.) थट्टा करणें.

केळडें–न. केलडें पहा. 'बाघ पडला बावी केळडें गांड दावी.' –लोक २.७३.

केळवण–लीन. गडगनेर पहा. [का. केळे=स्नेह, एकी ? +वण]

केळवण–न. (राजा.) काळजी; काळजीपूर्वक संभाळणें. [का. केळ=लक्ष देणें, काळजी ठेवणें ?]

केळवणें, केळावणें–सक्रि. १ (काव्य) केळवण करणें; गडगनेर करणें. 'कन्या नेली निज मंडपासी । हृषीकेशी केळवला ।' –एरुस्व १४.५१. 'केळावला वर असे शिशुपाळ राजा।' –अक. कृष्णकौतुक ३०. –अक्रि. २ (ल.) सजणें; नटणें; शोभिवंत दिसणें; मिरवणें. 'भीमाकरीं जे केळवली । गदा नोवरी सगुणाथिली ।' –मुसभा १५.११२. –अक्रि. सजणें; शृंगारणें. 'केळवती व्यभिचारिणी । दैन्यवाणी पतिव्रता ।' –तुगा ४१४९.

केळविणें–उक्रि. काळजीनें सांभाळणें; जोपासना करणें. [का. केळ]

केळवली–स्त्री. १ केळवलेली, केळवण झालेली नवरी. 'नातरी केळवली नोवरी ।' –ज्ञा १३.५५१. २ (ल.) सुखी.

केळा–पु. कन्हा; मडकें; मातीची घागर. [सं. कलश; का. केल=मातीची घागर]

केळांबा, केळ्या आंबा–पु. १ आंब्याच्या झाडाची एक जात. याला केळीच्या फळासारखें लांबट फळ येतें. २ त्याचें फळ. [केळ+आंबा]

केळी–स्त्री. धातूची अथवा मातीची लहान कळशी; घागर; केळा; बिंदगी. [का. केल] **म्ह०** केळीवर नारळी घर चंद्रमौळी. =मातीच्या लहान मडक्यावर एक नरोटी आणि मोडकें–ज्यांत चांदणें पडतें असें–झोपडें (अत्यंत दारिद्र्याचें चिन्ह).

केळी–स्त्री. जोंधळ्याची एक जात.

केळी–स्त्री. केळीचें झाड. (हें रूप देशावर आढळतें). केळ पहा. **०कदंब**–स्त्री. कदंबाची एक जात. –शे ११.२०८.

केळें–न. केळीचें फळ. केळ पहा.

केळें–न. (कृ.) अधेवट पिकलेली चिंच.

कै, कैं–क्रिवि. (काव्य) केव्हां ? कधीं. कई पहा. 'आतां कर्मठा कैं वारी । मोक्षाची हे ।' –ज्ञा १८.६८. 'कै वाहावें जीवन। कैं पलंगीं शयन ।' –तुगा २७१७. [सं. कदा; प्रा. कइ; हिं. कै]

कै, कैं–क्रिवि. कोठें ? 'तरि मागिला जुंझीं राणे । कैं गेलें होते ।' –शिशु ९१५. 'रामसखा मज भेटेल कै कैं ।' [सं. क]

कै, कैं–वि. कित्येक; अनेक.

कै॥–(संक्षेप) कैलासवासी.

कैक–वि. पुष्कळ; कित्येक. [कतिपय एक प्रा. कइअक= निकर, समूह ?]

कैकट–ड–कीकट पहा. 'आणि देश कैकट फटकाळा ।' –यथादी १७.२३५. –वि. १ भयंकर; वाईट; किडयांचा (देश). २ मगधदेशासंबंधीं (मगधामध्यें म्लेंच्छांचें ठाणें बसल्यामुळें तो धर्मकृत्यास अयोग्य असा मानला गेला आहे). 'मग म्लेंच्छांचे वसौटे । दांगाणे हन कैकटे । –ज्ञा १७.२९४. [सं. कीकट]

कैकाड–न. कैकाडी लोकांचा समूह; एक जात.

कैकाडी–पु. एका जातीचें नांव. यांतील लोक बुरडया, टोपल्या इ० विकून व भिक्षा मागून उदरनिर्वाह करतात. महाराष्ट्रांत यांच्या चार पोटजाती आहेत.–१ चोरकैकाडी, किंवा फिरस्ते; किंवा डोंटलमोर. २ गांवकैकाडी किंवा बुढी; टोपल्ये. ३ खुचडी किंवा कुंचीवाले. ४ माकडवाले किंवा लाल बाजारवाले; कैकाडी ही गुन्हेगार जात आहे. –पु. कैकाडी माणूस. [सं. कीकट–राजवाडे] **कैकाडीण**–स्त्री. १ कैकाडयाची, कैकाडी जातीची बायको. 'प्रथमचि मी तव दादा कैकाडीण झालें।' –भज ४०. २ कैदाशीण; भांडखोर स्त्री. ३ (प्रेमानें) गबाळ, केंस पिंजारलेल्या मुलीस म्हणतात.

कैकायी–ई–कैकाडीण पहा. 'कैकायी कैकायी दुरील माझा देश।' –भज ४०. [कैकाडी]

कैकाळ—कळिकाळ पहा. 'कैकाळाचें धाक नाहीं अवघीं विघ्नें नीवारी।' –ऐपो ३५०.

कैकेयी, कैकै—स्त्री. १ (काव्य) दशरथ राजाची पत्नी. 'कैकेयी आनंदली थोर।' –रावि ३.९५. २ (ल.) शिरजोर, दुष्ट, कजाग, हट्टी स्त्री. [सं. कैकय]

कैंगटीला येणें—क्रि. (क.) मेटाकुटीस, जेरीस, जिकीरीस येणें. 'माझा जीव अगदीं कैंगटीला आला.'

कैगेयाबहिगेया, कैगयाबहिगया-बैगया—क्रिवि. समूळ नाश झाला; वाताहात झाली. कहगया बहगया पहा.

कैचण—न. (व. ना.) काडी-कचरा; पाचोळा (विस्तव पेटविण्याकरतां); केरकचरा. किलचण पहा. 'दारापुढें कैचन पडलें होतें.

कैंचा-ची—वि. (काव्य) १ कोणता? २ कोठचा? कोठील? कसला? 'कैंचा धर्म कैंचें दान। कैंचा जप कैंचें ध्यान। –दा २.५.११. वाल्मिक ऋषी बोलिला नसता। तरी आम्हांसी कैंची रामकथा।' –दा १६.१.१८. 'धृतराष्ट्र म्हणे आतां कैंचा आनंद संजया मातें।' –मोसभा ७.८९. [सं. क्वचित्?]

कै(कैं)ची—स्त्री. १ कातर. २ (वास्तु.) धीर देण्यासाठीं एकमेकांस तिरपे दोन वासे जोडून केलेली रचना. कैंचीचे प्रकार:– साधनकैंची, गळपट कैंची, एकखांबी, दुखांबी इ०. ३ तुळया इ० घरावर चढविण्याकरतां दोन वाशांस दोरी बांधून जी कातरीसारखी रचना करतात ती. ४ जास्त वजनाचे पदार्थ तोलण्याचे काटयासाठीं लांकडाच्या तीन दांडयांची केलेली तिकटी. ५ (कु.) घराच्या मोराब्याच्या बाजूचें लांकूड. ६ दारू भरलेल्या २४ बाणांची जुडी; दारूच्या बाणांचा समुदाय. 'पन्नास हजार फौज सातशें कैंची उंटावर बाण।' –ऐपो २५५. **कैंचींत धरणें**–क्रि. पेचांत धरणें; अडचणींत गांठणें. [तु. कैंची]

कैंछा—पु. हलवायाचें उपकरण. करछा पहा.

कैतव—न. कपट; लुच्चेगिरी; लबाडी. 'त्याचें कसें कैतव साहसी गे।' –सारुह ७.१२५. [सं.]

कैताळ—न. करताळ; झांज. [का. कै=कर, हात+सं. ताल=टाळ]

कैद—स्त्री. १ बंदी; नियंत्रण; बंधन; तुरुंगवास २ शिस्त; कदर; अंमल; तावा. –पया ११८. 'त्याची कैद कठीण.' ३ मर्यादा; नियंत्रण (सरकारचें, धार्मिक, सामाजिक चालींरीतीचें). ४ (कों.) निर्भत्सणें; धमकावणें; एकसारखे दोष पहाणें. –वि. बंदिस्त; कैदेंत पडलेला (चोर). [अर. कैद्] ०कानू–स्त्री. १ सरकारी कायदे, हुकूम यांना संज्ञा. २ बंदोबस्त; अंमल. 'दिल्ली म्हणजे बादशाही तख्ताची जागा, तेथील अमर्यादा करून फौज दरवर्षी पाठवून कैदकानू तुम्ही आपली बसविली.' –पाव १५०. [अर. कैद्+कानू] ०खाना–पु. बंदिशाळा; तुरुंग; कारागृह. [अर. कैद+खाना] ०खोर–वि. (कों.) तिरसट; टोंचून बोलणारा; कांचांत ठेवणारा. [अर. कैद+फा. खोर] ०दगा–पु. फसवणूक; फसवेगिरी. 'मग यास का कैददगा म्हणावा तरी इंग्रज हठऊन तंग करून बडोद्यास घालविले.' –रा १९.८४. [अर. कैद+दगा] ०धार–क्रिवि. शिस्तवार; हुकुमांत; नम्रपणें; नियम पाळून शिस्तीनें. –सभासद ९. –वि. शिस्तबंद; नियमित; व्यवस्थित. 'ब्राह्मणीराज्य कैदवार एकापेक्षां एक मसलती।' –ऐपो २३१.

कैदकाळ-कू—वि. (व.) निष्ठुर. 'असा कैदकाळू मालक नाहीं पाहिला.' [कैद+काळ]

कैदाशी(सी)ण—स्त्री. कैकाडीण; कजाग, नाठाळ, भांडखोर स्त्री. [अर. कैद्=युद्ध]

कैदी—वि. १ बंदिवान; तुरुंगांत असलेला. २ परतंत्र; ताब्यांत असणारा. २ (कों.) कैदखोर; खटयाळ; खाष्ट; चिडखोर; तिरसट. [कैद]

कैने—न. एक वाद्य. –देहु ३९. [हिं. कैन=बांबूची काठी]

कैंपख—पु. कैपक्ष पहा. 'ऐसें कां कैंपखें। बोलिलासी।' –ज्ञा १७.३५. [कैं=कोणता+पक्ष–पख]

कैपंजी—स्त्री. (गो.) हातानें घरावयाची पणती. कयपंजी पहा. [का. कै=हात+पंजी=पणती]

कैपत—स्त्री. एक प्रकारचा पितळी दिवा. कैपंजी पहा.

कैपत—स्त्रीन. दुष्ट, खटयाळपणाची योजना; गुप्त कट; खोडसाळपणाचा कट, मसलत, कारस्थान. 'नानाप्रकारच्या कैपती करून लोकांचीं घरें बुडविलीं.' (क्रि० करणें; रचणें; काढणें; चालवणें; मांडणें). [अर. कैफियत] ०खोर–कैपती–वि. दुष्ट प्रकारचें कारस्थान करणारा; कुभांडी; कपटी; कारस्थानी. 'काना कैपती, आंधळा हिकमती'

कैपक्ष—पु. १ कंवार; पक्षपात. 'म्हणती एकाचा कैपक्ष करीं।' –ज्ञा ९.१६८. 'दैवाचा कैपक्ष घेणें' –सूर्योदय ३३३. २ बाजू; पक्ष. 'विरक्तें वोढावा कैपक्ष। परमार्थाचा।' –दा २.९. १४. [कै=कोणता+पक्ष]

कैपक्षी—वि. कैवारी. 'देव अनाथांचा कैपक्षी।' –दा ४. ८.२७. 'कैपक्षी रघुनाथ माझा।' –दावि ५३.

कैफ—पु. १ धुंदी; उन्माद; गुंगी; निशा. 'सुरसेप दारुचे कैफ धुंद लढयेती।' –ऐपो ११०. 'इंग्रजी विद्येच्या अभ्यास कैफांत आमच्या विद्वानांनीं सुधारणेच्या नव्या दिशा काढल्या.' –टि ४.१८३. २ मादक, आमली पदार्थ, द्रव्य (भांग, गांजा, इ०). ३ मादक गुण; झिंगण्याची शक्ति. [अर. कैफ्]

कैफियत, कैफत, कैफयेत, कैफेत—स्त्री. १ वर्णन; हकीकत; करिणा; लेखी जबानी; खटल्याचा तपशील. २ काम; खटला; उद्योग; व्यवहार; मुकदमा. ३(कायदा) दावा लावल्यावर विरुद्ध पक्षाचें दाव्याबद्दल जें लेखी म्हणणें कोर्टांत दाखल करतात तें. ४ खरा दस्तैवज, लेख; अधिकारपत्र; लेखी हुकुम. उ० आपल्या मृत्यूनंतर दत्तक घेण्यासंबंधीं नवऱ्याचा बायकोस लेख, आज्ञापत्र. [अर. कैफीयत्]

कैफी—वि. १ मादक पदार्थांचें सेवन करणारा (माणूस); गांजेकस; दारूबाज. २ गुंगी आणणारें; मादक (पेय). [फा.]

कैमर्थ्य—न. अनुपयुक्ततेचा, वैयर्थतेचा, अनुचिततेचा दोष (वादविवादांत, धंद्यांत, कामांत, इ०). निरुपयोग; कांहीं जरूरी नसणें. 'पर्जन्यांवाचून जर धान्य पिकतें, तर पर्जन्यास कैमर्थ्य येतें' [सं. किं+अर्थ=उपयोग]

कैमुतिकन्याय—पु. अर्थन्याय; एखादी दुष्कर गोष्ट होईलच होईल असा अर्थ असला म्हणजे त्याला म्हणतात. कुऱ्हाडीनें लाकूड तुटतें, मग गवत सहजच तोडतां येईल. [सं. किमुत+न्याय]

कैरव, कैरविणी—नस्त्री. चंद्रविकासी पांढरें कमळ. 'सार्थक प.र्थ करी ती कैरविणी तो सुधांशु गौर विती।' –नवनीत [सं.]

कैरा, खैरा—वि. १ कैरे डोळ्या; मांजऱ्या; घाऱ्या डोळ्याचा (घोडा); कैराडोळा असणें हें अशुभचिन्ह आहे. २ ज्याचें बुबुळ घारें आहे असा (डोळा). ३ घाऱ्या, करडया रंगाचा. 'चितार भिंगारें खैरें। मोरें सेंवरें आणि कैरें।'–ह १०.१९२.[हिं.]

कैरा—वि. १ तिरळा; चकणा (डोळा). 'तारसें धुलें काणें कैरें।' –दा ३.६.४२. २ चकणा डोळा असलेला. [सं. केकर=तिरवा ते. कैकरमु]

कैरी—स्त्री. १ कच्चा आंबा; लहान आंबा. कुयरी. २ (ना.) कप शीचें हिरवें बोंड. [तुल० का. काई=हिरवें, कच्चें+री]

कैल—न. शेतांतील धान्याचें मान, माप; बांटण्यापूर्वीची पिकाची मोजणी. कैली पहा. [अर. कैल=माप; का. कयी=हात; ते. कैलु=हात]

कैलास—पु. कुबेर, शंकर यांच्या निवासस्थानाचा पर्वत. हा हिमालयांत आहे. महादेवाचा लोक (विष्णूचा ज्याप्रमाणें वैकुंठ तसा). [सं.] **म्ह० कैलास कंटाळे तों गाणें. कान फाटेस्तुर केणें** (ककैश, बेताल, बेसुर गाणें आणि भपकेदार बहुमोल पोषाख अलंकार घालणें यावरून वेडगळ व अवाढव्य, काम, भपका; टोलेजंग देखावा.) **०येणें, मिळणें, उतरणें, प्राप्त होणें**–कांहीं तरी मोठा लाभ होणें. **कैलासाला डोकें लागणें**—अस्मान ठेंगणें होणें; गर्वानें अतिशय फुगून जाणें. **कैलासवासी**–वि. (मृत्यु पावलेल्या माणसाबद्दल त्याचें दर्शक म्हणून कागदोपत्रीं– विशेषतः मृत मनुष्य शिवभक्त असल्यास–उल्लेख करतानां योजतात). परलोकवासी; मृत.

कैली—वि. मापी आकार; खंडी, पायली, शेर इ० धान्यें वगैरे मोजण्याच्या प्रमाणदर्शक शब्दांमागें हा शब्द लावतात. याच्या उलट वजनी. 'तांदूळ कैली कोठीमापें पांचमण.'–रा १५. २२४. [अर. कैल्=माप; का. कैलो=हातानें] **०माप**–न. मापानें मोजून व्यावयाचें परिमाण. याच्या उलट वजनी माप.

कैली—स्त्री. (गो.) फुटक्या मडक्याचा तुकडा; खापर [का. केल=मडकें]

कैवजा—क्रिवि. किती, अनेक प्रकारें. 'येथें आलियानें रक्नुदौला यास वस्वास येईल म्हणोन कैवजा लिहिले.' –रा १.५३. [कै=कई, किती अनेक+अर. वज्ह]

कैवर्त-क—पु. कोळी; मासेमाऱ्या, भिस्ती; पाणक्या. 'किरात कैवर्तक दुष्ट भारी।' –वामन (नवनीत पृ. १३६). [सं.]

कैवल्य—न. १ सायुज्य; मोक्ष; मुक्ति; जीवात्मा व परमात्म्या यांचें ऐक्य. 'तें कैवल्य पर तत्त्वता। पातलें जगीं।' –ज्ञा ३.१५१. 'माशां पडती संतपाय। सुख कैवल्य तें काय।' –तुगा २१९७. २ केवळपणा; एकटेपणा. 'कैवल्य म्हणजे केवळपणा, एकटेपणा किंवा प्रकृतीशीं संयोग नसणें असा असून...' –गीर १६२. [सं.] **०दानी**–पु. (मोक्ष देणारा) ईश्वर; गुरु; ईश्वराचें एक अभिधान. 'सुखानंद आनंद कैवल्यदानी।' –राम ३६. **०निधान-धाम**–न. मुक्तिसदन; मोक्ष. 'मुमुक्षूस कैवल्यधाम।' –यथादी १.४६. २ मोक्षाचें स्थान जो परमेश्वर तो. 'हुंबरती गाय तयांकडे कान। कैवल्यनिधान देउनि ठाके।' –तुगा २४१. **०पद**–न. सायुज्य मुक्ति; कैवल्यधाम. **०पद येणें-मिळणें-प्राप्त होणें**–अलभ्य लाभ होणें; फार चांगली गोष्ट मिळणें. **०वाटणें**–(व.) कौतुक वाटणें.

कैवाड—न. गुप्त कट; कारस्थान; हिकमत; मसलत; खोल विचार; (विशेषतः दुष्टपणाचा); कुभांड; थोतांड. (क्रि० रचणें). 'ज्या कर्मीचेनि कैवाडें। यश श्री उदंड जोडे।' –एभा २५. २२३. 'मृत्यु न म्हणे हा करामती। कैवाड जाणें।' –दा ३. ९११. [कुवाड, कुवेडें] **कैवाडी**–वि. १ धूर्त. शहाणा; गुप्त मसलती.

कैवाड—नपु. (काव्य) एका पक्षाचें समर्थन, कैवार, अभिमान. कैवार बहल चुकीनें. 'एकाच्या कैवाडें। उगवे बहुतांचें कोडें।' –तुगा २७४. 'श्रीरामाचेनि कैवाडें। काळिकाळ पळतो पुढें।' –भाग किष्किंधा १६.३०. [कैवार] **कैवाडी**–वि. कैवारी.

कैवाडू—न. कारस्थान; कोडें; कैवाड पहा. 'तेथचा नुगवे कैवाडु धर्मजातासी।' –एभा ६४०.

कैवार, कैवर—पुन. १ वर्तुळ काढण्याचें हत्यार; कंपास. (इं.) कॉंपस. २ वर्तुळ (कंपासानें काढलेलें). ३ परिघाची रेषा. ४ व्यास मापण्याचें हत्यार; (इं.) कॅलिपर्स. [का. कैवार]

कै(कें)वार—पु. दयेमुळें केलेला पक्षपात; बाजू घेऊन ती पुरी करणें; साहाय, मदत करणें; पक्ष उचलणें; कड, बाजू घेणें. कैवाड पहा. (क्रि० घेणें; धरणें; करणें). ' तेवेळीं आपुल्याचेनि कैवारें। –ज्ञा ४.५१. [सं. कृपाकर–कींवाकर–कींवार, कीं वारस्य भावः कैवार. –राजवाडे भाअ १८३२; तुल० ते. का. कैवारमु, कैवारिसु= स्तुति करणें]

कैवारी—वि. कैवार घेणारा; साह्यकर्ता. ' आला भक्तकाजकैवारी। ' ' कैवारी देवांचा । नाथ अनाथांचा । स्वामी माझा। ' –पु. (खि.) १ सत्याचा आत्मा. २ पवित्र आत्मा (त्रिविधैक्य देवांतील एक). ३ संबोधक (नवा करार). ' मी न गेलों तर कैवारी तुम्हाकडे येणार नाहीं. ' –योहा १६ १७.

कैसरचांदणी—स्त्री. घोडयाला होणाऱ्या चांदणी नांवाच्या रोगाचा एक प्रकार. –अश्वप २.१०४.

कैसा, कैसिआं—क्रिवि. (काव्य) कोणत्या जातीचा: किती; कसा; कसला. ' तरि माझिया वैरिणी । तिआं कैसिआं । ' –शिशु ८१९. ' निषधराया़शीं तुल्यरूप कैसा । ' –र २. [सं. कीदृश; प्रा. कइस; हिं. कैसा.]

कैसेन-नी—क्रिवि. कसें; कशाच्या योगानें; कशानें ? 'तो देव कैसेनि म्हणावा । ' –विपू ५.२५. ' कैसेनि घडे जी साधेक.' –दा ३.१०.६८. [कसा]

को-ऑपरेटिव्ह—वि. परस्पर सहाय्यक; संघशक्तीचें; संघटित; (काम, धंदा. इ०). **०सोसायटी**–स्त्री. परस्पर सहाय्यकारक मंडळी, संस्था. [इं.]

कोइटारू—वि. (कों.) कोइटानें शाकारलेलें; कोइटाचें छप्पर असलेलें. [कोईट–कुईट]

कोईडा—पु. (माण). चाबकाचा लांकडी दांडा, मूठ; कोयंडा पहा.

कोइ(ई)ल—पु. कोकिळा. [सं. कोकिल; प्रा. कोइल]

कोइ(ई)ल—स्त्री. भिंगरी; हातानें फिरवावयाचा भोंवरा.

कोई—स्त्री. आंब्याची कोय; बाठा. कोय पहा.

कोई—स्त्री. कोबीची भाजी [?]

कोईकमळ–न. पांढरें कमळ.

कोई कोई–स्त्री. भीतीमुळें फोडलेली किंकाळी; कुईकुई. (क्रि० करणें; होणें). [ध्व]

कोईट—न. (कों.) शाकारणीचें गवत. कुईट पहा.

कोईन—स्त्री. (कों.) नदीच्या प्रवाहांत मासे पकडण्यासाठीं बांबू, टाळे, दगड यांचा बांध घालून त्याला लावलेल्या टोपल्या; पायगीर; वोक्षी; (राजा. कुण) कींड. (क्रि० बांधणें). खोईण पहा.

कोईल—स्त्री. (कों.) विटीदांडू खेळतांना जी जमिनींत खळगी खणतात ती; गली. [कोली] **०डाव**–पु. विटी गारण्याची पाळी; कोलण्याची पाळी.

कोकू—(बे.) लड्डा(तोबा)चा खेळ; वर्तुळाकार बसलेल्या गडयांच्या मागें नकळत लड्डू ठेवून खेळतात तो खेळ. [ध्व.]

कोक—न. १ कुबडा. २ कुबड; पोंक. ३ (ल.) फुगीरें उंचवटा; फुगा. ' बुचडयाचा आधीं झोंक, त्यामधीं ठेवी कोक नोक, झोंकें भर पुरली । ' –प्रला १११. [का. कोक्कि–के, कोंकु= वांक, वाकडेपणा, पोंक]

कोक—पु. चक्रवाक पक्षी. 'मी कोक झालों निका।'–आसेतु २६. ' प्रार्थावा पुत्रार्थीं स्वपिता स्वसुखार्थे तपन कोकार्थी। ' –मोसभा ६.७७. [सं.]

कोक—न. १ (ना.) भोंक; छिद्र; बीळ; भगदाड. २ (गो.) खोंक; जखम. [खोंक]

कोक, कोकशास्त्र—न. कामशास्त्र; रतिरहस्यशास्त्र. हा ग्रंथ कोक कवीनें केल्यामुळें या ग्रंथास कोकशास्त्र हें नांव पडलें. यांत संभोगाचें, वशीकरणाचें, कामविकाराबद्दलचें व स्त्री–पुरुषांच्या गुणावगुणांचें वर्णन आहे. कित्येकांच्या मतें चक्रवाक पक्ष्यांच्या (कोक) परस्पर मीलनोत्सुकतेवरून हा ग्रंथ लिहिला आहे (दिवसा चक्रवाक नर व मादी एकत्र असून रात्रीं त्यांचा वियोग होतो अशी कविकल्पना आहे). ' कोकीं नाहीं ठेलें। भारत तरीं म्हणितलें। ' –ज्ञा १३.८३०. ' कोकशास्त्रींची अधिष्ठात्री। ' –एभा ११.५१९. ' नातरी कोकशास्त्राचे पुस्तकांत। बांधिले जैसे वेदांत। ' **कोकशाळा**–स्त्री. नाटकशाळा. ' कोकशाला नाटकशाला दासी यांचा ध्याल मुका। ' –राला ८५.

कोकटहोळी—स्त्री. होळीच्या आदल्या दिवशीं मुलें होळीचे खेळ खेळतात ती. [कोकटणें ?+होळी]

को(कों)कड—स्त्रीन. खोकड पहा.

कोकडा—वि. (व.) वांकडा; वांकलेला; कुबडा. ' पोटदुखीनें कोकडा झाला ' [का. कोंकु=वांक]

कोंकण—न. १ मुंबई हलाख्यांतील एक प्रांत. सह्याद्रीच्या पश्चिमेकडील प्रदेश. सध्यांचे ठाणें, कुलाबा व रत्नागिरी हे तीन जिल्हे, सावंतवाडी संस्थान आणि गोमंतक यांचा कोंकणांत अंतर्भाव होतो. (त्याचे, तुमचे इ०) **बैल कोंकणांत जाणें**–१ शक्तिहीन होणें. २ वयपरत्वें दुबेल होणें; अशक्त होणें. ३ नपुंसक होणें. ' माझे हात का कोंकणांत गेले ' ? =मी काय अशक्त झालों ? [का. कोंग्+कण्=मावळ दिशा, कुंगु=मावळणें; किंवा कोंकु=वांक, वांकडेपणा ?] **०धार**–स्त्री. करकोची पक्षीण. **०दुधी**–पु. (गो.) दुध्या भोपळा. **०पट्टी**–स्त्री. कोंकण किनारा; कोंकण पहा. **०स्थ**–पु. महाराष्ट्र ब्राह्मणांची एक

पोटजात; चित्पावन ब्राह्मण. [सं.] ०स्थी–वि. चित्पावन ब्राह्मण-जातीसंबंधीं; कोकणस्थांचा (बेत, व्यवहार, कारभार इ०).

कोंकणा—पु. (गो.) सर्वसाधारण हिंदु लोकांना किरिस्ताव लोक हा शब्द लावतात.

कोंकणी–ण्या—वि. १ कोकणसंबंधीं. २ कोंकणचा राहणारा; याच्या उलट घाटी. ३ (निंदाव्यंजक) कोंकणस्थ.

कोंकणें—अक्रि. १ ओरडणें; भुंकणें (कुत्रा). २ आरवणें (कोंबडा); ओरडणें; किंचाळणें (पोपट; कावळा). ' कोंबडा-कोंकतो, पैसा मागतो। ' –भिकारीगाणें. [ध्व.; प्रा. कोक्क= बोलावणें]

कोंकणें—न. एक रानवेलीचें फळ.

कोंकतारी, कोंकतर–स्त्री. (गो.) पाणकोंबडा. [सं. कोक]

कोक(ग)दम्या येणें—अक्रि. श्रमामुळें बेजार होणें; कासावीस होणें. [?]

कोकनद—न. तांबडें कमळ. ' नेणति हे परलोक, विलोक न कोकनदासम पाणिपदें। ' –आविश्वा २२. [सं.]

कोंकंब–बी, कोकम–पु. रातंबा; अमसोलाचें झाड. हें झाड कोंकणांत सर्वत्र आढळतें. याची उंची सधारणतः पांच–सहा पुरुष. याच्या फळाला कोकंब अथवा रातांबा म्हणतात. बियापासून तेल काढतात, त्याचा आमांशावर व थंडीनें आंग फुटतें त्यावर उपयोग होतो. आमसोलें हीं पित्तनाशक म्हणून पथ्यकारक आहेत. **कोकंबेल**–न. कोकंबाच्या बियांचें तेल. हें पोटांतहि घेतात व आंगाला बाहेरून चोळतात. [कोकंब+तेल] ०**साल–सोल**–स्त्री. वाळलेली कोकंबाची साल.

कोकमार्ग—पु. कोकशास्त्र पाळणारा एक पंथ; कोकशास्त्राला मानणारा एक वर्ग, लोक. **कोकमार्गी**–वि. कोक मार्गाचा अनुयायी. कोक पहा. [कोक+मार्ग]

कोंकर—न. माशांची एक जात; विशिष्ट मासळी; हे दिवाळीच्या सुमारास पकडतात.

कोंकरचाल—स्त्री. कोंकरासारखी चाल, गति (घोडयाला योजतात). कुकरचाल पहा. [कोंकरू+चाल]

कोंकरा–रूं—पुन. करडें; मेंढीचें लहान पिलूं (नर जातीचें) **कोंकरी**–स्त्री. मेंढीचें मादी जातीचें पिलूं. [ध्व. कोंकों?]

कोकलणें—अक्रि. १ ओरडणें; भोकाड पसरणें; उपाय फसल्यामुळें हाका मारीत बसणें. २ तक्रार करणें; एखाद्याच्या नांवानें हाका मारणें. –उक्रि. तुडविणें; बदडणें; रडावयाला लावणें; कोंकों करावयास लावणें. [ध्व. सं. कों+कल्]

कोंका—पु. १ मोना; केळीच्या गाभ्यांतून केळफुलासह जो कोंब बाहेर पडतो तो; केळफूल; पोफळीचा मोहोर अथवा फुलें ज्यांतून बाहेर पडतात तो. पोफळीच्या कोक्यांपासून कागद तयार करतात. २ कानफाटे गोसावी वाजवितात ती किनरी; लहान एकतारी. ३ बगळा; कंक. ४ एक प्रकारचा शिंपीतील मासा. [सं. कोक]

कोका—पु. एक झाड, याच्या एकंदर ५० जाती असून पैकीं हिंदुस्तानांत ६ आढळतात.

कोंका–की—पुस्त्री. पागोटयाच्या वरील चोंच (कोकी); पागोटयाच्या (पगडीच्या) कमळाच्या वर असलेला हा भाग कागदाचा करून त्यावर कापडी पट्टया शिवतात. [फा. कुका; तुल० का. कोक्कि=बांक]

कोंकाट—पु. १ कोळीण पक्ष्याचा शब्द. २ (ल.) कलकलाट; गोंगाट; गलका. [ध्व.]

कोकाटी—स्त्री. हस्तिदंताचा भोंवरा. याला भोंक असल्यानें याचा गुंगुं असा आवाज होतो. २ एक पक्षी; कोंकाट पहा. [कोंकाट]

कोकाट्या—वि. कोंकाट करण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा; गोंगाट करणारा. [ध्व. कोकाट]

कोकाबी—पु (जुन्नरी) कोंबडयासारखा तांबूस रंगाचा एक पक्षी. मांसाहारी लोक याचें मांस खातात. [ध्व]

कोकादर, कोंकतारी—स्त्री. (गो.) पाणकोंबडी. [ध्व.]

कोंकारणी—स्त्री. (गो.) कोंबडयाची आरव. [ध्व.]

कोंकारचें—अक्रि. (गो.) कोंबडयाचें आरवणें. [ध्व.]

कोकारा—पु. (राजा.) आरोळी; मोठयानें मारलेली हांक.

कोकारा—पु. (गो.) लहान मासा.

कोंकारी—स्त्री. (गो. कु.) १ पाणकोंबडा. २ एक मासा. [ध्व. कों.]

कोंकावणें—अक्रि. १ सूं, गुं, इ० आवाज होणें (बाण, भोंवरा इत्यादिकांचा). २ भोकणें; केकाटणें (कुत्र्यानें). ३ केकावणें (केका). ' मोर कोकावती ते। ' –अक रसकल्लोल ५. [ध्व]

कोकिल–ला, कोकि(की)ळ—पुस्त्री. मंजुळ शब्द करणारा एक पक्षी. त्याचा आवाज फार मधुर असतो. मादी आपलीं अंडीं कावळ्याच्या घरटयांत उबवून घेते अशा समजुतीवरून यास संस्कृतांत परभृत, अन्यभृत म्हणतात. कोकिल वसंत ऋतूंतच फक्त गातो. **कोकिलाव्रत**—न. अधिक आषाढांत कोकिळेचा शब्द ऐकल्यानंतर जेवण्याचें बायकांचें एक व्रत.

को(कों)की—स्त्री. १ पागोटें, इरलें, इत्यादीवरील बांकडे टोंक, चोंच; राघु; कोंब. कोका पहा. २ डोळ्यांतील फूल, [कोका] ०**दार**–वि. कोकी असलेलें (इरलें, पागोटें)

कोंकें—न. (गो.) दमा. [ध्व.]

कोंकेणें—अक्रि. (राजा.) ओरडणें; आरवणें. कोंकणें पहा.

कोंकेर—न. (गो.) पाथरवटाचें हत्यार (दगड काढण्याचें).

कोंकेरी—स्त्री. एक पक्षी; पाणकोंबडा. कोंकारी पहा.

कोको--पु. हें झाड दक्षिण अमेरिका व वेस्ट इंडीजमध्यें होतें. याच्या बियांपासून कोको (पेय) व चाकोलेट करतात. झाडाचीं फळें डेंगेसारखीं, अर्धाफूट लांब असतात. बी लावल्यापासून ६ वर्षांनीं फळें येतात. [मूळ मेक्सिकन शब्द (कका); -स्पॅनिश-इं.]

कोंक्या--वि. कोंकणस्थास निंदाव्यंजक नांव. 'तुम्ही हल्लीं पुण्याहून कोंक्या, परांजपे आडनांवाचा आणला आहे ना?' -विक्षिप्त ३.१८. [कोंकण]

कोंग--न. १ ढोंग; सोंग (दारिद्र्य, दुःख, वेड इत्यादींचें). (क्रि० घेणें; करणें; लावणें). 'जो न्यायासनावर चढला कीं दुष्यंत राजाप्रमाणें त्या गांवचाच नाहीं असें बळानें कोंग मात्र करतो ...' -नि ६२५. [का.]

कोंग--न. कुबड; कुबडया. कोंक पहा. [का.]

कोंगल्ल--वि. (गो.) वांकडेतिकडें; कोंग. [का. कोंक-ग]

कोंगळी--स्त्री. विळा; कोयती. [का. कोंग=वांकडी विळी]

कोंगा--पु. (गो.) १ पाणथळ शेतांत राहून भाताची नासाडी करणारा प्राणी. २ एक लहान मासा. [ध्व.]

कोंगा, कोंगाडा-डी--पु १ कर्नाटकांतील एक जात -देहु ६६. २ (ल.) मूर्ख माणूस. --वि. (क.) रोंग्या; रोगी; कुबडा. [का. कोंग]

कोंगाडी--वि. सोंगाडया; ढोंगी; बहुरूपी. कोंगी पहा. 'कोंडाण्यास कोंगाडयाचें सोंग घेऊन ...' -सूर्य ५६. [का.]

कोंगाळा--वि. (कों.) लांब, वांकडे चिंचेचे आंकडे ज्यास आहेत असें (चिंचेचें झाड). [का.]

कोंगाळें--न. (कों) लांबट, वांकडी चिंच (फळ व झाड). कोंगाळी चिंच; चिंचेचा आंकडा. [का. कोंग=वांकडें]

कोंगी-ग्या--वि. कोंग करणारा; ढोंगी; सोंग करणारा; सोंगाडया. [का.]

कोगूळ--स्त्री. (कु. गो.) कोकिळ.

कोंगें--न. मधाचें लांबट पोळें. [का. कोंगे=आंकडी]

कोंघ--कोंग पहा.

कोच--पु. (कों.) आंबेहळदीचा कांदा, गड्डा.

कोच--पु. बसावयाचा पलंग, बाक, बैठक. [फ्रें. कोशर इं. कोच]

कोंच--स्त्री. १ खोंक; एखाद्या अणकुचीदार पदार्थानें झालेली जखम; खोंच. २ अणकुचीदार टोंक. [खोंच, खोंचणें; हिं. कोचना]

कोंच--स्त्री. पगडी, इरलें इ० चें टोंक. (कों)कोंका अर्थ १ पहा.

कोंच--न. (राजा.) जांभ्या दगडांत कातळावर उगवणारें व कांटयाप्रमाणें टोंचणारें बारीक गवत, वेल. [सं. कूचै; प्रा. कुच्च]

कोंचं कोंचं--वि. (व.) थोडें थोडें. 'तूप कोंचं कोंचं वाढ.' [का. कोंच=थोडें; तुल० सं. कुच्=थोडा होणें, करणें]

कोचक(का)ई--स्त्री. मोठे व जून झालेले आंवळे उकडून त्यांतील बिया काढून टाकून त्यांत मीठ, हिंग, जिरें वगैरे घालून केलेला पदार्थ; किंवा वाळवून वडया तयार करतात ती. [का. कोच्चु=तुकडे करणें, पूड, चूर्ण+काई=फळ]

कोचका--पु. (व.) कोंपरा 'असा कोचक्यांत कां बसलास?' [कोचकी]

कोचकिंदर--न. (को.) १ अडगळीची जागा; घाणेरडया गर्दीच्या जागेबद्दल योजतात. २ गळाठा; अडगळ. ३ अडचणीची, संकोचाची अवस्था, स्थिति; गर्दी, गोंधळ असणें. [कोचा+कंदर?]

कोचकी--१ (वास्तु.) कोपरा; कोन (घरांतील, खोलीचा इ०) २ दिखाऊ चांदई. [कोंच]

कोंचकी--स्त्री. १ कोकी अर्थ १ पहा. २ पागोटें. 'मृदुतर थिरमे त्या कोचक्या कोरदारा' -सारुह ३.४०. [कोंच] ०दार--वि. कोचकी असलेलें. (पागोटें इ०)

कोचकील--वि. अरुंद; कोंदट चिंचोळी (जागा). [कोचकी]

कोचट, कोचा--वि. सकुंचित; कोंदट; अपुरी (खोली); अरुंद; लहान तोंडाचें (भांडें, वस्तु). [सं. कुच्]

कोंचणें--अक्रि. १ (राजा). कुरतडणें; तोडणें (नखें, दांत, चोंच इ०नी). २ (व.) जोरानें दाबणें. 'त्यानें टोपलींत कोचून फळें भरलीं.' ३ (बे.) खिळयांनीं बोचणें. ४ (बे.) भाजी चिरणें. [का. कोच्चु=कापणें; हिं. कोंचना; गु. कोचवु]

कोचंबणें--अक्रि. (व.ना.) कुचंबणा होणें; संकोचणें; विरमणें; लाजणें. [कुचंबणें]

कोचमन-मिल, कोचमीन--पु. गाडीवान; गाडीहांकया; सारथी; सूत. 'गाडींत बसले असतां कोचमिलास स्वतःच्या पदवीस चढवून जातीनें सारथ्य ...' -नि ९७. 'कोचमीन (महाराजांचा) मराठेजातीचा ... ... होता.' -विक्षिप्त २. ११८. [इं. कोच=गाडी+मॅन=(हांकणारा) माणूस]

कोचर--स्त्री. (व.) आखूड शिंगांची म्हैस.

कोचळा, कोचाळा, कोचाळें--पुन. (व. ना.) पक्ष्यांचें घरटें. कोंचाळें पहा.

कोचा--स्त्री. हळद. -देहु १८४. चोरा हळद. -मुंज्या १४४.

को(कों)चाळें--न. १ वतुळ; कोंडाळें (बसलेल्या लोकांचें). (क्रि० घालणें; घालून बसणें; उडणें; मोडणें; काढणें). २ भोंवऱ्यासारखें एक खेळणें. [का. कोंचे=तट, भोंवतालची भित+म. आळें]

कोंचाळें--कचोळें पहा.

कोचिंदा--पु. एक वनस्पति, हिला पाती येतात, त्यांची भाजी (पोढांतील) जंतुनाशक आहे.

कोचिन(नी)ल—पु. एक किडा. हा मूळचा मेक्सिको व पेरू या देशांतील असून त्याची उपजीविका मुख्यतः फडपा निवडुंगावर होते. याच्या रुपेरी व काळा अशा दोन जाती आहेत. यापासून किरमिजी रंग करतात. –प्राणिमो १०४. [कोकम=किरमिजीरंग (फळ); लॅ. कोकिमम्=किरमिजी झगा; फ्रें. कोचनील; इं. कोचिनील]

कोची—स्त्री. अणकुची; टोंक; कोंच पहा.

कोची—स्त्री. (नंद भाषा) (क.) चोळी; काचोळी. 'कोची अंगांत घाल.' [काचोळी अप.]

कोचोक—पु. (गो.) केर; उकिरडा.

कोच्या—पु (व.) ठोसा; गुद्दा; हुर्री [कोंचणें]

कोंजट, कोंजा—कोंझट–कोंझा पहा.

कोजळणें—अक्रि. (कों.) १ कोजळीनें आच्छादिलें जाणें; काळ्या किटानें युक्त होणें (नारळ, फळ, इ०). २ कोजळी धरणें (दिव्याच्या वातीनें). [कोजळी]

कोजळी—स्त्री. १ जळत्या वातीचा शेष; कोळी; काजळी. २जळणाऱ्या पदार्थांची ठिणगी. ३ राख (गवत काटक्या इ० ची). ४ धुरामुळें होणारें जाळें, जळमठ (छपरावर वगैरे). [सं. कज्जल]

कोजळी—स्त्री. (कों.) काळजी पहा.

कोंजळी—स्त्री. ओंजळ; पक्षा (दोन हातांचा).

कोंझा, कोंझट–डा, कोंझा—वि. (कों.) १ खोलगट डोळयाचा (माणूस). २ खोल गेलेला व बारीक (डोळा). ३ (ल.) तुसडा; तिरसट. [सं. कुंचित; प्रा. कोंचिअ]

कोजागर–री—पुस्त्री. आश्विनी पौर्णिमा; या दिवशीं रात्रीं लक्ष्मीप्रीत्यर्थ मध्यरात्रीपर्यंत द्यूत वगैरे खेळून जागून नंतर लक्ष्मी व चंद्र यांची पूजा करून दूध वगैरे पितात. [सं. कोजागर्ति=कोण जागतो असें लक्ष्मी विचारून जाग्याला संपत्ति देते अशी समजूत.]

कोट—पु. १ किल्ला; गढी. 'किल्ले गड कोट। दवलत खानाच्या हवाला' –ऐपो १३. २ गांवाचा अगर किल्ल्याचा तट. ३ सैन्याचा व्यूह. 'कोट बांधून पिंजरा केला।' –ऐपो १३. ४ (पत्ते) बोललेल्या भिडूनें स्वतःच सात दस्ते (हात) करणें; ओळीनें आपले सात किंवा सर्व हात करणें. (कि० देणें करणें). [सं. कोट; कोट्ट] ०गिरी–स्त्री. वेडा. 'असता खंडया महार (तर) फोडता दळण्याची कोठगिरी।' –ऐपो ६९.

कोट—कोटी पहा. 'पांच कोट रुपये.' ०कल्याण–न. १ भरपूर, पूर्ण कल्याण; पराकाष्ठेचा लाभ. 'असें केल्यास माझें कोटकल्याण करण्याविषयीं जी तिची इच्छा आहे ती कमी होईल.' –पाब्रह ८८. २ पराकाष्ठेची तुसता; भरपूरपणा. 'शेर-भर दुधांत आमचें कोटकल्याण होतें.'

कोट—पु. एक प्रकारचा अंगरखा. [इं. लॅ. कोट्टे पासून; तुल० सं. कोट्ट=किल्ला?]

कोट(टि)गा—वि. कोडगा; निर्लज्ज; निर्ढावलेला. 'सबळा प्रति जो कोटगा।' –प्रंथराज ३.१०७. 'स्वयेंहि कथितों नसे तिळहि लाज मी कोटिगा।' –केका १७. [का. कोट्टि=निर्लज्ज]

कोटगा—पु. १ दोरीनें फिरावयाचा भोंवरा. २ वाघे लोकांचा कोटंबा.

कोटंबा–टुंबा—पु. १ खंडोबाच्या वाघ्याचें लांकडी चौकोनी भिक्षापात्र; खंडोबाचे भक्त ह्याची पूजा करतात. 'हृदय कोटंबा सांगतें। घोळ वाजवूं अनुहातें।' –तुगा ४४४६. २ लांकडी डोणी; कोटंबी; काथवट (लांबट, चौकोनी, व खोलगट). जनावरांस चूण, भूस वगैरे खाणें घाल्ण्याचें लांकडी पात्र. [प्रा. दे. कोट्टिंब=डोणी; म. कोठा]

कोटंबी—स्त्री. लहान कोटंबा, डोणी; काथवट.

कोटंबें—न. कोळंबें, रहाटगाडग्याचें पाणी ज्या डोणग्यांत पडतें तें डोणगें [कोटंबा]

कोटर—न. झाडाची ढोली. 'लोटेतो तरुकोटरीं लपुनियां कोठें तरीही रहा।' –मराठी ६ वें पुस्तक पृ १२४ (१८९६) [सं.]

कोटरान—न. (ना.) निर्जन प्रदेश; भयाण रान.

कोटघ—पु. (कों.) एक लहान मासा.

कोटसा—वि. कोठेंसा? कोणत्या जागीं? [कोठें+असा]

कोंटा—पु. (हैद्रा.) कोपरा. [सं. कोण? म. कोन+टा]

कोटि–टी—स्त्री. १ शंभर लक्ष; एक करोड; कोट. 'जागजागीं आहेत वीर कोटी।' –र १०. २ (वादविवादांत) निरुत्तर करण्यासारखें खुबीदार उत्तर; भाषणाची मोठ्या युक्तीनें रचना; खुबीचें भाषण. ३ शब्दांत, वाक्यांत कांही फरक करून किंवा एकाच उच्चाराचे पण भिन्न अर्थांचे शब्द घेऊन अर्थाच्या गमती वरून अलंकार–चमत्कार दाखविणें. हें एक भाषा कौशल्य समजलें जातें. श्लेष पहा. 'अहो विद्वत्ताप्रचुर कोटपांचीं गुंतवळें गेलीं दहापांच घशांत' –नाकु ३.३४. ४ विशिष्ट वर्ग, प्रकार, 'रजोगुणाची कोटी। लोभिष्ट पोटीं स्त्री पुत्रां।'–एभा १३.४५. भेद. 'गुरामध्यें दोन मोठ्या कोटि–म्हशी आणि गाई' ५ काटकोन त्रिकोणाची उभी बाजू; लंब रेषा; कर्णाखेरीज एक बाजू. ६ थोर योग्यता, दर्जा; श्रेष्ठपणा; शौर्य, सद्गुण, विद्या यांमध्यें अतिशय प्रवीण असलेल्याच्या स्तुतिदर्शक सन्मानदर्शक संज्ञा. 'खऱ्या साधूची कोटी याच्या उलट असते.' ७ धनुष्याचें टोंक; चंद्रकलेचीं टोंकें. ८ कल्पना; विचारसरणी. 'परंतु ही कोटी इतिहासदृष्टया टिकेल असें आम्हांस वाटत नाहीं' –टि ४.११६. ९ पराकाष्ठा; कळस; उच्च शिखर. 'पराकोटी.' ०डमखिणें–ध्वजा

उभारणें. 'तरी यशाची उमळनि कोटी।' –नव १९ १७७. ०क्रम–पु. १ युक्तिवाद; शक्कल; खुबीदार विवेचनपद्धति; श्लेषात्मक भाषण. 'हाच कोटिक्रम स्वीकारलेला आहे.' –गीर १५७. २ पेंच. ०क्रम लढविणें–तोड काढणें; युक्ति योजणें ०ज्या–स्त्री. (त्रिकोणमिति) कोभुजज्या. काटकोन त्रिकोणांतील लघुकोनाच्या लगतची बाजू व कर्ण यांचें गुणोत्तर. कोटिज्या आणि भुजज्या यांच्या वर्गांची बेरीज १ भरते. (इं.) कोसाईन. ०ध्वज(लावणें, उभारणें)–पु. नवकोट नारायण होणें; अफाट संपत्तीचा देखावा करणें; कोटयधीश होणें. ०भोज–वि. कोटयधीश. 'धनेश्वर नामें कोणियेक ब्राह्मण। तो वस्तुवित्तेसि संपूर्ण। कोटिभोज पै।' –कथा २.१५.६. ०शः–वि. कोटयवधी. 'या कामाला कोटिशः रुपये पडतात.' [सं.] ०स्पर्शज्या–स्त्री. (त्रिकोणमिति) कोटिज्या व भुजज्या यांचें गुणोत्तर. कोस्पर्शज्या (इं.) कोटँन्जेंट.

कोटीर—पु. डोकीवरचा मुकुट. 'मस्तकीं कोटीर झळकत।' –जै १४.५६. [सं. कोटिर, कोटर]

कोटें—न. १ पक्ष्यांचें घरटें; कोटें. २ रेशमी किडयांचा कोशेटा. [सं. कोट्ट; कोट]

कोंटूटा—पु. (तंजा) बीं; कोय; बाठा. [ता. का. कोट्टे]

कोटयधीश—वि. नवकोट नारायण; मोठा श्रीमंत; करोडपति. [कोटि+अधीश]

कोटयवधी—वि. कोटीच्या मापानें मोजण्यासारखा; अपार; अगणित; अनंत. [कोटि+अवधि]

कोटयानकोटी—वि. अगणित; अतोनात. 'जळत हृदय माझें जन्म कोटयानकोटी' –रामदासकरुणाष्टक (नवनीत पृ. १७०). [सं. कोटि+अनुकोटि]

कोठ—पु. १ किल्ला. २ किल्याचा तट. कोट पहा. ३ कोठी पहा. [सं. कोष्ठ; प्रा. कोट्ठ]

कोठ—पु. १ मोठीं व वाटोळीं चकंदळें पडणारी रक्तपिती. २ गजकर्ण; नायटा. [सं. कुष्ठ]

कोठचा—वि. १ कोठल्या गांवचा, स्थळाचा, ठिकाणाचा. कुठचा पहा. २ कोणता; कसचा. [कोठें.]

कोठडी—स्त्री. १ घरांतील खोली; (विशे.) सामान ठेवण्याची कोठी. दालन; भाग, 'हरिविजयग्रंथ भांडार। छत्तीस कोठड्यांचें परिकर।'–ह ३६.२१६. २ (व.) कपाट; फडताळ. [सं. कोष्ठ; प्रा. कोट्ठ; हिं. कोठरी]

कोठणे—क्रिवि. (प्र.) कोठून? कोणत्या ठिकाणाहून?

कोंठदार—वि. (चांभारी) विशिष्ट प्रकारचा मारवाडी जोडा; हा मारवाडी कुणबी घालतात.

कोठनीस—पु. कोठावळा; कोठीवाला; कोठीवरील अधिकारी. [म. कोठी+फा. नवीस]

कोठपर्यंत–पावेतों–घर—क्रिवि. कुठवर; कोणत्या ठिकाण–मुद्या–पल्ला–मजलेपर्यंत? (स्थळ किंवा वेळ यासंबंधीं). [कोठें+पर्यंत इ०]

कोठपो—पु. (कु.) भाताची पेज गाळण्याचा रुंबट चौकोनी कोटंबा, भांडें; काथवट. कोटंबा पहा.

कोठं(ठ)बा—पु. कोटंबा पहा.

कोठंबी, कोठमी—स्त्री. पाण्याची डोणी; हंडा. [प्रा. दे. कोट्टिंब]

कोठयॉ–वा—पु. (कों. गो.) कोठया; एक प्रकारचें परदेशी गलबत. हें गुजराथेकडील खारवी मुसलमान वापरतात. याच्या व दक्षिणी गलबताच्या बांधणींत फरक असतो. यांचें धाकटें शीड व कलमी हीं लहान असतात [सं. कोष्ठ; प्रा. कोट्ठ, कोट्ठय]

कोठला—वि. कुळला. कोठचा पहा.

कोठलेलें—वि. (कु.) बरेच दिवस सांठयास पडून राहिलें असल्यामुळें जुनें झालेलें (कापड).

कोठ(ठा–ठि)वळा—पु. कोठनीस पहा. 'दाटी पुढील दारीं मागिल दारीं आहे कोठिमधें कोठवळा।'–प्रला १६७. [कोठ–ठा–ठी+वाला] म्ह० खरचणाराचें खरचतें, कोठावळयाचें पोट दुखतें.

कोठा—पु. १ कोठार; संग्रहालय; बखार; आगर; सांठवण (धान्य, पाणी, इ० ची). २ पोट; पक्वाशय. ३ (शिवणकाम) छातीपोटाचा भाग (शिवावयाच्या कपडयाचा). ४ बंदूकीतील दारु, कारंजाचें पाणी इ० चा कप्पा, सांठा. ५ पक्ष्यांचें घरटें. ६ (व. ना.) गुरांचा गोठा. ७ हुंडीच्या ज्या घरांत रकमेचा आंकडा लिहितात तो. ८ निळीचा रंग तयार करतांना निळीचीं झाडें ज्यांत भिजत टाकतात तो हौद. ९ पानाच्या डब्यांतील पानें ठेवण्याचें पूड. १० कोष्टक; सदर; स्तंभ; रकाना. ११ (जंबिया) जंबियाच्या खेळांत आपल्या हातांतील जंबियानें जोडीदाराच्या बरगडीच्या खडयांतून (शिर्पीतून) बेंबीकडे फाडत येणें. [सं. कोष्ठ; प्रा. कोट्ठ]

कोठार–री—नस्त्री. १ धान्यागार; कोठडी; खोलींतील किंवा भितीतील बळद; बखार; सांठवणीची जागा. 'कीं विश्वबीजाचें कोठार।'–ज्ञ ३८. 'तेलातुपाचिया कोठारा।'–ज्ञा १६.३९५. २ पक्ष्यांचें घरटें. [सं. कोष्ठागार; प्रा. कोट्ठार]

कोठारली—स्त्री. (कु.) घोणीच्या वर्गातील एक लहान प्राणी.

कोठारी—पु. कोठनीस पहा.

कोठारें—न. १ कोठार पहा. २ भूस बाहेर जाऊं नये म्हणून त्यावर लावलेल्या कडब्याच्या पेंढया. [कोठार]

कोठावणें-विणें—उक्रि. कोठें जातां किंवा कोठून आलात असें विचारणें. [कोठें]

कोठिंबा, कोठिंबी, कोठिंबें—कोटंबा पहा.[प्रा.दे.कोट्ठिंब]

कोठी—स्त्री. १ धान्यागार; संग्रहालय; वखार; खजिना; हौद; रांजण. 'पाण्याची कोठी एक मातीची.'—ऐरापु विवि २९७. २ कारखाना; पेढी; दुकान; खोली. ३ सैन्याची दाणागोटयाची बेगमी. 'लष्कराची कोठी चालली—उतरली—आली—लुटली' ४ नळाचें पाणी सांठवून ठेवण्याची, किंवा बंदुकींतील बाराची दारु रहावयाची जागा. ५ शरीरांतील भाग (हे ७२. आहेत.) 'आतां बाहत्तर कोठयांतील शुद्धि पिंडामध्यें'—मोल.६ साळी वगैरे ठेवण्याकरतां केलेली बांबूची लांबट व मोठी कणगी. लोखंडी पत्र्याची पाटी, पींप. ७ मिठागरांतील चौकोन, खांचर. ८ एक प्रकारचें गलबत. ९ (वाद्य) भोपळा. १० सरकारी वाडा; मोठया सरदार जहागीरदाराचा इमला; रेसिडेंटची कचेरी. (इं.) रेसिडेन्सी. 'साहेबांनीं महाराजांस—देवासकरांचे कोठीवर तुम्ही कां गेला होता—म्हणून विचारलें' —विक्षिप्त ३.१७१. [कोट—ठा] **०फरा**—पु. वखारींतील तांदुळांच्या नासधुसीबद्दल अजमास करून जास्त वसूल केलेलें धान्य. **०भाडें**—न. रयतेनें किल्ल्यावर धान्य नेऊन देण्याऐवजीं त्यांच्यावर बसवलेला कर. **०महाल**—पु. सरकारी धान्याची वखार, कोठार. **०वाला**—पु. १ कोठवळा पहा. २ पेढीवाला; सावकार; व्यापारी.

कोठील—वि. कोणत्या ठिकाणचा ? कोठचा ? [सं. क]

कोठून, कोठोन—क्रिवि. कोणत्या ठिकाणापासून—स्थळा—वेळेपासून; कुठून.

कोठें—न. (कों.) पक्ष्याचें घरटें. कोटें पहा.

कोठें—क्रिवि. १ कोणत्या ठिकाणीं. २ (जोर दिला असतां) कोणत्याहि स्थळीं; कोणीकडेहि; कोठेंहि. 'मीं तेव्हांपासून एथेंच आहे. मी कोठें गेलों नाहीं' ३ (चुकीनें) कधीं; केव्हां. 'मी कोठें ग गेलों, उगीच कां बोलतेस ?' **म्ह० 'कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तटाणी' =अत्यंत थोर व अत्यंत क्षुद्र अशा दोन वस्तूंची तुलना कधी होणार? ०कोठें-मोठें**—क्रिवि. कांहीं कांहीं ठिकाणीं. [कोठें द्वि.]

कोठ्या—पु. कोठी (अव.) अर्थ ७ पहा. कोठा पहा.

कोड—पुन. महारोग; रक्तपिती. [सं. कुष्ठ; प्रा. कोड्ढ, कोढ; हिं. कोढ; गु. कोड]

कोड—स्त्री. खंडी; वीस (२० ही संख्या). कोडी पहा.

कोड—न. १ (काव्य) कौतुक; लळा; लाड; कुरवाळणें (मूल, देव, प्रिय वस्तु इ०); आवड; मौज; नाजूक रीतीनें वागविणें; काळजीनें जपणें. कौतुक शब्दाबरोबर बहुधा योजतात. 'सकल शाखां चाळीतां कोडें।' —ऋ ३८. 'जयातें अव्यक्त म्हणों ये कोडें।' —ज्ञा ८.१७९. 'पुत्र पहावयाचें चाडें। अण्डें भेदूनि पाहतां कोडें।' —मुआदि ४.३५. 'मुक्तरंगमाळा कोडें। रामरथा घातल्या॥' —वेसीस्व ९.६८. २ (काव्य) हौस; उत्कट इच्छा; हांव; उत्कंठा (ज्यांत हेकेखोरपणा, हट्ट, तऱ्हेवाईकपणा गर्भित असतो). ३ (काव्य) खेळाडूपणा; चैनी स्वभाव; आनंदीपणा; मजा; गंमत. 'एक करताळिया वाजवुनि। कोडें नृत्य करिती त्याजपुढें॥' ४ आश्चर्य, आनंद, नवल, उत्पन्न करणारी गोष्ट. 'ज्याच्या शरीरबळाचें कोड। एकला लक्षांवरी दे झड।'—एभा १७.१३९. ५ कोडें; कूट प्रश्न; गूढ. 'कोऽहोड घालिती बुद्धिमंद।' —दावि २३७. ६ (ल.) संकट; कष्ट. 'कोडें थोडें तो करी नीर गोळा।'—अकक हरिराज मुद्गलार्याचें भाषांतर ३०. **०पुरविणें**—कौतुकानें हौस पुरविणें; लाड पुरविणें; पाहिजे असलेली वस्तु देऊन आनंदित करणें. 'आवडी धरूनि करूं गेलों लाड। भक्तिप्रेमकोड न पुरेचि।' —तुगा ८७६. **०कौतुक-तिक**—न. लाड; प्रेमाचें लालन; उपचार. (क्रि० पुरविणें). [प्रा. दे. कुड्ड; सिं. कोडु]

कोड—न. कायदेपुस्तक; कायद्यांचा, नियमांचा संग्रह. 'लष्करी कोड कुणालाच नाकबूल नाहीं.' —के २२।७।१९३०. 'पिनलकोड.' [इं.]

कोंड—पु. १ (कों.) गोल कुंपण; वई; गांवकुसूं. 'इंद्रियग्रामींचें कोंड।' —ज्ञा ३.२४२. २ शपथ घेणाराच्या भोंवतीं काढलेलें वर्तुळ. ३ (गोटया) गोटीकरितां केलेलें वर्तुळ; गल. ४ वर्तुळाकार वस्ती; खेड्यांतील एक स्वतंत्र वस्ती (ही एकाच जातीची असते); आळी; वाडी. ५ एकाच्या वहिवाटींतील जमीन, शेत. ६ (राजा. कु.) नदींतील डोह; (गो.) डबकें; फोंड; कुंड. ७ कोंडमारा; गुदमरा. 'बहू पाहतां अंतरीं कोंड होतो।' —राम करुणाष्टकें ७. —स्त्री. कोंडी; बंद केलेली जागा किंवा घर; तुरुंग. **०डाव**—पु. (गोटया) कोंडीचा डाव; यांत निरनिराळीं घरें व रेघा आंखून खेळ खेळतात. याच्या उलट अगळडाव; यांत विशिष्ट गली सांगून खेळ खेळतात. **०पडणें**—संकट येणें. [सं. कुंड; प्रा. कोंड]

कोंडका—पु. लांकडाचा ओंडका, गांठ. कोंडकें पहा.

कोंडकी—स्त्री. १ बगीच्यांत पाणी सांठविण्याकरतां केलेला लहानसा खड्डा; हौद. २ मिठागर. ३ भाताचें खांचर (बांध घालून तयार केलेलें); कोंडकें पहा. [कोंड]

कोंडकें—न. १ (कों.) डोंगरांतील आडवळणाची जागा; गुहा; दरी. 'पर्वताच्या कोंडक्यांत गांव असल्यामुळें...' —खेया

३७. २ बांध घातलेला वाफा (पाणी राखून ठेवण्यासाठीं). ३ कोंडका, कोंडकी पहा. ४ खिटी; कुर्‍हे. कोरडिकें पहा. ५ (ओतकाम) भांडें चरकावर धरण्यासाठीं लावण्याचा लांकडी ठोकळा. [कोंड]

कोडगा—पु. भोंवरा; कोटगा पहा.

कोडगा—पु. लाथा, बुक्क्या इ० चा मार; हत्या मार. (क्रि० देणें). –वि. १ मार खालेला; मारलेला; लतखोर, २ निर्लज्ज; निसवलेला; कोटगा; निगरगट्ट. [का. कोट्टि=वेशरम; तुल० कोडण=माकड] **म्ह०** लतकोडग्याची बलाय दूर, खाता पायपोस जाजा नूर. **–गेखाऊ**–वि. जो नेहमीं हत्यामार खातो पण दुर्गुण सोडीत नाहीं असा. **–गेला**–वि. कांहींसा कोडगा; हट्टी.

कोंडण—स्त्री. कोंडण्याची जागा; गोठा; कोंडवाडा. [कोंड]

कोंडणी—स्त्री. (काव्य) कोंडलेली अवस्था; गुंतून,अडकवून. पडलेली, बंदिस्त स्थिति; गुंतून, बांधून पडणें (शब्दशः व. ल.) ' ऐशा विचाराच्या घालुनि कोंडणी । काय चकपाणी निजलेती । ' [कोंड]

कोंडणें—उक्रि १ चोहोंकडून प्रतिबंधांत आणणें; अडकून धरणें; अडविणें; बंद करणें (माणूस खोलींत घालून, नदींस बांध घालून इ०). २ (ल.) घोटाळ्यांत घालणें, आणणें; गांगरविणें; कुंठित करणें; निरुपाय करणें (वाद इ० मध्यें). [कोंड]

कोडत—न.न्याय देण्याची जागा;न्यायालय;कोर्ट. 'कोडतां तूनहि मराठी भाषा काढण्याचा सरकार यत्न चालवीत आहे हें अगदीं गैर आहे.'–नि ४. [इं. कोर्ट]

कोडतसांव—पु. (गो.) पैलू.

कोडता-ते—पुन. १(वे.)(शेती) हातांनीं हेटें (ढेकळें) फोडण्याचें हत्यार. २ (सुतारी) (वे.) लांकडी ठोकणी; हातवडा. [का. कोडति]

कोडपणें—अक्रि. (ना.) मारणें; शिक्षा करणें.

कोडबा—वि. कोडबी वल्हवणारा. कोडबी पहा.

कोडबॉ—पु.(गो.) नदीकिनाऱ्यावर उगवणारें गवत.

कोडबी—स्त्री. (कों.) उलंडी असलेली मोठी होडी. [प्रा. कोट्टिंब]

कोडबुळें–बोळें, कोडबळें—न. भाजणीच्या पिठाचें, तेलांत तळून वर्तुळाकार केलेलें खाद्य. [का. कोड=शिंग+बळळी=वेली ?]

कोडबो-बो—पु. भात (धान्य) ठेवण्याचें, होडीसारखें लांकडी पात्र. कोटंबा पहा.

कोडम—न. (व.) कोनाकार लांकूड.

कोंडमार–रा—पु. १ कोंडून ठेवून मारणें; लहान खोलींत घालून गुदमरविणें. २ भांडणांत, वादांत, चढाओढींत, प्रतिपक्षीयानें केलेली अडवणूक, कोंडी. ३ संकटांत, अडचणींत आणून नकोसें करणें; ४ चहूंकडून कोंडल्यामुळें होणारी अवस्था; अगतिकत्व; कुचंबणा. [कोंडणें+मारणें]

कों(कुं)डय—स्त्री. (गो.) शिंप्याची जात.

कोंडली—स्त्री. (चंद्रपुरी) गाडगें; मडकें.

कोंडलें—न. (कु.) पातळ पदार्थ राहण्यासाठीं सभोंवार भात इ० पदार्थ लावून जे ताटांत (जेवतांना) अळें करतात तें; कुंड. [सं. कुंड]

कोंडवरा—वि. (राजा.) खोल; खोलगट (भांडें इ०). [का. कोडे; हिं. कोडना=खोदणें+वरा प्रत्यय]

कोडवॅलॉ—वि. (गो.) कडू.

कोंडवाड—नस्त्री. (कों.) गुरांचा गोठा. कोंडवाडा पहा.

कोंडवाडा—पु.गुरें कोंडण्यासाठीं केलेली कोंडी;गावांत अगर शेतांत शिरून नासाडी करणारीं गुरें कोंडून ठेवण्याची सरकारी जागा; गधेघाट; त्यांच्या सुटकेसाठीं मालकाला रोजचा त्यांचा खर्च व दंड भरावा लागतो. [कोंडणें+वाडा]

कोडवादीनें—क्रिवि. प्रत्येक वस्तूची किंमत न ठरवितां सरसकट कोडीची किंमत ठरवून (देणें, घेणें). [कोडी+वादी]

कोडवाव—स्त्री. कोरडी, कोरडवाहु जमीन; केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेली जमीन; पाणथळ किंवा बागाईत नव्हे अशी जमीन. [कोरड+वावर]

कोडवाळ—स्त्री. (गो.) कडू मासळी; कडुवाळ. [कोड=कडू+वाळ=वाळलेली (बोंबील)]

कोडवी—स्त्री. (कु.) एक प्रकारचें झाड.

कोंडळ—स्त्री. एक क्षुद्रुप, वनस्पति.

कोंडळी—स्त्री. लांकडी फावडें; धान्य मळतांना पार्तीतून उडून गेलेलीं कणसें गोळाकरण्याचें साधन.

कोंडळें—न. कडें; वर्तुळ; कोंडाळें. ' मग जमदग्नीनें विचारिलें। मृत्तिकेंचकोंडळें केलें।' –कालिकापुराण २२.२६. [कोंड+आळ]

कोंडा—पु. १ धान्याचें भूस, सालपट, तूस इ०. ' देवा कळणा अथवा कोंडा । ' –तुकाराम (नवनीत पृ. ४४८.) 'काष्ठिं म्हणे वायुपुढें जरि काय टिकत असेल कोंडा या।' –मोभीष्म १०. ४४. २ (ल.) ताप निघाल्यानंतर अंगावरील निघणारा एक प्रकारचा भुसासारखा पदार्थ, सांलें, मळ. ३ खपली; पापुद्रा. ४ चिवा; एक लहान प्रकारचा बांबू. [का. कोंडे=गोंडा, तुरा ?]–**कुत्र्याचा मांडा करणें**–१ अगदीं निकृष्ट परिस्थितींतूहि चांगलें कार्य करून दाखविणें; साध्या गोष्टींच्या मदतीनेंहि चांगल्या गोष्टी करणें.

२ (ल.) अडून न बसणें; गोड करून घेणें; समाधानी राहाणें. ३ सुप्रणपणा अंगीं असणें. ०पाऊस-पु. पावसाची बुरबुर, रिपरिप; केवळ तुषारयुक्त पाऊस पडणें. ०पाणी-न. अन्नपाणी. 'नका देऊं तिळमात्र कोंडापाणी।'-ऐपो २३५. ०भोंडा-पु. १ कोंडा, भूस इ० पदार्थ. २ (ल.) कोरडें, नीरस, वाळलेलें अन्न; कदन्न.

कोंडा—१ कोयंडा (दाराचा) पहा. २ (तंजा) मल्याळी तऱ्हेची वेणी व तिचा साज. [ता.]

कोंडाळणें—अक्रि. १ गरगर फिरणें; सैरावैरा धांवणें; कोंबलेल्या जागेंत इकडे तिकडे फिरणें; वाहणें (वारा); २ घिरट्या घेत जाणें; वाताहत होणें; उधळणें (गवताच्या काड्या, धूळ); ३ भोंवरे करीत वाहणें; गिरक्या घेत जाणें (नदी). ४ घोंटाळणें; गांगरणें (मन). ५ पुढेंमागें जाणें; सैरावैरा धांवणें (निबिड अरण्यांतल्या प्रमाणें) ६ (ना.) कोंदणें; गुदमरणें. [कोंडणें प्रयोजक]

कोंडाळें—न. १ वर्तुळ; वेटोळें; वाटोळी जागा; आळें. २ माणसांनीं वर्तुळाकृति बसणें; भोंवतीं बसणें. ३ थालिपीठ; कोडोळें ४ (गो.) आळें. [कोंड+आळें]

कोडिसवाणा-णी-णें—वि. सुंदर; मनोहर; कौतुकवाणें; लहान; गोजिरवाणें. 'ऐसी मूर्ति कोडिसवाणी रूपा। करूनि होसी विश्वरूपा।'-ह्रा ११.२९१. 'परि लेंकरुआंचे बोबडें बोलणें। मायबापां कोडिसवाणें।'-दाव ४०७. 'ठसिलें सुंदरें कोडिसवाणी।'-वेसीस्व ७.५७. [सं. कूटसम; कोडिस+वाणें]

कोडी—स्त्री. विसांची संख्या; खंडी (कापड, लोखंडी पत्रे, बांगड्या इ० मोजतांना योजितात). 'इंगरेजी तरवारा उत्तम कोडी'-पेद ८.५२. [तुल० सं. कोटि; ते. कौडिग=२०]

कोडी—स्त्री. १ कोटी; शंभर लक्ष. 'जे वर्षशतांचिया कोडी।'-ह्रा ६.४६५. 'तेयें तेहतीस कोडी। देवांची वसे परवडी।'-कथा ७.११.१०८. २ अनेक पंक्ती. 'आनंदें डोलति कोडी। विमानाचिया।'-ऋ ३६. ३ प्रकार; तऱ्हा. 'कोडीअे असंख्यातु कळसु। जेथें मिर्वती गगना।'-धवळे १५. ४ (भूमिति) उंची; खोली. कोटी पहा. [सं. कोटी]

कोडी—वि. रक्तपित्या; कोड झालेला; महारोगी. ०खाना-पु. रक्तपितीवाल्यांचें वसतिगृह. [कोड]

कोंडी—स्त्री. १ कोंडलेली जागा; कोंडवाडा. २ ब्राह्मणांना दक्षिणा देण्याचे वेळीं त्यांना बसण्याकरितां केलेलें आवार; रमणा. 'लग्नांत कोंडी करून दक्षणा देतात.' ३ (आटपापाट्या) गडी जेथें दोन्हीकडून अडवून धरतात ती पाटी (पाटीवरचा गडी व मुरंदुरया यांनीं अडविलेली). ४ नदीच्या बंधाऱ्याची जागा. ५ (कों.) मीठ बनविण्याचीं लहान मिठागरें. [कोंडणें]

कोंडी—स्त्री. (बे.) (सोनार) सरीचा अथवा ठुशीचा भाग.

कोंडींव—वि. १ कोंडलेलें; बंद केलेलें (पाणी, वारा, जागा). २ बंदींत ठेवलेला (माणूस, प्राणी). [कोंडणें]

कोडुळें, कडुवळें—न. (व.) कडुबुळें. कोडबोळें पहा.

कोडू—स्त्री. (गो.) चिरीमिरी; वानगी.

कोडू—पु. (बे.) कात.

कोडें—न. १ (काव्य) अडचण; कोंडमारा; पेंच; संकट. 'कोडें सांकडें संकट। नाना संसार खटपट।'-दा ४.३.६. २ कूटस्थळ; गूढ प्रश्न. 'आजि फिटलें माझें कोडें'।-तुगा २२४०. ३ कुवेडें; जादुटोणा. [सं. कूट] ०उलगडणें-समजणें; कळणें; शंकानिरसन होणें. 'तुम्हांस कोडें हें उलगडलें तर बरेंच काम झालें.'-टि ४.५७. ०धर्म-न. कपटवृत्ति; कूटकर्म. 'कासया करावें कोडेंवर्म। सत्यधर्म लपवूनी।'-भवि १४.१४.

कोडें—न. १ पणती (मातीची); दिवेलाबळें. २ डांक लावण्याच्या वेळीं उपयोगांत आणावयाचा समईवजा दिवा. [सं. कुट=मडकें; का. कोडे=खापरी भांडें]

कोंडे—न. (कों.) पाणसाप (वेडूक खाणारा.) [कोंड]

कोंडेकड—न. (कुलाबा) नवीन तांदुळाच्या कोंड्याचे लहान पापड (केळीच्या सोपटाच्या किंवा कोहळ्याच्या पाण्यांत पीठ भिजवून करतात ते). [कोंडा]

कोडेल—वि. (व.) कोड आल्यासारखें अधूनमधून; तुटक तुटक; एकसारखें नसणारें. [कोड]

कोंडो—पु. (गो.) १ बांबू. २ जमीन मोजण्याचें माप. कोंडा पहा.

को(कों)डोळें—न. १ थालिपीट (भाजणीचें). २ कोंडाळें पहा.

कोड्या-ढ्या, कोढी—वि. कुष्ठरोगी; रक्तपित्या. 'जैसा कोढी आपुला हाती। वारंवार लक्षित।'-मुरंशु २६०. म्ह० कोढ्याचा कोढी होईल न होईल पांच डाग तरी घेऊन उठेल. [कोड]

कोंड्या-ढ्या—पु. माडी, ताडी ठेवावयाचा भोंपळा. हा ताडीच्या झाडाला टांगून ठेवितात. [कुंडा]

कोंड्या—पु. एक झाड.

कोंड्या मुरूम—पु. भुसभुशीत, ठिसूळ मुरूम. [कोंडा+मुरूम]

कोढ—पु. रक्तपिती. कोड पहा.

कोंढ—न. गांवकुसूं; कोंड पहा.

कोंढ—न. १ कोंदण. २ (ल.) खोल. 'डोळे कोंढनी जाती।'-ज्ञाप्र ८२३. [कोंदण]

कोंढा—सर्व अर्थी कोंडा पहा.

कोढी—वि. (ना.) हट्टी; दुराग्रही. [कुढा]

कोंडी—स्त्री. १ मिठागर; खांचर. २ कुंडी, कोंडी पहा.

कोण—सना. १ प्रश्नार्थक सर्वनाम; अज्ञात माणसासंबंधानें विचारतांना योजतात. २ कोणती; किती. 'तेथें या कांबिटाचा गरिब गुण किती? प्रौढिही कोण येणें?।' –आसी ३२. ३ किती तरी; फार: अतोनात. 'त्याचें मत वळवावयास मला कोण प्रयास पडले?' ४ काय? 'तुम्ही हा उद्योग करतां याचा विषय कोण?' [सं. कःपुनः; प्रा. कोउण; अप. कवुण–कवण] **कोणाचा कोण**–(अज्ञात माणसासंबंधीं माहिती व त्याच्या नात्यागोत्यासंबंधानें माहिती विचारतांना) लांबचा नातेवाईक; बळेनें संबंध जोडलेला. (यःकश्चित, फालतू माणसासंबंधीं योजतात). **म्ह०** कोणाचा कोण पितळाचा होन, सांपडला तर शोधतो कोण? **०एक**–सना. १ कोणी तरी एक. २ विशिष्ट किंवा एखादा माहीत (मनुष्य, वस्तू). **०चा-ता**–वि. १ दोन वस्तूंपैकीं कोठला. २ जो तो; विवक्षित. 'तुम्हांला या घोडयांतून कोणता पाहिजे तो घ्या.' **०जाणें**–कोणास ठाऊक, माहीत; न कळे बुवा. **०ताका-चाका**–पुलीन. हवा तो; पाहिजे तो. कोणताहि (एकवचनी व अनेकवचनी प्रयोग). 'दोन्ही वटि सारखे आहेत, कोणताका घेईनास.' **०त्या झाडाचा पाला**–कसपटाप्रमाणें लेखणें. 'नवरा म्हणजे कोणत्या झाडाचा पाला!' –सु ३५. **०त्या तोंडानें-नाकानें**–न शरमतां, न लाजतां, उघडपणें, उजळमाथ्यानें कसा (प्रश्नार्थक) 'तो या गांवचा देणेदार आहे तेव्हां तो कोणत्या तोंडानें येथें येईल.' 'मागें तशी प्रतिज्ञा करून आतां त्यांकडे कोणत्या नाकानें जाऊं?' **०त्यासी**–कोणास? 'येणें कोणत्यासी रोंख दिलें।' –ब ५०३. **०पदार्थ**–यःकश्चित्; निंद्य; त्याज्य; क्षुद्र. 'कोणपदार्थ स्त्रियांच्या जाती। अपवित्रा दुष्टिणी। पति असतां व्यभिचारिणी।' –पला ४३. **०य**–(गो.) १ कोणीहि. २ कसाहि. **०सा**–वि. कोणी तरी; फलाणा; बोलण्यारास माहीत नसलेला. 'तुम्हांला कोणस हाक मारतो आहे.' [कोण+सा=सारखा]

कोण—पु. कोपरा; कोन. 'तुझ्या स्वरूपाच्या निजस्थानीं। आकाश लोपलें एके कोणीं।' –भारा बाल ११.१७०. 'तूजा प्रताप बसला लपोन जाऊनि काय कोणाला?' –भक्तमयूरकेका पृ ४. [सं. कोण] **०पा**–पु. (बे.) कोपरा; कोना. **०पिका-पीक**–वि. कोपऱ्यांत अगर घरांत पिकलेला (आंबा, फणस इ०). याच्या उलट वरपिका (झाडावर पिकलेला). **०बिंदु**–पु. कोनाच्या बाजू ज्यांत मिळून कोन झालेला असतो तो बिंदु. –महमा ३.

कोणगें—न. (कों.) मोठया फांदीवर लागलेलें मधाचें पोळें. कोंगें, कोनगें पहा.

कोणप—न. १ कुणप; प्रेत. २ (ल.) तुच्छ, गलिच्छ वस्तु. 'करीते कर्मला कोणपा या।' –भासी ३८. [सं. कुणप=प्रेत]

कोणाक—सना. (कु.) कोणाला.

कोणी—प्रश्नार्थक सना. कुणी; कोणी एक? कोणीतरी? कोणीहि? 'नये ज्वाळ वीशाळ सन्निध कोणी।' –राम १२१. –वि. कोणी एखादा; वाटेल तो; हवा तो. 'कोणी ब्राह्मण सांगा, आमची हरकत नाहीं.' **म्ह०** १ कोणी कोणाचा गुरु कोणी कोणाचा चेला. २ कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. (अंदाधुंदी, गोंधळ या अर्थी). [कोण] **०एक**–वि. कोणता तरी; कोणीहि; अमुकच नव्हे असा; हवा तो. **०कडूंन-कडून**–क्रिवि १ कोणत्या ठिकाणाहून–दिशेहून–बाजूकडून? २ कसेंहि; कोणत्याहि प्रकारें. **०कडे**–क्रिवि. कोणत्या बाजूला, दिशेला, ठिकाणीं. **कोणीका**–सना. हवा तो; पाहिजे तो. 'कोणीका औषध देईना! गुण आल्यार्शी कारण.' **०तरी**–सना. १ कोणीहि; कुणीतरी. २ यःकश्चित्; नालायक; भिकार.

कोणे—न. खोली. अंतर्गृह. [का.] **०कोणीं**–क्रिवि. प्रत्येक कोपऱ्यांत; अडचणींत. कोनीं पहा.

कोणें—न. गुरांच्या कानांत होणारा एक रोग. यामुळें गुरांच्या कानांतून पाण्यासारखा पू वहात असतो.

कोणेएक, कोणेक—कोणीएक पहा. 'कोणेक विरळ यातें वदती तत्त्वज्ञ पति अनाथांचा।' –भक्तमयूरकेका पृ. १४.

कोण्या—प्रस. कवण्या? कोणत्या? 'विरक्तें असावें कोण्या गुणें.' –दा २.९.१.

कोण्हा—प्रश्नार्थक सर्वनाम. कोणास; कोणाला? 'सांगावें कोणें कोण्हा।' –रामदासी २.१७४.

कोण्ही—कोणी पहा.

कोत—स्त्री. (कु.) कुवत; शक्ति. [अर. कुव्वत]

को(कों)त—पु. १ भाला; त्याचें फळ. 'घायीं कोत न जिरे।' –हा १३.५३८. 'घायींचा कोत न जिरे।' –एभा १२.२५०. २ (बे.) वेळूचा, बांबूचा कोंब; चिन्नें. –न. (कों.) माडाच्या किंवा ताडाच्या पोयीचें अग्र; गाभ्याचें टोंक (टोंक कापून नंतर त्यांतून रस काढण्यासाठीं तेथें मडके लावतात). [सं. कुंत=भाला; का. कोंत] **०कांती**–स्त्री. भाला; एक शस्त्र. 'लांगूल सागर कटारें। कोतकांती ईट तोमरें।' –कथा ३.११. १४. **०कारु-कर**–पु. भालाईत. 'सेले सावळे कोतेकर।' –एरुस्व ७.१३.

कोतमीर-रीब—स्त्री. (कुण.) कोथिंबीर पहा.

कोतल—वि. १ (व.) रिकामें; राखीव. २ जरूरीपेक्षां जास्त. –पु. कोतवाली घोडा. शृंगारलेला घोडा (मिरवणुकीचा) 'कोतल नर कोतवाल वारण मगनमस्त किल करित।' –ऐपो २००. 'स्वारींत कोतल वर कोणी आरूढ न होतां...' –ऐरापुप्र ९.५१०. [हि.]

कोतवार—पु. कोतवाल अर्थ ३ पहा.

कोतवाल—पु. १ मराठी साम्राज्यांतील नगररक्षकांचा मुख्याधिकारी; शहरचा मुख्य संरक्षक अधिकारी; फौजदार; पोलीस सुपरिंटेंडेंट; कोंकणांत सब-इन्स्पेक्टरला कोतवाल म्हणतात. हल्लींच्या याच्या कामापेक्षां मराठी राज्यांत याला कज्जे तोडणें, बाजारांतील वस्तूंचे भाव ठरविणें, खरेदी-विक्रीचे दस्तऐवज नोंदणें इ० कामें असत. २ (बडोदें, काशी) गांवांत जेवणाचें अथवा इतर समारंभाचें आमंत्रण करणारा अधिकारी; बोलावणेकरी. 'निमंत्रणें करण्यास कोतवालास द्यावी,—ऐरापुप्र ९.४५९. ३ (व.) सरकारी काम करणारा गांवमहार. ४ नित्योपयोगापेक्षां ज्यास्त संग्रह केलेला पदार्थ. कोतल पहा. ५ स्वारी इ० पुढें शोभेकरितां चालविलेले घोडे; कोतल; कोतवाली घोडा. 'कोतवालतेजी धांवा घेती।' –ऐपो ११. ६. (ल.) शोभेसाठीं वापरावयाचे अलंकार, कपडे इ०; ठेवणींतला पदार्थ; वस्तु. [सं. कोट्टपाल; प्रा. कोट्टवाल फा. कोतवाल] **म्ह०** १ उलटा चोर कोतवालाला दंडी. २ (गो.) कोतवाला आधीं चोरा बोंब. सामाशब्द– **०घोडा**–पु. मिरवणुकीपुढे शृंगारून चालविलेला घोडा; कोतल; कोतवाल. [हिंदी] **०चावडी**–स्त्री. कोतवालाची काम करण्याची सरकारी जागा, कचेरी, हपीस.

कोतवाली—स्त्री. १ कोतवालकचेरी; कोतवालाचा कारभार, खातें. २ शहरजकात; बाजारपट्टी. ३ (बा.) पोलीसचौकी; नाकें; चावडी. 'सहा महिने पायांत विडया ठोकून एकेक महिना एकएक कोतवालीवर त्यास बसविला.' –विक्षिप्त १.८८ ४ कोतवालाचा खर्च भागविण्यासाठीं बसविलेले कर. –वि. कोतवालसंबंधी; फौजदारी. **–चा पोषाख**–पु. सणासुदीस घालावयाचा उंची पोषाख; ठेवणींतील पोषाख. **०पिंजरा**–पु. कैदखाना; तुरुंग. 'कोणास बेशुद्ध होईपर्यंत मार देण्यांत आला व कोतवाली पिंजऱ्याची भरती करण्यांत आली.' –विक्षिप्त १.७३.

कोता—वि. जरूरीपेक्षां आंखूड; अपुरा; लांडा; त्रोटक; लहान; तुटका; कमती; तुटपुंजें; संकुचित. 'हें प्रमाणहि येथें कोतेंच पडतें!' –नि २१२. 'आमचें ज्ञान किती कोतें आहे पहा.' –मीर २४६. [फा. कोताह्; सिं. कोताही] **कोताई–ही**–स्त्री. आंखुडपणा; अपुरेपणा; कमताई; तोटा; कोतेपणा. 'वसूल घेण्यास सख्ती करितां कोताही केली नाहीं.' –ऐटि ५.११. [फा. कोताही]

कोतार—न. (कु.) वैर; भांडण.

कोतियाळ—वि. कोयता (शस्त्र) घेतलेला (वीर). 'येक धावती आगळे। लोहागळे कोतियाळ। फरशधर॥' –कालिका २२.७. [कोयता]

कोती—स्त्री. वरी(धान्य)ची एक जात; हिचा दाणा पांढरा असतो.

कोते-अंदेश—वि. अदूरदृष्टि; अविचारी. 'आपण खाविंद समीप असतां कोते-अंदेशांनीं उपद्रव द्यावा हें ठीक नाहीं.' –दिमरा १.२२७. [फा. कोताह्+अंदेश]

कोतेक(का)र–रु— पु. भालाईत. कोतकारु पहा. 'पैले कोंतेकारां। जवळिकें चाला।' –शिशु ५६४. 'कोंतेकारां सुटला पळु।' –उषा १६०८. 'सेले साबळे कोतेकर। धनुर्धर पायांचे।' –एरुस्व ८.१३. [सं. कुंत+कार]

कोतो—पु. (कु.) पाणी काढण्याच्या लाठीचा कोळंबें अडकविण्याचा बांबू; माणगा. [का. कोट्ट=बांबूची नळी]

कोत्त—पु (तंजावरी) जुडगा; घोंस. [का ता. कोत्तु]

कोत्ता—पु. (तंजावरी) गवंडी. [ता. कोलुतुकार]

कोथ—न. (शाप.) सडणें; कुजणें. (इं.) डिकांपोझिशन. –शिल्पवि १०१.१०२. [सं. कुथ्=कुजणें]

कोथंबरी–बिरी–बीर, कोथिंबरी–बिरी–बीर, कोथमीर, कोथरीब—स्त्री.१ धन्याचें रोप. हें उगवून कोथिंबीर होण्यास १५ दिवस लागतात. धने करावयाचे असल्यास ५–६ महिने लागतात. कोथिंबीर कोंवळी असतांना तिचीं पानें व दांडे भाजीपाल्यांत घालतात. यांचा एक विशेष स्वाद असतो. धने मसाल्याच्या उपयोगी आहेत. (बा.) सांबार. २ धने. [सं. कुस्तुंबरी; प्रा. कुत्थुंभरी] **०भात**–पु. (कों. कु.) भाता(साळी)ची एक जात. **०देवी**–स्त्री. (अव. कोथिंबिऱ्या) देवीच्या रोगाचा एक प्रकार. **०वाळी**–स्त्री. कानांत घालावयाच्या बाळ्यांचा एक प्रकार. याला कोथंबिरीच्या दाण्याच्या आकाराचे मोत्यांचे घोस जोडलेले असतात. 'कोथिंबिरी टोपण घोंसबाळ्या।'–सारुह ६.२४. 'फुलें इल कोथिंबिरी घोंसबाळी।' –अकक भस्मासुराख्यान ३१. 'बोंड बाळ्या कोथिंबिरीबाळ्या बहुत सुंदर।' –अफला ५५.

कोथळा—पु. १ मोठें पोतें; थैला (धान्याचा, दारूचा). 'माझ्या हातांतली चूड इथल्या कोथळ्याला लावली कीं पुरे!' –सूर्योदय १७६. २ मोठा माणग्याचा कणगा, पालटें (धान्य ठेवण्याचें); मध्यें रुंद व वर निमुळतें, सामान्यतः एका प्रकारच्या बरणीसारखें, धान्य वगैरे ठेवण्यासाठीं केलेलें मातीचें भांडें. 'जैसें धान्यें कोथळेयामध्यें साटविती।' –ऋ ७५. टीप. ३ पोट (पक्वाशय); पोटांतील कोठा; पोटांतील कोळ्याभोंवतालचें मांसाचें आवरण. ४ शरीरांतील कोणतीहि पिशवी, कोश. जसे–अन्नाचा कोथळा; मूत्राचा कोथळा; मळाचा कोथळा. 'पोटीं दक्षिणभागी मळाचा कोथळा।' ५ भोत (उशीचा); खोळ; अभ्रा. ६ पोट; भोंसकल्यामुळें पोटांतून बाहेर पडलेलें आंतडें. ७ जनावरें वितांना बाहेर पडणारीं आंतडीं, गुह्यभाग

८ कबंध; धड. 'मस्तक करूनिया भिन्न । कोथळे भूमी पाडिले.' –मुवन १४.४९. [सं. कोष्ठ+ल; प्रा. कोत्थल]

कोथळी—स्त्री. १ लहान कोथळा; रांजण; मातीची कणगी. इतर बहुतेक अर्थ कोथळ्याप्रमाणें. २ (व.) हावरी अथवा तिळाच्या झाडांची गंजी. ३ (व. ना.) महालक्ष्मीचा मुखवटा बसविण्याकरतां केलेली मातीची वाटोळी व पोकळ उंच बैठक; खापराचें धड.

कोथळी—स्त्री. मुंबई ६ मणांची गोणी. ६७२० सुरती भारांचें वजन. –मुंव्या १०५.

कोथा—पु. (कु.) पाणी काढण्याच्या लाठीच्या कोळंब्याची काठी; ओकतीची काठी. कोतो पहा.

कोथिंमेथें—न. (कों.) धने, हिंग, मेथी इ० जिन्नसांचा समुच्चय. [कोथिंबीर(धने)+मेथ्या]

कोथेर-रें—न. एक प्रकारचें गवत.

कोंद—स्त्री. भाजलेले तीळ कुटून त्यांत गूळ घालून तयार केलेलें पुरण; लाह इ०. 'तिळाच्या कोंदेची पोळी.' –पाक ५४.

कोंद—पु. (व.) तांदुळाचा कोंडा. [कोंडा]

कोंद(दा)ट—वि. चोहोंकडून हवा येण्यास प्रतिबंध असलेली; आडोशाची; कोंडमाऱ्याची (खोली, जागा). [कोंदणें]

कोदंड—न. १ धनुष्य. 'आतां कोदंड घेऊनि हातीं। आरूढ पां इयें रथीं।' –ज्ञा ३.१८९. २ (ल.) भ्रूकोदंड; भुंवई. ३ (ल.) मोठें संकट (रावणाच्या छातीवर शिवकोदंड पडल्यानें तो कासावीस झाला त्यावरून). रामकोदंड पहा. [सं.]

कोदंड—वि. उद्धट; दांडगा; भांडखोर; वेपर्वा.

कोंदण—न. १ अलंकारावर रत्नें बसविण्यासाठीं केलेलें घर, बैठक, जेडा. 'सौंदर्य हें साधुवृत्तीच्या कोंदणांत अधिकच सुंदर दिसतें.' –नीति ८६. २ रत्नें बसविण्यासाठीं काढलेली सोन्याची तार किंवा पत्रा. [कोंदणें; तुल० का. कुदन=सोनें] **०पट्टी**—स्त्री. कोंदण बसविण्याकरितां तयार केलेली सोन्याची पट्टी, पत्रा.

कोंदणें—उक्रि. १ जोरानें आंत भरणें; दाबणें; कोंबणें; खच्चून, ठासून भरणें (धुरानें घर, मेघांच्या गडगडाटानें आकाश, आनंदातिशयानें मनुष्य इ०). 'हहीं दोहींचि परि संसारु। कोंदला असे।'–ज्ञा १५.४७६. 'तंव अंगधारें कोंदली सृष्टी।'–मुआदि ३६.५४. 'नादें अंबर कोंदलें' –भूपाळी ३०. २ बंद होणें; छिद्र, भोंक बुजणें. 'पडशानें नाक कोंदलें.'

कोंदया—पु. (व.) कुंड (भांडें) [कोडी?]

कोंदरणें—क्रि. (बे.) उकरणें. [सं. कु=पृथ्वी+द=विदारणें]

कोंदरा—वि. (नंदभाषा) चोरटा. 'तो दन (मनुष्य) कोंदरा आहे.'

कोंदा—पु. हलकें व घाणीचें काम; काबाडकष्टाचें काम; कुत्तेघांशी. बहुधा अव. प्रयोग–कोंदे. (क्रि० करणें; निपटणें; उपसणें; करणें; पडणें अक्रि.). उदा० 'बाळंतपणाचा–दुखणेकऱ्याचा–पोरांचा–म्हाताऱ्याचा–संसाराचा–चाकराचा कोंदा मी उपसतों.' [क्षुद्र?]

कोंदाकोंदी—स्त्री. दाटी; खेंचाखेंच; भीड; गर्दी. 'माझारींचि कोंदाकोंदी।' –ज्ञा १५.१५६. [कोंदणें]

कोंदाट—स्त्री. विपुलता; पूर्णता; दाटी. 'कर्पूरकेळींचीं गर्भपुटें। उकलतां कापुराचेनि कोंदाटें।'–ज्ञा ११.२५०. –वि. कोंदट पहा.

कोंदाटणें—उक्रि. गच्च भरणें; एके ठिकाणीं गर्दी करणें; ठांसून भरणें; कोंबणें. 'तेजें कोंदाटलिया दिशा। जयाचेनि।' –ज्ञा १.१३९. 'कोंदाटलें पुढें।परब्रह्म सांवळें।'–तुगा २२४०. –अक्रि. कोंदणें पहा. [कोंदणें]

कोंदा(द्)वणें—अक्रि. १ (कुण. राजा. कु.) गुदप्रक्षालन करणें. २ कोंदा उपसणें, करणें. कोंदा पहा.

कोंदी—स्त्री. कोन; भिंतीची सांध किंवा जोड. बहुधा सांधीकोंदी असा जोड शब्द येतो. [कोंदणें]

कोंदुणें—अक्रि. (कु.) ढुंगण धुणें. कोंदावणें अर्थ १ पहा.

कोंद्रव, कोंद्रू—पु. एक प्रकारचें हलकें धान्य; हरीक. हें सर्व धान्यांतील हलकें धान्य असून गरिबाशिवाय दुसरे कोणी खात नाहींत. हें कितीहि निकस जमिनींत पिकतें. [सं. कोद्रव]

कोन—पु. १ कोंपरा. २ प्रसूति; बाळंतपण (ह्या प्रसंगीं स्त्री घराच्या कोपऱ्यांत–बाजूला जाते यावरून). 'तिचा कोनचांगला म्हणून लवकर बाळंतीण होती' ३ बाळंतिणीचीं वस्त्रें, खाटलें, भांडीकुंडीं इ० सामान; बाळंतें. ४ (वे.) ठेवण्याची, राहाण्याची जागा. 'देवाचा कोन'=देवघर. ५ (यंत्र. भूमिति) दोन रेषा तिरकस येऊन एका बिंदूत एकत्र होतात ती आकृति. याचे लघुकोन, काटकोन, विशालकोन असे प्रकार आहेत. (इं.) अँगल. [सं. कोण] (वाप्र.) **०होणें, निघणें**–(व.) बाळंत होणें; प्रसूत होणें. (विप्र.) **कोनीं निघणें, कोन येणें**–बाळंत होणें. हे प्रयोग सर्वमान्य आहेत. 'मग ते गरोदर होऊनि कोनीं निघाली' –पंच ४३. तंजावराकडे **कोन्नी–घेणें, जाणें**–असें म्हणतात. [फ्रें. जि. कुनि] सामाशब्द– **०कोंपरा, कोनाकोपरा**–पु. १ सांधीकोंदी; एका कडेची बाजू; अडगळ; सहज लक्षांत न येणारी जागा. 'वस्तु कोठें कोनाकोपऱ्यास पडली असेल ती पाहून आण.' २ टेंगुळ; पुढें आलेला फुगीर (भाग). 'भिंतीला कोठें कोनाकोपरा वाढला असेल तर छाटून टाक. [कोन+कोपरा] **कोन्याकोपऱ्याचा**–वि. १ सांधीकोंदींतला; कोठला तरी. २ (ल.) क्षुद्र; हलका. **कोनटा**–पु. १ (व.ना.) कोपरा.

२ घरांतील अंधारी जागा. [कोन हिं. कनौठा] **कोनडा-डें, कोनाडा-डें**–पुन. सामान ठेवण्याकरतां भिंतींत ठेवलेलें छिद्र, जागा; देवळी; गोखला. **०पट**–न. (कोनचें हीनत्वदर्शक रूप) १ कोंपरा. २ (ल.) एकीकडची, एकांताची जागा; आड बाजू. **०पडा, कोनपा**–पु. कोनपट पहा. **०पालट**–पु. १ दुखणेंकऱ्यास आराम पडण्यासाठीं निजण्याची जागा बदलणें. २ व्यालेल्या मांजरीनें आपल्या पिलांचें स्थलांतर करणें. [कोन+पालटणें] **०पिका-पीक**–वि. कोणपिका पहा. **०फळी**–स्त्री. (कों.) दोन भितीच्या कोपऱ्यांत बसविलेली फळी. **०बिंदु**–पु. (भूमिति) त्रिकोणाचा शिरोबिंदु (इं.) व्हरटेक्स. कोणबिंदु पहा. **०मापक**–पु. कोन मापण्याचें हत्यार. (इं.) प्रोट्रॅक्टर. **०वासा**–पु. (कों.) घराच्या दोन पाख्यांच्या सांध्यावर आडव्यापासून छपराच्या कोपऱ्यापर्यंत घातलेला मोठा वासा. **०वृत्त**–न. (ज्यो.) ईशान्य किंवा वायव्य वेधवलय किंवा वेधवृत्त.

कोन–पु. (व.) कोंडा पहा.

कोन, कोनफळ–पुन. एक कंद व त्याची वेल (हा कांदा गोराडूसारखा असतो).

कोनगें–न. (गो.) दरींतील तुटलेल्या कडयाला लागलेलें मधाचें पोळें; कोंगें; मधाच्या पोळ्याची एक जात; कोणगें.

कोनट, कोना-न्या–पु. (कों.) कुणब्यास निंदाव्यंजक शब्द. [कुणबट]

कोनटोपर–न. (व.) कानटोपी; कान्होळें. [कान+टोपडें]

कोनसो–पु (गो.) कोंपरा; कोन. [कोन]

कोना-न्या–पु. १ कोंपऱ्याचा घडीव दगड. २ घराच्या आडव्यावर किंवा कोनवाशावर घालण्याचें चापट कौल ३ कोनवांसा. [कोन] **कोनात्मक**–वि. कोनसंबंधी; कोनाचें. **कोनात्मक अंतर**–न. कोनाचें अंतर. वर्तुळाच्या भागामध्यें मोजावयाचें अंतर; वर्तुलखंड.

कोनीक–सना. (कु. हेट) कोणाला ? [कोण]

कोनें–न. हत्ती, उंट, म्हैस, गाय इ० जनावरांच्या पायांस, कानाला किंवा एखाद्या सांध्यांत होणारा एक रोग. कोणें पहा. [कोन]

कोनें बांधणें–क्रि. (माण.) अंबाडीच्या काडयांची जुडगीं, बिंडे बांधणें. [का. कोने=झाडाची फांदी, काटकी]

कोन्टा–पु. (ना.) कोंपरा. कोनटा पहा. ' तो कोन्टयांत बसला. '

कोन्हें–न. मधाचें पोळें. कोनगें पहा.

कोप–पु. १ दुसऱ्याच्या अपराधामुळें आपल्या अंतःकरणाची होणारी रागीट वृत्ति; राग; क्रोध. ' तुमच्या कोपें कोठें जावें. ' –तुगा ११६५. २ प्रकोप पहा. ' पित्त-वात कोप. '

कोपट–वि. कोपिष्ट; रागीट; चिडखोर. **कोपास चढणें**–रागावणें; क्रोध येणें; संतापणें. ' गांगेय कोपा चढला कसा रे. ' –वामन. भीष्मप्रतिज्ञा १०. [सं.]

कोप–पुन. १ कुजलेली, गंजलेली, किडलेली, व्रणाची जागा (फळ, काष्ठ, पाषाण इत्यादीची). २ (सामा.) दोष; विकार; व्यंग. [सं. कुप्]

को(कों)प-पी, कोपट–स्त्रीन. १ झोंपडें (शेतांतील गवत पानांचें); खोंपटी; कुटी; मांडव; मंडपी. ' तैशी जीवेसी कोंपटी धरूनि ठाके. ' –ज्ञा १३.७८५. ' कोपटें आणि धवळारें. ' –एभा १४.२३२. २ (ल.) घर. ' तेणें हुरहुरां जळति कोंपटिआं. स्वर्गादिकांचिआं. ' –शिशु ९१३. ' लावि आंत ठाऊनि कोपट. ' –अमृ ४.४. ' म्हणौनि मठाचे दारिं कोंपि करुनि असावें. ' –पंच १.२८. ३ (ल.) शरीर. ' काय करू उपचार. कोंप मोडकी जर्जर ॥ ' –तुगा ६८२. [का. तुळु कोप्प=खोपटी, खेडें]

कोपणें–अक्रि. रागावणें. ' परि कोपेल त्रिभुवनपति. ' [कोप]

को कों)पर–पु. भुजा आणि हात यांच्या मधल्या सांध्याचें मागील टोंक. [सं. कूर्पर; प्रा. कोप्परे; गु. कोपरिंयुं] (वाप्र.) **कोपराढोपरानें करणें**–(बायकी) कसें तरी करून कष्टानें, आयासानें (घरकाम) करणें. **कोपराढोपरानें चालणें, जाणें**–मोठ्या नेटानें संकटांतून तरून जाणें; कसेबसें काम पुरें पाडणें (कमजोर, अशक्तता असतांना). **कोपरापासून हात जोडणें**–अति कळवळ्यानें विनविणें. **कोपरापासून नमस्कार**–१ वरील अर्थ २ संबंध नसावा अशा अर्थी. ' असल्या नाटक्यांना कोपरापासून नमस्कार असो. ' **म्ह**० १ मऊ सांपडलें म्हणून कोपरानें खणूं नये. किंवा २ मऊ-नरम लागलें म्हणजे कोपरानें खणणें= गरीब मनुष्य सांपडला म्हणजे त्याचा फार फायदा घेणें. सामाशब्द–**०काऱ्या**–स्त्री. वांकडया पात्याची काऱ्या. शस्त्रक्रियेंत हिचा उपयोग असतो. **०ख(खि)ळी**–स्त्री. १ कोपरानें मारलेली दुसणी, ढुसकणी. (क्रि. मारणें; येणें). २ कोपरानें पाडलेला खेळगा. (हा गुराख्यांचा खेळ असतो. अशा खेळण्यांत तीं पोरें गोटयांनीं खेलतात. (क्रि० पाडणें). ३ (ल.) लेखांत, भाषणांत उगाच दुसऱ्यावर घेतलेलें तोंडसुख; जातां जातां, सहजासहजीं एखाद्याविरुद्ध बोलणें. **०घुसणी**–स्त्री. (गोटयांच्या खेळांतील एक शब्द) कोपरानें गोटी गल्लींत घालणें. कानघुसणी पहा. **०मोड**–वि. (व.) कोपरासारखी मोडलेली (जागा). **०वाळी**–स्त्री. (व.)बाजू बंद; एक दागिना. [कोपर+वाळा]

कोपर-रा-री, कोहोपरा–पुस्त्री. (व. ना.) भाकरीचें पीठ मळावयाची मोठी परात (तांब्यापितळेची); थाळी; सनकी; पितळी. लहान कोपराला कोपरी म्हणतात. (कु.) कोपरो= हंडा; रुंद तोंडाचें भांडें. [सं. खर्पर]

कोपरबरास-ब्रास—न. १ तांबे व पितळ यांची मिश्र धातु. २ (कु.) टीनची धातु. कोपरबरासचा डबा=केरोसिनचा (टिनचा) डबा. ३ जर्मनसिल्व्हरला म्हणतात. [इं. कॉपर+ब्रास]

कोपरा—पु. लहान लोखंडी कढई. कोपर-रा पहा.

को(कों)परा—पु. १ कोन; उपदिशा. २ (वास्तु.) दोन भिंतींच्या सांध्यांतील दर्शनी काटकोनांतील चौरस दगड. [सं. कूपर; प्रा. कोप्पर] **०धरणें**-(वायकी) १ रुसणें. २ विटाळशी होणें.

को(कों)परी—स्त्री. १ तळहातापासून कोंपरापर्यंत ४० अगर जास्त वेढे देऊन सुंभ इत्यादि दोरीची केलेली गुंडाळी. २ गोटयांच्या खेळांतील एक संज्ञा, डाव लागला म्हणजे नियमित स्थळापासून गोटी कोपराकोपरानें उडवीत गल्लीमध्ये आणून टाकणें. ३ नखुरडें. ४ कोपराजवळ येणारी सूज; एक रोग. ५ कोपरापावेतों बाह्या असलेली बंडी, अंगरखा. 'अंगांत रेशमी कोपरी.' -हाकांध २११. [कोपर]

कोपल-फल—न. एक प्रकारचें तेल, व्हार्निश. 'रोगणाचा उपयोग करणें झाल्यास कोपल रोगणाचा उपयोग करावा' -मॅरट २५. -सेंपु २.७५.

कोपळी, कोपई, कोपी—स्त्री. (व.) कटिरी झुडुप.

कोपळें—न. (व.) कोपळी तोडण्याचें हत्यार.

कोपायमान—वि. रागावलेला; संतप्त. [सं. कुप्यमान]

कोपिष्ट, कोपी—वि. ज्यास लवकर राग येतो असा; शीघ्रसंतापी.

कोपी—स्त्री. शेतांतील झोपडें; खोपट. कोप ट पहा. 'आश्रमासी स्थान कोपी गुहा।' -तुगा २७२५. [का. कोप्प-प्पी]

कोपीण-न—नस्त्री. लंगोटी. (क्रि० नेसणें). 'नेसोनि कोपीन शुभ्रवस्त्र जाण।' -तुगा २८३०. [सं. कौपीन]

कोफता—पु. गोळा (स्वयंपाकांतील). 'खेम्याचे कोफते म्हणजे गोळे करून...' -गृशि २.१०. [फा. कोफ्ता=कुटलेला गोळा (मांसाचा)]

कोंब—पु. १ कोम; झाडाचा धुमारा (केळीच्या कांद्यापासून निघणारा पासंबा). 'बाळार्क कंदा निघाले कोंब। तैसे रत्नमणींचे खांब।' -मुसभा २.८ २ अंकुर; मोड. 'विपरीत ज्ञानाचा कोंब फुटे।' -विउ ३.७. ३ (गो.) पालखीचा वांकलेला दांडा. [सं. कंबी; का. कौंबु=शिंग, फांदी]

कोंबट—वि. कोमट; उबट; सोमळ; किंचित् उष्ण; साधारण ऊन. (शरीर, वस्तु, इ० स लावतात, हवेसंबंधी योजीत नाहींत). [सं. कोष्ण; कवोष्ण ?]

कोंबडसाद-पहाट—स्त्री. कोंबडा आरवण्याची वेळ; पहाट.

कोंबडसादीं—क्रिवि. (कों.) कोंबडा आरवण्याच्या वेळीं; अगदीं पहाटें [कोंबडा+साद]

कोंबडा—पु. १ एक पाळींव पक्षी; मुरगा. याचा रंग चित्रविचित्र असून डोक्यास तुरा असतो व गळ्यास कल्ले असतात. यांचें मांस खातात. २ फुगडीचा एक प्रकार. गाणें- 'जिजीबाईचा कोंबडा आला माझ्या दारीं, घालीन चारा पाजीन पाणी' इ० **म्ह०** १ (म्हातारीनें, शेजारणीनें) कोंबडा झांकला म्हणून उजडावयाचें (तांबडें फुटावयाचें) रहात नाहीं. २ कोंबडा नेला डोंगरा म्हणून का दिवस उगवत नाहीं. =जी गोष्ट व्हावयाची ती क्षुल्लक अडथळ्यानें टळत नाहीं. स्वाभाविक परिणाम व्हावयाचाच. **कोंबडी**—स्त्री. कोंबडयाची मादी ही बाराहि महिने अंडीं घालते व एकवीस दिवसांत अंडीं उबवून पिलें बाहेर काढते. **कोंबडें**—न. १ कोंबडयाचें लहान पिलूं. २ ढुंगांतील तांबूस पट्टे; पाऊस पडण्याचें चिन्ह. (वाप्र.) **दाणे टाकून कोंबडे झुंजविणें**-मुद्दाम पदरचें खर्चून भांडणें लावणें. **०आरणें**-न. कोंबडा आरवण्याची वेळ. **कोंबडेरात-रात्र**-स्त्री. पहांटे चार वाजण्याची वेळ.

कोंबडा—पु. चंद्राभोंवतीं पडलेलें खळें.

कोंबणें—उक्रि. १ ठासून भरणें; गच्च भरणें; ठासणें. २ बदडणें; कुबलणें.

कोंबणें—अक्रि. कोमेजणें; वाळणें; निस्तेज होणें.

कोंबणें, कोंबवणें—अक्रि. कोंब, अंकुर फुटणें; मोड येणें. [कोंब]

कोंब(बा)रा—पु. कोंब, अंकुर. 'मुळीं सुवासना विघती आरा। घेऊनी फुटती कोंबारा।' -ज्ञा १५.१८४.

कोंब(म)री—स्त्री. (गो.) कोंब पहा.

कोंबरो—पु. (कु.) मातीचें एक भांडें. [सं. खर्पर; म. खापर]

कोंबलें—न. आंबे काढण्याकरतां काठीला जाळें बांधतात तें; घळ; झील; झेलगें; झेला.

कोंबलेबारक, कोंबरब्राक—न. टिन धातु; कोपरबरास पहा. कोंबलेबारकचा डबा=राकेलचा, टीनचा डबा.

कोंबा—पु. (वास्तु.) चुना, माती, कांक्रीट, सिमेंट, शेळीच्या लेंडया इ० चें मिश्रण. ह्यानें भुई, गच्ची तयार करतात.

कोंबा—पु. (गो. कों.) कोंबडा. -स्त्रिपु.

कोंबा—पु. (कों.) अंकुर; कोंब पहा.

कोंबाया—स्त्रीअव. (व.) कलकल करणाऱ्या बाया-स्त्रिया.

कोंबाळ—पु. (चि.) १ फारसें काम न करणारा मुलगा, म्हातारा, इ० निरुपयोगी समुदाय. २ सटरफटर वस्तु. -मसाप २.१०७.

कोबी, कोब—स्त्री. एक पानांचा गड्डा; भाजी; ही युरोपियांनीं आणलेली असुन हिचे तीन-चार प्रकार आहेत. जिचा-गड्डा जड ती उत्तम. ही थंडीच्या दिवसांत तयार होते हिला जमीन चांगली लागते. हिच्या हाळी (लवकर होणारी) व गरी (उशीरां होणारी) अशा दोन जाती आहेत. करम, करमाची भाजी असेंहि म्हणतात. (गो.) कोबू. [पोर्तु. कोजवे; इं. कॅबेज]

कोंबी—स्त्री. १ लहान कोंब. कोंब पहा. २ (गो.) कोंबडी पहा.

कोबीट—न. फाळ नसुन बोंडशी असलेला बाण, तीर.

कोंबू—न. एक वाद्य. –वेहु ३८.

कोबेणें, कोबेवणें—अक्रि. (राजा. गो.) कोंब येणें; अंकुर फुटणें. कोंबणें पहा. [कोंब]

कोंबो—पु. (कु) कोंबा; कोंबडा पहा.

कोंभ(म)—पु. अंकुर. कोंब पहा. 'कां रत्नबीजा निघाले कोंभ.' –ज्ञा ६.२५३. 'प्रथम कोंभरिया उपक्रम.' –सिसं ४. ७६.

कोंभ—पु. स्तंभ; खांब. 'डोळे फिरवी गरगरां दांत खाया करकरा कोंभाचि कचकावला.' –भज १२८. [कोंब]

कोंभ—पु. डांग; वन; अरण्य. एकांतजागा; सांधीकुंदी. 'उदैजेति परबिंबीं. कळि कोळिगा राहिला कोंभीं.' –ऋ ९०.

कोंभणें—क्रि. अंकुर येणें; कोंब येणें; कोबेणें; उत्पन्न होणें. 'तंव दोर्दंडीं जैसें. आकाश कोंभेलें.' –ज्ञा ११.२६६. [कोंब]

कोंभ(भा)रा—पु. कोंब पहा.

कोंभा—पु. (व. ना.) ठोसा; गुद्दा; कोपराखळी.

कांभा—पु. (कों.) माडाचा रोपा. [कोंब]

कोम—हा शब्दव यानें आरंभ होणारे शब्द कोंब खालीं पहा.

कोम—स्त्री. १ कागदपत्रांत विधवेच्या नांवापुढें व तिच्या नवऱ्याच्या नांवामागें हा शब्द योजतात. जसें–ज्ञानकीबाई कोम रामजीपंत. ज्या जातींत पाट लावण्याची चाल नाहीं अशा ब्राह्मण जातींत हा शब्द वापरतात व ज्या जातींत पाट लावतात अशा कुणबी व शूद्र जातींत कोम ऐवजीं 'जवजे' हा शब्द वापरतात. कोम च्या अर्थाबद्दल बराच मतभेद आहे. कित्येकांच्या मतें जवजे, वलद, विन यासारखाच याचा अर्थ होतो. म्हणजे 'ची बायको,' व कित्येकांच्या मतें. 'जिचा नवरा अमुक' असा अर्थ होतो. २ जात. [अर. कौम्=जात, कुटुंब]

कोमजणें—अक्रि. सुकणें; वाळणें (फूल); झडणें; अशक्त होणें; क्षीण होणें. [कोमगें]

कोमट—कोंबट पहा.

कोमटी—पु. १ कर्नाटकांतील वैश्य जात व तींतील माणूस. २ (ल.) सोंवळें-ओवळें नसणारा; अधार्मिक; नास्तिक. 'मेला आवें.' –तुगो ११६५. ३ [का.]

कोमडा-डी-डें—कोंबडा पहा.

कोमणें—उक्रि. ठासुन भरणें; कोंबणें पहा.

कोमणें, कोमाइ(य)णें—अक्रि. कोमजणें पहा. 'कोमुन जातां तरी मला तूं फेंकुन दिधलें असतें.' –टिक ३९. 'म्हणोनी कृपा आकलिला. दिसतसे अति कोमाइला.' –ज्ञा २.४; –संवि १३.१७. 'कोमाइलें श्रीरामवदन. तों येतां देखिला लक्ष्मण.' [सं. कु+म्लान; प्रा. दे. कुम्मण=म्लान]

कोमल-ळ—वि. १ मृदु; सुकुमार; नाजुक; सुंदर. २ गरीब; सौम्य; हळव्या मनाचा. ३ मृदु; मधुर; रमणीय (शब्द, नांव, आवाज). 'रामनाम जपे कोमल.' कोमलच्या उलट कठोर. [सं.] **०चित्ताचा** किंवा **चित्ताचा कोमल**–वि. कोंवळया, हळव्या मनाचा; दयार्द्र मनाचा, अंतःकरणाचा. **०ऋषभ**–पु. (संगीत) पांच विकृत स्वरांपैकीं पहिला स्वर; विकृतस्वर पहा. **०गांधार**–पु. पांच विकृत स्वरांपैकीं दुसरा स्वर. **०धैवत**–पु. पांच विकृत स्वरांपैकीं चौथा स्वर. **०निषाद**–पु. पांच विकृत स्वरांपैकीं पांचवा स्वर. **०मध्यम**–पु. कोमल मध्यम व शुद्ध मध्यम हे ध्वनीनें एकच आहेत. नामभेद मात्र आहेत. मध्यम शब्द पहा. **०स्वर**–पु. (संगीत) शुद्ध स्वरांपेक्षां ध्वनीनें नीच स्वर. हल्लींच्या संगीत पद्धतींत कोमल स्वर पांच मानतात. (कोमळ) ऋषभ, गांधार, मध्यम, धैवत, निषाद.

कोमलणें-मायणें-मावणें-मेजणें—अक्रि. १ कोमणें; कोमाइणें; कोमजणें; निस्तेज होणें. 'ब्रह्मादिसुखें कोमाये.' –भाए १७५. 'बहुत कोमावली पहावेना दृष्टिंगें उभयांला.' –ऐपो ३९९. २ द्रवणें; सद्गदित होणें. 'माझें तोंड उतरलेलें पाहून हा फारच कोमावला.' –बाळ २.१८. [कोमल]

कोमलॉ—पु. (गो.) कोंबडा.

कोमार—न. १ तरुणपण; कौमार्य. २ उत्साह; हौस. [कौमार्य] **०काड**प–(गो.) हौस उत्पन्न करणें. **०काढणें**–(कु.) कोणत्याहि गोष्टीस प्रवृत्त होणें. **०येणें**–(कु.) तारुण्यांत येणें.

कोमाळणें, कोम्हाळणें—अक्रि. (व.) प्रेमानें अंगावरून हात फिरविणें; कुरवाळणें; गोंजारणें. 'कोम्हाळलें म्हणजे कुत्र्याला बरें वाटतें.' [कोमल]

कोमेणें—कोमणें, कोमजणें पहा. 'वदनेंदु कोमेला कळाहीन वाटे सुखसंपत्ती.' –पला ४४

कोमेतुला—पु. समुद्रांतील एक प्राणी. सपक्ष, सकेश तारा. –प्राणिमो १३९.

कोय—पु (आगरी) डोंगर. 'कोयाला चमकल्या विजा.' [फा. कोह्=पर्वत]

कोय—स्त्री. १ आंब्याच्या फळांतील बाठा, बाठी; आठी; अठळी; बीज. २ वरील बाठींतील गर; बाठीच्या पोटीं असणारा

दोन अवयवरूपी अंश. ३ (ल.) अंडकुली. ४ ताडफळाच्या गिरावरील कवची. ५ आंब्याच्या अर्ध्या बाठीची भिंगरी [?]

कोयकमळ—न. श्वेतकमळ; कुवलय. [सं. कुवलय; हिं. कुई+कमळ]

कोयकोय, कोंयकोंय—स्त्री. कुत्र्याचें किंवा त्याच्या पिल्लाचें भुकणें, ओरडणें; क्यांव क्यांव करणें. [ध्व.]

कोयका—पु गुन्हेगार जातींतील पोलीस या अर्थाचा शब्द. –गुजा ४२.४३. ०नाई-पु. पोलीस शिपाई.

कोयंडा—पु. (राजा.) आंब्यांतील कोय. [कोय]

कोयंडा—पु. १ दाराची कडी अडकविण्याचें गोलाकार अडकण; वांकवून दुहेरी केलेला खिळा. २ कडींत घालावयाचा खिळा; अडसर; आंकडा; हूक. ३ (क.) लांब आयुडाचा लांकडी दांडा. ४ फांसा (नथ, हूल इ० चा). ५ कोल दांडा (मनुष्याला किंवा गुराला घालण्याचा) हातास बांधून त्यामध्यें घातलेला. ६ (कु.) एका खेळांतील वांकडी काठी (गुराखी हा खेळ खेळतात).

कोयंडी—स्त्री. १ गुरें दावें चावून तोडतात म्हणून एका दांडघास दोन कान्या लावून बांधण्याची केलेली व्यवस्था. २ शिक्षा व्हावी म्हणून हात वगैरेनां कळ लागण्यासाठीं ज्या टिपऱ्या लावतात त्यांपैकीं प्रत्येक.

कोयंडी, कोंयडो—स्त्रीपु. (गो.) विहिरीच्या दोराचा फांस.

कोयडें—न. कुवेडें पहा.

कोयडेबार—न. (गो.) विटीदांडूचा खेळ.

कोयंडो, कोंयडो—पु. (गो. क.) दांडू. [कोयंडा]

कोयतट— न. आंब्यांतील कोयीला तिरस्कारार्थी म्हणतात [कोय+तट प्रत्यय]

कोयतपट्टी—स्त्री. जी जमीन नांगरटी करण्यास योग्य नसल्यानें हातांनींच कसतात तेव्हां कोयत्यांच्या संख्येप्रमाणें अशा जमीनीवर पट्टी बसवितात ती. [कोयता+पट्टी]

कोयता—पु. लांकूड तोडण्याचें एक हत्यार; विळा. (गो.) कोयतो. ' मी हिवाने मेलो घे माझो कोयतो । ' –भज ८. [का. कोय=कापणें; कोयित=विळा]

कोयतालू—न. (बे.) शेताच्या कडेची जमीन.

कोयती—स्त्री. लहान कोयता. कोंकणांत भात कापण्याच्या कोयतीला करवतीसारखे दांते असतात, तिला दांती कोयती असेंहि म्हणतात.

कोयतें-तूल—न. (राजा.) लहान कोयता, कोयती.

कायतेघाल—स्त्री. ज्या बालाच्या शेंगा कोयतीच्या आकाराच्या असतात ते; खरसांबळ.

कोयनळ, कोळिंदर—पु. (कों.) दोन रुखांवर खुंटया मारून त्यांवर एक आडवें लांकूड मारतात त्यास कोयनळ म्हणतात. कोयनळावर कोळंब्याची एक बाजू टेकलेली असते. [कों.]

कोयनाटकी—स्त्री. कोयीची केलेली भिंगरी;कोकाटी;कोय.

कोयनाटकी—वि. (कोयीनें तुष्ट होणारा) कंजुष, कृपण. [कोय+नटणें]

कोयनेल—न. तापावरचे एक ओषध; सिंकोना सालींचें सत्त्व. [इं. क्वीनीन]

कोयपाणी—न. गुळळया व पाणी (चोथापाणी) झालेलें (शितडापाण्याचें) दहीं. [कोय+पाणी]

कोयम—न. (कु) एक पक्षी.

कोयमे—न. (खा.) ताक करावयाचें मडकें. कोळंबें पहा.

कोयर—पु. (गो.) केर; उकिरडा. ०**सिताडो**-पु. शेणपोतेरें.

कोयरी—स्त्री. १ चांदीच्या पत्र्याची, सपाट अगर पसरट आकाराची, साधी अगर नक्षी केलेली अशी डबी. ही मधोमध कापलेल्या आंब्याच्या छेदासारखी दिसते. हींत हळदकुंकू ठेवण्यासाठीं दोन-तीन पुडें असतात; हळदकुंकवाचा करंडा; डबी; कुयरी. २ (अव. कोयऱ्या) झीक व टिकली यांचें कोयरीच्या आकाराचें विणकाम. ३ आंबेघाटी कोयरीच्या आकाराचीं टोपणें, मणी, धागऱ्या जींत ओंविली आहेत असा दागिना; कमरपट्टा; माळ इ०. **कोयरीची माळ**-स्त्री. चांदीच्या कोयरीच्या आकाराच्या मण्यांची माळ. घोडयाचा दागिना.

कोयल—न. (बे.) नांगरतांना चुकलेली जागा.

कोयल-याळ, कोईळ—स्त्री. कोकिळा. ' मंजूल शब्द जशि टाहो करिति कोयाळ । ' –अफला ५४. ' कंठामधीं कोयाळ मधुर बोलणें रंग गोरटा । ' –होला १०४. [सं. कोकिल; प्रा. कोइल; हिं. कोयल]

कोया—पु. १ एक पक्षी. २ या पक्ष्याचें केंविलवाणें ओरडणें, ध्वनि, शब्द. ०**कोया करणें-करीत हिंडणें**-१ कींव येण्याजोगी याचना, विनवणी करणें (अन्न इ० करितां). २ कंगाल होऊन भटकत फिरणें. [ध्व.]

कोयाडें—न. पिके व आंबट आंबे उकडून गीर काढून त्यांत पाणी, गूळ व मसाला वगैरे घालून केलेला पदार्थ; आंब्याचें तोंडीलावणें. [कोय]

कोयार—पु. (व.) बेलफळ कोरून केलेला भोंवरा. [कोय+आर=भोंवरा]

कोयाळ—स्त्री. १ कोयीचें केलेलें वाद्य; पुंगी; पिपाणी. २ आंब्याच्या कोयीची भिंगरी; कोकाटी. –वि. कोय अथवा बाठा धरलेला आंबा. [कोय]

कोयाळणें—अकि. (कों.) (आंब्यानें) बाठा धरणें; आंबा कोयीनें युक्त होणें. [कोय]

कोयी—स्त्री. (न्हावी) डोक्यांतील केर काढण्यासाठीं आंब्याच्या कोयीस दांते पाडतात ती कोय.

कोर—स्त्री. १ कडा; धार; कडेची रेषा; किनारा; पदार्थाच्या कडेचा सूक्ष्म व एकसारखा धाराकार अवयव. २ (वस्त्राचा) काठ; काठाची पट्टी; (जरीची) किनार; फीत, इ०. ३ –पुस्त्री. (भाकरी–पोळीचा) चतकोर (चंद्रकोरेप्रमाणें चतकोराला कड असते त्यावरून किंवा का. कोरु=भाग यावरून). ४ –स्त्री. नखाच्या मुळाशीं असलेल्या चंद्राच्या कोरेप्रमाणें रेषा व तेथें होणारें नखुरडें. ५ रुपयाच्या एकतृतीयांशाचें एक नाणें. ६ (शिंपी) खाकेंत लावण्याचा तिकोनी तुकडा; दुशी. –शिकशि २.१४२, १४४. ७ (ना.) हजामतीचा एक प्रकार; कोर धरणें पहा. ८ हद्द; मर्यादा. ' तैसें जी न बडबडी । पदाची कोर न सांडी । ' –ज्ञा १३.८५३. [हिं. गु. कोर; तुल० का. कोरु=भाग; द्रा. ओरम=कड; लॅ. ओरा=कांठ] **०धरणें**–कपाळावरील केंस चंद्राच्या कोरीप्रमाणें ठेवणें, राखणें; तशी हजामत करणें. **०दार**–वि. कंगणीदार. 'मृदुतर थिरमे त्या कोंचक्या कोरदारा । ' –सारुह ३.४०. **०दृष्टि**–स्त्री. तिरपी नजर; चोराची नजर; चोरून पहाणें, न्याहाळणें. 'कोरदृष्टीनें असावें पहात । ' –कथा १.६.१९६. **०पट्टी**–स्त्री. वेलबुट्टी व कशिदा काढलेला काठ; ही कापडास स्वतंत्रपणें जोडतात. **०भर**–वि. चतकोराएवढी.

कोर—स्त्री. मत्सर; द्वेष; बरकस. [अर. कुन्हा] **०धरणें**–द्वेष करणें. ' मानकऱ्यानें कोर धरली । ' –ऐपो २८७. **०बंद**–वि. चिडखोर; त्राशिक. **०बंदी**–स्त्री. बरकस; द्वेष

कोर—स्त्री. शिपायांची. तुकडी, रांग. [इं. कोअर] **०बंदी**–स्त्री. एका ओळींत सैन्याची रचना करणें. ' त्या बाबा फडक्याची कोरबंदी न्यारी । ' –ऐपो २८१.

कोरक—न. एक भाजी. –शर (ना पृ २०८.)

कोरका—पु. (नंदभाषा) स्तंभ; हुंडी; वही; कागद.

कोरका—पु. (व.) (भाकरीचा) तुकडा, कोर. ' मला भाकरीचा कोरका वाढ '

कोरकांगुणी-गोणी—स्त्री. एक प्रकारचें धान्य. कांगुणी पहा. [कोर+कांगुणी]

कोरकांडें—न. (कों.) कोरफड. (सं.) घृतकुमारी; कन्याकुमारी. [सं. कुमारी–कुंवार–कोर+कांड]

कोरकापी—स्त्री. (कों.) सुतारांचें नक्षी कामाचें एक हत्यार. [कोरणें+कापणें]

कोरकू—स्त्री. (व.) मेळघाटांतील एक रानटी जात; पहाडी जात.

कोरकें—न. कोरडें अन्न. ' तळणवळण केलें कोरकें सिद्ध जालें । ' –सारुह ६.७२.

कोरखडी—स्त्री. एक प्रकारचा खडू. हा शिंपी लोक कापडावर खुणा करण्यासाठीं वापरतत.

कोरगिरी—कोरबंदी पहा.

कोरगू—पु. खेडयांतील एक बलुत्या; प्रवाश्यांची बडदास्त ठेवण्याचें काम याच्याकडे असे. कोरभू पहा.

कोरट—स्त्री. कांतलेलें पण कच्चें (न उकललेलें) रेशीम. [हिं. कोरा=सार्धे रेशीम ?]

कोरट—न. कोर्ट; न्यायकचेरी. ' कोरटकचेरी ' [इं. कोर्ट]

कोरंटा-टी—पुस्त्री. एक फुलझाड. कोरांटा-टी पहा. –शे ७.२८.

कोरटाण—स्त्री. (कों.) कोरेपणाची घाण, वास (**कपडे, मडकीं** वगैरेस येणारी). [कोरा+घाण]

कोरड—स्त्री. १ तोंड अथवा घसा यास पडलेला शोष (आजार, उपास, भय वगैरे प्रसंगीं), तोंड वाळणें; कंठशोष. (क्रि० पडणें; येणें). २ (सामा.) शुष्कपणा; ओलेपणा नसणें. (क्रि० पडणें). [का. कोरगु=वाळणें, शुष्क होणें] **०वळणें, वाळणें**–क्षुधेनें व्याकुळ होणें (जेवणास उशीर झाला असतां).

कोरड—स्त्री. (तंजावरी) अंगण; घरापुढील उघडा ओटा. [इं. कोर्ट–कोरट]

कोरडक—न. (कों.) खालीं लोंबणारें कोळिष्टक, जळमट (घराच्या आढयाला, भिंतीला असणारें). [?]

कोरडणें—अकि. (काव्य) कोरडें पडणें; वाळणें. ' कोरडली आहे वात । आणि कोण जाईल बाजारांत । ' ' बोलायाचें पुष्कळ शक्ति न कोरडले ओंठ । ' –अनंततनयकृत माझें कुंडल (हृदयतरंग २). [कोरड]

कोरडणें—न. (बे.) ओझें आवळतांना दोरी ज्यावरून ओढून घेऊन बांधतात तो लोखंडी मणी; पुली. कोरडिकें पहा. [का. कोरडु=लांकडाचा तुकडा]

कोरडवट—स्त्री. १ जिराईत, कोरडवाहू जमीन; सुकी जागा. २ (क्रि.) जमीन; भूमी (नदी, समुद्र, सरोवर याच्या विरोधी शब्द); खुष्की [कोरडा+वत्]

कोरडवाव-वाऊ-वाही-वाहू—वि. विहीर किंवा पाट बंधाऱ्याच्या पाण्याविरहित फक्त पावसाच्या पाण्यावर पिकणारी जमीन; जिराईत; कोरडवट. –शेतकी-शेतकरी ३.२. –शे ८.१९९; १७४; ७.२२०. [कोरडा+सं. वह् किंवा म. वाव(र्)]

कोरडा—वि. १ अनार्द्र; शुष्क; जलहरित; आर्द्रताविरहित. 'ते रडे भरतही तसा रडे जोंवरी नयन होति कोरडे ।'–वामनभरत भाव १६. **म्ह० कोरडयाबरोबर ओलेंहि जळतें=अपराध्याबरोबर**

निरपराधी गरीबहि चिरडला जातो. २ नुसतें; कोरड्यास बरोबर कांहीं नसलेलें; दूध, दहीं, वगैरे पातळ पदार्थांचें कालवण नसलेलें (अन्न). ३ नक्त (जेवणाशिवाय मज़री); उक्ति. 'मला कोरडे तीन रुपये मिळतात.' ४ (लक्षणेनें निरनिराळ्या ठिकाणीं हा शब्द योजतात. –जसे) औपचारिक; शुष्क;पोकळ; वरकांती; निष्फळ; बिनहेशिलाचा; बिनकायद्याचा; निरर्थक; ओला (विशेषतः ओलाव्याचा) याच्या उलट. 'किं वेदांतज्ञानावांचून। कोरडी व्यर्थ मतिशून्य।' 'बारा वर्षे पडत होतों परंतु कोरडा.' कोरडा–आदर, मान, प्रतिष्ठा–ममता–बोलणें–व्यवहार –श्रम इ० पहा. ५ व्यर्थ, फुकट. 'हिंडणवारा कोरडा। तैसा जया' ज्ञा १३.६८९. 'कांहीं लाभावांचून कोरडी खटपट कोण करतो.' ६ (ल.) वांझ **म्ह०** 'कोरड्या अंगीं तिडका, बोडक्या डोईं लिखा.' सामाशब्द– **०अधिकार**–पु. १ नुसता पोकळ, नांवाचा अधिकार. २ बिनपगारी अम्मल, हुद्दा; बिनावेतन काम. **०अभिमान**–पु. पोकळ मिजास; रिकामा डौल; अज्ञानी अहंकार. **०आग्रह**–पु. वरवरचें आमंत्रण; इच्छा नसतांनां बाह्यात्कारें बोलावणें. पैठणी आग्रह. **०आदर**–पु औपचारिक सन्मान. मनांत कांहीं पूज्यभाव नसतां बाह्यात्कारें केलेला गौरव. (विवाहादि समारंभांत) शाब्दिक सन्मान. **०खडक**–पु. १ अतिशय कठीण, टणक खडक. खडक पहा. २ (ल.) अडाणी. ३ कोरडा पाषाण पहा. **०टांक**–वि. (अतिशयितता व्यक्त करण्यासाठीं) अतिशय शुष्क., कोरडी (नदी, विहीर, तलाव वगैरे). [कोरडा+टांक=बिंदु, कण] **०डौल**–पु. रिकामा दिमाख; खोटा बडिवार, मोठेपणा. **०दरमहा–पगार–मुशारा**–पु. नक्त वेतन (जेवणाशिवाय) **०द्वेष**–पु. विनाकारण मत्सर. **०धंदा**–पु. आंत बट्ट्याचा, बिन नफ्याचा उद्योग. **०पाषाण**–पु. १ कठीण, टणठणीत दगड. २ (ल) उपदेशाप्रमाणें आचरण न करणारा असा माणूस; चांगल्या गोष्टीचा परिणाम न झालेला माणूस. **म्ह०** लोकां सांगे ब्रह्मज्ञान। आपण कोरडा पाषाण. **०ब्रह्मज्ञानी**–वि. भोंदू; ढोंगी. स्वतः ब्रह्मज्ञानाचा अनुभव नसलेला पण लोकांना त्याचा उपदेश करणारा मनुष्य. **०मान**–पु. पोकळ, रिकामा, काम न करतां मिळणारा, दिलेला मान; कोरडा–आदर पहा. **०विचार**–पु. १ निष्फळ, निरर्थक चौकशी शोध. २ निष्क्रिय बडबड, विचार. **०विश्वास**–पु. वरवरचा विश्वास. **०व्यवहार**–पु. १ कोरडा धंदा पहा. २ रिकामा, निष्कारण उद्योग. **०सत्कार**–पु. १ पोकळ, वरवर सन्मान. २ गैरफायद्याचा मानमरातब; निरर्थक बडेजाव. **०सा**–वि. वाळल्याप्रमाणें; शुष्कप्राय. **०स्नेह**–पु. वरवरची प्रीति; पोकळ मैत्री. **कोरडेकष्ट ०श्रम**–पु. (अव.) विनाफायदा, निरर्थक श्रम; व्यर्थ मेहनत. **कोरड्या टांकाचा हिशेब–हिशोब–हिसाब**–पु. ज्यांत यत्किंचितहि फेरबदल करण्यासाठीं लेखणीचा टांक शाईंत बुडविला गेला नाहीं असा स्वच्छ, शुद्ध, विनचुक लिहिलेला जमाखर्च, तक्ता; चोख हिशेब. (क्रि० देणें; करणें) **कोरड्यास–ला, कोरड्याशास–ला, कोरड्याशास–ला**–क्रिवि. (कोरडा–याचें विभक्तीरूप) भाकर इत्यादि कोरडी खावयत नाहीं म्हणून त्याबरोबर घेण्याकरितां (तूप, वरण वगैरे पातळ कालवण); तोंडी लावण्यास (गो) कोरडघाक. –न. कालवण; तोंडीलावणें. 'आज कोरड्याशास काय केलें? –कढी केली, भाजी केली.' **कोरडी**–वि. शुष्क; वाळलेली; कोरडा पहा. सामाशब्द– **०आग**–स्त्री. भयंकर मोठी आग. याचे उलट, ओली आग =अतिवृष्टीनें होणारें नुकसान. **म्ह०** कोरडी आग पुरवते पण ओली आग पुरवत नाहीं. =पाठीवर मारलेलें चालतें पण उपासमार झालेली सोसवत नाहीं. **०ओकारी**–स्त्री. १ घशांत बोटें घालून मुद्दाम काढलेली ओकारी. सकाळीं तोंड धुतांना घशांत बोटें घालून काढलेलें खाकरे. (क्रि० देणें; काढणें). २ ओकारी येतेसें वाटणें. (क्रि० येणें). पोटांत ढवळल्याप्रमाणें होऊन मळमळ सुटते आणि थुंकी पडते, हृदयांत पीडा होते, ओकारी येते परंतु अन्न पडत नाहीं, अशा वेळीं म्हणतात. –योर १.२७७. **०सवाशीण**–स्त्री. जेवणाखेरीज ओटी भरून कुंकू लावून जिची बोळवण करतात अशी सवाशीण. ब्राह्मणेतरांच्या घरीं अशी ब्राह्मण सवाशीण बोलावितात. **०किटाळ**–स्त्री. १ (शब्दशः) कोरडी ठिणगी. २ (ल.) तोहमत; आळ. (क्रि० घालणें; उठवणें; घेणें). **०किरकिर**–स्त्री. विनाकारण कटकट, तकार, पिरपीर, भुणभुण; निष्कारण त्रास. **०खाकरी**–स्त्री. कोरडी ओकारी पहा. (क्रि० देणें, काढणें) [खाकरणें] **०चाकरी**–स्त्री. १ वेतन, मजुरी घेतल्याशिवाय चाकरी; निर्वेतन सेवा. २ रोख पैसा घेऊन जेवणाशिवाय चाकरी; कोरडा दरमहा. **०जांभई–जांभळी**–स्त्री. श्रमामुळें आलेली (झोंपेमुळें नव्हे) जांभई. **०दारू**–स्त्री. वायबाराची दारू; वायबार. **०प्रतिष्ठा**–स्त्री. औपचारिक मानसन्मान. हातीं पैसा नसतां अगर अंगांत कर्तबगारी नसतां मिरवलेला डौल. कोरडा मान पहा. **०भिक्षा**–स्त्री. तांदूळ, गहूं, वगैरे धान्याची भिक्षा (शिजविलेलें अन्न, माधुकरी शिवाय). **०ममता–माया**–स्त्री. वरकांती दाखविलेलें प्रेम; लोकाचारास्तव दाखविलेला सभ्यपणा. **०मेजवानी**–स्त्री. अल्पाशिवाय मेवामिठाईची आणि फळफळावळीची मेजवानी; उपहार. **०मैत्री**–स्त्री. वरवरचें प्रेम; अंतःकरणापासून प्रेम नाहीं अशी मैत्री. **–ड्या गाथा**–स्त्री.अव. बनावट बातम्या; भुमका; कंड्या. [कोरडी+गाथा] **कोरडें**–वि. वाळकें; निष्फळ; शुष्क. कोरडा–डी पहा. सामाशब्द– **कोरडें खाणें**–आवश्यक वस्तूंचा अभाव भासणें; आवश्यक म्हणून इच्छिणें त्यामुळें त्रास होणें (निषेधार्थी रचना). 'मी काय त्यावांचून

कोरडें खातों' =तें नाहीं म्हणून माझें नडतें कीं काय ? **०अंग**–न. वांझपणा; वांझ कुस. **०काम**–न. १ विटाळशेपर्गी व पांचवे दिवशीं न्हाऊन शुद्ध होण्यापूर्वी करावयाचें काम. 'चौथ्या दिवशीं बायका कोरडें काम करतात.' २ वेळ घालविण्याकरितां केलेलें सटरफटर काम. **०तप**–न. श्रद्धाहीन, भक्तिहीन तपश्चर्या, आराधना. 'जळो जळो त्याचा प्रताप । काय चाटावें कोरडें तप । जैसें विगतधवेचें स्वरूप । यौवन काय जाळावें ।' **०बोलणें, भाषण**–न. वरकांती, मनापासून नव्हे असें भाषण, बडबड. **०ब्रह्मज्ञान**–न. आचरण नसतां सांगितलेला वेदांत, परमार्थविद्या; बकण्यान; भोंदूपणा, ढोंग. **०वैर**–न. निराधार द्वेष, मत्सर. **०वैराग्य**–न. विषयाचा खरा तिटकारा आल्याखेरीज दाखविली जाणारी पोकळ विरक्ति; साधूपणाचें ढोंग; निवृत्तिमार्गाची बतावणी. **०सुख**–न. उपभोगाशिवाय सुख; नांवाचा आनंद. **कोरडया अंगीं तिडका**–१ गर्भ नसतां बाळंतपणाच्या वेदना भासविणें. २ ढोंग; भोंदूपणा.

कोरडा—पु. १ कातडी चाबूक; असूड. २ तडाखा, मार, फटकारा. [अर. कोर=नवी दोरी] **०ओढणें**–(पाठीवर)–चाबूक लगावणें; मारणें.

कोरडिकें-डीक, कोरडुकें, कुरडूक, कोरुडकें-रुडगें, कोडकें, काडका-कें—न. १ अडसर; अडकण (गज, दाराचें कुर्नें, कुस, तसेंच कुळव, पाभर यांचे एले किंवा कोयंडा याचे कुसूं). २ अर्धगोल किंवा अंतर्गोल लांकडी मणी, पुली (यांतून दोर ओढून घेऊन शेतकीचीं अवजारें बांधतात.). दोर तुटूं नये म्हणून हीं बांधतात. ३ सूत काढण्याच्या रहाटास बसविलेलें (कण्याच्या शेवटीं) एक लांकडी चाक. या चाकाला एक बोट जाईल असें भोंक असून त्यांत बोट घालून तें फिरविलें असतां रहाट फिरतो. ४ सनगर लोकांचें बिन चाकाचें सूत उलवण्याचें हत्यार. (कों.) कोरीटक. (वरील तिन्ही अर्थ वस्तुतः एकच आहेत परंतु स्थलपरत्वें त्याचे तीन भेद मानतात.) यांचीं भिन्न भिन्न रूपें आढळतात. [का. कोरडु]

कोरडीक—न. बैल्याला बांधलेला दोर. बैला–ली २ पहा. कोरडिकें ४ पहा.

कोरण—स्त्री. खोबण; खांच; (खिडकीच्या झडपांच्या खालच्या पट्टीतील) कोरून काढलेला भाग. [कोरणें]

कोरण-णें—न. कोरान्न; कोरडी भिक्षा. 'कोरणें मागुन झोळी भरली।' –भज ४२. 'मी कोरण भिक्षा मागत जातों काशी तीर्थांत।' –ऐपो १६०. [कोरान्न]

कोरणी-णें—स्त्रीन. १ कोरणें–धातुसाधित नाम. कोरण्याची क्रिया; खोदणी. २ कोरण्याचें हत्यार; शस्त्र (मूर्ति बनविण्याच्या, कान कोरण्याच्या कामीं उपयोगी; नालबंदी करतांना घोडयाचे खुर कोरण्याचें; मातीच्या चित्राच्या कामीं लागणारी करणी. ही पितळी, लोखंडी किंवा लांकडाची असून गुळगुळीत, सभोंवार चपटी व निमुळती गोलेट मारलेली असते. चुनाळयाची कोरणी त्याला सांखळीनें अडकाविलेली असते; ती कार्डीसारखी पण तोंडाला चापट असते. 'कान–दांत कोरणी–णें. [कोरणें]

कोरणें—उक्रि. १ एखाद्या पदार्थावरील थोडा थोडा अंश नाजुक रीतीनें काढणें; पोखरणें; खोदणें; नकसणें (आकार देण्यासाठीं किंवा आंतील भाग काढण्यासाठीं). २ कान, दांत यांतील मळ काढणें. ३ नकसकाम करणें. ४ (ल.) एखाद्याचें द्रव्य त्याला नकळत थोडेथोडें युक्तीप्रयुक्तीनें बळकाविण्याचा व्यापार, उद्योग. [का. कोरे=खोदणें, भोंक पाडणें; तुल० इं. काव्हे] (वाप्र.) **दांत कोरून पोट भरणें**–अतिशय कंजुषपणा करणें. **म्ह०** दांत कोरून पोट भरत नाहीं.

कोरणेल—पु. कर्नेल (अप.) इंग्रजी फौजेवरचा एक मोठा अंमलदार. [इं. कर्नेल]

कोरनाड—वि. (तंजा.) या पेठेच्या साड्या व लुगडीं (रेशमी, जरीचीं). [का. कोरे=लग्नप्रसंगीचें वस्त्र; भारी वस्त्र+नाड=देश, पेठ]

कोरप—न. १ (कों.) गोवऱ्यांची आगटी; झगरें. २ वंदुकीचा काना.

कोरपा—वि. (व.) वाळून शुष्क झालेला (पदार्थ). [करपणें]

कोरफड—स्त्री. एक औषधी नवस्पति. ही वनस्पति पाण्याशिवाय जगते, हिंदुस्थानांत सर्वत्र होते. हिच्या पाती जाड असुन त्यांतील गर कडू असतो. जुन्या पात्या सुकल्या म्हणजे आंतून नव्या पात्या फुटून ही वनस्पति नेहमीं ताजी राहते, म्हणून हिला कुंवारी, कुमारी, कुवारकांडें म्हणतात. हिच्या रसापासुन कडू (काळा) बोळ तयार करतात. –वगु २. ६१. –न. कोरफड; कोरफडीपासून तयार केलेला पदार्थ, औषध. [सं. कुमारी; गुं. कुवार; कों. कुवारकांडं, कोरकंड; कुवारी+फड]

कोरंब—वि. (राजा.) झडलेला; झिजलेला; खंगलेला; जीर्ण; अशक्त; जर्जर (काष्ठ, शरीर इ०). [का. कोरे=झडणें, कमी होणें. तुल० सं. कोरित=कुडलेलें लहान केलेलें]

कोरबी—स्त्री. (कों.) शिंगा; एक प्रकारचा मासा. [का. कोरब]

कोरबू-भू—पु. गांवांतील एक बलुतेदार. ही धनगर जात आहे. कोरबूचीं कामें पुष्कळ आहेत. पैकीं प्रवाशाची बरदास्त ठेवणें, त्याचीं ओझीं वाहणें, रयतेपासून सरकारदेणें–घेणें वसूल करणें इ०. [द्रा. कुरुब, कुरुंब] **०गिरी**–स्त्री. कोरबूचें काम व अधिकार.

कोरम—पुन. सभेस आरंभ करण्यासाठीं अवश्य ठरविलेली सभासदांची संख्या; गण. [इं.]

कोरमणा—स्त्री. (क.) रुसवा. [कोरणें; गो. कोरमेनचें=पोखरणें]

कोरमा—पु. एक मांसयुक्त खाद्य. –गृशि २.५१. [उर्दू]

कोरमांचें—क्रि. (गो.) पोखरणें.

कोरघट—वि. नव्यासारखें; कोरें. कोरवाण पहा.

कोरघडे—पुअव. (व.) उडदाच्या पिठाचे वडे. यांत कोहळ्याचा कीस घालतात. 'सहित पापडे कथिकवडे, आणिक कोरवडे।' –अमृतसुदाम १४.

कोरवण—न. घरशाकारणीचें गवत.

कोरवाण-न—न. १ अगदीं नवें, कोरें दिसणारें कापड. २ हलक्या किंमतीचें खादी इ० कापड. –वि. १ (निणकाम) मागावरून काढलेलें परंतु पांजणी न केलेलें (वस्त्र अगर ताणा) हा अर्थ कोमटी लोकांत रूढ आहे. २ (सामा.) अगदीं कोरें करकरीत; ताजें; नवें (कापड, मोतीं, भांडीं, दागिने वगैरे). [कोरें+वाण]

कोरवान—वि. कपाळावर केसाची कोर ठेविली आहे किंवा ठेवण्याचें वय झालें आहे असें (दहाधारा वर्षांचें मूल). कोर पहा; कोर धरणें पहा. [कोर+वान]

कोरवाण-साण—कोरगण पहा.

कोरळ—पु. एक वृक्ष; याच्या पानांची भाजी करतात. –गृशि १.१८८. [का. करले]

कोरळा—पु. (कुलाबा) समुद्राच्या कडेला मासे खाऊन राहणारा, पिवळ्या पायाचा व चोंचीचा, एक पांढऱ्या रंगाचा, पक्षी. शिकारी याचें मांस खातात.

कोरा—वि. १ ताजा; नवा; नवीन; धुकताच केलेला; न धुतलेला; न उपभोगलेला; न वापरलेला (कागद, भांडें, वस्त्र, इमारत, दुकान इ०). २ (ल.) ज्याला सराव किंवा रावता नाहीं, असा; नवशिका (माणूस). ३ न सुधारलेला, बदललेला; कांहीं परिणाम, फायदा ज्यावर होत नाहीं असा; संस्कारहीन (शिक्षण, शिक्षित वगैरेंतीं). 'हा बारा वर्षें पडत होता परंतु कोराचे कोरा.' ४ कमजास्तपणा, वाढ किंवा कांहीं परिणाम झाला नाहीं असा (व्यवहार, व्यापार, माल). [फा. कोऱ्हा=नवें मडकें; हिं. कोरो; तुल० करा, कऱ्हा] **०करकरीत**–वि. करकरीत पहा.

कोरांटा-टी, कोऱ्हांटा-टी, कोऱ्हांटकी—पुस्त्री. एक फुलझाड; याला पांढरीं, तांबडीं, पिंवळीं, नीळीं, पारवीं या जातींचीं फुलें येतात. झाड ३।४ हात उंच असतें. सर्वांगास कांटे असून फुलाला वास येत नाहीं. या फुलांत मध फार असतो.

कोरा—न. न शिजविलेलें धान्य (हिरवे तांदूळ, गहूं इ०). अशी भिक्षा; कोरडी भिक्षा पहा. (क्रि० करणें; मागणें). 'काय समर्थाची कांता। कोरान्न मागे।' –झा १२.८५. 'नित्य करून कोरान्न। मेळवून आणी कण।' –ह २९.११. **०करकरी-करीण**–पुस्त्री. कोरान्नाची भिक्षा मागणारा–री. 'दारा न ये कोरान्नकर।' –एभा २३.९३. [कोरें+अन्न]

को(कों)राळ जमीन—स्त्री. (डांग प्रांतांतील) तांबडसर अशी निकस जमीन. ही टेकडयांच्या पायथ्याशीं असते. कोराळें पहा.

कोराळें—न. डोंगरांतील कडा. 'एन्हवीं फोडी कोराळें। पाणी जैसें।' –झा १६.११७. २ डोंगरांतील कोरीव लेणीं. ३ दगड; खडकाळ जमीन [का. कोरे=टोंक, कापलेला भाग+आळ प्रत्यय ?]

कोरी—स्त्री. भिकार जमीन. ही दुसऱ्या जमिनीबरोबर कसली असतां त्यावर सरकारसारा बसत नाहीं. कोराळ जमीन पहा. [तुल० सं. कुमारी; प्रा. कुआंरी; म. कुवारी–कोरी] **०स्वाशीण**–स्त्री. (हवशाणी) विवाहित परंतु ऋतु प्राप्त न झालेली सवाष्ण. –मसाप १.११.

कोरीटक—कोरडिकें पहा.

कोरीव—वि. १ कोरलेलें; खोदलेलें; पोखरलेलें. २ खवलेला, मगज बाहेर काढलेला (नारळ इ०). **०कातीव**–वि. कोरलेलें व कातलेलें. (ल.) सुबक; सुरेख; सुंदर; चांगल्या आकाराचें. [कोरणें+कातणें] **०ठोकळा**–पु. चित्रें छापण्याचा ठसा. (इं.) ब्लॉक.

कोरो(ऱ्हो)डा-को(ऱ्हो)डा—कोरवडे पहा.

कोरोलें—न. (गो.) शेतांतील तण. कोरळ पहा. [का.करले]

कोरोली—स्त्री. (गो.) करवली पहा,

कोर्ट—न. १ न्याय देणारी सभा. न्यायकचेरी; न्यायसभा; सरकार दरबार. २ न्यायाधीश. ३ सर्व जज्ज आणि माजिस्ट्रेट आणि लवादपंच खेरीज करून दुसऱ्या ज्या मनुष्यांस पुरावा घेण्याचा कायद्यावरून अधिकार आहे असे सर्व इसम. हायकोर्ट–वरिष्ठ न्यायाधिशी. [इं.] **०फोर्ट**–वि. (ना.) अज्ञानांचें पालन करणारें खातें. कोर्ट ऑफ वॉर्डस्. 'मुलाची इस्टेट कोर्टफोर्ट झाली' (कोर्ट ऑफ वॉर्ड्सच्या ताब्यांत गेली) **०फी स्टँप**–पु. कोर्टांत काम चालविण्याकरितां दाखल करावयाच्या कागदांस लावावें लागतें तें तिकिट. **०माशील**–पु. लष्करी न्यायकचेरी–सभा. 'त्यांचा इन्साफ कोर्ट माशील कहून करवावा.' –के १७. ५.३०.

कोर्स—पु. अभ्यासक्रम, (मार्ग, पद्धति). 'कॉलेज कोर्स' 'पुणें येथें ज्योतिषशिक्षण कोर्स सुरू केला आहे.' –के १०.६. ३०. [इं.]

कोर्हेर-री—वि. लांकूड इत्यादिकांचें कोरलेलें बाहुलें. [तुल० सं. कुट्टी]

कोल—न. कर्जफेडीकरितां जप्त केलेलें उत्पन्न, मालमत्ता. शेतांतील पीक, इ० जप्तीचामाल; कबज. (क्रि० धरून ठेवणें; सोडणें). [अर. कौल=करार]

कोल—वि. (कों.) गरीब, अशक्त, दुबळा (द्रव्यानें, शरिरानें, चालण्यानें, बुद्धीनें); असमर्थ. [का. कोळे=वाळणें, झिजणें]

कोल—पु. डुक्कर. **०कुतरा**–पु. डुक्कर, कुत्रा वगैरे क्षुद्र प्राणि. 'ते होती शत जन्म कोलकुतरे गोमायु गोपुच्छहीं' –निमा १.१९. [सं. कोल=डुक्कर+कुत्रा. का. कोला=कुत्रा]

कोल, कोलण-णी—स्त्री. विटीदांडूच्या अगर गोटयांच्या खेळांतील गली. कोली पहा.

कोलकर—पु. (माण.) सेवेकरी; शिपाई; तराळ पहा. –गांगा २९. [का. कोलुकार=शिपाई]

कोलकाठी—स्त्री. एक खेळ; दांडपट्टा. 'देवेंसी कोलकाठी धरूं। अखाडा झोबीलोंबीं करूं।' –ज्ञा ११.५४८. 'खेळों कोलकाठी पुढें धांवसील वेगें।' –निगा ९५. [का. कोलु=काठी]

कोलखंड—न. (गो.) मोठें पोट.

कोल(लां)गडें—न. (कों.) कुलंगडें पहा.

कोलंगी—स्त्री. अग्नीची ठिणगी. (क्रि०उडणें)[प्रा. दे. कोल्ल=कोलीत; का. कोळिळ=कोलित]

कोलगें—न. (गो.) कुत्री. कोली पहा. [प्रा. दे. कोल्लुग–कोल्हें]

कोलडें—न. १ एक प्रकारच्या गवतावें बीं. हें कबूतरें खातात. २ एक प्रकारचें बारीक धान्य.

कोलणें— उक्रि. १ (विटीदांडू) गलीवरची विटी दांडूनें उडविणें. 'रावबानें प्रथम कोललें व त्याची विटी झेलली गेली.' –सुदे ६. २ आपणावरची जबाबदारी दुसऱ्यावर टाकणें(कामाची, देण्याघेण्याची इ०). 'पैका मागावयास लागलें, म्हणजे बाप लेकरावर कोलतो लेक बापावर कोलतो.' 'निकड कार्यें करणें आल्या दुसऱ्यावर कोलत्यें।' –प्रला १७०. ३ लोटणें; झिडकारणें; दूर फेकणें; नाकारणें; हडहड करणें; उडविणें. ४ पराजित करणें (वादविवादांत). [का. कोळु=काठी] **कोलून मारणें**– १ लाथेनें धुगारून देणें, उडवून फेकणें; वर करणें; उचकणें. २ एका अंगावरून दुसऱ्या अंगावर वळविणें.

कोलता—पु. (ना.) निखारा. कोलित पहा.

कोलती, को(लि)लीत-लेती—स्त्री. १ मशाल; जळतें, पेटलेलें लहान लांकूड. 'पैं कोल्लिताही कोपे ऐसें। द्राक्षांचें हिरवेपण असे।' –ज्ञा १८.७९०. २ (ल.) द्वेष-मत्सर–दुष्ट बुद्धिनें रचलेलें कुभांड; खोटा आरोप. (क्रि० वर ठेवणें). म्ह० पिशाचाचे हातीं कोलीत. **०लावणें**–(ल.) कलागत लावणें. 'लावूनि कोलित। माझा करितील घात।' –तुगा १००७. **०कांकण**–न. आलातचक्र. पेटतें लांकूड गरगर फिरविलें असतां जो कंकणाकृति आकार दिसतो तो.

कोलदंडा, कोलदांड-डा—पु. १ द्वाड कुत्र्याच्या गळयास बांधतात तें दांडकें अगर गज. (क्रि० बांधणें). २ (शिक्षेचा प्रकार). उकिडवें बसवून हातांमध्यें पाय सांपडवून व हात बांधून कोपरें व गुडघे यांच्या मधून घातलेला दांडा. 'जावाई हाचि कोलदांड। काळें घातलासे वितंड।' –स्वादि २.३.३८. 'कोलदांडे घालुनियां एकसरी। झाडांसी टांगिताति हारोहारी।' –अफळा २७. [का. कोलु=काठी+दंड]

कोलदेव—पु. (कुलाचा) करकोचा किंवा कुदळपक्षी.

कोलन— पु. (व.) अगदीं लहान खड्डा. [का. कोळ=डबकें, तळें]

कोलनवाटर—न. एक औषधी थंड सुवासिक बाष्पभावी पाणी. जर्मनींतील कोलन गांवावरून हें नांव पडलें. 'कोलनवाटर भडकलेलें माथें थंड करतें.' –के १६.४.३०. [इं. कोल्न+वॉटर=पाणी]

कोलनाडॉ, कॉझाडॉ—पु. (गो.) कोलदांडा पहा.

कोलंबी—स्त्री. (कलाबा) या नांवाचा एक मासा. 'ही संगीत कोलंबी तडतड नाचती पांई.' –संगीत धोटाळा ६.

कोलबोल—पु. कौल. 'मुलखास कोलबोल देऊन बंदोबस्त करणें.' –ऐच ८९. [फा. कौल+म. बोल]

कोलमांड—कलमांड पहा.

कोलमा(म)डणें—उक्रि. १ अडखळविणें; ठेंचकळणें; मागें ओढणें; दुसऱ्या बाजूवर पडणें, वळणें, वळविणें; उलटणें. २ खालीं कोसळून पडणें; पाडणें (सोसाटयाच्या वाऱ्यानें झाड). [का. कोले=मार+माडु ?]

कोलमाडा—पु. १ एका बाजूवरून दुसऱ्या बाजूवर जाणें; एका कुशीवरून दुसऱ्या कुशीला वळणें. (क्रि० देणें). २ उलटणें; ठेंचाळणें; अडखळणें; कोलांटी खाणें; मागें ओढणें; कलाटणी. (क्रि० देणें). ३ (ल.) लांबणीवर टाकणें; टाळाटाळ करणें; दिरंगाई करणें. (क्रि० देणें). [का. कोले+माडु ?]

कोलवणें— कोलणें प्रयोजक पहा. 'परंतु पठाण हे मुसलमान व त्यांजवर हत्यार उचलण्यांत हिंदू मजूर प्रमुख, त्याचा

फायदा घेऊन हा तंटा हिंदुमुसलमान तंटयाच्या वळणावर कोलवून देण्यांत आला. ' –सासं २.६४.

कोलवा—पु. (राजा. गो.) घरावर घालावयाचा गवताचा जुना शाकार; सुपारी, नारळ इ० चा चूड.

कोलषाकोलघ, कोलाकोल-ली—स्त्री. १ टोलवाटोलवी; एकमेकांवर टाकणें. (धंदा इ०); इकडून तिकडे व तिकडून इकडे असें. (क्रि. मारणें, उडविणें). २ चुकवाचुकव; अनास्था; टाळाटाळ. [कोलणें द्वि.]

कोलवें—न. (व.) अगदीं लहान खोली; कोचकें. ' घरांत एखादा मोठा दिवाणखाना नाहीं, सारीं कोलवींच कोलवीं. ' [हिं. कोल, कौल]

कोलस्विंदर—न. एक झाड.

कोला—कोल्हा–ल्हें पहा.

कोला—पु. (बे.) कुत्रा.

कोला—पु. (व.) जळता निखारा. [का. कोळिज; तुल० सं. कोधिन्; प्रा. कोहिल; हिं. कोयला. इं. कोल; ग्री. कोहेल]

कोलाटी—पु. (काठीच्या साहाय्यानें) दोरीवरील नाच व इतर कसरतीचीं कामें करणारी एक भिक्षेकऱ्यांची जात. [का. कोलु=काठी+अटिग=खेळणारा]

कोलांटी—स्त्री. एक विशेष प्रकारची उडी. ही उडी विशेषतः कोल्हाटी लोक मारतात. (विप्र.) **कोलांटी उडी.**

कोलाडा—पु. (वांई.) हरळीसारखें गवत.

कोलाघण—स्त्री. जहाजावरील जकात. –शर. ? [सं. कोल=बोट+वण प्रत्यय]

कोलाहल—पु. मोठा गलबला; गोंगाट; कलकलाट; ओरड; गोंधळ. [सं.]

कोलिता—वि. रक्षणकर्ता. [सं. कुल्=आसाप्रमाणें वागणें]

कोलिसें—न. १ रेशमासारखें पांढऱ्या अंगाचें कोळी वगैरे किड्यांनीं बनिवलेलें जाळें किंवा घरटें. याचें बंदुकीला वेष्टन करतात. २ तोडग्याच्या बंदुकीस रेशमाचें दिलेलें वेष्टन. [कोळी+सरी ?]

कोली—स्त्री. विटीदांडू; गोटया इ० खेळण्यास जी खळी करतात ती; गल. कोल पहा.

कोली—स्त्री. (गो. बे.) कुत्री. कोलगें.

कोलीस—न. एक कुंडींत वाढणारी वनस्पति.

कोलु—पु. (कर्ना.) कोलदांडा पहा. –स्त्री. विटी.

कोलु—पु. घाणा.

कोलू—पु. (गो. कु.) घरावरचें जुनें शाकार (चुडतें, गवत इ०). कोलवा पहा. ' नळे वरुशीर न मिळाल्यामुळें घरावर कोलू घालावा लागला. '

कोलूक—न. (गो.) कुत्रें.

कोलेती—स्त्री. खाजकोलती नांवाची वनस्पति.

कोलो—पु. (खान. कों.) कोल्हा. ' एक कोलो आयो. '

कोल्ल—स्त्री. (गो.) विटी. **०बार**–पु. (गो.) विटीदांडू.

कोल्लमशक—पु. हा शक ख्रिस्ती शकाच्या आठशेंचोविसाव्या वर्षी सुरू झाला, हा मलबारांत चालू आहे.

कोल्ली—वि. (गो.) १ रागीट. २ नादी, लहरी. [सं. कोधिन्; प्रा. कोहिल्लि]

कोल्हरी—स्त्री. (काव्य) सोंग; मिष; बतावणी. ओडंबरी, कोल्हारी पहा.

कोल्हा-ल्हें—पुन. १ कुत्र्याच्या वर्गांतील प्राणी. हा भुऱ्या वर्णाचा व मऊ केसांचा असून रात्रीचा हिंडतो. याला द्राक्षें वगैरे फळें आवडतात. ककैश ओरडणारा, फार धूर्त पण भित्रा. जंबुक; शृगाल. ' कीं कोल्हेया चांदणीं । आवडी उपजे । ' –ज्ञा ४.२३. २ (ल.) धूर्त माणूस, चोरटा माणूस. [दे. प्रा. कोल्लुअ] **म्ह०** १ अडलें कोल्हें मंगळ गाय=संकटांत सांपडलेला दुष्ट मनुष्यहि संकटांत घालणाराची स्तुति करतो. तुल० अडला नारायण गाढवाचे पाय धरी. २ एक कोल्हं सतरा ठिकाणीं ब्यालं. ३ कोल्हं काकडीला राजी=ज्या वस्तूवर आपला मुळींच हक्क नाहीं ती आपणांस अगदीं थोडी मिळाली तरी क्षुद्र माणूस खूष होतो. अल्पसंतोषी. (वाप्र.) **कोल्हाकोल्हीचें लग्न**–ऊन असतांना पाऊस पडूं लागला असतां म्हणतात. **कोल्ह्याचेंतोंड बघणें,–नागवें कोल्हें भेटणें**–शुभ शकून घडणें, अकल्पित मोठा लाभ होणें. **कोल्ह्याचें शिंग**–(गो.) सशाचें शिंग. (ल.) अशक्य गोष्ट साध्य होणें; वशीकरणकला अवगत असणें. (पुढील समासांतील पहिलें पद ' कोल्हें ' आहे) **०कुई**–स्त्री. कोल्ह्यांची आरडाओरड; हुकी. (ल.) क्षुद्र लोकांची निरर्थक विरुद्ध बडबड; क्षुद्र अडथळा. ' बाहेरच्या जगाला विसरून...जगाची ककैश कोल्हेकुई कोण ऐकत बसणार ? ' –प्रेमसंन्यास **०टेंकण-णें**–न. (विशेषतः चतुर्थी विभक्तींत बसणें, किंवा येणें बरोबर उपयोग). **कोल्हे टेकण्यास बसणें**–कोल्ह्याप्रमाणें दबकून बसणें. **कोल्हें टेकण्यास येणें**–१ वयामुळें अशक्तता प्राप्त होणें. २ मावळण्यास येणें (सूर्य, दिवस). कोल्हा मागल्या पायावर बसला असतां जमीनीपासून जितक्या उंचीवर असतो तितक्या उंचीवर सूर्य मावळतांना क्षितीजापासून असला म्हणजे म्हणतात. **०भुंक-भोंक**–स्त्री. १ कोल्ह्याची हुकी, ओरडा; कोल्हेकुई. २ मोठी पहांट; प्रभात. [कोल्हें+भुंकणें] **०शाही(ई)**–स्त्री. लुच्चेगिरी. ' असला कोल्हेशाई प्रश्न कशाला ? ' –टि १.२६. **०हुक**–स्त्री. १ कोल्ह्याची हुकी; कोल्हेकुई. २ (ल.) मोठमोठ्यानें ओरडून हल्ला करणें.

कोल्हा—पु. (व.) सुरवंट.

कोल्हाट, कोल्हांट—न. कोल्हाटयांचा खेळ; डोकें खालीं करून एक चक्कर मारून पुन्हां पायांवर उभें राहण्याची उडी. कोलांटी पहा. **०अड**–न. कोलांटी उडी. **०खेळ**–पु. कोल्हांटयाचा खेल. **–टयाचें शूरत्व**–न. धीटपणाचा आव. धाडसाचा देखावा.

कोल्हांटी-ण-टिन—पुस्त्री. १ दोरीवर कसरत करणारी भिक्षेक=यांची एक जात, भोरपी, नाडेभोरपी, डोंबारी. 'जीवनोपावो कां जैसा। कोल्हाटियांचा।' –ज्ञा १८.६०६. 'आली कोल्हाटिन खेळाया। सगुण गुण माया।'–भज ३५. २ कोल्हाट; कोलांटी; कसरतीचा खेळ; नाच. [का. कोलु=काठी+अटिग=खेळणा]

कोल्हापुरी—वि. करवीर प्रांतीय; जसें–कोल्हापुरी जोडा, माप, इ०. [सं. प्रा. कोल्लापुर] **०माप**–न. (कोल्हापुरी माप फार मोठें असतें यावरून) अतिशय मोठा जोडा, वहाण, इ०.

कोल्हार—पु. कुंभार.

कोल्हार—न. (महानु.) गुहा; कपाट. 'ब्रह्मविद्येचें कोल्हार।' –भाए ६६२. [का. कोल्हार=खिड, बिकट मार्ग]

कोल्हारा—पु. एक रानभाजीचें झाड. कोरळ पहा. [का. कोळर]

कोल्हारी-ल्हेरी–वि. कुंभारी (चित्रें मातीचीं). कृत्रिम; बनावट. 'कोल्हेरीचे वारु। न येती धारकीं धरुं।'–अमृ ७.४. 'अथवा कोल्हेरीचे असिवार।'–ज्ञा ९.१७३. 'कां कोल्हेरीचे असिवार।'–रंयो ८.३१५. [सं. कुलाल–कौलाल; प्रा. कोलाल=कुंभारासंबंधीं; मातीचें पात्र] **०वेताळ**–पु. शेतांतील बुजगावणें; भुताचें चित्र. 'आतां कोल्हारीचे वेताळ। तैसे निर्जीव हे आहाती।'–ज्ञा ११.४६६.

कोल्हाळ—पु. गलका; कोलाहल पहा. 'आणि भयासुर रणकोल्हाळ। सुभटांचे।'–ज्ञा १.१३२. 'कोल्हाळ माजविला रणतुर्यी।'–मुआदि ४४.५१.

कोल्हाळ—न. एक खाद्य? –शर.

कोल्ही—स्त्री. जोंधळयाची एक जात. याचा दाणा वर दिसून येत नाहीं. [कोली]

कोल्ही—स्त्री. कोल्ह्याची मादी. –वि. कोल्ह्याच्या रंगाची मेंढी (तोंड, पोट, पाय काळे बाकी सर्व अंग पांढरें असलेली). 'ही मेंढी कोल्ही आहे.'

कोल्हू—पु. उंसाचा चरक; तेल्याचा घाणा. [हिं.]

कोल्हे-ल, कोल्हें—न. भोपळयाच्या आकाराचा बियाणें ठेवण्याचा भाताण्याचा (पेंढयाचा) मुडा, भांडें. [का. कोळवी=तेल इ० ठेवण्याचा नळा]

कोवणें—उक्रि. १ जुनें होणें; (मडकें इ० ची वाईट अथवा कोरेपणाची) घाण नाहींशी होणें; कोरेपणा जाणें. २ (ल.) रुळणें; सरावणें; निर्ढावणें (वाईट गोष्टींत).

कोंवरी—स्त्री. फणसाची कुयरी.

कोवसप—क्रि. (गो.) मुरणें; कोवणें पहा.

कोवसा—वि. १ आधार; आश्रय. (क्रि० देणें; करणें). २ कैवारी; आश्रयदाता; कंशा पहा. 'जो भक्तांचा कोंवसा।' –दा २.७.४. [कः+वस्=आच्छादणें]

कोवळणें—सक्रि. आलिंगणें. कवळणें पहा.

को(कों)वळसर—पु. १ जरा कोंवळा (नारळ; सुपारी, इ०) २ लहानसर; अपक्व; नाजूक. [कोंवळा]

को(कों)वळा—वि. १ लहान; कच्चा; अपक्व; हिरवा. २ ताजा. (कोंबडीचें अंडें, इ०) याच्या उलट निथर. ३ (ल.) सौम्य. (सकाळ, सूर्यकिरण, ऊन). ४ कच्ची, अडाणी; अप्रगल्भ (ग्रहणशक्ति, समजूत). अर्धवट; कोता; अप्रौढ; पुरतेपणाचा नव्हे असा (सल्ला मसलत, विचार). ६ कमी बळकट; नाजूक; कोमल. [सं. कोमल; सीगन. कोवळो. फ्रेंच. जि. कोवलो] **०किरळा**–वि. लहान आणि नाजूक (अंकुर फुटलेला). [कोवळा+किरळ] **०दुपार, दोनप्रहर**–स्त्रीपु. दोनप्रहर होण्याच्या आधींचा काळ. नुकतीच सुरवात झालेली दुपार, मध्यान्ह.

को(कों)वळीक—स्त्री. १ कोंवळेपणा; (अप्रौढतेंतील) नाजूकपणा, अशक्तपणा. (अपक्वपणांतील). २ तारुण्याचा बहर; टवटवीतपणा. ३ मृदुपणा. 'आणि महाबोधीं कोंवळीक। दुणा वली।'–ज्ञा १.३४. 'कोवळीक घाली सिरणें, शिरस पुष्पेंसी।' –भाए २६. –वि. कोवळी.

कोंवा–पु. कोंका; किनरी (कानफाटयाची); एकतारी. [का. कोवी]

कोंवारीण—स्त्री. कुवारीण पहा. (बायकी) लग्न न झालेली आठ अगर त्याहून कमी वयाची मुलगी जिला बोडणास अगर देवीच्या पूजेस (नवरात्रांत) बसविताात व जेवावयास घालतात.

कोविद्—वि. पंडीत; ज्ञाता; सुज्ञ; कुशल. 'सांगो काय तुज तुह्या पौत्रांचें युद्ध कोविदा राया।'–मोभीष्म ३.४९. [सं.]

कोविदार—पु. एका जातीचें झाड; कोरल; कांचन; शिसु. 'तुळसी करवीर कोविदार।' –ह १०.१५९. 'तुळसी, कोविदार सुंदर। कनकवेलि, नागवेलि, कोमळांकुर।' [सं.]

कोवी—स्त्री. (कों.) पोखरलेला नारळ; बेलें. [का. कोवि=पोकळ नळी]

कोव्हरी—क्रिवि. (ना.) कुठवर; किती वेळपर्यंत कोठपर्यंत? [कोठवर]

कोव्हाळा-ळें—पुन. कोहळा; याची भाजी, सांबगे इ० करतात. कोहळा पहा.

कोव्हाळी—स्त्री. कोहळ्याचा वेल.

कोश—पु. १ खजिना; साठा; संग्रह; तिजोरी; खाण: वखार. २ देहामधील अन्न-प्राण-मन-विज्ञान-आनंदमय असे जे कोश आहेत त्यांपैकीं प्रत्येक; आत्म्याचें आवरण. ३ शब्द, विषय, संज्ञा इ० चें संग्रहयुक्त विवेचन करणारा ग्रंथ; निघंटु; (इं) डिक्शनरी, शब्दसंग्रह. उदा० शब्दकोश, ज्ञानकोश, चरित्रकोश, इं०. ४ आवरण; पटल; पापुद्रा; अस्तर. ५ म्यान (तरवारीचें). ६ कोळी-कीटक अंड स्थितींतून कीटस्थितींत येऊन शरीराभोंवतीं रेशमासारखें मऊ आवरण करतो तो; कोशेटा. ७ कळी. 'अंतरीं फांके। हृदयकोशु।' -ज्ञा ६.२०९. ८ दिव्य करून लावलेला निकाल; न्यायदानांतील दिव्य (अग्नि, पाणी, विष, वजनाचा कांटा, उकळणारें तेल, कुलदेवतेवर पाणी घालणें-ब्राह्मणांच्या चरणांवर पाणी घालणें. किंवा त्यांचें तीर्थ घेणें इ०.) शपथ; प्रतिज्ञा. 'पीयालीं कृतनिश्चयाचा कोश।' -ज्ञा १३.६०४. **०कार**-पु. १ रेशमाचा किडा; कोळ्याच्या वर्गांतील प्राणी. २ कोशस्थितींत असलेला, कोशवासी किडा, फूलपाखरूं. ३ शब्दार्थकोश रचणारा; कोश तयार करणारा संपादक. **०कीट-कीटक**-पु. कोशकार (अर्थ १।२) पहा. कोशकिडा हा आपल्या भोंवतीं कोशेटा करून आपणासच कोंडून घेतो. 'एऱ्हवीं कोशेकीटका-चिया परी। तो आपणपया आपण वैरी।' -ज्ञा ६.७२. -वि. १२.१६१. **०गृह**-न. भांडार. 'कीं कोशगृहीं प्रवेशोनी।' -रावि १.७१. **०पान**-न. देवाचें तीर्थ पिणें. दिव्याचा एक प्रकार. शपथ घेणें; दिव्य करणें. **०पिणें**-शपथ घेणें. 'शरीर वाचा मानस। पियालीं कृतनिश्चयाचा कोश।' -ज्ञा १३ ६०४. **०वृद्धि**-स्त्री. संपत्तीची वाढ; भरभराट; समृद्धि. 'होम हवनें होय कोशवृद्धि॥' **०शुद्धि**-स्त्री. दिव्यानें निरपराधित्व सिद्ध करण्याची क्रिया.

कोश—पु. दोन मैल अंतर, कोस पहा. [सं. क्रोश; प्रा. कोस]

कोश—पु. (कु.) फरक; अंतर; कोस पहा. 'दोन काठ्यांच्या मापांत थोडासा कोश राहिला.'

कोशरें, कोशेरें—न. एक प्रकारचें जाडेभरडें रेशीम. [कोश]

कोशा—वि. काळसर रंगाची (गाय, बैल).

कोशा—पु. डोक्याला बांधावयाचा रेशमी रुमाल, फेटा (कोशेटयाच्या रेशमाचा). [सं. कौशेय; प्रा. कोसेअ=रेशमी वस्त्र]

कोशागार—पु. तिजोरी; जामदारखाना; भांडारगृह; खजिना. [सं. कोश+आगार]

कोशाध्यक्ष—पु. खजिनदार; द्रव्यसंग्रहावरील अधिकारी. [सं. कोश+अध्यक्ष]

कोशिक—न. कोशेटा. 'कासया करिसी रुदन। आपण आपणां केलें बंधन। कीटक करी स्वभुवन। कोशिके जैसें।' -कथा ५.७.८. [सं. कौशिक]

कोशिंदा—पु. कोचिंदा वनस्पति.

कोशिंब—पु. एक झाड; हें मोठें असतें. याच्या बियांचें तेल निघतें तें खाण्यास, दिव्यामध्यें जाळण्यास केसांना व देशी औषधांत वापरतात. फांद्यापासून पुष्कळ लाख उत्पन्न होते. बीला कोशिंबी म्हणतात. [सं. कोशी+आम्र, कोशाम्र; प्रा. कोसंब; म. कोशी+आंबा]

कोशिंबरें—न. तांदुळाचा एक प्रकार; कोशिंबरें भात.

कोशिंबीर-बरी-कोशिंबिरिका—स्त्री. कच्च्या फळांची दह्यांत कालवून केलेली चटणी; रायतें; तोंडी लावणें. 'या कोशिंबिरिका अनेक रचिल्या देवी तुला तोषदा।' -निमा १.१४. 'कोशिंबिरी आंबेरायत।' -नव ९.११८. [सं. कुस्तुंबरु. का. कोस्तुंबरी]

कोशिंबेल—न. कोशिंबीचें तेल.

कोशीस—स्त्री. प्रयत्न; मेहनत. (क्रि० करणें). 'इकडील दौलतीविषयीं कोशीस करीत जावी।' -रा ८.५. [फा. कोशिश्]

कोशेटा-टी-कोशेरा—पुस्त्री. १ फणस व इतर फळांतील आठळीचें टरफल. २ व्रणाची खपली, साल; कातडें. ३ कोळी व इतर कांहीं किड्यांचें जाळें; कोश; किड्याचें घर. [कोश+ट]

कोष—पु. कोश पहा. [सं.] समासांत अंडकोष, बीजकोष इ०. **०वृद्धि**-स्त्री. अंतर्गळाचा रोग; अंडवृद्धि.

कोष्ट—कोष्ठ पहा.

कोष्टक—पुन. १ कॉलम; रकाना. कोष्ठक पहा. २ किंमत; वजन; मापें इ० परिमाणदर्शक संज्ञांचें परस्पर प्रमाण दाखविणारी यादी. [सं.] **०कीं गुणाकार**-पु. गुण्य राशींचे जितके अंक तितक्या कोष्टकांचा गुणकांक. सम संख्यांक पंक्ती करून गुण-ण्याचा प्रकार. धांवरा गुणाकार, बैठा गुणाकार. कपटसिंधु पहा.

कोष्टम—न. (व.) झेंगट; लफडें; खेंकटें. 'तुमच्या मागें अद्याप कांहीं कोष्टम लागलें नाहीं.'

कोष्टी—पु. १ एक विणकर जात; ह्याचा धंदा सुत कातणें व विणणें; साळ्यापेक्षां यांची जात निराळी. २ (ल.) कोळी-किडा-हा तंतू काढून जाळें विणतो. [कोश, कोशेटी]

कोष्टी—स्त्री. (गो. कु.) बकऱ्याची, डुकराची इ० मानाची सागोती. सागोतीची पुडी. [कु.]

कोष्ठ—न. कोड (एक त्वचेचा रोग). [सं. कुष्ठ]

कोष्ठ—पु. १ पोट; कोठा. २ धान्याचें कोठार; कोठी. ३ खोली; दिवाणखाना. ४ आम, रुधिर, मूत्र इ० देहांतील स्थानें; आमकोष्ठ; मूत्रकोष्ठ इ०. **०क**-न. हिशेबाकरितां केलेलीं आडव्या उभ्या रेषांचीं घरें; प्र.; चौक; तक्ता; घर; रकाना; कॉलम; कोष्टक.

[सं.] •बंधक–वि. मलावरोध करणारें; स्तंभक. [सं.] •शुद्धि–स्त्री. शौचाला साफ होणें; कोठा शुद्ध होणें; (पुष्कळ रेच झाल्यानंतर).

कोष्ठ, कोष्ठकोळं(ळां-ळिं)जन—न. एक औषधी वनस्पति. ही काश्मीरकडे होते. ह्याच्या मुळया औषधी आहेत. शिवाय त्यापासून अत्तर व केसांचा कलप तयार करतात. [सं. कुष्ट+कुलंज; हिं. कोलिंजन]

कोष्ण—वि. किंचित उष्ण; कोंबट; कुबट. [सं.]

कोस—पु. अंतर दाखविणारें रस्ता मोजणीचें माप; साधारणतः दोन मैल. इंग्रजी ४५५८ यार्ड. एक चतुर्थांश योजन. (याचें निरनिराळया ठिकाणीं गजाच्या लांबीप्रमाणें अंतर निरनिराळें असतें). साधारणपणें चार हजार हातांचा कोस धरतात. [सं. क्रोश; प्रा. कोस]

कोस—स्त्री. (व.) सापाची कात. 'साप कोस टाकतो.' [सं. कोश]

को(कों)स—पु. चतुष्कोण, त्रिकोण, इ०. विवक्षित आकार तंतोतंत नसून त्यांत वांकडेपणा आल्यामुळें होणारा न्यूनाधिक भाव; कोच (ताणलेलें कापड, हातरुमाल, शेत, भिंत, रस्ता, कुंपण इ०. ना येणारा). आधिक्य, वाढ. (क्रि० येणें, असणें, होणें, जाणें, निघणें, काढणें, जिरणें, जिरवणें). 'या जागेला फार कोस आहे.' [का. कोशि=वांकण, वळण]

कोंसपेणी—स्त्री. कोसांची मोजदाद.

कोसंब—कोशिंब पहा. 'कोसंब अंजीर खैराड।'—कालिका २२.१५.

कोसम्यांचें—क्रि. (गो.) पाण्यामुळें (लांकूड) कुजून जाणें. [कुसमणें]

कोंसरा–पु. कोळी, किडा. कोसला पहा. 'गगनीं लागला कोंसरा। कोण पुरवी तेथें चारा।'—तुगा ३३०९.

कोसला—पु. १ रेशमाचा किडा. 'जैसा स्वयें बांधोन कोसला मृत्यु पावें।'—दा ८.७.९. २ रेशमाचा किडा किंवा कोळी यांचा कोशिटा. ३ ह्या कोशेटयाचा तोडयाच्या बंदुकीच्या भोंवतीं असलेला वेढा. [सं. कोश+ल]

कोसली—स्त्री. (ना.) मकरसंक्रांतीच्या दिवशीं तिळगूळ किंवा साखर इ० घालून तयार केलेली करंजी, मिष्ट पदार्थ. कोसल्या उकडून किंवा तळून करतात. [सं. कोश+ली]

कोसळणें—अक्रि. १ एकदम पडणें; तुटून, मोडून पडणें; ढांसळून पडणें; ढांसळणें; विस्कळणें (भिंत, विहिर, रास इ०). 'बाजी एकदम जागच्या जागींच कोसळला.'—स्वप ८८. २ पडून तुकडे होणें (यंत्र इ०). ३ (ल.) जोरानें वेगानें खालीं येणें, पडणें, (पाऊस). ४ आधार सुटून, वियुक्त होऊन, सपाटून भरभर खालीं पडणें (वाऱ्यानें फळें, फुलें). ५ फिसकटणें; प्रतिकूल होणें; निष्फळ होणें (बेत, मसलत). ६ केव्हां केव्हां वरील अर्थी सकर्मक क्रियापदासारखा उपयोग करतात. [का. कोसर=आधार सुटणें, सोडणें]

कोसाई—स्त्री. घोडयाचा एक रोग. त्याच्या दोन्ही मांड्यांखालीं गांठी येतात. –अश्व २.२८३.

कोसीस—कोशीस पहा.

कोस्टी—स्त्री. (कु.) शिकार करून मारलेल्या सावजाचे वालण्यांत येणारे वाटे. कोष्टी २ पहा.

कोस्त—पु. (गो.) कलमी आंब्याची एक जात. [पो. कोस्ता]

कोहं, कोहं-कार—उद्गा.पु. 'मी कोण;' मी कोण अशा अर्थाचा ध्वनि; मूल जन्मल्यानंतर हें प्रथम जो आवाज करतें तो. गर्भांत असतांना मूल ईश्वर आणि आपण एकच आहों असें समजून सोऽहं (तो मी) असें म्हणत असतें पण बाहेर आल्यानंतर ईश्वराला विसरून 'कोहं' मी त्याहून निराळा आहे काय? या अर्थी 'कोहंकोहं' मी कोण मी कोण, असा या मायोपाधींत सांपडल्यामुळें उच्चार करतें. सोऽहं पहा. 'तैं अज्ञान एक रूढे। तेणें कोहंविकल्पाचें भांडें।'—ज्ञा १५.३४२. 'गर्भी म्हणे सोहं सोहं। बाहेरी पडतां म्हणे कोहं।'—दा ३.१.४७. 'कोऽहं कोऽहं रडूं लागला।'—अमृतकटाव ५२. [सं. कः+अहम्] •भाव–पु. कोऽहं म्हणत असतांना बालकाची मनस्थिति. वरील अर्थ पहा. [सं.]

कोहक, कोहंक—न. कुहर; विवर; गुहा; डोंगर; पर्वत. 'कोहकी वसती।'—ऋ ७९.(टीप). 'कोणें एके नगरा बाहेरी कोहंकी। चंडरव नामे कोल्हा असे।'—पंच १.३७. [सं. कुहर; फा. कोह]

कोहकर्णें—अक्रि. (व.) वाळणें; सुकणें; रोडावणें. 'मागील दुखण्यापासून तो कोहकून गेला.' [सं. कोथ; प्रा. कोह=शीर्णता]

कोहटळी—स्त्री. कुजकी घाण; घाणीची जागा. 'मग बाळपणीची कोहटळी। धुंडूनि घेतसे॥'—स्वानु ९.४.७३. [सं. कोथ; प्रा. कोह=सडकी+स्थळ]

कोह(हे)डें—वुहडें पहा.

कोहळा-ळी-ळें, कोहाळा-ळी-ळें, कोहोळा-ळी-ळें—पुस्त्रीन. १ कोव्हाळा–ळी–ळें. एक प्रकारचा भोपळा; फळ आणि वेल. हा एक वेल असतो. याचें फळ, लहान भोपळयाएवढें हात दीड हात लांब असतें. याचा पाक पौष्टिक असून फोडींचे सांडगे करतात. २ (व. ना.) तांबडा भोपळा. याची भाजी करतात. [सं. कुष्मांड; प्रा. कोहालिआ] म्ह० आवळा देऊन कोहळा काढणें. =थोडीशी लालूच देऊन मोठें घबाड साधणें. लहानाच्या मोबदल्यांत मोठें मिळविणें.

कोहळी-ळें—स्त्रीन. कोथळी; करंडा. 'रांक्षण कोहळीं घागरी बहुवसा।' –दा ४.७.९. 'तो आंत होतीं सात कोहळीं।' –रावि २७.४. [सं. कोथ; प्रा. कोह=कोथली, थैला]

कोहळें-हाळें-होळें—न. बैलाचें वशिंड. [सं. कुष्मांड; प्रा. कोहुलिआ]

कोहोपरी—स्त्री. (व.) परात; थाळी. कोपरी पहा.

कोळ—न. तिळाच्या झाडांची तीळ झाडून घेतल्यानंतरची लहान पेंढी. 'झाडिलीं कोळें झाडी। तया न फळे जेवीं बोंडी।' –ज्ञा १३.५८५. 'तीळ नाहीं म्हणून कोळ सांठविले घरांत घालून ओघा।' –पला ८७. 'नपुसकें तुम्ही निवडेंळे। जैसीं तिळांचीं शुष्क कोळें।' –पांप्र २२.२७. [कवळ]

कोळ—पु. १ ज्यांत (पाणी, ताक इ०) चिंच, आंबे, भात इ० काल्वून करतात तें दाट पाणी; कुवळ; कोळलेलें पाणी. २ चिंच कोळल्यानंतर तिचा टाकाऊ भाग, चोथा. [कोळणें]

कोळ—पु. १ जळालेला पदार्थ. (क्रि० होणें). २ राख; वाळलेली; करपलेली अवस्था. 'डाहाळी जळुन कोळ जाती गळुन पडे भिंतीवर आंबा।' –सला ५७. 'कागद जळून कोळझाला' =अगदीं राख झाली. [प्रा. दे. कोल्ल=जळकें लांकूड; का. कोळिंळ=कोलित] **वाळून कोळ होणें**–अगदीं वाळून शुष्क होणें; झडणें. (वनस्पति, पानें); कोमजणें; आकसणें; करपणें (वनस्पति, जनावरें).

कोळ—पु. गहाण; कर्जाची फेड न केल्यामुळें कर्जाइतकी जिंदगी (कजेदारासून अगर दुसऱ्या कोणापासून) घेऊन अडकवून ठेवणें; गहाण माल. (क्रि० पाडणें). [अर. कौल=करार]

कोळ—पु. (कों.) खाडीचा फाटा; **पोहडी**; ओहर. [का. कोळ्ळ=खोल जागा, भगदाड, दरी]

कोळ—पु. रानडुकर; कोळ पहा. –वि. मस्त माजलेला. [सं. कोल]

कोळउंदीर-कुंदूर—पु. घूस. [सं. प्रा. कोल]

कोळऊ—स्त्री. कोल उवा; अंगावरील ऊ. (म्हैस, डुकर इत्यादींच्या); कोळवू पहा.

कोळकांदा—पु. (गो.) एक जंगली औषधी कांदा.

कोळख—स्त्री. (गो.) ऐरणीचें लांकूड.

कोळखंड-खांदा—नपु. (कों.) बैलाचें वशिंड. [कोहळें+खांदा]

कोळखण—स्त्री. (गो.) सोनाराची सामान ठेवण्याची कोळंबी; लांकडी पात्र.

कोळगंड—पु. कोळयाला (कोळी जातीला) तुच्छतेनें म्हणतात. (न्हावगंड शब्दाप्रमाणें). [कोळी+गंड]

कोळ(ळि)गा—पु. भ्रमर. 'उदैजेति परबिंबीं कळि कोळिगा राहिला कोंभीं।' –ऋ ९०. [सं. कुलिंग?]

कोळंगा—पु. जळजळीत निखारा. [का. कोळ्ळि]

कोळंगी—स्त्री. ठिणगी, गूल, काजळी.

कोळणें—न. (बे.) तांब्याचें किंवा पितळी पींप. हें लहान मोठ्या आकाराचें असतें. [का. कोळगा]

कोळंजणें—अक्रि. जळून राख होणें (विस्तवांतून काढलेलें कोलीत; निखारा) उन्हानें करपून काळें होणें, पडणें; कोळपणें पहा.

कोळंजन, कोळांजन, कोळिंजन—न. कोष्ठ कोळंजन, अंबेहळदीसारखें झाड; पानांचा वास मधुर; मुळयांचा रंग पांढरा; चव तिखट. गड्डे व फळ औषधी. मज्जातंतुपौष्टिक व कामोद्दीपक आहे. ही वनस्पति हिंदुस्तानांत सर्वत्र उत्पन्न होते. [सं. कुलिंजन]

कोळणें—उक्रि. कुसकरणें; (पाण्यांत) हातानें चुरडणें; गर काढणें; पिळणें (चिंच, आंबा); सार, सत्त्व काढून घेणें. [कोळ]

कोळदांडा—कोलदांडा पहा.

कोळपणी—स्त्री. कोळप्यानें वेणणें; पेरलेल्या जमीनींतील तण काढणें; खुरपणी.

कोळपणें—उक्रि. कोळपणी करणें. –शे ८.२२३.

कोळपणें—अक्रि. करपणें; काळवंडणें; वरवर जळून काळें होणें; उन्हानें काळें पडणें (झाड, शरीर); चुलींत पेटलेलें निखारे राखेनें झांकले जाणें; लांकूड जाळ न होतां काळें पडणें. (सामा.) धुमसणें; जळणें. 'करीना शांत कांत ही कांत म्हणुन कोळपत्येंं।' –पला २१८. [का. कोळ्ळि=कोलित]

कोळपाट—पु. (तंजा.) पोळपाट.

कोळपुटी, कळपुटी—स्त्री. (गो.) माशांच्या डोक्याचे तुकडे करून त्यांचें केलेलें पक्वान्न.

कोळपें-पा—नपु. वीतभर पीक उभें असतां उपयोगांत आणावयाचें आऊत, यानें पिकांच्या दोन ओळींमधील जमीन हलविणें, भुसभुशीत करणें, आंतील तण काढणें, पिकास मातीची भर देणें हीं कामें होतात. खानदेशांत, देशावर व कर्नाटकांत दोन तऱ्हेचीं कोळपीं आढळतात. याचे दांते एकापासून आठापर्यंत असतात. साताऱ्याकडे मिरच्यांच्या कोळप्यास डुवें कोळपें व उंसाच्या कोळप्यास ताफेचा कोळपा म्हणतात. दोन बैलांच्या एका जुंवावर पिकांच्या मानानें दोन दोन चार चारहि कोळपीं ठेवितात. –शे ७.१७.२०२. [का. कोळ=फाळ, दांत]

कोळंब—पु. (गो.) कोंडवाडा.

कोळंब-बा—नपु. तांबडें जाडें शाकारणीचें गवत; तांबट; तांबेट.

कोळंब-ब्या—पु. (कुलाबा कु.) एक प्रकारचें भात.

सन्यासी, स्वामी इ० खडावा वापरतात. [सं. काष्ठ+वह्; हिं. खडांव-ऊं; का. कडाव] **पायाला खडावा असणें**–तळपाय चापट नसून चवडा व टाचं यांच्या मधील भाग जमिनीस टेकत नाहीं असा पोकळ पाय असणें; हें शुभचिन्ह मानतात.

खडाष्टक—न. १ अतिशय द्वेष; हाडवैर (क्रि० बाळगणें; धरणें). २ (फल ज्यो.) षडाष्टक; वधुवरांपैकीं एकाच्या राशीपासून दुसऱ्याची रास सहावी व दुसऱ्याच्या राशी पासून पहिल्याची रास आठवी आली म्हणजे त्या दोघांत खडाष्टक येतें. यावरून वैर हा अर्थ. खडाष्टकाचे दोन प्रकार आहेत –(अ) प्रीतिषडाष्टक=प्रीति दाखविणारें खडाष्टक. (आ) मृत्युषडाष्टक=वैर दाखविणारें; पैकी प्रचारांत दुसरें घेतात. [सं. षट्+अष्टक]

खडाळ—वि. दगडाळ; खडाटी पहा. **म्हण** शेत खडाळ बायको तोंडाळ. [खडा+आळ प्रत्यय]

खडाळणें—अक्रि. खंड पाडणें; सोडून जाणें; खंडित करणें. [सं. खंड]

खडाळी—स्त्री. (ना.) खार (जमावर); चानी; खडी. खडूळ पहा.

खंडाळी—स्त्री. खंवडाळी पहा.

खंडाळें—न. खणाळें; खणांचा तागा. [सं. खंड+आलय; खणाळें अप.]

खडिंजा—पु. उभ्या विटांचा थर. खडंजा पहा. (क्रि० देणें; लावणें).

खंडित—वि. खंडानें घेतलेलें; मक्त्यानें घेतलेलें; ठराव करून दिलेलें (काम). [खंड=मक्ता]

खंडित—वि. १ तुटलेलें; मोडलेलें; भग्न. 'एकें हातीं दंतु। जो स्वभावतां खंडितु।' –ज्ञा १.१२. २ मध्यें अडथळा आणलेलें; तहकूब केलेलें. ३ उडवलेलें; निरुत्तर केलेलें (शंका, प्रश्न इ०). [सं. खंड] **०पांडित्य**–न. तुटपुंजी विद्वत्ता; कोतें ज्ञान.

खडित—वि. (व्यापार.) नक्त; ठोक. '१५ रुपयांचे वर कितीही किमतीपर्यंत मागितल्यास एक रुपया खंडित अडत घेऊं' –मुंव्या १८४ [खंड]

खडिया—पु. उंसाची एक जात; हा ऊस कणक असतो. –कृषि ४५२.

खडी—स्त्री. १ लिहिण्याच्या धूळपाटीवर घासण्यासाठी अथवा भिंतीला रंग देण्यासाठी अथवा भिंतीसाठी लागणारी माती; चिकण-पांढरट दगड; खडीचा दगड; खडूची माती. –पदाव ३७. 'खडीचा रंग चुन्यासारखा तयार होतो.' २ कापडावर नक्षी काढण्यासाठी केलेलें मिश्रण (गोंद, अभ्रक); एक चिकट रंग. ३ या मिश्रणानें काढलेली नक्षी, आकृति; खणांवर, चंद्रकळांवर खडी काढून घेतात. [सं- खडी=खड्]

खडी—स्त्री. माणसाचें दुखणें पिशाच्चबाधेपासून आहे किंवा काय हें ठरविण्यासाठीं करावयाचा विधि; देवभक्त पिशाच्च पाहण्यासाठीं गहूं, तांदूळ यांची एकीबेकी करून पाहतात, ती समसंख्या आल्यास बाधा आहे व विषम आल्यास नाहीं असें समजतात.

खडी—स्त्री. १ लहान दगड; सडकेवर घालण्याची गिट्टी. रस्त्यावर घालण्यासाठीं मोठे दगड बारीक फोडून त्यांची खडी करतात. २ (कु.) लाकडी तुळईखालीं बसविलेला दगड. [खडा]

खडी—स्त्री. (माण.) १ उंचवटा; टेकडी. २ खालाटी; सह्याद्रीच्या पश्चिम बाजूची पायथ्याची डोंगराळ जमीन; घाटाखालील कोस-दोन कोस डोंगरवट जमीन.

खडी—वि. खडा पहा. १ उभा–भी–में. २ खरा–री–रें. ३ स्पष्ट; सडेतोड. **०किंमत**–स्त्री. स्थिर, ठोक किंमत. 'सोन्यारुप्याची खडी किंमत.' **०खट**–वि. (माण.) स्पष्ट; सडेतोड. **खडींखापरीं**–खटीखापरीं पहा. **०चाकरी**–स्त्री. सततची, एकसारखी, विश्रांति नाहीं अशी नोकरी. **०चोट**–क्रिवि. त्याच जागीं; त्याच क्षणीं; खडाखडी. **०ताजीम**–स्त्री. सन्माननीय पाहुण्यांचे आगमनप्रसंगीं त्यास पद्धतशीर दिलेलें उत्थापन; पुरी ताजीम; याच्या उलट निम ताजीम. 'गुरुजीस पाहून व त्यास खडी ताजीम दिल्यानंतर.'–परिभौ ४७. **०तैनात**–स्त्री. खडी चाकरी पहा. **०दुपार**–स्त्री. ऐन मध्यान्हकाळ. **०फौज**–स्त्री. सतत तयार–नोकरींत असलेली फौज. **०रेघ**–स्त्री. मोडी लेखनांतील एक प्रकार; खडे पहा. **०हुंडी**–स्त्री. न वटविलेली, न स्वीकारलेली हुंडी. **खडी हुंडी राखणें**–हुंडीचा स्वीकार न करितां किंवा खोटी न म्हणतां ती आगळ राखणें.

खडी—खडीसाखर पहा.

खडी-खडीखपर-खाप—स्त्री. (खा.) खार; चानी.

खंडी—स्त्री. १ वजनाचें, जिन्नस मापण्याचें एक प्रमाण; एक कैली माप. निरनिराळ्या प्रांतात निरनिराळी खंडी आढळते. मुंबईकडे सामान्यतः २० मणांची खंडी असून विशिष्ट पदार्थांनां ८ मणांची असते. पुण्यास २० मणांची खंडी असते. २ (सामा.) पुष्कळ मोठी रास, प्रमाण याअर्थी. जसें–खंडीभर पोरें–मेंढ्या–काम–बोलणें. 'यांचीं वनें विस्तारीं अठरा खंडी प्रकारें काव्य गाईन,' –वसा ३.३ जमिनीचें माप–१२० बिघ्यांचें. ४ वीस संख्या (मेंढ्या, बकरीं इ० संबंधीं). 'त्या धनगराची २ खंडी शेरडें आहेत.' [द्रा. कंडि; का. कंडुग] (वाप्र.) **०लाधणें**–फसविणें; ठकविणें; युक्ति करणें. **०वर पेंढी होणें**–२१ वें मूल होणें. **०गणती-खंडोगणती**–१ खंडीखंडीनें; खंडीनें मोजतां येण्याजोगें. २ (ल.) अतिशय; पुष्कळ; अमाप. **०भर, वारी**–क्रिवि. खंडीच्या मापानें; खंडीखंडीनें; खंडीनें मोजण्याइतकीं पुष्कळ. **म्हण** १ खंडीस नवटकें (नवटकें=एकअष्टमांश

कोळसॉ-सो—पु. (गो.) चोवीस शेरांचें माप.

कोळसिंदा-शिंदा-सुंदा, कोळिसरा, कोळिस्ता-स्सा-सें—पुन. एक वन्यपशु; एक आंखूड शेपटीचा, लांब कानाचा लहान प्राणी. हा आपल्या शेपटीवर मुततो व तें मूत वाघाच्या डोळ्यांत शिंपडून त्याला आंधळा करतो व ठार मारतो असें म्हणतात. कोणी याला मांजरासारखें, कोणी कोल्ह्यासारखें मानतात. कोळसन-सुना-सुन पहा.

कोळसुंदा, कोळसा, कोळिस्ता, कोळिस्सा—पु. एक झुडुप, कोरांटीतील एक जात; हें शेताच्या बाजूस किंवा ओहोळाच्या कांठीं येतें. याची उंची २।२॥ फूट असते याच्या कोवळ्या पानांची भाजी करतात. पानें लांबट असून त्यांस खालीं एक कांटा असतो. याच्या बीस तालीमखाना म्हणतात. –वगु २.६७.

कोळसुंदा—पु. बंदुकीची माशी, मोहरी. हिच्याकडे बघून गोळीचा नेम धरतात.

कोळसें—न. (कु.) नांगराचा फाळ बसविण्याचा लांकडी ठोकळा.

कोळसेमुडें—न. कोळसे वाहाण्याकरितां केलेला भात्येणाचा मुडा. [कोळसा+मुडा]

कोळा—पु. (कु.) मोठा डांस.

कोळावें—न. कोळी लोकांचा दरवडा, धाड. –नामको. [का. कोळ्ळे=लुटालूट; दरवडा]

कोळिता—पु. कोळसुंदा पहा.

कोळिश्रय, कोळिस्सा, कोळिसरा—पु. १ एक रेशमाचा किडा. 'जैसा कोळिश्रयाचा बंधा। तो तयासचि करी बद्ध।' –कथा १.५. २ रेशमाच्या किड्याचें कोशीट, कोश. हा औषधी असतो.

कोळिष्णा—कोळसन, कोळसिंदा पहा.

कोळिसरा-स्सा-सें—पु.न. एक प्रकारचा झुरळासारखा प्राणी.

कोळिसरी—स्त्री. एक झुडुप; गवताचा प्रकार. कोळसुंदा पहा.

कोळी—पु. जळत्या किंवा जळलेल्या वातीची काजळी. [प्रा. कोल्ल; का. कोळ्ळी]

कोळी—पु. एक प्रकारचा पाण्यांत राहणारा पक्षी. **०ण**—स्त्री. कोळी पक्ष्याची मादी.

कोळी—पु. १ एक जात व तींतील माणूस. हे मासे पकडण्यांत पटाईत असतात. हे मासे विकण्याचा व नावाडथाचा धंदा करतात. याच जातींतील दुसरे लोक डोंगरांत, अरण्यांत राहून शिकार व चोरी करून उदरनिर्वाह करतात. प्राचीन ग्रामसंस्थेंत कोळ्याकडे पाणी पुरविण्याचें काम असे; धीवर. ही एक गुन्हेगार जात समजली जाते. पण यांच्यापैकीं फक्त महादेवकोळी (राजकोळी) व गुजराथकोळी याच दोन पोटजाती गुन्हे करतात. २ कोळी नांवाचा किडा; हा आपल्या अंगांतून सूत काढतो व त्यांचें जाळें बनवितो. [प्रा. कोलिअ] **०ण**—स्त्री. १ कोळी जातींतील बाई. २ कोळी किडयाची मादी. ३ शिमग्याच्या सणांत कोळणीचें सोंग आणतात त्यांत स्त्रीवेषांत नाचणारा पुरुष. **०लांकडी**—स्त्री. जंगलांतून तोडून आणलेल्या लांकडावरील कर, दस्तुरी. **०वडा**—पु. कोळवाडा पहा. **०शुक**—न. कोळशीट; कोश. **कोळ्याचें सूत**—न. १ लांब सूत. २ (ल.) लांबच लांब, निरस व कंटाळवाणें भाषण.

कोळुसांटा—पु. (बे.) एक प्रकारची वनस्पति.

कोळू—स्त्री. (गो.) जनावराच्या अंगावरील ऊ. [कोळ]

कोळें—न. १ बैलाचें वशिंड; कोळखंड. २ गवताचा लंबवर्तुळाकार (अंडाकृति) मुडा किंवा पुडा. यांत भात किंवा भाताचें बियाणें ठेवतात. गवताची पुरचुंडी (पावटे इ० ठेवण्याची). –शे ७.२८. [कोहळें] **०भर**–वि. कोळ्यांत राहतील इतके. 'कोळेंभर पावटे सुमारें दीड पायली होतात.'

कोळे रोग—पु. सुपारीवरील एक रोग.

कौकचित, कौटल-ळ, कौटाल-ळ, कौटाल्या, कौटाळणें, कौटाळी-कौटाळीण-कौवटाळीण, कौटिल्य, कौटीळ, कौठ, कौठी, कौंडळ, कौडा, कौडागहूं, कौडाळ, कौडी, कौडीचुंबक, कौडीटंक, कौडीपूत, कौंड्या ऊद, कौड्या घोणस, कौड्या साप—हे शब्द 'कव' खालीं पहा.

कौटाळीण—कवटाळीण पहा. 'हे कौटाळीण निर्धारीं। नसतींच दैवतें उभी करी।' –ह ३.४१.

कौटाळ्यविद्या—स्त्री. (कुण.) (अडाणी लोकांचा पांडित्य प्रदर्शक प्रयोग) कौटाळ; जादू; जारणमारण; चेटूक. [कवटाळ+विद्या]

कौटिल्य—न. १ वांकडेपणा; वक्रता. २ (ल.) कपट; दुष्टपणा;कवटाळ;ठकबाजी. 'राणीचें आनंदीबाईच्या सवाई निष्ठुराचरण व कौटिल्य; खंडूजीचा मत्सरी स्वभाव ...' –नि ५४४. ३ चाणाक्षपणा. ४ चाणक्य ऋषि–चंद्रगुप्त मौर्य राजाचा मंत्री. याचा अर्थशास्त्र ग्रंथ प्रसिद्ध आहे.

कौंतिक—पु. भालेकरी. [सं. कुंत=भाला]

कौंती—स्त्री. भाला; एक हत्यार. [सं. कुंत; हिं. कौंत]

कौतुक—न. १ आश्चर्य; कुतूहल; जिज्ञासा; नवल; आश्चर्य, विस्मय, प्रियता, आनंद किंवा जिज्ञासा उत्पन्न करणारी कोणतीहि गोष्ट (मनुष्य, वस्तु, कृत्य, गोष्ट, देखावा इ०) 'त्याचे बोलण्याचें कौतुक वाटलें.' 'ज्या पदार्थाचें ज्यास कौतुक नाहीं त्यास तो

देऊं नये.' २ प्रेम; ममतेनें, आनंदानें धरणें; लाड करणें; कुरवाळणें (मूल किंवा वस्तु); अतिशय प्रीति, अभिमान धरणें; लालन पालन; नाजुक रीतीनें बागविणें; फार काळजी घेणें. (क्रि० (कौतुकानें) राखणें, ठेवणें). ३ मौज; खेळ; विनोद; प्रदर्शन; गाणें नाचणें. इ० 'उत्तर निज तुरगांतें धाया अरुणासि कौतुक पिटाळी।' –मोविराट ४.८१. ४ मनोरंजन; करमणूक; ख्याली-खुशाली. [सं.]

कौतुकी—वि. खेळ्या; मौज करणारा, आनंदी; उल्हासी.

कौतुकेंकरून, कौतुकें–कानें—क्रिवि. सहज; लीलेनें. 'तैसा आवडतिये भूमिके। आरूढलियाहि कौतुकें।' –अमृ ७. २६०. [सं.]

कौतूहल—न. कौतुक अर्थ १.३.४. पहा. कुतुहल पहा. [सं.]

कौत्सित्य—न. कुत्सितपणा; दुष्टपणा; कपटभाव. कुत्सित (वि.) पहा. [सं.]

कौदरी—स्त्री. चवेणीचें झाड.

कौन—वि. (दलाली) नऊ ही संख्या.

कौभवी—वि. १ चमत्कारिक; भीतिदायक; भयंकर; हिडिस परंतु अगम्य व अनिश्चित असा (पदार्थ, माणूस वगैरे); २ काण्णवाण्णू पहा. [कोण+बाऊ ?]

कौपीन—नस्त्री. १ लंगोटी; छाटी (क्रि० नेसणें). 'मुळीं मुंडलें मुंडन। बंदी बंदाची कौपीन।' –तुगा ४०२०. २ कफनी. 'माझ्या खोलींत दुसरी एक कौपीन आहे ती घालून इकडे ये.' –सूर्योदय १५९. [सं.]

कौबेरी—स्त्री. उत्तर दिशा. [सं कुबेर]

कौंभणें—क्रि. कोंब फुटणें; डिऱ्या येणें; कोंभणें पहा. 'कैवल्यद्रुमु कौंभेला।' –भाए ३. 'ते पुनरपी कौंभेली।' –कृमुरा ३९.९. [कोंब]

कौमार–त्व—न. बालपण; पांच ते दहा वयापावेतों वय; कुमारपण. 'एथ कौमारत्व दिसे।' –ज्ञा २.१०९. [सं.]

कौमुदी—स्त्री. १ चांदणें; चंद्रप्रकाश. २ व्याकरणावरील एक ग्रंथ. (भट्टोजी दीक्षिताचा सिद्धान्त कौमुदि). 'त्यानें कौमुदी म्हटली आहे.' [सं.]

कौमोदकी—स्त्री. विष्णूच्या गदेचें नांव. 'कौमोदकी प्रियगदा स्मर अंतरंगे।' –ध्यानमा ८. [सं. कुमुद]

कौल—न. घराच्या छपरावर आच्छादनासाठीं घातलेलें मातीचें पन्हळ (चपटें, नळीवजा, मंगळोरी). (वाप्र.) **घरावर कौल राहूं न देणें**–एखादें कुटुंब समूळ नष्ट करणें. [सं. कीलक–कीलअं–केलुं–कवेलु–कौल ?] **म्हo** घरावर नाहीं कौल आणि रिकामा डौल=पोकळ श्रीमंती.

कौल—पु. १ वचन; आश्वासन; अभय. २ जमिनीची लागवड करण्यास किंवा व्यापार करणाऱ्यास सरकार जें अभयपत्र, करार, कबुलायतीचा कागद देतें तो. हा जमाबंदींतील नेहमीचा शब्द आहे. मालक, सरकार किंवा जमीनदार कुळाला ७ या कांहीं सवलतीच्या अटी देतो किंवा त्याच्याशीं जे करार करतो त्यांस कौल म्हणतात. कौल केल्यानंतर सारा इ० वाढत नाहीं. पडीत जमिनीबद्दल साऱ्याची सूट घेण्याकरितां कौल देण्यांत येतो; सरकारी करारनामा; कबुलायत; कौलनामा. 'तुम्हांस चि. रा. माधवराव नारायण याचा कौल.' –रा १२.१३७. –शिच ४५. 'बंदरोबंदरीं कौल पाठवून आमदरफ्ती करावी.' –मराआ २१. ३ परवाना; अभयपत्र (शत्रूला आपल्या प्रांतांतून जाण्यासाठीं दिलेलें); माफी देणें; सूट देणें. 'दगेखोर गनीम आपण जेर झालों असें जाणून दगाबाजीनें कौल घेतो, म्हणून जवळ बोलावूं नये.' –मराआ ३६. ४ ईश्वरी वचन; ईश्वराची आज्ञा मिळविणें; प्रश्न; साक्ष; प्रसाद; देवाजवळ गाऱ्हाणें सांगून त्यावर अमुक उपाय करावा किंवा नाहीं हें विचारतांना देवाच्या अंगास लावावयाचे तांदूळ, सुपाऱ्या इ०; देवाची संमति. 'इंद्रियांचे पेटे भला कौल देती।' –तुगा ४०८. 'या मनोदेवतेस कौल लावावा.' –गीर १२३. [अर. कौल्. सर्व भाषांतून थोड्याफार अपभ्रंशानें आला आहे] (वाप्र.) **कौलास येणें**–शरण येणें; तह करण्यास कबूल होणें. 'झालें मोंगल बेजार मरूं लागले, आले कौलाला।' –ऐपो २३६. सामाशब्द– **०अहद्**–पु. वचन; कौल. 'त्यावरून म्यां त्याजला कौलअहद दिधला.' –रा ६.५७०. [कौल्+अहद] **०करार**–पु. लेखी करारमदार; कबुली; ठराव; वचन; आश्वासन; अटींना संमति. [कौल+करार] **०करारदाद**–पु. वचन. 'इज्जतसाहेबाचा तरी कौलकरारदाद आपल्यास आहे कीं तुमचे जागीरपैकीं एक चावर कसोदगी करणें नाहीं.' –इम ६७. **०नामा**–पु. १ सरकारनें शेतकऱ्याला करून दिलेलें करारपत्र; लेखी करार; कबुलायत. २ (कायदा) भाडेपट्टा. (इं.) लीज. **०पत्रक**–न. कमी साऱ्यानें ज्या जमिनी केल्या त्यांचा हिशेब. (गांवचा). **०प्रसाद**–पु. १ (कों.) गुरवानें देवतेचें अनुमोदन मिळविण्याकरतां तिच्या अंगाला लावलेले कळे, फुलें वगैरे खालीं पडून प्रश्न विचारणारास दिलेलें उत्तर अथवा प्रसाद. २ कौल मागतांना लावलेलीं फुलें वगैरे. **कौल अर्थ** ४ पहा. (क्रि० लावणें; लागणें).

कौलघ—न. (ज्यो.) अकरा करणांतील तिसरें करण. [सं.]

कौला—पु. १ एक भाजी; कौल्याची भाजी कोंकणांतप्रसिद्ध आहे. हें झुडुप वीतभर उंच वाढत असून रानांत पावसाळ्यांत उगवतें. याची भाजी श्रावण्या सोमवारीं अवश्य खावी असें म्हणतात. [सं. कलाय]

कौला-ले—पुन. (हिं.) एक मोठया जातीचें नारिंग. याची साल आंतील फळापासून सुटी निघते. सालीस कडवट वास येतो.

कौलागम—न. मंत्रशास्त्र. [सं. कौल=शाक्तपंथ+आगम]

कौलाफोक—वि. कोंवळा आणि सरळ (झाड, वनस्पति, रोपटा); तरुण व ताठ (मनुष्य-सौंदर्यलक्षण). [कोंवळा+फोंक]

कौलार—न. कौलें घातलेलें छपर.

कौलार-रू—वि. कौलें घातलेलें (छपर, घर). [कौल+आर प्रत्यय]

कौला लसलसीत—वि. कोंवळा लुसलुसीत; नाजुक; नवीन; ताजा; कोंवळा; जोमदार आणि टवटवीत (झुडप, फळ). [सं. कोमल+लस्-लसित]

कौलावण—स्त्री. १ सरकारी कौल, परवाना मिळविण्यास द्यावयाची पट्टी, किंमत, फी. २ (नाविक) गलबताचा नोर; गलबतांतून आण्यायेण्यास पडणारें मूल्य. [कौल]

कौलिक—वि. वंशपरंपरागत; वडिलोपार्जित; कुळासंबंधीं. वारशानें आलेलें. [सं. कुल]

कौलिक—पुवि. १ शाक्त पंथांतील एक व्यक्ति, अथवा तो पंथ. शाक्त. 'पूजिता मातीचा मोदळा। कौलिक पावला ईश्वर कळा।' २ (सामा.) मांत्रिक; वाममार्गी; चेटक्या. [सं.]

कौलिक—पु. व्याध; पारधी. 'एके दिनीं कौलिक पारधीतें।' –वामन व्याधाख्यान १. [सं. कोल]

कौली—स्त्री. सरकारपासून कौल घेऊन प्रथमतः लागवडीस आणलेली जमीन. –वि. सरकारांतून ज्याचा कौल घेतला आहे असें (शेत, झाड इ०). [कौल] **०मक्तेदार**—पु. कौलानें शेत करणारा. याच्या उलट थळकरी.

कौलू—स्त्री. जुनाट पाणथरी. लघ्वांतरत्वचाग्रंथी कठिण होणें.

कौशल-ल्य—न. १ कुशलता; तरबेजपणा; चातुर्य; पारंगतता. २ सुख; कल्याण; सुरक्षितता; निश्चितता. [सं.]

कौशा—पु. रक्षक; पाठीराखा; सूड उगविणारा; वाली; कड घेणारा, कंशा, कोवसा पहा.

कौशि(शी)-कानडा—पु. (संगीत) गायनशास्त्रांतील एक राग; कानडा. ह्या रागांत षड्ज, तीव्र ऋषध, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण; वादी मध्यम, संवादी षड्ज; गानसमय रात्रीचा तिसरा प्रहर. हा कानडयाचा एक प्रकार आहे.

कौशेय—वि. रेशमी (वस्त्र, सूत). [सं.]

कौंस—पु. कंस; वर्तुळाच्या परिघाचा कोणताहि भाग; परिघांश. [अर. कौस=धनुष्य]

कौ(कौं)सल-साल-ल्य—न. गुप्त मसलत; कट; अनिष्ट, कपटी योजना; कवटाळ; कवसाळ. (क्रि० करणें). 'म्हणे काय कौंसाल केलें सतीनें।' –रामसुतात्मज (द्रौपदी वस्त्रहरण १९२) –वि. १ कसबी; कुशल (माणूस, योजना, इ०). 'नाना कौसाल रचना। केली धर्माचिया स्थापना।' –कालिकापुराण १६.६६. २ कपटी; कुंभाडखोर. 'तुकयाबंधु स्वामि कानडया कौसाल्या रे।' –तुगा १४०. [सं. कौशल्य ?]

कौंसल—पु. मंत्रिमंडळ; कायदेमंडळ; कौन्सिल. [इं. कौन्सिल] **०दार**—पु. कौन्सिलचा सभासद; नामदार. 'पुढें वाढतां वाढतां तो मद्रास येथें कौंसलदार झाला.' –नि ६१२.

कौन्सिल, कौंसिल—न. कायदेमंडळ; मंत्रिमंडळ; कारभारीमंडळ; परिषद; सभा. **कौन्सिलर**—पु. कौंसिलसभासद; मंत्री; नामदार. [इं.]

कौसुंभ—वि. १ कुसुंब्याच्या रंगानें रंगलेला. २ कुसुंब्या संबंधीं [सं.]

कौस्तुभ—पु. समुद्रमंथनांतील चौदा रत्नांपैकीं एक; श्री विष्णूच्या कंठांतील मणि, अलंकार. 'कौस्तुभाहोनि निर्मिलें। लेणीं दिधलीं।' –ज्ञा ९.३८९. 'कंठीं कौस्तुभमणि विराजित.।' –तुगा १. [सं.]

कौस्तुभी-की—स्त्री. घोडयाच्या गळयाखालीं लोंबणारी पोळी; गललोंबीका –अश्व १.९९. [कौस्तुभ]

कौळा-ळी—कवळा-ळी पहा.

कौळिक—स्त्री. कावीळ. हा रोग झाल्यास दृष्टीला भ्रांत पडते. 'जाणिजे कौळिक।' –भाए ७४६. [कौळ]

कौळिक—पु. कोळी; भिल्ल; व्याध; निषाद. 'मातियेचा द्रोण केला। तो कौळिका भावो फळला।' –एभा १.४३. [सं. कोल]

कौळी—स्त्री. एक झुडुप; कावळी. [सं. काकनासा; म. कावळी]

कौक्ष—वि. ओटीपोटासंबंधीं; पोटासंबंधीं; कुक्षीसंबंधीं. [सं. कुक्षि]

क्यंच—न. (बे.) लांकडाचा नार; गाभा. [का. केच्चु]

क्याट—न. (क.) एक प्रकारचें रेशीम (लुगडयांच्या व्यापारांत रूढ). 'हल्लीं चोहों कडे लुगडयाला क्याट वापरतात.' [कंतान ?]

क्याट—पु. (कुण. बायकी) पत्त्यांचा डाव, जोड. [इं. कार्ड–कॅर्ड–कॅट ?]

क्याटलाग—पु. हजिरीपत्रक (शाळेंतील विद्यार्थ्यांचें). कॅटलॉग पहा.

क्याटी—न. बावन तोळयांचें वजन. 'क्याटीचें वजन बावन तोळे असतें.' –मुंव्या ११९. [?]

क्यातखुरपें—न. (बे.) वाते व पाठीकडे धार असलेला कोयता, खुरपें. [का. कत्ति=कोयता+खुरपें]

क्यांप—कँप पहा.

क्याबला—उद्गा. (काशी) काय (हें) संकट! [हिं. क्या+बलाय]

क्यारट—कॅरट पहा.

क्यारी, क्यारडी—(गुज.) १ भातजमीन; खाचर. २ पुष्पवाटिका; वाफा (बागेंतील फुलांचा) (ह्याच्या भोंवतीं फरसबंदी करतात). [सं. केदार; हिं. कियारी, क्यारी]

क्याल—न. (कृ.) केळीचें काल, गाभा. काल पहा. [सं. कदल; प्रा. कयल]

क्यास—पु. तर्क; अंदाज. क्यास पहा. 'काय मनसबा करितील हें क्यासांत येत नाहीं.' –पया २५९. [अर. कियास्]

क्रकच—पुन. करवत. [सं.] **०नासिक**–वि. करवतीसारख्या नाकाचा (एक मासा). **०मक्षिका**–स्त्री.(प्राणि.) झाडाच्या पानाला व फांदीला भोंकें पाडून पानांवर अंडीं घालणारी माशी. (इं.) सॉफ्लाय.

क्रतु—पु. १ यज्ञ. 'म्हणूनि समूळ हा उचितु। स्वधर्मरूप क्रतु।' –ज्ञा ३.१३९. २ (प्रामुख्यानें) अश्वमेध यज्ञ. ३ सप्तर्षींपैकीं एक ऋषि. [सं. क्रतु; तुल०प्री. क्रतोस्; झेंद क्रतु]

क्रतुंतकाळ—क्रतांतकाळ पहा.

क्रंदन—न. रडणें. आक्रंदन पहा. [सं.]

क्रम—पु. १ वर्ग; अनुक्रम. २ व्यवस्था; मांडणी; पद्धत; कांहीं नियमानुसार चालणें; मोड. ३ प्रगति; पुढें जाणें, चालणें; क्रमण. ४ विधि; नियम. ५ (संगीत) स्वरांचा आरोह. ६ परंपरा; सरणी; संप्रदाय. [सं.] सामाशब्द– **०त्रैराशिक**–पुन. सरळत्रैराशिक. [सं. क्रम्=जाणें] **०पाठी**–वि. वेदसंहितेंतील दोनदोन पदांचा अनुक्रम धरून एक वाक्य तयार करून पठण करणें व पठण करतांना मागील पद पुढील पदास जोडणें, याप्रमाणें अध्ययन करणारा. उ० 'अग्निमीळे। ईळे पुरोहितम्। पुरोहितंयज्ञस्य।' इ० ह्याप्रमाणें जटापाठी; घनपाठी; शाखापाठी असे अध्ययन करणारांचे दुसरे वर्ग आहेत. [सं.] **०प्राप्त**–क्रमागत पहा. **०योगी**–क्रमाक्रमानें ब्रह्मप्राप्ति करून घेणारा योगी. 'हे मज मिळतिये वेळे। तयां क्रमयोगियां फळें।' –ज्ञा १८.११३४. **०मार्ग**–रुळलेला, नेहमीचा मार्ग; धोपटमार्ग; सनदशीर मार्ग. 'क्रांतिमार्गे क्रममार्गापेक्षां नेहमींच वाईट असतो असें नाहीं, पण बहुधा तो वाईट असतो.' –सुदे १११. **०मुक्ति**–स्त्री. देवयानमार्गानें मिळणारा मोक्ष. 'म्हणून या मार्गास क्रममुक्ति ... नांव आहे.' –गीर २९५. **०शः**–क्रिवि. ठराविक पद्धतीनें, क्रमानें; व्यवस्थितपणें. [सं.] **०संख्याबाचक विशेषण**–न. अनुक्रमानें संख्या दर्शविणारें विशेषण. जसें– पांचवा, सहावा, इ०. **क्रमागत-यात**–वि. क्रमानें प्राप्त झालेला, असलेला; वंशक्रमानें; वारसानें मिळालेला (वांटा, जिंदगी) [सं.] **क्रमानें, क्रमाक्रमानें**–क्रिवि. १ एकसारखें; नियमितपणें; सुव्यवस्थितपणें; व्यवस्थित प्रगतीनें. २ एकामागून एक अशा प्रमाणें; ओळीनें; नंबरवार. **क्रमिक**—वि. १ इयत्तावार नेमलेलें; अभ्यासासाठीं लावलेलें (पुस्तक इ०). 'शिकविल्या गेलेल्या क्रमिक पुस्तकांची यादी मिळत नाहीं' –केले १.१४३. २ क्रमागत पहा.

क्रमण—न. गति; गमन; पुढें जाणें; पुढें पुढें सरणें, चालणें; प्रगति; [सं.]

क्रमणें—उक्रि. १ (वेळ, काळ) आनंदांत काढणें, घालविणें; करमणें. २ आक्रमण करणें; पुढें जाणें, चालणें; ओलांडणें; पलीकडे जाणें; उल्लंघणें. 'क्रमी ध्यानाचें चवरें। सांपडे तंव।' –ज्ञा ६.५८. ३ मरणें. 'संवसारें जालों अतिदुःखें दुःखी। मायबापें सेखीं क्रमिलिया।' –तुगा ६५३. [सं. क्रम्=जाणें]

क्रमुक—पु. सुपारीचें झाड. –शाकी. [सं. क्रमुक=पोफळ, सुपारी]

क्रमोक्रम—पु. व्यवस्था आणि अव्यवस्था; योग्य व अयोग्य रचना, जुळणी. –क्रिवि. सुलटया व उलटया क्रमानें. [क्रम+उत्क्रम (व्युत्क्रम)]

क्रय—पु. १ खरेदी; पदार्थ विकत घेणें; विकत घेतांना दिलेला पैका. २ विक्री; घेतलेला पैका. –न. (गो.) विकून आलेली किंमत. [सं. क्री=विकत घेणें] **०लेख्य**–न. देवघेवीचें पत्र, लेख; खरेदी–विक्रीखत. [सं.] **०विक्रय**–पु. १ देवघेव; खरेदीविक्री; सौदा; व्यापार. २ व्यापार; उदीम. [सं.]

क्रय्य—वि. खरेदीविक्रीला योग्य; विकण्यासाठीं बाजारांत आलेला; विकावयास काढलेला (पदार्थ). [सं.]

क्रव्य—न. १ कच्चें मांस. २ मांस. [सं.]

क्रव्याद्—वि. १ हिरवें मांस खाणारे (वाघ, सिंह इ०). राक्षस, पशु वगैरे मांसभक्षक. २ (व.) दुष्ट; राक्षसवृत्तीचा. [सं.]

क्रांत—क्रिवि १ व्याप्त; उल्लंघिलेला; आक्रमिलेला. (समासांत) २ चालून गेलेला; हल्ला केलेला. चोरक्रांत; टोळक्रांत; राजक्रांत इ० आक्रांत पहा. ३ व्याकुळ; विव्हल; व्याप्त (दुःख इ० नीं). 'एकें तियें दुःखें। क्रांतें भूतें॥' –ज्ञा १५.४१२ –स्त्री. (क्रांतीचें संक्षिप्त रूप) चाल; हल्ला; धाड (मुख्यत्वें चोर, शत्रू, टोळ यांची). [सं. क्रांति] **०दर्शी**–वि. त्रिकालज्ञ; दीर्घदर्शी; ज्ञानी. 'त्यजौनि जिये मार्गीं केली भिक्षा। क्रांतदर्शी॥' –ऋ ६. 'एथ मोहले गा क्रांतदर्शी।' –ज्ञा ४.८८. [सं.]

क्रांतणें—उक्रि. १ पादाक्रांत करणें; चालून जाणें; आक्रमणें (देश, रस्ता). २ व्याकुळ होणें (भूक, तहान, दुःख, श्रम, क्षोप, कजे, दारिद्र्य यांमुळें).

क्रांति—स्त्री. १ क्रमण; पुढें जाणें; प्रगति. २ चळवळ; बंड; उलथापालथ; फेरफार. (समासांत) राज्यक्रांति; धर्मक्रांति. ३ विषुववृत्तापासून खस्थ पदार्थाचें अंतर (हें याम्योत्तर वृत्तावर मोजलें जातें); अपम. ४ सूर्याचा गमनमार्ग (क्रांतिवृत्तावरून). ५ अधिकाऱ्याचा जुलूम; नोकरशाहीचा जुलूम. [सं.] **०कक्ष**–पु. क्रांतिवृत्त. [सं.] **०कारक**–वि. चळवळ्या; बंडखोर; प्रचलित राज्ययंत्र उलथून पाडणारा (माणूस, गोष्ट). 'पुण्यांतील क्रांतिकारक तरुणांनीं त्यांना मुख्य नेमलें.' –इंप ९३. **०ज्या**–स्त्री. क्रमज्या; क्रांतीची ज्या. **०पात**–पु. विषुववृत्ताला क्रांतिवृत्त जेथें छेदितें तेथील बिंदु; संपातबिंदु. [सं.] **०पातगति**–स्त्री. अयनचलन; अयनगति; विषुवायन. [सं.] **०मंडल-वलय-वृत्त**–न. सूर्याच्या गमनमार्गाचें वृत्त, कक्षा; सूर्याची भूमध्यरेषेच्या उत्तरेकडील २३॥ अंश व दक्षिणेकडील २३॥ अंश जाण्याची मर्यादा, तींतील बिंदु साधले म्हणजे जें वृत्त होतें तें. 'ज्या गमनमार्गांतून वार्षिक गतीनें भूगोल सूर्याभोंवतीं फिरतो किंवा सूर्य भूगोलाभोंवतीं समोरच्या राशींतून फिरतोसें दिसतें त्या गमनमार्गास क्रांतिवृत्त म्हणतात.' –सूर्य १२. **०मार्ग**–पु. बंडखोरीचा मार्ग; राज्यक्रांतिकारक चळवळ. 'क्रांतिमार्ग क्रममार्गापेक्षां नेहमीच वाईट असतो असें नाहीं. पण बहुधा तो वाईट असतो.' –सुदे १३१. **०साम्य**–न. क्रांतीमधील साम्य (सूर्य, चंद्र किंवा ग्रह यांच्या). **०सूत्र**–न. याम्योत्तरवृत्ताची रेषा. [सं.]

क्रॉप—पु. केसांची विशिष्ट कापणी; इंग्रजी पद्धतीची हजामत. (क्रि० राखणें; ठेवणें) [इं.]

क्रॉस—पु. १ आडवी व उभी लहान रेघ; फुली. २ कूस; ख्रिस्त्यांचें पवित्र चिन्ह; ख्रिस्ती धर्माची खूण; खुरूस. ३ कूसाच्या आकाराचा दागिना. [इं.]

क्रिकेट—पु. चेंडूफळीचा विलायती खेळ. 'जो साऱ्या दिवसभर भागून गेला आहे त्याला क्रिकेटच्या बॅटाचे टोले मारण्यांत किंवा चेंडूच्या पाठीमागें पळत सुटण्यांत मौज कोठून वाटणार?' –आगर ३.१६१. [इं.] **०मॅच**–स्त्री. चेंडुफळीच्या खेळाचा सामना. [इं.]

क्रिस, क्रिसन—पु. (शाप.) हवेंत अति सूक्ष्म प्रमाणांत असणारा एक वायु. (इं.) क्रिप्टॉन.

क्रिमि-मी—पु. जंतु; किडा; कीटक. [सं. कृमि]

क्रियमाण—क्रिवि. १ चालू क्रिया (जी केली जात आहे अशी); हातांतील काम, गोष्ट. २ पुढील, भावी कार्य (जें व्हावयाचें तें); ज्याचा आरंभ करावयाचा तें कार्य. ३ पूर्व जन्मींचें जें संचित असतें त्याचें बरेंवाईट फळ या जन्मीं भोगावयास लागतें तें, किंवा पुढील प्रारब्धाचें कारणरूप चालू जन्मांतील बरीवाईट कृति; क्रियमाण प्रारब्ध. [सं. कृ]

क्रिया—स्त्री. १ कर्म; काम; कृत्य; करणी; कृति. 'असेल माझी क्रिया बरी.' –वेसीस्व ३.६४. २ और्ध्वदेहिक कर्म; प्रेतसंस्कारविधि; उत्तरकार्य; क्रियाकर्मांतर. (क्रि० करणें). 'करुनि क्रिया पित्याची गेला तो श्रितभवाब्धिसेतुकडे।' –मोवन १०.८३. ३ धार्मिक विधि. ४ कोणत्याहि धंद्याचे, कामाचे विशेष मुद्दे, गोष्टी; इतिकर्तव्यता. ५ (शपथ, दिव्य, साक्षी, कागदपत्र इत्यादिकांवरून) खरें ठरविणें, सिद्ध करणें; शपथ; दिव्य; साक्ष; प्रमाण; पुरावा. 'क्रिया करी तुम्हां न वजे पासुनि।' –तुगा १८. 'क्रिया शहाजीची आम्हाला।' –ऐपो १४. ६ (वैद्यकी) औषधोपचार. ७ (व्या.) क्रियापद; धातूंचे अर्थ स्पष्ट करणारा व्यापार. ८ (संगीत) ताल धरण्याचा प्रकार; ह्यांत दोन प्रकार आहेत–सशब्द व निःशब्द. ९ (सामा.) परिणाम. 'रासायनिक क्रिया.' [सं. कृ=करणें] (वाप्र.) **०जागणें–धरणें–एखाद्याचे** उपकार जाणणें, आठवणें. **०टाकणें–सोडणें–सांडणें–विसरणें**–एखाद्याचा उपकार विसरणें; कृतघ्न होणें. सामाशब्द– **०कर्मांतर**–न. क्रिया अर्थ २ पहा. [सं.] **०कलाप**–क्रिया अर्थ ४ पहा. **०कौशल्य**–न. क्रिया करण्याची हातोटी; कामांतील कुशलता; वाकबगारी. **०द्वेषी**–वि. (कायदा) खटल्यांत ज्याची साक्ष अपायकारक होते असा (साक्षीदारांच्या पांच प्रकारांपैकींएक). **०नष्ट**–वि. १ कृतघ्न. २ स्वतःनें वचन न पाळणारा; खोटा.' नव्हे क्रियानष्ट तुम्हां ऐसा।' –तुगा १९११. **०परता**–स्त्री. (संगीत) अभ्यासतत्परता. [सं.] **०भाल**–वि. १ (कायदा) अज्ञान; अप्रौढ (माणूस); देणें, घेणें इ० व्यवहार करण्यास ज्यास कायद्यानें प्रौढत्व प्राप्त झालें नाहीं असा; (इं.) मायनर. २ असमर्थ; नालायक (माणूस–देवघेवींत). **०भ्रष्ट**–वि. १ वचनभ्रष्ट; वचन, शपथ न पाळणारा. २ कृतघ्न; उपकार न जाणणारा. ३ नित्यनैमित्तिक कर्मे न करणारा, धर्मभ्रष्ट. **०रूप**–न. क्रियापदाचें वचन, पुरुष, काल इ० भेदानें बदलणारें रूप. **०वाचक**–पु (व्या.) क्रियाबोधक; क्रियेसंबंधीं. [सं.] **०वाद**–क्रिया, विकार इ० गोष्टी आत्म्यावर आपली छाप बसवितात असें प्रतिपादणारें एक मत; वैशेषिक व जैन तत्त्वज्ञान यांतून हा वाद सांपडतो. याच्या उलट अक्रियावाद; हा वेदांत, सांख्य, योग, बौद्धमत यांतून दिसतो. **०वान-वंत**–वि. शास्त्राप्रमाणें विहित आचरण करणारा; नित्यनैमित्तिक नियम पाळणारा. 'वेदज्ञाहून शतगुणें बहुत। जो वेदार्थ करणार पंडित। त्याहून अनुष्ठानी क्रियावंत। शतगुणें आगळा।' –ह ३४.१००. **०श्रय**–पु. (व्या.) कर्ता (क्रियापदाचा); क्रियेचें प्रधान कारक. **०साहश्य**–न. (शाप.) क्रियांतील सारखेपणा; समता. (इं.) ॲनॉलॉजी.

क्रियांगराग—पु. (संगीत) शास्त्रांतील नियम कायम ठेवून विचित्रतेसाठीं विवादी स्वरांचा उपयोग ज्या रागांत केला जातो असा राग. [सं.]

क्रियापद—न. (व्या.) ज्या शब्दांकरून कोणत्याहि क्रियेचा, व्यापाराचा अथवा स्थितीचा बोध होतो तें; वाक्यांतील क्रियावाचक पद. [सं. क्रिया+पद]

क्रियाविशेषण (अव्यय)—न. (व्या.) ज्या शब्दाच्या योगानें क्रियेच्या गुणाचा अथवा प्रकाराचा, किंवा अमुक एका विशिष्ट अवस्थेचा बोध होतो तो शब्द. जसें- 'तो हळू चालतो.' कांहीं क्रियाविशेषणें मूळ नामांचीं विभक्त्यंतरूपें असतात. उदा० बुद्धया. [सं. क्रिया+विशेषण]

क्रियोपन्यास—पु. प्रमाणांचें प्रतिपादन; पुरावा दाखविणें. [सं. क्रिया+उपन्यास]

क्रीड—न. ध्येय; अंतिम हेतु; आद्यतत्त्व. 'जुन्या पक्षानें राष्ट्रीय सभेचे अंतिम हेतु किंवा क्रीड कायम ठरवून ...' –टि ३.२६३. 'आमचें क्रीड ज्यांना मान्य असेल त्यांनीं आमच्या कॉंग्रेसमध्यें यावें.' –सुदे ६३. [इं. क्रीड]

क्रीडणें—अक्रि. (काव्य) खेळणें; मौज करणें; विलास करणें. 'धन्य धन्य तें नंदाचें आंगण। जेथें क्रीडे मनमोहन।' –ह ५.१७७. 'गोपबालक गडी बलिराम। क्रीडती हरिसवें अभिराम।' [क्रीडा]

क्रीडन, क्रीडा—नस्त्री. १ खेळ; मौज; विलास; लीला; मनोरंजन; करमणूक. २ परमार्थाखेरीज जो व्यवहार तो. ३ मैथुन; सुरत. 'क्रीडा करो तुजसवें ललना पलंगीं।' –र ३. सामाशब्द– **०कलह**–पु.खोटें भांडण;रुसवा;छुट्टुपुट्टें अथवा विनोदाचें भांडण; चित्तविनोदार्थ कलह. **०कोप**–पु. प्रणयकोप; खोटा राग. [सं.] **०कौतुक**–न. चित्तविनोद; करमणूक; गंमत. [सं.] **०पाश**–पु. फांसा; अक्ष (खेळण्याचा). **०मृग**–पु. १ करमणूकीसाठीं बाळगिलेलें जनावर (हरिण, वानर). 'पढविलें पांखिरूं ऐसें न बोले। यापरी क्रीडामृगही तैसा चले।' –ज्ञा ११.१७०. २ (ल.) काठीचा घोडा; खेळवणा. ३ (ल.) दुसऱ्याच्या कह्यांत वागणारा माणूस; ताटाखालचें मांजर; लाळघोट्या माणूस. **०स्थान**–न. खेळण्याची, करमणुकीची, विलासाची जागा; उद्यान; अंतःपुर; राणीवसा; स्त्री. 'तुझें आवडतें क्रीडास्थान। तें मधुवन मोडिलें।'

क्रीत—पु. १ क्रीत पुत्र. विकत घेतलेला मुलगा; बारा वारसांपैकीं एक. २ दासांतील एक भेद. –वि. १ विकत घेतलेलें; खरीद केलेलें. २ विकलेलें. [सं.]

क्रीतानुनय—पु. (कायदा) विकत घेतलेली वस्तु विकणाऱ्याला परत करणें. पसंत न पडलेल्या खरेदीचा व्यवहार. मिताक्षरा. –व्यवहाराध्याय पृ २८३. [सं.]

क्रीम—पु. कृमि; किडा. 'चौखाणीमाजीं चौऱ्यासी लक्ष योनी। ते क्रीम जाणावे सर्व मिळोनि।' –स्वानु ७.४ ३४. [सं. कृमि]

क्रुद्ध—वि. रागावलेला; कुपित. [सं.] **०दृष्टि**–स्त्री. (नृत्य) दृष्टीमध्यें कठोरता व निश्चलता (पापण्या आणि बुबुळें निश्चल ठेवून) दाखविणें; क्रोधाचा भाव दाखविण्यासाठीं हिचा उपयोग करतात. [सं.]

क्रुम—न. १ (रसा. शाप.) एक मूल धातु–द्रव्य. २ (चांभारी) गाय, म्हैस यांचें पांढऱ्या रंगावर कमाविलेलें कातडें. ३ एक विशिष्ट प्रकारानें कमावलेलें कातडें. [इं. क्रोम]

क्रुमाम्ल—न. (शाप.) एक अम्ल. हा हिरव्या रंगाचा घन पदार्थ आहे. (इं.) क्रोमिक ॲसिड.

क्रूअर—न. एक लढाऊ गलबत, आपल्या युद्धार्चीं जहाजें संरक्षिण्यासाठीं व शत्रूंचा नाश करण्यासाठीं युद्धकालीं क्रूअरें ठेवतात. [इं.]

क्रूडाईल—न. खार्णीतील अशुद्ध तेल; कच्चें, गाळ तेल. 'ऑईल इंजिनांतील क्रूड ऑईल वापरण्याचा प्रघात बरेच जणास विदित असेल.' –सासं २.१३२. [इं. क्रूड+ऑइल]

क्रूर—वि. १ निर्दय; कठोर; कृपाहीन; निष्ठुर. २ भयंकर; उग्र; भीतिदायक. ३ प्रचंड; धडाक्यानें जाणारी, वाढणारी (आग इ०). ४ अमानुष; फाजील; रानटी (वर्तन, कृत्य). ५ हिंसक; हिंस्र (प्राणी); [सं.]

क्रूस—पु. १ वधस्तंभ, म्हणजे ज्या खांबावर प्रभु येशूख्रिस्ताला खिळून मारलें तो. क्रॉस पहा. 'येशूला जेथें क्रूसावर खिळलें होतें तें ठिकाण शहराच्या जवळच होतें.' –योहा १९. २०. २ येशूख्रिस्तार्चे मृत्युसूचक चिन्ह +; ख्रिस्ती धर्मचिन्ह. ३ आत्मयज्ञाची तयारी. ४ ख्रिस्ताबरोबर व ख्रिस्ताकरतां दुःख सहन करणें. [इं. क्रॉस]

क्रेतव्य, क्रेय—वि. १ विकत घेण्यास योग्य. २ विकण्यास योग्य. [सं.]

क्रेता—वि. १ विकत घेणारा. २ विकणारा [सं.]

क्रेन—स्त्री. (जड वजन उचलण्याची) यारी. [इं.]

क्रेप—न. एक प्रकारचें रेशमी कापड (बहुधा काळें). –वि. कुरुळें; चुण्या, आढ्या असलेलें. **०हेअर**–पुअव. (नाट्य) एक प्रकारचे केंस. कृत्रिम, काळ्या, पांढऱ्या, करड्या रंगाच्या दाढी, मिशा, भिवया करण्याकरितां या केसांचा उपयोग नाटकांतून केला जातो. भूमिकेच्या सजावटींतही आधुनिक सुधारणा आहे. –पाश्चात्य नाटकें. [इं.]

क्रोटन—नस्त्री. निरनिराळ्या रंगांच्या पानांचें एक सुंदर झाड; लाडणी. [इं.]

क्रोड—पुस्त्री. एक कोटी (संख्या). [सं. कोटि; हिं. इं. क्रोर]

क्रोड—नपु. १ छाती; ऊर. २ डुक्कर. 'तया क्रोडरूपें हिरण्याक्ष मेला।' –वामन नृसिंहदर्पण १५. ३ क्रोडपत्र; ग्रंथामध्यें असलेली न्यूनता, दोष, (अर्थ इ० ची) प्रथाखेरीजच्या दर कागदावर लिहून ठेवतात ते कागद; शुद्धिपत्र; पुरवणी दुरुस्ती. [सं.] ०पत्र–क्रोड अर्थ ३ पहा.

क्रोडीकरण—न. १ आलिंगन. २ समावेश; विषयीकरण. [सं.]

क्रोडीं—क्रिवि. कोटयवधि (रुपये).

क्रोध—पु. राग; कोप; संताप; दुसऱ्याचा अपराध न सोसुन त्याला शिक्षा करावी अशी मनाची वृत्ति होते तो. 'जरी कोणी तूजला क्रोध दावी। जपुनि तेथें त्वां शांति आदरावी।' ०दृष्टि–वि. रागीट नजरेचा. 'हस्तीं धरूनि वेताटी। केली परम क्रोधदृष्टि।'–९.६३. ०मुखीभार्या–स्त्री. रागीट मुद्रेची बायको; कैदाशीण; चार अनिष्ट गोष्टींपैकीं एक (बाकीच्या तीन–कुग्रामवस्ती, कुलहीनसेवा, कुभोजन). [सं.]

क्रोधणें, क्रोधावणें—अक्रि. रागावणें; कोपणें; संतापणें. 'रावण क्रोधावला अत्यंत।' [क्रोध]

क्रोधा—वि. (संगीत) नवव्या श्रुतीचें नांव. [सं.]

क्रोधाग्नि—पु. भयंकर संताप; कोपानल. [सं.] ०शिखा टाकणें–संतापानें बोलणें; बेफामपणें बोलणें.

क्रोधायमान—वि. रागावलेला; क्रुद्ध. 'व्यवसायी सांगतां जाऊन। अवली होईल क्रोधायमान।' [सं. क्रुद्धयमान]

क्रोधिष्ठ–ष्टु, क्रोधी—वि. रागीट; शीघ्रकोपी; कोपिष्ट.

क्रोमाइट—स्त्री. (शाप.) क्रोमियम व लोखंड यांपासुन होणारी धातु; कुमिक लोह, रंग व रंगीत चित्रें करण्याला लागणारे कुमसंयुक्त पदार्थ करण्याकडे याचा उपयोग करतात. [इं.]

क्रोश—पु. एक कोस (अंतर) पहा. 'अनादि पंचक्रोशक्षेत्र।' –ज्ञा १८.१८०३.

क्रोष्टु—पु. कोल्हा; जंबुक. 'घे पंचानन पांच क्रोष्टा दे मानवेल शितिकंठ।' –मोसभा ४.१९. [सं.]

क्रौंच—पु. करकोचा पक्षी. [सं.]

क्रौन—पु. १ मुकुट. २ (ल.) राजा. –वि. १ (मुद्रण) वीस गुणिलें पंधरा इंची आकाराचा (छापण्याचा कागद). २ लोखंडाचा एक प्रकार. 'कमानीसाठीं ताणाच्या सळया क्रौन, बोलिंग ... लोखंडाच्या असाव्या.' –मॅरट २१. [इं.]

क्रौर्य—न. क्रूरता; निर्दयपणा; निष्ठुरपणा; पाषाणहृदयता. [सं.]

क्लब—पु. १ मंडळ; संघ; मेळा; क्रीडास्थान; बैठकीची जागा. (अप.) क्लप–ब. २ (पत्ते) किलावर, फुलावर रंग. [इं.]

क्लांत—वि. दमलेला; थकलेला; भागलेला. [सं.]

क्लांति—स्त्री. थकवा; ग्लानि. [सं.]

क्लार्क—पु. कारकून; लेखक; गुमास्ता. [इं.]

क्लावर—पु. (तंजा) हिरा; माणिक. [?]

क्लास—पु. वर्ग; इयत्ता; प्रत. [इं.]

क्लिन्न—वि. १ ओलें झालेलें; भिजलेलें. २ विरलेलें; मुरलेलें (पाण्यांत). [सं.]

क्लिष्ट—१ अवघड, दुर्बोध; कठिण; बेजार करणारें (काम, पुस्तक, विषय, मार्ग). 'हा मार्ग डोंगर, ओढे, इ० कानीं मोठा क्लिष्ट आहे.' २ ओढून ताणून आणलेला; कष्टानें जुळविलेला (अर्थ, विचार योजना, स्पष्टीकरण). 'या ग्रंथाचा अर्थ लवकर ध्यानांत येत नाहीं, मोठा क्लिष्ट आहे.' ०अर्थ–पु. (क्लिष्टार्थ). १ ओढून ताणून केलेला अर्थ. २ दुर्बोध अर्थ. ०कल्पना–स्त्री. सरळ नाहीं अशी, ओढून ताणून काढलेली, कशीबशी जुळविलेली, सहज न समजणारी कल्पना, विचार, तर्क. ०विषय–पु दुर्बोध, कठिण विषय.

क्लीनर—वि. साफसफ करणारा. (अप.) किल्नर. (विशेषतः) मोटार धुवून पुसुन साफ करणारा. किल्नर पहा. [इं.]

क्लीब—१ नपुंसक; षंढ. 'न भजति सुयशस्काम क्लीबा आरोग्यकाम चिबुबाला।' –मोभीष्म १.६४. २ (ल.) अपराक्रमी; पौरुषहीन; बायकी; भ्याड. ३ खोजा; जनानखान्यावरील नोकर. [सं.]

क्लेद—पु. १ घाम; घर्म. २ आर्द्रता; ओलावा. [सं.]

क्लेदन—वि. १ ओलें होणें; दमटणें; भिजणें. २ वितळणें; विरणें. ३ द्रवामुळें होणारी संयोगशिथिल अशी अवस्था; मऊ, सरबरीत होणें. सप्तोपचार पहा. [सं.]

क्लेश—पु. त्रास; दुःख; श्रम; कांच; यातना; व्यथा (सामान्यतः अनेकवचनी प्रयोग). [सं.] ०काल–पु. त्रासदायक, संकटमय काळ, प्रसंग. 'जरि क्लेशकाल पातला बहुत। तरी धैर्ये न सोडावें यथार्थ।' ०दान–न. आजारी माणसाचें पुष्कळ दिवसाचें दुखणें (पाप) जावें म्हणून उडीद, तेल इ० चे दिलेलें दान.

क्लेशणें—अक्रि. त्रासणें; दुःख पावणें; छळणें; पीडणें. 'अन्य क्लेशें क्लेशत जाये। तो येक धन्य संसारीं।'–मुआदि ३.६५. [सं. क्लिश्]

क्लेशी, क्लेशित—वि. दुःखी; पीडीत; कष्टी; व्यप्र. 'बहुक्लेशी झाल्या श्रवणि पडतां हें द्विजसत्या।'–वामन, यज्ञपत्न्याख्यान ५०. [सं.]

क्लैब्य—न. १ नपुंसकत्व; हिजडेपणा. 'हा क्लैब्यपणा तुला शोभत नाहीं.' २ (ल.) भीरुता; अपौरुष. [क्लीब]

क्लोरोडाईन—न. (वैद्यक.) पोटदुखी व जुलाब यांवरील एक इंग्रजी औषध. यांत क्लोरोफार्म, अफूचें सत्त्व इ० द्रव्यें असतात. हें बाजारांत आयतें तयार मिळतें. [इं.]

क्लोरोफॉर्म—पु. (वैद्यक) हें इथिल अल्कोहल किंवा ॲसिटोनवर विरंजनचूर्णाची क्रिया झाली असतां मिळतें. हें मधुर वासाचें, रुचकर चवीचें, रंगहीन व गुंगी आणणारें द्रवरूप औषध आहे. रोग्यावर शस्त्रक्रिया करतांना गुंगी आणण्यासाठीं हें देतात; बेशुद्धीचें औषध. [इं.]

क्वचित्—क्रिवि. १ कोठें तरी; कांहीं थोड्या ठिकाणीं; सर्वत्र नाहीं असें. 'सहस्रांवर एकटा धांवून जाणारा क्वचित आढळतो.' २ केव्हां केव्हां; कांहीं वेळां. 'एकच ग्रंथी क्वचित् असें लिहितो क्वचित् असें लिहितो तस्मात् उभयपक्षीं करावें' [सं.] म्ह० क्वचित् काणा भवेत्साधुः =एक डोळा किंवा चकणा माणूस बहुधा लबाड असतो.

क्वणत्-न्—वि. मधुर आवाज करणारी (किंकिणी, नूपुर इ०). 'केयूरें भुज-पारिजात फुल्ले, माजी क्वणत् किंकणी।' –र (गजेंद्र मोक्ष) ६३. [सं.]

क्वणित—न. मधुर आवाज (नुपुर, पैजण यांचा). [सं.]

क्वथन—न. कढणें; काढा. [सं.]

क्वाकर, कुक्वाकर—स्त्री. एक पक्षी. [ध्व.]

क्वाचित्क—वि. विरळ; दुर्मिळ; तुरळक; क्वचित असणारा (पदार्थ, गोष्ट इ०). [सं.]

क्वाडका-कें—पुन. कोरडिकें पहा.

क्वाड्रेट—पु. (मुद्रण) मजकूर जुळतांना, पॅरेग्राफ संपविण्याचे जागीं ओळ अर्धी होऊन मजकूर संपला तर ती ओळ भरून काढण्यासाठीं टाईपाच्या उंचीपेक्षां कमीं उंची असलेले व ज्या जातीचा टाईप असेल तितक्याच जाडीचे व रुंदीचे शिशाचे तुकडे प्र. हे एक एम्, दोन एम् असे वेगवेगळे ५–६ एम् पर्यंत मोठे, व अर्धा, पाव एम् पर्यंत लहानहि असतात. –मुद्रणदर्पण १०५. [इं.]

क्वाथ—पु. औषधांचा काढा; कढविलेला पदार्थ. [सं.]

क्वापि—अव. कोठेंहि. [सं.]

क्वार-री—स्त्री. कुंवारी; कुमारी पहा. 'तेव्हां ते मातेनें सकरुणकरें क्वारि धरली।' –सारुह ७.१७३. [सं. कुमारी]

क्वारंटी—न. सांसर्गिक साथीच्या रोगानें दूषित असलेल्या ठिकाणचा मनुष्य गांवाबाहेर कांहीं दिवस ठेवण्याची व्यवस्था; क्वारंटाईन. 'बसले क्वारंटी। परगांवीं जाण्यास पाहिजे, सुभेसाहेबाची पासचिठ्ठी।' –गापो ११३. [इं. क्वारंटाइन]

क्वार्तेल—न. (गो.) लष्कराची बराक. [पोर्तु. क्वार्तेल]

क्विनाईन, क्विनिन—नस्त्री. कोयनेल पहा.

ख

ख—न. व्यंजनमालेंतील दुसरें व्यंजन, आणि मागच्या क व्यंजनाचा महाप्राणोच्चार करणारें व्यंजन. अक्षरविकास–क्षि. पू. तिसऱ्या शतकांतील पहिल्या व इ. स. पहिल्या शतकांतील दुसऱ्या अवस्थेंत खचे दोन अवयव (र+व) दिसत नाहींत, एकच पहिला दिसतो. दोन अवयव सातव्या शतकापासून दिसतात. –न. १ आकाश; (समासांत) खगोल; खप्रास. २ शून्य; पोकळी. 'तैसा मी गीता वाखाणी। हे खपुष्पाची तुरंबणी।' –ज्ञा १६.३९.

ख॥—(संक्षेप) खरेदी खत, खान.

खइश, खइरात, खइशा, खई, खईन, खईर, खईस—हे शब्द खै मध्यें पहा.

खईं—क्रिवि. (कु.) कोठें.

खउचट, खउट, खउडा, खउणें, खऊट, खऊंरा, खऊंट, खऊंद—हे शब्द खंवचट, खवडा इ० शब्दांबद्दल लिहितात. करितां हे शब्द 'खव' मध्यें पहा.

खउर—क्षौर (अप.) पहा. [सं. क्षौर; प्रा. खउर;]

खंक-ख—वि. १ दरिद्री; द्रव्यहीन; निर्धन; निष्कांचन. 'नाना तेवढयानें खंक झाला नाहीं.' –अस्तंभा ७१. २ कौर्यादि गुणांनीं जो द्वाड तो; क्रूर; निर्दय; रानटी; द्राष्ट. ३ कृपण; चिक्कू. ४ तापट; तडफदार (घोडा). ५ अशक्त; दुबेल. [हिं. खुख=गरीब; खाक=रक्षा;]

खकडे—क्रिवि. (कु.) कोठें. [तुल. खा. कुकडे, खईं=कोठें+कडे]

खंकर—पु. १ विस्तवावर भाजलेले कणकीचे गोळे; गाकर. २ कृपण; कटु. ३ क्रूर, निष्ठुर अंतःकरणाचा, कठोर हृदयाचा, निर्दय माणूस. [खंक+करणें]

खंकर—पु. रत्न; गोटी; खडा; कंकर पहा. [कंकर]

खकरनिखर—वि. चांगलें वाईट. [निखर द्वि.]

खकाण-न—वि. १ घाणेरडी; अस्वच्छ (जागा, पदार्थ, इमारत, मुलुख, जमीन इ०). २ वाईट; खराब; दरिद्री; गचाळ. 'तो अत्यंत खकान माणूस आहे.' [अर. खाक=धूळ; रक्षा]

खकाण, खकाणा-ना—नपुस्त्री. १ केर; (पुस्तकांवर-लांकडी सामानावर सांचलेली) धूळ. (क्रि० बसणें; येणें; उडणें; उधळणें). २ (तंबाखूची, तपकिरीची, मिरच्यांची) पूड (नाकांत, तोंडांत गेल्यानें त्रास देणारी); (क्रि० उधळणें). ३ (खा. माण.) गाळसाळ; केरकचरा; धुरळा (माप करतांना मालांतील धुरळा वजा करतात त्याबद्दल हा शब्द वापरतात). [अर. खाक=धूळ]

खंकारणें—अक्रि. १ खोकणें; खांकरणें; घशांतील कफ काढणें; बेडका काढून टाकणें. २ खिंकाळणें पहा. ३ खांकरून लक्ष्य वेधणें. [ध्व.]

खंकाळ, खंकाळा-ळ्या—वि. १ दुष्ट; उग्र. 'बेताल खंकाळ लागला. ब्रह्मगि=हो संचरला.' –दा ३.२.२८. २ तिरसट; कुरठा; रागीट, द्वाड. ३ पाणीदार; चलाख; तापट (घोडा, तट्टू). खंक पहा. **०तट्टू**–वि. अडेलतट्टू; माजूरी. **०भवानी**–स्त्री. अवदसा. 'आलीच ही खंकाळभवानी.'–सु २१.

खंका(खा)ळणें—अक्रि. घोड्यानें ओरडणें; खिंकाळणें पहा.

खंक्या, खणक्या—वि. बेपर्वा; उद्धट; बेदरकार; ताडफाड करणारा; दांडगा. [खंक]

खंखणपाळ, खणखणपाळ—वि. (गो.) दरिद्री; ठंणपाळ पहा. [ध्व.]

खग—पु. १ पक्षी. 'आतां मोडूनि ठेलीं दुर्गे। का वळित धरिले खगें।'–ज्ञा १३.५८३. 'या बळि खग-प्रभु–पुढें सर्व बळी अन्य टोळ खग दीन।'–मोसभा १.१०७. २ आकाशांतील ज्योती (सूर्य, नक्षत्र, ग्रह इ०). [सं. ख=आकाश+ग=गमन करणारा] **०नायक-पति**–पु. पक्ष्यांचा राजा; गरुड; विष्णूचें वाहन. 'ध्वजस्तंभीं ज्याचे खगपति सदा राहत असे।' –स्फह ८.१२०. [खग+पति]

खंग—पु. १ न्यूनता; कमीपणा. २ खंड; व्यत्यय; अडथळा; प्रतिबंध. 'म्हणऊनि अभेदें जो भक्तियोगु। तेथ शंका नाहीं नये खंगु।'–ज्ञा १०.११०. –वि. अशक्त; रोगानें खंगलेला. [सं. क्षयिक; प्रा. खइग; म. खंगणें;]

खंगणें—अक्रि १ क्षीण, अशक्त होणें; वाळणें; झिजून जाणें; कृश होणें (श्रम, रोग इ० मुळें). २ (ल.) दरिद्री होणें. 'कृपी-वलें खंगलीं भणंगें।'–मुसभा ३.१०८. [सं. क्षयण; प्रा. खइण; खंग पहा].

खंग(गा)र—पु. पक्की भाजलेली वीट. [अर. खाक्; म.खंक]

खंगार-ळ—वि. १ अशक्त; दुर्बल; जाया झालेला; वयोमानानें क्षीण झालेला (माणूस, प्राणी, झाड). २ वाईट; नापीक; फलहीन (देश, शेत, पीक वगैरे). [खंग]

खंगा(ग)ळणें—उक्रि. १ धुणीं पाण्यांत खळबळणें, जोरानें हालविणें, स्वच्छ करणें. २ भांडीं विसळणें, स्वच्छ करणें. [हिं. खंगालना]

खगेंद्र, खगेश्वर—पु. गरुड; खगनायक पहा. [खग+इंद्र, ईश्वर]

खगोल—पु. १ अवकाशकटाह; नक्षत्रखचित अंतरिक्ष; भूगोलाच्या भोंवतालचे तारे ज्या गोलाच्या अंतर्वक्र पृष्ठास डकलेले आहेत असें दिसतात तो; आकाशांतील गोल (ग्रह, तारे, इ०); याच्या उलट भूगोल. २ (ज्यो.) ज्योतिष (शास्त्र). ३ कंकणाकार गगन. ४ (ल.) ग्रहादि जाणण्यासाठीं केलेलें गोलाकार यंत्र. **०विद्या**–स्त्री. ज्योतिषशास्त्र. [सं.]

खग्राशा-स्या—वि. १ उसनवारी घेतलेले पैसे, विश्वासानें स्वाधीन केलेला माल खाऊन फस्त करणारा; लुच्चा; ठक; लुबाडणारा; हरामखोर. २ खादाड; अधाशी; अतिशय उधळ्या. ३ तोटा येणारें (काम); बुडीत (धंदा). [खग्रास]

खग्रास—पु. १ ग्रहणामुळें झालेला पूर्ण ग्रास (चंद्र, सूर्य, ग्रह, इ० चा). २ (ल.) नायनाट; स्वाहाकार; चापणें; गिळंकृत, फस्त (क्रि० करणें; होणें). –वि. पूर्णपणें ग्रासलेलें; तावडीत सांपडलेलें. [सं.] **०करणें, होणें**–(व्यथा, जाळपोळ इ० मुळें). निःशेष होईल असें करणें.

खच—पु. ढीग; दाट थर; रास (फळें, फुलें, केरकचरा इ० चा). –स्त्री. गर्दी; दाटी. [सं. खच् ?]

खचका—पु. सणसणीत रपाटा, सपाटा. कचका पहा. [ध्व.]

खंचणी—स्त्री. खांच; खोबण; पन्हळी [सं. खच्=जडवणें]

खचणें—उक्रि. १ (काव्य) (रत्नें वगैरे दागिन्यांत) बसविणें; जडणें; जडविणें; कोंदणांत बसविणें. 'जो धीर वीर हीर प्रवर प्रकरें करोनिया खचिला।' २ (दागिने, भूषणें वगैरे रत्नांनीं) जडविणें; मढविणें; रत्नें बसविणें; दागिने जडावांचे करणें. 'जैसा ब्रह्मकटाह खचिलें माणिकीं।'–ज्ञा ११.१३३. ३ एके ठिकाणीं कोंबून घट्ट भरणें; ठासणें; ठेचणें; वरून ठोकून–आपट्टन घट्ट बसविणें; कोंबणें; चिपून बसविणें. –अक्रि. १ खालीं जाणें, बसणें; धसणें (नरम, भुसभुशीत जमिनींत–इमारत, पाया इ०). 'दीर्घकाल खचली होती पारतंत्र्यभारीं।'–चिक ६. २ कोसळून पडणें; खालीं येणें; ढासळणें; अधोगतीस जाणें; विनाश होणें. 'गगनीहूनि खचलें बिंब।'–मुआदि २०.५. 'पुण्य सरतां स्वर्गाहून खचला।' ३ (ल.) समूळ नाहींसें होणें; गळणें; सुटणें (धैर्य, आशा, उमेद इ०). ४ (ल.) फसणें; फिसकटणें; कांहींच्याकांहींच होणें; विफल होणें (मसलत, विचार). ५ मरणें. 'शाहूमहाराज शिव झाला। अवतार खचला।'–ऐपो ९५. ६ अवसान गळणें; भीतीनें माघार घेणें. ७ मूर्च्छित होणें. 'दारुण–शरप्रहारें एका काळींच वीर ते खचले।'–मोकर्ण १०.१८. [सं. खच्]

खचता पाया—पु. १ खालीं जाणारा पाया. २ (ल.) पिछेहाट; माघार; उतरती कळा; क्षय; ऱ्हास; अपकर्ष (कीर्ति, वैभव, संपत्ति इ० कांचा).

खचर—न. खेचर पहा. [फा. खच्चर]

खचरट—वि. त्रासदायक; कंटाळवाणें; पीडाकारक; खडतर (खडकाळ, चिखलाचा रस्ता, नापीक देश, घोटाळ्याचें

काम, दुर्बोध लेख, गूढ अर्थाचा ग्रंथ इ० संबंधीं सढळपणें योजतात). [खरचट ?]

खचरटाण—स्त्री. वाईट घाण (विष्ठा इ०कांची). [कचरट]

खचरण—स्त्री. १ (तेलंगणांत) ताडपत्रावर लिहिण्याची लोखंडी अणकुचिदार लेखणी; चरे पाडण्याचें, कोरण्याचें हत्यार २ खांचखळग्याचा, वेडावांकडा रस्ता. [खचणें]

खचरा—पु. १ लांकडास खांच पाडण्याचें सुताराचें हत्यार; अरुंद पात्याचा रंधा; खतावणी; फावडी. २ खांच, खोबण. [सं.खच्]

खचवणें—सक्रि. कमी करणें; खालीं दाबणें (खचणें प्रयोजक). 'खचविलें काळें । उगवा लवलाहे जाळे ।' –तुगा ३५५ [सं. खच्]

खचळणें—अक्रि. खचणें पहा.

खंचॉ, खैंचॉ—वि. (गो.) कुठचा; कोठील. [सं. क]

खचाटणें—उक्रि. १ (गवत कापतांना होणाऱ्या 'खचखच' आवाजावरून, किंवा मनुष्याला फार श्रम झाल्यावर तो आवाज करतो त्यावरून) तोडणें; साकटणें; सटदिशी कापणें; सपासप तोडणें. २ वेगानें, आवेशानें धसफस करून खेंचणें, ओढणें, पकडणें, बांधणें; ओरडणें; (सामा.) मोठ्या आवेशानें किंवा धसफशीनें कांहीं करणें (याचा उपयोग अनिर्बंध करतात); कांहीं क्रियापदांच्या मागें खचाटून हा शब्द लावला म्हणजे त्याचा अर्थ जास्त जोरानें असा होतो. जसेः –खचाटून ओढणें, बांधणें, आवळणें, ताणणें, खेंचणें, झाडणें, जेवणें, भरणें वगैरे. उत्सुकता, तडकाफडकी, आवेश, नेट, वेग इ०चा बोध या शब्दावरून होतो; या शब्दाचा उपयोग कचकाविणें, रगडविणें, रपाटणें, दपटणें इ० शब्दांच्या अर्थाशीं जुळण्यासारखा करतात. [ध्व खच्]

खचित—वि. जडित; जडलेला; बसविलेला; (समासांत) रत्न–मणि–मौक्तिक–खचित. 'रत्नखचित मुगुट शोभतो बरा।' –गणपतीची आरती. [सं. खच्, खचित]

खचि(ची)त—क्रिवि. निश्चितपणें; खरोखर; खात्रीपूर्वक; [सं. खलु+चित्]

खचितार्थ—पु. (अप्राप्त समास). प्रस्थापित निष्कर्ष; पक्का निकाल–निर्णय; संशोधनाचा निष्कर्ष; पडताळून पाहिलेली गोष्ट; निश्चित गोष्ट. [खचित+अर्थ]

खचिती—स्त्री (क्र.) पक्केपणा; निश्चिती; निश्चितार्थ; ठरलेली किंवा निश्चित गोष्ट. [खचित]

खची, खच्ची—स्त्री. कापणी; छाटणी; बडवणी. **०करणें**—सक्रि. १ बडवणें (पशूचें अंड); २ कापणें; तोडणें (वृक्ष इ०). ३ (ल.) कमकुवत करणें; 'राष्ट्रास परकी भाषेंत शिक्षण देणें म्हणजे त्याची खच्ची करण्यासारखेंच आहे. –टिव्या १७. –वि. १ अंड बडवलेला (पशु). २ (पुन्हां चांगला फुटावा म्हणून) छाटलेला, कापलेला (वृक्ष). [अर. खसी]

खचीं—स्त्री. (गो.) डेंबुकासारखा मासा. –मसाप ३.२४७.

खचीत—वि. निश्चित; खचित पहा.

खच्च, खच्चून—क्रिवि. गच्च; दाटीनें; कोंबून; खेचून (माणसांची गर्दी, कोंबलेल्या वस्तू इ० संबंधीं योजतात). 'या गलबतांत माणसें खच्च भरलीं आहेत.' [खचणें]

खंज—वि. लंगडा; लंगडत चालणारा. 'जयांपुढें खंजन खंज जालें।' –सारुह ५.१०९. [सं.]

खंजन, खंजरीट—पु. एक पक्षी; काळी चिमणी; ही सारखी शेपूट हालवीत असते. 'तथापि ते निंदिति खंजनाला।' –सारुह २.९६. [सं.] **खंजरीट नयना**—स्त्री. सुंदर डोळे असलेली स्त्री. 'कामकुरंगी खंजरीट–नयना ये उभि राहे।' –देप ८५. [सं.]

खंज(जि–जे)री—स्त्री. टिमकी; लहान डफडी; सुमारें पांच इंच रुंद व अर्धा इंच जाड अशी फळी घेऊन तिचें टीचभर व्यासाचें कडें बनवितात व त्या कडयाचें एक तोंड चामडयानें मढवितात. जंगम गोसावी इ० लोक गाणीं म्हणतांना ताल धरण्याकडे हिचा उपयोग करतात. 'श्रीहरी वाजवी खंजरी।' –रासक्रीडा २१. 'सुरताल पखवाज खंजिरी मंजरींत वासरीं।' –राला ३१. [फा. खंजरी]

खंजवायु—पु. ज्याच्याभुळें शरीराचे अवयव वेडेवांकडे उडूं लागतात तो वायु. –बालरोगचिकित्सा पृ. १९.

खजानची–जी—पु. कोशाध्यक्ष; खजिनदार; तिजोरीवरील अधिकारी; 'धाकटयास खजानचीचें काम सांगून ....' –रा ५.४२. [अर. खझानची] **०गिरी**—स्त्री. कोशाध्यक्षाचें काम, हुद्दा; खजिनदारी; –रा ३.३५३.

खजानपूर—वि. ज्याची गंगाजळी सदोदित भरलेली आहे असा; समृद्ध; श्रीमान; खाजानपूर असाहि शब्द आढळतो. 'खजानपूर आहों तें कळतच आहे.' –रा १२.७०. 'शिंदे केवळ खजानपूर सर्दार द्रव्यदृष्टी होते.' –भाव ५६.

खजा(जि)ना—पु. १ भांडार; तिजोरी; कोश; द्रव्यनिधि; 'खजानाहि पूर्ववत्प्रमाणें नाहीं.' –दिमरा १.१६५. 'ऐवज सत्वर खजानेदाखल करणें.' –जोरा ७. २ सरकारी जमा; राज्याचें उत्पन्न; दौलत; सरकारी उत्पन्न (विशेषतः जमीन महसूल); ३ संग्रह; निधि; सांठा; खाण. 'विज्ञानस्थितीचा भरिला खजाना।' –स्वानु १०.२.२५. ४ कारंजाला पाण्याचा पुरवठा करणारा त्याजवळच बांधलेला हौद; कारंजाचा हौद. 'कारंजाचे हौद खजीने धुऊन करा निर्मळ स्वकरीं।' –होला ८०.११७. ५ मिठागरांतीं राखलेला पाण्याचा सांठा. ६ (सामा.) नळांतील वाहतें

पाणी सांठविण्याचा-उंच चढविण्याचा उच्छ्वास, बुरूज; ७ बंदुकीची कोठी, कोठा, पेट; कान्याजवळचा भाग, यांत दारू राहते; खेळण्यांतील दारू उडविण्याची-बार करण्याची उखळी; एक तऱ्हेचा गरनाळ. ८ तलवार अडकविण्याकरितां पडदळयास असणारें अडकण. [अर. खझीना, खिझाना, खझान]

खजाळ—वि. १ नेहमीं भांडणारा; भांडखोर; व्रात्य; खवचट; कलहप्रिय; कज्जेखोर. २ विषयलंपट; कामुक. [खाज]

खजाळी—स्त्री. कुचाळी; खोडी; चेष्टा; कुरापत; कुचोयपणा. [खाज]

खजि(जी)न(ने)दार—पु. कोशाध्यक्ष; खजिन्यावरील अधिकारी. खजानची पहा. [फा. खझानदार]

खंजिरी—स्त्री. रेशमावर छापण्याची एक तऱ्हा. [अर. खंजरी]

खंजीर, खंजर-री—पुस्त्री. एक शस्त्र; लहान कटयार; [अर. खंजर; तुल० सं. खड्गाजीरः-खञ्जीरः-खंजीर. 'जरि खड्गे वणिग्भेदे।'-विश्वकोश-भाभ १८३२.]

खजील—वि. लज्जित; ओशाळा; खेदयुक्त; शरमिंधा. [अर. खजल्=लाजाळु, नम्र]

खजुरा—पु. (व.) शंकरपाळे. [हिं.]

खजुरा-री(दोरा)—वि. अनेक पेडांचा किंवा पदरांचा वळून केलेला; जाडा (दोरा).

खजुरिया—पु. उंसाची एक जात. याचा रंग खजुरासारखा असतो. [सं. खर्जूर]

खजुरी—स्त्री. १ खजुरीचें झाड; हें सिंधीच्या झाडाप्रमाणें वाढतें. यांचीं वाळवलेलीं फळें खारका होत. बियांचें तेल औषधोपयोगी आहे. २ खजुराचेंच एक रानटी झाड. [सं. खर्जूर; प्रा. खज्जूर]

खजूर—पु. खजुरीच्या झाडाचें फळ; खजुरीची बी. **०छडी**-स्त्री. रेशमी वस्त्रावर काढलेली खजुराच्या पानाप्रमाणें आकृति, वेलपत्ती, नक्षी.

खज्जाळी—वि. (बे.) खजिल; हलकट.

खँऽ—क्रिवि. (राजा.) कोठें? खँऽचो=कोठला; खँऽसर=कोठपर्यंत? खँऽसून=कोठून? तुल० हिं. कहांसे. [सं. क]

खट—न. क्षत; जखम; व्रण; वण; गळूं; फोड. -स्त्री. घटा; वण. 'पाणी वाहतां खटी पडल्या खांदी कावड डुलतसे।' -अफला ७७. [सं. क्षत=जखम]

खट—पु. (संगीत) गायनशास्त्रांतील एक राग. ह्या रागांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र धैवत, कोमल निषाद, तीव्र निषाद हे स्वर येतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी कोमल धैवत, संवादी कोमल गांधार गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर.

खट—स्त्री. १ (व.) कुंधा झालेली शेतजमीन; वखरण्यांत न आलेली जमीन. 'या शेतांत खटा फार पडल्या.' २ अंगावर; पदार्थांवर चढलेले घाणीचें कीट, मळ; केरकचरा. (क्रि० पडणें; जमणें), [सं. खट=गवत, घाण; क्षत] (वाप्र.) **०काढणें, टाकणें**-(घाण काढणें). १ सपाटून, जोरानें मारणें. २ तासडपट्टी काढणें; खरडपट्टी काढणें. **खटीं खापरीं लागणें, जाणें, मिळणें**-१ आजारामुळें अंग घाणेरडें, खरबरीत होणें. २ (ल.) संपुष्टांत येणें; नष्ट होणें (धंदा, कारखाना, काम); उधळणें; नाहींसें होणें; धुळीस मिळणें (दौलत); नेस्तनाबूद होणें; जमीनदोस्त होणें (इमारत, गांव). याप्रमाणें खटीं खापरीं लावणें, मिळविणें.

खट—स्त्री. १ (विटीदांडू) विटीला दांडूनें टोला मारतांना दांडू जमीनीला लागला तर 'खट' असें म्हणतात. २ (खटखट) आवाज; खट् असा ध्वनि. 'कोण दारांभोंवतीं खटखट करितें.' -कफा १६. [ध्व.]

खट—न. रसायनशास्त्रांतील एक मूलद्रव्य. (इं.) कॅल्शिअम.

खट—वि. खटयाळ; खोडकर; द्वाड; दुष्ट. 'ठस ठोंबस खट नट।' -दा २.३.३२. २ (माण.) निर्लज्ज; हलकट. ३ ज्यादा. 'ही खट एकदां युरोपांतून निघाली असतां बरी.' -नि ९२८. ४ (गो.) पिशाच्च; दुर्जन. 'तुका म्हणे नेटया। भांडवल नलगे खटया।' -तुगा २९७४. **म्हo** खटास खट भेटे, जिवाचें पारणें फिटे. [सं. शठ]

खटकखटक—क्रिवि. (ध्वनि.) कटकट असा आवाज. 'हें दार खटक-खटक असें वाजतें.'

खटकण-कन-कर—क्रिवि. खटकन; झटकन; सटकन; सटदिशीं; त्वरित; तावडतोब; खट शब्द होई असें. (क्रि० निघणें; उमजणें; उजेडणें; डोळे उघडणें; झोंप न लागणें).

खटकणें—अक्रि. टोचणें; बोंचणें. 'ही गोष्ट विनोदिनीच्या मनांत कांट्याप्रमाणें खटकली.' -पेप्रे ६५. [ध्व. खच-ट]

खटकर्म—न. १ षट्कर्म-वेदाध्ययन, वेदाध्यापन, यजन, याजन, दान व प्रतिग्रह हीं ब्राह्मणाचीं सहा (षट्) कर्में होत; निर्वाहाचीं सहा कर्में; कणवृत्ति (खळ्यांतील दाणे वेंचणें), प्रतिग्रह, भिक्षा, कृषि, वाणिज्य व गोरक्ष. [सं. षट्+कर्म] २ (ल.) त्रासदायक; चेंगट; रेंगाळत चालणारें, तिरस्कार वाटणारें काम. [सं. शठ+कर्म]

खटका—पु. १ काठीचा, चाबकाचा 'फट्' असा आवाज. २ भांडण; तंटा; झगडा. ३ (वाद्य) कोणताहि स्वर वाजवीत असतां त्याच्या मागच्या अगर पुढच्या स्वरास झटका देऊन त्या दोन स्वरांपासून उत्पन्न केलेला मिश्र स्वर. ४ अडकण; कुत्रें;

कोयंडा वगैरे बसवितांना खट् असा आवाज करणारें मळसूत्र, अडकवण; त्याचा होणारा 'खट्' असा आवाज; नाद; ध्वनि; [ध्व.] **०मुख(हस्त)**–पु. (नृत्य) करंगळी व अनामिका हीं बोटें तळहाताकडे वांकविणें, अंगठा उभा ठेवून त्यास तर्जनी व मधलें बोट चिकटविणें. **०वर्धमानक(संयुत हस्त)**–पु. (नृत्य) खटकामुख हातावर खटकामुख हात ठेवणें.

खटका–पु. (ल.) मनांत ठेवलेला, आलेला संशय, अंदेशा, विकार. (क्रि० येणें; मनांत राहणें).

खटका-कें–पुन. (जेजुरी) खंडोबाच्या पूजेचें गंध उगाळणें, पाणी देणें इ० कामें करणारा धनगर.

खटकूळ–न. १ कर्ज फेडण्याला अगर सारा देण्याला जिगजिग करणारें; कटकटीवांचून ऋण देत नाहीं असें कूळ, असामी, खंडकरी, ऋणको. २ खर्चाला मागें घेणारा माणूस; चिक्कू. [सं. शट–खट+कूळ]

खटखट–स्त्री. १ कटकट; त्रास; कंटाळा; कंटाळवाणें काम. २ मोठ्यानें चाललेलें भांडण, कज्जा. 'सदा खटखट आणि लटपट।' –दा २.३.७. ३ बडबड; बोलण्याची पिरपिर.

खटखटणें–अक्रि. खटखटें वाजविणें; खटखट, कटकट करणें; आवाज करणें. [खटखट]

खटखटां–क्रिवि. खटखट आवाज होतो असें. **खटखटांचें**–(गो.) खटखटणें पहा.

खटखटाळणें–क्रि. आग्रह करणें; मागें लागणें; खटाळणें पहा.

खटखटी–स्त्री. एक झाड. हें २।३ पुरुष वाढतें. याचीं फळें गोड असतात. –वगु २.६९.

खडखडीत–वि. १ कोरडा; वाळलेला; खडखडीत; वाळल्यामुळें कडकडीत झालेली (एखादी ओली वस्तु). २ स्पष्ट; निर्भीड; निस्पृह (भाषण, वक्ता); (प्र.) खडखडीत पहा.

खटखटें–वि. १ शेतांतील पक्षी इ० उडून जावे म्हणून केलेलें खटखट आवाज करणारें लांकडी यंत्र. २ (ल.) संसारोपयोगी रोजगार, धंदा, मजूर इत्यादि. ३ (गो.) गुळाचा अतिटणक असा हलवा, किंवा गूळ-खोबरें यांचा अति टणक असा हलवा, चिक्की; गुडदाणी. [ध्व.]

खटखट्या–वि. १ कटकट लावणारा; भांडण करणारा; भांडखोर. २ एक प्रकारचा पक्षी. [खटखट]

खटंग–न. (प्रां.) खाट; बाज. [सं. खट्वांग; प्रा. खट्टंग]

खटंगनटंग–वि. (व.) बरावाईट; कसातरी. 'तिला नवरा चांगला मिळाला नाहीं तरी तिनें खटंगनटंग संसार रेटलाच.' [खटनट]

खटंगळ्या खाणें–क्रि. (व.) वाटेस जाणें; खोडी काढणें. 'माझ्याशीं तो अशा खटंगळ्या खातो म्हणून तर त्याचें माझें जमत नाहीं.'

खटगुळ–वि. खोडकर; नाठाळ (पशु). २ खचरट पहा. [खटकूळ?]

खटणें–अक्रि. १ थांबणें; अडथळा होणें (काम, धंदा इ० मध्य); रुसून बसणें (माणूस). 'खटे तेथ पिल्लें तिचीं वाढतात। उडो लागलीं तों झुले ती मनांत।' –अर्वाचीन ४९९. २ (ल.) थकणें; तहकूब होणें. ३ (ल.) हट्टास पेटून कोणाचें न ऐकणें; मागें राहणें; धट्ट उभें राहणें. ४ खलेल असणें; अडणें (घोडा). [खुंटणें]

खटंणें–उक्रि. खणणें या अर्थी ग्राम्य, खेडवळ शब्द.

खटनट–स्त्री. काळजी; त्रास; उपद्व्याप (पालन-पोषणाचा, अन्नाच्छादनाचा). (क्रि० काढणें; सोडणें). कटकट; भांडण-तंटा. –वि. १ टाकाऊ; नासलेला; वाईट-साईट; ओंगळ-सोंगळ; नासका. २ लुच्चा; ठक; दुष्ट. 'खटनट येकवटिले। चोरटे पापी।' –दा १९.३.८. [खट+नट] **म्ह० खटनट त्याला गिऱ्हाईक भट. खटनट्या**–वि. भांडखोर; घासाघीस करणारा.

खटपट–स्त्री. १ त्रास; दगदग; मेहनत; यातायात; उलाढाल; घालमेल; नाना तऱ्हेचीं लहानमोठीं कामें. (क्रि० करणें; घालणें). **म्ह० खटपट करी तो पोट भरी.** २ भांडण-तंटा; खटखट; किरकिर. ३ त्रासदायक, दगदगीचें, यातायातीचें काम. **म्ह० खटाटोपो भयंकरः** (घटाटोपो०). [सं. घटपट?]

खटपटणें–क्रि. भांडणें; कज्जा करणें. 'ऐसीं शाखें खटपटती। एकाचें एक न मानिती.' –ह २७.३५. [ध्व; का. कटपिटे]

खटपट्या–टी–पु. स्वयंपाक्याच्या हाताखालचा, अवांतर कामें करणारा माणूस. –वि. १ मेहनती; उद्योगी; बारीक-सारीक, मोठ्या कामांत उत्सुकतेनें झटणारा; सर्वत्र खटपट करण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा. २ धाडशी; कल्पक; कुशल; छातीचा; धडाडीचा; उलाढाल्या.

खटमल–पु (व.) ढेकूण. [हिं.; सं. खट्वा+मल्ल; प्रा. खट्टामल्ल]

खटमार–स्त्री. अपानद्वारीं किंवा कानांत लांकडी खुंटया ठोकण्याची शिक्षा. 'खटमार म्हणजे जगविख्यात वरकड मार त्याचे आश्रित।' –अफला २५.

खटरपटर–स्त्री. सटरफटर, चिल्लर जिनसांची रास, समूह.

खटराग–वि. त्रासदायक; न पटणारा; क्लेशदायक (माणूस, धंदा, काम). –स्त्री. १ ब्याद; पीडा; लचांड; लटांबर. (क्रि० लागणें; मागें लागणें; घालविणें). २ घरांतील जड-बोजड वस्तु; घोडयाचें सामान; बाडबिछाईत (जेव्हां अवजड, त्रासदायक असेल तेव्हां म्हणतात).

खटला–ल्ला–पुन. १ भांडण; तंटा; बेबनाव; भेद. २ जमीनजुमला; घरदार; गुरेंढोरें; जिंदगी. ३ परिवार; इतमाम;

लवाजमा; बाडबिछाईत; प्रवासी सामानसुमान. 'नागोपंतानें आपलें सर्व खटलें रवाना केलें होतें.' –विक्षिप्त १.३०. ४ कुटुंब. पत्नी; कारभारीण. ५ उद्योग; पोट भरण्याचा व्यापार; व्यापार धंदा; उदीम. 'हा सराफीचा खटला आज तीन वर्षें करतो.' 'तो बारा खटले करून पोट भरितो.' ६ त्रासदायक काम: भानगडीचें, गुंतागुंतीचें काम; मुद्दा; प्रकरण; बाब; लचांड; देवघेवींत लडथड. 'फितुराचे खटल्यांत तूं पडूं नको कारण त्यांत पुष्कळ खटले आहेत.' ७ (कायदा) फिर्याद; न्याय मिळविण्याकरितां कोर्टांत चालविलेला दावा; कज्जा. 'हायकोर्टाचे जज्ज सुद्धां त्यांचेसमोर चाललेल्या खटल्यांत इतकें लक्ष घालीत नसतील.' –नाकु ३.१. [का. कटले=फिर्याद, परंपरा पद्धत] (वाप्र.) ०ओढणें–संसार व्यवस्थित चालविणें. ०तुटणें–संबंध सुटणें. सामाशब्द–०खोर–वि. १ भांडखोर; कज्जेदलाल. 'खटलेखोर तो मधुनमुलख.' –ऐपो २६९. २ (क.) कुशल; धाडसी; हिकमती; योजक. ०घाईक–वि. कुटुंबवत्सल; जमीनजुमला, परिवार असलेला; संसारांत गढलेला.

खटवणी—न. मिरीं, मीठवगैरे असलेलें भाजीचें पाणी. कट पहा. [प्रा. दे. खट्ट=कढी+वणी=पाणी]

खटवें—न. १ स्त्रियांच्या पायांतील लहान जोडवें. २ पायांच्या बोटांत घालण्याचें दोन वेढ्यांचें चांदीचें वळें. [ध्व. खट्]

खटाई—स्त्री. १ आंबटपणा; आंबटाई. २ आंबट रस; आंबटपणा असणारा पदार्थ (खाद्य किंवा रासायनिक पदार्थी-तील); चिंच किंवा आंबट पदार्थांचें पाणी (भांडी स्वच्छ निघण्याकरितां); ३ आंब्याच्या वाळलेल्या फोडी. [प्रा. दे. खट्ट; हि. खट्टा=अम्ल. आंबट, खटाई=आंबटपणा, अम्लता]

खटाई—स्त्री. कापणी; कटाई पहा. ०काढणें-(व. ना.) खोड मोडणें; खरडपट्टी काढणें. खटी मोडणें.

खटाखट-टां—क्रिवि. फटफट, चटचट आवाज होऊन (रुपये देतांना, चापट मारतांना, तोंडांत, मुस्कटांत देतांना). [ध्व.]

खटाटोप—पु. १ मोठें अवडंबर, तयारी, बेत, चळवळी. २ मोठा डौल (पवित्र्यपणा, विद्या इ०चा). 'त्या तपस्व्याचा खटाटोप मात्र पहावा, आंत कांहीं ऐवज नाहीं.' ३ गोंगाट; गोंधळ व गडबड. 'दमनकातें खटाटोपें येतां देखिलां.' –पंच १.१६. ४ थाट; देखावा. ५ पसारा; उलाढाल (कामांची, धंद्याची) ६ (सामा.) मेहनत; यातायात; दगदग. 'विधवेलागीं कुंकुमटेव. खटाटोप कासया.' –नव २०.१७९. 'त्या शत्रूवर इतका खटाटोप घेऊन जाण्याचें प्रयोजन नाहीं.' **खटाटोपी-प्या**–वि. पोकळ प्रदर्शन करणारा, करण्याची इच्छा धरणारा; खटाटोप करणारा. **म्ह०** खटाटोपो भयंकरः प्रचंड पण पोकळ कृत्य; विस्मयकारक पोकळपणा, (थोड्या कार्याला फार खटपट जेव्हां केली जाते तेव्हां ही म्हण वापरतात. मूळ शब्द फटाटोपो भयंकरः. असा आहे. तो पुढील संस्कृत श्लोकांत आढळतो–'निर्विषेणापि सर्पेण कर्तव्या महती फणा। विषमस्तु न वा लोके फटाटोपो भयंकरः॥' म्हणजे विष नसलेल्या सापानें नुसता फटाटोप केला (फणेचा विस्तार केला) तरी तो लोकांना भयंकर त्रासदायक होतो); कार्य थोडें पण खटपटीचें अवडंबर फार. [ध्व. हिं. खटाटोप; तुल० सं. फटाटोप]

खटाड—वि. (व.) कुंभ्याच्या अगर पडयाळाच्या खटांनीं व्यापलेलें शेत. [सं. खट]

खटांबा—पु. (क.) १ आंबट आंबा. २ रानआंबा. [खट्टा+आंबा]

खटाय—स्त्री. (गो.) खटाई; वेडेपणा. [सं. शठ]

खटारणें-खटावणें—अक्रि. मरणें (सांकेतिक भाषेंत रूढ). –उक्रि. नाश करणें; उध्वस्त करणें (देश, गांव वगैरे). [सं. खट्वा; म. हिं. खाट=तिरडी]

खटारा—पु. १ सांगाडा; कवच; सामानाशिवाय भाग; सरंजामाखेरीज जिन्नस (घर, गाडी, पालखी, जहाज हीं सामान, बल, दोरखंड इ० च्या शिवाय असतां). 'एक मार्गी झालें पुरें. एकाचें आणिलें खटारें.' –एरुस्व १२.२७. 'गाडीचा खटारा मात्र त्यांचा, बैल आमचे.' २ धूड; अवजड वस्तु; निरुपयोगी मोठा पदार्थ (मोठें घर, पशु इ० पाळण्याचें सामर्थ्य नाहींसें झाल्यावर). 'एवढा घराचा खटारा कोण्ही शिवावा बरें!' 'हा केवढा हत्तीचा खटारा हो!' ३ मोठा गाडा; बैलगाडा; छकडा; पालखी; मेणा. 'एक खटाराभर सामान सहज भरेल.' ४ (कों.) बैल रहाटाला चालत नसेल तर त्याला शिकविण्यासाठीं एक लांकूड पुरून त्याला जोखड जोडून तयार करतात तो. [सं. क्षत्ता]

खटारा-ऱ्या–वि. म्हातारा; रोडावलेला; अशक्त; निरुपयोगी (माणूस. जनावर).

खटाल(ळ)णें—उक्रि. १ आग्रह करणें; निकड, तगादा लावणें; खलपटीस बसणें. २ सुचना करून आठवण देणें; उद्बोधन करणें. ३ पुढें ढकलणें.

खटास—स्त्री. आंबटपणा (फळ वगैरेचा). [हिं.]

खटासप—क्रि. (गो.) खाऊन टाकणें.

खटिया—स्त्री. (काशी) खाट; बाज. [खाट]

खटीत—वि. खटलेला; खुटलेला; पडीत; थकलेला (कूळ, वसुल, बाकी). 'खटीत अशा पांचशें जिनसांची यादी तयार केली.' –मुंव्या प्रस्तावना ६. [खटणें=थांबणें]

खटी—स्त्री. (गो.) खोड. (क्रि० मोडणें) –वि. द्वाड; खाष्ट. *खट पहा.* [खट]

खट्टें—न. खटवे पहा.

खटेली—पु. (कु.) जमिनीचा मालक; कुळाच्या उलट.

खटोली—स्त्री. (व.) लहान खाट; पलंगडी. [हिं. खटोला]

खट्टर—वि. (गो.) खडतर.

खट्टा—पु. १ कमरेचा सांधा; पाठीचा शेवटचा मणका; कमरेचें हाड (जड ओझें वाहिल्यानें, किंवा बराच वेळ ताठ बसून लिहिण्यानें जें दुःख किंवा ताठरपणा येतो त्यास अनुलक्षून याचा उपयोग करतात.) 'ओझीं वाहातां वाहातां त्याचे कमरेचा खट्टा मोकळा झाला.' २ (व्यापक) अति ताठरपणा; स्वतःची शक्ति किंवा महत्त्व याविषयीं घमेंड. (क्रि० मोडणें; मोकळा करणें; तोडणें; जिरविणें; उतरविणें; पुरविणें). 'कामदार अंमलदाराचा खट्टा तोडला' –गापो १०८. 'म्या त्याचा खट्टा मोडला.'=ताठा नाहींसा केला. या अर्थानें या शब्दाचे पुढील शब्दांशीं संयोग करतातः–कमरेचा–पाठीचा–मानेचा–मनगटाचा–हातापायांचा–हिंवतापाचा–गलांडाचा–वाईचा–पावसाचा–उन्हाचा–पटकीचा–वाऱ्याचा–पडशाचा खट्टा मोडला–मोकळा–ढिला झाला. (ताठरपणा, कणखरपणा, आवेश इ० इंद्रियांचे व अवयवांचे गुण, शारीरिक रोग, यांना अनुलक्षूनहि निरनिराळ्या अर्थानें हा शब्द लागतो).

खट्टा—वि. १ आंबट (फळ). २ (ल.) असंतुष्ट; त्रासलेला. (क्रि० पडणें). ३ उतरलेला; कमी झालेला; निस्तेज; फिका (रंग). ४ निरुत्साह; नाउमेद. [हिं.] ०**अनार**–पु. एका जातीचें डाळिंब, हें औषधी आहे. याचे दाणे आंबट असतात. ०**बार**–पु. फळाचा, पिकाचा दुसरा हंगाम–बहर; आंबट बहर. त्याच्या उलट मिठ्ठा अथवा गोडा बार=पहिला बहर.

खट्टा—पु. (खा.) खटारा. –भात्रै ७.१–४. [हिं.]

खट्टाई—खटाई पहा.

खट्टी—वि. १ अतिशय आंबट (फळ). २ तुसडा; तिरसट (मनुष्य, स्वभाव). ३ (ल). असंतुष्ट; त्रासलेला; नाखुष. 'मर्जी खट्टी जाहली.' –अफला ११. [हिं.]

खट्टू-खट्टू—वि. खट्टी अर्थ ३ पहा. [हिं.]

खट्टू—खटवे पहा.

खट्या, खट्या—खट्टा अर्थ १, २ पहा. ०**बैल**–पु. थकलेला बैल.

खट्याव(वि)णें—अक्रि. मरणें. [खाट.]

खट्याव(वि)णें—क्रि. निरुत्साही, निराश, उदास होणें; निकड लावून गळचेपीस लावणें; निकड–तगादा लावणें. खट्याळणें पहा. [खट्टू]

खट्याळ, खट्याळ–माठ्याळ—वि. १ खट; तुसडा; तिरसट; द्वाड; दुश्चित्त; वाईट; उपद्यापी (स्वभाव, वागणूक). 'कळों आलें खट्याळसें । शिवों नयें लिपों दोषें ।' –तुगा २७५४. २ खोडकर; हट्टी; छप्पन टिकल्याचा (घोडा, गाय). [सं. शठ; खठ+आळ; तुल० का. केट्ट=वाईट; का. केडु=खोडी, केडु+आळि खोड्याळ]

खट्याळणें—अक्रि. १ चेतवणें; भरीस घालणें; तातड लावणें; क्षोभविणें. २ (ल.) आठवण देणें (वचनाची); स्मरण देणें; खटाल(ळ)णें पहा.

खट्वा—स्त्री. खाट; पलंग; बाज. [सं.] ०**मरण**–न. खाटेवर आलेलें मरण. मरणकाली माणसाला कांबळ्यावर उतरण्याची चाल आहे. पण एखादा मनुष्य खाटेवरच मेला तर तें हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें निषिद्ध मानतात.

खट्वांग—न. खाटेचा खूर; शंकराचें एक आयुध. –वि. (गो.) हटवादी; जाडें प्रस्थ.

खड—स्त्री. १ (राजा). पाऊस पडल्यानंतर उगवलेलें कोवळें गवत. २ गाय, म्हैस इ० ना खाण्यासाठीं ठेवलेला दाणा, कडबा, गवत, चारा, वैरण इ० ३ (चि.) खाणें (पुष्टिकारक). मसाप–२.३६५. ४ (ल.) दाढी; तोंडावरचे केस. 'खड भरित परिपूर्ण । मोवळ पिंगट वर्ण ।' –शिपु २.१९.३९. [सं. खट; दे. प्रा. खड; हिं. गु. खड=गवत अर. खद्=गाल]

खंड—पु. १ दंड; चढाई करून आलेल्या शत्रूनें गांवांवर बसविलेली पट्टी; खंडणी. 'खंड काय मला मागतो ।' –ऐपो १४. –पया १२८. २ लढाईत कैद केलेल्या शिपायांबद्दल त्यांच्या सुटकेसाठीं द्यावयाचा पैसा. ३ कामाचा ठराव (ठरलेली रक्कम); मक्ता; करारानें ठरलेली रक्कम; अमुक कार्यास अमुक द्रव्यादिक असा ठराव. ४ धान्यरूपानें अगर पैशाच्या रूपानें मालकी हक्काबद्दल घेतलेला कर, फाळा, सारा. (सरकारीं खोती). 'आमचे जमिनीचा खंड १७५ रु. आहे.' ५ ठराव; निवाडा. 'तुका म्हणे केला । खंड दोघांचा विठ्ठला ।' –तुगा १४२८. [का. कंडॅगे (कडु धातु पासून)=तह; निकाल; ठराव; कौल] सामाशब्द– ०**कमाविशी–वीस**–स्त्री. गांवच्या इनामदाराला दंड करण्याचा व तो वसूल करण्याचा मिळालेला अधिकार. ०**करी**–पु. कूळ; खंडानें शेत करणारा. ०**काम**–न. अमुक द्रव्य व अमुक काम अशा रीतीनें ठरवून घेतलेलें काम; कंत्राटानें घेतलेलें काम; नेमून घेतलेलें काम. ०**खुरई**–खंडगुन्हेगारी पहा. ०**खोती**–स्त्री. इजारा. ०**गुन्हेगारी**–स्त्री. (गुन्हेगारापासून घेतलेली–ला) दंड; जप्ती; धरपकड वगैरेला सामान्य संज्ञा. 'या राज्यांत उगाच खंडगुन्हेगाऱ्या भराव्या लागतात.' [खंड+फा. गुन्हागारी] ०**चिठ्ठी**–स्त्री मक्तेपत्र; भाडेचिठ्ठी. ०**दालदी**–स्त्री. साष्टींत पाण्यांत

कोळ्यानें काठ्या रोवण्याच्या हक्कासाठीं दिलेला पैसा. [दा कोळी.] **०दारू**–स्त्री. दारू विकण्याचा मक्ता. **०फडशी**–स्त्री. सरकारच्या वतीनें वसूल केलेला दंड. **०फुरोई**–खंड गुन्हेगारी पहा. **०बकरी**–रें–स्त्रीन. घाटावर चरगीस–विकीस आलेल्या शेळ्या मेंढ्यांच्या कळपांतील एक शेळी–मेंढी सरकारी कर म्हणून घेणें; कळपावरील जकात. **०भट्टी**–स्त्री. भट्टीवरील कर **०मक्ता**–पु. कंत्राट; हक्क; इजारा; मक्तयानें दिलेली जमीन. **खंड-मक्ता**–करार यास व्यापक संज्ञा. **०शिंदी**–स्त्री. ज्यापासून ताडी काढतात त्या ताडीच्या झाडांवरील कर.

खंड—पु. १ खळ; अडथळा; विराम (काम, काळ, धंदा यामध्यें) व्यत्यय. 'सूर्य कधींच उजेड देण्यांत खंड पाडीत नाहीं.' २ तुकडा; भाग. 'मग तळवे तळहात शोधी। उर्ध्वीचे खंड भेदी।'–ज्ञा ६.२३२. ३ विषयाचा, ग्रंथाचा भाग; अध्याय; प्रकरण. ४ जंबुद्वीपांतील नवखंडांपैकीं एक खंड; नवखंड पहा. पृथ्वीवरील प्रदेशाचा एक मोठा भाग; अनेक देशांचा समुदाय. 'पृथ्वींत आशिया खंड सर्वांत मोठें आहे.' प्रदेश; प्रांत; जिल्हा उ० बुंदेलखंड. ५ एक काव्यरचना; मोठें काव्य; कथागीत. ६ (वे.) द्विदल धान्य चाळतांना. खालीं पडणारे धान्याचे बारीक कण; निरुपयोगी धान्याचा अंश. ७ (नृत्य) अनेक करणांचा समुदाय ८ (संगीत) ज्यामध्यें पहिला विभाग नियमानें पांच मात्रांचा असतो असा एक दक्षिणेकडील तालप्रकार. [सं.] (वाप्र.) **खंडे-खंडे, खंडविखंड करून टाकणें**–तुकडे करणें; मोडणें; तोडणें; फोडणें. सामाशब्द– **खंडक**–पु. (नृत्य) चार करणांचा समुदाय. **०गुणन**–न. गुणकाच्या अवयवांनीं गुणणें. **०पद**–न. (बीजगणित) मूळगत; करणीगत पद (इं.) सर्ड. **०प्रलय**–पु तात्पुरता जलप्रलय; सामान्य जलप्रलय; याच्या उलट ब्रह्मप्रलय. **०मंडल**–न. वर्तुळाच्या परिघाचा अंश, भाग. –वि. फुगीर. **०विखंड**–पु. तुकडे तुकडे. 'कुशब्द बोलोनिया उदंड। हृदय करी खंडविखंड।'–मुसभा ५.८७. **०वृद्धि**–स्त्री. थोडासा पाऊस; मधूनमधून पडणारा पाऊस. [सं.] **खंडशः**—क्रिवि. १ तुकडे तुकडे करून. २ भागशः **०श्रेढी**–स्त्री. (गणित) खंडितश्रेढी; संख्येचा तुटलेला क्रम; त्रुटित संख्यामालिका. **०ज्ञान**–न. १ भागशः, पायरी पायरीनें, क्रमाक्रमानें दिलेलें, मिळविलेलें ज्ञान. याच्या उलट अखंड ज्ञान. २ अर्धवट ज्ञान. ३ नाशिवंत वस्तूंचें ज्ञान, जीवात्मा व बद्धात्मा यांच्या ऐक्याबद्दलचें अपुरें ज्ञान; पूर्ण ज्ञान अथवा अभेद ज्ञानाच्या उलट. 'खंडज्ञान उपदेशितो।' –विपू १.३२. 'देहीच स्थानमान। हें सकळहि खंडज्ञान।'

खडक—पु. १ मोठा दगड; पत्थराची जमीन; दगडाची रांग; कातळ; शिळा, धोंडा; खडपा; पाषाण. 'ज्वालामुखींतून चळजळीत रस बाहेर येऊन ... त्याचे थरावर थर बसतात. या उष्णता निघून गेली म्हणजे त्यांचेच खडकाचे थर बनतात' –सृष्टि (खगोल) ३८. २ कातळांचा समूह; शिला. ३ मोठा खडक; कातळ. ४ (ल.) कठोर अंतःकरणाचा; पाषाणहृदयी माणूस. 'खडकाशीं धडका घेऊन काय फळ.' **म्ह० खडकावर पेरलें व्यर्थ गेलें.** –वि. १ वाळून कोरडा ठणठणीत झालेला; खडखडीत (धुतलेलें कापड, काष्ठ); 'हीं काष्ठें खडक झालीं आहेत.' अगदीं कोरडी, आटलेली (विहीर, तळें गाई–म्हशींची कास, किंवा एखाद्या स्त्रीचें स्तन). ३ लख्ख; चकचकीत (प्रभात, उषा). ४ तीव्र, कडक (ऊन, भूक). याशिवाय आत्यंतिक, पूर्ण, तीव्र या अर्थी वापरतात. कित्येक वेळीं 'कडक' शब्दाबद्दलहि योजतात. [सं. काठ=खडक, दगड; काठक. तुल० ध्व. खड्; किंवा सं. कटक; प्रा. कडग=पर्वतभाग, माची]. (वाप्र.) **०लागणें**–नका किंवा सुपरिणामाची आशा धरली असतां निष्फळ होणें. 'त्याचे घरीं रुपयांसाठीं गेलों होतों परंतु तेथें खडक लागला.' **खडकाचर पोट भरणें**–कोठेंहि पोट भरणें. सामाशब्द– **०खडक**–खडक (–वि.) पहा.

खडकण-कन-कर—खटकन पहा.

खडकणें—अक्रि. वाळणें; वाळून कडकडीत होणें (धुतलेलें कापड, ओलें सरपण). [खडक]

खडकणें—अक्रि. गति कुंठित होणें. 'वाघ मार्गावर ओरडतांच माणसें जेथील तेथेंच खडकलीं.' [खडक]

खडकत—स्त्री. खडकाळ जागा. –वि. खडकाळ. [खडक]

खडकतेरें—न. (कों.) खडकांत होणारें तेरें, अळूं –कृषि ६४५.

खडकपात्र—न. मुलाम्याची बांगडी. खड्गपात्र पहा. 'घरांत दारिद्र्य अठरा विश्वे हें तर बाहेर उघडेंच दिसतें. हातांत खडकपात्रें, कानांत ताडपत्रें.'–श्री भिक्षीणनाटक. इतर अर्थांसाठीं खड्गपात्र पहा.

खडकशेपू—स्त्री. एक वनस्पति.

खडक(का)ळ-ळी—स्त्री. १ दगडाळ; खडकाचा किंवा कठिण पृष्ठभाग; मैदानाचा माथा, जागा; पाषाणयुक्त जमीन; कातळमय पृष्ठभाग. २ (ल.) गोंधळाचा मुद्दा; कठिण गोष्ट; शकास्थान; समजावयास कठिण स्थळ. –वि. दगडाळ; धोंड्यांनीं युक्त. [खडक+ सं. आलय किंवा आळ प्रत्यय]

खडकळ-काळी—स्त्री. दगडाळ काळी जमीन. ही नेहमीच्या काळ्या चिकण जमीनीपेक्षां कमी सुपीक असते, तरी हींत ओलावा चांगला राहतो व कसण्याला जड जात नाहीं.

खडका—१ जवळ येणाऱ्याची चाहूल (माणसाच्या पायांची इ०) ओळखीचा आवाज; कांहीं ध्वनि. २ खडाजंगीचें भांडण; खटका. 'त्याचा व आमचा खूप खडका उडाला.' ३ (व.) खूप

खाणें; खाण्यावर तडाखा. 'आज पुरणपोळीवर खडका आहे.'. [ध्व.] ०घेणें, काढणें–कानोसा घेणें (जवळ येणाऱ्या माणसाचा, वस्तूचा). ०धडका–पु. भांडाभांडी; खडाजंगी; कलागत.

खडकावणी–वून—कडकावणी–वून पहा.

खडकाव(वि)णें—उक्रि. मध्येंच थांबविणें, स्तब्ध करणें खडकणें पहा.

खडकाव(वि)णें—उक्रि. रागें भरणें. कान उपटणें, उघडणें; खरड काढणें; कडकाविणें पहा.

खंडकी—स्त्री. एक प्रकारचें हलकें वस्त्र (विशेषतः तांबडया रंगाचें)

खडकी मीठ—न. सैंधव. (इं.) रॉकसाल्ट. –पदाव १. १०४. [खडक+मीठ]

खडकील–कूत–कूळ—वि. (प्रां.) खडकाळ.

खडकुती—स्त्री. सूर्याच्या खडतर उन्हानें पदार्थ करपून जाण्याची अवस्था; जळून जाणें. 'आम्र लागला सेती। धान्यें बणड्या आणी खडकुती।' –दा ३.७.४२ [कडका]

खंडकुली—स्त्री. जलाशय. –शर ?

खडकूत—पु. जनावरांच्या खुरांना होणारा एक रोग, खुरकूत.

खडक्या—वि. (नाशिक) निर्भीड; धसमुसळया; स्पष्टवक्ता; तोंडावर स्पष्ट बोलणारा. [खडकावणें]

खडक्या—पु. (व.) निजामशाहींतील तांब्याचा पैसा. 'खडक्या दक्षिणा वाटली.' [खडा]

खडखड–डां—क्रिवि. १ बैलगाडया वगैरेचा खडकाळ रस्त्यावरून चालतांना होणारा जो आवाज तसा आवाज करीत; कोरें कापड, कागद इ० हलविलें असतां होणारा आवाज काढीत. २ स्पष्टपणें; साफ; तडकाफडकीं; तोंडावर (बोलणें, उत्तर देणें). ३ झराझरा; झपाझप; सपाटयानें (धांवणें, जाणें). [ध्व.]

खडखडणें—अक्रि. १ खडखड आवाज होणें; तडतडणें; फडफडणें; खरखरणें; चरचरणें; वाजणें. इ० 'म्हशीचीं शिंगें गातडीवर खडखडत आहेत.' [ध्व. हिं. खडकना] **खडखडून उठणें–बोलणें–सांगणें–जाब देणें**–रागानें, आवेशानें, स्पष्ट, बेधडक बोलणें वगैरे. [खडखड]

खडखडविणें—उक्रि. १ मोठयानें सांगणें; खरडपट्टी काढणें; रागें भरणें; 'त्या कुळाला जेव्हां खडखडविलें तेव्हां त्यानें रुपये दिले.' २ खडखड वाजविणें; आवाज करणें. [खडखड]

खडखडाट—पु. (अतिशय खडखड) १ मोठयानें खडखडणें, कटकटणें, तडतडणें. २ (ल.) (रिकाम्या भांडयांच्या आवाजावरून) दुर्भिक्ष; दुष्काळ; शुकशुकाट; आत्यंतिक अभाव (पैशाची पिशवी, धान्याचें कोठार, विहीर यांतील–पैसा, धान्य, पाणी इ० चा); चणचण. 'ह्या विहिरीमध्यें पाण्याचा खडखडाट झाला आहे.' [ध्व. खडखडाट; हिं. खडखडाहट]

खडखडीत—वि. १ कोरडा व ठणठणीत; वाळून कडक, शुष्क झालेला (भिजलेली पण नंतर वाळलेली वस्तु, पदार्थ); कडकडीत (धुतलेलें कापड); कडकड, सळसळ वाजणारें (कापड). २ जोमदार; निरोगी; उत्साही; मजबूत; ठणठणीत (वयातीत, पोक्त माणूस); पुन्हां सशक्त; जोरकस (आजारांतून उठलेला). ३ धसमुसळा; स्पष्टवक्ता; चोख व्यवहार करणारा; ४ धोपट; खरें; उघडउघड (भाषण, व्यवहार, चौकशी). ५ (कु.) नाजूक नसणारें; खडबडीत; खरखरीत पहा. [ध्व. खडखड]

खडखडया—स्त्रीअव. दरवाजांतील पटयापटयांचे कलमदान- (इं.) पॅनेल. 'खडखडया गोलची केलेल्या उम्र्या गजांस ... पितळी विजागिऱ्यानीं जोडाव्या' –मॅरट ७२. [ध्व.]

खडंग—क्रिवि खडखडीत वाळणें या अर्थाच्या धातूंशीं (धान्य, कापड इ० संबंधीं) योजतात.

खडगळ–गूळ—वि. १ खडकाळ; दगडाळ. २ (ल.) खडंगूळ; कठिण; त्रासदायक; खडतर; खचरट. ३ नाठाळ; द्वाड; खटयाळ (गाय, पशु). ४ तिरसट; हिरवट; तुसडा; कुरठा; तिढतिडा. [खडक]

खडगुत—न. (व.) दाणा; चारा; वैरण. [प्रा. दे. खड=तृण, घास; हिं. खड=गवत; खड+गूत]

खडंगूळ—खडगळ अर्थ २ पहा.

खंडछाया—स्त्री. (ज्योतिष) मुख्य छायेच्या सभोंवती असणारा फिक्का किंवा पांढऱ्या रंगाचा भाग. (इ.) पेनंब्रा.

खडंजा—पु. उम्र्या विटांचा थर. [हिं. खडा]

खंडजाई—स्त्री. एक क्षुद्र देवता. 'खंडजाई देवी म्हणे तूं अखंडी।' –सप्र ५.३२. [सं. खंडजा+आई]

खडण, खडीण—वि. १ त्रासदायक; ओढाळ; नाठाळ; खटयाळ, (जनावर इ०). म्हण खडण गुरा बहु दुध. २ दूध काढतांना फार त्रास देते अशी (गाय, म्हैस); वांझ. 'खडिणा गाय दुभती। वैरी तेची मित्र होती।' ३ खटयाळ. [प्रा. खडणा=खटयाळ गाय]

खंडण–न–णा–ना—नस्त्री. १ मोडणें; तोडणें. २ निरंतर करणें; खोडून काढणें. ३ शेवट; भंग. 'या पोटाकारणें गा झालों पांगिला जना। न सरेची मायबाप भीक नाहीं खंडणा।' –तुगा ३४९. ४ खंड पडणें; थांबणें. 'मही लोटला आरक्षाचा पाट। खंडणा नोहे परम अचाट।' –नव ९.१५६. [सं. खंडन; (खण्ड्=तुकडा पडणें)]

खंडणी—स्त्री. १ करभार (मांडलिकांनीं सार्वभौमाला द्यावयाचा); दुसऱ्यानें आपणास उपद्रव न करावा किंवा अनुकूल

असावें म्हणून देण्यांत येणारें द्रव्य. २ दंड; गुन्हेगारी; बसविलेली बगणी; जबरीनें घेतलेला पैसा, वस्तु. ३ ठरविल्यानंतरचा चालू सालचा वसूल, सारा, कर. ४ खंड; फाळा; धान्य रूपानें मालकाला सारा देणें. ५ (खंडणें याचें धातुसाधित नाम) मक्ता करणें; किंमत किंवा अटी ठरविणें. **०तशरीफ**–पु. धारा नक्की केल्यानंतर गांवकामगाराला दिलेलें इनाम; पाटलाचें वेतन. **०दार**–वि. खंडणी देणारा; खंडकरी. [खंड, खंडणें]

खंडणूक—स्त्री. १ कामाचें कंत्राट; कामाचा मक्ता; विशिष्ट कामाबद्दल विशिष्ट पगार मिळण्याबद्दलचा ठराव, बोली वगैरे. २ (क्रि.) मक्ता; इजारा (सारा, जकात इ० चा). ३ किंमत, अटी ठरविणें. [खंड]

खंडणें—अक्रि. पडणें; गळणें; झडणें (झाडाचीं पानें). 'स्वराज्याच्या कोंदणांतील एक एक तेजस्वी हिरा कसा खडत चालला आहे पहा.' –स्वप १२४. –न. पानें गळालेलें झाड.

खंडणें—उक्रि. १ तुकडे करणें; तोडणें; मोडणें; तुटणें (हें क्रियापद निश्चित अर्थाचें नाहीं. तोडणें, मोडणें यांतील बारीक भेद या क्रियापदानें दर्शविला जात नाहीं). 'तें आदि नाहीं खंडलें। समुद्रीं तरी असे भिनलें।' –ज्ञा २.१५४. 'जें चर्म सात्यकीचें खंडी तो विंद उग्रकर्मा तें।' –मोकर्ण ९.१४. २ नाश करणें, पाडणें. 'काय हें खंडईल कर्म।' –तुगा ६९८. 'तुका म्हणे कृपावंता। माझी चिंता खंडावी।' –तुगा १७००. ३ खोडून टाकणें; निरुत्तर करणें; कुंठित करणें (वादांत). 'कीं न्यायें बौद्ध खंडिले कविनें।' –मोकर्ण ८.३२. [सं. खंडन]

खंडणें—उक्रि. १ मक्ता करणें; करार करणें; ठराविक पैसा घेऊन ठराविक काम, पार पाडणें; अथवा इजाऱ्यानें कांहीं एक काम पत्करणें, दुसऱ्यास देणें. २ किंमत निश्चित करणें; अटी व किंमत ठरविणें (विकत, भाड्यानें घ्यावयाच्या वस्तूची). ३ फिटणें; फेडणें (कर्ज); अटी पूर्ण करणें; स्वतःवरची जबाबदारी पार पाडणें; फल भोगणें. 'तुझें कर्म खंडेल गहन।' –रावि ४०. १००. ४ ठरविणें; निश्चित करणें. 'येका मळेयाचा येकांत स्थानीं। लोसेन ठावो करूं खंडुनी। तेथें मंदिर बांधोनी। वासु केला।' –ख्रिपु २.१२.८०. ५ खंडणी बसविणें; वसूल करणें. [खंड, खंडणी] **०दंड**–पु. खंडगुन्हेगारी पहा. दंड; गुन्हेगारी; जप्ती [खंड+दंड]

खंडनीय—वि. मोडण्यास योग्य; मोडण्या–खंडण करण्याजोगा. [सं.]

खडतर—न. (कों.) जुना, कुजका झांप (नारळीचा).

खडतर—वि. कठिण; त्रासदायक; कंटाळवाणें; खटखाळ; खाष्ट; द्राष्ट; उग्र (माणूस, देश, मार्ग, ग्रंथ इ०). 'झाली दडपणीं खडतर देवता। संचारली आतां निर्धो नये॥' –तुगा २०१.

[सं. खरतर] सामाशब्द– **०औषध**–न. तीव्र, अमोघ, रामबाण औषध. **०दैव-नशीब-प्रारब्ध**–न. दुर्दैव; दुर्भाग्य. **०देवत**–न. उग्र, दुराराध्य, कष्टसाध्य देवता (म्हसोबा, नरहरी, वीरभद्र, काली इ०). **०बीज**–न. १ वाईट बीं, मूळ; वाईट कूळ; हीन कूळ; २ (ल.) तिरसट, दुष्ट, खराब माणूस. **०वेळ**–स्त्री. १ कठिण, दुर्धट प्रसंग, योग, वेळ (दुपारची, तिनिसांजची). २ कुयोग (ग्रहांचा, राशींचा). **०शब्द**–पु. कठोर, खोंचदार, टोचणारा, बोचक शब्द, भाषण. **०साल**–न. वाईट वर्ष; अवर्षण, दुष्काळ, लढाई, रोग, सांथ यांनीं युक्त असें वर्ष. **०हत्यार**–न. भयंकर, तीक्ष्ण हत्यार; शस्त्र (संगिनीला तिच्या जखम करण्याच्या स्वरूपावरून म्हणतात.).

खडतरणें—अक्रि. १ खडखड आवाज होणें (दगडावरून, खडकावरून गाडी गेली असतां); खडबडून उठणें. 'तेणें सुखनिद्रेचिये सदनीं। जागरोनी खडतरला।' –मुसभा १५.१६४. २ मोठ्या आवाजानें लागणें, आपटणें, बोचणें, रुतणें, खोंचणें, भेदणें (बाण, दगड, बंदुकीची गोळी इ०). 'कृपवाक्शर काळजांत खडतरले।' –मोआदि २६.४७. 'एक खडतरला बाण। गगना गेला गवेषण॥' –एरुस्व १०.१६.

खडतरणें—अक्रि. (काव्य) खडतर, खचरट होणें.

खंडन—न. १ तोडणें; तुकडे करणें; नाश करणें. खंडण पहा. २ (ल.) अडथळा करणें; अडविणें. ३ (ल.) कुंठित करणें. (समासांत) वाद–मत–ग्रंथ–अभिमान–मान–खंडन. [सं.] **खंडन(चिबुक)**–न. (नृत्य) दांत एकमेकांवर आपटणें; संतापदर्शक अभिनय. **०मंडन**–न. सिद्धासिद्ध करणें; खोडून काढणें व स्थापणें; बाजूनें व विरुद्ध बोलणें.

खडप—पु. १ खडक; खडकाळ पृष्ठभाग; खडकाचा थर; रास. २ (ल.) भाकऱ्यांचा ढीग; खरकटया भांडयांचा ढीग. –न. मूठभर काडसरांची, ताटांची पेंढी, 'कडप' पहा.

खडपा—पु. १ मोठा खडक. २ खडकाचा सुटलेला कडा, भाग, सुळका; खडकाळ चढण; टेकाड; दरड. 'कितीही अवघड खडपे असले तरी त्यांवर तीं (बकरीं) सहज चढून जातात.' –मराठी ३ रें पुस्तक पृ. ११७ (१८७३).

खडबड—स्त्री. १ विशिष्ट आवाज. (उंदीर गवतांत–मडक्यांत गेल्यावर करतो तो). २ (ल.) कटकट; वाचाबाच; भांडण–तंटा. ३ अडगळ. ४ खडबडीतपणा (जमीन वगैरेचा). गडबड या अर्थानेंहि हा शब्दहमाल वगैरे लोक वापरतात. [ध्व.] **०खुंटा**–पु. रिकाम्या भांड्यांत पळी घातली असतां होणारा खडखड असा आवाज; त्यावरून अत्यंत अभाव; फडशा; फक्त; रिक्तता (विहीर, फडताळ, कोठार यांची).

खडबडणें—अक्रि. १ खडबड आवाज करणें. २ (काव्य) घोटाळणें; गोंधळणें; भिणें; क्षोभणें. गडबडणें पहा. 'खडबडी कनकाद्रि।' [खडबड]

खडबडाट—पु. खडबड असा मोठा आवाज; गोंधळ.

खडबडीत—वि. अतिशय खरखरीत; खरबरीत; खांच खळगे असलेली. (गो.) ओबड-धोबड; खरखरीत; खरबरीत व खडबडीत हे शब्द अनुक्रमें अधिकाधिक खरबरीतपणा दाखवितात.

खडबडून—क्रिवि. गडबडून; खडबड आवाज ऐकून किंवा करून. 'ती खडबडून जागी होते आणि उठून बसते.' –मोर ८३२. [खडबडणें; तुल० सं. खटखटयित्वा]

खडबुडणें—अक्रि. १ भेदरणें; अतिशय गोंधळणें. २ खळबळणें; सळसळणें. [ध्व. खडबड]

खंडमंड—स्त्री. (ना.) फिटंफाट; फिटाफीट. [खंडणें द्वि]

खंडमेरू—पु. १ ढीग; नियमितपणानें कमी होणारी रास (तोफगोळयांची); समप्रमाणांत उतरणारी संख्या. २ (संगीत) नष्ट व उद्दिष्ट यांतील इच्छित गोष्टी सुलभतेनें काढतां येण्याची रीति

खंडलेंतुटलें—न. भागीदारी तुटणें; सरकत मोडणें; लडथडीच्या व्यवहाराची देऊन घेऊन केलेली मोकळीक, सोडवणूक.

खडवण—न. १ खडकाळ जमीन. २ (राजा). कडा; तुटलेला खडक; मुळकेदार चढण. ३ बारीक खडे. [खडे+वण प्रत्यय]

खडवा—स्त्री.अव. (प्र.) खडावा; (एक खडव) पायांतील लांकडी जोडा; पादुका. [ध्व. खड्]

खडवा—पु. खोडवा पहा.

खडवा—पु. पर्वत; डोंगर; खडक. 'परिसाचा खडवाचि जोडला।' –ज्ञा ११.५३९.

खंडवा—पु. सबंध कोरडें असणारें नदीचें पात्र. [सं. खंड]

खंडवाडा—पु. बैलाच्या कामाबद्दल त्याच्या धन्याला दिलेलें धान्य. [खंड]

खडविणें—उक्रि. औताला बैल जोडणें, जुंपणें. [हिं. खडा=उभा]

खडवें—न. (राजा.) डोंगरावरची, वळणांची-नागमोडी वाट; घाटाचा टप्पा. खडवा पहा.

खडवें—न. जोडवें; खटवें पहा.

खंडशः—खंडविखंड पहा.

खडशिंग—न. खडशिंगीचें फळ.

खडशिंग-शेरणी—स्त्री. सागवानाच्या जातीचा एक मोठा वृक्ष; याचें लांकूड तांबूस रंगावर, बळकट व इमारतीच्या उपयोगी असतें.

खडशेंग—स्त्री. (व.) आबईची शेंग.

खडस-सा—वि. खणखणीत; दणकट; टणक; घट्टाकट्टा (म्हातारा माणूस).

खडस, खडसपट्टी—स्त्री. खरडपट्टी; भोंसडपट्टी; धमकावणी; खडकावणी; खरड काढणें (एखाद्याच्या गर्वाची, अहंकाराची, तोऱ्याची). (क्रि० काढणें). [खडसणें+पट्टी]

खडसणी—स्त्री. १ तोडणें; छाटणें; काटाकाट करणें (वृक्ष). २ (ल.) तासडपट्टी; खरडपट्टी भोसडपट्टी. (क्रि० काढणें). [खडसणें]

खडसणें—उक्रि. १ फांद्या तोडणें. २ ओबड-धोबड रीतीनें कसें तरी तोडणें. ३ (ल.) कठोरतेनें बोलणें; जोरानें, खोंचदार, ठसेलसें बोलणें; कानउघाडणी करणें; ताकीद देणें; खरड काढणें. ४ बजावून सांगणें; संभाळ, विसरशील असें अनेक प्रकारें सांगणें. [का. कडिसु=कापणें]

खडसपट्टी—स्त्री. (व.) डोंगराळ प्रदेश. 'खडसपट्टीतले राहणारे.'

खडसं(सां)बळ-ळी—१ आबईची वेल; ब्रह्मीचा वेल; कोयतेवाल, खरसांबळी पहा. (तंजा.) खडसमुळी. २ महाबळेश्वराच्या आसपास सांपडणारी एक वनस्पति (हिच्या मुळया खातात). [सं. खड्गशिंबी]

खडसमुळी—स्त्री. (तंजा.)वरील खडसंबळी अर्थ १ पहा. 'कुहिरी आबई खडसमुळी।' –अमृत ६२.

खडसर—वि. खडकाळ.

खडसा—पु. (राजा.) नांगराचा मुख्य अवयव; नांगरखुंट; ज्याला फाळ बसवितात तो भाग.

खडसाविणें—उक्रि. १ तासडपट्टी काढणें. २ ताकीद देणें; बजावणें. खडसणें पहा.

खडसून-हडसून—क्रिवि. हडसुन-खडसून पहा.

खडस्तन—वि. (गो.) मोठें; बडे; जाडें.

खडळ—पु. खडा. 'आणि घांसांआंतील हरळु। फेडितां लागे वेळु। तें दूषण नव्हे खडळु। सांडावा कीं।' –ज्ञा १३.३३५.

खंडळमंडळ—स्त्रीन. १ अनियमित होणें, पडणें; मधूनमधून, प्रसंगोपात्त उद्भवणें असा स्वभाव, गुणधर्म; अधूनमधून घडून येणें (काम, कृति, रग्गल, काल इ० संबंधीं). (क्रि० करणें; लावणें; मांडणें; चालवणें). 'पाऊस खंडळमंडळ पडूं लागला.' –क्रिवि. १ अधून मधून; केव्हां केव्हां; प्रसंगवशात्, टंगळ मंगळ करून. २ येथें तेथें; थांबून, अडखळत. ३ संदिग्धपणें; अनिश्चितपणें; नकारार्थी. –वि. (व.) तुटक तुटक. [सं. खंडल द्वि.]

खडा—पु. १ लहान दगड; गोटी; गोटा; धोंडयाचा बारीक तुकडा; दगडाचा लहान खंड. २ कळी (चुन्याची); तुकडा

(गोंद, हिंग, कात, खडीसाखर इ० चा); अलंकारांतील, अंगठींतील मणी, रत्न. 'एकेक खडा निवडक हातीं लागला.'–विवि १०.५–७.१२७. ३ मळाचा लहान पण कठिण गोळा; (सामा.) गट्टा; गोळा; पिंड. ४ गुळाची लहान ढेप. [सं. खंड; सिं. खडो] (वाप्र.) **०उडणें**–(गुडगुडी ओढतांना तींतील खडा वर उडतो त्यावरून) सर्वस्वी संपणें; खर्च होणें (द्रव्य, वस्तु). **०टाकून ठाव घेणें**–(पाण्याची खोली ठोकळमानानें खडा टाकून पाहतात यावरून) एखाद्या कामाचा कल जाणावयाचा असतां सहजपणें एखादा शब्द टाकून कामाची माहिती काढणें; आपलें काम होईल कीं नाहीं याचा अजमास पाहणें. **खडा न खडा माहिती असणें**-एखाद्या कामांतील बारीक सारीक सर्व गोष्टी माहीत असणें. **०फुटणें**–खडक फुटून पाण्याचा ओघ सपाटून बाहेर येणें. 'नदीचा खडा अजून फुटला नाहीं.' **खडे खाणें**–खस्ता खाणें; कष्ट करणें; त्रास सहन करणें (दगदगीच्या कामांत). **०खाघविणें–चारणें**–त्रास देणें; सतावणें; बेजार करणें. **०घालणें–फोडणें** (नांवानें)–१ एखाद्याची निंदा करणें; तक्रार करणें. २ (नांवाशिवाय) खूप कष्ट करणें; दगदग करणें. **०मोजणें**–खडे मांडून हिशोब करणें (कागदावर लिहितां येत नसल्यामुळें). **खड्या खड्यानीं डोकें फुटणें**–अनेक बारीकसारीक गोष्टींमुळें दिवाळखोर बनणें, भिकेस लागणें (एकाच गोष्टीमुळें नव्हे). **खड्यांनीं डोकें फोडणें**–दगडानीं मारून गाईला ठार केलें असतां प्रायश्चित्तादाखल त्या व्यक्तीचा दगडांनीं डोकें फोडून वध करणें. **खड्यासारखा निघडणें**–१ एखाद्याला कुचकामाचा म्हणून बाजूला सारणें, करणें; निरुपयोगी ठरविणें. २ चट्कन् वेगळा काढणें, ओळखणें. 'राहतां राहतां सुशिक्षितांचा वर्ग राहिला व त्यांस मोलें यांनीं शत्रू म्हणून खड्यासारखें निवडून काढलें आहे.' –टिळ्या ५. **खड्यासारखा बाहेर पडणें**–निरुपयोगी म्हणून बाजूला सरणें.

खडा–पु. पात्यांच्या भिवून तयार केलेल्या छत्रीस ज्या काडीवजा कांबी तासून लावतात त्या प्रत्येकी. [सं. खंड]

खडा—वि. (हिं.) १ ताठ; उभा. २ कायमचा; सततचा. 'त्याचे दरवाजावर खडा पहारा असतो.' ३ पोर्टी तपशिलाच्या रकमा न लावितां लिहिलेला, पुरा न केलेला (हिशेब); ४ अनिश्चित ठेवलेला; पडून राहिलेला; जो स्वीकारला नाहीं किंवा परतहि केला नाहीं असा. (चेक वगैरे) [हिं.]

खंडा—पु. रुंद पात्याची, दुधारी सरळ तलवार, खड्ग; खांडा पहा. 'खंडा पट्टा सुरे तिरकमान कटार लावून.' –ऐपो १०९. [सं. खड्ग] **०धैत**–वि. खड्गधारी; खंडा धारण करणारा.

खडाखड–डां—क्रिवि. १ खडखड, फटफट, तडतड इ० आवाज करून. २ न अडखळतां; फाड्कन; फडाफड (वाचन, भाषण). [ध्व]

खडाखड–डी—क्रिवि. १ जागच्याजागीं; तत्क्षणीं. २ ताबडतोब; झटकन; तडकाफडकीनें (येणें, देणें, खर्चणें, उत्तर देणें). 'ऐक्य जालें खडाखडी.' –दावि १११.

खडागुंडा—पु. रत्न; हिरकणी. [खडा+गुंडा]

खडा घाट—पु. १ उभी चढण; छातीवर येणारा, उभट घाट (डोंगराचा रस्ता). २ अपुरा, ओबड–धोबड घाट (भांड्याचा आकार), डौल, ठेवण.

खडाचढ(ट)—स्त्री. पोटांत विष्ठेचा खडा बनून होणारें दुःख. 'खडाचढाचेनि श्रमे। या नाव आध्यात्मिक।' –दा ३.६.२९.

खडाजंगी—स्त्री. १ जोराचें भांडण; लढाई; सफेजंगी; खडेजंगी. २ कडाक्याचें भांडण, बोलाचाली. [खडा=उभ्यां+जंग=युद्ध.] **०मचणें**–क्रि. (व.) भांडण जुंपणें.

खडाटी—वि. (गो.) खडकाळ; दगडाळ (जमीन, शेत). [खडा]

खडाड—पु. खडखडाट, खडाखड पहा. [ध्व.]

खडाडणें—अक्रि. मोठा गंभीर आवाज करणें; खडखडणें; गडगडणें; करकरणें; खरखरणें. [ध्व. खडाड]

खडाडता—स्त्री. खळखळ; क्षोभ. 'एन्हवीं आयुष्याचें सूत्र विघडतां। भूतांची उमटे खडाडता।' –ज्ञा ७.१८२. [ध्व.]

खडाण—वि. १ हुशार; चलाख; खमक्या. २ नाठाळ; त्रासदायक लाथाळ; (जनावर). खडण पहा. 'खडाणे आला पान्हा।' –ज्ञा १३.२०४. 'खडाणे धेनूसी दुरध किंचित।' –रावि ४.३८. 'खडाणा गाई न वळती।' –ह १३.१६.

खडाप—पु. (कु.) खडक; खडपा पहा.

खडा मसाला—पु. आक्खा मसाला. 'न बाटतां फडकयांत बांधून...जशाच्या तसा जो टाकतात त्याला खडा मसाला ...म्हणतात.' –गृशि २.५२.

खंडारवाणी–खंडारी—स्त्री. (संगीत) एक गायनपद्धति. ध्रुवपद गाणारा प्रसिद्ध राजा सन्मुखसिंग खंडार गांवीं राहात असे म्हणून त्याच्या ध्रुवपदगानपद्धतीस म्हणतात. [खंडार]

खंडाराणी—स्त्री. (बडोदें) राजाच्या गैरहजेरींत त्याच्या खंडाशी (कटयार, तरवार) जिचें लग्न लागतें अशी राणी.–अहेर बहुमान पोशाखाचा नियम ४१. [खंडा+राणी]

खंडारें—न. (व.) रीठ; पडकें घर; मोडकळीस आलेलें घर. 'घराचें खंडारें झालें.' [सं. खंड; म. खिंडार]

खडाल—क्रिवि. (व.) फडाफड; भडाभड; स्पष्ट. 'तो खडाल इंग्रजी बोलतो.' 'त्यानें खडाल सांगितलें.'

खडावा—स्त्रीअव. खडाव; खड्डय; लांकडाची पादुका. खडवा पहा. लांकडी तळावर कापडी किंवा कातड्याची पट्टी ठोकून नेहमीं घालण्याचें पायतण कोठेकोठें करतात. साधारणत

सन्यासी, स्वामी इ० खडावा वापरतात. [सं. काष्ठ+वह्; हिं. खडांव-ऊं; का. कडाव] **पायाला खडावा असणें**–तळपाय चापट नसुन चवडा वटांच यांच्या मधील भाग जमिनीस टेकत नाहीं असा पोकळ पाय असणें; हें शुभचिन्ह मानतात.

खडाष्टक––न. १ अतिशय द्वेष; हाडवैर (क्रि० बाळगणें; धरणें). २ (फल ज्यो.) षडाष्टक; वधुवरांपैकीं एकाच्या राशीपासुन दुसऱ्याची रास सहावी व दुसऱ्याच्या राशी पासुन पहिल्याची रास आठवी आली म्हणजे त्या दोघांत खडाष्टक येतें. यावरून वैर हा अर्थ. खडाष्टकाचे दोन प्रकार आहेत –(अ) प्रीतिषडाष्टक=प्रीति दाखविणारें खडाष्टक. (आ) मृत्युषडाष्टक=वैर दाखविणारें; पैकी प्रचारांत दुसरें घेतात. [सं. षट्+अष्टक]

खडाळ—वि. दगडाळ; खडाटी पहा. **म्ह०** शेत खडाळ बायको तोंडाळ. [खडा+आळ प्रत्यय]

खडाळणें—अक्रि. खंड पाडणें; सोडून जाणें; खंडित करणें. [सं. खंड]

खडाळी—स्त्री. (ना.) खार (जनावर); चानी; खडी. खडूळ पहा.

खंडाळी—स्त्री. खंवडाळी पहा.

खंडाळें—न. खणाळें; खणांचा तागा. [सं. खंड+आलय; खणाळें अप.]

खडिंजा—पु. उभ्या विटांचा थर. खडंजा पहा. (क्रि० देणें; लावणें).

खंडित—वि. खंडानें घेतलेलें; मक्त्यानें घेतलेलें; ठराव करून दिलेलें (काम). [खंड=मक्ता]

खंडिंत—वि. १ तुटलेलें; मोडलेलें; भग्न. 'एके हातीं दंतु। जो स्वभावता खंडितु।' –ज्ञा १.१२. २ मध्यें अडथळा आणलेलें; तहकूब केलेलें. ३ उडवलेलें; निरुत्तर केलेलें (शंका, प्रश्न इ०). [सं. खंड] **०पांडित्य**–न. तुटपुंजी विद्वत्ता; कोतें ज्ञान.

खडित—वि. (व्यापार.) नक्त; ठोक. '१५ रुपयांचे वर कितीही किमतीपर्यंत मागितल्यास एक रुपया खंडित अडत घेऊं' –मुंव्या १८४ [खंड]

खडिया—पु. उंसाची एक जात; हा ठणक असतो. –कृषि ४५२.

खडी—स्त्री. १ लिहिण्याच्या घूळपाटीवर घासण्यासाठीं अथवा भिंतीला रंग देण्यासाठीं अथवा भिंतीसाठीं लागणारी माती; चिकण–पांढरट दगड; खडीचा दगड, खडूची माती. –पदाव ३७. 'खडीचा रंग चुन्यासारखा तयार होतो.' २ कापडावर नक्षी काढण्यासाठीं केलेलें मिश्रण (गोंद, अभ्रक); एक चिकट रंग. ३ या मिश्रणानें काढलेली नक्षी, आकृति; खणांवर, चंद्रकळांवर खडी काढून घेतात. [सं- खडी=खड्]

खडी—स्त्री. माणसाचें दुखणें पिशाच्चबाधेपासुन आहे किंवा काय हें ठरविण्यासाठीं करावयाचा विधि; देवभक्त पिशाच्च पाहण्यासाठीं गहूं, तांदूळ यांची एकीबेकी करून पाहतात, ती समसंख्या आल्यास बाधा आहे व विषम आल्यास नाहीं असें समजतात.

खडी—स्त्री. १ लहान दगड; सडकेवर घालण्याची गिट्टी. रस्त्यावर घालण्यासाठीं मोठे दगड बारीक फोडून त्यांची खडी करतात. २ (कु.) लाकडी तुळईखालीं बसविलेला दगड. [खडा]

खडी—स्त्री. (माण.) १ उंचवटा; टेकडी. २ खालाटी; सह्याद्रीच्या पश्चिम बाजूची पायथ्याची डोंगराळ जमीन; घाटाखालील कोस-दोन कोस डोंगरवट जमीन.

खडी—वि खडा पहा. १ उभा–भी–भें. २ खरा–री–रें. ३ स्पष्ट; सडेतोड. **०किंमत**–स्त्री. स्थिर, ठोक किंमत. 'सोन्यारुप्याची खडी किंमत.' **०खट**–वि. (माण.) स्पष्ट; सडेतोड. **खडींखापरीं**–खटीखापरीं पहा. **०चाकरी**–स्त्री. सततची, एकसारखी, विश्रांति नाहीं अशी नोकरी. **०चोट**–क्रिवि. त्याच जागीं; त्याच क्षणीं; खडाखडी. **०ताजीम**–स्त्री. सन्माननीय पाहुण्यांचे आगमनप्रसंगीं त्यास पद्धतशीर दिलेलें उत्थापन; पुरी ताजीम; याच्या उलट निम ताजीम. 'गुरुजीस पाहून व त्यास खडी ताजीम दिल्यानंतर.' –परिभौ ४७. **०तैनात**–स्त्री. खडी चाकरी पहा. **०दुपार**–स्त्री. ऐन मध्यान्हकाळ. **०फौज**–स्त्री. सतत तयार–नोकरींत असलेली फौज. **०रेघ**–स्त्री. मोडी लखनांतील एक प्रकार; खडे पहा. **०हुंडी**–स्त्री. न वटविलेली, न स्वीकारलेली हुंडी. **खडी हुंडी राखणें**–हुंडीचा स्वीकार न करितां किंवा खोटी न म्हणतां ती आगळ राखणें.

खडी—खडीसाखर पहा.

खडी-खडीखपार-खाप—स्त्री. (खा.) खार; चानी.

खंडी—स्त्री. १ वजनाचें, जिन्नस मापण्याचें एक प्रमाण; एक कैली माप. निरनिराळ्या प्रांतात निरनिराळी खंडी आढळते. मुंबईकडे सामान्यतः २० मणांची खंडी असुन विशिष्ट पदार्थांनां ८ मणांची असते. पुण्यास २० मणांची खंडी असते. २ (सामा.) पुष्कळ मोठी रास, प्रमाण याअर्थी. जसें–खंडीभर पोरें–मेंढ्या–काम–बोलणें. 'यांचीं वनें विस्तारीं अठरा खंडी प्रकारें काव्यगाईन,' –वसा ३. ३ जमिनीचें माप–१२० बिघ्यांचें. ४ वीस संख्या (मेंढ्या, बकरीं इ० संबंधीं). 'त्या धनगराचीं २ खंडी शेरडें आहेत.' [द्रा. कंडि; का. कंडुग] (वाप्र.) **०लावणें**–फसविणें; ठकविणें; युक्ति करणें. **०वर पेंढी होणें**–२१ वें मूल होणें. **०गणती-खंडोगणती**–१ खंडीखंडीनें; खंडीनें मोजतां येण्याजोगें. २ (ल.) अतिशय; पुष्कळ; अमाप. **०भर, वारी**–क्रिवि. खंडीच्या मापानें; खंडीखंडीनें; खंडीनें मोजण्याइतकीं पुष्कळ. **म्ह०** १ खंडीस नवटकें (नवटकें=एकअष्टमांश

शेर)=फार अल्प प्रमाण; (करावयापेक्षां फार थोडें काम). 'अजून खंडीस नवटक्के नाहीं.' (कामाचें-विद्येचें-देवघेवीचें-संपत्तीचें प्रमाण)=अद्याप फारसें कांहीं झालें नाहीं, अजून व्हावयाचें फार आहे. २ (व.) खंडीस १९ कडो फोल (वीस गोष्टींत १९ खोट्या गोष्टी). थापाड्या, बाताड्या, गप्पीदास, आठ हांत लाकूड नऊ हांत ढलपी या तऱ्हेच्या मनुष्याबद्दल योजतात.

खंडींखंडीं पंडित—वि. सर्व विषयांतील परंतु अधैवट ज्ञान असलेला. [सं. खंड]

खडीखाप—वि. (लपंडावांतील एक संज्ञा, त्यावरून) फरारी; लपलेला (नोकर; बायको; चोर). –स्त्री. (खा.) खार.

खडीचा दगड—पु. अभ्रकाच्या जातीचा मऊ खडक; याचे पेले, बशा, नक्षीकाम, मूर्ती वगैरे करतात. (इं.) सोपस्टोन. खडी पहा.

खडीण—वि. (काव्य) खडण पहा.

खडीसाखर—स्त्री. खडे जमलेली साखर. ही उंसाच्या रसापासून करतात; मिश्री; साखरेचे जे स्फटिकासारखे खडे बनवितात ते. हिचे दोन प्रकार आहेत–पत्री व साधी. पत्री औषधाला वापरतात. साधारणतः खडीसाखरेचा उपयोग औषधाकडे करतात. [सं. खंड; म. खडा+साखर; तुल० इं. शुगर=साखर+कँडी (खंड) खडा] **खडीसाखरी भाषण**–न. वायफळ पण गोडगोड भाषण. 'लार्ड कर्झन यांचीं खडीसाखरी भाषणें त्यांच्या कृतीच्या विरुद्ध असतात ...' –टि २.५३,

खडु-डू—स्त्री. १ एक प्रकारची चिकण माती; शाडू; पांढरी माती. २ लिहिण्याचें किंवा फळ्यावर घांसण्याचें मिश्रण. खडी पहा. ३ –पु. एक प्रकारचा खनिज दगड; चुना व कॅर्बानिक ॲसिडवायु यांच्या कृत्रिम रासायनिक संयोगानें खडू बनतो. तसेंच पृथ्वीवरील चुनखडीशीं हवेंतील कॅर्बानिक ॲसिडवायु संयुक्त होऊन त्याच्या संयोगापासून खडू होतो. –वि. गढूळ. खडूळ पहा. 'जैसें तोडिजे खडु पाणी। पारकेया।' –ज्ञा १६.८९. [सं. खडी]

खडु(ड)वा—पु. पर्वत, खडक. 'परिसाचा खडुवाचि जोडला।' –ज्ञा ११.५३९.

खडुळ—न. गढूळ पाणी. 'सरिता घेऊनि येती खडुळें।' –ज्ञा ११.५५७. –वि. १ गढूळ; डहुळ. 'नंदनवनींचें खडुळ। मानससरोवरींचे मढूंचळ।' –शिशु ६४४. २ आरक्त; लाल (डोळा). [खडू]

खडुळणें—उक्रि. १ गढूळ होणें. २ गढूळ करणें; लाल करणें. (डोळे) ३ (गो.) अंगावर येणें; बेफाम होणें; खवळणें.

खडू—स्त्री. इतर भाग अथवा बाजू तासुन काढण्यानें राहिलेला लाकडाचा अथवा दगडाचा पुढें आलेला भाग (जोखड, दाराच्या झडपा, पुतळा, नक्षीकाम इ० तौल उठावदार भाग इ० चा). –वि. दाढी, मिशा काळे नसलेला; खाड्.

खडूली—स्त्री. (गो.) अंगण.

खंडूशाही—वि खोटथा जरताराची (लड).

खडे—स्त्री. (हिशेब) बंदावरील पहिला डाव्या हाताकडील एक रकाना सोडून पुढील उजव्या हाताकडील तीन रकामेभर ओढलेली रेघ. रेघ पहा.

खडे—क्रिवि. (कु.) कोठें.

खडेकंकर—पुअव. रत्न, हिरे वगैरेंना व्यापक, मोघम संज्ञा.

खंडे करणें—क्रि. (क.) बोटानें वेडावणें, वेडावण दाखविणें.

खडेखडे—क्रिवि. (ना.) उभ्या उभ्या; हातासरशी. [हिं. खडेखडे]

खडे घाट—पु. नदीवरील कपडे वगैरे धुण्याचा घाट, व तेथील धुणें-वाळविणें (कपडे वगैरे). २ (ल.) पहिलें, ओबड-धोबड काम. ३ (ल.) अतिशय स्वच्छता; धुतलेल्या कापडाप्रमाणें स्वच्छता. 'त्याचा नेहमीं खडेघाट असतो.' –वि. (खड्याघाटाचा) अतिशय निर्मळ, स्वच्छ; तेजस्वी; चकचकीत.

खडेजंगी—खडाजंगी पहा.

खडेदोनप्रहर—पुअव. ऐन दुपार; मध्यान्ह.

खडेफोड—वि. कठिण; त्रासदायक; दगदगीचें (धंदा, काम). [खडा+फोडणें]

खडेबंद—पु. रोजखर्डा; कच्चाखर्डा; कच्चा जमाखर्च. [खडा+फा. बंद]

खडे रान—न. ओसाड, खडकाळ प्रदेश. [खडा+रान]

खंडेराव—पु. १ शंकराचा अवतार; पुष्कळांच्या मतें भैरवाचा किंवा स्कंद, कार्तिकेय याचा अवतार; जेजुरीचा खंडोबा. २ (ल.) उत्तेजन देऊन, चढवून भरंवाळून, काम करण्यास प्रवृत्त झालेला माणूस; घोड्यावर बसलेला. [सं. खंडण; तुल० का. कंडेय=एक तलवार+राव; खंडा+राय; सं. स्कंध+राव] **०करणें**–घोड्यावर बसविणें; चढविणें; प्रवृत्त करणें (एखाद्या कार्यास).

खडेसाखर—स्त्री. खडीसाखर. 'तिनें ... आपल्या बहिणीचीं आसवें पुसलीं आणि ... आपले तोंडांतला खडेसाखरेचा खडा तिचे तोंडांत घातला.' –नि १४८.

खंडेश्वरी—स्त्री. तरवार. [खंड+ईश्वरी]

खडोखड-डी—क्रिवि. खडखड-डां अर्थ २ पहा. [खडा द्वि.]

खंडोबा—पु. खंडेराव पहा. (वाप्र.) **सोळा (अठरा) गुणांचा खंडोबा**–पु. अतिशय खोडकर, दुर्गुणी मनुष्य–पशु. **–चा कुत्रा**–पु. खंडोबाचा बाण्या, उपासक. **–ची काठी**–स्त्री.

खंडोबाचें निशाण, काठी. हें यात्रेंत थाटामाटानें मिरवितात. या काठीला तांबडें व निळें कापड गुंडाळून वर टोंकाला मोराचीं पिसें चवरीसारखीं लावलेलीं असतात. **–ची तळी–तळई**–स्त्री. नारळ, विड्याचीं पानें भंडार वगैरे पितळींत ठेवून एळकोट म्हणून उचलतात ती. (क्रि० भरणें). 'खंडोबाची तळई तरी भरा हो.' –चंद्रम ६१.

खडोळी—स्त्री. (व.) खार; चानी.

खड्ग—पु. १ तरवार. २ गेंडा व त्याचें शिंग. **०पात्र**–न. १ गेंड्याचें हाड किंवा शिंग. हें पवित्र मानलें असून याचीं भांडीं करतात. २ सोन्याचा मुलामा दिलेली चांदीची, पितळेची अथवा तांब्याची बांगडी–कोंकण. [सं.] **०पाणी**–वि. गेंड्याच्या शिंगाचें केलेलें. 'मुद्रिका असावी खड्गपात्री.' –गुच ३६.२४४. 'ही डबी खड्गपात्री आहे.' **०मृग**–पु. गेंडा. **०लता**–तरवार. 'आत्मज्ञानाचिया खड्गलता। छेदुनियां भवाश्वत्था'–ज्ञा १५. २१९.

खड्गूळ—वि. (व.) खोडकर. 'कृष्णा फार खड्गूळ आहे.'

खड्डा—पु. खळगा; खांच; गर्ता; खणलेली खोल जागा. [सं. खन्=खणणें; प्रा. खड्ड=खाण]

खड्डा—पु. (ना.) पुठ्ठा; पुष्ठिपत्र; कार्डबोर्ड.

खड्डी—स्त्री. (गो.) १ पांढरी मिरी. २ डोकें. 'खड्डेरबसप' =मागुनटीवर बसणें.

खड्डुल-डूस-खड्डूल—वि. (गो.) टकल्या.

खड्पमुख—न. (गो.) त्रास; दगदग. –वि. त्रासिक; श्रमी.

खड्या—पु. समुद्रांतील एक मोठा तांबडा मासा.

खड्या—पु. झाळण्याचें डाक देण्याचें, एक हत्यार. याला मूठ असते ती हातांत धरतात व दुसरीकडे तिरपें टोंक छिनी सारखें असतें तें प्रथम विस्तवानें लाल केलेलें असतें. त्यानें कथील लावतात.

खंड्या—पु. पाण्यावरचा एक पक्षी. हा पांढरा असून मासे हुडकून खातो.

खडखाखार—पु. टांकणखार; टांकणखाराचा एक प्रकार.

खड्या नाग—पु. १ बचनागासारखी एक विषारी वनस्पति. २ नागाची एक जात. त्याच्या अंगावर कण्गुलें असतात. हा विषारी असतो.

खड्या वाघ—पु. चित्ता; त्याच्या अंगावर ठिपके असतात. [खडा+वाघ]

खड्याळ—वि. (गाय). खटयाळ पहा. 'खड्याळे गायीस दूध किंचित्। परि लत्ताप्रहार देत बहुत।' –मोल.

खड्डुली—वि. (माण) पांढऱ्या अंगावर काळे ठिपके असलेली (मेंढी).

खण—पु. १ खणाळयांतील एका चोळीपुरता तुकडा; किंवा कापलेला भाग. हा दीड हात (१८ तसु, २७ इंच) लांबीचा असतो. जरीकाठी, बुट्टीदार, चौकटीदार इत्यादि खणाचे प्रकार आहेत. २ खोलीचा, जागेचा एक भाग, दोन खांबांमधील अथवा दोन तुळयांमधील अंतर. हें पांच ते सहा फुटापर्यंत असतें. ३ इमारतीचा एक भाग; चष्मा; सोपा; (कु.) खोली. ४ होडींतील दोन आडव्या फळयांतील जागा. या फळया बसण्यासाठीं असतात. ५ पेटींतील, कपाटांतील, लिहिण्याच्या टेबलांतील एक भाग; कप्पा. 'या कपाटाला चार खण आहेत.' ६ स्थान; भूमि. 'जेथ निरंतरासि खण।' –ऋ ४२. 'देहादिकाहुनि परतें। खण नाहिं ज्यांच्या,चित्तातें।' –रास १.३८४. ७ इमारतीचा–घराचा मजला; खणोखाण पहा ८ (नाविक) माल ठेवण्याची जागा. ९ कोठार; तळघर. 'मस्त हुडे दुर्गाचे खण।' –ऐपो ९. १० (छापखाना) खिळे ठेवण्याच्या चौकटींतील कप्पा.

खण—पु. मकरसंक्रांतीला स्त्रिया पांच सुगडांना कुंकू लावून वाटतात त्यांस म्हणतात. [सं. क्षण]

खण—पु. एखादा खाद्यपदार्थ न खाण्याचा नियम (पोळीचा, खिरीचा, भाताचा खण); एखाद्या देवतेप्रीत्यर्थ धरलेला निर्बंध. (क्रि० धरणें). [सं. खंड]

खण—पु. (राजा.) खाण. [सं. खनि.] **म्हण** (गो.) खण तशी माती नी आवे तशी पुती.

खणकत—स्त्री. (राजा.) कुळकट; कुळकथा; स्वतःच्या घरच्या अथवा पूर्वजांसंबंधी गोष्टी; कथा. [खाण+कथा]

खण-कत-कर-दिशीं—क्रिवि. खणखण असा आवाज करून. [ध्व.]

खणकरी—पु. खणण्याचें काम करणारा. 'तंव विदुरें धाडिला खणकरी।' –कथा ५.१२.४. [खणणें+करणें]

खणका—पु. १ खणदिशीं होणारा आवाज; खडाजंगी; भांडण; गोंधळ; आरडाओरड; गलबला (पुढीलप्रकारचा)–तोफेची सरबत्ती, मेघगर्जना, हत्यारांचा खणखणाट, रागाचा झपाटा, रागानें पाय आपटणें, खडसावणें, कडाडणें. २ कणका, कनका पहा. [ध्व. खण] **०दणका**–पु. खडाजंगीचें भांडण.

खणकाविणें—उक्रि. जोरानें बोलणें; खरडपट्टी काढणें; दरडाविणें; रागानें बोलणें; शिव्या हासडणें; धमकावणें. [ध्व. खणका]

खणकी—स्त्री. हलक्या किमतीचें कापड. खंडकी पहा.

खणकुदळ—स्त्री. १ अतिशय टोंचणी, तगादा, जाचणी; जोराचा आग्रह; पाठीस लागणें; जाच करणें. (क्रि० घेणें). २ निश्चयाचा, निर्धाराचा बेत; निग्रह; हट्ट; जबरदस्त व्यासंग (एखादा विषय साध्य करण्याचा, कोडें सोडविण्याचा). (क्रि० घेर्जे). [खणणें+कुदळ]

खणकें—न. खणखणाट; खडाजंगी (शब्दांची). खणका पहा. 'झालें मोठेंचि त्या रणीं खणकें।'–मोकर्ण ३१.५१. [ध्व.]

खणक्या—वि. १ खमक्या; कणक्या; खणखणीत; रोखठोक्या; दांडगा. २ झपाटघाचा; आवेशी; उत्साही. [खणका]

खणखण-णा—क्रिवि. घणघणा; दणदणा; खणखण आवाजानें, घंटा, चर्मवाद्य इत्यादिकांचा आवाज करून. 'खण खण खण खण वाजे ढोल रे।'–दाधि ४३१. 'खणखणा हाणी खड्गा प्रल्हादासीं।' [ध्व.]

खणखणणें—अक्रि. खणखण शब्द होईं असें वाजणें, आवाज करणें; दणदणाट होणें. [खणखण]

खणखणाट—पु. मोठा खणखण आवाज; दणदणाट, घणघणाट अशा सारखा मोठा ध्वनि. ' आकाशीं खणखणाट होत। असंभाव्य।'–कथा १.१३.१३१. [ध्व]

खणखणीत—वि. १ मोठी गर्जना करणारें (आवाज, घंटा); खणखण वाजणारें. २ निरोगी; धडधाकट (म्हातारा). ३ खडखडीत; स्पष्टवक्ता; मनमोकळा (माणूस); उघड-उघड; स्वच्छ; सरळ; प्रामाणिक (भाषण, व्यवहार). ४ खडखडीत वाळलेला (धुतलेला कपडा); कडकड वाजणारें; सळसळणारें (कोरें कापड). [ध्व. खणखण]

खणखापडी—स्त्री. खणपट पहा.

खणणें—उक्रि. १ खोदणें; उकरणें. २ गंजणें; खाणें; जळणें (धातु वगैरे); चरणें; आंतून चावणें; झोंबणें (गळूं वगैरे). ३ (ल.) (भांडण) उकरून काढणें; ओघास आणणें; तोंडून काढणें (मतप्रदर्शन, शाबासकी वगैरे). ४ पोखरणें (पाण्यानें भितीचा पाया). (गो.) 'मोव थंय खणचें' ५ उकळणें; जुलमानें काढणें; खणून काढणें (पैसा, गुप्त). ६ जोरजोरानें काढणें (ओकाऱ्या, खोकला वगैरे). 'तो रडें खणून काढतो.' ७ अडून बसणें. ' त्यानें त्या पदार्थासाठीं खणलें ' =तो त्या पदार्थासाठीं अतिशय अडून बसला. [सं. खन्; फ्रेंजि. शन्]

खणती—स्त्री. १ खणण्याची क्रिया; खोदणें; उकरणें. (क्रि० लावणें, करणें). ' पुण्याला खणती लावून सर्व द्रव्य होळकरानीं नेलें. ' २ ठुसठुसणें; झोंबणें; जळजळणें; कुरतडणें; आग होणें (जखम, खत यांची). ३ (ल.) टोंचणी; जाचणी; ससेमिरा; सततचें टुमणें लावणें; मागें लागणें (क्रि० घेणें.) ४ जोराचा, निश्चयाचा दृढ व्यासंग, हव्यास (अभ्यासाचा). ५ शोषण; ओढ (क्रि० लावणें). [खन्]

खणतें, खणतोड—न. कुदळ, पहार वगैरे जमीन खोदण्याचें, जमिनींत भोंक पाडण्याचें हत्यार. [सं. खनित्र; प्रा. खणित्त]

खणपट—स्त्री. निग्रहानें, निश्चयानें पिच्छा पुरविणें; आग्रह; हट्ट; निग्रह (रुकार मिळण्यासाठीं, लहान मुलांचा हट्ट, रुसवा, एखाद्या गोष्टीचा, अभ्यासाचा पिच्छा). (क्रि० घेणें; घेऊन बसणें). ' त्यानें खणपट घेतली तेव्हां तें कार्य सिद्धीस गेलें. ' **खणपटीस लागणें-बसणें-येणें**–पिच्छा पुरविणें; शेवटास जेणें. [खणणें]

खणपट—न. तरवारीस किरकोळ दागिन्यास वगैरे निंदा व्यंजक शब्द.

खणपेंड—न. ओल्या जमिनींतील ढेपें काढण्याचें लांकडी औत. [सं. खन्+पत्र]

खणपी—वि. (गो.) खणणारा.

खणपूट-स—न. १ टोंक; झिलपी; सल; धस; ज्यानें फाटलें जाईल असा पुढें आलेला भाग. (क्रि० भरणें; जाणें; शिरणें; लागणें). २ झाडाचा खुंट; ओंढका; यांवरून मूठ (तरवार, चाकू, भाला, झाडू वगैरेची); चौरंगाच्या पायाचा खुंट. ३ (सामा.) एखाद्या जिन्नसाचा अवशेष; बुडखा; अवशिष्ट भाग.

खणाखण-णां—क्रिवि. खणखण आवाज करून, होऊन. खणखण पहा. [ध्व.]

खणाखणी-जंगी—स्त्री. परस्पर मोठा कज्जा; हातघाईची लढाई; भांडण; तंटा; खडाजंगी पहा. 'मोठी होती खणाखणी।' –ऐपो ८५. [ध्व.]

खणाण—पु. खणखणाट; विशिष्ट आवाज. [ध्व. खण]

खणाणणें—अक्रि. खणखण असा आवाज होणें, करणें; खणखणणें.

खणाणां—क्रिवि. खणखण आवाज करून; खणदिशीं खोंचून. ' लागतां हृदयिं बाण खणाणा।' –आता १६.

खणाळें-खणेरें—न. बायकांच्या चोळयांच्या खणाचा एक तागा; तीन-चार खण होतील एवढा कापडाचा तुकडा. [खण+आलय]

खणिया—स्त्री. पटांगण. ' तेय खणियांची सोवानी। कांई सांघो।' –शिशु ६४६. [खण]

खणीक—वि. हट्टी; खोडयाळ. ' मोठा, खणीक दधिवटा प्राशीत घटघटा।'–अमृत ४६. [खणणें]

खणीखापडी—स्त्री. खणपट पहा.

खणीचा कोळसा—पु. दगडी कोळसा; खाणींतील कोळसा. (इं.) कोलला हा प्रथम बनविलेला प्रतिशब्द.

खणील—स्त्री. आवण काढणी; उपटणें (भातांचें रोप दुसरीकडे लावण्यासाठीं); खणती.

खणुवाल—वि. १ खरबरीत; खण असलेला; खडखडीत; 'अप्रवृत्तीचे खणुवाळे। फोक निघती सरळे।' –ज्ञा १५.१६५. २ कठिण; निष्ठुर. 'तैसा कर्माऐल शेवटु। खणुवाळा होय।' –ज्ञा १८.१८६. [खण]

खणोखण—वि. अनेक खण किंवा मजले असलेलें. 'खणोखणींचीं मंदिरें उभविलीं रायें।' –ख्रिपु १.८.२०. [खण+खण]

खण्णी–खण्णूक—स्त्री. खंडणी, खंडणूक पहा.

खत—न. हाताचा लेख; दस्तैवज; कर्जरोखा; कर्जखत; गहाणखत. फरोक्षत पहा. 'या जमिनीबद्दल कांहीं खतें तुमच्याजवळ आहेत काय?' [अर. खत्] सामाशब्द– **०किताबत**–स्त्री. पत्र, पत्रव्यवहार. 'खतकिताबतीनें खबरगिरी करावयासही याद होत नाहीं.' –रा ३.९०. **०खतूत**–न. कागदपत्र. [अर. खतूत; खत्चें अव.] **०खूत**–न. खतपत्रें. खतखतूत पहा. 'विश्वासु ठेवो घेऊनि जात। खतखूत हारपलें।' –एभा २३.१२८. **०पत्र**–न. दस्तैवज, खरेदी विक्रीचा–कागद. **०फाडणें**–अक्रि. १ करार कागद फाडणें. २ (ल.) संबंध तोडणें. 'जन्ममरणांचें उठवी धरणें। खत फाडणें विषयांचें।' –एभा ११.१४९२. **०बेजा**–वचनचिठ्ठी; प्रामेसरी नोट. 'त्यापैकीं तुम्ही आपणांस खत–बेजा दोनशें दिधले, बाकी सैंभर होन उरले' –रा १५.५७. [फा. खत+बजा=ऐवजीं]

खत—न. उत्तम पीक यावें म्हणून शेतांत घालावयाचें केरकचरा–शेणकूट वगैरेचें कुजलेलें मिश्रण; राब. [दे. प्रा खत्त=गोबर] **खतणें**–अक्रि. मलीन होणें; खराब होणें; सांचणें. 'जो नुच्चारी हरि नामासी। पाप त्यापासीं खतेलें।' –एभा ५८९ **०मुताचा**–वि. खत घातलेला–लें (शेत वगैरे). **०मूत**–न. राब. **०मूत एक असणें**–एकाच कुलांतील, वंशांतील असणें (गुरु वगैरे). **०मूत ओळखणें**–दुधावरून गाय–म्हैस ओळखणें **०घड, खताड**–न. १ उकिरडा. २ गू, मल.–वि. १ मलमूत्राची; उकरडयाची (जागा). २ खतमूत घातलेलें (शेत). **०विणें**–सक्रि. खत घालणें (शेतात).

खत—न. १ व्रण; डाग; जखम. 'यांतुनि एकेंचि इतर होता तत्काळ वा परायु खतें।' –मोशांति ७.२८. 'ज्याच्या बैसे खतावरी। ते चुरचुरी दुखवूनि।' –तुगा ३१९६. २ काढलेली रेघ; लेखणीचा फटकारा. ३ (सुतार धंदा). लांकडांवर आंखण्या करितां केलेली आंखणी; 'तीन सुतांवर खत मार.' [सं. क्षत] **०खशी**–रेघ; आकृति.

खत—पु. डोळ्यावर लेप देण्यासाठीं तव्यावर लोखंडी बत्त्यानें खलून अनेक औषधांचें तयार केलेलें मिश्रण. खत्ता पहा. [ध्व.]

खत—न. न्हावी काढतो ते दाढीचे केस. [अर. खत्त=दाढी, मिशा]

खंत—स्त्री. १ खेद; खिन्नता (क्रि० येणें). २ नैतिक किळस; ओकारी; वीट; लाज; चीड; तिटकारा. ३ मानसिक दुःख; हुरहुर; झुरणी. (क्रि० घेणें; देणें; धरणें). 'त्या मुलानें आईची खंत घेतली.' [सं. खिद्=खेद पावणें, खिन्न होणें] **०खोड**–स्त्री. जनावराचें व्यंग; उणीव; दोष (खंती येण्या जोगा). [सं. क्षत+खोड] **०खोर**–वि. नेहमीं खंत घेणारा; चवचाल; चोखनळ; दोषदृष्टी.

खंत—स्त्री. जमीन खोदण्याची कुदळ; खनित्र. [सं. खन्]

खतखत—पु. १ द्रवपदार्थास अग्नि, सूर्य वगैरेची उष्णता लागल्यामुळें त्यांतून आवाज निघण्याची अवस्था. २ (ल.) उद्बोधक कारणामुळें उत्पन्न होणारी उत्कंठा, आवेश. 'खतखत मनिं होती।' –अक हरिराज मुद्गलार्यांचें भाषांतर ४८. 'तो बेडेवाकडें बोलूं लागतांच याला बोलण्याविषयीं खतखत आला.' –क्रिवि. (खतखतां) खदखद आवाज करून; आवाजयुक्त रीतीनें. [ध्व. खद्खद्]

खतखतणें—अक्रि. १ शिजतांना, उकळतांना वगैरे खदखद असा आवाज करणें (चुन्यांत पाणी टाकलें अससां, पाणी उकळत असतां). २ उकडणें; तलखी होणें. ३ उत्कंठित होणें; अधीर बनणें.

खतखताविणें—उक्रि. उकळी आणणें; खदखद करण्यास लावणें; खतखतणें प्रयोजक.

खतखतें, खतखतलें—न. (कु. गो.) दोन–चार भाज्यांची एकत्र केलेली पातळ भाजी; सर्व प्रकारच्या भाज्यांची मिसळ.

खतखतें, खताखता भात—पु. (कु.) ताकांत पुन्हां शिजविलेला शिळा भात.

खंतडला—वि. (व.) वाईट; दृष्टीपुढें नकोसा वाटणारा; 'खंतडल्या वानाचा माणूस.' [खंत]

खतम—वि. समाप्त; पूर्ण; खलास. 'लढाई खतम झाली.' –होकै ८४. (क्रि० करणें). [अर. खत्म] **०करणें**–क्रि. पुरें करणें; संपविणें.

खंतमी—स्त्री. बयाळी बीज. –मुंव्या १५५. [अर.]

खतरा—पु. १ भय; धोका; संकट. २ शंका; संशय; धोटाळा. [अर. खतर्=खत्रा]

खतरी—स्त्री. रेशमी कापड विकणारी जात आणि व्यक्ति. खत्री पहा. [सं. क्षत्रिय]

खतलें—वि. धरणघेऊ? –हंको

खतवड–डी—स्त्री. पाथरवटाचा लघुकोनी गुण्या.

खता—स्त्री. १ संकटाची हुरहुर; चिंतायुक्त भीति. २ तोटा; नुकसान. ३ दोष; अपराध; उल्लंघन. 'वतनदार खरा, कोणे गोष्टीस खता नाहीं.'–रा ८.४४.'अतःपर नबाब खता करितील,

कदाचित् काळक्रम दुर्बुद्धी निर्माण जाली तर केलें पावतील.' –इम १९६. ४ संशय; किल्मिष; किंतु; मळ. 'मग निःशेष खता फिटे। मानसींचा।' –ज्ञा ४.२०८. [अर. खता=चूक, दोष] म्ह० 'दया उधार खता रोकडी'=दया दाखविल्याचें फळ कालांतरानें मिळतें पण अपराधाबद्दल ताबडतोब शिक्षा होते.

खता—लेप. खत्ता पहा.

खताईण—स्त्री. (छत्तीसगड) मोलकरीण.

खताखानत—स्त्री. लबाडी. 'कांहीं खताखानत जाली नाहीं, खामगांवकर खरे जाले' –रा ६.१११. [अर. खता+खियानत्]

खताम—न. घोड्याच्या गुडघ्याला होणारा एक रोग. –अश्वप २.२८८. [सं. क्षत]

खताली—पु. (व.) रायपुराकडील मजुरी करणारे लोक. –स्त्री. खताईण पहा.

खतावणी—स्त्री. १ रोजकीर्दीतील निरनिराळ्या रकमा खातेवार ज्या वहींत नोंदतात ती वही. २ रोजचा जमाखर्च खातेवार मांडण्याची क्रिया [अर. खत्त] ०घर घालणें–(कारकून लोकांत) कठिण कामावर लावणें.

खतावणी—स्त्री. सुताराचें लांकडावर रेघा मारण्याचें एक हत्यार. [सं. क्षत=रेघ; अर. खत्त्=रेघ]

खतावणें-विणें—अक्रि. उकिरडयासारखा होणें; कुजणें; घाण येऊं लागणें. –सक्रि. शेत किंवा जमीन खत घालून तयार करणें. [खत]

खतावणें-विणें—सक्रि. कीर्दीतील रकम खतावणींत बारा झाल्याबद्दल रोजखर्डयावर खात्यांचीं नांवें नोंदणें. उदा० स्वारी राजमंडळ, शिलकबंद खासगत इ०; खातेवार करणें; खात्यांत घालणें. 'रोजकीर्दी जमा धरुनी सकळ। खताविला काळ वरावरी।' –तुगा १८९४.

खतावणें-विणें—उक्रि. भिंतीवर रेघा, आकृती काढणें.

खंतावणें—स्त्री. १ चिळस, वीट येणें. २ हुरहुर, खुरखुर लागणें, वाटणें; तळमळणें. [खंत]

खंती—स्त्री. १ अस्वस्थता; अशांति. (क्रि० धरणें; घेणें). २ (काव्य) चिंतायुक्त शंका, उत्कंठा. 'जिवलगांची खंती। जेणें काळें वाटे चित्तीं।' –दा २.५.१९. 'रामा मज तुझी वाटे खंती।' ३ कंटाळा; तिरस्कार. 'बहु एकांतावरी प्रीति। जया जनपदाची खंती।' –ज्ञा १३.६१३. ४ खिन्नता. 'म्हणुनि करूं लाहे खंती' –ज्ञा १८.८०. सर्व अर्थी खंत पहा. –वि. १ हुरहुर लागलेला; अस्वस्थ; खिन्न. 'तें ऐकून भोज राजा फारच खंती होऊन माघारा फिरला.' –सिंहासनबत्तिशी १२. २ साशंक; चिंतातुर. [सं. खिद्–खंत]

खंती, खंतें, खंतोड—पु. खणती वगैरे पहा.

खतीब—पु. मशिदींत खुद्बा पढणारा; प्रवचनकार; धर्मप्रचारक. [अर. खतीब्] **खतिबी**–धर्मोपदेशकाचा धंदा; खतिबाची वृत्ति, पेषा. [अर.]

खतू—वि. (व.) फारच अशक्त; दुबेल. 'मुलगा दिसायला खतू दिसतो.' [खंत]

खतें—न. (कों.) वतनी शेत. [सं. क्षेत्र; प्रा. खेत्त; हिं. खेत]

खतेला-ली-लें—वि. १ भरलेला; खतलेला; लिप्त; व्याप्त; सांचलेला. 'कीं आंधारें खतेलें अंबर।' –ज्ञा १६.२७. 'कलियुगीं घोर पाप हें खतेलें। स्वधर्म सांडिलें चहूं वर्णीं।' –ब २८९. २ मळलेलें; घाणेरडें. 'पहा दर्पण खतेलें।' –दावि ४४९. [खत]

खतोड—वि. भरपूर खत घातलेलें (शेत वगैरे). खतवड पहा.

खतोड-डा—पुस्त्रीन. १ खतवड; पाथरवटाचा लघुकोनयुक्त गुण्या. २ एक प्रकारची पहार. [सं. क्षत; अर. खत्ती=भाला]

खतोडें—न. (व.) खत वाहण्याकरितां गाडीला बांधलेलें तुऱ्हाट्यांचें साधन, कुरकुल वगैरे. [खत]

खंतोषला—वि. (व.) द्वेषी, मत्सरी. [खंती]

खंतोस—पु. (व.) मत्सर; हेवा. ०खोर–वि. मत्सरी.

खत्ता—पु. अफू, तुरटी, हळद, लिंबाचा रस इत्यादि एकत्र करून तांब्याच्या भांड्यांत खलून केलेलें मिश्रण. हें डोळे आले असतां डोळ्यांस व डोकें दुखत असल्यास डोक्यास लावतात.

खत्ता—स्त्री. तोडणें; कमी करणें; कमीपणा आणणें; नुकसान; अपाय. 'त्याचे इज्जतीस खत्ता न करतां निरोप देऊं.' –रा ६.३६२. –वि. भग्न, नष्ट. 'अवधान अगदीं खत्ता जाहलें' –पाब ४१. [अर. खत्अ किंवा खता]

खत्ता—स्त्री. खता पहा.

खत्रड, खत्रूड—वि. १ दुष्ट; त्रासदायक. खडतर आणि खचरट पहा. २ कृश; रोड; रोडका मरतुकडा; पाप्याचें पितर; बुळा; नामर्द; अजागळ (मनुष्य, पशु). ३ खटपाळ; कोडगा; ओंगळ; हट्टी; नादान; कुचकामाचा (बायका, मुलें). [खरतर–खडतर?]

खत्रप—न. (प्रां.) खत (शेताचें).

खेत्रपाळ—पु. (गो.) क्षेत्रपाळ; विशिष्ट स्थानाचें रक्षक दैवत; स्थानदेवता. [सं. क्षेत्रपाळ]

खत्रा—पु. १ धोका; भीति. 'मार्गाचे खत्र्यामुळें पाठविली नाहीं' –दिमरा २.१९४. २ शंका; घोटाळा; कुतर्क; संशय (क्रि० बाळगणें). 'ज्याच्या वंशांत खत्रा असेल त्याचें कळेना; एक बाप असेल त्याजकडून तरी दुसरी गोष्ट घडणार

नाही. ' –रा १०.५२. ३ अडथळा; हरकत. [अर. खत्रा=भीति, धोका]

खत्री—पु. एक हिंदु जात; या जातीचा माणूस. हे पीतांबर, मश्रू इ० विणण्याचें काम करतात. [सं. क्षत्रिय]

खंदक—पु. १ किल्ला किंवा गांव यांच्या भोंवतीं खणलेला चर. यांत पाणी सोडतात. २ मोठा खळगा; खाई. ३ (ल.) पोकळ; अभावयुक्त या अर्थी. ' तुम्ही पक्के अगदींच कसे करंट पॉलिटिक्सचे खंदक आहांत हो! ' –नाकु ३.७६. ' अकलेचा खंदक ' [सं. खातक; अर. खंदक]

खदका—पु. १ खदखद अशी उकळी, कड. (क्रि० येण). २ (ल.) उमाळा (प्रीतीचा, ममतेचा); हुंदका; आवेग (रडण्याचा, हंसण्याचा); उबळ; झटका (दमा, खोकला इ० चा); जोराचें उधाण (खरूज इ० चें) (क्रि० येणें) [ध्व.]

खदखद—स्त्री. १ खतखत; उकळणाऱ्या पदार्थांचा आवाज. २ (ल.) आवेश; चेतना. [ध्व.]

खदखद्–दां—क्रिवि. १ हः! हः! हंसण्याचा प्रकार. ' येक खदखदां हांसती। सावकास। ' –दा १८.९.१३. २ उकळणाऱ्या पदार्थांचा आवाज होतो तसा आवाज करून.

खदखदणें—अक्रि. खदखद असें उकळणें, शिजणें; खदखद आवाज होणें. ' फेंस खदखदून पांच-पांच, सहा-सहा हात उंच होई, ' –पाण्ह ११२. [ध्व.]

खदणा—स्त्री. खोदणी. ' तेथुसें अरिराए खदणी। विक्रमसेनु। ' –शिशु १०३६. [सं. खन्]

खंदणें—अक्रि. अपमान करणें; अवमानणें. –शर. खंदोस पहा.

खंदणें, खदणें—सक्रि. खणणें; खोदणें.

खदरी—वि. (जुन्नर, धनगरी) काळ्या-पांढऱ्या रंगाचा. ' ही मेंढी खदरी आहे. ' [सं खदिर]

खंदल—न. (गो.) एक वन्य फळ.

खदलबदल, खदलाबदला, खदलामुबादला—स्त्रीपु १ अदलाबदल; बदलाबदल; देवघेव. (सामा.) व्यापार. २ बदला देणें (सैन्य, चाकर). [बदल द्वि.]

खंदस्त—वि. १ चलाख; हुशार; जोमदार. याच्या उलट जड; रेंगया; रेंगाळणारा. २ कडक; निश्चयी; निर्भय. याच्या उलट मऊ; गयाळ; मूर्ख. ३ तापट; पाणीदार (माणूस, जनावर). [फा. खदा=हास्य]

खंदस्त-स्ती—स्त्री. वैर; शत्रुत्व. स्पर्धा. ' बहु कृपण बहु खंदस्ती ' –दा ५.७.३५. [खंदा]

खंदळाखंदळ—स्त्री. तुडबातुडब; गडबड; धांगडधिंगा. आत खंदळाखंदळ क्षणभर बहुतच केली. ' –भाब १५३.

खंदा—पुस्त्री. मत्सर; द्वेष; आकस. खंदोस पहा. (क्रि० लावणें; करणें).

खंदा—वि. १ अतिशय पाणीदार; तल्लख (घोडा); तापट; रानवट; साहसी; धाडसी (माणूस); खोडकर; स्वैर (मूल). [फा. खंदा=हास्य. ०तुल सं. स्कंद्=उडणें, उडी मारणें] ०तट्टू –पु. आवेशी; धाडसी मनुष्य, मूल). ०वीर–पु. अतिशय पराक्रमी मनुष्य.

खंदा—पु. (बे.) उसाचें पाचट.

खंदा—वि. ज्ञानी; शहाणा. [फा. कुंदा, कंदा ?]

खंदाडी-डे—स्त्री. खांदाडी पहा.

खदान—स्त्री. (व.) खाण. ' मुरमाची खदान सांपडली. ' [सं. खनि]

खंदारा—वि. १ (संगीत) खंदारी वाणी (गायनांतील एक तऱ्हेची वाणी) गाणारा. खंडारवाणी, खंडारी पहा.

खंदारी—वि. कंदाहारी; कंदाहारचा (उत्तम घोडा इ०).

खंदारी वाणी—स्त्री. गाण्यांतील एक तऱ्हेची वाणी. [खंडारी पहा]

खदिर—पु. खैर; खैराचें झाड. ०सार–पु. कात. ' सर्व सारांचें शुद्ध सार। तो मी होईन खदिरसार। ' –एभा १२.५५१. [सं.] **खदिरांगार**–पु. खैराचा निखारा. ' अथवा निधान हें प्रगटलें। म्हणोनि खदिरांगार खोळे भरिले। ' –ज्ञा ९ १४९.

खंदील—पुन. कंदील पहा.

खदुळण, खदूळ—गढूळणें, (गो.) खदोळ. गढूळ पहा.

खंदें—न. एक लहान पक्षी.

खंदोस—पु. १ शत्रुत्व; वैर: मत्सर: चुरस; हेवा. २ मत्सरयुक्त स्पर्धा. (क्रि० बांधणें; धरणें: बाळगणें; लावणें; चालविणें). [सं. स्कंद्=बाहेर पडणें, गळणें. हेटाळणें ?]

खदक—वि. (व) खराब. ' तो माणूस फार खदक आहे. '

खद्योत—पु. काजवा; शेपटीमध्यें प्रकाश असणारा किडा. ' येरहवी भानुतेजीं काय खद्योता। शोभा आथी। ' –ज्ञा १.६७. खद्योतें फुलविलें रविपुढें डुंग। ' –तुगा ३०६७. [सं.]

खद्रूड – खव्रड, खव्रूड पहा.

खनक—न (गो.) खदक शब्दाचा अपभ्रंश.

खनका—खणका पहा.

खनतोडा—पु फूटभर लांबीचा लोखंडी बत्ता.याच्या टोकास टांकीसारख हत्यार असतें. हे मागांचें घरफोडीच हत्यार आहे. खतोड पहा.

खनन—न. १ खणणें; खोदणें. २ पुरणें (प्रेत). [सं. खन्=खणण] ०वहन–न. पुरणें आणि जाळणें (प्रेत). [सं.]

खननीय—वि. खणण्यास योग्य. [सं.]

खनपट—खणपट पहा.

खनपट—स्त्री. (व.) १ थोबाड; कानफट पहा. 'खनपटींत दे.'

खनपट—पु. (व.) क्षुद्र अलंकार; दागिना (तिरस्कारसूचक) दोन खनपट आहेत अंगावर.'

खनपूस—खणपूट-स पहा.

खनवादी—वि. मांत्रिक; मंत्रतंत्र करणारा 'कीं मोक्षनिर्घ धांडोळिते उघडे। खनवादी जे।' –ज्ञ २४.

खनाळ—न. गुहा; कडेपाट; एकांत स्थळ. 'खनाळामधें जाऊन राहे। तेथें कोणीच न पाहे।'–दा १५.२.२३. [सं खनि+आलय]

खनि—स्त्री. १ खाण. २ (ल.) कोठार; सांठा; आगर. उ० सुखखनि=सुखाची खाण; सौंदर्यखनि. [सं.] **०खोदनशास्त्र**—न. जमिनीच्या पोटांतील खनिज द्रव्यें शोधून व खणून काढण्याचें शास्त्र या शास्त्राची व्याप्ति भूगर्भातील खनिज पदार्थ शोधून काढण्यापुरतीच नसून भूपृष्ठावरील पदार्थांचें खनन करण्याचाहि या शास्त्रांत अंतर्भाव होतो.

खनिज—पु खाणींतील पदार्थ. धातू, खडू, गार, रत्नें, चिकण माती, स्लेट, टांकणखार इ० पदार्थ खनिज होत. (इं.) मिनरल 'वनस्पतीचा अगर प्राण्याचा एखादा अंश खडकांत गुरफटलेला असला म्हणजे त्याला खनिज म्हणतात.'–भू ५४. –वि. खाणींत असणारा; खाणीतील खणून काढलेला. **०कोटी**—स्त्री. खाणींतून काढलेल्या पदार्थांचा वर्ग; (इं.) मिनरल किंगडम. **०डांबर**—न. उघड्या हवेंत पेट्रोलिअम ठेवलें म्हणजे तयार होणारा पदार्थ. –पदाव १.१०१. **०विज्ञान-शास्त्र**—न. पृथ्वीच्या पाठीवर सांपडणाऱ्या द्रव्याच्या जाती व वर्गीकरण, तीं द्रव्यें सांपडण्याची ठिकाणें, त्यांचे गुणधर्म व उपयोग यासंबंधीं सामान्य माहितीचें या शास्त्रांत विवेचन केलेलें असतें.

खनित—वि. खणलेलें. [सं.]

खनित्र—न. खोरें; फावडें; खणण्याचें कोणतेंहि हत्यार. 'महापातक कंदखनित्र' [सं.]

खंन्या—उद्गा. (व.) तुच्छतादर्शक शब्द. 'मी काय त्याला काढून देणार आहे खंन्या?' [अ. खन्नस=सैतान?]

खप—पु. १ विक्री; व्यय; खर्च; वासलात; वाटेस लावणें; खपविणें (जिन्नस, माल); भक्ष्य, उपभोग्य पदार्थांचा जो विक्रया दिकेकरून विनियोग तो. २ काबाडकष्ट; मेहनत; श्रम; खपणें 'बाराहि महिने शेतांत खप करावा तेव्हां पोटापुरतें धान्य पिकतें. [स. क्षप्?]

खप—पु. खत (फलझडासाठीं).

खपक्या—वि. खमक्या; हुषार; चलाख; जोरदार.

खपखप—स्त्री. (गो.) धडकी. (बाप्र.) **०आयलों**–(गो.) धडकी भरली. **खपखपचें**—(गो.) धडकी भरणें.

खपट—न. १ माशाचा खवला. २ त्यासारखा सोन्याचा अगर रुप्याचा दागिना. ३ कणकेचा गाखर, आरोळी. ४ डोळ्यावरचें कातडें. (इं.) मेंब्रेनला हा प्रथम प्रतिशब्द योजला गेला. 'पक्षी खपटें सईल करून डोळे चपटे करितात.'

खपटी—स्त्री. गुळाची किंवा दुसऱ्या वस्तूची कढवून खाण्यासाठीं केलेली वडी. [खपट]

खपड—खप्पड पहा.

खपणें—अक्रि. १ काम करणें; मेहनत, कष्ट करणें. 'इंग्लंडसारख्या देशांत सार्वजनिक कामासाठीं अहोरात्र मोठमोठे लोक खपतात ते त्या करितांच.' –टि ४.१४८. २ विकलें जाणें; खप होणें; विकत जाणें; गिऱ्हाईक मिळणें (माल इ० ला). 'बाजारात नासका माल खपत नाहीं.' ३ (स.) खर्चणें; व्यय होणें; संपणें. 'घरांतलें धान्य सर्व खपलें.' ४ वाटेस लागणें; मरणें. 'दुसरे दिवशीं हरिच्या दृष्टिपुढें अर्जुनाशुगें खपला।' –मोकर्ण १.२. ५ आवडणें; सोसणें. 'ती खवत तुला खपणार नाहीं' –कोरकि २९. [सं. क्षपणम्; क्षप्=घालविणें]

खपता—वि. (प्रां.) भयंकर; तापट; क्रूर. [अर. खिफ्फत=भारदस्तपणाचा अभाव]

खपती—वि. १ निश्चयी; निर्धारी; आग्रही; आपला उद्देश शेवटास नेणारा; चिकट. २ खंदा; चलाख; हुशार; जोमदार (कामाला). ३ तापट बुद्धीचा, तल्लख, पाणीदार. [खपणें]

खपती—वि. १ रागीट; तामसी; चिडखोर; दीर्घद्वेषी. २ (ना.) वेडा. खप्ती पहा. [खपता]

खपन—न. (गो.) प्रेत झांकण्यांचें पांढरें वस्त्र; धवट. कफन पहा. **०खायरा**–वि. प्रेतावर टाकलेलें सामान खाणारा. **०फुटो**–वि. (गो.) प्रेतावरील वस्त्र नेणारा. **खपुनचें**–क्रि. (गो.) प्रेत वस्त्रांत गुंडाळणें.

खपरल—न. (व.) कौल; खपरेल पहा. [खापरी]

खपरी—स्त्री. १ अणकुचीदार, धारेचा दगडाचा तुकडा, चीप, कपरा (टाकीनें पाडलेला). २ खापर; फुटलेल्या भिंगाचा तुकडा, ठिकरी; खापरी. (क्रि० निघणें; जाणें; उडणें). [कपरी],

खपरेल—न. (हिं.) १ दोन्ही बाजूंस वळविलेलें चपटें कौल. २ किंवा तशीं कौलें घातलेलें छपर; घर. 'घराच्या अगदीं वरच्या भागावर घर झांकण्याकरितां खपरेल करावें लागतें.' –मराठी ३ रपु. पृ. ६२ (१८७३). [खापर–री; बं. खपरेल]

खपरेल–ली–वि. कौलारू.

खपला—पु. १ निराळा झालेला तुकडा; कपरा (साल, कातडें, कवच इ० चा); सालपट; कपची; खरपुडी; पापुद्रा;

खवला. २ गव्हांतील एक प्रकार. हा देशावर व कर्नाटकांत होतो. [खाप=तुकडा]

खपली—स्त्री. १ लहान कपरा; तुकडा. 'टांकीनें खपली फोडिली। ते मागुती नाहीं जडली।' –दा ८.६.१०. २ खवला; पापुद्रा (फोडाचा). (क्रि० काढणें; उचटणें). [खाप=तुकडा] ०काढणें–(ल.) जुनें भांडण उकरून काढणें.

खपल्याण—न. खपला गहूं पहा.

खपवणें-विणें—सक्रि. १ संपविणें; कमी कमी करणें. २ ठार मारणें. 'त्या बहुतांहीं सात्यकि भगवन्नंदनहि तो खपविला हो।' –मोमौसल १.५५. 'गंगाधरशास्त्री जात होता देवाला। मधीं खपविला रस्त्याला।' –ऐपो ३९०. [सं. क्षप्–प्रयोजक]

खपवा—पु. बाहींचें मागील तोंड. [फा. कफ=हात]

खपा-प्पा—वि. १ नाखूष; रुष्ट; रागावलेला. 'याजमुळें नबाबाची मर्जी खप्पा.' –रा ५.२०४. 'धासी मिया याजवर नबाब खफा आहेत.' –रा ५.१६. २ नावड उत्पन्न झालेला; विन्मुख (एखाद्या विषयापासून); कंटाळा आलेला. [अर. खफा=रागावलेला] ०मर्जी–स्त्री. इतराची.

खपाट-टा-टी, खपारी—नपु. १ रिकामें पोट. 'कोणाचीं अन्नाविणें खपाटें वळलीं आहेत,'–नि ५१०. 'पोटास खपाटा बसला–झाला.' २ खबदड; पोकळ भाग; खळगा; भोंक; भेग; दळद; बीळ. **खपाटें**–न.अव. (चि.) गालफडें; कानशिलें इ०.

खपाटें, खपाटथा बसणें–न. उपास इ० पासून पोटाला खळगा पडणें, पोट बखळ होणें. [सं. कपाट]

खपाटा—पु. (नाविक) किनाऱ्यापर्यंत आगबोटींतील माणसें किंवा माल घेऊन जाणारा–येणारा पडाव, होडी. ही होडी त्या त्या आगबोटकंपनीची असते.

खपाटा घेणें, खपाटीस बसणें-लागणें—आपली विनंति मान्य करून घेण्याकरितां पाठीस लागणें; आग्रह धरणें; पिच्छा पुरविणें; गळ घालणें; खनपटीस बसणें पहा.

खपाटून—क्रिवि. कचकावून पहा. विशेष जोरदार अर्थ या शब्दानें व्यक्त केला जातो.

खपाटो—पु. (कु.) एक प्रकारचा मासा.

खपाटथा-ट्या—वि. काम साध्य करण्याची चिकाटी असलेला; पिच्छा पुरविणारा; हातीं घेतलेल्या कामाचा निश्चयपूर्वक शेवट करणारा; वादविवादांत दुसऱ्यास चकविण्याचें सामर्थ्य बाळगणारा.

खपी-खप्पी, खप्पीदास—वि. १ उद्योगी; मेहनती; नेहमीं कामांत चूर असणारा. २ काम करण्यांत हुषार; चलाख; तडफदार. ३ रागीट; तामसी; कडक. ४ धूर्त; पक्का; बिलंदर. ५ खमंग; न लाजणारा किंवा न भिणारा; वस्ताद [सं. खप्पीन्= बलात्कारानें हरण करणारा?; खपणें]

खपीप-खफीफ—वि. १ लाजलेला; ओशाळा झालेला; फजित; श्रमी: मानखंडित. 'चेरीसाहेबांचें साल–जाबमध्यें तोंड उतरून गेलें व खफीफ बहुत जाहले.' –पदमव १०५. २ रुष्ट; नाखूष केलेला; उतरून गेलेले. 'गोसावी अनुपगीर सर्वांसी दुश्मन जाले व खपीप जाले.' –दिमरा १.८५. ३ हलकें. [अर. खफीफ्]

खपुष्प—न. (आकाशाचें फूल) असंभाव्य किंवा अशक्य गोष्ट दर्शविण्यासाठी योजतात. या अर्थाचे पुष्कळ शब्द आहेत. उदा० सिकतातैल (वाळूचें तेल), मृगजल अथवा मृगतृष्णा, मृगजलस्नान, कूर्मलोम, कूर्मदुग्ध, वंध्यापुत्र, अंधविलोकन, बधिरत्रास; मूकगायन. 'गंधवेदुगे कायी पाडावे।. काय शशविषाण मोडावें। होआवें मग तोडावें। खपुष्प कीं।' –ज्ञा १५. २१५. [सं. ख+पुष्प]

खपेटोणपे—पु.अव. खबेटोणपे पहा.

खफी—वि. (ना.) पिसाट; वेडगळ; खुळचट. [अर. खब्ती=वेडा; हिं. खफ्ता.]

खप्पड—वि. सुरकुत्या पडलेला; चिंबलेला (गाल किंवा चेहरा); क्षीण; म्हातारा. 'खप्पड झाले गाल, आतां विठ्ठलवारीस चाल।'

खप्पा—खपा पहा.

खप्पी—खपी पहा.

खप्प्याची पट्टी—स्त्री. (कुस्ती) कुस्तींतील एक डाव; आपला हात जोडीदाराच्या गालफडावरून घेऊन त्याच्या गळ्याची घाटी हाताच्या पोटरीनें दाबून त्यास घुसमटवून चीत करणें; गळ्याची टांग. [अर खफाह=गुत ?; गळा दाबणें; खफाह+पट्टी=बांधणें]

खप्प्या—वि. १ खपणारा; अतिशय मेहनत करणारा; सर्व काल कामांत कंठणारा. २ सदां कामांत गुंतलेला; उद्योगी; व्यासंगी. [खपणें]

खफगी—स्त्री. १ फजिती. २ नाराजी. 'नबाबाचे चित्तांत सर्दारांविषयीं रुष्टता व खफगी आहे.' –रा ५.१८१. ३ दु:ख. 'होळकरावर हे नौबत गुजरली सबब खफगीस जागा.' –रा ७. –खलप १.२७. [फा. खफगी=राग]

खफीफ—वि. हलका; बिन महत्त्वाचा; नीच. खपीप पहा. [अर. खफीफ]

खबखबणें—अक्रि. १ खबाखब असा आवाज करणें (रिकामें मडकें ठोकलें असतां, पंचपात्रांत आवाज केला असतां अथवा कुजक्या नारळाचा आवाज होतो तसा.) २ कफानें किंवा शेंबडानें दाटणें (गळा, नाक); बदबदणें. [ध्व.]

खबखबीत—वि. बदबद, खबखब, गबगब असा आवाज करणारा (जड पदार्थानें ठोकलेल्या रिकाम्या भांड्याप्रमाणें किंवा पचपचीत नारळाप्रमाणें). [ध्व.]

खबदड-डी, खबदाड—नस्त्री. १ ओबडधोबड पोखर अथवा खळगी; मुख्यत्वें गुहेसारखी किंवा तिरकस गुहा; कपार; दरी. २ घळींतील अथवा ओघळींतील खोल खळगी. ३ भगदाड (भिंतींतील); ओबडधोबड आकृतीचें मोठें भोंक (खडक, झाड, फळी यांमधील); भुयार; बीळ.

खबदडी—वि. उंचसखल व खांचखळगे असलेली; खडबडीत (जमीन).

खबर—स्त्री. १ बातमी; संदेश; वार्ता. २ समाचार; माहिती (परक्या गांवची). ३ गप्पासप्पा; वृथा गोष्टी; निरर्थक भाषण (अनेकवचनी प्रयोग). 'हा गांवात उगीच खबरा सांगत बसतो.' 'खबरांची झाली दाटी आणि कामाला लागली काटी.' [अर. खबर्] (वाप्र.) ०घेणें– सुद्ध घेणें; शिक्षा करणें. सामाशब्द– ०गीर–(हिं.) १ बातमी देणारे हेर; चार; २ पालनकर्ता; आश्रयदाता. ०अ(ए)ख्(क्)बार–स्त्री. बातमीपत्र. जयपुराकडील खबरएकबार पादशहासी आली कीं...' –दिमरा १.१८२. **खबर्गिरी**–स्त्री. विचारपूस. 'खबर्गिरी करावयासही याद होत नाहीं.' –रा ३.९०. 'आपण आमची खबर्गिरी व परामर्ष पूर्वापरीस अधिक असा केला.' –ऐस्फुले ४९. [फा. खबरगीरी]

खंबरखुंट—वि. (प्रां.) खंबीरखुंट पहा.

खबरदार—स्त्री. संरक्षण; मजबुती. 'तरी तुम्ही किल्ले झांशी वगैरे जागांची खबरदार मज्बुतीनें उत्तम प्रकारें करणें.' –रा ३.२१३. खबरदारी पहा. –वि. १ चतुर; तरबेज; कुशल; निष्णात; फरडा. 'तो कारकून जाबसाल करण्याविषयीं खबरदार आहे.' २ खाऊन पिऊन सुखी; संपन्न; समर्थ. ३ मजबूत; धडधाकट; चांगल्या स्थितींतला. ४ सावध; हुशार. 'नाना फडनवीस म्हणती भाऊला तुम्ही मोर्चाला खबरदार।' –ऐपो १८१. –उद्गा. लक्षांत ठेव! ध्यानांत धर! सावध रहा! (न राहशील तर संकटांत पडशील). [फा. खबर्दार्]

खबरदारी, खबर्दारी—स्त्री. १ काळजी; संभाळ; चांगल्या स्थितींत ठेवणें; बंदोबस्त; सावधगिरी; हुषारी; 'पंधरा हजार मावळे ... किल्ल्याचे खबरदारीस नेमून.' –मराचिस ५. २ निश्चय; खंबीरपणा (मनाचा). ३ मजबुती; कणखरपणा; टिकाऊपणा (लांकूड, कापड, वस्तू इ० चा). 'त्या लांकडाची खबरदारी या लांकडांत नाहीं.' –शास्त्रीको.

खबरबखर-बात—स्त्री. (हिं.) बातमी; समाचार; वार्ता; वर्तमान. 'आमची खबरबखर घेत जावी.' –ख २.८९७. [खबर द्वि; =खबर+बात]

खबरी—स्त्री. (गो.) निंदा. (क्रि० करणें).

खबऱ्या—वि. १ बातमी देणारा. २ गप्पा मारणारा.

खंबऱ्या—वि. १ चतुर; चलाख; हुशार; शहाणा; तत्पर; उत्साही; २ मजबूत बांध्याचा; धट्टाकट्टा; राकट; दणकट; बळकट; मजबूत. [खंबीर]

खबळ—स्त्री. (प्रां.) खळगा: खोल खड्डा; दरी; एकीकडची जागा; खबदाड; गुहा.

खंबा—पु. खांब. [हिं.; सं. स्तम्भ]

खंबाई(य)त-ती—वि. खंबायत गांवासंबंधी; खंबायत येथील (लुगडीं). 'नेसलि खंबाइत जरतारी।' –अमृत १०२. 'खंबाइती भरजरी नेसवुनि' –अमृतसुदा १३. (सामा). उंची वस्त्र. 'सुप्रसन्ना देवी खंबायत नेसविती।' –बसा ५३.

खबाड—न. १ खबदाड पहा. २ पाण्याचें ओबडधोबड टाकें; डबकें. 'डोहो डबकें खबाडीं टाकीं।' –दा १६.४.१०. पोकळी; बोळकें. 'तोंडाची खबाडी जाली' –दावि ७१.

खॅबाड—न. (गो.) लचांड.

खंबारी—स्त्री. शिवण नांवांचें एक झाड; शिवणी.

खबा(ब)लणें—उक्रि. १ अधाशीपणानें खाणें; गिळणें. २ (ल.) निरर्थक खर्च करणें; उधळणें; उधळेपणानें खर्च करणें. **गोष्टी-बाता खबालणें**–गप्पा, बाता झोकणें; बडबडणें. 'तो तेथें बाता खबलीत बसला आहे.' [अर. किबाल=समृद्धि; म. खबाला]

खबाला—वि. ऐसपैस; मोठें; टोलेजंग. [अर. किबाल]

खबाला—पु. १ अधाशी पणानें खाणें. २ (ल.) उधळेपणाचा खर्च, व्यय (अन्न, पैसा, वस्तु इ० चा). ३ व्यापारांतील मोठी बुडः तोटा; ठोकर. ४ तुकडे; फुटतूट; मोडतोड (बांगडी; बाटली; मडकें इ० चीं). ५ (सामा.)[अर. किबाल] धूळधाण; नाश.

खबाला-ल्या—वि. १ गप्पीदास; बडबड्या. (समासांत.) बाता–गोष्टी खबाल्या. २ खादाड; अधाशी. (समासांत) 'भात–लाडू–पोळी–खाऊ–खबाल्या.' [अर. किबाल]

खंबावती—पु. गायन शास्त्रांतील एक राग. ह्या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. अवरोहांत ऋषभ वर्ज्य, जाति संपूर्ण–षाडव, वादी गांधार व संवादी धैवत. गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर.

खबाळणें—क्रि. (व.) खवळणें; अनावर होणें; त्रास देणें. 'हा तांबडा बैल फार खबाळतो.' [खवळणें]

खंबाळे-ळें—न. उंची वस्त्र; खंबायती वस्त्र (जरीचें). 'भिलोत कां खंबाळें। अथवा भगवींही नेसावीं।' –ममृ ११५. [खंबायत]

खंबिरी—स्त्री. १ मजबुती; बळकटी; भक्कमपणा (इमारतीचा). २ बंदोबस्त. ३ कायमपणा; निश्चिती (वचनाची). [खंबीर]

खंबीर—पु निश्चितता; निखालसता; पोकळपणा, संदिग्धता याच्या उलट. 'तुमच्या बोलण्याचा खंबीर आसल्यास आम्ही उद्योग करितों.' –वि. १ मजबूत; भक्कम; दणगट; बळकट (इमारत, पदार्थ). 'माहांभूतांचा खंबीर केला। आत्मा घालून पुतळा जाला।' –दा २०.७.१८. २ (ल.) धिम्मा; निग्रही; दृढ निश्चयाचा (मनुष्य), निखालस; ठाम (भाषण); कायम (हुद्दा). ३ (व्यापक.) मोठें; वजनदार; अवजड (बोजा). ०खुंट–वि. १ अढळ; कायम; ठराविक; निश्चित (माणूस; हुद्दा; धंदा). २ दणकट; मजबूत.

खंबीर—न. (प्र.) खमीर. आंबवण; फुगवण; आंबवण्याची क्रिया. [खमीर अप.]

खबुतर-तर-दर—न. कबुतर पहा. ०खाना–पु. १ कबुतरखाना पहा. 'पुण्यांतील पेशव्यांचा खबुतरखाना तालीमखाना बनला आहे.' २ (ल.) (कबूतरांचें खुराडें कधीं कधीं गच्च भरलेलें व कधीं कधीं रिकामें असतें यावरून) कधीं फायदा कधी तोटा होणारा धंदा, व्यवसाय, उद्योग. [फा.] ०बाज–वि. शिकविलेलीं कबुतरें बाळगणारा. (अप.) खबुदबाज.

खबू-ब्बू—वि. (खा.) म्हातारा; बुद्धु (उपसाहार्थी).

खबूक—वि. अगडबंब; लठ्ठ; धिप्पाड (माणूस). खंबीर पहा.

खबूस—पु. गलबतावरील भटारखाना; कबुस पहा.

खबेटोणपे—पुअव. दुसऱ्याच्या मर्जीचे रक्षण व्हावें, आपल्याला मोठेपणा मिळावा किंवा एखादें अंगीकृत कार्य पुढें चालावें यासाठीं सोसावयाचीं अनेक प्रकारचीं दुःखें; धक्के चपाट, टक्के टोणपे; आघात; अडचणी; निंदा; कुचेष्टा. (क्रि० खाणें; घेणें; सोसणें).

खबेडु—वि. १ मनधरणी करण्यास कठिण; मन वळविण्यास कठिण; हट्टी; हेकेखोर; पाषाणहृदयी. २ खडबडीत; कठिण; अप्रिय; खडतर; खचरट पहा.

खब्बा—पु खबदड; ओबडधोबड बीळ, विवर.

खब्बा—स्त्रीअव. (विणकाम) सुत खालींवर करून त्यास पेच (सांध) पाडण्याकरितां उपयोगांत आणलेल्या लांकडी बारीक व सरळ काठ्या. या विणतांना जागजागीं ताण्यांत सरकविलेल्या असतात. [खांब]

खब्बू—खबू पहा.

खम—न. ठाण. 'हलीं ज्याप्रमाणें एखादा बी. ए. चड्डी, काचा भिडवून आखाड्यांत खम ठोकून उभा राहिला असतां लोकांस अचंबा वाटल ...' –नि ४९०. [फा. खम्=गांठ, घडी, फांस ?]

खमका(खा)विणें—उक्रि. खडकाविणें; धमकाविणें; दरडाविणें; दरडावून सांगणें; कानउघाडणी करणें. २ जोरानें ओढणें, बांधणें, धरणें, आवळणें; मुख्यत्वें खमकावून असा प्रयोग येतो व तो पाहिजे त्या क्रियापदार्शी योजतात. जसें–खमकावून ओढणें–बांधणें–धरणें–तासणें–चालणें. कचकून, कचकावून पहा.

खमक्या, खमशा—वि हुशार; चलाख. जोग्दार; आवेशी; तलख; पाणीदार; जहाल. याच्या उलट मऊ; साधाभोळा; मूर्ख; नामर्द; जड. खपाट्या पहा.

खमखम—स्त्री खुमखुम पहा.

खमखमीत, खमंग-क—वि. १ मसालेदार; स्वादिष्ट; चमचमीत; चवदार (भाजी, खाद्यपदार्थ, वास इ०). २ ल.) वस्ताद; धूर्त; पक्का. 'तुला कोणी खमंग भेटावयास पाहिजे म्हणजे गुर्मी उतरेल.' **खमंग काकडी**–स्त्री. एक तोंडीलावणें; कोंवळया काकडीच्या बारीक फोडी करून त्यांना मीठ लावून नारळाची खव व मिरच्यांचे तुकडे चोळतात आणि त्यांत भाजलेल्या मुद्दमुगाच्या दाण्यांचें कूट मिसळून त्यावर लिंबू पिळतात.

खमंगाई—स्त्री. स्वादिष्टता; चरचरीतपणा; झणझणीतपणा (मसाल्यानें आलेला). [खमग]

खमंचा—पु. एक खाद्यपदार्थ; तुपावर भाजलेले पोहे, शेंगादाणे, फुटाणे, खोबऱ्याच्या चकत्या इ० सर्व पदार्थांचें मिश्रण तुपाची फोडणी करून, गूळ, मिरच्यांचे तुकडे, कोथिंबीर, मीठ, तिखट हळदीसह तींत टाकावें व ढवळून कढई उतरावी; खातांना, त्यांत लिंबू पिळावें. –गृशि.१.४५६.

खमणकाकडी–खमंगकाकडी पहा.

खमणें—अक्रि. गडप होणें; नाहींसें होणें; जिरणें. [सं. शम्; म. शमणें]

खमणें—अक्रि धैर्यानें. निमूटपणें सोसला किंवा सहन केला जाणें (दुःख, अपराध). [सं. क्षम्]

खमध्य—पुन. १ याम्योत्तरवृत्त. २ खस्वस्तिक; शिरोबिंदु; क्वचित् अधःस्वस्तिक, अधोबिंदु. [सं.]

खमयसी—स्त्री. (हेट. नाविक) पावडा किंवा रोयली टांगून ठेवण्याची दोरी.

खमशेड—वि. (व.) बळकट; जोरदार.

खम(म्म)स—वि. पांच ही संख्या. [अर. खम्स्] **खमसी (सै)न**–वि. पन्नास; ५० ही संख्या.

खमसीन—पु मिसर देशांत वाहणारा उष्ण वारा. –सूपनि. २२९.

खमाज-स—पु. (संगीत) एक राग. ह्या रागास षडज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात आरोहांत ऋषभ वर्ज्य जाति षाडव-संपूर्ण, वादी गांधार व संवादी निषाद. गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर. **०थाट(राग)**-पु. एक थाटाचें नांव. याचे पुढील सात स्वर असतात–शुद्ध षड्ज, शुद्ध ऋषभ, शुद्ध गांधार, शुद्ध मध्यम, शुद्ध पंचम, शुद्ध धैवत, कोमल निषाद.

खमाटणें—उक्रि. गच्च ओढून बांधणें. (सामा.) खमाटून असा प्रयोग येतो. ओढणें–बांधणें–तापणें–खेचणें–आवळणें–या क्रियापदांशीं योजतात. **खमाटून धरणें**–घट्ट अथवा जोरानें धरणें. **खमाटून जेवणें-खाणें**–सपाटून; ओ येईपर्यंत जेवणें. कचकावून, खचकावून, रगडून, सपाटून पहा.

खमाट्या—वि. १ अडमुठा; दांडगा; कचक्या. २ राकट; दणकट; धिप्पाड; धटिंगण. [खमाटणें]

खंमाल, खम्माल—वि. खंबीर पहा. १ बळकट; मजबूत; भक्कम (इमारत, पदार्थ). २ जंगी; अवजड; भक्कम; (ओझें, गट्ठा).

खमाविशी—स्त्री. (कर्ना.) सरकारच्या प्रत्यक्ष नजरेखालीं कसलेली जमीन. **०दार**–पु. सरकारी जमिनीवर देखरेख करणारा अधिकारी कमाविशी पहा. –विल्सन कोश.

खमीर—न. १ अंबवण; ताडी अथवा तसले फसफसणारे पदार्थ. ' रोटींत खमीर मिसळलेला असल्यानें ती आठवडाभरहि टिकूं शकते.' २ किण्व, यीस्ट. ३ अंबवण किंवा सुरामंड तयार करणें; फुगवण. [अर. खमीर्]

खमीस—पु. एक प्रकारचा सद्रा; शर्ट; कुडतें. [पोर्तु कॅमिसा]

खय—१ स्त्री. गर्व; ताठा; अभिमान. (क्रि० मोडणें, जिरविणें. २ अडेलपणा; रग.

खय—न. (खा.) शेतांतील धान्याचें खळें. [खळें]

खँय—क्रिवि. (कों. गो. कु.) कोठें ? [सं. क्व; हिं. कहाँ; गु क्यौं] **०सर-**(कु) कोठें ? **०क्यान-सून-**(कु.) कोठून ?

खँयणँ—न. (गो.) खेळणें; खेळण्याची वस्तु. [खेळणें]

खयर—पु. खैराचें झाड. खैर पहा.

खय्या—पु.(व.) रिवाज; रीत; प्रघात. 'नवा खय्या पडला.'

खर—पु. गाढव. ' खरी टेको नेदी उडे । तानौनि फोडी नाकाडें ।' –ज्ञा १३.७०५. ' बाइल म्हणे खर मरता तरी बरें ।' –तुगा ८७३. [सं. फा.]

खर—स्त्री. १ कचरा; घाण; अनेक प्रकारचा मळ. २ श्वेत प्रदरांतील पांढरा सांका; लघवींतून पडणारे वीर्याचे कण. ३ आकाशांतील पांढरे, कापसाप्रमाणें ढग; पातळ पसरलेलें अभ्र. ४ आकाशांतील संध्याकाळचा रंग, आरक्त रंग ५ जमीन भाजण्याकरितां टाकलेल्या टहाळांवरील जुनें गवत, पानें, काटक्या; शेणकूट इ० चा कचरा; राब. ६ मुरूम किंवा बारीक खडी. ७ विहिरींतून खणून काढलेली माती; गाळ इ०. ८ रस करतांना राखेत अथवा मातींत पडलेले सोन्या-रुप्याचे कण. ९ नदीच्या तळची वाळू; पाण्यांतील गाळ, घाण; (गो.) पाण्याचा तळ. १० (नाविक) माल भिजूं नये म्हणून बांकांवर पसरलेलीं लांकडें. ११ (सोनारी) कोळशाची बारीक पूड; ही पाण्यांत घोटून तिचा थर मुशीच्या आंतून देतात. १२ (कु.) दंव. [सं.]

खर—वि. १ तीव्र, तिखट; कडक; प्रखर; कडत (मिर्च्यें, ऊन, थंडी). २ (कों.) ज्याची पाणढाळ फारच उतरती आहे अस (घर, वाडा वगैरे). (कों.) उभट (नांगर इ०). ३ शेंबगारें; बोंचणारें; कडक (भाषण, शब्द). ' खर दुर्वाक्यशरशतें भेदित होतासि जेधवा मर्मे ।' –मोकर्ण ४९.९. ४ जास्त (वजन किंवा माप). जसें–एका ठिकाणचा शेर दुसऱ्या ठिकाणच्या शेरापेक्षां जास्त असतो. ५ दाट; घट्ट (चिखल, लगदा इ०). [सं.]

खरकट, खरकटवड-वडा-वाडा, खरकटवळ-खरकटावळ—स्त्रीपु. १ ज्या जागीं जेवण झालें आहे त्या जागचें अवशिष्ट, उष्टी पानें, घाण इ०. खरकटें पहा. जिकडे तिकडे खरकटें पडलेलें असणें. २ (ल.) (खरकटवाडा) तुंबलेलें काम. [खरकटें+वड, वळ, वाड]

खरकटणें—उक्रि. १ ओबडधोबड लिहिणें; कुत्र्या-मांजराचे पाय लिहिणें; रेघोट्या ओढणें; घाईघाईनें लिहिणें; भरकटून लिहिणें. २ घाईनें चोळणें, पुसणें, झाडणें, सारवण, ३ रांगणें; खरडत जाणें. [सं खर+कट प्रत्यय]

खरकटणें—अक्रि. १ खरकटें होणें (अन्न, भांडीं, हात इ०). २ (व्यापक) भरणें; लेपाटलें जाणें; गदळ होणें; लिबलिबीत होणें. ' काम क्रोधलोभें खरकटलें । ' –ह १९.५. ' मी सारवण घालतें आहें; हीं वस्त्रें न उचलल्यास शेणानें खरकटतील. ' [खरकटें]

खरकटणें—अक्रि. भुईत जाणें; खुजटणें.

खरकटा—वि. (स्वच्छ व अस्वच्छ यांतील औपचारिक भेद दर्शविणारा शब्द.) १ शिजविलेलें, पकविलेलें, किंवा शिजविल्या पकविल्या शिवाय, पाण्याशीं मिसळलेलें (तांदूळ, भाकरी. पीठ, दुधाशीं किंवा एखाद्या फळाच्या रसाशीं मिसळलें तरी तें खरकटें होत नाहीं). २ ज्याला असलें खरकटें अन्न लागलें आहे, चिकटलें आहे, अथवा ज्याचा स्पर्श झाला आहे असें (हात, स्वयंपाकाचीं भांडीं, जागा, पदार्थ, इ०). खरकटया अन्नास सोवळ्यानें शिवलें तर चालतें, ओवळ्यानें शिवल्यास तें विटाळतें. (साधा-

रणतः ब्राह्मणांत असा जास्त परिपाठ). सोवळ्याओवळ्याचा भेद न मानणाऱ्या ब्राह्मणेतरांमध्येंहि शिजविलेल्या अन्नास खरकटेंच म्हणतात.

खरकटें—न. (हिं.) खरकट्या अन्नाचा शेष; शिजविलेल्या अन्नाचा (भाकरी, भात इ० चा) कण, चाराचुरा. मात्र हें शिजविलेलें अन्न पाण्यांत मिसळण्यापूर्वी तळलेलें किंवा भाजलेलें नसलें पाहिजे, त्याचप्रमाणें शिजवण्यापूर्वी ज्या अन्नांत पाणी, मीठ अथवा नुसतें पाणी मिसळलेलें आहे असल्या अन्नाऱ्या अवशेषालाहि खरकटेंच म्हणतात. २ (देशस्थांत रूढ) न भाजलेल्या पदार्थांचा स्वयंपाक, निर्लेप नसणारें अन्न. ३ (ल.) अपुरा व्यवहार, देवघेव (पैशाची); बिनहिशेबी धंदा. लडथड; भिजत घोंगडें. 'मागलें खरकटें काढून टाका मग दुसरा पैका देईन.' ४ अपूर्ण राहिलेली व त्रासदायक गोष्ट, काम. लोंबा पहा. (वाप्र.) **०सांवडणें**-खरकटें गोळा करणें; खरकटें काढणें. **खरकट्या हातानें कावळा न हाकणें**-(कदाचित् हातांचें खरकटें कावळ्याला मिळेल म्हणून) परक्यास थोडी सुद्धां मदत न करणें. (कंजूष माणसास ही म्हण लावतात).

खरकटेल—वि. ज्याला खरकटें (शिजलेलें अन्न, भात, कणीक, पीठ इ०) लागलेलें आहे असें (कापड, भांडें, हात, इ०). [खरकटा]

खरकणें—अक्रि. १ खर असा आवाज होऊन घसरणें, निसरणें; घसरत जाणें; जोरानें खालीं सरणें, जाणें. 'झाडांवरून त्याचा पाय खरकला.' 'मी खरकत तिकडे गेलों, पडलों.' २ ढुंगणानें सरकत जाणें, घसरत-घसरत जाणें; खरडणें. ३ झपाट्यानें व मोठ्या आवाजानें वाहात जाणें (नदी, पूर); पाटीमागें जाणें; कमी होणें; ओहोटीस लागणें (समुद्र); झटकन नाहींसें होणें (वाऱ्यानें ढग); झडणें (मांस, शरीर); उतरणें; म्लान होणें; पडणें (तोंड, चेहरा, माणूस); एकदम दबणें; खालीं बसणें (सूज); भिणें; घाबरणें; चरकणें; धास्ती धरणें. 'चोर म्हणतांच राजश्री खरकले.' [खर]

खरकन-कर-दिशीं—क्रिवि. १ खर अशा आवाजानें युक्त. २ चटकन; एका क्षणांत, निमिषांत. 'औषधानें कळ खरकन राहिली.' 'गंगेचें पाणी खरकन उतरलें.'

खरकबाण, खरकबाण मेहेरबान—वि. (विनोदानें) अकिंचन; अत्यंत दरिद्री, कफल्लक. [ध्व. खरक+बाण=शेकराचें लिंग]

खरका—पु. १ कातडीची खडबडीत आणि फुटीर स्थिति (थंडीच्या दिवसांत); खरबरीतपणा. २ कोरडेपणा व खपल्या पडलेली स्थिति (बरा झालेला गोवर, देवी इ० ची). (क्रि० उठणें; येणें). ३ दुःखकारक मानसिक स्थिति; दुखावलेल्या भावना; मनाला बसणारा धक्का (रागाच्या खडकावण्यानें). (क्रि० बसणें).

४ ठोकर; तोटा; गोता (व्यापारांत). ५ पिकाचें नुकसान; नासाडी. जसें-पावसाचा-हिंवाचा-उन्हाचा-उंदराचा खरका (पिकावर, धान्यावर). (क्रि० बसणें; होणें). ६ शंका; संशय; भीतीची अथवा दुःखदायक शंकेची आकस्मिक कल्पना; घोर. (क्रि० येणें; बसणें; राहणें; उडणें). ७ आकस्मिक व जबर कंडू, खाज. जसें-खरजेचा-देवीचा-गजकर्णाचा खरका. (क्रि० सुटणें). ८ खाजविण्याचा जबर झटका, आवेग, लहर. (क्रि० लावणें). ९ खडाडत जाणें; मोठ्या आवाजानें खडखडत पुढें जाणें (गाडा). १० (ल.) चलती; झपाटा; भरभर (व्यापारधंद्याची). [खरकणें. ध्व. खर] (वाप्र.) **०देणें**-खरडपट्टी काढणें; खडसावणें; जोरानें धमकावणें; ताकीद देणें. **०मारणें**-झोका मारणें; गोता देणें (लबाडीनें हिशेबांत इ०).

खरकाटणें—उक्रि. खरकटणें पहा.

खरकावणें—अक्रि. खरकन आवाज होऊन खालीं अथवा बाजूला कोसळणें; घसरणें; घसरत खालीं पडणें. [खरक]

खरकाविणें—उक्रि. १ चमकाविणें खडसाविणें; खरडपट्टी काढणें; खमकावणें. २ खरखर आवाज होईल असें ओढीत नेणें (ओढणें या क्रियापदार्थी जोडून अगर स्वतंत्रपणें योजतात). ३ ढकलणें; पुढें ओढीत नेणें (एखादा जड व आवाज होणारा पदार्थ). [ध्व. खरक]

खरकुटणें—अक्रि. खरकटा होणें; खरकटणें (-अक्रि.) पहा.

खरखटणें—अक्रि. मलिन होणें; खरकटणें पहा.

खरखर—स्त्री. १ डोळे आले असतां होणारी वेदना, ठणका; डोळ्याचा एक रोग. 'त्याचे डोळ्यास खरखर लागली.' २ (ल.) पश्चात्ताप; पस्तावा; अनुताप. ३ दुःखदायक विचार; काळजी; चुटपुट. (क्रि० लागणें). ४ घशांत होणारा घरघर आवाज (कफामुळें). (क्रि० लागणें; सुटणें). ५ कंड; खाज; खाजविण्याचा झटका. (क्रि० लागणें; येणें). [ध्व. खर]

खरखरः-रां—क्रिवि. १ घरघरा किंवा फरफरा ओढल्या जाणाऱ्या पदार्थांचा अगर माणसाचा होणारा आवाज करून, होऊन. (क्रि० ओढणें; चालणें; जाणें). २ घशांतील घरघर आवाजानें, आवाज करून. (क्रि० वाजणें). ३ कठिण; राकट; खरबरीत (स्पर्श). (क्रि. लागणें). [ध्व. खर]

खरखरणें—अक्रि. खडखड असा आवाज होईल असें ओढलें जाणें (जहाज वाळूवरून, फांद्यांसह झाड रस्त्यांवरून); खरखर आवाज करणें; खडाडणें; खरारणें किंवा वाजणें. २ घरघरणें (कफानें घसा). ३ ठसठसणें; ठणकणें; दुखणें (डोळे). [खरखर]

खरखरमुंडा-डा—पु. १ मुसलमान जातींतील भिक्षेकऱ्यांचा एक वर्ग, व्यक्ति. हे लोकांनीं भिक्षा द्यावी म्हणून आपल्या छातीवर, हातावर, डोक्यावर, दंडावर जखम करून लोकांकडून

आपली कौंव करवून घेऊन भिक्षा मिळवितात. 'मलंग भडंग कलंदर। खरखरमुंडे।'–दावि ४७४. २ भिक्षा मागतांना हिजड्याबरोबरचा एक सोबती, मुंडा पहा. ३ (ल.) निष्कांचन, अनाथ, कफल्लक माणूस.

खरखरा—पु. खरखर पहा. १ कसोटीचा खरखरीत दगड. २ डोळ्यांचा ठणका. ३ तळमळ; चुटपुट; घोर; काळजी; हुरहुर (क्रि० फिटणें; जाणें; फेडणें). 'लागे स्मरुनि अनादत विदुर-वचन मानसा खरखरा हो।' –मोशल्य ४.५३. 'परि कधि येईल वृद्ध मित्र हा मनामधें खरखरा।'–राला १०. ४ असंतोष, रुसवा; नाखुषी. ५ चडफड; तळमळ; तडफडणें; उसासणें (रागावलेल्या, अथवा महत्त्वाकांक्षी माणसानें). (क्रि० येणें; लागणें; राहाणें). ६ कंडू; खाज; खाजेचा उमाळा. (क्रि सुटणें होणें; लागणें). ७ घशांत दाटलेला कफ. ८ (क.) घरघर वाजणें. (क्रि० होणें; वाजणें; लागणें). ९ धास्ती; भीति; धक्का. (क्रि० बसणें). [ध्व. खरखर]

खरखराट—पु. खरखर असा अतिशय मोठा व कर्कश आवाज; खडखडणें; खरखरणें; खळखळणें इ०. [खरखर]

खरखराविणें—उक्रि. खरखरत, खडखडत जाण्यास लावणें (खरखरणेंचें प्रयोजक)

खरखरीत—वि. खरबरीत; ओबडधोबड; वाळलेलें; शुष्क; राकट; मृदुता किंवा गुळगुळीतपणा ज्यास नाहीं असें (लांकूड, दगड, वस्त्र इ०). [खरखर]

खरखरा—पु. अंगावरील पुरळ; अंगाला सुटणारी कंड खरका पहा.

खरग—न. (व.) शेतांत पिकामध्यें पडलेलें ठिगळ.

खरंगटणें—उक्रि. १ ओबडधोबड रीतीनें भरडणें, वाटणें (दोन दगडांमध्यें दाबून, कुटून). २ चेंचणें; चिरडणें (मिरीं, मिरच्या इ०); भरडणें.

खर(रं)गणें—उक्रि. चांगलें तळणें; खमंग होईपर्यंत तळणें; खरपूस भाजणें. –अक्रि. उन्हानें लाल होणें, सुजणें (डोळे, गाल, तोंड इ०). [खर]

खर(गों)गोश-स—पु. ससा. 'तेथें खगोंस निघाला, त्याचे पाठीं कुत्रे लागले' –ऐस्फुले २१. [फा.]

खरगोळ—पु. एक वृक्ष.

खरच-णें, खरच घेंच, खरची—खर्च पहा.

खरचटणें—अक्रि. चोळवटणें; खरंगटणें; घासणें; कातडी निघणें.

खरचाणी—स्त्री. लहान व रुचकर माशाची एक जात.

खरचिंच—न. (राजा.) आंत दाणा नसलेली मातीची लोंबी, लोंगर; पळिज; पोल; बिन दाण्याचें कणीस.

खरज—पु. १ (संगित) नीच स्वर; घोगरा आवाज. २ खरज स्वर वाजविण्याजोगा विण्यास लावलेला घोर. खर्ज पहा. [सं. षड्ज]

खरजाई—स्त्री. खरजेची देवता. हिचा अंगारा लावला म्हणजे खरूज जाते अशी समजूत आहे. [खरूज+आई]

खरजुडा-ला—वि. खरजेनें व्याप्त; ज्यास विशेष खरूज असते असा (माणूस). [सं. खर्जू]

खरजुवप—क्रि. (गो.) खाजविणें. **म्ह०** (गो.) खरजुता एक ठय खरपितां एकठय=खाज येते एके ठिकाणीं पण खाजवितो दुसऱ्याच ठिकाणीं. (वडयाचें तेल वांग्यावर काढणें).

खरजू—स्त्री. (गो.) खाज. [सं. खर्जू]

खरट—पु. (प्रां.) १ वाळू; खडी. २ खडा लागून होणारें क्षत (माणसाच्या, जनावराच्या पायाला, तळव्याला). करट पहा. [ध्व. खर+(व)ट प्रत्यय?]

खरटणें—अक्रि. वाढ खुंटणें. खुरटणें पहा.

खरटणें—अक्रि. खरडणें पहा.

खरंटा—पु. खराटा पहा.

खरंटा—पु. एक झुडप.

खरटिवाळा—पु. एक रणवाद्य. 'तेथ वाजती शंख काहाळा। तुरेरिआं तोंडी खरटिवाळा।' –शिशु १०२६.

खरड—स्त्री. १ घाई–घाईनें लिहिलेला, कागद अथवा लेख, आकृती, खर्डा, आराखडा. २ रेघोट्या; चिरखुडया. ३ खरडपट्टी; पाणउतारा; निर्भर्त्सना. (क्रि० काढणें; निघणें). ४ धातु शुद्ध करतांना तिचे भोंवतीं जमणारी राख व माती (ही धातूपासून खरडून काढलेली असते म्हणून हा शब्द); खरडून काढलेला भाग. ५ (गो.) टक्कल. ६ (गो.) केसांत सांचणारा मळ. [सं. क्षर्; प्रा. खरड=लेपणें; ध्व. खर?] सामाशब्द– **०घाशा**–वि. (उपहासार्थी) सरासरी लेखन जाणणारा, परंतु त्यांतील मर्म न जाणणारा (कारकून). २ अकुशल; बिनकसबी (लेखक, न्हावी, सुतार). [खरडणें+घासणें] **०निशी**–स्त्री. १ गिचमिड; वेडेवांकडें लिखाण, लेखन. २ खर्डेघाशी. **०नीस-निशा**–वि. वाईट लेखक. (खरड+नवीस). **०पट्टी**–स्त्री. १ खरड पहा. कडाक्याची निर्भर्त्सना; दटावणी; जोराची चापणी; बोडंती; भोसडपट्टी; दोष किंवा अपराध दाखवून रागानें झाडलेला ताशेरा. (क्रि० काढणें; निघणें). २ तोटा, नुकसान सोसावयास लावणें. (क्रि० काढणें; निघणें).

खरड—पु. १ खाणींत असंस्कृत स्थितींत सांपडणारें रत्न. २ ओबडधोबड खडा. खरट पहा. **०बरड**–वि. दगडाळ; नापीक (जमीन).

खरडणें—उक्रि. १ ओरखडणें; ओरबडणें; खरखरीतपणें चोळून काढणें; घासटणें. २ खुरपणें; उपटणें (गवत, तण, इ० खुरप्यानें). ३ निष्काळजीपणानें, खरखरीतपणें (खरखर वाजत); हजामत करणें, भादरणें. ४ ओबडधोबड रीतीनें, कसें तरी, कच्चें, घाईनें लिहिणें, टिपणें, टांचणें. 'जन्माच्या कर्मी कुठें कोटी आठवली ती मुद्दां शिळी, पण तिच्या जिवावर चार पानें खरडलीं.' –नाकु ३.४५. ५ संक्षिप्त टांचण करणें; सारांश, मुद्दे लिहून काढणें. ६ धसाफशीनें ओढणें, नांगरणें, दळणें इ० ७ चेंचणें; चुरणें; ठेंचणें. खरंगटणें पहा. ८ खरड काढणें; पाणउतारा करणें. ९ (ल.) समूळ उच्छेद करणें; खरडून काढणें. 'शत्रूस तेथून खरडून काढला.' –अक्रि. (प्राणी). ढुंगणावर सरकणें, चालणें; खरचटणें; फरफटणें; सरपटणें [खरड]

खरडणें—अक्रि. खुरटणें; भुर्इत जाणें; वाढ खुंटणें. 'हें झाड भुर्इशीं खरडतें.'

खरडा—पु. १ खरडून काढलेलें अन्न, खरकटें (स्वयंपाकाच्या भांड्यांतून). २ भरडलेल्या, भाजलेल्या, मिरीं, मेथ्या इ० कांचा चुरा. (क.) तिखट (ओल्या मिरच्यांचें). ३ चिताड कागद. (गिचमिड लिहिलेला, ओळीस ओळ लागलेला); डाग पडलेलें लिखाण; अक्षर वळविण्याकरितां किंवा घटविण्याकरितां लिहिलेला बंद; खरडे. ४ आराखडा; कच्चें टांचण; कच्चा मसुदा; रोजनिशी; टांचणवही; टिपणवही; चोपडी; व्यापारी, धंदेवाले लोक हिशेबाच्या दोन वह्या ठेवतात–(अ) कच्चा खरडा व (आ) पक्का खरडा. कच्च्या वरून पक्का लिहितात. ५ ओबडधोबड, खेंगडेंमेंगडें मोतीं; गोलबंद नसणारें मोतीं; हलक्या मोत्याचा दाणा; असल्या मोत्याचा खडबडीतपणा. ६ खरबुजाची एक जात. ७ देवी व गोंवर यांमुळें आलेली पोटांतील कडकी, उष्णता. ८ चित्ता; विष्या वाघ. 'होती कोंबडी ती खाली खरडयानें.' –मसाप १.१.२. ९ (कों.) भाताच्या लहान भरलेल्या ओंब्या, साळीच्या लहान, भरदार कणसांचा समुदाय. १० गुरांनीं खरडून खावयाजोगें म्हणजे फक्त खुरपतां येण्यासारखें आंखूड गवत. ११ तुपांत तळलेलें (जायफळ, बडिशेप, मुरुडशेंग यांचें) चूर्ण. हें रेचे बंद होण्याकरितां घेतात. १२ तुटवडा; कमीपणा; टंचाई (खरडावें लागेल इतकी). (क्रि० लागणें; पडणें). 'पाण्याचा खरडा लागला अथवा पडला' =विहिरीचें पाणी इतकें थोडें उरलें आहे कीं, तें (नरोटीनें) खरडलें पाहिजे. तसेंच धान्याला खरडा लागला.=पिकाचा तुटवडा पडला. १३ (ना.) पुठ्ठा; पुष्टीपत्र (कार्डबोर्ड). १४ (सोनारी) चांदीच्या सुताच्या एका टोंकास दिव्यावर धरून रवा किंवा गोलाकार करतात ती काडी (ही सुयाच्या कामीं उपयोगी पडते). [खरड] **खरडेघाशी**–स्त्री. निष्वळ कारकुनी. **खरडे घासणारा**–वि. निष्वळ कारकून. खरडघाशा पहा. **खरडे घासणें**–१ लिहिण्याचें कष्टदायक काम करणें. २ (निष्काळजीपणानें) लिहिणें; खरडणें; भरकटणें.

खरडी—स्त्री. १ जोराची खरडपट्टी; निर्भर्त्सना (क्रि० काढणें; निघणें). २ एक चर्मवाद्य; एक प्रकारची टिमकी. ३ काथ्याचा एक धागा; माडाच्या चुडतीचा बारीक दोरा; काथवडी. ४ (कु.) पुन्नाग (उंडी) झाडाचें कोंवळें किंवा सुकलेलें फळ; उडी. ५ (कु.) बैलगाडीचा वेग थांबविण्यासाठीं लावलेला चाकाच्या मागचा दांडा किंवा अडणा. ६ (कु.) सोललेली पण न तासलेली सुपारी. ७ (क.) (भजनी मंडळ) मृदंग इ० वाद्यास लावलेली कणीक खरडण्याचें एक हत्यार. 'खरडीनें कणीक घास.' [खरडणें]

खरडूं—न. (कु.) ऊचें पोर; बारीक ऊ.

खरडें—खरडा अर्थ ३, ४ पहा.

खरडेवजा मोतीं, खरडयाचें मोतीं—न. हलकें मोतीं. खरडा अर्थ ५ पहा.

खरडया—वि. १ ओबडधोबड प्रकारें लिहिणारा, हजामत करणारा. २ निष्वळ खरडेघाशा, कारकुंडा, न्हावडा. –पु. चित्ता; खरडया वाघ. खरडा अर्थ ८ पहा. [खरडणें]

खरणी—स्त्री. घोडयास होणारा एक रोग, यांत घोडयाच्या दोन्हीं नाकपुडयांतून वाफा निघतात दुर्गंधी सुटते, नाकपुडया ताणल्या जातात, घोडा पाणी पीत नाहीं व अगदीं कृश होतो. या रोगास घीणानुरोध असेंहि म्हणतात. –अश्वप २.१३७. [सं. क्षरण; प्रा. खरण]

खरणें—अक्रि. १ लघवींतून खर जाणें. २ वीर्यस्खलन होणें (मनुष्य, पशु इ० चें). [सं. क्षरण; प्रा. खरण]

खरतड—वि. १ खडतर पहा. २ स्पष्ट; निर्भीड. ०**बोहणी**–स्त्री. (ना.) लाभदायक बोहणी.

खरतडणें—अक्रि. १ खडतरणें पहा. २ शरीरास लागणें, जखम होणें. [खरतर]

खरतर—वि. तीक्ष्णतर. 'अन्योन्यासि विदारिति ते खरतर नरवर सिंह शावकसे।' –मोभीष्म ३.५१. [सं.] ०**शरवृष्टि**–(काव्य) बाणांची अतिशय जोराची वृष्टि, वर्षाव. [सं.]

खरतुडी—स्त्री. पांढरीं फुलें आणि खाण्याजोगीं मुळें असणारी एक वनस्पति. ही पावसाळयाच्या आरंभीं महाबळेश्वराकडे आढळते.

खरदडला—वि. (ना.) खडबडीत. [खर]

खरदळणें—सक्रि. खंडविखंड करणें; खंडळणें. 'तुमतें खाणौनि काढैलु तरीं। ऐसें खरदळितुसें।' –शिशु १००३.

खरनखर— क्रिवि. सरतेशेवटीं. अखरनखर पहा.

खरप—स्त्री. भांडयाच्या तळाची जळ; मस; काजळ. [सं. खर्परी=एक प्रकारचें काजळ; करपणें]

खरप—पु. (ना.) शस्त्रें पाजळण्याचा एक दगड, निसणा. [सं. क्षर्; प्रा. खर]

खरंप—स्त्री. (राजा.) आंतडयांतील तिडीक, वेदना.

खरपट-ड—न. १ खडपा; पर्वताचे मोठे खडक परंतु प्रायः जे भाजल्यासारखे दिसत असतात ते. २ मुरूम, दगड यांनीं बनलेली जमीन; कातळवट जमीन. ३ डोंगरावरील सपाटी. ४ फोड (क्रि० येणें; उठणें). –वि. मुरुम व दगड यांनीं कठिण झालेली (जमीन). [खरपट]

खरपट-ड—न. १ (रिकाम्या विहिरीच्या बाजूला अथवा तळाला भांडें आपटल्यानें होणारा आवाज, त्यावरून) अडचणीची, दुःखाची, हालाची ओरड, हाकाटी (अवर्षणामुळें आणि त्यामुळें पीक न आल्यास उत्पन्न झालेल्या दुष्काळामुळें, तसेंच तळीं, विहिरी यांच्या कोरडेपणामुळें). २ दुष्काळ; अवर्षण. (क्रि० पडणें). 'एखादे सालीं खरपड पडलें...म्हणजे तितक्यानेंच त्यांची नुकसानी होते.' –बाळ २.१२८. 'खरपड पडलें अति दारुण । दोन पायल्यांची झाली धारण ।' [सं. क्षर्+पत्]

खरपड-डी—स्त्री. टोळांची एक जात; खरपुडा पहा.

खरपडी—खरपुडी पहा.

खरपणें—अक्रि. खरडून, ओरखडून, जोरानें काढणें; खरडणें; खरवडणें. [सं. क्षर्; प्रा. खर]

खरंपणें—अक्रि. (राजा) खरंप (आंतडयाचा) रोग होणें.

खरपर—वि. खाष्ट; कडक. 'येथिल दैवत रे बहू खरपरे कर्तृत्व खुणा अशा ।' –आमहाबळ ४४.

खरपवप—क्रि. (गो.) खाजविणें. [खरपणें]

खरपळी-पुळी—स्त्री. खरपुडी; सालपट; थापटी (वाळलेला चिखल, गवरी इ० ची).

खरपा—पु. बारीक सूत ओढण्याची पट्टी. –शर.

खरपाडणें—न. (बे. सुतारी) लांकूड तासण्याचा रंधा.

खरपी—स्त्री. १ भाजून दळलेल्या अगर वाटलेल्या धान्याचा एक पदार्थ. २ जळक्या भांडयाच्या बुडाची खरवड; मस. [सं खर्परी=एक प्रकारचें काळें]

खरपुंचें, खोपुंचें—क्रि. (गो.) खरपणें; ओरपणें; ओरखडणें; खाजविणें.

खरपुट—न. जनावराच्या पायाचा खूर. 'पुढिलें खरपुटें ठेवी कुंभस्थळीं दिग्गजांचां ।' –शिशु १००७. [सं. क्षरपुट]

खरपुडा—पु. टोळांची एक बारीक जात. हे जमिनीवर व कोवळ्या पिकांवर पडतात.

खरपु(पो)डी—स्त्री. १ वेगळा झालेला, सुटलेला तुकडा (झाड, भित, त्वचा इ० चा); खपली (जखमेची); पोपडा; साल; जळक्या भाताचा भांडयास लागलेला लेप. २ बगळा; करकोचा. ३ खरपुडा पहा. ४ खरतुडी पहा.

खरपूस—वि. १ खमंग; पिंवळसर व पिंगट रंग येईपर्यंत व खुसखुशीत, रुचकर होईपर्यंत भाजलेला, तळलेला (पदार्थ). २ (ल.) खडखडीत; स्पष्ट; खसखसीत; निर्भीड; दणदणीत (हुकूम); निक्षून केलेलें (भाषण) ठाम; खणखणीत (हुकूम). ३ कडक; खरमरीत (उपाय, योजना). 'व्रतें आचरे खरपुसें ।' –ज्ञा १६.९२. ४ चलाख; हुषार; साहसी (माणूस, स्वभाव). ५ परिपक्व (मसलत, विचार). ६ बोचणारा; झोंबणारा; तीक्ष्ण. 'पावोनि तै स्पर्श । मलयानिळु खरपुसु । येपें मानें पशु । कुरवाळणें ।' –ज्ञा १३.२८९. –क्रिवि. फार; अतिशयितपणें (जोर दण्यासाठीं योजतात). उदा० **०तापविणें**–लाल होईपर्यंत उकळणें, कढत करणें, तसेंच. **०भाजणें,तळणें, बोलणें,सांगणें** इ०. **०ताकीद करणें**–निक्षून सांगणें; बजावणें. **०समाचार घेणें**–१ यथायोग्य पारिपत्य करणें; उट्टें काढणें. २ बेदम ठोकणें; बदडणें.

खरपें—न. मातीचें ढेंकूळ, डिखळ. 'जे सात्विकाचेनि वडपें । गेलें आध्यात्मिक खरपें ।' –ज्ञा ६.४९०.

खरब—न. (व.) खडकाळ जमीन. खरबड पहा. 'गांवाला लागूनच खरब आहे.' खराब पहा. [अर. खराब्]

खरंबटी—स्त्री. खरमाटी पहा.

खरबठ्ठर—वि. (व.) मन वळविण्यास कठिण. 'तो खरबठ्ठर माणूस सांपडला.' [खरतर, खडतर]

खरबड—वि. १ खडबडीत; चढउताराची (जमीन). २ कांहीं पदार्थ चिकटून, लिडबिडून खडबडीत झालेलें (भांडें, हात, अंग इ०).

खरबडणें—अक्रि. (अन्न, कणीक, भात इ० नीं) गदळ होणें; बरबटणें. करवडणें पहा.

खरबडी(री)त,खरबडा, खरबुडीत—वि.ओबडधोबड; उखीरवाखीर; भसाड. **म्ह०** अळी ना वळीचा आणि खरबडया डोईचा.

खरबा—स्त्री. (कु.) डोकींतील मेलेली त्वचा

खरबा-बी—पुल्ली. (कु.) गोडया पाण्यांतील एक मासा.

खरबुजी—स्त्री. खरबुजाचा वेल. खरबूज पहा. –वि. खरबुजाच्या आकाराची (तपकिरीची डबी, मणी, चुनाळें इ०). **०चेहेरा**–पु. देवीच्या वणांनीं युक्त असा चेहरा; ओबडधोबड, कुरूप माणूस.

खरबूज—स्त्री. खरबुजीचा वेल व त्याचें फळ. कलिंगडाप्रमाणें याचा वेल वाढतो, व त्याचें फळ वाटोळें, तांबूस रंगावर असतें. २या खरबुजाचा आंतील भाग हिरवट असतो त्यास तरटी म्हणतात. फळाची भाजी, रायतें, कोशिंबीर वगैरे करतात. याच्या ८ जाती आहेत व सामाशी, अकरमाशी, बारमाशी असे काहीं प्रकार आहेत. 'तयापाशीं होतीं खरबुजें दोन। ती केलीं गुरुसी अर्पण।'–शनि २८०. [फा.]

खरमंजरी—स्त्री. अघाडा; अपामार्ग झाड. [सं.]

खरमरा-ऱ्या—वि. १ कठोर; खरखरीत; कठिण. २ प्रखर; रखरखीत. 'तेथ उन्हाळा आगी खरमरा।'–ज्ञा १६.३९५. ३ हुशार; खपाट्या; चलाख; खणखणीत. **म्हo** 'राऊत असे खरमरा तर घोडा चाले तरतरां'

खरमरीत—वि. १ तीक्ष्ण; तिखट; झणझणीत; जलाल (मिर्ची); प्रखर (ऊन, आग). निर्भीड; झणझणीत; सडेतोड (भाषण, टीका); तडफदार; अचंचल (उपाय, साधन); स्पष्ट; खडखडीत (बोलणारा माणूस).

खरमसळी—स्त्री. एक भाजी. खरसांबळी पहा.

खरमस्त—वि. १ पाणीदार; चलाख; तापट (घोडा). २ घमेंडखोर; गर्विष्ठ; हवेंत उडया मारणारा. [फा.]

खरमस्ती—स्त्री. १ माज; मद; मस्ती; रग (घोडयाची). २ गर्व; घमेंड; दिमाख; डौल. (क्रि० मोडणें; जिरविणें; पुरविणें), ३ (गो.) खर्मस्ती=अति हट्ट; दांडगाई.

खरमा(म)टी—स्त्री. एक झाड. हें उंच व बारीक असतें; ओमणाच्या उपयोगी पडतें.

खरमाल—स्त्री. (हेट. नाविक) शिडाची दोरी टांगून ठेवण्याची जागा.

खरव(वा)ई—स्त्री. (तांबट, सोनार) भांडयांना विशिष्ट आकार देण्याचा किंवा भांडीं ज्याऱ्यावर ठोकतात असा लांबट व चौरस गज, पहार. याला टोकाशीं वळण देऊन उभट ऐरणीप्रमाणें सोय केलेली असते.

खरवट—वि. खडबडीत; खरखरीत.

खरवड—स्त्री. १ पदार्थ शिजत अगर आटत असतां तळाला कठिण झालेला आणि भांडयांस चिकटून राहिलेला खरडा, जळकट भाग; (भाताचा, तुपाचा, दुधाचा); खरपुडी. 'भ्रतारासी करी झगडा। तया घाली खरवडी कोंडा।'–कथा ५.२४९. २ अशा रीतीनें चिकटून राहिलेला आणि खरडून निघण्याजोगा भात. **म्हo** कामाला मरावें खरवडीला जपावें=१ कामाला चुकार पण खाण्याला अखेरपर्यंत. किंवा २ खूप काम करून शक्य तों काटकसर करावी (उद्योगीपणा आणि काटकसर असावी). ३ ल.) खरडपट्टी; निर्भर्त्सना; ताशेरा; बोडंती. (क्रि०. काढणें). 'त्याची म्यां भली खरवड काढली.' ४ (ल.) संपत्तीचा शेष; किडुकमिडुक; गडगंज जाऊन उरलेला अवशेष. ५ निकृष्टता दाखविण्यासाठीं उपहासानें योजतात. उदा० 'मोळ-वेठा शहाण्याची खरवड–गाणाराची खरवड.' ५ (निंदाव्यंजक). अर्क; गाळ; अतिशय खोडसाळ, त्रासदायक माणूस. 'तो सर्व गांवाची खरवड आहे.' ६ (कु.) नारळाची खव, खरड. [सं. खरवृत्त; म. खरडणें; किंवा प्रा. खरड=लेपणें, लपेटणें]

घराची खरवड–खराब, पडकें; मोडकें गैरसोयीचें घर. (अशा मोडक्या घरास तुच्छतेनें म्हणतात). 'मेलं घर आहे कां घराची खरवड!'–फाटक नाटयछटा ३.

खरवड—पु. (कु. गो.) अति लहान मासा, मासळी.

खरवड्या न्हावी—पु. वाईट हजामत करणारा हजाम; अकुशल कारागीर.

खरवडणी—स्त्री. (कु.) खरवड अर्थ १ पहा.

खरवडणें—न. जिनें पदार्थ खरडून काढावयाचा ती वस्तु (शिंप, कलथा इ०). –उक्रि. खरडून काढणें; घासणें; साफ करणें; निरपणें; खवणें (शिंप, खवणी, नख इत्यादिकांनीं). [खरवड]

खरवत-ती—स्त्री. एक खरखरीत पानांचें झाड.

खरवत-ती—स्त्री. (गो. कु.) (सुताराची) करवत; अरकस. [करवत]

खरवशिंगाळा—पु. समुद्रांतील शिंगाळा माशाची एक जात.

खरवस, खरस—पुस्त्री. १ जनावरानें कोंवळें (व्याल्यानंतरचें) दूध तापवून त्यांत गूळ घालून तयार केलेलें खाद्य. [सं. क्षार+रस]

खरवस, खरस—पु. तहानेपासून अथवा फार बोलण्यामुळें तोंडाच्या कोंपऱ्या कोंपऱ्यांत जमणारा पांढरा फेंस; चिकटा. **०तोंडीं येणें**–अतिशय दमणें; श्रांत होणें. 'विस्मरणाची खरस तोंडीं।'–एरुस्व ११.५५. 'भाऊसाहेब यांचे तोंडास हाणा! हाणा! हेंच करीत असतां खरस आली.'–भाव १५१. [सं. क्षर–क्षार=रस]

खरविखर—वि. (प्रां.) चढउतार; उंचसखल. [सं.]

खरविणें—उक्रि. (कों.) खोल व भरपूर खोदणें; पूर्ण साफसूफ करणें; उपसा काढणें (विहीर, डबकें, गटार याचा).

खरशिंग-शिंगळ-गूळ-गळी, खरसांबळी(ळें)खरसमुळी—स्त्री. एक वेल; मेंढशिंगी; ही मोठी व गांठाळ असून पानें कडुनिंबाच्या पानासारखीं असतात. शेंगा पाऊण हात लांबीच्या असून खाण्याच्या (भाजीच्या) उपयोगी असतात. हिच्या लांकडाचे मृदंग व तबले करतात. शेंगेस खरशेंग म्हणतात. [सं. मेषशृंगी]

खरशी—स्त्री. गोडया पाण्यांतील एक मासा.

खरशी-सी—स्त्री. खरवस-खरस पहा. 'हातपाय जाहले गोळा, मुखां खरशी आलीसें।' –कथा ६.१५.५१.

खरस—१ खरवस पहा. २ (गो.) धाप; दमा.

खरसांबळी—स्त्री. एक वेल; आबई; कोयते वाल.

खरसिंग—न. एका प्रकारचें शिंगाचें वाद्य. 'खिनखिनितीं तुरेरिआं। खरसिंगेसी।' –शिशु ५२४.

खरसुंचें—अक्रि. (गो.) खरस येणें; दम लागणें.

खरळखोंचर—पु. १ छिद्र; खांच खळगा. २ (ल.) दोष. –वि. (कों.) खांचखळग्याची; लहान लहान खळग्यांनीं युक्त. [खळी+खोंचर]

खरळा—पु. बोथट व जाड धारेचा विळा.

खरा—वि. १ सत्य; खोटें नव्हे असें. **म्ह०** खऱ्याला काय मरण आहे. २ अस्सल; अकृत्रिम; बनावट नसलेलें; शुद्ध. ३ चांगलें; हिणकस नसलेलें; बिन भेसळीचें (नाणें, मौल्यवान वस्तु). ४ सच्चा; विश्वासु; प्रामाणिक; निष्पाप; लबाड नसलेला. ५ बरोबर; सरळ; दोरीसुत (तयार केलेला, बसलेला खांब, तुळई). 'दहा खांब खरे झाले तितक्यावर बहाळें चढवा.' ६ संपूर्ण; बरोबर; पुरेपूर; चालीस अनुसरून; वतावळयासह किंवा वाढीसह. जसें–पंचोतरी आणि सळईसह कडब्याची किंवा शेकडयापाठीमागें १०, १५, २०, सहित आंब्यांची खरेदी. ७ ठाम; निश्चित; कायम (करार इ०). (क्रि० करणें). ८ न्यूनतारहित; पुरेपूर (वजन, परिमाण). –क्रिवि. बरें तर! निदान एवढें तरी असुं दे! निदानीं. 'तूं त्याला बोलाव तर खरा, तो येओ न येओ.' [सं. खलु; गु. खरूं?]

खरा—पु. १ एखाद्या अम्लांत भिजत घालून तांबडा केलेला किंवा कुंकू तयार करण्याकरितां सालपट काढलेला हळदीचा तुकडा, कुडं; गंधाचा रवा. जसें–हळकुंडाचा खरा, कुंकवाचा खरा, खडा. २ पुटकुळी; कातरा; उष्णतेमुळें तोंडांत येणारा फोड. ३ कोइती वगैरे शस्त्रांचे दांते प्रत्येकीं. ४ खडा. 'निश्चयाचा खरा। गांठीं बांधवीरा' –ज्ञा १४.१२८. [खडा. सं. खर. ध्व. खर] (वाप्र.) **०करून देणें**–खरा व अस्सल आहे म्हणून सिद्ध करणें; चांगलेपणा पटवून देणें. **म्ह०** खऱ्याखोटयामध्यें चार बोटें अंतर आहे.=डोळा व कान यांच्यामधील अंतर. सामाशब्द– **०खुरा-खोरा**–वि. निश्चयेंकरून जो खोटा नव्हे तो; खरोखर खरा; अगदीं वास्तविक; सत्य; न्याय्य; विश्वासु; खरोखर पहा. **०खोटा**–वि. खरा आणि खोटा. **खरारोकडा, खऱ्यारोकडयाचा**–वि. खरा आणि खाश्रीचा; सच्चा आणि अस्सल; प्रामाणिक आणि मोकळया मनाचा; खरा आणि वास्तविक (माणूस, वस्तु, वर्तन).

खराई—स्त्री. १ सत्यता; खरेपणा; वास्तविकता. २ प्रामाणिकपणा; इमान; नेकी. ३ शुद्धपणा; अस्सलपणा. ४ नीटनेटकेपणा; बरोबरपणा; दुरुस्तपणा. [खरा+ई प्रत्यय]

खराई—स्त्री. वीर्यांश; धातुरोगांत जाणारी वीर्याची खर. खर पहा. [सं. क्षर्. म. खर]

खराखर-रां—क्रिवि. ओढलेल्या, फरफटत नेलेल्या पदार्थापासून आवाज होऊन, आवाज करून. खरखर पहा.

खरागणें—सक्रि. १ ऊन होणें. 'नातरी खरागलेया पाये। डोळयांची दृष्टी जाये।' –ज्ञाप्र २१९. २ (कु.) करपणें.

खराच-चा—पु. (सांकेतिक) घरफोडीचें एक हत्यार. –गुजा.

खरांट, खराट—न. १ राडेरोडे. गाळसाळ; अवशिष्ट सामान. २ (कु) टक्कल. खरड पहा. –वि. १ नापीक; अनुत्पादक; अफलद (जमीन, प्रदेश). २ पर्णहीन; खरांटलेलें; बोडकें (झाड, झुडुप). ३ पडलेल्या इमारतींचें; गाळसाळ उरलेलें (सामान=विटकरीचे, कौलांचे, चुन्याचे तुकडे, राडेरोडे, माती इ०. इमारत बांधल्यावर उरलेलें). [खराटा]

खरांटणें—अक्रि. खराटा होणें; पानें झडणें, गळणें (झाडाझुडपांचीं).

खरा(रां)टा—पु. १ नारळी, पोफळी, तूर इ० च्या हिरांची अगर बांबूच्या पात्यांची किंवा तुकडयांची केलेली केरसुणी. 'तुआं खांडेआं खरांटेनी। दानवप्रतापु करू फेडौनी।' –शिशु १५८. २ झिजलेली (नुसता बुडखा राहिलेली) हिरांची केरसुणी. ३ पानें गळलेलें झाड; वठलेलें झाड. ४ (ल.) दुष्काळ; पूर्ण अभाव; तूट; तोटा. 'तैसें आपणपें नाहीं'दिठे। जयातें स्वसुखाचे सदा खरांटे।' –ज्ञा ५.११२. [सं. क्षर्; प्रा. खर+यष्टि? –भा.अ. १८३४] (वाप्र.) **०फिरणें**—अक्रि. सर्व नाश होणें; विध्वंस होणें. 'तेथें खराटा फिरला आहे.' **०फिरविणें**–नांगर फिरविणें; विध्वंस करणें; सत्यानाश करणें (देश, ग्राम, संपत्ति इ०चा).

खराड—पु. जोरानें फाटणें, खरवडणें; कडाडणें; गडगडणें. [ध्व.]

खराडा—पु. (कु.) गुरांची प्रसूतीपासून सुटका करणारा गांवठी वैद्य.

खराडी—स्त्री. (व.) खार; चानी.

खराडी—स्त्री. १ (खा.) अंबाडीच्या वाखाचा दोर वळण्याचें साधन. २ (खा.) विहिरींतून पाणी वर काढण्याची कप्पी. [ध्व.]

खराणा—वि. (कों.) गरम; उष्ण (दिवस, महिना यांशीं जोडून अव. प्रयोग). जसें–खराणे दिवस=उष्णकाळचे दिवस. (उन्हाळयांतील तीन महिन्यांच्या दिवसास म्हणतात. [सं. खर]

खरादणें—सक्रि. कातणें. 'एक तोळा खरादलेली अगर कातरलेली श्रीवर्धनी सुपारी.' –ऐरापु प्र. २.३९. [अर. खराद्= कातकामाचें यंत्र]

खरादी—पु. कातीव काम करणारा; अरकसी. [अर. फा.]

खराब—वि. १ नापीक; उच्चस्त; ओसाड (जमीन, प्रदेश) 'इकडे गुदस्तांच दंग्यामुळें खेडीं खराब होतीं.' –खरे २.८५०.२ बुगुर्णी; विकृत; बिघडलेला; वाईट (वस्तु, माणुस). [अर. खराब्] ०करणें–(रुपये-पैका-पैसा)=व्यर्थ उधळणें. ०हाल–वि. दुर्दशाग्रस्त; विपन्न 'येथें आम्ही खराब-हाल आहों.' –जोरा ४.

खराबा—पु. १ नापीक, टाकाऊ जमीनीचा, शेताचा तुकडा. रेताड, ओसाड जमीन. २ (नाविक) उथळ पाण्याच्या तळाशी असलेला खडक; समुद्रांतील खडक. हा गलबतांना नडतो. ३ नुकसान; तोटा. 'फार दिवस लश्करास ताकीद केल्यानें खराबा होईल.' –रा ६.५९१. 'मोंगलाचा खराबा करावयाचा तितका त्यांनीं केला.' –सूर्यग्र १४६. ४ (कुलाबा) अलिबाग तालुक्यांत अष्टागर प्रांतांत गांवठाणास स्वतंत्र जागा राखून ठेवण्यांत आलेली नसते. बागायतीच्या जागेंतच थोडी राहाण्यापुरती जागा बांधून खातेदार राहातो. या घराखालील जागेला खराबा म्हणतात. व ती जमीन महसुलांतून १९२८ पर्यंत वगळली गेली होती –के ४.१२.२८. [अर. खराब् फा. खराबा]

खराबी—स्त्री. नुकसानी; तोटा; हानि; दुर्दशा; हलाखी. 'तुमच्या लश्करची खराबी इराणीस कळली.' –पाब ३२. 'लुच्चे लोकांच्या नादीं लागल्यास फार खराबी होईल.' –विक्षिप्त १.७२. [फा.].

खरारणें—अक्रि. खरखर आवाज करणें; जोरानें फाटणें; खरखरणें, खराड पहा. [ध्व]

खरारा—पु. १ घोडयाला खाजविण्याचें, त्याचें अंग साफ करण्याचें एक साधन. २ घोडयाला खरारा करणें, खाजविणें, मालिश करणें. [ध्व. खर; हिं.] (वाप्र.) **खरारा खाजवीत नगारा वाजवीत**–कांहीं तरी करीत (येतो, फिरतो). **गाढ्याचा खरारा**–मूर्ख माणूस. –क्रिवि. खडखडत; ओरखडत; खरारा वाजविण्याप्रमाणें आवाज करून. खराड, खरारणें पहा.

खरारी-ळी, खरारळ—स्त्रीपु. (कों.) लहान कोयती; गवत कापण्याचा लहान विळा.

खराव—पु. १ (क.) खालीं आलेल्या, तोकडया पडलेल्या, अशा खांब इ० स उंच करण्यासाठीं खालीं अगर वर जो लांकडाचा तुकडा देतात तो. 'ह्या खांबास चार आंगळें खराव दिला म्हणजे सर्वांबराबर येईल.' २ ही खराव देण्याची क्रिया. ३ ह्या खराव देण्यामुळें वाढलेली (खांब इ० ची) उंची. 'खांबास चार आंगळें खराव देतांच बाहालासही चार बोटें खराव आला.' [हिं. खडा= उभा; खडाव?]

खरावणें—अक्रि. कायम, स्थिर, निश्चित होणें; वाढणें; टिकणें (वारा; उष्णता; पाऊस इ०). 'वारा खरावेल तेन्हां गलबत चांगलें चालेल.' खराविण पहा. [खरा]

खरावणें—अक्रि. आरक्त, लाल होणें (डोळे). 'त्याचा डोळा खरावला आहे.' [खर]

खराविणें—उक्रि. विसरूं नये किंवा उलट खोळं नये म्हणून एखादी गोष्ट पुनःपुन्हां समजावून सांगणें; जोरानें, ठसठशीत, मनावर ठसेलसें बोलणें; खरमरीत ताकीद करणें; जोरानें बजावणें; बारकाईनें व छानून विचारणें. [खरा करणें]

खराविणें—उक्रि. (राजा.) चांगला साफ करणें; सपाटून खोल करणें (पाण्याचा पाट, विहीर, तळें वगैरे). [सं. क्षर्; म. खर]

खराळणें—अक्रि. (व.) गडगडणें; खरखरणें; आवाज करणें; वाजणें. खरारणें पहा. 'आभाळ खराळतें.' 'पोट खराळतें.' [ध्व.]

खराळा—पु. १ (व. ना.) खरारा. २ गाडी वगैरे वाहनांचा दुरून ऐकूं येणारा आवाज. [खरारा]

खरिदी—स्त्री. १ विकत घेण्याची क्रिया. २ विकत घेतलेला माल. ०झाप–पु. झापांच्या विक्रीवरील सरकारी कर. खरीद पहा.

खरिपी-फी—वि. १ खरीप पिकासंबंधीं. २ खरीप पीक येणारी (कोंकणासारखी जमीन, प्रांत). [खरीप]

खरी—स्त्री. (कों.) कातळावर माती टाकून बनविलेली शेतजमीन; साधारण सपाट कातळावर, बाहेरील माती ६–१० अंगळें जाड इतकी पसरून कुडयाठा प्रमाणें तयार केलेल्या लहान लहान तुकडयांचा समुदाय. ही भातजमीन असते. हिची दरसाल भाजावळ करावी लागते, किंवा कुटी वगैरे खत घालावें लागतें. [खरीप]

खरी(रे)द-दी—स्त्री. क्रय. खरिदी पहा. 'त्याला बाजारांतून कांहीं जिन्नस खरेदी करावयाचे होते.' –कोरकि ९२. –वि. विकत घेतलेलें; क्रीत. [फा. खरीद] ०फरोक्त-क्ती–पुस्त्री. क्रयविक्रय; विकत घेणें–विकणें. 'खरेदी-फरोक्तास समुद्रांत हिंडतात.' –वाडसमा २.६६. 'माल घेऊन यात्रेप घेऊन खरीदी-फरोक्ती करणें.' –रा ७ १०६. ०खत, पत्र–न. विकेल्यापासून विकत घेणारानें मालकीहक्कासंबंधीं लिहून घेतलेला कागद; विकत दिल्याबद्दलचा लेख. ०दार–वि. विकत घेणारा. 'परंतु त्या घरास कोणी खरीद्दार होत नाहीं.' –रा १२.१८२.

खरीद्णें—उक्रि. खरेदी करणें; विकत घेणें.

खरीप-फ—पु. १ कार्तिकांत तयार होणारें पीक; पहिलें पीक; पावसावरील पीक; गुजराथेंत याला चौमासी पीक म्हणतात.

'अश्विन मासी गारा पडल्या, खरीफ बुडालें.' –रा ३.१६४. २ खरीपाच्या हंगामांतील धान्य; पूर्वधान्य (मूग, मटकी, बाजरी इ०). [अर. खरीफ]

खरीप—न. १ राडेरोडे, गोटे इ० भर घालण्यासाठीं वापरतात तें; खडी, लहान दगड वगैरे. २ पडलेल्या इमारतीचे लहान सहान दगड, विटा, कौलें, माती इ० सामान; विहीर, खड्डा, यांतून खणून काढलेला वरच्यासारखा माल, डबर. (कों.) ३ उथळ जमीन; सपाट जमीन. –स्त्री. पडित जमीनीची लागवड. खरी पहा. [खर]

खरुखरा—अ. खरोखर. 'मनमुराद धन खरुखरा।' –अमृत ५३.

खरूज—स्त्री. १ कंडू, खाज सुटणें, इ० चा रोग; एक त्वचेचा रोग; ह्या रोगाचे किडे कातडीखालीं अगदीं लहानसा खळगा करून राहतात. त्यांत मादी अंडीं घालून तेथेंच मरते. अंडीं लवकरच उबून नवे जीव तयार होतात. ही क्रिया होतांना फार खाज सुटते व खाजवून खाजवून तेथें लहान लहान फोड येतात, ते फुटले म्हणजे हे नवे जीव कातडीवर येतात. खरूज सांसर्गिक रोग आहे –प्राणी आणि आरोग्य ६१. खरजेवर औषध–आडुळशाचीं कोंवळीं पानें व हळद हीं तुळशीच्या रसांत अगर गोमूत्रांत वाटून तो लेप तीन चार दिवस द्यावा. –योर २.३६९. २ (ल.) द्वाड. [सं. खर्जू] **कांडळून-खाजवून खरूज काढणें**–आपल्यावर संकट अथवा अनर्थ ओढवून घेणें; भांडण उपस्थित करणें; शत्रूस जागें करणें.

खरूस—पु. कुणबी स्त्रियांच्या डोकींतील एक चांदीचा राखडीसारखा दागिना.

खरूस—पु. खरवस (कोंवळ्या, नव्या दुधाचा); चीक. [खरस]

खरे—पुअव. १ उष्णतेमुळें जिभेवर येणारे कांटे, पुरळ खरा पहा. 'खरे पडसा आणि खोकला। या नाव आध्यात्मिक.' –दा ३.६.३३. २ कोयती किंवा खराळी हिचे दांते.

खरे—उद्गा. (कु. हेट) गप्प रहा.

खरें—वि. (व.) दाट; घट्ट. –विवि ५९.३–४.

खरेंच—क्रिवि. खरोखर; अर्थात; बरोबर. 'अरेरे? खरेंच, तिकडे जायला मी विसरलों.' [खरा]

खरेंचा—वि. खरोखरचा; खरा; वास्तविक. ह्याच्या उलट **लटपुटचा**. [खरा]

खरोखर-रीं-रें, खरूखर—क्रिवि. निश्चितपणें; निःसंशय वस्तुतः; निखालस; खात्रीनें.

खरोखरा—वि. (खरा याच्या अर्थाला जोर येण्यासाठीं द्वि.) अगदीं खरा; न्याय्य; आधारभूत. खराखुरा पहा.

खरोटा—पु. (कातवाडी) एक खवल्या मासा.

खरोड—स्त्री. खरवड पहा.

खरोडा—पु. १ पोटांत पडलेली आग (उपास, ताप यांपासून). (क्रि० पडणें). २ (खरवडण्याची जरूरी भासते अशी स्थिति) दुष्काळ; खडखडाट; खरड; संपुष्टांत येणें. 'दाण्याला–कोठाराला–पाण्याला–विहिरीला खरोडा लागला.' ३ खरवड (भांडीं, इ० कांची). ४ खरचट्टन, घांसून निघालेली कातडी. (क्रि० काढणें; निघणें). [खरडणें]

खरोष्ण—वि. १ अतिशय उष्ण. २ जहाल; तीव्र, तीक्ष्ण [सं. खर+उष्ण]

खरोस—पु. खरवस (दुधाचा) पहा.

खर्कशा—पु. तंटा; कलह; गर्गशा. 'तुळाजी आंग्रे हमेश मुंबईकरांशीं खर्कशा व मुखालिफत करूं लागले.' –ख ७.३५६५. [अर. कर्कश]

खर्क(र्ख)णॅा—पु. (गो) सुगाऱ्या गोळा करण्याचें पात्र; बांबूच्या सऱ्यांचें गोलाकृति पात्र.

खर्खर-रा—स्त्रीपु. १ खुरखुर; खंत; हुरहुर; उत्कंठा; खरखरा पहा. २ मनांतील शंका. 'खर्खर खुर्खुर खुंटले.' –दा १४.४.३१. [ध्व. खरखर. फा. खार्खार=अस्वास्थ्य]

खर्खरीत—वि. (गो.) खडबडीत; खरखरीत पहा.

खर्ग—न. तरवार; खड्ग पहा. 'पाणिग्रहण ब्राह्मणांसी। खर्गलग्न क्षत्रियांसीं।' –एरुस्व ४.४३. 'शांती खर्ग हाती। काळासी ते नागवती।' –तुगा २४१८. [सं. खड्ग]

खर्च—पु. १ व्यय; वेंच; उपभोग; विनियोग. विनियोग केल्यामुळें संपण्याची क्रिया. 'या लग्नास हजार रुपयांचा खर्च झाला.' 'दाहा समयांचा मंडपांत लावल्यामुळें खर्चे झाला, परंतु आणखी दोन असाव्या.' २ उपयोगी लावलेला, व्यय केलेला पैका, सामुग्री, सामान. ३ (कायदा) दाव्याला लागलेली रकम; पदरमोड. ४ (हिशेब) दुसऱ्याकडे रोख अगर अन्य रूपानें गेलेली रक्कम. जमेच्या उलट बाजू; जावक रक्कम. ५ (ल.) लढाईंत पडणें; मृत्यु येणें. 'चार पुरुष खर्च झाले.' –रा ३.५१७. [अर. खर्च; फा. खर्च] (वाप्र) **खर्चास शेंडी फुटणें**–ठरविलेल्या अंदाजाबाहेर खर्चाची रक्कम जाणें; खर्च वाढणें. **खर्ची पाडणें-घालणें**–खर्च झालेला दाखविणें. 'बिलें मुदतशीर करून त्याचा खर्च पाडून रक्कम आदा करणें.' –ऐरापुविवि २३९. **खर्चीपाडणें**–(कोणेकास) तो आपणास पाहिजे ती गोष्ट बोले असें करणें. **म्हण** खर्चेणाराचें खर्चेतें आणि कोठावळ्याचें पोट दुखतें=आपण स्वतः औदार्य दाखवावयाचें नाहीं तें नाहीं आणि दुसरा कोणी औदार्य दाखवीत असला तर त्याच्या आड यावयाचें. सामासशब्द– **०पट्टी**–स्त्री. १ सर कारी कामगारांचा किंवा मोठ्या लोकांचा गांवांत मुक्काम असतां

त्यांचा खर्च भागविण्यासाठीं बसविलेला कर. २ गोसावी लोकांची टोळी आली असतां त्यांचा किंवा एखादी नैमत्तिक गोष्ट घडली असतां ती भागविण्यासाठीं बसविलेली वर्गणी. ०बुडीत–पु ज्याचा मोबदला मिळत नाहीं असा. उदा० –भोजनखर्च. 'लग्नांत बुडीतखर्च नुसता एक हजार रुपये आला.' ०वेंच–पु. १ एकंदर खर्चास सामान्यपणें संज्ञा; खर्च वगैरे. २ मालाची मूळ किंमत व त्यावर इतर झालेला खर्च. [फा. खर्च+वेच] ०शिल्लक–स्त्री. खर्चेल्यानंतर राहिलेली बाकी; हातांत शिल्लक.

खर्चक, खर्चींक––वि. १ उदार; सढळपणें खर्च करण्याचा ज्याचा स्वभाव तो; दाता. २ फाजील खर्च करण्याचा ज्याचा स्वभाव असा; उधळ्या. [फा. खर्ची]

खर्चणें—उक्रि. १ खरचणें; वेंचणें; व्यय करणें; सरविणें; घालविणें. २ पैसा देणें; खर्च होईं असें करणें. ३ उपयोगी लावणें चालविणें (बुद्धि, शहाणपणा). ४ हरण करणें; घेणें. 'मूर्च्छित करि भीमा ते इतरांचे तो पळें असुं खरचिता।' –मोकर्ण ४५.४.

खर्चा—पु. (ना.) वाटखर्च. खर्ची पहा.

खर्चाटी-डी—स्त्री. (गो.) लहान खर्ची.

खर्चाळू—वि. १ (नवीन) ज्यांत अतिशय खर्च होतो अशी. 'सक्कर धरणासारख्या खर्चाळू योजना ...' –टिळक हायस्कूल मासिक, जानेवारी १९३०. २ खर्चिक; खर्च करण्याचा ज्याचा स्वभाव आहे.

खर्ची—स्त्री. १ योजलेल्या कामासाठीं घेतलेला आगाऊ पैका; वाटखर्च. 'गंगु हैबती म्हणे स्वार पीटावा। ल्याहा कागद खर्ची बढावा॥' –प्रला १४०. २ खर्चण्यासाठीं लागणारा पैसा. 'ही दर मुकामीं खर्ची धाडी शिंद्याला।' –ऐपो ४३३. ३ कामगारांना आगाऊ दिलेली रक्कम (ॲडव्हान्स या इंग्रजी शब्दाला प्रतिशब्द). ४ वेड्यास सभोंगाकरितां यावयाचें द्रव्य. ५ पोटगी; उपजीविकेसाठीं रक्कम, तरतूद. –वि. १ रोजच्या उपयोगी किंवा चालू कार्यापुरता उपयोगी; सामान्य; खासगी; साधारण. खाशांच्या उलट. 'खासे व खर्ची मुदपाकाकरितां चुली.' –स्वारीनियम (बडोदें) ७४. 'खर्ची पानें.' २ खर्चलेला, लढाईंत पडलेला. ३ खर्चानें पिळून निघालेला; खर्चाच्या ओढचणींत सांपडलेला. 'मी ह्या कामांत खर्ची पडलों.' –मोल. [फा.] ०पडणें–खर्च होणें. ०पाडणें–खर्च करण्यास, यावयास लावणें; खर्चांत टाकणें.

खर्ची—स्त्री. (ना.) चोप; मार.

खर्ची—स्त्री. (गो. कु.) एक मासळीची जात. हा मासा रेतींत फिरणारा, हिंडणारा, चवदार, सफेत रंगाचा असून याचें तेल घायावर वापरतात.

खर्ज—पु. (संगीत) गायनांतील एका सप्तकाचें–सुराचें नांव. खरज पहा. 'खर्जास मागें ध्वनि एक सारी।' –अर्वाचीन २३४. [सं. षड्ज; ध्व. खर]

खर्जू-खोरजू—पु. (गो.) खरूज; कंद. [सं. खर्जू] **खर्जुबाळो**–वि. खजुडा.

खर्जूर—पु.. खजुरीचें झाड व तिचें फळ. खजूर पहा. [सं.] **खर्जूरासव**–न. खजूर ३२० तोळे घेऊन १०२४ तोळे पाण्यांत शिजवून गाळावा. नंतर धूपानें सुवासिक केलेल्या धागरींत भरून त्यांत योग्य प्रमाणांत शेरणी व धायटीचीं फुलें घालून धागरीचें तोंड बंद करून ती १४ दिवस जमिनींत पुरून ठेवावी, म्हणजे आसव तयार होतें. हें क्षय, सूज, पंडुरोग कावीळ, पांच प्रकारचा संग्रहणी, गुल्म यांचा नाश करतें. –योर १.५८३.

खर्जूरी—स्त्री. खजूरी; खर्जूर. [सं.]

खर्डा—पु. १ कच्चें टिपण; मसुदा. खरडा पहा. 'या ग्रंथाचा खर्डा मंडालेच्या तुरुंगांत प्रथम लिहून काढला.' –गीर ८६. २ फाडेबोर्ड; पुठ्ठा. ०चा खर्डा–वि (ना.) लांबलचक.

खर्डूल—स्त्री. (गो.) टक्कल पडलेली स्त्री. [खरड]

खर्ण, खर्न—न. (गो.) ईश्वरी कोप. [सं. क्षरण]

खर्पर—पु. १ मातीचा परळ. २ खापर; माठाच्या खालचा भाग; भिक्षापात्र किंवा शेगडीप्रमाणें उपयोगी पडणारें खापर. खापर पहा. [सं.] ०सूत्र–न. एक कृत्रिम धातु. [सं.]

खर्पा, खर्बा बांगडा, खुर्बी—पु. एक लहान मासा.

खर्बूज—न. खरबूज पहा. [फा. खर्बूझ]

खर्मेवर्मे—न. व्यंग; वर्मे; दोष; चूक; दुष्कृत्य; घिंग; काळेबेरें. (सामा. अव. प्रयोग) खर्मेवर्मे. (क्रि० काढणें; सांगणें; उच्चारणें; बोलणें), 'तुला लोकांचीं खर्मेकर्मे काढावयास कोणी सांगितलें?' [सं. कर्मेवर्मे]

खऱ्याचें खांड—न. खोटें बोलणारा मनुष्य. [खरा+खांड=तुकडा]

खर्व—वि. १ खुजा; बुटका; ठेंगणा. २ (ल.) अगदीं बालक; अडाणी; अजाण. 'खर्वे मी दास, कीं सर्वे चिंतालया।' –आसेतु ३१. –वि. एक हजार कोटी; दहा अब्ज संख्या. [सं.]

खर्व—वि. घोडयाचा एक प्रकारचा रंग; खिसमिससारखा रंग. –अश्वप १.३०.

खर्वट—न. बाजार भरत असलेलें गांव. 'खेट, खर्वट, ग्रामीं, पुरीं। भिक्षा करावी यथाप्राप्त।' –एभा २३.४९७. [सं.]

खर्वड—न. (गो.) खरवडून काढलेला, तासून काढलेला भाग; खरवडण्यास योग्य असा भाग; खवळ. 'तुरुत्याचें एक खर्वड पासून मेळूंना.' [खरवडणें]

खल—पु. १ चूर्ण करण्याचें धातूचें किंवा दगडाचें पात्र. 'चूर्ण करील तुम्हाला धर्म बता भंगवेश हा खल हो।'—मोभीष्म १.२१. २ (खान.) सोनाराची पाणी ठेवण्याची दगडी, कुंडी. ३ खलांत चूर्ण करणें, कुटण. (क्रि० करणें). 'चौसष्ट दिवस पिंपळीचा खल करावा, तेव्हां चौसटी पिंपळी होती.' ४ (ल.) चर्चा; घोटणी (क्रि० करणें). —वाक्यवृत्ति ५२८१. [सं. खल्ल]

खल—वि. दुष्ट; दुर्जन; नीच; पापी; हलका. [सं.]

खल—पु. धान्य मळण्याचें खळें. [सं.]

खलक—वि. (गो.) १ प्रस्थ. २ लचांड.

खल(ळ)क—वि. १ फितुरी; कारस्थानी. 'कित्येक खलक उगवावें। राजकारणांमधें॥' —दा १९.९.१८. 'खलकं समजों जास्ती (=शिक्षा) केल्यावेगळ सोडणार नाहीं.' —रा ८.२५. २ नीच जातीचा; गैरमातबर. 'गोरगरीब खलक चीजवस्त घेऊन सोडून दिले.'—मराठेशाही ७२. [अर. खल्क्. तुल० सं. खलएव खलकः]

खल(ळ)क—पु. १ लोक. 'उदयी खळक कुल बारदेशाकडे जातील.' —रा ८.२२. २ (गो.) झुंड; थवा. [अर. खल्क=लोक, सृष्टि] ०**दुनिया**—स्त्री. सारें जग; विश्व; तमाम जग. [अर. खल्क+फा. दुनिया]

खलकत—न. (व.) जमाव, मंडळी. 'त्याच्या घरीं खलकत जमले आज.' [अर. खिलकत्=लोक, जग]

खलखंदा—पु. कुटुंब, अनुयायी, जमीनी, घरें, गुरें वगैरे; आश्रित; मालमत्ता; (सामा.) ससाराचा मोठा खटला. [फा.]

खलखंदा—पु. खेलखाना पहा.

खलखलणें—अक्रि. चडफडणें; तडफडणें; चिडणें. [ध्व.; हिं. खलखलाना]

खलखला—वि. त्रासलेला; चिडलेला. [ध्व.]

खलखलाविणें—उक्रि. खोडया इ० करून त्रास देणें; सळो का पळो करून सोडणें; त्रासविणें.

खलखाना—पु. खेलखाना पहा.

खलणें—क्रि. १ खलात घालून मळणें, चूर्ण करणें, बारीक करणें; घोटणें. २ (ल.) विचाराचा विषय मनांत घोळून घोळून दृढ करणें. [खल]

खलबत, खल्बत—नस्त्री. एकांत; गुप्त मसलत; कारस्थान; गुप्त=याशीं एकांतीं केलेला विचार; बेत; डाव. (क्रि० करणें). 'वाड्यांत सुभ्यांची खलबत,' —ऐपो २३१. 'दोन घडीपावतों खल्बत केली' —पदभव ७४. [अर. खल्बत्=गुप्तता, एकांत] ०**खाना**—पु. एकांताची खोली; खुसलखाना.

खलबता-त्ता—पु. खल आणि वत्ता; घोळणें, उखळी आणि दस्ता. [खल+वत्ता; का. कलबत्ते]

खलबल—स्त्री. १ खलबळ; गलबल; आरडाओरड. २ दंगा; बंडाळी. ३ मनाचा क्षोभ; उद्वेग. [ध्व. हिं.]

खलबलणें—अक्रि. १ आरडाओरड, दंगा करणें. २ मन भडकणें, क्षुब्ध होणें. [खलबल]

खलयज्ञ—न (शेतकऱ्यांचा विनोदी शब्द) धान्य मळावयाच्या वेळीं खळ्यावर घालावयाचें जेवण, या जेवणांत कोंबडीं, बकरीं इ० मारतात. [सं. खल; म. खळें+यज्ञ]

खलल—खलेल पहा.

खलघी—वि. खलळेलें; खलून तयार केलेलें; खलांत घोटलेलें (औषध इ०). [सं. खल्ल]

खलशा—पु. १ खंड; अंतर. 'आमची दोस्ती आणि इतेहाद पूर्वीपासून जो आहे त्यांत खलशा न यावा.' —रा ५.३०. २ संशय; किल्मिश. [फा. खलिश्]

खला—अ. (बे.) कोण?

खलाटी-ठी—स्त्री. १ गांवाखालीं असलेली शेतजमीन, भातजमीन; शिवार. २ खालाठी; सखल जमीन. 'मुरुडची खलाटी लहान आहे.'

खला-मला—पु. खरीमैत्री; स्नेह. —जोरा ११९. [अर.]

खलाली—स्त्री. (कु. नाविक) १ समुद्रांतील उथळ पाण्याच्या तळाशीं असलेला खडकाळ भाग. २ खडकावर समुद्राचें पाणी आपटल्यामुळें होणारा आवाज; पाण्याची ओढ. [ध्व.]

खलाशी-सी—पु. १ नावाडी; नाखवा; गलबतावरील तांडेल सोडून इतर नोकर; जहाजावरला मजूर. २ तोफखान्यांत तोफा ओढण्यासाठीं ठेवलेला नोकर; गोलंदाज. 'तीन हजार खलाशी संग राव पगार खाई.' —ऐपो ४६४. [अर. खलासी]

खलास—वि. १ सरलेला; खर्चल्यानें गाहींसा झालेला; वेंचलेला; खतम. २ शेवटास गेलेला; संपलेला; पूर्ण झालेला; समाप्त. ३ मुक्त; सुटलेलें; मोकळें झालेलें. 'बहुत खुशवक्त जालें कीं जबर्दस्ताच्या चुगालांपासून गरिबाचें वतन खलास जालें.' —रा २०.४९. [अर. खलास्=मोकळें]

खलिता, खरिता—पु. १ थैली; लहान पिशवी. 'साखर खलिते दोन शेर.' —रा ३.३२८. २ जिच्यांत अमीरउमरावांस पाठविलेलीं पत्रें बंद करतात ती रेशमी पिशवी. 'दामाजीपंतानें रसद पाठविली। खलितीं ओतिली अजैदास्त।' ३ पत्र; राजपत्र; आज्ञापत्र. 'ऑ मुकदम्याविषयीं पार्शी पत्रें खरिता तयार झाला म्हणजे पाठवून देऊं.' —रा ५.३८. [अर. खरीता]

खलिपत—स्त्री. खिलाफत; खलिफाचें काम व हुद्दा. [अर. खिलाफत्]

खलिपा-फा—पु १ मुहम्मद पैगंबराच्या गादीवर बसणारा धार्मिक, राजकीय आणि सर्वाधिकार असलेला (विशेषतः) तुर्की

पंथाचा मुसलमान राजा; मुसलमान धर्मगुरु. २ वस्ताद; तालीम मास्तर. ३ वाजंत्र्यांचा मुख्य. ४ (ल.) (हिं.) आचारी, शिंपी इ० [अर. खलीफ]

खली-ल्ली—स्त्री. डेप; पेंड. [सं. खल; हिं. खली]

खलीकडे—अ. (बे.) कोठें? 'तो बैल खलीकडे गेलाया.' [सं. क]

खलीत—वि. खंडित; थांबेलला; थांबविलेला; तहकूब केलेला; खललेला. [सं. स्खलित]

खलीन—पु. लगाम. 'आस्तिक शपथ अहीचें कीं हरिचें आवरी बल खलीन।' —मोविराट १.६९.

खलेटला—अ. (बे.) कुठला?

खलेतां—स्त्री.पत्राची पिशवी.खलिता पहा.'दामाजीपंताच्या नांवें अजदास्त। लिहून खलेती मुद्रा केली।' —तुगा ४४३६ 'खलेती लहान देखोनि नयना। संशय मना वाटतसे।' —भवि ४०.१३१.

खलेल—स्त्री. (खलल). १ खंड. २ प्रतिरोध; व्यत्ययः अडथळा; हरकत. 'तुम्ही मुतावीक होऊन अंमलास खलेल कराल तरी न करणें.' —रा ८.१८०. ३ दांडगाई; उद्धट, उनाड, वर्तणूक; खलेल माणसाची वागणूक. ४ स्वैरता; हट्टीपणा; अडेलपणा (मूल, चाकर, घोडा यांचा). ५ तुसडेपणा; खाष्टपणा; द्राष्टपणा. —वि. १ दांडगा; उर्मट; उद्दाम; भांडखोर. २ खाष्ट; द्राष्ट; तुसडा; दोष काढणारा; निंदा करणारा; ३ हट्टी; दुराग्रही; अटीचा; स्वैर; खळखळ करणारा (मूल, चाकर); अडणारा (घोडा) 'खलेल घोडे उडती टणाटण।' —ऐपो २२३. [अर. खलल]

खलेली—स्त्री. खलेल पहा.

खलेले—अ. (बे.) कोणीकडे?

खलौर, खलुरिका—स्त्री. रणांगण; युद्धभूमि. 'अनंगाचिआं खलौरी।' —शिशु ५५४. [सं. खल=स्थान]

खल्बत—खलबत पहा.

खल्ल(उद्र)—न. (नृत्य) चवड्यावर उभें राहून श्वास रोधून पोटास भकाळी पाडणें (रोग, भूक लागलेली वगैरे दाखवितांना) [सं. खल्ल=खळगा]

खल्लक—वि. १ निष्कांचन; दरिद्री. 'हल्लक झाले खल्लक माल मवाशानें सुगडे।' —पला ४.३७. २ कृश; रोड; हडकुळा. [दे. प्रा. खल्ल=रिकामें; तुल० अर. खलास; कफल्लक?]

खल्लड—वि. क्षीण; खप्पड; सुरकुतलेली (मुद्रा, चेहरा). 'कांग पाठि लागसी हरी तुला खल्लड म्हणत।' —पारिभौ ३०.

खल्लाळ—पु. १ पाण्याचा खलखलाट. २ खलखळणारा प्रवाह; लाट. 'मिळती काष्ठें लोटतां पूर। आवळे दूर होती खल्लाळीं।' —तुगा ७१३. —नागा पृ. ५५९. [ध्व. खलाळ]

खल्ली—स्त्री. पाय, पिंढऱ्या, मांडया व हाताचा सांधा यांना लुळे पाडणारी वातविकृति —योर १.७६२. [सं.]

खल्वाट—न. १ टक्कल; टकलेपणा २ टक्कल पडलेलें मस्तक, डोई. —वि. टकल्या; टक्कल पडलेला; डोईस केस नसलला. 'खल्वाट चेडकिरणें अति तप्त झाला।' —वामन स्फुट (नवनीत) पृ. १३६. म्ह० खल्वाटो निधनः क्वचित्=टक्कल असलेला मनुष्य क्वचित् निर्धन असतो, प्रायः श्रीमंत असतो. कोठें कोठें गमतीनें 'खल्वाटो निर्धनः खचित।' (=टक्कल्या हा खचित दरिद्री असतो) असेंहि म्हणण्याचा प्रघात आहे. [सं.]

खवखव—स्त्री. १ अळू, सुरण इ० पदार्थ खाल्ल्यानें तोंडास किंवा जिभेला सुटणारी खाज किंवा चुरचूर; खाजण्याची विकृति. २ (ल.) भुकेमुळें पोटांत तोडणें. ३ पश्चात्तापाची बोचणी लागणें. ४ तीव्र इच्छा, वासना (विशेषतः सुरताची). 'इंद्रियाची खवखव सतत वाढत्या प्रमाणावर असल्यामुळें... कधींहि तृप्त होत नाहीं.' —गीर १०५. ५ लोभ; हावरटपणा. ६ मस्ती; सुरसुरी; खुमखुमी (वादविवादाची, लढण्याची). 'बंडखोराचर सूड उगविण्याला ...त्याचे हात खवखव करीत होते.' ७ उत्कंठा; उत्सुकता; चेतना; उद्बोधन; जागृति (सामग्री, सन्निधान इ० कारणांमुळें होणारी). 'तो गाऊं लागतांच याला खवखव सुटली.' ८ (विस्तवाची) धगधग [सं. क्षु-क्षव, क्षिव्=थुंकणें, बाहेर टाकणें?]

खवखवणें—अक्रि १ धगधगीत, धडाडून, पेटणें (विस्तव). २ चेतणें; उद्दीपित होणें; उन्माद येणें; उतावीळ, अधीर होणें (विषयवासना, लोभ, स्पर्धा यांनीं). ३ इच्छा करणें; आशाळ भूतपणें वाट पाहाणें; छंद घेणें; लुब्धणें. ४ मनांत जळणें; डांचणें; भाग होणें. —सक्रि. १ खाज सुटणें; खवखव करणें; डांचत असणें. २ (गो.) स्फूर्ती येणें. म्ह० खाई त्यास खवखवे. [खवखव]

ख(ख,चचट-ड—वि. १ खवट; खाजरा; खवरा; कांहींसें खवखव आणणारें; दुर्गंधयुक्त; नासकें. २ (ल.) तुसडा; एकांडया; कडू; कुत्सित; नष्ट (माणूस, भाषण इ०). खवट पहा.

ख(खं)घट—वि. १ उग्र वासाचा, रुचीचा; घुरट; पोटांत जातांना घसा जाळणारा, तोंडणारा (तेलकट, तळलला पदार्थ); २ नासका; कुजका (नारळ इ०). ३ कडू; मनास बोचणारी, झोंबणारी (भाषा, मनुष्य). [सं. क्षपू. प्रा. खव; तुल० का. कवुडु=दुर्गंध (तेल इ० चा.)] ०खां खरें—न. (ल.) तुसडा, ग्राड, कुजकट, क्षुद्र मनाचा मनुष्य.

खंवटाण—स्त्री. खंवट, उग्रट वास, घाण. [खंवट+घाण]

ख(खं)घटेल—वि. खवटाण; वासट, घुरट. खवट पहा.

खवटूचें,खवटेपण—क्रि. (गो.) तळलेले पदार्थ वाईट होणें, वास लागणें. [खवंट]

खवडव—स्त्री. १ चिडविणें; वेडावणें; खिजविणें; खोडया करणें. (क्रि. करणें). २ एखाद्याच्या पश्चात् त्याची केलेली निंदा.

खवडवा—वि खवडव करणारा; चिडविणारा; गांजणारा; त्रास देणारा; खिजविणारा; खोडकर.

खवडा—पु १ डोक्यांतील फोड (खरजेसारखा); डोक्यांत होणारी खरूज; चाई; उंदरी रोग. (अव. प्रयोग) खरजुडलें, नासकें डोकें, कफ, रक्त व कृमि यांचे प्रकोपामुळें, डोक्यांत एक प्रकारचे सूक्ष्म व्रण होतात, त्यांना बारीक अशीं पुष्कळ छिद्रें असतात, त्यांपासून लस वाहते त्यांना खवडे म्हणतात. –योर २.४२८. २ गुरांच्या अंगावरील खरूज, कथलीचा खवटा. ३ खवडे नाहींसे करण्याकरितां गुरांच्या विशिष्ट अवयवावर (डुंगणावर किंवा गालावर) दिलेला डाग; डागणें. [सं. क्षम् प्रा. खव ?] (वाप्र.) **०उडणें–उडविणें**-खवडा करणें अर्थ २ पहा. **०करणें–करून टाकणें**–१ नासणें; बिघडविणें; भंगविणें; निष्फळ करून टाकणें. फजीती करणें, ठर उडविणें, अपमान करणें; खरड काढणें **०जिरविणें**–ताठा उतरविणें; रग मोडणें.

खवंडाळणें—उक्रि. १ उठविणें; क्षोभविणें; चेतविणें; खिजवणें. २ फाजील खोडया, चेष्टा करणें; टवाळी करणें. ३ भांडण काढणें; चिडविणें. [खवदळणें]

खवंडाळी—स्त्री. १ खिजवणी; चेतवणी; उठावणी; खोडी. (क्रि० करणें). २ त्रास; चीड; क्षोभ. ३ दोष; बिंग; कुरापत. (क्रि० काढणें).

खवण—न. १ आकाश. २ पडसाद; प्रतिशब्द. [ख+वाणी]

खवणणें—उक्रि. (कों.) खरवडणें; खवणें; कीस काढणें; पोखरणें (नारळ, खरकूस) [खवणें]

खवणलें—न. कंठ; उत्कंठा. –शर.

खवणा—पु. १ (जैन) नग्न, दिगंबर जैनयति. 'एव्हढीं तरी खवणेयांच्या गावीं । पाटा उवें काय करावीं । ' –ह्रा ४.२२. २ पिशाच, भूत. 'खवणियाच्या अंगा । जेंगे केला वळघा । तो न करि तांचि उगा । घरीं होता । ' –अमृ ६.५९. [सं. क्षपण; प्रा. खवण]

खवणा—पु. नारळ इ० खवण्याचें साधन. याची बैठक लांकडी असून टोंकास दांते पाडलेली एक लोखंडी चकती असते. **खवला**. –वि. तीक्ष्ण; (माणूस)घाण्या; द्राष्ट; बोचणारा (माणूस, भाषण). [सं. क्षु–क्षव; प्रा. खव; क्षवण–खवण]

खवणी—स्त्री. १ खरवडणें. २ खरवडण्याचें साधन. खवणा पहा.

खवणी—स्त्री. एक झाड.

खवणें—उक्रि. १ (नारळांतील खोबरें, गीर) खरवडणें; पोखरणें. २ तोंड किंवा जीभ खवखवणें, चुरचुरणें, मिरमिरणें (अळूं, सुरण इ० पदार्थांमुळें). [सं. क्षवण; प्रा. खवण]

खवंद्, खवंदळ—न. १ व्रण; क्षत; मुख्यत्वें खाजविण्यापासून झालेलें क्षत. ' धका खवंदासी लागतसे । ' –तुगा २९६४. २ फोडाची खपली; खरपुडी. ३ खवडा; खांडूक.

खवदव—स्त्री. १ त्रास; काळजी; श्रम; चिंता. २ दगदग; खटपट; उपद्व्याप. ३ धांवपळ; गडबड; धामधूम. ४ खवडव पहा. [खवखव+दवदव]

खवदवणें—अक्रि. (कों.) सहन न होणें; जाचणें; खवखवणें पहा.

खवदवणें—अक्रि. गडबड, खटपट करणें; त्रास घेणें [खवदव]

खवदव्या—वि. उलाढाल्या; गडबड करणारा; लहानसहान कामें झपाटयानें उरकणारा; खटपटया. [खवदव]

खवदळ—पु. १ (गो.) खंदळ; गलगा; खवदव अर्थ ३ पहा. २ (गो.) उलथापालथ.

खवदळणें, खवंदळणें—उक्रि. १ (समुद्र, वारा, इ०), उचलणें; क्षुब्ध होणें; गढूळ करणें (द्रव पदार्थ). ' ती जमीन समुद्रासारखी खवंदळून दोन्ही बाजूंनीं ज्वलित कुंडांत पाणी पडे. '. –चाको १५२. २ हिंदळणें; हिसके बसणें; हादरणें (गाडींत बसलेला माणूस). ३ (ल.) खिजविणें; चेतविणें; राग आणणें; क्षुब्ध करणें. –अक्रि. १ रागावणें; खवळणें. ' समुद्र खवंदळला आहे.' २ पोटांत ढवळणें; डांचणें; डवचणें; कालवणें [खवळणें+ढवळणें; खदळणें; सं. क्षव+दलम ?]

खवदोळ—वि. (गो.) गढूळ.

खवना—वि. खवणा पहा.

खवय्या—वि. (हिं.) चवीनें खाणारा; खाण्याचा शोकी; चोखंदळ. ' शिरापुरीचे सदा खवय्ये । ' –ऐपो २६६. २ पोटबाबू. खादाड. [सं. खाद; म. खाणें. हिं. खाव]

खवरट, खवरा—वि. थोडासा तिखट व खवखव करणारा (अळूं, सुरण); खाजरा. [खवणें]

खवले-लें—न. १ शिताफळावरील नक्षीसारखा आकार, वरील खडबडीत भाग. २ (माशाच्या, सापाच्या अंगावरील) खरखरीत पृष्ठभाग; कवच. ३ खपली; खवंद (क्षतावरील). ' बाहेरी मूतांचीं पांचही खवलें । नेणताचि पडिलीं । ' –ह्रा ८.६२. ४ कापसासारख्या अभ्राचा वेगळा तुकडा; लहान अभ्रे. [दे. प्रा. खल्ला=साल, कातडें]

खवला—पु. १ खवणी (नारळ खरवडण्याची). २ सापाच्या अंगावरील ठिपका, **खवण**, पापुद्रा, बुट्टी; कवची. ३ खवले पाडण्याचें हत्यार (माती‌च्या सापावर). ४ ठोका; घाव; डाग. ५ खवंद; खपली. खवल पहा.

खवला--पु. (ना.) दहीं इ० स्निग्ध पदार्थांचा गोळा. कवडी.

खवला-ळा--पु. (कु) खवले असलेला रुपेरी रंगाचा एक मासा, हा तीस इंच लांबीचा असतो. [सं. प्रा. खवल्ल]

खव(ला)ली—पुस्त्री. १ खवणी (नारळाची). २ मासे धरण्याचें एक प्रकारचें जाळें.

खवलें(ळया) मांजर-मार्जार--पुन. एक रानटी जनावर. रानमांजर. हें मुंगया खातें. याच्या अंगावर खवले असतात, हें डोंगरांत बिळांत राहातें. हें शेपटानें माणसासहि मारूं शकतें.

खवंस-सें--वि. (गो.) निरुपयोगी; हलकें; कमी प्रतीचें

खंवसणें, खवसुचें--क्रि. (कु. गो.) मरणें. [सं. क्षपु; प्रा. खव=नाश करणें]

खवसान--स्त्री. (व.) नाकांतील वळवळ; ठसका. खवडाण पहा. ' मिरच्यांची खवसान सुटली.'

खवसेला—वि. १ (व.) घाणेरडा; अशुचि. ' इतका दिवस वर आला तरी तूं खवसेलाच! स्नान कर!' २ बुभुक्षित; खवखवलेला. 'किती दिवसांचा खवसेला होता कोणास कळे!' खवटेल पहा.

खवळ--न. (कु.गो.) १ माशाच्या अंगावरील कवच; खवला. २ (गो.) फोडावरील खपली. (गो.) ३ सारवलेल्या जमीनीवरील शेणाचा पोपडा. --स्त्री. (कु.) नारळ खवल्यानंतर करवंटीस चिकटलेला पातळ पापुद्रा, कातळी. खवल पहा.

खवळ—स्त्री. (प्रां.) जमीनींत किंवा भिंतींत पडलेली खोल भेग; तडा; चरा. [सं. खल्ल=खळगा]

खवळणें—अक्रि. संतापानें मार्थे फिरणें; चवताळणें; खवदळणें. ' पुच्छछेदें अहिसा चापच्छेदेंकरूनि बहु खवळे.' –मोभीष्म ६.५४. 'जैसा महाकालु खवळला.' –ज्ञा १.१४८. २ हालचाल करणें; उठणें (पित्त); डवचणें. ३ चेतना येणें; संवेदना होणें; जागें होणें (इंद्रिय). [प्रा. दे. खवलिअ=क्रुद्ध; तुल० का. कवळे= क्षुब्धता; भोंवऱ्याप्रमाणें फिरणें]

खवळनी—स्त्री. (व.) उत्तेजन. [खवळणें]

खवळा—पु. (कों.) माड, सुपारी, ताड इत्यादिकांस जेथून झांप, सांवळ्या, इत्यादि फुटतात ती जागा; शेंडा.

खवळी—स्त्री. (कों.) एक प्रकारचा मासा. खवला पहा.

खवळी—स्त्री. लहान खपली; सालपट; कवंदी. खवल पहा.

खवळया—वि. खवळ असलेला.

खवा—पु. दूध आटवून तयार केलेला घट्ट पदार्थ; मावा; नारळाच्या दुधाचाहि खवा होतो. [?]

खवा—पु. (गंगयडी) हट्टीपणाची लहर; दुराग्रह. (क्रि० घेणें). [खवणें]

खवा, खवाट-टा—पुनपु. १ खांद्याचा व हाताचा सांधा. २ खांदा. ' पहारे पहा उभी कंचुकी फाटली। पाठ खवे छातीमध्यें दाटली।' –प्रला १८६. [प्रा. दे. खवय=स्कंध]

खवाजखुरी—स्त्री. (व.) खाजकुइरी पहा.

खवार—वि. (व.) दरिद्री; निष्कांचन. ' रांडेच्या पायीं खवार झाला.' [फा. ख्वार=दीन]

खवारी—स्त्री. अप्रतिष्ठा; अवकृपा; अवज्ञा. ' मनस्वी लोकांच्या बुद्धी ऐकोन त्यांचें निदर्शन जे खवारी जाली.' –रा ८.१२८. [फा. ख्वारी=नीचपणा; दुःख]

खवाशी-सा--स्त्रीपु. हत्तीवरील अंबारी किंवा हौदा याचे मागील मानकरी, खिजमतगार बसण्याची जागा; खवासखाना. ' बैसोनि गुरुआज्ञे खवासित।' –दावि ३६२. ' आपाबळवंतराव खवाशित चौरी मिजाजित वारीत।' –ऐपो २००. [अर. खवासी]

खवास—पु. १ उमराव; मानकरी; राजासन्निध असणारा थोर घराण्यांतील मनुष्य. हा बहुधा मालकाच्या विश्वासांतला किंवा आवडता असे. २ हुजऱ्या; सेवक; खिजमतगार; नोकर. ३ गुलाम; बंदा नोकर. [अर. खवास्स्; तुल० तुर्की, शिबुय= सरकारी संदेश नेणारा. (यावरून) इं. शोस] ०खाना-खवाशी पहा. [फा.] ०निशस्त-वि. खवासखान्यांत बसलेला. ' तेव्हां खवासनिशस्त यांनीं जोडगोळी मारली.' –वाड कैफि २३.

खवाळ—न. (कु.) माशाच्या अंगावरील खवला. खवल-ळ पहा.

खंविरडा—वि. खंवरट-खवरा पहा.

खवीस—पु. १ मुसलमानाचें भूत, पिशाच्च. २ (ल.) रागीट; द्वाष्ट; ३ (ल.) दुष्ट, माथेफिरू, द्वाड, खुनशी, दीर्घद्वेषी माणूस. [अर. खबीस=दुष्ट; पि. च]

ख(खं)वूट-खोवरें—खवट-खावरें पहा.

खवैऱ्या-या—खवऱ्या पहा.

खवें—वि. (नंदभाषा) कमी किमतीचें; हलकें; स्वस्त. ' हें लुगडें कांहीं खवें पडलें आहे काय?'

खशाफशा-बशा-मशा—वि. १ डौलदार, सुबाच्य नव्हे असें (अक्षर); अव्यवस्थित; फरकटत घसफस लिहिलेलें, केलेलें. २ असें वाईट अक्षर ज्याचर आहे असा (कागद, पुस्तक, पदार्थ). –क्रिवि. अव्यवस्थितपणें; गिचमिड; कसें तरी. [ध्व. खस्-फस; प्रा. दे. खसफस=खिसकणें]

खशी—खसी पहा.

खष्ट, खंष्ट—न. (गो.) एक प्रकारचें झाड व त्याचें फळ, याच्या तेलास खेष्टल तेल म्हणतात, हें खरजेवर फार गुणकारी असतें.

खष्ट—वि. १ खाष्ट; द्राष्ट; कुरकुऱ्या; खडबडया; सदां खडसावणारा. २ वाईट; त्रासदायक; जिकिरीचा (खचरट, खडतर या शब्दांच्या अनेक अर्थांप्रमाणें सढळपणें योजतात. जास्त अर्थासाठीं ते शब्द पहा). ३ वाईट; खट; खडतर (नशीब, दैव). ४ बेबंद; गैरशिस्त; स्वैर (वर्तणूक, वर्तन). [कष्ट, शठ ?]

खस—पु. १ वाळा. एक प्रकारचें सुगंधी गवत. याच्या मुळांचे उन्हाळ्यासाठीं पडदे करतात, अत्तर काढतात. २ एक प्रकारचें अत्तर; वाळ्याचें अत्तर. [अर. खस्स्; फा. खस्]

खस—पु. १ ढीग; रास; डोंगर (पडलेलीं पानें, धुरळा, केर-कचरा इ० चा). २ (ल.) वैपुल्य; रेलचेल; लयलूट, विपुलता. [खच]

खस-कन-कर-दिनीं-दिशीं—क्रिवि. खस असा आवाज होईल अशा रीतीनें; धसमुसळेपणानें. (क्रि० ओढणें; खेंचणें; तोडणें; धरणें). [ध्व.]

खसक(का)विणें-खसकावून-खसकून—कचकाविणें-कचकावून पहा.

खसका—पु. आवाज होणारा प्रहार; धबका. कचका पहा. [ध्व. खस्]

खसखशी(सी)त—वि. १ खडखडीत; स्पष्ट; निखालस: भीडभाड न धरतां केलेली; खरपूस; साफ; धडधडीत (सूचना, ताकीद, भाषण). २ निश्चित; ठाम; धडाडीचें; उत्साहपूर्वक (वर्तन, उपाय). ३ धोपटमार्गी; सरळ व्यवहारी; खडखडीत बोलणारा (माणूस). ४ खरखरीत; भरड; खडबडीत; मऊ विसविशीत नव्हे असा (कागद, वस्त्र). –क्रिवि. (गो.) जोरानें (घासण इ०); खसाखसां. [ध्व.]

खसखस—स्त्री. अफूच बीं. हें मोहरीपेक्षां बारीक असतें खसखस वाटून अंगास लावतात. हींत मादकपणा नसून उलट चवदार असते. हिचें तेल काढतात. पेंड गोड व पौष्टिक असते. [सं.: अर. खशखश; फा. खसखस; का. कसकसे] **०मांडा**–पु. (वे.) खसखस वर लावून तयार केलेला मांडा, अनरसा. **–शीचें झाड**–न. अफूचें झाड. **–शीचें फूल**–न. अफूच्या झाडाचें फूल. **–शीचें बोंड**–न. अफूच्या झाडाचें बोंड.

खसखस-सां—क्रिवि. खसखस असा शब्द होईल अशा रीतीनें (किंवा खरखरीत गवत कापणें, लिहिणें इ०). ' खसखस दोन बंद लिहून टाकले. ' **खसखस पिकणें** (खसखस. अशा आवाजानें) मोठ्यानें व पुष्कळ हंसणें; चेनींत असतांना रंगेलपणें हंसणें. [ध्व]

खसखसणें—अक्रि. खसखस आवाज करणें (साप, जनावर इ० नीं). [ध्व]

खसखसाट—पु. मोठ्यानें खसखस आवाज (गवत कापण्याचा). (चुकीनें खडखडाटबद्दल) अभाव; तोटा; दुष्काळ. ' त्याचे जवळ रुपयांचा खसखसाट आहे. ' [खसखस]

खसखसावून, खसखसून—क्रिवि. १ जोरानें आवळून. २ कचकावून पहा. (क्रि० घासणें, चोळणें, धुणें, भाजणें इ०) ३ चपलतेनें; झट्दिशीं; जलदी. ४ क्रिया पुष्कळ वेळ चालली असतां योजतात. (क्रि० चावणें; लिहिणें). [खसखस]

खसणें—उक्रि. खचणें पहा. [हिं. खसना]

खसणें—अक्रि. खोकणें. [हिं खास]

खसपुद्दा—वि. १ घाणेरडा; नेभळा; गचाळ (माणूस). २ वाईट; भिकार; घाणेरडा (जिन्नस). [खस+पुदडा. अशिष्ट प्रयोग]

खसबस-सां—क्रिवि. विशिष्ट आवाजानें (उदा० कुजबुजणें, गवतांत सळसळणें, अंधारांत चाचपडणें अशा वेळीं होणाऱ्या आवाजाप्रमाणें).

खसबसाट—पु. सामान्य कुजबूज; सळसळ; खसखस; फसफस. [ध्व.]

खसरा—पु. (व.) जमाबंदीचा कागद. ' खसरा सरकारांत आहे. '

खस(सा)लत—स्त्री. प्रकृति; तबियत; स्वभाव (विशेषतः कठोर, द्राष्ट, उग्र); कदर. **०काढणें–भोगणें–सोसणें**–त्रास, कष्ट सोसणें, काढणें (तुसडया माणसाचा) [अर. खस्लत]

खस(सा)लती—वि. खाष्ट, कठिण, कठोर स्वभावाचा, प्रकृतीचा. [अर. खस्लीत]

खसवस-सां—क्रिवि. कठोरपणें; तिटकाऱ्यानें; चुरशीनें (बोलणें). [ध्व.]

खसाई—स्त्री. शीग; कबाब, एक मांसाचा खाद्य पदार्थ. –गृशि २.९.

खसाखस(सां), खसासां—क्रिवि. (खसाखसचा आत्यंतिक भाव) विशिष्ट आवाजानें; खसखसां. (उ० गवत कापणें इ० चा आवाज होऊन)

खसाटणें—उक्रि. १ दांडगेपणें आवाज होईल असें कापणें. खचाटणें पहा. २ (व.) फरफटत नेणें, ओढणें. 'खसाटत नेलें ' ३ खरचटणें. ' खांद्यावर जरा खसाटलें इतकेंच. ' ४ (व.) खरड काढणें. खसाटलें तेव्हां आला वाटेवर. '

खसार—वि. (व.) ठिसूळ.

खसासित—वि. कठोर; खाष्ट; स्पष्ट. खसखसीत पहा.' ऐसें सबाह्य खसासित । जयाचें गा । ' –ज्ञा १६ २४४.

खसी—स्त्री. १ खच्ची करण्याची क्रिया. २ तोडण्याची क्रिया; तोड. –वि. १ खच्ची केलेलें. २ तोडलेलें. [अर. खसी]

खसु—पु. त्रास. 'फुन खसु न धरै.' –शिशु ६६६. [सं. कास्=रोग; दे. प्रा. खसु]

खसूचित्व—न. अडाणीपणा; मूर्खपणा; अज्ञत्व. 'कांहीं पुस्तकें चाळावीं लागतात, कीं खसूचित्व प्रगट करून तब्येत लागेल तशी लेखणी चालविण्याबद्दल वाग्देवीच्या दरबाराचा आम्हास एखादा चांद मिळाला आहे' –नि ८८७. [सं.]

खसूस—वि. निश्चित; खचित; विशेष निखालस; निःसंशय. 'अशी खसूसु खात्री होईल तरच दिला पाहिजे' –खाअं बडोदें १३७. [अर. खसूस=विशेष]

खसूसीयत—वि. स्नेहपूर्ण; स्नेहांकित (एक मायना, पदवी). 'खसूसीयत-दस्तगाह् लक्ष्मण आप्पाजी' –रा १२.११२ [अर. खुसूसीयत्=मैत्री]

खस्त—वि. १ कत्तल केलेलें; नाश केलेलें; तुकडे केलेलें. धूळधाण केलेलें; जमीनदोस्त. 'वीरां खस्त करीतसें।' –एरुस्व ९.४०. 'लता मुष्टिघातें पती राक्षसाचा। बळे खस्त केला मुखा अस्तु वाचा।' –मुरामा ४.३१. २ (ल.) भग्न; नाउमेद; गोंधळलेला. 'तो आपले ठिकाणीं मरून खस्त झाला.' 'अवसान खस्त.' ३ जमीनदोस्त; नष्ट; खराब. 'तुम्ही आम्ही मिळून इंग्रजास खस्त करोन टाकूं –पया १९८. (**मरून खस्त होणें**–लढाई इ० त मरून केरकचऱ्याप्रमाण होणें; मातीला मिळणें. 'मरून खस्त होईन परंतु दास होणार नाहीं.' –सुधप्र १८६. –न. १ घाण; दाट चिखल (गटार, नाला यामधील); रेंदा; गाळ. २ नुकसान; तोटा; खराबी (क्रि० खाणें). [फा. खस्त=जखमी; रोगी]

खस्त—स्त्री. त्रास; कष्ट. खस्ता पहा.

खस्तवेस्त, खस्तावस्त—वि. ओढाताणीचें; बाष्कळ. 'अनुमानाचें खस्तवेस्त । बोलोंचि नये।' –दा १९.२.४. [खस्त द्वि. अस्ताव्यस्त]

खस्ता—स्त्री. १ काळजी; चिंता. २ श्रम; त्रास खवडव; उपद्व्याप (मुलें, दुखणेकरी यांचा). (क्रि० काढणें; खाणें; भोगणें सोसणें). 'त्याला तिच्या फार खस्ता खाव्या लागत' –चद्र ८. [फा. खस्त=जखमी, रोगी; सं. कष्ट?]

खस्तापुरी—स्त्री. पुरीचा एक प्रकार. –गृशि २.३७.

खस्ता—वि. खस्त असलेली, चिखली, गदळ, गाळ माठ लेली, खारी, जिच्यावर समुद्राच्या लाटा मधून-मधून येऊन आपटतात किंवा जिच्यावर गांवांतील घाण, मळ, टाकतात, अथवा जिच्यावर पावसानें घाण वाहून येते ती जमीन [खस्त]

खस्थपदार्थ—पु. आकाशांतील वस्तु, पदार्थ, तेजस्वी गोल इ० [सं. ख+स्थ+पदार्थ]

खस्वस्तिक—न. आकाशांतील आपल्या डोकीवरचा बिंदु; क्षितिजावरची लंब किंवा उभी रेषा आकाशाच्या दृश्य गोलार्धाला ज्या बिंदूत छेदिते त्याला खस्वस्तिक म्हणतात. –सूर्य १६. (इ.) झेनिथ, अधःस्वस्तिक याच्या उलट. [सं. ख+स्वस्तिक]

खहर—पु. (गणित) ज्याचा छेद शून्य आहे असा अपूर्णांक; अनंत संख्या. [सं.]

खळ—स्त्री. १ बटाट्याचें सत्त्व, गहूं, तांदूळ, उडीद, साबुदाण्याचें पीठ इ० पासून डकवण्यासाठीं, वस्त्रास ताठपणा यावा म्हणून किंवा कागद चिकटविण्यासाठीं तयार केलेली पेज, चिकी, राप, कोळ, गोंद. २ (कोष्टी) कपडा विणण्यापूर्वी सुतास बळकटी येण्यासाठीं तांदूळ, ज्वारी, मका किंवा बाजरी यांचें पीठ शिजवून त्याची लापशी करून ती सुतास कुंचल्यानें लावतात अथवा जींत सुत बुडवून काढतात ती. ३ धारगे करण्यासाठीं गुळवण्यांत शिजविलेलें पीठ. ४ (गो.) अम्लयुक्त खारट पाणी; खार (लोणच्याचा). [सं. खळ्=एकत्र करणें?] **म्ह०** परटाची खळ, ब्राह्मणाची सळ (बायको) लागलीच आहे. **०गट**–न १ पातळ व भिकार कालवण (पीठ, भाजीपाला, चिंच इ० मिसळलेलें), (निदान्यंजक). २ (ल.) कोणतेंहि अतिशय पातळ व आंबट, खारट कालवण; आंबटी; साबारें.

खळ—पु १ तहकुबी. खंड, (कामाचा, गमतीचा). (क्रि० पडणें). 'लेखणी चालूं दे, खळ पाडूं नको.' २ उशीर; खोटी. [स. स्खल्]

खळ—स्त्री. पक्का हट्ट; आग्रह; छंद; नाद; हट्टीपणाची लहर. (क्रि० घेणें). 'आणिलां ही रूपा बळें। करूनि खळे हरिदासीं।' –तुगा २२०१. 'त्या पोरानें खाऊसाठीं खळ घेतली.'

खळ—वि. दुर्जन; नष्ट; वाईट; नीच; दुष्ट खल पहा. 'साधुनिंदक परम खळ। आम्हांस वरिसी तूं विठाळ॥' 'जड होती खळ दुष्ट लोक।' –तुगा १५. [सं. खल]

खळ—न. खळें पहा. १ शेतांतील धान्य मळणीची जागा, आळें. २ (कों.) आंगण, उघडी जागा सामाशब्द– **०उडगल**–(कर्ना.) खळें झाडणें. **०पुंजी**–स्त्री. खळ्यावरचें धान्य मापतांना प्रत्येक मोठ्या राशींतून घेतलेले लहान ढीग. मराठा अमदानींत ही सरकारी दस्तुरी समजली जाई. **०यज्ञ**–खलयज्ञ पहा. **०वट**–न. शेतमाल तयार होऊन खळ्यावर धान्याच्या राशी पडूं लागतात तो हंगाम, काल. –गांगा ९९. **०वटणी**–स्त्री. मळणीकरितां धान्याच्या पेंढ्या एकत्र जमा करणें. **०वळ**–न. रास काढून नेल्यानंतर खळ्यावर इकडे तिकडे पडलेलें धान्य. हा गांवच्या महाराचा हक्क आहे. **०वाडी**–स्त्री. अनेक शेतकऱ्यांचीं खळीं असलेली गांवाच्या बाहेरची कुंपण घातलेली जागा; खळ्यांचा

समुदाय. 'खळवाडेकडे गेला निघोनि।' –दावि २८. [खळ+वाडी]

खळक—पु. (राजा.) चिंच, आमसोल इ० चें अतिशय आंबट पाणी (निदार्थी शब्द) खळगट पहा. [खट]

खळ-कन-दिनीं-दिशीं—क्रिवि. खळखळ, घळघळ, झुळझुळ; छणछण, क्षणक्षण, खणखण अशा आवाजानें (बांगडया, किल्ल्या इ० चा शब्द). [ध्व. खळ्]

खळका—पु. १ बागडया, मडकीं, बाटल्या इ०चे तुकडे. २ खळखळाट; मोठयानें खळखळणें (पाण्याचें). ३ (ल.) भांडण, तंटा; कचकच; गलगा; गोंगाट; कोलाहल. [ध्व. खळ्]

खळके-खळके—पुअव भांडणतंटे; कचाकची (एकवचन) खळकाखळका=भांडण; कटकट.

खळखळ—स्त्री. झुळझुळ, घुळघुळ, असा आवाज (ओढ्याचें पाणी इ० चा). 'नदीचा ख खळ शब्द न जुमानता पलीकडे जाऊं लागला.' –पाह्न २७. छनछन, खणखण, क्षणक्षण असा आवाज (बांगडयांचा); खटखट, डबडब, खटखट असा आवाज (वाळल्या नारळाचा).

खटखळ—स्त्री. (ल.) १ कटकट; खटखट; बाचाबाची. 'खटखळ खटांसीं न करावी।' –दा १४.४. आडेवेडे. 'तीं म्हैस दूध दण्याविषयीं अलीकडे खटखळ करते.' २ वटवट, खटखट. ३ दगदग; उपद्व्याप, त्रास; कष्ट; श्रम. ४ गडबड; घालमेल. 'नाना प्रसंगीं खटखळ।' –दा १७.४.१२.५ (गो.) हंसणें, खिदळणें यांची गर्दी. (वाप्र.) ०करणें–एकाद्या गोष्टींत विशेष नाखुषी दाखवून ती न करण्याचा हट्ट करणें, घेणें, किंवा ती गोष्ट करण्यास भारी आढेवेढे घेणें. 'एखाद दिवशीं ... यस्तंतरावानें ... एखाद्या गोष्टीबद्दल फार खटखळ केली तर तिला कसेकसेंच होऊन ...' –यशख. ०करून–पुष्कळ खटखटीनें.) म्ह० दगडाचें पेव घालतांना खटखळ, काढतांना खळखळ.

खळखळ(ळां)—क्रिवि. खळखळ आवाजानें. 'जें तद्वत्त वहातचि हातें वर्षाबुवें खळखळां तें।' –मोभीष्म २.१२. [ध्व.] **खळखळां रडणें**–ढसढसा रडणें. 'स्मरला विदुरकविवचन शतदा ता रडुनियां खटखळां तें।' –मोशल्य ४.२६.

खळखळणी—स्त्री. खटखळणें पासून धातुसाधित नाम. खटखळणें पहा.

खळखळणें—अक्रि. १ खटखळ आवाज करणें. बांगडया, तोरड्या इ० नीं खळखळ शब्द होई असें वाजणें. २ वाऱ्यानें सळसळणें (पानें पाचोळा); खटखट करणें (उंदीर इ० नी आढ्यांतून, कौलांतून). ३ जोरानें वाहणें (ओढा, नदी). ४ (अकृक्रि.) पोटांत खळखळ आवाज होणें. [ध्व]

खटखळणें, खळखळाविणें—उक्रि. १ आवाज होईल अशा रीतीन घुणें, घासणें, खगाळणें, विसळणें. २ खटखट भांडणें (रुपये); खणखण, खटखट करण्यास लावणें (नाणें); खुळखुळणें. [ध्व. खटखट]

खळखळाट—पु. १ (खटखटचा अतिशय) मोठा खळखळ आवाज करणाऱ्या दोन वस्तू एकमेकींवर आपटल्यानें होणारा आवाज. २ ओहोळ; ओढा. 'अशुद्ध नदीचे खळाळाट। पुमती सागराची वाट।' –मुआदि ३२.५५. **म्ह० उथळ नदीस खटखळाट फार.** [ध्व.]

खळखळी—स्त्री. (कों.) ओढयाचा खटखळ शब्द (दगडगोट्यांवरून वहात जातांना होणारा). **म्ह० उथळ पाण्याला खटखळी फार.** [खटखट]

खळखळीत—वि. १ खटखटणारा; आवाजदार; खटखळ आवाज काढणारा. २ फडफडीत; कोरडा; ज्यांतील शीतनशीत मोकळें झालें असा (भात); वाळलेली (द्विदल धान्याची शेंग). ३ स्वच्छ; साफ; मळ किंवा घाणीपासून मुक्त (कांगलें धुतलेलें कापड, भांडें, समुद्राच्या पाण्यानें धुतलेला खडक, यांच्या बद्दल योजतात). ४ डुळडुळीत; गळगळीत (कालवण, ताक). [खटखळ]

खळगा—पु. खाच; खोलगा; भोंक; गर्ता; खालवट जागा; [सं. खळ]

खळगा—पु. १ धान्याच्या उपयोगी माती; पिवळी, कुंभारी माती. २ (चांभारकाम) चिकण माती; खडीच्या ऐवजीं हिचा उपयोग करतात. **०लावणें**–चिकणमाती सारविणें. [सं. खल=माति, जमीन]

खळगा—पु. १ कळगा; फुटक्या कडगुल्याचा अथवा बांगडीचा तुकडा; कांच. २ (ल.) डिखळलेली, मेगाळलेली माती (नदीच्या कांठची); मातीची बीट; डिखळ. [कळगा]

खळगी—स्त्री. लहान खळगा; खांच; बीळ. [खळगा]

खळें—वि. लहान. ? –हंको.

खळचें, खळप—क्रि. (गो.) थांबणें; चुकणें; खळ पडणें. [खळ]

खळणी—स्त्री. (गो.) खळ; खंड. [सं. स्खलन]

खटणें—उक्रि. खळ लावणें, वर्णे (कपडयांना); बुडविणें (कागद, तुरटीच्या पाण्यांत). [खट]

खळणें—अक्रि. १ मध्येंच थांबणें (बारा, पाऊस, उद्योग, कामधंदा इ०). 'मनुष्याच्या शरीरांतले व्यापार जसे कधीं खळत नाहींत.' –नि ५८. २ गतीला अटकाव होणें; मार्ग खुटणें (प्रवाहाचा). 'बारा वर्षांत तिच्या डोळ्याचे पाणी खळलें नाहीं.' –इंप ५६. ३ हात आखडणें; थोपविणें; कांहीं वेळपर्यंत राहणें, थांबणें (माणूस). ४ बीथीपात होणें (माणूस, पशु यांचा). 'तो घोडा हमेशा खळतो.' [सं. स्खलन; प्रा. खलण]

खळबळणें—सक्रि. १ पाण्यांत घालून जोरानें हलविणें (धुताना, कपडे इ०); एकदोनदां पाण्यांत बुडविण, पिळणें. २ जोराने धुणें (भांडयांत हात घालून घांडयावर जोरान पाणी टाकून, चोळून), पुष्कळ पाण्यानें व जोरानें धुणें. ३ (ल) क्षुब्ध, अस्वस्थ, व्यग्र करणें; उत्तेजित करणें. –अक्रि. १ मोठयानें आवाज करणें, हालचाल करणें (उसळणारें, आदळणारें, उचमळणारें पाणी करत तसा). 'आठवण होतांच रक्त कसं खळखळतं म्हणून सांगू ?'–स्वप ५८. २ अस्वस्थ, बेचैन, क्षुब्धावस्थेंत असणें; भडकणें (देश, एखाद्याचे मन, जीव). ३ पोटांत खळबळ होणें; आवाज होणें. ४ (अकर्तृक क्रि.) पोटांत कालवणें; दयेनें मन कळवळणें. [खळबळ]

खळबळा—पु. गडबड; अस्वस्थता (पोटांतील). २ लोकांचा दंगा; बंड; धुमश्चक्री. ३ हालचाल; वादळ; उसळी (समुद्राची, भांडयांतील पाण्याची). खळबळणें पहा.

खळबळाट, खळबळी—पुस्त्री. १ उसळणाऱ्या, आपटणाऱ्या, डुचमळणाऱ्या पाण्याचा आवाज. २ गडबड; धुमश्चक्री. [ध्व.]

खळबळाविणें—उक्रि. खळबळणें (उक्रि) पहा.

खळबळीत—वि. मोकळ्या मनाचें; घरगुती; अघळपघळ: साधें; खुलाशाचें (भाषण, दळणवळण, माणूस). [खळबळ]

खळभट—पु. हट्टी, दुराग्रही माणूस; चिकट व फार त्रास देणारा भिकारी. 'हा अगदींच खळभट दिसतो.' [खळ=हट्ट]

खळभट्ट—पु. धान्याच्या खळ्यावर मळणी चालू असता तेथें भिक्षा मागून निर्वाह करणारा ब्राह्मण; निरक्षर ब्राह्मण, विद्येचा पोकळ डौल दाखविणारा माणूस; ग्रामरंडित. [खळें+भट]

खळमळ—पु. १ नवीन कापडाची खळ, मळ इ० २ (मळाची द्वि) घाण; रेंदा; गाळसाळ; केरकचरा. 'नद्यादिकांस एकदां पूर येऊन गेला म्हणजे खळमळ धुवून जाऊन पाणी स्वच्छ होतें.' [खळ+मळ; तुल० सं किलिमल]

खळव—पु. १ कामामध्यें, गतीमध्यें खंड; खळ. २ झऱ्याचें, पाटाचें, वाहतें पाणी वर बंद केलें असतांहि जो थोडा प्रवाह पुढें वहात असतो तो. [खळ]

खळवटणें—क्रि. (गो.) नाक फेंदारणें.

खळवटणें—उक्रि. १ भोंवतालीं अनेक जागीं पडलेलें एकत्र करणें; जमा करणें; गोळा करणें (विशेषतः भांडयांत); (घराच्या) सर्व सांधीकोपऱ्यांतून खरडुन काढून एकेठिकाणीं आणणें. 'चोरांनीं सर्व घरांतील पदार्थ खवटून नेले.' २ एखाद्या पदार्थाच्या प्राप्तीसाठी सर्व स्थळें शोधणें, धुंडाळणें; चाळाचाळ करणें. 'सर्व घर खळवटल तेव्हां भांगठी सांपडली.' ३ वेंचणें; गोळा करणें (फळे). ४ शेत कापणें. ५ (ल. राजा.) प्राण गोळा होणें, व्याकूळ होणें. 'जीव खळवटला.' [खळें+वटणें]

खळवटणें—सक्रि. खळबळणें पहा. –अक्रि. १ बंद राहाणें; थांबणें; खेळणें (काम, गति). २ बांध घातला जाणें (ओढा वगैरेस). [सं. स्खद्; प्रा. खल+वळ]

खळवाद—पु. हट्टीपणाचा, रिकामटेकडा वाद; वितंडवाद; काथ्याकूट. (क्रि० करणें; घेणें; सांगणें). [खळ+वाद]

खळवादी-द्या—वि. १ वितंडवादी; दुराग्रही. २ हेकट; हटवादी; तंटेखोर. [खळवाद]

खळविणें—उक्रि. १ थांबविणें; थोपविणें; तहकूब करणें. २ अडथळा आणणें. [खळणें]

खळा—पु खळगट पहा.

खळाखळ-ळां—क्रिवि. खळखळ करून; खळखळ अशा मोठया आवाजानें. खळखळ-ळां पहा.

खळाळ—पु. (खळखळचा अतिशय) १ गर्जना; घोष; मोठा ध्वनि (खडकावर फुटणाऱ्या लाटांचा). नाद निघणाऱ्या दोन वस्तूंचा एकमेकांवर आदळतांना होणारा आवाज; घणघण; खणखण; छनछन इ०. २ ओढयाच्या, नदीच्या पाण्याचा खळखळाट. 'शुष्क जळाचे चळाळ। धारा धबाबे खळाळ।'–दा ११.७.४. ३ खळखळणारा ओढा, प्रवाह. 'खळाळाच्या लगबगी। फेडूनि खळाळाच्या भागीं।'–ह्मा १५.३८६. 'अशुद्धांचे खळाळ। वाहती रर्णी।'–कथा १.६.१४७. ४ खळबळ. 'रजागुणाचेनि खळाळ। स्वर्गु गाजे।'–ह्मा ७.७८. [ध्व. खळ]

खळाळ-ळां—क्रिवि. १ मोठयानें गर्जून; खळखळाटानें (लाटा, धबधबा). २ ढळढळां; खळखळां; सळसळां (अश्रु वाहणें). असेच अनेक अर्थ होतात. उदा० खळाळ खपल्या पडतील, पोपडे निघतील इ०.

खळाळणें—अक्रि. खळखळणें; मोठा गंभीर आवाज करणें; दीर्घ आवाज काढणें; गर्जना करणें; आरडणें; ओरडणें; आदळणें; सडकणें इ० [ध्व. खळाळ]

खळाळी—स्त्री. १ खळाळ; खडकावरून प्रवाह चालला असता होणारा आवाज. म्ह० उथळ पाण्याला खळाळी फार. २ वरील प्रकारें आवाज करणारा ओढा. 'आथवा खळाळीं पडिलें।'–दा ३.७.१०.३ (ल.) खळबळ; क्षोभ. 'पाखांडाचा खळाळी।'–भाए ११०.

खळी—स्त्री. १ खड्डा; खांच; खळगी; खोलवा; पोंचा. 'मधुस्मिताची खळी कपोलीं उलट तिच्या पडली।'–विक ४१. 'तोफ चमेलीचे खळियांत येऊन आचरीचे घाटास राहिली.'–भाव ४९.२ (गो.) लहान ओढा; पाट; गटार. [सं. खल=खांच] (वाप्र.)

०खणणें–१ (कोणत्याहि पदार्थासाठीं) अटून बसणें. २पायानें जमीन उकरणें (जसें घोडा खाद्य शोधण्यासाठीं खुरानें जमीन उकरतो तसें). **खळीस येणें**–त्वेष चढणें; इरेस पडणें. ' डुक्कर खळीस येतो तैसे इरेस पडून मारामार केली. ' –भाव ४२. **खळ्या खांदींत बसणें**–(डोईफोडे किंवा इतर भिकारी यांचा खोळंबा केल्यास भिक्षा न दिल्यास ते आपल्या सांखळदंडानें जमीन उकरतात त्यावरून) हटवादीपणा, दुराग्रह करणें; खनपटीस बसणें; तगादा करणें.

खळी—स्त्री. १ तुरटी. २ कापडाला लावण्याची खळ. [खळ]

खळें–न. १ धान्यांचीं कणसें झोडण्यासाठीं, मळण्यासाठीं केलेली जागा (शेतांत अगर अंगणांत). ' झोडा भारे, खळें भरेल। भाताची मग रास पडेल ॥ ' –मराठी पहिलें पुस्तक पृ ५० (१९३२) (खान.) शेतांतून माल कापून आणल्यावर तो सांठवून ठेवण्याची जागा; तळवें. २ (ल.) (बायकी) लहान मुलांनीं अन्न वगैरे खातांना केलेला अन्नाचा लादा, काला, गिचमिड. ३ सूर्य–चंद्र यांच्या भोंवतीं पडलेलें अभ्राचें कडें (तळें पहा). चार मैल उंचीच्या विरल अशा ढगाचे बिंदू बर्फमय असतात, त्यांतून चंद्रकिरण येत असतां त्यांचें वर्तुलाकार होऊन खळें पडतें. कधीं एकांत एक अशीं २ अगर ३ खळीं पडतात. ४ (राजा.) अंगण (घरापुढील). [सं. खल; बं. खल; उरि. खला; हिं. खला, गु. खलवाड] (वाप्र.) **०खुरचणें**–(माण.) खळ्यांत पाणी शिंपडून, बैल तिवड्यास जुंपून त्यांच्याकडून खळ्यांतील जमीन घट्ट करणें; खळें चोपणें. सामाशब्द– **०तळवें**–न. १ मळणी करावयाची जागा (खळें) आणि धान्य सांठवावयाची जागा (तळवें). २ (ल.) खळ्यावर इकडेतिकडे पडलेलें आणि तळ्यावर पडलेलें धान्य. ' खळें तळवें सगळें अर्धेल्यास देऊं नये, अर्धे आपण घ्यावें व अर्धे त्यास द्यावें. ' **०भट**–खळभट पहा. **०वाडी**–स्त्री. अनेक खळ्यांचें आवार. खळवाडी पहा. **०वेसकर**–पु. खळ्यावर काम करणारा महार; याच्या उलट गांव वेसकर.

खळोती–स्त्री. खळ्यावर शेतकऱ्यांपासून धान्य घेण्याचा बलुतेदारांचा हक्क.

खळ्या—वि. हट्टी; दुराग्रही. खळभट पहा. ' हा अगदींच खळ्या दिसतो, पैसा दिल्याशिवाय हलायचा नाहीं. ' [खळ]

खळ्याचा–वि. खळ्यावर मळलेला; याच्या उलट बड्याचा=बडविलेला. [खळें]

खळ्याची मेढ—स्त्री. तिवडा.

खां—अ. खान; सरदार; मुसलमानांतील एक मोठी पदवी. **०साहेब**–पु. खान; बडेखान. ' त्याबेळच्या दरबारला खांसाहेब फको. २, ४९ बांनीं हैद्राबादेहून मुद्दाम एक कलावंतिणीचा ताफा आणिला. ' –विवि ८.११.२०५.

खाइर-रा—वि. (काव्य) खाणारा. ' नेणें मांसखाइरु। काळे गोरें। ' –ज्ञा १८.५५४. ' कोणाचा तूं पालेखाइऱ्या। ' –रावि २५.४०. [सं. खादित; प्रा. खाइअ]

खाई—स्त्री. १ सती जाण्यासाठीं केलेली खांच, चिता; निखाऱ्यानें भरलेली खळी. ' ओंवऱ्याची करीन शिळा उंबऱ्याची करीन खाई। ' –वसा ६८. ' अमृतसंजिवनी विजविली खाई। ' –तुगा ३७८९. २ खांच; खंदक; चर; खड्डा. [सं. खन्=खात, खातिका; प्रा. खाइआ]

खाई—स्त्री. नाश; क्षय; ऱ्हास. ' परि ऐलीकडिले मुखीं खाई। हों सरली जगाची। ' –ज्ञा ११.४४०. [सं. क्षी–क्षायिक; प्रा. खाइअ]

खाई—स्त्री. १ (बालभाषा) खाऊ; गोड पदार्थ. (कों.) २ स्तन; आमा. [सं. खादित; प्रा. खाइअ]

खाई-न-खाई—क्रिवि. कांहीं झालें तरी; निश्चयेंकरून; जरूर; खचित; हमखास. ' आम्ही श्रावणमासीं खाईनखाई येतों. ' –रा ३.१४१. [फा. खॉही–न–खॉही]

खाई(ही)श—स्त्री. इच्छा. ' रघोजी येथें यावा हे खाईश आम्हांस नव्हती. ' –रा १.२२. [फा. ख्वाहिश]

खाऊ—पु. १ (बालभाषा) कांहीं गोड खाण्याचा पदार्थ; खाई; खाद्य; मिठाई. ' खाऊ मजला आणीत होता। ' –नव २४. १७३. २ लांच; बक्षीस. –वि. १ (समासांत तिरस्कारार्थी) खाणारा; खादाड; खाबू. ' अफीम–भांग खाऊ. ' २ (ल.) घेणारा; सोसणारा, भोगणारा. ' मार–खेटरखाऊ ' ' प्राणखाऊ ' (समासांत) शेण–लांच–कोडगे–खापर–माती–हुज्जत–हुरमत–पैसे–माल–बट्टा–व्याज–भाड–दम–खाऊ. [सं. खाद्; प्रा. खाअ.] (वाप्र.) **खाऊची गोष्ट**–नशीब उघडणें; नफा; फायदा (व्यापार धंदा यात). सामाशब्द– **०इतमाम**–पु. पुलीच्या खाजगी खर्चासाठीं मुलुख तोडून देणें. –स्वप ३७९. **०खादाड**–वि. आधाशी; अतिशय खाणारा. **खाऊं गिळूं, खाऊडाऊ, खाऊडाऊं**–स्त्री. एकसारखी, फार, सतत जाचणी, गांजणूक. (क्रि० करणें; लावणें). [मी खाऊं–गिळूं–यापासून] **०घेवर्डा**–स्त्री. अति आधाशी, खादाड बाई. **०निंदक**–वि. खाल्ल्या घरचे वासे मोजणारा, कृतघ्न. **०पासरी**–वि. १ अधाशी; खाबूनंदन. २ फक्त खाण्याला तयार, इतर कामीं निरुपयोगी; उदरपरायण. [खाणें+पासरी]

खाऊन—स्त्री. कंबक्तीची वेळ. (क्रि० येणें). ' त्याची खाऊन आली. '

खाक—वि. जळून राख झालेला; धुळीस मिळालेला; पूर्णपण नष्ट झालेला ' परशरू होईना खाक, ' –ऐपो ४१७. ' पाऊस नाहीं म्हणून शेतें जळून खाक झालीं. ' –स्त्री. राख; धूळ; माती ' गवताची जळून खाक होते. ' –पाव्ह ५५. [अर. फा. खाक्=धूळ]

खाक, खांक—स्त्री. (गो.) खोकला. [सं. कास; प्रा. खास; किंवा ध्व. खॉ, खॉ करणें]

खा(खां)क—स्त्री. काख; बगल. काख पहा. ' खाकेस घेऊनियां श्वान । ' –यथादी ३.८०३. [सं. कक्षा प्रा. ककख; हिं. कांख; फ्रें. जि. खक, कांख] काख शब्दाखालीं सर्व वाक प्रचार व म्हणी पहा. **०म्ह** (व.) खाकेंत खवला अन् महादेव पावला सदोदित मूलकडेवर घेऊन फिरणाऱ्या व काम न करणाऱ्या स्त्रियेला लावतात.

खांकचें—क्रि. (गो.) खोकणें.

खांकट-टा—पु. (को.) माड, पेरू इ० वृक्षाचें कोवळें फळ.

खाकटणें—उक्रि. दांडगाईनें ओरबडणें, मोडणें, खेचणें छाटणें (झाडापासून त्याच्या फांद्या, पानें इ०).

खाक(कु)डचें—क्रि. (गो.) चांचरणें.

खांकमांजरी—काखमांजरी पहा.

खाकर—पु. १ सागाच्या वाशाचें निमुळतें टोंक. २ (ना.) वासा. [स. खक्खर]

खा(का)कर—पु. (राजा.) ओरखडा; जखम.

खा(खां)कर—वि. वयानें जीर्णे झालेला (प्राणी, वनस्पति); शुष्क; क्षीण. ' खांकर झाले वृक्ष सर्व । ' –एभा १२.३. –न. वठलेलें झाड; वांझ फळझाड. ' भग्न भाजनवृक्ष खांकर । स्मशानभूमि अकाळ मेघ निर्धार । ' –पांप्र २२.२९.

खांकर, खांकरा—पु घोड्यास चाल शिकवितांना जो खुलखुला वाजवितात तो; खुलखुळ्याची काठी ? ' जैसा वारु उपलाणी । तरट खांकर झणाणी । ' –एभा (पाठभेद) २.२१६. [सं. खक्खर=भिकाऱ्याची काठी; ध्व. खॉ+कु-कर]

खांकर-रा—पु. गाखर; बट्टी;गोवऱ्यांच्या झगऱ्यावर भाजलेले कणकेचे जाड रोट.

खा(खां)करणें, खाकेरणें—उक्रि. १ घसा साफ करणें. कफ वर आणण्यासाठीं खांकरा काढणें; बेडका काढणें. ' ना शास्त्राचेनि कीर नावे । खाकरोंही नेणती जीवें । ' –ज्ञा १७.९३. –अक्रि. १ खंकारणें; शब्द करणें; खोकणें; घशांतील कफ बाहेर आणण्यासाठीं प्रयत्न करणें. २ नानूं, काकूं करणें. [ध्व. खा ! खा ! ; खात्कृ-खात्करोति-खाक्करइ-खाकरतो. –मसाप २. २३८.]

' खांकरवसा-वासा—पु. खडसावणें; खरडपट्टी; ताशेरा (जोराचा). (क्रि० घालणें; सारणें; करणें; काढणें). खाकरवासा पहा.

खाकरवासा—पु. (वाळलेला व उंच वासा) १ वठलेलें उंच झाड, वनस्पति. २ (ल.) वार्धक्यानें, अशक्तपणानें वाहेर निघालेला पाठीचा कणा. ' पाठीचा खाकरवासा निघाला. [खाकर+वासा]

खा(खां)करा, खाकेरा—पु. १ कफाचा बेडका (खांकरून काढलेला); खाकरण्यानें सुटलेला कफ (क्रि० काढणें; टाकणें). ' वदनींचा खांकरा टाकला. ' [ध्व. खॉ; सं. खक्ख्=हंसणें ?]

खाकरी—स्त्री. दाणे काढून घेतलेलीं कणसें (विशेषतः बाजरीचीं).

खाकरी—स्त्री. (व.) चिलमींत ओढण्याची तमाखूची भुकटी, पूड. [अर. फा. खाक]

खाक(का)री—स्त्री. बेडका, कफ काढण्याची क्रिया; घसा साफ करणें; ओकारी (कफ काढण्याचा). (क्रि० काढणें).

खांकरेजणें-रेजणें—अक्रि तयार होणें; फुटणें; उद्भवणें. ' तेथ प्रवृत्तीचेनि वृद्धिलोभें । खांकरेजती शुभाशुभे । ' –ज्ञा १५. १५९. [खाकरणें; सं. कक्षा. खाक]

खाकस—(व. ना.) खसखस पहा.

खाका—पु. १ भिंतीवर, जमीनीवर काढावयाच्या आकृती; चित्रें वगैरे पहिल्यानें ज्या कागदावर काढतात तो कागद. २ कच्चा मसुदा; आराखडा; खर्डा. [फा. खाका]

खाका—पु. बाणा; तऱ्हा; वृत्ति. खाक्या पहा. [फा. खाका=आराखढा]

खाका—वि. (कों. कुला.) नारळाच्या सबंध पानाच्या दांड्यापैकीं ज्या दांडयावर पानें नसतात तो. [खाक]

खाकावणें—अक्रि. गरजणें; ओरडणें. [ध्व. खा]

खाका—स्त्री. हीनता, ' आम्हास खाकी यावी असा समय येऊन बातखाला (?) आहे. ' –रा ६.५२१. –वि. राखेसारखा; धुळीसारखा; मातीसारखा (रंग). [अर. फा. खाक=राख. फा. खाकी] **०गासावी-साधू**–पु. अंगाला राख फासणाऱ्या गोसाव्याचा एक पंथ; त्या पंथातील व्यक्ति. हे कृत्रिम गंगाजळाच्या (पाण्यांत गोपीचंदन कालवलें म्हणजे तें गंगेच्या पाण्यासारखें दिसतें) कावडी घेऊन हिंडतात. –गांगा १३२. २(ल.) तापट, रागीट, डोक्यांत राख घालणारा माणूस.

खांकुड—वि. (गो.) गांगरट.

खांकाटा—पु. खांकट-टा पहा.

खांकोटी-खाखोटी—कांखोटी पहा.

खाकोरणें—उक्रि. ओरखडणें; ओरबाडणें. खाकरा पहा.

खाकोरा—पु. ओरबाडा; ओरखाडा; बोंचकारा.

खाको(खो)ळें—न. मस्तकावरचा अर्धा भाग; कवटी; खोपटी; डोकें (दगड, काठी यानें मारण्याच्या, फोडण्याच्या, रक्त वाहण्याच्या संबंधानें अथवा तिरस्काराथीं योजतात). (क्रि० फोडणें; फुटणें). खोकें, खोकाळें पहा.

खाक्या—पु. प्रघात; बाणा; ठराविक वर्तनक्रम, स्वरूप; युक्ति. ' असा नेहमींचा खाक्या असे ' –सूर्योदय १३९. [फा. खाका=आराखडा, खर्डा]

खांख(खे)रणें, खांखकरा, खांखेरा—खांकरणें–खांकरा पहा.

खाखा—स्त्री. १ अनावर क्षुधा; पोटांतील भुकेची आग. (क्रि० करणें; सुटणें) २ अधाशीपणा; हावरटपणा; बराडीपणा. [खाणें]

खाखा—पु. मौक्तिक भस्मास लागणारीं बारीक मोत्यें; गाळ.

खाखाइणें—अक्रि. वाजणें; कर्कश वाजणें. ' निशाण त्राहाटिल्या भेरी । खाखाइल्या रणमोहरी । ' –एरुस्व ८.२०. ' रणतुरें खाखाइलीं अपार । ' –हरु २४.१२. [मूळ शब्द रव=ध्वनि पासून रवरवणें असेल व त्याचा उच्चार चुकीनें ' खाखा ' असा रूढ झाला असावा.]

खाखाई—स्त्री. खाखा; खवखव; सडकून लागलेली भूक. (क्रि० सुटणें; होणें). [खाणें द्वि.]

खाखात—वि. खा खा करीत उठलेला. ' खांखातें प्रेतें । खाएं गिळी करिते । ' –शिशु ९०२. ' भयानकें खाखातें । महा प्रळयो जेयें । ' –ज्ञा १.१३१. [खाणें द्वि.]

खाखात—वि. कर्कश. –ज्ञा १.१३१. [खाखाइणें–टीप पहा]

खाखावणें—अक्रि. सपाटून भूक लागणें; खाखा सुटणें. [खाणें द्वि.]

खांखोटा—खांकट–टा पहा.

खागडा—पु. (सांकेतिक) छप्परबंद जातीच्या टोळीचा नाईक.

खागें—न. अंतिम स्थळ, ठिकाण; शेवटची जागा. ' अगा मी एकुलाणीचें खागें । ' –ज्ञा ९.४७०.

खागें—न. खाद्य; खाजें; भातुकें. ' हे कथा कैसी सांगे । हो काज ब्रह्मविद्येचे खागे । ' –ज्ञाप्र १९. ' देह काळसर्पाचें खागें । ' स्वानु ३.४.३५. (–हंको. व –शर. याचा अर्थ खळें (मंडल) असा देतात). [खाजें]

खा(खां)च—स्त्री. बाणाचा टप्पा, पल्ला; शरपात. [खेचणें]

खा(खां)च—स्त्री. १ खड्डा; खळगा; खोंचा. २ (ल.)) व्यापारांतील बूड, तोटा. (क्रि० येणें; होणें; पडणें; बसणें). [खचणें; का. कच्चु=खोंचा, खळी] ०खच(ब)ळ–खळगा–ओबळा–स्त्री. खांचखड्डा; खांचखळी; खोलगीं बिळें (व्यापक रीतीनें). (सामा.) खांच. ' चालते समयीं खांचखळगा पाहून चालावें. ' म्हo जिकडे गेली बाला तिकडे खासा खबळा. ०खोंच–स्त्री. चढउतार; उंचसखल; विषमता (भित, जमीन यांची) ' भित रचली मात्र आहे, परंतु तिच्या खांचाखोंचा काढिल्या नाहींत. ' २ वाढ व घट; न्यूनाधिक्य; कमजास्तपणा. बारीकसारीक दोष (हिशेब, नक्कल, मसुदा, यांत). ' ह्या मसुद्यांत खांचखोंच असल्यास काढून तो साफ लिहा.' ३ गायनांतील खटके; आवाजांत चढउतार; उच्चनीच स्वर. ४ मर्म; वर्म; विंग. ' यांतील बारीक खांचाखोंचा मला पूर्ण माहीत आहेत. ५ भाषणांत, लेखनांत अलंकार ज्यांमुळें साधतो ती शब्दयोजना.

खाँचण—न. (गो.) फुलांची वेणी बुचड्यावर घट रहावी म्हणून आधीं खोंवतात तीं फुलें किंवा पानाची घडी. [खोंचणें]

खांचणी—स्त्री. खोबण, कोरणी; खंचणी पहा.

खांचणें—उक्रि. १ कमी करणें; काट मारणें. 'तैसा दानपुण्यें खांची । गोत्रकुटुंबा वंची । परी गारी भरी स्त्रियेची । उणी हों नेदी ।' –ज्ञा १३.७९४. २ खंडण करणें. ' म्हणोनि ते बुद्धि रचूं । मतवाद हे खांचूं । ' –ज्ञा १३.१०४९. –अक्रि. श्रमणें; दमणें; थकणें. ' उच्चैःश्रवा खांचे । खोलणिये । ' –ज्ञा ९.३२६. [खांच, खचणें]

खाचर—न. (व.) एक प्रकारची बैलगाडी. ' मोर्शीवरून उमरावतीस जाण्यास भाड्याचें खाचर मिळतें.'

खा(खां)चर—न. १ खळगा; खांच; खळी; खड्डा. २ पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळें जमीन धुपून पडलेला नाला, घळ; ओहोळ. ३ (कों.) डोंगराच्या बाजूवर अथवा पायथ्याशीं तसेंच कातळावर तयार केलेला शेतजमीनीचा तुकडा. ४ अर्ढ, भाजी इ० लावलेली आहे अशी पाण्याची खोलवट जमीन, खांचरी; उंसाचा मळा. ५ (सामा.) भातजमीन. ६ खडबडीत वस्त्र; जाडें–भरडें वस्त्र, धोतर, लुगडें. [खांच] ०खळगा–खुचर–पुन. खांचखवळ पहा.

खाँचरॉ—पु. (गो.) एक प्रकारचें भाताचें बीं.

खांचरी—स्त्री. १ (कों.) लावणीसाठीं तयार करावयाची भाताच्या रोपांची खोलगट जमीन; मोठें खांचर. २ उंसाचा लहान मळा. [खांच]

खांचवणें—उक्रि. खोबण पाडणें; खोबणींत बसविणें. 'ह्या पटया खांचवून बशीव.' [खांचणी]

खांचा—पु. खांड; कंगोरा; खोबण; खांच; खाप; खोंगा; (खुंटी, काठी, झाड, विहिरीची बाजू यांना पाडतात तो.) (क्रि० घेणें; पाडणें; काढणें; करणें). [खांच]

खांचाड—न. (खांच याचा अतिशय) वांकडातिकडा व मोठा खड्डा, खांच. [खांच]

खांची—स्त्री. खांच; झाडावर चढतांना पाय ठेवण्याची जागा; वेळका. 'पाय घसरुनी पडेल। अथवा खांची उपटी उपडेल।' –निगा ४४. [खांच]

खाज—स्त्री. १ कंड, कंडू; चिणचिण; हुळहुळ. (क्रि० सुटणें, निघणें). २ सुरसुरी; खुमखुमी; प्रबळ इच्छा; उत्कंठा (एखाद्या गोष्टीची) ३ खाद; कसर (कारभारी, मुनीम इ० ची). ४ (कु.) अधाशीपणा. [सं. खज्जु; फ्रें. जि. शज, शांज; का. कज्जि.] ०**जिरविणें**–खोड, खुमखुमी, रग मोडणें.

खाज—न. (व.) खोबऱ्याचा कीस, खसखस व साखर यांचें मिश्रण करंज्या, मोदक इत्यादींत घालतात तें. करंज्यांचें पुरण; सारण. 'खाजी करंज्यांत खाज घातलेलें असतें.' [सं. खाद्य; प्रा. खज्ज] –स्त्री. (गो.) चुरमा. खर्जाचे लाडू; चुरमी लाडू.

खाजँ—न. (गों.) दांड लगावण्याचा एक प्रकार.

खाजकुइ(यहि)री–ली, खाजकोयरी, खाजकोलती–कुवली—खाजरी कुहरी पहा.

खाजगत, खाजगी–वाला—खासगत, खासगी पहा.

खाजण–न—न. १ (कों.) खाऱ्या खाडीच्या पात्रांत, जेथें ओहोटीच्या वेळीं फारसें पाणी रहात नाहीं व बारीक रेव व चिखल असतो अशी जागा. २ अशा क्षेत्राच्या (एका बाजूस डोंगरपायथा असल्यामुळें ती बाजू खेरीज करून बाकीच्या) तीन बाजूंकडे मजबूत बांध घालून तयार केलेली भातजमीन; खारी शेतवाडी. ३ मीठ तयार करण्याचा वाफा. ४ (कु.) नदींतील गाळानें बनलेली जमीन. ५ (सामा.) खारी, दलदलीची जमीन. [वे. खंजण;गु. खांजण] ०**कोंबडा–पु.** (कों.) खाजणांत आढळणारा एक पक्षी. [तुल० सं. खंजन;प्रा. खंजण=खंजरीट पक्षी] **खाजणी**–वि. खाजणामध्यें उत्पन्न केलेलें, किंवा खाजणासंबंधीं (पीक, जमीन).

खांजणी—स्त्री. पाढे इत्यादींचा मिळवणीचा एक प्रकार; एक प्रकारची बेरीज. ही पूर्वी शाळेंत शिकवीत. [सं. खंडन] ०**भांजणी**–स्त्री. १ बेरीज आणि वजाबाकी; गुणाकार आणि भागाकार (अनेकवचनी प्रयोग). 'मी खांजण्याभांजण्या शिकलों.' २ (ल.) देवघेवीमध्यें नफातोटा सोसून एकमेकांचे विचारें केलेली सरासरी तोड. ३ अडचणींत सांपडलेल्या गिऱ्हाइकास वगैरे त्याजकडून येणाऱ्या रकमेंत दिलेली सूट. ४ (ल.) क्षयवृद्धि; उत्पत्ति–संहार. 'खांजणीभांजणीचें समजावें. मूळ तैसें।' –दा १५.४.१८. [सं. खंडन+भंजन]

खाजणें—उक्रि. खाज उत्पन्न करणें, सुटणें; खवखवणें; कंड सुटणें; खाज आणणें. (खाज सुटणाऱ्या सुरण, अळूं इ० पदार्थांमुळें). 'हाताला अळूं खाजतें.' –अक्रि. अंगाला खाज सुटणें; खाजवावेसें वाटणें. [सं. खर्जन]

खाजदार–री— खासदार–री पहा.

खाँजनॉ—पु. (गो.) एक जाड लोखंडी नळी; त्या नळींत दारू भरून काढलेला बार.

खाजभोडा—वि. (कु.) खादाड. [खाज+शिवी]

खाजरा—वि. खाज उत्पन्न करणारा; खवखवणारा; खंबरा (अळूं, सुरण इ० भाजी).

खाजरी कुहरी–ली—स्त्री. हें लहानसर झाड असून याचीं पानें मोठीं व काळसर असतात. झाडांना शेंगा येतात. पानें व शेंगा यांना कुसें असतात व तीं अंगास लागल्यास अंगाची आग होते (याला संकृत नांव आत्मगुप्ता अगर कपिकच्छ असें आहे). याच्याउलट गोडी कुयरी.

खाजलॅं—न. (गो.) खाद्य; खाणें.

खाजव—स्त्री. खाज; कंडू. (क्रि० सुटणें; येणें; होणें; मोडणें). [खाज]

खाजवाखाजव—स्त्री. १ परस्पर खाजविणें; सर्वत्र खाजविण्याचा व्यापार. २ त्रास, चीड; क्षोभ आणणें; चेतव; भांडण उपस्थित होण्यासाठीं मुद्दाम केलेली चेष्टा; लावालावी. [खाजविणें]

खाजविणें—उक्रि. १ कंडू शमनार्थ अंग चोळणें, खरडणें. 'प्रेमें वृकांनीं मृग खाजवावे। जेथें, अशा टाकुनि काय जावें।' –नरहरी गंगारत्नमाला. (नवनीत पृ. ४१७.) २ त्रास, चीड, क्षोभ आणणें; कलह उत्पन्न करणें; आग लावणें; डिवचणें; चिडविणें. [सं. खर्ज] (वाप्र.) **खरखर–रा खाजविणें**–जोरानें खाजविणें; ओरबडणें. म्ह० खाजवील त्याला खरूज भोगील त्याला संपदा. **खाजवून अधधणा आणणें**–आपल्या हातानें आपल्या जिवाला त्रास करून घेणें. **खाजवून खरूज काढणें**–(खरूज झालेल्या जागीं खाजविल्यानें खपली धरलेली असली तरी ती निघून खरूज वाढते यावरून) मिटलेलीं भांडणें पुन्हां उकरून काढणें; बळेंच कलह उत्पन्न करणें. **खाजवून पान्हा आणणें**–कोणेएकास कांहीं उत्तेजन देऊन कामास प्रवृत्त करणें.

खाजा—खाजी, खाजें पहा. –हिंदु ११.२.३०. ०**करंजी**–खाजी करंजी पहा. 'सगर्भ शुभ्र खाजा करंजा।' –जै ९४.५६.

खाँजॉ—वि. (गो.) नपुंसक. [खोजा]

खाजाळा–ळू—वि. १ भांडखोर; कळीचा नारद; खवाळ पहा. २ विषयी; कामुक. ३ खाज उत्पन्न करणारा. **खाजरा** पहा. ४ नेहमीं अंग खाजविणारा; (गो.) खाजाळो. [खाजण]

खाजाळूं—न. खाजरें अळूं. [खाज+अळूं]

खाजिवरा—वि. (राजा.) खाजरा पहा.

खाजी—स्त्री. (हिं.) एक मिठाई, पक्वान्न; खाजीकरंजी. [सं. खाद्य; प्रा. खज्ज] ०**करंजी**–स्त्री. हा एक करंजांचा प्रकार आहे. खालीं एक व वर एक अशा दोन पापड्यांमध्यें करंजांचेंच सारण घालून सर्भोवतीं मुरड घालावी व तुपांत तळाव्या –पाक ५८. 'फेण्या खाजी करंजी मृदुतर लुचया शकरेमाजि घोळी.' –किंसुदाम ३४.

खाजुकली—(बे.) खाजरी कुइरी पहा.

खाजुकें-गें—न. खाऊ; भक्ष्य. खाजी, खाजें पहा.

खाजुळी—स्त्री. वचनागासारखी एक वेल.

खाजूर—पु. (गो. राजा.) खजूर. [सं. खर्जूर] ०**माड**–पु. (गो.) खजुरीचें झाड.

खाजें—न. (ना.) लग्नांतला एक विधि. ?

खा(खां)जें—न. १ पंचखाजे; खारीक, खोबरें, खसखस, खिसमिस, खडीसाखर हे ख नें आरंभ होणारे पांच पदार्थ. पंचखाद्य पहा. 'होळीमध्यें खाजें आहे. तें तूं विचारुनी पाहे.' –रामदास होळीपंचक. २ वाणसौदा; वाण्याकडील सामान. ३ खाजी नांवाची मिठाई. 'घ्या घास मुहूर्ते येथें वाढितें खाज्या.' –प्रला १९४. ४ (कु.) हरभऱ्याच्या पिठाच्या लांबट गोळ्या गुळाच्या पाकांत करतात त्या (खाज्या). ५ एखाद्याच्या आवडीचें खाणें, खाद्य. उदा० मेंढरूं हें लांडग्याचें खाजें, उंदीर माजराचें खाजें. 'आणितो हिमांशुचि जेवि खाजें चकोराचें.' –ह्रा ६.२९. 'स्त्री म्हणिजे मेंढिएचें खाजें गा.' –सूत्रपाठ आचार, उत्तरार्ध २५३. 'ऐसें शरीर बहुताचें मूर्ख म्हणे आमुचें. परंतु खाजें जीवाचें. तापत्रैं बोलिलें.' –दा १.१०. ६०. ६ लहान मुलांचा खाऊ; भातुकें; मिठाई. –वि. चमचमीत; आवडतें; मुप्रास (भोजन). 'नहो एंची जुंझ भांडण. तन्हीं तु नाहीं खाजें जेवण.' –शिशु १२०. [सं. खाद्य; प्रा. खज्ज] ०**करु-कार**–वि. (गो. महानु.) हलवाई; खाजें करणरा. 'भांडारी खाजेकरू.' –शिशु ३५४. [खाजे+कर]

खाजोळा—वि. (कु.) खादाड. 'हो मोठो खाजोळो आसा.' [सं. खाद्य; प्रा. खज्ज+अलू प्रत्यय]

खाजोळा—वि. (कु.) खाजरा; अंगास खाज आणणारा. 'हो सुरण खाजोळो आसा.' [खाजणें]

खाट—वि. १ खाष्ट; द्रष्ट; तिरसट; रानवट (मनुष्य, प्राणी). २ कठिण; कठोर; निष्ठुर; करडें (वर्तन, भाषण). [खाष्ट; तुल० कानडी. काट=पीडा]

खाट—पु. ठसका; भपकारा; खकाणा (मिरच्या इ० उघळणाऱ्या पदार्थांचा). 'मिरची घरांत ठेविली तर कांहींच होत नाहीं पण तीच अग्नींत पडल्यास तिचा खाट उठण्यास आरंभ होतो.' –दयानंद सरस्वती १५६. [का. काट?]

खाट—स्त्री. चारपाई; बाज; बाजलें; खाटलें; काथ्यानें विणलेला पलंग. [सं. खट्वा; प्रा. खट्टा; तुल० का. कट्टु=बांधणें; ता. कट्टिल=पलंग; इं. कॉट] (वाप्र.) **खाटेवर चढणें**–पूज्य माणसाविरुद्ध किंवा उपकारकर्त्याविरुद्ध उलटणें; कृतघ्न बनणें. सामाशब्द– ०**खटलें-खडबड**–नस्त्री.(व्यापक) बाडबिछायत;सामानसुमान; चंबुगवाळें; प्रपंच. ०**खिळथा**–वि. खाटेस,बिछान्यास खिळलेला; सदोदित आंजारी असलेला. 'तो ना! जन्माचा खाटखिळथा!' [खाट+खिळणें] ०**खोली**–स्त्री. (खाट आणि खोली न सोडणें) खाटखिळथा होणें. (क्रि० करणें). ०**पसारा**–पु. फाफट पसारा; पखळण; (सामान्यतः वस्तूंचा) अस्ताव्यस्त कारभार; गोंधळ. (क्रि० करणें; मांडणें; घालणें; –कर्माची षष्ठी; होणें; पडणें –कर्त्याची षष्ठी). ०**मार**–पु. खाटेस बांधून फटक्यांचा दिलेला मार. 'खाटमार ऐकिलात कोठें.' –अफला ६५. 'खाटमार मोठा कठिण. नाहिं कुठें ऐकिली तऱ्हा.' –ऐपो ३६०. [खाट+मारणें] ०**वाईक**–खाटलेवाईक पहा. ०**वाक(ख)ळ**–स्त्री. १ खाटखिळथाचें घेतलेलें सोंग; आजारीपणाचे ढोंग. (क्रि० घेणें; निजोंग; निजून पडणें). २ (ल.) उपेक्षेनें, बेपर्वाईनें, निष्काळजीपण वागविण.

खाट—स्त्री. (गो.) लाथ; टांच. [खोट] **खाटांवचें**–क्रि. (गो.) लाथा मारणें.

खाटक-की, खाटीक—पु. १ पशूंना मारून त्यांचें मांस विकणारी जात; बकरीं, मेंढरें यांची सागुती विकणारी एक हिंदू जात व तींतील व्यक्ति; कसाई. (स्त्री–खाटकीण). २ (ल.) निर्दय पुरुष. [सं. खट्टिक] **खाटकी माल**–पु. मांस; सागुती.

खांटयॉ—पु. (गो.) सोनाराचा लहान घण, हातोडा.

खाँटलॉ—पु. (गो.) बुरडी टोपली.

खाटलें—न. १ लहान बाज; खाट. २ (कुण.) सप्तऋषी (आकाशांतील तारकापुंज, त्यांच्या आकृतीवरून). ३ बैलगाडी. ४ बाडबिछाना. [खाट] **खाटल्यावर जाणें**–१ मातृगमन करणें. २ खाटेवर चढणें पहा. (ना.)(वाप्र.) ०**टाकणें**–आजारी पडणें. [खाट] ०**बाजलें**–न. १(कुण.) सप्तऋषी (आकाशांतील तारकापुंज, त्यांच्या आकृतीवरून). २ बायकांच्या लुगड्यावरील समविषम चौकटींची नकशी. ०**वाईक-कुजवणारा**–वि. अंथरुणाला खिळलेला; खाटखिळथा पहा.

खाटवा—पु. खाट; बाज. [सं. खट्वा]

खाटवावडी—स्त्री. एक प्रकारचा पतंग, वावडी.

खाटसरी—स्त्री. (विणकाम) वस्त्राचा विणलेला भाग ताठ राहण्यासाठीं केलेली काठया वगैरेंची हातमागांतील योजना; कटतर. काटसरी, काटोसी पहा.

खाटा—वि. (माण.) १ पुढच्या पेरणीसाठीं नांगरून व मशागत करून पडित ठेविलेली (जमीन). (ही हवेंत उघडी राहिली म्हणजे हींत आंब अथवा क्षार जमतो यावरून). २ अशा जमिनींत उत्पन्न केलेलें (धान्य, दाणा इ०). [खट्टा.; सं. क्षत्ता]

खाटा—वि. (हिं.) आंबट. [खट्टा]

खाटिक—पु. १ टोळ, किडे, सरडा खाणारा एक पक्षी. २ कसाई. [सं. खट्टिक]

खाटी—वि. (कों.) १ आंबटढाण (विशिष्ट फळझाडें, फळें इ०). २ हलका; वाईट. [प्रा. खट्ट; हिं. खट्टा] **०डाळ**—स्त्री. (गु.) आंबट वरण; आमटी.

खाटीक—पु. खाटक पहा. हिंसक; मारक. 'सांग, मकरंदाप्रमाण वेषांतर करूं ... कां दुष्यंताप्रमाणें मृगबालकांचा खाटीक बनूं ? ' –भा ५०.

खाटी मेजवानी—स्त्री. मांसाहारी भोजन.

खाट्टु–ट्टू, खाट्टळ–टोळ—वि. (कु.) आंबलेलें; नासलेलें (अन्न, फळ). [प्रा. खट्ट]

खांटोळी, खांडपोळी—स्त्री. (हेट.) तांदुळाच्या रव्याचें केलेलें एक पक्वान्न; खांडव्याच्या वड्या.

खा.टया—वि. १ आंबट; आंबटतुरट (विशिष्ट फळें व फळझाडें). २ आंबट (स्वयंपाक, पदार्थ). उदा० खाटया वरण–डाळ–आंबटी–भाजी–फळें इ०. [खाटा]

खाड—स्त्री. खाडी पहा.

खाड—स्त्री. (व.) १ तूट; अभाव. ' महिनाअखेर नोकरी करणाऱ्याच्या येथें सर्व गोष्टींची खाड पडते.' २ संकट. 'तुमच्यावरची खाड आमच्यावर आली.' ३ नाट. [सं. खंड]

खा(खां)ड—न. दाढी व कल्ले (तिरस्कारार्थी). ' मग आपुले करकमलें । ब्रह्मयानें खांड सोडविलें । ' –कथा ५.४.१८. ' वक्त्याचें खाड हाले । ' –गीता २.१३९८. २ दाढीची हजामत; दाढी. ' अर्धे खाड अर्धे श्मश्रु । मुंडण करून टाकिलें । ' –मुविराट ६. १४१. [सं. खंड; अर. खड=गाल] **म्हo** खाडास वेगळें बोडास वेगळें कोण देतो ? =लहानसहान गोष्टींत भेद कोण करतो ? **खाडकी**—स्त्री. १ (गो.) दाढी. २ (कु.) हनुवटी. **खांडमिशा**—स्त्री अव. १ दाढी व मिशा. (एक. व.) खांडमिशी. २ चाई लागलेल्या, अर्धवट काढलेल्या, जागजागीं खंड पडलेल्या, ओठाच्या खालच्यांत खंड पडलेल्या मिशा. ' युद्धीं खाडमिशा बोडी । हे आपरवडी त्वां केली । ' –एरुस्व १३.११. ' जळलीं मुखें भस्मल्या खांडमिशा । ' –रामदासांची कविता भाग १. पृ. ८. [खांड=दाढी+मिशा; किंवा खड=त्रुटित+मिशा]

खांड—पु. तरवार खांडा पहा.

खांड—स्त्री. १ ताली, बंधारा, भित यांतील भेग, तडा, चीर, भोंक. ' खाचरास खांड पाडली. ' २ कातरा; सड; दांता; खरा (तरवार, विळा यांच्या धारेवरील). ३ दांतांमधील खिंड. ४ पिवळसर व भरड, हस्तकृतीची साखर. ही थोडी अंबूस असते. ' खाये खीर खांड । ' –तुगा ४२९. –न. १ भक्कम व चौरस किंवा आधी तुळई, तुळवट. २ एखाद्या वस्तूचा तुकडा (सुपारी, बिब्बा, हळकुंड, चंदन, गोवरी इ०) ' ऐसें हे सेंडया,कडिल खांड । ' –दा २०.३.४. ३ टोळी; दाटी; कळप (बकरीं, मेंढया यांचा). ४ झाडाचा ठोकळा, भाग. ५ शेताचा तुकडा. ६ धान्याचा चुरा; कळण. –वि. १ दाट. २ भंगलेलें. ' असावें का खांड देउळीं । ' –भाए ४९३. [सं. खंड] सामाशब्द–**०क(ग)ळी शिवी–खांडगाळी**—स्त्री. सुवासिनी स्त्रीस रांड, बोडकी या अर्थाची शिवी. [तुल० सं. खंडालि=जिचा नवरा दुराचारी आहे अशी स्त्री]. **०कापी सुपारी**—स्त्री. क(का)चरी सुपारी; सुपारी कोंवळी असतां शिजवून व राप (सुपारीच्या काचऱ्या शिजविलेलें पाणी) शिंपडून उन्हांत वाळवितात. व काचऱ्या काढतात अशा सुपारीला खांडकापी म्हणतात. हिलाच चुकीनें ' लवंगकाचरीसुपारी ' म्हणतात. **खांडकी**—स्त्री. दगडाचा फोडलेला मोठा तुकडा; चीप; कळपा; फाडी; इमारतकामांतील खांडकीची पुढील चौरस बाजू घडीव, असुन मागील उतरती व अणकुचीदार असते. **खांडकें**—न. उसाचें कांडें. **खांडक्या**—वि. (गु–हाळ) उसाचे तुकडे करणारा;पेरुळया. **खांडडोह–हो**—पु. १उन्हाळयांत नदीचा प्रवाह आटल्याभुळें मध्यें मध्यें प्रवाहाला पडलेले खंड; खंडित डोह. खांडवा; भाट–टी. २ (चुकीनें) पाण्याच्या प्रवाहांतील खोल जागा (कोठली तरी). सामान्यतः अनेकवचनी प्रयोग. (क्रि० पडणें) **०तुळई**—स्त्री. तुळवट; खांड अर्थ ५ पहा. **०तोळी**—स्त्री. (राजा.) एक पक्वान्न; खांडवी. हें तांदुळाच्या कण्यांचें करतात. **०दोर**—पु. (व.) बैलास बांधावयाचा दोर. **०पासोळा**—पु. खुनशी, आकसखोर मनुष्य. [खांड+फासळी] **०फाडोळी**—वि. (व.) एका बाजूस फांसळी कमी असलेलें (जनावर). **रागखांडव**—पु. एक प्रकारचा मोरंबा. कृति–साल काढलेल्या हिरव्या आंब्याच्या फोडी तुपांत परतुन खडीसाखरेच्या पाकांत शिजवून, मिरीं, वेलदोडे, कापूर यांचा वास लावून बरणींत ठेवणें.–योर १.८०. **खांडव**—पु. (संगीत) अवरोह. (क्रि० करणें). **खांडव**—पु. लग्नांत विडे, सुपारी वाटण्यासाठीं केलेली कापडाची (खणाची) झोळी. [खंडवस्त्र] **खांडव–वा**—पु नदीच्या प्रवाहांत पडलेली भाटी; खांडडोह. **०वी**—स्त्री. वाळविलेल्या खाऱ्या मासळीचा तुकडा. **खांडवी–वें–वे–पोळी–बोळी**—स्त्रीनपुअवस्त्री. १ (कों.) तांदुळाचा रवा काढून त्यांत गूळ, खोबरें, लवंगा,वेलदोडे इ० घालून त्याच्या वाफे वर शिजवलेल्या वड्या, या तुपाबरोबर खातात. २ गूळ, पीठ, नारळाचें दूध एकत्र करून शिजवून करतात तें पक्वान्न. ३ (क. सारस्वत) कानोले. **०वेल**—स्त्री. एक मोठी वेल. **०साखर**—स्त्री. १ एक प्रकारची गुळी साखर. खांड अर्थ ४ पहा. २ खडीसाखर.

खांड—पु. (गो.) लहान दगडी पूल; सांडवा. [खंड]

खांडँ-णँ—न. (गो.) खतासाठीं शेतांत सांठवून ठेवतात तें खारें पाणी. [सं. खंड=एक प्रकारचें मीठ, क्षार]

खाड-कन-कर-दिनीं-दिशीं—क्रिवि. (खाड! अशा आवाजानें, मोडणाऱ्या, पडणाऱ्या झाडाच्या आवाजाच्या अनुकरणावरून) विशिष्ट आवाज होऊन. (क्रि० मोडणें; वाजणें; पडणें थोबाडीत मारणें.)

खाडखडबड—स्त्री. खसखस, फसफस आवाज. (भांड्यांत उंदराचा, पाला पाचोळ्यांत कीटकांचा) [ध्व. खाड+खडबड]

खाडखाड—क्रिवि. खाड! खाड! अशा आवाजानें युक्त. ' खाड खाड उठती टापा। ' –संग्रामगीतें ५.१७. [ध्व.]

खाडगी—पु. (कु.) कसाई; खाटीक.

खांडचोर-री—खाणचोर-री पहा.

खांडणावळ—स्त्री. खणण्यावळ; खणण्याची मजुरी. [खांडणें]

खांडणें—उक्रि. १ मोडणें; जोरानें तोडणें; छेदणें; छाटणें; खापणें; काटणें; खंडणें. ' समिधा तो खांडुं लागला। ' –वसा ६१. २ खणणें; खोदणें. ' उपनिषदर्थाची माळी–। माजीं खांडिलीं ' –ज्ञा १८.३५. ३ (ल.) कुरतुडणें; चावणें; खुडखुड करणें (गिळलेली माशी). ४ (राजा.) जेवण्याचें पान अथवा द्रोण करण्यासाठीं पोफळीच्या झाडाची पोय, विरी, पानें कातरणें, छाटणें. ५ खांडवीच्या बर्फीच्या वगैरे वड्या, खापा पाडणें. ६ (ल.) निरास करणें. ' मा तर्काचें खुरपें। खांडे कोणा। ' –अमृ ६.२४. ७ (ल.) अडविणें. ' सर्पे वाट खांडिली ' –वसा ५९. ८ वेगळें करणें; पृथक् करणें. ' कां चांचूचेनि सांडसें। खांडिजे पय पाणी राजहंसें। ' –ज्ञा ९ ४४. [सं. खंडन] **सडा खांडणें**–(वांसरूं किंवा करडूं यानीं) सड थान किंचित कुरतडणें, चावणें. **म्ह० आडवें आलें तें खांडून काढावें.**

खॉडप—न. (गो.) चुडतांच्या किंवा कुडांच्या भिंतीची केलेली खोली.

खाडयॉ, खाडियॉ—वि. (गो.) दाढीवाला. [खाड]

खाडवें—न. ताडमाडावर चढतांना पायांत अडकविण्याचा दोरीचा फांस; पायंडा. (वाप्र.) **अडव्यास खाडवें बोलणें**–(ल.) चांगल्याच्या मोबदला वाईट बोलणें; आदराबद्दल अनादर दाखविणें. (आडव्या झाडाला खाडवें लागत नाहीं पण तें वापरावयाचें–यावरून).

खाडा—पु. १ खंड; खळ; तहकुबी (कामांत, गतींत). ' त्या कामास चार दिवस खाडा पडला. ' २ तहकुबीचा एक दिवस, एक पाळी; रिकामा वेळ. ' त्या महिन्यांत तुम्हे चार खाडे झाले. ' ३ खळगा–गी; खांच; खोलगा; खालीं गेलेली किंवा दबलेली जागा. ४ (ल.) खडखडाट; अभाव (खाद्य, पाणी, पाऊस यांचा). [सं. खात, किंवा खंड] (वाप्र.) **खाड्यांत उतरणें-घालणें-पाडणें-टाकणें(माणसास)**–दारिद्र्यांत, तोटयांत, हलाखींत घालणें. **खाड्यांत घालणें (पैशास-डागिन्यांस-गहाणास)**–लबाडीनें आत्मसात करणें; गिळणें, दाबणें. **खाड्यांत पडणें**–तोटा येणें; नाश होणें, सामाशब्द-**०दिवस-तिथी-वेळ-काळ**–वि. रिकामा दिवस इ०.

खॉडॉ—पु. (गो.) खोडा; बंधन.

खांडा-डुं—पुन. रुंद पात्याची, दुधारी, सरळ व वाटोळ्या टोंकाची तरवार. खंडा पहा. ' तुझां खांडेआं खरांटेनीं। दानव प्रतापु केरू फेडौनी। ' –शिशु १५८. ' वोडन खांडें घेतलें करीं। ' –एरुस्व १२.१२६. **०ईत**–वि. खांडा बाळगणारा; खांडेकरी (शिपाई).

खांडा—पु. १ शस्त्राच्या, हत्याराच्या धारेस पडलेली खांच, खरा, कातरा, दांत. २ खवदाड; घळ; चर; ओहळ. [सं. खंड]

खाडाण—वि. दूध न देणारी, नाटाळ (गाय). **खडण, खडाण** पहा.

खांडार—न. (खांड याचा अतिशय) मोठें भगदाड; मेग; चीर; खिंडार. [खांड]

खांडावा—पु. खंड; तुकडा. ' यार्णी मध्यें वेलाशक घोडी घालून अगदीं खांडावा तोडला. ' –भाव ११९. [खंड, खांड]

खा(खां)डी—स्त्री. दाढी. खांड पहा.

खाडी—स्त्री. नदींत जेथवर समुद्राच्या भरतीचें पाणी येतें तेथवरचा भाग, वांकण, ओहोळ. [सं. खन्–खात किंवा क्षार–री]

खांडी—स्त्री. १ खिंड. २ शरीरावरील खवंद. ३ दातांतील खिंड. ' तसे खांडीहूनि लाळे। पडती पूर। ' –ज्ञा १३.५६७. [खंड]

खांडी—स्त्री. खांडा; तरवार. ' लखलखितें खांडीं ' –शिशु १०३८. [खंड]

खाडूं—न. (हेट. कु. गो.) खाडवें; दोराचें अगर वेलीचें वेटोळें. याचा उपयोग माडावर चढण्याकडे करतात. खाडवें पहा.

खाडू—वि. १ खट्याळ; नष्ट (घोडा, माणूस). २ मिशा, दाढी नसलेला. ३ (सांकेतिक, औपरोधिक) पावणेआठ, नपुंसक; षंढ; तुवर. ४ (व.) वृद्ध कपि; निखाडू. ५ (व.) (निदाव्यंजक) परीक्षेंत अनेकदां नापास झालेला विद्यार्थी; ढ. [खाड]

खांडू(डु)क—न. १ गळूं; गलंड; गांठ. ' खांडुक जाल्यां किडे पडती। ' –दा १.१०.५२. २ फुटलेलें गळूं; वाहणारें क्षत. ३ हाडावरील उटंगळ; उठापूं. ४ खवडा; डोईंतील फोड. [सं. खंड किंवा कंद ?] **खांडु(डू)केला**–वि खांडकांनीं ग्रस्त, व्याप्त.

खाडूस—न. १ अडकाठी; अडथळा; प्रतिबंध; व्यत्यय; बाध; अड; नड; लोढणें; व्याधि; उपाधि; त्रास. २ (ल.)

अडथळा करणारा, जाचणारा, त्रास देणारा, व्यत्यय आणणारा माणूस, मुद्दा, विषय. 'घरामधें सुनेला सासूचें खाड्स.' [खंड]

खांडे—न. नदीच्या पात्रांतील कोरडी जागा; खांडडोह. [खंड]

खांडें—न. (गो.) शस्त्र टेवण्याची पिशवी. ?

खांडे—न. तरवार; खांडा. 'सारथियांचा तोंडीं सुनि खांडें।' –शिशु १०४७. [खंड] **खांडेकरी–कर**–पु. तरवार बाळगणारा शिपाई खांडाईत. 'तीनशत उभे खांडेकर।' –कथा ४.६.१७५. **•धुआवन**–न. (महानु.) (तरवारीस पाणी देणें). एक प्रकारचा कर; खंडणी. 'खांडेधुआवन मागे अंतराळीं।' –शिशु १६२.

खांडें—न. (व.) सुती जाड लुगडें (निंदाव्यंजक). 'एक खांडें घेतलें आहे नेसायला' [खंड]

खांडेनवमी—स्त्री. नवरात्र उत्सवांतील शेवटचा दिवस. या दिवशीं शस्त्रांची पूजा करतात व कुणबी लोक कोंबडीं, बकरीं यांचा बळी देतात. [खांडा]

खांडोरें—न. (खांडचें लघुत्व) खांड अर्थ १, २, ३ पहा.

खांडोळी—स्त्री. एक पक्वान्न. खांडवी–वे पहा.

खांडोळें—न. १ खंड; तुकडा; भाग. २ छाटलेला तुकडा; खंड (जिवंत साप, किडा, प्राणी यांचा). [सं.खंडल] (शस्त्रानें) **खांडोळीं करणें**–तुकडे तुकडे करणें.

खाऱ्या खार—पु. काडीखार; पापडखार. [सं खंड+क्षार]

खाण—स्त्री. १ खोल खड्डा; खळी; बळद. २ दगड, धातू, रत्नें इ० काढण्याकरितां खोल खणलेली जागा. ३ घर; निवासस्थान (मुंग्या, इतर किडे यांचें). ४ (ल.) मूळ; उगम; थळ; उत्पत्तीचें ठिकाण; जात; झरा. ५ आगर; निधि; सांठा; खनि; समृद्धिस्थान. [सं. खनि] **म्ह०** खाण तशी माती. (बीज तसा अंकूर या अर्थानें)=जशीं आईबापें तशी मुलें. 'जिचे उदरी तव उत्पत्ती। तिची निवडली ऐशी जाती। म्हणोनि खाणतशी माती। आहाणा लोकीं प्रसिद्ध।' –मुक्तेश्वर. सामाशब्द–**•करी**–पु. खाणींत खणणारा; खाणीवाला. 'ज्यांस अर्जुन खाणकऱ्यांनीं हात लाविला नाहीं अशा डोंगराच्या पोटांतून सोनें व संगमरवरी दगड निघतील.' –मराठी ६ वें पुस्तक पृ. ८२. (१८७५). **•गत**–स्त्री. खाणीपासून सरकारला मिळणारें उत्पन्न. **•चोर**–पु. खणून घर फोडणारा चोर; याच्या उलट दरोडेकरी, वाटमाऱ्या. इतर अर्थांसाठीं खानचोर पहा. **•चोरी**–स्त्री. घर फोडून केलेली चोरी. खा(न)चोरी पहा. **•वट**–स्त्री. कुळी; वंश; जातगोत. खानवटा पहा.

खाण—न.१ (क्र.) खाणें; अन्न. 'खाण चांगलें तर शरीर बळकट.' २ जेवण या शब्दास जोडूनहि वापरतात. 'तुमचें जेवणखाण झालें कीं?' [सं. खादन; प्रा. खाण] **म्ह०** १ खाण थोडें मचमच फार–थोडक्या गोष्टीचा सर्वत्र गवगवा करणें. २ (गो.) खाणजेवण कैसेंय आसूं अर्थ अपुर्बाय बरी=पेणें घेणें कसेंहि असलें तरी प्रेमाचा शब्द असावा.

खाणखुण—स्त्री. खूणखाण पहा.

खाणणें—उक्रि. खणून काढणें; हत्याराच्या साह्यानें उकरणें. खणणें पहा. 'किल्ला खाणून यमुनेंत टाकीन' –भाव ३०. 'जरी बहु जनामयद्रुम समूळही खाणिला।' –केका ४४. २ अजीबात नाहींसा करणें; निर्मूलन करणें. 'रामराम जप जपोनि दोष-खाणिला।' –आप ८. [सं. खन्]

खाणपद्—न. (गो.) घुसुट नांवाच्या वाद्यांतील एक चीज. 'हें वाजवून झालें कीं खाणपद म्हणा.' [सं. खंड+पद्य]

खाणवट—स्त्री. चोळीची पाठ. [खंड+पट]

खाणवें—न. (गो.) जमीनीवर पीठ सांडूं नये म्हणून जात्याखालीं घालावयाची बांबूची चटई. [खंड]

खाणाजंगी—स्त्री. खानाजंगी पहा.

खाणाघळ—स्त्री. पैसे दिले असतां जेवण मिळण्याची जागा, दुकान; हॉटेल; भिशी; (गु.) बिशी. २ तेथील जेवणाबद्दलचे पैसे. ३ सार्वत्रिक, एकवट जेवण (सार्वजनिक भोजनालयांतील). [खाणें+वळ प्रत्यय]

खाणी—स्त्री. (खाण यांचें लघुत्व) खाण अर्थ २,४ पहा. १ योनी; जन्म 'बहु या प्रपंचें भोगविल्या खाणी।' –तुगा १५४५. २ उत्पत्तिस्थान; उगम. 'तैसी कर्मजातांचि हे खाणी।' –ज्ञा १८.३५२. (समासांत) पाप–पुण्य–गुण–ज्ञान–धर्म–खाणी. [खाण] सामाशब्द–**खाणीच्या–खानदानीच्या**–वि. चांगल्या कुळीचा, बीजाचा, वंशाचा, पैदाशीचा, कुलवंत. **•पुरळ**–स्त्री. गुजरायेंतील काळसर शेतजमीन. पाऊस पडल्याबरोबर हींत सर्वत्र भोकें पडतात. –कृषि १४.

खाणीव—वि. खणलेलें; खाणींतलें; खणून काढलेलें. 'खाणीवा खुडिवा तोडीवा। त्रिगुण गुणांच्या सोलिवा।' –एकस्व १४.१०४. [सं. खन्]

खाणें—उक्रि. १ भक्षणें, जेवणें. २ तनाखोरी करणें; गिळंकृत करणें; लांच खाणें; हरामखोरीनें किंवा लबाडीनें आत्मसात् करणें. ३ गिळणें; गट्ट करणें; ग्रासणें; चट्ट करणें. ४ घेणें; फस्त करणें (इमारत सामानसुमान संपविते तसें). 'त्या वरानें हजार वांसे खाले' ५ सोसणें; सहन करणें (मार, उष्णता, थंडी). 'खानें एक छडी खाली.' ६ आंत घेणें (हवा); ७ घेणें (शपथ); ८ प्रासून टाकणें, पूर्णपणें वश करणें. (औषध, मनुष्य). ९ पराभव करणें. 'काशीकरानें रंगनाथशास्त्र्यास एका क्षणांत खाऊन टाकलें.' १० गाळणें, टाकणें, सोडणें (बोलण्यांत अथवा लिहिण्यांत नसणें) ११ चावणें; डसणें. 'साप खाई पोट रितें' =दुसऱ्यास चावण्यानें

सापाचें पोट भरत नाहीं. (कुत्रीं, बिचारी किरडें, किडे, जिवाणूं यांच्याहि चावण्यास लावतात,तसेंच शारीरिक अस्वच्छतेबद्दल योजतात. 'मळ खातो, उवा खातात, पिसा खातात.'=उवा, पिसा ह्या मात्र डोकें (डोकसें, डोसकें, शीर) खातात म्हणजे चावतात, त्रास देतात). १२ तोडणें; टोचणें; मनाला बोचणें (पाप,गुन्हा,मन, पाप बुद्धि). 'कीं पापियासि निज पातक जेवि खातें.' १३ (ल.) कुरतडणें: डवचणें; तोडणें (वाईट अन्न, पित्त, मानहानीचें भाषण). १४ एखाद्या जोखमीच्या कामानें एखाद्याचा नाश करणें; 'या कंत्राटानें त्याला पुरें खाल्लें.' १५ खर्च करणें. 'तूं माझा अर्धा तास खाल्लास' १६ मारणें; बळकावणें. 'वजिरानें उंट खाल्ला.' १७ भोगणें; सेवणें (विसावा, चैन). –अक्रि. १ भक्षणें; भक्षणें आणि जगणें; अन्न घेणें, घालणें (भोजन करणें असा या क्रियापदाचा अर्थ होत नाहीं. 'जेवणें' पहा). २ दुखणें (डोकें, डोसकें, डोई, शीर, माथा, कपाळ इ०) –अकर्तृक क्रि. (ला. शीं जोडून). कोणी खातो, तोडतो अशी आंत भावना वेदना, होणें. [सं. खादन; प्रा. खाण; सिं. खाइणु; तुल० फा. खाईदन=कुरतडणें] (वाप्र.) खाईन खाईन करणें–अधाशीपणा करणें; खाण्यास धावावलेला असणें; खा खा करणें. खाऊन टेकर देणें–दुसऱ्याच्या वस्तूचा अभिलाष धरून ती आपलीशी करणें, गिळंकृत करणें, आत्मसात करणें. खाण्यामुळें हीनशक्त होणें–खाण्याच्या अभावामुळें अशक्त होणें. खाणें तुटणें–क्षुधा किंवा पचनशक्ति कमी होणें. खाण्याप्यायाचे दिवस–तारुण्यांतील आनंदाचे व उल्हासाचे दिवस; आयुष्यातील सुखाचे दिवस. जीव-प्राण-खाणें–दुसऱ्यास फार त्रास देणें. दांत ओंठ खाणें–अतिशय रागावणें. म्ह० १ खाई त्याला खवखवे (खवखवणें म्हणजे घशांत कंडू सुटणें यावरून)=जो वाईट काम करतो त्याच्या पोटांत तें डांचत असतें असा अर्थ; चोराच्या मनांत चांदणें. २ खाईन तर तुपाशी नाहीं तर उपाशी=मी म्हणेन तें ऐकलें तर ठीक आहे, नाहींतर मी रुसून बसणार असा हट्ट घेऊन बसणें या अर्थी.

खाणें—न. खाद्य; अन्न; खाण्याची वस्तु. ०**जेवणें**–न. १ (सरसकट) खाद्यपदार्थ; खावयाचा माल; अन्न. २ खाण्याची क्रिया;भोजन. 'त्या गांवांत खाण्याजेवण्याची सोय आहे काय?' ०**पिणें**–न. (खाणें व पिणें). १ खाणें जेवणें पहा. २ सुखाचे असणें. 'हे त्याचे खाण्यापिण्याचे दिवस!'

खाणोरा-री—वि. १ अधाशी; खादाड; पोटबाबू. 'पुत्र पत्नि बंधु सोयरीं खाणोरीं' –तुगा १५८९. २ चोखंदळ चवीचें खाणारा. [खाणें]

खाणोरी, खाणोरीचोर—पु. दरोडेखोर; चोर; घर फोडणारा; काळीजखाऊ. 'मज निद्रिस्थातें खाणौरियें । लुटौनि नेति' –ऋ ५५. 'दरवडेकरी खाणोरी।' –दा २.३.३१. 'घरिचे घरीं चोरी आपणचि खाणोरी।' –दावि २३४. खानचोर पहा. [खणणें] ०**चोरी**–खानचोरी पहा.

खाण्णी, खाण्णीभाण्णी—खांजणी पहा.

खात—पुन. १ शेतांत घालावयाचें खत. 'खात मूत भस्म मिळोन। पुन्हा पृथ्वी।' –दा १५.४.८. २ केरकचरा (खतासाठीं उपयोगी); गाळसाळ; उकिरडा; मळ; (कु.) चिखल. [खत]

खात—पु. खड्डा; खळी; खांच; बीळ. 'त्या मृत्यूचें खणोनि खात' –एभा २९.२२२. [सं. खन्]

खातकाम—न. (व.) लोहारकाम–धंदा. [खाती=लोहार]

खातकुली—स्त्री. (गो.) १ गुदगुली. २ (गो.) खाजकुइरी. **खातकुलांवचें**–क्रि. गुदगुल्या करणें.

खातड-ण-र—स्त्री. (कु. गो.) १ चिखल, पाणी जमीनीवर ओतलेली जागा. २ उकीरडा. [खात] ०**वासी**–उकिरड्यांत राहाणारा. 'तुका म्हणे खातडवासी। अमृतासी नोळखे। –तुगा ३४८५. **खातडांवचें**–(गो.) सुक्या जमीनीवर ती फुगेपर्यंत पाणी ओतणें.

खातर—स्त्री. (प्रां.) भोंक; भगदाड (भिंत, कुंपण यांतील). [सं. खात=भोंक]

खातर—स्त्री. १ गुमान, पर्वा; विचार; चिंता (सामान्यतः निषेधार्थी). 'पैका गेल्याची त्यास खातर नाहीं.' २ खात्री; विश्वास; भरंवसा; निशा. 'हा मनुष्य विश्वासु असी आमची खातर आहे.' ३ पसंती; मर्जी; मन. 'आमचे खातरेस वाटेल तें करूं.' ४ विचार. 'स्वामीची खातर जरूर जाणून...' –रा १.१३२. ५ भास्था. 'त्यांतही श्रीमंताचे सरकारांत या संस्थानची यास खातर अधिक.' –रा ७.३७. ६ सत्कार; मान. ७ आश्वासन. ८ (ल.) (ना.) मनस्वी त्रास; खोडमोड. 'सायकलीवरून हिंडलों पण माझी चांगलीच खातर झाली.' –शअ. करितां; साठीं. माझ्याखातर' 'त्या खातरहि ते मला कतेव्यच आहे.' –तोबं २२. [अर. खातिर्] (वाप्र.) ०**करणें**–खात्री करणें; पटविणें; आश्वासन देणें. ०**पटणें**–आवडणें, पसंत पडणें. **खातरेस येणें**–पसंत पडणें. सामाशब्द– ०**खा, खातीरखा**–वि. १ स्नेहाचा, चांगलें इच्छिणारा; हितेच्छु (केवळ पत्रव्यवहारांत). २ यशस्वी. 'कित्येक अमूत्र उमदे मनुष्ये खातीरखवाह होतील.' –रा १.५३. ३ समाधान. 'बहुत खातरखा केली.' –रा १०.२६५. –क्रिवि. १ इच्छेप्रमाणें. 'इंग्रेज पल्टणें पुण्यासमीप आली त्यांचें पारिपत्य खातरखा न जालें' –दिमरा १.४०. २ यथास्थित. 'बंदोबस्त ही खातरखा आमचे स्वामी करितील.' –रा १.१३२. ०**जमा**–स्त्री. १ खात्री; विश्वास; निशा; संशय, आशंका, संदेहनिवृत्ति. (क्रि०

करणें). ' एवंच दादासाहेब खातरजमेशीं जात नाहींत. ' –भाब ८४. २ हिंमत. ' एक वेळ लढाई खातरजमेची यावी.' –ख ११. ६०८४. ३ गुमान; हिशेब; पर्वा. –वि. स्वस्थ. ' तुम्ही खातरजमा असणें. ' –रा १५.२१. [फा. खातिरजम्अ] **०जामीनदार**–पु. खातरीदार पहा. **०तसल्ली**–स्त्री. समाधान. ' सर्वांची खातरतसल्ली होऊन जमाव जालाच असेल. ' –दिमरा १.३१. [अर. तसल्ली=समाधान] **०दारी**–स्त्री. १ खात्री; हमी (माणूस, चिन्ह यांची). २ विश्वास, निशा. [फा. खातिरदारी] **०दास्त**–स्त्री. खातरजमा, इच्छा. ' त्यांची खातरदास्त पुरेल तेथें जावें. ' –ख ९.४९६५. **०नशीन**–वि श्रुत. –खरे ७.३५६६. [फा. खातिर्निशीन] **०निशा**–स्त्री. मनाचें समाधान; संदेहनिवृत्ति. 'अशी माझी खातरनिशा झाली. ' –बाळ २.१६. [फा. खातिर्निशान]

खातरा—पु. खातरजमा पहा. 'त्यांत स्वारी समागमें कार्यभागी यांचा खातरा श्रीमंतांनीं पुरविला ... ' –ख २.८१५. [अर. खातिरा=विचार]

खातरा—पु. १ खत. २ खाचरा; खळगा; खड्डा; खातर पहा.

खातरी—स्त्री. १ खातर. अर्थ २ पहा. २ जामीनकी; हमी; खातरदारी; खातरीपत्र. (जामिन देणाऱ्या मनुष्यास अथवा वस्तूस लावतात). 'तुम्ही कोणाची खातरी या रुपये घेऊन जा.' **खातरीचा**–वि. पसंत पडलेला; मनाला आवडलेला. **०दार**–वि. जामीन. हा खातरी देतो, विश्वासूपणाबद्दल शिफारस करतो पण कोणत्याहि प्रकारची जबाबदारी घेत नाहीं. **०पत्र**–न. हमीपत्र, शिफारसपत्र; प्रशंसापत्र; सर्टिफिकीट. **०लायक**–वि. विश्वसनीय.

खातऱ्या—वि. खातर खणणारा अथवा त्यांतून शिरणारा; घरफोड्या; खाणोरी. [खातर=भोंक]

खातवट–ड—पु. उकिरडा. ' रांधवणी चुलीपुढें पन्हे उन्मादती खातवडे. ' –ज्ञा १३.५६२. –वि. १ पुष्कळ दिवस खतावलेली (जमीन). २ खत घातलेलें (शेत). [खात=खत]

खातवणा—वि १ (खाणारा) खादाड; पोटबाबू. ' पैशास शेर वांगी मागतो, मोठा गेला खातवणा ! ' २ चोखंदळ (निंदार्थी). ३ (राजा.) पान, सुपारी, तंबाखू, भांग इ० सेवन करणारा. [खाणें]

खाता—वि. खाणारा; भक्षणारा. (वाप्र.) **०जेवतां-पितां मरणें**–क्रिवि. खाण्यापिण्याची ददात न पडतां अथवा रोगानें खितपत न पडतां मरणें; सुखांत, ऐषआरामांत मरण येणें. **खाती पिती होणें**–(व.) न्हाण येणें. **म्हo** १ खात्याला न खाता देखूं शकत नाहीं. २ खातीचे गाल आणि न्हातीचे बाल झांकत नाहींत=विद्या, संपत्ति इ० झांकून रहात नाहींत, खरें आहे तें बाहेर आलेंच पाहिजे. सामाशब्द– **०जेवता-पिता**–वि. खाऊनपिऊन सुखी. खाण्याची ददात नाहीं असा. ' खातें जेवतें घर पाहून मुलगी द्यावी. ' **०तांळ**–पु. खाण्याजोगा तीळ. गोडा तीळ. **०निंब**–पु. खावयाचा निंब; कढी निंब. **खाते गोते**–वि. भोजनभाऊ, आश्रित. ' आम्हांसारख्या उदंड मिळलिल भंवताले खातेगोते ' –सला ६. **खातेंतोंड**–न. खाणारें तोंड; पोसावें लागणारें माणूस (स्त्री, मूल, चाकर). ' माझ्या घरीं दहा खातीं तोंडें आणि मणभर दाणा. ' **खात्या नारांचें दैव**–न. (सुखी स्त्रियेचें भाग्य) स्त्रियांस आशीर्वाद देण्याची एक प्रकारची शब्दयोजना. [खाणें+नार+दैव]

खाताड–डें—न. १ गांवाबाहेरील उकिरडयाची जागा; उकिरडा; खातवड. २ खरकटें. ३ (गो.) नासकें पाणी सांठल्यामुळें झालेला दुर्गंधिमय चिखल. –वि. खातवड पहा.

खाती—पु. (व. ना.) लोहार; धिसाडी. ' गांवा खातीये ओंघे मिळौनि कामठा घालीति. ' –चक्रधर सिद्धांतसूत्रें ८९. म्हणती शस्त्र खातियें केलें. ' –मुआदि १६.२२३. ' पावकातें, पिटी जैसा खाती. ' –कृमुरा १४.५७. [सं. क्षत्ता]

खातीर—स्त्री. १ दिलासा; खातरजमा; खात्री. खातर पहा. ' मिर्जाची बहुत खातीर केली. ' –दिमरा २.४०. २ समजूत. 'पाटील बावांनीं खातीर करून सांप्रत ठेवून घेतलें आहे. ' –दिमरा २.३७. खातर पहा. –शअ. (गो.) साठीं; स्तव; कारणें; करितां. ' ह्या पॉटाचें पाडजिणें पोटाखातीर ध्यौच उणें. ' [अर. खातिर]

खातूस—वि. खताचा वास मारणारी (भाजी). [ख–खात]

खातूस—वि. (गो.) आंबट (तोंड इ०) [खट्टा]

खातें—न. १ रोजकीर्दीवरून तयार केलेला, खतावणीवर दिसणारा किंवा खतावणीवरून काढलेला आणि केलेला हिशेब (व्यक्तीचा किंवा काम, धंदा यांत घातलेल्या भांडवलाचा). जमाखर्चाची नोंद. २ असा स्वतंत्र हिशेब दाखविणारा कागद, वही. खतावणी; हिशेबाची वही. ३ (ल.) टप्पा; पोहोंच; आटोका; आवांका, प्रांत; हद्द (सत्ता, अंमल, शासन, अंतर्भाव यांची). 'किल्ल्याचे खात्यांत मुलूक आहे. ' ' हा गांव मुंबईखात्याखालीं मोडतो. ' ४ प्रांत; कार्यक्षेत्र; कचेरी; काम; प्रकरण; कामाचा विशिष्ट भाग. जसें–बिगार–खैरात–खर्च–गांव–मुलकी–लष्करी–पैमाश–न्याय–खातें. ५ किनखाप किंवा इतर रेशमी कापडाच्या तुकडयाभोंवतीं गुंडाळावयाची दोरी, नाडी. ६ खातेदारानें धारण केलेला जमीनीचा तुकडा. ७ उधारीचा जमाखर्च; देणें घेणें. 'त्याचें आमचें खातें आहे. ' [अर. खत्त=ओळ; लिहिणें; किंवा अर. खित्ता=मर्यादा; क्षेत्र.] (वाप्र.) **०ठेवणें**–देण्याघेण्याचा व्यवहार चालू ठेवणें. सामाशब्द– **०दार**–पु. १ कूळ खेरीज करून दुसाला नसणाऱ्या जमीनीचा प्रत्यक्ष कबजा धारण करणारा. यांचे दोन

मेद–पहिला, जुन्या शर्तीचा म्हणजे गहाण खरेदी देणें वगैरे हक्क असणारा, दुसरा नव्या शर्तीचा म्हणजे सदरहु हक्क नसणारा. –गांगा १३. २ व्यापाराकडे, वाण्याकडे खातें असणारा; व्यापाऱ्याचें कूळ. **०पोतें**–न. (विकत देण्याघेण्याचा) व्यवहार; काम; जमा खर्च. [खातें=हिशेब+पोतें=पैशाची पिशवी, खजिना] **०पोतें बरोबर होणें**– १ जमा व खर्च, नफा व तोटा बरोबर होणें; तोंडमिळवणी होणें; रमारमी होणें. २ मालमत्तेपासून किंवा मुलांबाळांपासून मुक्त होणें, नागवलें जाणें (चोरांनीं मालमत्ता चोरल्यानें व मृत्यूनें मुलेंबाळें हरण केल्यानें). **०बाकी**–स्त्री परस्परांच्या खात्यांवरून हिशेब होऊन देण्याघेण्याचा राहिलेला शेषांश; हिशेबाच्या वहींतील अखेरची शिल्लक (जमेकडील किंवा नावेंकडील). **०मिळवणी**–स्त्री. (ताळेबंद काढतांना केलेली) खात्यांची मिळवणी; सदर मिळवणी करण्यासाठीं दाखल केलेली बाब. **०वही**–स्त्री. निरनिराळ्या माणसांचीं खातीं जींत लिहून ठेवलेलीं असतात ती वही. **०वाईक**–वि. दुकानदाराकडे ज्याचें खातें आहे असा खातेदार.

खातें—न. कोनाडा; देवळी. 'तेथ पटिमाळेचां पूर्वीली सीरा खातें। तेथ गणेषु। ' –ऋ १०६. [सं. खन=खणणें]

खातेड—स्त्री. (गो.) खातड पहा.

खातेरें—न. खातर, खाचर. १ घाण, केरकचरा. खत इ० ची रास; गाळ; घाण. ' मोऱ्यांतील खातेरें वगैरे पदार्थांस. ' –अगर ३.१७१. २ उकीरडा; केराची खांच. [खात, खातर]

खातोंड—न. (गो.) घाण पाणी सांठलेली जागा, कुंडी, डबकें. खातड, खाताड पहा. [सं. खात+कुंडी]

खातोर—शअ. (भिल्ली) करितां; साठीं म्हणून; खातर पहा. ' तिया खातार बेन आंगलें ती वाडीटाकी ' =काठी वांढेल म्हणून दोन बोटें ती तोडून टाकली. –भिल्ली २०. [अर. खातिर]

खात्रड—स्त्री. (कु.) दलदल; ओल; चिखल झालेली जागा. खातड पहा.

खात्रां—खातरी पहा.

खात्साण—स्त्री. (गो.) घाण.

खाद—स्त्री. १ खाद्य; अन्न; खाणें; भक्ष्य; आहार. २ चांगलें खाणेंपिणें, पौष्टिक अन्न. ३ कुरतुडणें (उंदरांचें); (पक्ष्यांनी फळें) चोंचावणें, टोंचें मारणें. ४ (शेताच्या पिकावर धाड घालणाऱ्या गुरांचें) अधाशीपणाचें खाणें. ५ (गांवकामगारांनीं लोकांपासून) उकळणें; लुटणें; (सरकारी कामगारांनीं) लांच खाणें; चावणें. ' या गांवामध्यें पाटलाची शंभर रुपये खाद आहे. ' ६ कुरतुडलेला जिन्नस, चोंचावलेलें फळ, खाण्याचें पीक. उकळलेला पैका–माल इ०. ७ जळ (आटवितांना विस्तवानें खाणें). [सं. खाद्य; तुल० फा. खा=(समासांत) चघळणें, कुरतुडणें] **म्ह**० १ खाद तशी लात=खाण्यासारखी शक्ति. २ कारकुनाचें लिहिणें उंदिराची खाद=कोणत्याहि व्यवहारांत कारकुनानें काढलेली आपली कसर. ३ खाद आहे तर लाघ आहे. ४ खाद हरी व्याध.

खाद—स्त्री. खाज; कंड्. (क्रि० सुटणें). [खाज]

खांद—स्त्री. (कों. कु.) झाडाची मोठी फांदी. [खांदी]

खांद—पु. १ खांदा; बाहुटा; (मनुष्य, पशु यांच्या) पाठीचा वरचा, मानेच्या पाठीमागचा भाग (ओझें वाहणें इ० वेळीं उपयोगांत आणतात). ' पालखीला खांद घातला–दिल्हा. ' 'खांद आला–मुजला' २ (ल.) सरावानें, अभ्यासानें झालेला राबता, परिचय किंवा संबंध (पाहुण्यांच्या उपद्रवाची). (क्रि० पडणें). ' आल्यागेल्याचा खांद नेहेमींचा ' –खरादे. २०१. ३ शेतीच्या तात्पुरत्या कामासाठीं आणलेला बैल: टोणग्याच्या मेहनतीबद्दल द्यावयाचें धान्य, कडबा, भाडें. ४ स्पर्धा; चढाओढ. ५ ओझें वहाण्यामुळें खांद्यास पडलेले व्रण, घट्टा, किंवा तशी स्थिति. (क्रि० पडणें; येणें). ' बैलास खांद आला आहे. ' ६ (ल.) आधार; आश्रय. ' खांदु मांडिजे धृती। त्रिविधा जया। ' –ज्ञा १८.७३१. [सं. स्कंध; प्रा. खध] (वाप्र.) **०आघळणें**–(चांभारी) चामडें टांगल्यावर उलटें करावें लागतें त्यावेळीं साल व हिरडा मधल्या भागांत रहावा म्हणून कातडयाच्या मानेजवळ दोरीनें आंवळतात. **०चोरणें**–जुंवाखालीं खांदा न देणें, चुकारपणा करणें. याच्या उलट खांद देणें **एखाद्याशीं खांद बांधणें, करणें**–बरोबरी करणें, टक्कर देणें, मारणें; स्पर्धा चालविणें. **०शिवणें**–(चांभारी) चामडें उलटें केल्यावर त्याचें एक तोंड उघडें असतें त्यास शिवावें लागतें, तें शिवणें. **०सोडणें**–(चांभारी) खांद शिवल्यावर दोरी सोडून टाकणें. सामाशब्द– **०करी**–वि. १ तिरडी अथवा प्रेत खांद्यावर वाहून नेणारा. २ (क्र.) ओझेकरी; खांद्यावरून सामान नेणारा. **०कार**–वि. (गो.) पालखी, प्रेत इ० ना खांदा देणारा. **०कुहा-घा**–पु. १ खांद्यावर भोंवरा असलेला घोडा. २. खांद्यावरचा भोंवरा; घोड्याचें एक अशुभ लक्षण. **०खोड**–पु. (माण.) कानाच्या मागल्या बाजूस असणारा एकच भोंवरा. हा (धन्याच्या) धाकटया बंधूस वाईट. **०जोड**–स्त्री. ज्याचा खांदा दुसऱ्याशीं जुळतो असा माणूस, जनावर इ०; खांद्यांचा मेळ. **०जोडी-ड्या**–वि. खांदजोड पहा. **०पाडणें**–संवय लावणें. **०च(प)खाल**–स्त्री. खांद्यावरची पखाल. ' सांधीजेती चंद्राचा खांदवखाली.। ' –शिशु ३०६. ' घामाची खांदवखाल। ' –भाए ३९६. [सं. स्कंध=खांदा; पयस्+खल्ल=पाण्याची कातडी पिशवी] **०वटा**–पु. खांदा; त्या लगतचा भाग ओझें वाहतांना योजतात. ' माझा खांदवटा दुखून आला. ' **०वडा**–पु. १ शेतीसाठीं तात्पुरत्या आणलेल्या

बैल वगैरेच्या मेहनतीबद्दलचा मोबदला. खांद अर्थ ३ पहा. २ वरील प्रकारची रीत. (क्रि० करणें). **खांदया**–वि. बैलाच्या जोडीचा. **खांदसा**–स्त्री. ओझें वगैरे वाहण्याची किंवा कांहीं सहन करण्याची सवय, अभ्यास, सराव.

खांदचोर, खांदयेकर—पु. घर फोडणारा चोर; खाणचोर पहा. ०**चोरी**–स्त्री. घरफोडीची चोरी; खाणचोरी पहा.

खांदडणें—उक्रि. खांद्यावर घेणें; खांदाडणें पहा.

खांदगी—स्त्री. १ लांच; तनाखोरी. (क्रि० खाणें). २ खाद अर्थ २ ते ६ (थोडयाफार फरकानें) पहा. ३ माणूस, पशु यांचा मेहनींचा–रोजचा आहार; शेर; खाण्याकरितां दिलेली नेमणूक; धान्य, पैसा या रूपाची पोटगी. 'खाल्ली खादगी दे आणि बायको घेऊन जा.' 'घोडयानें खादगी खाल्ली ती द्यावी.' ४ (व.) खाण्याचा सपाटा. 'उंदराची खादगी कळत नाहीं.' [सं. खाद्य]

खांदडवादी—वि. खादाड; अधाशी. 'बधिरा कुबडा पंगु आरडा खादडवादी बाहेर छंरी।' –अमृत (पुरवणी) ८. [खादाड+वादी]

खांदणी बांधणी—स्त्री. (खांदणें व बांधणें) जुने वरंबे फोडून त्यांतील माती उंसाला चढविणें. अशानें उंसास आधार मिळतो [सं. खन्–खांदणें+बांधणें]

खांदणें—उक्रि. खाणें. 'मागां बाळपणीं येणें श्रीपती। जैं एकवेळ खादली होती माती।' –ह्रा ११.१८२. 'पांडुरंगें पाहा खादलीसे रडी।' –तुगा १२१८. [खादन]

खांदणें—उक्रि. खणणें; खोदणें. [सं. खन्]

खांदवळवी—वि. खादाडांचा सेनापति; पुष्कळ खाणारा; अधाशी; घरभर. ' खादवळवी वाचले.' –ख २७११. [खाणें+दळवी]

खांदनिंदक—वि. खायनिंदक पहा.

खांदरा—वि. १ खाणारा; २ (ल.) सोसणारा; भोगणारा. (समासांत) (कुत्सितार्थानें प्रयोग) अफीम–भांग–लांच–खेटर–मार खादरा. [खाणें]

खांदल(ळ)णें—सक्रि. डोक्यास विश्रांति देण्यासाठीं डोकीवरचें ओझें खांद्यावरून नेणें. खांदणें. [खांद]

खांदा—पु. खांद. १ बाहुटा (बाहुमूलापासून ग्रीवामूलापर्यंत). २ जूं ठेवण्याची जनावराच्या शरीरावरील जागा. ३ फांद्या फुटतात तो झाडाच्या खोडाचा भाग. ४ खांद्याचें काम; धाव(खांदकरी लोकांत रूढ). ५ ओझें वाहून नेण्याची पाठीच्या वरची अगर खांद्याची जागा. ६ परिचय; संबंधानें आलेली गोष्ट; झालेला अभ्यास; सवय; सराव. (क्रि० पडणें). ७ (कृ.) लांब फांदी (झाडाची). ८ (नाविक) गलबताचा विस्तार करण्यासाठीं रोजाच्या पुढील टोंकास लांकडें जोडतात तीं प्रत्येकी. पहुण व खांदे यांच्यावर फळ्या जोडतात. [सं. स्कन्ध; प्रा. खन्ध; हिं. खांदा; गु. खांदो; हिं. कंधा–कांधा; पं. कन्धा; बं. काँध] (वाप्र.) ०**टाकणें**–(बे.) जुंवास जनावर जुंपल्यानंतर जूं न ओढतां जनावरानें खालीं बसणें. **खांदाडणें**–सक्रि. १ खांद्यावर ओझें घेणें. २ (ल.) एखादें काम अगर जबाबदारी अंगावर घेणें; भांडणतंटा उकरून काढणें, पत्करणें. **खांदाडी घालून नेणें**–खांद्यावर वाहून नेणें. **खांदाडीभर**–खांद्यावर मावेल एवढें ओझें. **खांदाडीस बसणें**–१ दुसऱ्याच्या खांद्यावर बसणें. २ (कों.) झाडाच्या फांदीवर जाऊन बसणें. **खांदाडीस मेखा देणें**–चंबूगवाळें आटोपणें. ०**मेखा देऊन काम करणें**–आंगमोहून, झटून काम करणें. **खांदा देणें**–प्रेताला खांद्यावरून वाहून नेणें. ०**येणें**–अति श्रमानें बैलाची मान सुजणें. **खांद्याखालीं पदर**–उंडगी, निर्लज्ज, विनयाचा अभाव असलेली स्त्री (पदर पहा). **खांद्यावर(मेखा, गाठोडें)देणें**–नोकरीतून-कामावरून बडतर्फ करणें; चंबूगवाळ्यानिशीं घालविणें. (डोकीवरचें) **खांद्यावर येणें**–दुस्सह ओझें (कजे इ० चें) दिल्याघेतल्यामुळ हलकें होणें. **खांद्यास लागणें**–तिरडीला खांदा देणें. सामाशब्द– ०**खांद्–**पुस्त्री. (खांद्याशीं खांदा) स्पर्धा; बरोबरी; तोलासतोल; **तोडीसतोड. खांदाड**–न. १ मोठी फांदी. २ मोठा खांदा. **खांदाडा**–पु. (राजा.) मोठी फांदी (झाडाची). **खांदाडी**–स्त्री. १ अर्धे पुढें व अर्धे मागें असें खांद्यावर वाहून नेण्याचें पडशी सारखें ओझें खांद्यावर घ्यावयाच्या सोईचें बांधलेलें ओझें. २ ओझें घेतांना खांद्यालाच म्हणतात. 'हजारों जुने पंडित आंपापले ग्रंथ खांदाडीस मारून दूरदूर देशीं पळाले.' –नि १०३३. **खांद्याचा बैल**–पु. ओझें वाहणारा बैल.

खांदा—पु. (व.) हप्ता; तुकडा. 'कर्जाचे खांदे पाडले.' [सं. खंड]

खांदॉ–दो—पु. (गो.) लग्नानंतर पंधराव्या दिवशीं सासरीं व तिसाव्या दिवशीं माहेरीं करण्यांत येणारा लग्नविषयक विधि.

खादाखाद—स्त्री. परस्पर कटकट, घासाघीस; एकमेकांना चावणें, खाणें. [खाद द्वि.]

खांदाज–जी—खांदान–नी पहा.

खादाड—वि. अधाशी; पुष्कळ खाणारा; हांवरा. ०**कुरकुला–भा(मा)वसा**–पु. खूप खाणारा. ०**मावशी**–स्त्री. खादाड स्त्री.

खांदान, खानदान—पुस्त्री. थोर कुलशील; कुलवान घराणें; कुलीन वंश. 'शाबास तुमचे खान्दानाची असे.' –रा १२. १२३. **खानदान, खांदानीचा**–वि. १ कुलीन; चांगल्या घराण्यांतील, कुलांतील; खान्दान. 'बहुत दिवसांचे खानदान लोक होते.' –भाव ११४. २ (ल.) हुशार; चतुर; चाणाक्ष (कारकून, शिपाई). [फा. खानदान्]

खांदानी, खानदानी—स्त्री. उच्च, श्रेष्ठ घराणें; कुलीन घराणें. खांदान पहा. 'पुरातन खानदानींतील मनुष्याचें बहुत प्रीतीनें पालन करीत जावें.' –ऐस्कुले ५४. [फा. खानदान्]

खादिम—पु. (हिं.) नोकर; चाकर. [अर.]

खादी—स्त्री. खाद. १ चांगलें खाणें; पौष्टिक अन्न. २ (ल.) पैसे खाणें; लांच घेणें. 'बाळासाहेब अगदीं जरूरीपुरतेंच इनामदारीचें काम पहात, त्यामुळें नेमलेल्या लोकांत खादी फार चाले.' –हाकांघ ११५. –वि. धष्टपुष्ट; खादीचा. [खाद]

खादी—स्त्री. १ जाड, हातानें कातलेल्या सुताचें व हातमागावर विणलेलें कापड. 'परम पवित्र खादी हीच स्वदेशाला संपन्न करील.'–के १६.४.२०. २ (सामा.) साधें, जाडेभरडें कापड.

खांदी—स्त्री. (गो.) चोरी. **०मारप**–चोरी करणें.

खांदा—स्त्री. १ झाडाची फांदी; डहाळी; शाखा. २ खांदा पहा. [सं. स्कंध; म. खांद] **०देणें**–बैल अगर रेडा नांगरटीच्या कामासाठीं मोबदला घेऊन देणें. **म्हण०** (गो.) खांदी मेळली म्हणोन झाड हुमदूंक जायना=बोट शिरकलें म्हणून हात घालण्याचा प्रयत्न करूं नये.

खादीचा—वि. खाऊन पिऊन पुष्ट झालेला; पोसलेला (माणूस; पशु). **खादीचें शरीर**–न. भरदार, गोंडस, नितळ, पुष्ट, गोटीदार शरीर. [खाद]

खादू—वि. १ खादाड; खाबू; पोटबाबू; पोटपुजारी. 'कार्य करणारे थोडे पण खादू फार.' २ लांच खाणारा; हरामखोरी करणारा. [खाद]. **०नंदन**–पु. खादाड माणूस. [खाद+नंदन]

खांदेकरी-चाईक—पु. १ खांद्यावरून ओझें नेणारा, वाहणारा; हमाल. २ प्रेत वाहणारा; खांदा देणारा. [खांदा]

खांदेपालट—नस्त्री. १ खांदा बदलणें; ओझें एका खांद्यावरून दुसऱ्या खांद्यावर घेणें. २ एकमेकांना साहाय्य करणें, देणें. [खांदा+पालटणें]

खांदेरी—स्त्री. एक रानडुक्कर.

खांदेला-ली—वि. १ खांद झालेला; ओझें वाहिल्यानें खांद्यास घट्टा अगर व्रण पडलेला (पशु, माणूस). २ खांदा देणारा; प्रेतवाहक.

खांदोडा-डी—पुस्त्री. खांदवडा पहा. 'कर्ज मिळण्या इतकी पत नसली किंवा कर्ज न काढतां निभण्यासारखें असलें तर ते दुसऱ्या कुणब्याशीं खांदोडी करतात.' –गांगा १४५.

खांदोर—पु. एक प्रकारचें गाणें.

खांदोल—स्त्री. खांद्याची बरोबरी (वाहक किंवा बैल यांच्या) [खांदा]

खांदोली—वि. ज्याचा खांदा दुसऱ्याच्या खांद्याशीं जमतो असा (बैल, भारवाहक)

खाद्य—न. खाण्याच्या उपयोगी पदार्थ; अन्न; खाण्याचा जिन्नस; भक्ष्य, भोज्य पदार्थ. –वि. खाण्यास योग्य; भक्ष्य; भोज्य; खाण्याचा (पदार्थ). 'तयाचिपरी खाद्याखाद्य। न म्हणे निंद्यानिंद्य।' –ह्रा १८.५६०. [सं. खाद्=(खाणें)-खाद्य]

खाद्या—वि. (ल.) खाणारा; सोसणारा; भोगणारा. खादरा पहा.

खांद्या—वि. १ खांद्यावर वाहून नेणारा. २ ओझें वाहणाराचा–विशेषतः प्रेतवाहकाचा–सहसोबती. ३ प्रेतवाहक. [खांदा]

खाद्रम्मा—वि. (कों.) खादाड; अधाशी. [खादर+अम्मा]

खान—न. १ खणती. 'ईश्वरीं खान घेतलें।' –गीता २. ३४२५. 'स्वहिता घातलें खान।' –तुगा ३२५७. २ खणतीची चोरी. खाणचोरी; घरफोडी. 'मी माझें करीत होतो जतन। भीतरिल्या चोरें घेतलें खान।' –तुगा ३७०. खाणोरी खानचोर पहा. [सं. खन्]

खान—न. १ खाणें; खाद्य; अन्न. 'खान पराचें पान पराचें।' –विक ५. २ ताट; थाळा. 'मेजवानी मिठाईचे खाने' –रा ७. २११. [म. खाणें; तुल० फा. ख्वान=थाळा] **०पोश**–पु. तबकावरचें आच्छादन, वस्त्र, रुमाल. 'खानपोश जदोजी जवाहिर–जडीत मोत्याची झालरचे आणून ठेविले.' –पदमव ९७. [फा. ख्वान्पोश्]

खान—पु. १ सरदार; अमीर; राजा. २ मुसलमानी पदवी. मुसलमान सरदारास ही पदवी असते. विशेषतः फारसी किंवा पठाणी वंशांतील थोरांना असे. पुढें हलक्या मोंगलांनाहि वापरूं लागले. उ० मीरखान, याकुबखान इ० [फा.]

खानका—पु. हिंदूच्या मठाप्रमाणें मुसलमानांची एक धार्मिक संस्था. 'खानका नांवाच्या धार्मिक संस्था मुसलमानांच्या असतात.' –धका ८२. [फा. खान्काह्]

खानगी—स्त्री. दासी; वेश्या; नायकीण. 'सलाबतजंग ... दोन जनाने, हत्ती व कांहीं खानगया घेऊन गेले होते.' –रा १. १९७. [फा. खानगी=वेश्या]

खानगी—स्त्री. भोजनाची नेमणूक; शिधा, अन्न वगैरे; उपजीविका; वृत्ति. दुसऱ्या अर्थासाठीं 'खादगी' पहा.

खानगी—स्त्री. (चुकीनें) खानदान पहा. वंश; कुळ; विशेषतः पिढीजात आचरण अथवा स्वभावाविषयीं योजतात. –वि. खाजगत; स्वतःचें; राजाचे. 'हा कारखाना खानगीच्या ताब्यांत आला.' [फा. खानगी=घरगुती] **०कामदार-कारभारी**—पु. खाजगी खात्याचा कारभारी.

खानचोर—वि. (शब्दाची व्युत्पत्ति जशी लावण्यांत येते तसा तसा अर्थ बदलतो) १ अडल; बिलंदर (चोर). [कांहींच्या मतें वरील शब्द खान=वंश,+चोर असा साधला आहे]. २ घरफोड्या चोर;

गुपचुप घर फोडून चोरी करण्याकरितां आंत शिरणारा. [फा. खान =घर+चोर यापासून साधितात]; ३ खांद किंवा खाणचोर [खाण =खणणें+चोर=घराची भिंत खणून अथवा खोदून आंत शिरणारा]. हे सर्वसामान्य अर्थ आहेत. खानोरीचोर (खणती लावून चोरी करणारा) पहा. दरोडेखोर व वाटमाऱ्या यांच्या उलट.

खानचोरी—स्त्री. घर खणून केलेली चोरी; खाणचोर पहा.

खानजाद-दी, खानजादीचा—वि. खांदान-नी पहा.

खानडोह-हो—पु. खांड डांह पहा.

खानदान-नी—खांदान-नी पहा. 'निदान खानदान मनुष्य याप्रमाणें कामास येतें.' –भाब १०९.

खानदेशी—वि. खानदेशसंबंधी 'वऱ्हाडी कऱ्हाडी बहू खानदेशी।' –सारुह ६.४१. [खान+देश]

खाननीस—पु. खानगीकडील कारभारी, चिटणीस. [फा खान=घर+नवीस]

खानवटा—पु कुल; वंश; कुळी; बिजवट. [फा. खान=घर]

खानवटा—पु खांद्याचा सांधा. 'त्यानें माझा खानवटा दुखविला पण म्यां त्याचा खानवटा उपटलाच.' [खांदा]

खानवटा-ठा, खानिवटा—पु. १ उन्हाळ्यात गुरें बांधण्यासाठीं वर टाळे किंवा गवत घालून तयार केलेली जागा; २ कोंडण; गोठा; कावण; ह्यांत आजारी गुरें वगैरे बांधतात. [फा. खाना=घर+वटा प्रत्यय]

खानसा—पु संचय; सराव; (प्र.) खांदसा पहा.

खानसामा—पु. आचारी; स्वयंपाकी; भोजनव्यवस्थापक; बबर्जी. [फा. खान्सामान्]

खाना—पु. १ जागा; स्थान; घर; (समासांत) तोफखाना. दारूखाना; किताबखाना इ० २ लहान पेटींतील कप्पा, खण, पूड. ३ घराणें; कुल. ४ खातें. [फा. खान] **०खराब-बा**–पु. सत्यनाश. 'बद्दुवा दिल्ही कीं या दोघांचा खाना खराब.' –मदरु १.११८. **०जंगी, खानेजंगी**–स्त्री. १ खडाजंगी; भांडण; खणाखणी २ बोलाचाली; बाचाबाची. ३ गृहकलह; यादवी. 'हे सर्व आप सची खानाजंगी करून ...' –दिमरा १.८८. ✓ सादतखान तर खानेजंगीत जखमी होऊन दुसरे दिवशीं मृत्यू पावले.' –ऐच २२. [फा.] **०जाद**–वि. दासीपुत्र; लेकवळा. 'फुलाजीचा खानजाद तुलाजी.' –रा १७.४. [फा. खाना+झाद्] **खाने तलाशी**–स्त्री. झडती. [फा. खानातलाशी]

खानेसुमार-री—स्त्री. १ गांवांतील माणसांची, घरांची, इतर गोष्टींची गणती, मोजणी; शिरगणती. (क्रि० करणें). ही गणती साधारणतः दर दहा वर्षांनीं होते. यावेळीं सांस्कृतिक पाहणीच्या अनेक गोष्टी नमूद करण्यांत येतात. २ गणतीचा आंकडा; नोंद; शिरगणतीचा तक्ता, नोंद. ३ शेतीसंबंधीं (गुरांढोरांची) गणती. ४ सरकारी नोंद (घरें, माणसें इ० ची). [फा. खाना+शुमारी]

खानोटा—पु. घराणें; कुल; खानवटा पहा.

खानोरीचोर—पु. १ घरफोड्या. खानचोर पहा (कांहींच्या मतें हा शब्द 'खाणें' या पासून झालेला, यावरून) खाण्यापिण्याच्या पदार्थांची चोरी करणारा; किरकोळ चोऱ्या करणारा (हा व खांडडोह, खापरीचोर इ० अनेक शब्द अनिश्चितार्थी योजितात.

खॉन्न, खॉर्ण—न. (गो.) भट्टी. [पो. फोर्नो; इं. फर्नेस]

खाश्री, खाश्रीभाश्री—खांजणी, खांजणीभांजणी पहा.

खा(खां)प—स्त्री. १ रास; ढीग; जुडी (तंबाखूची किंवा विड्याच्या पानांची). २ माडाच्या किंवा तसल्या इतर झाडावर चढण्यासाठीं त्याच्या खोडाला पाडलेली खांच; खालवट. ३ फोड; काप; फाक (फळाची). ४ खांड; लहान तुकडा (सुपारीचा). ५ घट्ट गोळा; वडी (साखळलेल्या रक्ताचा, ओल्या खजुराचा, दही किंवा दूध यांचा) ६ लहान ढलपी; तुकडा; खपला. ७ (गो.) कणसें ठेवण्याच्या उपयोगी पडणारा खळगा. [सं. क्षप्? म. काप] **०कडी**–स्त्री. सुपारीची शिजवलेली खांडें, खापा, काचऱ्या.

खाप, खापटी—स्त्री. (गो.) लहान, चपटा कांटिदार मासा. –मसाप ३.२४७.

खापटी, खपटी—स्त्री. १ गुळाची थापटी, लहान पोळी; कान्हवला. २ (सामा.) एखाद्या पदार्थाची थापटी, वडी.

खापट्टल—न. (गो.) लहान खापटी.

खापणें—उक्रि. १ खापणी करणें. २ वरून दडपण ठेवून दाबणें (कापसाचे गठ्ठे, गवताचीं ओझीं, पेंढ्या इ० दबला जाणारा माल). ३ (क्र.) उभ्या तोडणें; निमुळतीं करणें; तासणें.(टेकडीच्या कडा, बाजू); खरडणें. [खाप]

खापणी—स्त्री १ सरकारसारा, दंड, खंड, पट्टी, गांवखर्च इ० संबंधीं जो पैक्याचा ठराव त्याची कुळांबर केलेली हिस्सेवारीची वाटणी. २ त्या वांटणीचा प्रत्येक वाटा. ३ खोडावर खांचा पाडणें, करणें. खाप अर्थ २ पहा. [खापणें]

खापर—न. १ धान्य भाजण्यासाठीं, भाकरी, खापरपोळी करण्यासाठीं उपयोगांत आणावयाचें रुंद, उतरतें किंवा चपटें मातीचें ताट, परळ इ० २ मडक्याचें खालचें अर्ध (भिक्षेसाठीं, शेगडीसाठीं). 'नाचतया पुण्यगिरी। चिद्भरवाच्या खापरीं।' –ज्ञा १८.१०४०. ३ (प्रसंगविशेषीं सामा.) कोणतेहि भांडें (धातूचें, मातीचें–घागर, मडकें वगैरे). ४ (सं. प्रा.) श्राद्धांतील पिंडदानासंबंधीं सामानाने भरलेलें टोपलें. 'पिंडदान साहित्याचें टोपलें घ्यावें लागतें ... त्यास खापर म्हणतात.' –तीपु १३०. ५ मडक्याचा एक तुकडा. 'येमपुरी नागवी केली। खांडां खापरां सकट।' –शिशु १६१. 'कीं नामे स्पर्शमणि स्पर्शे परि काय

करिल खापर मी।' –मोसंशयरत्न माला (नवनीत पृ ३५१) ६ (व.) कौल (घरावर घालण्याचें). ७ (बायकी) नापसंत व्यक्ति; विन किमतीचा माणुस (कित्येकवेळां हा शब्द निरर्थकपणेंहि उपयोगांत आणतात). ८ अपयश. ९ डोक्याची कवटी. [सं. खर्पर; प्रा. खप्पर; हिं. पं. खप्पर; उरि. खपरा; बं. खाबरा] (वाप्र.) **०डोक्यावर–डोईवर–शिरावर फोडणें**–दुसऱ्यावर आपराध, आळ घालणें; एखाद्या निरपराध्यावर दोष लादणें. **०डोक्यावर फुटणें**–विनाकारण अपराधी होणें, दोष येणें. **०डोक्यावर येणें**–संकटांत येणें. **–रांत मुतून तोंड पहा**–फजिती झाली असतांहि फुशारकी मारणारास म्हणतात. सामाशब्द– **०खु(खुं)टी**–स्त्री. मडक्याचा तुकडा. **०तोंड–ड्या**–वि. निपणतूचा मुलगा; मूळपुरुषापासून सहावी पिढी (निदार्थी प्रयोग); त्यावरून दुर्दैवी; दळभद्र्या; पाढऱ्या पायाचा; काळतोंड्या. [खापर पणत्वंड] **०पणजा**–पु. पणजाचा आजा; निपणजाचा बाप; चालूपिढी पूर्वीचा सहावा पुरुष. **०पणतू–पणतोंड–पणत्वंड**–पुन. निपणतूचा मुलगा; पणतूचा नातू. **०पोळी**–स्त्री तांदुळाच्या पिठाची, खापरावर भाजलेली पोळी; धिरडें. **०पोळें**–न. पोळी करण्याचें खापर. **०सूत**–न. (सोनारी) एक धातु; एक काल्पनिकधातु; जस्त. 'तांबें आणि खापरसुत। येकवटली असे धात। तयाचा वृत्तांत। पितळ होय॥' –कालिका पुराण २८. २१. **०सुर्ता**–वि. खापरसुतानें केलेला दमडी इ० पदार्थ **–राची घागर**–स्त्री मातीची घागर; कुंभ. **खापऱ्या**–वि. १ दुर्दैवी; भद्रकपाळ्या; क्षुद्र अशा अर्थानें अनियंत्रितपणें योजतात. 'म्हणे खापऱ्यासी पडली गांठी। आतां नव्हे सुटी सर्वथा।' २ (कु.) शिद्दीचें (माणसाचें) पिशाच. खापरी २ पहा. **०कालजाचा**–वि. (गो.) चांडाळ वृत्तीचा. –खापरासंबंधीं. **०नारळ**–पु. पातळ दळाचा, खोबऱ्याचा नारळ.

खापराळ—स्त्री. (कों.) केळीची एक जात.

खापरा—स्त्री. १ मडक्याचा तुकडा; खापर अर्थ ४ पहा. 'परिस स्वर्णत्व तें न दे खापरिस।' –मोकृष्ण ४७.९१.. २ (ल.) पांथरीचा चापट कठिणपणा. ३ (ना.) चैत्री पौर्णिमेला देवीला ज्या मातीच्या पात्रांत तेलांत भिजविलेल्या चिंध्या पेटवून ओवाळतात तें पात्र; खापरी ओवाळण्याचा विधि. **०चोर, खापऱ्याचोर**–वि. १ (कों.) अट्टल चोर; बिलंदर चोर. २ हलक्या चोऱ्या करणारा; बारीकसारीक वस्तु (खापरीसारख्या) चोरणारा, खिशांत टाकणारा; खानोरीचोर पहा.

खापरी—पु. (गो.) (निंदाव्यंजक) नीग्रो; काफरी लोक. 'आफ्रिकेंत खापऱ्यांनी सुरू केलेलें बंड.–सह्याद्री १६२. [पोर्तु. काफे; अर. काफीर]

खापरेपण—न. (गो.) निष्ठुरपणा; निर्दयपणा.

खांपरोळी—स्त्री. (हेट. कु.) खापरपोळी.

खापलणें—उक्रि. १ तोडणें; छाटणें; जोरानें छेदणें; शस्त्रानें तोडणें. २ सप्पा उडविणें; कापून काढणें (सैन्य). [खापणें, खाप. खापर?]

खांपॉ—(गो) १ धाडशी; निष्णात. २ नांवाजलेला. ३ बिलंदर; पूर्णतेस पोंचलेला.

खॉपॉ—पु. (गो.) खोपा; आगवळ. **०भरप**–वेणींत फुलें भरणें.

खापार—न. (कु.) खापर पहा.

खापी—स्त्री. (गो.) सरंग्यासारखी एक लहान जातीची पांढरी मासळी.

खापुल्लें—न. (गो.) खापरीण (निग्रो) स्त्री.

खापेकड—न. (कों.) रहाटगाडग्याच्या माळेमध्यें लोटे बांधण्यासाठीं सुमारें दीड वीत लांबीचे जे लांकडाचे तुकडे घालतात ते प्रत्येकी. ह्याला दोन बाजूस दोन व मध्यें सारख्या अंतरावर दोन अशा चार खांपा असतात. बाजूच्या खांचा खापेकड माळेंत अडकविणेसाठीं व मधल्या शिकारी अडकविण्यासाठीं असतात. बहुधा खापेकडें सागाचीं करतात. [खाप+स. काष्ठ]

खांब—पु. १ इमारतीचा भार सहन करणारें, उथळ्यावर उभें केलेलें अगर जमिनींत पुरलेलें लाकूड; स्थूणा; सोट; स्तंभ; धीरा; आधार. २ (ल.) केळीचा खुंट. ३ (ल.) घरांतील किंवा समाजाचा नेता; कर्ता पुरुष; आधारभूत गोष्ट. 'अवघ्या लोकांनीं हिंमत टाकिली खांब बुडाला दौलतीचा।'–ऐपो १३४. (समासांत) –घुसळ–मलखांब. ४ (ओतकाम) समईचा मधला भाग. ५ (बीडकाम) चरकाच्या दोन्ही बाजूंच धिरे. [सं. स्तंभ; प्रा. खंभ; का. कंबु] (वाप्र.) **खांबाला डीक पाहणें**–अशक्य गोष्टीची अपेक्षा करणें. उदा० कडू माणसापासून द्रव्याची अपेक्षा करणें; गारगोटीपासून दुधाची इच्छा करण. सामाशब्द– **०खांबोळी**–स्त्री. मुलांचा एक खेळ. ह्यांत सर्व मुलें एक एक खांब धरून राहतात. व पुढें एकमेक आपापला खांब सोडून दुसरा पकडतात, ह्यावेळीं मध्येंच चोर भालेल्या गडद्यानें दुसऱ्याला पकडलें तर तो (पकडला गेलेला गडी) चोर होतो. **खांबट**–न. लहानसा खांब; किरकोळ, भक्कम नव्हे असा खांब, वांसा. **खांबणी, खांबला, खांबली, खांबुला, खांबा**–स्त्रीपु. १ (राजा.) घर इ० चे पोटमांडणीचे जे लहान खांब ते प्रत्येकी; दुबेळकें; कांभेरा. २ आखूड पुरलेला खुंट. 'खपरेल करावयास खांबण्या ... ओमण इतकें सामान लागतें.' –मराठी ३ रें पुस्तक पृ. ६२. (१८७३). **०सूत्र**–न. खांबसूत्राचा खेळ; कळसूत्री बाहुल्यांचा खेळ. 'संसार म्हणजे खांबसूत्र। चौऱ्याशी लक्ष पुतळ्या विचित्र। त्यांचा सूत्रधारी ईश्वर। त्याचिया इच्छे

वर्तिजे।' –एरुस्व १२.३४. 'खांबसुत्रींची बाहुली। तेणें पुरुषें नाचविली।' –दा ८.१.१०३. ०सूत्र पुतळी–स्त्री. कळसूत्री बाहुली चालविण्याचा खेळ व ती पुतळी. ०सूत्री–वि. १ कळसूत्री बाहुल्यांचा खेळ करणारा. 'नातरी जैसा खांबसूत्री। अचेतन पुतळ्या नाचवी यंत्रीं।' –एरुस्व १३.६४. 'तुका म्हणे दोरी खांबसूत्र्या हातीं।' –तुगा ३८१३. २ खांबसूत्राबद्दल.

खाबगा—पु. शय्यागृह; निजण्याची खोली. 'बाडें सुंदर खाबगे नवगजा सिद्धाच होत्या घरीं।' –साहह ३.४५. खाबूगा पहा. [फा. ख्वाब्गाह्=शय्यागृह; तुल० सं. स्वप्–स्वाप+गृह]

खाबड—वि. उंचसखल. [हिं.] ०खुबड–वि. खांच खळग्याची; चढउताराची (जमीन).

खांबडी—वि. एक प्रकारचें भात; तांदुळाची एक जात.

खाबरी—स्त्री. (व.) दुभत्यासाठीं वापरावयाचें मातीचें मडकें. [खापरी]

खांबला–पु. १ लहान खांब. २ (विणकाम) गोमीच्या मध्यें जे तांबडे अगर हिरवे तार असतात ते प्रत्येकी. [खांब]

खांबली—स्त्री. १ लहान खांब. २ (गुऱ्हाळ) वाईनसळांतून जमिनींत निघून गेलेल्या व वाईनसळास हालूं न देणाऱ्या खुंटया–मेखा; चरकाचें दालन व काथवट यांना जोडणारा भाग.

खाबान—न. बागेंतील फुलाचा ताटवा; वाफा. [फा. खायबान]

खांबी—वि. (गो.) खांदा मारणारा, देणारा.

खाबू—वि. १ पोटबाबू; खाखा करणारा; खादाड; अधाशी; खाणोरी. २ पैसे खाणारा; लांच घेणारा. [खाणें]

खांब्रो—पु. (गो.) खळयांतील मळणीचा खांब; तिवडा. (अव.) खांबे. [खांब]

खांबोटी—स्त्री. लहान खांब; खांबट पहा. [खांब]

खांबोळ–ळी–ळें—नस्त्री. १ भिंतींतील खांबासाठीं ठेवलेली जागा. २ उत्सव वगैरे समारंभाच्या मंडपांतील खांबास आच्छादावयाचें वस्त्र. ३ तुळईखालच्या खाबाच्या टोकावर दोन आडव्या लांकडी तुकडयांची + अशी मांडणी; चाफा; टिटवें. [खांब+ओळ]

खाबूगा—पु. शय्यागृह. 'खाबूगामध्यें नबाब बरामद जाले.' –रा ७.८३. [फा. ख्वाब्गाह्; खाबगा पहा]

खांब्या—वि. खळयावर मळणी करीत असणाऱ्या बैलांपैकीं तिवडयाजवळचा, पहिलाच बैल. [खांब]

खांब्याखुरान—वि. (गो.) हाडापेरानें. [खांब+खुर]

खामखा–माखा, खामखास–माखास, खामाखाम–खाय, खामोखाम–य—क्रिवि. खचित; नक्षी; खात्रीनें, निश्चयानें; कांहीं झालें तरी; इच्छा असो नसो; जरूर; मुद्दाम; हटकून; (युक्तीनें) हमखास. 'जो स्नेहकार्यें–मन्सुबा बन्धुत्व संपादणें तें कार्य खामखा करावेंच करावें.' –रा ८.१७५. 'येकूण खामखा येके मोर्चाबरी या चौ रोजांत ...' –पेद ३.१८. [फा. ख्वाह्म ख्वाह]

खामतमा—स्त्री. फाजील हाव. –चित्रगुप्त ८. [फा. खाम्तम्अ]

खामन(ण)खुजा—वि. बुटगा; खुजा; ठेंगणा. [सं. क्षाम; प्रा. खाम=कृश; दुबेळ. तुल० फा. खाम्=अपक्व+अन्+खुजा?]

खामपट्टी—स्त्री. एकंदर गांवांतील शेतजमिनीवर सरकारनें बसविलेल्या ठोकळ शेतसाऱ्याची वांटणी; कुळवार वांटणी. [फा. खाम्=कच्ची+पट्टी]

खामला—पु. (गो.) जार.

खामी—स्त्री. १ तोटा; नुकसान; घस; उणीव (व्यापार इ० मध्यें). 'आज सतरा वर्षे खुदावंत त्याची खामी करवितात तरी मोडत नाहींत.' –मराचिथोशा ७६.२ (गु.) दोष; व्यंग; अपराध. ३ (व.) लाज; शरम; कमीपणा. 'अतःपर पादशाहीस खामी आली.' –चित्रगुप्त ३४. ४ वाईट अवस्था; डबघाई. 'विन्मुख होऊन श्रीमंत आणिले चंहुकडून खामीस।' –ऐपो ३९८. [फा. खामी=नुकसान]

खामोश—क्रिवि. १ स्तब्ध; शांत; अचल. 'नबाब निजाम अलीखां व भोसले ताहाल (अद्याप पर्यंत) खामोश त्याचा सबब कायम कळे.' –रा १०.१८२. [फा. खामोश्] ०करणें–शांत राहाणें; शांति राखणें. 'तेसमयीं बाजीराव यांणीं खामोश करून आपले खाजगत डेऱ्यांत गेले.' –होकै ३. **खामोशी**–स्त्री. स्तब्धता; शांतता. [फा.]

खाय—स्त्री. १ खाई; खड्डा; खांच. २ अलावा. [सं. खाति; प्रा. खाइ]

खायखाय—स्त्री. खादाडपणा; वखवख; खाखा होणें (भुकेनें व्याकुळ झाल्यास म्हणतात). (क्रि. सुटणें; येणें; मोडणें; होणें). २ (ल.) (खान.) खोडकी; खोड. [खाणें] **म्ह०** (व.) खाय खाय मसणा जाय. =अधाशाला म्हणतात. **खायला उठणें**–एखाद्यावर हल्ला, गहजब करणें. [खाणें]

खायनिंदक—वि. कृतघ्न; खाल्लघा घरचे वासे मोजणारा; बेइमान. [खाणे+निंदा]

खायला–ल्ली—वि. (राजा. कु.) खालचा; तळचा; बुडाचा.

खायलाटी–ठी—स्त्री. (राजा.) खलाटी.

खायरा–यिर—वि. खाणारा. 'रामा! ते कपि सत्वहीन असतां पालाफळें खायरीं।' –निमा १.५०. [सं. खाद; प्रा. खाअ]

खायी—स्त्री. खांच; खंदक. खाय पहा. **खायींत उडी टाकणें**–संकट ओढवून घेणें.

खार—पु. १ लवण, मीठ (खनिज अथवा वनस्पतिजन्य, स्वाभाविक अथवा कृत्रिम); संचळ, सैंधव, सवागी, तुरटी इ० क्षार. २ अघाडा, माठ, पोकळा इ० वनस्पती जाळल्यावर राहिलेली राख शिजवून तें खारवणी गाळून त्याची वाफ करून काढलेला अशुद्ध क्षार. ३ खारटपणा. ४ लोणच्यांतील द्रवरूप पदार्थ. 'झोंबतो व्रणि जसा बहु खार.'—कर्म २.५६. ५ (ल.) खरावी; नुकसान; तोटा. —स्त्री. १ आंब्याचा मोहोर, वालाचीं फुलें इ० जडून जाण्यासारखें अभ्रांतून पडणारें दंव. खारी घुई. (क्रि० येणें; पडणें). २ हवेंतील अतिशय गारवा; घुई; बादल हवा. (क्रि० सुटणें; पडणें; होणें). (खार ही वामळेपासून भिन्न आहे, वामळ हिंवाळा व पावसाळा यांमध्यें मोठा पाऊस पडल्या नंतर पडते आणि खार फक्त हिंवाळ्यांतच पडते). ३ क्षारापासून येणारा ओलसरपणा, दमटपणा, लोणा (भिंतीवर, जमिनीवर). ४ खर; पावसाच्या शेवटीं संध्याकाळीं आकाशांत दिसदिसणारे तांबडे ढग. ५ समुद्र हटवून, हटून मिळालेली जमीन; खारट; खाजण. ६ खारी दलदल, जमीन; भाताची खारी जमीन. ७ (ल.) तोटा; नुकसान. —न. १ सुकविलेले खारे मासे. २ (गो.) शेतास खत मिळण्यासाठीं समुद्राचें किंवा खाडीचें शेतांत साठविलेलें पाणी. —वि. खारट; क्षारयुक्त. [सं. क्षार; प्रा. खार] (वाप्र.) **०खाणें**–(ना.) द्वेष करणें; पाण्यांत पाहणें. **खारणें**–अक्रि. क्षारयुक्त होणें; क्षारानें विकृत होणें (जमीन, शेत); लोणचें इ० च्या अंगीं मीठ इ० चा क्षार मुरल्यामुळें त्यांनीं क्षाररसविशिष्ट होणें. —सक्रि. क्षारयुक्त करणें. **०पाडणें**–(कों.) समुद्राच्या भरतीखालील जमिनी शेतीच्या उपयोगी करणें. **०लागणें–पडणें–लावून घेणें**–१ नुकसान होणें; संकट येणें; चट्टा बसणें 'आपल्या या शहाणपणामुळें आज आमच्या खिशाला चांगलाच खार लागला.' २ काळिमा येणें; शिंतोडा उडणें. **०लावणें**–नुकसानींत आणणें. सामाशब्द–**०कट**–वि. १ खारट; क्षारयुक्त २ (ल.) खुनशी; मत्सरी; आकसखोर (माणूस). **०जमीन**–स्त्री क्षारयुक्त जमीन; खारवट जमीन. **खारणें**–न. (नंदभाषा) मीठ 'खारण्याशिवाय कोणताहि पदार्थ गोड होत नाहीं.' **खारट**–वि. क्षारयुक्त. 'खारट खारट मीठ, खारट घोट' =अतिशय खारट. —न. खाजण. **खारट तुरट**–वि. १ थोडेसें खारट व थोडेसें तुरट; चवदार; रुचकर; स्वादिष्ट (खाद्य); २ थट्टेचें, विनोदपर; चुरचुरीत (भाषण, निबंध). ३ पाणीदार, निश्चित, दमदार (कृत्य, वतैन). **खारटाई**–स्त्री. खारटपणा. **खारटाण**–वि. खारट जमीन. **खारणी**–स्त्री. (क.) (सोनारी) क्षाराच्या साहायानें तयार केलेलें, चांदीत मिसळावयाचें हीण. 'चांदींत खारणी मिसळलेली नाहीं.' **०वट**–स्त्री. खारीजमीन; खाजण. —वि. खारट (जमीन, शेत). **०वडा**–पु. कुरडया घालून राहिलेला जो चीक त्याचे घातलेले सांडगे, वड्या. **०वणी**–न. खारट पाणी. **०वांगी**–स्त्री. खाजणांत होणारें वांग्यांचें झाड; व त्याचें फळ. खारवांगें. **०संध**–पु. (सोनारी) धातूंना द्रावयाचा डाक; क्षारमिश्रित कस्तूर. (खार+सांधा) **०सळई, सोळी**–स्त्री. खारसंध घोटण्याचा दगड; डांक देण्यासाठीं टाकणखार उगाळण्याची सहाण **०सान**–न. (गो.) खारटपणा.

खार—स्त्री. एक जनावर; चानी; खडी. [प्रा. खार] –पु. सापाची एक जात.

खारकी बोर—न. (ना.) खारकेएवढें बोर; नागपुरी, पेवंदी बोर.

खारखंडा—पु. (निंदेनें) खाजणांतील शेती करणारा वर्ग. [खार+खंड]

खार(री)ज—वि. बाहेर; हद्दपार. –रा १२.२२. [अर. खारिज्]

खारडें—न. (चांभारी) करडाचें कातडें.

खारवा—पु. गुजराथेत होणारें, गडद लाल रंगाचें कापड, खादी. याचा गादी, उशी इ० करण्याकडे उपयोग करतात. [हिं. खारुआ; फा. खारा=एक प्रकारचें कापड]

खारवा–वी—पुस्त्री. नावाडी (एक हिंदु जात व तींतील व्यक्ति); हे नावाड्याचें, घरें शाकारण्याचें, आगरें करण्याचें इ० कामें करतात. २ (गो) कोळी; गाबीत. [फा. खार्वा] **म्ह०** खारवी गेला पोंय आंबा वाढून थय.

खारवी—वि खारव्या (कापडा, रंगा) संबंधी.

खारवीणशी झगडप—क्रि. (गो.) मासळीवालीसारखें लाज-लज्जा सोडून मोठ्यानें भांडणें.

खारवें—न. खारव्या रंगाचें लुगडें; अलवण.

खारस्ता–स्ती—वि. खाष्ट; तुसडा; निंदक. [फा. खारिश्तह्]

खारा—न. (खान.) लोणचें ठेवण्याचें विशिष्ट आकाराचें मडकें. –वि. १ खारट. २ खाजणांत तयार होणारें (भात). ३ खारट पाण्यांत जगणारा (मासा). ४ खाडीवरून, खाजणावरून वाहणारा (वारा). ५ जड, क्षारयुक्त (पाणी) [खार] **०वारा**–पु. दिवसा समुद्राकडून जमिनीकडे वाहणारा वारा.

खाराईत—पुस्त्री. गुजराथी रंगाऱ्याची एक जात व तींतील व्यक्ति. खारवा करणारा. 'गुजैर रंगारी खाराईत.' –भवि ४०. ६४.

खारांऊ–व—न. शेंदरी, हलक्या किंमतीचें, तांबडें सुती, लुगडें–कापड; खारवा पहा.

खाराखीर–खिरी, खाराखेर–खोर—स्त्री. १ बारीक तपास, छडा, पाहणी; बारीक चौकशी; सामान्यतः रिकामपणाची, वाईट हेतूनें केलेली चौकशी; रिकामी उठाठेव. २ क्षुल्लक

गोष्टीबद्दल दुराग्रह; तकार; घासाघीस; ओढाताण; वादविवाद; बारीक कीस काढण्याचा वादविवाद; विनाकारण दोष काढणें; छेडणें; खोचून बोलणें; चिरडीनें, तुसडेपणानें बोलणें; आडफाटे फोडणें. ३ असमाधानाची चडफड; कांहींहि पसंत न पडणें; मर्जीत येण्यास कठिण. ४ चोळणें, उडविणें इ० कारणानें मालाची होणारी दुर्दशा. ' तूं माझ्या मालाची खाराखिरी करूं नको. '

खाराण—न. (गो.) उन्हाळ्यांत विहिरींतील पाणी आटल्यावर हातराहाटाचा पोहरा भरून येण्यासाठीं विहिरींत पाडलेलें डबकें. [सं. क्षर]

खाराणी—स्त्री. मुतेरें; मुतलेलें वस्त्र. ' कव्हणी एक निजला असे । तो आंतुरणीं मुती । मग स्वप्नाचेनि भ्रमे म्हणे मी दारांगेला ... चहला तव लटके । खाराणी ती साचः तें धुतलियाचीण न फिटे । ' –चक्रधर सिद्धांतसूत्रें ५३. [खार]

खारावणें—अक्रि. १ क्षारयुक्त होणें; खारें होणें. २ खाडी, खाजण यांवरून वाहणाऱ्या वाऱ्यामुळें डोळे तांबडे होणें. [खार]

खारी—स्त्री. एक कैली माप; १६ द्रोण; खंडी. [सं.]

खारी—स्त्री. एक जनावर. खार पहा.

खारी—स्त्री. १ अभ्रे; मळभ; हवेंतील गारवा; थंडाई; सर्दी; (क्रि० सुटणें; पडणें; येणें). **म्ह०** (व.) १ आभाळाला आली खारी अन उद्दोळ म्हनते मी कामाची झाली ? २ धाब्यावर टाकण्यासाठीं वापरावयाची पिवळट माती; चिकणमाती; हिच्यामुळें वरांत पावसाचें पाणी गळत नाहीं. ३ (व.) गांवाच्या जवळचें शेत; खारी जमीन.

खारी—स्त्री. (नेमाडप्रांतीय) गुरांचा एक रोग; पायखुरी; लाळ.

खारी—स्त्री. (बाग.) थाळा.

खारी—स्त्री. (बे.) (गुन्हाळ) रस कढवितांना तो हलविण्याचें लांकडी अगर लोखंडी कलथ्यासारखें साधन.

खारीक—स्त्री. १ अपक्व स्थितींत वाळलेला खजूर; ह्याची झाडें रुक्ष व थंड प्रदेशांत (अफगाणिस्थान, अरबस्थान येथें) होतात. फळ वाळलें म्हणजे खारीक होते. वरील कवच गोड व पौष्टिक असतें- आंतील बीं औषधी असतें. २ रानटी खजुरी.

खारीक—पु. खाजणांत धान्य पिकविणारी, आगरी जात व त्या जातींतील व्यक्ति; खारखंडा पहा. [खार]

खारीज—वि. (हिं.) काढून टाकलेला; बडतर्फ; फेटाळलेला; बहिष्कृत; नष्ट. (क्रि० करणें). ' अबदालीस खारीज केलें आहे. ' –दिमरा २७७. ' नोकरीवरून खारीज केल्याबद्दल बादशाही फर्मान निघालें. ' –सन १८५७. २१४. [अर खारिज्= बाह्य]

खारीज—पु. (गो.) कालवा; मोठा पाट.

खारी घुई—स्त्री. खाऱ्याधुक्याचा येंव; दंव; खारा अर्थ ५ पहा.

खारी पुरी—स्त्री. १ तिखटमिठाची पुरी. २ मेवेदार सलोनी; मांसाच्या पुरीचा एक प्रकार. –गृशि २.१९.

खारी माती—स्त्री. १ समुद्रकिनाऱ्यावरची, खाजणांतील माती. २ (लिलांव) लिलांव केलेला जिन्नस (ह्याचा एकदां लिलांव झाल्यावर तो हलक्या किंमतीचा असला तरी परत घेतला जात नाहीं यावरून) माळावरचा धोंडा पहा. ३ (समुद्रांत) फुटलेल्या गलबतांतील वहात आलेला माल, जिन्नस. ४ लोणा आलेली जमीन. ५ क्षारयुक्त म्हणून नापीक झालेली शेतजमीन. ६ शाडू; धाब्यावर घालावयाची माती; बरण्या वगैरे चिनीमातीचीं भांडीं जी- पासून करतात ती माती.

खारीव—वि. १ खारलेलें (लोणचें, जमीन इ०). २ क्षारयुक्त; खारट. [खार]

खारू, खारेडी—स्त्री. खार; खारोटी; चानी.

खारें—न. खार. १ (कु. गो.) खारावलेली मासळी. २ शेताचा कस वाढण्यासाठीं त्याला बांध घालून त्यांत समुद्राचें पाणी खत म्हणून घेतात तें. [खार]

खारेपाट—पु (कों.) समुद्रकांठची खारवट जमीन; खाजण.

खारें मीठ—न. खाणींत सांपडलेलें मीठ; हें समुद्राच्या पाण्यापासून तयार होणाऱ्या मिठाहून निराळें असतें.

खारोड्या—स्त्रीअव. (व.) बाजरी भाजून, भरडून तींत मीठ, तिखट घालून भजांप्रमाणें केलेल्या वडया (थालीपिठाप्रमाणें). [खार+वडया]

खारोणी—न. खारें पाणी. –वि. (ना.) खारें; खारट. [खार+पाणी]

खाल—स्त्री. साल. १ चामडें; अंगाचें कातडें; साल. (मराठींत क्वचित प्रयोग, फक्त मारणें, छडीनें मारणें यासबंधांत योजतात). (क्रि० काढणें). ' वैराग्याची खाली काढिली । ' –ज्ञा ३.२५२. 'खाल काढून टाकिती । या नांव आदिभूतिक । ' –दा ३.७.७३. २ जनावरांचें कातडें. [सं. खल्ल; प्रा. दे. खल्ला=चामडें; गु. हिं. खाल; सिं. खल]

खाल—स्त्री. भोत; खोळ. 'इया शृंगारूनियां खाला । मांडिलियां पै । ' –ज्ञा ११.४६५.

खाल—क्रिवि. (राजा.) खालीं; अधोभागीं. (वाप्र.) **०च्या मानेनें चालणें–पाहणें**–नम्र, विनयशील, मर्यादेनें वागणें; लाजेनें खालीं मान घालून चालणें. ' ती खालच्या मानेची बायको. ' –निचं ९३. **खालवणें, खालावणें**–अक्रि. १ नम्र होणें; खालीं होणें; वांकणें. 'तैसें जीवमात्रां अशेखां।

खालावती ते।' –झा ९.२२५. २ दुर्दशा होणें; गरीबी येणें. –उक्रि. नाश करणें. 'सूर्यकुळीं अवतार धरी रिपू खालवी।' –लहुकृष्णाख्यान मराठी ५ वें पुस्तक पृ. १६४. (१८८५) **खालींवर**–क्रिवि. उलथापालथा; उफराटा सुफराटा; खालतीं वरतीं (खालीं+वर). **०धर आंथरणें-घालून निजणें-पांघरणें**–बिछान्यांतील पांघरूण अर्धे अंगाखालीं आणि अर्धे अंगावर घेऊन निजणें. **०वर दृष्ट-नजर ठेवणें-करणें, ०धर पहाणें**–सर्भोवतीं न्याहाळून, बारकाईनें, चौकस बुध्दीनें पहाणें. **०वर पाय पडणें**-पाऊल अडखळत पडणें, चुकणें **०धर मन होणें**–मन डळमळीत होणें; धरसोड करणें; घुटमळणें. **खालविणें**–सक्रि. खालीं करणें; खालाविणें पहा. 'जेथ खालविजे सीबिका.' –ऋ २१. 'जलधर हनुवटी खालवूनी।' –अर्वाचीन ७०. **खालसवणें–सावणें** –अक्रि. पडणें; बसणें; बुडणें; ढासळणें; आंत येणें (परिस्थितीमध्यें); नक्षा उतरणें (गर्वांत, अभिमानांत). [खालीं] सामाशब्द- **०चा-ला**–वि. १ तळासंबंधीं; तळचा; बुडाचा. २ हाताखालचा; ताबेदार; आज्ञांकित; कमी दर्जाचा. ३ पूर्वेकडचा; गंगमोहरा पहा. सामाशब्द– **०चा थर (वर्ग)**–१ हलका वर्ग; कमी प्रतीची, दर्जाची वस्तु. २ (ल.) अशिक्षित वर्ग; 'पूर्वीसारखी ही चळवळ वरच्या वर्गांत (सुशिक्षितांत)च राहिली नसून चळवळीचीं पाळेंमुळें अगदीं खालच्या थरापर्यंत जाऊन भिडलीं आहेत.' –के १६.९.३०. **०ची मांडी**–स्त्री. नडगी (घोडयाची). –अश्वप १.७४. **०चें(लें) पोट**–न. ओटीपोट; बस्तिप्रदेश. **०च्या मानेचा-ची**–वि. नम्र; विनयशील. **खालट**–वि. खालसर; नीच (देश, प्रांत); ठेंगणा; बसकट; बदखल; थबगट (वस्तु). **खालणें-नें**–क्रिवि. खालून; खालच्या भागांतून; बुडापासून. **खालतड**–क्रिवि. (व.) पूर्वेकडेस. **खालता**–क्रिवि. १ खालीं; खालतीं; खालच्या बाजूस. 'धरून केशीं मग खालता हा।' –सारुह १.८३. २ पूर्वेकडे. गंगमोहरा पहा. **खालती**–स्त्री. (व.) पूर्वेदिशा. **खालतीं-तें**–क्रिवि. खालीं. **खालतीं येणें**–तोटा येणें; कमी पडणें; बुड येणें. 'त्या व्यवहारामध्यें मी पांचशें रुपयांस खालतीं आलों' **खालपट**–वि. १ कांहींसा खालतीं; उतरता; उताराचा. २ सखल; उताराची (जमीन). ३ थबकट; बसकट; चपटा. **खालमाग्या**–वि. (व.) गायतोंडया; दृष्टीस दृष्टि न भिडविणारा पण हळूच खोडया करणारा; आंतून डाव करणारा. तुल० खालीं मुंडी पाताळ धुंडी. **खालला**–वि. खालचा.

खालदार—वि. पांढऱ्या रंगाचा असुन त्यांत काळे केंस मिश्र असलेला (घोडा). हा अशुभ होय. –अश्वप १.१०४.

खाल(लि)सा—पु. १ साक्षात् सरकारापासुन धारण केलेली अथवा जिच्या वसुलाचा सरकार एकटेंच मालक आहे अशी जमीन, गांव, अथवा प्रांत. २ खोताच्या अभावीं सरकारनें वहिवाटलेल्या जमिनी; जहागीर किंवा इनाम नसलेली जमीन. 'नेबानें कुल बिसादी लुटून खालसा केली.' –रा १५.१३. ३ सरकारजप्त जमीन, गांव. ४ संस्थानाच्या अंमलांतील नसून इंग्रजसरकारचे अमलाखालील गांव, जमीन. 'मोंगल अंमलांत सांपडलेला महाराष्ट्र, खालसा महाराष्ट्रापेक्षां अधिक दुर्दैवी.' –के १७।५।१९३०. ५ मिरासी खेरीज सरकारच्या वहिवाटीला असलेली कीदेसार जमीन. –गांगा १३. ६ मुसलमानी अमदानींतील जमाबंदी खातें. –वि. १ खास सरकारी (जमीन, सैन्य, तोफखाना इ०). २ संस्थानी नव्हे असा (प्रांत, जमीन इ०). ३ सरकारजमा, जप्त. [फा. खालिसा] **०मुलुक**–पु. इंग्रज सरकारचा प्रांत.

खालसा—पु. शीख जातींतील एक पंथ.

खालस्ता—वि. आकसखोर; खुनशी; द्वेषी. [फा. खलश]

खॉलॉं—पु. (गो.) पान; पानाचा तुकडा.

खालां—क्रिवि. खालीं पहा. 'हें असो पावो उचलिला। मदमुख न ठेविती खालां।' –झा १८.७३६.

खालाट-टी-ठी—नस्त्री. १ सखल प्रदेश; सह्याद्रीच्या पायथ्यापासुन पश्चिमेकडे समुद्राच्या किनाऱ्याकडे जाणारा उतरता प्रदेश; याच्या उलट वलाटी. २ (कों.) अगदीं समुद्रकिनाऱ्यावरील जमीन; किनाऱ्याच्या आंतील आणि घाटाकडे चढत जाणाऱ्या जमीनीस वलाटी म्हणतात. ३ स्वराच्या ७ २ या उकारी खुणा (या अक्षरांच्या खालीं जोडतात म्हणून). याच्या उलट वेलाटी ((ि ी) या खुणा किंवा चिन्हें अक्षराच्या वर येतात म्हणून). [खाली+ठाय] **०वेलाटी**–स्त्री. उताराचा व चढावाचा प्रदेश. **०कर**–वि. खालाटीचा रहिवासी.

खालाडीभात—न. (कों.) नुकत्याच लागणीस आणलेल्या जमीनीमध्यें केलेलें भात. 'शिवार तोडून भाजावळ करून खालाडी भात करतात.'

खालारा—शअ. (काव्य) खालीं; खालतीं. –क्रिवि. खालीं; खालती; उतरणीकडे. 'जैसें खालारा धावें पाणी।' –झा १८.४८१. [खाल]

खालावणें—अक्रि. १ कमी होणें, पडणें; हलकें होणें; उतरती कळा लागणें (वारा, पाऊस, ऊन्ह, संपत्ति इ०स). 'ऊन्ह अंमळसें खालावलें म्हणजे जाऊं.' २ खालच्या किंवा खराब स्थितीप्रत जाणें; खालीं येणें. 'त्या व्यापारांत लाख रुपये तोटा आल्यापासुन तो सावकार खालावला.' **खालवणें** पहा. [खालीं]

खालाविं(घ)णें—उक्रि. (काव्य) खालीं आणणें; खालीं करणें; नम्र करणें. 'रावणाची हे दुर्दशा। आम्ही खालाविल्या मिशा।' [खालीं]

खॉलासणी-खालासी—स्त्री. (गो.) सुतारांचें वाकसासारखें एक लहान तासण्याचें हत्यार; हें एका हातानें वापरतात.

खाली—वि. १ रिकामा; रिता. 'गडकरी यांणीं राजमंदिर म्हणून खाली न ठेवावें.' –मराठा ३२. 'ब्राह्मणांचीं घरें खाली करवितात.' –रा ७.१०६. २ वृथा; वायां. 'एक गोळा खाली न जाय असा मारितो' –ख ६.२५१५. ३ रिकामा; न गुंतलेला; न अडकविलेला; बिन उद्योगाचा. 'खाली घरीं बसून बंदोबस्त होणें ती गोष्ट निराळीच आहे.' –ख ६.२०४६. ४ मोकळें 'सावनूर खाली पडतें.' –ख ८००. [प्रा. खल्ल=रिक्त; अर. खाली; हिं. सिं. खाली] (वाप्र.)**०करणें**–रिकामें करणें. **०मैदान होणें**–अरक्षित मोकळा प्रांत होणें. –पया २१२. सामाशब्द– **०खटला**–पु. बाजारबुणगें; सामानसुमान इ० बाडबिछाईत, वस्त्रपात्र, चीजवस्त (सैन्याचें). **०चिठी**–स्त्री. (नाविक) गलबतांत सामान भरण्याचा किंवा रिकामें करण्याचा परवाना. **०पण**–न. (व.) रिकामपण; फुरसत. **०पिली**–वि. निष्कारण; निराधार; व्यर्थ; रिकामा; पोकळ; उगीचच्या उगीच. **०बार**–पु. वायबार. (क्रि० मारणें; टाकणें). **०मैदान**–ज्यांत खडें लव्कर नाहीं असा प्रांत; रिकामें ठिकाण; मोकळी जागा. 'खाली मैदान पाहून हैदराचा उपद्रव होईल.' –ख ८००.

खालीं-लें—शअक्रिवि. खालतीं; अधोभागीं; तळाशीं; बुडाशीं. 'ते माडीवर राहतात आम्ही खालीं राहतों.' २ (ल.) खालच्या दर्जात, पदवींत, तावेदारींत, हुकमतींत. 'सर्व भाषा संस्कृत भाषेच्या खालीं.' ३ आटोक्यांत; टप्प्यांत; पोहोंचेंत. 'पुरंदरखालीं अठ्ठावीस गांव आहेत.' (समासांत) कामा–खेळा–कष्टा–मेहनती–मस्करी खालीं=काम इ० करीत असतां. 'कामाखालीं दिवस जातो.' विचाराखालीं–अभ्यासाखालीं–प्रघाताखालीं–नित्याखालीं पडणें=विचाराखालीं येणें. ४ कांहीं एका प्रतिष्ठित किंवा अप्रतिष्ठित नांवाखालीं. (क्रि० विकणें; मोडणें). 'श्रीवर्धनी सुपारीचे खालीं मुद्दची सुपारी विकते.' [सं. खात–खाल–खालीं. सप्तमी सं. भूतकालवाचक ?] **०पडणें**–संवय लागणें; वहिवाटींत, रावट्यांत पडणें. २ रद्द होणें; निरुपयोगी होणें. ३ शांत होणें. 'कर्ज फेडल्याशिवाय माझा जीव खाली पडणार नाहीं.' **०येणें**–कमी होणें. 'चांदीचा भाव खाली आला.' –के १०.६.३०. **०राहणें**–बाकी, शिल्लक राहणें. 'वीस आंबे होते पैकीं पांच खाले, खालीं राहिले पंधरा.' **०घर होणें**–अतिशय काळजी लागणें. म्ह० खालीं मुंडी पाताळ धुंडी=गोगलगाय पोटांत पाय या अर्थी. (वाप्र.) **एकाखालीं एक**–एका खालतीं दुसरें; खालोखाल; एका बरोबर दुसरें (चांगल्या बरोबर वाईट या अर्थी). 'हीं दहा ठाणें एकाखालीं एक सगळीं देऊन टाकिलीं.' **नांवाखालीं**–नांवाच्या जोरावर. 'मोठ्या नांवांखालीं सारें पचून जातें.' **हाताखालीं**–१ कबज्यांत (घेणें अन्यायानें). 'त्यानें पुतण्याचे पैसे हाताखालीं घातले.' २ हुकमतींत असणें. 'त्याच्या हाताखालीं दहा शिपाई आहेत.' **घराखालीं**–घरालगत, जवळ, पलीकडे. 'आमच्या घराखालीं बाग आहे.' (जीव)

खालील—वि. १ तळासंबंधीं; अधोभागासंबंधीं. २ ताबेदार; आज्ञांकित; हाताखालचा. ३ हलक्या दर्जाचें; निकृष्ट. [खालीं] **खालीलाकडे**–पूर्वेकडे; गंगमोहरा पहा.

खालून—शअक्रिवि. खालच्या भागापासून किंवा बाजूनें.

खाले—क्रिवि. (काशी) खालीं. 'घेतां लांच चढे दुनी गडबडे, कोणीं न खाले पडे.' ' 'तूं ये तरी खाले' –होला ५३. [खालीं]

खालें—शअक्रिवि. खालीं. ' उतरे स्वरथाखालें करुनि असें तुमुल युद्ध राया तें.' –मोकर्ण ४८.५५. [खालीं]

खालोखाल—क्रिवि. कांहीं अंशीं खालीं; किंचित न्यून; योग्यतेनें किंचित कमी (खूण, वय, आकार यांत). [खालीं द्वि.]

खालौता-ती—क्रिवि. खालतीं; खालीं. 'मुखें करुनि खालौतें.' –रास १.६७५.

खाल्लाकडन—क्रिवि. (माण.) सपाटीच्या बाजूनें; सखल भागाकडून. [खालीं+कडून]

खाल्ला, खाल्लेला—खाणें या क्रियापदाचें भूतकाळवाचक रूप. **खाल्ल्या घरचे वासे मोजणें**–कृतघ्नपणा करणें; कृतघ्न होणें. (ज्याचें अन्न खावें, त्याला जर वाईट स्थिति आली आणि त्याला घर विकण्याचा प्रसंग आला, तर घराची किती किंमत येईल हें पाहण्याच्या दृष्टीनें त्याचे वासे मोजणें म्हणजे त्याचें वाईट चिंतणें). 'शिवाजीस माणसाची परिक्षा चांगली होती. त्यामुळें त्यानें हातीं धरलेल्या माणसाच्या पुत्रपौत्राकडूनहि...खाल्ल्याघरचे वासे मोजण्याचें नीच कृत्य घडलेलें नाहीं.' –निबंधचंद्रिका. **०वासे मोजणारा**–पु. कृतघ्न; उपकारकर्त्यावर उलटणारा.

खाल्लेंधाल्लें—वि. संतुष्ट. 'मन सदां खाल्लेंधाल्लें आहे.' –बाळ २.१८१. [खाणें+धाणें]

खाल्ल्या—(बाग.) खालीं पहा.

खांवक—न. (गो.) खाऊ; खाण्याचा पदार्थ. 'माका खांवक दी.' [खा]

खांवगॉ—वि. (गो.) अधाशी; खा खा करणारा. [खा.; हिं. खाव]

खांवची—वि. (गो.) खावयाची; खाण्याची (वस्तु; पान इ०). 'खांवची पान' =विड्याची पानें.

खांवचें—क्रि. (गो.) १ खाणें. २ (ल.) नागविणें.

खाबट, खाबाड—वि. १ अधाशी; खादाड. २ लांचखाऊ. [खाणें]

खावटी—स्त्री. १ जेवणखाण; भोजन; खाणेंपिणें. २ पोटगी; अन्नवस्त्र; खाण्यावह्लचे पैसे. ३ अन्नसंग्रह; खाद्यपदार्थांचा सांठा. [खाणें]

खावट—न. (गो. कु.) खाऱ्या शेताचा समुद्राकडील तुटलेला बांध; फुटलेल्या बांधाची मधली तडा, फूट, भेग.

खावड—स्त्री. (गो.) (गुरांचें) खाणें; खाद्य.

खांवडें—न. १ नांगरलेल्या किंवा पेरलेल्या शेतांतील बिन नांगरलेली अथवा बिन पेरलेली जागा; लागवडीच्या शेतांतील ओसाड जागा. २ लेखांतील न लिहिलेली-कोरी सोडलेली-जागा. ३ (सामा.) रिती जागा, तुकडा, भाग. ४ चाल् कृत्यांत खंड (पावसाची सर इ० मध्यें). [सं. खंड]

खावणी-नी—स्त्री. १ मनोधर्म; मनोगत. ' कीं जाणतुसि खावनी । वल्लभाची । ' –ऋ ३४. २ हेतु; उद्देश. ' आतां यांचें सिंपनेयांची खावणियां । माते पुसा पां । ' –शिशु ६९५.

खावणें—उक्रि. (व.) गमावणें; दवडणें.

खावंद(वि)द्—पु. १ यजमान; सरकार; महाराज; स्वामी; शास्ता. ' आम्हीं जो जाबसाल सांगतों तो खावंदाचे मर्जीस येत नाहीं. ' –भाब ६. २ मालक; धनी. ' बाबाजी पाटील निमे मोकदमीचा खावंद. ' –चंद्रचूड दप्तर १.२० [फा. खावंद्]

खावंदड—स्त्री. (व.) दुखापत. [खवंद]

खावंदी-विंदी—स्त्री. खावंदगिरी. ' ईप्रजांचे दौलतीवर देखील मालकीयत व खाविंदी राहील. ' –दिमरा १.२०७. [फा. खावंदी] **०गिरी**–स्त्री. स्वामित्व; धनीपणा; साहेबी. 'खावंदगिरी कशी असते व सेवा कशी हें पुर्तें ठाऊक नाहीं. ' –रा १४.४३.

खाव(ऊ)निंदक–वि. कृतघ्न; खाल्ल्याघरचे वासे मोजणारा. [खाणें+निंदक]

खावराडिवरा—वि. १ आड येईल त्याची व्यवस्था लावणारा; खाण्यास, फस्त करण्यास सदां तयार. २ चलाख; हुषार; तल्लख; आवेशी; साहसी; उत्साही. ३ (चुकीनें) खावराबावरा. ४ (व.) मारकोंडा; रागीट; तापट; कडक. [खाणें+डिवरा]

खावराबावरा—वि. भय, राग अथवा आश्चर्य यांनीं गांगरलेला. कावराबावरा (अप) पहा.

खावान—वि. (खान.) खाण्याचें; खाण्यालायक (वस्तु, पदार्थ इ०). ' खावान तेल. ' =गोडें तेल. [खाणें]

खावत-द्—स्त्री. (व. ना.) खोड; संवय; स्वभावदोष. [अर. खासियत्]

खाशा—वि. (गो.) औरस; सख्खा. [खास]

खाशानिशीं—क्रिवि. (खासचा विचित्र प्रयोग) जातीनें; खुद्द; स्वतः. ' मग भाऊसाहेबांनीं निश्चय केला कीं, या उपरि गिलचा खाशानिशीं मारीन. ' –भाव २१६. [अर. खास्स्]

खाशी—उद्गा. शाबास! सुरेख! वाहवा! छान! उत्तम! नामी! [अर. खास्सा]

खाशी—वि. निवडक; खास पहा. **०पंगत**–स्त्री. निवडक, उच्च प्रतीच्या लोकांची किंवा धन्यांची पंगत; किंवा त्या मंडळीचें जेवण. **म्ह०** (गो.) खाशां पंक्तीक सुठी पिठो=मोठ्यांच्या नांवाचा कांहींच फायदा न मिळणें. **०मंडळी**–स्त्री. उच्च वर्गाचे लोक; प्रतिष्ठित लोक; यजमान व त्यांचें कुटुंब. **०स्वारी**–स्त्री. १ यजमान; धनी; राजा. २ खाशा लोकांची मिरवणूक. ३ (थटेनें) स्वतः; मी. [अर. खास]

खाशी—स्त्री. (हिं.) खोकला. खास पहा. [सं. कास]

खाष्ट-ष्टी—वि. १ द्वाड; दुष्ट; तामसी; त्रासदायक. २ कुरकुऱ्या; सदोदित निंदा करणारा (माणूस, स्वभाव) ३ कठिण; अवघड (काम, अभ्यास). [सं. कष्ट ?]

खाष्टें—न. खांच; वेडावांकडा खळगा; खड्डा.

खास—क्रिवि. १ खचित; निखालस; खात्रीनें; निश्चयपूर्वक. २ बरोबर, तंतोतंत. ३ खुद्द; स्वतः; जातीनें. –वि. १ राजा किंवा राज्यासंबंधीं; सरकारी. २ स्वतःचें; खाजगी; जातीचें. (समासांत) खासपथक; खासपागा. ३ शुद्ध; अस्सल; खरा; चांगला. ४ विशेष; विशिष्ट. ५ निवडक; थोरथोर; उच्च. सामान्य सामासिक शब्द राजकीय अथवा सरकारी या अर्थाचे व कांहीं स्वतःचे किंवा जातीचे या अर्थाचे खासकोठी–खास–खजाना–सरंजाम–जामदार–हुजुरात–जामीन–इमाम–नेमणूक इ०. [अर. खास्स्] विशेष सामाशब्द. **०आमदानी**–स्त्री. नियमित पीक, उत्पन्न. याच्या विरुध्द शिवाई आमदानी=जादा पीक. ऐन अमदानी हा शब्दहि कधींकधीं या अर्थानें योजतात. **०खबर**–स्त्री. १ खात्रीलायक बातमी. २ सरकारी बातमी. **०खेल**–वि. सेनाखासखेल; सेनापति. ' एक सेनापती जन्मला । खासखेल सयन । ' –ऐपो ७९. **०गत, खाजगत**–वि. १ स्वतःचा; आपला; जातीचा; खाजगी. ' आमचा खासगत वाडा पुण्यास आहे. ' २ मालक स्वतः जमाखर्च लिहीत असल्यास हा शब्द तो आपल्या नांवामागें लावतो. –क्रिवि. जातीनें; खुद्द. ' मी खासगत त्यांसच रुपये दिले. ' **०गत राजश्री**–(जमाखर्च) मालकाच्या नांवामागें लावतात. **०गाडी**–स्त्री. राजाची किंवा स्वतःसाठीं मुद्दाम काढलेली (स्पेशल) आगगाडी. 'खाशांच्या स्वाऱ्या खासगाडीनें अगर मोटारीनें जाण्याच्या असल्यास ... ' –डुकराची शिकार (बडोदें) २. **०जमीन**–स्त्री. १ जमीनदार खुद्द करीत असलेली जमीन. २ जिचा वसुल प्रत्यक्ष सरकार वसुल करतें अशी जमीन. **०नीस,खासनवीस**–पु. खानगी कारभारी;सरकारी हिशेबनीस; (इं.) प्रायव्हेट सेक्रेटरी. **०निशी**–स्त्री. त्यांचें काम. 'बाजी मुरार यांचे नातू हे खासनिशी करून...राहिले, ' –मराचिसं १. **०पंगत**–

स्त्री. ज्या पंक्तींत यजमान जेवावयास बसतो ती पगत; राजाची अथवा सरदारांची पंगत; थोरथोर लोकांची पंगत. २ उच्च जात; शिष्ट वर्ग. ३ निवडक मंडळी. **०पथ(त)क**–न. एखाद्याचें स्वतःचें, खासगी घोडेस्वारांचें पथक; ज्याच्या निशाणाखालीं हे घोडेस्वार चाकरी करितात आणि ज्याच्या खर्चानें ते ठेविले असतात त्याचें पथक; खाशांचें पथक. **०पथ(त)की**–वि. खासपथकासंबंधी–(स्वार, शिपाई, घोडा). **०पागा**–स्त्री. राजानें अथवा राज्यकर्त्यानें स्वतः ठेवलेली आणि त्याच्या हुकमांतील घोडेस्वारांची टोळी; घोडदळ. **०पाग्या**–पु. १ खासपागेवरचा अधिकारी. २ खासपागेतील घोडा किंवा स्वार. **०बंदी**–स्त्री. खेड्यांतील कांहीं घराण्यांत वाटेल तशी वांटून दिलेली जमीन व प्रत्येकाची कांहीं ठोकळमानानें ठरविलेला सारा. **०बरदार-बादार-बालदार**–पु. राजा, सरदार किंवा मोठा माणूस यांची बंदूक वगैरे नेणारा सेवक. 'हिंमत बहादुर खासे बालदार'–ऐपो ३३३. **०बातमी, वर्तमान**–स्त्रीन. सरकारी खबर. **०बारगीर**–पु. राजा किंवा सरदार यांचा शरीरसंरक्षक स्वार. **०बाल**–स्त्री. बालू चिकणमाती यांच्या मिश्रणानें बनलेली जमीन. ही खतावल्यास चांगलें पीक देते. **०बिघा**–पु. खासबंदी गांवांतील कुळांच्या जमिनीचा धारा ठरविण्याचें माप; मोजणीमाप. **०महाल**–पु. १ खाजगी महाल. २ विवाहित पत्न्यांचा महाल; राणीवसा. याच्या उलट खुर्द महाल (रखेल्यांचा महाल). **०स्वारी**–स्त्री. राजा किंवा सरदार यांचा लवाजमा, मिरवणूक; जिलीब; त्याचप्रमाणें स्वतः राजा, अथवा सरदार. खाशी स्वारी पहा.

खांस, खांसखोंस, खांसणी, खांसर, खांसरी—खांच, खांचखोच इ० शब्दांऐवजीं चुकीनें योजलेले शब्द.

खासदार–पु. 'कौन्सिल ऑफ स्टेट' या वरिष्ठ कायदेमंडळाचा सभासद. **०दारी**–स्त्री. खासदाराचें काम किंवा अधिकार. [खास]

खासदार-खाजदार-खास्तार—पु. १ मोतदार; घोडेवाला, पाग्या. 'पांडवघरचा खासदार हा, ती कंसाघरची दासी.'–राला पृ. ४३. 'असा प्रभुहि सेवका भजसि खासदारापरी.'–केका ७. २ शरीरसंरक्षक; हुजुरातींतील एक असामी. ३ पूर्णपणें अंकित किंवा अधीन म्हणून मानलेल्या माणसास थट्टेनें किंवा सलगीनें म्हणतात (चाकर, बायको, लोबती, भक्ताधीन देव इ०). [फा.]

खा(खां)स-सी—स्त्री. (हिं) ढास; खोकला. [सं. कास=श्वास; प्रा. खास]

खास(ज)गी—स्त्री. राजाची किंवा एखाद्या गृहस्थाची जातीची, स्वतःची जिंदगी, व्यवहार (राज्याचा, संस्थेचा नव्हे असा)- 'त्या राजानें खाजगीचे लिहिण्याकडे पंचवीस कारकून ठेविले आणि राज्याचे लिहिण्याकडे हजार ठेविले आहेत.'

खासगीचा–वि. स्वतःचा; जातीचा; खासगत (पैका, कारकून, खर्च इ०). **०वाला-ले**–पु. खासमंत्री, दिवाण, राजा किंवा सरदार यांची खाजगी रोकड ठेवणारा, खजिनदार; संस्थानांतील खाजगीकडील रोकड ठेवणारा; खाजगीकडचा मुख्य अंमलदार; खानगीवाले.

खा(खां)सडा—पु. १ जोडा; पायपोस (जोडा मारण्याचे प्रसंगीं योजतात). २ प्रहार; आघात; मार; (मुख्यत्वें भाल्याचा). (क्रि० मारणें; बसणें). 'दोन खांसडे मारतांच चोरी कबूल झाला.' **खासडेमार**–पु. फाल्गुन वद्य प्रतिपदेची (धुळवडीची) जोडाजोडी, खेटरा-खेटरी.

खा(खां)सणें—अक्रि. १ खोंकणें; ढांस लागणें. २ (व.) वानराचें ओरडणें. 'वानर खासतें.' [खास. हिं. खासना]

खास(च)र—न. (व.ना.) ओझीं वाहण्याच्या कामाचा मोठा गाडा, खटारा. 'भरतीचें खासर आहे माऊसाहेब! हें तर हळुहळूच चालणार!'

खासा—वि. १ चांगला; नामी; उत्कृष्ट; शेलका; उंची; अभिजात; श्रेष्ठ. 'पांडव म्हणती तुज खासा.!'–दतपर्दे पृ ४१. 'शिवाजी अंगाचा खासा आहे.'–सभासद ३०. २ राजा, अमीरउमराव, सरदार यासंबंधीं. 'खासियाचे पलंग.'–ऐपो १५. ३ मुख्य; प्रधान; श्रेष्ठ; नायक. 'अहो खासा राहे यदुतिलक अंबापरिसरीं.'–सारुह ७.८८. ४ औरस; कायदेशीर; नीच उत्पत्तीचा किंवा लेकवळा नव्हे असा; (गो.) सख्खा.–पु. १ मोठ्या व्यक्तीचें प्रत्यक्ष नांव न घेतां संकेतानें सुचवितांना–नोकरलोक धन्यास-वापरतात (अनेकवचनीं). 'खासे कोठें आहेत?' खासे कोठें गेले?' २ पति, नवरा. 'हंसाबाई! तुमच्या खाशांची शिस्तच मोठी कडक!'–स्वप ४६. [अर. खास्स्] **०कागद**–पु. दौलताबाद येथें तयार होणारा, लिहिण्याचा उत्तम कागद; याच्या उलट खर्ची कागद. **०लोक**–पु. अमीरउमराव; सरदार; दरकदार; उच्च पदवीचे लोक; मानकरी; शेतकऱ्यांपासून हक्क वसूल करणारे हक्कदार. **०स्वारी**–स्त्री. खासस्वारी पहा. [हिं. खास सवारी]

खांसाड—न. (प्र.) खांचाड; वेडेवांकडें, मोठें भगदाड, खड्डा. [खांच]

खासावीस—वि. (गो. कु.) घाबरा. कासावीस पहा.

खास्त—क्रिवि. १ निखालस; खात्रीनें; खास. २ बरोबर; तंतोतंत. खास पहा. [खास. (अप.)]

खास्त—स्त्री. आकस; खुनस; द्वेष; छळवाद, (क्रि० धरणें; करणें). 'हा माझी खास्त करतो.' [अर. खिस्सत्=दुष्टपणा] **खास्तीस लागणें, पेटणें**–त्रास देणें. 'माझ्या खस्तीस पेटला, लागला.'

खास्त-स्ती—स्त्री. १ खंत; धुरणी (क्रि० घेणें; धरणें; करणें). 'आई गेल्यापासून पोरानें खास्त-स्ती घेतली. २ मनांत अढी धरून दोष काढणें; एकसारखी तिरस्कारानें निंदा करणें; रागें भरणें. (क्रि० करणें; लावणें; मांडणें; बांधणें; चालवणें). [अर. खिस्सत्]

खास्त-स्ती, खास्तखोर-खास्तीखोर—वि. खाष्ट; द्वाष्ट; तुसडा निंदक; सदोदित चिडून कुरकुर करणारा. २ आकसखोर; खुनशी; दावा धरणारा; मत्सरी. [अर. खिस्सत्]

खास्त-स्ती—पु. बाणाचा किंवा तोफेच्या माऱ्याचा टप्पा 'श्रीमन्महाराज उभयतां बाणाचे खास्तीवरी उभे राहून...' –पया ३९३. 'खासा मालोजी शिंदे बाणाची खास्त निघाले होते.' –भाब ६३. [फा. खास्तन्=उभें रहाणें, उठणें]

खाळ—पु. गटार; मोरी; पाण्याचा स्वाभाविक किंवा कृत्रिम पाट; कालवा; नळ; खांच; खाई. **०कुवा**–पु. घाण पाण्याचे टांकें, डबकें; तारदखाना (इं. सेसपूल). 'मोऱ्यांतील खाळकुंड्यांतील पाण्यांत चुना घातल्यानें जंतू मरतात.' –सेंपू १.१९७. खोळ पहा.

खाॅळ—स्त्री. (गो.) घोंगडीची खोळ.

खाळणें—न. नकसगाराचें एक हत्यार.

खाळा—पु. गलबला; गोंगाट; गडबड (क्रि० मचविणें).

खिंकाळणें—अक्रि. १ डसणें; चावणें. २ खिंकाळणें पहा. [ध्व.]

खिंका(खा)ळणें—अक्रि. खिंकाळणें. १ घोडयाचें ओरडणें; हिंसणें. २ मोठ्यानें खोखो हसणें; मौजेनें हीही हसणें. [ध्व.]

खि(खी)क्या-ख्या—स्त्रीअव. खोखो; निंदेचीं उपहासाचीं भाषणें, बोलणीं; उपहास, चेष्टा करणें. (क्रि० घालणें; करणें). 'तो सवैदां दुसऱ्याची खिख्या करीत बसला असतो.' 'ऐशा करूनियां खोक्या धिःकारे बोलती।' –निगा ३१५. [ध्व. गु. खिखि=हंसणें]

खिखि—स्त्री. खदखदा हास्य; हीही हास्य. –क्रिवि. खदखदां हास्या(ध्वनि)चें अनुकरण; फिदिफिदी. [ध्व.]

खिच—पु. खिचडी. 'जें काळाचा खिच उशिटा' –ज्ञा ८. १४४. [प्रा. दे. खिच्च=खिचडी]

खिचकट—स्त्री. (गो.) खेचाखेंच. **खिच-खींच्च**–वि. (गो.) गच्च. **खिचऊंचे**–उक्रि. गच्च धरणें.

खिचकुला—पु. मुलें व मुली मिळून भातुकली खेळतात तो खेळ.

खिचट-टें—न. खिचडी; मिसळ. 'तेथ सुखदुःखांचें खिचटें। जेविजे एकेचि तातें।' –ज्ञा १४.२७३. [खिच]

खिचडा—पु. १ करड तांदूळ इ० भरडून, शिजवून गुरास खावयास द्यावयाचें खाद्य. (क.) २ सजगुऱ्याचा सडून केलेला भात. ३ तांदूळ व डाळ यांचें शिजविलेलें मिश्रण. ४ तातुताचे दिवसांत फकिरास घालावयाचें मिश्र धान्य, मिसळ. ५ दाटी; गर्दी. [खिचडी]

खिचडावचें—सक्रि. खिजविणें; चिडविणें.

खिचडी—स्त्री. १ तांदूळ व डाळ (बहुधा मुगाची) यांची मिसळ (शिजविलेली किंवा बिन शिजविलेली). २ पंचमेळ (निरनिराळीं धान्यें किंवा भिन्नभिन्न नांणीं इ० यांची); खिचडमिचड; गोतांबील; 'श्रीमंतानीं मोहरा-पुतळ्यांची खिचडी वाटली.' ३ ज्यांतील जमीनीचा एक भाग धारेकऱ्यानें व एक भाग खोतानें धारण केला आहे असा गांव. ४ गर्दी; दाटी. 'यात्रेमध्यें अनेकजातीय मनुष्यांची खिचडी असल्ये, यामुळें विटाळ होतो.' [दे. प्रा. खिच्च; हिं. खिचडी; सिं. खिचणी; गु. खिचडा; तुल० सं. कृसर] **०वांगी**–अव. तुरीच्या डाळीचें पीठ, चण्याचें पीठ व वांगीं यांची भाजी. –गृशि १.४०. **०विचडी**–स्त्री. अंदाधुंदी; गोंधळ. [खिचडी द्वि.]

खिचडें—न. एकत्र शिजविलेल्या, भरडलेल्या तांदुळाचें आणि कोंड्याचें जनावरांना घालावयाचें आंबोण. खिचडा अर्थ १ पहा.

खिचणें—अक्रि. मार्गे हटणें, सरणें; एका बाजूला अथवा मार्गाबाहेर होणें. २ (ल.) (वचन अथवा उद्देश यांपासून) फिरणें; चळणें. [सं. कृष्–कर्ष; हिं. खिंचना]

खिचबिड—वि. खरडलेलें; भरकटलेलें; गिचमीड. [खिच द्वि.]

खिचरट—वि. खचरट पहा.

खिचवट(ड)णें—उक्रि. १ वरवर उकरणें (जमीन). २ खाजवणें. ३ चिडविणें; खिजविणें. 'स्वनाश न कळे कसा खिचवट्टनि काळानना?' –मोकृष्ण पृ. ७७.१०.

खिचविणें—उक्रि. मार्ग अथवा बाजूला सारणें; वाटेंतून अथवा मार्गांतून ढकलून अथवा सारून देणें. [खिचणें]

खिची—स्त्री. १ खिचडी पहा. २ चिखल; किचड. 'चौमेरीं लोळवितांति धडे। तेथ खिची थोरी जाली।' –शिशु ९५५. ३ पीठ, डाळ इ० घालून केलेली पातळ पालेभाजी. ४ (ल.) दाटी; खच. [खिच]

खिचकट—स्त्री. (गो.) गर्दी. किचकट पहा. **खिचकटांवचें**–क्रि. (गो.) गर्दी करणें.

खिचपेट—स्त्री. (गो.) अडगळ.

खिज—स्त्री (ना.) खिजविणें; खिजविण्याचा शब्द. [खिजणें]

खिजगणती—स्त्री. गणती; मोजदाद; पर्वा (निषेधार्थी प्रयोग). [हिं. किसगनती]

खिजणें—अक्रि. १ चिडणें; रागावणें. 'ब्राह्मण देखुनियां खिजतो.' –देप १८३. २ खजील होणें. [सं. खिद्; प्रा. खिज्ज; सिं. खिजणु; हिं. खिजना]

खिजमत, खिजमतगार–गारी–खिजमतदार—खिदमत इ० पहा.

खिजमती—स्त्री. बायकांच्या हातांतील कंकण; एक दागिना. खिसमती पहा. 'गोठ हातसर जवे खिजमत्या मिनेदार करीं चुडे।' –प्रला ११८. [अर. खिदमत किंवा फा. किस्मत=दैव]

खिजरणें, खिजरियणें—क्रि. (व.) चिडणें. 'खिजरला काय म्हणून?' [खिजणें]

खिजवणी—स्त्री. चिडवणी; चेतवणी; खिजविणारी भाषा, हावभाव, क्रिया. [खिजणें प्रयोजक]

खिज(जा)व(वि)णें—सक्रि. चिडविणें; राग आणणें; चेतविणें; त्रास देणें. 'म्हणउनि खिजवीतो रुक्मिणीतें हरी तो।' –वामन रुक्मिणीविलास ४. [सं. खिद्; प्रा. खिज्जिअ; हिं. खिजाना; म. खिजणें प्रयोजक]

खिजाणा—वि. हताश; नाखूष; खट्टू; निराश; शरमिंदा. खिझाण–णा पहा. [खिजणें]

खिजान—पु. घोडयाचा एक वातरोग. 'खिजान म्हणजे शरीर वाळतें व कैस जातात, रात्रीस नाकांतून श्वास चालतो.' –अश्वप २.१८७.

खिजीपडन—क्रि. (खान.) हट्ट घेणें; खिजणें. –भात्रै ७.१–४.

खिटखिट—स्त्री. किटकीट; त्रास. [सं. खिट् द्वि.]

खिटखिटणें—अक्रि. बारीक व कर्कश आवाज करणें; किटकिटणें; ठकठकणें. [ध्व. सं. खिट्]

खिटी—पु. १ लांकडाचा तुकडा; धलपी; उघडून अलग ठेवण्यासाठीं किंवा लावून घट्ट बसण्यासाठीं दोन वस्तूंत बसविलेला लाकडी तुकडा, पाचर, खुंटा; कोयंडयांत कडी बसविल्यावर घालण्यांत येणारें अडकण; फिरकीची खीळ; अडकवण म्हणून घातलेली चीप; लांकडी दट्ट्या; कठड्याचा लहानसा गज; चाकाची खीळ. २ दाराचा लहानसा लांकडी अडसर, कुत्रें. ३ (ल.) अडचळा; अंतर. 'सरळ स्नेहामधें पडलि खिटी।' –प्रला १६७. [सं. खिट्] (कामांत) ०घालणें–मध्यें अडचळा आडकाठी आणणें.

खिड—स्त्री. १ दोन टेकडयांतील चिंचोळी वाट; अडचणीचा; रस्ता; दरी. २ भोंक; वाट; दार; खिडार; भगदाड (भिंत, कुंपण यांतील). ३ गाळलेला भाग (धडयांतील, ग्रंथांतील). ४ (ल.) फट; सवड; पळवाट. ५ खांड (धारेवरील). 'वस्त्रन्याला खिडी पडतील.' [सं. खंड; का. किंडी]

खिडकबाळी—स्त्री. बायकांचा कानांतील एक दागिना. [खिड+बाळी]

खिडकी—स्त्री. १ गवाक्ष; वातायन; जाळी; झरोका; बारी; मागचें दार; दिंडी; फाटक; वेसकट; पक्षद्वार (गुप्तदार); हवा व उजेडाकरितां केलेलें लहान दार. 'त्या खिडकीस एक लहानशी दुसरी खिडकी होती' –धर्माजीरावांचें कुटुंब पृ. ५३. २ (ल.) क्षुल्लक, लंगडी सबब; पळवाट; सुटण्यास जागा, सवड. ३ (गो.) देवळाच्या गाभाऱ्याच्या दोन्ही बाजूंस गज किंवा गरादे लावून तयार केलेल्या पडण्या. [सं. पक्षद्वार खडक्किका–त्रिकांड शेष; सं. खडक्किका; प्रा. खडुकी अथवा खडक्किआ, खडक्की; का. किडकी; हिं. खिडकी; ते. किटिकि] ०दार–वि. चौकडीदार; पोफळी; खिडकीच्या आकाराची वेलपत्ती काढलेलें; एकाआड एक रंगाच्या चौकडीचें व जाड सुतांनीं स्पष्ट मर्यादा दाखविणारें (कापड). [हिं. खिडकीदार]

खिडकुळी(ळें), खिडुकळी(ळें)—स्त्रीन. १ दोन टेकडयांतील लहान खिंड. २ भिंत, कुंपण यांतील लहान भगदाड, भेग, भोंक. [खिंड]

खिडगोंडी—स्त्रीअव. गळ्या; बोळ; अरुंद रस्ते; खिंडी आणि गोंडी (घळी) (व्यापक अर्थानें). [खिंड+गोंडी]

खिडबिडी—स्त्री. (गो.) प्रेत वाहून नेण्याची शिडी; निसणी; तिरडी.

खिडार–रें—न. मोठें भगदाड; भोंकसा; भोंक; दोन शेतांतील चिंचोळी वाट. २ भग्नावशेष, मोडकेंतोडकें, पडकें घर, गांव वगैरे). –वि. मोडकळीस आलेलें; जमीनीस मिळालेली (गांव, इमारत). [खिंड]

खिडी—स्त्री. भेग; भगदाड; अरुंद रस्ता; गोंड; घोल. 'राजद्वार नव्हे हावा। धर्म खिडी।' –ऋ ६०. 'मज निघावा खिडियेरें वाडि पाहों दे।' –पंच ५.७. [खिंड] ०त गांठणें–ऐन अडचणींत पकडणें.

खिडुकमिडुक—न. किडुकमिडुक पहा. मोडकेतोडके व बारीक सारीक दागिने.

खिडें—न. एक प्रकारचें पोलाद.

खिडोर—स्त्री. खिडार; दरी; भगदाड; मोडकळीस आलेलें घर. 'तरी त्या खिडोरा आंत। सदा दगडमाती राखत।' –एभा १३.१२८. [खिंड]

खिडु टोपल्—न. (व.) किटण न लावलेलें वेळ्चें टोपलें.

खिण—पु. क्षण; थोडा वेळ. 'बारा तास बत्तीस घडया खिण एक नाहीं उशीर।' –ऐपो ३५१. [सं. क्षण; प्रा. खण; पं. छिण; सिं. खिण; हिं. छिन; गु. खण]

खिण—न. (गो.) चामडीस पडलेला घट्टा. [सं. क्षिण; प्रा. किण]

खिणखिण—क्रिवि. बारीक व तीव्र आवाजाचा; किटकिटा. [ध्व]

खितखित करणें—क्रि. खंत घेणें (मुलानें) [ध्व]

खितखितणें—अक्रि. गदमदणें; उकडणें; चिकचिक वाटणें.

खितखितल्लो—पु. (गो.) मुलींच्या खेळांतील भातुकली; खाऊ.

खितपण(णी), खितपीण(णी)—स्त्री. क्षिजणी; क्षीणावस्था; ग्लानीनें किंवा दुःखानें क्षीण होणें; खाटेस खिळणें. (क्रि० घेणें अथवा खितपतीस लागणें). [सं. क्षि=क्षिजणें+तप्=तापणें]

खितप(पि)णें, खिदप(ब)णें—अक्रि. क्षिजणीस लागणें; क्षीण व्हावयाजोगें बहुत दिवस दुखण्यानें पडणें; अशक्त होत जाणें. 'मागावें सखि ! तपतां देवा ! देवू नको मृतीस खितपता । '–मोकृष्ण पू. ३९.४०. [सं. क्षि=क्षयपावणें+तप्=तापणें]

खिताब—पु. किताब; पदवी. –दिमरा २.९९. [फा.]

खिति—स्त्री. पृथ्वी. 'ऐसें पापें दाटली खिती । ' –ज्ञिपु १. ८.३८. [सं. क्षिती]

खिदखिद-दां—क्रिवि. फिदिफिदीं; खदखदां; खोखो; खिखि; मोठ्यानें आवाज करून (हसणें, खिदळणें वगैरे). [ध्व.]

खिदखिदणें—अक्रि. फिदीफिदी हंसणें. [ध्व.]

खिदखिदणें—अक्रि. रट्रट् शिजणें; खदखदणें. [ध्व.]

खिद(दा)डणें—अक्रि. दंगामस्ती करणें; हुंदडणें; उडणें; बागडणें; दंगल माजविणें; बोकळणें. –सक्रि. धूम पळावयास लावणें; पळवून लावणें; (क.) रागें भरणें; खरडपट्टी काढणें. ' खिदडल्याशिवाय तो ताळ्यावर येणार नाहीं. ' [ध्व.]

खिद(दा)डा—पु. दंगल; आरडाओरड; नाच; हुतुतु (क्रि० घालणें). [ध्व]

खिद(ज, स)मत—स्त्री. १ सेवा; चाकरी; कर्तव्य; नोकरी; तैनात. 'माझे आजास व बापास खिजमत होती ते मजकडे सांगावी. ' –दिमरा १.१८५. २ खुशामत; आर्जव. [अर. खिद्मत्] ०गार-दार-द्दार-पु मोठ्या माणसाचा हलक्यासलक्या कामांचा चाकर (अंग रगडणें, जोडे नेणें, हातावर पाणी घालणें इ०); सेवक; परिचारक; हुजऱ्या. ' तुळाजी खिजमतदार झाला बोलता । ' –ऐपो १७०. ०गारी-दारी–स्त्री. खिदमतगाराचें काम, हुद्दा. [फा.]

खिद(दा)ळणें—अक्रि. खिदडणें पहा. [ध्व.]

खिदक्षण—वि. (व.) थकलेला. ' तो धावण्यानें खिदक्षण झाला. ' [सं. खिद्+क्षि=क्षीण]

खिन—पु. क्षण; थोडावेळ. ' खिनभर करूं नको गलबला । ' –पांडवांची लावणी (मसाप १.५.) [सं. क्षण]

खिनानतीर—पु. घोड्याचा एक रोग; अंगावर फोड होणें, सांधे ढळणें, शरीरांतून पिवळेंपाणी निघणें, नाकांतून निळें पाणी येणें, त्यास घाण येणें व माशी बसणें. हीं लक्षणें होतात. –अपश्व २.१८७.

खिन्न—वि. दुःखी; त्रस्त; कष्टी; पीडित; श्रमी; खेदयुक्त; मलूल. [सं. खिद्-खिन्न]

खिन्नट—वि. (गो.) अशक्त; कृश; क्षीण. [क्षि-क्षय]

खिन्नावणें—अक्रि. खिन्न होणें; कष्टी होणें. ' तेव्हां त्यां सुरसुंदरी अतिशयें खिन्नावती मानसीं । ' –निमा १.४०. [खिन्न]

खिपणी-णें—खितपणी-णें पहा.

खिपत—स्त्री. अपमान; अप्रतिष्ठा; फजिती. ' नवाबास खडर्यावर खिपत बसली. ' –रा ५.१८. [अर. खिफ्फत्=अपमान] **खिपती**–वि. अपमानित; हेवेखोर; द्वेषी. ' श्रीमंत भाऊ यास खिपती मुसलमान यानें दरबारांत हुल कटाराची चालविली. ' –पेद १.१२.

खिपतण—स्त्री. पलखण; पलखत; हट्टानें वाटेंतच घातलेली बैठक; एखाद्या हट्टी मुलास वाटेंतून एकीकडे करतांना किंवा उचलतांना त्यानें अडून बसणें, भोंवतीं भोंवतीं घोटाळणें, सोडून जावयास नाखूष असणें; चिकटणें. (क्रि० घेणें). [सं. क्षिप्त+पण]

खिपतणी-णें—खितपणी-णें पहा. [खितप वर्ण व्यत्यास]

खिपरीं बसणें—क्रि. (लु) १ (खिपरी=भोंवतीं) भोंवतीं घुटमळणें, चिकटणें. २ खितपत राहणें (ताप, आजार, पिशाचबाधा यांनीं).

खिपली—स्त्री. (ना.) खपली.

खिम(म्म)ट, खिमाट—न. (कों) कुसकरलेला भात; मऊ केलेला भात; चिकचिकीत शिजविलेला भात; दाट, घट्ट पेज. ' मूल वर्षाचें झालेना ? त्याला येवढें भाताचें खिमट घालीत जा. ' [खिमा]

खिमा—पु. सुरीनें अतिशय बारीक केलेलें मांस व त्याचा केलेला एक पदार्थ. [अर. कीमा]

खिमाव्रर्त—पु. घोड्याच्या तंगडी(नेवरा)वर खुराच्यावरील बाजूस असलेला केसाचा भोंवरा. [सं क्षेम+आवर्त]

खियाल—ख्याल पहा.

खिरकटणें—अक्रि. सरपटणें; भुईसरसें जाणें. [ध्व.]

खिरकटलें—न. (तिरस्कारानें); फार पातळ झालेली खीर; तांदुळाची खळखळीत खीर. [खी अल्पार्थी]

खिरखिड—स्त्री. ज्यापासून राळ उत्पन्न होते असें एक भरदार मूळ.

खिरखिर-रां—क्रिवि. करवरां; खडखडां; जड वस्तु ओढीत नेतानां होणारा आवाज करून [ध्व.]

खिरखिरावि णें—सक्रि. खरखरावि णें; खरखर, खडखड शब्द करावयास लावणें. [ध्व.]

खिरखिरें—न. लहान मुलांचें खेळणें; किरकिरें पहा.

खिरंगटणें—अक्रि. खुरटणें; कमी होणें. 'परी तें खिरंगटलें असे जाण। वैराग्येंवीण वाढेना।' –एभा ११.४२७.

खिरचें—सक्रि. (गो.) विरघळणें. [सं. क्षर्]

खिरटणें—अक्रि. रोगादिकामुळें मनुष्य, पशु इ० ची वाढ खुंटणें; खुरटणें.

खिरटा—पु. किडक्या दातांतील किंवा दाढेंतील कृमींचा एक रोग (अव. खिरटे). [सं. कृमि-किर-ट ?]

खिरटा-टें—वि. खुजा; खुजट; वाढ खुंटलेला; ठेंगणा.

खिरड—न. १ एक मासा. २ गोचीड.

खिरडणें—अक्रि. १ मागें सरणें; हटणें; जिकला जाणें. 'आठवितां मन खिरडे।' –ज्ञा १६.४२१. 'द्वेष खिरडुनि सांडिला।' –दा ५.९.४९. २ खरडत चालणें. 'कैसी सर्वांगें सुंदरी। खिरडली हे।' –शिशु ८३१. 'ठांचा उलल्या खिरडत चाले।' –ह २१.१७३. [सं. क्षर्]

खिरण—स्त्री. तंबोरीवर काढलेली काळी वर्तुळाकार आकृति.

खिरणा—पु. एक झाड.

खिरणी—स्त्री. १ राज(य)णीचें, झाड. याचें पान बकुळीसारखें व फळ कडुनिंबाच्या निंबोळीसारखें असून आंतचीक असतो फळ मधुर असतें. लांकूड कठिण व चिवट असल्यामुळें रंगारी लोक रंगीत कापड बडविण्यास याचे दांडकें घेतात. २ खिरणी फळ. –कृषि ७६६. ३ खरबुजाची एक जात. 'शेवें शीतांफळें हीं खरबुज खिरणी सुंदरें तूत बोरें।' –सारुह ३.४९. [सं. क्षीरिका] ०**बाळ्या**-स्त्री. बायकांच्या कानांतील एक दागिना. 'खिरणीबाळ्या पोंवळ्याच्या बाळ्या.' –अफला ५५.

खिरणें—न. चाळणी; गाळणी. 'पाठीचें खिरणें.' [सं. क्षरण]

खिरणें—सक्रि. १ गाळणें; चाळणें. –अक्रि. गळणें; मधून जाणें; वाहणें; स्रवणें (मुख्यत्वें धातु, वीर्य, किंवा मूत्र यासंबंधी). 'कोंदलें असत न खिरे। कवणे काळीं।' –ज्ञा ८.१५. २ झुरणें; शिजणें. ३ वीर्यपात होणें; बेजार होणें. [सं. क्षरण]

खिरणें—अक्रि. शिरणें. [सृ=सरणें, अपभ्रंश]

खिरतुपडी—स्त्री. (सोंगटयांचा खेळ) तुप्पी; आपली खेळ्याची पाळी झाली तरी शत्रुपक्षाची सोंगटी मारल्याबद्दल पुन्हां खेळावयास मिळालेला डाव. (क्रि० खाणें; खेळणें). [खीर+तृप] ०**खाणें**–(ल.) चांगला मार मिळणें, खाणें; झोडपलें जाणें.

खिरपण-णी, खिरपिणी-पीण, खिरपणें-पिणें—खितपणी-णें पहा.

खिरबिटथा—स्त्रीअव. रेघोट्या; फरफाट्या; गिचमीड लिखाण. [सं. क्षर्]

खिरवड—स्त्री. (गो.) प्रेत वाहण्याची निसण; तिरडी.

खिरवड—स्त्री. (गो.) कटकट; कंटाळा.

खिरसाळ—स्त्री. भाताची एक जात. [सं. क्षीर+शालि]

खिरा—पु. १ कांकडीची एक जात. याचा रंग हिरवट पांढरा व लांबी ३-९ इंच असते. याचे वेल ६ फूट वाढतात. २ एक झाड. ३ घोड्याचा एक रंग. –अश्वप १.२८. [अर. खियार=काकडी]

खिराडी—स्त्री. (ना. व.) खार नांवाचा प्राणी. [खराडी]

खि(ख)राडी—स्त्री. १ विहिरींतून पाणी काढावयाचें लोखंडी चाक. खराडी अर्थ २ पहा.

खिरापत—स्त्री. १ कथेच्या शेवटीं श्रोत्यांना द्यावयाचा प्रसाद; पूर्वी पळीभर दूधसाखर देण्याची चाल होती तीस अनुसरून. भोंडल्याच्या शेवटीं मुली खोबऱ्याचा कीस, साखर यांचा किंवा हरभऱ्याच्या डाळीचा प्रसाद देतात ती. (ल.) २ सढळ हातानें दिलेली देणगी. ३ (ल.) उधळपट्टी. (क्रि० करणें; होणें). ४ (ल.)(गो.) जळू. (प्राणी). [सं. क्षीरपत्र; फा. खैर+आफियत् ?] ०**काढणें**–क्रि. (ना.) हकालपट्टी करणें; सळो का पळो करून सोडणें.

खिराळें—न. (कों.) अडसराचें भितींतील भोंक. खिळोरें पहा. [खीळ+आलय]

खिरी—स्त्री. पोलादाची एक जात. [हिं.]

खिरीट—पु. एक मासा. –प्राणिमो ८१.

खिरीपुरी—स्त्री. १ चैनीचें जेवण, राहणी. (क्रि० खाणें). २ श्रीमंती थाटानें मेजवानी देणें. (क्रि० वाटणें; देणें; वाढणें). [खीर+पुरी]

खिरोटी—स्त्री. (चंद्रपुरी) खीळ. [सं. कील]

खिरोंचें—सक्रि. (गो.) विरघळविणें. [सं. क्षर्]

खिल(ला)त—पुस्त्री. सन्मानाचा पोषाख; राजा खूष होऊन आपल्या हातानें आवडत्या माणसास जो पोषाख देतो तो. (या पोषाखाबरोबर त्या त्या दर्जाप्रमाणें जवाहीर, घोडा, हत्ती, शाली इ० देत असत). 'बक्षीगिरीचा खिलत.' –दिमरा १.८६. [अर. खिलअत्] ०**फाखरा**–पु. बहुमानाचा उंची पोषाख. 'खलाअत फाखरे मुम्ताज होऊन.' –वाड १४०.

खिलबत—न. १ खलबत; एकांत; गुप्त बैठक. २ खलबतखाना; खाजगी बैठक. [अर. खल्वत्]

खिलाई—स्त्री. (व.) खावटी; खुराक; खाय. 'म्हशीचें दूध खिलाईवर अवलंबून आहे' [हिं; सं. खाद्]

खिलाडी-डू—वि. १ खेळण्यांत पटाईत. 'आम्ही हिंदु लोक ... म्हणण्यासारखे खिलाडू होतो किंवा नाहीं याचा बराच संशय आहे.' –आगर ३.१६१. २ खेळकर; आनंदी; उत्साही; हसून खेळून वागणारा. ३ (ल.) थट्टेखोर; गमती. 'तऱ्हेबाज ती आधीच खिलाडु नवऱ्याच्या गोष्टी ऐकून।' –पला ७८. [सं. खेल्]

खिलाप(फ)त—स्त्री. १ खलिपाई; खलिपाची पदवी, काम; मुहुम्मद पैगंबराचें प्रतिनिधित्व. २ इस्लामी साम्राज्य. [अर. खिलाफत्]

खिलाफ—वि. विरुद्ध; प्रतिकूल; उलट. 'श्रीमंताची खिलाफ मर्जी करून नवाब ... जातील तर गोष्ट दुराग्रहास पडेल.' –रा ३.४५६. [अर. खिलाफ्]

खिला(ल्ला)र—न. कळप; तांडा (गाई-म्हशींचा). 'जियें गांवीं खिल्लारें। कामधेनूंचीं।' –ज्ञा ९.३२१. 'त्यांस पुसे हें कोणाचें खिल्लार।' –ह २९.१८५.

खिला(ल्ला)री—पु. १ गोप; गवळी; गुराखी; गोवारी. 'मी खिल्लारी नंदाचा।' –मुसभा ९.५१. 'नंदाचे घरचा खिल्लारी।' –ह ३४.२. २ गुरें विकणारा लमाण. –वि. गाई, बैल यांची एक जात. **०धनगर**–पु. गाईम्हशी आणि शेळ्यामेंढ्या यांचा कळप राखणारा. याच्या विरुद्ध मिरका धनगर.

खिलावणें—न. १ खेळ; क्रीडा. २ खेळणें. ३ (ल.) प्रीतिपात्र. 'तुम्हीं तर माझें खिलावणें।' –प्रला १६७. [सं. खेल् हिं. खिलौना]

खिल्ली—स्त्री. (व.) १ चेष्टा; फजीती. २ विनोद; थट्टा. [हिं.; सं. खेल्]

खिव-खेम—स्त्री. (गो.) आलिंगन. [सं. क्षेम]

खिशाण-णा-णी, खिसाणा—वि. निराश; लज्जित; खिन्न; दुःखी; कष्टी; श्रमी. [सं. खिद्; हिं. खिसाना]

खिशी—स्त्री. सांडगे; कुरडया; पापडया; वडे इ० पदार्थ तयार करण्याकरितां शिजविलेलें पीठ. (क्रि० घेणें; शिजविणें). [शिजतांना खिस! अशा होणाऱ्या आवाजावरून; ध्व.]

खिसकणें—अक्रि. (माण.) रागावणें; रागानें बोलणें. [ध्व.]

खिसखिशा, खिसखिस—वि. तिडतिडा; तुसडा; चिरडखोर; सदां कुरकुरणारा. [ध्व.]

खिसखि(खी)स—स्त्री. जिकीर; कटकट; चिरडखोरपणाचा आक्षेप; निंदा; भर्त्सना; खरडपट्टी. –क्रिवि. खदखदां; खोखो; फिदीफिदी. (क्रि० करणें; हंसणें). [ध्व.]

खिसखिसणें—अक्रि. १ कचकचणें; दांत खाणें (माकडाचें). २ निंदणें; खडसावणें; खरडपट्टी काढणें. [ध्व.]

खिसगणती—स्त्री. किसगणती (अप); खातर; पर्वा. 'येथील हायस्कूलचे हेडमास्तर व सरकारचे रिपोर्टर हेहि 'एलिफास' साहेबाच्या खिसगणतीस नाहींत.' –नि ६३४. [हिं. किसगिनती सं. किम् अस्य+गणना]

खिसणें—अक्रि. १ बाजूला होणें; वाटेंतून एकीकडे सरणें; बाजूला सरून जागा करणें. २ दांत खाणें (माकड रागानें करतें). (त्यावरून) ३ रागानें अथवा चिडून अंगावर जाणें. ४ खिजणें; रुसणें. [सं. खिद्; हिं. खसना]

खिसमत-गार-दार–खिद शब्दाखालीं पहा.

खिसमती—स्त्री. स्त्रियांच्या हातांतील कंकण, हें दुहेरी असून त्यावर पितळी बेगड चिकटवितात; खड्गपात्र. 'चुडे खिसमत्या मोठया.' –श्रीगीतमाला पृ. ६५. [अर. किस्मत्=दैव]

खिसमीस—स्त्री. बेदाणा; द्राक्षाची एक लहान जात; यांत बी नसते. [फा. किशिमश]

खिसा—पु. १ कप्पा; कसा; अंगरख्यास पिशवीसारखा भाग असतो तो. २ (ल.) पडदा; कूड; खण; गौण, अंतर्भूत गोष्ट अथवा बाब. 'हें माजघर एक दिसतें परंतु यांत तीन खिसे आहेत.' 'या मामलतेचे पोटीं चार खिसे आहेत.' 'त्या कामामधें खिसे पुष्कळ आहेत.' ३ (ल.) मनांत किंवा पोटांत ठेवलेली गोष्ट; दाबून किंवा दडवून ठेविलेला मुद्दा (सांगण्यांतील). (क्रि० राखणें). [फा. कीसा, सीसा] (वाप्र.) **०कातरणें**–भामटेगिरी करणें; लुबाडणें; फसविणें. **०गरम करणें**–खूप पैसे मिळविणें. **खिशांत टाकणें**–लांबविणें; चोरणें. **खिशांतली गप**–स्त्री. निव्वळ थाप. **०भरित**–वि. खिसा भरून. 'वरी खिसेभरित होन त्यांसि अर्पितसे.' –अमृतध्रुव १५. **०खोकला**–पु. भांडणतंटा; बेजबाब वाद. [खिसा+खोकला]

खिसा—पु. १ बोलाचाली; तंटा; उपसर्ग; त्रास. 'तनखेविषयींचा जाब बोलून खिसा झाला.' –हौकै २. २ (व.) गत; स्थिति, अवस्था. खिस्सा पहा. [अर. किस्सा]

खिसाणा—पु. खदखदां हास्य; खिदखिदणें. (क्रि० करणें; मांडणें; चालणें). [ध्व.]

खिसारत, खिसारा—पुस्त्री. १ नुकसान; तोटा. 'यांत ...फौजेचा खिसारा बेमुबल्ग होतो.' –रा ५.१९८. 'आपण पंधरा सोळा लाखाचे खिसारतेंत आलों.' रा –१.१९२. २ कारवाई; फसवणूक. 'असे नाना प्रकारचे खेळ-खिसारे आम्रेत.' –ख ७.३२५८. ३ (ल.) फितूर. 'सर्कारच्या फौजेत खिसारा फार पडला आहे.' –ख ६.३१५०. ४ गुंतागुंत; कंटाळवाणेपणा; लांबलचकपणा (कामाचा, व्यापाराचा). (क्रि० पडणें); तसेंच गुंतागुंतीचें, कंटाळा आणणारें काम. (क्रि० पडणें). [अर. खिसारत=नुकसान]

खिसारा—पुस्त्री. भाग; हिस्सा (कामाचा, खटल्याचा). [फा. खीसा]

खिस्त—स्त्री. १ हप्ता. २ हप्त्यांची किंवा हप्त्यानीं फेड; हप्तेबंदी ३ हप्त्यांची मुदत, अवधि. 'खिस्त भरल्यानंतर रुपये राहिले तर व्याज पडेल.' ४ पैसे कर्जाऊ घेण्याचे अनेक प्रकार हा शब्द दर्शवितो. जसें–प्रत्येक संध्याकाळीं थोडें थोडें मुद्दल परत करणें व त्यावरील व्याज देणें; दररोज व्याजावरोबर मुद्दलाचा कांहीं भाग देणें आणि अशा रीतीनें सर्व मुद्दल फिटेपर्यंत सर्व रकमेवरचें व्याज देत जाणें; दररोज इतकी रक्कम आणि इतक्या मुदतीपर्यंत देणें कीं दररोजच्या फेडींची बेरीज केली असतां ती मुद्दलापेक्षां अध्यानें, चौथ्या हिश्शानें इत्यादि जास्त होईल; दररोज सकाळीं कर्ज घेऊन रोज सायंकाळीं व्याजमुद्दलासह फेडणें. इ० ५ (ल.) कामाचा हिस्सा; खिसा अथवा लक्ष पुरविण्याची भिन्न बाब. असले घोटाळ्याचे अनेक अर्थ या शब्दांचे रूढ आहेत. त्रास, त्रासदायक काम 'हें खिस्तीचें काम आहे' 'हा खिस्तीचा रोजगार.' 'हा खिस्तीचा स्वयंपाक.' ६ (ल.) विशिष्ट गोष्ट, बाब, रक्कम; निमित्त; खोटी सबब. 'हा पाटील हजार खिस्तीनें छळतो.' ७ (गो.) आक्षेप. [अर. किस्त] ०बंदी–स्त्री. कर्जाची हप्तेबंदी; हप्त्यानीं कर्ज देण्याचा करार. [अर. किस्तबंदी] **खिस्ती खांदा**–पु. १ खिस्त अर्थ ४ पहा. (क्रि० करणें; लावणें; देणें; घेणें; वारणें). २ खांदवडा. [खिस्त द्वि.] **खिस्तीचा**–वि. १ पुष्कळ खिस्ते, भिन्न बाबी, रकमा अणारा; यावरून. २ (ल.) त्रासदायक; खडतर; कंटाळवाणें (काम, गोष्ट.).

खिस्तक—नस्त्री. विजारीची दोन मांडयांमधील गुह्यभाग झांकणारी पट्टी. [अर. किस्तक]

खिस्ताई, खिस्ताईचा-व्यापार-व्यवहार-धंदा-काम—स्त्रीपु. दररोज किंवा अल्प मुदतीनें कर्ज घेण्याचें आणि व्याजासह तें फेडण्याचें काम; खिस्त अर्थ ४ पहा.

खिस्ती—पु. गुजराथी ब्राह्मणांची एक जात व तींतील व्यक्ति; जंबु. –वि. १ खिस्तीच्या पद्धतीपैकीं कोणत्याहि पद्धतीनें पैसे कर्जाऊ देणारा; व्याजबट्टा करणारा (सावकार). 'विठोबा खिस्ती मजकारण।'–भवि १६.३३. २ त्रासदायक; किचकट; खडतर (गोष्ट). ३ –स्त्री. सावकारी; व्याजबट्टा. 'अंगीं ब्रह्मक्रिया खिस्तीचा व्यापार।' –तुगा ३०६१. [खिस्त]

खिस्त्या—वि. खिस्ती (–वि.) पहा.

खिस्मतगार—खिदमतगार पहा. 'खिस्मतगारी करणार।' –मव ११.६९.

खिळ—पु. खीळ; प्रतिबंधक वस्तु; खुंटी वगैरे. 'तोंडींचा खिळ नव्हतां दूरी। नारेळजळ न चढे करीं।' –एभा १३.२९.

खिळखिळा, खिळखिळणा, खिळखिळीत—वि. ढिला; शिथिल; डगमगणारा (सांधा, सांध्याच्या अधूपणामुळें माणूस, वस्तु). (क्रि. करणें). [स. कीलक, स्खल्?]

खिळखिळॉ-ळो—पु. (गो.) खुळखुळा; खेळणें. [सं. खेल्]

खिळखिळी—स्त्री. सांध्याचा ढिलेपणा; शिथिलपणा. –वि. (गो.) निखळीच्या मागोमाग झालेली मुलगी. [सं. स्खल्]

खिळण—स्त्री. १ खिळेबंदी; डांबणें; न हालेसें करणें. २ (ल.) डांभणी; चिकट्टन रहाणें; खिट्टन राहाणें (घर, बिछाना, खुर्ची इ०शीं); सांध्यांचा किंवा शिरांचा ताठरपणा (अर्धांगवायूनें आलेला); दाराशीं घेतलेलें धरणें (तगादार, गळग्रह, भिकारी यांनीं); हट्ट; पाठपुरावा; छंद (एखादी गोष्ट करण्याविषयीं मुलाचा); हटवाद; दुराग्रह (प्रार्थनेंत); हट्टास पेटणें किंवा बसणें. (क्रि. घेणें; धरणें; खिळणीस येणें). [खिळणें]

खिळणें—सक्रि. १ खिळेबंदी करणें; डांभणें; न हालेसें करणें; पक्कें करणें; चिकट्टन राहीसें करणें; जखडून टाकणें; 'काई बाणवरी खिळूं। वारयातें।' –ज्ञा ११.४६१. 'गज खिळोनी केले अचळ।'–मुआदि २३.१३९. २ खीळ किंवा अडसर लावणें, घालणें. ३ (ल.) रोखणें; अडकविणें. 'खिळण पहा. 'मंत्रीं महासर्प खिळिती।' –दा ९.८.३७. ४ चावणें (विशिष्ट लहान कीटकांच्या चावण्याच्या आणि घट्ट धरण्याच्या संबंधीं) ५ (व.) पावसाचे थोडेसे शिंतोडे पडणें. ६ (व.) उभ्या पिकांतील मधलीं झाडें वाळणें. [सं. कील्]

खिळनी—स्त्री. अटक; अडसर; खिळा; खीळ. 'नातरी शृंगारा खिळनी बांधिली।' –शिशु १८८. (क्रि० बांधणें) [सं. कीलन]

खिळपट—पु. शेतांतील-रस्त्यांतील दगडांचा पोकळ ढीग, वरंडा. [खिळा]

खिळविणें—सक्रि. खिळणें प्रयोजक पहा.

खिळा—पु. १ खीळ; मेख; लोहशंकु; लोखंडाची अणकुचीदार वस्तु. २ गाय, म्हैस यांच्या स्तनांतून दूध बाहेर निघण्यास आंतील प्रतिबंध करणारा मळ, हा जनावर व्याल्यानंतर काढावा लागतो. ३ रचलेल्या दगडांचा ढीग, वरंडा; एखादी शंक्वाकृति रचना. ४ जमिनींतून नुकताच बाहेर येणारा अंकुर. ५ तीन अथवा चार गांवांच्या सीमा एकत्र मिळण्याचें ठिकाण. ६ छापण्याचा ठसा, टाईप ७ (माण) गाडीच्या जोखडांतील भोकांत (बैलास दुसरीकडे खांदा वळवितां येऊं नये म्हणून) बसविण्याची खुंटी, दांडा, शिवळ. खिळयाचे प्रकार–स्क्रू, टेकस, कुऱ्हाडी, तारेचा. [सं. कीलक; प्रा. खीलओ; गु. खिळो; बं. ओरि. खील, खिला].

म्ह० खिळ्यासाठीं नाल गेला, नालासाठीं घोडा गेला, घोड्यासाठीं स्वार गेला, एवढा अनर्थ खिळ्यानें केला=क्षुल्लक चुकीपासून परंपरेनें मोठा अनर्थ गुदरतो. **०जोडणार**-पु. ठसे, टाइप जुळविणारा, कंपाझिटर. **०पट्टी**-स्त्री. १ घराचें लोखंडी काम. 'घर तर झालें खिळापट्टी व्हायाची आहे.' २ कपाळावर लाविलेल्या तांबड्या गंधाच्या दोन ओळी व त्यांत सुपारी जाळून तिचा किंवा कस्तुरीचा लाविलेला टिळा. त्यावरून **खिळेपट्टी करणें**-लोकांच्या घरीं जेवणें. 'आज कोठें खिळेपट्टी झाली?' **०माणी**-वि. लोखंडी खुंटी व तिच्या भोवतीं लोखंडी मायणी असणारें (जातें). किलेमाणी पहा. **खिळारें**-खिळोरें पहा.

खि(खिळ)ळी—स्त्री. १ (विणकाम) हत्येच्या चौकटीच्या दोन्ही बाजूंच्या दोन खुंट्या; (सामा.) दाराचा अडसर, खिळा, मेख. २ खीळ पहा. (खिळी हा शब्द खील शब्दाबद्दल कोंकणांत वापरतात). ३ (गो.) दाराची कडी. (कु.) खिटी; आडणी. 'खिळि लाउनि धरला वाडा।'-आप ८६. [सं. कीलक]

खिळीव—वि. डांबलेला; न हालेसा केलेला. [कील]

खिळेखुरदा—पु. तोफेंत किंवा गोळ्यांत भरलेले खिळे, लोखंडी तुकडे, दगड इ० [खिळे+खुरदा]

खिळेछाप—पु. शिसाचे अक्षरांचे ठसे, टाईप. याच्याविरुद्ध शिलाछाप, लिथोग्राफी.

खिळेपट्टी, खिळेमाणी—खिळा पहा.

खिळोटी—स्त्री. (ना.) दार लावण्याचा खिळा, अडसर.

खिळोटया—वि. (व.) एखाद्याच्या कामांत खीळ (अडचण) घालणारा. [खिळा]

खिळोरें—न. (राजा. कों.) दरवाजाचा अडसर राहण्यासाठीं बाजूच्या भिंतींत ठेवलेले दोन कोनाडे, मोठीं भोकें; अडसराचें कुलंगडें. (क्रि० घालणें). [खिळा]

खीच—स्त्री. खिचडी. खिच पहा.

खींच—वि. (गो.) गच्च.

खीचपुरी—स्त्री. खिचडी. 'मनपवनाची खीचपुरी। वाढुनियां।'-ह्रा १८.१०४०.

खिस्सा—पु. किस्सा पहा. कर्मकहाणी; अवस्था; स्थिति; तऱ्हा; गोष्ट; गत. 'उगाच खिस्सा लिहिला तो प्रमाण काय.' -बाडसमारो ३.६९. 'नवे नवेच खिस्से काढून बारामतीस गेले.' -ख ६.३१६५. [अर. किस्सा]

खीज—स्त्री. रुसवा; चिरड; चीड; इतराजी. (क्रि० येणें.) [सं. खिद्]

खीट—न. १ गुरांच्या गळ्यांत बांधलेली काष्ठघंटा, लाकडी गोळा, घाट. २ लहान लाकडी खुंटी. खिटी पहा.

खीण—पु. (कु.) क्षण. खिण पहा. [सं. क्षण]

खीण—पु. (गो.) घडा; वण. खिण पहा. [सं. किण]

खीमा—पु खिरापतीसारखा किंवा तिच्यापेक्षांहि बारीक किसलेला पदार्थ. खिमा पहा. [अर. कीमा]

खीर—स्त्री. दुधांत गव्हले, तांदूळ, साखर इ० घालून आटवून केलेलें पक्वान्न; गोमंतकांत रताळ्याचे तुकडे, तांदुळाचें पीठ, गूळ इ०पदार्थ खिरींत घालतात. खिरींचे प्रकार-गव्ह्ल्यांची, फणोल्यांची, नखोल्यांची, मालत्यांची, बोटव्यांची इ० [सं. क्षीर; प्रा. खीर; सीगन खील; सिं. खीरु; पं. हिं. गु. खीर; ओरि. खीरी] (वाप्र.) **खिरींत तूप पडणें**-चांगल्या पदार्थाशीं दुसऱ्या चांगल्या पदार्थांचा संयोग होणें. **म्ह०** १ पोर पोटांत खीर ताटांत=मूल होण्यापूर्वीच त्याच्या उष्टावणाची तयारी; यावरून (ल.) अतिशय उतावळेपणा. २ जेथें खीर खाल्ली तेथें राख खावी काय? =जेथें फुलें वेचलीं तेथें गवऱ्या वेचाव्या काय? सामाशब्द- **खिरींत सराटा**-पु. चांगल्या माणसांतील वाईट माणूस; समाजांतील त्रासदायक माणूस; समाजकंटक; उपाधि; ब्याद; कांटा; (बायकी भाषा) विरूप माणूस; चांगल्या नाजूक वस्तूंतील वाईट व भसाडी वस्तु; एकचित्त मंडळींतील प्रतिकूल व्यक्ति. **खिरींत हिंग**-पु. चांगल्या मनुष्यांतील, वस्तूंमधील वाईट माणूस, वस्तु.

खीरम्या—पु. उंची वस्त्र.

खीळ—स्त्री. १ दरवाजाला लावण्याचें, लोखंडाचें किंवा लांकडाचें केलेलें आडकण; अडसर; खुंटी; शंकु. २ शिडीच्या पायऱ्या प्रत्येकी. ३ लांकडांचा सांधा जोडावयासाठीं मारलेला खिळा. ४ खिळा. ५ स्तनाग्रांतील दुग्धप्रतिबंधक मळ. (क्रि० बसणें; फोडणें) ६ हाडांचा सांधा; खुबा; जसें-कोपराची-ढोपराची-दांताची-मनगटाची-पायाची-खीळ. ७ (व.) गळू अथवा खांद्क याच्या तोंडावर जमलेली पुवाची गोळी, खडा. खिळा पहा. ८ शिवळ. [सं. कीलक] (वाप्र.) **०फोडणें**-जनावर ब्याल्यानंतर त्याच्या स्तनांतून दुधाच्या चार धारा काढणें. **०बसणें-घालणें**-अडथळा आणणें. **म्ह०** चालत्या गाडीस खीळ=सुरळीतपणें चालत असलेल्या कामांत विघ्न आणणें.

खुकारा—पु. कुकारा; जोराची हांक; हरळी. [ध्व.]

खुखु—क्रि. जलद व हलकें हास्य; खीखी हांसणें. (क्रि० हंसणें; करणें) -क्रिवि. खीखी हंसण्याचा आवाज; फिदीफिदी. [ध्व.]

खुजट-ड—वि. कांहींसा खुजा; अकालीं वाढ खुंटलेला; खुरट; ठेंगणा. 'तूं उभा ना बैठा। दिघड ना खुजटा।'-ह्रा ११.२७७. 'वामनरूपातें वानिती खुजड।'-दावि २२९. [सं. कुब्ज; प्रा. खुज्जो, खुज्ज; म. खुजा] **०पण-न**. ठेंगणेपण.

'सर्वेचि खुजटपण सांडिलें.' –एरुस्व २.१६. ०हाड–न. लहान मुलाचें हळू हळू वाढणारें हाड. याच्या उलट उफाडयाचें हाड.

खुजरत—खुदरत पहा.

खुजस्ते—वि. शुभ; कल्याणकारक. [फा. खुजिस्ता] ०अख्तर–वि. सुदैवी; चांगल्या नशिबाचा, प्रहाचा –रा ८.७७. ०फर्जाम–वि. सद्गतीस पोंचलेला. –रा १५.२५३. ०बुनियाद–वि. कल्याणकारक पायाचें; औरंगाबाद शहराचें गौरवपर नांव शाहुरोजनिशी ३८. (हें औरंगाबादेचें नांव औरंगजेबाच्या हयातींत प्रचलित होतें).

खुजा—वि. ठेंगणा; ठेंगु; बुटका; ह्रस्व; वाढ खुंटलेला. 'नादन्हा खुजें.' –ज्ञा १५.१३. 'मेरूही मजशीं खुजा,' –आसी ४१. [सं. कुब्ज; प्रा. खुज्ज, खुज्जो; तुल० का. गुज्ज] ०वृक्ष–यवृक्ष पहा.

खुजा-जो—पु. १ लांब व निमुळत्या मानेचें पाणी ठेवण्याचें मातीचें भांडें; चंबू; सुरई. 'तांबे, जांब, खुजे, प्रशस्त तिवया, ताटें नवीं तासकें.' –सारुह ३.४३. २ (गो.) (सोनारीधंदा) सोनें शुद्ध करण्यास लागणारें काचेचें भांडें, मूस. [सं. कु=पृथ्वी+जा; फा. कूजा; इं. कूझ]

खुंट—पु. १ खालीं राहिलेला भाग; खोड; कांड; सोट; बुंधा (झाड, झुडप, शेपट, केरसुणी, हजामत झाल्या नंतरचे केंस इ० चा). 'समूळ फोडियेले खुंट.' –एरुस्व १०.७६. २ (मासे मारण्यासाठीं समुद्र किंवा नदी यांत) रोविलेला खांब, डांभ. ३ ज्यामध्यें फाळ बसवितात तें नांगराचें टोंक; खुलसा; कोळसा. ४ गाय, म्हैस यांच्या आचळांतून दूध येण्यास प्रतिबंध करणारा मळ. ५ गोफण, जाळें, शिकें करण्याकरितां दोरीचे दोन पदर अथवा पेड तिरकस बाहेर ओढले जातात त्यापैकीं शेवटचे तंतू पुन्हां याच रीतीनें बाहेर काढले जाऊन वळले जातात, अशा शेवटच्या तंतूंपकीं प्रत्येकास खुंट म्हणतात. ६ दूध न देणारा जनावराचा सड; मुका, आंधळा सड. ७ पृथ्वीचे चार कोपरे, 'हिंडूं देश कोण खुंट चारी.' –तुगा ११८. 'चार खुंट जहागीर. ८ दणकट शरीराची गाय, म्हैस, जनावर किंवा स्त्री. 'काळवीट खुंट खरे,' –ऐपो २४२. ९ मध्यम आकाराचा केळीचा कोंब, खोड, मोना (मोठ्या केळीस चिकटलेला किंवा निराळा काढलेला). १० चार रस्त्यांचा चौक; चौहाट; अड्डा. ११ रस्त्यांचें टोंक; शेवट. १२ (ल.) कुटुंब; घरदार; त्यापैकीं एक व्यक्ति; वंशाची शाखा; वंशांतील मूल; वंशाचें फल; संतान. १३ बुगडीचें मळसूत्र ज्यांतून जातें तो भाग; बुगडीचा, कुड्यांचा कानांतील भाग. १४ अंगरख्याच्या बाहीच्या चुण्या जींत एकत्र करतात ती पट्टी अथवा गजासारखी शिवण. १५ (ल.) आधारस्तंभ; आश्रयदाता. १६ (आंधळया कोशिंबिरीच्या खेळांत) आंधळ्याचें सोंग घेणाराचे डोळे झांकणारा मुलगा; भोग्या. १७ (गो.) कुंपणाची काटी. १८ (कों.) तुकडा. १९ खोखोच्या खेळांतील न हालणारा गडी. 'होऊनियां खुंट बसा जपून.' –भोग–यांची कविता, मराठी तिसरें पुस्तक खेळ ५ पृ. ४८. २० (ढोरधंदा) अत्यंत आखूड सळ. २१ कांठ; कोपरा. 'खेटितां कुंप कांटी खुंट दरडी न पाहे.' –तुगा ३४९. २२ स्वारी; उतारू (गाडीमधील). २३ खांब; मेढ. 'मग परमस्नेहाचा खुंट उभवोन । गरके घालिती त्यासवें.' –नव २४.१५५. २४ जनावरास बांधण्यासाठीं जमीनींत गाडलेला लांकडी खुंटा; दांडकें. २५ वाघूर लावण्यासाठीं ठोकलेल्या लांकडाच्या मेढी; खुटला. –वि. (गो.) ताठ; नीट. [सं. कुट्–कुंट्=स्तम्भित होणें; प्रा. खुंट; तुल० का. कुंटु=लंगडा] (वाप्र.) ०होणें–हट्ट धरून खुंटा सारखें ताठ व स्तब्ध बसणें. ०ळणें–बाल इ० चा एक एक दाणा लावण्यासाठीं जमीनींत खुंटीनें, किंवा काठीनें टोचा, भोंक पाडणें, टोवणें. **खुंटास खुंट उभा राहणें–होणें**–एक जातो तोंच त्याच्या जागीं दुसरा येणें; गेलेल्याची जागा नवीन येणारानें भरून काढणें; खंड पडल्याची जागा भरून काढणें. **खुंटास खुंट घेणें**–जशास तसें करणें; उसनें फेडणें. **खुंटासारखा उभा राहणें–असणें–खुंटणें**–खुंटाप्रमाणें ताठणें, ताठ उभा राहणें. म्ह० आजा मेला नातु झाला खुंटास खुंट उभा राहिला. खुंटावरचा कावळा=घरदार, वतनवाडी, बायकामुलें नसलेला, वाटेल तेथें राहणारा माणूस. सामासशब्द–०कन–कर–दिनीं–दिशीं–क्रिवि. तीव्र व हलक्या आवाजानें; खाडदिशीं (दोन काष्ठांचा परस्परांना लागून होणारा शब्द) (क्रि० वाजणें). चुटकी, टाळी यांच्या होणाऱ्या आवाजांप्रमाणें शब्द होऊन ०कळी–स्त्री. बगलकळी; अंगरख्याच्या पाठीमागचा त्रिकोणी तुकडा. बगलेंतील पेशकळी आणि आगा असे दोन तुकडे व खुंटकळी मिळून अंगरख्याची एक बाजू होते. **खुंटण**–न. खुंट अर्थ १–२ पहा. ०पान–न. (राजा.) केळीच्या गाभ्यापासून निघणारें शेवटचें आणि कोंक्याच्या पूर्वी येणारें आंखुड पान. ०बरा–पु. खुंटी. खुंटा पहा. ०बाखली–स्त्री. १ (राजा.) एक प्रकारची बाहुली. २ उंचीवरचा पदार्थ काढण्यासाठीं चवडयांवर उभें राहणें. (क्रि० करणें). अशा रीतीनें खुंटबावलीवर उभें राहणें. ३ (निंदेनें). काम न करणारी व खुंटयासारखी तिष्ठत रहाणारी स्त्री. ०बाळी–स्त्री. स्त्रियांचें एक कर्णभूषण. 'खुंटबाळया साऱ्या बाळया त्याजबर.' –अफला ५५. ०भाजी–स्त्री. विशेष विस्तार न्हावा म्हणून पुन्हां पुन्हां अग्रें खुडून राखिलेली भाजी; खुंटापासून किंवा मुळापासून निघालेला कोंब व त्याची भाजी. ०रोग–पु. १ पुष्कळ दिवस खुंटास बांधून ठेवल्यामुळें पशूंना येणारा रोडकेपणा किंवा होणारा आजार. २ (ल.) अशा बैठेपणापासून होणारा

आजार, रोग. ०रोगी–वि. खुंटरोग झालेला. **खुंटला**–पु.(व.) गाडीच्या दोन बाजूंस (आंतील सामान बाहेर पडूं नये म्हणून) लाविलेले खुंट प्रत्येकी. ०सार–वि. (गो.) खुंटासारखा.

खुटकणें––क्रि. हटकला किंवा थांबविला जाणें. खुडकणें पहा.

खुटकाविणें––खुडकाविणें पहा.

खुटखुट––स्त्री. १ विशिष्ट प्रकारचा बारीक आवाज (बिळांत किंवा गवतांत कुजबुजणाऱ्या उंदरांचा, एकसारखा आणि हलकेंच थाप मारण्याचा किंवा ठोठावण्याचा, कडकड चावण्याचा किंवा तोडण्याचा). २ पोटांत होणाऱ्या बारीक वेदना; चावल्यासारखें वाटणें; गुरगुरणें; तिडीक; कळ. 'दोन घटका पोटांत खुट खुट चालली आहे.' [खुट्] **खुटखुट–टां**–क्रिवि. वरील प्रकारचा आवाज होऊन. **खुटखुटी**–स्त्री. १ (ताठयाच्या अथवा तल्ख स्वभावाच्या मनुष्याचें) उसासणें; फुगणें; जोराचा श्वास. २ हांव; कंडू; आग; सोस.

खुटखुटणें––अक्रि. १ खुट! खुट! असा शब्द होईसें वाजणें. २ किंचित् स्फुरणें, दुखणें (पोट किंवा दुखेर बोट यांत); खुदखुदणें; तडतडणें; उडणें; डकडकणें. 'खरूज खुटखुटती' =खरजेनें विकार पावलेलें अंग तडतडतें (खरूज तडतडत नाहीं). [खुट्; ध्व.]

खुटखुटीत––वि. १ सुटसुटीत; आटोपशीर; लहान आणि टुमदार; आटोपता; घट्टसर; लहानसर (घर, शरीर, काम, संसार). २ सुटसुटीत; चुरचुरीत; खरपूस; कुरकरीत; खुसखुशीत; कडक व वाळलेलें. 'हा पहाथे सुका असल्यामुळें खुटखुटीत लागतो.'

खुंटचें––सक्रि. (गो.) तोडणें, खुंटणें (नारळ, पानें इ०).

खुटण, खुटणभर––न. नांगरणीचा सामान्य पल्ला किंवा प्रमाण; बैलांच्या शक्तीचें प्रमाण. याच अर्थी अडटभर किंवा औटभर असेंहि म्हणतात. औटभर पहा. [सं. कुट्; म. खुटणें]

खुंटणाबळ––स्त्री. धान्यें, भाजी खुंटण्यासाठीं तीं तोडण्यास लावलेल्या लोकांची मजुरी. [खुंटणें]

खुंटणी––स्त्री. एक वनस्पति.

खुंटणी––स्त्री. बोटांनीं पिळवटून काढणी, तोडणी. [खुंटणें–धातुसाधितरूप]

खु(खुं)टणें––सक्रि. बोटांनीं पिळवटून अथवा नखांनीं तोडून काढणें; तोडणें; खुडणें (भाजी, द्विदल धान्याची शेंग, कणसें इ०). 'कणसें खुंटिजेति कृषीवळीं।'–मुआदि ४९.११४. [सं. कुट्]

खु(खुं)टणें––अक्रि. १ गतींत रोध होणें; गति कुंठित होणें, बंद पडणें; थांबविला, अडकविला, रोखला जाणें; स्तम्भित होणें; थांबणें; थबकणें. 'कीं क्षुधातृषादि शांति। खुंटलिया।'–ज्ञा ३.५६. २ (ल.) कुंठित, निरुत्तर, गतिहीन, थक्क होणें; दाबली जाणें; थंडावणें (उत्कंठा, आशा). ३ वारंवार हटून बसणें; दुराग्रहपूर्वक किंवा निश्चयपूर्वक खिळणीस येणें; खिळण घेणें; हट्टास पेटणें; समजुतीला दाद न देणें; अडून बसणें. ४ तुटणें. 'दोर खुटला तो पछि होऊन गेला।'–ऐपो ९७. ५ कमी येणें; कमी होणें; अपुरें पडणें. 'दोन मण गुळांत दहा शेर खुंटला.' [सं. कुट्=अडथळा करणें; तुल० का. कुंटु=लंगडणें]

खुटन––न. (माण.) नांगरताना औत फिरण्याची नेमलेली जागा; पल्ला. खुटण पहा.

खुंटयाळें––न. (गो.) खुंटाळें; अनेक खुंट्या बसविलेली एक पट्टी. [खुंटी]

खुटवळ––पु. (कु.) कवळ तोडल्यावर जमीनींत राहिलेला खुंट. [खुंट]

खुटवा––पु (नाविक) बंदरांत वरवा करण्यास आलेल्या गलबतावरील किंवा आपल्या हद्दींतील समुद्रांत नांगर टाकणाऱ्या गलबतांवरील जकात; सरकारी कर (हा दहा टनांवरील जहाजांवर असतो). [खुटणें=थांबणें]

खुंटविणें––सक्रि. अटकाविणें; अडविणें; रोखणें; थबकविणें; कुंठित करणें; गतीस विरोध करणें [खुंटणें प्रयोजक]

खुटा––पु. (व.) खुंटा.

खुंटा––पु. १ डांब; मेख; दांडकें. २ जात्याचा लांकडी दांडा (दळतांना हातांत धरावयाचा); जात्याची खीळ; खुंटी; चुलेत; वल्ह्याचा दांडा; तसल्या आणीक वस्तु. ३ (सोंगट्यांचा खेळ) दुफाशी खेळांत, उभे पडलेल्या दोन फांशांपैकी एक. –शाब्रीको. ४ मोठी खुंडी. [सं. कुट्–कुंठ्=कुंठित करणें; का. गूट=मेख] (वाप्र.) ०गाडणें–पाय रोवणें. ०बळकट–खबरदार–असणें–बलिष्ठ, भक्कम आश्रयदाता असणें. **खुंटाऱ्याखालीं घालणें**–विद्या शिकण्यासाठीं पंतोजीच्या हाताखालीं ठेवणें. (पाय) ०वर्णे–विणें–अक्रि. १ थांबविला, खिळला जाणें. २ स्वतःस बळकट बसविणें; अढळ रहाणें. ०विणें–सक्रि. १ जमिनींत घट्ट बसविलेल्या खुंटयास पायाचा तळवा बळकट बांधून आणि खुंट्याच्या शेवटावर पाचर ठोकून आंखडलेला किंवा ताठेलेला पाय सरळ करणें. २ (मंत्रानें, पिशाच्च वगैरे) बांधून टाकणें; त्यांची उपद्रवशक्ति कमी करणें. ०हलवून (किंवा हलवून खुंटा) **बळकट करणें**–एखाद्या गोष्टीचा निकाल आपले विरुद्ध झाला असतां पुन्हां तीच गोष्ट अयोग्य वेळीं किंवा अयोग्य रीतीनें काढून पूर्वीचा प्रतिकूल निकाल पक्का करून घेणें. **खुंट्याच्या जोरानें दावें ओढणें–उड्या मारणें**–आपला आधार भरभक्कम आहे अशा समजुतीनें बेपरवाईनें वागणें. म्ह० खुंटावरचा कावळा–सतरा पिंपळावरचा मुंजा या अर्थी. सामाशब्द–**खुंडाड**–न. खुंटापर्यंत तोडलेलें झाड; निरुपयोगी खुंट; सोट.

[खुंट–निंदाव्यंजक] ०ड्या–वि. विनोदानें वैष्णव लोकांस म्हणतात, कारण त्यांच्या कपाळास कस्तुरीची उभी रेष लाविलेली असते म्हणून. ०पळी–स्त्री. भक्कम व आखूड काठी. ०प्रा–पु. खुंट; ठोंब; उभा सोट. ०फळी–स्त्री. १ गुराखी मुलांचा एक खेळ. २ (तुळजापूर गांवीं) घोड्यांवरील जकात; खुंट्यामागें घ्यावयाचा कर. ' त्या स्थानीं (तुळजापूर गांवीं) यात्रा येते तीस कर यावा लागतो त्यास खुंटाफळी म्हणतात. ' –तीप्र २०७. **खुंटारा**–पु. (कों.) १ खुंट. २ पाण्याचा रहाट किंवा तेल्याचा घाणा यास बैल जुंपून त्यास फिरण्यास शिकविण्यासाठीं खुंटा पुरून जें यंत्र करितात तें; खटारा. ३ (गो.) झिजलेला, खराब व जुना खराटा, खराटयाचा बुडखा. **खुंटारो**–पु.(गो.) विस्तार नसलेला किंवा आखूड तुकडा. ०**वणी**–स्त्री. (गो) मासे धरण्याचा एक प्रकार. ०**वरो**–पु.(गो.कु.) जुनी वाढवण; झिजलेली केरसुणी. **खुंटावळी**–स्त्री.मुडा बडविण्याची भक्कम आणि आखूड काठी, दांडकें. **खुंटाळा**–स्त्री. (निंदाव्यंजक) वांझ स्त्री. **खुंटाळें**–न. खुंटयांचा संच. **खुंटाळ्या**–पु. १ न्हावी; (निंदाव्यंजक). न्हावगंड. २ खुंटाडया पहा.

खुटाण—न. (कु.) विडीचें थोटूक. [खुंट]

खुटाला—पु. सुतांची गुंतागुंत काढण्याचें एक यंत्र.[खुंट]

खुटी—स्त्री. खडखड आवाज होणारी जनावराच्या गळ्यांत बांधलेली लाकडी लोळी; घंटा. [खुंट]

खु(खुं)टी—स्त्री. १ लांकडी मेख. २ लहान लांकडी खुंट, सोट. घस; मुळका; सड. (क्रि० भरणें). ' तीन रात्र खुंटी बांध लीसे । ' –ब ५२. ३ (कों.) शिवेची खूण; खूट; क्षेत्रमर्यादा. ४ (सुतारी धंदा) दोन लांकडांचा सांधा जोडण्यासाठीं मारलेली पाचर. ५ (खान.) वखराच्या रुमणीची मूठ. ६ (छापखाना) फर्मा आवळण्यासाठीं ज्या कांड्या ठोकतात, त्या ठोकण्याचें साधन. ७ (खडी काढणें) ठसे उठविण्यासाठीं वरून दाबण्याचा लांकडी दांडा. ८ वस्त्रें वगैरे ठेवण्यासाठीं भिंतीत बसविलेला लहान खुंटा. ९ (गो.) एक दैवत. १० (कों.) इसाडाच्या ज्या टोकांत नांगरखुंट व लुमणी घालतात तेथें ती बाहेर पडूं नये म्हणून इसाडाला भोंक पाडून त्यामध्यें घालावयाचा लांकडी तुकडा, खिटी. [खुंट] (वाप्र.) ०**उपटणें**–घालवून देणें; (कामावरून अथवा अधिकारावरून) काढून टाकणें; पदच्युत करणें. ०**(आंत)ठेवणें**–**मारणें**–**राखणें**–थांबविणें, अटकविणें. ०**पिरगाळणें**–**पिळणें**–**पिळवटणें**–**मारणें**–१ प्रयत्नांत किंवा बेतांत अडथळा आणणें; एखाद्याचें बहुतेक पुरें झालेलें काम नासविणें; बेत हाणून पाडणें. २ खिजविणें; भांडण लावणें; भांडण करण्यास उत्तेजन देणें. ३ आपल्या योजनेच्या किंवा आरंभिलेल्या कार्याच्या विरुद्ध दुसऱ्या कोणी खटपट केली असतां ती सफळ होऊं नये म्हणून अगोदरच आपण सावधगिरीनें तजवीज करून ठेवणें. **खुंटीस अडकणें**–तहकूब होणें; थांबलें जाणें, राहणें; भिजत पडणें. **खुंटीस गाठोडें–गबाळें लागणें**–वादविषयक मालमत्तेचा निवाडा न होणें, ती न्यायनिविष्ट असणें; व्यवस्था लागण्याच्या तयारींत असणें; तिकडे लक्ष्य असणें; प्रवेश होणें; बोट शिरकविणें; केवळ उतारकरू असणें; पडशी खुंटीवर तयार ठेवणें; हुद्दयावर अद्यापी कायम न होणें; घटकोघटकीं बडतफीची वाट पहाणें. म्ह० (गो.) खुटीक चेपें दवरप=आपण हजर आहों, अशा अर्थाची खूण म्हणून खुंटीला चेपें (टोपी) लावून ठेवणें.

खुटुरुटु—क्रिवि.हळू हळू; मंद गतीनें; जडपणानें; रडतखडत; रेंगाळत (चालू काम, घोडयाची चाल).

खुंटे–खुटले—पुअव. बैलगाडीच्या बाजूच्या घोडक्यांना भोकें पाडून बसविलेलीं उभीं लांकडें. **खुंटेउपड, खु(खुं)टी उप(पा)टड**–स्त्री. घोडयाच्या ७२ दोषांपैकीं एक खोड. असल्या अपशकुनी घोडयाच्या मालकाला आपल्या कामांत अपयश येतें. हा दोष म्हणजे गोम (केंस) उलट फिरलेली किंवा उजव्या गुडघ्याखालील उलटा भोंवरा होय. -अश्वप १.९९. –वि. ज्या चाकराच्या पायगुणानें यजमानाचा तोटा (अधिकार जाणें इ०) होतो किंवा कांहीं वाईट होतें अशा चाकरासहि हा शब्द लावतात. २ उपरी, चार दिवस राहणारा (उतारू, वाटसरू.) ३ खुंटे उपाड असणारा (घोडा). [हिंदी] ०**खळाळ**–वि. १ खुंड्यास बांधलें असतां त्याभोंवती खळखळ करणारा, गडबड करणारा (घोडा, बैल) यावरून. २ (ल.) रानोमाळ हिंडणारा;भटकणारा; भटक्या. ०**गाड**–वि. १ डाव्या गुडघ्याखालीं भोंवरा असणारा (घोडा). हें शुभचिन्ह असुन यामुळें धन्याची चाकरी स्थिर होते. २ (व.) उपव्यापी, व्यर्थ खटपट करणारा. [हिंदी] ०**बाळी**–स्त्री. बायकांचें एक कर्णभूषण; खुंटबाळी.

खुटेकर—पु. धनगरांच्या जातींतील एक प्रकार. धनगरांत खुटेकर, हटकर, सेगर व सणगर असे चार प्रकार आहेत. –थोमारो २.

खुट्ट—न. जलद आणि बद्द आवाज; यत्किंचित् आवाज (दोन काठ्या, परस्परांवर आपटल्यानें झालेला). [ध्व.]

खुट्टी—स्त्री. शौचकूप. [हिंदी]

खुट्टार दवरप—क्रि. (गो.) परवा न करणें.

खुंट्या—स्त्रीअव. (बैलगाडी) पाचरा. काळीचीं बाहेरील टोकें व पातें वगैरे भक्कम करण्यासाठीं यांचा उपयोग होतो. [खुंटी] **खुंट्यावरचा अथवा खुंटीवरचा कावळा**–पु. १ उपरी; उतारू; वाटसरू. २ कोणीतरी, अनोळखी माणूस; कोण? कोठला? ३ (ल.) अल्प सुख किंवा दुःख; क्षणिक गोष्ट; पाण्यावरचा बुदबुदा. **खुंट्यावळ–खुंट्याळें**–न. (गो.) खुंटाळें.

खुड—उप्रा. कोंबडया, कावळे इ० ना हांकलून देतांना उच्चारावयाचा शब्द; हुर्र्‌ ! [सं. क्षुद्र; प्रा. खुद्द; ध्व.]

खुड—स्त्री. छाट; काट (कोंवळया हरभऱ्याच्या शेंडयांची); (याची भाजी करतात). [खुडणें]

खुडकणें—अक्रि. १ स्नायूंच्या संकोचानें आंखडणें; खिळल्याप्रमाणें वाटून ताठ आणि जड होणें (अवयव). २ अडकणें; थांबणें; थबकणें. 'वोढिजती मग खुडके। मृगु जैसा।' –ज्ञा १४. १४८. ३ खुटणें. ४ (व.) पळून जाणें. 'चल खुडक येथून.' [सं. खुडक=घोटयाचें हाड; प्रा. खुडक्क=उगे रहाणें, ताठणें.]

खुडका—पु. झिडकारणी; हेडसावणी; खडसावणी (क्रि० देणें). [खुड !]

खुडकाविणें—सक्रि. १ खुड असें म्हणून पक्ष्यांना हांकलून देणें, यावरून २ (ल.) झिडकारणें; जोरानें हांकलणें; धूत करणें; हेडसाळणें (तिरस्कारानें) [खुड ! खुड ! ध्व.]

खुडखुड—स्त्री. प्राणांतिक आचका, आंसडा, वळवळ. 'खुडखुड केली आणि प्राण सोडला.' [ध्व.] **खुडखुडां**–क्रिवि. विशिष्ट प्रकारचा (पोटांतील खुटखुटण्याचा, कांपण्याचा, थरथरण्याचा; दांताच्या कडकडण्याचा; मरणाऱ्या पक्ष्याच्या फडफडण्याचा; मरणाऱ्या किंवा जखमी मनुष्याच्या धडपडण्याचा इ०) आवाज होऊन (क्रि० वाजणें; करणें) **खुडखुडणें**–अक्रि. १ थंडीनें कुडकुडणें. २ (पोटांत थोडेसें) खुटखुटणें. ३ खुटखुट असा आवाज होणें. [ध्व.]

खुडखुडी—स्त्री. हीवतापाची हुडहुडी, कंप, कांटा. [ध्व.]

खुडखुडीत—वि. १ खुटखुटीत पहा. २ हलका व आटोपशीर; सुटसुटीत व लहानसर; चपळ व हलक्या अंगाचा. ३ खडखडीत; टणक आणि मजबूत (म्हातारा); कडक आणि सुकलेला; कडक व कुडकुडीत; चुरचुरीत व कुरकुरीत (पूर्वी ओली असून चांगली वाळलेली वस्तु) ४ आटोपशीर; टुमदार; (शरीर, घर, काम).

खुडगा-गी—पुस्त्री. (कों.) गाडीच्या साटीचे खुंटे प्रत्येकीं; करळी.

खुडणी—स्त्री. धान्याच्या कणसांची तोडणी, वेचणी, काटणी. [खुडणें]

खुडणें—सक्रि. बोटांनीं पिळवटून किंवा नखांनीं तोडून काढणें; तोडणें; खुटणें; (सामा.) नखांनीं तोडणें. 'जैसी वरिवरी पालखी खुडीजे।' –ज्ञा २.३०५. [सं. कुंतन; खुड्=तोडणें; म. खुंडणें; प्रा. खुट्ट]

खुडणें—खुडकणें पहा. वांकणें; खुरकटून बसणें. 'खुडित मस्तक हस्त पदां नमी।' –अकक हरिराज–मुद्गलाचार्य विरचित रामायणाचें भाषांतर ११. 'भारद्वाज चाप परदुःखानें खुडती।' –ऐपो ३११.

खुडत(तु)डणें—अक्रि. १ खुडणें अर्थ १ पहा. २ दांतांनीं कुरतडणें, तोडणें. 'तूं दांतांनीं नखें खुडतुडूं नको.'

खुडन्—स्त्री. (व.) संवगत झाल्यावर धांडयाचीं कणसें कापून घेणें. [खुडणें]

खुडबुड—स्त्री. विशिष्ट आवाजाचें अनुकरण (गवतांत किंवा गाडग्यात उंदीर वगैरेच्या खडबडीचें) [ध्व.] **खुडबुडणें**–अक्रि. खुडबुड आवाज करणें, होणें.

खुडबुडाट—पु. मोठी खुडबुड. [खुडबुडचें अधिक्य]

खुडमुळ—न. फुलाची कळी. [सं. कुड्मल]

खुडसणा—स्त्री. १ पश्चात्ताप; अनुताप; खेद; हुरहुर रुखरुख (मनास लागलेली); (क्रि० लागणें; राहणें). २ उत्कट इच्छा; हांव. 'म्या खुडसणी धरली होती ती आज फिटली.' [सं. खुड्=तोडणें]

खुडसणी—स्त्री. १ खुडणी. २ छाटणी. ३ खडसावणी, झिडकारणी. [सं. खुड=तोडणें]

खुडसणें—सक्रि १ (कों.) नखांनीं खुडणें, तोडणें. २ खडसणें; छाटणें (झाडें). ३ (ल.) खडसावणें; झडकावणें; झिडकारणें.

खुडसाविणें—सक्रि. १ खुड म्हणून पक्ष्यांना हांकलून देणें; त्यावरून. २ (ल.) धुतकारणें, झिडकारणें. [खुड् ; ध्व.]

खुडा—पु. खंदक; खड्डा. 'ऐसा अज्ञानु अनाथु बापुडा। पडिला भवखुडा।' –ज्ञ ५५.

खुडा—पु. शेंडा (रोपटयांचा). [खुडणें] **०करणें**–लहान रोपांचीं पानें खुडणें.

खुडा-डे—वि. १ स्नायूंच्या संकोचानें आजारी असलेला; ताठलेला; आंखडलेला; जडपणा आलेला (संधिवात, फार श्रम किंवा बैठक मारून बसल्यामुळें). २ (ल.) उल्लंघनीय; अल्प. 'तया संसारु हा खुडा।' –गीता २.१८६५. [सं. खुडक= घोटयाचें हाड. तुल. का. कूडरु=बसणें ?]

खुडी—स्त्री. १ पावसाळयासाठीं गलबतावर बांधलेलें छप्पर. २ गोठा (गुरांचा); खुराडें (पक्ष्यांचें); विशेषतः वासरांचा लहान गोठा, छप्पर. ३ तवेल्यांतील घोडयाचें मूत सांचविण्याचा खड्डा, मोरी, कुंडी. ४ खाण; बिजवट (उंटाची). ५ (ना.) शौचकूपांतील दगडी पायरी. [का. कूडरु=बसणें] **०पोहरी**–स्त्री. (मोंगलाई) गुरांचा गोठा; पक्षांचें खुराडें.

खुडी—स्त्री. १ (पुणें.) झाडावरून आंबे खालीं काढण्याचा लहान शेला. २ (मराठवाडा) कणसें कापीत असतांना कणसांचा घातलेला ढीग, अडी–डी. [खुडणें]

खुडी—वि. कजाग; दुष्ट; दांडगी; कुडी (स्त्री). 'तोंडाळ मोठी खुडी।' –अमृत ९७. [कुडी]

खुंडी—स्त्री. १ एका शेवटास शिवून दुमडलेली खोळ; खोपा; घोंगता; झोळी (बाजारांत विकावयाचें धान्य ठेवण्या-

साठीं). २ जोंधळ्याची एक जात; ही चाऱ्याकरितां करतात. [खुडणें]

खुडीच—वि. खुडलेली (भाजी इ०). ' खाणीवा खुडिवा तोडिवा । ... शाका वाढिती स्वानुभवा । ' –एरुव १४.१०४. [खुडणें]

खुडुकणें—अक्रि. अडकणें. [का. कूडरु=बसणें]

खुडुक—स्त्री. कोंबडी आपली अंडीं उबवते ती वेळ व तिची कृति. (क्रि० बसणें). –क्रिवि. १ आपलीं सर्व अंडीं घातल्याच्या स्थितींत (कोंबडी). २ पाय पोटाशीं घेऊन त्यांना हातांनीं मिठी मारून बसून. [सं. खुडक=घोटयाचें हाड; किंवा ध्व. या काळांतील कोंबडीचा मृदु व हलका स्वर त्यावरून; तुल० का. कूडरु= बसणें]

खुडुक—न. सर्व पानें नाहींशी झालेला झाडाचा सोट, बुंधा. [खुडणें]

खुडें—न. खुराडें; कबूतरखाना.

खुण—खूण पहा. ०**मारणें**–संकेत किंवा इशारा करणें. ' मारती खुण सरज्याच्या लोकांला । ' –ऐपो २१.

खुणखुण—स्त्री. १ किंचित् मानसिक अस्वास्थ्य; संताप; खेद; हुरहुर; खंत. २ कुणकुण; कुजबुज; कुरकुर; कुरबुर. ३ (अनिश्चित) खुमखुम. [सं. क्वण; ध्व.] **खुणखुणणें**–अक्रि. १ खुणखुण शब्द होईसें वाजणें (वाद्यें). ' खणखणती टाळ खुणखुणिती घागरिया । ' –दावि १६३. २ कोधानें नाकांत बोलणें; आंतल्या आंत चडफडणें; धुसफुसणें.

खुणस-सी, खुनशी—खुनस पहा.

खुणा—स्त्री. १ (राजा.) आठवणीचें, ओळखण्याचें चिन्ह. २ हातानें, बोटानें किंवा डोळ्यानें केलेला संकेत. ' मला इतक्यांत बन्निनाथानें खुणा केली ' –विवि ८.११.२०७. [का. खुण] ०**मुद्रा**–स्त्री. खूण; चिन्ह; मुद्रा (ठसा यास व्यापक अर्थानें).

खुणाविणें, खुणविणें—सक्रि. खुणेनें, संकेतानें दर्शविणें; आज्ञा करणें, सांगणें; मान हालवून, डोळ्याच्या इशारतीनें, दूरच्या उल्लेखानें किंवा सूचनेनें कळविणें. ' कौशिक ऐशी ऐकतां मात । खुणावित श्रीरामचंद्रा । ' –रावि ८.८७. [खूण]

खुणी—वि. खुनी. [फा. खून=रक्त]

खुतखावणी—स्त्री. धनीण; यजमानीण. ' वाढिताती नवजणी । खुतखावणी जाणोनी । ' –एरुव १४.१०१. [फा. खुद्= स्वतः+खाविंद=मालक]

खुतखुत—स्त्री. १ खदखद (उकळण्याचा आवाज). २ हुरहुर; रुखरुख; मनाची दोलणी. ३ (राजा.) उवांचा बुजबुजाट. ४ (राजा.) गर्दी; दाटी; भीड; पुंजका. (क्रि० पडणें). [ध्व.] **खुतखुतणें**–अक्रि. (चुन्याची कळी भिजतांना किंवा पाणी तापतांना) खुत, खुत, शब्द होणें; खदखदणें.

खुतखुतला—पु. (कु.) मुलांची भातकुली.

खुतखुता, खुतखुता भात—पु. ताकांत पुन्हां शिजविलेला शिळा भात. [ध्व.]

खुतणी-नी—स्त्री. अर्धरेशमी व अर्धसुती आणि वर पट्टेपट्टे असलेलें कापड. कुतनी पहा. [अर. खुतन]

खु(खुं)तणें—अक्रि. १ हट्टानें बसणें; दुराग्रहपूर्वक चिकटणें; कांकरणें; आशंकणें; गुंतणें. ओढतें घेणें. ' आतां प्रमाई खुतलें असे । ' –ऋ ८७. २ गुंतणें; ध्यान धरून बसणें. 'तेवि तुझे ठायिं नयन । खंतले त्यासि हाचि निरोधु । ' –रास ३.४५४. [सं. कुट–कुंठ्]

खुतपुत—स्त्री. १ खुरखुर; हुरहुर. (क्रि० करणें; लागणें). २ सतावणी; हट्ट; त्रास (लहान मुलांचा). (क्रि० करणें; लावणें; लागणें). [ध्व.]

खुत(द्)बा, खुत्बा—पु. १ मुसलमानांत दर शुक्रवारीं, मशिदींतील नमाजानंतर किंवा राजाच्या तक्तारोहणानंतर पांच (मुहम्मद पैगंबर व त्याचे चार उत्तराधिकारी) साधूंची आणि विद्यमान राजाचीं स्तोत्रें (प्रवचनें) म्हणतात तीं; त्याबरून. २ (ल.) गलबला; कलकल; कचकच. [अर. खुत्बाह्]

खुतला—वि. तटस्थ; कुंठित; निश्चय करून बसलेला. ' बकु जैसा खुतला । मासेयासी । ' –ज्ञा १८.६५४. [खुतणें]

खुतु-तू—न. शिरस्त्राण. 'अंगांत जिरे खुतु घालून.'–मदरु १.५२. [फा. खुद्]

खुतकन, खुदकन—क्रिवि. खुत्, अशा आवाजानें एकदम (हंसणें). [सं. क्षु=शिंकणें; खुत्=शिंकण्यासारखें अल्प हंसणें]

खुद्-द्—पु. (ल.) (बायकी) पति; नवरा. 'एकदां चेष्टेनें कां होईना, खुद्द दादाला विचारलं दिसेल.' –गाढवांचा गोंधळ (प्रफुल्लता १२.७.२४). –सना.स्वत:. –वि. १ स्वतःचा; मालकीचा; खासगी; जातीचा; आत्मीय; खासगत. २ (जोर व दुजोरा देण्यासाठीं) खास स्वतःचा. ' घर खुद माझें. ' ३ (ल.) विशेषतः राजाचा. –क्रिवि. स्वतः; जातीनें. [फा. खुद्] सामासशब्द– ०**अल(यख्ति)त्यार**–पु. स्वेच्छा. 'हें सल्लाहानें झालें किंवा खुद्दयख्तियारानें?' –रा ५.५१. [फा. खुद्द+ इख्तियारी] ०**असामी**–पु. १ स्वतःच्या नांवानें; हिंमतीनें पुढें येणारा मनुष्य. २स्वकर्तृत्व; स्वोर्जितत्व. ०**खर्च**–पु. खास राजाचा अथवा दुसऱ्या एखाद्याचा खासगी खर्च. याच्या उलट–सरंजामी खर्च किंवा डौल (लष्करी खर्च, राज्याचा खर्च, सरकारी खर्च इ०). ०**खातें**–न. (जमाखर्च) लिहिणारांचें स्वतःचें स्वतंत्र खातें. ०**खासा**–विक्रिवि. (मी, तूं, तो, इ०) स्वतः; जातीनें. [फा. खुद्+खासा] ०**खुद्द**–क्रिवि. स्वतःच; आपण होऊन. ०**गर्जे**–वि. अप्पलपोटघा; स्वार्थी. ०**गर्जी**–स्त्री. स्वार्थ; अप्पलपोटेपणा. ' खुदगर्जीवर नजर देऊन, ' –ख ७.३५७०. ०**जातीनें**–क्रिवि.

स्वतःच. **०निसबत**-वि. १ स्वतः संबंधी. २ स्वतःवर अवलंबित; स्वांकित; (खुदनिसबत याचा अर्थ आणखीहि खुद या उपसर्गाप्रमाणें करतात). **म्ह०** काम सरकारनिसबत दावा खुदनिसबत=काम सरकारचें पण त्यांतील दोष मात्र स्वतःचे. **०निसबतीचें मंत्रिमंडळ**-न. (कायदा) (आजचें) प्रिव्ही कौन्सिल. **०पसंती-दी**-स्त्री. १ स्वतःची मान्यता. २ (ल.) अहंमन्यता; गर्व. ' बाईचा प्रकार खुदपसंतीचा आहे.' -मदबा १.१८८. **०सनद्**-स्त्री. स्वतः राजाकडून किंवा मुख्य अधिकाऱ्याकडून मिळालेली सनद.

खुदकी—स्त्री. घोडयाची दुडकी चाल. यानें वर बसलेल्या माणसास आंचके बसतात. [हिं.]

खुदखुद्—स्त्री. १ (घोडयाची) रग; चमक; खुमखुमः पाणी. २ उचंबळणें; ऊत; तृष्णा; आग; हांव; सोस (स्पर्धा, महत्त्वाकांक्षा, अभिमान यांची). ३ हुरहुर; अस्वस्थता. -स्त्रीपु (येणारा-जाणारांची पुष्कळवेळ चाललेली व त्रासदायक) गड बड; गजबज; (लहान मुलांचा) हट्ट; टकळी; वेवताळणी. [ध्व. खदखद ?]

खुंदणें—न. (ना.) तुडविण्याची क्रिया. **खुंदणें**-क्रि. तुडविणें. [सं. कंदन; हिं. खुंदलना]

खुदबळणें—क्रि. (कु.) खुबळणें पहा.

खुदरत—स्त्री. शक्ति; सामर्थ्य; क्षमता (निषेधार्थी प्रयोग). [अर. कुद्रत]

खुदरती—वि. पिवळया रंगाचें कापसाचें (सूत). -देहु १५२.

खुदरापादरा—वि. १ बदफैली; कामुक; बीभत्स; घाणेरडा; अभद्र; २ निंदक; अवाच्य; शिवराळ (भाषण किंवा बोलणारा). ३ (व्यापक) वाईट; भिकार; गलतान; निरुपयोगी (जनावर, वस्तु). [पादणें द्वि.]

खुंदल(ळ)णी—स्त्री. दांडगाईची बागवणूक; हिडीसफिडीस. [खुंदलणें]

खुं(खु)दल(ळ)णें, खुदडणें—उक्रि. १ दांडगाईनें वागविणें; बुदकणें; कुदलणें; ठोकणें; मारणें; लाताबुक्क्यांनीं जबर करणें; ओढाताण करणें; कचकावून आणि बेपर्वाईनें वापरणें, वहिवांटणें (वस्तु, पशु). ' मग त्या खुंदळिलें चरणीं।' -कथा ३.१६.८५. ' त्या मुलाला मास्तरानें चांगलाच खुंदलून काढला.' २ दामटणें; पिटाळणें; शक्तीबाहेरील काम देणें; खराब करणें; चेंदामेंदा करणें. ३ कुंदलणें; चुरडणें; गुधडणें; तुडविणें; मळणें (कमविण्याचा चुना, चिखल). ४ हलविणें; हांदुळणें; हिसके देणें (खटारा गाडी, घोडा इ०). [सं. कंदन]

खुंदला(ळा)—पु. शैथिल्यावस्था; क्षीणता; शीणभाग. खुरदमा पहा. [खुंदलणें]

खुदा—पु. प्रभुः ईश्वर; अल्ला. [फा.] **खुदाई**-वि. ईश्वरी. ' खुदाई आहेवर मनुष्य विचार करील ऐसें म्हणतां नये.' -ऐदि २.९१. **०ए-तआला, खुदाताला, खुदायताला**-पु. तेजोमय ईश्वर; परमेश्वर. **०तर्सी**-स्त्री. ईश्वरास भिणें; ईश्वरभीरुता. ' खुदातर्सी फकिरी तौरानें राहतात.' -रा १.६३. [फा. खुदा+तर्स=भीरु] **०यवंद, ०वंत-द्**-पु. १ प्रभु; खावंद; मालक; धनी. २ (संबोधनार्थी) सरकार ! महाराज ! [फा. खुदावंद] **०वंत न्यामत**-वि. श्रीमंत. ' खुदावंत न्यामत रावसाहेब पंडित प्रधान.' -रा १०.१६५. [फा. खुदावंद्-इ-निआमत्]

खुदाई—स्त्री. १ खोदाई; खोदण्याची क्रिया. ' खाणीच्या खुदाईचें क्षेत्र वाढत जातें त्याप्रमाणें...दुसरा खड्डा...खणतात.' -पदाव १.९२. २ खणतीची मजुरी. [खोदणें]

खुदुखुदु—स्त्री. खदखदां हास्य. (क्रि० करणें). -क्रिवि. मौजेनें; आनंदानें; प्रेमानें (हंसणें); खुदखुद; खदखदां. (क्रि० हांसणें); [ध्व.]

खुद, खुद जातीनें—खुद पहा.

खुद्दकखुद्दक—क्रिवि. दुडक्या चालीनें; खुदुक असा शब्द होई अशा प्रकारें. [ध्व.]

खुद्रा—पु. १ (बे.) भाताची एक जात. २ माशांची एक जात.

खुनकी—स्त्री. (व.) थंडाई; गार वारा. ' वाळयाच्या ताटीनें खुनकी चालते. ' [फा. खुनुक=थंड, खुनुकी=थंडी]

खुनचा—स्त्री. (साबणाचा कारखाना) साबणाचा घट्ट रस ओतण्यासाठीं जस्ताचें, कल्या असलेलें भांडें. [फा. खवानचा, खुनचा=परात]

खुन(ऱ)स—पुस्त्री. आकस; चुरस; द्वेष; सूडबुद्धि. (क्रि० धरणें; करणें; बाळगणें). [फा. खून=रक्त] **०खोर-रा**-वि. (व.) खुनशी. ' भयंकर खुन्नसखोर माणूस. '

खुनसी-शी—वि. आकसखोर; मत्सरी; चुरसी; द्वेषी; द्वेष्टा. [सं. कुहनशील; हिं. खुनसी; फा. खून=रक्त]

खुनी—वि. १ ज्यानें खून केला आहे असा; वध करणारा. ' खुन्ये पळून गेले. ' -वाडसमा ३.८८. २ घातक; हिंसक; मारेकरी; क्रूर. ३ खुनासंबंधी (मुकद्दमा, चौकशी, साक्ष, कयास इ०) [फा. खून=हत्या; खूनी] **०आरोपी**-वि. ज्याचेवर खुनाचा आरोप आहे असा. **०मूळव्याध**-स्त्री. रक्ती मूळव्याध; हिच्या उलट मोडाची मूळव्याध.

खुनी—स्त्री. (पाणरहाट) आऱ्याला कोनाचा मारलेला गोलटा. [कुणी ?]

खुने(न्या)रा(री), खुन्या—वि. घातकी; हिंसक; खुनी. [फा. खून]

खुन्ना—वि. (क.) गिड्डा; बुटका; खुजा. [क्षुण्ण ?]

खुपकला—पु. एक सुगंधी द्रव्य. -मुंव्या १०९.

खुपणी—स्त्री. टोंचणी; चुरचुर; जाचणी. [खुपणें]

खुपणें—अक्रि. १ टोंचणें; बोंचणें; दुःख देणें; पीडा करणें (कांटा, केस, शल्य यानीं). 'यथार्थ तरी खुपणें। नाहीं कवणा।' –ज्ञा १६.१२०. २ दुखावणें; सलणें (डोळा इ०). ३ (ल.) डोळ्यांत किंवा मनांत कांटणाप्रमाणें, शल्याप्रमाणें बोंचणें, सलणें. 'अंतरीं मृदु लोणी तैसा। कोणाही सहसा खुपेना॥' –भारावाल ११.२४६. ४ अनुतप्त होणें; पश्चात्ताप होणें. ५ मनांत डांचणें; मनाला खाणें; अस्वस्थता उत्पन्न करणें. ' परि तुझा बोल होता खुपत। हृदयामाजीं।' –कथा ५.११.१६१. [सं. क्षुभ्; प्रा. खुभ किंवा खुप्प+निमग्न होणें?]

खुपरा—पु. (डोळे आले किंवा खुपरी झाली असतां त्याची) खुपणी; ठणका. (क्रि० घेणें; जाणें; होणें; फोडणें). –वि. १ ठणकणारा; खुपणारा (खुपऱ्या झालेला डोळा इ०). २ खुपऱ्या डोळ्याचा (माणूस). ३ स्वभावतः ठणकणारा; खुपणारा (डोळा). [खुपणें]

खुपरी—स्त्री. १ खुपरा (–पु.) पहा. (क्रि० भरणें; लागणें). २ डोळ्याचा एक रोग; डोळ्याची पापणी उलटून पाहिली असतां त्यावर दिसणारी बारीक, लाल, दाणेदार पुटकुळी. हा रोग चिकट व हट्टी आहे. ३ खाऱ्या जमिनीवरचा शिंपल्यांचा थर. [खुपणें]

खुपशा—वि. १ जमाखर्चांत एखादी बाब लुच्चेगिरीनें घुसडून देणारा; खुपसणारा; घुसडणारा. २ जें जें आपल्या हातार्शी येईल तें तें खिशांत टाकणारा किंवा अपहार करणारा; भुरटा चोर. ३ (ल.) बारीट घेणारा; कुभांडी. [खुपसणें]

खुपसणें—अक्रि. १ (एखाद्या पदार्थांत हात वगैरे) जोरानें घालणें; घुसडणें; कोंबलणें; भोसकणें; शिरविणें; दडपणें. २ खोचणें; प्रविष्ट करणें; हळूच शिरकविणें; आंत घालणें. [प्रा. खुप्प=बुडणें]

खुपसदशमी—स्त्री. जळतें लाकूड कणकेंत किंवा भाकरीच्या पिठांत खुपसून (मग तें निर्लेप समजून) त्याची केलेली दशमी, पोळी.

खुपसुरत—खुबसुरत पहा.

खुपिया—पु. (ना.) गुप्त पोलीस.

खुफिया—विक्रिवि. गुप्त; अंतस्थ; कुफिया. 'परंतु खुफिया मुनशीवेगास रवद पावती केली.' –दिमरा २.१५. [फा. खुफ्या=लपविलेला]

खुंब, खुंब—पुन. लोक; राष्ट्र; देश; जात; कुल. 'कानुकायदे अठरा खुंब जागे जागे चौघरे नेमून दिले.' –मदर १. १५. 'माळीखुंब, साळीखुंब;' [अर. कौम=लोक, राष्ट्र]

खुबचार—पु. डावपेंच. 'फक्त बालमपेंच खुबचार मार खई होती।' –ऐपो ११०. [फा. खूब=चांगलें; सं. चार]

खुबचें—अक्रि. (गो.) रागानें बुजणें.

खुबड—न. १ सांधा; संधि. २ (राजा. कु.) कुबड; पाठीचें पोंक. ३ (संदिग्धपणें) पाठ; कणा; पाटीचा वरचा मणका (ज्यावर ओझें घेतलें जातें तो); मानेचा कांटा. **०मोडका**–वि. मोडक्या पाठीचा किंवा अवटळलेल्या मानेचा. **०मोडणें**–अक्रि. एखाद्याची मान आसडली जाणें. पिळली जाणें, ताठर होणें, अवटळली जाणें (ओझें, संधिघात व म्हातारपण यामुळें). –सक्रि. लटपटविणें; त्रेधा उडविणें; गोंधळविणें; कुंठित करणें; घाबरगुंडी उडवणें. [खुबा]

खुबडी—स्त्री. १ खुराडें. २ पाण्यांतील गोगलगाय (किंवा एक प्रकारचा मासा, कालव) व तिची शिंप; एक प्रकारचा शंख. खुबा पहा.

खुबलणें—अक्रि. कुबलणें; चोपणें; मारणें; खुंदलणें. कुबलणें पहा. 'त्याला खूपच खुबलून काढला.'

खुब(प)सुरत—वि. अतिशय सुंदर; देखणा; उत्तम; सौंदर्यशाली; लावण्यपूर्ण; मनोहर. [फा. खूब=सुंदर+सूरत्=रूप] **खुपसुरती–सुर्ती**–स्त्री. सौंदर्य; लावण्य. 'मुखचंद्राची काय वर्णु खुपसुर्ती।' –अकूराचा पाळणा (पाळणे संग्रह) २०.

खुबळणें—अक्रि. (मांडीवर, हातावर घेऊन) इकडेतिकडे हालविणें; वर फेकणें; झेलणें (मुलास). –अक्रि. १ (मूल मांडीवर) चळवळणें; वळवळणें. २ गचके खाणें; हादुलले जाणें (गाडीमध्यें किंवा घोड्यावर). [खुबा]

खुबळें—न. खळबळ; जोराचा हट्ट; अडवणूक; निषेध.

खुबा—पु. १ शरीराचा मुख्य वर दिसणारा उंचवटा; सांधा (खांद्याचा संधि, कमरेचा खवाटा–गोफा, मनगट, गुडघा इ०, मुख्यत्वें पहिले दोन). ' वाघाच्या पाठीमागच्या खुब्यांत शिरला.' –सूर्योदय ४. २ (ल.) उंचवटा; टेंगूळ; बाहेर आलेला टोंकदार भाग. (जमीन, झाड इ० चा). ३ एक प्रकारचा पाण्यांतील प्राणी; कालव खुबडी अर्थ २ पहा. या पाणगोगलगायी किंवा मासे खातात व त्यांच्या शिंपी भाजून खाण्याचा चुना तयार करतात. ४ शिंपल्याची एक जात. ५ (गो.) कोपर. [सं. कूपकः, गुल्फ]

खुबाट—न. (राजा.) खुबा; कमर.

खुबी—स्त्री. १ नीटनेटकेपणा; चकपकपणा; छब; रम्यता; चांगलेपणा. २ वैशिष्ट्य; विशिष्ट गुण; उत्कृष्टता; ध्यानांत ठेवण्याजोगें चिन्ह (स्वभावाचें, प्राण्याचें, एखाद्या कारागिराच्या कामाचें). ३ रहस्य; तात्पर्य; मर्म; खोंच; मख्खी (एखाद्या गोष्टींतील). [फा.खूब=सुंदर] **०दार**–वि. १ सुरेख; नामी; मोहक; छनदार; उमदा; मजेदार. २ युक्तीप्रयुक्तीचें; कौशल्ययुक्त.

खुबी—स्त्री. लहान मासा; शिंप. खुबडी व खुबा अर्थ ३ पहा.

खुबुट—पु. (व.) लहान खुबा (जमीनीचा उंचवटा). ' खुबुटाची ठेंच लागली. ' [खुबा]

खुबेनाळ—स्त्री. (जनावराच्या) खांद्यामधील खवंद, क्षत. (क्रि० पडणें). [खुबा+नाळ]

खुम—स्त्री. (गो.) रीत; चाल; रिवाज; [अर. कौम]

खुमखु(खु)म-मी—स्त्री. १धमक; रग; ताठा; मस्ती (भांडणांतील शेरास सव्वाशेर मिळालेल्यांची). २ पुन्हां भांडण, मारामारी सुरू करण्याची वाट पहाणें व त्याकरितां उसळणें. ३ खाज; प्रबळ इच्छा (लढाई, भांडण, सुड, वैभव यांची). ' हातांला तुझिया जरी खुमखुमी होती तरी ते मुके। ' –केक ४२. (क्रि० मोडणें; जिरणें; येणें; सुटणें). [प्रा. खम्मखम्म]

खुमणॉ—पु. (गो.) टोमणा.

खुमणें—न. १ (गो.) तोंड; तोंडवळा; चेहरा. २ (ल.) नायकीण.

खुमाच—पु. चंग कांचन गंजीफांतील चौथा रंग किंवा उतरत्या बांजवांतील रंगांपैकी पहिला. –स्त्री. १ वस्त्रादिकांची सफाई, सूत, पोत. २ बंगला, घर इ० वस्तूंचा सुरेखपणा; नीटनेटकेपणा; छबदारी; देखणेपणा; घवघवीतपणा; तेज; सौंदर्य (रंग, रंगीत पदार्थांचा). [खुमास]

खुमारी-ई—स्त्री. १ उत्कृष्टता; नामीपणा; लज्जत; गोडी; स्वाद; चवदारपणा; रुचि; उत्तेजक किंवा संतोषदायक गुण (मुख्यत्वें खाद्य व वास यासंबंधीं); खुमाच अर्थ २ पहा. 'या आमच्या साध्या वनभोजनांत कांहीं विशेष खुमारी यावी...' –पाण्ह ४६. २ मौज; मजा; आकर्षक दृश्य; सौंदर्य. ' दाखवी किती थरकाउन गेंद खुमारी। ' –प्रला २०७. ३ खुबी; मर्म. ४ (गो.) ईर्षा. [अर. खुमार्=दारूचा कैफ, निशा. ही मन उल्हसित करते, त्यावरून मन उल्लसित करणाऱ्या पदार्थाच्या चवीस म्हणतात]

खुमाशी-सी—स्त्री. खुमाच अर्थ २ पहा. –वि. खुमास नांवाच्या गंजिफांच्या बाजूसंबंधीं. खुमाच अर्थ १ पहा.

खुमास—पु. खुमाच पहा. –स्त्री. १ खुमाच अर्थ १,२ पहा. २सुंदरपणा;चकपकपणा;गोंडसपणा;सौंदर्य;शोभा(सामान्यतः वस्तु, रूप यांचा). खुमारी पहा. [हिं. खमस=गरम] ०दार–वि. सुंदर; उत्तम; (तंबाखूचा एक प्रकार, लज्जतदार पण कडक).

खुर—पु. टांच; टाफ; शफ; कित्येक जनावरांच्या पावलावर ठणकत्वचा असते तो भाग; (सामा.) पाय; तंगडी. 'घोडे यांचा खुर चिजातां। ' –शिशु ५५७. खुर पहा. [सं.] **खुरकी**–स्त्री. (कों.) कुराच्यालची वाढ आणि टांचेजवळचा शिंगासारखा पदार्थ; गेळें (वासराच्या जन्माच्या वेळी असणारा). **खुरकतणें-खतणें, खुरकतणें-खुतणें**–अक्रि. खुरकुताचा विकार होणें (गुरांस). **खुरकूत, खुरखूत, खुरगुटी**–पु. गुरांच्या पायांस होणारा एक रोग. हा खुराच्या बेचक्यांत होतो. ०तोडी–वि. लाथाळ (गाय). ' ते खुरतोडी नुसधी। पोषी कवण। ' –ज्ञा १३.६३७. **खुरनिसात, खुरनिशी**–नमन. कुर्निसात,पहा. ' तो मलकाजमानीकडे जाऊन खुरनिसात करून अदबशीर उभा राहिला. ' –भाव २०. ०पट्टी–स्त्री. (चांभार) खुरें काढण्यासाठीं कापलेली पट्टी. ०मांडी–स्त्री. गुडघे मोडून पाय माघारे नेऊन त्यांच्या बोटांवर घातलेली मांडी. राजदरबारीं हें आसन घालून बसण्याची रीत आहे. २ खुर डिंबी (चुकीनें) पहा. ०मुंडी–स्त्री. १ निरनिराळ्या प्रसंगीं शेळ्या, बकरीं मारण्याचे वेळचे माहारांचे हक. २ पाय आणि डोकें एकत्र बांधणें; गुडघ्यांत डोकें खुपसून बसणें; डोकें व पाय एके ठिकाणीं आणून निजणें; अंगाचें गाठोडें करून निजणें (माणूस, पशु यांनीं). ' हा हातपायांची खुरमुंडी करून बसला. ' ' तापानें–हिवानें–रोगानें माझी खुरमुंडी केली–करून टाकली किंवा मी करून निजलों. ' (क्रि० वळणें); **खुरमुंडीस येणें-घालून बसणें**–(ल.) जेरीस येणें; पराजित होणें; हताश होणें. **खुरमुंडी करणें, करून टाकणें**–जेरीस आणणें. [खूर+मुंडी=डोकें] ०संधी–पु. घोडयाच्या कूर्चिकेच्या खालचा अवयव. –अश्वप १.६३.

खुर–पु. (व.) पांढरें कोड; पांढऱ्या कोडाचा चट्टा चांदी. [फा. खुर=कोड]

खुरक(कु)टणें—अक्रि खरकटणें; भात, पीठ किंवा शिजलेलें अन्न किंवा खरकटें यांनीं (भांडें, हात) लिडबिडलेला असणें; खरकटा (पहा) होणें. [खरकटा]

खुरक(कु)टणें—अक्रि. सरपटत जाणें; खुरडणें पहा.

खुरक(कु)टेल, खुरक(कु)टला—वि. १ खरकटेल पहा. २ गदळ; घाणेरडा; ओंगळ (माणूस). [खरकटा]

खुरक(ख)तणें, खुरकु(खु)तणें, खुरकुटणें—अक्रि. १ चुरा होणें; मोडणें (नीट न भाजलेली भाकरी); २ (क.) खुंटणें (झाडें वगैरे).

खुरका, खुरकणी—पुस्त्री. तिटकारा; हेडसावणी; झिडकारणी. (क्रि० देणें; बसणें).

खुरकाढा—पु. (व.) हकालपट्टी.

खुरकाधिणें—सक्रि. तिटकारणें; झिडकारणें; हसडणें. [?]

खुरखु(खु)र-रा-री—स्त्रीपुस्त्री. १ (आशेनें लागणारी) तळमळ; चुरमुर; उत्कंठा; चुटपुट; (अतिशय तोटयामुळें होणारें) दुःख; क्षोभ; आवेग. २ उतावीळ; अधीरपणा; खाज; उत्कटेच्छा;

खुमखुम; रग. १ (गो. खुरखुरी) धमक; हौस. [ध्व. खरखर] •उठणें–(माण.) घोडगाऱ्या पोटांत रोग होणें.

खुरखुरणें—अक्रि. १ (मारण्यासाठीं हात, बोलण्यासाठीं जीभ) शिवशिवणें; उत्कंठित होणें. 'दुष्ट दैत्यांचे हात पहा खुरखुरती' –(अकूर) पाळणेसंग्रह २१. २ उतावीळ किंवा अधीर होणें (आण्यास, करण्यास). [ध्व.]

खुरखुराट—पु (खुरखुरचा अतिशय) अतिशय चुटपुट; तळमळ; हुरहुर; हांव; उतावीळ.

खुरग(गु)टणें—अक्रि. १ खुजट होणें; वाढ खुरटी होणें; खुरटणें. २ खुरडत चालणें; ढुंगणावर सरपटणें. [खुरगुटी]

खुरचा—क्रीअव. खुर्दा; तुकडे. [फा. खुर्दा; सं. क्षुद्र; हिं किचें] •पाडणें–खांडणें, तुकडे तुकडे करणें. 'सांभाळ ब्राह्मणा अधिक बोललास तर खुरचा पाडीन.'

खुरचांपा-फा—पु. चांफ्याच्या झाडाचा एक प्रकार; पांढरा चांफा; ढोंपरचांफा. **खुरचांपें**—न. त्याचें फूल. चांफा पहा.

खुरची, खुर्ची, खुरशी, खुर्शी—स्त्री. १ चार पायांचें मागें पाठ असलेलें, लांकडी उंच आसन. 'थरथर किति कांपती वयस्कर उभे टाकुनी खुरशी।' –ऐपो ३०४. २ खांबाखालील उथळे, कुंभी; ठेप. ३ खुरजी पहा. ४ शाळेंतील मुलांच्या शिक्षेचा एक प्रकार; भितीस पाठ टेकून व अर्धवट उभे राहून (गुडघे, मोडून) हात गुडघ्यांवर ठेवणें. (क्रि० देणें). [अर. कुर्सी]

खुरजी, खुर्जी—स्त्री. १ (सराफाची पैशाची) थैली; कसा; हमीण. २ विशिष्ट प्रकारचा गालीचा. [अर. (अव.) खरज, (एव) खर्जत]

खुर(रें)ट—वि. १ खुजट; ठेंगणा; वाढ खुंटलेला. २ थबकट; बसकट. [सं. खुर=कापणें] **खुर(रें)टणें–खुरडणें**—अक्रि. खुजटणें; वाढ खुंटली असणें, भुईत जाणें. **खुरटपाय**–पु. गिड्डा; आंखूड पाय (धन्यास व इतरास अशुभकारक). 'ह्याचा खुरटपाय जेथें जाईल तेथें वाटोळें करील.' **खुरटया पायाचा, खुरंटपायी, खुरंटपावल्या, खुरडेपायाचा**–वि. अभागी; कपाळकरंटा.

खुरडणें—अक्रि. ढुंगणावर सरपटणें; भुईसरपट जाणें. [ध्व.]

खुरडिंबी—स्त्री. (कडक्याच्या वादप्रसंगीं) एक बैठक. शरीराचा तोल पुढें टाकून गुडघ्यांवर, नळीवर किंवा पायाच्या बोटांवर बसणें. [खुर+सं. डिंब=युद्ध]

खुरडी—स्त्री. करवंटींतून काढलेला खोबऱ्याचा तुकडा. [खुरडणें; सं. खुर=कापणें ?]

खुरत(तु)डणें—उक्रि. (नखें, दांत यांनीं) कुरतडणें; खुडणें.

खुरद-दा, खुरदेकरी, खुरदेसानक—खुर्दे, खुर्दा पहा.

खुरदमा—पु. १ (ओढाताण, ओझें, अतिशय श्रम इ० मुळें) अवयव शिथिल व्हावयाजोगी दुर्दशा; बेजारपणा. २ खुदडलेली, गुधडलेली, चुरडलेली स्थिति; खुरदा; चूर (पशु, वस्त्र, गाडी यांचा, कचकावून किंवा बेपाईनें वापरल्यामुळें झालेला) (क्रि० घालणें; करणें). [फा. खुर्दा=तुकडा]

खुर(रें)दळणें—उक्रि. १ तुडविणें; तुडवून खराब करणें. २ (ल.) चिरडणें; कुसकरणें; निष्काळजीपणानें, बेपर्वाईनें वापरणें; चोळामोळा करणें; खुंदळणें. [सं. खुर+दलन]

खुरदळा, खुर(रें)दळा—पु. १ खुरदमा पहा. २ चक्काचूर (मडक्यांचा); चुरा; भुगा (भाकरीचा). •होणें–क्रि. (माण.) जमीनीवर जोरानें पाऊल पडून माती निघणें.

खुरपण—न. १ खुरपलेलें गवत, तण. २ (व.) खुरपें पहा

खुरपणी—स्त्री. खुरप्यानें गवत काढण्याची क्रिया; निंदणी. [खुरपणें]

खुरपणें—उक्रि. १ खुरप्यानें तण, गवत; काढणें; निंदणें. २ खुरप्यानें खडबडीत जमीन साफ करणें. 'तुवां खुरपिला स्वहस्तें मळा।' –महिपतिस्तोत्रमाला, पांडुरंगस्तोत्र. ३ कोंवळ्या नारळांतील खोबरें हातांनीं खरडणें. [सं. क्षुर=खुरपें]

खुरपी—स्त्री. १ (तव्यावरील भाकरी पोळी उलथण्यांचें) उलथणें, कालथा. २ दूध, पाक इ० ढवळण्याचा मोठा कलथा. ३ एक प्रकारचें फावडें, हें खुरप्याहून थोडेसें निराळें असतें. ४ खुरपें.

खुरपें-पा—नपु. १ खुरपण्याचें हत्यार; लहान बांकदार विळा (गवत, तण काढण्याचा). २ (सामा.) शस्त्र. 'मा तर्काचें खुरपें। खांडे कोणा।' –अमृ ६.२४. 'धर्मे धेनू खुरपें। खुटलें जैसें।' –ज्ञा १६.३२९. ३ खोरें; फावडें. ४ (साबण कारखाना) साबणाचा द्रव हलविण्याचा लांकडी दांडा. ५ (चांभारी) चामडें ओढण्याचें किंवा ताणण्याचें हत्यार. [सं. क्षुरप्र; प्रा. खुरप्प] •लावणें–फार पैसा ओढणें. 'त्यानें आतांशी खुरपें लावलें आहे.'

खुरबाण, खुर्बाण—न. १ आहुति; बली; उतारा; ओवाळणी. 'जीव प्राण तूंवर खुर्बाण।' –प्रला २०४. 'खुरबाण प्राण हा तुझ्या हवाला केला.' २ अतिशय आसक्त, अनुरक्त झालेला माणूस, वस्तु. कुरबाण पहा. [अर. कुर्बान]

खुरबुराट—पु. खडबड. खुडबुडाट पहा.

खुरबेटी—स्त्री. १ एक प्रकारचा मासा, कालव. खबडी पहा. २ गोगलगाय.

खुरब्यां—न. (कु.) मुग्यांची एक जात.

खुरम-मा, खुर्मा—स्त्री. खारीक (मोठी). [फा.] •रोटी–स्त्री. खारका घातलेली पोळी; रोटीचा एक प्रकार. –बृशि २.३०.

खुर(रा)म(आलात)—पु. (राजा. दर्यावर्दी) जहाजाच्या नांगरास बांधण्याचा मोठा दोर; हा समुद्रांत सोडतात, त्यामुळें नांगर समुद्राच्या तळास जातो.

खुरखडा—पु, पक्ष्यांचें खुराडें.

खुरखत—वि. (व.) साफ; तयार. **०करणें**–(व.)मळणीचें खळें ओलें करून त्यावर बैल फिरवून त्याच्या खुरांनी जमीन घट्ट बसवणें. खळें खुरखतणें पहा.

खुरशिंग-गी–स्त्री. एक मोठें झाड.

खुरखणी(सणी)-ओवा-तीळ-हळद—खुरासनीमध्यें पहा.

खुरसानी कोहळें—न. (व.) तांबडा भोपळा. [हिं. खोरासानी+कोहळा]

खुरा-ऱ्या—पु. १ नालबंद, सोनार, घिसाडी इ० चें ठोकण्याचें साधन; एक प्रकारची ऐरण; वटांग; संध. वर्तुळाकार दागिन्यास तोंड बसविण्यास किंवा पैलू पाडण्यास जमीनींत, लांकडांत किंवा अन्यत्र उभा करण्याचा इंग्रजी 'टी' आकाराचा पोलादी तुकडा. 'लाटा खुरा ही मायाच आकारही सुवर्णाचे' –यथा १२.५१३. २ (खुरा, खुऱ्या नव्हे) जोडा, वहाण, यांची टांच; टांचेखालचा भाग. ३ टांचेखालचे तुकडे **०लावणें**–टांच लावणें. [खूर]

खुराक—पु. १ अशक्त माणसास किंवा जनावरास त्याच्या पुष्टयर्थ तूप, साखर, दूध इ० पुष्टी आणणारा आहार, खाद्य. २ रतीब; खाणें. [फा. खुराक्] **-काचा**–वि. १ लठ्ठ; मांसल; गुटगुटीत (चांगल्या खाण्यापासून). २ रोज खुराक खाण्याची संवय असलेला. **खुराकी**–वि. रतीब, आहार, यासंबंधीं. जसें–खुराकी सामान, जिन्नस. –स्त्री. १ खाण्याची नेमणूक; शेर; भत्ता (पैका किंवा अन्न). २ (क्र.) अन्नाचा प्रकार, प्रमाण.

खुराट—पु. खुंट; खराटा. 'कुवासना टोळांची पडे उडी। समूळ सशेंडी खुराट।' –एभा १०.५१८. [खुरट]

खुरांटणें—अक्रि. खुरट होणें, वाढ थांबणें. खुरंटणें पहा.

खुराड-डें—न. १ घरटें; खोंप; कबुतरखाना (यांत प्रत्येक पक्ष्यास एक एक लांकडी खण असतो). २ गोठा; लहान गोठा (वासरांसाठीं). ३ (ल.) लहान घर. 'त्यानें घराच्या मागील बाजूस गुलामांकरितां म्हणून बांधून ठेवलेल्या खुराडांत त्यांना वस्तीकरितां जागा दाखवून दिली.' –उषाप्रभमाला (माक्षी पण) तीच गत १२. ४ (बुरुडी) भाजी ठेवण्याची लहान बुरडी, करंडी. [सं. कुटीर; प्रा. कुडीर?]

खुरापत—स्त्री. कुरापत अर्थ १ पहा.

खुरास(सा)णी-नी—स्त्री. खुरासणी तीळ, कारळा, रामतीळ. हें खरीपाचें पीक हलक्या, भुसभुशीत जमीनींत होतें. तयार होण्याचा हंगाम दिवाळी. याचें तेल खातात, पेंड गुरांस व खतास उपयोगी आहे. याचें फूल पिवळें, बीं काळें व लांबट असतें. –वि. खोरासान प्रांतांतील (ओवा, तीळ. हळद इ०). [फा. खुरासानी] **०ओंवा**–पु. हा खोरासानांत पिकतो. हा चपटा, बारीक व किंचित् तिखट, असून औषधाच्या फार उपयोगी आहे. **०हळद**–स्त्री. एक प्रकारची हळद.

खुरी—स्त्री. एक लहान जंगली झाड.

खुरा—स्त्री. १ झाडावरून आंबे, फुलें काढण्याची लांब दांडीची जाळी; झेलणी. २ नखीप्रमाणें पुढें येणारा (वासरांच्या इ०). खुराचा पुढील भाग; गेळा. ३ (व.) गुराचा एक रोग; पायखुरी; हा रोग गुरांच्या खुरास जसा होतो तसा तोंडासहि होतो त्यास तोंडखुरी म्हणतात. ४ फांकेलेल्या खुराचा एकभाग. ५ पाभर; तिफण. [खूर] **०मुंडी**–स्त्री. १ (दुखण्यांतून माणूस उठल्यावर नवसाप्रीत्यर्थ) देवापुढें बकरें, मेंढी मारून व तिचे खूर आणि डोकें देवास वाहण्याची क्रिया. २ खुरमुंडी पहा. [खूर+मुंडी]

खुरीस, खुरूस—पु. (गो. कों.) (ख्रिश्चन धर्मीयांचा) क्रूस; क्रॉस. [इं. क्रॉस]

खुरुंदळणें, खुरुंदळा—खुरंदळणें, खुरंदळा पहा.

खुरूप—न. घर करून बसलेल्या कांटयानें झालेलें उवाणूं; भोंवरी; कांठा बोचण्यानें आलेली सूज. कुरूप पहा.

खुरें—न. (ना. खुरो.) पायतणाची टांच. खुरा(ऱ्या) पहा.

खुरेटी—स्त्री. (कों.) गोगलगाय. खुरबेटी पहा.

खुर्ची-शीं—खुरची पहा. 'फिरंगी व आपण मिळून खुर्शीवर शहाजादेस बसवून तमाम सरदारांनीं नजर न्याज केले.' –बा ८.४२२५. [अर. कुर्सी]

खुर्दे—वि. १ कनिष्ठ; अधिक लहान; एकाच नांवाचीं दोन गांवें असल्यास लहान गांवास म्हणतात; याच्या उलट मोठ्यास बुद्रुक म्हणतात. २ लहान; छोटा; धाकटा (वयानें), याच्या उलट वयानें मोटयास बुद्रुक म्हणतात. [फा. खुर्द; सं. क्षुद्र. पेहलवी–खोर्दे, खुर्द; 'खोर्दे अवेस्ता'=लहान अवेस्ता] **०बुजरूख**–वि. लहानथोर. 'हें सर्व खुर्दबुजरूख यांस माहीत आहे.' –बाड-कैफीयत १००.

खुर्दे(र्दा)सानक—स्त्री. १ भुक्त अन्न. २ (ल.) हातांतून गेलेलें परत न येतां येणारें इनाम, जमीन, वतन. सानक पहा. [फा. खुर्दन्=खाणें+सानक=ताट]

खुर्दळ—पु. कंदन; खुंदलाखुंदली; तुडवणी. 'रणीरण खुर्दळ मांडला।' –ऐपो ८६. [सं. खुर+दल्]

खुर्दा—पु. १ रुपाया. इ० मोठ्या नाण्याबद्दल हलकीं नाणीं, पैसे; तांब्याच्या नाण्यांची, कवडयांची मोड; परचुरण; चिल्लर.

(क्रि० करणें). २ फुटलेल्या, छिन्नभिन्न झालेल्या वस्तूचे तुकडे (मडकीं, भांडीं इ० चे). ३ (हांतुळणें, गचके बसणें यापासून झालेला) शरीराचा चेंदामेंदा. खुरदमा अर्थ १ पहा. जसें–'अंगाचा किंवा शरीराचा खुर्दा.' ४ (ल.) मोठ्या माणसांच्या जमावांतील मुलांचा समुदाय. ५ (ल.) नाश. 'सैन्याचा खुर्दा झाला.' [फा. खुर्दा; सं. क्षुद्र] **खुर्देकरी**–पु. मोड देण्याकरितां तांब्याचीं नाणीं ठेवणारा माणूस; खुर्देवाला.

खुर्निसा, खुर्निसात, खुर्नीस––स्त्री. कुर्नीस, कुर्निसात् पहा.

खुर्पी—स्त्री. (खा.) खुरपें पहा.

खुर्सदगी—स्त्री. आनंद; संतोष. 'मज़कूर दर्याफ्त जाला व खातरेस बिस्यार बिस्यार खुर्सदगी जाली.' –भाऐपयाव ४६. [फा. खुर्सन्द=संतुष्ट]

खुर्सावेल––स्त्री. (गो.) मुदशन वेल. [खुरसी+वेल]

खुल—पु. (पाणी, दूध इ० चा) चुळका. (भर याबरोबर उपयोग). 'खुलभर दूध घेतलं.' –सोमवाराची कहाणी पृ. ११. [सं. क्षुल्ल; प्रा. खुल्ल=लहान]

खुलगा—पु. (कों.) रेडा; खुलगा पहा.

खुलणें—अक्रि. उघडणें; याचे लक्षणेनें पुढील कांहीं अर्थ होतात. १ (ल.) फुलणें; उमलणें; प्रसन्न होणें (अंतःकरण, स्वभाव). 'दोन पदें ऐकतांच तो खुलला आणि गाऊं लागला.' २ उदयास येणें (दैव, नशीब). ३ स्पष्टपणा, तकतकीतपणा, सारखेपणा मिळणें, होणें; (रंग). ४ उघडणें; थांबणें (पाऊस). ५ बुद्धिगम्य, स्पष्ट, कळेसा होणें (बेत, इंगित). ६ शोभणें; साजणें; साजरें होणें. 'हें पागोटें त्या शालजोडीस खुलतें.' ७ पुढें येणें; आपल्या सर्व गुणांनीं व बुद्धीनें चमकून पडणें. 'बादाचा तडाखा चालला म्हणजे हा खुलतो.' [अर. खलास्=मोकळा प्रशस्त. हिं. खुलना]

खुलपी—स्त्री. (सोनारी) गोल घुमट व त्या मधोमध उभें शिखर राखून सोन्याच्या अगर चांदीच्या पत्र्याचें ताइताप्रमाणें तोंडाशीं बसवावयास केलेलें टोपण. [कुलप?]

खुलघर—क्रीन. लांच; लालूच. –स्त्री. १ चोरीच्या, लबाडीनें मिळविलेल्या, वस्तूंचा गुप्त सांठा. २ मालकांपैकीं किंवा भागीदारांपैकीं एखाद्यानें (स्वतःच्या खाजगी उपयोगासाठीं) सर्वसाधारण मालमत्तेचा आपणासाठीं चोरून ठेवलेला भाग (पैका, जिन्नस यांचा). ३ (कों.) घरांतील कर्त्या माणसाच्या न कळत पुरून ठेविलेलें द्रव्य; असल्या प्रकारचा गुप्त सांठा करणें. 'केली खुलघर शेवटीं मुकर देतील दगा कर्जाचे डोंगर दाविताल करून घर त्या वगा।' –पला ८५. (क्रि० करणें). [खुला] **खुलघरचा**–वि. लबाडीनें मिळविलेला. 'ठाऊकच नांदणूक म्हणती असेल खुलघरचा।' –पला २९.

खुलविणें—उक्रि. खुलणें प्रयोजक.

खुला—वि. १ मोकळा; उघडा; बंदिस्त नसलेला (माल, जागा, गट्टा). २ बोडका; अनाच्छादित (अंबारीविरहित हत्ती, खोगिराशिवाय घोडा, पलाणाखेरीज उंट). ३ रितें; खालीं; मोकळें (भांडें, घर, जागा). ४ मनमोकळा; कुढा नसलेला. ५ (ल.) अनिश्चित; अनियंत्रित; स्वतंत्र इ० लाक्षणिक अर्थ; जसें–खुली मुदत=अनिश्चित न ठरविलेली मुदत; खुली चाकरी=मनास येईल तेव्हां सोडतां येण्यासारखी चाकरी. ६ स्पष्ट; उघड; खडखडीत; साफ (भाषण). ७ (चंद्रपुरी) फोड; तुकडा; काप. ८ (व.) वालविलेली फळभाजी; उसऱ्या. [अर. खलास्=मोकळा; हिं. खुला] **०कागद**–पु. मोकळा कागद; बंद न केलेलें पत्र. **०कारभार, व्यापार, धंदा, काम**–पुन. मोकळा, उघडा उघड, प्रामाणिक, सचोटीचा, चोख कारभार किंवा व्यवहार. **०पदर**–पु. सदाचारी; निष्पाप वर्तन (विवाहित स्त्रीच्या बाबतींत). 'माझा खुला पदर आहे कोण खार लाविती?' **०व्यापार**–पु. आयात मालावर जकात न बसविणें. (इंग्रजी 'फ्री ट्रेड' या शब्दास प्रतिशब्द). **०हिशेब**–पु. स्वच्छ, विन भानगडीचा, सरळ, विन लबाडीचा हिशेब, जमाखर्च.

खुला—पु. कवडीच्या जातीची मोठी, उंच व पांढरी शिंप.

खुलाड–डें—न. खुराडें पहा.

खुलावट—स्त्री. सजावट; शोभा; सौंदर्य; उठून दिसणें. [खुलणें]

खुलाविणें—उक्रि. १ खुलविणें; प्रसन्न करणें; अनुकूल करणें; २ उमलविणें; बोलका, मोकळया मनाचा, आनंदी करणें. ३ शोभिवंत करणें. [खुलणें प्रयोजक]

खुलास—वि. १ मोकळें; प्रशस्त; बंदिस्त नसलेलें (प्रदेश, स्थळ). २ मुक्त; अनियंत्रित. ३ अकपट; मनमोकळा; निष्कपटी. [अर. खलास्=मुक्तता] **खुलाशाचा**–वि. १ मोकळा. २ (ल.) आंत बाहेर नसलेलें; मोकळें (भाषण). 'खुलाशाचें बोलणें बोलत नाहीं.'

खुलास–सा—पु. १ मनमोकळेपणा. 'खुलासा बळकट झाला.' –पया ३७५. २ शुद्धभाव. 'चित्तांतील खुलासा व अहवाल जाहीर व्हावा.' –रा ७.९२. [अर. खलास्=मोकळेपणा]

खुलासा—पु. १ अर्थ; मतलब; उद्देश; हेतूंक; आशय; धोरण; अभिप्राय (भाषण, लेख याचा). (क्रि० काढणें; निघणें). २ निवाडा; निकाल; निर्णय. ३ स्पष्टीकरण. ४ सार; निष्कर्ष, सारांश. 'त्यांत खुलासा हाच कीं अंतर्वेदींत मन्हाटे न आणावे.' –रा ६.३०८. [अर.]

खुलासा—पु. १ निश्चिन्ती. 'खुलासियानें अमल जावें.' –ख १.१६९. २ पेंचमुक्त. 'बरकदांचा सरंजाम खुलासा, यांचा

सरंजाम सुटलाच नाहीं.' –ख २.८४५. ३ मोकळेपणा; खुलेपणा. [अर. खलास्]

खुली—वि. मोकळी. खुला पहा. **०कैद**—स्त्री. १ बेड्यांशिवाय कैद. २ नजरकैद; इकडेतिकडे फिरण्यास मोकळीक असलेली कैद; डिला निग्रह. खुली मुदत, खुली चाकरी. खुला पहा.

खुलें—वि. (जरतारी धंदा) रेशमावर तार विरळ गुंडाळली असलेलें.

खुलौरी—स्त्री. रंग; शोभा; खुलावट. 'आनंदाची खुलौरी हारतली।' –भाए ९०. [खुलणें]

खुल्द मकान—वि. स्वर्गस्थ; स्वर्गास जाण्यास योग्य; कैलासवासी. औरंगजेबास हें उपपद लाविलेलें आढळतें. [फा. खुल्द्+मकान]

खुश—वि. आनंदित; संतुष्ट; तृप्त; प्रसन्न. [फा. खुश्] सामाशब्द– **०खत–खात**–न. सुरेख अक्षर; सुंदर लिपी. [फा. खुश्+खत] **०खबर**–स्त्री. चांगली, आनंदाची बातमी. [फा.] **०खरिदी**–स्त्री. आग्रह, जुलूम विरहित, आपखुशीनें खरेदी; बिनजुलमी व्यापार. **०खुर्मी**–स्त्री. आनंद; समाधान. 'ते पोहोंचून खुशखुर्मी हासल जाहली.' –रा १०.११८. [फा. खुश्+खुर्रमी] **खुशबो–बोई–खुशबोय**–स्त्री. सुगंध; सुवास; अत्तर. 'खुशबोई अत्तर लावु राजसा.' –सला ७८. [फा. खुशबो] **०मर्जी**–स्त्री. १ मान्यता; अनुकूलता; खुशी. २ चांगली वृत्ति; स्नेहभाव; आनंदीपणा. 'नबाबानीं खुशमर्जीनें आम्हांस...पत्रें पाठविलीं.' –ख ७.३४५३. –वि. १ मान्य असणारें; कबूल करणारा. २ चांगल्या वृत्तीचा. [फा. खुश्+अर. मर्जी] **०मस्करी–र्‍या**–पु. १ थट्टामस्करी करणारा; विनोदी; थट्टेबाज. २ विदूषक; राजाजवळील गमत्या. ३ तोंडपुज्या; स्तुतिपाठक. [हिं.] **०मिजाजी**–वि. (गु.) आनंदी. **०मौज**–स्त्री. क्रीडा; गंमत; खेळ; करमणूक. **०मौजा–जी**–वि. गाणें–बजावणें, हांसणें–खिदळणें, थट्टामस्करी वगैरेंत आनंद मानणारा; खयालीखुशालींत असणारा; रंगेल. [फा. खुश्+मजाह्] **०रंग**–वि. आनंदी; चैनी; विलासी. [हिं.] **०रजामंद–द**–वि. होकार देणारा; राजी; कबूल; मान्यता असणारा. [फा. खुश्+रजामंद] **०रजामंदी–दी**–स्त्री. मान्यता; कबुली; खुशी; अनुमति; खुशीची संमति. [फा.] **०वख्त–ख्ती**–स्त्री. १ उल्हासाचा काळ; आनंददायक प्रसंग; प्रसन्न मनाचा काल. 'थोरांचा खुशवख्त पाहून अर्जी द्यावी.' २ सुखावह, समाधानकारक स्थिति, अवस्था, प्रसंग. **०वख्त**–वि. १ सुखी; खुशाल; संतोषदायक स्थितीचा, काळाचा, प्रसंगाचा. २ खुशी; आनंदित. 'नबाब बहुत खुशवख्त होऊन ...' –रा ११.५९. ३ आनंददायक; सुखकर. 'शेज पुष्पाची खुषवख्त।' –सला १३. [फा. खुशवख्त]

खुशाकी—स्त्री. १ जमीन; भूभाग; (याच्या उलट जलवेष्टित प्रदेश, द्वीप, बेट). २ भूमिमार्ग (याच्या उलट जलमार्ग). ३ कोरडी जमीन (कृत्रिम रीतीनें भिजविलेली नव्हे.) ४ जमीनीवरील जकात, स्थलमार्गानें येणाऱ्या मालावरील जकात. [फा. खुश्की तुल. सं. शुष्क]

खुशाद—वि. मोकळा; सुटा. 'हात खुशाद होईल ते समयीं मागती लोक ठेवावयास उशीर काय?' –ख १.४६३. [फा. कुशाद्]

खुशामत–द—स्त्री. रुचेल असें प्रिय भाषण; स्तुति; हांजी हांजी; आजेब; थुंकीझेलणी; तोंडपुजेपणा (भाषेचा, क्रियेचा) [फा. खुश्+आमद्] **म्ह० हड्ड खुशामत ताजा रोजगार=खुशामत्याला पेशाची रोजगाराची पंचाईत नसते. सामाशब्द– ०तलबी**–स्त्री. स्तुतिप्रियता. 'पाटीलबाबांची मर्जी खुदपसंती व खुशामत तलबी बहुत' –दिमरा १.२५९. **०दोस्त**–वि. स्तुतिप्रिय. 'खुशामतदोस्त असुं नये म्हणजे आत्मस्तवावर प्रीती नसावी' –ऐस्फुले ४८. **खुशामती–दी**–वि. खुशामत करणारा; तोंडपुज्या. 'खुशामति गुलाब हा चटक चूटक्या वाजवी.' –गाणें (काशीकडील) 'हिंदुस्थानी माणूस ब्राह्मणापासोन अतिशूद्र व मुसलमान पावेतों दगाबाज, मात्रागमनी, बेइमान, खुशामदी व तत्कालच निर्दय, प्राण घेणार पोटच्या संतानापावेतों' –ऐस्फुले १०३. [फा. खुश्+आमदी]

खुशाल—वि. १ सुखी; सुखसंपन्न; संपत्ति व स्वास्थ्य असणारा; आनंदी. 'ह्या फौजा गेल्या म्हणोन इंग्रज व मोंगल फार खुशाल जाहले' –ख ९.४५२६. २ सुखरूप; निरोगी; चांगला; बरा. –क्रिवि. सुखानें; सुखेनैव; बेलाशक; सुदामत; भय, धोका, चिंता, आशंका याशिवाय. [फा. खुश्+हाल=स्थिति; सं. कुशल] **०चंद–टेकडा**–वि. निष्काळजी; चैनी; क्रीडासक्त; खेळाडू; विषयलोलुप; रिकामटेकडा; खुशमोजा; रंगेल; गुलहौशी.

खुशालणें—अक्रि. आनंदणें; सुखी होणें. 'कां न तो खुशालेल अंतरीं.' –विक ३३ [खुशाल]

खुशाली—स्त्री. १ संतोष; स्वस्थता; सुख २ निरोगी व सुखी स्थिति; क्षेम; कुशल; समाधान; आनंद, आनंदितपणा. 'त्याजवरून खुशाली केली.' –रा १.५५. ३ मौज; गंमत; क्रीडा. [खुशाल] **०ब–खुशाली**–स्त्री. विशेष आनंद; आनंदीआनंद; संतोषचसंतोष 'खुशाली–ब–खुशाली रूमदाद जाहली.' –पया ३८६.

खुशी—स्त्री. १ आनंद; संतोष; समाधान. 'त्यांत खुशीची खबर आहे.' –ख ७.३५८६. २ मर्जी; इच्छा. 'माझे खुशीस आलें तर जाईन.' –वि. १ आनंदित; संतुष्ट; तृप्त. 'तो गाणें ऐकून खुशी झाला.' २ तयार; इच्छू. [फा. खुश्] **खुशींत गाजरें खाणें**–मूर्खपणानें, क्षुल्लक वृत्तीनें आनंद प्रदर्शित करणें.

-बा सौदा-पु. गैर जबदेस्तीची, मर्जीची, इच्छेची गोष्ट, मामला; वाटल्यास करावी न वाटल्यास न करावी अशी गोष्ट.

खुश्क—वि. सुका; वाळलेला. 'खुश्क मेव्याचे खोन.' -रा १०.२९६. [फा. खुश्क; तुल. सं. शुष्क] **०साली**-स्त्री. खुश्की; अवर्षण; दुष्काळ. 'साल मज्कूरीं खुश्कसाली आहे.' -रा २२.५२.

खुश्की—स्त्री. १ जमीन. खुशकी पहा. 'खुश्कीचे तमाम सर्दारांनीं इंग्रेजास तंबी करून खुश्कीतून त्याजला खेरीज करावें.' -रा १०.१८१. २ अवर्षण; दुष्काळ. 'कपर्दिक खुश्कीमुळें आगिरीपैकीं हातीं लागत नाहीं.' -दिमरा १.८३.

खुश्नमत—वि. आनंददायक; संतोषकारक. 'खत खुश्नमत.' -पया ३८४. [फा. खुश]

खुश्नुदी—स्त्री. आनंद. 'मुफावीजा मकूम केला तो पोंहचून खुश्नुदी हासल जाली.' -रा १०.१२९. [फा. खुश्नूदी]

खुश्नुमा—वि. दिसण्यांत चांगलें; उचित. 'अरुवारनवीस तेथें जाणें जाहिराण्यांत खुश्नुमा दिसत नाहीं.' -रा ५.१०४. [फा.]

खुश्बो-बोई, खुश्बई, खुश्मर्जी, खुश्मस्करी-र्या, खुश्वक्त—खुश पहा.

खुश्बो(श्व)दार—वि. सुगंधी. खुशबो पहा. 'चिकणी सुपारी नुसती व खुश्बोईदार करून ठेवीत जावी.' -पया २८१. [फा. खुश्-बो-दार]

खुष, खुषकी, खुष-खत-बोई-मर्जी-रजावंती-वक्त, खुषामद, खुषी, खुष्की—हे शब्द खुशमध्यें पहा.

खुषी(षि)रंग—पु. संतोष; आनंद; खुशरंग पहा. 'जिवा होईल खुषिरंग.' -ऐपो १३१.

खुस, खुसकी, खुसखत—खुश पहा.

खुस-कन-कर-दिर्शी—क्रिवि. खुदकन पहा. हळूच; आनंदानें; रंगेलपणें; मन मोकळेपणानें; गालांतल्या गालांत (हंसून). [ध्व.]

खुसखुरणें—उक्रि. हातानें कुसकरणें; चुरडणें. कुसकरणें पहा.

खुसखुसणें—अक्रि. आवाज होणें; खसखसणें; खजबजणें. [ध्व.]

खुसखुशी(सी)त—वि. मऊ व कोरडा; चुरचुरीत; कुडकुडीत; खमंग; खरपूस भाजलेला. [ध्व.]

खुसप(पु)ट—न. १ गुप्त दोष; व्यंग; न्यून; चीड येण्याजोगें किंवा अप्रतिष्ठा ह्यावयाजोगें वर्म, चुकी; गुंजावीस; बारीकसारीक दोष. (क्रि०. काढणें). २ (अव.) अल्प, क्षुद्र, संदिग्ध टीका, शेरा, भाषण; गोडीगुलाबीनें व निकाल लागेल अशा रीतीनें जास्त महत्त्वाची गोष्ट पुढें मांडण्यासाठीं बोलणें (विनंति, खरडपट्टी); हातीं चेतलेल्या कामापासून परावृत्त करण्यासाठीं काढलेल्या अडचणी; आक्षेप. ३ भांडणास कारण किंवा निमित्त; कळ; कुरापत; खोडी. (क्रि० काढणें; निघणें). **०रखणें-मांडणें**-(भांडण उकरून काढण्यासाठीं) एखाद्याचे न कळत झालेले अपराध, चुक्या, व्यंग ओळीनें पुढें मांडणें, ठेवणें. [कसपट, कुसपट; सं. कुशपत्र?]

खुसपट्या—वि. खुसपटें काढणारा; छिद्रान्वेषी; लोकांचे फक्त दोष काढणारा; दोषदर्शी. [खुसपट]

खुसपणें—उक्रि. खुपसणें पहा. (खुपस वर्णव्यत्यास).

खुसबुसणें—खुसखुसणें पहा. 'अगबाई! इथं खुसबुसलं काय बरं?' -चंद्रप्र २१. [ध्व.]

खुसूप—न. दृश्य; प्रसंग. 'ऐसीं खुसुपें देखोनि.' -गीता २.२३२२.

खुसूस—अ. विशेषतः. -रा ५.५२. [फा.]

खुस्तार—क्रिवि. (गो.) खर्चानें. 'फुल् खुस्तार खॉजनॅ' =फुल्ल्या खर्चानें मजा करणें. [पोतु. इं. कॉस्ट]

खुळ—न. वेड, खूळ पहा. **०कट-गट**-वि. वेडा; बावळा; मूर्ख; वेडपट; वेडसर. [खूळ] **०चोंट-झेपा**-वि. (ग्राम्य) जडबुद्धीचा; वेडसंबा; ठोणपा; मंदधी. **०चट-पट-पट्या**-वि. १ खुळा; वेडा. २ वांकडया हातापायांचा; अपंग. ३ खुरट; वांकडा; खुजट (अवयव). **०सट-सर**-वि. बावळट; मूर्ख; वेडसर.

खुळ-कन-कर-दिन-दिर्शी—क्रिवि. खुळखुळ असा आवाज होऊन. खुळखुळ पहा. [ध्व.]

खुळपट-ट्या—खुसपट-ट्या पहा.

खुळखुळ-ळां—क्रिवि. खुळ! खुळ! अशा आवाजानें (पायांतील घागऱ्यांचा, ओढण्याच्या झुळझुळ वाहणाऱ्या पाण्याचा, वाळलेल्या नारळाचा, चूळ खळखळण्याचा इ०). खुळ! खुळ! असा आवाज काढीत. 'झोटिंग वायोस्वरूप असती। सर्वेच खुळखुळां चालती।' -दा १०.४.२५. [ध्व.] **खुळखुळणें**-क्रि. १ खुळखुळ आवाज करणें, होणें, वाजणें. २ चूळ भरून टाकणें.

खुळखुळा, खुळखुळणें—पुन. १ आंत खडे असल्यामुळें खुळ! खुळ! वाजणारें, मुलांचें एक खेळणें. 'दांतांचा खुळखुळा झाला =दांत हलूं लागले. २ घोड्यास रंगणावर धरतांना वाजविण्याचें एक साधन. ३ तागाच्या झाडाप्रमाणें पुरुषभर उंचीचें, तागाप्रमाणें फळें असणारें एक झाड; हीं फळें वाळल्यावर खुळखुळ! वाजतात. घाटसर्प असें यास दुसरें नांव आहे. -वगु २.७४. **खुळखुळा**-वि. खुळ! खुळ! आवाज करणारें (काठी, शेटा, भोगराळें इ०). **०शिंगळा**-पु. एक झाड; याचीं फुलें जर्द पिंवळीं

असून याच्या शेंगेचा आवाज खुळ ! खुळ ! असा होतो. **खुळ-खुळाविणें**-सक्रि. १ खुळ ! खुळ ! शब्द करणें. २ तोंड घुणें; चूळ भरणें. **खुळखुळी काठी**-स्त्री. खुळ ! खुळ ! शब्द करणाऱ्या क्षिलमिळ्या लाविलेली काठी. [ध्व.]

खुळखुळें—न. (कु.) निखळीनंतर जन्मलेलें मूल.

खुळगा, खुळगट—पुन. (कों.) रेडा; हेला; महिष. ' यमें कवळीला खळ खुळगासा उठिला । ' –वामन (कंसवध) २.२.

खुळबुळ—स्त्री. खुळखुळण्याची क्रिया. (क्रि० करणें). **खुळबुळ-लां**-क्रिवि. खुळ ! खुळ ! असा आवाज करीत **खुळबुळणें, खुळबुळाविणें**-उक्रि. तोंडांत पाण्याची चूळ खळखळ वाजविणें; गुळणा करणें; खुळाविणें. [ध्व.]

खुळा—पु. रेडा. खुळगा पहा.

खुळा—वि. १ वेडा; बावळा; मूर्ख; बावचळलेला; खुळचट. २ थोटा; अपंग; वांकडया हातापायाचा. ' एऱ्हवीं असतां हातीं खुळा.'–ज्ञा १३.४५६. [सं.क्षुल्ल, खुल्ल; तुल० का. ते. कूळ= वेडा] सामाशब्द- **०ऊंस, रानऊस**-पु. औषधी उंसासारखें झाड; औषधी ऊंस. **०चा पाऊस**-पु. १ खुशामतीमुळें फुरारून गेलेल्यानें केलेली भरमसाट उधळपट्टी, बेसुमार औदार्य. २ कामाची बेपर्वाई; भरमसाट कारभार. **०पैसा**-पु. राजापूरप्रांतीं चालणारें एक जुनें तांब्याचें नाणें; एका रुपयास हे सातशें मिळत. **०मधुरा**-पु. १ विषमज्वर; वेडा मधुरा. यांत माणूस वेडयासारखी बडबड करतो. २ (ल.) वेडा माणूस. **०वेडा**-वि. खुळा आणि वेडा; विक्षिप्त व वायचळलेला; ठोंब्या. ' खुळें वेडें पोटचें, चिंबपोल शेतचें. ' **खुळॉय**-स्त्री. (गो.) वेड लावणारी गोष्ट; गम्मत इ० **खुळाघणें**-अक्रि. वेडे होणें; मूर्ख बनणें, वेड लागणें. [खुळा] **खुळी**-स्त्री. (गो.) पायाची टांच. **खुळें**-वि. १ वेडें; मूर्ख. २ थोटें; अपंग. ' न धरे तैसे स्नेह खुळें । सर्वत्र होय । ' –ज्ञा १८.९५७. ३ शक्तिहीन; दुर्बळ. **खुळेश्वर**-वि. विलक्षण मूर्ख; मूर्खांचा राजा. [खुळा+ईश्वर]

खुळ्या—पु. (कों.) रेडा; हेला; खुळगा पहा.

खूजा—पु. (तंजा.) फिरकीचा तांब्या. [खुजा]

खूट—स्त्री. १ उणीव; तूट; न्यूनता; वजनांतील कमीपणा. २ खुंट; उंसाच्या चरकाच्या बुडाच्या (मळसूत्री खांबाचे) भागाचा जादा तुकडा. [खुटणें]

खूट, खूंट—पु. १ (कों.) नांगराचें खोड; कोळसा; फाळ भरण्याचें लांकूड. २ अंगरख्याच्या बाहीखालील चुण्या करून त्यावर पट्टीसारखी शिवण केलेली अडते ती. खुंट पहा. ३ (कु.) वेलीचा आधार, खांब. इतर सर्व अर्थी खुंट पहा. **०आगुळ**-स्त्री. (व.) मधली आगुळ. **०गय**-स्त्री. (व.) वर खुंट देऊन बसविलेली गय.

खूड—स्त्री. हरभऱ्याच्या झाडाचे तोडलेले कोंवळे शेंडे. **खूड करणें**-हरभऱ्याचे शेंडे खुडणें. ' हरभऱ्याचे झाड कोंवळें असतें तेव्हां त्याची खूड करतात. ' –कृषि ३१३ [खुडणें]

खूण—स्त्री. १ चिन्ह, ज्यानें एखादी गोष्ट जाणली जाते किंवा समजली जाते तें लक्षण; टिपका; निशाणी; व्यंजन; संकेत-चिन्ह. ' हळूच खुणें सांगतसे । ' –नव १२.१८८. २ (विशेषतः) क्षेत्रसीमाचिन्ह; शींव. ३ संकेत; इशारा (डोकें हालविणें, हातवारे, नेत्रसंकेत इ० क्रियेनें दिलेला). सूचना; सांकेतिक सूचना; उल्लेख; पर्यायोक्ति. (गुप्तरूपानें आपला अभिप्राय दुसऱ्यास समजावा म्हणून केलेला) ४ वर्म; मर्म; लक्षण. ' या खुणा तूं कहीं। चुकों नको। ' –ज्ञा ९.१३४. [सं. क्षुण्ण; का. खुन] (वाप्र.) **०धरणें**-ध्यानांत ठेवणें. **०पाळणें**-आज्ञा पाळणें; मनोगताप्रमाणें वागणें. ' नव्हे तयाची खूण पाळिळी. ' –ज्ञा १८.९१४. **म्ह०** दादाची खूण वहिनी जाणें=एखाद्याचें मर्म त्याच्या जवळच्या माणसास ठाऊक असणें. सामाशब्द- **०खाण**-स्त्री. खुणा, संकेत, मनोगत, सूचना, चिन्हें यांस व्यापक शब्द. खूण पहा. **०गांठ**-स्त्री. १ (एखाद्या गोष्टीची) आठवण होण्यासाठीं किंवा ती सोडून देण्यासाठीं वस्त्रास किंवा त्याच्या पदरास मारिलेली गांठ. २ (ल.) खात्री. **म्ह०** विश्वास कीं खूणगांठ. **०मुद्रा**-स्त्री. इशारा, चिन्ह, निशाणी, मुद्रा, ठसा, अंक इ० मोघम शब्दाबद्दल आणि व्यापक अर्थानें योजतात. एखादी खूण किंवा सर्व खुणा. खूण पहा.

खूण-न—स्त्री. (कु.) मासे पकडण्याचा बांबूच्या बिळांचा सांपळा; हा मृदंगाच्या आकाराचा असतो. खोइन पहा.

खूद—पु. भेंडाऱ्यांचें ताडी ठेवण्याचें अरुंद गळयाचें मडकें.

खूद—क्रिवि. खुद्द; स्वतः; खासगत इ० खुद्द पहा.

खून-ण—पु. १ मनुष्यवध; हत्या; घात; मनुष्यास ठार मारणें. २ रक्त, रक्तपात; (या मूळ अर्थानेंहि योजतात). ३ (कायदा) खात्रीनें मरण येईल असें कृत्य करून ठार मारणें. [फा. खून=रक्त; प्राणनाश] **०चढणें**-१ मनुष्यवधामुळें उन्माद चढणें; वेड लागणें. हा उन्माद खुनी इसमास सुड घेणाऱ्या देवतांनीं पुढाऱ्या प्रतिकारार्थ पाठविला असतो अशी समजूत आहे. **०खराबा**-पु. कत्तल, नासधूस; लूट व धूळधाण किंवा जाळपोळ इ०. **०माफ-फी**-पुस्त्री. खुनाच्या शिक्षेपासून मुक्तता. **खूनमाफ**-वि. खुनाच्या शिक्षेपासून मुक्त. **०माऱ्या**-वि. (गो.) खुनशी.

खूप—स्त्रीपु. १ खपरी अर्थ १,२ पहा. ठणका; वेदना. (क्रि० भरणें). ' माझ्या डोळ्यांस खूप लागली आहे.' २ खपरी रोग. (क्रि० होणें). [खपणें]

खूप-ब—वि. फार; पुष्कळ; अतिशय. 'त्यानें खूप लाडू खाल्ले.' –क्रिवि. चांगल्या रीतीनें; नामी रीतीनें; सुरेख प्रकारें; धवधवीतपणें; विपुलपणें; उमदेपणानें. 'ती खूप बनली आहे.' 'त्याला खूब मारलें.' –उद्गा. भले! वाहवा! [फा. खूब] **०तराशी**–क्रिवि. उत्कृष्ट रीतीनें; डौलानें; शोभा येईल असें; श्रीमंती थाटानें; उत्तम तऱ्हेनें. [फा.] **०बजा**–क्रिवि. उत्तम रीतीनें. 'मुसा बुसी यास खूबबजा ताकीद करून रवाना करावें.' –रा १.५१.

खूब—वि. सर्व रंग एकाच प्रकारचा असून एका कानाचा रंग निराळा असलेला (घोडा). –अश्व १.३२.

खूम—पु. लोक; राष्ट्र; जात; कुल; समाज. 'तरी कसबे मजकुरीं कुलखूम असतील त्याजवर पट्टी करून रुपये देवविं' –वाडबाबा २.२१. २ गांवांतील प्रतिष्ठित माणूस, प्रामणी. [र. कौम] **०दार**–वि. प्रतिष्ठित मनुष्य. [फा. कौमदार=कुटुंब + वा जात असणारा] **०धार**–वि. जातवार; लोकवार (कर, पट्ट).

खूम—स्त्री. (गो.) विधि; पद्धत; चाल. 'देवळांत गेल्यावर देवाची भेट घेतली पाहिजे अशी खूम होऊन पडली आहे.' खुम पहा.

खूर—पु. क्षुर पहा. १ टाप; शफ; पंचनख पशूंचून इतर पशूंचें जें पाऊल तें. २ शफाचे दोन भाग. ३ पलंगाचा, खाटेचा, खुर्चीचा पाय. ४ चुलीच्या वरील मातीचे गोळे प्रत्येकीं; तुळशीवृंदावनावरील चार उंचवट कोपरे प्रत्येकीं. ५ खुरकी, खुरमध्यें पहा. ६ गाय, म्हैस यांचा सड. **म्ह०** जेथें गाय व्याली तेथेंच खूर खोदे=संकटाला तेथल्या तेथें तोंड द्यावें. **एक खुराचा**–वि. संबंध कि – न फुटलेल्या खुराचा; एकगेळी (घोडा वगैरे). **दोन खुराचा**–१५ फुटलेल्या खुराचा; गेळें असलेला (बैल वगैरे). **०मुंडी**–खुरमध्यें पहा. **०पक्का**–पु. जनावरांचा एक रोग. –शे ६.१०८.

खूल—स्त्री. धूळ. 'म५–चाची खूल धरी।' –भाए ६०२.

खूश—वि. आनंदित; संतुष्ट; मस. खुश पहा. 'आपण खूश दिलीष असावें.' –दिमरा १.२१०. [फा. खुश्]

खूळ—न. १ वेड; अभिष्टपणा; चळ; छंद; वेडी समजूत. (क्रि० लागणें). २ (बंडखोर, लुटारू, दरोडेखोर इ० ची) टोळी; जमाव. ३ गोंधळ व दंगल, जाळपोळ व लुटालूट (बंडखोर किंवा लुटारूंची धाड यामधील); दंगल; भांडण; उपद्रव; त्रास. (क्रि० मातणें; माजणें; उभें राहणें; उठणें; मांडणें; घालणें; लावणें; उठवणें). 'हिंदुस्थानांत एक नजीबखान मात्र, खूळ राहिलें आहे.' –भाब ४७. ४ अडथळा; आडकाठी; उपाधि; पीडा (माणसें, वस्तु, प्रसंग यांच्यासंबंधीं अनियंत्रितपणें योजतात). (क्रि० पाडणें; पडणें). ५ (सामा.) बंड. 'किल्ला दिल्यानें खूळ करतील.' –रा १२.१६८. ६ गुरांचा एक रोग. –नाको. [का. कूळ=वेडा] **०पिकणें**–(बंड, खूळ, दगा) वाढत जाणें. **०लागणें**–१ वेड लागणें. २ (ल.) नाद, व्यसन लागणें.

खे॥—(सांकेतिक) १ खरेदी. २ खेरीज.

खेओ—क्षणीं; वेळीं. खेवो पहा. 'मातें देखत खेओ पळती कैसी।' –शिशु ८८९. [सं. क्षण, सप्तमी]

खेंक—स्त्री. (कों.) खोकला; ढांस. (क्रि० लागणें). [खोकणें]

खेंकचें—अक्रि (गो.) ओशाळणें.

खेंकटें—न. १ उलाढाल; वेत; मसलत; युक्ति; उपाय; उपजीविकेसाठीं अंगिकारलेले पंचाइतींचें काम किंवा लचांड. 'संसार चालविण्यासाठीं हजार खेंकटीं करावीं लागतात.' २ अडचण; अड; नड; लचांड; कचाट; कुलंगडें; उपाधि; व्याधि; पीडा (कुटुंब, कारखाना, मनुष्य यांची). ३ तुफान; बालेट. ४ गोंधळ; गुंतागुंत; घोटाळा (कामाचा). (क्रि० करणें; होणें; उलगडणें; निस्तारणें). 'त्वां माझ्या कामाचें खेंकटें केलें परंतु त्यानें माझ्या कामाचें खेंकटें उलगडलें किंवा निस्तारिलें.' ५ रोगाची साथ; पीडा; उपसर्ग. 'खोकल्याचें–पडशाचें–तापाचें–खेंकटें' [सं. संकट–षंकट–खंकट–खेंकटें?] **०खोर–खेंकटथा**–वि. हिकमती; उलाढाल्या; (पोटासाठीं) खेंकटीं करणारा. **खेंकटथास मेंकटें**–शेरास सव्वा शेर.

खे(खें)कड–डा, खेंकडें—नपु. एक प्राणी; किरवें; चिमेरा; चिमोरें; चिमोरी; कर्के–ट. हा दशपादवर्गांतील प्राणी आहे. [सं. कर्कटक]

खें(खे)कड–डा—वि. १ वयस्क; जख्ख; खोकड; जीर्ण. २ तुसडा; खाष्ट; हिरवट. [खेंकणें, खेकडा] **०चाल्या**–वि. खेंकड्याप्रमाणें चालणारा; तिरप्या चालीचा. **०मेकडा**–वि. १ अव्यवस्थित; वेडावांकडा; गदळ; ओंगळ; नेभळा. २ कुरूप; बेडौल; वाईट. (मनुष्य, वस्तु) [खेकडा द्वि.]

खेंकडी—स्त्री. १ खेंकड्याची मादी. २ कोल्ह्याची एक लहान जात.

खेंकणें—अक्रि. १ दांत खाऊन कचकचणें; वेडावणें (रागावलेल्या माकडानें) २ फुरें करणें (घोडयानें). ३ (ल.) रागानें, चिरडीनें वस्सकन अंगावर जाणें, बोलणें; कातावणें, चिडणें. ४ खोकणें. [ध्व. खें]

खेंकर—स्त्री. (वायदेशी) रोगाची सांथ.

खेंकसणें, खेंकावणें—अक्रि. रागावणें; चिडणें; अंगावर येणें. खेंकणें अर्थ ३ पहा. [ध्व. तुल० का. केकस=रागीट भाषा; सं. कर्कश]

खेंकाटणें—अक्रि. १ खेंकणें अर्थ १ पहा. २ खें! खें! करणें; रडणें; कोंकाटणें. (मूल) [ध्व.] **खेंकाटथा**–वि. खेंकटणारा.

खेंका धावणें—अक्रि. (व.) खेकणें अर्थ ३ पहा. धाक, भीति दाखविणें.

खेंका(खा)ळणें—अक्रि. १ हिंसणें; खंकाळणें; खिंकाळणें पहा. २ (निंदेनें) फिदीफिदी हंसणें; खिदखिदणें (मोठ्यानें हंसणें). ३ आनंदानें खें खें करणें, हंसणें. (मूल). [ध्व.]

खेंखे—स्त्री. १ वरकन अंगावर येणें. खेकणें अर्थ ३ पहा. २ आनंदानें शब्द करणें (लहान मूल). –क्रिवि. रागानें वरकन अंगावर जाऊन; खिंकाळत; फिदिफिदि हंसत. (क्रि० करणें, हांसणें). [ध्व.]

खेंगट—न. बोंबील, कोळंबी, झिंगे इ० माशांची केलेली एकत्र रास. **०खाऊ**–वि. मासेखाऊ (विशिष्ट जातीची निंदा करावयाची असल्यास योजितात; उलट निंदित जाती निंदा करणाऱ्या मांसाहारी जातीस हाडखाऊ असें उलट म्हणतात)

खेंगटें, खेंगटेखोर—खेंकटें-खोर पहा.

खेंगाळा—पु. एक तांबड्या जातीचा मासा.

खेंचकट—न. (कु.) गर्दी; घणाई; गचडी. [खिंच]

खेंचणी—स्त्री. १ घट्ट ओढणी. (क्रि० करणें; देणें) जोराची, दांडगाईची ओढ. (क्रि० देणें, करणें). २ (जरतार) परडी फिरविण्याचा ६ इंच लांबीचा लांकडी दांडा. [खेंचणें]

खेंचणें—उक्रि. ओढणें; जोरानें ओढणें, ओढून नेणें; फार ताणणें, आंवळणें, बांधणें. **खेंचून धरणें**–१ ओढून धरणें; हट्टास पेटून किंवा दुराग्रहपूर्वक अडविणें. २ मार्गातून एकीकडे सरावयास किंवा जागा द्यावयास लावणें. –अक्रि. खेंचणें. [सं. कृष्. हिं. खींचना]

खेंचर—न. १ (आकाशांत फिरणारे) पक्षी; ग्रह; नक्षत्रें. २ योगी. ३ समंध; भूत. ' जैसा जनामाजि खेचरु । असतुचि जना नोहे गोचरु ।' –ज्ञा ५.९९. [सं. ख=आकाश+चर=फिरणें]

खेंचर—न. गाढवी व घोडा यांची मिश्र संतति; अश्वतर. –मोआदि ७ [सं. खरज; हिं. खच्चर]

खेचरी(मुद्रा)—स्त्री. हटयोगांतील एक मुद्रा; गुरूपदिष्ट पद्धतीनें दृष्टि भ्रूमध्यावर नेहटून इडा, पिंगला व सुषुम्ना या तीन नाड्यांचा मार्ग जें कपाळाच्या आंतील छिद्र, त्यांत जिभेचें टोंक वळवून राखण्याची क्रिया. ही मुद्रा सर्व मुद्रांत श्रेष्ठ आहे. ' जेवी खेचरीयोगिया ।' –एरुस्व ९.३२. ' तेरा दिवसीं खेचरी सिद्धि साधून ।' –स्वादि ९.५.२१. [सं.]

खेंचाखेंच—स्त्री. कचकावून किंवा दांडगाईची ओढाताण, रेटारेट. [खेंचणें]

खेंडकणी, खेंचणी—स्त्री. (गो,) हिणविणें. [खिजविणें]

खेट—स्त्री. १ पाचर; खुंटी (गच्च बसविण्यासाठीं). २ दाटी; अभाव. ३ जमण्याची नियमित जागा किंवा अड्डा, वेळ. ' फुलबागेची थेट खेट केली । ' –पला ४.२२. (क्रि० पाळणें; संभाळणें; ठरणें; ठरवणें). ४ भेट. ' तो घडवील तेव्हां जगजेठी । तेव्हांच खेटी होतील । –अफला ५.६. खेट. अर्थ १।२ पहा.

खेट—न. खेडेगांव; खेडें. **०खर्वेट**–न. बाजार भरणारें खेडेंगांव. ' खेट खर्वट ग्रामीं पुरीं ।' –एभा २३.४९७. [सं. खेट]

खेटक—न. ढाल. ' खेटकाआड असुर दडती ।' –रावि २५.१४९. ' आले गर्जत खड्ग खेटक गदापाणी दणाणी धरा ।' आमा ३९. [सं. खेट; का. खेड=ढाल]

खेटण—स्त्री. दाटी; गर्दी. [खेटणें]

खेटणी—स्त्री. १ (विणकाम) कापड विणतांना बाण्याचीं सुतें खेटून बसविण्याची क्रिया; ठांसणी त्यावरून. २ वीण; पोत. ३ ओलांडणी. (-क्रि.) पहा. [खेटणें]

खेटणें—सक्रि. १ ओलांडणें; उल्लंघणें; मजल मारणें (जागा). ' खेटितां कुंप कांटी खुंट दरडी न पाहे.' –तुगा ३४९. ' आम्ही चार मुलुख खेटले । '–पला ८८. ' म्यां पांच कोस मजल खेटली.' २ रस्त्यांतून एकीकडे सारणें; बाजूला ढकलणें; जागा द्यावयास लावणें. –अक्रि. १ भिडणें; शिवणें. २ (खा.) अगदीं जवळ जाऊन बसणें; चिकटणें. ३ जातांना घसटा देऊन जाणें; झगटणें. ४ एके ठिकाणीं दाटी, गर्दी करणें; जवळजवळ, चिकटून बसणें. ५ जवळ येऊन ठेपणें, पोहोंचणें, भिडणें. [का. केट्=फार, अतिशय]

खेटनी—स्त्री. (व.) तगादा; द्वमणें. ' सरी करण्याची खेटनी मागें लागली.' [खेटणें]

खे(खें)टर—न. १ जोडा; वहाणा; पादत्राण; पायपोस (निंदाव्यजक). २ पाय; लाथ. ३ (ल.) अत्यंत क्षुद्र वस्तु; तिरस्करणीय पदार्थ. **म्ह० १ चांभाराच्या देवास खेटराची पूजा; २ आपल्या खेटरावर माया, ती दुसऱ्याच्या पोरावर नाहीं. ३ वडिलांचीं खेटरें घेऊन पळणारा=अवज्ञा करणारा, कोडगा मुलगा. ४ खेटर तुटो अथवा जळो=काडीइतकी पर्वा नसणें या अर्थी.** सामाशब्द– **०खाऊ**–वि. (निंदार्थी). सवैदां खेटरानें बडविला जाणारा; कोडगा; निर्लज्ज. **०मार**–पु. जोड्याचा मार. **खेटरा-खेटरी**–स्त्री. जोडाजोडी; जुतेपैजार-री.

खेटघणें—सक्रि. १ दाटी करणें. २ भिडविणें. [खेटणें प्रयोजक]

खेटा—पु. १ क्षेत्र किंवा देवस्थान यास जाण्याची नियमित खेप; वारी; फेरा. (क्रि० करणें; घालणें). यावरून (खेटे. अव. योजून) एकसारख्या येरझारा, खेपा; किंवा निष्फळ येजा. (क्रि० घालणें; करणें). २ (राजा.) गर्दी; चेप; दाटी; खेंचाखेंच. ' शरीरीं नाडींचा खेटा ।' –दा १३.९.११. ' गजबज अति खेटा ठायीं ठायीं पताका । ' –माधवकृत रामायण बालकांड ३८ (महाराष्ट्रकवि). **०खेट**–स्त्री. १ दाटी; गर्दी. २ अंगाशीं

अंग लागण्याजोगा परस्परांचा संबंध; ढकलाढकली; धक्काबुक्की. **खेटो**-पु. (गो.) येरझारा; अडथळा. 'प्रत्येक कामांत खेटो हा येतो.' **खेट्या-खेटे घाल्या**-वि. एखाद्या कामाविषयीं फेऱ्या घालणारा; वारकरी; येरझार करणारा; उंबरठा झिजविणारा.

खेटी—स्त्री. १ गर्दी; लगट. 'मागें पुढें रिघे पोटी । साहे खेटी करी ते ।' -तुगा १६७६. [खेट]

खेड—स्त्री. १ मिसळ; मिश्रण; मिश्रितपणा; मिश्रित किंवा मिसळीचें द्रव्य. (मुख्यत्वें धान्य, दाणे). २ (शेती) चिखल. -कृषि २५७. ३ (राजा.) फणसाच्या आठोळांची दाणे घातलेली सुकी भाजी. [खेड]

खेड—पु. चमत्कारिक, विलक्षण, तऱ्हेवाईक माणूस. **०कर**-वि. मिश्रित (धान्य). **०गणती**-स्त्री. सरसकट मोजणी.

खेड-खेडें—न. लहान गांव (शके ७२८. ज्या वणी ताम्रपटांत हा शब्द आला आहे). [सं. खेट-क] **०कचेरी**-स्त्री चावडी. **०वळ-वाळ, खेडाऊ, खेडोळ, खेडावळ, खेडाळ, खेडाळू, खेडवल-वाल**-वि. १ गांवढळ; अशिक्षित; खेड्यांत राहणारा; शेतकरी. २ गांवरानी; गांवठी; धडवती; गांवासबंधीं (भाषण, धान्य, कारागिरीचा पदार्थ).

खेंड—स्त्री. गोल टोंकाची व जड तरवार; खांड पहा.

खेंड, खेंडगोंडी, कुली-खेंडार, खेंडुकली-ळें—खिंडगोंडी, खिंडकुली, खिंडार पहा.

खेंड—न. (माण.) गोवरीचा किंवा लांकडाचा पेटलेला तुकडा [सं. खंड]

खे(खें)डकुली(ळी)—स्त्री. १ बागेंतील पाण्याचा लहान पाट. 'खेंडकुलिया आराम । त्यामाजीं दोघां समागम ।' -एभा ७.५६३. २ वाकणें घेत जाणारी नदी; खेड्यांतील ओढा. 'साहित्याचियां खेडकुलिया ।' -शिशु २६. 'ब्रह्मरसाची खेडकुली ।' -शिशु ३९३. [सं. क्षेवेड=वक+कुल्या=पाट, कालवा, ओढा]

खे(खें)डकुली--स्त्री. खेडवळ स्त्री. [खेटक+कुल]

खेडणें—सक्रि. खेटणें पहा.

खेडणें—सक्रि. जमीन कसणें; नांगरणें. [सं. कृष्=खेड] **खेडहक्क**-पु. जमीन कसण्याचा हक्क. 'प्रत्यक्ष राजापासून आपली जमीन खेडहक्कानें उपभोगणाऱ्या या कुळानें.....' -पार्ले ५.

खेडम्या—पु. (ना.) म्हातारडा; येरडा; वृद्धकपि. **खेडमी**-स्त्री. येरडी [सं. क्षेवेड=वक]

खेंडा-डें—पुन. १ भरड किंवा विरळ पोताचें व हलक्या किंमतीचें कापड; उणाख शेला. २ प्रेतावरील वस्त्र. 'खेंडयावर फुलें घालून तिरडी तयार केली.' -पाण्ह ११८.

खेंडी—स्त्री. पर्वतांतील खिंड. 'मोठे उंच पर्वत आंतल्याआंत खचून जाऊन त्यांत खेंडी पडल्या.' -मराठी साहावें पुस्तक भा. २ पृ. ४५. (१८७५) [खंड]

खेडु(डू)त, खेडू—पु. १ (गु.) शेतकरी. २ (व.) मत्तधानें किंवा बटाईनें शेत करणारा; जमीन करणारा. [खेडणें]

खेडें—न. गांवढें; आडगांव (विशेषतः शेतकऱ्यांचें). [सं. खेट-खेटक-खेड; तुल० सीगन खेख; फ्रेंच जि. खेख] **०गांव**-पु. लहान गांवढीं, आडगांवें यांस व्यापक शब्द. **०गांवचा**-वि. खेडचा; गांवढळ; भिकार गांवचा; शेतकरी. **०पाडें**-न. खेडें. [खेंड द्वि] **खेडांखेडीं**-गांवोगांव. **०खेड्या**-वि. खेडेगांवचा पहा.

खेडें—न. १ पोलाद. २ ढाल. 'नघे भाला खेडें ।' -भाए ४५०. खिडें, खेंड पहा. [सं. खेट=ढाल; तुल. का. खेड=ढाल]

खेणी—क्रिवि. (कु.) कशानें ?

खेत—न. १ शेत. २ रणक्षेत्र. ३ (ल.) युद्ध. 'घोडे सोडून खेत केलें.' -पया ४५४. ४ मैदान; मोकळी जागा. ५ पुण्य क्षेत्र. [सं. क्षेत्र] **खेतास येणें**-लढाईंत शत्रुसन्मुख ठार होणें; मरणें. 'कितेक गाडदी खतास आले.' -भाव १५. **०पडणें**-खेतास येणें. **०कर**-पु. (व.) शेतकरी.

खेती—स्त्री. रणक्षेत्र. 'खेती म्हणजे रण सोडून गोळीची खास्त निघाले तरी नामोहरम जाले.' -भाब १३. [सं. क्षेत्र]

खेती-त्री—स्त्री. शेती; शेतकी; शेतीचा व्यापार. [सं. क्षेत्र] -पु. शेती करणारा; शेतकरी. [सं. क्षेत्रिन्; प्रा. खेत्ति] **०वाडी**-स्त्री. शेतवाडी.

खेतूर--क्रिवि. (कु.) कशांत ?

खेतें-तो--नपु. (गो.) माकड.

खेत्री--पु. १ क्षत्रिय. त्यावरून. २ रणशूर; पराक्रमी पुरुष. 'खेत्री हाणा म्हणती रणशूरा ।' -ऐपो १२६. [सं. क्षत्रिय; हिं. खत्री, खत्री]

खेत्री--पु. (गो.) (क्षेत्रांत राहणारें) पिशाच्च. [क्षेत्र]

खेद--पु. १ इष्ट पदार्थाचा वियोग किंवा अनिष्ट पदार्थाची प्राप्ति झाल्यानें अंतःकरणास होणारी व्यथा; दुःख; मनस्ताप. २ पश्चात्ताप; अनुताप. ३ त्रास; पीडा. 'जीवमात्रांस देणें खेद ।' -दा २.६.१९. ४ कंटाळा. 'जया पुरुषाच्या ठायीं । कर्माचा तरी खेदु नाहीं ।' -ज्ञा ४.१०३ [सं. खिद्=त्रास होणें] **खेदणें**-सक्रि १ दुखविणें; त्रासविणें. 'जिवलगांस खेदूं नये ।' -दा २.२.१०. २ (ना.) (ल.) हांकणें; हांकलून लावणें; घालविणें (पशु इ०). **खेद मानणें**-दुःख करणें; मनास लाऊन घेणें. **खेदविणें**-सक्रि. दुःख देणें; खिन्न करणें; त्रासविणें. **०क्षीण**-वि. दुःखी. 'बहु जालों खेदक्षीण ।' -तुगा १०२६. **खेदित**-वि. दुःखित; कष्टी; खिन्न.

खेंद(दा)डा—पु. (अक्षिष्ट) मूर्ख; गधडा; खेंबडा. –वि. १ खेद देणारा; नाठाळ; अडणारा; तापट; त्रासदायक; खटयाळ (घोडा). त्यावरून. २ खाष्ट; द्राष्ट (माणूस); उनाड; कजाख (मूल, स्त्री); स्वच्छंदी; दुष्ट; द्वाड; नष्ट; कुरूप; नेभळा; अव्यवस्थित (मूल, स्त्री, यांस रागानें) [सं. खिद्]

खेदा—पु. (ना.) पिच्छा; पाठलाग.

खेदारू—पु. एक प्रकारचा गूळ. –शे ७.१४६.

खेन्नकरप—क्रि. (गो) बकरीं इ० बळी देणें.

खेप—स्त्री. १ जा ये; येरझार; हेलपाटा. (क्रि० करणें). २ देशांतराहून आणलेला मालाचा किंवा धान्याचा (बैल, गलबतें इ० वरून केलेला) एका वेळचा पुरवठा, भरणा, फेरी; माल तयार करणाराकडून एका वेळीं आलेला माल. 'विडयांची खेप.' ३ एक वेळ किंवा प्रसंग. ' एक खेप गय केली दुसऱ्या खेपेस मारीन. ' पाळी; वारी; एखाद्या प्रसंगाचें उदाहरण. ' तिच्या बाळंतपणाची ही पांचवी खेप. ' एखाद्या क्रियेची सर्व मुदत; एक कृत्य किंवा त्या कृत्यानें व्यापलेला काळ. 'तूं धोतरें धुतोसच आहेस तर खेपेसरशीं माझींहि धोत्रें धुवून टाक.' ' पैका घेतेखेपेस गोड लागतो मग देतेखेपेस कां कडू लागतो ? ' ४ निष्फळ येरझार; हेलपाटा. (क्रि० घालणें). ५ रोगाच्या सांथीचा काल. ' तापाची देवीची -जरीमरीची-पडशाची खेप.' (क्रि०येणें). [सं.क्षिप्-क्षेप; हिं. खेप] **खेपेसरसा, खेपेनें**–क्रिवि. हातासरसां; हातांतील कामाबरोबरच; चालू काम न थांबवितां. **खेप्या**–वि. १ एकसारख्या खेपा, हेलपाटे, येरझारा घालणारा, करणारा. २ रोकड वगैरे वाहण्याच्या खेपा करून त्यावर उपजीविका करणारा. ३ डाक (टपाला)ची ने आण करणारा. 'नववे रोजीं उज्जनीहून खेप्या पुण्यास जातो. ' –मराठी रियासत उत्तर विभाग २.४२२.

खेपचें—क्रि. (गो.) शिव्या हांसडणें. [सं. क्षिप्]

खेपणें—सक्रि. कोंदणें; खोडा घालणें; बुजविणें; बंद करणें; लोटणें; अडकविणें; त्रास देणें; अडविणें. –अक्रि. अडकणें; बंद होणें. [सं. क्षिप्]

खेपाटा—पु. १ कंटाळवाणी, निष्फळ येरझार; हेलपाटा. (क्रि० घालणें). २ त्रासदायक विनंति, दुराग्रह, माथाकूट. (क्रि० करणें). [खेप]

खेप—पु. (गो.) अनर्थ.

खेंबडा, खेंबुडला—वि. १ खेंदडा पहा. कुरूप. 'कोठें होती रांड खेंबडी. ' –राला ७६. २ वांकडातिकडा; अव्यवस्थित (दांत, दांतांची कवळी). ' दांताला जीभ लावल्यानें दांत खेंबडे येतात. ' [सं. क्वेड=वक्र; फा. खमीदा=कुबडा, वांकडा] **०लेंबडा**–वि. १ गदळ; घाणेरडा; ओबडधोबड; हिडीस; नापसंत (मनुष्य, प्राणी, चेहरा, नाक, इतर अवयव, इमारत, चित्र, लिखाण, वस्तु इ०) २ अव्यवस्थित (दांत इ०) [खेंबडा+लेंबडणें]

खेंबाळणी—स्त्री. (राजा.) निष्काळजीपणानें वापरणें, वापर. [खेंबाळणें]

खेंबाळणें—सक्रि. (राजा.) कचकाळून, वाटेल तसें वापरणें; हिसकाहिसकी करणें; ओढाताण करणें; जोरानें फेंकणें, हलविणें.

खेम—स्त्री. १ मिठी; विळखा; खेंव; आलिंगन. 'पवनासि देतां खेम । अपान ऐसें पावला नाम । ' –सिसं २.२०७. (क्रि० मारणें; देणें; घेणें). २ –न. कल्याण; सुख; खुशाली; क्षेम. [सं. क्षेम] **०वेंगेस येणें**–एखाद्याच्या कबजांत येणें. **खेमालिंगन**–न. मित्रत्वाची मिठी. [सं. क्षेम+आलिंगन]

खेमटा—पु. (ताल.) एक ताल; याच्या बारा मात्रा व चार विभाग आहेत.

खेमा—पु. डेरा; तंबू. 'पातशाही खेम्याची वगैरे तयारीची मात्र आज्ञा केली आहे. ' –दिमरा १.१९. [अर. खीमा= तंबू] **खेमेदाखल**–क्रिवि. लढाईवर निघतांना गांव सोडून सैन्याचा तळ दिलेल्या ठिकाणीं येऊन; डेरेदाखल. ' तूं बाहेर खेमेदाखल होऊन... ' –रा ५.७८. –पया २०१. **खेमेठोक**–वि. (व.) जबरदस्त (मनुष्य).

खेमा—पु. १ चेंदामेंदा. २ मांसाचा बारीक चुरा, चूर्ण, तुकडे. [अर. कीमा]

खेर—स्त्री. १ घाण; गाळ; गदळ; केर; टाकलेला भाग; उरलेला भाग. २ एकत्र मिसळल्यानें झालेली नासाडी. ' एक एक उचलून घे, आंत हात घालून मालाची खेर करूं नको. ' ३ (गो.) खद्द. –वि. गाळसाळीचा; निरुपयोगी; केराचा. [केर; तुल. का. केडिसु=विघडविणें] **०खाना**–पु. खेलखाना पहा **०माती**–स्त्री. नासाडी (काम, माल, वस्तूंची). (क्रि० करणें). **०मेर**–स्त्री. कचरा; घाण; खेर अर्थ १ पहा. [खेर द्वि.]

खेर—पु. खेर (झाड).

खेरखेरात—स्त्री. खुशाली. [फा. खैरखैरियत]

खे(खा)रीज—वि. १ जादा; अधिक; वेगळा; निराळा; भिन्न. २ वगळलेला; अवांतर; निराळा काढून ठेवलेला. ' जाती खेरीज करून. ' –बाडसमा ३.२५१. 'मला खेरीज ठेवून बाकीच्यांस बोलावणी केली. ' –शअ. १ शिवाय. ' तुज खेरीज मला कोण्ही आश्रय नाहीं.' २ वांचून; विना. 'मजखेरीज तूं जाऊं नको.' ३ बाहेर; वेगळे. 'इंग्रजास तंबी करून खुर्दीं तून त्याजला खेरीज करावें.' –रा १०.१८१. (क्रि० करणें; वगळणें). [अर. खारिज्] सामाशब्द– **०कलम**–न. निराळें किंवा जास्त सदर, बाब, वस्तु. **०जमा-वसूल-दस्त**–स्त्रीपु. शेतसाऱ्याशिवाय घेतलेला कर; जादा सारा, पट्टी; चिल्हर बाबी. **०मक्ता**–पु. साक्षात् सरकारनें

मक्त्यानें दिलेल्या जमिनी, इजाऱ्यानें किंवा खोतीनें दिलेल्या जमिनी किंवा जकाती याहून भिन्न; रयतवारी; खेरजी मक्तामुशारा पहा. **०मिळकत**–स्त्री. अवांतर प्राप्ति, मिळकत, फायदे. **०मुशारा–मुशाहिरा, खेरजी मक्ता–मुशारा**–पु. (सरकारी नोकरांस दिलेल्या पगाराशिवाय) भत्ता; बक्षिसें इ०; नैमित्तिक खर्च (मेजवान्या, धर्मादाय इ०चा). याच्या मुख्य बाबी–वर्षासन, रोजिनदार, धर्मादाय, खैरात, देवस्थान, तैवज, कचेरी, दफ्तर, रोशनाई, देहनगी, पोटगी, बक्षीस, शिरपाव, ऐवजास खर्च, सावकारी, हमी, बट्टा, इमारत, भोजन, कापड, तोटा, शिलकी दागिने, थटी इ०.

खेल—पु. (व.) विभाग; हिस्सा; पक्ष. [फा. खैल=सैन्य–विभाग]

खेल(र)खाना—पु. १ सैन्याचें सामान व बाजारबुणगें; फौजेतील बाजार व सामानखातें. त्यावरून (ल.) २ अडगळ; अव्यवस्थितपणें राशी घातलेल्या वस्तू इ०. 'या दिवाणखान्यांत खेलखाना भरला आहे, तो काढून मोकळें कर.' अव्यवस्थित प्रकार; स्थिति. ३ अडगळीची खोली. [फा. खैलखाना]

खेलाडी—वि. खेलाडू; चतुर; हुशार. [सं. खेल्]

खेव(खेंव)—स्त्री. १ मिठी; आलिंगन; खेम. 'स्नेहें मीनल्या खेंवकवळी.' –मुआदि ४५.११९. 'आपण निवोनि निववी पुष्कळ त्याही सुखेंव देत्यातें.' –मोभीष्म ३.४३. २ खेट; घसडा; चाट; चादून जाणें. [सं. क्षेम–खेंव]

खेव–वो—पु. अरिष्ट; दुर्दैवानें आलेलें विघ्न; अपकार; त्रास; खोडी; घात; उतरती कळा; नाश. (क्रि० येणें). 'आपासाहेबाच्या राज्याला आला खेव.' –गापो पृ. ८६. [सं. क्षय] **०आणणें**–(व.) सतावून सोडणें; त्रास देणें.

खेव—पु. क्षण. **खेवीं, खेवो**–तक्षणीं. त्याच वेळीं. 'हा बोळु आइकत खेवीं.' –ज्ञा १७.३२६. जातखेवो; जातां क्षणीं. 'नातरी निद जातखेवों.' –अमृ १.६२. भेटतखेवों, म्हणतखेवों, पावतखेवो. 'ऐसें शृंगारियांहि उदजे। देखत खेवों' –ज्ञा ६.१७०. 'जल्मतां खेवीं तेयां धरतु.' –क्रिपु १.१५.१४. [सं. क्षण]

खेवण–णें—न. १ कोंदण. 'पदपद्मती खेवणें। प्रमेय रत्नांचीं.' –ज्ञा १.५. २ जडित अलंकार; भूषण; जडाव. 'जेयाचि वाहाणा चिंतामणी खेवणा' –ऋ ५२. 'मिती नाहीं अलंकारखेवणां.' –कुमुरा ४६.७६. ३ शोभा. **खेवणें**–क्रि. पच्चीकाम करणें; जडणें. 'खेवलें अंतरीं पालटेना.' –तुगा ३९८६. **खेवणणें**–क्रि. जडित करणें. 'रविचंद्र तारा लोककुसरी। खेवणोनियां तयावरीं.' –एभा २४.१८९. **खेवणी–नी–नु**–स्त्री. जडाव; जडणी; खोवणी; खोचणी. 'माजी गुंजाची खेवनी.' –दाव २४२. –वि. जडित. [सं. क्षेपणम्]

खेवदा—खेवय्या—पु. (कार्शा) वल्हविणारा माणूस; नावाडी. [खेवा]

खेवा—पु. आलिंगन; मिठी (क्रि० करणें). [सं. क्षेम]

खेवा—पु. वल्हें. (क्रि० मारणें).

खेश—वि. नातलग; सोयरा. 'खेश सोइरे.' –रा १८.८७. [फा. खेश]

खेस—नपु. एक प्रकारचें कापड (सुती, लोंकरी, रेशमी). –स्त्री. १ घसा वाजणारा खोकला, दमा (गुरांचा). २ (ना.) उग्र वास (फोडणी किंवा मिरच्या इ० चा). [हिं. सं. कास;]

खे(खें)सणें—अक्रि. १ दांत खाऊन खेंकसणें, फिसकारणें (रागावलेल्या माकडानें); त्यावरून २ (ल.) रागावून, चिडून वस्सकन अंगावर जाणें. ३ घसा वाजेल असें खोंकणें. ४ खिकाळणें (घोडा). ५ (व.) खांकरणें; खोकलणें. [ध्व.]

खेसर—स्त्री. (खा. व.) थट्टा; मस्करी; चेष्टा.

खेळ—पु. १ करमणूक; क्रीडा; मौज; केलि (चित्तविनोदार्थ केलेली). २ खेळणें–णीं; खेळण्याची वस्तु (बुद्धिबळें, सोंगट्या, भोंवरा, गोटया इ०). ३ तमाशा; देखावा; प्रदर्शन. ४ अभ्यास; मेहनत (बुद्धीचा, इंद्रियांचा); व्यापार; क्रिया; चलनवलन (यंत्राचें). ५ खेळण्याची पाळी (एखाद्या खेळांत). ६ चाळा; कृति; खावडाव; वाईट कृत्य. 'म्हणे वांसरा घात झाला असारे। तुझे माउलीचेचि हे खेळ सारे.' –वामन भरतभाव १७. ७ नाटकाचा प्रयोग. ८ लीला; कृपा. ९ (ल.) लढाई; युद्ध. 'उलटेल जरी हा खेळ.' –संग्रामगीतें ४७. १० (गो.) विशेषतः जुगाराचा खेळ; जुगार. [सं. खेल्; हिं. पं. खेल; बं. खेला सीगन, फ्रेंचजिप्सी खेल.] (वाप्र.) **०करणें–उडवणें**; उधळणें; बेपर्वा खर्च करणें; घोटाळा, अव्यवस्था करणें; नासणें; बिघडविणें. **०करणें–खेळणें–मांडणें**–चांगला खेळ किंवा काम करणें; एखादी हुषारीची किंवा शिताफीची गोष्ट साधणें. **खेळणें**–अक्रि. १ क्रीडा, मौज करणें; स्वतःस रमविणें. **म्ह० खेळेल तो पोळेल.** २ गमणें; अळंटळं करणें; माशा मारीत बसणें. ३ एखादा खेळ खेळणें. ४ वाद्य वाजविणें. ५ (भूतसंचारामुळें) इकडेतिकडे उडत्या मारणें. ६ हळू हळू हालणें; झुळझुळणें (एखादी वस्तु वाऱ्यामध्यें किंवा सूर्यकिरणें पाण्यामध्यें). 'किल्ल्याभोंवतीं; पाणी खेळत असतें.' ७ व्यापार करणें; चालणें; चालत असणें; चलनवलन करणें (यंत्र). **०ल्हावणें–मांडणें**–एखाद्या कटाचा किंवा वाईट मसलतीचा पाया घालणें. **०ल(वि)णें**–सक्रि. १ क्रियेंत, व्यापारांत चालू ठेवणें; चालवणें;

हलविणें. 'स्वमायेचें आडवस्त्र । लावूनि एकला खेळवी सूत्र । ' –ज्ञा १८.१३०३. २ नाचविणें; आपल्या मर्जीप्रमाणें वागावयास लावणें. 'जो ब्रह्मादिकां खेळवी अर्णेगीं परी । ' –शिशु १. ३ काम सुरू ठेवणें (यंत्र; वाफेचें यंत्र, हत्यार इ०चें). ४ रमविणें. सामाशब्द- **०कर**–वि. १ हकडे तिकडे खेळण्यास योग्य; खेळण्याच्या वयांत आलेला. 'दे गे माळणी फुलांचा झेला । माझा मातु खेळकर झाला । ' २ खेळाडू; मौज्या; आनंदी. ३ आगलाव्या; कळलाव्या; खेळघा; कज्जेदलाल. **०करी**–पु. तमासगीर; चित्रें दाखविणारा; मोंठ्या लोकांचीं सोंगें आणणारा; बहुरूपी; दशावतारी. **०कुडी**–स्त्री. १ खेळण्याची चेष्टा; माकडचेष्टा. २ चाळा; क्रीडा; युक्ति; मौज; थट्टा (मनापासून केलेल्या कृत्याच्या उलट). 'खेळकुडीनें कोणी चोर म्हटलें तरी त्याचा राग मानूं नये. ' **०कुली–ळी**–स्त्री. उपवनांतील पाण्याचे लहान लहान पाट. खेडकुळि पहा. 'रत्नबद्धा खेळकुळिआं जवळी.' –दाव १५९. 'चित्रविचित्र खेळकुलिया । ' –मुआदि २९. ५०. **खेळकू–गड–गर**–वि. १ खेळाडू; मौज्या. २ मौज करणारा; क्रीडा करणारा; विनोदी; विदूषक. ३ खेळण्याचें वय झालेलें (मूल). **०खंडोबा**–पु. नाश; सर्वस्वी विघाड; पूर्ण सत्यानाश; धूळधाण (खंडोबा, झाडाच्या अंगांत संचार करून त्यास रानोमाळ नाचावयास व गडबडा लोळावयास लावतो यावरून). (क्रि० करणें). **०खाना**–पु. खेळण्याचा अड्डा; क्लब. ' वयोवृद्ध कामगार सकाळसंध्याकाळ ..... दरबारांत, खेळखान्यांत ..... जसा वीरमंत्र देतील ..... ' –टि १.४१९. **०गड**–पु. १ खेळांतील सोबती. २ –स्त्री. (कों.) खेळांतील सोबत किंवा मैत्री. ' त्याची व याची लहानपणापासून खेळगडी आहे. ' **०गड्या**–वि. (राजा.) खेळांत किंवा गंमतींत व्यर्थ वेळ घालविणारा; खेळघा; आळशी; छचोर **खेळणी**–स्त्री. १ खेळणें, क्रीडा करणें. २ खेळाचा दिवस, (व.) सुटीचा काल ' शाळा सुरू झाल्यापासून ४.५ दिवस खेळणीच असते. **खेळणें**–न. १ खेळण्याची वस्तु. २ लहान मुलाच्या पाळण्याकर वेगड, कागद, कापडाच्या चिमण्या इ० वस्तु बांधतात त्या. ३ सहज प्राप्त होणारी वस्तु. 'आम्हां केलें परब्रह्म खेळणें. ' –एभा १८.३९५. **खेळणें(तें), रांगणें(तें)**–न. मकरसंक्रांतीच्या वेळचें एक व्रत, वसा; एका स्त्रीनें दोन नारळ घेऊन 'खेळतें घ्या रांगतें घ्या ' असें म्हणून दुसऱ्या स्त्रीस ते नारळ द्यावयाचे व नंतर दुसरीनेंहि असेंच म्हणून दोन नारळ पहिलीला द्यावयाचे. **खेळतारांगता**–वि. १ खेळण्याच्या व रांगण्याच्या वयांत आलेला (मुलगा). २ शरीरास मोकळी हालचाल करतां येईल असा; अघळपघळ (वस्त्र, दागिना). ३ खेळतां येईल असा नेमस्त; हलका; बेताचा (ताप, देवी, गोवर, कांजिण्या). **खेळतें वारें**–न. देव किंवा भूत यांचा जोराचा संचार, अवसर (यानें भविष्य किंवा शकुन समजतो अशी समजूत आहे.) **०त्या देवी**–स्त्रीअव. देवींचा (फोडयांचा) एक प्रकार. देवी पहा. **०द्रव्य**–वि. खेळासाठीं किंवा चेष्टामस्करीसाठीं ठेवलेला; बगलबिल्ली; खुषमस्कऱ्या; विदूषक (माणूस, प्राणी, वस्तु, खेळणें, क्रीडामृग इ०). **०द्वणी**–स्त्री. प्रिया; मैना; लाडकी स्त्री (विलासी स्त्री किंवा नानाप्रकारचे खेळ खेळून पुरुषास आपल्या व्यसनांत अडकविणारी स्त्री); स्त्रीस लडिवाळपणें म्हणावयाचा शब्द. **०शेपणा**–पु. (राजा.) आळशीपणा; अळंटळंपणा; रेंगाळण्याची किंवा गमण्याची प्रवृत्ति; खेळगडीपणा. **खेळा, खेळि(ळी)या, खेळ्या**–वि. (कों. राजा.) १ शिमग्यांत दवाऱ्याच्या पालखीबरोबर जाणारे, यांचे कापडखेळे व डफखेळे असे दोन प्रकार आहेत; सोंगाडया; बहुरंग. 'पूर्वी खेळे बहुत जाहले सृष्टीं । ' –ह १३.४६. २ लग्नांत खेळ खेळणारा. ' तो वीरराज जयांचा खेळा । ' –शिशु ९९८. ३ नेहमीं भलत्यासलत्या कामांत किंवा अन्यायाच्या कृत्यांत गुंतलेला; आगलाव्या; कळलाव्या; चुगलखोर. ४ फंदफितूर करण्याचा स्वभाव असलेला. ५ खेलाडू. **खेळिअला**–खेळला. 'ब्रह्मांडमंडपीं गोंधळ । खेळिअला संतोषें । ' –मुआदि १.४१४९. **खेळी**–स्त्री. १ खेळ; मौज. २ खेळण्याचा दिवस; सुटीचा काल. ३ खेळण्याची पाळी (वुद्धिबळें). मोहऱ्यानें एका वेळीं केलेली हालचाल, किंवा गति. ४ खेळा पहा. –वि. खेळणारी; मौजा मारणारी; चबचाल स्त्री. ' माझी सासु मोठी खेळी । ' –भज ५५. **०मेळा**–स्त्री. १ दाट परिचय; घसट; सलगी. २ मौज; क्रीडा; थट्टामस्करी; रंगेल चेष्टा; गंमत; मौज. **०मेळीचा खेळ्यामेळ्या**–वि. दाट परिचयाचा, सलगीचा. **०मेळा, खेळीं मेळीं**–क्रिवि. (काव्य) मौजेत; हास्यविनादांत किंवा खेळांत; करमणुकींत (काळ घालविणें). ' आता जाऊं खेळीमेळीं । गाईं चारावया । '–तुगा२३०. मौजेनें; विनोदानें, परिहासबुद्धीनें (बोलणें, करणें) **खेळीमेळी**–आले घरा गोपीनाथ । गोपाळांसहित मातेपासीं । ' **खेळेमेळें**–क्रिवि. परस्परें थट्टा मस्करी करावयाजोग्या परस्परांच्या मित्रभावानें. ' एथें करों या भाजनें । खेळेमेळें । ' –दाव १९९. ' आहार निद्रादि खेळेमेळें । ' –एभा १३.५६८. **खेळुगा**–वि. खेळाडू.

खेळणी—स्त्री. (गो) उचकी.

खै—स्त्री. १ अहंता; अभिमान; ताठा. (क्रि० मोडणें; जिरविणें). २ नाठाळपणा; चढेलपणा; मस्ती (ठाणबंदी पशूची). (क्रि० मोडणें; जिरविणें). ३ शिक्षा; ओळ; शिस्त. ' त्या पोरास खै लाविली पाहिजे. '

खैं—क्रिवि. (गो.) कोठें? **खैंचा**–वि. (गो.) कोणता–चा? **खैंच्यो**–वि. (गो.) कुठल्या? **खैंसर**–क्रिवि. कोठें? **खैंसून**–क्रिवि. कोठून. ' खैंसून आयला? '

खैचणें—खेचणें पहा.

खैण—वि. (गो.) खारट.

खैणाडॉ—पु. (गो.) शेत, आगर यांत खारें पाणी जाऊं न देण्यासाठीं घातलेला बांध.

खैन—पु. रंगाळणारा खोकला. [ध्व.] ०**करी-करीण**-पुस्त्री. रंगाळणारा खोकला असणारा पुरुष, स्त्री. **खैनी-न्या**-वि. १ खोकेलकरी. २ तिरसट; खाष्ट; चिडखोर.

खैर—पु. एक कांटे असलेलें झाड. याची पानें शमीसारखीं असून लांकूड इमारतीच्या उपयोगी पडतें. याच्यापासून कात व गोंद होतो. -वगु २.७५. [सं. खदिर] ०**सागर**-पु. खैरापासून केलेलें एक औषध.

खैर—स्त्री. १ क्षेम; कुशल; कल्याण. २ चांगली स्थिति; आबादी; खुशाली. ३ ईश्वरी कृपा. ' ते खैर होऊन निघाले पुनर्जन्म झाला. ' -मराचिथोरा ६०. [अर. खैर=भले] (वाप्र.) ०**असणें**-उद्गा. सर्व चांगलें, ठाकठीक असणें. ०**होणें**-आलेला वाईट प्रसंग टळणें; उपकार होणें. सामाशब्द- ०**आफियत**-स्त्री. क्षेम; खुशाली. ' आपणाकडील खैर आफियतेचा खबर मालुम होत नाहीं. ' -रा १०.११८. ०**खबा-ख्वा-खाह**-वि. हितेच्छू. ' ते मानसें बिलकुल राजेसाहेबाचे सरकारचे खैरख्वा नाहींत. ' -रा १०.२५१. ' ईश्वर हे फतेची खबर सर्व खैरख्वा लोकांस मुबारक करो. ' -पेद १.८४. ०**खाही**-स्त्री. शुभचिंतन. -रा ८.६. [फा. खैर + ख्वाही] ०**खुशी**-स्त्री. क्षेमकुशल. ०**खैरात**-स्त्री. दानधर्म. ' खैर खैरात केली ' -मदवा १.२०१. [फा.] ०**शादमानी**-स्त्री. खुशाली. 'आपली खैर शादमानी हमेशां कलमी करावी. ' -रा २२.८६. [फा. खैर+शादमानी=आनंद] ०**सला(ल्ला)**-स्त्री.१सुखशांति;क्षेम कुशल (मुख्यतः पत्रव्यवहारांत योजना) ' आपली खैरसल्ला दर्वक्त लिहीत जाणें. ' -रा १५. २५०. २ स्नेह; मित्रत्व; सख्य. ३ (उप.) पूर्ण अभाव किंवा टंचाई, दुष्काळ (पाणी, अन्न, दाणा, पैसा यांचा). [फा. सलाह्]

खैर, खैरत—स्त्री. १ चांगली गोष्ट. 'एक जरा तस्वीस दिलिया खैरत नाहीं. ' -रा १५.१३७. २ भलाई. ' त्यांतच तुमची आमची सर्वांची खैरत असे. ' -रा ६.६१८. [अर. खैरत्]

खैरभट—पु. १ या नांवाचा एक ब्राह्मण. हा शक्ति व पराक्रमाबद्दल प्रसिद्ध होता. एकदां त्याला चोरांनीं अकस्मात् गांठून त्याचेवर हल्ला केला असतां त्यानें जवळचें एक खैराचें झाड उपटून त्यांना चोपून पिटाळून लाविलें अशी गोष्ट आहे. त्यावरून अचाट शक्तीचा माणूस; भीम. २ अशिक्षित, निरक्षर किंवा निव्वळ दगडधोंडे किंवा झाडें यांना शिकविण्याच्या योग्यतेचा ब्राह्मण.

खैरा—पु. जोंधळा-बाजरीवर पडणारा एक रोग.

खैरा—वि. १ घनसांवळा; कपिश. २ करडा; पांढऱ्यावर तांबडे किंवा तांबडयावर पांढरे ठिपके असणारा. ' चितार भिंगारें खैरें. ... अवघीं वासरें आपण जाहला. ' -ह १०.१९२. ३ निरनिराळया रंगाचा (डोळा); किंवा निरनिराळया रंगाचे डोळे असलेला (माणूस, पशु) कैरा पहा. ४ मिश्र रंगाचा; चित्रविचित्र; मिश्र. ०**कबूतर**-न. लालभडक किंवा काळसर तांबट रंगाचें कबूतर. ०**थांडा**-वि. पांढऱ्यावर काळे किंवा काळयावर पांढरे ठिपके असलेला.

खैराड—न. खैराचें झाड. ' कोसंब अंजीर खैराड. ' -कालिकापुराण २२.१५. [खैर+ड अल्पार्थी प्रत्यय]

खैरात—स्त्री. १ दानधर्म; भिक्षा; देकार. २ मशिदीच्या खर्चासाठीं किंवा फकिरांना दानधर्म देण्याच्या खर्चासाठीं दिलेली बिन साऱ्याची इनाम जमीन किंवा गांव. ३ (ल.) कुरवंडी. ' सखे खैरात करीन तुजवरून. ' -पला ४.१८. [अर. खैरात्]

खैराती—वि. कमी योग्यतेचा; हलकट; सामान्य; क्षुद्र; भिकार; टाकाऊ (माणूस, वस्तु, पशु-कारण दान द्यावयाच्या वस्तु बहुधा क्षुद्र, भिकार असतात). ' खैराती सामान मात्र नसावें. ' -ख ४.१६०९.

खैरि(री)यत, खैर्यत—स्त्री. क्षेम; खुशाली; सुख; हित; मनःस्वास्थ्य; चांगली स्थिति; भरभराट. ' त्याचे लेकीचें खैरीयतीचें वर्तमान पुशिलें आहे. ' -रा १.१८१. [अर. खैरीयत्]

खैरी—स्त्री. १ बांधीव नसलेल्या विहिरीवरील रहाटाच्या आधाराचे खांब प्रत्येकीं; बहुधा हे खैराच्या लांकडाचे असतात. २ अहंभाव; गर्व; मीपणा. [खैर] -वि. खैराच्या लांकडाचा केलेला. ०**शेरी**-वि. हलक्या किंमतीचा; कवडीमोल; क्षुद्र.

खैलाटी-ठी—स्त्री. खालाटी पहा.

खैवंग—वि. बळकट; मजबूत. ' देहधर्माच्या खैवंगीं. अधिष्ठिलें आंगीं. ' -ज्ञा १३.१०७. [सं. क्षेमांग]

खैशा—वि. खेस, खवीस याचा स्वभाव असलेला; कुलक्षणी; अमंगळ, पिशाच्च यासारखा द्वाड; राक्षस (निंदार्थी). [खवीस]

खैस—पु. (कों.) (अशिष्ट) खवीस पहा.

खो—पु. १ (खोखोचा खेळ) पाळी आलेला पकडणारा गडी रांगेतील गडयाला उठावयास लावून त्याच्या जागीं बसतांना जो शब्द उच्चारतो तो. २ (ल.) नाश; तोटा; खीळ; छाट. ३ विपत्तिकाल; उत्पात; अडथळा. [सं. क्षोभ-खोह-खोअ-खो-भाइ १८३२; ध्व.] ०**घालणें-देणें**-१ कामावरून घालवून देणें; (मजीतून) उखाडणें; उच्चाटणें; युक्तीनें जागा ताब्यांत घेणें; (कामांत) बिब्बा घालणें.

खो, खोखो—स्त्री. १ खदखदां हांसणें; खोकलणें; ढांस. (क्रि० लागणें; करणें; लावणें; चालणें). 'छातीचें मडकें होई। खोखोचें मजरे घेई।' –सन्मित्रसमाज मेळा पद ४. पृ. ९. (१९२९). –क्रिवि. १ सपाटून; मोठमोठ्यानें; खोखो असा आवाज काढीत. (क्रि० हांसणें, खोकलणें). २ तडा गेलेल्या मडक्यावर वाजविलें असतां होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन. (क्रि० वाजणें). **खो-कन-कर-दिन-दिशीं**–क्रिवि. खो असा शब्द होई असें वाजून; पहुन. **खोका(खा)घेणें**–अक्रि. खो असा शब्द होईल असें पडणें; फुटणें; वाजणें पाऊस, (जड वस्तु).

खोईण—स्त्री. (कों.) मासे पकडावयासाठीं पाण्याच्या प्रवाहांत ठेवलेली एक निमूळती वाटोळी बांबूची विणलेली नळी. कोयनी असेंहि रूप आढळतें. खूण पहा. [कोन]

खो(खों)क—स्त्री. १ (दगड इ० च्या) प्रहारामुळें शरीरास झालेली जखम; क्षत. २ क्षणिक खोकला; वशांत कांहीं अडकल्यामुळें उत्पन्न होणारी तात्पुरती ढांस. (क्रि० येणें).[ध्व.]

खोकड—स्त्री. खोखोचा खेळ.

खो(खों)कड—स्त्री. १ कोल्ह्याच्या जातीचें एक जनावर; हें मोठें कावेबाज, पूर्त, मोठमोठ्या शिकाऱ्यास व शिकारी कुत्र्यांस पुरेपुरे करून सोडणारें, झुपकेदार व गोंडस शेंपटाचें, ओढ्याच्या दरडींतील बिळांत राहणारें आहे. कांहींच्या मतें कोल्हीण. २ (ल.) म्हातारा, जख्खड, कुरूप, अशक्त, रोगी माणूस किंवा पशु. त्यावरून ३ (कों.) नापीक, रुक्ष, खडकाळ जमीन. [प्रा. खोड=शृगाल]

खोकडी—स्त्री. तोंडा(चेहऱ्या)ची एक बाजू; खोकाड पहा. [ध्व.] **०गुंगविणें**–१ जोरानें, फाडदिशीं तोंडांत भडकाविणें; यावरून. (ल.) २ नासणें; चालेनासें करणें; घोटाळा माजविणें; घात करणें.

खोक(ख)णें—अक्रि. खांसणें; ढांसणें; कास रोगानें कंठांतून खोखो असा शब्द येणें. [ध्व.]

खो(खों)कर-ड, खोंकरें—वि. (काव्य) १ फुटकें; तडकलेलें; नाशवंत. 'जें आकारीं इये खोकरें।' –ज्ञा ८.१५ मोडकळीस आलेलें. 'रिता वाडा खोंकर.' –तुगा २०५५. 'नरदेह खोंकर जैसें फुटकें कावल।' –स्वादि ६.४.७७. २ वयातीत; जख्ख. [सं. क्षयकर]

खोकरणें–अक्रि. क्षय पावणें; फुटणें.

खोकरणें—अक्रि. ओसरणें; कमी होणें. 'आयुष्यजळ खोकरे.' –गीता २.४३१. खोकणें.

खोकरपण—न. विनाशयता; क्षणभंगुरता; क्षणिकत्व. 'तेणें खोकरपणें चढे। क्षर हें नाम।' –ज्ञा १५.५००. [सं. क्षयकर+पण]

खोक(ख)ला, खोक—पु. (राजा.) प्राणवायु उदानवायूशीं मिश्र झाल्यानें दूषित होऊन तोंडांतून बाहेर पडणारा आवाज; कास; ढांस; खालेंलें अन्न श्वासमार्गांत गेल्यानेंहि खोकला उद्भवतो. याचे पांच प्रकार आहेत:–वातदोषाचा, पित्तदोषाचा, कफदोषाचा, उरःक्षताचा व क्षयरोगाचा. –थोर १.६१०. 'खोकलें खरूज अत्यंत।' –गीता १३.२४९७. [सं.कास] **म्ह०** गळा कापला खोकला मिटला (वारला). (वाप्र.) **०चिकत घेणें**–स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेणें; नसतें लचांड आपण होऊन अंगावर ओढून घेणें. **–लेकरी**–वि. सदोदित खोकला येत असलेला.

खोकली—स्त्री. एक मोठें झाड. यांचीं पानें हिरड्याच्या पानासारखीं, साल तेजबलाच्या सारखें जाड व पिवळें व फळें हरभऱ्याएवढीं असून झाडास सांवरीप्रमाणें कांटे असतात. –वसु २.७६.

खोक(ख)स—न. धान्यांतील पोल व तूस, भुसकट.

खोका-खा—पु. १ पैसा देऊन निकालांत काढलेली हुंडी. २ दिलेल्या हुंडीच्यासंबंधीं सूचनापत्र. ३ सुटका; हकालपट्टी (अधिकारावरून किंवा जागेवरून). (क्रि० येणें; आणणें). ४ झांकण नसलेली पेटी (विशेषतः देवदारी). ५ (कु.) म्हातारा, जख्ख माणूस. ६ (हिरडा व्यापार) भिजून, फुगून खारकेसारखा सुकणारा, पिंवळा व हिरवी झांक असणारा उत्तम प्रकारचा हिरडा; दळ जाड, बीं बारीक, वजनदार असून सुपीक जमिनींत फळ पडल्यास तेथील पीक जळतें. ७ राशींतून चांगली सुपारी निवडून राहिलेला खराब माल; पोकळ, हलकी सुपारी.

खोकाड—न. तोंड, गाल यांची एक बाजू; थोराडपणा, कुरूपता, गदळपणा, सुजेमुळें आलेली विरूपता किंवा तोंडांत भडकविणें इ० अर्थानें पण निंदार्थी वापरतात. खोकडी पहा.

खोकाळें—न. मस्तकाची टाळू; खाकोळें पहा.

खोक्खा—पु. वानराच्या ओरडण्याचा शब्द; यावरून खोकला, खोकणें हे शब्द बनले आहेत असें म्हणतात. –मसाप २.३.२४२. [ध्व.]

खोखर—वि. जीर्ण. खोकर पहा. 'खोखर वृक्ष असलियावरी। आणि वसंत वोळला तयावरी।' –महिकथा १.३६.

खोखो—पु. मुलांचा एक खेळ. खो पहा.

खोंगळा-ळी—पुस्त्री. १ खोदलेला पाट, कालवा; खंदक. २ पाण्याच्या लोंढ्यानें केलेली घळ, ओघळ, चर. [का. कोंके=वांकडा]

खोंगा—पु. तळहाताचा पसा, पोकळी. 'खोंगाभर दाणे भिकाऱ्यास घाल.' [का.कोंके=वांकडा]

खोंगी—स्त्री. गुडघे व छाती यांत डोकें घालून बसण्याची क्रिया. (क्रि० घालणें; घालून बसणें). [का. कोंके]

खोगीर—पुन. पलाण; घोड्यावर घालावयाचें (कापडी, चामडी) जीन. [फा. खोगीर] (वाप्र.) **०घर–लादणें–चढविणें, ठेवणें**–१ घोड्यावर जीन ठेवणें, कसणें. २ (ल.) एखाद्यावर दोष लादणें; ठपका देणें. ३ पोशाख चढविणें. 'पांच सा मिनिटांत जेवण उरकायचं कीं लगेच खोगीर चढवून हापीसचा रस्ता!' –फाटक नाटयछटा. सामाशब्द– **०भरती**–स्त्री. १ अवजड व कुचकिंमतीच्या वस्तू; क्षुद्र माणसें व निरुपयोगी पशु; निव्वळ जागा भकन काढण्यासाठीं ठेवलेल्या वस्तू, प्राणी; बाजारबुणगे. २ (घोड्याऐवजीं जीन मोजणें) गफलतीनें किंवा लबाडीनें एकत्र केलेल्या घोड्यांचा जमाव (मोठे व लहान, मजबूत व लुकडे किंवा खोगीर चढविलेला वाटेल तसा घोडा अथवा प्राणी). (पूर्वी स्वारांच्या गणतीच्या वेळीं खरे शिपाई जेव्हां एखाद्या सरंजामी सरदाराजवळ नसत, तेव्हां तो घोड्यांच्या ऐवजीं खोगीर दाखवून वेळ मारून नेत असे त्यावरून किंवा खोगिराच्या पोटांत चिंध्या इ० निरुपयोगी वस्तूच फार असतात त्यावरून).

खोंच—वि. (नंदभाषा) हलक्या किंमतीचा; स्वस्त.

खो(खों)च—स्त्री. १ ठोका; घाव; खोंक; बोंच. २ खंड; खांच. ३ पुढें आलेलें टोंक; कांटा; अणकुची; खोचाटा. ४ (ल.) व्यापारांतील तोटा; नुकसान; धक्का. ५ रोष; असंतोष. 'मजविषयीं त्याचे मनांत खोंच आली.' ६ गाण्यांतील स्वरभेद, खुबी. 'त्या रुयालामध्यें त्यानें दहा खोंची घेतल्या.' ७ खुबी; मर्म; तात्पर्य, रस (गोष्ट, बनाव, प्रसंग, भाषण यांतील) 'त्याच्या बोलण्याची खोंच माझ्या लक्षांत आली.' ८ व्यंगोक्ति; व्याजोक्ति; उपरोध. ९ बाणांचा टप्पा. 'पुढें बाणाच्या खोचेचे तफावतीनें उभे राहिले.'–हमं २८९. [सं. कुच्] (वाप्र.) **०मारणें**–मर्मभेदक टीका करणें. 'मोठमोठ्या इंग्रेजी ग्रंथकारांची कोणास खोंचा मारण्याची रीत किती संभावितपणाची व रामबाण असते हें ठाऊक असेलच.' –नि ९. सामाशब्द– **०कील**–वि. संकुचित; अडचणीचें; कोंदट. **०खांच**–स्त्री. खांचखोंच (वर्णव्यत्यास) पहा.

खो(खों)चट—स्त्री. १ कांटा; अणकुची; पुढें आलेलें टोंक; खोचाटा. (क्रि० लागणें). २ व्यापारांतील ठोकर; तोटा. (क्रि० लागणें; बसणें; येणें).

खो(खों)चटणें—अक्रि. अडकून फाटणें; खोंच लागणें; घसावर किंवा टोकावर अडकणें; टरकणें.

खोचडें—न. (ना.) कातडीचा खरचटलेला भाग.

खोचण—स्त्री. (राजा.) बायकांच्या लुगड्याचे ओचे; कमरेभोंवतीं आवरलेली बाजू किंवा भाग; खोंविलेला भाग.

खोंचणी—स्त्री. १ खोंचणें; खोवणें. २ खुपसणी; टोंचणी. 'आंगवणा करावेआं खोंचणी।'–शिशु १०३५. [खोचणें]

खोंचणें, खोंचरणें—अक्रि. १ बळेनें शिरकविणें; जोरानें आंत घालणें; खुपसणें; दडपणें. २ (गो.व.) खोसणें; खोवणें. ३ लावणें; पुरणें; रोवणें. ४ (ल.) टोचणें; भभ्मेत्साह होणें; मनास लागणें; वरमणें; विरमणें, अतिशय दुःख होणें. 'नरपतिरमणी ते खोचलीसे जिव्हारीं।' –सारुह ३.५७. ५ संकोचित होणें; संकट वाटणें. 'तुका म्हणे देवा, कां गा खोंचलासी जीवा।' –तुगा ६२९. ६ रुपणें; टोंचणें. 'हें असो पर्वताचिये हृदयींचें। जेविं पर्जन्यधारास्तव न खोंचे' –ज्ञा ९.२२६ ७ भोसकणें; जखमी करणें. 'तो देवें पांचारौनि खोचिला।' –शिशु १०६७. [सं. कुच्; हिं. खोंचना; कोच]

खो(खों)चर(ल)णें—क्रि. १ (कों.) दांत कोरणें. २ पोंचा पडणें; खोमलण. खोंचणें पहा.

खोंचरा, खोंचारा—पु. खोंचण्याचें, भोसकण्याचें एक शस्त्र; भाला; बरची इ०. 'सुणी ससाणे चिकाटी खोंचरा। घेऊनि निघती डोंगरा पारधी जैसे।' –ज्ञा १६.३४५. [खोंचणें]

खोचरा—पु. (कु.) भातांची एक जात. खोंचरॉ पहा.

खों(खा)चा—पु. १ धोतराचा ओंचा, सोगा, खोवण्याचा भाग. २ पोंचा; खोमा; धस लागून फाटणें. ३ (मांसांत शिरलेलें) टोंक; शल्य. ४ थान पीत असतांना वासरानें गाईस मारलेली ढुसणी, हुंदडा. ५ (गाईचें दूध पितां येऊं नये म्हणून वासराच्या तोंडास बांधलेली) भाळी; लाकडी चौकट. ६ खुंटाळें. –शर. [खोंचणें]

खोंचा—पु. (कों.) भातखाचराचा ताल घातलेला भाग; लहान खांचर.

खो(खों)चाटा—पु. अणकुची; टोंक; धस; कांटा. (क्रि० लागणें).

खोचार–ड—न. खिंड; घळ; दरी; अडचणीची, बंदिस्त, कोंदट जागा. –वि. अडचणीची; अरुंद (जागा).

खोंची—स्त्री. १ (सपाट पृष्ठभागावरील लहानशी) खोंच; खांड (फळी, शेत इ० मधील). २ (ल.) लहानशी खाडी; खाडीचा फांटा; खाडीच्या वर असलेली खिंड; खिंडार; खळी. ३ (कु) समुद्राचें किंवा नदीचें पाणी खेळविण्याकरितां खोदलेली जमीन, चर. ४ (कु. नाविक) जहाज लावण्याची सोइस्कर जागा. **०चें कलम**–न. खुंटीचें कलम; कलमी झाडाची खांदी चांगली जोरदार पाहून सुमारें वीत–दीड वीत तोडून आणावी व सुमारें तीन बोटांएवढें जाड साधें झाड पाहून त्याच्या खालच्या बाजूस म्हणजे जेथें साल जाड असेल तेथें जनावराच्या शिंगानें अगर कठिणशा लांकडाच्या खुंटीनें भोंक पाडून तें भोंक जितकें खोल पाडलें असेल तितकीच कलमी झाडाची खांदी चहूंकडून तासून त्यांस बसवून वेऊन सोपटानें घट्ट बांधावी. [खोंचणें]

खोचून घेवप—क्रि (गो) दसऱ्यास वगैरे अंगांत देवाचा संचार झाल्यावेळीं डोकीवर तरवारीनें घाव करून घेणें.

खांचेरा—पु. बिळांतून साप बाहेर ओढून काढण्याचें दुटोंकी हत्यार; चिमटा. [खोंचणें]

खोज—पु. (ना. व.) शोध; तपास; चौकशी. [हिं.] **०लाग**–खोज; शोध; थांग.

खोजा—पु. मोठी थाळी. [फा. ख्वान्, ख्वांचा]

खोजा—पु. मातीची सुरई. खुजा पहा.

खोजा—पु. १ एक मुसलमान जात. २ प्रतिष्ठित मुसलमान. [फा. ख्वाजा]

खोजा-ज्या—पु. षंढ; हिजडा; सौवीर; नपुंसक. ' बसवंतराव आपा कासुरडे खोज्या होण्याचें कारण हेंच.' –मदरु १. १२२. [फा. ख्वाजा]

खोट—स्त्री १ धातूचा गोळा; लगड; वीट (बिन घड लेल्या किंवा रस केलेल्या जुन्या धातूची). ' आसुरी संपत्ति हा खोटु।'–ज्ञा १६.२१६. ' संस्कृत खोटिये गाळून मनें। वेशभाषा घडिलें लेणें।' –मुसभा १.२१. २ (ल.) गोळा; लगदा (कफ, रक्त, दही, खवा इ० चा); गुठळी; गोळी. **खोटीचा**–वि. लगडीचा बनविलेला, केलेला. ' खोटीचें भांडें.'

खोट—स्त्री. १ टांच. २ (गो.) लाथ. **०वाद**–पु. टांचबंद (वहाणेचा).

खोट—स्त्री. तोटा; नुकसान (व्यापार–व्यवहारांत). [खूट] **०खाणें**–तोटा येणें; बूड लागणें. **०वेरा**–पु. सरकारी वसुलांतील तूट भरून काढण्यासाठीं बसविलेला जादा कर, आकारणी.

खोट—स्त्री. १ खोटें; असत्य; खरेपणा, प्रामाणिकपणा, विश्वासूपणा इ० चा अभाव. २ (व.) दोष; वैगुण्य; कमताई [सं. कूट] **०चाल**–वि. १ गैरशिस्त; बदफैली; दुर्गुणी चालीचा, संवईचा. २ संप्रदायाविरुद्ध वर्तनाचा. **०पत्र**–न. (कायदा, ग्रामपंचायत) अपराध्यापासुन त्याच्या खोटेपणाची किंवा अपराधाची घेतलेली लेखी कबुलायत; तसेंच वादांत हरलेल्या माणसाकडून घेतलेलें जितपत्र. **०वाद**–पु. खोटेपण.; लबाडीचा आरोप. (क्रि० येणें). ' त्याचे पदरीं खोटवाद आला.' **०साळ**–वि. १ हीण; हीणकस; खोटी (धातु). २ अप्रामाणिक; खोटा; वाईट चालीचा; दुर्वर्तनी. ' अमुच्या आशांनीं भीतीला खोटसाळ हो म्हटलें।'–केक २. ३ कृत्रिम; बनावट. ४ गैरभरंवशाचा; लुच्चा; **खोडकर**; दुष्ट. खोडसाळ पहा. [खोट+साळ=शाळा]

खोटबावली—स्त्री. खुंटबावली पहा.

खोटर—न. १ ज्यांतून पाभरीच्या दिंडाकडें एलें नेतात तो कप्पा. २ (व.) बैल, वासरूं यांच्या गळयांत बांधावयाचा दीड हात लांबीचा वारतीचा तुकडा.

खोटलो—पु. (गो.) १ बांबूची टोपली. २ (कु.) धान्य बांधून ठेवलेला गवताचा मुडा.

खोटा—वि. १ असत्य; खरा किंवा वास्तविक नव्हे असा. २ विश्वासघातकी; बेइमानी; लबाड. ३ कृत्रिम; बनावट; नकली; मिश्र. ४ हीणकस; अशुद्ध; मिसळीचा; वाईट (पैसा, नाणें). ५ पापी अधार्मिक. (माणूस). ' मांडया मोडुनि बधिला, तुज दावि वामअंक जो खोटा।' –मोऐषिक ३.२५. ' जेयें धर्मिष्ठाला खोटेंपण लाविती स्वयें खोटा।'–मोसभा ५.१०४. ६ त्याज्य; टाकाऊ; वाईट. ' बहु खेळ खोटाचि आलस्य खोटा।' –मराठी तिसरें पुस्तक पृ. १६ (१९३३). ७ हलका; कमी प्रतीचा धड च्या उलट. ' सद्, नशिबाचा खोटा आहे.' [सं. कूट; का. कॅट्ट=वाईट] **म्ह०** १ खोट्याच्या कपाळीं गोटा किंवा कुऱ्हाडीचा घाव=खोटें काम करणाऱ्याच्या नशिबीं नुकसान ठेवलेलेंच असतें. २ खोटा तरी गांठचा, वेडा तरी पोटचा=स्वतःच्या सर्व गोष्टी, कृत्यें इ० निर्दोष आहेत असें वाटतें. **खोटाई**–स्त्री. खरेपणाचा, वास्तविकपणाचा अभाव; लबाडी; खोटेपणा. ' कां करिसी खोटाई।'–दावि २४१; **खोटानाटा**–वि. वाईट; खोटा; हीण (व्यापारी जिन्नस, पैसा, मौल्यवान धातु). [खोटा द्वि.] **खोटारा**–वि. (कों.) खोटा; खोडसाळ. **खोटारेपणा**–पु. खोटेपणा; लबाडी. ' काय हा खोटारेपणा ! –रोमियो ज्यूलियट ५.

खोटावचें—अक्रि. लाथ मारणें. [खोट]

खोटिल—पु. खानदेशांतील सपाटीवर राहणारा भिल्ल. –गुजा २४.

खोटी—स्त्री. खोळंबा; उशीर; विलंब; अडथळा किंवा अडथळ्याची स्थिति. –वि. खोळंबा, उशीर, अडथळा केलेला. [सं. कुट्–कुंट्; प्रा. दे. खुड] **०करणें**–१ खोळंबा, उशीर करणें. २ थांबवून धरणें. ' मोहिबास येइतलग त्यास खोटी करावे.' –पेद ३.५९.

खोटी—स्त्री. लगड; गोळा (धातूंचा). खोट पहा. ' आटलेपण ते खोटी म्हणिपे।' –ज्ञा ८.१७३. ' लोहपरिसाची भेटी। घडतां सहज सुवर्णखोटी' –निमा (आत्मचरित्र) १.१०८.

खोटें—न. (राजा.) माणसांना व वास्तूंना (घरांना) पछाडणारें एक पिशाच्च (हें पिशाच्च खरा नांवाच्या देवतेच्या उलट आहे म्हणून खोटें). [सं. कूट, खोट]

खोटें—वि. खोटा पहा. १ असत्य. २ दुष्ट; वाईट. 'चारुनि विषान्न भीमा सर्प डसविले नृपें, असें खोटें।' –मोकर्ण ४९.६. ' घडे भोगणें पाप तें कर्म खोटें।' –राम ९. ३ त्याज्य; वाईट. ' दुसऱ्याच्या आज्ञत वागणें हें बहुत खोटें आहे' –बाल १ ७०–८०. (आवृत्ति १) [सं. कूट, कौट; हिं. खोटा; गु. खोटुं] **०पण**–न. १ असत्यता. २ दोष; अपराध. ' त्यजी मदपराध हें मजकडेचि खोटेंपण।' –केका १८.

खोड—न. १ खोगिराची चौकट, कमान. २ भोपळ्या शिवाय दांडी, सांगाडा (सतार, वीणा यांचा); तबला, मृदंग करण्यासाठीं तयार केलेला व पोखरलेला लांकडी ठोकळा, हा एक किंवा दुतोंडी असून शिसू किंवा खैराचा असतो. ३ सुगंधी द्रव्याचा खडा, लांकडाचा तुकडा (चंदनाचा, इतर सुगंधी झाडाचा). ४ शेंडा व फांद्या छाटून टाकलेलें झाड; ओंडका; खुंट; सोट; बुंधा; फांद्यांच्या खालचा भाग. ' तिन्ही लोकीं तुझें नाम वृक्ष पल्लव शाखा । वेंचलों वरि खोडा धरुनि भाव टेंका ॥ ' –तुगा ३५४. ५ अंगावरून वारें गेलेला माणूस. (क्रि० होऊन पडणें; होणें). ६ म्हातारी व न विणारी किंवा गाभण राहण्यास अयोग्य गाय, म्हैस; फळें, फुलें न येणारें जुनाट झाड. ७ (सामा.) झाड. 'आमराईतील खोडें पांचशें आहेत.' ८ (मावळी) मृदंग. ९ लोखंडी घडकामाची चौरस पहार टेकविण्याचा लाकडी ठोकळा. १० (गो.) लांकडी पसरट पाळें; पोहे कांडण्याची उखळी. [प्रा. दे. खोड=काष्ठ, खुंट. का. कोडु=बुंधा] **खोडका**–पु. (व.) वाळून शुष्क झालेलें झाड; खोड. ' जळणास रुपाया एक लहान खोडका. ' –राला ११०. **खोडवा**–न. (कर.) १ दौतीचें कलमदान किंवा ठोकळा २ उंसाचा बुडखा. ३ (व.) जुनाट झाड. ४ (व.) गोडें तेल ठेवण्याचें दगडी भांडें. **खोडवन**–(व.) जमिनीतील पिकाचें नुकसान भरून निघण्याकरिता, दुसऱ्याच्या मालकीच्या त्या जमिनींत असलेल्या झाडांच्या पिकांतून घेतलेला हिस्सा.

खोड—स्त्री. १ वाईट प्रवृत्ति, कल; वाईट संवय, चाल; अवगुण; लहर; तबियत; रग. **म्ह०** १ जित्याची खोड मेल्यावांचून जात नाहीं.' २ ' जी खोड बाळा ती जन्मकाळा ' २ अयब; व्यंग; दोष; गोम (घोडा इ० जनावराची. घोडयाच्या ७२ खोडी सांगितलेल्या आहेत). **म्ह०** ' एक गोरी बहात्तर खोडी चोरी' ३ दोष; बिंग; चूक; अशुद्धता (भाषण, बोलणें यांतील); गोम; तडा; फूट (जिन्नसातील). ४ चोखंदळपणा; लहर; तबियत; मिजाज. **म्ह०** ' दरिद्र्यास खोड असूं नये. ' ५ कलंक; डाग; काळिमा. [सं. कूट; म. खोट; का. कोडी=न्यूनता] (वाप्र.) **०काढणें**–१ खिजविणें; चेतविणें; बाहेर काढणें (गुप्त वैर, दुष्टपणा). २ वाटेस जाणें; खोडी करणें. ' वाघाची खोड काढूं नये.' ३ दोष काढून टाकणें. **०काढणें-करणें**–लहानसहान उपद्रव देणें; खाजविणें; चेतविणें;चिडविणें; राग आणणें. **०ठेवणें**–दोष ठेवणें किंवा शोधणें; नांवें ठेवणें; छिद्रें बाहेर काढणें किंवा वघणें. **०मोडणें**–ताठा, गर्व कमी करणें; खोडकी जिरविणें; एखाद्याच्या वाईट संवई, प्रवृत्ति, ओढी त्याजकडून टाकविणें, सोडविणें, घालविणें; किंवा त्यासाठीं कडक शिक्षा करणें. सामाशब्द–**०कर**–वि. १ चेष्टेखोर; टवाळ; खोडयांनीं परिपूर्ण. २ वाईट संवयी,चाली, व्यंगें, दोष असणारा. ३ मिजाजखोर; लहरी; तबियती. **०खत**–स्त्री. दोष व वंश; अवगुण व बिजवट; आचारकुळि. (क्रि० पहाणें; विचारणें; पुसणें). –पु. चाबुकस्वार किंवा गुरेढोरें विकणारा. [खोड+अर. खत] **०सर-सा, खोडसाळ**–वि. खोडकर. खोटसाळ पहा.

खोंड—पु. १ तरुण बैल; गोऱ्हा; पाडा; सांड; पोळ. २ (व.) बैलाचें वर्शिड. [सं. षंढ=बैल]

खोंड—पु. जोंधळयाची एक जात.

खोंड—पु. (कों.) डोंगरावरील जनावरांची पाऊलवाट. गवंड. खोंडा पहा.

खोंड, खोडकुल—पु. (गो.) खड्डा. [सं. कुंड]

खोडकी—स्त्री. खोड; दोष; मिजाज; ताठा. ' त्याची खूप खोडकी जिरविली. ' [खोड]

खोडकी—स्त्री. (व.) बिन आरीचा, गांवठी भोंवरा.

खोडंग—(ना.) कोंडवाडा [खोडा]

खोडणें—उक्रि. १ डागणें; दूषणें; कलंकित करणें. २ नांवें ठेवणें; व्यंगें, बिंगें बाहेर काढणें. –अक्रि. वाईट संवयी, खोडी लावून घेणें. ' ती गाय आजपर्यंत सुरळीतपणें दूध देत असे परंतु अलीकडे चार दिवस खोडली. ' [खोड]

खोडणें—उक्रि. १ रद्द करणें (खरडून, पुसून, मधून एक रेघ ओढून). २ पेटके देत आंखडणें; अवटारणें (अवयव). **हातपाय खोडणें**–हातपाय पाखडणें; मरणकाळीं हातपाय झाडणें. ' विधातियाची मान रगडी। विरंची बहुत हातपाय खोडी। ' –महिकथा २.१४८. **म्ह०** जीव जाईना म्हणून हातपाय खोडावे. =पोट भरण्यासाठीं जोराची धडपड करणें. [खुडणें]

खोडप—स्त्री. (गो.) १ चुडतांच्या कुडाची खोली. (क्रि० करणें).

खोडपत्र—न. खोटपत्र पहा.

खोंडरू—न. (तुच्छतादर्शक) कांबळयाची घुगी; खोळ.

खोडवा-वें—पुन. (माण.) मडकें. मातीचें मोरव्यापेक्षां मोठें भांडें; (तंजा.) बरणीच्या आकाराचें लांकडी किंवा पितळी भांडें.

खोडवा, खोडावा—पु. १ उंसाचें दुसरें पीक; तोड झाल्यावर राखलेल्या बुडख्यांपासून पुन्हां फुटलेला ऊंस; पुन्हां फुटण्याकरितां जमीनींत राखून ठेवलेले बुडखे. २ मागची फूट; पहिल्या काढणीनंतर राहिलेलीं मुळें किंवा बुडखे (मिरच्या, वांग्या, शाळू, तमाखू यांचे). ३ (घाटी) (ल.) मुळया किंवा बुडखे ठेविलेलें शेत अथवा मळा. **०खोडव्याचा ऊंस**–पु. दुसऱ्या पिकाचा ऊंस. ' खोडव्याचा शाळु-तमाखू-वांगी–ताग–अंबाडी इ० ' [खुडणें]

खोडसा—पु. सापाची एक जात. 'परड, खोडसे, महाडुळे। शुद्ध नाग सोनसळे।' –कथा ४.४.३१.

खोडसें—न. (जरतार) दोन्ही बाजूंनां खिळे ठोकलेली व मध्यें वेजपट्टी लाविलेली लांकडी घडवंची; पाड, कुंदा.

खोडा—पु. अपराध्याचे हातपाय अडकवून शीक्षा करण्याचें एक लांकडी यंत्र, सांपळा. 'तेथ चंदनाचेही खोडे। न लेची तो।' –ज्ञा १८.८९८. 'घातलोंसें खोडा हा डांचिया।' –तुगा १५४३. २ उनाड जनावराच्या गळ्यांतील लोढणें, मानखुंट. ३ (ल.) त्रासदायक, अडविणारें, पेचांत आणणारें काम, लचांड, लटांबर. 'लग्न होतांच संसाराचे खोडयांत सांपडला.' ४ संधिवाताची अवस्था (शरीर, अवयव यांची). ५ कुंठितावस्था; अडकून पडणें. **०चढविणें**—स्त्री. १ मल्लविद्या प्रतिपक्ष्याच्या पायांभोंवतीं (किंवा मानभोंवतीं) आपले पाय विशिष्ट तऱ्हेनें अडकविणें. २ (ल.) अडथळा करणें. [सं. खोड=लंगडा] **म्ह०** चालला तर गाडा नाहींतर खोडा. **०बि(बे)डी-मोडा**—स्त्रीपु. १ वारें गेलेली अर्धांगरोगाची स्थिति. २ खोडा (शिक्षेचा प्रकार). **खोडावर्णे**—अक्रि. पक्षघातानें, अर्धांगवायूनें आजारी पडणें, लुळें किंवा खुडे होणें. 'वेठीऐसें वाटे निर्फळ कारण। शीतळ होऊन खोडावलों।' –तुगा ८७६. [सं. खोडा=लंगडा]

खोंडा—पु. १ एका टोंकाची खोळ केलेला कांबळा. २ दोन डोंगरामधील संधिप्रदेश, याला कोंपरा असतो; घळ; दरी; अंधाराची व आडवळणाची जागा.

खोंडा—पु. जोंधळ्याची एक जात; खोंडी-डें.

खोडाखोड-डी—स्त्री. १ पुष्कळ ठिकाणीं खरडून टाकणें; लिहिलेल्या मजकुरावर रेघोटया मारलेल्या असणें; बदलणें; दोन ओळींमध्यें लिहिणें (दुरुस्त्या). २ चिंतारलेली, खरडून टाकलेली कागदाची स्थिति; काढून टाकलेल्या भागामुळें मूळांत झालेला बिघाड. [खोडणें]

खोडाळ, खोडील-डेल, खोड्या, खोड्यारा, खोड्याळ—खोडकर पहा. **खोडाळमावसा**–वि. (ना.) खोडका; चेष्टेखोर.

खोंडाळ—वि. (माण.) नुसते खोंड विणारी (गाय).

खोडाळी—स्त्री. चेष्टा; खोडी; चाळा; छंद. [खोडी+आळी]

खोडी—स्त्री. खोड (–स्त्री.) पहिले चार अर्थ पहा. 'खोडी न ठेवावी चतुरीं। ग्रंथ निर्धारी न पाहतां।' –एरुस्व १८.६६.

खोंडी—स्त्री. खोंडा; धान्य, भूस इ० वाहून नेण्यासाठी केलेली कांबळ्याची तात्पुरती खोळ. खुंडी पहा.

खोंडी—स्त्री. जोंधळ्याची एक जात.

खोडीव—वि. १ पुसलेलें; खोडलेलें; रेघोटया मारलेलें. २ रद्द केलेलें; टाकाऊ. [खोडणें]

खोंडें—न. उष्ण हवेंत बागाइतींत होणारा जोंधळा **खोंडा-डी. ०खोंडेकोंडे**–पु. भुसकट; कोंडा. 'मग कां खावे खोंडेकोंडे।' –अफला २.

खोंडया—वि. (व.) वर्शिड असलेला (बैल). खोंड पहा.

खोणें—उक्रि. १ खोवणें; जोरानें आंत खुपसणें; **खोंचणें**; २ हलकेंच आंत शिरकविणें, घालणें. [खोवणें]

खोत—पु. १ गांव साऱ्यानें घेणारा अधिकारी; गांवाचा सारा भरणारा वतनदार; वसुलाचा इजारदार; जकातीचा इजारदार; (सामा.) मक्तेदार; सरकारांतून नफा–तोटा आपले अंगावर पतकरून जकात किंवा कांहीं एक जिन्नस सर्व आपण घ्यावा, मग आपण विकणें तर विकावा अशा रीतीनें काम करणारा इजारदार. २ (कांहीं ठिकाणीं) सरकारासाठीं गांवचा वसूल जमा करणारा पिढीजाद कामदार; तसेंच या कामासाठीं तात्पुरता नेमलेला कामगार.' (याचे अधिकार, हक्क यासाठीं रत्नागिरी ग्याझेटियर पृ. २०४ पहा). कोंकणांत जुन्या वतनी हक्कामुळें किंवा पिढीजाद मुलकी अधिकारामुळें खोत हा जमिनदार बनलेला असतो व कुळांकडून वाटेल तितका वसूल घेत राहातो.' ३ दक्षिण कोंकणांतील एक ब्राह्मण जात; जवळ जात. 'गोविंद खोत.' [खेत?] सामाशब्द– **०करी**–पु. जमिनींचा किंवा जमिनींच्या उत्पन्नांचा मक्तेदार किंवा इजारदार, खोत. **खोतकी–गी**–स्त्री. खोतांचें काम, हुद्दा. **०खराबा**–पु. १ ज्या गांवाची ज्यास खोती सांगितली त्या गांवच्या खराब जमीनी कांहीं एक ठराव करून (सरकारनें) खोताच्या माथीं मारणें; खराबा मक्त्यानें देणें. २ अशा खराब जमिनी. **०धारा**–पु. जमिनीबद्दल कुळांकडून जमीनदाराला मिळावयाचा खंड. **०पट्टी**–स्त्री. खोताच्या नफ्याकरितां बसविलेला फाळा, कर. **०बाकी**–स्त्री. खोताच्या येण्याची बाकी. **०वार**–वि. खोताकडे लावून दिलेला (गांव). **०वेठ**–स्त्री. खोतानें मजुरी दिल्याशिवाय कुळांपासून घेतलेली चाकरी, वेठ किंवा जिन्नस. यांचे पुढील प्रकार आहेत:–वरंडी-गवत, पान–पेंढा, शाकारणी माणूस, रवळी, पाटी, सूप, शिंपली, हवसा, वाढवण, हतरी, तट्टया, हातर, नागरजोत, भाऱ्या–लांकडें, मानासंबंधीं नारळसुपारी, बाबभांडें, अर्धेली, तिर्धेली इ०. या बाबींहून कारसाईची बाब भिन्न आहे. हे प्रकार दक्षिण कोंकणांतील आहेत. **०सजा(ज्जा)**–पु. खोतापासून साऱ्यानें, भाडेपट्टयानें घेतलेल्या जमिनी. याच्या उलट रकमी जमीन (सरकाराकडून ठरावीक रकमेनें घेतलेली जमीन) **खोती**–स्त्री. १ खोताचा व्यापार, काम, अधिकार. २ इजाऱ्यानें, खंडानें, मक्त्यानें देणें घेणें; इजारा पहा. ३ उभ्या पिकाचा, जंगलांतील लांकडाचा, बागाइती उत्पन्नाचा मक्ता. ४ वाढीदिढीनें शेतकऱ्यास पेरण्यासाठीं वगैरे आगाऊ धान्य देण्याचा धंदा. ५ गांवची मुख्त्यारी. [खोत]

खोंद—न. १ पाठीवरील कुबड; पोंक; खोंड. २ उंचवटा; बांकण; फुगीर भाग (भिंत, कुंपण, रस्ता यांचा).

खोंदकला, खोंदकाम—स्त्रीन. खोदीव कामाची कला; नैसर्गिक पदार्थांची कोरून केलेली प्रतिकृति; नक्षीकाम; कोरीव काम. [सं. क्षोद; प्रा. खोद]

खोंदगिरी—स्त्री. १ (दगड, लांकूड, धातू यांवर) खोदणें; नक्षी कोरणें. २ मूर्तिशिल्प; नक्सकाम; खोदलेलें, कोरलेलें काम; नक्षीकाम. [खोदणें]

खोंदणावळ—स्त्री. खोदण्याची, कोरीव कामाची मजुरी किंवा किंमत. [खोदणें]

खोंदणी—स्त्री. १ खणणें; कोरणें; खणती; कोरणी. २ फुलें, आकृती इ० खोदण्याचें, कोरण्याचें एक हत्यार; कोरणी. ३ (ल.) खणपटीस बसून पैका काढण्याची क्रिया; उकळणी. (क्रि० लावणें; मांडणें). ४ सोनाराचें खाळणें. [खोदणें]

खोंदणें—उक्रि. १ खणणें; उकरणें. २ कोरणें. ३ (कों.) उघडणें; ' दार खोद. ' ४ उकरून भांडण उपस्थित करणें. [सं. क्षुद्=पीठ करणें, क्षोदन; प्रा. खोदन] **खोंदखोदून विचारणें, पुसणें**—अक्रि. (गुप्त गोष्ट समजावून घेण्यासाठीं) बारकाईनें, आग्रहानें, डावपेंच घालून, युक्तिप्रयुक्तीनें विचारणें.

खोंदरा, खोंद्रा—पु. (ना. व.) चर; खोबण; खड्डा. ' घुशीनें घरांत केवढा खोद्रा करून ठेविला आहे. ' [सं. क्षोद; प्रा. खोद+दर]

खोंदळणें—उक्रि. खंवदळणें पहा.

खोंदाई—स्त्री. खणण्याची किंवा कोरण्याची मजुरी, किंमत; खोदणावळ. [खोदणें; हिं. खोदाई]

खोंदींव—वि. १ खणलेलें; खोदलेलें; कोरलेलें. २ कोरीव; नक्षीदार. [खोदणें]

खोप—स्त्री. १ वीण; वेत. २ बिजवट; खाण; थळा;(सामा.) ३ एखाद्या सांधीचा भर, व्याप्ति, वादा. ' देवीची-तापाची-गोंवराची-खोंकल्याची खोप. ' (क्रि० येणें; चालणें; चालू होणें). ४ (व.) पिढी. ५ (व.) पशूंचा विण्याचा (जननाचा) मोसम [?]

खो(खों)प—स्त्री. १ झोंपडी; खोपटी; माळघावाचून बांधलेलें घर. ' नातरी आकाशाचे खोंपे. ' –ज्ञा ९.१०३. २ पक्ष्यांचें घरटें ३ (ल.) पोट; उदर. ' असो यावरी सोमवंशी जगद्रूपें । वसुदेव देवकीया खोंपे । विश्वदुरितदहनार्थ कृष्णरूपें । आदिनारायणें । ' –स्वानु ९.१.१७. ४ (ल.) दरी; गुहा. ' सिंहखोपें केवि गजप्रवेश । ' –कथा ४.१६.१८६. ५ पोकळी; ढोली. [प्रा. दे. खुंपा=गवती झोपडी; का. कोप्प=लहान गांव; तामिळ, तुळु; कोप्प=झोपडी; ते. कोप्प; तुल० बोअर लोकांत झोपडीला कोपी म्हणतात]

खोप—स्त्री. केसांचा झुपका; वेणीचा खोंपा. ' खोप वळूनिया कुरळी । ' –कथा १.१.२९. [खोपा]

खोप—स्त्री. (कु.) आघातानें झालेली खोंच: जखम; खोक; [प्रा. खुप्प]

खोप(पा)ट-टी, खोपडी—नस्त्री. लहान घर; खोप; झोपडी. ' मोडकें खोपट असे जर्जर। ' [खोप; दे. खुंपा]

खोप(पा)ड—स्त्रीन. १ ढोली; दरी; कपार; गुहा (झाड, खडक, डोंगर यांतील). २ पक्ष्यांचें घरटें. [खोप]

खोपडा—पु. ठाणबंदी गुरापुढें खाण्यासाठीं हिरव्या गवताची (विशेषत: झाडांच्या डहाळ्यांची) टांगून ठेवलेली पेंढी. [खोप]

खोपडें-डी, खोपरी—स्त्री. १ डोकें; कपाळ; टाळकें; बोडकें. २ डोक्याची कवची–टी.

खों(खो)पा—पु. (बायकी) वेणीचा विशिष्ट आकार, घाट; वेणी घातल्यावर त्याचा डोक्यावर बांधलेला बुचडा; तसेंच वेणींत फुलें गुंफून बांधलेला बुचडा. ' तोहनि गगनाचीं पुष्पें । गुंफूनि भरलीं खोपे । वंध्यापुत्र वधूचे । ' –स्वानु ११.६.५९. फुलांची गुंफलेली वेणी; वेणींत गुंफलेलीं फुलें. [का. कोप्पु; हिं. खोंपा]

खौ(खों)पा—पु. १ पक्ष्याचें घरटें. 'उफराटा पिंपळ त्यावरीं येका कावळीनें केला खोपा रे।'–मध्वमुनीश्वरांची कविता पृ. ११०. ' चिमणीचा खोपा '. २ झाडांतील ढोली. ३ (सागवान इ०च्या) रोपांवर छाया राहण्यासाठीं पानांचें नागफडीच्या आकाराचें केलेलें आच्छादन. ४ घोंगता. ५ पागोटयाच्या पुढील भागांतील लहान खळगी. ६ निवांत जागा. [का. कोप्पे=खोळ]

खोंबकर—वि. क्षोभकर; उत्तेजक. ' नागरां देवां खोंबकरू । ' –शिशु १५२. [सं. क्षोभ; प्रा. खोभ+कर]

खोंबजणें—अवि. संभ्रमणें; गोंधळणें. ' खोंबजती युवती अति लाजती । ' –वामन, कात्यायानीव्रत १६. [सं. क्षोभ; प्रा. खोभ]

खोंबडी—स्त्री. (कुंभारीं) खापरी कुंडी; ही परळापेक्षां मोठी असते.

खोंबण–णी—पुस्त्री. १ कुसुं बसविण्याचें छिद्र, घर. २ पन्हाळी; खाप; खांचणी; भिंतींतील सरा, बहाल ठेवण्याची जागा, दर, भोंक. ३ अडसराचें अडकण. ४ लांकूड इ०मध्यें पाडलेली खांच. (क्रि० पाडणें). ५ सांधा बसविण्याचा खोलगट भाग; सांध्याचा प्रकार. **०दाते**–पुअव. लांकडी सांध्याचा एक प्रकार. एका लांकडास खोबण पाडावयाची व दुसऱ्या लांकडास दांता पाडून तो त्या खोबणींत अडकवायाचा ही पद्धति [वै. सं. क्षुभ्=तडाखा, ठोका?]

खोंबरवेल—पु. (ना.) अनंतमुळाचा वेल; अनंतमूळ.

खोबरी—स्त्री. (ना.) दूध तापविण्याचें, दहीं ठेविण्याचे मडकें. [खोपरी]

खोबरी,खोबऱ्या—वि. खोबऱ्याचा. **खोबऱ्या आंबा**–खोबऱ्यासारखा खुसखुशीत आंब्यांतील एक प्रकार. **–चा वाळा**–पु. खोबऱ्याचा कीस. **–ची आई**–स्त्री. नारळाची करवंटी; नरोटी.

खोबरें—न. १ नारळांतील मगज, गाभा, दळ. २ (राजा.) सुपारीच्या मधोमध असलेला पांढरा मगज, दळ, अंश. ३ झेंडूच्या फुलाच्या दांडयाच्या बुंध्याच्या आंत असलेला भाग. ४ (गो.) सुकें खोबरें. ५ (ल.) नाश; दुर्मिळता. 'आज माझ्या झोंपेचें खोबरें झालें.' ' मनुष्यास अन्नाचें खोबरें झालें.' –भाब १३०. (क्रि० होणें; करणें). [का. खोब्बरी] **०पाक**–पु. साखरेच्या पाकांत किसलेलें खोबरें घालून केलेली मि ठाई. **०रोटी**–स्त्री. रोटीचा एक प्रकार. –गृशि २.१८. **खोबऱ्याची बर्फी**–स्त्री. खोबरेपाकांत बर्फी किंवा खवा घालून केलेला मेवा.

खोबरेल—न. सुक्या खोबऱ्याचें तेल. [खोबरें+तेल]

खोबलें, खोबलां—न. (कु.) १ झाडावरील फळें काढण्याची, जाळें बांधलेली वेळूची लांब काठी; आंबे काढण्याचा झेला, घळ. २ गुराच्या तोंडाला बांधण्याची जाळी.

खोबळपट्टी–आखरी—स्त्री. (बैलगाडी) गाडीचा लोखंडी आंस बसविण्याची जाड, लांकडी फळी (ही खोबळा व आंस यांच्यामध्यें असते).

खोबळा—पु. १ पट्टा या शस्त्राची पोकळ मूठ; ही कोंपरापासून पुढील सर्व हाताचें रक्षण करते. २ अभ्यासासाठीं, शिकण्यासाठीं केलेला लांकडी पट्टा (हत्यार). ३ गाडीच्या आंसाची पेटी. ४ कुसवाचें घर. ५ जमीनींतील ओबडधोबड खांच, खळगा; भोंक, खळी, खळगा (भित, ताल, दगड, फळी यांतील). ६ (विणकाम) ज्यामध्यें नक्षीचे दोरे (तार) ओवलेले असतात व ज्यास चाळलें म्हणजे नकशी उमटते तो; चाळा. ७ (सोनारी) (खोबला–) खोबऱ्याच्या वाटीसारखा, पण लांबट, चांदीच्या जरासारखें सूत ओढण्यासाठीं केलेला व बारीक भोंकें असलेला द्रोण. ८ फरा; खवा; बाहुटा. ९ (व.) तुकडा; पापुद्रा; शिलपी. १० टोपण; अस्तर; बुजवण. 'घालूनि नखाचे खोबळे । अग्रीं अग्रबळें बुजिले.' –एभा ८.२३४. [सं. क्षुभ्; प्रा. खुभ] **०खाचा**–पु. (बैलगाडी) आखरीला पाडलेली खोबण.

खोबळी, खोबी—स्त्री. १ लहान भोंक; छिद्र, खळी. २ खांच; पोकळी. (क्रि० पाडणें). [खोबळा]

खोबी—स्त्री.तेलाच्या घाण्याच्या तळांतील खळगा;पोकळी. **खोब्री पोतेरें**–न. १ खोबींतील तेल पुसून काढावयाचें पोतेरें, फडकें. २ घाण्यांतील या खळग्यांत साठलेलें व पोतेऱ्यासारख्या कपड्यानें टिपून बाहेर काढलेलें तेल. 'सहा पैसे गाळणावळ मागतोस, त्यापेक्षां खोबीपोतेरें तुला देणार नाहीं.'

खोमट, खोमटाण—वि. खंवट, खंटाण पहा.

खोमण—वि. तोंडाचें बोळकें झाल्यानें नाक व हनुवटी जवळ जवळ आलेला; वांकडा; वक्र.

खोमणकाकडी—खमंगकांकडी पहा.

खामणें—न. १ नारळ इ० खवण्याची किसणी; खवणी. २ (काव्य) खळगा; खोंच; दबका. ३ (ल.) वांकडेपणा; कमीपणा; न्यूनता. 'जयाचिये अनुस्यूती । खोमनें नाहीं. । ' –ज्ञा १३.९१६. [खंवणें]

खोमणें—उक्रि. (प्रां.) १ जोरानें आंत घालणें; खोंचणें; खुपसणें. २ रोपणें; रोवणें; गाडणें (खांब इ०). **खोवणें** पहा. [खोवणें]

खोमणें—अक्रि. कमी होणें; कमीपणा येणें. ' चाळितांही न खोमे । गुणातीतता । ' –ज्ञा १४.२८५.

खोमण्या—वि. (प्रां.) १ कडक; दरा=याचा; अधिकारयुक्त; ज्याचा आज्ञाभंग न होईल असा. २ खमक्या; खमशा; खबेड. [सं. क्षोभण; प्रा. खाभण]

खोमलणें—उक्रि. १ भांडें वगरेस खोंचा पाडणें; खोम्यानें युक्त होणें. २ भुसकट पडणें; फार दमणें (अतिशय श्रम, कष्ट केल्यामुळें). [खोमा]

खोमसणें—उक्रि. भोंकांत माती ठांसणें, घालणें.खुपसणें पहा.

खोमा—पु. १ खोंचा; पोंचा; चरा (भांडें आदळल्यानें, आपटल्यानें पडणारा). २ जमिनीवरील खळगी; लहान खड्डा; खांच. (क्रि० घेणें; पाडणें).

खोमेटी—स्त्री. फेंक (दगडाची).

खोय—स्त्री. १ स्वभाव; प्रकृति; रागरंग. २ (व.) खोड; आदत. 'त्याची खोयच मोडली.' [फा. खो, खू] **०बोय**–स्त्री. मन; वृत्ति; भाव; प्रकृति; तबियत. (क्रि० घेणें; काढणें; पाडणें). [फा. खो, खू=स्वभाव+फा. बोय्=वास]

खोय—स्त्री. (खा.) पांढरी पासोडी, तिची खोळ.

खोर—नपु. (राजा.) दरी; खोडा. खांरें पहा.

खोर—अ. एक फारशी प्रत्यय (खुर्दन्=खाणें याक्रियापदापासून). हा मराठींत रूढ झाला आहे. जसें–चहाडखोर; हेकेखोर; हवाखोरी=हवा खाण्यास जाणें; दिवाळखोरी इ०.

खोरडण—न. (कों.) गुरांच्या पायाखालचा, भोंवतालचा, शिलकी, वाईट चारा, गवत, बुचाड, केरकचरा.

खोरडा—पु. (व.) कोंबडयांचें खुराडें.

खोरण—स्त्री. मोठें खोरें;घळ; दरा (दोन डोंगरांतील); खोंडा.

खोरण—न (कों.) निखाऱ्यांची रास.

खोरण-णी-णें—नस्त्री. १ कचरा काढण्याचें एक प्रकारचें फावडें. २ उचटणें (पोळघा, तळण्याचे पदार्थ, निखारे इ०वर–खालीं करण्याचें). (व.) लांकडी सरळ चाटू; उलथणें; कलथा. 'पळी असतां खोरणें । कासयाला पाहिजे.' –अफला ३. ३ (हेट.) राख ठेवण्याची लहान खोबडी. ४ निखारे चाळविण्याचा दांडा; काठी. [सं. क्षुर; प्रा. खोर=पात्रविशेष] **०लावणें**–मागण्या लावणें; तगादा करणें (एखाद्याच्या खचिक स्वभावाचा फायदा घेऊन); खोऱ्यानें पैसा ओढणें.

खोरणें—उक्रि १ (चूल, निखारे) चाळविणें; ढोसणें; (जमीन, माती) पोखरणें; उकरणें; (फावडें) लावणें. [खोरें]

खोरणें—न. (कु.) भिंतींतील खोबण; भगदाड; बळद (वस्तु ठेवण्याचें). [कोरणें]

खोरपणें—उक्रि. (प्रां.) नासाडी करणें; लुटणें; नागवणें; तोडणें. [खोरें; सं. क्षुरप्र; प्रा. खुरप्प]

खोरली—स्त्री. (कु.) माडाच्या चुडतांचा लहान खोरा.

खोरसणी—स्त्री. खोदखोदून विचारणें; बारकाईची चौकशी; कसून उलट तपासणी. (क्रि० घेणें). 'त्यानें जेव्हां खोरसणी घेतली तेव्हां ती गोष्ट सांगणें प्राप्त झाली.'

खोरा-री—पुस्त्री. कोणत्याहि पानाचा केलेला एकटांकी द्रोण. डोणा; डोणी. २ (कों.) पावसाळ्यासाठीं माडाच्या झावळीची झांप विणून त्याची वळवून केलेली खोळ; इरलें; इरल्यासारखी सरळ घोंगडीची खोळ; हिच्या उलट कमरभोडी. ३ खोंड; दरा; खोरें.

खोरा-री—पुस्त्री. खोरें; फावडें. [सं. क्षुर; प्रा. खुर; हिं. छुरा]

खोराड—न. पक्ष्यांचें खुराडें.

खोरी—स्त्री. खोरा पहा.

खोरी—स्त्री. व्यापारांतील तोटा, नुकसान, चुड. 'नवनीत शेलकें हेरी। आणिलें खोरी।'—राला ६६. **खोरीं, खोरींस येणें-पडणें, खोरी होणें**—१ (द्रव्यानें अथवा पैक्यानें) नुकसानींत येणें; भिकेस लागणें. 'तो लग्नाच्या पार्यीं खोरी झाला.' २ (अंगानें, शरीरानें) अशक्त होणें; रोडावणें. ३ (अब्रूनें) हलक्या पदवीस येणें नामोशी होणें. ४ (प्रयत्नांनीं, उपायांनीं) कुंठितमति होणें, शहाणपण खुंटणें. 'केले टाणे टोणे सारी। पाहिले करून झाले खोरी।'—पला ९०. [सं. क्षुर; प्रा. खुर]

खोरू—स्त्री. (गो.) लहान मासळी.

खोरूज—खरूज पहा.

खोरें—न. शेण, केरकचरा ओढण्याचें फावडें; खोरा—री. **म्ह०** १ खोऱ्यानें माती आपल्याकडे उसपणें=केवळ स्वार्थासाठीं झटणें, आपल्या पोळीवर तूप ओढणें. २ खोऱ्यानें पैसा ओढणें=खूप पैसा मिळविणें. **०लावणें**—खोरणें मध्यें खोरणें लावणें पहा. [सं. क्षुर; प्रा. खुर]

खोरें—न. अरुंद, लहान दरी; खोंड. 'घाडले कागद खोऱ्याला।'—ऐपो ३७. [सं. फुहर]

खोरेणें—अक्रि. (कु.) थंडीनें अंग कांकडून बसणें.

खोरेती—स्त्री. खरवती झाड. त्याच्या पानावर करवतीसारखे खरखरीत कांटे असल्यानें कोंकणांत हें पान लांकडी काम साफसुफ व गुळगुळीत करावयास सुतार लोक वापरतात. [करवती]

खोऱ्याळ-ळी—स्त्री. चुका; अपराध; दोष; व्यंग; न्यून (उघडकीस आणलेलें). (क्रि० काढणें).

खोल—वि. ओंड; गभीर; उथळ अथवा सखल नसलेलें किंवा खाऱ्या उलट. २ (ल.) आंतल्या गांठीचा; मख्ख. 'अती खोल तो बोल बोलेल कैचा।'—दावि १५१. ३ शहाणा; धूर्त; धोरणी; विद्वान. ४ गहन; गूढ; दुर्बोध; उथळ, दिखाऊ नसलेला. 'कारण पाहूं जातां फार खोल आहे असें नाहीं.'—नि ७१. ५ (उतार दाखविणाऱ्या शब्दाबरोबर योजना) उभा; सुळाचा. ६ कठिण; दुर्लभ. 'वेंचितां फुकाचे बोल। केवढें खोल अभागियां।'—तुगा ७०१. [दे. प्रा. खोल्ल; तुल० का. कोळ्ळ=लवण, दरा; सं. कुहर] **खोलटणें, खोलगटणें**—अक्रि. १ खोलगट होणें; खांचखळगे पडणें; दबणें (पावसानें जमीन इ०). २ खोल जाणें; आंत जाणें; ओढलें जाणें (डोळे, गाल, पोट). ३ आंकडे मोडणें; शेपखळी पडणें; दुंगणाच्या बाजूस खळखा पडणें; प्रसूतीचिन्हांनीं युक्त होणें (गाय, म्हैस यानीं विण्याच्या पूर्वी). **खोलणें**—उक्रि. १ जास्त खोल करणें (विहीर, खड्डा). २ स्पष्ट करणें; फोड करणें. ३ पुढें चालणें. 'दिहा खोलणें रात्रीं जागोवा।'—ज्ञा १६.३४०. **०पाण्यांत शिरणें**—(ल.) जास्त तपशिलांत जाणें; बारकाईनें शोध घेणें; एखाद्या व्यवहारांत फार मन घालणें; एखाद्या विचाराच्या दुर्बोध भागाचें ज्ञान करून घेण्याचा प्रयत्न करणें; आपल्या आवांक्या पलीकडे जाणें. **खोलवणें**—उक्रि. (सोनारी) खोलगट आकार देणें. **खोलविणें**—उक्रि. खोल करणें; एखाद्या धातूच्या गोळ्याचा पाहिजे तसला खोलवा बनविणें; भोंक पाडणें. २ खोल बसेल असें लावणें. 'पंचाग्नीची दडगी। खोलवीजती शरीरालागीं।'—ज्ञा १७.२५५. **खोलून खोलून विचारणें**—खोदखोदून पुसणें; घोळघोळून पहाणें. सामाशब्द—**०कट-गट, खोलट**—वि. १ किंचित खोल. २ सखल; दबलेली (जमीन). **खोलगा**—पु. खळगा; खांच; खड्डा; दबलेला भाग; खळण. **खोलणी-ण्या**—पु. १ (सोनारी) चांदीच्या पत्र्यास खोलावा आणून भांडयाचा आकार आणण्याचा हातोडा. २ (कासारी) पत्रा खोलण्याचें साधन. **०बुद्धि**—स्त्री. अतिशय शहाणपण; गूढ मसलत, उपाय युक्ति इ०—वि. खोल बुद्धीचा पहा. **०बुद्धीचा**—वि. फार शहाणा; अत्यंत मुत्सद्दी, धोरणी, मसलतीचा. जो विषय घेतला त्यांत तरबेज; त्यांतील एकूण एक मख्खी जाणणारा. **०घट-घाट**—वि. १ किंचित् खोल. २ सखल (जमीन); बदखल (जागा; खदक, खोल चर, घळ). **०घटा**—पु. खोलपणा; खोली. **०घणा**—पु. खोलणी पहा. **०चत**—न. सामता; आरी; गिरमिट. **खोलवा**—पु. खळगा; दबका; लहान भोंक; आंत दबलेली जागा.

खोलणी—स्त्री. पुढें जाणें; पुढें चालणें. 'उच्चैःश्रवा खांचे। खोलणिये।'—ज्ञा ९.३२६. 'उच्चैःश्रवा अश्व जाण। पुढें आपण खोलणिये।'—एभा १०.६०६. —वि. पुढें चालणारा; भिरवणुकींत धन्याच्या पुढें चालणारा. 'इयावरी खोलणीयें। अठराजण बंदिये।'—स्वानु ७.५.४६. [सं. खोल्=लंगडणें; लंगडत चालणें]

खोलणें—उक्रि. उघडणें; खुलें करणें. [खुला; हिं. खोलना]

खोलता—पु. १ वाटाडया; पुढें चालणारा. 'स्वामीपुढें खोल्ता। होईन मी।'—ज्ञा १३.४१७. २ (ल.) मशालजी; दिवटया. [खोलणी पहा]

खोलपा-पी—पुस्त्री. १ थोडेसे जिन्नस ज्यांत घालून देतात ती वाण्यानें केलेली कागदाची शंकाकृति सुरळी; पुडं. २ (कु.) पानांचा एकटांकी द्रोण. [खोल]

खोलबंदी—स्त्री. घोडयाचे नाल काढून, खूर तपासून पुन्हां ते बसविणें; नालबंदी; खूरबंदी. [हिं. खोलबंदी]

खोला-ल्या—पु. १ एकटांकी द्रोण. खोलपा अर्थ २ पहा. २ ओडबघोबड, चांगले टांके नसलेली पत्रावळ (मधुकरी लोक कढी, आमटी किंवा इतर अन्न घेण्याकरितां झोळींत ठेवतात ती). ३ अर्धगोल तळाचें व उघडया तोंडाचें भांडें हें कोळंब्यापेक्षां लहान असतें; फुलांची परडी ४ (कु.) कोणत्याहि झाडाचें पान.

खोलावणें—सक्रि. खोल करणें, जाणें. खोलवणें पहा. 'तें चौपासि घेऊनि आगारें। खोलावती।'—१५.९२. [खोल]

खोलावा—पु. ओंडी; खोली; खोलपणा; दबका. [खोल]

खोलिजणें—क्रि. चालणें; चालतां येणें. खोलणें पहा. 'कां गगनामाजीं पाईं। खोलिजतु असे।'—ज्ञा १५.७१.

खोली—स्त्री. १ खोलपणा; ओंडपणा. 'भेटे अलतति तया जशि पाहे सागरा शिला खोली।'—मोविराट१५.९२. २ कोठडी; अंतर्गृह; आडोश्याची जागा. ३ अंत; ठाव; परमावधि. 'प्रभुची जाणेल कसा बाहुबळें तोचि एकला खोली।'—मोवन ३.१६. ०हुंदी—स्त्री. १ खोलपणा व रुंदपणा. २ (ल.) व्याप्ति; लागणारी जागा; एकंदर आकार; गोळाबेरीज. **खोलीव**—स्त्री. खड्डा; खोलावा. 'उभयांचा कटक प्रदेश बुडे। हतुकी खोलीव जाली।'—कुमुरा ३१.६८. [प्रा. खोल्ल; म. खोल]

खोल्ली—स्त्री. (गो.) पत्रावळीच्या उपयोगाचें फणसाचें पान; खोलपी. खोला पहा.

खोलेरीखाट—स्त्री. (क्र.) खाटेस खिळून बसणें (आलेला प्रसंग टाळण्यासाठीं आजारीपणाच्या ढोंगानें); बिछाना धरून बसणें; मूस मारून निजणें. [खोली+खाट]

खोलो—पु. (गो.) केळीचें किंवा तसल्या जातीचें मोठें पान; पानाचा तुकडा.

खोल्पी—स्त्री. (गो.) फणसाच्या पानांचा पेज पिण्याच्या उपयोगी चमचा.

खोवखोव, खोखोवणें—खवखव. खवखवणें पहा.

खोवणी—स्त्री. (कों.) १ खांप. २ (कों.) जेवणाऱ्या ताटास खालून दिलेला टेंकू. ३ लोखंडी दंतुर वर्तुळाकार तुकडे एकांत एक बसवून त्याला पितळी मूठ लावून लांकडी बैठकीवर एका खांबावर बसवितात ती. खवणी पहा. [खोवणें]

खोवणें—उक्रि. १ खोसणें; जोरानें आंत घालणें; खुपसणें; खोंचणें. २ हलकेंच आंत शिरकविणें; खुपसुन देणें. ३ (ल.) वाईट गोष्ट सुचविणें. ४ पेरणें. 'जें बीज भुईं खोंविलें। तेंचि वरी रुख जाहलें।'—ज्ञा १३.२९६. ५ रोवणें; ठाम उभें राहणें. 'मृत्युपुढें अभिमानें तोही खोवील पाय काशाला।'—मोकर्ण ३६.४९. ६ फुकट दवडणें; घालविणें. 'वृथाच परि खोविलें बाळपण मुलासवें खेळीं।'—देप ४३. [सं. क्षिप्-क्षेपण; प्रा. खिवण?]

खोवा—पु. खवा; आटवून घट्ट केलेलें साधें दूध; तसेंच घट्ट केलेलें नारळाचें दूध. [खवा]

खोंसड-डें—न. (व.) खरचटून निघालेलें कातडें. **खोसड**—वि. (व.) खोंचून, टोंचून, कुजकें बोलणारा.

खोंसडखाऊ—वि. कोडगा; खेटरखाऊ; बेअब्रूचा; निगरगट्ट; अतिशय मूर्ख. [खोंसडा=जोडा+खाऊ]

खोसडा—पु. भोसका; खोंच; दुस्सी; गुद्दा (भाला, मूठ यांचा). [खोंसणें]

खोंसड्डा—पु. जोडा; वहाण. खांसडा पहा.

खोसणें—सक्रि. खोंचणें. खोवणें पहा. 'विंचू नांगीं विष धरी। खोसवेवरी मृत्यू त्या।'—निगा २७४.

खोसर—वि. जीर्ण; फुटका. खोकर पहा.

खोसा—पु. (ना. व.) खोंचा (वस्त्रास धस लागून पडलेला); खोंच.

खोसी—स्त्री. (गो.) खुशी; मर्जी. [खुशी]

खोळ-ळी—स्त्रीपु. १ पोकळ पिशवी; अभ्रा (गादी, उशी, रजई, अंगरखा यांची-आंत कापूस भरण्यासाठीं). 'जें ऐसेंही परि विरुळें। इये विज्ञानाचियें खोळे। हालवलेंही न गळे। तें परब्रह्म।'—ज्ञा ८.१७. २ (ल.) खळगा; खळी. 'अहो आकाशाचिये खोळे। दिसतीं ग्रहगणांचीं कुळें।'—ज्ञा ११.२५८. ३ पावसापासून रक्षण होण्याकरितां केलेली (खांद्यावरील कपडा किंवा धोंगडें यांची) घुगी; झूल. 'कीं काळपुरुषाची कांबळी। कीं गजावरी खोळ घातली।'—रावि ३१.१८. ४ मुलांची कुंची; घुगी. ५ ज्यानें गर्भ वेष्टिलेला असतो ती वार; जार; गर्भवेष्टन; गर्भाशय. 'एकी त्वचेची खोळ। काढोनि दिधली स्वहस्तकीं।'—मुआदि ११.१४८. 'त्वचेविण गर्भ खोळे।'—दा ३.१.३१. ६ तोंडावरून पायापर्यंत घेतलेलें पांघरूण.—तुगा २२३२. ७ बायकांची वस्त्राची ओटी; ओटी. 'वाढविली न्हाणी खोळा भरली सुईणी'—वसा ६२. ८ गवसणी. 'भरौनि आणै खोळ। उन्मेषांचेआ।'—ऋ २८२. ९ (व.ना.) जाजमासारखें पांघरावयाचें एक वस्त्र. १० देवाच्या मूर्तीवर शेंदराचें चढलेलें जाड पूट; कवच. ११ (ल.) अडचण; सांदीकोंदी. 'वरीं खोळे घातला'—गीता १.६७९. १२ आच्छादन; सापाची कात. 'सांडुनि आंगींची खोळी। सर्प रिगालिया पातालीं।'—ज्ञा १४.३१२. १३ पिशवी; झोळी. 'तो बागुलाचें मारु। प्रतिबिंब खोळेभर।'—अमृ ६.५१. १४ गुहा. १५ बाणांचा भाता. [सं. खोल=शिरस्त्राण; सं. खोलि=बाणांचा भाता. प्रा. खोल=वस्त्रकदेश?] **०कर**—वि. सुरकुत्या, चिरण्या असलेली (ठिगळ दिलेली, शिवलेली जागा, शिवण). **खोळ(ल)बुंथ**—स्त्री. (महानु.) घुंगट; अंगावर घेण्याचें जाड वस्त्र. 'स्याळे दीस तरी खोळबुंथ घालीति'—पूजावसर.

खोळंबणें—अक्रि. १ थांबणें; वाट पाहणें; तिष्ठणें; उभें राहणें; मार्गप्रतीक्षा करीत राहणें. २ थांबणें; अडणें; खोटी होणें (काम, व्यवहार यांची). 'जातो त्याविण आमुचाहि तरि तो खोळंबतो काय हो?।'—मोकृष्णपू १९.६५.

खोळंबविणें—उक्रि. १ थांबवून धरणें; तिष्ठविणें; वाट पहावयास लावणें किंवा वाट पहात ठेवणें. २ खोटी करविणें; मागें पाडणें; उशीर करविणें (कामांत). [खोळंबणें]

खोळंबा(ब)—पु. खोटी; थांबविलेली किंवा खोटी केलेली स्थिति; विलंब; उशीर. २ मोडता; अडवणूक.—वि. अक्रिय, कांहीं न करणारा. 'देव खोळंबा देव खोळंबा। मज झळंबा म्हणे कोंडी।'—तुगा. ३६७९. [सं. स्खलन; का. कोळंब=आडकाठी]

खोळबेला—पु. खुशाली.—शर.

खोळा-ळी—पुस्त्री. १ खोळ अर्थ १,२,३ पहा. 'लेवोनि खोळि पंचभूतांची।'—परमा ४.१४. २ कात (सापाची). 'सांडुनि आंगींची खोळी। सर्प रिगालिया पातालीं।'—ज्ञा १४.३१२.

खोळेरें हरलें—न. पाठीखालीं न मोडतां सरळ खालीं जाणारें हरलें; याच्या उलट कासवी किंवा कमरमोडी हरलें. [खोळ]

खोंट—वि. खवट पहा. 'दधि मंथून काढिजे लोणी। तें ठेवितां धरी खोंट घाणी।'—भारा बाल १०.९३.

खोडा, खोंडाळणें, खोंडाळी, खोंड्—खवमध्ये पहा.

खोस—पु. खिजमतगार. 'पोटासाठीं खोसा । वंदिती मलिच्छाच्या ।' –तुगा ४१४९.

ख्याख्या—उद्गा. १ खोकला आला असतां होणारा शब्द. (क्रि० करणे; खोकणें). २ चिडण्याच्या किंवा खेकसण्याच्या अनुकरणात्मक शब्द करून. (क्रि० बोलणें; करणें). ३ खो! खो!; खेकणें; खोकणें. [ध्व.]

ख्यात—स्त्री. पराक्रम; कीर्ति. ख्याति पहा. 'सांगेन मर्दाची ख्यात.' –ऐपो ६५. –वि. १ प्रसिद्ध; नामांकित; नांवालौकिकास चढलेला; प्रख्यात. 'येक भक्त जाले ख्यात।' –दा १.१०.६. २ जगजाहीर; ज्याचा दांडोरा किंवा डंका वाजलेला आहे असा; महशूर. [सं. ख्या=बोलणें]

ख्याति-ती—स्त्री. १ प्रसिद्धि; कीर्ति. 'हांसे आले ख्याती नगरीं असि विभु करूनि आले ख्याति।' –मोकृष्णपू ४३.२०. २ जगजाहीरपणा; महशूरता; लोकप्रसिद्धि; डंका; दांडोरा. 'त्रिकूटाचळीं ख्याति ऊर्ध्व जाली।' –राक भाग १ श्लोक ४६. ३ पराक्रम; मर्दुमकी. 'तेव्हां ख्याति प्रत्याहारें केली.' –ज्ञा ९.२१५. 'ख्याति केली विष्णुदासीं।' –तुगा ३५५. ४ गोष्ट; हकीकत. ५ (वेदांत) प्रतीति; कथनरूप व्यवहार. पांच ख्याती आहेत. पहिली असत् ख्याती, ही शून्यवादी यांची. जसें–असत (निःस्वरूप)सर्पाची रज्जूवर प्रतीति व कथन; दुसरी आत्मख्याति. ही क्षणिक विज्ञानवादी यांची. जसें–क्षणिक बुद्धिरूप आत्म्याची सर्परूपानें प्रतीति व कथन; तिसरी अन्यथा ख्याति. ही नैयायिकांची. जसें–दूर देशांत स्थित सर्पाची दोषाच्या बलानें रज्जुदेशावर प्रतीति व कथन, अथवा रज्जूरूप ज्ञेयाचें सर्परूपानें ज्ञान; चौथी अख्यातिख्याति. ही सांख्य प्रभाकर मताची. जसें 'हा सर्प आहे' येथें 'हा' अंश तर रज्जूच्या इदंपणाचें प्रत्यक्ष ज्ञान आहे व 'सर्प' हें पूर्वी पाहिलेल्या सर्पाचें स्मृतिज्ञान आहे, हीं दोन ज्ञानें आहेत, त्यांच्या दोषाच्या बलानें अख्याति म्हणजे अविवेक (भेदप्रतीतीचा अभाव) होतो; पांचवी अनिर्वचनीय ख्याति. ही वेदांत्यांची. वेदांत व सिद्धांतांत रज्जूवर तिच्या अविद्येनें अनिर्वचनीय (सत् असताहून विलक्षण) सर्प व त्याचें ज्ञान उपजतें त्यांची ख्याति म्हणजे प्रतीति व कथन होतें. 'आख्याति अन्यथाख्याती। शून्यख्याती सत्ख्याती। अनिर्वचनीय जे ख्याती। तो वादू निश्चिती मी उद्धवा।' –एभा १६.२०७. [सं.] **०लाविणें**–पराक्रम करणें, करून दाखविणें. 'वैयादिक पक्षपाती। त्यांसी रणीं लावीन ख्याती।' –एरुस्व ५.४.

ख्याति—स्त्री. (व.) चिंता; पर्वा. खंती पहा. 'नापास झालों तरी मला त्याचि ख्याति नाहीं.'

ख्याल—पु. १ (संगीत) खियाल; चीजेचा एक प्रकार; यांत शृंगाररस प्रधान असून ऋतुवर्णन; उत्सवप्रसंग इ० विषय या चिजेंत येतात; तिलवाडा; त्रिताल; झुमरा इ० तालांत ही चीज म्हणतात. २ –अव. चेष्टा; चाळे; चार; विलास; प्रेम; खेळ; गमती; मौजा. 'मांडिल विंदान ख्याल सुखाचें संधान।' –तुगा १३३. ३ विचार; कल्पना. 'ताऱ्हाल हा ख्याल दिलांत न आणिला.' –ख ७.३५७५. ४ (व. काशी) नाद; छंद. 'पइंना दुसऱ्याच्या ख्यालिं ग।' –प्रला १७४. 'तुमा ख्याल मला सखे निशिदिनीं चित्तीं असे लागला।' –काशींतील गार्णी. 'माझ्या ख्यालीं पहूं नकोस.' ५ (व.) मत. 'आमच्या ख्यालीं तो मेलाच!' [अर. खियाल्] **०तमाशा**–पु. गाणें, नाचणें इ० चैन; विलास. 'तऱ्हेचे ख्यालतमाशे बहुत होती दळभारांत.' –ऐपो १९८. **ख्यालिया**–वि. १ ख्याल गाण्यासंबंधीं; ख्यालाच्या उपयोगी. २ ख्याल म्हणणारा; ख्याल म्हणण्यांत कसबी. **ख्याली असणें, लागणें, पडणें**–१ निरंतर विचारांत, छंदांत असणें; इच्छेनें अथवा चिंतेनें ग्रासलें जाणें. २ आसक्तिपूर्वक पाठीस लागणें; मागें असणें.

ख्याली—वि. १ चार, चाळे, चोज, विलास यांनीं परिपूर्ण; विलासी; रंगेल; विनोदी; खेळकर. २ ख्याल या गीतासंबंधीं; ख्यालप्रधान (गाणें); ख्यालिया. [अर. खियाल्] **०खुशाली**–स्त्री. क्रीडा; मौज; गंमत; चैन; चित्त रमविण्यासाठीं कलेले गाणें, खेळणें, नाचणें इ० सुखोपभोग. [अर. खियाल्+फा. खुशहाल]

ख्यालोरा—वि. (कु.) खेळकर; नाना प्रकारच्या लीला करणारा; ख्याली. 'आवूस् ख्यालोरी। हेचो बापूस जटयाळो। भयणनाय हेका। पोरगो शिवल्याचो।' –(मालवणी) गणपतीची आरती. [ख्याल]

ख्यांव, ख्यांव ख्यांव—स्त्री. केंकावणें; खेकसणें. –उद्गा. दुखावलेल्या कुत्र्याचा शब्द; क्यांव; क्यांव; रागावलेल्या कुत्र्याचा शब्द. –क्रिवि. (ल.) खेकसून; रागावून; चिडून कुत्र्याप्रमाणें अंगावर तुटून पडून किंवा येऊन. [ध्व.]

ख्यास—पु. १ न्यायनिवाडा इ० कयास; कयासनामा पहा. २ विचार; तर्क (निश्चित ठरविण्यासाठीं; गमन करण्यासाठीं केलेला). (क्रि० करणें). [अर. कियास]

ख्यास्त—स्त्री. (गो.) बेअब्रूची शिक्षा.

ख्यास्ती—स्त्री. (गो.) त्रास; खस्त. खास्त पहा.

ख्रिश्चन, ख्रिस्ती—वि. ख्रिस्ती धर्मविषयक. –पु. ख्रिस्ताचे अनुयायी; किरिस्ताव माणूस; ख्रिस्तानुयायी. –प्रेकृ ११.२६.

ख्रिस्त—पु. १ येशूचें नांव. २ ख्रिस्ताचें वचन व धर्मसिद्धांत. –मत्त १६.१६.–लुक ४.४१. –प्रेकृ २.३८. –वि. १ अभिषिक्त. २ येशूची एक पदवी. [ग्री. ख्रिस्टॉस=अभिषिक्त; इं. क्राइस्ट]

ख्रिस्मस—पु. किरिस्तावांचा नाताळाचा सण; हा दर वर्षाच्या अखेरीस (तारीख २५ डिसेंबरला) असतो.

ख्वांक—स्त्री. (कु.) खोल जखम. खोंक पहा.

ख्वार—पु. हलाखी. 'लोक यांचा फार ख्वार जाहला।' –जोरा ४५. [फा. ख्वार्]

ख्वाहीश, ख्वाहिशी—स्त्री. इच्छा; मागणी. 'ख्वाहिशी-दर्ख्वास्तीप्रमाणें' –रा १०.२५१. [फा. ख्वाहिश्]

M 491.3 D79M
آخری درج شدہ تاریخ پر یہ کتاب مستعار
لی گئی تھی مقررہ مدت سے زیادہ رکھنے کی
صورت میں ایک آنہ یومیہ دیرانہ لیا جائے گا۔